REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ६ जानेवारी, १९३७. अंक १

## वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६०; हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,२०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## ओरायन (मॅग्नमस्)

उत्कृष्ट व्हर्जिनिया तंबाकूपासून बनविलेली ही सिगारेट

२॥ आण्याला १० चें पाकिट किंवा १२ आणे ५० चा डबा

सर्वत्र मिळते

एकदा ओढल्यानंतर नेहमीच पसंत कराल

बनविणार—

DECCAN TOBACCO WORKS,
POONA 4

Telegraphic Address —'CIGARETTES', POONA.
*Apply for Agencies.*

## जे. जी. दातीर

जिलब्या मारुतीजवळ, घ न ८७१, पुणे २

सर्व तऱ्हेच्या समारंभाकरिता हार, गोटे, इत्यादि माल सुबक स्वस्त व वक्तशीर तयार करून मिळेल

वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक

आमच्या इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात

"मिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यातील विशेष होय"

भाऊ गंगाधर साठे,

बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणे २

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं, अहमदाबाद

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

### वर्गणीदारांस सूचना

१ जानेवारी, १९३७ रोजीं "अर्थ"चे तिसरें वर्ष सुरू झालें. गेल्या वर्षाची ज्यांची [illegible] अजून यावयाची असेल, त्यांनीं ती नव्या [illegible] त्वर पाठवावी ज्यांची मुदत संपली असेल, त्यांनीं [illegible] नको असल्यास तसें कळवावें

## विविध माहिती

### हिंदी साखरेच्या धंद्याची वाढ

हिंदी साखरेचें उत्पादन हिंदी मागणीपेक्षां ज्यास्त होण्याचा स्पष्ट रंग दिसत असल्यानें, देशी धंद्याची ह्यापुढें आणखी वाढ होऊं देऊं नये, अशा अर्थाचें आपलें म्हणणें साखरेच्या कारखानदार संघानें सरकारास कळवलें आहे. टारिफ बोर्डाच्या नेमणुकीची वेळ नजीक येऊन ठेपली असल्याकारणानें सरकार आज ह्याबाबत निर्णय करील, असें वाटत नाहीं.

### राष्ट्रसभेच्या अधिवेशनाचे वेळीं पाठविण्यांत आलेल्या तारा

फैजपूर येथील राष्ट्रसभेच्या अधिवेशनाचे वेळीं टिळकनगरांतील तार ऑफिसातून पाठविण्यात आलेल्या तारांतील एकूण शब्दांची बेरीज अर्ध्या कोटीपेक्षां ज्यास्त झाली.

### सावकार व सराफ यांचे संबंधांतील चौकशी पुढे ढकलणार

सर्वसाधारण बँकिंगच्या क्षेत्रात जुन्या पद्धतीनें व्यवहार करणारे सावकार व श्रॉफ कसे सामील करून घेतां येतील, ह्यासंबंधीं चौकशी करण्यास हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांस विनंती केली होती. आतांच अशी चौकशी करून फायदा होणार नाहीं, कर्जबाजारीपणासंबंधीं आम्हीं केलेल्या कायद्यांपासून निष्पत्ति काय होते तें आधीं पहावें, अशा अर्थाचें उत्तर प्रांतिक सरकारांनीं पाठविलें आहे.

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

एप्रिल ते नोव्हेंबर ह्या आठ महिन्याच्या मुदतींत हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय निर्गत व्यापाराची किंमत आयात व्यापाराच्या किंमतीपेक्षा ५५ कोटि ८८ लक्ष रुपयांनीं ज्यास्त होती. १९३५ सालच्या ह्याच आठ महिन्याच्या अवधींतला हा आकडा ४३ कोटि, ४५ लक्ष रुपये इतका होता.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडियाचा व्यवहार

गेल्या महिन्याच्या १८ तारखेच्या प्रसिद्ध झालेल्या इंपीरिअल बँकेच्या आकड्यांवरून असें दिसतें कीं, तिचें एकूण भाडवल ९१ कोटि, १७ लक्ष रुपये होतें. त्यापैकीं ५१ कोटि ४० लक्ष रोख्यात गुतवलेले होते व २३ कोटि, ५२ लक्ष कर्जाऊ दिलेले होते. निरनिराळ्या स्वरूपातल्या ठेवी ७८ कोटि, ७१ लक्ष रुपये इतक्या होत्या.

### साखरेच्या कारखानदारांचें विक्रीबाबत सहकार्य होत नाहीं

हिंदी साखरेच्या कारखानदारसंघानें साखरेच्या विक्रीकरतां एक मध्यवर्ती बोर्ड स्थापन करण्याचें १९३४ सालीं ठरविलें, तथापि कारखानदारामध्यें अशा तऱ्हेच्या व्यवस्थेसंबंधीं विशेष उत्साह दिसून येत नसल्याकारणानें हा प्रश्न पुनः पुढें ढकलण्यात आला आहे.

### रशियांतील लेखकांस ग्रंथरचना करणें भाग पडणार

एकादें चांगलें पुस्तक लिहून व त्याच्या आवृत्त्यावर आवृत्त्या काढून ग्रंथकार कायमची प्राप्ती करून ठेवतात. पाश्चात्य देशांत मोठमोठ्या ग्रंथकारांस दरसाल ह्या रीतीनें लाख-सव्वा लाख रुपये मिळतात. पुस्तकें लिहिण्याच्या आश्वासनावर कित्येक ग्रंथकार प्रकाशकांकडून अगाऊ रकम उचलतात, परंतु पुस्तकें लिहिण्यास मात्र आळस करतात. रशियामधील निष्णात अधिकाऱ्यांस अगर यंत्रकारासहि दरसाल पंधरावीस हजारापेक्षां ज्यास्त पगार मिळत नाहीं सहाजिकच, त्या देशात, ग्रंथकार लोकांच्या टीकेस पात्र झाले आहेत. एक पुस्तक लिहून त्यावर ग्रंथकारास गबर होऊ देणाऱ्या पद्धतीस कायद्यानें आळा घालून, लेखकांकडून ज्यास्त वाङ्मय निर्माण करविण्याची कायदेशीर व्यवस्था रशियांत होणार आहे, असें समजतें.

### हौरा पुलाचें कंत्राट . बंगाली लोकांची तक्रार

कलकत्याशेजारील हुगळी नदीवरील पुलाच्या बांधकामाचें कंत्राट एका ब्रिटिश कंपनीस देण्यात आलें आहे. कंत्राट पार पाडताना अर्थातच अनेक दुय्यम कंत्राटदारांकडून कामें करून घ्यावीं लागतात. हीं कामें देतांना बंगाली लोकांस प्राधान्य मिळत नाहीं, अशी तक्रार प्रांतिक सरकाराकडे करण्यात आली आहे.

### जपान व ऑस्ट्रेलिया ह्यांमधील व्यापारी करार

जपान आणि ऑस्ट्रेलिया ह्या दोन देशांमध्यें १८ महिने मुदतीचा एक व्यापारी करार झाला आहे, त्या अन्वयें ऑस्ट्रेलियानें दरसाल १० कोटि २५ लक्ष चौरस वार जपानी कापड खरेदी करावयाचें आहे. ह्या उलट ऑस्ट्रेलियानें लोकरीच्या ८ लक्ष गासड्या ३० जून १९३८ अखेर पाठवावयाच्या आहेत. दोन्ही देशांनीं एकमेकांच्या आयातीवरील विशेष बंधनें दूर करण्याचें ठरविलें आहे.

### आयर्लंडची नवी राज्यघटना

आयर्लंडच्या कायदेमंडळानें नुकत्याच पास केलेल्या कायद्यानें गव्हर्नर जनरलची जागा रद्द झाली आहे. तथापि, सध्याचे गव्हर्नर जनरल त्यांची मुदत संपेपर्यंत कामावर रहावयाचे आहेत. फक्त त्यांस काम मात्र कांहींच उरलेलें नाहीं. गव्हर्नर जनरलचें काम कायदेमंडळाच्या अध्यक्षाकडे सोंपविण्यांत आलें आहे. नव्या निवडणुकीनतर कायदेमंडळाची सभा कोणी भरवावयाची, हा प्रश्न नव्या कायद्यानें सोडवलेला नाहीं. युद्ध पुकारण्याची तजवीजहि त्यात कोठें सापडत नाहीं. आयर्लंडच्या अतर्गत कारभारांतून बादशहाचें नाव वगळण्यांत आलें आहे. राज्यघटनेंतील ह्या फरकामुळें ग्रेटब्रिटन व आयर्लंड ह्यांच्या परस्परनात्यांत फरक झालेला नाहीं, कारण बाहेर देशांशीं व्यवहार करण्यापुरती औपचारिक मान्यता आयरिश पार्लमेंटानें ब्रिटिश सम्राटास दिली आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता २०-१२-३६ ते २६-१२-३६ | २९,६२,४९८ |
| ता. २७-१२-३६ ते २-१-३७ | ६,२१,१२५ |
| ता. २१-९-३१ ते २-१-३७ | २,८९,९५,८६,९६५ |

अनुक्रमणिका

| | पृ. | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २ | सिंधमधील लाचलुचपतीचे प्रकार | |
| २ 'अर्था'चें तिसऱ्या वर्षांत पदार्पण .. | ३ | ६ जाधव टेलरिंग कॉलेज | ६ |
| ३ हिंदुस्थान सरकारची कर्ज-विषयक परिस्थिति... | ३ | ७ वेस्टर्न इंडिया कंपनीचें मूल्यमापन ... .. | ७ |
| ४ हिंदुस्थानातील आयात मालाची वर्गवारी ... | ४ | ८ सोया बीन .. .. | ८ |
| ५ स्फुट विचार ... | ४ | ९ कागदाचा व्यापार .. | ९ |
| रिझर्व्ह बँकेचा कोरडा उपउपदेश—रिझर्व्ह बँक वाट पहाणार—दिल्लीची आर्थिक परिषद—हिंदी संरक्षक जकातीविषयक धोरण-धडाडीच्या धोरणाची आवश्यकता— | | १० को-ऑपरेशन ॲन्ड अकौंटन्सी डिप्लोमा बोर्ड... | ९ |
| | | ११ हिंदी विम्याच्या धंद्याचें परीक्षण . ... | ९ |
| | | १२ निवडक बाजारभाव | १० |

अर्थ

बुधवार, ता. ६ जानेवारी, १९३७

## "अर्थाचें" तिसऱ्या वर्षांत पदार्पण

हा "अर्थाचा" तिसऱ्या वर्षाचा पहिला अंक आहे ज्या उद्देशानें हें साप्ताहिक आम्हीं चालू केलें तो कितीसा सफल झाला आहे हें निश्चित करण्याची कसोटी आहे ती लावून पाहाता आमचा प्रयत्न हळु हळु यशस्वी होत आहे हें नमूद करण्यात आम्हांस आनंद होतो. "अर्था" नें ज्ञानाचें नवीन दालन उघडलें आहे आणि, अभ्युदयाचे अपरिचित मार्ग तो महाराष्ट्रीय समाजास दाखवीत आहे हें कार्य शैक्षणिक तऱ्हेचें व मार्गदर्शकाचें असल्यानें त्याची प्रगति मंद गतीनें होणार हें ठरलेलेंच आहे राष्ट्रीय संस्कृतीच्या आर्थिक अंगाकडे पिढ्यानुपिढ्या दुर्लक्ष झाल्याकारणानें जनतेचा पोटापाण्याचा प्रश्न अत्यंत अवघड होऊन बसला आहे तो समाधानकारक रीतीनें सुटण्यास लागणारी शिक्षणपद्धति व व्यावहारिक मनोवृत्ति ह्याचा आमच्या समाजात अभाव आहे ह्या कारणानें अत्यंत जिव्हाळ्याच्या अशा आर्थिक वाङ्मयाविषयीं अभिरुचि उत्पन्न करण्याचें काम दुर्घट झालें आहे. हिंदुस्थानचा अभ्युदय शेती, उद्योगधंदे, व्यापार, सराफी ह्यांची सुधारणा व प्रगति ह्याचेवर अवलंबून आहे, हें अनेकास कळतें, पण ती घडवून आणण्यास जरूर असलेलें ज्ञान, संघटनाची प्रवृत्ति आणि श्रम करण्याची संवय ह्याविषयींची तयारी क्वचितच दिसून येते उद्योगधंदे व व्यापार ह्याचे वाचून महाराष्ट्रीय तरुण पिढीस गत्यंतर राहिलें नाहीं, तरी घरींदारीं, शाळांत, कॉलेजात, क्लबात, ह्या व्यावहारिक विषयाची भाषाहि ऐकावयास मिळावयाची नाहीं, अशी स्थिति आहे ज्या थोड्या लोकास सुदैवानें चार पैसे मिळत आहेत, त्यांस व्यापार-उदीम विषयींच्या व्यापक ज्ञानाची पर्वा नसते आणि "आम्हास ह्या माहितीचें काय करावयाचें ?" असें म्हणून बहुसंख्याक सुशिक्षित लोक बेफिकीर असतात. शेतकरी व कामकरी वर्ग तर निर-

१ प्रपंच, आर्थिक-उन्नतीच्या बाबतींत चोहोंकडे अनास्था दिसून येत आहे तथापि, ह्या निराशाजनक वातावरणात आशेचे किरण झळकूं लागले आहेत हें उत्तेजनकारक असून उद्योगधंदे व व्यापार ह्यांचे मार्गांत महाराष्ट्रीय समाजाचें पाऊल दिवसानुदिवस पुढें पडत आहे "अर्था" चा मित्रसमूह व वाचकवर्ग वाढत आहे. शिक्षण संस्था, व्यापारी, कारखानदार, जबाबदार नागरिक आणि मुलामुलींचे आईबाप व पालक ह्यांस "अर्था"चें महत्त्व अधिकाधिक पटत चाललें आहे. आमच्या वृत्तपत्रीय व्यवसायबधूंची आम्हास सहानुभूति लाभत आहे आणि आमच्या कार्याची उपयुक्तता जाणून अनेक मित्रांनीं आम्हास सहाय दिलें आहे, ह्याबद्दल आम्हीं त्या सर्वांचे आभारी आहों. सहकारी संस्थांस "अर्था"चा पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे ह्याची जाणीव पसरत आहे आणि कारखानदार व व्यापारी ह्यांचीहि मदत आम्हास मिळत आहे महाराष्ट्रीय संस्कृति, वाङ्मय आणि सामाजिक जीवित ह्यामध्यें "अर्था"स महत्त्वाचें स्थान मिळावें आणि त्याच्या हातून सार्वजनिक हिताचें कार्य घडावें ही आमची मनीषा तृप्त करणें समजस जनतेच्या हातीं आहे.

---

## हिंदुस्थान सरकारची कर्जविषयक परिस्थिति

### कर्जफेडीची निश्चिती : बाजारांतील दांडगी पत

नवीन फेडरल राज्यघटनेमध्यें, सरकारची आर्थिक पत दृढ राखण्याची जबाबदारी गव्हर्नर जनरलावर व्यक्तिशः टाकण्यात आलेली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यास जरूर ते अधिकारहि गव्हर्नर जनरलास देण्यात आले आहेत जरूर पडल्यास, त्यास ह्या कामीं सहाय करण्याकरितां एका आर्थिक तज्ज्ञाची नेमणूक करतां येईल तेव्हां, हिंदुस्थान सरकारास यापुढेंहि कर्जें उभारण्यात अडचण येणार नाहीं. कर्जरोखे विकत घेणारास आपल्या पैशाची—भांडवल व व्याज ह्या दोन्हींची—पूर्ण निश्चिती वाटेल अशी नव्या कायद्याच्या अन्वयें तरतूद करण्यात आलेली आहे. कोणताहि हिंदी फडनवीस रोखेदारांच्या मनाची चलबिचल करूं शकणार नाहीं, अशी पक्की व्यवस्था झालेली आहे.

सुरवातीच्या काळांत हिंदुस्थान सरकारनें आपलीं कर्जें ग्रेटब्रिटनमध्यें उभारणें अपरिहार्य होतें ईस्ट इंडिया कंपनीच्या अमलात युद्धाकरितां उभारलेलीं कर्जें, १८५७ सालच्या बंडाचे वेळचा खर्च भागविण्याकरिता उभारलेलें कर्ज, दुष्काळ व चीन, अफगाणिस्तान, ब्रह्मदेश इत्यादि ठिकाणचीं युद्धें ह्यामुळें झालेलें कर्ज, हीं सर्व विलायतेंतच उभारलेलीं होतीं महायुद्धाचे वेळीं खुद्द हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर कर्जें काढण्यांत आलीं व तेव्हापासून हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानातच अनेक कर्जें उभारण्यांत आलीं आहेत ह्या कारणानें, गेल्या २५ वर्षांत एकूण कर्ज *ज्या मानानें वाढत गेलें, त्यापेक्षा हिंदुस्थानात उभारलेल्या* कर्जांची रकम ज्यास्त शीघ्र गतीनें वाढत गेली, ही गोष्ट खालील आकड्यावरून स्पष्ट दिसून येईल.—

*हिंदुस्थान सरकारचें कर्ज*

| | हिंदुस्थानात उभारलेलें कर्ज (कोटि रु.) | ग्रेट ब्रिटनमध्यें उभारलेलें कर्ज (कोटि रु.) |
|---|---|---|
| ३१ मार्च १९११ | १३८ | २३७ |
| ३१ मार्च १९२६ | ४१८ | ४५६ |
| ३१ मार्च १९३६ | ४५८ | ५०१ |

आगगाड्या, पूल, पाटबंधारे, इत्यादि योजनांसाठीं लांब मुदतीचीं कर्जें काढावीं लागतात व त्यांच्या परतफेडीची मुदत ठरवून आणि ममाजळींत जरूर ती रकम दरसाल टाकून करारप्रमाणें व्यवस्था करावी लागते ग्रेटब्रिटनमध्यें अशा तऱ्हेचीं कर्जें अजिबात नाहींतच असें म्हटलें तरी चालेल. त्या देशांत भांडवलाचा पुरवठा स्वस्त व मुबलक असल्याकारणानें, खासगी कंपन्या उत्पादनाचें कार्य करण्याकरितां आपण होऊन पुढें येतात आणि सरकारास मध्यें हात घालण्याचें कारण उरत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या कर्जाचा मोठा थोरला भाग उत्पादक कार्यासाठी खर्चण्यांत आलेला असून, त्याच्या व्याजाचा बोजा कर भरणाऱ्या नागरिकांवर फारसा पडत नाहीं. उत्पादक कामाच्या व्यवहारांत फायदाच उरला नाहीं, तर गोष्ट वेगळी.

हिंदी रेल्वेजमध्यें गुंतलेलें भांडवल अनुत्पादक ठरून आतां तें कर्ज बोईजड झालें आहे आणि मोटारींच्या स्पर्धेमुळें रेल्वेजचें उत्पन्न घटून कशी बिकट परिस्थिति निर्माण झाली आहे, ह्याची कल्पना सर्वांस आहेच. हिंदुस्थान सरकारच्या कर्जाची उत्पादक व अनुत्पादक कर्जांत खालील प्रमाणें वाटणी करतां येईलः—

| | व्यापारी खात्यांकडे वर्ग केलेलीं कर्जें ( कोटि रु. ) | एकूण कायम व तरंगतें कर्ज ( कोटि रु. ) |
|---|---|---|
| ३१ मार्च १९११ | ३४४ | ४०५ |
| ३१ मार्च १९२६ | ७३८ | ८७४ |
| ३१ मार्च १९३६ | ९६८ | ९६० |

एकंदरीनें पहाता, हिंदुस्थान सरकारावरील अनुत्पादक कर्जाचा बोजा विशेष त्रासदायक नाहीं. त्यामुळें आणि रोखेदारांच्या हितसंरक्षणाची कायदेशीर भक्कम तजवीज असल्यामुळें सरकारास कर्ज मिळणें कठिण जात नाहीं व कर्ज देणारासहि आपल्या पैशाबद्दल काळजी वाटत नाहीं. अशा रीतीनें, हिंदुस्थान सरकारची पैशाचे बाजारांत उत्कृष्ट पत आहे.

## हिंदुस्थानांतील आयात मालाची वर्गवारी

हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या मालाची वर्गवारी खालील कोष्टकात करण्यांत आली आहे, त्यावरून वेगवेगळ्या मालाच्या आयातीचें एकूण आयातीशीं पडणारें प्रमाण लक्षांत येईल. प्रत्येक तऱ्हेच्या आयातीची किंमतहि देण्यांत आली आहे.

आयात

| | १९३१ ३२ ( लक्ष रु | १९३३-३४ ( लक्ष रु ) | १९३५-३६ ( लक्ष रु ) | एकूण आयातीशीं पडणारें प्रमाण १९३५-३६ |
|---|---|---|---|---|
| कपास व कपास कापड. | २६,१९ | २१,३० | २७,९० | २० ७६ |
| यंत्रसामुग्री | १०,९२ | १२,७७ | १३,६८ | १०·१८ |
| धातु | ९,७८ | ९,५० | १२,०3 | ८·९५ |
| तेलें | ९,७२ | ६,७५ | ७,२५ | ५·३९ |
| वहानें | ४,४८ | ८,७७ | ६,९२ | ५·१५ |
| उपकरणें इ० | ३,६९ | ४,०२ | ५,१८ | ३·८६ |
| लोखंडी सामान | २,६१ | २,८८ | ३,२७ | २·४३ |
| साखर | ६,१७ | २,७१ | १,९१ | १·४२ |
| कांच व कांच सामान | १,२२ | १,२२ | १,३९ | १·०४ |
| फळें व भाज्या | १,३४ | १,०० | १,३३ | ०·९९ |
| साबण | ८९ | ७८ | ३४ | ०·२६ |
| पादत्राणें | ६५ | ४८ | २९ | ०·२२ |
| आगपेट्या | १ | ३/४ | १ | ० ०१ |
| एकूण आयात | १२६,३७ | ११५,३६ | १३४,३७ | १०० |

## स्फुट विचार

### रिझर्व्ह बँकेचा कोरडा उपदेश

शेतीच्या धंद्यास पैसा पुरवण्याच्या बाबतींत रिझर्व्ह बँकेस कोणत्या प्रकारानें सहाय देतां येईल ह्या संबंधानें त्या बँकेच्या डायरेक्टरानीं गव्हर्नर जनरलकडे रिपोर्ट करावा असें एक कलम कायद्यामध्यें आहे. त्यास अनुसरून बँकेचें शेतीचें स्वतंत्र खातें आहे, त्यानें चौकशी करून आपला अभिप्राय नमूद केला आहे, तो नुकताच प्रसिद्ध झाला आहे. रिझर्व्ह बँक कांहीं तरी विधायक सूचना करून शेतीच्या धंद्यास पैसा पुरवण्याचे बाबतींत शिफारसी करील अशी अपेक्षा होती ती निष्फळ ठरली आहे. बँकेच्या शेतीशाखेनें केलेल्या रिपोर्टांतल्या बाबी शिळ्या आहेत आणि तिनें व्यक्त केलेल्या अभिप्रायांत नवें असें कांहींच नाहीं. "शेतकऱ्याच्या आधीच्या कर्जाचें निवारण झालें तरी तो पुन्हां कर्जांत पडणार नाहीं अशी तजवीज झाली पाहिजे व ह्यासाठी शेतकऱ्याची नीट समजूत घालण्यांत आली पाहिजे. शेतकरीवर्गांतले सावकार असतात, त्यांच्याहि व्यवहारांचें नियंत्रण करणें जरूर आहे. संयुक्त भांडवलाच्या बँकांचे हातून लांब मुदतीच्या कर्जाचें कार्य होण्यासारखें नसल्यानें त्यासाठीं प्रत्येक प्रांतांत एक लँड मॉर्गेज कॉर्पोरेशन अस्तित्वांत यावी आणि शेतकऱ्याची स्थिति सुधारण्यास त्यांची मिळकत वाढणें अगत्याचें असल्यानें प्रांतिक सरकारांनीं त्या संबंधात योग्य योजना अमलांत आणाव्या," हा रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टाच्या एका भागाच्या मथितार्थ आहे. प्रांतिक सहाणाच्या बँकांच्या कामाचा थोडाबहुत अनुभव आला म्हणजे त्यास मदत देतां येईल किंवा कसें ह्या प्रश्नाचा विचार रिझर्व्ह बँक करील एवढेंच आश्वासन आज देण्यांत आलें आहे. शेतीच्या मालाचा उठाव होण्यांत त्याच्या विक्रीच्या हुंड्या काढल्या गेल्या तर त्याच्या तारणावर व्यापारी बँकांस अल्पकालिक कर्जें देतां येतील, आणि एवढ्यासाठी प्रांतिक सरकारांनीं अल्पमुदतीच्या हुंड्यांवरची स्टँप ड्यूटी हलकी करावी अशीहि सूचना रिझर्व्ह बँकेनें केली आहे. वरील सारांशावरून असें दिसून येईल कीं, रिझर्व्ह बँक सध्याच्या परिस्थितींत शेतीच्या धंद्यास कांहींच सहाय देऊं शकत नाहीं आणि प्रांतिक सरकार व जनता ह्यांनीं विशिष्ट दिशेनें हालचाल करावी एवढेंच सांगून ती स्वस्थ बसली आहे

### रिझर्व्ह बँक वाट पहाणार !

सहकारी चळवळीसंबंधानें चौकशी करण्यासाठीं मि. डार्लिंग ह्यांची नेमणूक झाली होती, आणि त्यांच्या शिफारसींच्या आधारानें रिझर्व्ह बँकेनें कांहीं सूचना केल्या आहेत, त्याहि वरील तऱ्हेच्याच असून निराशाजनक आहेत. "सहकारी पतपेढ्यांनीं आपलीं लांब व अल्प मुदतीचीं कर्जें वेगळीं ठेवावीं, म्हणजे त्यांस कर्जाविषयींची जबाबदारी नीट समजेल. ह्या संबंधांत सहकारी संस्था अयशस्वी ठरल्या आहेत. खेडेगांवीं सावकारांचे व्याजाचे दर भरमसाट प्रकारचे असतात अशी जी कल्पना प्रचलित आहे, ती चुकीची आहे. सावकारांच्या व्यवहारांचें व हिशेबाचें नियंत्रण करणारे कायदे मात्र सर्व प्रांतामध्यें होणें अगत्याचें आहे." सहकारी पेढ्या व बँका ह्यांस अशा उपदेशवजा अनेक सूचना रिझर्व्ह बँकेनें केल्या आहेत. शेतीच्या कामासाठीच कर्जें घेण्यांत यावीं, तीं अल्प मुदतीचीं असावीं, त्यांची वसुली वेळच्या वेळीं व्हावी

जावी, थकबाकी वाढू लागल्यास पतपेढ्या गुंडाळून टाकाव्या, पिकें बुडलीं असतील तरच कर्जाची मुदत वाढवली जावी, शेतकरी सभासदानें एकाच संस्थेकडून कर्ज घ्यावें आणि त्यानें आपल्या मालाच्या विक्रीच्या पैशांतून त्या संस्थेच्या कर्जाची फेड केली पाहिजे अशी सक्ती असावी, अशा अर्थाच्या ह्या सूचना आहेत. "ग्रामसुधारणेच्या चळवळींची प्रगति झाल्यावाचून रिझर्व्ह बँक किंवा इतर बँका ह्यास सहकारी पतपेढ्यास म्हणण्यासारखें सहाय देता येणें अशक्य असल्यानें प्रांतिक सरकारांनीं हा प्रश्न हातीं घ्यावा. ग्राम सुधारणेच्या संबंधात थोडेंफार कार्य चालू आहे, तेंच विशिष्ट शास्त्रांत नेटानें झालें पाहिजे बँकांच्यापाशीं वाटेल तेवढा पैसा पडून राहिला असला तरी शेतकऱ्यांची स्थिति-सुधारेपर्यंत त्याचा उपयोग करता येणें अशक्य आहे तेव्हा, त्यासबधात आणखी तपशीलवार चौकशी होईपर्यंत रिझर्व्ह बँकेस वाट पहाणें जरूर आहे" असा निष्कर्ष शेवटीं नमूद करण्यात आला आहे एवंच, सहकारी चळवळींतल्या व तिच्या बाहेरच्या शेतकऱ्यांस रिझर्व्ह बँकेकडून कोणतेंच सहाय आज मिळू शकत नाहीं, हें स्पष्ट झालें आहे

---

## दिल्लीची आर्थिक परिषद

गेल्या आठवड्यात दिल्ली येथें भरलेल्या अखिल भारतीय आर्थिक परिषदेचें अध्यक्षस्थान, हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी माहितीखात्याचे मुख्य, डॉ. जॉन मथाय, ह्यास देण्यात आलें होतें हे गृहस्थ कित्येक वर्षेपर्यंत टारिफबोर्डाचे अध्यक्ष होते आणि त्या नात्यानें त्यांनीं बहुमोल कामगिरी केली असल्याविषयीं प्रसिद्धी आहे त्यांचें सध्याचें स्थान लक्षांत घेतां डॉ. मथाय ह्यास औद्योगिक संरक्षण, चलनव्यवस्था, इत्यादि वादग्रस्त प्रश्नांची चर्चा करणें शक्य नव्हतें तथापि, त्यांनीं अर्थशास्त्राचा हिंदुस्थानांत चालणारा अभ्यास व अर्थशास्त्रीय सिद्धांताची नवी मांडणी केली जाण्याची आवश्यकता ह्या विषयावर आपल्या भाषणात जोर दिला आणि त्या संबंधांत स्फूर्तिदायक सूचना केल्या हिंदुस्थानात राष्ट्रीयत्वाची भावना विशेष जागृत झाल्यामुळें हिंदी अर्थशास्त्रज्ञांचें लक्ष व्यावहारिक स्वरूपाच्या प्रश्नाकडे लागलें आहे ह्या देशातील विशिष्ट राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमुळें आणि त्याचप्रमाणें हिंदी जनतेचें दारिद्र्य व मागसलेपणा ह्यांचे योगानें हिंदी शास्त्रज्ञामध्यें त्याच्या विचारास राष्ट्रीयत्वाचें वळण देण्याची प्रवृत्ति दिसून येतें हें सहाजिक असलें तरी हिंदी अर्थशास्त्रज्ञांची दृष्टि संकुचित असूं नये असें डॉ मथाय ह्यांचें म्हणणें आहे परंतु सर्व जगभर जी राष्ट्रीयत्वाची लाट पसरली आहे ती लक्षात घेता भारतीय अर्थशास्त्र राष्ट्रीयत्वाच्या पायावर उभें केलें जाणें स्वाभाविक आहे आर्थिक प्रश्नाचा विचार शास्त्रीय पद्धतीनें व तत्त्वशुद्ध रीतीनें व्हावा असें डॉ मथाय ह्यांचें मत आहे, तें मात्र चिंतनीय आहे, एवढेंच नव्हे तर त्याप्रमाणें कृती होणें अगत्याचें आहे आमच्या देशात शिक्षण परकी भाषेतून देण्यात येत असल्याकारणानें अर्थशास्त्राचा अभ्यास तात्त्विक पद्धतीनें व्हावा तसा होत नाहीं ह्या त्याच्या मुद्यात पुष्कळ तथ्य आहे

---

## हिंदी संरक्षक जकातींविषयक धोरण

श्री आ. रा भट, एम् कॉम्, ह्यांनीं आग्रा येथील आर्थिक परिषदेपुढें मांडलेल्या वरील विषयावरील आपल्या निबंधांत औद्योगिक संरक्षणाचें धोरण हिंदुस्थानांत कसें कुचराईनें अंमलात आणलें जात आहे, ह्याचा पाढा वाचला. हिंदी परिस्थितीस अनुसरून जरूर त्या सरक्षक जकाती बसविण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारास आहे आणि हिंदी सरकार व कायदेमंडळ ह्यांचें एकमत झाल्यास भारतमंत्र्यानीं त्यांच्या धोरणात ढवळाढवळ करूं नये, ह्या आर्थिक स्वायत्ततेचें महत्त्व, हिंदुस्थानाच्या दुय्यम राजकीय दर्जामुळें अगोदरच कमी झालें होतें फिस्कल कमिशनवरील हिंदी सभासदाच्या सूचनेविरुद्ध त्यातील बहुमतानें पुरस्कार केलेल्या अत्यंत मर्यादित स्वरूपाच्या धोरणाचा सरकारनें स्वीकार केला आणि सरक्षणाचें क्षेत्र ज्यास्तच आकुंचित होऊन गेलें "ज्याचें सरक्षण करावयाचें, त्या धद्यास हिंदुस्थानात काहींतरी विशेष नैसर्गिक अनुकूलता असावी" ही कमिशनची शिफारस अनेक धंद्यास संरक्षण मिळण्याचे मार्गांत आडवी आलेली आहे तथापि, वेळोवेळ नेमण्यात आलेल्या टारिफ बोर्डानीं ह्या प्रश्नाचा विचार व्यापक आणि व्यावहारिक दृष्टीनें करून सदरहु अटीमधील काटेकोरपणा कसा सौम्य केला, ह्याचें वर्णन श्री भट ह्यानीं उदाहरणें देऊन विस्तारानें केलें आहे कांचेच्या व लोकरीच्या धद्यासबधांतील बोर्डाच्या शिफारसी ह्याच दृष्टीनें करण्यांत आल्या, हें उघड आहे बोर्डाच्या सूचना मान्य करणें अगर न करणें सरकारच्या मर्जीवर रहातें आणि फिस्कल कमिशननें घालून दिलेल्या अटी बोर्डानें नीट विचारांत घेतल्या आहेत किंवा नाहींत व चौकशी परीपूर्ण झाली किंवा नाहीं, ह्याचा निर्णय फडनविसाच्या कलावर अवलबून रहातो टारिफ बोर्डाच्या शिफारसी पूर्णतः अगर अंशत. सरकारनें अमान्य केल्याचीं अकरा उदाहरणें श्री भट ह्यानीं दिलीं आहेत टारिफ बोर्डाची नेमणूक कायमची होणें, औद्योगिक सरक्षणाचें धोरण ज्यास्त सहानुभूतीचें बनणें आणि देशी उद्योगधदे वाढीस लागतील अशी व्यवस्था सरकारनें घडवून आणणें ह्या सुधारणा तात्काळ अंमलांत येण्याची आज विशेष आवश्यकता आहे.

---

## धंद्याच्या संरक्षक धोरणाची आवश्यकता

मुंबई येथील इंडियन इंडस्ट्रीज फेअरचें उद्घाटन करतांना सर टी विजयराघवाचार्य ह्यांनीं उद्योगधद्याच्या संवर्धनासबंधीं काढलेले उद्गार समयोचित व विचारप्रवर्तक असे आहेत. इंग्लंडसारख्या उद्योगधद्यात पुढारलेल्या देशात मुद्दाम प्रयत्न करून शेतीचें सरक्षण करण्यात येतें त्याचप्रमाणें, उद्योगधद्यात मागसलेल्या हिंदुस्थानातील धंद्यास सरकारी सहाय मिळालें पाहिजे. शेती हा हिंदुस्थानातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे व तो तसाच राहील तथापि, वाढत्या लोकसख्येबरोबर लोकांचें जमिनीवरील अवलबन कमी करणें अपरिहार्य झालें आहे शहराच्या उत्कर्षाबरोबर खेडेगावाचा उत्कर्ष झालाच पाहिजे हिंदी उद्योगधद्यास मनपूर्वक सहाय करण्याचें धोरण सरकारनें आखणें आज अत्यंत आवश्यक आहे जगातील सर्वच राष्ट्रें आर्थिक स्वावलबनाचें धोरण आखत असताना व त्यामुळें हिंदुस्थानाचें अत्यंत नुकसान होत असताना हिंदुस्थान सरकारनें धद्याच्या सरक्षक धोरणाचा स्वीकार अवश्यमेव केला पाहिजे सर टी विजयराघवाचार्य याच्या ह्या वरील उद्गारास अनुसरून सरकारनें वागलें पाहिजे. हिंदी फडनवीसाचा कल खुल्या व्यापाराकडे जाऊ लागल्याचीं चिन्हें दिसू लागलीं आहेत, तेव्हां सर विजयराघवाचार्यांसारख्या अनुभवी तज्ज्ञानें वेळींच दिलेला इशारा समयोजित व समर्पक नाहीं, असें कोण म्हणेल ?

---

### सिंधमधील लाचलुचपतीचे प्रकार थांबविण्याचा प्रयत्न

सिंध प्रांताचे गव्हर्नर, सर लान्सलॉट ग्रॅहॅम, ह्याच्या हुकमानें सिंधमधील लाचलुचपतीच्या प्रकारांसबंधीं एक सर्क्युलर काढण्यांत आलें आहे. लाचलुचपत व पैसे खाणें हे प्रकार सिंधमध्यें आज कित्येक वर्षे प्रचलित असून, ते थांबविण्याचा प्रयत्न नेटानें केला पाहिजे, असें इलाखाधिपतींच्या सर्क्युलरमध्यें स्पष्ट म्हटलेलें आहे. निरनिराळ्या खात्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ह्या गोष्टींपासून स्वतः अलिप्त राहून केवळ भागणार नाहीं; त्यांनीं आपल्या हाताखालील अधिकारी व खासगी नोकर ह्यांसहि सन्मार्गास लावलें पाहिजे; दुय्यम अधिकाऱ्यांनीं आपल्या वरिष्ठांस ह्या बाबतींत सर्वतोपरी सहाय करावें; जनतेनेंहि सरकारी नोकरांतील ह्या दोषांचा नायनाट करण्यास मदत करावी; अशा अर्थाच्या सहकार्याची विनंति जाहीर रीतीनें करण्यांत आली आहे. लाचलुचपतीच्या प्रश्नाचा इतक्या उघडपणें निर्देश करून, असले प्रकार थांबविण्याचा निश्चय जाहीर करण्याची इलाखाधिपतींवर पाळी आली, ह्यावरून सिंधमधील वस्तुस्थितीची कल्पना करता येण्याजोगी आहे. सरकारी अधिकारी व जनता ह्या दोघांचेंहि ह्या बाबतींत अंग असलें पाहिजे आणि लोकांनींहि सरकारी नोकरांच्या अन्याय्य मागण्यास विरोध केला पाहिजे. खुद्द इलाखाधिपतींनींच ह्या प्रश्नाचा पुरस्कार केला असल्यानें, सिंध प्रांतातील पैसेखाऊ नोकरास आतां दहशत बसेल आणि सार्वजनिक जीवनांत सचोटीस कांहीं किंमत राहील असें मानण्यास हरकत नाहीं.

### जाधव टेलरिंग कॉलेज

गेल्या डिसेंबरमध्यें मॅट्रिकचे विद्यार्थी पास होऊन बाहेर पडले, त्यांचे सहा महिने व्यर्थ जाणार आहेत. कारण, जूनपर्यंत त्यांना कॉलेजमध्यें प्रवेश नाहीं तेव्हां याबद्दल काय करावें असा त्यांचे पालकांपुढें मोठा प्रश्न आहे. याबद्दल आम्ही कांहीं विचार करून कांहीं रूपरेखा आखीत होतों. अशाच वेळीं प्रो. ओतुरकर यांचा या विषयाला चालना देणारा लेख ता. ११ डिसेंबरचे केसरींत आला आहे. पुण्यासारख्या शहरीं व इतर ठिकाणीं हजारों मुलें मॅट्रिक परीक्षेंत पास होऊन बाहेर पडलीं व त्यांचे सहा महिने व्यर्थ जाणें हें योग्य नव्हे. धंदेशिक्षणाकडे हळुहळु लोकांचें लक्ष्य वळत आहे. सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न लोकांपुढें आहेच. त्यांत ही आणखी भर पडणार.

थोड्या भांडवलांत, थोड्या खर्चाच्या शिक्षणात स्वावलंबी बनून योग्य मोबदला मिळणाऱ्या शिक्षणाची जरूरी आहे, असें आजकाल अगदीं योग्य शिक्षण म्हणजे टेलरिंग ॲण्ड कटिंग हें होय. आमच्या सोळा वर्षांचा संस्थेचा इतिहास जनतेपुढें आहेच. ह्या शिक्षणाचा प्रसार करून बेकारीचा प्रश्न सोडविण्याचा आमचा प्रयत्न सारखा चालू आहे. अशाच वेळीं, मॅट्रिक पास झालेल्या हजारों विद्यार्थ्यांचे सहा महिने वाया जाऊ नयेत, म्हणून सहा महिन्यांत जरूर तें शिक्षण घेऊन ते स्वावलंबी बनावे, इतकी त्यांची तयारी करावी अशी आमची इच्छा आहे. यदा मॅट्रिक पास झालेल्या मुलाच्याच करितां फीमध्यें स्पेशल कन्सेशन देऊन व सहा महिन्यांत योग्य व जरूर असलेला स्पेशल कोर्स पुरा करून त्या मुलांना स्वावलंबी बनवावें व हा धंदा सुशिक्षितांची बेकारी किती उत्तम तऱ्हेनें सोडवतो हें जनतेला दाखवावें या दृष्टीनें हा आम्ही प्रयत्न करीत आहोंत. त्याचा जनतेनें जरूर फायदा घ्यावा.

खरोखरीच सुशिक्षितांचें लक्ष्य या धंद्याकडे जितकें जावें तितकें तें गेलें नाहीं. हा धंदा पूर्णपणें शिकणाऱ्या अशिक्षितांना वर्ष पाऊण वर्ष तरी लागतें तोच धंदा सुशिक्षित सहा महिन्यांत शिकून स्वावलंबी बनतील व उत्तम तऱ्हेनें पोटाचा प्रश्न सोडवतील ही खात्री सुशिक्षितांना पटण्याकरिताच या परिस्थितीचा फायदा घेऊन आम्ही हा प्रयत्न करीत आहोंत

या सहा महिन्याच्या स्पेशल कोर्स घेणारास सरकारी परीक्षेसही बसवलें जाईल.

वाय. टी जाधव,
प्रिन्सि. जाधव टेलरिंग कॉलेज,
४९७ बुधवार, पुणें.


## आयुर्वेद रसशाळा पुणें, लिमिटेड.

**यांचीं शास्त्रोक्त खात्रीलायक औषधें**

| | |
|---|---|
| च्यवनप्राश—पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु |
| सुवर्णमालिनीवसंत | १ तो. १० रु. |
| वज्रदंती दंतमंजन— | बाटली किं. ४ आ. |
| सुखसारक चूर्ण—शौचास साफ करणारें | १ पौंड १॥ रु |
| एरंड पाक—मलावरोध घालविणारा | १० तो. ८ आ. |
| हेमगर्भ मात्रा—सर्व वात-कफ-रोगहर | मात्रा...५ रु. |
| सुवर्णराज वंगेश्वर—धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| कुमारी आसव— ... ... | १ पौंड ५ रु |
| त्रिभुवनकीर्ति—सर्व ज्वरांवर ... | १ तो १२ आ. |

या शिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटीका, अवलेह वगैरे मागवून एकवार अनुभव घ्या.

—कॅटलॉग मागवा—

ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत नियम मागवावे

मुंबई दुकान—ठाकुरद्वार नाकें, सूर्यमहाल शेजारी, गिरगांव रोड, मुंबई ४.
पुणें दुकान—लक्ष्मी रोड, गणपती चौक, पुणें २.
सांगली—आयुर्वेद रसशाळा दुकान, पेठ.
कोल्हापूर—आर्यवैद्य श्री. वीं चिटणीस, लक्ष्मीकांत दवाखाना, कपीलतीर्थ कॉर्नर
नागपूर—आयुर्वेदिक मेडिकल स्टोअर्स, महाल रोड.

**डेक्कन जिमखाना, पुणें ४.**



## दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, पुणें.

अध्यक्ष: आर एन अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ, पुणें

**अधिकृत भांडवल: रु. १०,००,००० दहा लाख**
**तूर्त विक्रीकरतां काढलेलें**
**भांडवल रु. ५,००,००० पांच लाख**
**प्रत्येकीं रुपये १०० प्रमाणें ५,००० शेअर्स**

अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु १५. अर्जमंजुरीनंतर रु. १० बाकीच्या रकमेची तूर्त मागणी केली जाणार नाहीं

विशेष माहितीकरतां ऑफिसकडे लिहा
पत्ता—१० बुधवार पेठ, विश्रामबाग रोड, पुणें.

नि ना क्षीरसागर, चिं त्रिं चितळे } मॅनेजिंग डायरेक्टर्स

## वेस्टर्न इंडिया कंपनीचें मूल्यमापन

वेस्टर्न इंडिया विमा कपनीचा, ३१ डिसेंबर १९३५ अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनाचा अहवाल व डायरेक्टराची त्यासबंधातील शिफारस, ह्याची एक प्रत आमचेकडे आली आहे. त्यावरून, वेस्टर्न इंडियाची सर्व बाजूंनीं अखंड प्रगति होत असल्याचें स्पष्ट दिसून येतें. मूल्यमापनामध्यें ७ लक्ष ४० हजाराचा वाढावा दिसून आला व त्यात इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंडातील १ लक्ष ८० हजार रुपये मिळविल्यावर ९ लक्ष २० हजार रुपये नफावाटणीस शिलक राहिले सापत्तिक मजबुती व स्थैर्य - ह्याकडे कंपनीचे चालक पहिल्यापासूनच विशेष लक्ष पुरवीत असल्याकारणानें, कंपनीनें आपल्या वार्षिक ताळेबंदात ठेवींची मूळ किंमतच दाखविलेली होती वास्तविक, त्यातील रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत सुमारें १२ लक्षानीं ज्यास्त भरत असतांहि, कपनीच्या ताळेबदांत ह्या गोष्टीचा फायदा घेण्यात आला नव्हता. ता. ३० नोव्हेंबर रोजीं, ह्या रोख्याची मूळ पडलेली किंमत व त्या दिवशींची त्याची बाजारभावानें होणारी किंमत, ह्यात १६ लक्ष रुपयाची तफावत पडली ! कपनीचे फंड अशा रीतीनें गुंतलेले असतांना इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फडातील २ लक्ष ६५ हजार रुपये मजबुती वाढविण्यास उपयोगी असले तरी त्या फडाचें वास्तविक प्रयोजन उरलें नव्हतें ह्या फडाचा काहीं भाग लाइफ ॲशुअरन्स फडात वर्ग करावा असें ॲक्चुअरीनें सुचविलें व त्यास अनुसरून ९ लक्ष २० हजार रुपयाचा वाढावा वाटणीकरिता घेण्यात आला. " मजबुतीची परमावधि झाली आहे, तेव्हा फंडापैकीं कांहीं भाग नफा वाटणीस द्या " असा सल्ला ॲक्चुअरीनें देण्याचा सुप्रसंग वेस्टर्न इंडियाचे बाबतींत उपस्थित झाला, ही अत्यंत अभिनंदनीय गोष्ट आहे. स्थैर्य व बळकटी ह्यास प्राधान्य देताना, वेस्टर्न इडियानें आपले बोनसचे दर मोठे राखले आहेत, हा सदरहू कंपनीचा एक विशेष समजला पाहिजे.

मूल्यमापनाचे हिशेबात ॲक्चुअरीनें व्याजाचा दर ४ टक्के गृहीत धरलेला आहे. हा दर, कंपनीस, तिच्या भाडवलावर व ठेवींवर मिळालेल्या दरापेक्षा १¾ टक्क्यानीं कमी आहे म्हणजे, ह्या बाबतींत दूरदर्शीपणानें मजबुतीकडे लक्ष देण्यात आलेलें आहे. कंपनीस, तिच्या चालू कामावर पडणाऱ्या खर्चाचें प्रमाण १० ते ११ टक्के इतकें अल्प राहिलें आहे, ह्यावरून चालकाच्या काटकसरीच्या कारभाराची कल्पना येते.

वाढाव्याच्या ९ लक्ष २० हजार रुपयापैकीं विमेदारांत ७ लक्ष २४ हजार रुपये वाटण्यात यावयाचे आहेत. त्यातून आयुष्याच्या पॉलिसीवर आणि मुदतीच्या पॉलिसीवर त्रैवार्षिक दर हजारीं बोनस अनुक्रमें ७५ रुपये व ६० रुपये देण्यात येईल वेस्टर्न इडियाचे बोनसचे दर समाधानकारक असल्यानें, ज्यास्त चढीचे दर जाहीर करण्याचें कंपनीस कारण वाटलें नाहीं बोनसचे दर वाढविण्याऐवजी कमी करण्यासबंधीं विमा व्यवसायातील लोकाची खटपट चालू आहे आणि विम्यासबंधींच्या नव्या कायद्यामुळें कपन्यास काहीं किमान अटी पार पाडल्याखेरीज बोनस देण्यास प्रतिबंध होण्याचा संभव आहे अशा परिस्थितींत, वेस्टर्न इंडियानें आपले बोनसचे दर जास्त वाढवले नाहींत, हें योग्यच केलें कपनीच्या विमेदारांस वरील वृत्तांत वाचून उचित समाधान होईल व भागीदारासहि २० टक्के डिव्हिडंडची शाश्वती मिळाल्यानें आनंद होईल. वेस्टर्न इंडियानें केलेली प्रगति भूषणावह असून, ताज्या मूल्यमापनामुळें तिचें उच्च स्थान ज्यास्तच दृढ झालें आहे

### वेस्टर्न इंडिया कंपनीची प्रगति

( स्थापना १९१३ )

| मूल्यमापनाचें वर्ष | एकूण चालू काम | मूल्यमापनाचे वेळीं आढळलेला वाढवा | विमेदारात वाटलेली रकम | भागीदारास डिव्हिडंड | विमेदारास बोनस दर हजारीं दरसाल: आयुष्याच्या पॉ. | विमेदारास बोनस दर हजारीं दरसाल: मुदतीच्या पॉलिसीवर |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष रु | लक्ष रु | लक्ष रु. | रु. | रु. | रु. |
| १९२३ | ४४¾ | १¼ | ½ | ७ | १० | १० |
| १९२६ | ७४½ | ३¼ | १½ | १० | २२½ | १८ |
| १९२९ | १२२¾ | ५¼ | २¾ | १५ | २५ | २० |
| १९३२ | १९२½ | ५ | ४¼ | २० | २५ | २० |
| १९३५ | २७६ | ९¼ | ७¼ | २० | २५ | २० |


अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

झारापकर टेलरिंग कॉलेज

माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

स्थापना १९२० प्रथम मुंबई सरकारने व कोल्हापूर सरकारनें मान्य केलेले



जाधव टेलरिंग कॉलेज

मॅट्रिक पास विद्यार्थ्यांकरितां ६ महिन्याचा स्पेशल कोर्स स्पेशल फीशिवाय सरकारी परीक्षेस बसविले जाईल या सवलतीचा फायदा घ्या ता १५ जाने आंत नांवें नोंदवा [ ४९७ बुधवार, पुणें २

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning Pigmy & Monthly Income Deposit Schemes."

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

म्यानेजिंग एजंटस्

### सोया बीन

सोया बीन हें धान्य जगांतील व्यापारांत महत्त्वाचें स्थान पटकावणार, असा रंग दिसत आहे. विशेषत: अमेरिकेंत, सोया बीनची लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. गेल्या पांच वर्षांत त्या देशांतील सोया बीनचें उत्पादन तिप्पट वाढलें आहे. "शिकॅगो बोर्ड ऑफ ट्रेड" नें गेल्या ऑक्टोबरमध्यें आपल्या मालाचे बाजारांत सोया बीनचे वायदे करूं देण्यास परवानगी दिली, ह्यावरून ह्या धान्याचें वाढतें महत्त्व लक्षांत येईल. खाण्याकडेच नव्हे, तर रंग, व्हार्निश, इंक, छपाईची शाई, बटणें, खिडक्यांचे सांगाडे, इत्यादि माल बनविण्याकडेहि सोया बीन्सचा उपयोग होऊं लागला आहे. अमेरिकेंतील फोर्ड मोटार कंपनी मोटारींच्या बनावटींत वापरण्याकरितां दरसाल ३ लक्ष बुशेल सोया बीनची स्वत:चे शेतांतून लागवड करते ह्या धान्याच्या औद्योगिक उपयोगासंबधीं संशोधन करण्याची व्यवस्था सरकारच्या शेतकी खात्यामार्फत करण्यांत आली आहे. मँचूरियांत जगांतील शेकडा ७५ टक्के सोया बीनचें उत्पादन होतें; तथापि हळू हळू अमेरिकेंतील लागवड वाढत आहे. हिंदुस्थानांत सोया बीननें प्रवेश केला आहे. खाण्याचें धान्य ह्यापेक्षां त्या धान्याचा ज्यास्त उपयोग आपल्या देशांत आज होणार नाहीं.

### एका कंत्राटानें तीन कामें केलीं

इजिप्तमधील नाईल नदीवर बांधण्यांत यावयाच्या एका पुलाचें कंत्राट क्रप्स ह्या सुप्रसिद्ध जर्मन कंपनीस मिळालें आहे जर्मनीनें मागें इजिप्तमधून कांदे मागवले होते, त्याची ३५ हजार पौंड किंमत अद्याप इजिप्तला मिळालेली नाहीं जर्मन सरकार ही रकम क्रप्सला देईल व उरलेली बाकी क्रप्स इजिप्त देशाच्या सरकारकडून घेईल. अशा रीतीनें, कंत्राट पार पाडणाऱ्या कंपनीस आपले पैसे मिळतील, इजिप्त देशाची मागची बाकी वसूल होईल आणि जर्मनीस ती देतांना हुंडणावळीची अडचण भासणार नाहीं.

### सहकारी रजिस्ट्रारांचा युरोपांत दौरा

मुंबई इलाख्याच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, मि. के. एल्. पंजाबी, हे गेल्या आठवड्यांत युरोपकडे रवाना झाले. युरोपांतील सहकारी बँकांच्या, विशेषत: लँड मॉर्गेज बँकांच्या व्यवहाराची माहिती मिळवून ते मे, १९३७ मध्यें परत येतील

### डहाणू येथें अर्बन बँकेची स्थापना

डहाणू येथें एका सहकारी अर्बन बँकेच्या स्थापनेसंबंधींची योजना पुरी झाली आहे बँकेच्या डायरेक्टरांनीं २ हजार रुपये जमा केले असून मुंबई सरकार १४,००० रुपये कर्जाऊ देणार आहे. १६,००० रुपयांच्या भांडवलावर बँकेच्या कारभारास सुरवात होईल सरकारचें कर्ज वार्षिक हप्त्यांनीं फेडण्यांत यावयाचें आहे सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारांनीं ह्या योजनेस मान्यता दिली आहे.

### कागदाचा व्यापार

#### हिंदी उत्पादन वाढलें; ग्रेटब्रिटनमधून होणारी आयात उतरली

१९३५-३६ सालीं, हिंदुस्थानांतील कागदाच्या ११ कारखान्यांपैकीं ९ कारखाने चालू होते. ह्या नऊ कारखान्यांपैकीं चार बंगालमध्यें, तीन मुंबई इलाख्यांत, एक संयुक्त प्रांतांत व एक त्रावणकोर संस्थानांत होता १९३३-३४ सालीं, हिंदी कारखान्यांतून ८३/४ लक्ष टन कागदाचें उत्पादन झालें होतें तें १९३५-३६ सालीं ९३/४ लक्ष टनापेक्षा ज्यास्त झालें ह्या कागदास लागणारा लाकडी रांधा मुख्यत: नॉर्वे, स्वीडन व अमेरिका ह्या देशांतून आला.

कागद व कार्डबोर्ड ह्यांची आयात १९३५-३६ सालीं थोडीशी वाढून, २ कोटि ९९ लक्ष रुपयांचा माल हिंदुस्थानांत उतरला. ह्यापैकीं, एकट्या छपाईच्या कागदाची किंमत ९६ लक्ष रुपये भरली. जर्मनीमधून होणाऱ्या ह्या कागदाच्या आयातींत ३½ पट वाढ झाली. एकूण ४१½ लक्ष रुपयांची जुनी रद्दी हिंदुस्थानांत उतरली! ह्या रद्दीपैकीं शेकडा ९५ कागद ग्रेटब्रिटनमधून आला.

हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या कागदाच्या व कार्डबोर्डच्या व्यापाराची वेगवेगळ्या देशांमधील शतमानानें वांटणी खालील कोष्टकावरून लक्षांत येईल:—

| | १९१३-१४ % | १९२९-३० % | १९३५-३६ % |
|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ५६·२ | ३२·८ | २९·७ |
| नॉर्वे | ५·१ | १४·२ | १२·६ |
| स्वीडन | ३·२ | १०·३ | १३·८ |
| जर्मनी | १७·३ | १२·० | १९·१ |
| ऑस्ट्रिया | ८·३ | ९·१ | ४·८ |
| जपान | १·० | २·८ | ३·९ |

कागदाचे व्यापारांत जर्मनीनें आपलें पूर्वस्थान मिळवलें आहे आणि नॉर्वे व स्वीडन ह्या देशांमधून होणारी आयात वाढत आहे. तथापि ग्रेटब्रिटनचा ह्या व्यापारांतील हिस्सा मात्र बराच कमी झाला आहे, ही गोष्ट वरील आकड्यांवरून स्पष्ट दिसते.

### कळवण तालुका (जि. नाशिक) सहकारीवृत्त

(१) ग्रुपसेक्रेटरी डिबेटिंग क्लबाची ता १२-१२-३६ रोजीं सभा होऊन "दिवाळीला कुणबी कसा शहाणा होतो" ह्या विषयावर चर्चा झाली. (२) लोकांत 'सहकारा' चा प्रचार व्हावा, ह्याकरितां डिबेटिंग क्लबाची सभा फिरती ठेवण्याचें ठरलें. येती सभा ता. १०-१२-३६ रोजीं निवाणें येथें होऊन खेड्यांतील सुधारणा हा विषय घेण्यांत येईल. (३) सीनियर इन्स्पेक्टर श्री. सहस्रबुद्धे ह्यांचे नेतृत्वाखालीं कळवण व देवळे तालुक्यांतील सोसायट्यांची १६ व १७ रोजीं सभा झाली सभासदांनीं सोसायट्या सुधारण्याचें व व्याजाची सवलत घेण्याचें आश्वासन दिलें.

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे थंडी-
गिरगांव, मुंबई करतां

## कोऑपरेशन ॲन्ड अकौन्टन्सी डिप्लोमा बोर्ड

"कोऑपरेशन" व "कोऑपरेटिव्ह अकौन्टन्सी" ह्या विषयासंबंधाच्या सरकारी डिप्लोमाच्या परीक्षा घेण्याकरितां मुंबई सरकारनें वरील बोर्डाची स्थापना केली आहे. सहकारी खात्याचे रजिस्ट्रार हे ह्या बोर्डाचे अध्यक्ष व मुंबईच्या सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकनॉमिक्सचे प्रिन्सिपॉल हे एक सभासद् असतील. ह्या खेरीज, प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट व प्रांतिक सहकारी बँक ह्यांचा प्रत्येकीं एक प्रतिनिधी, एक सुप्रसिद्ध हिशेब तपासनीस, एक निष्णात वकील व एक शिक्षणतज्ज्ञ ह्यांची बोर्डावर नेमणूक व्हावयाची आहे. १ जानेवारी १९३७ रोजीं वरील बोर्ड अस्तित्वांत आलें. खालील गृहस्थांची तीन वर्षांकरितां बोर्डावर नेमणूक करण्यांत आली आहे:—

(१) मि. एम. डी. भनसाळी, आयु. सी. एस., रजिस्ट्रार, अध्यक्ष

(२) प्रिन्सिपॉल एम्. एल्. टॅनन

(३) प्रोफेसर व्ही. जी काळे

(४) श्री. व्ही. पी वर्दे

(५) सर शापुरजी बिलिमोरिया

(६) दिवाण बहादुर के. एम जव्हेरी

बोर्डाची कचेरी पुणें येथें रहावयाची आहे.

### कॅलेंडर प्रदर्शन, पुणें, १९३७

यंदाचें कॅलेंडर प्रदर्शन मार्च १९३७ चे पहिले आठवड्यांत मोठ्या प्रमाणावर येथें भरणाऱ्या "औद्योगिक प्रदर्शनाचे" जागेंत भरणार आहे. प्रदर्शनांत आलेल्या कॅलेंडर्सपैकीं उत्कृष्ट व उपयुक्त ठरणाऱ्या पहिल्या तीन नंबरास तसेंच यंदा जास्तींत जास्त कॅलेंडरें (१९३७ चीं) जमविणाऱ्या पहिल्या तीन नंबरांस, अशीं सहा बक्षिसें ठेवण्यांत आलीं आहेत.

गेल्या (१९३६) कॅलेंडर प्रदर्शनाचें अहवालपत्रक छापलेलें कोणास पाहिजे असल्यास पोस्टेजकरिता ०१ आण्याचें तिकिट पाठवावें.

तरी हें प्रदर्शन यशस्वी करण्याकरिता सर्व व्यापारी व धंदेवाईक मंडळींनीं चालू १९३७ कॅलेंडर प्रसिद्ध होतांच त्याची एक प्रत प्रदर्शनात ठेवण्याकरिता पाठवावी असें सेक्रेटरी C/o श्रीगणेश वाचनालय, बुधवार पुणें नं २, हे कळवतात.

### लेखकांस व प्रकाशकांस विनंति

म्हापसें—गोवा येथील वाङ्मयविहार मंडळातर्फे कादंबरी, नाट्य, लघुकथा, इतिहास या विभागातील पुस्तकाची चढाओढ ठेवण्यात आली असून तज्ञमंडळाच्या परीक्षणानें जीं पुस्तकें पहिल्या प्रतीचीं ठरतील त्यास सुवर्णपदक व त्या पुस्तकांच्या प्रकाशकांस मानपत्र देण्यांत येईल. पुस्तकें पाठविण्याची मुदत जानेवारी १९३७ अखेरपर्यंत असून निकाल मार्च १९३७ अखेर जाहीर होईल. तरी लेखक लेखिकांनीं व प्रकाशकानीं यात भाग घ्यावा, अशी कार्यवाहाची विनंति आहे.

## हिंदी विम्याच्या धंद्याचें परीक्षण

हिंदुस्थानांतील आयुर्विम्याच्या कामाचा आढावा घेतांना, 'इकनॉमिस्ट' ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश साप्ताहिकानें ताज्या अंकांत प्रदर्शित केलेले विचार लक्ष्यांत बाळगण्याजोगे आहेत. त्यांतील महत्त्वाचीं वाक्यें येथें उद्धृत केलीं आहेत:—

"इतर देशांतील कंपन्यांचे मानानें हिंदी विमा कंपन्यांवर सरकारी नियंत्रण फारच थोडें आहे. उदाहरणार्थ, कंपन्यानीं पैसे कसे गुंतवावे अथवा ॲक्चुअरीनें विम्यांवरील जोखमीचा आढावा कसा काढावा, ह्यासंबंधीं निर्बंध घातलेले नाहींत. विम्याचे हप्ते ग्रेटब्रिटनमधील हप्त्यांचेपेक्षा भारी आहेत. पहिल्या प्रतीच्या हिंदी विमा कंपनीच्या व त्याच दर्जाच्या एका ब्रिटिश कंपनीच्या हयातीनंतरच्या नफ्याविरहित विम्याचे दराची तुलना केली, तर २० वर्षे वयाच्या इसमास दर हजार रुपयांच्या विम्यामागें हिंदी कंपनींत ५ रुपये ज्यास्त भरावे लागतात. ५० व्या वर्षी तर हिंदी कंपनीचे हप्ते २० रुपयांनीं महाग पडतात. हयातींतील मुदतीच्या दरांत मात्र इतकी विषमता आढळून येत नाहीं. हिंदुस्थानांतील कंपन्यांस व्याज चांगलें पडतें, ह्यामुळें मृत्यूचें प्रमाण ज्यास्त असलें तरी नुकसान होत नाहीं. ब्रिटिश कंपन्यांचे मानानें हिंदी कंपन्याचा व्यवस्थेचा खर्च फार म्हणजे सुमारें दुपटीनें भारी आहे.

ग्रेटब्रिटनमध्यें, नव्या विमा कंपनीची स्थापना होणें म्हणजे एक अद्भुत चमत्कार समजला जाईल. हिंदुस्थानांत मात्र दरसाल अनेक नव्या कंपन्या निर्माण होत आहेत. नव्या कंपन्याच्या पॉलिसी रद्द होण्याचें प्रमाणहि प्रचंड आहे. नवीन काम मिळवितांना अवाच्या सवा खर्च करण्यात येतो व त्याचा विम्याचे धंद्यावर प्रतिकूल परिणाम होतो. हिंदी विमा कंपन्यांच्या आजच्या परिस्थितींत, त्यांनीं तज्ज्ञ ॲक्चुअरींची केवळ मूल्यमापनाचे वेळींच नाहीं, तर रोजच्या मामुली धंद्यावर देखरेख करण्यासाठी नेमणूक करावी; त्यामुळें कंपन्यांचेंच अंतिम हित होईल."

### नव्या अमदानींतील आय. सी एस. अधिकारी

इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या भवितव्यतेचा विचार करण्याकरितां लंडन येथें नुकतीच एक सभा झाली, त्यावेळीं भाषण करतांना एक सेवानिवृत्त आय. सी. एस अधिकारी, मि. किंकेड, हे म्हणाले:—

"जज्जाचें काम करणारास कायद्याचें ज्ञान असणें आवश्यक आहे, ह्याची जाणीव सरकारच्या कार्यकारीमंडळास असल्याचें दिसत नाहीं.

हिंदी न्यायमंदिरांतील न्यायमूर्ती केवळ कार्यनिपुण, प्रामाणिक व निष्ठावंत असून भागणार नाहीं; ते कायद्याचे ज्ञानांतहि पारंगतहि असणें जरूर आहे. त्यावांचून सिव्हिल सर्व्हिसमधील अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा रहाणार नाहीं"

किंमत रु. १२॥ ओव्हरकोट खरेदी करा बुधवार चौक, पुणें

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—५ |
| ५% ( १९२९-४४ ) लोन ... ... | १०८—१३ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—८ |
| ४% १९६०-७० ... ... | ११५—९ |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—११ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—४ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०७—६ |
| २¾% १९४८-५२ ... ... | १०१—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १११—१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११३—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३८—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु भरले व ६% डिव्हि. ) | ३५—१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि.) | १५९५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४१—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०१—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतिज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९२१—२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १५३—१२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १६२७—८ |
| टाटा पॉवर ( १,००० रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १६१७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९९—६ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८आ.) | १७८—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २९८—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | १०४२—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५२—१२ |


# धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

## नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
|---|---|

| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
|---|---|---|

| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |
|---|---|

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०४,००,००० |

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रें ( मुंबईनजिक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



व्यापारी-उद्यमी लोकांस

## —अपूर्व संधि—

पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

दि डॉन ऑफ इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.
पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली
ता १ आक्टोबरपासून सुरू ] नवीन योजना [ ता १ आक्टोबरपासून सुरू
मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
फायदेशीर अपूर्व सोय.
बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवींवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.
गरजूनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें
पुणें, ता २२-९-३६ | जनरल मॅनेजर

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.
रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.
पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता
सध्याच्या यांत्रिक युगात, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद का पुरवतां येऊं नये !
ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.
८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

“ दुसरें मूल्यमापन जाहीर झालें ”
स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष–श्री न. चिं केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास } दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला { हयातीनंतर विम्यास
३७॥ रु. } दर हजारीं त्रैवार्षिक नफा { ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

“ अर्थ ” ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १६ (ट ख निराळा)
व्यवस्थापक, ‘अर्थ’ ग्रन्थमाला, पुणें ४

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

## महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया

**मध्यप्रांत व वऱ्हाड**

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठीं मंजूर

# अर्थ

[ व्यापार, उद्योगधंदे शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक ]

सपादक : प्रो. वा गो. काळे

सहायक . श्री. श्री. वा. काळे

**मुंबई इलाखा**

सरकारी व सरकार-मान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठीं मंजूर

महाराष्ट्रीयाचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यास ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं उद्योगधंद्यात असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यात नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबात व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे वार्षिक-वर्गणी फक्त चार रुपये असून टपालखर्च वेगळा नाहीं मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा

व्यवस्थापक, **अर्थ**, अर्थ ऑफिस, पुणें ४



# रु. ५,००० आपलें बक्षिस आतांच मिळवा

प्रवेश फी रु १ (प्रत्येक यत्नास)

सीलबंद उत्तर
**दि वेस्टर्न बँक ऑफ इंडिया**
जवळ ठेवण्यांत आलें आहे.

प्रत्येक बिनचूक उत्तरास किमान २०० रु मिळण्याची हमी

फी व उत्तरें मिळण्याची अखेरची तारीख १६-१-३७ ]    [ निकाल तारीख २१-१-३७.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | १५ | |
| | | |

बाजूचे कोष्टकांत ० ते २४ पर्यंतचे आंकडे अशा रीतीनें भरा कीं, ज्यांची उभी, आडवी व काटकोनी बेरीज ४५ यावी. कोष्टकात एकच आंकडा पुनः येऊ नये सीलबंद उत्तराशीं जुळणाऱ्या प्रत्येक उत्तरास किमान २०० रुपयांचें बक्षिस गॅरंटीनें दिलें जाईल म ऑ. अगर इंडियन पोस्टल ऑर्डरबरोबर पाठविलेलीं साध्या कागदावरील कितीहि उत्तरें स्वीकारलीं जातील बक्षिसांच्या रकमेची गॅरंटी असून कोणत्याहि कारणानें ती कमी केली जाणार नाहींत मॅनेजरचा निकाल कायद्यानें बंधनकारक व अखेरचा समजला जाइल.

वि सू ७ जानेवारी १९३७ पूर्वीं उत्तरें पाठविणारांपैकीं ज्यांचें उत्तर बरोबर येईल त्यांत १,००० रु वाटले जातील उत्तरें व फी प्रीमियर कमर्शिअल एजन्सी, कॉंपिटिशन डिपार्टमेंट, बॅंबे बझार, कराची ह्या पत्त्यावर पाठवावीत


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा श्रीपाद वामन काळे, बी ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १३ जानेवारी, १९३७. अंक २

**डेक्कन गोल्ड फ्लेक**

गो ल्ड फ्ले क

गिऱ्हाईकांच्या आवडीनिवडीचा पूर्ण विचार करून अनुभवी तज्ज्ञांच्या देखरेखीखाली तयार केलेली ही सिगारेट फार लोकप्रिय झाली असल्यास नवल नाहीं

*Apply for Agencies—*

**Deccan Tobacco Works,**
**Poona 4**
Tel. Address—'CIGARETTES' POONA

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ —
दररोज सकाळी १० ते ३, शनिवारी १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवीवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी

कर्ज सोनें, चांदी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

म्यानेजिंग एजंटस्

**K. K. & Co.**
**Photographic Dealers**
**POONA**

**विमा कंपन्यांना आदर्श**

" विमा कंपन्यात एक आदर्श संस्था म्हणून होऊन राहण्यासारखी आपण जी समाजाची सेवा चालविली आहे तिचें महत्त्व यापुढें लोकांच्या नजरेत जास्त जास्त भरत जाईल अशी मला फार आशा आहे "

ग स मराठे, विमागणिती

( कंपनीच्या सातव्या मूल्यमापन वृत्तातील उतारा )

**वेस्टर्न इंडिया**

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड. सातारा

या संस्थेचें

**सातवें मूल्यमापन**

प्रगति, स्थैर्य यांचें आदर्श
सेवा, लाभ उदाहरण

मूल्यमापनाचा आधार-पूर्वीहून अधिक कडक

विमेदारांस वाटावयाची नफ्याची रक्कम

७,२२,८७२ रु

**बोनसचा दर** ( त्रैवार्षिक दर हजारी )

हयातीनंतरच्या पॉलिसीवर ७५ रु.

आणि

हयातींतील पॉलिसीवर ६० रु.

अलीकडे काही वर्षे चालू असलेल्या अननुभूत मंदीला आणि उद्योगधंद्यातील उलथापालथीला न जुमानता वेस्टर्न इंडिया आपला प्रगतीचा मार्ग बिनधोक आक्रमीत आहे

विम्याच्या धंद्यांत लोकहिताच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आणि उत्कृष्ट अशा ज्या काहीं गोष्टी आहेत त्याच्या दृष्टीनें पाहिलें असतां वेस्टर्न इंडियानें पहिल्या प्रतीचें स्थान संपादन केलें आहे. या मूल्यमापनानेंहि हीच गोष्ट आणखी एकदा सिद्ध केली आहे.

तपशीलवार माहिती व मूल्यमापनाचा अहवाल पत्रानें मागवा

मॅनेजर

# विविध माहिती

## सिलोन स्वतंत्र चलन काढणार

आजपर्यंत सिलोनी चलन हिंदी रुपयास जोडलेलें आहे आपली स्वतःची मध्यवर्ती बँक स्थापून तिच्या मार्फत नोटा काढणें किंवा सिलोनी चलन ब्रिटिश पौंडास स्वतत्र रीतीनें जोडणें हे मार्ग सिलोनला मोकळे आहेत ह्या प्रश्नाचा विचार मत्रीमडळ लवकरच करणार आहे.

## सिलोनचें दहा कोटींचें कर्ज

दहा कोटि रुपयाचें कर्ज काढण्याचें सिलोन सरकारनें ठरविलें होतें. त्यापैकीं आठ कोटींचें कर्ज लडनमध्यें उभारण्यात आलें आहे बाकीच्या दोन कोटींचें कर्ज सिलोनमध्येंच गोळा करण्यात यावयाचें आहे

## मुबई येथील डेव्हेलपमेंट खात्याच्या चाळी

मुबईची वस्ती वाढणार व कामकरी लोकास रहाण्याच्या घरांची टचाई पडणार, ह्या समजुतीनें कांहीं वर्षांमागें वरळी वगैरे भागात सरकारनें अनेक चाळी बांधल्या त्यातील १६,५२४ खोल्यापैकीं फक्त ८,४८५ खोल्यात १९३५-३६ मध्यें भाडेकरी होते आणि बाकीच्या रिकाम्या पडल्या होत्या ह्या बाबतींत सुधारणा अत्यत मंद गतीनें होत आहे

## ग्रामोद्धाराकरितां टेलिफोन व तार ऑफिसें

हिंदुस्थान सरकारच्या ग्रामोद्धाराच्या योजनेचा एक भाग म्हणून सरकारी पोस्ट व तार खात्यानें एक योजना आखली आहे. ज्या ठिकाणीं तार ऑफिसें व टेलिफोन नाहींत, त्या ठिकाणीं ही गैरसोय दूर करण्याकरिता सुमारें ९० लक्ष रुपये खर्च करण्याचें ठरलें आहे शहरें व खेडीं ह्यास जोडून, खेड्यांची प्रगति घडवून आणण्याच्या प्रयत्नास ह्या योजनेचें सहाय होईल, अशी तिच्या पुरस्कर्त्यांची अपेक्षा आहे.

## कृत्रिम सोनें

एका जपानी प्रोफेसरानें कृत्रिम सोनें बनवलें असून तें अत्यत स्वस्त आहे असें म्हणतात तांबें व अल्यूमिनियम ह्याचाहि शोध त्यानें केलाआहे. ह्या कृत्रिम धातूपासून काटे, चमचे, बटणें इत्यादि प्रयोगादाखल करण्यात आलीं आहेत

## ब्रिटिश प्रधानमंडळांतील सभासदांचे पगार वाढणार

ब्रिटिश प्रधानमंडळातील सभासदाच्या पगारातील विषमता नष्ट करून, त्यापैकीं कांहींच्या पगारात वाढ करणारें एक बिल पार्लमेंटापुढें लवकरच येणार आहे त्या अन्वयें प्रत्येक मंत्र्यास एकजात पाच हजार पौंड व मुख्य प्रधानास आठ हजार पौंड तनखा मिळावयाचा आहे

## केरोसीन तेलाची आयात

गेल्या सालीं एकूण ६३/४ कोटि गॅलन केरोसीन तेल हिंदुस्थानात उतरलें. त्यापैकीं ४ कोटि ६८ लक्ष गॅलन तेल रशियांतून आलें व इराणनें १ कोटि गॅलन तेल पाठविलें एकूण आयात गेल्या वर्षी पेक्षा ४० लक्ष गॅलन कमी झाली

## टेलर्स रिसवूड ब्रदर्स

वरील मडळींनीं सदाशिव पेठेच्या हौदासमोर शिवण कामाचें दुकान चालू केलें आहे, त्याचा पानसुपारीचा समारंभ गेल्या रविवारीं सकाळीं झाला. मंडळीस आपल्या धंद्याचा अनेक वर्षांचा अनुभव असून सर्व प्रकारचे व फॅशनचे कपडे वक्तशीर शिवून देण्याची व्यवस्था त्यांनीं आपल्या दुकानात केली आहे.

## एम एस. एम रेल्वे कंपनी

मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वे कंपनीशी सरकारचा करार येत्या वर्षीं संपतो हिंदुस्थान सरकारनें ह्या कराराची मुदत आणखी आठ वर्षें म्हणजे नोव्हेंबर १९४५ अखेर वाढविली आहे. करारातील अटींत मात्र थोडा फरक केला आहे.

## पिकांवर कडक थंडीचा परिणाम

अलीकडे कडक थंडी पडत आहे, आणि पुणें, अहमदनगर व सोलापूर ह्या जिल्ह्यांतल्या ज्वारीच्या पिकावर तिचा अनिष्ट परिणाम झाला आहे. विशेषतः उशीरा लावलेलीं ज्वारीचीं पिकें ओलाव्याच्या अभावीं व जमीन चिरावल्यामुळें सुकत आहेत

## ब्रिटिश बँकांची चलती

ग्रेटब्रिटनमध्यें आर्थिक मंदी दूर होऊन चलतीची लाट उसळत आहे, ह्याचें निदर्शक तेथील पाच प्रमुख बँकास गेल्या सालीं झालेल्या वाढत्या नफ्याच्या आकड्यामध्यें स्पष्ट दिसत आहे. त्याचा गेल्या सालातला नफा पूर्ववर्षापेक्षा ८३/४ टक्क्यानीं व १९३० पेक्षां १९ टक्क्यानीं जास्त होता.

## जर्मनीस देश अपुरा पडतो

जर्मन लोकांच्या ताब्यात पुरेसा प्रदेश नाहीं, ह्यामुळें त्याची कुचबणा होत असल्याची तक्रार डॉ शास्ट ह्यांनीं आपल्या एका भाषणात अलीकडे केली आहे

## पेट्रोलच्या भारी दराचा मोटारचे धंद्यावर परिणाम

मोटारगाड्या तयार करणाऱ्या देशांमध्यें फ्रान्सचा दुसरा नंबर असे, तो खाली जाऊन पाचवा आला आहे. फ्रान्समध्यें पेट्रोल अत्यत महाग असल्यामुळें त्या देशातील मोटरींची व मोटारसायकलींची सख्या कमी झाली आहे. बदरात पेट्रोल ४ आणे गॅलन या दरानें येऊन पडतें, परतु पॅरिस शहरात एका गॅलनास सुमारें १३/४ रुपया पडतो.

## जर्मन मुलांची उंची वाढली

जर्मनींतील १४ वर्षें वयाच्या मुलाची उंची गेल्या १० वर्षांत दीड इंच वाढली आहे. उंचीच्या प्रमाणात वजनात वाढ झालेली नाहीं सुधारलेलें आरोग्य व शारीरिक खेळ ह्यामुळें उंचींत हा फरक घडून आला असला पाहिजे, असें अनुमान आहे

## लष्करी महत्त्वाचा नवा रस्ता

म्यूनिच ( जर्मनी ) व रोम ह्यास ऑस्ट्रियातून जोडणारा एक नवा मोटारींचा रस्ता बांधण्याची योजना ऑस्ट्रियन, इटालियन व जर्मन सरकाराच्या हुकमानें आखण्यात येत आहे ह्या रस्त्यामुळें लष्करी गाड्यांची वहातूक शीघ्र करणें सुलभ होणार आहे. ह्या रस्त्यास सुमारें ४० कोटि रुपये खर्च येईल ऑस्ट्रिया व इटली ह्याच्या सरहद्दीवरील आल्प्स पर्वताखाली १२ मैल लांबीच्या बोगद्यातून हा रस्ता नेण्यात येईल

## सह्याद्रि विमा कंपनी, लि

नाशिक येथें स्थापन झालेल्या सह्याद्रि विमा कंपनीचा उद्घाटन समारंभ गुरुवार, ता. १४ जानेवारी रोजीं नाशिक येथें श्री ग स मराठे, अॅक्चुअरी, ह्याच्या हस्तें होणार आहे

## मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| २७-१२-३६ ते २-१-३७ | ६,२१,१२५ |
| ३-१-३७ ते ९-१-३७ | १,०६,६२,६८९ |
| ६१-९-३१ ते ९-१-३७ | २,९१,०२,४९,६५४ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १४ |
| २ आर्थिक स्वयपूर्णतेची जर्मनीची योजना ... | १५ |
| ३ सुचक वेष्टन व मालाचा उठाव ... ... | १६ |
| ४ घरगुती नोकराचा प्रश्न | १६ |
| ५ स्फुट विचार . शेअर बाजारातील कारवायाची दंगल—स्टॉक एक्सचेंज कमिटीच्या कामास आरंभ—मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सच्या सूचना—सरक्षक जकाती—शेतकऱ्याची मिळकत वाढली पाहिजे—श्री. वैकुंठराय ह्यांचा अभिप्राय—क्षीरापकर टेलरिंग कॉलेज—डेक्कन टॉकीजचें उद्घाटन | १७ |
| ६ तबाखू . ... | १९ |
| ७ मुंबई इलाख्यातील जमीन गहाणाच्या बँका ... | २० |
| ८ अल्पायुषी हिंदी जनता | २१ |
| ९ हिंदुस्थानातील जन्ममृत्यूचे आकडे ... .. | २१ |
| १० आगगाड्या व मोटारी ह्यांची वहातुक ... | २२ |
| ११ व्यापारी जहाजाचें महत्त्व | २३ |
| १२ निवडक बाजारभाव | २३ |



# अर्थ

बुधवार, ता १३ जानेवारी, १९३७


## आर्थिक स्वयंपूर्णतेची जर्मनीची योजना

जर्मनीमध्यें आर्थिक स्वयपूर्णतेची चतुर्वार्षिक योजना तेथील राज्यकर्त्यांनीं जाहीर केली असून तिची अंमलबजावणीहि चालू झाली आहे राष्ट्रसरक्षण हा ह्या योजनेचा मुख्य हेतु असल्याचें प्रसिद्ध करण्यात आलें आहे. परराष्ट्रें आपणावर हल्ला करून आपलें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा यत्न करणार आणि आज ना उद्यां युरोपात युद्ध होणार असून त्याची तयारी त्यांनीं चालविली आहे अशी आपली समजूत जर्मनीनें करून घेतली आह महायुद्धापूर्वी, १९१३–१४ सालीं, युरोप खंडांत अशाच प्रकारचा परिस्थिति निर्माण झालेली होती. तेथील राष्ट्राचे परस्परविरोधी गट पडून क्षुल्लक कारणावरून युरोपात युद्धाचा वणवा पेटला आणि त्याच्या ज्वाला सर्व जगभर पसरल्या. शस्त्रसन्यास, जागतिक शातता आणि राष्ट्रसघाचे तडजोडीचे प्रयत्न ह्यासबधात प्रगति होण्याचेऐवजी अलीकडे पीछेहाट होत चालली आहे स्वत:वर शेजारी राष्ट्राचा आघात होणार या जर्मनीच्या समजुतीस काय आधार आहे हें समजणें कठिण आहे बावीस वर्षामागें जर्मनीनें निमित्त साधून फ्रान्सवर हल्ला केला, तसाच डाव तें राष्ट्र सध्या खेळत आहे आणि येनकेन प्रकारेण आपलें घोडें पुढें दामटण्याचा त्याचा बेत आहे असे मानण्यास जागा आहे. इटलीची ॲबिसीनियावरील स्वारी, फ्रान्स व रशिया ह्यांचा परस्पर स्नेह, स्पेनमध्यें भडकलेला कलहाग्नि, राष्ट्रसघाचें दौर्बल्य इत्यादि गोष्टींची अनुकूलता पाहून जर्मनी आपल्या महत्वाकांक्षेचा डाव खेळत आहे, असें दिसतें. समाजसत्तावादी व फॅसिस्ट राष्ट्रें असा जो भेद युरोपात निर्माण झाला आहे, त्याचा फायदा घेण्याचाहि जर्मनीचा व इटलीचा विचार असल्याचें अनुमान अलीकडील घडामोडींवरून स्पष्ट निघतें

ह्या वणव्यामध्यें स्वत.चें सरक्षण व्हावें आणि प्रसगीं दुसऱ्यावर आघात करता यावा ह्या हेतूनें जर्मनीनें जय्यत तयारी चालविली आहे. आधुनिक युद्धांत नुसत्या सेना व शस्त्रास्त्रें ह्याची अनुकूलता असून चालत नाहीं अन्नसामुग्री व कच्चा माल याचा भरपूर पुरवठा नसेल तर अत्यत शूर शिपायासहि माघार घ्यावी लागते असा अनुभव जर्मनीस महायुद्धात आलेला आहे. प्रबळ शत्रु आपलें अन्न व कच्चा माल तोडून आपणास शरण यावयास लावतो आणि त्याच्यापुढें शूर शिपाइगिरी व्यर्थ ठरते, हा बोध त्या राष्ट्रानें घेतला आहे म्हणून, असल्या जरूरीच्या मालाच्या परराष्ट्रातून होणाऱ्या आयातीवर अवलबून रहावयाचें नाहीं आणि तो माल शक्यतांवर आपल्या देशात उत्पन्न करावयाचा असें जर्मनीनें ठरविलें आहे ह्या योजनेमुळें जनतेस पोसण्याची जबाबदारी जर्मनींतल्या नात्सी राज्यकर्त्यांनीं स्वतःच्या शिरावर घेतली असून,मालाचें उत्पादन,त्याची आयात, विभागणी, बाजारभाव, वस्तूचा उपभोग इत्यादि बाबींचें नियत्रण करणें त्यास आवश्यक झालें आहे ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं जर्मन राष्ट्राची आर्थिक घटना साफ बदलून गेली आहे. व्यक्ती व सहकारी सस्थाहि ह्या नवीन योजनेच्या भोंवऱ्यात सापडल्या असून त्यास अधिकाऱ्याच्या आज्ञेप्रमाणें लहानमोठ्या सर्वच गोष्टींत वागावें लागत आहे. आर्थिक व्यवहारांतलें मामुली स्वातन्त्र्य नष्ट झालें आहे आणि हुकूमशाहीच्या तत्रानें व्यापार व औद्योगिक हालचाली व्हाव्या लागत आहेत.

राष्ट्राची अंतर्गत आर्थिक घटना बदलण्याचा परिणाम आतरराष्ट्रीय व्यापारावर होणें सहाजिकच आहे. राजकीय उद्देश डोळ्यापुढें ठेवून राष्ट्रें आर्थिक व्यवहाराचें नियमन करीत असल्यानें अर्थशास्त्राचे मामुली सिद्धांत त्यास लागू पडतनासे झाले आहेत बाहेरच्या बाजारात स्वस्तात स्वस्त माल मिळेल तो आयात करावा आणि ज्यास्तींत ज्यास्त किंमत मिळेल तेथें परदेशात आपला माल विकावा हा साधा व सीधा व्यवहार आता अशक्य झाला आहे. कोणता माल लोकांनीं बनवावा आणि वापरावा हें सरकारनें सक्तीनें ठरवणें आर्थिक नियमाच्या चौकटींत बसत नाहीं, आणि एका राष्ट्रानें स्वयसिद्धतेचें व्रत आचरण्यास प्रारभ केला असता इतराना आपली आर्थिक पद्धती त्या तत्वास जुळती करून घेणें भाग पडतें. म्हणजे, स्वत.च्या इच्छेप्रमाणें आणि शक्तीप्रमाणें आर्थिक व्यवहार करून ससार चालवण्याची व्यक्तींची चिरपरिचित पद्धति येथें संपते आणि सामुदायिक हिताच्या अनुरोधानें राज्यकर्ते ठरवतील त्या मार्गाचा अवलब सर्वांस करावा लागतो. सरकार झालें तरी त्यास नैसर्गिक मर्यादेपुढें नमावेंच लागतें, हें खरें आहे तथापि, उच्च राष्ट्रीय ध्येयाप्रीत्यर्थ जनतेस स्वार्थत्याग करावयास लावून राज्यकर्ते त्या मर्यादेंत आपलें विशिष्ट धोरण आणून बसवतात. दुकानदारी करणाऱ्या सहकारी सस्थास जर्मनीमध्यें राष्ट्रीय सरकारनें निश्चित केलेल्या आर्थिक योजनेप्रमाणें पदार्थांचें उत्पादन व विक्री ह्या विषयींची व्यवस्था करावी लागत आहे, हें त्याच्या वृत्तपत्रांवरून दिसून येतें. जर्मनीसारख्या राष्ट्राच्या स्वयपूर्णतेच्या धोरणामुळें ग्रेटब्रिटन वगैरे राष्टाच्या व्यापारास निराळें वळण लागणें अपरिहार्य झालें असून आपापल्या जनतेच्या आर्थिक हिताचें योग्य रक्षण करण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली आहे आर्थिक व्यवहाराबाबत योजनात्मक धोरण आखण्याची आवश्यकता सर्व राष्ट्रास आज भासत आहे ह्याचें रहस्य वरील विवेचनावरून ध्यानात येईल शांततेच्या काळातलें अर्थशास्त्र व आर्थिक व्यवहार ह्यास सध्या जगांत जागा नाहीं, आणि ही परिस्थिति कांहीं वर्षें टिकल्यास अर्थशास्त्रास नवीन वळण लावावें लागेल असा रंग दिसत आहे.

## सुबक वेष्टनामुळें मालाचा उठाव कसा होतो ?

बाजारांत विकल्या जाणाऱ्या साबण, सिगारेट्स, इत्यादि जिनसा सुबक व सोइस्कर वेष्टनांतून विकण्यांत येतात, ह्याची सर्वांस माहिती आहेच. ह्या वेष्टनाचें मुख्य कार्य आंतील वस्तूचें संरक्षण करणें, हें असतें. ती वस्तु विकली जाण्यास सहाय होणें हें त्याचें दुय्यम काम समजलें पाहिजे. एकाच दर्जाच्या व किंमतीच्या दोन जिनसांपैकीं सोइस्कर व मोहक पॅकिंगमधील जिन्नस ज्यास्त लवकर खपतो. चिवड्याचा पुडा हें सोयवार पॅकिंगचें उदाहरण चटकन् पटण्यासारखें आहे. देशी मालास परदेशी मालाशी टक्कर द्यावी लागते, ती यशस्वी होण्यास पॅकिंगकडे विशेष लक्ष पुरवणें अगत्याचें आहे. कित्येक कारखानदारास ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य केल्यामुळें ठोकर बसलेली आहे.

वेष्टनावर जाहिरातीचा मजकूर प्रसिद्ध करणें फारच सोईचें असतें. त्याबाबत वेगळा खर्च पडत नाहीं. सहज उपलब्ध होणाऱ्या जागेचा उपयोग करून घेण्याचाच केवळ हा प्रश्न आहे. वर्तमानपत्रांतील जाहिरात वाचकाचे नजरेस येते, त्यावेळीं जिनसा खरेदी करण्याच्या तंद्रींत वाचक असेलच असें नाहीं. तथापि, दुकानामधील गिऱ्हाइक खरेदीसाठीच बाहेर पडलेलें असतें आणि पॅकिंग व वस्तु ह्यांच्या सान्निध्याचा त्याचे मनावर तात्काळ परिणाम होतो. ह्या पॅकिंगवरील चित्रांची व अक्षरांची रचना त्या विषयातील तज्ञाकडून करून घेणेंच अखेर फायद्याचें ठरतें. कारण, पॅकिंगवर होणाऱ्या खर्चांत बचत कशी करतां येईल आणि पॅकिंगमुळें खप कसा वाढवता येईल, ह्याची त्यास माहिती असते दुकानांत वस्तू मांडून ठेवतात, त्यावेळीं गिऱ्हाइकाचे नजरेस कोणती बाजू पडेल, ह्याचा विचार करूनच पॅकिंगची योजना केली पाहिजे केवळ एकाच बाजूनें पॅकिंग सुबक असून भागणार नाहीं सारांश, ह्या प्रश्नाचा पूर्ण विचार व अभ्यास केला पाहिजे. कपाटात मांडून ठेवलेल्या पॅकबंद जिनसा लांबूनच गिऱ्हाइकाचे दृष्टीस पडतात, तेव्हा एका फुटावरून सुबक दिसणारें पॅकिंग लोकांचें लक्ष वेधण्यास उपयोगी पडणार नाहीं; लांबूनहि तें आकर्षक वाटलें पाहिजे.

पॅकिंगवर मालाचें व कारखानदाराचें नांव, रंग, गुण व स्वाद, आकार व वजन, किंमत, ह्या गोष्टी जरूर द्याव्यात जिन्नस वापरण्याची माहितीहि छापण्यास हरकत नाहीं, परतु ती खाली अगर पाठीवर असावी, म्हणजे पॅकिंगचा उठाव कमी न होता गिऱ्हाइकाचें समाधान होतें. "स्थापना सन १९०५", "खास आमच्या देखरेखेखालीं बनविलेलें", "हजारो प्रशस्ति पत्रकें मिळालेलें" इत्यादि वाक्यांनीं जागा भरून काढल्यास विशेष फायदा न होतां लहान टाइपानें मजकुराची खिचडी मात्र होते.

मालास वेष्टनावरील चित्रांनीं शोभा आणण्याचा प्रघात बराच रूढ आहे. धोतरजोड्यांवरहि रंगीत चित्रें चिटकविलेलीं दिसून येतात आंतील मालाचे गुण बाहेर उठून दिसावेत, ह्या हेतूनें कित्येक वेष्टनाची रचना केलेली असते लेबलांवरील चित्रांचा गिऱ्हाइकावर होणारा परिणाम मालाच्या प्रतीवर व गिऱ्हाइकांच्या मनोवृत्तीवर व शैक्षणिक दर्जावर अवलंबून राहील, हें उघड आहे. सुबक व रेखीव पॅकिंगमुळें मालाचा उठाव होण्यास सहाय होतेंच. त्याबरोबरच, दुकानात व घरांमध्यें आनंदाचें व प्रसन्न वातावरण निर्माण होईल आणि त्यामुळें समाजाची सेवाहि घडेल, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## घरगुती नोकरांचा प्रश्न

### पाश्चात्य देशांतील उच्च रहाणीचा दाखला

लोकांत दारिद्र्य व बेकारी पसरलीं असताहि घरगुती काम करणारे स्वयंपाकी, वाढपे, मोलकरणी व इतर नोकर मिळणें कठिण पडतें, ह्याचा अनुभव हिंदुस्थानाप्रमाणें इतर देशांतहि येत आहे. ह्या संबंधांत जरूर ती चौकशी करून अहवाल सादर करण्याकरतां वाय. डब्ल्यू. सी. ए. नें एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें ग्रेटब्रिटन, अमेरिका जर्मनी, रशिया, इत्यादि देशांतील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें व त्याचें सार म्हणून घरगुती नोकराच्या कामाबाबत एक नमुन्याचें करारपत्र तयार केलें. इतर ठिकाणीं काम करतांना नोकरास आपल्या दास्यत्वाची पदोपदीं जाणीव होत नाहीं, ती घरकामांत होते ही प्रस्तुत प्रश्नांतील अत्यंत महत्त्वाची तक्रार असून ती पूर्णपणें दूर होणें कठिण आहे, असें कमिटीस वाटतें. पाश्चात्य सुधारलेल्या देशांतील घरकाम करणाऱ्या नोकरांच्या अपेक्षा काय आहेत, ह्याची कल्पना कमिटीनें सुचविलेल्या करारपत्रकावरून येण्याजोगी आहे म्हणून, सदरहु पत्रकांतील प्रमुख अटींचा निर्देश येथें केला आहे:—

( १ ) कामाचे कमाल तास रोजीं १० अगर आठवड्यातून ६०.

( २ ) ह्या मर्यादेपुढें काम करावें लागल्यास वेळेच्या अगर पैशाच्या स्वरूपात जादा मोबदला.

( ३ ) दर आठवड्यास दोन संध्याकाळ अगर एक सबंध दिवस सुट्टी. एका वर्षाच्या नोकरीनंतर १४ दिवसांची पगारी रजा. पगार न दिल्यास रेल्वेभाडें

( ४ ) रात्रीचे कमीत कमी ९ तास असंड विश्रांति.

( ५ ) चालू दरानें पगार.

( ६ ) पुरेसें कसदार अन्न, निजण्याची स्वतंत्र सोय, स्नानगृहाचा उपयोग करण्याची मुभा व मित्र वगैरे आल्यास त्याचा आदरसत्कार करण्यास स्वातंत्र्य.

( ७ ) पगार आठवड्यानें अगर महिन्यानें मिळत असेल त्या प्रमाणें नोकरी सोडतांना आठवड्याची अगर महिन्याची नोटीस. ही अट उभयपक्षी बंधनकारक.

( ८ ) नोकरी सोडतांना किती दिवस व कोणत्या स्वरूपाचें काम केलें हें सांगणारें सर्टिफिकेट देण्याची मालकावर जबाबदारी.

( ९ ) आरोग्य व अपघात ह्याबाबत विम्याची तरतूद. ह्या संबंधांतील खर्चाची दोन बाजूंमध्यें निमेनिम वाटणी.

इतर व्यवसायांतील कामाचे बरोबरीच्या दर्जास घरगुती काम यावें, ह्या हेतूनें वरील सूचना करण्यात आल्या आहेत. पाश्चात्य देशांतील रहाणीचें मान किती उच्च दर्जाचें आहे आणि कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या नोकरांचीं परिस्थिति हिंदुस्थानातील उच्च व मध्यम वर्गातील लोकांपेक्षांहि किती चांगली असते, ह्याची कल्पना उपरिनिर्दिष्ट अटींवरून येईल व आर्थिक आणि सामाजिक प्रगतीस आपल्या देशांत अद्याप किती वाव आहे, हें स्पष्ट दिसून येईल.

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd. Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes.**"

# स्फुट विचार

## शेअर बाजारातील कारवायांची दंगल

शस्त्रास्त्राचा पुरवठा आणि विशेषत. वैमानिक दलाची सामुग्री वाढवण्यासाठी कित्येक कोटि रुपयांचा खर्च करण्यास ब्रिटिश सरकारनें इंग्लडमध्यें प्रारंभ केला आहे. ह्या मालाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सबंध असलेल्या सर्वच उद्योगधद्यास तेजी आली आहे. पोलाद व लोखड आणि त्यापासून तयार होणारा माल ह्याच्या किंमती चढल्या आहेत आणि मंडळयाच्या भागाचे भावहि वर गेले आहेत पोलादास तेजी आल्याकारणानें हिंदुस्थानात टाटा कपनीनें आपल्या किंमती चढवल्या आहेत आणि ह्याचा परिणाम कपनीस चागला नफा मिळण्यात होण्याची अपेक्षा असल्यानें तिच्या भागाच्या किंमतींहि चढल्या आहेत हा कार्यकारण सबध साहजिक आहे असें मानण्यास हरकत नसली तरी टाटा कपनीच्या भागाच्या किमतींत गेल्या आठवड्यात जो विलक्षण चढ झाला आहे तो स्वाभाविक आहे असें म्हणता येत नाहीं शेअर बाजारातील काहीं जुगारी वृत्तीच्या धदेवाल्यांच्या कारवाईची ही घटना असल्यानें त्यांच्या व्यवहाराचे दुष्परिणाम अनेकास भोगावे लागण्याची भीति आहे टाटा आयर्न अँड स्टील कपनीच्या डिफर्ड भागाच्या किंमती उच उड्या मारीत हवेंत गेल्या आहेत. ह्या भागाची दर्शनी किमत ३० रुपये आहे दोन महिन्यामागें त्याचा बाजारभाव ८२५-८५० रुपये होता. गेल्या आठवड्यात तो १११०, ११४५ व ११७५ ह्या क्रमानें वर उडत गेला. टाटा कपनीचे ऑर्डिनरी भागाची मूळ किमत ७५ रुपये आहे ती बाजारात चढत चढत १५० रुपयावर गेली होती दोन महिन्यामागें त्याचा भाव २०० च्या घरांत होता, तो गेल्या आठवड्यात २९३ वर गेला. इतर काहीं भागाच्या किमतींवरहि ह्या तेजीच्या परिणाम झाला आहे सरकारी कर्जरोखे, सोनें व चादी ह्या भानगडीपासून अर्थात अलिप्त आहेत रोखे बाजाराचे अध्यक्ष, मि. श्रॉफ, ह्यानीं वर वर्णिलेल्या कारवायाबाबत भयसूचना दिली आहे आणि दलाल लोकांस सावधगिरीनें व काळजीकाट्यानें आपले व्यवहार करण्यास निक्षून सागितलें आहे किफायतशीर रीतीनें पैसे गुतवू इच्छिणाऱ्या सामान्य जनतेनें असल्या प्रसगीं विशेष खबरदारी घेणें अगत्याचें आहे. धदेवाल्याचा खेळ होईल, पण आपलें भलतेंच नुकसान होईल हें लोकानीं लक्ष्यात ठेवावें.

---

## स्टॉक एक्स्चेंज कमिटीच्या कामास प्रारंभ

मुबई येथील रोखे बाजारातील व्यवहारपद्धतीची चौकशी करून तिच्या सुधारणेचे उपाय सुचविण्याकरितां मि. मॉरिसन ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली आहे ह्या कमिटीचे कामकाजास गेल्या आठवड्यात सुरवात झाली आणि त्याच सुमारास स्टॉक एक्सचेंजमधील "बैला"च्या म्हणजे विशिष्ट भावानें रोखे खरेदून ते चढीच्या भावानें विकू पहाणाऱ्या दलालाच्या कारवाईचें जणूं काय एक प्रात्यक्षिकच घडून आलें आहे टाटा स्टील कंपनीचे 'डिफर्ड' भाग सुमारें ११० रुपयानीं एकदम चढले व त्याचा परिणाम इतर भागावरहि झाला. युरोपांतील युद्धविषयक बातम्याचा फायदा घेऊन, "बैलां"नीं बाजारात धुमाकूळ घातला अशा तऱ्हेच्या सट्टेबाजीस आळा बसावा आणि बाजारातील व्यवहार पद्धतशीर रीतीनें सुनियंत्रित चालावे, ह्या हेतूनें जरूर तीं बंधनें सुचविण्याकरिता नेमण्यात आलेल्या चौकशी-कमिटीस प्रस्तुत सट्टेबाजीचें प्रकरण बोधप्रद होईल, ह्यात सशय नाहीं रोख्याचे अगर भागाचे किंमतींत कृत्रिम चढ-घट घडवून आणणाराच्या व्यवहारावर नियत्रण असणें जरूर आहे. स्टॉक एक्सचेंजच्या डायरेक्टरास ह्या बाबत सध्या विशेष अधिकार नाहींत, असें सागण्यात येतें चौकशी कमिटी ह्या सर्व प्रश्नाचा विचार करीलच.

---

## मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सच्या सूचना

स्टॉक एक्स्चेंज चौकशी कमिटीकडे मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सनें आपलें म्हणणें लिहून पाठवलें आहे, त्यात रोखे बाजाराच्या व्यवहारासंबधीं दोन-तीन उपयुक्त सूचना करण्यात आल्या आहेत. वायद्याच्या करारास चेंबरचा विरोध नाहीं, तथापि, कराराची पूर्तता मासिक असण्याचे ऐवजी ती करण्याचे दिवस महिन्यातून दोनदा असावेत अशा तिचा आग्रह आहे. खरेदीचा अगर विक्रीचा करार करण्याचा व सेटलमेंटचा अगर वळणाचा दिवस ह्यामध्यें जेवढें अंतर कमी असेल, तितका सट्टेबाजीस कमी वेळ मिळेल, हें उघड आहे त्यामुळें, पैसे गुतविण्याची खरी इच्छा असणाराच्या हिताचेंहि सरक्षण होईल रोख्याची व भागाची विक्री अगर खरेदी जमवून देणाऱ्या दलालांस किती कमिशन मिळावें, ह्या सबधीं सध्या काहींच नियम नाहींत, ते करण्यात यावेत, अशी चेंबरची दुसरी सूचना आहे. दलालांमध्यें कमिशनबाबत स्पर्धा लावून आपलें काम जवळ जवळ फुकट करवून घेणारे सट्टेबाज अनेक आढळतात ह्या कारणानें व्यवस्थित धदा करणाराचें नुकसान होतें आणि रोखेबाजारावरहि त्याचा अनिष्ट परिणाम होतो. दलालामधील ही स्पर्धा थाबवावी आणि त्याच्या कमिशनचे किमान दर ठरवून देण्यात यावे, असें चेंबरनें सुचविलें आहे. रोखेबाजारास असलेल्या सुट्ट्या कमी करण्यात याव्या, अशीहि चेंबरची सूचना आहे चौकशीकमिटीकडे इतर व्यापारी सस्थाचें म्हणणें लिहून पाठवलें जाईल, तें सर्व समजून घेऊन कमिटी आपल्या शिफारसी करील. ह्यासाठी तिनें एक प्रश्नमालिका तयार केली आहे आणि तिला उत्तर देणें माहितगारास व धदेवाल्यास सोयीचें होणार आहे.

---

## संरक्षक जकाती—स्वदेशी कांचेचा धदा

जकातींची पद्धति, प्रांतावरील कर, राष्ट्रीय उत्पन्न, रेलवेज व मोटारी ह्याची स्पर्धा आणि हुंडणावळीचे दर व व्यापार ह्याचा परस्पर-सबध हे विषय आग्रा येथें भरलेल्या अखिल भारतीय आर्थिक परिषदेपुढें चर्चेसाठी निवडण्यात आलेले होते खुल्या व्यापाराचें तत्व सर्वसामान्य रीतीनें मान्य होण्यासारखें असलें तरी जगाच्या सध्याच्या परिस्थितींत राष्ट्रीय उद्योगधद्याच्या सरक्षणासाठी जकाती बसवून व्यापाराचें नियत्रण करणें अपरिहार्य आहे, असें मत परिषदेंत व्यक्त करण्यात आलें हिंदी सरकार, टारिफ बोर्डानें संरक्षक जकातींची शिफारस केली असताहि आपल्या स्वतःच्याच कलाप्रमाणें तिची बोळवण करतें आणि ह्या रीतीनें कित्येक स्वदेशी धद्यास जरूर असलेलें सहाय मिळत नाहीं अशी तक्रार करण्यात आली. चौदा वर्षामागें फिस्कल कमिशननें औद्योगिक सरक्षणासंबधानें ज्या अटी नमूद केल्या आहेत, त्याचा विचार सरकार अत्यंत आकुंचित दृष्टीनें करीत असतें, हें अर्थशास्त्रदृष्ट्याहि समर्थनीय नाहीं. उदाहरणार्थ, एखादा प्राथमिक अवस्थेंतला धदा संरक्ष-

णाच्या सहायानें काहीं वर्षांत यशस्वी होण्यासारखा असल्यास त्यास लागणारा सर्व कच्चा माल हिंदुस्थानात विपुलतेनें उपलब्ध असला पाहिजे, ह्या फिस्कल कमिशनच्या शर्तीवर विशेष जोर देण्यात वास्तविक हशील नाहीं मालास देशात चांगली मागणी असून कालांतरानें तो स्वस्त विकला जाण्याची शक्यता दिसून आल्यास, त्याच्या उत्पादनास लागणारीं कच्चीं द्रव्यें अंशतः बाहेरून आणावीं लागलीं तरी हरकत वस्तुतः नसावी हिंदी कांचेच्या धंद्यास सरक्षण देण्यात आलें नाहीं, ह्याचें प्रमुख कारण, त्यास लागणारी सोडा-ॲश बाहेरून आणावी लागते, हें आहे असें सरकारनें सांगितलें परंतु इतर देशांत, कित्येक द्रव्यें पर ठिकाणाहून आणावीं लागलीं तरी दुसऱ्या बाबतींतली परिस्थिति अनुकूल असल्याकारणानें धंदे ऊर्जितावस्थेस येऊं शकतात, असा अनुभव आहे ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन टारिफ बोर्डानें स्वदेशी कांचेच्या धंद्यास सरक्षण द्यावें असें सुचवलें असता ती शिफारस हिंदुस्थानसरकारनें अमान्य केली, हें योग्य झालें नाहीं, असा अभिप्राय आर्थिक परिषदेंत व्यक्त करण्यात आला.

### शेतकऱ्याची मिळकत वाढली पाहिजे

हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळें आर्थिक मंदी दूर होऊन शेतकऱ्याची स्थिति सुधारण्यास त्याची कमाई वाढणें जरूर आहे शेतकऱ्याची मिळकत शेतीच्या मालाचें उत्पादन व त्याचे बाजारभाव ह्यावर सर्वस्वी अवलंबून आहे गेल्या सहा वर्षांत बाजारभाव इतके उतरले आहेत कीं, माल कितीहि पिकला तरी शेतकऱ्याच्या पदरात त्याच्या ससारास आवश्यक असलेला पैसा पडत नाहीं ब्रिटिश कारखानदारास आपला माल हिंदुस्थानात खपावा असें वाटतें आणि हिंदी शेतकऱ्याची कमाई घटल्यानें उत्पन्न झालेल्या त्याच्या मार्गातल्या अडचणीची त्यास जाणीव आहे ब्रिटिश सरकारचे ह्या देशातले व्यापारी प्रतिनिधी, सर टॉमस ॲन्स्कॉफ, ह्यानी आपल्या १९३५-३६ सालाविषयींच्या अहवालात ह्या गोष्टीवर विशेष जोर दिला आहे. त्या सालीं बाजारभावात किंचित चढ झाल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें आहे त्यांनीं दिलेल्या आकड्यावरून असें दिसतें कीं, हिंदुस्थानामधून बाहेर जाणाऱ्या मालाच्या किंमती थोड्या चढत आहेत आणि परदेशातून येणाऱ्या मालाचे भाव उतरत आहेत परदेशी माल स्वस्त होऊन हिंदी मालास येणारा भाव चढणें ही दुहेरी गोष्ट प्रगतीची निदर्शक आहे असें त्याचें म्हणणें आहे बाजारभावाचे कलकत्त्याचे आकडे घेतले तर असें दिसून येतें कीं, १९१४ सालच्या किंमती १०० होत्या असें कल्पिल्यास त्याच्या मानानें १९३५ मार्चमधला एकूण बाजारभावाचा सरासरीचा आकडा ८७ होता, तो १९३६ मार्चमध्यें ९१ झाला म्हणजे, थोड्या प्रमाणात का होईना, बाजारभावात चढण्याची प्रवृत्ति दिसून आली हिंदुस्थानात येणाऱ्या व येथून बाहेर जाणाऱ्या मालाच्या किंमतींचा उल्लेख वर केला आहे त्याचे बाबतींतील तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत —

जुलै १९१४ चे भाव = १००

| | बाहेर जाणारा माल | आत येणारा माल |
|---|---|---|
| १९२९ (सप्टेंबर) | १३३ | १५० |
| १९३१ (डिसेंबर) | ८३ | १२४ |
| १९३२ ” | ६९ | ११५ |
| १९३३ ” | ७३ | ११२ |
| १९३४ ” | ७६ | १०९ |
| १९३५ (मार्च) | ७५ | १०८ |
| १९३६ ” | ८२ | १०५ |

### श्री वैकुंठराय मेथा ह्यांचा अभिप्राय

टाइम्स ऑफ इंडियाच्या प्रतिनिधीस दिलेल्या मुलाखतींत, प्रांतिक सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वैकुंठराय मेथा, ह्यानीं रिझर्व्ह बँकेनें शेतीच्या धंद्यास भांडवल पुरविण्याच्या व्यवस्थेबाबत रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे, त्यावर आपला प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केला आहे ‘शेतकऱ्यास पैसा कर्जाऊ देऊन तो वेळीं वसूल करण्याचें काम किती अवघड आहे आणि प्रचलित मंदीच्या अडचणीच्या परिस्थितींतहि सहकारी बँका तें कसें करीत आहेत, ह्याची योग्य जाणीव रिझर्व्ह बँकेस नाहीं तिनें केलेल्या सूचना सध्याहि अमलात आहेत परंतु हिंदी शेतकऱ्याची आर्थिक स्थितीच इतकी हलाखीची आहे कीं, ती सुधारण्यासाठी हेतुपुरःस्सर उपाय योजल्यावाचून प्रगति होणें अशक्य आहे. प्रांतिक सरकार व सहकारी सस्था ह्याचेवर सर्व जबाबदारी टाकून रिझर्व्ह बँक मोकळी झाली आहे आणि स्वतःच्या अंगावर कोणतेंच विधायक कार्य तिनें घेतलेलें नाहीं शेती व कारखानी धंदे ह्यामध्यें मूलग्राही फरक आहे, तो लक्षात घेऊनच रिझर्व्ह बँक व सरकार ह्यानीं शेतकरीवर्गाच्या हितार्थ खास योजना आखून त्यांची अमलबजावणी केली पाहिजे.’ वरील आशयाचें मत श्री वैकुंठराय ह्यानीं व्यक्त केलें आहे, तें आम्हीं “अर्थात” प्रकट केलेल्या प्रस्तुत विषयावरील विचारास सर्वस्वी धरून आहे हें चाणाक्ष वाचकाच्या ध्यानात सहज येण्यासारखें आहे

### झारापकर टेलरिंग कॉलेज, पुणें

वरील सस्थेस प्रो काळे ह्यानीं गेल्या आठवड्यांत भेट देऊन तेथील शिक्षणाचें काम पाहिलें व विद्यार्थ्यांस उपदेशाचे चार शब्द सांगितले प्रचलित शिक्षणक्रमास व्यावहारिक वळण देण्याविषयींची चर्चा चोहोंकडे चालली असता झारापकरबधूंनीं आपल्या सस्थेच्याद्वारें हा प्रश्न सोडवण्यास प्रत्यक्ष सहाय्य केलें असल्याबद्दल प्रो. काळे ह्यानीं समाधान व्यक्त केलें आणि विद्यार्थ्यानीं नवीन धंद्याचा मार्ग स्वीकारण्याचें औचित्य व धैर्य दाखविलें आहे त्याबद्दल त्याचें अभिनदन केलें हस्तकौशल्याबरोबर पद्धतशीरपणा व वक्तशीरपणा हे गुण ह्या धंद्यात पडूं इच्छिणाऱ्या तरुणानीं आपल्या अंगीं आणले पाहिजेत आणि गिऱ्हाइकाची मर्जी सपादन करण्याचा यत्न करून केला पाहिजे असें त्यानीं सांगितलें काळाच्या ओघावरोबर शिवण कामाच्या धंद्याचें महत्त्व वाढत आहे आणि लोकांच्या बदलणाऱ्या अभिरुचीस अनुसरून हिंदी धंदेवाल्यानीं वागणें जरूर आहे असें म्हणून झारापकर बधूंनीं चालविलेल्या संस्थेचा व्यवस्थित व पूर्ण फायदा विद्यार्थ्यांनीं घ्यावा असा उपदेश वक्त्यानीं केला व सस्थेस सुयश चिंतिलें.

### डेक्कन टॉकीजचें उद्घाटन

फर्ग्युसन कॉलेज रोडवर मान्याच्या जागीं श्री घारे ह्यांनीं सोइस्कर असें सिनेमागृह बाधलें असून श्री. बाळासाहेब पेंडसे ह्यानीं त्यात बोलपट दाखवण्याचें काम आपल्या अंगावर घेतलें आहे ह्या डेक्कन टॉकीजचा उद्घाटन समारंभ श्री. तात्यासाहेब केळकर ह्याच्या हस्तें गेल्या शनिवारीं झाला लकडीपुलाच्या उत्तरभागात अलीकडे विस्तृत वसाहत झाली असून त्या बाजूस अनेक शिक्षण व व्यायाम सस्था आहेत ह्या बाजूस रहाणाऱ्या लोकास नवीन सिनेमागृह विशेष सोयीचें वाटेल ह्यात शंका नाहीं. पुण्यामध्यें आता अनेक टॉकीज प्रस्थापित झाल्या आहेत आणि स्थानवैशिष्ट्य व दाखविले जाणारे बोलपट ह्यांचें वैशिष्ट्य याचे योगानेंच त्याचेकडे प्रेक्षक आकर्षले जाणार हें उघड आहे

## तंबाखू

तबाखूची सवय मूळ अमेरिकेंतून युरोपांत गेली तेव्हा धूम्रपान हा गुन्हा समजण्यात येत असे व त्यास कडक शासन करण्यात येई हळु हळु ही समजूत दूर होऊन तंबाखूच्या सवयीचा चोहोंकडे प्रसार झाला तरीहि इतर निषिद्ध पदार्थांप्रमाणें तंबाखूवर भारी कर बसवण्यांत येई चैनीची वस्तु म्हणून ती आज कराचा विषय बनली आहे अठराव्या शतकात चिलीम, (पाइप) एकोणिसाव्यात चुट्टा ( सिगार ) व विसाव्यात विड्या ( सिगारेट ) अशा क्रमानें तबाखूच्या शोकाची उत्क्रांति देशात झालेली आढळते. तथापि, हॉलंड व ग्रेटब्रिटन ह्या देशामध्यें चिलमीचें स्थान सिगार-सिगारेट्सनीं पूर्णत्वानें हिरावून घेतलेलें नाहीं उष्ण प्रदेश तंबाखूच्या उत्पत्तीस विशेष अनुकूल असले तरी कित्येक शीत प्रदेशातहि तिच्या लागवडीचा शिरकाव झालेला आहे आधुनिक शास्त्रीय शोध व सुधारणा ह्याचा उपयोग ह्या कामीं करण्यात आला आहे रोपें लावण्यापासून ते तंबाखू बाजारात येईपर्यंत ज्या अनेक कृती कराव्या लागतात त्या निरनिराळया देशात थोड्या भिन्न आहेत

* * *

सिगार व सिगारेट बनवण्याचीं यत्रें लहान-मोठ्या कारखान्यात प्रस्थापित होऊन हा धदा अलीकडे फार मोठ्या प्रमाणावर चालत आहे ह्या कारखान्यातली बहुतेक सर्व क्रिया यंत्रें करतात व त्यात मनुष्याचा हात लागण्याचा प्रसग फारच थोडा येतो दर तासास अर्धा लक्ष सिगरेट बनवणारीं यत्रें वापरण्यात येतात व त्यामध्यें रोजी पाच लक्ष सिगरेटस् तयार होतात ह्या राक्षसी कारखान्यात प्रचड प्रमाणावर उत्पादन होऊ लागल्यामुळें जर्मनींत लहान-सहान धदेवाल्याची तारांबळ उडाली, आणि शेवटीं ह्या सर्वाचें एकीकरण होऊन अनिष्ट स्पर्धेस आळा घालण्यात आला इतर देशामध्यें ह्या धद्याचें सघीकरण ( कार्टेल ) होणें अपरिहार्य झालें असून, तें आतरराष्ट्रीय स्वरूपाचेंहि बनलें आहे

* * *

महायुद्धानतरच्या काळात तंबाखूचें जागतिक उत्पादन झपाटून वाढलें असून तिच्या लागवडीचें क्षेत्र दुप्पट झालें आहे. गेल्या वीस वर्षांत तबाखूचें सबध जगातलें पीक दहा लक्ष टनापासून वीस लक्ष टनाच्यावर चढलें आहे हिंदुस्थानात सहा लक्ष, अमेरिकेंत पांच लक्ष, पूर्व एशियात पाच लक्ष, ब्राझीलमध्यें एक लक्ष टन ह्याप्रमाणें उत्पादनाची वर्गवारी असून ग्रीस, तुर्कस्थान बल्गेरिया ह्या देशाचाहि जागतिक उत्पादनात त्याच्या आकाराच्या मानानें चागला हिस्सा आहे जगातील तबाखूच्या व्यापाराची उलाढाल सात वर्षांमागें सहा लक्ष टनाच्यावर होत होती, ती आर्थिक मदीमुळें पाच लक्ष टनावर उतरली आहे ह्या व्यापाराची किंमतहि त्याच अवधींत दीडशें कोटि रुपयावरून पन्नास कोटींपर्यंत घसरली आहे गेल्या दोन वर्षांत हा व्यापार पुन्हा वर डोकें काढूं लागला आहे व त्यात थोडीशी वाढ झालेली दृष्टोत्पत्तीस येत आहे तंबाखूच्या आयातींत ग्रेटब्रिटनचा नंबर पहिला असून तिचा आकार एक लक्ष टन इतका आहे. त्याच्या खालोखाल जर्मनीची आयात ऐंशी-नव्वद हजार टन आहे. स्पेन व हॉलंड ह्याची आयात जर्मनीच्या निम्म्यानें आहे तंबाखूची निर्गत करण्यांत अमेरिकेचा नंबर पहिला असून तिचें वजन पावणेदोन लक्ष टनाच्यावर आहे ग्रीसमधून अर्धा लाख टन, क्यूबामधून तीस हजार, बल्गेरियातून पचवीस हजार व ब्राझीलमधून बावीस हजार टन तंबाखु परदेशात जाते

हिंदी तबाखूची निर्गत

| युद्धापूर्वीची सरासरी | | १९३५-३६ | |
|---|---|---|---|
| वजन | किंमत | वजन | किंमत |
| २१½ कोटि पौंड | ३७ लक्ष रु | ३ कोटि पौंड | ९२ लक्ष रु. |

* * *

तबाखूच्या उत्पादनाचे बाबतींत जगातील राष्ट्रामध्यें हिंदुस्थानचा दुसरा नंबर लागतो. हिंदी तबाखूची निर्गत साली ना सरासरीनें दोन ते तीन कोटि पौंड होते, आणि त्यापैकीं सुमारें निम्मा माल ग्रेटब्रिटनमध्यें जातो. ब्रिटिश साम्राज्यातील देशापैकी कॅनडाची इग्लडला होणारी निर्गत पाउण ते एक कोटि पौंड दर वर्षी भरते दक्षिण ऱ्होडेशियाच्या तबाखूस इग्लंडमध्यें चागली मागणी असते, आणि तिच्या ब्रिटनमधील आयातीच्या वजनाचा आकडा एक कोटि पौंडाच्या आसपास असतो ऑस्ट्रेलियातून ही निर्गत होत नाहीं. ब्रिटिश साम्राज्यात होणारी तबाखू बहुतेक चिलमींत वापरण्यासाठी किंवा खाण्यासाठी उपयोगांत येते ह्या प्रीत्यर्थ इग्लडमध्यें लागणाऱ्या तबाखूपैकीं ऐंशी टक्के माल साम्राज्यातला असतो परतु सिगारेटसाठी वापरण्यात येणारी सर्व तबाखू साम्राज्याबाहेरील देशामधून इग्लडमध्यें जाते सिगारेट्समध्यें विशिष्ट स्वाद देणारीच तबाखू लागते, चिलमींमध्यें निरनिराळया प्रकारच्या तबाखूचा धूर निघालेला खपतो. इग्लडमध्यें कित्येक लहान कारखानदार सिगारेटसमध्यें ब्रिटिश साम्राज्यातर्गत देशात होणारी तबाखू वापरतात आणि ती कोणच्या देशांतून आली ह्याविषयीं वाच्यता झाली नाहीं म्हणजे हा माल गिऱ्हाइकें निमूटपणें घेतात व चोखदळपणा करीत नाहींत


डेक्कन टॉकीज
पुणे ४ ) ( टे नं ५१३
विचित्र विवाह
SMALL TOWN GIRL
M G M PICTURE
नटीः—जेनेट गेनर नट—रॉबर्ट टेलर
बुधवार ते शुक्रवार ता. १३ ते १५ जाने. पर्यंत
खेळाच्या वेळाः—३-३०, ६-१५, १० वाजतां



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

## पश्चिम खानदेश जिल्हा सहकारीवृत्त

माहे नोव्हेंबर व डिसेंबर १९३६ मध्यें सोसायट्यांचे सेक्रेटरी-करिता धुळें तालुक्यांत ३ व सिंदखेड तालुक्यांत ३ एकूण ६ रिफ्रेशर वर्ग भरविण्यांत आले. सदर वर्गांचा ५० सोसायट्यांचे ३० सेक्रेटरींनीं फायदा घेतला. सदर वर्गांस व्याख्यान देण्याचे कामीं ऑडिटर्स, सुपरवायझर्स व बँक इन्स्पेक्टर्स ह्यांनीं मदत केली. चालू वर्षाचा वसूल, नवीन कर्जवाटणी व सवलतीचें धोरण, कमाल मर्यादा पत्रक व जिंदगी पत्रक, लवाद, सेक्रेटरींचीं कर्तव्यें, कायदे-कानू, पोटनियम व सर्क्युलर्स व इन्स्टिट्यूट ह्या विषयांवर सेक्रेटरींना माहिती देण्यात आली. नंदुरबार येथें ता.|१३।१२।३६ रोजीं त्या जिल्ह्यांतील फिल्डवर्कर्सची सभा ह्या विभागाचे असि. रजिस्ट्रार श्री. के. जी. प्रभू एम. ए जी डी. ए. ह्यांचे अध्यक्षतेखालीं झाली.

---

## गोखले इन्स्टिट्यूटचा स्थापना–दिन

---

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इकॉनॉमिक्स ह्या संस्थेच्या स्थापनादिनाच्या निमित्तानें रविवार, ता. १७ रोजीं, सायंकाळीं ६ वाजतां गोखले हॉलमध्यें प्रो वा. गो. काळे ह्यांचें इंग्रजींत व्याख्यान होणार आहे. व्याख्यानाचा विषय ' New Trends in Economic Policy and Thought ' हा आहे

## ब्रिटिश सहकारी चळवळीची धडाडीची प्रगति

ग्रेट ब्रिटनमधील सहकारी सस्था, संसारांत लागणाऱ्या मालाचा आपल्या सभासदांस पुरवठा करणें आणि शक्य तेथें तो माल स्वत.च्या कारखान्यांत बनवणें, ह्या उद्देशानेंच बहुतेक चालवल्या जातात. शेतकऱ्यांस कर्ज देणें व त्यांच्या मालाची विक्री करणें ह्या बाबींस त्या देशांत महत्त्व नाहीं, ह्याचें कारण ब्रिटिश राष्ट्राची मोठ्या प्रमाणावर झालेली औद्योगिक प्रगति हें होय १९३५ सालीं ब्रिटिश सहकारी सस्थांनीं आपल्या सभासदास सुमारें २९५ कोटि रुपयांचा माल विकला आणि २६ कोटि रुपये खरेदीवरील डिव्हिडंड म्हणून त्यामध्यें वांटले. भागांच्या भांडवलांत गेल्या वर्षी २६ कोटि रुपयांची वाढ झाली. सहकारी संस्थांचें एकूण भांडवल सुमारें १६० कोटि रुपये आहे व त्याच्या कारखान्यांचा विस्तार झपाट्यानें होत आहे.

---

## येलूर को. सुपरवायझिंग यूनियनचा रिफ्रेशर क्लास

वरील क्लास येलूर येथें ता. ६–१–३७ पासून सुरू झाला असून तो एक आठवडा चालणार आहे. त्यामध्यें यूनियनक्षेत्रांतील सामील सोसायट्यांचे व बाहेरील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. श्री. एन. डी. कुलकर्णी, सुपरवायझर, ह्यांचे देखरेखीखाली सदरहु क्लासमध्यें कायद्याची, दप्तराची व सहकारी कार्यास उपयुक्त अशी माहिती देण्यात येते क्लासचे शेवटीं परीक्षा होणार आहे.

---

## मुंबई इलाख्यांतील जमीन–गहाणाच्या बँका

मुंबई इलाख्यांत जिल्हानिहाय स्थापन झालेल्या दहा प्राथमिक जमीनगहाणाच्या बँकांची ३० सप्टेंबर १९३६ अखेरची प्रगति खालीं दिलेल्या कोष्टकावरून लक्षांत येईल. ह्या बँकांचे पहिले सर्व डायरेक्टर पहिल्या तीन वर्षांकरितां सहकारी रजिस्ट्रारनीं नेमलेले आहेत. कर्जाची कमाल मर्यादा १० हजार रुपये असून विशिष्ट परिस्थितींत रजिस्ट्रारच्या परवानगीनें २५ हजारांपर्यंतहि कर्ज देतां येतें. कर्जफेडीची कमाल मुदत २० वर्षे ठरविलेली आहे. जुन्या जमीन गहाणाच्या बँकांपैकीं भडोच व पाचोरा बँकांनीं नवे बायलॉज स्वीकारून स्वतःस प्रांतिक बँकेस जोडून घेतलेलें आहे. धारवाड बँकेनें अद्याप आपले नियम बदललेले नाहींत

### प्राथमिक जमीनगहाणाच्या बँकांचें कार्य

| नांव | भाग, भांडवल व रिझर्व्ह फंड | कर्जाचे अर्ज आले | | शिफारस केलेले कर्जाचे अर्ज | | कर्जें दिलीं | | सूट मिळवून दिलीं |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (रु.) | संख्या | रकम (रु.) | संख्या | रकम (रु.) | संख्या | रकम (रु.) | रु. |
| सुरत | २६,६४१ | १६१ | ३,५३,२५० | ३८ | ७१,६३५ | ११ | २२,७६५ | ३,००० |
| नाडियाद (खेडा) | ६,०८१ | १६८ | ४,३७,०३८ | १२ | २४,४२८ | — | — | — |
| धुळें (प. खा.) | १५,८८६ | १८१ | ३,५३,४२० | ९० | १,५३,४०० | २८ | ४२,२०० | १२,७२१ |
| जळगांव (पू. खा.) | २३,०४९ | ३९७ | ५,४६,९०० | ३४ | ४८,५५० | २० | ३१,८१० | ८,३८९ |
| पुणें | ११,०१५ | २०३ | ३,४६,८२५ | ८६ | १,१०,३७५ | २७ | ३९,६०४ | ६,७२३ |
| कऱ्हाड (सातारा) | २८,५४१ | २२१ | ३,८७,९३० | ५६ | ७३,३२१ | १२ | ९,८५० | २,१०० |
| नाशिक | ८,३११ | ११७ | २,१२,१८५ | २० | ४५,३२४ | ३ | ३,४५० | ५३६ |
| बेळगांव | १४,००० | ३०१ | ७,७२,६६४ | ४२ | ८८,५१५ | १३ | २६,३९० | ३,२४२ |
| हुबळी (धारवाड) | ८,४०२ | १६२ | २,४६,६९५ | ५९ | ९७,०५० | ३४ | ३६,१४२ | १३,७४० |
| कारवार (उ. कानडा) | ९,७७५ | ५३ | १,२८,६८० | २२ | ६२,५८० | ७ | १३,६०० | ६३३ |
| एकूण | १,५१,७०१ | १,९५४ | ३७,८५,५८७ | ४६९ | ७,७५,१७८ | १५५ | २,२५,७७१ | ५१,०८४ |

## अल्पायुषी हिंदी जनता

शहरापेक्षा खेडेगांवातली रहाणी अधिक आयुर्वर्धक असते, ही कल्पना, हिंदुस्थानातल्या जननमरणाच्या प्रसिद्ध झालेल्या आकड्यावरून खोटी ठरू पहात आहे नैसर्गिक परिस्थिति अनुकूल असताहि खेडेगावीं जनतेची आयुर्मर्यादा शहराच्या मानानें जास्त असू नये हें हिंदी सामान्य जनतेच्या असमाधानकारक रहाणीचें, अज्ञानाचें व दारिद्र्याचें लक्षण आहे खेडेगावात मृत्यूचें प्रमाण दर हजारीं २४ आहे व शहरात तें २४½ पेक्षा थोडें कमी आहे आधुनिक पद्धतीच्या रहाणीचा देशात प्रसार होत असला तरी त्याचे योगानें जननाचें प्रमाण कमी झालेलें नसून तें दर हजारी ३४ ते ३७ असें आहे आरोग्याच्या सुधारणेचे उपाय अमलात येत असल्यानें मृत्युसख्येस मात्र आळा बसला आहे आणि मृत्यूचें प्रमाण गेल्या पचवीस वर्षात दर हजारीं दहानें उतरलें आहे. त्याचा आकडा दर हजारास २२ ते २५ असा आहे १९३४ सालातले मनुष्यगणतीचे आकडे पाहिले तर असें दिसून येतें कीं, पाच वर्षांच्या खालचीं मुलें ४ कोटि असता पधरा ते वीसच्या वयाचीं माणसें अडीच कोटि आणि ५० ते ६० ह्या वर्षाच्या वयाचीं अवघीं दीड कोटि माणसें होतीं. म्हणजे, एकदरीनें विचार करता हिंदी जनतेची आयुर्मर्यादा अल्प आहे आणि तिच्यावर वाढत्या वयात मृत्यूचा जोराचा घाला येतो जनता अल्पवयी होण्याचें कारण अज्ञान व दारिद्र्य हेंच आहे मुलें जन्मास येऊन त्याचीं कर्तीसवर्ती आणि सुखी प्रजा बनू नये ही गोष्ट अत्यत शोचनीय आहे. समाजात व्यथा व दु.ख ह्यास लोक बळी पडत आहेत शहरातली रहाणी प्रकृतीस व सुखासधानास अपायकारक आणि खेडेगावामध्यें निसर्गाच्या सान्निध्यात लोक निरोगी व सुखी ही समजूत चुकीची ठरत असल्यानें खेडेगावाच्या सुधारणेचें व उन्नतीचें महत्व सर्वांस पटलेंच पाहिजे जेथें आरोग्याची व दीर्घायुष्याची अपेक्षा करावयाची तेथेंच रोगानीं ठाणें दिलें तर राष्ट्राची अवस्था पुढें काय होणार हा चिंताजनक विचार मनात आल्यावाचून रहात नाहीं सुधारणेचा चळवळीचा मोर्चा सध्या खेडेगावाकडे वळत आहे, हें त्यातल्या त्यात समाधानकारक आहे

---

### ब्रिटिश हिंदुस्थानातील जन्म-मृत्यूचे आकडे
### (इ स १९३४)

हिंदुस्थान सरकारच्या पब्लिक हेल्थ कमिशनरनें प्रसिद्ध केलेल्या ताज्या (१९३४ च्या) अहवालावरून त्या सालातील जन्म-मृत्यूचे आकडे समजून येतात त्या वर्षाच्या मध्याचे सुमारास ब्रिटिश हिंदुस्थानाची लोकसख्या २७½ कोटि, म्हणजे दर चौरस मैलास ३१०, अशी होती अहवालाचे सालीं ९२½ लक्ष जन्म व ६७½ लक्ष मृत्यू घडून आले, म्हणजे त्याचें दर हजारी प्रमाण अनुक्रमें ३४ व २५ असें पडलें मुलें होण्याजोग्या म्हणजे १५ ते ४० वयाच्या दर हजार स्त्रियात १६७ असें जननाचें प्रमाण आढळलें. पंजाबात हें प्रमाण सर्वात अधिक म्हणजे २१५ तर ब्रह्मदेशात सर्वांत कमी म्हणजे १४४ होतें मुंबई इलाख्याबाबतचा तत्सम आकडा १७२ होता. दर हजारी एकूण जननापैकी १७५ मुलगे व १६१ मुली, असें प्रमाण होतें म्हणजे १०० मुली जन्मास आल्या तर १०८ मुलगे जन्मले, असा हिशेब निघतो.

---


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

**हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा—

स्वदेशप्रेमी लोकानीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्याचें कर्तव्य आहे जनतेची सेवा करणे हेच आमचे ध्येय आहे वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**एशियन पॉलिसी**

म्हणजेच

**आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.**

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

**धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड**

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

व्यापारी-उद्मी लोकांस

**—अपूर्व संधि—**

पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

## आगगाड्या व मोटारी ह्यांच्या वहातुकीमधील एकसूत्रीपणा

### हैदराबाद संस्थानांतील प्रयोग

निजाम स्टेट रेल्वे ही हैदराबाद सस्थानाच्या मालकीची असून तिच्यामध्यें गुंतलेल्या १४ कोटि रुपये भाडवलापासून सरकारी तिजोरीस दरसाल एका कोटीपेक्षा ज्यास्त फायदा मिळतो ह्या किफायतदार व्यवसायास भाडेकरी मोटारगाड्याच्या स्पर्धेची झळ लागू नये, ह्या हेतूनें १९३२ साली रेल्वेनें आपल्या स्वतःच्या लॉऱ्या ठेवण्यास सुरवात केली व काहीं विशिष्ट रस्त्यावरील वहातूक करण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार रेल्वेस मिळाला निजामच्या राज्यात मोटार लॉऱ्याचा प्रसार किती झपाट्यानें झाला आहे आणि वरील प्रयोग किती यशस्वी झाला आहे हें खालील कोष्टकावरून लक्षात येईल.—

| | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३५-३६ |
|---|---|---|---|---|
| रस्त्याची लाबी (मैल) | २८३ | ५९४ | १,२३२ | १,३५४ |
| गुतलेलें भाडवल (रु) | ४ लक्ष | ७½ लक्ष | १५½ लक्ष | २२½ लक्ष |
| उतारुच्या वहातुकीसाठी लॉऱ्या | २७ | ४८ | ८६ | ११८ |
| वाहिलेले उतारू | १४¾ लक्ष | २४ लक्ष | ५२ लक्ष | ७० लक्ष |
| एकूण उत्पन्न रु | २¾ लक्ष | ५¾ लक्ष | ९¾ लक्ष | १२⅓ लक्ष |
| एकूण खर्च (घसाऱ्या सुद्धा) (रु) | २½ लक्ष | ५ लक्ष | ८½ लक्ष | ११ लक्ष |
| निवळ नफा (रु) | ३६ हजार | ७५ हजार | १,५६हजार | २,४१हजार |
| भाडवलावर पडणारें व्याज | ८½% | १०% | १०% | १०¾% |

चालू वर्षअखेर लॉऱ्याची सख्या २३५ पर्यंत वाढणार असून, त्याच्या वहातुकीखालील रस्त्याची लाबी ३,८२४ मैल होणार आहे दर माणशीं दर मैली उस्मानिया शिक्क्याच्या सहा पै भाडें आकारण्यात येतें म्हणजे, हें भाडें ब्रिटिश नाण्यात पाच पै पडतें रेल्वेनें मोटारवहातूक स्वतःकडे घेण्यापूर्वी ह्यापेक्षा पाऊणपट स्वस्त भाड्यात लोक जाऊ शकत असत, तथापि धदा व्यवस्थित चालण्यास हें भाडें अपुरें पडत असलें पाहिजे, असें दिसतें. विमानाची वहातुकहि स्वतःकडे घेऊन सस्थानातील सर्व वहातुकीचें नियत्रण करण्याचा सरकारी रेल्वेखात्याचा विचार आहे

( उस्मानिया युनिव्हर्सिटीचे प्रो रहमान ह्यानीं हिंदी आर्थिक परिषदेपुढें वाचलेल्या निबधावरून )


दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, पुणें.

अध्यक्ष आर एन अभ्यंकर, बी ए, एलएल बी, मॅनेजिंग एजट, कॉमनवेल्थ, पुणें

अधिकृत भांडवल: रु १०,००,००० दहा लाख

तूर्त विक्रीकरतां काढलेलें भांडवल रु. ५,००,००० पांच लाख

प्रत्येकी रुपये १०० प्रमाणे ५,००० शेअर्स

अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु १५ अर्जमजुरीनतर रु १० बाकीच्या रकमेची तूर्त मागणी केली जाणार नाहीं

विशेष माहितीकरतां ऑफिसकडे लिहा

पत्ता—१० बुधवार पेठ, विश्रामबाग रोड, पुणें

नि ना. क्षीरसागर, चि त्रिं चितळे } मॅनेजिंग डायरेक्टर्स

"व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे

ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ०८ आणे. नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं

कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, ७५३ सदाशिव पेठ, पुणें.

स्टॉकिस्ट.—तावे आरोग्य भुवन, मुबई, श्री लक्ष्मी ट्रेडिंग कपनी, सागली, बेळगांव, कोल्हापूर

स्थापना १९२०



प्रथम मुबई सरकारने व कोल्हापूर सरकारनें मान्य केलेले

जाधव टेलरिंग कॉलेज

मॅट्रिक पास विद्यार्थ्यांकरितां ६ महिन्याचा स्पेशल कोर्स, स्पेशल फी, शिवाय सरकारी परीक्षेस बसविले जाईल. या सवलतीचा फायदा घ्या ता १५ जाने. आंत नावें नोंदवा [ ४९७ बुधवार, पुणें २

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे थंडी-

गिरगांव, मुंबई करतां

## व्यापारी जहाजांचें ब्रिटिश साम्राज्यास महत्त्व

पी अँन्ड ओ कपनीचे अध्यक्ष, सर अँलेक्झँडर शॉ, हे कंपनीच्या वार्षिक सभेचे अध्यक्षपदावरून भाषण करताना म्हणाले —

" व्यापारी जहाजाचा धदा बुडाला तरी फारसें आर्थिक नुकसान होणार नाहीं, असें म्हणून त्या धद्याकडे दुर्लक्ष करून चालण्याजोगी परिस्थिति नाहीं उलट, तो ग्रेट ब्रिटनचा अत्यंत आवश्यक असा प्राणरक्षक धदा आहे अडचणीचे प्रसगीं जहाजाची वहातूक बद पडली, तर जमिनीवरील, समुद्रावरील आणि हवेंतील शत्रुनिवारक साधनें निरर्थक ठरतील ग्रेटब्रिटनमधील नागरिकाचें पोषण जहाजातून चालणाऱ्या व्यापारानें होतें व ह्या जीविताचें सरक्षण सैन्य, आरमार व वैमानिक दलें हीं करतात म्हणजे व्यापारी जहाजाचें महत्त्व पहिल्या प्रतीचें ठरतें तथापि. ह्या धद्याकडे सरकार पुरेसें लक्ष देत नाहीं शत्रूपासून बचाव करण्याच्या योजनात मात्र तत्परता दाखविण्यात येते.''

## पुणें अनाथ विद्यार्थी गृह

वरील सस्थेचा ३० सप्टेंबर, १९३६ अखेरचा अहवाल व १९३७ चें कॅलेंडर आमचेकडे आलीं आहेत गरीब व निराश्रित परतु बुद्धिमान व होतकरू अशा हिंदू मुलाचें पालनपोषण करून व त्यास शिक्षण देऊन त्याना कार्यक्षम करण्याचें काम ही सस्था आज २७ वर्षे करीत आहे सस्थेची नाशिक येथें एक शाखा आहे तेथें ४६ व पुणें येथें ६६ मिळून ११२ विद्यार्थी सस्थेच्या मदतीनें विद्यार्जन करीत आहेत वसतिगृहें महाराष्ट्र विद्यालय, लोकसग्रह कारखाना, ग्रन्थप्रकाशन, महाराष्ट्र मुद्रण शाळा, पत्रा कारखाना, वर्कशॉप, विणकाम, कारखाना, रासायनिक प्रयोगशाळा, मोफत वाचनालयें, शालोपयोगी ग्रन्थसंग्रह, रुग्णसाहित्य सग्रह, क्षयरोग आरोग्य भुवन, इत्यादि उपक्रम सस्थेच्या व्यापाची व उपयुक्त कार्याची साक्ष देतात केवळ लोकाश्रयावर चाललेल्या ह्या सस्थेची प्रगति योग्य मार्गानें होत आहे, तेव्हा हितचिंतकानीं सस्थेच्या चालकास सहाय करावें

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed percentage tender in form B-1 for the work of Improvements to Bridge No 63 in mile 13/5 of the Dharwar-Goa Road estimated to cost Rs. 10,479/- are invited and will be received by the undersigned on 20-1-1937 upto 2 P. M Other particulars regarding the contract etc, can be had at the undersigned's Office on any working day

2 The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

P K. SHINDE,
Executive Engineer, Dharwar Division
Executive Engineer's Office,
Dharwar, 5th January, 1937

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| १% करमाफ लोन ( १९४५-५५ ) .. | १२०–१० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन .. ... | १०८—८ |
| ४½% लाब मुदत ( १९५५-६० ) .. | १२०—६ |
| ४% १९६०–७० .. ... | ११५—० |
| ५% १९४३ ... ... ... | १११—६ |
| ३½% बिनमुदत .. ... ... | ९९—९ |
| ३½% १९४७–५० - ... ... | १०६–१४ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत ) | ११२—० |
| ४% मुबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... | १११—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉड (७०वर्षे मुदत) | १११—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—८ |

### मडळ्याचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडड ) | १४०–८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडड) | ११५—० |
| सेंट्रल बॅक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु भरले व ६% डिव्हि. ) | ३५–१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १६००—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३८—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रातज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१५–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु डिव्हि. १३% ) | १५२–१३ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १६२७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १६१७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९९—६ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७७—८ |
| टाटा ऑयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २८३—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ११००—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३५—०–९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५२—७–० |

किंमत ओव्हरकोट खरेदी करा

रु. १२॥ बुधवार चौक, पुणें

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

"गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धद्यातील विशेष होय."

**भाऊ गंगाधर साठे,**
बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१९ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

# रु. ५,००० आपलें बक्षिस आतांच मिळवा

प्रवेश फी
रु. १
( प्रत्येक यत्नास )

सीलबंद उत्तर
**दि वेस्टर्न बँक ऑफ इंडिया**
जवळ ठेवण्यांत आलें आहे.

प्रत्येक बिनचूक उत्तरास किमान १०० रु. मिळण्याची हमी

फी व उत्तरें मिळण्याची अखेरची तारीख १६-१-३७. ] [ निकाल तारीख २१-१-३७.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | १५ | |
| | | |

बाजूचे कोष्टकात ० ते २४ पर्यंतचे आंकडे अशा रीतीनें भरा कीं, ज्यांची उभी, आडवी व काटकोनी बेरीज ४५ यावी. कोष्टकांत एकच आंकडा पुनः घेऊ नये. सीलबंद उत्तराशीं जुळणाऱ्या प्रत्येक उत्तरास किमान २०० रुपयांचें बक्षिस गॅरटीनें दिलें जाईल म. ऑ. अगर इंडियन पोस्टल ऑर्डरबरोबर पाठविलेलीं साध्या कागदावरील कितीहि उत्तरें स्वीकारलीं जातील. बक्षिसांच्या रकमेची गॅरटी असून कोणत्याहि कारणानें ती कमी केली जाणार नाहींत. मॅनेजरचा निकाल कायद्यानें बंधनकारक व अखेरचा समजला जाईल

वि सू. ७ जानेवारी १९३७ पूर्वी उत्तरें पाठविणारांपैकीं ज्यांचें उत्तर बरोबर येईल त्यांत १,००० रु. वाटले जातील उत्तरें व फी प्रीमियर कमर्शिअल एजन्सी, कॉपिटिशन डिपार्टमेंट, बॅंचे बझार, कराची ह्या पत्त्यावर पाठवावीं.

## "दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनात वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

–शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २० जानेवारी, १९३७. अंक ३

## दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत
पत्रव्यवहार करावा
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

## ओरायन (मॅग्नमस्)
उत्कृष्ट व्हर्जिनिया तंबाकूपासून बनविलेली ही सिगरेट
२॥ आण्याला १० चें पाकिट किंवा १२ आणे ५० चा डबा
सर्वत्र मिळते
एकदां ओढल्यानतर नेहमीच पसंत कराल
बनविणार—
DECCAN TOBACCO WORKS,
POONA 4
Telegraphic Address —'CIGARETTES', POONA.
*Apply for Agencies*

व्यापारी-उद्यमी लोकांस
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes**"

## "दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"
स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कपन्यास कठीण असें अपूर्व यश सपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी –
## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष–श्री न चिं केळकर, सचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

## न. वि. वडनेरकर
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील

# विविध माहिती

### चंदनापासून प्राप्ती

चंदन व चंदनाचें तेल ह्यांच्या विक्रीपासून म्हैसूर संस्थानास दरसाल दहा तें बारा लक्ष रुपयांची प्राप्ती होते.

### पेट्रोलचा वाढता खप

हिंदुस्थानांत पेट्रोलचा खप झपाट्यानें वाढत आहे १९३४-३५ सालीं ८½ कोटि गॅलन पेट्रोल खपलें होतें; १९३५-३६ सालीं ९ कोटि गॅलनचा खप झाला. कलकत्ता येथें दर गॅलनी पेट्रोलची किंमत १ रु ५½ आ. व मुंबई येथें १५ आ होती

### रिझर्व्ह बँकेची वार्षिक सभा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची दुसरी वार्षिक साधारण सभा मुंबई येथें सर कावसजी जहांगीर हॉलमध्यें सोमवार ता. ८ फेब्रुवारी रोजीं भरणार आहे.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न वाढलें

३१ डिसेंबर अखेर संपलेल्या ११ दिवसांच्या मुदतींत हिंदी सरकारच्या मालकीच्या रेल्वेजना ३ कोटि ३१ लक्ष रुपये उत्पन्न झालें. हा आकडा गेल्या वर्षांतील तत्सम मुदतीमधील उत्पन्नापेक्षां ४३ लक्षांनीं ज्यास्त आहे

### रशियांत शिरगणती

सोव्हिअट रशियाची लोकसंख्या १९३३ च्या खानेसुमारींत १६ कोटि भरली होती. चालू महिन्यांत पुन्हां शिरगणती करण्यांत आली आहे माहिती जमवण्यासाठी १२ लक्ष माणसें शिकवून तयार केलीं आहेत आणि तिची मांडणी करण्याचें काम १ लक्ष ३२ हजार वरच्या दर्जाच्या इसमाकडे सोपवण्यात आलें आहे.

### विलायतेंत हिंदी विद्यार्थ्यांचें वार्षिक भोजन

ग्रेटब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी संघात आठशें सभासद आहेत त्यांच्या वार्षिक भोजनाचे प्रसंगीं गेल्या महिन्यात १७० सभासद हजर होते भोजनाचा बेत हिंदी थाटाचा असून डाळ, दहीं, म्हैसूर पाक, आमटी वगैरे इकडील पदार्थ होते डॉ. राधाकृष्णन् ह्यांचें मुख्य भोजनभाषण झालें. " आपसांतील भांडण-तंटे नाहींसे करून एक व्हा व स्वराज्याची पात्रता अंगीं आणा " असा उपदेश त्यांनीं श्रोत्यांस केला.

### एका तासांत २४,००० प्रती

ग्रेटब्रिटनमधील रेडियो टाइम्स ह्या साप्ताहिकाच्या ३१ लक्ष प्रती खपतात अंकांत १२४ पृष्ठें असून त्याप्रीत्यर्थ दर आठवड्यास ७०० टन कागद लागतो. अंकाच्या २४,००० प्रती एका तासांत छापून तयार होतात.

### माटवर येथील लॉइड डॅम

माटवरचें धरण १९० फूट उंच व ५,३३३ फूट लांब आहे. बुडाशीं त्याची रुंदी १२४ फूट भरते. बांधकामानें २ कोटि १५ लक्ष घनफूट दगड-चुना भक्षण केला आहे ह्या योजनेस १ कोटि ७२ लक्ष रुपये खर्च आला धरणामध्यें २४०० कोटि घनफूट पाणी अडून राहूं शकतें.

### जी आय. पी. रेल्वेचें उत्पन्न वाढलें

१ एप्रिल, १९३६ ते १० जानेवारी १९३७ पर्यंतच्या अवधींत जी. आय पी रेल्वेस १० कोटि, १६ लक्ष रुपये उत्पन्न झालें पूर्व सालच्या तत्सम मुदतीच्या मानानें हा आकडा ५९ लक्ष रुपयांनीं ज्यास्त आहे.

### पंजाबांतली निवडणूक

नवीन घटनेस अनुसरून व्हावयाची प्रांतिक कायदेमंडळाची निवडणूक पंजाबांत गेल्या आठवड्यांत पार पडली. २७ लक्ष मतदाराच्या मतदानासाठीं ३,२०० ठिकाणें निश्चित केलेलीं होतीं. पंजाब असेंब्लीच्या १७५ जागांकरितां ७७५ उमेदवारांनीं खटपट केली.

### तंबाखूच्या विक्रीसाठीं गतूर येथें कंपनी

गतूरची तंबाखू प्रसिद्ध आहे. तिच्या विक्रीची पद्धतशीर व्यवस्था करण्याच्या हेतूनें दि इंडियन टोबॅको कंपनी ह्या नांवाच्या मंडळीची स्थापना होत आहे.

### कृत्रिम मालाची बनावट

राकेल, रबर, लोकर इत्यादि जिन्नस कृत्रिम रीतीनें बनवण्याचा जर्मनींत सपाटा चालू आहे.

### ब्रिटिश रेल्वेजचें उत्पन्न

गेल्या वर्षी चार प्रमुख ब्रिटिश रेल्वेजचें एकूण उत्पन्न सुमारें २०८ कोटि रुपये झालें

### रशियांत कपाशीचें पीक

जगांतील कपाशीच्या एकूण उत्पादनापैकी आठवा हिस्सा पीक रशियांत आतां निघत आहे. ह्या कापसाचें कापड बनवण्यासाठी जादा यंत्रसामुग्री प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालू आहे.

### इंपीरियल बँकेचें १२ टक्के डिव्हिडंड

इंपीरियल बँक ऑफ इंडियानें करमाफ १२ टक्के दरानें डिव्हिडंड जाहीर केलें आहे. ३१ डिसेंबर अखेर संपलेल्या सालीं बँकेस ६५ लक्ष रुपये नफा झाला. त्यापैकीं ३३½ लक्ष रुपये भागीदारांत वाटण्यांत येतील व २८ लक्ष रुपये पुढील वर्षांत ओढण्यांत येतील.

### बंगालमध्यें वजन मापाचा कायदा

मुंबई इलाख्यांतील वजन-मापांच्या कायद्याच्या धर्तीवर एक कायदा करण्याचा बंगाल सरकारचा विचार आहे

### ग्रेट ब्रिटनमधील ' औद्योगिक जत्रा '

लंडन व बर्मिंगहॅम येथें वरील जत्रा १५ ते २८ फेब्रुवारीच्या दरम्यान भरणार आहे राज्यारोहणाच्या समारंभाच्या निमित्तानें ह्या जत्रेस अनेक प्रेक्षक व गिऱ्हाइकें लाभतील, अशी अपेक्षा आहे. निरनिराळ्या ६० देशांतील व्यापारी सौदे पटविण्याकरितां जत्रेस जाणार आहेत.

### दिल्ली येथील शेअर बाजार

दिल्ली स्टॉक एक्सचेंजच्या शेअर व भाग ह्यांसंबंधी व्यवहारांस ता ११ जानेवारी रोजीं सुरवात झाली. जुन्या दिल्लींतील फत्तेपुरीमध्यें एक्सचेंजचें कार्यस्थान आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. २ आ. ७ पै. व्याजाचा दर

गेल्या आठवड्यात तीन महिने मुदतीच्या ३ कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलाकरितां २ कोटि ६४ लक्ष रुपयांचे अर्ज आले होते. स्वीकारलेल्या टेंडरावरील व्याजाचा सरासरी दर १ रु. २ आ. ७ पै. पडला

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ३—१—३७ ते ९—१—३७ | १,०६,६२,६८९ |
| १०—१—३७ ते १६—१—३७ | ५८,७९,८८२ |
| २१—९—३१ ते १६—१—३७ | २,९१,६१,२९,५३६ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | २६ |
| २ रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा .. | २७ |
| ३ गोखले इन्स्टिट्यूटचा स्थापना दिन .. | २८ |
| ४ नवीं आर्थिक धोरणें व नवे आर्थिक विचार ... | २८ |
| ५ स्फुट विचार . .. | २९ |
| स्वदेशी व परदेशी लोकरींचें कापड—विमा कंपन्या यशस्वी कशा होतील ?—लँकेशायर आणि हिंदुस्थान—चौघे को-ऑपरेटिव्ह कार्टेली—स्टॉक एक्सचेंजच्या सभासदत्वावरील निर्बंध | |
| ६ परदेशांतील ठेवींपासून अब्ज रुपये ... .. | ३० |
| ७ वारशावरील कर | ३१ |
| ८ धुळें फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स . | ३१ |
| ९ जॉबर व ब्रोकर ह्यांमधील लढा . . | ३२ |
| जत्रामधील करमणुकीचा धंदा .. .. | ३२ |
| १० दि बँक ऑफ इंडिया लि | ३३ |
| ११ मोटारींच्या व्यापारांत अमेरिकेचें अग्रस्थान .. | ३३ |
| १२ दूध पुरवठ्याची नवी सहकारी योजना .. | ३४ |
| १३ टेलरिंग-कटिंग परीक्षेचा निकाल | ३५ |
| १४ निवडक बाजारभाव .. | ३५ |


# अर्थ

बुधवार, ता २० जानेवारी, १९३७

## रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

### ( १ )

### प्रास्ताविक

रिझर्व्ह बँकेच्या कायद्याची चर्चा चालू असताना ह्या संस्थेचा उपयोग शेतकरी वर्गास होणें अगत्याचें आहे, ह्या विचारानें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें, सभासदांनीं सदरहु बाबतींत कांहीं तरी विधायक योजना केली जाण्याची आवश्यकता प्रतिपादली मध्यवर्ती बँकेचें मुख्य कार्य, देशांत आर्थिक व्यवहारांस लागणारा पैसा योग्य प्रमाणात खेळता ठेवणें, हुंडणावळीचा दर व परराष्ट्रीय देणें—घेणें ह्याचेविषयींच्या घडामोडी सुरळीत चालतील अशी व्यवस्था करणें आणि भाडवलाचा पुरवठा व व्याजाचे दर व्यापार व उद्योगधंदे ह्याच्या योगक्षेमास अनुकूल रहातील अशी खबरदारी घेणें हें आहे मध्यवर्ती बँक मुख्यत्वें करून सरकाराशीं व इतर बँकाशीं व्यवहार करते, आणि नोटा काढण्याचा व ठराविक दरानें सोन्याची खरेदी-विक्री करण्याचा अधिकार तिला असल्यानें देशात खेळणाऱ्या पैशाचा विस्तार व आकुंचन करून आर्थिक व्यवहारात स्थैर्य व पद्धतशीरपणा राखण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं असतें. रिझर्व्ह बँकेस आपलें कर्तव्य नीटपणें पार पाडता यावें म्हणून मोठ्या जॉइंट स्टॉक बँका तिला जोडण्यात आल्या आहेत व त्यानीं आपली रोकड शिल्लक तिच्याकडे विशिष्ट प्रमाणांत बिनव्याजी ठेवली पाहिजे अशी कायद्याची सक्ती आहे चलनाचा पुरवठा व त्यास असलेली मागणी ह्याचा मेळ सतत घालता येऊन आर्थिक व्यवहाराचें यंत्र सुरळीत चालण्याचें आपलें कार्य मध्यवर्ती बँकेस हमखास करता यावें ह्याच हेतूनें रिझर्व्ह बँक व इतर बँका ह्याची सांगड लावून दिलेली आहे जनतेस खेळता पैसा पुरवण्याची सामान्य बँकाची शक्ति मर्यादित असते आणि ती मर्यादा ओलांडली गेली असतां त्यास मध्यवर्ती बँकेनें चलनाचा पुरवठा करावयाचा असतो. त्याचप्रमाणें, वाजवीपेक्षा अधिक पैसा देशात खेळत आहे असें दिसून आल्यास ह्या पुरवठ्याचें आकुंचन करण्याचें कामहि मध्यवर्ती बँकेस करावयाचें असतें

इतर देशांपेक्षा हिंदुस्थानची आर्थिक स्थिति भिन्न असल्यामुळें तिकडील मध्यवर्ती बँका व हिंदी रिझर्व्ह बँक ह्याच्या कार्यपद्धतींत व विधायक कामगिरींत तफावत असणें साहजिक आहे. ह्या गोष्टीची जाणीव हिंदी मध्यवर्ती बँकेचा पुरस्कार करणारास प्रथमपासूनच होती हिंदुस्थानसरकार आणि इंपीरिअल बँक ऑफ इंडिया ह्या दोघामध्यें चलनाचा पुरवठा व व्यापाऱ्यांस लागणाऱ्या पैशाचा कर्जाच्या द्वारें पुरवठा हीं कामें वाटलीं गेल्यामुळें जी एक अडचण भासत होती, ती रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेनें दूर झाली आहे आणि हे दोन व्यवहार ह्या मध्यवर्ती संस्थेच्या हातीं एकवटले आहेत इतकेंच कार्य रिझर्व्ह बँक अस्तित्वात आल्यानें वास्तविक झालें आहे शेतीचा धंदा व खेडेगावीं व्यापार ह्याचा संबंध आधुनिक बँकाशीं फारसा येत नाहीं. त्यास लागणारा पैसा पुरवण्याचें काम सावकार व सराफ करतात ह्या वर्गाचे व्यवहारहि आधुनिक पद्धतीच्या बँकाच्या कक्षेंत येत नाहींत बहुजनसमाज व देशातील अत्यंत महत्त्वाचा असा शेतीचा धंदा बँका व रिझर्व्ह बँक ह्याच्यापासून अलग रहाणें ह्या रीतीनें अपरिहार्य आहे रिझर्व्ह बँकेचा हात खेडेगावें व शेतकरी ह्याचेपर्यंत जाऊन पोहोंचत नाहीं आणि शेतकरी, सावकार व सराफ ह्यास तिचा फायदा मिळत नाहीं असें झालें म्हणजे दोन्हीं बाजूचें कार्य घडत नाहीं असें झालें. सहकारी पेढ्या व बँका सुसंघटित असल्यानें त्यांचा संबंध शहरी बँका व रिझर्व्ह बँका ह्यांच्याशीं येणें शक्य आहे, आणि म्हणून प्रांतिक सहकारी बँकास रिझर्व्ह बँकेशीं जोडलेल्या व्यापारी बँकाच्या बरोबरीचें स्थान रिझर्व्ह बँकेच्या कायद्यात दिलेलें आहे.

एकंदरीनें पहाता वर वर्णिलेली स्थिति असमाधानकारक असल्यानें रिझर्व्ह बँकेनें तिच्यामधून कांहींतरी मार्ग काढावा आणि शेतीच्या धंद्याची व खेडेगावी व्यवसायांची पैशाची सोय पहावी ह्या उद्देशानें चौकशी व सूचना करण्याची जबाबदारी त्या बँकेवर कायद्यानें टाकण्यात आली. त्या बँकेबाबतच्या कायद्याच्या ५६ व्या कलमान्वयें शेती व सराफ ह्यांस रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत आणण्यासंबधानें चौकशी व सूचना करावयाच्या होत्या त्याविषयींचा प्राथमिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे व त्याचा उल्लेख आम्हीं "अर्था"मध्यें मागें केलाच आहे परिस्थितीची पहाणी करून रिझर्व्ह बँकेनें त्या विषयींचा आपला अभिप्राय सदरहु रिपोर्टांत व्यक्त केला आहे मि डार्लिंग ह्यांनीं केलेल्या चौकशीचा आधार अर्थातच त्यात घेण्यांत आला आहे सहकारी पेढ्या व बँका, सहकारी चळवळ, जमीन गहाणाच्या बँका, शेतकरी वर्ग, सराफ व सावकार ह्याच्या हिताच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट अत्यंत महत्त्वाचा आहे, हें सांगावयास नको "तूर्त कांहीं करता येत नाहीं" हें त्याचें निराशाजनक सार आहे तरी, त्यात नमूद केलेली स्थिति, विचार व सूचना ह्याची छाननी व विवेचन होणें अत्यंत अवश्यक आहे माहितीपूर्वक मत बनवून रिझर्व्ह बँक व सरकार ह्यास जरूर त्या सुधारणा करावयास लावणें हें जनतेचें कर्तव्य आहे ह्याकरिता, रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टाचा योग्य परामर्श घेण्यासाठीं प्रस्तुत लेखमाला आम्हीं चालू करीत आहों. विविध पेशाच्या व दर्जाच्या आमच्या वाचकास ती बोधप्रद व उपयुक्त वाटेल असा आम्हास विश्वास आहे.

———

## गोखले इन्स्टिटयूटचा स्थापना दिन

### प्रो. काळे यांचें व्याख्यान

### नवीं आर्थिक धोरणें व नवे आर्थिक विचारप्रवाह

गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकॉनॉमिक्सचा स्थापना-दिन गेल्या रविवारीं साजरा झाला त्यावेळीं प्रि गाडगीळ ह्यानीं सस्थेच्या कार्याची माहिती सागून प्रो काळे ह्यास आपलें अध्यक्षीय भाषण करण्याची विनति केली. ह्या सस्थेची स्थापना १२ जून, १९३० रोजीं म्हणजे सर्व्हंट्स ऑफ इडिया सोसायटीच्या २५ व्या वार्षिक दिनाचे दिवशीं झाली राष्ट्रीय प्रश्नाचा काळजीपूर्वक अभ्यास करणाराच्या परिश्रमाचा सोसायटीस फायदा मिळावा, ह्या हेतूनें कै रा ब काळे ह्यानीं त्यावेळीं सोसायटीस एक लक्ष रुपयाची देणगी जाहीर केली आणि इतर धनिकाच्या सहायानें इन्स्टिटयूटचें कार्य जोमानें चालेल अशी आशा प्रदर्शित केली सस्थेच्या कार्यक्षेत्रापैकी (राजकारण व अर्थशास्त्र) अर्थशास्त्राकडेच प्रथम लक्ष पुरविण्याचें ठरवून,प्रादेशिक सशोधनात्मक कार्य हातीं घेण्याचें निश्चित झालें स्थानिक स्वरूपाच्या आर्थिक पहाण्या हिंदुस्थानांत अद्याप फारशा झालेल्या नाहींत, त्याकडे सस्थेनें लक्ष देण्यास प्रथम सुरवात केली विद्यार्थ्यांस सशोधनासाठी अशाच स्वरूपाचे विषय निवडून देण्यांत येतात आजूबाजूच्या प्रदेशासबधीं आर्थिक सशोधन व चालू उपयुक्ततेच्या प्रश्नाचा आकडेवार अभ्यास, हीं दोन कामें सस्थेनें हातीं घेतलीं इन्स्टिटयूटच्या आर्थिक परिस्थितीस दरसाल दोहोंपेक्षा ज्यास्त सशोधनात्मक पहाण्या झेपत नाहींत, असा अनुभव आहे इपीरियल कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चनें सस्थेच्या कार्यास थोडीफार मदत करण्यास सुरवात केली आहे गेल्या पाच वर्षात संस्थेनें पाच सशोधनात्मक निबध प्रसिद्ध केले आहेत शेतीच्या व्यवसायास 'सर्व्हे मेथड' कितपत लागू पडते, हें पहाण्याचें काम इन्स्टिटयूटने आता अगावर घेतलें आहे. पुणें शहराच्या आर्थिक पहाणीचें चालू असलेलें सशोधन लोकांच्या परिचयाचें आहेच इन्स्टिटयूटच्या आर्थिक बलाचे मानानें तिचें काम अत्यत स्पृहणीय आहे, ह्यात शका नाहीं ज्याच्या स्फूर्तीनें व सहायानें ही सस्था जन्मास आली, त्याचें नाव इन्स्टिटयूटला देण्याचा प्रथम विचार होता तथापि, कै रा ब काळे ह्यानीं त्यास समति दिली नाही आणि कै गोपाळ कृष्ण गोखले ह्याच्या नावाशीं ती सबद्ध असावी असा त्यानीं आग्रह धरला

प्रो. काळे ह्याच्या व्याख्यानाचा विषय "नवीन वळणाचीं आर्थिक धोरणें आणि सिद्धात' हा होता प्रारभीं, कै रावबहादुर काळे ह्याची उदारमतवादाची न्या. रानडे ह्याची परपरा आणि राजकीय व आर्थिक प्रश्नाचा पद्धतशीर अभ्यास होण्याची त्या परंपरेस अनुसरून असलेली रावबहादुराची इच्छा आणि त्याचप्रमाणें, ती पूर्ण करण्यासाठी त्यानीं गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स व इकॉनॉमिक्स ह्या सस्थेस दिलेली उदार देणगी, ह्याचा गौरवपूर्वक उल्लेख करून तिचें कार्य करण्यास प्रि गाडगीळ ह्याच्यासारख्या अर्थशास्त्रधुरधर अभ्यासूची यथायोग्य योजना झाली असल्याचें व्याख्यात्यानीं सागितलें जगामध्यें सध्या ज्या विलक्षण राजकीय व आर्थिक उलाढाली चालल्या आहेत त्याच्या दृष्टीनें आर्थिक विषयाची सागोपाग माहिती जमा करून तिची व्यवस्थित मांडणी करण्याचें मोठें महत्त्व आहे आणि हिंदुस्थानात तर तें विशेष आहे असा प्रस्ताव करून प्रो काळे ह्यानीं सदरहु उलाढालींची रूपरेखा काढली ह्याच्या भाषणांतले महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत

### भाषणांतील महत्त्वाचे मुद्दे

सध्याचें जग राजकीय तसेंच आर्थिक सर्वाधिकाऱ्याचें झालें असून ह्या कालखंडास 'युद्धाच्या तयारीचें युग' असें म्हणावयास हरकत नाहीं.

व्यापार, उद्योगधंदे, बाजारभाव, चलन, हुडणावळ इत्यादींच्या सरकारी नियंत्रणाचा हा काल आहे.

ह्यामुळें मामुली आर्थिक व्यवस्था सर्व राष्ट्रामध्यें कमी-अधिक प्रमाणात पालटून गेली आहे.

पूर्वीचे कमी अधिक अनिर्बंध आतरराष्ट्रीय व्यापार बद होऊन राष्ट्रीय सरकारांनीं केलेल्या करारांप्रमाणें ठराविक मालाची आयात-निर्गत देशाचे दरम्यान होत आहे.

हुडणावळीच्या दरास पूर्वी असलेला सोन्याचा आधार सुटून जरूरीप्रमाणें राष्ट्रीय चलनें हलकीं करण्यात राष्ट्रानीं परस्परस्पर्धा केली आहे. चलनाच्या रक्षणासाठी स्वतत्र फंड उपयोगात आणले जात असून वरील सर्व व्यवस्था कायमची होऊ पहात आहे.

मालाचें उत्पादन, विक्री व बाजारभाव ह्याचें नियमन सरकारें करीत आहेत जर्मनींत हें धोरण परमावधीस पोहोंचलें असून ग्रेट ब्रिटनमध्येंहि वरील नियमासाठी बोर्डें स्थापन झालीं आहेत.

ह्याप्रमाणें आर्थिक व्यवहाराचें नियमन राष्ट्रीय भूमिकेवर राज्यकर्ते करीत असल्यानें मामुली आर्थिक घटनेवर आधारलेले अर्थशास्त्राचे सिद्धात बदलणें आवश्यक झालें आहे

अर्थशास्त्राच्या इतिहासांत भिन्न भिन्न विचाराचे प्रवाह प्रथमपासूनच वहात चालले असून ब्रिटिश आर्थिक सिद्धात हिंदुस्थानच्या परिस्थितीस कसे लागू पडत नाहींत हें न्या रानडे यानीं पचेचाळीस वर्षापूर्वीच मार्मिक रीतीनें दाखवून दिलें

राष्ट्रीय भूमिकेवर आर्थिक प्रश्नाचा विचार करण्याची आवश्यकता आणि सरकारनें आर्थिक व्यवहारास इष्ट वळण लावण्याची जरूरी ग्रेट ब्रिटनसारख्या देशातहि भासू लागली आहे हें विशेष आहे

प्रो केन्स ह्या नामांकित अर्थशास्त्रज्ञाचें उदाहरण येथें देण्याजोगें आहे ब्रिटिश परपरेंत वाढलेल्या त्या तज्ज्ञानें आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रथात स्वत. शिकलेल्या व शिकवलेल्या अर्थशास्त्रीय सिद्धाताचा पाया बदलल्यामुळें त्यात फेरबदल करण्याची अवश्यकता प्रतिपादली आहे

बाजारभाव, उत्पादन, व्याजाचे दर ह्याचें योग्य नियमन सरकारनें केलें पाहिजे ह्या अर्थाचा एक लेख प्रो. केन्स ह्यानीं लंडन टाइम्समध्यें प्रसिद्ध केला असल्याची रॉयटरनें दिलेली माहिती दैनिक वृत्तपत्राच्या वाचकास असेलच

प्रत्येक राष्ट्रानें अतर्गत व्यापाराचें व्यवस्थित नियमन केल्यास, बदललेल्या नव्या आतरराष्ट्रीय परिस्थितींत देशादेशात झगडे होण्याचें आणि सर्वाधिकाऱ्याच्या हातात सर्व सत्ता जाण्याचें कारण उरणार नाहीं

अर्थशास्त्राची पुनर्रचना करण्याच्या उद्देशानें जर्मनींत एक नवीन संस्था नुकतीच स्थापन झाली आहे

ह्या सर्व गोष्टींवरून हिंदुस्थानात आपल्या विशिष्ट परिस्थितीस अनुसरून योग्य आर्थिक धोरण आणि आर्थिक विचार निश्चित होण्याची अवश्यकता किती आहे, हें ध्यानात येईल.

सरकार ह्या बाबतींत हालचाल करीत नसल्यानें आर्थिक उन्नतीचा प्रश्न लोकानीं हातीं घेतला पाहिजे.

माहिती जमा करून ती पद्धतशीरपणानें पुढें माडण्याचें गोखले इन्स्टिटयूटचें कार्य ह्या दृष्टीनें अत्यत महत्त्वाचें आहे.

# स्फुट विचार

## स्वदेशी व परदेशी लोकरीचें कापड

हिंदुस्थान देश दरिद्री असल्यामुळें येथील सामान्य जनतेस हरतऱ्हेचे जिन्नस विकत घेणें परवडावें म्हणून येथील गिऱ्हाइकांकरितां स्वस्त माल तयार करून परदेशी कारखानदार इकडील बाजारांत पाठवतात. जिनसांची विक्रीची किंमत कमी होण्यास त्यांच्या उत्पादनाचा खर्च कमी करणें प्राप्त होऊन कारखानदार हलक्या दर्जाचा कच्चा माल वापरून त्याचें मोल उतरवतात ह्या कारवाईत मालाची किंमत कमी होते पण स्वस्ताईबरोबर त्या मालाची उपयुक्तता घटते हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. सध्याच्या थंडीच्या दिवसांत गरम वस्त्रें वापरण्याची अवश्यकता भासून हिंदी जनता बाजारांत स्वस्त मिळणारीं लोकरीचा फ्लॅनेल, ब्लँकेटें इत्यादि माल खरेदी करते. त्या जातीच्या परदेशांतून येणाऱ्या मालांत शुद्ध लोकरीशीं हलक्या प्रकारच्या कच्च्या जिनसांची भेसळ असते ही गोष्ट थोड्याच लोकांच्या लक्षात येते हिंदी लोकरीच्या धंद्यानें संरक्षणाची मागणी केली होती, तिची चौकशी टारिफ बोर्डानें केली त्यावेळीं भेसळीच्या लोकरी कपड्याची बाब त्यास विचारांत घ्यावी लागली होती आणि बोर्डाच्या रिपोर्टांत ह्या संबंधांतली पुष्कळ बोधप्रद माहिती नमूद आहे हिंदी गिरण्यांत तयार होणाऱ्या लोकरीच्या मालांत ह्या तऱ्हेची गल्लत करण्याची रीत नाहीं. परंतु जुने, वापरलेले लोकरीचे जिन्नस घेऊन, त्यांचा रांधा व सूत करून आणि तें पुन्हां वापरून त्याचें नवें कापड बनवण्याचा प्रघात कांहीं बाहेरच्या देशात आहे आणि असलें कापड हिंदी बाजारांत येतें व त्याची स्पर्धा स्वदेशी लोकरीच्या मालास सहन करावी लागते हें टारिफ बोर्डाच्या रिपोर्टावरून स्पष्ट दिसतें. हिंदी जनतेनें लोकरीचा माल खरेदी करताना नुसत्या स्वस्ताईला बळी पडूं नये आणि शुद्ध बनावटीचे स्वदेशी जिन्नस घ्यावे ह्या हेतूनें येथील स्वदेशी संघानें सदरहु गोष्ट लोकाच्या नजरेस आणली आहे. हिंदुस्थानांतल्या कारखान्यात तयार होणारें शुद्ध लोकरीचें हरतऱ्हेचें कापड बाजारात सोइस्कर मिळतें, त्याची चौकशी करून जनतेनें शुद्ध व खरा उपयोगी माल विकत घ्यावा अशी संघाची शिफारस आहे.

## विमा-कंपन्या यशस्वी कशा होतील ?

हिंदुस्थानांत नवीन विमाकंपन्यांस अद्याप वाव आहे, असें नेहमी सांगण्यांत येतें हें विधान कोणत्या अर्थानें खरें आहे, ह्याचें विवेचन श्री ग. स. मराठे, ॲक्चुअरी, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत नाशिक येथील सह्याद्रि विमा कंपनीचें उद्घाटन करताना केलें. विम्याची समाजाला अवश्यकता आहे काय व असल्यास ती कशा रीतीनें भागविली जात आहे, ह्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन आपले देशांत विम्याची वाढ अजून पुष्कळ मोठ्या प्रमाणावर व्हावयास पाहिजे, असा अभिप्राय श्री. मराठे ह्यांनीं व्यक्त केला. " विमेदाराला शक्य तितका अधिक भाग विम्याची रकम व बोनस ह्यांच्या द्वारें परत मिळावा आणि उरलेला भाग देसील अशा लोकाच्या हातीं पडावा कीं, ज्याचें कल्याण झाल्यानें विमेदाराचेंहि अप्रत्यक्ष रीतीनें कल्याण होईल. म्हणून, साधारण मनुष्याची, आपले परिचयाचे व हितसंबंधाचे मनुष्यांशीं व्यवहार करण्याची प्रवृत्ति असते " ह्या दोन गोष्टींचा विचार नवीन कंपन्याचे बाबतींत केला पाहिजे असें श्री. मराठे ह्यांनीं सांगितलें. कंपनीला पुष्कळ विम्याचें काम मिळेल, तरच ती कंपनी फायदेशीर रीतीनें चालू शकेल, हा सिद्धांत सोदाहरण पटवून देऊन, कंपनीच्या यशास अवश्यक असणारीं इतर लक्षणेंहि श्री. मराठे ह्यांनीं सांगितलीं. कंपनीजवळ भांडवल चांगलें असावें, डायरेक्टर लौकिकवान व जबाबदारी ओळखणारे असावेत, व्यवस्थापक हुशार, विद्वान व कर्तृत्ववान आणि दक्ष असावेत, प्रथमदर्शनीच कंपनीविषयीं अनुकूल ग्रह उत्पन्न होईल असें वातावरण निर्माण केलें पाहिजे, विमा कंपनी म्हणजे कंपनीबद्दल अभिमान वाटणाऱ्या अनेक व्यक्तींचें एक आनदी व उद्योगी कुटुंब अशी स्थिति झाली पाहिजे. एजंट व डायरेक्टर लोक इत्यादींमध्येंहि कंपनीविषयीं प्रेम व आत्मविश्वास उत्पन्न झाला पाहिजे. डायरेक्टर लोक हे बहुतेक भागीदारांचे प्रतिनिधि समजले जातात; परतु ज्या कंपनीला प्रामाणिकपणाचा लौकिक सपादन करावयाचा असेल त्या कपनींचे डायरेक्टर लोकाना, विमेदारांचे हितांतच भागीदारांचें हित आहे व विमेदार संतुष्ट रहाण्यासाठी भागीदारांचें हित क्षणभर मागें राहिलें तरी हरकत नाहीं, अशी जाणीव पाहिजे. वरील कसोटीस उतरणाऱ्या विमा कंपन्या हिंदुस्थानांत थोड्या आहेत हें लक्षांत घेतां, ध्येयवादी व तत्त्वनिष्ठेनें चालणाऱ्या नव्या कंपन्या निघाल्या तर त्या योगानें हिंदुस्थानचें हितच होईल, असा श्री. मराठे ह्याच्या भाषणाचा निष्कर्ष होता. अलीकडे स्थापन झालेल्या बहुतेक कंपन्यांस हें वर्णन लागू पडत नाहीं, ह्याची त्यांनीं जाणीव करून दिली असल्याकारणानें तत्त्व आणि व्यवहार ह्यांमधील अंतर तोडणें कठिण आहे, हें सिद्ध झालें आहे. श्री. मराठे ह्यांच्या उपदेशानुसार सह्याद्रि विमा कंपनी चालून तिची भरभराट होवो, असें आम्हीं इच्छितों.

## लँकेशायर आणि हिंदुस्थान

ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें व्हावयाच्या व्यापारी कराराबद्दल वाटाघाटी चालू आहेत, त्यांमध्यें लँकेशायरच्या गिरणीवाल्याची विशेष सवलतींची मागणी ही एक अडचण उपस्थित झाली असावी असें दिसतें. मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्सच्या हिंदुस्थान शाखेचे अध्यक्ष, मि. कँबेल, ह्यांनीं गेल्या आठवड्यात काढलेल्या उद्गारावरून हें अनुमान दृढ होतें. लँकेशायरच्या कापडाची हिंदुस्थानात होणारी आयात घटली आहे ह्याचें कारण जपानची स्पर्धा हें नसून हिंदी गिरण्यांस देण्यांत आलेलें फाजील जकातींचें सरक्षण हें आहे असें त्यांनीं बोलून दाखविलें. आजपर्यंत ब्रिटिश गिरण्याच्या हलाखीच्या बाबतींत जपानच्या स्पर्धेवर जोर देण्यांत येत असे. जपानची हिंदुस्थानांत होणारी आयात मर्यादित झालेली असल्यानें लँकेशायरच्या कारखानदारांनीं आपला आक्षेपाचा मोर्चा तिकडून वळवून त्यांनीं हिंदी गिरण्यांवर चाल केली आहे. इंग्लंड हें राष्ट्र हिंदी कच्च्या मालाचें जपानपेक्षां मोठें गिऱ्हाइक असतां हिंदुस्थान ब्रिटिश मालास सवलती देऊन त्याच्या आयातींत वाढ होऊं देत नाहीं हें रास्त नाहीं, असें म्हणून होऊं घातलेल्या व्यापारी कराराच्या वाटाघाटींचा ब्रिटिश सरकारनें फायदा घेऊन येथील देशी गिरण्यास मिळणारें संरक्षण कमी करून घ्यावें अशी स्पष्ट

सूचना मि कॅंबेल यानीं केली आहे हिंदी गिरण्यांतलें कापडाचें उत्पादन अलीकडे वाढलें असल्यानें ब्रिटिश कापडास येथील बाजारात पूर्वीसारखा वाव मिळत नाहीं.ही प्रगति कायम राहील अशा प्रकारचें सरक्षण हिंदी गिरण्यास मिळणें अगत्याचें आहे ह्या बाबतींत लॅंकेशायरशीं तडजोड व्हावयाची म्हणजे स्वदेशी उद्योगधद्याची पीछेहाट होणें अपरिहार्य आहे या प्रकारची नुकसानकारक तडजोड करण्यास हिंदुस्थान तयार होईल अशी अपेक्षा मि कॅंबेल ह्यानीं का करावी ? लॅंकेशायरच्या मालास अगोदरच सवलती आहेत, त्यानीं ब्रिटिश कारखानदाराचें समाधान होत नाहीं हिंदुस्थानांतला स्वदेशी धंद्रा जगवून ह्या देशास परस्पर सवलतीच्या तत्त्वावर ग्रेट ब्रिटनला सहाय करणें शक्य होईल होऊ घातलेला हिंद-ब्रिटन व्यापारी करार ह्याच तत्त्वावर केला जाणें सरळ आहे

## " बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली "

वरील त्रैमासिकाचा डिसेंबर, १९३६ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. अंकाचे सुरवातीस कै. सर लल्लुभाई सामळदास ह्याच्या पुण्यस्मरणात्मक प्रो. काळे ह्याचा लेख आला असून, श्री सी. एम गाधी, ए. यू मळजी व एस आर. वेंकटरामन् ह्यानींहि कै सर लल्लुभाईबद्दल गौरवपर लेख लिहिले आहेत. क्रॉपॉटकिनची सहकार विषयक कल्पना, डेन्मार्कमधील शेतकऱ्यांतील सहकारी चळवळ, घोल्का व धाडुका ( जि. अहमदाबाद ) तालुक्यामधील सहकारी चळवळींचें निरीक्षण, नवसरी भगी सहकारी मंडळी, बॅंक्स कॉन्फरन्सच्या बैठकीची माहिती, इत्यादि वाचनीय लेख क्वार्टर्लीमध्यें आले आहेत पुस्तकावरील अभिप्राय, संपादकीय स्फुटें, सहकारी चळवळीविषयक माहिती, पत्रव्यवहार, इन्स्टिट्यूटचें कामकाज, रजिस्ट्रारचीं सक्युलरें, सरकारी ठराव, इत्यादि नेहमींचीं सदरें अंकात आहेतच वरील विविध विषयासबधातील लेखामुळें व माहितीमुळें अंक वाचनीय झाला आहे

## स्टॉक एक्सचेंजच्या सभासदत्वावरील निर्बंध दूर करा

मुबई येथील रोखे बाजाराचें नियत्रण करणारी सस्था म्हणजे नेटिव्ह शेअर ॲण्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन, ही होय. ह्या असोसिएशनचें सभासदत्व अत्यत मर्यादित असून, इतर बाजारात व्यवहार करणारास वरील असोसिएशनचे सभासद होता येत नाहीं त्यानें इतर ठिकाणचा आपला सबध सोडला तरी पाहिजे नाहीं तर असोसिएशनच्या सभासदत्वाची इच्छा बाळगता कामा नये, अशी आज परिस्थिती आहे ह्या कारणानें कपास, सोनें-चांदी, इत्यादि बाजारामधील व्यवहार व स्टॉक एक्सचेंजमधील व्यवहार ह्यांची पूर्णपणें फारकत होते इतर बाजाराच्या सस्थातून असला कडक निर्बंध आढळत नाहीं, तरी नेटिव्ह शेअर ॲण्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनच्या सभासदत्वातील ही अडचण दूर करण्यात यावी अशा अर्थाची सूचना ईस्ट इडिया कॉटन असोसिएशननें स्टॉक एक्सचेंज इन्कायरी कमिटीकडे केली आहे

## प्राप्तीवरील करासंबंधींच्या चौकशीचा रिपोर्ट


हिंदुस्थानातील प्राप्तीवरील कराच्या आकारणीच्या पद्धती सबधीं चौकशी करून सूचना करण्याचें काम दोन ब्रिटिश तज्ज्ञाकडे सोंपविण्यात आलें होतें व त्याचे मदतीस मुंबईचे इन्कम टॅक्स कमिशनर, खान बहादूर जे. बी. वाच्छा, हे देण्यात आले होते कमिटीनें आपला रिपोर्ट सरकारकडे सादर केला असून, त्यावर तिघाच्याहि सह्या आहेत कमिटीच्या सूचना येत्या वर्षाच्या अदाजपत्रकात अतर्भूत होण्याचा फारसा सभव नाहीं रिपोर्टावर प्रांतिक सरकाराचें व व्यापारी मडळ्यांचें मतें मागविण्यांत येईल.

## परदेशांतील ठेवींपासून ब्रिटनला दरसाल २¼ अब्ज रु.

ग्रेटब्रिटनमधील नागरिकानीं आपले पैसे इतर देशाच्या सरकारी रोख्यात व व्यापारी मंडळ्याचे भागात गुतविलेले आहेत, त्यावर मिळणारी व्याजाची रकम फारच मोठी असते ग्रेट ब्रिटनमध्यें भाडवलाचा पुरवठा मुबलक असल्यानें, भारी व्याजाच्या अपेक्षेनें तेथील लोक आपल्या रकमा इतरत्र गुतविण्यास तयार असतात कर्जें उभारण्याचें केंद्र म्हणून लडन शहराची सर्व जगभर ख्याति आहे १९२९ ते १९३५ ह्या मुदतींत परदेशातील ठेवींपासून ब्रिटिश नागरिकांस किती प्राप्ती झाली, ह्या सबंधातील आकडे येथें दिले आहेत: —

| | १९२९ (कोटि रु) | १९३१ (कोटि रु.) | १९३३ (कोटि रु) | १९३५ (कोटि रु) |
|---|---|---|---|---|
| इतर देशांतील सरकारी व म्युनिसिपालट्यानीं उभारलेलीं कर्जें | ८४ | ८९ | ७९ | ७९ |
| ग्रेटब्रिटनमध्यें नोंदलेल्या ब्रिटिश कपन्या | ११२ | ६४ | ५५ | ६६ |
| इतर देशात नोंदलेल्या कपन्या | ८१ | ५३ | ४५ | ५५ |
| इतर ठेवी | २३ | १७ | १४ | १९ |
| | २०० | २२३ | १९३ | २१९ |

१९३३ सालानतर मंदी कमी होऊन व्याजाच्या उत्पन्नात वाढ झालेली आढळून येते, तथापि आर्थिक मंदीच्या पूर्वीइतकी मिळकत अद्याप होऊ लागलेली नाहीं सरकारी रोख्यांवरील व्याजांत फारसा फरक पडलेला नाहीं, परतु व्यापारी कपन्यांच्या डिव्हिडडमध्यें मात्र उतार झालेला दिसत आहे कपन्यांस वाढतें काम मिळून व त्यापासून नफा उरून त्याचें डिव्हिडंडमध्यें रूपातर होण्यास वेळ लागतो ह्या कारणानें आर्थिक मंदीची तीव्रता कमी होत असली तरी कपन्याचें डिव्हिडड त्या मानानें वाढलें नाहीं, हें वरील कोष्टकावरून स्पष्ट होत आहे ग्रेटब्रिटनला इतर देशांतून दरसाल सुमारें २¼ अब्ज रुपयांचें येणें निघतें. माल पाठवून त्याच्या मोबदला माल मागवणें हा सरळ व्यवहार झाला मागें केव्हातरी परदेशात पाठविलेल्या मालाची किमत येणें कर्ज धरून त्यावरचें व्याज अखड भोगीत बसणें, हें श्रीमतीचें लक्षण आहे हा अदृश्य व्यापार सरकारी अहवालात स्पष्टपणें नोंदला जात नाहीं, तथापि पैशाचे मोलात त्याचें महत्त्व किती आहे, हें वरील आकड्यावरून ध्यानात येईल. व्याजाच्या ऐवजी ब्रिटिशांचें परदेशातून कोट्यवधि रुपयाचें वार्षिक येणें असतें ह्याच्या उलट, हिंदी जनतेत दरवर्षास व्याजाचें देणें द्यावें लागतें आणि व्याजाचीहि आयात व निर्गत मालाच्या स्वरूपात होते. मालास अलीकडे अपुरी मागणी असल्यानें हिंदुस्थान सोनें परदेशीं पाठवून आपलें देणें भागवीत आहे

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

## वारशावरील कर

### अमेरिकेंतल्या नवकोटि नारायणांच्या इस्टेटी

हिंदुस्थानात सरकारी उत्पन्न वाढवण्याच्या प्रश्नाचा जेव्हां जेव्हा विचार होतो तेव्हां तेव्हां मृत माणसाच्या इस्टेटीवर आणि वारसदारास मिळावयाच्या जिदगीवर कर बसवण्यात यावा अशी सूचना करण्यात येते ह्या देशात श्रीमान माणसाची संख्या लहान, त्याच्या वारशावरील करापासून होणारें उत्पन्न अल्प आणि अशा कराची आकारणी व वसुली करण्याच्या मार्गांत अडचणी अनेक ह्या कारणांमुळें वरील सूचना आजवर येथें ग्राह्य समजण्यात आलेली नाहीं प्राप्तीवरील कराप्रमाणें वारशावरील कर ग्रेटब्रिटन, अमेरिका वगैरे सपन्न देशात न्याय्य गणला जातो आणि त्याचे योगानें सरकारी तिजोऱ्यात उत्पन्नाची चागली भर पडते अमेरिका हें नवकोटि नारायणाचें राष्ट्र असल्याची प्रसिद्धी आहे आणि तेथें हा कर तेथील मध्यवर्ती सरकारच मुख्यत्वें करून गोळा करतें. तीन वर्षांपूर्वी इस्टेटीच्या ४५ टक्के ह्या कमाल प्रमाणात कराची आकारणी होत असे आतां हा दर ७० टक्क्यापर्यंत चढवण्यात आला आहे मिळकत ज्या मानानें ज्यास्त त्या मानानें कराच्या आकारणीचा दर ज्यास्त हें प्राप्तीवरील कराचें तत्त्व वारशावरील करासही लागू आहे. ह्यामुळें ७० टक्क्याचा दर सर्व इस्टेटींवर आकारला जात नसून त्याच्या सर्वांत वरच्या अंशावर बसतो, आणि आणि खालच्या अशावर कमी कमी दराची आकारणी होते. सहवीस हजार रुपयापेक्षा कमी किमतीच्या इस्टेटींवर कर घेतला जात नाहीं. सहवीस हजार ते बावन हजारापर्यंतच्या इस्टेटीवर ४ टक्के दर आहे, पुढें दर सहवीस हजार रुपयांच्या वाढाव्यास २ टक्के अधिक असा क्रम अडीच लाख किमतीच्या इस्टेटीपर्यंत लावलेला आहे. सहवीस लक्ष ते चाळीस लक्ष ह्याचे दरम्यानच्या कराचा आकार ३२ टक्के आहे सव्वाकोटि रुपयाची मर्यादा इस्टेटीनें गाठली कीं ५६ टक्के लागू होतात आणि अडीच कोटि ते सव्वा पाच कोटि ह्याचे दरम्यानचा दर ६७ टक्के इतका बसतो. शेवटीं, १३ कोटि वरच्या इस्टेटींपैकी ७० टक्के सरकारी तिजोरींत घेतले जातात.

वारसाकराच्या आकारणीचे नवे व वाढलेले दर निश्चित झाल्यापासून फार मोठ्या इस्टेटी त्याच्या तडाख्यात आलेल्या नाहींत तथापि, तत्पूर्वीचीं काहीं उदाहरणें अमेरिकेच्या श्रीमंतांवर उत्कृष्ट प्रकाश पाडतात. १९३१ मध्यें मि बेकर ह्या नावाचे एक नवकोट नारायण वारले कराच्या कक्षेंत येणाऱ्या त्याच्या जिंदगीची किमत सुमारें २० कोटि रुपये भरली आणि तिच्यावर सुमारें ३ कोटि रुपयाचा कर घेण्यांत आला. तंबाखूच्या धंद्यावर श्रीमान् बनलेल्या मि ड्यूक ह्या नावाच्या धनिकाची जिंदगी सुमारें २४ कोटि रुपये होती आणि तिच्यापासून अमेरिकेच्या राष्ट्रीय तिजोरीस २½ कोटि रुपये मिळाले मि रायन ह्या रोख्याच्या उलाढाली करणाऱ्या धंदेवाल्यानें आपल्या मागें ३६ कोटि रुपये ठेवले आणि त्यातून ७ कोटि रुपये सरकारी तिजोरींत गेले. नातेवाइकांस देणगी म्हणून दिलेल्या रकमावर कराचा दर माफक असल्यामुळें कित्येक लोक कर वाचवण्यासाठी अशा देणग्या देत असतात आणि त्यांचा हेतु योग्य आहे किंवा नाहीं ह्याबाबत वाद उपस्थित होतात कायदेशीर पळवाट काढण्याचे ह्याच प्रकारचे दुसरेहि प्रयत्न करण्यात येतात. वाढलेल्या कराचा उपयोग सरकार लोकहिताच्या कार्यांकडे करणार असल्यानें धनिकानीं आपल्या सपत्तीमधून ह्या कामासाठी निराळया देणग्या देण्याची अवश्यकता राहिलेली नाहीं असेंहि कित्येक श्रीमान् लोकास वाटूं लागलें आहे. मि. स्ट्राउस ह्या नावाच्या गृहस्थानें सुमारें १५ लक्ष रुपये धर्मादायासाठी देण्याचें ठरविलें असता ह्या कारणासाठी मृत्युपूर्वी थोडे दिवस त्यानीं आपला हा बेत बदलला. स्वतःची कर्तबगारी किंवा नशीब ह्यांच्या जोरावर कोणीहि सपत्ति संपादन केली असली तरी तिच्यावर समाजाचा व राष्ट्राचा हक्क आहे हें तत्त्व आतां प्रस्थापित झालें आहे, हें प्रस्तुत विवेचनावरून ध्यानांत येईल.

---

### धुळे डिव्हिजन ( प. खानदेश ) फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स

नंदुरबार येथें श्री. प्रभु, असि रजि. को.सोसायटीज, धुळें याचे अध्यक्षतेखाली ता. १३।१२।३६ रोजीं फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स झाली. सदर प्रसगीं ज्या त्या भागाचे सुपरवायझर्स, बॅकइन्स्पेक्टर्स, ऑडिटर्स, व यूनियन प्रतिनिधी हजर होते सदर सभेंत व्याजाची सवलत, नवीन कर्ज देण्याचें धोरण, तसेंच हल्लींच्या खालावलेल्या परिस्थितींत खालच्या वर्गाच्या सोसायट्या सुधारण्याबाबत उपाययोजना वगैरेसबंधीं महत्त्वाची वाटाघाट होऊन त्या दृष्टीनें ठराव पास करण्यात आले. वरील प्रकारचें धोरण ठरवितेवेळीं श्री रमणीकराय, मॅनेजर मुं प्रॉ. को बँक, व धुळ्याचे सीनियर इन्स्पेक्टर श्री काळे यानीं कॉन्फरन्समध्यें भाग घेऊन कॉन्फरन्स यशस्वी केली. मे असि. रजिष्ट्रार यानीं सर्वांचा मोकळेपणानें सल्ला घेतला. कॉन्फरसला हजर असलेले फील्ड वर्कर्स याची उतरण्याची वगैरे व्यवस्था रा.उपाचार्य, नंदुरबार सुपरवायझर, ह्यानीं उत्तर प्रकारें ठेविली हें भूषणावह होय तसेंच नंदुरबार यूनियनचे प्रेसिडेंट रा. सोमजी लाटेवारी ह्यानीं कॉन्फरन्सचे बाबतींत मेहनत घेतली

फक्त १ रु. ८ आण्यास ३ घड्याळें व १२९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या १६ कुप्या १ रु ८ आण्यास एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निकाचें फाउटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च ( किंवा ) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पांच वर्षे गॅरटीचें एक जर्मन 'बी' टाइम पसि पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

EASTERN TRADING CO.

*Post Box No. 12204, CULCUTTA ( 24 )*

## वायद्याचे करार: जॉबर व ब्रोकर ह्यांमधील लढा

### इंडियन मर्चंट्स चेंबरचा अभिप्राय

मुंबईच्या रोखे बाजाराचे व्यवहारात सुधारणा सुचविण्या-करिता नेमलेल्या कमिटीकडे इंडियन मर्चंट्स चेंबरनें आपलें मत पाठविलें आहे. वास्तविकपणें जरूर असलेल्या व्यवहारापेक्षा अनेक पटींनीं खरेदी–विक्री करण्याची रोखे बाजारातील पद्धति दलालास व पैसे गुतविणारांसहि हानिकारक आहे, असें मत सार्वत्रिक असल्याचें चेंबरच्या कमिटीस आढळून आलें. रोखीनेंच फक्त व्यवहार केले असता अशा तऱ्हेच्या मोहास आळा बसेल. तथापि, नेटिव्ह स्टॉक व शेअर ब्रोकर्स असोसिएशनला वायद्याचे करारहि समत असल्यानें व करार दर महिन्यास पुढें ढकलत नेण्याची तरतूद असल्यानें भरमसाट खरेदी व विक्री करण्यात धोका रहात नाहीं. औद्योगिक मडळ्याच्या भागांस कायम मागणी राहून त्याच्या किंमतींत विशेष चढ-घट होऊं नये, ह्या दृष्टीनें वायद्याचे करार समर्थनीय ठरले व भांडवलाचा पुरवठा कायम होत रहावा ह्याकरिता ही सवलत देणें श्रेयस्कर वाटलें, तरी अशा व्यवहारावर नियंत्रण घालणें इष्ट आहे, असें चेंबरचें मत आहे

चेंबरच्या पत्रकातील दुसरा मुद्दा, कित्येक ब्रोकर जॉबरचेंहि काम करतात, त्या बाबतचा आहे. लंडन येथील स्टॉक एक्सचेंज-मध्यें, तेथील सभासदाचे ब्रोकर व जॉबर असे दोन वर्ग करण्यात आले आहेत ब्रोकर हा आपल्या गिऱ्हाइकाच्या ऑर्डरी जमा करून त्याची खरेदी अगर विक्री घडवून आणीत असतो. ह्या उलट, जॉबरचा संबंध एक्सचेंजचे बाहेरील कोणत्याहि इसमाशीं असत नाहीं त्याचे व्यवहार इतर जॉबर व ब्रोकर ह्याचेशींच फक्त चालतात मुंबईच्या रोखेबाजारातील जॉबर मात्र खासगी गिऱ्हाइकाशींहि व्यवहार करतात आणि त्या कारणानें घोटाळा निर्माण होतो. आपल्या गिऱ्हाइकाची खरेदीची अगर विक्रीची ऑर्डर असली, तर हे जॉबर स्वतः प्रथम आपल्या नांवानें खरेदी अगर विक्री करून मधला नफा खातात व नंतर आपल्या गिऱ्हाइकास हे व्याहार वर्ग करतात. ह्याकारणानें खऱ्या ब्रोकर्सशीं जॉबर्सची अनिष्ट स्पर्धा होऊन ब्रोकर लोकाचें नुकसान होतें प्रत्येक वर्षाचे सुरवातीस आपण जॉबर अगर ब्रोकर म्हणून काम करणार हें सभासदाकडून लिहून घेऊन त्याप्रमाणें त्यास वागण्यास लावावें, अशी चेंबरनें सूचना केली आहे

रोखे बाजाराच्या व्यवस्थापक मंडळात १६ सभासद असावेत व त्यामध्यें मर्चंट्स चेंबर, मुंबईची श्रॉफ असोसिएशन व प्रातिक असेंब्ली ह्याच्या प्रतिनिधींचा समावेश व्हावा असेंहि चेंबरनें सुचविलें आहे.

---

### जत्रांमधील करमणुकीचा धंदा

जत्रा व प्रदर्शनें ह्यामध्यें रहाट, चक्रें, जादूगिरी, चित्रें, पुतळे इत्यादि करमणुकीचे खेळ लावण्याचा धंदा हिंदुस्थानात चालतो, हें सुप्रसिद्ध आहे जनतेच्या करमणुकीचा हा उद्योग ग्रेटब्रिटन-सारख्या पाश्चात्य देशातहि लोकप्रिय आहे. यामध्यें ७० हजार लोकांस आज काम मिळत असून २२ कोटि रुपयांचें भांडवल गुतलेलें आहे दरवर्षी सुमारें अडीच कोटि लोक निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या ठिकाणीं भरणाऱ्या जत्रा पहावयास जातात, असा अंदाज आहे ग्रेटब्रिटनमध्यें भरणाऱ्या जत्रांत जनमन-रंजनाचा धंदा करणाऱ्या लोकाची अत्यत कार्यक्षम अशी संघटना आहे.

Fergusson College Rd. Poona 2. Phone No 513

DECCAN TALKIES

"His Brother's Wife"
M. G M Picture
Starring
Barbara Stanwyck & Robert Taylor
From Wed. 20th to Fri 22nd

"Crime & Punishment"
A Columbia Picture.] [with Edward Arnold
From Sat 23rd to Tue 26th

हंस पिक्चर्सचा २ रा
अद्वितीय बोलपट
धर्मवीर
मिनर्व्हा टॉकीजमध्यें पहा
लेखक : प्रि. अत्रे
—भूमिका—
बाबूराव पेंढारकर, विनायक,
रत्नप्रभा, इंदिरा वाडकर.

स्वदेशी रग्ज आणि ब्लँकेट्स
शभर टक्के अस्सल लोकरीचे असल्याकारणानें
विदेशी कापूस मिसळलेल्यापेक्षां उबेस श्रेष्ठ.
किंमत रु. २–३–० पासून
महाराष्ट्र स्वदेशी स्टोअर्स, ४६२ बुधवार, पुणें

स्थापना १९२०

प्रथम मुंबई सरकारने व कोल्हापूर
सरकारनें मान्य केलेले
जाधव टेलरिंग कॉलेज
मॅट्रिक पास विद्यार्थ्यांकरिता ६ महिन्याचा स्पेशल कोर्स, स्पेशल फी; शिवाय सरकारी परीक्षेस बसविले जाईल या सवलतीचा फायदा घ्या. ता १५ जाने. आंत नावें नोंदवा [ ४९७ बुधवार, पुणें २

## दि बँक ऑफ इंडिया लि.

३१ डिसेंबर १९३६ अखेर संपलेल्या वर्षी बँक ऑफ इंडियास, मागील वर्षांतून ओढलेले रु ६,०३,९९०-४-७ धरून एकूण झालेला नफा—२६,६७,१७१ रु १५ आणे ४ पै

| | |
|---|---|
| चालू वर्षाचा प्राप्तीवरील कर व सुपरटॅक्स देण्यास लागणाऱ्या रकमेची तरतूद .. | १,५०,००० ०-० |
| ३० जून १९३६ रोजीं पहिल्या सहामाहीचें १० टक्के दरानें डिव्हिडंड जाहीर केलें, त्याबद्दल दिलेली रकम . . | ५,००,०००-० ० |
| नफा वांटणीकरता आता २०,१७,१७१ १५ आ ४ पै राहातात | |
| ३१ डिसेंबर अखेरच्या वर्षाचें १० टक्के दरानें करमाफ डिव्हिडंड कायम करण्याचें डायरेक्टरानीं ठरविलें आहे ... . | ५,००,०००-० ० |
| प्रत्येक भागास आठ आणे ( दरसाल १% ) प्राप्तीवरील कर माफ बोनस | १,००,०००,-०-० |
| बॅंकेच्या मालमत्तेचे खार्ती वर्ग | २,५०,०००-०-० |
| कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह | २,५०,०००-०-० |
| बँकेच्या रिझर्व्ह फंडाकडे वर्ग | १,५०,०००-०-० |
| पुढील वर्षांत ओढण्याकरिता (नोकर वर्गाग बोनस दिल्यास तो ह्यातून यावयाचा आहे ) | ६,६७,१७१-१५-४ |

### मोटारींच्या व्यापारांत अमेरिकेचें अग्रेसरत्व

१९३५ सालीं सबंद जगात मिळून ३,७०,००,००० मोटरगाड्या वापरात होत्या ह्यापैकीं ४६,४८,७०० गाड्या ब्रिटिश साम्राज्यातील देशामध्यें उपयोगात आणल्या जात होत्या अमेरिकेंत २ कोटी ६० लक्ष मोटरगाड्या खपल्या, ग्रेटब्रिटनचे वाटणीस फक्त २० लक्ष गाड्या आल्या. क्षेत्रफळाचे मानानें पहाता मात्र ग्रेट ब्रिटनमध्यें दर चौरस मैलास २२, फ्रान्समध्ये १० व अमेरिकेंत ९ गाड्या, असें प्रमाण पडतें हिंदुस्थानात १० चौरस मैलास एक गाडी इतकें अल्प प्रमाण आहे लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार केला असता, अमेरिकेंतील प्रत्येक पाच माणसागणिक एक मोटार आहे ब्रिटिश साम्राज्यात १०६ माणसांचे वाट्यास एक मोटार येते, तर जगांतील उरलेल्या भागात २७८ १ असें प्रमाण पडतें १९३५ सालीं अमेरिकेनें ४० लक्ष मोटारी तयार केल्या हा आकडा ग्रेटब्रिटनमधील उत्पादनाचे दसपट आहे ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका हीं मोटारींचीं सर्वांत मोठीं गिऱ्हाइकें आहेत मोटार सायकली जर्मनीमध्यें सर्वांत अधिक लोकप्रिय आहेत ग्रेटब्रिटनमध्यें मोटर सायकलींचें उत्पादन जर्मनीचे खालोखाल होतें.

### ॲबिसीनियाच्या माजी बादशहांची हलाखी.

ॲबिसीनियाचे माजी बादशहास स्वदेशत्याग करून जवळचें किडुकमिडुक विकून गुजारा करण्याची पाळी आली आहे त्यानीं आपलीं चांदीचीं भांडींकुंडीं लिलावानें विकलीं, त्याचे सुमारें ३० हजार रुपये आले त्याचेजवळ सुमारें वीस लक्ष रुपये किंमतीचे कंपन्याचे शेअर आहेत पण ते विकून त्याचा रोकड पैसा ह्या माजी राजास उभा करता येईल किंवा नाहीं, ह्याविषयीं शंका आहे हे शेअर बादशहाच्या मालकीचे नसून आपण जिकलेल्या राज्याच्या मालकीचे आहेत, असें इटलीचें म्हणणें आहे


# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता . MAHABANK : फोन नं ५७२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : : : १०,००,००० |
| विक्रीस काढलेले भांडवल : | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल : | २,०९,६५० |
| रोख भरलेले भाडवल . | १,०४,५२५ |

## दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द २॥ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यापासून पाच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी

कर्जे, सोनें, चादी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिश. पतीवर रकमा दिल्या जातात

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यावरहि कर्जे दिली जातात

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात

कर्जरोख्याची खरेदीविक्री त्यावरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते खात्यात भरलेलें मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमाबद्दल बँकेकडे चौकशी करावी

एम् व्ही गोखले,
मॅनेजर

# धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

## नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा.—

स्वदेशप्रेमी लोकानीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचे कर्तव्य आहे जनतेची सेवा करणें हेंच आमचे ध्येय आहे वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर

## दूधपुरवठ्याची नवी सहकारी योजना

मुंबई शहरात सहकारी तत्त्वावर दुधाचें उत्पादन आणि विक्री करण्याची एक योजना श्री. बी. जी. आठल्ये ह्यांनीं तयार केली आहे.

दुधाचें उत्पादन करण्याचें काम असोसिएटेड को-ऑपरेटिव्ह डेअरीज लि कडे राहील व कन्झूमर्स को-ऑपरेटिव्ह यूनियन लि ही दुधाच्या पुरवठ्याकडे लक्ष देईल. (१) दूध देणाऱ्या सुमारें १० म्हशी आणून व रोजी १७० पौंड दूध पुरविण्याचें कबूल करून खेरीज (२) वरील दोन्ही सस्थाचा एक एक भाग घेणारा असोसिएटेड को-ऑपरेटिव्ह डेअरीज लि. चा सभासद होऊ शकेल प्रत्येक सभासदास जनावरांची खरेदी-विक्री, कडब्याची वगैरे खरेदी, इत्यादि बाबतींत स्वातंत्र्य राहील. तथापि, कन्झूमर्स को-ऑपरेटिव्ह यूनियनशीं केलेला करार नीट पाळला जावा, ह्याप्रीत्यर्थ सभासदाची एक मॅनेजिंग कमिटी नेमण्यात येईल एका पगारी सभासद-मॅनेजिंग सुपरिटेंडेंट-करवीं कमिटी कारभार पाहील

बॉबे डेव्हलपमेंट डिपार्टमेंटच्या मालकीच्या कांदिवली येथील जमिनीपैकीं२००एकर जागा श्री आठल्ये ह्यांनीं मुक्रर केली आहे रेल्वे स्टेशनापासून दीड मैलावर ही जागा असून तींत पाणी-पुरवठाहि मुबलक आहे सरकारकडून जागा भाड्यानें घेण्याबाबत वाटाघाट चालू आहे सुशिक्षित गवळ्याची वसाहत करण्याचा हा प्रस्तुत प्रयत्न आहे. श्री आठल्ये ह्यांनीं दुधाच्या उत्पादनाच्या व विक्रीच्या उत्पन्नखर्चाचे आकडे दिले आहेत, त्यावरून सदरहु योजना यशस्वी होईल असा भरवसा वाटतो

कन्झूमर्स यूनियन ही सस्था नियंत्रित भाडवलाची कपनी असून तिचें भाडवल पाच लाखांचें आहे ५० हजारांचे भाग खपल्याबरोबर तिच्या कामास सुरवात होईल दररोज उत्पादन होणाऱ्या १२५ मण दुधापैकीं ६० मण दूध घाउक विकलें जाईल व जवळ जवळ तितकेंच दूध घरोघर नेऊन घालावें लागेल दहा केन्द्रातून ह्या दुधाची वाटणी केली जाईल

चागलीं जनावरें खाटकांच्या तावडींतून वाचवून,दुभत्या जनावराची निपज करणें व पारड्या जनावरास पोसून नव्या जनावरास याव्या लागणाऱ्या किंमतींत बचत करणें,ह्या दृष्टीनेंहि प्रयत्न करण्यात यावयाचा आहे कांदिवली येथील योजना यशस्वी झाल्यास तापी व नर्मदा खोऱ्यात सुरती म्हशींचे गोठे करण्याचाहि विचार आहे शहरात दूध महाग मिळतें, परतु खेडेगावात त्याचें स्वस्त किंमतींत उत्पादन होऊ शकतें ह्या दोहोंचा सयोग घडवून आणणारी ही योजना यशस्वी होईल अशी अपेक्षा आहे.


**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेंपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

म्यानेजिंग एजंटस्

**POONA CIRCULATING LIBRARY**

Deccan Gymkhana, POONA 4

Magazines & Books supplied in your own home. Over 100 different English Marathi, Hindi, Bengali, Gujrati, French & German journals to choose from.

*For particulars see or write to* —

D P ATHALYE,
*Proprietor*

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धद्यातील विशेष होय "

भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणे २

**महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे** थंडी-

गिरगांव, मुंबई करतां

## झारापकर टेलरिंग कॉलेज

### सरकारी परीक्षेचा निकाल व बक्षिससमारंभ

येथील सरकारमान्य झारापकर टेलरिंग कॉलेजचें सरकारी परीक्षेला बसलेले पुढील सर्व विद्यार्थी पास होऊन शे १०० टक्के निकाल लागला

१ श्री. मुजावर डी आर इचलकरजी, २ शेटी के एन् मंगळूर, ३ टेकवडे एस. एम. पुरंदर, ४ अडविरकर एस. व्ही. रत्नागिरी, ५ कुळकर्णी एम. एम खानदेश ६ पुराणिक जी. सी जळगाव, ७ देशपांडे आर. आर जमखडी, ८ जोशी व्ही जी सावतवाडी, ९ पुजारी व्ही आर नागपूर, १० कपलाने एम एस. आळंदी

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचें अभिनंदन करण्यासाठीं प्रो रा वि. ओतुरकर एम ए याचे अध्यक्षतेखालीं सभा भरली होती त्या वेळीं प्रभात सिनेटोनचे श्री. वसंतराव देसाई, श्री जवखेडकर, श्री. पटेल, श्री टेकवडे, श्री पाठक, श्री, गोडबोडे, श्री. शेट्टी, श्री. भट, श्री. जोशी, इत्यादींचीं विद्यार्थ्यांच्या अभिनंदनपर भाषणें झालीं शेवटीं प्रो ओतुरकर यानीं विद्यार्थ्यांना मार्गदर्शक होतील अशातऱ्हेचे विचार मांडले. अल्पोपाहार होऊन सभा विसर्जन झाली.

---

## जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें

### १०० टक्के फर्स्टक्लास पास

कमिटी ऑफ डायरेक्शन फॉर टेक्निकल एज्युकेशन, बॉम्बे प्रेसिडेन्सीतर्फे घेण्यात आलेल्या टेलरिंग–कटिंगच्या परीक्षेंत प्रथम सरकारमान्य जाधव टेलरिंग कॉलेजचे खालील सर्व विद्यार्थी फर्स्टक्लासमध्यें पास झाले

१ वरपे विनायक लक्ष्मण ( पुणें ), २ आत्मकोर-सॅम्पसन डेव्हिड ( सिकंदर ), ३ पानट वसंत शंकर (इ खा ), ४ मिसेस ए जॉर्ज डेव्हिड (हैद्राबाद), ५ गोडसे गजानन दत्तात्रय (पुणें), ६ नायक चिमणलाल शहा ( अहमदाबाद ), ७ आमरराज पॉल बेनिडिक्ट (सिकंदराबाद), ८ पतंगे तुकाराम मिठाप्पा (सोलापूर), ९ धारवाडकर मध्व भगवंत ( धारवाड ), १० मायकेल बरेटो (पुणें), ११ बेंद्रे वामन दत्तात्रय ( पुणें ), १२ घोडे वसंत विठ्ठल ( कुलाबा ), १३ चावडा माधवजी नारायणजी ( पुणें ), १४ करमाळेकर पांडुरंग विष्णू ( बीड )

---

### "शेतकी आणि शेतकरी"

ह्या मासिकाच्या जानेवारी, १९३७ च्या अंकात ग्रामसुधारणा, पिकें, खतें, इत्यादि विषयासंबंधीं उपयुक्त लेख आले आहेत आफ्रिकन बाजरीची अनुभवपूर्ण माहिती श्री देशपांडे ह्यानीं दिली आहे. बाजाची पिकें, पूर्व खानदेशातील धान्याची लागवड, पिकें व हाडें, इत्यादि लेखहि वाचनीय आहेत

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बॅंक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—३ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—४ |
| ४% १९६०–७० ... ... | ११४—० |
| ४% १९४३ ... ... ... | १११—१० |
| ३½% बिनमुदत .. ... ... | ९९—६ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षें मुदत) | ११०—१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११२–१२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) .. ... | १२५—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बॅंका

| | |
|---|---|
| बॅंक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १४०–८ |
| बॅंक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | ११८—० |
| सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) | ३६—४ |
| इंपीरिअल बॅंक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७५—० |
| रिझर्व्ह बॅंक ( १०० रु ) | १३७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९२०–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु डिव्हि. १३% ) | १५४—६ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६८–१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु ऑर्डि. डिव्हि ६½% ) | १५९५—० |
| टाटा पॉवर ( १,००० रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १६०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९७—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७७—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि ) | २७६—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु डिफर्ड ) | १०७७—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळ्यास | ३५—०–९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५०–१५–८ |

किंमत ओव्हरकोट खरेदी करा
रु. १२॥ बुधवार चौक, पुणें

॥ श्रीहेरंब भवतु ॥

## श्रीमाणकेश एजन्सी

**लुगडीं व खणाचे व्यापारी, मार्केट रोड, पुणें**

आमचे दुकान गेलीं चारपांच वर्षे लुगडी-खणासंबंधीं प्रसिद्ध आहेच. आम्हीं सर्व प्रकारची फॅन्सी किनार, मनमोहक रंग, चालू फॅशनचीं, पातळें व स्पेशल खास टिकेकरवाडी येथील माल ठेवला आहे. लांब रुंद भरपूर, पोतास सफाईदार, टिकण्यांत उत्तम असा नांवाजलेल्या—

**" दि टिकेकर टेक्स्टॉईल मिल " चा माल अगदी नवीन फॅशनचा ठेवला आहे.**

---

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख म्युच्युअल विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय

**प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.**

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

---

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult

## V. G. & Sons

**ELECTRICAL and RADIO ENGINEERS**
AND
**LICENSED ELECTRICAL CONTRACTORS**
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

---

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books
(2) We supply Government of Bombay, and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

---

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २७ जानेवारी, १९३७. अंक ४

## वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा

आपल्या अन्नांत माती कां कालवितां ?
स्वयपाकात वापरण्याचे सर्व जिन्नस निवडून साफ करून घेता मग मीठच तेवढें घाणेरडे कां वापरतां ?
आजच
'सोलर मिठा'ची आपल्या वाण्याकडे मागणी करा
आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हाला लिहा.
Uran Salt Works, 583 Chira Bazar, Bombay 2

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA

## पुणेकरांची सोय

घरपोंच

पुण्यात बनविलेल्या सिगारेट्स्

दर शेकडा

डेक्कन रेड. डेक्कन गोल्ड फ्लेक ओरायन मॅग्नम
३ आणे ७ आणे १ रुपया

ओढण्यास फारच उत्तम आहेत. अनुभव घ्या !

डेक्कन टोबॅको वर्क्स. पुणें ४.

—स्टॉकिस्ट—

शा प्रेमचंद कीलाचंद
तंबाखू आळी, पुणें

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं, अहमदाबाद

# विविध माहिती

### मोटार व्हेइकल्स कमिटीपुढें मराठा चेंबरची साक्ष

मोटारींच्या वाढत्या वहातुकीमुळें होत असलेल्या अपघातास आळा बसून उतारूच्या हिताचें सरक्षण व्हावें, ह्याकरितां सदरहु प्रश्नाची चौकशी करून सूचना करण्यासाठी नेमण्यात आलेल्या कमिटीपुढे साक्ष देण्याकरिता मराठा चेंबरतर्फे कार्याध्यक्ष, प्रो वा. गो काळे, व चिटणीस, श्री. आ रा भट, ह्यास मंगळवार, ता. २६ रोजीं बोलावण्यात आलें होतें. चेंबरनें आपलें म्हणणें कमिटीस लेखी आधी कळवलेलें आहेच.

### शेकडा ३३ राष्ट्रांनीं राष्ट्रसघांची वर्गणी दिली नाहीं

राष्ट्रसघाच्या एकूण ५८ सभासद-राष्ट्रांपैकी १९ राष्ट्रांनीं आपल्या १९३६ सालच्या वर्गणीची एक पै देखील राष्ट्रसंघास दिलेली नाहीं

### भढारदरा येथील धरण

प्रवरा नदीवरील भढारदऱ्याचा वुइल्सन डॅम २८२ फूट उंच असून त्याची लांबी १,६०० फूट आहे धरणामध्यें ११२०० कोटि घनफूट पाणी राहू शकतें. बांधकामास १९११ सालीं सुरवात झाली व तें १९२६ सालीं पुरें झालें

### सोलापूर गिरणीचे नवे मॅनेजिंग एजंट्स

सोलापूर स्पिनिंग अँण्ड वीव्हिंग कपनीनें आपल्या पहिल्या मॅनेजिंग एजंटाचे जागीं मेसर्स मुरारका आणि कपनी ह्यास नेमलें आहे. नव्या एजटांनीं आपली नेमणूक होईल ह्या अपेक्षेनें कंपनीस ९ लक्ष रुपये कर्जाऊ दिले असून, तिला खेळतें भाडवल पुरविण्याकरितां आणखी ५ लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें आहे. कंपनी चालविण्यास पुढें येणाऱ्या एजटांपैकीं मुरारका आणि कपनी ह्याच्याच अटी सर्वांत ज्यास्त अनुकूल होत्या

### रस्त्यांतले भयकर अपघात

गेल्या सहा वर्षांत ग्रेटब्रिटनमध्यें रस्त्यात झालेल्या अपघातांमुळें चाळीस हजारांच्यावर माणसें मृत्युमुखीं पडलीं आणि सुमारें तेरा लक्ष जायबदी झालीं.

### क्वेट्टा धरणीकंपांतून वांचलेली मालमत्ता

क्वेट्टा येथील धरणीकपात जमीनदोस्त झालेल्या इमारतींतला, डिसेंबर १९३६ अखेर, ५८३ लक्ष रुपये किंमतीचा माल उकरून काढून त्याच्या मालकाच्या स्वाधीन करण्यात आला.

### स्पेनमधील यादवींत भाग घेणारे परदेशीय लोक

स्पेनमधील अतस्थ यादवीमध्यें सरकारचे बाजूनें ४० हजार व जनरल फ्रँकोचे बाजूनें ३२ हजार मिळून सुमारें ७२ हजार परदेशी लोक भाग घेत आहेत असा अंदाज आहे जनरल फ्रँकोच्या ह्या सहायकांपैकीं १२ हजार जर्मन व २० हजार इटालियन आहेत

### ब्रिटिश पोस्टल सेव्हिंग बँकांतल्या ठेवी

गेल्या वर्ष अखेरचा ब्रिटिश पोस्टल सेव्हिंग्ज बँकांतील ठेवींचा आकडा ७५६ कोटि रुपये इतका होता. पर्वांच्या वर्षापेक्षां ५६ कोटींनीं हा आकडा मोठा आहे.

### इराणशीं वाटाघाट करण्याकरता जर्मन शिष्टमंडळ

"आम्हास तुमची कपास द्या, आम्हीं तिच्याबद्दल तुम्हांस यंत्रें पाठवितों व तुमच्या खाणींतून खनिज द्रव्यें काढण्यास सहाय करतों," अशा अर्थाची वाटाघाट करण्याकरतां एक जर्मन मंडळ इराणकडे रवाना झालें आहे.

### हजामतीचे आकडे व आकड्यांची हजामत

दररोज दाढी करणारा मनुष्य ४८ चौरस इंचांच्या क्षेत्रावर वस्तरा फिरवतो. ह्या क्षेत्रात २५ हजार केसांचें पीक असतें. ह्यांपैकी प्रत्येक केस प्रतिदिनीं एकशंभरांश इंच वाढतो. म्हणजे, प्रत्येकाच्या केसांची वाढ एकूण २५० इंच लांबीची होते. ग्रेट ब्रिटनमध्यें दीड कोटि लोक दररोज दाढी करतात असें मानलें तर १२५ एकराच्या केसांच्या रानात प्रतिदिनीं ५० हजार मैल लांबीचें पीक काढण्यात येतें असा हिशेब होतो. मुंबई टाइम्सच्या लंडन येथील प्रतिनिधीनें वरील आकडे दिले आहेत.

### हिंदुस्थान सरकारचे फडनवीस रजेवर जाणार

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, हे २४ एप्रिलपासून ४ महिने रजेवर स्वदेशीं जाणार आहेत.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आणा व्याजाचा दर

ता. १९ जानेवारी रोजीं १ कोटि रुपयांचीं ३ महिने मुदतीचीं ट्रेझरी बिलें स्वीकारण्यात आलीं, त्यावर सरासरी व्याजाचा दर १ रु. १ आ. पडला.

### पूना सर्क्युलेटिंग लायब्ररी

वरील लायब्ररीनें ह्या महिन्यापासून "श्रीकृष्ण-निवास"मधील प्रशस्त जागेंत स्थलांतर केलें आहे ही जागा लायब्ररीच्या पहिल्या जागेसमोरच आहे.

### विलायतेंत नागपुरी संत्रीं

नागपुरी संत्र्याची हिंदुस्थानभर प्रसिद्धी आहे. रत्नागिरीच्या आंब्याप्रमाणें हीं फळें विलायतेंत पाठवून विकतां आलीं तर एका स्वदेशी धंद्याचा उत्कर्ष होण्यास सधी मिळेल. गेल्या वर्षीं कांहीं नागपुरी संत्रीं इग्लंड व फ्रान्स इकडे पाठवण्यांत आलीं होतीं आणि हा व्यवहार यशस्वी झाला. इग्लंडमध्यें कॅम्डेन येथील संशोधन सस्थेमध्यें सध्या नागपुरी संत्रीं टिकवण्याबाबत प्रयोग चालू आहेत आणि तें काम मध्यप्रांतांतले एक विद्यार्थी, श्री. वैद्य, ह्याचेकडे सोंपविण्यात आलें आहे. ह्या प्रयोगास यश आल्यास नागपुरी संत्र्याची निर्गत पद्धतशीर रीतीनें मोठ्या प्रमाणांत होऊन हिंदी फळाच्या धंद्यास उत्तेजन मिळेल.

### वसई येथें टेलिफोनची सोय

वसई येथील व्यापाऱ्याचे सोईकरता त्या गांवामध्यें ऑटोमॅटिक टेलिफोनची व्यवस्था करण्याचें ठरलें असून, त्याप्रीत्यर्थ असेंब्लीच्या स्टँडिंग फायनॅन्स कमिटीनें २५ हजार रुपये मंजूर केले आहेत. वसई व मुंबई ह्याचे दरम्यान टेलिफोनची व्यवस्था असावी, ही कित्येक दिवसाची मागणी आतां फलद्रूप होत आहे.

### पुणें व कोल्हापूर टेलिफोननें जोडलें जाणार

पुणें व कोल्हापूर ह्या विभागातील टेलिफोनची वाण दूर करण्याचें ठरलें असून त्याप्रीत्यर्थ १ लक्ष रुपये मंजूर झाले आहेत.

### फेडरल कोर्टाकरितां नवी इमारत

हिंदुस्थानच्या नव्या राज्यघटनेमधील संयुक्त-फेडरल-कोर्टाची इमारत नव्या दिल्लीमध्यें बांधण्यांत येणार असून तिला अदाजें तीन लक्ष रुपये खर्च येईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| १०-१-३७ ते १६-१-३७ | ५८,७९,८८२ |
| १७-२-३७ ते २३-१-३७ | ४१,०६,१४३ |
| २१-९-३१ ते २३-१-३७ | २,९९,०२,३५,६७९ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... .. | ३८ |
| २ रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा ... ... . | ३९ |
| ३ बाजारभावाची चढती कमान .. . | ४० |
| ४ ब्रिटिश हिंदुस्थानातील इस्पितळें व त्यांमधील रोगी | ४० |
| ५ स्फुट विचार ... | ४१ |
| बजेटें जवळ आलीं–स्टॉक एक्सचेंज आणि मराठा चेंबर–चित्रपटांच्या धंद्याची प्रगति—मोटार गाड्या व दुखापतीचा विमा–राज्यारोहणासंबंधांतील विमा—मुंबई शहरांतील मोटारींचे अपघात | |
| ६ खारापकर टेलरिंग कॉलेज | ४३ |
| ७ नोकराच्या मर्यादातिक्रमाबद्दल मालकावरील जबाबदारी ... .. ... | ४३ |
| ८ मीठ आणि समुद्र ... | ४४ |
| ९ औषधांची आयात ... | ४५ |
| १० निवडक बाजारभाव ... | ४५ |
| ११ गैरसावधपणाचें प्रायश्चित | ४६ |
| १२ शतायु ब्रिटिश बँक ... | ४६ |



# अर्थ

बुधवार, ता. २७ जानेवारी, १९३७


## रिझर्व्ह बॅंक आणि शेतीचा धंदा

(२)

### दुहेरी मर्यादा

प्रस्तुत लेखमालेंत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारास जा रिपोर्ट सादर केला आहे त्याचा पृथक्करणपूर्वक साराश देऊन त्यांतील मुख्य मुद्यांचें विवेचन करण्याचा आमचा विचार आहे. रिपोर्टाच्या पहिल्या प्रकरणात प्रस्तावनात्मक मजकूर आहे. त्यात असें म्हटलें आहे कीं, रिझर्व्ह बॅंक अस्तित्वात येण्यापूर्वीच हिंदुस्थान सरकारनें मि. डार्लिंग ह्याची नेमणूक करून सहकारी संस्था व सावकार आज शेतीच्या धंद्यास भांडवल पुरवीत आहेत, त्याच्यामार्फत रिझर्व्ह बँकेस शेतकरी वर्गास कशी मदत करता येईल ह्याविषयीं चौकशी व सूचना करण्याच्या कामावर नेमलें होतें. व्यापारी बँका व सराफ लोक ह्याच्या धंद्याबाबत माहिती मिळवण्यास पुरेसा वेळ त्यास मिळाला नाहीं तरी मि. डार्लिंग ह्याचा रिपोर्ट आपणांस उपयोगी पडला असें सागून त्यातली माहिती गुप्त स्वरूपाची असल्यानें ती आपण प्रत्यक्ष उद्धृत केलेली नाहीं असा शेरा रिझर्व्ह बँकेनें मारला आहे सराफ व सावकार ह्यास रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत कसें आणता येईल ह्याबद्दलची माहिती जिल्हाधिकाऱ्याच्या करवीं जमा करून तिच्या आधारावर आपला स्वत:चा अभिप्राय व्यक्त करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारामार्फत रिझर्व्ह बँकेनें प्रांतिक सरकारांस विनंति केली. सराफ व सावकार स्वत. धंदेवाले म्हणून रजिस्टर करून घेण्यास तयार होतील किंवा नाहीं आणि आपल्या व्यवहाराचे हिशेब ठराविक पद्धतीनें ठेवण्याची त्यांची तयारी आहे किंवा कसें ह्या प्रश्नांवर विशेषेंकरून जरूर ती माहिती पुरवावी, असें प्रांतिक सरकारास कळवण्यात आलें. ह्या रीतीची चौकशी करण्यात कांहीं हशील नाहीं आणि शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत प्रचलित झालेल्या कायद्यांचा परिणाम काय होतो हें पाहूनच आपलें मत व्यक्त करणें बरें, अशीं उत्तरें बहुतेक प्रांतिक सरकारांकडून रिझर्व्ह बँकेस गेल्यामुळें पुढील विधायक कार्याचा प्रश्न येथच आटोपला. प्रातिक सरकारांचे अभिप्राय हातीं येईतोंपर्यंत अगोदरच उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारावर, पुढें सोडवावयाच्या मुख्य प्रश्नासंबंधाचे आपले प्रास्ताविक विचार एकत्र करून मांडावयाचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आणि प्रस्तुत रिपोर्ट लिहून प्रसिद्ध केला.

आपल्या रिपोर्टांत नवीन असें कांहींच नाहीं, कमिशनें व कमिट्या ह्यानीं पूर्वींच प्रसिद्ध केलेले आणि प्रांतिक सरकारानीं विचारात घेतलेले अभिप्राय ह्यांचाच पुनरुच्चार आपण करीत आहों आणि ह्या संकलनाचा ज्यास्त चौकशी व चर्चा ह्यांस उपयोग होईल असें रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टांत स्वच्छ म्हटलें आहे वेळ व पैसा ह्याचा खर्च होऊन बँकिंग कमिट्यांनीं शिफारसी करून सहा वर्षे लोटलीं असतां रिझर्व्ह बँकेस स्वत:च्या दृष्टीनें आवश्यक व इष्ट असलेल्या विधायक सूचना व योजना पुढें मांडतां येऊं नयेत आणि प्रांतिक सरकारासहि आणखी कालक्षेपाची जरूर भासावी हें आश्चर्यकारक आहे. अमूक प्रकारच्या परिस्थितींत व अमूक अटींवर आपणांस विशिष्ट पद्धतीनें अपेक्षित कार्य करता येणें शक्य आहे असें रिझर्व्ह बँकेनें प्रातिक सरकारास कळवलें असतें तर सध्याप्रमाणें प्रस्तुत प्रश्नाचा डाव कुजला नसता आणि त्याचें आणखी एक पाऊल प्रगतीच्या मार्गांत पडलें असतें ह्या दृष्टीनें पाहिलें असतां रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट निराशाजनक आहे, असें म्हटल्यावाचून गत्यंतर नाहीं. वर नमूद केलेल्या परिस्थितींत शेती कमिशन, बँकिंग कमिट्या इत्यादींच्या एखाद्या अभ्यासकानें लिहिलेल्या निबंधाचें स्वरूप ह्या रिपोर्टास आलें असल्यास आश्चर्य नाहीं "आम्हीं नवीन असें कांहींच सांगत नाहीं" असें एकादा रिझर्व्ह बँकेनें म्हटलें म्हणजे तिच्या लिखाणावर टीका करण्यास अवसरच रहात नाहीं असें होतें.

रिपोर्टाच्या दुसऱ्या प्रकरणात सर्वसाधारण प्रकारची चर्चा आहे आणि "शेतीच्या धंद्यात लागणारा पैसा" म्हणजे काय ह्याचें प्रथम विवेचन आहे जमीनींतून पिकें काढण्यास लागणारी सामुग्री अशा मर्यादित अर्थानें ह्या शब्दसमुच्चयाचा उपयोग करतां येईल शेतकऱ्यास हरतऱ्हेच्या कामासाठीं, म्हणजे बी-बियाणें, बल आउतें, जोड धंदे, कर्जफेड, लग्नकार्यासारखे प्रसंग इत्यादि बाबींकरितां जरूर असलेला पैसा ह्या अर्थानेंहि तो वापरतां येईल शेतीच्या मालाचा उठाव व विक्री ह्यात गुंतणाऱ्या पैशाचाहि ह्या संबधात अतर्भाव केला पाहिजे आणि असें झालें म्हणजे शेतीच्या गुतागुंतीच्या व्यवहारात पैशाच पुरवठा कसा व्हावा लागतो ह्याची कल्पना येईल ह्या तिन्ही दृष्टींनीं शेतकरी वर्गाच्या व्यावहारिक जीवनाचा विचार करण्याचा संकल्प सोडून रिपोर्टाच्या लेखकानें विवेचनास प्रारभ केला आहे. शेतकऱ्याच्या द्रव्यविषयक गरजा भागवण्याच्या व्यवस्थेस दोन प्रकारच्या मर्यादा असतात. ज्या तऱ्हेचा व्यवहार करणाऱ्या संस्था किंवा धंदेवाले शेतकऱ्यास पैसे पुरवतात त्या तऱ्हेची एक मर्यादा असते आणि दुसरी मर्यादा शेतीच्या वैशिष्ट्यातच मूलभूत अशी आहे. ह्या दुहेरी मर्यादेची बरोबर कल्पना न आल्याकारणानें शेतीस लागणारा पैसा कर्जाच्या मार्गानें पुरवतां येईल किंवा हा पैसा कर्जाऊ पुरवला गेला कीं शेतकऱ्याच्या सर्व अडचणी संपल्या अशी भ्रामक समजूत अनेक लोकांची असते. शेतकऱ्यास जणूं काय भरपूर कर्ज मिळण्याची सोय नाहीं

म्हणूनच केवळ तो दुःस्थितींत आहे आणि ही व्यवस्था झाली कीं शेतीच्या धंद्याचा प्रश्न सुटला! ह्या चुकीच्या समजुतीनें भलत्याच कल्पना लोकांच्या मनात पसरल्या असल्यामुळें वर निर्दिष्ट केलेल्या दुहेरी मर्यादाचें खुलासेवार विवेचन करणें जरूर आहे, ह्या आशयाची प्रस्तावना रिझर्व्ह बॅंकेच्या रिपोर्टांच्या दुसऱ्या प्रकरणात आहे कोणत्याहि धंद्यास चालू खर्चासाठी भांडवल लागतें आणि मोठमोठ्या कारखानदारांसहि तें कर्जाऊ घ्यावें लागतें ह्यात शंका नाहीं हें भांडवल किती मुदतीपुरतें लागणार व त्याची परतफेड कशी होणार हें प्रत्येक धंद्याच्या स्वरूपावर व परिस्थितीवर अवलंबून राहाणं स्वाभाविक आहे. सदरहू परिस्थितीस अनुरूप असाच भांडवलाचा उगम, वापर व परतफेड असणार हेंहि उघड आहे. ह्या दृष्टीनें शेतीच्या धंद्याचें व त्यास लागणाऱ्या भांडवलाच्या पुरवठ्याच्या मामुली व्यवस्थेचें स्वरूप काय आहे, ह्याचा विचार केला पाहिजे, आणि रिपोर्टांच्या प्रस्तुत प्रकरणात ह्याच विचाराचा विस्तार आहे.

## बाजारभावांची चढती कमान

शस्त्रास्त्राचे कारखाने व त्यास पोषक असलेले धंदे ह्यामध्यें अनेक देशात सध्या जोरानें काम चाललें आहे आणि युद्ध उपस्थित होण्याच्या भीतीमुळें चरितार्थास लागणाऱ्या वस्तूंच्या पुरवठ्याची तरतूद करणें त्यांस आवश्यक वाटत आहे. विशिष्ट जातींचा कच्चा व अर्धा—पक्का माल ह्यांस सदरहू कारणांमुळें अधिक मागणी उत्पन्न होऊन त्याचे बाजारभाव चढले आहेत पुढें मालाचा पुरवठा मर्यादित होणार ह्या कल्पनेनें कारखानदार व घाउक व्यापारी आपल्या मालाच्या किंमती चढवीत आहेत. काहीं कच्चा माल व खाण्याच्या जिनसा ह्याचा व्यवहार व व्यापार सबंध जगाच्या पाठीवर चालतो आणि त्याचे बाजारभावातला चढउतार एकदम सर्व बाजारपेठात अनुभवास येतो हिंदुस्थानांत गेल्या तीन-चार आठवड्यात कित्येक जिनसाच्या किमती चढणीस लागलेल्या दिसून येतात ह्याचें कारण वर वर्णिलेली जागतिक घडामोड हें आहे. कच्च्या मालाचे बाजारभाव इंग्लंडमध्यें गेल्या दोन महिन्यांत ८–९ टक्क्यांनीं चढले आहेत आणि अमेरिकेंतहि तशीच प्रवृत्ति दिसून येत आहे खाण्याचें धान्य, गळिताचीं धान्यें, तांबें वगैरे धातु, ह्याच्या किमती चढल्या असून त्या चढीचा परिणाम इतर बाजारभावावर कमी—अधिक प्रमाणात होणें अपरिहार्य आहे मोठे कारखानदार व घाउक व्यापारी पूर्वीच्या भावानें लांब मुदतीचे सवदे करण्यास तयार नसणें त्याचप्रमाणें स्वाहजिक आहे बाजारभावाचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेतः—

तुलनात्मक बाजारभाव

१९३१ = १००

| १९३६ | इंग्लंड (एकूण भाव) | इंग्लंड (कच्चा माल) | अमेरिका | फ्रान्स |
|---|---|---|---|---|
| सप्टें. ३० | १२१ | १४४ | १२१ | ९६ |
| ऑक्टो. २८ | १२३ | १४५ | १२२ | १०२ |
| नोव्हें. ११ | १२५ | १४८ | १२३ | १०५ |
| नोव्हें २५ | १२६ | १५० | १२४ | १०७ |
| डिसें. ९ | १२८ | १५७ | १२५ | १०९ |
| डिसें. ३० | १३१ | १६३ | १२७ | ११२ |

केवळ ग्रेटब्रिटनमध्यें चलती कशी झाली आहे, हें खालच्या तुलनात्मक आकड्यांवरून समजून येईल:—

ब्रिटिश बाजारभाव

१९२७ = १००

| | नोव्हें. २५ १९३६ | डिसें. ९ १९३६ | डिसें. ३० १९३६ |
|---|---|---|---|
| धान्य व मास | ८१ | ८३ | ८६ |
| खाण्याचे इतर पदार्थ | ६४ | ६५ | ६५ |
| सूत व कापड | ६६ | ६६ | ६७ |
| धातू | ९० | ९२ | ९५ |
| इतर जिन्नस | ७८ | ७९ | ८१ |
| एकूण | ७६ | ७७ | ७९ |

## ब्रिटिश हिंदुस्थानांतील इस्पितळें व त्यांमधील रोगी

( १९३४ चा ताजा अहवाल )

ब्रिटिश हिंदुस्थानांत १९३४ अखेर इंग्रजी पद्धतीनें औषधोपचार करणाऱ्या एकूण ६,५९७ इस्पितळें व दवाखाने ह्या सस्थापैकीं १,३५६ मद्रास इलाख्यात, १,३१० बंगालमध्यें व मुंबईत फक्त ६८६ होत्या प्रत्येक सस्थेनें सरासरीनें ४१,८०० लोकांस औषधपाणी दिलें.

ह्या संस्थापैकीं शेंकडा ७९ सरकारी अगर निमसरकारी होत्या. फक्त ५४५ संस्थाचा खर्च खाजगी वर्गणींतून चालत असे. खेड्यापाड्यातून औषधपाण्याची व्यवस्था अत्यंत असमाधानकारक आहे.

सर्व तऱ्हेच्या इस्पितळांत व दवाखान्यात मिळून ७२,००० रोग्यांस ठेवून घेऊन औषधोपचार करण्याची सोय आहे अहवालाचे सालीं एकूण ७३ कोटि रोग्यास औषध दिलें गेलें, त्यापैकीं ४३ कोटि पुरुष होते ह्यावरून, स्त्रियामध्यें आरोग्य जास्त प्रमाणांत आढळून येतें, असा मात्र निष्कर्ष निघत नाहीं स्त्रियाची इस्पितळातून पुरेशी सोय नाहीं व त्या औषधपाण्यासाठी घराबाहेर सहसा पडत नाहींत हें स्त्री-रोगी अल्प प्रमाणांत असण्याचें कारण आहे.

सरकारकडून व स्थानिक सस्थांकडून मिळून इस्पितळांस ४३ कोटि रुपये ग्रँट मिळाली एकूण खर्चापैकीं ९६ लक्ष रु. डॉक्टराच्या पगारात गेले, ३६३ लक्ष रुपये परिचारिकास दिले गेले, ३०३ लक्ष रु. अन्नखर्च आला व ४९ लक्ष रुपयाचीं औषधें लागलीं

१९३४ सालीं सर्व इस्पितळांत मिळून ३,६९७ परिचारिका कामावर होत्या ह्यापैकीं ३,४८६ नीं शहरात व २११ नीं खेडेगावात काम केलें खेडेगांवात शुश्रूषेची अद्याप समाधानकारक व्यवस्था झालेली नाहीं

१९ वेड्याच्या इस्पितळांत, १०३ हजार पुरुष व ३ हजार स्त्रिया मिळून १३३ हजार लोक होते हीं इस्पितळें चालविण्यास ३५ लक्ष रुपये खर्च आला: १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानातील वेड्याची संख्या ९८,००० आहे.

ब्रिटिश हिंदुस्थानातील १० वैद्यकीय कॉलेजापैकीं बंगाल, मुंबई व मद्रास ह्याच्या वाट्यास प्रत्येकीं २ कॉलेजं येतात. वैद्यकीय शाळांची संख्या २८ असून त्यापैकीं मुंबई इलाख्यांत ५ आहेत

# स्फुट विचार

### बजेटें जवळ आलीं!

दर वर्षी फेब्रुआरी–मार्च महिन्यांत मध्यवर्ती व प्रांतिक सरकाराच्या बजेटाचें स्वरूप हा तर्क-वितर्कांचा विषय होऊन बसतो. चालू वर्षांत झालेली सरकारी तिजोरीची आवक-जावक, आर्थिक परिस्थितीमुळें खर्चांबाबत उत्पन्न झालेल्या व होणाऱ्या गरजा, इत्यादि बाबींवरून फडनवीसाचें बजेट कसें होणार ह्याची कल्पना करण्यांत येते उत्पन्नासबंधाची सरकारची स्थिति अनुकूल नसेल आणि ज्या एकूण आर्थिक घडामोडींवर ती अवलबून असणें अपरिहार्य आहे, त्या प्रतिकूल दिशेनें चालल्या असतील तर उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी होण्यासाठी जुने कर वाढवणें किंवा नवीन कर बसवणें ह्या मार्गाचा अवलंब फडनवीसास करावा लागतो कर देणारी जनता आपल्यावरचा सरकारी देण्याचा भार कांहीं कमी होईल का ह्याची काळजी वहात असते तर धंदेवाले व व्यापारी लोक आपल्या व्यवसायावर येत्या बजेटाचा कसा परिणाम होणें संभवनीय आहे, ह्याचा विचार करीत असतात. बजेटाचें स्वरूप हेरून आपल्या व्यवसायाच्या धोरणास वळण लावण्याचा यत्न कित्येक धंदेवाले करतात ह्या रीतीनें राष्ट्रीय व प्रांतिक बजेटाचे परिणाम दूरगामी होत असल्यानें त्याविषयीं सार्वत्रिक कुतूहल असणें स्वाभाविक आहे सहरहु बाबतींत तर्क लढवून व्यवहार करणें हें अनेक वेळा जुगार खेळण्यासारखें असतें आणि बजेटाच्या प्रतिकूल परिणामाचा विमा उतरण्याच्या पद्धतीचा अवलंब करण्याचीहि प्रथा पाश्चात्य देशात पडलेली आढळते हिंदुस्थान सरकारास चालू सालीं जकातीचें उत्पन्न अपेक्षेच्या मानानें कमी येणार हें सरसबधाचे प्रसिद्ध झालेले आकडे सागत आहेत रेल्वेजची आवक अंदाजापेक्षा बरी आहे व चांदीच्या आयातीनें सरकारला हात दिला आहे, पण कस्टम्समध्यें एकूण दीड कोटि रुपयाची खोट येईल असें दिसतें नवीन प्रांतिक राज्यघटनेची अंमलबजावणी येत्या एप्रिलपासून व्हावयाची आहे, तिच्या जादा खर्चाचा ताण मध्यवर्ती तिजोरीवर पडावयाचा आहे ह्यासाठी हिंदी फडनवीसांनीं मागील वाढाव्यांतून दोन अडीच कोटि रुपये बाजूस काढून ठेवले असले तरी येत्या बजेटात उत्पन्न–खर्चाची तोंडमिळवणी करण त्यांस अवघड जाईल असा रंग आहे पाऊसपाण्याच्या प्रतिकूल परिस्थितीमुळें मुंबई इलाख्याच्या बजेटात तूट येण्याची भीति आहे आणि नवीन राज्यघटनेच्या अमदानींत प्रधानमंडळावर ह्यासबधात अवघड जबाबदारी येऊन पडणार आहे

### स्टॉक एक्सचेंज आणि मराठा चेंबर

मुंबईच्या रोखेबाजाराच्या पद्धतींत अवश्यक असलेल्या सुधारणाबाबत येथील मराठा चेंबरनें आपला अभिप्राय त्यासबधात चौकशी करण्यासाठी नेमलेल्या कमिटीस सादर केला आहे महाराष्ट्रातील व्यापारी व सहकारी बँका, विमामडळ्या, सार्वजनिक संस्था व व्यक्ती ह्यांचेमध्यें कर्जरोखे व भाग ह्यात पैसे गुंतवण्याची सवय वाढत असून मुंबईच्या रोखेबाजारांत भरमसाट चढउतार न होता व्यवस्थित रीतीनें काम चालावें अशी त्या सर्वांची इच्छा आहे. तीस अनुसरून चेंबरनें कांहीं ठळक मुद्यासबधानें विधायक सूचना केल्या आहेत. वायद्याच्या व्यवहारामुळें रोख्याच्या भावात स्थिरता उत्पन्न होण्यास सहाय होतें हें तत्त्व चेंबरला मान्य असून वायद्याची मुदत एक महिन्याचे ऐवजी पधरावडा असावी-असें तिनें सुचविलें आहे कांहीं दलाल स्वत.चाच धंदा करतात हें चागलें नाहीं, त्याचे प्रत्येकीं ठराविक दुय्यम दलाल निश्चित असावे व ह्यानीं एकाच दलालास चिकटून रहावें, म्हणजे अवाच्या सवा व्यवहार होणार नाहींत असें चेंबरनें म्हटलें आहे दलालाच्या मुबईबाहेरील एजंटास मुबईमधील दुय्यम दलालासारखेंच समजण्यात यावें अशीहि तिची शिफारस आहे आणीबाणीच्या प्रसगीं उपयोगात आणावयाचे नियत्रणाचे अधिकार स्टॉक एक्सचेंजच्या नियामक मंडळास असले पाहिजेत आणि त्याबद्दलचे नियम अमलात यावेत, ह्या नियामक मडळात व्यापारी व सहकारी बॅंका, विमामडळ्या वगैरेंचे चार प्रतिनिधी घ्यावे आणि प्रांतिक कायदेमडळानें निवडलेले प्रतिनिधी घेण्याचें प्रयोजन नाहीं असा अभिप्राय चेंबरनें व्यक्त केला आहे दलालानीं दुसऱ्या एक्सचेंजमध्यें धंदा करूं नये आणि त्याच्या दलालीचे दर निश्चित केले जाऊन गिऱ्हाइकाशीं होणाऱ्या कराराच्या पत्रकात दलाली स्पष्टपणानें नमूद झाली पाहिजे असा चेंबरचा आग्रह आहे स्टॉक एक्सचेंजच्या व्यवहारास जुगाराचें स्वरूप प्राप्त होऊन आणीबाणीचे व भयकर नुकसानीचे प्रसग उद्भवतात, ते कडक नियम केले तरी सर्वस्वी बद झाले नाहींत, तरी त्या योगानें जुगारी वृत्तीस काहीं तरी आळा बसेल. असें म्हणून पैसे गुंतवणाऱ्या जनतेस आपल्या हिताचें योग्य रक्षण होण्याची मागणी करण्याचा हक्क आहे असें तिनें प्रतिपादलें आहे

### चित्रपटांच्या धंद्याची प्रगति

सिनेमाच्या धंद्याची आर्थिक यशस्विता चित्रपटाच्या खपावर अवलबून असते. चित्रपट पहाण्यास जाणाराची सख्या लहान-मोठी असेल त्या मानानें सिनेमामालकास आणि चित्रपट बनवणारास फायदा होणार हें उघड आहे अमेरिकेनें सिनेमाच्या धंद्यात अपूर्व यश मिळविलें आहे, ह्याचें कारण चित्रपट दाखवण्याचीं ठिकाणें व त्याचीं गिऱ्हाइकें ह्याची प्रचड सख्या हें आहे हे चित्रपट अमेरिकेच्या बाहेर जातात हें खरें असलें तरी प्रत्यक्ष अमेरिकेमध्येंच सिनेमाचे चहाते व त्याच्या सोयी ह्याचे बाबतींत परिस्थिति अत्यत अनुकूल अशी आहे ब्रिटिश चित्रपटास स्थानिक गिऱ्हाइक त्या मानानें मर्यादित आहे, ह्यामुळें त्याच्या बनावटींवर अमेरिकेप्रमाणें वाटेल तसा खर्च करणें परवडत नाहीं आणि ते चित्रपट विशेष आकर्षक असे होत नाहींत अमेरिकेंत १४,५०० सिनेमागृहें असून त्यामध्यें १ कोटि प्रेक्षक बसण्याची सोय आहे ग्रेटब्रिटनमध्यें ४,३०० सिनेमागृहें आहेत, आणि त्यांत फक्त ३८,७२,००० माणसें बसू शकतात मूकपटाचे जागीं बोलपट आल्यापासून ब्रिटिश धंद्याचे मार्गांत आर्थिकच अडचण उपस्थित झाली आहे भाषेची अडचण हिंदुस्थानांत कशी भासते हें प्रसिद्धच आहे ब्रिटिश सिनेमागृहात तद्देशीय बनावटीचे चित्रपट विशिष्ट प्रमाणांत दाखवलेच पाहिजेत अशी कायद्याची सक्ती आहे, तिच्या मुळाशीं स्वदेशी धंद्यास उत्तेजन देणें हाच मुख्य हेतु आहे परदेशी चित्रपटाची सख्या मर्यादित करून देशी चित्रपटास परस्पर सहाय करण्याचें धोरण चालू ठेवण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे हिंदी चित्रपटाच्या धंद्याची प्रगति व्हावी ह्यासाठी विशेष प्रयत्न कसे अवश्यक आहेत, हें ब्रिटिश धोरणाच्या उदाहरणावरून ध्यानात येण्यासारखें आहे चित्रपटात सर्वांगीण सुधारणा व्हावी ह्याविषयीं इंग्लडमध्यें काळजी घेण्यात येत असून कायद्याची मदत त्याच तत्त्वावर दिली जात आहे हिंदी स्वदेशी चित्रपटाच्या धंद्याचा उत्कर्ष ह्याच मार्गानें होणें इष्ट आहे.

## मोटारगाड्या व दुखापतींचा विमा

अलीकडे मोटार लॉऱ्यांची वहातुक वाढत्या प्रमाणावर चालू झाल्यामुळें अपघातांस आळा बसण्यासाठी कांहीं उपाय-योजना अमलात आणणें अवश्यक आहे कीं काय ह्या प्रश्नाची चौकशी एका कमिटीमार्फत होत आहे आणि त्यासंबंधांत साक्षी घेतल्या जात आहेत. मोटारगाड्या चांगल्या स्थितींत रहाव्या, त्या हांकणारे लोक लायक व कार्यदक्ष असावे, रस्त्यांत होणाऱ्या अपघातांबद्दल उतारू व रस्त्यानें जाणारी जनता ह्यास नुकसानभरपाईची सोय करून दिलेली असावी, इत्यादि मुद्दे चालू चौकशींत उत्पन्न झाले आहेत. धंदेवाल्या मोटार लॉऱ्यांच्या बाबतींत जीं नियंत्रणें आहेत व घालण्यांत येतील तीं खाजगी मोटार-मालकांवरहि घातलीं जावीं किंवा नाहीं, विम्याची रकम काय असावी, ह्या संबंधांतल्या विमा मंडळयांची व्यवस्था कोणत्या प्रकारची असावी, इत्यादि प्रश्नांचाहि विचार कमिटीस करावयाचा असल्यानें त्याविषयींचें धंदेवाल्याचें व सामान्य जनतेचें मत व्यक्त करण्यांत येत आहे येथील गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स व एकॉनॉमिक्सचे सचालक, प्रि गाडगीळ, ह्यांनीं मार्गे स्वतः गोळा केलेल्या माहितीच्या आधारावर कमिटीपुढें साक्ष देऊन कित्येक महत्त्वाच्या सूचना केल्या, आहेत. त्याचप्रमाणें, येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजनें लॉरी मालकांच्या सभा भरवून त्यांच्याशीं चर्चा केली आणि त्यांचें मत आजमावून त्याच्या आधारावर आपला अभिप्राय कमिटीस सादर केला आहे. जनतेची सुरक्षितता, लॉरीवाल्याच्या धंद्याचे, सामान्य लोकाचे आणि खाजगी मोटारगाड्यांच्या मालकाचे हितसंबंध इत्यादि प्रश्न चालू चौकशीमध्यें येत असल्यानें तिच्या बाबतीत सर्वांनीं काळजीपूर्वक लक्ष घालणें अगत्याचें झालें आहे सर्व बाजूंचीं मतें स्पष्टपणें कमिटीपुढें आल्यावाचून योजलेले कायदेकानू समाधानकारक व्हावयाचे नाहींत, हें कोणीहि विसरता कामा नये.

## राज्यारोहणासंबंधांतील विमा

बादशहांच्या राज्यारोहणाबाबतच्या जोखमीसबंधीं विमे उतरण्यांत आले, त्याबद्दल विमाकपन्यांवरील जबाबदारी विमा पत्रकांतील अटींवर अवलबून राहील, हें उघड आहे. "आठवे एडवर्ड ह्याचें राज्यारोहण" असा स्पष्टपणें उल्लेख केलेल्या पॉलिसीविषयीं शंकाच रहात नाहीं तथापि केवळ राज्यारोहण असाच उल्लेख असल्यास मात्र घोटाळा होण्याचा संभव आहे राज्यारोहण पुढें ढकललें जाण्याचे प्रसंगाबाबतच फक्त विमा उतरलेला असेल व सहाव्या जॉर्ज बादशहाचा ठरल्याप्रमाणें मेच्या १२ व्या तारखेस राज्यारोहण समारंभ झाला, तर विमा कंपन्यांस नुकसान येण्याचें कारण नाहीं. नुकसान आल्यास विशिष्ट रकम देणारे करार करणाऱ्याच बहुतेक पॉलिसी आहेत, तर कांहीं पॉलिसी केवळ झालेलें नुकसान देण्यास बांधलेल्या आहेत

## मुंबई शहरांतील मोटारींचे अपघात

मुंबई शहरामध्यें एकूण १०,५०० मोटारगाड्या असून, त्यापैकीं ९,४०७ खासगी मालकीच्या आहेत टॅक्सींची संख्या ९१० असून बसेस १११, मालाची वहातुक करणाऱ्या मोठ्या गाड्या ९०० आणि भाड्याच्या लॉऱ्या ७९ आहेत. १९३५ साली प्राणघातक असे ८६ अपघात झाले होते; १९३६ सालीं ही संख्या ११२ भरली. ह्यापैकीं ६४ अपघात खासगी गाड्यांमुळें झाले, ७ अपघातास टॅक्सी कारणीभूत झाल्या, बसेसच्या बळीं ९ इसम पडले आणि लॉऱ्यांखाली ३२ लोक सांपडले अपघातांत जखमी झालेल्यांस मोटार मालकानीं नुकसानभरपाई दिल्याचीं उदाहरणें फारशीं आढळलीं नाहींत.

Fergusson College Rd. Poona 4 Phone No.513.

**DECCAN TALKIES**

**"One Night of Love"**

Starring—GRACE MOORE

*From Wed 27th to Fri. 29th*

**"CURLY TOP"**

Starring—Shirley Temple & John Boles

*From Sat. 30th to Tue 2nd*

हंस पिक्चर्सचा २ रा

अद्वितीय बोलपट

**धर्मवीर**

मिनर्व्हा टॉकीजमध्यें पहा

लेखक : प्रि. अत्रे

—भूमिका—

बाबूराव पेंढारकर, विनायक,

रत्नप्रभा, इंदिरा वाडकर.

"व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे

ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं. पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ॥८ आणे. नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्त्रबुद्धे, ७५२ सदाशिव पेठ, पुणें.

मिळण्याचीं ठिकाणें.


घुळें—सहस्त्रबुद्धे ब्रदर्स

इंदेर—हॉटेल आय व्हिजीट

अमळनेर—बऱ्हाणपूरकर ( कमिटीच्या बागेसमोर )

नागपूर—वैद्य ब्रदर्स, ओल्ड स्टेशन रोड

स्थापना १९२०



मुंबई सरकारनें व कोल्हापूर सरकारनें प्रथम मान्य केलेले

**जाधव टेलरिंग कॉलेज**

नवीन वर्ग सुरू झाले. नावें नोंदवा. माहिती मागवा [ ४९७ बुधवार, पुणे २

## झारापकर टेलरिंग कॉलेज

### पुण्यातील एक उपयुक्त औद्योगिक संस्था

स्वावलंबनानें घरबसल्या अल्प भांडवलात करता येण्यासारखा शिवणकलेचा धंदा मध्यम स्थितींतील माणसास सुद्धा शास्त्रीय पद्धतीनें शिकता यावा, म्हणून श्री झारापकर बंधूंनीं सन १९३३ सालीं 'झारापकर टेलरिंग अँड कटिंग कॉलेज' ह्या संस्थेची स्थापना केली प्रथमपासूनचें पाश्चात्य पद्धतीनें शिक्षण देण्याचें ठेवलेलें धोरण, सुशिक्षित तरुणास आपल्या चरितार्थाचा प्रश्न सोडवितां यावा यासाठी घेतलेल्या प्रयत्नाची पराकाष्ठा, यामुळें व अशा अनेक कारणामुळें आज चार वर्षांच्या अल्पावधींत ह्या संस्थेची अत्यंत भरभराट झालेली दिसून येत आहे या अल्पावधींत महाराष्ट्राच्या सर्व भागातून आणि दक्षिण हैद्राबाद, वऱ्हाड, मध्यप्रांत, मारवाड, गुजराथ, कर्नाटक, म्हैसूर, मद्रास, इत्यादि प्रांतातून आणि इराण, आफ्रिका इत्यादि दूरदूरच्या देशातूनहि अनेक विद्यार्थी येऊन व ह्या संस्थेचा फायदा घेऊन आज ते उत्तम रीतीनें आपापल्या गावीं आपला चरितार्थ चालवीत आहेत हिंदुस्थानातील निरनिराळया भाषांच्या निरनिराळया प्रांतातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या त्या सर्व भाषांतून शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे, हें एक या संस्थेचें वैशिष्ट्य होय या संस्थेतील बहुतेक सर्व चालक व शिक्षक यांनीं लंडन येथील 'टेलर अँड कटर अकॅडमी'चें उच्च दर्जाचे डिप्लोमा मिळविले असून या संस्थेचे व्हाइस प्रिन्सिपाल श्रीयुत गोविंदराव झारापकर यांनीं स्वतः लंडनला जाऊन तेथें त्या संस्थेचा कोर्स पुरा केला असून, त्या संस्थेचा फर्स्ट क्लास बुइथ ऑनर्सचा बहुमानाचा डिप्लोमा मिळविला आहे. सदर संस्थेनेंहि झारापकर बंधूंचें ह्या कलेंतील प्राविण्य पाहून त्यांना हिंदुस्थानातील विद्यार्थ्यांना लंडन येथील 'टेलर अँड कटर अकॅडेमी'चा शिक्षणक्रम शिकविण्यासाठी इन्स्ट्रक्टर नेमलें आहे मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यानेंहि येथील उत्कृष्ट शिक्षणपद्धति पाहून ह्या संस्थेला मान्यता दिली आहे संस्थेंत विद्यार्थ्यांस लागणारीं यंत्रें व उपकरणें अत्यंत आधुनिक पद्धतीचीं व भरपूर ठेविलीं असून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण मिळावें म्हणून अनुभविक व तज्ञ अशा शिक्षकांची योजना केली आहे. संस्थेंत शिवणकलेसंबंधीं ग्रंथ संग्रह भरपूर असून निरनिराळया देशी व विदेशी फॅशन्सचें प्रदर्शनहि मांडलें आहे.संस्थेला आतापर्यंत थोरथोर लोकांनीं भेटी देऊन संस्थेची शिक्षणपद्धती पाहून समाधान व्यक्त करून संस्थेबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांनीं ह्या कॉलेजबद्दल "शिवण व कर्तन कलेचें अत्यंत आधुनिक पद्धतीनें सशास्त्र शिक्षण मिळण्याची आतापर्यंत भासत असलेली उणीव झारापकर टेलरिंग कॉलेजनें दूर केली आहे" असा अभिप्राय दिला आहे

इंग्रजी शाळांतून शिक्षण घेणाऱ्या तरुणांस उदर निर्वाहाच्या साधनाची अडचण पडून त्यांचेमध्यें भयंकर बेकारी पसरली आहे आणि आमच्या शिक्षणपद्धतीस व्यावहारिक वळण देणें आवश्यक आहे अशा सूचना सर्वत्र केल्या जात आहेत. अशा स्थितींत झारापकर बंधूंनीं आपल्या संस्थेमार्फत शिक्षणाचा व उद्योगधंद्याचा नवीन मार्ग जनतेस दाखविला आहे ह्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. त्यांनीं आपलें कॉलेज नमुनेदार रीतीनें चालविलें आहे. त्याचा शिक्षणक्रम व शिक्षणपद्धति ही कार्यक्षम, सुघटित व सुव्यवस्थित असून अनेक जातींचे व अनेक ठिकाणचे विद्यार्थी त्याचा फायदा घेत आहेत, हें अभिनंदनीय आहे. झारापकर बंधूंचा उत्साह व टापटीप वाखाणण्यासारखी असून त्यास धंद्यातलें रहस्य उत्तम समजलें आहे. त्यांच्या शिक्षणसंस्थेचा उपयोग विद्यार्थ्यांनीं योग्य रीतीनें घ्यावा आणि त्यांच्या श्रमाचें चीज करून स्वतःचें हित साधावें हें उचीत आहे झारापकर टेलरिंग कॉलेजची उत्तरोत्तर अधिकाधिक प्रगती होवो असें आम्ही इच्छितों

---

## नोकराच्या मर्यादातिक्रमाबद्दल मालकावरील जबाबदारी

नोकरानें आपल्या मालकातर्फे काम करीत असता एकादी बेकायदा गोष्ट केली, तरी त्याबाबत मालक जबाबदार धरला जातो, ह्याचें कारण नोकराची नेमणूक मालकानें केलेली असते आणि त्याचेकडे कांहीं काम सोपविलेलें असतें, हें होय हें काम करीत असताना त्यानें मर्यादेबाहेर एकादी गोष्ट केल्यास त्याची जोखीम मालकावर रहाते. अर्थात, नोकरीच्या कक्षेबाहेरील गोष्टीबाबत मालकास जबाबदार धरता येणार नाहीं नोकराची जबाबदारी अर्थातच नाहींशी होत नाहीं आणि त्याच्या हस्तें नुकसान पावलेल्या इसमास मालक व नोकर ह्या दोघांकडूनहि नुकसानीची भरपाई मागतां येते तथापि फक्त नोकराकडूनच भरपाई मागून व ती कोर्टाकरवीं मिळवून, ती अपुरी वाटली म्हणून मालकाविरुद्ध मात्र पुनः इलाज करता येत नाहीं मालकाची जबाबदारी कोठें सुरू होते व ती कोठे संपते, हा प्रश्न दिसतो तितका सोपा नाहीं त्यामधील श्लेष ध्यानात येणें कठिण आहे. लंडनमध्यें घडलेल्या एका हकीकतीवरून वरील प्रश्नावर चांगला प्रकाश पडण्याजोगा आहे.

लंडन शहरातील एका मैदानात लोकांस खुर्च्या भाड्यानें देण्याचें कंत्राट एका कंपनीकडे होतें दोन आण्याचीं तिकिटें विकण्याचें व तीं तपासण्याचें काम कंपनीनें आपल्या एका नोकराकडे सोपविलें होतें डेव्हिस नावाचा एक गृहस्थ एके दिवशीं एक खुर्ची भाड्यानें घेऊन तेथें जाऊन बसला त्याच्या ओळखीची एक बाई त्याचे शेजारीं येऊन बसली आणि तिच्याकरितां आणखी एक तिकीट त्यानें विकत घेतलें डेव्हिसच्या स्वतःचे तिकिटाबद्दल कांहीं बाधा उपस्थित झाली आणि तिकिट दाखविण्यास त्यास विलंब लागला कंपनीचा नोकर प्रक्षुब्ध होऊन तो डेव्हिसच्या अंगावर चालून गेला मोटारीच्या अपघातामधून नुकत्याच बाहेर आलेल्या डेव्हिसचा तोल जाऊन त्यास इजा झाली आणि त्याचा परिणाम कायम स्वरूपाचें व्यंग रहाण्यात झाला डेव्हिसनें कंपनीविरुद्ध दावा लावला, परंतु घडलेल्या प्रसंगाशीं कंपनीचा संबंध पोंचत नाहीं, असें कंपनीतर्फे सांगण्यात आलें. दोन्ही तिकिटें नोकरानें विकलीं होतीं आणि तीं त्यानें तपासलीं होतीं, येथें नोकराचें काम संपलें त्यानंतर कांहीं भांडण झालें असल्यास तें कंपनीचा नोकर ह्या भूमिकेमध्यें तो असताना घडलेलें नाहीं, तें वैयक्तिक स्वरूपाचें होतें. ह्या कारणानें कंपनीस जबाबदार धरता येत नाहीं, असा कोर्टानें निकाल दिला

---

## मीठ आणि समुद्र

" समुद्रांतलें मीठ कोठून आलें " ? ह्या प्रश्नास, " नद्यांच्या गोड्या पाण्यांतून " असें दिलेलें उत्तर ऐकलें असतां बहुतेकास आश्चर्य वाटेल. तथापि, कित्येक नवलकथा सत्य असतात, तशा-पैकीच हा प्रकार आहे. नदीच्या गोड्या पाण्यांत दर हजारीं ·१६ इतकें मीठ असतें आणि जमीनींतून वहात समुद्राकडे जात असतां नद्या मातींमधून मीठ काढून सागरात सारख्या टाकीत असतात मातीमधला क्षार नद्यांच्या पाण्याबरोबर समुद्रांत जाऊन त्यास खारट बनवण्यास कारणीभूत होतो ह्याप्रमाणें जगांतील सर्व नद्या मिळून दरवर्षी २७० कोटि टन वजनाचे क्षार समुद्रांत नेऊन मिसळतात, असा अंदाज आहे. लाखो वर्षांमागें समुद्राचें पाणी गोड असलें पाहिजे आणि तें हळूहळू खारट होत आलेलें आहे जगांतल्या सर्व समुद्रांत मिळून किती मीठ आहे ? समुद्राच्या सपाटीवर अखिल युरोपात जेवढी जमीन आहे तिच्या चवदापट मोठा असा ढीग ह्या समुद्रातल्या मिठाचा बनेल असा अजमास केलेला आहे.

समुद्राच्या पाण्यांत सरासरीनें दर हजारी छत्तीस भाग मीठ असतें कांहीं समुद्र इतरांच्या मानानें कमी खारट असतात आणि बाल्टिक समुद्र ह्याचें उदाहरण आहे तांबडा समुद्र अधिक खारट आहे आणि मृत समुद्राविषयीं तर बोलावयासच नको त्याच्या पाण्यात दर हजारी दोनशे भाग मीठ असतें. एकंदर भूपृष्ठाचा दोन–तृतियांश भाग समुद्रानें व्यापला असून त्याची सरासरी खोली सव्वा दोन मैल आहे. ज्यास्तींत ज्यास्त खोली साडे सहा मैल भरते. नद्या क्षाराशिवाय अनेक द्रव्यें व पदार्थ समुद्रांत टाकीत असतात. ही भरती अशीच चालू राहिली तर ६३ लक्ष वर्षांमध्यें नद्या समुद्राच्या सपाटीवरची सर्व जमीन वाहून नेऊन सागरास्तृप्यंतु करतील असा अंदाज आहे पण ह्याविषयीं किंवा मिठाच्या तुटवड्याविषयीं आजच्या पिढीनें काळजी करण्याचें मुळीच कारण नाहीं समुद्र जमीन कुरतडत व खात असतात आणि सागरांच्या लीलांमुळें जमीनीचें काठावरचें क्षेत्र-फळ कमी-जास्त होत असतें समुद्राच्या लाटा जास्तींत जास्त चाळीस फूट उंचीपर्यंत वर उसळतात. पॅसिफिक महासागरांत ही उंची केव्हा केव्हा साठ फुटापर्यंत जाते. दर तासास तीस मैल या सरासरीच्या वेगानें समुद्राच्या पृष्ठावर लाटा धावतात. समुद्रांत धरलेल्या माशांचें उत्पन्न ग्रेटब्रिटन व आयर्लंडमध्यें प्रति-वर्षी २५–३० कोटि रुपये होतें ("मिल्गेट" वरून)

---

**पूर्व खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, जळगांव**

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या जळगांव शाखेस मुंबई इलाख्याचे फडनवीस, खानबहादुर कूपर, ह्यांनीं ता. ११-१-३७ रोजीं भेट देऊन शाखेच्या कामकाजासंबंधीं समाधान व्यक्त केलें

ह्या शाखेमार्फत अंमळनेर येथें ता को. सुपरवायझिंग यूनियनचे अध्यक्ष ,श्री त्र्यंबकराव खुशाल पाटील, ह्यांचे अध्यक्षतेखाली तालुक्यांतील सोसायट्यांचा पंच कमिटी ट्रेनिंग क्लास ता १८-१-३७ रोजीं भरविण्यांत आला. त्यावेळीं शंभरावर लोक हजर होते


**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा. द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

म्यानेजिंग एजंटस्.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

| 41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City. |
|---|---|

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यांतील विशेष होय "

भाऊ गंगाधर साठे,

बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,

५१९ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

**महिंद्रकर ब्रदर्स** ह्यांचे थंडी-

गिरगांव, मुंबई करतां

## औषधांची आयात

१९३५-३६ सालीं एकूण २ कोटि ११ लक्ष रुपये किमतीचीं परदेशी औषधें हिंदुस्थानात उतरलीं. पेटंट औषधाची आयात वाढत असून ग्रेटब्रिटन, जर्मनी व अमेरिका हे देश औषधें वाढत्या प्रमाणात पुरवीत आहेत. २२½ लक्ष रुपयाचा कापूर आला, त्यापैकीं जपाननें १३ लक्ष रुपयाचा व जर्मनीनें ८½ लक्षाचा माल पाठविला. एकूण २६ लक्ष रुपयाचें कोयनेल आलें, त्यापैकीं ११ लाखाचें जर्मन होतें, गेल्या पंचवीस वर्षांतील आयातीसबंधीं तुलनात्मक माहिती खालील कोष्टकावरून मिळेल

आयात झालेल्या औषधांची किंमत (लक्ष रु.)

| | युद्धापूर्वीची सरासरी | युद्धकालातील सरासरी | युद्धानतरच्या कालातील सरासरी | १९३४ ते ३५ | १९३५ ते ३६ |
|---|---|---|---|---|---|
| कापूर | १६ | २४¼ | २४¾ | २१½ | २२½ |
| पेटंट औषधें | २४¾ | २१¾ | २४¾ | ३९¼ | ६४ |
| कोयनेल | ११½ | १८ | २७½ | २६ | २६ |
| इतर औषधें | ४२ | ५६¾ | ९३ | १०५ | २८ |
| एकूण | ९४ | १,२०¾ | १,७० | १,९२, | २,११ |

हिंदी औषधाच्या निर्गतींत (किमत २५½ लक्ष रु) 'सेना'चें महत्त्व विशेष आहे ह्या एकट्या पदार्थाची १० लक्ष रुपयांची निर्गत झाली १ लक्ष रुपयाचें नक्स व्हॉमिका परदेशीं गेलें.

---

### ब्रिटिश फलज्योति[illegible]ी परिषद

ब्रिटिश फलज्योतिष्याच्या [illegible]रिषद आपल्या धंद्याबाबतच्या प्रश्नाचा विचार करण्या[illegible] नुकतीच भरली होती " जगांतले सर्व धर्म फलज्योतिषावर आधारलेले आहेत, जगात होणाऱ्या घडामोडींपैकीं एक-तृतीयाश दैवाधीन पण बाकीच्या दोन-तृतीयाश मनुष्याधीन असतात, ही कल्पना फलज्योतिषाचा पाया आहे, ड्यूक ऑफ वुइंडसर ह्याची कुंडली पहाणारास नुकत्याच घडून आलेल्या गोष्टींचें भाकित करता आलें असतें " इत्यादि उद्गार वक्त्यांनीं परिषदेंत काढले.

---

### व्यापारवृद्धीस प्रचारकार्याचें महत्त्व

मुंबई येथील हॉर्नबी रोडवरील म्हैसूर एम्पोरियमचें उद्घाटन करतेवेळीं, म्हैसूरचे युवराज म्हणाले —

" केवळ गुणावर माल खपेल, ह्या अपेक्षेनें व्यवहार करणाऱ्या कारखानदाराचे दिवस आता उरले नाहींत नव्या धर्तीची व शास्त्रीय पद्धतीची उत्पादन-पद्धती आणि उत्कृष्ट कच्चा माल याचे बरोबर मालाची सुबक मांडणी व जाहिरात ह्यांचें आता विशेष महत्त्व आहे.

---

—मार्मुगाव हार्बर येथील श्री. गो त्रि बर्वे ह्यानीं, गतवर्षाप्रमाणें यंदाहि दासनवमीचा उत्सव गोमतकातील सर्व शिक्षण संस्थानीं साजरा करावा, असें विनतिपत्रक काढलें आहे मिरजेचे श्री. दा मो भट ह्यानीं लिहिलेल्या 'समर्थांचें कार्य' ह्या ग्रंथाची एक प्रत मागणी केली असतां मोफत पाठविली जाईल, असे ते कळवतात

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ३% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—३ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—० |
| ४% १९६०-७० ... ... | ११३-१४ |
| ५% १९४३ ... ... ... | १११-१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—० |
| ३½% १९४७-५० ... ... | १०६—० |
| २¾% १९४८-५२ ... ... | १००—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षे मुदत) | ११०—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११२—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—८ |

### मंडळ्याचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १४०-४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११८—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३७—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४¾%) | १०५—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९२०-० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३—२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु चा भाग, डिव्हि. ९%) | २६८-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु ऑर्डि. डिव्हि ६½% ) | १५६५—० |
| टाटा पॉवर ( १,००० रु प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १६०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९७—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु प्रेफरन्स, २२रु. ८ आ ) | १७८—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि ) | २९९—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु डिफर्ड ) | १२२७—८ |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३५—१—३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५०—८—० |

किंमत ओव्हरकोट खरेदी करा

रु. १२॥ बुधवार चौक, पुणें

## गैरसावधपणाचें प्रायश्चित्त

कोर्टांतील एका खटल्याची माहिती देताना वर्तमानपत्राच्या बातमीदारानें अवधान न राहून थोडीशी चूक केली, परंतु त्याचा परिणाम काय झाला, ह्याची हकीकत मनोरंजक आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें घडलेल्या प्रकाराची ही हकीकत आहे.

हॉटेलमध्यें सायकाळीं चैन करून दोन गृहस्थ बाहेर पडले व दारांतील दुसऱ्या कोणाच्या तरी मोटारगाडींत बसून चालते झाले मोटार मालकाच्या नजरेस ही गोष्ट येताच त्यानें पोलिसास वर्दी दिली. पोलिसानीं तात्काळ चौकशी केली व त्यास हॉटेल शेजारच्याच रस्त्यावर ती मोटार व ते दोन गृहस्थ आढळले दुसऱ्याची चीजवस्तू त्याजपासून कायमची हिरावून नेण्याची कल्पना नसताना वस्तू केवळ हालवणें ही चोरी होत नाहीं. तथापि, दुसऱ्याच्या मोटारींतून सहल करून येऊन गाडी सोडून देण्याचा प्रघात कांहीं वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें बराच बोकाळल्याकारणानें त्याविरुद्ध इलाज करता यावा म्हणून १९३० च्या रोड ट्रॅफिक ॲक्टाखालीं तो गुन्हा ठरविण्यांत आला. वरील दोन्ही गृहस्थावर चोरीचा आणि ह्या नव्या कायद्याखालील गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात आला खटला चालू झाल्यावर सरकारी वकिलानें चोरीसबधीं तक्रार परत घेतली आणि दुसऱ्या परतु सौम्य प्रकारच्या (मालकाचे परवानगी शिवाय त्याची मोटार घेऊन चालविल्याच्या) आरोपासबधीं चौकशी सुरू झाली. वर्तमानपत्राच्या बातमीदाराचे लक्षात ह न आल्या-कारणानें "मोटार गाडीची चोरी" ह्या शीर्षकाखाली खटल्याची हकीकत प्रसिद्ध केली गेली त्यामुळें आपली अब्रुनुकसानी झाली, असें म्हणून दोघा गृहस्थानीं कोर्टाकडे नुकसानभरपाई मागितली सदरहु गृहस्थावरील दोन्ही आरोपाच्या गांभीर्यांत केवळ कमी-आधिक प्रमाणाचा फरक होता, हा मुद्दा कोर्टास पटला नाहीं. बातमीदार हे निष्काळजी व गैरसावध होते असें म्हणून कोर्टानें दोघा गृहस्थांस प्रत्येकीं १०० पौंड अब्रुनुकसानीदाखल देववले

---

## शतायु ब्रिटिश बॅंक—दि वेस्टमिंस्टर

ग्रेट ब्रिटनमधील दि वेस्टमिंस्टर ह्या नामांकित बॅंकेच्या स्थापनेस एक शतक झालें असून ती आज जोरात चालू आहे बॅंक ऑफ इंग्लंडशीं स्पर्धा होऊ नये म्हणून लंडन शहराच्या आसमंतात पासष्ट मैलाच्या टापूंत नोटा काढण्याच्या बॅंकेच्या स्थापनेस शंभर वर्षांमागें मज्जाव होता नोटा न काढता सराफी व्यवहार करावयाच्या तत्त्वावर लंडनमध्यें निघालेली ही पहिली बॅंक असण्याचा तिला मान मिळाला आहे तिनें आपल्या धंद्याचा व्याप हळुहळु वाढवला आणि क्रमाक्रमानें इतर बॅंका तिला सामील झाल्या इंग्लंडमधील नाणावलेले अर्थशास्त्रज्ञ व व्यवहारज्ञ पुढारी ह्यांचा चालकत्वाच्या नात्यानें ह्या सस्थेशी सबध आला आहे बॅंकिंगवरील प्रसिद्ध ग्रंथांचे लेखक, गिल्बर्ट, वॉल्टर, बेजहॉट व वॉल्टर लीफ ह्यांचीं नावें बॅंकेच्या इतिहासाशी निगडित झालेलीं आहेत. बॅंकेच्या शतसांवत्सरिक उत्सवाचे निमित्तानें प्रो ग्रेगरी ह्या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ अध्यापकानें सस्थेचा इतिहास निवेदन करणारा ग्रंथ लिहिला असून तो दोन भागांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

---


# दि बॅंक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता . MAHABANK : फोन न ५७२

अधिकृत भांडवल : : १०,००,०००

विक्रीस काढलेले भांडवल :- ५,००,०००

खपलेलें भांडवल : २,०९,६५०

रोख भरलेले भांडवल : १,०४,५२५

## दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द द शेकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बॅंक ठेवीवर चेक स्वीकारून द. द २॥ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यापासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यावरहि कर्जें दिली जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिली जातात.

कर्जरोख्याची खरेदीविक्री त्यावरील व्याज जमा करणें ही कामें केलीं जातात

या बॅंकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बॅंक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते खात्यात भरलेले मुंबई बॅंकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात

शेअर खरेदीबद्दल व [illegible]च्या नियमाबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी

म दहीं गोखले,
मॅनेजर

# धी सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

## नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे जनतेची सेवा करणे हेच आमचे ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# ARDOMIX

UTERINE TONIC SUPREME

स्त्रियाचा आजार म्हणजे ससाराची दुर्दशा त्याचा मुख्य विकार म्हणजे विटाळ-दोष व गर्भाशयात बिघाड होणें हा होय पाढरी व तावडी धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, तो कष्टदायक होणें अथवा प्रमाणा-पेक्षा जास्त जाणें, विटाळशीपणात ओटीपोटात कळा येणें, प्रसूतीनतर अती रक्तस्राव होणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, अपचन, डोकें दुखणे, कबर दुखणें, शौच्यास साफ न होणें, जीव गलबलणें, हातापायास कळा लागणें इत्यादि आर्तव विकार आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या अनेक व्याधींमुळें हजारों स्त्रियाचा प्रत्यहीं नाश होत आहे स्वाभाविक लज्जेमुळें स्त्रिया आपलें दुखणें गुप्त राखतात व मुकाट्यानें त्रास सहन करतात परतु वेळेवर योग्य उपचार न झाल्यास प्रथम थोडें असलेलें दुखणें विकोपास जाऊन त्यांच्या शरीरावर व भावी सततीवर फार अनिष्ट परिणाम घडतो ही हानी टाळण्यास वेळेवर व योग्य उपाय करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे वरील सव प्रकारच्या विकारावर उत्तम उपचार म्हणजे—

SUPREME UTERINE TONIC

**Ardomix**

**ही प्रभावशाली दिव्यौषधी देणे होय एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाने ५० वर्षापूर्वी लिहिलेल्या (फार्म्युला) यादीवरून उत्तम निवडक देशी औषधी द्रव्यापासून शास्त्रीय पद्धतीने बनविलेले हे औषध इतक्या वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या गर्भाशयदोषादि अनेक विकारांवर हमखास गुणकारक ठरलेलें असून भपकेदार जाहिरातीच्या जोरावर पुढे आलेले कोणतेही औषध गुणामध्ये याची बरोबरी करूं शकत नाहीं प्रदरादि विटाळ दोषांवर खात्रीचा उपाय व दूषित गर्भाशय शुद्ध करून शक्ति देणारे (टॉनिक) म्हणून वैद्य व डॉक्टर्स याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करीत आहेत यापेक्षा जास्त प्रशंसा नको तुमची पत्नी, भगिनी अथवा कन्या यांचा गुप्त रोगांपासून बचाव करण्यासाठीं विलब न लावतां आजच आर्डोमिक्स मागवा.**

आमच्या प्रसिद्ध **"आर्तवदोषारि"** औषधासच आता **"आर्डोमिक्स"** हें नवें नाव दिलें असून हें रजिस्टर केलें आहे.

## अनेकांपैकीं कांहीं अभिप्राय

**डॉ बी डी पटेल, इटारसी.**—"आर्तवदोषारि वापरून पाहिलें फायदा झाला माझ्या रोग्याना मी त्याची शिफारस करतो"

**रा गणपत जाणोजी पाटील, दुधलगाव**—"माझें स्वत.चे मुलीचें पोट दुखणें फारच भयकर स्थितीचें होतें तें आपले आर्तवदोषारि औषधानें बद होऊन तिला सततीहि झाली आहे आपलें अबलाजीवन आर्तवदोषारि औषध स्त्रियाच्या सर्व दु.खावर रामबाण आहे असा माझा अनुभव आहे"

**पडित भागवत प्रसाद, गगेले, हरदा**—"स्त्रियाच्या रोगावर योजना करण्यासाठीं आपणाकडून ३।४ वेळा आर्तवदोषारि मागविलें सतत ३।४ बाटल्या घेतल्यास चागला गुण येतो असा अनुभव आहे आणखी दोन बाटल्या व्ही पी नें पाठविण्याचें जरूर करावें"

**Mr F, A Manteiro, Bombay '4**—"I am not exaggerating that I have not found another to match it (Artavdoshari) During the 8 years of my wife's ailments, several specialists were consulted but she could not have any benefit from injections and other treatment Leucorrhoea inflamation of the ovary seem to have disappeared. She intends taking more bottles"

**डॉ जी. एन् महाजन, मोठे वाघोदें-खानदेश**—"आपलें पत्र मिळालें त्याप्रमाणें व्ही पी सोडवून घेतली व औषधी रोग्याना सुरू देसील केली आहे मीं मागें आपणाकडून आर्तवदोषारीच्या बाटल्या वापरल्या व हल्लींसुद्धा वापरीत आहे व पुढेंहि वापरीनच हा आर्तवदोषारि दिल्यापासून स्त्रियाना अवेळी होणारा विटाळ, ढेंकर येणें, हातपाय सुजणें, अन्न न पचणें, पोटात दुखणें वगैरे रोग दुरुस्त झालेले आहेत त्यापासून बारा आणे गुण आलेला आहे व औषधी अजून सुरू आहे बहुतेक पूर्ण गुण येईल असें वाटतें. या बाटल्या खलास झाल्यावर पुन्हां व्ही पी ची ऑर्डर देतों."


## किंमत बाटलीस ३ रुपये. टपाल खर्च १२ आणे

एकदम ३ बाटल्यास टपाल खर्च माफ ]     [ व्यापाऱ्यास भरपूर कमिशन

## पत्ताः—धी इंडो फॉरिन एजन्सीज (डिपार्टमेंट नं ६)

**३६१ सदाशिव पेठ, पुणें नं. २.**

फक्त १ रु. ८ आण्यास ३ घड्याळें व १२९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या १६ कुप्या १ रु ८ आण्यास एकदम घेणारास एक सोनेर मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निकाचें फाउटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पांच वर्षें गॅरटीचें एक जर्मन 'बी' टाइम पसि पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**EASTERN TRADING CO.**

*Post Box No 12204, CULCUTTA (24)*



"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कपन्यास कठीण असें अपूर्व यश सपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष–श्री न. चिं केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
| --- | --- | --- |
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



**न. वि. वडनेरकर**

जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील



**दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.**

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच का वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणे ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

अर्थ एव प्रधान ' इति कौटिल्य अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. बा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ३ फेब्रुवारी, १९३७. अंक ५

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात

" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यातील विशेष होय "

**भाऊ गंगाधर साठे,**
बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणे २

**पुणेकरांची सोय**

**घरपोंच**

पुण्यात बनविलेल्या सिगारेट्स्

दर शेकडा

| डेक्कन रेड. | डेक्कन गोल्ड फ्लेक | ओरायन मॅग्नम. |
|---|---|---|
| ३ आणे | ७ आणे. | १ रुपया. |

ओढण्यास फारच उत्तम आहेत. अनुभव घ्या !

**डेक्कन टोबॅको वर्क्स. पुणें ४.**

—स्टॉकिस्ट—

**शा प्रेमचंद कीलाचंद**
तंबाखू आळी, पुणें.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत
माहितीसाठीं लिहा

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें सेक्रेटरी


व्यापारी-उद्मी लोकांस

**—अपूर्व संधि—**

पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

" WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes** "

**फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें**




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यास एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल एक अंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबाचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च ( किंवा ) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पाच वर्षे गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)

# विविध माहिती

### मुंबई शहरांत स्टोव्हला पडलेले बळी

गेल्या वर्षी मुंबई शहरांत जळत्या स्टोव्हमुळें अपघात झाले-ल्यापैकी १९ लोक मृत्युमुखीं पडले. १९३५ सालीं १६ लोकास अशा रीतीनें मृत्यु आला होता. स्टोव्हच्या अपघातामध्यें बहुधा सर्व स्त्रियाच असून त्यात गुजराती स्त्रियांचा भरणा विशेष होता

### असेंब्लीमधील प्रश्नोत्तरांचें नियंत्रण

मध्यवर्ती कायदेमंडळातील बैठकींचा रोजचा पहिला तास प्रश्नो-त्तराकरितां राखून ठेवलेला असतो. विचारावयाचे प्रश्न अधिवेशनाचे सुरवातीस ज्या अनुक्रमानें अध्यक्षास पोंचतात, त्या अनुक्रमानेंच ते विचारावयाचे असतात. ह्या कारणानें कित्येक महत्त्वाचे प्रश्न पुढें ढकलले जातात आणि एकाद्या सभासदाची प्रश्नमालिका कालहरण करीत बसते. एका सभासदास दिवसातून तीनच प्रश्न विचारतां यावे अशा अर्थाची नियमात दुरुस्ती करण्याचा सर-कारचा विचार आहे

### नागपूर शहराचा नकाशा

विमानातून घेतलेल्या फोटोंच्या सहायानें नागपूर शहराची तपशीलवार माहिती देणारा नकाशा सरकारच्या सर्व्हे खात्यानें तयार केला आहे. एका मैलास सोळा इंच ह्या हिशेबानें नका-शाची आणखी केलेली आहे

### टेलिफोनचा वापर वाढत चालला

जानेवारी, १९३७ च्या पहिल्या आठवड्यांत हिंदुस्थानांत एकूण २५ हजार लोकानीं ट्रंक टेलिफोनचा फायदा घेतला, म्हणजे एका शहरांतून दुसऱ्या शहराशीं ते बोलले. गेल्या वर्षातील तत्सम आठवड्यात फक्त १२,००० लोकानींच टेलिफोनचा असा उपयोग केला होता. ह्यावरून, टेलिफोनची लोकप्रियता किती झपाट्यानें वाढत आहे, तें दिसून येतें

### लंडनला जाण्याचा नवा मार्ग

हिंदुस्थानातून राज्यारोहणाचे सोहळ्यास हजर रहाण्या-करिता जाणाऱ्या सर्व लोकांस बोटींवर जागा मिळणें कठिण आहे. आगबोटींची संख्या वाढविल्यासेरीज ह्या प्रवाशांची सोय होणें शक्य नाहीं. तथापि, खुष्कीच्या मार्गानेंहि लंडनला वेळेवर जातां येईल. प्रवाशाच्या वहातुकीचा धंदा करणारी एक कंपनी हा मार्ग लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करीत आहे

### केळ्याची उपयुक्तता

हिंदुस्थानाच्या सर्व भागात केळीं मिळतात आणि हें फळ स्वस्त पण अत्यंत गुणकारी आणि लोकप्रिय आहे प्रसिद्ध शास्त्रज्ञ, डॉ बेलहूश, ह्यांनीं केळ्याची मोठी स्तुति केली आहे. एक केळें व पेलाभर दूध ह्यानीं वेळची भूक तर भागतेच, पण तें पौष्टिक अन्नहि आहे कित्येक रोगावर केळें उत्कृष्ट गुण देतें

### अरब-ज्यू दंग्यामुळें झालेलें नुकसान

पॅलेस्टाईन येथील गेल्या वर्षीच्या अरब-ज्यू दंग्यामुळें तेथील सरकारचें सुमारें १½ कोटि रुपये नुकसान झालें

### कराची म्युनिसिपालिटीचें नवें कर्ज

कराची म्युनिसिपालिटीनें ८½ लक्ष रुपयाचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. व्याजाचा दर तीन टक्के आहे

### 'दि बँक ऑफ बरोडा' ची कलकत्ता येथें शाखा

बडोदा बँकेनें कलकत्ता येथें १ फेब्रुवारीपासून आपली शाखा सुरू केली आहे.

### मुंबई शहराचा दूध पुरवठा

मुंबई शहरामध्यें रोज सुमारें २½ लक्ष शेर दूध खपतें. ह्यापैकी १½ लक्ष शेर दुधाचा पुरवठा शहरातील गवळ्यामार्फत होतो व बाकीचें दूध बाहेरून येतें.

### नव्या टारिफ बोर्डाचे अध्यक्ष

साखरेच्या धंद्यासंबंधीं चौकशी करण्याकरितां नेमण्यांत याव-याच्या टारिफ बोर्डाचें अध्यक्षस्थान मद्रास इलाख्याचे फडनवीस, मि. ब्रोकन, ह्यांस देण्यांत येईल, असें समजतें.

### राज्यारोहणाचे सोहळ्यांत भाग घेण्याकरितां हिंदी प्रतिनिधी

राज्यारोहणाचे सोहळ्यात भाग घेण्याकरितां सुमारें ६०० ब्रिटिश व हिंदी लष्करी आणि पोलीस अधिकारी हिंदुस्थानतर्फे जाणार आहेत.

### मिसेस सिंप्सन प्रकरणामुळें ५० हजार बेकार

बादशहा आठवे एडवर्ड ह्यांच्या विवाहासंबंधींच्या घडामोडीं-मुळें इंग्लंडमध्यें मध्यंतरीं अनिश्चिततेचें वातावरण पसरलें होतें. राज्यारोहणाच्या तयारीचीं कामें त्यामुळें तावडतोब थांबविण्यात आलीं व दुकानांमधील विक्रीहि कमी झाली. मिसेस सिंप्सनच्या पायीं सुमारें ५० हजार लोकांचें सात दिवस काम बुडालें!

### रस्त्यांतील अपघातांचे बळी

ग्रेटब्रिटनमध्यें १९३६ सालीं एकूण ६,४८९ लोक रस्त्यां-वरील अपघातांमुळें मृत्यु पावले व २,२५,६८९ जणांस दुखापती झाल्या.

### पाहुण्यांच्या सोईकरिता माहितीपुस्तक

राज्यारोहणाचे निमित्तानें चालू वर्षी अनेक देशांतील लोक ग्रेटब्रिटनमध्यें जातील ह्या पाहुण्यांच्या सोई-करितां एक माहितीपुस्तक तयार करण्यात आलें असून त्यांत सबंध वर्षांत होणाऱ्या कार्यक्रमांची खुलासेवार हकीकत, हॉटेलांतील नोकरास द्यावयाचें बक्षिस, मोटारींचा विमा, इत्यादींचें तपशीलवार वर्णन करण्यांत आलें आहे.

### मुंबई शहरांतील आत्महत्त्या

मुंबई शहरामध्यें १९३६ सालीं १०० पुरुष व २० स्त्रिया मिळून एकूण १२० लोकांनीं आत्महत्त्या केली. ह्यापैकी ६७ लोकानीं अफू, आर्सेनिक इत्यादि विषाचा 'उपयोग' केला, १३ जणांनीं खिडकीबाहेर उडी टाकून प्राण दिला व आठांनीं स्वतःस जाळून घेतलें. वरील १२० आत्मघातक्यांची ७७ हिंदू, १९ मुसलमान, १३ पार्शी, ६ ख्रिस्ती, ४ युरोपियन व १ ज्यू अशी वर्गवारी होते. आत्महत्त्या करणाऱ्या स्त्रियांपैकी बहुतेक सर्व, घरांतील जाचास अगर असाध्य रोगास कंटाळून गेलेल्या असल्याचें आढळलें.

### हिंदी रेल्वे बजेट

हिंदी रेलवेजचें येत्या वर्षाचें अंदाज-पत्रक ता १६ फेब्रुवारी रोजीं असेंब्लीस सादर करण्यांत येणार आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| १७-१ ३७ ते २३-१-३७ | ४१,०६,१४३ |
| २४-१-३७ ते ३०-१-३७ | २८,२८,५८१ |
| २१ ९ ३१ ते ३० १-३७ | २,९३,३०,६४,२६० |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ५० | ६ दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँकेचें उद्घाटन | ५४ |
| २ रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा | ५१ | ७ विमा कंपन्यांवरील नियंत्रण वाढणार | ५५ |
| ३ प्राप्तीवरील कराची आकारणी व वसुली | ५२ | ८ सहकारी चळवळ | ५६ |
| ४ लँकेशायर गिरण्यास मागील वर्ष कसें गेलें ? | ५२ | ९ दुधाचा रतीब वाढवा | ५७ |
| ५ स्फुट विचार | ५३ | १० हिंदी रेग्वेजसंबंधी ताजा अहवाल | ५७ |
| प्राप्तीवरील करासंबंधी कमिटीच्या सूचना–विमाविषयक नवीन कायदा–धंदेवाल्या मोटारी व हायरपर्चेस पद्धति–मोटारींच्या विम्याकरतां सहकारी संस्था–जपानचें स्वयंपूर्णतेचें धोरण | | ११ स्वदेशाच्या सफरीकरतां १९ लक्ष रुपये | ५७ |
| | | १२ रिझर्व्ह बँकेची गेल्या वर्षांतील प्रगति | ५८ |
| | | १३ पेट्रोल पुरविणारी नवी कंपनी | ५८ |
| | | १४ देशी सिनेमाचा धंदा | ५९ |
| | | १५ निवडक बाजारभाव | ५९ |


# अर्थ

बुधवार, ता. ३ फेब्रुवारी, १९३७

## रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

( २ )

### हिंदी शेतकऱ्याच्या विशिष्ट अडचणी

कारखानदारी व शेतीचा धंदा ह्यांचेमध्यें ठळक भेद आहे आणि त्या कारणानें शेतकऱ्यास कारखानदाराप्रमाणें कर्ज मिळण्याची पात्रता नसते ( १ ) इतर धंदे मोठ्या प्रमाणावर चालवता येऊन ते प्रसरणशील असतात आणि त्यांची व्यवस्था एकसूत्री होऊं शकते, शेतीच्या धंद्यांत हा गुण वास करीत नाहीं इतर धंद्यातल्या अनेक क्रिया स्वतंत्रपणें चालवून त्यामध्यें सुधारलेली यंत्रसामुग्री वापरता येते, शेतीची परिस्थिति ह्याच्या उलट असते ( २ ) कारखानदारीच्या धंद्यात मालकास प्रतिकूल स्थितीचा विशेष धोका सहन करावा लागत नाहीं, परंतु शेतींतली परिस्थिति, ( पाऊस, पाणी वगैरे ) शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरची असल्यानें अवर्षण, पूर, थंडीचा कडाका ह्यावर त्याची सत्ता चालत नाहीं ( ३ ) कारखानदारास मागणीच्या प्रवृत्तीस अनुसरून मालाचें उत्पादन बदलणें किंवा कमी–ज्यास्त करणें शक्य असतें आणि ह्या बाबतींत योजनात्मक धोरण तो आखू शकतो पिकाच्या उत्पादनास अवधि मोठा लागतो आणि ह्या व इतर कारणामुळें शेतकऱ्यास पिकामध्यें फेरबदल करून आपल्या मालाचा पुरवठा मागणीशी जुळता करून घेता येत नाहीं ( ४ ) शेतीच्या धंद्याची व्यवस्था व घटना अशी आहे कीं बाजारांत यावयाच्या मालाचा पुरवठा व किंमती ह्यांचें नियमन करणें शक्य होत नाहीं. कारखानदार ही गोष्ट करू शकतात' शेतीचें हें चतुर्विध वैशिष्ट्य रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टांत तज्ज्ञाच्या ग्रंथांतले उतारे देऊन दाखवण्यात आलें आहे.

शेतीच्या धंद्याची ह्या प्रकारची सर्वसाधारण स्थिति आहे त्यांतहि, हिंदुस्थानातील शेतीच्या मार्गांत दुसऱ्या कित्येक अडचणींची भर पडलेली आहे. जगांतला कोठलाहि शेतकरी घेतला तरी त्याच्या धंद्याची परिस्थिति कारखानदारीच्या मानानें प्रतिकूल असते हिंदी शेतकऱ्याचा धंदा त्याहूनहि अधिक अडचणीचा झाला आहे हिंदी शेतकऱ्याचें दरमाणशी क्षेत्र सरासरीनें इतर देशाच्या मानानें अतिशय लहान असतें आणि त्याचे लहान लहान तुकडे पडून ते भिन्न-मालकाच्या लागवणींत भिन्न भिन्न ठिकाणीं येतात पिढी दर पिढी शेताच्या ठिकऱ्या उडत चालल्या आहेत आणि भाऊबदात होणाऱ्या मिळकतीच्या वाटण्याचा परिणाम शेतीच्या किफायतशीरपणावर प्रतिकूल तऱ्हेचा होत आहे जमीनहि सरासरीनें चागल्या कसाची नसते आणि तिची नैसर्गिक उत्पादनशक्ति अल्प असते शेतकरी वर्ग निरक्षर व अडाणी असल्यानें त्यास नवीन नवीन शास्त्रीय शोधाचा उपयोग करून त्याचा फायदा घेता येत नाहीं जोडधंदे शेतकरी क्वचितच करतात, ह्यामुळें त्याच्या अल्प मिळकतींत भर पडत नाहीं लग्नकार्यासारख्या सामाजिक प्रसंगीं अवाच्या सवा खर्च मात्र चालतो आणि शेतकऱ्यास भलत्याच दरानें सावकाराकडून कर्ज काढावें लागतें कित्येक ठिकाणीं शेतकऱ्याची जमिनीवरची मालकी कायद्यानें मर्यादित झाल्यानें त्यास कर्जास पुरेसें तारण देता येत नाहीं कर्जावर जबर व्याज द्यावें लागल्यानें कर्जबाजारीपणातून शेतकऱ्याचें डोकें वर निघत नाहीं सारांश, फायदा व नक्त मिळकत ह्याचेसाठी हिंदी शेतीचा धंदा चालत नसून परंपरागत आलेला व्यवसाय एवढाच त्याचा अर्थ होतो हिंदी शेतीच्या दु:स्थितीचा अशा तऱ्हेचा पाढा रिझर्व्ह बँकेनें आपल्या रिपोर्टांत वाचला आहे

शेतीचा धंदा वरील प्रकारचा असतां तो चालवण्यास लागणारें भांडवल कसें मिळणार ? ह्या भांडवलाचा उगम कोणता आणि त्यापासून शेतकऱ्यापर्यंत प्रवाह कसा वाहणार ? सर्वतें भांडवल जनतेनें बचत केलेल्या शिलकी पैशातूनच कोणत्याहि धंदेवाल्यास मिळणार सर्वांचा द्रव्यसंचय तोच. तो पैसा ठेवींच्या स्वरूपात गोळा करून गरजू लोकास पुरवण्याचें कार्य " व्यापारी " बँकाचें आहे ह्या बँकाजवळचा पैसा अल्प मुदतीचा असून तो सारखा येता–जाता राहिला पाहिजे शेतीच्या धंद्यास तर भांडवल " अडलांब " मुदतीचें लागणार आणि तो वर वर्णिलेल्या नैसर्गिक व इतर कारणामुळें बँकास योग्य वेळीं परत मिळण्याची मारामार पडणार अशा स्थितींत, समाजाच्या बचतीच्या साठ्यामधून पैशाचा पाट शेतीच्या धंद्याकडे वाहू शकत नाहींत आणि तो कोरडा रहातो. शेतीच्या मालाच्या विक्रीचे व्यवहारास तात्पुरता पैसा पुरवणें एवढीच सोय बँकास व सराफास करता येते खेडेगावी सावकाराचा प्रश्न निराळा आहे, कारण ते ठेवी घेत नसून स्वत:च्या पैशावर व्यवहार करतात आणि त्याचा संबंध पैशाच्या मुख्य बाजाराशी येत नाहीं ह्या रीतीनें अत्यंत संकुचित मर्यादेंतच सामाजिक बचतीचा पैसा शेतीच्या उपयोगी पडतो बँका, सराफ व सावकार ह्यांचीं कार्यक्षेत्रें भिन्नभिन्न आहेत बँकानीं आपल्या अल्प मुदतीच्या व खात्रीनें परत यावयाच्या भांडवलाचा पुरवठा शेतीस करणें वर दिलेल्या कारणामुळें अशक्य आहे रिझर्व्ह बँकेच्या ह्या विचारसरणीचा रोख असा आहे कीं, केवळ सामान्य बँकाच्यामार्फत व्यवहार करणारी जी मध्यवर्ती बँक तिनें शेतीच्या धंद्यास अप्रत्यक्ष भांडवल पुरवावें ही अपेक्षा अयुक्त आहे रिझर्व्ह बँक आणि शेती ह्याचा संबंध सामान्यत: जोडण्यांत येतो, तो किती चुकीचा आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न त्या बँकेनें आपल्या रिपोर्टांत केला आहे.

## प्राप्तीवरील कराची आकारणी व वसुली

### ब्रिटिश तज्ञाच्या सूचना

[ हिंदुस्थानातील प्राप्तीवरील कराच्या आकारणीच्या पद्धतीसबधी चौकशी करून सूचना करण्याकरिता दोन ब्रिटिश तज्ञाची ऑक्टोबर १९३५ मध्यें नेमणूक करण्यात आली होती त्यानीं हिंदुस्थान सरकारास सादर केलेला रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला आहे रिपोर्टावर, सदरहु तज्ञाच्या मदतीस दिलेले खान बहादूर वाच्छा ह्याचीहि सही आहे वरील तिघाच्या सूचनांचा साराश येथें दिला आहे ]

( १ ) हिंदी नागरिकांस हिंदुस्थानाबाहेर झालेल्या, परंतु हिंदुस्थानात न आणलेल्या, प्राप्तीवरहि कर घेण्यात यावा

( २ ) शेतीचे उत्पन्नावर कर घेण्यात येऊ नये, परतु इतर उत्पन्नावर कोणत्या दरानें कराची आकारणी व्हावी, हें ठरविण्याकरिता तें उत्पन्न हिशेबात घेतलें जावें

( ३ ) हिंदुस्थानातील सरकारी नोकरीबद्दल पेन्शन मिळणारा नोकर कायमचा हिंदुस्थानाबाहेर राहणारा असेल, तर त्याच्या पेन्शनचे रकमेंतून प्राप्तीवरील कर घेता येणार नाहीं, अशी नव्या राज्यघटनेंतील २७२ व्या कलमानें तरतूद केली आहे तेव्हा ह्या पेन्शनास हात लावता येत नाहीं

( ४ ) रजा घेऊन हिंदुस्थानाबाहेर गेलेले सरकारी नोकर आपला पगार तिकडेच घेतात, त्यावर मात्र प्राप्तीवरील कराची आकारणी करता येईल ह्या सबधातील सध्याची सवलत काढून घेण्यात यावी

( ५ ) काहीं विशिष्ट मिळकतीपर्यंत कराची माफी, त्यानतर विशिष्ट मर्यादेपर्यंत ठराविक दरानें आकारणी व काहीं विशिष्ट रकमेपेक्षां ज्यास्त उत्पन्न असल्यास सबद उत्पन्नावरील आकारणीचे दरात टप्प्याटप्प्यानें वाढ, अशा पद्धतीनें सध्या हिंदुस्थानात कर वसूल केला जातो उत्पन्नात थोडीशी वाढ होऊन आकारणीच्या दराचा टप्पा ओलाडला गेला कीं, नवीन वाढत्या दरानें सबध उत्पन्नाची आकारणी होते. ह्यामुळें, कित्येक प्रसगीं, उत्पन्नात थोडीशीच वाढ झाली तरी कराचे रकमेंत एकदम भर पडते आणि जादा उत्पन्नामुळें कर भरणाराचें नुकसानच होतें ही पद्धत ग्रेटब्रिटनमध्यें चालू नाहीं

( ६ ) वरील पद्धतीऐवजीं सध्या हिंदुस्थानात सुपरटॅक्सचे बाबतींत अमलात असलेली पद्धत प्राप्तीवरील करासहि लागू करावी. म्हणजे, प्रत्येक टप्प्यातील उत्पन्नास विशिष्ट दर लागू पडेल व फक्त जादा उत्पन्नास जादा कर द्यावा लागेल. उदाहरणार्थ, ह्या सूचनेनुसार, दोन ते पाच हजारापर्यंतच्या उत्पन्नावर रुपयास सहा पै ह्या दरानें कराची आकारणी केली जाईल, त्यावरील पाच हजारांवर नऊ पै दरानें कर घेतला जाईल, नतरच्या पाच हजारास एक आणा दरानें कर द्यावा लागेल, इ सध्याच्या कायद्याप्रमाणें, पधरा हजार उत्पन्नवाल्यास सबध उत्पन्नावर एक आणा दरानें कर द्यावा लागतो.

( ७ ) कपन्यांस मिळालेल्या नफ्याची रकम ५० हजारावर गेल्यास त्यावर सुपरटॅक्स आकारण्यात येतो त्यापेक्षा लहान नफ्यास कर माफ आहे वास्तविक हा कर कपनीच्या भागीदारातर्फे भरण्यात न येता, कंपनीच्या खर्चाचा एक भाग म्हणून समजला जातो. मोठ्या कपन्याप्रमाणें लहान कपन्यासहि सयुक्त भांडवलाच्या मदलळयास मिळणाऱ्या विशिष्ट सवलती मिळत असल्याकारणानें, सध्याची ५० हजाराची करमाफीची मर्यादा काढून टाकण्यास हरकत नाहीं.

( ८ ) पत्नीचें उत्पन्न तें पतीचें उत्पन्न मानण्यात यावें पत्नीच्या स्वकष्टार्जित मिळकतीपैकी पहिल्या ५०० रुपयास फक्त करमाफी असावी.

( ९ ) इनकम टॅक्स खात्याच्या इन्स्पेक्टराच्या कामात सुधारणा व्हावी, ह्याकरितां त्याचेवर वरिष्ठ अधिकाऱ्याचें योग्य नियत्रण असावें. परंतु त्याबरोबरच त्यास ज्यास्त अधिकारहि देण्यांत यावे.

( १० ) कर देणाऱ्या नागरिकाच्या सोई-गैरसोईकडे इनकम टॅक्सचे अधिकारी योग्य लक्ष पुरवीत नाहींत, ह्या तक्रारींत बरेंच तथ्य आहे एकाच दिवशीं, एकाच वेळीं, अनेकांस मुलाखतीस बोलावून त्यास तिष्ठत ठेवणें, त्यांच्या हिशेबाच्या वह्या कित्येक दिवस ठेवून घेणें, इत्यादि प्रकार कमिटीनें समक्ष अवलोकन केले आहेत

( ११ ) इनकम टॅक्स अधिकाऱ्याच्या नोटिशीची वाट न पहातां, करास प्राप्त असलेल्या प्रत्येक इसमानें आपल्या मिळकतीचा तपशील सादर केला पाहिजे, अशी त्याचेवर कायद्यानें सक्ति करण्यात यावी. आज कराचे कक्षेंतून अनेक लोक निसटतात, ते ह्यामुळें कर भरू लागतील

( १२ ) कराच्या आकारणीसंबंधातील वादाचा निकाल स्वतत्र असिस्टट कमिशनरानीं द्यावा, आणि त्याचे निकालावरील अपील ऐकण्याकरिता सबद हिंदुस्थानकरिता सहा जणांचें एक स्वतंत्र ट्रायब्यूनल नेमण्यांत यावें. त्यावरील नेमणुकी गव्हर्नर-जनरलनें कराव्यात

( १३ ) हिंदुस्थानातील सर्व प्रांतामधील कराच्या आकारणींत एकसूत्रीपणा आणण्याकरिता एका चीफ कमिशनर ऑफ इन्कमटॅक्सची नेमणूक करण्यात यावी.

---

### लॅंकेशायर गिरण्यांस मागील वर्ष कसें गेलें ?

( १ ) कामगाराचे रोजगारात ९½ टक्के इतकी वाढ झाली

( २ ) पूर्वीच्या कित्येक वर्षांपेक्षा गेल्या वर्षी गिरण्यास नफा चागला उरला.

( ३ ) एकूण १४७ कपन्यानीं ५८ कोटि रुपयाच्या भाडवलावर २६ लक्ष डिव्हिडंड वाटलें. १९३५ सालीं १५३ कपन्यानीं ६३ कोटि भाडवलावर २४ लक्ष रुपये डिव्हिडंड दिलें होतें.

( ४ ) गेल्या काहीं वर्षांत मिळून सुमारें ४० लक्ष चात्या बाद झाल्या आहेत कित्येक कंपन्यानीं सूत काढण्याचें सोडून देऊन विमानें, रेनकोट, हँड बॅग्ज इत्यादींचें उत्पादन सुरू केलें आहे.

( ५ ) येतें वर्ष लॅंकेशायर गिरण्यास चागलें जाईल, अशी अपेक्षा आहे

---

### जागतिक व्यापार आणि बाजारभाव

गेल्या वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यातले जागतिक व्यापार व बाजारभाव ह्याविषयींचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून बहुतेक राष्ट्रांचे बाबतींत ह्यासबधात वाढ झाली आहे असें दिसून येतें घाउक बाजारभाव घेतले असता १९३५ च्या पहिल्या नऊ महिन्याच्या मानानें गेल्या सालीं ते फ्रान्समध्यें १४ टक्के व ग्रेटब्रिटनमध्यें ५½ टक्के वर गेले, पण हिंदुस्थानात पुरी एक टक्काहि वाढ झाली नाहीं असें आढळतें. हिंदुस्थानचा निर्गत व्यापार १३ टक्क्यांनीं वाढला आणि आयात व्यापार ८ टक्क्यानीं घटला. ग्रेटब्रिटनचे बाबतींत हे आकडे अनुक्रमानें १२½ टक्के व १½ टक्के वाढीचे आहेत.

# स्फुट विचार

### प्राप्तीवरील करासंबंधीं कमिटीच्या सूचना

प्राप्तीवरील करासंबंधींच्या चौकशी कमिटीच्या शिफारसींचा गोषवारा आम्ही आजच्या अंकांत ५२ व्या पृष्ठावर देऊन, त्याचें रहस्य थोडक्यात सांगितले आहे चौकशी कमिटीच्या कांहीं शिफारसी अत्यंत महत्त्वाच्या असल्यानें त्यांचेकडे विशेष लक्ष वेधणें अवश्यक आहे करास पात्र होणाऱ्या प्रत्येक नागरिकानें आपण होऊन आपल्या मिळकतीचा तपशील इनकमटॅक्स अधिकाऱ्यास कळविण्याची त्याजवर कायदेशीर सक्ती असावी, अशी कमिटीची शिफारस आहे सध्याच्या पद्धतीप्रमाणें उत्पन्नासंबंधीं माहिती देण्याबद्दल ज्यावर नोटिस काढण्यात येते, तोच इसम फक्त आपल्या प्राप्तीचा आकडा कळविण्यास बांधलेला असतो ह्यामुळें, करास पात्र असलेल्या कित्येक लोकांवर आकारणी होत नाहीं कमिटीची शिफारस ग्रेटब्रिटनमधील पद्धतीस अनुसरून आहे तथापि, ह्या देशांत अनेक लोकांच्या अनभिज्ञतेमुळें ती जाचक होण्याची भीति वाटते प्राप्तीवरील कराचें उत्पन्न वाढविण्याकरितां शेतीपासून मिळालेल्या प्राप्तीसंबंधीं कमिटीनें केलेली सूचना नवीन नसली तरी दूरगामी आहे कराची आकारणी करतांना एकूण प्राप्तीचा हिशेब करावा लागतो, त्यात शेतीच्या उत्पन्नाचा अंतर्भाव व्हावा, म्हणजे कराचा दर ठरवितांना त्याचा विचार केला जाईल आणि इतर उत्पन्नावर भारी दरानें आकारणी होऊन सरकारचें उत्पन्न वाढेल, असा कमिटीच्या सूचनेचा निष्कर्ष आहे शेतीच्या मिळकतीवरील उत्पन्नावर कर कोणत्या पद्धतीनें आकारला जावा, हा प्रश्न कमिटीच्या कक्षेबाहेरचा व व्यापक स्वरूपाचा असून, त्यामध्यें ऐतिहासिक परंपरेचा विचार प्रामुख्यानें करावा लागेल हिंदुस्थानाबाहेर वास्तव्य करणाऱ्या हिंदुस्थानच्या अधिकाऱ्यांचें पेन्शन नव्या राज्यघटनेनेंच करमाफ ठरविलें आहे तथापि, रजेवर गेल्यानंतर तिकडेच पगार घेतला असतां त्यावर कर आकारला जात नसे ही माफी ह्यापुढें राहूं नये, अशी कमिटीची शिफारस आहे स्वतःच्या मिळकतीचा कांहीं भाग आपल्या पत्नीच्या नावानें करून देऊन व तें वेगळें उत्पन्न दाखवून योग्य अशा कराच्या दरानें होणारी आकारणी टाळणारे अनेक लोक आहेत, त्यास आतां ह्यापुढें अशा रीतीनें कर चुकवितां येणार नाहीं करआकारणीच्या सुचविलेल्या नव्या पद्धतीमुळें दरात वाढ होणार हें मात्र ठरल्यासारखेंच आहे

---

### विमाविषयक नवीन कायदा

विदेशी विमा कंपन्यास असेंब्लींत मांडलेल्या नव्या बिलास अनुसरून हिंदी कंपन्याप्रमाणेंच सरकारांत डिपॉझिट ठेवावें लागणार असून, हिंदुस्थानातील व्यवहारासंबंधीं खुलासेवार तपशील सादर करावा लागणार आहे त्याच्या ठेवींपैकी कांहीं रकम हिंदुस्थानातच गुंतविणें त्यांस भाग पडणार आहे आणि एकाद्या देशात हिंदी कंपन्यावर अयोग्य निर्बंध घातले गेले, तर त्या देशांतील कंपन्यावर हिंदुस्थानांत जशास तसें ह्या न्यायानें निर्बंध घालण्याचा अधिकार सरकारनें घेऊन ठेवला आहे. विमाविषयक बिलांतील उपरिनिर्दिष्ट व्यवस्था हिंदी कंपन्यांच्या दृष्टीनें योग्य व इष्ट अशीच आहे. तथापि, देशी कंपन्यास ह्याहि पेक्षा ज्यास्त संरक्षण मिळणें अवश्यक आहे, असें ह्या व्यवसायामधील पुढाऱ्यांचें म्हणणें आहे (१) सरकारी हुकमतीखालील विम्यांचें सर्व काम देशी कंपन्यास मिळावें, (२) निमसरकारी आणि सरकारी मदत मिळणाऱ्या खासगी संस्था ह्यांनीं आपल्या इमारतींचा देशी कंपन्याकडे विमा उतरविला पाहिजे, अशी त्याजवर सक्ती असावी, (३) सरकारकडून संरक्षण मिळणाऱ्या उद्योगधंद्यांच्या विम्याचें काम देशी कंपन्याकडे गेलें पाहिजे, (४) हिंदुस्थानात काम करणाऱ्या विदेशी कंपन्यांनीं 'रीइन्शुअरन्स' देशी कंपन्याकडेच केलें पाहिजे, (५) विदेशी कंपन्यांच्या पॉलिसीवर जादा स्टॅंपड्यूटी बसवण्यात यावी, इत्यादि त्यांच्या सूचना आहेत डिपॉझिटची ५० हजाराची रकम लहान हिंदी कंपन्यास डोईजड होईल विमेदाराच्या हिताचे दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पहावें लागेल, हें उघड आहे विमा एजंटास लायसेन्स घेणें अवश्यक करणें, रिबेटच्या पद्धतीस आळा बसविणें, इत्यादि बिलातील सूचनांचा तपशीलवार विचार करावा लागेल. लायक व कार्यक्षम लोकास विम्याचा धंदा सुरू करण्यास आडकाठी येणार नाहीं, याबद्दल तजवीज झाली पाहिजे नियंत्रणाचे नावाखालीं ह्या धंद्याची मालकी एका विशिष्ट वर्गाकडे जाणार नाहीं, ह्याची खबरदारी घेतली पाहिजे. हिंदी विमा मंडळ्या, त्यांचे चालक, भागीदार, विमेदार व प्रचारक ह्यांच्यापैकी कोणाच्याहि न्याय्य हितसंबंधास बाध येऊं न देतां ह्या धंद्याचें क्षेत्र सर्वांस खुलें राहील, अशी व्यवस्था झाली पाहिजे, म्हणजे विम्याचे धंद्याची प्रगति योग्य मार्गानें होईल.

---

### धंदेवाल्या मोटारी व हायर-पर्चेस पद्धति

लॉरी मालकांचा अभिप्राय घेऊन तो मराठा चेंबर ऑफ कॉमर्सनें मोटार-विमा कमिटीपुढें मांडला मोटारींच्या धंद्यातल्या बहुतेक लॉऱ्या हप्तेबंदीच्या खरेदी पद्धतीनें घेतलेल्या असतात आणि अंतर्गत स्पर्धेच्या तीव्रतेमुळें त्यांपैकीं जवळ जवळ निम्म्या परत द्याव्या किंवा विकून टाकाव्या लागतात असा अनुभव असल्याची माहिती कमिटीस सांगण्यांत आली विशिष्ट टापूंत व्यवहार करणाऱ्या लॉरीमालकांचा संघ स्थापन झाल्यास अनिष्ट स्पर्धा टळेल आणि वहातुकीचे दर वगैरे बाबींसंबंधानें समाधानकारक व्यवस्था होऊं शकेल हप्तेबंदीच्या म्हणजे हायर-पर्चेस पद्धतीनें धंदेवाल्यांस लॉऱ्या खरेदी करण्याचा मोह उत्पन्न होतो आणि व्यवहाराच्या किफायतशीरपणाकडे दुर्लक्ष होतें ठरलेले हप्ते चुकते करण्यास लागणाऱ्या पैशाची कूस लॉरीवाल्याच्या उत्पन्नात रहात नाहीं आणि त्याची कार्यक्षमता घटते. ह्याचा परिणाम मोटार लॉऱ्याच्या संबद्ध धंद्यावर होतो. लॉरीवाल्यांनीं स्वतःची संघटना करून आपल्या धंद्यात पद्धतशीरपणा आणि फायदेशीरपणा निर्माण करणें अवश्यक आहे. सध्याच्या काळ आर्थिक संघटनेचा व शिस्तीचा आहे हें ओळखून स्वतःचें व समाजाचें हित साधण्याचा प्रयत्न सर्वांनीं केला पाहिजे

---

### मोटारींच्या विम्याकरितां सहकारी संस्था

लॉऱ्या, बसेस व मोटारी ह्यांचे अपघात होतात, त्यातल्या दुखापतीचा व मृत्यूचा विमा उतरण्याच्या प्रश्नाचा विचार सध्या चालू आहे. लॉऱ्यांमधले उतारू व पादचारी जनता ह्यास रस्त्यांत मोटार वहातुकीमुळें अपघात झाल्यास त्या नुकसानीची भरपाई होण्याची आज मितीस निश्चित अशी कांहींच तरतूद नाहीं. हें

दुहेरी रीतीनें अनिष्ट आहे एक तर, अपघात झालेल्या लोकास नुकसान भरपाई मिळेल आणि ती योग्य प्रमाणात मिळेल ह्याविषयीं कांहींच खात्री नसते ह्याबद्दलचे खटले कोर्टापर्यंत क्वचितच जातात. जबर दुखापत किंवा मृत्यू झाला असता लॉरीवाल्यास त्याच्या ऐपतीबाहेर भरपाईची रकम द्यावी लागून त्याचा धंदा बसण्याची भीति ही दुसरी आपत्ति असते. ह्यासाठी विम्याची निश्चित योजना अमलात आल्यास जनता व लॉरीवाले ह्या दोघाचीहि सोय होण्यासारखी आहे अपघाताच्या विम्याची व्यवस्था लॉरीवाल्याच्या संघानीं सहकारी तत्त्वावर केली असता ती सोयीची व स्वस्त होईल अशी आम्हास आशा आहे. रत्नागिरी जिल्ह्यात ह्या प्रकारचा प्रयत्न झालेला असून त्यात बरेंच यश आलें असल्याचा दाखला चेंबरनें दिला आहे, तिकडे लॉरीवाल्यानीं लक्ष द्यावें. मोटार विम्याची कायद्यानें सक्ती होण्याचा पुष्कळ संभव असल्यानें त्याविषयींची व्यवस्था एव्हापासूनच करून ठेवण्यात दूरदर्शीपणा आहे

### पेट्रोलचे बाबतींत जपानचें स्वयंपूर्ततेचें धोरण

प्रत्येक देश आता स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करीत आहे अडचणीचे प्रसंगीं आयात पेट्रोलचा पुरवठा बंद पडल्यास स्वदेशातच पेट्रोल बनविण्याच्या योजना अनेक देशानीं आखल्या आहेत जर्मनीनें ह्या बाबतींत दहा वर्षांपूर्वीच सुरवात केली होती आणि आता इंग्लंडनेंहि कोळशापासून पेट्रोल काढण्यास सुरवात केली आहे हें कृत्रिम पेट्रोल महाग पडतें, तथापि आपत्तीस तोंड देण्याकरिता तयार रहाण्याची ती किंमत समजली जाते जपाननेंहि आता कोळशापासून पेट्रोलचें उत्पादन करण्यास आरंभ केला आहे कोळशाचा पुरवठा कायम रहावा ह्याकरितां विजेचा प्रसार करण्याचें धोरण तेथील सरकारनें आंखलें आहे


मुंबईचे २५ वर्षांचे अनुभवी

**टेलर्स रिसबूड ब्रदर्स**

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २



**रोखे बाजार**

मुंबईच्या रोखे बाजाराच्या चौकशी कमिटीचें काम सुरू झालें त्याबाबत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, कमिटीकडे पाठविलेल्या सूचना, तज्ज्ञांनी दिलेल्या साक्षी, इत्यादि गोष्टींचें आकलन होण्यास रोखे बाजाराची पूर्वपीठिका माहीत असणें अवश्यक आहे

प्रो. काळे ह्यांनीं लिहिलेल्या

**व्यापारी उलाढाली**

ह्या पुस्तकात रोखे व भाग ह्याच्या उलाढालींचें व रोखे बाजारातील व्यवहाराचें सोपपत्तिक विवेचन करण्यात आलें आहे ह्या कारणानें, सदरहु पुस्तक अत्यंत वाचनीय झालें आहे निश्चित व्याजाचे रोखे, संयुक्त भांडवलाच्या मंडळ्याचें भाग, व्यापारी मंडळ्या, रोखे बाजार, मालाचे बाजार, पैशाचा बाजार, इत्यादि प्रकरणें पुस्तकात आलीं आहेत सार्वजनिक कार्यकर्ते व चालू प्रश्नाचे अभ्यासक ह्यांस हें पुस्तक मार्गदर्शक होणार आहे पृ. सं १४३, किं १ रु

व्यवस्थापक—अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.


## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक, लि

### श्री न चिं केळकर ह्यांचे हस्तें बँकेचें उद्घाटन

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि चा उद्घाटन समारंभ ता ३१ जानेवारी रोजीं श्री. न. चिं केळकर ह्याचे हस्तें पार पडला समारंभास पुण्यातील अनेक प्रमुख गृहस्थ हजर होते. बँकेचे अध्यक्ष, श्री रा न अभ्यंकर, ह्यानीं सुरवातीस स्वागतपर भाषण करून प्रथम बँकेची पूर्वपीठिका निवेदन केली ते म्हणाले, "देशातील लहानमोठ्या नव्या व जुन्या उद्योगधंद्यास सुरवातीच अथवा चलाऊ भांडवलाचे रूपानें शक्य व योग्य ती आर्थिक मदत करण्याचा ह्या बँकेचा एक प्रमुख उद्देश आहे आपली पूर्वकालीन संपन्न स्थिति, सांप्रतची विपन्नावस्था, जनतेच्या विचाराचा ओघ आणि तज्ज्ञाचे अभिप्राय ह्या सर्वांचा साकल्यें विचार करता औद्योगिक बँकेची आपणास अत्यंत अवश्यकता आहे, हें स्पष्ट आहे तूर्त लहान लहान उद्योगधंद्याना मदत करून पुढें जसजसा लोकाश्रय मिळत जाईल त्या मानानें आम्ही आपलें क्षेत्र व धोरण व्यापक करणार आहों ह्या रकमा गुतविताना योग्य ती काळजी व दक्षता चालक घेतील ठेवीदारातर्फें संचालक मंडळात एक डायरेक्टर घेण्याचें आम्हीं ठरविलें आहे असें करणारी आमची ही पहिली जॉइंट स्टॉक बँक असेल औद्योगिक बँकिंगच्या व्यवहारास सुरवातीस सामान्य बँकिंगची जोड दिली तरी शेअर आणि डिबेंचर भांडवल व लांब मुदतीच्या ठेवी ह्याचाच विनियोग औद्योगिक खात्याकडे करण्यात येईल कमी मुदतीच्या ठेवीचा तसा उपयोग करण्यांत येणार नाहीं. औद्योगिक बँकेची आपणास तीव्र स्वरूपाची उणीव भासत होती, ती ही बँक काढून आम्ही दूर करण्याचा अल्पसा प्रयत्न करीत आहोंत, तरी सर्वानीं आपली सहानुभूति, आश्रय व आशीर्वाद आम्हास द्यावा"

अध्यक्ष, श्री न. चिं. केळकर, ह्यानीं बँक उघडल्याचें जाहीर करून ता. १ फेब्रुवारीपासून कामास सुरवात होईल असें सांगितलें. शेठ वालचंद हिराचंद ह्याच्या औद्योगिक निधीबाबतच्या प्रयत्नाचा त्यांनीं उल्लेख केला, त्याचप्रमाणें पुणें सेंट्रल, मर्चंटस, इत्यादि बँकाच्या प्रगतीचीहि त्यानीं हकीकत सांगितली. मागील अनुभवाचा फायदा घेऊन नवीन बँकानीं चालावें, असें त्यानीं सुचविलें व प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँकेस शुभ चिंतून आपलें भाषण पुरें केलें बँकेचे एक मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. नि ना. क्षीरसागर, ह्यांनीं आभार मानले व अल्पोपाहारानंतर समारंभ पूर्ण झाला


# जाहीर नोटीस.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड**

बँकेची कचेरी ता ८ फेब्रुवारी १९३७ पासून हल्लींच्या जागेपासून (न्यू किताब बिल्डिंग) जवळच असलेल्या काकाकुवा मॅन्शन, दुसरा मजला, लक्ष्मीरोड, पुणें शहर, या ठिकाणीं नेण्यांत येईल.

ता. १-२-१९३७

M V. Gokhale,
मॅनेजर.

## विमा कंपन्यांवरील नियंत्रण वाढणार

### नवीन बिलाचा मसुदा

[विमा कंपन्यांबाबतच्या कायद्यात दुरुस्ती करण्यापूर्वी त्याबाबत पूर्व चौकशी करण्याकरिता हिंदुस्थान सरकारनें श्री सुशील सेन ह्यांची नेमणूक केली होती श्री सेन ह्यांच्या रिपोर्टाचा विचार करण्याकरिता तज्ज्ञांची एक कमिटी गेल्या वर्षी नेमण्यात आली होती. हा रिपोर्ट व त्यावरील कमिटीचा अभिप्राय ह्यांच्या अनुरोधानें सरकारनें एक बिल तयार करून, असेंब्लीमध्यें तें रीतसर मांडलें आहे १९१२ सालातील दोन वेगवेगळ्या कायद्यास धरून सध्या विमा कंपन्यांचा कारभार चालू आहे आता नव्या एकाच कायद्यामध्यें ह्या दोहोंतील व्यवस्थेचा अंतर्भाव करण्यांत यावयाचा आहे असेंब्लीस सादर केलेल्या बिलामधील महत्त्वाच्या कलमाचा साराश येथें दिला आहे ]

-(१) ब्रिटिश हिंदुस्थानात विम्याचें काम करणाऱ्या सर्व कंपन्यावर सरकारचे नियंत्रण प्रभावी होईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

(२) ह्या बाबतींत हिंदी कंपन्या आणि परदेशात स्थापन झालेल्या परंतु शाखाचे अगर एजन्सीजूचे द्वारा हिंदुस्थानात काम करणाऱ्या विदेशी कंपन्या, ह्यांचेबाबतींत भेद करण्यात आलेला नाहीं

(३) आयुर्विम्याचें काम करणाऱ्या कंपन्यास ह्यापुढें किमान ५० हजार रुपये सरकारात डिपॉझिट ठेवावे लागणार आहेत.

(४) कंपन्याच हिशेब योग्य रीतीनें ठेवले जातात किंवा नाहीं आणि व्यवस्था चोख आहे किंवा नाहीं हें पहाण्याकरिता खुलासेवार माहिती पुरविण्याची कंपन्यावर जादा जबाबदारी टाकण्यात आली आहे

(५) विदेशी कंपन्यानीं पुरविलेली माहिती ताडून पहाता यावी ह्याकरिता त्यानीं आपल्या प्रमुख हिंदी कचेऱ्यातून हिशेब व कागदपत्रें तयार ठेवणें अवश्यक होणार आहे.

(६) पॉलिसींच्या रकमा कोणास द्यावयाच्या हें ठरवितांना अडचण आल्यास, त्या कोर्टांत भरण्यास कंपन्यास अधिकार मिळणार आहे

(७) विमा एजटाना लायसेन्स घ्यावा लागेल रिबेटच्या पद्धतीस आळा बसणार आहे

(८) नव्या कायद्याची अमलबजावणी करण्याचें काम 'सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स' कडे देण्यात यावें व सरकारी ॲक्चुअरीनेंच ह्या हुद्याचें काम पहावें अशी योजना आहे

(९) प्रॉव्हिडंड सोसायट्यांवरील नियंत्रण वाढणार आहे सोसायट्यांच्या विमाविषयक योजनास ॲक्चुअरीनें समति दिलेली असावी आणि दर ठराविक मुदतीनंतर सोसायट्याच्या आर्थिक परिस्थितीची ॲक्चुअरीमार्फत तपासणी व्हावी अशी व्यवस्था करण्यात येणार आहे

---

### पोस्ट खात्याचे वाढतें काम

नाताळचे सुट्टीमध्यें पत्रें, तारा, टेलिफोन, इत्यादींची संख्या वाढते व त्याकरिता जादा माणसें कामावर घ्यावीं लागतात ग्रेट ब्रिटनमध्यें गेल्या नाताळात अशीं ८० हजार हंगामी माणसें कामावर ठेवावीं लागलीं १९३१ सालापासून पोस्ट व तार खात्याचें नाताळातील काम वाढत आलें आहे, परंतु गेल्या नाताळानें त्या बाबतींत रेकॉर्ड निर्माण केलें आहे. उद्योग-धंद्याची वाढ व आर्थिक चलती ह्यांचें हें निदर्शक आहे


हंस पिक्चर्सचा २ रा
अद्वितीय बोलपट
धर्मवीर
मिनर्व्हा टॉकीजमध्यें पहा
लेखक : प्रि अत्रे
—भूमिका—
बाबूराव पेंढारकर, विनायक,
रत्नप्रभा, इंदिरा वाडकर.

स्थापना १९२० मुंबई सरकारनें व कोल्हापूर सरकारनें प्रथम मान्य केलेले

जाधव टेलरिंग कॉलेज
नवीन वर्ग सुरू झाले नावें नोंदवा माहिती मागवा [ ४९७ बुधवार, पुणें २



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

POONA CIRCULATING LIBRARY
Deccan Gymkhana, POONA 4
Magazines & Books supplied in your own home. Over 100 different English Marathi, Hindi, Bengali, Gujrati, French & German journals to choose from
*For particulars see or write to —*
D. P ATHALYE,
*Proprietor*

## सहकारी चळवळ

### मुंबई प्रॉ को बँक लि. (शाखा शिरपूर)

३०-६-३६ अखेर ५३ सोसायट्या वरील शाखेस सामील होत्या. तीन सोसायट्यांचे सभासदाकडून मुळीच वसूल येणार नाहीं, म्हणून, व दोन सोसायट्याजवळ स्वतःचें पुरेसें भाडवल होतें म्हणून एकूण पाच सोसायट्यांनीं बँकेकडून कर्जें घेतलीं नाहींत ४४ सोसायट्यास मिळून १ लक्ष २९ हजार रुपयाचें नवीन कर्ज देण्यांत आलें एकदर वसूल १ लक्ष ८९ हजार रुपये झाला वसुलाचें प्रमाण शेकडा ५४१ इतकें पडलें. सोसायट्यास कर्ज देताना, बँक त्याची रकम सोसायट्याचे चालू खात्यावर वर्ग करते आणि सोसायट्या चेक काढून कर्ज वांटतात. अशा प्रकारें चेकची पद्धत लोकप्रिय होत आहे शिरपूर शाखेखालील सोसायट्याची वार्षिक साधारण सभा ८-९-३६ रोजीं श्री. सौ. गिरिजाबाई केळकर ह्याचे अध्यक्षतेखाली भरली होती त्या आपल्या भाषणात म्हणाल्या, "सर्वांनीं आपल्या खेडेगावाचा, आपल्या जमिनीचा अभिमान बाळगला पाहिजे. आपले शिक्षणाचा उपयोग आपली जमीन, आपलें घर व आपलें गाव सुधारण्याकडे केला पाहिजे स्वच्छता ठेवली पाहिजे. तंटे, भाडणें कमी करून कोर्ट-कचेऱ्या शक्यतोंवर टाळाव्या. कर्ज शक्यतोंवर कमी काढावें कर्जफेड होईपर्यंत अन्नहि गोड वाटतां कामा नये हें सर्व नीट होण्यास प्रेमाची व सघशक्तीची गरज आहे याकरता निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी सस्था काढल्या पाहिजेत अशा सस्थांच्या द्वारें आपण आपली स्वतःची व आपले शेतकरीवर्गाची सर्व प्रकारें उन्नति करून देशाचें भाग्य वाढवावें व आपला ससार सुखाचा करावा"

बँकेतर्फे आभार मानताना, श्री रमणिकराय मेहता यानीं, स्त्रियांनीं सहकारी चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतला तर त्याचा विशेष चागला परिणाम होतो याबाबत आपला अनुभव सागून पुरुषाबरोबरच स्त्रियानींहि यापुढें सहकारी चळवळींत भाग घ्यावा अशी विनति केली

---

### येलूर येथील सहकारी बातमीपत्र

येलूर सुपरवायझिंग यूनिअनला सामील असलेल्या सर्व सेक्रेटरींचा रिफ्रेशर क्लास ता. ६-१-३७ ते ता १३-१-३७ अखेर आठ दिवस सुरु राहून ता १७-१-३७ रोजीं सेक्रेटरींची परीक्षा घेण्यात आली. क्लासचा समारोप समारभ इसलामपूर कोर्टाचे सब जज्ज मे खानसाहेब याचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला समारभास सुमारे २०० मडळी हजर होती. सुरवातीस क्लासचा अहवाल वाचून दाखविण्यात आला, त्यावरून या क्लासात सर्व सेक्रेटरीनीं शिक्षण घेतल्याचें व सोसायट्यांशीं सबध असलेले सर्व विषयाचे शिक्षण देण्याची कमिटीनें व्यवस्था केल्याचें दिसून आलें.

यानतर 'रिफ्रेशर क्लासची जरूरी' या विषयावर इसलामपूर भागाचे बँक एजट श्री मोकाशी, सुपरवायझर श्री कुलकर्णी व माजी सुपरवायझर श्री. हेरवाडे यांचीं भाषणें झालीं शिक्षण घेतलेल्या तीन सेक्रेटरींनीं क्लासपासून मिळालला फायदा या विषयावर भाषणें केलीं. यानतर श्री विचारे, प्रेसिडेंट इन्स्टिट्यूट सातारा जि शाखा, यांनीं सभासदाना पोस्टल सर्व्हिस या नवीन पद्धतीनें शिक्षण देणेचे योजनेबद्दल सर्क्यूलर वाचून दाखविलें शेवटीं अध्यक्षसाहेबांनीं विद्यार्थ्यांस उपदेशपर असें भाषण केलें.


पायोनियर डाईंग हाऊस पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२१ सदाशिव पेठ

मुलांचा खाऊ म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टकल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

CONFIDENCE
is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE.
The following figures will convince you
NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
(ESTD 1907)
Branches Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
Offices throughout India & the East
S. C MAJUMDAR, MANAGER Bombay Branch | N. SARKAR, General Manager
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## दुधाचा रतीब वाढवा

### इग्लंडांतील अनुभवः हिंदुस्थानांतील प्रयत्न

मनुष्याच्या आहारामधील दुधाचें महत्त्व आता सर्वांस मान्य झालें असलें, तरी लोकाच्या पिण्यात जेवढें दूध यावयास पाहिजे तितकें तें येत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे ह्याचें कारण, पहिली गोष्ट म्हणजे दुधाची महर्गता दूध पिणें परवडत नाहीं अशीच वस्तुस्थिति सर्वत्र आढळून येते तथापि ज्यास दुधावर जास्त खर्च करणें शक्य आहे, असे लोकहि दुधात काटकसर करताना दिसतात दूध प्याल्यानें प्रकृति सुधारते आणि रोगास हटविण्याचें सामर्थ्य वाढतें, ह्या गोष्टींचा अनुभव इंग्लडमधील कारखानदारानीं उत्पादक कार्याकडे कसा लावला, ह्याची हकीकत मनोरजक व उद्बोधक आह

कचेऱ्यात काम करणारे कारकून वरचेवर आजारी पडतात आणि त्यामुळें मालकाचें काम वक्तशीर होत नाहीं. आजारी कारकुनांच्या कामाचा भार इतरावर पडतो व अशा रीतीनें सर्वांचीच कार्यक्षमता कमी होते लिव्हरपूल येथील एका कचेरीमधील स्त्री-टाइपिस्टांस मधल्या सुट्टींत चहाचे ऐवजीं दूध पिण्यास प्रवृत्त करण्याचा १९३२ सालीं प्रथम प्रयत्न करण्यात आला आणि आता सुमारें ५० टाइपिस्ट दुग्धपान नियमितपणें करू लागल्या आहेत. गैरहजेरीमुळें होणाऱ्या खाड्याचें प्रमाण ५½ टक्क्यावरून २½ टक्क्यावर आलें आणि आजारीपणाचें प्रमाणहि उतरलें.

पीक, फ्रीन आणि कंपनीच्या बिस्किटाचे कारखान्यातहि दुग्धपानाचा प्रचार यशस्वी झाला आहे. १४ व्या वर्षी शाळा सोडून कारखान्यात दाखल झालेल्या मुलास श्रमाची सवय नसते, आणि कामाच्या ताणाचा दुष्परिणाम त्याचे प्रकृतीवर दिसूं लागतो. तीं मुलें १६ वर्षांचीं होईपर्यंत कारखान्यात त्यास दूध पिण्यास सवलती देण्यात येतात आणि दुधाची निम्मी किंमत कारखाना सोसतो नवीन दाखल झालेल्या उमेदवारास कारखानी वातावरणाची संवय होईपर्यंतच्या मधल्या काळात जरूर तें पोषक पेय त्यास देणें कारखान्याच्या दृष्टीनें हितावह असतें, हें सागावयास नकोच. त्यामुळें उमेदवाराची बुद्धि तल्लख रहाते, सागितलेल्या गोष्टी त्यांस लवकर समजतात आणि थकवा न येता ते हुशारीनें कामें करूं शकतात

प्रकृति सुधारून कार्यक्षमता वाढविणाऱ्या ह्या पेयाचा आपल्या नोकरवर्गात प्रसार करण्यास कारखानदार पुढें येत आहेत, ह्यावरून त्याचा कनवाळूपणा दिसून येतो, असें मुळींच नाहीं. नोकरास दुग्धप्रवृत्त करणें त्यास किफायतशीर पडतें, हें सदरहु प्रचाराच्या मुळाशीं आहे तें काहींहि असो, दुधाची उपयुक्तता मात्र त्यानें सिद्ध झाली आहे. स्वस्त व स्वच्छ दुधाचें उत्पादन व त्याचा खप वाढविणें हें जरी व्यक्तीच्या हातीं नसलें, तरी प्रत्येकास आपल्या कुटुबाचें अंदाजपत्रकास सोइस्कर पडेल त्या मानानें दुधाचा रतीब वाढवता येणें शक्य आहे. मुंबई शहरांत सहकारी तत्त्वावर दुधाचें उत्पादन आणि विक्री करण्याच्या श्री आठल्ये ह्याच्या योजनेची माहिती आम्हीं आमच्या ता. २० जानेवारीच्या अंकात दिलेली आहेच अशा तऱ्हेच्या योजना सर्व मोठ्या शहरातून आखल्या जाणें इष्ट आहे म्हशींचे गोठे शहरांत असावेत कीं ते बाहेर असावेत, ह्या प्रश्नावर मागें मुंबई कार्पोरेशनमध्यें चर्चा झाली होती. शहरांतील गोठ्यावर म्युनिसिपालिटीच्या आरोग्यखात्याची देखरेख राहू शकते, ह्या मुद्यावर हे गोठे शहरहद्दींत असण्यास हरकत नाहीं, असा कॉर्पोरेशननें निर्णय दिला होता इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या सल्लागारबोर्डानें हा प्रश्न आतां हातीं घेतला आहे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय, लॉर्ड लिन्लिथगो, ह्यांनीं दुग्धप्राशनाचा पुरस्कार केलेला आहे, तथापि दूध स्वच्छ परतु स्वस्त मिळाल्याखेरीज ह्या प्रचारास विशेष यश येणें कठिण आहे ह्या दृष्टीनें सदरहु प्रश्नाचा विचार करावा लागेल ह्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीसबधीं मतभेदास जागा नाहीं, सबब दुग्धप्राशनाचे मोहिमेस सर्वांनीं सहाय करणें इष्ट आहे

---

## हिंदी रेल्वेजसंबंधी ताजा अहवाल

हिंदुस्थानातील सरकारी मालकीच्या रेल्वेजसबधातील रेल्वे बोर्डाचा ३१ मार्च १९३६ अखेर सपलेल्या वर्षाचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे १९३५-३६ सालीं रेल्वे बजेटात २½ रुपयाची तूट येईल असा अदाज सुरवातीस करण्यात आला होता सालअखेर ही तूट ४½ कोटींवर जाईल, अशी अपेक्षा होती. तथापि, ३ कोटि ९९ लक्ष रुपयाचीच तूट आल्याचें आता आढळून आलें आहे १९३४-३५ सालीं आलेल्या तुटीपेक्षा हा आकडा १ कोटि ७ लक्षांनीं लहान आहे, म्हणजे रेल्वेजची परिस्थिति ज्यास्त न बिघडता सुधारणेच्या मार्गावर आहे, असें म्हणता येईल.

रेलवेजच्या एकूण १०४ कोटि रुपये उत्पनापैकीं ६५ कोटि रुपये मालाच्या वहातुकीपासून मिळाले, उतारूच्या भाड्याची ३१ कोटि रुपये मिळकत झाली आणि पार्सलें-लगेज इत्यादींचे ८ कोटि रुपये मिळाले हिंदुस्थानातील रेलवेजच्या रस्त्याची एकूण लाबी ४३,२१८ मैल आहे, त्यापैकीं ३१,७८३ मैलाचे रस्ते सरकारी मालकीचे आहेत आणि त्यामध्यें ७ अब्ज ८९ कोटि रुपयाचें भाडवल गुतलेलें आहे. अहवालाचे सालीं सरकारनें आपल्या रेलवेजवर भाडवली स्वरूपाचा २½ कोटींचा खर्च केला.

हिंदुस्थानांतील सर्व रेल्वेजवर मिळून ७ लक्ष १२ हजार माणसें कामावर आहेत अहवालाचे वर्षी सरकारी रेल्वेजवरील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या केलेल्या ३२ नेमणुकापैकीं २९ नेमणुका हिंदवासीयाच्या वाट्यास आल्या

अहवालाचे वर्षी हिंदी रेल्वेजवर १०,९५० लोकांस इजा झाली आणि ३,१०९ लोक अपघातांत मरण पावले.

---

## सरकारी अधिकाऱ्यांस स्वदेशच्या सफरीकरितां १९ लक्ष रुपये

हिंदुस्थानातील सिव्हिल सर्व्हिसमधील अधिकाऱ्यांची भरती, त्यांचे पगार, त्याची आर्थिक परिस्थिति, इत्यादींसबधीं चौकशी करून रिपोर्ट करण्याकरिता लॉर्ड ली ह्याच्या अध्यक्षतेखाली १९२३ सालीं एक रॉयल कमिशन नेमण्यात आलें होतें. ह्या कमिशनच्या शिफारसींप्रमाणें युरोपियन अधिकाऱ्यास, त्याच्या नोकरीचे मुदतीमध्यें सरकारी खर्चानें स्वदेशाच्या चार खेपा करता येतात, आणि त्याच्या पत्नीसहि तितक्याच वेळां सफर करता येते प्रत्येक मुलामागें एका वेळचें भाडें मिळतें. नोकरीवर असताना अधिकारी मरण पावल्यास त्याच्या कुटुबास स्वदेशीं जाण्याकरितां लागणारा खर्च सरकार देतें अशा रीतीनें याच्या लागणाऱ्या भाड्याची रकम १९३५-३६ सालीं सुमारें १९ लक्ष रुपये भरली. ह्यापैकी सिव्हिल सर्व्हंटाकरितां १३ लक्ष रुपये खर्ची पडले, रेल्वेंतील अधिकाऱ्याच्या भाड्यास ५½ लक्ष रुपये लागले व लष्करी खात्याच्या अधिकाऱ्याचे वाटणीस ५० हजार रुपये आले.

## रिझर्व्ह बॅंकेची गेल्या वर्षांतील कामगिरी

[ ५३ लक्ष रुपये नफा-बॅंक नोटा-जोडलेल्या बॅंकांचे शाखांत वाढ-शेतीच्या धंद्याची उपेक्षा ]

हिंदी रिझर्व्ह बॅंकेस-३१ डिसेंबर १९३६ अखेर संपलेल्या वर्षीं एकूण ५३½ लक्ष रुपये नफा झाला. त्यापैकी भागीदारास द. द. ३½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यास १७½ लक्ष रुपये लागतील पांच टक्क्यांची डिव्हिडंडची कमाल मर्यादा कायद्यानेंच निश्चित केलेली असून, या मर्यादेच्या आंत किती टक्के दरानें फायदा वांटला जाईल, हें भाग विक्रीस निघण्याचे वेळीं गव्हर्नर जनरल इन-कौन्सिलनें जाहीर करावयाचें होतें त्याप्रमाणें, मार्च १९३५ मध्यें ३½ टक्के हा दर ठरविण्यात आला

रिझर्व्ह बॅंकेच्या स्थापनेनंतर नोटा काढण्याचा अधिकार सरकारकडे राहिलेला नाहीं बॅंकेचा तो एकमेवाद्वितीय अधिकार आहे स्वत:च्या नोटा काढण्याची तयारी पुरी होईपर्यंत, हिंदुस्थान सरकारच्या करन्सी नोटाच प्रचलित रहावयाच्या आहेत. बादशहा आठवे एडवर्ड ह्यांच्या राज्यत्यागामुळें बॅंक-नोटा काढण्यास विलंब होत आहे नवीन बादशहांचा मुखवटा बॅंक नोटांवर ह्यापुढें दिसेल.

रिझर्व्ह बॅंकेस जोडलेल्या ( शेड्यूल्ड ) बॅंकांच्या शाखांची संख्या १९३६ अखेर १०५ नीं वाढवून ती ८२८ झाली ही वाढ इष्ट व योग्य आहेच, परंतु ह्यापेक्षांहि ज्यास्त शाखा स्थापन होण्यास जागा आहे

रिझर्व्ह बॅंकेस जोडलेल्या बॅंकांचा विशिष्ट दर्जा नव्या कंपनी कायद्यानें मान्य केला आहे रिझर्व्हमध्यें टाकावयाच्या रकमासंबधीं व इतर कांहीं निर्बंध ह्या जोडलेल्या बॅंकांस लागू नाहींत रिझर्व्ह बॅंकेच्या देखरेखीखालीं त्या बॅंकांचा व्यवहार व्यवस्थित चालेलच हा अर्थ सदरहु सवलतींमध्यें अभिप्रेत आहे

शेतीच्या धंद्याची व खेडेगावीं व्यवसायाची पैशाची सोय पहाण्याचे संबंधांतील रिझर्व्ह बॅंकेचे प्रयत्न विशेष नेटानें चालू लेले दिसत नाहींत त्या बाबत रिझर्व्ह बॅंकेचा रिपोर्ट कसा असमाधानकारक आहे, ह्याची चर्चा ' अर्था ' मधील लेखमालेंत चालू आहे तीवरून रिझर्व्ह बॅंक व शेतीचा धंदा ह्यासंबधींच्या प्रश्नाची यथार्थ कल्पना येईल

---

### पेट्रोल पुरविणारी नवी कंपनी

अमेरिकेंतील कॅलिफोर्निया टेक्सॅस ऑइल कंपनी आज कित्येक वर्षे हिंदुस्थानांत इंजनाचीं तेलें पुरविण्याचा धंदा करीत आहे इराणच्या आखातामधील बेहरीन बेटांतील तेलाच्या खाणींतून रॉकेल, पेट्रोल, इत्यादि पदार्थ काढून त्याचा हिंदुस्थानात प्रसार करण्याचें सदरहु कंपनीनें आतां ठरवलें आहे तेलें शुद्ध करण्याकरितां तीन कोटि रुपयांची यंत्रसामुग्री बसविण्यांत आली असून ५ हजार लोक आज तेथें कामावर आहेत सहा महिन्यांचे अवधींत कंपनीचा माल हिंदुस्थानांत दाखल होईल. तोंपर्यंत, विक्रीच्या व्यवस्थेची संघटना पुरी होईल मुंबई, कलकत्ता, मद्रास व कराची हीं कंपनीच्या पुरवठ्याचीं केंद्रें होतील व कंपनीची मुख्य कचेरी मुंबई येथें राहील बेहरीनचीं बेटें हिंदुस्थानाचे इतक्या नजीक असतांना, ह्या देशाच्या बाजारांत आपणास योग्य स्थान मिळणें इष्ट व स्वाभाविक आहे, असे उद्गार कंपनीच्या अध्यक्षांनीं नुकतेच काढले कंपनीच्या नव्या पुरवठ्यामुळें स्पर्धा उत्पन्न होऊन पेट्रोल व रॉकेल स्वस्त होण्याचा संभव आहे काय, ह्यासंबधीं लोकांत तर्क चालू आहेत


**धी सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचे कर्तव्य आहे जनतेची सेवा करणें हेच आमचें ध्येय आहे वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**वेस्टर्न इंडिया**

**लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.**

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी-सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्यांची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

**महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे** थंडी-

गिरगांव, मुंबई करतां

## देशी सिनेमाचा धंदा

मोशन पिक्चर सोसायटीचे अध्यक्ष सर फिरोज सेटना व ऑल इंडिया मोशन पिक्चर कन्व्हेन्शनचे अध्यक्ष शेठ चिमणलाल देसाई ह्यानीं मध्यवर्ती कायदे मंडळातील मुंबई इलाख्याच्या प्रतिनिधींस गेल्या आठवड्यात एक मेजवानी दिली त्यावेळीं अनेक नामांकित अधिकारी व पुढारी हजर होते आपल्या भाषणात सर फिरोज सेठना म्हणाले, " १९३०–३५ ह्या मुदतींत मुंबई शहरात एकूण ७०२ चित्रपट तयार करण्यात आले, त्यापैकीं ४२३ बोलपट होतें १९३४ नंतर एकहि मूकपट करण्यात आलेला नाही सबंध हिंदुस्थानात मिळून ९७४ सिनेमागृहें आहेत त्यापैकी ३०४ गृहांत फक्त देशी फिल्म्स दाखविण्यात येतात, १५७ मध्यें फक्त इंग्रजी फिल्म्स दाखवितात आणि उरलेल्या २१३ थिएटरातून दोन्ही प्रकारच्या फिल्म्स आणतात एक चांगला बोलपट तयार करण्यास हिंदुस्थानात ७५ ते ९० हजार रुपये खर्च येतो ह्या धंद्यात सुमारें ११½ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें असून २५ हजार लोकास काम मिळतें "

शेठ चिमणलाल हे आपल्या भाषणात म्हणाले, " हिंदी सिनेमाचे धंद्यास स्वस्त भांडवल पुरविणाराची आज अत्यंत आवश्यकता आहे हिंदी भांडवल पुढें न आल्यास परदेशी भांडवल ह्या धंद्यास सहाय्य करण्याकरिता धाऊन येईल व देशी धंद्याची हेंडसाळ केल्याचा आणखी एक दाखला निर्माण होईल "

## राष्ट्रीय संस्कृति आणि शिक्षण

प्रत्येक देशातली शिक्षणपद्धति तेथील संस्कृतीस पोषक व व्यवहारज्ञान देणारी अशी असावी ह्या गोष्टीची जाणीव इंग्लंडमध्यें वसाहतींतल्या शाळांच्या बाबतींत आताच होऊं लागली आहे ब्रिटिश संस्कृति व ब्रिटिश भाषा ह्याचें वर्चस्व साम्राज्यातील इतर देशात स्थानिक संस्कृति व परिस्थिति ह्यावर लादणें चुकीचें आहे असे उद्गार, ब्रिटिश वसाहत–मंत्री, मि ऑर्मस्बी गोअर, ह्यानीं लंडनमध्यें भरलेल्या एका शिक्षणपरिषदेंत काढले हिंदुस्थानात देशी भाषास शिक्षणक्रमात योग्य स्थान मिळण्यास किती काल लोटावा लागला आहे आणि हिंदी संस्कृतीचें रक्षण होण्याची आवश्यकता आमच्या शिक्षणपद्धतींत कितीशी लक्षात घेतली जाते, हें येथें विचार करण्यासारखें आहे जगाचा इतिहास व भौतिक शास्त्रें ह्याचें शिक्षण अगत्याचें आहे, पण त्याबरोबरच राष्ट्रीय स्थानिक परंपरा व संस्कृति ह्याच्या रक्षणाची व्यवस्था शाळा व कॉलेजें ह्याचेमध्यें झाली पाहिजे असें मि ऑर्मस्बी गोअर ह्यानीं बोलून दाखविलें स्त्री-शिक्षकाच्या परिषदेंत एका ब्रिटिश शिक्षकीणबाईनें हिंदुस्थानातला आपला अनुभव निवेदन केला त्या म्हणाल्या कीं, चांगला नवरा मिळावा म्हणून मुली चांगल्या उच्च परीक्षास व इंग्लंडमधील परीक्षास बसतात, व उर्दू, ॲरेबिक आणि पर्शियनमध्यें पास होतात. इंग्लंडच्या इतिहासास मुली कंटाळत असल्यानें त्याच्याऐवजीं हिंदुस्थानचा इतिहास शिकवावा अशी शिक्षकीणबाईंची सूचना आहे !

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ३% करमाफ लोन ( १९४५-५५ ) … | ११९—६ |
| ३% ( १९३९-४४ ) लोन . … | १०७—१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) … | ११८—८ |
| ४% १९६०–७० … .. | ११३—०. |
| ४% १९४३ .. … … | ११०—० |
| ३½% बिनमुदत … .. .. | ९६—१० |
| ३½% १९४७–५० … . | १०५—८ |
| ३½% १९४८–५२ .. .. | ९९—१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) … | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) … | १११—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) … … | १२५—० |

### मंडळ्याचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३९—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | ११८—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) | ३५—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५३७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु ) | १३५—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०५—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु चा भाग, डिव्हि. १० ) | ९२०-० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ( ऑर्डि भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५०—१० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु चा भाग, डिव्हि. ९%) | २६८—१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि डिव्हि. ६½% ) | १५६२—८ |
| टाटा पॉवर ( १,००० रु प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १६०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि ६% ) | १९७—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. द्वि. प्रेफरन्स, २२रु. ८ आ ) | १७७—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २९५—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु डिफर्ड ) | १२९५—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—२—६ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५०—३—० |

किंमत रु. १२॥

# ओव्हरकोट खरेदी करा

बुधवार चौक, पुणें

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books

(2) We supply Government of Bombay and Government of India publications

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री न चिं. केळकर, सचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधन्दे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बॅंक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु (ट स. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशातच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्याच्या यांत्रिक युगात, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये !

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा श्रीपाद वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. न १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १० फेब्रुवारी, १९३७. अंक ६

वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक
आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.
" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यातील विशेष होय "
भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणे २


शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत
माहितीसाठीं लिहा
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

व्यापारी-उद्मी लोकास
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

पुणेकरांची सोय
घरपोंच
पुण्यांत बनविलेल्या सिगारेट्स्
दर शेकडा
डेक्कन रेड. डेक्कन गोल्ड फ्लेक ओरायन मॅग्नम
३ आणे ७ आणे. १ रुपया
ओढण्यास फारच उत्तम आहेत. अनुभव घ्या !
डेक्कन टोबॅको वर्क्स. पुणें ४.
—स्टॉकिस्ट—
शा प्रेमचंद कीलाचंद
तंबाखू आळी, पुणें.

" WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning Pigmy & Monthly Income Deposit Schemes "

फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निफाचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च ( किंवा ) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पाच वर्षें गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी, पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)

## विविध माहिती

### इंदूरच्या महाराजांचा खास डबा

इंदूरच्या महाराजानीं आपल्या खास उपयोगाकरितां एक आगगाडीचा डबा इंग्लंडमध्यें बांधविला असून, त्यास दोन लक्ष रुपये किंमत पडली आहे. हा डबा बांधण्यास एक वर्ष लागलें.

### परदेशस्थ जर्मनांच्या हितसंबंधाची काळजी

जर्मनीबाहेर रहाणाऱ्या आपल्या नागरिकांच्या हितसंबंधांवर लक्ष ठेवण्याकरितां जर्मनीनें एक स्वतंत्र खातें निर्माण केलें आहे.

### लष्कर भरतीकरतां प्रयत्न

लष्करांत भरती करण्याचे वेळीं वैद्यकीय तपासणींत नापास होणारांस शारीरिक शिक्षण देण्याचा ग्रेट ब्रिटनमधील प्रयोग यशस्वी झाला आहे. त्यांस सुदृढ बनवून, लष्करी नोकरीस लायक करण्याचा हा उपक्रम आहे.

### १०१ हिंदी भाषांत बायबलचें भाषांतर

ब्रिटिश ॲन्ड फॉरिन बायबल सोसायटीनें बायबल ह्या ख्रिस्ती धर्मग्रंथाचें १०१ हिंदी भाषांत भाषांतर केलें आहे. अंध लोकांकरिता बायबलें तयार करण्याचें अवघड व खर्चाचें काम सोसायटीनें आतां अंगावर घेतलें आहे.

### हिंदी रेल्वेज आणि युरोपिअन व अँग्लोइंडिअन नोकर

हिंदी रेल्वेजवर लायक हिंदी नोकर नेमतां येण्यासारखे असतां ३,५०० युरोपिअन व १३,००० अँग्लो-इंडियन ह्यांची भरमसाट पगारावर नेमणूक केल्यानें रेल्वेजचा खर्च निष्कारण वाढला असल्याविषयींची तक्रार रेल्वेमेन्स फेडरेशन ह्या कामकरी संघानें केली आहे

### अपशकून कोणास ?

विन-तिकिट प्रवासांबाबतच्या बिलासंबंधांतल्या सरकारी ठरावाविरुद्ध १३ मतें पडून तो असेंब्लींत पास झाला. १३ हा आंकडा इग्लंडमध्यें अपशकुनी समजला जातो. पण हा अपशकून बिलास झाला, कीं त्याच्या विरोधकांस झाला ह्या प्रश्नावर असेंब्लीमध्यें विनोदात्मक कोटिक्रम झाला.

### एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें आणि द. द. शें. १५ आणे व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयाच्या सरकारी ट्रेझरी बिलांस १ कोटि ४० लक्ष रुपयाची मागणी आली. व्याजाचा सरासरीचा दर, दरसाल दर शेंकडा १५ आणे बसला.

### पेट्रोलवर दर गॅलनास २ आणे पट्टी चालू राहाणार ?

पेट्रोलवर दर गॅलनास २ आणे ह्या दरानें सध्याची पट्टी चालू रहावी आणि तिच्या उत्पन्नाचा विनियोग रस्त्याच्या सुधारणेकडे होत रहावा अशा आशयाचा ठराव असेंब्लीमध्यें सर फ्रँक नॉइस आणणार आहेत.

### दारूचा खप वाढला

मुंबई इलाख्यांत १९३०-३१ सालीं ८ लक्ष ६६ हजार गॅलन देशी दारू खपली. हा खप वाढत वाढत जाऊन १९३४-३५ सालीं १० लक्ष ४४ हजारांवर गेला. ताडीच्या विक्रींतहि ७७½ लक्ष गॅलनांपासून १ कोटि २५ लक्ष गॅलनांपर्यंत वाढ झाली. सरकारच्या उपन्नांतहि सहाजिकच भर पडत गेली. ताडीच्या व दारूच्या दुकानांची संख्या ७१० नें वाढून ती ३४१२ इतकी झाली. गांजा, भांग व चरस यांचें गिऱ्हाइकहि वाढतें आहे.

### पाळीं जनावरें मुंबईबाहेर नेण्यास सवलत

पाळलेल्या गाई व म्हशी मुंबई शहरांतून जी. आय. पी. रेल्वेवरील कोणत्याहि स्टेशनास पाठवणें आतां सोईचें होणार आहे, कारण जी. आय. पी. नें त्याकरितां विशेष सवलतीचे दर ठेवले आहेत. ही सवलत जून ते सप्टेंबरअखेर अंमलांत राहील.

### स्त्रियांस खाणींत काम करण्यास बंदी

खाणींमध्यें जमिनीच्या पृष्ठभागाखालील कामाची स्त्रियांस बंदी करण्याचें धोरण हिंदुस्थानसरकारनें मागेंच आखलें होतें. १ जुलै १९३७ नंतर कोणत्याहि स्त्रीस जमिनीखालीं काम करतां येणार नाहीं, असें गॅझिटांत आतां जाहीर करण्यात आलें आहे.

### लंडनमधील खासगी इस्पितळें

लंडनमध्यें खासगी उत्पन्नावर चालणाऱ्या इस्पितळांत १८ हजार रोग्यांच्या शुश्रूषेची सोय आहे १९२१ सालीं फक्त १३,३०० रोग्यासच अशा रुग्णालयांत प्रवेश मिळूं शके.

### टेलिफोन्सची संख्या वाढली

ग्रेटब्रिटनमध्यें गेल्या वर्षी एकूण १ लक्ष ९१ हजार नवे टेलिफोन बसविण्यांत आले, म्हणजे आतां २५ लक्ष ८० हजार टेलिफोन त्या देशांत वापरीत आहेत.

### विजेचें उत्पादन वाढलें

टाटाच्या खोपोली, भिवपुरी व भिरा येथील पॉवर स्टेशन्समध्यें ४ फेब्रुवारी अखेर संपलेल्या ह्या वर्षाच्या पहिल्या पांच आठवड्यांत मिळून ५ कोटि ८० लक्ष युनिट्स वीज उत्पन्न करण्यांत आली. हा आकडा गेल्या वर्षांतील तत्सम आंकड्यापेक्षां ४० लक्षांनीं मोठा आहे. विजेच्या उत्पादनाप्रमाणें खपहि अर्थात् वाढला. व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या चलतीचें हें लक्षण आहे.

### ग्रेट ब्रिटनमध्यें रेडिओचा प्रसार

ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण ८० लक्ष रेडिओ चालू आहेत. जर्मनीचा ह्याबाबतचा पहिला नंबर अबाध कायम आहे. त्या देशांत रेडिओ स्वस्त आहेत आणि बेकार व युद्धांत कामगिरी बजावलेले नागरिक ह्यांस लायसेन्स फी माफ आहे.

### हिंदुस्थानांतील साक्षरतेची मंद प्रगति

जगांतील शेंकडा ६२ लोकांना लिहितां वाचतां येत नाहीं. हिंदुस्थानांतील ३५½ कोटि लोकांपैकीं फक्त २३½ कोटि लोक साक्षर आहेत शिक्षणाच्या प्रगतीचें पाऊल हिंदुस्थानांत इतक्या मंद गतीनें पडत आहे, कीं सध्याच्या पद्धतीनें शिक्षण चालू ठेवल्यास, जपानइतका हा देश साक्षर होण्यास ११५० वर्षे लागतील !

### ग्रेटब्रिटनमध्यें कच्च्या मालाची वाढती आयात

ग्रेटब्रिटनमध्यें होणाऱ्या आयातींत वाढ होत आहे, तथापि त्यांत कच्च्या मालाचा भरणा मोठा असून त्याच्यापासून ग्रेटब्रिटन पक्का माल बनवीत आहे. तेव्हां या आयातीविषयीं काळजी करण्याचें कारण नाहीं, असें सर रॉबर्ट हॉर्न ह्यांनीं आपल्या एका भाषणांत सांगितलें.

### नव्या पेट्रोल कंपनीच्या कामास सुरवात

अमेरिकेंतील कॅलिफोर्निया टेक्सस ऑइल कंपनीनें हिंदुस्थानांत तेलें खपविण्याच्या पूर्वतयारीस सुरवात केली आहे. कंपनीनें कराची येथील पोर्ट ट्रस्टकडून ३ लक्ष १२ हजार चौरस फूट जागा ४३ वर्षांच्या भाडेपट्ट्यानें घेतली आहे. पहिलीं आठ वर्षे दरसाल १७½ हजार रुपये भाडें ठरलें असून पुढें तें वाढत जावयाचें आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... ... | ६२ | इषारा–दि सनशाइन इन्शुअरन्स लि | |
| २ विम्यासंबंधीं नवीन हिंदी कायदा ... ... | ६३ | ५ आगगाड्या चालविण्यास कोणतीं इजनें सोइस्करी | ६७ |
| ३ प्रॉव्हिडंट फंडावरील व्याजाचा हिशेब ... | ६४ | ६ शैक्षणिक चित्रपटाचा जर्मनींत प्रसार. ... | ६७ |
| ४ स्फुट विचार ... .. | ६५ | ७ निवडक बाजारभाव. | ६९ |
| बिन-तिकीट रेल्वे प्रवास–रिझर्व्ह बँकेच्या भागांची क्षेत्रवार वाटणी–भागाची सख्या कमी झाली–हिंदुस्थानास लँकेशायरचा | | ८ सहकारी चळवळ | ६९ |
| | | ९ मोटारींचा विमा | ७० |
| | | १० दि नागपूर प्रीमियर को. हौ सोसायटी ... | ७१ |



# अर्थ

बुधवार, ता. १० फेब्रुवारी, १९३७


## विम्यासंबंधीं नवीन हिंदी कायदा

### बिलांतील महत्त्वाच्या योजना

हिंदुस्थानात व्हावयाच्या विमाविषयक नवीन कायद्याच्या मसुद्यांतील महत्त्वाच्या सूचनाचा साराश आम्हीं ‘अर्था’च्या गेल्या अकांत दिलेलाच आहे. नवीन बिल असेंब्लीच्या सिलेक्ट कमिटीकडे आतां पाठविण्याचें ठरलें असून, तिच्या कामास सुरवात होण्यास सहा महिने अवकाश असल्याकारणानें, लोकमत व्यक्त होण्यास पुष्कळ अवधि आहे.

नवीन बिलातील सर्वांत महत्त्वाची दुरुस्ती मॅनेजिंग एजंटांचे संबधाची होय कपनी कायद्यात नुकतीच दुरुस्ती झाली, त्यामध्यें मॅनेजिंग एजटावरील बंधनें वाढविण्यांत आलीं मॅनेजिंग एजंटाचे हातीं फाजील सत्ता जाऊन कंपनीच्या हिताकडे दुर्लक्ष होतें, एजंट लोक भरमसाट नफा मारतात, कंपनी काढतांनाच ते आपणास सोईचे व फायदेशीर करार करून घेतात, इत्यादि तक्रारींवर इलाज म्हणून ही पद्धतच काढून टाकावी, अशा अर्थाची सूचना त्या वेळीं करण्यांत आली होती. मॅनेजिंग एजंट स्वतःचें भांडवल पुरवून अगर दुसऱ्याकडून मिळवून देऊन कंपन्यांस अडीअडचणींचे प्रसंगीं मदत करतात, आणि त्यांस जरूर त्या सवलती दिल्या नाहींत तर नवीन उद्योगधदे काढण्यास लायक लोक पुढें येण्यास अडचण पडेल असें सदरहु टीकेस उत्तर देण्यांत आलें होतें. कंपनी कायद्यानें अखेर ही पद्धत कायम ठेवली, परंतु एजंटांवर अनेक बधनें घातलीं आणि कराराची कमाल मुदत २० वर्षांची ठरवून दिली. इतर कंपन्यांचे बाबतींत मॅनेजिंग एजंटांची गरज भासते तशी विमा कपन्याचे बाबतींत भासण्याचा संभव नाहीं, कारण ह्या कंपन्यास भांडवलाच्या पुरवठ्याचें प्रयोजन वरचेवर लागत नाहीं, अशा युक्तिवादाचे आधारावर विमा कंपन्यांची व्यवस्था मॅनेजिग एजटांचे हातीं असूं नये अशी तजवीज नवीन बिलात करण्यात आली आहे. विमा कपन्याचे सध्यांच्या मॅनेजिग एजंटांशीं झालेले करार तीन वर्षांनंतर रद्द व्हावेत असेंहि सुचविण्यांत आलें आहे हे करार रद्द झाल्याबद्दल एजटास नुकसान भरपाई देखील मिळावयाची नाहीं. एजटास दिलेली ही मुदत फारच अल्प आहे असें म्हणतां येईल, आणि त्याबाबत बिलात सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे नवीन कायद्याच्या अंमलबजावणीस सुरुवात झाल्यानंतर नवीन मॅनेजिग एजटाच्या नेमणुकीस बंदी होणार आहे

बिलातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा परदेशी कंपन्याच्या अनिष्ट स्पर्धेबाबतचा आहे श्री सेन ह्यानीं ह्या तक्रारीसबधीं विशेष बारकाईनें चौकशी केली कंपन्याचे चालक परदेशी कपन्याविरुद्ध तक्रार करण्याची एकहि संधि वाया जाऊं देत नाहींत आणि विमाविषयक मासिकें व वृत्तपत्रें या म्हणण्यास नेहेमीं पुष्टी देत असतात. विम्यासबधींच्या कायद्याचा मसुदा तयार करण्यापूर्वीं एक सल्लागार कमिटी नेमण्यांत आली होती, तिच्यापुढें अशा प्रकारच्या अनिष्ट स्पर्धेसंबधीं पुरावा आला नाहीं विदेशी कपन्याचे हप्त्याचे दर हिंदी कंपन्याच्या दरापेक्षां हलके नसतांना ते दर घातुक व आनिष्ट स्पर्धा करणारे आहेत असें म्हणता येणार नाहीं, अशा आशयाचें मत हिंदुस्थान सरकारचे कायदेपंडित, सर नृपेंद्र सरकार, ह्यानीं प्रदर्शित केलें व विदेशी कपन्यासहि ह्यापुढें आपले हिशेब दाखवावे लागतील आणि कमिशन, रिबेट इत्यादि सबंधातील नियम पाळावे लागतील असें सांगितलें

विम्याचें काम मिळवून देणाऱ्या एजटास किती कमिशन देण्यात यावें, ह्या बाबत बिलात समाविष्ट असलेल्या सूचनाचा विचार फार काळजीपूर्वक करावा लागेल ४० टक्क्यापेक्षा ज्यास्त दरानें आयुर्विम्याच्या पहिल्या वर्षाचे हप्त्यावर कमिशन देणें बेकायदा ठरणार असून रिन्युअल कमिशनचा दर ५ टक्क्याचे वर जाता कामा नये असें बिलांत सुचविण्यांत आलें आहे काम मिळविण्याचा यत्न करणाऱ्या नव्या कंपन्यांस हे निर्बंध जाचक होण्याचा सभव आहे. नवीन कपनीकरिता काम करणाऱ्या एजंटास आकर्षक कमिशन देणें जरूर असतें ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं विमेदार, एजटाकडून कमिशनच्या रकमेमधून रिबेट मागतात, आणि असा रिबेट देणें आतां नित्याचें होऊन गेलें आहे. एकीकडे कमिशनच्या दारांत घट व दुसरीकडे रिबेटची मागणी, ह्या दुहेरी कात्रीमध्यें विमा एजट सापडणार आहे. रिबेट देणें बेकायदा झालें तरी नियमाची अमलबजावणी करणें अत्यंत कठिण आहे. ह्या कारणानें कमिशन व रिबेट ह्यांवर बसविण्यांत आलेले निर्बंध अव्यवहार्य ठरण्याचा सभव आहे. अशा परिस्थितींत एजटांस लायसेन्स घेणें भाग पाडण्यापासून कांहीं विशेष फायदा होईल असें वाटत नाहीं

नवीन बिलातील महत्त्वाच्या सूचनांचा परामर्श वर घेण्यात आला आहे. विम्याचे धंद्यांत हितसंबध असणारे सहस्रावधि लोक ह्या बिलाचा काळजीपूर्वक विचार करून आपल्या अडचणी व मागण्या व्यवस्थित रीतीनें पुढें मांडतील, तर लोकमताचा परिणाम सिलेक्ट कमिटीवर आणि असेंब्लीच्या सभासदावर झाल्याखेरीज रहाणार नाहीं. विम्याचा धदा सुरक्षित आणि सुसघटित व्हावा हें कोणास मान्य नाहीं? परतु प्रत्यक्ष काम करणाराच्या अडचणी व त्याचे न्याय्य हितसंबध ह्यांकडे कानाडोळा करणें योग्य होणार नाहीं. विम्याचें महत्त्व सामान्य स्थितींतल्या जनतेस विशेष असल्यानें तिच्या हिताचें व्यवस्थित रक्षण होणें अगत्याचें आहे ह्यात शका नाहीं. हें हित आणि विमामडळ्यांची घटना व कारभार ह्याचा मेळ घालण्यांतच कायदे करणारांचें कौशल्य दिसून येणार आहे.

## प्रॉव्हिडंट फंडावरील व्याजाचा हिशेब*

प्रॉव्हिडंट फंडाचे हिशेब करणें अत्यंत जिकीरीचें काम असते आणि त्यांत चुका होण्याचा संभव असतो. अंकगणिताचीं कामें आतां यंत्रें करूं लागलीं आहेत आणि अगोदर हिशेब करून तयार केलेल्या तक्त्याच्या सहायानें हिशेब बिनचूक व लवकर करण्याची सोय झाली आहे. मोठ्या आणि प्रगतिपर कचेऱ्यांतून अशा यंत्राचा व तक्त्याचा वापर नित्याचा होऊन बसला आहे. ई. डी. ससून आणि कंपनीचे श्री एन्. डी. जोशी ह्यानीं प्रॉव्हिडंट फंडावरील व्याजाची आकडेमोड वाचविणारे तक्ते तयार केले असून २ ते ६½ टक्केपर्यंतच्या कोणत्याहि दरानें व्याजाची आकारणी होत असली तरी व्याजाचा हिशेब सदरहू तक्त्यात तयार मिळतो करंट व सेव्हिंग्ज बँक खात्यावरील व्याजाच्या हिशेबाचे तक्तेहि पुस्तकाचे अखेर देण्यांत आले आहेत हे तक्ते कसे वाचावयाचे ह्याची माहिती प्रत्यक्ष उदाहरणें घेऊन सुरवातीस देण्यांत आली आहे.

येथें आम्हीं सदरहू पुस्तकातील एका पृष्ठामधील कांहीं आकडे उद्धृत केले आहेत, त्यावरून वाचकास पुस्तकाच्या योजनेची कल्पना येईल व्याजाची आकारणी सहा महिन्यानीं अगर वर्षानें होईल, त्याप्रमाणें स्वतंत्र हिशेब दिलेले आहेत

| अर्धवार्षिक | | | | रकम | वार्षिक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुरवातीच्या शिलकीवरील व्याज | मासिक हप्त्यावरील व्याज | | | | सुरवातीच्या शिलकीवरील व्याज | मासिक हप्त्यावरील व्याज | | |
| रु | रु | आ | पै | १ आ | रु | रु | आ | पै |
| ०००८६ | | | ४२१५ | | ·००१७२ | | | १८१५ |
| ०१३७५ | | | ६६० | १ रु | ०२७५० | | २ | ५०४ |
| ·१३७५० | | ५ | ६०० | १० ,, | ·२७५०० | १ | ८ | २४० |
| १७८७५ | | ७ | १८० | १३ ,, | ३५७५० | १ | १५ | ५·५२ |
| ·४६७५० | १ | २ | ८४ | ३४ ,, | ९३५०० | ५ | २ | ३३६ |
| ·६८७५० | १ | ११ | ६०० | ५० ,, | १३७५०० | ७ | ९ | ००० |
| १·३७५०० | ३ | ७ | ००० | १०० ,, | २७५००० | १५ | २ | ००० |

पुस्तकात दिलेल्या एका उदाहरणावरूनच ह्या आकड्याचा उपयोग कसा करावयाचा तें पाहू. ३,४७८ रुपयांची फंडात सुरवातीची शिलक आहे आणि दर महिन्याचे अखेरच्या तारखेस १३ रुपये हिशेबांत दाखल करावयाचे आहेत. व्याजाचा दर ३¾% आहे आणि दर सहामाहीनें व्याज चढविण्याचें आहे, तर तें किती होईल ?

**( अ ) सुरवातीच्या शिलकेवरील व्याज**

वरील कोष्टकातील पहिल्या रकान्यावरून खालीलप्रमाणें हिशेब निघतो

| | रु. |
|---|---|
| ३४ रु. वरील व्याज .. ... | ४६७५० |
| ∴ ३,४०० रु ,, ,, ... ... | ४६·७५० |
| ७८ रु. ,, ,, .. ... | १·०७२५० |
| ∴ ३,४७८ रु. ,, ,, ... ... | ४७·८२२५० |

पुस्तकात दुसरीकडे दिलेल्या कोष्टकावरून

ह्या रकमेचे रु आ. पैत ... =रु ४७–१३–१·९२

**( ब ) मासिक हप्त्यांवरील व्याज**

वरील कोष्टकातील दुसऱ्या रकान्यांतील

हिशेबाप्रमाणें १३ रुपयांवरील व्याज ...रु. ०–७–१·८०

एकूण व्याज ... ... ... ४८–४–३·७२

प्रॉव्हिडट फंडांत मालकानें भरावयाची रकम दरमहा, सहामाहीनें अगर वर्षानें आदा केली जात असली किंवा नोकराचा हप्ता कायम नसला, तरी हीं कोष्टकें वापरता येतील व त्याबाबत लेखकानें सुरवातीच्या पृष्ठात खुलासा केलेला आहे. ई. डी. ससून कंपनीचे मॅनेजरांनीं श्री. जोशी ह्याचे तक्ते वापरले असून त्यामुळें वेळेची आणि श्रमाची बचत होते, असा अभिप्राय नमूद केला आहे. अत्यंत उपयुक्त असें हें पुस्तक तयार करण्यास लेखकास फारच मेहनत पडली असली पाहिजे, हें उघड आहे. ज्या ज्या कचेऱ्यात प्रॉव्हिडट फंडाची योजना अंमलात आहे, तेथें तेथें हें पुस्तक उपयोगी पडेल. केवळ पुस्तकांतील पृष्ठसंख्येच्या मानानें त्याच्या किमतीचा विचार करणें इष्ट होणार नाहीं

*"प्रॉव्हिडंट फंड इंटरेस्ट कॅल्क्युलेटर"
ले०—श्री एन डी जोशी, पृ स ४८, किं ३ रु


# दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

तारेचा पत्ता : "प्रेसिडेन्सी" पुणें ] **१० विश्रामबाग रोड** [ टेलिफोन नंबर ७६३.

अध्यक्ष.—श्री. रा न अभ्यंकर, बी ए., एलएल बी., मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ विमा कंपनी

अधिकृत भांडवल : : रु. १०,००,००० दहा लाख

विक्रीकरितां काढलेलें : : रु. ५,००,००० पांच लाख

प्रत्येक शेअर रु १०० याप्रमाणे ५००० शेअर्समध्ये विभागलेलें. अर्जासोबत रु १५ व अर्जमंजुरी रु. १०

**ठेवी :** चालूं ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के

मुदतीच्या ठेवी सहा महिन्यांपासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी

**कर्ज :** थोड्या व लांब मुदतीचीं कर्जें दिलीं जातात. कारखानदाराच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्ज देण्याची व्यवस्था केली आहे. बँकेनें पसत केलेल्या इसमाचीं चिठ्ठें डिस्काउंट केलीं जातात

चेक्स, बिल्स, ड्राफ्ट्स, हुड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिलीं जातात.

ठेवीदारांतील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे

मॅनेजिंग डायरेक्टर्स.—नि ना क्षीरसागर, चिं. त्रिं चितळे

## स्फुट विचार

### बिन-तिकिट रेल्वेप्रवास

तिकिटावाचून प्रवास करणारे अनेक उतारू आगगाड्यामध्ये आढळतात आणि ह्या फुकट्या लोकांमुळें रेल्वेजचें नुकसान होतें अशी तक्रार ऐकण्यात येते. हिंदी रेल्वेजची सांपत्तिक स्थिति हलाखीची झाल्याकारणानें ह्या मार्गानें रेल्वेजच्या उत्पन्नास लागलेली गळती थांबवावी अशी सूचना पुढें आली. बिन तिकिट प्रवासावर कायद्याची योजना झाली तरच ह्या प्रकारास आळा बसेल या कल्पनेनें हिंदुस्थान सरकारनें एक कायद्याचा मसुदा तयार केला आणि त्यावर लोकमत अजमावून पाहिलें. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें मागील बैठकींत त्याची चर्चा झाली तेव्हा सदर बिलास जोराचा विरोध झाला आणि जनतेच्या माहितीसाठीं तें प्रसिद्ध करावें असें ठरलें गेल्या आठवड्यात सदरहु बिलाचा विचार होण्यासाठी कायदेमंडळाची कमिटी नेमावी हा सरकारी ठराव बहुमतानें पास झाला लोकनियुक्त सभासदांनीं ठरावाविरुद्ध जोराचीं भाषणें केलीं तथापि सध्या असेंब्लीमध्यें त्यांची संख्या अत्यंत अल्प असल्यानें विरोध फलद्रूप झाला नाहीं बिलावर घेण्यात येणारे आक्षेप कमिटी विचारात घेईल आणि त्यातले दोष दूर करण्याचा प्रयत्न कसोशीनें होईल असें आश्वासन सर महमद झाफरुल्लाखान ह्यानीं सरकारचे वतीनें दिलें. कमिटीमध्यें सर्व पक्षाच्या प्रतिनिधींचा अंतर्भाव केलेला असून राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी आज असेंब्लींत हजर नाहींत ते पुन्हां उपस्थित होऊं लागल्यानंतरच कमिटीचें काम चालू केलें जाईल असेंहि त्यांनीं सांगितलें फुकट रेल्वे प्रवास उतारूनीं करावा आणि त्या योगें रेल्वेकंपन्यांचें नुकसान होऊं द्यावें असें कोणीच म्हणत नाहीं. बिन-तिकिट प्रवासावर योजण्यांत येणारे कायदेशीर इलाज सामान्य जनतेस जाचक होऊं नयेत ह्याविषयीं योग्य खबरदारी घेतली जावी हाच टीकाकाराचा मुख्य मुद्दा आहे

---

### रिझर्व बँकेच्या भागांची क्षेत्रवार वाटणी

रिझर्व बँकेच्या स्थापनेचे वेळीं, देशांतील सर्व भागांतील लोकांस तिचे भाग धारण करण्याची योग्य संधी मिळावी म्हणून तिच्या पाच क्षेत्रामध्यें भांडवलाची वाटणी करून देण्यात आली होती मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व रंगून ह्या पाच क्षेत्राची हिस्सेरशी त्यांच्या आर्थिक महत्वाच्या मानानें निश्चित होणें स्वाभाविक आहे. प्रारंभीं वाटून दिलेली भागाची संख्या किंवा रकम पुढें कायम रहावी आणि एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रांत भागांची मालकी जाऊं नये असा निर्बंध घालणें अर्थातच शक्य नव्हतें. भागांची खरेदी विक्री सर्व देशभर सरकारी कर्जरोखे व मंडळ्याचे शेअर्स याच्या पद्धतीनें बाजारात होणें व होऊं देणें अपरिहार्य व इष्ट होतें ज्या क्षेत्रात अधिक संपत्ती आणि रोख्यांची उलाढाल करणारे अधिक लोक त्या क्षेत्राकडे रिझर्व्ह बँकेच्या भागाचा ओघ वळणें स्वाभाविकच आहे ह्या बाबतींत मुंबईच्या क्षेत्रास अग्रेसरत्वाचा मान मिळाला आहे, हें लक्षात ठेवण्यासारखें आहे. मुंबईच्या वाट्यास मुळात १ कोटि ४० लक्ष रुपयाचे भाग आले होते, आणि कलकत्त्याचा हिस्सा त्याहून किंचित मोठा म्हणजे १ कोटि ४५ लक्ष रुपयांचा होता. गेल्या वर्षांत भागाच्या प्रारंभींच्या वांटणींत बराच बदल झाला आहे असें रिझर्व्ह बँकेच्या त्या सालाविषयींच्या वृत्तांतावरून दिसून येतें ह्या बाबतींत मुंबई क्षेत्रानें चांगलीच आघाडी मारली आहे हें खाली दिलेल्या तुलनात्मक आकड्याच्या तक्त्यावरून घ्यानात येईल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत १०० रुपये आहे हें येथें लक्षात ठेवावें:—

भागाची वाटणी
( संख्या )

| क्षेत्र | १, एप्रिल, १९३५ | ३१, डिसेंबर, १९३६ |
|---|---|---|
| मुंबई | १,४०,००० | १,८९,००० |
| कलकत्ता | १,४५,००० | १,३१,४२३ |
| दिल्ली | १,१५,००० | ९७,३१४ |
| मद्रास | ७०,००० | ६१,२१७ |
| रंगून | ३०,००० | २०,२०८ |

---

### भागांची संख्या कमी झाली

इतर सर्व क्षेत्रात यादीवर असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या भागाची संख्या कमी होऊन मुंबई क्षेत्रातली संख्या वाढली आहे हें वरील आकड्यावरून दिसून येईल रिझर्व्ह बँकेचे भाग निश्चित व्याज देणारे आणि सरकारी कर्ज-रोख्यासारखे विशेष लौकिक विश्वासास पात्र असल्यानें पैसे गुंतवणाराच्या उड्या त्यावर पडाव्या हें साहजिकच आहे भाग खरेदी करताना पडलेल्या किंमतीपेक्षा त्यास बाजारात येणारी किंमत अधिक असल्याकारणानें वर्षानुवर्ष डिव्हिडंड मिळवीत बसण्यापेक्षा ते विकून नफा काढून घ्यावा त्या वृत्तीचेहि अनेक माणसें असतात शंभर रुपये दर्शनी किंमतीच्या भागास मुळात प्रत्येकी शंभरच रुपये पडले पण पुढें त्याचा भाव वाढणार हें जाणूनच कित्येकानीं ते प्रारंभीं खरेदी केले होते ह्यामुळें भागाची विस्तृत उलाढाल होऊन ते आरंभीच्या मानानें थोड्या लोकाच्या हातीं गेले आहेत. म्हणजे, भाग धारण करणाराची पटावरील मूळ संख्या कमी झाली आहे आणि ही प्रवृत्ति रिझर्व्ह बँकेच्या पाचहि क्षेत्रात सारखीच अनुभवास आली आहे भाग धारण करणाराची एकूण संख्या आणि तिची क्षेत्रवार वाटणी गेल्या डिसेंबर अखेरच्या मुदतींत कशी बदलली आहे, हें खाली दिलेले तुलनात्मक आकडे सांगतील:—

भाग धारण करणाराची संख्या

| क्षेत्र | १, एप्रिल, १९३५ | ३१, डिसेंबर, १९३६ |
|---|---|---|
| मुंबई | २८,००० | २२,३४२ |
| कलकत्ता | २३,८९० | १५,५७१ |
| दिल्ली | २३,००० | १६,७४४ |
| मद्रास | १४,००० | ९,७०२ |
| रंगून | ३,१५७ | १,९१४ |
| एकूण | ९२,०४७ | ६६,२७३ |

---

### हिंदुस्थानास लँकेशायरचा इशारा

ग्रेट ब्रिटन हिंदुस्थानाकडून नाना प्रकारचा माल विकत घेतें, परंतु हिंदुस्थान मात्र ब्रिटिश कापडास आपुलकीच्या नात्यानें वागवीत नाहीं, अशी तक्रार मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्सच्या हिंदी विभागाचे अध्यक्ष, मि. कँबेल, ह्यांनीं आपल्या भाषणांत नुकतीच केली, तिचा उल्लेख आम्हीं मागें केलेला आहे. १९२९ सालीं ग्रेट ब्रिटनचें १३७ कोटि चौरस वार कापड हिंदुस्थानांत खपलें. १९३३ सालीं हा आकडा ४८½ कोटींवर आला. कपास व रेयॉन ह्यांच्या मिश्रणापासून बनविलेल्या ब्रिटिश कापडाची निर्गतहि फारच कमी झाली आहे ह्या उलट, हिंदी जवस, गोणपाट, कातडीं, इत्यादींचा ग्रेटब्रिटनमध्यें होणारा खप वाढला आहे. लँकेशायरनें गेल्या वर्षीं ५½ लक्ष गासड्या कापूस हिंदुस्थानांतून आयात केला. ही आयात त्या पूर्वीच्या वर्षांतील आयातीपेक्षा ३९ टक्क्यांनीं जास्त आहे. लँकेशायर व ग्रेट ब्रिटन हिंदी मालास उत्तेजन देत असतां हिंदुस्थान आपलें कर्तव्य बजावीत नाहीं, असें मि. कँबेल ह्याचें म्हणणें आहे आणि नवीन हिंदब्रिटन करार करतेवेळीं ब्रिटिश कारखानदारांच्या हितसंबंधांचें कसोशीनें रक्षण केलें जावें असें त्यांनीं सुचविलें आहे. हिंदुस्थानानें मित्रत्वाच्या नात्यानें ब्रिटिश मालांचा पुरस्कार न केल्यास हिंदी मालाच्या ग्रेटब्रिटनमधील खपावर प्रतिकूल परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाहीं असा त्यांनीं इशारा दिला आहे.

---

### दि सनशाइन इन्शुअरन्स लि.

ह्या कंपनीनें विम्याची पहिली पॉलिसी ता. १० ऑक्टोबर १९३३ रोजीं दिली. ३० जून १९३६ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षांत कंपनीकडे आलेल्या १२९१ विमा अर्जांपैकीं ९ लक्ष ८१ हजार रुपयांचे ११७२ अर्ज स्वीकारण्यांत आले. मामुली विमा व स्वस्त विमा अशीं कंपनीचीं दोन खातीं आहेत. कंपनीस हप्त्यांचे रूपानें ५४½ हजार रुपये मिळाले आणि इतर मार्गांनीं १४ हजार रुपयांची मिळकत झाली. व्यवस्थेचा खर्च ३६ हजार रुपये झाला. अहवालाचे सालअखेर ३६ हजारांचा रिझर्व्ह फंड निर्माण करण्यांत आला. मॅनेजिंग एजंट्स व डायरेक्टर्स ह्यांनीं आजपर्यंत विनामूल्य काम केलें असून, खर्चांत काटकसर करण्याचें धोरण त्यांनीं सतत आपल्यापुढें ठेवलें आहे. सरकारी रोख्यांच्या किंमतीमधील घसाऱ्याप्रीत्यर्थ ७½ हजाराचा फंड वेगळा ठेवण्यांत आला आहे, ही गोष्ट स्तुत्य आहे. कंपनीच्या वार्षिक अहवालांत, दक्षिण हिंदुस्थानाचे ब्रँच सेक्रेटरीज, मेसर्स नगरकर ब्रदर्स, ह्यांच्या कामगिरीचा विशेष बहुमानपूर्वक उल्लेख करण्यांत आला आहे. दिवाण बहादूर राजा नरेंद्रनाथ, एम एल. सी., लाहोर, हे कंपनीचे अध्यक्ष आहेत.

---

### भागलपूर ( बहारप्रांत ) येथें प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सहकारी परिषद्

—बहारमध्यें भागलपूर येथें प्रांतिक सहकारी परिषद् येत्या १३-१४ ह्या तारखेस भरणार असून प्रो काळे तिचें अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत.

---





अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितिपत्रक मागवा

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

दी सनशाइन इन्शुअरन्स लि.
या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेंकरतां पगारी एजंट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा.
ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस :- ३३४ गणेश पेठ, पुणें.

आणखी एकवार
नवीन कामांत प्रचंड वाढ
स्थैर्य व प्रगति यांचा सुंदर मिलाफ
वेस्टर्न इंडिया
लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा
१९३६ साल अखेर ६६ लाख रुपयांचें नवीन विमा काम.
प्रगतीचा भला मोठा टप्पा
१९३४ मध्यें......४१ लाख.
१९३५ मध्यें......५१ लाख.
१९३६ मध्यें......६६ लाख
अशा जलद परंतु खात्रीच्या वेगानें कंपनी प्रगतीच्या मार्गावर नेटानें आणि वैभवानें चालली आहे. आणि तरीही खर्चाचें प्रमाण अत्यंत अल्प राखून भरपूर शिलकी फंड आणि मजबूत व्याजाचा दर यांची जोड मिळवून व जास्तींत जास्त बोनसचा दर कायम ठेवून
आदर्श विमा कंपनी
म्हणून आपलें स्थान कंपनीनें आणखी एकवार सिद्ध केलें आहे.
याच कंपनींत आपला विमा उतरा.
मॅनेजर

## आगगाड्या चालविण्यास कोणतीं इंजनें सोइस्कर?

—:०:—

### वाफेचीं, डीझल का विजेचीं ?

रेल्वेजच्या वापरामध्यें वरील तिन्हीं प्रकारचीं इंजनें असूं शकतील ह्यापैकीं कोणतें इजन सर्वांत श्रेयस्कर, हें ठरवूनच इंजनाची निवड करावी लागते आगगाड्यांची वहातूक खर्चाची होता कामा नये व त्याप्रीत्यर्थ शक्य तीं काटकसर झाली पाहिजे, परतु त्यामुळें सुरक्षितपणास बाध न येता उतारूंची सोय होऊन कामगाराच्या वेतनाचें मानहि योग्य राहिलें पाहिजे.

हिंदुस्थानातील बहुतेक आगगाड्या वाफेच्या इंजनानेंच ओढल्या जातात काहीं ठिकाणीं विजेच्या गाड्या सुरू झाल्या आहेत, परंतु लोहमार्गाच्या एकूण लांबीचे मानानें विद्युत्करणाची प्रगति विशेष झालेली नाहीं वाफेच्या इंजनातील प्रमुख फायदा म्हणजे, इंजन नादुरुस्त झाल्यास त्यामुळें इतर वहातुकीस बाध येत नाहीं. प्रत्येक इंजनाचें जळण व शक्तीचा उगम हीं इतरांपासून स्वतंत्र असतात स्वदेशी कोळसा त्यात जाळतां येतो इंजनाची यंत्ररचनाहि सोपी असते. थोडीफार नादुरुस्त इंजनेंहि सुरक्षितपणें उपयोगात आणता येतात ह्या उलट, वाफेच्या इजनाचा धूर व त्यामुळें होणारें अस्वच्छ वातावरण आणि वरचेवर कोळसा, पाणी व तेल ह्याचा पुरवठा करण्याची आवश्यकता, हीं सदरहु इंजनाच्या वापरास अनुकूल नाहींत. बॉयलर वरचेवर स्वच्छ करावा लागतो, त्याकडे वरचेवर लक्ष द्यावें लागतें व दुरुस्तीचा खर्च बराच येतो इजीनियरच्या दृष्टीनें वाफेच्या इंजनामधीलें सर्वांत मोठा दोष म्हणजे त्याची अत्यंत अल्प कार्यक्षमता, हा होय शक्ती निर्माण करण्याकरता उपयोगांत आणलेल्या जळणाच्या फक्त एक षोडशांश शक्ति खरोखर उपयोगांत येते.

डीझेल इंजनामध्यें बॉयलरचें काम नसल्याकारणानें त्रास व खर्च वाचतो आणि इंजन तावडतोब सुरू करतां येतें त्याचें जळण कमी जागा व्यापतें आणि यंत्रास तेल देण्याची व्यवस्था आपोआप होत असल्यानें, इजनाकडे फार लक्ष द्यावें लागत नाहीं. रेडिएटरला पाणी लागेल तेवढेंच, बाकी पाण्याची गरज नाहीं. वाळवंटातून अगर कोरड्या प्रदेशांतून चालणाऱ्या आगगाड्याच्या दृष्टीनें ही बाब अत्यत महत्त्वाची आहे वेगाच्या दृष्टीनें हीं इंजनें मागें पडत नाहींत. तथापि तेलाचा पुरवठा स्वदेशात होत नसेल, तर मात्र डीझेल इंजनामुळें परावलंबन वाढेल, हें उघड आहे महायुद्धासारख्या राष्ट्रीय आपत्तीचे वेळीं तेलाची आयात बंद पडल्यास आगगाड्यांच्या वहातुकीवर त्याचा तात्काळ परिणाम होईल सोइस्कर किंमतीमध्यें स्वदेशात तेलें निघू लागल्याखेरीज डीझेल इंजनांवर अवलबून रहाणें धोक्याचे ठरेल वाफेच्या इजनाचे मानानें डीझेल इजनें ज्यास्त स्वच्छ ठेवावीं लागतात व त्यात आळस केल्यास धोका उत्पन्न होण्याचा संभव असतो डीझेल इजनाची गती एकसारखी कायम रहात असल्याकारणानें आगगाडीचा वेग नियंत्रित करण्याकरितां एकादें माध्यम योजावें लागतें. मोटारीचा क्लच व गिअर्स अगर विजेच्या मोटर्स ह्यांचे द्वारा हें साधावें लागतें.

विजेचीं इंजनें स्वच्छ, वेगवान् व चालविण्यास सोपीं असतात आगगाडींत थंडपणा, उष्णता अगर हवाशीरपणा हीं सहज साधतां येतात आगगाडीच्या डब्याचे सख्यानुसार विजेच्या मोटारींची संख्या वाढवता येते व एका माणसाचे देखरेखीखाली सबद आगगाडी चालते उतारूंची गर्दी कायम असून आगगाड्या एका मागाहून एक सारख्या सुटतात, अशा वहातुकीस विजेचीं इंजनें विशेष सोईचीं पडतात

वाफेचीं, डीझेल अगर विजेचीं इंजनें उपयोगात आणणें हें विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून राहील. जेथें पडत्या पाण्याचे सहाय्यानें वीज निर्माण होते, तेथें सहाजिकच वीज अत्यंत स्वस्त मिळूं शकते तथापि, लोहमार्गाचें विद्युत्करण करण्यास प्रथम भांडवली खर्च मोठा लागतो. ज्या ठिकाणीं कोळसा मुबलक सांपडतो, त्या ठिकाणीं वाफेचीं इंजनेंच सोईचीं पडतील डीझेल इजनाचा आगगाड्या ओढण्याचे कामीं सरीस उपयोग होण्यापूर्वी त्यात कित्येक सुधारणा व्हाव्या लागतील तत्त्वत: विजेचीं इजनें सर्वोत्कृष्ट असलीं तरी खर्चाच्या तुलनात्मक परिस्थितीवरच विशिष्ट प्रकारच्या इजनाची निवड करणें श्रेयस्कर ठरणार, हें उघड आहे

---


हंस पिक्चर्सचा ४ था

अद्वितीय बोलपट

# धर्मवीर

मिनर्व्हा टॉकीजमध्यें पहा

लेखक : प्रि. अत्रे

—भूमिका—

बाबूराव पेंढारकर, विनायक,

रत्नप्रभा, इंदिरा वाडकर.


## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड.

नोटीस देण्यांत येतें कीं बँकेच्या भागीदारांची दुसरी साधारण सभा रविवार ता. २८ फेब्रुवारी १९३७ रोजीं सायकाळीं ५ वाजता ( स्टँ. टा. ) नूतन मराठी विद्यालय हायस्कूल असेंब्ली हॉल, २१ बुधवार, पुणें शहर या ठिकाणीं खालील कामांसाठीं भरेल.

१ बँकेचें ता. ३१ डिसेंबर १९३६ अखेरचें नफातोटापत्रक, ताळेबद आणि डायरेक्टरबोर्डाचा व ऑडिटर्सचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

२ ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरवणें.

३ अध्यक्षाचे परवानगीनें पुढे येणारीं इतर कामें करणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,
M V Gokhale,
मॅनेजर.

पुणें, ता. ८-२-३७.

वि. सू:—बँकेची शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. २०-२-३७ ते २-३-३७ ( दोन्ही दिवस धरून ) बद राहतील.

## जपानमधील छोटे कारखाने

जपाननें जगांतील सर्व बाजारपेठा काबीज करून आपल्या जुन्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आहे औद्योगिक उन्नतीच्या शिखरावर गेलेल्या ह्या देशात भांडवलशाहीचा कळस झालेला असेल अशी कित्येकाची समजूत होते वास्तविक पहाता जपान हा देश अद्याप शेतीप्रधान आहे आणि तेथें औद्योगिक प्रगति व पुरातन कालातील उत्पादन पद्धति हीं एकत्र आढळून येतात एका बाजूनें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या कारखान्याची प्रचंड वाढ झाली आहे, तथापि अगणित छोटे घरगुती धंदे अद्याप कायम असून त्यांत काम करणारांचेंच संख्याधिक्य आहे औद्योगिक व्यवसायावर उपजीविका करणाऱ्यांपैकी शेकडा ५३ लोक १९३० सालीं अगदी लहान धंद्यात गुंतलेले होते, असें त्या सालच्या शिरगणतीवरून दिसून येतें त्यानंतरच्या काळांत छोट्या कारखान्याची संख्या वाढतच गेलेली आढळते

जपानी उद्योगधंदे इतक्या छोटेखानी कारखान्यातून चालतात ह्याचें प्रमुख कारण म्हणजे त्या देशांतील स्वस्त मजुरीचे दर आणि भांडवलाचा व कच्च्या मालाचा त्या मानानें तुटवडा, हें होय वाढत्या लोकसंख्येस पोट भरण्याकरिता कारखान्यांकडे वळावें लागतें आणि देशांत भांडवलाचा संचय पुरेसा झालेला नसल्याकारणानें हलक्या दरानें भांडवल मिळणें कठिण जातें. त्यामुळें शक्य तितक्या कमी भांडवलावर जास्तींत जास्त कामगाराकरवीं कामें करून घेणें सोईचें पडतें आणि मोठ्या प्रमाणावर भांडवल खाणाऱ्या कारखान्यांची वाढ जोरानें होत नाहीं जपानमधील भांडवल कांहीं विशिष्ट कौटुंबिक गटांत एकत्रित झालेलें आहे आणि त्याचा उपयोग उत्पादनापेक्षा व्यापाराकरिता करणें त्यास ज्यास्त फायदेशीर वाटतें, हेंहि लहान कारखान्याच्या मोठ्या संख्येचें एक कारण आहे जपानमध्यें विजेचा पुरवठा स्वस्त आणि मुबलक असल्याकारणानें एक दोन हातमाग चालविणेंहि कोणासहि शक्य होतें आणि मोठ्या कारखान्यांतील उत्पादनाच्या प्रचंड प्रमाणामुळें मिळणाऱ्या फायद्यातील वैशिष्ट्य शिलक रहात नाहीं.

छोटेखानी कारखान्यास कच्च्या मालाकरितां आणि तयार झालेल्या मालाचे उठावाकरिता मध्यस्थ दलालावरच अवलंबून रहावें लागतें. ह्यामुळें, कंत्राटानें कामें देण्याची पद्धत तेथें सर्रास चालू आहे व्यापारी कच्चा माल विकत घेऊन छोट्या कारखानदाराकडून त्याचा तयार माल करून घेतो आणि अखेर तो विकून टाकतो, म्हणजे छोटा कारखानदार हा केवळ मजुरीचा धनी बनतो. जास्त वेतन मिळण्याची त्यास पंचाईत असली तरी काम चालू रहाण्याची निश्चिंती असते. कच्चा माल स्वतः विकत घेऊन त्याचें पक्क्या मालात रूपांतर करणारे छोटे कारखानदार फार थोडे, आणि त्याचें हें स्वातंत्र्यहि दीर्घकाल टिकत नाहीं

जपानमधील छोटे कारखाने सबंद देशभर पसरलेले आहेत आणि लक्षावधि लोकांचें उपजीविकेचें तें एकमेव साधन आहे मालकाच्या स्वत:च्या कुटुंबातील मंडळीच कित्येक वेळा त्याचे कारखान्यांत मजुरी करीत असतात आणि मालक व मजूर ह्यांचें रहाणीच्या दर्जामध्यें फारसें अंतर नसतें आजूबाजूच्या खेड्यातून बहुतेक लोक कामास येतात, तर कांहीं मजूर मालकाचे घरींच रहातात. त्या दोघांसहि कारखान्याबद्दल आपुलकी वाटत असते आणि त्यामुळें कामगाराची स्वतंत्र संघटना होणें अशक्य होतें. छोट्या कारखान्याचें अस्तित्व आणि त्यांची वाढ हीं जपानच्या विशिष्ट सामाजिक व आर्थिक घटनेस आवश्यक झालीं असल्यानें, राष्ट्रीय सरकार ह्या प्रश्नाकडे सहानुभूतीनें पहात असतें लहान प्रमाणावर उत्पादन करणारे घरगुती कारखाने ह्यापुढेंहि चालत रहाणार, फक्त त्यामध्यें सुधारणा घडून येईल, तेवढाच काय तो फरक पडेल अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितींतहि ह्या कारखान्यांनीं आपलें स्थान कायम राखलें आहे, ही एकच गोष्ट त्याच्या उपयुक्ततेची व सामर्थ्याची साक्ष पटवून देण्यास पुरेशी आहे.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न वाढलें

१ एप्रिल, १९३६ ते २० जानेवारी, १९३७ ह्या मुदतीमध्यें हिंदी रेल्वेजना गतसालातील त्याच मुदतीमधील उत्पन्नापेक्षा ३ कोटि ३० लक्ष रु. ज्यास्त मिळालें कपास व गळिताचीं धान्यें ह्याची वहातुक वाढत्या प्रमाणावर होत आहे

### असेंब्लींतलें काम सात मिनिटांत संपलें

गेल्या ५ तारखेचा लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचा कार्यक्रम सात मिनिटात उरकला योजिलेले ठराव पुढे मांडणारे सभासद उपस्थित नसल्यानें हा क्वचित घडणारा प्रसंग असेंब्लीस अनुभवावा लागला.

### हायकोर्टांत पन्नास वर्षे कामगिरी

सर चिमणलाल सेटलवाड ह्यांनीं मुंबईच्या हायकोर्टांत वकिली करण्यास प्रारंभ केला, त्यास उद्ईक ५० वर्षें पूर्ण होतील.

### ग्वाल्हेर संस्थानांतील सहकारी संस्था
### प्रो काळे चौकशी करणार

ग्वाल्हेर दरबारच्या सूचनेस अनुसरून प्रो काळे ह्यांनीं ग्वाल्हेर संस्थानामधील सहकारी संस्थाच्या परिस्थितीची पहाणी व चौकशी करून त्याच्या सुधारणेसंबंधानें शिफारसी करण्याचें काम पत्करलें आहे. चौकशीच्या कामास चालू महिन्यांतच प्रारंभ होणार असून तें सुमारें आठ महिन्यात पुरें होईल.


स्थापना १९२० मुंबई सरकारने व कोल्हापूर सरकारनें प्रथम मान्य केलेले



जाधव टेलरिंग कॉलेज

नवीन वर्ग सुरू झाले नांवें नोंदवा माहिती मागवा [ ४९७ बुधवार, पुणें २

महिंद्रकर ब्रदर्स -ह्यांचे थंडी-

गिरगांव, मुंबई करतां

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०७–१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११४—० |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९५—५ |
| ३½% १९४७–५० .. ... | १०५–१४ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००–२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉड (७०वर्षे मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११२—० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—४ |

### मंडळ्याचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १४०–१२ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५–१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५४०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३८—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु चा भाग, डिव्हि. १० ) | ९२६–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि १३% ) | १५३—२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २७०—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १५२७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५९५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९६–१४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७८—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | ३०९—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | १४२५—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३५—३–९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० ताळयास | ५०—२–० |

## सहकारी चळवळ

### दि बॉंबे प्रॉ को. बँक लि ( शाखा तासगांव )

ह्या शाखेस एकूण ३२ सोसायट्या जोडलेल्या असून त्यापैकीं ७ ‘अ’ वर्गांत व १९ ‘ब’ वर्गांत आहेत. ह्यावरून शाखे-खालील बहुतेक सोसायट्यांचा व्यवहार बरा चालला आहे असें दिसतें. सोसायट्यांनीं एकूण १ लक्ष २७ हजारांचीं कर्जें घेतलीं. वसूल १ लक्ष २२ हजार रुपये झाला १९३५–३६ अखेर थक-बाकीचें प्रमाण ० ९% पडलें. अहवालाचे अवधींत कोणत्याहि सोसायटीकडे व्याज थकलें नाहीं. शाखेकडे सुमारें एक लक्ष रुपयाच्या ठेवी आहेत “ प्रत्यक्ष रोकडीनें देवघेव करण्यापेक्षा चेकनें देवघेव करणें किती सोईचें व बिनधोकपणाचें आहे, ही गोष्ट खेडेगावातील जनतेसुद्धा पटू लागली आहे ” जयवन्त कापसाचे बियाचा प्रसार करण्याची शाखेनें व्यवस्था केली. तासगाव येथें एक अर्बन बँक काढण्याचे बाबतींत शाखेनें खटपट केली. सदरहु बँकेच्या कामकाजास सुरवातहि झाली आहे. तासगाव शाखेस जोडलेल्या सोसायट्यांची वार्षिक सभा ता. ११–१०–३६ रोजीं शाखाकमिटीचे अध्यक्ष, श्री. बा रा सत्याण्णा, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

### वाई तालुका को सुपरवायझिंग यूनियन, लि.

३०–६–३६ अखेर वरील यूनियनला तालुक्यांतील सर्व म्हणजे ३० सोसायट्या सामील आहेत, त्यापैकीं ‘अ’ वर्गांत ८ व ‘ब’ वर्गांत १३ आहेत. थकबाकीचें प्रमाण गेल्या वर्षी १८% होतें तें आतां ११% झालें आहे. प्रांतिक सहकारी बँकेनें वाई येथें शाखा स्थापन करण्याचें ठरविल्यामुळें ह्या बाबतची सोय आतां झाली आहे. लॅड मॉर्गेज बँकेच्या कार्याच्या प्रसारास यूनियननें सहाय केलें. २८–१–३५ रोजीं यूनियनच्या पहिल्या ऑडिटमध्यें, तिला ‘ब’ वर्ग मिळाला आहे. ‘अ’ आणि ‘ब’ वर्गांतील सोसायट्यांची मोठी संख्या, थक-बाकीचें उतरतें प्रमाण, व्याजाच्या सवलतीचा सोसायट्यांनीं घेतलेला फायदा, इत्यादि गोष्टींवरून यूनियनचें काम समाधान-कारक चालू असल्याचें दिसून येतें.

### पू खानदेश को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, जळगांव

ह्या जिल्हा शाखा को इन्स्टिट्यूटकडून खालील कार्यक्रम आखल्याप्रमाणें पंच कमिटी ट्रेनिंग क्लासेस भरविण्यात आले व सोसायट्यांच्या पचाना त्यांचे कामाची व आपलेवर असलेल्या जबाबदारीची व वसुलींसंबधींची जाणीव करून देण्यात दिली

| पंच कमिटी ट्रेनिंग क्लासचें ठिकाण | तालुका | हजर सोसायट्या | एकूण सभासद हजर | तारीख |
|---|---|---|---|---|
| सार्वे बु॥ | पारोळा | १२ | ७५ | २५-१-३७ |
| पिंपळकोठे बु॥ | एरंडोल | १६ | १०० | २६ १-३७ |
| धार | ” | १० | ५० | २८-१ ३७ |
| निशाणे | ” | १२ | ७५ | २९-१-३७ |

किंमत रु. १२॥

ओव्हरकोट खरेदी करा

बुधवार चौक, पुणें

## मोटारींचा विमा

### रत्नागिरी मोटार असोसिएशनची योजना

अलिकडे वाढलेल्या मोटार वाहातुकीमुळें मोटारीखाली होणाऱ्या अपघाताचें प्रमाण वाढत असल्यामुळें या बाबतींत चौकशी करून मोटारींचा उतारू व इतर इसम आणि मालमत्ता ( थर्ड पार्टी ) यास होणाऱ्या अपघाताकरिता विमा उतरण्याबद्दल सक्ति करावी अगर कसें या बाबतींत अभिप्राय देण्याकरिता हिंदुस्थान सरकारनें मि रौटन, आय. सी एस, यांचे अध्यक्षतेखाली एक कमिटी आक्टोबर १९३६ मध्यें नेमिली होती या कमिटीचे मुंबई येथील दौऱ्यात रत्नागिरी मोटार असोसिएशनतर्फे साक्ष देण्यांत आली

रत्नागिरी येथें सन १९३० मध्यें अशा प्रकारचा विमा उतरण्याची सक्ति करण्यात आली त्यावेळीं डी एस. पी., मि सटन, व संस्थेचे प्रतिनिधि यांचे दरम्यान करार होऊन संस्थेच्या सभासदाचे गाड्याकडून उतारू व इतर प्रवासी वगैरेंस दुखापत झाल्यास त्या बाबतींत लवाद, कोर्ट अगर अन्य रीतीनें ठरणारें नुकसान भरून देण्याची जबाबदारी असोसिएशननें घ्यावी व असोसिएशन या कराराप्रमाणें वागत आहे तोपर्यंत डी एस पी नीं संस्थेच्या सभासदाजवळ संस्थेची विमा पॉलिसी असल्याशिवाय लायसेन्स बदलून द्यावयाचें नाहीं, असें ठरलें

यानतर संस्था सहकारी कायद्याखाली नोंदण्यात आली त्यावेळीं पूर्वीचा करार बदलून देताना डी. एस्. पी. नीं सरकारनें दुरुस्त केलेल्या ४६ वे नियमास अनुसरून दर गाडीमागें जरूरीचे प्रसगीं रु ५००० पर्यंत रकम देण्यास संस्था समर्थ असावी म्हणून संस्थेचा विमा फंड रु.५०,००० असावा अशी अट घातली.

संस्थेनें वरील फंड जमविण्याकरिता प्रत्येक सभासदाकडून अर्धा टन गाडी मागें रु. २६५ व एक टन गाडीमागें रु. ४०० हप्तेबदीनें वर्गणी म्हणून जमविली आहे. एकदा ही वर्गणी पुरी भरल्यावर सभासदास तो संस्थेंत असेतोपर्यंत विमापॉलिसी फुकट मिळू शकते. सदर पॉलिसीज् दुसऱ्या गाडीवर बदलण्याची सवलत नियमात असून संस्था रद्द झाल्यावर विमा फंड सभासदामध्यें आपसात वांटण्याची व्यवस्थाहि दुरुस्त नियमांत करण्यात आली आहे.

संस्थेचे सध्या ११६ सभासद असून त्याच्या १९४ गाड्याचे विमे उतरलेले आहेत. विमा फंडाची शिलक रु. ५२,५३७ असून आजपर्यंत गेल्या ४ वर्षांत फक्त १२ अपघातात रु. १,४५७ संस्थेस द्यावे लागले. सर्व क्लेम संस्थेची इन्शुअरन्स कमिटी ठरवीत असून एकहि केस कोर्टांत गेलेली नाहीं. संस्थेचे हिशेब जनरल सभेनें निवडलेल्या हिशेबतपासनिसांकडून व त्याशिवाय सरकारी ऑडिटरकडून तपासले जातात.

साक्षीचे वेळीं कमेटीचे चेअरमन यानीं, अशा प्रकारची सर्व हिंदुस्थानात ही पहिलीच संस्था असून तिचें काम यशस्वी रीतीनें चाललें असल्याबद्दल समाधान व्यक्त केलें लेखी पुराव्यात असलेल्या कांहीं शकाबाबत त्यानीं तोंडी प्रश्न विचारले व त्यांचीं समाधानकारक उत्तरें मिळाल्यावर नियमात थोडीफार दुरुस्ती केल्यास ही संस्था नवीन व्यवस्थेखालीहि चालू ठेवण्यास हरकत नाहीं, असें त्यानीं सांगितलें.

अशा प्रकारच्या संस्था मोटारवाल्याचे सर्वस्वी हिताच्या असल्यामुळें बाकीच्या ठिकाणींहि तशाच स्थापन करण्याबद्दल सरकारकडे कमेटीनें शिफारस करावी असें संस्थेतर्फे सांगण्यात आलें

धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सिफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरिता पत्रव्यवहार कराः—
स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचे कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणे हेंच आमचे ध्येय आहे वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.
सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

एशियन पॉलिसी
ASIAN ASSURANCE Co. Ld.
म्हणजेच
आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.
महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत
धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

मुंबईचे २५ वर्षांचे अनुभवी
टेलर्स रिसबूड ब्रदर्स
सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणें २.

## दि नागपूर प्रीमियर को. हौउसिंग सोसायटी, लि.


३१ जानेवारी १९३६ अखेरचा ताळेबंद

| | देणें रु. | | येणें रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ७५,९०० | फर्निचर व सामान | ९९१ |
| गंगाजळी व इतर रिझर्व्हज | ३,६१८ | कर्जें | २,५४,७१५ |
| कायम ठेवी | १,५२,७४३ | सरकारी रोखे ( रिझर्व्ह फंडाचे ) | २,७५८ |
| सी. पी ॲन्ड बरार प्रॉ. को. बँक, नागपूर, चें कर्ज व कॅश क्रेडिट | ६८,६४८ | अधिकृत गुंतलेल्या इतर रकमा | ४०,७७३ |
| इतर बाबी | ४,०५४ | व्याज | ७,९१२ |
| व्याज | २९३ | इतर बाबी | १,०४१ |
| वर्षअखेरच्या नफ्यापैकी शिलक | १६ | शिलक, रोख व प्रातिक बँकेंत | ३१३ |
| | ३,०५,२७२ | | ३,०५,२७२ |


# पैसे मिळविण्याचा सोपा उपाय !

# रु. १५००० मिळवा


१८



नं. १

उत्तरें पाठविण्याची शेवटची
तारीख २८।२।१९३७.

**प्रत्येकीं प्रवेश फी रु. १-०-०**



३६

न २

( १ ) बँकेंत ठेवलेल्या सीलबंद उत्तराशीं ततोतत जुळणाऱ्या बिनचूक उत्तरवाल्यास रु. १३,५०० वाटण्यात येतील.
( २ ) उत्तरें कमीजास्त प्रमाणांत आल्यास बक्षिसें सारखीं वाटण्यात येतील.
( ३ ) परंतु रु. ५०० ची रक्कम प्रत्येक बिनचूक उत्तरवाल्यास देण्याची हमी घेतों
( ४ ) ता. ७ ते १५ फेब्रुवारी १९३७ च्या आत सर्वांत जास्तींत जास्त उत्तरें पाठविणारास रु. १००० आणि रु. ५०० स्पेशल बक्षीस देण्यात येईल.
( ५ ) उमेदवारानें १ व २ चौकटींत १ ते २४ पर्यंतचे आकडे वापरावेत. न. १ व २ चौकटींतील बेरीज उभी, आडवी व तिरपी कशी केली तरी अनुक्रमें १८ व ३६ भरावी.
( ६ ) एक आंकडा दोनदां वापरला जाऊं नये.
( ७ ) प्रत्येक चौकटीला प्रवेश फी रु. १ वाटेल तितकीं उत्तरें साध्या कागदावर लिहून प्रवेश फी म. ऑ. नें किंवा इंडियन पोस्टल ऑर्डरनें पाठवावी. म. ऑ ची पावती उत्तरासोबत पाठवावी.
( ८ ) उमेदवारानें २५ व १२ उत्तरें अनुक्रमें रु. २० रु व १० भरून पाठवावींत.
( ९ ) बक्षिसें उत्तरें येण्यावर अवलंबून राहतील. निकाल १० दिवसात लागेल. जे एक आण्याचें पोस्टाचें तिकिट पाठवतील त्यांना घरपोंच निकाल कळविण्यात येईल.
(१०) मॅनेजरचा निकाल शेवटचा व कायदेशीर बंधनकारक समजला जाईल.

**प्रवेश फी व उत्तरें खालील पत्त्यावर पाठवावीं:—**

**दि मॅनेजर—इंडियन ट्रेडिंग कंपनी**

गवुजीस चाळ, मसजीद बंदर रोड,
मुंबई नं ३

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळी १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द. शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात
सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रक्मा दिल्या जातात
म्यानेजिंग एजंटस्

**पायोनियर डाइंग हाऊस पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

**S. B. JOSHI & Co.**
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**"व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे**
ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नांहीं. पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ८८ आणे नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं
कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, ७५३ सदाशिव पेठ, पुणें.
मिळण्याचीं ठिकाणें
धुळें—सहस्रबुद्धे ब्रदर्स
इंदोर— हॉटेल आय व्हिजीट
अमळनेर—बऱ्हाणपूरकर ( कमिटीच्या बागेसमोर )
नागपूर—वैद्य ब्रदर्स, ओल्ड स्टेशन रोड

**" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "**
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.—
**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**
अध्यक्ष—श्री न चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १७ फेब्रुवारी, १९३७. अंक ७

"दुसरें मूल्यमापन जाहिर झालें"

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष–श्री न चि केळकर, संचालक केसरी

| हयातीतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

व्यापारी-उद्मी लोकांस

—अपूर्व संधि—

पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes**"

**दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें**

तारेचा पत्ता . "प्रेसिडेन्सी" पुणे ] १० विश्रामबाग रोड [ टेलिफोन नंबर ७६३

अध्यक्ष —श्री रा न अभ्यंकर, बी ए, एलएल बी, मॅनेजिंग एजट, कॉमनवेल्थ विमा कपनी

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : | : | रु १०,००,००० दहा लाख |
| विक्रीकरितां काढलेलें | : | : | रु ५,००,००० पांच लाख |

प्रत्येक शेअर रु १०० याप्रमाणें ५००० शेअर्समध्यें विभागलेलें अर्जासोबत रु १५ व अर्जमंजुरी रु १०

**ठेवी :** चालूं ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के

मुदतीच्या ठेवी सहा महिन्यांपासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी

**कर्ज :** थोड्या व लांब मुदतीचीं कर्जें दिलीं जातात कारखानदारांच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्जें देण्याची व्यवस्था केली आहे बँकेनें पसंत केलेल्या इसमाचीं बिलें डिस्काउंट केलीं जातात

चेक्स, बिल्स, ड्राफ्ट्स, हुंड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिलीं जातात

**ठेवीदारातील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे**

मॅनेजिंग डायरेक्टर्स —नि. ना क्षीरसागर, चिं. त्रिं चितळे

## विविध माहिती

### बँकास सुट्टी

मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकीनिमित्त ता १५ व १७ फेब्रुवारी हे सार्वजनिक सुट्याचे दिवस म्हणून जाहीर झाले आहेत.

### राज्यारोहणाची फिल्म घेण्याकरितां अमेरिकन तज्ज्ञांस बोलावणें

बादशहा सहावे जॉर्ज ह्यांच्या राज्यारोहणाची रंगीत फिल्म घेण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार ब्रिटिश मूव्हीटोन न्यूजनें मिळविला आहे ४० हजार फूट लांबीच्या फिल्मपैकी २० हजार फूट रंगविण्यात येतील ही फिल्म सर्वोत्कृष्ट व्हावी, ह्याकरितां अमेरिकन तज्ज्ञांचें सहाय घेण्यात येणार आहे.

### अंड्यांचा खप

कॅनडामधील प्रत्येक मनुष्य वर्षातून सरासरीनें २८४ अंडीं खातो ब्रिटिशांचा ह्या बाबतींत चौथा नंबर येतो त्यांचे वांटणीस प्रत्येकीं १७२ अंडीं येतात

### जपान व ब्रह्मदेश ह्यांमधील व्यापारी करार

ब्रह्मदेशात पिकणारीं बहुतेक सर्व कपास परदेशी जाते जपान हें तिचें प्रमुख गिऱ्हाईक आहे जपाननें ब्रह्मदेशाची दरसाल ६५ हजार गासड्या कपास घ्यावी म्हणजे त्याचे बदली ४ कोटि २० लक्ष चौरसवार कापड जपानातून आयात होण्यास ब्रह्मदेशाची हरकत असणार नाहीं, अशा अर्थाचा जपानशी करार करण्यास ब्रह्मदेशाची तयारी आहे जपान व ब्रह्मदेश ह्याचेमध्यें कराराच्या वाटाघाटी चालू असून ब्रह्मी प्रतिनिधींनीं ब्रिटिश सरकारच्या ब्रह्मदेशमंत्र्याचा सल्ला विचारला आहे लँकेशायरच्या हितसंबंधाची जोपासना ह्या मार्गानें करण्यात येईल, असें दिसतें

### पोस्टांतील ठेवी व विमा पॉलिसी

३१ मार्च,१९३६ रोजीं हिंदी पोस्टातील एकूण ३५ लक्ष ४१ हजार सेव्हिंग्ज खात्यात मिळून ६७½ कोटि रुपये होते पोस्टामार्फत उतरलेल्या विमा पॉलिसींची संख्या ९२,१०० असून ज्याची दर्शनी किंमत १७½ कोटि रुपये होती

### पदवी धारण करणारांची संख्या व लोकशाही

किताब धारण करणाराची संख्या सध्याच मोठी आहे. तेव्हा आपल्या प्रधानकीच्या कारकीर्दींत मुख्य प्रधान हे नवीन पदवीदानें तहकूब करतील काय,असा प्रश्न मजूर पक्षाच्या एका सभासदानें ब्रिटिश पार्लमेंटात विचारला.मि. बाल्डविन ह्यांनीं, "ज्यास्त लोकांस पदव्या मिळणें हे लोकशाहीचें लक्षण आहे" असें म्हणून प्रश्नास नकारार्थी उत्तर दिलें.

### जगांतील अत्यंत श्रीमान गृहस्थ

अमेरिकेंतील कोट्यधीश, मि. जॉन. डी रॉकफेलर, हे जगातील पहिल्या प्रतीचे श्रीमान गृहस्थ आहेत. त्याच्या वयास ९८ वर्षे लवकरच पुरीं होतील आयुष्य आणि धन ह्याची विपुल संपत्ति त्यांनीं उपभोगिली आहे

### ब्रह्मदेशाचे हिंदुस्थानास देणें

ब्रह्मदेश विभक्त होताच त्यानें कर्जाच्या फेडीप्रीत्यर्थ सुमारें सव्वातीन कोटि रुपये हिंदुस्थानास यावयाचे आहेत समाइक कर्जापैकी सुमारें ५२ कोटि रुपये ब्रह्मदेशाच्या वाट्यास आले असून ह्या रकमेची फेड सोयीनें व्हावयाची आहे.

### इंडियन सेंट्रल ज्यूट कमिटी

वरील कमिटीची पहिली सभा सर ब्राइस बर्ट ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तागाचे उत्पादनाची आकडेवार माहिती जमविणें, संशोधन करणें व मालाचा उठाव करण्यास सहाय्य करणें हीं कामें कमिटीनें करावयाचीं आहेत हिंदुस्थान सरकार कमिटीस पहिला पाच वर्षे दरसाल ५ लक्ष रुपये देणार आहे.

### आर्थिक तज्ज्ञाची नेमणूक

हिंदुस्थान सरकारास सल्ला देण्याकरिता एक आर्थिक तज्ज्ञ नेमण्यात यावा, असें आज कित्येक वर्षे घाटत होतें. स्टँडिंग फिनॅन्स कमिटीनें ह्या तज्ज्ञाच्या येत्या वर्षातील खर्चाकरिता रकम मंजूर केली आहे सदरहु अधिकाऱ्याचा हुद्दा सरकारच्या जॉइंट सेक्रेटरीच्या बरोबरीनें राहील आणि सरकारास व वेगवेगळ्या खात्यास वेळोवेळ योग्य तो सल्ला देण्याचें काम तो करील हिंदुस्थानच्या हिताचे दृष्टीनें योग्य ती माहिती व आकडे पुरविण्याचें कामहि त्याच्याकडे दिलेल्या खात्याकडे सोंपविण्यात येईल.

### टारिफ बोर्डाकरिता शास्त्रीय सल्लागार व सेक्रेटरी

येत्या वर्षी साखरेच्या धंद्याची चौकशी करण्याचें काम टारिफ बोर्डास करावें लागणार आहे ह्याखेरीज, इतरहि कांहीं धंद्याबाबतची चौकशी बोर्डाकडे सोपविली जाण्याचा संभव आहे. बोर्डास मदतनीस म्हणून शास्त्रीय सल्लागाराची व जरूर पडल्यास एका सेक्रेटरीची नेमणूक करण्याकरितां स्टँडिंग कमिटीनें २,८४,२०० रुपये मंजूर केले आहेत.

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार–ब्रिटिश जहाजांची तयारी

हिंदुस्थानाचा इतर देशाशीं होणारा व्यापार आतां भरभराटींत येत आहे, आणि ह्या वहातुकीचा फायदा मिळविण्याकरिता ब्रिटिश आगबोट कंपन्या शक्य तों प्रयत्न करणार आहेत मंदीच्या काळांत झालेलें नुकसान भरून काढून मालाची वहातूक काबीज करण्याचा त्याचा प्रयत्न आहे

### अमेरिकेंत भांडवलाचा प्रवाह

अमेरिकेंत इतर देशातून भांडवल धाव घेत आहे हा प्रवाह कसा थांबवावा, ह्यासंबंधीं तेथील सरकारचे प्रयत्न चालू आहेत

### येत्या वर्षी दरबार भरत नाहीं

आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी ग्रेटब्रिटन सोडून दीर्घकाल बाहेर जाणें आपणास शक्य नसल्यानें हिंदुस्थानास भेट देऊन दरबार भरविण्याचा बेत पुढें ढकलला असल्याचें बादशहानीं जाहीर केलें

### हिंदी उंसाच्या पिकाचा अंदाज

१९३६–३७ सालीं उंसाच्या क्षेत्रांत १० टक्के वाढ होऊन गुळाचें उत्पादन १४ टक्के जास्त होईल असा सरकारी अंदाज आहे

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| ७–२–३७ ते १३–२–३७ | ९,४५,५२७ |
| २१–९–३१ ते १३–२–३७ | २,९२,७६,५९,४९३ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ७४ |
| २ खेड्यातील भांडवल शहराकडे धांव घेऊं लागलें | ७५ |
| ३ हिंदुस्थानातील कपास कापडाच्या गिरण्या | ७६ |
| ४ राजेसाहेबांच्या खर्चाची तरतूद | ७६ |
| ५ स्फुट विचार .. . | ७७ |
| प्राप्तीवरील कराच्या कायद्यांत दुरुस्ती—किनाऱ्यालगतची वहातुक—युद्धाच्या पूर्व तयारीकरिता कर्ज—रोडफंड व दळणवळणाची सोय—मोटारीच्या दळणवळणाचें नियंत्रण—प्रांतिक सरकाराची कुचंबणा-टाटा कंपनी व बंगाल आयर्न कंपनी— | |
| ६ शेतीचा धंदा कसा सुधारेल ? | ७९ |
| ७ कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश ... | ८१ |
| ८ रिझर्व्ह बँकेची दुसरी वार्षिक सभा .. | ८२ |
| ९ सहकारी चळवळ | ८३ |
| १० निवडक बाजारभाव | ८४ |

# अर्थ

बुधवार, ता. १७ फेब्रुवारी, १९३७

## खेड्यांतील भांडवल शहराकडे धांव घेऊं लागलें

### रिझर्व बँकेचें जबाबदारी टाळण्याचें धोरण

शेतीचा धंदा व खेडेगांवी व्यापार ह्याचा संबंध आधुनिक बँकाशीं फारसा येत नाहीं रिझर्व बँक व तिला जोडलेल्या बँका आणि जुन्या पद्धतीनें व्यवहार करणारे सावकार व सराफ ह्याच्या व्यवहाराचा दुवा जोडल्याखेरीज रिझर्व बँकेचें उद्दिष्ट पार पडणार नाहीं हा संबंध कसा जोडण्यात यावा आणि खेडेगावांतील व्यवसाय रिझर्व बँकेच्या कक्षेंत कोणत्या मार्गानें आणले जावेत ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेनें केलेला प्राथमिक रिपोर्ट निराशाजनक आहे, हें आम्हीं "अर्था" मध्यें मागें दाखविलेंच आहे सावकार आणि सराफ ह्याच्या व्यवहारावर दिवसानुदिवस जास्त जास्त नियंत्रणें घातलीं जात असल्याकारणानें आपला पैसा खेडेगावात गुंतविणें त्यास फायद्याचें उरलेलें नाहीं आणि हा पैसा शहराकडे धाव घेऊ लागला आहे, अशी तक्रार मुंबई श्रॉफ असोसिएशनचे अध्यक्ष, श्री चुनीलाल मेहता, ह्यानीं आपल्या भाषणात नुकतीच केली. तडजोडीनें कर्जें मिटविणें, शेतकऱ्याना सवलती देणें, इत्यादि गोष्टी कर्जदाराचे दृष्टीनें आवश्यक असल्या तरी सावकाराचा 'धंदा'हि फायदेशीर पडला पाहिजे, ही गोष्ट दृष्टीआड झाल्यास शेतकऱ्यास सावकाराकडून कर्ज मिळणें दुरापास्त होईल, हें उघड आहे ह्या विशिष्ट परिस्थितींत, रिझर्व्ह बँकेनें तिला दिसणारा सर्वांत सोपा मार्ग स्वीकारून सध्या काहीं करतां येणें अशक्य आहे असा अभिप्राय नमूद केला, ही गोष्ट शेतीच्या धंद्याचे दृष्टीनें शोचनीय समजली पाहिजे सावकाराचे मनात त्याच्या पैशाचे निश्चितीविषयीं विश्वास उत्पन्न करून, खेडेगावातून शहराकडे येणाऱ्या ठेवी परतविल्या पाहिजेत, असें श्री. मेहता ह्यानीं सांगितलें तें परिस्थितीस अनुरूप असेंच आहे आणि त्याचा विचार होणें अगत्याचें आहे

रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टांत, तिनें शेतकऱ्याकरितां निश्चित योजना व कार्यक्रम सादर केलीं नाहींतच, उलट सावकारावरील बंधनें मात्र वाढविलीं पाहिजेत, असें सुचविलें आहे. सावकारांस लायसेन्स घेण्यास भाग पाडणें, त्यांस ठराविक रीतीनें वक्तशीर हिशेब ठेवण्यास लावणें, इत्यादि नियंत्रणें सध्याच्या परिस्थितींत अव्यवहार्य ठरतील असें आपलें मत मध्यवर्ति बँकिंग चौकशी कमिटीनें नमूद केलें होतें सावकारास जास्त खर्चांत घालण्यानें व त्याच्या शक्तीबाहेरच्या अटी त्यांवर लादण्यानें सध्याच्या व्यवस्थेंत बिघाड मात्र होण्याचा संभव आहे. वरील नियंत्रणाबरोबर रिझर्व्ह बँकेनें कांही सवलती देऊ केल्या असत्या तर तिचे सूचनात काहीं तरी तथ्य आहे, असें म्हणतां आलें असतें. शेतीच्या मालाचे तारणावरील हुंड्यावर दिलेलीं कर्जें वसूल करण्यास सहाय, इंपीरियल बँकेनें इतर बँकास व पोस्टखात्यानें सहकारी सोसायट्यास पैशाच्या वर्गावर्गीची दिलेली सवलत सावकारास मिळण्याची व्यवस्था, सावकारास पोस्टात चालू खातीं उघडण्याची सवलत, इत्यादि सुधारणा प्रांतिक बँकिंग चौकशी कमिटीनें केल्या होत्या. रिझर्व्ह बँकेनें ह्या सुधारणाचा पुरस्कार करणें इष्ट होतें.

रिझर्व्ह बँक आणि शेतकरी ह्याचा संबंध जोडण्याकरितां प्रांतिक सरकारनें मान्यता दिलेल्या व नोंदलेल्या सावकारांच्या सहीस काहीं अटींवर हुंड्याचें बाबतींत मान्यता देण्यास रिझर्व्ह बँकेनें तयारी दर्शविली आहे जॉइंट स्टॉक बँकाच्या शाखा खेडेगावात पसरलेल्या नसल्याकारणानें आणि अगदीं कमी रकमाच्या हुंड्याचा स्वीकार करण्यास बँका तयार होणें कठिण असल्यानें, रिझर्व्ह बँकेनें मोठ्या उदारपणें देऊ केलेली ही सवलत निरुपयोगी ठरणार आहे सावकाराचा आणि रिझर्व्ह बँकेचा इतर बँकांच्या माध्यमाची आवश्यकता न ठेवता संबंध जोडण्यांत आला, तरच त्याचा काहीं उपयोग आहे हिंदुस्थानात व्यापारी हुंड्याचा अभाव असल्यामुळें प्रथम अशा हुंड्यांचा प्रसार झाल्याखेरीज, त्याचेवर मिळणारीं कर्जेंच उद्भवू शकत नाहींत, आणि ह्याकरिता त्यावरील स्टॅप ड्यूटी कमी करून त्यांच्या प्रसारास प्रोत्साहन दिलें पाहिजे ह्या बरोबरच, सदरहू हुंड्या रिझर्व्ह बँकेस विकून त्याची रकम पुन उभी करण्यास सावकारास सवलती दिल्या पाहिजेत, म्हणजेच त्याचा रिझर्व्ह बँकेशीं संबंध जोडण्यात आला असें होईल थोडक्यात सांगावयाचें म्हणजे शेतीच्या धंद्यात पतपत्रिकाचा शिरकाव करून व त्याचा प्रसार वाढवून त्याच्या तारणावर रिझर्व्ह बँकेकडून रकमा मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

सहकारी बँका व पेढ्या ह्याच्यामार्फत शेतीच्या धंद्यास सहाय करता येईल व त्याबाबत मि डार्लिंग ह्यांच्या सूचनानुसार रिझर्व्ह बँक आपले धोरण जाहीर करील, ही अपेक्षा आतां फोल ठरली आहे ह्या बाबतची आपल्यावरील जबाबदारी सदरहू बँकेनें अंगाबाहेर टाकण्याचा यत्न केला असून, शेतकऱ्यांस इतका काळ कर्जें पुरविणाऱ्या सावकारवर्गास आशा वाटण्याजोग्या सवलतीहि तिनें सुचविल्या नाहींत. ह्यामुळें शेतकरी वर्गाची मात्र कुचंबणा होणार आहे. ह्या बाबतींत रिझर्व्ह बँक आणि हिंदुस्थान सरकार यांचें कर्तव्य काय आहे ह्या विषयाचें विवेचन प्रो काळे ह्यानीं भागलपूरच्या प्रांतिक सहकारी परिषदेंत केलेल्या अध्यक्षीय भाषणांत सविस्तर आलें आहे, तिकडे आम्हीं वाचकाचें लक्ष वेधूं इच्छितों

---

## हिंदुस्थानांतील कपास–कापडाच्या गिरण्या

### तुलनात्मक माहिती

चात्याच्या सख्येच्या अनुरोधानें हिंदुस्थानातील गिरण्यांचें वर्गीकरण केलें असता वेगवेगळ्या ठिकाणच्या गिरण्यातील फरक तात्काळ लक्षात येतो—

**चात्यांची सख्या**

| चात्याची सख्या (हजार) | मुबई | | अहमदाबाद | | सबध हिंदुस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गिरण्यांची सख्या | एकूण सख्येशीं प्रमाण% | गिरण्यांची सख्या | एकूण सख्येशीं प्रमाण% | गिरण्यांची सख्या | एकूण सख्येशीं प्रमाण% |
| १५ पेक्षा कमी | ४ | ६ | ६ | ८ | ५३ | १७ |
| १५–३० | ९ | १३ | ५० | ६६ | १३७ | ४५ |
| ३०–४५ | २८ | ४१ | १५ | २० | ६५ | २१ |
| ४५–६० | १३ | १९ | २ | २ | २८ | ९ |
| ६०–८० | ७ | १० | ३ | ४ | १२ | ४ |
| ८०–१०० | ४ | ६ | | . | ६ | २ |
| १०० चे वर | ३ | ५ | | . | ७ | २ |
| एकूण | ६८ | . | ७६ | | ३०८ | |

कमी चात्याच्या गिरण्या मुबई व अहमदाबाद येथें फारशा आढळत नाहींत. १५ ते ३० हजार चात्याच्या गिरण्यांचा अहमदाबाद येथें भरणा जास्त आहे व सबध हिंदुस्थानाचे दृष्टीनेंहि हा वर्ग प्रातिनिधिक स्वरूपाचा म्हणता येईल ३० ते ४५ हजार चात्याच्या गिरण्या मुबई शहरात प्रामुख्यानें आढळतात मोठ्या गिरण्याची सख्याहि मुंबईतच जास्त आहे हिंदुस्थानातील इतर भागातहि कांहीं मोठ्या गिरण्या आहेत

मुबई शहरातील गिरण्यामधील चात्यांची सरासरी ४२ हजार आहे. अहमदाबाद येथील गिरण्यात सरासरीनें २६ हजार चात्या आहेत, तर सबध हिंदुस्थानची सरासरी २६ हजार चात्याची आहे. म्हणजे, मुंबई शहरांतील गिरणीच्या मानानें अहमदाबाद येथील गिरणीचा सरासरी आकार तीन पचमाश इतका येतो इतर हिंदी गिरण्या ह्याहिपेक्षा लहान आहेत, हें वरील आकड्यांवरून स्पष्ट होत आहे.

**मागांची सख्या**

खालील कोष्टकांत हिंदी गिरण्याची त्यामधील मागांच्या संख्येस अनुसरून माहिती देण्यांत आली आहे

| मागाची सख्या | मुबई | | अहमदाबाद | | सबध हिंदुस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गिरण्यांची सख्या | एकूण सख्येशीं प्रमाण% | गिरण्यांची सख्या | एकूण सख्येशीं प्रमाण% | गिरण्यांची सख्या | एकूण सख्येशीं प्रमाण% |
| २०० पेक्षा कमी | — | — | १ | १ | २६ | ९ |
| २००–४०० | १ | १ | १२ | १६ | ५७ | १९ |
| ४००–६०० | ९ | १४ | २७ | ३५ | ६८ | २३ |
| ६००–८०० | १५ | २३ | २० | २६ | ५७ | २० |
| ८००–१००० | १४ | २१ | ९ | १२ | ३१ | ११ |
| १०००–१२०० | १२ | १८ | २ | २ | २१ | ७ |
| १२००पेक्षा जास्त | १५ | २३ | ६ | ८ | ३१ | ११ |
| एकूण | ६६ | | ७७ | | २९१ | |

दोनशेपेक्षा कमी माग असलेल्या गिरण्या मुबई व अहमदाबाद येथें क्वचितच आढळतात ४०० ते ६०० मागांच्या गिरण्या सर्वत्र आहेत, तथापि, मुबई येथील गिरण्यातील मागांची सख्या ४०० ते १ हजारपर्यंत असलेली दिसते मुंबईच्या गिरणींत सरासरीनें ९२० व अहमदाबाद येथील गिरणींत ५९० माग असतात. सबध हिंदुस्थानाची सरासरी अहमदाबाद इतकीच आहे.

मुबई येथें उद्योगधद्याची स्थापना होऊन बराच काळ लोटला आहे, त्यामुळें गिरण्याची जबाबदारी अगावर घेण्यास तयार असणारे लोक तेथें लवकर निर्माण झाले. तेथील गिरण्या सयुक्त भाडवलाच्या तत्त्वावर काढण्यात आल्या अहमदाबाद येथील गिरणीमालकाचें बहुशीं स्वतःचें भाडवल असल्यानें त्याच्या गिरण्या सहाजिकच जरा लहान प्रमाणावर असलेल्या आढळतात विसाव्या शतकाचे सुरवातीपर्यंत मुबई येथील गिरण्या फक्त सूतच काढीत असत व त्यास चीन व जपान ह्या देशात मोठी मागणी असे. ती आता कमी झाल्यावर तेथील गिरण्यानीं आपले माग वाढविले आहेत अहमदाबाद येथें हा धदा सुरू होऊन फार वर्षे झालेलीं नाहींत

[ प्रो सुदर रामशास्त्री ह्याच्या एका लेखावरून ]

## राजेसाहेबांच्या खर्चाची तरतूद

इग्लडचे राजे गादीवर आल्यानतर त्याच्या खासगी खर्चाची तरतूद सरकारी खजिन्यामधून करण्यात येते. नवे बादशहा, सहावे जॉर्ज, हे पार्लमेंटास खलिता पाठवून आपल्या खर्चाची तरतूद करण्याविषयीं लवकरच लिहितील फडाणिशी खात्याचे प्रधान, मि चेंबर्लेन, हे सिलेक्ट कमिटीच्या नेमणुकीची सूचना आणतील आणि ह्या कमिटीच्या सूचनेनुसार पार्लमेंट ठराव करील पचम जॉर्ज बादशहास ६१ लक्ष रुपयाचा तनखा मिळाला होता आणि आठव्या एडवर्डास दरसाल ५२ ३/१० लक्ष रुपये मंजूर झाले होते. ह्या ५२ ३/१० लक्षाची वाटणी खालीलप्रमाणें झाली होती:—

| | रु. लक्ष | हजार |
|---|---|---|
| बादशहांचा खासगी खर्च | १४ | ३० |
| नोकराचा पगार, पेन्शनें इ. | १७ | ४० |
| नेहमीचा मामुली खर्च | १९ | ९० |
| देणग्या, धर्म, बक्षिसें इ. करिता | १ | ७० |
| | ५२ | ३० |

## मुबई इलाख्यांतील इस्पितळें व दवाखाने

मुबई इलाख्यातील इस्पितळें व दवाखाने ह्याचा लोकांस फायदा कसा होत आहे, हें दर्शविणारे १९३४ व १९३५ सालाचे आकडे येथें दिले आहेत:—

| | १९३५ | १९३४ |
|---|---|---|
| एकूण रोगी | ३३½ लक्ष | ३१ लक्ष |
| स्त्री रोगी | १½ " | १⅓ " |
| किती रुग्णांच्या शश्रूषेची सोयं | ७,२१० | ७,३२० |
| शस्त्रक्रिया | १,५४,०१८ | १,७३,९८६ |

१९३५ अखेर इस्पितळें व दवाखाने ह्याची सख्या ५३४ होती आणि त्याप्रीत्यर्थ एकूण ४९ लक्ष ६५ हजार रुपये खर्च आला उत्पन्नाच्या ६३½ लक्षापैकी २७¾ लक्ष रुपये प्रातिक सरकारनें व २० लक्ष रुपये स्थानिक सस्थानीं दिले होते.

# स्फुट विचार

## प्राप्तीवरील कराच्या कायद्यांत दुरुस्ती

प्राप्तीवरील कराच्या आकारणीच्या पद्धतीसंबधीं चौकशी करून ब्रिटिश तज्ज्ञांनीं हिंदुस्थान सरकारास आपला रिपोर्ट सादर केला, त्याचा सारांश 'अर्था' च्या ३ फेब्रुवारीचे अंकात दिलेला आहे. कराची आकारणी टाळणें बंद करून उत्पन्न वाढविण्याचे कांहीं मार्ग सदरहु तज्ज्ञांनीं सुचविले आहेत पति आणि पत्नी, बाप आणि अल्पवयी मुलगा इत्यादि नातेवाऱ्या अगर पत्नीच्या व मुलाच्या नांवानें करण्यात येणारे इस्टेटीचे कागदपत्र, ह्यात कित्येक प्रसंगीं कर चुकविणें हाच प्रधान हेतु असतो अशा गोष्टींस आळा बसल्यास, पहिल्याच वर्षीं सरकारचें उत्पन्न २० लाखांनीं वाढेल अशी अपेक्षा आहे. चौकशी कमिटीच्या सूचना अंतर्भूत करून बिल तयार करण्यास वेळ लागेल, ह्याकरितां वरील प्रकारची कर-चुकवणी थांबविणारी दुरुस्ती सध्याच्या कायद्यात तांतडीने करण्यात येत आहे हें दुरुस्तीचें बिल ३१ मार्चच्या आत पास न झाल्यास तें ब्रह्मदेशास लागू पडणार नाहीं, ह्या करिता ही थोडी घाई करण्यात येत आहे. कायद्यामधील दुरुस्तीमुळें, कित्येकावर अन्याय्य आकारणी होण्याचा संभव आहे तथापि अशीं उदाहरणें सरकारच्या नजरेस आल्यास त्याबाबत जरूर ती तजवीज करण्यात येईल, असें सर जेम्स ग्रिग ह्यांनीं सरकारतर्फें असेंब्लींत आश्वासन दिलें वरील दुरुस्त बिल असेंब्लींत पास झालें असून, प्राप्तीवरील कराच्या जाळ्यांतून निसटणारांस खेचण्याची अशा रीतीनें सुरवात झाली आहे

---

## हिंदी किनाऱ्यालगतच्या व्यवहारांत जपानी आगबोटी

हिंदी आगबोटींच्या धंद्याचे मार्गांत इतक्या अडचणी आहेत कीं, त्यास सरकारनें विशेष सवलती व सहाय दिल्यावाचून त्याची प्रगति होण्याची फारशी आशा वाटत नाहीं हिंदुस्थानच्या किनाऱ्या लगतचीहि वहातूक हिंदी आगबोट मंडळ्यांच्या ताब्यात नाहीं, तेव्हा महासागराच्या हमरस्त्यावरचा व्यवहार त्यांच्या टापूच्या बाहेर आहे, हें सांगावयास नकोच किनाऱ्यालगतच्या वहातुकींत परदेशी मंडळ्याची इतकी स्पर्धा चालते कीं, तिच्या पुढें स्वदेशी आगबोटवाल्यास हात टेकावे लागतात. आपल्या देशाच्या किनाऱ्यालगतच्या आगबोटींच्या धंद्यात परराष्ट्रीय मंडळ्यास शिरू द्यावयाचें नाही असा प्रत्येक देशाचा शिरस्ता आहे इंग्लड, फ्रान्स, अमेरिका व खुद्द जपान ह्या देशात परकी मंडळ्यांवर ह्या प्रकारचा स्पष्ट निर्बंध आहे तशा प्रकारचा नियम हिंदुस्थान सरकारनें करावा ह्या मागणीस हिंदी सरकारनें मान्यता दिलेली नाहीं. जपाननें आता त्या क्षेत्रात शिरकाव करून परकीय स्पर्धेत भर टाकली आहे व हिंदी बंदराच्या मधला व्यवहार चालू केला आहे कलकत्त्याच्या हिंदी चेंबर ऑफ कॉमर्सनें सदरहु चढाईच्या धोरणाचीं उदाहरणें हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणून त्यास प्रतिबंध होण्याची तजवीज करावी असें सुचविलें आहे. हिंद-जपान व्यापारी कराराची चर्चा चालली असताना जपानच्या प्रतिनिधींनीं ह्या बाबतींतल्या आक्रमणास आळा घालण्याची व्यवस्था करण्याचें आश्वासन दिलें होतें, त्याची आठवण करून देऊन अभिवचनाप्रमाणें जपाननें वागावें अशी आग्रहाची सूचना व्यापारी संघानें सरकारास केली आहे, तिचा योग्य विचार होणें जरूर आहे.

---

## युद्धाच्या पूर्वतयारीकरितां ५०० कोटि रुपयांचें कर्ज

युद्धाच्या पूर्वतयारीकरिता होणारा खर्च चालू उत्पन्नातून भागत नसल्यानें, ५०० कोटि रुपयाचें ३० वर्षें मुदतीचें कर्ज उभारण्याची ब्रिटिश सरकार तजवीज करीत आहे आणि त्याबाबत पार्लमेंटमध्यें ताबडतोब एक बिल मांडण्यांत येईल असें फडणिशी खात्याचे मुख्य, मि चेंबर्लेन, ह्यानीं गेल्या आठवड्यांत जाहीर केलें. कर्जावरील व्याजाची आणि परतफेडीची तरतूद दरसालच्या बजेटातून करण्यात येईल. इतर राष्ट्राच्या मानानें ग्रेट ब्रिटनची संरक्षक तयारी जय्यत झालेली नाहीं त्यासबंधातील खर्च किती वर्षे चालू ठेवावा लागेल आणि एकूण किती रकमेची जरूर पडेल, ह्याचा आज अदाज करता येत नाहीं, असेंहि मि चेंबर्लेन ह्यानीं सांगितलें परिस्थिति उत्पन्न होईल त्याप्रमाणें धोरण बदलावें लागेल, परतु पार्लमेंटच्या मजुरीखेरीज खर्चाचा तपशील ठरविण्यात येणार नाहीं हें त्यानीं स्पष्ट केलें. कर्जाची रकम जरूर पडेल त्याप्रमाणें पाच वर्षांत ती उभारण्यात येईल आणि ह्या मुदतीमधील अदाजपत्रकातील वाढाव्याचा विनियोगहि संरक्षक तयारीकडेच करण्यात येईल नवीन कर्जाच्या ह्या घोषणेमुळें ग्रेट ब्रिटनमध्यें येत्या वर्षीं प्राप्तीवरील करात वाढ होणार ह्या भीतीनें हा करभार चुकविण्याकरिता लोक आपले पैसे ज्यास्त फलदायी ठिकाणीं गुतविण्याचा प्रयत्न करतील, अशी अपेक्षा आहे. नवीन कर्जामुळें पैशाचे बाजारावर ताण पडण्याचा आणि व्याजाच्या सध्याचे स्वस्त दरावर प्रतिकूल परिणाम होण्याचा सभव नाहीं, असा अदाज आहे

---

## रोड फंड व दळणवळणाची सोय

हिंदुस्थानात दळणवळणाच्या सोयीचे चांगले व भरपूर रस्ते असावे, ह्याकरितां कोणतें धोरण आखणें इष्ट आहे, ह्याचा विचार करण्याकरिता हिंदुस्थान सरकारनें १९२७ सालीं एक कमिटी नेमली होती तिच्या शिफारशीस अनुसरून सरकारनें पेट्रोलच्या प्रत्येक गॅलनावर दोन आणे जादा कर बसविला आणि त्याच्या उत्पन्नातून प्रातिक सरकारें व संस्थानें ह्यास त्याच्या हद्दीमधील पेट्रोलच्या खपाचे प्रमाणात रस्ते सुधारण्याकरिता रकमा वाटून दिल्या ह्या रकमातून प्रातिक सरकारानीं आतरप्रातिक मोठे रस्ते व रेल्वेस जोडणाऱ्या अतर्गत सडका, ह्यांच्या सुधारणेचा खर्च करावा, अशी योजना होती. तथापि १९३१ सालीं मदीस सुरवात होऊन, ह्या फडाचा विनियोग नवीन रस्त्याच्या बाधणीकडे करण्याऐवजीं, जुन्या सडकाच्या दुरुस्तकिडेच करण्याची प्रातिक सरकारांवर पाळी आली. रेल्वेजची सापत्तिक स्थितीहि बिघडली आणि रेल्वे विरुद्ध मोटार वहातुक असा लढा उपस्थित झाला प्रातिक सरकारानीं रोडफडाच्या उत्पन्नातून करावयाचा खर्च रेल्वेजना पोषक व्हावा व रेलवेजचीं गिऱ्हाइकें वाढावीं, अशी हिंदुस्थान सरकारची विचारसरणी होती मोटारींच्या रस्त्याची स्पर्धा रेलवेजशीं होऊ नये, ह्याकरिता मोटारींच्या वहातुकीचें नियत्रण हिंदुस्थान सरकारच्या सांगण्याप्रमाणें प्रातिक सरकारानीं केलें पाहिजे, असें त्याचें म्हणणें होतें. पेट्रोलवरील जादा पट्टीच्या उत्पन्नाची मालकी हिंदुस्थान सरकारकडे असल्यानें, प्रांतिक सरकारास आपलें म्हणणें प्रभावी करणें शक्य झालें नाहीं आणि रेल्वेजचे हितसंबध जास्त महत्त्वाचे मानले जाऊन अखेर हिंदुस्थान सरकारची सरशी झाली.

---

### मोटारींच्या दळणवळणाचें नियंत्रण

हिंदी रेल्वेजमध्यें गुतून पडलेल्या ८०० कोटि रुपयाचे भांडवलाचा बोजा हलका करावयाचा म्हणजे त्यावर व्याज सुटणें अवश्यक आहे. रेल्वेज अजिबात फायद्यात पडत नसताना, हिंदुस्थान सरकार मोटारींच्या वहातुकीस म्हणजे रेल्वेजच्या प्रतिस्पर्ध्यास उत्तेजन देणें शक्य नव्हतें आगगाडीच्या रस्त्याशीं समातर असणाऱ्या रस्त्यावरून होणारी मोटार वहातुक रेल्वेजना नको आहे, कारण त्यामुळें रेल्वेजचें गिऱ्हाईक कमी होतें अतर्गत मुलुखातून रेल्वेस्टेशनवर आणून सोडणारे रस्ते मात्र वाढावे, असें हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे ह्या ,धोरणाची जाहीर घोषणा सरकारनें एका ठरावाच्या रूपानें असेंब्लींत गेल्या आठवड्यात केली आणि हा ठराव बहुमतानें पासहि झाला प्रांतिक सरकारानीं मध्यवर्ती सरकारच्या योजनांशीं सहकार्य केलें नाहीं, तर रोड फंडातून त्यास द्यावयाची ग्रँट बंद करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें आपणाकडे राखून ठेवला आहे रोड फंडातील प्रत्येक पैचा विनियोग रस्त्याकडेचें होईल, असें आश्वासन सर फ्रँक नॉइस ह्यानीं असेंब्लीमधील वादविवादाचे वेळीं दिलें मात्र ह्या संबंधातील प्रांतांनीं आखलेल्या योजना नामंजूर करण्याचा हक्क हिंदुस्थान सरकारकडे रहावयाचा आहे अशा रीतीनें मोटारींची वहातूक नियंत्रित करण्याचें काम मध्यवर्ती सरकारनें आपणाकडे घेतलें आहे

---

### प्रांतिक सरकारांची कुचंबणा

रोड फंडाची मालकी हिंदुस्थान सरकारकडे असल्यानें त्या फंडाचा विनियोग सरकारास योग्य वाटेल त्याप्रमाणें करण्याचा त्यास अधिकार आहे, असें सरकारचे रोड इंजिनियर, मि. मिचेल, हे आपल्या भाषणात म्हणाले ह्या वाक्यांतच सरकारी धोरणाचें सर्व सार आहे. रेल्वेज आपल्या पायावर पुन. नीट उभ्या राहून त्या मध्यवर्ती बजेटास पोषक झाल्याखेरीज प्राप्तीवरील कराचा हिस्सा प्रांतिक सरकारांचे वाटणीस येणार नाहीं, ह्या भितीनें तरी सर्व प्रातास मध्यवर्ती सरकारशीं सहकार्य करावें लागेल, अशी विचारसरणी पुढें माडण्यात आली आहे प्रांतांतील दळणवळणाच्या सोयी-गैरसोयी न पहाता आणि मोटार वहातुकीच्या धद्याकडे लक्ष न देता केवळ रेल्वेजना पोषक होईल असेंच स्वार्थी धोरण हिंदुस्थान सरकारनें आखलें आहे प्रांतिक सरकारानीं ह्या योजनेस समति नाकारणें अशक्यच होतें रोडफंडाच्या मूळ हेतूस कलाटणी देऊन, मोटारींच्या वहातुकीवरील कराचा उपयोग, रेल्वेजना होणाऱ्या मोटार वहातुकीच्या स्पर्धेस आळा घालण्याकडे आता करण्यांत यावयाचा आहे. मोटारीचे धद्यात हितसबध असणारास सरकारचें हें धोरण निराशाजनक वाटेल ह्यांत सशय नाहीं

---

### टाटा कंपनी व बंगाल आयर्न कंपनी

बंगाल आयर्न, इंडियन आयर्न व टाटा ह्या तीन कंपन्याच्या एकत्रीकरणासंबंधीं वाटाघाटी गेल्या ऑगस्टमध्यें लडन येथें चालू होत्या आणि एक नवीन कंपनी काढण्याचे बाबतींत वरील कंपन्यांचें एकमतहि झालें होतें इंडियन आयर्न कंपनीनें मध्यंतरी बंगाल आयर्न कंपनी विकत घेतली टाटा व इंडियन आयर्न ह्यांच्या प्रतिनिधींमध्यें अखेर मतभेद होऊन वाटाघाटी फिसकटल्या इंडियन आयर्ननें हिरापूर येथें कारखाना काढण्याचें निश्चित केलें असून पैशाची व यत्रसामुग्रीची व्यवस्थाहि पुरी झाली आहे तयार होणाऱ्या मालास ग्रेटब्रिटनमध्यें व इतर देशात प्रचड मागणी असल्याकारणानें कपनीस भरभक्कम नफा होईल, अशी तिच्या चालकाची अपेक्षा आहे. टाटा कपनीनेंहि आपला कारखाना वाढविण्याचें ठरविलें आहे


बदाम तेल
व्यापारी भावाने खात्रीचें मिळेल
द. ना. हेजीब
किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी, २० शुक्रवार, पुणें.

वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक
आमचा इमारतीच्या बाधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.
" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यातील विशेष होय "
भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणे २

Fergusson College Rd. Poona 4. Phone No 513.
DECCAN TALKIES
*From Wed. 17th to Fri 19th*
RED HEADS ON PARADE
Actor—JOHN BOLES
*From Sat 20th to Tue 23rd*
IT HAPPENED ONE NIGHT
MATINEE on—Sat. & Sun at 4 P M

हंस पिक्चर्सचा ४ था
अद्वितीय बोलपट
धर्मवीर
मिनर्व्हा टॉकीजमध्यें पहा
लेखक : मि. अत्रे
—भूमिका—
बाबूराव पेंढारकर, विनायक,
रत्नप्रभा, इंदिरा वाडकर.

# शेतीचा धंदा कसा सुधारेल ?

## सहकारी चळवळीचें महत्त्व

### रिझर्व्ह बॅंकेचें कुचराईचें धोरण

**प्रो काळे ह्यांचें भाषण**

[ बहार आणि ओरिसा प्रांताच्या सहकारी परिषदेचें १९ वें अधिवेशन भागलपूर येथें ता १३ व १४ रोजीं प्रो. वा. गो काळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलें होतें अध्यक्षाचे भाषणातील महत्त्वाच्या मुद्यांचा साराश येथें दिला आहे ]

[ १ ] वेगवेगळ्या प्रांतांतील आर्थिक व सामाजिक परिस्थिति थोडीफार भिन्न असली, सहकारी चळवळीची रचना प्रत्येक प्रांतात किंचित वेगळी आढळली आणि चळवळीमधील प्रश्नाच्या स्वरूपात वैचित्र्य दिसलें, तरी प्रमुख आणि मुद्याच्या गोष्टींत व भासणाऱ्या अडचणींत, त्याचप्रमाणें सुचविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्येंहि बरेच साम्य आहे.

[२] हें साधर्म्य असणें स्वाभाविकच आहे. कारण, सरकारच्या पुरस्कारानेंच हिंदुस्थानात सहकारी चळवळीस आरंभ झालेला असून, प्रांतिक सरकारांनीं तिला बाल्यावस्थेंत सहाय व प्रोत्साहन दिलेलें आहे. ही चळवळ आपल्या पायावर लवकरच उभी राहील, अशी सर्वांची अपेक्षा होती.

[ ३ ] सहकारी चळवळीचा ज्या देशात प्रथम उगम होऊन प्रसार झाला, त्या देशात ही चळवळ सरकारच्या मदतीनें स्थापन झालेली नव्हती. ध्येयवादी लोकाच्या प्रयत्नामुळेंच चळवळीचीं बीजें रुजून तिचा वृक्ष तेथें फोंफावला गेला. ह्या कारणानें, तेथील संस्थाचे व्यवहारात एक प्रकारचा आत्मविश्वास दिसून येतो. शिक्षण व प्रचारकार्य ह्याचे द्वारा, सहकार हें एक केवळ ध्येय नसून तो व्यवहार आहे, ह्याची जाणीव त्या देशात सर्वांस करून देण्यात येते

[ ४ ] हिंदुस्थानात सहकारी चळवळ सरकारच्या पुरस्कारानें सुरू झाली, हा काहीं दोष समजण्याचें कारण नाहीं समाजातील गरजू व गरीब लोकास सहाय करण्याचें धोरण जगांतील सर्व देशात सरकारांनीं अंगीकारलेलें आहे तथापि, हिंदुस्थानामध्यें चळवळीचें सरकारावरील अवलंबन कायम राहिलें असून, लोकामध्यें सहकाराच्या तत्त्वाचा प्रसार झालेला नाहीं सहकारी संस्था ह्या आपल्या स्वत:च्याच संस्था असून त्याबाबत आपणास काहीं अधिकार तर आपलीं काहीं कर्तव्यें आहेत ह्याचीहि जाणीव सभासदास नाहीं. चळवळींत मोठ्या उत्साहानें भाग घेणाऱ्या पुढाऱ्याची व सरकारी अधिकाऱ्यांचीहि निराशा होऊन गेली आहे

[५] चळवळीच्या सुरवातीच्या काळात हे दोष फारसे जाणवले नाहींत. कर्ज देणारी संस्था, ह्याच दृष्टीनें सोसायटीकडे शेतकरी पहात असल्यानें अमर्याद जबाबदारीच्या तत्त्वाची जाणीव फारच थोड्यास होती. कर्जाचा विनियोग योग्य होतो किंवा नाहीं ह्याकडे दुर्लक्ष झालें, देखरेख व्यवस्थित झाली नाहीं व सोसायट्यांचे व्यवहार व शेतीच्या धंद्यातील तेजी-मंदी ह्यांचा मेळ राहिला नाहीं अर्बन सहकारी संस्थाची प्रगति मात्र चांगली झाली तथापि, एकदरीनें पहाता, चळवळीमधील दोषाचें वेळींच निराकरण झालें नाहीं व प्रवाहाबरोबर ती वहात गेली.

[६] मंदीचे बाजारभाव, शेतकऱ्याचीं कर्जें परत फेडण्याची अक्षमता, इत्यादि कारणामुळें थकबाक्या वाढत जाऊन त्याची झळ मध्यवर्ति बॅंकासहि लागली व त्यास आपला गुंतलेला पैसा परत मिळवणें अशक्य झालें सामान्य लोकास सहकारी चळवळीविषयीं पहिल्यापासूनच सहानुभूति वाटत नव्हती, परतु आतां कित्येक सहकारी कार्यकर्त्यांचीहि निराशा झाली आहे आणि प्रांतिक सरकारासहि मार्ग सुचेनासा झाला आहे

[ ७ ] हें काहींहि असलें, तरी शेतकऱ्याची उन्नति होण्यास सहकाराखेरीज दुसरें कोणतेंहि साधन नाहीं, असें माझें ठाम मत आहे ह्याबाबत शेतकी कमिशननें प्रकट केलेला अभिप्राय आजच्या परिस्थितींतहि योग्य व उचित, असाच वाटेल. अडाणी व अशिक्षित शेतकऱ्यास दलालाचे व सावकाराचे तावडींत देऊन, त्यास आर्थिक संकटाशीं टक्कर देण्यास मोकळा सोडणें निष्ठुरपणाचें होईल उलट, त्याबाबतची सर्व जबाबदारी स्वत:वर घेणें हीहि गोष्ट सरकारचे दृष्टीनें अव्यवहार्यच ठरेल सहकारी चळवळच फक्त शेतीच्या धंद्यास व्यवस्थित स्वरूप देऊ शकेल प्रांतिक सरकारांनीं ह्या चळवळींत सुधारणा करण्याची शिकस्त चालविली आहे परंतु त्यांचा उत्साह व चळवळीवरील विश्वास हीं मात्र नाहींशीं झालीं आहेत सोशलिस्ट व फॅसिस्ट देशात सहकारी चळवळीस योग्य तें स्थान देण्यात आलेलें आहे व भांडवलशाहींत ही चळवळ आपल्या प्रतिस्पर्ध्यास उत्कृष्ट रीतीनें तोंड देत आहे

( ८ ) गेल्या काहीं वर्षांच्या मंदींतून सहकारी चळवळ अपेक्षेपेक्षा चागल्या तऱ्हेनें तग धरून राहिली, ही गोष्ट नाकारता येणार नाहीं तथापि, प्रांतिक सरकारांनीं ह्या चळवळीकरिता जास्त पैसा खर्च केला पाहिजे सहकारी खात्याचें काम वाढत असून तें करण्यास माणसें कमीं पडत आहेत. खात्याचे निर्णय होण्यास वेळ लागतो, सुधारणा होण्यास विलंब होतो आणि चळवळीच्या वाढीकडे त्यास लक्ष देण्यास फुरसत होत नाहीं बिनसरकारी सहकारी संस्थाचीहि हीच तक्रार आहे सहकारी रजिस्ट्राराचा चळवळीवर विश्वास पाहिजे व बिनसरकारी कार्यकर्त्यांना त्यानीं प्रोत्साहन दिलें पाहिजे.

[ ९ ] वर दाखवून दिलेल्या गोष्टींच्या अनुरोधानेंच पुढें पाऊल टाकलें पाहिजे ओरिसा बहारपासून आता अलग होत असल्यानें, सहकारी चळवळीचा आढावा घेऊन पुढील धोरण आखण्यास ही रुचि उत्कृष्ट आहे

[ १० ] सहकारी सोसायट्यांची थकलेली बाकी वसूल कशी करावी व त्यास भक्कम पायावर पुन: कसें उभें करावें, हा बिकट प्रश्न सर्वच प्रांतात उपस्थित झाला आहे. व्याजामध्यें योग्य ती सवलत व माफी आणि जरूर तेथें कायदेशीर इलाज हा एकच मार्ग आता शिलक आहे मुदतीचीं कर्जें अडकून गेल्यामुळें कठिण परिस्थिति निर्माण झाली आहे अगदींच निकृष्टावस्थेस सोसायटी पोचली नसेल, तर ती चालू ठेवून चागल्या सभासदास सहाय केलें पाहिजे नवीन कर्जें देतांना दक्षता बाळगली पाहिजे आणि ह्या बाबतींत मध्यवर्ती बॅंका, प्रांतिक बॅंक व सहकारी खातें यानीं सहकार्यानें चाललें पाहिजे

( ११ ) शेतकऱ्यास दिलेला पैसा दीर्घ काळ अडकून बसणारा असला तरी तो पुरविणाऱ्या संस्थाच्या ठेवी मात्र अल्प मुदतीच्या आहेत. सहकारी चळवळीकरिता लाब मुदतीच्या ठेवी

मिळविणें जरूर आहे बहुतेक सर्व प्रातांतून अगीकारलेलें, सहकारी चळवळ सुधारण्याचें व तिच्यामधील दोष नाहींसे करण्याचें, धोरण योग्य असलें तरी प्रगति न करणें म्हणजे मागे जाण्याप्रमाणेंच आहे. ग्रामसुधारणा व ग्रामोन्नति ह्यांस सहकारी तत्त्वाची व पायाची जोड दिली, तर प्रगति जास्त झपाट्यानें होईल. शेतीच्या मालाचा उठाव व त्यास लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा सहकारी तत्त्वावर होणें अगत्याचें आहे मध्यवर्ती सरकारनें दिलेल्या ग्रँटचा विनियोग अशा प्रकारच्या योजनांचे पुरस्काराकरिता होणें इष्ट आहे.

[ १२ ] लवकरच अमलात येणाऱ्या प्रांतिक स्वायत्ततेमुळें लोकांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा घडून येईल ही अपेक्षा व्यर्थ आहे. जकाती, व्यापार, चलन, इत्यादि महत्त्वाच्या बाबी मध्यवर्ती सरकारचे कक्षेंत येत असल्यानें प्रांतिक सरकारास आपलें स्वत.चें धोरण प्रभावी करता येणार नाहीं. नैसर्गिक अडचणी आणि मध्यवर्ती सरकारच्या धोरणामुळें उत्पन्न होणारी आर्थिक परिस्थिति, यांच्या कक्षेंतच त्यास कार्य करावें लागेल. देशाची सर्वसाधारण आर्थिक प्रगति झाल्यासेरीज प्रांतिक सरकारांच्या प्रयत्नास फारसें यश येणार नाहीं. मध्यवर्ती सरकारनें, जगातील इतर राष्ट्रीय सरकाराप्रमाणें, देशातील आर्थिक व सामाजिक रचनेची घडी नीट बसविण्याचा मुद्दाम प्रयत्न केला पाहिजे

[ १३ ] रिझर्व्ह बँकेनें शेतीच्या प्रश्नासंबंधानें आपला रिपोर्ट सरकारास नुकताच सादर केला आहे. रिझर्व्ह बँकेचे पैसे दीर्घकालीन कर्जांत न गुंतता ते खेळते रहाणें आवश्यक आहे, आणि ह्याकरिता विश्वासार्ह बँका व बँकर्स ह्याचेशींच फक्त व्यवहार करणें तिला शक्य आहे, शेतीच्या धंद्यास वरील अटी पाळता येणें कठिण असल्यानें सदरहु धंदा रिझर्व्ह बँकेकडून मदत मिळण्यास लायक होईपर्यंत बँकेस काहीं करतां येणार नाहीं, असा तिच्या रिपोर्टाचा सारांश आहे शेतीच्या धंद्याची पत वाढविण्याचें काम ओघानेंच प्रांतिक सरकाराकडे येतें

[ १४ ] रिझर्व्ह बँकेनें आपली भूमिका स्पष्ट केली, हें ठीक झालें परंतु तिला ह्यापेक्षा ज्यास्त सहायकारक धोरण स्वीकारतां येणें शक्य होतें शेतीच्या धंद्याबाबत बँकेनें एक स्वतंत्र विभाग स्थापन करावा, अशी कायद्यानें तरतूद केलेली असल्यामुळें ह्या प्रश्नाकडे बँक सहानुभूतीनें पाहील व निश्चित योजना आंखून देऊन आपणास काय मदत करता येईल तें स्पष्ट करील अशी अपेक्षा होती, ती मात्र फोल ठरली आहे आपल्या कार्याविषयीं व जबाबदारीविषयीं बँकेनें अत्यंत आकुंचित कल्पना करून घेतली आहे, असें म्हणणें भाग पडतें

( १५ ) आर्थिक मर्दीतून शेतकऱ्यास बाहेर काढण्याची, रिझर्व्ह बँक आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यावर विशेष प्रकारची जबाबदारी आहे बँकेनें आपल्या रिपोर्टांत फक्त प्रांतिक सरकारासच सूचना केलेल्या आहेत, मध्यवर्ती सरकारशी ह्यासंबंधीं तिनें विचारविनिमय केलेला दिसत नाहीं. सहकारी संस्था व्यवस्थित रीतीनें आपल्या पायावर उभ्या राहिल्यासेरीज रिझर्व्ह बँक मदत देण्यास तयार नाहीं आणि खेडेगावाच्या सुधारणेकरता ग्रँट दिल्यावर आपलें कर्तव्य आता संपलें, असें म्हणून मध्यवर्ती सरकार स्वस्थ बसणार तेव्हा रिझर्व्ह बँकेच्या अटी शेतकऱ्यास पार पाडता येण्यास किती काळ लागणार, कोणास माहीत! तोपर्यंत, रिझर्व्ह बँकेचा शेतीच्या धंद्यास काहींच उपयोग होणार नाहीं, असाच बँकेच्या रिपोर्टाचा अर्थ होत नाहीं काय ?

[ १६ ] सहकाराच्या तत्त्वानुसार आपली चळवळ चालविणें, हा एकच मार्ग माझ्या मतें आता शिल्लक आहे. आपलें स्वत.चें सामर्थ्य वाढवून परावलंबन थांबविलें पाहिजे. ग्रामसुधारणा व समाजसेवा ह्याबाबतच्या सध्याच्या अनुकूल वातावरणाचा फायदा घेऊन सहकारी चळवळीचा पाया दृढ केला पाहिजे. ह्याकरिता अनेक कार्यकर्त्यांची जरूरी आहे व ते आपण होऊन पुढें येतील अशी आशा आहे.

[ १७ ] सहकारी संस्थाची व्यवस्था लोकांच्या हातीं असावी व त्या बाबतची सर्व जबाबदारी त्यानीं पत्करावी, सरकारनें फक्त लोकहिताचे दृष्टीनें, कायद्यानें सांगितल्याप्रमाणें सर्वसाधारण देखरेख ठेवावी हें ध्येय आज शिल्लक राहिलेलें नाहीं. आपल्या संस्थांची स्वतः व्यवस्था पहाण्याची सहकारी कार्यकर्त्यांची मागणी अगदीं रास्त आहे, परंतु सहकारी संस्थानींच प्रथम आपला कारभार सुधारून आपल्या मागण्या मान्य करावयास सरकारांस भाग पाडलें पाहिजे. नालायक व गचाळ बिनसरकारी सहकारी संस्थाचा देखावा कायम ठेवण्यात हशिल नाहीं.

[ १८ ] आपण इतर देशातील सहकारी तत्त्वाचा अंगीकार केला असला तरी त्याचें मर्म जाणून त्याप्रमाणें व्यवहार करण्यास मात्र आपण शिकलों नाहीं. शिक्षण व प्रचार ह्याचें महत्त्व अजून आपणास पटलेलें नाहीं ग्रामसुधारणेच्या कार्यांत ह्या गोष्टींची नड भासेल. अशिक्षित व नालायक नोकरवर्ग आणि गैरशिस्त व्यवस्था, ह्याचे दुष्परिणाम सहकारी संस्थानीं ओळखून ते टाळण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

[ १९ ] बहारमधील सहकारी चळवळीमध्यें वरपासून खालपर्यंत निराशामय परिस्थिति दिसून येते. प्रगति अजिबात खुटली असून प्राथमिक सोसायट्या आणि प्रांतिक व मध्यवर्ती बँका सर्वच अडचणींत सापडल्या आहेत बिनसरकारी कार्यकर्त्यांत उत्साह राहिलेला नाहीं. ह्या कठिण परिस्थितींतून मार्ग काढण्यास सर्वांनीं सहकार्यानें प्रयत्न केले पाहिजेत

## खरे कुलांतील मंडळींना जाहीर विनंति

काहीं दिवसापूर्वीं पुण्यातील खरे मंडळींनीं एकत्र जमून परगांवच्या कित्येक खरे मंडळींच्या अनुमतीनें "खरे कुलवृत्तात मंडळ" स्थापन केलें आहे सध्या या मंडळाचा उद्देश खरे घराण्याची प्राचीन व अर्वाचीन माहिती एकत्र करणें एवढाच असून त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू आहे खरे कुलांतील अनेक लोक शारङ्पाणी, धोपावकर, दीक्षित, पुराणीक, खानदेशे, स्वयंपाकी वगैरे उपनामानीं ओळखले जातात. अशा कित्येक मंडळींना व्यक्तिशः भेटून व पत्रें पाठवून माहिती जमविण्याचा प्रयत्न चालू आहे. पण सर्वांचेच बाबतींत असें करणें शक्य नसल्यानें या विनंतिपत्रकाचे द्वारें सर्वांस जाहीर विनंति कीं, खरे किंवा खरे कुलांतील पण इतर उपनामें धारण करणाऱ्या सर्व मंडळींनीं व खरे घराण्याची हकीकत ठाऊक असणाऱ्या इतर मंडळींनीं त्यांना जी माहिती असेल ती, वंशावळ जुन्या कागदपत्राच्या नकलांसह खालील पत्त्यावर पाठवून देण्याची कृपा करावी कार्याचें महत्त्व जाणून शक्य असेल त्यानीं शक्त्यनुसार आर्थिक मदत करावी अशी विनंति आहे.

नारायण माधवराव खरे,
कार्यवाह-खरे कुलवृत्तात मंडळ,
३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर.

## कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

१९३२-३३ ते १९३५-३६ अखेर ब्रॉडकास्टिंगवर हिंदुस्थान सरकारनें एकूण १५½ लक्ष रुपये खर्च केले. ऑगस्ट १९३५ पर्यंत फक्त एकच इंग्रज अधिकारी ह्या खात्यांत होता, आतां चार आहेत.

* * *

मद्रास ॲन्ड सदर्न मराठा रेल्वेशीं झालेल्या सरकारी कराराची मुदत १९२८ अखेर पुरी होणार आहे, तथापि ती आणखी आठ वर्षांनीं वाढविण्यांत आली आहे.

* * *

एका प्रांतांत नोंदण्यांत आलेल्या मोटारी दुसऱ्या प्रांतांत जातात, त्या वेळीं त्यांवरील करांचे आकारणीसंबंधानें प्रश्न उपस्थित होतो. ह्या बाबतींत निश्चित नियम करण्याचें काम सरकार लवकरच हातीं घेणार आहे.

* * *

सध्या व्यापार व उद्योगधंदे ह्यांस थोडीशी तेजी असल्याकारणानें मालाच्या वहातुकीस रेल्वे वॅगन्सचा तुटवडा पडत आहे. वॅगन्सची संख्या वाढविण्याचा सरकार विचार करीत आहे.

* * *

कल्याण येथील पॉवर हाउसमध्यें वीज उत्पन्न करण्यास प्रत्येक यूनिटमागें अर्ध्या आण्यापेक्षां थोडासा जास्त खर्च येतो. सध्याच्या यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानें, भांडवली खर्च विशेष न वाढतां जास्त वीज उत्पन्न करणें शक्य आहे. मुंबई व त्या शहराचीं उपनगरें ह्यांमध्यें जी. आय. पी. व बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वे ह्यांस लागणारी वीज (सुमारें १० कोटि यूनिट्स) टाटाच्या कंपन्यांकडून विकत घेण्यांत येते. जी. आय. पी. रेल्वेची एकटीचीच मागणी ७ कोटि यूनिटसची आहे, ती कल्याण पॉवर हाउसमधून पुरविण्याची योजना सरकारपुढें आहे.

* * *

लोखंडाचे व पोलादाचे धंद्यास दिलेल्या संरक्षणाची मुदत १९४१ अखेर संपते, त्यापूर्वीं टारिफ बोर्ड नेमण्यांत येऊन ह्या धंद्याविषयीं चौकशी करण्यांत येईल.

* * *

विचारलेल्या प्रश्नास उत्तर देण्यास प्रत्येकी ७५ रुपये खर्च येतो. असेंब्लीच्या गेल्या ऑगस्टमधील बैठकींत एका सभासदानें ३९५ प्रश्न विचारले.

* * *

तुंगभद्रा नदी म्हैसूर व हैद्राबाद संस्थानें आणि मद्रास इलाखा ह्या तिघांच्या हद्दींतून वहात जाऊन कृष्णेस मिळते. ह्या नदीच्या पाण्याचे वांटणीविषयीं मद्रास व म्हैसूर सरकारांमधील वांधा मिटला असून, हैद्राबाद संस्थानाचा त्याबाबत कांहीं विरोध आहे काय, ह्याविषयीं विचारणा करण्यांत आली आहे.

* * *

रेल्वे चौकशी कमिटीवर एकहि हिंदी तज्ज्ञ नेमण्यांत आला नाहीं ह्याबद्दल लोकनियुक्त सभासदांनीं असेंब्लींत असंतोष व्यक्त केला. ह्या कमिटीवर सरकारचा २,१८,००० रुपये खर्च होणार आहे.

* * *


### नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ७७,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७५८ |
| इतर फंड | ९०२ |
| मुदतबंद ठेवी | १,५२,७०८ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ४,२८४ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,५१,२१५ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रकम | ४०,७७३ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचें तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्.

**फाळणा** दरसाल हलं नये म्हणून आमचें **इच्छा गर्भ संभव** औषध घ्या व **संततिनियमन करा.** औषध बंद केलें कीं, मुलें होतात. महिन्यांतून एकदांच घ्यावें लागतें. वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु. ५. ट. ख. नि.

गद्रे फिजीशिअन, खांडवा सी. पी.

भिडे यांचे लोखंडी नांगर

कॅटलॉग मागवा



भिडे आणि सन्स सांगली

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल

लॅकटूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

## रिझर्व्ह बँकेची दुसरी वार्षिक सभा

### बँकेच्या व्यवहारासंबंधीं खुलासा

रिझर्व्ह बँकेच्या भागीदारांची दुसरी वार्षिक सभा मुंबई येथें कावसजी जहांगीर हॉलमध्यें गेल्या आठवड्यांत भरली होती. बँकेचे डेप्युटी गव्हर्नर, सर जेम्स टेलर, हे अध्यक्षस्थानीं होते. बँकेचा अहवाल आणि हिशेब सादर करतांना ते आपल्या भाषणांत म्हणाले,

### सर जेम्स टेलर ह्यांचें भाषण

" गेल्या ऑक्टोबरमध्यें, लंडन येथें बँकेची शाखा स्थापन झाली व तिचें मामुली काम १ एप्रिल, १९३६ रोजीं सुरू झालें त्याबाबत बँकेस थोडा खर्च आला. स्वतःच्या इमारती बांधण्याचें बँकेनें धोरण स्वीकारल्यामुळें घसाऱ्याचे रकमेंतहि वाढ दिसून येते बँकेच्या नोटांचे विभागापैकी, ब्रिटिश पौंडातील रोख्यांच्या परतफेडीची मुदत पांच वर्षांपेक्षा दीर्घ असतां कामा नये, हा निर्बंध येत्या एप्रिलपासून अमलांत यावयाचा आहे. हिंदी रोख्यांचे बाबतींत अशा तऱ्हेचा नियम घालून दिलेला नसला, तरी सदरहु निर्बंधाचे मुळाशीं असलेला हेतु ओळखूनच बँकेस वागावें लागेल. अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजाचे दर वर्षभर अत्यंत पडीचे राहिले, त्याचा बँकेच्या नफ्यावर थोडाबहुत परिणाम झाला. आतां हिंदी व्यापार व उद्योगधंदे पुनः तेजींत येऊ लागले असून चलनास मागणी वाढत आहे किंमतींत वाढ झाली, म्हणजे शेतकऱ्यास आपल्या धान्याचे मोबदला जास्त जिनसा घेतां येतील. अर्थात् युद्धाच्या पूर्व तयारीच्या मागणीमुळें कांहीं उद्योगधंद्यांची जी चलती होत आहे, ती आर्थिक क्षेत्राचे बाहेरची समजली पाहिजे

खेडेगांवांतील शेतकरी व श्रॉफ ह्यांस रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत आणण्यास बँकांच्या शाखांची संख्यावाढ अत्यंत उपयोगी पडेल. बँकिंगच्या धंद्याचें शिक्षण घेतलेल्या लोकांची सहकारी चळवळींतहि अवश्यकता आहे व्यापारी पद्धतीनें हिशेब ठेवण्याची शिस्त सहकारी संस्थांस लागली पाहिजे. बँकेच्या शाखांत कितीहि वाढ झाली, तरी सावकारांचा व त्यांचा संबंध जोडला गेल्याखेरीज खेडेगांवांची बँकिंगची नड भागणार नाहीं. "

बँकेच्या हिशेबतपासनीसांचे जागीं तीन फर्म्सची नेमणूक करण्यात आली आणि प्रत्येकीस तीन हजार रुपये देण्याचें ठरलें गेल्या वर्षीच्या एका युरोपियन फर्मचे ऐवजीं श्री पी के घोष ह्यांस नेमण्यांत आले बाकीचे दोन हिशेबतपासनीस कायम ठेवण्यांत आले

### इंडियन इंडस्ट्रियल ट्रस्ट, लि.

वरील कंपनीस, ३१ डिसेंबर १९३६ अखेर संपलेल्या वर्षी एकूण २ लक्ष ८७ हजार रुपये नफा झाला. मागील वर्षातील नफ्यापैकीं त्यात ५८३ हजार रुपये मिळवले, म्हणजे एकूण ३ लक्ष ४५३ हजार रुपये होतात. ह्यापैकीं, भागीदारांस ४ टके दरानें कर भरलेलें डिव्हिडंड देण्याकरितां २ लक्ष रुपयाचा विनियोग करण्यांत यावा अशी बोर्डाची शिफारस आहे. डिव्हिडंड ईकलायझेशन फंडात ५० हजार व रिझर्व्हमध्यें ५३ हजार रुपये टाकावेत, अशी बोर्डाची सूचना आहे.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

दि गुड-वुईल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

मुंबईचे २५ वर्षांचे अनुभवी
टेलर्स रिसवूड ब्रदर्स
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे थंडी-
गिरगांव, मुंबई करतां

## सहकारी चळवळ

### विणकऱ्यांच्या धंद्यास सरकारी सहाय

मालेगाव, येवलें आणि भिवंडी येथें प्रत्येकी एक विणकऱ्याची सहकारी सोसायटी स्थापन करण्यास मुंबई सरकारनें मंजुरी दिली आहे व्यक्तिशः विणकर, त्याचेबद्दल सहानुभूति बाळगणारे सहायक व विणकऱ्याच्या सहकारी सोसायट्या नवीन संस्थाचे सभासद होऊं शकतील त्याच्या व्यवस्थापक मंडळात मार्केटिंग ऑफिसर, असिस्टंट रजिस्ट्रार आणि उद्योग खात्याचे वीव्हिंग असिस्टंट हे अधिकारपरत्वें असतील. हतेबंदीनें अगर अन्य मार्गानें विणकऱ्यास सुधारलेली यंत्रसामुग्री पुरवणें, योग्य भावानें कच्चा माल मिळवून देणें, नवीन तऱ्हा व डिझाइन्स ह्यांविषयीं सल्ला देणें, मालाची आकर्षकता वाढविणें व त्यास रंग देणें, विणकऱ्याच्या मालाचा उठाव करण्यास सहाय करणें, इत्यादि ह्या सोसायट्यांचे उद्देश आहेत. प्रत्येक सोसायटीमार्फत एक दुकान चालविण्यात येईल. हिंदुस्थान सरकारच्या ग्रॅन्टमधून तीन्ही सोसायट्यास दरसाल दोन हजार रुपये, ह्याप्रमाणें तीन वर्षें मदत देण्यांत येणार आहे

---

### अहमदनगर सेंट्रल को इन्स्टिट्यूट

वरील शाखेचा १९३४-३५ व १९३५-३६ चा अहवाल आमचेकडे आला आहे ३०-६-३६ रोजीं १६० सोसायट्या आणि ५९ व्यक्ती मिळून २१९ सभासद शाखेचे पटावर होते व्यक्तिशः सभासदांपैकीं १७ सभासदांची वर्गणी बऱ्याच वर्षांची थकलेली आहे, परंतु वसूल होत नाहीं, अशी अहवालांत नोंद आहे १९३५-३६ सालीं वार्षिक सभा न झाल्यानें मागील वर्षातील कमिटीच चालू होती ११-८-३५ रोजीं नगर जिल्ह्यातील सहकारी चळवळींमधील कार्यकर्त्यांची परिषद शाखेतर्फे भरविण्यात आली होती कॅनॉल सोसायट्याच्या परिषदेचें पुढील कार्य तडीस नेण्यास गेल्या सालीं शाखेनें उत्कृष्ट सहाय केलें ९-९-३५ ते २०-१०-३५ अखेर सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास भरविण्यात आला. नवीन शेतकी पतपेढ्या व नॉनक्रेडिट सोसायट्या स्थापण्याचा प्रयत्न, पत्रकाचे द्वारा प्रसिद्धी, डिबेटिंग क्लब, इत्यादि कामगिरीचा निर्देश अहवालात करण्यात आला आहे.

### रत्नागिरी सेंट्रल को इन्स्टिट्यूट

वर्ष अखेर ह्या शाखेचे तक्त्यावर ६५ सोसायट्या व २८ व्यक्ती मिळून एकूण ९३ सभासद होते १९३५-३६ सालीं ३ अर्बन बँका, ३ तालुका डे. असोसिएशन्स व वेंगुर्लें मच्छिमार सोसायटी अशा ७ संस्था नवीन रजिस्टर झाल्या व जुन्यापैकीं एकहि रद्द झाली नाहीं. रत्नागिरी ता. आवेविक्री सहकारी मंडळी, फणसोप शेतीसुधारणा मंडळी व जाभारी विणकर सहकारी मंडळी ह्याच्या स्थापनेचे प्रयत्न चालू आहेत प्रचारकानीं एकूण ५१ मंडळ्यास भेट दिली जिल्ह्यातील सहकारी मंडळ्याची संख्या वाढली नसली तरी त्याचे सभासदांचे सख्येंत, खेळत्या भांडवलात व स्वत:च्या मालकीचे भांडवलात प्रगति होत आहे. मात्र, थकबाकीहि वाढत आहे शेतकऱ्याचें बाहेरून येणारें उत्पन्न कमी होत आहे व खर्च मात्र वाढत आहे आणि शेतकी पतपेढ्यांची व्यवस्था असावी तितकी चोख रहात नाहीं अर्बन पतपेढ्याचें काम सुरळीत चालूं आहे. बँकाच्या अडचणींचें निराकरण करून त्याची उपयुक्तता वाढविण्याचा प्रयत्न जिल्हा इन्स्टिट्यूट करीत आहे. संस्थेच्या उत्पन्नाच्या मानानें तिची कामगिरी भरीव आहे, हें अहवालावरून तात्काळ लक्षात येईल. शाखा इन्स्टिट्यूटच्या चालकाचें, संस्थेच्या यशाबद्दल अभिनंदन करणें जरूर आहे

---


### कळवण-चांदवड ( जि. नाशिक ) सहकारी वृत्त

ता २०-१-३७ रोजीं तहकूब झालेली कळवण-चांदवड तालुका को. सुपरवायझिंग यूनियनची विशेष साधारण सभा ता. १-२-३७ रोजीं भरली त्यात मुख्यतः खालील कामें झालीं.

१ अस्तित्वात येणाऱ्या डिस्ट्रिक्ट सुपरवायझिंग यूनियन बोर्डास ही युनिअन जोडावी

२ जुन्या पोटनियमाऐवजीं नवीन हस्तपत्रक एफ एफ मधील पोटनियम खात्याकडील सूचनेप्रमाणें फेरविचारासह स्वीकारण्यात आलें


फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु. १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॅकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च ( किंवा ) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पाच वर्षे गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी, पोस्ट बॉक्स नं. १२२०४, कलकत्ता (२४)

ओव्हरकोट खरेदी करा

किंमत रु. १२॥

बुधवार चौक, पुणें

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९–१४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०७—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८–१० |
| ४% १९६०–७० ... ... | ११३–१२ |
| ४% १९४३ ... .. ... | ११०—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६—७ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०५–१२ |
| ३½% १९४८–५२ ... ... | ९९–१४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११२—० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—४ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १४०—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५–१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३३—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| धोंड–बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९२०–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५२–१३ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २७०—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६¾% ) | १५१७—८ |
| टाटा पॉवर ( १,००० रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १६०९—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु प्रेफरन्स, १७ रु. ८ आ.) | १७९—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. रु ६) | २९०—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु डिफर्ड रु ७ आ ८ ) | १३२७—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळ्यास | ३५—३–३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यांस | ५०—५–० |


## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

म्यानेजिंग एजंटस्.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००

खपलेलें भांडवल : २,१०,७००

रोख भरलेले भांडवल : १,०५,०९०

दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यावरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम् व्ही. गोखले,
मॅनेजर

स्थापना १९२०



मुंबई सरकारने व कोल्हापूर सरकारनें प्रथम मान्य केलेले

## जाधव टेलरिंग कॉलेज

नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा. माहिती मागवा [ ४९७ बुधवार, पुणें २

## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा—

स्वदेशप्रेमी लोकानीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे जनतेची सेवा करणे हेच आमचें ध्येय आहे वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

(ESTD 1907)

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Offices* throughout India & the East

S. C MAJUMDAR, MANAGER Bombay Branch | N. SARKAR, *General Manager*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं

असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि पुणें) | १६ अकलूज (जि सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १७ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | १८ धुळें („ प खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | ११ दौंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | १० शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २१ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २२ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २३ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २४ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २५ तळोदे („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २६ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २७ सटाणा („ „) |
| १३ भिवंडी („ ठाणें) | २८ कळवण („ „) |
| १४ पालघर („ „) | २९ दोहद („ पचमहाल) |
| १५ कल्याण („ „) | ३० कालोल („ „) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**पायोनियर डाइंग हाऊस पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**S. B. JOSHI & Co.**
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA

# पैसे मिळविण्याचा सोपा उपाय !

# रु. १५००० मिळवा

१८

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

न १

उत्तरें पाठविण्याची शेवटची तारीख २८।२।१९३७

**प्रत्येकीं प्रवेश फी रु. १-०-०**

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

न २

३६

( १ ) बँकेंत ठेवलेल्या सीलबद उत्तराशीं तंतोतत जुळणाऱ्या बिनचूक उत्तरवाल्यास रु. १३,५०० वाटण्यात येतील.
( २ ) उत्तरें कमीजास्त प्रमाणांत आल्यास बक्षिसें सारखीं वांटण्यात येतील.
( ३ ) परतु रु ५०० ची रक्कम प्रत्येक बिनचूक उत्तरवाल्यास देण्याची हमी घेतों.
( ४ ) ता. ७ ते १५ फेब्रुवारी १९३७ च्या आत सर्वांत जास्तींत जास्त उत्तरें पाठविणारास रु १००० आणि रु ५०० स्पेशल बक्षीस देण्यात येईल.
( ५ ) उमेदवारानें १ व २ चौकटींत १ ते २४ पर्यंतचे आंकडे वापरावेत. न. १ व २ चौकटींतील बेरीज उभी, आडवी व तिरपी कशी केली तरी अनुक्रमें १८ व ३६ भरावी
( ६ ) एक आंकडा दोनदा वापरला जाऊं नये.
( ७ ) प्रत्येक चौकटीला प्रवेश फी रु १ वाटेल तितकीं उत्तरें साध्या कागदावर लिहून प्रवेश फी म. ऑ. नें किवा इंडियन पोस्टल ऑर्डरनें पाठवावी म ऑ ची पावती उत्तरासोबत पाठवावी.
( ८ ) उमेदवारानें २५ व १२ उत्तरें अनुक्रमें रु २० रु व १० भरून पाठवावींत.
( ९ ) बक्षिसें उत्तरें येण्यावर अवलबून राहतील निकाल १० दिवसात लागेल जे एक आण्याचें पोस्टाचें तिकिट पाठवतील त्याना घरपोंच निकाल कळविण्यांत येईल.
( १० ) मॅनेजरचा निकाल शेवटचा व कायदेशीर बंधनकारक समजला जाईल.

**प्रवेश फी व उत्तरें खालील पत्त्यावर पाठवावीं:—**

**दि मॅनेजर—इंडियन ट्रेडिंग कंपनी**

गवुजीस चाळ, मसजीद बंदर रोड,
मुंबई नं ३

[illegible] पत्र पुणें, पेठ भांबुडा घ. न १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास.' भांबुर्डा, घ नं १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २४ फेब्रुवारी, १९३७. अंक ८

एशियन पॉलिसी

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

व्यापारी-उद्यमी लोकास
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning Pigmy & Monthly Income Deposit Schemes"

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२१ सदाशिव पेठ

वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक
आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात
" गिलाद्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यातील विशेष होय "
भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

# विविध माहिती

### मद्रास शहरांत सिनेमा फलकावर कर!

मद्रास कॉर्पोरेशननें आपल्या हद्दीमधील सिनेमा फलकावर कर बसविण्याचा विचार चालविला आहे. मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडियाच्या कार्यकारी मंडळानें ह्याबाबत एक ठराव पास करून कॉर्पोरेशननें हा विचार सोडून द्यावा, असें सुचविलें आहे.

### मुंबई शहरांतील शिक्षणप्रसार

गेल्या ३० वर्षांत मुंबईच्या म्युनिसिपल शाळांतील मुलांची संख्या ८½ हजारांची ७७ हजार झाली आहे आणि खर्च १¾ लक्षांपासून ३२ लाखांवर गेला आहे प्रत्येक विद्यार्थ्यामागें सरासरीनें दरसाल ४९ रुपये खर्च येतो शहरांतील दोन मागसलेल्या वार्डांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें केलें आहे.

### राष्ट्रसंघाच्या प्रतिनिधीचें आगमन

राष्ट्रसंघाच्या अफूविषयक व सामाजिक विभागाचे संचालक डॉ एक्स्ट्राड हे हिंदुस्थानास लवकरच भेट देणार आहेत मुंबई येथें ता. ११ ते १३ मार्च अखेर,त्यांचा मुक्काम आहे.

### २४ तासांत २२ इंच पाऊस

मुंबई शहरांत एका दिवशीं सर्वांत ज्यास्त पाऊस पडल्याची नोंद सप्टेंबर १९३० सालीं झाली त्या महिन्यातील एका दिवसाच्या २४ तासात २२ इंच पाऊस पडला

### सोन्या-चांदीच्या उत्पादन हक्कावद्दल २६ लक्ष रुपये

म्हैसूर सरकारास १९३५-३६ सालीं, सोनें व चांदी ह्यांच्या उत्पादनाच्या हक्काचे वार्षिक करापासून २६ लक्ष रुपये मिळाले.

### अहमदाबाद येथील ४० गिरण्यांत रात्रपाळी

अहमदाबाद येथील कपास कापडाच्या गिरण्याचे मालास भरपूर मागणी येत आहे ४० गिरण्यात रात्रपाळी चालू आहे व उत्पादन वाढत आहे.

### आफ्रिकेंतील स्थानिकांस बोलावणें नाहीं

ग्रेटब्रिटनच्या आफ्रिकेंतील साम्राज्यामधील स्थानिक संस्थानिकास राज्यारोहणाचे समारंभाकरिता बोलावण्यांत आलेलें नाहीं दक्षिण आफ्रिकेच्या सरकारचा अशा बोलावण्यास विरोध आहे, असें म्हणतात

### परदेशांतून ग्रेटब्रिटनमध्यें येणारे पाहुणे

इतर देशांमधून ग्रेटब्रिटनमध्यें येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत आहे १९३६ सालीं मजेनें प्रवास करणाराची संख्या १९३५ सालापेक्षा ४० हजारांनीं वाढून ती २,६७,३०५ इतकी भरली कामानिमित्त १,०२,३६९ प्रवासी आले ब्रिटिश पासपोर्टानें इतर ठिकाणाहून येणारे व फ्रान्स व बेलजम ह्या देशातून दर आठवड्यास उतरणारे प्रवासी वरील आकड्यात समाविष्ट नाहींत.

### दक्षिण आफ्रिकेंतील खाणींत कामगाराचा तुटवडा?

दक्षिण आफ्रिकेमधील सोन्याच्या खाणींत सध्यां ३० हजार युरोपियन व ३ लक्ष तद्देशीय लोक कामावर आहेत. नवीन १५ खाणींचें खोदकाम चालू असून त्याकरितां येत्या वर्षी आणखी १० हजार युरोपियन व १ लक्ष तद्देशीय लोकांची जरूरी भासेल, असा अदाज आहे

### मुंबई पोर्ट ट्रस्ट

मुंबई पोर्ट ट्रस्टला येत्या (१९३७-३८) वर्षी २ कोटी ६३¾ लक्ष रुपये उत्पन्न मिळेल, त्यातून २ कोटि ५७ लक्ष रुपये खर्च होऊन ६¾ लक्ष रुपयाचा वाढावा राहील अशी अपेक्षा आहे.

### चहाच्या निर्गतीवरील पट्टी वाढली

हिंदुस्थानांतून निर्गत होणाऱ्या चहावरील पट्टी दर १०० पौंडास १२ आणे होती, ती आता १ रु ४ आ करण्यांत आली आहे.

### कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री

कापडाच्या गिरण्यास लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची ग्रेटब्रिटनमधून मोठ्या प्रमाणावर निर्गत होत असते १९३४ सालीं ७८½ हजार टन यंत्रें बाहेर पाठविण्यात आलीं. १९३५ सालीं ही निर्गत ६७ हजार टनावर आली आणि १९३६ सालीं फक्त ५३ हजार टनांचा मालच परदेशीं खपला १९३५ सालीं हिंदुस्थाननें २८ हजार टनांची यंत्रें मागविलीं होतीं. गेल्या वर्षी हा आकडा १९½ हजारावर आला.

### हिंदी कपाशीच्या लागवडीचा अधिकृत अंदाज

१९३६ सालच्या हिंदी कपाशीचा सरकारी अदाज प्रसिद्ध झाला आहे २३ कोटि एकरांत कपास पेरली जाऊन ५९ लक्ष, ५९ हजार गासड्या कापूस तयार होईल असा अजमास आहे.

### इंग्रजी भाषेंतील शब्दभांडार

डॉ. जॉन्सनच्या सुप्रसिद्ध इंग्रजी शब्दकोशांत १५ हजार शब्द आहेत हल्लीच्या इंग्रजी कोशातून ४ लक्ष शब्द आढळतात. शब्दांचें एवढें प्रचंड भांडार असतां, सर्व साधारण मनुष्याचें बोलण्यांत एका सबंद वर्षांत २½ हजारांपेक्षां ज्यास्त शब्द येत नाहींत

### चिनी व इंग्रजी भाषा बोलणारांची संख्या

चिनी भाषा बोलणाराची संख्या सबंद जगात ४० कोटि भरते. इंग्रजी भाषेचा दुसरा नंबर लागतो, २० कोटि लोकाची मातृभाषा इंग्रजी आहे

### ब्रह्मदेश विभक्त झाल्यामुळें रेल्वेजची तूट कमी होणार

ब्रह्मदेशाच्या विभक्तीकरणामुळें तेथील बुडीत रेल्वेजहि हिंदी रेल्वेजमधून वेगळया होणार आहेत ह्या कारणानें, हिंदी आगगाड्यांचें एक आतबट्टातील खातें कमी होईल तथापि, रेल्वे फंडातील ब्रह्मदेशाच्या वाटणीचा हिस्सा त्यास द्यावा लागेल.

### मुंबई ते काठेवाड वैमानिक वहातुक

मुंबई ते भावनगर हा १७५ मैलाचा पल्ला गाठण्यास आगगाडीनें २२ तास लागतात विमानानें फक्त सव्वा तास पुरेल ही वैमानिक वहातुक व्यापारी प्रमाणावर करण्याकरिता एक कंपनी स्थापन झाली आहे सुरवातीस कंपनी पाच विमानें घेणार असून प्रत्येकांतून सहा उतारू नेता येतील हळु हळु कंपनीचें क्षेत्र वाढविण्यात येईल

### पारशी समाजांतील बेकारांस समाजाची मदत

सुमारें २,००० पारशी कुटुंबांना त्यांच्या समाजाकडून दरसाल सुमारें ५ लक्ष रुपयाची रोख मदत मिळत आहे इतर मार्गानें गरीबास सहाय केलें जातें, तें वेगळेंच.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| ७-२-३७ ते १३-२-३७ | ९,४५,५२७ |
| १४-२-३७ ते २०-२-३७ | ३४,०८,९११ |
| २१-९-३१ ते २०-२-३७ | २,९३,१०,६८,४०४ |

## शैक्षणिक चित्रपटांचा जर्मनींत प्रसार

शिक्षणाच्या तंत्रांत आतां बदल झाला असून विद्यार्थ्यांस विविध शास्त्रांचीं तत्त्वें समजावून सांगण्यास व पटवून देण्यास फिल्म्सचा उपयोग करणें सोयीचें व आवश्यक वाटूं लागलें आहे. वास्तवतेची कल्पना आणून देण्यास चलाचित्रपटासारखें सोईस्कर व सोपें साधन दुसरें कोणतेंहि नाहीं. जर्मनीमध्यें शैक्षणिक फिल्म्सचा प्रसार करण्याकरितां १९३४ सालीं एक स्वतंत्र सरकारी खातें निर्माण करण्यांत आलें व त्याच्या द्वारें चित्रपट तयार करण्यांत येतात. शाळेंतील व कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे पालकांकडून दर तिमाहीस कांहीं लहानशी रक्कम गोळा करण्यांत येते. आपण दिलेल्या पैशाचा विनियोग कसा काय करण्यांत येतो, ह्याकडे सहाजिकच पालकांचें लक्ष लागतें आणि त्यामुळें सर्व नागरिकांत शैक्षणिक फिल्म्ससंबंधीं कुतूहल निर्माण होतें. प्रत्येक चित्रपट दहा ते पंधरा मिनिटें चालेल अशा लांबीचा करण्यांत येतो व त्यास सोईचें पडेल त्याप्रमाणें विषयाची मांडणी व आखणी करावी लागते. सध्या फक्त मूकपटच तयार केले जातात, कारण बोलपट दाखविणारीं यंत्रें फार खर्चाचीं असतात. चार शाळांतून मूकपट दाखविणें एकाच शाळेंत बोलपट दाखविण्यापेक्षां चांगलें, हा विचार मूकपटच तयार करण्याच्या योजनेचे मुळाशीं आहे. शैक्षणिक चित्रपटांप्रमाणें शास्त्रीय विषयांसंबंधींहि चित्रपट तयार करण्यांत येतात. शाळा—कॉलेजांतील शिक्षणक्रमांत फिल्म्सचें महत्त्व फार आहे ह्याची जाणीव आतां सर्व देशांतील लोकांस झालेली आहे आणि अशा तऱ्हेच्या फिल्म्सहि तयार होऊं लागल्या आहेत. सर्व देशांनीं शैक्षणिक चित्रपटांचे बाबतींत सहकार्य केल्यास फार चांगलें होईल. इतिहास व भूगोल शिकवितांना एका विशिष्ट देशाच्या लोकांस स्वतःबद्दल काय वाटतें, हें त्या देशांत तयार केलेल्या फिल्म्सवरूनच फक्त उत्कृष्टपणें समजून येणें शक्य आहे. ह्या संबंधांत सहकार्याची योजना आखली गेली पाहिजे.

### हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

(१९३७-३८)

| | |
|---|---|
| अपेक्षित उत्पन्न | ९०¾ कोटि रु. |
| अपेक्षित खर्च | ६१½ कोटि रु. |
| मिळकत | २९¼ कोटि रु. |
| द्यावें लागणारें व्याज | २९⅕ कोटि रु. |
| वाढावा ( मध्यवर्ती सरकारास मिळावयाची रकम ) | १५ लक्ष रु. |


१ एप्रिल, १९३७ रोजीं ब्रह्मदेश विभक्त होणार असल्यानें ब्रह्मी रेल्वेजसंबंधींचे आंकडे वरील रकमांत समाविष्ट नाहींत.

### भोपाळ संस्थानचें ३½ टक्के दराचें कर्ज

भोपाळ सरकारनें ३० लक्ष रुपयांचें नवें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. ह्यापैकीं १० लक्ष रुपयांची परतफेड १९४२ सालीं होईल व उरलेले २० लाख १९४६ नंतर परंतु १९४९ च्या आधीं परत केले जातील. व्याजाचा दर ३½ टक्के असून भोपाळ संस्थानांतील प्राप्तीवरील कर त्यावर आकारला जाणार नाहीं. १ मार्च ते ३ मार्च अर्ज स्वीकारले जातील.

मुंबईचे २५ वर्षांचे अनुभवी
टेलर्स रिसबूड ब्रदर्स
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

### पुणें लॉर्ड रे म्यूझियम



वरील संस्थेतर्फे पुणें येथें ता. ७ मार्च ते ११ एप्रिल अखेर औद्योगिक प्रदर्शन भरणार आहे.

### हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्या

गेल्या दोन वर्षांतील तुलना

| | १९३५-३६ | १९३४-३५ |
|---|---|---|
| एकूण गिरण्या | ३७९ | ३६५ |
| त्यांमधील चात्या | ९८½ लक्ष | ९६¾ लक्ष |
| ,, माग | २,००,०६२ | १,९८,८६२ |
| धंद्यांत गुंतलेलें [ भरणा झालेलें ] भांडवल रु. | ४० कोटि, ५५ लक्ष | २९ कोटि ४७ लक्ष |
| कापड करण्यास लागलेली कपास, खंडी [ १ खंडी=७८४ पौंड ] | १५ लक्ष, ५५ हजार | १५ लक्ष ६२ ह. |
| कामगारांची संख्या | ४ लक्ष १८ हजार | ४ लक्ष १५ ह. |

बदाम तेल
व्यापारी भावानें खात्रीचें मिळेल.
दं. ना. हेजीब
किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी, २० शुक्रवार, पुणें.

स्थापना १९२० मुंबई सरकारनें व कोल्हापूर सरकारनें
प्रथम मान्य केलेलें

जाधव टेलरिंग कॉलेज
नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा. माहिती मागवा. [ ४९७ बुधवार, पुणें २

दंतरोगांचा नाश करून दांत अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लक्ष्मी टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

# दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

तारेचा पत्ता : "प्रेसिडेन्सी" पुणे ] १० विश्रामबाग रोड [ टेलिफोन नंबर ७६३

अध्यक्ष.—श्री रा न अभ्यंकर, बी ए, एलएल बी., मॅनेजिंग एजट, कॉमनवेल्थ विमा कपनी

## विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. ५,००,००० पांच लाख

प्रत्येक शेअर रु १०० याप्रमाणें ५००० शेअर्समध्यें विभागलेलें. अर्जासोबत रु १५ व अर्जमंजुरी रु १०

**ठेवी :** चालूं ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के

मुदतीच्या ठेवी सहा महिन्यापासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी

**कर्ज :** थोड्या व लांब मुदतीचीं कर्जे दिलीं जातात कारखानदारांच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्जे देण्याची व्यवस्था केली आहे. बँकेनें पसत केलेल्या इसमांची बिलें डिस्काउट केलीं जातात.

चेक्स, बिल्स, ड्राफ्टस्, हुड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिली जातात

ठेवीदारातील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे

मॅनेजिंग डायरेक्टर्स.—नि ना क्षीरसागर, चिं त्रिं चितळे.



## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कपन्यास कठीण असें अपूर्व यश सपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कपनी –

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री. न चिं केळकर, सचालक केसरी

| हयातीतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट. ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धदा सुप्रसिद्ध होता


सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

**तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.**

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु. १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॅकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निकाचें फाउटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यन्त्रसामुग्रीचें व पांच वर्षे गॅरटीचें एक जर्मन 'बी' टाइम पसि पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें.

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)



## पैसे मिळविण्याचा सोपा उपाय !

# रु. १५००० मिळवा

उत्तरें पाठविण्याची शेवटची तारीख २८।२।१९३७

**प्रत्येकीं प्रवेश फी रु. १-०-०**

१८

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

न १

३६

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

न २

(१) बँकेंत ठेवलेल्या सीलबंद उत्तराशीं ततोलत जुळणाऱ्या बिनचूक उत्तरवाल्यास रु. १३,५०० वाटण्यात येतील.
(२) उत्तरें कमीजास्त प्रमाणात आल्यास बक्षिसें सारखीं वाटण्यांत येतील.
(३) परतु रु. ५०० ची रक्कम प्रत्येक बिनचूक उत्तरवाल्यास देण्याची हमी घेतों
(४) ता. ७ ते १५ फेब्रुवारी १९३७ च्या आत सर्वांत जास्तींत जास्त उत्तरें पाठविणारास रु. १००० आणि रु. ५०० स्पेशल बक्षीस देण्यात येईल.
(५) उमेद्वारानें १ व २ चौकटींत १ ते २४ पर्यंतचे आंकडे वापरावेत. नं. १ व २ चौकटींतील बेरीज उभी आडवी व तिरपी कशी केली तरी अनुक्रमें १८ व ३६ भरावी.
(६) एक आकडा दोनदा वापरला जाऊ नये.
(७) प्रत्येक चौकटीला प्रवेश फी रु १ वाटेल तितकीं उत्तरें साध्या कागदावर लिहून प्रवेश फी म. ऑ. नें किंवा इंडियन पोस्टल ऑर्डरनें पाठवावी. म ऑ. ची पावती उत्तरासोबत पाठवावी
(८) उमेदवारानें २५ व १२ उत्तरें अनुक्रमें रु. २० रु. व १० भरून पाठवावींत.
(९) बक्षिसें उत्तरें येण्यावर अवलबून राहतील निकाल १० दिवसांत लागेल. जे एक आण्याचें पोस्टाचें [illegible] पाठवतील त्याना घरपोंच निकाल कळविण्यांत् येईल.
(१०) मॅनेजरचा निकाल शेवटचा व कायदेशीर बधनकारक समजला जाईल.

**प्रवेश फी व उत्तरें खालील पत्त्यावर पाठवावीं:—**

**दि मॅनेजर—इंडियन ट्रेडिंग कंपनी**

गबुजीस चाळ, मसजीद बंदर रोड,

**मुंबई नं ३**


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा अनत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्य' अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ३ मार्च, १९३७. अंक ९

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून
जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी –
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष–श्री न चि केळकर, संचालक केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला दर हजारी त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा
मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे
किं १ रु ( ट स निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

मुलांचा खाऊ म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २

व्यापारी-उदमी लोकास
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें
तारेचा पत्ता : "प्रेसिडेन्सी" पुणे ] १० विश्रामबाग रोड [ टेलिफोन नंबर ७६३
अध्यक्ष —श्री रा न अभ्यंकर, बी ए, एलएल बी, मॅनेजिंग एजन्ट, कॉमनवेल्थ विमा कंपनी
विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. ५,००,००० पांच लाख
प्रत्येक शेअर रु १०० याप्रमाणे ५००० शेअर्समध्ये विभागलेलें अर्जासोबत रु १५ व अर्जमंजुरी रु १०
ठेवी : चालू ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के
मुदतीच्या ठेवी सहा महिन्यापासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी
कर्ज : थोड्या व लांब मुदतींचीं कर्जे दिलीं जातात कारखानदाराच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्जे देण्याची व्यवस्था केली आहे बँकेनें पसंत केलेल्या इसमांचीं बिलें डिस्काउंट केलीं जातात
चेक्स, बिल्स, ड्राफ्ट्स, हुंड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिलीं जातात
ठेवीदारांतील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे
मॅनेजिंग डायरेक्टर्स —नि ना क्षीरसागर, चिं त्रिं चितळे

## विविध माहिती

### २३ लक्ष वाघिणींची रोज मोजदाद

आपल्या मालाच्या वाहतुकीकरिता कारखानदारांची कुचंबणा होऊ नये ह्याप्रीत्यर्थ ग्रेटब्रिटनमधील एल एम एस. रेल्वे अत्यंत दक्षता बाळगते रेल्वेच्या २ लक्ष ७० हजार वाघिणींची दररोज दुपारीं १२ वाजता खानेसुमारी करण्यात येते, आणि रिकाम्या वाघिणी जरूर असेल तेथें तावडतोब पाठविण्यात येतात

### हिंदी रेलवेजमध्यें नोकर कमी झाले

गेल्या सात वर्षांत हिंदी रेलवेजवरचे हलक्या पगाराचे १लक्ष १६ हजार नोकर कमी करण्यात आल्याविषयीं असेंब्लींत टीका झाली

### टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षा

| | तारीख |
|---|---|
| प्रवेश, प्रथम, मध्यम व उपाध्य . | २६-४ १९३७ पासून |
| विशारद.. | १०-५ १९३७ „ |
| वरील सर्व परीक्षांकरितां अर्ज व फी | २७ ३-१९३७ पर्यंत |

### गरीब लोकांस इंग्लंडमध्यें सहाय

इंग्लंड व वेल्समध्यें गरीब व निराश्रित लोकांच्या सहायार्थ दरवर्षी सुमारें ६० कोटि रुपये खर्च होतात स्थानिक संस्था जनतेच्या जिंदगीवर विशिष्ट प्रमाणात कर बसवून हा पैसा उभा करतात

### लोखंड आणि पोलाद यांचें उत्पादन

जगामध्यें एकूण ९ कोटि टन लोखंड व १२ कोटि टन पोलाद इतकें वार्षिक उत्पादन होतें सध्या ह्या दोहोंसहि उत्पादनापेक्षां अधिक मागणी आहे

### स्वतःच्या देशाबाहेर वस्ती करणारांची संख्या

स्वतःचा देश सोडून परराष्ट्रात वस्ती करणाराची १९३० मध्यें एकूण संख्या २ कोटि ८९ लक्ष, म्हणजे जगातील एकंदर वस्तीच्या १ ६ टक्के, इतकी होती. एकट्या अमेरिकेंत ६३ लक्ष परदेशीय लोक रहतात आशिया खंडातून बाहेर जाऊन इतर खंडांत वस्ती करणारांची संख्या १९१० सालीं ५ लक्ष होती ती २० वर्षांत दुप्पट झाली

### ब्रिटिश कापडाच्या आयातींत घट

हिंदुस्थानात होणाऱ्या ब्रिटिश कापडाचे आयातींत १९३५ च्या मानानें १९३६ सालीं २३ टक्के घट पडली ब्रिटननें इतर देशात निर्गत केलेल्या कापडात मात्र ६३ टक्के वाढ झाली

### पोस्ट खात्याच्या कामात वाढ

एकट्या लंडन शहरात आज १८३ पोस्टऑफिसें आहेत येत्या वर्षी त्यात २० ऑफिसांची भर पडणार आहे टेलिफोनचे व तारेचे दर उतरविल्यामुळें पोस्टाचें काम वाढलें आहे १९३६ सालीं ब्रिटिश पोस्ट खात्यामध्यें ११ हजार नवीन लोक कामावर घेण्यात आले

### म्हैसूरमधील नवा कारखाना

ड्रेनेजकरिता लागणारे नळ व इतर सामान तयार करण्याकरितां म्हैसूर संस्थानात एक समाईक भांडवलाची कंपनी उभारण्यात येत आहे म्हैसूर सरकारनें सदरहू कंपनीस अनेक सवलती देऊं केल्या आहेत

### हिंदुस्थानातील सुवर्णसंचय

आज हिंदुस्तानात १,०२२ कोटि रुपये किंमतीचा सोन्याचा संचय आहे असा मि. फिंडले शिरास ह्याचा अजमास आहे

### नव्या राज्यघटनेमधील मतदार व लोकनियुक्त जागा

नव्या राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणें संबंद हिंदुस्थानात मिळून ३३ कोटि मतदार आहेत त्यांपैकीं ६० लक्ष स्त्रिया आहेत. लोकांनीं निवडावयाच्या १,५८५ जागांपैकी ७७७ जागा मुसलमानांकरितां राखून ठेवलेल्या असून उरलेल्या ८०८ मध्यें हिंदू व इतर जातींचा समावेश होतो सहा प्रांतात वरिष्ठ कायदेमंडळाची योजना आहे व त्यात २५० जागा आहेत.

### आपत्तिनिवारणाकरिता प्रशंसनीय खटपट

अमेरिकेंतील मिसिसिपी आणि ओहिओ नद्यांच्या महापुरामुळें ओढवलेल्या आपत्तींमधून लोकांचा बचाव करण्याकरितां अमेरिकन कायदेमंडळानें २३ अब्ज रुपये मंजूर केले आहेत मंजुरीचें बिल अत्यंत तातडीनें पास करण्यात आलें. वरिष्ठ कायदेमंडळात त्यास विलंब लागू नये, म्हणून कनिष्ठ मंडळाच्या अध्यक्षाची (स्पीकरची) बिलावर सही घेण्याकरता एका कारकुनानें त्यास रात्रीं नाटकगृहात गाठलें. अध्यक्ष त्या वेळीं आपल्या मुलीचा अभिनय पहाण्यात गुंग झाले होते व तेथेंच त्यांनीं बिलावर सही केली

### महाराष्ट्र शुगर मिल्स लि.

३० सप्टेंबर १९३६ अखेर संपलेल्या वर्षी वरील साखरेच्या कारखान्याचे कंपनीस १,४२,७०० रु नफा झाला. गेल्या वर्षांच्या ताळेबंदातील तूट भरून काढण्याकडे ७२ हजारांचा विनियोग करून ६५ हजार रुपये घसारा खातीं घालावे व ५,७२३ रुपयांची बाकी पुढील वर्षाचे हिशेबात ओढावी, असें कंपनीच्या तिसऱ्या साधारण सभेंत ठरलें कंपनीचा कारखाना अहमदनगर जिल्ह्यात टिळकनगर ( पो ऑ बेलापूर ) येथें आहे

### श्रीमान लोकांचा विचित्र नाद

विलायतेमधील कित्येक लोकांस उंदीर पाळण्याचा छंद आहे. उंदराच्या तीस–पस्तीस जाती असून, प्रत्येक उंदराच्या रंगावर आणि हुषारीवर त्याची किंमत अवलंबून असते काहीं उंदीर प्रत्येकीं एक एक हजार रुपयांस विकले जातात! उंदराच्या कातड्यापासून स्त्रियांचे कोट करतात ४०० उंदरांच्या कातड्याचा एक कोट होतो व त्यास ८००-९०० रुपये पडतात. इंग्लंडमधील मिसेस ब्लोअर्स नावाच्या एका बाईजवळ वेगवेगळ्या रंगाचे व जातीचे ११ हजार उंदीर आहेत मागणीबरहुकूम उंदीर पुरविण्याचा तिचा धंदा आहे कित्येक शोकी लोक विमानानेंहि उंदीर मागवतात

### नव्या मोटारीची खरेदी

बाप —" एका गॅलनला मोटार किती मैल जाईल ?"
आई —" आतल्या गाद्या कोणत्या रंगाच्या आहेत ? "
मुलगा —" ती किती वेगानें जाईल ? "
मुलगी:—" आत चांगला आरसा आहे का ? "
शेजारीपाजारी.—" त्यांना ती कशी परवडेल कोणास ठाऊक?"

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु किंमत |
|---|---|
| १४-२--३७ ते २०-२--३७ | ३४,०८,९११ |
| २१-२--३७ ते २७-२--३७ | ३४,९९,७७० |
| २१-९-३१ ते २७--२--३७ | २,९३,४५,६८,१७४ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | १०० | ६ कपाशीस वाढती मागणी | १०५ |
| २ मध्यवर्ती बजेटात तूट | १०१ | ७ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. | १०२ |
| ३ हिंदी रेलवेज आणि हिंदी नागरिक | १०२ | ८ मडळ्याचा नफा व त्याची वाटणी | १०६ |
| ४ कॅलेंडर प्रदर्शन | १०२ | ९ सहकारी चळवळ | १०७ |
| ५ स्फुट विचार | १०३ | १० ग्रामोद्धार | १०८ |
| हुंड्यावरील स्टँप ड्यूटी–मद्रास ॲन्ड स म रेल्वे–शेतीच्या मालाची प्रतवारी व सुणचंदी–नवें ब्रिटिश कर्ज–जर्मनीची आर्थिक कामगिरी | | ११ तफ्कीर | १०८ |
| | | १२ निवडक बाजारभाव | १०९ |



# अर्थ

बुधवार, ता. ३ मार्च, १९३७


## मध्यवर्ती सरकारच्या बजेटांत तूट

### खर्चापेक्षा उत्पन्न ३½ कोटि कमी

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यानीं १९३७–३८ चें अंदाजपत्रक गेल्या शनिवारीं असेंब्लीस सादर केलें गेल्या वर्षी मध्यवर्ती सरकारास वाढत्या उत्पन्नामुळें कर कमी करता येण्याचें भाग्य लाभलें होतें. पण १९३६–३७ अखेर थोडासा वाढावा राहील, ही अपेक्षा आता फोल ठरणार असून उलट १ कोटि ९७ लक्ष रुपयाची तूट येणार, असा अजमास आहे. १९३५–३६ च्या हिशेबातील २४२ लक्षांच्या अपेक्षित वाढव्यापैकीं १९७ लक्ष रुपये गंगाजळी म्हणून बाजूस काढण्याचें मागील वर्षी ठरलें होते ह्या रकमेचा विनियोग १९३७-३८ मध्यें नवीन राज्यघटनेमुळें जरूर पडणाऱ्या पुनर्योजनेकरिता लागणाऱ्या जादा खर्चाकडे करावयाचा, अशी योजना होती तथापि, १९३५ ३६ अखेर अपेक्षेपेक्षा उत्पन्न कमी होऊन ह्या गंगाजळींत फक्त १८४ लक्ष रुपयेच टाकता आले. १९३७-३८ सालाच्या बजेटांत ३४२ लक्षाची तूट अपेक्षित असून, गंगाजळीनें त्यातील १८४ लक्ष भरून काढले, तरी १५८ लक्षाची तरतूद करण्याकरिता उपाययोजना करणें आवश्यक झालें आहे वर निर्दिष्ट केलेली परिस्थिति खाली दिलेल्या आकड्यावरून सहज ध्यानात येईल.—

| वर्ष | | वाढावा (+) तूट (−) |
|---|---|---|
| १९३५–३६ | दुरुस्त अदाज | + २४२ लक्ष रु |
| ,, ,, | पुरे हिशेब | + २२९ ,, ,, |
| १९३६–३७ | अदाज | + ६ ,, ,, |
| ,, ,, | दुरुस्त अदाज (८१ कोटि, ३६ लक्ष रु उत्पन्न ८३ कोटि, ३३ लक्ष रु खर्च) | − १९७ ,, ,, |
| १९३७–३८ | अदाज (७९ कोटि, ९९ लक्ष रु उत्पन्न, ८३ कोटि, ४१ लक्ष रु. खर्च) | − ३४२ ,, ,, |

सर जेम्स ग्रिग ह्यांच्या गेल्या वर्षाच्या भाषणातील आशामय अपेक्षा निष्फळ ठरल्या आहेत, हें वरील आकड्यांवरून स्पष्ट होईल अपेक्षेच्या मानानें उत्पन्नात १७८ लक्षांची तूट आली आणि खर्च २५ लक्षानीं वाढला कस्टम्सचें उत्पन्न २१६ लाखांनीं घटलें, प्राप्तीवरील करात ३७ लक्षांची बूड आली आणि करन्सी खात्यानें अंदाजापेक्षा २८ लक्ष रु कमी दिले. ह्या उलट एक्साइजचें उत्पन्न ४१ लाखानीं वाढलें, मिठावरील करांत १० लाखाची भर पडली आणि इतर उत्पन्नात ३७ लाखांची वाढ झाली

१९३७–३८ सालाचे सुरवातीस ब्रम्हदेश हिंदुस्थानापासून विभक्त होणार आहे, आणि त्यामुळें मध्यवर्ती सरकारास २ कोटि ३३ लक्षांची बूड येणार आहे. प्रांतिक स्वायत्ततेमुळेंहि हिंदुस्थान सरकारास १ कोटि ८५ लक्ष रुपयाचें नुकसान सोसावें लागणार आहे म्हणजे, नव्या राज्यघटनेच्या पायीं मध्यवर्ती बजेटास ४ कोटि १८ लक्ष रुपयाची ठोकर बसणार, असा हिशेब होतो मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकार ह्यामधील उत्पन्न-खर्चाच्या संबधाचे बाबतींत शिफारसी करण्याकरितां सर ओटो नीमायर ह्यांची योजना झाली होती आणि नवीन राज्यघटना अमलात येण्याचे मार्गांत हिंदुस्थान सरकाराच्या सांपत्तिक परिस्थितीची अडचण येणार नाहीं असा अभिप्राय त्यानीं व्यक्त केला होता रेलवेजचें उत्पन्न वाढण्याच्या शक्यतेवर त्यानीं बरीच भिस्त ठेवली होती तथापि, सरकारी बजेटातील आकडे फारसे आशाजनक नाहींत, असें म्हणणें भाग पडतें व्यापार व उद्योगधंदे ह्यामध्यें वाढ होत असल्यानें,लवकरच भरभराटीचे दिवस उगवतील, अशी आशा सर जेम्स ग्रिग ह्यानीं आपल्या भाषणात व्यक्त केली, परतु प्रत्यक्ष आकडे ज्यास्त बोलके आहेत, असें कोणासहि सहज सुचण्यासारखें आहे

येत्या वर्षातील बजेटामधली तूट भरून काढण्याकरिता करवाढ होणें अपरिहार्यच आहे पोलादाच्या व सिमेंटच्या कारखान्याचे उत्पादनास सध्या चांगली मागणी असल्यानें सदरहु मालावरील जकातींत वाढ होण्याचा संभव होता तथापि, फडनवीसाच्या तीक्ष्ण नजरेंतून पोलाद व सिमेंट निसटलें असल्याचें दिसतें साखरेवरील अंतर्गत पट्टी दर हंड्रेडवेटास १ रु ५ आ होती ती २ रु असावी, आणि साखरेच्या आयातीवरील जकात ७ रु ४ आ कायम करून चालू अंतर्गत पट्टीची निमध्यें भर घालण्यात यावी, अशी सर जेम्स ग्रिग ह्यांची सूचना आहे म्हणजे, आयात साखरेवर ९ रु. ४ आ. कर बसेल आणि अंतर्गत उत्पन्नावर २ रु पट्टी द्यावी लागेल. चांदीवरील पट्टीहि २ आण्याची ३ आणे करण्यात आली आहे. साखरेवरील करवाढ बजेटातील तूट भरून काढून थोडासा वाढावा निर्माण करील, अशी अपेक्षा आहे.

### बुकपोस्ट व पार्सल ह्यांच्या दरांमध्यें दुरुस्ती

येत्या वर्षाच्या बजेटामध्यें पोस्ट खात्यातील बुक पोस्टाच्या व पार्सलच्या दरात खालील प्रमाणें दुरुस्ती सुचविण्यात आली आहे:—

| | सध्याचा दर | सुचविलेला दर |
|---|---|---|
| बुकपोस्ट | पहिले ५ तोळे ½ आणा | पहिले २½ तोळे ½ आणा |
| | पुढे प्रत्येक ५ तोळे ½ ,, | पुढे प्रत्येक २½ तोळे ½ ,, |
| पार्सल | २० तोळ्यासाठी २ आणे | ४० तोळ्यांसाठी ४ आणे |

## हिंदी रेल्वेज आणि हिंदी नागरिक

ह्या देशातल्या प्रमुख रेल्वेज सरकारच्या म्हणजे हिंदी जनतेच्या मालकीच्या आहेत एवढेंच नव्हे तर ह्या लोकाच्यासाठी सरकारच चालविते, हा त्याचा विशेष आहे कर देणारे प्रवासी, व्यापारी व धंदेवाले ह्याच्या विविध भूमिका ह्या रीतीनें एकत्रित होऊन हिंदी रेल्वेजच्या सापत्तिक स्थितीचा प्रश्न गुतागुतीचा पण अत्यत महत्त्वाचा होऊन बसला आहे रेल्वेजमधून प्रवास करताना सर्व प्रकारच्या सोयी हव्या, व्यापार व उद्योगधंदे ह्याच्या सुस्थितीस अनुकूल असे वहातुकीचे दर हवे आणि रेल्वेज फायदेशीर रीतीनें चालून त्यापासून कर देणाराचा बोजा हलका व्हावा हे उद्देश एकसमयावच्छेदेकरून साध्य व्हावे अशी हिंदी नागरिकाची इच्छा असणें स्वाभाविक आहे. ह्या रेल्वेजमध्यें सरकारचें म्हणजे लोकाचें सहाशें--सातशें कोटि रुपये भांडवल गुतलें आहे, त्यावर योग्य व्याज देता येऊन त्यांच्या उत्पन्नातून घसाऱ्याची तरतूद व्हावयास पाहिजे. रेल्वेजच्या व्यवस्थेकडे धदा ह्या नात्यानें पहाणें अत्यत आवश्यक आहे. त्याच्या उत्पन्नामधून रिझर्व्ह व घसारा ह्यांविषयीं फंड बाजूस काढून ठेवण्यात आले नाहींत तर कांहीं वर्षांनीं रेल्वेंत घातलेलें भाडवलच नाहींसें होईल शिवाय, हिंदी नागरिक हे जणू काय रेल्वेजच्या धद्याचे भागीदार आहेत, आणि त्यांस वार्षिक डिव्हिडड मिळणें जरूर आहे. हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नांत प्रतिवर्षी विशिष्ट रकमेची भर रेल्वेजनीं टाकली असता हें डिव्हिडड त्यास मिळाल्यासारखें होतें हिंदी रेल्वेज किफायतशीर रीतीनें चालून त्यानीं हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस दरवर्षी सुमारें पाच कोटि रुपये नक्त द्यावे अशी योजना बारा वर्षांमागें निश्चित होऊन काहीं काळपर्यंत अमलात राहिली आर्थिक मंदीस प्रारभ झाल्यापासून रेल्वेजचें उत्पन्न घटल्याकारणानें ती बंद केल्यासारखीच झाली. आतां तिचें पुढें काय करावें हा प्रश्न उपस्थित झाला असून त्याचा निकाल लावण्याचें अवघड कार्य राष्ट्रापुढें आलें आहे

सर राल्फ वेजवुड ह्याच्या कमिटीच्या चौकशीचें काम पुरें झालें असून तिचा रिपोर्ट एक-दोन महिन्यात प्रसिद्ध होईल हिंदी रेल्वेजच्या व्यवस्थेंत कोणत्या सुधारणा त्यानीं सुचविल्या आहेत आणि त्यांची सापत्तिक स्थिति सुधारण्यासाठी त्यानीं काय शिफारशी केल्या आहेत हें जनतेस समजण्यास कांहीं काळ लोटावा लागेल मोटारींच्या धद्याची स्पर्धा रेल्वेजना भोंवत आहे म्हणून त्याचें नियत्रण व्हावें अशा सूचना आजच केल्या जात आहेत, त्यास वेजवुड कमिटी पुष्टी देते कीं काय हें पाहिलें पाहिजे. रेल्वेजप्रमाणें मोटारींचा धदाहि नागरिकाच्या सुखसोईसाठी आहे, हें येथें विसरता कामा नये. नाहीं तर रेल्वेजच्या हिताचें सरक्षण होण्याची व्यवस्था निश्चित केली जात असताना मोटारींच्या धंद्याचें नुकसान होऊन जनतेची गैरसोय होण्याची भीति आहे एकदर राष्ट्राच्या व समाजाच्या व्यापक दृष्टीनें ह्या सव गुतागुतीच्या प्रश्नाचा विचार होणें कसें आवश्यक आहे, ह्याची वरील विवेचनावरून कल्पना येईल दर वर्षाचा सुमारें पाच कोटि रुपयाचा नफा गेल्या सहा वर्षांत रेल्वेजनीं हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस दिलेला नाहीं. त्याचप्रमाणें, ह्या मुदतींत झालेलें नुकसान घसारा फडातून रकमा उचलून भरून काढण्यांत आलें आहे. म्हणजे, आज तागायत सुमारें साठ कोटि रुपयाची खोट रेल्वेजना लागली असून ती भरून निघाल्यावांचून त्याचा व्यवहार धदेवाइक रीतीनें पुढें चालू रहाणें अशक्य आहे. तेव्हां, ही साठ कोटींची नुकसानीची रकम रेल्वेजच्या हिशेबातून काढून टाकावी आणि त्यास आपली सापत्तिक पुनर्घटना करण्यास संधी द्यावी अशी सूचना पुढें आली आहे, तिचा विचार मध्यवर्ती कायदे मंडळानें करावयाचा आहे. बिनसरकारी मंडळयाची व खाजगी धद्याची स्थिति रेल्वेजच्या प्रस्तुत परिस्थितीसारखी झाली असता पूर्वीचीं नुकसानें काढून टाकून व तितकें भाडवल नाहींसें झालें असें कल्पून पुढें चालावयाचा त्याचा प्रघात असतो, तसेंच प्रस्तुत प्रकरणीं करावें हा सदरहु सूचनेचा मथितार्थ आहे. साठ कोटि रुपयाची रकम आजच काढून टाकण्यापेक्षां ती रेल्वेजच्या ताळेबदात राहूं द्यावी आणि पुढील पाच--चार वर्षांत काय परिस्थिति होते हें पाहून मग ह्या बाबतींत कायमचा निकाल करावा हें त्या सूचनेपेक्षा अधिक सयुक्तिक होईल ही विचारसरणी येथें मननीय आहे. वेजवुड कमिटीच्या शिफारसी पाहून आणि रेल्वेजच्या सापत्तिक स्थितींत होत असलेली सुधारणा विचारात घेऊनच रेल्वेजच्या साठ कोटि रुपये देण्याची कायमची विल्हेवाट करणें युक्त होणार आहे. सध्याच्या अनिश्चितपणाच्या स्थितींत साठ कोटींचें नुकसान ताळेबदातून काढून टाकणें बरें नाहीं तें तसेंच राहूं दिल्यास रेल्वेजच्या व्यवस्थापकांवर जी काटकसरीविषयींची जबाबदारी राहील ती इष्ट अशीच आहे. रेल्वेजच्या सांपत्तिक व्यवस्थेचा साकल्यानें विचार करताना पूर्वीच्या नुकसानीची बाब विचारात घेणें सोयीचें होईल, ही गोष्ट कोणासहि पटण्यासारखी आहे असें आम्हास वाटतें.

## मध्यवर्ती बजेट

(लक्ष रु)

| | १९३६–३७ अंदाज | १९३६–३७ दुरुस्त अंदाज | १९३७–३८ अंदाज |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ८३,१४ | ८१,३६ | ७९,९९ |
| खर्च | ८३,०८ | ८३,३३ | ८३,४१ |
| वाढावा (+) अगर तूट (–) | (+) ६ | (–) १,९७ | (+) ३,४२ |

### येत्या वर्षांतील करवाढ

| | सध्याचा दर | नवीन दर |
|---|---|---|
| चांदी आयात, प्रत्येक औसास | २ आ. | ३ आ. |
| साखर एक्साइज „ हड्रेडवेटास | १ रु. ५ आ. | २ रु ० आ. |
| साखर आयात „ „ | ९ रु. १ आ | ९ रु ४ आ. |

## कॅलेंडर प्रदर्शन, १९३७

यंदा वरील प्रदर्शन पुणें औद्योगिक प्रदर्शनाचे जागेंत भरणार आहे आपल्या मालाच्या उठावाकरिता अनेक व्यापारी व कारखानदार कॅलेंडरें काढीत असतात. गिऱ्हाईक मिळविणें व तें टिकविणें ह्याकरिता कॅलेंडराचा उपयोग होतो,. तथापि गिऱ्हाइकाची मनोरचना व प्रवृत्ति आणि आपल्या मालाचा प्रचार ह्याची सागड घालण्याचें चातुर्य विरळा सापडतें. वेगवेगळया धदेवाइकांचीं कॅलेंडरें एकत्र आणून व्यापाऱ्यात व सर्वसाधारण लोकांत ह्याविषयीं विचारप्रवर्तक जिज्ञासा निर्माण करण्याचें वरील प्रदर्शन हें उत्कृष्ट साधन आहे. ह्या दृष्टीनें, व्यापार व उद्योगधंदे ह्यांस कॅलेंडर–प्रदर्शन सहायकारक होणार आहे.

## स्फुट विचार

### हुंड्यांवरील स्टॅंप ड्यूटी रद्द करण्याची आवश्यकता

हिंदुस्थानात व्यापारी हुंड्यांचा प्रसार अद्याप फारसा झालेला नाहीं. कारखानदार, घाऊक व्यापारी, सराफ इत्यादींनीं आपल्या गिऱ्हाइकावर हुंड्या काढून व्यापार व उद्योगधंदे ह्यास लागणारा पैसा व्यवहारात खेळवण्यास सुरवात केल्याखेरीज रिझर्व बॅंकेस आपलें बॅंकिंगच्या क्षेत्रातील कार्य नीटपणें करता येणे अशक्य आहे हुंड्या अगर ऋणपत्रकें ह्याचे पैसे आणि ते देऊन विकत घ्यावयाचे जिन्नस कालांतरानें मिळावयाचे असतात. तथापि ह्या वचनचिठ्यात नमूद असलेले हक्क विकून त्याची रोकड तात्काळ उभी करता येते, आणि धयात पुन. खेळतें भांडवल घालता येतें हुंडीच्या मुदतीचें व्याज कापून घेऊन ती हुंडी डिस्कौंट करून बॅंक अगर दलाल बाकीची रकम हुंडी काढणारास देतात. स्वत.स जोडलेल्या बॅंकानीं खरेदी केलेल्या हुंड्या पुन. डिस्कौंट करून त्यास पैशाचा पुरवठा करण्याचें काम मध्यवर्ती बॅंकेचें आहे अशा रीतीनें, हुंड्याच्या व्यवहाराची वाढ आणि रिझर्व्ह बॅंकेची व्यापार, शेती व उद्योगधंदे ह्यास सहाय करण्याची क्षमता, ह्यांचा अत्यंत निकटाचा संबंध आहे. अंतर्गत हुंड्यांवरील स्टॅंप ड्यूटी रद्द करून त्यास उत्तेजन द्यावें असें करन्सी कमिशननें व मध्यवर्ती बॅंकिंग कमिटीनें सुचविलें होतें, व त्या बाबतची पहिली पायरी म्हणून एका वर्षाचे आतील मुदतीच्या हुंड्यावरील ड्यूटी दर हजारीं फक्त दोन आणे घ्यावी, अशी बॅंकिंग कमिटीची शिफारस होती रिझर्व्ह बॅंकेनें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आपल्या रिपोर्टांत हाच सवलतीचा दर सुचविलेला आहे ही स्टॅंप ड्यूटी अजिबात रद्द व्हावी असा व्यापारी संस्थांचा आग्रह आहे. सदरहु ड्यूटीचें उत्पन्न प्रांतिक सरकारास मिळत असल्यानें त्यांचा सल्ला घेऊन आपलें धोरण जाहीर करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. हुंड्याची देवघेव वाढण्याच्या मार्गांत स्टॅंप ड्यूटी येते, हें जाणून अमेरिकन सरकारनें ती ड्यूटी रद्द करण्याची गेल्या महायुद्धानंतर पहिली संधी साधली आणि बॅंकिंगच्या क्षेत्रांतली अडचण दूर केली करन्सी कमिशनची ह्या बाबतची शिफारस आज ११ वर्षे अमलात आलेली नाहीं. आतां हा प्रश्न धसास लागत आहे ही समाधानाची गोष्ट आहे

---

### मद्रास अॅंड सदर्न मराठा रेलवे

हिंदुस्थानातील रेलवे कंपन्याशीं झालेल्या कराराच्या मुदती सपताच सरकारने त्या विकत घ्याव्या व त्याची व्यवस्था त्यांचेकडून आपल्या हातीं घ्यावी हें धोरण हिंदुस्थान सरकारनें व मध्यवर्ती कायदेमंडळानें निश्चित केलें आणि त्याची अंमलबजावणी आतापर्यंत झाली आहे हिंदी लोकमताचा विशेष आग्रह पाहून सरकारनें ह्या धोरणाचा स्वीकार केला. आपला अधिकार गमावणें रेलवे कंपन्यास अर्थातच पसत नव्हतें. परतु ह्या प्रश्नाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एका कमिटीनेंहि सरकारनें रेलवेज स्वतः ताब्यात घेण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला होता, त्याचाहि परिणाम वरील धोरण निश्चित होण्यावर झालेला होता. मद्रास अॅंड सदर्न मराठा रेलवे, बेंगॉल नॉर्थ वेस्ट आणि कमाउन रेलवेजच्या कराराची मुदत संपली असूनहि सरकारनें त्या आपल्या हातीं घेण्याचें पुढें ढकलल्याचें ठरवलें आहे ह्याविरुद्ध लोकमतानें ओरड केली असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. कायदेमंडळानें योग्य असें मानलेलें धोरण सरकारास संधी मिळताच बदलावयाचें आहे अशीहि शंका ह्या बाबतींत उत्पन्न झाली आहे हेंहि स्वाभाविक आहे. सर महमद झाफरुल्ला ह्यानीं सरकारच्या धोरणाचें समर्थन करताना असें सांगितलें कीं, हातीं घ्यावयाच्या रेलवेजची सांपत्तिक स्थिति असमाधानकारक असल्यानें त्या विकत घेणें आज फायदेशीर होणार नाहीं व सरकारास अनिष्ट अशी जबाबदारी स्वीकारावी लागेल आणि खरेदीचा पैसा मोठ्या रकमानीं एकदम भरावा लागल्यानें लडनमध्यें हुंडणावळीवर विलक्षण ताण पडेल ह्या सर्व अडचणी लक्षात घेऊन सरकारनें प्रस्तुत धोरणाचा अवलंब केला आहे असें त्याच्यातर्फे सांगण्यांत आलें आहे साउथ इंडिअन रेलवेच्या कराराची मुदत संपण्यास अजून अवकाश आहे आणि ही रेलवे व मद्रास अॅंड सदर्न मराठा रेलवे ह्याचें एकीकरण होणें कार्यक्षमतेच्या दृष्टीनें आवश्यक असल्यानें ह्या दोन रेल्वेज एकदम हातीं घेणें इष्ट होईल हाहि मुद्दा सरकारतर्फे पुढें मांडण्यांत आला आहे. हें सर्व समर्थन एकतर्फी असल्यानें जनतेस पटेल असें वाटत नाहीं.

---

### शेतीच्या मालाची प्रतवारी व खूणबंदी

शेतीच्या मालास योग्य किंमत येऊन ती मालकाच्या पदरात पडावी अशी व्यवस्था होणें जरूर आहे ह्यांत दुमत असणें शक्य नाहीं. ह्या संबधात पाश्चात्य देशामध्यें पद्धतशीर योजना अमलात आल्या असून त्या लोकांच्या अगवळणी पडल्या आहेत. उंची व हलक्या जातींच्या मालाची भेसळ झाल्यास किंवा चांगला व कमी दर्जाचा माल स्वतंत्र रीतीनें मिळण्याची सोय नसल्यास सर्वच मालाचे भाव उतरतात आणि शेतकऱ्याचें नुकसान होतें. चांगल्या मालास चांगली किंमत येईल तरच तो तयार करण्यास शेतकऱ्यास उत्तेजन प्राप्त होईल आणि शेतीची सुधारणा होऊन तिच्यापासुन अधिक मिळकत उत्पन्न होईल. एवढ्यासाठी मालाची प्रतवारी लावून त्याची प्रत गिऱ्हाइकास ओळखता येईल अशी व्यवस्था उत्पादक व व्यापारी ह्यास करावी लागते पण ह्या लोकाचें संघटन नसल्यास व्यवहारांत शिस्त रहात नाहीं आणि प्रतवारी यशस्वी होत नाहीं कायद्यानेंच संघटन व शिस्त यांची व्यवस्था करावी लागते असा सार्वत्रिक अनुभव आहे. शेतीच्या हरतऱ्हेच्या मालाची विक्री पद्धतशीर रीतीनें कशी करता येईल ह्यासबधानें हिंदुस्थान सरकारच्यामार्फत मोठ्या प्रमाणावर सध्या खटपट चालली आहे. त्यासबधात एक प्रयोग म्हणून कातडीं व अंडीं ह्यांची प्रत लावणें आणि हा माल बिनचूक ओळखता यावा म्हणून त्यावर विशिष्ट दर्जा दाखविणाऱ्या खुणा घालणें ह्याबाबत मध्यवर्ती कायदे मंडळानें एक कायदा केला असून त्याची अंमलबजावणी प्रथम विशिष्ट ठिकाणीं व्हावयाची आहे. प्रतवारी व मालावरील खुणा ह्याचेसबंधात गल्लत होऊं नये आणि गिऱ्हाइकाची दिशाभूल केली जाऊं नये ह्याकरिता नियम केले जातील.

---

### नवें ब्रिटिश कर्ज

राष्ट्राच्या सरक्षणासाठी लढाऊ सामानाचा पुरवठा करण्यासाठी येत्या तीन-चार वर्षांत मोठमोठ्या रकमा खर्च करण्याचें ब्रिटिश पार्लमेंटनें ठरविलें आहे. इंग्लडला युद्ध नको आहे, पण जागतिक शांततेचा भंग झाल्यास स्वसंरक्षणाची व एक प्रमुख राष्ट्र ह्या नात्याची आपली जबाबदारी पार पाडण्याची त्याची तयारी अवश्य असली पाहिजे, ह्या विचारसरणीच्या आधारावर ब्रिटिश

प्रधान मंडळानें कर्जास पार्लमेंटची समति मिळविली आहे. कर्जानें पैसा उभारला तरीहि सुमारें ४२ कोटि रुपये दर वर्षी मामुली उत्पन्नातूनच घ्यावे लागतील आणि कर्ज न काढतां सरक्षणाची योजना पुरी करावयाचें म्हटलें तर प्रतिवर्षी १५० कोटि रुपयाचा जादा कराचा बोजा ब्रिटिश जनतेच्या डोक्यावर लादावा लागेल एवढी मोठी जादा रकम लोकाच्या मिळकतीमधून दरवर्षी सरकारनें काढून घेतल्यास आर्थिक मंदी दूर करण्याच्या मार्गांत व्यत्यय येऊन राष्ट्राची प्रगति थांबेल ह्या मुद्यावर मि. चेंबर्लेन ह्यानीं कर्जाच्या योजनेचें समर्थन केलें आणि प्रधान मंडळाच्या धोरणास आक्षेप घेणारास उत्तर देण्याचा प्रयत्न केला संरक्षणाप्रीत्यर्थ खर्च व्हावयाच्या एकूण पैशाचा बराच मोठा भाग कर्ज काढलें असतांहि कर देणारावर पडणारच आहे असें त्यांनीं सांगितलें. कर्ज केव्हा, कसें, किती व कोणत्या दरानें काढावयाचें हें वेळोवेळच्या परिस्थितीस अनुलक्षून सरकार ठरवील आणि जनतेवर कमींत कमी बोजा पडेल अशी व्यवस्था करील असें आश्वासनहि त्यानीं दिलें व्याजाचे दर आणि एकदर आर्थिक परिस्थिति ह्यावर नवीन कर्जाचा अनिष्ट परिणाम होणार नाहीं अशी खबरदारी मि. चेंबर्लेन कोणत्या रीतीनें घेतात हें पहावें

---

### जर्मनीची आर्थिक कामगिरी

जर्मन मध्यवर्ती बॅंकेचे अध्यक्ष आणि अर्थमत्री, डॉ. शाख्ट, ह्याच्या वयास नुकतीच साठ वर्षे पुरीं झालीं. त्या प्रसगीं, हेर हिट्लेर ह्याच्या नेतृत्वाखाली आणि आपल्या स्वतःच्या सल्ल्यानें जर्मन राष्ट्रानें काय कामगिरी आर्थिक क्षेत्रात बजावली, ह्याचें विवेचन त्यांनीं एका भाषणात केलें. शस्त्रास्त्रांचें उत्पादन आणि इतर बेकारी-निवारणाचीं कामें ह्यांसाठी लागणाऱ्या पैशाचा पुरवठा, कर्जफेड, निर्गत व आयात व्यापार ह्याची तोंडमिळवणी व चलनाच्या स्थैर्याचें रक्षण हें चतुर्विध कार्य गेल्या दोन-तीन वर्षांत जर्मनीनें केलें असल्याचें त्यांनीं अभिमानपूर्वक सागितलें आर्थिक घडी विस्कटू न देता जर्मनीनें हा चमत्कार कसा केला ह्याचें आश्चर्य इतर राष्ट्रांस वाटतें, परतु भांडवलाच्या पुरवठ्याचें सरकारनें केलेलें नियत्रण हीच सदरहु गूढ उकलण्याची किल्ली आहे असें स्पष्टीकरण त्यानीं केलें जर्मन हुंडणावळ स्थिर राखण्यांत आली होती आणि दुसऱ्या देशांनीं आपली स्वत.ची हुंडणावळ उतरली त्याचा पूर्ण फायदा जर्मनीस मिळाला आणि जर्मनीचें परराष्ट्रीय कर्ज सुमारें ८५० कोटि रुपयानीं हलकें होऊं शकलें. जेवढ्या मालाचा मोबदला आपणास देता येईल त्यापेक्षा अधिक माल परदेशांतून आणावयाचा नाहीं आणि अत्यंत जरूरीचे असेच जिन्नस आयात करूं द्यावयाचे हें जर्मन व्यापारी धोरण यशस्वी ठरलें आहे असें डॉ. शाख्ट ह्यांचें म्हणणें आहे ह्या धोरणाचे योगानें कच्च्या मालाची आयात वाढविणें व पक्क्याची मर्यादित करणें जर्मनीस शक्य झालें आहे. धंदेवाल्यानीं आपली कार्यक्षमता व उत्पादन वाढवावें आणि हेर हिट्लर ह्याच्या धोरणास पाठिंबा द्यावा अशी सूचना त्यानीं केली. डॉ. शाख्ट ह्याच्या भाषणात आत्मश्लाघा व प्रौढी ह्यांचा भाग कितीहि असला आणि जर्मनीच्या महत्वाकांक्षी व लढाऊ धोरणाचें समर्थन त्यात कितीहि असलें तरी जर्मनीच्या अलीकडच्या आर्थिक योजनेच्या स्वरूपावर त्यामुळें उत्कृष्ट प्रकाश पडत आहे.

---

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA

बदाम तेल
व्यापारी भावानें खात्रीचें मिळेल.
द. ना. हेजीब
किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी, २० शुक्रवार, पुणें.

पायोनियर डाइंग हाऊस पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर.
कामाची वेळ—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात
म्यानेजिंग एजंटस्.

हंस पिक्चर्सचा ४ था
अद्वितीय बोलपट
धर्मवीर
मिनर्व्हा टॉकीजमध्यें पहा
लेखक : प्रि. अत्रे
—भूमिका—
बाबूराव पेंढारकर, विनायक,
रत्नप्रभा, इंदिरा वाडकर.

## कपाशीस वाढती मागणी

### बाजारभाव वाढणार काय ?

जगांतील सर्वच देशामधील कपाशीचें उत्पादन वाढलें आहे. हिंदुस्थान, चीन, रशिया, ब्राझील, अर्जेंटिना, इत्यादि देशात उत्कृष्ट पीक आलें आहे. ह्याबरोबरच, आर्थिक परिस्थितीमधील सुधारणेचें प्रतिबिंबहि तयार मालाचे उठावावर पडू लागलें आहे १९३५-३६ व १९३६-३७ च्या मोसमातील कपाशीच्या उत्पादनाचे कांहीं प्रमुख देशासंबधीचे आकडे येथें दिले आहेत हातानें सूत काढून विणल्या जाणाऱ्या कपाशीचा अंतर्भाव त्यात झालेला नाहीं

| ४७८ पौंड=१ गासडी | मोसम १९३५-३६ लक्ष | मोसम १९३६-३७ लक्ष |
|---|---|---|
| अमेरिका | १०५ | १२४ |
| हिंदुस्थान | ५२ | ५६ |
| चीन | २३ | ३५ |
| रशिया | २३ | ३० |
| ब्रॅझील | १५ | १६ |
| अर्जेंटिना | ३½ | ४½ |
| इजिप्त | १७½ | १९ |

१९३५-३६ सालीं जगातील एकूण उत्पादन २ कोटि ६२ लक्ष गासडच्या इतकें झालें होतें, १९३६-३७चा तत्सम आकडा ३ कोटि ८ लक्ष आहे.

शेतीप्रधान देशात धान्याचे भाव आतां वाढूं लागले असल्यानें कापडास चांगली मागणी येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. युद्धाच्या पूर्वतयारीकरताहि बरीच मोठी मागणी पुरवावी लागणार आहे. तथापि त्याकरितां कपाशीचा पुरवठा कमी पडण्याचा संभव नाहीं. मध्यम धाग्याच्या अमेरिकन कपाशीचा मात्र तुटवडा येण्याची भीति आहे. एकंदरीनें पहातां, कपाशीचे बाजारभाव थोडेसे तेजींत येण्याचा रंग दिसतो. कपाशीची लागवड कित्येक देशांत वाढत्या प्रमाणावर होत असल्यानें, मागणी व पुरवठा ह्याचा लवकरच मेळ बसेल आणि बाजारभावात फारशीं आंदोलनें होणार नाहींत. जगाच्या कपास बाजारात अमेरिकेंतील लागवडीस विशेष महत्त्व आहे आणि तेथील उत्पादनाच्या आकड्यावरच बाजारभाव अवलंबून रहाणार हें उघड आहे.

### दि बॅंक ऑफ महाराष्ट्र लि.

वरील बँकेची दुसरी साधारण सभा ता. २८ फेब्रुवारी रोजीं प्रो काळे ह्याच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्यावेळीं, ३१ डिसेंबर १९३६ अखेरचें बँकेचें नफातोटा पत्रक, ताळेबंद आणि डायरेक्टरांचा रिपोर्ट हीं मंजूर करण्यांत आलीं. श्री डी जी जोशी व श्री. जी. डी. आपटे ह्यास नवीन वर्षाकरिता पुन. ऑडिटर नेमण्यांत आलें

एका वर्षाच्या अल्पावधींत बँकेचें १ लक्ष ४½ हजाराचें रोख भांडवल जमलें असून ७ लाखावर ठेवी आल्या आहेत वर्षअखेर बँकेस ६३५ रु नफा झाला आहे त्याचा विनियोग रिझर्व्ह आणि प्राथमिक खर्च ह्याच्या हिशेबी करण्यांत यावा, असें ठरलें आहे.

प्रो काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत बँकेवरील लोकाच्या विश्वासाबद्दल समाधान व्यक्त केलें आणि मॅनेजर, श्री. गोखले, व बँकेचा नोकरवर्ग ह्याच्या कार्याविषयीं गौरवपर उद्गार काढलें.


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खाते ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा.—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हे त्यांचे कर्तव्य आहे जनतेची सेवा करणे हेंच आमचें ध्येय आहे वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर

नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ७८,४०० |
| रिझर्व्ह फंड | २,७५८ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,५२,७०९ |
| सेव्हिंग्ज बॅंक ठेवी | ४,२८४ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,५६,०५४ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४०,७७३ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतांपर्यंतडिव्हिडंड पांच टक्क्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचें तारणावर कर्ज देते

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes.**"

## मंडळ्यांचा नफा व त्याची वांटणी

नफ्यापैकीं किती रकम गंगाजळी, घसारा, इत्यादिकरता बाजूस काढून ठेवावी व किती रकम भागीदारांमध्यें वांटून टाकावी, हा प्रश्न व्यापारी व औद्योगिक संस्थांच्या चालकांचे पुढें दरसाल उभा रहात असतो आज मंडळीस चांगले दिवस असले तरी पुढें नुकसान आल्यास त्याची झळ वाटावयाच्या नफ्यास (डिव्हिडंड) लागू नये आणि मंडळीस स्थैर्य प्राप्त होऊन तिच्यासंबधानें जनतेंत विश्वास उत्पन्न व्हावा, अशा प्रकारची व्यवस्था कर्तव्यदक्ष चालक करीत असतात. भरमसाट नफावाटणी व स्थैर्याविषयींची फाजील सावधगिरीची कल्पना ह्याचा मध्यबिंदु येथें निश्चित करावा लागतो. जागतिक आर्थिक मंदीमधून कित्येक मंडळ्या सुखरूपपणें बाहेर पडल्या, ह्याचें कारण त्यानीं प्रथमपासूनच स्वीकारलेलें सावधगिरीचें धोरण, हें होय १९२९ मध्यें सुरू झालेल्या मंदीमध्यें ब्रिटिश मंडळ्यांची मिळकत कमी झाली, तरी भागीदारांस दिलेल्या डिव्हिडंडचा दर त्यानीं त्या प्रमाणांत कमी होऊ दिला नाहीं आणि १९३२ नंतर नफ्याचें प्रमाण वाढलें तरी त्यामानानें डिव्हिडंडचा दर भरमसाट वाढू दिला नाहीं, ही गोष्ट सदरहू मंडळ्यांच्या त्यासंबधांतील आकड्यांवरून स्पष्ट झाली आहे. भरभराटीच्या काळात रिझर्व्ह वाढवावयाचे व त्यातून पडत्या काळांत डिव्हिडंडचा दर कायम राखण्याची व्यवस्था करावयाची आणि अशा रीतीनें तेजी-मंदीच्या रहाटगाडग्याचे दुष्परिणाम टाळावयाचे हें तत्त्व वरील धोरणाच्या मुळाशीं आहे.

मंडळीस झालेल्या नफ्यापैकीं किती अंश भागीदारात वाटून टाकावा, हा प्रश्न उपस्थित होण्यापूर्वी, नफा कशास म्हणावें, हा प्रश्न उभा रहातो, आणि कोणत्या बाबींची तरतूद झाली म्हणजे उरलेल्या रकमेस नफा असें म्हणता येईल, ह्याचा विचार प्रथम व्हावा लागतो नव्यानें स्थापन झालेल्या मंडळीचे भागात लोक जेव्हा प्रथम भांडवल गुंतवितात, तेव्हा त्याची अपेक्षा आपल्या पैशावर काहीं विशिष्ट दरानें डिव्हिडंड मिळत राहील, अशी असते. हें डिव्हिडंड कायम रहावयाचें म्हणजे मंडळीची उत्पन्न देणारी मालमत्ता कायम टिकली पाहिजे, असा अर्थ झाला सुरवातीस घातलेलें भांडवल कायम टिकावें म्हणून घसाऱ्याची तजवीज केली पाहिजे तथापि, आर्थिक घडामोडींमुळें अगर यांत्रिक सुधारणामुळें मंडळीची मिळकत घटू लागली, तर काय करावयाचें हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे मंडळीच्या मालमत्तेची किंमत हिशेबात किती धरली आहे आणि दरसाल घसारा किती धरावयाचें ठरविलें आहे, ह्या दोन गोष्टींवर ही तजवीज पुरी पडेल किंवा नाहीं, हें अवलंबून रहातें समजा, एकाच धंद्यांतील दोन मंडळ्यास सारख्याच दरानें नफा होत आहे, परंतु एका मंडळीच्या मालमत्तेची किंमत एक लक्ष रुपये व दुसरीची दोन लक्ष रुपये धरण्यात आली आहे. दरसाल, एकूण किंमतीच्या सात टक्के घसारा टाकावयाचा असें दोन्ही मंडळ्यानीं ठरवल्यास, पहिल्या कंपनीस सात हजार रुपये व दुसऱ्या कंपनीस चौदा हजार रुपये बाजूस काढून ठेवावे लागतील तथापि कांहीं कारणामुळें, उदाहरणार्थ जुनी यंत्रसामुग्री अजिबात निकामी ठरल्यामुळें, नवीन यंत्रें आणावीं लागल्यास, दोन्ही मंडळ्यांची ताळेबंदातील घसाऱ्याबाबतची तजवीज- सारख्याच प्रमाणांत असली तरी दुसऱ्या मंडळीस त्या मानानें नुकसान भासणार नाहीं घसाऱ्याची योजना कोणत्या दरानें केली असतां भागेल ह्या संबधीं नियम घालून देतां येणार नाहीं हें वरील उदाहरणावरून स्पष्ट होईल, घसाऱ्याची तरतूद केल्यानंतर परंतु नफ्याची वांटणी करण्यापूर्वी, त्यातील काहीं भाग वेगवेगळ्या रिझर्व्हजमध्यें, म्हणजे गंगाजळींत, टाकण्याची पद्धत आहे. वास्तविक हा नफ्याचाच अंश असतो. गंगाजळींत टाकलेल्या रकमा कित्येक प्रसंगीं मंडळीस चालू खर्च भागविण्यासाठी काढून घेण्याची पाळी येते, म्हणजे भागांची किंमत व डिव्हिडंडचा दर वाढण्यास कारणीभूत होणारा हा पैसा नियोजित कामासाठीं वापरला जात नाहीं पुढें द्याव्या लागणाऱ्या घसाऱ्याची ह्या गंगाजळींतून सोय होते आणि आधीच्या वर्षांतून जाहीर केलेला नफा वास्तविक त्या मानानें फुगवला गेलेला होता असा अर्थ निघतो खरा नफा किती झाला, हें कळणें ह्या कारणानें अत्यंत गुंतागुंतीचें होतें. नफा जाहीर करण्यापूर्वी घसारा व गंगाजळी ह्यात किती रकम वर्ग केली आहे, हें असंदिग्धपणें स्पष्ट करणाऱ्या मंडळ्या फारच थोड्या आढळतात आणि त्या योगानें पैसे गुंतविणारास मंडळीची खरी परिस्थिति समजणें कठिण पडतें.

भागीदाराच्या हातात अखेर काय पडावयाचें, हें प्राप्तीवरील कराच्या आकारणीवर अवलंबून रहातें. डिव्हिडंड जाहीर करण्यापूर्वी मंडळीनें प्राप्तीवरील संबद्द कर भरला असला म्हणजे भागीदारांस कर भरलेलें डिव्हिडंड मिळतें, त्यावर पुनः करभार पडत नाहीं झालेल्या नफ्याचा सर्वच भाग मंडळी भागीदारात वाटीत नाहीं. न वांटलेल्या नफ्यावर म्हणजे गंगाजळींत टाकलेल्या रकमावर मंडळीस कर द्यावा लागतोच तथापि, भागीदाराच्या नफ्याचे हिश्यावरील कर त्याचे वाटणींमधून कापावयाचा शिल्लक ठेवला असेल, तर मात्र त्या मानानें भागीदाराच्या डिव्हिडंड मधून कपात होते. मंडळीचा निवळ नफा काढण्यापूर्वी ह्या कराची तरतूद केलेली आहे किंवा नाहीं, भागीदारास द्यावयाच्या डिव्हिडंडचा दर कर माफ आहे कीं त्यातून कराची आकारणी व्हावयाची आहे, इत्यादि बाबी ह्या संबधात महत्त्वाच्या आहेत.

वरील विवेचनावरून, मंडळीच्या नफ्याची खरी रकम शोधून काढणें भागीदारास कसें कठिण जातें ह्याची कल्पना येईल. हिशेबाच्या मांडणीचे पद्धतींत सर्व मंडळ्यांच्या बाबतींत दिखाऊ एकजातपणा असला, तरी आंतील गुंतागुंत समजणें सामान्य मनुष्यास अवघड जातें नफा कशास म्हणावयाचें येथपासूनच घोटाळ्यास सुरवात होते आपलें भांडवल कायम राहून त्यावर अपेक्षित व्याज देण्याची कायम तरतूद देण्याची शक्य तो व्यवस्था झाल्यावर मंडळीस उरणारा वाढावा, तो तिचा नफा असें समजलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत आकड्यांशीं प्रसंग आला असता गोंधळ उडाल्याखेरीज राहणार नाहीं, विविध प्रकाराच्या मंडळ्यांच्या वार्षिक हिशेबाची काळजीपूर्वक छाननी केल्यास वरील प्रश्नाचें मर्म लक्षात येण्यास सहाय होईल

The House for Quality goods at most reasonable prices.

**K. M. BELSARE & Co.,**

**PLAIN & DECORATIVE FURNITURE**

FOR

Home, School, College, Office etc in

WOOD & IRON

Sadashiv, POONA 2

# सहकारी चळवळ

## प खानदेश सहकारीवृत्त

जानेवारी १९३७ मध्यें इन्स्टिटयूटनें शिरपूर तालुक्यातील को. सोसायट्यांचे सेक्रेटरीज करितां नाथे, शिरपूर व थाळनेर ह्या ठिकाणीं सेक्रेटरीज रिफ्रेशर वर्ग भरविले शिरपूर तालुक्यांतील ४९ सोसायटयांपैकीं ४२ सोसायट्यांचे सेक्रेटरींनीं सदर वर्गाचा फायदा घेतला. सदर वर्गाचे वेळीं सेक्रेटरींना खालील विषयावर माहिती देण्यात आली.—[१] यदाचा वसूल, नवीन कर्ज वाटणी व सवलतींचें धोरण [२] वक्तशीर कर्जफेडीचें महत्त्व[३]कायदे, कानू व पोटनियम [४] सहकारी चळवळीपासून शेतकऱ्यांचे फायदे [५] सहकारी पतपेढ्या, बॅंक, सु युनियन, असोसिएशन व इन्स्टिटयूट ह्याचा परस्पर संबंध [६] सेक्रेटरींचीं कर्तव्यें सदर वर्ग चालविणेचे कामीं प्रॉ. को. बॅंकेच्या शिरपूर शाखेचे इन्स्पेक्टर, श्री देशमुख आणि सु यूनियनचे सुपरवायझर्स श्री. कुळकर्णी व श्री. भागवत ह्यानीं फारच मदत केली व सेक्रेटरींना वरील विषयावर माहिती दिली हें त्याना भूषणावह आहे

शिरपूर येथील वर्गास २० सेक्रेटरी, चेअरमन व पंच हजर होते वर्गाचे शेवटीं सर्वांना इन्स्टिटयूटनें अल्पोपाहार दिला

प्रॉ.ऑफिसर ह्यानीं वरील वर्ग भरवून 'क' व 'ड'वर्गांतील मिळून ९ सोसायट्यास भेटी दिल्या भेटीचे वेळीं खरेदी विक्री युनियन, लॅंडमॉर्गेज बॅंक, ह्याबाबत प्रचारकार्य केलें.

---

## चादवड ( जि नाशिक ) सहकारी वृत्त

सहकारी डिबेटिंग क्लबची फिरती सभा निवाणें येथें ता २२।२।३७ रोजीं श्री. बी आर सावळगी, सुपरवायझर, याचे अध्यक्षतेखाली भरली होती. ऐतिहासिक पुरुषाचें चारित्र व त्यापासून घ्यावयाचा बोध याविषयीं वक्त्यांचीं भाषणें झालीं.

सहकारी स्टाफतर्फे फिरत्या वाचनालयाचें उद्घाटन श्री सहस्रबुद्धे, सीनियर इन्स्पेक्टर, नगर भाग, याचे अध्यक्षतेखाली होऊन १२½ रुपयाचीं पुस्तकें अध्यक्षानीं मोफत दिलीं.

तालुका इप्लिमेंट सोसायटी स्थापन करणेबद्दल असिस्टंट रजिस्ट्राराची परवानगी आली असून कार्यास सुरवात करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

श्री वैकुंठराय मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई प्रा. को. बॅंक, यानीं कळवण शाखेस ११।२।३७ रोजीं भेट दिली. त्यावेळीं, मालाचे तारणावर व्यवहार सुरू करणेबद्दल, पुढील हंगामाकरतां बीं बियाणेची मागणी घेणेविषयीं व नवीन सोसायट्याच्या स्थापनेसंबधीं स्थानिक सहकारी कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून सहकारितेचें पाऊल जोरात पुढें टाकण्याविषयीं त्यानीं उत्तेजन दिलें


शैक्षणिक विषयास वाहिलेलें व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं झटणारें एकच एक साप्ताहिक

सुरू : २१-२-३७ ] विद्यार्थी [ वा. व. २॥ रु. व्ही. पी. नाहीं

पत्रव्यवहाराचा पत्ता —

३५१ अ, सदाशिव, पुणें २


# Notice to Contractors.

Separate tenders, sealed and superscribed with the name of the work, to Government Design or to their own designs are invited from Contractors for the following works —

| Name of work | Estimated cost of the work. | Date of completion of the work | Earnest money | Cost of Tender forms | Last date of entertaining applications for Tender forms | Final date of receipt of Tenders |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) Constructing 4 R.C.C deck bridges across Katta, Sawarvada, Girewad & Sukhalwad Nallas on Malwan Phonda Road miles 13 to 18 including approach roads | Rs 78,494 | 30th June 1938, for masonry works and 31st December 1938 for approach roads | Rs 800 | 8/- | 20th March 1937, 5 P M | 25th March 1937, 2 P M |
| (2) Constructing 3 R.C.C deck bridges across Osargaon, Kasawane and Wagda Nallas on Malwan Phonda Road miles 24 to 27, including approach roads | 44,752 | | 450 | 5/- | | |

2 Drawings and details of design may be seen in the office of the Undersigned during office hours on week days except public Holidays, and Blue Print copies obtained, if necessary, on payment of fees at 0-4-0 per Sq foot, applications for which will be entertained up-to 15th March, 1937 only

3 Conditions of contract etc will be supplied along with the tender forms

4 The Superintending Engineer, Southern Circle, reserves the right to reject any or all of the tenders and also to give one or both the works to one contractor, without assigning any reasons

B P. JAGATAP,

EXECUTIVE ENGINEER, R DN.

RATNAGIRI

18th February, 1937


मुंबई सरकारचें सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेलें

डॉ. काळे यांचें पूना लेप्रसी क्लिनिक

म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चर्म विकारावरील उपचाराचें विश्वसनीय ठिकाण

टिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॉलिस्ट

## ग्रामोद्धार

### श्री वैकुंठराय मेहता ह्यांच्या कार्याचा अहवाल

[ राजकारणापासून अलिप्त राहून, ग्रामोद्धार, खेडेगांवीं उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन, शेतकऱ्यांची नैतिक व शारीरिक उन्नति, इत्यादि कामें सत्वरित रीतीनें करण्याकरितां, मुंबई येथें भरलेल्या राष्ट्रसभेनें मंजूर केलेल्या योजनेस अनुसरून १४ डिसेंबर १९३४ रोजीं वर्धा येथें 'अखिल भारतीय ग्रामोद्योग संघा'ची स्थापना झाली संघाच्या व्यवस्थापक मंडळाचे सभासद, श्री वैकुंठराय मेहता, ह्यांनीं आपल्या ३१ डिसेंबर १९३६ अखेरच्या वर्षातील कार्याचा अहवाल संघास सादर केला आहे, त्यांतील महत्त्वाच्या गोष्टींचा सारांश येथें दिला आहे. ]

श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या कार्यक्षेत्रांतून पुणें व नाशिक हीं शहरें आणि ठाणें व कुलाबा हे जिल्हे वगळण्यात आले होते वर्षअखेर ६ एजंट्स, ४० सभासद, १८ निर्वेतन कार्यकर्ते आणि ३ पगारदार प्रचारक श्री मेहता यांच्या नेतृत्त्वाखालीं काम करीत होते. स्थानिक कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय करण्याकरिता श्री. मेहता ह्यांनीं निरनिराळ्या गावास भेटी दिल्या पूर्व व पश्चिम खानदेशांतील खेडेगावांमधील आरोग्याकडे व स्वच्छतेकडे विशेष लक्ष पुरविण्यात आलें सातारा जिल्ह्यात प्लेग व कॉलरा ह्यांच्या प्रतिबंधाकरिता कसून खटपट करण्यात आली. सोलापूर व नगर जिल्ह्यांत दुष्काळनिवारणाचें कार्य हातीं घेण्यांत आलें. सूत काढण्याच्या धंद्यास उत्तेजन देण्यात येऊन शेतीच्या जनावराच्या पोषणाची व्यवस्था करण्याचीहि खटपट चालू होती.

अहवालाचे वर्षांत श्री वैकुंठराय मेहता ह्यानीं पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेंत 'मुंबई इलाख्यातील खेडेगावीं उद्योगधंदे' ह्या विषयावर एक व्याख्यान दिलें, त्याचप्रमाणें अनेक परिषदांतून त्यानीं सहकार व ग्रामोद्धार ह्यासंबंधीं भाषणें करून ठराव मांडले 'हरिजन' मध्यें ते लेख व स्फुटें लिहीत असत. इतरहि अनेक वृत्तपत्रात त्यांचे लेख प्रसिद्ध झाले तेलाच्या घाण्या व त्यामधील सुधारणा, हातसडीच्या तांदुळासंबधीं टागोराचे विचार, हाडाचें खत, जनावरांची पैदास सुधारण्याची योजना, इ. विषयाची माहिती देणारीं हस्तपत्रकें वाटण्यात आलीं लखनौ प्रदर्शन, फैजपूर प्रदर्शन, इत्यादिविषयकहि माहिती महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांस पुरविली गेली.

श्री. मेहता ह्यानीं (१) हातानें बनविलेला कागद व (२) पोंगड्या ह्या दोन धंद्यांकडे विशेष लक्ष पुरविलें कागद करणारास तज्ज्ञाकडून सल्ला देवविला आणि त्यास माल खपविण्यास सहायहि केलें. जुन्नर व पुणें येथील कागद्यांचे तारणावर कर्जें देण्यासंबधीं पुण्यातील बँकांशीं चर्चा केली कागद आता चांगल्या प्रतीचा निघू लागला आहे पोंगड्याच्या धंद्याबाबत श्री भुरके ह्यांची खास नेमणूक करण्यांत येऊन त्यांचेमार्फत कार्य चालू आहे एका सहकारी सोसायटीच्या स्थापनेसबंधींहि खटपट सुरू आहे

लखनौ येथील अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग प्रदर्शनाबाबत महाराष्ट्रांत प्रचार करण्यात आला फैजपूरच्या प्रदर्शनाचे तर श्री मेहता हे संयुक्त चिटणीस होते ८० हजार लोकांनीं तिकिटें काढून प्रदर्शन पाहिलें व अखेर प्रदर्शनाचे कामांत ४,८०० रु. नफा उरला रत्नागिरी, मालवण व सावंतवाडी येथील माल प्रदर्शनात यावा, ह्याकरिता प्रयत्न करण्यात आले मुंबई व पुणें येथें विक्रीच्या दुकानांचें उद्घाटन श्री. मेहता ह्यांच्या हस्तें झालें इतर ठिकाणींहि 'डेपो' काढण्याविषयीं चर्चा करण्यात आली वेगवेगळ्या प्रश्नासबधीं कार्यकर्त्यांकडून विचारणा करण्यात आल्या, त्यास योग्य अशा तज्ज्ञामार्फत सल्ला देवविला गेला. मॅजिक लॅंटर्नच्या ३६ काचा संघाकरितां तयार करवून घेण्यात आल्या श्री. मेहता हे पुण्याच्या ॲडल्ट लिटररी असोसिएशनचे सभासद झाले आणि त्यानीं सांगलीच्या भिडे मॅच वर्क्सलाहि सहाय केलें.

संघाच्या कार्याकरितां एकूण १,२४० रु. खर्च झाले, त्यापैकीं १०० रुपये वर्गणीच्या रूपानें जमा झाले.

---

## तपकीर

पुण्यामध्यें "वर्तकी" तपकीरीची प्रसिद्धी आज अनेक पिढ्या आहे, "कृष्णभट्टी" तपकीरहि कित्येक वर्षें विशेष गाजली आहे मद्रासी व मंगलोरी तपकीर पुणें, मुंबई वगैरे भागांत लोक अलीकडे वापरतात आणि स्थानिक बनवाटीची तपकीर ठिकठिकाणीं चोहोंकडे खपते सुवासी व औषधी तपकिरीस मध्यंतरीं बरीच मागणी असे इंग्लंडमधील दोनशे वर्षें चाललेले तपकिरीचे दोन कारखाने बंद होऊन त्यातली यंत्रसामुग्री नवीन ठिकाणीं स्थापन होणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्यापैकीं एकांतली यंत्रसामुग्री शंभर वर्षें चाललेली आहे आणि ती आणखी कित्येक वर्षें काम देईल अशी अपेक्षा आहे तीमध्यें, पाण्याच्या जोरावर एक चाक फिरतें व त्याबरोबर दोन खलबत्ते तंबाखू कुटतात खल ओकच्या लाकडाचा असून बत्ता लोखंडी आहे. उखळ व मुसळ ह्यात कुटून निघालेल्या तंबाखूची पूड दुसऱ्या यंत्रानें होते

तंबाखूचीं पानें कुटून व वाटून त्यांची वस्त्रगाळ पूड करतात, ती सर्व कृति हातानेंच चालते. तंबाखूची निवड व तिचें मिश्रण ह्यावर तपकिरीचा स्वाद अवलंबून रहातो वर वर्णिलेल्या ब्रिटिश कारखान्यातली ह्या संबधातली कृति धंद्यातलें गुपित ह्या नात्यानें मुख्य मालकाशिवाय दुसऱ्या कोणासहि कळून दिली जात नाहीं. तपकिरीची सवय इंग्लंडमध्यें कमी झालेली नाहीं तेथें एकूण खपणाऱ्या तपकिरीचा चार-पंचमांश भाग दहा वर्षांमागें स्त्रियांमध्यें खपत असे देशाच्या निरनिराळ्या भागात तपकिरीचे भिन्न भिन्न प्रकार लोकप्रिय असतात हा अनुभव हिंदुस्थानातहि येतो. मद्रासी, महाराष्ट्रीय, मंगलोरी वगैरे तपकिरीच्या जाती ह्या कारणानेंच रूढ झालेल्या आहेत अभिरुची कालांतरानें बदलते आणि विशिष्ट जातींच्या तपकिरीचा खप कमी-जास्त होतो, असें वेळोवेळ आढळून येतें

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे किंमत
गिरगांव, मुंबई

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११८–१० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन .. .. | १०६—८ |
| ४½% लाब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—४ |
| ४% १९४३ .. ... .. | १०८–१२ |
| ३½% बिनमुदत .. .. ... | ९५–१२½ |
| ३½% १९४७–५० .. .. | १०४–१२ |
| ३½% १९४८–५२ ... ... | ९९—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत ) | १०७—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... | १०७—४ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉड (७०वर्षे मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्याचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | ११७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) | ३४–१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५१५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७ –८ |
| अहमदाबाद-प्रातज ( ५०० रु चा भाग, डिव्हि १०, बानस ६ रु ४ आ ) | ८३७ -८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ( ऑर्डि भाग ५० रु डिव्हि १३% ) | १५१–१४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९% ) | २७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु ऑर्डि. डिव्हि ५½%) | १४५२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १६०९—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि ६% ) | १९८–१२ |
| टाटा आयर्न (१०० रु दु प्रेफरन्स, १७ रु ८ आ.) | १७९—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु ऑर्डि रु ६) | ३३४—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु ७ आ ८ ) | १६४५—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—३–९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५१—४–० |


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक

आमचा इमारतीच्या बाधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

" गिलावयाचा चुना हा तर आमचे चुन्याचे धद्यातील विशेष होय "

भाऊ गंगाधर साठे,

बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,

५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

स्थापना १९२० मुंबई सरकारने व कोल्हापूर सरकारनें प्रथम मान्य केलेलें



जाधव टेलरिंग कॉलेज

नवीन वर्ग सुरू झाले नावें नोंदवा माहिती मागवा [ ४९७ बुधवार, पुणे २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा

सूट स्पेशॅलिस्ट

टेलर्स रिसबूड ब्रदर्स

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २

फाळणी दरसाल हलू नये म्हणून आमचें इच्छा गर्भ सभव औषध घ्या व संततिनियमन करा

औषध बद केलें कीं, मुलें होतात महिन्यांतून एक्दाच घ्यावें लागतें- वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट ख नि

गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी

रु. ९॥ सिल्ककोट खरेदी करा

बुधवार चौक, पुणें

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## दी सनशाइन इन्शुअरन्स लि.

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरतां पगारी एजंट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा.

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस : ३३४ गणेश पेठ, पुणें.

## जनानी व मर्दानी कापड

मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
**माधव सोमण ब्रदर्स,**
लक्ष्मीरोड, पुणें. २










## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें



आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु. १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निफाचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पांच वर्षें गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पसि. पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें.

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं. १२२०४, कलकत्ता (२४)


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान ' इति कौटिल्य अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १० मार्च, १९३७. अंक १०

**"व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे**

- ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ०८ आणे नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

कारखानदार —भास्कर पाडुरंग सहस्रबुद्धे, ७५२ सदाशिव पेठ, पुणें

मिळण्याचीं ठिकाणें

धुळें—सहस्रबुद्धे ब्रदर्स
इदोर—हॉटेल आय व्हिजीट
अमळनेर—बऱ्हाणपूरकर ( कमिटीच्या बागेसमोर )
नागपूर—वैद्य ब्रदर्स, ओल्ड स्टेशन रोड
नाशिक—एस आर बेले

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज सोनें, चांदी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

म्यानेजिंग एजंटस्

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

**प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँक तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा करण्यात येणाऱ्या आपल्या **रौप्यमहोत्सवा**निमित्त सदरहु तारखेपासून **दशवार्षिक रोखे** शेंकडा ७० रु ८ आण्याच्या दरानें विक्रीस काढणार आहे

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रुच्या दर्शनी किंमतीचे आहेत वरील रकम शेतकऱ्याची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठीं कर्जाऊ दिली जाणार आहे

हे रोखे विकत घेण्यात बिलकूल सट्टेबाजी नाहीं | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर, ता १ मार्च १९३७
जी. ए भोंसुले, बी कॉम्
मॅनेजर, दि सी पी अॅन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

**काळाच्या ओघाबरोबर फोर्ड पुढें पाऊल टाकीत आहे !**

- ऐसपैस जागा, आरामशीरपणा, काम देण्याची हातोटी आणि सर्वसाधारण श्रेष्ठत्व ह्यात प्रतिबिंबित झालेला गुणसमुच्चय
- फोर्ड इतकी ऐसपैस जागा आणि सुखावह दुमरी गाडी तितक्या किंमतींत मिळणें दु साध्य आहे मोटारविषयक सर्व गरजा भागविण्याची व्यवस्था, अनेक सुखसोयी, अखंड शक्ति आणि विश्वासार्हता ह्या गोष्टींचा विचार करताना फोर्ड गाडीचें तिच्या किंमतीचें वर्गातील श्रेष्ठत्व तात्काळ पटेल

**दि सिल्व्हर ज्युबिली मोटार्स लि.,** — फोर्ड डीलर्स — १२, अर्सेनल रोड, पुणे

# विविध माहिती

**बँकास सुट्टी**

गुरुवार, ता. ११ मार्च रोजीं महाशिवरात्रीनिमित्त बँका बंद रहातील

**संत्र्याची प्रतवारी ठावणारें यंत्र**

फळाची प्रतवारी ठावणारें एक यंत्र नागपूर येथें उपयोगांत आणलें जात असून त्याचे सहायानें संत्र्याच्या आकारमानाप्रमाणें त्याचे सहा वर्ग केले जातात. वेगवेगळ्या करंड्यातून तीं सत्रीं भरून ठिकठिकाणच्या बाजारात विक्रीकरितां पाठविण्यात येतात.

**मोटार-गाड्यावरील करासबंधीं सूचना**

मोटार-गाड्यावरील कराची मुदत ३१ मार्च रोजीं संपत असल्यानें नव्या म्हणजे ३१ मार्च, १९३८ अखेरच्या वर्षाचा कर भरण्याची वेळ जवळ आली आहे. १५ एप्रिलचे आत कर भरून मोटारींची पुन: नोंदणी केली पाहिजे.

**निबंधाकरितां बक्षीस**

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें शेतीविषयक निबंधास दरसाल सुवर्ण व रौप्य पदकें देण्याचें १९३३ सालीं जाहीर केलें होतें १९३८ सालीं द्यावयाच्या बक्षीसाकरिता 'वॉटर लिफ्ट्स' म्हणजे पाणी वर उचलण्याचे प्रकार हा विषय निश्चित करण्यांत आला आहे जास्त खुलाशाकरिता कौन्सिलच्या सिमला अगर दिल्ली येथील पत्त्यावर चौकशी करावी.

**हिंदुस्थानांतील आगगाड्याचे रस्ते**

३१ मार्च, १९३६ रोजीं ४३,११८ मैल लांबीचे लोहमार्ग हिंदुस्थानात वापरामध्यें होते त्यापैकीं ३१,७८३ मैल लांबीचे म्हणजे शेकडा ७४ टक्के लांब रस्ते सरकारच्या मालकीचे होते.

**लंडनमधील प्राणीसंग्रहालय**

लंडनमधील प्राणीसंग्रहालयांतील प्राण्यांची एकूण किंमत ६६ हजार रुपये आहे.

**जर्मनीचा लढाऊ खर्च**

गेल्या चार वर्षांत जर्मनीनें युद्धाच्या तयारीप्रीत्यर्थ सुमारें तीन हजार कोटि रुपये खर्च केले आहेत.

**जागतिक उत्पादन व व्यापार**

सबंध जगांतलें मिळून संपत्तीचें उत्पादन सध्याची मंदी सुरू होण्यापूर्वीच्या बेतास आलें आहे, परतु आंतरराष्ट्रीय व्यापार मात्र रेंगाळत आहे.

**आगबोटी बांधण्याचा धंदा**

मंदीच्या काळात गेल्या पांच वर्षांत आगबोटी बांधण्याचा धंदा जगभर सर्वत्र बसल्यासारखा झाला होता, तो आतां कोठें पुन्हा डोकें वर काढू लागला आहे १९१३ सालीं सर्व जगात मिळून ३३ लक्ष टन वजनाच्या आगबोटी तयार झाल्या. हा आकडा १९२९ मध्यें सुमारें २८ लक्ष टन होता तो पुढें ५-१० लक्षांपर्यंत उतरून गेल्या सालीं २१ लक्षावर चढला. ह्या धंद्यांतला ग्रेटब्रिटनचा हिस्सा मात्र पूर्वीच्या मानानें उतरला असून इतर देश पुढें जात आहेत.

**साम्राज्यांतर्गत इतर देशांतील लोकांची हिंदुस्थानांत वस्ती**

हिंदुस्थानात वस्ती करणाऱ्या व उद्योगधंद्यांत गुंतलेल्या ऑस्ट्रेलियन, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिकन लोकांची संख्या अनुक्रमें ५६९, १६० व १,५२८ आहे असें सर गिरिजाशंकर बाजपेय ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

**मादक द्रव्यांचे दास**

मादक द्रव्यांचे (ड्रग) दास बनलेले असे वीस लक्ष इसम जगामध्यें आहेत ग्रेटब्रिटनमध्यें त्यांची संख्या तीस हजार आहे

**अन्न आणि आयुर्मान**

मनुष्याच्या अन्नात पोषक द्रव्यांचें योग्य मिश्रण असल्यास तो शेकडों वर्षे जगूं शकेल हा अमेरिकेंतील नामांकित भिषग्वर्य डॉ हे याचा अभिप्राय आहे. त्याचें वय ७८ वर्षांचें असून त्यांची प्रकृति उत्कृष्ट आहे आणि ते दररोज बारा तास काम करतात

**चांदीची आयात व करांचें उत्पन्न**

चालू वर्षीं चांदीच्या एकूण १ लक्ष पाटल्या हिंदुस्थानात आयात झाल्या. सध्यां मुंबईचे बाजारात ४५ हजार पाटल्या शिलक आहेत आणि येत्या वर्षीं ३० हजारांपेक्षां ज्यास्त पाटल्याची आयात संभवनीय नाहीं. ह्या हिशेबानें चांदीवरील पट्टीमधील वाढ फलदायक होणार नाहीं असें मुंबई बुलियन एक्सचेंजच्या अध्यक्षांनीं आपल्या पत्रकांत मत व्यक्त केलें आहे. अपेक्षित उत्पन्न येण्यास ७७ हजार पाटल्याची आयात व्हावयास पाहिजे.

**जंगलखात्याचें उत्पन्न**

मुंबई इलाख्याच्या जंगलखात्यांस १९३५-३६ सालीं ५३ लक्ष, ४३ हजार रु. उत्पन्न मिळालें आणि ३१ लक्ष, ९ हजार रु. खर्च आला.

**म्हैसूर सरकारनें साखरेवरील जकात वाढविली**

साखरेच्या अंतर्गत उत्पन्नावरील पट्टी हंड्रेडवेटास १ रु. ५ आ. होती ती २ रु करण्याचे हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. म्हैसूर सरकारनेंहि आपल्या संस्थानात ही वाढ करण्याचें जाहीर केलें आहे.

**प्रमुख बंदरांचा ताबा पुन: मध्यवर्ती सरकारकडे जाणार**

मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील बंदरांची व्यवस्था पोर्ट ट्रस्ट मार्फत पाहिली जाते व हिंदुस्थान सरकारच्या तर्फेनें प्रांतिक सरकार त्यावर देखरेख करितात. १ एप्रिल १९३७ पासून मध्यवर्ती सरकार पुनः ही देखरेख पाहूं लागणार आहे. अर्थात् चालू व्यवस्थेमध्यें त्यामुळें विशेष फेरफार होणार नाहीं.

**ब्रिटिश सरकारच्या लष्करी व आरमारी खर्च**

ब्रिटिश सरकार आपल्या आरमारावर येत्या वर्षीं १३७ कोटि रुपये खर्च करणार आहे. गेल्या वर्षांपेक्षां ही रकम ४० कोटींनीं मोठी आहे. लष्करी खात्यावर ८२ कोटि रुपये खर्च होतील.

**पंजाबमधील रस्तेसुधाराईची योजना**

पंजाबमधील रस्ते सुधारण्याकरितां २० वर्षांची एक योजना आंखण्यांत आली असून तिच्याप्रीत्यर्थ १ कोटि, ३१ लक्ष रु. खर्च येणार आहे. ह्यापैकीं ६३ लाखाचीं कामें मंजूर झालीं आहेत.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रु. किंमत |
|---|---|
| २१-२-३७ ते २७-२-३७ | ३४,९९,७७० |
| २८-२-३७ ते ६-३-३७ | ४५,०६,१७१ |
| २१-९-३१ ते ६-३-३७ | २,९३,९०,७४,३५० |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ११२ | ९ माधव सोमण ब्रदर्स | ११९ |
| २ बँकिंग आणि आर्थिक परिस्थिति ... ... | ११३ | १० जाधव टेलरिंग कॉलेज | ११९ |
| ३ रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा . ... | ११४ | ११ शिवणकला व तिच्या-मधील सुधारणा | १२० |
| ४ स्फुट विचार ... | ११५ | १२ जीवनातला समतोलपणा व प्रमाणबद्धता .. | १२१ |
| हिशेब ठेवणाऱ्या अधिकाऱ्याचें बजेट—करवाढ आहे पण खर्चांत काट नाहीं—लंडन येथील साखर परिषद्—वाढती लोकसंख्या व वसाहती | | १३ मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतिक सहकारी बँक ... | १२१ |
| ५ पुणें औद्योगिक प्रदर्शनाचें उद्‌घाटन ... ... | ११७ | १४ ईस्टरच्या लहरी ... | १२२ |
| ६ अखिल भारतीय मुद्रण परिषद् ... . | ११७ | १५ १९३५ व ३६ सालांतील सोन्याची आयात व निर्गत ... ... | १२३ |
| ७ भाऊ गंगाधर साठे . | ११८ | १६ पोस्ट आणि तार खात्याचें अंदाजपत्रक ... | १२३ |
| ८ महिंद्रकर ब्रदर्स . | ११८ | १७ निवडक बाजारभाव | १२४ |
| | | १८ गणेश सहकारी नाज भांडार . . | १२४ |


# अर्थ

बुधवार, ता १० मार्च, १९३७

## बँकिंग आणि आर्थिक परिस्थिति

इंग्लंडमधील प्रमुख बँकांच्या वार्षिक सभाचे प्रसंगीं त्यांच्या अध्यक्षांनीं केलेलीं भाषणें अत्यंत बोधप्रद असतात स्वतःच्या बँकांच्या व्यवहाराचेंच सिंहावलोकन त्यानीं केलेलें असतें असें नसून राष्ट्रीय व जागतिक आर्थिक परिस्थितीचें त्यात उद्‌बोधक विवेचन असतें. भोंवतालच्या आर्थिक स्थितीचें प्रतिबिंब बँकांच्या व्यवहारांत उमटणें स्वाभाविक आहे. बँकांचे व्यवस्थापक, भागीदार, नोकर व गिऱ्हाइकें ह्यांचे संबंध अत्यंत सलोख्याचे असल्याचें इंग्लंडमध्यें आढळून येतें. त्या संस्थांचें स्थैर्य, चोखपणा व कार्यक्षमता हीं जगभर सुप्रसिद्ध आहेत आणि त्यांच्या वार्षिक सभाचे अहवाल वाचले असता ह्या त्यांच्या सर्व गुणांची खात्री उत्कृष्ट रीतीनें पटते त्यांच्या अध्यक्षांच्या भाषणातील मुद्यांची कल्पना आम्हीं "अर्था" मध्यें देत असतों, ह्याचें कारण इंग्लिश बँकांच्या परंपरेची ओळख आमच्या लोकास व्हावी आणि त्यानी त्यांचे चांगले गुण उचलावे ही आमची इच्छा होय आधुनिक तऱ्हेच्या बँकिंगचा ( सहकारी व बिन-सहकारी पद्धतीच्या ) प्रसार व उत्कर्ष ह्यास महाराष्ट्रात पुष्कळ वाव आहे आणि तो यशस्वीपणें घडवून आणण्यास विशिष्ट गुण अंगवळणीं पडणें अगत्याचें आहे.

सध्या जागतिक व्यापार मंदीच्या तडाक्यातून सुटला नसला तरी इंग्लंडची अंतर्गत आर्थिक परिस्थिति चलतीच्या चढणीस लागली आहे, ह्यात शंका नाहीं अंतर्गत बाजारातील उलाढाली वाढल्या आहेत, जुन्या उद्योगधंद्यास उत्तेजन मिळालें आहे व बेकारी कमी होत आहे. सार्वजनिक उपयोगाचीं कामें राष्ट्रीय व स्थानिक सरकारानीं काढलीं आहेत व लढाऊ सामानाच्या उत्पादनावर कोट्यवधि रुपयाचें भांडवल खर्ची पडत आहे ह्या चलतीचा प्रमाणाबाहेर जोर होऊन मंदीचें पारडें पुन्हां खाली जाण्याचीहि भीति उत्पन्न होऊन आर्थिक परिस्थितींत अशी उलटापालट होऊं नये म्हणून खबरदारी घेतली जावी अशा सूचना आतांच केल्या जात आहेत. मार्टिन्स बँकेचे अध्यक्ष, मि ऑर्म, ह्यानीं आपल्या भाषणात लोखंड, पोलाद, कोळसा जहाजांची बांधणी, गहूं, लोकर इत्यादि मालास असलेल्या मागणीचा उल्लेख करून त्याच्या वाढलेल्या उलाढालीवरून चलतीची कल्पना कशी स्पष्ट होते, हें सांगितलें त्याबरोबरच, "गेलेली आर्थिक शक्ति पुन्हा येण्यास वेळ लागतो, पण ती जाण्याची क्रिया त्वरित घडते" अशी इशारत त्यानीं दिली आणि रोखेबाजारात झालेल्या किंमतीच्या चढाचा उदाहरण म्हणून उल्लेख केला. इंग्लंडमधले उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या चलनशीलतेच्या मुळाशीं असलेल्या कित्येक बाबींचा परिणामकारकपणा कमी होत असला तरी ब्रिटिश सरकारची शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्याची योजना अमलात येत आहे, तिचा जोर आर्थिक चलतीस उपकारक होणार आहे ही गोष्ट त्यानीं दृष्टीआड केली नाहीं.

ग्रेटब्रिटनमधली चालू चलती चार मुख्य गोष्टींमुळें घडून आली आहे [ १ ] संरक्षक जकाती, [ २ ] सुवर्ण-चलनाचा त्याग, [ ३ ] परदेशात भांडवल कर्जाऊ दिलें जाण्यास प्रतिबंध व [ ४ ] व्याजाचे दर चढू न देण्याचें सरकारी धोरण ह्या त्या बाबी असून त्यामध्यें काहीं फेरबदल झाल्यास चलतीच्या गतीस विरोध झाल्यावाचून रहावयाचा नाहीं. रबर, गहू, कोको व निरनिराळे धातु यांचे बाजारभाव चढले आहेत आणि कच्चा माल जगाच्या बाजारात विकणाऱ्या राष्ट्रांची मिळकत वाढल्यानें व्यापारास चालन मिळालें आहे. तथापि, बाजारभाव चढले असता उत्पादनाचा खर्च वाढणार आणि त्याचा अनिष्ट परिणाम एकूण आर्थिक परिस्थितीवर होण्याचा संभव आहे इंग्लंडची टिकाऊ औद्योगिक सुस्थिति आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विस्तारावरच शेवटीं अवलंबून राहणार आणि तात्पुरत्या अंतर्गत प्रगतीवर ब्रिटिश जनतेस अवलंबून राहतां येणार नाहीं. तथापि, सोन्याचें जागतिक उत्पन्न वाढत असून त्याचा पुरवठा गरजू देशास होण्याची आशा वाटत आहे आणि त्यामुळें बाजारभाव न पडण्यास सहाय होण्याचा संभव दिसत आहे तरीहि, ब्रिटिश उद्योगधंद्यांची सध्यांची चलती कच्चा माल व खाण्याचे जिन्नस ह्यांच्या आयातीस उत्तेजनकारक होत असून निर्गत व्यापारात प्रगति होणें कठिण झालें आहे. देण्याच्या मानानें ब्रिटिश राष्ट्राचें परदेशाकडचें येणें वाढत नाहीं. जगाची राजकीय परिस्थिति आजमितीस आंतरराष्ट्रीय देवघेवीस फारशी अनुकूल नाहीं. ह्यामुळें जागतिक हुंडणावळींमध्यें स्थिरता उत्पन्न झाली असली तरी त्या स्थैर्याचा अपेक्षित सुपरिणाम व्यापारावर झालेला नाहीं व्यवहारात विपुल पैसा खेळता ठेवून व्याजाचे दर हलके राखण्याचें धोरण आर्थिक चलतीस उपकारक झालें असलें तरी त्यावर विशेष प्रकारानें विसंबून रहाण्यात हंशील नाहीं असें बार्कलेज बँकेचे अध्यक्ष, मि फिशर, ह्यांचें म्हणणें आहे तें विचार करण्यासारखें आहे. स्वस्त मिळणाऱ्या भांडवलाचा दुरुपयोग होण्याचा पुष्कळ संभव असतो आणि त्याच्या पुरवठ्यानें उत्पन्न केलेली हुशारी अनेक वेळीं अंगलट येते, ही गोष्ट हिंदुस्थानांतहि ध्यानात बाळगली पाहिजे

आज जगात अर्थकारण स्वतंत्र राहिलेसें नसून तें राजकारणाच्या दडपणाखाली आहे आर्थिक स्वयंपूर्णता, संरक्षक जकाती, शेती व उद्योगधंदे ह्यांचें सरकारांनीं चालविलेलें संरक्षण व नियंत्रण ह्या गोष्टी सध्याच्या जागतिक परिस्थितीच्या निदर्शक आहेत. उपस्थित झालेल्या राजकीय व आर्थिक परिस्थितींत बँकानीं आपल्या पतीचा ज्यास्तींत

ज्यास्त उपयोग आपल्या समाजास कसा होईल हें पहावयाचें असतें त्याच्या स्वत च्या कामगिरीस राजकीय व आर्थिक मर्यादा असतात, त्याचें उल्लघन त्यास करतां येत नाहीं हिंदुस्थानात ह्या रीतीनें व्यापार व उद्योगधद्दे ह्यास पैसा पुरवणाऱ्या संस्थानीं आपलें राष्ट्रकारणांतलें स्थान ओळखून उपयुक्त कामगिरी बजावा वयाची आहे. परतु येथील ह्या सबधातली स्थिति बिनघटनेची व मागसलेपणाची आहे रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टावर आम्हीं लेखमाला गुफीत आहों तिच्या परिशीलनानें ह्या परिस्थितीवर उत्तम प्रकाश पडत आहे

## रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

( ४ )

### लांब मुदतीचीं कर्जें

शेतकऱ्यास लागणारें कर्ज अल्प किंवा दीर्घ मुदतीचें असतें, ह्यावर त्या संबधातल्या प्रश्नाचें स्वरूप अवलबून रहातें लाब मुदतीचें कर्ज ( १ ) जमीन-खरेदी, ( २ ) जमिनीची दीर्घकाळ टिकणारी सुधारणा व ( ३ ) जुन्या कर्जाची फेड ह्या तीन उद्देशानीं काढण्यात येतें रिझर्व्ह बँकेच्या मतानें ह्यापैकीं तिसरा उद्देश अत्यत महत्त्वाचा असून शेतकऱ्याची पत वाढवण्यास त्याकडे विशेष लक्ष पुरवणें अगत्याचें आहे मध्यवर्ती बँकिंग कमिटीनें हिंदी शेतकऱ्याचें एकूण कर्ज ९०० कोटि रुपये असावें असा अदाज केला होता आणि हा आकडा गेल्या सहा वर्षांत फुगला असला पाहिजे. मालाचे भाव उतरल्यानें आणि आपला माल विकूनच शेतकऱ्यास देण्याची फेड करावी लागत असल्यानें कर्जाचा बोजा वरील अदाजाच्या दुप्पट झाला असला पाहिजे. हें जबर ओझें शेतकऱ्याच्या डोक्यावरून खाली उतरल्यावाचून किंवा चालू उत्पन्नातून त्याची फेड करता येईल इतकें तें हलकें झाल्यावांचून त्याची पत जाग्यावर आणणें दुरापास्त आहे. ह्या दृष्टीनें सध्याची स्थिति तर अत्यत बिकट आहे व्याजाचेंच ओझें एवढें जड झालें आहे कीं, शेतसाऱ्यावर अवलबून असणाऱ्या प्रातिक सरकाराची सापत्तिक कारभारात तारांबळ उडणार आहे जेथें जेथें कर्जाचा बोजा असह्य झाला असेल तेथें तेथें मुद्दल किंवा व्याज किंवा दोन्हीं कमी झालीं पाहिजेत असा रिझर्व्ह बँकेचा अभिप्राय आहे. ही सूट धनकोनीं आपखुषीनें दिली तरी प्रातिक सरकाराची त्या बाबतींत मदत अवश्य लागेल. सक्तीच्या सुटीचे परिणाम एकंदर दानत व पत ह्यावर प्रतिकूल होण्याची भीति असल्यानें मुद्दलाची व व्याजाची सूट आपखुषीची असावी असें मत त्या बँकेनें व्यक्त केलें आहे सावकारानें सूट व सवलत द्यावी ह्यासाठी वसुलीच्या वगैरे बाबतींत सहाय देणें प्रातिक सरकारास आवश्यक आहे. मध्यप्रातात ह्यासबधानें करण्यात आलेला योजनेचा अनुभव विचारात घेण्याजोगा आहे. कर्जाच्या तडजोडीसाठी स्वतत्र बोर्डे नेमण्याचा प्रयोग इतर प्रातांमध्यें केला जावा अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे हत्तेबंदी व चागल्या हंगामाचे सालात जास्त हप्त्यांची शर्त अशी व्यवस्थाहि ज्या कर्जदाराचे बाबतींत उपयुक्त ठरणार नाहीं, त्या खालावलेल्या व बुडण्याच्या पंथास लागलेल्या ऋणकोस दिवाळखोरीचा स्वतंत्र कायदा लागू करण्यात यावा अशी शेतकी कमिशननें शिफारस केली होती, तिला बँकेच्या रिपोर्टांत दुजोरा देण्यात आला आहे. ह्या तऱ्हेच्या वंशपरंपरा चालत आलेल्या कर्जास कायद्यानें प्राधान्य द्यावें, कारण, शेतकऱ्याच्या गळ्यातली ही आनुवंशिक धोंड दूर होणें एरव्हीं कठिण आहे असें त्यात म्हटलें आहे

जुनीं कर्जें फिटल्यानेंहि खरा प्रश्न सुटत नाहीं कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा कर्जांत पडणार नाहीं अशी व्यवस्था होणें महत्त्वाचें तसेंच अवघडहि आहे, कर्जमुक्तता हा नवीन कर्जाचा सोपा मार्ग होण्याची खास भीति आहे शेतकऱ्यास शिक्षण मिळाल्यावाचून कर्जबाजारीपणाची अनिष्टता त्याच्या मनात बिंबावयाची नाहीं आणि हें शिक्षण तर दीर्घकालाचें काम आहे. कायदेकानूची अमलबजावणी व अनुत्पादक कार्यासाठी खर्च न करण्याचें शिक्षण ह्याचा परिणाम अखेर शेतकऱ्यास हिशेबी बनवण्यात होईल असा रिझर्व्ह बँकेस भरवसा वाटत आहे. जमिनीच्या साऱ्याच्या किंवा किमतीच्या विशिष्ट प्रमाणात कर्जाची रकम निश्चित होईल तर तें सहायकारक होईल आणि ह्या नियमाचें उल्लघन होऊं नये म्हणून सावकारांवरहि नियत्रण घालतां येईल कर्ज एकाच धनकोकडून काढले जावें असाहि नियम करता येणें शक्य आहे, त्याचा विचार ~~व्हावा~~ अशी रिझर्व्ह बँकेची शिफारस आहे. जमीन-धारणाच्या विविध पद्धति हिंदुस्थानात प्रचलित आहेत शेतकऱ्याची जमीन इतर वर्गाच्या हातीं जाऊ नये म्हणून काहीं प्रांतात कायद्याचीं बंधनें घातलीं आहेत असल्या कायद्याचें समर्थन करता आलें तरी त्याचा प्रतिकूल परिणाम शेतकरीवर्गाच्या पतीवर झाला आहे ह्यात शंका नाहीं पुरेसें तारण नसल्यानें सावकार लोक कर्जें देण्यास तयार नाहींत व त्या कारणानें शेतीच्या धद्यास भांडवलाचा पुरवठा होणें कठिण जात आहे. सहकारी पतपेढ्या व जमीन गहाणाच्या बँका ह्यासारख्या सस्थाच्या मार्गांतहि त्यामुळें आडकाठी येत आहे शेतकऱ्यामध्येंच सावकार निर्माण होऊन त्याचा लोभीपणा धदेवाल्या धनकोपेक्षा कितीतरी अधिक जाचक होत आहे जमिनीच्या मालकीची उलाढाल होण्याच्या मार्गांत कायद्यानें अडचणी उत्पन्न केल्या आहेत, त्या जाचक असल्यानें लाब मुदतीच्या वगैरे कर्जाच्या फेडीबाबत सरकारनें सावकारास व सहकारी सस्थास खास सवलती देणें आवश्यक आहे. कर्जाचे ठरलेले हप्ते थकल्यास सरकारनें जमीनमहसुलाप्रमाणें सावकारास वसूल करून देणें आणि कुळाची जमीन जमीनगहाणाच्या बँकास तारण लावून देता येणें ह्यासबधात मध्यप्रातात अलीकडे कायदे झाले आहेत, त्याचा दाखलाहि लक्ष्यात घेण्याची शिफारस इतर प्रातातील सरकारास रिझर्व्ह बँकेनें केली आहे वर वर्णिलेल्या प्रकारची व्यवस्था झाल्यावाचून शेतकऱ्यास लाब मुदतीचीं कर्जें मिळण्याविषयींची तजवीज होणें अशक्य आहे असें तिचें म्हणणें आहे जुन्या कर्जाची फेड झाल्यावरच ही योजना अमलात यावी, नाहींतर शेतकऱ्याच्या अडचणींत भर पडून त्याचें उपजीविकेचें मुख्य साधनच नाहींसें होईल अशी इशारत शेवटीं तिनें दिली आहे.

उन्हाळ्याकरितां ब्राह्मी तेल हें शुद्ध सोवरेल तेलात तयार केलेलें असतें

स्टॉकिस्ट : म गो कुळकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणे

मॅन्युफॅक्चरर : दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी.

### ईस्टरच्या लहरी

एप्रिल १ ते ३१ मार्च असें वर्ष धरण्यात येतें, त्यात ईस्टरच्या सणाची व सुट्टीची विलक्षण गल्लत होत असते एका ब्रिटिश वृत्तपत्रानें ह्या सबधात मजेदार माहिती दिली असून हिंदुस्थानातहि वरील अवर्धाचें "अधिकारयुक्त वर्ष" मानलें जात असल्यानें ती मनोरंजक होण्यासारखी आहे यदा ईस्टर मार्च महिन्यांत आणि गेल्या वर्षापेक्षा एक पधरवडा व १९३५ पेक्षा तीन आठवडे अलीकडे येत आहे १९३६–३७ सालात ईस्टर एकदा येऊन गेलाच आहे व तो आता पुन. त्याच सालअखेर आत घुसणार आहे येत्या ईस्टरचं शेपूट मात्र सोमवारीं १९३७-३८ सालांत पडेल आणि पुढच्या वर्षाच्या वाट्यास ईस्टरचा तेवढाच अश येणार आहे १९३८-३९ मध्यें ईस्टर सबध त्या वर्षीत पडेल पण १९३९ ४० सालीं ईस्टर दोनदा येईल आणि १९४०-४१ मध्यें ईस्टर मुळींच असणार नाहीं! कधीं मार्चमध्यें व कधीं एप्रिलमध्यें लहरीप्रमाणें येणाऱ्या ईस्टरच्या हालचाली निश्चित केल्या जाव्या असें वाटणें स्वाभाविक आहे

---

### माझी अगबोट कपनी

माझी आगबोट कपनी ह्या नावानें परिचित असलेल्या 'इंडियन कोऑपरेटिव्ह नॅव्हिगेशन ॲन्ड ट्रेडिंग कपनी 'ला शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कपनीनें जरूर तें भाडवल देण्याचें ठरविलें आहे ह्यामुळें, कोंकणच्या किनाऱ्यावर वहातुक करणाऱ्या ह्या देशी कपनीस स्पर्धेस तोंड देता यऊन तिला चागले दिवस लाभतील अशी अपेक्षा आहे.

## पुणें येथील फर्स्टक्लास सब जज यांचे कोर्टांत

**मुक्काम पुणें येथें**

नादारी अर्ज न १० सन १९३७

शकर तुकाराम सावत, मराठा, वय अदमासें ४५, धंदा नोकरी, रा घोरपडी, ता हवेली, अर्जदार रिणको

विरुद्ध

बोरीदास जसरुपजी आणि कपनी, वगैरे ५ जाब देणार धनको

ज्याअर्थी सदर अर्जदार रिणको यानें, प्राव्हिन्शिअल नादारीचा आक्ट (सन १९२० चा ५ वा) याअन्वयें आपणास नादार ठरविण्याविषयीं या कोर्टास तारीख २१ माहे १ सन १९३७ या तारखेची अर्जी सादर केलेली आहे व सदरीं सागितलेल्या रिणकोने फैल केलेल्या धनकोच्या यादींत तुमचें नाव आहे, त्याअर्थीं तुम्हास यावरून नोटीस देण्यात येत आहे कीं, सदरीं सागितलेल्या अर्जीच्या चौकशीसाठीं व रिणकोची जबानी घेण्यासाठीं या कोर्टानें तारीख १३ माहे ३ सन १९३७ ही तारीख नेमली आहे सदरहू प्रकरणात तुमच्या वतीनें काहीं सांगावयाची तुमची इच्छा असल्यास, तुम्हीं जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडरच्या द्वारें, हजर राहावें

तसेंच तुम्हास अशीहि नोटीस देण्यात येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वीं बजावर्णासाठीं पत्ता लिहून देण्यात तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यात येणार नाहीं

आज तारीख २ माहे २ सन १९३७.

S S Jogalekar,
नाझर


# आणखी एकवार

## नवीन कामांत प्रचंड वाढ

### स्थैर्य व प्रगति यांचा सुंदर मिलाफ

## वेस्टर्न इंडिया

### लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा

१९३६ साल अखेर ६६ लाख रुपयांचें नवीन विमा काम प्रगतीचा भला मोठा टप्पा

| | |
|---|---|
| १९३४ मध्यें | ४१ लाख |
| १९३५ मध्यें | ..५१ लाख |
| १९३६ मध्यें | .....६६ लाख |

अशा जलद परंतु खात्रीच्या वेगानें कंपनी प्रगतीच्या मार्गावर नेटानें आणि वैभवानें चालली आहे आणि तरीही खर्चाचें प्रमाण अत्यंत अल्प राखून भरपूर शिलकी फंड आणि मजबूत व्याजाचा दर यांची जोड मिळवून व जास्तीत जास्त बोनसचा दर कायम ठेवून

## आदर्श विमा कंपनी

म्हणून आपलें स्थान कंपनीनें आणखी एकवार सिद्ध केलें आहे. याच कंपनींत आपला विमा उतरा.

मॅनेजर

# एशियन पॉलिसी

म्हणजेच

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

## धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## १९३५ व ३६ सालांतील सोन्याची आयात व निर्गत.

१९३५ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणींतून सुमारें १०४ कोटि रुपये किमतीचें सोनें खणून काढण्यांत आलें. गेल्या वर्षांपेक्षा हें उत्पादन ६३/४ कोटि रुपयांनीं अधिक आहे रशियातील खाणींचेंहि उत्पादन वाढलें आहे ग्रेटब्रिटनकडे सोन्याचा प्रवाह कसा वहात आहे, ह्याची कल्पना खालील आकड्यावरून येईल:—

| सोनें | ग्रेटब्रिटनची आयात-निर्गत १९३५ | १९३६ |
|---|---|---|
| आयात | २९५ कोटि रु | ३९६ कोटि रु. |
| निर्गत | २०५ " | १०४ " |
| निर्गतीपेक्षां जास्त आयात | ९० " | २९२ " |

हिंदुस्थानासंबंधींचे सोन्याच्या आयात-निर्गतीचे आकडे खाली दिले आहेत:—

| सोनें | हिंदुस्थानची आयात-निर्गत १९३५ | १९३६ |
|---|---|---|
| आयात | . | ०·१३ कोटि रु |
| निर्गत | ४५ कोटि रु. | ३२ कोटि रु. |
| आयातीपेक्षा जास्त निर्गत | ४५ कोटि रु. | ३१ ८७ कोटि रु. |

हिंदुस्थानामध्यें सोन्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत नसतांना निर्गतीचा प्रवाह १९३१ सालापासून अखंड सुरू आहे हें लक्षात ठेवण्याजोगें आहे

### पोस्ट आणि तार खात्याचें अंदाजपत्रक

हिंदी पोस्ट व तारखात्यास १९३७–३८ मध्यें ४ लक्ष रु. नफा उरेल, अशी अपेक्षा आहे. ह्या खात्याच्या अंदाजपत्रकातील तपशील येथें दिला आहे.

( आकडे लक्ष रुपयाचे आहेत )

| | दुरुस्त १९३६–३७ | बजेट १९३७–३८ ब्रह्मदेश व एडन धरून | बजेट १९३७–३८ ब्रह्मदेश व एडन वगळून |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ११,६८ | ११,९१ | ११,१६ |
| खर्च | १०,८१ | ११,२१ | १०,३९ |
| मिळकत | ८७ | ७० | ७७ |
| थावें लागणारें व्याज | ७९ | ७९ | ७३ |
| वाढावा (+) तूट (–) | +८ | –९ | +४ |

म्हणजे ब्रह्मदेशाच्या व एडनच्या विभक्तीकरणामुळें पोस्ट व तारखात्यास फायदाच झाला आहे, असें आढळून येतें

### इनकमटॅक्सबाबतच्या कायद्याचा मसुदा येत्या वर्षी तयार होणार

प्राप्तीवरील कराबाबतच्या चौकशी कमिटीनें सुचविलेल्या सुधारणांस अनुसरून १९३८ सालच्या बजेट-अधिवेशनात बिल माडण्यात येईल व तपशीलवार छाननीकरितां तें सिलेक्ट कमिटीकडे सोपविण्यांत येईल कायदेमंडळाच्या सिमला येथील अधिवेशनात बिल पास होऊन त्याच्या अंमलबजावणीस १ एप्रिल १९३९ रोजीं सुरवात होईल असा अंदाज आहे.


**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price

**नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ७८,४०० |
| रिझर्व्ह फंड | २,७५८ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,५२,७०९ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ४,२८४ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,५६,०५४ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४०,७७२ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचें तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११८—० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०६—१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—१० |
| ४% १९४३ ... .. ... | १०८—१२ |
| ३½% बिनमुदत ... .. ... | ९५—१२ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०४—१२ |
| ३½% १९४८—५२ ... ... | ९९—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०६—१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९१३—६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३८—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) | ३४—१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५१७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | १०३—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—८ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु. ४ आ. ) | ८९७-८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ( ऑर्डि भाग ५० रु डिव्हि. १३% ) | १५०—१५ |
| कराची ( १०० रु चा भाग, डिव्हि ९% ) | २७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १४८२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५८२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९८—१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. इ प्रेफरन्स, १७ रु ८ आ ) | १८०—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु.ऑर्डि. रु ६) | ३८७—० |
| टाटा आयर्न ( ३० रु डिफर्ड रु. ७ आ ८ ) | १८४७—८ |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—५—९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयांस | ५३—५—० |

## गणेश सहकारी नाज ( धान्य ) भांडार, लिमिटेड.

### भिलसा, संस्थान ग्वालेर

ग्वालेर संस्थानातील भिलसा या जिल्ह्यासाठी एक सहकारी धान्याची कोठी भिलसा येथें तारीख २३ एप्रिल १९३३ रोजीं नोंदविण्यात आली आहे ही संस्था आपली सर्व देवघेव धान्यातच करते हिचें अधिकृत भाडवल २,००० मण धान्य असून प्रत्येक भाग ५ मण धान्याचा आहे. एका सभासदास जास्तींत जास्त २५ भाग धारण करतां येतात हिचे हल्ली १९ सभासद असून ते मुख्यत: दक्षिणी समाजांतील आहेत. संस्थेचें क्षेत्र जिल्हा असल्यानें सभासदाची संख्या वाढवून इतर समाजातील मंडळींना त्यात सामील करण्याचा कार्यकारी मंडळीचा हेतु आहे

संस्थेच्या प्रत्येक सभासदानें, मग त्यानें कर्ज घेतलें असो वा नसो, दरसाल निदान एक नवीन भाग घेतलाच पाहिजे अशी नियमात तरतूद केलेली आहे, याचा हेतू असा आहे कीं, हळूहळू प्रत्येक सभासदाच्या मालकीचें निदान १२५ मण धान्य कोठींत जमा होऊन रहावें

ता. ३० जून १९३६ रोजीं या कोठींत ५०६ मण गहूं जमा झालेले होते व त्यापैकीं ५०५ मण सभासदाकडे कर्जाऊ म्हणून देण्यांत आलेले होते कर्ज मुख्यत: बियासाठी उचललें जाते.कांहीं सभासद घर-खर्चासाठीहि थोडें धान्य कर्जाऊ घेतात.

उचललेलें धान्य सव्वा पटीनें सुगी संपताच प्रत्येक सभासद परत करीत असतो. आजपर्यंत या संस्थेचा कारभार व्यवस्थितपणें चालला असून तिचा फायदा सभासदाना पुरेपूर मिळतो असा अनुभव आला असल्यानें अशा प्रकारच्या संस्था ठिकठिकाणीं स्थापन करण्याचा संस्थानचा मानस असल्याचें कळतें

या संस्थेस व्याज रूपानें मिळणाऱ्या धान्यातून मामुली स्वरूपाचा खर्च वजा जाता रहाणाऱ्या धान्यापैकीं ½ गंगाजळी ठेवीस जमा केलें जातें व ¼ पर्यंत सभासदाच्या उन्नतीसाठी खर्च केलें जातें या खर्चांतून आखाडा, वाचनालय वगैरे चालवता येतात बाकी रहाणारें ¼ धान्य सभासदाना नफा म्हणून वाटलें जातें

या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष रा. फडणीस व सेक्रेटरी रा गद्रे हे आहेत.

वरील प्रकाराचा बृहन्महाराष्ट्रांतील नवीन उपक्रम महाराष्ट्र कांहीं निवडक ठिकाणीं करून पाहील काय ?

## विद्यार्थी

शैक्षणिक विषयाची सांगोपांग चर्चा करून विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याच्या धोरणानें वरील साप्ताहिक पुणें येथें चालविण्यात येणार आहे. अशा स्वरूपाचें एकहि पत्र सध्या अस्तित्वांत नाहीं, ही उणीव भरून काढण्याचा चालकाचा मानस आहे लवकरच साप्ताहिकाचीं पृष्ठें वाढविण्यात येतील श्री. दा गो भुसारी हे सदरहु साप्ताहिकाचे संपादक आहेत वा. व २ रु. ८ आ.

---

### ट्रेझरी बिलावर १५ आणे १० पै व्याजाचा दर

सरकारी ट्रेझरी बिलास १ कोटि, ३६ लक्ष रुपयांची मागणी गेल्या आठवड्यात आली सरकारास १ कोटि रुपये हवे होते, तेवढ्याचीं टेंडरें त्यांनीं स्वीकारलीं आणि त्यावर सरासरीचा व्याजाचा दर द. सा द शे १५ आणे १० पै इतका बसला

## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरिता पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी सस्थेला उत्तेजन देणें हें त्याचे कर्तव्य आहे जनतेची सेवा करणें हेंच आमचे ध्येय आहे वरील स्वदेशी सस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर



# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you

## NEW BUSINESS

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

## BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
*Offices* throughout India & the East

S C. MAJUMDAR, MANAGER . Bombay Branch | N. SARKAR, *General Manager*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगाव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगाव ( „ „ ) | १० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदे ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगाव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल ब्लॅक टूथ पावडर

पोरवाल अ‍ॅन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

भिडे यांचे लोखंडी नांगर

कॅटलॉग मागवा



भिडे आणि सन्स सांगली

दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

तारेचा पत्ता : "प्रेसिडेन्सी" पुणें. ] १० विश्रामबाग रोड [ टेलिफोन नंबर ७६३.

अध्यक्षः—श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ विमा कंपनी

विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. ५,००,००० पांच लाख

प्रत्येक शेअर रु. १०० याप्रमाणें ५००० शेअर्समध्यें विभागलेलें. अर्जासोबत रु. १५ व अर्जमंजुरी रु. १०.

ठेवी : चालूं ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के

मुदतीच्या ठेवी सहा महिन्यांपासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी.


कर्ज : थोड्या व लांब मुदतीचीं कर्जें दिलीं जातात. कारखानदारांच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्जें देण्याची व्यवस्था केली आहे. बँकेनें पसंत केलेल्या इसमांचीं बिलें डिस्काउंट केलीं जातात.

चेक्स, बिल्स, ड्राफ्ट्स्, हुंड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिलीं जातात.

ठेवीदारांतील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे.

मॅनेजिंग डायरेक्टर्सः—नि. ना. क्षीरसागर, चिं. त्रिं. चितळे.

फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें





आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु. १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पांच वर्षें गॅरंटीचें एक जर्मन 'वी' टाइम पीस. पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळे.

ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी, पोस्ट बॉक्स नं. १२२०४, कलकत्ता (२४)

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान' इति कौटिल्य अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १७ मार्च, १९३७. अंक ११

## दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

तारेचा पत्ता "प्रेसिडेन्सी" पुणे ] १० विश्रामबाग रोड [ टेलिफोन नंबर ७६२

अध्यक्ष —श्री रा न अभ्यकर, बी ए, एलएल बी, मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ विमा कंपनी

### विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. ५,००,००० पांच लाख

प्रत्येक शेअर रु १०० याप्रमाणे ५००० शेअर्समध्ये विभागलेलें अर्जासोबत रु १५ व अर्जमंजुरी रु १०

**ठेवी :** चालू ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के

मुदतीच्या ठेवी सहा महिन्यापासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी

**कर्ज :** थोड्या व लांब मुदतीचीं कर्जें दिलीं जातात कारखानदाराच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्ज देण्याची व्यवस्था केली आहे बँकेनें पसंत केलेल्या इसमाचीं बिलें डिस्काउंट केलीं जातात

चेक्स, बिल्स, ड्राफ्टस्, हुंड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिलीं जातात

ठेवीदारातील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे

मॅनेजिंग डायरेक्टर्स —नि ना क्षीरसागर, चिं त्रिं चितळे

### दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

## प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बॅन्क तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा करण्यात येणाऱ्या आपल्या रौप्यमहोत्सवानिमित्त सदरहु तारखेपासून दशवार्षिक रोखे शेंकडा ७० रु ८ आण्याच्या दरानें विक्रीस काढणार आहे

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रुपयांच्या दर्शनी किंमतीचे आहेत वरील रक्कम शेतकऱ्याची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे

हे रोखे विकत घेण्यात बिलकूल सट्टेबाजी नाहीं | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें

नागपूर शहर,
ता १ मार्च १९३७

जी. ए भोंसले, बी कॉम्
मॅनेजर, दि सी पी अँन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

उन्हाळ्याकरितां **ब्राह्मी तेल** हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें
स्टॉकिस्ट म गो कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें
मॅन्युफॅक्चरर . दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी

## विविध माहिती

**बँकांस सुट्टी**

बुधवार, ता. २४ मार्च रोजीं, मोहरमानिमित्त बँका बंद रहातील.

**शाळेंतील मुलास मोफत दूध पुरविण्याची योजना**

मुंबई कार्पोरेशनच्या शाळामधील मुलास रोज मोफत दूध पिण्यास देण्यासंबधीं स्कूल कमिटीनें एक योजना आखली आहे सदरहु योजना अमलांत आणण्यास कॉर्पोरेशननें मंजुरी दिल्यास त्याबाबत दरसाल दोन लक्ष रुपये खर्च येईल.

**लॅंकेशायरच्या गिरण्यात हिंदी कपाशीस मागणी**

ऑगस्ट १९३५ ते जुलै १९३६ ह्या मुदतींत लॅंकेशायरनें हिंदी कपाशीच्या ५ लक्ष, ४६ हजार गासड्या खरेदी केल्या, १९३४-३५ सालीं ३ लक्ष ९४ हजार गासड्याचा उठाव झाला होता.

**स्वदेशी कापडाचें उत्पादन ११० कोटि वारानीं वाढलें**

गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थानातील गिरण्यातलें कापडाचें उत्पादन २४० कोटि चौरस वारापासून ३५० कोटि वारापर्यंत वाढलें

**नवीन दिल्लींतल्या रस्त्यांवरचे विजेचे दिवे**

न्यू दिल्लीमधील रस्त्यावरचे म्युनिसिपल विजेचे दिवे १९३५-३६ मध्यें ५,६८८ होतें. त्याची संख्या १९३६-३७ मध्यें ६,४९१ झाली आणि त्याचे प्रीत्यर्थ म्युनिसिपालिटीस १ लक्ष ३९ हजार रुपये खर्च आला १९३५-३६ मध्यें हा खर्च १२ हजार रुपयांनीं कमी होता

**हिंदी साखरेच्या धंद्याविषयींचे नकाशे**

निरनिराळ्या प्रांतांतली उसाची लागवड, साखरेचे कारखाने आणि रेलवेजचा त्याच्याशीं संबंध ह्या गोष्टी स्पष्ट करून दाखवणारे दोन नकाशे इंपिरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या विद्यमानें प्रसिद्ध झाले आहेत.

**पुणें अनाथ विद्यार्थीगृह प्रवेशपरीक्षा**

पुणें अ. वि. गृहात प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या स्पृश्य हिंदु विद्यार्थ्यांनीं संस्थेचा छापील अर्ज फॉर्म २३ आण्याची तिकिटें पाठवून मागवावा व तो भरून १५ एप्रिलचे आत पाठवावा विद्यार्थ्यांचें वय १२ ते १५ असून वयाप्रमाणें त्याचें शिक्षण झालेलें असावें.

**राष्ट्रसंघाच्या वर्गणीची वसुली**

१९३६ सालअखेर राष्ट्रसंघाच्या ५८ सभासद-राष्ट्रांपैकीं ३८ राष्ट्रानीं आपली वर्गणी वेळेवर दिली आहे ९ राष्ट्रांनीं अद्याप काहींच दिलेलें नाहीं व ११ राष्ट्रांनीं वर्गणीचा कांहीं भाग दिला असून बाकी हप्त्या हप्त्यानें भरण्यात येत आहे

**हिंदी भुइमुगाच्या पिकाचा सरकारी अंदाज**

१९३५-३६ सालीं ५८ लक्ष, ५७ हजार एकरात भुइमूग पेरण्यात आला होता व शेंगदाण्याचें उत्पादन २२ लक्ष ५८ हजार टन इतकें झालें होतें चालू वर्षी ह्या आकड्यात अनुक्रमें २३ व २४ टक्क्यानीं वाढ होईल अशी अपेक्षा आहे. मुंबई इलाख्यातील १७ लक्ष ५२ हजार एकरांतील भुइमुगापासून अपेक्षित उत्पादन ६ लक्ष, ११ हजार टन आहे

**हिंदी एरंडीच्या पिकाचा सरकारी अंदाज**

यदाचे वर्षी १३ लक्ष, ७७ हजार एकरात एरंडीची लागवड झाली असून १ लक्ष २६ हजार टनाचें उत्पादन होईल असा सरकारी अजमास आहे म्हणजे, गेल्या वर्षीपेक्षां ४ ते ५ टक्क्यानीं वाढ झालेली आहे एकट्या हैद्राबाद संस्थानातच हिंदुस्थानातील एकूण लागवडीच्या ५२ टक्के एरंडी पेरण्यात आलेली आहे.

**गुरांसाठी इस्पितळें व दवाखाने**

मुंबई इलाख्यांत १९३५-३६ सालीं इस्पितळाची व दवाखान्यांची संख्या ११२ इतकी होती ह्या खात्यावर ४ लक्ष ८७ हजार रुपये खर्च करण्यात आला

**हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांमधील टपालाचे दर**

ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून विभक्त होत असल्यानें ह्या दोन देशांमधील पत्रव्यवहारास ह्यापुढें जादा दरानें टपालहशील द्यावें लागेल ब्रह्मदेशातून हिंदुस्थानात टपाल येतें त्यापेक्षा हिंदुस्थानांतून त्या देशाकडे ज्यास्त टपाल जातें, ह्या कारणानें वाढलेल्या दरामुळें हिंदुस्थानास थोडासा नफा होणार आहे

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें**

कै. आचार्य रवडे पारितोषकासाठी निबंध पाठविण्याची मुदत ३० जून अखेर वाढविण्यात आली आहे. निबंधाचा विषय सध्याच्या सुवर्ण-निर्यातीचा देशाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम असा आहे.

**ब्रिटिश तज्ज्ञांप्रीत्यर्थ ३९ हजार रु खर्च**

हिंदी शिक्षणपद्धतीमध्यें जरूर त्या सुधारणा सुचविण्याकरिता मि ॲबट व मि. वुड ह्या दोन ब्रिटिश तज्ज्ञाची एक कमिटी नेमण्यात आली आणि तिच्याप्रीत्यर्थ ३९ हजार रु. खर्च करण्यात आला. कमिटीच्या सभासदास पुरेसा वेळ नसल्यानें त्यांनीं फक्त तीन प्रांतासच भेट दिली. सरकारकडे अद्याप त्याचा रिपोर्ट दाखल झालेला नाहीं

**संयुक्त प्रांतामधील साखरेचे कारखाने**

हिंदुस्थानातील एकूण १४६ साखरेच्या कारखान्यापैकीं ७० कारखाने एकट्या संयुक्त-प्रांतात आहेत.

**पोस्टांत दुपारीं पत्रें टाका**

साधारणपणें सर्व लोक पोस्टाच्या पेटींत संध्याकाळीं पत्रें टाकतात. ह्या कारणानें, तीं निवडून व छाप मारून वेगवेगळ्या पिशव्यांत भरून पाठविण्याचें काम संध्याकाळीं व रात्रीं करावें लागतें सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं हीं पत्रें, विभागलीं गेल्यास पोस्टखात्याची सोय होईल ह्या हेतूनें ब्रिटिश पोस्टखात्यानें प्रचार चालविला आहे

**देशी साखरेवरील पट्टींत वाढ : शुगर मिल्स असोसिएशनचें गाऱ्हाणें**

देशी साखरेवरील अंतर्गत पट्टी दर हंड्रेडवेटास १ रु. ५ होती ती २ रु. करण्यात यावयाची आहे ह्यासंबधातील आपलें म्हणणें हिंदी साखरेच्या धंद्यात हितसंबंध असणाऱ्या व्यापाऱ्याच्या शिष्टमंडळानें फडनवीसापुढें गेल्या आठवड्यात मांडलें लवकरच नेमण्यात यावयाच्या टारीफ बोर्डाची जादा पट्टीमुळें कुचंबणा होईल, कारखानदार आणि व्यापारी ह्याच्यामधील देवघेवीवर पट्टीचा प्रतिकूल परिणाम होईल, कारखान्यावर जादा कराचें ओझें बसेल आणि एकूण पट्टी २५ टक्के कराइतकी प्रभावी होईल, इत्यादि मुद्दे शिष्टमंडळानें पुढें मांडले

**मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रु. कि. |
|---|---|
| २८-२-३७ ते ६-३-३७ | ४५,०६,१७१ |
| ७-३-३७ ते १३-३-३७ | २२,७२,२०२ |
| २१-९-३१ ते १३-३-३७ | २,९४,१३,४६,५४७ |

अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... १२८
२ बँकिंग आणि आर्थिक परिस्थिति ... १२९
३ ब्रिटिश लोकसंख्या घटत चालली .. १३०
४ राष्ट्रसंघाचें सामाजिक ऑफिस . .. १३०
५ स्फुट विचार . १३१
डफरीन जहाज आणि पी ॲन्ड ओ कंपनी–मोटार विमा कमिटीच्या शिफारसी–फेंच चलनाचें ग्रहण–म्हैसूरांत रेशमाचा कारखाना–श्री वालचंद ह्यांचें विमा परिषदेपुढील भाषण–विदेशी स्पर्धेपासून बचाव–मुद्रण प्रदर्शन व परिषद्–जर्मनींत भागेदारांची सत्ता संपली
६ स्वदेशी साखरेसंबंधा संशोधन ... . १३१
७ मोडतोडीच्या पोलादास जपानमध्यें मागणी . १३४
८ मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांत बँकेची ज्युबिली १३५
९ मुंबई येथील कापडाच्या गिरण्या .. . १३५
१० हिंदी सिमेंटच्या धंद्याची वाढ . .. १३५
११ सहकारी चळवळ . १३७
१२ निवडक बाजारभाव १३७

अर्थ

बुधवार, ता १७ मार्च, १९३७

## बँकिंग आणि आर्थिक परिस्थिति

(२)

इग्लंडमध्यें व्यापार व उद्योगधंदे ह्यास निदान तात्पुरती तरी चालना मिळाली आहे, ह्याचें प्रत्यतर ब्रिटिश बँकांच्या व्यवहारासंबधातल्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आकड्यामध्यें पहावयास सांपडतें. त्या बँकांमधल्या ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जें ह्या दोहोंतहि वाढ झालेली आहे गिऱ्हाइकांनीं बँकांकडून घेतलेलीं कर्जें चालू खात्यात जातात आणि एका बँकेवर काढलेल्या चेक्सचे पैसे देवघेवींच्या मार्गानें इतर बँकात ठेवी म्हणून दाखल होतात. ह्या कारणानें बँकांच्या ठेवी व कर्जें ह्याविषयींच्या आकड्यामध्यें वाढ झालेली दिसणें स्वाभाविक आहे. बार्क्लेज बँकेचें उदाहरण घेतलें तर असें दिसून येतें कीं, गेल्या डिसेंबर अखेर तिच्यामधल्या ठेवींचा आकडा सुमारें ५६० कोटि रुपयाचा होता व तो पूर्वसालाच्या मानानें ३० कोटि रुपयानीं जास्त होता लंडनमधल्या दहा प्रमुख बँकामध्यें असाच वाढावा झालेला दिसून येतो ह्या सर्व प्रमुख बँकांच्या ठेवींची एकूण रकम सुमारें ३,२०० कोटि रुपयापर्यंत चढली ह्या आकड्याकडे पाहिलें असता ब्रिटिश बँकांचे अवाढव्य प्रमाणातले व्यवहार आणि हिंदी बँकांच्या कार्याचा मर्यादितपणा ह्याची चांगली कल्पना येते लंडनच्या दहा मुख्य बँकात पूर्वीच्या वर्षाच्या मानानें गेल्या डिसेंबर अखेर एकूण १९० कोटि रुपयापेक्षा अधिक वाढावा झाला ठेवींच्या मानानें त्याची रोकड शिलकहि वाढली आणि रोकड व ठेवी ह्याचें परस्पर प्रमाण थोडें कमी होऊन व्यापारास लागणाऱ्या जास्त पैशाची तजवीज त्यास करता आली बार्क्लेज बँकेचें उदाहरण घेतलें तर असें दिसतें कीं, १९३५ मध्यें दर शंभर पौंडांच्या ठेवीस १२¾ पौंड रोकड शिलक तिनें बाळगली होती, पण १९३६ मध्यें हें प्रमाण शेकडा १२ इतकेंच होतें म्हणजे, गिऱ्हाइकाच्या ठेवींच्या मानानें शिलक रोकड कमी झाली आणि थोड्या रोकडीच्या आधारावर नेहमीपेक्षा अधिक प्रमाणांत कर्जें त्यास देण्यात आलीं. उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या वाढत्या उलाढालींचा हा परिणाम असून तो अभिनंदनीय आहे, हें उघड आहे. रोकड शिलकेच्या मानानें अधिक पैसा व्यापारात गुंतवला जाणें बँकास फायदेशीर होतें, हें सांगावयास नको

ब्रिटिश बँका सरकारनें काढलेल्या ट्रेझरी बिलात आपला बराचसा पैसा गुंतवतात १९३६ सालात ह्या बिलांच्या एकूण रकमा पूर्वीच्या वर्षाच्या मानानें थोड्या कमी असल्या तरी त्यांतला बँकांचा हिस्सा कमी न होता किंचित् वाढला, ह्याचें कारण हीं बिलें बँकाव्यतिरिक्त संस्थांनीं कमी प्रमाणात उचललीं हें होय. हुंडणावळीच्या दरात स्थिरता कायम राखण्यासाठी इंग्लंडमध्यें जो एक स्वतंत्र फंड निर्माण केलेला आहे, त्याच्या उलाढाली सारख्या चाललेल्या असतात ट्रेझरी बिलांची खरेदी–विक्री त्या फंडामार्फत चालते आणि ह्या व्यवहाराचा संबंध बँकांनीं ट्रेझरी बिलात घातलेल्या पैशाशीं अर्थातच येतो ब्रिटिश बँकांनीं खरेदी (डिस्कौंट) केलेल्या हुंड्याचें प्रमाण त्याच्या एकूण कर्जाच्या व्यवहाराशीं अल्प असतें आणि ह्या हुंड्यांमध्यें सरकारी ट्रेझरी बिलाचा भरणा असतो, हें लक्षात ठेवण्यासारखें आहे बार्क्लेज बँकेचें उदाहरण घेतलें तर असें दिसतें कीं, तिनें गेल्या सालीं हुंडी-खरेदींत फक्त ८० कोटि रुपये गुंतविले होते, त्यांपैकीं सुमारें ४८ कोटि ट्रेझरी बिलात होते, आणि ३२ कोटि रुपये व्यापारी हुंड्याच्या खरेदींत गुंतले होते व्यापारी व कारखानदार ह्यांनीं काढलेल्या हुंड्या बँकाकडे पूर्वीसारख्या येत नाहींत अशी तक्रार ब्रिटिश बँकर्स करीत आहेत, आणि बार्क्लेज बँकेचे अध्यक्ष, मि एडविन फिशर, ह्यांनीं आपल्या भाषणात ह्या प्रवृत्तीचा निर्देश मुद्दाम केला आहे

हिंदुस्थानात व्यापारी हुंड्या वाढत्या प्रमाणावर निघून त्या बँकाकडे डिस्कौंटसाठी आल्यावाचून आधुनिक पद्धतीच्या बँकिंगची प्रगति ह्या देशात होणार नाहीं, आणि हिंदी रिझर्व्ह बँकेचें मुख्य कार्य यशस्वी रीतीनें चालण्यास सहाय व्हावयाचें नाहीं, असें नेहमी सांगण्यात येतें त्या दृष्टीनें इंग्लंडमधील वर निर्दिष्ट केलेली प्रवृत्ति विचारात घेतली जाणें अवश्यक आहे आंतरराष्ट्रीय व्यापार घटला असून त्यास पैसा पुरवण्याची पद्धतिहि अलिकडे बदलली आहे ह्या कारणानें आयात-निर्गत करणारे व्यापारी बँकाकडे हुंड्या सत्कारल्या किंवा वटवल्या जाण्यासाठी पूर्वीसारखे येत नाहींत कारखानदारहि स्वतःच्या पैशावर बरेच व्यवहार करीत असल्यानें बँकेकडे हुंड्या घेऊन जाण्याची त्याची प्रवृत्ति कमी झाली आहे हिंदी बँकाकडे येणाऱ्या व्यापारी हुंड्याचा व्यवहार वाढणें अत्यंत अवश्यक आहे, ह्यात शंका नाहीं रिझर्व्ह बँकेमार्फत प्रसिद्ध होणारे, तिला जोडलेल्या म्हणजे ह्या देशातील प्रमुख बँकांचे आकडे पाहिले असता ह्या हुंड्याचें प्रमाण किती अल्प आहे आणि त्या बाबतींत प्रगतीस किती जागा आहे, ह्याची कल्पना येते मुदती हुंड्यावरील स्टँप ड्यूटी कमी करून सरकारनें त्याच्या व्यवहारास उत्तेजन द्यावें अशी शिफारस बँकिंग- चौकशी कमिट्यांनीं केली होती त्या संबंधात मध्यवर्ती कायदेमंडळात एक प्रश्न नुकताच विचारण्यांत आला असता प्रांतिक सरकारांच्या हातातली ही गोष्ट असल्यानें त्याच्याशीं विचारविनिमय चालू आहे, असें उत्तर हिंदी फडनवीसांनीं दिलें ह्या महत्त्वाच्या बाबतींत अशी दिरंगाई कां व्हावी हें समजणें कठिण आहे. प्रांतिक सरकाराच्या उत्पन्नाशीं ह्या प्रश्नाचा संबंध येतो, हें खरें असलें तरी त्याचा निकाल लागण्यास दिवसगत होत आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं

## ब्रिटिश लोकसंख्या घटत चालली

उत्तर युरोप व उत्तर अमेरिका येथील देशात जनन-मृत्यूचें प्रमाण झपाट्यानें बदलत असून लोकसंख्येची वाढ कमी होत आहे. सुधारलेल्या रहाणीमुळें वयोमर्यादा वाढली तरी जनन घटत आहे आणि थोड्याच वर्षांत लोकसंख्या वाढण्याऐवजीं हळु हळु कमी होत जाणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत ह्यामुळें या प्रश्नाची चर्चा ग्रेट ब्रिटनमध्यें तज्ज्ञ मंडळींनीं चालविली असून त्याच्या मतें, लोकसंख्या घटण्याची प्रवृत्ति, संतति नियमनाच्या कृत्रिम उपायाचा वाढता अवलंब होत असल्यानें बळावत आहे १९३३ सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें जन्मास आलेल्या प्रत्येक मुलीस तिच्या आयुष्यात सरासरीनें ¾ मुलगी होइल असा सिद्धांत एका शास्त्रज्ञानें काढला आहे. म्हणजे, एका पिढींतून दुसरी पिढी पूर्णत्वानें न निघून ती चतुर्थांशच होणार आणि ह्या प्रमाणात ब्रिटिश लोकसंख्या कमी कमी होत जाणार लोकसंख्येमध्यें मुलें आणि तरुण स्त्री-पुरुष ह्यांचा भरणा कमी होणार हेंहि उघड आहे पासष्ट वर्षांनीं पासष्ट टक्के स्त्रियांचें वय सरासरीनें पासष्ट असेल असा ह्या संबंधातला हिशेब आहे लोकसंख्येची वाढ आजमितीस गरीब व मागसलेल्या वर्गांत होत आहे आणि तीहि कालांतरानें घटत जाणें अपरिहार्य आहे

ह्या प्रवृत्तीचा विचार राजकीय, सामाजिक, आर्थिक व नैतिक दृष्ट्या होणें जरूर आहे. ज्याची लोकसंख्या कमी होत आहे अशा देशावर इतरांचा डोळा असतो आपल्या वाढत्या प्रजेच्या उदरनिर्वाहाचें साधन कमी दाट वस्तीच्या देशात मिळणें रास्त व न्याय्य आहे असें त्यास वाटू लागतें ह्या दिशेनें पहाता, ब्रिटिश साम्राज्याचा दुसऱ्या देशास हेवा वाटून तो युद्धास कारणीभूत होण्याची भीति असते. ब्रिटिश वसाहतींमध्यें अफाट प्रदेश मोकळे पडले आहेत त्यांत पुरेशी वस्ती नाहीं आणि ग्रेटब्रिटनमधून वसाहतवाले तिकडे रहावयास पाठवणें शक्य नाहीं ऑस्ट्रेलिया हा देश सध्याच्या लोकसंख्येच्या पाचपट माणसें सहज पोसू शकेल, पण तेथील लोकास बाहेरचे लोक रहाण्यास येण्यास नको आहेत लोकसंख्या वाढावयाची थांबली असता जनतेच्या रहाणींत प्रतिकूल फरक होणार नाहीं, थोड्या माणसांमध्यें संपत्ति वाटल्यामुळें प्रत्येकाचा हिस्सा मोठाच होईल परंतु राष्ट्रीय कर्जाचा प्रत्येकावरचा बोजा अधिक जड होईल आणि विमा मंडळयास एका बाजूनें मृत माणसाबद्दल पैसे द्यावे लागतील आणि नवीन विम्याचें काम उतरत्या प्रमाणात मिळेल. लोकसंख्या घटणें राष्ट्रीय दृष्ट्या अनिष्ट आहे असें सिद्ध झालें असता ह्या आपत्तीस उपाय काय ?

कुटुंबामध्यें मुलींची संख्या मोठी असल्यास आईबापास आपल्या रहाणीचें मान उच्च ठेवता येत नाहीं, असा सार्वत्रिक अनुभव आहे जननाचें प्रमाण वाढून समाजाचें संख्याबल टिकावें असें त्यास वाटत असल्यास, मुलें निर्माण होणें आईबापाच्या दृष्टीनें फायद्याचें झालें पाहिजे, इतकेंच नव्हे, तर मोठ्या कुटुंबाच्या वाट्यास राष्ट्रीय संपत्तीचा ज्यास्त भाग येईल, आणि त्यांचें जीवन अविवाहितापेक्षा अगर निपुत्रिक पति पत्नीपेक्षा अधिक सुखकारक होईल, अशी समाजानें तरतूद केली पाहिजे फ्रान्स, जर्मनी, बेल्जम, इटली, इत्यादि देशात ह्या दिशेनें प्रयत्न चालू आहेत, तथापि फक्त जर्मनीमधील योजनासच दृश्य फल आलेलें दिसतें लोकसंख्येमध्यें वाढ व्हावी ह्याप्रीत्यर्थ युरोपखंडात आर्थिक मदतीचें आमिष दाखविण्यात येतें, परंतु त्याचा फारसा उपयोग होत नाहीं, असा अनुभव आला आहे. आपल्या म्हातारपणीं आपली शुश्रूषा करून पोटास घालण्याकरिता हक्काचें कोणीतरी असावें, अशी भावना कित्येकाची असते व आपल्या मुलाकडे ते ह्या दृष्टीनें पहातात. युरोपातील सुधारलेल्या राष्ट्रानीं म्हातारपणाच्या पेन्शनाची तजवीज करून वार्धक्याचा भीतिदायकपणा नष्ट करून टाकला असल्यानें आईबापाचें मुलावरील अवलंबन नाहींसें झालें आहे. अशा परिस्थितीमध्यें एकच मार्ग उरतो, तो म्हणजे, मोठें कुटुंब असणें आर्थिक दृष्टीनें हितकारक झालें पाहिजे जितकीं मुलें ज्यास्त तितकें वेतन अधिक व सवलती मुबलक अशी व्यवस्था होऊन मोठ्या कुटुंबाचे कर्णधारास मुलें नसणारापेक्षा ज्यास्त सुखानें राहाता आलें पाहिजे राष्ट्राच्या उत्पन्नाची वाटणी वरील तत्त्वाप्रमाणें केल्याखेरीज, मुलांची संख्या वाढविण्यास आईबापास पुरेसें उत्तेजन मिळणार नाहीं.

राष्ट्रीय संपत्तीच्या मानानें लोकसंख्या बेसुमार वाढत आहे, अशी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांतील इंग्लंडमधील परिस्थितीचें निरीक्षण करून माल्थसनें ओरड केली. परिस्थिति आता अजिबात पालटलेली आहे. लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करताना पूर्वग्रह सोडून देऊन, विशिष्ट परिस्थितीस अनुरूप असा सिद्धांत बांधणें कसें युक्त असतें, ह्याचें प्रत्यंतर वरील विवरणावरून तात्काळ येईल

---

## पौर्वात्य राष्ट्रांसाठी राष्ट्रसंघाचें स्वतंत्र सामाजिक ऑफिस

राष्ट्रसंघाच्या सामाजिक विभागातर्फे जाव्हामधील बॅंडोंग गावीं पौर्वात्य राष्ट्राच्या सामाजिक विषयाची चर्चा करण्यासाठी फेब्रुअरीमध्यें एक परिषद् भरली होती या परिषदेंत सर्व पौर्वात्य व काहीं पाश्चिमात्य राष्ट्राचे प्रतिनिधी व काहीं सामाजिक संस्थाचे चालक यानीं भाग घेतला. परिषदेच्या शेवटीं सामाजिक कार्य अविश्रांतपणें चालण्यासाठी पौर्वात्य राष्ट्रासाठी एक स्वतंत्र ऑफिस उघडण्याचें ठरलें या ऑफिसच्या द्वारें स्त्रिया व लहान मुलें याच्या अन्याय्य व्यापारास बंदी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल ह्या प्रीत्यर्थ, अशा व्यापाऱ्याचीं नावें गुप्तपणें एकत्र करून जास्त चौकशीसाठी ती पोलीसकडे देण्यांत येतील. याविषयीं निरनिराळ्या राष्ट्रातील प्रतिबंधक चळवळींची माहिती एकत्र करण्यात येऊन ती प्रसिद्ध करण्यात येईल निरनिराळ्या राष्ट्रातील पोलीस अधिकाऱ्याच्या गुन्हेगार पकडण्यासंबंधीच्या उपाययोजनाची माहिती खासगी रीत्या इतर पोलीस अधिकाऱ्याना कळविण्यात येतील गुन्हेगारास जागच्या जागीं पकडण्यासाठी जादा अधिकार मिळवण्याचा प्रयत्न या ऑफिसतर्फे करण्यात येईल व त्यासाठी बंदरातील अधिकाऱ्यांशीं जास्त सहकार्य केलें जाईल वेश्याव्यवसायाना परवाने देऊन त्याना दिलें जाणारें अधिकृत उत्तेजन इत पर थांबावण्याचें ठरलें स्त्रियाना वाचवण्यासाठी स्त्रियासच अधिकारी नेमण्यावर या ऑफिसचा कटाक्ष राहील सारांश, निरनिराळ्या पौर्वात्य राष्ट्राच्या सहकार्यानें स्त्रिया व लहान मुलें ह्याचा अमानुष व्यापार थांबवण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न करण्याच्या उद्देशानें या कचेरीची स्थापना होऊन परिषदेचें काम संपलें

# स्फुट विचार

### डफरीन जहाज आणि पी. ॲण्ड ओ. कंपनी

हिंदी तरुणास आगबोटींवर अधिकाऱ्याचें काम करण्यास लायक बनवण्याचें शिक्षण देण्याच्या हेतूनें डफरीन बोटीची योजना निश्चित झाली आणि निवडक विद्यार्थ्यांचा शिक्षणक्रम तिच्यावर चालला आहे. ह्या आगबोटींवर दिलें जाणारें शिक्षण कार्यक्षम असतें ह्याविषयीं समाधानाचे उद्गार वारवार प्रसिद्धहि झाले आहेत तथापि, ह्या शिक्षणक्रमातून बाहेर पडणाऱ्या तरुणास त्यानीं मिळवलेल्या अनुभवाचा व लायकीचा पुढें आयुष्यात उपयोग करण्याची संधि मिळेल तरच तें शिक्षण काहीं कामाचें असें मानता येईल आगबोटी बनवण्याच्या धंद्याचें तर ह्या देशात नावच घ्यावयास नको त्याच्या वहातुकीच्या देशी धद्याची स्थिति काय आहे हें दिसतेंच आहे तशीच स्थिति आगबोटीं वरील अधिकाऱ्याच्या कामाची होऊ नये म्हणून डफरीन बोटीवर शिक्षण देण्याची खास व्यवस्था हिंदी तरुणाचेसाठी करण्यात आली पी. ॲड ओ सारख्या कंपन्यास हिंदुस्थानात मोठी मिल्हाईकी असल्यानें तिच्या बोटींवर शिकलेल्या व लायक हिंदी तरुणास काम मिळावें अशी अपेक्षा साहजिकपणें उत्पन्न झाली परंतु लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें विचारल्या गेल्या प्रश्नास सरकारकडून जीं उत्तरें मिळालीं त्यावरून प्रस्तुत बाबतींत लोकाची निराशा होणार आहे आम्हीं नोकर कोणते ठेवावें हें ठरवण्याचा हक्क आमचा आहे असें पी ॲड ओ चे चालक म्हणणार आम्हीं फार तर शिकाऊ उमेदवार म्हणून हिंदी लोकास ठेवून घेऊ, पण त्यास अधिकाऱ्यांच्या कायमच्या नोकऱ्या देण्यास आम्ही बाधलेलें नाहीं, ही त्याची बाजू आहे कंपनीवर वजन पाडून तिच्या नोकरवर्गात हिंदी तरुणाचा शिरकाव करून घेण्याचें सामर्थ्य हिंदुस्थान सरकारात नाहीं असें त्यानीं असेंब्लींत दिलेल्या उत्तरावरून स्पष्ट दिसत आहे. ह्यावरून हिंदी जनता आणि सरकार ह्यानीं काय बोध घेतला पाहिजे हें निराळें सागण्याची आवश्यकता नाहीं

---

### मोटार--विमा कमिटीच्या शिफारशी

धंदेवाल्या मोटारगाड्याच्या मालकास अपघाताचा विमा उतरण्याची सक्ती करावी किंवा नाहीं ह्याची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या कमिटीचें काम पुरें झालें असून तिचा रिपोर्ट लवकरच प्रसिद्ध होईल कमिटीच्या शिफारशींचा अदाज काहीं वृत्तपत्रानीं केला आहे, त्यावरून असें दिसतें कीं, हिंदुस्थानातील बहुसख्य प्रात सक्तीच्या विम्यास अनुकूल आहेत. सरहद्द प्रात, पंजाब व संयुक्त प्रात ह्याच्या मतें खेडवळ लोकास विम्याचा फायदा होऊ शकणार नाहीं आणि त्याच्या योजनेमुळें प्रातिक सरकाराच्या उत्पन्नात ढवळाढवळ होईल सक्तीच्या विम्यामुळें मोटारींचे अपघात कमी झाले नाहींत, तरी त्या हाकण्यात काळजी घेतली जाण्याविषयींची तजवीज त्याच्या मालकास करणें जरूर होईल त्याचप्रमाणें, अपघाताबद्दल नुकसानभरपाईची कायदेशीर व्यवस्था झाली आहे असें खेड्यातील व अशिक्षित जनतेस कळून आलें म्हणजे सामान्य लोकहि आपले हक्क बजावण्यास पुढें येतील, असें कमिटीचें मत आहे सक्तीच्या विम्यासबधानें खेडेगावातील लोकानीं मागणी केलेली नाहीं, ह्याचें कारण त्यांस ही सोय नको आहे, हें नसून त्यास आपल्या गरजा पुढें मांडतां येत नाहींत, हें आहे मोटारींच्या वेगाचें नियत्रण करण्याची व्यवस्था प्रातिक सरकारानीं केल्यास आणि त्या मार्गानें अपघाताच्या सख्येस आळा घालण्यात आल्यास विमामडळया जोखीम पत्करण्याचा प्रश्न हातीं घेण्यास तयार आहेत मोटारी विकण्याचा धंदा करणारे लोक सक्तीच्या तत्त्वास अनुकूल आहेत, आणि विरोध मुख्यत्वेंकरून त्याच्या धंदेवाईक मालकाकडून होत आहे, हें अगदीं स्वाभाविक आहे तथापि अनेक मालकानीं सक्तीच्या विम्यास पाठिंबा दिला असून सामान्य जनतेचें मत व्यक्त करणाऱ्या सस्थाची तर त्यास हार्दिक अनुमती आहे विमा कमिटीच्या अभिप्रायाचा कयास वर दिला आहे, तो वस्तुस्थितीस धरून आहे, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं

---

### फ्रेंच चलनाचें ग्रहण अजून सुटलें नाहीं !

फ्रान्सनें आपल्या चलनाची किंमत ( परराष्ट्रीय हुडणावळीचा दर ) उतरवून तो स्थिर राखण्यासाठी ग्रेट-ब्रिटन व अमेरिका ह्याच्याशीं सहकार्ययुक्त व्यवस्था केली तथापि फ्रान्सच्या अतर्गत आर्थिक परिस्थितीची घडी नीट बसली नसल्याकारणानें त्या राष्ट्राच्या चलनात अलीकडे पुन्हा गडबड उडाली आहे फुगलेला सरकारी खर्च आणि वाढलेलीं कर्जें ह्याचा परिणाम पैशाच्या बाजारावर आणि चलनाच्या स्थैर्यावर होणें अपरिहार्य आहे फ्रॅंक चलनाची किंमत आणखी कमी होते कीं काय, ह्या शकेमुळें फ्रेंच जनतेची प्रवृत्ति सोनें परदेशात पाठवण्याकडे होणार हें उघड आहे ह्या प्रवृत्तीस आळा घालून हुडणावळीवरील लोकाचा डळमळणारा विश्वास दृढ करणें फ्रेंच प्रधान मडळास आवश्यक झालें आहे नवीन जाहीर कर्ज काढून तिजोरीची स्थिति आटोक्यात आणावयाची व ह्या सुधारणेचा आधार फ्रॅंकच्या हुडणावळीच्या दरास द्यावयाचा हें त्या मडळाचें मुख्य धोरण असलें पाहिजे त्याप्रमाणें फ्रेंच सरकारनें तजवीज केली असून ती यशस्वी होण्याची शिकस्त चालविली आहे स्टर्लिंगचा भाव ह्या गडबडींत १०५ चा १०७ एकदम झाला, परतु ह्या रीतीनें फ्रॅंकची हुडणावळ मुद्दाम खालीं आणून ती कमी दरानें स्थिर करण्याचा फ्रेंच मडळाचा विचार असणें शक्य नाहीं हुडणावळीच्या दराचे बाबतींत फ्रान्स, इग्लंड व अमेरिका ह्याचें संगनमत झालें तेव्हा जागतिक आर्थिक मदी दूर होऊन आतरराष्ट्रीय व्यापाराच्या ओघास त्यानें सहाय मिळणार अशी दृढ आशा उत्पन्न झाली होती आणि सार्वत्रिक चलनस्थैर्याच्या प्रवृत्तीस अभिनदनीय प्रारभ झाला असें मत प्रदर्शित करण्यात आलें होतें. ह्या समजुतीस फ्रॅंक चलनासबंधाच्या गेल्या आठवड्यातील बातम्यानीं धक्का दिला तथापि ही चावटळ लवकर नाहींशी होऊन जागतिक चलन व्यवस्थेचा ओघ अविरोध पुन्हा चालू लागेल अशी आशा पुन्हा वाटत आहे.

---

### म्हैसुरात रेशमाचा नवा कारखाना

औद्योगिक प्रगतीच्या बाबतींत म्हैसूर सस्थानचें धोरण अत्यत धडाडीचें असल्याविषयीं प्रसिद्धी आहे रेशमाच्या धद्यासबंधीं तेथें कित्येक वर्षें काम चाललें असून बगलोरच्या जवळ निघावयाच्या एका नव्या कारखान्याच्या इमारतीची मुहूर्तमेढ रोवण्याचा समारभ नुकताच म्हैसूरच्या महाराजाच्या हातून झाला त्या प्रसगीं केलेल्या भाषणांत महाराजानीं उद्गार काढले, ते मननीय आहेत प्रत्येक धद्यात कोणताहि कच्चा-पक्का माल वाया

जाऊ द्यावयाचा नाहीं, त्याचा काहींनाकाहीं उपयोग करून उत्पादनाचा खर्च कमी करावयाचा हें पुढारलेल्या देशांतील कारखानदाराच्या व्यवहारांतलें तत्त्व हिंदुस्थानांतल्या लोकांनीं शिकलें पाहिजे, आणि म्हैसूरमधील रेशमाच्या धद्यांत त्या तत्त्वाचा अवलंब केला जाणार आहे असें महाराजानीं सांगितलें रेशमाच्या बनावटींतल्या सर्व क्रिया कारखान्यात करून त्या धद्याचा पुरेपूर फायदा मिळेल अशी व्यवस्था करण्याचें धोरण म्हैसूरमध्यें आता निश्चित झालें आहे अठ्ठावीस हजार शेतकरी कुटुंबास सध्या वाया जाणाऱ्या कच्च्या रेशमापासून काहीं तरी उत्पन्न आता मिळू शकणार आहे आठ हजार विणकर कुटुंबास कच्चें रेशीम व रेशमाचें सूत सोइस्कर किंमतीस मिळण्याचीहि व्यवस्था होणार आहे तसेंच, रेशमी कापड वापरणाऱ्या जनतेचीहि पक्क्या मालाचे गुण व किंमती ह्याचे बाबतींत सोय होण्यासारखी आहे नवीन कारखान्यापासून म्हैसूरच्या जनतेस होणाऱ्या ह्या फायद्यांचा उल्लेख महाराजाच्या भाषणात आला आणि ह्या प्रगतीबद्दल त्यानीं आपल्या संस्थानच्या रेशीमखात्याचा गौरव केला ह्या संस्थानात चाललेल्या औद्योगिक प्रगतीसंबंधात तेथील सरकार आणि प्रजा सारखीच अभिनंदनास पात्र आहेत.

## श्री वालचंद ह्यांचे विमा परिषदेपुढील भाषण

हिंदी विमा कपन्याच्या परिषदेचें चौथें अधिवेशन कलकत्ता येथें ता ७ रोजीं श्री वालचद हिराचद ह्याचे अध्यक्षतेखाली भरलें होतें अध्यक्षानीं आपल्या भाषणात हिंदी विम्याचे मार्गांतील अडचणी व त्या निवारण्याचे मार्ग ह्याचें विवेचन केलें आणि विमाविषयक नवें बिल हिंदी धद्यास सरक्षण देण्यास अपुरें आहे, असें आपलें मत व्यक्त केलें विदेशी कपन्याची अनिष्ट स्पर्धा हिंदुस्थान सरकारच्या कायदा मत्र्यास कबूल नसली, तरी देशी कपन्यास त्याची अडचण पदोपदीं भासत आहे आणि टारिफ बोर्डासारख्या बोर्डाकडे हा प्रश्न सोपवला असतां हिंदी विमा धद्यास सरक्षण का हवें, हें साधार दाखविता येईल, असें श्री वालचद ह्यानीं सागितलें बँकिंगचा, विम्याचा व आगबोटींचा हे तिन्ही धदे केवळ हिंदी लोकाच्या हिताचे दृष्टीनें चालविले जाऊन त्याप्रीत्यर्थ जरूर ते प्रयत्न करण्यात आले पाहिजेत, ह्या दृष्टीनें नवीन विम्याचें बिल अत्यत असमाधानकारक आहे असा अभिप्राय त्यानीं प्रकट केला हिंदी विम्याचे धद्यास येणाऱ्या अडचणींची पूर्ण कल्पना असणाऱ्या तज्ज्ञानीं आपल्या रिपोर्टांत केलेली सरक्षणाची मागणी सरकारास अमान्य वाटून, प्राथमिक अनामत रकम व नोंदणी एवढ्या सूचनाचाच फक्त कायद्यात अतर्भाव झालेला आहे, ह्याबद्दल श्री वालचद ह्यानीं निराशा व्यक्त केली

## विदेशी कंपन्यांच्या स्पर्धेपासून बचाव

अनामत रकमेची अडचण हिंदुस्थानात काम करणाऱ्या विदेशी कपन्यास भासण्याचा काहींच सभव नाही, कारण त्यानीं प्रचड फड शिलकेंत टाकलेले आहेत आणि त्यामधून त्या केवढेंहि मोठें डिपॉझिट भरू शकतील. काहीं किमान डिपॉझिटची अट कायम ठेवून, एकूण फडाच्या प्रमाणात कपन्याकडून अनामत रकम घेण्यात यावी, असें श्री वालचद ह्यानीं सुचविलें सिलेक्ट कमिटीस ह्या बाबत जरूर त्या सुधारणा बिलामध्यें घडवून आणता येतील एकाद्या देशात हिंदी कपन्यांवर अयोग्य निर्बंध घातले गेले तर त्या देशाच्या कपन्यावर हिंदुस्थानात जशास तसें ह्या न्यायानें निर्बंध घालण्याचा अधिकार सरकारनें स्वत.कडे घेऊन ठेवला आहे, तथापि ही तरतूद निरुपयोगी ठरणार आहे इतर देशात मोठ्या प्रमाणावर विम्याचें काम हिंदी कपन्यास जोंपर्यंत मिळत नाहीं, तोंपर्यंत ह्या अधिकाराचा फारसा उपयोग नाहीं हें उघड आहे. इतर देश आपल्या विम्याचें काम बाहेर जाऊ देत नाहींत ह्या सबधातील श्री वालचद ह्यानीं दिलेलें जपानचें उदाहरण उद्बोधक आहे १९२३ सालच्या त्या देशातील धरणीकपाचे आपत्तीनतर जपाननें विम्याच्या धद्याची सघटना करण्याचें ठरविलें व नवीन विमा कपन्यास बदी करून जपानच्या बाहेरील कपन्यास प्रवेश मिळू नये अशी व्यवस्था केली आज, जपानातील बहुतेक सर्व विम्याचें काम त्या देशातील कपन्याकडेच असून, हा धंदा स्वत च्या पायावर उभा राहिला आहे अशाच तऱ्हेची तरतूद हिंदुस्थानात करण्यात यावी, अशी श्री वालचंद ह्यानीं शिफारस केली. विशेषत. आयुर्विम्याच्या कपन्याची सख्या आधी मर्यादित झाली पाहिजे, असें त्यानीं सागितलें अस्तित्वात असलेल्या कपन्याचें एकत्रीकरण होणें अवश्यक आहे असेंहि त्यानीं सुचविलें. बिलाचें कायद्यात रूपातर करताना सिलेक्ट कमिटी व 'मध्यवर्ती कायदेमडळ त्यात अवश्यक त्या सुधारणा करतील, अशी आशा आहे

## मुद्रण प्रदर्शन व परिषद

अखिल भारतीय मुद्रण प्रदर्शन व परिषद पुणें येथील औद्योगिक प्रदर्शनाचे जागेंत भरणार आहे सदरहु प्रदर्शनामध्यें छापखान्यास लागणारी यत्रसामुग्री, टाईप, शाई, कागद, इत्यादि पदार्थ ठेवण्यात येणार असून काहीं प्रात्यक्षिकेंहि दाखविण्यात येतील अशा प्रकारचें प्रदर्शन सबध हिंदुस्थानात हें पहिलेंच आहे, ह्या दृष्टीनें त्याच्या चालकाचें अभिनदन केलें पाहिजे ह्या प्रदर्शनाबरोबर मुद्रण-परिषदहि बोलावण्यात आली असून हिंदुस्थानातील बहुतेक सर्व छापखान्यास निमंत्रणें रवाना झालीं आहेत असें समजतें परिषदेपुढें येणाऱ्या प्रश्नांची रूपरेषा आम्हीं गेल्या अकात दिली आहे, तीवरून परिषदेचें महत्त्व कळून येईल, परदेशातील ह्या सबधातील सहकार्य व सघटना आपल्या नजरेसमोर ठेवून, परिषदेंतून एकादी कायम स्वरूपाची सघ-संस्था निर्माण व्हावी, अशी आमची सूचना आहे प्रेस ॲक्ट, फॅक्टरी ॲक्ट, परस्पर स्पर्धा, लिपी सुधारणा, इत्यादि बाबतींत छापखान्याचें सहकार्य झाल्यास ह्या धद्याची प्रगति शीघ्र गतीनें झाल्याखेरीज रहाणार नाहींच प्रदर्शन व परिषद ह्याच्या निमत्रणाचा स्वीकार करून छापखान्यांच्या धद्यात गुतलेल्या सर्व लोकांनीं ती यशस्वी होण्यास हातभार लावावा अशी आमची शिफारस आहे

## जर्मनींत भागीदाराची सत्ता सपली

ज्यानीं एखाद्या कपनींत आपलें भाडवल घातलें असेल अशा भागीदाराची मालकी व सत्ता कपनीच्या कारभारावर चालावी हा लोकशाही तत्त्वाचा योग्य असा दडक आहे जर्मनीमध्यें व्यक्तिनेतृत्वाचें माहात्म्य बोकाळलें असल्यानें तेथील नाझी सरकारनें ह्या तत्त्वाचें उच्चाटन केलें आहे ह्यापुढें कारखान्यांच्या व व्यापारी मडळ्या भागीदाराच्या देखरेखीखाली न चालता सरकारी अधिकाऱ्याच्या नियत्रणाखाली चालावयाच्या आहेत. व्यक्तिगत व अनियमित जबाबदारीचें तत्त्व जर्मन सरकारनें सयुक्त भाडवलाच्या मडळ्याच्या घटनेंत घुसडलें परंतु तें धोरण अव्यवहार्य ठरल्यानें आता पगारदार डायरेक्टराच्या हातीं कपन्याची सत्ता देण्यात आली असून त्याचा अध्यक्ष सर्वाधिकारी बनवण्यात आला आहे

## स्वदेशी साखरेसंबधीं शास्त्रीय संशोधन

### यांत्रिक शिक्षणाची सोय व स्वदेशीचा उत्कर्ष

कोणत्याहि धंद्याचा उत्कर्ष घडवून आणावयाचा असतां त्यास नुसतें जकातीचें किंवा दुसऱ्या स्वरूपाचें रक्षण देऊन भागत नाहीं. संरक्षणाच्या सहायानें तो धंदा हळुहळु स्वतःच्या पायावर उभा राहू शकेल ह्या तऱ्हेचे प्रयत्न हेतुपूर्वक करावे लागतात कच्चा माल सकस बनवणें, सुधारलेलीं यंत्रें कारखान्यात चालू करणें, विक्रीची पद्धति अधिक कार्यक्षम करणें, इत्यादि उपायानीं उत्पादन वाढवणें व त्याचा खर्च कमी करणें आवश्यक असतें ह्या गोष्टी कारखानदारास किंवा कच्चा माल उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्यास स्वतःच्या वैयक्तिक हिमतीनें व जबाबदारीनें करता येणें शक्य होत नाहीं शास्त्रीय व यांत्रिक सुधारणाची तजवीज संघटितपणानें व्हावी लागते आणि ती सरकारनें हातीं घेणेंहि आवश्यक होतें सध्याचा काळ आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा आहे, तसाच तो शास्त्रीय व यांत्रिक प्रगतीचा आहे अधिकाधिक उत्पादक यंत्रें बसवून आणि उत्पादनाच्या क्रियांची कार्यक्षमता वाढवून चांगल्या प्रतीचा व स्वस्त माल बनवणें हें कारखानदाराचें धोरण असतें हिंदुस्थानासारख्या देशात चोहोंकडे निरक्षरता पसरली आहे आणि यांत्रिक व औद्योगिक शिक्षणाचा अभाव आहे अशा स्थितींत शास्त्रीय संशोधन व यांत्रिक शिक्षण ह्याचे बाबतींत प्रगति घडवून आणण्याचा उपक्रम करण्याची जबाबदारी सरकारवर येऊन पडते हिंदुस्थानातील साखरेच्या धंद्याचा उत्कर्ष होण्यासाठी कोणते उपाय योजणें आवश्यक व शक्य आहे, ह्याचा विचार करण्यासाठी नेमलेल्या एका कमिटीनें अठरा वर्षांमागें अनेक सूचना केल्या होत्या, त्यामध्यें सरकारनें साखरेविषयींच्या संशोधनासाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करावी अशी शिफारस केली होती कानपूर येथें ‘इंपीरिअल इन्स्टिटयूट व शुगर टेक्नॉलजी’ ह्या संस्थेच्या इमारतीचें उद्घाटन सर फ्रॅंक नॉइस ह्याच्या हस्तें नुकतेंच झालें ही त्या कमिटीच्या उद्दिष्टाची परिपूर्तता होय, असें म्हणावयास हरकत नाहीं.

वरील उद्घाटनसमारंभाचे प्रसंगीं सर फ्रॅंक नॉइस ह्यानीं केलेलें भाषण मननीय आहे त्याच्यासारख्या हिंदुस्थानसरकारच्या जबाबदार कार्यमंत्र्यानें काढलेल्या उद्गारास विशेष महत्त्व प्राप्त होणें स्वाभाविक आहे. ह्या देशात-साखरेच्या धंद्याचा उत्कर्ष होऊ शकणार नाहीं असें त्यास काहीं वर्षें मागें वाटत होते, ती भीति निराधार ठरली असल्याचें त्यानीं स्वतः प्रांजलपणानें कबूल केलें आहे अठरा वर्षांमागें स्वदेशी साखरेच्या धंद्याविषयींची चौकशी झाली त्यावेळेच्या मानानें अलीकडे प्रगति घडून आली आहे, त्या विषयींचे आकडे त्यानीं दिले ते लक्षात ठेवण्यासारखे आहेत त्यावेळीं उसाची लागवड सुमारें २७½ लक्ष एकर जमिनींत होत होती, ती आता ४४ लक्ष एकरावर आली आहे सुधारलेल्या उसाची लागवड मागें अपवादात्मक असे ती आता सार्वत्रिक होऊन गेली आहे हिंदी शेतीचा धंदा व हिंदी शेतकरी वर्गाची आर्थिक स्थिति ह्याच्या दृष्टीनें सदरहु आकडे अत्यंत महत्त्वाचे आहेत. उसासारखें खर्चाचें व तेंहि उंची दर्जाचें पीक वाढत्या प्रमाणावर काढण्याची संधि शेतकरी वर्गास मिळणें ह्या गोष्टींत देशाच्या आर्थिक उन्नतीचें रहस्य साठलेलें आहे. उत्पादनाचे आकडेहि तसेच उत्तेजनकारक आहेत. गुळाच्या मापानें मोजावयाचें झाल्यास असें दिसतें कीं, १९२० सालीं हिंदुस्थानचें एकूण उत्पन्न ३० लक्ष टन होतें आजामितीस तें दुप्पट झालें आहे साखरेच्या धंद्यासंबधानें यांत्रिक व शास्त्रीय संशोधनाची सोय आता कानपूर येथील मध्यवर्ती संस्थेंत झाली असून तिचा उपयोग उत्पादकानीं अवश्य करून घेतला पाहिजे. स्वदेशी कारखान्यात वाकबगार यंत्रशास्त्रज्ञाची जरूरी भासेल, ती मागणी पुरी करण्याची व्यवस्था ह्या संस्थेंत झाली आहे. व्यावहारिक शिक्षणाचा हा नवा मार्ग मोकळा झाला असून स्वदेशी धंद्याचा उत्कर्ष आणि हिंदी तरुणास कामाची तरतूद ह्या दोन गोष्टी प्रस्तुत उपक्रमामुळें साध्य होणार आहेत


अखिल भारतीय

**मुद्रण प्रदर्शन व परिषद, पुणें**

ता २७।२८ मार्च १९३७

या दिवशीं वरील परिषद भरणार असून छापखान्याच्या धंद्याशीं संबध असलेल्या सर्व लोकानीं या परिषदेस प्रतिनिधि होऊन अवश्य हजर रहावें अशी विनंति आहे सर्व छापखान्याकडे परिषदेची व प्रदर्शनाचीं माहितीपत्रकें व निमंत्रणें रवाना होत आहेत. पण कोणास न मिळाल्यास त्यानीं पुढील पत्त्यावर कळवावें म्हणजे पाठविलीं जातील

पत्ता–चिटणीस, मुद्रण-परिषद,
आर्यभूषण छापखाना, पुणें.


मुंबई सरकारचे सर्जन जनरल साहेबानी भेट दिलेलीं

**डॉ. काळे यांचे पूना लेप्रसी क्लिनिक**

म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चर्मविकारावरील उपचाराचें विश्वसनीय ठिकाण

ठिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट

**FOLDING BOX & CAMERA**



Fitted with powerful lens Even a beginner can take excellent photos of anything on film in a second with this Camera Unemployed can earn Rs 5 daily Film Card, Frame, Chemicals, instruction book are given free Folding Camera Rs 4 Box Camera No 2, Rs 2-12 No 1, Rs 3-12 Packing & postage extra DUTTA & Co, (12) 15/1 Jay Mitra Street P O Hatkhola (Calcutta)



## मोडतोडीच्या पोलादास जपानमध्यें मागणी

मोडतोडीच्या जुन्या पोलादास ( माइल्ड स्टील ) नेहमींच मागणी असते व त्यास "स्क्रॅप आयर्न" म्हणतात. कच्च्या लोखंडापासून पोलाद बनवतात, तेव्हा त्यांत हें स्क्रॅप आयर्न भट्टीमध्यें घालावें लागतें, म्हणून पोलादाच्या कारखानदारास त्याची नेहमीं जरूर भासते सध्या लढाऊ सामान तयार करण्याची सर्व देशांत गर्दी उडाल्याकारणानें पोलादाच्या कारखान्यांची विशेष चलती चालु आहे आणि कच्चें लोखड ( पिग आयर्न ) कोक व स्क्रॅप ह्यास वाढती मागणी उत्पन्न होऊन त्या जिनसांच्या किंमती चढल्या आहेत. जपानच्या पोलादाच्या कारखान्यांत स्क्रॅप आयर्नचा तुटवडा झाला आहे आणि त्यांचे दलाल हिंदुस्थानांत हा माल धुंडून काढून तो स्वदेशीं पाठवीत आहेत. ह्यामुळें स्क्रॅप आयर्नचा बाजारभाव गेल्या महिन्यात पुष्कळ चढला आहे.

टाटा कपनीच्या लोखडास ( पिग आयर्न ) जपानमध्यें व युरोपांतहि मागणी असते आणि ती सध्याच्या चलतीच्या परिस्थितीमुळें वाढली आहे. मोडतोडीच्या पोलादाची किंमत पक्क्या पोलादी मालाच्या किंमतीवर अवलबून असणें स्वाभाविक आहे, आणि सध्यां मुबईच्या बाजारांत ती दर टनास ५०–५५ रुपये इतकी वर गेली आहे १९३४ सालीं ५७ हजार टन वजनाचें स्क्रप आयर्न हिंदुस्थानांतून बाहेर गेलें आणि त्याची १४½ लक्ष रुपये किंमत भरली ह्यातली बहुतेक सगळी निर्गत जपानला होती. १९३५ सालींहि स्क्रॅप आयर्नच्या व्यापाराची हीच स्थिति होती आणि जपान हिंदुस्थानातून हा माल मोठ्या प्रमाणावर घेत आला आहे मोडतोडीचें पोलादी सामान हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं गोळा करून तें मुबईच्या बदराकडे रवाना करण्याचा धदा सध्या किफायतशीर बनला आहे मोडक्या बाजारांतल्या जुन्यापान्या लोखडाचें नशीब उदयास आलें आहे, ह्यावरून दैवगति कशी विचित्र असते ह्याची सहज कल्पना येते. असल्या मालास परदेशात मागणी असेल आणि तो तिकडे मोठ्या प्रमाणांत आगबोटी भरून जात असेल ह्याची माहिती थोड्याच लोकास असेल धार काढण्यापूर्वी गायींच्या आचळांस दूध लावतात, त्याप्रमाणें पोलादाचा रस बनवण्याच्या भट्टींत लोखडाबरोबर जुनें पोलाद घालावें लागतें, हेंहि लक्षात ठेवण्यासारखें आहे हिंदुस्थानात, लोखड व पोलाद आणि त्यापासून कारखान्यात बनणारा माल ह्यांच्या किंमतीवर सध्या जगात चाललेल्या उलाढालींचा परिणाम घडून येणें अपरिहार्य आहे

* * *


# दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,

मॅनेजिंग डायरेक्टर

# दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चादी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजटस्

व्यापारी-उद्मी लोकांस

—अपूर्व संधि—

पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

उन्हाळ्याकरितां **सिल्क कोट वापरा**

महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे तयार अगर करून मिळतील.

बंबाचे माडीवर ] बुधवार चौक, पुणें.

## मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतिक सहकारी बँक लि.

### रौप्यज्युबिली . प्रगतीचा आढावा

मध्यप्रात व वऱ्हाड प्रातिक सहकारी बँकेची रौप्य ज्युबिली शनिवार ता. १३ मार्च रोजीं साजरी करण्यात आली, त्या वेळीं गव्हर्नरसाहेब हजर होते बँकेचे अध्यक्ष, रावबहादुर देशपाडे, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक स्वागतपर भाषणात सस्थेच्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला ते म्हणाले:—

"बँकची स्थापना २ एप्रिल १९१२ रोजीं जबलपूर येथें झाली दिवाण बहादुर शेठ वल्लभदास हे तिचे पहिले अध्यक्ष होते व त्यानीं पाच वर्षें काम केलें १९१७ सालीं रा ब एन् के केळकर हे अध्यक्ष झाले १९२० सालीं बँकेचें नागपुरास स्थलातर करण्यात आलें रा ब केळकर हे दिवाण झाल्यानतर रा. ब देशपाडे ह्यास अध्यक्ष करण्यात आलें व तेव्हा पासून बँकेचे तेच अध्यक्ष आहेत

सुरवातीस सयुक्त भाडवलाच्या तत्त्वावर बँकेची योजना करण्यात आली होती, परंतु नतर तिची घटना बदलुन तिला सहकारी रूप देण्यात आलें १९१३ सालीं बँकेस कायम ठेवी स्वीकारण्यास मंजुरी मिळाली आणि सेव्हिंग्ज व चालू ठेवींचीहि काहीं कालानतर जोड देण्यात आली आज बँकेकडे सर्व तऱ्हेच्या मिळून १ कोटि ३० लक्ष रुपयाच्या ठेवी आहेत १९३१ सालापासून बँकेनें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें सुरू केलें आहे

१९२० साल बँकेस जरा काळजीचें गेलें, परतु सरकारनें वेळींच कर्ज देऊन मदत केली १९३० सालानतर मात्र परिस्थिति ज्यास्त बिकट झाली तथापि, बँकेनें आपलें काम आजवर व्यवस्थित चालविलें आहे शेतकऱ्याच्या कर्जाच्या तडजोडीबाबत बँकेनें सरकारशीं सहकार्य केलें आहे परतु दुसऱ्याच्या पैशानें व्यवहार करताना औदार्य दाखविण्यास मर्यादा आहत, हें विसरून भागणार नाहीं

कर्जबाजारी शेतकऱ्यास सहाय करण्याच्या उद्देशानें, सरकारी गॅरटीचीं डिबेंचर्स उभारून, बँकेनें जमीन गहाणाच्या दहा बँकाच्या स्थापनेस मदत केली आहे व त्यास २३ लक्ष रुपये कर्जाऊ दिले आहेत."

हिंदुस्थानात सहकारी चळवळीची प्रगति फारशी समाधानकारक झालेली नाहीं तथापि, सहकारी प्रयत्नाखेरीज शेतकऱ्यांची उन्नति होणार नाहीं, अशा अर्थाचा समारोप करून बँकेच्या अध्यक्षानीं आपलें भाषण सपविलें.

### इलाखाधिपतींचें भाषण

इलाखाधिपति, सर हाइड गोवन, ह्यानीं प्रातिक सहकारी बँकेच्या सुरक्षितपणाबद्दल व मजबुतीबद्दल गौरवपर उद्गार काढले, आणि तिच्या व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केलें सहकारी चळवळीसबधीं सर्वसाधारणपणें बोलताना ते म्हणाले, "ह्या चळवळीमधील सस्थातून कर्जदारांचेंच प्राबल्य आह सहकार यशस्वी होण्याच्या दृष्टीनें, कर्ज देणारे व घेणारे ह्याचा एकाच गटात समावेश होणें इष्ट आहे सहकारी सस्थाच्या सूत्रचालकाचें जागीं अनुभवी बँकर्स असणें जरूर आहे शेतकऱ्याच्या कर्जाचा बोजा हलका होऊन थकलेल्या कर्जाची परतफेड झाली पाहिजे आणि त्यास पुन कर्जबाजारीपणा प्राप्त होऊ नये, अशी व्यवस्था करण्यात आली पाहिजे कर्ज काढण्याची त्यास जडलेली संवय मोडली जाणेंहि आवश्यक आहे कर्जापासून अलिप्त रहाणाऱ्या शेतकऱ्यांचें उदाहरण इतरांचेसमोर ठेवून त्यापासून होणारे फायदे त्यास समजावून दिले पाहिजेत."

---

## मुंबई येथील कपास कापडाच्या गिरण्या

### गिरणीमालक संघाच्या अध्यक्षांचा आढावा

मुबई मिलओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. विठ्ठलराव चंदावरकर, ह्यानीं असोसिएशनच्या वार्षिक साधारण सभेचे वेळीं भाषण करताना मुबई शहरातील कपास कापडाच्या गिरण्याच्या परिस्थतीचा आढावा घेतला ते म्हणाले —

"१९३५ सालाच्या मानानें १९३६ साल चागलें गेलें, आणि येतें वर्षहि आशादायक आहे तथापि, कापडाच्या खपास मर्यादा असल्यानें रात्रपाळी करून उत्पादन वाढविताना विचार करूनच पाऊल टाकलें पाहिजे आयात होणाऱ्या मालास बाजूस सारून हिंदी मालाचा प्रसार करणें सोपें नाहीं १९२७ सालीं हिंदी गिरण्यानीं २४० कोटि वार कापड तयार केलें, आता हें उत्पादन ३५० ते ३६० कोटि वार होत आहे कामाच्या तासामध्यें शेंकडा १० इतकी घट होऊनहि ही प्रगति झाली आहे, हें लक्षात ठेवण्याजोगें आहे मुबई शहरातील गिरण्यांच्या उत्पादनांत मात्र गेल्या दहा वर्षांत वाढ झालेली नाहीं हातमागाच्या कापडाचे उत्पादनात भर पडत आहे, हें विसरता कामा नये देशी व परदेशी गिरण्यांच्या स्पर्धेस तोंड देण्यास मुबई शहरातील गिरण्या आता समर्थ झाल्या आहेत. मुबईच्या गिरण्याचा माल परदेशात ज्यास्त खपू लागला आहे १९३५ सालीं ६३ कोटि वार कापड हिंदुस्थानाबाहेर खपलें, गेल्या वर्षीं हा आकडा ८३ कोटींवर गेला. इजिप्त व सिलोन हीं हिंदी कापडाचीं प्रमुख गिऱ्हाइकें आहेत

चागल्या दर्जाचें कापड बनविण्याकरिता लागणारा कापूस आयात करावा लागतो आणि ह्या प्रत्येक पौंड कापसावर आणा जकात द्यावी लागते रग, रसायनें, तेलें, यत्रसामुग्री, हीं सर्व परदेशांतूनच आणावीं लागतात आणि त्या सर्वांवर आयातपट्टी बसते, ह्या कारणानें लँकेशायरच्या मानानें मुंबईमधील गिरण्यास ज्यास्त खर्च येतो ब्रिटिश कापडावरील जकात कमी करावी अशी लँकेशायरची खटपट चालू आहे, तथापि हिंदी धद्यास दिलेलें सरक्षण १९३९ च्या मार्चअखेर कायम रहावयाचें ठरलेलें आहे आणि ह्या योजनेंत बदल होता कामा नये."

---

### हिंदी सिमेंटच्या धंद्याची वाढ

हिंदुस्थानांत सिमेंटचा खप सालोसाल ज्यास्त ज्यास्त होत असला, तरी आयातींत घट होत आहे व अतर्गत उत्पादन वाढत आहे, ही गाष्ट खालील आकड्यावरून नजरेस येईल.—

| वर्ष | हिंदी सिमेंटाचा खप ( टन ) | आयात सिमेंट ( टन ) | सिमेंटाचा एकूण खप ( टन ) |
|---|---|---|---|
| १९१४ | ९४५ | १,५०,५३० | १,५१,४७५ |
| १९१७ | ७३,७२८ | ७०,३१३ | १,४४,०४१ |
| १९२० | ९१,२५३ | १,१८,५०७ | २,०९,७६० |
| १९२३ | २,४३,९३६ | ९८,४८१ | ३,३३,४१७ |
| १९२६ | ३,८८,००६ | ५४,८०० | ४,४२,८०६ |
| १९२९ | ५,६०,६८२ | ७४,८०० | ६,३५,४८२ |
| १९३२-३३ | ५,८५,९२३ | ६०,८०० | ६,४६,७२३ |
| १९३५-३६ | ८,८६,२६७ | ४२,९०० | ९,२९,१६७ |

मिरजोळें ग्रामसुधारणा मंडळातर्फे भरलेलें हस्तव्यवसाय प्रदर्शन

वरील प्रदर्शन २४।१।३७ रोजीं मु पावस, ता रत्नागिरी, येथें उघडण्यांत आलें. प्रदर्शनाकरिता सुमारें २० गावातून ४०० वर नग आले होते. समारंभाचे सुरवातीस, सस्थेचे अध्यक्ष श्री भाटवडेकर ह्यानीं प्रास्ताविक भाषण करून सस्थेच्या कामा सबधीं माहिती सांगितली आणि कारागिरास भाडवलाचा पुरवठा व मालविक्री ह्याबाबत मदत करणें प्रत्येक राष्ट्रप्रेमी गृहस्थाचें कर्तव्य आहे, तें सर्वांनीं पार पाडावें, अशी विनंति केली ऑनररी सेक्रेटरी, श्री. भास्करराव भाटवडेकर, ह्यानीं आपला अनुभव निवेदन केला आणि ग्रामिकाचें व कार्यकर्त्याचें ध्येय काय असावें, ह्याबाबत आपले विचार सागितले सभेचे मुख्य वक्ते, श्री विष्णुपत आठल्ये, शिपोशी, ह्यानीं जिल्ह्यातील औद्योगिक परिस्थितीचा आढावा घेतला व उपधद्यांची आवश्यकता प्रतिपादन केली अशा उद्योगधद्यास लागणारें प्राथमिक भाडवल सरकारनें पुरवावें व कारागिरांनीं सहकारी तत्त्वावर सस्था चालवाव्यात असा त्यानीं उपदेश केला इतराचींहि समयोचित भाषणें झाल्यावर ५६ रु ४ आ ६ पै -किंमतीची बाक्षिसें वाटण्यात आलीं समारभाचे अध्यक्ष श्री. वि रा पित्रे, राजापूर, ह्यानीं आपल्या भाषणांत औद्योगिक प्रगतीकरता प्रत्येकास खटपट कशी करतां येणें शक्य आहे हें स्पष्ट केलें.

प खानदेश जिल्हा को. इन्स्टिटयूट

नदुरबार ता को सुपरवायझिंग यूनियनच्या कार्यकारी मडळाची सभा ता. २४ २-३७ रोजीं माजरें येथें चावडीवर भरविण्यात आली होती. कार्यक्रमाप्रमाणें सभेचें काम सपल्यावर यूनियनचे सुपरवायझर, श्री. उपाचार्य, ह्यानीं उपस्थित असलेल्या सोसायटी-सभासदास सभा कशा चालवाव्या, ठरावाची अमलबजावणी कशी करावी, ठरावबुक कसें लिहावें, इ समजावून सांगून सोसायट्याची सापत्तिक स्थिति व ती सुधारण्याचे उपाय, त्याचा कारभार, इत्यादि गोष्टींचीहि माहिती दिली इन्स्टिटयूटचे प्रॉ ऑफिसर, श्री पाटील, ह्यानीं सोसायटी चालविताना नैतिक वजनाचा कसा उपयोग करावा, इ गोष्टींचें विवेचन केलें रात्रीं त्यानीं "सहकारी चळवळीपासून फायदे" ह्या विषयावर सदीप व्याख्यान दिलें वरील कार्यक्रमाचा लोकावर उत्कृष्ट परिणाम झाल्याचें आढळून आलें, कारण रात्रीं तावडतोब ३०० रु वसूल झाला व ५०० रुपये एका आठवड्यात मिळण्याचीं आश्वासनें मिळालीं कार्यकारी मडळाच्या सभा नेहमी तालुक्याचे गावीं यूनियनचे कचेरींतच न करता वाईट सोसायट्याचे गांवीं त्या आळीपाळीनें भरवल्या असता त्याचा परिणाम हितावह होतो, हें वरील सभेनें स्पष्ट केलें आहे

---

नदुरबार ता. ( प खानदेश ) को सुपरवायझिंग यूनियन

वरील यूनियन ता १५ १ ३२ रोजीं नोंदविण्यात आली सध्या तिला एकूण ४४ सोसायट्या सामील असून त्यापैकीं १७ भिल्ल सोसायट्या स्पेशल ऑफिसर, तळोदे, ह्याजकडे वर्ग केल्या आहेत उरलेल्या १७ सोसायट्यापैकीं ३ 'अ' वर्गात १२ 'ब' वर्गात व १२ 'क' वर्गात आहेत २५-१२-३६ रोजीं झालेल्या ऑडिट तपासणींत यूनियनला 'अ' वर्ग मिळाला आहे प खानदेशातील 'अ' वर्गामधील ही एकच यूनियन आहे १९३५ ३६ सालीं ६७ सोसायट्यापैकीं १४ सोसायट्यांनीं व्याजाचे सवलतीचा फायदा घेतला यूनियनचे अध्यक्ष श्री सोमजी लोटू बारी व सुपरवायझर श्री उपाचार्य ह्याचें वरील समाधानकारक प्रगतीबद्दल अभिनंदन केलें पाहिजे.


## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८०,५०० |
| रिझर्व्ह फड | २,७८७ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,४४७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ४,८६९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६६,१०५ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात | |
| गुतविलेली एकूण रक्कम | ४०,१७६ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घरांचें तारणावर कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें / विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा.—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी सस्थेला उत्तेजन देणें हे त्याचें कर्तव्य आहे जनतेची सेवा करणे हेच आमचे ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर

सूट स्पेशॅलिस्ट

## टेलर्स रिसबूड ब्रदर्स

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ½% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११७-१४ |
| ½% ( १९२९-४४ ) लोन .. ... | १०६—६ |
| ४½% लाब मुदत ( १९५५-६० ) ... | ११६—८ |
| ४% १९४३ ... ... ... | १०७-१२ |
| ३½% विनमुदत .. . ... | ९२—० |
| ३½% १९४७-५० ... ... | १०४-४ |
| २¾% १९४८-५२ ... ... | ९८—१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लाब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४—२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५१०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—६ |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—८ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु. ४ आ. ) | ९००-० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५०-१५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि ५½% ) | १५२७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प प्रेफरन्स डिव्हि ६% ) | १९८-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. द्ु. प्रेफरन्स, १७ रु. ८ आ ) | १७९—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. रु.६) | ४१०—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १९७२—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३५—४—३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५२-१४-० |


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**पायोनियर डाइंग हाऊस पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२१ सदाशिव पेठ

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात

" गिलाव्याचा चुना ह्या तर आमचे चुन्याचे घचातील विशेष होय "

भाऊ गंगाधर साठे,

बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,

५११ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

**जनानी व मर्दानी कापड**

मिळण्याचें

खात्रीलायक एकच ठिकाण

**माधव सोमण ब्रदर्स,**

लक्ष्मीरोड, पुणें. २

स्थापना १९२०



मुंबई सरकारनें व कोल्हापूर सरकारनें प्रथम मान्य केलेलें

**जाधव टेलरिंग कॉलेज**

नवीन वर्ग सुरु झाले नांवें नोंदवा माहिती मागवा [ ४९७ बुधवार, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा

## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॅकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक सासळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निकाचें फाउटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यत्रसामुग्रीचें व पांच वर्षें गॅरटीचें एक जर्मन 'बी' टाइम पसि पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं. १२२०४, कलकत्ता (२४)

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

### रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्याच्या यांत्रिक युगात, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद का पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

### " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री न चि केळकर, संचालक केसरी

हयातीतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

### " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बॅक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु (ट स निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

"**W**RITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes**"

## K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. न १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए, यांनीं 'दुर्गाविवास,' भांबुर्डा प. न १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान ' इति कौटिल्य' अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ | पुणें, बुधवार, तारीख २४ मार्च, १९३७. | अंक १२

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

## प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बॅन्क तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा करण्यात येणाऱ्या आपल्या **रौप्यमहोत्सवा**निमित्त सदरहु तारखेपासून **दशवार्षिक रोखे** शेंकडा ७० रु ८ आण्याच्या दरानें विक्रीस काढणार आहे

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु च्या दर्शनी किंमतीचे आहेत वरील रक्कम शेतकऱ्याची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे

हे रोखे विकत घेण्यात बिलकूल सट्टेबाजी नाहीं | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें

नागपूर शहर,
ता १ मार्च १९३७

जी ए भोसले, बी कॉम्
मॅनेजर, दि सी पी अॅन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड

## काटकसर आणि चढाओढ

सध्याचे आर्थिक मंदीचे दिवसांत अधिक काटकसर कशी करितां येईल हा विचार प्रत्येकापुढें आहेच संस्था, ऑफिस, कारखाना, घर इ० सर्व ठिकाणीं काटकसरीचा प्रयत्न सुरू आहे

**परंतु**

वेळेची काटकसर करणें आरोग्याशिवाय कसें शक्य होईल, आणि आरोग्य मिळण्यास व टिकविण्यास उपाय काय ?

**याचें उत्तर**

## आरोग्यमिश्रण

**याचे सेवनाने**

शौचास साफ होऊ व तरतरी आणि लागून भूक वाढते उत्साह हीं वाढतात

बोधचिन्ह

**सर्व एजंटांकडे मिळतें**

**श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना, पनवेल—कुलाबा.**

## घरपोंच जोडी रु. ८




विद्यार्थिनी, कुलीन स्त्रिया, नर्सेस यांच्या आवडीचीं ती हीच

**टिकेकरी पातळें.**

नमुने मोफत पोस्टेजकरिता दीड आण्याचीं तिकिटें पाठवा

दि टिकेकर टेक्सटाईल मिल, लि.
पो टिकेकरवाडी, सोलापूर

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं, अहमदाबाद

# विविध माहिती

### हिंदी रेल्वेवरील वाघिणी

हिंदुस्थान सरकारच्या मालकीमधील रेल्वेजवरील वाघिणींच्या सख्येंत १९३५–३६ साली २३४ डब्याची भर पडली

### ७० हजार टन रुळाची खरेदी

मार्च, १९३६ अखेर संपलेल्या वर्षी हिंदी रेल्वे खात्यानें टाटा कंपनीकडून ७० हजार टन रूळ खरेदी केले

### दंग्यामधील नुकसानीची भरपाई

मुंबई येथील गेल्या हिंदु–मुसलमानाचे दंग्यातील प्राणहानि, घरादारास झालेलें नुकसान व शारीरिक इजा ह्यांच्या भरपाईकरिता २७ लक्ष ५९ हजार रुपयाची मागणी करणारे ४५८ अर्ज मुंबईच्या मुख्य प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें दाखल करून घेतले आहेत

### सिंधमध्यें सिमेंटचा कारखाना

सिंधमध्यें सिमेंटचा कारखाना स्थापन करण्याच्या दृष्टीनें पूर्वपहाणी चालू आहे

### ब्रिटिश रेलवेजचें भाडवल व भागीदार

ब्रिटिश रेलवेजमध्यें सुमारें १,६०० कोटि रुपयांचें भाडवल गुतलेलें आहे आणि तें ५ लक्ष ब्रिटिश भागीदाराच्या मालकीचें आहे

### वाफेची आणि विजेचीं रेल्वे इंजनें

वेग आणि उतारूंचें सुख ह्याचे दृष्टीनें विजेच्या इंजनापेक्षा वाफेच्या इंजनानीं ओढल्या जाणाऱ्या आगगाड्या चागल्या असतात असा अनुभव आहे

### आगगाडीचा दरतासास १०० मैल वेग

इंग्लंडमधील लंडन व न्यू कॅसल ह्याचे दरम्यान मध्यें न थाबता जाणारी आगगाडी दरतासास १०० मैल ह्या वेगानें धांवते ह्या वेगाच्या दृष्टीनें पाहता डेकन क्वीनला पुणें–मुंबईचा प्रवास ( बोरघाट हिशेबात धरता ) सुमारें दीड तासात करता यावा

### पुणें जिल्ह्यांतील मादक द्रव्यांचीं दुकानें

पुणें जिल्ह्यातील ताडीच्या एकूण ६१ दुकानापैकीं ५२ दुकानाचा येत्या वर्षाकरितांचा लिलाव गेल्या आठवड्यात झाला, आणि त्याचा मक्ता २ लक्ष २७ हजार रुपयास विकला गेला गेल्या वर्षीपेक्षा हा आंकडा ११३ हजारानीं लहान आहे अफूच्या ५२ दुकानाचा मक्ता १ लक्ष ६५ हजारांस गेला भांगेच्या दुकानाकडून सरकारास ९४ हजारांची प्राप्ती होईल

### मोफत शारीरिक शिक्षण वर्ग

सालाबादप्रमाणें यदाहि महाराष्ट्रीय मडळातर्फे पुरुष व स्त्रीवर्गाकरितां शारीरिक शिक्षणाचे मोफत वर्ग १ मे १९३७ पासून ३१ मे १९३७ पर्यंत चालविण्यात येणार आहेत. अर्ज पाठविण्याची मुदत २० एप्रिल अखेर आहे अर्जाबरोबर १ रु. रजिस्ट्रेशन फी पाठवावी

### गव्हर्नर जनरल ह्याचा खास अधिकार आणि कराबाबतचें बिल

स्वदेशी साखरेवरील पट्टी वाढवू नये आणि पोष्ट कार्डाची किंमत कमी करावी ह्या दोन महत्त्वाच्या दुरुस्त्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें कराबाबतच्या सरकारी योजनेंत सुचवल्या होत्या, त्या गव्हर्नर जनरल ह्यांनीं आपल्या खास अधिकारात नामंजूर केल्या आहेत

### कलकत्ता कॉर्पोरेशनचें बजेट

कलकत्ता कॉर्पोरेशनच्या बजेटात उत्पन्न सुमारें २३ कोटि रुपयाचें धरण्यात आलें आहे

### लंडनमध्यें हिंदी खेडेगांवी कारागिरीचा माल

एका मुंबईच्या मडळीनें हिंदुस्थानातील खेडेगावी कारागिरीच्या मालाचें प्रदर्शन लंडनमध्यें थाटलें असून तेथें कायमचें दुकान चालू करण्याचा तिचा बेत आहे.

### हिंद–जपान व्यापारी करार

हिंदुस्थान व जपान ह्याचेमध्यें व्हावयाच्या व्यापारी करारासबधीं वाटाघाटी अजून चालू आहेत. सल्लागार ह्या नात्यानें सरकारनें हिंदी व्यापारी प्रतिनिधींचें म्हणणें ऐकून घेतलें आहे त्याचा उपयोग करारांत कितीसा होतो, तें पहावें

### कॅडबरीचा प्रचंड कारखाना

कोको व चॉकोलेटच्या कॅडबरी ( ग्रेटब्रिटन ) कारखान्यांमध्यें तयार होणाऱ्या मालास दरसाल २ कोटि गॅलन दूध लागतें. कारखान्यातून ५३ कोटि कोकोचे डबे विक्रीकरिता रवाना होतात.

### हिंदी नाविक दलांतील अधिकारी

हिंदी नाविक दलाच्या अधिकारी वर्गातील १२३ अधिकाऱ्यापैकीं १० हिंदी आहेत व आणखी १२ हिंदी त्यासबधांतील उमेदवार आहेत

### साखरेवरील जादा पट्टीचा सुपरिणाम !

कानपूर येथील इंपीरियल इन्स्टिटयूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजीचें उदघाटन करताना सर फ्रॅंक नॉइस, हे म्हणाले.—

"साखरेवरील जादा पट्टीचें ओझें कारखानदारावर पडेल, गिऱ्हाइकास तें उचलावें लागेल का दोघावर तें विभागलें जाईल, हें आज निश्चित सागतां येत नाहीं. तथापि, ह्या पट्टीमुळें, साखरेच्या उत्पादनाची किंमत शक्य तितकी उतरवून साखरेस मागणी वाढविण्यासाठीं कारखानदार शक्य ते प्रयत्न करण्यास उद्युक्त होतील"

### वऱ्हाडमध्यें अर्बन बँकांची स्थापना

वऱ्हाड सहकारी इन्स्टिटयूटनें मुंबई इलाख्यातील सहकारी बॅंकाची पहाणी करण्याकरितां एक प्रतिनिधीमडळ पाठविलें होतें ह्या मडळानें वऱ्हाडमधील कांहीं प्रमुख शहरात अर्बन बॅंकाची स्थापना करण्यात यावी असें सुचविलें आहे उमरावती, एलिचपूर, खामगाव आणि यवतमाळ हीं शहरें बॅंका काढण्यास सोइस्कर आहेत, असा मडळाचा अभिप्राय आहे उमरावती येथें अर्बन बॅंक स्थापन करण्यासबंधीं पूर्वतयारी सुरू झाली आहे.

### इराकचा खजूर

इराकमधील खजूराच्या व्यापाराचा सर्वाधिकार सुमारें पाऊण कोटि रुपये भांडवलाच्या एका कपनीस मिळावा असा यत्न चालू आहे ह्या कपनीचे भाग कोणाहि इराकी माणसास घेता येतील आणि त्यांत सरकारचा हिस्सा असूं शकेल. ह्या योजनेचा विचार करण्यासाठी इराकचे मुख्य प्रधान व्यापारी लोकांची एक प्रातिनिधिक परिषद बोलावणार आहेत.

### मुंबई बदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किं. |
|---|---|
| ७-३-३७ ते १३-३-३७ | २२,७२,२०२ |
| १४-३-३७ ते २०-३-३७ | ३४,४४,८४७ |
| २१-९-३१ ते १३-३-३७ | २,९४,४७,९१,३९४ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १४० |
| २ व्याजाचे दर व कर्जरोख्याचे बाजार भाव | १४१ |
| ३ मध्यप्रांतीय सहकारी प्रांतिक बँक | १४१ |
| ४ रोखे बाजाराचें नियंत्रण | १४२ |
| ५ स्फुट विचार . | १४३ |
| सर ऑस्बोर्न–स्मिथ ह्यांचा राजीनामा–सावकारी कर्जाची चर्चा–शे काळे ह्यांचें ग्वाल्हेर येथील व्याख्यान–हिंदुस्थानांतील कारखाने–रेल्वे रिस्क नोट 'बी' संबंधीं निवाडा | |
| ६ गव्हाच्या पोह्यांचे कारखानदार, श्री सहस्रबुद्धे | १४५ |
| ७ औद्योगिक प्रगतीची आवश्यकता | १४४ |
| ८ श्री धूत पापेश्वर आर्योषधि कारखाना | १४७ |
| ९ सहकारी चळवळीचा प्रसार | १४७ |
| १० रोखे बाजारांतील व्यवहाराचें नियंत्रण | १४८ |
| ११ निवडक बाजारभाव | १४९ |



# अर्थ

बुधवार, ता २४ मार्च, १९३७


## व्याजाचे दर व कर्जरोख्यांचे बाजारभाव

सर्वच देशांत आणि विशेषत. इंग्लंडमध्यें लढाऊ सामानाच्या कारखान्यांत जोराचें उत्पादन चालू असल्यामुळें पोलादाचा माल आणि आनुषंगिक कच्चा माल यास विशेष मागणी उत्पन्न झाली आहे बाजारभावाची व औद्योगिक मंडळयाच्या भागाच्या किंमतींची चढती कमान आहे. ब्रिटिश सरकार लढाऊ तयारीकरता चारपांचशें कोटि रुपयांचें कर्ज काढणार असें जाहीर झाल्यापासून पैशाच्या बाजारात खळबळ उडाली आहे भांडवलास जादा मागणी आली असता व्याजाचे दर चढणार आणि सरकारी कर्जरोख्याचे भाव उतरणार हा सहाजिक परिणाम घडणार आहे हिंदुस्थान सरकारच्या कर्जरोख्याच्या किमतींत अलीकडे घट झाली आहे आणि व्याजाचे दर थोडेसे चढणीस लागले आहेत, हें ध्यानात ठेवण्यासारखें आहे मंदी हळु हळु नाहींशी होऊन चलतीस प्रारंभ झाला असता ह्या प्रगतीच्या मार्गांत व्यत्यय येऊ नये म्हणून ब्रिटिश सरकारनें लढाऊ तयारीचा खर्च कर्ज न काढता करांचें उत्पन्न वाढवून भागवावा अशी सूचना प्रो. केन्ससारखे तज्ज्ञ करीत आहेत तथापि, कराचा बोजा वाढवून जरूर असलेला पैसा उभा करता येईल किंवा कसें हा व्यावहारिक अडचणीचा प्रश्न आहे कराच्या रूपानें दरवर्षी शंभर–दीडशें कोटि रुपये जादा उत्पन्न करता येतील आणि कर्ज काढणें टाळता येईल अशी कल्पना ब्रिटिश फडनवीसाची आहे असें दिसत नाहीं. मामुली उत्पन्नात होईल तो वाढावा काढून घेऊन बाकीची आवश्यक असलेली रकम कर्जरूपानेंच त्यांस उभी करावी लागेल असा रंग दिसतो कर्जास अनुकूल परिस्थिति असणें त्याच्याहि दृष्टीनें इष्ट असल्यानें व्याजाचा दर वाढू न देणें हें त्यांसहि अभिप्रेतच असणार, ह्यात शंका नाहीं. कर, कर्ज व व्याजाचे दर ह्यांचा मेळ बसवूनच त्यास आपलें धोरण निश्चित करावें लागणार आहे

काहीं महिनेपर्यंत ब्रिटिश सरकार ट्रेझरी बिलाच्याद्वारें पैसा उभा करील आणि अगदी अडेल तेव्हाच लांब मुदतीचें कर्ज जाहीर करील ट्रेझरी बिलाची विक्री मोठ्या प्रमाणावर होऊं लागेल तेव्हा त्याचे व्याजाचे दर चढतील, ते बेतांत राखण्यासाठीं पाच–चार वर्षांच्या मध्यम मुदतीचीं कर्जें काढून काम भागवण्यांत येईल सरकारी कर्जरोख्याच्या किंमती उतरू न देण्यात ब्रिटिश फडनवीसाचें हित असल्यानें प्रो केन्स ह्यांचा सल्ला ते लक्षांत बाळगतील ह्यात संशय नाहीं परंतु ही गोष्ट कितीशी व्यवहार्य आहे, हा येथें खरा व महत्त्वाचा प्रश्न आहे लांब मुदतीचे व्याजाचे दर चढू न देण्याचें सरकारचें सामर्थ्य मर्यादित आहे. इकडे सर्वसामान्य जिनसाचे बाजारभाव वाढत आहेत आणि तें आर्थिक चलतीचें लक्षण आहे परंतु दुसऱ्या बाजूस त्याबरोबरच भांडवलास असलेली मागणी व व्याजाचे दर चढणें अपरिहार्य आहे. कर्जरोख्यात गुंतलेला आपला पैसा काढून बँका गिऱ्हाइकांस तो कर्ज म्हणून देऊं शकतील असें वाटत नाहीं आणि त्यास आपल्या रोकड शिलकेचें प्रमाणहि उतरवता येईल असें दिसत नाहीं बँकांनीं कर्जरोखे बाहेर काढले नाहींत म्हणजे त्याच्या किंमती उतरून व्याजाचे दर चढण्याचा संभव नाहीं एकंदरीनें पाहतां काहीं काळपर्यंत तरी सरकारी कर्जरोख्याच्या किंमती विशेष खालीं जातील असें दिसत नाहीं, ह्या आशयाचा अभिप्राय ब्रिटिश तज्ज्ञानीं व्यक्त केला आहे, तोच न्याय कमी अधिक प्रमाणात हिंदुस्थानांतील सरकारी कर्जरोख्यास लागू करण्यास हरकत नाहीं मंदी हळु हळु दूर होत असता बाजारभाव भरमसाट वाढून चलतीच्या जोराच्या लाटेमध्यें समाजानें गटांगळ्या खाऊं नयेत हा मुद्दा लढाऊ कर्जाच्या विरुद्ध पुढें मांडण्यात येत आहे पण कर्ज अपरिहार्य झाल्यास त्याचे दुष्परिणाम समाजास भोगावे लागूं नयेत अशी खबरदारी ब्रिटिश सरकार घेईल असें मानण्यास पुष्कळ जागा आहे सरकारी कर्जरोख्याचे भाव गेल्या तीन-चार वर्षांत चढीचे झाले, तेव्हा बँका व इतर संस्था ह्यास नफा काढून घेऊन पूर्वीचें नुकसान भरून काढता आलें आतां रोख्याच्या किंमती उतरावयास लागल्याकारणानें उलटा प्रकार घडून येत आहे आणि ह्या परिस्थितीमुळें होणाऱ्या नुकसानीची तजवीज करणें त्यास जरूर झालें आहे. पैसे गुंतवूं इच्छिणाऱ्या सामान्य जनतेसहि ही परिस्थिति व तिचें भवितव्य ह्या संबधात जिज्ञासा वाटणें स्वाभाविक आहे ह्यासाठीं पैशाच्या बाजारांतील उलाढालींकडे लक्ष ठेवणें आवश्यक झालें आहे.

## मध्यप्रांतीय सहकारी प्रांतिक बँक

### काहीं महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा

मध्यप्रांत–वऱ्हाड प्रांतिक सहकारी बँकेची रौप्य ज्युबिली नुकतीच साजरी झाली त्याप्रसंगीं प्रांताचे गव्हर्नर, सर हाइड गोवन, ह्यानीं बँकेचें अभिनंदन करताना, सध्याच्या विलक्षण मंदीच्या काळातहि बँकेनें आपली सांपत्तिक स्थिति मजबुतीची ठेवली आहे आणि ह्याचें लक्षण, भरपूर गंगाजळी, संशयित कर्जाची पुरेशी तरतूद व बँकेच्या मालकीचें बरेंच मोठें भांडवल ह्या गोष्टी आहेत असें सांगितलें बँकेचें स्थैर्य व सुरक्षितपणा हीं

मुख्यत्वेंकरून वेळोवेळ नफ्यामधून बाजूस काढून ठेवलेल्या रिझर्व्ह-सूच्या रकमांवर अवलंबून असतात ह्या दृष्टीनें पहाता सर हाइड गोवन ह्यांचे उद्गार यथार्थ आहेत असें म्हटलें पाहिजे प्रांतिक मध्यवर्ती बँकेचें मुख्य काम समाजात बचलेला व खेळणारा पैसा सहकारी संस्थास योग्य वेळीं व योग्य रीतीनें उपयोगी पडेल अशी निश्चित व्यवस्था करण्याचें असतें आणि मध्यप्रांतातील बँकेनें तें नीट बजावलें आहे अलीकडे प्रांतांच्या अनेक भागात बँकाचीं कर्जें थकलीं आहेत ह्या वैगुण्याकडे लक्ष वेधून, सहकारी संस्थामध्यें कर्जदाराचें प्राबल्य माजलें असल्यानें वसुली वेळेवर होत नाहीं व पैसा भरमसाट रीतीनें वाटला जातो ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टांत केलेल्या सूचनाकडे गव्हर्नरसाहेबानीं बोट दाखविलें बँकाच्या व्यवस्थेंत ठेवीदाराचें, म्हणजे कर्जें न घेणाराचे, प्रतिनिधी मोठ्या प्रमाणांत येतील तर फाजील कर्जें देणें व वसुलींत चालढकल करणें ह्या अनिष्ट गोष्टीस आळा बसेल ही त्याची सूचना विचारात घेण्यासारखी आहे बँकेच्या व्यवस्थेंत तज्ञ व जबाबदार माणसें पाहिजेत आणि तिच्या चालकात भिडस्तपणा असता कामा नये हें निर्विवाद आहे शेतकरी वर्गाच्या प्रतिनिधींमध्यें सढळ हातानीं कर्जें देण्याची व कर्जफेडीचा तगादा न करण्याची प्रवृत्ति आढळते ह्यांत शंका नाहीं सहकारी बँकाच्या व्यवस्थापक मंडळात व्यक्तिशः भागीदारांचे प्रतिनिधि असतातच ठेवीदाराचे निराळे प्रतिनिधि व्यवस्थेंत घेणें आवश्यक आणि व्यवहार्य आहे असें वाटत नाहीं सहकारी तत्त्वास अनुसरून आणि बँकिंगच्या चोख व्यवहारपद्धतीस धरून बँकाचीं कामें चालतील तर इष्ट सुधारणा घडून येईल ठेवीदाराचे प्रतिनिधि व्यवस्थापक मंडळांत घेतल्यानें हा कार्यभाग होईल असें नाहीं ठेवीदारासहि कर्जाची जरूर असते आणि शहरांतल्या सहकारी बँकामध्यें त्याचे भरपूर प्रतिनिधि असतात पण तेथेंहि थकलेलीं कर्जें आढळतात सारांश, बँकेच्या कारभारात जबाबदारीची कल्पना, निस्पृहपणा व चोखपणा हे गुण अवश्य आहेत आणि त्याच्या अभावीं अव्यवस्था व नुकसान झाल्यावाचून रहाणार नाहींत.

सध्यांच्या आर्थिक मंदीच्या दुर्घट अवस्थेंतून सहकारी चळवळ बाहेर काढण्याकरितां मध्यप्रांतीय सरकारानें कोणते उपाय योजले आहेत, ह्याचें सर हाइड यानीं वर्णन केलें लवादाच्या पद्धतीनें कर्जाच्या रकमा कमी करणें, सावकारी व्यवहाराचें नियंत्रण करणें आणि व्याजाचे दरास मर्यादा घालणें ह्या गोष्टीं-शिवाय जमीनगहाणाच्या बँकानीं काढलेल्या डिबेंचर्सच्या मुद्दलाची व व्याजाची हमी घेऊन सरकारानें शेतकरी वर्गांची स्थिति सुधारण्याच्या कार्यांत बरेंच पुढें पाऊल टाकलें आहे बँकांची हप्तेबंदीची बाकी थकल्यास ती सरकारनें जमीनमहसुलाच्या नियमाप्रमाणें वसूल करावी आणि जमीनदाराच्या कुळाची जमीन त्यास गहाण टाकता यावी अशी तजवीज करण्यात आली आहे तिचा उल्लेख रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टांत आहे ह्याविषयीं गव्हर्नरानीं समाधान व्यक्त केलें ह्या सर्व सुधारणा झाल्या तरी शेवटीं शेतकरीवर्ग जाणता, स्वावलंबी व काटकसरी बनल्यावाचून खरी प्रगति झाली असें म्हणतां येणार नाहीं ह्यासाठीं सदरहु शिक्षणानें व संघटनेचें काम हातीं घेण्यांत आलें पाहिजे आणि ह्या संबंधांत रिझर्व्ह बँकेनें केलेल्या सूचना मननीय आहेत असा अभिप्राय त्यानीं व्यक्त करून नवीन राज्यघटनेस अनुसरून मंत्रिमंडळ अस्तित्वात येईल त्यानें हे प्रश्न हातीं घेणें आवश्यक आहे असें सुचवलें

---

## रोखेबाजाराचें नियंत्रण

---

मुळात उपयुक्त असलेल्या कोणत्याहि गोष्टीचा दुरुपयोग करता येतो. अशा प्रकारची उपयुक्त बाब टाकून देण्यापेक्षा दुरुपयोगाची शक्यता मर्यादित करणें हाच शहाणपणाचा मार्ग असतो. हा व्यवहारातला नियम रोखेबाजारातील वायद्याच्या करारास लावावा लागतो. पुढें कमी ज्यास्त होणाऱ्या किमतीचा अंदाज करून आज रोख्याची खरेदीविक्री करण्यात थोडीबहुत जुगार असतो हें खरें, पण अशा प्रकारचे व्यवहार आवश्यक व अपरिहार्य असल्यास त्याचें नियंत्रण करून ते चालू देणें हें श्रेयस्कर आहे अंदाजावर आधारलेल्या करारास केवळ भरमसाट सट्टेबाजीचें स्वरूप प्राप्त होतें तें मात्र गर्ह्य असतें. ह्या व्यवहारास आळा बसावा अशी व्यवस्था रोखेबाजाराची घटना व नियम ह्यामध्यें केलेली असते. मुंबईच्या रोखेबाजाराची घटना व व्यवहार ह्याची चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, त्यामध्यें ह्या तत्त्वावर जोर देण्यात आला असून त्यास धरून शिफारशी केलेल्या आहेत ह्या बाजारात चालणाऱ्या धंद्यात सट्टेबाजीच्या सवद्याचें प्रमाण फारच मोठें असतें व तें ८०-९० टक्के असावें असा अंदाज आहे रोखे घ्यावयाचे नाहींत व द्यावयाचे नाहींत आणि वायद्याचे करार करून किमतींत होणारे फरक काय ते करारास अनुसरून द्यावयाचे व घ्यावयाचे अशा प्रकारचा केवळ जुगारीचा धंदा करणाराचा त्यात भरणा असल्यानें रोखेबाजाराचा आर्थिक उपयोग इलाख्यांतील जनतेस होत नाहीं, असा अभिप्राय कमिटीनें स्पष्ट नमूद केला आहे रोखेबाजाराचा संबंध लोकाच्या हिताशीं इतक्या निकटपणानें येतो कीं त्या संस्थेचे सभासद व चालक ह्यांनीं अत्यंत जबाबदारपणानें वागलें पाहिजे आणि ही प्रवृत्ति रूढ करणें हें उद्दिष्ट कमिटीनें शिफारसी करताना स्वतःपुढें ठेवलें आहे असें तिचें म्हणणें आहे

बाजाराची स्थिति बिघडली आहे असें वाटतांच व्यवस्थापक मंडळ मध्यें पडून खरेदी-विक्रीच्या कराराचे व्यवहार मागणी-पुरवठ्याच्या नियमास अनुसरून अनिर्बंधपणानें होऊ देत नाहीं, ह्या तक्रारीचा विचार करून मंडळाचे अधिकार मर्यादित व्हावे आणि त्याबरोबरच करार पुरे न करणाराविरुद्ध नियमाची अमलबजावणी कडक रीतीनें व्हावी अशी दुहेरी व्यवस्था कमिटीनें सुचवली आहे रोखेबाजाराची संस्था नियमाचें बंधन सरळ रीतीनें पाळीत नाहीं व आपली जबाबदारी ओळखत नाहीं असें दिसून आल्यास सरकारनें तिचे सर्वच अधिकार काढून घेण्यास कचरूं नये असें कमिटीचें म्हणणें आहे शेअरबाजारातल्या दलालांनीं धंद्याच्या सोयीसाठीं मंडळ बनवलें असता त्याच्या कारभारात जनता व सरकार ह्यानीं पडूं नये हा युक्तिवाद कमिटीस पटलेला नाहीं व्यवस्थेंत चोखपणा असावा म्हणून तिनें बाजाराच्या व्यवस्थापकास कांहीं अधिकार एका हातानें दिले आहेत, पण दुसऱ्या हातानें कडक निर्बंधहि घातले आहेत वायद्याचे व्यवहार करणारानीं दलालाजवळ विशिष्ट रकम अनामत ठेवली पाहिजे म्हणजे भरमसाट सट्टेबाजीस आळा बसेल ही सूचना दलालांच्या मतें अव्यवहार्य होती, पण तिला कमिटीनें पाठिंबा दिला आहे

---

# स्फुट विचार

## सर ऑस्बोर्न स्मिथ ह्यांच्या राजीनाम्याचा प्रतिध्वनी

रिझर्व्ह बँकेचे पहिले गव्हर्नर, सर ऑस्बोर्न स्मिथ, ह्यानीं आपला राजीनामा देऊन बराच काळ लोटला असला तरी त्याच्या कारणाविषयीची लोकाची जिज्ञासा अजून तृप्त झालेली नाहीं हिंदुस्थान सरकार आणि सर ऑस्बोर्न ह्याच्यामध्यें कोणत्याहि विशेष महत्त्वाच्या प्रश्नाबाबत मतभेद उपस्थित होऊन त्यास राजीनामा द्यावा लागला असें नाहीं, ह्या आशयाचें उत्तर लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत सर जेम्स ग्रिग ह्यानीं दिलें तथापि त्यानें समाधान न होऊन श्री सप्रू ह्यानीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें ठराव आणून सरकारनें जनतेस खात्री पटवील अशी माहिती देण्याची विनति केली. हुंडणावळ, सोन्याची निर्गत, लंडनच्या सराफाचें हिंदी धोरण निश्चित होण्यात प्राबल्य, इत्यादि प्रश्नाबद्दल सर ऑस्बोर्न स्मिथ व हिंदुस्थान सरकार ह्यांचें जमलें नसावें अशी लोकाची शंका त्यानीं आपल्या भाषणात प्रकट केली आणि ह्या गूढ प्रकरणावरचा पडदा दूर करण्यात यावा, असें प्रतिपादलें राजीनाम्याचें मूळ खासगी कारणात होतें, आणि रिझर्व्ह बँक व हिंदुस्थान सरकार ह्याच्या दरम्यान होणाऱ्या वाटाघाटी गुप्त स्वरूपाच्या असणें इष्ट असल्यामुळें ह्या सबधातला पत्रव्यवहार प्रसिद्ध करता येत नाहीं असें मि निक्सन ह्यानीं समर्थन केलें. रिझर्व्ह बँकेकडे कायद्यानें जे व्यवहार सोपविले आहेत, त्यात ढवळाढवळ सरकारनें केव्हाहि केलेली नाहीं असें आश्वासन त्यानीं दिलें ज्या परिस्थितींत व ज्या प्रकारानें सर ऑस्बोर्न स्मिथ ह्याचा राजीनामा जाहीर झाला, त्यावरून लोकाची विशिष्ट समजूत झालेली आहे मुदत सपण्यापूर्वी राजीनामा द्यावा लागल्यानें व त्यास नुकसानभरपाईदाखल रकम मिळाल्याचें ठरलें असल्याची बातमी प्रसिद्ध झाल्याकारणानें वरील समजुतीस मजबुती प्राप्त झाली आहे अधिक माहिती सरकारपाशीं द्यावयास नाहीं, ह्या उत्तरापलीकडे प्रस्तुत प्रकरणाची प्रगति सरकारच्या बाजूनें होण्याचा सभव नाहीं. लोकाच्या कल्पनेंत काहीं तथ्य असल्यास पुढेंमागें ह्या राजीनाम्याच्या प्रकरणावर प्रकाश पडेल असें मानून स्वस्थ बसण्यावाचून त्यांस गत्यतर नाहीं

## कौंसिल ऑफ स्टेटमध्यें सावकारी कर्जांची चर्चा

*लाला रामसरणदास ह्याचा, शेतकऱ्यास हलक्या व्याजानें* कर्जें मिळतील अशी तजवीज सरकारनें करावी ह्या आशयाचा, कौंसिल ऑफ स्टेटमध्यें पुढें माडलेला ठराव नामजूर झाला ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें काहीं नाहीं. शेतीचा धदा व त्याकरिता लागणाऱ्या कर्जाची तरतूद हे विषय प्रातिक अधिकारातले असून मध्यवर्ती सरकाराच्या कक्षेंत येत नाहींत ह्या आक्षेप त्या ठरावाविरुद्ध घेण्यात येईल अशी अपेक्षा कोणीहि सहज केली असती फडनवीशी खात्याचे चिटनवीस, मि निक्सन, ह्यांनीं लालाजींच्या ठरावास विरोध करताना ती हरकत पुढें केलीच सावकारानीं जरूर ती हमी दिल्यास *त्याच्या मार्फत* शेतकऱ्यास कर्जें मिळण्याची व्यवस्था सरकारानें करावी अशी ठरावात मुख्य सूचना होती रिझर्व्ह बँकेनें ही गोष्ट घडवून आणावी असें त्यांनीं म्हटलें असतें तर त्या बँकेच्या सरकारास सादर झालेल्या रिपोर्टाकडे बोट दाखवून हिंदुस्थान सरकारास सदरहू बाबतींत काहींच करता येणें शक्य नाहीं अशा युक्तिवादाचा आश्रय मि निक्सन ह्यांनीं केला असता. ही अडचण लक्षात घेऊन श्री. रामदास पंटलू यानीं एक उपसूचना पुढें माडून मूळ ठरावाची बाजू सावरून धरण्याचा यत्न केला. रिझर्व्ह बँकेनें पसत केलेले सावकार आणि प्रातिक सरकारानीं मान्य केलेल्या जमीनगहाणाच्या बँका ह्यांच्या मार्फत हलक्या व्याजाच्या दरानें शेतकऱ्यांस कर्जें मिळावीं अशी त्याची दुरुस्ती होती. अनियत्रित सावकाराच्या स्वाधीन पैसा करणें धोक्याचें आहे असें त्यानीं बोलून दाखविलें त्याची उपसूचना कौंसिलनें मंजूर केली, परतु मूळ ठरावावर मतें घेण्यांत आलीं तेव्हा तो नापास झाला ह्यावरून ह्या विषयात मन घालण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार नाहीं, हें स्पष्टच झालें

---

## प्रो काळे ह्याचें ग्वालेर येथें व्याख्यान

" आर्थिक आदोलनें " ह्या विषयावर ग्वालेर येथें प्रो. काळे ह्यानीं गेल्या १५ तारखेस व्याख्यान दिलें चलती व मद्दी ह्याचा एका पाठीमागून एक येण्याचा अनुक्रम चालतो असा अनुभव आल्यावरून अशा चक्रनेमिक्रमाची कारणें काय आहेत ह्याचा शोध अर्थशास्त्रवेत्त्यानीं केला आहे, त्यासबधातला अर्थशास्त्रीय सिद्धात सोपे दाखले देऊन वक्त्यानीं समजाऊन सागितला. " पाश्चात्य राष्ट्रात सध्या चलती चालू झाली आहे आणि ती सपून एकदम मद्दी पुन्हा येऊं नये म्हणून एव्हापासूनच खबरदारी घेण्यात यावी अशा सूचना केल्या जात आहेत जगांतील राष्ट्राचे परस्पर सबध राजकीय व आर्थिक बाबतींत इतके तेढीचे बनले आहेत कीं, व्यापार, उद्योगधदे व चलन ह्याच्या हालचाली अविरोधपणानें होऊ शकत नाहींत. राष्ट्राच्या अतर्गत औद्योगिक व्यवस्थेची घडी नवीन तऱ्हेनें बसवली जात आहे अशा परिस्थितींत मद्दी जाऊन चलती सुरू होण्याचा मामुली नियम आजच्या अवस्थेस लागू होत नाहीं. हिंदुस्थानची अवस्था तर अगदी विचित्र होऊन गेली आहे येथें कोणतेंच निश्चित धोरण अमलात येत नाहीं आणि आम्हीं जगाच्या घडामोडींत हेलकावे खात बसलों आहों ही असहायतेची स्थिति *प्रत्येक सुबुद्ध माणसानें मनन करण्यासारखी आहे ज्ञान, घटना* व कृति ह्या मार्गानें मंदी-चलतीचा प्रश्न आम्ही सोडवला पाहिजे". वरील आशयाचें प्रो. काळे ह्याचें भाषण झाल्यावर डॉ दिवेकर ह्यानी समारोप केला व व्याख्यात्याचे आभार मानले.

---

## हिंदुस्थानातील कारखाने

कारखान्याच्या कायद्याखाली येणारे असे सुमारें १० हजार लहानमोठे कारखाने १९३५ सालअखेर हिंदुस्थानात होते, त्यापैकीं ८,८३१ चालू होते नोंदलेल्या कारखान्याची संख्या एवढी मोठी आजवर कधीच भरली नाहीं, हें ध्यानात ठेवण्याजोगें आहे मुंबई इलाख्यामध्यें अहवालाचे वर्षी एक मोठा काचकारखाना स्थापन झाला रबरी बूट तयार करण्याचा धंदा बगालमध्यें मोठ्या प्रमाणावर निघाला आहे मोटार व सायकली ह्यास लागणाऱ्या टायर्सचें उत्पादनहि तेथें लवकरच सुरू होईल १९३५ मध्यें एकूण १६ लक्ष ११ हजार मजूर कारखान्यात कामावर होते. १९३३ व १९३४ च्या मानानें ह्या सख्येंत अनुक्रमें २ लक्ष ६ हजारानीं व १ लक्ष २४ हजारानीं वाढ झालेली आहे तागाच्या कारखान्यांत ५½ लक्ष लोक कामावर होते. कपाशीच्या कापडाच्या *गिरण्यातन ४ लक्ष ३८ हजार कामगार काम करीत* होते. १९३३ सालीं फक्त ३ लक्ष ६४ हजार लोकच ह्या

धंदांत होते आणि १९३४ सालीं हा आकडा ३ लक्ष ८५ हजारांवर गेला होता. कपास कापडाच्या गिरण्यांस गेल्या वर्षाइतके मजूर कामावर असण्याचें भाग्य ह्यापूर्वीच्या कोणत्याच वर्षी लाभलें नव्हतें. स्त्रीमजुरांच्या संख्येंत थोडी वाढ होऊन ती २ लक्ष ३० हजार भरली; मजूरी करणाऱ्या मुलांची संख्या मात्र सालोसाल कमी होत आहे १९३५ सालीं १५३/४ हजार मुलें कामावर होतीं. कारखान्यातील अपघातांत वाढ झालेली आढळली. १९३३ च्या मानानें ४३/४ हजार व १९३४ च्या मानानें २३/४ हजार अपघात ज्यास्त झाले. एकूण २३ हजार अपघातांपैकीं २०७ अपघात प्राणघातक ठरले. मजुरांसाठी चाळी बांधण्याच्या कामात प्रगति दिसून आली.

---

### रेल्वेरिस्क नोट 'बी' आणि त्यासबंधांतील रेल्वेवरील जबाबदारी

एप्रिल, १९२५ मध्यें सुरत कॉटन, स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्स लि. नें बी बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेच्या सुरत स्टेशनावरून ई बें. रेल्वेच्या सीआल्डा स्टेशनावर पोंचते करण्याकरितां कापडाचे ५८ गठ्ठे पाठविले, आणि त्याकरिता रेल्वेची रिस्क नोट 'बी' ही भरून दिली. ईस्टर्न बेंगाल रेल्वेवर माल जाण्यापूर्वी मध्यंतरीं तो ईस्ट इंडियन रेल्वेवरून जावा लागतो. ह्या ५८ गठ्ठ्यांपैकीं फक्त १५ गठ्ठेच रेल्वेनें माल मागविणाऱ्या व्यापाऱ्याचे स्वाधीन केले. बाकीचे ४३ गठ्ठे वाटेंत ई इ रेल्वेवर चोरीस गेले. त्याबद्दल नुकसानभरपाई मिळावी, म्हणून सुरतेच्या गिरणी-कपनीनें, ई. इं रेल्वे कंपनी सरकारी मालकीची असल्यानें, भारत मंत्र्यावर दावा लावला, व सुरतेच्या फर्स्टक्लास कोर्टानें वादीच्या बाजूचा निकाल दिला. मुंबई हायकोर्टानें हा निवाडा फिरविला, तथापि प्रिव्ही कौन्सिलनें हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध झालेलें अपील मंजूर करून सुरत येथील गिरणी कंपनीस २५,८२० रु. देवविले. फर्स्ट क्लास कोर्टाच्या हुकुमनाम्यातील रकमेवर ६ टक्के दरानें १९२६ सालापासून व्याज आणि कोर्ट खर्च हीं सर्व सुरत येथील गिरणी कपनीस मिळावयाचीं आहेत. गहाळ झालेल्या मालासंबंधीं रिस्क नोट 'बी' भरून माल पाठविणारास पूर्ण माहिती देण्याच्या रेल्वे कपनीवरील जबाबदारीचे दृष्टीनें हा निवाडा महत्त्वाचा आहे. वरील दाव्यामध्यें, रेल्वे कपनीनें आवश्यक असे साक्षीदार ( उ. रेल्वेगार्ड ) दाखल केले नाहींत, ह्यावरून त्यांची साक्ष रेल्वेविरुद्ध गेली असती, असें समजण्यास प्रिव्ही कौन्सिलला जागा सापडली आणि रेल्वे कंपनीच्या नोकरांनीं अफरातफर केल्यामुळें झालेलें मालकाचें नुकसान तिनें भरून दिलें पाहिजे, असा अखेरचा निकाल झाला

---

### औद्योगिक प्रगतीची आवश्यकता

सुरत येथील " ट्रेड्स ॲन्ड ॲग्रिकल्चरल एक्झिबिशन " च्या उद्घाटनप्रसंगीं मुंबई इलाख्याच्या उद्योगखात्याचे प्रमुख अधिकारी, मि पी. बी. अडवाणी, हे म्हणाले,

" सबंद हिंदुस्थानांत औद्योगिक दृष्टीनें मुंबई इलाखा हा सर्वांत पुढारलेला आहे, असें समजण्यांत येतें. तथापि ह्या इलाख्याची औद्योगिक क्षेत्रांत प्रगति केलेल्या देशांशीं तुलना केली तर अद्याप आपण किती मागसलेले आहोंत, ह्याची कल्पना येते. अजूनहि आपला प्रांत शेतीप्रधानच आहे. उद्योगधंद्यांची वाढ झाल्याखेरीज आपली आर्थिक स्थिति सुधारणार नाहीं. औद्योगिक व्यवसायांवर उपजीविका करणारांची संख्या शेतकऱ्यांच्या बरोबरीनें झाली पाहिजे आणि त्यांचें उत्पन्न शेतीच्या मिळकतीपेक्षां मोठं असलें पाहिजे, असें ध्येय आपण डोळ्यापुढें ठेवणें जरूर आहे. "


## —आदर्श विमा कंपनी—

## वेस्टर्न इंडिया

### लाईफ इन्शुअरन्स कं. लि. सातारा

या संस्थेचें

### सातवें मूल्यमापन प्रसिद्ध झालें.

मजबुतीची पराकाष्ठा ! ... नमुनेदार काटकसर !

सुप्रसिद्ध विमागणिती श्री ग. स. मराठे म्हणतात,

" विमा कंपन्यांत एक आदर्श संस्था होऊन राहण्यासारखी आपण जी सेवा चालविली आहे तिचें महत्त्व या मूल्यमापनामुळें यापुढें लोकांच्या नजरेंत जास्त जास्त भरत जाईल "

जास्तींत जास्त बोनस त्रैवार्षिक दर हजारी

**हयातीनंतरचे ७५ रु. व हयातींतील ६० रु.**

याच स्वदेशी कंपनींत विमा उतरा.

मॅनेजर.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

### लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल : | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल : | २,१४,१०० |
| रोख भरलेलें भांडवल : | १,०६,१२० |

### दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यावरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही गोखले,
मॅनेजर.

## गव्हाचे पोहे बनविणारे कारखानदार श्री. सहस्रबुद्धे

श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं नोकरी सोडून कारखानदारी पत्करली, ती सुखाच्या आशेनें नव्हे कांहीं युरोपियन स्नेह्यांबरोबर त्यास एकदा वनभोजनास जाण्याचा प्रसंग आला खाण्याच्या इतर पदार्थांत फोर्स नावाच्या कॅनडा येथें तयार होणाऱ्या गव्हाच्या पोह्याचा एक पदार्थ होता श्री सहस्रबुद्धे ह्यांनीं हें काय, तें कसें तयार केलें, अशी पृच्छा चालविली होती त्यावेळीं गव्हाच्या पोह्याचा त्याना परिचय झाला आणि ते पोहे त्यानीं पाहावयास मागून घेतले.

आपल्या इकडे आपण भाताचे पोहे बनवितों त्याहून हे पोहे तयार करण्याची कृति भिन्न असते, असें त्याना कळून चुकलें हे पोहे जेथें तयार होतात, तेथें एका युरोपियन स्नेह्याच्या वतीनें पत्रव्यवहार करून पाहिला. परंतु अवश्य ती यंत्रसामुग्री मिळण्यासारखी नाहीं असें त्याना आढळलें हिंदुस्थानात भरपूर गहूं पिकत असता गव्हाचे पोहे मात्र येथें बनविता येऊ नयेत, ह्याचें त्याना मोठें वैषम्य वाटलें गव्हाचे पोहे कसे तयार करावे, ह्या विचारांत चारदोन वर्षें निघूनहि गेलीं

मध्यतरींच्या अवधींत त्यांनीं नोकरी पत्करली होती. परंतु तें जीवन त्याना मळमळीत वाटूं लागलें म्हणून त्यांनीं गव्हाच्या पोह्याची जुनी कल्पना उकरून काढली आणि नोकरीस निरोप दिला

पण कारखानदारी म्हणजे सुळावरची पोळी, हें माहीत असूनहि त्यानीं फासे हातीं घेऊन दान टाकावयाचें ठरविलें कारखानदारी म्हणजे भाडवल अशी सर्वांची समजूत आहे ही समजूत अंशत. खरी आहे अंशत. म्हणण्याचें कारण असें कीं, भाडवलापेक्षाहि अधिक मोलाच्या गोष्टी म्हणजे रात्रदिवस काम करण्याची हौस, अडचणींस न जुमानण्याची धडाडी, लोकाच्या दृष्टीनें मूर्खपणा पत्करण्याची तयारी, अशा कितीतरी गोष्टी कारखानदाराच्या अगीं असावयास पाहिजेत ह्या गुणाच्या जोरावर मनुष्य भाडवल पैदा करू शकेल,पण त्यावाचून दसलाखी भाडवलाचा विनाकारण खुर्दा झाल्याशिवाय राहणार नाहीं

श्री सहस्रबुद्धे ह्यानीं गव्हाच्या पोह्यासाठीं यंत्र बनविण्याचें प्रथम हातीं घेतलें त्यापूर्वी त्यानीं प्रत्यक्ष गव्हाच्या पोह्याचा कारखाना पाहिला नसल्यामुळें कोठून आणि कशी सुरवात करावयाची हा मोठा प्रश्न पडला भाताचे पोहे जसे लाटीवर तयार होतात तसे गव्हाचे होणें शक्यच नव्हतें कारण भाताचें कणखर टरफल गव्हावर नसल्यामुळें लाटीखाली गव्हाची पूड होऊं लागली. परंतु नदीमुखाकडून उगम शोधीत जाण्यासारखें त्यानीं हळु हळु सशोधन सुरू केलें सध्याचें जें यंत्र त्यानीं बनविलें आहे तें पूर्णत्वास नेईपर्यंत त्यानीं इतके कष्ट केले कीं ते पाहणाराच्या डोळ्यासहि शीण यावा एक मोडावें, दुसरें उभारावें, फिरून तेंहि चुकावें आणि तिसरें बनविण्याच्या नादास लागावें म्हणजे प्रयोगाखातर केलेल्या श्रमाला आणि पैशाला काहीं मोजमाप लावण्याची सोय नाहीं. मात्र ह्या सर्व कष्टात आणि निराशमय स्थितींत मनात एक दृढनिश्चय कीं वनभोजनास गेल्यावेळीं ज्या पोह्याचा पदार्थ खाल्ला तसे पोहे हिंदुस्थानात बनवावे आणि ह्याच दृढनिश्चयाच्या जोरावर ते मोडण्या-रचण्याची नित्य नवी उलाढाल करीत

दोन वर्षांच्या परिश्रमानतर बऱ्या-वाईट स्वरूपाचे पोहे एकदाचे बनू लागले परतु अडचण अशी येऊ लागली कीं बाजारी गहू एकराशीचे नसल्यामुळें यंत्रातील आचेला ते सारखे तग धरीनात एकादा दाणा अधिक खरपूस व्हावा तर दुसरा अर्धवट कच्चा राहावा असें होऊ लागलें. कदाचित् भट्टीचा दोष असू शकेल ह्या दृष्टीनें त्यानीं ती आमूलाग्र तपासून पाहिली. आच कमी करावी तर पोहा फुलेना बरें, भट्टीचें क्षेत्र लाबवावें तर काहीं गव्हाचे दाणे आचेला तग न धरल्यामुळें करपून जात.

परतु सकल्पाप्रमाणें पूर्ण नसली तरी अर्धी मुर्धी सिद्धी प्राप्त झाल्यानतर श्री सहस्रबुद्धे ह्यांनीं स्वत' तयार केलेले पोहे त्याच युरोपियन मित्रास भेटीदाखल दिले आणि वनभोजनाचा प्रसग मुद्दाम घडवून आणला. खुद्द श्री. सहस्रबुद्धे ह्याना स्वतःचे पोहे फोर्सच्या पोह्याइतके सरस उतरले नाहींत ही अतर्यामीं जाणीव होतीच, परतु त्या व्यक्तीला इतपत पोहे तरी हिंदुस्थानात तयार करता येतील कीं नाहीं ह्याची शका होती इतकेंच काय, पण फोर्स हें काय आहे असें प्रथम विचारणारा गृहस्थ फोर्ससारखे पोहे तयार करू शकला हें त्याला मोठें नवलाचें वाटलें श्री सहस्रबुद्धे ह्याचें त्यानीं उदार अंत.करणानें अभिनंदनहि केलें पण श्री सहस्रबुद्धे ह्यांनीं फोर्सच्या पोह्याइतके ते साधले नसल्याचें स्पष्टपणें कबूल केलें परतु तिकडे लक्ष न देता तो गृहस्थ म्हणाला, "चुकता मि सहस्रबुद्धे तुम्हीं तुमचे पोहे फोर्स इतके साधले नाहींत ही बाब गौण आहे ते आज नाहीं उद्या तुम्ही खात्रीनें साधाल मीं अभिनदन केलें तें ह्या दृष्टीनें कीं फोर्स प्रॉडक्ट काय हें माहीत नसणारा गृहस्थ आज प्रत्यक्ष तसल्या प्रॉडक्टचा कारखानदार ह्या नात्यानें येथें आला आहे "

" तात्पर्यार्थानें तुम्ही म्हणता हें बरोबर. पण ह्या नुकत्याच पख फुटू लागलेल्या पाखराला केवढी भरारी मारावयाची आहे हें काय मीं सागावयास पाहिजे?" श्री सहस्रबुद्धे उत्तरादाखल म्हणाले

रात्रभर रानात कुडकुडत पडलेल्या प्रवाशाला सकाळीं धुकें फुटून सूर्य दिसू लागावा त्याप्रमाणें श्री. सहस्रबुद्धे ह्यांना श्रमसाफल्याचा थोडा फार आनद वाटला आणि ते नव्या जोमानें कामास लागले एवढ्या अवधींत त्याना नाउमेद करणारे किती प्रसग आले असतील व वाक्प्रहार सहन करावे लागले असतील 'हें जावें त्याच्या वंशा तेव्हा कळे.'

असो श्री. सहस्रबुद्धे ह्याच्यासारख्या कर्तबगार कारखानदाराविषयीं जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. त्याचे पोहे आज हिंदुस्थानांत तरी अद्वितीय आहेत त्याच्या पोह्याचा आजचा दर्जा खरोखर प्रशंसनीय असल्याचें डॉ. जोन्ससारख्यानीं खुल्या अत करणानें कबूल केलें असून सदर पोहे मिरजेच्या इस्पितळात उपयोगात आणले जात आहेत श्री सहस्रबुद्धे ह्यानीं चिकाटीच्या प्रयत्नाच्या जोरावर कारखानदारी प्रस्थापित केली असून व्यापारी क्षेत्र त्याना आक्रमावयाचें आहे थोडक्याच अवधींत त्यामध्येंहि ते यश मिळवितील ह्यात शका नाहीं.

नोकरी पाहिजे ना? अत्यत माफक फीत मोटार ड्रायव्हिंग व सपूर्ण दुरुस्ती शिकवून लायसेन्सची हमी दिली जाते ८२ आण्याचीं पो तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवा
लक्ष्मी मोटार स्कूल.—७७४ रविवार, पुणें २

## Notice to Contractors.

Sealed percentage tender on B–1 form are invited from approved contractors for the following work:—

| Name of Work | Estimated cost of the work | Date of completion of the work | Earnest money | Cost of tender forms | Last date of entertaining applications for tender forms | Final date of receipt of tenders |
|---|---|---|---|---|---|---|
| Improvements to Chiplun water supply masonry service reservoir 1.5 lakh gallons capacipty. | 17,676 | 31st December 1937 | 180/- | 5/- | 10th April 1937 5 P. M. | 15th April 1937 5 P. M. |

2. Drawing and details of design and estimate may be seen in the office of the Undersigned during office hours on any working day.

3. Conditions of contract etc., will be supplied along with the tender forms.

4. The Executive Engineer, Ratnagiri Division reservers the right to reject any or all tenders, without assigning any reasons.

Ratnagiri, 19 March 1937. Sd. B. P. JAGTAP Executive Engineer, R. Dn.


मुंबई सरकारचे सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेली

**डॉ. काळे यांचें पूना लेप्रसी क्लिनिक**

म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चम-विकारावरील उपचाराचें विश्वसनीय ठिकाण.

ठिपसे आश्रम, पुणें नं. ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट



**"व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे**

ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं. पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ०८ आणे. नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्त्रबुद्धे, ७५१ सदाशिव पेठ, पुणें.

मिळण्याचीं ठिकाणें.

धुळें—सहस्त्रबुद्धे ब्रदर्स

इंदोर—हॉटेल आय व्हिजीट

अमळनेर—बऱ्हाणपूरकर ( कमिटीच्या बागेसमोर )

नागपूर—वैद्य ब्रदर्स, ओल्ड स्टेशन रोड

नाशिक—एस. आर. बेले.






**फोल्डिंग बॉक्स व कॅमेरा**



सामर्थ्यवान लेन्स बसविलेला. ह्या कॅमेऱ्यानें नवशिक्यास सुद्धां फिल्मवर उत्कृष्ट फोटो घेतां येतात. बेकार रोज ५ रु. मिळवूं शकतात. फिल्म कार्ड, फ्रेम, रसायनें, कॅमेरा कसा वापरावा हें सांगणारें पुस्तक मोफत.

फोल्डिंग कॅमेरा, रु. ४. बॉक्स कॅमेरा नं. २, रु. २–१२. नं. १ रु. ३–१२. पॅकिंग व पोस्टेज वेगळें.

Dutt & Co ( 12 )
15/,-Jay Mitra Street,
P. O. HATKHOLA ( Calcutta ).



# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## श्रीधूतपापेश्वर आरोग्यमंदिर आर्यौषधि कारखाना, पनवेल

आयुर्वेदीय औषधें मोठ्या प्रमाणावर तयार करून त्याच्या व्यापारास सुरुवात करून देणारा निदान दक्षिण हिंदुस्थानातील तरी हा पहिलाच कारखाना होय

ह्या व्यापाराचें एक नवीन क्षेत्र निर्माण करावें अशी कल्पना उभयता पितापुत्र, कै कृष्णशास्त्री व कै विष्णुशास्त्री पुराणिक, यांनीं सुमारें पन्नावन्न वर्षापूर्वी काढली

आयुर्वेदीय औषधें हल्लींप्रमाणे बाजारांत मिळत नसत अशा वेळीं या कारखान्याची कल्पना उत्पन्न होऊन ती मूर्त स्वरूपात आली, आणि त्यायोगें शास्त्रसेवा आणि लोकहित साधून व्यापाराचें एक नवीन क्षेत्र उघडलें गेलें

घरची गरिबी असल्यानें कारखान्याचे सुरुवातीचें भांडवल तीस-चाळीस रुपयाहून अधिक नव्हतें औषधें इ स. १८७८ पासून तयार होऊ लागलीं परंतु तीं आरंभीं घरच्या वैद्यकीच्या धंद्यापुरतींच होतीं आयुर्वेदीय रसशास्त्राची अधिष्ठात्री देवता श्रीशंकर असल्यानें व पुराणिक कुटुंबाचें उपास्य दैवत श्रीधूतपापेश्वर ( धोपेश्वर, ता राजापूर, जि रत्नागिरी, येथील स्वयंभू देवस्थान ) हें असल्यानें कारखान्याचें श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना असें अन्वर्थक नामकरण इ स १८९६ सालीं करण्यात आलें पुढें कै विष्णुशास्त्री पुराणिक यांनीं कारखाना अधिकाधिक वाढवून त्यास मोठें स्वरूप प्राप्त करून दिलें कै विष्णुशास्त्री यांच्या पश्चात् श्री रामचंद्र कृष्णशास्त्री पुराणिक यांच्या चालकत्वाखाली कारखाना पुष्कळ भरभराटीस आला आहे

कारखान्यात तयार झालेल्या औषधाच्या माहितीचें पुस्तक मराठी, गुजराथी, हिंदी, कानडी, इंग्रजी वगैरे भाषांत प्रसिद्ध झालेलें आहे शिवाय सामान्य सुशिक्षित लोकांचेंही वैद्य वेळेवर न मिळेल तर अडू नये व त्यास सामान्य औषधोपचाराची व आरोग्यविषयक माहिती व्हावी,म्हणून एक ग्रंथमाला मराठी भाषेंत प्रसिद्ध केली आहे तिला 'व्यवहार वैद्यकमाला' असें नाव दिलें आहे शिवाय निरनिराळया नेहमीं आढळून येणाऱ्या व साथीच्या रोगासंबंधीं उपचारपत्रकें प्रसिद्ध केलीं असून, तीं विनामूल्य देण्यात येतात पत्रव्यवहारानेंही वैद्यकीय सल्ला देण्यात येतो प्रकृतिमानाप्रमाणें रोग्यास पनवेल येथेंच येण्यास कळवून ते आल्यानंतर त्यास वैद्याचे देखरेखीखाली औषधोपचार करण्यांत येतो प्रांताप्रांतातून औषधोपचाराकरिता समक्ष येणाऱ्या लोकांची संख्याही बरीच मोठी असते कारखान्याच्या एजंटाची संख्या निरनिराळया सर्व प्रांतात मिळून सुमारें एक हजार आहे व त्यापैकीं सुमारें पावणेदोनशें एजंट आपआपल्या गावचे मुख्य एजंट आहेत धर्मार्थ दवाखान्यास व वैद्यास सवलतीचे दरानें औषधें देण्यात येतात

## सहकारी चळवळीचा प्रसार

### विद्यार्थी वर्गांत जागृति करण्याचा पुणें इन्स्टिट्यूटचा उपक्रम

कित्येक वेळा आपणास असें दिसून येतें कीं, या चळवळीची माहिती समाजातील मोठ्या,वजनदार व प्रतिष्ठित अशा घटकासहि नसते, आणि यामुळें या चळवळीबद्दल सहानुभूति उत्पन्न होऊन तिच्या प्रसारास जशी मदत व्हावयास पाहिजे तशी होत नाहीं सहकारी चळवळींत काम करणाऱ्या लोकांना हा अनुभव नेहमी येतो व समाजातील अशा लोकात या चळवळीसंबधीं असलेलें अज्ञान पाहून अद्याप चळवळीच्या प्रसाराचें अवाढव्य असें कार्य सहकारी चळवळींत भाग घेणाऱ्या प्रत्येक माणसापुढें आहे याची जाणीव पूर्णपणें झाल्याशिवाय राहात नाहीं या दृष्टीनें पहाता त्या बाबतींत निरनिराळया मार्गानें सहकारी चळवळीचा प्रसार करणें अत्यंत जरूर आहे ह्यासंबंधीं कोणाचेंहि दुमत असणार नाहीं.

या चळवळीचा प्रसार करण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यापैकीं विद्यार्थी वर्गास व विशेषतः प्रौढ विद्यार्थीवर्गास या चळवळीसंबंधीं माहिती करून देणें हा अत्यंत महत्वाचा व आवश्यक असा मार्ग आहे. विद्यार्थी वर्गास या चळवळीची माहिती दिल्यानें व त्याचेमध्यें चळवळीसंबंधीं जोरानें प्रसार झाल्यानें या चळवळीच्या वाढीस अतिशय मदत होणार आहे. खेडोंपाडीं व इतर सर्व ठिकाणीं चळवळीच्या प्रसाराकरिता आज कित्येक लोकांची जरूरी आहे, व अशा तऱ्हेनें प्रसार करण्यासाठीं त्यानीं पुढें येण्याकरिता या चळवळीसंबंधीं त्याचे मनात आदरबुद्धि व सहानुभूति उत्पन्न होणें जरूर आहे शेतकरीवर्गावर हिंदुस्थानचें जीवन सर्वस्वीं अवलंबून असल्यानें तो सुखी व जिवंत राहाणें व त्याकरिता परिश्रम घेणें हें हिंदुस्थानातील प्रत्येक व्यक्तीचें पवित्रतम कर्तव्य आहे विद्यार्थीवर्ग हाच राष्ट्राचा मुख्य आधारस्तंभ आहे व राष्ट्राची भावी उन्नतीहि त्याचे कर्तबगारीवरच अवलंबून आहे अशी वस्तुस्थिति असल्यानें सहकारी चळवळीसंबंधीं त्याना पूर्णपणें ज्ञान होऊन तिचे प्रसाराकरिता झटणें हें प्रत्येकाचें अत्यंत पवित्र कर्तव्य आहे, याची जाणीव त्याना पूर्णपणें झाल्यास सहकारी चळवळीचा प्रसार हिंदुस्थानातील कानाकोपऱ्यातहि होणें अशक्य होणार नाहीं.

या दृष्टीनें पुणें जि. को इन्स्टिट्यूटनें चालू वर्षी करावयाचे कामामध्यें पुणें जिल्ह्यातील सर्व हायस्कूलमधील वरच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना या चळवळीची माहिती करून देण्याचें कार्य हातीं घेतलें असून त्याप्रमाणें सर्व शाळाचे चालकाना विनंति करण्यात आली आहे काहीं शाळाचे चालकाकडून या बाबतींत इन्स्टिट्यूटकडे व्याख्यानाकरिता तारखा ठरविण्याबद्दल लिहूनहि आलेलें असून त्याप्रमाणें तारखा निश्चित करून इन्स्टिट्यूटकडून व्याख्यानाची व्यवस्था शक्य तेवढ्या लवकर करण्यात येईल तरी सर्व शाळाचे चालकानीं या कामीं इन्स्टिट्यूटला सहानुभूतिपूर्वक व आस्थावाईक मदत करावी अशी विनंति आहे

उन्हाळ्याकरितां सिल्क कोट वापरा
महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे तयार अगर करून मिळतील.
बंबाचे माडीवर ] बुधवार चौक, पुणें.

## रोखेबाजारांतील व्यवहारांचें नियंत्रण

### मॉरिसन कमिटीच्या सूचना

मुंबईच्या रोखेबाजाराची सदोष व्यवस्था सुधारावी आणि जुगारी वृत्तीस आळा बसावा, म्हणून मुंबई सरकारनें लंडनच्या रोखेबाजाराचा अनुभव असलेले तज्ज्ञ, मि. मॉरिसन, ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती सर सोराबजी पोचखनवाला व सर रहिमतुल्ला चिनॉय हे कमिटीचे सभासद होते कमिटीनें आपल्या सूचना एकमतानें केल्या आहेत नेटिव्ह शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनच्या अधिकारावर कमिटीनें थोडें नियंत्रण सुचविलें आहे आणि २४ तासापेक्षा ज्यास्त वेळ रोखे बाजार बंद ठेवावयाचा असल्यास,- त्यास सरकारची आगाऊ परवानगी मिळविली असली पाहिजे अशी कमिटीची सूचना आहे करारातील अटी पार पाडण्यास असमर्थ होणाराशीं तडजोड न करता, त्यास अद्दल घडावी, अशी व्यवस्था होण्यावर कमिटीचा भर आहे. नियमाचें उल्लघन करणाराची रोखेबाजाराबाहेरील मालमत्ताहि त्याचे घेणेदाराकरिता उपयोगात आणण्याचा असोसिएशनला अधिकार असावा, अशी कमिटीची शिफारस आहे स्वत.च्या सट्टेबाजीमुळें आपला करार पार पाडण्यास एखादा सभासद असमर्थ झाल्यास त्याचें सभासदत्व रद्द समजावें, परतु रुपयात सोळा आणे फेड करणारास, इतर बाबतींत त्याचे विरुद्ध तक्रार नसल्यास, पुन. सभासद करून घेण्यास हरकत नाहीं. केवळ दैवयोगानें एखादा सभासद नुकसानींत आला असेल, तर त्यास पुनः सभासदत्वाचे हक्क देण्याचा डायरेक्टरबोर्डास अधिकार असावा, अशी कमिटीची शिफारस आहे सब ब्रोकर्सनीं असोसिएशनकडे ५ हजार रु. अनामत ठेवावे व सालिना १०० रु वर्गणी द्यावी, आणि इतर धद्यातील आपला सबध तोडून टाकावा, इत्यादि नवीन नियम कमिटीनें सुचविले आहेत किमतीमधील तफावतीच्या देण्याघेण्याकरितां डिपॉझिटची योजना असावी, दलालीचे किमान दर निश्चित करावे, दलालीची रकम स्पष्ट दर्शविणारीं करारपत्रकें तयार करावीं, इत्यादि सुधारणा कमिटीच्या रिपोर्टात अतर्भूत आहेत कोणत्या वर्गावर्गीवर नियत्रण सुचविण्यात आलें आहे. बोर्डाची निवडणूक दरसाल व्हावी, तीन डायरेक्टरानीं प्रत्येक वेळीं आळीपाळीनें निवृत्त व्हावे, परतु त्यास पुनः निवडणुकीस उभे रहाता यावें, म्हणजे प्रत्येक डायरेक्टर बोर्डाचा पाच वर्षे सभासद राहील, अशी कमिटीची योजना आहे. असोसिएशनचें सभासदत्व मिळवूं इच्छिणाऱ्यानें २ वर्षांच्या मुदतीचे प्रत्येकी १० हजाराचे तीन जामीन द्यावे अगर ३० हजाराचें डिपॉझिट ठेवावें, जुन्या सभासदाची वार्षिक फी १०० रु. करण्यात यावी परतु नवीन सभासदाकडून दरसाल ३०० रु घेण्यांत यावे, 'मार्जिन्स'ची पद्धत अमलात आणणें कठीण पडल्यास निदान पाक्षिक वटणाची योजना तरी निश्चित करावी, वायद्याचे करार अधिकृत असलेल्या रोख्याची सख्या वाढवावी, इत्यादि सुधारणा कमिटीनें सुचविल्या आहेत बाजारभावाचें दैनिक व मासिक पत्रक असोसिएशननें प्रसिद्ध करावें, अशीहि कमिटीची शिफारस आहे

रोखेबाजाराच्या डायरेक्टर बोर्डाची निवडणूक गेल्या आठवड्यात नुकतीच पार पडली, त्यावेळीं बोर्डावरील १६ जागाकरिता २३ सभासद उभे होते नवीन बोर्ड मॉरिसन कमिटीच्या शिफारशींचा विचार करून आपलें मत व्यक्त करणार आहे

---


**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८०,५०० |
| रिझर्व्ह फंड | २,७८७ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,४४७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ४,८६९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६६,१०५ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात | |
| गुतविलेली एकूण रकम | ४८,१८६ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचें तारणावर कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्



**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज: सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्



व्यापारी-उद्यमी लोकांस

**—अपूर्व संधि—**

पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७



वेळेवर मनपसंत कपडे मिळण्याचें एकच ठिकाण

**टेलर्स रिसबूड ब्रदर्स**

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## बृहन्महाराष्ट्र सिंडिकेट लि. पुणें

ता. २७ आक्टोबर १९३६ इ. रोजीं तीस वर्षांचा पाण्याचा करार करण्याबद्दल मुंबई सरकार यांचेकडे सिंडिकेटनें रिपोर्ट पाठविला होता त्याचें उत्तर ता १६ मार्च १९३७ इ रोजीं मुंबई सरकार याच्याकडून आलें व कराराचा मसुदाहि आला सदर कराराप्रमाणें कराराच्या तारखेपासून तीस वर्षेपर्यंत व तीस वर्षानंतर पुन करार होईल त्याप्रमाणें उसाकरिता नीरा राइट बॅक कॅनालचें पाणी सिंडिकेटला मुंबई सरकार देणार आहे

जमीन व पाणी याची तीस वर्षेपर्यंत तजवीज झाली असल्यामुळें सिंडिकेटच्या साखर कारखान्याला हंगामशीर उत्तम ऊंस खात्रीनें मिळेल तेव्हा शेअर मजूर करून मशिनरी मागविण्याचा ठराव सचालक मंडळानें ता २१ मार्च १९३७ इसवी रोजीं केला आहे.

मुंबई सरकार यांच्याकडून पाण्याचे कराराबाबत उत्तर येण्यास उशीर लागल्यामुळें सुमारें चार महिन्याचा अपरिहार्य विलंब झाला आणि शेअर विक्रीचें कार्य विशेष होऊ शकलें नाहीं ता २१-३-१९३७ पासून शेअर विक्रीचें कार्य पुनः चालू करण्यात आलें आहे

| | |
|---|---|
| अ पां कोठे देशमुख | वि ना वर्तक |
| भ गे गिरमे | वा गो काळे |
| चं गो आगाशे | र. चिं सोहोनी |
| | रा न अभ्यंकर |

### निवडक बाजारभाव

#### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बॅंक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११८-१० |
| ५% ( १९२९-४४ ) लोन . | १०६—१ |
| ३½% लांब मुदत ( १९५५-६० ) . . | ११६-१२ |
| ४% १९४३ . ... .. | १०७—८ |
| ३½% बिनमुदत . .. ... | ९३-११ |
| ३½% १९४७-५० . . . | १०४-१२ |
| २¾% १९४८-५२ ... . | ९९—२ |

#### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) .. . | १२४—० |

#### मंडळ्यांचे भाग

##### बॅंका

| | |
|---|---|
| बॅंक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—४ |
| बॅंक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११०—० |
| सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) | ३४—४ |
| इंपीरिअल बॅंक (५०० रु, १२% डिव्हि ) | १४९६—४ |
| रिझर्व्ह बॅंक ( १०० रु. ) | १३०—८ |


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**पायोनियर डाइंग हाऊस पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यातील विशेष होय "

भाऊ गंगाधर साठे,

बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,

५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

**जनानी व मर्दानी कापड**

मिळण्याचें

खात्रीलायक एकच ठिकाण

**माधव सोमण ब्रदर्स,**

लक्ष्मीरोड, पुणें. २

स्थापना १९२०



मुंबई सरकारनें व कोल्हापूर सरकारनें प्रथम मान्य केलेले

**जाधव टेलरिंग कॉलेज**

नवीन वर्ग सुरू झाले नावें नोंदवा माहिती मागवा [ ४९७ बुधवार, पुणें-२




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा

## दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

तारेचा पत्ता : "प्रेसिडेन्सी" पुणें ] १० विश्रामबाग रोड [ टेलिफोन नंबर ७६३.

अध्यक्ष —श्री रा न अभ्यंकर, बी ए, एलएल बी, मॅनेजिंग एजन्ट, कॉमनवेल्थ विमा कंपनी

**विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. ५,००,००० पांच लाख**


प्रत्येक शेअर रु १०० याप्रमाणें ५००० शेअर्समध्यें विभागलेलें अर्जासोबत रु १५ व अर्जमंजुरी रु १०.

**ठेवी :** चालू ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के
मुदतीच्या ठेवी सहा महिन्यांपासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी

**कर्ज :** थोड्या व लांब मुदतीचीं कर्जें दिलीं जातात. कारखानदारांच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्ज देण्याची व्यवस्था केली आहे बँकेनें पसत केलेल्या इसमाचीं बिलें डिस्काउंट केलीं जातात

चेक्स, बिल्स, ड्राफ्टस्, हुंड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिलीं जातात
ठेवीदारांतील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे.
मॅनेजिंग डायरेक्टर्स —नि ना क्षीरसागर, चिं. त्रिं. चितळे

## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यास एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निकाचें फाउटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पाच वर्षें गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पसि. पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)

## "दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री न चिं केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास } दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला { हयातीनंतर विम्यास
३७॥ रु. } दर हजारीं त्रैवार्षिक नफा { ४५ रु.

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा

मॅनेजिंग एजन्ट्स.

## "अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे

किं. १ रु (ट ख निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning Pigmy & Monthly Income Deposit Schemes."

## K. K. & Co.

Photographic Dealers
POONA

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे

भावाचें माहितीपत्रक मागवा

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २

उन्हाळ्याकरितां **ब्राह्मी तेल** हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें

स्टॉकिस्ट . म गो कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें | मॅन्युफॅक्चरर . दि बॉबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई न ४


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ न १,६१३ आर्यभूषण छापखान्यांत रा अनत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काणे, बी ए, यांनीं 'दुर्गाधिवास.' भांबुर्डा घ न १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्य. अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ३१ मार्च, १९३७. अंक १३

—कजाकर—
स्वस्त, मनपसंत व टिकाऊ कापड मिळण्याचें पुण्यांतील प्रमुख ठिकाण
"पी ये म"
— कटपीस स्टोअर —
कोटिंग, शर्टिंग, फॅन्सी पीसेस व नवीन डिझाइनच्या पातळांचा भरपूर स्टॉक,
लक्ष्मीरोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें २

विठ्ठल भिकाजी साबणे—किराणा व भुसार मालाचे व्यापारी. निवडक किराणा व भुसार माल आमचेकडे नेहमीं मिळतो.
३०५ सदाशिव पेठ, ब्राह्मण कार्यालयासमोर, पुणें २.

घरपोंच जोडी रु. ८ची
कां, विचार कसला करिता !




तुमच्यासमोर हा सुप्रसिद्ध
टिकेकरी पातळांची
जाहिरात असता उगीच दुसरी कडील पातळें मागविण्याचे मोहास पडू नका
टिकेकरी पातळें सर्वांगसुंदर अर्थात आपल्यास पाहिजेत तशींच आहेत
नमुने मोफत पोस्टेजकरिता दीड आण्याची तिकिटें पाठवा
दि टिकेकर टेक्सटाईल मिल, लि.
पो टिकेकरवाडी, सोलापूर

कला आणि करमणूक यांचा अपूर्व संयोग
म्हणजेच
मेणाचीं हालचालीचीं चित्रें
"एक वेळ अवश्य पहा"
स्टाल नं. ४०६ ] [ प्रवेश फी १ आणा

श्री न गं आपटे, बी एजी, याच्या देखरेखीखाली
रूरल प्रॉडक्ट्स कंपनीने चांगल्या फळांपासून
केलेले शुद्ध
रस व सरबतें
मिळण्याचे मुख्य ठिकाण —
महाराष्ट्र इंडस्ट्रिअल को एजन्सी, पुणे १
व सर्व प्रमुख दुकाने
मुंबईत —तांबे आरोग्य भुवन, गिरगांव व कोट

# विविध माहिती

### ग्रेटब्रिटनमध्यें विजेचा वाढता उपयोग

• दहा वर्षांपूर्वी ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल ५५० कोटि युनिट्सचें उत्पादन होत असे १९३६ सालीं २,००० कोटि युनिट्स वीज निर्माण करण्यात आली गेल्या चार वर्षांत २३ लक्ष घरामध्यें विजेनें नव्यानेंच प्रवेश केला. त्या देशांत ३० हजार शेतामध्यें विजेच्या शक्तीचा उपयोग करण्यात येत आहे हिंदुस्थानात प्रकाशाखेरीज इतर कार्यांकरिता अद्याप वीज फारशी वापरण्यात येत नाहीं विजेच्या आगगाड्यांनीं मात्र प्रगति केली आहे

### एका दिवसात १½ लक्ष शब्दांच्या तारा

गुरुवार, ता. १८ मार्च रोजीं नव्या दिल्लीमधून हिंदुस्थानातील वेगवेगळ्या वर्तमानपत्रांकरिता तारेनें बातम्या पाठविण्यात आल्या, त्यातील शब्दांची संख्या १,४७,९०० इतकी भरली. सरकारी व खासगी तारामधील शब्दाचा समावेश ह्या संख्येत झालेला नाहीं ता. १७ मार्च रोजीं १,४४,५२५ शब्दांच्या तारा झाल्या.

### सिंधमधील कपाशीची लागवड

सिंधमध्यें सक्करच्या धरणाखालील क्षेत्रामध्यें ९ लक्ष १४ हजार एकरात कपास पेरण्यात आली असून खैरपूर संस्थानात ६२ हजार एकर कपाशीखाली आहेत, असा सरकारी अंदाज आहे अमेरिकन जातीच्या कपाशीची लागवड वाढत आहे

### "बी बी. सी" चें उत्पन्न

ग्रेट ब्रिटनमधील रेडिओ कार्यक्रमाची व्यवस्था पहाणाऱ्या ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला १९३६ सालीं केवळ लायसेन्स फीपासून ३½ कोटि रुपये उत्पन्न झालें. रेडियोवरील कार्यक्रमांसबधीं कॉर्पोरेशनला सूचना वगैरे करणारीं एकूण १ लक्ष ६० हजार पत्रें आलीं त्यापैकी शेकडा ८० पत्रें कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त करणारीं होतीं

### लंडनमधील दुग्धगृहें

ग्रेटब्रिटनमध्यें दुधाचा खप वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. ठिकठिकाणीं दुधाचीं दुकानें उघडण्यात येत असून एकट्या लंडन शहरांत अशीं १३६ दुकानें आहेत

### त्रावणकोर संस्थानचीं 'मंदिर-प्रवेश' तिकिटें

त्रावणकोर दरबारानें संस्थानच्या हद्दीमधील देवळें सर्वांस खुलीं असल्याविषयीं जाहीरनामा काढला, त्या निमित्तानें संस्थानच्या पोस्ट खात्यानें खास तिकिटें विकण्यास ता २८ मार्च रोजी सुरवात केली. प्रत्येक तिकिटावर त्रावणकोरमधील एका विख्यात देवळाचें चित्र असून देवळासमोर स्पृश्य व अस्पृश्य पूजेकरितां एकत्र जमले आहेत, असा देखावा दाखविण्यात आला आहे

### बादशहाच्या राज्यारोहणानिमित्त पोस्टाचें खास तिकिट

बादशहा सहावे जॉर्ज ह्याच्या राज्यारोहणानिमित्त ब्रिटिश सरकार दीड पेनीचें खास पोस्टाचें तिकिट काढणार आहे

### घारापुरीच्या लेण्याचें रक्षण

मुंबई शेजारील घारापुरीचीं लेणीं १,२०० वर्षांपूर्वी खोदलेलीं आहेत अलीकडे त्या लेण्यातील दगड झिजून जाऊन पडू लागले आहेत. गेल्या आठवड्यात, एक मोठा कडा कोसळून खालील दगडी सिंहाचें डोकें भंगलें आहे हीं लेणीं ज्यास्त काळ कशी टिकवितां येतील, ह्यासंबंधीं सूचना करण्याकरिता नेमलेल्या तज्ज्ञाच्या कमिटीचा अहवाल लवकरच प्रसिद्ध होणार आहे

### लोखंड व पोलाद ह्यांचा ग्रेटब्रिटनमध्यें तुटवडा

ग्रेट ब्रिटनमध्यें लोखंडाचा व पोलादाचा तुटवडा भासूं लागला आहे. ह्याकरिता त्याच्या आयातीवरील जकात उतरविण्यात आली आहे

### व्यापारी जहाजांस सरकारी सहाय

ब्रिटिश व्यापारी जहाजाचें आर्थिक मंदीपासून संरक्षण करण्यासाठी देण्यात येणारें अडीच कोटि रुपयाचें सरकारी सहाय आणखी एक वर्षपर्यंत चालू ठेवण्याचें ब्रिटिश पार्लमेंटनें ठरविलें आहे.

### विद्यार्थ्यांस फुकट जेवण

प्राथमिक व दुय्यम प्रतीच्या शाळांतील मुलांस दररोज एकतरी जेवण सरकारी खर्चानें फुकट मिळण्याच्या आवश्यकतेचें तत्त्व ब्रिटिश कॉमन्स सभेनें मान्य केलें आहे

### साखरेच्या धद्याचे चौकशीकरितां टारिफ बोर्ड

३१ मार्च, १९३८ ते ३१ मार्च, १९४६ ह्या मुदतीमध्यें हिंदी साखरेच्या धद्यास किती संरक्षण देण्यात यावें, ह्यासंबधांत चौकशी करण्याकरिता सर ज्यॉर्ज ब्रॅकन ह्यांच्या अध्यक्षतेखाली टारिफ बोर्डाची नेमणूक करण्यात आली आहे. बोर्डाच्या कामास एप्रिलमध्यें सुरवात होईल

### पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि

पुणें येथील विजेच्या ग्राहकांची संख्या गेल्या वर्षी १,७३८नीं वाढून ती ११,००७ इतकी झाली. अर्धवर्षाचें दिलेलें डिव्हिडंड, रिझर्व्ह फडात टाकलेले १½ लक्ष रुपये इत्यादि बाबी सोडून कंपनीस १,०८,८५६ रु. नफा झाला. प्रेफरन्स भागांवर प्रत्येकी ३ रु ८ आ. व ऑर्डिनरी भागावर प्रत्येकीं ५ रु. डिव्हिडंड कायम करण्यात आलें आहे.

### बी बी ॲंड सी. आय. चें उत्पन्न वाढलें

१ एप्रिल, १९३६ ते १० मार्च, १९३७ ह्या मुदतींत पूर्व-वर्षाच्या त्याच मुदतीच्या मानानें बी बी. ॲंड सी आय रेल्वेस सुमारें ७४ लाख रुपये अधिक उत्पन्न मिळालें.

### शत्रूच्या विमानापासून नागरिकाचें संरक्षण

शत्रूच्या विमानांनीं विषारी धुराचे व इतर स्फोटक गोळे टाकल्यास त्यापासून नागरिकाचें संरक्षण करण्याच्या व्यवस्थेसाठी ब्रिटिश बजेटात सुमारें ६ कोटि रुपयाची तरतूद सुचवण्यांत आली आहे.

### भागाच्या वर्गावर्गीबद्दलची रजिस्ट्रेशन फी

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या भागाची रजिस्ट्रेशन फी प्रत्येकीं २ आणे आहे. टाटा पॉवर कंपनी १ रुपया घते. टाटा आयर्न ॲन्ड स्टीलच्या ऑर्डिनरी भागाची रजिस्ट्रेशन फी ४ आणे आहे तथापि २००० पेक्षां कितीहि ज्यास्त भाग एकदम रजिस्टर करण्यास ५०० रु. च पडतात. काहीं कंपन्या मुळींच फी घेत नाहींत सर्वसाधारणपणें पहाता, ब्रिटिश कंपन्याच्या मानानें हिंदी कंपन्या ज्यास्त रजिस्ट्रेशन फी घेतात असें आढळून येतें. ग्रेटब्रिटनमध्यें प्रत्येक नोंदणीस २½ शिलिंग म्हणजे सुमारें १½ रुपये पडतात, मग कितीहि भाग एकदम वर्ग केलेले असोत.

### तारेचा दर वाढला

ब्रह्मदेश उद्या ता १ एप्रिल रोजीं हिंदुस्थानापासून विभक्त होणार असल्यानें, त्या देशास तार पाठविणें आतां ज्यास्त खर्चाचें होईल ऑर्डिनरी तारेस ८ शब्दास कमींत कमी १ रु. २ आणे पडतील. पुढें प्रत्येक शब्दास २ आणे द्यावे लागतील.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १५२ | ७ पालादाचा नवा कारखाना . | १५७ |
| २ बँकिंग आणि आर्थिक परिस्थिति .. | १५३ | ८ एस बी जोशी आणि कंपनी ... | १५८ |
| ३ जपानी व्यापाऱ्यांची धूर्तता व चिकाटी . | १५४ | ९ दि वर्ल्ड वाईड ॲशुअरन्स लि. | १५९ |
| ४ विमानांतील प्रवास व विम्याचे हप्ते . | १५४ | १० सायन्स ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग ॲकेडमी | १५९ |
| ५ स्फुट विचार .. कलकत्त्याची साखर परिषद्–देशी साखरेच्या धंद्याचें संघटन–स्वदेशी साखरेचा धंदा–महाराष्ट्रांतले साखरेचे कारखाने–पर्वती मोफत वाचनालय–ग्रेटब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार . | १५५ | ११ श्रीधूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट . | १६० |
| | | १२ खेड्यांतील दवाखाना | १६० |
| | | १३ अखिल भारतीय मुद्रण परिषद् .. | १६२ |
| | | १४ 'अर्थ' पत्राची शिफारस | १६२ |
| | | १५ हिंदुस्थानातील वैमानिक वहातुक | १६३ |
| ६ पुणें औद्योगिक प्रदर्शन, १९३७ ... | १५७ | १६ पंचकमिटी शिक्षण वर्ग | १६४ |
| | | १७ निवडक बाजारभाव | १६५ |



# अर्थ

बुधवार, ता. ३१ मार्च, १९३७


## बँकिंग आणि आर्थिक परिस्थिति

### (२)

आपल्या खातेदारास दिलेल्या कर्जाचें वर्गीकरण मॅकमिलन कमिटीच्या शिफारशींस अनुसरून प्रसिद्ध करण्याचें ब्रिटिश बँकांनीं अलीकडे ठरविलें आहे, ही महत्त्वाची व बोधप्रद गोष्ट होय निरनिराळ्या पेशांच्या व धंद्याच्या लोकांस बँका कर्ज देतात, त्यावरून समाजातील कोणत्या वर्गातील माणसास बँकिंगच्या सवलती मिळतात, हें समजणें उद्बोधक होईल ह्यांत शंका नाहीं. सामान्य स्थितींतल्या जनतेस व लहानसहान धंदेवाल्यास बँका पैशाचें सहाय करतात किंवा नाहीं ह्यावर बँकिंगच्या व्यवहाराची सामाजिक व राष्ट्रीय उपयुक्तता अवलंबून रहाणार हें उघड आहे मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या बँकांचा लहानसहान माणसास उपयोग होत नाहीं अशी तक्रार ऐकूं येते आणि बँकिंगचा धंदा राष्ट्रीय मालकीचा करणें हा उपाय सुचविण्यापर्यंत ह्या बाबतींतली मजल गेलेली आहे बँकांनीं दिलेल्या कर्जाचें पृथक्करण होऊन तें प्रसिद्ध झाल्यास ह्या प्रश्नावर चांगला प्रकाश पडलाच पाहिजे हें सांगणें नको ब्रिटिश बँकांनीं चालू केलेल्या ह्या प्रघाताचें अनुकरण हिंदुस्थानांतहि होणें आवश्यक आहे त्या बँका आपण होऊनच आपल्या भागीदारास ही माहिती पुरवतात हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे

मार्टिन्स बँकेचे मि ऑर्म आणि बार्कलेज् बँकेचे मि फिशर ह्यांनीं यंदाच्या वार्षिक सभेंत प्रस्तुत विषयाचें प्रामुख्यानें विवेचन केलें व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या चलतीमुळें कर्जरोख्यापेक्षा गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जांत बँकांचे गेल्या वर्षी अधिक पैसे गुंतवले गेले. मार्टिन्स बँकेच्या कर्जदाराचें अठ्ठावीस भिन्नभिन्न गटामध्यें वर्गीकरण केल्यास सर्वांत मोठा गट वैयक्तिक व पांढरपेशा लोकांचा असून एकूण कर्जापैकीं २१ टक्के रकमा ह्या गिऱ्हाइकांनीं उचललेल्या असल्याचें दिसून येतें. एकुण कर्जदारांचा विचार केल्यास प्रत्येक कर्जाची सरासरीची रकम १५ हजार रुपये भरते, पण मध्यम स्थितींतल्या व गरीब वर्गांतल्या लोकांची कर्जाची सरासरी फक्त ६ हजार रुपये आहे. ग्रेटब्रिटनच्या सांपत्तिक स्थितीच्या मानानें ही रकम बेताची आहे असें मानण्यास हरकत नाहीं. बार्कलेज बँकेचे कर्जदार गिऱ्हाइक २ लक्ष असून प्रत्येक कर्जाची सरासरी सुमारें ११ हजार रुपये आहे प्रत्येकी सरासरीनें १३ हजार रुपये नांवें असलेल्या गिऱ्हाइकांची संख्या फार मोठी असून त्याचें एकूण कर्जदारांशीं ८८ टक्के इतकें प्रमाण पडतें. उत्पादक कामासाठीं घेतलेल्या पैशाचें बँकेनें दिलेल्या एकूण कर्जाशीं प्रमाण ३२ टक्के आहे ह्या गटामध्यें शेतकरी कर्जदाराचा समावेश होतो व त्याचें प्रमाण ८ टक्के आहे तेवढेंच प्रमाण इमारत बांधकामासाठीं घेतलेल्या कर्जाचें आहे विमा मंडळ्या, दलाल, बँकिंग कंपन्या ह्यांचें प्रमाण ७ टक्के असून ह्या गिऱ्हाइकांची संख्या सुमारें एक हजार आहे घाउक व्यापारी व कच्च्या मालाचा व्यवहार करणारे लोक ह्यांच्या कर्जाचें प्रमाण ३½ टक्के आहे आणि त्यांत झालेली वाढ आयात व्यापाराच्या चलतीची निदर्शक आहे

आपल्या गिऱ्हाइकामध्यें सामान्य स्थितींतल्या माणसाचा विशेष भरणा आहे ह्या गोष्टीवर मि फिशर ह्यांनीं आपल्या भाषणांत जोर दिला. गिऱ्हाइक कोणत्या कामासाठीं कर्ज घेत आहे, ह्याची चौकशी करण्याचा बँकांचा नेहमींचा रिवाज आहे परंतु माहीत असलेल्या पांढरपेशा व्यक्तीस दिल्या जाणाऱ्या कर्जासंबंधानें तपशील काढणें कठिण असतें ह्या गटातल्या लोकांस बार्कलेज बँकेनें गेल्या वर्षी सुमारें ७५ कोटि रुपये कर्जाऊ दिले होते आणि त्या कर्जाचें पृथक्करण मुद्दाम करण्यांत आलें आहे, तें बोधप्रद आहे. हे ७५ कोटि रुपये एकूण १ लक्ष, १८ हजार लोकांनीं उचलले त्यांपैकीं २२ हजार लोक धंद्याचे चालक, व्यवस्थापक व नोकर असून त्याचें एकूण कर्ज सुमारें ११ कोटि रुपये आहे व प्रत्येकी सरासरी ५हजार रुपये आहे. १६ हजार लोकांनीं जमीन व घरें ह्यांच्या खरेदीसाठीं २३ कोटि रुपये कर्ज घेतलें व त्यांच्या प्रत्येक कर्जाची सरासरी १३ हजार रुपये आहे सुमारें ६ हजार लोकांनीं सरकारी रोखे व मंडळ्यांचे भाग ह्यांत पैसे गुतवण्याकरितां १३ कोटि रुपये उचलले वकील, डॉक्टर, इत्यादि लोकांनींहि अल्प प्रमाणांत कर्जें घेतलीं आहेत, त्यांची सरासरीची प्रत्येकी रकम ७ ते १२ हजार रुपये आहे कर्जें देतांना बँक अत्यंत दक्षता बाळगते आणि जुगारीच्या स्वरूपाच्या सट्टेबाजीसाठीं तीं घेतलीं जाऊं नयेत असा तिचा कटाक्ष असल्याचें मि. फिशर ह्यांनीं सांगितलें. चांगल्या काळांत धंदेवाल्यांनीं आपला पैसा कांहीं प्रमाणांत गंगाजळीवजा काढून ठेवावा म्हणजे मंदीच्या परिस्थितींत त्याचा उपयोग होतो हा बोध अलीकडल्या अनुभवावरून सर्वांनीं घ्यावा, हा त्यांनीं दिलेला सल्ला ध्यानांत वागवणें अगत्याचें आहे लॉइड्स बँकेचे अध्यक्ष, लॉर्ड वॉर्डिंगटन, ह्यांनींहि आपल्या भाषणांत त्यांच्या संस्थेनें दिलेल्या कर्जाची छाननी केली. ह्या बँकेनें सुमारें २० हजार जमीनदारास एकूण १८ कोटि रुपयांचें कर्ज गेल्या वर्षी दिलें, म्हणजे प्रत्येक कर्जाची सरासरी रकम सुमारें ९ हजार रुपये पडली. ह्या जमीनदारांपैकीं ७६ लोकांचीं कर्जें बुडलीं व बँकेस पाऊण लक्ष रुपयांच्यावर नुकसान झालें. शेतीच्या धंद्याची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेता ही बूड क्षुल्लक आहे, असें लॉर्ड वॉर्डिंगटन ह्यांनीं बोलून दाखविलें. आपल्या मालाचा उठाव किफायतशीर होईल ह्या हिशेबानें कार-

खानदार उत्पादनाच्या योजना हातीं घेतात त्याच तत्त्वानें बँकर्स-नाहि आपला व्यवहार करावा लागतो घेतलेल्या ठेवींची रक्कम व स्वरूप ध्यानात धरून खात्रीनें परतफेड होईल अशींच कर्जें गिऱ्हाइकांस देण्याची काळजी त्यास घ्यावी लागते प्रत्येक बँकर आपला व्यवहार सावधगिरीनें करील आणि जनतेस उपयोगी पडण्याचा आपला उद्देश व्यावहारिकपणानें व कुशलतेनें पार पाडील तर सबंद बँकिंगचा धंदा राष्ट्रास हितकर अशाच रीतीनें चालेल आणि बाहेरच्या अनिष्ट नियंत्रणाची आवश्यकता भासणार नाहीं.

## जपानी व्यापाऱ्यांची धूर्तता व चिकाटी

जपानी लोकानीं व्यापार व उद्योगधंदे ह्याच्या प्रसाराचे बाबतींत पाश्चात्यावर ताण केली आहे त्यांच्या यशाचें इंगित काय, हें जाणण्याची हिंदुस्थानात तीव्र इच्छा असणें अगदी स्वाभाविक आहे. आशियांतील एका चिमुकल्या राष्ट्रानें पाश्चात्यांच्या आर्थिक क्षेत्रांत मिळवलेला विजय हिंदी जनतेस उद्बोधक व ध्येयात्मक व्हावयास पाहिजे. जपानी राष्ट्राची आपले हातपाय परदेशात पसरविण्याची कला पाश्चात्यांसहि आश्चर्यकारक वाटत आहे आणि त्याच्या चिकाटीचें कौतुक चोहोंकडे होत आहे. व्यापाराची किंवा धंद्याची नवीन संधि कोठेंहि दिसली कीं हळूच तेथें आपलें चबूगवाळें टाकावयाचें आणि काहींतरी गिऱ्हाइकी कमावल्यावांचून हलावयाचें नाहीं, अशी जपान्याची रीत आहे. उत्तर नाइल नदीवर वीज उत्पन्न करण्याचे कारखाने उभे व्हावयाचे होते. त्या कामाचीं हलकीं टेंडरें देऊन जपान्यानीं आफ्रिकेच्या क्षेत्रात चंचुप्रवेश केला कराराचीं बोलणीं चाललीं असता जपानी माल हळु, हळु त्या प्रदेशात घुसत होता आणि त्यानें आफ्रिकेचें क्षेत्र आक्रमिलें तेव्हा जपान्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना आश्चर्य वाटलें ॲबिसीनियामध्यें व्यापार व उद्योगधंदे स्थापण्याची योजना इटलीनें हातीं घेतली आहे त्याबाबत व्यवस्था करणारें कमिशन कामास लागलें तेव्हा जपानी लोकानीं ॲबिसीनियामध्यें विस्तृत प्रदेशात जमिनीच्या मालकीचे व तीमध्यें धंदे चालू करण्याचे हक्क अगोदरच मिळवून ठेवले असल्याचें त्यास आढळलें. हे हक्क सोडून देण्यास जपान तयार होईना व त्याचें आणि इटलीचें ह्याबाबत बोलणें ( किंवा बाचाबाची म्हणावयास हरकत नाहीं ) चालू झालें आफ्रिकेच्या मुलखांत जपानचें पाऊल रुजण्यास कायद्याच्या व इतर अडचणी होत्या, त्या अप्रत्यक्ष रीतीनें दूर करण्याची जपानी राष्ट्रानें खटपट सुरू केली ह्या कामीं त्यास अरब व्यापाऱ्याचें सहाय झालें पाश्चात्य धंदेवाल्यांस जपानी लोक चांगले प्रतिस्पर्धी होतील, ह्या भावनेनें त्यानीं जपानी प्रयत्नास पाठिंबा दिला जपान्यानीं स्थानिक लोकास अत्यंत सवलतीच्या दरानें पैसा पुरवण्याचा मार्ग स्वीकारून त्यास आपणाकडे वळवून घेतलें आजमितीस ७४ कोटि येन इतकें जपानी भांडवल इजिप्तमध्यें गुंतलें आहे दक्षिण आफ्रिकेमध्येंहि जपानी लोक एजंट ह्या नात्यानें आपले हातपाय पसरीत आहेत जपानी धंदेवाल्यास त्याच्या राष्ट्रीय सरकारचा पाठिंबा आहे, हे येथें लक्षात ठेवलें पाहिजे. जपानी भांडवल हलक्या दरानें आफ्रिका खंडात पेरलें जाणें एरव्हीं अशक्य आहे. परकी देशात होणाऱ्या आर्थिक व्यवहारांत धोका असतो, त्याबद्दलची हमी कमी-अधिक प्रमाणात राष्ट्रीय सरकारें घेतात आणि ह्या रीतीनें आपल्या प्रजेच्या व्यापारास उत्तेजन देतात जपानी सरकार ह्या धोरणाचा अंगीकार करीत असलें पाहिजे ह्यात संशय नाहीं.

## विमानांतून प्रवास करणारे विमेदार
## व
## जादा हप्त्यांची आकारणी

विमानातून प्रवास करणाऱ्या विमेदारास अपघाताचा धोका ज्यास्त असतो, ह्याकरिता त्याचेकडून जादा हप्ते घेण्याची आवश्यकता आतां उरली आहे काय? असा प्रश्न विम्याचे संबधात उपस्थित झाला असून त्याबाबत साधकबाधक चर्चा चालू आहे जादा प्रीमियम घेण्याचे थांबविल्यानें, आगगाडी, मोटारी इत्यादि वहानाच्या सुरक्षिततेच्या पातळीवरच विमानास बसविल्यासारखें होईल हें उघड आहे प्रवास करणाऱ्या उतारूंस व वहातुकीचा धंदा करणाऱ्या कंपन्यास हे जादा हप्ते नकोच आहेत. विमेदाराची त्यामुळें बचत होणार असून वहातुक कंपन्याचा दर्जा वाढणार आहे विमानांतील प्रवासाच्या सुरक्षितपणावर तज्ञाचें शिक्कामोर्तब झालें, म्हणजे हवेंतील वहातुक लोकप्रिय होईल आणि कंपन्याचा धंदा वाढेल हें सरळ आहे. विमानाच्या अपघाताचें प्रमाण आता अत्यंत कमी झालें आहे, ह्या गोष्टीकडे विमा कंपन्यानीं लक्ष पुरवलें पाहिजे ठराविक मार्गानें वहातुक करणाऱ्या विमानांतून प्रवास करणारास त्याचे आयुर्विम्याच्या जादा हप्त्याची माफी देण्यास विलायतेंतील काहीं विमामंडळयानीं सुरवात केलेली आहे

अपघाताच्या विम्याचे बाबतींत मात्र जादा हप्त्याची सूट देण्यास कंपन्या लवकर तयार होत नाहींत एकूण प्रवाशाच्या संख्येचे मानानें विमानातून सफर करणाराची संख्या अल्प असल्यानें त्याचेकडून जादा हप्ता न घेणें म्हणजे इतर विमेदारावर अन्याय्य बोजा टाकणें होय, ह्या तत्त्वाचा अवलंब करून वैमानिक प्रवाशाकडून जास्त प्रीमियम घेणेंच रास्त आहे, असें एका बाजूनें प्रतिपादन करण्यात येत आहे हे उतारू श्रीमंत वर्गांतील असतात व कित्येक प्रसंगीं त्याच्या विम्याचे पैसे त्यास नेमणाऱ्या कंपन्याच भरतात ह्या उलट, विमानातून जाणाराचेंच अपघाताबाबत विमा उतरणारांत संख्याधिक्य असतें, असें सांगण्यात येतें. विमानाची वहातुक जलद वाढत आहे आणि तीमधील धोकाहि कमी कमी होत आहे रोज नव्या सुधारणा अंमलात येत असल्यानें प्रवास सुखरूप झाला आहे वैमानिक प्रवाशाची संख्या वाढत जाऊन धोक्याचें मान उतरत गेलें कीं, विमा कंपन्यास जादा हप्ते उतरविण्याचा निश्चय करणें सोपें जाईल. विमानाच्या प्रवासास सुरक्षितपणाचे दृष्टीनें इतर वहातुकीचें दर्जास आणून बसविण्याची वेळ आज प्राप्त झाली आहे किंवा नाहीं, एवढाच मतभेदाचा प्रश्न आहे.

मुंबई सरकारनें प्रथम मान्य केलेले, कोल्हापूर सरकारचे आश्रयाखालील
**जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग**
माहिती मागवा ] व [ नांवें नोंदवा
४९७ बुधवार पुणें सिटी

# स्फुट विचार

## कलकत्त्याची साखर परिषद्

विलायती साखर देशात यावयाची कमी होऊन तिच्यावरच्या जकातीचें सरकारी उत्पन्न कमी झालें, पण त्याबरोबर हिंदी शेतकरी, कामकरी, पांढरपेश, व्यापारी इत्यादिकांस अधिक काम मिळालें, हा राष्ट्राचा फायदा झाला हें विसरता कामा नये. साखरेच्या धंद्यासंबंधातलें हिंदुस्थान सरकारचें धोरण, साखरेचे उतरलेले बाजारभाव, ह्या धंद्याच्या भवितव्याचा विचार करण्यासाठी लंडन येथें पुढच्या आठवड्यात भरणारी आंतरराष्ट्रीय परिषद्, हिंदी साखरेचें उत्पादन मर्यादेच्या बाहेर होत आहे कीं काय अशी वाटणारी शंका, चौकशीसाठी टारिफ बोर्डची नेमणूक इत्यादि कारणामुळें देशी साखरेच्या धंद्याचें वातावरण प्रक्षुब्ध झाल्यासारखें दिसत आहे. नवीन स्थापन झालेल्या कोणत्याहि धंद्याबाबत अशी परिस्थिति मधून मधून निर्माण होणें अपरिहार्यच असतें. ह्या दृष्टीनें पहाता, देशी साखर कारखानदारांची एक परिषद् गेल्या आठवड्यात कलकत्ता येथें भरून त्यांनीं आपल्या धंद्याच्या संघटनेचा विचार केला ही गोष्ट अभिनंदनीय आहे असें म्हटलें पाहिजे. संयुक्तप्रांत व बहार येथें देशी साखरेचे कारखाने एकवटले असल्यानें आणि त्यांची परस्पर स्पर्धा सर्व धंद्यास भोंवत असल्यानें त्यांच्या चालकांनीं ह्या संघटनेच्या कामीं पुढाकार घ्यावा हें साहजिक आहे. संयुक्तप्रांतातील प्रसिद्ध सरय्या कारखान्याचे सरदार कृपालसिंग हे कलकत्त्याच्या परिषदेचे अध्यक्ष होते. देशी साखरेचें उत्पादन जरूरीच्या मानानें अधिक आहे, असें सांगण्यात येतें, तें खरें नाहीं असा त्यांनीं व्यक्त केलेला अभिप्राय लक्षात ठेवण्यासारखा आहे. हिंदुस्थानास दरवर्षीं १२ लक्ष टन इतकी साखर लागते, ती सर्व अजून देशी कारखान्यात तयार होत नाहीं. परदेशी साखर देशात येणें बंद झाल्यास सबंद मागणी देशी कारखाने सहज पुरवू शकतील असें त्यांनीं सांगितलें.

## देशी साखरेच्या धंद्याचे संघटन

देशी साखरेच्या धंद्याचें संघटन करण्याचे अनेक व्यावहारिक मार्ग सरदार कृपालसिंग ह्यांनीं सुचविले, त्यांचा अवलंब होणें अगत्याचें आहे. साखरेची साठवण व विक्री ह्यांच्या व्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा करता येण्याजोगी आहे. विक्रीच्या व्यवस्थेसाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करता येण्यासारखी आहे, तिच्या विषयींच्या योजनेस निम्म्या कारखान्यांच्या चालकांनीं संमति दिली आहे, हें उत्तेजनकारक आहे. दर मणास ७ रुपये ह्या प्रमाणें साखरेची किमान किंमत निश्चित करण्यात यावी ह्या सूचनेस शेंकडा ७० कारखान्यांची संमति मिळाली आहे. देशी साखर विक्रीसाठी बाहेर पाठविणेंहि शक्य व सध्याच्या परिस्थितींत इष्ट आहे. साखरेच्या विक्रीसाठी मध्यवर्ती संस्था स्थापन होण्याचें घाटत आहे, ती कंपनीच्या स्वरूपाची होईल आणि तिच्यामध्यें विशिष्ट शर्तींवर कोणत्याहि कारखानदारास भाग घेतां येईल. ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारानें जरूर त्या सवलती दिल्यास हिंदी साखर इंग्लंडला पाठवून तेथें विकणें शक्य होईल, हें सरदार कृपालसिंग ह्यांनीं तपशीलवार आंकडे मांडून विशद करून सांगितलें. साखरेचे कारखानदार ह्यांनीं आपल्या धंद्याचें संघटन केलें आणि सरकारनें त्यास जरूर तें सहाय दिलें तर हिंदी साखरेचा धंदा भक्कम पायावर उभा राहील. ह्यांत संशय नाहीं. कोणत्याहि मोठ्या धंद्याची व्यवस्था अशाच मार्गानें करावी लागते आणि त्यांत कार्यक्षमता, जूट व राष्ट्रीय वृत्ति ह्यांचें एकीकरण आवश्यक असतें. मधून मधून उद्भवणाऱ्या अडचणींस तोंड देण्याचा प्रयत्न सर्वांनीं जुटीनें केल्यास स्वदेशी धंद्याचा उत्कर्ष झाल्यावाचून रहाणार नाहीं. सरकारची सहानुभूति व पाठिंबा हीं हवीं तशीं मिळालीं नाहींत तरीहि हिंदी लोकांनीं चिकाटी सोडता कामा नये. हिंदी स्वदेशी चळवळीचा आजपर्यंतचा इतिहास हेंच सांगत आहे.

## स्वदेशी साखरेचा धंदा

देशी साखरेच्या धंद्याच्या परिस्थितीची चौकशी करून त्यास किती संरक्षण देण्याची आवश्यकता आहे ह्याविषयीं शिफारस करण्यासाठी टारिफ बोर्डाची नेमणूक केली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ही व्यवस्था पूर्वसंकेतास अनुसरून झालेली आहे. टारिफ बोर्डाच्या सल्ल्यावरून स्वदेशी साखरेस पंधरा वर्षें जकातीचें संरक्षण देण्याचें सात वर्षांपूर्वीं निश्चित झालें, त्याच वेळेस ह्या प्रकारची चौकशी मध्यंतरीं पुन्हा व्हावी आणि उरलेल्या सात वर्षांत द्यावयाच्या संरक्षणाची मर्यादा कायद्यानें घालून द्यावी असें म्हटलें होतें. सरकारच्या बजेटात येणारी तूट भरून काढण्याकरता सर जेम्स ग्रिग ह्यांनीं, टारिफ बोर्डाचा निर्णय होईपर्यंत स्वदेशी साखरेवरील पट्टी वाढवावयास नको होती. देशी कारखान्यास फायदा अधिक होतो का कमी होतो हें ठरवावयाचा अधिकार टारिफ बोर्डाचा असून तो हिंदुस्थान सरकारच्या फडनविसांनीं स्वतःच्या हातात घेणें वाजवी नव्हतें. त्यांच्या पट्टीवाढीस लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मंजुरी मिळाली नाहीं तेव्हा गव्हर्नर जनरल ह्यांनीं आपल्या खास अधिकारात ती वाढ करण्याचें ठरविलें ही गोष्ट गैर झाली असून ती स्वदेशी साखरेच्या धंद्यास अन्यायकारक आहे. सध्याचें संरक्षण वाजवीपेक्षां अधिक आहे असें चौकशीअंतीं टारिफ बोर्डास वाटेल तर त्याप्रमाणें तें अभिप्राय व्यक्त करील आणि त्यास अनुसरून सरकारास आपलें धोरण आंखता येईल. देशी साखरेवरची पट्टी वाढवणें म्हणजे तिच्या उत्पादनाचा खर्च वाढवणें आणि तिला मिळत असलेलें संरक्षण कमी करणें होय. विलायती साखरेवरील जकातीचें सरकारी उत्पन्न कमी झालें आहे, तसें देशी साखरेचा धंदा विस्तार पावला असता होणें अपरिहार्य व अपेक्षितच होतें. "भाकरी खावयाची व पुन्हा ती शिल्लक ठेवावयाची ह्या दोन्ही गोष्टी एकदम शक्य नाहींत" अशी एक इंग्रजी म्हण आहे, तिची सर जेम्स ग्रिग ह्यांस आठवण व्हावयास पाहिजे होती.

## महाराष्ट्रांतले साखरेचे कारखाने—बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट

महाराष्ट्रात सध्या साखरेचे आठ कारखाने चालू असून बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचा कारखाना लवकरच सुरू व्हावयाचा आहे. पाणीपुरवठ्याबाबतच्या कराराविषयींचें सरकारचें उत्तर येण्यास विलंब लागल्यामुळें यंत्रसामुग्री मागवणें व भांडवलाचे पैसे जमा करणें ह्या संबंधातलें सिंडिकेटचें काम मंदावलें होतें, तें आता जोरानें चालू होणार असल्याची बातमी आम्हीं गेल्या अंकांत प्रसिद्ध केली आहेच. साखरेच्या कारखान्यासारखा मोठ्या प्रमाणावरचा धंदा प्रस्थापित होण्यास (विशेषतः महाराष्ट्रात) वेळ लागणें अपरिहार्य आहे. कित्येक वेळां हा विलंब परिणामीं

अनुकूलच ठरत असतो, कारण, नवीन निघणाऱ्या कारखान्यास जुन्यांच्या अडचणी, अनुभव व चुका ह्याचा फायदा मिळूं शकतो. महाराष्ट्रातल्या इतर कारखान्याची प्रसिद्ध व अप्रसिद्ध माहिती, उंसाची आपल्या स्वत च्या जमीनींतली लागवड आणि उसाची साखर करण्याची क्रिया ह्यांचा अनुभव,तसेंच,ह्या सवर्धांतले दुसऱ्या ठिकाणचे उत्पादनाचे वगैरे विश्वसनीय आकडे ह्यांच्या आधारानें बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें आपली कारखान्याची योजना निश्चित केली आहे, ती पहाता मंदीच्या काळातहि ह्या कपनीस आपला ससार थाटता येईल असें दिसून येतें आस्थेवाइकपणा, काटकसर व कार्यक्षमता ह्याच्या जोरावर सिंडिकेटला महाराष्ट्रांतील यशस्वी कारखान्याच्या बरोबरीचें स्थान प्राप्त करून घेणें अशक्य नाहीं उची दर्जाच्या उसाची निपज आणि कारखान्याच्या वगैरे व्यवस्थेचा काटकसरींचा खर्च ह्या गुणामुळेंच हिंदी साखरेचे कारखाने ह्यापुढें यशस्वी व्हावयाचे आहेत पुष्कळ पैसा खर्चून अलोट नफा साखरेच्या कारखान्यातून काढूं अशी अपेक्षा करणारांची निराशा होईल, पण खऱ्या धद्देवाइकपणानें व आपुलकीच्या व्यवस्थेनें काम करणारास साखरेच्या धद्यात वाव आहे हें महाराष्ट्रीय जनतेनें ध्यानात बाळगून ह्या स्वदेशी उद्योगाकडे सहानुभूतीनें व स्नेहभावानें पहावें. मंदीच्या व अडचणीच्या काळांतच तर चिकाटीचें व संघटनेचें महत्त्व विशेष आहे कलकत्त्यास भरलेल्या साखरेच्या कारखानदाराच्या परिषदेचा उल्लेख वर केला आहे, त्यावरून हाच सिद्धात प्रस्थापित होतो

---

### पर्वती मोफत वाचनालय

पुणें अनाथ विद्यार्थी गृहानें सार्वजनिक उपयोगाचें एक अंग म्हणून १९१२साली पर्वती मोफत वाचनालयाची स्थापना केली. स्त्रियांच्या उपयोगासाठी १९३२ सालीं वाचनालयाची स्त्री-शाखा सुरू करण्यात आली शिवाय आणखी एक शाखा नाशिक येथें १९२६ सालापासून सुरू आहे मोफत वाचनालय सुरू होउन २५ वर्षे झालीं. त्यानिमित्त रौप्य महोत्सवाचा समारंभ शनिवार ता २७ मार्च रोजीं श्री न. चिं. केळकर ह्याचे हस्तें साजरा झाला. सस्थेमध्यें आज सुमारें १३० नियतकालिकें येत असतात व अ वि गृहातील विद्यार्थी श्रमविभागपद्धतीनें वाचनालय चालवितात, त्याचा रोज सुमारें १२५ ते १५० लोक फायदा घेतात १९२४ सालापासून पुणें शहर म्युनिसिपालिटीची मदत वाचनालयास मिळत आहे. वर्तमानपत्राची संख्या आता वाढली असून त्याची किंमतहि कमी झाली आहे ह्या दृष्टीनें पुण्यासारख्या शहरात मोफत वाचनालयाच्या कार्याचे वाढीस मर्यादा आहे तथापि, खेडेगावात अशा प्रकारच्या कार्यास पुष्कळच वाव आहे आणि त्याबाबत प्रयत्न करण्याजोगे आहेत.

---

### ग्रेट ब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार

इंग्लंड हें कारखानदारीचें वे व्यापारी राष्ट्र आहे त्यामुळें साम्राज्यातील देशाशीं कितीहि सवलती देऊन व्यापार केला तरी त्या राष्ट्राची देवघेव परकी देशाशीं मोठ्या प्रमाणावर होत रहाणें अपरिहार्य आहे १९३६ सालचे आकडे पाहिले तर असें दिसतें कीं, ब्रिटिश आयातीपैकीं ३९ टक्के व्यापार साम्राज्याशीं झाला व ६१ टक्के माल परदेशातून आला निर्गत व्यापार मात्र जवळ जवळ निम्मा साम्राज्याशीं व बाकीचा निम्मा परदेशाशीं झाला इतर देशाच्या आर्थिक स्वावलबनाचा हा परिणाम होय

---


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल . . | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भाडवल .. | .. रु १,००,००,००० |
| रिझर्व्ह फड | .. रु. १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वाद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों, व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों, विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते नियमाची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात

एजट — टी आर लालवाणी

---

## नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८०,५०० |
| रिझर्व्ह फड | २,७८७ |
| इतर फड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,४४७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ४,८६९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६६,१०५ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४०,१७६ |

**सोसायटी** जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घरांचें तारणावर कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

# पुणें औद्योगिक प्रदर्शन, १९३७

### मेणाचीं हालतीं चित्रें

प्रो. लेले ह्यांनीं पुणें येथील १९३५ च्या प्रदर्शनांत प्रथम स्टॉल घेऊन आपलीं मेणाचीं हालतीं चित्रें लोकांस दाखविलीं. यंदाहि त्यांनीं औद्योगिक प्रदर्शनांत आपलीं चित्रें मांडलीं आहेत. मुंबईचे प्रसिद्ध आर्टिस्ट, श्री. फडके, ह्यांचे हाताखालीं श्री. लेले ह्यांनीं मॉडेल्स बनविण्याचें शिक्षण घेऊन त्यांत प्राविण्य मिळविलें आहे. त्याची प्रचीति त्यांनीं बनविलेलीं चित्रें पाहून ताबडतोब येते. श्री. लेले ह्यांच्या स्टॉलला भेट देऊन त्यांच्या गुणांचें प्रेक्षकांनीं अवश्य चीज करावें.

श्री. कारूळकर हे उत्कृष्ट फोटोग्राफर असून त्यांनीं आपला मुंबईप्रमाणें पुण्यांतहि स्टुडिओ उभारला आहे. त्यांनीं आपलें शिक्षण बडोदा येथील कलागृहांत पुरें केलें असून, त्यांच्या अंगांतील गुणांचा तेव्हांपासूनच विकास होऊं लागला. ग्वालेरसारख्या संस्थानांतूनहि त्यांची वहावा झालेली आहे. श्री. लेले व श्री. कारूळकर ह्यांस त्यांचे धंद्यांत आम्ही सुयश इच्छितों.

### पूना गेस्ट हाऊस, पुणें

वरील नांवाचा एक पथिकाश्रम श्री. न. दा. ऊर्फ नानासाहेब सरपोतदार यांनीं पुणें येथें लक्ष्मी रोडवर सुरू केला असून तो बराच प्रसिद्धीला आला आहे. हा आश्रम शहरांतील मध्यवर्ती ठिकाणीं असून तेथें रहाण्याची व जेवणाची व्यवस्था उत्कृष्ट होते. मध्यम वर्गांतील कुटुंबांची त्यामुळें फार उत्तम सोय झाली आहे. गेस्ट हाउसनें प्रदर्शनांत एक शाखा उघडली असून ती अत्यंत लोकप्रिय झाली आहे.

### दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें.

श्री. रा. न. अभ्यंकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या ह्या बँकेची प्रगति व्यवस्थितपणें होत आहे. कमर्शिअल व इंडस्ट्रिअल असे व्यवहाराचे दोन भाग पाडून लांब मुदतीच्या ठेवींचीं लांब मुदतींकडे कर्ज देण्याबद्दल व अल्प मुदतीच्या ठेवींची थोड्या मुदतीच्या कर्जांकडे अशी व्यवस्था करण्याचा चालकांचा मानस आहे. कारखान्यांना लागणाऱ्या लांब मुदतीच्या कर्जांची व्यवस्था डिबेंचर पद्धतीनें बँकेमार्फत करण्याचा चालकांचा विचार आहे. बँकेनें प्रदर्शनाचे जागेंत आपली एक तात्पुरती शाखा उघडली असून स्टॉल घेणाऱ्या व्यापाऱ्यांची व कारखानदारांची सोय केली आहे.

### श्रीराम सिल्कश्वरींग फॅक्टरी, बंगलोर

वरील कारखाना १९२६ सालीं स्थापन झाला असून अवघ्या दहा वर्षांच्या अवधींत कारखान्याचा बराच विस्तार झाला आहे. कारखान्यांत सुमारें चारशें मजूर कामावर आहेत, यावरून विस्ताराची सत्यता कोणालाहि पटेल. फॅक्टरीचे मालक श्री. नारायणराव नाईक हे नुकतेच जपानला जाऊन आले. म्हैसूर सरकारनें कारखान्याला बरेंच उत्तेजन दिलें आहे.

### रूरल प्रॉडक्टस कं.


वरील कंपनीनें श्री. न. गं. आपटे, बी. एजी., वॉटर फाइंडिंग स्पेशॅलिस्ट ह्यांच्या नेतृत्वाखालीं ताज्या फळांपासून वेगवेगळे पदार्थ व पेयें बनविलीं आहेत. त्यांचें संत्रा ड्रिंक हें अत्यंत लोकप्रिय झालें आहे. पदार्थ तयार करण्यास लागणारी यंत्रसामग्रीहि त्यांनींच तयार केलेली आहे.

## पोलादाच्या नव्या कारखान्याची पूर्वतयारी

### भांडवलाची उभारणी

बंगालमध्यें स्थापन व्हावयाच्या पोलादाच्या नव्या कंपनीसंबंधाची पूर्वतयारी संपत आली आहे. कंपनीनें उभारावयाच्या ऑर्डिनरी भागांवर, इतर सर्व खर्चाची तरतूद करून, १२½ टक्के व्याज सुटेल, अशी चालकांची अपेक्षा आहे. अधिकृत भांडवलापैकीं तूर्त ५ कोटींची रकम वसूल करण्यांत येईल. इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कंपनी व मेसर्स बर्न आणि कं. हे मिळून १२ लक्षांचे ऑर्डिनरी भाग खरेदी करणार आहेत. ह्याखेरीज, मॅनेजिंग एजंट्स ५० लाखांचे प्रेफरन्स भाग घेतील. कंपनीच्या कलकत्ता येथील ब्रोकर्सनीं ३० लक्ष प्रेफरन्स व ७० लक्ष ऑर्डिनरी भागांची हमी घेतली आहे. उरलेले ४० लक्षांचे व ६० लक्षांचे अनुक्रमें प्रेफरन्स व ऑर्डिनरी भाग सर्वसामान्यपणें विक्री करतां काढण्यांत येतील. १० लाख पौंडांचीं डिबेंचर्स इंग्लंडमध्यें उभारलीं जातील. ५ टक्क्यांच्या प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंडपैकीं ४ टक्के व्याज, पहिलीं तीन वर्षें, भांडवलांतून देण्याची परवानगी प्रांतिक सरकाराकडून कंपनी मिळवणार आहे.


## थोडासा विचार करा.



आपल्याला रोज एक आणा वांचवितां येईल काय ?
अशी शिल्लक नियमितपणें टाकतां यावी म्हणून विमेदारांना एक
मजबूत घड्याळ
मोफत देण्यांत येतें. हें घड्याळ रोज नाणें टाकल्या शिवाय चालत नाहीं.

रोज एक आणा शिल्लक टाकून आपल्याला रु. ५०० पेक्षां जास्त रकमची पॉलिसी घेतां येईल.

आमची एजन्सी घेऊन आपली प्राप्ती व सामाजिक दर्जा वाढवा.

आमची विम्याची पॉलिसी रद्द झाल्यास ती, व्याज किंवा बाकी हप्ते न भरतां सुरू करतां येत शस्त्रक्रिया व रुग्णालयाच्या खर्चासाठीं विमेदारांना मदत मिळण्याची सवलत आहे.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं., लि.,
लक्ष्मी रोड, पुणें २. पो. बॉ. नं. ४६.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

## एस. बी. जोशी आणि कंपनी
### इंजिनिअर्स व कॉन्ट्रॅक्टर्स

श्री एस बी. जोशी आणि कंपनीपैकीं श्री सी बा. जोशी, बी ई., ए एम आय. ई, यास कॉन्ट्रॅक्टर कै दादासाहेब फाटक यांचे कामावर कांहीं महिने काम केल्यामुळें अनुभव मिळाला मुंबई येथील आर्किटेक्ट श्री. गोविंद त्रिंबक टेंबे याच्या सल्ल्याचा त्यास नेहमी फायदा मिळतो.

सन १९३२ सालीं वसईजवळ आगाशी येथें शाळागृह बांधण्याचें काम श्री. जोशी यानी स्वतंत्र रीतीनें केलें. हेंच त्याचें पहिलें काम होय त्याच वर्षी त्याचे बंधु श्री. रामचंद्र नारायण जोशी हे बी. ई. झाल्यावर त्यास भागीदार म्हणून मिळाले. त्याशिवाय त्यांचे बंधु श्री रघुनाथ बाळकृष्ण जोशी एल. एम ई हे दुय्यम म्हणून व श्री दामोदर बाळकृष्ण जोशी ह पोट-कॉन्ट्रॅक्टर म्हणून कंपनीकडेच काम करितात इतर कंत्राटी कामाशिवाय रीइन्फोर्स्ड कॉक्रीटच्या इमारती व पूल वगैरेंचीं डिझाइन्स व देखरेखीचीं कामें एस. बी जोशी आणि कं पहिल्यापासून करीत आले आहेत.

इमारतींचे प्लान व राजवाड्याच्या व इतर इमारतींच्या Interior Decoration च्या योजना त्याचेतर्फे केल्या जातात नुकतीच कच्छच्या महाराजाचे राजवाड्याच्या आतील Decoration ची योजना त्यानीं केली आहे. त्यांनीं आजपर्यंत सार्वजनिक संस्थाकरतां शाळागृहें वगैरे, अदाजी किंमत दीड लाख रुपये, खासगी बंगले किंमत दीड लाख रुपये, रीइन्फोर्स्ड कॉक्रीटचे पूल व कल्व्हर्टस वगैरे एक लाख रुपये, मुंबई म्युनिसिपालटीचे कॉक्रीट रस्ते, ह्यूम पाईप लाइन टाकणेची ड्रेनेजची खोदाई ३० फूट खोल असलेलीं कामें अदाजी दोन लाख रुपये अशी कामें केलीं आहेत सध्या मुंबई येथेच अंदाजी ३ लाखाचें ड्रेनेज काम चालू आहे

प्रामाणिक नोकरवर्ग व हितचिंतकाची सहानुभूती हींच त्याच्या प्रगतीचीं मुख्य कारणें आहेत

त्याचा आजपर्यंतचा अनुभव खालीलप्रमाणें आहे —

(१) सर्व स्वतंत्र धंद्यास पुष्कळ वाव आहे.

(२) लायक व मेहनती मनुष्य शोधून सुद्धा मिळत नाहीं.

(३) पांढरपेशा मनुष्य मेहेनतीचे कामास टिकत नाहीं

(४) कॉंट्रॅक्टरची जात अप्रामाणिक असा गैरसमज पसरल्यामुळें खाजगी लोक त्याचा फायदा घेऊन कॉंट्रॅक्टरचे पैसे बुडवितात असा कंत्राटाचे धंद्यातील लोकाचा अनुभव आहे. सुदैवानें एस बी जोशी ह्याची फर्म माणूस पाहून काम घेत असल्यामुळें त्यास अजून तसा अनुभव आला नाहीं

(५) सरकारी व इतर सार्वजनिक संस्थाशीं होणाऱ्या कराराच्या शर्ती एकतर्फी असतात त्यामुळें कॉंट्रॅक्टरवर अन्याय होऊन त्याचें पुष्कळ वेळां विनाकारण नुकसान होतें. फायद्याचें मान कमी झाल्यामुळें व धंद्यांत सुशिक्षितांचा भरणा झाल्यापासून सदरहु अन्याय जास्त तीव्रतेनें भासू लागला आहे. कामावरील अंमलदाराच्या न्यायीपणावर व दयाळूपणावरच कॉंट्रॅक्टरास विसंबून राहावें लागतें.


# यांत अशक्य काय आहे ?

## आयुष्याच्या विम्याचें काम करणाऱ्या ह्या प्रगतिमान विमा कंपनींत

# एकदाच फक्त १०रुपये ठेवून १७,५०० रु. मिळवा!

ह्या योजनेबद्दल थोर लोकाचे खालील अभिप्राय पहा:—

**महाराष्ट्राचे सु अर्थशास्त्रज्ञ प्रो वा. गो. काळे—**

वर्ल्डवाइड ॲशुअरन्सच्या डिबेंचरच्या योजनेमध्यें मुळांत धोक्याचा असा कांहींच भाग नाहीं किमान १२½ रु भरून १० रुपयांचे डिबेंचर्स घेणाराच्या वारसांस ही १० रुपयांची रक्कम तर मिळेलच, पण तिच्यावर दर तीन वर्षांनी सुटणारा कांहीं नफा त्यांच्या स्वतःच्या हयातींतहि मिळेल ह्या शिवाय, या योजनेंत बोनसहि मिळण्याची कंपनीनें योजना केली आहे

**सुप्रसिद्ध विमा तज्ज्ञ श्री, ग स. मराठे—**

ह्या स्कीममध्यें विशेष दिसेल तें हेंच, कीं विभागणी तत्त्वावर चालविलेल्या स्कीममध्यें अगर लॉटरींत असणाऱ्या वैगुण्यापैकीं ह्यांत एकाहे नाहीं

**मजुरांचे पुढारी श्री एस. एच. झाबवाला, एम एल ए. मुंबई:—**

व्याकश बोलावयाचें, तर तुमची स्कीम शास्त्रोक्त असल्यामुळ चांगल्या रीतीनें चलू शकेल

**सु० राष्ट्रीय पुढारी, श्री रामराव देशमुख, बार-ॲट-ला. वऱ्हाड:—**

पूर्ववयांत कांहीं कारणांमुळें ज्यांची इन्शुअरन्सची गाडी चुकली आहे, त्याना ती मिळवणेकरितां ह्या डिबेंचर स्कीमचा चांगलाच उपयोग होईल.

**कंपनीने पॉलिसी-होल्डर्सच्या सुरक्षिततेसाठी सरकारजवळ १९१२ च्या इन्शुअरन्स ॲक्टाप्रमाणें गव्हर्नमेंट सिक्युरिटीज तारण दिल्या आहेत.**

विशेष माहितीकरितां पुणें प्रदर्शनांत आमच्या स्टॉलला भेट द्या अगर खालील पत्त्यावर लिहा—

## दि वर्ल्डवाईड ॲशुअरन्स लि.

हेड ऑफिस: ग्रेहॅम बिल्डिंग, १०९, पार्शी बझार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

ऑर्गनायझिंग ऑफिस: ५५ बुधवार, पुणें

## ' दि वर्ल्डवाईड ॲशुअरन्स लि. मुंबई "

महाराष्ट्रीय विमा कंपन्यातील एक उद्योन्मुख विमा कपनी म्हणून "वर्ल्ड वाईड" विमा कपनीचे नाव नमूद करणें जरूर आहे सदर कपनी आयुष्याचे मोठाले विमे तर घेतेच पण त्या बरोबरच गरिबाच्या सोईकरिता कंपनीनें फायदेशीर यात्रिक प्रिमियमच्या घड्याळाच्या योजनाहि तयार केल्या आहेत त्यामुळें गरिबाना लहान रकमेचे विमे घेणें सोईचें झालें आहे. कपनी विमेदाराना ज्या सवलती देते त्यात आजारीपणातील मदत, शस्त्रक्रियेकरिता सहाय, अपघातानें मृत्यु आल्यास दुप्पट रकम देण्याची सवलत, विमापत्रक रद्द होऊ नये म्हणून दिलेल्या विशेष सवलती, मुलाचे ऐच्छिक विमे आणि स्त्रियाचे विमे वगैरे सवलती उल्लेखनीय आहेत सदर कंपनीनें अलीकडेच श्री. ग स. मराठे याच्या सहायानें तयार केलेली डिबेंचर योजना अत्यत नाविन्यपूर्ण असून शास्त्रीय आहे या योजनेमुळें वारवार हप्ते भरण्याचा विमेदाराचा त्रास वाचून त्याना आपल्या मुलांबाळांची तरतूद अगदी थोड्या रकमेंत करता येते बेकारीच्या ह्या भीषण युगात मोहाला बळी पडून गरीब लोकाचा सट्टे, लॉटरी व विभागणी तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या योजना यात वाया जाणाऱ्या पैशाच्या ओघाला बराच पायबंद बसेल असें मानाण्यास बरीच जागा आहे सदर योजनेवर सुप्रसिद्ध पुढारी, श्री. रामराव देशमुख, श्री एस् एच् झाबवाला वगैरेंचे उत्कृष्ट अभिप्राय आहेत. कपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन पुण्याचे सुप्रसिद्ध श्री. व्ही एन ऊर्फ आण्णासाहेब वर्तक हे असून डायरेक्टर बोर्डांत डॉ बी एस मुजे, रा ब मुळे, श्री र चिं सोहोनी वगैरे गृहस्थ आहेत सदर कपनीनें प्रदर्शनात आपला स्टॉल उघडला असून तेथें कंपनीच्या विविध योजनाची माहिती दिली जाते

## श्री. कळसकर ह्यांची "सायन्स ऑफ टेलरिंग ॲंड कटिंग ॲकेडमी"

शिवणकामाच्या धंद्याला आर्थिक भांडवल जितकें अत्यंत लागतें, तितकेंच अधिक भांडवल बौद्धिक शिक्षणाच व अनुभवाचें मिळवावें लागतें हें भांडवल पैसा खर्चूनहि योग्य असें मिळत नाहीं, कारण आपल्या धंद्यातील गुरुकिल्ली सर्वस्वी उघड करून शिष्य तयार करणारे उदार कलावत आपल्या देशात फारच थोडे आहेत व श्री माधवराव कळसकर हे त्यापैकींच एक प्रमुख आहेत

श्री माधवराव कळसकराची ख्याती शिवण व कर्तन कलेचे कर्णधार म्हणून वर्तमानपत्री जगात जरी फारशी नसली, तरी महाराष्ट्रातील नावाजलेल्या शिवण व कर्तन कलेच्या कलावंताच्या मनात त्याच्याविषयीं उच्च आदर वास करीत आहे व तो अत्यत योग्य आहे कोणत्याहि प्रकारचा आडपडदा न ठेवतां खुल्या दिलानें व सुलभ रीतीनें शिक्षण देऊन आजवर त्यानीं सुमारें तीनशेहूनहि अधिक कारागीर तयार केले आहेत, आणि खुद्द पुण्यात त्याच्या तालमींत तयार झालेले, नाणावलेले, टेलर्स व कटर्स दोन्ही हाताच्या बोटावर मोजून उरतील इतके आहेत.

ज्या शिवणकलेचा श्री माधवराव कळसकर हे जन्मभर अभिमान बाळगीत आले, त्या कलेची प्रगति व्हावी ह्याकरिता त्यानीं स्वत:ची शिक्षणसस्था "सायन्स ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग ॲकेडमी" ह्या नावानें बुधवार पेठ पुणें, येथें कांहीं दिवसापूर्वी स्थापन केली आहे माफक फी घेऊन योग्य शिक्षण देणें व आपल्या शिष्याना धंद्याच्या दृष्टीनें खरेखुरे कलावत बनविणें हें त्याचें एकमेव ध्येय आहे ज्ञानाबरोबर आपल्या अनुभवाचा फायदा देऊन विद्यार्थ्यांचें सचोटीचें शील बनविण्याकडेहि त्याचें लक्ष असतें. श्री कळसकराचें अगीकृत कार्य यशस्वी होवो व त्याची शिक्षणसस्था चिरायु होवो.

फॉरिनला जाणाऱ्यांचे —फेवृट टेलर्स— म्हणजेच
**वर्वे टेलरिंग फर्म**, अप्पा बळवंत चौक, पुणें २

**श्री राम सिल्क थ्रोइंग फॅक्टरी, बंगलोर.**
( स्टॉल नं. ६५ )
आमचे फॅक्टरींत रेशमी व गर्भरेशमी लुगडीं, साड्या, खण, कद, फेटे, शर्टिंग, कोटिंग वगैरे फॅन्सी व निरनिराळया डिझाइन्सचा माल तयार होतो.
**पुणें:—औद्योगिक प्रदर्शनांतील**
आमचे स्टॉलला एकवार भेट द्या.

## श्रीधूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट

आयुर्वेदशास्त्रसेवा व लोकसेवा व्हावी या हेतूनें श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना या खाजगी संस्थेनें चैत्र शु. १ शके १८५५ तारीख २७-३-३३ रोजीं इमारती, बाग वगैरे ७५,००० रु. किंमतीची स्थावर मिळकत आणि पन्नास हजार रुपये द्रव्यनिधि इतक्याचा एक पब्लिक ट्रस्ट केला आहे.

डॉ. नीलकंठ भालचंद्र भाटवडेकर, बी.ए., एम्. बी. बी.एस्., गिरगांव, मुंबई; डॉ.पुंडरीकाक्ष गदाधर पुराणिक, पनवेल, कुलाबा; रा. गंगाधर विष्णु पुराणिक, वहिवाटदार ट्रस्टी, पनवेल, कुलाबा; हे तिघे ट्रस्ट्री असून आठ जणांचें सल्लागार मंडळ आहे.

ट्रस्टडीडमध्यें, अनुकूलतेप्रमाणें यथावकाश खालील कामें व्हावीं, असें आहे.

श्रीधूतपापेश्वर मूर्तीची स्थापना, वैद्यशास्त्रविषयक पदार्थसंग्रह, वनौषधींच्या नमुन्यांचा संग्रह, औषधींचा असंदिग्ध गुणनिश्चय, त्यांचें परिक्षण आणि निर्दोष, उपयुक्त व जास्तींत जास्त गुणकारी औषधें तयार करण्याच्या पद्धतींचा निश्चय,त्रिदोष सिद्धांतांचें स्पष्टीकरण, ग्रंथसंग्रह करणें,आयुर्वेद विद्यालयाची स्थापना करणें, धर्मार्थ दवाखाना, रुग्णालय, सूतिकागृह अशा लोकोपयोगी वैद्यकविषयक व आरोग्यविषयक संस्था चालविणें, इत्यादि कामें ट्रस्टनें करावयाचीं आहेत. ट्रस्टचें ध्येय व्यापक आहे. मुख्य हेतु मनुष्य निरोगी व्हावा व निरोगी रहावा हा होय व तो आयुर्वेदोन्नतीचे द्वारें बहुतांशीं पुरा होईल, अशी ट्रस्टचे संस्थापकांची श्रद्धा असल्यानें आणि विशेषत: श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना ही संस्था या ट्रस्टची जनक असल्यानें "श्रीधूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट" असें नांव ट्रस्टला दिलें आहे आणि ट्रस्टकडून आयुर्वेदीय चिकित्सेचाच अवलंब प्रामुख्यानें करण्यांत यावयाचा आहे.

## खेड्यांतील दवाखाना

श्री. ग. कृ. प्रधान, जी. डी. सी. ए., ऑडिटर, को. सो., नगर विभाग, ह्यांनीं लिहिलेलें "खेडेगांवांतील दवाखाना" या नांवाचें मराठी पुस्तक अभिप्रायाकरितां आमचेकडे आलें आहे. खेड्यांत शेतकऱ्यांना जरूरीच्या वेळीं किरकोळ औषधें देखील वेळेवर मिळणें त्यांच्या गरिबीमुळें आणि अज्ञानामुळें शक्य होत नाहीं. खेड्यांतील लोकांची प्रकृति मूळचीच काटक असते आणि वेळेवर थोडेसें औषध मिळालें असतां त्यांचे कितीतरी रोग सहजासहजीं बरे होणें शक्य असतें. लहान मुलांच्या बाबतींत तर ही गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते. खेडुतांची ही अडचण लक्षांत ठेवून व डॉक्टरी औषधांमधील अत्यंत स्वस्त, उपयुक्त व साधीं औषधें हुडकून काढून हें पुस्तक शक्य तितक्या सोप्या भाषेंत लिहिलेलें आहे. पुस्तक मुद्दाम सहकारी सोसायट्यांच्या उपयोगासाठी लिहिलेलें असल्यामुळें खेडेगांवांत त्यांना फुकट औषध कसें पुरवितां येईल तें मुद्दाम स्पष्ट केलें आहे. ग्रामसुधारणेच्या दृष्टीनें या योजनेचा प्रसार व प्रचार जितका होईल तितका चांगला. या पुस्तकाचा उपयोग शक्य तितक्या लोकांस व्हावा ह्याकरितां त्याची किंमत फक्त एक आणा ठेवण्यांत आली आहे. सदरहु पुस्तक नगर जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. पुस्तकाचे सुरवातीस सोप्या व स्वस्त अशा औषधांची यादी व अदमासें किंमत दिली आहे व सर्वसाधारण सूचनाहि केलेल्या आहेत. खेडेगांवांत तात्कालिक उपाययोजनेकरितां पुस्तकाचा व त्यांतील औषधांचा चांगला उपयोग होईल.

*For All Medicinal Requisites*

— TRY —

**N. MAHADEV & Co.**

DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS

City Post Office Corner, POONA 2.




दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲंड बेरार

**प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या रौप्यमहोत्सवानिमित्त सदरहु तारखेपासून दशवार्षिक रोखे शेकडा ७० रु. ८ आण्यांच्या दरानें विक्रीस काढले आहेत.

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु.च्या दर्शनी किंमतीचे आहेत. वरील रक्कम शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आह.

हे रोखे विकत घेण्यांत बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर,
ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम्.
मॅनेजर, दि सी. पी. ॲन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

व्यापारी-उद्मी लोकांस
**—अपूर्व संधि—**
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

**दी सनशाइन इन्शुअरन्स लि.**

या कपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरता पगारी एजट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रॅच ऑफीस · ३३४ गणेश पेठ, पुणें

**एशियन पॉलिसी**

ASIAN ASSURANCE Co.


म्हणजेच

**आयुर्विम्याच्या निरनिराळया सर्वांस सोयीस्कर योजना.**

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

**धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड**
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

**फोल्डिंग व बॉक्स कॅमेरा**



सामर्थ्यवान लेन्स बसविलेला ह्या कॅमेऱ्यानें नवशिक्यास सुद्धां फिल्मवर उत्कृष्ट फोटो घेतां येतात बेकार रोज ५ रु मिळवूं शकतात फिल्म कार्ड, फेम, रसायनें, कॅमेरा कसा वापरावा हें सांगणारें पुस्तक मोफत.

फोल्डिंग कॅमेरा, रु. ४. बॉक्स कॅमेरा न २, रु २-१२. नं १ रु ३-१२ पॅकिंग व पोस्टेज वेगळें

Dutt & Co (12)
15/,-Jay Mitra Street,
P O HATKHOLA (Calcutta)

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**
लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन न ५७२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल . | २,१४,१०० |
| रोख भरलेले भांडवल : | १,०६,१२० |

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द द. शेकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द द २॥ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंडया, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्याची खरेदीविक्री त्यावरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते खात्यांत भरलेले मुंबई बँकावरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात
शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी

एम व्ही गोखले,
मॅनेजर

उन्हाळ्याकरितां **सिल्क कोट वापरा**

महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे तयार अगर करून मिळतील.

बंबाचे माडीवर ] बुधवार चौक, पुणें.

# अखिल भारतीय मुद्रण परिषद

## अधिवेशन पहिलें, पुणें.

( ता. २७।२८ मार्च १९३७ )

स्वागताध्यक्ष, श्री. अ वि. पटवर्धन, हे आपल्या भाषणांत म्हणाले.—

### स्वागताध्यक्षांचें भाषण

"या धंद्यांत सुधारणा करण्याच्या दृष्टीनें अनेकांनीं विविध तऱ्हेनें परिश्रम केले आहेत.तथापि या मुद्रणकलेच्या धंद्याची माहिती कामगारांना होण्याकरिता आज कितपतसे प्रयत्न झाले आहेत ते पाहिले म्हणजे खरोखर वाईट वाटतें. किर्लोस्कर. नाटक कंपनीचे रा शंकरराव मुजूमदार यांचें 'मुद्रणदर्पण' व गौरीशंकर छापखान्यांत छापलेलें पुरोहित यांचें 'मुद्रणकलादर्शक' पंचवीस पानीं चोपडें, याशिवाय आज आमचेपाशीं कामगारास शिक्षण देण्यास उपयोगी पडणारें साधन कांहीं नाहीं. छापखान्याचा धंदा या देशांत आता बद्धमूल झाला आहे नवीन राजवटींत सर्व बाजूनें या धंद्यांत प्रगति करून घेण्याची जबाबदारी आपलेवरच येऊन पडली आहे शिक्षण-प्रसार करण्याचें कार्य आता आम्हांस हातीं घ्यावयाचें आहे व हें कार्य यशस्वी होण्यास छापखान्यांची मदत पाहिजे आहे तेव्हां या धंद्याची वाढ कशी होईल याचें चिंतन आम्हीं सतत केलें पाहिजे, अशी स्थिति उत्पन्न झाली आहे.

पुण्यांत या धंद्यातील शिक्षण देण्यास कांहीं सोय नाहीं हें पाहून शरमेनें मान खालीं घालावी लागणार आहे ही परिस्थिति सुधारावी म्हणून १५-२० वर्षांपूर्वी 'पुणें प्रेस ओनर्स असोसिएशन'ची स्थापना १०-१५ छापखानेवाल्यांनीं केली परंतु ही संस्था स्थापनेपासून कशीतरी जीव धरून राहिली, यावाचून तिचे हातून जास्त काम १०-१५ वर्षांत झालें नाहीं. युरोपमध्यें छापखानेवाल्यांचे जे संघ आहेत, त्यांचे अहवाल वाचले म्हणजे आम्हीं इतके मागें का रहातों याबद्दल साहजिकपणें विचार उद्भवतो. या परिषदेमध्यें British Federation of Master Printers या संस्थेच्या कार्याबद्दल व कार्यपद्धतीबद्दल आपल्यास माहिती देण्यांत येईलच. परदेशातील धंदेवाले आपल्या धंद्याच्या वाढीकरता किती तऱ्हेचे प्रयत्न करतात हें पाहिलें म्हणजे त्यांची प्रगति का होत आहे, तें तेव्हाच कळून येतें. आमची तपश्चर्या त्यांच्यासारखी नसल्यानें आम्हास फलप्राप्ति होत नाहीं हें यथायोग्यच आहे तेव्हा ही स्थिति कशी बदलणें शक्य आहे याबद्दल एकत्रित बसून विचारविनिमय व्हावा म्हणूनच आपल्यास आज हजर रहाण्याची तसदी दिली आहे व आपल्यापुढें कांहींतरी मूर्त स्वरूपांत ठेवावें म्हणूनच या वेळीं भरणाऱ्या औद्योगिक प्रदर्शनचा फायदा घेऊन त्यांत मुद्रणधंद्याचे प्रदर्शन मांडण्यात आलें आहे. तेव्हा आपण आपल्या धंद्याचें बाबतींत आपले अनुभव व अडचणी एकमेकांपुढें मनमोकळेपणानें मांडून या धंद्याची उन्नति करण्याच्या विचारास लागू या"

### अध्यक्षांचें भाषण

अध्यक्ष, श्री. व्ही व्यंकटेश्वर शास्त्रुलु गारु, हे आपल्या भाषणांत म्हणाले.—

"देशी भाषेंत छपाईचीं कामें करणारे छापखाने फार वाढत असून त्यांचें काम त्यांच्या व धंद्याच्या दृष्टीनें असमाधानकारकपणें चालविलें जात आहे या मुद्रणधंद्याप्रमाणेंच इतर धंदे अशाच प्रकारें चालविले जात आहेत यांत शंका नाहीं. या धंद्याच्या बाबतींत चांगली सुधारणा व्हावी याबद्दल जनतेनेंहि खटपट करणें जरूर आहे मोठ्या छापखान्यांच्या बाबतींत फॅक्टरी ॲक्टची ज्या प्रकारें अमलबजावणी केली जाते, त्याबद्दल फार मोठी तक्रार आहे. कामगारांच्या हितसंरक्षणासाठी जीं कलमें कायद्यांत घालण्यांत आलीं आहेत त्यांची कसोशीनें अमलबजावणी करण्याच्या बाबतींत कोणीहि तक्रार करील असें वाटत नाहीं फॅक्टरी ॲक्टांतील महत्त्वाच्या कलमाबाबत समाधानकारक परिस्थिति असल्यावर केव्हां केव्हा होणाऱ्या किरकोळ चुकांचा फायदा घेऊन त्याबद्दल प्रमाणाबाहेर शिक्षा देणें हें वाजवी नाहीं. या धंद्याच्याबाबत ट्रेड यूनियनची जी एक बाजू आहे, तिची वाढ झाल्यास मला वाईट वाटणार नाहीं. त्याचबरोबर हा छापखान्याचा धंदा सहकारी तत्त्वावर चालविण्याची योजना करण्यात यावी आणि हा मुद्रणधंदा इतर धंद्याप्रमाणें चालविण्यात यावा. हा धंदा सहकार्यानें असा चालविला गेला पाहिजे कीं, ज्यामुळें धंद्यातील इसमास सर्वसाधारणतः उदरनिर्वाहासाठी लागणारी रकम मिळूं शकेल व एखादा छापखानेवाला धंद्यातून निवृत्त झाल्यावर त्याला त्यास लागणारी चरितार्थाची रकम मिळण्याची सोय व्हावी. या बाबतींत प्रत्येक प्रांताची आंकडेवार माहिती गोळा करणें उपयुक्त होणार आहे. या व अशा प्रकारच्या बाबतींत या परिषदेनें कांहीं तरी करण्याची हीच वेळ आहे."

## "अर्थ" पत्राची रजिस्ट्रारसाहेबांकडून शिफारस

[मुंबई इलाख्याच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, मि एम. डी. भनसाळी, ह्यांनीं एक सर्क्युलर काढून, महाराष्ट्रांतील मध्यवर्ती जिल्हा बँका, अर्बन बँका, खात्यामधील अधिकारी, सहकारी मासिकें व असिस्टंट रजिस्ट्रार ह्यांकडे त्याची एक एक प्रत माहितीकरितां व मार्गदर्शनाकरितां पाठविली आहे सदरहु सर्क्युलरचें मराठींत भाषांतर करून त्याच्या प्रती सोसायट्या व यूनियन्स ह्यांजकडे पाठविण्यात येतील. रजिस्ट्रारसाहेबांच्या सर्क्युलरचा गोषवारा खालीलप्रमाणें आहे ]

**सर्क्युलर नं.** GEN—306 of 1937

"ह्या ऑफिसचें १५-३-३५ चे सर्क्युलर नं GEN-306 मध्यें, प्रो. वा गो काळे, एम् ए ह्यांनीं संपादलेल्या 'अर्थ' पत्राची शिफारस करण्यात आली होती, त्याकडे सर्व सोसायट्या, सहकारी बँका व यूनियन्स ह्यांचें लक्ष वेधण्यात येत आहे शेती, व्यापार, बॅंकिंग, उद्योगधंदे, सहकार, विमा, ग्रामसुधारणा व इतर व्यावसायिक विषयास हें साप्ताहिक वाहिलेलें असून प्रौढांस आर्थिक शिक्षण देण्याचें काम तें करीत आहे. ह्या इलाख्यातील व बाहेरील सहकारी संस्थांच्या कार्यासंबंधीं व सहकारी व इतर आर्थिक प्रश्नासंबंधीं माहिती देणारें मराठींमधील हें एकच नियतकालिक आहे विशेषतः महाराष्ट्रांतील बॅंकांस व सोसायट्यांस आणि नेहेमीं प्रचारकार्य करावें लागणाऱ्या सहकारी कार्यकर्त्यांस ह्या साप्ताहिकाची उपयुक्तता तर विशेषच आहे सहकारी बँका, यूनियन्स व सोसायट्या ह्यांच्या ताळेबंदाची छाननीहि "अर्था"त होत असते व सहकारी संस्थांची सुधारणा व्हावी ह्या हेतूनें सूचनाहि केलेल्या असतात सहकारी खात्याच्या सर्व अधिकाऱ्यांस, बँकांस व सोसायट्यांस ह्या साप्ताहिकाची रजिस्ट्रार आनंदानें शिफारस करीत असून, त्यांनीं ह्या पत्राकडे प्रसिद्धीकरतां मजकूर पाठविण्यास अगर ते विकत घेण्यास हरकत नाहीं."

## हिंदुस्थानांतील वैमानिक वहातुक

### गेल्या आठ वर्षांतील प्रगति

( १ ) हिंदुस्थान सरकारशीं करार करून १९२९ सालीं "इंपीरियल एअरवेज" नें लंडन ते दिल्ली अशी साप्ताहिक वहातुक सुरू केली

( २ ) २९ डिसेंबर, १९३१ रोजीं ह्या कराराची मुदत संपली, तथापि वहातुकीच्या व्यवस्थेंत बिघाड होऊं नये, ह्यासाठीं कराची ते दिल्ली टपाल आणण्या–नेण्याकरिता सरकारनें दिल्ली फ्लाइंग क्लबशीं करार केला ही योजना जुलै १९३३ पर्यंत चालू होती.

( ३ ) लंडन ते कराची वैमानिक वहातुक चालू होतीच. कराची व कलकत्ता हीं शहरें जोडलीं जाऊन अखेर ऑस्ट्रेलियापर्यंत साखळी बनवण्याच्या वाटाघाटींतून, ' इंडियन ट्रॅन्सकॉंटिनेंटल एअरवेज् लि ' ही खासगी कंपनी निर्माण झाली ह्या कंपनीमध्यें २४% भाडवल हिंदुस्थान सरकारचें असून इंपीरियल एअरवेज लि चें ५१% आहे. इंडियन नॅशनल एअरवेज लि ह्या तिसरी कंपनीनें २५% भाग घेतलेले आहेत एकूण भाडवल १० लक्ष रुपयाचें आहे

( ४ ) " इंडियन ट्रॅन्सकॉंटिनेंटल एअरवेज लि. " नें जुलै, १९३३ मध्यें कराची ते कलकत्ता वहातुक सुरू केली. ऑक्टोबरमध्यें रंगून शहरापर्यंत मजल गेली. डिसेंबरमध्यें सिंगापूर कराचीशीं जोडलें गेलें १९३५ मध्यें ही वहातुक आठवड्यातून दोनदां सुरू झाली.

( ५ ) १९३२ मध्यें टाटा सन्स लि. नें कराची ते मद्रास ही वहातुक करण्याचें अंगावर घेतलें टाटाचीं विमानें वाटेंत अहमदाबाद, मुंबई व हैद्राबाद हीं शहरें घेतात.

( ६ ) "इंडियन नॅशनल एअरवेज लि" ह्या ३० लक्ष रुपये अधिकृत भाडवलाच्या कंपनीनें १९३४ सालीं कराची–लाहोर हीं शहरें जोडलीं एप्रिल १९३६ पासून ही वहातुक आठवड्यातून दोनदा होऊं लागली आहे नॅशनल एअरवेजकडे व्हाइसरॉयाच्या विमानाची व्यवस्था सोंपविण्यात आलेली असून त्याकरितां सरकारकडून दरसाल कांहीं ठराविक रकम तिला मिळते.

( ७ ) टाटा कंपनीनें २९ आक्टोबर १९३५ मध्यें मुंबई–गोवा–त्रावणकोर ही वहातुक सुरू केली, ती २० एप्रिल १९३६ पर्यंत चालू होती २८ आक्टोबर १९३६ पासून ती पुन्हा चालू आहे

### जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग व कटिंग, पुणें

वरील संस्थेतर्फे रा ब तुसे हे प्रांतिक कायदेमंडळांत ( असेंब्लींत ) निवडून आल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें, त्यावेळीं ते म्हणाले:—

"महात्मा गांधींच्या संदेशाप्रमाणें जसा चरखा घरोघर फिरला पाहिजे तसें शिवणकाम घरोघर आलें पाहिजे" संस्थेच्या मॅनेजरांनीं आभार मानताना कोल्हापूरच्या छत्रपतींकडून त्यांच्या पेट्रनेजसबंधींचा हुकूम वाचून दाखविला.

हायक्लास क्वॉलिटीची खात्री पटवून देणारे ३४ वर्षांचे खास अनुभवी
टी. डी. भोसले, यांची
दि पूना रबर स्टँप

कॉंपिटिशन कं ७६४ सदाशिव, गायआळी, पुणें १ ओळ ६ आणे, २ ओळी ८ आणे ३ ओळी १० आणे डिझाइन स्टॅंप १ रु

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd. Poona, concerning Pigmy & Monthly Income Deposit Schemes"

वेळेवर मनपसंत कपडे मिळण्याचें एकच ठिकाण
टेलर्स रिसबूड ब्रदर्स
सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणें २

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ —
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवीवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.
कर्ज. सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात
मॅनेजिंग एजंटस्.

काटकसर आणि चढाओढ
सध्याचे आर्थिक मंदीचे दिवसांत अधिक काटकसर कशी करितां येईल हा विचार प्रत्येकापुढें आहेच संस्था, ऑफिस, कारखाना, घर इ० सर्व ठिकाणीं काटकसरीचा प्रयत्न सुरू आहे
परंतु
वेळेची काटकसर करणें आरोग्याशिवाय कसें शक्य होईल, आणि आरोग्य मिळण्यास व टिकविण्यास उपाय काय ?
याचें उत्तर
आरोग्यमिश्रण
याचे सेवनाने
शौचास साफ होऊं व तरतरी आणि
लागून भूक वाढते उत्साह हीं वाढतात.

बोधचिन्ह
सर्व एजंटांकडे मिळतें
श्रीधूतपापेश्वर आयौषधि कारखाना,
पनवेल—कुलाबा.

## कुरकुंभ ( जि. पुणें ) येथील पंचकमिटी शिक्षणवर्ग

पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें कुरकुंभ ( पेटा दौंड) येथें पेट्याचे महालकरी श्री. गावडे ह्यांचे अध्यक्षतेखाली ता ७-३-३७ रोजी सोसायट्यांच्या पंच कमिटीचा शिक्षणवर्ग बोलावण्यांत आला होता. त्यावेळीं सुमारें ५०-६० मंडळी हजर होती.

प्रारंभीं इन्स्टिट्यूटचे प्रॉपेगेंडा ऑफिसर श्री. इंगळे यांनीं सहकारी चळवळीचीं मूलतत्वें सांगून शेतकरी बंधूंनीं आपले आर्थिक व सर्वांगीण उन्नतीसाठीं सहकार्याचा अवलंब करणें हल्लीच्या आर्थिक हलाखीच्या काळांत किती आवश्यक आहे याबद्दल सांगोपांग विवरण केलें. तसेच, आर्थिक अडचण दूर करण्यास सोसायटीची आवश्यकता आहे हें जरी खरें असले तरी सोसायटीचा मुख्य हेतु परस्परामध्यें प्रेमसंवर्धन होऊन सर्वांनीं एकीच्या बळावर आपली उन्नति करून घेणें हा आहे व या दृष्टीनें शेतकऱ्यांच्या उन्नतीकरतां प्रचलित असलेल्या चळवळींमध्यें सहकारी चळवळीचें किती महत्त्वाचें स्थान आहे हें स्पष्ट करून सांगितलें व त्या दृष्टीनें सोसायटीच्या चालकांचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या काय आहेत याचा खुलासा केला. त्यानंतर श्री. बाळासाहेब देशपांडे ह्यांनीं शेतकी पतपेढ्यामध्यें सभासदांना कर्जें देतेवेळीं चालकांनीं काय काय खबरदारी घ्यावयास पाहिजे व कर्ज घेतल्यानंतर त्याची वक्तशीर फेड करणें हें सभासदांच्या दृष्टीनें किती आवश्यक आहे याचें विवरण केलें. श्री. आण्णासाहेब देवभानकर ह्यांनीं आपल्या भाषणांत, केवळ पैशाकरितां सोसायट्या काढलेल्या नसून अगदीं अडचणीच्या वेळीं आधार या दृष्टीनेंच सोसायटीचा उपयोग सभासदांनीं करावयास पाहिजे, व हा हेतु साध्य होण्याकरितां सोसायटीच्या प्रत्येक सभासदानें स्वावलंबी होणें किती जरूर आहे व आपण स्वावलंबी बनून आपल्या शेतकरी बंधूंस स्वावलंबी बनण्यास मदत करणें किती आवश्यक आहे हें विशद करून सांगितलें. त्यानंतर श्री. कुलकर्णी ह्यांनीं सभासदांना कर्जमंजुरीचे शिफारशीचे वेळीं सोसायटीच्या चालकांनीं कोणकोणत्या बाबी नजरेपुढें ठेवणें आवश्यक आहे, याचें स्पष्टपणें दिग्दर्शन केलें. अध्यक्ष श्री. गावडे यांचें सहकार्यावर समयोचित भाषण झालें. त्यानंतर श्री. भानू हे आभार मानतांना आपल्या भाषणांत म्हणाले कीं, ज्यांचे अध्यक्षतेखाली आजची सभा होत आहे, त्यांना सभासदांचे वसुलीसाठीं येथें येण्याचें कारण पडूं नये अशा तऱ्हेनें प्रत्येक सभासदानें सोसायटीशीं आपला व्यवहार चोख ठेवला पाहिजे व सोसायटीची भरभराट दिवसेंदिवस होऊन तिचा खराखुरा उपयोग सभासदानें करून घेतला पाहिजे. आभारप्रदर्शन, पानसुपारी वगैरे समारंभानंतर सभेचें काम संपलें.

---

### कळवण ता. ( जि. नाशिक ) सहकारी वृत्त

( १ ) ग्रुप सेक्रेटरी मासिक डिबेटिंग सभा ता. ८-३-३७ रोजीं पिंपळगांव येथें भरली होती, त्यावेळीं 'भाऊबंदकी' ह्या विषयावर श्री. वाघ ( चेअरमन डि. स्कूल बोर्ड ) ह्यांचे अध्यक्षतेखालीं चर्चा झाली. ( २ ) कळवण-चांदवड ता. सु. यूनियननें व्याजाची सवलत, लवाद, मेंबरांची वसुली, इंप्लिमेंट सोमापटी, बीं बियाण्यांचा पुरवठा, शेतीच्या मालाचे तारणावर पैसे देण्याची योजना, इ. बाबत प्रचार करण्याकरितां पांच ठिकाणीं सभा बोलावल्या, त्यांपैकीं चार सभा पार पडल्या आहेत. ( ३ ) जिल्हाधिकाऱ्यांनीं ता. १५-३-३७ रोजीं यूनियनला भेट देऊन कामाबद्दल समाधान व्यक्त केलें.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट : तें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा.—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you

**NEW BUSINESS**

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

प्रातिक सरकारांनीं करावयाची कर्जफेड

प्रातिक सरकारांनीं हिंदुस्थान सरकारकडून उचललेलें सर्व कर्ज व्याजासुद्धां ३१ मार्च १९८२ चे आत फेडावयाचें आहे दरसाल दोन वेळां मध्यवर्ती सरकारास रकमा द्यावयाच्या ह्या हिशेबानें हप्त बसविण्यांत आले आहेत मुंबई सरकारनें ३१ जुलै व ३१ जानेवारी रोजीं दरवर्षी आपले हप्ते चुकते केले पाहिजेत

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) .. | ११८—७ |
| ५% ( १९२९-४४ ) लोन .. .. | १०५—१४ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—० |
| ४% १९४३ ... ... .. | १०७—४ |
| ३½% बिनमुदत .. . . | ९३—१२ |
| ३½% १९४७—५० . . | १०४—१४ |
| ३½% १९४८—५२ ... ... | ९९—२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) . | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... . | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) . | १३५—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | १०९—१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) | ३४—२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५०२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु ) | १३१—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | १०३—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु चा भाग, डिव्हि १०, बोनस ६ रु ४ आ. ) | ८९०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५०—१५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७३—१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½%) | १५१०—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९८—१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, १७ रु.८ आ.) | १७९—१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. रु.६) | ३९२—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | २०२२—८ |


S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटींग, सडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक
आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.
" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यांतील विशेष होय "
भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

मुंबई सरकारचे सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेली
डॉ. काळे यांचे पूना लेप्रसी क्लिनिक
म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चर्मविकारावरील उपचारांचें विश्वसनीय ठिकाण
ठिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

## दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

तारेचा पत्ता : "प्रेसिडेन्सी" पुणें. ] १० विश्रामबाग रोड [ टेलिफोन नंबर ७६३

अध्यक्षः—श्री रा न अभ्यंकर, बी ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ विमा कंपनी

**विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. ५,००,००० पांच लाख**

प्रत्येक शेअर रु १०० याप्रमाणें ५००० शेअर्समध्यें विभागलेलें. अर्जासोबत रु १५ व अर्जमंजुरी रु १०

**ठेवी :** चालू ठेव : : : १॥ टक्का
सेव्हिंग्ज : : : २॥ टक्के

मुदतीच्या ठेवी सहा महिन्यांपासून १० वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल चौकशी करावी

**कर्ज :** थोड्या व लांब मुदतीचीं कर्जें दिलीं जातात. कारखानदारांच्या मशिनरीवर, इमारतीवर, जागेवर कर्ज देण्याची व्यवस्था केली आहे बँकेनें पसंत केलेल्या इसमांची बिलें डिस्काउंट केलीं जातात


चेक्स, बिल्स, ड्राफ्टस्, हुंड्या, पेन्शन बिल्स, सिक्युरिटीवरील व्याजें वसूल करून दिलीं जातात.

ठेवीदारांतील एक डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर घेण्याची व्यवस्था केली आहे.

मॅनेजिंग डायरेक्टर्स:—नि ना क्षीरसागर, चिं. त्रिं चितळे



## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक अंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यंत्रसामुग्रीचें व पाच वर्षें गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें.

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)



## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री. न चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस्.



### " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. (ट ख निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४



आपल्या अन्नांत माती कां कालवितां ?

स्वयपाकांत वापरण्याचे सर्व जिन्नस निवडून साफ करून घेतां मग मीठच तेवढें घाणेरडें कां वापरतां ? आजच

## 'सोलर मिठा'ची

आपल्या वाण्याकडे मागणी करा

आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हाला लिहा

Uran Salt Works, 583 Chira Bazar, Bombay 2



**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.

भावाचें माहितीपत्रक मागवा

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.



उन्हाळ्याकरितां **ब्राह्मी तेल** हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें

स्टॉकिस्ट : म गो कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें

मॅन्युफॅक्चरर : दि बॉम्बे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई न ४


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ न १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चोकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ७ एप्रिल, १९३७ अंक १४

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यास कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

मुलांचा खाऊ म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे

भावाचें माहितीपत्रक मागवा

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २

उन्हाळ्याकरितां ब्राह्मी तेल हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें

स्टॉकिस्ट म गो कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें

मॅन्युफॅक्चरर : दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई नं ४

घरपोंच जोडी रु. ८ची

कां, विचार कसला करिता !




तुमच्यासमोर हा सुप्रसिद्ध टिकेकरी पातळांची जाहिरात असता उगीच दुसरी कडील पातळें मागविण्याचे मोहांत पडू नका टिकेकरी पातळें सर्वांगसुंदर अर्थात आपल्यास पाहिजेत तशींच आहेत.

नमुने मोफत- पोस्टेजकरितां दीड आण्याचीं तिकिटें पाठवा

दि टिकेकर टेक्सटाईल मिल, लि.

पो टिकेकरवाडी, सोलापूर

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लॅकटूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

भिडे यांचे लोखंडी नांगर

कॅटलॉग मागवा



भिडे आणि सन्स सांगली

# विविध माहिती

### म्युनिसिपालिट्यांचें उत्पन्न व त्यांचा खर्च

मुंबई इलाख्यांत ( सिंध धरून ) १९३५–३६ अखेर १५४ म्युनिसिपालिट्या होत्या, व त्यामधील लोकसंख्या ३० लक्ष ४० हजार इतकी होती त्यांचें निव्वळ उत्पन्न २ कोटि २२¾ लक्ष रुपये होते. त्यापैकीं १ लक्ष ६५ हजार रुपये म्युनिसिपल करापासून व भाड्यापासून वसूल झाले सर्व म्युनिसिपालिट्यांची मिळून २६¾ लक्ष रुपये बाकी वसूल व्हावयाची राहिली आहे. १९३५–३६ मध्यें त्यांचा एकूण खर्च २ कोटि १५ लक्ष रुपये झाला, त्यापैकीं १९¾ लक्ष रुपये रस्त्यांवर खर्चण्यात आले शिक्षणाप्रीत्यर्थ ४५¾ लक्ष रुपये खर्ची पडले व वर्षअखेर ६३ लक्ष ३९ हजार रुपये शिलक राहिली.

### मलेरियास १३ लक्ष लोक बळी पडले

हिंदुस्थान सरकारच्या पब्लिक हेल्थ कमिशनरचा ताजा ( १९३४ चा ) अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. अहवालाचे वर्षी १३ लक्ष १९ हजार लोक मलेरियामुळें मृत्युमुखीं पडले. ह्या रोगामुळें मनुष्याची शक्ति नाहींशी होऊन त्यामुळें आर्थिक नुकसानहि मोठें होतें. सबद हिंदुस्थानकरितां एक मध्यवर्ती मलेरिया ब्यूरो स्थापन करण्यांत यावा, अशी कमिशनरची सूचना आहे

### हिंदुस्थानांतील विमा कंपन्या

३१ डिसेंबर, १९३६ रोजीं हिंदुस्थानात काम मिळविणाऱ्या ३७५ विमा कंपन्या होत्या, त्यापैकी २२६ देशी व १४९ विदेशी होत्या सरकारकडे २ लक्ष रुपयापेक्षा जास्त रकम अनामत ठेवणारी एकच हिंदी विमा कंपनी होती.

### ग्रेट ब्रिटनमध्यें विदेशी छत्र्या

गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमध्यें २० लक्ष छत्र्यांची आयात झाली. हा आकडा त्यापूर्वीच्या सालाच्या मानानें ५ लाखानीं मोठा आहे जपान व जर्मनी ह्या देशातून मुख्यतः स्वस्त माल आला ऑस्ट्रियांतून व अमेरिकेंतूनहि छत्र्या येऊ लागल्या आहेत. परदेशी मुठींवरील भारी जकातहि त्याची आयात थांबविण्यास असमर्थ ठरली आहे

### राज्यारोहणानिमित्त प्रवाशांची गर्दी

ग्रेट ब्रिटनमध्यें परदेशांतून ज्यास्त ज्यास्त प्रवासी राज्यारोहणाचे निमित्तानें येऊं लागले आहेत, त्यांत जर्मन लोकांचा भरणा मोठा आहे

### हिंदुस्थानांतील रेडिओ

हिंदुस्थानात रेडिओचा प्रचार दिवसानुदिवस ज्यास्त होत आहे. १९३४–३५ सालीं १८,००० लायसेन्स देण्यांत आले. १९३५–३६ सालीं ही संख्या २८,१०० इतकी झाली व १९३६–३७ च्या फेब्रुवारी अखेरच्या ११ महिन्यांत ३८,००० लायसेन्स दिले गेले. जानेवारी, १९३६–३७ अखेरच्या १० महिन्यात १९,७०२ रेडिओ परदेशातून हिंदुस्थानांत आले.

### म्हैसूरी कॉफीचा जर्मनीमध्यें प्रसार

म्हैसूर सरकारनें जर्मनीस कॉफी पाठवावी आणि त्याचे बदली जर्मनीनें यंत्रसामुग्री पुरवावी, अशा स्वरूपाच्या ऐनजिनसी देवघेवीसंबधीं म्हैसूर संस्थान व जर्मनी ह्यामध्यें वाटाघाटी चालू आहेत.

### संरक्षण युद्धाची पूर्व तयारी : १० हजार विमानें

संरक्षण-युद्धाच्या तयारीकरितां ग्रेट ब्रिटननें १० हजार विमानें तयार करण्याची ऑर्डर दिली आहे.

### कावेरी नदीच्या पाण्यासंबंधीं तडजोड

मद्रास इलाखा व म्हैसूर संस्थान ह्याचे हद्दींतून कावेरी नदी वहाते. नदीच्या पाण्याचे वापरासंबंधीं ह्या दोन सरकारात मतभेद होता वीज उत्पन्न करण्याकरिता म्हैसूर सरकार नदीचें पाणी वापरीत असून त्याबद्दल मद्रास सरकारास ह्यापुढें दरसाल २० हजार मिळावयाचे आहेत.

### जर्मनीमधील नव्या रस्त्यांचें बांधकाम

१९४० अखेर जर्मनीमधील ४,३०० मैल लांबीच्या नव्या रस्त्याचें बांधकाम पुरें होऊन मोठमोठ्या शहरास जोडणाऱ्या प्रशस्त रस्त्याचे बाबतींत जर्मनीचा पहिला नंबर लागेल.

### बुक पोस्टाचे व पार्सलचे नवे दर

ता. १ एप्रिल पासून खालील दर अंमलांत आले आहेतः—

बुकपोस्टः { पहिल्या २½ तोळ्यापर्यंतः ६ पै
पुढें प्रत्येक २½ तोळ्यांस. ३ पै

पार्सलः { पहिल्या ४० तोळ्यापर्यंतः ४ आ
पुढें प्रत्येक ४० तोळ्यांसः ४ आ.

### फोर्ड मोटारींचें उत्पादन

१८९३ सालीं पहिली फोर्ड मोटार तयार झाली, तेव्हापासून आतापर्यंत २½ कोटि फोर्ड गाड्यांचें उत्पादन झालें आहे.

### खेडेगांवाकरिता रेडिओची योजना

खेडेगावातील लोकांकरिता रेडिओचे कार्यक्रम आखण्याची मुंबई सरकारची योजना ता. १ एप्रिल रोजीं अंमलांत आली. ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील १८ खेडेगावात रेडिओ बसविण्यात आले असून, त्यांचेकरितां दररोज एक तास योग्य अशा विषयासंबंधीं माहिती मुंबईच्या स्टूडिओमधून आठवड्यातून पांच वेळां ब्रॉडकास्ट केली जाईल

### बॉबे टेलिफोन कं लि

मुंबई टेलिफोन कंपनीस ३१ डिसेंबर, १९३६ अखेर संपलेल्या वर्षी २३ लक्ष ६७ हजार रुपये निवळ नफा झाला, त्यातून भागीदारांस ८ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यात आलें

### बँक ऑफ इंडिया लि. च्या सेवानिवृत्त मॅनेजरचा मृत्यु

दि बँक ऑफ इंडिया लि ची १९०७ सालीं स्थापन झाली, तेव्हापासून १५ वर्षे तिचे मॅनेजर असलेले मि. स्ट्रिंगफेलो, हे गेल्या आठवड्यात मरण पावले १९२२ सालापर्यंत त्यांनीं बँकेची उत्कृष्ट सेवा करून तिची भरभराट केली.

### साखरेचें जागतिक उत्पादन

महायुद्धापूर्वी साखरेचें वार्षिक जागतिक उत्पादन २ कोटि टन इतकें होतें, तें आता ३ कोटि टनावर गेलें आहे. म्हणजे, गेल्या २० वर्षांत तें दीडपट झालें आहे साखरेचा बाजारभाव ३५ टक्क्यांनीं उतरला आहे.

### राज्यारोहणामुळें व्यापाऱ्यांचा लाभ !

राज्यारोहणाचे निमित्तानें ग्रेट ब्रिटनमध्यें येणाऱ्या परदेशीय पाहुण्यांचा बराच पैसा त्या देशात खर्च होईल. इंग्रज लोकहि नेहमींपेक्षां ज्यास्त खर्च करतील एकूण सुमारें २०० कोटि रुपयांची उलढाल होईल, असा अजमास आहे. व्यापारी लोकांची साहजिकच चगळ उडेल

### सिलोन—ब्रह्मदेश टेलिफोन

ता. २ एप्रिल रोजीं सीलोन व ब्रह्मदेश हीं टेलिफोननें जोडलीं गेलीं

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| २१–३–३७ ते २७–३–३७ | १६,७३,०८५ |
| २८–३–३७ ते ३–४–३७ | १९,४८९२१ |
| २१–९–३१ ते ३–४–३७ | २,९४,८४,१३,४१० |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १६८ | ६ चित्रपट दाखवणाराचा जमाखर्च .. .. | १७१ |
| २ चांदी-सोन्याचा व्यापार | १६९ | ७ हिंदुस्थानांत घोड्यांची पैदास . | १७३ |
| ३ भांडवलाची आंतरराष्ट्रीय आयात-निर्गत . . | १७० | ८ परदेशी तज्ज्ञाची आयात | १७३ |
| ४ स्फुट विचार .. | १७० | ९ म्हैसुरांत कागदाचा नवा कारखाना .. | १७३ |
| नवीन कर कायम झाले—सोन्याच्या निर्गतीवर जकात कां नाहीं—कारखान्याचें भांडवल आणि ठेवींचा उपयोग—कामगारांच्या पगारावरील जप्तीस मनाई—स्थानिक स्वराज्याची पुच्छप्रगति | | १० स्पर्धेस आळा घालण्याची दुकानदारांची योजना | १७४ |
| | | ११ पेशाला वा[illegible]री | १७४ |
| | | १२ चिंच्या व [illegible]डे ह्याच [illegible] .. | १७४ |
| | | १३ उत्कृ[illegible]ठाची पैदास . . | १७५ |
| | | १४ खरा "सुवर्ण" महोत्सव | १७५ |
| ५ ब्रिटिश चित्रपटांचा आर्थिक चित्रपट .- | १७२ | १५ सहकारी चळवळ . | १७६ |
| | | १६ निवडक बाजारभाव | १७७ |



# अर्थ

बुधवार, ता ७, एप्रिल १९३७


## चांदी–सोन्याचा व्यापार

### सोन्याची निर्गत

### ( १ )

चांदी-सोन्याच्या व्यापाराच्या दृष्टीनें हिंदुस्थान देशास जगामध्यें विशेष महत्त्व आहे ह्या धातूंच्या पुरवठ्यावर राष्ट्राच्या चलनाची व्यवस्था, बाजारभाव व जागतिक व्यापारी देवघेव पुष्कळ अंशानीं अवलंबून रहात असल्यानें आणि हिंदुस्थानातील कोट्यवधि लोकामध्यें सोन्या–चांदीस कायमची मागणी अस ल्यामुळें बाहेरील सराफ, फडनवीस व मुत्सद्दी ह्यास आमच्या अंतर्गत बाजारावर आणि आयात-निर्गतीवर सारखें लक्ष ठेवावें लागतें. "हिंदुस्थान देश ही एक जगातलें सोनें व चांदी गडप करणारी खाच" आहे असें अर्धवट निंदाप्रचुर, अर्धवट विनोदात्मक वर्णन करण्याचा पाश्चात्य लेखकाचा व वक्त्याचा अनेक वर्षांचा परिपाठ आहे ह्या देशांत वर्षानुवर्ष कोट्यवधि रुपयाचें सोनें व चांदी येऊन पडल्यामुळें दुसऱ्या देशास ह्या धातूचा पाहिजे तसा पुरवठा होत नाहीं व त्याची गैरसोय होते अशी तक्रार हिंदुस्थानाविरुद्ध होत आली आहे गेल्या पांच वर्षांमध्यें, ह्या देशात सोन्याची आयात होण्याऐवजी येथूनच त्या धातूची निर्गत मोठ्या प्रमाणात चालली आहे आणि नेहमींचा सोन्याच्या व्यापाराचा ओघ उलटला आहे. त्यामुळें दुसऱ्या देशाची सोय होऊन ते आता हिंदुस्थानास दुवा देत आहेत. सोन्याचा मोठा संचय अमेरिका व फ्रान्स ह्या देशांमध्यें झाला असून त्या धातूची किंमत चढली आहे. अशा स्थितींत लंडनच्या बाजारांत दर आठवड्यास सरासरीनें अर्धा कोट किंमतीचें सोनें हिंदुस्थानामधून जातें, त्याच्या योगानें जागतिक चणचण मर्यादित होण्यास सहाय मिळत आहे.

ह्या चांदी–सोन्याच्या व्यापाराचें हिंदुस्थानच्या बाबतींत सिंहावलोकन केल्यास खाली दिलेली परिस्थिति आढळते. १९३४–३५ सालीं ६८ लक्ष औंस वजनाचें सोनें हिंदुस्थानातून बाहेर गेलें आणि त्याची किंमत ५८ कोटि रुपये भरली. १९३५ सालातले हे आकडे अनुक्रमें करून ५७ लक्ष औंस व ५३ कोटि रुपये असे होते. चालू सालीं गेल्या जानेवारी अखेरच्या दहा महिन्यातले तत्सम आकडे २९ लक्ष औंस व २७ कोटि रुपये असे आहेत म्हणजे, हिंदी सोन्याची निर्गत हळू हळू घटत चालली आहे. सोन्याची चढलेली किंमत आतां स्थिरावली असून हिंदी जनतेजवळ विकण्यासारखें सोनें उरलेलें नाहीं आणि बाजारभाव थोडेसे वर जात चालल्यानें सोनें विकण्याची आवश्यकता कमी तीव्रतेनें भासत आहे हीं कारणें निर्गत घटण्यास जबाबदार आहेत असें सागण्यात येत आहे गेल्या सहा वर्षांत जवळ जवळ ३०० कोटि रुपये किंमतीचें सोनें ह्या देशाबाहेर गेलें तरी येथील सचय एवढा मोठा आहे कीं, आणखी अनेक वर्षे निर्गतीस तो पुरून उरेल असा विश्वास पाश्चात्य सराफास व व्यापाऱ्यास वाटत आहे सन १८७३ ते १९३१ ह्या मुद्तींत निर्गत वजा जाता सुमारें ५५ कोटि रुपये किमतीचें सोनें हिंदुस्थानात आलें, त्याची आजच्या भावानें अजमासें १,२०० कोटि रुपये किंमत होईल १८७३ साळाच्या पूर्वी देशात अगोदरच असलेलें सोनें ह्यात मिळवलें तर अलीकडची निर्गत सुरू होण्यापूर्वींचा हिंदुस्थानचा एकूण सुवर्णसंग्रह सुमारें १,४०० कोटि रुपयाचा होता. त्यातून गेल्या सहा वर्षांत ३०० कोटि रुपयाचें सोनें बाहेर गेलें आहे ही निर्गत क्षुल्लक आहे आणि उतरत्या प्रमाणात का होईना ती चालू रहाणार ह्या प्रकारचें समाधान ब्रिटिश सराफ मानीत आहेत सोन्याचा व्यापार करावयाचा कीं चांदीचा करावयाचा हें वेळोवेळ ह्या धातूंचे बाजारभाव जास्त–कमी होतील त्याप्रमाणें हिंदी सराफ व व्यापारी ठरवतील असा त्या लोकाचा कयास आहे. चांदीच्या व्यापाराविषयीं विवेचन करण्यापूर्वी सोन्याच्या निर्गतीचे गेल्या तीन वर्षांचे तपशीलवार आकडे येथें देतों:—

### हिंदुस्थानांतून सोन्याची निर्गत

| महिना | १९३६–३७ | | १९३५–३६ | | १९३४–३५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वजन, लक्ष औंस | किंमत, लक्ष रु | वजन, लक्ष औंस | किंमत, लक्ष रु | वजन, लक्ष औंस | किंमत, लक्ष रु |
| एप्रिल | ३ | २८० | १ | १०४ | ६ | ५३५ |
| मे | ३ १/२ | ३२८ | २ | ९५ | ५ ३/४ | ५३० |
| जून | ३ | २८० | १ | १११ | ५ १/२ | ५०६ |
| जुलै | ४ १/२ | ४०५ | ६ १/२ | ६०४ | ६ १/४ | ५८३ |
| ऑगस्ट | २ १/२ | २२६ | ७ १/२ | ६७७ | १ | १०० |
| सप्टेंबर | २ १/२ | २२१ | ३ १/४ | ३१८ | ३/४ | ७२ |
| ऑक्टोबर | ३ १/२ | ३२९ | ३ १/४ | ३४५ | ४ | ३८९ |
| नोव्हेंबर | २ ३/४ | २५८ | ४ १/४ | ३९६ | ६ | ५५१ |
| डिसेंबर | १ १/२ | १५६ | ३ | २७८ | ६ ३/४ | ६२५ |
| जानेवारी | २ १/२ | २३९ | ४ | ३७१ | ४ ३/४ | ४४२ |
| फेब्रुवारी | ... | .. | २ ३/४ | २६४ | ५ | ४७८ |
| मार्च | ... | ... | २ १/४ | २०८ | ५ १/४ | ५१५ |

## भांडवलाची आंतरराष्ट्रीय आयात-निर्गत

### अमेरिकेंतली परिस्थिति

व्याजाच्या व नफ्याच्या अपेक्षेनें एका देशातील लोक दुसऱ्या देशात, तेथील कर्जरोखे व कपन्याचे भाग खरेदी करून, आपलें भांडवल गुतवीत असतात हिंदुस्थानातलें भांडवल ह्या तऱ्हेनें लंडनमध्यें घातलें जातें, आणि कोट्यवधि रुपयाचें ब्रिटिश भांडवल ह्या देशांत गुतलेलें आहे, हें प्रसिद्धच आहे अमेरिकन राष्ट्रात भांडवल गुतवण्याचें हें देवाण-घेवाण प्रचंड रकमांमध्यें होत जाणें साहजिक आहे एखाद्या देशात बाहेरून भांडवल येणें हें त्याच्या आर्थिक सुस्थितीचें व स्थैर्याचें अभिनंदनीय लक्षण असलें तरी हा व्यवहार पुष्कळ वेळा त्या देशास धोक्याचा किंवा गैरसोयीचा असतो असा अनुभव अलीकडे आला आहे बाहेरून भांडवल येतें, तसें तें परतहि जातें. ह्या कारणानें अडचणी उपस्थित होतात. रोख्याचे बाजारभाव भरमसाट चढतात किंवा उतरतात आणि हुडणावळीच्या दरावर म्हणजे सबंध चलनव्यवस्थेवर ह्या येजाचा विलक्षण ताण पडतो. अमेरिकन सरकारला असल्या भानगडीची भीति अलीकडे वाटूं लागून त्याबधात कांहीं उपाययोजना अमलात आणण्याचाहि विचार करावा लागला आहे. महायुद्धापूर्वी ४५० कोटि डॉलर इतका बाहेरचा पैसा अमेरिकेंत गुतला होता आणि त्यात कॅनडा व युरोपिअन राष्ट्रें ह्याचा फार मोठा हिस्सा होता. मध्यंतरीं बदललेल्या परिस्थितींत ही रकम वेळोवेळ कमी-अधिक झाली असली तरी १९३५ सालीं तिचा आकडा ५०३ कोटि डॉलरवर गेला. ह्यात इग्लंडचे १३७ कोटि, कॅनडाचे १०० कोटि आणि हॉलंडचे ७८ कोटि डॉलर होते. ह्यापैकी ४० टक्के इतका पैसा बाजारभावाच्या चढउताराच्या फायदा घेण्याच्या हेतूनें अमेरिकन रोख्यात व कपन्यांच्या भागांत गुतवलेला होता १९३६ सालचा अमेरिकेंतील परकीय भांडवलाचा आकडा ७०० कोटि डॉलर इतका झाला प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यास ह्या प्रचंड रकमेची धास्ती वाटत असल्यास त्यात नवल नाहीं अमेरिकेचें स्वतःचें भांडवल परदेशात गुतलें आहे त्याचाहि उल्लेख येथें करणें आवश्यक आहे परदेशीय भांडवलवाल्याचे ७०० कोटि डॉलर अमेरिकेंत आहेत तर अमेरिकेच्या मालकीचे १,३५० कोटि डॉलराचें भांडवल इतर देशात गुंतलेलें आहे ! आपलें भांडवल बाहेर पाठवावयाचें आणि बाहेरचें भांडवल आत घ्यावयाचें हा द्राविडी प्राणायाम कशाला ? असा प्रश्न सहज सुचण्यासारखा आहे परंतु आधुनिक आतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडी असल्या गुतागुतीच्या स्वरूपाच्या आहेत कीं प्रत्येक देशानें स्वतःचेंच भांडवल वापरावें, बाहेरून पैसा येऊ देऊ नये किंवा तो बाहेर पाठवूं नये, अशी व्यवस्था अव्यावहारिक आहे

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा.—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**दी रेडिओ इलेक्ट्रिक स्टोअर्स**
रिप्रेझेंटेड बाय—एम. जी. साठे
रे-मार्केटनजीक, ८० शुक्रवार, पुणें.

## स्फुट विचार

### नवीन कर कायम झाले

हिंदुस्थान सरकारच्या फिनॅन्स बिलात असेंब्लीनें दुरुस्त्या केल्या आणि साखरेवरची जादा पट्टी दूर करून पोस्ट कार्डाची किंमत कमी करावी असें ठरविलें ह्या योगानें बजेटात दीड कोटि रुपयाची तूट आली असती ती दुसऱ्या मार्गानें भरून काढणें शक्य नव्हतें ह्या मुद्यावर अखेर मूळचें फिनॅन्स बिल सरकारनें कौन्सिल ऑफ स्टेटकडे पाठविलें अपेक्षेप्रमाणें तेथें तें बहुमतानें मंजूर झाल्यानें बजेटात दाखल असलेल्या कराच्या योजनेस कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे. कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें आपल्या बजेटाची तरफदारी करताना साखरेवरील पट्टीविरुद्ध घेण्यात येणाऱ्या आक्षेपाचा सर जेम्स ग्रिग ह्यांनीं समाचार घेतला. ते म्हणाले:—" हिंदुस्थानात खुल्या व्यापाराचें तत्त्व अमलात यावें असा माझा उद्देश नाहीं. माझें म्हणणें असें आहे कीं, धंद्यास दिलें जाणारें सरक्षण वाजवी असावें, तें जरूरीपेक्षां अधिक असूं नये व त्याचे योगानें सरकारी उत्पन्न निष्कारण बुडूं नये " फडनवीसाचा हा कोटिक्रम सरळ व योग्य आहे. पण स्वदेशी धंद्यास मिळत असलेलें संरक्षण फाजील आहे, हें ठरवावयाचें कोणीं? हा प्रश्न आहे ह्या विषयांची चौकशी करण्यासाठी एकीकडे टारिफ बोर्ड नेमलें जात असतां दुसरीकडे, ती चौकशी होण्यापूर्वीच, साखरेवरील पट्टी वाढवणें म्हणजे त्या बोर्डाचे अधिकार सरकारनें स्वतःचे हातीं घेणें होय. टारिफ बोर्डाची चौकशी व त्याच्या शिफारसी होण्यापूर्वींच त्याचेबद्दलचा आपला अभिप्राय व निर्णय सरकारनें जाहीर केल्यासारखेंच होत आहे ही गोष्ट सर जेम्स ग्रिग ह्याचे ध्यानात यावयास पाहिजे होती. ग्रामसुधारणेच्या कार्यासाठीं हिंदुस्थान सरकारास प्रांतिक सरकाराना ग्रँट्स देतां आल्या नाहींत ह्यासंबधानें त्यांनीं दिलगिरी प्रदर्शित केली आणि पुढें केव्हातरी त्या चालू करतां येतील अशी आशा प्रकट केली प्रांतिक सरकाराची सांपत्तिक स्थिति व ग्रामसुधारणेचें महत्त्व लक्षात घेता हिंदुस्थान सरकारास ह्या कार्यासाठी पैसा खर्च करतां येत नाहीं हें शोचनीय आहे यांत कांहीं सशय नाहीं.

### सोन्याच्या निर्गतीवर जकात का बसवीत नाहीं ?

साखरेवरील पट्टीच्या ऐवजीं सोन्याच्या निर्गतीवर जकात बसवून तूट कां भरून काढीत नाहीं ? ह्या आशयाच्या टीकेस उत्तर देताना सर जेम्स ग्रिग म्हणाले कीं, आक्षेपकांनीं ही सूचना करणें म्हणजे आपल्या स्वतःच्या मुद्याविरुद्ध बोलण्यासारखें आहे. अडचणींत सापडलेल्या शेतकऱ्याचें सोनें विकलें जाऊन तें देशाबाहेर चाललें आहे, ह्या युक्तिवादांत कांहीं अर्थ असेल तर सोन्याच्या निर्गतीवर जकात बसली असता त्याची किंमत कमी होऊन तें विकणाऱ्या शेतकऱ्याचें नुकसान होईल आणि हा कर शेतकरीवर्गावर बसेल हें ओघानेंच प्राप्त होतें, असें हिंदी फडनवीसानीं प्रतिपादिलें आणि प्रतिपक्षाची टीका त्याचेच गळ्यांत घालण्याचा यत्न केला. परंतु ही विचारसरणी प्रतिपक्षीयांस निरुत्तर करण्याऐवजीं स्वतःवरच उलटेल हें त्यांच्या ध्यानात आलें नाहीं लोकांच्या प्रतिनिधींचें म्हणणें चुकलें आणि सोन्याच्या निर्गतीबाबतचा सरकारी युक्तिवाद समर्थनीय आहे असें मानलें तर काय निष्कर्ष निघतो तें पहा. निर्गत होणारें पुष्कळसें सोनें मध्यम स्थितींतल्या व श्रीमान लोकांचें असून त्यास

चढीची किंमत येत आहे हा फायदा आहे, हें जर खरें असेल तर जकातीमुळें सोन्याची किंमत कमी होऊन त्या कराचा बोजा वरील वर्गावर पडला तर काय हरकत आहे? सोनेंविक्रीच्या फायद्यावर कर बसला तर सरकारला जादा उत्पन्न होऊन त्यात वरील जनतेचें काहींच नुकसान नाहीं प्रतिपक्षीयानीं ह्याप्रमाणें युक्तिवाद केल्यास सरकारास निरुत्तर होणेंच प्राप्त आहे

## कारखान्याचें भांडवल आणि ठेवींचा उपयोग

अहमदाबादच्या गिरणीवाल्याच्या सभेचे अध्यक्ष, सेठ कस्तुरभाई लालभाई, यानीं त्या संस्थेच्या वार्षिक सभेचे प्रसगीं केलेल्या भाषणात एक दोन महत्त्वाचे मुद्दे पुढें /ढले, त्याचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे अहमद/दच्या गिरण्या बहुतांशीं लोकाकडून घेण्यात येणाऱ्या / व्या भाडवलावर चालतात, हें प्रसिद्ध आहे कोणत्याहि धद्या लागणारें खेळतें भाडवल तात्पुरतें बाहेरून आणावें लागतें आणि तें बँका किंवा श्रीमान व्यापारी व सराफ पुरवितात त्याप्रमाणें खेळतें भाडवल मालाच्या उत्पादनबलापुरतें हंगामी उसनें घेण्याचा प्रघात सार्वत्रिक असून त्यात वावगें असें काहीं नाहीं परंतु कारखान्यातली यंत्रसामुग्री वगैरेस लागणारें भाडवल दीर्घकालिक स्वरूपाचें असावें लागतें आणि तें भागाच्या मार्गानेंच उभारणें जरूर असतें तात्पुरत्या ठेवी स्वीकारून त्याचा पैसा स्थावर जिंदगींत घालणें आणि यत्रसामुग्रीमध्यें अडकावून टाकणें धोक्याचें असतें हा पैसा जरूर तेव्हा उपलब्ध होण्याची खात्री नसते आणि ठेवीदाराची निकड लागल्यास गिरणीवाल्यावर सकट आल्यावाचून रहात नाहीं अहमदाबादेंतील कारखानदारानीं ठेवींवरचें आपलें अवलबन कमी करण्याची सूचना सेठ कस्तुरभाई ह्यांनीं केली ती सर्वस्वी ग्राह्य अशीच आहे गिरणीचें स्वत.चे भागाचें भाडवल थोडें आणि ठेवींच्या स्वरूपातलें भांडवल अधिक, असा प्रकार झाल्यानें त्यास होणारा धंद्यातला नफा अल्प भाडवलावर झाला असा भ्रम उत्पन्न होतो आणि डिव्हिडंडचें प्रमाण फुगलेलें दिसतें ही त्यानीं दर्शवलेली वस्तुस्थिति लक्षात ठेवण्यासारखी आहे डिव्हिडडच्या स्वरूपात वाटता येण्याजोगा नफा म्हणजे काय ह्याविषयींची वास्तविक कल्पना येणेंहि आवश्यक आहे एकूण नफ्यामधून घसाऱ्यासाठीं पुरेशी रकम बाजूला काढून ठेवून बाकीचा फायदा डिव्हिडड वाटण्यासाठी उपयोगात आणण्याचें महत्त्व भागीदारांस व इतरास पुष्कळ वेळां कळत नाहीं कारखाने कार्यक्षम स्थितींत रहाण्यास व त्याचें नफा देण्याचें सामर्थ्य टिकण्यास असे रिझर्व्ह नफ्यांतून काढणें इष्ट असतें, ह्या गोष्टीवरहि शेठ कस्तुरभाई ह्यानीं जोर दिला

## कामगाराच्या पगारावरील जप्तीस मनाई

हिंदुस्थानातील मजुराच्या परिस्थितीसंबंधानें चौकशी करून ती सुधारण्याविषयीं सूचना करण्याकरिता ब्रिटिश कॉमन्स सभेचे माजी अध्यक्ष, मि. व्हिटले, ह्याच्या अध्यक्षतेखाली १९२९ सालीं एक रॉयल कमिशन नेमण्यात आलें होतें नोकरांच्या व मजुरांच्या पगारावर जप्ती आणणें सोपें असल्यानें सावकार कर्जें देण्यास मागेंपुढें पहात नाहींत व त्यामुळें कामगारहि आपल्या ऐपतीबाहेर कर्जें काढतात, असें कमिशनला आढळून आलें. सावकारास भरपूर तारण मिळून सरकारी खातीं, रेलवेज व कारखान्याचे मालक ह्याचे मार्फत त्यास कर्जाची वसुली करतां येई ३०० रुपयापेक्षा कमी मासिक प्राप्ती असणाराच्या पगारावर जप्ती आणतां येऊं नये, अशा अर्थाची कमिशननें शिफारस केली हिंदुस्थान सरकारनें ह्या संबधातील तत्त्व मान्य केलें, परतु जप्तीची माफी १०० रुपये पगार मिळणारापुरतीच मर्यादित करून त्याप्रमाणें मध्यवर्ती कायदेमडळात त्यानीं बिल आणलें तें मजूर झालें आहे. सरकारी, रेल्वेच्या व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या नोकराचे पगारापैकीं पहिल्या १०० रुपयावर आता जप्ती आणता येणार नाहीं. त्यापेक्षा मोठा पगार असेल, तर ह्या जास्त रकमेपैकी ...च रकम जप्त करता येईल अशा रीतीनें ...या पगाराचें तारण सावकारास ह्यापुढें मिळणें ...ार असल्यानें, त्यास कर्ज मिळणें कठीण होईल कामगाराच्या कर्जबाजारीपणास त्यामुळें आळा बसेल, परतु त्याबरोबरच त्याची बाजारातील पत कमी झाल्यामुळें त्यास अडचण सोसावी लागेल, हें उघड आहे

## स्थानिक स्वराज्याची पुच्छप्रगति

मुंबई इलाख्यांतील (सिंध धरून) म्युनिसिपालिट्यांच्या कारभारासबधीचा १९३५–३६ सालविषयक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यात दर्शित केलेल्या निराशामय परिस्थितीचा परिचय करून देणें आवश्यक आहे म्युनिसिपल कारभाराचे बाबतींत, इलाख्याचे विशेषत. मध्यभागात, गेल्या दहा वर्षांत काहींच प्रगति झालेली नाहीं, असें सदरहु अहवालात नमूद करण्यात आलेलें आहे. कामाचा निकाल लावण्यात दिरगाई, अधिकाऱ्याच्या कारभारात ढवळाढवळ करण्याची सभासदाची प्रवृत्ति, इत्यादि कारणांमुळें म्युनिसिपल सस्थांचे कार्यांत अडथळा उत्पन्न होतो लोकानीं निवडलेल्या प्रतिनिधींनीं धोरण आखून देणें केव्हाहि रास्तच आहे, परतु संस्थाचे अधिकारी त्याचा बजावणी करीत असता, बहुमतवाल्या पक्षाच्या सभासदानीं त्यात व्यत्यय आणणें इष्ट नाहीं. म्युनिसिपल अधिकाऱ्यास, कोणाचीहि भीडभाड न बाळगता कायद्याप्रमाणें व नियमाप्रमाणें व्यवस्थित काम करण्यास मोकळीक मिळणें आवश्यक आहे, ती तशी स्थानिक स्वराज्य सस्थातून मिळत नाहीं आणि त्यामुळें त्याचा कारभार शिस्तीनें चालू शकत नाहीं. सर्वसाधारणपणें, मुंबई इलाख्यातील सर्वच म्युनिसिपालिट्यातून अशी परिस्थिति आहे, तथापि त्यातल्या त्यांत मध्यभागातील म्युनिसिपालिट्यात जास्तच सावळागोंधळ आढळतो, ही गोष्ट अभिनदनीय खास नाहीं. म्युनिसिपल कारभाराचे बाबतींत सुधारणा होणें असल्यास, नागरिकानीं व त्याच्या प्रतिनिधींनीं आपल्यावरील जबाबदारी ओळखण्यास शिकलें पाहिजे. वैयक्तिक हित साधण्याकरितां निवडून येण्याची खटपट करण्याची लोकामधील प्रवृत्ति नाहींशी होऊन, व्यापक ध्येयाकरितां झटण्याची त्यांस सवय लागली पाहिजे.

नोकरी पाहिजे ना? अत्यंत माफक फींत मोटार ड्रायव्हिंग व संपूर्ण दुरुस्ती शिका लायसेन्सची हमी दिली जाते ०२ आण्याचीं पो तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवा.
लक्ष्मी मोटार स्कूल.—७७४ रविवार, पुणें २

## ब्रिटिश चित्रपटांचा आर्थिक चित्रपट

( ग्रेट ब्रिटनमधील चित्रपटाच्या धंद्याची आर्थिक पहाणी लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या प्रसिद्ध 'एकॉनॉमिस्ट' नामक साप्ताहिकात केलेली आहे. ह्या पत्रानें आपल्या लेखात ब्रिटिश चित्रपटाच्या धंद्याविषयीं आर्थिक महत्त्वाची माहिती दिली आहे, ती महाराष्ट्रांतील चित्रपट मंडळ्या आणि सिनेमागृहाचे चालक ह्यांस उपयुक्त होण्यासारखी आहे तिच्यामधल्या विशेष उद्बोधक बाबी आम्हीं खाली उतरून घेतल्या आहेत, त्याकडे महाराष्ट्रातील चित्रपटाच्या धंद्याशीं संबंध असलेल्या मंडळींचें लक्ष जाईल अशी आम्हास आशा आहे )

***

### ब्रिटिश चित्रपटांचा पसारा

ग्रेट ब्रिटनमध्यें दर आठवड्यास ३०,००० करार होऊन त्या अन्वयें २०,००० मैल लांबीचे चित्रपट सिनेमागृहात दाखल होतात हे चित्रपट ४,५०० सिनेमागृहात २ कोटि लोकाची करमणूक करतात

***

### अमेरिकन चित्रपटांचा उत्पादन खर्च

प्रसिद्ध प्रमुख अमेरिकन फिल्म कंपन्यास प्रत्येक चित्रपटामागें सरासरीनें १० लक्ष रुपये खर्च येतो. दुय्यम कंपन्याचा उत्पादन खर्च सुमारें २½ लक्ष होतो

***

### चित्रपटांबद्दल इंग्लंड अमेरिकेस काय देतें ?

अमेरिकन चित्रपट दाखवण्याच्या हक्काबद्दल ब्रिटिश सिनेमागृहाच्या चालकांस दरवर्षी सुमारें ९ कोटि रुपये अमेरिकेस द्यावे लागतात

***

### चित्रपट-शालांचा अमेरिकेंत खर्च

प्रतिवर्षी अमेरिकेंत तयार होणाऱ्या चित्रपटांचा एकूण खर्च २६ कोटि रुपये होतो.

***

### इंग्लंड चित्रपटांबाबत किती खर्च करतें ?

गेल्या वर्षी ग्रेटब्रिटनमध्यें तयार झालेल्या चित्रपटांस एकूण ५½ कोटि रुपये खर्च आला.

***

### अमेरिकेंत ब्रिटिश चित्रपटांस स्थान नाहीं

ब्रिटिश चित्रपट दाखवण्याबद्दल इंग्लंडला अमेरिकेहून कांहींच प्राप्ती होत नाहीं, म्हणजे त्या चित्रपटांची अमेरिकेंत डाळ शिजत नाहीं

***

### चित्रपट मंडळ्यांचे स्वत.चे एजंट

ग्रेट ब्रिटनमध्यें दाखवले जाणारे बहुतेक अमेरिकन चित्रपट हॉलीवुडमध्यें श्रीमान व प्रबळ कंपन्यानीं बनवलेले असतात. ह्या मंडळ्यांचे स्वतःचे स्टूडिओ असतात एवढेंच नव्हे तर चित्रपट दाखवण्याचे करार त्या स्वतःच्या एजंटाचे मार्फत करतात. ह्यामुळें सदरहू व्यवहारातली दलाली ब्रिटिश लोकांस मिळत नाहीं. दुय्यम प्रतीच्या अमेरिकन मंडळ्यांचीच काय ती एजन्सी त्याच्या वाट्यास येते आणि तीपासून होणारी मिळकत अत्यंत अल्प असते.

***

### नट-नटी व कथानकें

मोठ्या मंडळ्या सुप्रसिद्ध नट व नटी अडकावून ठेवतात आणि दुसऱ्या, तिसऱ्या प्रतीच्या नट-नटींवर आणि सामान्य कथानकांवर त्यास काम भागवावें लागतात. ग्रेट ब्रिटनमध्यें चित्रपट भाड्यानें देण्याचें काम ब्रिटिश लोकास मिळतें, तें ह्याच दुय्यम दर्जाच्या मंडळ्याचें होय

***

### चित्रपट दाखवणाराचा जमा खर्च

चित्रपट दाखवणाराचा मामुली खर्च कायम असतो आणि प्रत्येक चित्रपटाचें भाडें द्यावें लागतें त्या रकमेचाच दर वेळीं फरक पडतो. चित्रपटाचें द्यावें लागणारें भाडें ही खर्चांतली महत्त्वाची बाब असते आणि तिच्याकडेच काळजीपूर्वक व काटेकोरपणानें लक्ष पुरवावें लागतें ह्यासंबंधातला जमाखर्च एक उदाहरण घेऊन दाखवतां येईल गार्बो, शर्ले टेंपल किंवा क्लार्क गेबल ह्यापैकीं कोणाचें काम असलेला चित्रपट दाखवला असता ५० टक्क्यांनीं तिकिटविक्रीचें उत्पन्न वाढेल असा अदाज असल्यास त्याप्रमाणें भाड्याची रकम निश्चित करावी लागेल समजा, एखाद्या सिनेमागृहात दर आठवड्यास तिकिटाचें निवळ उत्पन्न १,००० रुपये होतें आणि कायमचा मामुली खर्च ४०० रुपये येतो चित्रपटाचें आठवड्याचें भाडें ४०० रुपये पडतें असें मानल्यास मालकास २०० रुपये नफा रहातो. एखादा नाणावलेला चित्रपट दाखवला असता आपणास नेहमीपेक्षां दीडपट म्हणजे आठवड्याचें १,५०० रुपये उत्पन्न होईल असें वाटून दर्शकानें १,००० रुपये भाड्याकरिता द्यावयाचे ठरवल्यास त्यास निवळ नफा नेहमीच्या मानानें अधिक न होता कमी राहील असें झालें तरीहि चित्रपट दाखवणारा सदरहू प्रकारचा व्यवहार करील, ह्याला दोन कारणें आहेत. एक तर, उत्कृष्ट बोलपट दाखवण्यावर त्याच्या आश्रयदात्याची गिऱ्हाइकी अवलबून असेल, आणि दुसरें, चांगले चित्रपट भाड्यानें देणाऱ्या धंदेवाल्याशीं स्नेहाचे संबंध राखणें त्यास आवश्यक वाटत असेल

उन्हाळ्याकरितां सिल्क कोट वापरा
महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे तयार अगर करून मिळतील.
बंबाचे माडीवर ] बुधवार चौक, पुणें.

## हिंदुस्थानांत चांगल्या घोड्यांची पैदास

हिंदुस्थानात होणाऱ्या घोड्याच्या शर्यतीवर दरसाल ४२ लक्ष रुपयांचीं बक्षिसें लावण्यात येतात, त्यांपैकी फक्त २ लक्ष रुपये हिंदी निपजेच्या घोड्यांचे वांटणीस येतात. शर्यतीमध्यें पळणाऱ्या घोड्यांपैकी शेकडा ९० घोडे विदेशी असतात पन्नास वर्षांपूर्वी दक्षिण आफ्रिकेंतहि अशीच परिस्थिति होती, परतु तेथील शर्यतीच्या घोड्यांपैकी शेकडा १५ देशीच आता विदेशी नसतात स्वदेशातील घोड्यांची निपज चागली व्हावी, याकरिता निरनिराळ्या १४ राष्ट्रांत खास प्रयत्न चालू आहेत आज हिंदुस्थानात सुमारें २२½ लक्ष घोडे आहेत विलायती घोड्यावर आयात पट्टी बसवावी, अशा अर्थाचा ठराव १९३४ सालीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सर फिरोज सेटना ह्यानीं आणला होता व त्याबाबत चौकशी करून योजना करण्याचें सरकारनें आश्वासन दिलें होतें तथापि, त्या बाबतींत अद्याप कांहींच करण्यात आलेलें नाहीं हिंदुस्थानांत चागल्या जातीच्या घोड्यांची पैदास वाढविण्याचे प्रयत्न करण्याकरिता मुबई येथें नुकतीच एक संस्था स्थापन करण्यात आली आहे.

* * *

## परदेशी तज्ज्ञांची आयात

जानेवारी १९३६ ते डिसेंबर १९३६ अखेर हिंदुस्थान सरकारच्या बोलावण्यावरून हिंदुस्थानात आलेल्या विदेशी तज्ज्ञांवर खालीलप्रमाणें खर्च करण्यात आला:—

| तज्ज्ञ व त्यांचें काम | खर्च रु. |
|---|---|
| मध्यवर्ती सरकार व प्रातिक सरकार ह्यामधील उत्पन्नाच्या वाटणीसंबधीं चौकशी करून अहवाल सादर करण्याकरिता बोलावलेला एक तज्ज्ञ . | १२,००० |
| दोन शैक्षणिक तज्ज्ञ. . . . | ३९,६०० |
| रेल्वे चौकशी कमिटीचे तीन सभासद . | २,२५,००० |
| ब्रॉडकास्टिंगसबधांतील तज्ज्ञ. . | ७,००० |
| " इंपीरियल कौन्सिल व ॲग्रिकल्चरल रिसर्च " च्या शास्त्रीय सशोधनाचा आढावा घेऊन सल्ला देण्याकरिता आणलेले दोन तज्ज्ञ. . | ८०,००० |


### म्हैसूर संस्थानांत कागदाच्या कारखान्याची स्थापना

भद्रावती ( म्हैसूर ) येथें "म्हैसूर पेपर मिल्स"च्या पायाचा दगड बसविण्याचा समारभ म्हैसूरच्या महाराजाचे हस्तें ता. १ एप्रिल रोजीं पार पडला सदरहू कारखान्यात १९३८ चे सुरवातीस कागद तयार होऊं लागेल व दरसाल ४½ हजार टन कागदाचें उत्पादन होऊं शकेल म्हैसूर सरकारनें, कारखाना चालविणाऱ्या कंपनीचे ⅔ भाडवल खरेदी केलें आहे, जमीन मोफत दिली आहे, १२ रु टन ह्या भावानें कारखान्यास दरसाल १४ हजार टन बाबू पुरविण्याचें अगावर घेतलें आहे व दिवसा आणि रात्रीं अनुक्रमें ६¾ पै व ४¾ पै यूनिट ह्या अत्यंत माफक दरानें वीज पुरविण्याचें ठरविलें आहे कारखान्यात तयार झालेला कागद समाधानकारक व किंमतींत योग्य असल्यास संस्थानास लागणारा सर्व कागद " म्हैसूर पेपर मिल्स " कडूनच घेण्यात येईल

पुणे येथील सर्वात जुनी व वेळेवर कामे करणारी
टेलरिंग फर्म
D M T O A (London)
पाटसकर आणि कंपनी
४८ निहाल पेठ, पुणे शहर
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व
तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील

मुंबई सरकारनें प्रथम मान्य केलेले, कोल्हापूर
सरकारचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग
माहिती मागवा ] व [ नांवें नोंदवा
४९७ बुधवार पुणें सिटी

"व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे
ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं
पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ८ आणे नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं
कारखानदार —भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे,
७५३ सदाशिव पेठ, पुणें
मिळण्याचीं ठिकाणें
धुळें—सहस्रबुद्धे ब्रदर्स
इंदोर—हॉटेल आय व्हिजीट
अमळनेर—बऱ्हाणपूरकर ( कमिटीच्या बागेसमोर )
नागपूर—वैद्य ब्रदर्स, ओल्ड स्टेशन रोड
नाशिक—एस आर बेले

फोल्डिंग व बॉक्स कॅमेरा

सामर्थ्यवान लेन्स बसविलेला ह्या कॅमेऱ्यानें नवशिक्यास सुद्धा फिल्मवर उत्कृष्ट फोटो घेतां येतात बेकार रोज ५ रु मिळवू शकतात फिल्म कार्ड, फ्रेम, रसायनें, कॅमेरा कसा वापरावा हें सांगणारें पुस्तक मोफत
फोल्डिंग कॅमेरा, रु. ४ बॉक्स कॅमेरा न २, रु २-१२ न. १ रु ३-१२ पॅकिंग व पोस्टेज वेगळें
Dutt & Co (12)
15/,-Jay Mitra Street,
P O. HATKHOLA (Calcutta)

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## स्पर्धेस आळा घालण्याची दुकानदारांची योजना

कोणत्याहि जिनसाचीं दुकानें गिऱ्हाइकाच्या सख्येच्या मानानें ज्यास्त झालीं म्हणजे दुकानदारांमध्यें एकमेकांत स्पर्धा सुरू होऊन धद्याचा चुथडा होतो, ही गोष्ट आतां नित्य परिचयाची झाली आहे गिऱ्हाइकाचा अर्थातच त्यामुळें फायदा होतो, परतु दुकानें मात्र नुकसानींत येतात. विशिष्ट मालाची विक्री करणारांनीं सघटन करून, नवीन दुकानें उघडणारास घाउक दरानें माल मिळणें अवघड करणें हा आत्मसरक्षणाचा मार्ग अवलबिल्यास स्पर्धा नाहींशी करता येणें शक्य आहे लिव्हरपूल येथील मेवामिठाईची किरकोळीनें विक्री करणाऱ्या दुकानदाराचे ह्या बाबत प्रयत्न चालू आहेत. सुमारें १,००० दुकानदारांनीं सहकार्यानें योजना आखली आहे, ती अन्वयें शहरांतील दोन दुकानामध्यें निदान ४५० फूट अतर असलें पाहिजें आणि शहराच्या मध्यबिंदूपासून चार मैलाबाहेरील क्षेत्रात ६१० फुटामध्यें दोन दुकानें येता कामा नयेत. मेवामिठाईचा घाउक दरानें पुरवठा करणारानीं ह्या व्यवस्थेस संमति दिलेली आहे एकाद्यानें तिच्याविरुद्ध नवीन दुकान उघडल्यास, त्या दुकानदारास माल मिळणें कठीण जाईल व एकाद्या घाउक व्यापाऱ्यानें शिस्त मोडल्यास त्याचेवर हजार दुकानदारांचा बहिष्कार पडेल लिव्हरपूल येथील प्रयोगाकडे सर्वांचें लक्ष वेधून राहिलें आहे आणि ह्याच तत्त्वावर ब्रिटिश सरकार एकादी व्यापक योजना आखण्याचा बराच सभव आहे

---

## पैशाला वाढती मागणी

अलीकडे खेळत्या पैशास वाढती मागणी उत्पन्न होऊन व्याजाचे दर हळु हळु वर जात आहेत, ह्याचें एक लक्षण सरकारी ट्रेझरी बिलावरचें व्याज आता द. सा द शे १ रुपयापर्यंत चढलें आहे, ह्यामध्यें सापडतें. सरकार दर आठवड्यास १ कोटि रुपयाच्या ट्रेझरी बिलांबाबत टेंडर्स मागवतें त्यास लोकाची साप्ताहिक मागणी दर वेळेस ३–४ कोटि रुपयाची येत असे आणि सरकारास जरूर असलेला पैसा द सा द शे ८-१० आणे दरानें मिळत असे गेले काहीं महिने ही स्थिति बदलत आली असून कारखान्याची चलती सुरू झाल्याकारणानें ट्रेझरी बिलांसाठी येणाऱ्या टेंडरची रकम उतरत आली आहे व त्याच मानानें त्यावरील व्याजाचे दर चढणीस लागले आहेत. गेल्या आठवड्यात १ कोटि रुपयाच्या बिलास १ कोटि ११ लक्ष रुपयांची मागणी झाली आणि सरकारास द सा द शे १ रुपया इतका व्याजाचा दर द्यावा लागला.

---

## चिंध्या व हाडाचे तुकडे ह्यांचें महत्त्व

जर्मनीनें, कच्च्या व पक्क्या मालाचे बाबतींत स्वयपूर्ण होण्यासबधीं जारीनें खटपट चालविली आहे, आणि त्या सबधात तपशीलवार नियम करण्यात आले आहेत. वाया जाणाऱ्या चिंध्या, हाडकें, धातूचे तुकडे, इत्यादींचें वर्गीकरण केलेलें असून प्रत्येक घरातून वाया जाणाऱ्या ह्या जिनसा गोळा करण्याकरिता स्वयसेवकाच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत आणि पेठानिहाय कमिट्यामार्फत हें काम व्हावयाचें आहे. शाळातील विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्यांनींहि ह्या कार्यास हातभार लावावयाचा आहे हाडकें, टुथपेस्टच्या ट्यूब्स, टिनच्या डब्या, स्वयपाकघरातील केरकचऱ्यामधील उपयुक्त जिनसा, इत्यादि जमा करण्याचें काम वेगवेगळ्या लोकात विभागून दिलेलें आहे


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**पायोनियर डाइंग हाऊस पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोधाक प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बाधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धद्यातील विशेष होय "

**भाऊ गंगाधर साठे,**

बिल्डिग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,

५११ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

**जनानी व मर्दानी कापड**

मिळण्याचें

खात्रीलायक एकच ठिकाण

**माधव सोमण ब्रदर्स,**

लक्ष्मीरोड, पुणें. २

मुबई सरकारचे सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेलें

**डॉ. काळे यांचे पूना लेप्रसी क्लिनिक**

म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चमविकारावरील उपचारांचें विश्वसनीय ठिकाण

ठिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा

## उत्कृष्ट स्वदेशी मिठाची पैदास

शुद्ध व चांगलें मीठ हिंदुस्थानच्या मिठागरात पिकणेंच अशक्य आहे, अशी कांहीं वर्षांपूर्वी लोकांची समजूत होती. हिंदुस्थान सरकारच्या व्यापार मंत्र्यानींहि लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत कांहीं वर्षांपूर्वी श्री. न चिं. केळकरांचे प्रश्नास असलेंच उत्तर दिलें होतें परंतु योगायोग असा कीं, त्याच सुमारास हिंदुस्थान-सरकारच्या कांहीं अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहनानें व त्यांनीं पसंत केलेले केमिस्ट श्री. र व जोगळेकर, एम एससी. ह्यांच्या यशस्वी प्रयत्नानें मुंबईचे मिठाचे कारखानदार खा ब. भिवंडीवाला आणि कंपनी यानीं विलायतीच्या तोडीचें शुद्ध सफेत बारीक मीठ बनविण्यास छोट्या प्रमाणावर सुरुवात केली अशा प्रकारचें मीठ नैसर्गिक रीतीनें हिंदुस्थानांत बनविण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे ओखा येथें असें मीठ बनविणें शक्य आहे परंतु ओखा हें संस्थानी हद्दींत असल्यामुळें कलकत्ता सोडून ब्रिटिश हद्दींत इतर ठिकाणीं हें मीठ पाठविण्यास ब्रिटिश सरकारची मनाई आहे. खाराघोडा येथेंहि असें मीठ पिकतें, परंतु तेथील कृति नैसर्गिक नाहीं. आपण घरीं पांढरें मीठ तयार करतों त्याप्रमाणेंच तेथें पाण्यांत वाईट मीठ घालून व त्यांत कांहीं प्रमाणात सोडा मिसळून तें पाणी गोणपाटातून छानतात व विस्तव वर काहिलींत उकळून मीठ तयार करतात भिवंडीवाल्याचे कारखान्यात इतर काळ्या मिठाप्रमाणें हें मीठ सूर्याच्या उष्णतेनें व समुद्राच्या तुफान वाऱ्याच्या सहायानें तयार होतें व म्हणूनच त्यानीं ह्याला "सोलर टेबल सॉल्ट" हें नाव दिलें आहे.

'टेबल सॉल्ट' म्हणजे जेवताना वापरण्याचें मीठ प्रथम वर्षी हें मीठ एक पौंड कार्डबोर्डच्या पुड्यांतून विक्रीस ठेविलें होतें परतु ह्या प्रकारच्या पुड्याचा उपयोग फक्त युरोपियन किंवा तत्सम लोकच करतात व ते तर भिवंडीवाल्याचें नाव पुड्यावर पहिल्याबरोबर हिंदी मीठ म्हणून नाकें मुरडूं लागले, त्यामुळें ह्यास खप फारसा झाला नाहीं. लष्करी खात्यानें ब्रिटिश सैनिकाकरिता व सर्व सरकारी लष्करी डेअरी फार्म्सकरिता हें मीठ पसंत करून १९३३-३४ सालाचें कॉंट्रॅक्ट भिवंडीवाल्याना दिल्यापासून मात्र बाजारात ह्याला मागणी चांगली येऊ लागली आहे. १९३४ सालापासून भिवंडीवाल्यानीं सर्रास सर्वांना हेंच मीठ स्वयंपाकात, लोणच्यात व जेवतांना वापरता यावें म्हणून, बाजारात दोन [illegible] व एक मणी (आत माजरपाटाची खोळ असलेल्या) पोत्यां[illegible] विक्रीकरिता ठेविलें आहे. "सोलर टेबल सॉल्ट" चा एक पौंडी विलायती व त्यासारखा पुडा बाजारात किरकोळ २ ते २½ आण्यांपर्यंत विकला जातो व हें साखरेसारखें १ ते १½ आणा पौंडाप्रमाणें तोलून देणें परवडतें. कारण ह्याला पॅकिंगचा वगैरे खर्च फार नाहीं बाजारात मिळणाऱ्या काळ्या मिठापेक्षां ही किंमत जास्त आहे खरी परंतु ती परिणामीं जास्त नाहीं. कारण इतर काळ्या मिठात १५ ते २० टक्के खाण्याला अयोग्य असे पदार्थ असतात, ते ह्यात नसल्यामुळें हें जास्त खारट आहे व म्हणून कमी पुरतें. शिवाय ह्याला दळणाचा खर्च नाहीं व पावसाळ्यात पाणी सुटण्याचीहि भीति नाहीं. हें मीठ साखरेप्रमाणें तोलून दिलें जातें बाजारात बहुतेक ठिकाणीं मीठ मापून देतात व मापी मण वजनापेक्षां केव्हांहि कमी भरतो. कांहीं मिठाचे बाबतींत तर तो तीन चतुर्थांशहि भरत नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे पुष्कळ लोक पानात वाढण्याकरिता म्हणून पांढरें मीठ घरीं तयार करितात. तें तयार करण्याच्या खर्चाचा विचार करिता हें मीठ खात्रीनें स्वस्तच पडेल. लोणच्यात हें मीठ वापरल्यास लोणचें काळें पडत नाहीं

काळें मीठ आमच्या इतकें परिचयाचें झालें आहे कीं तें पाहिल्यावर त्यात किती वाईट गोष्टी असतील हा विचार आमच्या मनाला शिवतहि नाहीं परंतु हिंदुस्थान-शिवाय इतर कोठल्याहि देशात आपण वापरतों असलें मीठ फक्त खत म्हणून, मासळी सुकविण्यासाठीं किंवा इतर कांहीं धंद्यांना उपयोगी म्हणूनच केवळ वापरतात खाण्यास कधींच वापरीत नाहींत. आपण स्वयंपाकात वापरण्याचे सर्व जिन्नस साफ करून वापरतों, परतु मीठ ही चीज अशी आहे कीं, ती कशीहि असली तरी आपणास चालते इतके दिवस चांगलें शुद्ध मीठ देशांत तयार होत नव्हतें, परंतु आता तीहि सबब राहिलेली नाहीं म्हणून लोकानीं हें मीठ सर्रास वापरून ह्या नवीन स्वदेशी धंद्याला प्रोत्साहन द्यावें अशी आमची आग्रहाची सूचना आहे

## खरा "सुवर्ण" महोत्सव

दक्षिण आफ्रिकेंतील जोहान्सबर्ग शहर स्थापन होऊन गेल्या सप्टेंबरांत पन्नास वर्षें पुरीं झालीं ह्या स्थापनेचा सुवर्ण महोत्सव हा अलंकारिक नसून शब्दशः सोन्याच्या धातूचा महोत्सव होय १८८६ सालीं प्रेसिडेंट क्रूगर ह्यानीं सोन्याच्या खाणींत काम करणाऱ्या पन्नास लोकांच्या वस्तीस स्वतंत्र गांवाचे हक्क अर्पण केले आज तेथील खाणींमध्यें ३२,००० गोरे व २,६६,००० कृष्णवर्णीय मजूर काम करीत आहेत. दहा हजार फूट खोल खाणींत काम चालू असून अत्यंत कार्यक्षम अशीं यंत्रें तेथें वापरात आहेत. १८८७ ते १९३२ ह्या सालाच्या दरम्यानचे मुदतीमध्यें सुमारें २७० कोटि रुपयांचें भांडवल खाणीच्या धंद्यात घातलें गेलें असून सुमारें ३०० कोटि रुपयांइतकें डिव्हिडंड त्यावर वांटण्यात आलें आहे. हा धंदा इतका भरभराटला कीं त्यापासून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें मिळणारें कराचें उत्पन्न सरकारच्या एकूण उत्पन्नाच्या निम्म्या इतकें होऊं लागलें. ग्रेट-ब्रिटन व त्याच्या पाठोपाठ इतर राष्ट्रें ह्यानीं आपल्या चलनाचा सुवर्णाचा आधार काढून टाकला आणि कागदाचें चलन=त्यावर छापलेल्या रकमेचें सोनें, हें जुनें कोष्टक अर्थशून्य बनलें तरीहि जगामध्यें सोन्यास असलेला मान व महत्त्व हीं कमी झालेलीं नाहींत. राष्ट्रें व मध्यवर्ती बँका सुवर्णसंचय सारखा करीतच आहेत दर आठवड्यास दक्षिण आफ्रिकेंतून दोन-तीन कोटि रुपये किंमतीचें सोनें लंडनला जात आहे आणि तेथून तें बँकांच्या व इतर संचयामध्यें गडप होत आहे हिंदुस्थानातून होणारी साप्ताहिक सुवर्णनिर्गत तिकडचीच वाट धरत दक्षिण आफ्रिकेच्या खाणींमधील सोन्यापासून तेथील लोकाची कमाई व सपत्तीचा सचय हीं वाढत आहेत हिंदुस्थानातून बाहेर जाणारें सोनें संचित संपत्तीस ओहोटी लागल्याचें चिन्ह आहे.

व्यापारी-उद्यमी लोकांस
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक दर्शन १९३७

## सहकारी चळवळ

**पश्चिम खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, धुळें**

सहकारी संस्थांमार्फत ता डे. अॅग्रि. असोसिएशनकडून शेतीची सुधारणा कोणत्या रितीनें घडवून आणता येईल व त्याबाबत कोणते परिणामकारक उपाय योजिले पाहिजेत, हें ठरविण्याकरिता शेतीखातें व सहकारीखातें ह्यांची एक संयुक्त परिषद धुळें येथें बॉम्बे टॉकिजचे थिएटरात शेतीखात्याचे डे. डायरेक्टर, श्री. के व्ही जोशीसाहेब, ह्यांचे अध्यक्षतेखाली रविवार ता ७ मार्च, १९३७ रोजीं भरविण्यांत आली.

सभेंत, शेतीची सुधारणा कशी घडवून आणता येईल व त्याकरितां कोणते उपाय योजिले पाहिजेत ह्याखेरीज खालील विषयावरहि चर्चा करण्यांत आली व निर्णय घेण्यात आले.

( १ ) सहकारी संस्थांचे मार्फत खेड्याची सुधारणा.
( २ ) पतीव्यतिरिक्त सहकारी संस्था व त्यांची वाढ
( ३ ) कॅटल ब्रीडींग व डेअरी सोसायट्यांची स्थापना
( ४ ) विणकर सोसायट्यांची सुधारणा

शेवटीं, अध्यक्षांनीं समारोपाबाबत अत्यंत कळकळीचें भाषण केलें शेती खातें व सहकारी खातें जरी वेगवेगळीं असलीं तरी दोन्हीं खात्यांचें ध्येय एकच आहे. तेव्हां परस्परांनीं परस्परांशीं सहकार्य करावें व प्रथम शेतीची सुधारणा घडवून आणून आपली आर्थिक उन्नति करून घ्यावी असा अध्यक्षांचे भाषणाचा आशय होता

इन्स्टिट्यूटचे चेअरमन, श्री. दामोदर गणपतराव पाटील, यानीं मे. जोशीसाहेब, मे प्रभुसाहेब ह्याचे व सर्व उपस्थित सहकारी बंधूचे आभार मानून, सभेंत झालेल्या निर्णयाप्रमाणें प्रत्येकानें झटावें व शेतकरी सुखी तर जग सुखी ह्याची सत्यता शेतकरी समाजास पटवून देऊन शेतकऱ्यास सुखी करावें असें सांगितलें

---

**रिफ्रेशर्स ट्रेनिंग क्लास, अहमदनगर**

अहमदनगर येथील प्रॉ को आपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या शाखेच्या विद्यमानें नगर येथें सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरी लोकांना व फील्डमनना शिक्षण देण्यासाठी एक रिफ्रेशर्स ट्रेनिंग क्लास ता. १८ ते २१ मार्च १९३७ अखेर भरविण्यात आला होता.

ह्या क्लासला सुमारें ६० लोक सतत चार दिवस हजर होते व त्यानीं सुमारें २० उपयुक्त विषयाची माहिती घेतली कोंबड्याची जोपासना व खेड्यामधील दवाखाना ह्या दोन विषयास विशेष प्राधान्य देण्यात आलें होतें व त्यावर श्री आल्बर्ट डिसोझा व श्री ग कृ. प्रधान ह्यांचीं सप्रयोग व्याख्यानें झालीं. क्लास आटोपल्यानतर श्री प्रधान ह्यांचे अध्यक्षतेखाली सेक्रेटरींचें वार्षिक समेलन भरविण्यांत आलें अशा रीतीनें, हा क्लास अत्यंत यशस्वी झाला

---

**पुणें औद्योगिक प्रदर्शनांतील बोलपट–नाटकगृह**

या प्रदर्शनामध्यें ता. २४-३-३७ पासून बोलपट–नाटक–गृह सुरू झालें या नाटकगृहांत मोशन पिक्चर सोसायटीकडून आलेले. शिक्षण, शेती, उद्योगधंदे, भूगोल, आरोग्य इत्यादि विषयांवरील बोलते चित्रपट दाखविण्यांत येत असतात. याशिवाय, आरोग्य मंडळानें आरोग्यविषयक चित्रपट दाखविण्याची व्यवस्था केलेली आहे.


**नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८०,१०० |
| रिझर्व्ह फंड | २,७८७ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६३,०५६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ५,०१९ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९९० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४१,४९४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबरानां त्यांच्या घराचें तारणावर कर्ज देते

–सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ — दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज: सोनें, चांदी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes**"

पिक्चर–फिट कपडे मिळण्याचें एकच ठिकाण

**टेलर्स रिसबूड ब्रदर्स**

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११८-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०५—८ |
| ४½% लाब मुदत ( १९५५-६० ) .. | ११७—४ |
| ५% १९४३ ... ... ... | १०६-१० |
| ३½% बिनमुदत .. ... | ९२-११ |
| ३½% १९४७-५० .. ... | १०५—२ |
| २¾% १९४८-५२ ... ... | ९९—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) .. | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... . | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३१—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०९-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु. [illegible] रु. ) | १५१५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु व ३½% डिव्हि. ) | १३१—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४½% | १०३—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | [illegible]७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु चा भाग, डिव्हि १०, बोनस ६ रु. ४ आ ) | ९१०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु डिव्हि १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९% ) | २७३-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १४८०—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९८-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, १७ रु.८ आ.) | १७८—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि रु.६) | ३८१—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १९५०—० |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—०—३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५४-११-० |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदे ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books

(2) We supply Government of Bombay and Government of India publications

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.


**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यन्त्रसामुग्रीचें व पांच वर्षें गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

## प्रॉव्हिन्शल को–ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या **रौप्यमहोत्सवानिमित्त** सदरहु तारखेपासून **दशवार्षिक रोखे** शेंकडा ७० रु ८ आण्याच्या दरानें विक्रीस काढले आहेत

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु च्या दर्शनी किंमतीचे आहेत वरील रक्कम शेतकऱ्याची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यात बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें

नागपूर शहर,
ता १ मार्च १९३७

जी. ए भोंसले, बी. कॉम्
मॅनेजर, दि सी पी अँन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को–ऑपरेटिव्ह बँन्क, लिमिटेड

श्री न गं आपटे, बी एजी, याच्या देखरेखीखाली रूरल प्रॉडक्ट्स कंपनीनें चांगल्या फळांपासून केलेले शुद्ध

## रस व सरबतें

मिळण्याचें मुख्य ठिकाण.—
महाराष्ट्र इंडस्ट्रिअल को. एजन्सी, पुणे २
व सर्व प्रमुख दुकानें
मुंबईंत:—तांबे आरोग्य भुवन, गिरगांव व कोट

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.


हें पत्र पुणे, पेठ भांबुर्डा घ न १३६।३ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा श्रीपाद वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १४ एप्रिल, १९३७ अंक १५

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

## प्रॉव्हिन्शल को—ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या **रौप्यमहोत्सवा**निमित्त सदरहु तारखेपासून **दशवार्षिक रोखे** शेंकडा ७० रु. ८ आण्यांच्या दरानें विक्रीस काढले आहेत.

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु.च्या दर्शनी किंमतीचे आहेत. वरील रक्कम शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यांत बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर,
ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम्,
मॅनेजर, दि सी. पी. अॅन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को—ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
**भावाचें माहितीपत्रक मागवा**
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

उन्हाळ्याकरितां **ब्राह्मी तेल** हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें.

स्टॉकिस्ट : म. गो. कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें.

मॅन्युफॅक्चरर : दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई नं. ४

**घरपोंच जोडी रु. ८ची**
कां, विचार कसला करितां !




तुमच्यासमोर ह्या सुप्रसिद्ध **टिकेकरी पातळांची** जाहिरात असतां उगीच दुसरीकडील पातळें मागविण्याचे मोहास पडूं नका. टिकेकरी पातळें सर्वांगसुंदर अर्थात् आपल्यास पाहिजेत तशींच आहेत.

**नमुने मोफत.** पोस्टेजकरितां दीड आण्याचीं तिकिटें पाठवा.

**दि टिकेकर टेक्सटाईल मिल, लि.**
पो. टिकेकरवाडी, सोलापूर.




## दी सनशाइन इन्शुअरन्स लि.

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरतां पगारी एजंट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा.

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस : ३३४ गणेश पेठ, पुणें.

# विविध माहिती

### बँकास सुट्टी

सोमवार ता १९ एप्रिल रोजीं रामनवमीनिमित्त बँका बंद रहातील.

### संगीतामुळें कार्यक्षमता वाढते

हल्लीच्या यांत्रिक जीवनामध्यें मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या पद्धतीमुळें कामगारास तेंच तेंच काम दिवसभर करीत रहावें लागतें, त्या कारणानें काम कंटाळवाणें होतें हातामधील कामास अनुरूप अशा संगीताच्या तालानें कामगाराची कार्यक्षमता वाढते असा अनुभव आला आहे संगीत थांबविलें कीं काहीं दिवसांनीं काम पुन: कमी होऊं लागतें

### जागतिक साखर परिषद

जागतिक साखर परिषदेचें उद्घाटन गेल्या आठवड्यात मि रॅम्से मॅक्डोनल्ड ह्यांनीं लंडन येथे केलें २२ राष्ट्रांचे प्रतिनिधी परिषदेस हजर होते हिंदुस्थानास आमंत्रण नव्हतें. साखरेचें जागतिक उत्पादन व खप ह्यामध्यें काहीं तरी मेळ असावा, ह्या दृष्टीनें प्रयत्न झाले पाहिजेत, असें मि मॅक्डोनल्ड ह्यांनीं सांगितलें.

### हिंदुस्थानांतील चलनी नोटा

गेल्या महिन्याच्या २६ तारखेस एकूण २०८ कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा हिंदुस्थानात काढलेल्या होत्या आणि त्यापैकीं १३ कोटि, ६४ लक्षाच्या नोटा रिझर्व्ह बँकेच्या रोकड शिलकेंत असून बाकीच्या १९४ कोटि, ३५ लक्षाच्या नोटा व्यवहारात खेळत होत्या

### अकरा सिमेंट कारखान्यांचें एकीकरण

हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागातील अकरा सिमेंट कारखान्याच्या एकीकरणाची योजना आतां पुरी झाली असून त्याची व्यवस्था "असोसिएटेट कंपनीज लि." ह्या नवीन स्थापलेल्या मंडळीच्या हातीं आली आहे

### कृत्रिम रेशमाच्या कापडावरील जकात वाढली

जपानमधून कृत्रिम रेशमाच्या कापडाची आयात झपाट्यानें वाढल्यामुळें त्याची स्पर्धा देशी गिरण्यास होऊं लागली होती व त्यासंबंधांत हिंदी कारखानदारांनींहि बरेच दिवस तक्रार चालविली होती हिंदुस्थान सरकारनें आतां ह्या मालावरची जकात थोडीशी वाढविली आहे.

### जर्मनीच्या इतिहासाचे आधारभूत ग्रन्थ

ग्रेट ब्रिटनमधील "इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च" ह्या संस्थेस जर्मनीतर्फे त्या देशाच्या इतिहासाचे २,६०० आधारभूत ग्रन्थ नुकतेच नजर करण्यात आले. जर्मनीच्या इतिहासाची पुरी माहिती सदरहु ग्रन्थात आढळते

### लोकसंख्येंत वाढ—इटलीची सरशी

इटलीमध्यें दरसाल दर हजारात १३ लोक मरण पावतात व २३ अर्भकें जन्मास येतात. म्हणजे, प्रत्येक १,००० लोकसंख्येस १०, ह्या प्रमाणात इटलीची वस्ती वाढत आहे जर्मनींत हें प्रमाण ७½ व अमेरिकेंत ६ इतकें पडतें, परंतु ग्रेट ब्रिटनमधील लोकसंख्येंत दरसाल दर हजारी फक्त तिघाची भर पडते फ्रान्समध्यें हें प्रमाण १०००. १ इतकें अल्प आहे

### राज्यारोहण समारंभाचा खर्च

महाराणी व्हिक्टोरिया ह्याच्या ग्रेट ब्रिटनमधील राज्यारोहण समारंभास जेवढा खर्च आला, त्याच्या सहापट खर्च सहाव्या जॉर्ज बादशहाच्या राज्यारोहण समारंभास येणार आहे.

### ब्रिटिश पोस्टखात्याचें उत्पन्न

ब्रिटिश पोस्ट खात्यास होणाऱ्या उत्पन्नापैकीं शेकडा ५९ इतकी रकम पोस्टाच्या कामाबद्दल मिळते, शेकडा ३४ इतकी प्राप्ती टेलिफोनच्या वापरापासून होते व उरलेलें उत्पन्न ताराच्या फीपासून मिळतें. वरील माहितीवरून ग्रेट ब्रिटनमध्यें टेलिफोनचा फैलाव किती झाला आहे, ह्याची कल्पना येते.

### ब्रिटिश पोस्टखात्याचें वाढतें काम

| | १८४३-४४ | १९३५-३६ |
|---|---|---|
| पोस्टाचें एकूण उत्पन्न | २¼ कोटि रु | १०४ कोटि रु. |
| वाहलेल्या पत्राची संख्या | २३ कोटि | ७०० कोटि |

१९३५-३६ सालीं पोस्ट खात्यास १५½ कोटि रुपये निव्वळ नफा झाला

### रस्त्यांची योजना आखण्याकरितां अधिकाऱ्याची नेमणूक

मुंबई इलाख्यातील रस्त्यासंबंधीं एक मोठ्या प्रमाणावर योजना आखण्याकरिता एक स्वतंत्र अधिकारी नेमण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे प्रांतिक रोड फंडातून ह्या अधिकाऱ्याचा पगार, इत्यादींची तरतूद करण्यात येईल

### बाहेर जाणाऱ्या लोखंडी तुकड्यांची निर्गत

मोडक्या-तोडक्या लोखंडाच्या वस्तूंना लोखंडाच्या महर्घतेमुळें प्रचंड मागणी येत आहे. १९३५ सालीं अशा तऱ्हेचें ५२ हजार टन लोखंड हिंदुस्थानातून जपानला गेलें, व १९३६ सालीं ५२ हजार टनाची निर्गत झाली गेल्या फेब्रुवारी अखेरच्या ११ महिन्यात ९२ हजार टन लोखंड जपानकडे गेलें. मागील एक-दोन महिन्यात जपाननें १० हजार टन मोडकें-तोडकें लोखंड हिंदुस्थानात खरेदी करून नेलें आहे

### १२ मे, १९३७

बादशहा सहावे जॉर्ज ह्याच्या राज्यारोहणाचा समारंभ लंडन येथें ता १२ मे १९३७ रोजीं साजरा होणार आहे. सदरहु दिवस हिंदुस्थानात सार्वजनिक सुटीचा दिवस म्हणून जाहीर करण्यात आला आहे लवकरच हिंदुस्थानास समक्ष भेट देऊन दरबार भरविण्याचा बादशहाचा बेत असल्यानें, ता. १२ मे रोजींचा हिंदुस्थानांतील समारंभ विशेष थाटामाटानें करण्यांत येणार नाहीं

### हिंदी हायकोर्टांतील युरोपियन जज्ज

हिंदुस्थानांतील सर्व हायकोर्टांत मिळून ४७ युरोपियन व ४८ युरोपियनेतर न्यायाधीश आहेत १९१० सालीं शेकडा ७४ न्यायाधीश युरोपियन होते

### असेंब्लीच्या सभासदाचीं भाषणें रेडिओवर कां ऐकवीत नाहीं?

लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत होणारीं भाषणें ऐकण्यास जनता अत्यंत उत्सुक असल्यानें तीं रेडिओवर घेऊन लोकाच्या कानावर का घालीत नाहीं असा प्रश्न एका सभासदानें विचारला असता जनतेच्या ह्या औत्सुक्याची सरकारास माहिती नाहीं व म्हणून त्यासंबंधांत कोणतीच व्यवस्था करण्याचें प्रयोजन नाहीं असें उत्तर देण्यात आलें

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| २८ ३-३७ ते ३-४-३७ | १९,४८,९२१ |
| ४-४-३७ ते १०-४-३७ | ७९,११,०९० |
| २१-९-३१ ते १०-४ ३७ | २,९५,६६,७३,५९१ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | १८० | ७ युद्धविषयक तयारी व औद्योगिक चलती | १८४ |
| २ चांदी सोन्याचा व्यापार | १८१ | ८ संरक्षक धोरणाचा सुपरिणाम | १८५ |
| ३ कपास आणि साखर | १८१ | ९ गिल्ट्दाइकावरील धर्मादाय पट्टी | १८६ |
| ४ कच्च्या फिल्म्सवरील जकात कमी झाली | १८२ | १० हिंदी व्यापारी संस्थांच्या मध्यवर्ती सभेची बैठक | १८७ |
| ५ स्फुट विचार — परकी लष्कर व त्याचा हिंदुस्थानास खर्च—साम्राज्याची ग्रेट ब्रिटनला अवश्यकता—रौटन कमिटीच्या शिफारसी—सक्तीचा विमा—मध्यप्रांतातली सहकारी चळवळ | १८२ | ११ एक्सचेंज बँकांचा कामात वाढ | १८८ |
| ६ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट | १८४ | १२ प्राप्तीवरील कराराबाबत एक निवाडा | १८८ |
| | | १३ निवडक बाजारभाव | १८९ |



# अर्थ

बुधवार, ता १४ एप्रिल, १९३७


## चांदी–सोन्याचा व्यापार

(२)

इंग्लडनें आपल्या चलनाची सोन्याच्या मानाची किंमत उतरवली आणि हिंदुस्थानच्या हुंडणावळीचा दर स्थिर ठेवला, ह्या कारणानें सोन्याची हिंदुस्थानात रुपयाच्या नाण्यात व्यक्त होणारी किंमत चढून दर तोळयास २४ पासून ३५ रुपयावर गेली ह्याच सुमारास आर्थिक मंदीमुळें हिंदी जनतेस गाठचें सोनें विकून संसाराचा गाडा हाकण्याची तजवीज करणें भाग पडलें सोन्याची निर्गत हिंदुस्थानातून १९३१ सालअखेरपासून मोठ्या प्रमाणात होत आली आहे, त्याचें कारण ह्या परिस्थितींत आहे चांदी–सोन्याचे व्यापारी मागणी–पुरवठा पाहून आणि हिंदी व परदेशी बाजारातले कमी–ज्यास्त भाव लक्षात घेऊन ह्या धातूची खरेदी–विक्री व आयात–निर्गत करणार, हें उघड आहे प्रस्तुत विषयावरील पहिल्या लेखात सोन्याच्या व्यापाराची माहिती आम्हीं दिली आहे चांदीच्या आयात–निर्गतीसंबंधाची माहिती खाली देत आहों हिंदी जनतेंतील मध्यम स्थितींतल्या लोकांची व गोरगरिबांची शिल्लक चांदीमध्यें गुंतवण्यात येते, हें सुप्रसिद्ध आहे पण चांदीच्याहि खरेदी–विक्रीवर आणि आयात-निर्गतीवर उतरत्या-चढत्या किंमतींचा परिणाम होत असतो. चांदी देशात सारखी येत असते व देशातून बाहेर जात असते अलीकडे चांदीच्या निर्गतीपेक्षा आयात अधिक होत आली आहे हें गेल्या काहीं महिन्यातल्या व्यवहारावरून स्पष्ट होतें १९३५ सालच्या शेवटच्या नऊ महिन्यात चांदीच्या आयातीपेक्षा सुमारें २½ कोटि रुपयाची निर्गत ज्यास्त होती १९३६ सालातल्या ह्याच नऊ महिन्यात पारडें फिरून निर्गतीपेक्षा आयात ९ कोटि रुपयांनीं अधिक झाली

हिंदुस्थानात चांदीची आयात दरवर्षीं सारखी होत आलेली आहे पण १९३३ सालापासून गेल्या वर्षापर्यंत ह्या देशानें चांदीची आयातीपेक्षां निर्गतच ज्यास्त केली अमेरिकेनें मध्यंतरी चांदीची खरेदी करून किंमत चढीची राहील असें राष्ट्रीय धोरण अवलंबिलें होतें, त्याचा हा परिणाम होय. चांदीस चागला भाव येताच त्या संधीचा फायदा घेऊन हिंदी व्यापाऱ्यानीं वीस कोटि औंस वजनाची चांदी परदेशात विकली आणि अमेरिकेनें पूर्वीचें आपलें धोरण बदलल्यामुळें बाजारभाव खाली आलेले पाहून त्यानीं पुन्हा चांदी खरेदी करून भरली. १९३४-३५ मध्यें दर महिन्यास सरासरीनें २२ लक्ष औंस वजनाची चांदी बाहेर गेली आणि १९३५-३६ सालचा हा आकडा १७ लक्ष औंस इतका होता चालू सालीं हा साप्ताहिक निर्गतीचा आकडा दोन लक्षच काय तो आहे ह्याच्या उलट चांदीची आयात मोठ्या प्रमाणात वाढली आहे १९३४ ३५ सालीं एकूण आयात २९६ लाख औंस झाली आणि १९३५-३६मध्यें ती ३८५ लक्ष औंस होती १९३६-३७ च्या एप्रिल ते जानेवारी अखेरची दहा महिन्यातली आयात ६३४ लक्ष औंस इतकी झालेली आहे. १९३७ ३८ सालच्या बजेटात चांदीवरची आयात जकात दर औंसास दोन तोळ्याची तीन तोळे करण्यात आली आहे आणि ह्या वाढाव्यापासून ५० लक्ष रुपये अधिक उत्पन्न सरकारच्या तिजोरीस होईल अशी अपेक्षा आहे यावरून १९३७ ३८ मध्यें ८०० लक्ष औंस चांदी हिंदुस्थानात येईल असा फडनवीसाचा अदाज आहे, हें स्पष्ट आहे हा अजमास कितीसा खरा ठरेल हें सागतां येत नाहीं. चांदीचा अलीकडील बाजारभाव बेताचा आहे आणि तो लोकाच्या खरेदीस अनुकूल असा आहे अमेरिकेच्या चांदी महाग करण्याच्या धोरणाचा कल सोडून दिला तर एकंदरीनें चांदीची किंमत मर्यादेच्या बाहेर चढलेली नाहीं हिंदी जनतेचा कल सोन्यापेक्षा चांदीकडे राहील असा कित्येक तज्ज्ञाचा अभिप्राय आहे. सोन्याची निर्गत घटत जाणार असा रंग दिसत आहे आणि सोन्याच्या ऐवजीं चांदी संग्रहित करण्याची जनतेची प्रवृत्ति वाढेल असें दिसतें

## कपास आणि साखर

### जागतिक उत्पादन व हिंदुस्थान

कपास व साखर ह्याच्या उत्पादनात जगाच्या बाजारात हिंदुस्थानास नाव घेण्यासारखें स्थान असल्यानें त्या विषयींच्या प्रसिद्ध होणाऱ्या आकड्यामध्यें हिंदी मालाचा अंतर्भाव होतो. गेल्या आठ वर्षाचे व चालू सालाचे कपास व साखर ह्या बाबतचे तुलनात्मक ठोकळ आकडे खाली दिले आहेत ते प्रमुख देश व एकदर जग ह्यासंबंधाचे आहेत प्रथम कपाशीचे आकडे दिले आहेत

कपास

( लक्ष गाठींचे आकडे )

| वर्ष | ब्राझिल | इजिप्त | हिंदुस्थान | अमेरिका | एकूण जग |
|---|---|---|---|---|---|
| १९२९ | ५¼ | १६ | ५८ | १५७½ | २८८½ |
| १९३० | ५½ | १७ | ५२½ | १६०½ | २८४¾ |
| १९३१ | ४¾ | १६½ | ५२¼ | १४९ | २७६¾ |
| १९३२ | ५¾ | १२¾ | ४० | १८१½ | २९१ |
| १९३३ | ४¼ | १० | ४६½ | १३९ | २५१. |
| १९३४ | ९½ | १७ | ५१ | १४०¼ | २८३½ |
| १९३५ | १३ | १५ | ४८½ | १०६¼ | २५५ |
| १९३६ | १७ | १७ | ५७¼ | ११७¼ | २८२½ |
| १९३७ | १८ | १९ | ५८½ | १३५ | ३२७¼ |

हिंदी कारखान्यातलें साखरेचें उत्पन्न गेल्या पाच–सात वर्षात एक दीड लक्ष टनापासून सुमारें नऊ लक्ष टनावर गेलें आहे, हें आता सुप्रसिद्ध आहे तथापि, जगातील इतर देशात साखरेची पैदास किती होते आणि जागतिक उत्पादनाची वाटणी प्रमुख देशात कशी झाली आहे, हें समजणें जरूर आहे त्याचप्रमाणें, हिंदी साखरेची पैदास वाढत गेली, त्याबरोबर जाव्हाच्या कारखान्यातलें उत्पादन कसें घटत गेलें आहे, आणि सरकारच्या सहाय्यामुळें ग्रेट ब्रिटनमध्यें बीटाच्या साखरेची उत्पत्ति कशी वाढली आहे, हें खाली दिलेल्या तुलनात्मक आकड्यावरून दिसून येईल.—

साखरेचें उत्पादन

( लक्ष टनाचे आकडे )

| वर्ष | क्यूबा | जावा | इंग्लंड | एकूण जग |
|---|---|---|---|---|
| १९२९ | ५१½ | ३१ | २¼ | २८३½ |
| १९३० | ४६¾ | ३०½ | ३ | २८१ |
| १९३१ | ३१¼ | ३१¼ | ४¾ | २९१ |
| १९३२ | २६½ | २९½ | २¾ | २६८ |
| १९३३ | २० | २७ | ३¾ | २५३ |
| १९३४ | २३ | १४¾ | ५½ | २५१¼ |
| १९३५ | २५¾ | ७ | ७ | २४८ |
| १९३६ | २५½ | ५½ | ५½ | २६७ |
| १९३७ | २८½ | ६ | ५½ | २७३ |

सर्व जगात मिळून सुमारें २५० ते २७५ लक्ष टन इतकी साखर दर वर्षी तयार होते त्यापैकी हिंदुस्थानचा हिस्सा फक्त १० लक्ष टन एवढाच आहे ह्या आकड्यात हिंदुस्थानात होणाऱ्या गुळाचा अतर्भाव अर्थातच केलेला नाही तो केला असता हिंदुस्थानचा नबर फार वर जातो

---

कच्च्या फिल्म्सवरील जकात कमी झाली

कच्च्या सिनेमा फिल्म्सवरील जकात सरकारनें अजीबात काढून टाकावी अशी खटपट मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडियानें आज गेलीं ४½ वर्षे चालविली आहे अधिकाऱ्याकडे शिष्ट मंडळें, असेंब्लीमध्यें ठराव व प्रश्न, वर्तमानपत्रातून प्रचार, इत्यादि मार्गांनीं सोसायटी प्रयत्न करीत होती कच्च्या फिल्मला द्यावी लागणारी भारी किंमत ही देशी धद्याचे प्रगतीच्या मार्गातील एक मोठी अडचण आहे आयात होणाऱ्या कच्च्या ब्रिटिश फिल्म्सवर १५% व ब्रिटिशेतर फिल्म्सवर २५% अशी जकात आतांपर्यंत आकारण्यात येत असे, ती १ एप्रिल पासून प्रत्येकीं ५ टक्क्यानीं उतरविली असल्याचें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे मोशन पिक्चर सोसायटीच्या प्रयत्नास आलेलें हें यश सोसायटीची लोकप्रियता व तिच्यावरील विश्वास वाढविण्यास सहायकारक होईल, ह्यात संशय नाहीं देशी चित्रपटांच्या धद्याचे प्रगतीबाबत सोसायटी करीत असलेलें काम अभिनंदनीय आहे

---

# स्फुट विचार

## परकी तज्ञ व त्यांचा हिंदुस्थानास खर्च

कोणत्याहि महत्त्वाच्या प्रश्नाची चाकशी कर्तव्य असता तिच्यासाठी, इंग्लंडमधील तज्ञ आणून त्याचेकडे तें काम सोंपवावयाचें अशी प्रथा हिंदुस्थान सरकारनें अलीकडे जोरानें चालू केली आहे निरनिराळ्या विषयात हिंदी लोक तयार करून विशिष्ट ज्ञान, माहिती व अनुभव सपादन करण्याकरिता जरूर वाटल्यास परदेशात पाठवून त्यास सार्वजनिक हिताच्या कामासाठी लायक बनवणें हा वास्तविक उत्कृष्ट मार्ग होय. जपानसारख्या राष्ट्रांनीं ह्या पद्धतीचा अवलंब केल्यानें तेथील सरकारास तज्ञ सल्लागार बाहेरून आणण्याची आता अवश्यकता भासत नाहीं ब्रिटिश तज्ञास हिंदी प्रश्नाच्या चौकशीसाठी पाचारण करण्याची हिंदुस्थान सरकारची संवय अलीकडे इतक्या थरास जाऊन पोहोंचली आहे कीं, ह्या सल्लागारांच्या आयातीवर जकात बसवावी अशी सूचना एका सभासदानें असेंब्लीमध्यें विनोदानें नुकतीच केली होती ! १९३६ सालाच्या जानेवारी ते डिसेंबर ह्या बारमाहींत हिंदुस्थान सरकारनें किती तज्ञ बाहेरून आणले आणि त्याप्रीत्यर्थ किती खर्च झाला ह्या विषयींचे आकडे लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत डॉ झियाउद्दीन अहमद ह्यानीं सूचना केल्यावरून पुरवण्यात आले ते बोधप्रद आहेत मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्याचेमध्यें उत्पन्न-खर्चाची वाटणी करण्याबाबत आलेल्या एका तज्ञाचा १२ हजार रुपये खर्च झाला दोन शिक्षण तज्ञाच्या सल्ल्याची किंमत सरकारास ३९ हजार रुपये पडली रेल्वे चौकशीसाठी तीन तज्ञ आले होते, त्याचा सव्वादोन लक्ष रुपये खर्च झाला ब्रॉडकास्टिंगबद्दलच्या सल्ला देणारासाठी सुमारे ७ हजार रुपये खर्च झाले शेती विषयक दोन सल्लागाराचा ८० हजार रुपये खर्च झाला ह्या प्रमाणें नऊ परदेशीय तज्ञाचे पायीं एका वर्षात हिंदुस्थानास सुमारें पावणेचार लक्ष रुपये खर्चावे लागले देशी लोकावर हा पैसा खर्च झाला असता तर हिंदुस्थानात लायक तज्ञ तयार होऊन त्याचेपासून राष्ट्रास कायमचा फायदा झाला असता हिंदुस्थानांत तज्ञ नाहींत व तयार होऊ शकत नाहींत ह्या प्रकारची कल्पना सरकारनें का करावी? अशा कल्पनेनें लोकाचा पैसा खर्चून लायक माणसें येथें कधींच तयार होणार नाहींत व हिंदुस्थानचें ह्या बाबतींतलें परावलबन कधींच दूर होणार नाहीं

---

## साम्राज्य टिकविल्याखेरीज ग्रेट ब्रिटनची धडगत नाहीं

ग्रेट ब्रिटनचें जीवन त्या देशाच्या आयात व निर्गत व्यापारावर अवलंबून आहे. कच्चा माल व खाण्याचे पदार्थ मिळून सुमारें २ लक्ष टन वजनाचा माल त्या देशात दररोज उतरतो. ग्रेट ब्रिटन निर्गत करीत असलेल्या मालापैकीं तिसरा हिस्सा ब्रिटिश साम्राज्यातील देशात खपतो ब्रिटिश साम्राज्यावरील ग्रेटब्रिटनचें प्रभुत्व कमी झाल्यास अर्थातच हा व्यापार घटल्याखेरीज रहाणार नाहीं सर्व देशानीं खुल्या व्यापाराचें तत्त्व अमलात आणल्यास पूर्वीप्रमाणें आताहि ग्रेट ब्रिटनची भरभराट होत राहील, परंतु खुला व्यापार हल्लीच्या धक्काबुक्कीच्या काळात टिकाव कसा ? ब्रिटिश साम्राज्याख्य। खालोखाल रशियाचें क्षेत्रफळ व फ्रेंच साम्राज्याची लोकसख्या हीं येतात. हॉलंडचेंहि साम्राज्य मोठें आहे व पोर्तुगाल, डेनमार्क

आणि इटली ह्या देशाचेंहि मुलूख क्षेत्रफळा लहान नाहींत जर्मनीस मात्र साम्राज्य नाहीं. मार्क नाणें त्या देशाबाहेर कोणीच स्वीकारीत नाहीं, तेव्हा त्यानें कच्चा माल मिळवावा कसा? जगातील सोन्याच्या एकूण उत्पादनापैकीं शेकडा ६० उत्पादन एकट्या ब्रिटिश साम्राज्यात होतें, त्यामुळें जर्मनी-सारख्या देशाची कुचंबणा झाल्यास नवल नाहीं जपानच्या लोकसंख्येसहि तेथील जमीन अपुरी पडते आणि कच्चा माल मिळवून पक्का माल परदेशात खपवणें त्यास कठीण जातें जपान, जर्मनी, इटली, इत्यादि देशात प्रत्येक चौरस मैलामागें ३५० पेक्षां ज्यास्ती लोकवस्ती आहे, तर कॅनडा, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, न्यूफौंडलंड इत्यादि ब्रिटिश वसाहतींत हें प्रमाण २० इतकें देखील पडत नाहीं. ऑस्ट्रेलियात तर दर चौरस मैलामध्यें सरासरीनें फक्त २३ लोकांची वसति असल्याचें आढळतें त्या सबंद देशातील लोकसंख्येपेक्षा एकट्या लंडन शहराची वस्ती २० लाखानीं जास्त आहे! वसाहती मिळविण्यासाठीं धडपडणाऱ्या व युद्धाची जय्यत तयारी करणाऱ्या राष्ट्रांचे परस्पर स्पर्धेतून व आक्रमणातून ब्रिटिश साम्राज्याचा बचाव करणें ग्रेट ब्रिटनला अत्यंत अवश्यक आहे. जपान, इटली, इत्यादि देशात लोकसंख्या वाढत आहे, ह्या उलट ब्रिटिश वसाहतींमध्यें जननाचें प्रमाण घटत आहे अशा ह्या धोक्याचे परिस्थितीमध्यें आपलें साम्राज्य कायम टिक-विण्यावरच ग्रेट ब्रिटनचें जीवन आणि सामर्थ्य अवलंबून आहे

## रौटन कमिटीच्या शिफारसी

अलीकडे मोटार लॉऱ्यांची व बसेसची वहातुक मोठ्या प्रमाणावर होत असल्याकारणानें, त्यामुळें होणाऱ्या अपघातास आळा बसवि-ण्याकरितां कांहीं उपाययोजना अमलात आणणें जरूर झालें आहे ह्या संबंधात चौकशी करून शिफारसी करण्याकरिता हिंदुस्थान सरकारनें नोव्हेंबर, १९३६ मध्यें मि. रौटन, आय सी एस, ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे मोटारगाड्या चांगल्या स्थितींत रहाव्या, रस्त्यात होणाऱ्या अपघाताबद्दल गाड्यातील उतारू व रस्त्यानें जाणारे लोक ह्यास नुकसानभरपाई मिळण्याची व्यवस्था व्हावी, इत्यादि प्रश्नावर चौकशी कमिटीनें मतें मागवून व साक्षी घेऊन आपलें काम समाधानकारक रीतीनें पार पाडलें आहे हिंदुस्थानात मोटारींच्या प्राणघातक अपघाताचें प्रमाण १० हजार गाड्यास ९३ इतकें भारी पडत असल्याचें कमिटीस आढळून आलें इतर कोणत्याहि देशात मोटारींखाली इतके बळी पडत नाहींत मोटा-रीमुळें होणाऱ्या लहानसहान अपघाताची संख्याहि हिंदुस्थानात मोठी आहे अपघातामध्यें सापडलेल्या लोकांस नुकसानभर-पाई फारच क्वचित् मिळते, कारण भाड्याच्या गाड्यांत विमा उतरलेल्या वाहनाची संख्या सहात एक एवढीच आढळते. लॉऱ्यामधील उतारू व पादचारी जनता ह्याच्या सुरक्षिततेसाठीं अपघातामधील दुखापतीचा व मृत्यूचा विमा उतरविण्यास मोटार-वाल्यावर सक्ती करणें अवश्यक आहे, असें कमिटीचें ठाम मत आहे सध्या नुकसानभरपाईची निश्चित अशी कांहींच तरतूद नाहीं

## सक्तीचा विमा—सहकाराचा अवलंब

आपल्या गाडीचा विमा उतरविण्यास प्रत्येक बसवाल्यास सालिना १५० ते १७५ रु. खर्च येईल, परंतु जनतेच्या हिताचे दृष्टीनें तो अवश्यकच आहे, ह्यात संशय नाहीं. विम्याची सक्ती केल्यानंतर, विमा कंपनीस आपल्या एजंटास पूर्वीइतकें कमि-शन द्यावें लागणार नाहीं व त्या मानानें विम्याच्या हप्त्यात बचत होऊं शकेल, अशी कमिटीची अपेक्षा आहे केवळ विम्यामुळें अपघाताचें प्रमाण कमी होईल, असें मुळींच नाहीं मोटारींतील उतारूंची संख्या मर्यादित राखली पाहिजे व निष्काळजी मोटार-हाक्यास कडक शासन करण्यात आलें पाहिजे, ह्याची कमिटीस जाणीव आहे विम्याची व्यवस्था लॉरीवाल्याच्या संघानीं सहकारी तत्त्वावर केली असतां ती सोईची व स्वस्त पडते, असा अनुभव रत्नागिरी मोटार असोसिएशनला आलेला आहे, व त्याबाबत कमिटीनें अनुकूल अभिप्राय व्यक्त केला आहे सहकारी विम्याचा इतर ठिकाणींहि प्रसार व्हावा, ह्या दृष्टीनें कमिटीनें उपयुक्त सूचना केल्या आहेत एका मालकाची एकच लॉरी, अशी परि-स्थिति आज कित्येक ठिकाणीं आढळते. ह्या लॉरीवाल्याची एक-मेकाशीं तीव्र स्पर्धा चालते व त्यामुळें अपघाताची संख्या वाढते. हा धोका कमी व्हावा, ह्याकरिता मोटारवाल्यांचें पद्धतशीर संघटण होणें आवश्यक आहे. शिस्त व पद्धतशीरपणा ह्याचा अवलंब केल्यास त्यात मोटारवाल्याचा फायदा आहे, हें त्यानीं ओळखलें पाहिजे. रौटन कमिटीनें अशा प्रकारच्या व्यवस्थेवर भर दिला, हें योग्यच आहे एकंदरीनें पाहता, कमिटीच्या शिफारसी अपेक्षित स्वरू-पाच्या आहेत तिनें केलेल्या सूचनातील विम्याबाबतची शिफा-रस सर्वांत महत्त्वाची आहे विम्याच्या अंमलबजावणींत कांहीं अडचणी उपस्थित होण्याचा संभव असला तरी त्या दूर कर-ण्याची शिकस्त करून, लॉऱ्यामधील उतारू व पादचारी जनता ह्याच्या हिताकडे सरकार तावडतोब लक्ष पुरवील, अशी आशा आहे हिंदुस्थान सरकारनें रौटन कमिटीच्या रिपोर्टावर प्रांतिक सरकाराचे अभिप्राय मागवले आहेत

## मध्यप्रांतांतली सहकारी चळवळ

सहकारी संघटनाचे सुपरिणाम अनुभवास येण्यास सामान्य आर्थिक परिस्थितींत सुधारणा होणें अगत्याचें आहे, जोंपर्यंत शेतकऱ्याचीं पिकें चांगलीं येत नाहींत आणि त्याच्या किंमती चढत नाहींत तोंपर्यंत सहकारी संस्थानीं केलेले सुधारणेचे प्रयत्न अपेक्षेप्रमाणें फलद्रूप होऊं शकत नाहींत, हा सिद्धांत, मध्यभाग व वऱ्हाड प्रांतातील सहकारी खात्याच्या अहवालात नमूद केला आहे तिकडे लक्ष्य देणें अवश्यक आहे पतपेढ्याच्या थकलेल्या कर्जाच्या बाक्या इतक्या वाढल्या आहेत कीं शेतकऱ्यास चालू खर्चास लागणारा पैसा मिळणें कठीण झालें आहे. मध्यप्रांत व वऱ्हाड येथें गेलीं कित्येक वर्षे कर्जबाजारीपणामुळें पतपेढ्या बंद करणें आणि नवीन पेढ्या न काढणें असलें दुहेरी धोरण अवलंबावें लागलें होतें ही कोंडी आता फुटली असून ह्या दोन्ही बाबतींत सुधारणा झाली अस-ल्याचें अहवालात निदर्शनास येतें नवीन सहकारी संस्था स्थापन करताना मागच्या चुका होणार नाहींत अशी खबरदारी घेण्यात यावी अशी सूचनाहि त्यात केली आहे, तिची अंमलबजावणी कर्ज देणें व वसूल करणें ह्याचे बाबतींत काळजीनें होणें अग-त्याचें आहे खेडेगावातील पतपेढ्याच्या लोकांत शिक्षण नस-ल्यानें त्यास बँकावर सर्वस्वी अवलंबून रहावें लागतें आणि आपल्या संस्थेचा कारभार डोळसपणानें करता येत नाहीं ह्या सर्वसामान्य वैगुण्याचा उल्लेख अहवालात आहे आणि हिंदुस्थान सरकारनें दिलेल्या ग्रँटमधून शिक्षणावर पैसा खर्चला जात आहे त्याचा योग्य उपयोग होईल अशी आशा प्रदर्शित केली आहे शिक्षण, संघटन व व्यावहारिकपणा हे गुण सहकारी संस्थाच्या यशास अत्यावश्यक आहेत आणि त्याची जोपासना सतत होईल तरच ह्या चळवळींत प्रगति होण्याची आशा आहे

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें

### दि ब लिमये यांची डायरेक्टर बोर्डावर नेमणूक

संचालक मंडळानें मशिनरीची मागणी केली असून त्याप्रमाणें करारपत्र मशिनरी कंपनीकडून लिहून घेतलें आहे प्रथम पाच हजार टन साखर तयार करितां यावी व नंतर सात हजार टनांपर्यंत साखर कारखाना वाढवितां यावा अशा धोरणानें मशिनरी विकत घेतली आहे जमिनी व पाणी याची तीस वर्षेपर्यंत निश्चित तजवीज झाली असल्यामुळें, प्रथम तीस वर्षपर्यंत व तीस वर्षानंतर सरकार,जमीनमालक व सिंडिकेट यांना हल्लींच्या शर्तींत कांहीं योग्य फेरफार करावा असें वाटल्यास त्याप्रमाणें पुनः तीस वर्षेपर्यंत सिंडिकेटच्या साखर कारखान्याला हंगामशीर स्वतःचा उत्तम ऊस मिळूं शकेल. सिंडिकेटचा स्वत.चा ऊस असल्यामुळें किंमती वाढण्याची भीति सिंडिकेटला नाहीं.उलट थोडक्या खर्चांत भरपूर व चांगलें पीक आणतां येण्याचा प्रयत्न करतां येईल. हिंदुस्थानांतील १५० साखर कारखान्यापैकीं महाराष्ट्रीय संचालक मंडळाच्या खास देखरेखीखालीं चालविलेला हा एकच कारखाना ब्रिटिश हद्दींत आहे. शेअर घेऊन हा कारखाना यशस्वी करण्याची जबाबदारी महाराष्ट्रीय जनतेवर आहे इंपीरियल बँक, बँक ऑफ इंडिया, पुना सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक, दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड व दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड व वरील बँकांच्या शाखा यांचेकडे सिंडिकेटचे शेअर फॉर्म मिळतील. दे भ तात्यासाहेब केळकर यांनीं प्रकृतिस्वास्थ्याकरितां सिंडिकेटच्या डायरेक्टरच्या जागेचा राजीनामा दिल्याचें केसरींत जाहीर झालें आहे त्याच्या जागीं दिवाणबहादूर लिमये, सोलापूर, यांची सिंडिकेटच्या डायरेक्टच्या जागीं बोर्डानें नेमणूक केली आहे

चिं ना वर्तक,
अध्यक्ष

---

### बंगाल प्रांतामधील प्राथमिक शिक्षणाचा प्रसार

बंगाल प्रांतामध्यें सुमारें एक लक्ष खेडीं आहेत, त्यापैकीं ७० हजार खेड्यांत एकहि शाळा नाहीं एकूण शाळा ६४ हजार असून, शिक्षकांची संख्या ८८ हजार आहे

---

### मुंबई इलाख्याचें पहिल्या सहामाहीचें अंदाजपत्रक

१ एप्रिल १९३७ ते ३० सप्टेंबर १९३७ अखेर प्रांतिक सरकारांनीं करावयाच्या खर्चास कायदेमंडळाच्या संमतीची जरूरी नाहीं, गव्हर्नरांच्या अधिकारांतील ती गोष्ट आहे. ५ कोटि ९२ लक्ष रुपयाच्या खर्चाचें पहिल्या सहामाहीचें बजेट मुंबईच्या गव्हर्नरांनीं तयार केलें आहे

*For All Medicinal Requisites*

— TRY —

**N. MAHADEV & Co.**

**DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS**

City Post Office Corner, POONA 2

## Notice to Contractors

Sealed Percentage Rate Tenders are invited separately for :—

(1) Making Improvements to Shirpur Raver Road—Miles 22 to 30, costing Rs 48,009/–appro

(2) Making Improvements to Shirpur Raver Road—Miles 31 to 39, costing Rs 47,285/–appro.

(3) Making Improvements to Shirpur Raver Road—Miles 68 to 71, costing Rs 42,536/–appro

(4) Making Improvements to Shirpur Raver Road—Miles 78 to 83, costing Rs 29,778/–appro

The date of receiving Tenders will be 23-4-37, 2 P M. Tenders Forms will be issued by the Office of the Excecutive Engineer, Khandesh Division on working days on payment of Rs. 3/– for each Form upto 4 P.M on 27-4 37

For details apply to the Undersigned

8-4 37

S K KARANDIKAR,
Executive Engineer,
Khandesh Division.

---

## L. S. G. D. Classes

The next session of the Local Self Government Institute's Training Classes will begin from 20th April, 1937 at Poona, Bombay and Ahmedabad. Apply for Prospectus to :

**( For Poona Centre )**

Sd/–B. M. GUPTE, M. A, LL B., Hon Secretary & Treasurer, Maharashtra Branch, 410 Shanwar, Poona

**( For Other Centres )**

The Superintendent, Local Self Govt Institute, 11, Elphinstone Circle, Fort, Bombay

---

## Fergusson College, Poona

A Supplementary F Y Examination will be held for ex-students of this college about 1st June 1937 Students must register their names for this examination before 22nd May 1937 on paying the necessary fees Any students who fail to obtain the F Y certificate at this examination will have to keep terms again.

9th April 1937

PRINCIPAL

---

**पुणें औद्योगिक प्रदर्शन**

ता १८-४-३७ अखेर चालू ठेवण्याचें ठरलें आहे

### संरक्षक धोरणाचा सुपरिणाम

हिंदी उद्योगधंद्यांस संरक्षण देण्याचें धोरण हिंदुस्थान सरकारनें १२ वर्षांपूर्वी स्वीकारलें. ह्या संरक्षणाचा सुपरिणाम खालील आकड्यावरून दिसून येत आहे:--

| | १९२६-२७ | १९३५-३६ |
|---|---|---|
| आगपेट्या (ग्रोस पेट्या) | १ कोटि ५ लक्ष | २ कोटि ४२ लक्ष |
| कागद (टन) | २८,००० | ४८,००० |
| कपास-कापड (लक्ष वार) | १९५ | ३५८ |
| हातमागावरील कापड (लक्ष वार) | १६६ | १६६ |
| साखर (लक्ष टन) | ३½ | ११½ |
| गूळ (लक्ष टन) | ३५ | ६७ |
| पोलाद (लक्ष टन) | ३½ | ६½ |

वरील तुलनात्मक आकड्यावरून संरक्षक धोरणाच्या प्रभावीपणाची कल्पना येईल हिंदुस्थान सरकारची ह्याबाबतची आस्था कमी झाली आहे, अशी श्री सैतान ह्याची तक्रार आहे.

---

### दि नागपूर प्रीमियर को हौऊसिंग सोसायटी लि

३१ मार्च १९३७ अखेरचा ताळेबंद

| | देणें रु | | येणें रु. |
|---|---|---|---|
| भाग भाडवल | ८०,६०० | फर्निचर व सामान | ९९१ |
| गंगाजळी व इतर रिझर्व्हज | ३,६८२ | कर्जें | २,६८,९९० |
| कायम ठेवी | १,६३,०५६ | सरकारी रोखे (रिझर्व्ह फंडाचे) | २,७८७ |
| सी पी अँड बरार प्रॉ को बँक नागपूरचें कर्ज व कॅश क्रेडिट | ६६,४६५ | अधिकृत गुंतलेल्या इतर रकमा | ४१,४९४ |
| सभासदाच्या सेव्हिंग्ज ठेवी | ५,०१९ | व्याज | २,३३२ |
| इतर बाबी | २७६ | इतर बाबी | १,२३० |
| व्याज | ५८९ | शिलक, रोखे व प्रातिक बँकेंत | १,८७९ |
| वर्ष अखेरच्या नफ्यापैकीं शिलक | १६ | | |
| | ३,१९,७०३ | | ३,१९,७०३ |

---

### विद्यार्थ्यांकरितां सहकारी चळवळीवर व्याख्यान

ता ७ ४-३७ रोजीं लोणावळा येथें लोणावळा हायस्कूलमध्यें 'सहकारी चळवळ व त्याबाबत विद्यार्थीवर्गाचें कर्तव्य' ह्या विषयावर पुणें जिल्हा को इन्स्टिट्यूटचे प्रॉपगंडा ऑफिसर, श्री. ए के. इंगळे, यांचें व्याख्यान झालें व्याख्यानास विद्यार्थी वर्ग व शिक्षक वर्ग मिळून सुमारें १०० मंडळी हजर होती

---

### पू खा. जिल्हा को इन्स्टिट्यूट

पूर्व खानदेश सहकारी इन्स्टिट्यूटतर्फें सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देण्याकरिता एक वर्ग जळगाव येथें ता. ७-५-३७ ते २४-५-३७ पर्यंत भरविण्याचें ठरलें आहे. वर्गाची फी (जेवणाची व राहाण्याची व्यवस्था धरून) १० रु आहे व ती २०-४-३७ चे आंत भरली पाहिजे सहकारी परीक्षा ता २३-५-३७ ते ३०-५ ३७ पर्यंत घेण्यात येतील परीक्षेस बसूं इच्छिणारांनीं इन्स्टिट्यूटच्या कचेरीकडे पत्रव्यवहार करावा.

---

### प्रो काळे ह्यांचीं उज्जनी येथें व्याख्यानें

उज्जनी येथें माधव कॉलेजमध्यें एक मराठींत व दुसरें इंग्रजींत अशीं दोन व्याख्यानें प्रो. काळे ह्यांनीं दिलीं.

---



दी रेडिओ इलेक्ट्रिक स्टोअर्स
रिप्रेझेंटेड बाय--एम. जी. साठे
रे-मार्केटनजीक, ८० शुक्रवार, पुणें.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

मुंबई सरकारचे सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेला
डॉ. काळे यांचें पूना लेप्रसी क्लिनिक
म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चमविकारावरील उपचाराचें विश्वसनीय ठिकाण
ठिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

फाळणी दरसाल हल्ल नये म्हणून आमचें इच्छा गर्भ संभव औषध घ्या व संततिनियमन करा
औषध बंद केलें कीं, मुलें होतात महिन्यांतून एकदांच घ्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट ख नि
गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी

## गिऱ्हाइकावरील ' धर्मादाय ' पट्टी

( ले श्री भाऊ गंगाधर साठे, कॉन्ट्रॅक्टर, पुणें )

वस्तूची किंमत ठरविल्यानतर सदरहु किंमतीमध्यें धर्मादाय म्हणून काहीं आकारणीची वाढ करण्याचा व्यापारी संप्रदाय आहे एकादें गिऱ्हाइक नाखूष झाल्यास त्यास धार्मिक बाबींचें महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला जातो साधारणपणें कोणतेंच गिऱ्हाइक ही पट्टी खुषीनें देत नाहीं. योग्य दरावर चढलेला पै, पैसा मोठ्या नाइलाजानें, आपले सबंध सलोख्याचे टिकावे, म्हणून देणें त्यास भाग पडतें अशा प्रकारची आकारणी केव्हांपासून चालत आलेली आहे, हें निश्चित सागता येत नाहीं परतु या फंडाची रकम, ती साठवली गेली असल्यास, बरीच मोठी फुगलेली आढळून येईल धर्मादायाची गिऱ्हाइकावर बळजबरी करणें कितपत न्यायाचें व शिष्टाचारास धरून आहे, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे

धर्मादाय म्हणून जमा झालेल्या पैशाचा विनियोग कसा करण्यात येतो, ह्यासबधींची माहिती कोठेंहि वाचनात नाहीं धर्मादाय घेण्याची स्थानिक पद्धत आहे, असें मात्र व्यापारी सागतात विशिष्ट पेठेंतील व्यापाऱ्याच्या समितीचा दडक ग्राहकावर का लादण्यांत यावा ? व्यापारी क्षेत्रात अनेक धर्मांचे व पथाचे लोक असतात, आणि गिऱ्हाइकहि असेंच समिश्र असतें व्यापारी व ग्राहक हे भिन्न धर्मीय असल्यास, व्यापाऱ्यान वसूल केलेल्या धर्मादाय रकमेचा विनियोग ग्राहकाचे धर्मभावनास अनुसरूनच होईल, अशी मुळीच खात्री देता येत नाहीं मग सदरहु ग्राहकास पुण्य कसें लाभणार ? प्रत्येक मनुष्य आपल्या धार्मिक रीतिरिवाजाप्रमाणें धर्मादाय करीत असतोच. व्यवहारामध्यें विश्वधर्म म्हणून काही वेगळा पहावयाचा असतो काय ? विजातीयाचे हातीं धर्मादायाकरितां रकम देण्यास ग्राहकास भाग पाडणें, हें योग्य दिसत नाहीं परधर्मीयाकडून गोळा करण्यात येणारा पैसा एखाद्या विशिष्ट धर्मातील लोकाच्या जमातीकडे धार्मिक कार्याकरिता का सोपविण्यात यावा ? ह्या प्रश्नासबधातील खालील गोष्टींचा विचार करणें आवश्यक आहे

( १ ) हा पैसा कोणत्या व्यवहारात व कोणी घ्यावा हें निश्चित केलें पाहिजे

( २ ) भिन्नपथीय लोकावर त्यांची सक्ती केली जाऊ नये

( ३ ) ही रूढि मोडणें जरूर आहे. परंतु तें अशक्य ठरल्यास, जमलेल्या रकमेचा विनियोग योग्य होईल अशी व्यवस्था करणें इष्ट आहे

( ४ ) रोज जमा होणारा हा पैसा आजवर किती साठला आहे, ह्याचा आढावा घेतला पाहिजे

( ५ ) ह्या रकमेचा विनियोग मंदीचे काळात हलक्या व्याजानें कर्जें देण्याकडे करता येण्याजोगा आहे शेतकऱ्यांचें कर्जनिवारण, दुष्काळनिवारण, इत्यादि प्रीत्यर्थहि त्यातून मदत देतां येईल

धर्मादाय रकमेच्या वसुलीसबधीं व तिच्या विनियोगासबधीं सुचलेले विचार वर माडले आहेत धर्मादायाची पद्धत कायद्यानें अजिबात बद करणें श्रेयस्कर व इष्ट ठरेल का नाहीं हा प्रश्नहि विचार करण्याजोगा आहे ह्या विषयास चालना मिळण्यास वरील हकीकत कारणीभूत होईल, अशी आशा आहे

### जगांत दरवर्षी किती मोटारगाड्या तयार होतात

सर्व प्रकारच्या मिळून मोटारगाड्यांचें जगातलें उत्पादन १९२९ सालीं ६२ लक्ष, ८३ हजार गाड्या इतकें होतें चालू सालचें उत्पादन ह्यावरहि ताण करील असा रग दिसत आहे १९३६ मध्यें मोटारगाड्यांचें जागतिक उत्पादन ५८ लक्ष गाड्या इतकें झालें


—आदर्श विमा कंपनी—

वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कं. लि. सातारा

या संस्थेचें

सातवें मूल्यमापन प्रसिद्ध झालें.

मजबुतीची पराकाष्ठा ! नमुनेदार काटकसर !

सुप्रसिद्ध विमागणिती श्री. ग स मराठे म्हणतात,

" विमा कंपन्यात एक आदर्श सस्था होऊन राहण्यासारखी आपण जी सेवा चालविली आहे तिचें महत्त्व या मूल्यमापनामुळें यापुढें लोकाच्या नजरेंत जास्त जास्त भरत जाईल " -

जास्तींत जास्त बोनस त्रैवार्षिक दर हजारी

हयातीनंतरचे ७५ रु. व हयातींतील ६० रु

याच स्वदेशी कपनींत विमा उतरा.

मॅनेजर



एशियन पॉलिसी

ASIAN ASSURANCE CO. LD.

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## हिंदी व्यापारी संस्थांच्या मध्यवर्ती सभाची वार्षिक बैठक

### सरकारास सूचना व शिफारसी

[ हिंदुस्थानातील व्यापारी संस्थांच्या मध्यवर्ती संस्थेचें ( फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्री ) वार्षिक अधिवेशन दिल्ली येथें गेल्या आठवड्यात भरलें होतें त्यावेळीं, तिचे अध्यक्ष श्री. डी पी खैतान, ह्यांनीं केलेल्या भाषणाचा साराश व बैठकींत मजूर झालेल्या ठरावाची रूपरेषा येथें देण्यात येत आहे ]

### अध्यक्ष, श्री खैतान, ह्यांचें भाषण

"गेल्या वर्षीं व्याजाचे दर हलके राहिले व उद्योगधंद्यांचीहि वाढ झाली परंतु, देशी धंद्यास यावयाच्या संरक्षणाबाबत सरकारचें धोरण असमाधानकारक होऊं लागल्याविषयींची शंका व्यापारी वर्गास येऊं लागली आहे रेल्वे चौकशी कमिटीवर व रेल्वे बोर्डावर एकहि हिन्दी मनुष्य नेमण्यात आला नाहीं आणि दोन रेल्वे कंपन्यांच्या कराराची मुदत लाबविण्यात आली, ह्या गोष्टी मध्यवर्ती कायदे मडळाच्या शिफारशींस धरून नाहींत. हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसाच्या बजेटावरील भाषणात आयात व्यापार घटत असल्याबद्दल काळजी व्यक्त करण्यात आली आहे देशी साखरेच्या धंद्याचे वाढीबद्दल समाधान वाटण्याऐवजी साखरेची आयात कमी झाल्यानें जकातीचें उत्पन्न बुडालें, ह्याबद्दल फडनवीसास विषाद वाटत आहे बजेटाची तोंडमिळवणी करून केवळ हिंदी आर्थिक परिस्थिति सुधारणार नाहीं, आयातींत घट होणें हा हिंदी उद्योगधंद्याच्या वाढीचा स्वाभाविक परिणाम आहे, हें त्यांनीं लक्षात ठेवलें पाहिजे

हिंदुस्थानचें जागतिक व्यापारी क्षेत्रातील स्थान डळमळीत आहे सध्या निर्गत व्यापारात सुधारणा झालेली दिसते, ती युरोपातील युद्धविषयक पूर्वतयारीमुळेंच केवळ होय इतर देश एकमकाशीं व्यापारविषयक करार करण्याच्या खटपटींत असताना, हिंदुस्थान सरकार त्याबबत विशेष आस्था दाखवीत नाहीं चलन व हुडणावळ ह्या सबधातील आपलें धोरण बदलण्यासहि सरकार तयार नाहीं तें बदलल्याखेरीज व खर्चांत काटकसर केल्याखेरीज आर्थिक प्रगति होणें कठीण आहे शेतीस प्राधान्य देऊन उद्योगधद्याकडे दुर्लक्ष केलें जात आहे, हें योग्य नाहीं दोन्हींची वाढ एकसारखी झाली पाहिजे ब्रिटिश साम्राज्यातील इतर देशानीं औद्योगिक उन्नतीकडे लक्ष पुरविलें आहे व ते देश जरूर त्या योजना आखण्यास व पार पाडण्यास समर्थ आहेत. हिंदुस्थानानें त्याचा कित्ता गिरविला पाहिजे सरक्षक जकाती, वहातुकीचे हलके दर, स्वस्त भाडवलाचा पुरवठा, इत्यादि मार्गांनीं उद्योगधंद्यास सहाय करता येण्याजोगें आहे गेलीं दहा वर्षें अमलात असलेलें सरक्षक धोरण यशस्वी झालेलें असून, त्यामुळें उद्योगधंद्याच्या झालेल्या वाढीनें हिंदुस्थानाचा दरसाल १०० कोटींचा फायदा होत आहे उद्योगधंद्याच्या प्रगतीमुळें जकातीचें उत्पन्न घटलें असलें तरी इतर मार्गांनें, एकदरीनें पहाता, फायदाच होत आहे, हें कोणीहि कबूल करील

नव्या राज्यघटनेंतील प्रांतिक व मध्यवर्ती (फेडरल) सरकारास आपल्या योजना पार पाडण्यास जास्त ज्यास्त रकमाची जरूरी भासत जाणार हें उघड आहे सध्याच्या हलाखीच्या परिस्थितींत लोकावर अधिक कर लादणें अशक्य आहे. देशातील सपत्तीमध्यें वाढ झाल्याखेरीज प्रगति होणें शक्य नाहीं शेतकऱ्याच्या परिस्थितींत सुधारणा, मध्यम वर्गातील बेकारीचें निवारण, इत्यादि गोष्टींकडे सरकारनें तावडतोब लक्ष पुरविलें पाहिजे, व दूरदृष्टीनें त्याबाबत धोरण आखलें पाहिजे "

### अधिवेशनांत मंजूर झालेले ठराव

( १ ) प्राप्तीवरील कराबाबत चौकशी करण्याकरिता नेमलेल्या कमिटीनें केवळ उत्पन्न वाढविण्याकडेच ज्यास्त लक्ष दिलें. कमिटीच्या ह्या संबधातील शिफारसी अमलात आणण्यापूर्वीं इनकम टॅक्स खात्याच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्यांत यावी गेल्या फेब्रुवारींत इनकम टॅक्स दुरुस्तीचें बिल पास करून घेण्यात सरकारनें निष्कारण घाई केली ( २ ) झाजीबारमधील हिंदी रहिवाशाच्या हितसबधाचें सरक्षण करण्याकरिता सरकारनें पराकाष्ठा करावी ( ३ ) ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यामध्यें नवीन व्यापारी करार करतेवेळीं सरकारनें खालील गोष्टी ध्यानात बाळगाव्या'—हिंदुस्थानचा निर्गत व्यापार वाढावा, इतर देशाशीं व्यापारी करार करण्यास हिंदुस्थानास मुभा असावी, हिंदी व्यापारविषयक धोरण आखण्यास कोणत्याहि तऱ्हेची अडचण येईल अशा अटी मान्य करण्यात येऊं नयेत, ब्रिटिश कपास-कापडास सध्यापेक्षा जास्त प्राधान्य कोणत्याहि स्वरूपात मिळू नये, ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी माळाचा जास्त खप व्हावा, इ (४) सरकारनें वेजवुड कमिटीवर एकाहि हिंदी नागरिकाची नेमणूक केली नाहीं, व कायदेमडळाच्या ठरावास व आपल्या स्वत च्या १९२३ सालीं स्वीकारलेल्या धोरणास बाजूस सारून दोन रेल्वे कंपन्याच्या कराराची मुदत वाढविली, ह्याबद्दल असमाधान (५) युरोपांतील, विशेषत जर्मनीमधील, बाजारातून हिंदी व्यापाराची पीछेहाट होत आहे ह्याबद्दल काळजी. सरकारनें परिस्थितीचा अभ्यास करून तेथील देशाशीं करार करावेत, अशी शिफारस. (६) हुड्यावरील स्टॅंप ड्यूटी कमी करण्याची सरकारास सूचना ( ७ ) सबंद देशात एकजात वजनें-मापें असणें इष्ट आहे, त्याबाबत सरकारास कायदा करण्याची विनति ( ८ ) हिंदी आगबोटींच्या धंद्याची वाढ होईल, असें धोरण आखण्याची सरकारास शिफारस. (९) साखरेच्या धंद्यानें केलेल्या प्रगतीबद्दल समाधान व सरकारच्या ह्या धंद्याविषयींच्या धोरणाबद्दल नापसती (१०) महत्त्वाच्या धंद्याच्या वाढीस सहाय व्हावें ह्याकरिता शास्त्रीय सशोधनाची अवश्यकता (११) रेल्वेच्या भाड्याचे दरात वाढ करण्यात आली आहे, त्यासबधीं असमाधान, इ०

उन्हाळ्याकरितां सिल्क कोट वापरा
महिंदकर बदर्स यांचेकडे तयार अगर करून मिळतील.
बंबाचे माडीवर ] बुधवार चौक, पुणें.

## एक्सचेंज बॅंकांच्या कामांत वाढ

हिंदुस्थान व आशिया खंडातील इतर देश ह्यामध्यें काम करणाऱ्या ब्रिटिश एक्सचेंज बॅंकाना गेलें वर्ष समाधानकारक गेलें असल्याचें, सदरहु बॅंकापैकीं काहीं बॅंकाच्या ३१ डिसेंबर, १९३६ अखेरच्या हिशेबावरून दिसून येतें व्यापारांत थोडी वाढ झाल्या-कारणानें, बॅंकास काम जास्त मिळालें व त्याचा नफ्यावरहि अनुकूल परिणाम झाला चार्टर्ड बॅंक, ईस्टर्न बॅंक, मर्कंटाइल बॅंक व नॅशनल बॅंक ह्या चार बॅंकिंग संस्थाच्या जिंदगींत गेल्या वर्षीं १०½ कोटींची भर पडली व त्याची एकूण मालमत्ता १९३६अखेर सुमारें १७० कोटि रुपये झाली मंदी कमी होऊन व्यापार वाढत जाईल त्या मानानें बॅंका कर्जें सढळ हातानें देऊं लागतील व त्यानीं रोख्यात गुतविलेल्या रकमाचें प्रमाण कमी होईल वरील बॅंकांस १९३६ सालीं झालेला नफा व त्यानीं वाटलेलें डिव्हिडंड ह्याची माहिती पुढील कोष्टकावरून मिळेल —

| बॅंक | निवळ नफा लक्ष रु. | वाटलेलें डिव्हिडंड % |
| --- | --- | --- |
| चार्टर्ड बॅंक ऑफ इंडिया | ६० | १५८ |
| ईस्टर्न बॅंक | १७ | ७ |
| मर्कंटाईल बॅंक | २२ | १२ |
| नॅशनल बॅंक | ५३ | १८ |

हिंदुस्थानात व्यवहार करणाऱ्या एक्सचेंज बॅंकाची संख्या सुमारें १८ आहे परंतु त्या सर्व पाश्चात्याच्या मालकीच्या व त्याच्या हुकमतीखाली काम करणाऱ्या आहेत परराष्ट्रीय व्यापा-रास पैसा पुरविणें हा त्याचा मुख्य व्यवहार होय सेंट्रल बॅंक ऑफ इंडियाचा पुरस्कारानें एक्सचेंज बॅंकिंगच्या क्षेत्रात आता हिंदी पाऊल पडलें आहे पहिली हिंदी एक्सचेंज बॅंक लंडनमध्यें ऑगस्ट १९३६ मध्यें उघडण्यात आली इंपिरियल बॅंकेनेंहि पर-राष्ट्रीय व्यापारविषयक व्यवहार करण्यास सुरवात केली आहे.

## प्राप्तीवरील कराबाबत एक निवाडा

### संयुक्त हिंदू कुटुंबांतील विधवेची पोटगी

| बंधु | श्री. लालजी | बंधु |
| --- | --- | --- |
| (मयत) | (मयत) | कल्याणजी (हयात) |
| नामाबाई (पत्नी, हयात) | | मुलगा (हयात) |


श्री लालजी व त्याचे दोघे बंधू मिळून वरील हिंदू एकत्र कुटुंबापैकीं कल्याणजी, त्याचा मुलगा व नामाबाई अशीं तिघें हयात आहेत. नामाबाई ह्या विधवेस १६५ रु. दरमहा पोटगी मिळत आहे ह्या तिघाच्या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नामधून ही पोटगीची रकम प्राप्तीवरील कर आकारणीचे वेळीं वजा करावी किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित झाला संयुक्त कुटुंबातील विधवा ह्या दृष्टीनेंच नामाबाईस पोटगी मिळत असल्यानें तिच्या पोटगीची रकम कराचे आकारणीच्या रकमेंतून वजा घालता येत नाहीं, असा मुंबई हायकोर्टानें निकाल दिला

## मोटारगाड्यांच्या उत्पादनात अमेरिकेचा पहिला नंबर

मोटारगाड्याच्या वार्षिक उत्पादनात अमेरिकेचा पहिला नंबर आहे १९३६ मध्यें अमेरिकेनें ४४ लक्ष ५५ हजार नव्या मोटार गाड्या बनवल्या. ग्रेट ब्रिटनचा नंबर दुसरा आहे पण ब्रिटिश उत्पादन फक्त ४ लक्ष, ७५ हजार गाड्या एवढेंच गेल्या सालीं झालें.

मुंबई सरकारनें प्रथम मान्य केलेले, कोल्हापूर सरकारचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग अॅन्ड कटिंग
माहिती मागवा ] व [ नांवें नोंदवा
४९७ बुधवार पुणें सिटी

फोल्डिंग व बॉक्स कॅमेरा



सामर्थ्यवान लेन्स बसविलेला ह्या कॅमेऱ्यानें नवशिक्यास सुद्धा फिल्मवर उत्कृष्ट फोटो घेतां येतात बेकार रोज ५ रु मिळवू शकतात फिल्म कार्ड, फ्रेम, रसायनें, कॅमेरा कसा वापरावा हें सांगणारें पुस्तक मोफत
फोल्डिंग कॅमेरा, रु ४. बॉक्स कॅमेरा न. २, रु २-१२. न १ रु ३-१२ पॅकिंग व पोस्टेज वेगळें
Dutt & Co (12)
15/,-Jay Mitra Street,
P O. HATKHOLA (Calcutta)

CONFIDENCE
is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you
NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
(ESTD 1907)
*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
*Offices* throughout India & the East.
S. C MAJUMDAR, MANAGER Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ९८-१५ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०५—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—४ |
| ४% १९४३ .. ... ... | १०६-१२ |
| ३½% बिनमुदत ... ... | ९३—० |
| ३½% १९४७–५० .. .. | १०५—० |
| २¾% १९४८–५२ ... .. | ९९—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) .. ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३१—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) | ३४—६ |
| इंपीरिअल बँक (५०० रु , १२% डिव्हि. ) | १५१५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु ४ आ. ) | ९१०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉम्बे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु डिव्हि १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९% ) | २७३-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १४९२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु प्रेफरन्स, १७ रु.८ आ ) | १७९— ० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि रु.६) | ३३७—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु ७ आ ८ ) | १६८०—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३४-१२-६ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५४-१२-० |


**नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८०,६०० |
| रिझर्व्ह फंड | २,७८७ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६३,०५६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ५,०१९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९९० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४१,४९४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचें तारणावर कर्ज देते

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ — दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेव्हिंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी

कर्ज सोनें, चांदी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning Pigmy & Monthly Income Deposit Schemes"

पिक्चर–फिट कपडे मिळण्याचें एकच ठिकाण

**टेलर्स रिसबूड ब्रदर्स**

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कपन्यास कठीण असें अपूर्व यश सपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कपनी.–

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री न. चिं. केळकर, सचालक केसरी

| | | |
|---|---|---|
| हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु. |

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें


१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु ( ट स निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यास एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबाचें फाउटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च ( किंवा ) मजबूत यत्रसामुग्रीचें व पांच वर्षें गॅरटीचें एक जर्मन 'बी' टाइम पसि पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यास असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद का पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—

**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

# K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA**


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. न १३६।३ आर्यभूषण छापखान्यात रा अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद् वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २१ एप्रिल, १९३७ अंक १६

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार
## प्रॉव्हिन्शल को—ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या रौप्यमहोत्सवानिमित्त सदरहु तारखेपासून दशवार्षिक रोखे शेंकडा ७० रु. ८ आण्यांच्या दरानें विक्रीस काढले आहेत.

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु.च्या दर्शनी किंमतीचे आहेत. वरील रकम शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यांत बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर, ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम्,
मॅनेजर, दि सी. पी. अॅन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को—ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

उन्हाळ्याकरितां **ब्राह्मी तेल** हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें.
स्टॉकिस्ट: म. गो. कुळकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें.
मॅन्युफॅक्चरर: दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई नं. ४

**घरपोंच जोडी रु. ८ची**
कां, विचार कसला करितां!




तुमच्यासमोर ह्या सुप्रसिद्ध **टिकेकरी पातळांची** जाहिरात असतां उगीच दुसरीकडील पातळें मागविण्याचे मोहास पडूं नका. टिकेकरी पातळें सर्वांगसुंदर अर्थात् आपल्यास पाहिजेत तशींच आहेत.
नमुने मोफत. पोस्टेजकरितां दीड आण्याचीं तिकिटें पाठवा.
दि टिकेकर टेक्सटाईल मिल, लि.
पो. टिकेकरवाडी, सोलापूर.

## दि गुड-वुइल
## अॅशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट: मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस: कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

# विविध माहिती

### नव्या घरांची वाढती संख्या

ग्रेट ब्रिटनच्या लोकसंख्येपैकीं सुमारें १¼ कोटि लोक गेल्या २० वर्षांत नव्या घरातून रहावयास गेले महायुद्धाचे काळापासून नवीन घरें बांधण्याची मोहीम ग्रेट ब्रिटनमध्यें जारीनें चालू आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील अमेरिकन विद्यार्थी

एकूण ५८९ अमेरिकन विद्यार्थी ग्रेट ब्रिटनमधील विश्वविद्यालयात शिक्षण घेत आहेत, त्यापैकीं २१८ विद्यार्थी एकट्या लंडन युनिव्हर्सिटीचे पटावर आहेत.

### म्हैसूर संस्थानांतील रेल्वेरस्ते

म्हैसूर संस्थानातील एकूण ७३२ मैल लांबीच्या रेल्वेरस्त्यापैकीं ४६० मैल रस्ते संस्थानाचे देखरेखीखाली आहेत. बाकीच्या रेल्वे-रस्त्यांची व्यवस्था मद्रास ॲन्ड सदर्न मराठा रेल्वेकडे आहे.

### मुंबई इलाख्यांतील रेडिओ

मुंबई इलाख्यात एकूण १४,५५१ लोकाजवळ रेडिओचें लायसेन्स आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील दारूचा खप

ग्रेट ब्रिटनमध्यें, १९३६ सालीं एकूण ३२० कोटि रुपयाची दारू खपली. १९३५ च्या मानानें हा आकडा ११ कोटींनीं जास्त आहे. दुधापेक्षा एकट्या बीरचा खप जास्त आहे

### हिंदुस्थान सरकारचें जकातींचें उत्पन्न

१९३५–३६ सालीं हिंदुस्थान सरकारास जकातींपासून ५६ कोटि, ३२ लक्ष रुपये उत्पन्न झालें, म्हणजे त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें उत्पन्न २¾ कोटींनीं वाढलें. ब्रिटिशेतर देशातून आलेलें कापड, कृत्रिम रेशमी कापड, कच्ची कपास व यंत्रसामुग्री ह्याची आयात वाढली व साखरेची आयात उतरली.

### डॉक्टरीचा धंदा व खेडेगावातील जनता

डॉक्टरीची पदवी देऊन विद्यार्थ्यास वैद्यकीचा धंदा सुरू करण्याची परवानगी देण्यापूर्वी, त्यानें निदान एक वर्ष तरी खेडेगावात काम केलें पाहिजे, असा नियम जर्मनींत करण्यात येणार आहे.

### रेयॉनच्या उत्पादनात जपानची सरशी

रेयॉन ( कृत्रिम रेशीम ) कापडाचे उत्पादनामध्यें आजवर अमेरिकेचा पहिला नंबर होता, तो आता जपाननें पटकावला आहे. गेल्या वर्षी जपानमध्यें २८¾ कोटि पौंड वजनाइतकें रेयॉन तयार करण्यांत आलें, अमेरिकेमध्यें २७¾ कोटि पौंड रेयॉनचें उत्पादन झालें.

### लोकसंख्येंत वाढ करण्याकरिता इटलीची योजना

इटलीमधील जननाचें प्रमाण वाढावें, ह्याकरिता त्या देशाचें सरकार हरतऱ्हेनें प्रयत्न करीत आहे २६ वर्षाखालील वयाच्या पती–पत्नीस सरकारकडून कर्ज मिळू शकतें व त्यास होणाऱ्या मुलाचे संख्येनुरूप कर्जाचे परतफेडींत सवलत देण्यात येते. चार मुलें झाल्यास ४० टक्के सवलत मिळते !

### विमा–मंडळीचा अवाढव्य कारभार

प्रुडेन्शल विमा कंपनीस ब्रिटिश विमा मंडळयामध्यें उच्च स्थान मिळालें आहे, ह्याचें कारण तिचा अवाढव्य व चोख कारभार हें होय ह्या कंपनीची एकूण जिंदगी सुमारें ४२५ कोटि रुपये असून दर आठवड्याची आवक सव्वाकोटि रुपयाच्यावर आहे !

### प्रधानमंडळाच्या तनख्यात वाढ

ब्रिटिश प्रधानमंडळाच्या पगारात वाढ करणारें बिल सध्या पार्लमेंटपुढें आहे, त्या अन्वयें मुख्य प्रधानास सालीना १० हजार पौंड मिळावयाचे असून इतर मंत्र्यास ५ हजार पौंड मिळावयाचे आहेत. विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यास व माजी मुख्य प्रधानास २ हजार पौंड मिळावे, अशीहि योजना आहे पार्लमेंटच्या प्रत्येक सभासदास सालीना ४०० पौंड मिळतात, त्यांत वाढ व्हावी अशी मजूर पक्षाच्या सभासदांची मागणी आहे. सरकारनें सुचविलेल्या पगारवाढीमुळें ब्रिटिश तिजोरीवर वार्षिक ५ लक्ष रुपयाचा बोजा बसणार आहे

### आंब्याची निर्गत

गेल्या शनिवारच्या आगबोटीनें मुंबई बंदरातून एकूण २,१८० आंबे लंडनला रवाना झाले.

### रेडिओ–टेलिफोनच्या दरांत सवलत

हिंदुस्थानातून ग्रेट ब्रिटनमधील मनुष्याशीं टेलिफोनवर बोलणें राज्यारोहणाचे निमित्तानें मे महिन्यापुरतें स्वस्त करण्यात आलें आहे. पहिल्या तीन मिनिटात ४० रुपये व पुढें प्रत्येक मिनिटास १३ रुपये ५ आणे पडतील

### आयर्लंडमधील लोकसंख्या घटत आहे

आयर्लंडमधील लोकसंख्या सालोसाल घटत आहे. १९२९ सालापर्यंत आयरिश लोक अमेरिकेंत कायमचें वास्तव्य करण्याकरिता देश सोडून जात असत. ही निर्गत थांबल्यावर तरी आयरिश लोकसंख्येंत वाढ होईल, अशी अपेक्षा होती, परंतु आता लोक ग्रेट ब्रिटनकडे धाव घेऊं लागले आहेत. १९३५ ते ३६ मध्यें २३,७०० लोक आयर्लंडबाहेर गेले १९२६ ते १९३६ ह्या दहा वर्षांत ७८,१३० लोक ग्रेट ब्रिटनमध्यें रहावयास गेले. ही तूट भरून काढण्याइतकी जननाची संख्या नाहीं व त्यामुळें लोकसंख्या कमी होत आहे

### ग्रेट ब्रिटनचें उत्पन्न व खर्च

१९३६–३७ मध्यें ब्रिटिश सरकारनें उत्पन्नापेक्षा ७¾ कोटि रुपये जास्त खर्च केले. १,०३२¾ कोटि रुपये उत्पन्न होऊन १,०४० कोटि रुपये खर्ची पडले जुन्या कर्जाची फेड करण्याकरिता १७ कोटींची तरतूद करण्यांत आली, तिचा अंतर्भाव ह्या खर्चाचे रकमेंतच आहे हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न पुरें १०० कोटि रुपयेहि नाहीं, हें लक्षात ठेवण्यासारखें आहे. ग्रेट ब्रिटनचे मानानें हिंदुस्थानाचें क्षेत्रफळ २० पट व लोकसंख्या ७ पट आहे.

### आस्ट्रेलियाचे मुख्य प्रधान मि. फॉर्गन स्मिथ

महायुद्धाच्या आधी कांहीं वर्षें सुतारीचा धंदा चालविण्याकरितां स्कॉटलंडमधून ऑस्ट्रेलियास गेलेला कामगार उसाच्या लागवडीचे धंद्यांत पुढें आला व आज तो ऑस्ट्रेलियाचा प्रमुख पुढारी बनला आहे. त्याचे नेतृत्त्वाखाली मजूर पक्ष सत्तारूढ आहे. ऑस्ट्रेलियन सरकार स्वतः लॉटऱ्या चालवून पैसे मिळवितें, ते लोककल्याणाच्या कामाकरितां खर्चण्यांत येतात.

### मुंबई इलाख्यातील सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| ४–४–३७ ते १०–४–३७ | ७९,११,०९० |
| ११–४–३७ ते १७–४–३७ | ४९,९८,७३८ |
| २१–९–३१ ते १७–४–३७ | २९६,०९,००,९६० |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती .. | १९२ |
| २ शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा ... | १९३ |
| ३ मुद्रणाच्या धंद्यासंबंधी शास्त्रीय संशोधन ... | १९३ |
| ४ स्फुट विचार | १९४ |
| मुंबईचें कामचलाऊ प्रधानमंडळ—हिंद-जपान व्यापारी करार—हिंदी व्यापारी संस्थाची मध्यवर्ती संस्था—वसाहतीचें आर्थिक महत्व—काहीं बाजारभावाची चढती कमान—इंग्लंडमध्यें छऱ्याचा धंदा—[illegible]चें अचकारी उत्पन्न | |
| ५ अनिश्चितपणा व जगाची हताश वृत्ति .. | १९७ |
| ६ शेतीचें अर्थशास्त्र | १९८ |
| ७ रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा... . ... | १९९ |
| ८ दुकानांतील विक्रेते व गिऱ्हाइक .. .. | २०० |
| ९ हिंदुस्थानातील शिक्षणाची प्रगति . | २०० |
| १० निवडक बाजारभाव | २०१ |

# अर्थ

बुधवार, ता २१ एप्रिल, १९३७

## शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा

(१)

### मध्ययुरोपातला अनुभव

अनिश्चितपणा व धोका शेतीच्या पाचवीस पुजलेला असल्यानें तो धंदा करणारे लोक सर्व जगभर कर्जामध्यें असतात हिंदुस्थानात शेती लहान प्रमाणावर व पुष्कळ ठिकाणीं बिनफायद्यांत चालते आणि हिंदी शेतकरी अशिक्षित व मागसलेला असल्यामुळें प्रतिकूल परिस्थितींत त्याची दैना होते इतर देशातली शेती बहुतेक मोठ्या प्रमाणावर चालते आणि तेथील शेतकरी धंदेवाइकपणानें व्यवहार करू शकतो. असें आहे तरी सध्याच्या सारख्या मंदीच्या काळांत पाश्चात्य शेतकऱ्याचीहि तारांबळ उडाली असून त्यांचा कर्जबाजारीपणा विलक्षण वाढला आहे आणि पाश्चात्य राष्ट्रीय सरकारास त्यांच्या सहायासाठी अनेक उपाय योजावे लागले आहेत लवादाच्या मार्गानें शेतीचीं कर्जें हलकीं करणें, कर्जफेडीस हप्तेबंदी करून देणें, व्याजाचे दर उतरवणें, जमीनगहाणाच्या बँका स्थापणें इत्यादि उपायाचा अवलंब हिंदुस्थानात केला जात आहे. शेतीच्या डोईजड कर्जाचा प्रश्न जगभर सर्वच देशात जाचक झाला आहे आणि सार्वजनिक रीतीनें, कायद्यानें व सरकारमार्फत तो सोडवल्यावांचून गत्यंतर राहिलेलें नाहीं रोममध्यें आंतरराष्ट्रीय शेतीसंस्थेची मध्यवर्ती कचेरी आहे. तिच्यामार्फत इतर विषयाबरोबर ह्याहि प्रश्नाबाबतची माहिती प्रसिद्ध करण्यांत येते त्या संस्थेच्या मासिकात प्रस्तुत विषयाबाबत विश्वसनीय माहिती अलीकडे आली आहे, तिच्या मधल्या कित्येक महत्वाच्या गोष्टी आम्ही खालीं देत आहों

शेतीचें कर्ज डोईजड झालें म्हणजे शेतकरी आपल्या उद्योगासंबंधानें स्वाभाविकपणें बेफिकीर बनतो आणि त्यास पैशाची जरूर विशेष असते अशा ऐन वेळीं भांडवलवाल्या संस्था व व्यक्ती आपला हात आखडतात. कर्ज देण्याघेण्याचा व्यवहार व त्याचा पाया जी पत त्यावरचा समाजाचा विश्वास उडू लागतो. कर्जाचे पायीं जमीनजुमले विकले जातात आणि समाजांत मालमत्तेची नवी वाटणी विलक्षण रीतीनें होते अशी परिस्थिति निर्माण झाली असता शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाच्या प्रश्नास सार्वजनिक स्वरूप प्राप्त होतें आणि समाजावर येणाऱ्या ह्या आपत्तीचें निवारण करण्याची जबाबदारी राष्ट्रीय सरकारावर येऊन पडते. महायुद्धानंतरच्या काळात कृषिप्रधान मध्ययुरोपिअन राष्ट्रामध्यें अशा प्रकारची स्थिति विशेष रीतीनें उत्पन्न झाली. शेतीचा विस्तार होऊन तीमध्यें खेळतें भांडवल मोठ्या प्रमाणात घातलें गेलें होतें आणि तें कर्जाऊ घेण्यात आलें होतें मामुली खेळतें भांडवल शेतकऱ्याचे मालकीचें असतें आणि तें जमिनींत घातलेल्या भांडवलाच्या मानानें थोडें असतें तोंपर्यंत वा[illegible] आला असता शेतकरी त्यास तोंड देऊं शकतो पण शेतीच्या उद्योगासाठीं मोठ्या प्रमाणात भांडवल घालावें लागलें आणि त्याचा कर्जाच्या द्वारें पुरवठा करावा लागला म्हणजे परिस्थिति शेतकऱ्याच्या शक्तीबाहेर जाते त्यांतच धारण उतरली म्हणजे नवीन अडचणीची भर पडून शेतीचा धंदा चालणें व शेतकऱ्याचा उदरनिर्वाह होणें कठीण पडतें ऊस, कपास वगैरे "रोकड देणारीं" पिकें काढणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांची परिस्थिति विशेषच बिघडून गेली आहे, ह्याचें कारण वरील विवेचनावरून स्पष्ट होईल

महायुद्धानंतर काहीं काळपर्यंत चढीचे बाजारभाव होते, ते हळूहळू स्थिरावले, पण १९३० मध्यें एकदम घसरले. शेतीच्या मालाच्या किंमती एकाएकीं इतक्या खालीं गेल्या आणि बाजारभावाची ही मंदी इतकीं वर्षें टिकली आहे कीं, ह्या संकटास तोंड देणें शेतकऱ्यास दुरापास्त होऊन गेलें आहे. कच्चा-पक्क्या सर्व मालाचे भाव सारखेच उतरले असते तर ती गोष्ट वेगळी होती. पण झालें असें कीं, पक्क्या मालाच्या किंमती शेतीच्या मालाच्या मानानें उतरल्या नाहींत बदललेल्या परिस्थितीस तोंड देण्याचें सामर्थ्य कारखानदारांत असतें तसें शेतकऱ्यात असत नाहीं. आपल्या धंद्याची पद्धति व त्याचें परिमाण त्यास बदलतां येत नाहीं मंदीच्या काळात शेतकऱ्याचें उत्पन्न कमी होतें पण त्या मानानें त्याचा खर्च कमी होत नाहीं देणीं तशींच रहातात आणि येण्यास मात्र खोट बसते. मध्ययुरोपिअन राष्ट्रातल्या शेतीच्या धंद्याविषयींच्या आकड्यावरून हाच निष्कर्ष निघतो. आंतरराष्ट्रीय व्यापार बसला, मालाचा उठाव होईनासा झाला, शेतकऱ्यास योग्य मजुरीहि पडेनाशी झाली आणि व्याज व कर देण्यासाठी कर्ज काढणें व तें न मिळाल्यास मालमत्ता विकून टाकणें अशी स्थिति तेथें निर्माण झाली.

## मुद्रणाच्या धंद्यासंबंधीं शास्त्रीय संशोधन

येथील औद्योगिक प्रदर्शनाची संधि साधून मुद्रणाच्या धंद्यांतील मंडळींनीं आपली परिषद भरवली, हा एका मोठ्या कार्याचा केवळ ओनामा होय असें समजलें पाहिजे समव्यवसायी लोकांनीं आपल्या व्यवहाराच्या हिताचे प्रश्न सामुदायिक पद्धतीनें व सहकार्यानें सोडवणें अत्यंत आवश्यक असून त्या कामीं यश येण्यास संघटन, चिकाटी व सार्वत्रिक हिताविषयीं आस्थ

ह्या गुणाचें अगत्य असतें हिंदी मुद्रणाच्या धंद्यात कितीतरी सुधारणा होण्यास वाव आहे आणि पाश्चात्य देश हिंदुस्थानाच्या पुढें आहेत, ह्याचें एक प्रमुख कारण तेथाल धंदेवाल्या लोकात वरील गुणांचें वास्तव्य आहे हें होय, ही गोष्ट ध्यानात बाळगली पाहिजे लंडनच्या छापखानेवाल्याच्या मध्यवर्तीत "प्रिंटिंग अँड अलाइड ट्रेड्स असोसिएशन" ह्या नावाची एक संस्था कित्येक वर्षे अस्तित्वात असून छापखानेवाले, वर्तमानपत्राचे मालक, कागद व शाई ह्याचे कारखानदार, पुस्तकें बांधणारे, ठशाचीं कामें करणारे वगैरे धंदेवाल्यास त्याच्या धंद्यासंबंधानें माहिती पुरवण्याचें काम ती करीत आली आहे. आतापर्यंत ह्या संस्थेचें वार्षिक उत्पन्न अत्यंत अल्प म्हणजे सुमारें २० हजार रुपये असल्यानें तिची कामगिरीहि मर्यादित होती शास्त्रीय संशोधनासाठी धंदेवाले स्वत सढळ हातानें खर्च करण्यास तयार असतील तर सरकार त्यास द्रव्य-सहाय देईल, ह्या धोरणाचा वरील संस्थेनें फायदा करून घेण्याचें आता ठरविलें आहे धंदेवाल्यांनीं सुमारें ९० हजार रुपये स्वत: उभे करावे व सरकारनें ४० हजार रुपयाची ग्रँट द्यावी अशी त्याची योजना आहे संस्थेनें २५ हजार रुपये आणखी जमवल्यास सरकार तेवढ्याच रकमेची जादा ग्रँट देण्यास तयार आहे

मुद्रकाच्या ह्या संस्थेनें आता शास्त्रीय संशोधनाची शाळा स्थापिली आहे. छापण्याच्या धंद्यातल्या सर्व क्रियाचे संबंधानें तेथे संशोधन चालण्याची व्यवस्था झाली असून धंदेवाल्यास आपल्या अडचणी दूर करून घेणें आणि व्यवसायात सुधारणा घडवून आणणें ह्या गोष्टी साध्य झाल्या आहेत वृत्तपत्राच्या ६० हजार प्रती दर तासास छापणें, कापणें, घड्या घालणें व मोजणें ह्यासारख्या गोष्टी छापखान्यास नित्याच्या जरूरीच्या झाल्या आहेत. ह्या त्वरित गतीनें कामाचा उठाव होण्यास यंत्रें, कागद व शाई ह्यामध्यें दमदारपणा असला पाहिजे. सामुग्री व त्वरित कामाची मागणी ह्याचा मेळ बसण्यास भौतिक शास्त्रातले संशोधक सहायकारी झाले पाहिजेत आणि हें काम लंडनमध्यें स्थापन झालेल्या प्रयोगशाळेंत चालतें शाई तात्काळ वाळली पाहिजे, झपाट्यानें फिरणाऱ्या रुळामध्यें टिकेल असा मजबूत कागद पाहिजे आणि छापखान्यातील हवेचें उष्णतामान कायम राहिलें पाहिजे ह्यासारखे प्रश्न शास्त्राच्या सहायानेंच सुटणार हें उघड आहे आणि चांगल्या प्रयोगशाळेवाचून हें कार्य होऊ शकणार नाहीं, हें तितकेंच स्पष्ट आहे रसायनशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र ह्यातले तज्ञ लंडनमधल्या प्रयोगशाळेंत आपापल्या क्षेत्रात येणारीं कामें करीत आहेत आणि धंदेवाले त्याच्या उद्योगाचा फायदा करून घेत आहेत ह्या प्रयोगशाळेची स्थापना आणि त्या बाबतींतलें, छापण्याच्या व्यवसायाशीं संबंध असलेल्या धंदेवाल्या लोकाचें संघटन ह्या संबधात हिंदुस्थानात कितीतरी बोध घेता येण्यासारखा आहे. परिषदात होणाऱ्या भाषणाची व चर्चेची विधायक कार्यात परिणति होईल तरच त्याचा खरा उपयोग आहे पुढाकार घेऊन श्रम करण्याची आस्था वाटणारे उत्साही लोक आणि त्यास मनोभावें सहाय देण्यास तयार असलेले त्याचे व्यवसायबंधु ह्याचा संयोग होईल तरच भरीव कामगिरी घडून येणें शक्य आहे

## स्फुट विचार

### मुंबईचें कामचलाऊ प्रधानमंडळ

चालू महिन्याच्या पहिल्या तारखेपासून नवीन राज्यघटनेप्रमाणें प्रातिक स्वायत्ततेस प्रारंभ झाला नवीन नियमाप्रमाणें निवडल्या गेलेल्या मुंबई असेंब्लीच्या सभासदामधील बहुसंख्य पक्षाच्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली प्रधानमंडळ निश्चित होऊन त्यानें राज्यकारभाराच्या नावेचें सुकाणू आपल्या हातीं घ्यावयाचें असा सुधारलेल्या राज्यघटनेचा दंडक आहे लोकानीं निवडलेल्या सभासदांच्या हातीं राज्यकारभार आल्यानें शेती, सहकार, शिक्षण, आरोग्य, उद्योगधंदे इत्यादि समाजहिताच्या गोष्टी प्रधानमंडळ हातीं घेईल व त्याचे बाबतींतली अगत्याची सुधारणा निर्वेधपणानें चालू करील अशी घटना बनवणाराची व सामान्य जनतेची अपेक्षा असणें स्वाभाविक आहे तथापि, दुर्दैवानें मुंबई इलाख्यात अपेक्षित जबाबदार प्रधानमंडळ निर्माण झालेलें नसल्याने राज्यघटनेच्या गाड्यास प्रारंभींच खीळ बसली आहे असेंब्लीच्या बहुसंख्य सभासदास मान्य व जबादार असलेलें प्रधानमंडळ गव्हर्नर व बहुसंख्य सभासद ह्यांचें एकमत न झाल्यानें अस्तित्वात येऊं शकलें नाहीं म्हणून गव्हर्नराच्या संमतीनें चार मंडळींचें तात्पुरतें व कामचलाऊ प्रधानमंडळ स्थापन झालें आहे घटना-पंडितामध्यें ह्या तऱ्हेच्या अनपेक्षित बनावाबाबत वाद चालू असून नवीन राज्यघटनेच्या भवितव्यासंबंधानें शंकावृत्ति निर्माण झाली आहे. कामचलाऊ प्रधानमंडळानें आपल्या धोरणाचा कार्यक्रम प्रसिद्ध केला आहे. त्यात शिक्षण, सहकार इत्यादि अनेक विषयाच्या परामर्शासंबंधानें दिग्दर्शन करण्यात आलें आहे पुढें मांडण्यात आलेल्या सुधारणाबाबतचें प्रगतिपर धोरण इष्ट व स्तुत्य असेंच आहे परतु हें सर्व औट घटकेचें राज्य आहे, ही गोष्ट खुद्द तात्पुरत्या प्रधानमंडळानेंच जाहीर केली आहे. नवीन राज्यघटनेप्रमाणें व्हावयाच्या कारभारात आज निश्चितपणाचा अभाव आहे ह्याचें कारण तात्पुरत्या प्रधानमंडळास कायदेमंडळाचा पाठिंबा नाहीं, हें होय इतर काहीं प्रांतात प्रधानमंडळानें असेंब्लीचा विश्वास संपादन केला असल्यानें त्यास अंगीकृत कार्यास भरीवपणानें प्रारंभ करता आला आहे मुंबई इलाख्यात कायदेमंडळाची सभा भरून त्याच्या संमतीनें राज्यकारभार करण्याचें सामर्थ्य कामचलाऊ प्रधानमंडळात नाहीं ही परिस्थिति प्रगतीस प्रतिकूल अशी आहे जबाबदार प्रधानमंडळ अस्तित्वात आल्यावाचून खऱ्याखुऱ्या सुधारणेस आरंभ होऊ शकत नाहीं हें सर्वांसच मान्य होण्यासारखें आहे पूर्वीसारखा मामुली राज्यकारभार चालेल, पण त्यात प्रांतिक स्वायत्ततेचा ओलावा व जिवंतपणा नाहीं, हेंहि निर्विवाद आहे. नव्या घटनेची घडी लोकमतास अनुसरून नीट बसणें अगत्याचें असल्यानें ती बसवण्याचा प्रयत्न, ज्याचे हातीं ह्या गोष्टीचा निर्णय आहे, त्यानीं करणें आवश्यक आहे.

नोकरी पाहिजे ना? अत्यंत माफक फींत मोटार ड्रायव्हिंग व संपूर्ण दुरुस्ती शिका लायसेन्सची हमी दिली जाते ०२ आण्याचीं पो. तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवा
लक्ष्मी मोटार स्कूल.—७७४ रविवार, पुणे २

### व्यापारी करार

हिंदुस्थान व जपान यांच्यामध्यें १९३४ सालीं झालेला करार रद्द होण्यासंबधीं हिंदुस्थान सरकारनें ऑक्टोबर १९३६ मध्यें जपानला नोटीस दिली होती व त्याप्रमाणें ३१ मार्च १९३७ रोजीं ह्या कराराची मुदत संपली त्याचे ऐवजीं आता नवीन करार करण्यात आला असून तो ३१ मार्च १९४० अखेर अमलांत राहील. जपानच्या २८ कोटि ३० लक्ष वार कपास कापडाची आयात हिंदुस्थानानें होऊं द्यावी व त्याचे बदली जपाननें १० लक्ष गासड्या हिंदी कपास खरेदी करावी, असा ह्या कराराचा आशय आहे. जपाननें हिंदी कपास ह्यापेक्षा जास्त घेतली, तर अशा प्रत्येक १० हजार गासड्यांचे बदली जपाननें १५ लक्ष वार कापड पाठविण्यास हरकत नाहीं. तथापि, जपानी कापडाची वार्षिक आयात ३५ कोटि ८० लक्ष वारांपेक्षा कधींच जास्त होता कामा नये. हिंदुस्थानात होणारी फेन्ट्सची म्हणजे कापडाच्या तुकड्यांची आयात जपाननें नियंत्रित करण्याचें ठरविलें आहे. दरसाल ८९½ लक्ष वारापेक्षा जास्त फेन्ट्स आता हिंदुस्थानात उतरणार नाहींत कपाशीचे कापडाचे धंद्याबाबतचा हा करार पूर्वींच्या हिंद-जपान करारास अनुसरूनच आहे, तथापि इतर अनेक देशी धंद्यासहि जपानी स्पर्धेची झळ लागते, त्यास मात्र ह्या करारापासून फायदा होणार नाहीं. नवीन करार करतेवेळीं सर्वच गोष्टींचा विचार व्यापक प्रमाणावर करून जपानी स्पर्धेची तीव्रता कमी करण्याचा सरकार प्रयत्न करील, अशी लोकांची अपेक्षा होती, ती निष्फळ ठरली आहे. नवीन करारासंबंधानें सरकारास सल्ला देण्याकरितां सरकारनेंच नेमलेल्या व्यापारी पुढारी मंडळानें एकमतानें केलेल्या शिफारसी नवीन करारात अंतर्भूत झालेल्या नाहींत, अशी त्या मंडळाचे अध्यक्ष शेठ कस्तुरभाई लालभाई, ह्यांची तक्रार आहे हिंदुस्थान व जपान ह्या देशांमधील कराराच्या अटी दोन्ही देशांच्या प्रतिनिधींच्या वाटाघाटींत हिंदुस्थानात ठरल्या असल्या, तरी करारावर शिक्कामोर्तब लंडन येथें व्हावयाचें आहे

---

### हिंदी व्यापारी संघांची मध्यवर्ती संस्था

हिंदुस्थानातील व्यापारी मंडळाच्या मध्यवर्ती संस्थेची (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स) वार्षिक सभा दोन आठवड्यामागें दिल्ली येथें भरून तिच्यामध्यें हिंदी उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्याबाबतच्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा झाली व निर्णयनिदर्शक असे अनेक ठराव पास झाले युरोपिअन व्यापारी संघाची अशीच एक मध्यवर्ती संस्था असून तिची सभा दरवर्षीं भरत असते हिंदुस्थानचा व्यापार व धंदे ह्यांच्या प्रगतीसाठी झटणाऱ्या हिंदी व युरोपिअन अशा दोन निरनिराळ्या संस्था अस्तित्वात असून त्यांचा सहविचार किंवा एकमत होत नाहीं हें लक्षात ठेवण्यासारखें आहे हिंदुस्थानात व्यापार करणारे युरोपिअन धंदेवाले आणि हिंदी व्यापारी व कारखानदार ह्यांचा दृष्टिकोन, धोरण व हितसंबंध भिन्नभिन्न आहेत हें यावरून स्पष्ट होतें दिल्ली येथें भरलेल्या सभेंत तिचे अध्यक्ष, श्री सैतान, ह्यांनीं केलेल्या भाषणाकडे वळून पाहिलें म्हणजे ह्या भिन्नत्वाची उत्कृष्ट कल्पना येते. हिंदुस्थान देशास उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या त्वरित प्रगतीवाचून तरणोपाय नाहीं आणि हिंदी सरकारानें आपलें आर्थिक धोरण त्या प्रगतीस सहायक होईल ह्या रीतीनें आखलें व चालविलें पाहिजे हा त्यांच्या भाषणाचा मथितार्थ होता शेतीची उन्नतिहि व्यापाराच्या प्रगतीवर अवलंबून असल्यानें त्या धंद्या आणि कारखाने व गिरण्या ह्यांचा धंदा ह्यांचेमध्यें वास्तविक विरोध नाहीं असें त्यांनीं सांगितलें खेडेगावी, लहान व मध्यम प्रमाणावरचे आणि मोठे असे उद्योगधंदे एकाच वेळीं बरोबरीनें उत्कर्ष पावले पाहिजेत आणि ह्यासाठी मध्यवर्ती व प्रांतिक सरकार, रेल्वेज व निमसरकारी संस्था ह्या सर्वांनीं सहकार्य करणें अगत्याचें आहे, असें श्री सैतान ह्यांनीं सुचविलें औद्योगिक सरक्षणाचें धोरण यशस्वी झालें आहे, परंतु त्याचा पुरस्कार जोरानें व अधिक विस्तृत प्रमाणात होणें अगत्याचें आहे आणि त्या बाबतींत सरकारनें अर्धवटपणा सोडून देऊन उत्साह, धडाडी व विश्वास प्रकट केला पाहिजे असें ठासून सांगण्याचा त्यांच्या भाषणाचा मुख्य रोख होता.

---

### वसाहतींचें आर्थिक महत्त्व

महायुद्धात जर्मनीनें आपल्या आफ्रिकेंतल्या व इतर वसाहती गमावल्या, त्या परत मिळवण्याची सदरहू राष्ट्राची सारखी खटपट चालली आहे वसाहतींच्या अभावामुळें आपली आर्थिक घडी नीट बसण्यास अडचण पडते आणि कच्च्या माळाचा पुरवठा त्यांच्यामधून न झाल्यानें व्यापार व उद्योगधंदे मंदीमधून बाहेर पडू शकत नाहींत अशी जर्मनीची ओरड आहे ह्या तक्रारींत राजकीय हेतु नसेल आणि ती केवळ अर्थमूलकच असेल तर कच्चा माल व खाण्याचे पदार्थ ह्यांचा वसाहतींतून होणारा पुरवठा सर्व राष्ट्रांमध्यें अनिर्बंध रीतीनें कसा वाटला जाईल ह्याचा विचार करतां येणें शक्य आहे असा अभिप्राय सर सॅम्युअल होअर यांनीं राष्ट्रसंघाच्या एका सभेंत दीड वर्षामागें व्यक्त केला होता त्यास अनुसरून संघानें एक कमिटी ह्या प्रश्नाची चौकशी करण्यासाठी नेमली होती, तिची बैठक नुकतीच होऊन कार्यास प्रारंभ झाला आहे वसाहतवाली व बिन वसाहतवाली राष्ट्रें ह्यांचे विचारात मूलत.च तीव्र विरोध दिसून आला आहे सर फ्रेडरिक लीथरॉस ह्या ब्रिटिश प्रतिनिधीनें असें मत व्यक्त केलें कीं वसाहती ताब्यात असणें ही काहीं फायद्याची गोष्ट नाहीं, त्यांचे योगानें वसाहतवाल्या राष्ट्रावर जबाबदाऱ्या व खर्च येऊन पडतात, त्यांचे दरवाजे सर्वांस मोकळे करणें वसाहतींच्या स्वत च्या दृष्टीनें अनिष्ट आहे आणि त्यांचकडून माल घेण्यापेक्षा तो जगाच्या खुल्या बाजारात खरेदी करणें अधिक फायद्याचें असतें ह्याच्या उलट, पोलिश व जपानी प्रतिनिधींचें असें म्हणणें पडलें कीं वसाहतींचे दरवाजे त्यांच्या मालकांनीं बंद केल्यामुळें बिनवसाहतवाल्या राष्ट्रात माणसांची गर्दी झाली आहे आणि ते उघडले गेल्यावाचून जागतिक स्पर्धा व खेचाखेच चालू रहाणें अपरिहार्य आहे परंतु ह्या विस्तृत भूमिकेवर वसाहतींच्या प्रश्नाची चर्चा करण्यास राष्ट्रसंघाची कमिटी तयार नाहीं आणि राष्ट्रास कोणता कच्चा माल लागतो व तो वसाहतींतून मिळण्यास कोणत्या अडचणी आहेत ह्याचाच विचार करण्याचें तिनें ठरविलें आहे.

---

### काहीं बाजारभावाची चढती कमान

कित्येक प्रकारच्या कच्च्या मालास जगात एकदम मागणी येते व त्याचे बाजारभाव चढतात. भाव उतरण्यातहि हीच तऱ्हा होते. मागणी वाढत आहे असें दिसताच व्यापारी किंमती वाढवतात आणि ह्या व्यवहारास जुगारीचें स्वरूप येतें. कारखानदारास कच्च्या माळाचा पुरवठा निश्चित करून ठेवावयाचा असतो

आणि म्हणून ठराविक चढलेल्या भावानें खरेदीचे वायदे करणें त्यास भाग पडतें. अल्पकालिक तगी दूर झाली म्हणजे बाजारभाव खाली येतात आणि कित्येक लोकांचें नुकसान होतें. तांबें, कथिल, शिसें ह्या धातूंच्या किंमती एका आठवड्यात भरमसाट वर चढल्या रबर, गहू, साखर ह्यांच्या किंमतीहि चढल्या. वाढलेल्या भावानें कच्चा माल खरेदी करणाऱ्या कारखानदाराचा उत्पादन खर्च वाढतो आणि पक्क्या मालाच्या विक्रीचे प्रसंगी नुकसान सोसण्याची पाळी येते सध्याच्या काळी खरेदीदारानीं सावधगिरीनें वागणे जरूर असू बाजारातल्या जुगारी व्यवहारास आळा घालण्यांत आला पाहिजे गेल्या वर्ष-सहा महिन्यात इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स ह्या देशात बाजारभावाची प्रवृत्ति सारखी वाढीकडे असून पक्क्यापेक्षा कच्च्या मालाच्या किंमती अधिक चढल्या आहेत ह्या चढत्या बाजारभावाचा फायदा हिंदी शेतकरीवर्गाच्या पदरात पडेल काय ?

### इंग्लंडमध्ये छत्र्यांचा धंदा-स्वदेशीचा पुरस्कार

छत्र्याच्या सुट्या भागाच्या आयातीवरील जकात ब्रिटिश सरकारनें नुकतीच चढविली आहे इंग्लंडमध्यें परदेशातून सुटे भाग आयात करून त्यांच्या छत्र्या बनवण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो आणि हा धंदा करणाराच्या दृष्टीनें सदरहु वाढलेली जकात अनिष्ट आहे सबंद तयार छत्र्यावरील जकातहि ह्याच प्रमाणांत वाढवावयास हवी होती, असें ब्रिटिश कारखानदारांचें म्हणणें आहे छत्र्याच्या चागल्या मुठी इंग्लंडमध्यें तयार होत नाहींत आणि त्या परदेशातून आणाव्या लागतात ह्या प्रकारच्या सुट्या भागाच्या आयातीवरील जकात वाढल्यामुळें ब्रिटनमध्यें बनवलेल्या छत्र्यांस परदेशी मालाची स्पर्धा जाणवू लागली असल्याची तक्रार कारखानदार करीत आहेत परदेशी छत्र्याच्या वाढत्या आयातीवर आपण नजर ठेवली असून त्यांची स्पर्धा नियत्रित होण्याची आवश्यकता भासल्यास योग्य तजवीज करता येईल असें ब्रिटिश सरकारनें जाहीर केलें आहे छत्र्याच्या धंद्यास अगोदरच जकातीचें सरक्षण असून त्याची जोपासना करण्याची आवश्यकता इंग्लंडमध्यें जनता व प्रजा ह्यास कशी पटली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे

---

### मुंबई सरकारचें अबकारी उत्पन्न

जमीनमहसुलाचे खालोखाल अबकारी कर मुंबई सरकारास उत्पन्नदायक होतो. १९३५-३६ सालीं मुंबई इलाख्याच्या अबकारी खात्यास २ कोटि, ८८ लक्ष रुपये निव्वळ उत्पन्न झालें ४ लक्ष, २४ हजार झाडास ताडीचा परवाना देण्यात आला होता. अहवालाचे सालीं ताडीचा खप ३३/४ लक्ष गॅलनानीं वाढला. विलायती दारूचा खपहि वाढला आहे २५३/४ हजार शेर गाजा, ८३/४ हजार शेर भाग व ७ हजार शेर चरस लोकानीं उपयोगात आणला अबकारी कायद्याविरुद्ध एकूण१०,०२१गुन्हे उघडकीस आले चोरून दारू गाळण्याच्या प्रवृत्तीस आळा बसावा, ह्या हेतूनें लोकांस परवडेल अशा दरानें ताडी विकणाऱ्या दुकानाची सख्या वाढविण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें होतें. मुंबई सरकारच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी म्हणजे जमीनमहसूल, अबकारी कर, स्टॅंप फी व जगलखातें, ह्या होत एकूण उत्पन्नाचा तिसरा हिस्सा रकम अबकारी खात्याकडून मिळते, ह्या दृष्टीनें अबकारी उत्पन्नाचें महत्त्व विशेष आहे. दारूबंदीचें धोरण यशस्वी होण्याचे मार्गांत ही एक मोठी अडचण आहे दरसाल थोड्या प्रमाणात दारूचा पुरवठा कमी करीत आणण्याची योजना मुंबई सरकारनें मागें आखली होती, परतु ती तशीच सोडून देण्यांत आली


# आणखी एकवार
## नवीन कामांत प्रचंड वाढ
स्थैर्य व प्रगति यांचा सुंदर मिलाफ
## वेस्टर्न इंडिया
लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा

१९३६ साल अखेर ६६ लाख रुपयांचें नवीन विमा काम. प्रगतीचा भला मोठा टप्पा

१९३४ मध्यें . ..४१ लाख.
१९३५ मध्यें .. ५१ लाख
१९३६ मध्यें ... ६६ लाख

अशा जलद परतु खात्रीच्या वेगानें कपनी प्रगतीच्या मार्गावर नेटानें आणि वैभवानें चालली आहे आणि तरीही खर्चाचें प्रमाण अत्यंत अल्प राखून भरपूर शिलकी फड आणि मजबूत व्याजाचा दर याची जोड मिळवून व जास्तीत जास्त बोनसचा दर कायम ठेवून

## आदर्श विमा कंपनी

म्हणून आपलें स्थान कपनीनें आणखी एकवार सिद्ध केलें आहे याच कपनींत आपला विमा उतरा

मॅनेजर



# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन न ५७२
अधिकृत भांडवल : . . १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल . ५,००,०००
खपलेलें भांडवल : २,१४,१००
रोख भरलेलें भांडवल : १,०६,१२०

## दर शेअरची किं. : रु. ५०

चालु ठेवी द द शेकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द द २॥ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यापासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी

कर्जे, सोनें, चादी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिश. पतीवर रकमा दिल्या जातात

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यावरहि कर्जे दिली जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिली जातात

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यावरील व्याज जमा करणें ही कामें केली जातात

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुबई कमिशनशिवाय वसूल करून देते खात्यात भरलेले मुबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी

एम. व्ही गोखले,
मॅनेजर

## अनिश्चितपणा व जगाची हत‍ वृत्ति

### युद्धविषयक तयारी

युद्धाच्या भीतीचें वातावरण शांततेच्या स्थितींतच होऊं शकणाऱ्या आर्थिक प्रगतीस विघातक आहे सहा वर्षांमागें मंदीस प्रारंभ होऊन ती राष्ट्रांस जाचक होऊं लागली तेव्हा सामुदायिक विचारानें तिच्यामधून मार्ग काढण्याचा उपाय सहजच सुचला आणि तो सर्व लोकांस पटून त्याचा अवलंब केला जाईल असें एका काळीं वाटलें. परंतु सहविचार व सहकार्य ह्यांचें महत्त्व राष्ट्रास पटलें असलें तरी त्यास अनुसरून कृति मात्र झाली नाहीं राष्ट्रसंघाच्या विद्यमानें परस्परानीं जवळ येण्याच्या ऐवजीं देश एकमेकापासून दूर झाले महत्त्वाच्या प्रश्नाबाबतचें धोरण एक विचारानें आखण्याचें सोडून राष्ट्रें नवीन गट उत्पन्न करण्याचे मार्गास लागलीं, आणि महायुद्धाचे पूर्वीची परिस्थिति आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झाली व्यापार व उद्योगधंदे ह्यांचा ओघ भलत्या मार्गानें वाहूं लागला आणि शस्त्रास्त्रावरचा राष्ट्राचा खर्च वाढला, जनतेच्या रोजच्या गरजा भागवण्याचें जिन्नस कारखान्यात तयार होण्याचें राहून भलत्याच पदार्थांच्या पैदाशीवर भांडवल व श्रम खर्च होऊं लागले प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं नुकत्याच केलेल्या एका भाषणात ह्या प्रवृत्तीचा उल्लेख केला, पण आजकाल एकमेकाविषयीं साशंक बनलेलीं राष्ट्रें लोकांच्या मामुली गरजा आणि त्यांच्या सुखसोयी ह्याचेकडे लक्ष पुरवण्याच्या मन स्थितींतच नाहींत, अशी अवस्था आहे पुढारलेलीं पाश्चात्य राष्ट्रें भलतीकडे वहावत चाललीं असल्यानें आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सलोखा राखण्याचें सामर्थ्य त्यामध्यें उरलें नसल्यानें जगाचें आणि त्यातल्या त्यात आधुनिक प्रगतीचे बाबतींत मागसलेल्या देशांचें विलक्षण नुकसान होत आहे काहींतरी निमित्ताची ठिणगी उडून युद्धाचा वणवा पेटण्याची भीति सर्वत्र वाटत आहे आणि तिच्यामुळें निर्माण झालेली परिस्थिति आर्थिक स्वास्थ्यास विघातक आहे बिघडलेली आर्थिक घडी कशी नीट बसवावी हें, या प्रकारच्या अनिश्चितपणामुळें कळेनासें होऊन जग हताश बनल्यासारखें झालें आहे

आंतरराष्ट्रीय बाजारांमध्यें सध्या चणचण उत्पन्न झाली आहे, तिचें मुख्य कारण अनेक देशांत एकाच वेळीं लढाऊ तयारीच्या मालास वाढती मागणी उपस्थित झाली आहे, हें होय लोखंड, पोलाद व तांबें ह्या धातूंची विशेष आवश्यकता शस्त्रास्त्रांच्या बनावटीमध्यें असते, ह्या कारणानें सदरहु मालाच्या किंमती चढल्या असल्यास आश्चर्य नाहीं भावी युद्धाची व त्यापासून राष्ट्रीय संरक्षणाची अशी दुहेरी तयारी आज जगात चालली आहे युद्ध कोणतें राष्ट्र चालू करणार आणि कोणाविरुद्ध करणार हें समजत नाहीं, पण शांतता फार वेळ टिकत नाहीं आणि तिचा भंग केव्हा होईल ह्याचा नियम नाहीं, अशी भावना सर्वत्र असल्याचें मात्र दिसतें पोलाद–लोखंडाचा पुरवठा आपल्या देशात नियंत्रित करण्याचें जर्मन सरकारनें ठरविलें आहे आणि रशिया अमेरिकेंत सोन्याची निर्गत करून तेथें पैशाची तजवीज करून ठेवीत असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे युद्ध उद्भवल्यास रशियास मालाची खरेदी अमेरिकेंत करावी लागेल व त्यासाठी सदरहु राष्ट्रास पैसा रोख द्यावा लागेल आयत्या वेळीं ह्या संबंधातली व्यवस्था होऊं शकणार नाहीं आणि अमेरिकेवरच्या हुंड्या मिळणार नाहींत सबब, आजच तिकडे सोनें पाठवून ठेवावें आणि पुढें जरूर पडेल तेव्हा त्यातून पैसा देण्याची सवड होऊं शकेल अशी परिस्थिति निर्माण करून ठेवावी, ह्या प्रकारच्या दूरदर्शीपणाचें धोरण रशियाचें असावें असा प्रस्तुत प्रकरणीं तर्क करण्यांत येत आहे रशियातून अमेरिकेकडे सोनें गेलें आहे व जात आहे, त्याचा उद्देश अगदी सामान्य व्यापारी व्यवहार हाहि असू शकेल परंतु सध्या आंतरराष्ट्रीय वातावरण इतकें बिघडून गेलें आहे कीं, त्यांत युद्धाच्या तयारीचा वास सर्वत्र येत आहे आणि देशांमध्यें परस्पराविषयीं अविश्वास नांदत आहे ह्या परिस्थितींत उद्योगधंद्याची चलती तात्पुरती दिसून आली तरी ती टिकाऊ होणार नाहीं, हें उघड आहे सध्याची चलतीची लाट ओसरली म्हणजे पुढें काय ? हा प्रश्न म्हणूनच उपस्थित होणार आहे





मुंबई सरकारनें प्रथम मान्य केलेले, कोल्हापूर सरकारचे आश्रयाखालील

**जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग**

माहिती मागवा ] व [ नांवे नोंदवा

४९७ बुधवार पुणें सिटी

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा.—

**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें

**१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र असलेले**

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

**यांचेकडेच आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.**

बुधवार चौक, पुणें.

## "शेतीचें अर्थशास्त्र"*

हिंदुस्थानचा शेतकरीवर्गच फार दरिद्री का? या प्रश्नाची कारणमीमांसा करून शेतकऱ्याचे दैन्य निवारण्याचा अचुक मार्ग कोणता असूं शकेल याचें उत्तर देण्याचा प्रयत्न "शेतीचें अर्थशास्त्र" या पुस्तकात लेखकानें केला आहे लेखक स्वतः सरकारी पेन्शनर व खातेदार आहेत. त्यानीं या विषयासबधीं पुष्कळ उपयुक्त माहिती मिळवून प्रथम व्याख्यानें व लेख ह्या मार्गांनीं आपले विचार सागितले व तेच काहीं टिपणें जोडून आता पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले आहेत.

पुस्तकात दोन विषयाचा प्रामुख्यानें उल्लेख केलेला आह विद्यमान पद्धतींत शेतीचें प्रत्यक्ष उत्पन्न व साऱ्याची रकम याचा अन्योन्य सबध सालदरसाल रहात नाहीं, तो ठेवणें जरूर आहे व हुडणावळीच्या चालू दरामुळें शेतीच्या मालास कमी किंमत येते म्हणून त्या दरात बदल करणें आवश्यक आहे, असा ह्या ग्रथाचा निष्कर्ष आहे

शेतसाऱ्यासबधीं लेखकानें सुचविलेला उपाय असा कीं, शेतकऱ्यानें उत्पन्नाचे व खर्चाचे तक्ते ठेवावेत आणि दरसाल प्राप्तीवरील कराप्रमाणें निवळ नफ्यावर सरकारनें साऱ्याची रकम आकारावी हा उपाय दिसावयास चागला आहे, परतु त्याचा अम्मल करणें तितकेंच बिकट आहे शेती हें हिंदुस्थानात उपजीविकेचें प्रमुख साधन असल्यानें सरकारी खर्चाचा बराच भार त्या धद्यावर पडणें स्वाहजिक आहे. परतु बहुतेक प्रातात सामान्य शेतकरी हा अज्ञान व दारिद्र्य ह्यात रुतलेला आहे शिवाय, शेतकऱ्याच्या जमिनीचें सरासरी क्षेत्र व धद्याचें उत्पन्न हेंहि फार अल्प आहे काहीं थोडे सुशिक्षित शेतकरी सोडले तर इतरास निदान आज तरी योग्य तऱ्हेचे हिशेब राखणें अशक्य आहे ह्या परिस्थितींत शेतकरी हिशेब तपासणाऱ्या व पिकाचे अदाज करणाऱ्या अमलदाराच्या हातीं गेल्यास त्याचें दैन्य कमी होईल का वाढेल हें सागणें कठीण आहे फार तर मोठ्या प्रमाणावर शेती करणाऱ्याच्या उत्पन्नावर वाढत्या प्रमाणात शेतसारा घ्यावा हें प्राप्तीवरील कराचें तत्त्व जमीनधाऱ्यास लावणें शक्य आहे पण ह्या बाबतींतहि कायद्याच्या कचाट्यातून सुटण्याला एवढ्या पळवाटा आहेत कीं श्रीमत शेतकऱ्यावर वाढत्या दरानें शेतसारा घेण्याऐवजीं इतर काहीं मार्गानें त्याजकडून सरकारी खजिन्याकरिता पैसा काढणें हेंच अधिक श्रेयस्कर ठरेल. शेतकऱ्याच्या एकदर सख्येच्या मानानें असा श्रीमत वर्ग फारच थोडा असल्यानेंहि प्राप्तीवरील कराचें तत्त्व शेतकऱ्यास लावण्यापासून सरकारी उत्पन्नात म्हणण्यासारखी भर पडणार नाहीं शेतसाऱ्याचें निवळ उत्पन्नाच्या अदाजाशीं असलेलें प्रमाण मर्यादित करणें, साऱ्यांत वाढ करताना विशेष काळजी घेणें, ग्रामसस्थाच्या प्रतिनिधींची जर्मान महसुलाचा कायदा योग्य तऱ्हेनें पाळला गेला आहे अशी खात्री पटवून देणें, बाजारभावात मोठमोठे फरक झाले तर त्या मानानें साऱ्याची रकम बदलणें, पाऊसपाण्याच्या परिस्थितीस अनुसरून सारावसुली सोइस्कर करणें इत्यादि मार्गांनीं जमीनमहसुलाचे बाबतींत पुष्कळ सुधारणा होण्यासारखी आहे

दुसरें कारण, हुडणावळीच्या कृत्रिम दरानें शेतीच्या मालास येणारी मदी हें होय, याबद्दल विचारी लोकात मतभेद क्वचितच होईल बाजारभाव चढल्यावाचून शेतकऱ्याची कमाई वाढणार नाहीं, हें सर्वमान्य आहे. तथापि, सत्तेपुढें शहाणपण व्यर्थ आहे,' ही म्हण या बाबतींत आज कित्येक वर्षे अनुभवास येत आहे.

या पुस्तकाचें वैशिष्ट्य हें कीं, या विषयावरील विचार मराठी वाचकापुढें त्यात स्पष्टपणें, सुलभ भाषेंत माडलें जात आहेत पुस्तकातील विचार नवीन नाहींत हें ठिकठिकाणीं दिलेल्या आधारग्रथावरून दिसून येत आहे व लेखकासहि त्याची जाणीव आहे परतु शेतकऱ्यावरील चढलेल्या कर्जाचे डोंगरास शेतकऱ्याचें अज्ञान, आळस व व्यसनें वगैरे व्यक्तिगत कारणाखेरीज अन्य प्रबळ कारणेंहि आहेत याची निवळ मराठी वाचकास जाणीव करून देण्याचें उपयुक्त कार्य हें पुस्तक करील

*(ले०—स सी वर्वे, ५२५ नारायण पेठ, पुणें कि १ रुपया)

---

नादारीच्या अर्जीच्या चौकशीच्या तारखेची धनकोस

# नोटीस

कलम १९, नमुना नबर ४

## पुणें येथील फर्स्टक्लास सब जज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम पुणें येथें

नादारी अर्ज न १५, सन १९३७ पैकीं

मारुती कृष्णा भोसले, मराठा, वय ३०, धंदा नोकरी, रा ५०३, वेताळ पेठ, पुणें. अर्जदार रिणको

विरुद्ध

हरचरण रामगुलाम वगैरे ३, जाब देणार धनको.

ज्याअर्थीं सदर अर्जदार रिणको यानें, प्राव्हिन्शिअल नादारीचा आक्ट (सन १९२० चा ५ वा) याअन्वयें आपणास नादार ठरविण्याविषयीं या कोर्टास तारीख १ माहे फेब्रुवारी सन १९३७ या तारखेची अर्जी सादर केलेली आहे व सदरीं सागितलेल्या रिणकोनें फैल केलेल्या धनकोच्या यादींत तुमचें नाव आहे, त्याअर्थीं तुम्हास यावरून नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं सागितलेल्या अर्जीच्या चौकशीसाठीं व रिणकोची जबानी घेण्यासाठीं या कोर्टानें तारीख ४ माहे जून सन १९३७ ही तारीख नेमली आहे सदरहू प्रकरणात तुमच्या वतीनें काहीं सागावयाची तुमची इच्छा असल्यास, तुम्हीं जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडरच्या द्वारें, हजर राहावें

तसेंच तुम्हास अशीहि नोटीस देण्यात येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यात तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यात येणार नाहीं

आज तारीख ६ माहे एप्रिल सन १९३७

S S Jogalekai,

नाझर

शिक्का

# रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

## (५)

### जमीन गहाणाच्या बँकेची सहकारी घटना

जुन्या कर्जाची फेड झाल्यावांचून आणि कर्जमुक्त झालेला शेतकरी नव्या कर्जांत पुन्हा पडणार नाहीं ह्याविषयीं तजवीज झाल्याखेरीज सुधारणेचें पुढें पाऊल पडूं शकत नाहीं, म्हणून ह्याबाबत प्रांतिक सरकारांनीं जरूर त्या योजना अमलांत आणाव्या असें सांगून, रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट लांब मुदतीचीं कर्जे देणाऱ्या संस्थांची घटना कशी असावी ह्या प्रश्नाच्या विचाराकडे वळला आहे मामुली व्यापारी बँकांच्या कक्षेंत शेतकऱ्यास लांब मुदतीचीं कर्जे देण्याचें कार्य येत नाहीं आणि त्यासाठी जमीन-गहाणाच्याच संस्था आवश्यक आहेत, हें तत्त्व सर्वमान्य आहे रिझर्व्ह बँकेच्या मतानें ह्या संस्था पायापासून शिखरापर्यंत सहकारी तत्त्वावर उभारण्याची प्रवृत्ति आज हिंदुस्थानात सर्वत्र दिसून येत आहे ती इष्ट नाहीं. जमीन-गहाणाच्या बँकेचा प्रश्न निघाला कीं ती सहकारी तत्त्वावर चालली पाहिजे हें जणू काय गृहीतच धरण्यात येतें. असल्या बँकेची व्यवस्था आणि चालकत्व हीं कर्जे घेणाऱ्याच्या हातीं असणें कितीसें श्रेयस्कर आहे ह्याचा विचार होणें अगत्याचें आहे. सहकारी संघटनेचें मूळ तत्त्व असें आहे कीं, तीमध्यें काहीं माणसें पैसा देणारीं आणि इतर कर्ज घेणारीं असावीं; परंतु हिंदुस्थानांत जमीन-गहाणाच्या बँकामध्यें अशी तजवीज नाहीं असें रिझर्व्ह बँकेचें म्हणणें आहे ह्या बँकांचें भांडवल बहुतेक सर्व बाहेरून आणलेलें असतें आणि घटक बँकांचें म्हणून जें भांडवल असतें तेंहि वास्तविकपणें मध्यवर्ती बँकेचें कर्जच असतें. मध्यवर्ती जमीन गहाणाची बँक सहकारी पद्धतीची व बाहेरच्या भांडवलावर उभारलेली असण्याचे ऐवजी स्वतंत्र धंदेवाइकपणाच्या तत्त्वावर चालणारी असावी. तिनें आपल्या भागीदारास वाटावयाच्या डिव्हिडंडला मर्यादा घालण्यात आली म्हणजे तिची गंगाजळी वाढून फायद्याचा कांहीं अंश कर्जदारास मिळण्याचीहि व्यवस्था करणें शक्य होईल. ह्या तऱ्हेच्या जमीन-गहाणाच्या बँकेचा सहकारी चळवळीस चांगला उपयोग होईल आणि त्या चळवळीचें क्षेत्र ह्या बँकेमुळें मर्यादित होण्याची भीति बाळगण्याचें मुळीच कारण नाहीं. धंदेवाइकपणाच्या तत्त्वावर चाललेली मध्यवर्ती बँक भांडवल देणारांच्या हिताचें संरक्षण करून कर्जे भरमसाटपणें न दिलीं जाण्याविषयीं खबरदारी घेईल प्राथमिक बँका कर्जे वांटण्याचें तपशीलाचें काम करतील, त्यास मध्यवर्ती बँकेनें पैशाच्या विस्तृत बाजारांत गोळा केलेलें भांडवल वापरावयास मिळेल आणि त्यांची सामुदायिक जामीनकी त्या बँकेचा पाया अधिक दृढ करील.

जमीन-गहाणाच्या मध्यवर्ती बँका सहकारी घटनेच्या आणि तत्त्वाच्या असू नयेत ह्या रिझर्व्ह बँकेच्या वर नमूद केलेल्या अभिप्रायाचा विचार येथें करणें जरूर आहे. सहकारी घटनेचें आद्य तत्त्व हें आहे कीं, तीमध्यें काहीं धनको असावेत आणि बाकीचे रिणको असावे, हा रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टाचा सिद्धांत मूलभूत व अबाधीत आहे असें म्हणतां येत नाहीं. मध्यम व गरीब स्थितींतल्या लोकांत आपल्या विविध आर्थिक गरजा वैयक्तिक हिंमतीनें भागवण्याचें सामर्थ्य नसतें. म्हणून त्यांनीं आपल्या अल्प शक्ती एकत्रित करून त्या समुच्चयाच्या जोरावर गरजा भागवाव्या हा तर सहकाराचा हेतु आहे ह्याच तत्त्वावर पतपेढ्या, माल खरेदी-विक्रीचीं दुकानें, घरांची बांधणी करणाऱ्या मंडळया इत्यादि सहकारी संस्था आधारलेल्या असतात. एकवटलेली अनेकांची पत पुढें करून तिच्या सहाय्यानें अनेकांकडून कर्जे काढावयाचीं आणि सामान्य व कनिष्ठ स्थितींतल्या अनेक सभासदांच्या अल्प जिद्गीच्या तारणावर पैसा उभा करावयाचा हें सहकारी बँकांचें मूळ तत्त्व आहे. कांहीं धनको व कांहीं रिणको ह्यांची मिळून सहकारी संस्था बनली पाहिजे हें सहकारी घटनेचें आद्य तत्त्व रिझर्व्ह बँकेनें कोठून शोधून काढलें हें समजत नाहीं तिनें नमूद केलेला सिद्धांत इतर देशामध्यें प्रत्यक्ष व्यवहारात दिसून येतो आणि हिंदुस्थान ह्या नियमास अपवाद आहे, हें त्या बँकेचें सरसकट विधान समर्थनीय नाहीं. पैसेवाल्या लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांच्यापैकीं कांहीं जणांचा समावेश सहकारी संघटनेंत व्हावा असें म्हणणें सरळ आहे आणि हिंदुस्थानातल्या सहकारी बँकांत ह्या प्रकारचा रिवाज रूढहि आहे. पतवाली, अनुभवी आणि परोपकारी माणसें आत घेतल्यानें सहकारी संस्थाच्या कार्यास सहाय होतें, ह्याची जाणीव सहकारी कार्यकर्त्यांस आहे प्राथमिक जमीन गहाणाच्या बँकामध्यें कर्ज घेणारे व कर्ज न घेणारे असे दोन प्रकारचे चालक आमच्या इलाख्यांत आहेत, आणि ह्याच तत्त्वाचा अवलंब प्रांतिक जमीन गहाणाच्या बँकेंत आढळेल ह्या उदाहरणावरून असें दिसून येईल कीं, रिझर्व्ह बँकेचा वर नमूद केलेला सिद्धांत व विधान हीं निरपवाद नाहींत. कर्जे भरमसाटपणानें दिलीं जाऊं नयेत आणि जमीन-गहाण बँकांच्या व्यवहारांवर बिनकर्जदारांचें नियंत्रण रहावें अशी खबरदारी घेण्यात आलेली आहे. मध्यवर्ती बँक धंदेवाइकपणानें चालवण्यांत यावी ह्या विषयीं दुमत आहे कोठें? प्राथमिक बँका यशस्वी होण्यास हा काटेकोरपणा आवश्यक आहे ह्यात वादच नाहीं, आणि अशा रीतीची दक्षता घेण्यांत यावी ह्याविषयीं योग्य तरतूदहि करण्यात आली आहे सहकारी पद्धतीच्या संस्थामध्यें धंदेवाईकपणा व चोखपणा नसतो, किंवा नसावा असें मुळींच नाहीं. त्याचप्रमाणें, बिनसहकारी संस्थांच्या कारभारात त्या सहकारी नाहींत म्हणूनच केवळ हे गुण वास करूं शकतात असें तरी कोठें आहे? उलट, सहकारी संस्थांमध्यें नियंत्रणें अनेक रीतींचीं घातलेलीं असतात हें प्रसिद्ध आहे आणि बिनसहकारी म्हणजे भांडवली संस्थांमध्यें भरमसाटपणाचे व्यवहार होण्याची विशेष भीति असते, ह्याचा लोकांस अनुभव नाहीं, असेंहि नाहीं. तेव्हां रिझर्व्ह बँकेची भूमिका अधिक स्पष्ट होऊन तिचें प्रस्तुत विषयासंबंधानें वास्तविक म्हणणें काय आहे हें नीट समजणें जरूर आहे. तिच्या रिपोर्टांत सहकारी घटनेच्या बाबतींत सूत्रवत् विधानें आहेत त्यांचा सहकारी कार्यकर्त्यांस बोध होणें कठीण आहे. त्यांचा होणारा सरळ अर्थ घेतल्यास तीं असमर्थनीय आहेत असें म्हटल्यावाचून गत्यंतर नाहीं.

**पाहिजेत**—महाराष्ट्रांतील जिल्ह्याकरितां सढळ अटींवर एजंट्स व ऑर्गनायझर्स पाहिजेत.
दि नेपच्यून ॲशुअरन्स कं. लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २, ह्या पत्त्यावर अर्ज करावे.

### दुकानांतील विक्रेते व गिऱ्हाइक

दुकानांतील विक्रेत्याच्या हुशारीवर व वागणुकीवर मालाचा खप बऱ्याच अंशीं अवलंबून असतो. विक्रेत्यांनीं गिऱ्हाइकाशीं कसें वागावें, ह्या सबधांतील अमेरिकेंतील पत्रांत प्रसिद्ध झालेले दहा सोपे नियम खाली दिले आहेत:—

[ १ ] अगोदर आलेल्या गिऱ्हाइकाशीं चाललेलें बोलणें संपेपर्यंत अगर आधीं काढलेला माल परत जाग्यावर ठेवीपर्यंत नवीन गिऱ्हाइकास वाट पहात बसू देऊ नका

[ २ ] अगोदर आलेल्या गिऱ्हाइकाकडे आधीं लक्ष पुरवा. लहान मुलाकडेहि मोठ्या माणसांप्रमाणेंच आस्थेनें लक्ष द्या

[ ३ ] गिऱ्हाइक दुकानात असताना दुकानाबाहेरील लोकाशीं बोलू नका.

[ ४ ] गिऱ्हाइकासंबधीं इतरास ऐकू जाईल असें दुकानात बोलू नका

[ ५ ] गिऱ्हाइकाशीं बोलतांना लघळपणा करूं नका.

[ ६ ] त्याची व तुमची कितीहि ओळख असली तरी त्याच्या संपूर्ण नांवानेंच त्यास हाक मारा, घरगुती नावाचा उच्चार करू नका

[ ७ ] गिऱ्हाइकाचे उच्चार चुकले तरी त्याची त्यास जाणीव होऊ देऊ नका

[ ८ ] कमी माल घेणारासहि इतराइतकेंच अदबीनें वागवा.

[ ९ ] गिऱ्हाइकाचें समाधान करता न आल्यास थापा देऊ नका आपलें अज्ञान कबूल करा

[ १० ] गिऱ्हाइक आपल्याकडे चालत येण्याची वाट पाहूं नका; तुम्ही पुढें जाऊन त्याचें स्वागत करा.

---

### हिंदुस्थानांतील शिक्षणाची प्रगति

हिंदुस्थान सरकारनें तयार केलेला १९३४-३५ सालासबधींचा हिंदुस्थानातील शिक्षणविषयक प्रगतीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यातील महत्त्वाचे कांहीं उतारे येथें दिले आहेत:—

( १ ) शिक्षणपद्धतीमध्यें सुधारणा होणें अगत्याचें आहे, ह्याबद्दल सर्वांचें एकमत आहे तथापि, ही सुधारणा घडवून आणणें मात्र अद्याप कोणत्याच प्रांतास शक्य झालेलें नाहीं

( २ ) प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यांपैकीं शेकडा ७४ मुलें साक्षरतेची पायरी गाठत नाहींत ह्याचा अर्थ, प्राथमिक शिक्षणावरील खर्चाचा तीन चतुर्थांश पैसा वाया जातो

( ३ ) शारीरिक शिक्षणाकडे लक्ष दिलें जात आहे व स्काउटिंगचीहि प्रगति होत आहे.

( ४ ) शिक्षणावर खर्च होणाऱ्या रकमेपैकीं ४३७ टक्के पैसा सरकार पुरवितें, १५७ टक्के रकम स्थानिक संस्था देतात व १५६ टक्के रकम इतर मार्गांनीं जमा होते. हायस्कुलांतील प्रत्येक विद्यार्थ्यामागें ५५ रु खर्च येतो, मिडल स्कुलातील विद्यार्थ्याकरिता २१ रु. खर्च होतो व प्राथमिक शाळेंतील प्रत्येक विद्यार्थ्यास ८ रु. लागतात.

( ५ ) शाळेंत जाणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या १ कोटि, ३५ लक्ष इतकी होती. एकूण शाळाची संख्या २,५६,२६३ इतकी असून शिक्षणाप्रीत्यर्थ एकूण २६३ कोटि रुपये खर्च झाला

---


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल | रु २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाही अखेर व्याजाची रकम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाही कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धा आम्ही ठेवून घेतों, व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाची तीं करावीं लागल्यास तींसुद्धा ही बँक करते नियमाची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट— टी आर लालवाणी

---

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८०,६०० |
| रिझर्व्ह फंड | २,७८७ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६३,०५६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ५,०१९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९९० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रकम | ४१,४९४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचें तारणावर कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ६% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन .. ... | १०५—८ |
| ४½% लाब मुदत ( १९५५-६० ) ... | १७—४ |
| ५% १९४३ ... .. ... | ०६—१२ |
| ३½% बिनमुदत ... ... | ९२—०३ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०५—० |
| २¾% १९४८—५२ ... ... | ९९—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०६—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मडळयाचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडड ) | १३५—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडड) | १०९—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५२५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४¾%) | १०३—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रातज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु ४ आ. ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| ब्वॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु डिव्हि १२% ) | १५१—१४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७३—१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १४९५—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु प्रेफरन्स, १७ रु.८ आ.) | १७९—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु.ऑर्डि. रु.६) | ३४२—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु ७ आ. ८ ) | १६५०—० |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३४—१५—६ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५३—१०—० |


दी रेडिओ इलेक्ट्रिक स्टोअर्स
रिप्रेझेंटेड बाय—एम. जी. साठे
रे-मार्केटनजीक, ८० शुक्रवार, पुणें.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

मुंबई सरकारचे सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेलीं
डॉ. काळे यांचें पूना लेप्रसी क्लिनिक
म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चर्मविकारावरील उपचाराचें विश्वसनीय ठिकाण
टिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

पिक्चर—फिट कपडे मिळण्याचें एकच ठिकाण
टेलर्स रिसबूड ब्रदर्स
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कपन्यास कठीण असें अपूर्व यश सपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः–

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास } ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वाटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.



## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु. १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें हमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम हमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबाचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च ( किंवा ) मजबूत यन्त्रसामुग्रीचें व पांच वर्षे गॅरंटीचें एक जर्मन 'बी' टाइम पीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळे.

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं. १२२०४, कलकत्ता (२४)



## दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें


मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्



## फोल्डिंग व बॉक्स कॅमेरा



सामर्थ्यवान लेन्स बसविलेला. ह्या कॅमेऱ्यानें नवशिक्यास सुद्धां फिल्मवर उत्कृष्ट फोटो घेता येतात बेकार रोज ५ रु मिळवू शकतात. फिल्म कार्ड, फ्रेम, रसायनें, कॅमेरा कसा वापरावा हें सांगणारें पुस्तक मोफत.

फोल्डिंग कॅमेरा, रु. ४. बॉक्स कॅमेरा न २, रु. २–१२. नं. १ रु. ३–१२ पॅकिंग व पोस्टेज वेगळें

Dutt & Co ( 12 )
15/,-Jay Mitra Street,
P. O. Hatkhola ( Calcutta ).



"**W**RITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes.**"



# K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास.' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ | पुणें, बुधवार, तारीख २८ एप्रिल, १९३७ | अंक १७

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार
## प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या रौप्यमहोत्सवानिमित्त सदरहु तारखेपासून दशवार्षिक रोखे शेंकडा ७० रु. ८ आण्यांच्या दरानें विक्रीस काढले आहेत.

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु.च्या दर्शनी किंमतीचे आहेत. वरील रकम शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यांत बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर,
ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम्,
मॅनेजर, दि सी. पी. अँन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

उन्हाळयाकरितां **ब्राह्मी तेल** हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें.
स्टॉकिस्ट : म. गो. कुळकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें.
मॅन्युफॅक्चरर : दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई नं. ४

माफक किंमती, मनमोहक रंग, हरतऱ्हेचे वाण, भरपूर लांबरुंद, अत्यंत पक्के रंग व तलम पात वगैरे गोष्टी




**टिकेकर पातळ -**
सेरीज मिळणें शक्य नाहीं. तेव्हां विनाकारण नकली माल घेऊन पस्ताऊं नका. आमच्याकडे हरतऱ्हेच्या चटकदार किनारीचीं मोहक रंगांतील पातळें तयार आहेत. एकदम जोडा घेतल्यास रु. ८ आ. ८ घरपोंच जोडी मिळते. तरा मागणीची त्वरा करावी. नमुने मोफत. पोस्टेजकरितां दीड आण्याचीं तिकिटें पाठवा.

दि टिकेकर टेक्सटाईल मिल, लि.
पो. टिकेकरवाडी, सोलापूर.

आपल्या अन्नांत माती कां कालवितां ?
स्वयंपाकांत वापरण्याचे सर्व जिन्नस निवडून साफ करून घेतां. मग मीठच तेवढें घाणेरडें कां वापरतां ?
आजच
**'सोलर मिठा'ची** आपल्या वाण्याकडे मागणी करा.
आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हाला लिहा.
Uran Salt Works, 583 Chira Bazar, Bombay 2

## दी सनशाइन इन्शुअरन्स लि.

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरतां पगारी एजंट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा.

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस : ३३४ गणेश पेठ, पुणें.

# विविध माहिती

**मार्च महिन्यांतली आयात-निर्गत**

मार्च महिन्यामध्यें हिंदुस्थानात १३ कोटि, १० लक्ष रुपयाचा माल आला व २२ कोटि रुपयांचा हिंदी माल बाहेर गेला. सोन्या-चांदीच्या आयातीपेक्षां त्यांची निर्गत १ कोटि रुपयांनीं अधिक झाली. म्हणजे एकूण आयातीपेक्षा एकूण निर्गत १० कोटि रुपयांनीं जास्त झाली.

**ॲबिसीनियांत सोन्याची खाण**

ॲबिसीनियामध्यें एका इटालियन कंपनीनें सोन्याच्या खाणीचें काम सुरू केलें आहे.

**जर्मनींत शारिरिक खेळांवर खर्च**

शारीरिक खेळांप्रीत्यर्थ जर्मनींत दरवर्षी १०० कोटि रुपये खर्च होतात

**ब्रिटिश शेतीच्या धंद्यास सहाय**

ग्रेट ब्रिटनमधील शेतीच्या धंद्यास निरनिराळ्या स्वरूपात दरवर्षी ५२ कोटि रुपयांचें सहाय मिळतें.

**काटकसरीचा नमुना**

"मुलामुलींनीं आपल्या वह्याच्या पानावरील पहिल्या ओळीवर कांहीं लिहितां कामा नये" हा नियम लंडनच्या स्थानिक संस्थेनें काढून टाकल्यामुळें नागरिकांची ४,००० रुपयांची वार्षिक बचत झाली.

**दुधाचें महत्व**

"दुधाची सर दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या अन्नास येणें शक्य नाहीं" असा अभिप्राय राष्ट्रसंघाच्या शरीरपोषक समितीनें व्यक्त केला आहे.

**तंबाखूचा वर्ण व प्रकृति**

शेतांत वाढणाऱ्या तंबाखूचा "नूर" पाहून रोपात कोणतें पौष्टिक द्रव्य कमी आहे ह्याचें निदान कृषि-वैद्य करूं शकतात.

**मुळाला पाहुण्यांस बोलावणें नको**

"आम्हीं आमचे आर्थिक प्रश्न सोडवले नाहींत तोवर न्यूझीलंडमध्यें आम्हीं कोणाहि पाहुण्यास बोलावणार नाहीं किंवा त्याचें येण्याचें भाडें देणार नाहीं. आमच्या देशाची आर्थिक स्थिति सुधारली म्हणजे न्यूझीलंडमध्यें पाहुण्याच्या आपोआप उड्या पडतील"—मि. सॅव्हेज, न्यू झीलंडचे मुख्य प्रधान, ह्याचे उद्गार.

**पुणें औद्योगिक प्रदर्शन**

वरील प्रदर्शन ७ मार्च ते १८ एप्रिल, १९३७ अखेर ४३ दिवस चालू होतें सुमारें २½ लक्ष लोकांनीं त्यास भेट दिली. प्रदर्शनास खर्च वजा जातां थोडासा नफा उरेल अशी अपेक्षा आहे

**दक्षिण आफ्रिकेचें भरभराटीचें बजेट**

सोन्याच्या खाणींची जोराची चलती चालू असल्यामुळें दक्षिण आफ्रिकेच्या सुमारें ५० कोटि रुपयांच्या बजेटांत १९३६-३७ सालांत ६½ कोटींचा वाढावा झाला

**राष्ट्रीय शरीरसंवर्धन**

जनतेच्या शरीरसंवर्धनासाठीं खाजगी संस्थांस द्रव्यसहाय देण्याची योजना ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध केली आहे.

**सोन्याचें जागतिक उत्पादन**

गेल्या सात वर्षांच्या अवधींत जगांतील सोन्याच्या खाणींचें एकूण उत्पादन ८० टक्क्यांनीं वाढलें आहे. रशियांतलें उत्पादन सातपट झालें आहे.

**इंग्रज लोकांचें रबर-कंपन्यांमधील भांडवल**

सुमारें ५½ अब्ज रुपयांचें ब्रिटिश भांडवल रबर कंपन्यांत गुंतलेलें आहे.

**ग्रेटब्रिटनमध्यें कॉफीचा खप**

ग्रेटब्रिटनमध्यें १९३६ सालीं ७९ हजार हंड्रेडवेट हिंदी कॉफी खपली. हा आकडा १९३४ चे मानानें दीडपट आहे. कॉस्टारिकामधून ग्रेटब्रिटनमध्यें १½ लक्ष हंड्रेडवेट कॉफी गेल्या वर्षी उतरली. ब्रिटिश पूर्व आफ्रिकेनें १½ लक्ष हंड्रेडवेट कॉफी पाठविली.

**मुंबई बंदराचा परराष्ट्रीय व्यापार**

१९३६-३७ सालांत मुंबई बंदराचा परराष्ट्रीय आयात व्यापार १९३५-३६ च्या पेक्षा ५ टक्के व १९३४-३५ पेक्षा १२ टक्के अधिक झाला. निर्गतीच्या व्यापारात मात्र पूर्वीच्या दोन वर्षांच्या मानानें अनुक्रमें करून ५° व १५ टक्के इतकी घट झाली परराष्ट्रीय मालाची पुनर्निर्गत पूर्वीच्या सालापेक्षां वाढली.

**हिंदुस्थानच्या भवितव्यतेचें कोडें**

हिंदुस्थानच्या भवितव्यतेचें सामान्य ब्रिटिश जनतेस कसें कोडें पडलें आहे ह्याची कल्पना इंग्रजी लघुकथामध्येंहि त्या विषयाचा सहज उल्लेख केला जातो ह्यावरून येईल. एका इंग्रजी मासिकांतील लघुकथेंतल्या नायकास उद्देशून लेखक म्हणतोः— "हिंदुस्थानचें भवितव्य, सुवर्ण परिमाण चलनपद्धति व घटस्फोटाबाबतच्या नैतिक कल्पना ह्याचें सामान्य माणसास गूढ वाटतें तशी त्याची गोष्ट नव्हती."

**महाराष्ट्र स्वदेशी संघ**

महाराष्ट्र स्वदेशी संघाची वार्षिक सभा गेल्या रविवारीं प्रो. काळे ह्याच्या अध्यक्षतेखाली भरून तींमध्यें गेल्या सालचा अहवाल व हिशोब मंजूर झाले आणि नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली.

**आफ्रिकन थिएटर्स, लि**

सिनेमाचा धंदा दक्षिण आफ्रिकेंत बराच फायदेशीर असल्याचें दिसतें. आफ्रिकन थिएटर्स लि. ह्या कंपनीचे ताब्यात तेथील सर्व सिनेमा गृहें आहेत दक्षिण आफ्रिकेस आर्थिक मंदीची झळ लागली नसल्याकारणानें, गेल्या पाच वर्षांत सिनेमाच्या धंद्यानें तेथें पुष्कळच प्रगति केली आहे. गेल्या एका वर्षांत वरील कंपनीचें उत्पन्न ३५ टक्क्यांनीं वाढलें व डिव्हिडंडचा दरहि १५ चा २७½ टक्के करण्यात आला कंपनीच्या २० शिलिंग दर्शनी किंमतीच्या ऑर्डिनरी भागाची आज बाजारांत ६६½ शिलिंग किंमत आहे!

**मि. बाल्डविन नवीन घरांत जाणार**

ग्रेटब्रिटनचे मुख्य प्रधान, मि बाल्डविन, हे बादशहांच्या राज्यारोहण समारंभानंतर सेवानिवृत्त झाल्यावर आपले जामात, मि हॉवर्ड, ह्यांच्या लंडन येथील घरात रहावयास जाणार आहेत. हें घर प्रशस्त असल्याकारणानें मि. बाल्डविन ह्यांचें बहुमोल ग्रंथालय त्यांत माडण्याची उत्कृष्ट सोय होणार आहे.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रु. किंमत |
|---|---|
| ११-४-३७ ते १७-४-३७ | ४९,६८,७३८ |
| १८-४ ३७ ते २४-४ ३७ | २६,३९,८०६ |
| २१-९-३१ ते २४-४-३७ | २,९६,३५,४०,७६६ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २०४ |
| २ शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा .. ... | २०५ |
| ३ विमा कंपन्यांच्या हिशेबाची छाननी .. | २०६ |
| ४ स्फुट विचार .. | २०७ |
| मध्यम वर्गातील बेकारी—हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार—ब्रिटिश बजेट—स्वदेशी साखरेचा धंदा—मोटारगाड्यांची चटक—मुंबई इलाख्यांतील शिक्षणाचा प्रसार | |
| ५ इंजिनियरिंगच्या धंद्यांत यश कसें मिळेल . | २१० |
| ६ प्रचलित कॅलेंडरांत सुधारणा : | २१० |
| ७ सहकारी चळवळ .. | २११ |
| ८ सहकारी रजिस्ट्रारांचें सर्क्युलर् ... ... | २१२ |
| ९ हिंदी शेतकऱ्याची स्थिति .. ... | २१२ |
| १० निवडक बाजारभाव | २१३ |



# अर्थ

बुधवार, ता २८ एप्रिल, १९३७


## शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा

### (२)

### मध्ययुरोपिअन राष्ट्रांचा अनुभव

व्यवहाराचा बिनहिशेबीपणा, व्याजाचे भारी दर, वाईट दिवस येणार त्याची तरतूद न करण्याचा निष्काळजीपणा, इत्यादि अनेक कारणांनीं शेतकऱ्याच्या कर्जाचा बोजा वाढला असून दीर्घकाल चालू असलेल्या मंदीमुळें तो असह्य झाला आहे शेतकरी बुडणें, जमिनी त्याच्या हातून सावकाराकडे जाणें इत्यादि शेतीच्या कर्जबाजारीपणाचे परिणाम सर्व समाजास पर्यायानें भोगावे लागतात आणि म्हणून राष्ट्रीय सरकारास ह्या दुःस्थितीवर उपाय योजणें भाग पडतें राष्ट्रांची सामाजिक व आर्थिक घटना भिन्नभिन्न असते आणि त्याचे कायदे व परंपरा भिन्न असतात ह्यामुळें शेतकरीवर्गाच्या कर्जबाजारीपणावर योजावयाचे उपाय सर्वत्र एकाच तऱ्हेचे असूं शकत नाहींत. तथापि, त्या सर्वांच्या मुळाशीं मात्र एकच तत्त्व आढळतें, आणि तें हें आहे कीं शेतीच्या धंद्याचा कर्जबाजारीपणा ही सामाजिक व राष्ट्रीय आपत्ति असल्यानें तिच्या निवारणाच्या जबाबदारीचा बोजा सबंद समाजानें आपल्या शिरावर घ्यावा लागतो आणि आवश्यक होणाऱ्या स्वार्थत्यागांत सर्व वर्गांनीं अंशभागी व्हावें लागतें शेतकऱ्याचें संकट त्याचें त्यानें सोसावें अशा प्रकारची वृत्ति येथें अनिष्ट व अप्रयोजक ठरते. केवळ हिंदुस्थानाचा विचार केला तरी ह्या देशाच्या निरनिराळ्या प्रांतांत व देशी संस्थानांत परिस्थिति–भिन्नत्वामुळें कर्जनिवारणाची कोणतीहि छापील ठशाची योजना अमलांत आणतां येत नाहीं, तथापि, सरकार व जनता ह्यांनीं शेतकऱ्याच्या कर्जाच्या बोजास हात लावावा हें सामान्य तत्त्व सर्वत्र मान्यता पावलें आहे

युरोपांतील राष्ट्रांनीं योजलेल्या उपायांचे तीन प्रकार आढळतात (१) पहिल्या वर्गांतील देशामध्यें शेतीच्या कर्जाची फेड कायद्याच्या सक्तीनें केली जाते. कर्जाच्या रकमा व व्याजाचे दर उतरवण्याची सक्तीची व्यवस्था कायद्यानें होते. (२) दुसऱ्या वर्गांतल्या देशांतले उपाय इतके कडक नसतात. लवादामार्फत व तडजोडीनें कर्जाचा बोजा हलका करणें, व्याजाचे दर कमी करणें, कर्जफेडीची हप्तेबंदी करणें, जमिनीचे लिलाव तहकूब ठेवणें, सरकारनें कर्जफेडीस द्रव्यसहाय देणें, असल्या उपायाचा अवलंब ह्या देशांत होतो. (३) तिसऱ्या वर्गांतल्या देशांत सावकार व कर्जदार ह्यांच्यामधील करार सक्तीनें बदलण्यास सरकार तयार नसतें कर्जफेडीच्या भानगडींत स्वतः प्रत्यक्ष न पडतां शेतीच्या धंद्याची स्थिति सर्वसाधारणपणें सुधारून शेतकऱ्याच्या डोक्यावरील बोजा त्यास झेपेल अशा रीतीनें सर्वसामान्य स्वरूपाचें धोरण सरकार अंगिकारतें. ज्या देशांत कर्जें सक्तीनें "एक घाव दोन तुकडे" ह्या न्यायानें कमी करण्यात आलीं आहेत तेथें ह्या धोरणाचे परिणाम प्रतिकूल झाल्याचें अनुभवास आलें आहे धनकोचें भांडवल ह्या योजनेनें बुडवलें गेल्यानें आणि सक्तीच्या अंमलबजावणीमुळें पतीस धक्का बसल्याकारणानें शेतकऱ्यांस नवीन पैसा मिळणें कठीण झालें आहे. सर्व सामाजिक व्यवहार परस्पर-विश्वासावर आधारलेले असतात आणि त्या विश्वासावर जोराचा आघात होतो, तेव्हां सबंद सामाजिक जीवनासच धक्का बसल्यासारखें होतें. एवढ्याकरिता कर्जनिवारणाचे उपाय सौम्य स्वरूपाचे असावे, त्यांत तडजोडीचा बराच भाग असावा आणि सरकारनें कमी-ज्यास्त सहाय देऊन धनको साफ बुडवला जाणार नाहीं आणि पत व भांडवल ह्यांचा झरा आटणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी, ह्या आशयाचा निष्कर्ष मध्ययुरोपिअन राष्ट्रांच्या अनुभवावरून काढण्यांत आला आहे व्याजाचे दर उतरवणें, ऋणकोच्या जमिनीचा लिलाव व विक्री थांबवणें इत्यादि उपाय व्यावहारिक व इष्ट आहेत, हें उघड आहे व्याजाचे दर किती कमी करावे हें प्रत्येक ठिकाणच्या विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून राहील शेतीच्या मालाची विक्री किफायतशीर रीतीनें होईल अशी व्यवस्था झाल्यासहि शेतकऱ्यास नफ्याची कूस राहू शकेल

कर्जावरील व्याजाचे दर कमी केल्यानें शेतकऱ्यास जी सवलत मिळेल तिच्यापेक्षा शेतीच्या मालाचे भाव थोडे चढल्यानें त्याचा अधिक फायदा होईल. शेतीचा खर्च व तिचें उत्पन्न ह्यांचेमधील फरक नुसतें व्याज कमी होऊन फारसा वाढत नाहीं आणि शेतकऱ्याचे कमाईत त्या योगानें फारशी बढती होत नाहीं रुमानिया व युगोस्लाव्हिया ह्या कृषिप्रधान देशांमध्यें तेथील अधिकाऱ्याच्या लक्ष्यांत ही गोष्ट आली आहे. युगोस्लाव्हियाच्या कृषिमंत्र्यांनीं असें बोलून दाखविलें आहे कीं, शेतकऱ्यांचीं कर्जें एकदम रद्द केल्यानें त्याची पत सर्वस्वी नष्ट होऊन धंदा बसण्याचा प्रसंग येतो, म्हणून असल्या योजनेपेक्षा शेतीच्या मालाच्या किंमती वाढून शेतकऱ्याच्या कमाईत भर पडेल व त्याचें आर्थिक सामर्थ्य वृद्धिंगत होईल अशी व्यवस्था करणें अधिक इष्ट आहे. अलीकडे शेतीच्या मालाचे बाजारभाव थोडेसे वर गेले आहेत, पण ही स्थिति टिकाऊ आहे किंवा नैमित्तिक व अल्पकालिक आहे हें सांगता येत नाहीं. बाजारभाव उतरले आहेत त्यामानानें शेतीचा उत्पादन खर्च कमी झालेला नाहीं व होणें शक्य दिसत नाहीं तेव्हा, बाजारभाव चढणें व शेतकऱ्यांची कमाई वाढणें ह्या गोष्टीकडेच सरकारांनीं विशेष लक्ष पुरवणें अगत्याचें आहे तात्पुरत्या अडचणी दूर करण्याच्या उपायांनीं शेतीचा आर्थिक प्रश्न कायमचा व समाधानकारक रीतीनें सुटू शकत नाहीं.

## विमाकंपन्यांच्या हिशेबांची छाननी

आग किंवा अपघात ह्यांच्या अंदाजापेक्षां भावी मृत्यूचा अंदाज विमा मंडळ्यांस अधिक खात्रीनें करता येत असला तरी आयुष्याच्या विम्याची जबाबदारी वार्षिक नसून अनेक वर्षांच्या मुदतीची असते, हा तिचा विशेष आहे. विमेदार सरासरीनें पंचवीस वर्षें जगेल अशा अजमासावर विमाकंपनीच्या पॉलिसीच्या पैशाची मदार असली आणि विमेदाराची हयात वीस वर्षांचीच झाली तर कंपनीस प्रीमिअमचें उत्पन्न कमी येऊन नुकसान सोसावें लागेल. ह्याच्या उलट, विमेदाराची हयात कंपनीच्या अंदाजापेक्षां ज्यास्त झाली तर तिला अधिक काळपर्यंत प्रीमिअमचे पैसे मिळून फायदा होईल. मृत्यूनंतर किंवा ठरलेल्या मुदतीच्या शेवटीं कंपनीस वेळोवेळ ज्या रकमा विमेदारांस व त्याच्या वारसांस कराराप्रमाणें द्यावयाच्या असतात त्याची भरपाई करतां येईल एवढा फंड कंपनीपाशीं अविछिन्न असला पाहिजे. तो किती असावा म्हणजे अडचण पडावयाची नाहीं व विमेदारांस मिळावयाच्या पैशाविषयीं तिला शाश्वती वाटेल, हें गणिताच्या सहायानें तज्ञ ( ॲक्चुअरी ) कडून निश्चित करून घ्यावें लागतें. विमाकंपनीनें घेतलेल्या जोखमीची आज किती रक्कम भरते आणि तिच्या दृष्टीनें विमाफंडांतली रकम पुरेशी आहे कीं नाहीं हें ॲक्चुअरी हिशेब करून सांगतो. अशा रीतीनें निश्चित केलेली कंपनीच्या जोखमीची रकम आणि कंपनीनें आपल्या देण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी बाजूस काढून व्याजीं लावलेला विमाफंड ह्या दोहोंमधली तफावत हा ॲक्चुअरीनें केलेल्या हिशेबाचे वेळीं निघणारा वाढावा होय. येथें वाढावा न येतां तूट येणें म्हणजे कंपनीचा व्यवहार तिला व विमेदारांस नुकसानीचा आहे असें निश्चित होणें होय. सामान्यतः बऱ्या चालणाऱ्या कंपन्यांच्या ॲक्चुअरीनें काढलेल्या आढाव्यात वाढावाच निघतो आणि ती नफ्याची बाब असते.

कंपनीचा मामुली खर्च वजा जातां प्रीमिअमच्या रकमेची रहाणारी शिलक हा लाइफ फंड होतो आणि विम्याच्या द्याव्या लागणाऱ्या अजमावलेल्या रकमेच्या मानानें तो जेवढ्यानें ज्यास्त असतो, तो फरक हा ॲक्चुअरीच्या हिशेबावरून फायदा सिद्ध होतो. ह्या नफ्याची व्यवस्था कशी केली जाते हें आतां पाहूं. ॲक्चुअरीचा आढावा दर तीन किंवा पांच वर्षांनीं काढला जातो ह्या अवधींत लाइफ फंडांत, प्रीमिअम्सचे पैसे आणि फंडावरील व्याज जमा होत असतें आणि कमिशन व कंपनीचा कारभार ह्याबद्दलचा खर्च त्यामधून होत असतो. ही जमा व चालू खर्च ह्यांतला फरक हा नफा समजावयाचा नाहीं. ॲक्चुअरी पुन्हा तीन किंवा पांच वर्षांनीं आढावा काढीपर्यंत फंडांत प्रारंभीं असलेल्या रकमेंत चालू जमाखर्चांतून होणाऱ्या वाढाव्याची भर पडत रहाणार आणि नव्यानें आढावा काढला गेला म्हणजे नफा किती उरला हें निश्चित होणार. नफ्याच्या ह्या रकमेंत फायद्यातला हिस्सा मिळण्याचा, कराराप्रमाणें ज्यांस हक्क असतो असे ( वुइथ प्रॉफिट ) विमेदार पहिले अंशभागी असतात कंपनीचे चालक बहुतेक रिव्हर्शनरी बोनस देण्याचें ठरवतात. म्हणजे, विमेदारांस त्यांच्या फायद्याच्या रकमा रोख न मिळतां त्यांच्या पॉलिसींच्या रकमेंत त्यांच्या मानानें वाढावा केला जातो हिशेबाच्या दृष्टीनें ह्या पद्धतीचा असा परिणाम होतो कीं, लाइफ फंडाची " जिंदगी " ताळेबंदांत कायम रहाते, पण त्यातलें " देणें " मात्र वाढतें. हा "देण्या"चा वाढावा नफ्यात तेवढी रकम कमी येऊन बनतो. नफ्यापैकीं कांहीं अंश खास अंतर्गत रिझर्व्ह म्हणून ठेवण्यांत येतो, त्यानेंहि "देण्या"ची बाजू वाढते पण "जिंदगी"ची रकम बदलत नाहीं नफ्यांतला उरलेला तिसरा हिस्सा एकूण नफातोटापत्रकांत सामील केला जातो त्यांतला कांहीं भाग सर्व साधारण गंगाजळींत जाऊन बाकीची रकम डिव्हिडंड म्हणून वाटतां येते. त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक आढाव्यांत निघणारा नफा एका " सस्पेन्स " खात्यात - जातो. पुढच्या तीन किंवा पांच वर्षांच्या मुदतींतल्या प्रत्येक सालात त्या सालांतल्या नफातोट्याच्या हिशेबांत "सस्पेन्स" खात्यांतून एक तृतीयांश किंवा एक पंचमांश ( आढाव्याची मुदत तीन किंवा पांच वर्षांची असेल त्याप्रमाणें ) रकम काढून घेण्यांत येते आणि कंपनीच्या वार्षिक हिशेबांत ती तशी दाखवण्यात येते. आढाव्याची मुदत संपते तेव्हां नफ्याची रकमहि खलास झालेली असते व सस्पेन्स खात्यांत शिलक उरत नाहीं. १९३१–३५ च्या पंचवार्षिक मुदतींत दर वर्षी वांटलेला नफा १९३० मध्यें काढलेल्या आढाव्यांतून निघालेला असतो. म्हणजे त्याचा उगम त्यापूर्वींच्या पांच वर्षांत ( १९२६–३० ) लाइफ फंडांत झालेल्या वाढाव्यामध्यें असतो हें येथें ध्यानात ठेवलें पाहिजे. १९३१–३५ च्या मुदतींत वांटलेल्या नफ्याचा कंपनीच्या ह्या पांच वर्षांच्या व्यवहारांशीं कांहींच संबंध नसतो ह्या पांच वर्षांतला वाढावा १९३५ मध्यें निघणाऱ्या ॲक्चुअरीच्या आढाव्यावर अवलंबून रहाणार, हें उघड आहे.

विमाकंपन्यांचे अहवाल व ताळेबंद ह्यांमधील आकड्यांचें आकलन करणें सामान्य विमेदारास अगर भागीदारास कठीण जातें. तथापि, त्यांची हिशेब ठेवण्याची पद्धत समजावून घेऊन विशिष्ट कंपनीच्या धोरणाची माहिती करून घेतल्यास, कंपन्यांचे व्यवहार कसे चालतात, हें समजणें सोपें जाईल.

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

★ महेंद्रकर ब्रदर्स ★

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.

बुधवार चौक, पुणें

## ... विचार

### मध्यमवर्गातील बेकारी–मुंबईसरकारची योजना

सुशिक्षितांमधील बेकारीचा प्रश्न सोडविण्याचा एक प्रयत्न म्हणून मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यानें व्यवसायविषयक शिक्षणाची सोय करण्याकरितां एक योजना आंखली व तिच्या-प्रीत्यर्थ कायदेमंडळानें गेल्या वर्षी ५० हजार रुपयाची तरतूदहि केली. १,२५० रुपये मासिक पगाराच्या एका दुय्यम डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजची नेमणूक ह्या कामाकरितां खास करण्यात आली असून श्री. डी. सी. गुप्ता हे ह्या कामावर काल रोजीं रुजूं झाले सुमारें ९० कारखानदारानीं मिळून ४२५ विद्यार्थ्यांस येत्या वर्षी उमेदवार म्हणून दाखल करून घेण्यास समति दर्शविली आहे. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या कमिटीकडे ह्या योजनेवर देखरेख ठेवण्याचें काम सोपविलेलें असून येत्या आठवड्यात अर्जदार उमेदवारा-मधून लायक विद्यार्थ्यांची निवड कमिटी करील व जून, १९३७ पासून ही योजना अंमलात येईल इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यास पाच वर्षे उमेदवारी करावी लागेल सुरवा-तीस त्यास १५ रुपये मेहनताना मिळेल व लायकीप्रमाणें त्यांत वाढ होईल. उमेदवारीची मुदत संपल्यावर त्याची-वरच्या दर्जाचे कामगाराचे जागीं नेमणूक होईल, अशी ही योजना आहे. पहिल्या वर्षी सुमारें ३०० विद्यार्थ्यांची मुंबई येथें व १२५ विद्या-र्थ्यांची अहमदाबाद येथें शिक्षणाची व्यवस्था करण्यात येईल सालोसाल ही संख्या वाढविण्यात यावयाची आहे. सुशिक्षित तरुणाच्या बेकारीचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सरकारास नाकारतां येत नाहीं आणि अल्प प्रमाणांत का होईना, मुंबई सरकारनें ती कबूल केली आहे, हें वरील योजनेवरून सिद्ध झालें आहे हा प्रयत्न कितपत यशस्वी होतो, हें समजण्यास बराच काळ लोटावा लागेल तथापि, एका नवीन योजनेचा उपक्रम ह्या दृष्टीनें ह्या सदरहु प्रयत्नाकडे सर्वांचें लक्ष लागून रहाणें स्वाभा-विक आहे.

---

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

हिंदुस्थान व एशियातले इतर देश ह्यामध्यें व्यवहार कर-णाऱ्या चार्टर्ड व नॅशनल बॅंक ऑफ इंडिया वगैरे बॅंकांचें गेल्या वर्षाचे ताळेबंद आणि त्याच्या अध्यक्षाचीं वार्षिक भाषणें प्रसिद्ध झालीं आहेत शेतीच्या मालाचे भाव वाढत आहेत, त्यामुळें शेतकरीवर्गाची कमाई थोडीशी वाढली आहे, हिंदुस्था-नचा परराष्ट्रीय व्यापार हळूहळू वाढत असून निर्गत व्यापाराचें प्रमाण अधिक होत आहे इत्यादि लक्षणावरून मंदी संपून चल-तीस प्रारंभ झाला आहे असा निष्कर्ष सदरहु भाषणात काढ-लेला दिसतो. आणखीहि एक गोष्ट त्यामध्यें नमूद केलेली आढ-ळते ती ही कीं, हिंदुस्थानातले स्वदेशी धंदे विस्तार पावत असल्याकारणानें बाहेरून येणाऱ्या पक्क्या मालाच्या आयातीस आळा बसला आहे आणि देशात राष्ट्रीय भावना विशेष जागृत झाली असल्यानें ब्रिटिश मालाच्या आयातींत वाढ होण्यास फारशी जागा नाहीं. लोखंड, पोलाद, सिमेंट, कापड, साखर इत्यादि जिन्नस स्वदेशी कारखान्यात भरपूर निघत आहेत, अशा स्थितींत परदेशी मालास फारच मर्यादित वाव आहे. सोन्याची निर्गतहि कमी होत जाणें अपरिहार्य आहे निर्गतीच्या मानानें आयात वाढलेली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे आणि लॅंकेशायरच्या गिरणीवाल्यांची निराशा झाली आहे. १९३६ सालची हिंदी मालाची निर्गत १८५ कोटि रुपयांची व आयात १२४ कोटींची झाली. १९३५ सालाच्या मानानें हे आंकडे अनुक्रमेंकरून २५ व ११ कोटींनीं अधिक होते १९३५ मध्यें हिंदुस्थाननें ५३ कोटींचा माल ग्रेटब्रिटनमधून घेतला होता, त्या व्यापारात १९३६ सालीं ५ कोटि रुपयाची घट झाली त्या देशात झालेली निर्गत मात्र ४७ कोटींची ५८ कोटि रुपये झाली. १९३६ मध्यें हिंदुस्थानात १३ कोटींची चांदी आली. त्यापूर्वीच्या दोन वर्षांत चांदीची, ह्या उलट, निर्गत झालेली होती.

---

### ब्रिटिश बजेट

भावी शत्रुसंकटापासून राष्ट्राचें रक्षण करण्यासाठी पाच वर्षांच्या मुदतींत पाच-सहाशे कोटि रुपये शस्त्रास्त्राच्या तयारी-निमित्त खर्चण्याचें इंग्लंडनें ठरवल्यामुळें ब्रिटिश बजेटात तूट येणें व ती भरून काढण्याकरिता नवीन कर बसवावे लागणें ह्या गोष्टी अपरिहार्य होत्या. जादा लष्करी खर्च कराचा जनतेवरील बोजा वाढवून भागवणें अशक्य होतें आणि ही सर्व रकम कर्जाच्या द्वारें उभारणें अनिष्ट होतें म्हणून, ब्रिटिश फडनवीस, मि चेंबर्लेन, ह्यांनीं प्राप्तीवरील कराच्या दरात थोडी वाढ करून आणि धंद्यातल्या नफ्यावर नवीन पट्टी बसवून चालू उत्पन्नात भर टाकण्याची व्यवस्था पार्लमेंटला सादर केलेल्या आपल्या अंदाजपत्रकात केली असून लढाऊ खर्चाची बाकीची रकम कर्जाऊ घेण्याचें ठरविलें आहे इंग्लंडमध्यें सुरू झालेल्या आर्थिक चलतीस विरोध होऊ न देतां धंदेवाल्यास होणाऱ्या जादा नफ्याचा काहीं भाग सरकारी तिजोरीकडे आकर्षून घेणें हें दुहेरी धोरण त्यानीं आखलें आहे व्याजाचे दर भरमसाट चढू नयेत आणि देशात फाजील पैसा खेळून बाजारभाव भलत्याच प्रमाणात वाढूं नयेत अशी खबरदारीहि त्यास घ्यावी लागली आहे. सर-कारास जरूर असलेला पैसा तिजोरीस मिळून राष्ट्राच्या आर्थिक व्यवहारांचा गाडा भरभराटीच्या रस्त्यानें सुरक्षीत चालेल अशी ब्रिटिश फडनवीसाची अपेक्षा आहे. भावी युद्धाच्या भीतीची कृष्ण छाया त्याच्या बजेटात पडलेली आहे, तथापि प्रतिकूल परिस्थितींत अत्यंत सावधगिरीचें असें धोरण त्यानीं अंगिकारलें आहे ह्यामुळें हिंदी बाजारात त्याच्या बजेटामुळें विशेष खळबळ उडाली नाहीं.

---

### स्वदेशी लाखेचा धंदा

कोणत्याहि धंद्याची सुधारणा व प्रगति होण्यास त्यासंबधांत शास्त्रीय संशोधन चालू रहाण्याचें महत्त्व दिवसानुदिवस वाढत आहे नैसर्गिक स्थितींत प्राप्त होणाऱ्या पदार्थांच्या ऐवजी कृत्रिम-पणानें बनविलेला माल उद्योगधंद्यात वापरण्याची प्रवृत्ति बळावत आहे आणि त्याचप्रमाणें, कारखान्यात उपयोगात आणल्या जाणाऱ्या मालातहि अदलाबदल होत आहे दिवसेंदिवस उठावदार पण स्वस्त माल तयार करण्याकडे कारखानदाराचें लक्ष असतें ह्याचें कारण जगांत जोरानें चालणारी चढाओढ हें आहे हिंदु-स्थानात लाखेची पैदास मोठ्या प्रमाणावर होते आणि बाहेरच्या देशात तिला गिऱ्हाइकहि आहे हा धंदा टिकाऊ व्हावा ह्याकरितां लाखेच्या पैदाशीवर पट्टी बसवण्यांत आली आहे आणि तिच्या उत्पन्नांतून लाखेबाबत शास्त्रीय संशोधन चालू ठेवण्याची व्यवस्था अलीकडे करण्यात आली आहे. इंग्लड व अमेरिका ह्या देशांतील

हिंदी लाखेची मागणी वाढावी म्हणून तेथील गिऱ्हाइकांच्या दृष्टीनें हा प्रयत्न होत आहे रंग, व्हार्निस, विजेचीं उपकरणें इत्यादि जिनसांमध्यें हिंदी लाख अधिक प्रमाणात खपेल अशी तजवीज होण्यासाठी बाहेरच्या देशातील ग्राहकाच्या गरजा समजून घेण्यात येत आहेत आणि त्यास अनुसरून हिंदुस्थानात लाखेच्या धंद्यात कोणत्या सुधारणा करतां येतील ह्याचा शोध हिंदी शास्त्रज्ञ लंडनमध्यें करीत आहेत १९३५–३६ सालीं लाखेवरील पट्टीच्या उत्पन्नातून दोन लक्ष नव्वद हजार रुपये धंद्याच्या सुधारणेबाबतच्या प्रयत्नाप्रीत्यर्थ खर्चण्यात आले. प्रस्तुत धंद्यासंबंधात जागरूकपणानें प्रयत्न चालले आहेत ही गोष्ट अभिनंदनीय आहे

---

### मोटार गाड्यांची चटक

" अलीकडे मोटार गाड्यांचा काय सुळसुळाट झाला आहे हो !" ही भाषा नेहमी प्रत्येकाच्या कानावर पडल्यावाचून रहात नाहीं रस्त्यात होणारे अपघात आणि अंगावर उडणारी धूळ व चिखल ह्याविषयीं कितीहि तक्रारी झाल्या तरी बस व लॉरी ह्याच्या सोयीचा फायदा घेण्यास कोणीहि चुकत नाहीं मोटारींच्यामुळें बैलगाड्यांचा धंदा बसला, लोकांची पायीं चालण्याची सवय मोडली, जनतेचा पैसा निष्कारण खर्ची पडू लागला इत्यादि प्रकारची टीका साधार असली तरीहि प्रवासाचें सुखकर व सोयीचें साधन म्हणून मोटारगाड्याची लोकप्रियता सारखी वाढत आहे अपघाताबद्दल विमा उतरण्याची जबाबदारी आली, लायसेन्स व रजिस्ट्रेशनची फी वाढली आणि रस्तेदुरुस्तीचा बोजा सरकार व स्थानिक संस्था ह्यास उचलावा लागला तरी मोटारी व लॉऱ्या बंद कराव्या असें कोणी म्हणत नाहीं ! मोटारगाड्याची संख्या सर्व देशात सारखी ,वाढत आहे ग्रेटब्रिटनची लोकसंख्या गेल्या पंचवीस वर्षांत ४५ लक्षानीं वाढली पण मोटारी ह्या अवधींत दसपट झाल्या. गेल्या दहा वर्षांत खाजगी मोटारींच्या किंमती सरासरीनें निम्म्यानें उतरल्या आहेत. पेट्रोल व टायर्सहि पूर्वीच्या मानानें कितीतरी स्वस्त झाल्या आहेत मध्यम स्थितींतल्या लोकास परवडेल अशा किंमतींत गाड्या बनवण्यांत मोटार कंपन्यानीं पुष्कळच प्रगति केली असून गाड्यांचा आकार व सोईस्करपणा ह्यात अतिशय सुधारणा झालेली आहे लोकास मोटारगाड्याची चटक लागली आहे, तीमध्यें फरक होईल असें दिसत नाहीं आणि रस्ते सुस्थितींत कसे राखावे ह्याची काळजी मात्र सरकार व स्थानिक संस्था ह्यांस वहावी लागेल.

---

### मुंबई इलाख्यांतील शिक्षणाचा प्रसार

| | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३५-३६ |
|---|---|---|---|
| शिक्षणविषयक संस्था | १६,७३० | १६,९२७ | १७,३१४ |
| त्यातील विद्यार्थी | १३,७४,२९६ | १४,२२,१४६ | १४,७६,४०४ |
| शिक्षणावर झालेला एकूण खर्च (रु.) | ३ को. ९८ ल | ४ को, ११ ल | ४ को २२ ल |
| कॉलेजांची संख्या | ३४ | ३४ | ३५ |
| कॉलेज-विद्यार्थ्यांची संख्या | १६,४३० | १७,७३६ | १७,९१४ |
| ॲंग्लो–व्हरनॅक्युलर शाळा | ५७१ | ६१० | ६३६ |
| त्यातील विद्यार्थी | १,००,९५९ | १,०८,७३२ | १,१३,२४७ |
| प्राथमिक शाळा | १४,६१६ | १४,७३० | १४,९५२ |
| त्यातील विद्यार्थी | ११,६८,५६४ | १२,०६,८८२ | १२,४८,०१२ |

---


*For All Medicinal Requisites*

— TRY —

**N. MAHADEV & Co.**

DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS

City Post Office Corner, POONA 2

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca


*Offices* throughout India & the East

S C. MAJUMDAR, MANAGER Bombay Branch | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## फोल्डिंग व बॉक्स कॅमेरा



सामर्थ्यवान लेन्स बसविलेला. ह्या कॅमेऱ्यानें नवशिक्यास सुद्धां फिल्मवर उत्कृष्ट फोटो घेतां येतात बेकार रोज ५ रु. मिळवू शकतात फिल्म कार्ड, फ्रेम, रसायनें, कॅमेरा कसा वापरावा हें सांगणारें पुस्तक मोफत फोल्डिंग कॅमेरा, रु. ४ बॉक्स कॅमेरा न २, रु. २-१२. न. १ रु ३-१२ पॅकिंग व पोस्टेज वेगळें.

Dutt & Co (12)
15/,-Jay Mitra Street,
P. O Haikhola (Calcutta).

---

"**DAWN'S MENSORIUM**" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, Poona"

---

**पाळणा** दरसाल हलू नये म्हणून आमचें इच्छा गर्भ सभव औषध घ्या व संततिनियमन करा औषध बद केलें कीं, मुलें होतात महिन्यातून एकदाच घ्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट. स. नि

गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी

---

***Ardomix*** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगावर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गलचलणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरें करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत अनुभव घेण्यास सोपें जावे म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे ट स १२ आणे निराळा. गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट न. ६)**
३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर

एजन्सीज —

मुंबई—**यशवंत दत्तात्रय गाडगीळ**, फणसवाडी, मुंबई २.
धामणगांव—**मे भागवत ब्रदर्स**, धामणगांव, व-हाड
हरदा—**चौथाजी तुळशीराम** आणि सन्स, हरदा, सी. पी.
खानदेश—**डॉ जी एन महाजन**, मोठें वाघोदें, खानदेश.


## NOTICE TO CONTRACTORS.

Separate sealed percentage tanders in form B-1 for each of the following works are invited and will be received by the undersigned on 12-5-1937 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc. can be had at the undersigned's office on any working day during office hours.

| | | Estimated cost. |
|---|---|---|
| 1. C. R. to Poona Bangalore Road miles 235 to 266. | Rs. | 7680/- |
| 2. C R to Dharwar Goa Road miles 1 to 18. | Rs. | 2172/- |
| 3. C. R. to Dharwar Goa Road miles 19 to 58 | Rs. | 6412/- |
| 4. C.R. to Dharwar Saundathi Road. | Rs. | 5302/- |
| 5. C. R. to Saundathi Bagewadi Rood. | Rs. | 7044/- |
| 6. C. R to Kumta Hubli Road. | Rs | 2816/- |
| 7. C. R. to Hubli Sholapur Road | Rs. | 2062/- |
| 8 C. R. to Poona Bangalore Road miles 273 to 287. | Rs. | 5831/- |
| 9 C. R to Gadag Pala Road | Rs | 2490/- |

2 The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for acceptance or rejection of any

Ex Engr's Office, Dharwar, 22nd April, 1937

P K Shevde,
Executive Engineer,
Dharwar Division, Dharwar.

---

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed tenders are invited for —

Dhulia Bhusawal Edlabad Nagpur Road, Masonry works on Edlabad Icchapur Section, on B-1 form percentage rate tender, costing ... ... Rs 41,400/- approximately.

The Date of receiving Tenders will be 10th May 1937 upto 2 P M Tender forms will be issued in the office of the Executive Engineer, Khandesh Division on working days upto 9th May 1937.


For details apply to the Undersigned

Office of the Ex Engr, Khandesh Division, Dhulia, W Khandesh,

S. K. Karandikar,
Executive Engineer,
Khandesh Division

---


स्थापना १९२० प्रथम मुंबई सरकारनें मान्य केलेले व कोल्हापूर सरकारचे आश्रयाखालील



**जाधव टेलरिंग कॉलेज**

माहिती मागवा ] व [ नावें नोंदवा

पत्ता.-प्रिन्सि जाधव टेलरिंग कॉलेज
४९७ बुधवार, पुणे २

## इंजिनियरिंगच्या धंद्यांत यश कसें मिळेल ?

### उमेदवारांस उपयुक्त सूचना

मुंबई येथील इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीनें इंजिनियरिंगच्या धंद्यात प्रवेश करणाऱ्या उमेदवाराकरिता एक व्याख्यानमाला आखली आहे, त्यामधील सुरवातीचें व्याख्यान कंपनीचे जनरल मॅनेजर मि. ट्रॉलिप, ह्यांचें झालें. ते म्हणालेः—

" विश्वविद्यालयीन पदव्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात फार तर ४० ते ५० टक्के उपयोग होतो इंजिनियरिंगचे धंद्यात मनुष्यस्वभावाची पारख, कार्याची पद्धत व साधनाची माहिती ह्या तीन गोष्टींची फार आवश्यकता आहे मजुरावर वचक बसविणें व त्यांचेकडून काम करून घेणें हें शिकण्यापूर्वी हुकुमाचा आपल्या स्वतःवर काय परिणाम होतो, तें नीट समजावून घ्या वरिष्ठाच्या शिव्यांनीं संतापून न जाता त्याचे मागील कारणाची माहिती करून घ्या उमेदवारीचे काळात ह्या गोष्टींचें ज्ञान करून घेणें अत्यंत आवश्यक आहे

प्रत्येक गोष्टीकडे कुतूहलपूर्वक लक्ष द्या व काय, का, कसें, इत्यादि प्रश्न एकसारखे विचारीत जा. अशा तऱ्हेची मार्मिक नजर निर्माण होणें हें सर्वांचें काम आहे. प्रत्येक प्रश्नाचा विचार सर्व बाजूनीं काळजीपूर्वक करीत जावें व त्याची छाननी करून तपशीलवार माहिती करून घ्यावी.

सर्व तऱ्हेचें काम शिस्तींत चालावें, ह्याकरिता कांहीं नियम घालून देणें आवश्यक असते. ' बेस्ट ' कंपनीचें शेकडा ८० टक्के काम ह्या पद्धतीनें चालतें केवळ एकाद्या विषयासबंधी संपूर्ण ज्ञान मिळवून भागणार नाहीं, यश मिळविण्याकरिता सर्वांगीण कार्यक्षमतेची आवश्यकता आहे."

### प्रचलित कॅलेंडरात सुधारणा

महिने व वर्ष मोजण्याची हल्लींची इंग्रजी पद्धत बरीच गैरसोयीची आहे, म्हणून तीमध्यें सुधारणा करण्याच्या हेतूनें राष्ट्रसंघानें आपल्या सभासद-राष्ट्राकडून सूचना मागविल्या होत्या. चिली देशाच्या सरकारनें सुचविलेलें कॅलेंडर सध्याच्या पद्धतींत विशेष फेरफार न करतां तीमधील दोष टाळणारें आहे. त्यामधील महत्त्वाच्या सुधारणा खालीलप्रमाणें आहेतः—

( १ ) प्रत्येक वर्षी जानेवारीची पहिली तारीख रविवारींच येईल

( २ ) प्रत्येक आठवडा रविवारीं सुरू होऊन शनिवारीं संपेल

( ३ ) वर्षाचे चार भाग कल्पून प्रत्येक भागांत १३ आठवडे म्हणजे ९१ दिवस येतील प्रत्येक भागांतील पहिला महिना ३१ दिवसाचा व पुढील दोन महिने ३० दिवसाचे असतील.

( ४ ) दर वर्षाचे अखेर एक दिवस जास्त राहील प्रत्येक चार वर्षांनीं ३० जून व १ जुलै ह्याचेमध्यें एक दिवस आणखी धरला जाईल हे दिवस आंतरराष्ट्रीय सणाचे म्हणून समजले जातील.

### ट्रेझरी बिलावर १ रु १॥ आणा व्याज

पैशाची तंगी व चढणीस लागलेले व्याजाचे दर ह्याचें प्रतिबिंब हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलाच्या साप्ताहिक विक्रीच्या व्यवहारांत स्पष्ट उमटलेले दिसत आहे गेल्या आठवड्यात १ कोटि रुपये किंमतीच्या ट्रेझरी बिलास फक्त १३ कोटि रुपयांच्या टोकाची मागणी येऊन त्यावर द द १ रु. १३ आणा व्याजाचा दर सरकारास द्यावा लागला कांहीं महिन्यामागें हा व्याजाचा दर ७-८ आणे होता, तो आता दुप्पट झाला आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

दी रेडिओ इलेक्ट्रिक स्टोअर्स
रिप्रेझेंटेड बाय—एम. जी. साठे
रे-मार्केटनजीक, ८० शुक्रवार, पुणें.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोप्लेन प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

मुंबई सरकारचे सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेली
डॉ. काळे यांचे पूना लेप्रसी क्लिनिक
म्हणजेच महारोग, पांढरे कोड व इतर सर्व प्रकारचे चर्मविकारावरील उपचाराचें विश्वसनीय ठिकाण
ठिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

पिक्चर-फिट कपडे मिळण्याचें एकच ठिकाण
टेलर्स रिसबूड ब्रदर्स
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## सहकारी चळवळ

### फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स, नाशिक.

**आसि. रजिस्ट्रार, श्री शहा, यांचें मननीय भाषण**

नाशिक डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूटच्या विद्यमानें श्री. डी. ए. शहासाहेब यांच्या सांगण्यावरून रविवार ता. ११-४ ३७ रोजीं ३ वाजता नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम भागांतील फील्ड वर्कर्सची एक परिषद् रावबहादुर आर्. व्ही. वडेकर यांचे बंगल्यावर भरली होती.

प्रारंभीं रावबहादुर वडेकर, चेअरमन, नाशिक डि. को. इन्स्टिट्यूट, यांनीं परिषदेचा हेतु समजावून सांगितला व श्री. डी ए. शहासाहेब यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी त्यांना विनंति केली. अध्यक्षाचे सूचनेवरून श्री. बी. आर. पालेकर, ऑडिटर, नाशिक, यांनीं व्याजाच्या सवलतीची योजना समजावून सांगितली नंतर ते म्हणाले कीं, सोसायट्यांची सद्यःस्थिति फारच खालावलेली आहे व अशा बिकट परिस्थितींतून योग्य मार्ग काढून सुधारणा करण्यास ही सांप्रतची व्याजाची सवलत फारच परिणामकारक ठरेल असें माझें मत आहे. म्हणून, सर्व कार्यकर्त्यांनीं एकजुटीनें व कसोशीनें प्रयत्न केल्यास त्याचें फळ इच्छिल्याप्रमाणेंच मिळेल यात मला काहीं शंका वाटत नाहीं. यासाठीं सर्वांनीं शक्य तों प्रयत्न करावा अशी माझी विनंति आहे.

**कर्जाच्या परतफेडीचें महत्त्व**

नंतर निरनिराळ्या वक्त्यांनीं सवलत फारच उपयुक्त आहे व हिच्या योगानें फारच फायदा होईल असें आपल्या भाषणांतून मत व्यक्त केलें. नंतर कांहींच्या शंकांना श्री. शहासाहेब यांनीं समर्पक उत्तरें दिल्यानंतर व व्याजाच्या सवलतीच्या योजनेबाबत चर्चा झाल्यानंतर ते समारोपादाखल भाषण करतांना म्हणाले.—

"आतांपर्यंत झालेल्या चर्चेवरून मला आतां परिस्थितीची कल्पना आली आहे शेतीची परिस्थिति बरी नसल्यामुळें सोसायट्यांची स्थिति खालावलेली आहे असें नेहमी सांगण्यात येतें. पण तें बरोबर आहे असें मला वाटत नाहीं. कारण एका विवक्षित भागांतील सारखी परिस्थिति असलेल्या दोन गांवांतील सोसायट्यांची परिस्थिति सारखी आढळून येत नाहीं. यावरून निवळ शेतीच्या परिस्थितीवरच सोसायट्यांची स्थिति अवलंबून आहे असें म्हणतां येणार नाहीं. शेतीच्या बरोबर आणखी दुसऱ्या बाबीहि विचारात घ्याव्या लागतात. सध्याची परिस्थिति कशा प्रकारची आहे हें तुम्हां सर्वांस ठाऊक आहेच. अशा वेळीं योग्य खबरदारी घेतली नाहीं तर हल्लींपेक्षांहि वाईट स्थिति उत्पन्न होईल व त्यायोगानें सभासदांचें जास्त नुकसान होईल. आतां आपणापुढें दोनच प्रश्न उभे आहेत. एक असा आहे कीं, सध्याची जी परिस्थिति आहे ती तशीच चालू ठेवावयाची व कायद्याचा अवलंब करून वसूल करावयाचा कीं काय? या योगानें सभासदांना अर्थातच त्रास फारच होईल. त्याना कदाचित् आपल्या जमीनींसहि मुकावें लागेल व मजूर बनून रहावें लागेल. सध्या जे पैसे वाटले आहेत ते जर पुढें केव्हांहि वसूल करावयाचे नाहींत व शेवटीं सूट द्यावयाची आहे असें जर कोणी आपणांस सांगणारा भेटला तर मग मीहि वसूल देऊं नका असें म्हणेन. पण जोपर्यंत असें कोणी म्हणत नाहीं व मलाहि असें सांगणारा कोणीहि आजपर्यंत आढळला नाहीं तोंपर्यंत वसूल हा दिला पाहिजे आणि ज्याअर्थी वसूल केव्हां तरी देणें हें क्रमप्राप्त आहे त्याअर्थी तो उद्यापेक्षां आजच देणें जास्त फायद्याचें आहे हें मी आपणांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. आज वसूल दिला तर तुम्हांस सवलतीचा फायदा मिळेल व तुमचेवरील कर्जाचा बोजा हलका होईल.

**अप्रिय परंतु पथ्य**

पुष्कळ दिवसाच्या सवयीमुळें कर्जफेड आजवर झाली नाहीं व त्यामुळें कर्जाचे बोजे होईजड झाले आहेत. अशा स्थितींत कर्जाची मागणी केल्यास ती लोकांना साहजिकच आवडणार नाहीं व जे वसूल मागण्यास जातील त्यांना त्यांची अप्रियता संपादन करण्याची पाळी येईल ही गोष्ट खरी आहे. पण माझें त्यास असें उत्तर आहे कीं, एखादा माणूस आजारी पडला तर आपण त्यास औषध त्याच्या मर्जीप्रमाणें गोड देत नाहीं त्यास कडू औषध दिल्याशिवाय तो बरा होणार नाहीं हें आपणांस ठाऊक असतें. म्हणून कडू औषध दिल्यास रोगी आपणावर रागावेल ही भावना आपल्या डोक्यांत येत नाहीं. कारण तो बरा झाला पाहिजे ही आपली इच्छा असते. ज्याप्रमाणें रोग्याच्या बाबतींत आपण कडू औषध देतांना त्याच्या हिताकडे लक्ष देतों त्याचप्रमाणें वसूल करतांना सभासदांच्या हिताकडे आपण सर्वांनीं लक्ष दिलें पाहिजे. आपण आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे मग त्यायोगें आपण अप्रिय झालों तरी हरकत नाहीं. कारण जर आपण आपलें यावेळीं कर्तव्य बजावलें तर त्यायोगानें सभासदांचें हित होणार आहे. म्हणून माझी आपणा सर्वांस सूचना आहे कीं, आपण आपलें कर्तव्य पार पाडा. कर्तव्याची जाणीव ठेवून कामास लागा.

**जबाबदारीनें काम करण्याची आवश्यकता**

कामास लागतांना मला आणखी एका गोष्टीकडे आपलें लक्ष वेधणें जरूर आहे. ती ही कीं, नुसते कागदी घोडे नाचविल्यानें काम होत नाहीं. कागदावर लिहिलेलें काम कागदावर ठेवल्यानें त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. जें काम आपण स्वीकारलें तें काम जबाबदारी ओळखून पार पाडणें या गोष्टीला जास्त महत्त्व मी देतों. यासाठीं कर्तव्याची जाणीव जागृत ठेवून व जबाबदारी ओळखून कार्य करणारे स्वयंसेवक मला पाहिजे आहेत. याच दृष्टीनें मी आपल्या कामाकडे पाहीन व आपल्या कामाचा आढावा वेळोवेळ घेत राहीन.

आपल्या अंगीकृत कार्यांत आपणास जरूरीप्रमाणें मदत देण्यासाठीं व आपल्या कामात मदत करण्यासाठीं मी या दोन-तीन महिन्यांकरिता एक स्वतंत्र सब ऑडिटर येथें नेमण्याचें ठरविलें आहे व तो लवकरच आपल्या कामीं येऊन रुजू होईल.

शेवटीं मला आपणांस एवढीच विनंति करावयाची आहे कीं आपण स्वयंस्फूर्तीनें कार्य अंगावर घ्या व तें यशस्वी करण्याचा अटोकाट शिकस्तीचा प्रयत्न करा आणि येथील परिस्थिति सुधारून दाखवा. काल्पनिक संकटें आपल्या मार्गांत उभीं करूं नका. जो प्रामाणिकपणानें प्रयत्न करील व आपलें लक्ष या कामांत घालील त्यास आपला मार्ग आपोआप दिसूं लागतो. म्हणून तुम्हीं जोरानें व नव्या दमानें कार्यास लागा व यशस्वी व्हा एवढेंच माझें आपणास सांगणें आहे. आपल्या इच्छेप्रमाणें सोसायट्या वांटून घ्याव्या व त्याप्रमाणें कार्याला लागावें." याप्रमाणें सुमारें एक तासभर त्यांनीं अत्यंत विचारपरिप्लुत व परिणामकारक भाषण केलें. त्यानंतर सर्वांनीं काम करण्याचें आश्वासन देऊन श्री शहासाहेबांचे आभार मानले व त्यांना हार अर्पण केल्यानंतर ते गेले. त्यानंतर वेगवेगळ्या कार्यकर्त्यांनीं कामाची वांटणी करून घेतली.

## जमीन गहाणाच्या बँकांमार्फत सोसायट्यांचीं देणीं भागविण्याची योजना

### रजिस्ट्रार साहेबांचें सर्क्युलर

( मुंबई इलाख्यांतील सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार, श्री. एम डी. मनसाळी, ह्यांनीं जमीन गहाणाच्या बँकांनीं करावयाच्या कर्जनिवारणाबाबत व सोसायट्यांस द्यावयाच्या अल्प मुदतीच्या कर्जाबाबत एक सर्क्युलर काढलें आहे, त्याचा गोषवारा येथें देण्यांत येत आहे. )

सहकारी सोसायट्याकडे येणें असलेल्या दीर्घकालीन कर्जाची फेड करण्याकरितां रकमा मागणाऱ्या अर्जांचा व अर्जदारांच्या ऐपतीबाहेरील कर्जें भागविण्याकरितां मागणाऱ्या कर्जविषयक अर्जांचा प्रांतिक जमीन गहाणाच्या बँकेनें विचार करावयास हरकत नाहीं, अशा अर्थाचा ठराव तिच्या डायरेक्टर बोर्डानें २४–६–३६ रोजीं केला. लहान मुदतीचीं कर्जें भागविणाऱ्या अर्जांचाहि विचार प्रत्येक अर्जाचे पात्रतेप्रमाणें करण्यात यावा असेंहि ठरलें. ह्या बाबत रजिस्ट्रार साहेबांनीं खालील सूचना केल्या आहेतः—

( १ ) सोसायट्याचीं लहान मुदतीचीं देणीं भागविण्याकरिता त्याच्या सभासदांस सामान्यत. कर्जें देण्यात येऊं नयेत

( २ ) कर्जाचें स्वरूप बरोबर समजावें, ह्या करिता अर्जदारानें अर्जाबरोबर कर्जाची माहिती देणारा रजिस्टर मधील उतारा पाठवावा

( ३ ) सोसायट्याचें कर्ज भागविण्यापूर्वीं ह्यासबंधीं अर्जदाराच्या पतीसबधीं जमीन गहाणाच्या बँकेनें सोसायटीचें व सेंट्रल बँकेचें लेखी मत घ्यावें

---

### हिंदी शेतकऱ्याची स्थिति

"हिंदुस्थानातले शेतकरी जमिनीच्या लहान तुकड्यामध्यें पिकें करतात आणि पिकलेल्या मालाचा बराच मोठा भाग कुटुंबाच्या नित्याच्या उपयोगासाठी राखून ठेवतात बाकीचा माल विकून येणाऱ्या पैशातून ते खड, जमीनीचा सारा व कर्जावरील व्याज इत्यादींचा खर्च भागवतात. ते नेहमी कर्जांत असल्यामुळें व्याजाचा पैसा दर वर्षीं भरावा लागतो. ह्यानंतर राहिलेल्या शिलकेमधून हिंदी शेतकरी कपड्यालत्त्याच्या वगैरे आपल्या साध्या गरजा भागवतो. अनुकूल परिस्थितींतहि कुटुंबाच्या मामुली खर्चासाठी त्याच्या जवळ फारसा पैसा उरत नाहीं आणि वाईट काळीं तर त्याची अल्प मिळकतहि नाहींशी होते म्हणून शेतीच्या मालाच्या व विशेषतः कपास, ताग, धान्यें ह्याच्या पिकाच्या भाजारभावाचें हिंदी शेतकऱ्यास व सर्व हिंदुस्थानास विशेष महत्त्व आहे"—मर्कंटाइल बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष, लॉर्ड कॅट्टो, ह्याचे भाषण

---

### तुर्कस्तानची औद्योगिक प्रगति

तुर्कस्तानात नवीन धंदे उदयास यावे ह्याकरिता तेथील सरकारानें कारखान्यांस लागणाऱ्या कच्च्या मालावरील आयात जकाती कमी करण्याचें ठरविलें आहे. लोखंड व पोलाद ह्याच्या धंद्याची स्थापना करण्याची योजना तुर्की सरकारनें आखली असून सरकारी सहायानें आर्थिक प्रगति व्हावी अशी व्यवस्था करण्यात आली आहे

---


# एशियन पॉलिसी

म्हणजेच

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

अल्प प्रिमियम आणि भरपूर बोनस

## धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १



## नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८०,६०० |
| रिझर्व्ह फंड | २,७८७ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६३,०५६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ५,०१९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९९० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४१,४९४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्यांहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचें तारणावर कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे :

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) .. | ११९–१३ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०५—५ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—८ |
| ४% १९४३ .. .. | १०६–१२ |
| ३½% बिनमुदत .. .. | ९४—५ |
| ३½% १९४७–५० ... .. | १०५—० |
| ३½% १९४८–५२ .. ... | ९९–१२ |

### बिनसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) .. | १२४—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३८—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | १०९—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४–१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि ) | १५२६—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु. ४ आ. ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| मुंबई ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१—९ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९% ) | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १५०८–१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५५०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. द्वु. प्रेफरन्स, १७ रु. ८ आ.) | १७९—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु.ऑर्डि. रु.६) | ३३६—० |
| टाटा आयर्न ( ३० रु डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १५६५—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३४–१५–३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५३—०–० |


दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेव्हिंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात
मॅनेजिंग एजंटस्.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते
भेटा अगर लिहाः—
भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
लक्ष्मीरोड, पुणें
तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं ५७२
अधिकृत भांडवल : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००
खपलेलें भांडवल : २,१४,३५०
रोख भरलेलें भांडवल : १,०७,०३५
दर शेअरची किं. : रु. ५०
चालू ठेवी द द शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेव्हिंग्ज बँक ठेवींवर चेक स्वीकारून द द २॥ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी
कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात
कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात
चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंडया, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात
कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात
या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात
शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी
एम्. व्ही गोखले,
मॅनेजर.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदाराना ६ टक्के फायदा व विमेदारास वाढता नफा वाटून जुन्या व स्थिर झालेल्या कपन्यास कठीण असें अपूर्व यश सपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी.–

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री. न चिं. केळकर, सचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनात वाटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरिता समक्ष भेटा अगर लिहा

मॅनेजिंग एजन्ट्स.



## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट स निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४



## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यास एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॅकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निबचें फाउटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च ( किंवा ) मजबूत यत्रसामुग्रीचें व पाच वर्षें गॅरटीचें एक जर्मन 'बी' टाइम पीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्याच्या यांत्रिक युगात, कागदाचे प्रकार आणि त्यास असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद का पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.



"WRITE to the Dawn of India Life Insurance Company, Ltd Poona, concerning **Pigmy & Monthly Income Deposit Schemes**"



## K. K. & Co.

**Photographic Dealers**

POONA


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ न. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 5434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ५ मे, १९३७ अंक १८

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

### " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा ).

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

### मुलांचा खाऊ

म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.

भावाचें माहितीपत्रक मागवा

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१६ सदाशिव, पुणें २.

उन्हाळ्याकरितां **ब्राह्मी तेल** हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें.

स्टॉकिस्ट : म. गो. कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें.

मॅन्युफॅक्चरर : दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई नं. ४

पहावयास आणलीं तीं नेसावयास काढलीं असा अनुभव क्वचितच येत असतो.




### टिकेकरी सुंदर पातळें

ही गोष्ट आपल्यास सिद्ध करून देतील. त्याचे झुळझुळीत पोत, पक्के पण मोहक रंग, नव्या अभिरुचीच्या किनारी, भरपूर लांबरुंद हे गुण टिकेकरी मालांतच एकवटल्यानें तीं लोकप्रिय झालीं आहेत. तेव्हां हींच पातळें मागवून मनाची हौस भागवावी. निरनिराळे वाण घरपोंच जोडी रु. ८ आ. ८ नमुने मोफत. पोस्टेजकरितां दीड आण्याचीं तिकिटें पाठवा.

दि टिकेकर टेक्सटाईल मिल, लि.
पो. टिकेकरवाडी, (सोलापूर.)

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

### दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.



# विविध माहिती

अमेरिकेंतील बँका

पंधरा वर्षांमागें अमेरिकेंत ३० हजार बँका अस्तित्वात होत्या. पुढें त्यापैकीं अनेक लहान संस्था बुडाल्या आणि कित्येक मोठ्या बँकांत विलीन झाल्या त्यातच आर्थिक मंदीची आपत्ति उद्भवली. शेवटीं १९३२ मध्यें अमेरिकन बँकांची संख्या १९ हजारावर आली आणि गेल्या सालीं आणखी घटून ती १५½ हजार झाली. गेल्या चार वर्षांत बँका कमी झाल्या तरी त्यांचें एकूण खेळतें भांडवल वाढलें.

अमेरिकेचे उद्योगधंदे

जगांतील कारखान्याच्या एकूण उत्पादनाचा अर्धा भाग एकट्या अमेरिकेंत बनवला जातो जगाची लोकसंख्या २०० कोटि आहे. त्यांपैकीं अमेरिकेंत १२½ कोटि लोक आहेत.

तांब्याचें उत्पादन व अपुरा पुरवठा

गेल्या सालीं सबंध जगांत मिळून १६ लक्ष टन इतकें तांबें खाणींतून निघालें. मागणी मात्र ह्या पुरवठ्यापेक्षां अधिक भरली.

जर्मनींत नव्या घरांची बांधणी

नवीन घरें बांधण्याची मोहीम इंग्लंड वगैरे देशांप्रमाणें जर्मनींतहि चालू आहे गेल्या वर्षाच्या अखेरीस पूर्वसालाच्यापेक्षां ३२ टक्के ज्यास्त घरांची बांधणी चालू होती

चांदीचें उत्पादन

गेल्या वर्षी चांदीचें जागतिक उत्पादन २५ कोटि औंस भरलें त्यातला चौथा हिस्सा अमेरिकेंत निघाला १९२९ सालचें चांदीचें उत्पादन २६ कोटि औंस होतें

जर्मन मध्यवर्ती बँकेचें १२ टक्के डिव्हिडंड

जर्मन मध्यवर्ती बँकेनें ( राइश बँक ) गेल्या वर्षाबाबत १२ टक्के डिव्हिडंड वाटलें बँकेच्या नफ्यापैकी पावणे दोन कोटि रुपये एवढा हिस्सा जर्मन सरकारास मिळाला

स्वित्सर्लंड व सुवर्णाधिष्ठित चलन

जागतिक परिस्थिति अनुकूल होताच स्वित्सर्लंडमध्यें सोन्याचें तारण असलेली चलनपद्धति पुनश्च चालू करण्याच्या धोरणाचा पुरस्कार स्विस राष्ट्रीय मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षांनीं केला.

साखरेच्या धंद्याचें यांत्रिक शिक्षण

कानपूर येथें अखिल भारतीय साखर यंत्रशाळा सरकारमार्फत गेल्या ऑक्टोबरमध्यें स्थापन झाली. ह्या "इंपीरिअल इंस्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलजी"च्या अभ्यासक्रमास येत्या जुलैच्या १० तारखेस प्रारंभ होईल गरजू विद्यार्थ्यांनीं माहितीसाठीं १० मेच्या आत अर्ज करावयाचे आहेत.

मद्रास इलाख्याची जमीनमहसुलाची पद्धति

मद्रास इलाख्याच्या जमीनमहसुलाच्या पद्धतीचा विचार करुन तींत जरूर ते फेरबदल सुचवण्यांसाठीं एक कमिटी तेथील सरकारनें नेमली आहे.

१३ मे, १९३७: सुट्टीचा दिवस

गुरुवार, ता १३ मे, हा निगोशिएबल इंस्ट्रुमेंट्स कायद्याअन्वयें, राज्यारोहणाच्या समारंभानिमित्त जादा सुट्टीचा दिवस म्हणून मुंबई सरकारनें जाहीर केला आहे.

डनलॉप कंपनीचा नफा

डनलॉप रबर कंपनीस गेल्या वर्षी अडीच कोटि रुपयांचा निव्वळ नफा झाला. ऑर्डिनरी भागावर ९ टक्के डिव्हिडंड वाटण्यात येईल.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचें डिव्हिडंड व बोनस

सेंट्रल बँक ऑफ इंडियास गेल्या वर्षी २६ लक्ष, ४२ हजार रुपये नफा होऊन ६ टक्के डिव्हिडंड व १ टक्का बोनस वाटण्यांत आलें

प्लॅटिनम धातूची उत्पत्ति

प्लॅटिनम हा धातु दुर्मिळ आहे. त्याच्या किंमतींत भरमसाट वाढ झाल्यामुळें त्याचें उत्पादनहि गेल्या सालीं वाढलें. जागतिक उत्पादन पावणेदोन लक्ष औंस झालें व त्यांपैकी सव्वा लक्ष औंस एकट्या कॅनडा देशात झालें

विजेचें उत्पादन वाढलें

विजेचा वाढता खप हें व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या चलतीचें लक्षण आहे. टाटांच्या खोपवली, भिवपुरी व भिरा येथील विद्युत्‌गृहात उत्पादन झालेल्या विजेचे आकडे खाली दिले आहेत:—

१ जानेवारी ते २९ एप्रिल, १९३५:—१८ कोटि, ४१ लक्ष यूनिट्स
" " १९३६:—१८ कोटि, ४९ लक्ष यूनिट्स
" " १९३७.—२१ कोटि यूनिट्स.

बसवाल्यांचा संप

लंडन शहरातील बसवाल्यांनीं संप पुकारल्यामुळें तेथील रहिवाशांची अत्यंत गैरसोय झाली लंडनमधील ५७½ लक्ष उतारू ५,००० बसेसमधून दररोज प्रवास करतात, म्हणजे एकूण वहातुकीपैकी शेकडा ५८ टक्के वहातूक बसेसमधून होते.

बादशहाचा तनखा

बादशहा सहावे जॉर्ज ह्यास पंचम जॉर्ज बादशहाचे इतकाच, म्हणजे दरसाल सुमारें १४⅔ लक्ष रुपये तनखा देण्यात येणार असल्याचें समजतें.

हिंदुस्थान सरकारचे ॲक्चुअरी

हिंदुस्थान सरकारचे विमा गणिती श्री मुकर्जी हे नुकतेच मरण पावले. त्यांचे जागीं श्री राजगोपालन ह्यांची नेमणूक होणार आहे.

टाटा कंपनीचें डिव्हिडंड

टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें, गेल्या वर्षाचा नफा म्हणून प्रत्येक ऑर्डिनरी भागास १० रु. व डिफर्ड भागास ३६ रु ५ आ. ३ पै डिव्हिडंड द्यावें, असें सुचविलें आहे, असें समजतें.

मद्रास सरकारची रस्तेवाढीची योजना

मद्रास सरकारनें रस्तेवाढीची एक योजना आखली आहे. ह्या योजनेवर सात वर्षांत मिळून १ कोटि, १८ लक्ष रुपये खर्च होणार आहेत.

एम्पायर ऑफ इंडिया लाइफ ॲशुरन्स कं लि.

२८ फेब्रुवारी, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें १ कोटि, ८७ लक्ष रुपयांच्या १०,९१५ विमा पॉलिसी दिल्या. १२⅓ कोटि रुपयांचे ७० हजार विमे कंपनीकडे चालू आहेत. हप्त्याच्या उत्पन्नाशीं खर्चाचें प्रमाण २४.९ टक्के पडलें फेब्रुवारी १९३७ अखेरच्या पंचवार्षिक मुदतीचें मूल्यमापन मि. डब्ल्यू. जी. बॅरेट ( ॲक्चुअरी ) हे करणार आहेत.

मुंबई शहरांतील बसेस

मुंबई शहरांत बसेसची (उतारूंच्या लॉऱ्या) वहातूक १९२६ सालीं सुरू झाली, त्यावेळीं फक्त ४ लहान बसेस होत्या. आतां १०१ बसेस असूनहि त्या पुरेशा नाहींत. नवीन मोठ्या २० बसेस मागावण्यांत आल्या आहेत.

मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| १८-४-३७ ते २४-४-३७ | २६,३९,८०६ |
| २५-४-३७ ते १-५-३७ | ४०,२९,३४४ |
| २१-९-३१ ते १-५-३७ | २,९६,७५,७०,११० |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती .. | २१६ | वाढला—बादशहा व महाराणी ह्यांचें रंगीत चित्र | |
| २ साखर ... ... | २१७ | ६ सहकारी चळवळ ... | २२१ |
| ३ चित्रपटांचा आर्थिक चित्रपट ... .. | २१८ | ७ सोन्याचा भाव आणि अमेरिकेचें धोरण ... | २२३ |
| ४ दि बॉबे कलकत्ता ट्रेडिंग कं. ... .. | २१७ | ८ फ्रान्समध्यें कामाच्या तासांस मर्यादा ... | २२३ |
| ५ स्फुट विचार .. | २१८ | ९ गेलें वर्ष मुंबई इलाख्यांतील शेतीस कसें गेलें ? | २२४ |
| लढाऊ खर्च व राष्ट्रीय कर्जें—ब्रिटिश सरकारचें नवें कर्ज—दि गुडविल विमा कंपनी—शेतीच्या मालाचे बाजारभाव—निर्गतीचा वाढावा | | १० औद्योगिक राष्ट्रांस आफ्रिकेचें महत्त्व ... | २२४ |
| | | ११ निवडक बाजारभाव | २२५ |


# अर्थ

बुधवार, ता. ५ मे, १९३७

## साखर

साखरेचा पुरवठा व तिला असलेली मागणी ह्यांचा मेळ घालून ह्या धंद्याचा किफायतशीरपणा निश्चित करण्याच्या हेतूनें लंडन येथें बावीस राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद भरली होती. तिचें कार्य गेल्या आठवड्यात समाप्त झालें हिंदुस्थानांत स्वदेशी साखरेचा नुकताच उदयास आलेला धंदा आमच्या राष्ट्राच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा असल्यानें आणि ह्या विषयाची चौकशी टारिफ बोर्डानें सध्या चालविली असल्यानें प्रस्तुत विषयासंबंधाची ठळक माहिती वाचकास उपयुक्त वाटेल साखरेच्या एकूण जागतिक उत्पादनापैकी ९० टक्के इतक्या पुरवठ्याशीं संबंध असलेल्या २२ राष्ट्रांनीं लंडनच्या परिषदेंत भाग घेतला होता. ह्यावरून सदरहु धंदा स्थिर पायावर उभारण्याचें महत्त्व कसें सार्वत्रिक झालें आहे, ह्याची कल्पना येईल

महायुद्धापूर्वी बीटाची साखर उसाच्या साखरेच्या बरोबरीनें तयार होऊन खपत असे युद्धकालात ह्या जातीच्या साखरेचें उत्पादन घटलें व तिची जागा विस्तार पावलेल्या उसाच्या साखरेनें घेतली क्यूबा व जाव्हा येथें उंसाची व साखरेची पैदास झपाट्यानें वाढून धंद्यात शास्त्रीय व यांत्रिक सुधारणा झाल्यामुळें ती स्वस्त पडू लागली. अनुकूल परिस्थितींत व हलक्या खर्चात हा धंदा पुढें गेला हें ठीक झालें, असें साहजिकच वाटण्यासारखें होतें. बीटाची साखर महागाईची असल्याकारणानें तिला कायमचा खो बसणार असा रंग दिसत होता, परंतु बीटाच्या साखरेच्या धंद्यास युरोपिअन राष्ट्रांतील सरकारांनीं जकातीचें व प्रत्यक्ष द्रव्याचे सहाय दिल्यानें त्यानें पुन्हा डोकें वर काढलें. कांहीं देशामध्यें तर अंतर्गत किंमती चढीच्या ठेवून बिटाच्या स्वस्त साखरेची निर्गत बरीच वाढवण्यांत आली ह्या कारणानें चालू मंदी सुरू होण्यापूर्वीच साखरेचा जागतिक पुरवठा मागणीच्या मानानें अधिक होऊं लागला. बीटाच्या साखरेचें उत्पादन साखरेच्या एकूण जागतिक उत्पन्नात १९२०–२१ मध्यें २७ टक्के होतें, तें दहा वर्षांत ४० टक्क्यांपर्यंत चढलें जगाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात जेवढी साखर देवघेवींत येते, तिच्यातला निम्मा माल ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या दोन राष्ट्रांत खपतो. त्यांनींच स्वतःच्या स्वदेशी साखरेस उत्तेजन देण्याचें धोरण अमलांत आणल्यामुळें परराष्ट्रीय व्यापारासाठी साखर करणाऱ्या देशांचें गिऱ्हाइक मर्यादित होऊन बाजारभाव पडले व सर्वत्र धंद्यास मंदी आली.

साखरेस जागतिक मागणी अडीच–पावणेतीन कोटि टनाची असतां तिचें एकूण उत्पादन १९३०–३१ मध्यें सुमारें तीन कोटि टनापर्यंत गेलें. इंग्लंड व्यतिरिक्त युरोपखंडात एकूण खप ७५ लक्ष टन असता त्यात केवळ ३½ लक्ष टनाची आयात १९३४–३५ सालीं झाली, ह्यावरून युरोपिअन देशातलें साखरेचें उत्पादन कसें वाढलें होतें याची कल्पना येईल. ही सर्व बीटाची साखर असून तिचें उत्पादन नुकसानींत आणि जकातींच्या व सरकारी आश्रयाच्या सहायानें चाललें आहे, हें येथें लक्ष्यात ठेवलें पाहिजे लंडनच्या बाजारांत साखरेची किंमत १९२७ सालीं दर हंड्रेडवेटास १४ शिलिंग अशी होती, ती गेलीं तीन वर्षे ५ शिलिंगाच्याहि खालीं गेली. अलीकडे तिनें डोकें पुन्हा वर काढलें आहे

ह्या आपत्तीस तोंड देण्यासाठी १९३१ सालीं "चॅडबूर्न योजना" ह्या नावाची एक आंतरराष्ट्रीय व्यवस्था साखरेच्या व्यापाराचें नियमन करण्याच्या हेतूनें अमलात आणली गेली, पण ती यशस्वी झाली नाहीं, ह्याचें कारण कित्येक राष्ट्रांनीं आपलें उत्पादन व निर्गतही मर्यादित केलीं होतीं तरी जागतिक पुरवठा व मागणी ह्यांचा परस्पर मेळ बसू शकला नाहीं, हें होय हिंदुस्थानात साखरेचा धंदा जोरानें चालू झाला आणि जाव्हा साखरेचा येथील खप घटला. चीन, जपान व हॉंगकॉंग येथेंहि जाव्हा साखर कमी खपू लागली. ह्याचा परिणाम जाव्हाचा धंदा अत्यंत मर्यादित होण्यात झाला १९३० सालीं जाव्हामध्यें उत्पादनाचा आकडा ५ लक्ष टनावर उतरला ! एशियाच्या बाजारांत आपलें बस्तान पुन्हा बसवण्याचा जाव्हाच्या मळेवाल्याचा बेत असून चालू सालीं त्याचें उत्पादन १४ लक्ष टन होईल असा अंदाज आहे. पाश्चात्य देशात दर माणशीं १०० पौंड वजनाची साखर दर वर्षी लागते. चीन देशांत हा सरासरीचा खप पुरा ३ पौंड देखील नाहीं. तेव्हा त्या देशात जाव्हा साखरेस वाव आहे आणि तिचा तिकडेच मोर्चा आहे अमेरिकेंतील बाजारात त्या देशांतीलच साखर खपावी अशी योजना प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं केली असल्यानें बाहेरच्या कारखानदाराची डाळ तेथें शिजण्याचा संभव नाहीं. सामान्यत. एकूण जागतिक उत्पादनांपैकी निम्म्या इतकी साखर जगाच्या बाजारांत आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गानें मार्गे येत असे, गेल्या सालीं हें प्रमाण ५० टक्क्यावरून १० टक्क्यावर घसरलें. ह्या परिस्थितीमधून मार्ग काढण्याच्या हेतूनें लंडनची साखर परिषद भरली होती तिच्यामध्यें जगाच्या बाजारपेठांतील खपाची वाटणी निश्चित झाली आहे. तिचा कितीसा उपयोग होतो तें दिसेलच.

### लंडन येथील साखर-परिषद

लंडन येथें भरलेल्या साखरपरिषदेचा कार्यक्रम पुरा झाला आहे साखरेचें उत्पादन व निर्गत करणाऱ्या राष्ट्रांनीं जगाच्या बाजारास प्रत्येकीं किती माल पुरवावा, ह्या बाबतचे आंकडे निश्चित करण्यांत आले ह्या रीतीनें पुरवली जाणारी साखर वार्षिक २१ लक्ष टन असावी असें ठरलें आहे.

## चित्रपटांचा आर्थिक चित्रपट

### (२)

### धंद्याचा व्याप

चित्रपटांच्या व्यवसायानें ग्रेटब्रिटनमध्यें महत्त्वाचें स्थान पटकावलें आहे. ह्या व्यवसायाचा संबंध जनतेशीं जितका येतो तितका दुसऱ्या कोणत्याहि धंद्याचा येत नाहीं. श्रीमंत, गरीब, लहान थोर सर्वच चित्रपटांचे आश्रयदाते आहेत, तशी वस्तुस्थिति इतर कोणत्याहि व्यवसायाची नाहीं.

### सिनेमागृहांचें उत्पन्न व त्याची वांटणी

चित्रपट पहाण्यासाठीं ब्रिटिश जनता सुमारें ५३ कोटि रुपये दर वर्षी खर्च करते. त्या रकमेची वांटणी खालीं सांगितल्या-प्रमाणें होते: पांच आण्यांच्या वरच्या सर्व तिकिटांवर करमणु कीचा कर द्यावा लागतो आणि त्याचें सरकारला ६३ कोटि रुपये उत्पन्न होतें बाकीच्या ४६ कोटीं पैकीं सुमारें २९ कोटि रुपये चित्रपट दाखवणारांस मिळतात व १७ कोटि रुपये चित्रपट भाड्यानें देणाराच्या वाट्यास येतात.

### चित्रपट दाखवणारांचा मामुली खर्च

चित्रपटांचें भाडें बाजूस ठेवलें तर ते दाखवणारांचा चालू मामुली खर्च दर वर्षी १३ कोटि रुपये होतो आणि त्याशिवाय सुमारें २३ कोटि रुपये घसाऱ्याकरितां काढून ठेवावे लागतात. त्याच्या वांट्यास येणाऱ्या एकूण २९ कोटींतून हे १५३ कोटि रुपये गेले म्हणजे सुमारें १३-१४ कोटि रुपये उरतात आणि बिगर-मामुली खर्च आणि नफा त्या रकमेंतून निघतो.

### सिनेमागृहाच्या भांडवलावर नफा

ब्रिटिश सिनेमागृहाची एकूण किंमत सुमारें १०६ कोटि रुपये आहे. ह्या भांडवलावर, खर्च जाऊन, १० टक्के निवळ नफा होतो असें म्हणावयास हरकत नाहीं.

### चित्रपटांचें भाडें

चित्रपट भाड्यानें देणारांस इंग्लंडमध्यें दरवर्षी १७ कोटि रुपये प्राप्ति होते, असें वर सांगितलें आहे ह्यातले ३ कोटि रुपये पगार, भाडें, जाहिराती वगैरे बाबींवर त्यांस खर्चावे लागतात व सुमारें ८ कोटि रुपये चित्रपटाच्या मालकांस त्यांच्या भाड्या-प्रीत्यर्थ अमेरिकेस पाठवावे लागतात. बाकी राहिलेल्या ६ कोटि रुपयांपैकीं २३ कोटि रु. बातम्यांचे व इतर चित्रपट ह्यांसाठी खर्चावे लागतात ब्रिटिश चित्रपट परदेशीं पाठविले जातात, त्याचे १३ कोटी रुपये मिळतात, ते हिशेबांत धरले पाहिजेत.

### अमेरिकन चित्रपटांचें भाडें

अमेरिकन चित्रपटांच्या मंडळ्या आपल्या स्वतःच्या एजंटां-मार्फत चित्रपट इंग्लंडमध्यें भाड्यानें देतात हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां, त्यांच्या भाड्याची रकम सरळ अमेरिकेंत जाते, हें उघड आहे.

### सिनेमागृहें आणि चित्रपटाचें भाडें

निरनिराळ्या सिनेमागृहवाल्यांकडून चित्रपटांचें भाडें किती घ्यावें, हें स्थानिक परिस्थिति व पडद्यांत पडावयाच्या निवळ रकमेचा अंदाज ह्यांचे दृष्टीनें ठरवावें लागतें. चांगल्या दर्जाचे चित्रपट कित्येक वेळां सामान्य दर्जाच्या सिनेमागृहांत दाखविले जातात आणि ते उच्च दर्जाच्या सिनेमागृहांस मिळत नाहींत, ह्याचें कारण, चित्रपट भाड्यानें देणारांची निवळ प्राप्तीची अपेक्षा हेंच असतें.

### अनेक सिनेमागृहांची संयुक्त मालकी

ग्रेटब्रिटनमध्यें एकपंचमांशापेक्षां अधिक सिनेमागृहें सहा-सात मंडळ्यांच्या कब्जांत आहेत. एका मंडळीच्या मालकीचीं ३३० गृहें आहेत व दुसऱ्या एका गटाच्या हातांत २५० आहेत. ह्या मंडळ्यांचें सामर्थ्य दांडगें असल्यानें त्यांस चांगले चित्रपट अगोदर मिळतात आणि भाडेंहि सवलतीच्या दरानें पडतें

### चित्रपट भाड्यानें देणारांचा संघ

चित्रपट भाड्यानें देणारांचा एक संघ असून शेकडा ९८ चित्र-पट त्यांच्या सभासदांच्या मार्फत वांटले जातात चित्रपट दाख-वणारांचें भाडें वेळेवर त्यांस पोंचलें नाहीं कीं, चित्रपट बंद होतात. ह्या कारणानें भाडें बुडल्याचीं उदाहरणें फारच क्वचित् आढळतात हा संघ चित्रपट दाखवणाराचे भाडें कमी करण्याचे सामुदायिक प्रयत्न हाणून पाडतो. सिनेमागृहांची संख्या वाढणें त्यांच्या फायद्याचें असल्यानें तिला आळा घालण्याचे यत्न चित्र-पट भाड्यानें देणारांचा संघ चालूं देत नाहीं.

---

## दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी

वरील कंपनीचे चालक, शेठ पोपटलाल, ह्यांनीं सुमारें तीस-पस्तीस वर्षांपूर्वी स्वदेशीच्या भावनेनें प्रेरित होऊन सुगंधी तेलें, साबण, इ. जिन्नस तयार करून हिंदी पैशाचा विलायेकडे जाणारा ओघ थांबविण्याचें ठरविलें व १९०५ सालीं वरील नावानें कारखाना सुरू केला. यावेळीं मुंबईमध्यें हेअर ऑईल करणाऱ्या दोन-तीन कंपन्या होत्या. कनोज, जोधपूर, इत्यादि ठिकाणीं देशी पद्धतीनें तयार होणारीं तेलें सोडलीं, तर फॅशने-बल पॅकिंगमधून विकल्या जाणाऱ्या पेटंट घेतलेल्या तेलांत व्हाइट ऑईलसारख्या तेलाचा उपयोग केला जात असे. मालाचा गुण उठून दिसण्याकरितां आकर्षक पॅकिंग व अतिश-योक्तिपूर्ण वर्णनानें भरलेल्या जाहिराती ह्यांचा उपयोग सर्रास केला जाई. शेटजींनीं सुरवातीपासूनच ह्या दोन गोष्टींवर बहि-ष्कार टाकला गिऱ्हाइकास त्यांच्या पैशाचें पुरेपूर मोल देण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें व आयुर्वेदीय पद्धतीनें खोबरेल व तिळाचें तेल ह्यांपासून तेलें बनविण्यास सुरवात केली केवळ गुणाचे जोरावर हीं तेलें हळू हळू लोकप्रिय होत गेलीं व दहा वर्षांचे अखेर वार्षिक १५ ते २० हजारांची विक्री होऊं लागली. त्यांच्या बनावटींत स्वदेशीचें व्रत कसोशीनें पाळलें जातें हा त्यांचा विशेष होय सुमारें २०-२५ वेगवेगळ्या औषधीं-पासून हीं तेलें केलीं जातात.

मध्यंतरीं चालकांस स्वतःच्या आजारीपणामुळें कांहीं वर्षे धंदा बंद ठेवावा लागला, तो त्यांनीं पुन. मोठ्या उमेदीनें चालू केला. वस्तूची केवळ बाह्य टापटीप न पहातां आंतील गुणदोष पहाण्याची विवेकबुद्धि महाराष्ट्रांत इतर ठिकाणापेक्षां ज्यास्त आहे, असा शेटजींचा अनुभव आहे. तथापि केवळ भपकेबाज जाहिराती व आकर्षक पॅकिंग ह्यांच्या जोरावर गिऱ्हाइकाचे गळ्यांत अद्याप कितीतरी तऱ्हेचा माल पडत आहे! शेटजींची तत्त्वनिष्ठा त्यांचे धंद्याच्या प्रगतीचे मार्गांत थोडीफार आली, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनीचीं तेलें देशी पद्धतीनें तयार करून चुलीवर उकळून व कापडांनीं गाळून नंतर बाटल्यांत भरण्यात येतात. त्यांच्या ब्राह्मी तेलाची ख्याति त्या तेलाच्या गुणांमुळेंच झालेली आहे, ह्यांत संशय नाहीं.

---

## स्फुट विचार

### लढाऊ खर्च व राष्ट्रीय कर्जें

मंदी दूर व्हावी ह्या हेतूनें व्याजाचे दर हलके राखण्याच्या राष्ट्रीय सरकारांच्या धोरणास लढाईच्या तयारीप्रीत्यर्थ काढाव्या लागणाऱ्या कर्जामुळें अडथळा येणें स्वाभाविक आहे. सध्यांच्या चलतीच्या मुळाशीं लढाऊ सामान तयार करणाऱ्या धंद्यांस मिळणारें काम मुख्यत्वेंकरून आहे. त्यांमध्यें भांडवलास वाढती मागणी उत्पन्न झाली आहे आणि तें स्वस्त दरानें मिळणें अवघड होत आहे. फ्रान्समध्यें सरकारी कर्जावर ४½ टक्के दरानें व्याज द्यावें लागत आहे आणि परदेशांतून भांडवल मिळणें अलीकडच्या राजकीय व आर्थिक घडामोडींच्या योगानें सर्वत्र अशक्य झालें आहे. अमेरिकेस युरोपिअन राष्ट्राकडून युद्धकालीन कर्जाची कोट्यवधि रुपयांची रकम येणें आहे. पण हें कर्ज केवळ कागदावर आहे. राष्ट्रीय चलनाच्या किंमती उतरवून अनेक देशांनीं आपलीं बाहेरचीं कर्जें कमी करून टाकलीं आहेत. गेल्या सात वर्षांत ५४ राष्ट्रांचीं परदेशीय कर्जें ५½ हजार कोटि रुपयांवरून ३½ हजार कोटि रुपयांवर घसरलीं आहेत. बाहेरून भांडवल येणें अशक्य झाल्यानें राष्ट्रें अंतर्गत कर्जानें आपली जरूर भागवू लागलीं आहेत. जगांतील ४४ राष्ट्रांमध्यें अंतर्गत कर्जाचा बोजा गेल्या सात वर्षांत ३७ टक्क्यांनीं वाढला आहे. महायुद्धापूर्वी जगांतील सर्व राष्ट्रांचा मिळून वार्षिक लढाऊ खर्च एक हजार कोटि रुपये असे, तो १९२८ मध्यें सोळाशें कोटि व १९३१ मध्यें दोन हजार कोटि रुपये झाला! अलीकडे ह्या खर्चानें पुन्हां उचल खाल्ली आहे. शस्त्रास्त्रें व सैनिक ह्यावर संपत्तीचा अशा रीतीनें भरमसाट उपयोग होत असतां सामान्य जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्यास वाव कसा मिळणार?

---

### ब्रिटिश सरकारचें नवें कर्ज

राष्ट्राच्या संरक्षणाची आखलेली लढाऊ योजना पुरी करण्यासाठी पैसा लागणार, त्यांतला बराच मोठा भाग कर्जाच्या मार्गानें उभा करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे आणि ह्या धोरणाचा पहिला हप्ता म्हणून १० कोटि पौंड म्हणजे सुमारें १३० कोटि रुपये एवढ्या रकमेचें कर्ज काढण्याचा बेत त्यानें जाहीर केला आहे. शंभर पौंडांच्या दर्शनी किंमतीच्या प्रत्येक रोख्याबद्दल ९९½ पौंड स्वीकारण्यांत येतील आणि व्याजाचा दर २½ टक्के राहील. ह्या कर्जाची फेड १९४८ अखेर होईल आणि दर वेळेस कर्जाच्या एक-पंचमांशाहून कमी नाहीं अशा प्रमाणांत ती करण्यांत येईल. १९४४ मध्यें फेडीच्या पहिल्या हप्त्यास प्रारंभ होईल. पोस्ट ऑफिसमार्फतहि कर्जाच्या रकमा ५ पौंडांच्या रकमेनें स्वीकारल्या जातील आणि ह्या रोख्याची व्यक्तिशः कमाल मर्यादा एक हजार पौंड राहील. मध्यम लांबीच्या मुदतीचें कर्ज ब्रिटिश सरकारास २½ टक्क्यांनीं काढतां येत आहे, ह्यावरून भांडवलाचा इंग्लंडमधला पुरवठा भरपूर आहे आणि सरकारी कर्जरोख्यांवर तेथील जनतेचा पूर्ण विश्वास आहे, हें उघड होत आहे. औद्योगिक चलतीमुळें भांडवलास वाढती मागणी असली तरीहि १३० कोटि रुपये अडीच टक्क्यांनीं कर्जाऊ मिळण्यास ब्रिटिश सरकारास अडचण पडत नाहीं, हें ध्यानात ठेवण्यासारखें आहे. बजेटांत ८ कोटि पौंड कर्जाचा अंदाज असतां १० कोटींचें कर्ज कां काढण्यांत येत आहे, ह्या प्रश्नास ब्रिटिश फडनविसांनीं असें उत्तर दिलें कीं, अनुकूल परिस्थिति पाहून सरकार कर्जरोखे विक्रीस काढील आणि त्यांची रकम व विशिष्ट सालांत प्रत्यक्ष खर्ची पडणारी रकम ह्याचा मेळ असण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश सरकारचें नवें कर्ज "अर्धलांब" मुदतीचें असल्यानें विमामंडळांसारख्या संस्थांस त्यात पैसे गुंतवणें सोयीचें होणार आहे आणि ह्या कारणानें कर्जास समाधानकारक मागणी येईल अशी अपेक्षा आहे.

---

### दि गुडविल अॅशुअरन्स क. लि., कुपवाड

वरील कंपनीची पहिली वार्षिक सभा रविवार, ता. २ मे रोजीं विलिंग्डन कॉलेज, कुपवाड, येथें भरली होती. कंपनी ता. १६ डिसेंबर १९३५ रोजीं नोंदल्यानंतर मे १९३६ अखेर तिला विम्याचें काम सुरू करण्यास परवानगी मिळाली व जूनच्या पहिल्या आठवड्यात कामास प्रत्यक्ष आरंभ झाला. अहवालाचे वर्षीं म्हणजे खरोखर सात महिन्यांत कंपनीनें ३ लक्ष रुपयांचे विमे मंजूर केले असून १ लक्ष ८५ हजाराच्या पॉलिसी दिल्या आहेत. कंपनीच्या प्राथमिक खर्चाकरिता फक्त ३,९२१ रु. खर्ची पडलेले असून भाग खपविण्यासाठी एक पै देखील कमिशन देण्यात आलेलें नाहीं अहवालाचे वर्षीं कंपनीस ८,४२२ रु. उत्पन्न झालें, त्यांतून सालअखेर ७७२ रुपयाचा विमा खाती फंड निर्माण करण्यांत आला आहे. डॉ. व्ही. जी वैशंपायन (सोलापूर) हे कंपनीचे अध्यक्ष असून श्री. बी. व्ही. मराठे, बी. ए., एलएल. बी., हे तिचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. कंपनीनें अल्पावधींत मिळविलेलें यश उत्तेजनकारक आहे ह्यांत संशय नाहीं. काटकसरीच्या व दक्ष कारभारावर कंपनीचा कटाक्ष आहे, हें योग्यच आहे. अहवालाचे सालीं कंपनीविरुद्ध एकहि क्लेम निर्माण झाला नाहीं, हें तिच्या चोख व्यवहाराचें एक चिन्ह आहे. कंपनीची प्रगति द्रुत गतीनें होत जाईल अशी आम्हांस आशा आहे.

---

### शेतीच्या मालाचे बाजारभाव

हिंदुस्थानांत व्यवहार करणाऱ्या एक्सचेंज बँकांचे हितसंबंध येथील आर्थिक परिस्थितीच्या सुधारणेशीं संबद्ध झाले असल्यामुळें बाजारभाव, व्यापार इत्यादि बाबींत होणाऱ्या फेरफाराकडे त्यांचें लक्ष असणें स्वाभाविक आहे. मर्कंटाइल बँकेचे अध्यक्ष, लॉर्ड कॅट्टो, ह्यांच्या अलीकडच्या भाषणाचा एक उतारा आम्हीं दिलाच आहे. ह्या देशात मंदी चालू झाल्यापासून गेल्या दोन वर्षांतच काय तो शेतीच्या मालाच्या किंमतींत वाढावा झाला आहे, हें त्यांनीं दर्शविलें आहे. १९२९ सालचे घाउक बाजारभाव १०० होते असें मानल्यास त्या मानानें अलीकडे त्यांत कसा फेरबदल झाला आहे हें खालील आकड्यांवरून समजेल.

शेतीच्या मालाचे घाउक भाव

| साल | |
|---|---|
| १९२९ | १०० |
| १९३३ | ६१-७ |
| १९३६ (जानेवारी) | ६५-२ |
| १९३७ ( " " ) | ६९-५ |

किंमतींत दिसून येणारी सुधारणा समाधान वाटण्यासारखी असली तरी इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत कच्चा माल व धान्य

ह्यांचे भाव चढले आहेत, त्या मानानें हिंदुस्थानांतली प्रगति क्षुल्लक आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. शेतीच्या धंद्यात अगोदरच फूस थोडी आणि त्यातून पूर्वी जेथें १०० रुपये मिळत असत तेथें त्याच मालाचे ६५–७० रुपये हातीं पडत असतां हा धंदा चालण्याची शेतकऱ्यास कशी पचाइत होत असली पाहिजे हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

## निर्गतीचा वाढावा वाढला

जगांतील बाजारपेठांत एकदर बाजारभाव चढल्याचा परिणाम हिंदुस्थानातील मालाच्या किंमतीवर होणें स्वाभाविक आहे. हिंदी बाज़ारभावात थोडा चढ झाला असून येथून परदेशात होणाऱ्या निर्गतीची किंमतहि वाढली आहे. मालाच्या आयातीपेक्षा त्याची निर्गत जितकी अधिक असेल त्या मानानें हिंदुस्थानाचा परराष्ट्रीय व्यापार ज्यास्त हितकारक समजला जातो देशातून सोनें बाहेर जाण्याऐवजीं माल निर्गत होणें केव्हाहि श्रेयस्कर आहे ह्या सबधात मालाच्या आयात-निर्गतीचे व त्याबरोबरच सोन्याचांदीच्या व्यापाराचे काहीं वर्षांचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत ते बोधप्रद आहेत —

हिंदुस्थानचा आयात निर्गत व्यापार
( आकडे दशलक्ष रुपयाचे आहेत )

| महिन्याची सरासरी | माल | | | सोनें–चांदी आयातीचा वाढावा (+) निर्गतीचा ,, (−) | |
|---|---|---|---|---|---|
| | आयात | निर्गत | निर्गतीचा वाढावा | चांदी | सोनें |
| १९२९ | २०८६ | २६८८ | +६०२ | +६१ | +१४९ |
| १९३३ | ९५६ | १२०४ | +२४८ | −५१ | −४१८ |
| १९३४ | १०४४ | १२३६ | +१९२ | −२८ | −४९७ |
| १९३५ | १११९ | १३०९ | +१९·० | −७६ | −३६·० |
| १९३६ | १०१९ | १५०४ | +४८५ | +१२६ | −२६६ |

मालाच्या आयातीपेक्षां त्याची निर्गत दरमहा सरासरीनें ६० दशलक्ष म्हणजे ६ कोटि रुपये इतकी मदीच्या प्रारंभापूर्वी होती, आणि चांदी व सोनें ह्यांच्या निर्गतीपेक्षां आयात अधिक असे. मालाच्या निर्गतीचा आयातीवरचा मासिक वाढावा १९ दशलक्ष रुपयाचा गेल्यासालीं ४८½ दशलक्ष झाला आणि सोनें-चांदीच्या निर्गतीचा मासिक वाढावा हळु हळु घटत आला आहे. गेल्या वर्षी मात्र चांदीची निर्गतीच्या मानानें आयातच अधिक झाली. मदीची छाया व्यापारावर अजून पसरलेली आहे आणि ती मुंगीच्या पावलानें दूर होत आहे, हें वरील आकड्यांवरून दिसेल

## बादशहा व महाराणी ह्यांचें रंगीत चित्र
### के के आणि कपनीचा उपक्रम

राज्यारोहणाचे पोषाखांतील बादशहा सहावे जॉर्ज व महाराणी एलिझाबेथ ह्यांचें एक सुदर रंगीत चित्र पुणें येथील के. के. आणि कपनी, फोटोग्राफिक साधनसामुग्री व शास्त्रीय उपकरणें ह्याचे व्यापारी, ह्यांनीं मुद्दाम तयार केलें असून विक्रीस ठेवलें आहे. ह्या चित्राचा आकार १४"×२०" असा असून किंमत १० आणे आहे. २¾"×३¾" ह्या आकाराचे फोल्डर्सहि विक्रीस तयार आहेत, त्याची किंमत शेकडा ३६ आहे विक्रीच्या एकंदर उत्पन्नातून रुपयात दोन आणे एवढी रकम व्हाइसरॉयाच्या पशुसुधारणा फंडास देण्यात यावयाची आहे. १९२१ सालीं प्रिन्स ऑफ वेल्स ह्याचें, १९३५ सालीं जॉर्ज बादशहा व महाराणी मेरी ह्यांचें व गेल्या सप्टेंबरांत आठव्या एडवर्डाचें चित्र के के. आणि कंपनीनें प्रसिद्ध केलें होतें. प्रस्तुत राज्यारोहणाचे प्रसंगीं बादशहा व महाराणी ह्यांचें चित्र प्रकाशित करून के. के. आणि कपनीनें औचित्य दाखविलें आहे

## झारापकर टेलरिंग कॉलेज
### डॉ कुर्तकोटी यांची भेट

पुणें येथील सुप्रसिद्ध सरकारमान्य झारापकर टेलरिंग कॉलेजला जगद्गुरु श्रीमत् शंकराचार्य डॉ कुर्तकोटी यानीं ता. १ मे रोजीं भेट दिली. सस्थेचे जनरल मॅनेजर श्री. आप्पासाहेब कदम यांनीं श्रींना सस्था दाखवून सस्थेतील शिक्षणपद्धतीची माहिती करून दिली व त्याना विद्यार्थ्यांस दोन उपदेशपर शब्द सांगण्याची विनति केली. त्यावर श्री आपल्या भाषणात म्हणाले—" या संस्थेंत निरनिराळया आठ भाषातून शिक्षण दिलें जातें परतु बहुसंख्य विद्यार्थी मराठी भाषा जाणणारे असल्यामुळें मी आपणांला मराठी भाषेंतून दोन शब्द सागतों या कॉलेजमध्यें येण्यापूर्वी शिवणकलेचें शिक्षण इतक्या सशास्त्र पद्धतीनें दिलें जात असेल अशी मला कल्पना नव्हती. परतु आपलें कॉलेज पाहून पाश्चात्य देशांप्रमाणें आपल्या देशातील तरुणहि आपल्या देशाच्या औद्योगिक उन्नतीसाठी झटत आहेत हें पाहून मनाला अत्यंत समाधान वाटतें. कॉलेजची जी आतापर्यंत भरभराट झालेली आहे ती चालकाना भूषणावह असून कॉलेजचा असाच उत्कर्ष होत जावो असें मी इच्छितों "

## हिंदुस्थानातला प्राप्तीवरील कराचा कायदा

ह्या देशात प्रचलित असलेला प्राप्तीवरील कराचा कायदा दुरुस्त करण्याचा विचार चालू असून त्या बाबतींत पूर्ण चौकशी होऊन तिचा रिपोर्ट तयार आहे. ह्या रिपोर्टावर लोकमत अजमावण्यांत येऊन कायद्याचा मसुदा तयार होईल आणि तो लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत पुढील सालच्या प्रारंभीं मांडण्यांत येईल.

## इग्लडला जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची सोय

हिंदी विद्यार्थी इग्लडला जातात तेव्हा तेथें त्यांची रहाण्याची नीट सोय व्हावी म्हणून त्यास सहाय देण्यासाठी हिंदुस्थानचे हाय कमिशनर यांनीं आपल्या शिक्षणखात्यांतील मिस् बोस ह्यांची नेमणूक केली आहे. रहाण्यालायक वसतिगृहें व खाजगी कुटुंबाचीं घरें ह्यांची एक यादी तयार करण्यात आली आहे आणि गरजू विद्यार्थ्यांनीं अगाऊ कळवल्यास तेथें त्यांची राहण्याची व्यवस्था केली जाईल.

## इंटर सायन्स परीक्षेंत ११०५ विद्यार्थी पास

मुंबई युनिव्हर्सिटीच्या इटर्मीजिएट सायन्स परीक्षेस गेल्या मार्चमध्यें १९६३ विद्यार्थी बसले होते, त्यापैकीं ११०५ जण पास झाले.

## सहकारी चळवळ

### पश्चिम खानदेश सहकारी वृत्त

#### तळोदें येथें खरेदी-विक्री सघाची स्थापना

सहकारी चळवळीमुळें शेतकऱ्यांना शेतीचे कामासाठी लागणारें भांडवल कमी व्याजानें सहकारी पतपेढ्यामार्फत पुरविण्याची सोय झाली, परंतु तेवढ्या एका उपायानें शेतकऱ्याची शेती किफायतशीर होऊ शकत नाहीं असा अनुभव सर्वत्र आला आहे कोणताहि धंदा किफायतशीर होण्यासाठी दोन गोष्टींची काळजी घ्यावी लागते त्या दोन गोष्टीं म्हणजे एक उत्पादन-खर्च कमी करणें व दुसरी, शक्य तेवढ्या किफायतशीर रीतीनें उत्पन्न झालेल्या मालाची विक्री करणें कमी व्याजानें पैसा कर्जाऊ दिल्यानें उत्पादन खर्च थोडासा कमी होतो परंतु शेतीसाठी लागणारें बीं, खत, औतें वगैरे जिन्नस फुटकळ रीतीनें घेण्यापेक्षा साधिक पद्धतीनें ठोक भावांत खरेदी केल्यास त्यातहि खर्चाची बचत होण्यासारखी आहे. त्याचप्रमाणें शेतींत तयार होणारा माल एकत्रित करून सघशक्तीनें त्याच्या विक्रीची व्यवस्था केल्यास एकेकऱ्यानें निरनिराळी विक्री करण्यापेक्षा जास्त फायदेशीर होतें याचा अनुभव हळु हळु येत चालला आहे शेतकऱ्याना उत्तम बीं योग्य वेळीं खरेदी करून तें सवलतीचे दरानें पुरविणें व त्याच्या मालाची हगामात जास्तींत जास्त किफायतशीर भावानें विक्री करणें हीं कामें करण्यासाठी ह्या जिल्ह्यात एक सहकारी खरेदी-विक्री सघ स्थापन केलेला आहे त्या सघाच्या शाखा जिल्ह्यात दोन-तीन ठिकाणीं आहेत अशींच एक नवीन शाखा तळोदें येथें उघडण्याचा समारभ त्या जिल्ह्याचे कलेक्टर मि. ड्रेकपसाहेब याचे हस्तें ता १६।४।३७ रोजीं पार पडला तळोदें तालुक्यात मुख्य वस्ती भिल्ल लोकाची असून सहकारी पतपेढ्याहि भिल्ल लोकाच्याच जास्त आहेत खरेदी-विक्री सघामार्फतच मालाची खरेदी व विक्री करण्याची का आवश्यकता आहे या गोष्टींचें महत्त्व भिल्ल समाजातील लोकाचे मनावर बिंबविण्याकरिता समारंभाचे वेळीं सुमारें तीन-चारशे भिल्ल लोक निरनिराळ्या खेड्यांतून हजर रहातील अशी योजना त्या भागातील भिल्ल जातीचे चीफ श्रीमत वीरसिग बापूजी पाडवी यानी केली होती त्या शिवाय सभेस सहकारी खात्याचे असिस्टंट रजिस्ट्रार, श्री के. जी प्रभू, ऑडिटर श्री केसकर व बँकेचे स्थानिक आधिकारी हजर होते. तालुका ऑनररी ऑर्गनायझर श्री. भांगरे यानीं खरेदी-विक्री सघाचें महत्त्व भिल्ल समाजाचे मनावर भिल्ल भाषेंतून उत्कृष्ट रीतीनें बिंबवून दिलें. शेवटीं कलेक्टर साहेब यांनीं सर्वांना एकजुटीनें व निश्चयानें ह्या नवीन योजनेचा फायदा घेण्याबद्दल कळकळीचा उपदेश केला पानसुपारी व हारतुरे होऊन समारंभ समाप्त झाला

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### इंदापूर शाखेची वार्षिक सभा

( एका बातमीदाराकडून )

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या इंदापूर शाखेची तिसरी वार्षिक सभा रविवार ता २५ माहे एप्रिल १९३७ रोजीं बँकेचे चेअरमन श्री. धों कृ साठे यांच्या अध्यक्षतेखाली उत्तम तऱ्हेनें पार पडली

ही शाखा १९२७ सालचे अखेरीस उघडण्यात आली असून अशा वार्षिक सभा भरविण्याचा उपक्रम हल्लींचे एजट श्री. वा. चिं. भानु यानीं १९३४ सालापासून केला आहे, व त्याप्रमाणें यंदाची ही ३ री सभा होती

या शाखेच्या कार्यक्षेत्रांत हल्ली २४ सोसायट्या असून त्यांत २ बिगर शेतकी आहेत. ही शाखा इतर बँकिंगचा सर्व व्यवहार करीत असते. हल्लीं शाखेजवळ रु ४५,००० च्या ठेवी आहेत व जोडलेल्या सोसायट्याकडे वगैरे रु २,००,३०० कर्जाचे रूपानें गुतलेले आहेत

या शाखेमार्फत सोसायट्यांच्या सभासदाचे शेतीच्या मालाची विक्री करण्याकरितां एक अडत दुकान चालविणेंत येत आहे

गेल्या दीड-दोन वर्षांत या तालुक्यात दुष्काळी परिस्थितीचा चिमटा बसत आहे त्याचे निवारणार्थ शाखेनें १९ सोसायट्याचे सभासदास बैरणीसाठीं रु २०,००० चीं कर्जे तावडतोब मजूर करून वाटलीं याच वेळीं सरकारनें तगाई म्हणून सबध तालुक्यांतील ५० गावासाठी फक्त रुपये ७,००० मजूर केले होते!

तसेंच इंदापूर तालुक्यातील पूर्व भागाची सततची दुष्काळी परिस्थिति नाहींशी व्हावी म्हणून या शाखेचे एजट रा. भानू यानीं स्थानिक पुढाऱ्याचे सहायानें सहकारी तत्त्वावर नीरा लेफ्ट बॅक कॅनालमधून न ६० व ६१ चे नवीन फाटे काढण्याबद्दलची एक योजना मुंबई सरकारकडे सादर केली आहे तिला सरकारची मान्यता लौकरच मिळेल अशी उमेद वाटत आहे ही मान्यता मिळून फाट्याचें काम झाल्यास या तालुक्यांतील बरेंच मोठें क्षेत्र सहकारी चळवळींत सामील होणार आहे

या सभेंत लवादी कुळाची तडजोडीनें ऋणमुक्तता करणें, हक्कनोंदणीचे पद्धतीची माहिती, जामिनकी विरुद्ध जमीन तारण, इत्यादि विषयाची सर्व दृष्टीनें चर्चा झाली. तालुक्याचे मामलेदार, श्री. शं ल कुलकर्णी यानीं हक्कनोंदणीचे कामासबधींचें महत्त्व कसें आहे तें उत्तम तऱ्हेनें समजावून सागितलें. स्थानिक मंडळी पैकीं श्री बाळासाहेब देशपांडे, शेख समशेर हुसेन इत्यादि व यूनियन सुपरवायझर श्री पवार व मु प्रा बँकेचे सीनियर इन्स्पेक्टर श्री चावडा व शाखेचे एजंट रा. भानु यानीं सभेच्या चर्चेत प्रमुख भाग घेतला होता


१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

★ महिंद्रकर ब्रदर्स ★

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.

बुधवार चौक, पुणें

## तिसरी इंदापूर तालुका सहकारी परिषद

पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें इंदापूर येथें मेमोरिअल हॉलमध्यें रविवार ता. २५-४-३७ रोजीं श्री. एन्. व्ही भोंडे, बी. ए., एलएल बी., याच्या अध्यक्षतेखाली तिसरी इंदापूर तालुका सहकारी परिषद् भरविण्यात आली होती. इंदापूर तालुक्यांतील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, सेक्रेटरीज, तालुक्याचे मामलेदार श्री. कुलकर्णी, तसेंच, सहकारी चळवळींत आस्थेनें भाग घेणारे स्थानिक हितचिंतक, पुणें सें को बँकेचे अंमलदार, मुंबई प्रॉ को. बँकेचे सीनिअर इन्स्पेक्टर, बारामती सुपरवायझिंग यूनिअनचे सुपरवायझर, इन्स्टिट्यूटची अधिकारी मंडळी वगैरे मिळून सुमारे २०० लोक हजर होते

प्रारंभीं मुलाच्या गोड व कर्णमधुर अशा आवाजात प्रार्थना व स्वागतपर पद्यगायन झालें. नतर पुणें जि को. इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष श्री वाय. आर दाते यांनीं परिषदेस जमलेल्या प्रतिनिधींचें व पाहुणे मंडळींचे परिषदेस आल्याबद्दल स्वागत केलें स्वागतपर भाषण करतांना, हल्लींच्या दुष्काळी परिस्थितींत सोसायट्यांनीं एकत्र जमून त्यातून मार्ग काढण्यास काय उपाययोजना करावयाची याचा विचार करण्यास ही योग्य संधि आली असून या संधीचा फायदा या परिषदेच्या द्वारें आपण करून घेतला पाहिजे असें त्यांनीं सांगितलें तसेंच, या तालुक्यातील दुष्काळी परिस्थिति निवारण करण्याकरिता चालू असलेल्या ६०, ६१ फाट्याच्या योजनेचा उल्लेख करून अशाच आणखी योजना निघाल्यास त्या शेतकऱ्याच्या दृष्टीनें फायदेशीर होतील असें सांगितलें शेतकऱ्यांचा माल दलालामार्फत न विकता तो सहकारी तत्त्वावर विकला जाण्याचे दृष्टीनें प्रयत्न होणें जरूर आहे, तसेंच सोसायट्यांचे सभासदांना चळवळीसबधीं शक्य तेवढें जास्त शिक्षण मिळणें आवश्यक आहे असें सागून सोसायट्याचे सभासदाना लँड मॉर्गेज बँकेनें कर्ज द्यावयाच्या बाबतींत कोणतें धोरण आखण्यांत यावें याचाहि ऊहापोह आजचे सभेंत व्हावा असें त्यानी सांगितलें तसेंच सध्या नवीन कौन्सिल स्थापन होत असून मुंबई सरकारचे फडनवीस हे दुष्काळ देशाची पहाणी करीत आहेत अशा वेळीं सारासुटीसारखे प्रश्न सरकारपुढें आपण एकमुखानें ठेवून त्याचा निकाल लावून घेणें किती जरूर आहे याचेंहि त्यांनीं विवरण केलें.

या परिषदेचें अध्यक्षस्थान रा ब व्ही एल ठुबे यानीं स्वीकारण्याबद्दल इन्स्टिट्यूटकडून विनति करण्यात आली होती तथापि त्याना कार्यबाहुल्यामुळें येता आलें नाहीं याबद्दल खेद प्रदर्शित करून परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल श्री नानासाहेब भोंडे याना विनति करण्यात आली.

अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानतर इन्स्टिट्यूटचे प्रोपॅगंडा आफिसर श्री. इंगळे, यांनीं परिषदेस आलेले सदेश वाचून दाखविले व मागील परिषदेचा त्रोटक वृत्तान्त सांगितला

नतर अध्यक्षानीं आपले प्रास्तविक भाषणात सहकारी चळवळ यशस्वी होण्याच्या दृष्टीनें चळवळींतील कार्यकर्त्या मंडळींवर असलेली जबाबदारी स्पष्ट करून दाखविली व तिचे पोषणाचे दृष्टीनें जरूर तो विचारविनिमय करण्यास अशा परिषदाची किती आवश्यकता आहे हें सांगितलें.

त्यानतर रावबहादूर ठुबे यांचा परिषदेस आलेला शुभ सदेश श्री शिंदे यानीं वाचून दाखविल्यावर ठरावाचे चर्चेस सुरवात झाली. प्रारंभीं सहकारी चळवळींतील कार्यकर्ते कै सर लल्लुभाई सामळदास, बाबासाहेब देवधर वगैरेंच्या निधनाबद्दल दुःखप्रदर्शक ठराव झालेनतर चालू सालची दुष्काळी परिस्थिति व त्याबाबत वसुलीचें व नवीन कर्जाचें धोरण, तालुक्यांतील दुष्काळी भागात पाणीपुरवठ्याच्या दृष्टीनें ६०,६१ फाट्याची योजना, सारासुटीबद्दलचा प्रश्न, लवादी कुळाच्या ताब्यात आलेल्या जमिनीची समाईक पद्धतीनें मशागत व त्याचे कर्जमुक्ततेबाबतची योजना, लँडमार्गेज बँकेनें सोसायटीचे सभासदास द्यावयाच्या कर्जाचे बाबतींत लँडमॉर्गेज बँकेनें ठेवावयाचें धोरण, मुंबई प्रॉ. को. इन्स्टिट्यूटच्या नवीन घटनेबाबत विचार करण्यासाठी सभा बोलावण्याची योजना, शेतकऱ्यास ता. डे. असोशिएशनमार्फत बीं, बियाणें, खतें, औतें, वगैरे माल पुरवण्याबाबत तालुक्यात ठिकठिकाणीं करावयाच्या योजनेचें महत्त्व व शेतकऱ्याच्या मालविक्रीची सहकारी तत्त्वावर योजना, नवीन सोसायट्या स्थापनेबाबत त्वरेनें तजवीज होण्याची आवश्यकता, तालुक्याकरिता स्वतत्र सुपरवाझिंग यूनिअन असण्याचें महत्त्व, सवलतीची मुदत आणखी एक वर्ष म्हणजे ता. ३१-७-३८ पर्यंत वाढविण्याची आवश्यकता, तसेंच कॅनॉल भागातील बागाइतदार शेतकऱ्याचे बाबतींत त्याचे हिताचे दृष्टीनें जमीनसुधारणा, पाणीपट्टी व सारा सूट वगैरे महत्त्वाचे ठरावाबाबत सागोपाग चर्चा करण्यात आली

नतर सहकारी चळवळीचें ध्येय, परिषदेचा उद्देश, शेतकरी वर्गास शिक्षणाची अत्यत आवश्यकता व चळवळीचें पावित्र्य, इ. संबधीं सहकारी म्हणविणारावरील जबाबदारीबाबत श्री. भाऊ देवभानकर, ऑनररी सेक्रेटरी, पुणें जि को. इन्स्टिट्यूट, यानीं भाषण करून सर्वांचे आभार मानल्यानतर हारतुरे, पानसुपारी, राष्ट्रगीत वगैरे होऊन परिषदेचें कामकाज रात्रौ ९ वाजता संपलें.

---

## कळवण तालुका सहकारी वृत्त

(१) ग्रुप सेक्रेटरी मासिक सभा ता १०-४ ३७ रोजीं भरविण्यात येऊन सोसायट्याचे पुनरुज्जीवनाबाबत व इतर जरूर त्या बाबींविषयीं विचारविनिमय करण्यात आला (२) सहकारी डिबेटिंग क्लबची सभा ता. ११-४-३७ रोजीं देवळवाडी येथें श्री चादोरकर मास्तर याचे अध्यक्षतेखाली भरून स्वावलबन व काटकसर या विषयावर मार्मिक भाषणें झालीं नतर शेख हसन मिया भाई, मास्तर, कळवण, याचे ग्रामोद्धार व ऐतिहासिक विषय ह्यासबधीं पोवाडे झाले. सदर सभेंत जवळपासच्या सोसायट्यांनीं उत्साहानें भाग घेतला होता (३) देवळवाडी येथें बेटर लिव्हिंग सोसायटी काढण्याचें घाटत आहे. (४) पुढील डिबेटिंग क्लबची सभा चणकापूर येथें भरविण्याचें ठरलें असून त्या वेळीं धर्म या विषयावर चर्चा होईल सदर कार्यक्रम सहकारी सफर या दृष्टीनें सुद्धा आदर्श होईल

---

## शेतीच्या जनावरांबाबत सिमला येथें परिषद्

चालू महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात सिमल्यास व्हाइसरॉयाच्या हस्तें एका परिषदेचें उद्घाटन होणार आहे, तीमध्यें शेतीच्या जनावराकरितां कुरणें, पिकाविषयीं योजनात्मक पद्धति, वळूंचा पुरवठा व जनावराचे तज्ज्ञांची सख्या वाढवण्याची आवश्यकता ह्या विषयाची चर्चा होईल प्रातिक सरकाराचे मत्री आणि दोन सरकारी अधिकारी व दोन बिनसरकारी गृहस्थ ह्या परिषदेस हजर रहातील

## सोन्याचा भाव आणि अमेरिकेचें धोरण

इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं हुंडणावळीचे दर व सोन्याचा भाव शक्यतोंवर स्थिर राखण्याची योजना केलेली प्रसिद्ध झाली आहे. तथापि, ह्या व्यवस्थेंत फेरफार होण्याच्या बातम्या मधून मधून उठतात व त्यामुळें सोन्याच्या भवितव्यतेसंबंधानें साशंक वृत्ति निर्माण होते केवळ सोन्याच्या किंमतीचाच हा प्रश्न नसून त्याच्याशीं जागतिक व्यापार, बँकिंग व रोखेबाजार संबद्ध झालेले आहेत ह्या कारणानें त्यास विलक्षण आर्थिक महत्त्व आहे सोन्याच्या डॉलरचा भाव अमेरिका कमी करणार अशी हूल एक महिन्यामागें उठून लंडन, पॅरिस व इतर ठिकाणच्या बाजारांत गडबड उडाली होती. ह्या प्रकारची बातमी अलीकडे पुन्हां आली असून तिचा परिणाम गेल्या आठवड्यांत मुंबईच्या सोनें बाजारावरहि झाला होता. अमेरिकेंत परदेशांतून सोन्याचा ओघ सारखा चालला आहे तो थांबविणें आणि सोनें त्याकरिता स्वस्त करणें ह्याविषयीं तेथील सरकाराचा विचार असल्याचा दाट संशय उत्पन्न झाला आहे सोन्याच्या आयातीमुळें देशांत फाजील चलन खेळून बाजारभाव चढतील आणि आर्थिक परिस्थितींत हळु हळु सुधारणा होत आहे तिच्या मार्गांत व्यत्यय येईल अशी भीति अमेरिकेच्या सरकारास पडली असून त्याबाबत योग्य उपायहि योजले जात आहेत बाहेरून येणाऱ्या सोन्यास प्रतिबंध कसा करावा आणि तें आलेंच तर त्याचा अनिष्ट परिणाम पैशाच्या बाजारावर होऊं न देण्यास काय करावें ह्याचा पेंच अमेरिकन सरकारास पडला आहे. सोन्यास आज बाजारांत पडणाऱ्या डॉलर्सपेक्षा कमी डॉलर्सवर त्याची कायदेशीर किंमत निश्चित करावी अशी सूचना पुढें आली आहे. इतर उपाय थकून शेवटीं, प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यास ह्या मार्गाचा अवलंब करणें भाग पडल्यास ब्रिटिश व फ्रेंच हुंडणावळींत गडबड उडेल आणि हिंदुस्थानांतून सोन्याची निर्गत चालली आहे, तिला आळा बसेल, ह्यांत शंका नाहीं जगांत एवढी खळबळ उडवून देणाऱ्या धोरणाचा अंगीकार दीर्घ विचारावांचून व अगतिकता उत्पन्न झाल्यावांचून अमेरिकन सरकार सहसा करणार नाहीं तथापि, ह्या बाबतींतल्या अनिश्चिततेचा परिणाम मुंबईच्या सोनें-बाजारावर झाला आहे व होणार आहे हें निर्विवाद आहे

---

## फ्रान्समधील दुकानें आठवड्यांतून दोन दिवस बंद

फ्रान्समधील १० हजारांपेक्षा ज्यास्त वस्तीच्या शहरांतील मोठीं दुकानें प्रत्येक रविवारीं व सोमवारीं बंद ठेवण्यांत आलीं पाहिजेत, असा त्याचेवर सरकारनें निर्बंध घातला आहे. दुकानांतील नोकरांस आठवड्याच्या इतर पांच दिवशीं दररोज आठ तास काम करावें लागेल. आठवड्यांतील ४० तास कामाची वाटणी सोईस्कर रीतीनें करून सोमवारीं दुकानें उघडीं ठेवतां येतील, ही दुकानदारांची अपेक्षा फोल ठरली आहे ज्या दुकानांतून नोकरवर्ग नेमलेला नाहीं अशीं दुकानें सोमवारीं उघडीं राहण्यास हरकत नाहीं. गेल्या बारा महिन्यांत दुकानांतील कामाच्या तासाचे बाबतींत फ्रान्स देशांत अत्यंत झपाट्यानें सुधारणा करण्यांत आली आहे.

---


दी रेडिओ इलेक्ट्रिक स्टोअर्स
रिप्रेझेंटेड बाय—एम. जी. साठे
रे-मार्केटनजीक, ८० शुक्रवार, पुणें.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२१ सदाशिव पेठ

मुंबई सरकारचे सर्जन जनरल साहेबांनीं भेट दिलेली
डॉ. काळे यांचें पूना लेप्रसी क्लिनिक
म्हणजेच महारोग, पांढरें कोड व इतर सर्व प्रकारचे चर्मविकारावरील उपचारांचें विश्वसनीय ठिकाण
ठिपसे आश्रम, पुणें नं ४ | डॉक्टर काळे, लेप्रसी स्पेशॅलिस्ट



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

पाहिजेत—महाराष्ट्रांतील जिल्ह्याकरिता सढळ अटींवर एजंट्स व ऑर्गनायझर्स पाहिजेत.
दि नेपच्यून ॲशुअरन्स कं. लि, न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २, ह्या पत्त्यावर अर्ज करावे.

## गेलें वर्ष मुंबई इलाख्यांतील शेतीस कसें गेलें ?

१९३५–३६ सालीं अवर्षणामुळें इलाख्याच्या बहुतेक सर्व जिल्ह्यांतील खरीपाच्या पिकांवर अनिष्ट परिणाम झाला, तथापि पिकांपासून मिळावयाच्या उत्पन्नात फारशी घट झाली नाहीं. एकूण ३ कोटि २७ लक्ष एकर जमीन लागवडीखालीं आली व १ कोटि ५० लक्ष एकरांत पेरणी झाली नाहीं. निरनिराळ्या पिकांसंबधीं तुलनात्मक माहिती खालील कोष्टकात दिली आहे:–

### पिकांची वर्गवारी

( आकडे हजार एकरांचे आहेत )

| | १९२१–२२ ते १९३१–३२ | १९३४–३५ | १९३५–३६ |
|---|---|---|---|
| खाद्य धान्यें, ऊस इ. ( सरासरी ) | | | |
| ज्वारी | ७९,२७ | ७९,४५ | ७८,४३ |
| बाजरी | ४०,४६ | ३९,४६ | ३८,४९ |
| तांदूळ | १९,३० | २०,४८ | ३९,७२ |
| गहू | १४,२३ | १७,३४ | १६,९१ |
| हरबरा, तूर, इ | ५१३ | ७,६४ | ६,९० |
| फळझाडें, भाजीपाला इ. | ३४,४१ | ३७,१२ | ३८,०२ |
| ऊंस | ६२ | ७५ | ८३ |
| इतर पिकें | ३८० | ४,४० | ४,३० |
| एकूण | १९,७७२ | २०,६६४ | २०,३६० |
| व्यापारी पिकें | | | |
| तबाखू | १,१९ | १,८० | १,६० |
| गळिताचीं धान्यें | १२,५६ | १३,९२ | १९,५८ |
| कपास | ४२,८३ | ३६,५७ | ४१,६३ |
| इतर | २९,०० | ३१,४६ | २७,३२ |
| एकूण पिकें | २,८२,८० | २,९०,३९ | २,९३,७३ |

अहवालाचे वर्षी पाण्याखालील जमिनींत सुमारें ३० हजार एकराची घट झाली, म्हणजे १० लक्ष ६१ हजार एकर जमीन पाण्याखाली होती पिकाचे बाजारभाव मदींचेच कायम राहिले. विशेषत कपाशीची किंमत ज्यास्तच उतरली. शेतावर काम करणाऱ्या कामगाराचे मजुरींत काहीं फरक झाला नाहीं.

### औद्योगिक राष्ट्रांस अफ्रिकेचें महत्त्व

जगांतील निरनिराळ्या विभागांत व्यापारपेठा निर्माण करण्याची खटपट सर्व प्रमुख देशींनीं चालविली आहे ह्यासंबधात आफ्रिकेंतील खनिज द्रव्यें व खाणींतील संपत्ति ह्यापेक्षा तेथील मागसलेल्या १५ कोटि लोकांचें महत्त्व विशेष मानण्यात येतें आज तेथें दर माणशीं खरेदीचें प्रमाण तीन–चार रुपयेहि पडत नाहीं, परंतु प्रयत्न केल्यास तेथील लोकसंख्या ३० कोटींवर जाऊन प्रत्येकाचे जिनसा खरेदी करण्याचें सामर्थ्यहि २० पट वाढण्यास वेळ लागणार नाहीं असें झालें, म्हणजे जगातील इतर देशां मधील उद्योगधंद्यांच्या वाढीस गिऱ्हाईक मिळेल आणि आफ्रिकन लोकांनाहि हित होईल, अशा अर्थाचा युक्तिवाद प्रस्तुत प्रकरणीं करण्यात येत आहे


## NOTICE TO CONTRACTORS.

Separate sealed percentage tenders in form B-1 for each of the following works are invited and will be received by the undersigned on 12-5-1937 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc can be had at the undersigned's office on any working day during office hours.


| | | Estimated cost. |
|---|---|---|
| 1. | C. R. to Poona Bangalore Road miles 235 to 266. | Rs. 7680/- |
| 2. | C. R. to Dharwar Goa Road miles 1 to 18. | Rs. 2172/- |
| 3. | C. R. to Dharwar Goa Road miles 19 to 58 | Rs 6412/- |
| 4 | C.R. to Dharwar Saundathi Road | Rs. 5302/- |
| 5. | C. R. to Saundathi Bagewadi Rood. | Rs 7044/- |
| 6. | C. R. to Kumta Hubli Road. | Rs 2816/- |
| 7. | C. R. to Hubli Sholapur Road | Rs 2062/- |
| 8. | C. R. to Poona Bangalore Road miles 273 to 287. | Rs. 5831/- |
| 9 | C R. to Gadag Pala Road | Rs 2490/- |

2 The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for acceptance or rejection of any

Ex Engr.'s Office, Dharwar, 22nd April, 1937

P K SHINDE, Executive Engineer, Dharwar Division, Dharwar.

स्थापना १९२०



प्रथम मुंबई सरकारने मान्य केलेले व कोल्हापूर सरकारचे आश्रयाखालील

**जाधव टेलरिंग कॉलेज**

माहिती मागवा ] व [ नांवें नोंदवा

पत्ता.–प्रिन्सि. जाधव टेलरिंग कॉलेज ४९७ बुधवार, पुणें २

**काळजी** दरसाल हलू नये म्हणून आमचें इच्छा गर्भ संभव औषध घ्या व संततिनियमन करा. औषध बद केलें कीं, मुलें होतात महिन्यांतून एकदाच घ्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट. ख नि.

गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application. *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ४% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—८ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन .. .. | १०५—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—१० |
| ४% १९४३ .. .. .. | १०७—४ |
| ३½% बिनमुदत ... .. ... | ९४—२ |
| ३½% १९४७-५० .. .. | १०५—१४ |
| ३½% १९४८-५२ ... ... | ९९—११ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३९—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | १११—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४-१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५२२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १२८—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रातज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु. ४ आ. ) | ९०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १४८७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, १७ रु.८ आ ) | १७७-१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु.ऑर्डि. रु.६) | ३२४—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १४४०—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळ्यास | ३४-११-९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५२-१४-० |


## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१, लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग बँक ठेवींवर द सा द. शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज. सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी


| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८०,१०० |
| रिझर्व्ह फंड | २,७८७ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६३,०५६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ५,०१९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९९० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४१,४९४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पाच टक्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठी पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## फोल्डिंग व बॉक्स कॅमेरा



सामर्थ्यवान लेन्स बसविलेला. ह्या कॅमेऱ्यानें नवशिक्यास सुद्धां फिल्मवर उत्कृष्ट फोटो घेतां येतात बेकार रोज ५ रु. मिळवूं शकतात. फिल्म कार्ड, फ्रेम, रसायनें, कॅमेरा कसा वापरावा हें सांगणारें पुस्तक मोफत

फोल्डिंग कॅमेरा, रु. ४. बॉक्स कॅमेरा नं. २, रु. २-१२. नं. १ रु. ३-१२ पॅकिंग व पोस्टेज वेगळें.

Dutt & Co (12)
15/,-Jay Mitra Street,
P. O. Hatkhola (Calcutta)

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

# प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या रौप्यमहोत्सवानिमित्त सदरहु तारखेपासून दशवार्षिक रोखे शेंकडा ७० रु. ८ आण्याच्या दरानें विक्रीस काढले आहेत


विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रुच्या दर्शनी किंमतीचे आहेत वरील रकम शेतकऱ्याची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यात बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर,<br>ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम्,<br>मॅनेजर, दि सी पी अॅन्ड बेरार प्रॉव्हिन्शल-को-ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

## फक्त १ रु. १२ आण्यास ३ घड्याळें व १९५ फॅन्सी बक्षिसें




आमच्या मधुर वासाच्या ओटो रोझच्या ७ कुप्या १ रु १२ आण्यांस एकदम घेणारास एक सोनेरी मुलाम्याचें डमी रिस्ट वॉच, एक पट्टा, एक रेल्वे टाइम डमी पॉकेट वॉच, एक सेफ्टी वस्तरा, एक हजामतीचा साबण, एक आरसा, एक फणी, एक पावडरचें पाकीट, क्लिपसकट एक पेन्सिल, एक सिगारेट केस, एक आगपेट्याची डबी, एक सिगारेट लाइट, एक हातरुमाल, एक आंगठी, एक कात्री, एक साखळीसकट किल्ल्याची रिंग, एक पेन्सिल स्क्रू, १४ कॅरेट रोल्ड गोल्ड निफाचें फाउंटनपेन, ५५५ फूट फोकसचा टॉर्च (किंवा) मजबूत यत्रसामुग्रीचें व पांच वर्षें गॅरंटीचें एक जर्मन-'बी' टाइमपीस पॅकिंग व पोस्टेज १४ आणे वेगळें

**ईस्टर्न ट्रेडिंग कंपनी,** पोस्ट बॉक्स नं १२२०४, कलकत्ता (२४)

## DECCAN BOOK STALL.

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books

(2) We supply Government of Bombay and Government of India publications

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,<br>FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA**

FOR<br>SAFETY, ECONOMY<br>AND<br>DURABILITY<br>Consult

## V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS<br>AND<br>LICENSED ELECTRICAL CONTRACTORS

**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते<br>भेटा अगर लिहा:—

**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार<br>चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ नं. १२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ | पुणें, बुधवार, तारीख १२ मे, १९३७ | अंक १९

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

**प्रॉव्हिन्शल को–ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या रौप्यमहोत्सवानिमित्त सदरहु तारखेपासून दशवार्षिक रोखे शेंकडा ७० रु. ८ आण्यांच्या दरानें विक्रीस काढले आहेत.

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु.च्या दर्शनी किंमतीचे आहेत. वरील रक्कम शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यांत बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर,
ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम,
मॅनेजर, दि सी. पी. अँन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को–ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

**पाहिजेत**—महाराष्ट्रांतील जिल्ह्याकरितां सढळ अर्टीवर एजंट्स व ऑर्गनायझर्स पाहिजेत. दि नेपच्यून अॅशुअरन्स कं. लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २, ह्या पत्त्यावर अर्ज करावे.

**दी सनशाइन इन्शुअरन्स लि.**

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरतां पगारी एजंट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा.

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस : ३३४ गणेश पेठ, पुणें.

घरपोंच जोडी रुपये ८ आणे ८ ची ती हीच

**टिकेकरी नवीन फॅशनचीं पातळें**




आज हजारों कुटुंबें टिकेकरी फॅशनेबल पातळें वापरीत असून त्यांचें प्रामाणिक मत एकच, कीं नाना तऱ्हेचे मोहक पण पक्के रंग, चित्ताकर्षक किनारी, तलम व टिकाऊ पोत, भरपूर लांब-रुंद हे सर्व गुण याच मालांत एके ठिकाणीं आढळतात.

तरी ट्रायल ऑर्डर जरूर द्यावी. नमुने मोफत. पोस्टेजकरितां दीड आण्यांचीं तिकिटें पाठवा.

**दि टिकेकर टेक्सटाईल मि. लि.**

पोस्ट टिकेकरवाडी, सोलापूर

दि टिकेकर टेक्स्टाइल मिल लि., टिकेकर वाडी.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते भेटा अगर लिहाः—

**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अतीस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल

**लॅक टूथ पावडर**

पोरवाल अॅन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

# विविध माहिती

### स्वदेशी मीठ

बंगालचें परदेशी मिठाशिवाय भागत नाहीं व तेथील लोकास देशी मीठ चालत नाहीं, अशी स्थिति असल्यानें परदेशी मिठाचा खप त्या प्रांतात मोठ्या प्रमाणावर होत असे. अलीकडे विलायती मालाच्या तोडीचें मीठ हिंदुस्थानांत होऊं लागल्यानें वरील परिस्थिति पालटली आहे बंगालमधील परदेशी मिठाची आयात गेल्या बारा वर्षांत ४० टक्के कमी झाली असून बाहेरून येणारें मीठ एडनचें असतें. स्वदेशी मिठाच्या धंद्याची प्रगति अभिनंदनीय आहे.

### आगबोटी बांधण्याचा धंदा

गेल्या वर्षाच्या जून महिन्याच्या अखेर पुऱ्या झालेल्या बारा महिन्यात सर्व जगांत मिळून एकूण १० लक्ष टन वजनाच्या २९६ आगबोटी बांधण्यात आल्या. सतरा लक्ष टन वजनाच्या ५१९ आगबोटींच्या योजना तयार असून त्यांपैकीं निम्म्या ग्रेट ब्रिटन व आयर्लंड ह्या देशांत पुऱ्या व्हावयाच्या आहेत. ह्या धंद्याची सध्या जोराची चलती आहे.

### कसरती पिसा

आयात जकातीच्या आकारणीकरितां विविध जातींच्या व प्रकारांच्या मालाचें तपशीलवार वर्गीकरण करावें लागतें. कसरतीसाठीं शिकवून तयार केलेल्या पिसा कोणत्या वर्गांत घालाव्या हा अमेरिकेंत वादाचा विषय झालेला होता. शेवटीं, त्यास कीटकाच्या सदरात न घालता रानटी प्राणी ह्याच्या वर्गांत दाखल करावें असें आता ठरलें आहे

### बंगलोरचें इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स

बंगलोरच्या इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचें वार्षिक बजेट ५ लक्ष ४० हजार रुपयांचें आहे

### हिंदुस्थानातील ऊस

हिंदुस्थानातील साखरेच्या कारखान्यात सुमारें ११५ लक्ष टन वजनाचा ऊस दरवर्षी गाळला जातो आणि तेवढाच ऊस चावून खाण्यांत खर्च होतो. सुमारें ४५० ते ५०० लक्ष टन वजनाच्या उसाचा गूळ तयार होतो.

### दीर्घायुषी राजकुटुंब

व्हिक्टोरिया राणीचीं तीन अपत्यें हयात आहेत. त्यापैकीं प्रिन्सेस लुईस ह्याचें वय ९० आहे, ड्यूक ऑफ कनॉटचें ८६ आहे व प्रिन्सेस बिॲट्रिस यांचें ८० आहे वयोमानपरत्वें त्यांस राज्यारोहणाच्या मिरवणुकींत प्रत्यक्ष भाग घेता आला नाहीं, तरी तो सोहळा पहाण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

### स्कॉटलंडचे प्रचंड प्रदर्शन

पुढील वर्षी ग्लासगो येथें एक प्रचंड प्रदर्शन भरण्याचें ठरलें आहे आणि त्यात स्कॉटलंडच्या लोकांचें धाडस व कर्तबगारी ह्याची स्पष्ट कल्पना येईल अशी व्यवस्था व्हावयाची आहे. ब्रिटिश देश व वसाहती ह्यासहि प्रदर्शनात स्थान मिळेल. गॅरंटी फंडाबाबत इतक्यांतच एक कोटि रुपयांची अभिवचनें मिळालीं आहेत

### चार वेळा पृथ्वीपर्यटन

टपाल वाटण्याच्या कामात, एका ब्रिटिश पोस्टमनची, चाळीस वर्षाच्या नोकरीमध्यें, चार वेळां पृथ्वीपर्यटन करण्याइतकी चाल झाली.

### मॉंटी कार्लोच्या द्यूतसंस्थेचा नफा

मॉंटी कार्लोमधील सुप्रसिद्ध द्यूतसंस्थेस गेल्या मार्च अखेर पुऱ्या झालेल्या वर्षात सुमारें ८० लक्ष रुपयांचें उत्पन्न झालें आणि खर्चवेंच वजा जाता सुमारें पावणे तीन लाख रुपये नफा उरला. संस्थेच्या भागीदारास डिव्हिडंड वाटण्यात आलें नाहीं.

### बादशहांच्या राज्यारोहणामुळें धंद्याची चलती

बादशहाच्या राज्यारोहणाचा सोहळा पहाण्याकरितां परदेशांतून जे लोक येतील, त्याच्या हस्तें ग्रेटब्रिटनमध्यें सुमारें ३५ कोटि रुपये खर्च होतील असा अजमास आहे एकूण १० लाख लोक मिरवणूक बघण्यास येतील.

### हिंदी गिरण्यात कापसाचा खप

सप्टेंबर १९३६ ते मार्च १९३७ ह्या सात महिन्याच्या मुदतींत हिंदी गिरण्यात १४ लक्ष ८६ हजार गाठी ( एक गाठ= ४०० पौंड वजन ) कापूस खपला गेल्या सालचा तत्सम आकडा १५ लक्ष, ६० हजार इतका होता.

### शिवालयाचा जीर्णोद्धार—२० लक्ष रु. खर्च

तंजावरशेजारच्या एका गावीं असलेल्या प्राचीन देवालयाच्या जीर्णोद्धारास २० वर्षे व १७ लक्ष रुपये लागले. विधीस २ लक्ष रुपये खर्च आला. दोन हजार वैदिक ब्राह्मण व ५ लक्ष प्रेक्षक उपस्थित होते.

### टोकिओ–लंडन ९४ तासांत विमान–प्रवास

एका जपानी वैमानिकानें टोकिओ ते लंडन हें १०,००० मैलांचें अंतर ३ दिवस, २२ तास व १८ मिनिटें इतक्या थोड्या वेळांत तोडलें. एका तासास २०० मैल अशी सरासरीची ही गति झाली.

### ट्रेझरी बिलावर द. सा. द. शे. १ रुपया व्याज

गेल्या आठवड्यात एक कोटि रुपये किंमतीच्या सरकारी ट्रेझरी बिलांस सव्वा कोटीची मागणी आली होती. व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रुपया बसला.

### जर्मन सरकाराचें साठ कोटि रुपयांचें कर्ज

आपली राष्ट्रीय योजना पुरी करण्यासाठीं लागणारा पैसा साठ कोटि रुपयांचें कर्ज काढून उभारण्याचें जर्मन सरकारनें ठरविलें आहे. कर्जाचे रोखे पंधरा वर्षे मुदतीच्या ट्रेझरी बिलाच्या स्वरूपाचे असून त्यावर ४½ टक्के एवढा व्याजाचा दर आहे. जर्मनीमध्यें भांडवलाचा तुटवडा किती आहे ह्याची कल्पना, ब्रिटिश सरकाराच्या नव्या कर्जाशीं जर्मनीच्या कर्जाची तुलना केली असता सहज येईल.

### कपाशीचें उत्पादन —रशियाचा जगात तिसरा नंबर

सोव्हिएट रशियात कपाशीचें उत्पादन झपाट्यानें वाढलें असून ह्या बाबतींत त्या देशाचा जगात तिसरा नंबर लागत आहे. अमेरिका व हिंदुस्थान ह्याचा अनुक्रमें पहिला व दुसरा नंबर आहे.

### वाचकांची अभिरुचि

कलकत्ता येथील इंपीरियल लायब्ररीमधून गेल्या वर्षी वाचकांनीं वाचावयास नेलेल्या पुस्तकाच्या वर्गवारीवरून लोकांच्या अभिरुचीची कल्पना येते वाङ्मय, इतिहास, कायदा, चरित्रें, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, असे विषयाचे मागणीच्या अनुक्रमानें सहा नंबर लागतात. धार्मिक पुस्तकास मागें जशी मागणी असे तशी आतां येत नाहीं.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| २५–४–३७ ते १–५–३७ | ४०,२९,३४४ |
| २–५–३७ ते ८–५–३७ | ३८,५७,५६५ |
| २१–९–३१ ते ८–५–३७ | २,९७,१४,२७,६७५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | २२८ | शास्त्र संस्था—इंग्लंडमधील आर्थिक दुःस्थिति—सन लाइफ ऑफ कॅनडा | |
| २ राष्ट्रीय स्वयंपूर्णतेचें अर्थशास्त्र | २२९ | ५ कामाचे तास व मजूरी—रशिया व इटली | २३२ |
| ३ बादशहाचें राज्यारोहण—राज्यारोहणाची मिरवणूक | २३० | ६ सहकारी चळवळ | २३३ |
| ४ स्फुट विचार | २३० | ७ शेतकऱ्यांचा कर्ज-बाजारीपणा | २३५ |
| हिंदुस्थानचा वाढता परराष्ट्रीय व्यापार—साखरेच्या धंद्याची प्रगति—भाबडे लोक व धूर्त लोक—आकडे | | ८ मनोरंजक आकडेमोड | २३७ |
| | | ९ निवडक बाजारभाव | २३९ |


# अर्थ

बुधवार, ता १२ मे, १९३७

## राष्ट्रीय स्वयंपूर्णतेचें अर्थशास्त्र

अलीकडे युरोपियन राष्ट्रांत आर्थिक स्वयंसिद्धतेचे प्रयत्न जोरानें व मोठ्या प्रमाणावर चालू झाल्यानें ते अर्थशास्त्राच्या सिद्धांतास धरून आहेत किंवा कसें ह्या प्रश्नास महत्त्व प्राप्त झालें आहे. स्वयंसिद्धतेचें धोरण वरवर पाहाणारांस अशास्त्रीय आणि म्हणून अनिष्ट आहे असें वाटल्यावाचून रहाणार नाहीं आजपर्यंतचा मानवी समाजाचा इतिहास लक्षांत घेतला आणि त्यावरून मनुष्याच्या आर्थिक व्यवसायाची व्यवस्था कशी बनत चालली आहे ह्याचा विचार केला तर वस्तुविनिमय, परस्पर-सहाय व परस्परावलंबन हीं आवश्यक व हितकारक असल्याची खात्री सर्वत्र पटली असल्यानें आर्थिक बाबतींत स्वयंपूर्ण होण्याचें धोरण चुकीचें असलें पाहिजे असा निष्कर्ष सहज निघण्यासारखा आहे हें व्यक्ति, कुटुंब किंवा गाव ह्यास लागणारे नित्याच्या जरूरीचे अन्नवस्त्रादि जिन्नस त्यास सर्व स्वतः तयार करतां येत नाहींत. प्रत्येकानें विशिष्ट व्यवसाय करावा आणि आपणाजवळील जिनसाच्या मोबदल्यात दुसऱ्याकडून स्वतःस न करता येणारे पदार्थ घ्यावे ह्या प्रकारची देवघेव हजारों वर्षें समाजात रूढ आहे आणि श्रमविभागाच्या तत्त्वावर समाजाचें व राष्ट्राचें आर्थिक जीवित आधारलेलें आहे आपल्या सर्व गरजा स्वतःच्या श्रमानें भागवण्याची पात्रता व अनुकूलता व्यक्तींत व कुटुंबांत नसते आणि त्याचा स्वयंपूर्णतेचा प्रयत्न शक्ति व काल याचा अपहार करणारा ठरतो असा अनुभव आल्यानेंच व्यक्तींनीं व समाजानीं श्रमविभाग करून परस्पर-विनिमय व परस्पर सहकार ह्याचा अवलंब केला आहे हें आर्थिक तत्त्व व्यक्तींस व व्यक्तींसमुदायास लागू आहे, तसेंच तें राष्ट्रासहि लागू आहे. स्वस्त व सुबक माल परदेशांतून न आणतां तो अधिक खर्चानें व श्रमानें स्वदेशांत तयार करण्यांत राष्ट्राच्या शक्तीचा व संपत्तीचा अपव्यय होतो, ह्या सिद्धांतावर आंतरराष्ट्रीय विनिमय आधारलेला आहे, आणि त्याच्या दृष्टीनें पहातां राष्ट्राचे स्वयंपूर्णतेचे प्रयत्न पुच्छगामी व हानिकारक होणार ही विचारसरणी सयुक्तिक वाटते.

पाश्चात्य देशांत स्वयंपूर्णतेची मोहीम अलीकडे चालली आहे ती शास्त्रानिषिद्ध अतएव त्याज्य आहे असें वरील विवेचनावरून सिद्ध होतें असें म्हणावयाचें कीं काय ? अर्थशास्त्राच्या परंपरागत सिद्धांतास चिकटून राहण्याविषयीं प्रसिद्ध असलेल्या इंग्लंडसारख्या राष्ट्रानेंहि स्वयंसिद्धतेचें धोरण मर्यादित प्रमाणात स्वीकारलें आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे साखर, रंग, शेतीचा कित्येक जातींचा माल यांचें उत्पादन व व्यापार यांचेविषयींच्या व्यवहारास ब्रिटिश सरकारनें सहाय व कृत्रिम रीतीनें उत्तेजन दिलें आहे आणि "स्वस्त मिळेल त्या बाजारात माल खरेदी करा" ह्या जुन्या दंडकास महत्त्वाचे अपवाद निर्माण केले आहेत परदेशांतून स्वस्त माल आणण्यात व विकत घेण्यांत कित्येक व्यक्तींचा फायदा असला तरी त्या योगानें देशातील दुसऱ्या व्यक्ती व वर्ग ह्यांच्या धंद्याचें नुकसान होत असेल तर समाजाच्या वतीनें सरकारनें त्या व्यवहारात हात घालून सबंद राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें त्यास योग्य वळण लावावें हें तत्त्व वरील धोरणाच्या मुळाशीं आहे. जर्मनीमध्यें सध्या स्वयंपूर्णतेची योजना अमलात आणली जात असल्यानें तेथील विचारवंतास अर्थशास्त्रीय तत्त्वज्ञानाची व सिद्धांताची प्रस्तुत विचारसरणीस अनुसरून पुनर्रचना करण्याची आवश्यकता भासली आहे. राष्ट्राचें संरक्षण किंवा अस्तित्व ह्याविषयींचा प्रश्न उद्भवेल तेव्हां व्यक्तिस्वार्थ, स्वस्ताई व श्रमविभाग यांबाबतचे विचार बाजूस सारणें अगत्याचें असतें हा नियम सामान्य आर्थिक सिद्धांतास अपवाद म्हणून ब्रिटिश अर्थशास्त्राचे जनक, ॲडॅम स्मिथ, ह्यानीं घालून दिला होता तोच नियम विस्तृत व शास्त्रशुद्ध पायावर जर्मन अर्थशास्त्रज्ञ लिस्ट ह्यानीं उभा केला आणि संरक्षक आर्थिक धोरणास त्याचाच आधार घेण्याची प्रथा पडून गेलेली आहे पूर्वी अपवाद गणलेल्या गोष्टी अलीकडे नित्याच्या अशा बनल्या आहेत जगात युद्ध केव्हा सुरू होईल आणि शत्रु आपणावर केव्हां हल्ला करील ह्याचा नियमच नाहीं अशा प्रकारची साशंक वृत्ति सर्वत्र निर्माण झाली असता स्वरक्षणाची तयारी ठेवणें राष्ट्रास आवश्यक वाटत आहे राष्ट्राचें संरक्षण उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या सुरक्षिततेवर अवलंबून रहातें आणि त्या कामात व्यक्तिस्वार्थ व स्पर्धा ह्यास आळा घालणें सरकारास जरूर होतें. अन्नसामुग्रीचा भरपूर पुरवठा समाजास होईल अशी व्यवस्था करणें, बेकार लोकास उद्योग-धंद्यात काम मिळण्याची तरतूद करणें, बाजारभाव निश्चित करणें, व्याजाचे दर हलके राखणें इत्यादि अनेक आर्थिक बाबी सरकारी कारभाराच्या क्षेत्रात येतात. परदेशी स्वस्त माल घेण्याऐवजी महाग देशी माल घेण्यात होणारें नुकसान आपल्या बेकारास काम मिळण्यानें भरून येणें शक्य असतें. वैयक्तिक नफानुकसानीच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे न पाहता समाजास सार्वत्रिक व राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें पहाणें श्रेयस्कर ठरतें ह्या अनुभवावर आर्थिक स्वायत्ततेचें धोरण आधारलेलें आहे. अर्थशास्त्र हें व्यक्तिहिताचें शास्त्र नसून राष्ट्रहिताचें शास्त्र आहे हें येथें ध्यानात वागवावें लागतें. हिंदुस्थानातली ग्रामोद्योगाची चळवळ ह्या प्रकारच्या विचारानीं प्रेरित झाली आहे. खादी महाग असली तरी लोकानीं विकत घेऊन वापरावी, स्वदेशी मालास थोडी जास्त किंमत पडली तरी परदेशी मालापेक्षां आपल्याच लोकानीं केलेले जिन्नस पसंत करावे इत्यादि आशयाची ह्या देशांतली घोषणा पाश्चात्य राष्ट्राच्या स्वयंसिद्धतेच्या धोरणाहून तत्त्वतः भिन्न नाहीं.

## बादशहांचें राज्यारोहण

### दीक्षा व विधि

आज, ता १२ मे १९३७ रोजीं, बादशहा सहावे जॉर्ज ह्यांच्या राज्यारोहणाचा समारभ वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें होणार आहे इ स. १२६९ सालापासून आतापर्यंत ब्रिटनच्या सर्व राजांचें राज्यारोहण ह्या ॲबेमध्यें झालें आहे राज्यारोहणाच्या सर्व विधींची तपशीलवार माहिती दप्तरातून काळजीपूर्वक लिहून ठेवलेली आहे, तिच्या आधारें आजपर्यंतच्या वहिवाटीस अनुसरून समारभ पार पाडण्यात येईल ड्यूक ऑफ नॉरफॉक ह्याचेकडे समारभाची व्यवस्था सोपविलेली आहे. राज्याभिषेक होण्यापूर्वीं त्यास लोकानीं समति दर्शविली पाहिजे. कँटरबरीचे आर्चबिशप, डॉ.लँग,हे खड्या आवाजात पुढीलप्रमाणें भाषण करतील'—"राज्यपति येथें उभा आहे त्यास आपण अभिवादन करण्यास तयार आहात काय ?" बादशहा जागेवरून उठून सर्वांस दर्शन देतील व "राजे चिरायू होवोत" अशी लोक मोठ्यानें गर्जना करतील त्यानतर, "आपण पार्लमेंटनें केलेल्या कायद्यानुसार व रूढीस अनुसरून राज्य चालवू" असें बादशहा जाहीर करतील ह्यानतर त्याचे डोक्यास, हातास व छातीस पवित्र तेल लावण्यात येऊन राजपदाच्या विभूषणानीं त्यास अलकृत केलें जाईल. बादशहांचे मस्तकावर कँटरबरीचे आर्चबिशप मुकुट ठेवतील व महाराणींचें मस्तक यॉर्कच्या आर्चबिशपाचे हस्तें विभूषित केलें जाईल. बादशहांस उचलून सिंहासनावर बसविण्यात आल्यानतर त्यांचा नावानें जयजयकार करण्यात येईल. ॲबेतून बादशहा बाहेर आल्यावर त्याची थाटाची मिरवणूक निघेल

### राज्यारोहणाची मिरवणूक

राज्यारोहणाच्या समारभासाठी लडन शहरीं पाहुण्याची गर्दी उसळली आहे

राज्यारोहणाच्या मिरवणुकीचा रस्ता सहा मैल लाबीचा असून त्यावर दहा लक्ष प्रेक्षक सोहळा पाहतील आणि त्यासाठी सव्वा कोटि रुपये जागेचें भाडें म्हणून खर्च होतील.

दहा लक्ष प्रेक्षकांपैकीं दोन लक्ष लोक ब्रिटिश साम्राज्यातर्गत व इतर देश ह्यांतून आलेले पाहुणे असतील आणि पाच लाख लोक ग्रेटब्रिटनच्या निरनिराळ्या भागामधून लडनला आलेले असतील युरोपिअन देशातून निदान एक लक्ष पाहुणे इग्लडला आलेले आहेत

राज्यारोहणासाठी आलेल्या पाहुण्याचा इंग्लडमध्यें ३३ कोटि रुपये खर्च होईल आणि त्यातली पुष्कळशी रकम साम्राज्यातल्या पाहुण्याच्या खिशांतून बाहेर येईल.

राज्यारोहणाची मिरवणूक अडीच मैल लाबीची होईल तिचा कार्यक्रम अगदी वक्तशीर पार पडावा म्हणून रगीत तालमी झाल्या आहेत व अत्यंत दक्षता बाळगण्यात आली आहे बादशहाच्या रथाच्या गाडीवर मिरवणुकीची गति अवलबून असल्यानें ती अजमावण्यात येऊन निश्चित केली गेली आहे. रथाची गति ९२ वार लाबीस १ मिनिट ह्याप्रमाणें आहे मिरवणूक एकदम व सारखी चालावी म्हणून बादशहा व महाराणी रथाधिष्ठित होताच तिच्या रस्त्यावर बारा निरनिराळ्या ठिकाणांस बिनतारेचा सदेश पाठवला जाईल.

---

## स्फुट विचार

### हिंदुस्थानचा वाढता परराष्ट्रीय व्यापार

युद्धाची व संरक्षणाची तयारी पाश्चात्य राष्ट्रांनीं चालविली आहे, त्या कारणानें हिंदुस्थानच्या मालास परदेशात आज वाढती मागणी असून बाजारभावहि थोडे चढले आहेत, हें दर्शवणारे आकडे आम्हीं गेल्या अकात प्रसिद्ध केले आहेत गेल्या ३१ मार्चला पुऱ्या झालेल्या बारा महिन्यातले हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचे आकडे आतां उपलब्ध झाले आहेत, तेहि वरील परिस्थितीचे निदर्शक आहेत गेल्या वर्षांत पूर्वसालाच्या मानानें मालाची निर्गत ३५ कोटि रुपयानीं वाढली आणि आयातीपेक्षा निर्गतीचा वाढावा ७७ कोटि रुपयानीं अधिक झाला -जर्मनी, बेलजम, फ्रान्स व अमेरिका ह्याशिवाय बाकीच्या सर्व प्रमुख देशानीं हिंदुस्थानचा माल अधिक प्रमाणावर घेतला. इटलीशींहि होणारा व्यापार त्यावरील बंदी उठल्यावर वाढला इंग्लंडला ११ कोटि व जपानला ८ कोटि इतक्या रुपयांचा ज्यास्त माल गेला इराण सारख्या देशानींहि ह्या वाढाव्यांत भाग घेतला आहे. गेल्या वर्षीं परदेशी मालाची आयात घटली आणि पूर्वसालाच्या मानानें ती ९ कोटि रुपयानीं कमी झाली सोन्याची निर्गत ३७ कोटींची २७ कोटि रुपयावर घसरली आणि चादीची आयात १ कोटीच्या ऐवजी १३ कोटी रुपये झाली. निर्गत वाढणें व आयात कमी होणें ही सध्याची प्रवृत्ति चालू सालीं टिकेल असें नाहीं. हिंद–ब्रिटन व्यापारी करार लवकरच व्हावयाचा आहे, त्याचा काहीं तरी परिणाम आमच्या आयात-निर्गतीवर होईलच जागतिक परिस्थिति हीच बहुतांशीं प्रस्तुत सबंधात निर्णायक होणार, ह्यात शंका नाहीं. कारण व्यापाराची सध्याची चलती लढाऊ सामानाच्या कारखान्यांच्या भरभराटीमुळेंच चालली आहे, हें येथें लक्षांत ठेविलें पाहिजे.

### साखरेच्या धद्याची प्रगति—स्तुत्य उपक्रम

देशात कोणताहि धंदा विस्तृत प्रमाणात चालू झाला असतां त्याची सुधारणा सघटित प्रयत्नानीं करणें आवश्यक असतें. हिंदी साखरेच्या धद्याबाबत असें प्रयत्न केले जात आहेत, ही गोष्ट अभिनदनीय आहे. हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें इपिरिअल कौसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें एक पोटकमिटी साखरेच्या धद्याबाबतच्या प्रश्नाचा विचार करण्यास नेमली असून तिच्या मार्फत सुधारणेच्या अनेक योजना हातीं घेण्यात येत आहेत गव्हाच्या विक्रीच्या व्यवस्थेसंबंधाची एक विस्तृत पहाणी नुकतीच करण्यात आली आहे तिच्या धर्तीवर साखर, गूळ व ऊस ह्याच्या विक्रीबाबतची पहाणी व्हावी असें कमिटीनें ठरविलें आहे. साखरेबरोबर काकवी निघते, तिचें भुशाशीं मिश्रण करून जनावराचें चांगलें खाद्य बनवता येतें असें कानपूर येथील सस्थेंत केलेल्या प्रयोगावरून सिद्ध झालें आहे. काकवीचा अशा रीतीचा किफायतशीर उपयोग झाल्यास तें इष्ट आहे. रस्त्याच्या बाधणींतहि काकवीचा उपयोग होण्याची शक्यता वाटत आहे ऊस चागला पोसला जावा व त्यात साखरेचा अश मोठ्या प्रमाणात उत्पन्न व्हावा म्हणून विशिष्ट प्रकारचीं खतें वापरण्याबाबत प्रयोग करण्याचें घाटत आहे. अल्प खर्चानें ज्यास्तींत ज्यास्त साखर काढण्यांत यावी, उसाचा व

साखरेचा उत्पादन खर्च कमी व्हावा आणि ती स्वस्त विकणें परवडावें ह्या हेतूंनीं वरील प्रकारचे शास्त्रीय व संघटित यत्न केले जाणें अगत्याचें आहे आणि त्या विषयाकडे कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचें लक्ष आहे. कापूस, चहा इत्यादींच्या उत्पादन व विक्री ह्यांच्या व्यवस्थेंत अधिक कार्यक्षमता निर्माण करण्यासाठीं स्वतंत्र कमिट्या आहेत, त्या प्रकारची एक कमिटी साखरेच्या धंद्यासाठीं स्थापन व्हावी अशी सूचना पुढें आली आहे, तिची अंमलबजावणी होणें अगत्याचें आहे अशा संस्थेवांचून ऊंस व साखर यांच्या धंद्याची पद्धतशीर जोपासना व्हावयाची नाहीं.

## भाबड्या लोकांस पैशाच्या जाळ्यांत पकडणारे धूर्त

पैसे किफायतशीर आणि चांगल्या व्याजानें गुंतवण्याचें आमिष दाखवून लोभी, अडाणी व भाबड्या लोकांस फसवण्याचा कांहीं जणांचा धंदा असतो. कोठल्याहि समाजात पैशाचे व्यवहार समजणारांची संख्या अत्यंत अल्प असते आणि बायाबापड्या, थोड्या श्रमात व काळात श्रीमान होऊं इच्छिणारे व भोळसर वृत्तीचीं माणसें मतलबी लोकांच्या फसवेगिरीस बळी पडतात. फसलेलीं माणसें आपली फजीती जगजाहीर होऊं नये म्हणून किंवा हताश होऊन असल्या गोष्टींची वाच्यता करीत नाहींत. ह्या कारणानें फसवेगिरीचीं फार थोडीं उदाहरणें जनतेपुढें येतात इंग्लंड सारख्या देशांत ही लबाडी सामाजिक आपत्ति समजली जात असून तिच्यावर उपाय शोधून काढण्यासाठीं तेथील सरकारानें एक कमिटी नेमली आहे त्या देशात दर वर्षी सात-आठ कोटि रुपयांचें नुकसान फसगत झालेल्या लोकास सोसावें लागतें असा अंदाज आहे. मूर्ख लोकांनीं मतलबी धूर्तांच्या जाळ्यांत सापडूं नये म्हणून जनतेस सावध करण्यासाठी ब्रिटिश सरकारानें लाखों पत्रकें वाटलीं आहेत. कर्जरोखे, कंपन्यांचे भाग इत्यादींच्या खरेदीविक्रींत फायदा आहे असें सांगून निरनिराळ्या प्रकारांनीं हे धूर्त साध्या भोळ्या लोकांस लुबाडीत असतात मंदीच्या व तेजीच्या दोन्ही काळांत त्यास सावजें सापडतात रोख्याच्या व भागाच्या किंमतींत चलबिचल होत असते आणि भांडवलावर कमी व्याज व फायदा सुटत असतो, अशा वेळीं त्यांचें चांगलें फावतें आणि फायद्याच्या आशेनें लोक त्यांच्या जाळ्यात उडी घेतात. वजनदार व सरळ व्यवहाराच्या दलालांनीं आपल्या गिऱ्हाइकास सल्ला देणें योग्य आहे आणि ह्या सबधातलीं पत्रकें बंद करणें इष्ट व शक्य नाहीं तथापि, सामान्य जनतेची दिशाभूल होऊं नये म्हणून असल्या व्यवहारांची लोकांस माहिती असणें आवश्यक आहे. पोस्टऑफिसामार्फत सेव्हिंग्ज बॅंकेंतील खातेदारांकडे सूचनापत्रकें पाठवण्याची व्यवस्था ब्रिटिश सरकारानें केली आहे आणि एक कोटि लोकांच्या हातीं तीं जातील अशी त्याची योजना आहे. फायद्याच्या थापा देणाऱ्या पत्रावर लोकांनीं विश्वास ठेवूं नये व तीं केराच्या टोपलींत टाकावीं असा त्यांचा मथितार्थ आहे. आपले पैसे गुंतवण्यापूर्वीं विश्वसनीय लोकांचा सल्ला घ्यावा व पुष्कळ पैसा सहज मिळवण्याच्या मोहांत सामान्य जनतेनें पडूं नये अशी इशारत त्यात देण्यांत आली आहे.

## आकडे-शास्त्र संस्था

आकडे-शास्त्राचा अभ्यास करून त्याच्या सहायानें आर्थिक व सामाजिक प्रश्नांची माहिती व्यवस्थित लावणें हें कार्य अखिल भारतीय आकडे-शास्त्र-संस्था (इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट) करीत आहे. तिची मुख्य कचेरी कलकत्त्यास असून पुणें, म्हैसूर व मुंबई येथें तिच्या शाखा आहेत. गेल्या वर्षी इन्स्टिट्यूटनें केलेल्या कार्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यावरून संस्थेच्या उपयुक्ततेची कल्पना येते. बंगाल प्रांतांतल्या हातमागाच्या धंद्याची पाहणी संस्थेनें केली असून तिच्या करितां दहा हजार विणकर कुटुंबासबंधाचे आकडे गोळा करण्यात आले. पुण्याच्या शाखेतर्फे प्रि. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं व्याख्यानमालेच्या द्वारा आकडे शास्त्राचीं मूलतत्त्वें विशद करून सांगितलीं. कलकत्त्याच्या मुख्य कचेरीकडे सर्व हिंदुस्थानांतून आकड्यांविषयीं पृच्छा होत असते आणि तेथें जिज्ञासू लोकांना शास्त्रीय शिक्षण देण्याचीहि तरतूद आहे. पुण्यास हवापाण्याचें ऑफिस आहे, त्यातील तज्ज्ञांचीं स्थानिक शाखेमार्फत बोधप्रद व्याख्यानें झालेलीं आहेत आणि त्यांनीं चालविलेल्या शेतीच्या धंद्यास उपयुक्त अशा शास्त्रीय संशोधनाची माहिती त्यांमध्यें देण्यांत आली आहे.

## इलाख्यांत आर्थिक दुःस्थिति

मुंबई सरकारच्या गॅझेटांत खालील माहिती प्रसिद्ध झाली आहे:—भडोच व पंचमहाल (गोध्रा व दोहद तालुका आणि झालोड महाल).—दुःस्थितीची पीडा चांगलीच जाणवत आहे. लोकांच्या सहायाकरितां काढलेल्या कामावर येणारांची संख्या वाढत आहे अधिक कामें काढलीं जात आहेत. स्वस्त धान्याच्या दुकानांची संख्या वाढवली जात आहे जनावरासाठी चाऱ्याची विक्री चालू आहे कामावर सुमारें ३५ हजार माणसें आहेत

अहमदनगर.—लोकांच्या दुःस्थितिनिवारणार्थ चार कामें चालू आहेत. १,८८७ माणसें कामावर आहेत आणि २,७१७ इतर लोकांस मदत देण्यात येत आहे.

पुणें.—शिरूर व इंदापूर येथें दुःस्थिति कायम आहे. ८७५ माणसें कामावर आहेत व २४१ इतर लोकांस घर बसल्या मदत मिळत आहे.

सोलापूर.—करमाळ्याच्या कांहीं भागात दुःस्थिति आहे. ३,३६६ लोक कामावर आहेत व इतर मदत घेणारांची संख्या १,८०० आहे.

विजापूर.—दुःस्थिति वाढत आहे व कामावरील माणसांच्या संख्येंत भर पडत आहे. सुमारें २,६०० माणसें कामावर आहेत आणि इतरांची संख्या ६,६०० आहे.

## सन लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडा

वरील विमा कंपनीनें गेल्या ६६ वर्षांत आपल्या विमेदारास सुमारें २ अब्ज, ८८ कोटि रुपये दिलेले आहेत. ३१ डिसेंबर १९३६ रोजीं कंपनीकडे ७ अब्ज, ६१ कोटि रुपयांचे विमे चालू होते १९३६ सालीं ६१½ कोटि रुपयांचें नवें काम कंपनीस मिळालें ४९ कोटि रुपये उत्पन्न होऊन २९ कोटि रुपये खर्च झाला विमेदारास व त्यांच्या वारसास मिळून २१½ कोटि रुपये मिळाले. कंपनीची जिंदगी २ अब्ज १३ कोटि रुपये इतकी आहे. सन लाइफची मुख्य कचेरी मॉन्ट्रिअल (कॅनडा) येथें आहे.

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ—व्यापारी परीक्षा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें, ह्या संस्थेतर्फे जमाखर्च, टाइपरायटिंग, इत्यादि व्यापारी विषयाच्या प्रशंसापत्र व प्रशस्तिपत्र परीक्षा ता ७ जून, १९३७ पासून सुरू होणार आहेत. अर्जाची अखेरची तारीख २५ मे आहे.

## कामाचे तास व मजूरी—रशिया व इटली

रशियामध्यें अंगावर दिलेलें काम कामकऱ्यांनीं किती वेळात किती केलें पाहिजे आणि त्याप्रमाणें त्यांस मजूरीचे दर काय पडतील, हें निश्चित करण्यांत आलें आहे महाग यंत्राच्या कार्यक्षमतेच्या मानानें कामाचा उठाव होत नाहीं असें सोव्हिअट पुढाऱ्याच्या निदर्शनास आल्यामुळें त्यांनीं मजुराच्या कामाचें किमान प्रमाण वाढविलें असून मजुरीचे दर कमी केले आहेत. अधिक काम व मजुरी पूर्वीचीच, असा ह्या नियमदुरुस्तीचा अर्थ आहे. सामान्य मजूरास दररोज सरासरीनें किती काम करतां येईल ह्याचा अदाज करून त्यावर किमान कामाचें प्रमाण बसवण्यांत आलें असून ह्यापेक्षां अधिक उत्पादकता दाखवणारांस जादा मेहनताना मिळतो. पूर्वीच्या बोनसास पात्र होण्यासाठी मजुरास आता ज्यास्त काम करावें लागेल अधिक काम, अधिक मजुरी असा दडक रशियामध्यें आहे आणि औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या देशाप्रमाणें तेथें काम करणारांची कार्यक्षमता वाढावी अशा वरील योजनेचा उद्देश आहे. मजूरांचें काम करण्याचें सामर्थ्य वाढलें असता कित्येक जण बेकार होतील, त्यास दुसऱ्या ठिकाणीं कामास लावलें जाईल. मजुरीच्या मिळकतींचे संबंधात रशियामध्यें पूर्ण समता आहे, अशी कोणाची कल्पना असल्यास ती चुकीची आहे, हें यावरून दिसून येईल यंत्रातून ज्यास्तीत ज्यास्त काम काढणें व जादा मजूरीची आंच कामकऱ्याच्या श्रमास लावणें ह्या धदेवाईकपणाच्या गुणास सोव्हिअट रशियाचे पुढारी पारखे नाहींत

कामकऱ्याच्या मजूरीचे तास मर्यादित झालेले असले तरी विशिष्ट परिस्थितींत त्या संबधातली मर्यादा ढिली करण्याचा प्रघात इटलीमधील सरकारनें पाडला आहे. आठवड्यात चाळीस तास ही कामाची मामुली मर्यादा इटलींत कायद्यानें घातली आहे. तथापि, अलीकडल्या चलतीमुळें कित्येक कारखान्यात काम वाढलें आहे, ह्या कारणानें ४८ तास काम मजुरांनीं करण्यास हरकत नाहीं असें त्याचे बाबतींत सरकारनें फर्मावलें आहे. हा अपवाद एकूण मजुराच्या संख्येपैकीं सुमारें निम्म्या लोकांस लागू होणार आहे शस्त्रास्त्रांच्या कारखान्यामध्यें तर आठवड्यात ६० तासांची परवानगी मध्यतरीं देण्यांत आली होती. कारखान्यातलें उत्पादन वाढण्याच्या मार्गांत मजूरीच्या तासांची नियमबंदी आड येऊ नये ही दृष्टि इटालिअन सरकारनें ठेवली आहे. आर्थिक व्यवहाराचे बाबतींत मजूराच्या कामाबद्दलचे नियम व्यापक व राष्ट्रीय दृष्टीनें कसे सैल किंवा घट्ट करण्यात येतात हें वरील रशियन व इटालिअन उदाहरणावरून लक्ष्यांत येण्यासारखें आहे. फॅसिस्ट इटली व सोव्हिअट रशिया ह्या दोन्ही राष्ट्रात आर्थिक धोरण राष्ट्रीय वृत्तीचें असण्याची आवश्यकता सारखीच भासत आहे, हें त्यांवरून स्पष्टपणें सिद्ध होत आहे.

---

### राज्यारोहणाप्रीत्यर्थ दानधर्म

हिंदुस्थानातील व्यक्तिशः प्रजाजन किंवा त्यांच्या संस्था ह्यांनीं राज्यारोहणाचे प्रसंगीं बादशहांस मानपत्रें किंवा नजराणे अर्पण करूं नयेत अशी बादशहाची इच्छा असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. राज्यारोहणाचे निमित्तानें कोणास खर्च करावयाचा असल्यास त्याचा दानधर्म करावा अशी त्यांची इच्छा आहे.

---

**Ardomix** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगांवर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गलबलणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरें करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत इतर बाजारी औषधें याची बरोबरी करूं शकत नाहींत अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे. ट ख. १२ आणे निराळा. गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत. पत्रव्यवहार करावा.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** (डिपार्टमेंट नं. ६)
३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर.

एजन्सीज —

मुंबई—यशवंत दत्तात्रय गाडगीळ, फणसवाडी, मुंबई २.
धामणगांव—मे. भागवत ब्रदर्स, धामणगांव, वऱ्हाड.
हरदा—चौथाजी तुळशीराम आणि सन्स, हरदा, सी. पी.
खानदेश—डॉ. जी. एन. महाजन, मोठें वाघोदे, खानदेश.

**एशियन पॉलिसी**

म्हणजेच

**आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.**

अल्प प्रिमियम आणि भरपूर बोनस

**धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड**
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

# सहकारी चळवळ

## निरा कॅनाल सोसायट्यांचा सहकारी खरेदी-विक्री संघ, लिमिटेड, बारामती (जि. पुणें)

निरा कॅनाल सोसायट्याचा सहकारी विक्री संघ ता. १-११-३६ रोजीं स्थापन झाला असून त्याचें मुख्य दुकान बारामती येथें आहे व त्याची एक शाखा निरा येथें आहे. या संघाचे सभासद फक्त पतपेढ्या असून त्यापैकीं चालू २० आहेत व रद्द झालेल्या ८ आहेत या सर्वांचें एकूण वसूल झालेलें भागाचें भाडवल रु ३९,६१० आहे शिवाय रिझर्व फंड रु. ६,१०० व सशईत बुडीत कर्जासाठी फंड रुपये ८,५०० आहे या भाडवलापैकीं संघानें स्वतःचे इमारतींत रु २७,०६४ गुतवून ठेवलेले आहेत व सुमारें रु. ५,००० पर्यंत संघाचे आजपर्यंतच्या व्यवहारात व्यापारी व गिऱ्हाइकाकडे गुंतलेल्या रकमेंत बूड येण्याचा संभव आहे एकदरींत संघाची सापत्तिक स्थिति समाधानकारक आहे, व याचेवर संघाला बॉबे प्रॉव्हिन्शिअल को. बॅकेकडून रोजच्या व्यवहारास लागणारी रक्कम कॅशक्रेडिट व रु. ५०,००० मालतारणावर कर्ज मंजूर केलेलें आहे संघाचा रोजचा व्यवहार पगारी नोकराकडून केला जातो व सध्या एकूण नोकराची सख्या बारामती व निरा येथें मिळून ९ आहे संघाचे कामावर प्रत्यक्ष देखरेख वर्किंग कमिटीची असते, यात संघाचे चेअरमन, बॉबे प्रॉव्हिन्शिअल को बॅकेचे बारामती येथील सीनिअर इन्स्पेक्टर व तालुका सुपरवायझिंग यूनियनचे सुपरवायझर असतात सर्व कामें व्यवस्थापक मडळीच्या पसंतीप्रमाणें चालतात व्यवस्थापक मडळींत सभासद–सोसायट्याचे प्रतिनिधी ८, बारामती येथील बॅकेचे सीनिअर इन्स्पेक्टर व बारामती यूनिअनचे सुपरवायझर असे १० इसम असतात व्यवस्थापक मडळीच्या सभात झालेल्या ठरावाच्या नकला बोर्ड ऑफ कट्रोलकडे जातात व या ठरावापैकीं ठरावाची अगर ठरावाची अमलबजावणी करावी अगर न करावी, असा हुकूम करण्याचा अधिकार बोर्ड ऑफ कट्रोलला आहे या बोर्डावर मे. असिस्टट रजिस्ट्रार, को. सो. मध्यभाग, पुणें, मे मॅनेजर, बॉबे प्रॉ. को. बॅक व संघाचे प्रेसिडेंट हे असतात प्रेसिडेंट, हे संघाचे चेअरमन खेरीज निराळे अधिकारी आहेत व याची नेमणूक संघ दरसाल आपले वार्षिक साधारण सभेंत करतो. अशा तऱ्हेनें संघाचें काम योग्य नियत्रणाखाली चालतें

संघाचें काम सभासद-सोसायट्याच्या सभासदाना लागणारीं कृत्रिम खतें, बीं–बियाणें, औतें वगैरे माल पुरविणें, व त्याचा शेतींत तयार झालेला माल विकणें हें आहे. सभासद-सोसायट्याचे सभासद व्यवहाराकरिता संघाचे सभासद म्हणून गणले जातात अशा सभासदाना व बिनसभासदाना संघ निरनिराळ्या तऱ्हेची पेंड, अमोनिअम सल्फेटसारखीं खतें, व कपाशी बीं पुरवितो व त्याचा गूळ व कापूस विकतो सभासदाना माल पुरविण्यावर संघ आजपर्यंत २ टक्के कमिशन आकारीत होता तें आतां १½ टक्के केलेलें आहे. गावात इतर व्यापारी २ ते २॥ टक्के कमिशन आकारतात गूळ विक्रीवर ( बगाल ) मणावर सवा आणा कमिशन आकारलें जातें व कपाशीविक्रीवर १ टक्का कमिशन आकारलें जातें गूळविक्रीमधील हमाली शेतकऱ्याला याशी लागत नाहीं याशिवाय बहुतेक बाजारपेठेंत मालविक्रीवर धर्मादाय व पाजरपोळ व्यापारी आकारतात, व त्याचा शेतकऱ्याला प्रत्यक्ष काहीं उपयोग होत नाहीं. म्हणून संघ शेतकऱ्याकडून धर्मादाय व पांजरपोळ वसूल करीत नाहीं ता. ३० जून, १९३६ ला संपणाऱ्या वर्षी संघानें एकून रुपये ३,६४,२६२ चा व्यवहार केला त्यात शेतकऱ्याना रु. १,४५,२४१ चा माल पुरविला व रु १,४२,२२५ चा गूळ रु ७६,४५५ चा कापूस व रु ३४१ चा इतर माल विकला संघाला वरील व्यवहारांत रु ६,४२०-०-३ चें कमिशन मिळालें आहे. याशिवाय व्याजाचें उत्पन्न रुपये २,७०२-१२-३ व कोठाभाडें रुपये २,०६३ ३-३ झालें आहे

संघाची स्वत ची इमारत असल्यानें संघाला इमारतीवर दरसाल दर शेकडा ७½ टक्के इतकें व्याज सुटलें आहे. संघ शेतऱ्याचा माल जास्तींत जास्त भावानें व शक्य तितक्या कमी खर्चानें व कसोशीनें विकतो गेलें दोन वर्षांपासून सभासदाना गूळ विक्रीवर रिबेट देण्याचें सुरू केलें आहे गेल्या वर्षाचे गूळ विक्रीवर सभासदाना शेकडा ६ आण्यानें रिबेट दिलेलें आहे. बारामती व निरा येथें संघानें आपलें बस्तान चागलें बसविलें असून त्याची दोन्हीं ठिकाणीं प्रमुख व्यापाऱ्यांत गणना केली जाते. शेतकऱ्यानीं संघाबरोबर व्यवहार करण्यात त्यांचा फायदा आहे हें दिसल्यावरून पुष्कळसे बिन-सभासद संघाकडून माल खरेदी करतात अगर आपला माल संघामार्फत विकतात अशा तऱ्हेचे संघ अगर खरेदीविक्री सोसायट्या सर्व बाजारपेठांचे ठिकाणीं असणें जरूर आहे. अशा तऱ्हेच्या सोसायट्या पुष्कळ ठिकाणीं निघत आहेत या सोसायट्या अडतीवर माल विकतात, पण इतर व्यापाऱ्याप्रमाणें माल विकत घेऊन तो विकण्याचा त्याना अधिकार नाहीं व तसा अधिकार देणें धोक्याचें आहे या पुढची पायरी म्हणजे सर्व खरेदीविक्री सोसायट्याकरिता मुंबईसारख्या ठिकाणीं एक को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटीसारखी मध्यवर्ती सस्था निघणें जरूर आहे आता खालची भूमिका तयार झाली आहे व अशा वेळीं सर्व खरेदीविक्री सोसायट्यानीं बँकाचे सहायानें एक मध्यवर्ती खरेदी-विक्री सोसायटी होता होईल तों लवकर स्थापन करावी, अशी नम्र सूचना करावीशी वाटते

बारामती, ता २९-४-३७ — जी जी विचारे, ॲग्रिकलचरल ऑर्गनायझर

### " बॉबे को ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली "

वरील त्रैमासिकाचा २० व्या वर्षाचा शेवटचा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे शेतीस भाडवलाचा पुरवठा, लवाद व मुदतीचा कायदा, सहकारी विमा, मद्रास इलाख्यातील जमीनगहाणाच्या बॅका, सोनें–चादी व शेतीचा माल ह्याचे तारणावर कर्जे, रुपयाची किंमत उतरविण्याची आवश्यकता, इत्यादि विषयावर 'क्वार्टर्ली 'मध्यें अधिकारी लेखकाचे वाचनीय लेख आले आहेत पुस्तकावर अभिप्राय, संपादकीय स्फुट विचार, सहकाराची प्रगति, इतर देशातील चळवळींची माहिती, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें, इत्यादि नेहमींचीं उपयुक्त सदरेंहि अकात आहेत

## सवत्सर सहकारी मशिनरी व इम्प्लिमेंट सोसायटी, लिमिटेड

नगर जिल्ह्यात सवत्सर हें गाव कोपरगावापासून पाच मैलावर असून त्या गांवात पुष्कळसे बागाइतदार गोदावरी कॅनॉलखाली बागाइत करीत असतात त्यात उसाचें पीक मुख्य आहे जवळ जवळ १५० एकर उसाची लागवड तेथें असून सुधारलेल्या उसाचा प्रसार बराच झाला आहे आजतागायत तेथील बागाइतदार आपले ऊस साध्या चरकानें गाळत होते व त्यामुळें उसापासून जेवढा रस मिळावयास पाहिजे तेवढा न मिळता जवळ जवळ ५ टक्के रसाची तूट येत असे याची सर्वांना जाणीव असली तरी त्याच्यामध्यें सघटना नसल्यानें व पैशाच्या अभावीं त्यास यांत्रिक साहाय्यानें ऊस गाळून आपला फायदा करून घेतां येत नव्हता ही परिस्थिति पाहून मे. ॲग्रिकल्चरल ऑर्गनायझर, को सोसायटीज, कोपरगाव, यांनीं त्या गावातील बागाइतदाराना सहकारी तत्त्वें पटवून दिलीं व सहकारी सोसायटी स्थापना करून सभासदाच्या पतीवर कर्ज उभारून त्यांनीं एजिन व क्रशर घेण्याचें ठरविलें त्याप्रमाणें ही सोसायटी १५-१२-१९३६ रोजीं नोंदण्यात आली सोसायटीनें आपलें शेअर भाडवल रु ३,००० चें उभारलें व मुबई प्रॉ को-ऑपरेटिव्ह बॅकेकडून कमी व्याजाच्या दरानें लाब मुदतीचें ६ हजार रुपयाचें कर्ज मिळविलें या पैशानें २८ हॉर्स पॉवरचें एजिन व क्रशर सोसायटी घेऊ शकली शेतकी खात्याच्या तज्ञ माणसाकडून एजिन व क्रशर बसवून घेण्यात आलीं सध्या या गिरणींत दररोज पाऊण एकर ऊस गाळला जातो अशा रीतीनें सहकारी तत्त्वावर गिरणी आणल्यामुळें पूर्वी जें नुकसान होत होतें तें बद झालें व त्या कारणानें बागाइतदाराचा फायदा होऊ लागला आहे

कोपरगांव तालुक्यात अशा तऱ्हेची ही पहिलीच सोसायटी असून ती यशस्वी रीतीनें चाललेली आहे अशा सहकारी सोसायट्या ग्रामसुधारणेला मूळ आधारस्तभ आहेत सघटनेनें शेतकऱ्यांचा फायदा होत आहे हें ह्या उदाहरणावरून सिद्ध होतें, इतर बागाइतदारांनीं ह्याचे अनुकरण केल्यास त्याचाहि असाच फायदा होणार आहे.

---

## महाराष्ट्र ब्राह्मण सहायक पेढी लि., इंदूर

( एका सभासदाकडून आलेली माहिती )

वरील पेढीची दहावी वार्षिक सर्वसाधारण सभा ता २५-४-३७ रोजीं मु ब वि पा माटे याच्या अध्यक्षतेखाली यशस्वी रीतीनें पार पडली. ह्याचें श्रेय निस्पृह व कुशल अध्यक्षास, तसेंच पेढीच्या कार्यकारी मडळाच्या मनमिळाऊपणास दिलें पाहिजे

सन १९३६ चा वार्षिक वृत्तात पहाता पेढीचें भागाचें अधिकृत भाडवल रु ५,०००० चें असून वर्षअखेर ( ता ३१ १२ ३६ ) वसूल झालेलें भाडवल रु ३०,०००/- असल्याचें दिसतें गगाजळी ( नियमाप्रमाणें ) रु ५,२६६/- आहे ठेवी रु १,१९,५६५, इतर निधि रु. ३५७४ वगैरे मिळून पेढीचें एकदर खेळतें चलाऊ भाडवल रु १,६३,२०५ आहे सभासदाकडे येणें ( कर्जखातीं ) रु १,००,९८९ निघत आहे पेढीनें आपली जादा शिल्लक रु ५९,००१ इतर स्थानिक सहकारी पेढ्यात, भागाच्या व ठेवीच्या रूपानें, गुतविली आहे ह्या रकमेपैकीं बहुतेक सर्व रकम पेढीचें तरतें भाडवल (Fluid Cover) म्हणून ठेवण्यात आलें आहे झालेल्या नफ्यातून ( रु. ४,६४७ ) द द शेकडा ६ टक्के दरानें डिव्हिडड देण्याचें ठरलें

पेढीची वसूली जास्त कसोशीनें होणें आवश्यक दिसतें. चालू वर्षांत एकदर १४ दावे करावे लागले याशिवाय दिवाणी कोर्टांतहि अवार्ड वसूलीकरिता बजावण्या दाखल कराव्या लागल्या आहेत कर्जवसूलीसंबधीं अशा प्रकारची असमाधानकारक स्थिति कार्यकारी मडळानें व पेढीचे हिशेबतपासनीस रा. श वा जोशी ह्यानीं आपआपला वृत्तात नमूद करून सभासदांनीं ह्याकडे विशेष लक्ष द्यावें व कर्जाची फेड नियमितपणें करावी अशी अत्यत कळकळीची विनति केली आहे परत फेडीसबधातील अडचणी इतर सहकारी संस्थासहि भासत आहेत. ह्याकडे सर्वांचें लक्ष जाणें इष्ट आहे

---

## सटाणा तालुका ( जि. नाशिक ) को सुपरवायझिंग यूनियन, लि.

सटाणा तालुक्यातील सर्व म्हणजे ४० सोसायट्या यूनियनला सामील आहेत सोसायट्याची वर्गवारी सुधारत असल्याचें दिसतें तालुक्यातील वसुलाची सर्व भिस्त कपाशीच्या पिकावर आहे १९३५-३६ च्या सुरवातीस पिकास भाव बरा आला, परतु पुढें तो एकाएकीं घसरला. सर्व सोसायट्यात सभासदाकडील कर्जावरील व्याजाचा दर द द १० रु. १५ आ आहे. यूनियनच्या वार्षिक सभेंत १९३७ सालाकरितां श्री धर्माजी तानाजी पाटील ह्याची अध्यक्ष म्हणून फेर निवड झाली.

---

## कापडाचे बाबतींत हिंदुस्थानाची स्वयपूर्णता

१९२९ सालीं हिंदुस्थानामध्यें व ब्रह्मदेशात मिळून १३८ कोटि चौरस वार कापड ग्रेटब्रिटनमधून आयात झालें होतें. १९३३ सालीं ही आयात ४८½ कोटि चौरस वारापर्यंत उतरली आणि १९३६ सालीं फक्त ४१½ कोटि चौरस वारच ब्रिटिश कापड आयात झालें हिंदुस्थानांत खपणाऱ्या एकूण कापडापैकीं शेकडा ८० कापड आता हिंदी गिरण्यात तयार झालेलें असतें व उतरलेल्या २० टक्क्यात लॅंकेशायर व जपान ह्याची भागीदारी आहे

---

## ग्रेटब्रिटनच्या राष्ट्रीय खर्चाची वाढती कमान

शभर वर्षांपूर्वी ग्रेटब्रिटनमधील प्रत्येक नागरिकामागें सरकारी खर्च दरवर्षीं सुमारें ३० रुपये होत असे. आता दर माणशीं सुमारें २६५ रुपये खर्च येतो महाराणी व्हिक्टोरिया गादीवर आली, त्यावेळीं लष्करी व नाविक खात्याचा वार्षिक खर्च प्रत्येकीं ७½ कोटि रुपये होता आता लष्करी, नाविक व वैमानिक दलावर मिळून सालीना सुमारें २६० कोटि रुपये खर्च होतो

---


## पाहिजे

या जिल्हा शाखा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटला एका टॅंपररी क्लार्कची जरूरी आहे तरी गरजूनीं ता १-६-१९३७ चे आत या जिल्हा शाखा को इन्स्टिट्यूटकडे अर्ज आपले सर्टिफिकेटासह करावे गरजू इसम मॅट्रिक झालेला व त्यास मराठी व इंग्लिश टायपिंगची चागली माहिती असलेला पाहिजे. पगार लायकीप्रमाणें ठरविण्यात येईल. कळावें.

B. D DESHMUKH,
चेअरमन,
पूर्व खानदेश जिल्हा शाखा को. इन्स्टिट्यूट, जळगाव.

## शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा

### मध्ययुरोपिअन देशांतला अनुभव

जर्मनीमध्यें शेतीचें कर्ज सुमारें १,००० ते १,१०० रुपये आहे, आणि त्यावरचा वार्षिक व्याजाचा बोजा याच वर्षामागें २०० कोटि रुपये होता तो आता ६५ कोटि रुपये झाला आहे. शेतीच्या मालाची विक्रीची किमत आणि व्याजाची रकम ह्यांचें परस्पर प्रमाण जर्मनींत काय पडतें, हें दर्शवणारे आकडे उपलब्ध आहेत. १९३१-३२ सालीं मालाच्या किंमतीपैकी १३ टके रकम व्याजाचे पायीं खर्चावी लागली होती तो आकडा आतां ७ टक्क्यांवर खाली आला आहे गेल्या तीनचार वर्षांत शेतीच्या मालाच्या किंमती २० टक्क्यांनीं चढल्या आहेत शेतीचा माल विकून आलेली किमत व शेतीचा खर्च ह्याचेमधील तफावत ३०० कोटि रुपये आहे. जर्मनीची लोकसंख्या ६ कोटि आहे. त्यांमध्यें ३ कोटि लोक शेतीवर अवलंबून आहेत असें समजल्यास त्याचें कर्ज १००० कोटि रुपये, पिकांची वार्षिक किंमत ८०० कोटि रुपये, शेतीचा खर्च ५०० कोटि रुपये आणि निवळ उत्पन्न ३०० कोटि रुपये असा हा हिशोब होतो अनेक आनुषंगिक गोष्टी विचारात घेतल्यावांचून, ह्या आकड्यांवरून तुलनात्मक दृष्टीनें अनुमानें काढता यावयाचीं नाहींत, हें उघड आहे. जर्मनीमध्यें नात्सी पक्षाचें प्राबल्य होताच सरकारनें शेतकरी वर्गासंबंधानें अनेक कायदे केले आहेत. जमीनदारांच्या कुटुंबाचें रक्षण व्हावें म्हणून त्याची स्थावर मालमत्ता विभागली जाऊ नये, ती गहाण पडू नये व तिच्यावर कर्जाचा बोजा होऊं नये अशी व्यवस्था करण्यात आली आहे जमीनदार हे जर्मन राष्ट्राचे आधारस्तंभ असल्यानें त्याचीं कुटुंबें अविच्छिन्न टिकावीं हा सदरहु कायद्याचा उद्देश आहे. हें धोरण बाजूस ठेविलें तरी शेतीचें कर्ज कमी करण्याचे जर्मन सरकारचे उपाय इतरत्र अमलात येणाऱ्या योजनांच्या स्वरूपाचेच आहेत जमीनी लिलावात निघण्यास प्रतिबंद करणें, कर्जाची व्याजाची रकम कमी करणें, कर्जफेडीस हप्तेबंदी लागू करणें, नवीन कर्जें काढण्यात येऊ नयेत ह्यासंबधानें निर्बंध घालणें इत्यादि प्रकाराचे हे उपाय आहेत आणि त्यांच्या अंमलबजावणींत सरकारचें सर्व तऱ्हेचें सहाय शेतकऱ्यास मिळतें. शेतीच्या मालाची किंमत चढून शेतकऱ्याची मिळकत वाढावी अशा योजनेस जर्मनींत विशेष महत्त्व देण्यात येत आहे.

बेल्जममध्येंहि हप्तेबंदी व व्याजाचे दरांत उतार हेच उपाय मुख्यत्वें करून योजण्यात आले आहेत फ्रान्समध्यें शेतकरी-वर्गाचा कर्जबाजारीपणा डोईजड नाहीं शेतकऱ्याच्या मालमत्तेच्या एकदशांश इतकेंहि त्याचें कर्ज नसल्यामुळें कर्जफेडीची मुदत वाढवून देण्यापलीकडे विशेष काहीं करण्याची आवश्यकता फ्रेंच सरकारास भासलेली नाहीं फ्रेंच शेतकरी अत्यंत काटकसरी असल्याविषयीं प्रसिद्धी आहे, तो आपल्या कुटुंबांतील माणसांच्या सहायानें उद्योग चालवतो आणि त्यास सहकारी संस्थाकडून सर्व प्रकारचें सहाय मिळतें ह्या परिस्थितींत फ्रान्समध्यें शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न विशेष निकडीचा किंवा महत्त्वाचा नाहीं असें म्हटलें पाहिजे. इटलीमध्यें शेतकऱ्याचीं कर्जें किती आहेत- ह्याची विश्वसनीय माहिती मिळू शकते, तीवरून जमिनीची किंमत आणि तिचें उत्पन्न ह्यांच्या मानानें

( पुढील पृष्ठ पहा )


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल .. ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भाडवल ... .. ... | रु १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड .. ... | रु. १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दरगेजच्या रु. ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रकम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों, विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात

एजंट— टी. आर लालवाणी



## नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८२,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रकम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

(मागील पृष्ठावरून चालू)

शेतीचें कर्ज जबर आहे असें अनुमान निघत नाहीं. इटलीच्या निरनिराळया भागांत परिस्थितीप्रमाणें कर्जाचा बोजा कमी-जास्त आहे, हें खरें आहे कित्येक ठिकाणीं जमिनीच्या व शेतीच्या सुधारणेसाठी कर्जें काढण्यात आलीं आहेत, त्यांचा बोजा मात्र शेतकऱ्याच्या डोक्यावर आहे, इटालियन सरकारनें कायदे करून कर्जाची दीर्घ मुदतीची हप्तेबंदी ठरवून दिली आहे आणि परतफेडींत तें थोडीशी पैशाची मदत करतें. जमीन गहाणाच्या कर्जावरील व्याजाचे दर कमी करण्यात आले आहेत आणि भारी व्याजाच्या कर्जरोख्यांचें रूपांतर ४ टक्के व्याजाच्या रोख्यांत करण्यात आलें आहे. ह्या योजनेपासून शेतकऱ्याचा मोठा फायदा झाला आहे. इतर कर्जाबाबतहि अशीच सवलत देण्यांत आली आहे स्वित्सर्लंडमधील शेतकऱ्याचें कर्ज त्यांच्या एकूण जिंदगीच्या निम्म्या इतकें असल्याचें चौकशीवरून दिसून आलें आहे महायुद्धानतर ह्या कर्जांत सारखी वाढ होत गेली. एकूण कर्जापैकीं ९० टक्के कर्ज जमीन गहाणावरचें आहे आकाराच्या दृष्टीनें पहाता मोठ्या शेतापेक्षां लहान शेतांवर कर्ज सरासरीनें अधिक आहे, परतु जिंदगीच्या मानानें लहान शेतकऱ्याच्या कर्जाचा बोजा कमी आहे.

**धान्याची नासाडी थांबवा.**

हिंदुस्थानांतील गव्हाच्या पिकाची साठवण करण्याची नीट व्यवस्था नसल्यानें दरवर्षी ३ लक्ष टन धान्याची नासाडी होते आणि तिच्या योगानें सुमारें २½ कोटि रुपयांचें नुकसान होतें.

**शेतकऱ्याच्या हातांत रुपयांतले अकरा आणे**

शेतीच्या मालास (उदाहरणार्थ, गहू) बाजारात येणाऱ्या किंमतीपैकीं रुपयांत अकरा आणेच काय ते हिंदी शेतकऱ्याच्या पदरात पडतात

**मध्यप्रांत-वऱ्हाडमध्यें रेडक्रॉसचें कार्य**

मध्यप्रात-वऱ्हाडमध्यें रेडक्रॉस सोसायटीच्या १७ जिल्हा शाखा व ५ तालुका शाखा आहेत. शिशुहित ठिकाणें (चाइल्ड वेल्फेअर सेंटर्स) ७१ आहेत आणि त्यातील ५५ शहरात व १६ खेडेगावीं आहेत रस्त्यावर होणाऱ्या अपघातात सहाय देण्याची व्यवस्था सोसायटीनें ४९ ठिकाणीं केली आहे

**लंडनमधील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी**

लंडन येथील शाळामधील विद्यार्थ्यांची दरसाल वैद्यकीय तपासणी केली जाते प्रत्येक विद्यार्थ्याच्या तपासणीचें वाटणीस ६ मिनिटें येतात ह्या वेळात डॉक्टरानें तपासणीच्या पत्रकात ३५ बाबी भरावयाच्या असतात व विद्यार्थ्याचे पालकास सल्ला द्यावयाचा असतो


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2

१२ वर्षे पुण्यांत लोकादरास पात्र झालेले
☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆
यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

## मनोरंजक आकडेमोड

### रेडिओचा खर्च

इंग्लंडमध्यें ८० लक्ष रेडिओ सेट्स आहेत. त्यापैकीं निम्मे बॅटरीजवर चालतात प्रत्येकीं, दर वर्षास तीन ह्याप्रमाणें वार्षिक सुमारें सव्वा लाख बॅटरीज लागतात प्रत्येक बॅटरीचा साडेतीन रुपये खर्च धरला तर चाळीस लक्ष रेडिओ उपयोगात आणण्याचा एकूण वार्षिक खर्च चार कोटि रुपये होतो. ॲक्युम्युलेटर्स चार्ज करण्याचा दरवर्षीचा सुमारें १३/४ कोटि रुपयाचा खर्च ह्यात मिळवला पाहिजे विजेनें चालणाऱ्या रेडिओंचा वर्षाचा खर्च अडीच कोटि रुपये येतो

प्रत्येक रेडिओ सेटचें वजन सरासरीनें सात शेर असतें. म्हणजे, इंग्लडमध्यें सर्व सेट्चें मिळून एकूण वजन ५० हजार टन आहे

प्रत्येक सेटची रुंदी सरासरीनें १८ इंच असते, असें धरलें तर इंग्लंडमधल्या एका शेजारीं एक ठेवलेल्या एकंदर सेट्सची रांग २,२७२ मैल लांबीची म्हणजे इंग्लंड तें अमेरिका ह्या अंतराइतकी होईल. प्रत्येक सेटला तीस फूट लांबीचें एरिअल आहे असें मानल्यास सर्व सेट्सच्या एरिएलची एकूण लांबी ४५ हजार मैल होईल, म्हणजे ती पृथ्वीभोंवतीं दोनदा वळसा करील

### हिंदुस्थानांत " मांजरपाट "

या देशांत गिरण्या व हातमाग ह्याचे कापडाचें उत्पादन वाढल्याकारणानें लँकशायरच्या कापडाची आयात घटली आहे. १९२९ सालीं हिंदुस्थानांत १२७ कोटि चौरस वार इतकें कापड इंग्लंडमधून आलें होतें हा आकडा १९३३ मध्यें ४९१/२ कोटि वारावर आला व १९३६ मध्यें आणखी घट होऊन तो ४११/२ कोटि झाला

### सोयाबीनपासून रेयॉन तयार करणार

सोयाबीनच्या फोलपटापासून रेयॉन [ कृत्रिम रेशीम ] तयार करण्याकरिता मंचूरियामध्यें कारखाना काढण्याची एका कंपनीची खटपट चालू आहे

### जर्मनीमधील रस्त्यांची पहाणी

येत्या सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ब्रिटिश पार्लमेंटाचे सुमारे १०० सभासद जर्मनीमधील रस्त्यांबाबतची व्यवस्था अवलोकन करण्याकरिता त्या देशाच्या निमंत्रणावरून जर्मनीस जाणार आहेत पार्लमेंटाच्या सर्व सभासदास ही सफर मोफत आहे, परंतु सर्वजण अर्थातच जाऊ शकत नाहींत

लक्षांत ठेवा ] १९३७—३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचें अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी

मॅनेजिंग एजंटस,

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड

११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणी भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. ( ट. ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४

रोडगे यांच्याच
मजबूत
सतरंज्या
वापरा.
आपल्या पैश्याचा योग्य
मोबदला मिळवा.
सर्वत्र मिळतात.
कारखाना पत्ता:- ३० मिठगंज पेठ पुणें २

न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ,

रविवार पेठ, सराफ

बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल मात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरिता सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंद्खेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदे ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्



# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

## NEW BUSINESS

This year 1934-35,
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

## BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Offices* throughout India & the East

S C MAJUMDAR, MANAGER Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



**फाळणा** दरसाल हल्ल नये म्हणून आमचें इच्छा गर्भ सभव औषध द्या व संततिनियमन करा औषध बंद केलें कीं, मुलें होतात महिन्यांतून एकदांच द्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु. ५ ट ख नि

गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—७ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन .. ... | १०५—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—१० |
| ४% १९४३ ... ... ... | १०७—१ |
| ३½% बिनमुदत ... ... | ९४—६ |
| ३½% १९४७–५०. .. | १०५—१४ |
| ३½% १९४८–५२ ... .. | ९९—१३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... .. | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३८—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १११—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४—२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५३५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु चा भाग ३½% डिव्हि. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु ४ आ. ) | ९१०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु डिव्हि १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १५२२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १५१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु प्रेफरन्स, १७ रु. ८ आ.) | १७७—१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. रु ६) | ३४१—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १५९०—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३४–११–० |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५२–१५–० |

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, B---- Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

मुंबई सरकारनें प्रथम मान्य केलेलें, कोल्हापूर सरकारचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग
माहिती मागवा ] व [ नांवें नोंदवा
४९७ बुधवार पुणें सिटी

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोमाक प्रिंटिंग, जर्दीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६९५ सदाशिव पेठ



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा


जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

उन्हाळ्याकरितां ब्राह्मी तेल हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें.
स्टॉकिस्ट : म गो कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें
मॅन्युफॅक्चरर : दि बॉंबे कलकत्ता ट्रेडिंग कंपनी, मुंबई नं ४

# महाराष्ट्रांत साखरेचें ओव्हरप्रॉडक्शन नाहीं

## एकट्या पुणें शहरांत दरसाल दोन लक्ष मण साखर येते

| सन | प्रांताचें नाव | साखर कारखाने | दर वर्षी साखरेचा खप | महाराष्ट्रांत दरवर्षी होणारी साखर |
|---|---|---|---|---|
| १९३६ | मुंबई इलाखा सिंध सोडून | ८ फलटण व कोल्हापूर धरून | ६५,००० टन | ३२,००० टन |




संयुक्त प्रांत ( U P ) व बिहार येथील साखर महाराष्ट्रांतील बाजारपेठांत विक्रीस आणण्यास दरमणी एक रुपाया रेल्वे भाडें पडतें

**मशिनरी घेतली; शेअर फॉर्म्स भरून पाठवा**

**आरंभीं दरसाल ५००० टन साखर तयार होईल**

**१०० टक्के महाराष्ट्राची**

"It requires no intelligence to say 'No" to a new plan" —*H N. Casson*

**प्रेफरन्स शेअर रु. १०. ऑर्डिनरी शेअर रु. २५**

शेअर्स फॉर्म्सः— इंपीरिअल बँक, बँक ऑफ इंडिया लि , दि बॉम्बे प्रॉ. को. बँक लि., पूना सेंट्रल को. बँक लि., दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. व वरील बँकांच्या शाखांतून मिळतील
व
सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लिमिटेड**
२५७ बुधवार पेठ, पुणें २

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशातच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्याच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ११५/१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १९ मे, १९३७ अंक २०

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

## प्रॉव्हिन्शल को—ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या **रौप्यमहोत्सवा**निमित्त सदरहु तारखेपासून **दशवार्षिक रोखे** शेंकडा ७० रु. ८ आण्यांच्या दरानें विक्रीस काढले आहेत.

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु.च्या दर्शनी किंमतीचे आहेत. वरील रकम शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यांत बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.

नागपूर शहर,
ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम्,
मॅनेजर, दि सी. पी. अँन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को—ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

**पाहिजेत**—महाराष्ट्रांतील जिल्ह्याकरितां सढळ अटीं-वर एजंट्स व ऑर्गनायझर्स पाहिजेत. दि नेपच्यून अॅशुअरन्स कं. लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २, ह्या पत्त्यावर अर्ज करावे.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते भेटा अगर लिहाः—

**भाऊ गंगाधर साठे**, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

घरपोंच जोडी रुपये ८ आणे ८ ची ती हीच

**टिकेकरी नवीन फॅशनचीं पातळें**





आज हजारों कुटुंबें टिकेकरी फॅशनेबल पातळें वापरीत असून त्यांचें प्रामाणिक मत एकच, कीं नाना तऱ्हेचे मोहक पण पक्के रंग, चित्ताकर्षक किनारी, तलम व टिकाऊ पोत, भरपूर लांब-रुंद हे सर्व गुण याच मालांत एके ठिकाणीं आढळतात.

तरीं ट्रायल ऑर्डर जरूर यावी. नमुने मोफत. पोस्टेजकरितां दीड आण्याचीं तिकीटें पाठवा.

**दि टिकेकर टेक्सटाईल मि. लि.**

पोस्ट टिकेकरवाडी, सोलापूर

दि टिकेकर टेक्सटाइल मिल लि., टिकेकर वाडी.

# दि गुड-वुइल

## अॅशुअरन्स कंपनी लि.

**पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल**

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

# विविध माहिती

### लंडन प्रदर्शनांत हिंदी मालाचा उठाव

लंडन येथें नुकत्याच भरलेल्या 'साम्राज्य' प्रदर्शनांत हिंदी मालानें ३,७८६ चौ. फूट जागा व्यापली होती. गेल्या वर्षी ह्यापेक्षां ८०० चौ. फूट जागा कमी होती. वेगवेगळया स्टॉलवर मिळून एकूण ६३ हजार रुपये किंमतीच्या ऑर्डरी मिळाल्या. हा आकडा गेल्या वर्षीच्या विक्रीपेक्षा ४० टक्क्यांनीं मोठा आहे. प्रदर्शनांत भाग घेण्याबद्दल हिंदुस्थानास सुमारें २० हजार रुपये खर्च आला.

### गव्हाचा व्यापार

मुंबई इलाख्यांत इतर प्रांतातून दरसाल २½ लक्ष टन गहूं येतो, त्यापैकीं सुमारें ४० हजार टन गहूं एकट्या मुंबईमध्येंच खपतो. मुंबई बंदरांतून सुमारें १३,००० टन कणीक आफ्रिका, मलाया व इतर देश ह्यांकडे रवाना होते मुंबई इलाख्यात मुख्यत: संयुक्त प्रांतामधून व मध्य प्रांतातून गहूं येतो. १९३६-३७ साली हिंदुस्थानानें २ लक्ष ६० हजार टन गव्हाची निर्गत केली.

### मुंबईमध्यें परदेशी तांदूळ

ब्रम्हदेशांतून मुंबईमध्यें दरसाल ४० हजार टन तांदूळ येतो. सयाममधूनहि सुमारें ३० हजार टनाची आयात होते बंगालमधून थोडा तांदूळ येतो

### ओरिएंटल विमा कंपनीचें डिव्हिडंड

ओरिएंटल विमा कंपनीच्या वार्षिक सभेनें भागीदारास दर भागास प्राप्तीवरील कर माफ असलेलें १२५ रुपयाचें डिव्हिडंड जाहीर केलें आहे. भागाची मूळ किंमत २०० रुपये असून त्याचा बाजारभाव सुमारें ६ हजार रु. आहे.

### ब्रह्मदेशाकरितां स्वतंत्र चलनी नोटा

विभक्त झालेल्या ब्रह्मदेशाकरिता नोटा काढण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेकडेच आहे. तूर्त, हिंदुस्थान सरकारच्या नोटांवरच "ब्रह्मदेशांतच फक्त चालणाऱ्या" असा शिक्का मारून त्या चालवण्यात येत आहेत.

### "जॉर्ज" व "एलिझाबेथ"

राज्यारोहणाच्या सुमुहूर्तावर लंडन येथील इस्पितळात जन्मास आलेल्या कित्येक अर्भकाचीं "जॉर्ज" अगर "एलिझाबेथ" अशीं नावें ठेवण्यांत येतील.

### राज्यारोहणाचे समारंभाकरितां १२० लाउड स्पीकर्स

वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें राज्यारोहणाच्या समारंभानिमित्त जमलेल्यां ८,००० निमंत्रित पाहुण्यांच्या सोईकरितां १२० लाउड स्पीकर्स लावण्यात आले होते, त्यामुळें समारंभातील प्रत्येक शब्द सर्वांस उत्कृष्टपणें ऐकू आला. हे लाउड स्पीकर्स चुकून कदाचित् काम नीट देईनासे झाल्यास दुसऱ्या लाउड स्पीकर्सची व्यवस्था करून ठेवण्यात आली होती.

### फेडरल कोर्टाच्या कामाची पूर्वतयारी

हिंदी फेडरल कोर्टाच्या तीनहि न्यायाधिशाकरितां नव्या दिल्लीमध्यें रहाण्याचीं घरें मुक्रर करण्यात आलीं आहेत. कोर्टाच्या इमारतीची जागा सरन्यायाधिशाच्या सल्ल्यानें येत्या आक्टोबरमध्यें ठरविण्यांत येईल

### ग्रेटब्रिटनमध्यें तयार कपड्याची वाढती आयात

१९३७ च्या पहिल्या तिमाहीमध्यें सुमारें ७० लक्ष रुपये किंमतीचे तयार कपडे आयात झाले १९३६ च्या पहिल्या तीन महिन्या संबधातील तत्सम आंकडा फक्त ५० लक्ष रुपये इतका होता जर्मनी व अमेरिका हे देश वाढत्या प्रमाणावर माल पाठवीत आहेत.

### ॲबिसीनियन युद्धाचा खर्च

इटलीस ॲबिसीनियन युद्धाचा एकूण खर्च १,१३५ कोटि लायर म्हणजे सुमारें १६२ कोटि रुपये इतका आला.

### ब्रिटिश कोळशाच्या खाणींचे मालकी हक्काची खरेदी

ग्रेटब्रिटनमधील कोळशाच्या खाणींचे मालकी हक्क ब्रिटिश सरकार सुमारें ९० कोटि रुपये देऊन खरेदी करणार आहे, असें समजतें.

### मुंबई इलाख्यांतील ग्रन्थरचना

मुंबई इलाख्यात १९३६ च्या शेवटच्या तिमाहींत एकूण ८७६ पुस्तकें छापून प्रसिद्ध करण्यात आलीं ह्यामध्यें मासिकांचा व चोपड्याचाहि समावेश होतो. मराठी व गुजराथी भाषेच्या वाटणीस प्रत्येकी १५० पुस्तकें आलीं. काव्यास वाहिलेल्या मराठी पुस्तकाची संख्या ४० भरली इलाख्यात प्रसिद्ध झालेल्या ग्रन्थापैकीं निम्म्यापेक्षां ज्यास्त पुस्तकें शालेय होती.

### उन्हाळ्यांत थंड रहाणारे रेल्वेचे डबे

हिंदुस्थानांतील सरकारी रेल्वेवर जरूरीप्रमाणें कमी अगर ज्यास्त थंड हवामान राखणारे पहिल्या वर्गाचे डबे प्रयोगाखातर सुरू करण्याचें सरकारनें ठरविल्याचें मागेंच जाहीर झालें आहे. अशा प्रकारच्या पाच पहिल्या वर्गाच्या डब्यास जरूर ती यंत्रसामुग्री मुंबईमध्यें दाखल झाली आहे येत्या सप्टेंबरात ह्या राजेशाही डब्यांच्या वापरास सुरवात होईल.

### लॉर्ड स्नोडन

ब्रिटिश मजूर पक्षाचे एक पुढारी लॉर्ड स्नोडन हे गेल्या आठवड्यात मरण पावले. ते एकूण तीन वेळां फडनवीस होते. आपलीं मतें निर्भीडपणें व्यक्त करण्याविषयीं त्याची ख्याति होती. अर्थशास्त्र व समाजवाद ह्या विषयाचा त्याचा व्यासंग मोठा होता व ते एक अधिकारी लेखक समजले जात. लॉर्ड स्नोडन ह्याच्या फडनविशीमध्येंच १९३१ सालीं इंग्लंडनें सुवर्णचलन सोडलें

### हिंदी कॉफीचा प्रचार

ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअरचे वेळीं हिंदी कॉफी प्रचार बोर्डानें हिंदी कॉफीचा आस्वाद ४,००० लोकास मोफत दिला.

### हस्तिदंत

हस्तिदंत म्हणजे हत्तीचे सुळे कृत्रिम हस्तिदंताची खऱ्या हस्तिदंताशीं तीव्र स्पर्धा चालू आहे. हिंदुस्थानांत, मद्रास, त्रावणकोर व म्हैसूर येथील सरकारें दरसाल हस्तिदंताचा लिलाव करतात परदेशी हस्तिदंताची हिंदुस्थानांत आयातहि मोठ्या प्रमाणावर होते. बिलियर्डचे चेंडू केल्यानंतर उरलेल्या मालापासून बांगड्या वगैरे तयार होतात आयात हस्तिदंतावर ३० टक्के जकात आहे. उत्तम हस्तिदंतास प्रत्येक पौंड वजनास १० रु पडतात. आफ्रिकन हस्तिदंतापेक्षा हिंदी माल मऊ व त्यामुळें ज्यास्त किंमतवान् ठरतो

### म्हैसूर संस्थानांत नवा कारखाना

म्हैसूर सरकारनें भद्रावती येथें सिमेंटचा कारखाना काढण्याचें निश्चित केलें असून त्या संबधातील पूर्वतयारी करण्याकरितां दोन तज्ज्ञांस युरोपकडे रवाना केलें आहे हे दोघे वेगवेगळया देशांतील कारखान्याचें निरीक्षण व यंत्रसामुग्रीची जुळवाजुळव करतील,

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| २-५-३७ ते ८-५-३७ | ३८,५७,५६५ |
| ९-५-३७ ते १५-५-३७ | ४१,२४,६४० |
| २१-९-३१ ते १५-५-३७ | २,९७,५५,५२,३१५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती . | २४२ | ५ येट ब्रिटनचें १९३७-३८ चें अंदाजपत्रक ... | २४६ |
| २ सराफ आणि रिझर्व्ह बँक | २४३ | ६ गुडविल विमा कंपनी | २४७ |
| ३ मैदानी खेळांतला क्रिकेटी धंदेवाइकपणा ... | २४४ | ७ सहकारी चळवळ | २४८ |
| ४ स्फुट विचार .. | २४५ | ८ टाइपिस्टाची जागतिक चढाओढ ... | २४९ |
| स्वदेशी साखरेस संरक्षण चालू रहाणार—उसाच्या उत्पादनांत सुधारणा झाली पाहिजे—ब्रिटिश सरकारची शेतीस व इतर धंद्यास मदत—हिंदी-जपान व्यापारी करार | | ९ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट .. | २५० |
| | | १० निवडक बाजारभाव | २५१ |


# अर्थ

बुधवार, ता १९ मे, १९३७

## सराफ आणि रिझर्व्ह बँक

—o—

हिंदुस्थानात आधुनिक पद्धतीच्या बॅंकिंगचा प्रसार फारच थोड्या प्रमाणात झालेला आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांस शेतीच्या मालाचा उठाव करण्यास लागणारा पैसा परंपरागत पद्धतीनें व्यवहार करणारे सराफच पुरवितात. देशांतला अंतर्गत व्यापार नवीन पद्धतीच्या बॅंकिंग संस्थांचे कक्षेंत आलेला नाहीं. बॅंकिंगच्या एकूण व्यवहारापैकीं ९० टक्के देवघेव सराफ व सावकार ह्यांचे मार्फत होते असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. इंपीरियल बॅंकेनें हिंदुस्थानभर अनेक शाखा उघडल्या असल्या व सहकारी चळवळीचें जाळें देशभर पसरलें असलें, तरी पूर्वपरंपरागत पद्धतीनेंच सराफी व्यवहार सर्वत्र चालू आहेत, असें आढळून येतें. म्हणजे, रिझर्व्ह बँक ही चलनाची व्यवस्था पहाणारी कायदेशीर मध्यवर्ती संस्था असली व बॅंकिंगच्या क्षेत्रातील नियमनाचे सर्वाधिकार तिजकडे सोपविलेले असले, तरी देशांतील शेकडा ९० टक्के व्यवहार अद्याप तिचे कक्षेबाहेर चालतात अशी परिस्थिति आहे. रिझर्व्ह बॅंकेचें धोरण प्रभावी होण्याचा तिचा अधिकार पैशाच्या व्यवहारांच्या सबंद क्षेत्रावर चालणें अत्यावश्यक आहे, आणि तसें झाल्याशिवाय जनतेसहि रिझर्व्ह बॅंकेपासून विशेष फायदा होणार नाहीं व सवलती मिळणार नाहींत सराफ व सावकार ह्यांस शह देऊन त्यांचें काम नवीन पद्धतीच्या बॅंका आपले हातात घेतील, अशी अपेक्षा करणें आज व्यावहारिक होणार नाहीं, रिझर्व्ह बँकेच्या कक्षेमध्यें सराफाचे व्यवहार कसे आणता येतील, एवढाच आज महत्त्वाचा प्रश्न आहे रिझर्व्ह बॅंकेच्या कायद्याचा मसुदा लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढें असताना ह्या बाबत अनेक सूचना करण्यांत आल्या होत्या, परंतु त्या सर्व अग्राह्य ठरल्या आणि त्यासंबंधानें पुढें चौकशी व तरतूद व्हावी अशी योजना कायद्यांत दाखल करण्यात आली व ह्या रीतीनें सदरहु प्रश्नाचा विचार लांबणीवर टाकण्यांत आला ब्रिटिश हिंदुस्थानात बॅंकिंगचा धंदा करणाऱ्या ज्या व्यक्तींचा आणि संस्थांचा अंतर्भाव रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या शेड्यूल्ड बॅंकांच्या यादींत झालेला नाहीं, त्यासहि बॅंकेच्या कायद्याचीं कलमें लागू करण्यासबंधानें रिझर्व्ह बॅंकेनें तीन वर्षांच्या आत रिपोर्ट करून जरूर त्या सुधारणा सुचवाव्या, अशी जबाबदारी बॅंकेवर कायद्यानें टाकलेली आहे. तीस अनुसरून आतां रिझर्व्ह बॅंकेच्या डेप्युटी गव्हर्नरानें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे

हल्लीच्या पद्धतीप्रमाणें हिंदी सराफाचा रिझर्व्ह बॅंकेशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं, एखाद्या "शेड्यूल्ड" (संलग्न) बँकेमार्फतच फक्त तो येऊं शकतो. शेड्यूल्ड बँकांप्रमाणेंच सराफ रिझर्व्ह बॅंकेशीं जोडले जावेत, ह्या हेतूनें सध्या पहाणी व चर्चा चालू आहे. स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व, स्वतःचें पुरेसें भांडवल, स्वतंत्र हिशेबतपासनिसानीं तपासलेले हिशेब, बॅंकिंगच्या व्यवहाराची इतर व्यवहारांपासून पूर्ण फारकत, इत्यादि गोष्टीसंबंधानें परिस्थिति समाधानकारक आहे असें दिसून आल्यास सराफ-सावकारांचे व्यवहार रिझर्व्ह बँकेशीं जोडून घेतां येणें सुगम होणार आहे. शेड्यूल्ड बॅंकांप्रमाणें सराफ-सावकारांस रिझर्व्ह बॅंकेकडे डिपॉझिटहि ठेवावें लागेल व त्यांचीं इतर बंधनें स्वीकारावीं लागतील.

रिझर्व्ह बॅंकेनें बॅंकिंगसंबंधात कोणकोणते व्यवहार करावेत, ह्याची यादी रिझर्व्ह बँक कायद्याच्या १७ व्या कलमांत दिलेली आहे. व्यापारी हुंड्या शेड्यूल्ड बॅंकांनीं डिस्कौंट करून त्या पुनः रिझर्व्ह बँकेकडून रीडिस्कौंट करून घेतल्या, म्हणजे सदरहु हुंड्याच्या खरेपणाची जबाबदारी शेड्यूल्ड बँकांवर रहाते. शेतकऱ्यांच्या प्रॉमिसरी नोटीवर 'शेड्यूल्ड बँकांनीं पैसे दिले, म्हणजेहि रिझर्व्ह बँकेस विकण्याजोगें 'बिल' अस्तित्वात येऊं शकेल. ह्या संबंधातीलहि अंतिम जबाबदारी अर्थातच शेड्यूल्ड बॅंकांवरच येईल असे व्यवहार करणाऱ्या सराफ-सावकाराची यादी व त्यांपैकीं प्रत्येकाच्या पतीची मर्यादा ह्याविषयीं शेड्यूल्ड बँकास संपूर्ण माहिती तयार ठेवता येईल. ह्या माहितीचे आधारें रिझर्व्ह बँकेस विशिष्ट अटींवर बिलाचे व प्रॉमिसरी नोटाचे आधारावर रकमा देता येणें शक्य होईल. शेड्यूल्ड बँकानीं सराफास व सावकारास कोणत्या दरानें व्याज आकारावें, हा प्रश्न येथें महत्त्वाचा आहे शेड्यूल्ड बँकास बिलें रिझर्व्ह बँकेकडून रीडिस्कौंट करून घ्यावीं लागणार व ह्या दृष्टीनें त्या बँकाची प्रवृत्ति शक्य तितकें अधिक व्याज मिळविण्याकडे असणार, हें उघड आहे ह्या प्रवृत्तीस आळा कसा घालतां येईल, हा प्रश्न सोडविणं जरूर आहे रिझर्व्ह बँकेनें दिलेल्या सवलतींचा फायदा शेड्यूल्ड बँकाच्या द्वारा सराफ-सावकारांस व अखेर शेतकऱ्यास मिळावा, हा बँकेच्या स्थापनेचा हेतु साध्य व्हावयाचा असेल, तर रिझर्व्ह बँकेनें व्याजाचे दरासंबधांत कडक निर्बंध घालणें जरूर आहे बँकरेटपेक्षां २ अगर २½ टक्क्यानें शेड्यूल्ड बँका सावकारास व्याज आकारूं लागल्या तर त्यांचीं बिलें रिझर्व्ह बँकेनें रीडिस्कौंट करण्याचें साफ नाकारावें, अशी एक सूचना करण्यात आली आहे सराफ-सावकाराची पत तरी कमी आहे, अगर शेड्यूल्ड बँका अवाच्या सवा नफा तरी उकळीत आहेत, अशा दोनच गोष्टी व्याजाचा भारी दर दर्शवितील ह्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेस व्याजावर कडक नियंत्रण ठेवणें भाग पडेल

रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नराच्या पत्रकात त्या बँकेचा सराफ सावकाराशीं संबंध कसा जोडता येईल, ह्याविषयीं वरील

अर्थाच्या सूचना केल्या आहेत शेतीविषयक आपल्या कर्तव्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेनें अग्र झाढण्याचें धोरण कसें अंगिकारलें आहे, ह्यासंबंधाचें विवेचन 'अर्था'मध्यें नुकतेंच येऊन गेलेलें आहे आतां ह्या महत्त्वाच्या विषयाचे बाबतींत ती बँक कोणते उपाय योजते हें पहावयाचें आहे. सराफ-सावकाराचे व्यवहार रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत येण्याचे मार्गांत अनेक अडचणी आहेत, ह्यांत शंका नाहीं. पण त्याच्या बिकटपणावरच केवळ जोर न देतां त्या दूर कशा करतां येतील ह्याकडे ज्यास्त लक्ष पुरविलें गेल्यास काहींतरी निश्चित मार्ग सापडणें अशक्य नाहीं असें न होईल तर मध्यवर्ती बँक हें नांव केवळ पोकळ ठरून रिझर्व्ह बँकेच्या कार्याचा व्याप वाढणार नाहीं आणि अपेक्षेप्रमाणें शेतकऱ्यांचें हितहि तिच्या हातून होणार नाहीं.

## मैदानी खेळांतला हिशेबी धंदेवाइकपणा

महाराष्ट्रात कुस्तीचा शोक अत्यत लोकप्रिय आहे आणि त्याची आवड बहुजन समाजाच्या हाडीमाशीं खिळलेली आहे. कुस्त्या पहावयास दूरदूरच्या अंतरावरून लोक जातात आणि हे सामने मोठे चुरशीचे होतात. पेहेलवानाचा पेशा करणारे अनेक लोक आढळतात आणि त्यास पूर्वीपासून राजाश्रय मिळत आलेला आहे तालमींची परस्पर-स्पर्धा चागले पेहेलवान तयार करण्यास कारणीभूत होते आणि कुस्त्याच्या बक्षिसाचा उपयोग धंदेवाइक पेहेलवानांच्या मेहनतान्याकडे करता येतो. धंदेवाइक पेहेलवानास समाज मान देत आला आहे आणि त्याच्या कुस्त्याच्या योगानें तरुण पिढीच्या शरीर संवर्धनास सहाय होत आहे. बडोदें, पुणें, उमरावती येथील मंडळांच्या श्रमानें कुस्त्या व इतर देशी शारीरिक खेळ ह्यांस संघटित स्वरूप व सुशिक्षित समाजात मानाचें स्थान प्राप्त झालें आहे खेळांच्या सामन्यांसाठी खर्च होणारा पैसा सत्कारणी लागतो, ह्या भावनेनें जनता त्यास द्रव्यसहाय व आश्रय देत आहे तिकिटाचे पैसे भरून कुस्त्या पहाण्यास लोकाची गर्दी उडते आणि सामने पद्धतशीर रीतीनें केले जातात, ह्यावरून त्याचें सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्वरूप ध्यानात येण्यासारखें आहे. धंदेवाल्या पेहेलवानास योग्य खुराक व श्रमाचा मोबदला मिळून त्याच्या कौशल्याचें चीज समाजानें केलें पाहिजे ह्याची जाणीव आज वाढत आहे आणि असल्या खेळाचें राष्ट्रीय महत्व लोकांच्या मनावर ठसत आहे

क्रिकेट, फूटबॉल, हॉकी ह्यासारखे विदेशी खेळ हिंदुस्थानांत चालू झाल्यापासून त्याच्या सामन्याचें संघटनात्मक व धंदेवाइकपणाचें स्वरूप विशेष स्पष्ट रीतीनें निदर्शनास येत आहे खेळांच्या संस्थाचे संघ, त्याच्या मार्फत दरवर्षी होणारे चुरशीचे सामने, ते पहाण्यास प्रेक्षकाची केली जाणारी सोय, त्याच्यापासून होणारें तिकिटविक्रीचें उत्पन्न व फायदा, धंदेवाइक खेळाडूच्या पेशास खेळामध्यें मिळालेलें स्थान इत्यादि गोष्टी आतां नित्य परिचयाच्या झाल्या आहेत धंदेवाइक पेहेलवानाप्रमाणें क्रिकेट, फूटबॉल व हॉकी ह्या खेळातले धंदेवाइक खेळाडू आपल्या कौशल्यानें समाजांत मैदानी खेळाची आवड वृद्धिंगत करतात आणि ते अत्यत लोकप्रिय बनतात. पाश्चात्य देशांप्रमाणें हिंदुस्थानांतहि क्रिकेट, फूटबॉल व हॉकी ह्याचे जाहीर सामने हिशेबी पद्धतीनें होऊं लागले आहेत. काहीं धंदेवाइक खेळाडूंनीं सामन्यात आपलें प्राविण्य दाखवावें आणि हजारो बघ्यांनीं तें कौतुकानें करमणुकीखातर पहावें ह्या प्रकाराचा समाजास खरोखर काहीं उपयोग होतो काय? हा वादाचा प्रश्न मधून मधून उपस्थित होतो मैदानी खेळाची आवड तरुण पिढींत विस्तृत करण्याचें कार्य संघटित सामन्यांनीं केलें तर तें इष्टच आहे असें म्हटलें पाहिजे मैदानी खेळ पहाण्यांत प्रेक्षकाचा पैसा खर्च होतो, त्याचा मोबदला केवळ करमणुकीशिवाय योग्य रीतीनें समाजास मिळाला पाहिजे हें संघटित सामन्याच्या मुळाशीं महत्त्वाचें तत्त्व आहे तें ध्यानात बाळगणें आवश्यक आहे.

ग्रेटब्रिटनमध्यें फूटबॉलचे सामने संघटित व हिशेबी पद्धतीनें होतात फूटबॉल संस्था धंदेवाइक खेळाडू नेमून त्याच्यामार्फत सामने लढवतात. ते पहाण्यास पंचवीस हजारापासून एक लाखापर्यंत प्रेक्षक एकेका सामन्यास जमतात व सामन्याचें तिकिटविक्रीचें उत्पन्न प्रत्येकीं १० हजार ते तीन लक्ष रुपयांपर्यंत होतें. फूटबॉल संस्था नियमित जबाबदारीच्या मंडळयांच्या स्वरूपात औद्योगिक व व्यापारी कंपन्यांप्रमाणें नोंदलेल्या असतात आणि त्यांच्या वार्षिक ताळेबंदांवरून त्याच्या धंदेवाइक व्यवहाराची माहिती मिळू शकते. फूटबॉल संस्थाच्या मध्यवर्ती मंडळामार्फत होणाऱ्या वार्षिक सामन्यात सुमारें दोन कोटि रुपये इतकें तिकिटविक्रीचें उत्पन्न येतें चागल्या धंदेवाइक खेळाडूस प्रत्येकी खेळाच्या मोसमात दर आठवड्यास १०० रुपये व एरव्ही ८० रुपये तनखा मिळतो आणि जिंकलेल्या सामन्यांबद्दल बक्षिसहि मिळतें. पहिल्या प्रतीच्या खेळाडूस वर्षाची पाच-साडेपाच हजार रुपये कमाई होते आणि पाच वर्षांनीं जादा रकमहि मिळते. खेळाडूची कार्यक्षमता फार वर्षे टिकत नसल्यानें त्याची कमाई अल्पकालिक असते. एका संस्थेंतून दुसऱ्या संस्थेंत खेळाडूची बदली करून घ्यावयाची असल्यास क्लबांस एक लक्ष रुपयापर्यंत मोबदला द्यावा लागतो आणि आपला दर्जा व यशस्विता वाढवण्यासाठी ह्या कामीं लाखों रुपये कित्येक संस्थानीं खर्च केल्याचीं उदाहरणें आहेत. प्रेक्षकाकडून मिळणारे तिकिटाचे पैसे हें खेळाडू संस्थाचें उत्पन्न असतें आणि त्यांतून खेळणाराचा पगार आणि मैदानाची व इमारतींची व्यवस्था, ह्यांबद्दलचा खर्च चालतो. हा खर्च व कर्जावरील व्याज वजा जातां नफा उरेल तो भागीदारास डिव्हिडंड म्हणून वाटण्यांत येतो ह्या प्रमुख फूटबॉल संस्थाचें एकूण भांडवल सुमारें ६३ लक्ष रुपये आहे त्यास डिबेंचर्सच्या व इतर स्वरूपात ४०-४५ लक्ष रुपये कर्ज आहे. हा मोठा किफाइतशीर धंदा आहे असें नसून त्यांत धोकाहि पुष्कळ आहे सामन्यांच्या निकालाबाबत जुगार चालते तींत मात्र कोट्यावधि रुपयाची उलाढाल होते. ह्या व्यवहाराची वार्षिक उलाढाल ४० कोटि रुपयापर्यंत होते असा अदाज आहे मैदानी खेळाच्या सामन्यास धंदेवाइकपणाचें स्वरूप कसें आलें आहे ह्याची वरील वर्णनावरून कल्पना येईल आणि त्यास मर्यादेच्या बाहेर जाऊं देण्यात सामाजिक अनहित कसें आहे हेंहि पटेल

### जाहिरातीचा धंदा

" जाहिरातीच्या कलेसंबंधीं उत्कृष्ट अनुभव असलेले कित्येक लोक हिंदुस्थानात आहेत, पण त्यांस हिंदुस्थानाची काहींच माहिती नाहीं. ह्या उलट, हिंदुस्थानाची परिपूर्ण माहिती असलेल्यास जाहिरातीच्या कलेचें ज्ञान नाहीं. ह्या प्रश्नाकडे धंदा म्हणून पहाणारे लोक निर्माण झाल्याखेरीज त्याची प्रगति होणार नाहीं "—मि पी. जी. ओब्रायन ह्यांच्या मुंबई येथील एका भाषणाचा साराश.

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८२,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रक्कम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठी पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्



"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application. *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."



## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा द. शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.



रोडगे यांच्या मजबूत सतरंज्या वापरा.

आपल्या पैशाचा योग्य मोबदला मिळवा.

सर्वत्र मिळतात.

कारखाना पत्ता: ३० मिठगंज पेठ पुणें २



## न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ,

रविवार पेठ, सराफ

बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.



## K. K. & Co.

**Photographic Dealers**

POONA.



**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचे पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.

**भावांचें माहितीपत्रक मागवा**

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी ए, यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 5434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २६ मे, १९३७ अंक २१

दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार

## प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

**लोकांना आपला पैसा किफायतशीर व्याजाच्या दरानें गुंतविण्याची संधि देत आहे.**

वरील बँकेनें तारीख १३ मार्च १९३७ रोजीं साजरा केलेल्या आपल्या **रौप्यमहोत्सवा**निमित्त सदरहु तारखेपासून **दशवार्षिक रोखे** शेंकडा ७० रु. ८ आण्यांच्या दरानें विक्रीस काढले आहेत.

विक्रीस काढलेले रोखे फक्त ५,००,००० रु.च्या दर्शनी किंमतीचे आहेत. वरील रक्कम शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति दूर करण्यासाठी कर्जाऊ दिली जाणार आहे.

हे रोखे विकत घेण्यांत बिलकूल सट्टेबाजी नाहीं. | विशेष माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें.


नागपूर शहर,
ता. १ मार्च १९३७

जी. ए. भोंसले, बी. कॉम,
मॅनेजर, दि सी. पी. अॅन्ड बेरार प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बॅन्क, लिमिटेड.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

घरपोंच जोडी रुपये ८ आणे ८ ची ती हीच

## टिकेकरी नवीन फॅशनचीं पातळें

आज हजारों कुटुंबें टिकेकरी फॅशनेबल पातळें वापरीत असून त्याचें प्रामाणिक मत एकच, कीं नाना तऱ्हेचे मोहक पण पक्के रंग, चित्ताकर्षक किनारी, तलम व टिकाऊ पोत, भरपूर लांबरुंद हे सर्व गुण याच मालांत एके ठिकाणीं आढळतात.

तरी ट्रायल ऑर्डर जरूर यावी. नमुने मोफत. पोस्टेजकरितां दीड आण्यांचीं तिकिटें पाठवा.

**दि टिकेकर टेक्सटाईल मि. लि.**
पोस्ट टिकेकरवाडी, सोलापूर

दि टिकेकर टेक्सटाइल मिल लि., टिकेकरवाडी.

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
| --- | --- |
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८२,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रक्कम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्.

## विविध माहिती

### लंडनच्या बंदरातून होणारा व्यापार

लंडनमधील बंदरांत दरसाल ३० हजार आगबोटी उतरतात गेल्या वर्षी ह्या बंदरांत येणाऱ्या व बंदरातून जाणाऱ्या बोटींतून ६१/२ कोटि टन मालाची ने आण झाली बंदरातून आयात व निर्गत होणाऱ्या मालाची किंमत ६०० कोटि रुपये भरली.

### सरकारी प्रचाराकरितां फिल्म्सचा उपयोग

ग्रेट ब्रिटनमधील पोस्ट खात्यानें आपल्या प्रचाराकरिता ४० चित्रपट तयार केले आहेत. शेतकी खातें, कामगार खातें, सशोधन खातें, इत्यादींनीहि आपल्या कार्यासंबधीं चित्रपट तयार करवले आहेत.

### लंडनमधील चेक्सची देवघेव

फेब्रुवारी १९३७ मध्यें लंडनमधील बॅकर्स क्लिअरिंग हौसमध्ये झालेल्या चेक्सच्या देवघेवींची सरासरी २०० कोटि पौंड इतकी पडली. मुंबई शहरातील क्लिअरिंग हौसमध्यें दर आठवड्यास सरासरीनें २० कोटि रुपयाची देवघेव होते

### एक मिनीट म्हणजे किती वेळ ?

इंग्लंडमधील एका आगगाडीच्या अपघातासबंधातील चौकशीचे वेळीं एक साक्षीदार म्हणाला 'गाडी मिनीटभर थांबली होती.' घड्याळाप्रमाणें पहाता त्याचें मिनीट म्हणजे ४६ सेकंद भरले. वेळाकडे लक्ष न देणाराचें एक मिनीट आणि वेळाच्या ओघाविषयीं जाणीव असणाराचें एक मिनीट हीं सारखींच आहेत काय ? कामांत असणाराचें मिनीट व आराम खुर्चीवर विसावा घेणाराचें मिनीट ह्यात फरक नाहीं काय ? घड्याळातील काट्यांच्या हालचालीवर ही कालगणना अवलंबून आहे, कां एका मिनिटात घडून येणाऱ्या गोष्टींवरुन त्याची मर्यादा ठरवावयाची ? इत्यादि प्रश्न मानसशास्त्रदृष्ट्या येथें उपस्थित होतात

### ग्रेट ब्रिटनमधील प्राप्तीवरील कराचें उत्पन्न

मार्च १९३७ अखेर संपलेल्या वर्षी ब्रिटिश सरकारच्या एकूण उत्पन्नापैकी शेकडा २८३/४ टक्के इतकें उत्पन्न प्राप्तीवरील करापासून मिळालें, १९१३-१४ सालीं हें प्रमाण २१ टक्के इतकें होतें.

### ग्रेट ब्रिटनमधील रस्त्यावरील अपघात

१९३६ सालीं ग्रेट ब्रिटनमधील रस्त्यावरील अपघातात ६,४८९ लोक मरण पावले व २,२५,६८९ लोकांना दुखापती झाल्या. १९३४ च्या मानानें मोटारींची सख्या २० टक्क्यानीं वाढली असली तरी अपघातांचें प्रमाण १२ टक्क्यानीं उतरलें हें विशेष होय सायकलस्वारामध्यें अपघातांचें प्रमाण सर्वांत जास्त आढळतें

### मोटारीच्या पुढील जागेवर बसण्यात धोका

मोटारीच्या सारथ्याचे शेजारी बसणाऱ्या उतारूस अपघाताची भिती मोठी असते, असें त्याबाबतच्या आकड्यावरून सिद्ध झालें आहे आपल्या पाहुण्यास शेजारी बसवून स्वतः मोटार चालविणारे अशा रीतीनें मित्रास नकळत धोक्यांत घालीत असतात.

### जकातींचें उत्पन्न

एप्रिल १९३६ च्या मानानें एप्रिल १९३७ मध्यें हिंदुस्थान सरकारास जकातींपासून ६० लक्ष रु. ज्यास्त उत्पन्न झालें. आयात मालावरील जकातींपासून ह्या महिन्यात ३ कोटि २३ लक्ष रु. मिळाले.

### आर्मी अॅन्ड नेव्ही स्टोअर्स लि.

"आर्मी अॅन्ड नेव्ही स्टोअर्स लि" ह्या कंपनीस गेल्या वर्षी सुमारें ३६ लक्ष रु नफा झाला. भागीदारांस १५ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यांत आलें कंपनीचा हिंदुस्थानांतील व्यवहार वाढला असून नव्या दिल्लीमध्यें शाखा स्थापन करण्यासंबंधीं पूर्वतयारी चालू आहे

### सदोष शिक्षण पद्धति

अडचणींस तोंड देण्याची व श्रम करण्याची सवय प्रचलित शिक्षण पद्धतीनें विद्यार्थ्यांमध्यें उत्पन्न होत नाहीं अशी तक्रार एका इंग्रज लेखकानें केली आहे

### न्यूझीलंड देशात फोर्ड कारखाना

फोर्ड मोटार कंपनीनें वेलिंग्टन ( न्यूझीलंड ) येथें एक मोटार कारखाना उभारला आहे

### कागदावरील जकात कमी करा

वर्तमानपत्रास लागणाऱ्या कागदावरील जकात कमी करावी अशी विनंति हिंदुस्थान सरकारास करण्यात आली आहे. तिचा सहानुभूतीपूर्वक विचार होईल, अशी अपेक्षा आहे.

### इग्लंडमधील बेकारी कमी झाली

ग्रेट ब्रिटनची आर्थिक परिस्थिति सुधारत आहे याचें प्रत्यंतर म्हणजे बेकाराची संख्या आता कमी झाली आहे सध्याची मंदी चालू होण्यापूर्वी म्हणजे १९२९ सालीं १५ लक्ष बेकार होते, आणि ब्रिटिश बेकारांची सख्या आज तीच आहे. गेल्या आठ वर्षांत बेकारीचें मान इतकें कधीच कमी झालें नव्हतें.

### राष्ट्रसघांतून अॅबिसीनियाचें उच्चाटन

राष्ट्रसघाच्या कौन्सिलचें व असेंब्लीचें अधिवेशन ह्या आठवड्यांत सुरू झालें कौन्सिलच्या कामाच्या यादींत अॅबिसीनियाच्या प्रश्नाचा उल्लेख नाहीं. अॅबिसिनीयाच्या प्रतिधिनींस असेंब्लीमध्यें प्रवेश मिळूं दिल्यास इटली कामकाजांत भाग घेणार नाहीं, असें मुसोलिनीनें मागेंच जाहीर केलेलें आहे. तेव्हां, अॅबिसीनियाच्या बादशहानें आपले प्रतिनिधी पाठवूं नयेत, अशी त्याजवर खुशीची सक्ती केली जाण्याचा संभव आहे

### मि बाल्डविन ह्यांचा राजीनामा

ता. २८ मे रोजीं ब्रिटिश मुख्य प्रधान मि बाल्डविन हे आपल्या जागेचा राजीनामा देतील. १४ वर्षांपूर्वी ह्याच दिवशीं मि बाल्डविन ह्यांची कॉन्झर्वेटिव पक्षाच्या पुढाऱ्याचे जागीं निवडणूक झाली होती. ते मुख्य मंत्री होण्यापूर्वी फडनविशी खात्याचे प्रधान होते मि. चेंबरलेन ह्या जागेवरूनच मुख्य मंत्रीपदावर चढणार आहेत.

### मि. रॉकफेलर ह्यांचा मृत्यु

अमेरिकेंतील सुप्रसिद्ध कोट्याधीश मि जॉन डी. रॉकफेलर हे आपल्या वयाच्या ९७ व्या वर्षी गेल्या रविवारीं मरण पावले. रॉकेल तेल व पेट्रोल ह्याच्या उत्पादनात व व्यापारात त्यानीं नाव व पैसे कमावले. एके काळीं त्यांनीं अमेरिकेंतील शेकडा ९० टक्के पेट्रोलवर प्रभुत्व मिळविलें ! मि रॉकफेलर ह्यानीं आपल्या सपत्तीचा उपयोग समाजाच्या सुधारणेकडे केला. सुमारें २०० कोटि रुपये सर्चून त्यानीं वेगवेगळ्या सस्था स्थापन केल्या आहेत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ९-५-३७ ते १५-५-३७ | ४१,२४,६४० |
| १६-५-३७ ते २२-५-३७ | १९,१३,९८८ |
| २१-९-३१ ते २२-५-३७ | २,९७,७०,९६,१२६ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | २५४ | स्थान इ क लि -कागदा-वरील जकात | |
| २ शेअर बाजारांत पैसे कसे मिळवावे ? | २५५ | ५ सोलापूर जि को इन्स्टिट्यूट | २५९ |
| ३ सोनें स्वस्त कां होत नाहीं ? | २५६ | ६ स्वीडनमधील सहकारी चळवळ | २६० |
| ४ स्फुट विचार | २५७ | ७ "ग्रामोद्धार" | २६१ |
| राष्ट्रीयत्वाची भावना व आर्थिक प्रगति--भांडवलशाहीस मुरड-ब्रिटिश खाणींची राष्ट्रीय मालकी- ही लढाऊ चढा ओढ केव्हां थांबणार ?— रिझर्व्ह बँकेचे भाग—हिंदु- | | ८ जादा नफ्यावर कर | २६२ |
| | | ९ राजेसाहेबांचा तनखा | २६२ |
| | | १० निवडक बाजारभाव | २६३ |


# अर्थ

बुधवार, ता २६ मे, १९३७

## शेअर बाजारांत पैसे कसे मिळवावे ?

### " येर गबाळाचें काम नाहीं "

मुंबईच्या शेअर बाजारात मधून मधून खळबळ उडून कित्येक सट्टेवाल्यास नुकसान येतें आणि त्याची झळ अनेक लोकास लागण्याची भीति उत्पन्न होते, ह्याविषयींच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध होतात शेअर बाजाराची घटना, नियम व कारभार ह्याच्यामध्यें काहीं दोष आहेत कीं काय आणि ते कसे दूर होतील ह्याविषयीं चौकशी व शिफारसी करण्यासाठी मुंबई सरकारानें नेमलेल्या कमिटीच्या कित्येक महत्वाच्या सूचना बाजाराच्या व्यवस्थापक मंडळास पसंत नसल्यानें सदरहु बाबतींत सरकार पुढें काय करतें इकडे लोकाचे डोळे लागले आहेत शेअर बाजारात अनेक लोक पैसे मिळवून गबर होतात हें पाहून त्या गंगेंत हात धुवून घेण्याची इच्छा सामान्य माणसासहि होते आणि अशा व्यक्तींची संख्या अलीकडे वाढली आहे ह्या सट्टेबाजीस जुगारीचें स्वरूप प्राप्त होऊन त्यांत अनेक लोक बुडतात व त्याच्या घरादाराचें वाटोळें होतें अशा तक्रारी येऊ लागल्या असल्यानें शेअर बाजारात चालणाऱ्या व्यवहाराचें समाजहितदृष्ट्या नियमन व नियंत्रण कसें करावें हा सार्वजनिक महत्त्वाचा प्रश्न आज उपस्थित झाला आहे कर्जरोखे व संयुक्त भांडवलाच्या मंडळ्याचे भाग ह्यात जनतेनें पैसे गुतवणें आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट आहे आणि ह्या बाबतींत शेअर बाजाराची व्यवस्था सोइस्कर असल्यानें तो बाजार, त्यांत कांहीं अनिष्ट व मूर्ख सट्टेवाले जुगार खेळतात म्हणून, बंद करावा असें कोणीहि म्हणणार नाहीं त्याचप्रमाणें, वायद्याचे व्यवहार करून रोख्यांच्या खरेदी-विक्रीची सोय सट्टेवाले अप्रत्यक्षपणें करून देत असल्यामुळें त्यांस बंदी व्हावी असें सुचवणें हेंहि सयुक्तिक होणार नाहीं. तथापि, कोणत्याहि प्रकारच्या व्यवहाराचे दुष्परिणाम सामान्य जनतेस भोगावे लागत आहेत असें दिसून आल्यास त्यांचें नियमन करणें सरकाराचें कर्तव्य ठरतें तेव्हा, ह्यासंबंधांत शेअर बाजारांत चालणाऱ्या उलाढालींचें स्वरूप काय आहे आणि धंदा करूं इच्छिणारानीं व्यवहार कसे करावे ह्याची माहिती होतकरू धंदेवाल्यांस होणें अगत्याचें आहे अर्थग्रथमालेंत प्रसिद्ध झालेल्या "व्यापारी उलाढाली" ह्या पुस्तकात आम्हीं ह्या विषयाचें विवेचन सोप्या भाषेंत केलें आहे, तें वाचकानीं अवश्य पहावें

प्रस्तुत ह्या विषयाकडे वळण्याचें मुख्य प्रयोजन शेअर बाजारात यशस्वी रीतीनें धंदा कसा करावा ह्यासबधानें मुंबईच्या स्टॉक एक्सचेंजचे जुने, अनुभवी व सन्मान्य सभासद, श्री. नाबर, ह्यानीं इग्रजी भाषेंत लिहिलेल्या "Successful Speculation in Shares" ह्या पुस्तकाकडे लक्ष वेधणें हें होय. शेअर बाजार हा एक केवळ जुगारीचा अड्डा आहे आणि तो बंद करणेंच इष्ट आहे ही कल्पना कशी चुकीची आहे हें सिद्ध करून ह्या बाजारातला धंदा इतर धंद्याप्रमाणें सन्माननीय व समाजोपयोगी आहे हें ग्रंथकर्त्यानें विशद करून सांगितलें आहे शेअर बाजाराशीं संबंध येणाऱ्या लोकाचे तीन वर्ग आहेत निश्चित व्याज मिळावें म्हणून रोखे व कंपन्याचे भाग ह्यात पैसे गुंतवणाऱ्या व्यक्ती व संस्था पहिल्या वर्गांत येतात ह्या वर्गाच्या शिलकी पैशाचा ओघ उद्योगधंद्याच्या भांडवलात वहात असतो आणि तो नीट वाहून औद्योगिक प्रगतीस सहाय व्हावें हा शेअर बाजाराचा मुख्य हेतु आहे. तो हेतु साध्य होण्यास रोख्याची व भागांची उलाढाल करून त्याच्या किमतींत होणाऱ्या फरकाची जोखीम उचलणाऱ्या धंदेवाल्याचा दुसरा वर्ग बनतो. हे धंदेवाले खरेदी-विक्री करीत नसतील तर सामान्य जनतेस रोख्यात पैसे गुतवणें व ते जरूर पडेल तेव्हा मोकळे करणें ह्या गोष्टी सुसाध्य होणार नाहींत. रोखे ठराविक भावानें आज खरेदी करून पुढें त्याची किमत चढताच ते विकणें आणि ह्यां खरेदी-विक्रींतून फायदा काढणें हें वायद्याच्या व्यवहाराचें मर्म आहे. कापूस, सोनें, चांदी इत्यादि मालाची खरेदी-विक्री मुदतीच्या करारानें होण्यासाठी त्याचे भिन्नभिन्न बाजार आहेत, तशाच प्रकारचा बाजार रोखे व भाग ह्याच्या व्यवहारासाठी असून त्यासच स्टॉक एक्सचेंज म्हणतात बाजारभावांत अनेक कारणानीं चढउतार होण्याचा संभव असतो, त्याचा अंदाज बांधून प्रचलित भावानें खरेदी-विक्री अगाऊ करणारांच्या व्यवहारानीं बाजार भाव स्थिर रहाण्यास सहाय होतें हें विधान सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटेल परंतु तें सत्य असल्याचें अर्थशास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे आणि त्याचें विस्तृत विवेचन श्री. नाबर ह्यानीं आपल्या पुस्तकांत केलें आहे बाजार भावांत चढउतार का होतो ह्याचें ज्ञान नसताना आणि रोखे व कंपन्याचे भाग ह्याच्या किंमती कशा व किती वर-खाली जातील ह्याचा अंदाज बांधण्यास लागणारी माहिती, ज्ञान व अनुभव ह्यांचा अभाव असताना केवळ बाजारगप्पावर विसंबून त्वरित श्रीमान होण्याची हाव धरणारे लोक मात्र शेअर बाजारात पैसे घालतात तेव्हा त्याच्या व्यवहारास जुगारीचें स्वरूप येतें. असल्या लोकांचा तिसरा वर्ग बनतो आणि त्याच्या भरमसाटपणानें केलेल्या उलाढालींमुळें सबंद शेअर बाजारास सामान्य जनतेच्या दृष्टीनें बट्टा लागतो

वायद्याचे व्यवहार व जुगार ह्यांमध्यें फरक काय आहे हें श्री. नाबर ह्यांनीं मार्मिकपणानें व सोदाहरण दाखविलें असून त्यांनीं स्वतःच्या दीर्घकालीन अनुभवांतलीं दिलेलीं उदाहरणें उद्बोधक आहेत. वायद्याच्या व्यवहारांचा धंदा नीट चालवल्यास

तो किफायतशीर आणि मानाचा आहे, पण तो करूं इच्छिणाऱ्या होतकरू लोकांनीं आपल्या अंगीं ज्ञानलालसा, आत्मविश्वास, चिकाटी इत्यादि अनेक कष्टसाध्य गुण आणले पाहिजेत असें त्याचें सांगणें आहे. ह्या गुणांचें स्वरूप व उपयुक्तता ह्यांचें विस्तृत विवेचन त्यांनीं आपल्या पुस्तकांत केलें आहे, तें वाचनीय आहे. शेअर बाजारांत कोणीहि जुगार खेळावी व नशीबाची परीक्षा पहावी ह्या प्रचलित अनिष्ट प्रवृत्तीस त्याच्या सारख्या अनुभवी माणसानें दिलेल्या सल्ल्यानें आळा बसेल तर अत्यंत इष्टच आहे. प्रामाणिक व सरळ व्यवहाराच्या दलालामार्फतच शेअर बाजारांत धंदा करणारांनीं आपली खरेदी-विक्री करावी -आणि स्वतःच सट्टेबाजी करणाऱ्या दलालांपासून दूर रहावें हा त्याचा अभिप्राय ध्यानात बाळगण्यासारखा आहे. सरकारनें शेअर बाजाराच्या व्यवस्थेंत कायद्याच्या मार्गानें हात घालूं नये असें त्याचें सर्वसाधारण मत आहे, ह्या 'दृष्टीनें हा अभिप्राय चिंतनीय आहे. कायदे व नियम ह्यांच्या उपयुक्ततेस मर्यादा असते आणि बाजारांच्या देवघेवींत सरकारी सत्तेनें ढवळाढवळ करूं नये हें तत्त्व सामान्यतः मान्य करण्यास हरकत नाहीं. परंतु विशिष्ट देवघेवींच्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊन त्याचे दुष्परिणाम जनतेस भोगावे लागत असतील तर सरकारनें शक्य तें व्यावहारिक नियंत्रण केल्यावाचून गत्यंतर रहात नाहीं शेअर बाजारांत धंदा करू इच्छिणारास श्री. नावर ह्यांनीं केलेल्या सूचना शास्त्रशुद्ध व अनुभवसिद्ध आहेत व त्या त्यास मार्गदर्शक होवोत असें आम्हीं इच्छितों पूर्वतयारीशिवाय वाटेल त्यानें शेअर बाजारात धंदा करावा ह्या कल्पनेस त्यानें आळा बसल्यास तो परिणाम अत्यंत इष्ट असाच होईल, हें आम्हीं वर सांगितलेंच आहे.

## सोनें स्वस्त कां होत नाहीं ?

गेल्या सहा वर्षांत हिंदुस्थानातून निर्गत झालेल्या सोन्याच्या किंमतीचा आकडा आता तीनशे कोटि रुपयापर्यंत आला आहे, आणि त्यानें सोन्याच्या जागतिक पुरवठ्यात फार मोठी भर घातली आहे. त्याचप्रमाणें, जगातील खाणींतलें सोन्याचें उत्पादन अलीकडे वाढलें आहे आणि ह्या बाबतींत रशियानें आफ्रिकेच्या खालोखाल दुसरा नंबर मिळवला आहे. "जगाच्या व्यापारास लागणारा खेळता पैसा सोन्याच्या तारणावर अवलंबून असल्यानें आणि त्या धातूचें उत्पादन व्यापाराच्या प्रगतीच्या मानानें अपुरें असल्यानें पैशाच्या टंचाईमुळें बाजारभाव मंदीचे रहाणार आणि त्यावर उपाय म्हणून राष्ट्रांनीं सोन्याचा विनियोग हात राखून केला पाहिजे" अशी हाकाटी तज्ज्ञ म्हणवणारी मंडळी कांहीं वर्षांमागें करीत होती. राष्ट्रसंघाच्या विद्यमानेंहि ह्या प्रश्नाची चौकशी झाली, इतकें महत्त्व सोन्याच्या जागतिक पुरवठ्याच्या विषयास प्राप्त झालें होतें. आता सोन्याचें उत्पादन व जागतिक पुरवठा ह्यामध्यें इतकी वाढ झाली आहे कीं तिला आळा घालण्याचे प्रयत्न कसे करावे इकडे तज्ज्ञांचें लक्ष लागलें आहे! गेल्या सात वर्षांत सोन्याचें जागतिक उत्पादन देशपरत्वें कसें वाढत आलें आहे याची कल्पना पुढें दिलेल्या आकड्यांवरून येईल:—

### जगांतलें सोन्याचें उत्पादन

( आकडे लक्ष तोळ्याचे आहेत )

| देश | १९२९ | १९३६ |
|---|---|---|
| दक्षिण आफ्रिका | २७८ | ३०२ |
| रशिया | २८ | १९६ |
| कानडा | ५२ | १०० |
| अमेरिका | ५४ | १०० |
| ऑस्ट्रेलिया | १२ | २७ |
| इतर देश | ९७ | २०६ |
| एकूण | ५२१ | ९३१ |

सोन्याचें उत्पादन गेल्या सहा वर्षांच्या अवधींत दुप्पट झालें आहे. असें असता सोन्याचा भाव पूर्वी तोळ्यास चोवीस रुपये होता, तो चौतीस रुपयाच्या सुमारात कां राहिला आहे? सोन्याचें अजीर्ण होत आहे आणि तें पचवण्यास कांहीं तोडगा शोधला पाहिजे असें एकीकडे वाटत असता त्याची किंमत मात्र कमी होत नाहीं, असें कां व्हावें? ह्या प्रश्नाचा विचार करतांना हें लक्षात ठेवलें पाहिजे कीं सोन्याची किंमत ज्या निरनिराळ्या राष्ट्रीय चलनात व्यक्त केली जाते, त्या चलनाचें मोल सर्व देशाच्या सरकारांनीं सहेतुक कमी केलें आहे चलनांत, मग तीं धातूंचीं असोत किंवा कागदाचीं असोत, स्वत.ची अशी किंमत नाहीं. एक तोळा किंवा औंस सोन्यात अमूक रुपये किंवा पौंड बसतात असें कायद्यानें ठरवलेलें असतें आणि ह्या कारणानें त्या चलनाची किंमत सोन्याच्या किंमतीवर अवलंबून रहाते.

एक औंस सोन्यात पूर्वीपेक्षां अधिक डॉलर किंवा पौंड बसतात असें निश्चित केलें म्हणजे तीं चलनें स्वस्त झालीं व सोनें महागलें १६ पेन्साचे ऐवजीं १८ पेन्साचा रुपया केला असतां रुपया महागला व पेन्स किंवा पौंड स्वस्त झाला. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्याचे कारकीर्दीस प्रारंभ होण्यापूर्वी अमेरिकेत डॉलरमध्यें जेवढें सोनें होतें त्याच्या ५९ टक्क्याइतकेंच सोनें आता त्यात आहे असा कायदा झाल्यानें डॉलर स्वस्त झाला व त्या मानानें सोन्याची किंमत चढली. ह्या चढीच्या भावानें मध्यवर्ती बँका सोनें विकत घेण्यास तयार आहेत आणि डॉलरशी पौंड, स्टर्लिंग व फ्रँक इत्यादि चलनें जुळतीं घेतलीं असल्यानें सोन्याची किंमत सर्वत्र वाढली आहे अमेरिकेनें आपल्या डॉलरची किंमत चढवली तरच त्या चढीच्या मानानें सोन्याचा भाव उतरेल परंतु सध्याच्या कायद्यांत दुरुस्ती करून जगाच्या हुंडणावळीच्या दरात आज जें थोडेंबहुत स्थैर्य आहे, तें बिघडवण्यास अमेरिकन सरकार एकदम तयार होणार नाहीं. शिवाय, मध्यवर्ती बँका व सरकारी तिजोऱ्या ह्याच्या संग्रहांतील सोन्याची किंमत राष्ट्रीय चलनात जी फुगून दिसत आहे, ती कमी करण्यास सरकारें सहजासहजीं पुढें येणार नाहींत राष्ट्रांचीं चलनें स्वस्त झाल्यामुळें सोनें महागलें आहे. पौंड स्टर्लिंग स्वस्त करण्यांत आला आहे आणि त्याला हिंदी रुपया ठराविक दरानें ( १ पौंड=१३$\frac{1}{3}$ रुपये ) बांधला गेल्यानें त्याचीहि किंमत कमी झाली आहे. ह्याचाच अर्थ असा आहे कीं रुपयांत दाखविली जाणारी सोन्याची किंमत वाढली आहे सोन्यास जागतिक बाजारात एकच किंमत असल्यानें इतर देशाप्रमाणें हिंदुस्थानांतहि त्यास महर्घता आली आहे ह्या संबंधांतली जागतिक परिस्थिति किंवा हिंदुस्थानाचें स्वत.चें चलनविषयक धोरण बदलल्या वांचून सोन्याच्या किंमतींत विशेष फेरफार होणार नाहीं.

# स्फुट विचार

## राष्ट्रीयत्वाची भावना व आर्थिक प्रगति

व्यक्तिस्वार्थ, स्पर्धा व अनियंत्रित आंतरराष्ट्रीय व्यवहार ह्यांच्यावर आधारलेली आर्थिक व्यवस्था मागें पडून राष्ट्रीय संस्कृति, संरक्षण व प्रगति ह्यास अनुलक्षून सामाजिक व आर्थिक व्यवहार चालावे ह्या कल्पनेस मूर्तस्वरूप आज चोहोंकडे प्राप्त झालें आहे. अर्थशास्त्रदृष्ट्या ही पिछेहाट आहे आणि ह्या प्रवृत्तीचे योगानें जागतिक व्यापार आणि मानवी आधिभौतिक प्रगति ह्यास अडथळा येत आहे असें कित्येकांना वाटेल. परंतु व्यक्ति व जग ह्यास जोडणारा दुवा राष्ट्रीय मनोवृत्तीचा आहे हें विसरतां कामा नये आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे बाबतींत राष्ट्रीय स्वयंपूर्णतेवर जोर देण्यांत येत असेल तर ह्या प्रवृत्तीसच योग्य वळण लावून मानवी उन्नति साधली पाहिजे. सर आर्थर सॉल्टर ह्यांनीं एक नवीन ग्रंथ लिहिला आहे, त्यामध्यें ह्याच व्यावहारिक धोरणाचा पुरस्कार करण्यात आला आहे. ते म्हणतात:— " राष्ट्रीयत्वावर उभारलेल्या आर्थिक धोरणास शत्रू समजून त्याचेवर शस्त्र उपसण्यांत शहाणपणा नाहीं. ह्या धोरणातून नवीन व अधिक इष्ट अशी आर्थिक घटना निर्माण होईल असा यत्न आपण केला पाहिजे. " जागतिक व्यापार मर्यादित झाला असतां भांडवलशाहीची कुचंबणा होते आणि तिला मालाच्या उठावासाठीं राष्ट्रीय अंतर्गत बाजारपेठा विस्तृत कराव्या लागतात, हें खरें असलें तरी ह्या अडचणीमधून मार्ग काढणें अशक्य नाहीं. अंतर्गत व्यवहाराचा विस्तार होऊन त्याची घडी नीट बसली म्हणजे क्रमाक्रमानें आंतरराष्ट्रीय व्यापाराची व्यवस्था लावतां येईल. राजकीय दृष्ट्या राष्ट्र हा महत्त्वाचा घटक आज बनलेला आहे. तात्त्विक दृष्टीनें तो कितीहि अयुक्त वाटला तरी राष्ट्रीय वृत्ति गृहीत धरूनच जगाची आर्थिक पुनर्घटना झाली पाहिजे. हिंदुस्थानांतही स्वदेशी चळवळ ह्या विचारावरच आधारलेली असून उदार मतवादी पाश्चात्य पंडितांस स्वतःच्या राष्ट्रापुरतें तरी तिचें महत्त्व पटत चाललें आहे, हें उद्बोधक आहे. भारतीय अर्थशास्त्राचा हाच पाया आहे आणि त्यास नांवें ठेवणाराचे कान सोनाराकडून टोचले जात आहेत, हें ठीक आहे. राष्ट्रीय अर्थशास्त्राचा इंग्लंडमध्यें पुरस्कार करणारे विद्वान् हिंदुस्थानास समान न्याय लागू व्हावा असें मत प्रकट करण्यास कदाचित् कचरतील हा भाग निराळा.

---

## भांडवलशाहीस मुरड ?

व्यक्तीच्या मालकीच्या भांडवलावर उभारलेली सध्याची औद्योगिक घटना बदलणाऱ्या परिस्थितीशीं विसंगत असल्यानें ती नाहींशी होऊन तिच्या जागीं दुसरी आर्थिक घटना येणें अपरिहार्य व इष्ट आहे. ह्या कल्पनेचा पुरस्कार केला जात असतां प्रचलित भांडवलशाहीस हळू हळू कशी मुरड घालण्यांत येत आहे हें लक्ष्यांत घेणें बोधप्रद आहे. भांडवलशाहीची क्रांति समाजाच्या किंवा कामकरी वर्गाच्या सत्तेंत होणें आवश्यक, अपरिहार्य किंवा योग्य असो व नसो, भांडवलाच्या खाजगी मालकीवर अधिष्ठित झालेली औद्योगिक रचना क्रमाक्रमानें बदलत असून तिला नवीन वळण लागत आहे, ह्यांत शंका नाहीं, आणि ही प्रवृत्ति इंग्लंडसारख्या भांडवलशाहीच्या माहेरघरीं दिसून येत आहे, हें त्यांत विशेष आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य, स्पर्धा व प्रातिनिधिक राज्यपद्धति हीं त्या देशांत दृढमूल झालीं आहेत आणि उद्भवणाऱ्या अडचणींस तोंड देण्यासाठीं त्या घटनेचा आवश्यक दिसणाऱ्या सुधारणेशीं मेळ घालण्यात येत आहे. ह्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून ब्रिटिश कोळशाच्या खाणींचे मालकी हक्क सरकारनें विकत घेण्याचें घाटत आहे. ह्या व्यवस्थेचा उल्लेख करतां येईल. खाणींचे अनेक मालक, त्यांस स्वामित्वाबद्दल द्यावा लागणारा निरनिराळ्या दराचा मोबदला व ह्यामुळें खाणींचा धंदा किफायतशीर रीतीनें चालून कामकऱ्यांस योग्य मजूरी देण्यांत भासणारी अडचण ह्या गोष्टींची चर्चा इंग्लंडमध्यें अनेक वर्षें चालून सर्व खाणी सरकारनें हातीं घेतल्या असतां त्यांची व्यवस्था एकसूत्री होऊन सुधारणा शक्य होईल असें मत प्रचलित झालें.

---

## ब्रिटिश खाणींची राष्ट्रीय मालकी

ब्रिटिश कोळशाच्या खाणींच्या मालकांनीं स्वामित्वाच्या हक्काबद्दल प्रथम २०० कोटि रुपयांची मागणी केली व ही रकम पुढें सुमारें १५० कोटि इतकी कमी करण्यात आली. आपणास एकदम मिळण्याची रक्कम सरकारी कर्जरोख्यांत गुंतवली असतां तिच्यावरचें व्याज, खाणींचा खंड आज मिळत आहे, तितकें व्हावें, असा हिशेब मालकांनीं करून सदरहु आकडा निश्चित केला होता. परंतु ब्रिटिश सरकार ७५ कोटि रुपयांच्या वर जाण्यास तयार नव्हतें. शेवटीं, ह्या मोबदल्याबद्दलच्या रकमेचा आकडा निश्चित करण्यासाठीं एक पंचमंडळ नेमण्यांत आलें व त्यानें आतां स्वामित्वाची किंमत सुमारें ८८ कोटि रुपये ठरविली आहे. खाणींच्या मालकांस हा निवाडा पत्करणें प्राप्त होईल आणि त्यासंबंधांत पार्लमेंटमध्यें कायद्याचा मसुदा पुढें मांडण्यांत येईल. तात्त्विक भांडणें भांडत न बसतां व्यावहारिक रीतीनें अत्यंत बिकट प्रश्न निकालांत काढण्याची विलक्षण हातोटी ब्रिटिश राष्ट्रास साधली आहे ह्याचें हें उद्बोधक उदाहरण आहे. समाजसत्तात्मक क्रांतीस उत्क्रांतीचें स्वरूप देण्यांत त्या राष्ट्रानें विलक्षण कौशल्य दाखवलें आहे, तें निःसंशय नमुनेदार आहे.

---

## ही लढाऊ चढाओढ केव्हां थांबणार ?

इंग्लंडचें " हूड " ह्या नांवाचें लढाऊ गलबत ४२,००० टन वजनाचें आहे " रॉडने " व " नेल्सन " हीं गलबतें प्रत्येकी ३३,००० टन वजनाचीं आहेत. आंतरराष्ट्रीय करारांस अनुसरून अलीकडे प्रचंड आकाराचीं व मगदुराचीं लढाऊ जहाजें बांधण्यांत आलेलीं नाहींत. तथापि, इंग्लंडमध्यें प्रत्येकी ३५,००० टन वजनाचीं दोन जहाजें बांधण्याची सुरवात झालेली आहे आणि तशींच दुसरीं दोन जहाजें बांधण्याचें काम हातीं घेण्यांत येणार आहे. पस्तीस हजार टनाचें जहाज हें सामान्यतः मोठें मानण्यांत येतें. नाविक, नोकर, लढवय्ये व सामुग्री ह्यांचा विचार करतां हीं जहाजें एखाद्या गांवासारखीं गजबजलेलीं ठिकाणेंच वाटतात. अमेरिकेंत ५०,००० टनाचीं लढाऊ जहाजें बांधण्याविषयीं प्रयोग चालले आहेत आणि त्या प्रत्येकास १४ कोटि रुपये खर्च येणार आहे. जपान उद्यां ८० हजार किंवा १ लक्ष टनाचें जहाज बांधण्याचा यत्न करील आणि ह्या तऱ्हेच्या चढाओढीस अंतच रहाणार नाहीं. शिवाय, अशा अवाढव्य जहाजासाठीं मोठीं बंदरें व गोद्या आवश्यक असतात, त्यांची तरतूद करणें सोपें नाहीं आणि भावी युद्धांत त्यांचा योग्य उपयोग कितीसा करतां येईल ह्याचीहि शंका आहे. लढाऊ विमानाचें नाशकारक सामर्थ्य दिवसानुदिवस वाढत असल्या-

कारणानेहि जहाजांच्या युक्तायुक्ततेचा प्रश्न महत्त्वाचा झाला आहे ह्या दृष्टीनें पहातां, लढाऊ आरमारावाबत राष्ट्रांची स्पर्धा चालू आहे ती सर्व जगास हानिकारक आहे ह्या सवधानें सशय उरत नाहीं परतु शस्त्रसन्यासाविषयींचें आजपर्यंतचे प्रयत्न निष्फळ ठरल्यानें लढाऊ चढाओढीस आळा कसा घालावा हें समजेनासें होऊन गेलें आहे

### रिझर्व्ह बँकेचे भाग थोड्या लोकांच्या हातांत

रिझर्व्ह बँकेच्या कोणत्याहि एका भागीदाराच्या मालकीचे २०० पेक्षा ज्यास्त भाग असू नयेत, अशा अर्थाची दुरुस्ती प्रस्तुत कायद्यात करण्याचा सरकारचा विचार आहे रिझर्व्ह बँकेनें प्रथम जेव्हा आपलें भांडवल विक्रीस काढलें, त्या वेळीं भागाची मालकी थोड्या हातीं जाऊं नये अशी खबरदारी घेण्यात आली होती पाचापेक्षा ज्यास्त परतु पन्नासापेक्षा कमी भागांची मागणी करणारे अर्जच मागविण्यात आले होते व प्रत्येक भागीदारास दहापेक्षा ज्यास्त मताचा अधिकार असणार नाहीं अशी कायद्यानें तरतूद केली होती. बँकेच्या भागांची वर्गावर्गी मागाहून करण्यास प्रतिबंध नसल्यानें काहीं थोड्या लोकांनीं बँकेचे पुष्कळ भाग खरेदी करून ठेवले व त्या कारणानें एकाचेच हातातील पन्नासावरच्या भागाचा मताधिकार नष्ट झाला भागाच्या संख्येच्या प्रमाणातील मताधिकारास मर्यादा असल्यानें आणि भागांची वर्गावर्गी झाल्यानें शेकडा १३ टक्के भांडवल मत देण्याच्या दृष्टीनें आता निरुपयोगी झालें आहे म्हणून एकाच भागीदाराच्या मालकीचे २०० पेक्षा ज्यास्त भाग असू नयेत, अशी दुरुस्ती कायद्यात करण्याचें योजिलेलें आहे १ एप्रिल १९३५ रोजीं रिझर्व्ह बँकेचे भाग ९९,०४७ भागीदारात वाटले गेलेले होते पुढें भागाची विस्तृत उलाढाल होऊन ते आरंभींच्या मानानें कमी म्हणजे ६६,२७३ लोकाचे हातीं गले आहेत, असें ३१ डिसेंबर, १९३६ रोजीं आढळून आलें भागाची मालकी थोड्या लोकांच्या हातीं एकवटण्याच्या ह्या प्रवृत्तीस दुरुस्त कायद्यानें थोडाफार आळा बसेल, अशी अपेक्षा आहे.

### हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी लि०

उद्योगधंदे आणि व्यापार ह्यामध्यें पडलेल्या किंवा शिरू इच्छिणाऱ्या लोकास भांडवलाची अडचण नेहमीं भासत असते. त्याचप्रमाणें, पुढें उद्भवणाऱ्या गरजांचे बाबत पैशाची तरतूद करणें मध्यम स्थितींतल्या मंडळीस अगत्याचें असतें. अशा गरजू लोकास बेताच्या व्याजानें पैसा पुरविण्याची सघटित व्यवस्था होणें समाजाच्या सोयीच्या व हिताच्या दृष्टीनें आवश्यक असल्याकारणानें विश्वसनीय गृहस्थांच्या देखरेखीखालीं हें कार्य एखाद्या सयुक्त भांडवलाच्या मंडळीनें हातीं घेतल्यास तें इष्टच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. "हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी" ची जाहिरात आजच्या अकात दुसरीकडे छापली आहे तीवरून प्रस्तुत दिशेचा प्रयत्न ही मंडळी करीत आहे असें दिसून येईल तिनें तयार केलेली कर्जाची योजना हिशेबी तत्त्वावर बसविलेली असल्यानें सुरक्षित आहे मुलाचें शिक्षण, विवाह इत्यादि कारणाकरिता ज्यास कर्जाऊ पैसा उभा केलाच पाहिजे अशाची सोय ह्या योजनेंत केलेली आहे तिला लोकांचा आश्रय मिळेल त्या मानानें तिचा विस्तार व उपयुक्तता हीं अनुभवास येतील, हें उघड आहे खास कर्जाचीहि सोय कंपनीच्या योजनेंत आहे तिचा उपयोग विशिष्ट कामाकरिता वेळोवेळ पैसा पाहिजे असणारास होण्यासारखा आहे कर्जाच्या परतफेडीची व्यवस्था सोयीच्या व शिस्तीच्या दृष्टीनें चागली आहे कंपनीचे व्यवहार कसोशीनें केले जातील असें तिचें एकदर धोरण असल्याचें तिच्या योजनेवरून दिसून येतें तिचे सामाजिक उपयुक्ततेचे उद्देश सफल होण्यास लोकाश्रय मिळणें आवश्यक आहे


## "स्वल्प व्याजानें कर्ज"

स्वदेशी उद्योगधद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वत:च्याही फायद्यासाठीं, कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४ किंवा, प्रथम ६।८ व दरमहा ३, पुढें सहामहिने भरून १०० तें ५००० कर्ज, अगर रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊनही निकडीच्या गरजा भागवा प्रास्पेक्टस व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी लि०

हेड ऑफिस:—गिरगाव मुबई

ब्रँच:—लक्ष्मीरोड, काकाकुवा मॅन्शनसमोर, पुणें २

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,१४,३५० वसूल झालेलें भांडवल १,०७,०३५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें, २.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

## सोलापूर जिल्हा को. इन्स्टिट्यूट

— ज्युनियर सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा समारोप समारंभ

सोलापूर जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें को. ज्युनियर सेक्रेटरीच्या वर्गाचा उद्घाटन समारंभ ता. १८-४-३७ रोजीं श्री फडके, ऑडिटरसो को. सोसायटीज् याचे अध्यक्षतेखाली झाला. वर्गांत एकंदर ७२ विद्यार्थ्यांनीं नांवें नोंदविलीं, त्यापैकीं ६६ विद्यार्थ्यांनीं वर्गांत ता. ९।५।३७ पर्यंत शिक्षण घेतलें. सदर मुदतींत सहकारी खात्यातील निरनिराळया तज्ञ वक्त्याकडून एकदर ८० तास शिक्षण देण्यात आलें. त्यात मुख्यतः श्री जेऊरकर वकील, ऑडिटरसो, सब ऑडिटर, पारखे हेडमास्तर, सुपरवायझरर्स श्री पाटील, श्री रेठरेकर व श्री सावंत, मिसाळ, पवार वकील, सुरनीस, गोखले ॲग्रि. इन्स्पेक्टर, देशमुख मास्तर, सोनावणे, चौडा, स्पे इन्स्पेक्टर बी. पी बँक, वगैरे वक्त्यानीं विद्यार्थ्यांना सहकारी कायद्याचे व इतर उपयुक्त असें ज्ञान दिलें. ता. ८ व ९ मे रोजीं सदर क्लासची लेखी परीक्षा श्री. फडके, ऑडिटरसो यानीं स्वत.च प्रश्नपत्रिका काढून स्वत.चे देखरेखीखाली घेतली.

सदर क्लासचा समारोप समारंभ रावबहादूर डॉ. मुळे याचे अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आला. त्याप्रसंगी मे. ऑडिटरसो, सब-ऑडिटरसो, वरील सर्व व्याख्याते मंडळी, चीफ ऑफिसरसो डि. लो बो, श्री जी. डी. साठे, इन्स्टिट्यूट चेअरमन, श्री. रेवे, सीनिअर एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री गोखले, ॲग्रि. इन्स्पेक्टर मे जाधव व मोरे म्यु सभासद वगैरे सन्माननीय मंडळी हजर होती.

समारोपाचेवेळीं अध्यक्ष रावबहादूर मुळे यानीं सहकारी तत्वासबधीं, उपदेशपर, उपयुक्त व परिणामकारक असें भाषण करून समारोप केला. नतर इन्स्टिट्यूटचे चेअरमन श्री जी डी. साठे यानीं अध्यक्ष रा. ब मुळे, क्लासचे वक्ते व जमलेली मंडळी, विद्यार्थी वर्ग, क्लासचे व्यवस्थापक मि. पारखे मास्तर, सोलापूर म्यु स्कूल बोर्डाचे चेअरमन खानसाहेब अब्दुल करीम वकील, अ प प्रॉसिक्यूटर, सोलापूर, याचे आभार मानले नंतर जमलेल्या सर्व मंडळींना अल्पोपहार देण्यात येऊन हा गोड समारंभ सपविण्यात आला.

### कागदाची किंमत वाढली, जकात कमी करा

पुण्यातील वृत्तपत्रकारांच्या संस्थेनें हिंदुस्थान सरकारकडे अशी सूचना पाठविली आहे कीं, वर्तमानपत्रासाठी वापरण्यात येणाऱ्या कागदाच्या किंमती भरमसाट वाढल्या असल्यानें त्यावरील आयात जकात काढून टाकावी आणि हें करणें तात्काळ शक्य नसल्यास किंमतीवर जकात आकारण्या ऐवजीं ती ऐनजिनसी आकारण्यात यावी व कागद खरेदी करणारावर जकातीचा बोजा पूर्वीपेक्षा अधिक पडू नये अशा बेतानें तिचा दर निश्चित करण्यांत यावा.

### आंतरराष्ट्रीय चेंबर ऑफ कॉमर्सची बैठक

इंटर नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सच्या काँग्रेसचें ९ वें अधिवेशन बर्लिन येथें २८ जून ते ३ जुलै १९३७ अखेर भरणार आहे. श्री वालचंद हिराचंद ह्यांच्या पुढारीपणाखालीं श्री. कस्तुरभाई लालभाई, श्री. जी. डी बिर्ला, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास इत्यादि हिंदी प्रतिनिधी त्यावेळीं हजर राहणार आहेत.

Ardomix म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगावर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गळपळणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष दूर करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत. अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे. ट ख १२ आणे निराळा. गांवोगाव भरपूर-कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं ६)

३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर

एजन्सीज.—

मुंबई—यशवंत दत्तात्रय गाडगीळ, फणसवाडी, मुंबई २.

धामणगांव—मे भागवत ब्रदर्स, धामणगांव, वऱ्हाड

हरदा—चौथाजी तुळशीराम आणि सन्स, हरदा, सी. पी

खानदेश—डॉ जी एन महाजन, मोठें वाघोदे, खानदेश.

एशियन पॉलिसी

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

अल्प प्रिमियम आणि भरपूर बोनस

धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## स्वीडनमधील सहकारी चळवळ

औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या इतर युरोपियन राष्ट्रांतल्या-प्रमाणें स्वीडनमधील सहकारी चळवळींचा भर मालाची विक्री व उत्पादन ह्यांचेवर आहे. " उपभोक्त्यांचा सहकार " ( कन्झूमर्स कोऑपरेशन ) म्हणजे नित्योपयोगाचा माल चांगला व स्वस्त विकत मिळावा म्हणून मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतल्या लोकांनीं खरेदीची केलेली संघटात्मक व्यवस्था होय. ज्या वर्गांची कमाई बेताची असते, त्यास काटकसरीनें राहून खात्रीचा माल योग्य किंमतींत मिळण्याची तरतूद करणें आवश्यक असतें. सामान्य व्यापारी व दुकानदार वैयक्तिक नफ्यासाठी धंदा करून पोट भरतात. हा नफा खरेदी करणाराच्या पदरात पडण्याची व्यवस्था सहकारी संघटनानें घडवून आणतां येते ह्या प्रकारचें माल खरेदी करणाराचें संघटन युरोपात चांगलें यशस्वी झालें असून त्याचा फायदा सामान्य स्थितींतल्या लाखो लोकास मिळत आहे.

ह्या संबंधांत स्वीडन देशाचें उदाहरण घेतलें तर असें दिसून येतें कीं, तेथें माल विक्रीच्या ७०० सहकारी संस्था आहेत आणि ६ लक्ष कुटुंबें त्याची सभासद आहेत ह्याचा अर्थ असा होतो कीं स्वीडन देशाच्या लोकसंख्येपैकी एक-तृतियांश ते निम्मी संख्या ह्या सहकारी चळवळीशी संबद्ध आहे वरील सहकारी संस्थांचीं ४,२०० विक्रीचीं दुकानें आहेत आणि दरवर्षी त्यांमध्यें ४४ कोटि क्रोनर किंमतीची विक्री होते स्वीडन देशात खाण्या-पिण्याच्या पदार्थांचा किरकोळीचा व्यापार चालतो त्यातला सुमारें १५ टक्के विक्रीचा व्यवहार सहकारी संस्थाच्या मार्फत होतो. ही चळवळ राष्ट्रीय स्वरूपाची आहे, कारण तीमध्यें शेतकरी, कामकरी, पांढरपेशे, व्यापारी, इत्यादि सर्व वर्गांचा परस्परांशीं संबंध येतो आणि राजकीय, धार्मिक व आर्थिक भेदाभेद तीमध्यें मुळींच मानला जात नाहीं. प्रत्येक ठिकाणीं स्थानिक लोक आपल्या सहकारी संस्थेचा कारभार चालवतात आणि मालाच्या किंमतींचें नियंत्रण त्यास यशस्वी रीतीनें करतां येतें माल मोठ्या प्रमाणात खरेदी करणें व तयार करणें हें काम एका मध्यवर्ती संस्थेकडे सोंपवण्यात आलें आहे. लोकसत्तात्मक कारभार आणि कार्यक्षमता हीं एकत्र असू शकतात, हे स्वीडनमधील सहकारी संस्थानीं आपल्या चोख व यशस्वी व्यवहारानीं सिद्ध करून दाखविलें आहे. सभासदामध्यें ज्ञानाचा प्रसार करण्याचें कामहि ह्या संस्था करतात. शेतकरी वर्गाच्या उत्पादक सहकारी संस्थांचीहि प्रगति स्वीडनमध्यें झपाट्यानें चाललेली आहे उत्पादक व खरेदीदार ह्यांचें सहकार्य घडवून आणण्याचीहि व्यवस्था करण्यात आली आहे

उत्साह, सार्वजनिक कार्याविषयीं आस्था, संघटन व शिस्त ह्यांच्या सहायानें सहकारी चळवळ कशी समाजोपयोगी करता येते, ह्याची उत्कृष्ट कल्पना वरील माहितीवरून येण्यासारखी आहे.

### डेनमार्कमधील सहकारी संघटन

डेनमार्क देशाचें क्षेत्रफळ १७ हजार चौरस मैल आहे. त्या देशांत दरसाल ३० कोटि पौंड वजनाचें लोणी तयार होतें. लोणी तयार करणाऱ्या १३ हजार सहकारी संस्था आहेत. डेनमार्कमधील शेकडा ९० व्यवहार सहकाराचे तत्त्वावर चालतो.


दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious, Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Offices* throughout India & the East

S. C MAJUMDAR, MANAGER Bombay Branch | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## " ग्रामोद्धार "

• श्री. न. गं. आपटे ह्यांचें नवीन मराठी पुस्तक

श्री नरहर गंगाधर आपटे, बी. एजी, ह्यांनीं सुमारें सहा महिन्यामागें " रूरल रीकन्स्ट्रक्शन " ह्या नावाचें एक इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध केलें, त्यात शेती व खेड्याची स्थिति ह्या विषयावर निरनिराळया वेळीं लिहिलेले त्याचे लेख एकत्र छापले आहेत. ग्रामसुधारणेच्या प्रश्नाकडे सरकारचें व लोकाचें लक्ष वेधून राहिलेलें असल्याकारणानें ह्या बाबतींत शक्य तितक्या अधिक लोकांस माहिती करून देणें व त्याची सहानुभुति मिळविणें आवश्यक झालें आहे. ह्या दृष्टीनें श्री. आपटे ह्यानीं खेडेगावांच्या पुनर्घटनेसंबंधींचे आपले जुने-नवे लेख मराठींत एकत्र करून प्रस्तुत पुस्तकांत प्रसिद्ध करण्यात औचित्य दाखविलें आहे. पुस्तकाच्या सुरवातीच्या प्रकरणांत ग्रामोद्धारासंबधीं वस्तुस्थितिनिदर्शक माहिती देण्यांत आली असून नतर तात्त्विक विवेचन व त्यापुढें प्रत्यक्ष कार्यासंबंधीं विवरण अशी पुस्तकाची रचना आहे. श्री. आपटे ह्यास ग्रामसुधारणेसंबंधीं आस्था वाटत असून त्यांस ह्या कार्याचा प्रत्यक्ष अनुभवहि आहे. प्रस्तुत पुस्तक तात्त्विक ज्ञान व अनुभवजन्य व्यावहारिक माहिती ह्यावर आधारलेलें असल्यानें त्याचें महत्त्व विशेष आहे सुमारें २५० पृष्ठांच्या ह्या पुस्तकाची किंमत १ रु ८ आ. असून प्रो. श्री. र. राजगुरु ह्यानीं तें प्रकाशित केलें आहे.


## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी

### मुलांचें हायस्कूल, पुणें शहर

उन्हाळयाच्या सुटीनंतर शाळा गुरुवार तारीख ३ जून १९३७ रोजीं ११-१५ ला भरेल नवीन नावें तारीख २५ मे पासून दाखल केलीं जातील तरी ज्यांना नवीन नावें घालावयाचीं असतील त्यानीं आपल्या पूर्वीच्या शाळेच्या दाखल्यासह समक्ष भेटावे विद्यार्थ्यांची नियमित सख्या घ्यावयाची असल्यामुळें विद्यार्थ्यांनीं त्वरा करावी.

म. ए सोसायटी, पुणें } व्यवस्थापक

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी

### भावे प्राथमिक शाळा, पुणें शहर

उन्हाळयाच्या सुटीनतर शाळा गुरुवार तारीख ३ जून १९३७ रोजीं ११-१५ ला भरेल नवीन नावें तारीख २५ मे पासून दाखल केली जातील. तरी ज्याना नवीन नावें घालावयाची असतील त्यानीं आपल्या पूर्वीच्या शाळेच्या दाखल्यासह समक्ष भेटावे विद्यार्थ्यांची नियमित सख्या घ्यावयाची असल्यामुळें विद्यार्थ्यांनीं त्वरा करावी.

म ए सो. भावे प्राथमिक शाळा, पुणें २ { ल. वा. भावे सुपरिटेंडेंट

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा सस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचें अत्यत आभारी आहोंत " -

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलएल. बी
मॅनेजिंग एजंटस,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं. २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत- तरी विशेष माहितीकरिता हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु ( ट. ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

## जादा नफ्यावर कर

ब्रिटिश सरकारनें युद्धसामुग्री वाढविण्याचें धोरण अंगीकारल्यामुळें ही सामुग्री तयार करणाऱ्या कारखानदारास नफा मिळविण्यास उत्कृष्ट साधन प्राप्त झालें आहे राष्ट्रीय गरजेची व आपत्तीची झळ गरीब नागरिकांस वाढत्या कराचे रूपानें सोसावी लागत असताना ह्या कारखानदारानीं नफेबाजी करावी, हें सयुक्तिक होणार नाहीं. ग्रेटब्रिटनचे फडनवीस मि चेंबर्लेन, ह्यांनीं जादा नफ्यावर कर सुचविला असून, ५ एप्रिल १९३७ नतरच्या हिशेबाचे वर्षांत दोन हजार पौंडापेक्षां ज्यास्त नफा मिळविणाऱ्या सर्व धदेवाइकाकडून तो वसूल केला जाईल उत्पन्नावरील कराप्रमाणें ह्या कराचें प्रमाण ज्यास्त नफ्यावर वाढत राहील. ह्या कराची अंमलबजावणी कोणत्या रीतीनें करण्यात येईल, ह्याची कल्पना खालील उदाहरणावरून तात्काळ येईल

समजा, एका कपनीचें भाडवल १० लक्ष पौंड आहे व कराचे वर्षीं तिला १ लक्ष ६० हजार पौंड नफा झाला, तर भाडवलावरील पहिल्या ६ टक्क्यावर (६० हजार पौंडावर) कर माफ होईल ६ ते १० टक्क्यावर (४० हजार पौंडावर) १/५, १० ते १५ टक्क्यावर (५० हजार पौंडांवर) १/४ व त्यापेक्षा ज्यास्त नफ्यावर १/३ इतका कर घेतला जाईल एकूण नफ्यापैकीं ६ टक्के दरानें होणारा ६० हजार पौंड नफा सोडला, तर करास लायक असा १ लक्ष पौंड नफा उरतो. ह्यापैकीं, ४० हजार पौंडावर १/५, पुढील ५० हजारावर १/४ व उरलेल्या १० हजारांवर १/३ ह्या दरानें २३,८३३ पौंड कर कपनीस द्यावा लागेल. कपनीस होणाऱ्या सहा टक्के पर्यंतच्या नफ्यावर हा नवीन कर घेण्यात येणार नाहीं, परतु त्यापेक्षा ज्यास्त होणाऱ्या नफ्यावर वाढत जाणाऱ्या दरानें कराची आकारणी करण्यात येईल खासगी व्यक्ती व भागीदारी ह्यांस आठ टक्क्यांपर्यंत माफी आहे व पुढच्या प्रत्येक करवाढीच्या हप्त्यात त्यांस थोडी सवलत दिलेली आहे. ह्या नवीन करापासून येत्या वर्षीं सुमारें २५ ते ३० कोटि रुपये उत्पन्न होईल, अशी अपेक्षा आहे

## राजेसाहेबांचा तनखा

### रहाणी साधेपणाची असण्याविषयीं सूचना

राजेसाहेबास द्यावयाच्या तनख्यासबधीं रिपोर्ट करण्याकरिता पार्लमेंटनें नेमलेल्या सर्वपक्षीय सिलेक्ट कमिटीनें आपलें काम पार पाडलें आहे विवाहित राजेसाहेबास मिळावयाच्या ५३ १/३ लक्ष रुपयांच्या वार्षिक तनख्यास कमिटीनें हात लावलेला नाहीं मजूर पक्षाचे पुढारी मि ॲटली ह्यानीं कमिटीपुढें एक ठराव माडला तो राजपद व लोक ह्यामधील अतर कमी करण्याचे दृष्टीनें विशेष महत्त्वाचा होता राष्ट्राच्या जीवनातील राजपदाच्या सध्याचे स्थानास अनुसरून राजवाड्यातील रहाणी व समारभ असावे, समाजातील वेगवेगळ्या वर्गांच्या विभागणीमध्यें सध्या होत असलेल्या फरकाचें राजेसाहेबास ज्ञान व्हावें अशा प्रकारची मोकळीक त्यांस मिळावी, इत्यादि सूचना मि ॲटली ह्याच्या ठरावांत अतर्भूत होत्या ह्या ठरावास मि. चर्चिल ह्यानीं उपसूचना मांडली, ती १२ विरुद्ध ३ मतानीं पास झाली सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट ता. २४ मे रोजीं कॉमन्स सभेस सादर करण्यात आला.

पाळणा दरसाल हलू नये म्हणून आमचें इच्छा गर्भ संभव औषध घ्या व संततिनियमन करा. औषध बद केलें कीं, मुलें होतात महिन्यातून एकदाच घ्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट स. नि

गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी.

"**DAWN'S MENSORIUM**" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

## NOTICE TO CONTRACTORS.

Separate sealed percentage tenders in form B-1 for each of the following works are invited and will be received by the undersigned on 31-5-1937 upto 2 P M. Other particulars regarding the contract etc. can be had at the undersigned's office on any working day during office hours

| S.No | Name of Work | Amount of Estimate | Earnest money. |
|---|---|---|---|
| 1. | C R to Karwar Bellary Road (section from Gadag to Hesrur ). ... | 1673. | 17. |
| 2 | —Do—Saundatti Hubli Road miles 75 to 85 ... | 2664 | 27. |
| 3. | —Do— —Do— miles 86 to 102 . | 3576 | 36. |
| 4 | —Do—Hubli Gadag Road miles 103 to 126. . . | 7350 | 74. |
| 5 | —Do— —Do—Hubli miles 127 to 136. ... | 1670 | 17. |
| 6. | Asphalting miles 264 to 266 of the Poona-Bangalore Road ( collection of materials such as metal, murum etc. ) ... | 23952 | 240. |
| 7 | Strengthening and widening or reconstructing masonry drains in miles 264 to 266 of the Poona-Bangalore Road ... | 12473 | 125. |
| 8. | Asphalting sidewidths of first six furlongs of mile 267 of Poona-Bangalore Road ( collection of metal, murum etc ) | 2262 | 23. |

2 The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for acceptance or rejection of any

Ex Engr 's Office, Dharwar, 11th May, 1937

P. K SHINDE
Executive Engineer,
Dharwar Division, Dharwar.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... .. | १०५—६ |
| ४½% लाब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—८ |
| ४% १९४३ ... . ... | १०६—१४ |
| ३½% विनमुदत ... .. ... | ९५—९ |
| ३½% १९४७–५० . .. | १०५—१४ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत ) | १०७—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... | १०७—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०६—१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळयाचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडड ) | १३७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडड) | १०९—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि ) — | ३४—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३५—० |
| रिझर्व्ह बॅक ( १०० रु चा भाग ३½% डिव्हि. ) | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| बौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४¾%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रातज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु ४ आ. ) | ९१०—० |

### जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें

येथील छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखाली असलेल्या जाधव टेलरिंग कॉलेजतर्फे.–१ सि. मु. सुभेदार, ( रत्नागिरी ) २ गो स वरखेडकर, ( अहमदनगर ) ३ चिं म. नायक, ( अहमदाबाद ), हे विद्यार्थी लंडन डिप्लोमा परीक्षेस बसले होते ते पास होऊन त्याना लंडन येथील टेलर ॲण्ड कटर कपनीचे डिप्लोमा मिळाले त्यासबंधीं कॉलेजमध्यें सर्व विद्यार्थ्यांना रसपान होऊन फोटोग्राफहि काढला गेला व रा गो रा. वरखेडकर या विद्यार्थ्यास एक स्केअर बक्षिस देण्यात आला. असा कार्यक्रम होऊन हा समारभ पुरा झाला

### झारापकर टेलरिंग, कॉलेज पुणें

वरील सुप्रसिद्ध कॉलेजनें दरसालप्रमाणें ह्या वर्षी ५ हरिजन विद्यार्थ्यांना कॉलेज डिप्लोमा कोर्सचें शिक्षण मोफत देण्याचें ठरविलें आहे अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ जून ही आहे.


दी सनशाइन इन्शुअरन्स लि.

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरतां पगारी एजट पाहिजेत माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस : ३३४ गणेश पेठ, पुणें

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

जनानी व मर्दानी कापड
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
माधव सोमण ब्रदर्स,
लक्ष्मीरोड, पुणें. २

उन्हाळ्याकरितां ब्राह्मी तेल हें शुद्ध खोबरेल तेलांत तयार केलेलें असतें
स्टॉकिस्ट : म गो कुलकर्णी आणि मंडळी, पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें
मॅन्युफॅक्चरर : दि बाँबे कलकत्ता ट्रेडिंग कपनी, मुंबई न ४

तमाम दंत रोगांचा नाश करून दात अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल टूथपावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

आपल्या अन्नांत माती कां कालवितां ?
स्वयंपाकांत वापरण्याचे सर्व जिन्नस निवडून साफ करून घेतां. मग मीठच तेवढें घाणेरडें कां वापरतां ?
आजच
**'सोलर मिठा'ची** आपल्या वाण्याकडे मागणी करा
आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हाला लिहा
Uran Salt Works, 583 Chira Bazar, Bombay 2

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच का वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद का पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.




**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील

**K. K. & Co.**
Photographic Dealers,
POONA.

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास.' भांबुर्डा घ नं १२०१।३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 5434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २ जून, १९३७ अंक २२

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८२,१०० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रकम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्.

## FERGUSSON COLLEGE, POONA

Opens on 21st June 1937. Accommodation being limited to 1200 undergraduates, students should apply to the Principal in time for admission (both to the classes and the Hostel) on prescribed forms with the necessary fee. Admissions will be granted from 7th June on working days (12 noon to 3 P. M.).

## K. K. & Co.

Photographic Dealers


POONA.

खास रत्नागिरी—

आंबे हापुस व आंबे पायरी

चौकशी करा—म. गो. कुलकर्णी मंडळी,
पुष्करणी चौक, सदाशिव पेठ, पुणें.

## टिकेकरी मनमोहक पातळें तीं हींच




"विमल, तू आतां नेसलेल्या पातळाचे रंग व किनार किती छान आहे म्हणतीस! मला तें फारच आवडलें आहे. सांगशील काय कोठून मागविलीस तीं!

हात्तीचे! मी नां नेहमीं टिकेकरीच पातळें मागवित असतें. तेथील नवीन वाण पाहून मन भुलून जातें! हो कां, मग मी आतांच पत्र लिहून ऑर्डर देतें."

हरतऱ्हेचीं पातळें घरपोंच जोडी रु. ८ आणे ८. नमुने मोफत. पोस्टेजकरितां दीड आण्यांचीं तिकिटें पाठवा.

दि टिकेकर टेक्सटाइल मिल लि., टिकेकरवाडी.

डिपॉझिट घेऊन एजन्सी देणें आहे. तरी गरजूंनीं अवश्य चौकशी करावी.

दि टिकेकर टेक्सटाईल मि. लि., पोस्ट टिकेकरवाडी, सोलापूर

# विविध माहिती

**इंपीरिअल एअरवेजचें भांडवल**

प्रत्येकी एक पौंड किंमतीचे ४० लक्ष नवे भाग काढून इंपीरिअल एअरवेजचें एकूण भांडवल ५० लक्ष पौंड म्हणजे ६३/४ कोटि रुपये इतकें वाढवण्याचें ठरलें आहे.

**कॉमन्स सभेच्या सदस्याचा तनखा वाढला**

कॉमन्स सभेच्या सदस्यास आजपर्यंत वार्षिक ५,२०० रुपये तनखा मिळत असे ती रकम आतां ७,८०० रुपये करण्यांत आली आहे.

**लंडनशहराची लोकसंख्या**

लंडनशहराची लोकसख्या १९०१ साली ६५१/२ लक्ष होती ती आतां ८२ लक्ष झाली आहे. ब्रिटनमधील एकूण लोकसंख्येपैकीं १/५ लोक लंडनचे रहिवासी आहेत.

**लोकांस माहीत होतें तेंच संशोधकांनीं शोधून काढलें**

हिंदुस्थानांतील शेतीचीं जनावरें सुदृढ रहाण्यास कुरणांची पुरेशी सोय नाहीं, ती व्हावयास पाहिजे असा अभिप्राय तज्ञ संशोधकांनीं व्यक्त केला आहे.

**मध्यप्रांतात आगपेट्यांचा नवा कारखाना**

मध्यप्रातामध्यें आगपेट्याचा कारखाना काढण्यास शेठ जमनालाल बजाज ह्यास परवानगी मिळाली आहे असें समजतें. सध्या त्या प्रातातील दोन कारखान्यात, मिळून दरसाल १ लक्ष ८० हजार ग्रोस पेट्या तयार होतात तेथील एकूण खप ८३/४ लक्ष ग्रोस पेट्या आहे.

**मॉरिस मोटर्स लि. चा नफा**

मॉरिस मोटर्स लि. ला गेल्या वर्षी सुमारें २१/२ कोटि रु. नफा झाला. भागीदारास ४५ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्यात आलें.

**ट्रेझरी बिलांवर १५१/२ आणे व्याज**

रिझर्व्ह बॅंकेनें ता. २१ मे रोजीं १ कोटि रुपयाचीं तीन महिने मुदतीचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यावर द द व्याजाचा दर १५ आणे ८ पै इतका पडला.

**हिंदी कपाशीस ग्रेटब्रिटनमध्यें वाढती मागणी**

ग्रेटब्रिटनमध्यें हिंदी कपाशीचा खप वाढविण्याकरितां "लॅंकेशायर इंडियन कॉटन कमिटी" सुमारें तीन वर्षांपूर्वी स्थापन करण्यात आली. कमिटीनें हिंदी कपाशीची योग्यता ब्रिटिश कारखानदारांस पटवून देण्याचें व मालाच्या उठावास सहायकारक होईल असा प्रचार करण्याचें आपलें काम समाधानकारक रीतीनें चालविलें आहे, असें कमिटीच्या अहवालावरून दिसतें. १९३६ साली सुमारें ५ लक्ष गासड्या कापूस हिंदुस्थानातून ग्रेट ब्रिटनमध्यें उतरला

**'शिवणकलाकुशल' झारापकर**

येथील सरकारमान्य झारापकर टेलरिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. काशिनाथ रामचद्र झारापकर डी. एफ. सी. (लंडन) ह्यास त्याच्या शिवणकलेच्या प्राविण्याबद्दल श्री. शकराचार्य ह्यांनीं 'शिवणकलाकुशल' अशी बहुमानाची पदवी दिली आहे.

**गुळापासून साखर**

१९३७ सालीं हिंदुस्थानांत गुळापासून एकूण ३२,३०० टन साखर तयार करण्यांत आली, असा अंदाज आहे. १९३६ सालीं गुळापासून ५०,०६७ टन साखरेचें उत्पादन झालें होतें. म्हणजे, यंदा हें उत्पादन २८ टक्क्यांनीं उतरलें आहे.

**ग्रेट ब्रिटनमधील नवा कर**

वाढत्या उत्पन्नावर चढत्या दरानें कर बसविण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे सुमारें ३५ हजार फर्म्स ह्या नव्या कराचे कक्षेत येतील, असा अजमास आहे.

**राज्यारोहण समारंभानिमित्त पैशाची उलाढाल**

१२ मे, १९३७ रोजीं झालेल्या राज्यारोहणाचे निमित्तान सुमारें २ लक्ष परदेशीय लोक ग्रेटब्रिटनमध्यें येऊन त्यानीं ३२ कोटि रुपये खर्च केले असावेत, असा अंदाज आहे. साम्राज्यातर्गत देशांतून उतरलेल्या ८० हजार पाहुण्याचे ब्रिटिश आगबोटींच्या भाड्याबद्दल व ग्रेटब्रिटनमधील रहाणीचें मिळून २७ कोटि रुपये खर्च झाले असावेत. राज्यारोहणाची मिरवणूक पहाण्याकरिता शोकी लोकानीं तिकिटासाठी १३/४ कोटि रुपये खर्चले असतील, असा अजमास आहे

**सरक्षक जकातीचें समर्थन**

ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या दोन देशांमध्यें व्यापारी करारासबंधीं वाटाघाटी चालू आहेत. खुल्या व्यापाराचा आजवर पुरस्कार करणाऱ्या ग्रेटब्रिटननें १९३१ सालीं संरक्षक जकातीच्या धोरणाचा अवलब केला. हें धोरण सर्रास अंमलांत आणणें वेडेपणाचें असलें तरी तें सोडून दिल्यानें ब्रिटनचें नुकसान होणार आहे, असें मत ग्रेटब्रिटनच्या व्यापार खात्याचे मंत्रि, मि. रन्सिमन, ह्यानीं व्यक्त केलें संरक्षक जकातीं हें व्यापारी कराराच्या वाटाघाटींमध्यें सवलती मिळविण्याचें एक महत्त्वाचें साधन आहे, असेंहि ते म्हणाले.

**झेनिथ विमा कं लि.**

वरील कपनीनें डिसेंबर १९३६ अखेर सपलेल्या वर्षी एकूण ३३ लक्ष २१ हजार रुपयाचें विमे उतरविलें. कपनीकडे आज १३/४ कोटि रुपयाचे विमे चालू आहेत.

**बॉबे म्यूच्युअल लाइफ ॲन्शुअरन्स सोसायटी लि.**

डिसेंबर, १९३६ अखेर संपलेल्या वर्षी वरील विमा मंडळीनें २ कोटि, १३/४ लक्ष रुपयाच्या विमा पॉलिसी दिल्या. कपनीकडे ७ कोटि रुपयाचे विमे चालू आहेत. अहवालाचे वर्षी कंपनीस हप्त्यापासून ३६३/४ लक्ष रु, उत्पन्न झालें. साल अखेर विमाखातीं फडात ७६ लक्ष रुपये आहेत.

**परदेशगमनास चालना**

मार्च व एप्रिल १९३७ मध्यें सुमारें १० हजार लोक हिंदुस्थानांतून इंग्लंडमध्यें रवाना झाले, असा अदाज आहे. जगाचा प्रवास करणाऱ्या हिंदी उतारूंची संख्या २०० टक्क्यानीं वाढली आहे. गेल्या वर्षी ३,००० विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशीं गेले. परदेशगमनास अशा रीतीनें चालना मिळाली असून आगबोट कंपन्यास उत्कृष्ट गिऱ्हाइक लाभलें आहे. प्रवासामुळें मिळणाऱ्या पांडित्याचे मानानें त्यास पडणारी किंमत होईजड होत नाहींना, याकडे लक्ष देणें जरूर आहे.

**मलेरिया-प्रतिबंधक योजना**

मलेरियावर प्रतिबंधक उपाय म्हणून इजिप्त सरकारनें दलदलीचा प्रदेश कोरडा करण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेस सुमारें ५१/२ कोटि रुपये खर्च येईल.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रुपये किमत |
|---|---|
| १६-५-३७ ते २२-५-३७ | १९,२३,९८८ |
| २३-५-३७ ते २८-५-३७ | २४,३०,३६ |
| २१-९-३१ ते २८-५-३७ | २,९७,९५,२६,७६२ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २६६ | ५ मुंबई नगररचनेच्या कायद्यांत दुरुस्ती | २७० |
| २ जमशेदपूरच्या कारखान्याची अभिनंदनीय प्रगति ... | २६७ | ६ हिंदी कोळशाच्या धंद्याचें नियंत्रण ... | २७१ |
| ३ संरक्षणाच्या तयारीचा बँकांवर परिणाम | २६७ | ७ 'ब्रॉक्सीज'चा उपयोग | २७१ |
| ४ स्फुट विचार .. | २६८ | ८ संयुक्त प्रांतातील पाणी-पुरवठ्याची योजना | २७१ |
| साखर परिषदेंतील निर्णय—हिंदी साखरेच्या निर्गतीस बंदी कां ?—इंग्लंडमध्यें शेतीस सरकारी सहाय—व्यापारी करारावर जपानी लोकमत—उद्योग दिन—इजिप्त राष्ट्रसंघाचा सभासद झाला. | | ९ हिंदुस्थानांतून बुटांची निर्गत ... | २७२ |
| | | १० मोटार गाड्यांची आयात | २७२ |
| | | ११ सहकारी चळवळ ... | २७३ |
| | | १२ निवडक बाजारभाव | २७५ |

अर्थ

बुधवार, ता. २ जून १९३७

## जमशेदपूरच्या कारखान्याची अभिनंदनीय प्रगति

टाटाचें नांव हिंदुस्थानांत अनेक कारणांनीं सर्वतोमुखीं झालें असलें तरी जमशेदपूर येथील त्याचा लोखंड-पोलादाचा कारखाना हें त्याचें महनीय स्मारक आहे ह्या कारखान्यानें हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतीस विलक्षण उत्तेजन दिलें असून तो आता जगद्विख्यात झाला आहे. हिंदी कोळसा व अशुद्ध लोखंड ह्यांचा उपयोग करून आधुनिक यंत्रांच्या सहायानें प्रचंड कारखान्यात पोलादाचे अनेक जिन्नस बनवण्यास धडाडी, भांडवल व घटनात्मक कौशल्य लागलें, तें टाटांनीं प्रकट करून आपल्या देशास एका नवीन व मोठ्या प्रमाणावरील धंद्याची जोड करून दिली, ही गोष्ट लहानसहान नव्हे. जमशेदपूरच्या कारखान्यासंबंधानें दुसरी महत्त्वाची बाब लक्षात ठेवावयाची ती ही कीं त्यातला पोलादाचा धंदा औद्योगिक संरक्षणाचा फायदा मिळवणारा पहिलाच मोठा स्वदेशी धंदा होय. "बाल्यावस्थेंतल्या धंद्यास जकातीचें संरक्षण मिळालें असतां असल्या सहायाची त्यांस सवय लागते आणि प्राथमिक अवस्थेंतून तो कधींच बाहेर पडत नाहीं, शिवाय संरक्षक जकातींचा बोजा जनतेवर पडून धंद्यातला नफा मात्र भागीदार खाऊन जातात" अशा आशयाची टीका केली जाते. परंतु तिला टाटाच्या कारखान्यानें केलेल्या प्रगतीनें उत्कृष्ट उत्तर दिलें आहे. तेरा वर्षांमागें टारिफ बोर्डाच्या शिफारशींस अनुसरून सरकारनें टाटाच्या कारखान्यास प्रथम जकातीचें संरक्षण दिलें तेव्हापासून ह्या धंद्याची फेरचौकशी टारिफ बोर्डानें अनेकवार केली असून संरक्षणाचें प्रमाण वेळोवेळ कमी करण्यात आलें आहे. कारखान्याची कार्यक्षमता सारखी वाढवून टाटा कंपनीनें उत्पादन-खर्च उतरवीत आणला आहे आणि संरक्षणाची आवश्यकता मर्यादित केली आहे टाटा कंपनीच्या वार्षिक सभेंत गेल्या आठवड्यात तिचे अध्यक्ष, सर नौरोजी सकलातवाला, ह्यांनीं जी घोषणा केली तिचे योगानें हिंदी जनतेस साभिमान आनंद वाटल्यावांचून रहाणार नाहीं. सध्या कंपनीस मिळणारें उतरलेल्या प्रमाणांतील संरक्षण आणखी चार वर्षेंच टिकावयाचें आहे. ही मुदत संपतांच "आतां आपणांस संरक्षणाची आवश्यकता राहिलेली नाहीं" असें कंपनी, जनता व सरकार ह्यास सांगणार अशी तिची तयारी आहे हें ऐकून सर्व हिंदी राष्ट्रास अत्यंत समाधान वाटेल ह्या योगानें औद्योगिक संरक्षणाच्या धोरणास विरोध करणाराच्या पदरात त्याच्या चुकीच्या कल्पनेचें भरपूर माप पडून इतर स्वदेशी धंद्यास सरकारी सहाय सढळ हातानें मिळण्याची आवश्यकता सिद्ध होईल अशी वस्तुस्थिति घडवून आणल्याबद्दल टाटा कंपनीच्या चालकाचें अभिनंदन करणें अगत्याचें असून जमशेदपूरच्या कारखान्याच्या इतिहासापासून सरकार व जनता ह्यांनीं योग्य तो बोध घेतला पाहिजे.

संरक्षणाचा फायदा एकट्या टाटा कंपनीस तेवढा मिळतो आणि त्याच्या कारखान्यांत विविध प्रकाराचें पोलाद, त्यास देशांत मागणी असताहि, तयार होत नाहीं अशी तक्रार कित्येकांकडून केली जात असे. ही उणीव भरून काढण्याकरितां पोलादाचे इतर जिन्नस तयार करण्यासाठी नवीन एक मोठा कारखाना बंगालमध्यें काढण्याची योजना तयार झाली होती आणि ती आपल्या स्वतःच्या कारखान्यास पोषक असल्यानें तिच्या भांडवलांत व कार्यांत भाग घेण्याचा टाटा कंपनीचा विचार होता. परंतु वाटाघाटींत कांहीं महत्त्वाच्या बाबींसंबंधानें मतभेद झाल्या कारणानें वरील योजना तडीस गेली नाहीं आणि अखेर टाटा कंपनीनें स्वतःच्या कारखान्याचाच विस्तार करण्याचें ठरविलें आहे ह्या योजनेस लागणारें भांडवल कंपनीच्या नफ्यामधूनच घेतलें जाणार आहे आणि खेळता पैसा तात्पुरता लागेल तितकाच बेताच्या व्याजानें कर्जाऊ घेण्यात येणार आहे. योजिलेल्या सुधारणांचे व विस्ताराचे टाटा कंपनीचे बेत पुरे झाले म्हणजे तिची मालाच्या उत्पादनाविषयींची व त्याच्या विक्रीच्या व्यवस्थेची परिस्थिति इतकी सुधारेल कीं जमशेदपूरचा कारखाना सर्वस्वी स्वावलंबी बनेल आणि त्यास सरकारी जकातींचें सहाय लागणार नाहीं. लोखंड-पोलादाचे बाजारभाव सध्या अनपेक्षित रीतीनें चढले आहेत, त्याचा चांगलाच फायदा टाटा कंपनीस मिळणार आहे, परंतु ह्या जादा नफ्याचा उपयोग जमशेदपूरच्या कारखान्यास अधिक लागणारें भांडवल पुरवलें जाऊन त्याची कार्यक्षमता वाढवण्याकडे होणार असल्यानें तो पैसा सत्कारणीं लागला असेंच म्हणावें लागेल. पोलादाचा विविध जातींचा माल टाटांनीं काढला असता तो विशेष अर्थानें स्वदेशी असा समजला जाईल आणि त्या बाबतींतलें हिंदुस्थानचें परावलंबन दूर होईल.

## संरक्षणाच्या तयारीचा बँकांवर परिणाम

ग्रेटब्रिटनमध्यें औद्योगिक चलतीस सुरवात होते न होते तोंच राष्ट्रसंरक्षणाच्या तयारीचा कार्यक्रम सरकारनें हातीं घेतल्यामुळें ब्रिटिश उद्योगधंद्यास जोराची चालना मिळाली आहे. युद्धप्रसंगीं उपयोगी पडणाऱ्या हत्यारादि साधनाच्या उत्पादनास त्या देशाचे औद्योगिक क्षेत्रात आज महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. सरकारनें ह्याकरिता एक खास कर्ज उभारून भांडवलाचा पुरवठा केला असल्यानें ह्या परिस्थितीचा परिणाम बँकिंगचे क्षेत्रावरहि होऊं लागला आहे मोठमोठ्या आगबोटींचीं कामें, वैमानिक दलात वाढ, लष्करी हालचालींत यंत्रसामुग्रीचा प्रवेश, इत्यादि बाबतींत भांडवली स्वरूपाचा जो खर्च येतो, त्यास पैसा

पुरविण्याची जबाबदारी अखेर बँकांवरच येऊन पडते. मंदीच्या काळामध्यें कारखानदारांचें सेळतें भांडवल संपुष्टात आलें, घसाऱ्याची तरतूद लावणीवर टाकली गेली व अग्रहक्क असणारांचीं देणींहि तहकूब झालीं आता, वाढत्या व्यवहारास लागणारें भांडवली सामर्थ्य त्यांचेजवळ उरलेलें नाहीं आणि कच्च्या मालास पडणारी किंमतहि वाढलेली असल्याकारणानें, बँकाकडून कर्जें काढण्यासेरीज त्यास गत्यंतर राहिलेलें नाहीं गेल्या वर्षाचे मुदतींत बँकांनीं जितकीं कर्जें दिलीं, तितकीं मंदी सुरू झाल्यापासून आजवर कधीच देण्यांत आलीं नव्हतीं हें कर्जाचें प्रमाण सारखें वाढत आहे सरकारी रोख्यांचे बाजारभाव उतरलेले असल्यामुळें, जवळचे रोखे विकून व्यवहारास नुकसानीनें भांडवल पुरविण्यापेक्षा बँकाकडून कर्जें काढणेंच लोकास सोइस्कर वाटत आहे आणि ह्याचा ताण बँकांवर पडू लागला आहे. ब्रिटिश सरकारनें राष्ट्ररक्षणाच्या तयारीकरिता कर्ज उभारलें, त्यांतून वर्षभर युद्धविषयक सामुग्रीवर खर्च केला जाईल बँकासहि ह्या रोख्यांचे तारणावर कर्जें द्यावीं लागतील व धंदेवाल्यानीं एकमेकावर काढलेल्या अल्प मुदतीच्या हुंड्यांची जागा हे नवे कर्जरोखे घेतील अशी अपेक्षा आहे. बँकांस, स्वतःचे जवळील ठेवींचे मानानें, काहीं विवक्षित रकम रोख बाळगावी लागते आणि तात्काळ रोकड उभी करता येईल, अशा रीतीनें काहीं रकम हुंड्यात गुंतवावी लागते ठेवींच्या मानानें हुंड्यात गुंतविलेली रकम अगर रोख शिलक कमी होऊ न देणें अगत्याचें असतें अल्प मुदतीचीं कर्जें व रोख शिलक ह्यात मिळून ब्रिटिश बँकाची शेकडा सुमारें २८ ते २९ टक्के इतकी रकम गुंतविली जाते ह्यापैकी रोखीचें प्रमाण आता शेकडा १० वर उतरलें आहे ह्यापेक्षा कमी शिलका राखणें बँकिंगच्या व्यवहाराचे दृष्टीनें सुरक्षित ठरणार नाहीं. सध्या बँकाचीं अल्प मुदतीचीं कर्जें व हुंड्यात गुंतविलेल्या रकमा कमी झाल्या आहेत व रोख शिलकीचें प्रमाणहि सुरक्षितपणाच्या मर्यादेपर्यंत येऊन ठेपलें आहे कर्जाच्या वाढत्या मागणीमुळें ठेवींची रकमहि फुगणार, हें उघड आहे, कारण कर्जाचें रूपांतर तात्काळ ओव्हरड्राफ्टचे रूपानें ठेवीत होत असतें. ह्या कारणानें रोख शिलकीचें प्रमाण ह्याबरोबरच उतरणें स्वाभाविक आहे ही प्रवृत्ति थांबविल्याखेरीज बँकांस आपलें मामुली काम नीट पार पाडता येणार नाहीं. ह्याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं बँकास नवीन कर्जें देता येणार नाहींत व आपल्या रोख शिलकेचें प्रमाण योग्य मर्यादेंत राखण्याकरिता विशेष उपाययोजना करावी लागेल म्हणजे, त्यास आपला कर्जावरील व्याजाचा दर चढवावा लागेल ही गोष्ट राष्ट्रीय दृष्टीनें अनिष्ट वाटली तरी ती अपरिहार्य आहे, आणि त्यामुळें राष्ट्रसंरक्षणाचे लढाऊ योजनेस थोडा अडथळा येण्याचा संभव आहे

---

### जनावराची निपज कशी सुधारेल?

शेतीच्या जनावराची निपज सुधारण्याकरिता उपाययोजना निश्चित करण्यासाठी प्रांतिक सरकाराच्या प्रतिनिधींची एक परिषद मध्यवर्ती सरकारनें सिमला येथें भरविली होती. प्रत्येक प्रांतामध्यें ह्या कामाकरितां एक बोर्ड स्थापन करण्यांत यावें, त्या बोर्डाच्या शाखा जिल्हानिहाय असाव्या, प्रत्येक जिल्ह्यात जमा झालेला फंड स्थानिक सुधारणाकडे खर्चण्यात यावा, जनावरास चरण्याच्या सोयी वाढविण्यासाठी एक मध्यवर्ती कमिटी व प्रांतिक कमिट्या नेमण्यात याव्या, इत्यादि ठराव परिषदेनें पास केले मुख्य प्रश्न, पुरेसा पैसा उभा करण्यासंबंधीचा आहे

## स्फुट विचार

### लंडनच्या साखर-परिषदेतील निर्णयाविरुद्ध तक्रार

व्यापारविषयक कराराचे बाबतींत परराष्ट्राच्या प्रतिनिधींशीं बोलणीं होतात तेव्हा स्वकीय हितसंबंधी व्यापाऱ्याचा सल्ला घेण्याचा व त्यास सल्लागार म्हणून नेमण्याचा सरकाराचा रिवाज आहे. लंडन येथें नुकतीच आंतरराष्ट्रीय साखर परिषद भरली होती, तिच्या संबंधात हा परिपाठ पाळला गेला नाहीं, अशी तक्रार हिंदी व्यापारी मंडळांच्या संघानें हिंदुस्थान सरकाराकडे केली आहे, ती अगदी वाजवी आहे हिंदी व्यापाऱ्याची बाजू आपणास अवगत असून ती लक्षात ठेवूनच आपल्या प्रतिनिधींनीं लंडन परिषदेंत भाग घेतला असें ह्यावर सरकारचें म्हणणें असेल तर तें सयुक्तिक नाहीं. सरकारास सर्वच गोष्टी माहीत असणें अपेक्षित असल्या कारणानें व्यापारी मंडळाचा सल्ला घेण्याचें व त्याचे प्रतिनिधि सल्लागार म्हणून निवडण्याचें प्रयोजन कधीच पडणार नाहीं ब्रह्मदेशाशिवाय इतर देशात हिंदी व्यापाऱ्यानीं साखर पाठविण्याचें कारण नाहीं हा निर्णय हिंदुस्थानच्या वतीनें परिषदेंत मान्य करण्यात आला आहे, तो योग्य नाहीं हिंद-ब्रिटन व्यापारी करार होण्याचें घाटत आहे, त्यामध्यें हिंदी साखरेस ग्रेट ब्रिटनमध्यें सवलती मिळाव्या अशा अर्थाची मागणी करण्यास वरील मान्यतेमुळें बंदी होणार आहे. त्याचप्रमाणें, जाव्हासारख्या देशास साखर परदेशात पाठवण्याचें प्रमाण निश्चित करून मिळालें आहे, त्या धर्तीवर योजना करणें हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यास अशक्य झालें आहे. ह्या प्रश्नाची चर्चा मध्यवर्ती कायदेमंडळात व्हावी अशी व्यापारी मंडळाच्या संघाची मागणी आहे व सरकारनें ती मान्य करणें आवश्यक आहे. ह्या चर्चेनं हिंदी लोकमत जाहीर रीतीनें व्यक्त होऊन सरकारास मार्गदर्शक होईल आणि हिंद-ब्रिटन व्यापारी करारात हिंदुस्थानास अनुकूल अशा अटी दाखल करून देण्यास तिच्या योगानें सहाय मिळेल.

---

### हिंदी साखरेच्या निर्गतीस बंदी कां?

इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानासहि आपली साखर बाहेर पाठवण्याची सवड लंडनच्या साखर परिषदेनें मान्य केलेल्या योजनेंत ठेवण्यात आलेली नाहीं, ह्या गोष्टीचें समर्थन काहीं लेखकांनीं केलें आहे, तें लटपटित आहे हें सहज समजण्यासारखें आहे. जगाच्या बाजारात आज जी साखरेची किंमत आहे, त्या भावानें हिंदी कारखानदारास आपला माल परदेशात विकणें परवडणार नाहीं हा त्याचा महत्त्वाचा मुद्दा आहे पण अंतर्गत गिऱ्हाइकास एक किंमत आणि निर्गतीच्या सोयीसाठी परदेशात किंमत त्यापेक्षा हलकी असा व्यवहार कित्येक राष्ट्रें आज प्रत्यक्ष करीत आहेत. मग, हिंदुस्थानानेंहि तसें धोरण अंगिकारण्यास हरकत कां असावी असा सरळ प्रश्न उद्भवणार त्यास उत्तर म्हणून वरील लेखक म्हणतात कीं, परराष्ट्रीय गिऱ्हाइकास साखर स्वस्त किंमतीनें विकणें म्हणजे स्वकीय बांधवावर भारी किंमतीचा बोजा टाकणें असें असून परराष्ट्रातील लोक हा बोजा सहन करण्यास समर्थ आहेत, तशी हिंदी जनता नाहीं, ह्मणून हिंदुस्थानातून परदेशात साखर पाठविण्याची व्यापारी लोकास सवड ठेवणें इष्ट नाहीं हिंदी जनतेविषयींची ही सहानुभूति स्तुत्य आहे ह्यांत शंका नाहीं. परंतु हिंदी शेत-

करी, व्यापारी व गिऱ्हाइकें ह्यांच्या परस्पर हितसबंधाची काळजी घेणें त्यांच्यावरच सोंपवणें बरें नाहीं काय ? इतर राष्ट्रें स्वतःच्या गिऱ्हाइकावर बोजा टाकतात, तीं कांहीं मूर्ख नाहींत. एकूण समाजाच्या अंतिम हिताचा विचार करूनच तीं आपलें धोरण आखीत असतात ही साधी गोष्ट प्रस्तुत प्रश्नासंबधानें कां डोळ्याआड केली जाते ? हिंदुस्थानास आपली साखर परदेशीं पाठवणें परवडलें नाहीं तर ती निर्गत होणार नाहीं पण ह्या व्यापारास मुळातच बंदी कां व्हावी ? जपाननें लंडन परिषदेच्या निर्णयास मान्यता दिलेली नाहीं ही गोष्ट महत्त्वाची आहे. जपानी हितसंबधास तिनें बाध येईल म्हणूनच तें राष्ट्र बाजूस राहिलें आहे.

---

### इंग्लंडमध्यें शेतीस सरकारी सहाय

खुल्या व्यापाराच्या सांप्रदायिक तत्त्वाप्रमाणें इंग्लंड देशानें स्वतःस कारखान्याच्या धंद्यास वाहून घ्यावें आणि शेतीचा उपयोग दुय्यम दर्जाचा समजून धान्यधुन्य व कच्चा माल आपल्या पक्क्या मालाच्या मोबदल्यात परदेशातून घ्यावा परतु अलीकडे आर्थिक व्यवहार व विचार ह्याचे संबधात जी क्रांति घडून आली आहे, तीमध्यें उद्योगधद्याचे बाबतींत प्रत्येक राष्ट्रानें शक्य तितकें स्वावलंबी व स्वयपूर्ण बनाव ह्या कल्पनेस महत्त्व प्राप्त झालें आहे कृषिप्रधान देशांत कारखाने काढणें आणि कारखान्याच्या प्रगतींत पुढें गेलेल्या देशात शेतीची जोपासना करणें ह्या तऱ्हेची प्रवृत्ति सर्वत्र दिसून येत आहे. युद्धाची तयारी म्हणून नव्हे तर शांततेच्या परिस्थितींतहि ब्रिटिश शेतीचा धंदा सामर्थ्यवान् होईल अशी तजवीज ग्रेटब्रिटनमध्यें करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें असल्याचें कृषिमंत्रि, मि मॉरिसन, ह्यांनीं कॉमन्स सभेंत जाहीर केलें. गव्हाच्या पिकास सरकारी सहाय देण्यात येत आहे तें अधिक क्षेत्रावर दिलें जाईल. जमिनीचा मगदूर वाढण्यास सरकार मदत करील जमिनींतलें पाणी काढून देऊन ती पिकास उपयोगी व्हावी ह्याकरिता दरवर्षी सरकार सुमारें ६० लक्ष रुपये खर्च करील शेतीच्या जनावरांस होणारे रोग नाहींसे करण्याकरिता दरवर्षी ८० लक्ष रुपये खर्चण्यात येतील ह्या व इतर अनेक सुधारणा शेतीच्या धद्यांत व्हाव्या म्हणून ब्रिटिश सरकार दरवर्षी ४½ कोटि रुपये खर्च करणार आहे इंग्लडसारख्या देशात कारखान्याचे धदे विशेष मोठ्या प्रमाणावर चालत असता तेथील सरकारास शेतीच्या धद्याप्रीत्यर्थ कोट्यवधि रुपये खर्चून त्यात सुधारणा घडवून आणणें अगत्याचें वाटलें, ह्यावरून कृषिप्रधान समजल्या जाणाऱ्या हिंदुस्थान देशात येथील शेतीच्या सुस्थितीसाठी किती विस्तृत मदत दिली पाहिजे, ह्याची कल्पना येईल हिंदुस्थानात शेती व उद्योगधदे ह्यास सारखेंच सरकारी सहाय अपरिहार्य आहे ही गोष्ट आता सिद्ध करण्याचें कारण वास्तविक उरलेलें नाहीं. आपल्या देशात मान्य केलेलें आर्थिक तत्त्व ब्रिटिशानीं हिंदुस्थानास लागू केलें नाहीं तर त्यांच्या धोरणांतली विसगतता असंदिग्धपणानें सिद्ध होईल, इकडे त्यांचें लक्ष गेलें पाहिजे

---

### हिंद-जपान व्यापारी करारावर जपानी लोकमत

हिंद-जपान व्यापारी करारासंबंधीं जपान देशांतील वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या मतांवरून, सदरहु करारानें जपान विशेष संतुष्ट झालेला दिसत नाहीं. ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून विभक्त झाल्यामुळें जपानी कापडाची आयात त्या मानानें कमी करण्यात आली आहे, परतु हिंदी कपाशीच्या जपाननें करावयाच्या खरेदीस तेंच तत्त्व लागू करण्यांत आलेलें नाहीं, अशी जपानची तक्रार आहे ब्रिटिशेतर रेयॉन ( नकली रेशीम ) च्या आयातीवरील जकात २५ टक्क्यानीं वाढविली आहे तिचा परिणाम जपानी मालाचे व्यापारावर झाल्याखेरीज रहाणार नाहीं. जपाननें गेल्या वर्षी ९½ कोटि चौरस वार रेयॉन ह्या देशांत पाठविलें होतें आता कापडाच्या लहान तुकड्यांची (फेन्टस्) आयात फक्त ५० लक्ष वार होऊ दिली जाणार आहे जपाननें गेल्या वर्षी ३½ कोटि वार फेन्टस् पाठविले होते. हिंदी-जपान करारासबधीं कित्येक महिने वाटाघाटी चालल्या होत्या, त्या अखेर मोडूं नयेत व दोन देशामधील व्यापार पूर्ववत् चालावा, ह्या हेतूनें आपल्या प्रतिनिधींनीं हिंदुस्थान सरकारच्या अटींना मान्यता दिली, असें जपानचें म्हणणें आहे हिंदुस्थानासहि ह्याबाबत स्वार्थत्याग करावा लागला आहे. लहान सहान धंद्यास जपानी स्पर्धेची झळ लागत आहे ती थाबविणें सरकारास शक्य झालें नाहीं वरील व्यापारी करारानें दोन्हीं देश पूर्णपणें सतुष्ट होणें अर्थातच शक्य नव्हतें तथापि, देवाण-घेवाणीच्या तत्त्वावर चाललेल्या वाटाघाटी यशस्वी होणें दोघांसहि आवश्यक वाटल्यानें हा करार होऊं शकला असें स्पष्ट दिसत आहे. हिंदुस्थान सरकारास जपानकडून जास्त सवलती मिळवतां आल्या असत्या, असें मत हिंदी व्यापारी सघांनीं व्यक्त केलें आहे, ह्याचा उल्लेख मात्र येथें करणें आवश्यक आहे

---

### इजिप्त राष्ट्रसघाचा सभासद झाला

इजिप्त देशास राष्ट्रसघामध्यें दाखल करून घेण्यात आलें आहे. तेथील परदेशीय लोकास कांहीं विशिष्ट हक्क देण्यात आले होते, ते ह्यापुढें इजिप्तनें कमी करण्यास सदरहु प्रकरणात हितसबध असलेल्या राष्ट्रानीं मान्यता दिली आहे सुएझच्या कालव्याचे आसपास आणखी काही वर्षे ब्रिटिश सैनिक वास्तव्य करणार आहेत परंतु त्यानंतर आपलें स्वत.चें सरक्षण करण्यास इजिप्त समर्थ होईल अशी अपेक्षा आहे परदेशीय लोकास बारा वर्षांनंतर इजिप्शन कायदाच लागू करण्यात यावयाचा असून स्थानिक न्यायाधीशापुढेंच त्याचे खटले चालविण्यांत यावयाचे आहेत. विदेशीयाचे हितसबध अबाधित राखण्याचें इजिप्तनें कबूल केलें आहे. आता राष्ट्रसघानें इजिप्तला आपला सभासद निवडून त्या देशास स्वातंत्र्याचा दाखला दिला आहे


WHY THIS PAUCITY
OF
BOOK-KEEPERS
AND
ACCOUNTANTS ?

*Non Matriculates !*

Learn Book-Keeping, Accountancy, Short-hand Typewriting, secure Diploma and certificate of efficiency through the only recognised Institute

MARATHI CENTRE
10, Budhwar, Poona City.

## मुंबई नगररचनेच्या कायद्याच्या दुरुस्तीची आवश्यकता

[श्री. य द. सोले, एल. एस. जी. डी., ह्यांनीं लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन्स्टिट्यूटच्या त्रैमासिकाचे ताज्या अंकांत वरील विषयावर एक लेख लिहिला आहे, त्यांतील महत्वाच्या मुद्यांचा सारांश येथें दिला आहे]

मुंबई सरकारनें शहराच्या वाढत्या विस्ताराच्या नियंत्रणासाठीं व सौंदर्य संवर्धनासाठीं म्हणून सन १९१५ सालीं 'टाऊन प्लॅनिंग ॲक्ट' कायदेमंडळांत पास करून घेऊन त्याची अमलबजावणी सुरू केली व त्याचा फायदा आजतागायत निरनिराळ्या भागांतील सुमारें २५ शहरानीं घेतला आहे.

प्रथम या कायद्याच्या हेतुकडे दृष्टि टाकता असें दिसतें कीं, हा कायदा फक्त मोकळ्या जागापुरता होता व त्या भागाची योजना यशस्वी होण्यासाठीं शहरालगतच्या कांहीं भागाचा त्यांत समावेश करण्यांत येतो. परंतु यामुळें खुद्द जुन्या शहरातील दाटी तशीच राहते यासाठीं आमच्या मतें या कायद्याचें स्वरूप बदलून त्यास 'शहराच्या सुधारणेचा कायदा' असें विस्तृत नांव देऊन शहरातील बाधलेला दाटीचा भाग सुधारण्याचा मार्ग मोकळा करून द्यावा. यानंतर या कायद्याप्रमाणें करावयाची योजना, त्यात समाविष्ट करावयाचीं कामें व त्यासबधींचा सर्व सोहाळा यामध्यें सध्या जो काळ जातो तो फार जाऊन शिवाय आर्थिक नुकसानहि फार होतें. कांहीं ठिकाणीं योजनेचा इरादा जाहीर झाल्यानंतर अखेरची योजना मंजूर होण्यास चौदा वर्षांचा अवधी लागला. तेव्हां यामध्यें फारच महत्वाची अशी सुधारणा होणें जरूर आहे. त्याचप्रमाणें या कायद्याखालीं ज्या भागाची सुधारणा होते किंवा व्हावी अशी इच्छा आहे त्या ठिकाणीं त्या भागांची भरभराट होण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत याची छाननी करून त्यांचा समावेश झाल्याशिवाय योजना मंजूर होणार नाहीं असा दडक कायद्यानेंच घालून दिला पाहिजे

नगररचनेच्या योजनेंतील मालक वाढीच्या किंमतीची रकम म्युनिसिपॅलिटीस देऊन शिवाय आपल्या जमिनींतून रस्ते वगैरे काढून प्लॉट विक्रीची वाट पाहतात परंतु ज्या ठिकाणीं पाणी व ड्रेनेज याची व्यवस्था नाहीं अशा ठिकाणीं त्या भागाची प्रगति कशी होणार? एक वेळ ड्रेनेज नसलें तरी चालेल परंतु पाण्याची व्यवस्था आवश्यक पाहिजे. म्हणून या कायद्यातील कलमांत अशी दुरुस्ती झाली पाहिजे कीं, ज्या ज्या ठिकाणीं म्युनिसिपालिटी नगररचनेच्या योजना तयार करील तेथें तेथें पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणें हें म्यु चें कायदेशीर कर्तव्य समजून त्याची योजना झाली पाहिजे व असें करण्यास एखादी म्युनिसिपालिटी चुकल्यास तें काम त्या जिल्ह्याचा कलेक्टर यानें करून म्युनिसिपॅलीटीकडून पैसे वसूल करावेत.

लँड रेव्हिन्यू कोडपैकीं 'बिगर शेतसारा' घेण्याचें कलम या टाऊन प्लॅनिंग योजनेच्या क्षेत्रास लावलें जाणार नाहीं व नगररचनेच्या क्षेत्रांत येणारा सर्व भाग सारामाफीनें समजला जाईल अशी दुरुस्ती होणें जरूर आहे. नगररचनेच्या क्षेत्रांत येणारी शेतीची जमीन 'इमारतीचे उपयोगाकरितांच आणावयाची' हा हेतू आहे. यामुळें जमिनीचे मालक स्वतःच्या खुषीनें शेतीजमिनीचा उपयोग बिगर शेतीकडे करीत नसुन त्याना नगररचनेच्या कायद्यामुळेंच हा उपयोग करावा लागत आहे. नगररचना योजनेच्या आखणीमुळें व अमलबजावणीमुळें त्यांच्या जमिनीच्या किमतीमध्यें आपोआप वाढ होणार आहे परंतु वाढीच्या किंमतींपैकीं निम्मी रकम त्याना म्यु स द्यावयाची आहे. तेव्हा त्याच्यावर पुन्हा हा दुसरा वाढीचा सारा बसविणें त्या भागातील प्रगतीच्या दृष्टीनें श्रेयस्कर व बरोबर नाहीं व हा वाढीचा सारा वर्षानुवर्ष देणें त्यास परवडेल असें वाटत नाहीं तेव्हां याबाबत जरूर ती दुरुस्ती कायद्यात व्हावयास पाहिजे. ज्या भागासाठीं ही योजना आखावयाची त्याच्यापैकीं २।३ इतक्या बहुमताविरुद्ध योजना त्या भागावर लादली जाऊं नये. या नगररचनेचा सोहाळा थोडक्यात पुढीलप्रमाणें आहे.

(अपूर्ण)

---

### झग्यांचा सतरा लक्ष रुपये खर्च

राज्यारोहणासाठीं ब्रिटिश उमरावाच्या स्त्रियानीं मखमलीचे झगे वापरले, त्यांस सुमारें १७ लक्ष रुपये खर्च आला.

---


श्री

टिळक महाराष्ट्र विद्यापीठास जोडलेलें, आयुर्वेदाचें उच्च शिक्षण देणारें

# आयुर्वेद महाविद्यालय, पुणें

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर ता २१ जून १९३७ पासून सुरू होईल प्रवेश परीक्षा (Matriculation) पास असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल अभ्यासक्रम चार वर्षांचा सपूर्ण आयुर्वेदाच्या शिक्षणाबरोबर पाश्चात्य वैद्यकाचेंही शिक्षण मिळतें प्रत्यक्ष शिक्षणाच्या सर्वांत अधिक व उत्कृष्ट सोयी आहेत. प्रत्यक्ष शिक्षणाच्या सस्था.—

**(१) ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलः**—यामध्यें ४० राहत्या रोग्याची सोय असून बाहेरून औषधास येणाऱ्या रोग्याची सख्या रोज २०० वर असते. शस्त्रकर्माची उत्तम सोय असून दरसाल ५०० च्यावर महत्त्वाचीं शस्त्रकर्में होतात सर्व मुंबई इलाख्यांत हें एकच व नमुनेदार आयुर्वेदीय रुग्णालय असून यामध्यें विद्यार्थ्यांच्या रोग-निदान-चिकित्सा व शस्त्रकर्म या विषयाच्या प्रत्यक्ष शिक्षणाची चागली सोय आहे

**(२) सूतिका गृह**—सध्या ही व्यवस्था अल्प प्रमाणांत असून १।२ महिन्यात १० सूतिकाची सोय करण्यात येणार आहे. यामुळें विद्यार्थ्यांना प्रसूतिकर्माचें प्रत्यक्ष शिक्षणाची उत्तम सोय होईल

**(३) आयुर्वेद रसशाळा पुणे लिमिटेडः**—हा कारखाना लिमिटेड केल्यापासून औषध निर्माण करण्याचें काम फारच मोठ्या प्रमाणावर चालतें येथें विद्यार्थ्यांना सर्व औषध शास्त्रोक्त पद्धतीनें तयार करण्याचें शिक्षण मिळतें

**(४) शवच्छेदन-शालाः**—ही शाला सर्वांत मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें येथें विद्यार्थ्यांना शवच्छेदनाचें शिक्षण भरपूर मिळण्याची सोय आहे. याशिवाय प्रयोग-शाला, वनस्पति सग्रह, इत्यादि सर्व सोयी आहेत

- सविस्तर माहितीसाठीं ०२ ची तिकिटें पाठवावींत

नवीन विद्यार्थ्यांनीं ता १५ जूनपर्यंत ५ रु. प्रवेश-फीसह अर्ज पाठवावेत

पत्ताः—आयुर्वेद महाविद्यालय, २९७ सदाशिव, पुणें २ पु ग नानल अधिपति.

## हिंदी कोळशाच्या धंद्याचें नियंत्रण

### बरोज कमिटीच्या शिफारसी

हिंदुस्थानातील खाणींमधून कोळसा खणून काढण्याच्या पद्धतीसंबंधानें चौकशी करून, खाणींमधील कामगाराच्या सुरक्षितपणाची तजवीज करण्याकरिता व कोळशाचा वृथा होणारा नाश थांबविण्याकरितां उपाय सुचविणेसाठी मि. बरोज ह्याच्या अध्यक्षतेखाली ऑक्टोबर, १९३६ मध्यें एक कमिटी नेमण्यांत आली होती, तिचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे हल्लींच्या हिंदी कोळशाचा पुरवठा १२२ वर्षांपेक्षां ज्यास्त दिवस पुरणार नाहीं व झरिया क्षेत्रांतील चांगला कोळसा ८१ वर्षांत संपून जाईल, असा कमिटीचा अजमास आहे १९२५ ते १९२९ च्या दरम्यान हिंदुस्थान सरकारच्या जिऑलॉजिकल सर्व्हे खात्यानें हिंदी कोळशाच्या खाणींसबंधीं तपशीलवार पहाणी करून कोळशाचा पुरवठा जतन करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. तोंपर्यंत ह्या प्रश्नाच्या निकडीविषयीं लोकांची खात्री पटली नव्हती. कोळसा काढण्याचेवेळीं जरूर ती दक्षता न बाळगली गेल्यामुळें अपघात होण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण होते. पुरेशा जाडीचे खांब मध्यें कायम ठेवूनच आजूबाजूचा कोळसा काढावा लागतो, नाहीं तर कोळशाचा वरचा थर केव्हा खाली येईल ह्याचा नेम सांगता येत नाहीं. खालून टेकण देण्यास वाळूचा उपयोग ज्यास्त प्रमाणात करावा, असें कमिटीनें सुचविलें आहे. कोळशाच्या प्रत्येक टनावर आठ आणे व कठिण कोकवर बारा आणे पट्टी बसवून, तिच्या उत्पन्नाचा विनियोग खाणींतील काम निर्धास्त करण्यामध्यें व कोळशाचा आणि कामगाराच्या प्राणाचा बचाव करण्यात व्हावा अशी कमिटीची शिफारस आहे. हें काम सरकारनें नेमावयाच्या एका स्वतंत्र कमिटीकडे सोपविण्यांत यावें अशीहि सूचना करण्यात आली आहे ह्या कमिटीनें पुढें कोळशाचा खप वाढविण्याची व त्याचें नियमन करण्याची एक एजन्सी स्थापन करण्यात पुढाकार घ्यावा व खाणींचें संबंधांतील संशोधनकार्य करण्याकरितां एक रिसर्च बोर्ड स्थापण्यात यावें, असेंहि सुचविण्यात आलें आहे खाणींची मालकी सरकारनें स्वत.कडे घेण्याविरुद्ध मत कमिटीनें प्रदर्शित केलें आहे. कमिटीचे दोन सभासद, श्री नाग व डॉ कृष्णन, ह्यांनीं खाणी राष्ट्रीय मालकीच्या केल्या पाहिजेत, असें मत व्यक्त केलें आहे.

कोळशाच्या खाणींचे मालक थोड्या वेळांत ज्यास्त नफा काढण्याच्या उद्योगात असतात व कोळशाचा पुरवठा सतत कायम कसा टिकेल ह्या व्यापक प्रश्नाकडे त्यांचें लक्ष नसतें कोळशाचा विनाकारण होणारा अपव्यय थांबवून, ह्या धंद्याची अनियंत्रित स्पर्धेमधून मुक्तता होणें आवश्यक आहे. अलीकडे हिंदी कोळशाच्या खाणींमधील अपघातांचें प्रमाण वाढलेलें असल्याचें आढळून आल्याकारणानें कामगाराचें जीवित सुरक्षित रहाण्याची तातडीनें तजवीज करणें जरूर झालें आहे. बरोज कमिटीनें ह्या संबधात केलेल्या शिफारसीमधील अंतर्भूत तत्त्व हिंदुस्थान सरकारास मान्य असल्याचें त्यांनीं जाहीर केलें आहे. कमिटीच्या रिपोर्टानें हिंदी कोळशाच्या धंद्याचे सद्यःस्थितीवर उत्कृष्ट प्रकाश पाडला असून मार्गदर्शनाचें कामहि उत्तम केलें आहे. कोळशाचे धंद्यावरील नवीन नियंत्रणें खाणींच्या मालकास कदाचित् रुचणार नाहींत. परंतु राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या बहुमोल पुरवठ्यांचें जतन वेळींच करण्यांत सबंद देशाचा अंतिम फायदा आहे, हें कोणीहि कबूल करील. चहा, कागद, ताग, सिमेंट, इत्यादि धंदे सरकारी अगर बिनसरकारी मध्यवर्ती नियंत्रक संस्थाचे देखरेखीखाली आधींच आलेले आहेत आणि आतां कोळशाच्या धंद्यासहि तोच मार्ग स्वीकारावा लागणार आहे. ब्रिटिश कोळशाच्या खाणींचे मालकी हक्क सरकार राष्ट्राच्या वतीनें विकत घेत आहे. त्याच मार्गाचा अवलंब हिंदुस्थानांत करावा लागेल अशीं चिन्हें दिसत आहेत.

---

### "प्रॉक्सीज" चा उपयोग

संयुक्त भांडवलाच्या मंडळीचे सभेस समक्ष हजर रहाता आलें नाहीं तरी दुसऱ्याकरवीं आपलें मत देण्याचा अधिकार भागीदारांस असतो, त्यास 'प्रॉक्सी' असें म्हणतात. कित्येक वेळीं भागीदाराचें शिरगणतीनें बहुमत झालें तरी मतमोजणीचे वेळीं पारडें फिरतें, कारण कित्येक भागीदाराचीं प्रत्येक भागास एक, ह्या हिशेबानें हजारों मतें असूं शकतात ग्रेटब्रिटनमधील एका कंपनीच्या पुनर्घटनेविषयीं कोर्टानें निकाल देऊन, तिच्या क्यु प्रेफरन्स व ऑर्डिनरी भागीदाराच्या स्वतंत्र सभांतून ह्या योजनेचा विचार करण्यात यावा, असा हुकूम दिला होता क्यु प्रेफरन्स भागीदाराकरिता छापलेल्या प्रॉक्सीजच्या फॉर्ममध्यें सभेच्या अध्यक्षास तो हक्क बजावण्याचा अधिकार दिलेला होता. ह्या भागीदाराच्या सभेंत एका भागीदारानें कंपनीची पुनर्घटनेची योजना पुढें ढकलावी, असें सुचविलें आणि शिरगणतीनें ही सूचना पास झाली. अध्यक्षांनीं स्वतः पोल मागून स्वतः जवळच्या प्रॉक्सीजचा उपयोग केला आणि पुनर्घटनेची पहिली सूचना अखेर पास झाली. पराभूत भागीदारांनीं ह्याविरुद्ध कोर्टाकडे तक्रार केली. पुनर्घटनेच्या योजनेवरच फक्त मत देण्याचा अधिकार प्रॉक्सीजनीं अध्यक्षांस दिला होता, ह्या प्रश्नाचा विचार तहकूब करण्याच्या प्रश्नावर प्रॉक्सीजचा उपयोग करणें नियमबाह्य होतें, असें त्यांनीं प्रतिपादन केलें "प्रॉक्सीनें योजनेविरुद्ध मत देण्यास अधिकार दिला, ह्याचा अर्थ सदरहु योजना नामशेष करणाऱ्या ठरावाविरुद्ध मत देण्यासहि त्यानें अधिकार दिला, असा होतो", असा निर्णय कोर्टानें जाहीर केला.

---

### ट्यूब विहिरींतील पाण्यानें १५ लक्ष एकर भिजणार

बोअरिंगच्या विहिरींतून सुमारें १५ लक्ष एकर जमिनीस पाणी पुरविण्याची संयुक्त प्रांतानें आखलेली योजना पुरी होत आली आहे ह्या योजनेंतील १,३९७ विहिरी खोदून झाल्या असून ६५ विहिरी चालू वर्षांत तयार होतील प्रत्येक दोन चौरस मैलास एक विहीर ह्या हिशेबानें प्रत्येक विहिरीखाली १,००० एकर जमीन लागवडींत येईल योजना पुरी झाल्यानंतर २,९०० चौरस मैल जमिनीस पाणी मिळेल व दरसाल ६,२१,३५० एकरांत ऊंस, गहू, इत्यादि पिकांची लागवड होईल व घरगुती उपयोगाकरिताहि व पिण्यासाठी मुबलक पाणी मिळूं शकेल. ह्या सबंद योजनेस १ कोटि २६ लक्ष रुपये खर्च येणार असून दरसाल ४२ लक्ष रुपये उत्पन्न होईल, त्यांतून ३२½ लक्ष रुपये खर्च वजा जातां ९ लक्ष रुपये उरतील, त्यातून व्याज भागविलें जाईल वरील ट्यूब विहिरींतून विजेच्या सहायानें पाणी उपसण्यांत येणार आहे व त्याकरितां एका यूनिटला तीन पैसे ह्या दरानें विजेचा पुरवठा केला जाईल.

## हिंदुस्थानांतून बुटांची निर्गत होऊं लागली

### बाटानगरची प्रगति

१९३१–३२ मध्यें हिंदुस्थानात एकूण ४० लक्ष, ५५ हजार रुपये किंमतीच्या ६३ लक्ष बुटाची आयात झाली. १९३६-३७ च्या पहिल्या ११ महिन्यांत ही आयात १०¾ लक्षावर घसरली व त्यांची किंमत ६¾ लक्ष रुपये भरली. ह्याबरोबरच, १० लाखाचे १५½ लाख बूट परदेशीं रवाना झाले कलकत्त्याशेजारीं हुगळी नदीचे तीरावरील बाटानगरमध्यें दर आठवड्यास १ लक्ष, ७० हजार बूट तयार होऊ लागले आहेत. बाटानगरमधील बुटाचे कारखान्यात २,००० कामगार कामावर आहेत बाटाची किरकोळ विक्रीचीं दुकानें हिंदुस्थानभर पसरलेलीं असल्यानें दलाली वाचते व गिऱ्हाइकांस एकाच दर्जाचा माल स्वस्त व ठराविक दरानें मिळूं शकतो गेल्या दोन वर्षांतच पुढें आलेलें बाटानगर सर्व सोयींनीं परिपूर्ण आहे त्या शहराच्या प्रगतीसंबंधात खालील आकडे उद्बोधक वाटतील:—

| वर्ष | लोकसंख्या | मिळकतीचें प्रमाण (साप्ताहिक) |
|---|---|---|
| १९३३ | २५० | ५ रु. |
| १९३४ | ५५२ | ५ रु. १२ आ |
| १९३५ | ८५९ | ६ रु ४ आ. |
| १९३६ | ३,००० | ६ रु ८ आ |

बाटाच्या कारखान्यात हिंदी कच्चा माल वापरण्यात येतो कामगार व अधिकारी हेहि हिंदीच आहेत मालकी व देखरेख ही मात्र झेकोस्लोव्हाकिअन आहे

## हिंदुस्थानांत मोटार गाड्यांची आयात

(१९३६–३७)

| | |
|---|---|
| एकूण मोटार गाड्याची आयात | १२,९३९ गाड्या |
| त्यापैकीं ब्रिटिश | ६,३३७ ,, |
| ,, अमेरिकन | ३,८७० ,, |
| ,, कनेडियन | १,२९० ,, |
| ,, जर्मन | ८१३ ,, |
| गाडीची सरासरी किमत | १,८८० रु. |
| मुंबईमध्यें आयात | ६,०८० गाड्या |
| बंगालमध्यें ,, | ३,४१० ,, |
| मद्रासमध्यें ,, | १,७२२ ,, |
| एकूण मोटार सायकलींची आयात | ९२१ ,, |
| त्याची किंमत | ३,५०,००० रु. |
| मोटार लॉऱ्या व बसेसची आयात | ९,१६० गाड्या |
| त्याची किमत | १,३१,००,००० रु |
| त्यापैकीं ब्रिटिश | १,२१७ गाड्या |
| ,, अमेरिकन | ६,०१२ ,, |
| ,, कनेडियन | १,७१९ ,, |

मोटार गाड्यांची आयात पूर्वसालापेक्षां कमी झाली आहे. ब्रिटिश गाड्या सुमारें ४०० कमी आल्या, उलट जर्मन गाड्याची आयात ४७८ नी वाढली. मोटार सायकलींची आयात १८७ नीं सुधारली. अमेरिकन लॉऱ्याची आयात १९३५-३६ सालीं फक्त ५,०५१ गाड्या इतकीच होती कॅनडामधून गेल्या वर्षी पूर्वसालचे मानानें ६०० गाड्या कमी आयात झाल्या

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंटस,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणी भरपूर कमिशनवर एजन्ट्स नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु (ट. ख निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

१२ वर्षे पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.

बुधवार चौक, पुणें

# सहकारी चळवळ

## पुरंदर तालुका सहकारी परिषद्

पुणें जिल्हा को इन्स्टिटयूटच्या विद्यमानें जेजुरी येथें शनिवार ता २२ मे १९३७ रोजीं पुरंदर तालुका सहकारी परिषद् श्री जी. एम् ऊर्फ नानासाहेब गुप्ते, बी. ए, एलएल बी, याचे अध्यक्षतेखाली झाली.

परिषदेस पुरदर तालुक्यांतील सोसायट्याचे प्रतिनिधी, सेक्रेटरी व निमंत्रित पाहुणे मडळी मिळून सुमारें १०० लोक हजर होते त्यामध्यें श्री डी डी. चितळे (मॅनेजिंग डायरेक्टर, पु सें बॅक), श्री. पाडव, जि को. इन्स्टिट्यूटचे प्रेसिडेंट श्री य रा दाते, ऑनररी सेक्रेटरी श्री देवभानकर, कार्यकारी मंडळाचे सभासद् श्री बापूसाहेब भानु, प्रोपॅगंडा ऑफिसर ग इगळे, तसेच यूनियनचे प्रेसिडेंट श्री. टिळेकर, सुपरवायझर रा गाधी, श्री निरगुडे, श्री. जगताप वगैरे मडळी प्रामुख्यानें दिसत होती

परिषदेचे प्रारंभीं श्री दाते यानीं आपल्या स्वागतपर भाषणांत चालू सालची दुष्काळी परिस्थिति व त्यामुळें झालेली शेतकरी वर्गाची आर्थिक हलाखी याचा निर्देश करून या दृष्टीनें पहाता सहकारी चळवळ हल्ली आणीबाणीच्या स्थितींतून कशी जात आहे व शेतकऱ्यांस ती सहाय कसें करीत आहे याची जाणीव करून दिली

यानतर यूनिअनचे प्रेसिडेंट श्री टिळेकर यानीं अध्यक्षास अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंति केली त्यास रीतसर श्री निरगुडे यानीं अनुमोदन दिल्यानंतर अध्यक्षानीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. नंतर इन्स्टिट्यूटचे प्रोपॅगंडा ऑफिसर रा. ए. के. इंगळे यानीं परिषदेस आलेले सदेश वाचून दाखवून गेल्या तालुका परिषदेचा वृत्तात सादर केला.

त्यानतर परिषदेस सुरुवात करणेचे दृष्टीनें अध्यक्ष श्री नानासाहेब गुप्ते यानीं आपले भाषणात सहकारी चळवळीच्या मूलतत्त्वासंबधीं थोडक्यात माहिती सागून खाजगी सावकारी नाहींशी करून सामुदायिक भाडवल पद्धति असणें किती जरूर आहे व त्याकरिता चळवळींतील कार्यकर्त्यांवर किती मोठी जबाबदारी आहे हेंहि सागितलें त्याचप्रमाणें चळवळींत प्रामाणिकपणानें व निस्पृहपणें वागून आपण जें काम करतों तें मानमरातब मिळविण्यासाठी नसून आपण सर्व आपुलकीच्या भावनेनें संघटित शक्तीच्या जोरावर व सहकार्याच्या तत्त्वाला अनुसरून शेतकरी बधूंची उन्नति करण्यासाठी भाग घेत आहोंत, ही जाणीव ठेवून कळकळीनें या चळवळीचें मूल ध्येय साधण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांवर व पच कमिटीच्या सभासदावर कशी पडत आहे याचें त्यानीं स्पष्टपणें विवरण केलें

हल्लींची सोसायट्याची परिस्थिति लक्षात घेऊन दुष्काळाचे निवारणार्थ सभासदाच्या वसुलीचे व त्यांना द्यावयाचे नवीन कर्जाचें धोरण ठरविणें, तसेंच सोसायट्याचे ताब्यांत आलेल्या जमिनी परत करण्याबाबतची योजना, लॅड मॉर्गेज बॅंकेनें सोसायट्याचें सभासदास कर्ज देतेवेळीं ठेवावयाचें धोरण, पुरदर तालुक्यांत सहकारी पद्धतीवर खरेदी-विक्री सघ काढणें, सहकारी कायद्याचें कलम ५९ (२) अन्वयें सोसायट्याचे ताब्यांत लवादी कुळांच्या जमिनी देण्याबाबत त्वरित उपाययोजना करणें, बॅंकेनें सोसायट्याच्या कर्जावरील व्याजाचा दर कमी करणें' वगैरेबाबत महत्त्वाचे ठरावावर चर्चा होऊन ठराव पास करण्यांत आले.

श्री दाते, चितळे, पाडव, बापुसाहेब भानु, टिळेकर, निरगुडे, जगताप, मनोहर, इगळे वगैरे मडळींनीं चर्चेमध्यें प्रामुख्यानें भाग घेतला होता

श्री चितळे यानीं आलेल्या मंडळींचे व इतराचे इन्स्टिट्यूटतर्फे समयोचित आभार मानले आभारप्रदर्शक भाषण करताना, त्यानीं सहकारी चळवळींतील इन्स्टिट्यूटचें महत्त्व सागून चालू वर्षी सहकारी चळवळीसबधीं लोकजागृतीचें कार्य इन्स्टिट्यूटकडून फार उत्तम रीतीनें व जोरानें केलें जात आहे याबद्दल आनद व समाधान व्यक्त केलें.

सदर परिषद् यशस्वी करण्याचे कामीं पुरदर ता. को. सुपरवायझिंग यूनिअनकडून इन्स्टिट्यूटला अतिशय मदत झाली.

---

### पश्चिम खानदेश जिल्हा को इन्स्टिटयूट, धुळें

प. खा जिल्हा को इन्स्टिट्यूट, धुळें, ह्या सस्थेच्या विद्यमानें जिल्ह्यांतील को. सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग ता ५ मे ते २० मे पर्यंत चालून शेवटीं सेंट्रल एज्युकेशन बोर्डानें ता. २३ व २४ मे रोजीं परीक्षा घेतली. सदर वर्गाला ६५ विद्यार्थी हजर होते. ५२ उमेदवारानीं परीक्षेकरिता फॉर्म भरून पाठविले व त्यापैकीं ४६ उमेदवार परीक्षेस बसले.

सदर वर्ग व्यवस्थित रीतीनें चालविण्याचे कामीं मे. असि रजिस्ट्रारसो, खानदेश विभाग, व त्याचे हेडक्लार्क व इतर ऑफीसमधील अधिकारी, ऑडिटर्स, शेतकी खात्याचे अधिकारी, बॅंक इन्स्पेक्टर्स, सुपरवायझर्स, सब रजिस्ट्रार, स्पेशल रिकव्हरी ऑफिसर व इतर बिनसरकारी लोक यानीं सक्रिय सहानुभूति दाखविली व मनापासून हरएक प्रकारें मदत केली

सदर वर्गाचे वेळीं, भाषणाची व निबधाची चढाओढ लावून यशस्वी उमेदवारास तेरा रुपयाचीं निरनिराळीं दहा चांदीचीं पदकें बक्षीस म्हणून वाटण्यात आलीं.

ता. २५।५।३७ रोजीं प. खा जिल्हा को इन्स्टिट्यूटचे चेअरमन श्री. दामोदरराव गणपतराव पाटील याचे अध्यक्षतेखालीं बक्षीस समारभ होऊन त्यांच्या हातून यशस्वी उमेदवारास वरील सर्व बक्षीसें देण्यात आलीं.

---

### पूर्व खानदेश को. इन्स्टिटयूट

बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, शाखा जळगांव, तर्फे पचकमिटी ट्रेनिंग क्लासेस खालीलप्रमाणें भरविण्यात आले व सोसायट्याच्या पंचांना त्याचे कामाची व आपलेवर असलेल्या जबाबदारीची व वसुलीसबधीं जाणीव करून देण्यात आली.

| अ न | तारीख | ठिकाण | तालुका | सोसायट्या हजर | एकूण सभासद हजर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१-३ ३७ | नाद्रा | पाचोरे | १२ पैकीं ७ | ३८ |
| २ | २३ ३-३७ | तारखेडें | „ | १० पैकीं ७ | ४७ |

नाद्रा येथील वर्गाचे, श्री सखाराम दुला पाटील, चेअरमन नाद्रा सोसायटी, हे अध्यक्ष होते तारखेडें येथील वर्ग श्री के टी. पाटील, चेअरमन सेंट्रल को-आपरेटिव्ह बॅंक जळगाव, ह्याच्या अध्यक्षतेखाली भरला होता

## गुळुंब ( जि. सातारा ) येथील ग्रामसुधारणा

सातारा जिल्ह्यांतील वाई तालुक्यांत गुळुंब हें गांव ग्रामसुधारणा कार्यांत चांगलेंच पुढें आलेलें आहे. सदरहु गांवानें ता. २७।१।३६ रोजीं सहकारी सुखसंपत्तिसंवर्धक मंडळी स्थापन करून त्या संस्थेमार्फत ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या चळवळी चालविल्या आहेत. तरुणाकरितां रात्रीची शाळा गेल्या वर्षी ता. १।७।३६ ते १५।९।३६ पर्यंत चालविली व यंदाहि ता. १५।३।३६ पासून शाळेला सुरवात केली आहे व ती पेरणीचा हंगाम येईपर्यंत चालू राहील. स्वतः चेअरमन, श्री. बाळकृष्ण मारुती पाटील, हे शिकविण्याचें काम करतात. मुलांच्या शाळेच्या बाबतींतहि प्रगति प्रशसनीय आहे.

महिन्यांतून दोन वेळां गांवांतील सर्व रस्त्यांची व पडीक जागांची झाडलोट केली जाते. गेल्या आक्टोबर, १९३६ मध्यें रस्त्यांवर मुरूम व वाळू टाकली आहे व गांवच्या सार्वजनिक फंडातून गटारें बांधून घेतलीं आहेत. पाय विहिरीच्या पायऱ्या एप्रिल १९३६ पासून बंद करून तीन रहाट लोकल बोर्डाच्या मदतीनें लावले आहेत. विहिरींत परमॅंगनेट ऑफ पोटॅश बरचेवर टाकलें जातें. एकदां विहीर पूर्णपणें उपसून काढून स्वच्छ केली आहे. लोकलबोर्डाची औषधाची पेटी मिळवून जवळ जवळ २०० शेतकऱ्यांना औषधें व सल्ला फुकट दिला आहे.

सुमारें ३० शेतकऱ्यांनीं १२० पायली ज्वारीचें बीं चाळणीनें चाळून व गंधक चोळून पेरलें आहे. इटालियन बटाट्याचें बेणें गांवातच तयार करण्यांत यश मिळविलें आहे. इटालियन बटाट्याच्या बेण्याकरितां गांवातून दरसाल सुमारें ५,००० रुपये खेड, चाकण या भागात जात असत त्याची आतां बहुतेक बचत झाली आहे.

शेताच्या बांधाच्या बाबतींतील ६ तंटे व गावठाणातील जमिनीच्या बाबतींतील २ तंटे पंचांनीं आपसांत तडजोड करून मिटविले आहेत. शिमग्यात बीभत्स प्रकार न होऊं देतां मे. मामलेदारसाहेब, वाई, यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरवून कुस्त्या वगैरे खेळ करून उपदेशपर व्याख्यानें करविलीं. श्रीबहिरोबाच्या यात्रेच्या वेळीं तमाशे बंद करून पोवाडे, खेळ वगैरे करविले. व्यायाम मंडळांत ४० सभासद असून मंडळाचेंहि काम ठीक चाललें आहे निरनिराळ्या कामांकरितां शेतकी कमिटी, काटकसर कमिटी, शिक्षण कमिटी व आरोग्य कमिटी अशा कमिट्या नेमल्या आहेत.

गेल्या ता ६।११।३६ रोजी गव्हर्नरसाहेबांनीं गांवाला भेट देऊन केलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें आहे.

### जगांत सहकारी संस्थेचे सभासद किती आहेत ?

पांच-सहा वर्षांमागें आंतरराष्ट्रीय सहकारी संघास ४१ राष्ट्रें जोडलेलीं होतीं आणि त्या सर्वांचे मिळून १० कोटि सभासद होते. आतां ३८ राष्ट्रें संघास जोडलेलीं असून सभासदांची संख्या ६½ कोटि आहे. जर्मनी व इटली ह्यांचें संघाचें सभासदत्व काढून टाकण्यात आलें आहे आणि रशियांत सहकारी संस्था मोठ्या प्रमाणांत रद्द झाल्या आहेत, हें वर उल्लेखिलेली घट होण्याचें मुख्य कारण आहे.


जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**जनानी व मर्दानी कापड**
मिळण्याचें
खात्रीलायक एकच ठिकाण
**माधव सोमण ब्रदर्स,**
लक्ष्मीरोड, पुणें. २

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

**फाळणा** दरसाल मूल नये म्हणून आमचें इच्छा गर्भ संभव औषध घ्या व संततिनियमन करा. औषध बंद केलें कीं, मुलें होतात. महिन्यांतून एकदांच घ्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट. ख. नि
गद्रे फिजीशिअन, खांडवा सी. पी.

**S. B. JOSHI & Co.**
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०५—६ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७-१० |
| ४% १९४३ ... .. .. | १०७—० |
| ३½% बिनमुदत ... .. ... | ९५-१३ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६—० |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्याचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३८—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३–१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५२७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १२९—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु. ४ आ. ) | ९१०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१—९ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १४२५—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १५१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, १७ रु. ८ आ.) | १७७—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. रु. ६) | ३५४—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १६१७—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३४–१२–६ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयांस | ५२–११–० |

**Ardomix** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय. एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगांवर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गळपळणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरे करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे. ट ख. १२ आणे निराळा. गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**
**३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर**

एजन्सीज.—

मुंबई—यशवंत दत्तात्रय गाडगीळ, फणसवाडी, मुंबई २.
धामणगाव—मे भागवत ब्रदर्स, धामणगांव, वऱ्हाड
हरदा—चौथाजी तुळशीराम आणि सन्स, हरदा, सी पी.
खानदेश—डॉ जी. एन महाजन, मोठें वाघोदे, खानदेश.

**दी सनशाइन इन्शुअरन्स लि.**

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरतां पगारी एजंट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस : ३३४ गणेश पेठ, पुणें

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोमाफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दांतेवाडी' ६१५ सदाशिव पेठ



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी

### मुलांचें हायस्कूल, पुणें शहर

उन्हाळ्याच्या सुटीनंतर शाळा गुरुवार तारीख ३ जून १९३७ रोजीं ११-१५ ला भरेल. नवीन नावें तारीख २५ मे पासून दाखल केलीं जातील. तरी ज्यांना नवीन नावें घालावयाचीं असतील त्यानीं आपल्या पूर्वीच्या शाळेच्या दाखल्यासह समक्ष भेटावे. विद्यार्थ्यांची नियमित संख्या घ्यावयाची असल्यामुळें विद्यार्थ्यांनीं त्वरा करावी

शाळेची कचेरी सकाळीं ८–३० ते १०–३० उघडी राहील

म ए सोसायटी, पुणें } व्यवस्थापक

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी

### भावे प्राथमिक शाळा, पुणें शहर

उन्हाळ्याच्या सुटीनंतर शाळा गुरुवार तारीख ३ जून १९३७ रोजीं ११-१५ ला भरेल. नवीन नावें तारीख २५ मे पासून दाखल केलीं जातील तरी ज्याना नवीन नावें घालावयाची असतील त्यानीं आपल्या पूर्वीच्या शाळेच्या दाखल्यासह समक्ष भेटावे विद्यार्थ्यांची नियमित संख्या घ्यावयाची असल्यामुळें विद्यार्थ्यांनी त्वरा करावी

शाळेची कचेरी सकाळीं ८–३० ते १०–३० उघडी राहील.

म. ए. सो. भावे प्राथमिक शाळा, पुणें २. { ल वा भावे, सुपरिंटेंडेंट

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books
(2) We supply Government of Bombay and Government of India publications
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals
(4) We procure any book published any where and supply it at publisher's price.

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices




## न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ,

रविवार पेठ, सराफ

बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ९ जून, १९३७ अंक २३

## Sir Parashurambhau College, Poona 2

The College opens for the academical year 1937–38 on Monday, the 21st June 1937. Students should secure their admission early by enrolling their names in the College office between 12 ( noon ) and 3 P.M. from the 7th of June onwards. Applications for addmission to the Residency should be made to the Rector. There is accommodation for Ladies also in a newly built separate Residency. Applications should be addressed to the Resident Warden, (Mrs. Sumitrabai Kerkar ) Hostel for Ladies, Sir Parashurambhau College, Poona 2. Provision has been made for teaching Ardhamagadhi, French, Persian and Pali. There are many attractive scholarships and prizes in all classes and particularly to first-class students in Inter & B. A.

For particulars see College prospectus, 1937, which is supplied free on application.

R. D. KARMARKAR,
Principal.

Sir Parashurambhau College.
26th May, 1937.

## "नवीन फॅशनचे चित्ताकर्षक रंग, मोहकपणा व टिकाऊपणा"






हे मुख्य गुण ज्या मालांत आहेत ती टिकेकरीच हें कोणीही कबूल करील. मग दुसरा माल पहाण्याचे भानगडींत तरी कां पडता ! पोस्टेजकरितां १॥ आण्यांचीं तिकीटें पाठवा. म्हणजे मोफत नमुने घरबसल्या येतील व चालू फॅशनची कोणतीं पातळें त्याची कल्पना देतील !

( डिपॉझिट घेऊन एजन्सी देणें आहे. तरी गरजूंनीं अवश्य चौकशी करावी.)

दि टिकेकर टेक्स्टाइल मिल लि., टिकेकर वाडी.

दि टिकेकर टेक्सटाईल मि. लि., पोस्ट टिकेकरवाडी, सोलापूर

## FERGUSSON COLLEGE, POONA

Opens on 21st June 1937. Accommodation being limited to 1200 undergraduates, students should apply to the Principal in time for admission ( both to the classes and the Hostel ) on prescribed forms with the necessary fee. Admissions will be granted from 7th June on working days ( 12 noon to 3 P. M. ).

## K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८२,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रक्कम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठी पत्र-व्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्.

## विविध माहिती

### बाजारभाव वाढविण्याकरिता पिकाचा नाश

जगातील कॉफीच्या एकूण उत्पादनापैकीं शेकडा ७० इतकी कॉफी एकट्या ब्राझील देशांत तयार होते मालाच्या बाजार भावाचें नियंत्रण करण्याकरिता तेथील सरकार तयार झालेल्या कॉफीपैकीं शेकडा ३० इतक्या पिकाचा नाश करवतें.

### ग्रेटब्रिटनची औद्योगिक प्रगति

गेल्या शंभर वर्षांमध्यें ग्रेटब्रिटनची प्रगति कशी होत आली आहे, हें खालील आकड्यांवरून स्पष्ट समजून येईल.:—

| वर्ष | राष्ट्रीय कर | लोकसंख्या | आयात निर्गत | रेल्वेरस्ते | कोळशाचें उत्पादन | कापसलोढ |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु | | रु | मैल | को. टन | ल. ट |
| १८३७ | ६२ को. | २ को ६७ ल | १३० को | ५४० | ६½ | २३ |
| १९३६ | ९८३ ,, | ४ को ७१ ल | १,६७० ,, | ३६,८६६ | २२¾ | १७३ |

### लाहोर येथील औद्योगिक प्रदर्शन

येत्या वर्षाचे अखेरीस लाहोर येथें एक मोठें औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचा पंजाब सरकारचा विचार असून त्याकरिता १½ लक्ष रुपये खर्च येईल असा अंदाज आहे हिंदुस्थानातील इतर प्रांतामधील व परदेशातील सरकारास प्रदर्शनामध्यें माल पाठविण्याविषयीं विनंति करण्यात येईल

### वृत्तपत्राच्या कंपनीचा प्रचंड नफा

वृत्तपत्रें व मासिकें चालविणाऱ्या "अलाइड न्यूजपेपर्स लि " ह्या ब्रिटिश कंपनीस गेल्या वर्षी १½ कोटि रुपये नफा झाला, त्यातून भागीदारांस ९ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यांत आलें. हिंदी वृत्तपत्रकर्त्यांस ही सुस्थिति स्पृहणीय वाटेल.

### नवा ब्रिटिश कर तहकूब झाला

मागच्या प्रधान मंडळातील फडनवीस, मि चेंबरलेन, ह्यांनीं सुचविलेली वाढत्या नफ्यावरील कराची योजना सरकारनें मागें घेतली असल्याचें, त्यानींच नवीन मुख्य प्रधान ह्या नात्यानें पार्लमेंटांत जाहीर केलें आहे. ह्या कराच्या व्यवहार्यतेविषयीं व्यापारी वर्गानें शंका व्यक्त केली होती.

### पंजाबमधील पाणीपुरवठ्याची योजना

मिनावली जिल्ह्यामधील जमिनीस पाणी पुरविण्याकरितां सिंधु नदीवर धरण बांधण्यात यावयाचें आहे. ह्या योजनेवर सुमारें ४ कोटि रु खर्च होतील हवेली बहादुर शहाचे उत्तरेस आठ मैलावर झेलम नदी अडवून कालवे काढण्याची योजनाहि निश्चित झाली आहे. ह्या 'हवेली ' योजनेस ५ कोटि रु. खर्च येईल

### इतिहासाचें चुकीचे चित्रीकरण

जर्मनी व फ्रान्स ह्या दोन देशाचें आज कित्येक पिढ्याचें वाकडे आहे. ह्या देशांत घडलेल्या प्रसंगाचें चित्रीकरण प्रत्येक राष्ट्र आपल्या स्वतःच्या समजुतीप्रमाणें करीत असतें व त्यामुळें सहाजीकच ऐतिहासिक सत्यावर पूर्वग्रहाचें वेष्टन चढतें. जर्मनी व फ्रान्स ह्या देशातील इतिहासाच्या शिक्षकांनीं एकत्र विचारविनिमय करून अशीं विरोध स्थळें शक्य तेवढीं कमी केलीं आहेत. सुमारें ३५ ऐतिहासिक प्रसंगासंबंधीं त्यांचेमध्यें समजूत पटली आहे.

### कलकत्ता ट्रामवेज लि

वरील कंपनीची वार्षिक सभा गेल्या महिन्यात लंडन येथें सर जिऑफ्रे क्लार्क ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. कंपनीनें आठ टक्के दरानें डिव्हिडंड वाटलें आहे.

### मुंबई ते राजकोट विमानानें प्रवास

मुंबई ते काठेवाड विमानाची वहातूक करणाऱ्या "एअर सर्व्हिस ऑफ इंडिया लि " च्या कामास सुरवात झाली आहे कंपनीच्या विमानाचें पहिलें उड्डाण ता ३१ मे रोजीं झालें.

### सर सी व्ही रमण व बंगलोर इन्स्टिट्यूट

बंगलोर येथील सायन्स इन्स्टिट्यूटचें गव्हर्निंग कौन्सिल व इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर सर चंद्रशेखर रमण ह्यामध्यें अत्यंत तीव्र स्वरूपाचे मतभेद उपस्थित झाले असल्याकारणानें सर रमण ह्यास आपला इन्स्टिट्यूटशीं असलेला संबंध सोडून द्यावा लागणार आहे असें समजतें

### मि एफ ई दिनशा ह्यांचें स्मारक

मुंबई येथील धनाढ्य व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांतील एक नेते मि एफ ई. दिनशा हे गेल्या वर्षी निवर्तले त्यांचें कायम स्मारक करण्याकरितां नेमलेल्या कमिटीनें २ लक्ष रु. जमविले असून ती अजून १ लक्ष रु. मिळविणार आहे ह्या रकमेंतून, व्यापारविषयक व आर्थिक प्रश्नासंबंधाच्या पुस्तकाचा एक संग्रह स्थापन करण्याचें कमिटीनें योजिलें आहे.

### सर लल्लुभाई सामळदास स्मारक

सहकारी चळवळीचे एक पुढारी आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या क्षेत्रातील एक नेते, कै. सर लल्लुभाई सामळदास, ह्यांचें स्मारक करण्याचें मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें ठरविलें आहे मुंबईच्या उपनगरांत एक हॉल व लायब्ररी आणि इलाख्यातील वेगवेगळ्या विभागांतल्या खेड्यांतील सहकारी सोसायट्याकरितां इमारती कै. सर लल्लुभाईंचे स्मरणार्थ उभारण्यात यावयाच्या आहेत, अशी योजना असल्याचें समजतें.

### चहाच्या निर्गतीचा हिंदुस्थानचा वाटा

१९३७-३८ सालामध्यें हिंदुस्थानातून ३२,८५,२६,१३३ पौंड चहाची निर्गत होण्यास मंजुरी असल्याचें हिंदुस्थान सरकारच्या गॅझेटात जाहीर झालें आहे

### सिंधमधील लाचलुचपतीस आळा घालण्याचा प्रयत्न

सिंध प्रांतामधील सरकारी नोकरांत प्रचलित असलेल्या लाचलुचपतीच्या प्रकारांचा जाहीर उल्लेख तेथील गव्हर्नरांनीं आपल्या एका भाषणांत मागेंच केला होता ह्या प्रकारास आळा घालण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी पी डब्ल्यू डी, पोलीस व न्याय ह्या तीन खात्यांकरिता स्वतंत्र बिनसरकारी कमिट्या नेमण्याचें ठरलें आहे.

### पोस्टखात्याच्या उत्पन्नांत वाढ

एप्रिल १९३७ मध्यें गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या मानानें पोस्ट व तार खात्यास १२ लक्ष रु. ज्यास्त उत्पन्न झालें ही वाढ अशीच वर्षभर चालू राहील, अशी अपेक्षा आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| २३-५-३७ ते २८-५-३७ | १९,२३,९८८ |
| २९-५-३७ ते ५-६-३७ | ४,६१,६९१ |
| २१-९-३१ ते ५-६-३७ | २,९७,९९,८८,४५३ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २७८ | ८ सिव्हिल सर्व्हिस परीक्षा व हिंदी उमेदवार .. | २८४ |
| २ उद्योगदिन ... ... | २७९ | ९ राष्ट्रीय शिक्षण मंडळाचें आयुर्वेद शिक्षणाचें कार्य | २८५ |
| ३ हें सर्व सोनें कोठें गडप होतें ? ... ... | २७९ | १० शि प्र म चें स्कूल ऑफ कॉमर्स ... | २८७ |
| ४ म्हैसुरांत विजेची वाढली मागणी ... ... | २८० | ११ यंत्रसामुग्रीची आयात | २८७ |
| ५ स्फुट विचार... . शेअर बाजाराचे चालक जागे झाले—धंदेशिक्षण आणि बेकारी-कागदावरील जकात कमी करा—हिंदुस्थानातील शेतीस पाणीपुरवठा | २८० | १२ "मराठी सेंटर" चें नवें कार्यक्षेत्र ... ... | २८८ |
| ६ नगर रचनेच्या कायद्यात दुरुस्ती .. . | २८२ | १३ जाहिरातीमधील परका शब्द ... ... | २८८ |
| ७ पुणें येथील औद्योगिक दिन | २८३ | १४ मुंबई इलाख्याचें शेतकी खातें ... ... | २८९ |
| | | १५ कलकत्त्याची वीज कंपनी | २८९ |
| | | १६ निवडक-बाजारभाव | २९० |
| | | १७ श्री नां दा ठा महिला विद्यापीठाचें कॉलेज, पुणें | २९० |



# अर्थ

बुधवार, ता ९ जून १९३७


## उद्योगदिन

राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रश्नास व चळवळींस प्रोत्साहन मिळावें ह्या हेतूनें त्या संबधात "दिन" पाळण्याची प्रथा अलीकडे पडली आहे. अशा प्रश्नाचे व विषयाचे बाबतींत समाजात जागृति व आस्था उत्पन्न व्हावी हा उद्देश सदरहु प्रथाताचे मुळाशीं असतो. औद्योगिक प्रगतीचें महत्त्व हिंदुस्थानास व विशेषतः महाराष्ट्रास किती आहे हें सांगावयास नको. तथापि, ह्या संबधात जागृति व संघटना ह्याचें कार्य अजून व्हावयाचें आहे. त्याचें महत्त्व लक्षांत घेऊन येथील झारापकर टेलरिंग कॉलेजच्या चालकानीं उद्योग-दिन साजरा करण्याचा उपक्रम होण्यासाठी मेहनत घेतली हें अभिनंदनीय आहे ह्या कामीं त्यानीं औद्योगिक प्रगतीविषयीं आस्था व सहानुभूति वाटणाऱ्या संस्था व व्यक्ती ह्यांचें सहकार्य व मान्यता मिळवली आहे. दिन साजरा करणें म्हणजे प्रचारकार्य होय आणि त्यास शैक्षणिक महत्त्व असतें, ही गोष्ट ध्यानात बाळगली जाऊन उद्योग-दिनाच्या उपक्रमाचा उपयोग व्यवस्थित, भरीव व परिणामकारक रीतीनें होणें आवश्यक आहे. पुढील कार्यक्रमाची दिशा निश्चित करणें व ती योजना पार पाडणें ह्या संबंधानें झारापकर टेलरिंग कॉलेजात भरलेल्या सभेंत अध्यक्षांनीं सूचना केली आहे तिचा योग्य विचार होईल अशी आम्हांस आशा आहे.

धंदेशिक्षणाच्या महत्त्वाचें प्रतिपादन सर तेज बहादुर सप्रू ह्यानीं इंग्लंडमध्यें एका भाषणात नुकतेंच केलें, त्याचा परामर्श आम्हीं आज दुसरीकडे घेतला आहे. व्यावहारिक शिक्षणाबरोबर हिंदी उद्योग-धंद्यांचा विस्तार होणें कसें अगत्याचें आहे हें तेथें आम्हीं दाखविलें आहे. औद्योगिक प्रगति झाल्यावांचून हिंदी बेकार तरुणांस पोटापाण्याचा व्यवसाय मिळणार नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. नाहींतर बेकाराचा प्रकार बदलेल पण बेकारी नाहींशी होणार नाहीं. पुण्यांत उद्योग दिन साजरा करण्याचा उपक्रम गेल्या आठवड्यांत झाला, त्याचें वरील दृष्टीनेंच महत्त्व आहे. कित्येक तरुणांनीं निराशामय परिस्थितीस तोंड देऊन उद्योगधंद्याचे नवीन मार्ग कसे काढले ह्या विषयींचा स्वतःचा अनुभव त्या कार्यक्रमांत अनेक वक्त्यानीं निवेदन केला, तो स्फूर्तिदायक होता. पुरुषाचे व स्त्रियांचे धंदे, हस्त-व्यवसाय व व्यापार ह्या विषयींचें शिक्षण, पोटापाण्याचे नवे मार्ग शोधून काढण्यास लागणारी कल्पकता व ते यशस्वी होण्यास आवश्यक असलेली चिकाटी आणि प्रगतीचे बाबतींत जनतेकडून उत्तेजन व सहाय मिळण्याची आवश्यकता ह्या मुद्यांवर भर देणारीं व आर्धीं केलें मग सांगितलें ह्या प्रकारचीं स्वानुभवावर आधारलेलीं तीं निवेदनें होतीं आणि म्हणूनच तीं स्फूर्तिदायक व आशाजनक वाटलीं

उद्योग दिनाचा उद्देश व कार्य आणि औद्योगिक उन्नतीसंबधाची महाराष्ट्राची सद्यःस्थिति ह्याचें प्रो काळे यानीं आपल्या अध्यक्षीय भाषणात सोपपत्तिक व सोदाहरण विवेचन केलें. व्यावहारिक शिक्षण आणि धंदे-व्यवसायाचा विस्तार ह्याचा निकट संबंध आहे आणि केवळ धंदेशिक्षणानें काम भागणार नसून कारखाने, लहान सहान उद्योग, मालाच्या विक्रीच्या कार्यक्षम व्यवस्था ह्याच्या बाबतींत एकसमयावच्छेदेंकरून प्रगति झाली पाहिजे ह्या मुद्यावर त्यानीं जोर दिला. समाजाची बदलती अभिरुची पाहून गिऱ्हाइकाचें समाधान करण्याचे फायदेशीर मार्ग तरुणानीं शोधून काढिले पाहिजेत आणि त्यांच्या ह्या उद्योगास समाजानें झीज सोसूनहि सहाय दिलें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें कोणत्याहि धंद्यांत उमेदवारी करून त्याचें ज्ञान मिळवणें महत्त्वाचें असतें आणि ह्या पूर्व तयारीस तरुणानीं कंटाळतां कामा नये. त्याचप्रमाणें, धंदेवाल्यानीं होतकरू तरुणास उत्तेजन देण्यात कसूर करू नये ह्या बाबतींत उद्योगदिन समारंभाचे प्रसगीं देण्यात आलेली माहिती उत्तेजनकारक होती, तिचा प्रो. काळे ह्यांनीं समाधानपूर्वक उल्लेख केला आणि स्त्रियासाठीं धंदेशिक्षण देण्याची सोय सेवासदनांत करण्यात आली आहे तिच्या बद्दल त्या संस्थेचें अभिनंदन केलें. उद्योगदिनाच्या उपक्रमास स्थायी स्वरूप देण्याचा आणि तो शक्य तितका अधिक उपयुक्त करण्याचा प्रयत्न आतां झाला पाहिजे

## हें सर्व सोनें कोठें गडप होतें ?

जगांतील खाणींमधून, त्याची किंमत वाढल्याकारणानें, सोनें अधिक बाहेर निघत आहे आणि हिंदुस्थानामधून होणाऱ्या सोन्याच्या निर्गतीचा प्रवाह सारखा चालूच आहे. हें सगळें सोनें जातें कोठें व त्याचें होतें तरी काय हा प्रश्न सहजच उद्भवतो. सोन्याचा जागतिक पुरवठा वाढला असतां त्याचा उपयोग कोणी तरी करीत असलें पाहिजे, तो कोण व कसा करतो, ह्या प्रश्नाचें एक उत्तर, प्रमुख राष्ट्राच्या मध्यवर्ती बँकामधील सुवर्णनिधीमध्यें गेल्या सात वर्षांत पुष्कळ वाढ झाली आहे, तींत सापडतें राष्ट्रीय चलनाची किंमत उतरवली असल्यानें सोन्याची किंमत चढली आहे, म्हणून राष्ट्राच्या मध्यवर्ती बँकातील सुवर्णनिधीची किंमत आज फुगलेली दिसेल, एवढ्यासाठीं, त्या निधींची दर्शनी किंमत न पहातां त्यांमधील सोन्याचें वजन किती वाढलें आहे, हें पाहिलें पाहिजे. सोन्याच्या वजनाचे आकडे ह्याप्रमाणें विचारांत घेतले तर मध्यवर्ती बँकानीं आपल्या सुवर्ण-संचयात केवढी मोठी

भर घातली आहे, ह्याची यथातथ्य कल्पना येते. सात प्रमुख राष्ट्रीय मध्यवर्ती बँकांतल्या सुवर्णनिधीच्या वजनाचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत, ते बोधप्रद आहेत'—

बँकाच्या सुवर्णनिधींत वाढ

| राष्ट्रीय मध्यवर्ती बँक | किती लक्ष औंस वजन | | |
|---|---|---|---|
| | १९२९ | १९३१ | १९३६ |
| इंग्लंड | ३४० | २८० | ७४० |
| अमेरिका | १,३७० | १,४५० | ३,२२० |
| फ्रान्स | ७९० | १,२९० | ७७० |
| जर्मनी | २६० | ११० | ८ |
| हॉलंड | ९० | १७० | १४० |
| बेल्जम | ८० | १७० | २१० |
| स्वित्सर्लंड | ५० | २१० | १९० |

फ्रान्सचा सुवर्णसचय कमी झाला आहे आणि जर्मनीचा बहुतेक नाहींसा झाला आहे, बाकीच्या पाच राष्ट्राच्या मध्यवर्ती बँकानीं आपला सुवर्णनिधी वाढवला आहे, असें वरील कोष्टक दर्शवितें त्याचा एकूण वाढावा सुमारें २२ कोटि औंसांचा आहे १९३० ते ३६ ह्या सालात जगाच्या खाणींतून १८½ कोटि औंस सोने बाहेर निघालें आणि हिंदुस्थानातून सुमारें ४½ कोटि औंस निर्गत झालें. सोन्याचा हा दुहेरी पुरवठा अमेरिका, इंग्लंड इत्यादि पाच राष्ट्रांनीं आपल्या संग्रहात टाकला. पाच-दहा कोटि औंस सोनें हुंडणावळीच्या सरक्षणासाठी त्यानीं निर्माण केलेल्या निधीमध्यें आहे, तें ह्याशिवाय निराळेंच. महाग झालेलें सोनें ठराविक दरानें विकत घेऊन तें पचवण्याचें मध्यवर्ती बँकांचें सामर्थ्य मर्यादित आहे आणि वास्तविक पहातां, सोन्याचा एवढा पुरवठा त्यांस मिळाला असतां त्यानीं सोन्याची किंमत कमी करणें हें सरळ होईल. परंतु असें केलें असता जगाच्या बाजारास धक्का बसेल अशी त्यास भीति वाटत आहे आणि म्हणून सोन्याच्या अजीर्णावर सौम्य उपाय योजून पहाण्याचा प्रयत्न होत आहे. आतरराष्ट्रीय आर्थिक घटनेची प्रकृति बिघडली असतां तिच्यात विशेष सुधारणा होईपर्यंत असले जुजबी उपाय परिणामकारक होतील असें दिसत नाहीं.

### म्हैसुरांत विजेची वाढती मागणी

म्हैसूर सस्थानामध्यें शिवसमुद्रम् येथें कावेरी नदीचे धबधब्याच्या सहाय्यानें वीज निर्माण करण्यात येते ४६ हजार अश्वशक्तीचीं यत्रें तेथें बसविण्यात आलीं आहेत तथापि, सस्थानात विजेच्या सहायानें चालणारे अनेक लहानमोठे कारखाने आता स्थापन झालेले असल्याकारणानें शिवसमुद्रम् येथील विद्युतपुरवठा कमी पडू लागला आहे. हा पुरवठा कसा वाढवावा, ह्यासबधीं सस्थानचें सरकार विचार करीत आहे, [ १ ] शिवसमुद्रम् येथील यत्रसामुग्री वाढवावी, [२]शिमशा नदीचें पाणी साठवून पॉवरहाउस बाधावें अगर [३] शिमोगा येथील गिरसप्प्याचे धबधब्याचा उपयोग करून घ्यावा ह्याविषयीं साधकबाधक चर्चा चालू आहे. कावेरी नदीच्या पाण्याचे उपयोगाबद्दल म्हैसूर संस्थान मद्रास सरकारास दरसाल २० हजार रुपये देत असतें. १९४० च्या सुमारास अजमासें ५६ हजार अश्वशक्तीच्या विजेस सस्थानांत मागणी येईल, त्याची तरतूद करण्यास आजपासूनच लागणें जरूर झालें आहे शिवसमुद्रम् येथें ४०० फुटांवरून पाणी खाली येतें, शिमशा येथें ६२० फुटावरून तें खाली घेता येईल, व ह्यामुळें शिवसमुद्रम् येथें १ युनिट वीज निर्माण करतां येईल तेवढ्याच खर्चांत शिमशा येथें १⅔ यूनिट वीज तयार होऊं शकेल

## स्फुट विचार

### शेअर बाजाराचे चालक जागे झाले

मुंबईच्या शेअर बाजारात चालणाऱ्या जुगारी स्वरूपाच्या व्यवहाराचें व अनेक लोकाच्या होणाऱ्या फसगतीचें विवेचन आम्हीं दोन आठवड्या मागच्या अग्रलेखात केलें होतें आणि त्या संबधात सावधगिरीची सूचना केली होती. वरील प्रकारच्या व्यवहारांस विशेष अनिष्ट स्वरूप प्राप्त झाल्याची जाणीव होऊन शेअर बाजाराच्या सचालकानीं आता आपल्या संस्थेच्या क्षेत्रात चालणाऱ्या उलाढालीसबधाचे नियम घट्ट करण्याचें ठरविलें आहे सस्थेचे सभासद व त्याचे अधिकृत कारकून ह्यांनीं आपले व्यवहार बाजाराच्या व्यवस्थापकानीं पुरविलेल्या वह्यामध्यें रीतसर दाखल केलेच पाहिजेत असा निर्बंध आता घालण्यात आला आहे. ह्या नियमास सोडून जे व्यवहार होतील त्याचे संबधांत वांधे उपस्थित झाल्यास संचालक मंडळ त्याचेकडे ढुंकूनहि पहाणार नाहीं, असें त्यानें निक्षून सागितलें आहे अनधिकृत व बेजबाबदार रीतीनें सट्टे होऊन त्याचे परिणाम जनतेस भोगावे लागूं नयेत, हा वरील निर्बंधाचा उद्देश आहे शेअर बाजारात ज्या रोख्याची उलाढाल होणें मान्य झालें आहे त्याची अधिकृत यादी दररोज प्रसिद्ध होईल आणि मुंबईच्या शेअरबाजार संस्थेचा सभासद नसलेल्या दलालामार्फत केलेले सवदे व व्यवहार रद्दबातल समजले जातील अशी इशारत जनतेस देण्यात येईल. आपण दलाल आहों अशी जाहिरात देणाऱ्या दलालास बाजारात स्थान मिळणार नाहीं बाजार सस्थेचे सभासद नसून रोख्याचा व्यवहार दलाल ह्या नात्यानें करणाराचा लोकास उपद्रव होत असतो, त्याचें नियत्रण करण्याची आवश्यकता आजपर्यंत भासत होतीच ह्या मार्गानेंच व्यवस्थापक मंडळानें प्रस्तुतचे नियम घालून दिले आहेत.

### धदेशिक्षण आणि बेकारी

सर तेजबहादुर सप्रू यानीं ईस्ट इंडिया असोसिएशनच्या विद्यमानें लंडन येथें गेल्या आठवड्यात भाषण केलें, त्यात हिंदुस्थानातील सुशिक्षिताची बेकारी दूर होण्यास तरुणास उद्योगाचे मार्ग दाखवणें, मोठे, लहान व घरगुती धदे निर्माण करणें आणि यांत्रिक, व्यावहारिक व कृषिविषयक शिक्षण देणें ह्या गोष्टी अगत्याच्या आहेत असें सागितलें आजच्या हिंदी शिक्षण पद्धतीचा व सामाजिक जीवनाचा परस्पराशीं मेळ नसून त्या दोहोंची सागड घातली पाहिजे आणि विश्वविद्यालयाच्या शिक्षणक्रमाचा ज्यास उपयोग होणें शक्य नाहीं अशा तरुणांसाठी धदेशिक्षणाची सोय झाली पाहिजे असें त्यानीं प्रतिपादलें सर तेजबहादुर ह्याची विचारसरणी व त्याच्या शिफारसी हिंदुस्थानात आता परिचयाच्या झाल्या असून मुख्य अडचण आहे ती त्यास कृतीचें स्वरूप देण्यासबंधाची आहे. हिंदुस्थान सरकार व प्रातिक सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, विश्वविद्यालयें, शिक्षक, पालक, धंदेवाले, तरुण व सामान्य जनता ह्या सर्वांनीं सहकार्य करून निश्चयानें कामास लागल्यावांचून हा बिकट प्रश्न सुटावयाचा नाहीं. नवीन उद्योग धदे निघून त्यांमध्यें तरुणास काम मिळण्यास आर्थिक प्रगति होणें आवश्यक असल्यानें सरकारच्या औद्योगिक व व्यापार-विषयक धोरणाचा ह्या प्रश्नाशीं निकट सबंध येतो. सदरहू धोरण अनुकूल होण्याची वाट पहात राहून मात्र हिंदी

राष्ट्रास चालणार नाहीं आणि म्हणूनच लोकांनीं स्वावलंबनाच्या तत्त्वावर स्वत:च्या प्रेरणेनें व संघटनेनें शक्य ते उपाय योजले पाहिजेत.

### वृत्तपत्रांच्या कागदावरील जकात कमी करा

वर्तमानपत्रें छापण्यास योग्य असा कागद हिंदुस्थानांत तयार होत नाहीं, तो परदेशातून मागवावा लागतो ह्या कागदावर, त्याच्या किंमतीच्या मानानें, शेकडा २५ टक्के इतकी मोल-परिमाण ( ॲड् व्हॅलोरम् ) जकात आहे. सध्या, सदरहु कागदाच्या किंमती भरमसाट वाढल्या आहेत व त्यांचा बोजा वृत्तपत्रकारांच्या धंद्यास असह्य होऊं लागला आहे मूळ मालाची किंमत वाढली त्याबरोबर त्यावरील जकातहि प्रमाणशीर आपोआप वाढली आणि अशा रीतीनें वर्तमानपत्रकाराच्या अडचणींमध्यें भर पडली आहे. वर्तमानपत्रांतील पृष्ठांची संख्या कमी करणें त्याच्या चालकांस भाग पडलें असून, पत्रें चालू ठेवण्यासाठी नवीन खरेदी भलत्या दरानें करण्याची आपत्ति त्यांजवर कोसळली आहे. १९३५ च्या एप्रिलच्या मानानें चालू वर्षाच्या एप्रिल महिन्यात छपाईच्या कागदावरील सरकारी जकातीचें उत्पन्न ५० हजार रुपयानीं वाढलें आहे, ही एकच गोष्ट ह्या जकातीच्या आपत्तीकारक स्वरूपाची साक्ष पटवण्यास पुरेशी आहे. बाजारभाव स्थिर असताना कागदाच्या किंमतीच्या विवक्षित प्रमाणांत पट्टी आकारणें सयुक्तिक असलें, तरी किंमतीमध्यें भरमसाट वाढ झाली असतां, सदरहु पट्टीचा बोजा अपेक्षेच्या मानानें अवाच्या सवा होत आहे, इकडे सरकारचें लक्ष जाणें जरूर आहे. सध्याच्या परिस्थितींत, कागदावरील जकातीचा दर तत्काळ कमी होणें अगत्याचें आहे हें विस्तारानें सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं वर्तमानपत्राच्या वाचकाचेहि हितसंबध ह्या प्रश्नाशीं संबद्ध आहेत हें उघड आहे. वृत्तपत्रीय कागदावरची जकात उतरवल्यास इतर मालाचे बाबतींत अशीच मागणी करण्यात येईल, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे कागदाचे भाव इतक्या अनपेक्षित रीतीनें चढले आहेत कीं, खुद्द सरकारासहि त्यावरील जकातींच्या उत्पन्नात एकाएकीं झालेल्या वाढीबद्दल अचंबा वाटल्याखेरीज रहाणार नाहीं तेव्हां वर्तमानपत्रें करीत असलेलें शैक्षणिक व सामाजिक कार्य लक्षात घेऊन त्याच्या कागदाचे जकातीच्या बाबतींत, सर्व गोष्टींचा विचार करता, अपवाद करणें अन्यायाचें होणार नाहीं व त्यावर आलेल्या आपत्तीचें तातडीनें निवारण करणें सरकारचें कर्तव्यच ठरतें हिंदुस्थान सरकार ह्याबाबत अद्याप आकडे व माहिती जमा करीत आहे, असें समजतें. अधिक दिरंगाई न होतां, वर्तमानपत्राच्या कागदावरील जकात तत्काळ उतरविण्यात येईल, अशी आशा आहे

### हिंदुस्थानांतील शेतीस पाणीपुरवठा

१९३४-३५ सालीं (आकडे उपलब्ध असलेल्या ताज्या वर्षी) सबंद हिंदुस्थानात मिळून ५ कोटि ५३/४ लक्ष एकर जमिनीमधील पिकें पाण्याखाली होतीं २३/४ कोटि एकरांस सरकारी कालव्याचें व ३७ लक्ष एकरास खासगी कालव्याचें पाणी मिळालें ११/४ कोटि एकर जमिनीस विहिरींच्या पाण्याचा पुरवठा झाला आणि ६२ लक्ष एकरास तळ्याचें पाणी मिळालें. पाण्याखाली असलेल्या जमिनीची शतमानानें विभागणी पंजाब: २९% सयुक्तप्रांत: २१%, मद्रास १८%, मुंबई व बिहार आणि ओरिसा, प्रत्येकीं: १०% व इतर प्रांत १२%, अशी झाली. एकूण पिकांच्या मानानें पाण्याखालील पिकांचें प्रमाण पंजाबात शेकडा ५४, संयुक्त प्रांतात ३०, मद्रासमध्यें २८, मुंबई इलाख्यांत १६ व मध्यप्रांतात ४ असें पडतें ह्या पिकांत मुख्यत: तांदूळ, गहू, बार्ली, ज्वारी, बाजरी, मका व ऊंस ह्याचा समावेश होतो.


**भारतीय अर्थशास्त्र**

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो. दृ गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ५५०; किंमत पांच रुपये
प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल

**अर्थशास्त्र**

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो. दृ गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत तीन रुपये
ह्या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

अस्सल उंची मोत्यें टिकाऊपणाच्या गॅरंटीवर व अत्यंत कसोशीचे भावानें मिळण्याचें ठिकाण म्हणजेच
**मोतीवाले आपटे**
उंबऱ्या गणपतीनजीक, पुणें नं २

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें
**व्यापारी परीक्षा**—उन्हाळ्याचे सुट्टीनंतर नवीन वर्ग सुरू
मराठी शॉर्टहॅन्ड, टाइपरायटिंग, जमाखर्च, इन्कमटॅक्स, व्यापारी कायदा व इतर विषय शिकविले जातात [ त्र्यं स गोरे, चालक पुणें व्यापारी शाळा ] ७७३ सदाशिव, पुणें पुष्करणी हौदाजवळ

इनकम-टॅक्स कायदा वरचेवर बदलत आहे तरी इन्कम-टॅक्स भरण्यात बचत करण्यासाठीं
**बी. एल. ठोसर, पब्लिक अकौंटंट**
यांचेकडेच आपलें काम सोपवा
पत्ता:—१५५, रविवार पेठ, सोन्यामारुतीसमोर, पुणें.
ब्रँच ऑफिस —४९५-९७ काळबा देवी रोड, मुंबई २

**बालसन्मित्र**—मुलांना सन्मित्राप्रमाणें सदुपदेश करून हसत खेळत ज्ञानामृत पाजणारा, सुप्रसिद्ध बालवाङ्मय लेखक श्री पा ना मिसाळ यांच्या संपादकत्वाखालीं निघणारा, मुलांचा आवडता सोबती ( पाक्षिक ) बालसन्मित्र आपल्या मुलाच्या हातीं अवश्य द्या चालू सालीं बाललेखांक व दिवाळी अंक हे दोन खास अंक मिळून वेळोवेळीं मुलांना बक्षिसेंही मिळणार आहेत वार्षिक वर्गणी फक्त १८६ सहामाही ०११ नमुना मोफत
व्यवस्थापक—बालसन्मित्र, पो मालवण, जि रत्नागिरी

## मुंबई नगर रचनेच्या कायद्याच्या दुरुस्तीची आवश्यकता

( मागील अंकावरून समाप्त )

( १ ) प्रथम म्युनिसिपालिटीनें योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणें

( २ ) लोकांच्या हरकती मागविणें

( ३ ) योजना तयार करण्यास सरकारनें मंजुरी देणें

( ४ ) म्यु नें ड्राफ्ट योजना मंजूर करून ती प्रसिद्ध करणें व हरकती मागवून त्यांचा विचार करून सरकारकडे पाठविणें

( ५ ) ड्राफ्ट योजना सरकारनें मंजूर अगर नामंजूर करणें

( ६ ) आर्बिट्रेटरची नेमणूक करून त्यानीं पुन्हां ड्राफ्ट-योजनेची तपासणी करणें

( ७ ) आर्बिट्रेटर यांनीं दिलेल्या निकालावर विचार करण्याकरितां लवादमंडळाची नेमणूक करणें.

( ८ ) लवादमंडळाचा निकाल लक्षात घेऊन योजनेंत जरूर ते फेरफार करणें व सरकारकडे मंजुरीसाठीं पाठविणें

या सर्व गोष्टींमध्यें फार वेळ व श्रम जातात तेव्हां यांपैकीं कांहीं गोष्टी कमी करणें जरूर आहे आमचे मतें नगररचनेच्या योजनेचें सर्व काम सरकारी टाऊन प्लॅनिंग खात्याचे अधिकाऱ्याकडे देऊन त्याची नोकरी म्यु. कडे वर्ग करण्यांत यावी. प्रस्तुतच्या कायद्याप्रमाणें योजनेचा खर्च या जमिनीच्या वाढीच्या शेकडा ५० इतका मालकाकडून वसूल केला जातो व तो एकदम देणें शक्य नसल्यास हप्त्यानें व्याजानें घेतला जातो आहे. योजनेपैकीं बहुतेक खर्च जमिनींच्या मालकांकडून वसूल केला आहे. फारच थोडी रकम सरकार अगर म्यु खर्च करते. जर बिगर शेतसाऱ्याचें ओझें सरकारास कमी करता येणें शक्य नसेल तर मग खर्चापैकीं निम्मी रकम सरकारनें म्यु स नगररचनेच्या खर्चाकरितां मदत म्हणून यावी व निम्म्या खर्चापैकीं ½ रकम म्यु नें मदत म्हणून यावी व बाकीची रकम योजनेंतील मालकाकडून जेवढ्या वर्षांत योजनेंतील कामें पूर्ण होणार असतील तेवढ्या वर्षांत हप्त्यानें पण बिन व्याजानें यावी.

नगररचनेच्या योजनेंत कांहीं जागा सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें राखीव म्हणून ठेवण्यांत येतात परंतु त्यांचा उपयोग होण्याच्या दृष्टीनें बराच कालावधि लागतो. म्युनिसिपल मार्केटची योजना, शाळागृहें वगैरे गोष्टी जेवढ्या लवकर अमलांत येतील तेवढी नगररचनेची योजना जास्त लवकर यशस्वी होईल. कांहीं ठिकाणीं इमारतींचीं कामें लवकर होत नाहींत त्यामुळें प्रगति खुंटते अशी तक्रार आहे याकरितां योजना मंजूर झाल्यापासून ठराविक वर्षांचे आत हीं कामें होण्याची सक्ती योजनेमध्यें असावी

नगररचनेच्या योजनेप्रमाणें कामें करावयास व शहरातील निरनिराळ्या भागांसाठीं योजना आंखण्यासाठीं 'टाऊन प्लॅनिंग बोर्ड' असावें, त्यांत कांहीं म्यु चे प्रतिनिधी व कांहीं सरकारनें नेमलेले तज्ज्ञ असावेत व नगररचनेच्या योजनेबाबतचे सर्व अधिकार त्यांना द्यावेत यायोगें कामाचा उठाव व नवीन कल्पनां यांना वाव मिळून योजना यशस्वी होण्याची परिस्थिति निर्माण होईल

सध्याच्या काळात शहराचा विस्तार वाढत आहे व त्याच्यावर नियंत्रण असणें जरूर आहे हें कोणासहि मान्य करावें लागेल. परंतु तें नियंत्रण एकांगी असू नये. कोणत्याहि नगररचनेच्या योजनेमुळें जर मूळचे जमिनीचे मालक नामशेष होत असतील अगर त्यांचे परिस्थितींत फरक होत असेल तर त्याचा विचार करून योग्य त्या सुधारणा घडवून आणणें हें कोणाहि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अभिमान्याचें कर्तव्य आहे व याच दृष्टीनें आम्ही या लेखात ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा विचार व्हावा अशी विनंति आहे.


## The Willingdon College, Sangli.

Reopens for the new academic year on the 21st of June Registration of names will commence on the 7th June. The college provides for both Arts and Science courses in the first two years, for B A degree courses, pass and honours, and for post-graduate instruction About a hundred seats are available in the College Hostels Healthy surroundings, cheapness and efficiency are the special features of the College

The tuition fees are Rs 60 per term, and the room rent per term per student is Rs 12 for a double and Rs 15 for a single room Boarding charges come to about Rs 12 p m Further information can be had on application

Arrangements are made to secure accommodation for lady students in a well conducted hostel in Sangli

D. G. Karve,
Principal

## Deccan Institute of Commerce

( 20 years' standing )

Opens for the 1937-38 Session on Saturday the 26th June 1937 Students coached up for various Commercial Diploma and Certificate Examinations in Accountancy, Banking, Shorthand, Type writing Etc Courses suitable for Matriculates, Undergraduates and Graduates Classes in the morning and evening Prospectus free on application to

592/3 Budhwar Peth,
Opp New English School,
Poona
SECRETARY

## S. T. C. CLASS

**Camp Education Society, Poona 1.**

(Recognised by the Department of Education)

**For Teachers & Freshers**

The class starts work on 21st June 1937
Efficient staff & expert guidance.
Apply for prospectus to the Secretary

**P K ATRE,**
B. A., B T., T. D ( Lond ),
Principal.

## पुणें येथील औद्योगिक दिन

येथील सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजमध्यें ता १ जून १९३७ रोजीं उद्योग-दिन साजरा करण्यांत आला. या समारभाचें अध्यक्षस्थान प्रो. व्ही. जी. काळे ह्यानीं स्वीकारलें होतें. प्रथम ईशस्तवन झाल्यावर झारापकर टेलरिंग कॉलेजचे जनरल मॅनेजर श्री. आप्पासाहेब कदम म्हणाले:—"निरनिराळ्या वाङ्मयिक शिक्षणावर हजारो रुपये खर्च करून शेवटीं नौकरीसाठी वणवण हिंडण्यापेक्षां महाराष्ट्रातील तरूण निरनिराळ्या उद्योगधंद्यात शिरतील तर त्यांची आर्थिक स्थिति तर सुधारेलच व त्याशिवाय देशाचाही उत्कर्ष झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आम्हीं रात्रंदिवस उद्योगधंद्याचे क्षेत्रात वावरत असल्यामुळें तरुणांना बेकारीनिवारणार्थ कोणता योग्य मार्ग दाखवावा यावरच आम्ही विचार करीत असतों. उद्योगधंद्यांत शिरलेल्या निरनिराळ्या संस्थांनीं जर एकत्र जमून यावर विचार केला तर हा प्रश्न कांहीं अंशीं सुटेल. म्हणून आम्हीं ही उद्योगदिनाची कल्पना काढून त्याप्रमाणें निरनिराळ्या ४०-५० संस्थांचें सहाय मिळविलें.

बेकारदिन पाळून नैराश्यवाद उत्पन्न करण्यापेक्षां उद्योग-दिन साजरा करून तरुण वर्गांत आशावाद व उद्योगधंद्याविषयीं आवड उत्पन्न करणें हाच आमचा उद्देश आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत चालत आलेल्या शूद्र वृत्तीचा बीमोड करून वैश्य वृत्तीचा प्रसार व्हावा व महाराष्ट्र आर्थिकदृष्ट्या सपन्न झाला पाहिजे यासाठी असे उद्योग-दिन दरवर्षी सर्व महाराष्ट्रभर साजरे करण्यात आले पाहिजेत व अशा रीतीनें तरुणांचें लक्ष उद्योगधंद्यांकडे वेधलें पाहिजे"

नतर त्यांनीं पुढील १०।१२ संस्थांचीं सविस्तर माहिती सांगितली.

| संस्था | प्रतिनिधींचें नांव |
|---|---|
| झारापकर टेलरिंग कॉलेज, | प्रतिनिधी श्री टी. व्ही. (आप्पासाहेब) कदम |
| डॉ. गुणे यांचें स्पेसिफिक होम, | |
| के नाईक प्रीमियर टेलर्स, | |
| विणकर सहकारी औद्योगिक मंडळ | |
| भालचंद्र ज्योतिर्विद्यालय | |
| नारायणदया औषधालय मुबई. | |
| एडवर्ड स्टुडीओ | |
| एव्हरेस्ट स्टुडीओ | |
| गजानन पेंटिंग वर्क्स | |
| फडके पेंटर्स | |
| झारापकर इन्स्टिटयूट ऑफ फोटोग्राफी, मुबई. | |
| सायंटिफिक टॉय हाऊस | —श्री. जोगळेकर |
| ॲडल्ट एज्युकेशन लीग | —श्री. आपटे |
| कॉंग्रेस खादीभांडार | —श्री भोगीलाल जैनी |
| केसरी-मराठा संस्था | —श्री. आ. रा भट |
| स्कूल ऑफ कॉमर्स | —श्री मराठे |
| सेवासदन औद्योगिक शाखा | —श्रीमती मालतीबाई घारपुरे |
| मराठी सेंटर | —श्री. थत्ते |
| बालरंजन टॉय हाऊस | —श्री. जोशी |
| मेट्रो पब्लिसिटी सर्व्हिस | —श्री. तांबे |
| श्रीकृष्ण संगीत विद्यालय | —एक विद्यार्थी |
| धी सरस्वती कोचिंग क्लासेस | —श्री. टी.व्ही कदम |


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी

मॅनेजिंग एजंटस,

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड

११ बुधवार पेठ, पुणें नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. ( ट. ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

१२ वर्षे पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

★ महिंद्रकर ब्रदर्स ★

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.

बुधवार चौक, पुणें

## लंडनमधील सिव्हिल सर्व्हिस परीक्षा आणि हिंदी उमेदवार

इंडिअन सिव्हिल सर्व्हिसमध्यें भरती करण्यासाठीं इंग्लंडमध्यें व हिंदुस्थानात परीक्षा घेतली जाते. अनेक हिंदी तरुण विलायतेस जाऊन तेथील परीक्षेंत उत्तीर्ण होतात, व त्यामुळें नोकरीमध्यें युरोपिअनाचें प्रमाण सरकारास हवें इतकें ठेवता येत नाहीं. हिंदुस्थानात वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यांवर युरोपिअन अधिकारी मोठ्या प्रमाणात असल्यावाचून येथील राज्यकारभार नीट चालणार नाहीं, अशी समजूत ब्रिटिश सरकारनें करून घेतल्याकारणानें ब्रिटिश उमेदवारांनीं वार्षिक परीक्षेस बसावें म्हणून त्यास उत्तेजन देण्याचे प्रयत्न इंग्लंडमध्यें पद्धतशीर रीतीनें केले जात आहेत हिंदी तरुणास इंग्लंडमधल्या परीक्षेस बसण्यास आडकाठी नाहीं ह्या कारणानें तेथील परीक्षेंत उत्तीर्ण होणारात ह्याच तरुणाचें संख्याधिक्य होऊन युरोपिअन उमेदवार मागें पडतात परीक्षेस न बसलेल्या युरोपिअन तरुणाची सिव्हिल सर्व्हिसमध्यें नेमणूक करण्याचा तोडगा ह्या परिस्थितीवर सरकारनें काढला असून त्याचा परिणाम इंग्लंडमधील परीक्षास बसणाऱ्या हिंदी उमेदवारांची संख्या घटण्यात झालेला आहे आणि तो ब्रिटिश सरकारास इष्ट असाच आहे इंडिअन सिव्हिल सर्व्हिसमध्यें शिरू इच्छिणाऱ्या ४७१ उमेदवारांचीं नांवें इंग्लंडमध्यें चालू सालासाठीं दाखल झालीं आहेत त्यांमध्यें ३२२ युरोपिअन व १४९ हिंदी तरुण आहेत ह्या नोकरीकरिता दिल्लीमध्यें परीक्षा घेतली जाईल, तीमधील उमेदवार ह्याशिवाय निराळे असतील युरोपिअनाचीं ३२२ नांवें आहेत, त्यांत परीक्षेच्या द्वारानें नोकरींत शिरूं पहाणाराची संख्या १०० आहे. ८९ जण परीक्षेच्या व परीक्षेवांचून नेमणुकीच्या अशा दुहेरी द्वारानें आंत जाण्याची इच्छा करीत आहेत, व १३३ जणानीं नेमणुकीचा दरवाजा पत्करला आहे. म्हणजे, यंदा लंडनच्या परीक्षेस १८९ युरोपिअन व १४९ हिंदी उमेदवार बसणार आहेत १९३५ सालीं युरोपिअनाची संख्या ८३ व हिंदी तरुणाची २५१ होती आणि १९३६ मध्यें १४५ युरोपिअन व २४८ हिंदी तरुण लंडनच्या परीक्षेस बसले होते इंडिअन सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस अधिक युरोपिअन बसावे व त्या नोकरींत अधिक युरोपिअनाचा भरणा करतां यावा आणि लंडनच्या परीक्षेस बसणाऱ्या व तींत उत्तीर्ण होणाऱ्या हिंदी उमेदवारांची संख्या कमी व्हावी हा ब्रिटिश सरकारच्या नव्या योजनेचा हेतु सफल झाला आहे, हें वरील आकड्यावरून स्पष्ट दिसून येईल. परीक्षेवाचून नोकरींत शिरण्याची वाट युरोपिअनास मोकळी ठेवली असल्यानें युरोपिअन सिव्हिल सर्व्हंटाची संख्या अपुरी होण्याची भीति राहिली नाहीं.


## महिला पाठशाळा

श्री ना. दा ठा. महिला पाठशाळा, येरंडवणें, या संस्थेच्या कामाची सुरुवात उन्हाळ्याच्या सुटीनंतर सोमवार ता २१ जून १९३७ पासून होईल वसतिगृह २१ तारखेस सकाळीं ८ पासून सुरू होईल. तरी कॉलेजमध्यें व वसतिगृहामध्यें येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनीं खाली सही करणाराकडे अर्ज पाठवावे

फीचे दर खालीलप्रमाणें

रुपये ५ प्रवेश फी [ अर्जासोबत पाठविणें ]
रुपये ३० अध्यापन फी, प्रत्येक सहामाहीस [ आगाऊ देणें ]
रुपये ४ जिमखाना फी, प्रत्येक सहामाहीस [ आगाऊ देणें ]

याखेरीज वसतिगृहात राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना खालील रकम द्यावी लागेल.

रुपये १० डिपॉझिट [ प्रथम एकदाच अगाऊ भरावयाचे ]
रुपये १० खोलीभाडें दर सहामाहीस
रुपये ६ दिवाखर्च दर सहामाहीस [ अगाऊ देणें ]

फक्त भोजनखर्च दरमहा सुमारें १२ ते १५ रुपयापर्यंत सामान्यतः दरमहा २०-२२ रुपयापर्यंत विद्यार्थिनींचा खर्च भागू शकतो.
ता ३१-५ १९३७

प्रिन्सिपॉल,
श्री ना दा ठा महिला पाठशाळा
कर्वे रोड, येरंडवणें, पुणें नं ४

## S. P. Mandali's School of Commerce, Poona

The School will reopen for the 1937–38 session on the 21st June, 1937 to coach students for the **Government Commercial Diploma Examination** Admission from 7th June to 10th July 1937 between 7 A M and 9 A M on working days Admission fee Rs 5. Annual tuition fee Rs 80 Scholarships and free and half-free studentships available to deserving students Prospectus, sent free on application to the Superintendent S. P Mandali's School of Commerce N M. V High School Buildings Poona 2

N G NARALKAR,
Superintendent

## MARATHI CENTRE INSTITUTE, POONA

Secured *cent per cent* results this year in **Government Commercial Certificate Examination**
Students coached up in
SHORT-HAND, TYPEWRITING, BOOK-KEEPING & ACCOUNTANCY SHORT-HAND TAUGHT FREE
**Appy—MARATHI CENTRE,**
10 BUDHWAR, POONA.

त्वरा करा. नांवे नोंदवा
जेवणाची उत्तम सोय. **—न्यू प्रभाकराश्रम—** महिन्यांतून चार फीस्ट्स्
दर १२ रु सदाशिव पेठ गाय आळींतील श्रीराममंदिराजवळ मॅनेजर—न्यू प्रभाकराश्रम

## राष्ट्रीय शिक्षण मंडळाचें सतरा वर्षांतील आयुर्वेद शिक्षणाचें कार्य

(ले. वैद्य ना. व्यं जोशी, चिटणीस रा. शि. मंडळ, पुणें)

अलीकडे आयुर्वेदाची शास्त्रीयता व स्वतंत्र धंद्याच्या दृष्टीनें त्याची उपयुक्तता सर्वांस पटू लागल्यामुळें विद्यार्थ्यांचा कल या शास्त्राच्या शिक्षणाकडे वळू लागला आहे व चोहोंकडे या शास्त्राचें शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन झाल्या आहेत पुण्याच्या राष्ट्रीय शिक्षण मंडळानेंहि या दृष्टीनें आयुर्वेदाच्या अध्यापनाचें कार्य चालविलें आहे त्याचा गेल्या सतरा वर्षांचा अहवाल साराश रूपानें सादर करीत आहे.

**पूर्व वृत्तात.**—इ स १९२० च्या डिसेंबरमध्यें असहकारितेच्या चळवळींत सरकारी कॉलेजें सोडून आलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी टिळक महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. त्यामध्यें वाङ्मयाच्या शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी व्यापार, स्थापत्य वगैरे शाखा ठेवण्यात आल्या त्याच वेळीं भारतीयांचे प्राचीन वैद्यक शास्त्र जो आयुर्वेद त्याचें विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्यास आपल्या एका प्राचीन शास्त्रास उत्तेजन मिळून विद्यार्थ्यांनाहि स्वावलंबी बनविता येईल या हेतूनें आयुर्वेदाची शाखाहि सुरू करण्यात आली.

**आयुर्वेद शाखाः**—शिक्षणक्रमामध्यें आयुर्वेदाच्या संपूर्ण शिक्षणाबरोबर जरूर तेवढ्या पाश्चात्य शिक्षणाचा समावेश करून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आयुर्विद्या विशारद पदवीचा चार वर्षांचा अभ्यासक्रम नेमण्यात आला त्याप्रमाणें निरनिराळ्या विषयाच्या दृष्टीनें प्राचीन चरक, सुश्रुत, वाग्भट इत्यादि ग्रंथाचें सांगोपांग शिक्षण व त्याबरोबरच पाश्चात्य वैद्यकातील ॲनाटॉमी फिजॉलॉजी, मेडिसिन, सर्जरी वगैरे विषयांचेंहि शिक्षण देण्याची व्यवस्था केली. पुण्यातील प्रमुख वैद्य व डॉक्टर मंडळींनीं अध्यापनाची जबाबदारी आनंदानें स्वीकारली आरंभीं या शाखेकडे विद्यार्थी कमी होते पण पुढें या शाखेची उपयुक्तता व स्वावलंबी बनविण्याची पात्रता जशी पटू लागली तसा विद्यार्थ्यांचा भरणा या शाखेकडे अधिकाधिक होऊं लागला व इतर शाखा मागें पडून आयुर्वेद शाखेची वाढ होऊं लागली.

आरंभीं सर्व भर तात्त्विक शिक्षणावरच होता. प्रत्यक्ष शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणें म्युनिसिपालिटी व मिशन संस्था याच्या दवाखान्यामध्यें पाठवावे लागे. पण विद्यार्थ्यांची संख्या जशी वाढू लागली तशी प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोयीची आवश्यकता तीव्रतेनें भासू लागली म्हणून १९२५ सालीं अल्प प्रमाणांत रुग्णालयाची स्थापना करण्यात आली

**रुग्णालयः**—आरंभीं भाड्याच्या जागेंत सहा राहते रोगी, लहान शस्त्रक्रिया व दवाखाना एवढ्यापुरतीच व्यवस्था केली होती पण रोग्याची संख्या वाढत गेल्यामुळें ती व्यवस्था अगदीं अपुरी पडूं लागली व स्वतंत्र इमारत बांधून अधिक रोग्याची व्यवस्था करणें आवश्यक झालें. पुढें पुण्याचे प्रसिद्ध दानशूर शेट रा. ब हणमतराम रामनाथ यांनीं रुग्णालयाचें जीवदानाचें व ज्ञानदानाचें कार्य पाहून पन्नास हजार रुपयांची देणगी देऊं केली व चालकांनीं अहर्निश मेहनत करून आणखी पन्नास हजार रुपयाच्या देणग्या मिळविल्या. पुणें शहर म्युनिसिपालिटीनें इमारतीसाठी तीन एकर जागा देऊन चालू खर्चासाठी वार्षिक पांच हजार रुपये देण्याचें ठरविलें. या वाढत्या साधनामुळें रुग्णालयासाठीं सर्व साधनसामुग्रीनें समृद्ध अशी मोठी इमारत बांधण्यात आली व दात्याच्या इच्छेनुसार रुग्णालयाचें कार्य शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल या नावानें चालू झालें सध्या या हॉस्पिटलमध्यें चाळीस प्रवेशित रोग्यांची सोय असून बाहेरून औषधास येणाऱ्या रोग्याची संख्या २५० वर असते. सर्व तऱ्हेच्या शस्त्रकर्माची उत्तम सोय असून वर्षास ५०० वर शस्त्रक्रिया होतात विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था असून त्यांना येथें 'रोगनिदानचिकित्सा,' शस्त्रकर्म या विषयाचें प्रत्यक्ष शिक्षण भरपूर मिळतें. अशा रीतीनें सर्व साधनांनीं समृद्ध व निष्णात असा चालकवर्ग असलेलें आयुर्वेदीय रुग्णालय सर्व मुंबई इलाख्यांत हें एकच आहे.

**सूतिकागृह.**—यासाठीं स्वतंत्र इमारत बांधण्यात आली असून त्यामध्यें दहा सूतिकांची सोय केली आहे या विभागाचें काम तज्ञ अशा स्त्रीवैद्याचे देखरेखीखालीं चालतें यामुळें विद्यार्थ्यांना सूतिकाशास्त्राच्या प्रत्यक्ष शिक्षणाची चांगली सोय झाली आहे.

**शवच्छेदन शाला.**—हॉस्पिटलजवळ शवच्छेदन शाळेची इमारत बांधली असून तेथें स्वतंत्र डॉक्टराचे देखरेखीखालीं विद्यार्थ्यांना शवविच्छेदनपूर्वक शारीराचें शिक्षण देण्याची सोय केली आहे

**आयुर्वेद रसशाळाः**—विद्यार्थ्यांना औषधें तयार करण्याचें शिक्षण देणें व जनतेस शास्त्रोक्त औषधें पुरविणें या दुहेरी हेतूनें मंडळानें रसशाळा सुरू केली. पुढें या औषधाची उपयुक्तता लोकास पटून, मागणी वाढत्या प्रमाणात येऊ लागली व त्यासाठीं मोठ्या भांडवलाची उणीव भासूं लागली. म्हणून रसशाळेचें आयुर्वेद रसशाळा पुणें लिमिटेड या कंपनीमध्यें रूपांतर करून शेअर्स रूपानें भांडवल जमविलें असून औषधें निर्माण करण्याचें काम मोठ्या प्रमाणात चाललें आहे. या रसशालेमध्यें विद्यार्थ्यांना मात्रा, भस्में, आसवें वगैरे औषधी कल्पाचें प्रत्यक्ष शिक्षण देण्यासाठीं स्वतंत्र व्यवस्था केली आहे.

**प्रयोग शाळा.**—रसायनशास्त्र व पदार्थविज्ञान या विषयाच्या प्रत्यक्ष शिक्षणासाठी प्रयोगशालेची व्यवस्था केली असून तेथें स्वतंत्र तज्ञाकडून या विषयाचें शिक्षण देण्यात येतें.

**आयुर्वेदमहाविद्यालय.**—याप्रमाणें आयुर्वेद शाखेचें काम वाढत्या प्रमाणात चाललें असतां मध्यतरीं अचानकपणें थोडा खंड पडला. १९३२ सालीं असहकारितेच्या चळवळींत सरकारनें टिळक महाविद्यालय बेकायदा ठरविलें त्यामुळें इतर शाखांबरोबर आयुर्वेदशाखेचें शिक्षणकार्यहि बंद ठेवणें भाग पडलें पण शाखेची प्रगति व उपयुक्तता सर्वांना पटल्यामुळें विद्यार्थ्यांकडून ही शाखा पुन्हा सुरू करण्याबद्दल मागणी येऊ लागली व चालकानाहि दुजोरा मिळाला. यामुळें मंडळानें १९३३ च्या जून महिन्यात हें खंडित झालेलें कार्य स्वतंत्र 'आयुर्वेद महाविद्यालया'चे नांवानें अधिक उत्साहानें सुरू केलें

आतापर्यंत महाविद्यालयास स्वतंत्र इमारतीची उणीव होती प्रत्यक्ष शिक्षणाच्या दृष्टीनें महाविद्यालय रुग्णालयाशेजारीं असणें अगदीं आवश्यक होतें. त्यासाठीं रुग्णालयाच्या आवारात महाविद्यालयाच्या इमारतीसाठी जागा मिळविली असून येत्या दिवाळीपर्यंत तेथें स्वतंत्र इमारतीमध्यें महाविद्यालयाचें कार्य चालेल अशी खात्री वाटते.

**प्रवेश व शुल्कः**—शिक्षणाच्या इतक्या उत्कृष्ट सोयी असूनहि शुल्क आर्टस कॉलेजच्या पेक्षाहि कमी ठेविलें आहे पहिल्या

दोन वर्षांस वार्षिक ५० रु. व पुढें वार्षिक ६० रु. शुल्क ठेवण्यांत आलें आहे विद्यार्थ्यांच्या लायकीप्रमाणें शे १० नादाऱ्या व हुषार विद्यार्थ्यांस खास मिळालेल्या देणग्याच्या व्याजातून शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. कोणत्याहि विद्यापीठाची - प्रवेश परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळतो. शास्त्र समजण्याच्या व अभ्यासाच्या दृष्टीनें विद्यापीठानें ही अट घातली असून ती येथें कडकपणानें अमलांत आणली जाते. चार वर्षांच्या अभ्यासक्रमानतर विद्यार्थी कोठेंहि आपला धंदा स्वतंत्रपणें व आत्मविश्वासानें चालवू शकतो.

समारोपः—अशा रीतीनें ज्या आयुर्वेदाच्या शाखेस अल्पप्रमाणांत आरंभ झाला, तिला स्वतंत्र आयुर्वेदमहाविद्यालयाचें स्वरूप प्राप्त होऊन व रुग्णालय, सूतिकागृह व रसशाला यासारख्या प्रत्यक्ष शिक्षणाच्या साधनांची जोड मिळून तिचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत आहे. प्रत्यक्ष शिक्षणाच्या इतक्या सर्व सोयी अखिल महाराष्ट्रामध्यें या एकाच आयुर्वेद महाविद्यालयांत आहेत. इतकी साधनसामुग्री उभारण्यास चालकांना अहर्निश किती कष्ट करावे लागले असतील त्याचें वर्णन करणें अशक्य आहे एखादी शिक्षण संस्था, रुग्णालय अगर साधा धर्मार्थ दवाखाना चालविण्याचा ज्यांना अनुभव असेल त्यांना या कार्याच्या कष्टाची कल्पना येईल पण "क्लेशः फलेनहि पुनर्नवतांविधत्ते" या कव्युक्तीप्रमाणें कार्याचा जसा उत्कर्ष होतो तसा चालकांना अधिक उत्साह येतो.

अद्यापि शास्त्राच्या वाढीच्या दृष्टीनें पुष्कळ कार्य करावयाचें आहे. प्राचीन ग्रंथाचा संशोधनपूर्वक सूक्ष्म अभ्यास करून अभ्यासक्रमाच्या दृष्टीनें विषयवार ग्रथ तयार केले पाहिजेत. रुग्णालयांतील प्रत्यक्ष अनुभवाचा आधार घेऊन औषधी कल्पाचे गुणधर्म ग्रथरूपानें प्रसिद्ध करणें जरूर आहे. या दृष्टीनें अध्यापकाच्या सभांमधून विचारविनिमय चालू असून एक त्रैमासिक सुरू करण्याचें ठरलें आहे. याप्रमाणें मडळाच्या कार्याचा विहंगम दृष्टीनें वृत्तात सादर केला आहे.

शेवटीं ज्यांच्यासाठी हें शिक्षणकार्य चालू आहे, त्या विद्यार्थी वर्गास या सस्थेचा पूर्ण फायदा करून घेण्याबद्दल सूचना करून हा वृत्तान्त पुरा करितों

---

हिंदी निर्गतीमध्यें सुधारणा

१९३६–३७ सबधांतील हिंदी आयात-निर्गतींचे हिशेब पुरे झाले आहेत, त्यावरून खालील माहिती मिळते:—

| | १९३६–३७ | १९३५–३६ |
|---|---|---|
| आयात (किमत) | १२१½ कोटि रु. | १३४⅓ कोटि रु |
| निर्गत ( „ ) | २०२½ „ „ | १६४⅓ „ „ |

आयातीपेक्षां निर्गत मोठी असण्याची प्रवृत्ति चालू वर्षांतहि आढळून येत आहे.

मुबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेचा निकाल

मुंबई विश्वविद्यालयाच्या गेल्या मॅट्रिकचे परीक्षेस ९,९६४ विद्यार्थी बसले होते, त्यांपैकीं ३,३५२ म्हणजे शेकडा ३३.६ टक्के विद्यार्थी पास झाले

डॉ. जोशी म्हणजे जी. जी. ब्रदर्सचीं मलमें—त्वचा रोगांवर अत्यंत लवकर गुण देतात
डसनास १॥रु. गरिवास फुकट. ९८९ सदाशिव पुणे

## Deccan Education Society's Technical Institute

**( Attached to Fergusson College, Poona )**

This Institute will open on 5th July next and students will be admitted for a two-years' Diploma course in Paints, Pigments and Varnishes Admission is restricted to those studente who appear at and pass the admission examination to be held by the Institute in English, Mathematics and Physics and Chemistry, the standard aimed at being roughly equivalent to the Matriculation Examination of the Bombay University Applications giving full name, age, caste and sub-caste, details of school education, and name and address of the guardian should be sent to the undersigned on or before the 20th June 1937. The Admission Examination will be held on the 25th June, the detailed programme of which will be put up on the Notice Board The fees charged will be Rs 30 per term.

The head of the institute is Prof. R P. Sabnis, B Sc (Bombay), A. M (Columbia)

Two Limaye Loan Scholarships (open to poor Chitpavan Brahmin students) out of the Endowment of the late Mr. Krishnaji Mahadeo Limaye of Amraoti, and one free studentship every year (open to Cutchi Lohana students) are available for award to deserving students Three Cutchi Lohana students will be given preference with regard to admission every year, under the terms of the Liladhar Topan and Nagji Vishram donation.

D E Society's Office,
Fergusson College Buildings
Poona 4
*1st June 1937*

P M LIMAYE,
Secretary,
Deccan Education
Society, Poona

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कपनीचे लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २॥, किंवा प्रथम ६८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि..
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

### शिक्षण-प्रसारक मडळीचें स्कूल ऑफ कॉमर्स, पुणें

पुणें येथील शिक्षण-प्रसारक मडळीनें वरील संस्था २६ जून, १९३३ रोजीं स्थापन केली. सरकारी कमर्शिअल डिप्लोमाकरितां ह्या स्कूलमधून विद्यार्थी पाठविण्यात येतात डिप्लोमाकरितां खालील विषय नेमलेले आहेत.—

( १ ) कमर्शिअल इंग्लिश, ( २ ) कमर्शिअल भूगोल, ( ३ ) कमर्शिअल अङ्कगणित, ( ४ ) व्यापाराचें तंत्र व यंत्र, ( ५ ) बुककीपिंग, ( ६ ) अकौन्टन्सी अगर बँकिंग अगर शॉर्टहॅन्ड अगर टाइपरायटिंग अथवा ॲडमिनिस्ट्रेशन

वरील सर्व विषयात शेकडा ४० पेक्षा जास्त मार्क मिळवणारास मुंबई सरकारचा डिप्लोमा मिळतो पुण्यांतून विद्यार्थी पाठविणारी सरकारमान्य अशी ही एकच संस्था आहे परीक्षेस बसणारास सरकारनें मान्य केलेल्या संस्थेंतच शिक्षण घ्यावें लागतें मुंबई, कराची आणि पुणें येथें परीक्षा घेतली जाते परीक्षेचा अभ्यासक्रम एक वर्षाचा असून, स्कूल ऑफ कॉमर्सची वार्षिक फी ८० रुपये व प्रवेश फी, ५ रु आहे परीक्षेकरितां १५ रु फी द्यावी लागते अभ्यासाच्या पुस्तकास सुमारें २० रु. खर्चावे लागतात टाईपरायटिंगचें शिक्षण सर्व विद्यार्थ्यांस मोफत आहे गरीब व लायक विद्यार्थी नादार व अर्धनादार म्हणून घेतले जातात व शिष्यवृत्त्याहि देण्यात येतात संस्थेच्या लायब्ररींत सुमारें २५० पुस्तकें असून त्याचा विद्यार्थ्यांस चांगला उपयोग होतो

स्कूल ऑफ कॉमर्समधून बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांस सरकारी कचेऱ्या, बँका, फर्म्स, विमा कंपन्या,संयुक्त भांडवलाच्या मंडळ्या इत्यादि ठिकाणीं चांगल्या नोकऱ्या मिळालेल्या आहेत. संस्थेच्या पांचव्या वर्षाचे ( १९३७-३८ ) कामास २१ जून, १९३७ रोजीं सुरवात होईल १ जूनपासून विद्यार्थी दाखल करण्याकरिता कचेरी उघडी आहे प्रास्पेक्टस सुपरिंटेंडंटकडून मोफत पाठविण्यांत येईल इतर माहिती संस्थेच्या कचेरींत मिळेल

एन जी नारळकर,
सुपरिंटेंडेंट.

---

### हिंदुस्थानांत यंत्रसामुग्रीची आयात

| वर्ष | आयात ( किंमत रु ) |
|---|---|
| १९३४-३५ | १२ कोटि, ६ लक्ष |
| १९३५-३६ | १३ कोटि, ७ लक्ष |
| १९३६-३७ | १४ कोटि, १४ लक्ष |

जर्मनीमधून १९३५ ३६ सालीं १ कोटि, ६४ लक्ष रु किंमतीचीं यंत्रें आलीं होतीं, १९३६-३७ सालीं ही आयात २ कोटींवर गेली

कपास गिरण्यास लागणाऱ्या यंत्राच्या आयातीची किंमत १९३६-३७ मध्यें १ कोटि, ८० लक्ष रु, म्हणजे त्यापूर्वीच्या सालापेक्षा २० लक्ष रु कमी भरली

विजेचीं यंत्रें व साखरकारखान्याची यंत्रसामुग्री ह्याच्या आयातींत गेल्या वर्षीं वाढ झालेली आढळली शिवणाचीं व विणकामाचीं यंत्रें कमी प्रमाणात आलीं व टाइपरायटर्सहि कमी उतरले

---


# दि नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कं. लि.

हेड ऑफिस : : : : नागपूर

त्रैवार्षिक बोनस
हयातींतील विम्यास ३६ रु.
हयातीनंतरच्या विम्यास ४५ रु.

वार्षिक हप्त्यावर
२½ टक्के
बोनस

विम्याचे पैसे त्वरीत देण्याचें
कंपनीचें वैशिष्ट्य

काटकसरीची व्यवस्था
व
भरभक्कम लाइफ फन्डस

फायदेशीर अटीवर काम करण्यास वजनदार व उत्साही एजंटस पाहिजेत समक्ष भेटा अगर अर्ज करा.—

ब्रँच मॅनेजर,
साठे बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे

# नूतन बादशाही बोर्डिंग हाउस

जेवणाची व राहणेची उत्तम सोय

६३५ बुधवार चौक,
पुणें २

### "मराठी सेंटर" संस्थेचें नवें कार्यक्षेत्र

"मराठी सेंटर" ही संस्था १९३२ सालीं पुणें येथें स्थापन झाली. हल्लीच्या आर्थिक चढाओढीच्या दिवसात बेकार सुशिक्षिताना व्यापारक्षेत्रांत धनोत्पादन करता यावें या दृष्टीनें प्राथमिक व्यापारी शिक्षण म्हणजे मराठी व इंग्रजी लघुलेखन आणि टाईपरायटिंग या विषयाचें शास्त्रोक्त ज्ञान या संस्थेंतील विद्यार्थ्यांस पुरविलें जातें अवघ्या चार वर्षांचे अवधींत संस्थेंतून पांचशेंहून अधिक विद्यार्थी कार्यक्षम होऊन बाहेर पडले. गेल्या सालीं सस्थेस सरकारी मान्यता मिळाली. संस्थेच्या आजपर्यंतच्या कीर्तीला साजेल अशा तऱ्हेचा रिपोर्ट कमर्शिअल स्कूलच्या इन्स्पेक्टरनें केला आहे आणि त्याची प्रचीति, एप्रिलमध्यें झालेल्या गव्हर्नमेंट कमर्शिअल सर्टिफिकेट परीक्षेला संस्थेनें पाठविलेल्या दहा उमेदवारांपैकीं दहाहि उमेदवार यशस्वी होण्यानें सिद्ध झाली आहे. मुंबई इलाख्यांतील सर्व शॉर्टहॅन्ड आणि टाईपरायटिंग स्कूलमध्यें या "मराठी सेंटर"नें या वर्षी सर्व विद्यार्थी पास होऊन पहिला नंबर मिळविला हें संस्थेच्या चालकांस व विद्यार्थ्यांस भूषणावह आहे.

संस्थेनें यदापासून बुक-कीपिंग आणि अकौंटन्सी हे विषय शिकविण्याचें ठरविलें आहे व्यापारक्षेत्रात वरील विषयाची फारच नड आहे हा सर्वत्र अनुभव आहे इतकेंच नव्हे तर त्या त्या क्षेत्रांतील पदवीधर माणसें कार्यक्षम ठरत असूनहि पुरेशीं मिळत नाहींत, तेव्हा मॅट्रिक नापास झालेल्यांस अगर ज्यांच्यापुढें नोकरीचा प्रश्न आहे अशा तरुणास अत्यत उणीव भासत असलेले वरील तिन्ही विषय शिकविण्याची वरील संस्थेनें चांगली सोय केली आहे यदाचे सालाप्रमाणेंच संस्था या नवीन क्षेत्रांतहि पहिला नंबर मिळवील अशा आशा आहे.

---

### जाहिरातींत परकी शब्द वापरतांना सावधगिरी बाळगा

जाहिराती व दुकानाच्या पाट्या ह्यांमध्यें इंग्रजी शब्द घालण्याचा कित्येक हिंदी धंदेवाल्यास मोह होतो आणि तसें करतांना अज्ञानामुळें त्यांच्या हातून हास्यास्पद प्रमाद घडतात ह्याचे दोन मासले गोव्याकडील एका वाचकानें त्याच्या ब्रिटिश साप्ताहिकास पाठविले आहेत, ते पुढें दिले आहेत त्यावरून हिंदी धंदेवाल्यानीं सावधगिरी बाळगण्याचा बोध घेतला पाहिजे

(१) "अ ब क–कन्फेक्शनर, बेकर अँड हायक्लास लोफर."

(२) "....लॉंड्री—वॉश क्लोथ्स अँड डाय क्लीनर."

पहिल्या उदाहरणात "लोफ" (रोटी) करणारा तो "लोफर" (भटक्या) असा शब्दप्रयोग असून दुसऱ्यात "डाय" (Dye)=रंगवणें ह्याच्या ठिकाणीं "डाय" (Die) =मरणें हा शब्द वापरला आहे !

---


विक्रीस तयार

**विक्षिप्तराव**

दुसरी आवृत्ति

लेखक—प्रो वा गो काळे

एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे. 'विक्षिप्तराव' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग्य आला आहे हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळामधून तें करण्यास फार उपयुक्त आहे. किंमत फक्त १० आणे.



श्री

टिळक महाराष्ट्र विद्यापीठास जोडलेलें, आयुर्वेदाचें उच्च शिक्षण देणारें

**आयुर्वेद महाविद्यालय, पुणें**

उन्हाळ्याच्या सुट्टीनतर ता. २१ जून १९३७ पासून सुरू होईल प्रवेश परीक्षा (Matriculation) पास असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल अभ्यासक्रम चार वर्षांचा सपूर्ण आयुर्वेदाच्या शिक्षणाबरोबर पाश्चात्य वैद्यकाचेंही शिक्षण मिळतें प्रत्यक्ष शिक्षणाच्या सर्वांत अधिक व उत्कृष्ट सोयी आहेत. प्रत्यक्ष शिक्षणाच्या संस्थाः—

**(१) ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलः**—यामध्यें ४० राहत्या रोग्यांची सोय असून बाहेरून औषधास येणाऱ्या रोग्यांची संख्या रोज २०० वर असते शस्त्रकर्माची उत्तम सोय असून दरसाल ५०० च्यावर महत्त्वाचीं शस्त्रकर्में होतात सर्व मुंबई इलाख्यात हें एकच व नमुनेदार आयुर्वेदीय रुग्णालय असून यामध्यें विद्यार्थ्यांच्या रोग-निदान-चिकित्सा व शस्त्रकर्में या विषयांच्या प्रत्यक्ष शिक्षणाची चांगली सोय आहे

**(२) सूतिका गृह**—सध्या ही व्यवस्था अल्प प्रमाणात असून १२ महिन्यात १० सूतिकाची सोय करण्यात येणार आहे यामुळें विद्यार्थ्यांना प्रसूतिकर्माचें प्रत्यक्ष शिक्षणाची उत्तम सोय होईल

**(३) आयुर्वेद रसशाळा पुणे लिमिटेड.**—हा कारखाना लिमिटेड केल्यापासून औषध निर्माण करण्याचें काम फारच मोठ्या प्रमाणावर चालतें येथें विद्यार्थ्यांना सर्व औषध शास्त्रोक्त पद्धतीनें तयार करण्याचें शिक्षण मिळतें

**(४) शवच्छेदन-शालाः**—ही शाला सर्वांत मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें येथें विद्यार्थ्यांना शवच्छेदनाचें शिक्षण भरपूर मिळण्याची सोय आहे याशिवाय प्रयोग-शाला, वनस्पति संग्रह, इत्यादि सर्व सोयी आहेत

सविस्तर माहितीसाठीं ०२ ची तिकिटें पाठवावीत

नवीन विद्यार्थ्यांनीं ता १५ जूनपर्यंत ५ रु प्रवेश-फीसह अर्ज पाठवावेत

पत्ताः—आयुर्वेद महाविद्यालय, २९७ सदाशिव, पुणें २ — पु ग नानल, अधिपति



**जनानी व मर्दानी कापड**

मिळण्याचें खात्रीलायक एकच ठिकाण

**माधव सोमण ब्रदर्स,**

लक्ष्मीरोड, पुणें. २



पिक्चर-फिट कपडे मिळण्याचें एकच ठिकाण

**टेलर्स रिसबूड ब्रदर्स**

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## मुंबई इलाख्याचें शेतकी खातें

### १९३५-३६ चा अहवाल

मुंबई इलाख्याच्या शेतकी खात्यानें १९३५ ३६ सालीं एकूण १०२ प्रदर्शनें व २,००० प्रात्यक्षिकें भरविलीं, १३६ सभा घडवून आणल्या, २० मॅजिक लॅन्टर्न व्याख्यानें करविलीं, १० जमाबंदी सभा बोलावल्या व जनावरांचीं १० प्रदर्शनें घडवून आणलीं. नवीन व सुधारलेल्या जातींच्या बियाचा फैलाव करण्याचें काम शेतकी खात्यानें चालू ठेविलें. चांगल्या जातींच्या वळूंची सख्या वाढत आहे. अहवालाचे सालअखेर एकूण २,०८४ वळू नोंदलेले होते. धुळें व अंमळनेर येथील कपास बाजाराची ( कॉटन मॉर्केट्स ) प्रगति होत आहे. विजापूर, दौंडाइचे ( खानदेश ), मालेगाव ( नाशिक ) इत्यादि ठिकाणीं कॉटन मॉर्केट्स स्थापण्याविषयीं तयारी चालू आहे तांदूळ, गहूं व भुइमूग ह्यांस भाव बरा आला, परंतु कपास व ज्वारी ह्यांचे बाजारभाव पूर्व सालापेक्षां उतरले एकूण आठ साखरेचे कारखाने चालू होते, त्यामध्ये १९,११५ टन साखर तयार झाली. गुळाचा भाव एका पल्ल्यास १२ रुपये इतका खालीं गेला. निजामाचे राज्यातून खानदेश व वऱ्हाड येथें गुळाची आयात मोठ्या प्रमाणावर होऊं लागली असल्यानें दक्षिण भागातील शेतकऱ्याच्या मालास मागणी कमी झाली आहे कपाशीची किंमतहि घसरल्यानें गुळाचा खप पूर्वीसारखा होत नाहीं

## कलकत्त्याची वीज कंपनी

कलकत्ता कार्पोरेशननें आपल्या हद्दीमधील कलकत्ता इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशन लि. ची मिळकत ऑक्टोबर, १९३८ मध्यें विकत घेण्याचें ठरविलें होतें व त्याप्रमाणें कंपनीस नोटीसहि दिली होती कंपनीच्या डायरेक्टरांनीं कॉर्पोरेशनला पत्र लिहून सदरहु नोटीस आपण कायदेशीर मानीत नाहीं, असें कळविलें आहे ही वीज कंपनी दरसाल आपल्यां भागीदारांस १२½ टक्के नफा वाटीत आली आहे, त्याविषयीं कलकत्त्यामध्यें बराच असंतोष पसरला आहे हें लक्षात घेऊन, ह्यापुढें भागीदारांस १० टक्केच डिव्हिडंड वांटण्याचें तिनें ठरविलें आहे. नुकत्याच संपलेल्या वर्षीं कंपनीस २७¾ लक्ष रुपये नफा झाला लॉर्ड मेस्टन हे कंपनीचे अध्यक्ष असून, तिची मुख्य कचेरी लंडन येथें आहे

## हिंदुस्थान सरकारच्या ग्रामसुधारणेबाबतच्या देणगीचा विनियोग

हिंदुस्थान सरकारनें ग्रामसुधारणेकरिता मुंबई इलाख्यास १९३५-३६ सालाकरिता ७ लक्ष रुपये दिले होते. १९३६-३७ करिता ५ लक्षाची नवीन ग्रँट देण्यात आली. ह्या पैशाचा विनियोग कसा करण्यांत आला, ह्याविषयीं मुंबई सरकारनें तपशील प्रसिद्ध केला आहे

## राजमुकुटांत रत्नें

ब्रिटिश राजांच्या मुकुटात तीन हजारांच्या वर हिरे, माणकें वगैरे रत्नें आहेत.


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटींग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना

भिकारदास मारुतीरोड, 'ज्ञातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा

**Ardomix** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगावर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गलचलणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरें करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे. ट स १२ आणे निराळा गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर

एजन्सीज —

मुंबई—यशवंत दत्तात्रय गाडगीळ, फणसवाडी, मुंबई २.
धामणगाव—मे भागवत ब्रदर्स, धामणगांव, वऱ्हाड
हरदा—चौथाजी तुळशीराम आणि सन्स, हरदा, सी पी.
खानदेश—डॉ जी एन महाजन, मोठें वाघोदे, खानदेश.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) .. | ११९—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन .. | १०५—६ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) | ११७—१० |
| ४% १९४३ .. .. | १०७—० |
| ३½% विनमुदत . .. | ९५—७ |
| ३½% १९४७-५० . | १०६—० |
| ३½% १९४८-५२ ... . | १००—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—१४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) .. | १२२—० |

### मंडळ्याचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५० रु भरले व १०% डिव्हिडंड ) | १३७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु भरले व ६% डिव्हि. ) | ३१-१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५३२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु चा भाग ३½% डिव्हि ) | १२७—८ |

#### रेल्वज

| | |
|---|---|
| बार्शी-बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४½%) | १०३—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रातज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु. ४ आ ) | ९१०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु डिव्हि १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½%) | १४०५—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५४०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, १७ रु.८ आ.) | १७७—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु.ऑर्डि. रु.६) | ३३८—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १४९७—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३४-११-० |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यांस | ५२-१४-० |

## श्री ना दा ठा महिला विद्यापीठाचें पुणें येथील कॉलेज व त्याचें वैशिष्ट्य

ह्या विद्यापीठानें आखलेला अभ्यासक्रम हा स्त्रियांना विशेष उपयुक्त आहे एवढेंच नाहीं तर त्यांच्या सोई-गैरसोई काय आहेत व त्याना कोणकोणत्या बाबतींत विशेष सवलती दिल्या पाहिजेत हें लक्षात घेऊनच तो ठरविला आहे, हा या विद्यापीठाचा विशेष आहे

कॉलेजचें नाविन्य –( १ ) स्त्रियांना उपयुक्त असा विशिष्ट अभ्यासक्रम ( २ ) शिक्षणाचें माध्यम मातृभाषा ( ३ ) गृहीतागमा ही शेवटची डिग्री तीन वर्षात मिळविता येते ( ४ ) फक्त स्त्रियांकरिताच असलेली संस्था

अभ्यासक्रम:-१ आवश्यक.—मातृभाषा, इंग्रजी, गृहजीवनशास्त्र व इतिहास २ ऐच्छिक.—खालीं दिलेल्या विषयापैकीं एक विषय ऐच्छिक घ्यावा लागतो

१ गायन, २ ड्रॉइंग व पेंटिंग, ३ संस्कृत, ४ हिंदुस्थानातील कोणतीहि अर्वाचीन भाषा, ५ इतिहास व अर्थशास्त्र, ६ इंग्रजी, ७ गणित, ८ एथिक्स व फिलॉसफी, ९ नॅचरल सायन्स, १० भूगोल, ११ युरोपातील कोणतीहि अर्वाचीन भाषा.

इतिहास ह्या विषयात शेवटच्या वर्षी सोशिऑलॉजी व गृहजीवन शास्त्र या विषयात फिजियॉलॉजी, हायजीन, सायकॉलॉजी व स्टडि ऑफ चाइल्ड माइंड याचा अंतर्भाव होतो व हे विषय दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात शिकविले जातात.

वर दिलेल्या ऐच्छिक विषयापैकीं पुणें येथील महाविद्यालयात सायन्स, संस्कृत, इतिहास, अर्थशास्त्र व चित्रकला हे विषय शिकविण्याची सोय आहे तसेंच मराठी व गायन या विषयाची व्यवस्था ते विषय घेणारी मुलगी आल्यास करता येईल.

आमचें कॉलेज पुण्याहून फार दूर नसून हवेशीर अशा ठिकाणीं कर्वेरोडवर आहे कॉलेजला जोडून एक वसतिगृह आहे. त्यावर रेक्टर स्त्रीच असून क्लबची व्यवस्था वगैरे मुलीच पाहतात.

यंदाचे निरनिराळ्या परीक्षाचे निकाल समाधानकारक असून द्रविड संस्कृत प्राइझ या कॉलेजातील गगू परुळेकर या मुलीस मिळालें आहे.

| | जी. ए | दुसरें वर्ष | प्रथम वर्ष |
|---|---|---|---|
| बसल्या | १६ | २२ | १५ |
| पास झाल्या | ११ | १४ | ११ |

इतिहास या विषयात जी. ए मध्यें समाजशास्त्राचा अंतर्भाव होतो. गृहजीवनशास्त्र याची रचना पुढीलप्रमाणें आहे:—

प्रथम वर्ष.—वनस्पति शास्त्र व जीवशास्त्र

द्वितीय वर्ष:—शरीरशास्त्र व आरोग्य

जी. ए :—मानसशास्त्र ( विशेषत: लहान मुलासंबंधीं )

प्रिन्सिपाल,
श्री ना. दा ठा कॉलेज फॉर वुइमेन,
येरंडवणें, पुणें ४

**The Magazines Circulating Library**

Supplies as many as Forty English and American Magazines, Twenty Marathi and Hindi Magazines twice a week at reader's Residence For details see

D P ATHALYE,
Prop *Magazines Circulating Library*,
Deccan Gymkhana, POONA 4

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ].

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.



## मुलांचा खाऊ

म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.

भावाचें माहितीपत्रक मागवा

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.



तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अतीस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

## पोरवाल ब्लॅक टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी



## रोडगे यांच्याच मजबूत सतरंज्या वापरा.

आपल्या पैशाचा योग्य मोबदला मिळवा.

सर्वत्र मिळतात.

कारखाना पत्ता:- ३० मिठगंज पेठ पुणें २



## न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ,

रविवार पेठ, सराफ

बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.



## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

# आपुली आपण करी स्तुति तो एक X X– !

—श्रीसमर्थ

परंतु, आत्मविश्वास असणें, ही गोष्ट प्रत्येक ठिकाणीं प्रभावी ठरते; प्रत्येक धंदेवाईकास यशस्वी करणारा हा एकच सद्गुण आहे.

म्ह णू न च

आम्ही मोठ्या स्वाभिमानानें व आत्मविश्वासानें असें सांगूं शकतों कीं, आमचें गिऱ्हाईक व हितचिंतक हे आमच्या 'टेलरिंग अँड कटिंग'च्या कामावर बेहद्द खूष आहेत व आम्हांला 'कॉलेजिअन्स पेट टेलर्स' असें म्हणतात. अप्-टु-डेट फॅशन्स हेंच आमचें वैशिष्ट्य आहे.

# पी. एम. अँड को.,

आप्पाबळवंत चौक, पुणें शहर.

सर्व प्रकारचे कोटिंग, वुलन सिल्क वगैरे, शर्टिंग, फॅन्सी क्लॉथ, आमच्या शो-रूमवर पहावयास मिळेल.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. न. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १६ जून, १९३७ अंक २४

"नवीन फॅशनचे चित्ताकर्षक रंग,
मोहकपणा व टिकाऊपणा"




हे मुख्य गुण ज्या मालांत आहेत ती टिकेकरीच हें कोणीही कबूल करील. मग दुसरा माल पहाण्याचे भानगडींत तरी कां पडता? पोस्टेजकरितां ११ आण्यांचीं तिकिटें पाठवा. म्हणजे मोफत नमुने घरबसल्या येतील व चालू फॅशनचीं कोणतीं पातळें त्याची कल्पना देतील!
( डिपॉझिट घेऊन एजन्सी देणें आहे. तरी गरजूंनीं अवश्य चौकशी करावी.)

दि टिकेकर टेक्स्टाइल मिल लि., टिकेकरवाडी.

दि टिकेकर टेक्सटाईल मि. लि., पोष्ट टिकेकरवाडी, सोलापूर

## दि गुड-वुइल
## ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

## RAMNARAIN RUIA COLLEGE,
### MATUNGA.

Opens on 21st June 1937. Students should secure admission at the College office between 10-30 A. M. and 2-30 P. M. on all working days.

This year provision has been made for giving instruction in Arts and Science Courses of the first two years.

The total fees charged will be Rs. 90/- per term payable in two instalments. Due consideration will be shown to poor and deserving students and those of *the backward classes.*

V. K. BHAGWAT
Principal, R. R. College.

## —कर्तबगारी—

असल्यास नाशिकच्या **सह्याद्रि विमा कंपनीची** एजन्सी घ्या व उदरनिर्वाहाचा प्रश्न स्वावलंबानें सोडवा. मुख्य किंवा जोड धंदा म्हणून हाच उत्तम. **सरकारी रोख्यांत पैसा गुंतविणें,** हप्ते कमी असणें, एजंटांना अगदीं नवीन पद्धतीनें भरपूर कमिशन देणें वगैरे उत्तम गोष्टी **सह्याद्रींतच** सांपडतील.

नोकरी नाहीं म्हणून हताश न होतां सुखानें नोकरीपेक्षां अधिक उत्पन्नाचा म्हणून हाच मार्ग स्वीकारा.

अधिक माहितीसाठीं लिहाः—
मॅ. डायरेक्टर,
सह्याद्रि इन्शु. कं. नाशिक

INDUSTRIAL SOCIETY
## WORK SHOP

**Furniture on hire on Reasonable Terms**

Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time.

Old Furniture also can be bought or sold on commission.

**SHEVAK Bros.** 153 Kasba, POONA *Near Ganpati Temple*
Branch No. 1 : Fergusson Road.

# विविध माहिती

### ओरिएंटल विमा कपनीची विशेष साधारण सभा

ओरिएंटल विमा कपनीच्या भागीदारांची विशेष साधारण सभा ७ जुलै रोजीं भरणार आहे, त्यावेळीं १९३६ अखेरच्या मूल्यमापनाचा विचार, भागीदारांस बोनस, भागीदारांच्या १९३७, १९३८ व १९३९ सालाच्या डिव्हिडंड तरतूद, विमेदारास बोनस, इत्यादि बाबींचा विचार केला जाईल.

### विमा कपन्यांस सरकारकडून जाहीर नोटीस

अहमदाबाद येथील तरुण अॅशुअरन्स कंपनी व मुबई येथील प्रभात विमा कपनी आणि सेंट्रल म्युचुअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटी, ह्यानीं कंट्रोलर ऑफ करन्सीकडे जरूर तेवढे सरकारी रोखे डिपॉझिट न ठेवल्याकारणानें व १९१२ च्या विमासंबधातील कायद्याची इतरहि काहीं कलमें न पाळल्यानें, सदरहु कंपन्याचे डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट व इतर अधिकारी ह्यास हिंदुस्थान सरकारनें जाहीर नोटीशीच्या द्वारा त्या सबधात सूचना दिली आहे.

### साखरेवरील जादा जकात पचनी पडली?

साखरेवरील अंतर्गत पट्टी पूर्वी दर हड्रेडवेटास १ रु ५ आ. होती, ती १ एप्रिल, १९३७ पासून २ रु. करण्यांत आली आहे ह्या वाढत्या पट्टीचा हिन्दी साखरेच्या धद्यावर प्रतिकूल परिणाम झालेला दिसत नाहीं व एकहि कारखाना बद पडल्याचें सरकारच्या नजरेस आलें नाहीं, असें प्रसिद्ध झालें आहे.

### राष्ट्रसघाचे कचेरींत हिंदवासियाचा दुष्काळ

राष्ट्रसंघास हिंदुस्थान ज्या मानानें वर्गणी देतें, त्या मानानें हिन्दी लोकांना सघाच्या कचेरींत नोकऱ्या मिळत नाहींत. संघाचा एक सभासद २४ लक्ष फ्रँक वर्गणी देतो व त्यास पगाराचे रूपानें १५ लक्ष फ्रँक परत मिळतात हिंदुस्थानचा वर्गणीचा हिस्सा १७ लक्ष फ्रँक आहे, परतु हिन्दी नोकराच्या पगाराची वार्षिक बेरीज ५२ हजार फ्रँकच फक्त भरते

### वायरलेसच्या यत्रसामुग्रीची वाढती आयात

रेडिओच्या यंत्रसामुग्रीची आयात झपाट्यानें वाढत आहे १९३५-३६ सालीं एकूण २८¾ लक्ष रुपयाचा हिंदुस्थानात माल उतरला होता, १९३६-३७ सालीं हा आकडा ३५ लाखांवर गेला अमेरिकेंतून १६ लक्ष रुपयांचा व ग्रेटब्रिटनमधून १२½ लक्ष रुपयाचा माल आला

### पेटट्सची संख्या वाढली

संशोधकास आपल्या शोधासंबंधातील हक्काचा काहीं विशिष्ट काळपर्यंत उपभोग घेता यावा, ह्या करितां त्यास कायद्यानें सरक्षण देण्याची सोय 'पेटट'च्या द्वारा केलेली असते. हिंदुस्थान सरकारच्या पेटंट ऑफिसकडे १९३६ सालीं एकूण १,०६८ पेटंटस् नोंदण्यात आलीं १९३५ सालीं ह्याकरिता ९८० अर्ज आले होते पेटट्सची वाढती सख्या हें औद्योगिक प्रगतीचें चिन्ह आहे

### प्रातिक सरकारानीं करावयाची कर्जफेड

प्रांतिक सरकारांनीं हिंदुस्थान सरकारकडून उचललेलें सर्व कर्ज व्याजासुद्धां ३१ मार्च १९८२ चे आत फेडावयाचें आहे. दरसाल दोन वेळां मध्यवर्ती सरकारास रकमा द्यावयाच्या ह्या हिशेबानें हप्ते बसविण्यात आले आहेत. मुंबई सरकारनें ३१ जुलै व ३१ जानेवारी रोजीं दरवर्षी आपले हप्ते चुकते केले पाहिजेत.

### टेलिफोनचा वाढता वापर

लंडन शहरांतील सर्व लोक मिळून दररोज सरासरीनें ३३ लक्ष वेळा टेलिफोन करतात. गेल्या सालाचे मानानें हा आकडा ४ लाखांनीं वाढला आहे राज्यारोहणाचे निमित्तानें टेलिफोनचा वापर वाढला, त्याकरितां ३०० जादा ऑपरेटर्स नेमण्यात आले होते.

### विजेच्या ताराची व दिव्यांची आयात

१९३६-३७ सालात एकूण ९३ लक्ष रुपये किमतीच्या विजेच्या तारा हिंदुस्थानांत आयात झाल्या. विजेचे दिवे मात्र पूर्वसालाच्या मानानें कमी आले

### गिरणी कामगाराकरितां सहकारी पतपेढ्या

मुंबई शहरांतील गिरणी-कामगाराच्या सहकारी सोसायट्याचे संख्येंत समाधानकारक वाढ होत आहे. २४ गिरण्यात मिळून एकूण ४१ अशा पतपेढ्या आहेत.

### विद्यार्थ्यांचे घरचे अभ्यास

शाळेंतील विद्यार्थ्यांस घरीं करण्याकरिता अभ्यास नेमून देण्याची पद्धति सर्वत्र प्रचलित आहे. घरच्या अभ्यासामुळें अनेक फायदे होत असले तरी त्याबाबत योग्य मर्यादा पाळण्यात आल्या पाहिजेत, असें त्यासबंधांतील ग्रेटब्रिटनमधील इन्स्पेक्टराच्या एका चौकशी कमिटीनें आपलें निश्चित मत नमूद केलें आहे.

### रोल्स रॉइस कपनीचा नफा

रोल्स रॉइस कपनीच्या मोटारींची उत्कृष्टपणाच्या परमावधीबद्दल ख्याती आहे तथापि, विमानाचीं इंजनें बनविणें हा त्या कंपनीचा मुख्य धंदा आहे. आणि या धंद्यास सध्या तेजी आहे. रोल्स रॉइस कपनीस गेल्या वर्षी ½ कोटि रुपये नफा झाला.

### मुंबई शहरांतील प्रमुख ग्रन्थालयें

मुंबई येथील रॉयल एशियॅटिक सोसायटीची लायब्ररी सर्वात जुनी व मोठी आहे तिचे सुमारें ५०० सभासद असून ग्रंथालयात १ लक्ष पुस्तकें व २,००० दुर्मीळ हस्तलिखितें आहेत. जे. एन. पेटिट इन्स्टिट्यूट लायब्ररींत ४५ हजार ग्रन्थ आहेत व तिच्या सभासदांची सख्या ४ हजार आहे मुबई विश्वविद्यालयाच्या लायब्ररींत ६० हजार पुस्तकें आहेत व तेथें ३०० नियतकालिकें येत असतात पीपल्स फ्री रीडिंग रूम अॅन्ड लायब्ररींत १७ हजार ग्रन्थसंख्या आहे.

### रेफ्रिजरेटर्स

ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण १,४०,००० विजेचे रेफ्रिजरेटर्स ( पदार्थ थड व चागल्या स्थितींत राखणारीं कपाटें ) वापरात आहेत. गेल्या वर्षी ३५,००० नवें रेफ्रिजरेटर्स खपले अमेरिकेंत ९० लक्ष रेफ्रिजरेटर्स रोजच्या वापरात असून गेल्या सालीं २० लक्ष नवे खपले अमेरिकेंतील वीज असलेल्या १०० घरापैकीं ४१ घरात हीं यत्रें आहे ग्रेट ब्रिटनमध्यें हें प्रमाण १००: २ असें पडतें १९३६ अखेर सबध जगांत मिळून १ कोटि ११ लक्ष रेफ्रिजरेटर्स चालू असून त्या सालीं २२½ लक्ष नवीं यत्रें खपलीं असा अजमास आहे.

### मुबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु किंमत |
|---|---|
| २८-५-३७ ते ५-६-३७ | ४,६१,६९१ |
| ६-६-३७ ते १२-६-३७ | १६,९६,६०५ |
| २१-९-३१ ते १२-६-३७ | २,९८,१९,८५,०५८ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २९४ | ५ दौंड पेटा सहकारी परिषद् | २९९ |
| २ मुंबई सरकारचें अंदाजपत्रक .. ... | २९५ | ६ सहकारी शिक्षणाचा वर्ग ... ... | |
| ३ सुशिक्षित तरूण आणि व्यापार ... ... | २९६ | ७ उद्योगदिनात भाग घेणाऱ्या संस्था ... | ३०० |
| ४ स्फुट विचार ... | २९७ | ८ निवडक बाजारभाव | ३०० |
| प्रांतिक सुधारणाचा व कराचा कार्यक्रम—ब्रिटिश व्यापारास सरकारी सवलत—हिंदी दुय्यम धंद्यांस सरक्षण—बोनस वाटण्याची नवी योजना—प्रस्थापित यशाच्या किंमतीची चचलता— | | ९ गिरण्यांतील मजुरांची स्थिति ... | ३०१ |
| | | १० मि रॉकफेलर .. | ३०२ |
| | | ११ दुसऱ्याची सही करण्याचा धंदा | ३०२ |
| | | १२ प्रांतिक फडनवीसांची परिषद् .. | ३०३ |
| | | १३ डे इ ऑफ कॉमर्स, पुणें .. | ३०४ |
| | | १४ हिऱ्यांचा व्यापार ... | ३०४ |



# अर्थ

बुधवार, ता १६ जून १९३७


## मुंबई सरकारचें चालू वर्षाचें अंदाजपत्रक

गेल्या एप्रिलच्या प्रारभापासून प्रांतिक स्वायत्ततेची नवी घटना चालू व्हावयाची असल्यानें यंदाचें मुंबई इलाख्याचें बजेट जुन्या कायदेमडळापुढे, मामुली रिवाजास अनुसरून, माडण्यांत आलें नाहीं कायदेमडळ व कार्यकारी सरकार ह्या दोघाच्याहि दृष्टीनें प्रांतिक बजेटास विशेष महत्त्व असतें सरकारी खात्याच्या खर्चास कायदेमडळाची संमति आवश्यक असते आणि अशा मंजूरी वांचून राज्यकारभार कायदेशीर रीतीनें चालत नाहीं. कांहीं राखीव बाबींवरचा खर्च नवीन राज्यघटनेंतहि कायदेमडळाच्या सत्तेच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आला असला तरी पूर्वीची द्विदल राज्यपद्धति जाऊन त्या मडळास सर्वस्वी जबाबदार असलेल्या प्रधानमंडळाच्या हातात सर्व राज्यसूत्रें १९३५ च्या घटना कायद्याप्रमाणें आलीं आहेत ह्यामुळें प्रांतिक बजेटाचें महत्त्व वाढलें आहे द्विदल राज्यपद्धतींत बिनजबाबदार मत्र्यांस मोठे अधिकार होते आणि त्याच्या राखीव क्षेत्रांत जबाबदार प्रधानांस ढवळाढवळ करतां येत नसे ह्या रीतीनें सोंपीव खात्याच्या कारभारात सुधारणा करण्यास लोकनियुक्त मंत्र्यास फारसा वाव नव्हता. पार्लमेंटनें आतां सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या मार्फत प्रांतिक सरकारावर चालवावयाचा अधिकार संकुचित केला असून लोकांनीं निवडलेल्या व कायदेमंडळात बहुसंख्याक सभासदाचा पाठिंबा असलेल्या मंत्रिमंडळाकडे प्रांतिक कारभार सोपवला आहे हा कारभार गव्हर्नरानें करावयाचा असला व मंत्रिमडळ त्यानेंच नेमावयाचें असलें तरी वस्तुतः सर्व सत्ता कायदेमंडळ, त्यांतील बहुमतवादी सभासद व त्यानीं मान्य केलेलें प्रधानमंडळ ह्याच्या स्वाधीन झाली आहे नव्या निवडलेल्या कायदेमंडळास आणि त्याच्या पाठिंब्याच्या जोरावर राज्यकारभार करणाऱ्या मंत्रिमडळास प्रांताच्या राज्यव्यवस्थेविषयींचें धोरण आंखण्यास व त्यास अनुसरून बजेटाची माडणी करण्यास सवड व वेळ मिळावा म्हणून चालू सालाच्या उत्पन्न-खर्चाचें अंदाज-पत्रक सरकारचा मामुली जमाखर्च पाहून त्यापुरतें गव्हर्नरानें ठरवून जाहीर करावें अशी योजना अगोदरच करून ठेवण्यात आली होती. तिला अनुसरून चालू सालाची सहा महिन्याच्या उत्पन्न खर्चाची व्यवस्था सध्या चालली आहे पुढची तरतूद जबाबदार प्रधानमडळानें करावयाची आहे आणि त्यानें आपलें अदाजपत्रक कायदेमडळाकडून मंजूर करून घेतलें पाहिजे.

आमच्या इलाख्यात नवीन कायदेमंडळ रीतसर निवडलें गेलें आहे, परंतु जबाबदार मंत्रिमडळ बनवण्यात आलेलें नाहीं. सभासदाच्या बहुमतानें कायदेमडळाचा पाठिंबा मिळूं शकेल असे मत्री, त्याच्या अटी गव्हर्नरास मान्य न झाल्याकारणानें, कारभाराची धुरा उचलण्यास तयार नसल्यामुळें प्रांतिक प्रधानमडळ वाघ्यांत पडल्यासारखें झालें आहे आणि त्याची जागा कामचलाऊ मत्रिमडळानें भरून काढणें गव्हर्नरास प्राप्त झालें आहे कायदेमडळाची निवडणूक होऊन अडीच महिने लोटले तरी ह्याच परिस्थितीमुळें त्याची सभा बोलावणेंहि लाबणीवर पडलें आहे. राज्यकारभाराचा रथ अर्थातच पूर्वपरंपरेस धरून चालला आहे, पण त्यात युक्त सारथी नाहीं व त्यास दिशा दाखवणारें मंत्रिमडळहि त्यात नाहीं. तथापि, हंगामी प्रधानमडळ स्वस्थ बसलेलें नाहीं त्यानें आपला कार्यक्रम आखून तो प्रसिद्ध केला आहे, आणि त्यास कृतीचें स्वरूप देण्याविषयींचा त्याचा यत्न चालू आहे. कार्यक्रम चागला आहे कीं वाईट आहे ह्यापेक्षा तो कोण, केव्हां व कसा अमलात आणणार ह्या प्रश्नास वस्तुतः आज अधिक महत्त्व आहे. त्याचें उत्तर मिळण्याची वेळ जवळ येत चालली आहे, कारण कायदेमडळाची सभा एक दोन महिन्याच्या आत बोलावली गेली पाहिजे व तिच्यापुढे चालू सालचें अदाजपत्रक माडलें गेलें पाहिजे. बहुसंख्याक सभासदाचा पाठिंबा असलेल्या गटानें राज्यकारभाराची जबाबदारी उचलून मंत्रिमडळ बनवलें तर त्यास आपलें धोरण व अदाजपत्रक कायदेमडळाकडून मान्य करून घ्यावें लागेल. हगामी प्रधानमडळ कायदेमंडळाचें बहुमत आपल्या बाजूस वळवण्याचा यत्न अर्थातच करील तो यशस्वी न झाल्यास बिन जबाबदार प्रधानाच्या सहायानें गव्हर्नरास राज्यकारभार चालवावा लागेल. प्रस्तुत प्रकरणीं सध्या बाधा पडला असून गव्हर्नर व काँग्रेस ह्याचेमध्यें एकवाक्यता होऊन नवीन राज्यघटनेचा गाडा व्यवस्थित चालू होतो, का उपस्थित झालेल्या अडचणींमुळें त्याची गति कुंठित होते ह्यासंबंधानें संशयवृत्ति सर्वत्र पसरली आहे नवीन घटना आली, पण तिच्या बरोबर प्रांतिक उत्पन्नाच्या नव्या बाबी आलेल्या नाहींत. खर्चाचीं तोंडें मात्र पक्ष्याच्या पिल्लाच्या चोचींप्रमाणें आत पडावयाच्या भक्ष्याची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. स्वायत्त प्रधानमंडळानें विशेष कांहीं तरी करून दाखविलें पाहिजे, पण पैशावाचून त्याचें अडणार आणि नवीन कराचा बोजा जनतेवर लादूनच तो पैसा उभा करावा लागणार. कायदेमंडळाचा म्हणजे पर्यायानें बहुजनसमाजाचा पाठिंबा असेल तरच जादा कर बसवून सुधारणा घडवून आणण्याचा विधायक कार्यक्रम मत्रिमडळास पार पाडता येणार. गेल्या आठवड्यात मुंबई येथें कांहीं प्रांताच्या फडनवीसाची परिषद् ह्या परिस्थितीचा विचार करण्याकरितां भरली होती, तीमध्यें झालेल्या प्रमुख भाषणांत वर ध्वनित केलेलाच सूर ऐकूं आला. ह्यावरून आमच्या प्रांतिक बजेटाचा रागरंग काय आहे, याची कल्पना येईल.

## सुशिक्षित तरूण आणि व्यापार

### प्रो काळे यांचें व्याख्यान

येथील अनाथ विद्यार्थीगृहाचे विद्यमानें, तरूण विद्यार्थ्यांस चरितार्थाचे, उद्योगधद्याचे व व्यापाराचे मार्ग दाखविण्यांत यावे, ह्या उद्देशानें यदा एक व्याख्यानमाला गुफण्यात आली, तिचा समारोप म्हणून प्रो काळे यानीं वर मथळ्यात दिलेल्या विषयावर भाषण केलें. नोकरी, वकीली, वैद्यकी इत्यादि धंद्यात खेचाखेच झाल्याकारणानें सुशिक्षितवर्ग व बेकारी ह्याचें सहचर्य जमलें आहे असें म्हणून व्याख्यात्यांनीं खालील आशयाचे विचार प्रदर्शित केले ज्यांस आपलें पोट भरण्याची पात्रता नसते अशा माणसास सुशिक्षित म्हणावें ह्या प्रकारची एक व्याख्याच आज जणू काय बनली आहे ! वास्तविक पहातां शिक्षणाचा परिणाम असली अपात्रता निर्माण करण्यात का व्हावा ? शिकलेल्या माणसांची बुद्धि विकास पावली असतां कल्पकता व उद्योग ह्याच्या जोरावर त्यास पोटापाण्याची पचाइत पडू नये. उद्योग किंवा धद्दा म्हणजे केवळ हस्तव्यवसाय नव्हे आणि धान्य व कापड ह्याची खरेदी-विक्री करणें हाच व्यापारहि नव्हे. मुबईच्या शेअरबाजाराचें उदाहरण घेतल्यास तेथें दररोज लक्षावधि रुपयाची उलाढाल होते व हजारो लोक तिच्यावर पैसा मिळवून पोट भरतात. ज्यांस सुशिक्षित म्हणता येईल असे लोक ह्यामध्यें फारच थोडे आहेत, पण बुद्धीचा व बलाचा उपयोग करून पैसा मिळवणारे अल्पशिक्षितच त्यामध्यें बहुसख्य आहेत रोख्याची खरेदी-विक्री करणें हा व्यापारच होय आपल्या आयुष्याचा विमा उतरण्यास लोकाचें मन वळवून त्यास विमा-पॉलिसी देणें हा व्यापारच आहे तो शिकलेले महाराष्ट्रीय वाढत्या प्रमाणांत अलीकडे करू लागले आहेत ह्यावरून व्यापारास शिक्षणाचें वावडें आहे ही कल्पना चुकीची आहे, हें स्पष्ट दिसून येतें. कांहीं व्यवसाय हलके आहेत किंवा आपणांस साधावयाचे नाहींत ही समजूत शिकलेल्या लोकाच्या मनातून नाहींशी झाली पाहिजे. त्याचप्रमाणें, व्यावहारिक व्यवसाय हातीं घेण्यास तरुणांस अपात्र करणारे असे शिक्षणपद्धतींतले दोष दूर झाले पाहिजेत. धंदे व व्यापार ह्यांच्या शिक्षणाची सोय आता झाली आहे तिचा फायदा तरुणानीं घेणें जरूर आहे देशी व परदेशी व्यापाराचें उदाहरण घ्या. शेतात झालेल्या मालाची व्यवस्था तो गिऱ्हाइकाच्या हातीं पडेपर्यंत होते, तिच्या साखळींत किती दुवे असतात, आणि त्यामध्यें व्यापारास किती वाव असतो तो पहा पण उदरनिर्वाहाचें व सामाजिक उपयुक्ततेचें त्यांत साधन आहे ह्याची माहिती किती सुशिक्षितांस असते आणि ती माहिती मिळवून तिचा स्वत.करिता उपयोग करून घेण्याची प्रवृत्ति किती जणात दिसून येते ? अशा तऱ्हेचे व्यवसाय अनेक आहेत. त्यामध्यें महाराष्ट्रीय तरुणाना प्रवेश होणें अगम्याचें आहे आज त्यांचे दरवाजे सुशिक्षितास बंद आहेत असें दिसतें ते खुले झाले पाहिजेत आणि नवीन द्वारें उघडण्यांत आलीं पाहिजेत. शिक्षकांनीं विद्यार्थ्यांची दृष्टि व बुद्धि व्यावहारिक व्यवसायांकडे वळविली आणि त्याच्याशीं पालकानीं सहकार्य केलें तर ,महाराष्ट्राची आर्थिक उन्नति घडून येईल व सुशिक्षित वर्गाच्या बेकारीचा प्रश्न सुटेल. त्यासाठी व्यापाराचा विचार व्यापक रीतीनें केला पाहिजे आणि शिक्षण व उद्योगव्यवसाय ह्यांमध्यें विरोध असल्याची खोटी कल्पना नाहींशी झाली पाहिजे. शिक्षणक्रम व शिक्षणपद्धति ह्यामध्यें योग्य सुधारणा झाल्यास सुशिक्षिताची बुद्धि व्यापारांत उत्कृष्ट रीतीनें चालू शकेल. विशेष न शिकलेला मनुष्य सहज पोट भरू शकतो पण शिकलेला माणूस बेकार बनतो ह्या विपरींत प्रकाराचा खोल विचार केला असता आवश्यक असलेल्या सुधारणेचे मार्ग सहज दिसतील. सुशिक्षित वर्गात व्यावहारिक प्रवृत्ति मात्र निर्माण झाली पाहिजे.


## Gokhale Institute of Politics and Economics

SERVANTS OF INDIA SOCIETY'S HOME,
POONA 4.

ADMISSIONS TO STUDENTS.—reading for the M A Examination by paper or by thesis in Economics Two scholarships of Rs 25 p.m to be awarded to research students.

D R GADGIL,
Director

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed percentage tenders in Form B-1 for the following works are invited up to 30-6-1937. Other particulars regarding the contract etc can be had at the Undersigned's Office on any working day during Office hours

| | | Estimated cost Rs. |
|---|---|---|
| 1 | Improving the Karwar-Bellary Road section from Gadag to Hesrur | 4 082/- |
| 2 | Providing additional accommodation for patients at the Mental Hospital, Dharwar | 12,160/- |

2. The acceptance of the tender rests with the Undersigned and no reason will be given for acceptance or rejection of any

Executive Engineer's Office
Dharwar, 11th June 1937

P. K SHINDE
Executive Engineer,
D Dn

## आयुर्वेद-महाविद्यालयाच्या इमारतीच्या

### बांधकामाची टेंडर नोटीस

सर्व कंत्राटदार लोकास कळविण्यात येतें कीं, पुणें येथील आयुर्वेद-महाविद्यालयाकरितां ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलजवळ इमारत बाधावयाची आहे. कामाची अदाजें किंमत अदमासें वीस हजार रुपये होईल काम सुरू केल्यानंतर चार महिन्याच्या आत पुरें व्हावयास पाहिजे कामासंबधी लागणारी माहिती ( टेंडर फॉर्म्स, स्पेसिफिकेशन्स, नकाशे वगैरे ) खाली सही करणार यांच्याकडे मिळेल टेंडर फॉर्मची किंमत प्रत्येकीं दोन रुपये ठेविली आहे तरी ज्याना टेंडर देण्याची इच्छा असेल, त्यानीं ता ३०-६-३७ च्या आंत खाली सही करणार याच्याकडे सीलबद्द टेंडरें दुपारीं २ ते ६ चे दरम्यान आणून द्यावीत टेंडरबरोबर बयाणा-रक्कम रु. २०० भरली पाहिजे सर्वांत कमी किंमतीचें अगर कोणतेंहि टेंडर स्वीकारण्यास खाली सही करणार बांधले जात नाहीत

ना त्र्यं जोशी,
मंत्री, आयुर्वेद-महाविद्यालय, पुणें.

## स्फुट विचार

### प्रांतिक सुधारणांचा व करांचा कार्यक्रम

नवीन राज्यघटना पद्धतशीर रीतीनें सहा हिंदी प्रांतात चालू झालेली नाहीं. त्यांपैकीं संयुक्त प्रांत, बहार, आसाम, मध्यप्रांत व मुंबई ह्यांमधील हंगामी प्रधानमंडाळांतल्या फडनवीसांची परिषद् मुंबईस भरली होती. मँटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणा ह्या नावानें संबोधिली जाणारी राज्यघटना गेलीं सोळा वर्षें अमलांत असतां तिच्या मुदतींत जनतेच्या सुधारणेबाबत पाऊल फारसें पुढें टाकतां आलें नाहीं आणि नवीन प्रांतिक स्वायत्ततेच्या प्रारंभीं जबाबदार मंत्रिमंडळानें प्रगतीचा कार्यक्रम हातीं घ्यावयाचा म्हटल्यास सरकारजवळ पैसा नाहीं अशी तक्रार सर धनजीशहा कूपर व विशेषतः श्री. जमनादास मेथा ह्यानीं केली. मध्यवर्ती सरकाराकडून सहाय मिळण्याची आशा नाहीं, खर्चांत काटकसर होण्यास फारशी जागा नाहीं, नवीन कर्ज काढण्याची सोय नाहीं, तेव्हां जादा कर बसवून सुधारणेच्या कार्यक्रमाप्रीत्यर्थ पैसा खर्च करण्यावांचून गत्यंतर नाहीं हा दोघांच्याहि भाषणाचा मथितार्थ होता. राजकीय सुधारणांच्या उपक्रमाच्या निराशाजनकत्वाचें अधिक भडक चित्र काढणें कठीण आहे. नवीन कर बसवणें अपरिहार्य आहे असें सिद्ध झालें म्हणजे गरीब वर्गास सूट देऊन श्रीमंतांवर कराचा बोजा बसवावा हें ओघानेंच प्राप्त होतें. पण मध्यवर्ती सरकाराच्या करक्षेत्रात न येणारी व प्रांतिक सरकाराच्या कक्षेंत पडणारी श्रीमंती शोधून काढून तिच्यांतला जादा हिस्सा घेणें सोपें नाहीं. गेल्या सात वर्षांतल्या प्रचलित आर्थिक मंदीमुळें श्रीमान म्हणवल्या जाणाऱ्या वर्गाचेंहि कर देण्याचें सामर्थ्य मर्यादित झालें आहे. शिवाय, प्रांतिक सरकारांस शेतकऱ्यांवरचा बोजा कमी करावयाचा आहे व दारूचें उत्पन्न, मद्यपानास आळा घालण्याकरितां, सोडावयाचें आहे आणि त्याबरोबरच लोकोपयुक्त बाबींवरचा खर्च वाढवावयाचा आहे. एवढा पैसा करांच्या मार्गानें कसा उभा होणार आणि समाजांतील कोणत्याहि वर्गास अन्याय होणार नाहीं अशा रीतीनें कोणते कर बसवणार हा पेच फडनवीसास सध्या पडला आहे. बहुजनसमाजाच्या पाठिंब्यावाचून नवीन कराचा कार्यक्रम पार पाडणें दुर्घट आहे हें सरकारनें लक्षांत ठेविलें पाहिजे.

### ब्रिटिश व्यापारास सरकारी सवलती

आपला परराष्ट्रीय व्यापार वाढावा असें व्यापारी व सरकार ह्यास वाटतें आणि त्याकरितां ह्या व्यवहाराच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा त्यांचा प्रयत्न सतत चालू असतो. आंतरराष्ट्रीय अविश्वास, अनिश्चितपणा व अस्वस्थता ह्यांचे योगानें परदेशात माल पाठविला असतां त्याचा पैसा तिकडील गिऱ्हाइकांकडून खात्रीनें हातीं येईल ह्याचा भरंवसा व्यापाऱ्यांस वाटत नाहीं आणि ते कित्येक देशांशीं व्यवहार करण्यास धजत नाहींत ह्या अडचणीवर उपाय म्हणून ब्रिटिश सरकारनें व्यापाऱ्यांस परदेशीय गिऱ्हाइकांकडून पैसा मिळावयाच्या बाबतींत हमी घेण्याची योजना अमलांत आणिली आहे. परराष्ट्रीय व्यापार खात्याच्या स्वाधीन सुमारें ३५ कोटि रुपयांचा फंड करण्यांत आला आहे आणि त्याचा उपयोग व्यापाऱ्यास दिल्या जाणाऱ्या हमींची पूर्तता जरूरीप्रमाणें करण्याप्रीत्यर्थ होत आहे. ह्या योजनेचा फायदा ब्रिटिश व्यापारी घेत आहेत, म्हणून हमीच्या फंडाची रकम ६७ कोटि रुपये इतकी वाढवावी आणि सरकारी हमीची मुदत १९५० सालापर्यंत दीर्घ करावी ह्या अर्थाचा ठराव प्रधान मंडळाच्या वतीनें परराष्ट्रीय व्यापार खात्याचे चिटणवीसांनीं कॉमन्स सभेपुढें मांडला आणि तो सर्वानुमतें मान्य झाला. ब्रिटिश सरकार आपल्या व्यापाऱ्यांस कशा सवलती व उत्तेजन देतें ह्याचें प्रस्तुत उदाहरण लक्षात ठेवण्यासारखें आहे. ह्याच प्रकारचें दुसरेंहि एक उदाहरण येथें नमूद करण्याजोगें आहे. साम्राज्य प्रतिनिधींची एक परिषद् लंडनमध्यें भरली होती तिच्या नाविक समितीनें अशी शिफारस केली आहे कीं पॅसिफिक महासागरात वावरणाऱ्या ब्रिटिश व्यापारी जहाजांस द्रव्यसहाय देण्यांत यावें. व्यापारी व धंदेवाले यांनीं स्वतःच्या पायांवर उभें राहून आपले व्यवहार करावे आणि सरकारच्या तोंडाकडे पाहून जनतेनें दिलेल्या करांच्या उत्पन्नांतून सहाय मिळण्याची अपेक्षा करूं नये हें पुस्तकी तत्व पुस्तकांत राहून व्यावहारिक दृष्टीनें ब्रिटिश सरकार स्वदेशी उद्योगांस द्रव्यद्वाराहि उत्तेजन व पाठिंबा देतें. हेंच धोरण हिंदुस्थानांत अवलंबिलें जावें ह्यापेक्षां निराळी मागणी येथील जनतेनें केलेली नाहीं. इंग्लंड तें इंग्लंड आणि हिंदुस्थान तें हिंदुस्थान असा प्रकार होतां कामा नये.

### हिंदी दुय्यम धंद्यांस संरक्षण

हिंदु-जपान व्यापारी कराराची पहिली मुदत मार्च, १९३७ अखेर संपल्यानंतर नवीन करार करण्यांत आला, त्यांतील मुख्य अटी पूर्वीच्या करारास अनुसरूनच आहेत. तथापि, कपाशीचे कापडाच्या धंद्याप्रमाणें इतरहि अनेक देशी धंद्यांस जपानी स्पर्धेची झळ लागते, ती कमी करण्याची योजना करारांत कोठेंच अंतर्भूत नाहीं. कांच सामान, होजिअरी, रेशमी कापड, तारेचे खिळे, अत्तरें, रंग, छत्र्या, खेळणीं, साबण इत्यादि दुय्यम प्रतीच्या हिंदी धंद्यांस जपानी स्पर्धा मारक होत आहे. वरील प्रकारचा सुमारें २ कोटि रुपयाचा जपानी माल हिंदुस्थानांत दरसाल आयात होतो आणि ह्या आयातीचें प्रमाण एकसारखें वाढत आहे. ह्या देशी उद्योगधंद्यांस संरक्षण देण्याचे मार्गांतील अडचणी दूर करण्याचे हेतुनें हिंदुस्थान सरकारनें १८९४ चा इंडियन टॅरिफ ॲक्ट बदलून घेतलेलाच आहे. ह्यामुळें आतां फिस्कल कमिशनच्या सूचनांनुसार एकाद्या धंद्यास संरक्षणास पात्र होण्याकरितां पूर्ण करावयाच्या अटी पार पाडणें लहानसहान धंद्यासहि शक्य झालें आहे. तेव्हां देशी दुय्यम धंद्यांशीं अनिष्ट स्पर्धा करणाऱ्या परदेशी मालावर किमान मोल परिमाण (ॲड व्हॅलोरम) जकात बसविण्यास अडचण येणार नाहीं. मुंबई येथील इंडियन इंडस्ट्रीज असोसिएशन व इंडियन मर्चंटस चेंबर हीं ह्याबाबत प्रयत्न करीत आहेत व हिंदुस्थान सरकार ह्या प्रश्नाकडे सहानुभूतिपूर्वक पाहील, अशी आशा वाटण्यास जागा निर्माण झाली आहे.

### टाटा कंपनीची बोनस वाटण्याची नवी योजना

आपल्या नफ्यांतील कांहीं भाग, कामगारांस त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल बक्षीस देण्याची कित्येक कंपन्यांची पद्धत आहे टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीनेंहि गेलीं तीन वर्षें ओळीनें अशा रीतीनें बोनस दिलेलें आहे, व आपल्या नोकरवर्गास कंप-

नीच्या यशाचे वाटेकरी केलेले आहे. बोनसच्या पद्धतीस स्थाइकपणा यावा ह्या हेतूनें टाटा कंपनीनें आता एक कायमची योजना आखली आहे.

डिव्हिडडच्या रूपानें भागीदारास द्यावयाची रकम एक कोटि रुपयांपेक्षा ज्यास्त भरली म्हणजे एका कोटीवरील प्रत्येक २५ लाख रुपयांमागें कंपनीच्या नोकरास अर्ध्या महिन्याचा पगार बक्षीस मिळावयाचा आहे ह्या वाटणीचें कोष्टक खालीलप्रमाणें होईल:—

| भागीदारास वाटलेला नफा ( लक्ष रु ) | नोकरास मिळावयाचें बोनस |
|---|---|
| १०० ते १२५ | ½ महिन्याचा पगार |
| १२५ ते १५० | १ " " |
| १५० ते १७५ | १½ " " |
| १८५ ते २०० | २ " " |

इत्यादि.

बोनस आतांपर्यंत एका रकमेनें देण्यांत येत असे ह्यापुढें, ५०० रुपयांपेक्षा कमी दरमहा असणारास तें हप्त्यानीं देण्यात येईल. हे हप्ते पुरे होण्यापूर्वी कामगार कामावरून गेला, तर शिलक बोनस त्यास देऊन टाकण्यात येईल ५०० रुपयावरील नोकराच्या बोनसची रकम ट्रस्टीजमार्फत कंपनीच्या भागांत गुंतविली जाईल व नोकर नोकरी सोडून जाताना हे भाग त्याचे नावानें वर्ग केले जातील अगर ते विकून त्याची रकम नोकराचे हवाली केली जाईल. भागावरील डिव्हिडड नोकरास वेळोवेळ मिळत राहील. १९३७ सालाचें बोनस नुकतेंच जाहीर झालें असून, कपनीच्या नोकरांस व कामगारास २० लक्ष रु मिळावयाचे आहेत. टाटा कंपनीनें आखलेली ही वरील योजना चालक व नोकरवर्ग ह्यामध्यें सलोखा निर्माण करून, कपनीचे भागीदारासहि जादा नफा मिळवून देईल आणि अशा रीतिनें धंद्याची प्रगति घडवून राष्ट्रीय प्रगतीस सहायकारक होईल, अशी आशा आहे.

---

**प्रस्थापित यशाच्या किंमतीची ( गुडविल ) चचलता**

पेटंट औषधें तयार करून विकणाऱ्या कपन्याची चलती औषधाच्या लोकप्रियतेवर अवलंबून असते व ही लोकप्रियता संपादन करण्यास जाहिरातींवर बेसुमार खर्च करावा लागतो. औषधाची "गुडविल" हीच सहराहु कंपन्याची मुख्य जिंदगी असते. क्रुशन सॉल्ट कपनीच्या भागाचे बाजारभावांत झालेल्या आदोलनानें ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. ह्या कंपनीच्या २० शिलिंग दर्शनी किंमतीच्या भागाची किंमत गेल्या वर्षी ६० शिलिंगापर्यंत चढली होती, तीं आतां ३२½ शिलिंगांवर उतरून ठेपली आहे कपनीच्या मालानें लोकप्रियतेचें अत्युच्च शिखर गाठलें असून, ह्यापुढें जाण्यास त्यास वाव नाहीं आणि वाढत्या प्रचाराचे मानानें नफ्याचें प्रमाण वाढण्याचा सभव नाहीं, असें अनुमान वरील आकड्यावरून सकृद्दर्शनीं निघण्यासारखें आहे. विशिष्ट नावाची प्रसिद्धी कायम रहाण्यावर मालाचा खप व त्यांतून होणारा फायदा पुष्कळसा अवलबून रहातो विशिष्ट मालास तशाच प्रकारच्या दुसऱ्या मालाची स्पर्धा सहन करावी लागते आणि ह्या चढाओढींत जो तगतो, त्याची गुडविल कांहीं काळपर्यंत घसरली असली तरी ती पुन्हां सावरते.

---


# The Willingdon College, Sangli.

Reopens for the new academic year on the 21st of June Registration of names has commenced on the 7th June. The college provides for both Arts and Science courses in the first two years, for B A. degree courses, pass and honours, and for post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, cheapness and efficiency are the special features of the College.

The tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term per student is Rs. 12 for a double and Rs 15 for a single room. Boarding charges come to about Rs 12 p m. Further information can be had on application

Arrangements are made to secure accommodation for lady students in a well conducted hostel in Sangli.

D. G. Karve,
Principal.

---

# धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल . ... ... | रु | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भाडवल ... ... ... | रु | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फड .. .. ... | रु. | १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुबई ), बान्द्रें ( मुबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दरगेजच्या रु ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाही कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों, व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात

एजंट:— टी आर लालवाणी.

---

**डॉ. जोशी म्हणजे जी. जी. ब्रदर्संचीं मलमें**—त्वचा रोगांवर अत्यंत लवकर गुण देतात
डझनास १॥रु. गरिबास फुकट १८९ सदाशिव पुणें

## दौंड पेटा सहकारी परिषद्

पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें केडगाव येथें दौंड पेटा सहकारी परिषद् ता. १ जून, १९३७ रोजीं रावसाहेब जाचक, बारामती, याचे अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेस सोसायट्याचे प्रतिनिधी, सेक्रेटरी व इतर निमंत्रित पाहुणे मडळी वगैरे मिळून सुमारें १५० लोक हजर होते. त्यात श्री वाय आर दाते, आण्णासाहेब देवभानकर, बापुसाहेब भानू, पी व्ही कुलकर्णी, इगळे, मोकाशी, आबासाहेब सावत, शकरराव इनामके, सुपरवायझर केडगाव, वगैरे मडळी प्रामुख्यानें दिसत होती मुबईहून प्रॉ को इन्स्टिट्यूटचे सुपरिन्टेंडेंट श्री. तळपदे हेहि परिषदेस आले होते.

परिषदेस सुरुवात होण्याचे दृष्टीनें इन्स्टिट्यूटचे प्रेसिडेंट श्री. दाते यानीं जमलेल्या सर्व मंडळींचें मन:पूर्वक स्वागत केलें आपल्या स्वागतपर भाषणात, सहकारी चळवळीच्या हल्लीच्या परिस्थितीचें यथार्थ वर्णन करून हल्लीच्या दुष्काळी परिस्थितींतून पार पडण्यास या चळवळीचें सहाय हें किती उपयुक्त आहे, याची त्यानीं छाननी केली अध्यक्षाची निवड झाल्यावर व श्री. इगळे यानीं परिषदेस आलेले सदेश वाचून दाखविल्यानंतर अध्यक्ष, रावसाहेब एस टी जाचक, याचें भाषण झालें. सहकारी चळवळ ही स्वावलबन, काटकसर, परस्पर सहाय ह्या तीन तत्त्वावर प्रामुख्यानें उभारली गेली असून या तत्त्वानुसार सहकारी चळवळीचा उपयोग करून घेऊन आपली आर्थिक परिस्थिति सुधारणें किती आवश्यक आहे याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें आपली ही चळवळ सरकारी आहे अशी भ्रामक कल्पना व समजूत झालेली आहे परंतु चळवळ लोकाची असून ती पूर्णपणें यशस्वी करण्याची जबाबदारी लोकावर आहे हें आपण विसरून चालणार नाहीं, क या दृष्टीनें आपण आपले पायावर उभे राहिले पाहिजे तरच या चळवळीचें सारें मर्म आपणास कळलें असें होईल, असें ते म्हणाले. परिषदामुळें एका विचारें व सघसक्तीच्या जोरावर काम करण्याची सवय होते व मनावर तसेच परिणाम होतात इन्स्टिट्यूटकडून होत असलेले प्रयत्न स्तुतीस सर्वथैव पात्र आहेत हें सागून याबद्दल त्यानीं समाधान व्यक्त केलें

याप्रमाणें भाषण झाल्यानतर दुष्काळी परिस्थितीमुळें सोसायट्याच्या वसुलावर झालेला परिणाम व त्या दृष्टीनें चालू वसुलाचें व नवीन कर्जें देण्याबाबतचें धोरण, सोसायट्याच्या ताब्यात आलेल्या जमिनीची विल्हेवाट लावण्यासबधीं योजना, लँडमार्गेज बॅंकेनें सोसायट्याच्या सभासदाना कर्जें देताना ठेवण्याचें धोरण, दौंड पेट्याकरिता सहकारी खरेदीविक्री संघ स्थापन करणें, सोसायट्याच्या सभासदाकरिता तीन वर्षें मुदतीनें साधारण क्रेडीट मजूर करून देण्याबाबतची नवीन योजना, कोठागाच्या योजनेचा फायदा सर्व शेतकरी बधूंना मिळण्याबाबत बॅंकेनें द्यावयाची सवलत, सोसायट्यानीं सहकारी शिक्षण घेतलेलेच सेक्रेटरी नेमणें वगैरेबाबत महत्त्वाचे विषयावर सागोपाग चर्चा होऊन ठराव पास झाले

श्री दाते, भानू, देवभानकर, कुळकर्णी, मोकाशी, इंगळे, डी ए सावत, इनामके वगैरे मडळींनीं चर्चेत प्रामुख्यानें भाग घेतला होता

येणेंप्रमाणें ठरावाचें काम झाल्यावर, अध्यक्षानीं समारोपादाखल भाषण केलें नतर श्री. भा. त्र्यं. देवभानकर, ऑन. सेक्रेटरी, यानीं आभारप्रदर्शक भाषण करून आपले भाषणांत सहकारी चळवळीसंबधीं लोकाचीं कर्तव्यें काय आहेत याचेंहि खुलासेवार विवेचन केलें.

ही परिषद् यशस्वी करण्यांत केडगाव यूनिअनची इन्स्टिट्यूटला फार मदत झाली.

---

## सहकारी शिक्षणाचा उजळणी वर्ग

पुणें जिल्हा को इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें पुरदर तालुक्यातील सर्व सहकारी पतपेढ्याच्या सेक्रेटरीजकरिता ता ३१ जून १९३७ पासून सहकारी शिक्षणाचा उजळणी वर्ग (रिफ्रेशर्स क्लासेस) मु. सासवड येथें माळी समाज सभागृहात भरविण्यात आले होते या वर्गाचा उद्घाटन समारंभ श्री. टिळेकर (चेअरमन पुरंदर तालुका सु. यूनियन) याचे हस्तें करण्यात आला क्लासचा सर्व सोसायट्याच्या सेक्रेटरींनीं फायदा घेतला सहकारी सोसायट्याच्या कारभारास आवश्यक अशा विषयावर दररोज सरासरीनें ४-५ तास व्याख्यानें देण्यांत आलीं असून श्री वाय आर दाते, श्री. चितळे, श्री. कामत वकील सासवड, श्री पाडव, रा इगळे, रा गाधी सुपरवायझर वगैरे मडळींनींही भाग घेतला होता. सेक्रेटरींच्या कामकाजात व्यावहारिक अडीअडचणींची नोंद घेऊन त्यावर शेवटीं चर्चा व विचारविनिमय करण्यात आला.

ता ६ जून, १९३७ रोजीं सायकाळीं क्लासचा समारोपसमारभ श्री वाय आर, दाते याचे अध्यक्षतेखालीं झाला.

---

### पुणें जिल्हा सहकारी लँड मॉर्गेज बॅंक लि

वरील बॅंकेकडे मे, १९३७ अखेर एकूण ५½ लक्ष रुपये मागणीचे ३१७ कर्जाचे अर्ज आले, त्यापैकीं ८५ अर्ज बोर्डानें नामजूर केले आहेत. प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बॅंकेनें १½ लक्ष रुपयाचीं कर्जें मजूर केलेलीं असून ७८ अर्जदारास ९० हजार रु. आजपावेतो वाटलेले आहेत

---

### लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें.

मि सी. ई. ॲटकिन, आय. एस ई, सुपरिंटेंडिंग एंजिनियर, डेक्कन इरिगेशन सर्कल, यानीं निरा नदीच्या कालव्याचा व पाटबधाऱ्याचा भौगोलिक नैसर्गिक रचना दाखविणारा प्रदेशाचा नमुना लॉर्ड रे इडस्ट्रियल म्यूझियम पुणें या सस्थेच्या सग्रहालयांत आणून माडिला आहे हा नमुना मि एन् एस. जोशी, बॉंबे एंजिनिअरिंग सर्व्हिस, यानीं तयार केलेला आहे हा नमुना फार उद्बोधक व महाराष्ट्राच्या दृष्टीनें भारी महत्त्वाचा आहे या नकाशानें महाराष्ट्राच्या एका आर्थिकदृष्ट्या फार उपयुक्त विभागाची माहिती करून दिलेली आहे निरा नदी, तिचे पाटबंधारे व कालवे यांची व या नमुन्यासबधींची माहिती शाळा—कॉलेजातील विद्यार्थ्यांस अगाऊ सूचना देऊन वर्ग आल्यास व इतर कोणासहि श्री जोशी यानीं स्वत: हजर राहून समजावून साग ण्याचीहि व्यवस्था केलेली आहे.

---

## औद्योगिक दिनांत भाग घेणाऱ्या संस्था

[ पुणें येथें ता. १ जून, १९३७ रोजीं प्रो वा गो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली औद्योगिक दिन पाळण्यांत आला, त्यांत भाग घेणाऱ्या कांहीं संस्थांची संक्षिप्त माहिती येथें दिली आहे उरलेल्या संस्थांची माहिती मागाहून देण्यांत येईल ]

### झारापकर टेलरिंग कॉलेज

मध्यम वर्गीतील तरुणांना शिवण व कर्तन कलेचें शिक्षण पाश्चिमात्य पद्धतीनें अल्प मोबदल्यात देता यावें ह्या हेतुनें झारापकर बंधूंनीं सन १९२१ सालीं या संस्थेची स्थापना केली. सध्या कॉलेजमध्यें ८० विद्यार्थी असून निरनिराळ्या भाषातून शिक्षण देणारे आठ शिक्षक आहेत. संस्थेंत हिंदुस्थानातील सर्व प्रमुख भागांतुन विद्यार्थी शिक्षण घेण्यास येतात

संस्थेचे व्हाइस प्रिन्सिपॉल, श्री गोविंदराव झारापकर, यांनीं प्रत्यक्ष लंडन येथें जाऊन या कलेचा फर्स्ट क्लास वुइथ ऑनर्सचा डिप्लोमा मिळविला आहे या कॉलेजमधून लंडन येथील टेलर ॲन्ड कटर ॲकेडमीचे डिप्लोमा दिले जातात. या कॉलेजला मुंबई सरकारनें मान्यता दिली असून परिक्षेंत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना सरकारी सर्टिफिकेटस् दिलीं जातात संस्थेंतील बहुतेक सर्व शिक्षक लंडन डिप्लोमा होल्डर असून या कलेंत त्यांनीं अत्यंत प्राविण्य मिळविलें आहे. ही संस्था अत्यंत अल्पावधींत भरभराटीस आली असून हिंदुस्थानांतील एक आदर्श संस्था झाली आहे

### डॉ. बी. आर गुणे यांचें 'धी स्पेसिफिक होम'

डॉ. बी. आर. गुणे यांनीं १९०२ सालापासून १९२५ पर्यंत फोटोग्राफर या नात्यानें काम केलें. या कलेंत त्यांनीं युरोपियन फोटोग्राफर्सवर चांगलाच जय मिळविला. त्यांनीं वरील अवधींत साधारण एक लाख रुपये मिळविले व ते औषधांच्या संशोधनांत खर्च करून व वीस, धीस तास काम करून डांग्या खोकला, नारू, झटके येणें, डोकें-दुखी, मलेरिया यांवर आजपर्यंत जे शोध लागले नव्हते असे अप्रतिम शोध लाविले त्यांच्या औषधांबद्दल मोठमोठे सरकारी अधिकारी तसेच डॉ. कुर्तकोटी, श्री. सुभाषचंद्र, यांच्यासारख्या विद्वानांचीं सर्टिफिकेटस् आहेत यांचीं औषधें हिंदुस्थानभर खपलीं जातात

### विणकर औद्योगिक सहकारी मंडळ

मुंबई इलाख्यांत हातमागाचा धंदा हा प्राचीन व घरगुती असा धंदा आहे. मुंबई सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रीज या खात्यानें वरील विणकर सहकारी मंडळ स्थापलें असून कोष्टी लोकांस अ प किंमतींत व हप्त्यानें आधुनिक यंत्रें देण्यांत येतात, तसेंच त्यांच्याकडून कच्चा माल पक्का करून घेण्यांत येतो अशा रीतीनें त्यांना उद्योगधंदा मिळतो, शिवाय विणकरी व इतर मंडळीस या कलेंतील सल्ला देण्यांत येतो. वरील संस्थेनें स्तुत्य कामगिरी चालविली आहे.

### के. नाईक यांची प्रीमीयर टेलरिंग कंपनी

पुण्यात ज्या उत्कृष्ट शिवण कामाच्या संस्था आहेत त्यांत के नाईक यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल या कंपनीचे मालक-श्री. नाईक हे तरुण व या कलेंत पाश्चिमात्य पद्धतींचें शिक्षण घेऊन पूर्ण वाकबगार झालेले आहेत यांनीं बरेच विद्यार्थी शिकवून तयार केले आहेत. सुशिक्षित मंडळींनीं एक वेळ याचे-कडील शिलाईचा जरूर अनुभव घ्यावा.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ३½% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—६ |
| ३% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०५—६ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—१० |
| ४% १९४३ ... .. ... | १०७—० |
| ३½% बिनमुदत ... ... | ९५—८ |
| ३½% १९४७—५० ... | १०६—० |
| ३½% १९४८—५२ ... ... | १००—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) .. | १०८—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसुर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—८ |
| ४% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया-(भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११०—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५२१—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु चा भाग ३½% डिव्हि. ) | १३६-१२ |

#### रेल्वज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०३—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु ४ आ. ) | ९१०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि १२% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १३४७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५४२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु प्रेफरन्स, १७ रु.८ आ ) | १६४ ८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु ऑर्डि. रु.६) | ३१७—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १३७०—० |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | १०—६—० |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५१—१३—० |

त्वरा करा
जेवणाची उत्तम सोय—न्यू प्रभाकराश्रम—नांवे नोंदवा
महिन्यांतून ४ फीस्टस्
दर १२ रु सदाशिव पेठ गाय आळीतील श्रीराममंदिराजवळ मॅनेजर—न्यू प्रभाकराश्रम

## गिरण्यांतील मजुरांची परिस्थिति

मुंबई इलाख्याच्या लेबर ऑफिसनें इलाख्यातील कपास, रेशीम, लोकर, इत्यादि सर्व तऱ्हेच्या कापडाच्या गिरण्यातील कामगाराची मजुरी, त्यांचे कामाचे तास, इत्यादि विषयीं माहिती जमा करून संकलित केली, ती रिपोर्टाचे रूपानें नुकतीच प्रकाशित झाली आहे. १९३४ सालीं सुरू केलेली ही चौकशी नुकतीच पुरी झाली आहे. चौकशी क्षेत्रांतील शेकडा ९८ ३८ टक्के कामगार कपासकापडाच्या गिरण्यात कामावर आहेत, ह्या दृष्टीनें इतर गिरण्याचे, चौकशीच्या दृष्टीनें, महत्त्व विशेष मोठें नाहीं. चौकशींत अतर्भूत असलेल्या २,६१,२२५ मजुरांत ८२ टक्के पुरुष व १७.५ टक्के स्त्रिया असें प्रमाण पडतें. मुलाची संख्या फक्त १,०२८ आहे. सोलापूर व खानदेश येथील गिरण्यातच त्यांतील बहुतेक मुलें कामावर आहेत.

गिरण्यात मजुराची भरती करण्याचें काम मुख्यतः जॉबर मार्फत केलें जातें विशेषतः अहमदाबाद येथें ही पद्धति प्रचलित आहे. मुंबईमधील गिरण्यांनीं जॉबरचा सर्वसत्ताधिकार कमी करण्याचा प्रयत्न चालविला आहे. जागा कमी झाल्यास, नोंदलेल्या मजुरास कामावर घेण्याचें धोरण त्यानीं अगिकारलें आहे

कापडाच्या गिरण्यामध्यें मजुरीचे बाबतींत एकवाक्यता आढळून येत नाहीं. वेगवेगळ्या शहरातच फक्त नव्हे, तर एकाच शहरातील निरनिराळ्या गिरण्यात एकाच कामाबद्दल वेगवेगळें वेतन देण्यात येतें. वक्तशीरपणाकरिता अहमदाबाद येथें काहीं ठिकाणीं बोनस देण्याची पद्धति आहे. वरिष्ठ दर्जाच्या नोकराखेरीज इतरास पगारी रजा देण्याची व्यवस्था बहुतेक कोणत्याच गिरणींत नाहीं.

सबध इलाख्यात मिळून गिरणी मालकानीं मजुराकरिता १३,१९८ खोल्या बाधून दिलेल्या आहेत ससून कपनीनें गिरणी कामगारास ताजें अन्न मूळ किंमतीस मिळण्याची व्यवस्था केली आहे गरीब स्त्री—कामगाराकरितां त्यानीं वसतिगृह चालविलें असून, तेथें ८२ माणशीं दरमहा फक्त ६ रु. खर्च येतो. लहान मुलाचे, वयोमानाप्रमाणें, १ ते २ रु घेतले जातात. मुबई व सोलापूर येथील गिरण्यानीं मजुराच्या वैद्यकीय गरजाकडे लक्ष पुरविलें आहे प‍रतु अहमदाबाद ह्या बाबतींत मागसलेलें आहे. कामगाराच्या व त्याच्या मुलाच्या शिक्षणाची मात्र सर्वच ठिकाणीं आबाळ होत आहे.

### बिहार प्रातातील स्त्री-मजूर

कोळशाच्या खाणीमध्यें काम करण्यास स्त्री-मजुराना १ जुलै, १९३७ पासून बदी करण्यात आली असल्याकारणानें, रिकाम्या होणाऱ्या स्त्रियांस काम पुरविण्याचा बिकट प्रश्न बिहार प्रातापुढें उभा आहे हिंदुस्थान सरकारच्या हातमागाचे धंद्याबाबतच्या देणगीचा विनियोग सदरहु स्त्रियास काम पुरविण्याकडे करावा, ही बिहार प्रातिक सरकारची सुचना मध्यवर्ती सरकारास ग्राह्य वाटत नाहीं नवीन रस्ते करण्याचें काम काढून स्त्री मजुराना काम द्यावें म्हटलें तर आपल्या कुटुबापासून दूर जाऊन काम करण्याची स्त्रियाची तयारी नाहीं.

### करडीचा प्रतिस्पर्धी सूर्यफूल

हिंदुस्थानांत करडीचें सालीना उत्पादन सुमारें १½ लक्ष टन आहे व त्यातील बराच मोठा भाग आजपर्यंत निर्गत होत असे. आता रशियामध्यें सूर्यफुलाची लागवड मोठ्या प्रमाणावर होऊ लागली असल्याकारणानें, हिंदी मालास युरोपमध्यें पूर्वीप्रमाणें मागणी येत नाहीं.


**S. T. C. CLASS**

**Camp Education Society, Poona 1.**

(RECOGNISED BY THE DEPARTMENT OF EDUCATION)

**For Teachers & Freshers**

The class starts work on 21st June 1937

Efficient staff & expert guidance.

Apply for prospectus to the Secretary.

**P K ATRE,**

B. A, B. T., T. D. ( Lond ),

Principal.

श्री

टिळक महाराष्ट्र विद्यापीठास जोडलेलें,

आयुर्वेदाचें उच्च शिक्षण देणारें

**आयुर्वेद महाविद्यालय, पुणें**

उन्हाळ्याच्या सुट्टीनतर ता २१ जून १९३७ पासून सुरू होईल प्रवेश परीक्षा (Matriculation) पास असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल अभ्यासक्रम चार वर्षांचा सपूर्ण आयुर्वेदाच्या शिक्षणाबरोबर पाश्चात्य वैद्यकाचेंही शिक्षण मिळतें प्रत्यक्ष शिक्षणाच्या सर्वांत अधिक व उत्कृष्ट सोयी आहेत प्रत्यक्ष शिक्षणाच्या सस्थाः—

**(१) ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलः**—यामध्यें ४० राहत्या रोग्याची सोय असून बाहेरून औषधास येणाऱ्या रोग्याची सख्या रोज २०० वर असते. शस्त्रकर्माची उत्तम सोय असून दरसाल ५०० च्यावर महत्त्वाचीं शस्त्रकर्में होतात सर्व मुंबई इलाख्यांत हें एकच व नमुनेदार आयुर्वेदीय रुग्णालय असून यामध्यें विद्यार्थ्यांच्या रोग-निदान-चिकित्सा व शस्त्रकर्में या विषयांच्या प्रत्यक्ष शिक्षणाची चांगली सोय आहे

**(२) सूतिका गृह.**—सध्या ही व्यवस्था अल्प प्रमाणांत असून १।२ महिन्यात १० सूतिकांची सोय करण्यांत येणार आहे यामुळें विद्यार्थ्यांना प्रसूतिकर्माचे प्रत्यक्ष शिक्षणाची उत्तम सोय होईल

**(३) आयुर्वेद रसशाळा पुणें लिमिटेड.**—हा कारखाना लिमिटेड केल्यापासून औषध निर्माण करण्याचें काम फारच मोठ्या प्रमाणावर चालतें येथें विद्यार्थ्यांना सर्व औषध शास्त्रोक्त पद्धतीनें तयार करण्याचें शिक्षण मिळतें

**(४) शवच्छेदन-शालाः**—ही शाला सर्वांत मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें येथें विद्यार्थ्यांना शवच्छेदनाचें शिक्षण भरपूर मिळण्याची सोय आहे याशिवाय प्रयोग-शाला, वनस्पति सग्रह, इत्यादि सर्व सोयी आहेत.

सविस्तर माहितीसाठीं ०२ चीं तिकिटें पाठवावींत.

नवीन विद्यार्थ्यांनीं ता २० जूनपर्यंत ५ रु. प्रवेश-फीसह अर्ज पाठवावेत

पत्ताः—आयुर्वेद महाविद्यालय, २९७ सदाशिव, पुणें २ — पु ग नानल, अधिपति

**पाळणा** दरसाल हलूं नये म्हणून आमचें इच्छा गर्भ

**सभव औषध घ्या व संततिनियमन करा.**

औषध बद केलें कीं, मुलें होतात महिन्यांतून एकदांच घ्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट. ख. नि

गद्रे फिजीशिअन, खाडवा सी. पी

## मि. जॉन डी. रॉकफेलर

अमेरिकेंतील सुप्रसिद्ध कोट्याधीश, मि रॉकफेलर, हे आपल्या वयाच्या ९७ व्या वर्षी मरण पावल्याचें वृत्त गेल्या महिन्यात प्रसिद्ध झालेंच आहे. दीर्घायुष्यामुळेंच केवळ त्यास आपलें नाव जगात सन्माननीय करतां आलें, कारण वयाच्या ७५ व्या वर्षी त्यांच्या इतका तिरस्करणीय पुरुष अवघ्या अमेरिकेंत दुसरा कोणी नव्हता ! मि. रॉकफेलर ह्यांच्या प्रचंड धर्मादाय देणग्या-मुळें त्यास लोकप्रियता प्राप्त झाली, ती त्यांच्या ९० व्या वर्षी ! प्रतिस्पर्ध्यांस चीत करताना त्यांनीं मागेंपुढें कधींच पाहिलें नाहीं व ह्याबद्दल त्यांच्या कपनीस एकदा ८ कोटि रुपये दडहि झाला होता पेट्रोल शुद्ध करून विकणारी स्टँडर्ड ऑईल कपनी त्यानींच निर्माण केली आपल्या आयुष्यांत त्यानीं सुमारें २०० कोटि रुपयाच्या देणग्या दिल्या, त्यांचा विनियोग अखिल मानवजातीच्या हिताकडे व्हावा, अशी त्यांची योजना आहे. सार्वजनिक कार्यांत त्यानीं फारसा भाग घेतला नाहीं व त्याचे वैयक्तिक चरित्राची माहिती कोणासच नाहीं ते स्वस्त किंमतीचे कपडे वापरीत असत व एकाद्या गरीब कारकुनाप्रमाणें रहात. त्यास अग्निमांद्याची कायमची व्यथा होती. ग्रेटब्रिटनमधील केंब्रिज विश्वविद्यालयास आजपर्यंत मिळालेल्या देणगींत मि. रॉकफेलर ह्यांच्या देणगीचा नंबर अगदी वर लागतो.


**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २५, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि .**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुबई

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २


## दुसऱ्याची सही करण्याचा धंदा

दुसऱ्याची खोटी सही करणें हा गुन्हा आहे. पण त्याच्या सांगण्यावरून व त्याच्या सोयीसाठी त्याची सही पत्रांवर हुबेहूब उठवण्याचें काम करणारे कुशल "सह्याजी" अमेरिकेंत प्रतिष्ठितपणानें चागलें उत्पन्न मिळवतात कांहीं लोकास शेकडो, हजारो पत्रावर सह्या करण्याचें कारण पडत असतें आणि तें काम छापील किंवा रबरी शिक्क्याच्या सहीनें भागण्यासारखें नसतें. पत्र टाइपरायटरवर उठवलेलें असलें तरी दस्तुर खुद्द असल्यावाचून त्यात आपलेपणाचा व स्नेहभावाचा गुण उतरत नाहीं. कोणत्याहि सहीची नक्कल बरोबर उठवणारे हुशार कलावन्त पदरीं ठेवून कांहीं मंडळ्या अमेरिकेंत आपल्या गिऱ्हाइकांची सह्याविषयींची गरज भागवतात एक अत्यंत हुशार "सह्याजी" दर तासास सहाशे सह्या उत्कृष्ट रीतीनें करतो.

## घरे बांधण्यासाठी कर्ज देणाऱ्या ब्रिटिश मंडळ्या

मध्यम स्थितींतल्या लोकास स्वतःच्या मालकीचीं घरें विकत घेण्यासाठी कर्जे देणाऱ्या मंडळ्याचे व्यवहार इंग्लंडमध्यें फार मोठ्या प्रमाणावर चालतात हॅलेफॅक्स बिल्डिंग सोसायटीस दिलेल्या कर्जांची एकूण रकम सुमारें १२० कोटि रुपये असून कर्ज घेणाराची सख्या २½ लक्ष आहे. ह्यांपैकीं १½ लक्ष लोकांचें प्रत्येक कर्ज सरासरीनें सुमारें ६½ हजार रुपये आहे.


**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[स्थापना सन १९३५]

९३-१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज. सोनें, चांदी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,१४,३५० वसूल झालेलें भांडवल १,०७,०३५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात. या बँकेवरील चेक मुबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी

M. V GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## प्रांतिक फडनवीसांची परिषद्

मुंबई इलाख्याचे फडनवीस, श्री जमनादास मेहता, ह्याच्या पुरस्कारानें हिंदी स्वायत्त प्रांताच्या हंगामी प्रधान मंडळातील फडनवीसांची एक परिषद् मुंबई येथें गेल्या आठवड्यात भरली होती परिषदेस पाच प्रांताचे प्रतिनिधी हजर होते. मुंबई इलाख्याचे मुख्य प्रधान, सर धनजीशहा कूपर, ह्यांनीं परिषदेचें उद्‌घाटन करून मुंबईच्या गव्हर्नरचा संदेश वाचून दाखविला व नंतर श्री मेहता ह्याच्या अध्यक्षतेखाली परिषदेचें काम सुरू झालें. ते आपल्या प्रास्तविक भाषणांत म्हणाले.—

### श्री जमनादास मेहता यांचें भाषण

"प्राप्तीवरील कर, जकात, आगपेट्या, मीठ, साखर, इत्यादींवरील कर, ह्या वाढत्या उत्पन्नाच्या सर्व बाबी मध्यवर्ती सरकारनें स्वत.कडे राखून ठेवल्या आहेत प्रांताच्या वाटणीस फलदायी कर आलेले नाहींत. काटकसर, प्राप्तीवरील करात भागीदारी, कर्जउभारणी व नवीन कराची आकारणी ह्या चार मार्गांनीं प्रांतिक सरकारास उत्पन्न वाढविता येणें शक्य आहे.

गेलीं कांहीं वर्षे काटकसरीच्या मार्गाचा अवलंब करण्यातच गेलीं असल्यानें आता जास्त बचत करता येण्याची फारशी आशा नाहीं प्राप्तीवरील कराची मध्यम व प्रांतिक सरकारामधील वाटणी कायम झाली असल्यानें, उत्पन्नाचा तोहि मार्ग खुंटला आहे प्रांतानीं नवीन कर्ज उभारण्याच्या मार्गांत अनेक अडचणी असल्यानें, कर्जे उभारून कांहीं योजना पार पाडाव्या किंवा नाहीं, हा प्रश्नच उपस्थित करणें कठीण झालें आहे तेव्हा नवीन कर बसविणें, हा एकच मार्ग शिल्लक रहातो."

### परिषदेची फलश्रुति

परिषदेमध्यें, करवाढीसंबधीं तपशीलवार चर्चा करण्यात आली परंतु त्या संबधात प्रांताप्रांतामध्यें एकवाक्यता आढळली नाहीं. आसामसारख्या प्रांतामध्यें करवाढीस योग्य अशी चहाखेरीज एकहि बाब नाहीं, तर मुंबई इलाख्यात अनेक गोष्टींवर जादा कर बसविणें शक्य आहे हिंदुस्थान सरकारनें वाढत्या उत्पन्नाच्या सर्व बाबी स्वत.कडे राखून ठेवल्या याबद्दल परिषदेमध्यें तीव्र असमाधान व्यक्त झालें. प्रांतिक सरकारच्या ताब्यातील कराच्या बाबींचा विचार केला, तेव्हा प्रतिनिधींना असें आढळून आलें कीं स्थानिक स्वराज्य संस्थांचे मर्यादेवर अतिक्रमण केल्याखेरीज उत्पन्नात वाढ करता येणें अशक्य आहे म्हणजे, आज प्रांतिक सरकारें जी तक्रार मध्यवर्ती सरकाराविषयीं करतात तीच तक्रार त्यांस स्थानिक स्वराज्य संस्थाकडून ऐकावी लागेल, हें परिषदेमधील प्रतिनिधींना स्पष्ट दिसू लागलें परिषदेचे अखेर निश्चित असें कांहींच ठरलें नाहीं आणि वाढत्या उत्पन्नाची दहा-बारा सदरें चर्चिलीं गेलीं तरी त्याबाबत निर्णयात्मक विचार कोणत्याच प्रतिनिधीनें व्यक्त केले नाहींत अशा निराशजनक रीतीनें ह्या परिषदेची समाप्ती झाली नव्या राज्यघटनेमधील प्रांतिक स्वायत्ततेच्या मार्गांतील पैशाची अडचण किती तीव्र स्वरूपाची आहे, हें मात्र परिषदेमुळें सिद्ध झालें मुंबई शहरात व इलाख्यात आयात होणाऱ्या कपाशीवर पट्टी बसविण्याचा आपला निश्चय श्री. जमनादास मेहता ह्यानीं जाहीर केला.

### सोन्याचा भाव कायम रहाणार !

सोन्याचा भाव उतरणार नाहीं, असें आपलें मत जनरल स्मट्‌स ह्यांनीं जाहीर केलें आहे.

इनकम-टॅक्स कायदा वरचेवर बदलत आहे. तरी इन्कम-टॅक्स भरण्यात कायदेशिर रीत्या बचत करण्यासाठीं
वी. एल. ठोसर, पब्लिक अकौंटंट
यांचेकडेच आपलें काम सोपवा
पत्ताः—१५५, रविवार पेठ, सोन्यामारुतीसमोर, पुणें.
हेड ऑफिस.—४९५-९७ काळबा देवी रोड, मुंबई २

विक्रीस तयार } विक्षिप्तराव { दुसरी आवृत्ति
लेखक—प्रो वा. गो काळे
एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन फक्त लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे 'विक्षिप्तराव' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळामधून तें करण्यास फार उपयुक्त आहे किंमत फक्त १० आणे

CONFIDENCE
is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you.
NEW BUSINESS
Last year
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
(ESTD 1907)
*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* throughout India & the East
S. C. MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें

ही संस्था सन १९१८ सालीं स्थापन झाली सन १९१८ सालापासून आजपर्यंत सतत १९ वर्षे व्यापारी शिक्षणाचें कार्य या संस्थेनें केलें आहे. महाराष्ट्रीयांस व्यापारी शिक्षणाची दिशा दाखवून अशा शिक्षणाची आवड उत्पन्न करण्याचें बरेंचसें श्रेय या संस्थेस आहे.

एकंदर अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून त्यात मुख्यतः पुढील विषय येतात. देशी व इंग्रजी पद्धतीचा जमाखर्च, व्यापारी कायदा, लिमिटेड कंपन्यांच्या सेक्रेटरीचीं कामें, हिशेबतपासणी-शास्त्र, बँकेच्या व्यवहाराची माहिती, व्यापारोपयोगी पत्रव्यवहार

संपूर्ण कोर्स पूर्ण करणारा विद्यार्थी इंडियन मर्चंटस चेंबरच्या डि कॉम डिप्लोमा परीक्षा व कार्पोरेशन ऑफ अकौंटंट्सच्या ए सी. आर. ओ. अशा दोन्हीं परीक्षांस बसू शकतो.

या खेरीज, शॉर्ट हँड व टाईपरायटिंग शिकविण्याचीहि सोय केलेली आहे.

या संस्थेतून आतापर्यंत जे विद्यार्थी निरनिराळ्या व्यापार-विषयांचें शिक्षण घेऊन गेले त्यापैकीं कांहींजण स्वतंत्र धंद्यात पडले व पुष्कळसे जॉइंट स्टॉक व को-ऑपरेटिव्ह बँका, म्युनिसिपालिट्या, न्यूजपेपर ऑफिसेस, इन्शुअरन्स कंपन्या, इलेक्ट्रिक सप्लाय कंपन्या व इतर व्यापारी संस्था यामधून नोकरी करीत आहेत येथें शिक्षण घेऊन गेलेल्या विद्यार्थ्यांत मॅट्रिक, अंडरग्रॅज्युएट, ग्रॅज्युएट असा शिक्षणक्रम पुरा केलेले विद्यार्थी आहेत.

नवीन वर्ग २६ जूनला सुरू होत आहेत. तरी या संस्थेचा विद्यार्थ्यांनीं जरूर तो फायदा घ्यावा.

## हिऱ्यांचा व्यापार-जकातीस झुकांडी

मुंबईमध्यें हिऱ्याचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो आणि तो त्याच्या परदेशांतून होणाऱ्या आयातीवर अवलंबून असल्यानें व्यापारी व सरकार यांचें विशेष लक्ष त्याकडे लागणें स्वाभाविक आहे. हिऱ्यांचे दागिने वापरणें ही चैनीची व श्रीमंतीची गोष्ट आहे आणि त्याच्या आयातीवर जकात बसवून सरकारनें आपल्या उत्पन्नांत भर घालणें अगदीं रास्त आहे. तथापि, आकार लहान पण किंमत थोडी अशी हिऱ्याची स्थिति असल्याकारणानें जकात चुकवून ते बाजारात आणण्याचा मोह व शक्यता हीं उत्पन्न होतात ब्रिटिश हद्दीच्या बाहेरच्या बंदरांत आकारल्या जाणाऱ्या हलक्या जकातीच्या दराचा फायदा घेऊन कांहीं लोक हिरे तिकडून आणवतात आणि ह्याप्रमाणें ब्रिटिश बंदरांतली हिऱ्याची आयात कमी होऊन सरकारचें जकातीचें व व्यापाऱ्याच्या धंद्याचें उत्पन्न बुडतें. जकातीचा दर कमी करण्यांत आला असतां ब्रिटिश बंदरांत अधिक माल येऊन सरकारचें उत्पन्न हलक्या दरानेंहि वाढणें शक्य आहे. ह्या तत्त्वास अनुसरून हिंदुस्थानसरकारनें गेल्या सालीं हिऱ्यावरची आयात जकात २५ टक्क्यांची १० टक्के केली ह्या धोरणाचा परिणाम, त्यांच्या आयातीचे परिणाम पूर्ववर्षाच्या १५ लक्ष रुपयावरून ५४ लक्षांच्या वर गेलें जकात आणखी ५ टक्के कमी केल्यास ती चुकवण्याचा यत्न होण्याचें मूळ कारण नष्ट होईल असें हिऱ्याच्या व्यापाऱ्यांचें म्हणणें आहे पॉंडिचेरीमध्यें जकात माफक असल्यानें तिकडून ब्रिटिश हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर हिरे येतात असें आढळून आलें आहे ब्रिटिश हिंदुस्थानातली जकात चुकवण्याचे दुसरेहि मार्ग आहेत जकात आणखी कमी झाल्यास ते सर्व बंद होतील अशी अपेक्षा आहे

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी
मॅनेजिंग एजंटस,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं. २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणी भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

**महिंद्रकर ब्रदर्स**

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

# दी सनशाइन इन्शुअरन्स लि.

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनांचा प्रचार करणेकरतां पगारी एजट पाहिजेत माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा

**ब्रँच सेक्रेटरी,**
ब्रँच ऑफीस :-३३४ गणेश पेठ, पुणें.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
# N. MAHADEV & Co.
**DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS**
City Post Office Corner, POONA 2

# एशियन पॉलिसी

म्हणजेच

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

अल्प प्रिमियम आणि भरपूर बोनस

**धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड**
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

# S. B. JOSHI & Co.
**ENGINEERS & CONTRACTORS**
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

# पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
**रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी**
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
# झारापकर टेलरिंग कॉलिज्
आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

**Ardomix** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय.-एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगांवर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गलचलणें, हातांपायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरें करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत इतर बाजारी औषधें याची बरोबरी करूं शकत नाहींत अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून सध्या कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे ट स १२ आणे निराळा. गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत. पत्रव्यवहार करावा.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**
३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर

एजन्सीज —

मुंबई—यशवंत दत्तात्रय गाडगीळ, फणसवाडी, मुंबई २.
धामणगांव—मे भागवत ब्रदर्स, धामणगांव, वऱ्हाड.
हरदा—चौथाजी तुळशीराम आणि सन्स, हरदा, सी पी.
खानदेश— डॉ जी एन महाजन, मोठें वाघोदे, खानदेश.

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८२,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज़ बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुतविलेली एकूण रक्कम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठी पत्र-व्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## जनानी व मर्दानी कापड

मिळण्याचें खात्रीलायक एकच ठिकाण

### माधव सोमण ब्रदर्स,

लक्ष्मीरोड, पुणें. २

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application.

*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत व हिरड्या बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल ब्लॅक टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे

भावाचें माहितीपत्रक मागवा

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणे २

## K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

रोडगे यांच्याच मजबूत सतरंज्या वापरा.

आपल्या पैशाचा योग्य मोबदला मिळवा.

सर्वत्र मिळतात.

कारखाना पत्ता: ३० मिठगंज पेठ पुणे २

### न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ,

रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २३ जून, १९३७ अंक २५

INDUSTRIAL SOCIETY
**WORK SHOP**
**Furniture on hire on Reasonable Terms**
Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time.
Old Furniture also can be bought or sold on commission.
**SHEVAK Bros.** 153 Kasba, POONA. *Near Ganpati Temple*
Branch No. 1 : Fergusson Road.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा

**शेअरची विक्री पुनः सुरू झाली**

भांडवल तरतें राहून पांच टक्के नफा. २००० महाराष्ट्रीयांना उद्योगधंदा.

"महाराष्ट्रीयांना उद्योगधंदा मिळून रोजच्या चहाच्या कपांतील साखर महाराष्ट्रीयांनीं चालविलेल्या साखर-कारखान्याची मिळाली व भांडवलावर बँकेचें व्याज मिळालें तरी सुद्धा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांना आनंदच होईल.

आम्ही खादी वापरतों त्याचें कारण स्वाभिमानच.
हा तुमचा शेअरफॉर्म व हा चेक."

प्रेफरन्स शेअर रु. १० : : : ऑर्डिनरी शेअर रु. २५

शेअर फॉर्म्स व सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.**
२५७ बुधवार पेठ, पुणें २

**माधव सोमण ब्रदर्स**

जरी शालू, लुगडीं वगैरे. मोहक सर्व तऱ्हेचीं पातळें | पावसाळी कोट व छत्र्या | धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक

लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

# विविध माहिती

### हिंदी साखरेच्या निर्गतीस बंदी

साखरेच्या निर्गतीसबंधात एक आंतरराष्ट्रीय परिषद् भरून तिनें प्रत्येक राष्ट्रानें करावयाच्या साखरेच्या निर्गतीचा हिस्सा ठरवून दिला. हिंदुस्थान देशात हा धंदा वाढीस लागलेला असतांनाहि हिंदुस्थानास परिषदेंत स्थान नव्हतें हिंदी साखरेच्या निर्गतीची आवश्यकता आणि शक्यता परिषदेस न पटून, हिंदुस्थाननें साखर निर्गत करूं नये, असें तिनें ठरविलें ह्या करारावर सही करण्यापूर्वी मध्यवर्ती सरकार एका ठरावाच्या रूपानें कायदेमंडळाची संमति घेणार आहे, असें समजतें. ह्या ठरावास कसून विरोध होईल, हें उघड दिसतें.

### तागाच्या गिरण्यांतील मजुरांचे संपामुळें नुकसान

कलकत्ता येथील तागाच्या गिरण्यांत मजुरांचा नुकताच संप झाला, त्यांत एकूण २,१९,८०० कामगारांचे ९७,१६,५०० तास काम बुडालें. ३५½ लक्ष रुपये मजुरीच्या रूपानें त्यांस मिळाले असते, तेहि मिळाले नाहींत.

### ताजमहालाच्या दुरुस्तीकरितां पाऊण लाख रु.

हिंदुस्थानातील सुमारें ४ हजार ऐतिहासिक महत्त्वाचीं स्थानें सरकारी देखरेखीखाली संरक्षित आहेत, तीं दुरुस्तींत ठेवण्याकरितां दरसाल एक लक्ष रु. खर्चण्यांत येतात आग्रा येथील सुप्रसिद्ध ताजमहाल सध्यां रिपेरींत असून त्याप्रीत्यर्थ २५ हजार रु. मंजूर करण्यांत आलेले आलेले आहेत. तथापि, ७५ हजारावर खर्च जाईल, असा अजमास आहे.

### पहिल्या वर्गाच्या उतारूचा आरामशीरपणा वाढणार

आंतील हवा थंड राखणारे आगगाडीचे पांच खास डबे जी. आय. पी. च्या परळ वर्कशॉपमध्यें तयार करण्यात येत आहेत. मुंबई ते कलकत्ता ह्या डब्यातून प्रवास करणाऱ्या पहिल्या वर्गाच्या प्रत्येक उतारूस २६ रु. जादा द्यावे लागतील, असा अदाज आहे

### हुगळी नदीवरील नवीन प्रचंड पूल

कलकत्त्याजवळील हुगळी नदीवरील नव्या पुलाचें बांधकाम पुरें होण्यास ४ वर्षे लागतील व त्यास २½ कोटि रुपये खर्च येईल पुलावरील ७१ फूट रुंदीच्या रस्त्यावरून आठ वहानें समांतर जाऊं शकतील. दोन्ही बाजूंस पादचारी लोकांकरितां १५ फूट रुंदीचे फुटपाथ काढण्यात यावयाचे आहेत पुलाच्या कामामध्यें २७ हजार टन लोखंड उपयोगात आणलें जाईल

### स्वस्त दराची ज्यास्त वीज वापरा

मुंबई शहरास वीज पुरविणाऱ्या कंपनीनें आपले दर १ जुलैपासून पुनः उतरविले आहेत २३०.व्होल्टच्या मीटरचें मासिक भाडें ६ आण्यांचे ४ आणे करण्यांत आलें असून, पाळण्याकरितां घेण्यांत येणारा खास ४ आण्यांचा दर ह्यापुढें आकारण्यांत येणार नाहीं. पप-मोटारींसहि हीच सवलत मिळणार आहे. ग्राहकांची सोय पाहून आपला खप वाढविण्याचें धोरण कंपनीनें अंगीकारलें असून, गेल्या दोन वर्षांत तिसऱ्यांदा हा दरात उतार करण्यात येत आहे.

### अखिल भारतीय सहकारी परिषद्

प्रांतिक सहकारी बँका आणि इन्स्टिट्यूट्स ह्यांची अखिल भारतीय परिषद् बंगलोर येथें जूनच्या ३ व ४ ह्या तारखांस भरणार आहे

### सरकारी रेल्वेजचें उत्पन्न वाढलें

१ एप्रिल ते ३१ मे १९३७ अखेर हिंदी रेल्वेजचें १६ कोटि, ७५ लक्ष रु. उत्पन्न झालें. गेल्या वर्षांतील तत्सम मुदतीमधील उत्पन्नापेक्षां हा आकडा ८२ लाखांनीं मोठा आहे.

### हिंद-ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी

हिंद-ब्रिटन व्यापारी करारासंबंधातील वाटाघाटींविषयीं सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, शेठ कस्तुरभाई लालभाई व श्री घनश्यामदास बिर्ला ह्यानीं सर महमद झाफरुल्लाखान व मि. डेव्हिड मीक ह्याचेबरोबर प्राथमिक चर्चा करण्यास गेल्या आठवड्यांत सुरवात केली आहे. ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींबरोबर बोलणीं नुकतींच सुरू झालीं आहेत.

### कामकरी संघ व त्यांचे सभासद

१ मार्च, १९३७ रोजीं मुंबई इलाख्यातील कामकरी संघाची (ट्रेड युनियन्स) संख्या १०० भरली. त्यापैकीं ५२ मुंबई शहरात व १२ अहमदाबादमध्यें आहेत. ह्या मजूर संघाचे ८८ हजार सभासद आहेत, त्यापैकीं ५४ हजार एकट्या मुंबई शहरात व २४½ हजार अहमदाबादमध्यें आहेत.

### जर्मनीमधील जननाचें प्रमाण

| | एकूण जनन | दर हजारीं प्रमाण | एकूण विवाह | दर हजारीं प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९३५ | १२,७९,०२५ | १९·० | ६,५०,८५१ | ९·७ |
| १९३६ | १२,६१,२७३ | १८·९ | ६,११,११४ | ९·१ |

वरील आकड्यावरून असें दिसून येईल, कीं विवाहास उत्तेजन देण्याच्या जर्मनीच्या सरकारी धोरणास ह्यापुढें ज्यास्त यश येण्याचा संभव नाहीं. जननाचें प्रमाणहि कमी होण्याचा रंग दिसतो गेल्या वर्षी जर्मन लोकसंख्येंत ४ लक्ष ८३ हजारांची वाढ झाली.

### नवें 'वहातूक' खातें

सध्या हिंदुस्थान सरकारचीं (१) व्यापार व (२) उद्योगधंदे व कामगार अशीं दोन खातीं आहेत, त्यांचीं (१) व्यापार (२) वहातूक व (३) कामगार अशीं तीन खातीं करण्यात यावयाचीं आहेत. व्यापारखात्याकडेच उद्योगधंदे सोपविण्यांत येतील. नव्या 'वहातूक' खात्याकडे पोस्ट व तारा, ब्रॉडकास्टिंग, वैमानिक वहातूक, हवापाणी, बंदरें, अंतर्गत बोटींची वहातूक व रस्ते ह्या बाबी देण्यांत येणार आहेत. रेल्वेजचें खातेंहि वहातूक खात्याच्या मंत्र्याचे देखरेखीखाली राहील सर टॉमस स्टेवर्ट हे ह्या खात्याचे प्रमुख म्हणून काम करणार आहेत.

### ४० तासांच्या आठवड्यास विरोध

मजुराच्या कामाचे तासासंबधींचा प्रश्न आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेपुढें आहे. त्यावरील चर्चेचे वेळीं, सर एच पी. मोदी ह्यानीं ४० तासांच्या आठवड्यास कसून विरोध केला व हिंदी कापडाच्या गिरण्यास तो परवडणें अशक्य आहे, असें सांगितलें. तथापि, त्याबाबतच्या ठरावाचें पहिलें वाचन मजूर झालें हिंदुस्थान सरकारासहि ४० तासांचा आठवडा मान्य नाहीं. ग्रेट ब्रिटनहि ह्या सूचनेच्या विरुद्ध मत देणार आहे.

### जमशेदपूर येथील कामकऱ्यांस वीस लक्ष रुपये बोनस

जमशेदपूर येथील टाटाच्या कारखान्यातील कामकऱ्यांस वार्षिक नफ्यामधून देणगीदाखल रकम मिळण्याची योजना झाली आहे. तीस अनुसरून गेल्या वर्षाकरिता २० लक्ष रुपयाचें बोनस वाटण्यात येईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| ६-६-३७ ते १२-६-३७ | १६,९६,६०५ |
| १३-६-३७ ते १९-६-३७ | ४०,९९,२४८ |
| २१-९-३१ ते १९-६-३७ | २,९८,५७,८४,३०६ |

अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... ३०८
२ श्री मूळजींची महाराष्ट्र-वर मोहीम . ३०९
३ ब्रिटिश साम्राज्याचा शत्रूंपासून बचाव ... ३१०
४ स्फुट विचार . ३११
सेंट्रल को बँकेची अभिनंद-नीय प्रगति—ताब्याच्या बाजारात खळबळ—फ्रेंच सरकारचें सापत्तिक नष्ट-चर्य—मालाची प्रतवारी व उठाव—महाराष्ट्रातील दु स्थिति—मि रॉकफेलर ह्यांची अवाढव्य संपत्ति
५ गिरगाव जि सहकारी परिषद् . ३१३
६ करमाळा ता को सु यूनियन ... ३१३
७ सहकारी शिक्षणाचा वर्ग ३१४
८ सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् ३१५
९ श्री भाऊ गंगाधर साठे ३१५
१० बार्शी डाव्ह मॅं कं. लि ३१६
११ पुणें औद्योगिक दिन ३१७
१२ निवडक बाजारभाव ३१८

अर्थ

बुधवार, ता २३ जून १९३७

## श्री. मूळजींची महाराष्ट्रावर मोहीम

### साखर आणि गूळ

प्रांतिक व वैयक्तिक स्वार्थानें प्रेरित झालेला माणूस आत्मवंचना व परवंचना कशी करतो आणि भ्रामक युक्तिवादाचा त्यास कसा आश्रय घ्यावा लागतो, ह्याचें उत्कृष्ट उदाहरण, साखरेच्या अखिल-भारतीय व्यापारी संघाचे अध्यक्ष, श्री. मूळजी, ह्यांनीं महाराष्ट्रांतील साखरेच्या धंद्याविषयीं काढलेले उद्गार प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत सापडतें. लंडन येथें जागतिक साखर-परिषद् भरली होती, तीमध्यें हिंदुस्थानानें परदेशात साखर पाठवू नये असा ठराव झाला व तो ह्या देशाच्या वतीनें मान्य करण्यात आला. त्याविरुद्ध तक्रार करून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें तो नामंजूर व्हावा अशी व्यवस्था होणें जरूर आहे, परंतु संयुक्तप्रांत आणि बिहार ह्यामधील साखरेच्या कारखान्यात फाजील उत्पादन झालें आहे व त्याची आज विक्री होत नाहीं म्हणून. महाराष्ट्रांत साखरेच्या कारखान्यांनीं धंदा करूं नये असें उत्तरेकडील साखरेच्या व्यापाऱ्यांनीं प्रतिपादणें भ्रामक, स्वार्थीपणाचें व अन्यायमूलक आहे हिंदुस्थान देश इतका अफाट आहे कीं, भिन्नभिन्न जातींच्या मालाचे कारखाने शक्य आहे त्या मानानें ठिकठिकाणीं निघणें अपरिहार्य व इष्ट आहे. नैसर्गिक अनुकूलतेचा फायदा घेऊन प्रत्येक प्रांतानें स्वतःचे धंदे व कारखाने काढले पाहिजेत आणि ह्या बाबतींत कोणत्याहि एका प्रांतास विशिष्ट मालाच्या उत्पादनाबद्दलची मक्तेदारी प्राप्त होणें अयोग्य आहे. मुंबई शहर एका काळीं कापसाच्या गिरण्यांचें केंद्र होतें, आतां मध्य-हिंदुस्थान, बंगाल वगैरे क्षेत्रांत गिरण्या निघून कापडाचें उत्पादन सर्व प्रांतांमध्यें वाढत्या प्रमाणावर होत आहे आणि ह्या घटनेस मुंबईनें हरकत केलेली नाहीं. हाच न्याय साखरेच्या धंद्यास लागू आहे आणि त्यास अनुसरूनच निजामाचें राज्य, म्हैसूर, मद्रास व बंगाल इकडे नवीन साखरकारखाने निघाले आहेत. त्यांचे विरुद्ध उत्तरेकडील कारखानदार व व्यापारी ह्यांनीं गिल्ला करणें केवळ संकुचित स्वार्थाचें द्योतक आहे.

महाराष्ट्रानें गूळ तयार करून स्वस्थ बसावें आणि साखरेच्या धंद्यांत उत्तर-हिंदुस्थानाशीं स्पर्धा करूं नये असा पोक्त सल्ला देऊन श्री. मूळजींनीं आपली मजल, " तुम्हीं साखर कराल तर आम्हीं तुमच्या गिरण्यांचें कापड घेणार नाहीं, " अशी धमकी मुंबई इलाख्यास देण्यापर्यंत नेली आहे दक्षिणेंतील कालवे दुष्काळी कामें म्हणून मूळ करण्यांत आले आणि विसापूर तलावांतील पाणी एका साखरेच्या कारखान्यास स्वस्त दरानें देण्यात येत असून शेतकऱ्यास पाणी मिळेनासें झालें आहे असें ते म्हणतात. रेलवेच्या वहातुकीचे दर उतरवल्यामुळें संयुक्तप्रांत व बहार इकडची साखर दक्षिणेंत उतरते आणि ती चांगली नसते किंवा ती तयार होण्याला खर्च कमी येतो म्हणून तिचा महाराष्ट्रात खप होतो असें नाहीं असेंहि त्याचें म्हणणें आहे. महाराष्ट्रातला गूळ फार उंची प्रतीचा असतो आणि तोच तेथें तयार करण्यास सरकारनें उत्तेजन द्यावें, उत्तर हिंदुस्थाननें तो गूळ घ्यावा व दक्षिणेस साखर पुरवावी आणि अशी परस्पर-फायद्याची योजना प्रांतिक सरकारांनीं सहमतानें अमलांत आणावी अशी त्यांची सूचना आहे. आपल्या प्रांतातल्या कालव्यांत घातलेल्या भांडवलावर योग्य व्याज सुटावें, त्याच्या काठच्या जमिनींत उंसाच्या लागवडीचा प्रसार व्हावा आणि साखरेचे कारखाने निघून उसाचें पीक करणें शेतकऱ्यांस परवडावें ह्या हेतूनें मुंबई सरकारनें नीट चौकशी करून प्रस्तुतचें धोरण बुद्धिपुरःसर आखिलें आहे. महाराष्ट्रांतील शेती, कारखानदारी आणि कालव्याची व्यवस्था ह्याचे संबंधांत मुंबई इलाख्यातलें सरकार व जनता ह्यास उत्कृष्ट माहिती व आस्था आहे आणि त्या प्रकरणीं श्री. मूळजी ह्यास काळजी वहाण्याचें कारण नाहीं महाराष्ट्रातले कारखाने भरमसाटपणानें काढण्यात आलेले नाहींत. सरकारनें पूर्ण विचाराअंतीं त्या बाबतींत निश्चित धोरण आखलें आहे आणि त्यास अनुसरून ह्या धंद्याची घटना झाली आहे भाव पडल्यामुळें गूळ करणें शेतकऱ्यांस परवडणें शक्य नाहीं, हें सिद्ध झालें असूनहि तोच आंतबट्ट्याचा धंदा त्यांनीं करावा असा सल्ला त्यास देणें अत्यंत धार्ष्ट्याचें आहे. हिंदुस्थानच्या एका टोकावर साखरेच्या कारखान्याची गर्दी करून आपल्या फाजील मालास गिऱ्हाईक नाहीं म्हणून इतर प्रांतांत लोकांनीं कारखाने काढू नयेत असें म्हणण्यांत सयुक्तिकपणा नाहीं व इतर प्रांतांस फुकट उपदेश करण्यात स्वारस्य व सौजन्य नाहीं, ही गोष्ट श्री. मूळजी ह्याच्या लक्षांत यावयास पाहिजे होती. महाराष्ट्रात साखरेच्या उत्पादनास अनुकूलता नाहीं, व त्यामुळें सदरहु धंद्यात फायदा नाहीं असें त्यांस जर वाटत आहे तर दाक्षिणी साखरेच्या स्पर्धेची भीति त्यांस कां वाटावी व इतर प्रांत सोडून देऊन गरीब महाराष्ट्रावरच त्यांनीं शस्त्र का उपसावें ? दक्षिणेंतल्या साखरेच्या धंद्याचा प्रश्न सुमारें ४० वर्षांमागें न्यायमूर्ति रानडे यांनीं हातीं घेऊन त्यास सरकारनें उत्तेजन देण्याचें महत्त्व प्रतिपादलें. दक्षिणेंतील परिस्थिति ऊंस व साखर ह्यांस अनुकूल असल्याचें सिद्ध झालें आहे व आतां कोठें तो धंदा डोकें वर काढीत आहे, अशा वेळीं त्यावर उत्तर-हिंदुस्थानी धंदेवाल्यांनीं हल्ला चढवावा हें विचित्र आहे. आपली मक्तेदारी कायम राखण्यासाठी महाराष्ट्राचें नुकसान करण्याऐवजीं स्वतःचा धंदा सुधारण्याचे दुसरे मार्ग त्यांनीं शोधावे. श्री. मूळजींच्या भ्रामक युक्तिवादाचा समाचार मुंबई सरकारनें वेळींच घेणें आवश्यक आहे.

## ब्रिटिश साम्राज्याचा शत्रूंपासून बचाव

आज कित्येक वर्षें, ग्रेट ब्रिटनच्या नाविक दलाच्या सामर्थ्याचे जोरावर ब्रिटिश साम्राज्यातील निरनिराळ्या विभागास जोडणाऱ्या आगबोटीच्या मार्गाचें सरक्षण होत आलें आता फ्रान्स व इटली ह्या देशांचें नाविक सामर्थ्य भूमध्यसमुद्रात ग्रेट ब्रिटनशीं बरोबरी करूं पहात आहे, उत्तर समुद्रात जर्मनी आपलें सामर्थ्य वाढवीत आहे आणि पॅसिफिक महासागरात जपान व अमेरिका हीं राष्ट्रें स्पर्धा करू लागलीं आहेत गेल्या महायुद्धानतरच्या शांततेच्या काळामध्यें शस्त्रसंन्यासाविषयीं काहीं आतरराष्ट्रीय योजना सर्वमान्य होऊन अंमलांत येईल ह्या अपेक्षेनें ग्रेटब्रिटननें आपलें नाविक सामर्थ्य वाढविण्याचें लाबणीवर टाकलें इकडे, वैमानिक सामर्थ्याचें महत्त्व वाढू लागलें व ब्रिटिश बेटाचा ( ग्रेटब्रिटन देशाचा ) अलगपणा पूर्वीसारखा अभेद्य राहिला नाहीं इटलीनें ॲबीसीनियावर सार्वभौमत्व मिळविल्यापासून व मुसोलिनीनें भूमध्यसमुद्रापलीकडे साम्राज्य पसरविण्याचा चग बाधल्यापासून, इंग्लडला आपल्या लष्करांत व नाविक दलात सुधारणा करणें आवश्यक वाटूं लागलें. ग्रेटब्रिटनचें जीवन व त्याची औद्योगिक क्षमता आयात-निर्गत व्यापारावर किती अवलबून आहे, हें पुढील आकड्यावरून तात्काळ समजून येईल "आपले आगबोटींचे मार्ग बद पडले, तरी आपले कारखाने तीन महिने चालू रहातील, इतका कच्च्या मालाचा पुरवठा देशात शिल्लक राहील. परंतु, त्याची जरूरच भासणार नाहीं; कारण सहा आठवड्यांच्या आंतच आपली उपासमार होऊन सर्वांस मृत्यु ओढवेल" असें सर सॅम्युअल होअर, हे एका भाषणात म्हणाले. दररोज ५० हजार टन अन्नसामुग्री व १ लक्ष १० हजार टन कच्चा माल ग्रेटब्रिटनमध्यें आयात होतो. हा माल वेगवेगळ्या जलमार्गांनीं येतो, त्यांची लांबी एक लक्ष मैल भरते. एवढ्या जलमार्गावर देखरेख ठेवण्याचें काम सोपें नाहीं. वैमानिक दलाचे सहायाखेरीज एकट्या नाविक दलास हें काम करता येणें अशक्य आहे, आणि ह्या दृष्टीनेंच निरनिराळ्या सागरांतील व महासागरांतील महत्त्वाचीं ठिकाणें सुरक्षित करण्याचे ग्रेटब्रिटनचे प्रयत्न चालू आहेत.

ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणाचे दृष्टीनें ग्रेटब्रिटनला भासणारी मोठी अडचण म्हटली म्हणजे जरूर तेथें तातडीनें हलवतां येईल, अशा खड्या फौजेचा अभाव, ही होय साम्राज्याच्या विस्तृत क्षेत्रफळांतील कानाकोपऱ्यामधील ठिकाणाकडे फौजाची ने-आण करण्यास आवश्यक अशीं मोठीं जहाजेंहि ग्रेटब्रिटनचे सग्रहीं पुरेशीं नाहींत. सैनिकाचा पेशा पत्करण्यास जरूर तेवढीं माणसें पुढें येत नाहींत. इग्लडपुरती फौज केव्हाहि उभी करतां येईल, परतु युद्ध उपस्थित झाल्यास साम्राज्याच्या सेवेकरितां बाहेर पाठविण्यास सैनिकांचा तुटवडा पडण्याचा संभव आहे. स्वतःचा बचाव करण्यापेक्षां शत्रूवर तुटून पडण्यास कमी बळ लागतें ह्या दृष्टीनें ब्रिटिश साम्राज्यास आपलें युद्धविषयक सामर्थ्य वाढविणें अपरिहार्य होणार आहे. भरभक्कम युद्धसामुग्री व योग्य वेळीं हुशारीनें तिचा उपयोग, ह्या गोष्टींवरच साम्राज्याचा एकजीवीपणा व सुरक्षितता अवलंबून राहील हे उघड आहे.

( 'पॅसिफिक अफेअर्स' मधील एका लेखावरून )


## The Willingdon College, Sangli.

Reopens for the new academic year on the 21st of June Registration of names has commenced on the 7th June. The college provides for both Arts and Science courses in the first two years, for B. A. degree courses, pass and honours, and for post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, cheapness and efficiency are the special features of the College

The tuition fees are Rs 60 per term, and the room rent per term per student is Rs. 12 for a double and Rs. 15 for a single room. Boarding charges come to about Rs. 12 p m. Further information can be had on application

Arrangements are made to secure accommodation for lady students in a well conducted hostel in Sangli.

D. G. KARVE,
Principal.

## Deccan Institute of Commerce

( 20 years' standing )

Opens for the 1937–38 Session on Saturday the 26th June 1937 Students coached up for various Commercial Diploma and Certificate Examinations in Accountancy, Banking, Shorthand, Type-writing Etc. Courses suitable for Matriculates, Undergraduates and Graduates. Classes in the morning and evening Prospectus free on application to :

592/3 Budhwar Peth,
Opp. New English School,
POONA.
SECRETARY.

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed percentage tenders in Form B-1 for the following works are invited up to 30-6-1937. Other particulars regarding the contract etc can be had at the Undersigned's Office on any working day during Office hours

| | | Estimated cost Rs. |
|---|---|---|
| 1 | Improving the Karwar-Bellary Road section from Gadag to Hesrur | 4.082/– |
| 2. | Providing additional accommodation for patients at the Mental Hospital, Dharwar. | 12,160/– |

2. The acceptance of the tender rests with the Undersigned and no reason will be given for acceptance or rejection of any.

Executive Engineer's Office
Dharwar, 11th June 1937

P. K. SHINDE.
Executive Engineer,
D Dn.

## स्फुट विचार

### सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेची अभिनंदनीय प्रगति

येथील सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेंत लोकांच्या मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय बंदिस्त अशा निधिगृहात ( सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ) करण्यात आली असून ह्या उपक्रमाचा औपचारिक उद्घाटन विधि गेल्या सोमवारीं सकाळीं श्री तात्यासाहेब केळकर ह्याच्या हस्तें साजरा झाला आणि त्याच दिवशीं सायंकाळीं संस्थेचे भागीदार व हितचिंतक ह्यास पानसुपारी देण्याचा समारंभ करण्यात आला गेलीं वीस वर्षें ह्या संस्थेची प्रगति अव्याहत रीतीनें चाललेली असून जनतेच्या सोयीसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची तिनें केलेली व्यवस्था संस्थेच्या पुरोगामी व लोकहितकारक धोरणाचें अभिनंदनीय लक्षण आहे आपलीं खतपत्रें, दागिने, इत्यादि महत्त्वाचे व मोलवान जिन्नस घरीं सुरक्षित ठेवण्याची तजवीज सामान्य स्थितींतल्या व श्रीमान माणसासहि करता येत नाहीं, आणि त्याचेकरिता अशी सोय मोठ्या बँका करीत असतात परंतु त्या प्रकारच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स आजपर्यंत पुण्यामध्यें स्थापन न झाल्यामुळें, लोकास उणीव भासत होती, ती सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें भरून काढली ह्याबद्दल त्या संस्थेस धन्यवाद देणें आवश्यक आहे. तिनें बऱ्याच खर्चानें व परिश्रमानें केलेल्या नव्या आधुनिक पद्धतीच्या ह्या सोयीचा फायदा जनतेनें घ्यावा अशी आमची इच्छा असून ती पूर्ण होईल अशी आम्हास खात्री वाटते

### तांब्याच्या बाजारांत खळबळ

अनेक प्रकारच्या मालाची उलाढाल मुंबईस मोठ्या प्रमाणावर चालते आणि तिची व्यवस्था विशिष्ट संस्थाच्या नियमनानें होत असते रोखे, कपास, सोनें-चांदी यांच्या खरेदी विक्रीचें वायद्याचे व्यवहार चालतात आणि त्यात सट्टे करण्याचा अनेक लोकाचा धंदा आहे तांब्याचा पत्रा, भांडीं वगैरे जिन्नस तयार करण्यास लागतो आणि तो माल परदेशांतून येतो त्याची घाउक व किरकोळ खरेदी-विक्री देशभर होते. इतर जातींच्या मालाच्या किंमतींत चढउतार होतो त्याचा फायदा स्वत:स करून घेण्याच्या हेतूनें मुदतीच्या खरेदी-विक्रीचे सवदे धंदेवाले करतात, त्याचप्रमाणें तांबें व तत्सम धातूंच्या बाजारात सट्टे होत असतात. ऐनजिनसी खरेदी किंवा विक्री करणारे व्यापारी असतात, त्याबरोबरच, केवळ बाजारभावात वेळोवेळ होणाऱ्या फरकाचें देणें-घेणें करून निघणाऱ्या तफावतीवर पोट भरणारे धंदेवाले असतात. हे फरक मामुली असले व मर्यादित राहिले तर सट्टेवाल्याचें विशेष नुकसान होत नाहीं आणि नफ्या-तोट्याचा हिशेब सरासरीनें अनुकूल होतो, परंतु बाजारभाव, विशेष कारणानें, अनपेक्षित प्रमाणात चढले-उतरले तर त्यातल्या फरकाचें अगावर येणारें देणें चुकवून टाकणें धंदेवाल्याच्या ऐपतीबाहेर जातें आणि सट्ट्याच्या बाजारात गोंधळ उडतो. बाजाराचें नियंत्रण करणाऱ्या मंडळासहि देण्या-घेण्याचा मेळ बसवून धंदेवाल्याचे व्यवहार सुरळीत चालतील असें करणें कठिण होतें ह्याच तऱ्हेची परिस्थिति गेल्या आठवड्यात मुंबईच्या तांबे-बाजारात निर्माण झाली. युरोपात शस्त्रास्त्राच्या बनावटीचे कारखाने जोरानें चालू झाल्यामुळें लोखंड, पोलाद, शिसें, तांबें इत्यादि धातूस एकदम पुष्कळ मागणी आली आणि त्यांच्या किंमती चढल्या तांब्याचा भाव साधारणपणें चढीचा राहील ह्या कल्पनेनें कित्येक धंदेवाल्यानीं दर हंड्रेडवेटास ६९ रुपये ह्या भावानें वायदे केले होते. परंतु अलीकडे हा भाव ५१ रुपयावर उतरला आहे आणि कित्येक खरेदीदारास दर हंड्रेडवेटास १८ रुपयेप्रमाणें भुर्दंड द्यावा लागणार आहे मुंबईच्या बाजारात तांब्याचा पत्रा मोठ्या प्रमाणांत अगोदर येऊन पडला आहे आणि लंडनच्या बाजारांत भाव सारखे उतरत आहेत. आषाढ महिन्याचा वायदा पुरा करण्याचे कामीं कित्येक सट्टेवाल्याच्या नाकीं नव येणार आहेत असें दिसतें. धातु बाजाराच्या नियंत्रण मंडळानें वेताचे भाव निश्चित करून त्यास अनुसरून सवदे पटवले जावे असें ठरलेलें आहे तथापि, ह्या भावानें व्यवहार होण्यांत ज्या व्यापाऱ्यांचें व सट्टेवाल्याचें नुकसान होणार आहे, त्यानीं बाजार-मंडळाच्या ठरावाविषयीं असमाधान व्यक्त केलें आहे सवदे पटविले जाईपर्यंत वायद्याचे व्यवहार मंडळानें तात्पुरते बंद ठेवले आहेत

### फ्रेंच सरकारचें सांपत्तिक नष्टचर्य

राजकीय व आर्थिक अस्वस्थता आणि औद्योगिक व व्यापारी मंदी यांच्या वादळामधून आपल्या सांपत्तिक स्थितीचें तारू सुरक्षित रीतीनें बचावून नेण्याचा प्रयत्न जगातील सर्व राष्ट्राच्या सरकारास करावा लागत आहे एका बाजूस अमेरिका व दुसऱ्या बाजूस जपान ह्या देशात अशाच प्रकारची अवस्था असून आपलें आर्थिक आसन स्थिरावल्याचें समाधान राष्ट्रीय सरकारास प्राप्त झाल्याचें उदाहरण अपवादात्मकच समजलें पाहिजे फ्रेंच सरकारची स्थिति तर ह्या बाबतींत विलक्षण आहे समाजसत्तावादीपक्षाचें फ्रेंच कायदेमंडळात बहुमत आहे आणि मंत्रिमंडळानें लोकाराधनाच्या कित्येक योजना अंगिकारल्या आहेत तथापि, उद्योगधंदे व व्यापार ह्यात मंदी, सरकारच्या उत्पन्नात तूट व खर्चांत वाढ, राष्ट्रीय कर्जाचा फुगीरपणा, हुंडणावळींत चलबिचल, सोन्याची निर्गत व चलनाची नरमाई ह्या भानगडींतून राष्ट्रास बाहेर काढणें त्यासहि अशक्य झालें आहे सरकारच्या कर्जबाजारीपणाचा परिणाम फ्रान्समध्यें पैशाच्या बाजारावर तात्काल होतो आणि जनतेच्या अविश्वासाचीं वावटळें मधून मधून उठून राष्ट्रीय फडनवीस व प्रधानमंडळ ह्यास राजीनामे देण्याची पाळी वारंवार येते. ह्या तऱ्हेचें गंडांतर सध्या फ्रेंच मंत्रिमंडळावर आलें आहे. त्याची सांपत्तिक स्थिति व योजना ह्याविषयीं अनेक अफवा उठत असून आजपर्यंत ६५० कोटि रुपयांचें सोनें अविश्वासामुळें फ्रान्सच्या बाहेर गेलें आहे. ह्या परिस्थितीस आळा घालून नवीन कर्ज व कर ह्याच्या सहायानें ती स्थिर करण्याचा निश्चय फ्रेंच सरकारनें केला आहे आणि आपला कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडावा म्हणून कायदेमंडळाकडून वटहुकमाचें जादा अधिकार त्यानें मागितले आहेत आज सोनें बाहेर पाठविलें व फ्रेंच चलनाची किंमत सरकारनें कमी केली तर तो पैसा परत आणण्याच्या व्यवहारांत फायदा आहे ह्या हिशेबानें लोक सोन्याची निर्गत करतात. म्हणून, हुंडणावळीचे दरांत बदल होणार नाहीं ह्या अटीवर फ्रेंच चेंबरनें प्रधानमंडळाच्या योजनेस संमति दिली परंतु सेनेटच्या नकारामुळें मुख्य प्रधानास राजीनामा द्यावा लागला आहे

### मालाची प्रतवारी लावून त्याच्या उठावास सहाय

मालाचें उत्पादन होऊन तो गिऱ्हाइकाचे हातीं जाण्यापूर्वीं त्याची प्रतवारी झाली, तर चांगल्या मालास फायदेशीर भाव

येतो व गिऱ्हाइकासहि खात्रीलायक जिन्नस मिळतो. हलका भारी माल एकत्र मिसळला गेल्यास, हलक्या मालाचे दरानें भारी मालाची किंमत होते असा अनुभव आहे मालाची प्रतवारी लावण्याची पद्धतशीर व्यवस्था व्यापारी व्यवहारांत चालू व्हावी म्हणून हिंदुस्थान सरकारनें संशोधक तज्ज्ञाची नेमणूक करून त्याबाबतच्या योजना हातीं घेतल्या आहेत संघटनेच्या अभावीं ह्या प्रयत्नास तात्काळ दृश्यफल आलें नाहीं, तरी कालांतरानें त्याचे सुपरिणाम दिसू लागतील ह्यात शंका नाहीं गव्हाची प्रतवारी लावून, त्याच्या विक्रीची योजना आखण्याकरितां सदरहू धंद्याशीं संबंध असणारांची व मार्केटिंग अधिकाऱ्याची एक बैठक नुकतीच दिल्ली येथें झाली. तिच्या यशस्वितेनें हुरूप येऊन सरकारनें आता तुपाचा धंदा हातीं घेतला आहे हिंदुस्थानातील ठिकठिकाणच्या प्रमुख व्यापाऱ्यास जुलैअखेर दिल्ली येथें बोलावण्यांत येऊन त्यांच्याशीं ह्याबाबत चर्चा करण्यात येईल कानपूर येथील हारकोर्ट बटलर इन्स्टिटयूटमधील संशोधनाच्या आधारें तुपाची प्रतवारी, भेसळ ओळखण्याची पद्धति, इत्यादि बाबी निश्चित करण्यात येतील व सीलबंद डब्यातून तें विकलें जाईल अशी व्यवस्था करण्यांत येईल ह्यामुळें मालाची किंमत थोडीफार वाढली तरी तुपाच्या उत्कृष्टपणाबद्दल गिऱ्हाइकास साशंक रहाण्याचें कारण उरणार नाहीं व शेतकऱ्यास आपल्या मालाची किंमत ज्यास्त आल्यानें वाढणाऱ्या उत्पन्नातून जनावराची निपज व खुराक ह्याच्या सुधारणेप्रीत्यर्थ खर्च करता येईल, अशी अपेक्षा आहे. अर्थात्, शेतीचा व्यवसाय सुधारण्याच्या इतर मार्गांचाहि सहकार्यानें अवलंब केला गेल्याखेरीज इष्ट परिणाम घडून येण्यास कालावधि लागेल हें उघड आहे

### महाराष्ट्रांतील दु:स्थिति

मुंबई सरकारच्या ताज्या गॅझेटात खालील माहिती प्रसिद्ध झाली आहे:—

अहमदनगर—लोकाच्या दु:स्थिति-निवारणार्थ चार कामें चालू आहेत. २,४१५ लोक कामावर असून ३,०३७ इतर लोकास मदत देण्यात येत आहे

पुणें ( शिरूर पेटा व इंदापूर तालुका ) —दु:स्थिति कायम आहे मदत मिळणाऱ्या लोकाची संख्या वाढत आहे. २ ३३५ लोक कामावर आहत व १,४५७ जणास घरबसल्या मदत मिळत आहे. निवारा नसणारास वस्त्रें मोफत वाटण्यात येत आहेत.

सोलापूर—दु:स्थितीमधील लोकाची परिस्थिति मिळणाऱ्या मदतीमुळें समाधानकारक आहे.

विजापूर —दु:स्थिति तीव्रतेनें भासत आहे रहाण्याकरितां झोपड्या व पिण्याकरिता पाणी ह्याच्या तजवीजीची व्यवस्था करण्यात येत आहे.

---

### मि. रॉकफेलर ह्यांची अवाढव्य संपत्ति

सुमारें २५ वर्षांपूर्वी, म्हणजे आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी, मि रॉकफेलर ह्याच्या संपत्तीनें रेकॉर्ड निर्माण केलें होतें. त्याचेजवळील डॉलर किंमतीच्या नोटा एकापुढें एक मांडल्या असत्या, तर पृथ्वीला त्यांनीं ३½ वेढे घातले असते प्रत्येक मिनिटास मिळकतीपैकीं एक रुपया खर्चावयाचें म्हटलें तर संपत्ति संपण्यास ५,००० वर्षें पुरलीं नसतीं! मि. रॉकफेलर ह्यास त्याच्या वयाच्या ५५ व्या वर्षी अग्निमांद्याच्या विकारानें घेरलें, तेव्हा आपणास बरें करणारास त्यांनीं २५ लक्ष रु देऊं केले! अपचनामुळें त्यास मरेपर्यंत पथ्यावर रहावें लागलें.


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा-संस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी
मॅनेजिंग एजंटस,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा



" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १० ( ट ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४



१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

**☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆**

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

## गिरगांव जिल्हा सहकारी परिषद्

गिरगाव जिल्हा सहकारी परिषदेचें ४ थें अधिवेशन श्री वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली ता. १९ जून रोजीं पार पडलें १९३४च्या अधिवेशनानंतर, गिरगाव इन्स्टिट्यूटनें विशेषशी भरीव कामगिरी केली नसल्याचें स्वागताध्यक्ष, मि बी एच भाटपोरिया, ह्यांनीं आपल्या स्वागतपर भाषणात कबूल केलें. इन्स्टिट्यूटचे, ३६ व्यक्ति व ५० सोसायट्या, असे सभासद आहेत

### श्री वैकुंठराय ह्यांचें भाषण

"गिरगाव हा मुबई शहरांत शिक्षण इत्यादि दृष्टीनें फारच सुधारलेला भाग असताना ह्या भागात एकच स्टोअर असणें ही अत्यत नामुष्कीची गोष्ट आहे. पतपेढ्या ह्या सहकारी चळवळीचें सोपें असे अग असून त्या कितीहि उत्तम प्रकारें चालविल्या तरी योग्य व्ययाकरिता उत्पादन व गिऱ्हाईकास हितावह अशी विभागणी करणेचा सहकारी कार्यकर्त्यांचा उद्देश ह्यायोगें साध्य होणें कठीण असल्यामुळें गिरगाव भागांत गुजराथी स्त्री सहकारी मडळाप्रमाणें अनेक स्टोअर हवे होते

आरोग्यवर्धक व पोष्टिक अशा स्वच्छ अन्नाचा पुरवठा होणेकरिता इतर देशाप्रमाणें आपल्या देशातहि चळवळ सुरू आहे अन्नपुरवठा ह्या प्रश्नाचा स्त्रियांशीं जास्त सबंध असल्यामुळे त्याच्याकडून याबाबत योग्य सहाय मिळणें अत्यंत आवश्यक आहे दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दूध कलकत्ता व मद्रास शहरात सहकारी तत्त्वावर उभारलेल्या दूध पुरविणाऱ्या सोसायट्या असून याबाबत मुबई शहर अजूनपावेतों मागें होतें परंतु ना. जमनादास मेहता याच्या मदतीमुळें अशा प्रकारची एक सोसायटी मुबईस अलीकडे स्थापन झालेली आहे. रत्नागिरी येथें अलीकडे काहीं वर्षे सहकारी तत्त्वावर चालू असलेल्या व्हेइकल इन्शुअरन्स सोसायटीचे तत्त्वांवर गिरगाव भागांत एकादी सोसायटी काढता येणें शक्य आहे

याचप्रमाणें भगिनी समाज, महिला समाज, गुजराथी स्त्री मंडळ किंवा सेवासदन अशा संस्थाच्या साहायानें एकादी कन्झ्यूमर सोसायटी काढून स्त्रियाना शिवण-कलाकुसरीचीं कामें इत्यादी गोष्टींस लागणारा मालमसाला पुरवून नतर त्याच्या विक्रीची व्यवस्था केल्यास मध्यम वर्गातील स्त्रियास कौटुंबिक उत्पन्नात भर घालणेस मदत होईल

मुबई शहरांतील अर्बन बँकाची, उत्तम व्यवस्था व व्यवहारी धोरण याबाबत प्रसिद्धी आहे. अतर्व्यवस्थेत होणारी विसाढघाई व अत कलहाचे वादळ हे दोष खऱ्या सहकारी वृत्तीच्या अभावामुळें वारंवार दृष्टीत्पत्तीस येतात सहकारी बँकाना इतर जाईंट स्टॉक बँकाप्रमाणें मान्यता मिळावी अशी सहकारी कार्यकर्त्यांचा इच्छा असल्यास वरील दोष टाळणें अत्यंत आवश्यक आहे. याकरिता योग्य व सुशिक्षित माणसाची निवड व व्यवस्थापक मडळींची बँकेच्या कार्यावर योग्य देखरेख हीं अत्यंत आवश्यक आहेत. या दृष्टीनें सहकारी तत्वाचे योग्य शिक्षणाची व्यवस्था करून सहकारी चळवळ ही सुधारलेली सावकारी किंवा प्रामाणिक दुकानदारी ह्यापेक्षा अधिक महत्वाची गोष्ट आहे हें लोकांच्या मनावर पटवावयास पाहिजे जिल्हा इन्स्टिट्यूटनें सहकारी विषयावर वादविवाद व संभाषणें त्याचप्रमाणें स्वस्त साहित्य प्रसिद्ध करावें. सहकारी खात्यानें जिल्ह्यात सुपरवायझिंग युनियन स्थापन करून व इन्स्टिट्यूटचें उत्पन्न व मनुष्यबळ कमी करून त्याच्या शैक्षणिक व इतर कार्यांत विघ्न उत्पन्न केलें आहे. इन्स्टिट्यूटसारखी सस्था अस्तित्वात असताना देखरेख व मार्गदर्शनाकरिता नव्या कमेट्यांची नेमणूक करणें अनावश्यक होईल. परंतु बँकाचे जमाखर्च तपासण्याकरितां एखाद्या युनियनची मुबईत स्थापना करणें झाल्यास सहकारी बँकांना देऊं लागणाऱ्या मोठमोठ्या रकमेंत सूट मिळून त्यांचा फायदा होईल असें वाटतें. सहकारी शिक्षण व मतप्रचार याकरिता इन्स्टिट्यूटचें अस्तित्व कायम ठेवणें अत्यंत आवश्यक तर आहेच, किंबहुना नव्या स्थापन करू घातलेल्या सुपरवायझिंग युनियनचें कार्यहि इन्स्टिट्यूट आपल्या कमिटीतर्फे अधिक चांगल्या प्रकारें करूं शकेल. देशातील पुढाऱ्यांनीं सहकारी चळवळींत अधिक भाग घ्यावा अशी माझी विनंति आहे"

---

### करमाळा तालुका को. सुपरवायझिंग यूनियन

सोलापूर डि. को इन्स्टिट्यूटचे वियमानें टेंभुर्णी येथें १०-६-३७ रोजीं पच कमिटी ट्रेनिंग क्लास भरविणेंत आला. सदर क्लासला आसपासचे ७ सोसायट्याचे पंच व इतर सभासद मिळून सुमारें ६० मेंबर्स हजर होते याशिवाय सहकारी चळवळीसंबंधीं आस्था बाळगणारे गावातील लोक सुमारें २५-३० हजर होते

क्लासचें अध्यक्षस्थान श्री गणपतराव एकनाथ पाटील, यूनियन प्रेसिडेंट व इन्स्टि.चे मॅ.कमिटीचे मेंबर यानीं स्वीकारल्यानंतर श्री बी. डी. मिसाळ, इन्स्टि चे प्रोपॅगॅंडा ऑफिसर, यानीं सहकारी चळवळीचा इतिहास व कायद्याची रूपरेखा सागून पंच व सभासद याच्यावर असलेली जबाबदारी व त्याची त्या नात्यानें असणारीं कर्तव्यें हीं मुद्देसूद व सोप्या भाषेंत चांगल्या रीतीनें विशद करून सागितली तसेंच श्री बी. वाय. अवचट, यूनियन सुपरवायझर, यानीं सो चे अंतर्गत व्यवस्थेंत सोसायट्याचे पचांना वेळोवेळ भासणाऱ्या अडचणी व त्या निवारण करण्याचे मार्ग, सेक्रेटरी आणि पंच याचे सबध, वगैरे बाबत प्रत्यक्ष अनुभवास येणारी माहिती सागितली. नतर असो. चे फील्डमन श्री टी जी. पाटील आणि लो. बोर्डाच्या शाळेचे हेडमास्तर श्री. कदम यानीं शेती आणि दुय्यम धंदे, सोसायट्या व त्याचेशीं असलेला शेतकरी वर्गाचा निकट सबध याबद्दल उपयुक्त माहिती सागितली.

शेवटीं मे अध्यक्षसाहेब यानीं सहकारी चळवळीचा इतिहास, पच कामिटीचीं कर्तव्यें व जबाबदारी, नवीन मेंबर करून घेताना व कर्जें मंजूर करताना ठेवावी लागणारी दक्षता, पचकमिटीनें हलगर्जीपणा केल्यास त्याचा सर्व सोसायटीस भोगावा लागणारा अनिष्ट परिणाम, स्वावलबन, काटकसर, परस्पर सहकार्य वगैरेबद्दल फारच उपयुक्त व मुद्देसूद माहिती सागून पचकमिटीनें सोसायटीचे कामकाज आपलेपणाचे भावनेनें करून सोसायट्या उर्जितावस्थेस आणण्याचा प्रयत्न करावा अशी कळकळीची विनंति केली आलेल्या मडळींचे व व्याख्यात्याचे आभार मानल्यानतर जमलेल्या मडळींस अल्पाहार देण्यात आला

वरीलप्रमाणें पचकमिटीचे ट्रेनिंग क्लासेस या तालुक्यात जेऊर, पोमलवाडी व केम या ठिकाणीं भरविण्यात येऊन त्या त्या भागातील आसपासचे सो.चे पचकमिट्याचे मेंबराना शिक्षण देण्यात आलें.

## सहकारी शिक्षणाचा दौंड पेट्यांतील उजळणी वर्ग

पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें दौंड पेट्यांतील सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीजकरितां सहकारी शिक्षणाचा उजळणीचा वर्ग ता ८-६-३७ रोजीं श्री. नानासाहेब इनामके, प्रेसिडेंट दौंड पेटा को सुपरवायझिंग यूनियन, यांचे हस्तें मु. कडगांव येथें सुरू करण्यांत आला होता तालुक्यातील फक्त चार सेक्रेटरीज शिवाय बाकी सर्व सोसायट्यांचे सेक्रेटरींनीं हजर राहून क्लासेसचा फायदा घेतला.

क्लासेसचा समारोपसमारंभ श्री. डी. डी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, पु सें. बँक यांचे अध्यक्षतेखालीं ता. १२-६-३७ रोजीं साजरा करण्यांत आला. अध्यक्षीय भाषणांत श्री चितळे यांनीं, सेक्रेटरीज हे सोसायटीचें कार्यमापक यंत्र असल्याबद्दल सांगून त्याच्यावर कशी जबाबदारी आहे हें स्पष्ट करून सांगितलें. इन्स्टिट्यूटच्या कार्याची प्रशंसा करून, तालुक्याच्या ठिकाणीं असें क्लासेस भरविण्याचा जो उपक्रम चालविला आहे तो स्तुत्य आहे कारण अशा क्लासेसचा फायदा तालुक्यातील सर्व सोसायट्यांच्या सेक्रेटरींना थोड्या सर्चीत घेता येतो व सोईच्या दृष्टीनेंहि तें चांगलें आहे, असें ते म्हणाले.

श्री भा य देवभानकर यांनीं अध्यक्ष, व्याख्याते, सेक्रेटरीज, यूनियन, वगैरेंचे समयोचित आभार मानले

## जुन्नर अर्बन को. क्रेडिट सोसायटी, लि०

वरील संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा सोमवार ता ७ जून १९३७ रोजीं श्री. दत्तात्रय दिवाकर चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सेंट्रल को-ऑप० बँक लि, यांचे अध्यक्षतेखालीं भरून पुढीलप्रमाणें निवडणुकी झाल्या.

सुपरवायझिंग कमिटी.—१ मे व्ही. एम्. जोगळेकर, २ मे. व्ही जी. जोगळेकर, ३ मे. जी एल जोशी.

व्यवस्थापक कमिटी:—१ मे. वाय बी. वैद्य, २ मे व्ही. व्ही. बोडस, ३ मे. एच ए बुट्टे, ४ मे. एस. आर. बुट्टे, ५ मे. डी. पी पाडे, ६ मे आर. के ढोकळे, ७ मे के आर. देशमुख

ऑनररी सेक्रेटरी:—रा. व्ही ए देशपांडे

ऑनररी ऑडिटर:—रा. पी. जी शाळिग्राम.

सदर संस्थेच्या निवडणुकी सन १९३७–३८ सालासाठीं झाल्या असून संस्थेचे काम ता १–७–३७ पासून सुरू करण्याचें ठरलें आहे.

### " सहकारी पतपेढ्यांचा कारभार "*

श्री. ना. बा केळकर, बी ए, ह्यांनीं " सहकारी पतपेढ्यांचा कारभार " हें पुस्तक लिहून गेल्या ऑक्टोबरमध्यें प्रसिद्ध केलें सदरहू पुस्तकावर अनेक तज्ज्ञांचे उत्कृष्ट अभिप्राय आले आहेत "अर्थ"च्या ता.२५ नोव्हेंबर१९३७ च्या अंक त ह्या पुस्तकावरील परीक्षण आलेलें आहे. सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, श्री. एम डी भनसळी, ह्यानींहि श्री केळकर ह्यांच्या पुस्तकाची प्रशंसा केली आहे "पुस्तकामध्यें मनोरंजक व मौल्यवान माहिती सोप्या व चटकदार भाषेंत दिलेली असून, त्याची किंमत (८ आणे) बेताची आहे खेडेगावीं जनतेमध्यें उत्साह निर्माण करून त्यांस स्वावलंबी होण्यास पुस्तक प्रवृत्त करील, अशी आशा आहे सहकारी कार्यकर्ते, सेक्रेटरीज, यूनियन सुपरवायझर्स, ऑनररी ऑर्गनायझर्स इत्यादींस हें पुस्तक उपयुक्त होईल व मराठी शाळांतील वरच्या वर्गांमधील विद्यार्थ्यांसहि तें उपयुक्त वाटेल," अशा शब्दांत रजिस्ट्रारसाहेबांनीं श्री. केळकर ह्यांच्या पुस्तकाचा प्रशंसा केली आहे.

*पृ स. १०७ किंमत ८ आणे


भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारे ५५०, किंमत पांच रुपये

प्रथमत. अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरश विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल

विक्रीस तयार ] विक्षिप्तराव [ दुसरी आवृत्ति

लेखक—प्रो वा गो काळे

एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे ' विक्षिप्तराव ' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळांमधून तें करण्यास फार उपयुक्त आहे किंमत फक्त १० आणे

CONFIDENCE

Is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service.

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you

NEW BUSINESS

Last year

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Offices* throughout India & the East

S C. MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे
## सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स्

### श्री. केळकर यांचे हस्तें उद्‌घाटन

[ पुणें सें. को. बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्सचें उद्‌घाटन ता. २१ जून रोजीं श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांचे हस्तें झालें. ]

बँकेचे अध्यक्ष, श्री. धों. कृ. साठे, आपल्या प्रास्तविक भाषणांत म्हणाले:—

" आपली बँक ही इलाख्यांतील प्रमुख सहकारी बँकांपैकीं एक आहे. बँकेच्या बाल्यावस्थेंत तिजकडे असलेली लोकांची ठेव वाढत गेली. परंतु अलीकडे मात्र व्याजाचे दर वेळोवेळीं उतरविले तरीहि ठेवींचा आकडा इतका झपाट्यानें वाढला कीं नियमांचें उल्लंघन होऊं नये म्हणूनच परंतु अत्यंत नाखुशीनें नवीन ठेवी स्वीकारण्याचें बँकेस बहुतेक बंद करावें लागलें. आपली संस्था ही अनेक जॉइंट स्टॉक कंपन्यांची आणि स्थानिक व सार्वजनिक संस्थांची बँक म्हणून काम करते. तसेंच, सार्वजनिक फंड व पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटकडे असलेल्या सार्वजनिक ठेवी आपल्या बँकेंत ठेवण्यास सरकारनें मान्यता दिली आहे.

शेतीशिवाय महाराष्ट्रांत असलेल्या इतर उद्योगधंद्यांनाहि महाराष्ट्र इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह एजन्सी लि. या सहकारी संस्थेमार्फत आम्हीं थोडी-फार आर्थिक मदत करीत असतों. तसेंच शहरांतील सहकारी संस्थांना व हौसिंग सोसायट्यांना माफक व्याजानें कर्जाऊ रकमा देण्यांत येतात. शेतकरी व लहान लहान व्यापारी यांनाहि शेतीच्या मालाच्या तारणावर थोडीं-फार कर्जें दिलीं जातात. या योजनेचा हेतु एवढाच कीं, शेतकऱ्यानें तयार केलेल्या मालास योग्य भाव येईपर्यंत त्याला धान्य विकणें भाग पडूं नये व शिवाय त्याची तत्कालिन सांपत्तिक गरजहि अल्पांशानें भागविली जावी. पुण्यांतील मध्यम वर्गामध्यें व जिल्ह्यांतील शेतकरी मंडळींमध्यें चेकांचा जास्त फैलाव केल्याचें श्रेय आमच्या बँकेस विशेष आहे, हें येथें नमूद करणें जरूर आहे.

बँकेनें वेगवेगळ्या तालुक्यांचे मुख्य ठिकाणीं अगर दुसऱ्या सोयीच्या ठिकाणीं शाखा काढण्याचें धोरण सन १९२६ मध्यें मुक्रर केलें व त्यास अनुसरून एप्रील, १९२६ मध्यें पहिली शाखा खेड येथें स्थापन करण्यांत आली व हळूहळू इतरत्र शाखा स्थापन करण्यांत आल्या. हल्लीं आपल्या बँकेच्या सहा शाखा आहेत.

गेलीं दहा बारा वर्षें बँकेचा कारभार फार झपाट्यानें वाढत आहे. त्यामुळें सन १९२४ सालीं पुरेशी वाटत असणारी जागा सन १९३४ सालीं फारच अपुरी वाटूं लागली. नोकर वर्गाचे संख्येंत जरूरीप्रमाणें वेळोवेळीं वाढ झाली; तसेंच बोर्डावरील डायरेक्टरांची संख्याहि ९ पासून १७ पर्यंत हळूहळू वाढली.

या सर्व अडचणी लक्षांत घेऊन इमारतीवर दुसरा मजला चढवावा असें भागीदारांच्या संमतीनें बोर्डानें ठरवून हा मजला सन १९३५ मध्यें बांधला. दुसरा मजला बांधीपर्यंत बोर्डाच्या सभा इमारतीचे तळघरांत होत असत. परंतु मुख्य दिवाणखाना तयार झाल्यापासून त्या तेथें भरूं लागल्या व तळघरांतील जागा रिकामी राहूं लागली. बँकेनें आपल्या स्ट्रॉंगरूममध्यें खातेदारांच्या सीलबंद पेट्या व इतर महत्त्वाचे व किंमतवान कागदपत्र योग्य तें भाडें घेऊन ठेऊन घ्यावेत अशा अर्थाची मागणी बँकेकडे गेलीं पांच सात वर्षें अनेक व्यक्ति व संस्थांकडून वरचेवर करण्यांत येत होती. परंतु जागेच्या अभावामुळें सदर मागणीचा विचार करणें बोर्डास शक्य होईना. या सर्व परिस्थितीचा तपशीलवार विचार आक्टोबर १९३६ मध्यें मुद्दाम बोलाविलेल्या बँकेच्या भागीदारांच्या सभेंत होऊन तळघरामध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् सुमारें रुपये १५,००० खर्च करून बांधावेत व सेफ कस्टडीसाठीं बँकेकडे देण्यांत आलेल्या पेट्या वगैरे तेथें सुरक्षित ठेवण्यांत याव्यात आणि सेफ डिपॉझिट लॉकर्स व्हॉल्ट्समध्यें बसवून ते योग्य भाडें घेऊन खातेदारांना उपयोगासाठीं द्यावेत असें ठरलें. सदर योजनेस सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रारसाहेब यांचीहि मान्यता व मंजुरी मिळाली. व्हॉल्ट्स्च्या इमारतीचें बांधकाम पुण्यांतील एक प्रमुख कॉन्ट्रॅक्टर रा. भाऊ गंगाधर साठे यांचेकडे देण्यांत आलें होतें.

सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्चा हा प्रयोग यशस्वी झाल्यास त्या दिशेनें आणखीहि वेगवेगळे प्रयत्न केले जाण्याचा संभव आहे. तरी आतां गरजू मंडळींनीं व विशेषतः बँकेच्या सभासदांनीं या सोयीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेऊन हा प्रयोग सर्व दृष्टीनें यशस्वी करण्यास बोर्डास हातभार लावावा एवढीच त्यांस आग्रहाची विनंति आहे. लॉकर्ससाठीं ठेवण्यांत येणारें भाडें हें माफक असून मध्यम वर्गातील मंडळींस सहजीं देतां येईल इतकें तें थोडें आहे. "

### पुणें येथील तरुण कॉन्ट्रॅक्टर, श्री. भाऊ गंगाधर साठे



पुणें सें. को. बँकेचा दुसरा मजला श्री. साठे ह्यांनींच चढवला होता, त्याचा उद्‌घाटन समारंभ ३१ ऑगस्ट, १९३५ रोजीं सर चुनीलाल मेहता ह्यांचे हस्तें झाला. नगर वाचन मंदिराच्या तिसऱ्या मजल्याचें व आनंदाश्रमाचें कामहि त्यांनीं केलें आहे.

### " धंदेशिक्षण : खास १०० वा अंक "

धंदेशिक्षण मासिकाचा ११ व्या वर्षाचा खास १०० वा अंक आमचेकडे अभिप्रायार्थ आला आहे. अनेक छोटेखानी, अल्प भांडवली धंद्यांची त्यांत व्यावहारिक माहिती देण्यांत आली असून ती वाचकांत जिज्ञासा निर्माण करून होतकरू तरुणांस मार्गदर्शक करण्याजोगी आहे. वर्गणीदारांस हा १ रु. किंमतीचा अंक मोफत मिळतो. सदरहु मासिक मुंबई इलाखा व वऱ्हाड-मध्यप्रांत यांतील शाळांसाठीं मंजूर झालेलें आहे.

### बार्शी डाळ मॅन्युफॅक्चरिंग कं. लि , बार्शी

३१ मार्च, १९३७ अखेरच्या वरील कंपनीच्या चवथ्या वार्षिक रिपोर्टावरून तिची प्रगति चांगली होत असल्याचें दिसून येतें हिशेबाचे वर्षांत निव्वळ नफा ३,०९२ रु. १२ आ झाला त्यांत मागील साळचा नफा ६५० रु. ११ आ ३ पै मिळविला असतां एकूण रकम ३,७४३ रु ७ आ ३ पै होते त्यातून द. द. शे. ७ रु ८ आ. दरानें डिव्हिडंडकरितां १,९७३ रु. १२ आ मंजूर करण्यांत आले आहेत व पुढील साळाकरिता १,७६९ रु ११ आ ३ पै राखून ठेवण्यात आले आहेत कंपनीची वार्षिक सभा ता. १३ जून रोजीं भरली होती त्यावेळीं तिचे अध्यक्ष, श्री शेठ रामचंद मूळचंद, हे आपल्या भाषणात म्हणाले:—

" यंदा अवर्षणामुळें तुरी व हरबरे यांचा धंदा विशेष प्रमाणात होऊ शकला नाहीं, तरी शिलक मालास भाव बरा आल्यानें निव्वळ नफ्यात वाढ झाली आहे. कंपनीनें १३,००० चौ वार जागा त्यावरील पूर्वीची प्रेस–बिल्डिंग इ सह विकत घेतली व चाळींचीहि वाढ केली, ह्यामुळें यावें लागणारें भाडें वाचून शिवाय भाड्याचें उत्पन्न येऊं लागलें आहे सुरक्षितपणाचा विचार करतांना आपण स्थाइक मालमत्तेस अग्रस्थान देतों, ह्या दृष्टीनें वरील खरेदीचें महत्त्व विशेष आहे. झीज व घसारा पूर्णपणें वजा करून कंपनीनें सुरवातीपासून चागलें डिव्हिडंड वांटलें आहे. कंपनीचें भाग-भांडवल वाढत आहे आणि भागास मागणीहि चागली येत आहे "

### सेफ डिपॉझिट व्हॉल्टचे कंत्राटदार
### श्री भाऊ गंगाधर साठे

पुणें सेंट्रल को बँक लि. च्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टचें काम श्री भाऊ गंगाधर साठे ह्यानीं अवघ्या साडेतीन आठवड्यात समाधानकारक रीतीनें पुरें केलें आहे. अशा प्रकारचें बांधकाम पुण्यात प्रथमच करण्यात आलें असून खोल तळघरांत अवघड ठिकाणीं तें करणेचें होतें. पहिलें काम पाडून नवीन पाया घेणें, सळेह सिमेंट कॉंक्रीटचें आवरण करणें, दीड ते दोन टन वजनाचे दरवाजे जागेवर नेऊन बसविणें, व्हेंटिलेटर्स बसविणें, वॉटर प्रूफ स्नो क्रीट व्हाईट सिमेंटचें प्लॅस्टर करणें, तळावर ग्लेझड टाइल्स बसविणें, हीं कामें एकामागाहूनएक पद्धतशीरपणें करण्यांत श्री. साठे ह्यानीं चातुर्य दाखविलें आहे. कामाचे सुपरवायझिंग इंजिनियर श्री जी. टी. गोखले, बी. ई हे होते. सुमारें ५ हजाराचें हें अगदी नवीन तऱ्हेचें काम अल्प मुदतींत पुरें करून श्री. साठे ह्यानीं आपल्या कीर्तीत भर घातली आहे.


## " स्वल्प व्याजानें कर्ज "

स्वदेशी उद्योगधंद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याही फायद्यासाठीं, कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४ किंवा, प्रथम ६४८ व दरमहा ३, पुढें सहामहीने भरून १०० तें ५००० कर्ज, अगर रु. ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊनही निकडीच्या गरजा भागवा. प्रास्पेक्टस व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा. दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी लि०

हेड ऑफिसः—गिरगाव मुंबई

ब्रँचः—लक्ष्मीरोड, काकाकुवा मॅन्शनसमोर, पुणें २

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळी १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज सोनें, चांदी सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,१४,३५० वसूल झालेलें भांडवल १,०७,०३५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## पुणें औद्योगिक दिनांत भाग घेणाऱ्या संस्था

**झारापकर इन्स्टिट्यूट ऑफ फोटोग्राफी, मुंबई**

झारापकर आर्ट स्टूडिओ व झारापकर इन्स्टिट्यूट ऑफ फोटोग्राफी ही संस्था मुंबईत आज पंधरा वर्षांपासून लौकिक मिळवून आहे सस्थेचे चालक श्री. नानासाहेब झारापकर हे उत्तम फोटोग्राफर असून त्यानीं आतापर्यंत अनेक विद्यार्थी उत्तम तयार केले आहेत. याचे एक शिष्य उच्च शिक्षणाकरिता लडनला गेले आहेत.

**एव्हरेस्ट स्टूडिओ**

एव्हरेस्ट स्टूडिओचे चालक श्री काजरोळकर यांनीं हा स्टूडिओ गेले पचवीस वर्षे उत्तम लौकिक संपादन करून चालविला आहे. याचेकडे राजे लोकाचीं मोठमोठीं कामें केलीं जातात यानींहि बरेच शिष्य तयार केले आहेत.

**भालचंद्र ज्योतिर्विद्यालय**

या सस्थेचे चालक प्रो अवचट हे उत्तम ज्योतिषी असून त्यानीं वरील जोतिर्विद्यालय चागल्या- रीतीनें चालविलें आहे. ध्वोडधदा या दृष्टीनें ही कला अत्यंत उपयुक्त आहे.

**अभंग एजन्सी, सातारा**

श्री. अभंग यानीं ही संस्था १९३४ मध्यें स्थापन केली असून त्या सस्थेमार्फत जाहिराती दिल्या जातात. तसेंच उत्तम ब्लॉकस् व रबरी शिक्केही तयार केले जातात. अगदीं आडगांवीं व मागसलेल्या ठिकाणीं सुद्धा उत्तम रीतीनें धंदा चालविता येतो ह्याचें वरील संस्था हें उदाहरण आहे.


## P. W. D. Ahmednagar Division.

Sealed tenders are invited for the following supplies for 12 months from 1st July 1937 Tenders accompanied by Treasury Chalans as shown against each group should be addressed to the Executive Engineer, Ahmednagar Division and delivered at his office, up to 4 P. M. on 28/6/37. Tender forms with conditions of Contract will be available on payment at the office of the undersigned during office hours. New tenderres should furnish solvency certificates. The Executive Engineer reserves the right to reject all tenders and no reason will be given for the acceptance or the rejection of any tenders.

| | Cost of tender | Earnest money |
|---|---|---|
| (1) Hardware and Petty stores for Ahmednagar Division excluding Sangamner Sub-Division. | Rs. 3/- | Rs. 100/- |
| (2) Hardware and Petty Stores for Sangamner Sub-Division only | Rs. 2/- | Rs. 75/- |
| (3) Teak wood for Ahmednagar Division | Re 1/- | Rs. 25/- |
| (4) Kerosene Oil. Do | Re. 1/- | Rs. 25/- |

(Sd) N. B. GADRE,
B. E., A. M. I. E., I S E.
Executive Engineer,
Ahmednagar Division.

## S. P. Mandal's School of Commerce, Poona

The School has commenced for the 1937-38 session from the 21st June, 1937 to coach students for the **Government Commercial Diploma Examination** Admission from 7th June to 10th July 1937 between 7 A. M. and 9 A. M. on working days Admission fee Rs 5 Annual tuition fee Rs 80- Scholarships and free and half-free studentships available to deserving students Prospectus, sent free on application to the Superintendent S. P Mandal's School of Commerce, N. M. V. High School Buildings, Poona 2.

N. G NARALKAR,
Superintendent.

इनकम-टॅक्स कायदा वरचेवर बदलत आहे. तरी इन्कम-टॅक्स भरण्यात कायदेशीर रीत्या बचत करण्यासाठीं

**बी. एल. ठोसर, पब्लिक अकौंटंट**

यांचेकडेच आपले काम सोंपवा

पत्ताः–१५५, रविवार पेठ, सोन्यामारुतीसमोर, पुणें.

हेड ऑफिस –४९५-९७ काळबा देवी रोड, मुंबई २

***Ardomix*** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठाधरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगांवर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गळचलणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरे करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत. अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे. ट स. १२ आणे निराळा. गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

**३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर**

एजन्सीज.—

मुंबई—यशवंत दत्तात्रय गाडगीळ, फणसवाडी, मुंबई २
धामणगांव—मे भागवत ब्रदर्स, धामणगांव, वऱ्हाड.
हरदा—चौधाजी तुळशीराम आणि सन्स, हरदा, सी पी.
खानदेश—डॉ. जी एन महाजन, मोठें वाघोदे, खानदेश.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०५—२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—४ |
| ४% १९४३ ... .. ... | १०६–१४ |
| ३½% बिनमुदत ... .. ... | ९५—७ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०५—७ |
| ३¾% १९४८–५२ ... ... | ९९–१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७–१४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०७—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १११—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु भरले व १०% डिव्हिडंड) | १११—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२–१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि ) | १५३५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १९, बोनस ६ रु ४ आ. ) | ९३०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५०—५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९% ) | २७७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर ( १,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १३८७—८ |
| टाटा पॉवर ( १,००० रु. अेफरन्स, डिव्हि. ७½%) | १५४२—८ |

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते भेटा अगर लिहा:—

**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.

*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

# The Nair Hospital Dental College, Bombay

**Examination Results for the Session, 1936-37**

The following students have been declared pass—

Final L D. Sc. Class—P P Sahni, K B Irani, A. Oliver, E D Kavina, Alfred Alvares, B N. Ambike, N J Vasavada, *Miss P G Idnani*, Dr. Siquiera Nazareth, H H. Thakore

The following prizes are awarded to the successful candidates—

P P. Sahni—Dr Nair's Gold Medal for general proficiency, The Nair Hospital Dental Callege prize for Operative Practice, The Nair Hospital Dental College prize for Prosthetic Practice

K B Irani & Dr. S. Nazareth—Nadirshaw Printer's prize is divided equally between both.

---

Inter L. D Sc Class—M C Mazumdar, *Miss F. D Sales*, Norman Pinto, E N Karande, M S Ginwalla, N R Vazifdar, C P Barucha, S A. Mehta

Prize—M C Mazumdar is awarded N. Powell's prize for general proficiency

---

First L D Sc. Class.—G D Patel, T D Kathiram, R. W Varty, V D Agarwalla, Y. V Kittur, R V. Bhagwat, *Miss Shanti Raj*, *Miss T. F Canteenwalla*, N. H Moghe, P V Rath, B G Vyas

Prize—G D Patel is awarded N Powell's prize for general proficiency

V M DESAI,
D. D S,
Dean

---

रिणको सोडून देण्याविषयींच्या अर्जाची धनकोस नोटीस

## पुणें येथील फ. सब जज्ज यांचे कोर्टांत

मुक्काम पुणें येथें

नादारी अर्ज नंबर १२५ सन १९३६ पैकीं

विश्वनाथ वासुदेव विनोद, हिंदु ब्राह्मण, नोकरी, उ. वर्षे ३२, भागरवाडी–लोणावळे, अर्जदार रिणको यांच्या बाबतींत

वि०

जी. आय. पी. रेल्वे को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, वगैरे १३ जाब देणारे धनको.

तुम्हास नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं सांगितलेल्या नादारानें आपणास सोडून देण्याविषयीं ह्या कोर्टास अर्ज केलेला आहे आणि या कोर्टानें त्या अर्जाची चौकशी तारीख २ माहे जुलै सन १९३७ रोजीं करण्याचें ठरविलें आहे.

आज तारीख १० माहे जून सन १९३७

शिक्का

S. S. Jogalekar,
Clerk of the Court.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचें छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८२,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बॅंक ठेवी | ६,४७० |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात | — |
| गुतविलेली एकूण रक्कम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्र-व्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्,




मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बॅंक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बॅंक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि पुणें ) | १६ अकलूज ( जि सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगाव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०,०००००चे वर

या बॅंकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बॅंक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बॅंकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

त्वरा करा
जेवणाची उत्तम सोय—**न्यू प्रभाकराश्रम**—नांवे नोंदवा महिन्यांतून ४ फीस्ट्स
दर ११ रु सदाशिव पेठ, गाय आळींतील श्रीराममंदिराजवळ मॅनेजर—न्यू प्रभाकराश्रम

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

**दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.**
रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पद्मजी पेपर मिल, मुंबई.
पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता
सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!
ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.
८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

**रोडगे** यांच्या
मजबूत
**सतरंज्या**
वापरा.
आपल्या पैशाला योग्य मोबदला मिळवा.
**सर्वत्र मिळतात.**
कारखाना पत्ता:- ३० मिठगंज पेठ पुणे २

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील
शुभकार्यात भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।२ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ३० जून, १९३७ अंक २६

आणखी एक

प्रगतीचा मोठा टप्पा

५१ लाखांवरून ६६ लाख

वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लि, सातारा.

विमा व्यवसायात विशेष महत्त्वाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या अशा ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी कोणत्याहि जीवन विमा कंपनीस हार जाणार नाहीं आणि सुप्रसिद्ध विमागणिती श्री ग स मराठे, एम् ए, ए आय ए, (लंडन) म्हणतात त्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया ही

सर्व विमाकंपन्यांना आदर्श

अशी विमा संस्था आहे.

गेल्या वर्षअखेरचा प्रगतीचा आढावा.

| | |
|---|---|
| एकूण विमा | रु. ३,२०,००,०००हून अधिक |
| एकूण शिल्लक | रु ८३,००,०००हून अधिक |
| सन १९३६ मधील उत्पन्न | रु. १९,३२,८९९ |
| लाईफ फंड व इतर गंगाजळी | रु. ७७,०५,३७९ |
| सन १९३६मधील नवें काम | रु ६६,४०,८३९ |
| एकूण क्लेम्स दिले | रु. १७,१०,२०६ |
| त्याप्सर्चे प्रमाण | शेंकडा ४ |

त्रैवार्षिक दर हजारी बोनस

होल लाईफ रु. ७५ व एण्डौमेण्ट रु. ६०

विमा उतरण्याला किंवा एजन्सी घेण्याला हीच कंपनी उत्कृष्ट

पुणें शाखाः— बुधवार चौक, पुणें.

मॅनेजर.

INDUSTRIAL SOCIETY
WORK SHOP
Furniture on hire on Reasonable Terms
Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time
Old Furniture also can be bought or sold on commission
SHEVAK Bros. 153 Kasba, POONA. Near Ganpati Temple
Branch No. 1 Fergusson Road.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

मुलांचा खाऊ म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे.
भावाचें माहितीपत्रक मागवा
भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २.

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ —
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्

## विविध माहिती

### पळसाला पानें तीन

कोठेंहि जा, बेकारीचा प्रश्न कमीअधिक उग्र स्वरूपात आढळल्याखेरीज रहाणार नाहीं गोरें हद्दीमध्यें सुशिक्षित बेकार तरुणांचा सुळसुळाट झाला आहे, परतु धंदेशिक्षण देणाऱ्या सस्था विद्यार्थ्यांची वाट पहात बसल्या आहेत खेडोंपाडींसुद्धा डॉक्टराची सस्त्या जरूरीपेक्षा जास्त आहे शाळातील विद्यार्थ्यांचा भरणा वाढत आहे परतु शेतीकडे कोणाचेंच लक्ष नाहीं ! हिंदुस्तानातहि सर्वत्र हीच परिस्थिति आहे

### जपानी मोटारगाड्या दाखल झाल्या

जपानी मोटारींची आयात हळुहळू वाढणार असा रग दिसतो कलकत्ता येथें कॉर्पोरेशनचे अध्यक्ष, श्री. राय चौधरी, ह्यानीं जपानहून नुकत्याच आलेल्या डॅट्सन गाड्यांची शोरूम उघडली समारभाचे वेळीं, यत्रशास्त्रात जपान्यानीं केलेल्या प्रगतीसबधीं कौतुक व्यक्त करण्यांत आलें

### टॅरिफ बोर्डाचा पुण्यात मुक्काम

साखरेच्या धंद्याची चौकशी करीत असलेल्या हिंदी टॅरिफ बोर्डाचा मुक्काम पुण्यात ता १५ ते २५ जुलै अखेर आहे

### जपानची पचवार्षिक योजना

युद्धविषयक सिद्धतेची पूर्वतयारी म्हणून जपाननें एक पंचवार्षिक योजना आखून तीवर ७०० कोटि रुपये खर्चण्याचें ठरविलें आहे ह्या योजनेमुळें जपानची उत्पादन-शक्ति तिपटीनें वाढेल अशी अपेक्षा आहे

### भिकाऱ्याची शिरगणती

मुबई शहरातील भिकाऱ्यांची शिरगणती करण्याचें मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशननें ठरविलें आहे व त्याप्रीत्यर्थ ५०० रु मंजूर केले आहेत. एका दिवसामध्यें हें काम उरकण्यात येईल

### तिन महिन्यात ८५ संप

१९३७ च्या जानेवारी, फेब्रुवारी व मार्च ह्या तीन महिन्यात मिळून ब्रिटिश हिंदुस्थानातील कारखान्यात एकूण ८५ संप झाले त्यात १½ लक्ष कामगारांचे २७½ लक्ष कामाचे दिवस बुडाले ४१ संप बगालचे वाटणीस, आले व मद्रास इलाख्यात १५ व मुबई इलाख्यांत १३ सप झाले

### कोयनेलचा खप व पुरवठा

हिंदुस्थानांत दरसाल सुमारें १० कोटि लोकाना हिवतापाचीबाधा होते व त्या सर्वांस पुरेसें कोयनेल द्यावयाचें म्हणजे सालीना ७ लक्ष पौंड कोयनेल हवें. सध्या कोयनेलचा वार्षिक ख २ लक्ष पौंड इतका आहे, त्यापैकीं १ लक्ष १० हजार पौंडाची आयात होते व ९० हजार पौंड हिंदुस्थानात तयार होतें सिकोना झाडापासून कोयनेल काढतात. ह्या झाडाची लागवड करण्यास सोईस्कर अशा प्रदेशाची निवड करण्याचें काम हिंदुस्थानांत लवकरच हातीं घेण्यांत येईल, असें समजतें.

### डायरेक्टरांची डायरेक्टरी

ग्रेट ब्रिटनमधील सयुक्त भांडवलाच्या कंपन्याचे व्यवस्थापक मंडळांतील सभासदाची यादी आज ५८ वर्षें दरसाल प्रसिद्ध करण्यात येत असते. १९३७ सालासबधातील यादींत ३३,००० डायरेक्टरांचीं नावें आढळतात एकच मनुष्य अनेक कंपन्याचा डायरेक्टर असू शकतो, व त्या बाबतची माहितीहि ह्या यादींत दिलेली आहे ब्रिटिश व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अवाढव्यतेची ही साक्ष आहे.

### सरकारी ट्रेझरी बिलें

गेल्या आठवड्यात सरकारी ट्रेझरी बिलास १ कोटि ६५ लक्ष रुपयाची मागणी येऊन १ कोटीचीं टेंडर्स स्वीकारलीं गेलीं. बिलांवर व्याजाचा दर सरासरीनें द सा द. शे १५ आणे १० पै इतका पडला

### पंजाबमधील गुंडगिरी

पजाब प्रातामध्यें १९३५-३६ सालीं गुंडानीं एकूण ९४८ स्त्रिया पळवून नेल्या १९३६ च्या पहिल्या चार महिन्यांत पळवून नेलेल्या लोकामध्यें १९० स्त्रिया होत्या.

### हिंदुस्थान व सीलोन ह्यांमधील व्यापार

हिंदुस्थान सीलोन देशास दरवर्षीं ४½ कोटि रुपयाचा माल पाठवितो व सीलोनमधून आयात फक्त १½ कोटि रुपयाची होते. हिंदुस्थानात सीलोनी माल जास्त खपावा अशी त्या देशाची खटपट चालू आहे.

### ब्रिटिश साम्राज्याची खनिज सपत्ति

ब्रिटिश साम्राज्यात समाविष्ट असलेल्या देशामध्यें १९३५ सालीं एकूण ५३५ कोटि रुपये किंमतीची खनिज संपत्ति बाहेर काढण्यांत आली ह्यानला ग्रेट ब्रिटनचा हिस्सा ४२ टक्के, दक्षिण आफ्रिकेचा २० टक्के व कॅनडाचा १६ टक्के होता.

### औषधें बनविणाऱ्या कपनीचा नफा

" बूट्स प्युअर ड्रग कपनी " ह्या औषधें बनवून विकणाऱ्या ब्रिटिश कपनीस सर्व मामुली खर्च व प्राप्तीवरील कर वजा जातां गेल्या सालीं सुमारें सव्वा कोटि रुपये नफा झाला.

### सर फ्रेड्रिक साइक्स ग्रामसुधारणा ढाल

ग्रामसुधारणेचे कामीं चागली कामगिरी करणाऱ्या मध्यभागांतील गावाकरिता ठेवलेलें सर फ्रेड्रिक साइक्स शील्ड चालू वर्षीं नाशिक जिल्ह्यातील अढगाव ह्या गांवास मिळालें आहे. गेल्या वर्षीं, सातारा जिल्ह्यातील येळूर ह्या गावास हा मान मिळाला होता

### "एस पी सी ए"

जनावराची निर्दयपणापासून मुक्तता करण्याकरिता पुणें येथें "सोसायटी फॉर प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टु ॲनिमल्स" ही सस्था १९२६ सालीं स्थापन झाली. सदरहु सोसायटीनें एक दुय्यम चिटणीस, एक डॉक्टर, निर्दयपणा उघडकीस आणण्याकरितां आठ एजट्स व इतर सहायक पगारी नेमले आहेत. मोटारींतील एक फिरता दवाखानाहि संस्थेनें चालविला आहे १९३६-३७ सालीं निष्ठुरतेचीं २,१५६ उदाहरणें सोसायटीस आढळून आलीं १०५ जणांवर खटले भरण्यांत आले, ते सर्व शाबीत झाले इस्पितळामध्यें सुमारें १,३०० जनावराना औषधपाणी देण्यांत आलें फिरत्या दवाखान्यानें ६७२ जनावरास औषध दिलें सस्थेस व्यापारीवर्गाकडून मिळावें तसें सहाय लाभत नाहीं, अशी अहवालामध्यें सेक्रेटरींनीं तक्रार केली आहे.

### मुबई बदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| १३-६-३७ ते १९-६-३७ | ४०,९९,२४८ |
| २०-६-३७ ते २६-६-३७ | १८,६४,०९७ |
| २१-९-३१ ते २६-६-३७ | २,९८,७६,४८,४०३ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३२२ |
| २ दुखणें एक व औषध दुसरेंच ... ... | ३२३ |
| ३ वेजवुड कमिटीच्या शिफारसी ... | . ३२४ |
| ४ दयाळबाग ... | . ३२४ |
| ५ स्फुट विचार | . ३२५ |
| हिंदी रेल्वेजची आर्थिक स्थिति—मुंबईचा प्रांतिक कारभार—युद्धाची खुमखुम व आर्थिक अस्थिरता—श्री. मूळजींची मसलत्शी व मराठा चेंबर—प्रपंच आणि परमार्थ | |
| ६ वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगति | ३२७ |
| ७ विमा पॉलिसीवरील क्षमा भरण्याचा अधिकार | ३२७ |
| ८ नागपूर पायोनियर इं क. लि .. | ३२७ |
| ९ उच्च शिक्षण व बेकारी | ३२८ |
| १० सार्वजनिक आरोग्य कसें सुधारेल ? . .. | ३२९ |
| ११ सहकारी वृत्त ... | ३२९ |
| १२ सर प्रफुल्लचंद्र राय | ३३० |
| १३ दिवाणबहादुर गोडबोले | ३३० |
| १४ निवडक बाजारभाव | ३३१ |


# अर्थ

बुधवार, ता ३० जून, १९३७

## दुखणें एक व औषध दुसरेंच ?

—:०—

### श्री श्रॉफ ह्यांची स्पष्टोक्ति आणि सरकारची भूमिका

मुंबईच्या रोखे बाजाराच्या संस्थेचा आर्थिक उपयोग जनतेस व्हावा तसा होत नाहीं व त्यांतील सट्टेबाजीच्या सवद्याचें प्रमाण फारच मोठें —८० ते ९० टक्के असतें, असें मुंबई स्टॉक एक्सचेंज कमिटीस आढळून आलें व तिनें हे दोष सुधारण्याकरिता उपाययोजनाहि सुचविली मुंबईच्या रोखे बाजारांतील रोजचें दृश्य पहाणारास सदरहु बाजारांतील दोषच सामान्यतः आढळून येतील, त्यांतील व्यवहारामुळें होणारे सामाजिक फायदे त्यास सुचणारहि नाहींत. सरकारी व निमसरकारी संस्थास कर्ज व संयुक्त मंडळ्यांस भांडवल ह्यांचा पुरवठा रोखे बाजारामुळेंच सुलभतेनें प्राप्त होतो, जनतेचें भांडवल एकाच धंद्यात अडकून पडण्याची भीति रहात नाहीं व एकंदर सर्वच उद्योगधंद्यांस त्यामुळें चालना मिळते स्टॉक एक्सचेंजच्या व्यवहारापासून हे फायदे व्यवस्थितपणें मिळण्यावरच त्या संस्थेची उपयुक्तता व कायदेशीर अस्तित्व हीं अवलंबून आहेत. तथापि, प्रत्यक्ष रोजच्या उलाढालींमध्यें खऱ्या व्यवहारापेक्षा सट्टेबाजीच बोकाळली तर त्यामुळें जनतेचें नुकसान होण्याचा संभव असतो.

मुंबईच्या स्टॉक एक्सचेंजचें कागदोपत्रीं खरें नाव "दि नेटिव्ह शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन" असें आहे. सदरहु संस्थेच्या वार्षिक सभेचे वेळीं, तिचे अध्यक्ष श्री. के. आर पी. श्रॉफ, ह्यांनीं स्टॉक एक्सचेंज कमिटीच्या शिफारसींचा समाचार गेल्या आठवड्यात घेतला आणि तिच्या शिफारशींनें रोखे बाजारातील सदोष परिस्थिति सुधारण्यास सहाय होणार नाहीं, असें आपलें मत स्पष्टपणें व्यक्त केलें खऱ्या मागणी-पुरवठ्याचे मानानें कितीतरी पट व्यवहार रोखे बाजारात चालतात व त्यामुळें सट्टेबाजीस ऊत येतो असल्या सवद्याचें नियंत्रण करून ते मर्यादेंत ठेवण्याचें काम परिणामकारक होण्यास केवळ कागदी व दिखाऊ नियंत्रणांचा व नियमांचा उपयोग होणार नाहीं, मनुष्य स्वभावांत एकदम बदल होणें अशक्य आहे व मॉरिसन कमिटीच्या उपाययोजनेमुळें बलिष्ठ दलालाचें मात्र फावून सट्टेबाजी बोकाळेल, असें श्री श्रॉफ ह्यांनीं सांगितलें. आज अनेक लोक गैरमाहितीनें सट्टे करतात, तर उद्या माहितगार परंतु पैशाचें भरपूर पाठबळ असणारे लोक अनियंत्रित व भरमसाट वायदे करतील, ह्यापेक्षा कमिटीच्या शिफारसींपासून दुसरा कोणताहि फायदा होणार नाहीं. अशा सट्टेबाजीस आळा घालण्याकरितां रोख्यांचे व्यवहार नियमबद्ध केले पाहिजेत हें खरें आहे, परंतु लेखणीच्या फटकाऱ्यासरशी ही सुधारणा होणार नाहीं, असें श्री. श्रॉफ ह्यांचें म्हणणें आहे सब-ब्रोकर्स व आर्टिकल्ड क्लार्क्स ह्यांचेकडून अनामत रकमा व वार्षिक फी घेतल्यानें त्यांचा दर्जा वाढणार नाहीं. त्यांची शैक्षणिक लायकी, अनुभव, व्यवहाराचें प्रत्यक्ष ज्ञान, इत्यादींत सुधारणा होण्यावरच त्यांची सामाजिक उपयुक्तता अवलंबून राहील, हें उघड आहे ह्या प्रश्नाचा मॉरिसन कमिटीनें विचार केलेला नाहीं. आज कित्येक उपटसुंभ संस्था व फर्म्स रोख्यांची व भागांची खरेदी-विक्री घडवून आणण्याचा धंदा करितात व आपल्या भपक्यानें गिऱ्हाइकास फसवतात. त्यांच्या व्यवहाराचें नियंत्रण करण्याची स्टॉक एक्सचेंजला सत्ता नाहीं, ह्याबद्दल श्री श्रॉफ ह्यांनीं आपल्या भाषणात तक्रार केली. त्यासंबंधात नुकत्याच उघडकीला आलेल्या प्रकरणावरून, अशा नियंत्रणाची आवश्यकता स्पष्ट झाली आहे

श्री. श्रॉफ ह्यांनीं मॉरिसन कमिटीच्या रिपोर्टावर केलेली टीका धंदेवाल्याच्या दृष्टीची आहे नवीन नियम करून एका चुटकीसरशी सुटण्याजोगा हा प्रश्न नाहीं व जनतेनें त्याबाबत फारशी अपेक्षा करू नये, असा ध्वनि त्यांच्या भाषणांतून ऐकू येतो. रोखे बाजारातील व्यवहाराचें स्वरूप दलालांच्या शैक्षणिक व मानसिक उच्च-कनिष्ठ दर्जावर व नीतिमत्तेवर अखेर अवलंबून रहाणार, हा श्री श्रॉफ ह्यांचा सिद्धांत खरा असला तरी आजच्या परिस्थितींत तो आशाजनक नाहीं. नवी सुधारणा होण्यापूर्वीच त्यासंबंधानें धंदेवाइक दृष्टीचें स्वतःचें मत व्यक्त करून श्री. श्रॉफ ह्यांनीं वस्तुस्थिति उघड पुढें मांडली, हें ठीक झालें आतां, मॉरिसन कमिटीच्या रिपोर्टांतील कोणत्या सूचनांचा सरकार पुरस्कार करतें, इकडे लोकांचें लक्ष लागून रहाणें सहाजिक आहे त्या कमिटीच्या शिफारसी व श्री. श्रॉफ ह्यांच्या तक्रारी यांचे संबधांत सरकारचें जनतेच्या हिताचे दृष्टीनें काय म्हणणें आहे, तें जाहीर होणें अगत्याचें होतें.

ता ३ मे, १९३७ रोजीं स्टॉक एक्सचेंजच्या अध्यक्षांनीं मॉरिसन रिपोर्टासंबधीं एक पत्र सरकारकडे पाठविलें होतें, त्यास मिळालेलें उत्तर नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. कमिटीनें सरकारास देऊ केलेले जादा अधिकार श्री. श्रॉफ ह्यांच्या एक्सचेंजला मान्य नाहींत हें खरें, परंतु कमिटीच्या इतर शिफारसींची अमलबजावणी स्टॉक एक्सचेंज कशी करते ह्यावरून जनता आपलें काय तें मत बनवील, असें सरकारनें आपल्या उत्तरात म्हटलें आहे. कांहीं सुधारणा सरकारनें घडवून आणावयाच्या असल्या, तरी स्टॉक-एक्सचेंजच्या संस्थेनें त्यांची वाट पहाण्याचें काय कारण आहे व आपल्या अधिकारांतील सुधारणा लांबणीवर टाकण्यात काय फायदा आहे ? असा सरकारचा सवाल आहे किंमतीमधील तफावतीची भरपाई करण्याकरिता दलालांनीं आपल्या गिऱ्हाइकांकडून अनामत रकम अवश्यमेव घेतली पाहिजे, ही मॉरिसन कमिटीची शिफारस अव्यवहार्य असल्यास निदान पाक्षिक वळणाची योजना तरी निश्चित करण्यात यावी अशी सरकारची सूचना आहे वरील पत्रव्यवहारानें सुधारणेच्या मार्गांतील अडचणींवर स्पष्ट प्रकाश पडला आहे, ह्यांत शंका नाहीं.

---

## वेजवुड कमिटीच्या शिफारसी

### रेल्वेजकडून फायद्याची अपेक्षा करणें व्यर्थ

[ हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या रेल्वेजसबंधीं चौकशी करून त्यांचें उत्पन्न कसें वाढेल, मोटारी व आगगाड्या ह्यांमधील स्पर्धा कमी होऊन रेल्वेजची परिस्थिति कशी सुधारेल व रेल्वेजच्या जमाखर्चाची शक्य तितक्या कमी मुदतींत तोंडमिळवणी कशी करतां येईल, ह्यासंबंधीं सूचना करण्याकरतां हिंदुस्थान सरकारनें एक चौकशी कमिटी नेमली होती. सर राल्फ वेजवुड व मि. स्टेनर हे तिचे सभासद होते. ही कमिटी ता. १९ नोव्हेंबर, १९३६ रोजीं मुंबईस येऊन दाखल झाली. रिपोर्टावर १ जून, १९३७ रोजीं सभासदांच्या सह्या झाल्या व २७ जून रोजीं हा रिपोर्ट प्रसिद्ध करण्यांत आला. कमिटीच्या प्रमुख शिफारशींचा सारांश येथें देण्यांत आला आहे. ]

( १ ) कांहीं काळपर्यंत तरी हिंदी रेल्वेजचें उत्पन्न भांडवलावरील व्याज भागवून शिलक उरविण्याइतकें मोठें होईल, असें वाटत नाहीं. हिंदुस्थान सरकारास आगगाड्यांपासून कांहीं फायदा मिळेल, अशी अपेक्षा करण्यास जागा नाहीं. सर्वसाधारण बजेटावर रेल्वेजचाच बोजा पडला नाहीं, म्हणजे मिळविली.

( २ ) रेल्वेजच्या प्रत्येक खात्यांत काटकसर केली पाहिजे. बचत करण्याचे मार्ग कमिटीनें सुचविले आहेत. आगगाड्यांचा वेग वाढवून व त्याच्या वेळा सोईस्कर करून सुधारणा करता येईल. तोट्यात येणारे रेल्वेरस्ते बंद करतां येणें शक्य आहे. पगारात व मजुरींत सध्यापेक्षा जास्त कपात करणें योग्य होणार नाहीं. कांहीं जागा कमी केल्यानें काटकसर झाली असली तरी त्यामुळें रेल्वेजच्या कार्यक्षमतेस बाध आला आहे.

( ३ ) रेल्वेनोकराचा पैसेखाऊपणा व तोंडाळपणा कमी करण्याचा यत्न करण्यात यावा.

( ४ ) आगगाड्यापासून व्यापाऱ्यास करून घेतां येण्याजोगे फायदे त्याच्या नजरेस आणले पाहिजेत ह्याकरितां प्रचारकार्याची जरूरी आहे. सुरवातीस ग्रेटब्रिटनमधील अनुभवी तज्ञास आणल्यास बरें. वहातुकीचे दर वाढविणें व्यापारवृद्धीवर अवलंबून आहे. त्याबाबत प्रयत्न करण्यास आजची वेळ सोइस्कर नाहीं. आयात-निर्गत व्यापाराच्या वृद्धीस रेल्वेचे दर ज्यास्त पोषक असतात, ह्या तक्रारीचा विचार कमिटीनें केला नाहीं.

( ५ ) रेल्वे व मोटारी ह्यांच्या वहातुकीमध्यें एकसूत्रता येणें आवश्यक आहे. मध्यवर्ती सरकारनें घालून दिलेल्या धोरणानुसार प्रांतिक सरकारांनीं आपल्या रस्त्यांवरील वहातुकीचें नियंत्रण करावें. जरूरीप्रमाणें प्रादेशिक लायसेन्स देण्याची पद्धत सुरू करावी. मोटारींवरील कराबाबत सर्व प्रांतात एकवाक्यता असावी. प्रांतिक सरकारांनीं नवीन रस्त्याच्या बांधणीस सुरवात करण्यापूर्वी मध्यवर्ती सरकारची आपली योजनेस अनुमति घ्यावी. रेल्वेजना रस्त्यावरील वहातूक स्वतःकडे घेण्याची परवानगी असावी. त्यांनीं आपल्या स्वतःच्या मोटारींतून माणसांची व मालाची ने-आण करून स्पर्धेस तोंड द्यावें. रस्त्यांवरील वहानाच्या स्पर्धेमुळें रेल्वेजचें दरसाल ४½ कोटींचें नुकसान होत आहे व वेळींच उपाययोजना न केल्यास तें ह्याच्या दुप्पट होण्याचा संभव आहे. रेल्वेजनीं आपली लोकप्रियता वाढविण्याची खटपट करावी.

( ६ ) कांहीं रेल्वेजचें एकत्रीकरण करतां येणें शक्य आहे. परतु तें कालांतरानें करण्यांत यावें. नवीन रेल्वे-रस्ते आपल्याकडे घेण्याच्या हक्काचा सरकारनें १९४५ पर्यंत उपयोग करूं नये.

( ७ ) रेल्वेजच्या घसाराफंडांत निदान ३० कोटि रुपये शिलक असणें जरूर आहे. हिशेबाच्या स्वीकारलेल्या नवीन पद्धतीमुळें आगगाड्यांस दरसाल १½ कोटींची जादा तरतूद करावी लागणार आहे. सर्वसाधारण रिझर्व्ह फंडहि मोठा करण्याची जरूरी आहे. इतकें करून नंतर जादा नफा उरण्याची विशेष आशा नाहीं.

( ८ ) हिंदी रेल्वेजच्या व्यवहारांत राजकीय विचारांची लुडबूड होतां कामा नये. मध्यवर्ती सरकारास रेल्वेजकडून जादा नफ्याची अपेक्षा आतां नसणार, तेव्हां डिबेंचर धारण करणारास साजेल इतकेंच लक्ष फेडरल रेल्वेमंडळाच्या व्यवहारात त्यांनीं घालावें फेडरल ॲथॉरिटीनें रेल्वेबोर्डास सढळ अधिकार द्यावेत. रेल्वेजना स्वतःचें भांडवल बाजारांत उभारण्याच्या व्यवस्थेची तरतूद कशी करतां येईल, ह्याकडे फेडरल रेल्वे ॲथोरिटीनें लक्ष द्यावें.

## दयाळबाग

दयाळबाग ही राधास्वामी पंथाच्या अनुयायाची वसाहत आग्रा शहराशेजारीं एक मैलावर २० जानेवारी, १९१५ रोजीं स्थापन करण्यात आली. तिचें क्षेत्रफळ आता ३,००० एकर आहे. वसाहतीमधील एकूण ३,१०० लोकसंख्येपैकीं ७९६ विद्यार्थी आहेत. कामकऱ्याची संख्या सुमारें २,००० इतकी आहे. साहेबजी महाराज सर आनंदस्वरूप हे ह्या वसाहतीचे संस्थापक व प्रमुख होते, ते गेल्या आठवड्यात निधन पावले

दयाळबाग येथील वसाहतीची तुलना उपभोक्त्यांच्या सहकारी संस्थेशीं करतां येईल. ग्राहकाचें परस्पर-सहाय व त्याची स्वतःचीच उत्पादक संघटना, असा मिलाफ दयाळबाग येथें आढळून येतो पारमार्थिक उन्नतीची वाट चालत असतां ऐहिक सुखसोयींचा उपभोग घेणें अयोग्य नाहीं, ह्या भूमिकेवर तेथील व्यवस्था आखलेली आहे. राधास्वामी पंथाचे सुमारें एक लक्ष लोक दयाळबागेमध्येंच तयार होणारा माल विकत घेतात, हें सदरहु वसाहतीच्या भरभराटीचें एक प्रमुख कारण आहे. वसाहतीमधील कारखाने, बँक, छापखाना, इस्पितळ, घरें, हीं सर्व सामुदायिक मालकीचीं आहेत. दयाळबागेमधील "जीवन उद्धार फंड" विशेष उल्लेखनीय आहे. एक हजारापेक्षां जास्त रुपये देऊ शकणाराकडून रकमा जमा केल्या जातात व त्यावर ५ टक्के दरानें व्याज दिलें जातें. दुसऱ्या पिढीसहि हें व्याज मिळतें. तिसऱ्या पिढीनंतर मात्र ही वार्षिक नेमणूक बंद होते. मूळ रकम देणारास नड भासली, तर त्याचे पैसे त्यास परत मिळतात. अशा रीतीनें लाखो रुपयाचा फंड जमविण्याची चालकांची कल्पना आहे. महायुद्धाचे वेळीं कातड्याचीं बटणें सरकारास विकून दयाळबागेनें पुष्कळ पैसा कमावला. येथील प्रत्येक स्त्री-पुरुषानें काम केलेंच पाहिजे, असा दंडक आहे. मुलांमुलींना शाळेंत जाणें तेथें सक्तीचें करण्यांत आलें आहे.

### सर लल्लुभाई सामळदास स्मारक फंड

सर लल्लुभाई सामळदास ह्यांनीं सहकारी चळवळीकरितां जेवढें कार्य केलें तेवढें हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीनें केलें नसेल सर लल्लुभाई ता. १४ ऑक्टोबर, १९३७ रोजीं निवर्तले. त्याचें स्मारक करण्याचें मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें ठरविलें असून त्याकरितां एक कमिटी नेमली आहे. कमिटीच्या अध्यक्ष सौ. हंसा मेहता, एम्. एल्. सी., ह्या आहेत व श्री. आर. एम्. तळपदे हे सेक्रेटरी आहेत. स्मारक फंडास मदत करण्याची विनंति करणारें एक पत्रक कमिटीनें काढलें आहे. मुंबईच्या इलाखाधिपतींनीं फंडास २०० रुपयाची देणगी दिली आहे.

# स्फुट विचार

## हिंदी रेल्वेजची आर्थिक स्थिति विशेष सुधारण्याची आशा नाहीं

वेजवुड कमिटीच्या हिंदी रेल्वेजच्या सांपत्तिक सुधारणेबाबतच्या रिपोर्टाचा त्रोटक सारांश आज दुसरीकडे दिला आहे ह्या महत्त्वाच्या विषयाचें सविस्तर विवेचन आम्हीं पुढें करूं. आज इतकेंच नमूद करणें आवश्यक आहे कीं, कमिटीच्या मतें रेल्वेजची सांपत्तिक स्थिति हळुहळु सुधारत आहे तशीच ती पुढें राहील; परंतु कित्येकांची अपेक्षा आहे तिच्याप्रमाणें रेल्वेजच्या उत्पन्नातून सरकारला फायदा उरण्याची आशा करणें व्यर्थ आहे भांडवलावरचें व्याज, घसारा व निधि ह्यांची तरतूद होण्याइतकेंच उत्पन्न रेल्वेजना जेमतेम मिळेल. पण निवळ उत्पन्नातून सरकारच्या तिजोरीस कांहींच लभ्यांश व्हावयाचा नाहीं प्रांतिक स्वायत्ततेची राज्यघटना यशस्वी होण्यास प्रांतिक सरकारास उत्पन्नावरील करातला वांटा मिळणें आवश्यक आहे आणि हा वांटा तोडून देण्याचें सामर्थ्य हिंदुस्थान सरकारांत येण्यास त्यास रेल्वेजपासून प्राप्ती झाली पाहिजे वेजवुड कमिटीच्या रिपोर्टानें ह्या बाबतींतल्या आशेचा बुडबुडा फोडला आहे आणि नवीन राजकीय सुधारणाचा मार्ग कष्टमय केला आहे. रेल्वेजच्या हिताकरिता मोटारवहातुकीचें नियन्त्रण झालें पाहिजे असा वेजवुड कमिटीचा कटाक्ष आहे म्हणजे प्रांतिक सरकाराच्या क्षेत्रातल्या एका वाढत्या धंद्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न होऊन त्यांच्या उत्पन्नाची एक बाजू थोडीफार लंगडी पडणार आहे रेल्वेजच्या कारभारात विविध सुधारणा होऊन त्या सोयीच्या, कार्यक्षम व उत्पन्नदायी बनणें कितीहि अगत्याचें असलें तरी त्याचे योगानें हिंदी नागरिकांवरील करांचा बोजा हलका होण्याचा आणि स्वायत्त प्रांतिक सरकारांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा मार्ग निघू शकत नाहीं हा वेजवुड कमिटीचा अभिप्राय निराशाजनक आहे ह्यात संशय नाहीं.

---

### मुंबईचा प्रांतिक कारभार

हिंदुस्थानातल्या सहा प्रांतात नवीन राज्यघटनेस अनुसरून रीतसर मंत्रिमंडळें अजून स्थापन झालीं नाहींत, ह्यामुळें मुंबई सारख्या प्रांतात मामुली राज्यकारभारापलीकडे अधिक कांहीं करणें सरकारास अशक्य होऊन बसलें आहे उपस्थित झालेल्या बाध्यातून मार्ग निघावा ह्या हेतूनें लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं नुकतीच सविस्तर घोषणा केली आहे, तिचा परिणाम लोकमतावर कसा होतो आणि रीतसर मंत्रिमंडळाची स्थापना होणें सुकर होतें कीं काय ह्याचा निकाल अजून लागावयाचाच आहे कायदेमंडळातील बहुमतवाल्या पक्षानें अधिकारग्रहणाच्या बाजूनें निर्णय केल्यास सर्वच प्रश्न मिटेल आणि राज्यव्यवस्थेचा गाडा सुरळीत चालू लागेल तसें न झाल्यास हंगामी मंत्रिमंडळाच्या सहायानें गव्हर्नरास कारभार हाकावा लागेल हंगामी मंत्र्यांनीं आखलेल्या कार्यक्रमाची माहिती लोकांस व्हावी आणि तो अमलात येण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण व्हावी या विषयीं प्रयत्न चालू आहेत. इलाख्यामधील प्रातिनिधिक संस्थांच्या प्रतिनिधींची एक परिषद् लवकरच बोलावून तिला आपला कार्यक्रम समजावून देण्याचा व लोकांचा सल्ला घेण्याचा प्रधानमंडळाचा विचार आहे अशा रीतीनें जनतेचा पाठिंबा मिळविण्याची मंत्रिमंडळाची खटपट आहे. बहुमतवाल्या पक्षास व्हाइसरॉयाची घोषणा अधिकार ग्रहण करण्यास सोईची वाटल्यास अर्थातच हंगामी प्रधानांस त्यांस जागा मोकळी करून द्यावी लागेल येत्या आठवड्याचे अखेर ह्या विषयावर पूर्ण प्रकाश पडेल अशी अपेक्षा आहे

---

### युद्धाची खुमखुम आणि आर्थिक अस्थिरता

जगामध्यें शांतता प्रस्थापित होऊन व्यापार सुरळीत चालल्यावाचून प्रचलित मंदीस आळा बसणार नाहीं व जनतेच्या दु:स्थितीचें निवारण होणार नाहीं असें सर्व राष्ट्रांतले प्रमुख मुत्सद्दी कंठरवानें सारखे म्हणत असता शांततेस आवश्यक असलेलें धोरण मात्र निश्चयानें अंगिकारणेची टाळाटाळ जर्मनी व इटली ह्या देशांनीं चालविली असल्याचें स्पष्ट दिसतें स्पेनमधील अंतस्थ बंडाळी हें या परिस्थितीस निमित्तकारण झालें आहे. स्पेनमध्यें झगडणाऱ्या दोन पक्षास बाहेरून कोणत्याहि राष्ट्रानें मदत करूं नये आणि अंतस्थ युद्ध मर्यादित झालें म्हणजे तें निकालात निघणें सोपें होईल, ह्या भावनेनें इंग्लंड फ्रान्स, जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांनीं स्पेनभोंवतीं टेहाळणी व पहारा करण्याचें ठरविलें. स्पेनमधल्या सरकारास जर्मनी व इटली यांची आणि बंडवाल्यास रशियाची कुमक होत आहे अशा बातम्या वारंवार पसरतात आणि त्या योगानें अविश्वास व अस्वस्थता निर्माण होते. अलीकडे युरोपमधलें राजकीय वातावरण गरम झालें आहे आणि त्यात एखादी ठिणगी पडून युद्धाचा स्फोट होतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे जर्मनी व इटली ह्यांची सहानुभूति उघड उघड स्पेनमधल्या बंडवाल्यांच्या बाजूस आहे आणि हीं राष्ट्रें त्यांचें यश चिंतीत आहेत स्पॅनिश अतंकरुहात तीं जर उघडपणें पडलीं तर युद्धाचा वणवा युरोपभर पेटल्यावाचून रहात नाहीं, कारण इतर राष्ट्रांस ह्या परिस्थितींत तटस्थ रहाणें कठिण होईल मोठ्या युद्धास क्षुल्लक कारणहि पुरेसें होतें असा अनुभव असल्यानें जर्मनीनें स्पॅनिश सरकार व रशिया ह्यांचेविरुद्ध चालविलेल्या तक्रारीचा समाधानकारक निकाल न लागल्यास प्रकरण कोणत्या थरास जाईल हें सांगतां येत नाहीं इटालियन व जर्मन बनावटीचीं लढाऊ हवा विमानें स्पेनमध्यें वावरत असल्याची खात्रीलायक माहिती आपणास मिळाली आहे असें मि इडन यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें त्या उलट, लायपझिग नावाच्या जर्मन जहाजाविरुद्ध लाल नौकांनीं आगळिक केली आहे तिची भरपाई तावडतोब आपणास मिळाली पाहिजे, नाहींतर तटस्थपणा आपण झुगारून देऊं अशी धमकी जर्मनीनें दिली. स्पॅनिश सरकारास या बाबतींत चांगली समज दिली जावी ही जर्मन मागणी इटलीनें उचलून धरली

---

### श्री मूळजींची मखलाशी व मराठा चेंबर

साखरेच्या अखिल भारतीय व्यापारी सभाचे अध्यक्ष, श्री. मूळजी, ह्यांनीं हिंदी साखरेच्या धंद्यासंबंधानें मत प्रदर्शित करताना, महाराष्ट्रानें गूळ तयार करून स्वस्थ बसावें आणि साखरेच्या धंद्यात पडू नये, असें सांगितलें, त्याचा परामर्ष आम्हीं गेल्या अंकातील अग्रलेखात घेतलाच आहे "आपल्या फाजील मालास गिऱ्हाईक नाहीं म्हणून इतर प्रांतानीं महाराष्ट्रावर शस्त्र उपसावें, हें योग्य नाहीं, मुंबई इलाख्यातील उंसाची लागवड व साखरेचे कारखाने हीं मुंबई सरकारनें पूर्ण विचाराअंतीं ठरविलेल्या निश्चित योजनेचीं फळें आहेत, आणि सरकारनें श्री मूळजी ह्यांच्या गैरसमज पसरविणाऱ्या विधानास तावडतोब उत्तर देणें जरूर

आहे” इत्यादि मुद्दे मराठा चेंबरचे कार्याध्यक्ष, प्रो वा गो काळे, ह्यानीं आपल्या सरकारकडे पाठविलल्या पत्रात माडले आहेत श्री मूळजी ह्यांनीं आपल्या स्वत:च्या विधानासबंधीं आतां खुलासा प्रसिद्ध केला आहे परंतु त्यानें त्याच्या पूर्वीच्या विधानांचा भ्रामकपणा कमी झालेला नाहीं महाराष्ट्रातील साखर कारखान्याचे दिवस सपले आहेत व गुळाच्या उत्पादनाकडच आता त्यांनीं लक्ष पुरवावें, असें अजूनहि त्याचें, तुणतुणें आहे मुबई सरकारनें ह्या जिल्हाळ्याच्या प्रश्नात तातडीनें लक्ष घालून, त्या सबधातील खरी परिस्थिति ताबडतोब पुढें मांडावी व श्री मूळजींस निरुत्तर करावें, अशी मराठा चेंबर प्रमाणेंच आमची सूचना आहे सरकारनें बुद्धिपुर सर आखलेल्या धोरणाविरुद्ध तक्रार करणाऱ्या स्वार्थी किंवा परप्रांतीय हितसबधी लोकांच्या कागाळ्यांचा शक्य तितक्या लवकर निकाल लावणें जरूर आहे

---

### प्रपंच आणि परमार्थ

आग्र्याशेजारील प्रसिद्ध दयाळबाग ह्या सस्थेचे गुरु, सर आनद स्वरूप, ह्याच्या गेल्या आठवड्यात झालेल्या निधनानें हिंदुस्थान देश एका नामांकित, स्फूर्तिमान व कर्तृत्ववान व्यक्तीच्या समाजसेवेच्या कार्यास मुकला आहे श्री साहेबजी महाराज हे साधुवृत्तीचे व पुण्यशील पुरुष असून एका धार्मिक पथाचे प्रवर्तक होते तथापि, त्यानीं प्रपच व परमार्थ ह्याचा मेळ उत्कृष्ट रीतीनें घालून दिला होता मनन व उपदेश ह्यासच स्वत स मर्यादित करून न घेतां त्यांनीं समाजाची ऐहिक व पारमार्थिक उन्नति घडवून आणण्याचा मार्ग प्रत्यक्ष कृतीनें आपल्या अनुयायांस व इतरास दाखविला आहे सत किंवा साधू आणि आधुनिक शास्त्रीय व यांत्रिक सुधारणा ह्यामध्यें विरोधच असला पाहिजे ही प्रचलित कल्पना भ्रामक व खोटी असल्याचें स्वत:च्या चारित्रानें त्यांनीं सिद्ध केलें आहे. आग्रा शहराशेजारीं चार एकर जागा घेऊन तेथें त्यानीं वीस वर्षांमागें आपल्या अनुयायाची एक लहान वसाहत केली आज तिचें क्षेत्र पाच चौरस मैल असून साडेतीन हजार लोकांची तेथें वसती आहे ह्या नमुनेदार वसाहतींत अत्यत हवाशीर व सोयीचीं अनेक घरें आहेत पण तिचा विशेष,आधुनिक पद्धतीचे विविध कारखाने, शेतीवाडी व दुग्धालयें सुंदर रीतीनें चालविलीं जात आहेत, त्यामध्यें आहे टापटिपीचीं घरें व रस्ते, सुदर शेतें व बगीचे, पाश्चात्य जातींच्या बहुदुग्धदायी गायी, आधुनिक यत्राच्या सहायानें दूध शुद्ध करण्याची व्यवस्था, देवालयें व शाळा हीं एकत्र पाहून मन आनदित होतें उपासना मदिर, शिक्षण सस्था, कारखाने व गोशाळा ह्याचें दयाळबागेंत दिसून यणारें साहचर्य उद्बोधक आहे साधी रहाणी, धार्मिक आचरण व प्रगतिप्रियता ह्याचा मिलाफ तेथें झालेला पाहून प्रेक्षकास सर आनद स्वरूप व त्याचे अनुयायी ह्याचें कौतुक केल्यावाचून रहावत नाहीं. त्याच्या वसाहतीवर आतांपर्यंत अर्धा कोटि रुपये खर्च झालेले आहेत आणि तेथील शेतवाडी व कारखाने यांच्या मालाची वार्षिक निर्गत सुमारें ८ लक्ष रुपयाची भरते. सर आनद स्वरुप व त्याची दयाळबाग ह्यांचें अनुकरण इतरानीं इतरत्र करणें अगत्याचें आहे

अर्थशास्त्र
लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ३००, किंमत तीन रुपये
ह्या ग्रंथात अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांताचें विवेचन केलें आहे




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा
स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वत:च्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २५, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रक्कम मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २

**The Willingdon College, Sangli.**

Reopened for the new academic year on the 21st of June Registration of names has commenced on the 7th June The college provides for both Arts and Science courses in the first two years, for B A degree courses, pass and honours, and for post-graduate instruction About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, cheapness and efficiency are the special features of the College.

The tuition fees are Rs 60 per term, and the room rent per term per student is Rs 12 for a double and Rs 15 for a single room Boarding charges come to about Rs 12 p. m. Further information can be had on application

Arrangements are made to secure accommodation for lady students in a well conducted hostel in Sangli.

D. G. Karve,
Principal.

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगति

सातारा येथील वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची सर्व बाजूंनीं अखंड प्रगति होत असल्याचें तिच्या १९३६ सालअखेरच्या अहवालावरून दिसून येतें कंपनीची १९१३ सालीं स्थापना झाली व आता तिला २३ वर्षें पुरीं झालीं आहेत. अहवालाचे वर्षीं कंपनीनें ६६½ लक्ष रुपयाचें नवीन काम पुरें केलें. १९३४ सालीं वेस्टर्न इंडियानें ४०½ लक्ष रुपयाचे विमे उतरविले होते व १९३५ सालीं ५१½ लाखाचें काम तिला मिळालें होतें सालोसाल कामामध्यें झालेली ही वाढ निःसंशय अभिनंदनीय आहे. कंपनीस हप्त्याचे रूपानें एकूण २६ लक्ष ११ हजार, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा २½ लक्ष रुपये ज्यास्त मिळाले लाइफ फंडांत १०½ लाख रुपयाची भर पडून तो आता ७०½ लक्ष रुपये झाला आहे कंपनीजवळील रोख्याची बाजारभावानें होणारी किंमत त्यास पडलेल्या मूळ किंमतीपेक्षा १५ लक्ष, ३७ हजार रुपयानीं ज्यास्त आहे खरेदीची किंमत ६८½ लक्ष रुपये असून त्याची आज बाजारभावानें ८३ लक्ष, ६१ हजार रु. किंमत होते तथापि, आपल्या नेहमीच्या सावधगिरीच्या धोरणास अनुसरून कंपनीनें आपल्या जिंदगीमध्यें फक्त मूळ किंमतच दाखविलेली आहे आणि ह्या कारणानें कंपनीची मजबुती वाढली आहे. वेस्टर्न इंडियाकडे सध्या ३½ कोटि रुपयाचे विमे चालू आहेत, आणि तिचें वार्षिक उत्पन्न १९½ लक्ष रुपये आहे अहवालाचे सालीं कंपनीचा १९३५ अखेरच्या त्रैवार्षिक मुदतीच्या मूल्यमापनाचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला मूल्यमापनाचे हिशेबात ॲक्चुअरीनें व्याजाचा गृहीत धरलेला दर कंपनीस तिच्या भांडवलावर व ठेवींवर वस्तुत. मिळालेल्या दरापेक्षा बराच कमी होता, तरीसुद्धा कंपनी आपला दर हजारी वार्षिक २५ रु व २० रु ह्या बोनसचा दर कायम राखू शकली, ह्यावरून तिच्या सांपत्तिक यशाची व बळकटीची कल्पना येते "मजबुतीची परमावधि झाली आहे, तेव्हा फंडापैकीं कांहीं भाग नफ्याचे वाटणीकरिता घ्या" असा सल्ला ॲक्चुअरीकडून मिळण्याचें भाग्य कंपनीस लाभलें, ही अत्यंत स्पृहणीय व अभिनंदनीय गोष्ट होय मुंबई येथें कोटांत सर फिरोजशहा मेथा रोडवर स्वतःच्या मालकीचे जागेमध्यें कंपनी आता आपली इमारत उभारीत आहे मुंबई, महाराष्ट्र कर्नाटक, मध्यप्रांत व वऱ्हाड, मध्य हिंदुस्थान, गुजरात, संयुक्त प्रांत, पंजाब व सिंध ह्या प्रदेशाकरिता कंपनीनें स्थानिक सल्लागार मंडळें नेमलेलीं आहेत वेस्टर्न इंडियाचा हिंदी विमा कंपन्यामधील दर्जा अत्यंत उच्च असून, पहिल्या प्रतीच्या हिंदी कंपन्यामध्यें तिची गणति होते तिची वर्द्धनशील प्रगति, साहसमिश्रित सावधगिरीचें धोरण, मजबुतीकडे विशेष लक्ष, काटकसरीची व्यवस्था, विमेदाराची निवड, ह्या सर्वच गोष्टी इतर अनेक कंपन्यास मार्गदर्शक होण्याजोग्या आहेत कंपनीची रौप्यज्युबिली जवळ आली आहे, त्या निमित्तानें तिच्या प्रगतीची माहिती सर्वांस होऊन कार्याचे विस्तारास उत्कृष्ट सहाय मिळेल अशी सादर अपेक्षा आहे.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

## विमा पॉलिसीवरील हप्ता भरण्याचा अधिकार

### कंपनीस हप्ता नाकारतां येतो काय ?

मि. कर्टिस नावाच्या इंग्लंडमधील एका गृहस्थानें पर्ल ॲशुअरन्स कंपनीकडे आपल्या आयुष्याचा विमा उतरविला होता व दुसऱ्या एका गृहस्थाकडून त्यानें कर्ज काढलें होतें, त्यास ही विमा पॉलिसी तारण लावून दिली होती. अशा तऱ्हेच्या व्यवहारामध्यें, विमेदार ऋणको आपल्या विम्यावरील हप्ते वक्तशीर भरीत राहील, हें गृहीतच धरलेलें असतें. पॉलिसीमधील अटींप्रमाणें, हप्ते प्रत्येक तीन महिन्यानीं भरावयाचे होते व ३० दिवसाची सवलतीची जादा मुदत देण्यात आलेली होती. १५ मार्च, १९३६ रोजीं लागू झालेला हप्ता मि कर्टिस ह्यानीं त्या दिवशीं तर नाहींच, पण ९ एप्रिल रोजीं धनको गृहस्थ तो भरावयास गेला, तोपर्यंतहि भरलेला नव्हता. पर्ल ॲशुअरन्स कंपनीच्या मॅनेजरनें धनको गृहस्थाकडून हप्त्याची रकम घेण्याचें नाकारलें. "मि कर्टिस ह्याचेकडून हप्त्याचा चेक येण्याची मी व्यवस्था करीतच आहे, तेव्हा उगीच दुहेरी भरण्याचा घोटाळा नको," अशी मॅनेजरनें सबब सांगितली. मि कर्टिस ह्यानीं ता १७ एप्रिल रोजीं, म्हणजे सवलतीची मुदत संपल्यानंतर, आपला चेक पाठविला व चेकवर २३ एप्रिल अशी तारीख लिहिली २३ तारीख उजाडण्याचे आतच, हप्ता जमा होण्यापूर्वी, मि कर्टिस मरण पावले विम्याची रकम अर्थातच कंपनीनें देण्याचें नाकारलें, परंतु कोर्टानें कंपनीस पैसे देण्यास भाग पाडलें कंपनीच्या मॅनेजरानें हप्ता घेण्याचें नाकारलें व पुनः वरती हप्ता वेळेवर आला नाहीं म्हणून पॉलिसी रद्द केली, ही गोष्ट न्यायमूर्ति सिंगलटन ह्यास पटली नाहीं.

विमा पॉलिसीवर कर्ज देणाऱ्या सावकारास सदरहू पॉलिसी बुडत असतां स्वतः हप्ते भरून वाचवता येत नसेल, तर तिच्या तारणावर रकम देण्यास कोण तयार होईल ? कोर्टाचा निकाल समंजसपणास धरूनच आहे ह्या संबंधातील तत्त्वाची माहिती वरील खटल्याच्या दाखल्यानें मुद्दाम येथें दिली आहे.

### दि नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कं लि.

३१ डिसेंबर, १९३६ अखेर संपलेल्या वर्षी नागपूर पायोनियर विमा कंपनीनें १०½ लक्ष रुपयाचें काम पुरें केलें. कंपनीची सालोसाल प्रगति होत आहे पूर्ववर्षापेक्षा १९३६ मध्यें कंपनीनें ३ लाखाच्या ज्यास्त पॉलिसी दिलेल्या आहेत. सुरवातीपासून १९३६ अखेर कंपनीनें १ लक्ष ९० हजार रुपयाच्या क्लेम्सची व्यवस्था केलेली आहे कंपनीच्या विमाखातीं फंडात आतां ४ लक्ष रु आहेत अहवालाचे सालात कंपनीनें ३३ हजार रुपये किंमतीच्या दोन शेजार-शेजारच्या इमारती विकत घेऊन भाड्याच्या उत्पन्नाची चांगली व्यवस्था केली आहे. अलाहाबाद व मद्रास येथें कंपनीनें कार्याचीं केंद्रें प्रस्थापित केलीं आहेत. धर्मादायाच्या योजनेनुसार श्रद्धानंद अनाथालयास २०० रु व बर्लिनला गेलेल्या हिंदी ऑलिंपिक संघास २०० रु कंपनीनें दिले. रावबहादुर एम जी. देशपांडे, हे कंपनीचे अध्यक्ष असून श्रीमंत एम जी चिटनवीस, बी ए, हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

इनकम-टॅक्स कायदा वरचेवर बदलत आहे. तरी इन्कम-टॅक्स भरण्यात कायदेशीर रीत्या बचत करण्यासाठीं
**वी. एल. ठोसर, पब्लिक अकौंटंट**
यांचेकडेच आपले काम सोपवा
पत्ताः—१५५, रविवार पेठ, सोन्यामारुतीसमोर, पुणें
हेड ऑफिस—४९५-९७ काळबा देवी रोड, मुंबई २

## उच्च शिक्षण व बेकारी

सुशिक्षितांमधील बेकारीचा प्रश्न सर्वच देशामध्यें कमी अधिक प्रमाणात उपस्थित झालेला आहे कोणत्याहि तऱ्हेच्या कामास पदवीधर मिळणें आतां शक्य झालें असल्याकारणानें विश्वविद्यालयीन शिक्षणाखेरीज गत्यतर उरलेलें नाहीं शहरांमधील शिक्षण संस्थांची संख्याहि वाढली आहे आणि लोकांची प्रवृत्ति शहरांकडे धाव घेण्याची असल्यानें, कॉलेजातील शिक्षण घेणें अनेक तरुणास शक्य झालें आहे प्रत्येक देशाच्या परिस्थितीस अनुसरून त्यामधील विद्यार्थी वर्गाचें ध्येय ठरत असतें लढाऊ प्रवृत्तीच्या वर्गामध्यें सैनिकाचा पेशा लोकप्रिय होतो, तर कारकुनी पेशाच्या लोकांमध्यें इतर व्यवसायाचा स्वीकार होणें कठीण जातें ग्रेट ब्रिटन, अमेरिका, इत्यादि औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रामध्यें बँका व इतर धद्यातल्या कचेऱ्या ह्यामधील नोकऱ्या विद्यार्थ्यांचे नजरेंत असतात, परंतु विश्वविद्यालयीन शिक्षणाखेरीज त्यांत यश मिळणार नाहीं, असा विद्यार्थ्यांचा समज झाला आहे. चढाओढीच्या काळामध्यें, अर्थात्च, तो खरा ठरल्यास नवल नाहीं, कारण पदवीधरास प्राधान्य देण्याची पद्धति पाश्चात्य देशात व्यापारी वर्गानें स्वीकारली आहे सरकारी नोकरी हेंच एक ध्येय आजवर हिंदी तरुणापुढें असे व कॉलेजच्या मार्गानेंच तें गाठून उदरनिर्वाहाची तरतूद त्यास करावी लागत असे.

उद्योगधंदे व व्यवसाय ह्यांची पुरेशी वाढ आपल्या देशात झालेली नसल्यानें, सुशिक्षितांस उत्पादनात्मक व्यवसायात विशेषसा वाव कधींच नव्हता उत्पादक व उपभोक्ते ह्यांस एकत्र आणणाऱ्या मध्यस्थ व्यापाऱ्यांच्या कचेऱ्यातील कामें सुशिक्षितास करता येण्याजोगीं असलीं, तरी पदवीधराच्या अपेक्षेप्रमाणें त्यांत वेतन मिळण्याचा संभव नसतो आणि व्यापारी वर्गहि सुशिक्षिताकडे सहानुभूतिपूर्वक दृष्टीनें पहात नाहीं पदवीधर व्यवहारात नालायक असतात आणि त्याचा पगार व रहाणीची कल्पना व्यापारउदीमात खपावयाची नाहीं अशी त्याची समजूत असते असें असताहि हिंदी तरुण मराठी व इंग्रजी शाळातून कॉलेजात तडक प्रवेश करतात. उच्च शिक्षणाची धनोत्पादनक्षमता दिवसानुदिवस कमी, कमी होत चालली आहे, तरी कॉलेजाची व त्यातील विद्यार्थ्यांची संख्या फुगत आहे. ह्यामुळें, एका बाजूनें शिक्षणाचा उच्च दर्जा कायम रहाणें कठीण होणार व शिक्षिताच्या पोटापाण्याचा प्रश्न ज्यास्त, ज्यास्त बिकट होत जाणार हें उघड आहे बेकार तरुणानीं आपली परिस्थिति सुधारण्याकरिता दिसेल त्या मार्गाचा अवलंब करणें अपरिहार्यच होतें कोणत्याहि आत्यंतिक मताचा पगडा त्याचे मनावर तावडतोब बसतो व त्याचें बुद्धिप्रधानत्व बोथट बनतें. जर्मनीनें ही परिस्थिति टाळण्याकरितां उच्च शिक्षणास पायबंद घातला आहे आणि सर्व ज्यू लोकांस व बहुतेक स्त्रियास कॉलेजामध्यें जाण्याची बंदी करण्यात आली आहे आपलें नागरिकत्वाचें कर्तव्य दक्षतेनें पार पाडण्यास व आर्थिक आणि सामाजिक स्थिति सुधारण्यास उच्च शिक्षणाचा फैलाव होणें आवश्यक असलें तरी सुशिक्षितामधील वाढती बेकारी व तिचे दुष्परिणाम हीं टाळलीं जाणें अगत्याचें आहे शिक्षणाचे सर्व मार्ग मोकळे ठेवून सुशिक्षितांच्या वाढत्या संख्येचे दुष्परिणाम दूर करणें हें अवघड आहे उलट, उच्च शिक्षणास मर्यादा घालणें सोपें असलें तरी तें घातुक आहे ह्या दोन गोष्टींचा मध्य काढून राष्ट्रीय धोरण आखणें प्रत्येक देशाच्या सरकाराचें व पुढाऱ्याचें कर्तव्य आहे हिंदुस्थानातील बेकारीचा प्रश्न उद्योगधंद्याच्या वाढीशीं निगडित आहे, ह्या दृष्टीनें हिंदी सरकारावर दुप्पट जबाबदारी पडते. बेकारीमुळें उद्भवणाऱ्या कठीण अवस्थेस तोंड देण्यापेक्षा व्यवसायाचें क्षेत्र वाढविण्याकडे त्यांनीं आतापासूनच लागलें पाहिजे.


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८२,००० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवी | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात | |
| गुतविलेली एकूण रक्कम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबरानां त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते

सोसायटीसंबंधीच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

तमाम दंत रोगांचा नाश करून दात अतीस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल ब्लॅक टूथपावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

## सार्वजनिक आरोग्य कसें सुधारेल ?

"सेंट्रल अॅडव्हायसरी बोर्ड ऑफ हेल्थ"च्या सिमला येथें गेल्या आठवड्यात भरलेल्या सभेचें कामकाज सुरू होण्यापूर्वी व्हाइसरॉयांनीं प्रास्ताविक भाषण केलें. त्यात ते म्हणाले:—

### सहकार्याची आवश्यकता

"सार्वजनिक आरोग्याचें महत्त्व हिंदुस्थानांत सर्वत्र पटू लागलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. ह्या कार्यामध्यें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें व स्थानिक सस्था ह्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. औषधपाण्याच्या सोयी, साथीपासून बचाव, शाळांची वैद्यकीय तपासणी, खाणी व कारखाने ह्यांमध्यें स्वच्छता राहील अशी व्यवस्था, बाळंतपणाची सोय, अर्भकाची शुश्रुषा, दाटीच्या वस्तीस प्रतिबंध, आरोग्यदायक घराची तजवीज, पाणीपुरवठा, रस्त्याची झाडलोट, ड्रेनेज, खाण्याचे पदार्थांच्या दुकानातील स्वच्छता, इत्यादि गोष्टींचा सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नाशीं संबंध येतो. ह्याबाबत प्रगति करावयाची असल्यास त्याकरिता योग्य अशा कार्यकारी संघटनेची आवश्यकता आहे. सध्याच्या वैद्यकीय शिक्षणसंस्थांतील अभ्यासक्रमांत रोग-प्रतिबंधक इलाजास व केवळ रोगापेक्षां तो ज्या परिस्थितींत फैलावतो, त्या आजूबाजूच्या परिस्थितीच्या अभ्यासास ज्यास्त महत्त्वाचें स्थान मिळणें आवश्यक आहे. आरोग्यविषयक प्रश्नाबाबत जनतेमध्यें उत्साह निर्माण होणें जरूर आहे. मी हिंदुस्थानांत पाऊल टाकल्यापासून शेती, चागल्या जनावरांचा पुरवठा व जनतेस सकस अन्न मिळून तिची आर्थिक प्रगति होण्याची आवश्यकता, ह्याविषयीं प्रयत्न करीत आहें आणि त्यासंबधात प्रगतिहि होत आहे."

### बोर्ड ऑफ हेल्थच्या सभेनें मंजूर केलेले ठराव

सेंट्रल बोर्डानें मंजूर केलेल्या ठरावांत खालील गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख होता:—

(१) मध्यवर्ती सरकारनें सार्वजनिक आरोग्यावर ज्यास्त खर्च करावा, (२) मलेरिया हटविण्याचे कामात रेल्वेज, स्थानिक स्वराज्य सस्था व लष्करी खातें ह्यानीं सहकार्य करावें, (३) शिक्षक व मुलें ह्यास आरोग्यविषयक शिक्षण पद्धतशीरपणें देण्यांत यावें, (४) वैद्यकीय शाळा-कॉलेजांत सार्वजनिक आरोग्याचे प्रश्नावर भर देण्यात यावा, (५) प्रत्येक प्रांताकरितां एक मध्यवर्ती बोर्ड नेमण्यांत यावें, (६) प्रांतिक सरकारांनीं सार्वजनिक आरोग्यखातीं स्थापावीं, (७) कोयनेलच्या पुरवठ्याचे बाबतींत हिंदुस्थान स्वावलंबी व्हावा, अशी व्यवस्था करण्यांत यावी, इ.

### करमाळा ता. (जि सोलापूर) सहकारी वृत्त

सहकारी सोसायट्याचे पचकमेटींचे मेंबराना शिक्षण देण्याकरितां पंचकमेटीचे ट्रेनिग क्लासेस करमाळें तालुक्यांतील टेंभुर्णी, पोमलवाडी, जेऊर व केम येथें अनुक्रमें तारीख १०-६-३७, १२-६-३७, १३-६-३७ व १४-६-३७ रोजीं मे. गणपतराव एकनाथ पाटील,यूनियन प्रेसिडेंट,यांचे अध्यक्षतेखाली भरविण्यांत आले. प्रत्येक क्लासचे वेळीं त्या त्या भागातील सोसायट्यांचे पचकमिटीचे पंच, सोसायटींतील मेंबर्स, सेक्रेटरीज इन्स्टि चे प्रोपॅगंडा ऑफिसर व सहकारी चळवळीबद्दल आस्था असणारे इतर सद्गृहस्थ मिळून सुमारें १००-१२५ लोक हजर होते. सदर वेळीं यूनियनचे प्रेसिडेंट, सुपरवायझर, ता. डे. असो. चे फिल्डमन, मे डि. ऑग्रि. ओव्हरसिअरसाहेब पंढरपूर, यूनियन डायरेक्टर्स व डि को इन्स्टि. चे प्रोपॅगंडा ऑफिसर मि. बी. डी मिसाळ यांनीं सहकारी चळवळीचा पूर्वेतिहास,हल्लीची परिस्थिति, सोसायट्यांचें कामकाज व भासणाऱ्या अडचणीमधून निभावून जाण्याचे मार्ग, सहकारी सोसायट्याचे कायद्यान्वयें दिल्या गेलेल्या सवलती, पंचकमिटी व तिच्यावरील जबाबदारी व तिचीं कर्तव्यें, शेती, परस्पर सहकार्य, दुय्यम धदे वगैरेविषयक माहिती सागितली.

करमाळें तालुक्यांतील भोगेवाडी या गावीं नवीन सोसायटी स्थापन झाली असून तिची पहिली साधारण सभा भोगेवाडी येथें यूनियनचे प्रेसिडेंट मे. गणपतराव एकनाथ पाटील याचे अध्यक्षतेखाली ता १४।६।३७ रोजीं भरविण्यांत आली. सभेस सो चे मेंबर्स, यूनियन प्रेसिडेंट, सुपरवायझर व डायरेक्टर्स, यूनियन सेक्रेटरी, इन्स्टि. चे प्रॉ ऑफिसर व गावचे व इतर लोक मिळून सुमारें १२५ लोक हजर होते लोकांना सो. चे कामकाजाबद्दल माहिती देऊन नवीन अ (१) पो. नियम स्वीकारणें, पंचकमिटी निवडणें वगैरे कामें करण्यात आलीं.

### चिंचोली को. क्रे. सोसायटी (दौंड पेटा, पुणें)

वरील नुकत्याच रजिस्टर झालेल्या सोसायटीची पहिली सर्वसाधारण सभा ता. १३-६-३७ रोजीं झाली, त्यावेळीं पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटचे ऑ. सेक्रेटरी श्री देवभानकर व दौंड पेटा यूनियनचे सुपरवायझर हे हजर होते. "शेत हा शेतकऱ्याचा देव व सहकारी चळवळ हाच त्यांचा धर्म" असा श्री. देवभानकर ह्यानीं श्रोत्यास उपदेश केला.

### श्री. इंगळे ह्यांचें व्याख्यान

पुणें जि को. इन्स्टिट्यूटचे प्रॉपॅगंडा ऑफिसर, श्री. अ. कृ. इंगळे, ह्यांचें विंचूर (जि. नाशिक) येथें "सोसायटीच्या सभासदाचें कर्तव्य" या विषयावर ता १८-६-३७ रोजीं व्याख्यान झालें.


# माधव सोमण ब्रदर्स

भरजरी शालू, लुगडीं वगैरे. मोहक सर्व तऱ्हेचीं पातळें | पावसाळी कोट व छत्र्या | धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक

लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

## रसायनशास्त्रज्ञ बाबू प्रफुल्लचंद्र राय

सुप्रसिद्ध बंगाली रसायनशास्त्रीय संशोधक डॉ प्रफुल्लचंद्र राय, हे कलकत्ता विश्वविद्यालयाच्या नोकरींतून आज ता ३० रोजीं निवृत्त होत आहेत. १९१६ सालापासून ते " पालित प्रोफेसर ऑफ केमिस्ट्री " म्हणून काम करीत आहेत १९२२ सालानंतर त्यांनीं पगार घेतलेला नाहीं. ती रकम एका स्वतंत्र निधींत टाकण्यांत येऊन त्या पैशातून शास्त्रीय अभ्यास व संशोधन ह्यांच्याकरितां खर्चाची तरतूद केलेली आहे. डॉ. राय हे नामांकित रसायनशास्त्रज्ञ व संशोधक असून त्यांची शिष्यपरंपराहि मोठी आहे डॉ. प्रफुल्लचंद्र ह्याचा जन्म १८६१ सालीं झाला व आजच्या उतार वयांतहि त्यांचें काम अखंड चालू आहे. त्यांचा पहिला शोध १८९५ मध्यें प्रसिद्ध झाला. भारतीय प्रमुख संशोधक म्हणून त्यांनीं अखिल जगांत मान्यता मिळविली " भारतीय रसायन शास्त्राचा इतिहास "हा त्यांचा ग्रन्थ फार प्रसिद्धी पावला आहे संशोधक, ग्रंथकार व परंपरा चालविण्यास समर्थ असा शिष्यगण निर्माण करणारा ऋषी, ह्या तीनहि दृष्टींनीं डॉ राय ह्यांनीं यश संपादिलें आहे त्याची कामगिरी औद्योगिक क्षेत्रांतहि तितक्याच महत्त्वाची झाली आहे बंगालमधील औद्योगिक रसायन-विषयक उपक्रमांचें जनकत्व त्यांचेकडेच आहे. स्वदेशीवर त्यांची भक्ती असून, त्याकरिता व्यावहारिक प्रयत्न करण्याची त्यांची खटपट चालू आहे. शास्त्रीय व औद्योगिक प्रगति ह्यांचें परस्पर नातें कोणत्या प्रकारचें असतें, हें श्री राय ह्यांच्या उदाहरणावरून तात्काळ लक्षांत येण्याजोगें आहे महर्षी प्रफुल्लचंद्र रॉय ह्यास त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्तानें आम्हीं दीर्घायुष्य चिंतितों

## कै. दिवाणबहादुर गोडबोले

दिवाणबहादुर का. रा. गोडबोले हे गेल्या शुक्रवारीं पुणें येथें अकस्मात् मरण पावले त्यांचा जन्म १८४८ सालीं झाला. बी. ए. व बी. एससी. ह्या परीक्षा देऊन त्यांनीं मुंबई सरकारच्या पी. डब्ल्यू. डी मध्यें ३० वर्षें नोकरी केली व नंतर ३४ वर्षें पेन्शन उपभोगिलें पुण्यातील अनेक सार्वजनिक संस्थांस त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शकत्वाचा फायदा मिळालेला आहे रेल्वे कंपन्या व वीज कंपन्या स्थापून व चालवून त्यांनीं औद्योगिक क्षेत्रांतहि यश मिळविलें त्यांची राहाणी अगदीं साधी व निगर्वी होती काटकसरीसंबंधीं त्यांचा विशेष कटाक्ष असे, आणि खासगी व्यवहारांइतकेच सार्वजनिक संस्थांचे व्यवहार दक्षतेनें चालविले जाण्याबद्दल ते काळजी घेत दि ब गोडबोले ह्यांची प्रकृति शेवटपर्यंत निकोप होती, ह्याचें श्रेय त्यांच्या वक्तशीरपणास व उद्योगप्रियतेसच दिलें पाहिजे आपल्या दीर्घायुष्याचा सार्वजनिक सेवेकडे उपयोग करून दि ब गोडबोले ह्यांनीं महाराष्ट्रास उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे जमशेदपूर येथील टाटांच्या कारखान्याच्या पूर्वतयारीचें काम, ग्वाल्हेर संस्थानातील रेल्वे रस्त्याची आखणी, अनेक वीज व रेल्वे कंपन्यांची योजना व व्यवस्था, इत्यादि गोष्टी त्यांच्या कामगिरीचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यास पुरेशा आहेत.

---

## " बालसन्मित्र "

श्री. मिसाळ ह्यांच्या संपादकत्वाखाली मुलांकरिता चालविण्यात येणाऱ्या ह्या पाक्षिकास नुकतेंच ४ थें वर्ष सुरू झालें. श्री. मिसाळ ह्यांनीं मुलांसाठीं अनेक पुस्तकेंहि लिहिलीं असून ह्या पाक्षिकाप्रमाणें तींहि लोकप्रिय झालीं आहेत " बालसन्मित्रा "चा ४ था वाढदिवस मालवण येथें ता ३०।५।३७ रोजीं श्री. रा. बा. कामत ह्यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडला

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलएल बी
मॅनेजिंग एजंटस,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट. ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

★ महिंद्रकर ब्रदर्स ★

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०५—३ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—४ |
| ४% १९४३ ... ... ... | १०६–१४ |
| ३½% बिनमुदत ... .. ... | ९४–१२ |
| ३½% १९४७–५० .. ... | १०५—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... | ९९–१४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७–१४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) .. | १०७—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०७—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १११—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११३–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३१—२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु चा भाग ३½% डिव्हि. ) | १२८—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४¾%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु. ४ आ. ) | ९३०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १५०—० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि ९% ) | २७७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु ऑर्डि. डिव्हि. ५½% ) | १३८२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५५७—८ |

### लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम्, पुणें

पुणें शहर म्युनिसिपॅलिटीच्या जनरल बॉडीच्या ता १९-६-३७ रोजीं झालेल्या सभेमध्यें खालील ठराव मंजूर झाला आहे

"हिंदुस्थान सरकारच्या पुराणवस्तु संशोधन खात्याचे ताब्यात असलेला पुणें येथील पेशव्याचा राजवाडा ( शनिवारवाडा ) म्युनिसिपॅलिटीच्या ताब्यात यावा अशी पुणें शहर म्युनिसिपॅलिटीची सरकारास विनंति आहे. या वाड्यात लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम संस्थेसाठीं वाड्यातील एका चौथऱ्यावर इमारतीसाठीं जागा मिळावी. दिल्ली दरवाज्याचेवर जी थोडीशी इमारत आहे, तेथें आर्केऑलॉजिकल म्यूझियमची शाखा स्थापन करावी सर्व वाड्याचा उपयोग सार्वजनिक सुखसोयीसाठीं बागबगीचा, प्राणिसंग्रह व हवा खाण्याचें ठिकाण म्हणून व्हावा अशी पुणें शहर म्युनिसिपॅलिटीची मुंबई इलाखा सरकार व हिंदुस्थान सरकार यांस विनंति आहे."


**Ardomix** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगांवर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गलबलणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरे करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर प्रापरीत आहेत. इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत. अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे ट ख १२ आणे निराळा. गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डिपार्टमेंट नं ६ )
३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर

एजन्सीज —

मुंबई—यशवंत दत्तात्रय गाडगीळ, फणसवाडी, मुंबई २.
धामणगांव—मे भागवत ब्रदर्स, धामणगांव, वऱ्हाड
हरदा—चौथाजी तुळशीराम आणि सन्स, हरदा, सी. पी.
खानदेश—डॉ जी. एन महाजन, मोठें वाघोदे, खानदेश.



# एशियन पॉलिसी




म्हणजेच

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

अल्प प्रिमियम आणि भरपूर बोनस

**धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड**

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

त्वरा करा
जेवणाची उत्तम सोय—न्यू प्रभाकराश्रम—नांवे नोंदवा
महिन्यांतून ४ फीरट्रस्
दर १२ रु. सदाशिव पेठ, गाय आळींतील श्रीराममंदिराजवळ मॅनेजर—न्यू प्रभाकराश्रम

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

डॉ. जोशी म्हणजे जी. जी. ब्रदर्सचीं
मलमें—त्वचा रोगांवर अत्यंत लवकर गुण देतात.
डझनास १॥रु. गरिबास फुकट. १८९ सदाशिव, पुणे.

# शेअरची विक्री पुनः सुरू झाली

भांडवल तरतें राहून पांच टक्के नफा २००० महाराष्ट्रीयांना उद्योगधंदा.

" महाराष्ट्रीयांना उद्योगधंदा मिळून रोजच्या चहाच्या कपांतील साखर महाराष्ट्रीयांनीं चालविलेल्या साखर-कारखान्याची मिळाली व भांडवलावर बँकेचें व्याज मिळालें तरी सुद्धा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांना आनंदच होईल.

आम्ही खादी वापरतों त्याचें कारण स्वाभिमानच.
हा तुमचा शेअरफॉर्म व हा चेक "

प्रेफरन्स शेअर रु. १० : : : ऑर्डिनरी शेअर रु. २५
शेअर फॉर्म्स व सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.
२५७ बुधवार पेठ, पुणे २

रोडगे यांच्याच मजबूत सतरंज्या वापरा.
आपल्या पैशाचा योग्य मोबदला मिळवा.
सर्वत्र मिळतात.
कारखाना पत्ता: ३० मिठगंज पेठ पुणें २

न. वि. वडनेरकर
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

हें पत्र पुणें, ५८ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काटे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ७ जुलै, १९३७ अंक २६

इनकम-टॅक्स कायदा वरचेवर बदलत आहे तरी इन्कम-टॅक्स भरण्यात कायदेशिर रीत्या बचत करण्यासाठी

**बी. एल. ठोसर, पब्लिक अकौंटंट**

यांचिकडेच आपले काम सोपवा

पत्ताः—१५५, रविवार पेठ, सोन्यामारुतीसमोर, पुणें

हेड ऑफिस –४९५-९७ काळबा देवी रोड, मुंबई २

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application

*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

## "स्वल्प व्याजानें कर्ज"

स्वदेशी उद्योगधद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वत च्याही फायद्यासाठीं, कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४ किंवा, प्रथम ६८८ व दरमहा ३, पुढें सहामहिने भरून १०० ते ५००० कर्ज, अगर रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊनही निकडीच्या गरजा भागवा प्रास्पेक्टस व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इडस्ट्रियल कपनी लि०

हेड ऑफिसः—गिरगाव मुंबई.

ब्रॅच.—लक्ष्मीरोड, काकाकुवा मॅन्शनसमोर, पुणें २

INDUSTRIAL SOCIETY

**WORK SHOP**

**Furniture on hire on Reasonable Terms**

Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time

Old Furniture also can be bought or sold on commission

**SHEVAK Bros.** 153 Kasba, POONA
*Near Ganpati Temple*

Branch No 1 Fergusson Road

**K. K. & Co.**

**Photographic Dealers**

POONA

**मुलांचा खाऊ** म्हणजे सर्व प्रकारचें पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स, मिल्क टॉफी, वगैरे

भावाचें माहितीपत्रक मागवा

भारत इंडस्ट्रिअल वर्क्स, ८१३ सदाशिव, पुणें २

## दि साउंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी

कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

## विविध माहिती

### दि गुंटूर टोबॅकोज लि

तंबाखूची निर्गत व सिगारेट्स आणि सिगार ह्यांचें उत्पादन इ. करण्याकरितां वरील कंपनीची स्थापना झाली आहे सिगारेट्स बनविण्यास योग्य अशा तंबाखूचें उत्पादन करण्यास गुंटूर हें ठिकाण फार सोईचें आहे गुंटूर जिल्ह्यातील मालाचा उठाव ताबडतोब होतो, असा अनुभव आहे १९३४–३५ साली ह्या जिल्ह्यातील १, १९, ०१६एकर जमीन तंबाखूखाली होती. चालू वर्षी ही लागवड दीडपट झाली आहे गुंटूर तंबाखू निर्गत करण्याचा व्यवहार वरील कंपनी हातीं घेणार आहे

### ब्रिटिश साम्राज्य प्रदर्शन

वरील प्रदर्शन ग्लासगो ( ग्रेटब्रिटन ) येथें येत्या वर्षी मे ते ऑक्टोबर अखेर भरणार आहे ह्या प्रदर्शनांत भाग घेण्याविषयीं हिंदुस्थान सरकारचा विचार चालू आहे.

### कलकत्ता इम्प्रूव्हमेंट ट्रस्टचीं डिबेंचर्स

कलकत्ता इम्प्रूव्हमेंट ट्रस्टनें २५ वर्षे मुदतीचीं ३ टक्के दराचीं ५० लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स काढण्याचें ठरविलें आहे. अर्जाची अखेरची तारीख १६ जुलै, १९३७ ही आहे मागणी केलेल्या डिबेंचर्सच्या दर्शनी किंमतीचे शेकडा ५ इतकी रकम अर्जासोबत पाठवावयाची असून अर्ज मंजूर झाल्यावर ३० जुलैचे आत बाकीची रकम पुरी करावयाची आहे अर्ज नामंजूर झाल्यास अनामत रकम परत मिळेल.

### अमेरिकेचे राष्ट्रीय कर्ज

३० जून, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी अमेरिकन सरकारनें उत्पन्नापेक्षां सुमारें ६०० कोटि रुपये जास्त खर्च केले अमेरिकेचें राष्ट्रीय कर्ज ८,००० कोटींचे वर गेलें आहे गेल्या चार वर्षांतील तुटीची बेरीज सुमारें ३,००० कोटि रुपये भरते

### नवीन प्रांतिक सरकाराची गिर्यारोहणाची सोय

सिंध प्रांतामध्यें समुद्रसपाटीपासून उंच असें हवा खाण्याकरिता एकादें ठिकाण शोधून तेथें सुखसोयींची व्यवस्था करण्याचें घाटत आहे

### वऱ्हाड सहकारी परिषद

वऱ्हाड सहकारी परिषदेचें नववें अधिवेशन रविवार ता ११ जुलै, १९३७ रोजीं खामगाव येथें श्री रामदास पटलू ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे

### बॉंबे लाइफ ॲश्युअरन्स कं. लि

वरील विमा कंपनीनें १९३६ साली १ कोटि, ३६ लक्ष रुपयांच्या ७,५१० विमा पॉलिसी दिल्या. वर्षअखेर, कंपनीकडे ५ कोटि, १४ लक्ष रुपयाचे २८,२८९ विमे चालू होते

### नॅशनल इन्शुअरन्स कं लि., कलकत्ता

वरील विमा कंपनीच्या १९३५ अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनांत २६½ लक्ष रुपयाचा नफा आढळून आला. कंपनीनें १९३६ सालाबद्दल दर भागास १२ रु दरानें डिव्हिडंड दिलें व प्रत्येक भागास १०० रु. स्पेशल डिव्हिडंड म्हणून वांटले. कंपनीनें ही रकम आपल्या भागावरील 'कॉल' कडे वर्ग करून घेण्याचें ठरविलें आहे. म्हणजे प्रत्येक भागाची भरणा झालेली रकम १०० रुपयांनीं वाढेल.

### शिक्षणतज्ज्ञांचा रिपोर्ट

मि. वुड व मि. ॲबट हे दोन ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञ आपला हिंदुस्थानातील दौरा संपवून मार्गेच स्वदेशीं गेले त्यांनीं हिंदुस्थान सरकारास पाठविलेल्या रिपोर्टाचा सरकार काळजीपूर्वक विचार करीत आहे.

### ४ कोटि रुपयांच्या खर्चास मंजुरी

इंजनें, बॉयलर्स, उतारूंचे डबे, मालाचे डबे, इत्यादींप्रीत्यर्थ ४ कोटि रुपये खर्चण्यास रेल्वे स्टॅंडिंग फिनॅन्स कमिटीनें मंजुरी दिली आहे

### कारखानदार व मजूर ह्यांमधील तंटे

१९२८ ते १९३७ ह्या नऊ वर्षांत हिंदुस्थानातील सर्व कारखान्यांत मिळून१३८३ औद्योगिक तंटे झाले व त्यांत कामगारांची ६ कोटि, ७ लक्ष दिवसाची मजुरी बुडाली १९२८ हें साल संपाचे दृष्टीनें सर्वांत वाईट गेलें त्या एकाच वर्षी २०३ संप झाले व त्यामुळें कामाच्या ३½ कोटि दिवसाचें नुकसान झालें.

### स्टॉक एक्सचेंज ता. ५ रोजीं बंद

सर सोराबजी पोचखानवाला ह्यांच्या निधनानिमित्त सोमवार ता. ५ रोजीं मुंबई येथील स्टॉक एक्सचेंज व सोनें–चांदी बाजार हे बंद ठेवण्यात आले होते.

### ग्रेटब्रिटनमधील चलनी नोटा

गेल्या आठवड्यांत ग्रेटब्रिटनमध्यें ४८ कोटि, ८४ लक्ष पौंडाच्या चलनी नोटा व्यवहारात खेळत होत्या. हा आकडा इतका मोठा ह्यापूर्वी कधीच झाला नव्हता कित्येक फ्रेंच लोकाजवळ ब्रिटिश चलनाच्या नोटा आहेत, त्या मोडून फ्रेंच चलन घेण्याची त्याची तयारी नाहीं, ह्या कारणानेंहि वरील आकड्यांत वाढ दिसत आहे.

### काश्मीर संस्थानाचें उत्पन्न व खर्च

१९३६ सालीं काश्मीर संस्थानास २ कोटि ३७ लक्ष रुपये उत्पन्न मिळालें व २ कोटि ३० लक्ष रुपये खर्च झाला. संस्थानानें सुमारें ९४ लक्ष रुपये व्याजी लावलेले आहेत. वर्षअखेर रोख शिलक ४२ लक्ष रुपये उरली

### ट्रेझरी बिलांवर द सॉ द शे १५ आणे व्याज

जून २९ रोजीं रिझर्व्ह बँकेनें १ कोटि रुपयाचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यावरील व्याजाचा सरासरी दर द. सा द. शे. १५ आणे पडला.

### शर्यतीकरितां छोट्या गाड्यांची खरेदी

जामनगरच्या महाराजानीं इंग्लंडमध्यें एक मोटारगाडी खरेदी केली आहे जगातील सर्व मोटारींत ही गाडी लहान ठरेल, असें म्हणतात. स्वदेशीं परत येताना अशा मोटारींचा एक ताडा ते आणणार आहेत शर्यतीचें एक लहानसें मैदान तयार करून त्यावर ह्या छोट्या गाड्यातून शर्यत खेळण्याची सोय करण्याचा त्यांचा बेत आहे महाराजांच्या पाहुण्यांची त्यामुळें करमणूक होईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| २०–६–३७ ते २६–६–३७ | १८, ६४, ०९७ |
| २७–६–३७ ते २–७–३७ | ७९, ४९, ५८७ |
| २१–९–३१ ते २–७–३७ | २, ९९, ५५, ९७, ९९० |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३३४ |
| २ सोन्याच्या अजीर्णावर उतारा | ३३५ |
| ३ राज्यघटनेचा आर्थिक पाया भक्कम आहे काय ? | ३३६ |
| ४ कॉफी | ३३६ |
| ५ स्फुट विचार | ३३७ |
| नफा-नुकसानीस जबाबदार कोण ?-रेल्वेजचें रान वरिष्ठ-नोकरास मोकळें सोडा—फ्रान्सवरील आर्थिक गडांतर—सर सोराबजी पोचखानवाला ह्याचा मृत्यु—सहकारी पतपेढींचे पोटनियम | |
| ६ कै. सर सोराबजी पोचखानवाला | ३३९ |
| ७ बंगलोर येथील सहकारी परिषद् | ३४० |
| ८ फिल्म्सची आयात व त्यांवरील जकात | ३४० |
| ९ दक्षिण आफ्रिकेंत सोन्याचा धूर | ३४१ |
| १० प्राप्तीवरील कराची वसुली | ३४२ |
| ११ निवडक बाजारभाव | ३४३ |

# अर्थ

बुधवार, ता. ७ जुलै, १९३७

## सोन्याच्या अजीर्णावर उतारा

### सोन्याचें भवितव्य पुन्हां अनिश्चित ?

फ्रान्समध्यें प्रधान मंडळाच्या घटनेंत बदल होतांच फ्रेंच चलनाच्या, पौंड व डॉलर ह्याच्या मानानें स्थिरावलेल्या किंमतींत उतार करण्याचा तेथील सरकाराचा बेत आहे, अशा बातम्या पसरल्या. अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स ह्या तीन राष्ट्रांनीं आपल्या चलनांच्या परस्पर किमतीचे संबंध स्थिर राखण्याचा निश्चय मागें जाहीर केल्यापासून सोन्याच्या बाजारात म्हणण्यासारखी गडबड पुन्हा होणार नाहीं असें वाटावयास लागलें होतें. परंतु फ्रेंच सरकाराची सांपत्तिक परिस्थिति व फ्रेंच राष्ट्राची आर्थिक अवस्था असमाधानकारक झाल्यामुळें परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर बदलून म्हणजे फ्रँक हें चलन सोन्याच्या मानानें आणखी कमी किंमतीचें करून तिजोरीची व व्यापाराची घडी तात्पुरती सावरावी ही कल्पना फ्रान्समध्यें पुन्हा हवेंत खेळूं लागली. ह्या बाबतींत फ्रान्सचे दोघे सहकारी, अमेरिका व फ्रान्स काय करणार ह्याविषयीं साहजिकच कुतूहल उत्पन्न झालें. आम्हीं आमच्या सुवर्णविषयक व हुंडणावळीच्या धोरणात फेरफार करण्याचें योजलेलें नाहीं असें ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांनीं निक्षून सांगितलें असताहि लोकांची खात्री पटून त्याचें समाधान झालेलें नाहीं सोन्याचा भाव स्थिर रहाणार का कमी होणार हें जाणण्याची सार्वत्रिक इच्छा दिसून येत असून ती तृप्त न झाल्यानें अनिश्चिततेचें वातावरण पुन्हा पसरलें आहे.

सोन्याच्या भवितव्याचा प्रश्न पुन्हा उद्भवण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण घडून आलें आहे जगातील सोन्याचा पुरवठा देवघेवीच्या मानानें अपुरा असल्याची तक्रार पाश्चात्य राष्ट्रातले तज्ज्ञ म्हणवले जाणारे लोक कांहीं वर्षांपूर्वी करीत असत. सर हेन्री स्ट्रॅकॉश सोनें पुरवून वापरा, नाहीं तर त्याचा भयंकर तुटवडा पडून बाजारभाव अधिकच मंदावून राष्ट्राची आर्थिक अवस्था ज्यास्त बिकट होईल असें एकसारखें कंठरवानें सांगत होते आणि हिंदी सोन्याचा ओघ बाहेर जात होता त्याचें अभिनंदन करीत होते ! खाजगी संग्रहित सोनें व खाणींतून निघणारें सोनें हें सर्व मध्यवर्ती बँकांच्या निधींत व व्यापारी देवघेवींत गेलें पाहिजे असा त्याचा कटाक्ष होता. सध्या हें सर्व उलटें पालटें झालें आहे. सोन्याचा पुरवठा प्रमाणाबाहेर होत असून तो कसा पचवावयाचा ह्याची पंचाइत आता झाली आहे दुष्काळांत धान्याधुन्याचा उपयोग अत्यंत काटकसरीनें केला जातो आणि त्याच्या उलट, सुबत्तेच्या काळात धान्य जनावरांस खावयास घालण्यास दिक्कत वाटत नाहीं, तसाच प्रकार सोन्याच्या बाबतींत होऊं पहात आहे, किंबहुना झाला आहे सोन्याच्या मर्यादित संग्रहावर निर्वाह करण्याचा प्रसंग आल्यामुळें राष्ट्रांनीं थोड्या सोन्याच्या आधारावर जरूर तें चलन व्यवहारात चालू ठेवण्याचें ठरविलें, म्हणजे, विशिष्ट वजनाच्या सोन्याची चलनानें मापली जाणारी किंमत त्यांनीं वाढविली. ह्याचाच अर्थ सोनें महाग केलें आणि अर्थातच त्याच्या मानानें चलन उतरलें सर्व राष्ट्रात सोन्याची किंमत तेथील चलनात वाढल्या कारणानें सोन्याच्या खाणींच्या धंद्यास उत्तेजन मिळालें एक औंस वजनाच्या सोन्यास इंग्लंडमध्यें पूर्वी सुमारें ८४ शिलिंग इतकी किंमत होती, ती १४० शिलिंगाच्यावर गेली हिंदुस्थानात सोन्याचा तोळयाचा भाव २४ रुपयांवरून ३५ रुपयांपर्यंत चढला तेजीच्या भावाचा फायदा घेण्यासाठी खाणीवाल्यानीं सोन्याचें उत्पादन वाढवलें आणि जुन्या, सोडून दिलेल्या खाणींचेंहि नशीब उदयास आलें जगाचा व्यापार न वाढतां त्याचें विनिमय साधन जें सोनें त्याचाच पुरवठा वाढला आणि ह्या सोन्याचें काय करावें ह्याची विवंचना आता राष्ट्रास लागली आहे.

जगातलें सोनें इंग्लंड व अमेरिका ह्यासारख्या संपन्न राष्ट्रांकडे धाव घेतें हें साहजिकच आहे पण ह्या येणाऱ्या सोन्याचें काय करावें व त्याचा ओघ कसा थांबवावा हें त्यांस सुचेनासें झालें आहे. त्याचा पुरवठा मागणीच्या मानानें अधिक झाल्यानें सोनें नाणें म्हणून पुन्हां वापरात आणावें म्हणजे त्याची किंमत उतरण्याचें कारण उरणार नाहीं असें कित्येकाचें म्हणणें आहे. सोन्याचा सध्याचा भाव म्हणजे हुंडणावळीचा दर कमी करावा आणि ह्या रीतीनें त्याच्या पुरवठ्यास आळा घालावा अशीहि सूचना करण्यांत आली आहे सोनें खरेदी करून तें मध्यवर्ती बँकांच्या संग्रहात व त्याच्या बाजूस काढून ठेवलेल्या स्वतंत्र फंडात गारद करावें ह्याच उपायाचा अवलंब सध्यापावेतों करण्यात आला आहे पण एवढ्यानें भागत नाहीं असें दिसून आल्यावरून पूर्वीची सामान्य परिचयाची आंतरराष्ट्रीय सुवर्णचलन पद्धति पुनश्च चालू करावी असें कित्येकास वाटत असून जबाबदार मुत्सद्दी ह्या सूचनेचा काळजीपूर्वक विचार करीत आहेत १९३६ सालातलें जागतिक सुवर्णोत्पादन कल्पनेपेक्षा ज्यास्त झालें आणि रशियन खाणींमधून अंदाजाच्या मानानें अधिक सोनें बाहेर निघत आहे असें दिसताच चोहोंकडे खळबळ उडून गेली त्याचा भाव उतरण्यापूर्वी आपल्या गांठचें सोनें विकून टाकावें ह्या बुद्धीनें अनेकांनीं बाजारातील पुरवठ्यात भर घातली आहे त्या कारणानें सोन्याच्या अजीर्णाची प्रकृति अधिकच बिघडली आहे हिंदुस्थाननें गेल्या सात वर्षांत ३०० कोटि रुपयाचें सोनें बाहेर पाठवून जगास उपकृत केलें आहे आणि ह्याबद्दल विपुल धन्यवादहि मिळविले आहेत सोनें पचावयास कठिण म्हणून हिंदी सोन्याची निर्गत थांबवावी किंवा मर्यादित करावी अशी सूचना आमच्या सरकारास केली जाण्याचा संभव आहे हिंदी लोकमत सरकारास पटलेलें नाहीं, बाहेरच्या तज्ज्ञांच्या सल्ल्याचा व ब्रिटिश सरकारच्या धोरणाचा त्यावर कांहीं परिणाम होतो कीं काय तें पहावें.

———

## नव्या राज्यघटनेचा आर्थिक पाया भक्कम आहे काय ?

हिंदी रेल्वेजची आर्थिक स्थिति सुधारेल, अशी अपेक्षा करण्यास फारशी जागा नाहीं, हा वेजवुड कमिटीचा अभिप्राय हिंदुस्थानच्या सर्वसाधारण प्रगतीच्या दृष्टीनें आशाजनक नाहीं. नव्या राज्यघटनेमधील मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांमध्यें सरकारी उत्पन्नाची वाटणी सुचवितांना, नवीन राज्य-घटनेच्या मार्गांत सरकारी उत्पन्न-खर्चाच्या परिस्थितीची अडचण येणार नाहीं, असें आपलें मत सर ओटो नीमायर ह्यांनीं व्यक्त केलें होतें. रोख मदत देणें, जुनें कर्ज रद्द करणें, विशिष्ट कराच्या उत्पन्नांतील हिस्से तोडून देणें, इत्यादि मार्गांनीं नव्या–जुन्या प्रांतांस मध्यवर्ती सरकारनें सहाय करावयाचें आहे. ही जबाबदारी पार पाडण्यास हिंदुस्थान सरकारची स्वत:ची परिस्थिति सुधारली पाहिजे. रेल्वेजचें उत्पन्न हळु हळु वाढून त्या सरकारास पुरेशी कूस सापडेल, असें सर ओटो ह्यांचें म्हणणें होतें. त्यांच्या योजनेस पार्लमेंटनें मान्यता दिली, तथापि सदरहु शिफारशींतील मूलभूत अपेक्षा खरी ठरण्याविषयींची आपली साशंकता हिंदुस्थान सरकारनें त्यावेळींच स्पष्टपणें व्यक्त केली होती रेल्वेजचा खर्च कमी होऊन उत्पन्न वाढेल, ह्या आशेच्या ततूवर सर ओटो ह्याचा आशावादीपणा टांगून राहिला होता, परंतु आता वेजवुड कमिटीनें त्याचा स्फोट उडवला आहे रेल्वेजनीं आपला स्वतःचा रोजचा संसार जेमतेम चालवला म्हणजे मिळवली, मध्यवर्ती बजेटास त्याचेकडून प्राप्ती होण्याची ह्यापुढें आशा नाहीं, असें वेजवुड कमिटीनें स्पष्ट केलें आहे

मध्यवर्ती सरकारावरील ही आपत्ती प्रांतिक सरकारांसहि जाणवणार असें दिसतें स्वायत्त प्रांतांस प्राप्तीवरील कराचा काहीं भाग मिळावा, असें नीमायर लवादानें ठरविलें आहे ही वाटणी होणें मध्यवर्ती सरकारची स्वतःची आर्थिक परिस्थिति समाधानकारक असण्यावरच अवलंबून आहे प्रांतिक सरकारास करवाढ करण्यास फारसा वाव नाहीं परंतु त्याचेवरील जबाबदारी मात्र वाढली आहे. गेलीं काहीं वर्षे काटकसरीच्या मार्गाचा अवलंब करण्यातच गेलीं असल्यानें जास्त बचत करतां येण्याचीहि आशा उरलेली नाहीं नवीन सुधारणेच्या मार्गांतील पैशाची अडचण किती तीव्र स्वरूपाची आहे, हें प्रांतिक हंगामी प्रधान मंडळातील फडनवीसांच्या परिषदेंत नुकतेंच स्पष्ट झालें आहे मध्यवर्ती व प्रांतिक सरकारामधील उत्पन्नाच्या वाटणींत मुंबई इलाख्यास अन्याय झालेला असून, त्याचा दुष्परिणामहि आपल्या प्रांतास भोगावा लागणार आहे. रेल्वेजकडून कांहीं मदत मिळेल व त्यामुळें प्रांतिक सरकारांसहि थोडें फार सहाय होईल, ह्या आशेमुळें आजपर्यंत प्रांतिक निरुत्साह तीव्रतेनें प्रकट झाला नव्हता. वेजवुड कमिटीनें भ्रमाचा भोपळा लवकर फोडला, हें एका दृष्टीनें ठीकच झालें असें म्हटलें पाहिजे कारण, त्या योगानें वस्तुस्थितीची जाणीव होऊन पुढचा मार्ग योग्य रीतीनें आखण्याचें कार्य आता प्रांतिक सरकार व जनता ह्यास हातीं घ्यावें लागेल

लोकशाहीचा कारभार नेहेमींच खर्चाचा असतो. आधुनिक तंत्र हिंदुस्थानात अमलांत यावयाचें ठरलें परंतु त्याबरोबर आर्थिक सामर्थ्याची मात्र वाढ करण्याचा विचार व प्रयत्न नीट झाला नाहीं. वेजवुड कमिटीनें केलेल्या शिफारसी हिंदी राष्ट्रास समाधानकारक वाटणें शक्य नाहीं. रेल्वेजनी मोटारींच्या वहातुकीस, त्याची स्पर्धा नियंत्रित करून, तोंड द्यावें ही कमिटीची सूचना प्रांतिक सरकाराच्या हितसंबंधाशीं फारशी सुसंगत नाहीं. काटकसरीस जागा नाहीं, युरोपियन अधिकाऱ्यांचे पगार कायम ठेवून त्यांचें नोकरींतील प्रमाण वाढविलें पाहिजे, रेल्वेजच्या व्यवस्थेंत लोकप्रतिनिधींच्या मताची भानगड नको, कारभारात सुधारणा सुचविण्याकरिता युरोपियन तज्ज्ञ आणावे, इत्यादि तिच्या शिफारसी प्रगमनशील तर नाहींतच, परंतु उलट, रेल्वे व्यवस्थेंत हिंदी लोकांचा हात न शिरकता युरोपियनांचें स्थान स्थिर व्हावें अशा धोरणाच्या म्हणजे राष्ट्रीय आकांक्षांशीं सर्वस्वीं विसंगत आहेत. काहीं केलें तरी रेल्वेज जेमतेम चालतील इतकेंच, जनतेनें त्यांच्या कारभारात लुडबुडण्याचें कारण नाहीं, असें म्हणून वेजवुड कमिटीनें आपल्या चौकशीचें व शिफारसींचें क्षेत्र अत्यंत मर्यादित केलें आहे. रेल्वेजपासून फायदा तर नाहींच पण त्यांच्या व्यवस्थेवर प्रातिनिधिक देखरेख पण नाहीं आणि त्यापासून जनतेस आर्थिक हित करून घेण्याचें साधनहि नाहीं. ही परिस्थिति खचित समाधानकारक नाहीं.

## कॉफी

कॉफीच्या बिया भाजून पेयास योग्य अशा करण्यांत येतात साठवणानें त्या बिघडत नाहींत किंमत वाढवण्यासाठी त्या जाळण्याचा अलिकडचा प्रकार अजब आहे कॉफीचें उत्पत्तिस्थान ॲबिसीनिया असून तेथून ती अरबस्थानांत गेली सतराव्या शतकात लंडनमधलें पहिलें कॉफीगृह स्थापन झालें. अलीकडे कॉफीचा खप अमेरिकेंत दांडगा आहे त्या मानानें इंग्लिश लोक कमी कॉफी पितात इंग्रजांची विशेष भक्ती चहावर आहे. तथापि, युरोपात वापरली जाणारी पुष्कळशी कॉफी प्रथम इंग्लंडमध्यें येऊन तेथून निर्गत होते कॉफीच्या ब्रिटनमध्यें होणाऱ्या आयातीपैकीं निम्मी कॉफी युरोपखंडातील देशात जाते. दक्षिण अरबस्तानातल्या येमेन प्रांतात कॉफीचें उत्पादन होत असे. त्यामधूनच जगास पुरवठा होत असे आणि अजूनहि प्रसिद्ध मोचा कॉफी त्याच प्रदेशामधून येते युरोपमध्यें कॉफीपानाचा प्रसार होऊं लागला तेव्हा कॉफीच्या उत्पत्तीचें क्षेत्र मध्यअमेरिका, वेस्ट इंडीज व ब्राझिल इकडे निर्माण झालें, आणि अखेर जगास कॉफी पुरवण्याचे बाबतींत ब्राझिल देशास अग्रेसरत्व प्राप्त झालें जगातील कॉफीच्या उत्पादनापैकीं ७० टक्के ब्राझिलमध्यें होतें आणि ब्राझिलिअन कॉफीच्या निर्गतींत अमेरिकेचा हिस्सा ६० टक्के व युरोपचा ३० टक्के आहे कॉफीचा भाव अलीकडे उतरल्या कारणानें तिचा पुरवठा मर्यादित करून किंमत चढवण्याचे प्रयत्न ब्राझिलच्या सरकारनें केले आहेत कॉफीच्या वार्षिक उत्पादनाचा विशिष्ट हिस्सा सरकारच्या साठवणीसाठी उत्पादकानें पाठवलाच पाहिजे अशी सक्ती करण्यात आली असून ह्या पुरवठ्याच्या काहीं भागाचा नाश केला जातो नष्ट केलेल्या प्रत्येक पोत्याबद्दल उत्पादकास अगदीं अल्पसा मोबदला मिळतो आणि त्यामधून पोतीं व वहातुकीचा खर्च जेमतेम भागतो. बाजारभाव चढवण्याच्या प्रयत्नाम अलीकडे यश येऊन कॉफीच्या किमती थोड्याशा वर गेल्या आहेत. गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमध्यें सुमारें ४½ लक्ष हंड्रेडवेट वजनाची कॉफी आयात झाली आणि त्यापैकीं १½ लक्ष हंड्रेडवेट देशाबाहेर गेली. कांहीं वर्षीमागें हे दोन्हीं आकडे दीडपट–दुप्पट असत. कॉफीपानाची सवय कित्येक समाजात दृढमूल असल्यानें तिचा खप, किंमत थोडी चढली तरी, कायम राहील असें वाटतें

## स्फुट विचार

### नफा-नुकसानीस जबाबदार कोण ?

अनेक वर्षें हिंदी रेल्वेज नुकसानींत चालल्या होत्या त्यातून जनतेस नफा तर होतच नव्हता, पण त्याच्यासाठी काढलेल्या कर्जाचें व्याज भरण्यात ५० कोटि रुपयांचें एकूण नुकसान तिला सहन करावें लागलें आहे. बारा वर्षांमागें सरकारनें एक योजना आखली आणि तिला अनुसरून, रेल्वेजनीं राष्ट्राच्या तिजोरीस, त्याची मालमत्ता वापरल्याबद्दल, प्रतिवर्षी चार-पाच कोटि रुपये नियमानें द्यावें असें ठरलें त्या योजनेची अंमलबजावणी काहीं वर्षे झाली सात वर्षांमागें आर्थिक मंदी आली तेव्हापासून रेल्वेजनीं त्यांत घातलेल्या भांडवलावरील व्याज जेमतेम दिलें, पण चालू नुकसानीची भरपाई घसारा निधिमधून केली. ही उचललेली रकम आणि सरकारी तिजोरीस देणें असलेली वार्षिक रकम ह्यांचे ६२ कोटि रुपये झाले, ते हिशेबातून काढून टाकण्यांत आले सर्वसाधारण निधींतूनहि अनेक कोटींची उचल करण्यात आली. घसारा निधींत ३० कोटि आणि सर्वसाधारण निधींत ५० कोटि रुपये असे जमविण्यात यावे; म्हणजेच रेल्वेजच्या धंद्यास स्थैर्य व मजबुती येईल असें वेजवुड कमिटी म्हणते आर्थिक परिस्थितींत होणाऱ्या सुधारणेमुळें रेल्वेजची मिळकत वाढेल ती त्याजमध्येंच मुरवली जावी आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीनें त्यांचा कारभार वरिष्ठ नोकराच्या हातीं द्यावा अशी तिची शिफारस आहे सरकारच्या सांगण्यावरून नोकराच्या पगारात वाढ करण्यात आली आणि काटकसरहि त्याचमुळें करणें भाग पडलें, अशी तक्रार करण्यात आली आहे तसेंच युरोपिअन नोकराचे पगार व सख्या कमी करणें इष्ट नाहीं असेंहि स्पष्ट विधान कमिटीच्या रिपोर्टांत आहे कपन्याशीं झालेल्या करारांच्या मुदती संपताच सरकारनें त्याची व्यवस्था आपले हातीं घेण्याचें अलीकडचें धोरण तिला नापसत आहे नवीन स्थापन व्हावयाच्या "रेल्वे अथॉरिटी" नें ह्या प्रश्नाचा विचार व निकाल करावा, हिंदुस्थान सरकारनें करूं नये असें तिचें मत आहे.

### रेलवेजचें रान वरिष्ठ नोकरांस मोकळें सोडा !

हिंदी रेल्वेजची व्यवस्था सुधारण्याचे बाबतींत वेजवुड कमिटीनें केलेल्या शिफारसींचा निष्कर्ष काढावयाचा म्हणजे, नागरिक व सरकार ह्यांनीं तटस्थ व अलिप्त राहून रेलवेजचा कारभार त्यातल्या वरिष्ठ नोकरावर सोपवावा हाच तिचा अभिप्राय आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. रेलवेजमध्यें कोट्यवधि रुपयांचें भांडवल सरकारनें म्हणजे हिंदी राष्ट्रानें घातलें आहे. त्यावर अल्प व्याज घेऊन राष्ट्रानें संतुष्ट रहावें, फायदा मिळवण्याची व मालकीहक्क गाजवण्याची हाव धरूं नये असें वेजवुड कमिटीचें सांगणें आहे एखाद्या कपनीस कर्जाऊ भांडवल देणाऱ्या धनकोस ज्याप्रमाणें त्यानें दिलेल्या कर्जावर व्याज तेवढें ठरलेल्या दरानें घेण्याचा हक्क असतो आणि फायद्यामध्यें हिस्सा मागता येत नाहीं, त्याप्रमाणें हिंदी जनतेच्यातर्फे हिंदुस्थान सरकारनें डिबेंचर्स धारण करणाराची (भाग धारण करणाराची नव्हे) भूमिका स्वीकारावी आणि रेलवेजचा कारभार कसा चालला आहे इत्यादि बाबतींत निष्कारण चौकशी करू नये असें तिचें म्हणणें आहे. सरकार व जनता हे जर केवळ व्याजाचे धनी तर रेलवेजच्या उद्योगाचे मालक तरी कोण ? असा प्रश्न येथें उद्भवतो नवीन निर्माण व्हावयाच्या "रेलवे अथॉरिटी"नें रेलवेजच्या कामाकडे दुरून पहावयाचें आणि सरकारनें व कायदेमंडळानें त्यात ढवळाढवळ करावयाची नाहीं असें म्हटलें म्हणजे वरिष्ठ नोकराच्या व व्यवस्थापकाच्या हातीं सर्व सत्ता द्यावयाची असाच त्याचा अर्थ सरळ होतो. लोकांनीं रेलवेजमध्यें भांडवल घातलें आणि त्यापासून झालेलें अनेक कोटि रुपयाचें नुकसान सोसलें त्यास रेलवे कारभारावर अधिकार चालवू नका असें सांगणें हा कोठला न्याय ? रेलवेज जणू काय कोणासहि जबाबदार नसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याची मालमत्ता आहे अशी भावना वेजवुड कमिटीच्या रिपोर्टांत स्पष्ट दृग्गोचर होत आहे.

### फ्रान्सवरील आर्थिक गडांतर

फ्रेंच सरकाराची सापत्तिक स्थिति इतकी बिघडून गेली आहे कीं, मामुली उपचारानीं ती सुधारण्याची आशा नाहीं हें केव्हाच स्पष्ट झालें होतें तीव्र उपायांची योजना व्हावी म्हणून फ्रेंच मंडळानें कायदेमंडळाकडून मर्यादित काळपर्यंत सर्वाधिकाराची मागणी केली होती, ती फेटाळली गेल्याकारणानें मत्रिमडळच बदलण्याची पाळी आली तथापि, मत्रिमडळ बदललें म्हणून परिस्थिति तात्काळ थोडीच बदलणार आहे ! ह्याचा अनुभव नवीनमत्रि मंडळास येऊन त्यानेंहि जालीम उपाय योजण्यास जादा अधिकार सरकारास देण्यांत यावे अशी मागणी कायदेमंडळाकडे पुन्हां केली आहे सरकारी तिजोरी रिकामी झाली आहे, सरकारचें मामुली उत्पन्न अपुरें पडत आहे, धनवाले सट्टेबाजी करून सोनें देशाच्या बाहेर पाठवीत असल्यानें चलनाचें तारण कमी झालें आहे, व्यवहारात जरूरीइतका पैसा खेळेनासा झाला आहे, अशा एकना दोन, अनेक आपत्ति फ्रेंच राष्ट्रावर आल्या आहेत त्याचें निवारण करण्यास कडक योजना अमलात आणल्या जाणें अनिवार्य आहे. आर्थिक परिस्थिति सुधारण्याचा सरकारचा निश्चय व सामर्थ्य ह्यांवर जनतेचा विश्वास बसल्यावाचून विधायक कृति घडून येणें अशक्य आहे. फ्रान्ससारख्या जगांतील प्रमुख राष्ट्रावर असलें सकट यावें ही दुर्दैवाची गोष्ट आहे व त्यामधून फ्रेंच लोक निभावून निघतील अशी सार्वत्रिक इच्छा असणें स्वाभाविक आहे फ्रेंच हुंडणावळीचा दर १ पौंड स्टर्लिंग = १०५ फ्रँक असा इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांच्या समतीनें निश्चित करण्यात आला होता तो आता १२५ किंवा त्याच्याहि खाली म्हणजे १५० फ्रँकपर्यंत घसरू देण्याचें धोरण फ्रान्सला अगीकारावें लागत आहे तथापि फ्रेंच राष्ट्राच्या अडचणीच्या स्थितींत ह्याहि धोरणास पाठिंबा देण्याचें ब्रिटिश व अमेरिकन सरकारानें ठरविलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे

### सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचा मृत्यु

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि० चे मॅनेजिंग डायरेक्टर, सर सोराबजी पोचखानवाला, हे गेल्या रविवारीं ता ४ जुलै रोजीं मरण पावले गेले काहीं दिवस त्याची प्रकृति चिंताजनक झाली होती, ती सुधारली नाहीं. आधुनिक बॅंकिंगचा धंदा हिंदी लोकास करता येणार नाहीं, अशी सर्वसाधारण समजूत मागें प्रचलित होती. सर सोराबजींनीं मोठ्या आत्मविश्वासानें व अविश्रांत परिश्रमानें सेंट्रल बँकेची स्थापना व तिची जोपासना

केली. बँकेच्या प्रगतीच्या मार्गांत अनेकार्नी अडथळे आणले, तथापि सोराबजींची बँक सर्व संकटांतून पार पडली व आतां तिला हिंदी बँकिंगच्या क्षेत्रांत पहिल्या दर्जाचा मान प्राप्त झाला आहे तेवढ्यावरच सर सोराबजींचें समाधान झालें नाहीं सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया ह्या हिंदी एक्सचेंज बँकेची गेल्या सप्टेंबरात लंडन येथें स्थापना करून त्यानीं ह्या नव्या क्षेत्रांत धाडसानें प्रवेश केला. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार फार मोठा असल्याकारणानें जुन्या परदेशी एक्सचेंज बँकांशीं स्पर्धा करणें नव्या हिंदी बँकांस शक्य होत नाहीं व ह्यामुळेंच एक्सचेंज बँक काढण्याचें धाडस कोणी करीत नाहीं. हिंदी अंतर्गत व परदेशीय व्यापारास उपयोगी पडला पाहिजे असा पैसा एक्सचेंज बँकांचे हातीं जातो व देशी जॉइंट स्टॉक बँकासहि त्याची स्पर्धा जाणवते. सर सोराबजींच्या प्रगतिपर वृत्तीमुळें त्यास ही परिस्थिति रुचली नाहीं व सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मार्फत त्यांनीं लंडन येथें एक्सचेंज बँक स्थापन करण्याचें कामात पुढाकार घेऊन तिचें कामकाज सुरू करून दिलें सर सोराबजींच्या मृत्यूमुळें हिंदी बँकिंगचें लवकर न भरून येण्याजोगें फार मोठें नुकसान झालें आहे, ह्यांत संशय नाहीं

## शेतकी सहकारी पतपेढींचे पोटनियम

नवीन शेतकी सहकारी पतपेढ्या स्थापन करण्याचे बाबतींत सुधारलेले शेअर-पद्धतीचे पोटनियम अ (१) च्या प्रती सहकारी खा याकडे शिल्लक नसल्यानें भासणारी अडचण दूर करण्याकरितां अहमदनगर जिल्हा इन्स्टिट्यूटनें जरूर त्या सर्व दुरुस्तीसह व पोटनियमासह अ (१) पत्रकाच्या प्रती गेल्या वर्षी छापून घेतल्या. त्यास रजिस्ट्रारसाहेबाची आगाऊ संमति घेण्यात आली होती. पहिल्या प्रतीच्या ५,००० प्रती तावडतोब खपल्याकारणानें आतां ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्यात येत आहे ह्यामुळें लोकाची गैरसोय नाहींशी होईल सदरहू पत्रकासोबत नवीन शेतकी पतपेढ्या स्थापन करावयास लागणारी जरूर ती सर्व माहिती अत्यंत सोप्या शब्दांत दिलेली आहे सहकारी पतपेढीची स्थापना, तिच्या सभासदानीं लक्षात ठेवावयाच्या गोष्टी, पतपेढीचे पोटनियम, पतपेढी रजिस्टर होण्याकरितां करावयाच्या अर्जाचा नमुना, इत्यादि सर्व माहिती ह्या पत्रकात आली आहे. श्री ग कृ प्रधान, जी डी. सी. ए., (ऑडिटर, को सो नगर) ह्यानीं हें पत्रक लिहिलें व दुसरी आवृत्तीहि त्यानींच सुधारून तयार केली. नगर जि. सहकारी इन्स्टिट्यूटच्या ऑनररी सेक्रेटरीकडून पत्रकाच्या प्रती मिळूं शकतील


आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला

मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचे
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा बर्फी**
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयांची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल. बी
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेची पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु (ट. ख निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

१२ वर्षे पुण्यांत लोकादरास पात्र झालेले
# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆
यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

## बँकिंगचे क्षेत्रांतील नामवंत पुढारी

# सर सोराबजी पोचखानवाला

—:०:—

हिंदी बँकिंगची सर सोराबजी पोचखानवाला ह्यांनीं केलेली सेवा बँकिंगच्या इतिहासांतून कधींच विसरली जाणार नाहीं, इतकी ती महत्त्वाची आहे आधुनिक पद्धतीच्या व्यवहाराशीं हिंदुस्थानातील लोक विशेषसे परिचित नसताना व बँकिंगचे व्यवहार हिंदी व्यवस्थेखालीं चागले चालणें अशक्य आहे असें सर्वसाधारण मत प्रचलित असतांना सर सोराबजींनीं धडाडीनें करून दाखविलेलें कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे ९ ऑगस्ट, १८८१ रोजीं त्याचा मुबई येथें जन्म झाला सहाव्या वर्षी त्याचे वडील निवर्तले सोळाव्या वर्षी मॅट्रिकची परीक्षा देऊन त्यांनीं कॉलेजात प्रवेश केला, परतु पहिल्याच परीक्षेंत अयशस्वी होऊन त्यांनीं चार्टर्ड बँकेंत २० रुपये दरमहावर कारकुनी पत्करली बँकेच्या कामात त्यांची बुद्धि प्रकट झाली व त्यातील सर्व व्यवहाराची आमूलाग्र माहिती त्यांनीं करून घेतली फावल्या वेळात अभ्यास करून त्यांनीं अकौन्टन्सीच्या परीक्षा दिल्या परदेशी एक्सचेंज बँकातून हिंदी लोकाच्या बुद्धीचें व परिश्रमाचें चीज होत नाहीं, ह्याचा कटु अनुभव त्यास लवकरच आला, परतु धीर खचूं न देतां सोराबजींनीं अभ्यास चालू ठेवून इडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सचें पहिलें हिंदी सर्टिफिकेटेड असोसिएटेड होण्याचा मान मिळविला बँक ऑफ इडिया ह्या नवीन निघालेल्या हिंदी सस्थेंत त्यास चागली नोकरी मिळाली, परतु तेथेंहि युरोपियन व हिंदी नोकरात करण्यात येणारा भेद त्यास रुचला नाहीं त्याच सुमारास निघालेल्या मर्चटस् बँकेस मॅनेजर हवा होता, परतु सोराबजी हे फार तरुण म्हणजे फक्त २६ वर्षांचे असल्यानें ती नालायकी ठरविण्यांत आली! शेवटीं सोराबजींनीं स्वत.ची एक बँक काढण्याचा विचार निश्चित करून त्यांनीं बँक ऑफ इडियातील आपल्या २७५ रु पगाराच्या जागेचा राजीनामा देऊन टाकला

सोराबजींच्या नियोजित बँकेचे डायरेक्टर होण्यास मुबईतील वजनदार लोकांपैकी कोणीच कबूल होईना अखेर सर फिरोजशहा मेहता ह्यांनीं डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष होण्यास कबुली दिली व सोराबजी हे आपल्या स्वत.च्या बँकेचे मॅनेजर बनले. तीन महिन्याचे आत २० लाखाचें भाडवल जमून बँक चालू झाली.

बँकेस सुरवातीचीं वर्षें बरीच कठीण गेलीं. १९१३–१४ चे आसपास कित्येक मोठ्या हिंदी बँका कोसळल्या, परंतु सेंट्रल बँकेच्या अध्यक्षानीं व डायरेक्टरानीं आपल्या बँकेचा बचाव केला. आपल्या ठेवी एकदम परत मागणाऱ्या लोकानीं सेंट्रल बँकेस अनेक वेळा पेंच घातलेला आहे, तथापि त्यातून ती व्यवस्थितपणें पार पडलेली आहे तिच्या प्रगतीविषयीं अनेकास वैषम्य वाटून तिच्या मार्गात आड येण्याचे कित्येक प्रयत्न करण्यात आले प्रत्येक वेळीं सोराबजी पोचखानवाला ह्यानीं मोठ्या धडाडीनें व चतुराईनें बँकेच्या हिताचें सरक्षण केलें व बँकेची जोपासना करून तिला वाढवलें सेंट्रल बँकेची स्थापना, तिचा प्रचड विस्तार, तिचे अवाढव्य व्यवहार व हिंदी बँकिंगचे क्षेत्रात तिला प्राप्त झालेलें पहिल्या दर्जाचें स्थान हीं सर्व बँकेचे संस्थापक व सूत्रधार सर पोचखानवाला ह्याच्या परिश्रमाचीं फळें आहेत. हिंदी म्हणून तुच्छतेनें अवहेलना करणारे युरोपियन बँकर आपल्या धंद्याविषयीं प्रश्न उपस्थित झाला असता सर सोराबजींकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करू लागले एवढा मोठा फरक त्यानीं आपल्या कर्तबगारीनें घडवून आणला. कित्येक व्यापारी मंडळ्यांस सहाय करून व इतरास भाडवल उभारण्यास मदत करून त्यानीं हिंदी उद्योगधंद्याची प्रगति घडवून आणली आहे. युरोपियन व्यवस्थेखालीं १९२० सालीं सुरू झालेली युनियन बँक अडचणींत आली, तेव्हां तिची पुनर्घटना करून तिला मजबूत पायावर बसविण्याचें काम सर सोराबजींनींच केलें.

अलायन्स बँक ऑफ इंडियाच्या दिवाळयामुळें टाटा इंडस्ट्रिअल बँक अडचणींत आली, त्यावेळीं सर सोराबजींनीं तिचीं देणींघेणीं सेंट्रल बँकेकडे वर्ग करून, तिच्या अनेक शाखांसह टाटा बँकेस १९२३ सालीं आत्मसात केलें. अशा रीतीनें अनेकाचें नुकसान वांचलें व सेंट्रल बँकेच्या विस्तारासहि चालना मिळाली. युरोपियन व्यवस्थेस हिंदी व्यवस्थेखाली नमावें लागलें! इंपीरियल बँकेच्या स्थापनेनंतर इतक्या मोठ्या महत्त्वाची दुसरी कोणतीहि गोष्ट हिंदी बँकिंगच्या इतिहासांत नमूद नाहीं! आज सेंट्रल बँकेकडील ठेवी २६ कोटि रुपयाच्या आसपास असून तिच्या शाखा व उपशाखा ह्याची सख्या सुमारें ८० आहे सेंट्रल बँकेच्या स्थापनेपासून तिचें चालकत्व सर सोराबजी ह्याचेकडेच होतें.

सर सोराबजी पोचखानवालाचें चरित्र म्हणजे मुबईमधीलच नव्हे, तर हिंदुस्थानातील बँकिंगच्या प्रगतीचा इतिहास होय. सिलोनमधील बँकिंगच्या चौकशी कमिटीचे ते अध्यक्ष होते व काश्मीरमधील सरकारी बँकेसबधीं सल्ला देण्याकरिता त्याची योजना झाली होती. पुणें येथील बँक ऑफ महाराष्ट्राचें उद्‌घाटन त्यांचेच हस्तें गेल्या वर्षी झालें, हा महाराष्ट्रातील बँकिंगच्या प्रगतीस एक शुभशकुनच समजला पाहिजे.

एका निश्चित ध्येयाकरितां सर सोराबजींनीं आपलें तन-मन-धन अर्पण केलें व हिंदी लोकावरील नालायकीचा डाग काढून टाकून त्यात आत्मविश्वास निर्माण केला. सर सोराबजींचें चरित्र स्फूर्तिदायक असून त्यापासून पुष्कळच बोध घेतां येण्याजोगा आहे एक्सचेंज बँकिंगमध्यें म्हणजे आयात-निर्गतीच्या व्यापारांतील बँकिंगमध्यें हिंदी बँकांस अद्याप स्थान मिळालेलें नाहीं. ही उणीव दूर करण्याकरितां लंडन येथें त्याच्याच पुरस्कारानें गत सालीं एक एक्सचेंज बँक स्थापन करण्यांत आली. ह्या परदेशात स्थापन झालेल्या पहिल्या हिंदी एक्सचेंज बँकेची सेंट्रल बँकेप्रमाणेंच भरभराट होवो, असेंच कोणासहि वाटेल. सदरहु नव्या उपक्रमास योग्य मार्गदर्शन करण्याकरितां सर सोराबजींस आणखी थोडें आयुष्य लाभलें असतें, तर किती तरी बरें झालें असतें.

---

### मालेगांव तालुका (जि नाशिक) सहकारी वृत्त

मालेगांव तालुक्यांत माणके को. के. सोसायटी रजिस्टर झाली असून तिची पहिली वार्षिक साधारण सभा माणके येथें गांवाचे चावडींत ता २२-६ ३७ रोजीं श्री. बी एस. हिरे, बी ए, एल-एल बी., एम. एल ए, याचे अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळीं बँकेचे सीनिअर इन्स्पेक्टर व सुपरवायझर हेहि हजर होते. सीनिअर इन्स्पेक्टर सो. यांनी सोसायटीचें कामकाज कसें चालवावे याबाबत माहिती दिली.

## बंगलोर येथील सहकारी परिषद्

गेल्या शनिवारीं व रविवारीं अखिल भारतीय सहकारी परिषद बंगलोर येथें भरली होती. प्रांतिक व संस्थानांतील सहकारी बँका व इन्स्टिट्यूट्स ह्यांच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून आपल्या कार्यांत येणाऱ्या अडचणी व उद्भवणारे प्रश्न ह्यांची चर्चा करावी आणि त्यांवर उपाय शोधून काढावे हा सदरहु अखिल भारतीय परिषदेचा हेतु असतो. अलीकडे रिझर्व्ह बँकेनें कांहीं महत्त्वाच्या विषयांबाबत पत्रकें प्रसिद्ध केलीं आहेत आणि त्यांत सहकारी कार्यकर्त्यांस कित्येक सूचनाहि केल्या आहेत उदाहरणार्थ, जमीन गहाणाच्या प्रांतिक बँकांची घटना सहकारी प्रकाराची नसावी आणि ती संयुक्त भांडवलाच्या म्हणजे जॉईंट स्टॉक तऱ्हेची असावी असें मत रिझर्व्ह बँकेमार्फत व्यक्त करण्यात आलें आहे आणि त्यावर "अर्था"मध्यें टीका मागेंच येऊन गेली आहे. तथापि, डिबेंचर्सची मुदत काय असावी आणि ती कशी काढण्यांत यावी, सेंट्रल बँकांच्या व्यवस्थापक मंडळाची घटना कोणत्या प्रकारची असावी, त्यांनीं अल्प मुदतीचीं व वाढवून मुदत दिलेलीं कर्जें ताळेबंदांत व हिशोबात स्वतंत्र दाखवावीं, प्राथमिक पतपेढीच्या सभासदांस केवळ पिकांसाठीं व पिकांच्या तारणावरच कर्ज देण्यात यावें, त्यांनीं पिकें विकून आलेला पैसा कर्जफेडींत देण्याची सक्ती असावी, शेतकऱ्यांच्या पेढ्या केवळ कर्जांसच मर्यादित न होतां त्यांनीं खरेदी विक्री इत्यादि अनेक कामें सभासदांचे सोयीसाठी हातीं घ्यावीं, दुष्काळासारख्या कारणावांचून सभासदानें बाकी थकवल्यास ती त्याच्या मालमत्तेच्या खरेदीमधून तात्काळ वसूल केली जावी, इत्यादि विविध सूचना रिझर्व्ह बँकेनें केल्या आहेत, त्या बंगलोरच्या परिषदेपुढें चर्चेसाठीं मांडल्या गेल्या होत्या

ह्याशिवाय आणखी कित्येक विषय सुचवण्यात आले होते प्रांतिक सहकारी बँकांस याव्या लागणाऱ्या प्राप्तीवरील कराच्या वसूलीची पद्धति, हिंदुस्थान सरकारनें दिलेल्या ग्रँटमधून सहकारी अधिकाऱ्यांच्या शिक्षणाची होत असलेली तरतूद निरनिराळया प्रांतात कशी आहे हें पाहून तीमध्यें फेरफार सुचवण्याची आवश्यकता, हिंदुस्थानातील सहकारी चळवळीसबधानें चौकशी होण्याचें महत्त्व, प्रत्येक प्रांतांत सहकारमंत्री व रजिस्ट्रार ह्यांस सल्ला देण्याकरिता प्रातिनिधिक स्वरूपाचें मंडळ नेमण्याचा उपयोग, सहकारी संस्थांचीं येणीं नोकराकडून वसूल करण्यासाठीं पगाराच्या कांहीं अंशावर जप्ती आणता यावी म्हणून सिव्हिल प्रोसिजर कोडमध्यें दुरुस्ती, प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट्सना सरकारकडून पुरेशी आर्थिक मदत मिळण्याचें आगत्य, शेतीच्या मालाची पद्धतशीर विक्री होण्याबाबत कोठारांची वगैरे व्यवस्था, सहकारी व्यवहार व घटना ह्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास व त्या विषयींचें संशोधन होण्यासाठीं योजना इ. विषय परिषदेपुढें विचारासाठीं मांडले गेले. वरील यादीवरून परिषदेंत किती महत्त्वाच्या विषयांची चर्चा झाली, ह्याची कल्पना सहज येईल

बंगलोरच्या सहकारी परिषदेचीं दोन अंगें होतीं व त्यामुळें तिला दोन अध्यक्ष होते. सर पुतना चेटी ह्यांनीं प्रतिनिधींचें स्वागत केलें. व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो व म्हैसूरचे महाराज ह्यांचे परिषदेस उत्तेजनपर संदेश आले होते आणि म्हैसूरचे दिवाण, सर मिर्झा इस्माईल, हे स्वतः उपस्थित होते प्रांतिक बँकांच्या विभागाचे अध्यक्ष, कराचीचे प्रसिद्ध पुढारी श्री. जमशेद मेथा, ह्यांनीं आपल्या भाषणात सरकारनें सहकारी बँकेस स्वातंत्र्य देण्याचें महत्त्व प्रतिपादलें. इन्स्टिट्यूट्सच्या विभागाचे अध्यक्ष, श्री. रामदास पंटलू, ह्यांनीं हिंदी सहकारी चळवळीचें विस्तृत सिंहावलोकन केलें आणि विधायक सूचनाहि केल्या. प्रांतिक इन्स्टिट्यूट्सची सध्याची दुर्बलतेची स्थिति ह्या विषयाचें विवेचन त्यांच्या भाषणात येणें अपेक्षित होतें परंतु तो महत्त्वाचा प्रश्न त्यांच्या भाषणांतून सर्वस्वी गळला, हें आश्चर्यकारक आहे आम्हीं उल्लेखिलेल्या विविध विषयांवर परिषदेंत ठराव पास करण्यात आले

## फिल्म्सची आयात व त्यावरील जकातीचें उत्पन्न

हिंदी सिनेमाच्या धंद्याची सुधारणा कशी होत आहे, हें खालील आकड्यांवरून दिसून येईल परदेशी तयार फिल्म्सची व कच्च्या फिल्म्सची आयात ह्या दोहोंतहि सालोसाल वाढ झालेली त्यावरून समजेल.

परदेशी कच्च्या फिल्म्सची आयात

| वर्ष. | लांबी ( फूट ) कोटि लक्ष | किंमत (लक्ष रु.) | त्यावरील जकातीचें उत्पन्न (लक्ष रु ) |
|---|---|---|---|
| १९३४-३५ | ६, १ | २१½ | ४¾ |
| १९३५-३६ | ६, ७ | २१ | ४⅓ |
| १९३६-३७ | ६, ७८ | २३¾ | ५¼ |
| परदेशी तयार फिल्म्सची आयात | | | |
| १९३४-३५ | ०, ९० | २४¾ | ८¾ |
| १९३५-३६ | ०, ८५ | २४ | ९¾ |
| १९३६-३७ | ०, ९४ | २५ | ९¼ |

## पंचकमिटीचे क्लासेस

माढा तालुका को सुपरवायझिंग यूनियनचे कार्यक्षेत्रात सोलापूर जिल्हा को इन्स्टिट्यूटचे विद्यमानें माढा, शेटफळ व कुर्डुवाडी या तीन ठिकाणीं एकंदर २६ सोसायट्यांचे पंच ता २४, २५ व २६ जून, १९३७ रोजीं बोलावून त्याना सविस्तरपणें सहकारी कायदा, पंचकमिटीचीं कर्तव्यें, पंचकमिटीवर पडत असलेली जबाबदारी, पंचकमिटीचें व सहकारी चळवळीचें महत्त्व, वगैरेबाबत मे. जी डी साठे इन्स्टिट्यूटचे चेअरमन, मि. आर. पी. पाटील सुपरवायझर, मि बी. डी मिसाळ प्रॉ ऑफिसर व मि एस. आर. पाटील असि०-सुपरवायझर यानीं परिणामकारक भाषणें करून माहिती सांगितली प्रत्येक सभेस सोसायट्यांचे पंच व इतर मेंबर असे सुमारें ७५ सभासद हजर होते. प्रत्येक ठिकाणीं सोलापूर जिल्हा इन्स्टिट्यूटचे चेअरमन मे जी. डी. साठे यानीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. कुर्डुवाडी येथें पंचकमिटीचे क्लासास मे. नाडकर्णी, असि ऑर्गनायझर, हे हजर होते, व त्यांनीं सहकारी चळवळीचें महत्त्व सांगून, पंचकमिटींना आपल्या सोसायट्यांच्या इतर सभासदांची कशी सर्वांगीण सुधारणा करिता येते याबाबत शेतकऱ्यांना व सभासदांना उपयुक्त अशी माहिती सांगितली

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोमाक प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दांतेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

## दक्षिण आफ्रिकेंत सोन्याचा धूर

सोन्याच्या चढलेल्या भावामुळें खाणींचा धंदा करणाऱ्या मंडळ्यांची कशी चलती आहे आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या देशांतील सरकारांचें उत्पन्न कसें विलक्षण वाढलें आहे ह्याची कल्पना येण्यास एका मंडळीच्या व्यवहाराची माहिती दिली असतां पुरें होईल "यूनियन कॉर्पोरेशन" ह्या कंपनीस गेल्या वर्षी ४२ कोटि रुपये नफा झाला. त्यापैकीं निम्याच्या वर रक्कम डिव्हिडंडच्या स्वरूपांत भागीदारामध्यें वाटण्यांत आली आणि १८ कोटि रुपये दक्षिण आफ्रिकेंतील सरकारच्या तिजोरींत कराच्या मार्गानें गेले! ह्या कंपनीच्या मालकीच्या खाणींमध्यें कामावर ३ लक्ष तद्देशीय व ३७ हजार युरोपिअन लोक आहेत.

### नारायण दया औषधालय, मुंबई

या औषधालयाचे चालक श्री भि. स. गोटीवरेकर हे वनस्पतीशास्त्रांत अनुभविक व तज्ज्ञ असे आहेत यांनीं अनेक रोगांवर उत्तम औषधें तयार केलीं असून, गिरगांवांत याचा मोठा औषधें करण्याचा कारखाना आहे. यांचें नारायण दया केशवर्धक तेल व टूथपावडर सर्व मुंबईभर प्रसिद्ध आहेत स्वतंत्र उद्योगधंदे करू इच्छिणाऱ्या तरुणांनीं याचा कित्ता नजरेसमोर ठेवण्यासारखा आहे

### सिलोनचे व्यापारी प्रतिनिधि

सिलोनचे सरकारी व्यापारी प्रतिनिधी श्री कातावाला मुंबईंत येत असून सिलोनी व हिंदी धंदेवाल्यांचे व्यापारी संबंध दृढ करण्याचा प्रयत्न करणार आहेत.

## P. W. D.

1 Sealed tenders are invited for improving the surface of certain miles of the Dharamtar Mahableshwar Road between miles 1/3 and 62 Approximate cost of work Rs 1,22,300/-

2 Earnest money required Rs. 1,225/-

This will be forfeited if successful tenderer fails to complete contract documents.

3. Tender forms and conditions of contract may be obtained from the Office of the Undersigned upto 30th July 1937 on payment of Rs. 3/- for each tender form.

4 Tenders, sealed and superscribed with the name of work, will be received by the Undersigned upto 1 P M on 9th August 1937 and opened on the same day

5 The Superintending Engineer, Southern Circle reserves the right to reject any or all of the tenders without assigning any reason therefor.

6 The tender should be accompanied by a solvency certificate from the Collector of the District or by a Banker's certificate of financial stability.

Sd/- O D. O'SULLIVAN
Executive Engineer, R. Dn.


**अर्थशास्त्र**

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो. दृ गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत तीन रुपये
• ह्या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८२,२०० |
| रिझर्व्ह फंड | २,७९४ |
| इतर फंड | ८९० |
| मुदतबंद ठेवीं | १,६४,२४१ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,४७० |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,६८,९३० |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४१,५०८ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडंड पाच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्



## प्राप्तीवरील कराची वसूली

### सरकारी तिजोरींत झालेला एकूण जमा—कर चुकवण्याचे प्रयत्न—व्यापारविषयक परिस्थितीचा करवसुलीवर परिणाम

१९३५-३६ सालीं प्राप्तीवरील कर व सुपरटॅक्स मिळून हिंदुस्थान सरकारास १७ कोटि, ५ लक्ष रुपये उत्पन्न झालें १९३४ सालीं १७ कोटि, ५२ लक्ष रुपये जमा झाले होते १९३५-३६ सालीं ३७,७७२ लोक प्रथमच कराचे कक्षेंत आले व २७,२६७ लोकाचीं नावें यादींतून गळालीं. मुंबई इलाख्यात ६,४१२ लोकास नव्यानें कर लागू झाला आणि ३,९८६ लोकाचीं नावें कराच्या आकारणींतून कमी झालीं.

इंडियन इन्कमटॅक्स अॅक्ट (१९२२) च्या २२ (२) च्या कलमान्वयें करास पात्र असणाऱ्या इसमानें मागील सालांतील आपल्या उत्पन्नासबधीं तपशील सरकारास सादर करावा लागतो. ह्या तपशीलातील आकडा मान्य करून ज्यास्ती चौकशी न करता इन्कमटॅक्स अधिकाऱ्यानीं कराची आकारणी केली असती, तर १९३५-३६ सालीं ३½ कोटि रुपये कमी वसूल झाले असते म्हणजे, शभरातील सुमारें २८ रुपये अधिकाऱ्याच्या दक्षतेमुळें कराच्या आकारणींतून निसटण्याचे टळले

सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूच्या प्राप्तीवरील करासबंधांतील अहवालांत, कर टाळण्याचे प्रयत्न कसे करण्यात येतात, ह्यासबधीं कांहीं घडलेलीं उदाहरणें दिलेलीं आहेत.

( १ ) एका वजनदार गृहस्थानें प्राप्तींतून कापून घेतलेल्या कराचा रिफंड मिळावा अशी मागणी केली, परतु चौकशीअंतीं त्याचेकडेच एक लक्ष रुपये कराची बाकी निघाली !

( २ ) एक दुकानदार त्याजवर कराची आकारणी झाल्यापासून, दरसाल खोटे तक्ते भरीत असे एकदा अचानकपणें त्याचे दुकानातील हिशेब तपासण्यांत आलें तेव्हा ही लबाडी उघडकीस आली

( ३ ) आपल्या पत्नीला फर्मचे भागीदार करून उत्पन्न कमी दाखविण्याचे कित्येक प्रयत्न अधिकाऱ्यांनीं निष्फळ केले

( ४ ) एका वकिलानें आपल्या हिशेबात फीची सर्व वसुली दाखविली नाहीं कोर्टांतील रेकार्डावरून व स्थानिक व्यापाऱ्याच्या वह्यांवरून हें उघडकीस आलें

( ५ ) एका गृहस्थानें नफ्यापैकीं ४० हजार रुपये हिंदी सस्थानांतील काहीं अस्तित्वात नसलेल्या सावकाराचे खातीं जमा केले

१९३४-३५ च्या अखेर वसुलीची जेवढी रकम बाकी राहिली होती, त्यापेक्षा १९३५-३६ अखेर बाकी अधिक राहिली असल्याचें रिपोर्टावरून समजतें

प्राप्तीवरील कराची वसुली व्यापाऱ्याचे मिळकतीवर अवलबून असते आर्थिक परिस्थिति सुधारून व्यापार-धद्यात वाढ झाली, म्हणजे तिचें प्रतिबिंब कराच्या वसुलींत सहज पडतें. १९३४ ३५ सालीं झालेल्या नफ्यावरील कराची आकारणी १९३५-३६ मध्यें करण्यात आली, म्हणजे १९३४-३५ मधील व्यापारी तेजी मदीचा परिणाम त्याचे पुढील वर्षीच्या आकारणीवर झाला. बाजारातील मुबलक पैसा, लोखड व पोलादाच्या धद्याची भरभराट, सिमेंटच्या कारखान्याची प्रगति, इत्यादि कारणामुळें स्टॉक एक्सचेंजच्या व्यवहारात बरीच वाढ झाली व दलालानीं व सट्टेवाल्यांनीं चागले पैसे कमावले. सोन्याच्या निर्गतीचा प्रवाह अहवालाचे सालीं अखंड चालूच होता कापडाच्या व मोटार-गाड्याच्या धद्यात बरीच सुधारणा झाली विमाकंपन्या व साखरेचे कारखाने ह्यासहि हें वर्ष चागलें गेलें. एकंदरीनें, १९३४-३५ सालीं व्यापार व उद्योगधदे ह्याची स्थिति त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा बरी होती.

## सहकारी सोसायट्यांचें दप्तर उत्तम ठेवणाऱ्या सेक्रेटरींना प्रोत्साहन

सोसायट्याचें दप्तर व्यवस्थित व नीटनेटकें चालू तारखेपर्यंत पूर्ण रहाणें अत्यंत आवश्यक व महत्त्वाचें असून तिकडे विशेष लक्ष देणें जरूर वाटल्यावरून खात्याकडून सर्क्युलरनें वारंवार सूचना देण्यात आल्या असतील त्याप्रमाणें जो सेक्रेटरी आपले ताब्यातील दप्तर उत्तम रीतीनें ठेवील त्यास योग्य तें पारितोषक देण्याचा पुणें जिल्हा को इन्स्टिट्यूटचा विचार आहे. प्रत्येक सुपरवायझिंग यूनियनकडून दप्तराबाबत शिफारसी आल्यानतर त्या दप्तरांची इन्स्टिट्यूटनें ठरविलेल्या विशिष्ट नियमानुसार व नेमलेल्या कमिटीकडून पहाणी होऊन सर्वांत उत्तम ज्याचें दप्तर ठरेल त्या सेक्रेटरीस पारितोषक देण्यांत येईल याप्रमाणें प्रत्येक तालुक्याकरिता स्वतंत्र बक्षीस ठेवण्यात येणार आहे

## हिंदी विमा कंपन्यांसच काम द्या

बॉम्बे लाइफ अॅशुअरन्स कं लि ची २९ वी वार्षिक सभा २६ जून, १९३७ रोजीं श्री. के. एम् मुनशी ह्याचे अध्यक्षतेखाली भरली होती. अध्यक्षानीं आपल्या भाषणात विमाविषयक नवीन बिलासबधीं विचार व्यक्त केले ते म्हणाले:—

" ( १ ) ह्यापुढें आणखी २० वर्षें कोणत्याहि नव्या विदेशी कंपनीस रजिस्ट्रेशनचें सर्टिफिकेट देण्यात येऊ नये. ( २ ) री इन्शुअरन्सचें काम कांहीं एका विशिष्ट प्रमाणांत हिंदी कपन्याकडेच देण्यात यावें, अशी अट विदेशी कपन्यांवर बंधनकारक असावी ( ३ ) मध्यवर्ती व प्रातिक सरकारें, स्थानिक स्वराज्य संस्था, इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, पोर्ट ट्रस्ट, विश्वविद्यालयें, इत्यादींच्या आधिकारातील विम्याचें काम हिंदी कंपन्यांसच मिळालें पाहिजे, अशी त्याचेवर सक्ति करण्यात यावी "

माधव सोमण ब्रदर्स

भरजरी शालू, लुगडीं वगैरे. मोहक सर्व तऱ्हेचीं पातळें

पावसाळी कोट व छत्र्या

धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक

लॅक्ष्मी रोड : : : : : पुणें २

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—८ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... .. | १०५—२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—४ |
| ४% १९४३ ... ... ... | १०६–१४ |
| ३½% बिनमुदत ... .. ... | ९४–११ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०५—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... | ९९–१४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७–१४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०७—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १११—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—२ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३७—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११३–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३१—० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५४५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १२७—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि ४¾%) | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९७—० |
| अहमदाबाद-प्रांतिज ( ५०० रु चा भाग, डिव्हि. १०, बोनस ६ रु ४ आ. ) | ९३०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि १३% ) | १४९—१ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २७७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २८५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि ५½% ) | १३८०—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि ७½%) | १५५२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०—० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, १७ रु.८ आ ) | १६२—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु.ऑर्डि. रु.६) | २४०—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड रु. ७ आ. ८ ) | १५७७—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट) प्रत्येक तोळयास | ३४–१०–२ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयांस | ५१–१२–० |

**Ardomix** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय. एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगांवर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गलथलणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरे करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत अनुभव घेण्यास सोपें जावें म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे ट ख १२ आणे निराळा गांवोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डिपार्टमेंट न ६ )
३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर

एजन्सीज.—

मुंबई—**यशवंत दत्तात्रय गाडगीळ**, फणसवाडी, मुंबई २
धामणगांव—**मे भागवत ब्रदर्स**, धामणगांव, वऱ्हाड
हरदा—**चौथाजी तुळशीराम** आणि सन्स, हरदा, सी पी.
खानदेश—**डॉ जी एन महाजन**, मोठें वाघोदे, खानदेश.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books
(2) We supply Government of Bombay and Government of India publications
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published any where and supply it at publisher's price

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

त्वरा करा
जेवणाची उत्तम सोय—**न्यू प्रभाकराश्रम**—नांवे नोंदवा. महिन्यांतून ४ फीस्ट्स
दर १२ रु सदाशिव पेठ, गाय आळींतील श्रीराममंदिराजवळ मॅनेजर—न्यू प्रभाकराश्रम

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे**, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणे.

**डॉ. जोशी** म्हणजे **जी. जी. ब्रदर्सचीं मलमें**—त्वचा रोगांवर अत्यंत लवकर गुण देतात
डझनास १॥=) गरिबास फुकट १८९ सदाशिव, पुणे.

## शेअरची विक्री पुनः सुरू झाली

भांडवल तरतें राहून पांच टक्के नफा २००० महाराष्ट्रीयांना उद्योगधंदा.

"महाराष्ट्रीयाना उद्योगधदा मिळून रोजच्या चहाच्या कपातील साखर
महाराष्ट्रीयांनीं चालविलेल्या साखर-कारखान्याची मिळाली व भाडवलावर
बँकेचें व्याज मिळालें तरी सुद्धा स्वाभिमानी महाराष्ट्रीयाना आनदच होईल

आम्ही खादी वापरतों त्याचें कारण स्वाभिमानच
हा तुमचा शेअरफॉर्म व हा चेक"

प्रेफरन्स शेअर रु. १० : : : ऑर्डिनरी शेअर रु. २५
शेअर फॉर्म्स व सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.
**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.**
१५७ बुधवार पेठ, पुणे २

**रोडगे** यांच्या
मजबूत
**सतरंज्या**
वापरा.
आपल्या पैशाचा योग्य
मोबदला मिळवा.
**सर्वत्र मिळतात.**
कारखाना पत्ता: ३० मिठगंज पेठ पुणे २.

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

| जाहिरातींचे दर. |
|---|
| खालील पत्त्यावर चौकशी करावी |
| व्यवस्थापक, अर्थ, |
| 'दुर्गाधिवास', पुणें ४ |

# अर्थ

| वर्गणीचे दर. |
|---|
| वार्षिक वर्गणी |
| रु ४ |
| ( टपाल हशिल माफ ) |
| किरकोळ अंकास |
| एक आणा |

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १४ जुलै, १९३७ अंक २८

## दि नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कं. लि.

हेड ऑफिस : : : : नागपूर

त्रैवार्षिक बोनस
हयातींतील विम्यास २६ रु.
हयातीनंतरच्या विम्यास ४५ रु.

वार्षिक हप्त्यावर
२½ टक्के
बोनस

विम्याचे पैसे त्वरीत देण्याचें
कंपनीचें वैशिष्ट्य

काटकसरीची व्यवस्था
व
भरभक्कम लाइफ फन्डस

फायदेशीर अटींवर काम करण्यास वजनदार व उत्साही एजंटस पाहिजेत समक्ष भेटा अगर अर्ज करा.—

ब्रँच मॅनेजर,
साठे बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
### झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

-आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** याचे
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा वर्फी**
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

# माधव सोमण ब्रदर्स

भरजरी शालू, लुगडीं वगैरे. मोहक सर्व तऱ्हेची पातळें

पावसाळी कोट व छत्र्या

धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक

लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

# विविध माहिती

### सुएझचा कालवा

गेल्या सालीं सुएझच्या कालव्यामधून जहाजाच्या एकूण ५,८७७ खेपा झाल्या आणि त्या जहाजाचें निव्वळ वजन ३२½ कोटि टन भरलें. हा आंकडा १९३५ च्या मानानें अत्यंत अल्प प्रमाणात कमी आहे कालव्यामधून गेलेल्या मालाचें वजन २९½ कोटि टन भरलें. आणि १९३५ च्या मानानें तें ३ टक्के कमी झालें.

### जी आय. पी. रेल्वेच्या हद्दींत भिकाऱ्यांचा सुळसुळाट

मुंबई सबर्बन ( उपनगर ) मधील लोकल आगगाड्यांत बिनतिकिटानें जाणाऱ्या भिकाऱ्याचा उतारूंस फार त्रास होतो. ३१ मार्च, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी जी. आय. पी. रेल्वेनें अशा १,००९ भिकाऱ्यास पकडून त्याचेवर खटले भरले.

### ऑस्ट्रेलियासंबंधीं हिंदुस्थानांत प्रचार

ऑस्ट्रेलिया देशासबंधीं प्रचार करण्याकरितां ऑस्ट्रेलियन नॅशनल ट्रॅव्हल असोसिएशनचे प्रतिनिधि, मि. गॉलन, हे हिंदुस्थानात आले आहेत. ऑस्ट्रेलियन सरकार, त्या देशाशीं उतारूंची वहातूक करणाऱ्या आगबोट कंपन्या, तेथील स्थानिक रेल्वेज् व व्यापारी संस्था ह्या सर्वांनीं मिळून सदरहु असोसिएशनची योजना केलेली आहे हिंदी लोकास ऑस्ट्रेलियासंबंधीं माहिती मिळावी व त्या देशाशीं त्याचें दळणवळण वाढावें,- अशी मि. गॉलन हे खटपट करणार आहेत

### आंतरराष्ट्रीय साखर करार व हिंदी प्रतिनिधी

हिंदी साखरेच्या निर्गतीस बंदी करणाऱ्या आतरराष्ट्रीय साखर करारावर हिंदुस्थानातर्फे लंडन येथील हिंदी ट्रेड कमिशनर, मि मीक, ह्यानीं मध्यवर्ती कायदेमडळाची समति मिळेल, ह्या अपेक्षेनें सही केली आहे ही समति मिळण्याची सरकारास फारशी आशा वाटत नाहीं, सबब आंतरराष्ट्रीय साखर बोर्डावर आपला प्रतिनिधी न नेमण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे

### रेल्वेजच्या उत्पन्नांतील वाढ टिकाऊ आहे काय ?

हिंदी रेल्वेजना चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यात ( एप्रिल ते जून ) गेल्या सालातील तत्सम मुदतीमधील उत्पन्नापेक्षा १ कोटि ६४ लक्ष रु ज्यास्त मिळकत झाली ह्याच गतीनें उत्पन्न होत गेल्यास, गेल्या वर्षापेक्षां चालू वर्षअखेर ७ कोटि रु. ज्यास्त उत्पन्न होईल. तथापि, पहिल्या तिमाहीमधील उत्पन्नाच्या वाढीचें प्रमुख कारण गव्हाची मोठ्या प्रमाणावरील वहातुक, हें असल्यानें ती थाबल्यानतर वर्षाच्या उत्तरार्धात रेल्वेजच्या उत्पन्नात घट होऊ लागेल, असा अजमास आहे.

### नव्या असेंब्लीची बैठक

मुंबई इलाख्याच्या नव्या राज्यघटनेमधील कनिष्ठ कायदेमडळाचें अधिवेशन पुणें येथें ता. १९ जुलै रोजीं सुरू होईल.

### मुंबई शहरातील मोटारगाड्या

मुंबई शहरामध्यें १९३६ सालीं एकूण ३,९२१ मोटारगाड्या व ४८५ लॉऱ्या नोंदण्यांत आल्या. त्यापैकीं २,७५४ अमेरिकन बनावटीच्या व १,१४६ ब्रिटिश आणि ५०६ युरोपियन बनावटीच्या होत्या. मोटारींच्या अपघाताची संख्या ४,६६२ भरली व त्यांत ११२ माणसें मृत्युमुखीं पडलीं

### मुंबई शहरांतील पोलीस

मुंबई शहरात एकूण ४½ हजार पोलीस आहेत.

### म्हैसूर संस्थानचें उद्योगधंद्यांस सहाय

म्हैसूर संस्थानात बंगलोर शेजारीं रसायनें तयार करणारा एक कारखाना उभारण्यांत येत आहे. कारखान्याचे मंडळीस संस्थानानें ११ एकर जमीन बहाल केली असून दररोज २½ लक्ष गॅलन पाणी वापरण्यास परवानगी दिली आहे. विद्युत्पुरवठाहि स्वस्त दरानें करण्यांत येईल.

### दरमाणशीं २०० रु प्राप्तीवरील कर

ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक पांच इसमापैकीं एक प्राप्तीवरील करास पात्र आहे. अमेरिकेंत हें प्रमाण ३०:१ असें पडतें. प्राप्तीवरील कराचा दर ग्रेट ब्रिटनमध्यें जितका भारी आहे, तितका तो दुसऱ्या कोणत्याहि देशात नाहीं. प्रत्येक इंग्रजास सरासरीनें २०० रुपये इतका हा कर द्यावा लागतो. १९३५-३६ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानातील २७ कोटि लोकाकडून १७ कोटि रु. प्राप्तीवरील कर जमा झाला ह्यावरून हिंदी लोकाचें दारिद्र्य दिसून येतें

### मोटारींस बळी

अमेरिकेमध्यें दरसाल मोटारींचे अपघातामध्यें ३६ हजार लोक मृत्युमुखीं पडतात व १० लक्ष लोकांस इजा होते. १९३६ सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें रस्त्यावरील अपघातात ६½ हजार लोक मरण पावले.

### मुंबई प्रायव्हेट मोटार ड्रायव्हर्स असोसिएशन

वरील संस्था रजिस्टर करण्यांत आली असून तिचे ६०० सभासद झाले आहेत पुणें येथील प्रायव्हेट मोटार ड्रायव्हर्स असोसिएशनहि रजिस्टर करण्यासंबंधीं तजवीज होत आहे असें समजतें.

### १½ कोटि रुपयाच्या विमानाची किंमत ३० हजार रु. झाली

सुप्रसिद्ध जर्मन झेपलिन ( हवाई जहाज ) हिंडेनबुर्ग जळून खाक झालें, त्यातून सापडणाऱ्या धातूंस अजमासें तीस हजार रुपये किंमत येईल हें झेपलिन बाधण्यास १½ कोटि रुपये खर्च आला होता.

### ग्वाल्हेर संस्थानाचा उत्पन्न-खर्च

१९३७-३८ सालीं ग्वाल्हेर संस्थानास २२७½ लक्ष रुपये उत्पन्न होऊन त्यातून २२१½ लक्ष रुपये खर्च होईल आणि ६ लाखाचा वाढावा उरेल, अशी अपेक्षा आहे.

### पोस्टाचीं नवीं तिकिटें

नवे बादशहा सहावे जॉर्ज ह्याचा मुखवटा असलेलीं पोस्टाचीं तिकिटें २३ ऑगस्टपासून विकत मिळूं शकतील.

### तिरुपति देवस्थानाकडे जाण्याकरितां दोरावर चालणारी रेल्वे

मद्रास इलाख्यांतलि तिरुपति हें धार्मिक ठिकाण सुप्रसिद्ध आहे. तिरुपति गावापासून देवस्थानास जाण्यास सात मैलाची चढण चढावी लागते. रात्रीचे वेळीं ह्या रस्त्यावर दिवे लावण्यात येतात तिरुपति देवस्थानाकडे जाण्यास पडणारे श्रम वाचविण्याकरिता दोरावर चालणारी रेल्वे करण्याची आपली योजना पुण्याचे मेसर्स डेकन इंजिनिअर्स लि यांनीं मद्रास सरकारास सादर केली होती, ती मान्य होऊन सदरहु फर्मला रेल्वे करण्यास लायसेन्स मिळालें आहे.

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| २७-६-३७ ते ३-७-३७ | ७९,४९,५८७ |
| ४-७-३७ ते १०-७-३७ | २९,८७,१३२ |
| २१-९-३१ ते १०-७-३७ | २,९९,८५,८५,१२२ |

अनुक्रमणिका


| पृष्ठ | | पृष्ठ | |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३४६ | वरील जकात कमी झाली | |
| २ लँकेशायरची कैफीयत | ३४७ | ५ अर्थशास्त्रदृष्ट्या शेतीचें महत्त्व . | ३५० |
| ३ अखिल भारतीय सहकारी परिषद् ... . | ३४८ | ६ पॅलेस्टाइनची फाळणी | ३५१ |
| ४ स्फुट विचार | ३४८ | ७ चंदनाच्या तेलाचा उद्योगधंदा . | ३५२ |
| अधिकारग्रहणाच्या वादाचा निकाल लागला—तिसरें शतक बहुतेक पुरें झालें—सहकारी बँका आणि त्याजाचे दर–हिंदी स्टोअर्स खातें–वृत्तपत्राच्या कागदा- | | ८ मुंबई इलाख्यातील दारुचा खप | ३५२ |
| | | ९ ३½ टक्क्यांचे सरकारी रोखे .. | ३५३ |
| | | १० सहकारी चळवळ . | ३५४ |
| | | ११ निवडक बाजारभाव . | ३५५ |


# अर्थ

बुधवार, ता १४ जुलै, १९३७

## लँकेशायरची कैफीयत

ग्रेटब्रिटनमध्यें आर्थिक मंदी दूर होऊन चलतीस जोर आला आहे, ह्याचें कारण मुख्यत्वेंकरून देशांतला अंतर्गत व्यापार तेजींत आला आहे, हें होय. शस्त्रास्त्रांचें उत्पादन, आगबोटी व घरें बांधण्याच्या धंद्यास सरकारी प्रोत्साहन, शेती व सामाजिक स्थिति ह्यांमध्यें सुधारणा, इत्यादि बाबतींत योजना आखून त्या सरकारनें पद्धतशीर रीतीनें हातीं घेतल्या असल्यानें राष्ट्रीय उद्योगधंदे व व्यापार ह्यास उत्तेजन मिळालें आहे. तथापि, परदेशांत पक्का माल पाठविण्याच्या व्यापाराची वाढती त्या मानानें झालेली नाहीं आणि परराष्ट्रीय देवघेवीवर विशेष अवलंबून रहाणाऱ्या इंग्लंडसारख्या राष्ट्रास त्या कारणानें प्रचलित चलतीचा अनिश्चितपणा प्रतीत होणें स्वाभाविक आहे. पुढें उपस्थित होणाऱ्या मंदीची छाया दिसण्याचा भास इंग्लंडमध्यें अनेकांस होत आहे ह्याचें कारण तरी हेंच आहे परराष्ट्रीय गिऱ्हाइकी गमावणाऱ्या ब्रिटिश धंद्याचें ठळक उदाहरण द्यावयाचें तर लँकेशायरच्या गिरण्यांकडे बोट दाखविलें असता पुरें होईल लँकेशायरच्या कापडाच्या गिरण्यांची स्थिति गेल्या दहापंधरा वर्षांत बिघडली आहे, ती अजून सावरलेली नाहीं. महायुद्धाच्या पूर्वीच्या भरभराटीच्या काळाशीं तुलना केली असता असें दिसून येतें कीं, ब्रिटिश कापडाची निर्गत ह्या मुदतींत ५०० कोटि वार लांबी इतकी उतरली आहे, म्हणजे ही निर्गतीची घट ७० टक्क्याचे वर झाली आहे १९२४ सालापासून खुद्द ब्रिटनमधली गिऱ्हाइकी सुमारें ३० कोटि वारांनीं वाढली असली तरी ती केवळ दर्यामें खसखस ह्या स्वरूपाची आहे लँकेशायरच्या गिरण्यामधील जुनी यंत्रसामुग्री गेल्या दहा वर्षांत पुष्कळशी काढून टाकण्यात आली आहे. असें असूनहि ह्या धंद्यातली चवथा हिस्सा यंत्रें जरूरीच्या मानानें फाजील असल्याचें आज आढळत आहे.

लँकेशायरच्या ह्या दु:स्थितीस जबाबदार कोण? तेथील कारखानदारांचें ह्या प्रश्नास स्पष्ट व ठराविक उत्तर आहे आणि तें हें कीं, जपानची स्पर्धा व जगातील निरनिराळ्या पेठामध्यें वाढत असलेलें स्थानिक उत्पादन ह्याचे योगानें मँचेस्टरचा माल मागें पडला आहे जपानला आपलें कापड स्वस्त विकावयास कसें परवडतें? त्या देशातले तुलनात्मक मजुरीचे दर लँकेशायरच्या भावानें एक पंचमांशापेक्षाहि कमी आहेत, अशी मँचेस्टरवाल्याची तक्रार आहे हिंदी गिरण्याविरुद्ध त्याचें असें गाऱ्हाणें आहे कीं, औद्योगिक संरक्षणाच्या सरकारी धोरणामुळें येथील कापडाचें उत्पादन गेल्या पंचवीस वर्षांत ११३ कोटि वारापासून ३५५ कोटि वार लांबीपर्यंत चढलें आहे. ह्याच प्रकारचा उत्पादनाचा विस्तार अमेरिका, जर्मनी, झेकोस्लोव्हेकिया, इटली व तुर्कस्तान ह्या देशांमध्यें झालेला आहे. खुद्द इंग्लंडमध्यें सरकारी मदतीनें आर्थिक स्वयपूर्णतेचें धोरण अंगिकारण्यांत येत असता लँकेशायरच्या धंद्यानें, कोणाच्याहि सहायावाचून, जगांतल्या एकूण कापडाच्या व्यापाराचा ३० टक्के व ब्रिटिश गिऱ्हाइकीचा ९० टक्के इतका हिस्सा आपल्या हातीं राखला आहे ह्याचा अभिमान मँचेस्टरवाले बाळगीत आहेत ब्रिटिश साम्राज्यातील देशामध्यें कापडाच्या आयातीचें नियंत्रण होत असल्यानें जपानी मालाच्या व्यापारास पायबंद बसला आहे आणि लँकेशायरच्या कापडास वाव मिळाला आहे तथापि, इतर देशात कापडाच्या गिरण्याचा धंदा वाढत रहाणार हें निर्विवाद असून लँकेशायरच्या कारखानदारांस आपला उत्पादन खर्च कमी करणें प्राप्त आहे. एका काळीं लँकेशायरचा उच्च दर्जा होता, तो आतां तसा उरलेला नाहीं आणि इतर देश आपली यांत्रिक कार्यक्षमता सारखी वाढवीत आहेत तेव्हा, विशिष्ट मर्यादेमध्येंच लँकेशायरचा कापडाचा धंदा चालेल, पूर्ववैभव पुन्हा प्राप्त होण्याची त्यास आशा नाहीं खुल्या व्यापाराचें तत्त्व पूर्वीप्रमाणें आज इंग्लंडमध्यें अमलात नाहीं. ब्रिटिश शेती व इतर धंदे ह्याचें संरक्षण व्हावयाचें तर कापडासारख्या बाहेरच्या गिऱ्हाइकावर अवलंबून असणाऱ्या धंद्याची वाढ मर्यादित होऊ दिल्यावांचून इंग्लंडला गत्यतर नाहीं. स्वत:च्या बाजारपेठा आपल्या कह्यांत ठेवावयाच्या आणि परराष्ट्रीय गिऱ्हाइकी वाढवावयाची ह्या दोन्ही गोष्टी एकदम साधावयाच्या नाहींत, ही गोष्ट ब्रिटिश तज्ज्ञांनीं नीट चौकशी व विचार करून सिद्ध केली आहे. दुसऱ्याचा माल मोठ्या प्रमाणात घेतल्यावाचून आपला स्वत:चा माल त्यास कसा विकणार? हा प्रश्न येथें उपस्थित होतो.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

दि बँक ऑफ इंडिया लि. चे जून अखेर हिशेब पुरे झाले आहेत वर्षाच्या पहिल्या सहामाहीचे व्यवहारात बँकेस १३ लक्ष ६४ हजार रु. नफा झाला, त्यातून इनकम व सुपर टॅक्सकरिता १½ लक्ष रुपयाची तरतूद केली व मागील हिशेबातील ६ लक्ष, ८७ हजार त्यात मिळविले, म्हणजे १९ लक्ष, १ हजार रु नफा रहातो. भागीदारास १० टक्के दरानें कर माफ डिव्हिडंड (५ लक्ष रु) देऊन उरलेले १४ लक्ष १ हजार रुपये पुढील हिशेबात ओढावे, असें बँकेच्या डायरेक्टरांनीं ठरविलें आहे.

बँक ऑफ इंडियाची स्थापना १९०६ सालीं झाली. तिचा प्रत्येक भाग १०० रुपयांचा असून त्यांतील निम्में भांडवल वसूल केलेलें आहे. भागाची संख्या २ लक्ष व भांडवल १ कोटि रुपये आहे बँकेच्या भागाचा बाजारभाव १३५–१४० च्या सुमारास असतो

## अखिल भारतीय सहकारी परिषद्

### मजूर झालेले ठराव

[ अखिल भारतीय सहकारी परिषदेचें चौथें अधिवेशन ता ३ व ४ जुलै रोजीं बंगलोर येथें श्री रामदास पंतलु ह्यांचे अध्यक्षतेखाली भरलें होतें परिषदेंत पास झालेल्या ठरावांचा गोषवारा खाली दिला आहे ]

( १ ) सहकारी सोसायट्यांनीं सरकारी रोख्यात गुंतविलेले आपले रिझर्व्हज् व कांहीं विशिष्ट भांडवल खेळतें रहावें म्हणून त्यांस खरेदी करावे लागणारे रोखे ह्याच्या उत्पन्नावर प्रांतीवरील कर व सुपरटॅक्स ह्यांची आकारणी होऊ नये, अशी कायद्यांत दुरुस्ती करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास विनंति

( २ ) प्रांतिक बँका व सहकारी सोसायट्या ह्यास ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें जे हक्क व ज्या सवलती रिझर्व्ह बँक अ‍ॅक्टानें देण्यात आल्या आहेत, ते हक्क व त्या सवलती संस्थानी हद्दींमधील सस्थांस मिळाव्या, अशी शिफारस.

( ३ ) रिझर्व्ह बँकेनें शेतीसबधीं प्रसिद्ध केलेल्या प्राथमिक रिपोर्टासबधीं असमाधान व प्रांतिक सहकारी बँकामार्फत सहकारी हुंड्याचे तारणावर शेतकऱ्यांस कर्ज मिळावयाच्या व्यवस्थेची ( अ‍ॅक्टाचें १७ वें कलम ) अंमलबजावणी करण्यासबंधी आग्रह

( ४ ) मध्यवर्ती प्रांतिक लँड मॉर्गेज बँकाची घटना समाइक भांडवलाच्या तत्त्वावर करण्यात यावी, ह्या बँकेच्या शेतीविषयक रिपोर्टातील सूचनेस विरोध सहकारी प्रांतिक बँकास पुरेशा ठेवी मिळतात व त्याची घटना पूर्णपणें सहकारी तत्त्वावर असते, सहकारी बँकाचे व सोसायट्यांचे कर्जावरील व्याजाचे दर कमी आहेत ते वाढविण्यात यावेत ही शिफारस परिषदेस अमान्य आहे, जिल्हा बँकाची विभागणी करून त्याच्या लहान लहान बँका कराव्यात ही विचारसरणी परिषदेस कबूल नाहीं, इत्यादि ठराव.

( ५ ) लँड मॉर्गेज बँकांनीं जमीन गहाणाच्या बँकाचे डिबेंचर्सच्या मुद्दलाची व त्यावरील व्याजाची हमी घेतली असल्यास रिझर्व्ह बँकेनें सदरहु डिबेंचर्समध्यें पैसे गुंतवावे व डिबेंचर्सच्या तारणावर पैसे द्यावे, अशी शिफारस.

( ६ ) बँकिंगच्या व्यवहाराचें रिझर्व्ह बँकेमार्फत योग्य नियत्रण व्हावयाचें असल्यास, देशी पद्धतीनें धंदा करणारे श्रॉफ व सावकार रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत येणें जरूर आहे व त्या संबधातील अडचणी विशेषशा मोठ्या नाहींत, असा अभिप्राय.

( ७ ) सर्व सावकारांची नोंद करून त्यास लायसेन्स घेण्यास भाग पाडावें व प्रत्येक व्यवहाराचा तपशील पद्धतशीर लिहावयास त्यांस लावावें, अशी सूचना.

( ८ ) स्त्रियामध्यें सहकारी चळवळीचा प्रसार करावा अशी सहकारी संस्थांस शिफारस

( ९ ) प्रत्येक प्रांतानें व संस्थानानें सहकारी इन्स्टिट्यूटसला सढळ हातानें मदत करावी, रजिस्ट्रारचे जागेवर काम करणारा अधिकारी अनुभवानें व विशेष शिक्षणानें पात्र व लायक असावा, इत्यादि ठराव.

( १० ) इंडियन कोऑपरेटिव्ह रिव्ह्यु, हें मासिक सहकारी इन्स्टिट्यूट्स व सहकारी बँका ह्याच्या संयुक्त पुरस्कारानें चालावें व श्री. पंतलु ह्यानींच त्याचे संपादक म्हणून काम करावें असा ठराव.

## स्फुट विचार

### अधिकारग्रहणाच्या वादाचा निकाल लागला

कायदेमंडळातील बहुसख्याक पक्षानें अधिकार स्वीकार करण्याचें नाकारल्यानें सहा प्रांतांत राजकारणाचा डाव कुजला होता, तो राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळानें अधिकारग्रहणास अनुकूल ठराव मजूर केल्यामुळें आता चालू झाला आहे प्रांतिक स्वायत्ततेचा कारभार नीट चालण्यास आणि लोकहिताचा कार्यक्रम पार पडण्यास कायदेमंडळात बहुमत असलेल्या पक्षानें मत्रिमंडळें स्थापणें अगत्याचें होतें. सहा प्रांतांत ही गोष्ट घडून न आल्यामुळें राज्यकारभाराच्या गाड्यास खीळ बसल्यासारखी झाली होती. हंगामी मंत्रिमंडळें राज्यशकट कसाबसा हाकीत असलीं तरी खऱ्याखुऱ्या प्रधान मडळाची सर त्यास येणें अशक्य होतें. येत्या पंधरवड्यात राष्ट्रीय सभेच्या अनुयायाच्या हातात राज्यकारभाराचीं सूत्रें वरील सहा प्रातामध्यें जातील आणि त्यात नवीन कायदेमंडळाचीं अधिवेशनें भरतील मुंबई इलाख्यात प्रांतिक स्वायत्ततेच्या कारभारास रीतसर प्रारंभ झाला नाहीं आणि नवीन घटनेस अनुसरून निवडलेल्या कायदेमंडळाची बैठक होऊ शकली नाहीं. हंगामी मत्रिमंडळानें आपला कार्यक्रम लोकापुढें मांडून त्यास जनतेची मान्यता मिळवण्याचा प्रयत्न नेटानें केला आहे, आणि गेल्या शनिवारीं व रविवारीं येथें मुद्दाम भरवलेल्या परिषदेंत त्याची चर्चा झाली हें त्या कार्यक्रमाचेंच अंग होय. ह्या इलाख्यात कारभार ह्या मंत्रिमंडळाचे हातीं राहतो का राष्ट्रीय सभेच्या ताब्यात जातो, हें शेवटपर्यंत अनिश्चित राहिल्यानें मुंबई इलाख्यातली परिस्थिति थोडीशी चमत्कारिक झालेली आहे. कायदेमडळातील बहुमताचा काटा राष्ट्रीय सभेच्या बाजूस झुकेल आणि इतर पक्षाच्या शिस्तवार सघटनाचा निश्चित व स्थिर पाठिंबा सध्याच्या कामचलाऊ मंत्रिमंडळास मिळणें कठिण होईल असा रंग आज दिसत आहे घोडामैदान जवळ आहे, निकालास आता फार दिवस लागावयाचे नाहींत.

### तिसरे शतक बहुतेक पुरें झालें !

सुमारें सात वर्षामागें हिंदुस्थानातून सोन्याच्या निर्गतीचा ओघ चालू झाला आणि त्या प्रवाहात अजून खड पडलेला नाहीं सोन्याचा मोह जगात कोणास आवरला आहे ? पाश्चात्य राष्ट्रें सुधारलेलीं समजलीं जातात आणि चलनाचे कामीं त्यांच्या व्यवहारांत नोटा व चेक ह्यांचा सरसहा उपयोग होतो. तरी तेथेंहि सोन्याच्या सग्रहाविषयीं कोण धडपड चालली आहे ! सोन्याचें जागतिक उत्पादन फार झालें, त्यास मर्यादा घालण्याची सूचना दक्षिण आफ्रिकेसारख्या राष्ट्रांस करण्यात यावी असें कोणी म्हणतो तर सोन्याचें चलन पुन्हां चालू करावें म्हणजे सोन्याच्या फाजील पुरवठ्याचा उठाव होईल असें कोणी प्रतिपादतो सोन्याची किंमत इंग्लड, अमेरिका वगैरे प्रमुख राष्ट्रांनीं उतरवून स्थिर करावी अशीहि शिफारस करण्यात आली आहे पण हिंदी सोन्याची निर्गत सारखी चालू असून ती ह्या देशास हितावहच आहे असें मत हिंदुस्थान सरकार व्यक्त करीत आलें आहे. गेल्या सात वर्षातल्या हिंदी सुवर्ण निर्गतीची किंमत ३०० कोटि रुपयांवर येऊन ठेपली आहे आणि चालू आठवड्यांत हें तिसरें शतक पुरें होईल. ही निर्गत म्हणजे हिंदुस्थानच्या कोपऱ्यातला केर गेला असें

म्हणून ह्यासबधात बेफिकीरपणाची वृत्ति कित्येक दाखवीत आहेत आंतरराष्ट्रीय व्यापारी संघाच्या परिषदेनें नुकताच एक ठराव पास करून सुवर्णावर आधारलेली चलनें सर्व देशात पुन्हा चालू व्हावीं असें सुचविलें आहे पण ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारास स्वत.चें असें काहींच धोरण नाहीं आणि ग्रेटब्रिटन ठरवील त्याप्रमाणें त्यास वागावें लागणार. इतर राष्ट्रास स्वत च्या चलनासाठी सुवर्णसचय जर आवश्यक आहे, तर तो हिंदुस्थानास कां नको ? ह्या प्रश्नाचा सरळ विचार व्हावयास पाहिजे

## सहकारी बॅंका आणि व्याजाचे दर

रिझर्व्ह बॅंकेनें जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध केलेल्या आपल्या रिपोर्टांत असा अभिप्राय व्यक्त केला होता कीं, सहकारी बॅंकाचे ठेवींवरचे व कर्जावरचे व्याजाचे दर ह्यामध्यें जरूरी इतकी तफावत नसल्यानें त्या सस्थास मजबुती येत नाहीं, ह्याकरिता त्यानीं प्राथमिक पतपेढ्या व शेतकरी कर्जदार ह्यावर आकारण्यात येणारा व्याजाचा दर चढवावा शेतकऱ्यास द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा बोजा हलका करावा अशी मागणी एका बाजूनें सारखी येत आहे आणि ती पुरवण्याचा कसोशीचा प्रयत्न सहकारी बॅंका करीत आहेत, आणि त्याचबरोबर दुसऱ्या बाजूनें, व्याजाचे दर हलके असल्यानें ते चढवावे, अशी सूचना रिझर्व्ह बॅंकेसारखी अत्यत वजनदार सस्था करीत आहे ह्या चमत्कारिक परिस्थितींतून मार्ग काढण्याचें अवघड कार्य बंगलोर येथें भरलेल्या सहकारी परिषदेस करावें लागलें सहकारी संस्थाचा उद्देश भागीदारास अधिकात अधिक फायदा मिळवून देणें हा नसून शेतकऱ्यास स्वस्तात स्वस्त दरानें भाडवल पुरवणें हा आहे हें तत्त्व परिषदेंत प्रस्थापित करण्यांत आलें निरनिराळ्या क्षेत्रात परिस्थितीप्रमाणें व्याजाचे दर भिन्नभिन्न असणें अपरिहार्य आहे ही गोष्ट नमूद करण्यांत आली. त्याचप्रमाणें, बॅंकेचा मामुली खर्च चालून बुडीत कर्जाबाबत भरपूर तरतूद व्हावी आणि त्या बेतानें कर्जावरील व्याजाचे दर शक्य तितके हलके ठेवावे ह्या सावधगिरीच्या धोरणासहि मान्यता देण्यात आली सदरहु मर्यादेंत, निरनिराळ्या प्रातात व परिस्थितींत व्याजाचे दर शेतकऱ्यासाठी जितके हलके करता येतील तितके करावे असें परिषदेचें मत पडलें ह्या प्रश्नाची पुष्कळच चर्चा झाली आणि परिस्थितीच्या मानानें व सुरक्षिततेच्या दृष्टीनें व्याजाचे दर चढीचे असल्यास हरकत नाहीं असें काहीं प्रतिनिधींनीं प्रतिपादलें आणि रिझर्व्ह बॅंकेच्या अभिप्रायास दुजोरा दिला. तसेंच, बॅंकेचा चालू खर्च आणि भावी नुकसानीबद्दल योग्य तरतूद ह्याचा परामर्श घेतल्यावाचून डोळे मिटून व्याजाचे दर उतरवणें शहाणपणाचें होणार नाहीं आणि बॅंकेच्या धोरणासबधानें निष्कारण गैरसमज मात्र माजेल अशी इशारत कराचीचे मि जमशेद मेथा ह्यानीं दिली, तिचीहि नोंद घेण्यात आली. सदरहु प्रश्नाचा, साधक बाधक मुद्याची भरपूर चर्चा होऊनच निकाल लावण्यात आला हिंदी शेतकऱ्यास आहे हाच व्याजाचा बोजा सहन होत नाहीं, तर त्याचा दर वाढवून सहकारी बॅंका त्याचें हित कसें साधणार ? परतु ह्याचा अर्थ असा नव्हे कीं बुडण्यासारख्या कर्जाची अगाऊ व योग्य तरतूद न करता बॅंकानीं आधळेपणानें व्याजें हलकीं करावीं, कारण, असल्या धोरणाचे दुष्परिणाम शेवटीं सहकारी पेढ्या व त्यांचे शेतकरी सभासद ह्यासच भोगावे लागणार. तेव्हा रिझर्व्ह बॅंकेच्या अभिप्रायातला ग्राह्यांश तेवढा घेऊन त्यापासून उत्पन्न होणारा गैरसमज परिषदेनें दूर केला हें योग्यच झालें. रिझर्व्ह बॅंकेनें आपली भूमिका विशद करून मांडली असती तर प्रस्तुत वाद माजण्याचें कारणच नव्हतें.

## हिंदी स्टोअर्स खातें—स्वदेशीस उत्तेजन

सरकारी खात्यांच्या उपयोगाकरिता लागणाऱ्या विविध जिनसा चागल्या व स्वस्त मिळाव्या म्हणून त्याच्या खरेदीच्या कामासाठी स्टोअर्स डिपार्टमेंट ह्या नावाचें स्वतत्र खातें हिंदुस्थानात स्थापन झालेलें आहे माल कसोशीनें खरेदी करून निरनिराळ्या खात्यांस पुरवण्यासाठी लडनमध्येंहि असेच स्टोअर्स खातें आहे आणि त्याच्यामार्फत खरेदीची व्यवस्था होऊन हिंदुस्थानात माल पुरवला जातो. शक्यतोंवर ह्या देशांतून व देशातल्या देशात येथील स्टोअर्स डिपार्टमेंटनें मालाची खरेदी करावी म्हणजे ह्या व्यवहारातला फायदा निष्कारण बाहेर जाणार नाहीं, आणि हिंदी उद्योगधदे व व्यापार ह्यांस उत्तेजन मिळेल अशा अर्थाच्या सूचना लोकाकडून सरकारास करण्यात आल्या आहेत. तथापि, हिंदुस्थानातील स्टोअर्स खात्याच्या कार्याचा विस्तार, त्यास वाव आहे त्या मानानें, वाढलेला नाहीं आणि येथील व्यापारी सस्था त्या संबधात सरकाराकडे गाऱ्हाणें करीत आल्या आहेत. स्टोअर्सखात्यानें मनांत आणल्यास नमुन्याप्रमाणें चागल्या जातीचा माल येथें कारखानदाराकडून त्यास करवून घेता येणें शक्य असतें आणि विलायतच्या तोडीचे जिन्नस स्थानिक कारखान्यांमध्यें बनवता येतात, असा अनुभव आहे. हिंदुस्थानातील लष्करी खात्यास दरवर्षी साडेतीन लक्ष यार्ड इतकें मच्छरदाणीचें कापड लागतें, परंतु जरूर त्या नमुन्याचा माल येथें मिळूं शकत नाहीं ह्या सबबीवर तें सर्व आजवर बाहेरून आणण्यात येत असे हिंदी स्टोअर्स खात्यानें हा प्रश्न हातीं घेऊन एका कारखानदारास जरूर ती यत्रसामुग्री आणावयास आता सांगितली आहे आणि बिनलष्करी खात्याकरितां जाळीच्या कापडाची आर्डरहि त्यास दिली आहे. लष्करी खात्यानें निदर्शनास आणलेले दोष कारखानदारानें दूर केले आहेत आणि पचवीस हजार यार्डांची लष्करी ऑर्डर प्रयोगाखातर त्यास मिळाली आहे दुसरें उदाहरण हिंदी आरमारास लागणाऱ्या सुऱ्याचें देता येईल. हा माल हिदुस्थानात तयार होणें शक्य न वाटून तो परदेशातून आणण्यात येत असे. ह्या बाबतींतहि स्टोअर्सखात्याच्या खटपटीमुळें आग्रा येथील एका कारखानदारास नमुन्याची ऑर्डर मिळाली आहे. मध्यवर्ती व प्रातिक सरकारी खात्यास लागणारा माल, खटपट झाल्यास, पुष्कळसा हिंदी धदेवाल्यांस पुरवता येऊन हिंदी लोकास काम देता येतें आणि हिंदुस्थानचा पैसा विनाकारण बाहेर जाणें थाबतें ही गोष्ट वरील दोन दाखल्यावरून सिद्ध होत आहे. स्वदेशी मालाचा पुरस्कार चोहोंकडून होईल तरच देशी धद्याचें पाऊल जोरानें पुढें पडू शकेल

## वृत्तपत्रांच्या कागदावरील जकात कमी झाली

वर्तमानपत्रें छापावयाच्या कागदाचे आयातीवर त्याच्या किंमतीच्या मानानें शेकडा २५ टक्के मोलपरिमाण (ॲड-व्हॅलोरम्) जकात होती. सदरहु कागदाच्या किंमती अलीकडे बेसुमार वाढल्या व त्याबरोबर जकातीचा बोजाहि असह्य होऊं लागला मालाच्या मूळ भावातील जबर वाढीमध्यें त्यावरील प्रमाणशीर जकातीची भर पडली व वर्तमानपत्रकारावर आपत्ती कोसळली त्याचा दुष्परिणाम वाचकासहि थोडाफार सोसावा लागला. ह्यासबंधातील अडचण दूर करण्याविषयींची मागणी सरकारास मान्य होऊन, आयात पट्टीचा बोजा कमी करण्याचें त्यानीं ठरविलें आहे. किंमतीचे मानानें पट्टी न आकारता ती ह्यापुढें कागदाचे वजनावर आकारण्यात येणार आहे गुळगुळीत व रफ कागदाच्या रिळास दर हड्रेडवेटास अनुक्रमें १ रु १२ आ. व १ रु. ८ आणे पट्टी द्यावी लागेल उशीरानें कां होईना सरकारनें वर्तमानपत्राच्या धद्याचें गाऱ्हाणें ऐकलें, ही समाधानाची गोष्ट आहे. तथापि, रिळाचा कागद वापरणें मोठा खप असणाऱ्या पत्रासच परवडतें, सुटा कागद वापरणाऱ्या वृत्तपत्रांचीच संख्या फार मोठी आहे. ह्या सुट्या कागदावरील जकातींत फरक करण्यांत आलेला नसल्यानें बहुसख्य वर्तमानपत्रांवरील संकट दूर झालेलें नाहीं.

## अर्थशास्त्रदृष्ट्या शेतीचें महत्त्व

( लेखक.—श्री उद्धव नागेश केसकर, जी डी. सी ए , ऑडिटर, कोऑपरेटिव्ह सोसायटीज, नदुरबार )

ज्या धद्यात अधिकांत अधिक किफायत त्या धद्याकडे लोकांचें अधिकांत अधिक लक्ष, असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे ह्या सिद्धाताची कसोटी शेतीच्या धद्यास लावून पाहिली असतां, अलीकडे खेड्यीं ओस पडून शहरें का वाढत आहेत या प्रश्नाचा उलगडा सहज होतो. शेतीच्या धंद्यांत लाभाचें विशेष आकर्षण नाहीं, ह्या कारणानें शेतीची बरीच अनास्था होत आहे व त्यामुळें शेतीचें उत्पन्नहि घटत चाललें आहे वरवर पहाणारास शेतीसारखा किफायतशीर दुसरा कोणताच धद्दा नाहीं असें वाटतें. कारण धान्याच्या एका दाण्याच्या बदला ओंजळभर दाणे पैदा होतात, इतका जबरदस्त फायदा देणारा दुसरा कोणता धद्दा आहे ? परतु थोडा विचार केला असता असें दिसून येईल कीं, ओंजळभर दाणे एका कणापासून उत्पन्न होण्याकरिता जे परिश्रम करावे लागतात त्यांची किंमत पैदा झालेल्या मालाइतकीच जवळ जवळ होते शेतींत खपणाऱ्या शेतकऱ्याला साल अखेरीस खर्चवेंच वजा जातां केवळ मजुरीपेक्षां अधिक कांहींहि मिळत नाहीं ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे.

दक्षिणेंतील बहुतेक जिल्ह्यात बहुधा चार वर्षांतून एक साल दुष्काळाचें, दोन साधारण व एखादें चांगलें अशी क्रममालिका दृष्टीस पडते त्यांतले त्यांत नगर, सोलापूर, व साताऱ्याचा काहीं भाग यांत तर नेहमींच अवर्षणामुळें पिकांची हेळसांड होते. पिकाची नासाडी न होतां ईश्वरकृपेनें सर्व पीक बऱ्या रीतीनें पदरांत पडलें तरी धारण कशी राहाणार ही गोष्ट शेतकऱ्याच्या स्वाधीनची नसल्यामुळें त्यानें शेतींत केलेल्या श्रमाचा योग्य मोबदला हमखास त्याच्या पदरात पडेलच असें पीक चांगलें येऊन देखील ठासून सागतां येत नाहीं. त्याच्या पदरात त्याच्या श्रमाचा दाम पडणें हें सोडतींत लागणाऱ्या बक्षिसाइतकेंच अनिश्चित असतें या गोष्टीची प्रचीति जे शेतकरी आहेत त्यांना पुरेपूर आलेली आहे सन १९३१ सालच्या जागतिक मंदीपासून शेतकरी वर्गाची स्थिति काय झाली आहे ती त्याचा तोच जाणें ! शेतकऱ्याची स्थिति सुधारण्यासाठी सरकारचे व जनतेच्या पुढाऱ्याचे प्रयत्न चालू आहेत, परंतु स्वतः शेतकऱ्यांचेच डोळे उघडून त्याच्याचकडून संघशक्तीनें आपल्या उद्धाराचे प्रयत्न झाल्याखेरीज त्या प्रयत्नास यश येण्याचें चिन्ह दिसत नाहीं प्रामाणिकपणें कष्ट करून समाजातील निकृष्ट दर्जाच्या राहणीस अनुरूप असें जाडें भरडें अन्न आणि वस्त्र एवढ्या गोष्टींची देखील त्याना ददात पडावी यापरतें आणखी दुर्भाग्य तें कोणतें ? महाराष्ट्रांत सुपीक समजल्या जाणाऱ्या खानदेश जिल्ह्यातील शहादें तालुक्यात ज्याची शेती आहे अशा एका व्यवस्थित वागणाऱ्या व स्वत. मेहनती असलेल्या शेतकऱ्यानें आपल्या शेतीच्या उत्पन्नाचे व खर्चाचे ठेविलेले हिशेब खाली दिले आहेत ते बरेच उद्बोधक होतील.

हे जमाखर्चाचे आंकडे रा. मार्तंड गोविंद कुलकर्णी, काहाटूल, यांचे आहेत त्याची स्वत.ची मालकीची जमीन सुमारें ४५ एकर असून शेतसारा रु ७५ आहे. जमिनीच्या उत्पन्नावर निर्वाह भागत नाहीं म्हणून सदरहु गृहस्थ दुसऱ्याची जमीन नफ्यानें करितात व अशा नफ्यानें केलेल्या जमिनींचें उत्पन्न व खर्च हीं खालील आकड्यात आलीं आहेत. त्या आंकड्यावरून दिसून येईल कीं तेवीस वर्षांचें सरासरी उत्पन्न १३६ रु पडतें म्हणजे दर एकरीं निवळ उत्पन्नाचें प्रमाण ३ रुपये पडतें. हें प्रमाण शेतीच्या धंद्यात चागल्या हुषार, कर्तबगार, मेहनती व लायख इसमाना आकर्षण करणारें नाहीं हें उघड आहे

| सन | एकदर उत्पन्न | एकदर खर्च | नफा | तोटा |
|---|---|---|---|---|
| १९१४–१५ | २५०-१५-३ | ४५०–९–६ | . | १९९-१०-३ |
| १९१५–१६ | ३६५-१० ३ | ४०७–०–० | . | ४१–५–९ |
| १९१६–१७ | ५४७–६–३ | ६०९-१२-० | ... | ६२–५–९ |
| १९१७–१८ | ७२५–५–३ | ६३३-१४-३ | ९१–७–० | . |
| १९१८–१९ | ६४३-१३-९ | ६१७–२–० | २६-११-९ | |
| १९१९–२० | २०९६-१३-९ | ११८३–८–० | ९१३–५–९ | . |
| १९२०–२१ | २१४-१३-० | ६२७–४–६ | : | ४१२–७–६ |
| १९२१–२२ | ७२८-१४-६ | ५१७ १५-६ | २१०-१५-० | ... |
| १९२२–२३ | २६८–१–० | ३६२-१० ९ | . | ९४–९–९ |
| १९२३–२४ | २०७२–३–६ | ७७५–६– | १२९६-१३-० | ... |
| १९२४–२५ | ७५२–८–० | ५७६–७–६ | १७६–०–६ | . |
| १९२५–२६ | १६०–२–६ | ४५१-१४ ३ | | २९१-११ ९ |
| १९२६–२७ | ९४०–२–३ | ५९४–६–९ | ३४५-११-६ | ... |
| १९२७–२८ | १२२२-१२-३ | ८५०-११ ० | ३७२–१–३ | ... |
| १९२८–२९ | ७७५-१५-० | ५६७–४–६ | २०८-१०-६ | ... |
| १९२९–३० | ११०९-१३-० | ८७९–६–३ | २३०–६–९ | . |
| १९३०–३१ | ४४३–६–९ | ५३९–०–० | .. | ९५–९–३ |
| १९३१–३२ | ४४२–४–६ | ४९३-१३-० | ... | ५१–८–६ |
| १९३२–३३ | ५६०-१२-९ | ६४४–९–० | ... | ८३-१२-३ |
| १९३३–३४ | ६५२–६–३ | ५९२–३–६ | ६०–२–९ | ... |
| १९३४–३५ | ७६८–४–३ | ४९९–५–६ | २६८-१४-९ | ... |
| १९३५–३६ | ६१९-१२-३ | ७६६–५–० | . | १४६–८–९ |
| १९३६–३७ | १५३९ १५-० | १०२३–५–० | ५१६-१०-० | .. |
| तेवीस वर्षांची एकूण | १७९०२-३-३ | १४७६३-१४-२ | ३१३८–५–० | . |

उत्पन्नाचे प्रमाणात शेतसारा घेण्याची पद्धत सुरू करण्याबाबत पुष्कळाचे प्रयत्न चालू आहेत व अशी पद्धत सुरू झाल्यास आपत्तीचे काळांत शेतकऱ्यास पुष्कळच मदत होईल यात बिलकुल शंका नाहीं. तोंपावेतों आपल्या आवाक्यांत जे मार्ग आहेत त्याचें अवलबन शेतकऱ्यानें करीत राहिलें पाहिजे. शेती फिफायतशीर होण्यासाठी तिजवर होणाऱ्या खर्चांत काटकसर केली पाहिजे व तो खर्च शक्य तितका खाली आणिला पाहिजे व उत्पन्न शक्य तेवढें वाढवून आलेल्या मालाची जास्तींत जास्त किफायतशीर रीतीने विक्री केली पाहिजे. ह्या दोन्ही गोष्टी सघशक्तीनें जितक्या सहज साध्य आहेत तितक्या दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें साध्य होणाऱ्या नाहींत. पश्चिम खानदेश जिल्ह्यात निवडक बीं बियाण्याची घाऊक खरेदी करून शेतकऱ्याना हगामाचे पूर्वी तें पुरविण्याची व त्यांच्या मालाची किफायतशीर रीतीनें विक्री करण्याची सोय सहकारी खरेदी विक्री संघामार्फत करण्यात आली आहे. त्या योजनेचा भरपूर फायदा घेतला पाहिजे. प्रत्येक तालुकानिहाय शेती सुधारणा मंडळें ( तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स ) आहेत त्याचे सल्ल्यानें पिकावर पडणाऱ्या रोगराईचें निवारण करणें, सुधारलेलीं उपकरणें वापरणें,उत्तम खतें वापरणें,जमिनींची मेहनत व मशागत करणें, ताली घालणें वगैरे कामें झालीं पाहिजेत. शेतीच्या उत्प-

ह्याचे व खर्चाचे हिशेब ठोकळ मानानें का होईना ठेविले पाहिजेत व वेळोवेळीं प्रसिद्ध केले पाहिजेत प्रत्येक तालुकानिहाय शेतकऱ्याचे हितसरक्षक सघ काढिले पाहिजेत व त्यांचे मार्फतीनें आपल्या अडचणींची दाद लावून घेतली पाहिजे व दुष्काळा सारख्या प्रसगीं सकटातन पार पडण्यासारखी योजना घडवून आणिली पाहिजे. अर्थात् ह्या गोष्टी करण्यास शिक्षणाची आवश्यकता आहे. पण अशा रीतीनें सर्व बाजूंनीं नेटानें प्रयत्न झाल्याखेरीज 'शेती' ह्या धंयाचा दर्जा वाढणार नाहीं व चागले कर्तबगार लोक त्यात पडणार नाहींत. गिरणीतल्या मजुरास, ठाकडे तासणाऱ्या सुतारास, किंवा जोडे तयार करणाऱ्या चाभारास ज्याप्रमाणें आपल्या मेहनतीचा योग्य मोबदला मिळण्याबद्दलची खात्री असते तितपत तरी खात्री शेतीचा धदा करणारास मिळाली पाहिजे, व ही खात्री मिळणें शेतीचा धदा अधिक किफायतशीर होण्यावर सर्वस्वी अवलबून आहे

---

### पॅलेस्टाइनची फाळणी

१९१७सालीं तुर्कीकडून पॅलेस्टाइन हा प्रदेश ब्रिटिशानीं जिकला. महायुद्धाचे समाप्तीनंतर त्याची व्यवस्था पहाण्याचें काम ग्रेट ब्रिटनकडे आलें, म्हणजे पॅलेस्टाइन हें एक ब्रिटिश मॅडेट झालें सदरहु प्रदेश ज्यू लोकाचे दृष्टीनें अत्यत पवित्र असून तें त्याचें मूळ स्थान असल्यानें त्याकडे त्याचा विशेष ओढा असणें स्वाभाविक आहे. दिवसानुदिवस तथील ज्यू वसति वाढत आहे, तिला आळा घालण्यात यावा अशी स्थानिक अरबाची मागणी होती ज्यू लोकांच्या प्रयत्नामुळें पॅलेस्टाइनची पुष्कळच प्रगति झाली असली, तरी अरबास त्याचा वरचष्मा नको होता ह्या असमाधानाचें पर्यवसान अखेर बंडाळीमध्यें झालें ज्यू लोकास पॅलेस्टाइनमध्यें अवसर मिळेल असें त्यांस राष्ट्रसघानें अभिवचन दिलेलें होतें, परंतु भाडवलवाल्या ज्यू लोकापुढें आपला टिकाव लागणार नाहीं, ह्याकरितां वेळींच त्याचें उच्चाटन व्हावें, अशी अरबांची मागणी होती तेथील परिस्थितीची चौकशी करून सूचना करण्याकरितां ब्रिटिश सरकारनें गेल्या वर्षी लॉर्ड पील ह्याचे अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमलें होतें. त्याचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

एकदर परिस्थितीचा विचार करून पॅलेस्टाइनची फाळणी करावी असें त्यांनीं सुचविलें आहे ज्यू व अरब अशीं दोन विभक्त स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करण्यात येऊन त्याचेमध्यें पॅलेस्टाइनचा मुलूख वाटून टाकण्यात यावा, अशी कमिशनची शिफारस आहे दुसरी कोणतीहि व्यवस्था टिकाऊ होणार नाहीं, तेव्हा वरील फाळणीचा प्रयोग करून पहावा, असें तिचें म्हणणें आहे ज्यू अगर अरब ह्यापैकीं कोणाचेच प्रभुत्वाखाली दुसरा गट रहाण्यास तयार होणें शक्य नाहीं. कमिशननें ह्या फाळणीसंबधीं तपशीलवार सूचना केलेल्या नसल्या, तरी सदरहु योजनेच्या दिशा त्यानें दाखवून दिलेल्या आहेत. पॅलेस्टाइनमधील पवित्र स्थळाचें सरक्षण व्हावें व जगांतील ज्या कोणास तीं पवित्र वाटतील, त्यास तेथें अनिर्बंध प्रवेश मिळावा, याकरिता एका नवीन मँडेटची योजना कमिशननें सुचविली आहे पॅलेस्टाइनचें लष्करी केंद्र ह्या दृष्टीनें बरेंच महत्त्व असल्याकारणानें तेथील प्रकरणाविषयीं इतर राष्ट्रांसहि कुतूहल वाटत आहे. ज्यू व अरब ह्यांच्या विभक्तीकरणामुळें पॅलेस्टाइनमध्यें कायमची शांतता होण्यास सहाय होतें किंवा नाहीं हें लवकरच समजेल.

इनकम-टॅक्स कायदा वरचेवर बदलत आहे तरी इनकम-टॅक्स भरण्यात कायदेशीर रीत्या बचत करण्यासाठीं
बी. एल. ठोसर, पब्लिक अकौंटंट
याचेकडेच आपलें काम सोपवा
पत्ताः—१५५, रविवार पेठ, सोन्यामारुतीसमोर, पुणें
हेड ऑफिस—४९५–९७ काळबा देवी रोड, मुंबई २

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[स्थापना सन १९३५]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात
मॅनेजिंग एजंटस्.

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा
स्वदेशी धद्यांना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वत.च्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २७, किंवा प्रथम ६।८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि..
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई
ब्रँच —लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २

## चंदनाच्या तेलाचा उद्योगधंदा

### म्हैसूर सस्थानांतील कारखाना

म्हैसूर संस्थानात व त्याचे जवळपासच्या मुलुखातील जंगलात चदनाचे वृक्षाची लागवड होते. या झाडाच्या गाभ्यांतील खोडाच्या बारीक धलप्या तापवून त्यापासून निघणारा धूर साठवून त्यापासून चदनी तेल काढतात सन १९१५ पर्यंत म्हैसूर सस्थानांतील चदनाची निर्गत युरोपमधील देशात होत असे व त्याचें तेल काढण्याचा मक्ता केवळ परदेशांतील तेल गाळणाऱ्याऱ्याकडे होता महायुद्ध सुरू झालें आणि एकदम परदेशांतील चंदनाची मागणी थांबली. जगातील एकदर उत्पन्नाच्या सात अष्टमांश चदन एकट्या म्हैसूर सस्थानच्या अधिकारक्षेत्रात आहे उद्योगधद्याच्या प्रगमनशील धोरणानुसार सस्थानानें चदनी तेल तयार करावयाचा कारखाना स्थापन केला. सध्या एकदर पैदा होणाऱ्या सर्व तेलाची व्यवस्था म्हैसूरच्या सरकारी कारखान्शाच्या नियत्रणानें चालते व त्यांतून १,२०,००० पौंड तेलाचें उत्पादन होऊन सरकारास १८ लक्ष रुपये उत्पन्न मिळतें म्हैसूर सस्थानच्या बाहेर जवळपास चदनी तेल तयार करण्याचे अगदी लहान लहान काहीं कारखाने आहेत परंतु म्हैसूर सस्थानच्या कारखान्याच्या मानानें त्यांत होणारी पैदास व तिचे व्यवहार फारच लहान आहेत

म्हैसूर संस्थानचे कारखाने स्थापन झाल्यापासून अत्यत शास्त्रशुद्ध पद्धतीनें आतांपर्यंत एक हजार टनापेक्षा जास्ती तेल पैदा झालेलें आहे चदनी तेलाचे मुख्य उपयोग सुगधी कामात आणि औषधासाठीं होतात. उकळणाऱ्या चंदनी तेलाचें तपमान बरेंच असल्यामुळें सुवासिक साबण व अत्तरें करण्यासाठी चदनी तेलाचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर होतो या तेलाचा उपयोग कित्येक प्रकारच्या पिठास व मल्ईस सुवास देण्याकडे व हातरुमालाचे सुवास करण्यासाठींहि होतो चदनाच्या झाडाच्या खोडापासून वरील पद्धतीनें काढिलेल्या तेलास चदनी तेल असें म्हणतात. अन्य तऱ्हेनें केलेलीं कित्येक तेलें चदनी तेल या नावानें बाजारात आलेलीं आहेत परंतु अशा तेलात खऱ्या अस्सल व उची तेलात असणारे गुणांश मुळीच नसतात, किंवा फार थोडे असतात ज्याच्या योगानें खरें तेल औषधाच्या कामीं येतें त्यात ९०% ते ९५% गुणाश असतात हलक्या तेलात याचा बहुतेक अभाव असतो.

---

### मुबई इलाख्यांतील दारूचा खप

"मुबई इलाख्यातील खपणाऱ्या सर्व देशी दारूचा पुरवठा नाशिक येथील सरकारी डिस्टिलरीमधुन होतो. १९३६–३७ सालीं सुमारें २० लक्ष गॅलन देशी दारू खपली. ही सर्व दारू बाटल्यातून भरली व त्या बाटल्या एकापुढें एक ओळीनें माडल्या, तर त्याची लाबी ६३० मैल भरेल म्हणजे, मुंबई ते आग्रा इतकें लांब अंतर झालें! देशी दारू विकणाऱ्या दुकानाची सख्या मुंबई इलाख्यांत २,००० इतकी भरते गिऱ्हाइकास पडणारा दारूचा भाव सरकारनें निश्चित केलेला नसतो, तो (१) सरकार दुकानदारांस कोणत्या दरानें दारू विकतें, (२) विशिष्ट क्षेत्रात एक्साइज पट्टी काय आहे व (३) दुकानाचा मक्ता लिलावात किती किंमतीस जातो, ह्या तीन गोष्टींवर तो अवलबून असतो. बेकायदा दारू गाळण्याचें एकूण खपाशीं बरेंच मोठें प्रमाण पडत असावें, असा अदाज आहे." वरील माहिती कमिशनर ऑफ एक्साइज, मि नाइट, ह्यांनीं आपल्या एका भाषणात सांगितली.

---


**Ardomix** म्हणजेच आमची सुप्रसिद्ध औषधी "आर्तवदोषारी" होय. एका निष्णात स्त्री रोगचिकित्सकाच्या पाठावरून तयार केलेलें हें दिव्य औषध ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व रोगांवर अप्रतिम गुणकारी ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें अथवा थोडा असणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, जीव गळघळणें, हातापायास कळा लागणें, वगैरे विटाळदोष बरें करण्याचा हमखास गुण आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत इतर बाजारी औषधें याची बरोबरी करू शकत नाहींत अनुभव घेण्यास सोपें जावे म्हणून तूर्त कांहीं दिवस एका बाटलीची किंमत फक्त २ रुपये ठेविली आहे ट ख १२ आणे निराळा गावोगांव भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** (डिपार्टमेंट नं ६)

**३६१ सदाशिव पेठ, पुणें शहर**

एजन्सीज —

मुबई—**यशवंत दत्तात्रय गाडगीळ**, फणसवाडी, मुबई २
धामणगांव—**मे भागवत ब्रदर्स**, धामणगाव, वऱ्हाड
हरदा—**चौथाजी तुळशीराम** आणि सन्स, हरदा, सी पी
खानदेश—**डॉ जी एन महाजन**, मोठें वाघोदे, खानदेश.



**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८३,१०० |
| रिझर्व्ह फड | ४,८१२ |
| इतर फड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,९९३ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,७१६ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,८६,५३६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४२,६२४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज

### ३½ टक्क्यांचे सरकारी रोखे

रोखेबाजातील चढउतार मोजण्याचें प्रमुख साधन ३½ टक्याच्या रोख्याची किंमत हें आहे, असें समजण्यांत येतें. व त्या रोख्यांच्या बाजारभावाचे अनुरोधानें इतर भाव निश्चित होतात. एकोणिसाव्या शतकाचे पूर्वार्धांत ईस्ट इंडिया कंपनीनें वेळोवेळ कर्जे उभारलीं, परंतु त्यावर भारी व्याज द्यावें लागत असे. ग्रेटब्रिटननें कंपनीकडून हिंदुस्थानचा कारभार स्वतःकडे घेतल्यानंतर बरीच शांतता नांदू लागली व ३½ टक्के दरानें कर्ज मिळणें सरकारास शक्य झालें. मुख्यतः १८९४ सालीं जुनीं बरींच कर्जे ३½ टक्यात वर्ग करण्यात आलीं कित्येक कर्जाची रकम नंतर कमीहि केली गेली पहिल्या प्रथम ३½ टक्याचें कर्ज जेव्हां योजिलें गेलें, त्यावेळीं सदरहु कर्जाची रकम १ ऑगस्ट, १९३४ चे आंत परत केली जाणार नाहीं, अशी सरकारनें हमी घेतली होती. ह्यानंतर परतफेड करावयाची असल्यास तीन महिन्याची नोटीस देण्याचें बंधनहि सरकारनें स्वीकारलें. हमीची मुदत केव्हाच भरून गेलेली असल्याकारणानें ३½ टक्याचें कर्ज वरील अट संभाळून केव्हाहि परत करण्यास सरकारास मुभा आहे कर्जाचें कोणत्या वर्षी ३½ टक्यात रूपांतर झालें, हा प्रश्न आतां महत्त्वाचा नाहीं, सर्वच कर्ज परतफेडीस लायक झालेलें आहे इतर कर्जाची फेड केव्हां होणार, हें निश्चित केलेलें असतें व ठराविक तारखेपूर्वी तें परत करतां येत नाहीं व ज्यास्त दिवस ठेवताहि येत नाहीं ३½ टक्के दराच्या रोख्यावरून रोखेबाजाराची नाडी समजते व त्यामध्यें सट्टेबाजीहि पुष्कळ चालते, ह्या कारणानें त्यास प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झालें आहे सदरहु सर्व रोख्यावरील व्याज मिळण्याची तारीख मात्र एकच निश्चित नाहीं कोणत्या कर्जाचें रूपांतर त्यात झालें आहे, ह्यावर व्याजाची तारीख अवलंबून रहाते

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेस ३० जून अखेरच्या सहामाहीमध्यें, मागील सालातील ओढलेली बाकी धरून, एकूण १९ लक्ष, १२ हजार रु. नफा झाला, त्यातून भागीदारास करमाफ ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याकरिता ५ लक्ष, ४ हजारांचा विनियोग करून उरलेले १४ लक्ष, ८ हजार रु. पुढच्या सहामाहीचे हिशेबांत दाखवावे, असें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे.

सेंट्रल बँकेची स्थापना १९११ सालीं झाली. तिच्या ५० रुपयाच्या प्रत्येक भागापैकीं २५ रुपयाचा भरणा झालेला असून भागांची एकूण संख्या ६ लक्ष, ७३ हजार इतकी आहे. बँकेच्या भागाचा बाजारभाव ३३–३४ चे आसपास असतो.

### मराठी सेंटर इन्स्टिटयूट

'मराठी सेंटर' या संस्थेंत बुक–कीपिंग आणि अकौंटन्सी हे विषय शिकविण्याचा वर्ग यंदापासून सुरू करण्यांत येणार आहे सदर वर्गाचा उद्घाटन समारंभ आणि संस्थेच्या सध्याच्या अभिधानाचें '*मराठी केंद्र*' असें *मराठीकरण करण्याचा* समारंभ रविवार ता १८ जुलै, १९३७ रोजीं सायंकाळीं ४॥ वाजतां गोखले स्मारक मंदिरांत प्रो वा. गो काळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं होणार आहे

### अखिल भारतीय सहकारी परिषद

अखिल भारतीय सहकारी परिषदेचें अधिवेशन येत्या वर्षी कराची येथें भरविण्यात येईल आणि स्टँडिंग कमिटीची बैठक इंदूर येथें भरेल


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु (ट. ख निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४

**१२ वर्षे पुण्यांत लोकादरास पात्र झालेले**

**☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆**

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

# सहकारी चळवळ

### प. खानदेश जि. को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट, धुळें

जून महिना हा को-ऑपरेटिव्ह खात्याचा सालअखेरचा महिना असतो. त्यामुळें या महिनाअखेर इन्स्टिटयूटचे सुद्धा सर्व हिशेब एकत्रित करावे लागतात. इन्स्टिटयूटला जिल्ह्यांतील सर्व सोसायट्यांनीं या महिना अखेर आपल्या सर्व वर्गण्या भराव्या लागतात सालाबादप्रमाणें या इन्स्टिटयूटनें वर्गणी जमविण्याचा प्रयत्न केला आहे वर्गणीवसुलीच्या कामात सर्व तालुक्यांमध्यें शिंदखेडे तालुक्याचा पहिला नंबर लागला आहे कारण त्या तालुक्यांतून इंन्स्टिटयूटची जवळ जवळ तीनचतुर्थांश वर्गणी गोळा झाली आहे व याचें कारण म्हणजे तेथील सुपरवायझर्स व बॅंक इन्स्पेक्टर्स यांनीं मनापासून केलेले प्रयत्न, हें होय बाकीच्या तालुक्यातील सुपरवायझर्स व बॅंक इन्स्पेक्टर्स यानींहि वर्गणीच्या कामीं बरीच मदत केली आहे परतु शिंदखेडे तालुक्यांतील उदात्त धोरण व प्रत्यक्ष उदाहरण डोळ्यापुढें ठेवून बाकीचे सुपरवायझर्स व बॅंक इन्स्पेक्टर्स याहीपेक्षा इन्स्टिटयूटशीं पूर्णपणें सहकार्य करून व प्रत्यक्ष मेहनत घेऊन वर्गणी गोळा करण्याचे कामीं मदत करतील अशी आशा प. खा जिल्हा को. इन्स्टिटयूटचे चेअरमन, श्री दामोदरराव गणपतराव पाटील, ह्यानीं व्यक्त केली आहे

---

### खेड व जुन्नर तालुका को सुपरवायझिंग यूनियन लि
### ( खेड, पुणें )

खेड येथील यूनियनचे कार्यक्षेत्रांत पुढील सोसायट्या स्थापन झाल्या असून जून १९३७ मध्यें खाली दर्शविलेल्या त्यांच्या पहिल्या सर्वसाधारण सभा झाल्या—

(अ) जुन्नर तालुका:–१ कुसूर—ता २।६।३७ रोजीं पहिली सर्वसाधारण सभा झाली.

२ खानगांव—ता. ३।६।३७ रोजीं पहिली सर्वसाधारण सभा झाली.

३ आर्वी—ता १७।६।३७ रोजीं पहिली सर्वसाधारण सभा झाली.

( ब ) खेड तालुका:–१ ढोरे भांबुरवाडी–ता ८।६।३७ रोजीं पहिली सर्वसाधारण सभा झाली.

२ मोई–ता. ६-६-३७ रोजीं पहिली सर्वसाधारण सभा झाली.

येणेंप्रमाणें ५ शेतकी सोसायट्यांची नवीन स्थापना झाली आहे.

---

### पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅंक, लि.

## नोटीस

या बॅंकेच्या सन १९३७–३८ सालच्या हिशेबाची तपासणी करण्यासाठी येत्या वार्षिक साधारण सभेनें हिशेब तपासनीसांची नेमणूक करावयाची आहे तरी सदर जागेसाठी ज्यास उमेदवार म्हणून उभे रहावयाचे असेल त्यानीं आपळे अर्ज बॅंकेचे पुणें कचेरींत ता. ३१ जुलै १९३७ पर्यंत दाखल होतील अशा बेतानें पाठवावे. अर्जदार हा बॅंकेचा भागीदार असला पाहिजे उमेदवारानीं अर्जात आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावी.

पुणे शहर
ता. ६ जुलै १९३७

द वि चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City




**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

NEW BUSINESS
Last year
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
*Offices* throughout India & the East

S C. MAJUMDAR,
MANAGER. Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

### निवडक बाजारभाव

#### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९–१० |
| ५% ( १९२९-४४ ) लोन .. ... | १०५—३ |
| ४½% लाब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—४ |
| ४% १९४३ .. .. ... | १०७—० |
| ३½% बिनमुदत ... ... | ९५–१३½ |
| ३½% १९४७–५० .. | १०५—९ |
| २¾% १९४८–५२ ... .. | ९९–१४ |

#### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लाब मुदत ) | १०७–१४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... | १०७—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०७—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) .. | १११—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... .. | १२२—२ |

#### मंडळ्यांचे भाग

बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १४१—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३—४ |
| मुंबई प्रॉ. को. बँक ( ५० रु., ५% डिव्हि ) | ६१—० |
| इंपीरिअल बँक (५०० रु, १२% डिव्हि. ) | १५४५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. चा भाग ३½% डिव्हि. ) | १९८—४ |

## In the Court of the First Class Sub-Judge, at Poona

**Insolvency Petition No 146 of 1936**

In the Matter of : Gabriel Andrews, Christian, aged about 45, Tin maker, residing at 175, Sholapur Bazaar, Camp, Poona.

Applicant-debtor

Pursuant to a petition, dated 27th January 1936 made by the applicant-debtor and on reading it and hearing him it is ordered that the debtor be and the said debtor is hereby adjudged insolvent on condition that he pays in Court Rs 5/- p. m. with effect from July 1937 and he is ordered to apply for discharge within 12 months.

Dated this 28th day of June 1937.

D G Agashe,
F C. Sub-Judge, Poona

### दि बँक ऑफ बरोडा लि०

वरील बँकेस जून १९३७ अखेर संपलेल्या सहामाहींत, मागील वर्षातील ओढलेली बाकी ( ५७ हजार रु. ) धरून, एकूण २ लक्ष २१ हजार रु. नफा झाला. प्राप्तीवरील कर भरलेले १० टक्के डिव्हिडंड वाटण्याकरिता १½ लक्ष रु. खर्चाने व उरलेले १ लक्ष ७१ हजार रुपये पुढील सहामाहींत ओढावे, असें बँकेच्या डायरेक्टरांनीं ठरविलें आहे

बँक ऑफ बरोडा ही संस्था १९०८ सालीं स्थापन झाली. तिच्या १०० रुपयाच्या भागापैकीं ५० रुपयाचा भरणा झालेला आहे भागाची एकूण संख्या ६० हजार आहे. भागाचा बाजारभाव ११२–११५ रुपयाच्या आसपास असतो

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed item rate tenders in B–2 form are invited for the work of "Reconstructing and substantially improving the Baramati Sangvi Road from miles No 0 to 8⅝ (Road Portion only)" estimated to cost Rs 90,000/- approximately.

2 The contract documents, drawings and specification of work can be seen during office hours on any working day, at the office of the undersigned where forms can be obtained on payment of Rs 3/- per form

3 Tenders which should be sealed and endorsed 'Tender for the work noted above" will be issued up to 31st July 1937 and received by the undersigned up to 3 P. M. S. T. on 2nd August 1937 in his office and will be opened on the same date A sum of Rs. 1,000/- should be paid into any Government Treasury or a reliable bank as earnest money and the chalan or draft therefor must accompany the tender, without which no tender can be considered. This will be forfeited in case, after his tender is accepted, the contractor shall (in stated time) refuse to sign and complete the contract documents or to pay the Security Deposit, otherwise it will be refunded

4 The acceptance of the Tender rests with the Superintending Engineer, Deccan Irrigation Circle, who reserves the right to reject all tenders and no reason will be given for the acceptance or the rejection thereof.

5. No alteration in the form of the Tender or in the quantities of the Schedule and no addition in the shape of special stipulations shall be made without the consent of the undersigned and if this is done without authority, the tender may be rejected.

(Sd.) C. G. Kale,
Executive Engineer,
Poona Irrigation Division.

Central Offices,
Poona, 8th July 1937.

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult
# V. G. & Sons
**ELECTRICAL and RADIO ENGINEERS**
AND
**LICENSED ELECTRICAL CONTRACTORS**
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते
भेटा अगर लिहा —
**भाऊ गंगाधर साठे**, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें

**पाळणा** दरसाल हलू नये म्हणून आमचें इच्छा गर्भ
संभव औषध घ्या व संततिनियमन करा.
औषध बद केलें कीं, मुलें होतात महिन्यातून एकदाच घ्यावें
लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट. स. नि
गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी.

# शेअरची विक्री पुनः सुरू झाली
भांडवल तरतें राहून पांच टक्के नफा — २००० महाराष्ट्रीयांना उद्योगधंदा.

" महाराष्ट्रीयांना उद्योगधदा मिळून रोजच्या चहाच्या कपांतील साखर
महाराष्ट्रीयानीं चालविलेल्या साखर-कारखान्याची मिळाली व भांडवलावर
बँकेचें व्याज मिळालें तरी सुद्धा स्वाभिमानी महाराष्ट्रीयाना आनदच होईल

आम्ही खादी वापरतों त्याचें कारण स्वाभिमानच
हा तुमचा शेअरफॉर्म व हा चेक ! "

प्रेफरन्स शेअर रु. १० : : : ऑर्डिनरी शेअर रु. २५
शेअर फॉर्म्स व सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.
**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.**
२५७ बुधवार पेठ, पुणे २

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.
**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.**
पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि
महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता
सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां
आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!
ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या
कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर
चौकशी करून तो कागद घ्या.
८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २१ जुलै, १९३७ अंक २९


## दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,

मॅनेजिंग डायरेक्टर

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay. | 716 Sadashiv Peth, Poona City.

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

## पोरवाल ब्लॅक टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला

मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचें

देशी बनारसी साखरेच्या मिठाईचें दुकान

रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा बर्फी**

आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयांची मिठाई पुरवूं शकूं.

तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

## ★ महिंद्रकर ब्रदर्स ★

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर—१४¾ आणे

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें १ कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलांचीं टेंडरें स्वीकारलीं. त्यांवरील व्याजाचा दर द. द. शे. १४¾ आणे इतका पडला.

### याचकपरिषद

पोलंडमध्यें प्रकृति-स्वास्थ्याकरितां चांगल्या हवेच्या ठिकाणीं जाऊन रहाणाऱ्या लोकापाशीं भिक्षांदेहि करण्याच्या पद्धतीचा विचार करण्यासाठीं शेकडो पिढीजाद याचकांची परिषद अलीकडे भरली होती. आपल्या वसतिगृहांत उतरणाऱ्या गिऱ्हाइकांकडून पैसे जमवून ते भिक्षेकऱ्यांस वांटण्याची त्या गृहांच्या मालकांनीं सुचविलेली योजना पूर्वपरपरेस सोडून असल्याच्या मुद्यावर ती याचक परिषदेंत फेटाळली गेली.

### वहातुक वाढविण्याकरितां लोकांच्या अडचणींचें निराकरण

मोटारींच्या स्पर्धेस तोंड देऊन आपल्या रेल्वेवरील वहातुक वाढविण्याकरिता मद्रास ॲन्ड सदर्न मराठा रेल्वे कपनीचे प्रयत्न चालू आहेत. व्यापाऱ्याच्या व जनतेच्या अडचणी समजून घेण्याकरितां कंपनीनें २४ तज्ञ प्रचारकांची खास नेमणूक केली आहे. वेळापत्रकात सोइस्कर बदल, सोईच्या वेळीं आगगाड्यांची ये-जा, उतारूची सोय, शहरांतल्या शहरांत पार्सलें घेण्याची व देण्याची व्यवस्था, इत्यादि मार्गांनीं कंपनीचे प्रयत्न चालू आहेत.

### मि. रॉकफेलर ह्यांच्या जीवनाचें चित्रीकरण

अमेरिकेंतील सुप्रसिद्ध कोट्याधीश मि. रॉकफेलर हे आपल्या वयाच्या ९० व्या वर्षी नुकतेच मरण पावले. गरिबींत जन्मास येऊन त्यांनीं अगणित पैसा कमावला. मि. रॉकफेलर ह्यांच्या रहस्यमय आयुष्यावर आधारलेले दोन बोलपट दोन वेगवेगळ्या अमेरिकन कपन्या तयार करीत आहेत. ह्या आगामी बोलपटांचीं नांवें निश्चित करून त्यांनीं तीं नोंदूनहि ठेविलीं आहेत.

### विवाहाच्या नोंदणीची सक्ती

अहमदाबाद शहरम्युनिसिपॅलिटीनें आपल्या हद्दीमधील विवाहांच्या नोंदणीची सक्ती करण्याचें ठरविलें आहे. अशिक्षित लोकांस ह्या नियमापासून विनाकारण त्रास पोंहोचूं नये, ह्याबद्दल काळजी घेण्यांत येईल.

### रेल्वेजवरील कामगार

हिंदुस्थानांतील रेलवेजच्या धंद्यात एकूण ७,१२,३६४ कामगार काम करीत आहेत.

### नोकरांच्या भत्त्यामधील विषमता

पब्लिक वर्क्स खात्यामधील लाचलुचपतीच्या प्रकारासबंधीं चौकशी करण्याकरिता सिंध प्रातानें एक कमिटी नेमली आहे, तिचें कामकाज चालू झालें आहे. अधिकारीवर्गाच्या भत्त्याविषयीं चर्चा चालू असतां, अधिकारी लोक फिरतीचें काम असो अगर नसो दरमहा १९० रु भत्ता घेतात, पट्टेवाल्यांस रोजीं तीन आणे मिळतात व कारकुनास काहींच मिळत नाहीं, असें कमिटीस आढळून आलें !

### मुंबई इलाख्याच्या गेल्या वर्षाच्या हिशेबांत ३० लाखांचा वाढावा

मुंबई इलाख्याच्या १९३६–३७ च्या हिशेबांत ११ लक्ष रु. वाढावा राहील, अशी अपेक्षा होती. परंतु हा आकडा ३० लाखांवर जाईल, असा आतां अंदाज आहे.

### कॉमन्स सभेच्या सभासदांस ज्यास्त भत्ता कां हवा !

ग्रेटब्रिटनमधील कॉमन्स सभेचे सभासद सभेचें काम चालू असतांना खाणें पिणें करतात, त्यास प्रत्येकीं दरसाल सरासरीनें ७०० ते १४०० रु. खर्च येतो. तेथील चहाच्या दुकानामधील सर्व वाढप्यास मिळून बक्षिसाच्या ( टिप्स ) रूपानें त्याचेकडून ४० ते ५० हजार रु. मिळतात.

### आग्रा किल्ल्यासबधीं ऐतिहासिक माहिती

आग्रा येथील किल्ल्यासबंधीं तत्कालीन कागदपत्राचे आधारें ऐतिहासिक माहिती देणारें एक गाइड पुस्तक सरकारच्या आर्किऑलॉजिकल खात्यानें तयार केलें आहे. किल्ल्यावरील कोरीव लेखांचें भाषांतरहि त्यात देण्यांत आलें आहे.

### चीनमध्यें रिझर्व्ह बँकेची स्थापना

चीनमध्यें मध्यवर्ती रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेसंबंधांतील पूर्वतयारी पुरी झाली आहे. भांडवलापैकी शेकडा ४० इतकें भांडवल सरकार घालणार असून शेकडा ३० भाग चिनी बँका घेतील व उरलेलें भांडवल नागरिकास घालतां येईल.

### पोस्ट खात्याचें उत्पन्न वाढत आहे

१९३७–३८ च्या पहिल्या तिमाहींत हिंदी पोस्ट खात्यास गेल्या वर्षांतील तत्सम मुदतीमधील उत्पन्नापेक्षां १७½ लक्ष रुपये ज्यास्त उत्पन्न मिळालें.

### बीर दारूच्या निर्गतींत ग्रेटब्रिटनचा पहिला नंबर

बीर दारूची निर्गत करणाऱ्या सर्व देशांत ग्रेटब्रिटनचा पहिला नंबर लागतो. जर्मनी व जपान हे देश खालोखाल येतात. १९३६–३७ सालीं ग्रेटब्रिटननें ८५ लक्ष गॅलन बीर परदेशीं पाठविली. जर्मनीनें ५३ लक्ष गॅलनची निर्यात केली व जपानमधून ५२ लक्ष गॅलन बीर परदेशांत रवाना झाली. जर्मनीचें ह्या धंद्यांतील स्थान वर वर जात आहे.

### पोष्टाच्या तिकिटांवरील राजा–राणीचे मुखवटे

राज्यारोहणाच्या वेळीं काढलेल्या ग्रेटब्रिटनच्या पोस्टाच्या तिकिटांवर राजाचा मुखवटा डाव्या बाजूस असून राणीचा उजव्या बाजूस आहे. ब्रिटिश साम्राज्यातील इतर देशांमधील तिकिटांत ह्या जागांची अदलाबदल झालेली आहे. राष्ट्रीय समारंभाचे वेळीं राणी राजाचे डाव्या बाजूस असते, म्हणून तिकिटांवरहि राणीचा मुखवटा राजाचे डाव्या बाजूस असावा, अशी योजना मुद्दाम करण्यांत आलेली आहे. साम्राज्यातर्गत इतर देशांनीं आपलीं तिकिटें आधीच काढून टाकलीं होती, म्हणून त्याचे तिकिटावर राजा–राणीच्या जागा ह्याप्रमाणें नाहींत. ग्रेटब्रिटनच्या पोस्टल तिकिटावर राजा व राणी ह्या दोघांचेहि मुखवटे छापले असण्याचा प्रस्तुत हा पहिलाच प्रसंग आहे.

### मुंबई शहरांत पोलिसांनीं भरलेले खटले

१९३६ सालीं मुबई शहरातील पोलिसानीं एकूण १४०,६३२ लोकावर खटले भरले, ह्यापैकीं १,३०,५९९ लोकास, म्हणजे शेकडा ९३ लोकास शिक्षा झाली.

### मुंबई बदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| ४-७-३७ ते १०-७-३७ | २९,८७,१३२ |
| ११-७-३७ ते १७-७-३७ | ३३,९०,९७५ |
| २१-९-३१ ते १७-७-३७ | ३००,१०,७६,०९७ |

अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... ३५८
२ मुबई इलाख्यांतले लहान उद्योगधंदे ... ... ३५९
३ स्थानिक स्वराज्य - संस्थामधील सापत्तिक अव्यवस्था ... . ३६०
४ स्फुट विचार .. ३६१
राष्ट्रीय सभापक्षाचें प्रांतिक प्रधान मंडळ—लढाऊ विमानाचा वाढता खर्च—३½ कोटीच्या तुटीचे ऐवजीं १¼ कोटीचा वाढावा—मराठी केंद्राचें पुढें पाऊल—इंडियन शुगर सिंडिकेट, लि
५ कॉमनवेल्थ विमाकंपनीची नवी शाखा .. ... ३६२
६ वापरलेल्या मोटारगाड्यांची किंमत कशी वाढेल? ३६३
७ सहकारी चळवळ . . ३६४
८ सरकारचें उत्पन्नात वाढ ३६५
९ यूनियन बँक ऑफ इंडिया लि. . .. ३६५
१० पूना प्रा मो डायव्हर्स असोसिएशन . ३६६
११ निवडक बाजारभाव . ३६७


# अर्थ

बुधवार, ता २१ जुलै, १९३७

## मुंबई इलाख्यांतले लहान उद्योगधंदे

### औद्योगिक खात्याचें कार्य

मराठा चेंबर ऑफ कामर्स अँड इंडस्ट्रीजच्या निमंत्रणावरून ह्या इलाख्याच्या औद्योगिक खात्याचे मुख्य अधिकारी, श्री. अडवाणी, यांनीं सदरहू संस्थेच्या सभासदांस आपल्या कार्याची सांगोपांग माहीती दिली आणि त्यांच्याशीं विचारविनिमय केला ह्याबद्दल त्याचें व चेंबरचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीमध्यें जुन्या उद्योगधंद्यांची सुधारणा आणि नवीन व्यवसायांची स्थापना झाल्यावांचून सामाजिक दुःस्थिति व बेकारी यांचें निवारण होणें अशक्य आहे सध्याचा काळ यांत्रिक आणि शास्त्रीय सुधारणेचा असून, स्पर्धा तीव्र स्वरुपांत चोहोंकडे भासत आहे. अशा स्थितींत देशी उद्योगधंद्यांस उत्तेजन आणि सहाय देण्याचें कार्य सरकारनें हातीं घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं. जुन्या पद्धतीनें उद्योग करणाऱ्या धंदेवाल्यांस आणि होतकरू तरुणांस नवीन यांत्रिक सामुग्रीची माहिती नसते आणि ती उपलब्ध होण्याची सोयहि नसते. शास्त्रीय शोध करून धंद्यांत प्रगति घडवून आणण्याच्या प्रयत्नांचें नांवहि ह्या परिस्थितींत घेणें अशक्य आहे. ह्या अडचणींतून मार्ग निघावा आणि विशेषतः लहानसहान उद्योगधंद्यास उत्तेजन व सहाय मिळण्याची तरतूद व्हावी ह्या उद्देशानें मुंबई सरकारनें कांहीं वर्षांमागें औद्योगिक खातें स्थापन केलें. त्याचा व्याप व त्यावर केला जाणारा खर्च हीं अत्यंत मर्यादित आहेत. तथापि, खात्याचे डायरेक्टर, श्री. अडवाणी, ह्यांनीं त्यास उपलब्ध असलेल्या साधनाचा उपयोग लोकहिताच्या दृष्टीनें अत्यंत कुशलतेनें चालविला आहे हें स्तुत्य आहे. देशी धंद्याच्या उन्नतिविषयीं कळकळ असलेल्या हिंदी अधिकाऱ्यास मर्यादित कार्यक्रमातहि किती प्रगति करतां येते ह्याची कल्पना त्यांनीं आपल्या खात्याच्या कारभाराचें वृत्त सांगितलें, त्यावरून येण्यासारखी आहे.

पाश्चात्य देशांत मोठमोठाले कारखानेवाले स्वतःचीं शास्त्रीय संशोधनालयें चालवतात आणि त्यांमध्यें उद्योगधंद्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजनांचें संशोधन तज्ज्ञांचें हातून करवण्यात येतें आमचेकडे कापूस व ताग ह्यांच्या गिरण्या आणि पोलाद, सिमेंट व साखर ह्याचे कारखाने ह्यांवाचून मोठाले कारखे धंदे नाहींत. विणकर, कातर्डी रंगविणारे, बागड्या करणारे इत्यादि व्यवसायी लोकांस शास्त्रीय उपकरणें व शोध, ह्यांचा उपयोग करणें अशक्य आहे त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या दूर करणें व त्यास सुधारलेले उद्योगाचे मार्ग सुचविणें हें महत्त्वाचें काम श्री. अडवाणी ह्यांचें खातें करीत आहे कलाबतू व जरतार ह्यांच्या धंद्याची सुधारणा घडवून आणण्याचे कामीं आपण केलेले प्रयत्न यशस्वी झाले असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें, सुधारलेले हातमाग वापरून नव्या, नव्या नमुन्यांचें कापड विणणें, तें रंगवणें व छिटें तयार करणें ह्याबाबतींहि प्रत्यक्ष प्रयोगाचे द्वारें सुधारणा घडवून आणली जात आहे कातडें कमावण्याच्या पूर्वापार चालत आलेल्या कृतींत सुधारणा सुचवून, कमी खर्चीत चांगला माल तयार करण्याचे प्रयोगहि यशस्वी झाले आहेत, कागदी लिबाच्या सालीमधून अत्तर काढून तें परदेशीं पाठवण्यांत येत आहे आणि ह्या मालाच्या गुणाबद्दल हॉलंडमधील गिऱ्हाइकांकडून प्रशंसा झाली आहे. रत्नागिरीसारख्या समुद्र-किनाऱ्याच्या प्रदेशात मासे धरण्याचा कोळ्यांचा धंदा, अधिक कार्यक्षम व फायदेशीर होण्याचे मार्ग धंदेवाल्याच्या अनुभवास उतरल्यानें, त्यांचा अवलंब वाढत्या प्रमाणात होत आहे. गोड्या पाण्यांतील माशांचा धंदाहि सुधारण्याच्या प्रयोगांस यश आलें असून संपत्तीच्या उत्पादनांत ह्या दिशेनें भर टाकण्याचे उपाय लोक उचलीत आहेत.

बेकारी निवारणाचा प्रश्नहि श्री. अडवाणी ह्यांनीं हातीं घेऊन शिकलेल्या तरुणास कारखान्यात उमेदवारी आणि धंदेशिक्षण मिळेल अशी व्यवस्था धंदेवाल्याच्या सहायानें मुंबई व अहमदाबाद येथें नुकतीच करण्यात आली आहे. पद्धतशीर औद्योगिक शिक्षणाच्या शाळा मोठमोठ्या शहरांत निघून उच्च, बौद्धिक शिक्षणाकडे वहाणारा तरुणांचा प्रवाह व्यापार-उदीमाकडे वळणें जरूर असल्याचें आणि सर्व धंद्यांमध्यें उमेदवार घेण्याची सोय केली जाण्याची आवश्यकता तीव्रतेनें भासत असल्याचें त्यांनीं सांगितलें. पाश्चात्य देशामध्यें फारच थोडे मुलगे व मुली कॉलेजात जातात आणि त्यापैकीं बहुतेक कारखान्यांत व कचेऱ्यात उमेदवारी स्वीकारतात, ही पद्धति त्यांनीं समजावून सांगितली. विश्वविद्यालयीन पदव्याचा हव्यास तिकडे नाहीं आणि पडेल तें शारीरिक काम करून धंद्यामध्यें पोट भरण्याचा उद्योग शिकण्याची तरुण-तरुणींची तयारी असते ह्याविषयींचीं स्वानुभवाचीं उदाहरणें त्यांनीं दिलीं लहानसहान धंद्यांस लागणारें भांडवल पुरवण्याचीहि व्यवस्था श्री. अडवाणी ह्यांच्या खात्यामार्फत सरकारनें केली आहे आणि तिचा फायदा कांहीं लोकांनीं घेतला आहे. प्रांतिक औद्योगिक खात्यावर सरकार अधिक पैसा खर्च करील तर ह्यापेक्षां किती तरी ज्यास्त कामगिरी त्यास करून दाखवितां येईल सरकार, मुलामुलींचे पालक, शिक्षक व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यास श्री. अडवाणी ह्याच्या कार्यावरून पुष्कळ व्यावहारिक बोध घेतां येण्यासारखा आहे

## स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सांपत्तिक अव्यवस्था

इतर प्रांताप्रमाणें मुंबई इलाख्यांतील म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें ह्यांचा कारभार असावा तसा समाधानकारक नसल्याविषयींची तक्रार नेहमीं ऐकूं येते. इतर गोष्टी बाजूस ठेविल्या आणि म्युनिसिपल व लोकल जमाखर्च व आयव्यय ह्यांचा विचार केला तरी त्यात ठळक दोष दिसून येतात. ह्याकडे जनता आणि म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें ह्यांच्या कामाशीं प्रत्यक्ष संबंध येणारे अधिकारी, नोकर व लोकप्रतिनिधी ह्यांचें लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे. स्थानिक कर आणि त्यांच्या उत्पन्नाचा विनियोग ही बाब सार्वजनिकदृष्ट्या जिव्हाळ्याची आहे.

स्थानिक संस्थांच्या सांपत्तिक कारभारात व हिशेबांत आढळणारीं व्यंगें सरकारी हिशेबतपासनीस दरवर्षी त्याचे नजरेस आणीत असतात आणि त्यांच्या सूचनांचा मथितार्थ तपासणीखात्याच्या मुख्याधिकाऱ्यांच्या वार्षिक अहवालांत नमूद केला जातो. नोकरवर्गाच्या पगारावर होणाऱ्या खर्चांत बचत, पाणीपुरवठ्यासारख्या बाबींच्या खर्चाची त्यांप्रीत्यर्थ बसविलेल्या पट्टींतूनच तरतूद होण्याविषयींची व्यवस्था, कर व पट्ट्या ह्यांची वक्तशीर वसुली, नोटिसा व वॉरंटें जरूरीप्रमाणें काढण्याचा शिरस्ता, चांगल्या दरानें माल मिळावा, व कंत्राटें देतांना काटकसर व्हावी ह्याविषयीं दक्षता, कामांची व्यवस्थित आखणी व योजना, शिलकी रकमा योग्य रीतीनें गुंतविण्याची काळजी, इत्यादि संबंधांत सुधारणा होण्याबद्दल शिफारसी व सूचना लोकलफंड्स अकौंट्सच्या एक्झॅमिनरनें गेल्या वर्षी केल्या होत्या. सदरहु अधिकाऱ्याचा १९३५--३६ सालाबाबतचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यामध्यें म्युनिसिपालट्यांच्या गैरशिस्त कारभारासंबंधीं तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. सालोसाल करण्यांत येणाऱ्या असल्या टीकेचा व सूचनांचा नगरपित्यांवर व त्यांच्या सांपत्तिक व्यवस्थेवर विशेष सुपरिणाम घडून आलेला दिसत नाहीं, ही खेदाची गोष्ट होय.

मुंबई इलाख्यांतील म्युनिसिपालट्यांच्या करवसुलीची बाकी १९३५--३६ अखेर २६ लक्ष रुपये आहे. खुद्द सभासदांकडून ९,३०० रुपये येणें आहेत. ऑडिटरच्या शेऱ्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति सर्वत्र आढळून येते. वसूल करावयाच्या पट्ट्याचा तक्ता वर्षाचे सुरवातीस तयार नसल्याचीं अनेक उदाहरणें आढळलीं. म्युनिसिपालिटीचें देणें वेळेवर न दिल्याबद्दल सभासदत्व रद्द करण्याविषयींच्या नियमाची अंमलबजावणी १५ संस्थानीं केली नाहीं करवसुलीची हयगय, करांबाबतचे नियम पाळण्यांत ढिलेपणा व कराच्या दरांमध्यें अनधिकारानें देण्यात येणारी सवलत, ह्या कारणामुळें म्युनिसिपालिट्यांचें बरेंच नुकसान झालें. सर्वांत स्वस्त टेंडर काहींहि कारण न नोंदतां बाजूस सारून भारी दराचें टेंडर स्वीकारल्याचीं कित्येक उदाहरणें दृष्टोत्पत्तीस आलीं. वेळेवर काम पुरें न केल्याबद्दल कंत्राटदाराकडून घ्यावयाचा दंड क्वचितच वसूल करण्यात आला. प्रॉव्हिडंड फंडाचे हिशेब असमाधानकारक असल्याचें व फंडाची रकम व्यवस्थितपणें न गुंतविल्याचीं उदाहरणें पुष्कळ आढळलीं. सातारा शहराच्या चीफ ऑफिसरनें घरपट्टीमध्यें सुचविलेली वाढ, घरामधील खोल्या सुधारल्या व मोठ्या केल्या असताना देखील, स्टँडिंग कमिटीनें नामंजूर केली. सोलापूर शहरात रस्ते रुंद करण्याकरितां वाटेंतील घरें अक्वायर करण्यात आलीं, परंतु त्याबाबत निश्चित योजनेचा पूर्ण अभाव होता. २५६ घरें घेण्याकरिता १,६२,५१३ रुपये खर्चीं पडले परंतु एकहि रस्त्याचें काम पुरें झालें नाहीं. चीफ ऑफिसरनें ठरविलेली किंमत पचार्मी वाढविली नाहीं, असें क्वचितच घडलें. ३१ मार्च, १९३७ रोजीं एका सिनेमाच्या भाडेचिठ्ठीची मुदत संपत होती, परंतु त्यापूर्वींच नवीन भाडेचिठ्ठी करण्यांत आली व ३ हजारांची दुसरी मागणी फेटाळून २½ हजार रुपये सालिना भाड्यानें करार नोंदण्यांत आला. हीं उदाहरणें केवळ नमुन्यादाखल येथें दिलीं आहेत. लोकल फंड्स अकौन्टस एक्झॅमिनरनें बऱ्याच इतर गोष्टींचाहि तपशील आपल्या रिपोर्टांत नमूद केला आहे. लोकलबोर्डें व स्कूलबोर्डें ह्यांचे हिशेब म्युनिसिपालट्यांच्या हिशेबाचे मानानें ज्यास्त समाधानकारक असल्याविषयीं रिपोर्टांत उल्लेख आहे. तथापि, एकंदरीनें पाहता, स्थानिक स्वराज्य संस्थांचा सांपत्तिक कारभार सदोष असून, त्यात सुधारणा घडवून आणणें आवश्यक झालें आहे, ह्यांत संशय नाहीं. सभासदांच्या भीडेस बळी न पडतां स्वतन्त्रपणें व नियमांस अनुसरून आपलीं कामें करण्यास अधिकारी समर्थ झाल्याखेरीज प्रगति होणें कठीण आहे. जोंपर्यंत म्युनिसिपल सभासदांच्या मर्जीप्रमाणें त्यांस वागावें लागतें, तोंपर्यंत ही परिस्थिति अशीच टिकणार. म्युनिसिपल कारभार सुधारण्याचे कामीं दक्ष नागरिकांनीं प्रयत्न केल्यास व हे प्रयत्न चिकाटीनें चालू ठेवल्यास, त्यांस यश येणें शक्य आहे. स्थानिक संस्थाचें सभासदत्व प्रतिष्ठितपणा प्राप्त करून घेण्याचें साधन नव्हे, हें जेव्हां नगरपित्यास समजेल व उमजेल तेव्हांच त्याची कारभारांत अनिष्ट ढवळाढवळ न करतां तो कार्यक्षम बनविण्याकडे प्रवृत्ति वळेल व काम सुनियंत्रित व कायदेशीर चालून शहरांची सुधारणा होईल.

" त्याच्या लायकीच्या मानानें कोणत्याहि समाजाचा राज्यकारभार रहातो " ह्या इंग्रजी म्हणीचें येथें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं. मतदारांनीं आपण निवडलेल्या सभासदांस स्थानिक संस्थाच्या सुराज्याबद्दल जबाबदार धरलें आणि सभासदांत स्वतःच्या जबाबदारीची जाणीव उत्पन्न झाली तरच त्या संस्थांचें लोकहिताचें कार्य चांगलें चालेल. ह्या बाबतींत जनतेस एक प्रकारचें शिक्षणच मिळालें पाहिजे. स्थानिक संस्थाच्या हिशेबावर होणाऱ्या टीकेचा ह्या प्रकारचा उपयोग होईल तर तें इष्ट असून ह्याच दृष्टीनें प्रस्तुत प्रश्नाकडे सर्वांनीं पहाणें आवश्यक आहे.

## झारापकर टेलरिंग कॉलेज, पुणें

### डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजची भेट

वरील सुप्रसिद्ध टेलरिंग कॉलेजास गेल्या आठवड्यात मुंबई इलाख्याचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, मि. पी. बी अडवाणी, ह्यांनीं भेट दिली व संस्थेनें अल्पावधींत केलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केलें.

### सरकारी परीक्षेचा निकाल

झारापकर कॉलेजमधून सरकारी परीक्षेस एकूण ५१ विद्यार्थी बसले होते, ते सर्व पास झाले.

# स्फुट विचार

## राष्ट्रीय सभापक्षाचें प्रांतिक प्रधानमंडळ

मुंबई इलाख्याचा राज्यकारभार तात्पुरता ज्या मंत्रिमंडळाकडे होता त्यानें सूत्रें सोडून दिलीं असून तीं आता विधिमंडळातील सख्याप्रबळ गट ह्या नात्यानें राष्ट्रीय सभेच्या पक्षाचे हातीं गेलीं आहेत. त्याच्या सत्तप्रधानांचें मंत्रिमंडळ स्थापन झाल्याचें प्रसिद्ध झालें असून विधिमंडळाच्या रीतसर कार्यास प्रारंभ झाला आहे नव्या निवडलेल्या विधिमंडळाची सभाच आजपर्यंत भरली नसल्यामुळें जबाबदार प्रांतिक राज्यकारभाराचा गाडा चालूच झालेला नव्हता, तो आता मार्गास लागलेला आहे नवीन प्रधानमंडळाचें पहिलें कार्य चालू वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीचें म्हणजे वस्तुतः सबंद वर्षाचें प्रांतिक अंदाजपत्रक तयार करून विधिमंडळाकडून त्यास मान्यता मिळवणें हें आहे प्रधानमंडळाच्या राजकीय व आर्थिक धोरणावर त्याचें अदाजपत्रक अवलबून रहाणार, हें उघड आहे परंतु ह्या बाबतींतल्या पूर्वतयारीस आवश्यक असलेला वेळ त्यास मिळाला नसल्याकारणानें मामुली उत्पन्नाच्या खर्चांत विशेष महत्वाचे असे फेरफार त्यास एकदम सुचवता यणें कठीण आहे तात्पुरत्या प्रधानमडळानें स्वतःच्या दृष्टीनें योग्य असें अंदाजपत्रक तयार करून जादा खर्च व त्याकरिता जादा उत्पन्नाच्या बाबी सुचविल्या आहेत. ह्या योजनेचा उपयोग नवीन अधिकारारूढ मत्रिमडळ कितांसा करून घेतें आणि स्वतःच्या कोणत्या स्वतंत्र योजना आखतें हें आता लवकरच दिसून येईल.

---

## लढाऊ विमानांचा वाढता खर्च

जगातील सर्व राष्ट्रांचा मिळून होणारा लढाऊ विमानावरचा खर्च सारखा वाढत चालला आहे, ह्यावरून युद्ध व सरक्षण ह्याच्या सदरहु अंगाचें महत्त्व किती अधिकाधिक प्रत्ययास येत आहे याची कल्पना येईल. राष्ट्रसघाच्या विद्यमानें गोळा होणाऱ्या माहितीवरून असें दिसतें कीं, १९३० सालीं लढाऊ तयारी व सामुग्री ह्या प्रीत्यर्थ अखिल जगात सुमारें १,८०० कोटि रुपये खर्ची पडले, त्यापैकीं सुमारें २३० कोटि म्हणजे १३ टक्के विमानावर खर्च झाले होते पुढील सहा वर्षांत एकूण लढाऊ तयारीचा जागतिक वार्षिक खर्च ३,००० कोटि रुपयांवर गेला असून त्यांपैकीं ४००–५०० कोटि रुपये विमानावर खर्च झाले आहेत प्रमुख राष्ट्रें लढाऊ विमानें स्वतःच्या कारखान्यांत तयार करतात, ह्या कारणानें त्यातल्या अनेक उद्योगधंद्यास अलीकडे विलक्षण प्रोत्साहन प्राप्त झालें आहे काहीं वर्षांमागें जागतिक शस्त्रसन्यास परिषद् भरली होती, त्यावेळीं अदाज करण्यात आला होता, त्यावरून १९२९–३० सालीं जगाच्या एकूण लढाऊ खर्चापैकीं २९ टक्के इतकी रकम शस्त्रें, दारूगोळा इत्यादि सामुग्रीपायीं खर्च झाली असें आढळून आलें होतें. ह्यापैकीं निम्मा खर्च लढाऊ विमानांप्रीत्यर्थ झालेला होता १९३६ सालात विमानांचा जागतिक खर्च सुमारें २०० कोटि रुपये झाला असल्याचा अदमास आहे आणि चालू वर्षीं हा आकडा थोडासा वाढलेला दिसेल असा अदाज करण्यात आला आहे. विमानें बनवण्यात अनेक प्रकारचें साहित्य लागतें आणि नाना तऱ्हाचा कच्चा–पक्का माल त्यांत वापरावा लागतो. ह्या सर्व जातींच्या मालास वाढती मागणी उत्पन्न झाली असून तो तयार करणाऱ्या धंदेवाल्याची तात्पुरती चलती असल्यास त्यात आश्चर्य नाहीं.

---

## ३¾ कोटींच्या तुटीचे ऐवजीं १¼ कोटींचा वाढावा

१९३१–३६ सालीं हिंदी रेलवेजच्या हिशेबांत ४ कोटि रुपयांची तूट आली होती १९३६–३७ मध्यें ३¾ कोटि रुपयाची तूट येईल, अशी अपेक्षा होती. तथापि, रेलवेजचें उत्पन्न अदाजापेक्षां वाढलें व मार्च १९३७ अखेर १५ लक्षांचा वाढावा उरेल, अशी आशा गेल्या फेब्रुवारीमध्यें नव्या वर्षाचें अंदाजपत्रक माडतांना सर झाफरुल्लाखान ह्यानीं व्यक्त केली आतां १९३६–३७ चे हिशेब पुरे झाले असून, त्या वर्षातील रेलवेजच्या हिशेबात १ कोटि, २० लक्ष रुपयाचा वाढावा आढळून आला आहे म्हणजे, अपेक्षित ३¾ कोटींच्या तुटीऐवजीं १¼ कोटि शिल्लक उरत आहे ! रेलवेजच्या उत्पन्नातील ही वाढ चालू वर्षाच्या उत्तरार्धांत टिकणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. एप्रिल ते जून १९३७ ह्या तिमाहींत, गेल्या वर्षातील तत्सम तिमाहीमधील उत्पन्नापेक्षा, रेलवेजना १¼ कोटि रुपये जास्त उत्पन्न मिळालें आहे ह्यावरून, रेलवेजची परिस्थिति मद्गतीनें सुधारत आहे असें मानण्यास हरकत नाहीं तथापि, उत्पन्नातली वाढ ह्याच गतीनें पुढें चालू राहील असें म्हणतां येत नाहीं. तसेंच, वेजवुड कमिटीनें आगगाडयाच्या धंद्यासबधानें केलेला रिपोर्ट सर्वस्वी निराशाजनक असल्यानें, रेलवेजच्या उत्पन्नातील वाढीबाबत विशेष उत्साह वाटणें कठीण झालें आहे आगगाड्यांच्या व्यवहाराच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी होऊन, त्यांतून मध्यवर्ती सरकारास थोडीफार प्राप्ती होईल, तरच त्या धद्याची परिस्थिति सुधारण्याचें चिन्ह वरील आकड्यात दिसतें, असें म्हणता येईल. परंतु रेलवेजनीं सरकारच्या मामुली उत्पन्नात भर टाकण्याची कल्पना वेजवुड कमिटीनें अव्यवहार्य व अनिष्ट ठरविली असल्यानें कर देणाऱ्या जनतेच्या दृष्टीनें रेल्वे उत्पन्नात होणारी वाढ फारशी अभिनंदनीय ठरणार नाहीं. रेलवेजचा आतबट्ट्याचा व्यवहार बद होऊन त्याचा बोजा सरकारी तिजोरीवर पडत नाहीं एवढेंच समाधान तिच्यामधून काढतां येईल

---

## " मराठी केंद्रा " चें पुढें पाऊल—प्रो काळे यांच्या हस्तें समारंभ

श्री. थत्ते ह्यानीं टकलेखन आणि लघुलेखन शिकविण्याची सस्था कार्यक्षम रीतीनें चालविली आहे, तिच्या शिक्षणक्रमात जमाखर्च आणि हिशेब ह्या विषयांचा अतर्भाव चालू वर्षापासून करण्यात येत आहे. ह्या उपक्रमाचा सार्वजनिक समारंभ गेल्या रविवारीं गोखले मदिरात प्रो काळे यांच्या हस्तें झाला आणि त्याच प्रसंगीं श्री थत्ते ह्यांच्या सस्थेचें पूर्वीचें " मराठी सेंटर " हें नांव बदलून " मराठी केंद्र " हें शुद्ध मराठी नांव दिल्याचें प्रि. अत्रे याच्या करवीं प्रसिद्ध करण्यात आलें टकलेखन व लघुलेखन हे विषय विद्यार्थ्यांस शिकवण्यात श्री. थत्ते आणि त्याचे सहकारी ह्यानीं अभिनंदनीय यश संपादन केलें असून आता नवीन विषयांचें शिक्षण हातीं घेऊन प्रगतीच्या मार्गांत आणखी पुढें पाऊल टाकलें, हें त्याच्या संस्थेस भूषणावह आहे. संस्थेच्या नावाचें पूर्ण मराठीकरण होण्याचें महत्त्व प्रि अत्रे ह्यानीं आपल्या भाषणात प्रतिपादलें आणि प्रो. काळे ह्यानीं व्यापार-उद्दीमात जमाखर्च व हिशेब ह्याचें महत्त्व किती आहे हें समजाऊन दिलें. हिशेबीपणाचा गुण प्रत्येक व्यक्तींत असणें आवश्यक आहे. त्यातल्या त्यांत व्यापारी, दुकानदार व इतर धंदेवाले ह्यांनी चोख हिशेब ठेवणें अत्यंत अगत्याचें आहे ही गोष्ट प्रो. काळे ह्यानीं

अनेक उदाहरणें देऊन सिद्ध केली. जमाखर्चाची मोडणी आणि हिशेबाच्या विधेचीं मूलतत्त्वें घट्टेवाल्यास नीट समजली पाहिजेत, नाहीं तर आपला उद्योग फायदेशीर चालला आहे किंवा कसें ह्याची कल्पना त्यास येणें अशक्य आहे आणि महाराष्ट्रात व्यापारी शिक्षणाची आवश्यकता तीव्रतेनें भासत असल्यानें सर्वांनीं ह्या उपक्रमास उत्तेजन व सहाय दिलें पाहिजे, असें प्रा. काळे ह्यांनीं सांगितलें.

---

### इंडियन शुगर सिंडिकेट, लि

हिंदुस्थानांतील साखरेचा खप व किंमत ह्याचें नियंत्रण करण्याकरिता वरील कंपनीची स्थापना झाली असून तिच्या व्यवहारांस गेल्या आठवड्यांत प्रारंभ झाला. साखरेच्या एकूण १५० हिंदी कारखान्यांपैकीं ९० कारखाने ह्या सिंडिकेटशीं सहकार्य करीत आहेत साखरेचा भाव स्थिर राहिल्यास त्यामुळें कारखानदार, व्यापारी व शेतकरी, ह्या सर्वांचाच फायदा होईल, अशी अपेक्षा आहे कारखानदारास गुंतविलेल्या भांडवलावर अखंड व्याज मिळेल, व्यापाऱ्यास निर्धास्तपणें साखर साठविता येईल व शेतकऱ्याच्या उसासहि योग्य भाव येईल, अशी अपेक्षा सदरहु योजनेचे मुळाशीं आहे साखरेच्या विक्रीचें काम सिंडिकेट स्वत.कडे घेणार नाहीं, फक्त ती किंमत ठरवून देईल. सिंडिकेटनें ठरविलेल्या दरापेक्षां जास्त दरानें एकाद्या कारखान्यानें साखर विकल्यास दोन दरातील तफावतींत निघणारी रकम सिंडिकेटला मिळेल. कारखान्यांकडून येणाऱ्या रकमा एकत्र केल्या जाऊन त्याची सभासदात वाटणी होईल. यंदाच्या हगामांतील अनुभव पाहून ह्या व्यवस्थेस कायम स्वरूप धावयाचें किंवा नाहीं, हें ठरविण्यात येईल

---

## दि कॉमनवेल्थ विमा कं. लि., पुणें

### अहमदाबाद शाखेचा उद्घाटन समारंभ

कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या अहमदाबाद येथील शाखेचा उद्घाटन समारंभ ता. १० जुलै १९३७ रोजीं श्री. बळवतराय ठाकोर ह्यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला. ह्या शुभप्रसंगीं कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री रा न अभ्यंकर व डायरेक्टर श्री. ह. वि तुळपुळे हे पुण्याहून मुद्दाम गेले होते. प्रारंभीं श्री. चंद्रशेखर त्रिवेदी ह्यांनीं अध्यक्षाच्या निवडणुकीविषयींची सूचना पुढें मांडली व तिला श्री. रमणलाल ठाकोर ह्यांनीं दुजोरा दिला शाखेचे नियोजित मॅनेजर, श्री. लक्ष्मीनारायण दवे, ह्यांनीं कंपनीच्या आतापर्यंतच्या प्रगतीची माहिती सांगितली. श्री पोपटलाल साकळचंद ह्यांनीं उद्घाटनाच्या मुहूर्तावर सुमारें ५० हजाराचें काम दाखल केलें जनतेनें आपला पैसा स्वदेशी कंपन्यातच गुंतवावा, असें श्री नर्मदाशंकर यांनीं सुचविलें कंपनीची कारकीर्द यशस्वी होवो, अशी सदिच्छा श्री हरि शंकर व्यास ह्यांनीं प्रदर्शित केली. श्री हरिभाऊ तुळपुळे यांनीं सर्वांचे आभार मानताना, कंपनीचे व्यवहार कसे सुरक्षित आहेत, ह्याचें वर्णन केलें अध्यक्षांनीं आपल्या भाषणात नियोजित ब्रॅंचमॅनेजरांच्या विम्याचे धंद्यांतील अनुभवाचा उल्लेख केला व कंपनीच्या कामाचा विस्तार व तिची भरभराट होवो, अशी इच्छा प्रदर्शित केली.

---


**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
सजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं, अहमदाबाद

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.**
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ —
दररोज सकाळी १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बॅंक ठेवींवर द सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात
मॅनेजिंग एजंटस्.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**
स्वदेशी धंद्याना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपन्रीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४; किंवा प्रथम ६८८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.
**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,**
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई
ब्रॅंचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

## वापरलेल्या पण सुस्थितीमधील मोटार गाड्यांची किंमत कशी वाढेल ?

### विम्याची योजना

वापरलेल्या ( सेकंड हँड ) मोटार गाड्यांच्या उठावास सहाय करणारी विम्याची एक योजना इंग्लंडमधील लॉइड्स ह्या विमा संस्थेनें आखली आहे दिवसानुदिवस मोटार गाड्यांचा फैलाव ज्यास्त ज्यास्त होत आहे व गाड्यांची किंमत उतरत आहे, परंतु त्या मानानें सेकंड हँड गाड्याहि दुकानदारांकडे मोठ्या प्रमाणावर परत येत आहेत पहिल्या गाडीचे बदली, तिची किंमत कमी धरून, नवी गाडी दुकानदार आपल्या गिऱ्हाइकास देतात. जुनी गाडी विकत घेऊ इच्छिणारा सहाजिकच त्या गाडीचा सुरक्षितपणा व टिकाऊपणा ह्या संबंधानें साशंक असतो व तिच्या दुरुस्तीकरितां विशेष खर्च येईल, अशी त्यास भीति वाटत असते. गाडीच्या खऱ्या परिस्थितीसंबंधीं त्यास माहिती नसते व दुकानदारावर विश्वास ठेवण्यासहि तो तयार नसतो.

वर निर्दिष्ट केलेल्या योजनेनुसार, लॉइड्सनीं नेमलेल्या एका इंजीनियरमार्फत मोटारीची प्रथम तपासणी केली जाते त्यानें गाडी पास केल्यास, दुकानदारास एक सर्टिफिकेट देण्यांत येतें त्या अन्वयें, दुकानदारास सदरहु गाडीमधील यंत्रांत व विजेच्या व्यवस्थेंत बिघाड झाल्यास कंपनीकडून दुरुस्ती करून मिळेल, अशा अभिवचनाचा विमा उतरविण्याचा हक्क प्राप्त होतो व गाडी विकत घेणाऱ्या गिऱ्हाइकाकडेहि हा हक्क वर्ग करतां येतो. सहा महिनेपर्यंतच्या सर्व मोठ्या दुरुस्त्या करण्याची हमी कंपनी घेते मोडलेल्या भागाचे ऐवजीं नवीन भाग बसवून दिला जातो; मोटार गाडी दुरुस्तीचे कारखान्यात वाहून नेण्यास येणारा खर्च व नादुरुस्त मोटारींतील उतारूंस जवळच्या स्टेशनपर्यंत पोचविण्यास लागणारें भाडें हीं सर्व कंपनी सोसते. गाडीच्या किंमतीपेक्षां जास्त रकम खर्चण्यास मात्र कंपनी बांधलेली नसते. कंपनीतर्फे करण्यात येणाऱ्या मोटारीच्या तपासणीकरितां फी आकारण्यात येते परंतु मोटार नापास झाल्यास निम्मी फी परत केली जाते पास केलेल्या मोटारीच्या विम्यास एकजात वार्षिक ५० शिलिंग म्हणजे सुमारें ३५ रु पडतात तपासणीनंतर तीन महिन्यात गाडी विकली गेली नाहीं, तर तिच्या फेरतपासणीकरिता ५ शिलिंग द्यावे लागतात.

विम्याची वरील योजना ग्रेट ब्रिटनमध्यें बरीच लोकप्रिय झाली आहे. तीमुळें, दुकानदार व ग्राहक ह्या सर्वांचीच सोय होऊन, चांगल्या स्थितीमधील वापरलेल्या गाड्यांस किंमतहि योग्य येऊ शकेल ह्या योजनेचा विचार हिंदुस्थानातील होतकरू धंदेवाल्यांनीं अवश्य करावा.

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल. बी.
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणी भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. ( ट स निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,१४,३५० वसूल झालेलें भांडवल १,०७,०३५

सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी

M V GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

# सहकारी चळवळ

## नांदगांव व येवला तालुका ( जि नाशिक ) सहकारी वृत्त

नादगांव येवला तालुका को सुपरवायझिंग यूनिअनची कमिटी मीटिंग ता. ५–७–३७ रोजीं मुद्दाम, येवलें तालुक्यात मुनागडें येथें भरविण्यात आली, त्यावेळीं येवलें तालुक्यातील खालावलेल्या सोसायट्याचा विचारविनिमय करण्यांत आला.

येवलें तालुक्यातील सोसायट्याची स्थिती दिवसेंदिवस खालावत आहे याचें कारण असें कीं या भागात वारंवार दुष्काळाची वर्षानुवर्षें रांग लागलेली आहे -त्यामुळें मेंबराना कर्जाची व व्याजाची फेड वक्तशीर करिता येत नाहीं, इतकेंच नव्हे तर लोकाना आपला वर्षाचा चरितार्थ व शेतीचा जुजबी खर्च भागविणेंहि दु सह होत आहे असें सोसायट्याच्या जमलेल्या मेंबरानीं आपलें मत प्रदर्शित केलें. अशी जरी परिस्थिती असली तरी पण मुळपासूनच मेंबर लोक आपल्या कर्जफेडीची हेळसाड कशा रीतीनें करीत आलें व तो बोजा दिवसेंदिवस कसकसा वाढत गेला व त्याचे परिणाम आतां मेंबराना व बँकेला व सोसायट्याना कसे भोगावे लागत आहेत, याचें स्पष्टीकरण मे. व्ही आर. शिंदे बी ए, जी डी सी ए. ऑडिटरसाहेब को. सो मालेगाव भाग, व मे बी. व्ही. हाळवे सिनीयर इन्स्पेक्टरसाहेब मुं प्रॉ को. बँक मालेगाव शाखा व श्री वामनराव गोविंदराव पाटील प्रेसिडेंट नादगाव यूनिअन यानीं करून मेंबरांची निरनिराळ्या रीतींनें समजूत पटवून दिली व येता हगाम साधला तर आम्हीं वसुलाचा व सोसायट्या सुधारण्याचा शक्य तो प्रयत्न करू असें येवलें तालुक्यातील सोसायट्याचे सभासदानीं आश्वासन दिलें

---

## मालेगांव तालुका ( जि. नाशिक ) सहकारी वृत्त

पाडदळें येथें एका नवीन सोसायटीची स्थापना झाली असून तिची पहिली सभा ता ३-७-१९३७ रोजीं श्री गो. गो. कुळकर्णी ह्यांचे अध्यक्षतेखाली भरविण्यात आली मिळाणें येथील पहिली सभा ता. ५-७-३७ रोजीं झाली. मालेगाव तालुक्यात कांहीं भागांमध्यें पाऊस झाला असून पेरण्या सुरू आहेत सु यूनियनचे कचेरींत ता. ३०-६-३७ रोजीं असि रजिस्ट्रार व डेप्युटी डायरेक्टर ( शेती खातें ) ह्यानीं मालेगाव येथील सर्व सहकारी संस्थांना एकमेकांच्या सहाय्यानें कशीं कामें करता येतील ह्याबाबत चर्चा केली

---

## पजाबमधील सहकाराची प्रगति

पंजाब प्राताचा सहकारी सोसायट्यासबंधींचा ताजा ( १९३४–३५ चा ) अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून तेथें सहकारी चळवळीची प्रगति चागली होत असल्याचें दिसून येतें अहवालाचे वर्षअखेर पजाबांत २२ हजार सोसायट्या चालू होत्या, त्याचे पटावर ७ लक्ष सभासद होते व एकूण खेळतें भाडवल १२ कोटींचे वर होतें प्रांतामधील एकूण ३४ हजार खेडेगांवापैकीं १५ हजार खेड्यात कोणत्याना कोणत्या प्रकारची सोसायटी चालू होती. अहवालाचे सालीं सोसायट्याची संख्या पांचशेंनीं वाढून सभासदांचे यादींत ३० हजाराची भर पडली.

---

## जाधव टेलरिंग कॉलेज पुणें

### गव्हर्मेंट टेलर्स सर्टिफिकेट परीक्षा

१०० टक्के फर्स्ट क्लास रिझल्ट

एच एच. दि छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालीं असलेले येथील जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग अँण्ड कटिंग या संस्थेतील परीक्षा कमिटी ऑफ डायरेक्शन फॉर टेक्निकल एज्युकेशन, बॉबे प्रेसिडेन्सी, तर्फे घेण्यात आली त्याचा निकाल लागून सर्व विद्यार्थी फर्स्ट क्लासमध्यें पास झाले त्यांचीं नांवें.—

१ मिस चोकसी हिरामणी (अहमदाबाद), २ चौधरी खुशाल मुरारी ( पूर्व खानदेश ), ३ मुजुमदार शातावाई ( पुणें ), ४ चद्रात्रे रामचद्र श्रीधर ( प खानदेश ), ५ जोशी दत्तात्रय वासुदेव ( अमरावती ), ६ सोनार हरिश्चंद्र आत्माराम ( नदूरबार ), ७ शहा इंद्रवदन रणछोडदास ( सुरत ), ८ खरे बाळकृष्ण गोविंद ( सोलापूर ), ९ पुराणिक चिंतामण सिताराम ( पुणें ), १० चोपडेकर दशरथ भिकाजी ( रत्नागिरी ), ११ घर्वी चितामण केशव ( पुणें ), १२ भिडे विनायक राजेश्वर ( पुणें ) १३ बापट वामन वासुदेव ( पुणें ) १४ घोलप रघुनाथ गोविंद ( नाशिक ) १५ बुराडे मनोहर विश्वनाथ ( बीड, निजामस्टेट ) १६ उमराणीकर द्वारकानाथ ग ( कोल्हापूर ) १७ चौधरी गोविद बापू ( भुसावळ ) १८ भटनागर गुरमहरचंद ( रोहटक, पंजाब ) १९ जोशी गिरधारीलाल त्रिलोकचंद ( जोधपूर ) २० एम नदेश्वरअप्पा ( म्हैसूर ) २१ चेट्टी के. कृष्णस्वामी ( म्हैसूर ) २२ अफझल हुसेन ( हैद्राबाद डेक्कन ).

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें हेच आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आतंवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारातील इतर औषधें करू शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २. ८. व १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

## मुंबई सरकारचें उत्पन्न कसें वाढवितां येईल?

### प्रांतिक माजी प्रधानमंडळाची योजना

मुंबई इलाख्यांतील हंगामी प्रधान मंडळानें पुण्यामध्यें एक परिषद भरवून तिला आपला कार्यक्रम समजावून सांगितला व त्यासंबंधीं लोकाकडून सूचना मागविल्या. त्यानंतर राजीनामा देण्यापूर्वीं प्रधानमंडळानें आपल्या कार्यक्रमाच्या पूर्ततेकरितां लागणाऱ्या पैशाच्या तरतुदीसंबंधातील योजना समजावून सांगणारें एक पत्रक प्रसिद्ध केलें सदरहु व्यवस्थेमध्यें खालील योजनांचा समावेश होतो.—

(१) सावकारावर कर बसवून प्रत्येक सावकाराकडून सालिना २५ रु. घेतल्यास ५ लक्ष रु. जमतील.

(२) जुगारीवरील कर ४ टक्याचा ६½ टक्के केल्यास उत्पन्न ६ लाखानीं वाढेल.

(३) सध्यां चार आण्यांपर्यंत करमणुकीवरील कर माफ आहे ही माफी दोन आण्यांपर्यंत उतरवून दोन ते चार आण्यांच्या तिकिटावर दोन पैसे कर घेतल्यास त्यापासून २ लाखाची जादा प्राप्ती होईल.

(४) कारखाने व ट्रामवे ह्यास विजेच्या कराची माफी आहे, ती रद्द केल्यास सरकारचें उत्पन्न १५ लाखानीं वाढेल

(५) खरेदी–विक्रीच्या देवघेवींवर कर बसविल्यास त्यापासून १ कोटि रुपये जमा होऊं शकतील.

(६) वर्तमानपत्रातील कोष्टकांत शब्द भरण्याचीं व इतर कोडीं ह्यांवर कर लादला असतां ५ लाखांचें उत्पन्न होईल.

### यूनियन बॅंक ऑफ इंडिया लि०

३१ मार्च, १९३७ अखेर संपलेल्या वर्षीं वरील बॅंकेस २,६५,०४७ रु नफा झाला. प्रत्येक भागास प्राप्तीवरील कर माफ असलेले चार आणे दरानें डिव्हिडंड देण्याचें बॅंकेच्या वार्षिक साधारण सभेंत ठरलें बॅंकेच्या प्रत्येक भागाची सख्या किंमत ५ रुपये आहे एकूण भागाची संख्या ७,९८,००० इतकी आहे.

यूनियन बॅंकेची स्थापना १९१८ सालीं कांहीं मारवाडी व्यापाऱ्यानीं केली व ४ कोटि रुपये भाडवलाचीं आश्वासनें मिळविलीं. तिची व्यवस्था युरोपियन मॅनेजरकडे होती परतु पहिल्या वर्षीतच बॅंकेस मोठी ठोकर बसली व बॅंक बुडणार अशीं चिन्हें दिसूं लागली. कै. सर सोराबजी पोचखानवाला ह्याच्या नेतृत्वाखालीं सेंट्रल बॅंक ऑफ इंडियानें एका योजना आंखून यूनियन बॅंकेचें मॅनेजिंग एजटस ह्या नात्यानें ती काम पाहूं लागली व अशा रीतीनें एका मोठ्या देशी बॅंकेचा बचाव झाला. एका बॅंकेनें दुसऱ्या बॅंकेची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी घेतल्याचें हिंदुस्थानांतील हें पहिलेंच उदाहरण होय. सर सोराबजी हे साहजिकच यूनियनचेहि मॅनेजिंग डायरेक्टर झाले व त्यांच्या नेतृत्वाखालीं बॅंकेची प्रगति होत गेली.

स्थापना १९२० मुंबई सरकारमान्यतेचें, एच एच दि छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील



जाधव टेलरिंग कॉलेज

नवीन वर्ग सुरू झाले जुलैचे आंत नावें नोंदवणारास फीमध्यें सवलत माहिती मागवा

४९७ बुधवार, पुणें.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बॅंक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बॅंक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि पुणें) | १६ अकलूज (जि. सोलापूर |
| २ सातारा („ सातारा) | १७ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | १८ धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | १९ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २० शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी(„ „) | २१ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २२ नदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २३ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २४ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २५ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २६ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २७ सटाणा („ „) |
| १३ भिवंडी („ ठाणें) | २८ कळवण („ „) |
| १४ पालघर („ „) | २९ दोहद („ पचमहाल) |
| १५ कल्याण („ „) | ३० कालोल („ „ |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बॅंकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बॅंक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो

या बॅंकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि पूना प्रायव्हेट मोटार ड्रायव्हर्स असोसिएशन, पुणें.

वरील असोसिएशनची जनरल सभा असोसिएशनचे ऑफिसमध्यें ता ११ जुलै रोजीं रात्रौ ८ वाजता भरली होती सभेस सर्व सभासद, सहानुभूतिदर्शक मिळून ७५-८० लोक हजर होते. सस्थेचे अध्यक्ष यांची निवड व्हावयाची असलेनें बरींच गडबड चालली होती. सस्थेचे अध्यक्ष श्रीयुत अण्णासाहेब भोपटकर एम ए, एलएल बी., वकील याना आयते वेळीं जरूरीचे कामामुळें सभेस येता आलें नाहीं. सदरहु संस्थेचें कार्यकारी मडळ, चेअरमन व सेक्रेटरी यांच्या मुदती खलास झाल्यामुळें नवीन वर्षाकरितां वरील लोकाची निवड व्हावयाची होती. सदर सभेचें अध्यक्षस्थान रा. तुकाराम रामचद्र मेंढके यानीं स्वीकारावें असें रा. भाटे यानीं सुचविलें व रा. बरके यानीं दुजोरा दिला. नतर मेंढके यानीं अध्यक्षस्थान स्वीकारलें प्रथम कार्यकारी मडळ निवडण्याकरिता अध्यक्षानीं सुचविलें त्याप्रमाणें रा. घाटगे व बेहेरे यांच्या याद्या आल्या रा. घाटगे याची यादी पद्धतशीर होती. घाटगे यांची यादी व बेहेरे याची यादी पाहण्याकरितां सभेमध्यें बरीच मागणी आली, परतु त्या याद्या अध्यक्षांनीं वाचून दाखवून मतास टाकताच बहुमतानें रा. घाटगे याची यादी पास झाली, व यादींतील लोक कार्यकारी मडळ म्हणून निवडून आले.:—

| | |
|---|---|
| १ रा. गोविंद पाडुरग बर्वे | ७ कृष्णाजी रामचंद्र कट्टी |
| २ नारायण कृष्ण मेंढेकर | ८ विष्णू गणेश जोशी |
| ३ केशव कृष्ण रत्नपारखी | ९ रुपचद किसन परदेशी |
| ४ भालचद्र रामचद्र खिस्ती | १० शंकर बळवंत कुलकर्णी |
| ५ दत्तात्रय बाळकृष्ण भाटे | ११ हरीभाऊ जाधव |
| ६ भिकाजी महादेव कुलकर्णी | १२ गगाधर नारायण पावगी |

येणेप्रमाणें निवड झाल्यानतर यांतूनच चेअरमन याची निवड व्हावयाची असलेनें चेअरमनचे जागीं रा. गोविंद पांडुरग बर्वे, घाटगे व बकरे यांचीं नावें अनुक्रमें मेंढेकर, पावगी व जोशी यांनीं सुचविलीं व त्याना कट्टी, परदेशी व रत्नपारखी यानीं अनुमोदन दिलें. तिन्ही नावें मतास टाकतां बर्वे यांना ३५ मतें, घाटगे यांना २२ व बकरे यांना २० अशीं मतें पडलीं. बर्वे हे बहुमतानें निवडून आले व त्यांच्याशीं सर्वांनीं हस्तांदोलन केलें. राहाता राहिली निवडणूक सेक्रेटरी याची. सेक्रेटरीचें काम करण्यासाठी रा.मुजुमदार, बेहेरे, मेंढेकर व कुलकर्णी याचीं नावें सुचविलीं गेलीं परतु नावें सुचविताच पहिल्या तीन इसमानीं आपलीं नांवें परत घेतलीं. तसेंच कुलकर्णी यांनीं दुसऱ्या कोणीतरी इसमानें काम करावें अशी विनती केली, परतु कुलकर्णी यांनींच काम करावें अशाबद्दल मतें घेतलीं तों सर्वांनींच हात वर केले असलेनें दत्तात्रय रामचद्र कुलकर्णी हे निवडून आले. इतकें होईपर्यंत ११ वाजले दिवसभर सर्वांनीं समारभाकरितां खटपट केल्यामुळें सर्व लोक कंटाळले होते. इतर कामें होण्याची तशींच राहिलीं. शेवटीं रा. बर्वे ( चेअरमन ) व कुलकर्णी (सेक्रेटरी) यानीं स्वतःस मागील वर्षभर प्रेमानें वागवून व आताहि सर्वांनीं प्रेमानें निवडून दिलेबद्दल सर्वांचे आभार मानले. शेवटीं हारतुरे होऊन चहापार्टीनतर हा गोड समारभ पार पडला.

टीप:—कार्यकारी मडळाची मुदत सहा महिने,आणि चेअरमन व सेक्रेटरी याची मुदत एक वर्षाची असावी, असें ठरलें आहे.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल | .. . रु | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल . | ... रु | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड . | .. रु. | १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाची तीं करावी लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमाची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात

एजंट— टी. आर लालवाणी



## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८३,१०० |
| रिझर्व्ह फड | ४,८१२ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,९९३ |
| सेव्हिंग्ज बॅक ठेवी | ६,७१६ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,८६,५३६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४२,६२४ |

**सोसायटी** जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १२०—० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०५—५ |
| ४½% लाब मुदत ( १९५५–६० ) ... ... | ११७–१० |
| ४% १९४३ ... .. ... ... | १०७—४ |
| ३½% बिनमुदत ... .. .. ... | ९५–१२ |
| ३½% १९४७–५० .. ... ... | १०६—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत) ... | १०८—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) ... ... | १०८—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०८—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | १११—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भाडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४१—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३२–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५४५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२८—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९३५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... | ७७०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १४५–१५ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २७०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | ३५०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% ... ... | १४१६—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% ... ... | १६८०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु. ... ... ... | १७०—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु ... ... | ४८—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु ... ... ... | २८—८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ४ आ ... | ४३—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु बोनस ... | ४९२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% ... ... | १९२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे ( २०० ) १५ रु २ आ. ... | १६०–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. ... ... | ३५१—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ. ६ पै ... | १६५५—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... .. | ३४–१०½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१–१४ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—८ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | १०–१५ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | १०–१० |

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed item rate tenders in B–2 form are invited for the work of "Reconstructing and substantially improving the Baramati Sangvi Road from miles No 0 to 8⅜ (Road Portion only)" estimated to cost Rs 90,000/– approximately.

2 The contract documents, drawings and specification of work can be seen during office hours on any working day, at the office of the undersigned where forms can be obtained on payment of Rs 3/– per form.

3 Tenders which should be sealed and endorsed "Tender for the work noted above" will be issued up to 31st July 1937 and received by the undersigned up to 3 P. M. S T. on 2nd August 1937 in his office and will be opened on the same date. A sum of Rs. 1,000/– should be paid into any Government Treasury or a reliable bank as earnest money and the chalan or draft therefor must accompany the tender, without which no tender can be considered This will be forfeited in case, after his tender is accepted, the contractor shall (in stated time) refuse to sign and complete the contract documents or to pay the Security Deposit, otherwise it will be refunded

4 The acceptance of the Tender rests with the Superintending Engineer, Deccan Irrigation Circle, who reserves the right to reject all tenders and no reason will be given for the acceptance or the rejection thereof.

5. No alteration in the form of the Tender or in the quantities of the Schedule and no addition in the shape of special stipulations shall be made without the consent of the undersigned and if this is done without authority, the tender may be rejected.

(Sd.) C. G. KALE,
Executive Engineer,
Poona Irrigation Division

Central Offices,
Poona, 8th July 1937.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**अर्थशास्त्र**
लेखक.—प्रो. वा गो काळे व प्रो द्. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत तीन रुपये
ह्या ग्रंथात अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

**पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये**

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक-परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरशः विचार केलेला आहे हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल

विक्रीस तयार ] **विक्षिप्तराव** [ दुसरी आवृत्ति

लेखकः—प्रो वा गो काळे

एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे 'विक्षिप्तराव' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळामधून तें करण्यास फार उपयुक्त आहे • **किंमत फक्त १० आणे.**

*For All Medicinal Requisites*

— TRY —

## N. MAHADEV & Co.

**DISPENSING CHEMISTS**

AND

**DRUGGISTS**

City Post Office Corner, POONA 2

पुणे येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामे करणारी

टेलरिंग फर्म

## पाटसकर आणि कंपनी

मॅनेजर -श्री के पाटसकर, D M T O A (London)

४८ निहाल पेठ, पुणे शहर

**सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी**

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील

## दि नागपूर पायोनियर-इन्शुअरन्स कं. लि.

**हेड ऑफिस : : : : नागपूर**

त्रैवार्षिक बोनस
हयातींतील विम्यास ३६ रु.
हयातीनंतरच्या विम्यास ४५ रु.

वार्षिक हप्त्यावर २½ टक्के सूट

विम्याचे पैसे त्वरीत देण्याचें कंपनीचें वैशिष्ट्य

काटकसरीची व्यवस्था व भरभक्कम लाइफ फन्डस

फायदेशीर अटींवर काम करण्यास वजनदार व उत्साही एजंटस पाहिजेत. समक्ष भेटा अगर अर्ज कराः—

ब्रँच मॅनेजर,
साठे बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे

# माधव सोमण ब्रदर्स

भरजरी शालू, लुगडीं वगैरे. मोहक सर्व तऱ्हेचीं पातळें

पावसाळी कोट व छत्र्या

धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक

लक्ष्मी रोड : : : : : पुणें २


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. बा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २८ जुलै, १९३७ अंक ३०

आणखी एक

**प्रगतीचा मोठा टप्पा**

५१ लाखांवरून ६६ लाख

## वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लि., सातारा.

विमा व्यवसायांत विशेष महत्त्वाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या अशा ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी कोणत्यहि जीवन विमा कंपनीस हार जाणार नाहीं. आणि सुप्रसिद्ध विमागणिती श्री. ग. स. मराठे, एम्. ए., ए. आय. ए., (लंडन) म्हणतात त्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया हीं

सर्व विमाकंपन्यांना आदर्श

अशी विमा संस्था आहे.

गेल्या वर्षअखेरचा प्रगतीचा आढावा.

| | | |
|---|---|---|
| एकूण विमा : | रु. | ३,२०,००,०००हून अधिक |
| एकूण शिल्लक : | रु. | ८३,००,०००हून अधिक |
| सन १९३६ मधील उत्पन्न | रु. | १९,३२,८९९ |
| लाईफ फंड व इतर गंगाजळी | रु. | ७७,०५,३७९ |
| सन१९३६मधील नवें काम | रु. | ६६,४०,८३९ |
| एकूण क्लेम्स दिले : | रु. | १७,१०,२०६ |
| त्याप्सचें प्रमाण : | | शेंकडा ४ |

त्रैवार्षिक दर हजारी बोनस

होल लाईफ रु. ७५ व एण्डोमेण्ट रु. ६०

विमा उतरण्याला किंवा एजन्सी घेण्याला हीच कंपनी उत्कृष्ट.

पुणें शाखाः—
बुधवार चौक, पुणें.

मॅनेजर.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.







अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें सरकारमान्य
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितिपत्रक मागवा ]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचें दुकान
रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा वर्फी**
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयांची मिठाई पुरवूं शकूं.
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

# विविध माहिती

### बिस्किटाच्या कारखानदाराची संपत्ति

हटले अँड पामर ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश बिस्किट कंपनीचे एक डायरेक्टर, मि. चार्लस हर्बर्ट पामर, ह्यांनीं आपल्यामागें पावणेदोन कोटि रुपयांची मालमत्ता ठेवली आहे. त्यापैकीं सुमारें पाऊण कोटि रुपये कराच्या स्वरूपात सरकारी तिजोरीस मिळाले आहेत.

### सुरवंटाच्या सुळसुळाट

ग्रेटब्रिटनमध्यें काहीं ठिकाणीं सुरवंटांचा सुळसुळाट झाला असून त्या कोट्यवधि प्राण्यानीं झाडाचीं पानें व कुरणें ह्याचा फडशा उडवला आहे. पक्षी देखील त्यांस खात नाहींत आणि विषारी औषधानेंहि ते मरत नाहींत निसर्गाच्या क्रमानें त्यास सुप्तावस्था प्राप्त होऊन त्याचा उपसर्ग आपोआप बंद पडण्याची लोकांस आशा आहे.

### शिशुसप्ताहास २१ वर्षें पुरीं झालीं

शिशुसप्ताहाच्या उपक्रमास ग्रेटब्रिटनमध्यें सुरवात होऊन २१ वर्षें पुरीं झालीं. म्हणजे ही चळवळ वयात आली आहे! १९३७ सालीं आयुष्याच्या पहिल्या वर्षाचे आतच मरण पावणाऱ्या अर्भकांची संख्या दर हजारीं ९६ होती ती आतां ५९ वर आली आहे. बालसंगोपनाचें राष्ट्रीय महत्त्व, महायुद्धाचे वेळीं तरुण पिढी कापली गेली त्यावेळीं अनुभवास आलें व युद्धोपयोगी प्रजाजन निर्माण करण्याच्या आवश्यकतेमध्यें शिशुसप्ताहाचा जन्म झाला अर्भकांच्या मृत्यूचें प्रमाण आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इत्यादि देशात हजारीं ५० पेक्षाहि कमी आहे, ह्यावरून अद्याप ग्रेटब्रिटनमध्यें बरीच सुधारणा होण्यास वाव असल्याचें स्पष्ट दिसतें

### आगगाड्याचा वाढता वेग

पुणें मुंबई ह्या लोहमार्गावरील डेक्कन क्वीनप्रमाणें, मध्यें विशेष न थांबता त्वरित गतीनें आगगाड्या नेण्याचा प्रयत्न ग्रेटब्रिटन-मध्यें चालला आहे दर तासास सरासरीच्या ८० मैल वेगानें काहीं आगगाड्या अलीकडे जात आहेत. कांहीं अंतरावर त्याचा वेग दर तासास १०० ते ११५ मैल इतका असतो जर्मनींतल्या एका गाडीचा वेग तासास १२५ मैल इतका ह्या मार्गे झालेला आहे, त्याच्याशीं ग्रेटब्रिटनमध्यें स्पर्धा होईल असें म्हणतात.

### अँटलांटिक महासागर ८७ वेळा ओलांडला

सुप्रसिद्ध दानशूर कोट्याधीश, मि. अँन्ड्र्यू कॉर्नेजी हे १९१९ सालीं मरण पावले. त्यांच्या पत्नी अमेरिकेहून नुकत्याच स्कॉट-लंडमध्यें आपल्या घरीं परत आल्या स्कॉटलंड व अमेरिका ह्याचे दरम्यान त्यांची सारखी ये–जा चालू असते आतांपर्यंत त्यांच्या ८७ खेपा पुऱ्या झाल्या आहेत

### सफरचंदाच्या रसाचें पेय

कागदी लिंबें मोसमामध्यें बाजारांत एवढ्या प्रचंड प्रमाणांत येतात कीं, तीं अत्यंत स्वस्त विकावीं लागल्यानें बागवानांस ह्या अमूल्य संपत्तीचा योग्य फायदा मिळत नाहीं. पण त्याचा रस टिकवून आणि सालीमधून तेल काढून लिंबांचा पूर्ण उपयोग करून घेण्याचे प्रयत्न ज्या रीतीनें आपलेकडे चालू आहेत त्याच तऱ्हेचा उपक्रम इंग्लंडमध्यें होणाऱ्या सफरचंदा (अॅपल) च्या पिकाचे बाबतींत करण्यांत आला आहे. जर्मनी व अमेरिका ह्या देशांत सफरचंदाचा रस ह्यापूर्वीच लोकप्रिय झालेला आहे.

### सहारा वाळवंट

आफ्रिका खंडातील सहारा वाळवंटाचें क्षेत्रफळ युरोपएवढें असून त्यातील लोकसंख्या २० लक्ष इतकी आहे. वाळवंटाच्या ३/४ भागाची मालकी फ्रान्सकडे आहे. जमीन अत्यंत सुपीक आहे. परंतु पाणीपुरवठा मात्र नाहीं.

### मिस मेयोच्या अमेरिकेंत बालविवाहास मनाई नाहीं

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपैकीं ९ संस्थानांत मुलास १४ व्या वर्षी व मुलींस १२ व्या वर्षी लग्न करण्यास कायद्याची आडकाठी नाहीं.

### घोड्याचे मांसाचा प्रचार

घोड्याचें मांस ज्यास्त पुष्टिकारक असतें, ह्याकरितां त्याचा प्रसार वाढविण्याची जर्मनीमध्यें खटपट चालू आहे. जर्मनांचे वाडवडील सणावारीं हेंच मांस खात आलेले आहेत, असें सांग-ण्यात येतें. गेल्या वर्षी १½ लक्ष घोड्याची कत्तल करून त्यांच्या मांसाची चटणी करण्यांत आली

### मार्किस मार्कोनीची मालमत्ता

सुप्रसिद्ध इटालियन संशोधक मॉर्कोनी ह्यांनीं आपल्या मागें सुमारें ७ कोटि रुपयाची मालमत्ता ठेवली आहे.

### ऑस्ट्रेलियाच्या राजधानींत वृक्षारोपण

ऑस्ट्रेलियाची राजधानी, कॅनबारा, येथें झाडें लावण्याची एक मोठी योजना अमलात येत आहे. ती पुरी झाली म्हणजे ८० लक्ष झाडें लावण्याच्या संकल्पाची सिद्धि होईल. प्रत्येक झाडा-करितां ३ × ३ × ३ एवढा खड्डा खणला तर त्या सर्व खड्ड्याची लांबी लंडन ते कराची एवढी होईल

### घटस्फोटासंबंधाच्या कायद्यात दुरुस्ती

सुमारें २५ वर्षांपूर्वी एका कमिशननें केलेल्या शिफारसी अम-लांत आणून घटस्फोटाच्या कायद्यात दुरुस्ती करणारें एक बिल मि. हर्बर्ट ह्या गृहस्थानीं ग्रेटब्रिटनच्या कॉमन्स सभेंत आणलें व त्या बिलाचीं सर्व वाचनें पुरीं होऊन आतां फक्त राजेसाहेबांचीं मंजुरी मिळावयाची आहे. परित्याग, जाच व वेड इत्यादि कारणेंहि घटस्फोट मागणारास आता पुढें करतां येतील.

### राणीच्या मुखवट्याचे रुपये

व्हिक्टोरिया राणीच्या छापाचे रुपये सरकारी तिजोरींत भरले गेले असतां ते पुनः आता बाहेर खेळविले जात नाहींत. अशा रीतीनें ह्या नाण्याची संख्या कमी कमी होत आहे. तथापि, हें नाणें कायदेशीर चलन आहे, असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

### साखर टारिफ बोर्डास अल्पोपाहार

हिंदी साखरेच्या धंद्याबाबत चौकशी करण्याकरिता नेमलेल्या टारिफ बोर्डाचें काम पुण्यास चालू आहे. त्या संधीचा फायदा घेऊन मराठा चेंबर ऑफ कॉमर्सनें गोखले हॉलमध्यें त्या बोर्डाचे सभासदास गेल्या सोमवारीं अल्पोपाहार दिला. सर जॉफ्रे ब्रॅकन (अध्यक्ष), श्री फाजल इब्राहिम व डॉ. जैन ह्यास चेंबरचे सभा-सदांची ओळख करून देण्यात आली. त्यानीं उपस्थित मंड-ळींशीं अनौपचारिक रीतीनें चर्चा केली. सर टी विजयराघवा-चार्य हेहि उपस्थित होते.

### मुंबई बंदरातून सोन्याचीसाप्ताहिक निर्गत

| | किं रुपये |
|---|---|
| ११-७-३७ ते १७-७ ३७ | ३३,९०,९७५ |
| १८-७-३७ ते २४-७ ३७ | २७,७५,३७८ |
| २१-९-३१ ते २४ ७ ३७ | ३,००,४७,५१,४७५ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ३७० | ६ खासगी नोकराच्या चाकरीचा करार | ३७५ |
| २ ब्रिटनचा गुप्त सुवर्णनिधि | ३७१ | ७ कनेडियन सरकारचे बेकारीनिवारणाचे प्रयत्न | ३७५ |
| ३ जपानमधील उद्योगधंद्यांच्या भरभराटीचें रहस्य | ३७२ | ८ सहकारी चळवळ | ३७६ |
| ४ मुंबई इलाख्यांतील निवडणुकीचा अहवाल | ३७२ | ९ मार्कोनी | ३७७ |
| ५ स्फुट विचार | ३७३ | १० रेल्वेजचें भांडवल व हुंडणावळ | ३७७ |
| साधी रहाणी–महात्माजींची सूचना—प्रधानाचे पगार–देश तसा वेष–शेजारणीची सरी व आपल्या गळ्यात दोरी–पुण्यातलें औद्योगिक प्रदर्शन—अड्याची प्रतवारी | | ११ कोयनेल | ३७७ |
| | | १२ सार्वजनिक काका | ३७८ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ३७९ |



# अर्थ

बुधवार, ता २८ जुलै, १९३७


## ब्रिटनचा गुप्त सुवर्णनिधि

### चलनसंरक्षणाचा उपाय

सोन्याच्या निर्गतीस प्रारंभ झाल्यापासून हिंदुस्थानांतून गेल्या सहा वर्षात ३०० कोटि रुपये किंमतीचें सोनें बाहेर गेलें आहे. चलनव्यवस्था व हुंडणावळ ह्यांचे दृष्टीनें ह्या सुवर्णनिर्गतींत काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे, परंतु इंग्लंडमध्यें मात्र सोन्याचा राष्ट्रीय संचय वाढविण्याची पद्धतशीर खटपट चालू आहे बँक ऑफ इंग्लंडच्या सुवर्णसंचयात अलीकडे भर टाकण्यांत आली आहे आणि तो आतां सुमारें ४२५ कोटि रुपये किंमतीचा झाला आहे पौंड नोटेच्या मोबदला सोन्याचें नाणें देणें गेलीं सहा वर्षे बंद असलें तरी त्या चलनाचा शेवटचा आधार सोनें हाच आहे परराष्ट्राच्या देण्याघेण्यात बाकी निघाली असता तिची भरपाई अजूनहि सोन्यातच करावी लागते आणि हुंडणावळीचा दर स्थिर राखण्यासाठी सोन्याची देवघेव जरूरीप्रमाणें करणें प्राप्त होतें. पौंड-चलनाचा सोन्याचा आधार कायदेशीर रीतीनें जरी आज बंधनकारक नसला तरी आंतरराष्ट्रीय देवघेवींमध्यें सोनें निर्गत व आयात करूनच आपल्या देण्या-घेण्याचा व्यवहार देशास उलगडावा लागतो इंग्लंडची जी ही स्थिति, तीच अमेरिका, फ्रान्स इत्यादि देशांची असल्यानें त्यास आपली हुंडणावळ व सुवर्णनिधि ह्याविषयीं काळजी घ्यावी लागते,

मध्यवर्ती बँकेचें प्रमुख कार्य राष्ट्रीय चलनाची व परराष्ट्रीय हुंडणावळीची व्यवस्था पहाणें हें असल्यानें त्या संस्थेच्या सुवर्णनिधीवर सबंध देश व त्याचें सरकार हीं अवलंबून रहातात. व्यापाराच्या ओघात दुसऱ्या देशांचें फाजील देणें निघून सोन्याची निर्गत त्याचे भरपाईप्रीत्यर्थ होऊं लागली असतां मध्यवर्ती बँक आपला व्याजाचा दर ( बँकरेट ) वाढवून खेळणाऱ्या पैशास मर्यादा घालीत असे आणि सोन्याच्या बाहेर वाहणाऱ्या प्रवाहास ह्या रीतीनें अडथळा होऊन व्यापाराच्या देवघेवींचा मेळ पुन्हा बसत असे परंतु प्रचलित मंदी चालू झाल्यापासून मध्यवर्ती बँकांनीं योजावयाचे, हुंडणावळीच्या संरक्षणाचे हे उपाय अपुरे पडूं लागले हुंडणावळीच्या दरांत विलक्षण हेलकावे बसूं लागले आणि मध्यवर्ती बँकांतले सुवर्णनिधि अपुरे पडूं लागले जगांतील राष्ट्रांमध्यें सोन्याची वाटणी विषम होऊन कांहीं देशांमध्यें सोन्याचा तुटवडा पडला तर फ्रान्स व अमेरिका ह्या देशात त्याचा फाजील संचय झाला. पौंड नोटेच्या मोबदला, अंतर्गत व्यवहारात, सोनें विशिष्ट दरानें देणें बंद झालें एवढेंच नव्हे तर समूळच बंद झालें तरी हुंडणावळीच्या स्थिरतेसाठी व परदेशीय व्यापाराच्या सोयीसाठी सोन्याच्या भरपूर संचयाची व्यवस्था करणें ब्रिटिश सरकारास भाग पडलें ही जबाबदारी राष्ट्रीय महत्त्वाची असून ती बँक ऑफ इंग्लंडच्या आवाक्याबाहेरची असल्यामुळें सरकारनें हुंडणावळीचें स्थैर्य टिकवण्यासाठी "एक्सचेंज ईक्वलायझेशन फंड" ह्या नांवानें एक स्वतंत्र निधि उभारला आणि त्याचा व्यवहार स्वतःच्या हातीं ठेवला. नोटा काढणें व देशात पैसा खेळवणें वगैरे मामुली काम बँक ऑफ इंग्लंडनें करावें, परंतु सोन्याची आयात-निर्गत मोठ्या प्रमाणात होऊन हुंडणावळींत विशेष चलबिचल होण्याचा रंग दिसतांच मध्यें पडून सरकारनें सोनें खरेदी करून किंवा विकून असले प्रसंग पार पाडावे हा वरील फंडाच्या स्थापनेंत सरकारचा हेतु आहे.

सदरहु फंडाचा उपयोग प्रत्यक्ष कसा होतो, हें मात्र आजपर्यंत गुप्त ठेवण्यांत येत आहे. फंडाच्या व्यवहाराची परिस्फुटता झाल्यास सट्टेबाजीस संधि मिळून ह्या व्यवस्थेचा मूळ हेतु निष्फळ होईल म्हणून हें गुपित आजपर्यंत राखण्यात आलें आहे. तथापि पार्लमेंटला फंडाची माहिती दिल्यावाचून त्याचें काम चालवणें प्रधान मंडळास शक्य नव्हतें आणि सुमारें २७० कोटि रुपयाची त्यांत भर घालण्याची परवानगी मागण्याचा प्रसंग त्यास नुकताच आला, तेव्हा ब्रिटिश फडनवीस, सर जॉन सायमन, ह्यास फंडावरचें वेष्टण थोडेंसें बाजूस सारावें लागलें आणि त्याच्या हिशेबाची कल्पना वेळोवेळीं देण्याचें अभिवचनहि देणें प्राप्त झालें. ही माहिती अर्थात् अगदीं स्थूलमानानें दिली जाईल आणि ज्या मुदतीविषयीं ती द्यावयाची ती सपल्यावर बऱ्याच काळानें देण्यात येईल आता हुंडणावळ-संरक्षणफंडात सुमारें ७२० कोटि रुपये होतील. गेल्या मार्च अखेर त्या फंडात सुमारें ९३० कोटि रुपये किंमतीचें सोनें होतें असें सर जॉन सायमन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें तीन वर्षांमागें अकरा आठवड्यांच्या मुदतींत फंडामधून सुमारें १०० कोटि रुपयाचें सोनें द्यावें लागलें होतें ही माहिती त्यानीं दिली ह्याच रीतीनें त्यात सोन्याची भरहि केव्हा केव्हां पडली आहे हा सुवर्णसंचय मोठा कां पाहिजे आणि त्याचे व्यवहार शक्यतोंवर गुप्त का ठेवले पाहिजेत ह्याची कल्पना पार्लमेंटला यावी म्हणून ब्रिटिश फडनवीसांनीं सदरहु विवेचन केलें आहे

---

### "बॉंबे को-ऑपरेटिव्ह कार्टर्ली"

वरील त्रैमासिकाचा जून १९३७ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. स्वीडनमधील सहकारी चळवळ, भांडवलशाही व सहकार—औद्योगिक संघटनेच्या दोन पद्धती, ग्रामोद्धार व सहकार, सहकाराचे मार्गातील व्यावहारिक अडचणी, इत्यादि विषयांवर कार्टर्लीमध्यें लेख आले असून, पुस्तक-परीक्षण, संपादकीय स्फुटें, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें, इत्यादि नेहेमीचीं उपयुक्त सदरेंहि अंकात आहेत.

## जपानमधील उद्योगधंद्यांच्या भरभराटीचें रहस्य

—.०.—

### श्री. ओगले ह्याचें निरीक्षण

[ ओगले ग्लास वर्क्स लि चे मॅनेजिंग एजट, श्री श्रीपाद प्रभाकर ओगले, हे आपल्या धद्याविषयी जपानमधील कारखान्यातील कार्यपद्धतीचा अनुभव घेण्याकरितां त्या देशाची सफर करून परत आले आहेत श्री. ओगले ह्यांनी तेथें केलेल्या निरीक्षणाचें सक्षिप्त टाचण येथें देण्यात येत आहे, त्यावरून हिंदुस्थान व जपान ह्या दोन देशामधील औद्योगिक परिस्थितीची तुलना करता येईल ]

जपानी लोक कमालीचे उद्योगी व मेहनती आहेत घरोघर कोणत्याना कोणत्या तरी धद्यातील काम चालतें त्यामुळें फार मोठे कारखाने निदर्शनास न येताहि मालाची पैदास खूप होते

स्वच्छता, टापटीप, रग व डिझाइन्स या बाबतींत सर्वसाधारण कलात्मक दृष्टी व यत्रासारखी काम करण्याची सवय, या गुणानीं जपानी कारागीर व मजूर सर्व जगात श्रेष्ठ प्रतीचे ठरले आहेत

सर्वसाधारण मजुरीचे दर वगैरे हिंदुस्थानातल्याप्रमाणेंच आहेत. परतु कामाचा वेग, शिस्त व जपानी मालानें सर्व जग व्यापावयाचें आहे याची तीव्र जाणीव व देशाभिमान यामुळें कामाची निपज अधिक व गुणात श्रेष्ठ अशी होते !

आपले इकडे एका कारखान्यानें अनेक वस्तु बनविण्याचा परिपाठ पडला आहे व तशी अपेक्षाहि सर्वसाधारण जनता व गिऱ्हाईक करीत असते जपानांतील रिवाज याचे अगदीं उलट आहे त्या ठिकाणीं एक कारखाना आपले लाईनपैकींच १०–५ वस्तूपेक्षा अधिक वस्तु तयार करण्याचें काम हातीं घेत नाहीं. यामुळें अगदीं थोडी जागा, बेताचीं साधनें व लहानसें भाडवल यात काम भागतें एकाच हद्दींत एक एका तऱ्हेचे लहान मोठे कारखाने पुष्कळ असूनहि ते एकमेकांना पोषक होतात, मारक होत नाहींत उदाहरणार्थ, ओसाकाचे हद्दींतील काचेचे व पोर्सिलेनचे कारखाने घ्या. त्यापैकीं काहीं कच्चा माल व कांचेचीं तयार मिश्रणें ( बॅचीस ) दुसऱ्यांना पुरवितात काहीं दुसऱ्याकडून अर्धवट तयार झालेला माल आणून त्याच्या कडा घासणें, त्यास पैलू पाडणें, त्यावर नक्षी व चित्रें काढणें अशासारखीं पुढचीं कामें करतात. कोहीं तो योग्य तऱ्हेनें गुंडाळून पॅक करतात. मोठे कारखाने लहान कारखान्यांच्या मालाची विक्री करतात या श्रमविभागणीच्या पद्धतीमुळें कारखान्यांना जागा व भाडवल थोडें पुरतें. एकाच तऱ्हेचें काम एकसारखें करीत राहिल्यामुळें कामाची गती वाढते, आपआपसात चढाओढ होत नाहीं, सर्वांना भरपूर उद्योग मिळतो व एकदरींत धंद्याची वाढ फार झपाट्यानें होते.

तेथील शिक्षणहि धद्यांना पोषक असेंच आहे. ज्या ज्या गांवामध्यें जसले धदे चालतात तशा प्रकारचींच इंडस्ट्रियल स्कूल्स व टेक्नॉलॉजिकल्-रिसर्च इन्स्टिट्यूट्स् तेथें असलेमुळें सर्व लोक एक एका विषयात पारगत होऊन आपले ज्ञानाचा उपयोग धद्यासाठी करूं शकतात

तेथें विक्रीचें शास्त्र व पद्धत अगदीं पूर्णतेला गेलेली आहे एकएका जातीचा माल एकत्रित करून त्याची विक्री व निर्गत करणाऱ्या मोठमोठ्या असोसिएशन्स आहेत. त्या एका लाईनपैकीं कमी अधिक दर्जाचा माल आपले गोडाऊनमध्यें एकत्रित करून, नतर त्याचें सॉर्टिंग करून वर्गवारी ठरवितात व त्याप्रमाणें निरनिराळीं लेबलें लावून निरनिराळ्या देशास त्या मालाची रवानगी होते ज्या देशाची जसा दर देण्याची ऐपत असेल त्या दर्जाचा माल त्या देशास दिला जातो साधारणतः अमेरिकेस जाणारा माल पहिले प्रतीचा, युरोप खंडास दुसरे प्रतीचा व तिसऱ्या, चौथ्या प्रतीचा माल चीन, अफ्रिका, हिंदुस्थान वगैरे देशास जातो. अमेरिकेला व युरोपास जाणाऱ्या मालावरच बहुतेक सर्व किंमत उगवून घेतली जाते व त्यानतर बाकीचे देशांस जाणारा माल येईल त्या किमतीस विकून निर्गत व्यापाराची वाढ केली जाते यामुळें सरासरीनें जपानी कारखानदारास किफायतशीर भाव मिळून हिंदुस्थानास खूप स्वस्त माल पाठविता येतो

अशा कित्येक वस्तु आहेत कीं, त्या बाहेर देशात विकल्या जातात त्यापेक्षा खुद्द जपान देशात महाग विकतात

देशाच्या निर्गत व्यापाराचे अभिवृद्धीसाठी बँका, शिपिंग कपन्या, इन्शुअरन्स कंपन्या वगैरे घटक स्वत:साठीं कमींत कमी नफा घेऊन एकोप्यानें सहाय करतात.

व्यापारवृद्धीसाठी जपान हें सबंध राष्ट्र एकोप्यानें व स्वार्थत्यागानें श्रम करीत असून त्याच्याशीं तुलना करता आमचे औद्योगिक प्रयत्न कोणत्याहि सरकारी व अन्य सहायाचे अभावीं अगदीं अल्प व वैय्यक्तिक ठरतात व त्याचे पुढें तग धरूं शकत नाहींत.

आमचे इकडील कारखानदार व व्यापारी याच्या परिस्थितींत व जपानमधील परिस्थितींत आणखी एक विशेष नजरेंत भरण्यासारखी गोष्ट दिसून आली ती म्हणजे त्या देशांतील पोस्टेज, टेलिग्राम, रेल्वे भाडें, वगैरे सारखे खर्च फारच कमी आहेत साधारण एक पैशांत पोस्टकार्ड, ५ आण्यांत पत्त्यासह ३५ शब्दांची तार, अत्यंत त्वरित मालाची नेआण व सवलतीचीं रेल्वेभाडीं यामुळें वर्षअखेर पुष्कळच बचत होते. आमचेंच उदाहरण घेऊन बोलावयाचें झाल्यास, जपानातील प्रचलित पोस्ट, तार व रेल्वेचे दर इकडे लागू असते तर या तीनच बाबींवर आमचे २० ते २५ हजार रुपये बचले असते व तेवढी बचत ४-५ टक्याचे नियमित डिव्हिडड देण्याचे कामीं उपयोगी पडली असती. या देशात आम्हांस कारखान्यात येणाऱ्या कच्च्या मालावर व तयार होऊन बाहेर जाणाऱ्या पक्क्या मालावर ६० ते ७५ हजार रुपये रेल्वे भाड्याचे रूपानें द्यावे लागतात.

## मुंबई इलाख्यांतील निवडणुकीचा अहवाल

### मतांची नोंदणी

मुंबई इलाख्याच्या वरिष्ठ कायदेमडळांतील ( कौन्सिलमधील ) ३० सभासदांपैकीं २६ सभासद लोकनियुक्त आहेत गेल्या निवडणुकीमध्यें, ह्यापैकीं एक जागा बिनविरोध भरली गेली. उरलेल्या २५ जागाकरितां ५८ उमेदवार उभे होते. एकूण ७७४ टक्के मतदारानीं ( १०,५१९ लोकानीं ) आपला मतदानाचा हक्क बजावला १,७५५ स्त्रियास ह्या कायदेमंडळाचे निवडणुकींत मताधिकार होता त्यापैकीं ५६ ४ टक्के स्त्रियांनीं आपलीं मतें दिलीं

कनिष्ठ कायदेमंडळामध्यें (असेंब्लीमध्यें) १७५ सभासद असून ते सर्व लोकनियुक्त आहेत. ह्यापैकीं २६ सभासद बिनविरोध निवडून आले सर्व जागांस मिळून ३६४ उमेदवार उभे होते. एकूण ५१ ७ टक्के मतदारांनीं ( १२०९, २९८ लोकानीं ) मताधिकार गाजवला. स्त्रियामध्यें हें प्रमाण ४२·४ टक्के इतकें पडलें ५१ उमेदवारांनीं आपलें डिपॉझिट गमावलें

—

# स्फुट विचार

## साधी रहाणी—महात्माजींची सूचना

सहा प्रांताच्या कारभारांत राष्ट्रीय सभेचे अनुयायी प्रधान पदावर आरूढ झाले आहेत, तेव्हां त्यांनीं आपलें धोरण कसें ठेवावें ह्या विषयीं महात्मा गांधींनीं आपले विचार प्रकट करून कांहीं विधायक सूचना केल्या आहेत. त्यांचें तत्त्वज्ञान व वैयक्तिक जीवन हीं कोणत्या प्रकारचीं आहेत, हें सुप्रसिद्धच आहे. त्यांनीं केलेल्या सूचनांपैकीं मन्त्रिमंडळाच्या सभासदांनीं साधेपणानें व काटकसरीनें रहावें आणि ह्या वागणुकीचा धडा दुसऱ्यांस घालून द्यावा ह्या उपदेशाचा राज्यकारभाराच्या धोरणाशीं निकट संबंध आहे, हें ध्यानात ठेवण्यासारखें आहे. हिंदी राष्ट्राच्या सांपत्तिक शक्तीच्या मानानें येथील राज्यव्यवस्थेचा खर्च भारी आहे, ही लोकांची ओरड कित्येक वर्षांची जुनी आहे ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं मोठमोठाले पगार व खर्चाची रहाणी ह्या विषयींची परंपरा चालू केली आणि ही पद्धति हिंदी जनतेस झेपण्याजोगी नाहीं, अशी ओरड होत असताहि तिच लोण कारभारामध्यें चोहांकडे पसरलें वरच्या दर्जाचे नोकर जाडया पगारावांचून मिळूं शकत नाहींत ह्या मुद्यावर पगाराचें प्रमाण मोठें ठेवण्यात आलें. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा अनेक वर्षें इंग्लंडमध्येंच होत असल्यानें आणि त्या देशातल्या अभ्यासक्रमास व पदव्यास भलतेंच महत्त्व दिलें गेल्यामुळें उच्च दर्जाच्या नोकऱ्यात हिंदी लोकांचा प्रवेश होणें दुर्घट होऊन त्या जागांचे पगार मात्र मोठे राहिले. रहाणीप्रमाणें पगार आणि पगाराप्रमाणें रहाणी असें कोष्टकहि बसून गेलें

## प्रधानांचे पगार

मॉंटेग्यूचेम्सफर्ड सुधारणा चालू झाल्या तेव्हां सोंपीव खात्यांचे जबाबदार प्रधान राखीव खात्यांच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदाचे बरोबरीनें पगार घेऊं लागले सोंपीव व राखीव खात्याच्या मंत्र्याचा दर्जा समान राहिला पाहिजे आणि तो सारखा पगार असल्यावाचून राहू शकणार नाहीं ह्या भ्रामक समजुतीवर ही व्यवस्था आधारलेली होती पुढें प्रधानांचे पगार थोडेसे उतरले, तरीहि ह्या पद्धतींतला कृत्रिमपणा व निष्कारण खर्चिकपणा कायम राहिला. इंग्लंडमधल्या मंत्र्याच्या पगाराचे मानानेंहि येथील प्रधानाचे पगार फाजील मोठे होते. तथापि, हिंदुस्थानच्या आर्थिक स्थितीस नोकरांची व मंत्र्यांची मिळकत जुळती करण्याची कल्पना फलद्रूप होऊं शकली नाहीं. अलीकडे प्रांतिक दर्जाच्या पगाराचें प्रमाण कमी करण्यात आलें आहे खरें. तरी जबाबदार मंत्र्यांनीं स्वत उदाहरण घालून न दिल्यानें राज्यकारभाराचा खर्च आटोक्यांत आणण्याच्या धोरणास त्यामुळें जोर लागला नाहीं ह्या कामीं धडाडीचा उपक्रम राष्ट्रीय सभेच्या अनुयायांनीं अत्यंत अल्प वेतन स्वीकारण्याचें ठरवून केला आहे, तो अभिनंदनीय आहे. मंत्र्याच्या पगाराची रकम अमूकच असावी किंवा नाहीं, ह्याविषयीं मतभेद असला तरी प्रस्तुत धोरणाच्या मुळाशीं तत्त्व आहे, त्याचेंच विशेष महत्त्व आहे हें लक्षात ठेवलें पाहिजे.

## देश तसा वेष

हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशातील जनतेशीं समरस होऊं इच्छिणारांनीं आपली रहाणी नीटनेटकी व स्वच्छतेची पण काटकसरीची व साधेपणाची ठेवली पाहिजे असें महात्माजींचें सांगणें आहे. उच्च वर्गातील हिंदी लोकांचीहि रहाणी ह्या देशाच्या आर्थिक स्थितीस साजेल अशी असावयास पाहिजे, आणि ह्या बाबतींत पाश्चात्यांचें अंध अनुकरण वेडेपणाचें आहे. त्यांतहि खाजगी व्यक्तींनीं स्वकष्टानें मिळवलेल्या संपत्तीवर चैन केली व पैसा उधळला तर तें एक वेळ क्षम्य होईल, पण सामान्य जनतेच्या पैशावर जगणाऱ्या लोकांचा खर्चिकपणा केव्हांहि समर्थनीय ठरणार नाहीं. उच्च दर्जाच्या नोकराच्या पगारावर लोकांची आज सत्ता नाहीं, म्हणून ते कमी करता येत नाहींत, पण त्याच्याशीं समानतेचें नातें असावें ह्या कारणास्तव इतरांनींहि जाड्या पगाराचें समर्थन करावें हें इष्ट नाहीं. स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर शिक्षण संस्था चालवणारी अनेक मंडळी हिंदुस्थानात अल्प वेतनावर संतुष्ट आहेत त्यांचें धोरण चुकत आहे असें कांहीं जणांस वाटत असलें तरी बुद्धि, कर्तव्यतत्परता व कार्यक्षमता हीं पगारावर व दिखाऊ रहाणीवर अवलंबून नसतात, ही गोष्ट सिद्ध झाली आहे राष्ट्रीय सभेच्या अनुयायांनीं ह्या बाबतींत उत्कृष्ट धडा अगोदरच घालून दिला आहे आणि हिंदी देशी रहाणीमध्यें कोणताहि कमीपणा नाहीं हें त्यांतील पुढाऱ्यांच्या उदाहरणावरून लोकास कळून चुकलें आहे

## शेजारणीची सरी व आपल्या गळ्यांत दोरी

आधुनिक प्रगतिपर सुधारणा विरुद्ध पुराणप्रियता ह्या स्वरूपाचा प्रस्तुत प्रश्न नाहीं कार्यक्षम परंतु काटकसरीच्या व देशाच्या स्थितीस सुसंगत अशा रीतीच्या सामान्य राहाणीचा हा विषय आहे. प्रांतिक प्रधानांनीं अल्प वेतन स्वीकारून व आगगाड्यांच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात प्रवास करून राजकीय सत्ता धारण करणारे अधिकारी जनतेपैकींच आहेत आणि राज्यकारभाराचा खर्च बेतात राखून लोकहिताच्या कामास कराचा पैसा मुख्यत्वें करून लावण्याचा आपला उद्देश आहे ह्याची जाणीव लोकास करून दिली आहे. पुढाऱ्यांचें अनुकरण सामान्य लोक करीत असतात, ह्या नियमाचा अनुभव सबंद हिंदी राजकारणात येण्याची शक्यता आहे. उच्च विचार व साधी रहाणी ही महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांची परंपरा आहे, तिला साजेल असेंच धोरण महात्मा गांधींनीं प्रधानमंडळापुढें ठेवलें आहे. शेजारणीच्या गळ्यात सरी आणि आपल्या गळ्यांत दोरी ह्या लौकिक म्हणींत दर्शवलेला पाश्चात्य रहाणीच्या अंधानुकरणाचा वेडेपणा शिकलेल्या व श्रीमान् हिंदी लोकास पटणें आवश्यक आहे जनतेचें हित साधण्यास व तिची सेवा करण्यास उद्युक्त झालेल्या राजकारणी लोकांस साधेपणाच्या रहाणीवांचून आपल्या कार्यांत यश यावयाचें नाहीं ही गोष्ट त्यांचे ध्यानांत आली पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या अनुयायांचें वजन हिंदी जनतेवर पडलें आहे, ह्याचें एक प्रमुख कारण त्यांची सामान्य लोकांच्या जवळ जाऊन व त्यांमध्यें मिसळून कार्य करण्याची तत्परता हें आहे. ह्याचीच आठवण महात्मा गांधींनीं आपल्या "हरिजना"तील लेखात करून दिली आहे.

## पुण्यांतलें औद्योगिक प्रदर्शन

लोकशाही स्वराज्यपक्षाच्या विद्यमानें लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या सप्ताहातील कार्यक्रमाचा एक भाग म्हणून टिळकस्मारक मंदिरात स्वदेशी प्रदर्शन मांडण्यांत आलें आहे आणि त्याचा उद्घाटन समारंभ गेल्या शनिवारीं येथील विस्किटाच्या

कारखान्याचे मालक, श्री. साठे, ह्यांच्या हस्तें करण्यात आला प्रदर्शन मर्यादित प्रमाणातलें पण आटपशीर व चित्ताकर्षक आहे. मुख्यत्वेंकरून पुण्यांतल्या लहान-मोठ्या कारखान्यांत होणारा स्वदेशी माल त्यांत टापटिपीनें माडण्यांत आला आहे आणि त्यांमध्यें लहानापासून मोठ्यापर्यंत अनेक धद्याचा समावेश झालेला आहे अनुक्रमें समितीचे अध्यक्ष व कार्यवाह, श्री धोंडू मामा साठे व श्री. आ रा भट ह्यांनीं प्रदर्शनाचा उद्देश व स्वरूप ह्याची माहिती सागितली आणि श्री तात्यासाहेब केळकर, प्रो. काळे व श्री ग स मराठे ह्यांनीं एका नवीन धद्याचा महाराष्ट्रात उत्कर्ष करून दाखवणाऱ्या कारखानदारास अध्यक्ष निवडण्याचें औचित्य प्रतिपादलें. अध्यक्षांनीं आपल्या भाषणात अनेक विधायक सूचना केल्या प्रदर्शन चालू आठवडा अखेर उघडें रहाणार आहे.

---

### अड्यांची प्रतवारी

बाजारात येणाऱ्या अड्यात चागलीं-वाईट, लहान मोठीं, शिळीं-ताजीं, अशी भेसळ झालेली असते ह्या कारणानें मालाचा नीट उठाव होत नाहीं व गिऱ्हाइकासहि आपण घेत असलेल्या मालाची निश्चिती सागतां येत नाहीं ह्याबाबत सुधारणा करून, अडीं तपासून त्यांची प्रतवारी ठावण्याचें काम हिंदुस्थान सरकारच्या शेतीविषयक मार्केटिंग अधिकाऱ्यानें सुरू केलें आहे व त्याकरितां इग्लंडमधून यंत्रसामुग्री आणविली आहे. सरहद्द प्रात व त्रावणकोर सस्थान येथें प्रत्येकीं एक केंद्र स्थापन करण्यांत आलें असून, त्यात गेल्या जूनच्या मध्यापर्यंत २० लक्ष अड्याची तपासणी करून त्याची प्रतवारी लावण्यात आली. अड्याच्या वजनानुसार यंत्र त्याची निवड करतें व विशेष चागलीं, अ, ब व क अशी त्याची चार दर्जांमध्यें विभागणी झाल्यावर त्यावर शिक्के मारून तीं व्यापाऱ्यांचे स्वाधीन केलीं जातात. अशा प्रकारच्या नंबरी मालास मागणी वाढत आहे ह्या लोकप्रियतेमुळें अड्यांच्या धद्यास उत्तेजन मिळून अड्यांचा खपहि वाढेल, अशी अपेक्षा आहे. प्रतवारी लावणारीं यंत्रें सर्व प्रातांत ठिकठिकाणीं स्थापन झाल्याखेरीज, अर्थातच, ह्या योजनेचा फायदा खेड्यापाड्यातील सर्व लोकास घेता येणार नाहीं, हें उघड आहे

---


लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलूएल बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं. २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेड ऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु (ट. ख निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,१८,६०० वसूल झालेलें भांडवल १,०८,५९०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

## खाजगी नोकराच्या चाकरीचा करार

खासगी नोकरास केव्हाहि कामावरून दूर करण्याचा हक्क मालकास असतो, अशी हिंदुस्थानांत परिस्थिति आहे. मालकाचें काम व्यवस्थित व समाधानकारक केल्यानतर नोकरास आपली नोकरी कायम राहील अशी शाश्वती वास्तविक वाटली पाहिजे परंतु नोकरास त्याबाबत काहींहि हक्क नसतो पाश्चात्य देशातील नोकराचे काहीं हक्क सरकारांनीं निश्चित करून दिलेले असतात व त्या कारणानें काम करणारास एक प्रकारचें संरक्षण मिळतें. मुंबईच्या एका गृहस्थास जर्मनीमध्यें ह्या संबधात आलेला अनुभव उद्‌बोधक आहे

सर डोसाभाई होर्मसजी भिवंडीवाला हे जर्मनीमध्यें प्रवास करीत असताना त्यांनीं आपली मोटार हाकण्याकरितां एक सारथी नेमला ड्रायव्हरानें प्रथम मागणी केलेल्या वेतनापेक्षा कमी दरानें काम स्वीकारलें, परतु जर्मनीमधील कामगारांबाबतच्या नियमानुसार सर साहेबाकडून लेखी कराराची मागणी केली सर होर्मसजींनीं ती अमान्य केली. ड्रायव्हरानें १८ दिवस काम केलें, त्याबद्दल त्यास वेतनहि नियमितपणें मिळालें. नंतर त्यानें लेखी करार मिळाला नाहीं म्हणून नोकरी सोडण्याचें ठरविलें व स्थानिक नोटरीच्या ताब्यांत मोटारीची किल्ली देऊन कराराखेरीज काम करता येत नाहीं असा कोर्टाकडे अर्ज केला. कोर्टानें वेतनांतील बाकी म्हणून ड्रायव्हरास ६२५ रु. देवविले.

### कनेडियन सरकारचे बेकारीनिवारणाचे प्रयत्न

कॅनडाच्या मध्यवर्ती सरकारनें तरुणातील बेकारीनिवारणाकरिता एक योजना आखली असून, ती प्रीत्यर्थ २५ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. प्रांतिक सरकाराच्या सहकार्यानें बेकारांस उपयुक्त शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावयाची आहे, आणि त्याकरिता मध्यवर्ती व प्रांतिक ह्या दोन्ही सरकारांनीं खर्च वाटून घ्यावयाचा आहे मॅनिटोबाच्या प्रांतिक सरकाराशीं मध्यवर्ती सरकारानें करार करून वरील योजनेस प्रारंभ केला आहे (१) जंगलाचें सरक्षण व त्याची वाढ व (२) उद्योगधंद्यात उमेदवारी आणि (१) घरगुती काम व (२) नोकरी अशा विविध प्रकारच्या कामाचें शिक्षण अनुक्रमें मुलास व मुलींस मिळावें, असा सकल्प आहे. सुमारें १,००० तरुण-तरुणीस ह्या योजनापासून फायदा होईल अशी अपेक्षा आहे. कॅनडातल्या ह्या योजनेपासून हिंदुस्थानातील मध्यवर्ती व प्रांतिक सरकारानीं काहीं बोध घेण्यासारखा नाहीं काय ?

### जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें

येथील सुप्रसिद्ध जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग अ‍ॅण्ड कटिंग या सस्थेस इंडस्ट्रीज डिपार्टमेंटचे मुख्य, डायरेक्टर मि. पी. बी. अडवानी, यानीं भेट देऊन सस्थेंतील एकदर काम उत्तम चाललें असलेबद्दल समाधान व्यक्त केलें, असें सस्थेचे मॅनेजर, श्री. डी. ए कुलकर्णी, हे कळवितात.

### इंपीरियल बॅंकेनें व्याजाचा दर उतरविला

इंपीरियल बॅंकेनें आपल्या सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवींवरील व्याजाचा दर उतरवून, तो द द १ टका केला आहे १ ऑगस्टपासून हा नवीन दर अमलात येईल सेव्हिंग्ज डिपॉझिट्सवरील १½ टक्के दर कायम राहील


स्थापना १९१० मुंबई सरकारमान्यतेचें, एच एच छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर याचे आश्रयाखालील



जाधव टेलरिंग कॉलेज

नवीन वर्ग सुरू झाले जुलैचे आंत नांवें नोंदवणारास फीमध्यें सवलत माहिती मागवा.

४९७ बुधवार, पुणे

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आतंवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते —

धी इंडो फॉरिन एजन्सीज (डिपार्टमेंट न. ६)

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

# सहकारी चळवळ

## मुंबई इलाख्याच्या सहकारी रजिस्ट्रार साहेबांचीं सर्क्युलरें

(ए जी. सी न २८७)

कित्येक सहकारी पतपेढ्यांस रजिस्ट्राराच्या विशेष परवानगीनें ७५० रुपयापर्यंत दीर्घ मुदतींचीं कर्जें देण्याचा अधिकार आहे. सदरहू पतपेढ्याची घटना, त्याचें भाडवल, व्याजाचा दर, घराची अगर शेताची किमत करण्याकरितां जरूर असे लायक तज्ज्ञ इत्यादि गोष्टींचा विचार करता, दीर्घ मुदतीचीं कर्जें देण्याचा व्यवहार पतपेढ्यानीं करावा, असें रजिस्ट्रार साहेबास वाटत नाहीं परतु, इतक्यातच हा व्यवहार बद करणेंहि श्रेयस्कर नाहीं, म्हणून कर्जाची कमाल मर्याद ४०० रुपये असावी, असें त्याचें मत आहे सोसायटीच्या कर्जदार सभासदास हें कर्ज मिळूं नये, सुपरवायझिंग यूनियन व कर्ज देणारी सस्था ह्यांची मजुरी आगाऊ घेण्यांत यावी, कर्जाची परतफेड पांच वर्षांत व्हावी, अशा कर्जांची बेरीज एकूण खेळत्या भाडवलाचे ½ पेक्षा अगर रिझर्व्ह फडाच्या ¼ पेक्षा जास्त होऊं नये, इत्यादि बधनेंहि रजिस्ट्रारसाहेबानीं सुचविलीं आहेत

(ए. जी. सी नं. २८८)

जेव्हां बँका व सोसायट्या आपल्या बायलॉजमध्यें दुरुस्ती करून, स्वत. दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर उतरवितात, तेव्हा ही दुरुस्ती अमलात आल्यानतर देण्यात आलेल्या कर्जासच ही सवलत दिली जाते, असें रजिस्ट्रार साहेबाच्या नजरेस आलें आहे ही सवलत सर्वच कर्जदारांस त्याचेकडून येणें असलेल्या रकमाबाबत मिळणें आवश्यक आहे.

गेल्या काहीं वर्षांत कित्येक बॅंकांस सोसायट्याकडील आपल्या येण्यावरील व्याजाचा दर उतरवणें शक्य झालें आहे. हा कमी केलेला दर नवीन कर्जाप्रमाणेंच नियमातील दुरुस्ती अंमलात येण्याचें वेळीं येणें असलेल्या कर्जासहि लागू पडण्यास हरकत दिसत नाहीं. ह्यामुळें सोसायट्यांस स्वत स मिळणाऱ्या सवलतीमध्यें आपल्या सभासदांसहि अंशभागी करतां येऊन त्यास सहाय करतां येईल.

---

### श्री. वैकुंठराय ल. मेहता

(मॅनेजिंग डायरेक्टर, मुबई प्रॉ को प्रॉ बँक, लि०)

श्री. वैकुंठराय मेहता यांच्या प्रॉ. को. ऑपरेटिव्ह बँकेच्या नोकरींतील प्रवेशास ता. २२ जुलै, १९३७ रोजीं पचवीस वर्षें पूर्ण झालीं. सदर दिवशीं त्यांचा मुक्काम सातारा येथें होता. तेव्हा प्रॉव्हिन्शिअल बॅंकेच्या सातारा भागाच्या नोकर लोकांनीं त्या दिवशीं त्याच्या नोकरीचा रौप्यमहोत्सव दिन साजरा केला रात्रौ १० वाजता समारभ झाला. प्रारभीं त्याना पुष्पहार अर्पण करण्यात आला. नतर सातारा भागाचे सीनिअर इन्स्पेक्टर श्री गायतोंडे यांनीं त्याच्याबद्दल समयोचित गौरवपर चार शब्द सांगितले. उत्तरादाखल श्री. वैकुठराय यांनीं उपस्थित नोकर लोकांना उपदेश करून बॅंकेच्या उन्नतीविषयीं आणि दर्जाविषयीं सदैव जागरूक राहण्याबद्दल सुचविलें

शेवटीं अल्पोपहार आणि पानसुपारी होऊन समारभ समाप्त झाला.

---

## येलूर येथील उद्योग-दिन.

ग्रामस्थाना, विशेषतः शेतकऱ्याना, उद्योगाचें महत्त्व कळावें व वेडगळ चालींपासून लोकाना परावृत्त करून त्याना मार्गावर नेऊन सोडावें या हेतूनें येलूरच्या पुढाऱ्यांनीं हा दिन ता. ७-७-३७ रोजीं साजरा केला

श्री शकरराव बोगर यानीं उद्योगदिन साजरा करण्याची गरज कां भासली तें सागून अध्यक्षस्थानमे विश्वनाथ रामचद्र पाटील, सरपच ग्रामपचायत येलूर, यानीं स्वीकारावें, असें सुचविलें.

प्रथम काहीं शिक्षकानीं टांगलेल्या म्हणींचे अर्थ लोकाना निरनिराळीं उदाहरणें घेऊन पटवून दिले नंतर येलूर शाळेचे हेडमास्तर अकबर बापूसाहेब नद्दाफ यानीं भाषण केलें. कोंबड्या पाळणें, खत जमविणें, दोरखड करणें, विणकाम करणें, कपडे शिवणें, विड्या तयार करणें, वगैरे जोडधदे शेतकऱ्यास करतां येणें शक्य आहे व लग्नसमारभ, यात्रा, आपसातील कलह, चैन, निरनिराळीं व्यसनें हीं कमी करून पुष्कळ पैशाची बचतहि करतां येईल असें ते म्हणाले श्री शंकरराव बोगर यानीं गावातील व बाहेरचीं निरनिराळीं उदाहरणें घेऊन काहीं शेतकरी सुखी व काहीं कंगाल कां आहेत हें लोकाना त्याच्या शब्दात मार्मिक रीतीनें पटवून दिलें. जोडधदे करण्यात कमीपणा समजूं नका, असा त्यानीं उपदेश केला.

येलूर यूनियनचे सुपरवायझर श्री कुलकर्णी यानीं शेतकऱ्यांचा आर्थिक ऱ्हास थांबवणेसाठी दोन गोष्टी सुचविल्या. एक, प्रत्येक शेतकऱ्यानें आपला जमाखर्च ठेवावा. त्यासाठी यूनियननें एक जादा नोकर नेमून सर्व शेतकऱ्यांचा जमाखर्च मोफत लिहून द्यावा. म्हणजे शेतकऱ्याना आपण चुकतों कोठें तें नक्की दाखवितां येईल. दुसरी गोष्ट, म्हणजे दहावीस शेतकऱ्यानीं एकत्रित होऊन प्रपचास लागणारें सामान खरेदी करावें म्हणजे दर कुटुंबामागें वार्षिक सुमारें वीस रुपयाची बचत होईल

शेवटीं अध्यक्षानीं एक कमिटी निवडली व उत्तम शेता करणाऱ्या शेतकऱ्याची कमिटीनें पहाणी करून दिपवाळीचे सुमारास त्याना दहा रुपयाचीं बक्षिसें देण्याचें जाहीर केलें.

---

### खेडेगांवी उद्योगधंद्यांस सहाय

खेडेगांवातील उद्योगधद्यास सहकारी तत्त्वावर सहाय कसें करतां येईल, ह्याची चौकशी करून रिपोर्ट करण्याकरितां सयुक्त प्रात सरकारनें तीन वर्षांमागें एक कमिटी नेमली होती, तिनें केलेल्या सूचना नुकत्याच प्रसिद्ध झाल्या आहेत हातमाग, कातड्याचा धदा, काचकाम, ताब्याचीं भांडीं, कुलुपें, तूप, तेलगाळणें, इत्यादि व्यवसायास सहाय करण्याकरिता, एक स्वतत्र बोर्ड नेमण्यांत यावें, असें कमिटीनें सुचविलें आहे सदरहु बोर्डास सालिना दीड लाख रु ह्या प्रमाणें पाच वर्षेपर्यंत सरकारनें मदत द्यावी, अशी कमिटीची शिफारस आहे. जपानमधील खेडेगावी धद्यांची पहाणी करण्याकरितां एक अर्थशास्त्रज्ञ व एक विद्वान् इंजिनियर जपानमध्यें पाठविण्यात यावा, असेंहि तिनें सुचविलें आहे ग्रामोद्योगाचें महत्त्व पटून त्या बाबतींत व्यावहारिक प्रयत्नास प्रोत्साहन मिळत आहे हें सुचिन्ह होय

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

## सुप्रसिद्ध संशोधक मार्कोनी ह्यांचा मृत्यु

रेडिओचा प्रसार हिंदुस्थानात सर्वत्र झाला आहे व खेड्यापाड्यांतूनहि त्याचे कार्यक्रम ऐकविले जात आहेत. बादशहाच्या राज्यारोहणाचा संबंध कार्यक्रम जगांतील कानाकोपऱ्यांतहि रेडिओद्वारा लोकांनीं नुकताच ऐकला. शास्त्रीय संशोधनाचा उपयोग लोकांस कसा होतो, ह्याचें रेडिओ हें उत्कृष्ट उदाहरण आहे ज्यांच्या कल्पकतेमुळें रेडिओचा जन्म झाला, ते सुविख्यात इटालियन संशोधक मार्केस मार्कोनी हे गेल्या आठवड्यात आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षी मरण पावले वायरलेस टेलिफोन व वायरलेस संदेशयंत्र हे मार्कोनींचेच शोध होत ब्रॉडकॅस्टिंगचा उपयोग योग्य प्रमाणावरती सुरू होण्यास मार्कोनींचीच कर्तबगारी कारणीभूत आहे लंडन येथील मार्कोनी कंपनीनें शोधकाचे संशोधन व्यावहारिक उपयोगास लावले सदरहु कंपनीचे मार्कोनी हे अध्यक्ष होते आपल्या संशोधन क्षेत्रामध्यें मार्कोनींनीं अखेरपर्यंत अग्रेसरत्व कायम राखलें हा त्यांचा विशेष होय आतां कोणत्याहि एका देशामधून दुसऱ्या देशाशीं वायरलेस टेलिफोननें संभाषण करतां येते व रेडिओतून जगांतील सर्व देशांमधील कार्यक्रम ऐकता येतात इ स १९०९ सालीं मार्कोनी यास पदार्थविज्ञान शास्त्रासबंधातलें नोबेल बक्षीस मिळालें महायुद्धाचे वेळीं ते आपल्या मायदेशाचे सैन्यात दाखल झाले व त्याबाबत त्यांनीं उत्कृष्ट कामगिरी बजावली सर्वाधिकारी मुसोलिनी ह्यास मार्कोनींनीं पूर्ण पाठिंबा दिला व ॲबिसिनियामधील लढायाचे वेळीं आपलें शास्त्रीय सहाय त्यास देऊ केलें मार्कोनी याच्या संशोधनाशीं आता खेडुताचाहि निकट संबंध आलेला आहे ह्यावरून त्याच्या दीर्घ परिणामकारक कार्याची कल्पना येते.

## रेलवेजचें भांडवल व हुंडणावळीचा दर

हिंदी रेलवेजच्या भांडवलापैकीं बराच मोठा भाग ग्रेटब्रिटनमध्यें उभारण्यात आलेला आहे. हें कर्ज ज्यावेळीं उभारण्यात आलें, त्या वेळच्या हुंडणावळीच्या दरानें त्याचें रुपयामध्यें रूपांतर केलें गेलें हल्लीच्या अधिकृत चालू हुंडणावळीच्या दरानें हिशेब केला असता रेलवेजच्या कर्जाची रकम ८ कोटि, ३१ लक्षांनीं कमी होते, तितकें रेलवेजचें भांडवल कमी करावें, अशी पब्लिक अकाउंटस् कमिटीपुढें सूचना आली होती. हिंदुस्थान सरकारनें आपल्या इतर कर्जाचे बाबतींत हेंच धोरण स्वीकारलें असल्याविषयींचा दाखला देऊन असें करणें हिशेबाच्या तंत्रास धरून आहे, असें ऑडिटर जनरल ह्यांनीं सांगितलें. कमिटीस ही सूचना पटली नाहीं.

## हिंदी लोकसंख्येचें पुढें काय होणार?

लखनौ विश्वविद्यालयाचे प्रो राधाकमल मुकर्जी ह्यांनीं हिंदुस्थानातील लोकसंख्येच्या प्रश्नावरील आपलें मत, लंडन येथें त्यांनीं एक निबंध वाचला, त्यांत प्रकट केलें सध्याच्या अन्नपुरवठ्यांतून प्रत्येकास पोटभर खाण्यास द्यावयाचें म्हटल्यास आजच्या ३५ कोटि लोकसंख्येपैकीं ४½ लोकांस उपाशी रहावें लागेल, असें ते म्हणाले शेतीमध्यें कितीहि सुधारणा घडवून आणून उत्पादन वाढवलें तरी हिंदुस्थानास ४४½ कोटि लोकसंख्येपेक्षा ज्यास्त लोकांचा भार सहन होणार नाहीं, असें त्यांनीं सांगितलें व परदेशगमन हा उपाय सुचविला. साम्राज्य परिषदेनें ह्या बाबत पुढाकार घ्यावा असेंहि ते म्हणाले.

## कोयनेल

हिंदुस्थानांत दरसाल सुमारें १०कोटी लोकांना हिवतापाची बाधा होते त्या सर्वांस पुरेल इतकें कोयनेल हिंदुस्थानांत तयार होत नाहीं. ह्याकरितां सिंकोना झाडांची लागवड वाढविण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकार करणार आहे सुमारें १०० वर्षांपूर्वी सिंकोना झाडाचा शोध लागला स्पेननें दक्षिण अमेरिकेंतील पेरू देश काबीज केला व त्यावर सत्ता चालविण्याकरितां एका व्हाइसरॉयची नेमणूक केली. ह्या अधिकाऱ्याची पत्नी, कौंटेस ऑफ सिंकोन ही आजारी पडली असता स्थानिक वैद्यांनीं एका झाडाच्या सालीचें औषध देऊन तिला बरें केलें कौंटेसनें परत स्पेनला येताना कांहीं साली बरोबर आणल्या व कोयनेलचा युरोप खंडांत प्रवेश झाला. औषधीं झाडास कौंटेस ऑफ सिंकोनाचें नाव देण्यांत आलें. कोयनेलला तेव्हापासून एकसारखी मागणी वाढत गेली आणि हिंदुस्थान, आफ्रिका ईस्ट व वेस्ट इंडीज, इत्यादि ठिकाणीं सिंकोना झाडाची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. हें झाड सुमारें ४० फूट उच जातें. सिंकोनाच्या सालीपासून कोयनेल तयार करतात हिंदुस्थानात खपणाऱ्या २ लक्ष पौंड कोयनेलपैकीं १ लक्ष १० हजार पौंडाची दरसाल आयात होते

## जाधव टेलरिंग कॉलेज.
### परीक्षकाचा रिपोर्ट

जाधव टेलरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांचें काम फारच समाधानकारक आहे त्यांचे ड्राफ्टिंग लेआउट अतिशय चांगलें आहे. बेढब व्यक्तींचे कपडे कसे कापावेत हें ते उत्तम जाणतात शिवणकाम फारच उच्च दर्जाचे करतात एकंदरीत सर्वच काम फार चांगलें होतें.

एक्झॅमिनर,
गव्हर्मेंट टेलर्स सर्टिफिकेट परीक्षा


## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८३,१०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,९९३ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,७१६ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,८६,५३६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४२,६२४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## सार्वजनिक काका

### श्री. गणेश वासुदेव जोशी

[ काल आषाढ वा। ४ रोजीं सार्वजनिक काकांची पुण्यतिथि साजरी झाली, त्या निमित्तानें काकांच्या चरित्रातील महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख येथें करण्यांत येत आहे ]

१८२८ सालीं श्री. गणेश वासुदेव जोशी ह्यांचा सातारा येथें जन्म झाला. एक दोन वर्षांतच वडील वारले इंग्रजी शिक्षणाची सातारा शहरीं सोय नसल्यानें तुटपुज्या मराठीवरच त्यास समाधान मानावें लागलें १८४८ सालीं पुण्यास नाझर कचेरींत नोकरी धरली, ती सुटल्यावर त्यानीं वकिलीची परीक्षा दिली व ह्या नव्या धंद्यांत पैसा व कीर्ति हीं दोन्हीं मिळविलीं. श्री. गणपतरावांस सार्वजनिक कार्याची आवड असल्यानें लवकरच त्यानीं वकिलीमधील लक्ष काढून ते आपल्या आवडीच्या व्यवसायास लागले.

त्या वेळच्या शिक्षित लोकास इंग्रजी तेवढें चांगलें, आपलें सर्व वाईट, असें वाटूं लागलें होतें. ही समाजाची स्थिति गणपतरावांना पाहविली नाहीं ह्याच सुमारास पर्वती सस्थानच्या व्यवस्थेंत गढबड झाली, त्याविषयीं लोकांच्या वतीनें बोलण्याकरितां एखादी लोक प्रतिनिधि सभा असावी, असें ठरलें. हीच सस्था म्हणजे सार्वजनिक सभा होय तिची स्थापना १८७० सालीं झाली ह्या सभेची घटना, नियम इत्यादि सर्व गणपतरावानींच केलेलीं आहेत. पुढें सभेच्या कार्याचा विस्तार होत गेला व लोकमताची पुरस्कर्ती अधिकृत सस्था म्हणून सरकारनेंहि तिला मान्यता दिली सदर सभेच्या कार्याचा विस्तार होत गेला व गणपतराव तिचे आधारस्तभ होते. न्या. महादेव गोविंद रानडे ह्यांनीं सभेच्या कामकाजांत लक्ष घालून तिचें मार्गदर्शकत्व पत्करलें, ह्या कारणानें सभेस विशेषच महत्त्व प्राप्त झालें सार्वजनिक हिताचें सरक्षण करण्याचे सर्व तऱ्हेचे प्रयत्न सभा करीत आली असून त्यांस यशहि चांगलें मिळालेलें दिसतें.

सार्वजनिक काकानीं १२ जानेवारी, १८७२ रोजीं देशी कापड वापरण्याची शपथ घेतली, ती त्यानीं आमरणात निश्चयानें पाळली. सार्वजनिक कार्याकरितां आपलें सबद आयुष्य खर्चून ता. २५ जुलै १८८० रोजीं ते मृत्युमुखीं पडले.

## ऑस्ट्रेलियांतील बॅंकिंग कमिशनच्या शिफारसी

ऑस्ट्रेलियामधील बॅंकिंगच्या सबधीं चौकशी करण्याकरिता नेमलेल्या कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे भाडवलाच्या पुरवठ्याचें नियत्रण मध्यवर्ती बॅंकेनें करावें परंतु बिनसरकारी व्यापारी बॅंकाच्या मार्फत तें काम व्हावें असें त्यानें सुचविलें आहे ऑस्ट्रेलियामधील पौंडाचा एक सहस्राश इतक्या किमतीचें नाणें पाडावें व चलनाच्या कोष्टकाची व्यवस्था दशाश पद्धतीची असावी, अशीहि कमिशनची शिफारस आहे जगांतील सर्व सुधारलेल्या राष्ट्रानीं ही पद्धति एकजात सर्वत्र स्वीकारलेली आहे,परतु ग्रेट ब्रिटननें आपलीं पूर्वींचीं कोष्टकें बदललेली नाहींत. साम्राज्यातील एका देशानें ह्याबाबत पुढाकार घेतला, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. मेट्रिक पद्धतींचा उपयोग शास्त्रीय गणितामध्यें केला असतां अत्यत सोईचें जात असताहि ग्रॅम, मीटर व लायटर ह्याऐवजीं ग्रेन, यार्ड व गॅलन हीं वजनेंमापें ग्रेट ब्रिटनमध्यें अद्याप चालू आहेत. ऑस्ट्रेलियानें चलनाचे बाबतींत अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इत्यादि देशांचें अनुकरण करावें, ही बॅंकिंग कमिटीची शिफारस प्रगतिप्रियता दर्शविते, ह्यांत सशय नाहीं

### अपत्यसख्येबाबत स्त्रियांमध्यें चढाओढ

कॅनडा देशातील टॉरॅंटो येथील मि. चार्लस मिलर ह्या नावाच्या श्रीमान गृहस्थानें आपल्या मृत्युपत्रात एका विक्षिप्त प्रकाराच्या चढाओढींत बक्षिसासाठीं २० लक्ष रुपयांच्या रकमेची तरतूद केली असल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें आहे आपल्या मृत्युनतरच्या दहा वर्षांत टॉरॅंटोमध्यें ज्यास्तींत ज्यास्त ज्या स्त्रीस मुलें होतील तिला ही मोठी रकम द्यावयाची असल्यानें त्याबाबत विलक्षण चढाओढ चाललेली आहे. मि मिलर ह्याच्या वारसानें मृत्युपत्राचे सबंधात कोर्टामध्यें तक्रार दाखल केली होती. तिचा निकाल त्याच्या विरुद्ध झाला असून त्यावर अपील करण्यात आलें आहे. चढाओढींत सहा स्त्रियानीं भाग घेतला आहे व त्यापैकीं पाचास प्रत्येकीं नऊ मुलें झालेलीं असून सहावीचें म्हणणे आपणास १० वर्षांच्या मुदतींत तेरा आपत्यें झालीं आहेत असें आहे ह्या सहा स्त्रियातल्या एकीस एकोणीस वर्षांत अठरा मुलें झालीं आहेत. बक्षिस व चढाओढ हीं विलक्षण खरीं !


**धी ईस्टर्न नॅशनल बॅंक लि., कलकत्ता.**

या बॅंकेच्या सातारा डिस्ट्रिक्ट मॅनेजरच्या हाताखालीं काम करण्यासाठीं पगारी स्पेशल एजटस् नेमणें आहे

पगार रु ४०-५-१००_प्रमाणें शिवाय प्रॉव्हिडट फड व पेन्शन वगैरे

१४४ पॅलेस स्ट्रीट, सातारा सिटी. } बा. सा बारटक्के, बी ए एलएल बी., डि मॅनेजर ई नॅ. बॅंक

**१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले**

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

**यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.**

बुधवार चौक, पुणें

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११९–१४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०५—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५–६० ) | ११८–१० |
| ४% १९४३ | १०७—६ |
| ३½% बिनमुदत | ९५–१४ |
| ३½% १९४७–५० | १०६–१२ |
| २¾% १९४८–५२ | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरटी व लांब मुदत) | १०८—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७–१२ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०७–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | १११—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४१—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | ३३—० |
| इंपिरिअल बँक ( ५० ) १२% | १५२७—८ |
| बाँबे प्रॉ को बँक ( ५० ) ५% | ६१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १२८—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९७—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १०% व ६ रु ४ आ. बोनस | ९३५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७७६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १०% | १४५—० |
| कराची ( १०० ) ९% | २७०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | ३५०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १४०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% | १६९०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु | १७०—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु | ४८—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु | २८–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ | ४३—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु बोनस | ४९२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% | १९२—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु २ आ | १६६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. | ३४८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ ६ पै | १६२५—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३४—९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५२—३ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—७ |
| „ केसर प्रत्येक मणास | १०–१४ |
| „ सरया प्रत्येक मणास | १०—६ |

डॉ. जोशी म्हणजे जी. जी. ब्रदर्सचीं
मलमें—त्वचा रोगांवर अत्यंत लवकर गुण देतात
डझनास ११।रु. गरिबास फुकट २८९ सदाशिव, पुणे

फक्कडणा दरसाल हलू नये म्हणून आमचें इच्छा गर्भ
सभव औषध घ्या व संततिनियमन करा.
औषध बंद केलें कीं, मुलें होतात माहिन्यांतून एकदांच घ्यावें लागतें. वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु ५ ट. ख. नि
गद्रे फिजीशिअन, खांडवा सी पी.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

CONFIDENCE
is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you
NEW BUSINESS
Last year
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD 1907 )
Branches Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
Offices throughout India & the East
S C. MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा —
भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें

अर्थशास्त्र
लेखक.—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ३००, किंमत तीन रुपये
ह्या ग्रंथात अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा
स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४; किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ महिने १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्यांचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २.

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[स्थापना सन १९३५]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ —
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा. द शें ॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात
सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात
मॅनेजिंग एजंटस्.

दि नागपूर पायोनियर इन्शुअरन्स क. लि.
हेड ऑफिस : : : : नागपूर
त्रैवार्षिक बोनस
हयातींतील विम्यास ३६ रु.
हयातीनंतरच्या विम्यास ४५ रु
वार्षिक हप्त्यावर २½ टक्के सूट
विम्याचे पैसे त्वरीत देण्याचें कंपनीचें वैशिष्ट्य
काटकसरीची व्यवस्था व भरभक्कम लाइफ फन्डस
फायदेशीर अटींवर काम करण्यास वजनदार व उत्साही एजटस पाहिजेत. समक्ष भेटा अगर अर्ज कराः—
ब्रँच मॅनेजर,
साठे बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें.

माधव सोमण ब्रदर्स
भरजरी शालू, लुगडीं वगैरे. मोहक सर्व तऱ्हेचीं पातळें
पावसाळी कोट व छत्र्या
धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक
लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
(टपाल हशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्य अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ४ ऑगस्ट, १९३७ अंक ३१

## दि नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कं. लि.

हेड ऑफिस : : : : नागपूर

त्रैवार्षिक बोनस
हयातींतील विम्यास ३६ रु.
हयातीनंतरच्या विम्यास ४५ रु

वार्षिक हप्त्यावर
२½ टक्के
सूट

विम्याचे पैसे त्वरीत देण्याचें
कंपनीचें वैशिष्ट्य

काटकसरीची व्यवस्था
व
भरभक्कम लाइफ फन्डस

फायदेशीर अटींवर काम करण्यास वजनदार व उत्साही एजंटस पाहिजेत. समक्ष भेटा अगर अर्ज करा.—

ब्रँच मॅनेजर,
साठे बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें

UNEMPLOYMENT NO MORE



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[माहितीपत्रक मागवा]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी यांचे
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

## माधव सोमण ब्रदर्स

पावसाळी कोट व छत्र्या. धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक
लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

# विविध माहिती

### पढरपूर येथील यात्रा

पंढरपूर येथील गेल्या आषाढी यात्रेचे वेळीं कॉलऱ्याची सुई घेतलेल्यासच फक्त पढरपुरात प्रवेश होता. कित्येक यात्रेकरूंनीं टोचल्याचे दाखले आणले होते. १,११,००० यात्रेकरूंना पढरपूरलाच वेगवेगळया नाक्यावर टोचण्यांत आलें.

### पावसाबाबत विमा

लँकेशायरच्या (इग्लंड) धदेवाईक क्रिकेटपटु सिबल्स ह्यानें एका सामन्याचे वेळीं तीन तासपर्यंत पाऊस पडूं नये ह्याकरितां विमा उतरविला होता. दिवसभर सामना होऊ शकला नाहीं व त्यास कांहीहि न करतां १,००० पौंड मिळाले.

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द शें १२ आणे व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें ता २७ जुलै रोजीं १ कोटि रुपयांची ट्रेझरी बिलाचीं टेंडरें स्वीकारलीं, त्यावरील सरासरी व्याजाचा दर द. सा द शें. १२ आणे पडला.

### जी. आय. पी. रेल्वेच्या उत्पन्नांत वाढ

| | रुपये |
|---|---|
| १ एप्रिल ते २० जुलै १९३६ | ४,०५,००,००० |
| „ „ १९३७ | ४,१८,६१,००० |

### मुंबई बंदरांतील आयात-निर्गत

| | आयात (टन) | निर्गत (टन) |
|---|---|---|
| एप्रिल–जून, १९३६ | ७,७४,५७४ | ८,३६,०३३ |
| „ १९३७ | ६,६६,८९५ | ६,१५,२११ |

### बादशहा पांचवे जॉर्ज ह्यांच्या पुतळ्याकरितां २ लक्ष रु

कलकत्ता येथें मरहूम बादशहा पांचवे जॉर्ज ह्याचा एक पुतळा बसविण्यात येणार आहे त्याचें काम एका युरोपियन शिल्पकाराकडे सोपविण्यात आलें असून स्मारक-फंडांतील ३ लक्ष १४ हजार रुपयांपैकीं २ लक्ष रु. ह्या पुतळ्यावर खर्च होणार आहेत.

### आपलें पीक सरकार-स्वाधीन करण्याची शेतकऱ्यावर सक्ती

शेतकऱ्यानीं चालू वर्षाच्या आपल्या पिकांपैकीं स्वतःपुरतें व बियांस लागेल एवढें धान्य वगळून बाकी सर्व गहू व राय नावाचें धान्य सरकारी अधिकाऱ्यांचे स्वाधीन केलें पाहिजे, असा हुकूम जर्मन सरकारनें काढला आहे. अन्नाचा तुटवडा राष्ट्रास पडू नये, ह्याकरितां ही खबरदारी घेण्यात येत आहे

### दुय्यम धंद्यांच्या उत्पादन-खर्चाची चौकशी

दुय्यम धंद्याचें जपानी स्पर्धेपासून संरक्षण करण्याची योजना आखण्याची पूर्वतयारी म्हणून, श्री. आर. के नेहरू, आय सी. एस, हे मध्यवर्ती सरकारचे अधिकारी प्राथमिक चौकशी करण्यात गुतले आहेत. एकूण ५५ दुय्यम धंद्यांची यादी त्यांनीं केली आहे, त्यापैकीं १५ धंद्यांची चौकशी टारिफ बोर्डानें मागें केव्हां तरी केलेलीच आहे.

### जपानी मालाची हिंदुस्थानांत सरशी

महायुद्धापूर्वीं जपानमधून दरसाल सुमारें ३ कोटि, ६४ लक्ष रुपयांचा माल हिंदुस्थानात आयात होत असे. ३१ मार्च १९३७ अखेर सपलेल्या वर्षीं २१ कोटींचा जपानी माल हिंदुस्थानात उतरला

### रौटन कमिटीच्या शिफारसींची अंमलबजावणी

मोटार लॉऱ्या व बसेस ह्यांच्या वहातुकीचें नियत्रण करण्याकरितां उपाययोजना सुचविण्याकरितां मि. रौटन, आय. सी एस, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या नोव्हेंबरमध्यें एक कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट एप्रिल, १९३७ मध्यें प्रसिद्ध झाला मोटारगाड्यांचा विमा उतरणें सक्तीचें असावें, ही सदरहु कमिटीची सर्वांत महत्त्वाची शिफारस आहे. नवीन घडामोडींचा परिचय करून घेऊन नव्या बिलाचा मसुदा तयार करण्याचें काम कमिटीचे चिटणीस, मि. रेनॉल्डस, ह्यांचेकडे सोंपविण्यांत आलें आहे. मि. रेनॉल्डस हे सध्या हिंदुस्थानांतील प्रमुख प्रांतांतील हितसबधी लोकांचा सल्ला घेण्याकरितां दौऱ्यावर निघाले आहेत.

### मेवामिठाईच्या कारखान्यांस स्वस्त दुधाचा पुरवठा

ग्रेटब्रिटनमध्यें कोको व मेवामिठाई ह्याच्या कारखानदारांस खाजगी कुटुंबापेक्षां स्वस्त दरानें दूध मिळतें, ह्याविषयीं पार्लमेंट मध्यें नुकतीच तक्रार करण्यात आली. ग्रेटब्रिटनमधील दुधाच्या एकूण खपापैकी कोको, चाकोलेट इत्यादींच्या कारखान्यांत एक टक्क्यापेक्षाहि कमी दूध खपतें, असं सरकारतर्फे सांगण्यात आलें

### चढ-उतार करणारे पोस्टमन

लडनमधील कित्येक पोस्टमनास दररोज निदान १,२०० पायऱ्या चढाव्या व उतराव्या लागतात. पत्रें वाटण्यास निघण्याचे वेळीं ज्यास्तींत ज्यास्त १६ शेर ओझें त्यांस घ्यावें लागतें. फार चढउतार करावा लागणाऱ्या पोस्टमनांस फिरण्याचें काम तीन तासापेक्षां ज्यास्त पडूं नये, अशी लंडनमधील पोस्टमनांची मागणी आहे.

### बालवीरांची संख्या

बालवीर चळवळीस १९०७ सालीं सुरवात झाली. आतां ४९ देशात मिळून २८ लक्ष १२ हजार बालवीर ह्या चळवळींत सामील आहेत. सर्व देशांत अमेरिकेमध्यें बालवीरांची संख्या अधिक आहे.

### हिंदुस्थानांत मोटारगाड्यांची आयात

१९३६–३७ सालीं हिंदुस्थानांत २ कोटि, ४३ लक्ष रु किंमतीच्या १२,९३९ मोटारगाड्यांची आयात झाली १९३५–३६ सालीं १३,५९० गाड्या उतरल्या होत्या व त्यांची किंमत २ कोटि, ५१ लक्ष रु भरली होती. गेल्या सालीं अमेरिकेंतून ३,८५१, ग्रेटब्रिटनमधून ६३३७ व कॅनडातून १,२९० गाड्या आल्या. जर्मन गाड्यांची आयात वाढत आहे मोटारींच्या व्यापाराचा निम्मा हिस्सा ब्रिटिश बनावटीच्या गाड्यांनीं काबीज केला आहे.

### घारापुरी येथील लेण्याचें जतन

मुंबई शहरानजीकचीं घारापुरी लेणीं जुनीं होऊन तेथें पडझड होऊं लागली आहे लेण्यांच्या माथ्यावर सिमेंटचा थर दिला असतां आंत पाणी गळणार नाहीं व लेण्यांचें जतन होईल, ह्या अपेक्षेनें जरूर ती उपाययोजना ह्रतीं घेण्यांत येत आहे पावसाळा संपल्यानंतर हें काम सुरू होईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| १८–७–३७ ते २४–७–३७ | २७,७५,३७८ |
| २५–७–३७ ते ३१–७–३७ | ६९,१५,९४२ |
| २१–९–३१ ते ३१–७–३७ | ३,०१,१६,६७,४१७ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ३८२ | ६ आर्थिक चलतींचें नादारीमध्यें रूपांतर कसें झालें ? | |
| २ स्वदेशी आणि अर्थशास्त्रीय सिद्धांत | ३८३ | ७ हिंदी लष्करांतील सैनिकांचें आरोग्य | ३८८ |
| ३ धंदेशिक्षणाचा प्रसार | ३८४ | ८ डॉ बी. आर. गुणे | ३८९ |
| ४ स्फुट विचार | ३८५ | ९ सेवानिवृत्त नोकरांस दिलेलें बक्षीस | ३८९ |
| मध्यवर्ती राज्यव्यवस्थेंत लोकसत्ता पाहिजे—राष्ट्रीय संघटनेची आवश्यकता—रोखे बाजाराची घडी केव्हां बसणार ? | | १० कपाशीच्या भावाची घसरगुडी | ३९० |
| | | ११ क्रि प्रो. कोडाचें ९४ वें कलम व बँका | ३९० |
| ५ मोटार वहातुकीची सुरक्षितता व कार्यक्षमता | ३८६ | १२ निवडक बाजारभाव | ३९१ |

अर्थ

बुधवार, ता. ४ ऑगस्ट, १९३७

## स्वदेशी आणि अर्थशास्त्रीय सिद्धांत

सार्वजनिक सभा व महाराष्ट्र स्वदेशी संघ ह्यांचे विद्यमानें गेल्या मंगळवारीं पुणें येथें सार्वजनिक काकांची पुण्यतिथि साजरी करण्यात आली, त्या प्रसंगीं मुख्य वक्ते ह्या नात्यानें प्रो. काळे ह्यांनीं काकांच्या चरित्राचें रहस्य त्रोटक रीतीनें विशद करून सांगितलें आणि हिंदुस्थानातील स्वदेशी चळवळीचें अर्थशास्त्राच्या दृष्टीनें विवेचन केलें. स्वदेशी चळवळीवर घेण्यांत येणारे आक्षेप वस्तुतः अनियंत्रित व्यापाराच्या पुरस्काराचे बुडाशीं असलेल्या तत्त्वावर आधारलेले असतात आणि वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्य व खुला व्यापार ह्याच्या मर्यादा शास्त्रीय पद्धतीनें निश्चित केल्या असतां स्वदेशीचें मंडन सहजच होतें. स्वदेशीच्या विरोधाचें खंडन खुद्द अर्थशास्त्रवेत्त्यांनीं अनेक वर्षांमागेंच केलें असून लिस्टसारख्या जर्मन पंडिताचे सिद्धांत ह्या सबधांत मान्यता पावलेले आहेत. तेच सिद्धांत न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं दोन पिढ्याचे मागें हिंदुस्थानातील परिस्थितीस लावून ह्या देशात औद्योगिक संरक्षण व स्वदेशी ह्याची आवश्यकता किती आहे हें निदर्शनास आणून दिलें. हिंदुस्थानातील उद्योगधंदे काळाच्या ओघात सापडून आणि पाश्चात्य स्पर्धेच्या भोवऱ्यात गटांगळ्या खाऊं लागून नाहींसे होण्याचे मार्गास लागले असें पाहून सार्वजनिक काकांनीं साठ वर्षांमागें स्वदेशीचें व्रत अंगिकारलें आणि देशी उद्योगधंद्याच्या स्थापनेचा उपक्रम केला. ह्या विषयाचें महत्त्व अर्थशास्त्रदृष्ट्या काय आहे ह्याचें स्पष्टीकरण न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं त्याच वेळेस केलें आणि पुढें स्वदेशी चळवळीस पाश्चात्य नवमतवादी अर्थशास्त्रवेत्त्यांचा पाठिंबा असल्याचें विद्वत्ताप्रचुर रीतीनें सिद्ध केलें.

सध्याच्या काळात स्वदेशीची आवश्यकता पूर्वींइतकीच, किंबहुना अधिक आहे हें उदाहरणांनीं विशद करून त्या चळवळीस अर्थशास्त्राचा पूर्ण आधार आहे ही गोष्ट श्रोत्यांच्या मनावर प्रो. काळे ह्यांनीं बिंबविली. अर्थशास्त्राचा कटाक्ष वैयक्तिक हितापेक्षां सामाजिक व सामुदायिक हितावर अधिक असतो. समाजाचें धारण-पोषण योग्य रीतीनें व्हावें अशी वागणूक व्यक्तीस ठेवावी लागते व राष्ट्राच्या संरक्षणासाठीं व समाजाच्या प्रगतीसाठीं व्यक्तीस स्वार्थत्याग करावा लागतो. समाज किंवा राष्ट्र ह्याची अवनति किंवा नाश होऊं लागल्यास व्यक्तिस्वार्थाचा बळी देणें भाग पडतें. ह्या तात्त्विक व व्यावहारिक महत्त्वाच्या गोष्टी सर्वमान्य झालेल्या आहेत आणि स्वतःच्या वर्तनानें पाश्चात्य राष्ट्रांनीं त्यावर मान्यतेचा शिक्का मारला आहे. स्वस्त माल परदेशांतून आला तरी घ्यावा आणि त्याच्या मोबदला आपला स्वस्त माल त्यांस विकावा हा नियम व्यक्तींनीं स्वत:च्या आचरणांत पाळल्यास समाजाचें व राष्ट्राचें हित आपोआप साधतें हा जुना अर्थशास्त्रसिद्धांत अनुभवाच्या व विचाराच्या कसोटीस उतरत नाहीं, हींच गोष्ट प्रो. काळे ह्यांनीं पुढें मांडून ती शास्त्रीय विचारसरणीनेंच सिद्ध केली. स्वस्त पण परदेशी माल व्यक्तींनीं स्वार्थबुद्धीनें विकत घेतला आणि त्याचा परिणाम देशी धंदे बुडण्यामध्यें झाला तर त्यामुळें उद्भवणाऱ्या बेकारीची व हलाखीची झळ देशातल्या सामान्य जनतेस लागून ह्या आपत्तीचें निराकरण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकावर पडते. म्हणजे, आर्थिक व औद्योगिक अवनतीचा परिणाम सबंद समाजास भोवतो आणि ह्याकरिताच त्या परिस्थितीवर राष्ट्रास आणि त्याचें प्रतिनिधि जें सरकार त्यास, उपाय योजना करावी लागते. व्यक्तीस हितकारक वाटणारी परदेशी मालाची स्वस्ताई वास्तविक महागाईच ठरते. कारण, बेकारीस पोसण्याच्या जबाबदारीचा भार सर्व जनतेस म्हणजे कर देणारास सहन करावा लागतो. सारांश, देशी व परदेशी मालाकडे प्रत्येकास राष्ट्रीय दृष्टीनें पहावें लागतें आणि सरकारास औद्योगिक संरक्षणाच्या धोरणाची कास धरावी लागते.

पाश्चात्य राष्ट्रामध्यें आज व्यापार व उद्योगधंदे ह्यांचें नियमन तेथील राज्यकर्ते करीत आहेत. साखरेचा स्वदेशी धंदा नवीन निर्माण होऊन तो चालावा म्हणून इंग्लंडमधील सरकारनें त्यास पन्नास कोटि रुपयांचें द्रव्यसहाय दिलें असून ब्रिटिश जनता त्याकरितां झीज सोसून महाग साखर खात आहे. आर्थिक स्वयंपूर्णतेचें पाश्चात्य राष्ट्रांनीं अलीकडे अवलंबिलेलें धोरण स्वदेशी चळवळीच्या स्वरूपाचेंच आहे. व्यक्तींच्या स्वार्थमूलक वर्तनावर त्याचा परिणाम होणें अपरिहार्य आहे. लोक व समाज व्यवहारात कसे वागतात हें पाहून अर्थशास्त्रज्ञांनीं त्याच्या आधारावर आपले सिद्धांत उभारले पाहिजेत. शेती, उद्योगधंदे व व्यापार ह्याच्या प्रगतीवर व्यक्तीचें जीवित अवलंबून रहाणारें असल्यानें व सार्वजनिक हिताच्या जोपासनेनेंच व्यक्तिहित साधत असल्यानें आर्थिक उन्नतीप्रीत्यर्थ नागरिकांनीं स्वार्थत्याग करणें आवश्यक ठरतें. वैयक्तिक स्वार्थ आणि राष्ट्रीय हित ह्यामध्यें विरोध येतो तेव्हा व्यक्तिगत स्वार्थास माघार घ्यावी लागते, हें राजकारणाचें व तसेंच अर्थकारणाचें मूलतत्त्व आहे आणि हिंदी स्वदेशी चळवळीचा तो पाया आहे. बदलत्या काळात जनतेच्या अभिरुचीस नवीन वळण लागत असून नित्य व्यवहारांत लागणाऱ्या जिनसाची विविधता प्रतिदिनीं वाढत आहे. अशा परिस्थितींत स्वदेशी चळवळीचें महत्त्व वृद्धिंगत होत आहे,-हें ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. बदलत्या रहाणीस अनुसरून ज्या अनेक जिनसांस समाजांत मागणी आहे तो सर्व माल शक्यतोंवर देशात निर्माण होईल असा कसोशीचा प्रयत्न झाला पाहिजे. भांडवल जमा करून नवीन लहान-मोठे उद्योग-

धंदे स्थापणें हें स्वदेशी चळवळीचें विधायक अंग आहे तेव्हां प्रत्येकानें आपापल्या शक्तीप्रमाणें ह्या चळवळीस निरनिराळ्या मार्गांनीं सहाय करणें हें त्याचें कर्तव्य आहे सार्वजनिक काकाच्या काळाच्या मानानें स्वदेशीचें कार्य एका दृष्टीनें सोपें आहे, तसेंच तें दुसऱ्या दृष्टीनें अवघड झालें आहे परकीय स्पर्धा तीव्र झाली असून देशांत बेकारी वाढली आहे परिस्थितीकडे लक्ष देऊन राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीकरिता नागरिकांनीं पदरास खार लावून झटलें पाहिजे हें सार्वजनिक काकाच्या जीवितांचें रहस्य आजहि सर्वांनीं ओळखणें अगत्याचें आहे

---

## धंदेशिक्षणाचा प्रसार

### ब्रिटिश तज्ञांच्या शिफारसी

हिन्दी शिक्षणपद्धतीची पुनर्घटना व धंदेशिक्षणाचा प्रसार ह्यासबंधीं हिंदुस्थानांतील परिस्थितीचें निरीक्षण करून सल्ला देण्याकरितां मध्यवर्ती सरकारनें दोन ब्रिटिश तज्ञाची योजना केली होती सदरहु तज्ञानीं आपला अहवाल सरकारास सादर केला, तो आतां प्रसिद्ध करण्यात आला आहे. हिन्दी शिक्षणतज्ञांस हें काम करता आलें नसतें, असें म्हणणें धार्ष्ट्याचें होईल हिंदुस्थानांतील सर्व प्रातातील परिस्थिति समक्ष अवलोकन करण्यास ह्या ब्रिटिश तज्ञास सवड मिळाली नाहीं व दिल्ली, पजाब व सयुक्तप्रात येथील निरीक्षणावरच त्यास काम भागवावें लागलें ( १ ) सर्वसाधारण शिक्षणपद्धति व त्यावरील देखरेख आणि ( २ ) धंदे व व्यवसाय ह्यांस अनुरूप अशा शिक्षणाची तरतूद, असे चौकशीचे दोन भाग करून व दोघा तज्ञानीं ते आपसात वाटून घेऊन रिपोर्टांचें काम पुरें केलें आहे

रिपोर्टांतील तपशीलवार सूचना वाचल्या असता, त्यामध्यें विशेष नवीन काहीं आहे असें दिसत नाहीं. आज अनेक वर्षें अनुभवी हिंदी शिक्षणतज्ञ जें सागत आले आहेत, त्याचाच पुनरुच्चार रिपोर्टांत करण्यात आला आहे आता ब्रिटिश तज्ञाच्या शिफारसींचा त्याचेवर शिक्का बसला आहे म्हणून त्यास महत्त्व प्राप्त झालें आहे, असें फार तर कोणी म्हणावें पुस्तकी ज्ञानापेक्षा मुलाच्या कलास अनुरूप असें शिक्षण त्यास देण्यात यावें, प्राथमिक वर्गावर लायक स्त्री शिक्षकाची नेमणूक करावी, इग्रजी भाषेच्या शिक्षणावर फाजील भर न देता मातृभाषा हेंच शिक्षणाचें माध्यम ठेवावें परंतु इग्रजीचा अभ्यास मात्र सक्तीचा असावा, हस्तव्यवसायास अभ्यासक्रमात स्थान मिळावें, कलेच्या पद्धतशीर शिक्षणाकडे ज्यास्त लक्ष देण्यत यावें, शारीरिक शिक्षणाबरोबर इतर आरोग्यवर्धक गोष्टींकडेहि लक्ष पुरवावें ( १ ) शिक्षकाची नेमणूक होण्यापूर्वीचा व ( २ ) आपल्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव आल्यानतरचा अशा दोन टप्प्यात त्याच्या शिक्षणक्रमाची आखणी करावी, शिक्षणखात्यात ज्यास्त कडक शिस्त पाळण्यात यावी, इन्स्पेक्टरांस पुरेसा भत्ता देण्यात यावा, इन्स्पेक्टर व काहीं निवडक शिक्षक ह्यास परदेशातील शिक्षणपद्धतींचें अवलोकन करण्यास संधि मिळावी, इत्यादि शिफारसी कमिटीनें आपल्या रिपोर्टांतील सर्वसाधारण शिक्षणाच्या विभागांत नमूद केल्या आहेत.

### बेकारीकडे जाण्याचा नवा मार्ग ?

धंदेशिक्षणाच्या आवश्यकतेसबंधीं सर्वत्र एकमत आढळतें व व्यावसायिक शिक्षणाच्या सोई वाढवून सरकारनें तरुण पिढीच्या आयुष्यास नवें वळण लावलें पाहिजे, अशी मागणी नेहेमीं करण्यात येत आहे देशाची औद्योगिक प्रगति झाल्यावाचून धंदेशिक्षण घेतलेल्या तरुणाची सख्या केवळ वाढून काहीं उपयोग होणार नाहीं उद्योगधंदे व व्यापार ह्याची वाढ व व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार ह्याचा अत्यत निकट सबध आहे आणि नुसत्या शिक्षणाची वाढ झाल्यानें बेकारीचा प्रश्न सुटणार नाहीं हें उघड आहे. प्रत्येक प्रातानें स्वत.च्या क्षेत्रातील कारखान्यात किती शिक्षित तरुणास वाव आहे ह्याचा अदाज करून, जरूर तेवढ्या सख्येसच धंदेशिक्षण द्यावें असे तज्ज्ञद्वयानें सुचविलें आहे, व त्याबाबत कारखानदाराचें सहकार्यहि आवश्यक आहे, असें सांगितलें आहे, मुंबई इलाख्याच्या औद्योगिक खात्यानें आखलेली धंदेशिक्षणाच्या उमेदवारीची योजना ब्रिटिश तज्ज्ञानीं सुचवावयाच्या आधींच चालू झालेली आहे. तज्ञाच्या रिपोर्टांत 'धंदेशिक्षणाच्या व व्यापारी व्यवसायाच्या शाळांतील अभ्यासक्रमाविषयीं तपशीलवार सूचना करण्यांत आल्या आहेत, त्यांतहि विशेष नवीन असें काहीं नाहीं

धंद्यास योग्य असें शिक्षण घेतलेले तरुण लोक बेकार राहू नयेत अशी तजवीज करावयाची असल्यास, शिक्षितास कामधंदा मिळण्याची सोय प्रथम करण्यात आली पाहिजे, हल्लींच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या युगात, केवळ शिक्षणाचे सहायानें नवीन व्यवसाय निर्माण करणें एकट्या दुकट्या व्यक्तीस अशक्य आहे तें काम सघटित प्रयत्नाने, भाडवलाच्या पाठबळानें आणि सरकारी सहायानेंच होण्याजोगें आहे सरकारनें नुसत्या शिक्षणक्रमाकडेच लक्ष पुरविल्यास त्यानें आपलें कर्तव्य पूर्णपणें पार पाडल्यासारखें होणार नाहीं. उद्योगधद्याची जोपासना व वाढ आणि त्यास अनुरूप अशा शिक्षणाची व्यवस्था ह्यांची सांगड बसल्यावाचून औद्योगिक शिक्षणाचा प्रश्न समाधानकारकपणें सुटणार नाहीं. नाहीतर, सध्याचें वाङ्मयीन शिक्षण घेणाऱ्या तरुणाप्रमाणें धंदेशिक्षण घेणाऱ्या लायक तरुणासहि हात जोडून स्वस्थ बसण्याची पाळी येईल व बेकारीकडे जाण्याच्या कोणत्या अभ्यासक्रमाचा मार्ग पत्करावयाचा एवढाच विकल्प विद्यार्थ्यांपुढें शिलक राहील

---

### पॅलेस्टाइनमध्यें ज्यू लोकांचा वाढता प्रवेश

१९३६ सालीं पॅलेस्टाइनमध्यें कायम वसति करण्याच्या उद्देशानें एकूण ३१,६७१ परदेशीय लोक शिरले, त्यामध्यें २९,७२७ यहुदी ( ज्यू ) होते १९३५ सालीं ६१,८५४ ज्यू लोकाचा प्रवेश झाला होता पोलडमधून सर्वांत जास्त ( ४०% ) ज्यू आले जर्मनीमधून येणाऱ्या ज्यू लोकाचें प्रमाणहि १२% चें ३०% झालें पॅलेस्टाइनकडे आज कित्येक वर्षें ज्यू लोकांचा प्रवाह अखड चालू आहे, तथापि, त्यामुळें तेथील लोकाच्या रहाणीवर दृश्य परिणाम झाला नाहीं, हें विशेष आहे पॅलेस्टाइनला मायभूमि मानून, ज्यू लोक अरबावर आक्रमण कसें करू लागले, हें वरील आकड्यावरून दिसून येईल. अरब व ज्यू ह्या दोघासहि संतुष्ट करण्याचा ब्रिटिश सरकारचा प्रयत्न आहे, तो कितपत यशस्वी होतो, हें आतां लवकर समजेलच.

## आर्थिक चलतीचें नादारीमध्यें रूपांतर कसें झालें ?

### अमेरिकेचें उदाहरण

१९२७ ते १९३७ ह्या दहा वर्षांमध्यें अमेरिकन राष्ट्रानें उत्कर्ष व अपकर्ष ह्या दोन्ही अवस्थाचा आस्वाद क्रमानें घेतला व आतां त्या देशाची पुनः प्रगति होऊं लागली आहे. १९२७-२८ चे सुमारास अमेरिकेनें ऐहिक ऐश्वर्याचें परमोच्च शिखर गाठलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं २½ कोटि कुटुंबांचे नेते मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांतून कामें करून, आपल्या मिळकतीच्या पैशानें स्वत.च तयार केलेला माल विकत घेत होते व आपली शिलक कपन्याच्या भागामध्यें गुंतवीत होते. कारखानदार व कामगार ह्यामध्यें सलोखा नादत होता, कारण कामगारांस भरपूर वेतन देऊन आपला माल खपविण्याचें साधन निर्माण करण्याची कारखानदाराची खटपट होती व कामाचे तास कमी करून आपल्या कामगारांस वस्तूचा उपभोग घेण्यास सवड देण्याचें त्याचें धोरण होतें कामगारहि कामें उत्साहानें करीत अशा रीतीनें, सर्वत्र विश्वास उत्पन्न होईल असें वातावरण होतें. अमेरिकेंतील सर्वच लोक सुखात असल्याचे दिसे. इग्लंडमधील कामगारापेक्षा अमेरिकन कामगारास दुपट वेतन मिळे जिकडे तिकडे आनंदीमय वातावरण खेळत होतें.

हा उत्कर्ष चिरंतर टिकणार, अशीच सर्वांची कल्पना झाली नित्योपयोगी व चैनीच्या वस्तूंचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होऊ लागला च लोक आपल्या स्वत.च्या आवडीनिवडीस सोइस्कर अशा वस्तूंची खरेदी करू लागले. सट्टेबाजीसहि तात्काळ सुरवात झाली. "ही खुर्ची बरी दिसते माझे शेजारीहि असल्याच खुर्च्या उपयोगात आणतात. गेल्या वर्षी ह्या तऱ्हेच्या लाखो खुर्च्या खपल्या. मीहि एक उधारीचर विकत घेतो खुर्च्या तयार करणाऱ्या कंपनीस प्रचंड नफा होणार हें निश्चित. तेव्हां मी त्या कंपनीचे भागहि विकत घेणार व त्याची किंमत चढली कीं ते विकून टाकणार, म्हणजे खुर्चीच्या किंमतीची बेजमी झाली. मी स्वतः एक खुर्ची विकत घेतली म्हणजे पर्यायानें भागाची किंमत वाढण्यास सहाय होईलच. मला भागाचे देवघेवींत नफा उरला तर खुर्ची फुकट मिळाल्या सारखी होईल. परंतु नुकसान आल्यास मात्र जास्त काम करून आणखी पैसा मिळवावा लागेल." अशा तऱ्हेच्या विचारसरणीनें लक्षावधि लोक वरील प्रकारच्या व्यवहारास प्रवृत्त झाले म्हणजे त्याचा परिणाम चलतीचा दिखाऊपणा वाढण्याकडेच होणार, हें उघड आहे.

अमेरिकेमधील कारखान्यातील उत्पादनाचें प्रमाण सहाजीकच विलक्षण वाढलें. कोट्याधीशाची सख्या फुगली, कामगारास भारी दरानें मजूरी मिळूं लागली, कॉलेजातील विद्यार्थ्यांची सख्या पाऊण कोटींवर गेली, मोटारींचा सुळसुळाट झाला व रहाण्याच्या घरास प्रचंड मागणी उत्पन्न झाली. अशा परिस्थितींत युरोपांतील समाजसत्तावादास पाठिबा देणारा कोण मिळणार व राजकारणात लक्ष तरी कोण घालणार? चलतीचें पाऊल वेगानें पुढें पडत होतें. लोकाना पैसा बचत करण्याची इच्छाहि होईना व पुढच्या दोन, दोन वर्षांच्या उत्पन्नाची विल्हेवाट आजच लावून टाकण्याची पद्धत सर्वांनीं उचलली. दुर्दम्य आशावाद ह्यांच्या मुळाशीं होता. अमेरिकेंतील स्त्री-पुरुषास कंपन्यांचे भाग विकत घेण्याचें वेड लागलें. त्यांचें लक्ष डिव्हिडंडकडे नव्हतें, भागाची किमत चढेल व आपणास चुटकीसरशी श्रीमंत होतां येईल, ह्या विचारानें त्या सर्वांस व्यापलें होतें. प्रत्येकजण ह्या एकाच दिशेनें विचार करी व सुखस्वप्नांत निमग्न होई. भागाच्या किमतीचें मान चढतीचें राहिलें, तोंवर लोकांनीं त्या व्यवहारांत प्रचंड नफा मिळविला, परंतु ह्या नफ्याची रकम पुनः आणखी भाग खरेदी करण्याकडे खर्चण्यात येई. श्रीमत लोक आपला सर्व पैसा ह्या सट्टेबाजींत गुंतवीत व लहान असामी आपल्या जवळची सर्व पुजी त्यांत आणून ओतीत. बॅकासहि ह्या मनोविकारानें पछाडलें व भागांच्या फुगलेल्या किंमतींच्या तारणावर त्या नि.शंकपणें कर्जें देऊ लागल्या. ह्या कारणानें सट्टेबाजीस भयंकर ऊत आला. ह्या परिस्थितीमधील धोक्याबाबत कित्येक वेळां देण्यांत आलेल्या सूचनाचा विचार करण्याजोगी लोकांची मनःस्थितीच नव्हती.

हळु हळु, चलतीचें पाऊल मागें मागें येऊं लागलें व एका आठवड्यांचे आत भागाच्या किंमती घसरल्या ! किंमती आणखी खाली जाण्यापूर्वीं आपले भाग विकून टाकण्याची लोक घाई करूं लागले. दुकानदारानीं कारखानदाराच्या मालासबधातील ऑर्डरी छाटल्या, लाखों लोकांनीं जुन्याच मोटारगाड्या आणखी एक वर्षभर वापरण्याचें ठरविलें, विकलेला माल नापसंत म्हणून दुकानात परत येऊ लागला व आत्महत्त्येची लाट जोरानें उसळली सवा कोटि अमेरिकन लोक सट्टेबाजीच्या नादानें नुकसानींत आले, बॅकानीं आपले दरवाजे बद केले, कारखान्यास काम मिळेनासें झालें, बेकारी वाढली व मदीची साथ प्लेगप्रमाणें देशभर पसरली, आणि त्याचा सर्व जगावर प्रतिकूल परिणाम झाला. अमेरिकेनें युरोपातील ऋणको राष्ट्रास कर्जाची तहकुबी देण्याचें नाकारलें, ह्यामुळें सोन्याचा प्रवाह कर्जफेडीकरितां त्या देशाकडे वाहूं लागला. अमेरिकेस इतर राष्ट्रानीं देणें असलेल्या रकमाचे मोनानें जगातील सोन्याचा पुरवठा अत्यल्प होता, आणि अमेरिकेकडे पाठविलेलें सोनें त्या देशाचे राष्ट्रीय बॅकेंत अडकून पडल्यानें, तें दुर्मिळ होऊन महागलें इतर जिनसांची किंमत सोन्याच्या नाण्यानीं मापली जात असे, त्यामुळें अर्थातच सोनें महाग झालें तसे इतर मालाचे भाव उतरले सोन्याच्या किमतींत ४० टक्के वाढ झाली व तितकीच इतर बाजारभावांत घट झाली. मालाचे भाव पडल्याकारणानें लोकाजवळील क्रय-साधन कमी झालें, आणि जगातील सर्वच देशात हाहा.कार उडाला फ्रान्सनें अमेरिकेप्रमाणेंच सोनें साठविण्यास सुरवात केली, व सोन्याचा चलन म्हणून होणारा उपयोग बंद पडला. आजवर, अमेरिकेस औद्योगिक मंदीचे दुष्परिणाम कधीच भोगावे लागले नव्हते. उद्योगी मनुष्यास धनप्राप्ती व्हावयाचीच, एकाद्यास नोकरी मिळाली नाहीं तर त्यास जबाबदार तोच, अशी मनोवृत्ति अमेरिकेंत निर्माण झालेली होती. बेकारीसबधात समाजाचें काहीं कर्तव्य असतें, ह्याची जाणीवच त्या देशात उत्पन्न झालेली नव्हती. जोपर्यंत चलती होती, तोपर्यंत हें सर्व ठीक होतें, परतु आता मंदीच्या दिवसातहि बेकार लोकास सरकार विचारीनासें झालें. इंग्लंडमधील बेकारीच्या विम्याकडे व बेकारास देण्यात येणाऱ्या मदतीच्या योजनाकडे अमेरिका आजवर तुच्छतेनें पहात असे, परतु खुद्द स्वत.वरी पाळी आली, तेव्हा अमेरिकेस ह्या योजनांचें महत्व पटलें. कारखाने बद पडले व त्यातच अवर्षणाची भर पडून शेतीचा धद्दा पार बुडाला ! पिकांचा नाश झाला व शेतकरी कुटुंबें धुळीस मिळालीं ह्या सर्व आपत्तींस अमेरिकन सरकार मोठ्या धैर्यानें व चिकाटीनें तोंड देत आहे. परतु आज एक पचमाश लोकसख्येचें पोट सरकारी मदतीवर अवलबून आहे, अशा परिस्थितींत प्रगतीचें पाऊल मदच रहाणार हें उघड आहे. आता प्रगतीची दिशा दिसू लागली असून तिच्या मार्गांतील खांच खळगेहि स्पष्ट झालें आहेत. तेव्हा ह्यापुढें योग्य नियत्रणाखाली उद्योगधंदे चालविले जाऊन अंतिम लोकहिताचें संरक्षण केलें जाईल ह्यात सशय नाहीं.

( "न्यूज ऑफ दि वर्ल्ड" मधील एका लेखाचे आधारें )

## हिंदी लष्करांतील सैनिकांचें आरोग्य

हिंदी लष्करांतील ब्रिटिश सैनिकापेक्षां हिंदी सैनिकास आजारी पडून इस्पितळांत जाण्याचा प्रसंग कमी वेळां येतो व ब्रिटिशांपेक्षां त्यांचें आरोग्य चांगलें रहातें, असा अनुभव आहे १९३५ सालीं ह्यावाबत थोडी सुधारणा झाली असल्याचें खालील आंकड्यावरून दिसून येईलः—

| | इस्पितळांत जाणाऱ्याचें दर हजार संख्येशीं प्रमाण | |
|---|---|---|
| | १९३४ | १९३५ |
| ब्रिटिश अधिकारी | ४२९ | ४७० |
| „ सैनिक | ५७४ | ५६७ |
| हिंदी अधिकारी | ३३५ | ३४७ |
| „ सैनिक | ४५६ | ४२२ |

अधिकाराच्या जागांवरील सैनिकांस इस्पितळाची वारी कमी वेळा करावी लागते, हेंहि वरील आकड्यावरून स्पष्ट होतें.

ब्रिटिश सैनिकांस १९३५ सालीं मलेरियाचा उपद्रव कमी प्रमाणावर झाला. हिंदी सैनिकापैकीं १४,७२८ जणांस हिवताप आला, त्यांपैकीं ९ सैनिकांचा त्यानें बळी घेतला क्वेट्टा येथील लष्करी ठाणें हिंवतापाचे दृष्टीनें ब्रिटिशास जाचक झालें लष्करी ठाण्यातील हिंदी वस्तीमधूनच रोगाच्या उपद्रवास सुरवात होते असें सरकारी अहवालांत म्हटलें आहे.

---


## बार्शी सेंट्रल कोऑपरेटिव्ह बॅंक लि.

( स्थापना १९०६ )

## नोटिस

या बॅंकेचे सर्व मेंबरांस कळविण्यात येतें कीं, बॅंकेची सर्वसाधारण सभा तारीख २२ आगष्ट १९३७ रविवार रोजीं दुपारीं ( ३ ) वाजता बार्शी येथें बॅंकेचे ऑफिसात खालील विषयाचा विचार करण्याकरितां भरेल, त्यावेळीं सर्व मेंबरानीं हजर राहावें अशी विनंति आहे.

( १ ) ता. ३०।६।३७ अखेरचे हिशेब व मॅनेजिंग बोर्डानें केलेला रिपोर्ट मजूर करणें

( २ ) शेअरवर देण्याचा डिव्हिडंडचा दर ठरविणें

( ३ ) बॅंकेचा पोट नियम २७ ( ३ ) यांस अनुसरून चालू सालीं रिटायर झालेल्या डायरेक्टराचे जागीं नवीन निवडणूक करणें. व्यक्तिशः सभासदांतर्फे डायरेक्टरापैकीं श्री. जी आर साने हे व सोसायट्यातर्फे डायरेक्टरापैकीं, श्री देशमुख हे रिटायर होत आहेत.

( ४ ) रिपोर्टांतील यादीप्रमाणें पोट-नियम दुरुस्त करणें

( ५ ) व्यक्तिमात्र सभासदास रु. ३००० पर्यंत कर्ज मिळणेचे अर्ज मंजूर करणें. सदर अर्ज साधारण सभेपूर्वी निदान एक दिवस अगोदर दिले पाहिजेत.

( ६ ) सन १९३७–३८ सालामध्यें बॅंकेनें उभारावयाच्या कर्जाऊ भांडवलाची कमाल मर्यादा ठरविणें.

( ७ ) चेअरमन यांचे परवानगीनें आयते वेळीं येणारीं दुसरीं कामें.

बार्शी, ता २६ जुलै १९३७. } बोर्डाचे हुकुमावरून र. प पटवर्धन, मॅनेजर.



## धी बॅंक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल | ... ... ... रु | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | .. ... .. रु | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | .. ... ... रु. | १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बॅंक लिमिटेड

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाहीं अखेर व्याजाची रक्कम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बॅंकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों, व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों, विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागः त्यास तींसुद्धां ही बॅंक करते नियमाची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बॅंकेचे व्यवहार या बॅंकेमार्फत केले जातात

एजंटः— टी आर लालवाणी



## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८३,१०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,९९३ |
| सेव्हिंग्ज बॅंक ठेवी | ६,७१६ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,८६,५३६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४२,६२४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## स्फुट विचार

### मध्यवर्ती राज्यव्यवस्थेंत लोकसत्ता पाहिजे

येथील वाडिया कॉलेजमधील इतिहास व अर्थशास्त्र ह्या विषयाचा विशेष अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समितीची चालू वर्षांतली पहिली सभा झाली, त्याप्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं प्रि. खाड्ये यांचे अध्यक्षतेखालीं "हिंदुस्थानच्या राजकीय आणि आर्थिक परिस्थितीचीं कांहीं व्यावहारिक अंगें" ह्या विषयावर व्याख्यान दिलें राष्ट्रीय सभेसारख्या संघटित व बलवान पक्षाच्या अनुयायांनीं प्रधान मंडळें बनवून राज्यकारभार स्वतःच्या हातात घेतल्याकारणानें सनदशीर पद्धतीनें लोकसत्तेची प्रगति घडवून आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे असें सांगून मध्यवर्ती राज्यव्यवस्थेंत जनतेच्या प्रतिनिधींस योग्य अधिकार प्राप्त झाल्यावाचून हिंदुस्थानची खरी राजकीय व आर्थिक उन्नति होणार नाहीं असें त्यांनीं प्रतिपादन केलें. बहुजन समाजाच्या हिताच्या अनेक गोष्टी प्रांतिक प्रधान मंडळास करतां येतील आणि त्यानें त्या केल्या पाहिजेत हें खरें असलें तरी कराच्या महत्त्वाच्या बाबी आणि राष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबतचें धोरण हिंदुस्थान सरकारच्या कक्षेंत आहे आणि त्या संबंधांत नवीन राजकीय घटनेमध्यें कांहींहि सुधारणा नाहीं. आयात जकाती, औद्योगिक संरक्षण, चलन व हुंडणावळ, प्राप्तीवरील व मिठावरील कर, सैन्यावरचा खर्च इत्यादि अत्यंत महत्त्वाच्या विषयांत लोकनियुक्त प्रतिनिधींस कांहींच सत्ता नाहीं. नवीन घटना असमाधानकारक व अपुऱ्या असल्याविषयीं देशातल्या सर्व पक्षांच्या व विचारांच्या लोकांचें एकमत आहे. ह्याचें कारण प्रांतिक राज्यव्यवस्थेंत असलेले निर्बंध एवढेंच नसून मध्यवर्ती कारभारात लोकांचें पाऊल पुढें पडण्याची घटनेंत तरतूद नाहीं हेंच प्रमुख आहे आपल्या वाढत्या लोकसंख्येच्या पोटापाण्याचा प्रश्न प्रत्येक राष्ट्र वसाहतींच्या द्वारें सोडवू पहात आहे पण हिंदी जनतेची दक्षिण आफ्रिका व इतर देश ह्यामध्यें काय अवस्था आहे हें प्रसिद्धच आहे. झांजिबारचा लढा ह्याच राजकीय राष्ट्रीय दुर्बलतेचें लक्षण आहे राजकीय आणि आर्थिक स्वायत्तता ज्या घटनेंत नाहीं ती हिंदी लोकांनीं असमाधानकारक मानली तर त्यात काय आश्चर्य आहे ?

---

### राष्ट्रीय संघटनेची आवश्यकता

प्रो. काळे ह्यांच्या भाषणांतील दुसऱ्या महत्त्वाच्या मुद्याचें त्रोटक विवेचन खालीं दिलें आहे. ब्रिटिश लोक उत्क्रांतिवादी आहेत आणि ब्रिटिश पार्लमेंटरी पद्धतीची राज्यव्यवस्था हिंदुस्थानात स्थापन करण्याचा आपला निश्चय त्यांच्या मुत्सद्यांनीं जाहीर केला आहे. त्यांच्या देशाच्या राजकीय व आर्थिक इतिहासाचें मनन करून हिंदी लोकास स्वतःची राज्यघटना बदलून घेतां येईल राष्ट्रीय वृत्तीच्या प्रबळ व सुसंघटित पक्षाच्या हातांत अनेक प्रांतांमध्यें आतां सत्ता आली आहे. सध्याच्या घटनेस वेळोवेळ मुरड घालून व नवीन प्रघात पाडून अप्रत्यक्ष रीतीनें त्यास लोकशाहीची स्थापना क्रमाक्रमानें करतां येईल. राष्ट्रीय प्रगतीसाठीं मध्यवर्ती राज्यकारभारांत लोकप्रतिनिधींस सत्ता प्राप्त झाली पाहिजे तीहि जनतेचें संघटन व तिच्या मताचें बळ वाढवून हस्तगत करतां येईल आम्हीं नवीन घटना मोडून टाकणार ही घोषणा एका बाजूस आणि पार्लमेंटनें हिंदुस्थानास दिलेली घटना ही फार मोठी जबाबदारीची उदार देणगी असून कित्येक वर्षें हिंदी लोकांनीं तिच्यावरच समाधान मानून स्वस्थ राहिलें पाहिजे हा ब्रिटिश मुत्सद्यांनीं व्यक्त केलेला अभिप्राय दुसऱ्या बाजूस, ह्या दोन्ही गोष्टी आत्यंतिक स्वरूपाच्या आहेत असें विचारी नागरिकांनीं मानून राष्ट्रीय एकीकरण व लोकमताचें संवर्धन ह्याच्या मार्गें लागलें पाहिजे. फेडरेशन येवो अथवा न येवो, मध्यवर्ती राज्यकारभारात लोकनियुक्त प्रतिनिधींस सत्ता मिळाल्यावाचून राष्ट्राच्या उन्नतीचा मार्ग मोकळा होणार नाहीं आणि प्रांतिक स्वायत्ततेचा पूर्ण फायदा जनतेच्या पदरांत पडणार नाहीं ही मागणी एकमुखानें सतत होणें आवश्यक आहे. ह्याकरिता हिंदी जनतेमधील भेदभाव नाहींसे होऊन त्याच्यामध्यें परस्पर-विश्वास उत्पन्न झाला पाहिजे आणि हें राष्ट्रीय संघटनेचें महत्त्वाचें कार्य पुढाऱ्यांनीं हातीं घेणें अगत्याचें आहे राजकीय व आर्थिक भूमिकेवर हिंदी जनता उभी राहून आपल्या मागण्यांचा पुरस्कार जुटीनें करील तर ब्रिटिश पार्लमेंटास त्यास मान द्यावाच लागेल कारण, ब्रिटिश इतिहास, राजकारण व अर्थकारण ह्यांचें तेंच रहस्य आहे सध्याची राजकीय परिस्थिति ह्या प्रकारच्या प्रगतीस अनुकूल आहे, ही गोष्ट उत्तेजनकारक आहे आणि तिचा पूर्ण उपयोग लोकांनीं करून घेतला पाहिजे

---

### रोखेबाजाराची घडी केव्हां बसणार ?

मुंबईच्या रोखेबाजाराचा जम अजून नीट बसला आहे असें दिसत नाहीं त्या बाजाराचें नियंत्रण करणारें मंडळ आणि त्यामध्यें धंदा करणारे दलाल ह्यांच्या मतें आपल्या संस्थेस *विस्तृत मर्यादेंत स्वातंत्र्य असावें आणि तिच्या व्यवहारात सरकार* व बाहेरची जनता ह्यांनीं ढवळाढवळ करू नये, आणि ह्याच मुद्यावर मॉरिसन कमिटीच्या कित्येक शिफारसी आणि मुंबई सरकारच्या त्याविषयींच्या सूचना त्यास मान्य झालेल्या नाहींत आपल्या अधिकारात जीं नियंत्रणें रोखेबाजाराच्या व्यवहारावर घालता येण्यासारखीं आहेत तीं आपण घालू असें म्हणून बाजार-संस्थेच्या संचालकांनीं कांहीं नियमांची कडक अमलबजावणी करण्याचें ठरवलें परंतु हा नियंत्रणाचा उपक्रम धंदेवाल्या दलालास पटत नाहीं असें दिसतें. आपल्या कारकुनांनीं कांहीं तरवणीचा (एकाच रोख्यांची खरेदी विक्री करून ह्या व्यवहारातून नफा काढणें) व्यवहार केला आहे कीं काय ह्यासंबधाची माहिती सर्व दलालांनीं पुरवावी आणि हा निषिद्ध व्यवहार केला गेला असेल तर त्याबद्दल जबाबदार असलेल्या दलालांस रोखेबाजारात धंदा करण्याची एक आठवडाभर बंदी करण्यात येईल अशा आशयाची नोटिस संस्थेच्या चिटनवीसांनीं काढल्यामुळें बाजारात खळबळ उडून गेली आणि गेल्या शनिवारीं दलाल व दुय्यम दलाल ह्यांनीं नेहमीप्रमाणें ठरलेल्या वेळीं घटा झाली तरी व्यवहार करण्याचें नाकारलें तरवणीच्या व्यवहारामुळें रोख्यांचे भाव कृत्रिमपणानें वरखालीं जातात आणि सट्टेबाजीस उत्तेजन मिळतें ह्या मुद्यावर त्याचें नियंत्रण करण्यात येत आहे. प्रस्तुत विषयासंबधानें व्यवस्थापक मंडळानें केलेल्या ठरावाचा विचार करण्यासाठीं संस्थेच्या सभासदांची एक सभा बोलावली जावी असा प्रयत्न कित्येक दलालांनीं चालविला आहे. बंद पाडलेला व्यवहार चालू झाल्यावाचून आपण सुचविली जाणारी सभा बोलावणार नाहीं असें संस्थेचे अध्यक्ष, मि श्रॉफ, ह्यांनीं म्हटल्याचें प्रसिद्ध झालें आहे. व्यवस्थापकाच्या अधिकाराचा, शिस्तीचा आणि नियमाच्या युक्तायुक्ततेचा प्रश्न प्रस्तुत प्रकरणांत उपस्थित झाला आहे. मुंबईच्या रोखेबाजारांत अशीं वादळें ( चहाच्या पेल्यातलीं का तीं असेनात ) वारवार उठावीं आणि तेथील व्यवहार कांहीं वेळपर्यंत बंद पाडण्याची पाळी यावी हें ठीक नाहीं.

---

## मोटार वहातुकीची सुरक्षितता व कार्यक्षमता कशी वाढेल ?

मोठ्या शहरांतील गर्दीच्या रस्त्यातून मोटार सुरक्षितपणें हाकणें हें सोपें काम नाहीं त्याकरितां विशेष परिश्रम करून अनुभव व ज्ञान मिळविल्यावाचून मोटारीच्या सारथ्यास कार्यक्षमता प्राप्त होणें शक्य नाहीं केवळ मोटार चालवितां आली म्हणजे सारथ्याचे कामांत प्राविण्य मिळतें, असें मुळींच नाहीं. आपल्या इकडील कित्येक ड्रायव्हर अशिक्षित व बेजबाबदार असतात व त्यामुळें अपघाताची संख्या निष्कारण वाढते ह्या ड्रायव्हराची कसून परीक्षा घेतली व लायकीच्या काहीं किमान मर्यादेखालील सारथ्यास मोटार हाकण्यास प्रतिबंध केला, तर मोटारींची वहातूक आंतील उतारूंस व रस्त्यावरील इतर वाहनास व पादचारी लोकास सुरक्षित होईल ह्यांत संशय नाहीं. लंडन येथील भाड्याच्या मोटारींचे सारथ्यास भाडें करण्यास परवाना मिळण्यापूर्वी किती कडक परीक्षा द्यावी लागते, ह्याची हकीकत खाली दिली आहे, ती-वरून हिंदुस्थानांत ह्याबाबत प्रगतिपर जागरूकपणास किती वाव आहे, ह्याची कल्पना येईल.

स्वतःच्या मालकीची मोटार हाकूनच भाडें करावयाचें असल्यास लंडन मधील ड्रायव्हरास प्रथम मोटार खरेदी करावी लागते. भाड्याची मोटार १० वर्षांनंतर बाद केलीच पाहिजे, असा नियम आहे. साधारणपणें, प्रत्येक मोटार सरासरीनें ७ वर्षें टिकते. मोटारीच्या खरेदीनंतर ती चालविण्याचें पद्धतशीर शिक्षण घेतलें पाहिजे. नंतर लंडन येथील रस्त्यांबाबत त्यानें परीक्षा दिली पाहिजे "अ ठिकाणापासून ब ठिकाणापर्यंत जावयाचें आहे, त्यास सर्वांत जवळचा रस्ता कोणता ?' अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरें त्यानें चटकन् दिलीं पाहिजेत. ही परीक्षा उतरल्यानंतर मोटार हाकण्याची चाचणी घेण्यांत येते "येथें वळ, हा उतारू येथें मोटारींत घे. अमक्या रस्त्यानें चल" असे हुकूम त्यास बिनचूक पाळता यावे लागतात. नंतर वैद्यकीय परीक्षा उतरावी लागते. शरीरप्रकृति सुदृढ असून दृष्टीहि निर्दोष असल्यावाचून लायसेन्स मिळत नाहीं. ही शारीरिक तपासणी वरचेवर घेतली जाते आणि फक्त लायक ड्रायव्हराचा परवानाच कायम ठेवण्यांत येतो. ठराविक वयाचे वरील सारथ्यास ही परीक्षा दरसाल उतरावी लागते

लंडन शहरात ८,००० भाड्याच्या मोटारी आहेत. ह्या सर्व नेहमीं पूर्ण दुरुस्त स्थितींत राखाव्या लागतात. गेल्या वर्षी ह्या बाबत १२ हजार नोटिसा पोलिसाकडून मोटारहाक्यावर बजावण्यांत आल्या. सहा मैलाचे आंतील भाडें मोटारवाल्यांस नाकारतां येत नाहीं काहीं रस्त्यावर मोटार मागें नेऊन फिरविणें कायद्यानें विरुद्ध आहे. ह्याखेरीज इतर अनेक बंधनें त्यांस पाळावीं लागतात.

हिंदुस्थानातील मुंबईसारखीं काहीं शहरें वगळल्यास, इतर ठिकाणीं मोटारींची वहातूक वाढलेली असली तरी ती सुरक्षित चालावी ह्याबाबत प्रयत्न विशेषसे केलेले दिसत नाहींत. अरुंद रस्ते, वाटेंत खाचखळगे, वहातुकीच्या नियंत्रणाचा अभाव, अशिक्षित सारथी, बैलगाड्या व टांगे ह्यासारख्या कमी वेगाच्या व मोटारीसारख्या जलद वेगाच्या वहानांची गल्लत, इत्यादि अनेक कारणांमुळें मोटार वहातूक धोक्याची झाली आहे. भाड्याच्या लॉऱ्यावर कित्येक नियंत्रणें घातलेलीं असलीं तरी तीं पाळण्यांत योग्य दक्षता घेतलेली दिसून येत नाहीं हेंहि अपघातांचें एक कारण आहे शीघ्रगतीच्या साधनाबरोबर वहातुकीचें नियंत्रणहि येणें आवश्यक आहे नाहींतर सुधारणेच्या पायीं मनुष्यहत्या मात्र व्हावयाची. पाश्चात्य देशापेक्षां हिंदुस्थानात अपघातांचें प्रमाण मोठें आहे, ह्याचें कारण उघड असूनहि तें नाहींसें करण्याचे यत्न मात्र कसोशीनें होत नाहींत लंडनमधील सारथ्याकडून किती बिनचूक कामाची अपेक्षा केली जाते, ह्याचें वर दिलेलें वर्णन हिंदुस्थानांतील मोटारींच्या मालकास व मोटारहाक्यास मार्गदर्शक होण्याजोगें आहे अर्थात् पाश्चात्य देश व हिंदुस्थान ह्याच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितींत किती तरी अंतर आहे हें येथें विसरून चालावयाचें नाहीं. तथापि, गुलाबास कांटे असतात हें ध्यानात वागवलें पाहिजे आणि नवीन सुधारणा व सुखसोयी हव्यात तर त्यांचीं आनुषंगिक असलेलीं बंधनेंहि स्वीकारलीं पाहिजेत ह्याची जाणीव सर्वांस झाली पाहिजे. असें झालें नाहीं तर सुधारणा अंगलट येतात.

## झारापकर टेलरिंग कॉलेज

पुणें येथील सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजला ह्या आठवड्यांत पुढील थोर लोकांनीं भेटी दिल्या सोमवार, ता. २६ रोजीं, मुंबई सरकारचे माजी शिक्षणमंत्री दिवाण बहादूर सर एस. टी कबळी, ता. २७ रोजीं रावबहादूर व्ही. एल. ठुबे, एम. एल सी, श्री. डी. इ पालकर, बी. ए, एलएल बी., रावसाहेब चिपळूणकर व रावसाहेब बोटे, ता. २८ रोजीं मुंबई सरकारचे माजी मुख्य प्रधान सर धनजीशहा कूपर, ता २९ रोजीं मध्यभागचे असि कमिशनर मे. हॅम इस्त्रायलसाहेब या गृहस्थानीं भेटी देऊन संस्थेची शिक्षणपद्धति पाहून समाधान व्यक्त केलें

डॉ. बी. आर. गुणे
पुणे-सिटी यांचे
—पांढरें-सत्त्व—
हें सत्त्व पोटात अचानक उद्भवणाऱ्या नेहमीच्या विकारावर जलद गुण देणारें बहुमोल औषध-गणलें गेलें आहे. पोटदुखी, अपचन, मळमळ, वांती, छातींतील जळजळ, तोंडास घाण येणें, वगैरे विकारावर हें आश्चर्यकारक गुण देणारें आहे
(सर्वत्र मिळतें)
८ पॅकेट्सच्या एका बॉक्सची किंमत १। रुपया
डॉ बी आर गुणे,
स्पेसिफिक होम, १५३ बुधवार पेठ,
पुणें २.

पहिली बक्षिसाची वांटणी एक हजार रुपयांची, ता २०-६-३७ ला झाली
धेंचे धेंचे तळे साचे
आयुष्यांतील नानाविध आपत्तींशीं तोंड देण्यास 'कल्पतरू बॉंड' खरेदी करा
फक्त रु १३०८ बक्षिसाची वाटणी दरसाल
पुन्हां हप्ता नाहीं एका बॉंडची मुदत २० वर्षे
—प्रॉव्हिडंट विमा—
डॉक्टरी तपासणी नाही जास्तीत जास्त मिळणारी रक्कम रु ५००
मासिक हप्ता ८८ ते रु २ फायदेशीर एक ह्या विमा पॉलिसी
माहिती मागवा, अगर आमचे एजंटास विचारा.
धी महाराष्ट्र इन्शुअरन्स कं. लि.
कराड जि सातारा

## डॉ. बी. आर. गुणे

( अल्प-परिचय )

[ आपल्या कर्तबगारीनें उद्योगधंद्यांत पुढें आलेल्या यशस्वी महाराष्ट्रीय गुणवंतांच्या कार्यांचा परिचय आम्हीं 'अर्थ'च्या वाचकांस करून देत आहों. डॉ. बी. आर. गुणे ह्यांचा अल्पपरिचय खालील माहितीवरून होईल. ]

स्वतःचे कर्तबगारीवर महाराष्ट्रांत औद्योगिक क्षेत्रामध्यें जे थोडे पुरुष पुढें आले, त्यांत डॉ. बी. आर. गुणे यांचा प्रामुख्यानें उल्लेख केल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. पुण्यांतील पहिले फोटोग्राफर म्हणून डॉ. बी. आर. गुणे यांची ख्याती आहे.



डॉ. बी. आर. गुणे

सन १९०४ पासून २५ वर्षे सारा महाराष्ट्र श्री. गुण्यांची गुणवान फोटोग्राफर म्हणून गणना करीत होता व पाव शतकांत त्यांनीं केवळ फोटोग्राफीवर ७५ हजारांवर रुपये मिळविले आहेत.

प्रथम त्यांचें शिक्षण मुंबईस "स्कूल ऑफ आर्ट"मध्यें झालें. त्यांचें मूळ घराणें वैद्याचें, परंतु कारणपरत्वें त्यांस फोटोग्राफर बनावें लागलें. मुंबईतील त्यांच्या निवासस्थानाशेजारील एका कुटुंबांतील दोन-तीन मुलांस डांग्या खोकला आला होता. रोज रात्रीं मुलें खोकून खोकून हैराण होत. डॉक्टर व वैद्य लोकांचे औषधोपाय दोन-चार महिने करूनहि मुलांस आराम पडेना. मुलांचे ते प्राणांतिक हाल पाहून डॉक्टरसाहेबांचे मनावर फार विलक्षण परिणाम झाला.

औषधें देऊन मुलांचा खोकला कां थांबूं नये असा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिला. डॉक्टरांना विचारतां डांग्या खोकला मुदतीशिवाय जात नाहीं असें त्यांनीं उत्तर द्यावें. त्यावर आपण कांहीं तरी उपाय करावा असें त्यांच्या मनानें घेतलें व या संशोधनासाठीं लागणाऱ्या पैशाचे व्यवस्थेसाठीं त्यांना फोटोग्राफीचा धंदा करावा लागला. ज्या धंद्यांत आपण पडूं त्यांत वरच्या दर्जाचें स्थान पटकविण्याची डॉक्टरसाहेबांची महत्त्वाकांक्षा असल्यामुळें त्यांनीं आपल्या धंद्यांत बराच पैसा व उत्कृष्ट नांवलौकिक कमाविला व आपण युरोपियन फोटोग्राफरपेक्षां जास्त चांगलें काम करूं शकतों हें त्यांनीं सिद्ध करून दिलें. निरनिराळ्या कॉलेजचे युरोपिअन प्रिन्सिपॉल व त्या वेळचे गव्हर्नरसाहेब यांनींहि त्यांचेकडून मुद्दाम फोटो काढवून घेऊन त्यांचा गौरव केला. ह्या कार्यांत त्यांना जसजसें यश येत गेलें तसतशी त्यांची संशोधनाची महत्त्वाकांक्षा वाढत गेली व फोटोग्राफींत मिळविलेले पैसे ते औषधांचे संशोधनांत खर्च करूं लागले. अशा रीतीनें संशोधन करून त्यांनीं सन १९२४ सालीं डांग्या खोकला, मलेरिया, कॉलरा, नारू, झटके येणें, डोकेंदुखी यांवर पेटंट औषधें निर्माण केलीं.

सन १९२५ सालीं पुणें येथें भरलेल्या प्रदर्शनांत त्यांच्या औषधाचे ठिकठिकाणीं प्रयोग करण्यांत येऊन ते यशस्वी झाल्यानें त्यांस पुण्याचे कलेक्टर मि. मौंटफोर्ड यांनीं सुवर्णपदक दिलें. त्यांच्या या अलौकिक यशाबद्दल सन १९२७ सालीं त्यांचा जाहीर गौरव करण्यांत आला व पूना मर्चंटस् असोसिएशनप्रभृति संस्थांनीं त्यांना १२०० रुपयांची थैली व सुवर्णपदक हीं अर्पण केलीं.

डॉक्टरसाहेबांनीं रोज वीस वीस तास काम करून जें कार्य केलें त्यापासून तरुणांना चांगलाच धडा घेतां येण्यासारखा आहे. त्यांच्या औषधाबद्दल श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, श्री. सुभाषचंद्र बोस, डॉ. भडकमकर, डॉ. मुंजे व इतर अनेक मोठमोठ्या डॉक्टरांनीं व सद्गृहस्थांनीं उत्तम प्रशस्तिपत्रें देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

मुंबईचे माजी मुख्य प्रधान व त्या वेळचे लोकलबोर्डाचे अध्यक्ष सर धनजीशहा कूपर यांनीं त्यांच्या औषधांस प्रोत्साहन देऊन लोकलबोर्डाकडे त्यांचीं औषधें सुरू केलीं.

डॉ. बी. आर. गुणे यांनीं वरील औषधांच्या संशोधनार्थ देशाकरतां स्वार्थत्यागपूर्वक जी अपूर्व कामगिरी केली त्याबद्दल राष्ट्रानें त्यांचें उतराई होणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, त्यांच्या दीर्घश्रमांपासून योग्य तो बोध तरुण पिढीनें घेतला पाहिजे.

## सेवानिवृत्त होणाऱ्या नोकरास दिलेलें बक्षीस

### प्राप्तीवरील कराचे कक्षेबाहेर

एका हिंदी कंपनीमध्यें काम करीत असलेल्या नोकरास, तो सेवानिवृत्त होईपर्यंत, मासिक पगार व सहामाही बोनस मिळत असे. ह्या दोन्हींच्या रकमा प्राप्तीवरील कर कापून त्याच्या हातीं येत असत. कंपनीच्या अधिकाऱ्यांस पेन्शन न मिळतां, 'ऑफिसर्स रिटायरिंग फंडां'तून सेवानिवृत्तीचे वेळीं बोनस मिळण्याची योजना होती. वर निर्दिष्ट केलेला अधिकारी १९३२ सालीं सेवानिवृत्त झाला, त्यावेळीं कंपनीनें त्यास द्यावयाचे बोनसमधून प्राप्तीवरील कर कापून घेतला व इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडे तो भरला. ही कराची आकारणी कायद्यास धरून नाहीं, ह्या मुद्यावर मद्रास हायकोर्टानें कराची रकम परत देवविली. इनकमटॅक्स अधिकाऱ्यांनीं प्रीव्हीकौन्सिलकडे अपील केलें, तें खर्चासह काढून टाकण्यांत आलें. कंपनीनें फंडामध्यें अधिकाऱ्यांचे नांवानें दाखल केलेल्या रकमा चालू कामाकरितां द्यावयाच्या पगाराचे सदरांत बसत नाहींत व सेवानिवृत्तीचे वेळीं इमानी अधिकाऱ्यास दिलेल्या बक्षिसास प्राप्ति म्हणतां येणार नाहीं; सबब त्यावर कर घेतां येत नाहीं, असा प्रीव्हीकौन्सिलच्या 'ज्युडीशिअल कमिटी'नें निर्णय दिला.

**धी ईस्टर्न नॅशनल बँक लि., कलकत्ता.**

या बँकेच्या सातारा डिस्ट्रिक्ट मॅनेजरच्या हाताखालीं काम करण्यासाठीं पगारी स्पेशल एजंटस् नेमणें आहे.

पगार रु. ४०-५-१०० प्रमाणें. शिवाय प्रॉव्हिडंट फंड व पेन्शन वगैरे.

१४४ पॅलेस स्ट्रीट, सातारा सिटी. } वा. सा. बारटक्के, बी. ए. एलएल्. बी., डि. मॅनेजर ई. नॅ. बँक.

## कपाशीच्या भावाची घसरगुंडी

### बाजारभाव खाली कां गेला?

अमेरिकेंत कपाशीची लागवड अतिशय मोठ्या प्रमाणावर होत असल्यानें न्यूयॉर्क येथील कपास-बाजार फार मोठा आहे न्यूयॉर्क बाजारांतील दरांवर जगांतील इतर ठिकाणच्यां बाजारांतील भाव अवलबून असतात. न्यूयॉर्क येथील बाजारभाव विद्युत् संदेशानें जगभर पसरतात व त्याच्या अनुरोधानें इतर ठिकाणचे बाजरभाव हेलकावे खात असतात. तथापि, स्थानिक कारणांमुळेंहि कित्येक वेळां भावांत चढ-उतार होतो गेले तीन महिने न्यूयॉर्क बाजारांतील भाव मंदीचे असून किंमतीं १७५ पॉइंट्सनीं उतरल्या आहेत. १ पौंड वजनाच्या कपाशीच्या किंमतींत १०० पॉइंट्नीं चढ अगर उतार झाला म्हणजे मुंबईच्या बाजारांतील एक खंडी २० रुपयांनीं महाग अगर स्वस्त होते, असा ठोकताळा आहे. ह्या हिशेबानें मुंबई येथील बाजारात कपाशीचा भाव अलीकडे ७५ रुपयांनीं उतरावयास पाहिजे होता, परतु फक्त ४० रुपयाचीच त्यांत घट झाली आहे अमेरिकेंतील भाव पडण्याचीं कारणें स्थानिक राजकीय स्वरूपाचीं असल्यानें त्यांचा मुंबई बाजारभावावर परिणाम झालेला नाहीं. सर्वच जिनसांचे बाजार आता चढीचे आहेत लोकाची क्रयशक्ति वाढत आहे, युद्धविषयक पूर्वतयारीकरिता मालास मागणी येत आहे व सोन्याचा पुरवठाहि जास्त होऊ लागला आहे. अशा परिस्थितींत कपाशीचाच भाव फक्त खाली जाण्याचें प्रयोजन नाहीं मुंबईच्या बाजारभावांत झालेली चलबिचल सकारण नाहीं सबब त्यातील भाव लवकरच स्थिरावतील, अशी अपेक्षा आहे.

## क्रि. प्रो. कोडाचें ९४ वें कलम व बँकांचीं दप्तरें

क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ९४ व्या कलमानुसार बँकेच्या वह्या पोलीस स्टेशनवर दाखल करावयास पोलीसकडून हुकूम मिळाला असताहि इंपिरियल बँकेच्या लाहोर शाखेचे अकौंटंट, मि. प्राइस, ह्यानीं तसें केलें नाहीं, ह्याबद्दल त्यांचेवर इं. पि. को च्या १७५ व्या कलमाखाली खटला भरण्यांत आला होता. ज्या खटल्यामध्यें बँकेचा वादी अगर प्रतिवादी ह्या नात्यानें संबंध पोचत नाहीं, अशा वेळीं त्याबाबत अधिकार असणाऱ्या कोर्टाच्या हुकुमाखेरीज बँकेस आपले कागदपत्र दाखल करावयास पोलीसखातें भाग पाडूं शकत नाहीं, अशी आजवर बँकर्सची समजूत होती व बँकर्स बुक्स एव्हिडन्स ॲक्टानें त्यांस ह्या प्रकारचें संरक्षण दिलेलें आहे, असा त्यांचा ग्रह होता. मि प्राइस ह्यानीं हें प्रकरण हायकोर्टापर्यंत नेलें, परंतु बँकेच्या वह्यांची पोलीसांनीं तपासणी करण्यास कोर्टाच्या हुकुमाची आवश्यकता नाहीं, असा हायकोर्टानें निर्णय दिला. क्रि प्रो. कोडचें ९४ वें कलम बँकांच्या कागदपत्रास लागू होऊ नये, अशी व्यवस्था करावयाची कायदेमंडळाची इच्छा असती, तर तसा स्पष्ट खुलासा कलमात करण्यात आला असता. "आपल्या खातेदाराचे व गिऱ्हाइकाचे हिशेब गुप्त राखण्याची बँकेवर जबाबदारी असली, तरी कायद्याची आज्ञा मानणें हें बँकेचें आद्य कर्तव्य आहे. बँकेचे कागदपत्र पोलीसनाक्यावर नेणें फार गैर सोईचें होईल, ही गोष्ट खरी असली तरी कायद्यापुढें तें अपरिहार्य आहे" असें हायकोर्टानें आपल्या निकालांत म्हटलें आहे. मुंबई व कलकत्ता ह्या शहरांत मात्र पोलीसअधिकाऱ्यांस केवळ आपल्या हुकुमानें बँकाचीं कागदपत्रें पहाण्याकरितां मागता येत नाहींत

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवारपेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणी भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेची पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. ( ट ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

**१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले**

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

**यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.**

बुधवार चौक, पुणें

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) | १२०—० |
| ५% (१९३९–४४) लोन | १०५—८ |
| ४% १९४३ | १०७—८ |
| ३½% विनमुदत | ९६–११ |
| ३½% १९४७–५० | १०६–१२ |
| २¾% १९४८–५२ | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लाब मुदत) | १०८—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लाब मुदत) | १०७–१२ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षें मुदत) | १०७–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) | १११—६ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो)

### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०)-१०% | १४२—८ |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% | ११६—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ६% | ३३—२ |
| इंपिरिअल बँक (५०) १२% | १५२५—० |
| चॉर्बे मॉ को. बँक (५०) ५% | ६१—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १२८—८ |

### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४¾% | १०३—० |
| पाचोरा–जामनेर (१००) ४½% | ९५—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु ४ आ. बोनस | ९३५—० |
| तापी व्हॅली (५००) ७½% | ७७६—४ |

### वीज

| | |
|---|---|
| चॉर्बे ट्रॅम्वे ऑर्डि (५०) १०% | १४४—१ |
| कराची (१००) ९% | २७०—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | ३५८–१२ |
| टाटा पॉवर ऑर्डि (१०००) ५½% | १४२७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १७२०—० |

### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ८ रु | १६८–१२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. | ५१—८ |
| शिंदया स्टीम (१५) १ रु | २८—८ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु ४ आ | ४४—४ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ७५ रु बोनस | ४९२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे (१५०) ६% | १९२—० |
| टाटा आयर्न दु. प्रे (२००) १५ रु. २ आ. | १६६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि (७५) १० रु. | ३५०—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु ३ आ ६ पै | १६४२—८ |

### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ३४–८½ |
| चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास | ५१–१५ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—८ |
| „ केसर प्रत्येक मणास | १०–१४ |
| „ सरया प्रत्येक मणास | १०—७ |


DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published any where and supply it at publisher's price

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो वा गो काळे व प्रो. द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत तीन रुपये

ह्या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आतवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २. ट. ख १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते —

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टकल

ह्यावर अनुभविक उपाय

सजीवन मॅन्युफॅक्चरिंग क, अहमदाबाद

"**DAWN'S MENSORIUM**" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे, छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठीं कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २०-किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि..**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

१२१९ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द. सा द. शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

**से**विंग बँक ठेवींवर द सा. द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते

भेटा अगर लिहा

**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult

**V. G. & Sons**

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you

**NEW BUSINESS**

**Last year**
**Exceeds**
**7 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs 23** | On Whole Life **Rs. 20**

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Offices* throughout India & the East

S C MAJUMDAR,
MANAGER. Bombay Branch
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४.
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ११ ऑगस्ट, १९३७ अंक ३२

## डॉ. बी. आर. गुणे

पुणें-सिटी याचे

## —पांढरें-सत्त्व—

, हें सत्त्व पोटांत अचानक उद्भवणाऱ्या नेहमींच्या विकारावर जलद गुण देणारें बहुमोल औषध गणलें गेलें आहे पोटदुखी, अपचन, मळमळ, वाती, छातींतील जळजळ, तोंडास घाण येणें, वगैरे विकारावर हें आश्चर्यकारक गुण देणारें आहे.

( सर्वत्र मिळतें )

८ पॅकेट्सच्या एका बॉक्सची किंमत १। रुपया.

डॉ बी आर. गुणे,
स्पेसिफिक होम, १५३ बुधवार पेठ,
पुणें २.

पहिली बक्षिसाची वाटणी एक हजार रुपयांची
ता २०-६-३७ ला झाली

थेंबे थेंबे तळे साचे

आयुष्यांतील नानाविध आपत्तींशीं तोंड देण्यास **' कल्पतरू बॉंड '** खरेदी करा

फक्त रु. १३-८ — पुन्हां हप्ता नाहीं.
बक्षिसाची वांटणी दरसाल — एका बॉंडची मुदत २० वर्षे

—प्रॉव्हिडंट विमा—

डॉक्टरी तपासणी नाहीं जास्तींत जास्त मिळणारी रक्कम रु. ५००
मासिक हप्ता ८८ ते रु २. फायदेशीर एक हप्ता विमा पॉलिसी

माहिती मागवा, अगर आमचे एजटास विचारा.

**धी महाराष्ट्र इन्शुअरन्स कं. लि.**
कराड : . : जि. सातारा

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलएल. बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

# माधव सोमण ब्रदर्स

पावसाळी कोट व छत्र्या — धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक
लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

# विविध माहिती

### इग्लंडचे हेन्री फोर्ड

मोटारींचे कारखानदार म्हणून प्रसिद्धी पावलेले लॉर्ड ऑस्टिन ह्यांचें वय ७१ वर्षांचें आहे आणि त्यांच्या कारखान्यांत वीस हजार माणसें कामावर आहेत. त्यांची पहिली मोटारगाडी १८९५ सालीं बनवली गेली.

### यांत्रिक तज्ज्ञाच्या कामगिरीबद्दल देणावळ

एका कारखान्यांतली यंत्रें बंद पडली असतां त्यांच्या दुरुस्तीसाठीं यांत्रिक तज्ज्ञाचें सहाय घेण्यांत आलें ह्या तज्ज्ञानें हातोडा मागून घेतला आणि त्यानें थोडेसें ठाकठुक करतांच यंत्रें एकदम चालू झालीं. आपल्या कामगिरीबद्दल सदरहु तज्ज्ञानें बिल केलें तें येणेंप्रमाणें.—१ रुपया, हातोड्यानें ठाकठुक करण्याबद्दल; ४९ रुपये, कोठें ठाकठुक करावें ह्या विषयींच्या माहितीबद्दल, एकूण, ५० रुपये.

### इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स

वरील सस्थेच्या पटावर ३,२४८ सभासद आहेत. इन्स्टिटयूटच्या परीक्षास गेल्या वर्षी हिंदुस्थानातील १०० केंद्रात मिळून १,१६० उमेदवार बसले. सस्थेतर्फे एक मासिक चालविण्यात येतें. पुणें उपशाखेचे प्रो. काळे हे अध्यक्ष आहेत.

### महाराष्ट्र औद्योगिक उन्नति मंडळ

वरील सस्था ता. १ ऑगस्ट रोजीं कै. लो. टिळक ह्यांचे स्मरणार्थ मुबई येथें स्थापन करण्यांत आली आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीप्रीत्यर्थ सर्व तऱ्हेनें प्रयत्न करण्याचें संस्थेचें ध्येय आहे. मडळाचें कार्य चालविण्याकरितां प्रत्येक तालुक्याचे व जिल्ह्याचे ठिकाणीं प्रचारक नेमावयाचे आहेत.

### लघुलेखन विद्येस १०० वर्षे पुरीं झालीं

सर आयझॅक पिटमन ह्यानीं लघुलेखनविद्या शोधून काढली, त्यास गेल्या महिन्यात १०० वर्षे पुरीं झालीं. ४० देशांतील २५० प्रतिनिधींस त्यानिमित्तानें सर आयझॅक ह्यांच्या नातवानें लंडन शहरीं आमंत्रण केलें होतें.

### लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें

वरील सस्था पहावयास दि. ब. सर टी. विजयराघवाचार्य आणि साखरसमितीचे टॅरिफ बोर्डावरील सभासद, डॉ जैन, हे ता. २९-७-३७ रोजीं आले होते.

### मोशन पिक्चर सोसायटीचें शिष्टमंडळ

सर फिरोज सेटना ह्यांच्या नेतृत्वाखाली मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडियाच्या शिष्टमंडळानें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर सुलतान अहमद, ह्याची मुबई येथें गांठ घेतली व हिंदी सिनेमाचे धंद्यांतील अडचणी त्यांस निवेदन केल्या. व्यापारमंत्र्यानीं शिष्टमंडळाचें म्हणणें ऐकून घेऊन शक्य ती मदत करण्याचें आश्वासन दिलें.

### डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें

वरील सस्थेनें १९३६–३७ सालीं एकूण २७ मराठी पुस्तकांस सुमारें १४०० रुपयांचीं रोख बक्षिसें व १५ पुस्तकांस प्रशंसापत्रें दिलीं. मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ निरनिराळ्या विषयावर ग्रंथ तयार व्हावेत, हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

### रजिस्टर पद्धतीनें विवाह

स्पेशल मॅरेज ॲक्टान्वयें गेल्या वर्षी १४९ विवाह झाले. १९३५ सालीं फक्त ८२ दांपत्यांनीं ह्या ॲक्टाचा अवलंब केला होता.

### नोंदणी खात्याचा अहवाल

मुंबई इलाख्यामध्यें १९३६ सालीं एकूण २ लक्ष, ६६ हजार दस्तऐवज नोंदले गेले ह्यापैकीं ८०½ हजार गहाणखतें होतीं व त्याची किंमत ५ कोटि,२४ लक्ष रु. भरली. पूर्व सालाचे मानानें ५,७७० गहाणखतें ज्यास्त झालीं, परंतु खरेदीखतात वाढ झाली नाहीं. "आपल्या जमिनी हातच्या जाऊ न देण्याची लोकाची प्रवृत्ति स्पष्ट दिसून येते. जमिनीच्या किंमती वाढतील ह्या आशेवर लोक जमीन विकून न टाकता गहाण ठेवतात," असें नोंदणी खात्याचे प्रमुख आपल्या अहवालांत म्हणतात खात्यास १५½ लक्ष रु. उत्पन्न झालें व ५½ लक्ष रु. खर्च आला.

### "मूडीज" ग्रंथालय बंद झालें

लंडनमधील "मूडीज" ह्या नावाचें प्रसिद्ध ग्रंथालय स्थापनेपासून ९० वर्षांनीं नुकतेंच बद होऊन तें व त्याच्या शाखा ह्यांत काम करणारे ३५० नोकर बेकार झाले ह्या संस्थेचे १८८८ सालामध्यें ४० हजार वर्गणीदार होते व तिच्यामध्यें ६० लक्ष ग्रंथाचा संग्रह होता.

### अमेरिकेंत दीड कोटि कुमारिका–पति कां शोधीत नाहींत?

अमेरिकेंत दीड कोटि कुमारिका आहेत; त्या विवाहाच्या मार्गे न लागता नोकऱ्यांच्या नादीं लागतात अशी तक्रार तेथील एका ग्रथकारानें केली आहे. त्या देशात स्त्रियापेक्षां पुरुषाची संख्या १५ लक्षांनीं अधिक असतां कुमारिकानीं विवाहाचा मार्ग पाहू नये ह्याचें त्यास आश्चर्य वाटत असून त्यांनीं पुरुषाकडे लग्नाची मागणी घालण्याचें धैर्य दाखवावें अशी त्याची सूचना आहे.

### स्कॉटलंडमध्य दुग्धपानाची संवय वाढत आहे

स्कॉटलंडची व्हिस्कीपानाविषयीं प्रसिद्धी आहे. तथापि, अलीकडे तेथें दुग्धपानाचा प्रघात जोरानें वाढत आहे. दुधाची दुकानें नवीन नवीन निघत असून कामकरी लोकांसाठीं दूध पिण्याची सोय करून दिली जात आहे.

### सरकारच्या औद्योगिक सहार्यानें बेकारी-निवारण

आर्थिक मंदीमुळें दु:स्थितींत असलेल्या ग्रेट ब्रिटनच्या विशिष्ट भागात नवीन कारखाने व उद्योगधदे स्थापून बेकार लोकास काम देण्याच्या उद्देशानें सुमारें ४½ कोटि रुपयांचें भांडवल सरकारच्या सहायानें पुरवण्यांत आलें आहे. विविध प्रकारचा माल तयार करता येईल असे ९७ कारखाने ह्या भांडवलावर स्थापन होऊन त्यांमध्यें दहा हजार लोकास काम मिळालें आहे आणि आणखी दहा हजाराची तेथें सोय व्हावयाची आहे. वरील धद्यांमध्यें दगडी कोळसा काढणें व त्यापासून तेल तयार करणें, काचसामान, पोलादी पत्रें, टाइपरायटरच्या प्रती, शिवण्याचीं यंत्रें, कातडें कमावणें, इत्यादि व्यवसायांचा समावेश झाला आहे

### सहकारी दस्तऐवजांची नोंदणी

सहकारी सोसायट्यांबाबतचे एकूण १३½ हजार दस्तऐवज १९३६ सालीं नोंदण्यांत आले. १९३५ च्या मानानें हा आकडा २½ हजारानीं मोठा आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किमत |
|---|---|
| २५-७-३७ ते ३१-७-३७ | ६९,१५,९४२ |
| १-८-३७ ते ७-८-३७ | ४४,६६,७०६ |
| २१-९-३१ ते ७-८-३७ | ३,०१,६१,३४,१२३ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३९४ | मीमांसा ... ... | ३९८ |
| २ मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीचा आढावा | ३९५ | ६ धुळें अर्बन को. बँक लि | ३९९ |
| ३ टाकाऊ लोखडाचें सोनें | ३९६ | ७ न्यू इंडिया अॅ कं. लि | ३९९ |
| ४ स्फुट विचार ... | ३९६ | ८ धोक्याची सूचना .. | ४०० |
| महाराष्ट्रांतील साखरेचे कारखाने—साखरेच्या धंद्याच्या गरजा व सरकारचें कर्तव्य—आर्थिक संरक्षणाचें लोण स्वीडन-नार्वेपर्यंत गेलें।—पोषाखाबाबत पुराणप्रियता | | ९ ओगले ग्लास वर्क्स लि | ४०१ |
| | | १० व्हीट ब्लॉसमची शिफारस | ४०१ |
| | | ११ मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळ ... | ४०२ |
| | | १२ बार्शी सें को बँक लि | ४०२ |
| | | १३ सातारा जि. को. ग्रु. यूनियन लि. ... | ४०२ |
| ५ चोरीची अर्थशास्त्रदृष्ट्या | | १४ निवडक बाजारभाव | ४०३ |



# अर्थ

बुधवार, ता ११ ऑगस्ट, १९३७


## मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीचा आढावा

मुंबई इलाख्याच्या सहकारी चा ३० जून, १९३६ अखेरचा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. आर्थिक मंदी सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांनीं उचललेल्या कर्जांचा पडत्या भावाचे काळांत परतफेड होणें अतिशय कठीण झालें, तथापि, ह्या दुःस्थितींतून सहकारी चळवळ तरून गेली व आतां ती प्रगतीच्या मार्गास लागली आहे, असा आशाजनक निष्कर्ष वरील अहवालातून काढण्यास हरकत नाहीं. बाजारभाव वाढले म्हणजे सहाजिकच शेतीच्या मालास दर चांगला येऊन उत्पादनखर्च भागूं शकतो व कर्जफेड करणें शेतकऱ्यास शक्य होतें. ही सुधारणा जसजशी घडून येईल, त्या मानानें थकबाकी कमी होईल व शेतकऱ्यांस नवीं कर्जे पुनः मिळूं लागतील, हें उघड आहे मुंबई इलाख्यातील सहकारी चळवळीचें अहवालाचे सालीं पुढें पाऊल पडलें आहे, ही गोष्ट सोसायट्याच्या संख्येंत पडलेल्या भरीनें स्पष्ट होत आहे. वाईट स्थितींतील सोसायट्या रद्द करून नवीन सोसायट्यांस पूर्ण चौकशीअंतींच मंजुरी द्यावयाची, असें सावधगिरीचें धोरण सहकारी खात्यानें अवलंबिलें, तरीहि १२७ नवीन सोसायट्यांची गेल्या सालीं भर पडली ही समाधानाची गोष्ट आहे. १९३४-३५ सालीं रजिस्टर झालेल्या सोसायट्यांपेक्षां गुंडाळण्यात आलेल्या सोसायट्यांची संख्या ३५ नें मोठी होती.

सेंट्रल बँकाकडे ठेवींचा ओघ समाधानकारक रीतीनें वहात असून, त्यांस व्यापारी बँकापेक्षां विशेष ज्यास्त व्याजाचा दर द्यावा लागत नाहीं, ह्यावरून सदरहु संस्थावरील जनतेच्या विश्वासाची साक्ष पटते. ह्या अल्प व्याजाच्या दराचा फायदा प्राथमिक सोसायट्यांपर्यंत पोंचत नाहीं, अशी रजिस्ट्रारसाहेबांची तक्रार आहे. कित्येक मध्यवर्ती बँकांनीं ह्याबाबत अत्यंत सहानुभूतीचें धोरण स्वीकारलेलें आहे, तथापि व्याजाचे दरांत सूट देतांना बँकांस स्वतःच्या सांपत्तिक परिस्थितीकडेहि पहाणें आवश्यक आहे, हें विसरतां कामा नये. सध्याच्या विशिष्ट अडचणीच्या आर्थिक परिस्थितींत सेंट्रल बँकांनीं स्वत.चें स्थैर्य सभाळून शेतकी पतपेढ्यास शक्य तितक्या सवलती देणें आवश्यक असलें तरी त्या सहायास स्वाभाविक मर्यादा आहेत हें ध्यानांत बाळगणें अगत्याचें आहे.

जमीनगहाणाच्या बँकाबाबत मुंबई इलाख्यानें केलेला उपक्रम, ही अहवालाचे सालांतील एक महत्त्वाची गोष्ट गणली जाईल. ७ डिसेंबर, १९३५ रोजीं प्रांतिक लँड मॉर्गेज बँक रजिस्टर करण्यांत आली व वर्षअखेर तिचे ३ लक्ष, ६३ हजार रुपयाचे भाग खपले. अहवालाचे मुदतींत प्रांतिक बँकेनें प्राथमिक बँकांस ६८ हजार रुपयांचीं कर्जे दिलीं. नऊ प्राथमिक बँका रजिस्टर झाल्या, त्यापैकीं आठ बँकांनीं पहिल्या वर्षअखेर तोटा दाखविला आहे. जुन्या कर्जाची परतफेड करण्याकरिताच बहुतेक कर्जाचा विनियोग करण्यांत आला. जमीनसुधराईकरिता कर्जाची विशेष मागणी आली नाहीं. जुन्या कर्जाची चौकशी करून त्यांत तडजोड घडवून आणण्याचें महत्त्वाचें कामहि प्राथमिक बँकांनीं केलें. एकदर इलाख्याच्या विस्ताराचे मानानें जमीनगहाणाच्या बँकांनीं केलेलें कार्य अगदींच अल्प आहे ह्यांत संशय नाहीं. तथापि, हा प्रयोग नवीन असून, त्याच्या यशस्वितेवर सहकारी चळवळीची प्रगति अवलंबून आहे आणि ह्याकरितां त्या बाबतींत काळजीपूर्वक व सावधगिरीनेंच पाऊल टाकणें जरूर आहे, हें निर्विवाद आहे. निकृष्टावस्थेच्या परमावधीस गेलेल्या शेतकरीवर्गाची उन्नति होण्यास ह्या प्रकारच्या संस्था सहायकारक झाल्या, तरी दारिद्र्याचें मूळ नाहींसें झाल्यावाचून प्रगतीची गति मंदच रहाणार, हें उघड आहे.

मध्यवर्ती व अर्बन-बँकांस आपल्या जवळील रकमा किफायतशीर गुंतविणें दिवसानुदिवस कठिण होत चाललें आहे व सहकारी तत्त्वास सोडून कांहीं योजना अंमलात आणण्याची त्याची खटपट चालू आहे नामधारी सभासदाचा एक वर्ग निर्माण करून त्यास कर्जे देण्याची त्यांस सवलत हवी आहे अशा प्रकारचे व्यवहार सहकारी कक्षेंत बसत नाहींत, तेव्हां सहकारी योजना आखून त्यांमध्यें आपला पैसा बँकांनीं गुंतवावा, अशी रजिस्ट्रारसाहेबाची शिफारस आहे. सहकारी बँकांनीं आपले व्यवहार सहकारी चळवळीच्या खऱ्या तत्त्वास धरूनच चालविणें इष्ट आहे. तथापि, ह्या चळवळींत जास्त पैसा गुतविण्यासारखी आज तिची परिस्थिति नाहीं, ही गोष्ट मात्र स्पष्ट झाली आहे.

लोकांचें अज्ञान दूर करून त्यास सहकारी तत्त्वांचें योग्य शिक्षण देणें जरूर आहे व त्या बाबत प्रयत्न झाले पाहिजेत, ही रजिस्ट्रार साहेबाची सूचना कोणासहि तात्काळ मान्य होईल. सहकारी चळवळींतील लोकाची व्यवहारनीतिमूलक प्रवृत्ति सुधारून सहकाराचीं तत्त्वें त्यांचे अंगांत बाणल्याविना ह्या चळवळीचा पाया मजबूत होणार नाहीं, ही गोष्ट प्रत्येकास पटण्याजोगी आहे तथापि, ह्याबाबत प्रयत्न कोणत्या मार्गानें करण्यात यावेत, ह्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर अहवालात देण्यात आलेलें नाहीं. बिनसरकारी कार्यकर्त्यांस उमेद वाटेल असें वातावरण चळवळींत निर्माण झाल्यास, सहकारी चळवळीचें पाऊल इष्ट मार्गानें पुढें पडेल, अशी अपेक्षा करण्यास जागा आहे; आणि ह्या दृष्टीनें वरील प्रश्नाचा विचार होणें जरूर आहे.

## टाकाऊ लोखंडाचें " सोनें "

राष्ट्रसंरक्षणाच्या तयारीसाठी ब्रिटिश कारखाने लढाऊ माल मोठ्या प्रमाणात तयार करीत आहेत ह्या सामुग्रीस पोलादाचा योग्य पुरवठा जरूर आहे, आणि पोलादाच्या बनावटींत जुन्या, मोडक्या तोडक्या लोखंडावाचून चालत नाहीं खाणींतून दगडी कोळसा व अशोधित लोखंड वाटेल तसें काढतां येईल, परंतु जुनें पानें लोखंड व पोलाद याचा अवश्य असलेला पुरवठा कोठून आणावा हा प्रश्न ब्रिटिश कारखानदारांस बिकट होऊन गेला आहे जुन्या-पुराण्या लोखंडाचा पुरवठा अपुरा पडल्यानें त्याची किंमत विलक्षण चढली असून लोखंडास सोन्याचें महत्त्व प्राप्त झालें आहे निकडीचा परीस लोखंडास लागल्यानें त्याचें जणूं काय सोनेंच बनलें आहे एखादें राष्ट्र युद्धांत गुतलें असता लढाऊ उपयोगास लागणाऱ्या जरूरीच्या जिनसा जनता स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन स्वेच्छेनें पुरवण्यास तयार होते तसाच प्रकार सध्यां ग्रेटब्रिटनमध्यें लोखंडासंबधानें झाला आहे. लोखंडाच्या खाटा, पाळणे, लहान गाड्या, फुटकीं भांडीं, गजलेले खिळे, कढ्या इत्यादि जिन्नस कानाकोपऱ्यांतून धुडून काढून ब्रिटिश लोक राष्ट्रीय पोलाद कारखान्यास त्याच्या अडचणीचे प्रसंगीं पुरवीत आहेत हा रद्दी माल गोळा करण्याचे कामीं बालवीर, स्वयंसेवकाचीं पथकें इत्यादींचाहि उपयोग करण्यांत येऊन हें कार्य राष्ट्रीय रक्षणासाठी नागरिकांनीं करावयाचें कर्तव्य गणलें जात आहे! 'आमच्या घरचा गोळा केलेला लोखंडाचा गळाठा घेऊन जाण्याची व्यवस्था करा' अशा सूचनेचीं हजारों पत्रें कारखानदारांकडे येत आहेत. ब्रिटिश जनतेच्या राष्ट्राभिमानाचें हें उदाहरण लक्षात घेण्यासारखें आहे.

### पोलाद-लोखंडास विलक्षण मागणी

ग्रेट ब्रिटनमधील पोलादाच्या कारखान्यांतर्ले उत्पादन इतकें वाढलें आहे कीं, एकट्या गेल्या जून महिन्यात ११ लक्ष टन वजनाच्या पोलादाचा माल तयार करण्यात ६ लक्ष टन वजनाचें जुनें-पुराणें लोखंड खर्ची पडलें चालू सालीं एकूण १२० लक्ष टन पोलाद ब्रिटिश कारखान्यात तयार होईल असा अदाज असून त्या प्रीत्यर्थ ७० लक्ष टन मोडकें-तोडकें लोखंड लागेल घरची गरज एवढ्या निकडीची असता ब्रिटनमधून पोलाद बाहेरच्या देशात जाऊ देऊ नये अशी सूचना करण्यात आली आहे जुन्या लोखंडाची निर्गत थांबवता येईल, पण पोलादाची निर्गत ब्रिटिश साम्राज्यातर्गत देशामध्यें होत असल्यानें ती बद करणें इष्ट नाहीं आणि सध्याची अडचण संपल्यावर परदेशी बाजारपेठातलें गिऱ्हाइक कायम रहाण्याचें महत्त्व भासूं लागेल, त्या दृष्टीनेंहि निर्गत बदीचें धोरण अदूरदर्शित्वाचें होईल असा खुलासा वरील सूचनेसंबधानें करण्यांत आला आहे. लोखंडाचें सोनें झाल्याविषयीं आम्ही वर लिहिलें आहे पण जुन्या लोखंडास सोन्यासारखी किमत मात्र कारखानदारास देता येत नाहीं. ह्या टाकाऊ मालाची किमत कारखान्यांत तो येऊन पडला असता दर टनास २५ ते ४० रुपये पडते. पण तो जमा करून कामास येण्यालायक करण्यास व कारखान्यात नेऊन पोंचवण्यास भारी खर्च येतो ह्या कारणानें त्याच्या मालकाच्या हातांत मोठी रकम पडू शकत नाहीं. राडे-रोडे व कचरा ह्याच्या वास्तविक किमतीच्या मानानें तो हालवून योग्य जागीं पोहोंचवण्यासच ज्यास्त खर्च येतो असा इकडीलहि अनुभव आहे. म्युनिसिपालिट्या आणि स्वयंसेवक नागरिक सघ याच्या सहायानें हा वहातुकीच्या त्रासाचा व खर्चाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे.

## स्फुट विचार

### महाराष्ट्रातील साखरेचे कारखाने

येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे कार्याध्यक्ष, प्रो काळे, ह्यानीं कांहीं आठवड्यामार्गे साखरेच्या व्यापारी मडळातर्फे श्री. मूळजी, ह्यानीं दक्षिणेंतील साखरेच्या कारखान्याचे बाबतींत कित्येक भ्रामक विधानें केलीं होतीं, तीं खोडून काढण्यासाठी एक पत्रक प्रसिद्ध केलें होतें. मुंबई इलाख्यातला देशी साखरेचा धंदा महाराष्ट्रातच एकवटलेला आहे, ह्याचें कारण तेथील नैसर्गिक अनुकूलता आणि मुंबई सरकारनें इकडील कालव्याच्या उत्पन्नाबाबत चौकशी करून येथील कारखान्याचा विस्तार होईल असें आखलेलें धोरण, हें होय. महाराष्ट्रातील कारखाने आधळेपणानें किंवा भरमसाट रीतीनें काढण्यांत आलेले नसून ह्या भागात शेतकऱ्यास गूळ करणें परवडत नसल्यानें साखरेचें उत्पादन येथें होणें अगत्याचें आहे असा अभिप्राय सरकारनें नेमलेल्या कमिटीनें व्यक्त केलेला होता असें असतां, महाराष्ट्रानें गूळ करावा आणि उत्तर हिंदुस्थानातल्या कारखान्यात बनलेली साखर विकत घ्यावी हें श्री मूळजी ह्याचें म्हणणें अज्ञानमूलक आहे ही गोष्ट प्रो. काळे यांच्या पत्रकानें सिद्ध केली होती. संयुक्तप्रांत व बिहार ह्यामध्यें साखरेचें उत्पादन वाजवीपेक्षां अधिक झालें असल्यानें दुसऱ्या प्रांतांनीं स्वत: साखर तयार न करतां उत्तरेकडील कारखान्याचा माल घ्यावा हा अभिप्राय त्यांनीं खोडून काढला होता टारिफ बोर्डापुढें मुंबईस दक्षिणेंतील साखरकारखानदारांच्या प्रतिनिधींच्या साक्षी गेल्या आठवड्यात झाल्या, त्यांमध्यें ही महाराष्ट्राची बाजू त्यांनीं पुढें मांडली. योग्य संरक्षण आणखी सात वर्षे चालू राहिल्यास दक्षिणेंतले कारखाने इतर हिंदी कारखान्यांच्या बरोबरीनें स्वस्त साखर तयार करू शकतील ही गोष्ट त्यांनीं बोर्डाच्या नजरेस आणिली आहे. तसेंच, महाराष्ट्रीय कारखान्यास विशिष्ट सवलती मिळण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली.

---

### साखरेच्या धंद्याच्या गरजा व सरकारचें कर्तव्य

साखरेच्या कारखान्यात काकवी तयार होते तिला किमत न आल्यामुळें ती वाया जाऊन उत्पादन-खर्च कमी होण्यास सहाय मिळत नाहीं. तिच्यापासून आल्कोहोलसारखे पदार्थ तयार करण्याची सोय झाल्यास साखर स्वस्त दरानें विकणें कारखानदारास परवडेल. ह्या बाबतींत शास्त्रीय शोधांची आवश्यकता असून त्यास हिंदुस्थान सरकारनें सढळ हातानें सहाय देणें जरूर आहे असें टारिफ बोर्डापुढील आपल्या साक्षींत दक्षिणस्थ कारखानदारांच्या प्रतिनिधींनीं सांगितलें. महाराष्ट्रीय कारखान्यांच्या मार्गांतील विशेष अडचणींचा पाढाहि त्यांनीं वाचला. उत्तरेकडील साखर इकडे येते तिच्या रेल्वेवहातुकीचा दर कमी करण्यात आला आहे. परंतु दक्षिणेंतील बाजारास साखर पुरवण्याची सोय प्रत्यक्ष महाराष्ट्रात असतां अशा प्रकारची सवलत संयुक्त प्रांत व बहार ह्यामधील कारखानदारांस देऊन त्याची स्थानिक मालाशीं निष्कारण स्पर्धा चालते तिला न कळत उत्तेजन देण्याचें कारण नाहीं. जाव्हाच्या साखरेशीं टक्कर देणें हिंदी कारखानदारांस परवडावें हा वरील सवलतीच्या मुळाशीं असलेला उद्देश सध्याच्या परिस्थितींत निरर्थक आहे, हाहि मुद्दा टारिफ बोर्डापुढें माडण्यांत

-आला असून दरमणी एक रुपयाचे ऐवजीं पूर्वीच्या सुमारें दोन रुपयांचा रेल्वेवहातुकीचा दर आकारण्यांत यावा अशी सूचना करण्यांत आली आहे. उत्पादन-खर्चाचा अंदाज बांधतांना दरमणी उंसास सहा आणे न धरतां निदान सात आणे धरावे, हिंदी साखरेच्या निर्गतीस बंदी न होता ती अनियंत्रित रीतीनें होऊं द्यावी, देशी साखरेची प्रतवारी लावली जावी इत्यादि आशयाच्या शिफारसीहि टारिफ बोर्डापुढें मांडण्यांत आल्या. महाराष्ट्रीय साखर-कारखान्याचे संबधानें उत्पन्न करण्यात आलेल्या गैरसमजुतींचें ह्या साक्षींच्या योगानें निराकरण होऊन मुंबई सरकारहि ह्या विषयात योग्य लक्ष घालून त्याबाबतचें आपलें कर्तव्य करील अशी आम्हास आशा आहे.

---

### आर्थिक संरक्षणाचं लोण स्वीडन-नॉर्वेपर्यंत गेलें !

भावी युद्धाच्या आपत्तींत स्वत:चें संरक्षण नीट व्हावें ह्याविषयींची तजवीज जर्मनी, इटली, फ्रान्स व ग्रेट ब्रिटन हींच राष्ट्रें करीत असून आंतरराष्ट्रीय लढ्यात नेहमी तटस्थ राहणारीं उत्तर युरोपातील राष्ट्रें त्या बाबतींत बेफिकीर आहेत अशी अनेक लोकांची समजूत असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं स्वीडन, नॉर्वे, फिन्लंड ह्यासारखे देश लहान व बेतांचें सांपत्तिक व राजकीय सामर्थ्य असलेले असे आहेत आणि युरोपात बलिष्ठ राष्ट्रांचें युद्ध जुंपलें असतां त्यांच्या भानगडीपासून अलिप्त राहण्याचा त्यांचा प्रघात आहे परंतु गेल्या महायुद्धात तटस्थ राष्ट्रासहि व्यापार व उद्योगधंदे यांचे बाबतींत किती गैरसोय सोसावी लागली याची त्यांची आठवण बुजलेली नाहीं. त्याचप्रमाणें, युद्धस्य कथा रम्या ह्याच प्रकारची केवळ युरोपियन राष्ट्रांची लढाऊ तयारीची भाषा नसून ही आपत्ति आपणावर केव्हा कोसळेल याचा नियम नाहीं असें स्वीडन आदि करून राष्ट्रास वाटावयास लागलें असल्याची स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. त्यापैकीं प्रत्येक देशांतल्या राज्यकर्त्यांनीं युद्ध उद्भवलें असतां अन्न, कच्चा माल वगैरे कोणत्या जिनसांचा तुटवडा पडेल आणि त्याची वेळींच व्यवस्था कशी करावी ह्यासंबंधानें चौकशी व सूचना करण्यासाठी स्वतंत्र समित्या नेमल्या असून त्यांचें परस्पर-सहकार्य चालू आहे. बाहेरून येणाऱ्या परदेशी पण अत्यंत जरूरीच्या मालाच्या जागीं स्वदेशी मालाचा पुरवठा होण्याची तजवीज करण्याचा आणि ह्या बाबतींत एकमेकास सहाय देण्याचा ह्या राष्ट्राचा विचार आहे. म्हणजे, स्वयंसिद्धता व स्वदेशी ह्यांचा शक्य तेवढा अंगिकार करण्याचें धोरण त्यास आखावें लागत आहे परराष्ट्रीय व्यापारावर विशेष प्रमाणात अवलंबून रहाणारीं हीं उत्तर युरोपिअन राष्ट्रें आहेत, हें येथें लक्ष्यात ठेवणें आवश्यक आहे ह्यावरून आंतरराष्ट्रीय व्यापार व आर्थिक परस्परावलंबन ह्यांचे विषयीं जगांत वारा कसा वहात आहे, ह्याची कल्पना येईल.

### पोषाखाबाबत युरोपियन पुरुषांची पुराणप्रियता

राष्ट्राचें व समाजाचें हित हें ध्येय पुढें ठेवून त्याच्या जोपासनेसाठी स्वयस्फूर्तीनें प्रयत्न करण्याचा कार्यक्रम चालविणारीं नागरिकांचीं मंडळें कोणत्या प्रकारची विधायक लोकसेवा करतात ह्याचीं अनेक उद्बोधक उदाहरणें पाश्चात्य देशामध्यें आढळतात. आरोग्य, व्यायाम, शिक्षण, संस्कृतिसंरक्षण, इत्यादि नानाविध बाबी त्यांच्या कार्यक्रमांत येतात. परस्थ लोक लंडन शहरांत आले असतां त्यांस मार्ग दाखवण्याचें काम स्त्रियांच्या एका संघानें उचललें आहे शहरांतलीं प्रसिद्ध स्थळें त्यास सहज पहाता येऊन त्यांची लोकप्रियता वाढावी आणि ह्या संबंधात अनोळखी माणसांस सहाय मिळावें हा सद्‌हेतु योजनेचा हेतु आहे निसर्गदत्त रम्य स्थळें आधुनिक सर्वभक्षक सुधारणेच्या तडाख्यातून वाचवण्याचा उद्देश दोन मोठ्या मंडळानीं ग्रेट ब्रिटनमध्यें आपल्या पुढें ठेवला असून त्या मार्गानें त्यांचें कार्य चालू आहे. विद्रूप इमारती व जाहिराती ह्यांचे योगानें शहरें व खेडेगावें ह्यांचें सौंदर्य बिघडूं नये आणि कलेचा परिपोष व्हावा हा त्याचा हेतु बराच सफळ होत असून स्थानिक स्वराज्य संस्था त्याच्याशीं सहकार्य करीत आहेत पुरुषाच्या पोषाखात साधेपणाचा व सुटसुटीतपणाचा अभाव असल्याची तक्रार इंग्लंडमध्यें आज कित्येक वर्षें चालू आहे. त्या बाबत सुधारणा घडवून आणण्याच्या चंग एका मंडळानें बांधला आहे आणि पुरुष-नेपथ्य सौंदर्याविषयीं विधायक व व्यावहारिक सूचना करणारास त्यानें अलीकडे बक्षिस लावलें होतें स्त्री-नेपथ्य-विधानाच्या मानानें पुरुषाचे पेहराव जुनेपुराणेच राहिले असून त्याच्यातलें गतानुगतिकत्व दुर्दम्य आहे असा युरोपातला अनुभव आहे गैरसोय व अडचण सोसूनहि पुरुषवर्ग पोषाखाचे बाबतींत पुराणप्रिय राहिला आहे, त्यास सुधारण्याचा हा प्रयत्न मनोरंजक आहे ह्यांत संशय नाहीं.

---

### महाराष्ट्रांतील साखरेचा धंदा-प्रो काळे यांचें व्याख्यान

वुइलिंग्डन कॉलेजच्या इतिहास आणि अर्थशास्त्र समितीच्या विद्यमानें "महाराष्ट्रांतील साखरेचा धंदा" ह्या विषयावर गेल्या आठवड्यात बुधवार, ता ४ रोजीं प्रो. काळे यांचें व्याख्यान झालें व्याख्यात्यांनीं स्वदेशी साखरेच्या धंद्याचें महत्त्व वर्णन करून त्यासंबंधानें उपयुक्त माहिती दिली आणि विषयाचें विवेचन व्यावहारिक व तात्विक दृष्टीनें केलें. महाराष्ट्राच्या दृष्टीनें साखरेच्या कारखान्याची या भागात प्रगति होणें किती आवश्यक आहे आणि त्याकरिता सरकार व जनता ह्यानीं कोणते प्रयत्न केले पाहिजेत ह्याची उत्कृष्ट कल्पना व्याख्यात्यानीं श्रोत्यास करून दिली.

---


## जाहीर नोटीस

पंढरपूर अर्बन को बँकमधील सेव्हिंग्ज बँक खात्याचे ठेवींस ता. १-९-३७इ पासून दरसाल दर शेंकडा २½ टक्क्याऐवजीं २ टक्के व्याज देण्यात येईल.

बोर्डाचे हुकुमावरून

पंढरपूर ता. ४-८-३७ } एन्. पी. सुरनीस मॅनेजर

---

**RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS**

ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS

*Apply*—**MARATHI KENDRA,**

10 BUDHWAR, POONA 2

## चोरीची अर्थशास्त्रदृष्ट्या मीमांसा

[एका इंग्रज लेखकानें चोरीच्या व्यवसायाची विनोदप्रचुर अर्थशास्त्रात्मक चर्चा केली आहे, तिचा सारांश खाली दिला आहे.]

"आर्थिक क्षेत्रामध्यें चोरीच्या व्यवसायास मिळावें तितकें महत्त्वाचें स्थान प्राप्त होत नाहीं, हें खालील विवेचनावरून ध्यानांत येईल. आपण एका सामान्य चोराचें उदाहरण घेऊं. घरमालक बाहेर गेलेला असताना चोर घरात शिरून आतील मौल्यवान जिन्नसा लाबवतो. चोरीचा माल अर्थातच तो स्वस्त किंमतीस विकून टाकतो. आलेले पैसे तो चैनींत खर्च करतो आणि पुन: आठ-पधरा दिवसानीं चोरीच्या संधीची वाट पहात बसतो. तोपर्यंत घरमालकानें पोलिसात वर्दी दिलेलीच असते व पोलिस त्याचे तपासास लागलेलेच असतात. सरासरीनें पाच सहा चोऱ्या पचल्यानंतर चोर सांपडतो व त्यास एक-दोन वर्षांची शिक्षा होते.

चोरीचा माल विकून आलेल्या पैशाची चोर उधळपट्टी करतो व त्यामुळें पैसा मोठ्या प्रमाणावर समाजात खेळतो चोराच्या उधळपट्टीचा परिणाम त्याचे स्नेह्यासोबत्यांवर व आजूबाजूच्या लोकावर अनुकूल झाल्याखेरीज रहात नाहीं आणि त्याचे हातूनहि थोडाफार सढळ हातानें पैसा खर्च होतो. अशा रीतीनें हें लोण पसरत जातें. घरमालकास चोरीस गेलेल्या जिनसाचे जागीं नवीन वस्तू खरीदाव्या लागतात व ह्या दुसऱ्या मार्गानेंहि पैशाची देवघेव चालू होते अशा रीतीनें, पुरून ठेवलेला पैसा बाहेर पडतो व तो कारणी लागतो चोराकडून माल विकत घेणारा इसम थोडीशी जोखीम स्वीकारीत असल्याकारणानें, त्यास त्याचे व्यवहारात किफायत चागली होते. १०० रुपये तो चोरास देतो व त्याचे कमींत कमी २०० रुपये करतो मालास २०० रु देणारा सच्चा व्यापारी आपल्या बॅंकेवर चेक काढून देणें भाग-वतो. अशा रीतीनें पुन: बॅंकेतील पैसा व्यवहारात खेळू लागतो. चोरी होऊ नये म्हणून खबरदारी घेऊन झालेल्या चोऱ्याचा तपास लावण्याकरितां सरकारास मोठा खर्च करावा लागतो. गुन्हे-गारास न्याय देऊन त्यास तुरुंगात ठेवण्याकरिता खर्च येतो तो वेगळाच. मध्यम स्थितीमधील वर्ग कराचे रुपानें ह्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यास सहाय करीत असतो.

सर्वच दर्जाच्या लोकांमध्यें पैशाची अदलाबदल व देवघेव ह्या रीतीनें होत रहाते. चलनाच्या देवघेवीची गति वाढते व त्याचा परिणाम चलनांत भर पडण्यांत होतो. पैशाची देवघेव वाढवून चलन व्यवस्थेत बदल घडवून आणणाऱ्या चौर्याचें आर्थिक जीवनातील स्थान महत्त्वाचें नाहीं काय? चोर हा न कळत समाजाची सेवा करीत असतो. कारखानदाराप्रमाणें तो कोणत्याहि दृश्य वस्तूचें उत्पादन करीत नाहीं, तसें पाहिलें तर वकील, शिक्षक, अर्थ-शास्त्रज्ञ, वैद्य, कायदेमडळाचे सभासद, मोटारहाके, हे तरी कोणत्या दृश्य वस्तूचें उत्पादन होण्यास हातभार लावीत असतात? बिचाऱ्या चोरास त्याच्या कामाबद्दल धन्यवाद तर नाहींच मिळत, परतु शिक्षा मात्र भोगावी लागते. आपली बुद्धि-मत्ता तो जितकी ज्यास्त खर्च करील, तितक्या ज्यास्त जोरानें राष्ट्र त्याचेवर शस्त्र उगारतें. हा न्याय आहे काय?"

"एकॉनॉमिस्ट" ह्या ब्रिटिश साप्ताहिकातील एका लेखा-मधील विवेचनाचा वर सारांश दिला आहे. त्यावरून त्यातील मतें अर्थशास्त्रदृष्ट्या ग्राह्य आहेत, असें समजण्याचें कारण नाहीं. चोरानें चोरी केली नसती, तर सपत्ती पडून राहिली असती, परतु चोरीमुळें आर्थिक व्यवहारांस चालना मिळाली, असा वरील विवेचनाचा रोख आहे. आर्थिक व्यवहारास गति देऊन चल-नाच्या देवघेवींत वाढ करण्याचें काम चोरांच्या कारवायांमुळें आपोआप घडतें, हें खरें मानलें तरी त्यासाठी सरकारास खर्च किती पडतो व समाजासहि निष्कारण भुर्दंड किती सोसावा लागतो ह्याचा विचार झाला पाहिजे चोरीमुळें उपस्थित होणारें अस्थैर्य व अविश्वास ह्याचा अनिष्ट परिणाम व्यापार-उदीमावर होतो, आणि शिवाय दुसऱ्याच्या सपत्तीचा अपहार करणें म्हणजे तिच्या वाढीस सहाय करणें नव्हे. चल-नाचें प्रमाण वाढवून बाजारभाव सुधारण्याचें साधन सरकारपाशी असतें ह्याबाबत चोरीचें कार्य उपकारक मानलें तर त्याबरोबर अनेक समाजविध्वसक कृत्यांचें समर्थन करावें लागेल. चोरीचा प्रतिबध व अपराध्यास शासन ह्यात खर्च होणारा पैसा व वाया जाणारी शक्ति चागल्या विधायक कारणीं लावली असता समा-जाचें खरें कल्याण होणार आहे. वस्तूच्या उत्पादनास हातभार न लावतां व श्रमाचा किंवा दुसऱ्या वस्तूंच्या मोबदला न देतां केवळ समाजात उचलाउचलीचा धदा वाढविणारे चोरी-सारखे व्यवहार आर्थिक प्रगतीस सहायकारक होणें शक्य नाहीं किंत्येक राष्ट्रें सपत्तीच्या वांटणींत मोठ्या प्रमाणावर ढवळाढवळ करीत आहेत व ती एक प्रकारची अधिकृत चोरीच होय, असें कोणास म्हणतां येईल. खाजगी मालमत्ता ही देखील चोरीच आहे असें कित्येक म्हणतात. परंतु समाजाच्या सर्वांगीण अतिम हिताकरिता बुद्धिपुरःसर व पूर्ण विचारांतीं मान्य केलेली योजना व सस्था ह्यांस चोरानें नागड्या स्वार्थाकरितां इतराच्या सपत्ती-वर मारलेल्या डल्ल्याच्या पक्तीस बसवणें केव्हाहि अयोग्यच होईल सामान्य विनिमयाच्या व्यवहारात, देवघेव करणारांनीं परस्परांचें केलेलें कार्य हितप्रधान असतें आणि म्हणूनच ते समाजहितकारक ठरतात चोरीसारख्या कृत्यात असा सबध येत नसून तीं एकानें दुसऱ्यावर केलेल्या नाशकारक आघाताच्या स्वरूपाचीं असतात आणि म्हणूनच तीं समाजाविरुद्ध झालेला गुन्हा समजण्यात येतात.

१२ वर्षे पुण्यांत लोकादरास पात्र झालेले
☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆
यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

### दि न्यू इंडिया ॲशुरन्स कं लि०

वरील कंपनीनें १९२९ सालीं आयुष्याचे विमे स्वीकारण्यास सुरवात केल्यापासून त्या खात्याची अल्पावधींत प्रगति झाली व पहिल्या सहा वर्षांचे अवधींतच कंपनीस कमालीचें काम मिळालें. १९३५-३६ सालीं कंपनीनें १ कोटि,७६½ लक्ष रुपये किंमतीच्या ७,९३१ विमा पॉलिसी दिल्या व सालअखेर तिचेकडे ५ कोटि, २९½ लाखाचे विमे चालू होते खर्चाचें प्रमाण उतरत असून तें आता ३८ २% इतकेंच आहे विमा खातीं फंड ४०½ लाखांवर गेला आहे कंपनीनें अल्पावधींत मिळविलेलें हें यश अभिनंदनीय आहे. न्यू इंडियाच्या जिंदगीपैकीं ८० टक्के इतकी रकम रोखे बाजारातील रोख्यात—मुख्यतः सरकारी कर्जरोख्यात-गुंतविलेली असून त्यांच्या बाजारभावानें होणाऱ्या किंमतींत बराच वाढावा आढळून येईल. सर नौरोजी सकलातवाला हे कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष असून मि. आर. जे डफ ह्यांचेकडे व्यवस्थेचें काम आहे.

---

### विमा कंपनीची निवड कशी करावी ?

विमा कंपनीची निवड करणें व दुसऱ्या एखाद्या वस्तूची बाजारांत निवड करणें ह्यात महदंतर आहे विम्याचा करार दीर्घ मुदतीचा असल्याकारणानें विमा उतरूं इच्छिणाऱ्यास कंपनी पसत करण्यापूर्वी अनेक गोष्टींचा विचार करणें जरूर असतें. कंपनीच्या केवळ आजच्याच परिस्थितीकडे पाहून भागत नाहीं, दहा-पधरा-वीस वर्षांनीं कंपनीची आर्थिक स्थिति काय असेल, ह्याचाहि विचार त्यास करावा लागतो.

गृहीत धरलेल्या व्याजाच्या दरापेक्षा कंपनीस किती जास्त दरानें व्याज मिळालें, ह्या गोष्टीचा कंपनी निवड करताना विचार होणें आवश्यक आहे हा फरक सर्वच कंपन्याचे बाबतींत एकसारखा आढळणार नाहीं, परतु तो जितका मोठा त्या मानानें कंपनीची सुरक्षितता ज्यास्त, असें मानण्यास हरकत नाहीं ४½ टक्के दर गृहीत धरून ५½ टक्के दरानें व्याज मिळविणाऱ्या कंपनीपेक्षा ३ टक्के गृहीत धरून ५ टक्के दरानें व्याज मिळविणारी कंपनी श्रेयस्कर ठरेल, हें उघड आहे कारण आपल्या एकूण फंडावर ती जास्त व्याजाच्या दरानें रिझर्व्हमध्यें भर टाकीत आहे, असा त्याचा अर्थ होतो.

कंपनीनें खर्चाकरितां काढून ठेवलेल्या रकमेपेक्षा तिनें खर्च कमी केला कीं ज्यास्त केला, व कमी केला असल्यास बचत किती झाली, हाहि प्रश्न कमी महत्त्वाचा नाहीं नवीन काम मिळविण्याकरितां होणाऱ्या खर्चाचे आकड्यावरूनच केवळ कंपनीविषयीं मत बनवितां येणार नाहीं, हें लक्षात बाळगलें पाहिजे विम्याचें काम मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रचारकार्य केलें असेल, तर काहीं काळ खर्चाचें प्रमाण मोठें दिसेल, परंतु त्यानें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. कालांतरानें तें प्रमाण उतरूं लागेल.

विमेदारानें नफ्यासह पॉलिसी घेण्याचें ठरविलें, तरी बोनसची हमी कंपनीनें साधारणत. घेतलेली नसते सहाजिकच, ज्या कंपनीनें काहीं वर्षे ओळीनें चागलें बोनस वाटलें असेल, ती कंपनी पसत करणें फायद्याचें होईल, हें उघड आहे पॉलिसीमधील अटींचा सढळपणा, कंपनीजवळ उरणारा वाढावा, सोड किंमतीसंबधी व पेड अप् पॉलिसीविषयीं सवलती, पॉलिसीचे तारणावरील कर्जावर आकारण्यात येणारें व्याज, इत्यादि गोष्टींचाहि विमेदारास विमा उतरण्यापूर्वी तुलनात्मक विचार करावा लागेल.

### धुळें अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा : २२-८-३७ )

वरील बँकेच्या सभासदाची सख्या १,५८२ असून ९०,७७० रुपयाचें भाग भांडवल खपलेलें आहे. ठेवी ५½ लाखावर असून त्या रकमा किफायतशीर गुतविण्यास वाव नसल्यानें बँकेनें मुदतीच्या ठेवी घेणें बद करून व्याजाचे दरहि कमी केले आहेत. ४, लक्ष ९२ हजार रुपयाचीं कर्जे येणें आहेत व थकबाकी १ लक्ष ६१ हजार रु. आहे नफ्याचे रकमेंतून ६,८०० रु. ७½% दरानें डिव्हिडड देऊन २,७३७ रु रिझर्व्ह फडात, ५४७ रु. बिल्डिंग डिप्रीसिएशन फडांत, व ५४७+१२६७ रु डिव्हिडड ईक्वलायझेशन फडात टाकावेत, अशी मॅनेजिंग कमिटीची शिफारस आहे. कर्जाची थकबाकी फार वाढली आहे, ह्याची जाणीव कमिटीस आहे, व वसुलीची शक्य ती तजवीज करण्यांत येत आहे. सध्याच्या मॅनेजिंग कमिटीची नेमणूक रजिस्ट्रार साहेबांनीं पो नि. ५९ प्रमाणें २३-९-३७ अखेर केलेली आहे

### इंदापूर तालुक्याकरितां रिफ्रेशर्स ट्रेनिंग क्लास

- पुणें जिल्हा को-ऑप इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें इंदापूर येथें इंदापूर तालुक्यातील सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीकरितां ता. ११ ते १७ जुलै १९३७ पर्यंत सहकारी शिक्षणाचा उजळणी वर्ग व ताळेबद क्लासेस भरविण्यात आले.

क्लासचा उद्घाटन समारंभ इंदापूर येथील स्थानिक पुढारी श्री. बाळासाहेब देशपांडे, बी ए, एलएल बी, यांचे हस्तें झाला.

### चतुःशृगी को. क्रे. सोसायटी, लि, पुणें

( वार्षिक सभा : २२-८ ३७ )

वरील सोसायटीचें काम नेहमीप्रमाणें व्यवस्थित चालू आहे. परतु सोसायटीच्या व्यवहारासबधातील सभासदांच्या उदासीनतेबद्दलची व्यवस्थापक मडळाची तक्रार अद्याप कायम आहे. १९३६-३७ अखेर सोसायटीस ६९० रु. नफा झाला, त्यातून ३९५ रु. डिव्हिडड व धर्मादाय ह्याकरितां मंजूर करण्याविषयीं व्यवस्थापक मडळाची शिफारस आहे. सालअखेर एकहि कर्ज थकलेलें नाहीं

### पुणें जिल्हा को इन्स्टिट्यूट

वरील सस्थेची कचेरी ता. १ ऑगस्ट रोजीं ४२ बुधवार, लक्ष्मी रोड येथें गणपती चौकानजीक नेण्यांत आली आहे, पत्रव्यवहार ह्या नवीन पत्त्यावर करावा, असें ऑ सेक्रेटरी कळवितात

---


## आवश्यकता है

वेवी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाऊंस भी मिलेगा. नियम बहुत सरल हैं ( नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें ).

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

**दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.**

( स्थापित १९१६ ) अमीनाबादपार्क-लखनऊ

## धोक्याची सूचना

(लेखकः—श्री. र. प. पटवर्धन C AIIB)

गेल्या तीन-चार वर्षांपासून रोखेबाजारामधील व्याजाचे दर कमी कमी होत असून बँकांनींहि ठेवींवरील व्याजाचे दर पुष्कळच कमी केले आहेत. पोस्टल सेव्हिंग्ज बँकेचा व्याजाचा दर सदरहु बँक सुरू झाल्यापासून जो ३% प्रमाणें सुमारें ५० वर्षें कायम होता तो १-७-३६ पासून २% करण्यांत आला आहे.

ह्यामुळें मध्यम वर्गाचे लोक जास्त व्याज मिळविण्याच्या आशेनें रोखेबाजारामधील रोखे अथवा नवीन नवीन कंपन्यांनीं काढलेले शेअर्स विकत घेऊं लागले आहेत. एका दृष्टीनें बँकांमध्यें अथवा पोस्टामध्यें ठेवींच्या रूपानें पडून रहाणारा पैसा उद्योगधंद्यांकडे वळणें हा फायदाच आहे. परंतु त्या फायद्याबरोबरच जास्त व्याज मिळविण्याच्या मोहाला बळी पडून लोक आपले पैसे बेभरवशाच्या लोकांनीं काढलेल्या कंपन्यांचे शेअर्स विकत घेऊन स्वतःचें व पर्यायानें देशाचें नुकसान करतात, हा तोटाच आहे.

अशा प्रकारें लोभाला बळी पडणारा अगदीं पहिला वर्ग म्हणजे वर्तमानपत्रांमधील जाहिराती वाचून, दुसऱ्या कोणाचा सल्ला न घेतां, एकदम पैसे गुंतविणाऱ्या वाचकवर्गाचा होय. सुमारें २० वर्षांपूर्वी अशा तऱ्हेनें हजारो लोकांनीं आपले पैसे नव्या नव्या भपकेदार नांवाखाली चालणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्समध्यें गुंतविले व ते घालविलेहि.

हल्लींची परिस्थिति जवळ जवळ तशीच परंतु वेगळ्या कारणांनीं निर्माण झालेली आहे. वीस वर्षांपूर्वीं लोकांच्या खिशामध्यें पैसे खुळखुळत होते, ते युरोपमधील महायुद्धामध्यें मिळविलेल्या नफ्याचे निदर्शक होते. आजहि लोकांजवळ पैसे शिल्लक दिसत आहेत, पण ते प्रायः सोनें विकून आलेले पैसे आहेत असें म्हटल्यास गैर होणार नाहीं.

म्हणजे सध्या लोकांजवळ शिल्लक असलेले पैसे त्यांनीं सुरक्षित ठिकाणीं गुंतवून ठेवणें अगदी जरूर आहे. कारण सोनें विकून उभी केलेली ही गंगाजळी बेभरवंशाच्या ठिकाणीं गुंतविल्यानें जर नष्ट झाली तर त्याच्या हलाखीला सीमा रहाणार नाहीं.

वरील विचार वाचकवर्गापुढें मुद्दाम मांडण्याचें कारण म्हणजे हल्लीं वर्तमानपत्रांमध्यें नवीन नवीन कंपन्या व कांहीं विदेशी कंपन्या आपले शेअर्स अथवा रोखे विक्रीकरतां मांडीत आहेत हें होय. काहीं परराष्ट्रीय कंपन्या भारी दराचे प्रेफरन्स शेअर्स व मुदतीच्या कराराचे चांगल्या दराचे बॉन्ड्स खपवीत आहेत. ज्या देशामध्यें कंपन्या स्थापन झालेल्या असतात त्या देशामध्यें व्याजाचे दर फारच कमी असतात, असें असूनहि कंपन्या आपले रोखे हिंदुस्थानामध्यें विक्रीकरतां मांडतात, असें आढळतें. सामान्य वाचकवर्ग प्रॉस्पेक्टस कसा चांगला छापला आहे, डायरेक्टरामध्यें कोण साहेब अथवा बडे लोक आहेत वगैरे बाह्य गोष्टींनीं फसून आपले पैसे अशा कंपन्यांमध्यें गुंतविण्यास तयार होतात.

तरी सामान्य वाचकवर्गानें आपले पैसे कोणत्या ठिकाणीं गुंतविणें सुरक्षितपणाचें आहे ह्याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय नुसत्या जाहिरातींवर अथवा भपकेदार माहितीपत्रकांवर अवलंबून आपलें नुकसान करून घेऊं नये अशी विनंति आहे.


स्थापना १९२० मुंबई सरकारमान्यतेचें, एच. एच दि छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील



जाधव टेलरिंग कॉलेज

नवीन वर्ग सुरू झाले. जुलैचे आत नांवें नोंदवणारास फीमध्यें सवलत. माहिती मागवा.

४९७ बुधवार, पुणें

फाळणी दरसाल हलू नये म्हणून आमचें इच्छा गर्भसंभव औषध घ्या व संततिनियमन करा

औषध बंद केलें कीं, मुलें होतात महिन्यांतून एकदाच घ्यावें लागतें वर्षभर पुरणाऱ्या औषधाची किंमत रु. ५ ट. ख. नि.

मद्रे फिजीशिअन, खांडवा सी. पी.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.

*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८३,१०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,९९३ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,७१६ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,८६,५३६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत | |
| गुंतविलेली एकूण रक्कम | ४२,६२४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्यांहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज.

## ओगले ग्लास वर्क्स लि

( वार्षिक सभा : ८ ऑगस्ट, १९३७ )

काचेच्या धंद्याची परिस्थिति किती बिकट आहे, ह्याची माहिती सर्वांस आहेच. ह्या धंद्यास संरक्षण मिळणें जरूर असूनहि तें न मिळाल्याकारणानें काचेचा धंदा चालवणें आतां अत्यंत कठीण झालें आहे अशा प्रतिकूल व निराशामय परिस्थितींतहि ओगले वर्क्सनें प्रचलित स्पर्धेस तोंड देण्याची शिकस्त केली, हें त्यास भूषणावह आहे. जपानी स्पर्धेबरोबर अंतर्गत स्पर्धाहि तीव्र होऊं लागली आहे. ओगले वर्क्सनें गेल्या सालापेक्षा २ लक्ष नग ज्यास्त काढूनहि निवळ नफ्याचें प्रमाण कमीच पडलें, ह्यावरून काचेच्या धंद्यामधील हानिकारक व मारक स्पर्धेची कल्पना येईल. कंदील तयार करण्यास लागणाऱ्या मालाच्या किंमती वाढल्या तरी परदेशी कंदिलाचे भाव स्थिरच राहिले आहेत, ह्या कारणानें कंपनीच्या दरानें मागणी येईल तेवढेच कंदील तयार करण्याचें धोरण चालकास स्वीकारावें लागलें आहे. एव्हर सिल्व्हर भांड्याचा प्रसार होऊं लागला असून तें खातें आता स्वावलंबी होईल, अशी अपेक्षा आहे १९२८ सालाचे मानानें कांच व एनॅमलिंग खात्यांतील काम आतां चौपटीनें वाढलें असूनहि फायद्याचें प्रमाण घटत आहे. प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून व उत्पादनाचीं नवीं द्वारें उघडून ओगले वर्क्सनें आपला कारखाना नेटानें चालू ठेवला आहे. श्री. श्री. प्र. ओगले हे आपली जपानची सफर पुरी करून नुकतेच परत आले आहेत. त्यांच्या निरीक्षणाचा व अनुभवाचा फायदा कारखान्यास मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं. ओगले ग्लास वर्क्स आज इतकीं वर्षें काटकसरीनें व चातुर्यानें व्यवहार करीत आहे, त्यास आज नाहीं उद्यां चांगले दिवस आल्याखेरीज रहाणार नाहींत, अशी अपेक्षा आहे.

---

### श्री. सहस्रबुद्धे ह्यांच्या गव्हाच्या पोह्यांची शिफारस

"मी ब्लॉसम ( गव्हाचे पोहे ) फॅक्टरीस ता. १७ जुलै रोजीं भेट दिली. हे पोहे उत्कृष्ट सबंध गव्हापासून कुशल यंत्रसहायानें बनविण्यांत येतात मालास हस्तस्पर्श मुळींच होत नाहीं पोहे सर्व प्रकारें हितकारक असेच आहेत ते त्यांच्या ताजेपणामुळें अशाच प्रकारच्या विलायती मालापेक्षा श्रेयस्कर आहेत चालक आपल्या कारखान्याची वाढ करण्याचे विचारात आहेत. पुण्याचे शेजारींच बाहेर कारखान्याचें स्थित्यंतर झाल्यास बरें होईल. इतरहि मी कांहीं सूचना केल्या आहेत, त्याचा विचार कारखान्याच्या वाढीचे वेळीं करण्यांत यावा. उपक्रम यशस्वी होण्याचे योग्यतेचा खचित आहे व त्यास यश लाभेल, अशी मला आशा आहे."

पी बी अडवानी
डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, मुंबई

पुणें, १७ जुलै, १९३७

---

### पाऊसपाण्याची हालहवाल

मुंबई सरकारच्या ताज्या गॅझेटात खालील माहिती प्रसिद्ध झाली आहे:—

कोंकणात व गुजरातेंत भरपूर पाऊस झाला आहे महाराष्ट्रात व कर्नाटकातहि पाऊस चांगला आहे, परंतु कांहीं ठिकाणीं अद्याप पाण्याची कमतरता आहे भडोच, पंचमहाल, अहमदनगर, पुणें, सोलापूर व विजापूर ह्या जिल्ह्यांतील दुष्काळी कामें चालू आहेत, परंतु कांहीं लोकांस शेतावर काम मिळूं लागल्यानें दुःस्थितीची तीव्रता कमी होऊं लागली आहे.





अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी याचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयांची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स ( आतवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत किंमत बाटलीस रु २. ८. व १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

# सहकारी चळवळ

## मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची माहिती

### ( १ )

जून, १९३६ असेरच्या वर्षाचा मुंबई सहकारी खात्याचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यातील महत्त्वाच्या बाबींची माहिती आम्हीं दरसालप्रमाणें येथें देत आहों. १ एप्रिल, १९३६ पर्यंत सिंधची गणना मुंबई इलाख्यातच होत असे, परतु तो प्रांत आतां विभक्त झाला असल्यानें, १९३४--३५ च्या आकड्यांशीं तुलना करतेवेळीं खालील कोष्टकात सिंध संबंधाचे आकडे वजा केलेले आहेत

| संस्थेचा प्रकार | संस्थांची सख्या | | समासदांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | १९३४-३५ | १९३५-३६ | १९३४-३५ | १९३५-३६ |
| सेंट्रल बँका . | १४ | १५ | १३,२९० | १४,३७० |
| शेतकी सोसायट्या | ३,८२० | ३,९११ | २,६९,१७१ | २,६१,७०२ |
| बिगर शेतकी सोसायट्या | ७८६ | ८२३ | २,७९,८६५ | २,७२,५२० |
| एकूण | ४,६२० | ४,७४९ | ५,६२,३२६ | ५,४८,५९२ |
| युनियन्स | ९८ | ९६ | | |
| विमा संस्था ... | २ | २ | २,०४६ | २,५२१ |
| अखेरची बेरीज | ४,७२० | ४,८४७ | ५,६४,३७२ | ५,५१,११३ |

खालील कोष्टकात सहकारी सस्थांचें भाग भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड आणि खेळतें भांडवल ह्यांसबधीं तुलनात्मक आकडे दिले आहेत:—

( आकडे लक्ष रुपयाचे आहेत. )

| संस्थेचा प्रकार | भाग भांडवल | | रिझर्व्ह व इतर फंड | | खेळतें भांडवल | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९३४-१९३५ | १९३५-१९३६ | १९३४-१९३५ | १९३५-१९३६ | १९३४-१९३५ | १९३५-१९३६ |
| सेंट्रल बँका . | ३९ | ४३ | २३ | ३३ | ४,८१ | ५,४९ |
| शेतकी संस्था .. | २३ | २७ | ७४ | ८२ | ३,१८ | ३,२१ |
| बिगर शेतकी संस्था . | १,१५ | १,२६ | ५५ | ८५ | ५,५७ | ६ १७ |
| एकूण .. | १,७७ | १,९६ | १,५२ | २,०० | १३,५६ | १४ ८७ |

वरील कोष्टकावरून दिसून येईल, कीं सहकारी संस्थाची संख्या वाढली असली, तरी सभासदाचे सख्येंत घट झालेली आहे. रिझर्व्ह फंड व भांडवल ह्यामधील केवळ वाढ लक्षांत घेऊन सहकारी चळवळीच्या प्रगतीची कल्पना करणें चुकीचें होईल. थकबाकीच्या आकड्याचीहि त्याचेबरोबर तुलना केली पाहिजे, परंतु त्यांत मात्र समाधानकारक सुधारणा आढळून येत नाहीं पूर्वीच्या सालाचे मानानें थकबाकी फक्त ३½ लाखांनीं कमी झाली अहवालाचे सालीं ४२ सहकारी सस्था गुंडाळण्यांत आल्या व १७० नवीन रजिस्टर केल्या गेल्या. १९३४–३५ सालीं सहकारी सस्थाचे सख्येंत ३५ ची घट झाली होती, अहवालाचे सालीं १२७ सस्थांची निवळ भर पडली, ह्यावरून आशाजनक निष्कर्ष काढण्यास हरकत नाहीं.

## सातारा जिल्हा को. सुपरवायझिंग युनियन लि.

सातारा जि. सुपरवायझिंग युनियन बोर्डची पहिली साधारण सभा ता. २२-७-३७ रोजीं सातारा येथें भरली. सभेस बोर्डाचे, एक्स ऑफिशिओ चेअरमन, मे. डी ए शहा, असि. रजिस्ट्रारसाहेब प्रॉ. को. बँकेचे प्रतिनिधी मे के व्ही. विचारे, सातारा जि. शाखा को. इन्स्टिट्यूटचे प्रतिनिधी, मे जी. बी. कपाळे व युनियन्सचे प्रतिनिधी हजर होते.

आरभी मजूर होऊन आलेल्या डि. सुपरवायझिंग युनियन-बोर्डाच्या पोटनियमांची माहिती देण्यात आली व सदर पोटनियम मंजूर करणेचा ठरावहि सभेपुढें मांडला गेला. परतु "सदरचे पोटनियम मजूर करणेमुळें जिल्ह्यांतील सुपरवायझिंग युनियन्स, सोसायट्या, तसेंच जिल्हा इन्स्टिट्यूट याच्या अधिकाराचें केंद्रीकरण केलें जात आहे व त्या त्या संस्थेचे अधिकार नष्ट होऊन त्या सस्था निकामी होत आहेत; करितां सदर पोटनियम मंजूर करणेस आमचा विरोध आहे," अशा तऱ्हेची सूचना मे. शकरराव आबाजी बोगर यानीं मांडली व तीच बहुमतानें पास झाल्यामुळें तेवढ्यावरच सभेचें काम संपलें. त्यानंतर सातारा येथें ता. २७-७-३७ रोजीं सकाळीं मे. डी. ए शहा, असि. रजिस्ट्रारसाहेब, पुणें यानीं या प्रश्नाची चर्चा करण्याकरितां एक अनौपचारिक सभा बोलाविली. जिल्ह्यातील बिनसरकारी कार्यकर्त्यांनीं, आम्हीं या बाबतींत सहकारी खात्याचे दिवाण यांना शिष्टमडळामार्फत भेटून चर्चा करून निर्णय लावून घेतों, असें सभेंत सांगितलें व सप्टेंबरपर्यंत या बाबीचा विचार तहकूब करण्यांत आला. त्या दिवशीं नऊ युनियन्सच्या प्रतिनिधींची श्री. सिताराम मुरारजी शिंदे, अध्यक्ष, बोरगाव युनियन, याचे अध्यक्षतेखालीं सभा भरून तींत पुढील तजविजीसबधीं दोन ठराव करण्यात आले सातारा जि. को सुपरवायझिंग युनियन बोर्डाचे पोटनियमात सुचविलेल्या दुरुस्त्या सर्व युनियन्सना पाठविण्याचें व सहकारी खात्याच्या दिवाणांशीं वाटाघाट करण्याकरिता शिष्टमडळ पाठविण्याचें ठरलें

## बार्शी सेंट्रल को. बँक लि.

( वार्षिक सभा २२-८-१९३७ )

| कर्ज | रु | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| रिझर्व्ह व इतर फंड | ४६,२१८ | शिल्लक, रोख व बँकांत | १,७०,९७८ |
| ठेवी | ४,३४,५१४ | भाग | ४,२०० |
| भाग भांडवल | ७८,२९० | कर्जें | ३,८४,८२२ |
| नफा | १२,७६० | ऑफिस इमारत व जमीन | १५,५४५ |

सभासद ( ५५ सोसायट्या+७२७ व्यक्ती )=७८२

वरील बँकेकडील ठेवींत गेल्या सालाचे मानानें ६७ हजारांची भर पडली आहे व येणें रकमातहि ८४ हजारांची वाढ झालेली आहे. अवर्षणाचा वसुलीवर अनिष्ट परिणाम झाल्यामुळें थकबाकी थोडी वाढली. आर्थिक परिस्थिति जसजशी सुधारेल, उसतशी ही बाकी कमी होत जाईल, अशी आशा आहे. गेल्या सालचा शिलकी नफा मिळून एकूण नफा १२,८०० रु. १५ आ. १ पै इतका होतो, त्याचा विनियोग खालील प्रमाणें सुचविण्यात आला आहे.—दंडाचें व्याज बॅडडेट फंड : ५१० रु., रिझर्व्ह फंड . ३,०६४ रु., डिव्हिडंड ( ७½% ) : ५,७७५ रु., इमारतफंड : ७०० रु., डिव्हिडंड ई. फंड : १,३०० रु. इत्यादि.

बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड एकूण भांडवलाच्या मानानें समाधानकारक आहेत.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी कर्जरोखे** | |
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... . | १२०—५ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन .. ... ... | १०५–१३ |
| ४% १९४३ ... . .. | १०८—२ |
| ३½% बिनमुदत ... .. . .. | ९७—८ |
| ३½% १९४७–५० .. ... .. | १०६–१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... .. | १००—९ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) .. | १०९—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८—४ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०८—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | १११—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... .. | १२३—० |

**मंडळयांचे भाग**

( कसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भाडवल व कंसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... . | ११६—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% . | ३३—२ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% .. ... | १५४७—८ |
| चॉंबे मॉ. को. बँक ( ५० ) ५% .. .. | ६१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... .. | १२८—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—० |
| अहमदाबाद प्रानज (५००) १०% व ६ रु. ४ आ बोनस | ९८०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७७७—८ |

## नोटीस

गव्हर्मेंट सर्व्हंटस महाराष्ट्र को–ऑपरेटिव्ह बँक लि, पुणें, या संस्थेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २९ ऑगस्ट सन १९३७ इ. रोजीं दुपारीं चार वाजतां पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या असेंब्ली हॉलमध्यें भरणार आहे. त्यावेळीं सन १९३६–३७ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, पुढील सालाकरितां सल्लागार मंडळ, कार्यकारी मंडळ, व हिशेबतपासनीस याच्या निवडणुकी करणें वगैरे कामें होतील. तरी संस्थेच्या सभासदांस ज्या सूचना करणें असतील त्या त्यांनीं ता. १४ ऑगस्ट १९३७ रोजीं सायंकाळीं ७ वाजेपर्यंत बँकेच्या ऑफिसांत पाठवाव्या. ज्या सूचना पंचवीस सभासदाच्या सह्यांनिशीं येतील तेवढ्याच फक्त कार्यक्रमपत्रिकेवर छापल्या जातील.

तसेंच वरील मंडळाच्या किंवा हिशेबतपासनिसाच्या जागेकरितां ज्या सभासदास उमेदवार म्हणून उभें राहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज तारीख २४ ऑगस्ट सन १९३७ रोजीं सायंकाळीं ७॥ वाजेपर्यंत ऑफिसात पोचतील असे पाठवावेत.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें. ज्या सभासदांनीं अगर ठेवीदारांनीं आपले पत्ते बदललेले असतील त्यांनीं आपले नवीन पत्ते तावडतोब कळवावे, म्हणजे त्या पत्त्यावर अहवाल पाठवण्यास बरें पडेल.

पुणें
४–८–३७

कार्यकारी मंडळाच्या हुकुमावरून
आर. डी. मणगे,
ऑ. सेक्रेटरी


## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँक आणि त्याचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली



## भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा गो. काळे व प्रो द गो. कर्वे

**पृष्ठसंख्या सुमारें ५५०, किंमत पांच रुपये**

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, सरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल


नादारीच्या अर्जीच्या चौकशीच्या तारखेची धनकोस

## नोटीस

कलम १९, नमुना नंबर ४.

### पुणें येथील फर्स्टक्लास सब जज यांचे कोर्टांत

**मुक्काम पुणें येथें**

नि. नादारी अर्ज नं. ६०, सन १९३७ पैकीं

( १ ) बिंजराज लाधूराम बोहरा, वय २७ (२) चंद्रभान लाधूराम बोहरा, वय ५३, दोघे मारवाडी, रा. घोडनदी, जि. पुणें. अर्जदार रिणको.

**विरुद्ध**

फुवाजी चतराजी वगैरे १०, जाब देणार धनको.

ज्याअर्थी सदर अर्जदार रिणको यांनें, प्राव्हिन्शियल नादारीचा आक्ट (सन १९२० चा ५ वा) याअन्वयें आपणांस नादार ठरविण्याविषयीं या कोर्टास तारीख २६ माहे ६ सन १९३७ या तारखेची अर्जी सादर केलेली आहे व सदरीं सागितलेल्या रिणकोनें फैल केलेल्या धनकोच्या यादींत तुमचें नाव आहे, त्याअर्थीं तुम्हास यावरून नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं सागितलेल्या अर्जीच्या चौकशीसाठीं व रिणकोची जबानी घेण्यासाठीं या कोर्टानें तारीख १३ माहे ८ सन १९३७ ही तारीख नेमली आहे सदरहू प्रकरणात तुमच्या वतीनें काहीं सांगावयाची तुमची इच्छा असल्यास, तुम्हीं जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडरच्या द्वारें, हजर राहावें.

तसेंच तुम्हास अशीहि नोटीस देण्यात येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यात तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख २६ माहे ७ सन १९३७.

S S. Jogalekar,
नाझर.

Seal

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**अर्थशास्त्र**
लेखक.—प्रो वा गो काळे व प्रो. द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ३००; किंमत तीन रुपये
ह्या ग्रथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धातांचें विवेचन केलें आहे.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २॥, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडास्ट्रियल कंपनी, लि.,**
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

**दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.**
**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.**
पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता
सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!
ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.
८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १९ ऑगस्ट, १९३७ अंक ३३

डॉ. बी. आर. गुणे
पुणें-सिटी यांचे
—पांढरें-सत्त्व—

हें सत्त्व पोटांत अचानक उद्भवणाऱ्या नेहमींच्या विकारावर जलद गुण देणारें बहुमोल औषध गणलें गेलें आहे पोटदुखी, अपचन, मळमळ, वांती, छातींतील जळजळ, तोंडास घाण येणें, वगैरे विकारावर हें आश्चर्यकारक गुण देणारें आहे.

( सर्वत्र मिळतें )

८ पॅकेट्सच्या एका बॉक्सची किंमत १। रुपया

डॉ बी आर. गुणे,
स्पेसिफिक होम, १५३ बुधवार पेठ,
पुणें २

पहिली बक्षिसाची वांटणी एक हजार रुपयांची
ता २०-६-३७ ला झाली
येथे येथे तळें साचे
आयुष्यांतील नानाविध आपत्तींशीं तोंड देण्यास 'कल्पतरू बाँड' खरेदी करा

फक्त रु १३८ बक्षिसाची वाटणी दरसाल
पुन्हां हप्ता नाहीं एका बाँडची मुदत २० वर्षे

—प्रॉव्हिडंट विमा—
डॉक्टरी तपासणी नाहीं जास्तींत जास्त मिळणारी रक्कम रु. ५००
मासिक हप्ता ८८ ते रु २ फायदेशीर एक हप्ता विमा पॉलिसी
माहिती मागवा, अगर आमचे एजटास विचारा
धी महाराष्ट्र इन्शुअरन्स कं. लि.
कराड : : : जि सातारा

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

"जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत"

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलएल.बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं. २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजन्ट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

"अर्थ" ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु ( ट. ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

# माधव सोमण ब्रदर्स

पावसाळी कोट व छत्र्या
धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक
लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

# विविध माहिती

### पॅरीसमधील परदेशीय विद्यार्थी

शिक्षणाप्रीत्यर्थ पॅरीस शहरांत इतर देशांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. १९०० सालीं विद्यार्थ्यांच्या एकूण सख्येशीं तिचें प्रमाण १००:१० होतें तें आतां १००:३० इतकें झालें आहे.

### संशोधक मार्कोनी

मध्य वयांत घडलेल्या एका मोटार अपघातामुळें सुप्रसिद्ध संशोधक मार्कोनी ह्याचा एक डोळा निकामी झाला होता, परंतु त्यानीं ही अडचण न जुमानतां आपलें कार्य अखेरपर्यंत नेटानें चालविलें. ते गेल्या महिन्यांत मरण पावले त्यावेळीं खुद्द सिनॉर मुसोलिनी ह्यांनीं त्यांचे घरीं जाऊन अथरुणाशीं वाकून प्रार्थना केली.

### जपानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार

जपानच्या एकूण लोकसंख्येपैकी अर्धा टक्का लोक ख्रिस्ती आहेत, तथापि, जपानच्या पार्लमेंटातील ४३१ सभासदांपैकी ३१ सभासदांचा ख्रिस्ती धर्माशीं संबध आहे. जपानी सरकार धार्मिक बाबतींत ढवळाढवळ करीत नाहीं.

### हवेंतून होणाऱ्या हल्ल्यापासून बचाव

हवेंतून होणाऱ्या शत्रूच्या हल्ल्यापासून लोकांचा बचाव व्हावा, ह्याकरितां उपाययोजना ग्रेटब्रिटनमध्यें अंमलांत आणण्यांत येत आहे, परंतु तिच्या खर्चाचा कांहीं भाग (३०%) स्थानिक सस्थांनीं सोसावा, असें सरकारचें म्हणणें आहे. स्थानिक संस्थांस हें मान्य नाहीं बचावाचें काम सरकारचें आहे व सर्व खर्च त्यानेंच केला पाहिजे, अशी त्याची भूमिका आहे.

### जपानी व्यापारी आगबोटींचा युद्धाकरिता उपयोग

हिंदुस्थान व जपान ह्यांमध्यें मालाची व उतारूंची वहातूक करणाऱ्या चार आगबोटी जपानी सरकारनें चीनकडे सैनिक व युद्धसामुग्री रवाना करण्याकरितां उपयोगांत आणल्या असल्यानें जुलैमध्यें निर्गत होणारा जपानी माल हिंदुस्थानांत येण्यास थोडा विलंब लागणार आहे. हिंदी कपाशीपैकीं शेकडा ९० माल जपानकडे अगोदरच रवाना झाला असल्यानें त्याचा खोळंबा जाणवणार नाहीं.

### पोलीस खात्यावर सुमारें १ कोटि रु खर्च

१९३६-३७ सालीं मुंबई सरकारच्या पोलिस खात्यावर एकूण ९८½ लक्ष रुपये खर्च झाला. १९३५-३६ सालीं ९९ लाख रुपये खर्ची पडले होते.

### २५ वर्षांनंतरची मोटारवहातुक

१९६० च्या सुमारास अमेरिकेंतील मोटारगाड्यांची संख्या ३½ कोटींवर जाईल व त्याच्या वहातुकीकरिता स्वतंत्र मोठ्या रस्त्याची योजना करावी लागेल, असें एका तज्ज्ञाचें मत आहे ५० मैलापेक्षा कमी वेगानें मोटार चालविण्यास लोक तयार नाहींत, अशी त्याची अपेक्षा आहे

### बंगाल सरकारचें गिर्यारोहण

उन्हाळ्यांतील गिर्यारोहणाप्रीत्यर्थ बंगाल सरकारनें गेल्या पाच वर्षांत ३,१८,५५० रु खर्च केले

### भाड्याच्या लॉरींत प्राथमिक उपचाराचीं साधनें

प्रत्येक भाड्याच्या लॉरीमध्यें प्राथमिक उपचाराचें साहित्य बाळगण्यात आलेंच पाहिजे, असा म्हैसूर सरकारनें नियम केला आहे

### मँचेस्टरच्या कापडाची निर्गत

गेल्या जानेवारी ते जून ह्या सहामाहींत मँचेस्टर कापडाची परदेशांतली निर्गत ९८ कोटि चौरस वार लांबीची झाली १९३६ च्या पहिल्या सहामाहीचा हा आकडा ९२¾ कोटि होता. परतु १९३५ मधल्या त्या सहामाहींत १०० कोटि चौरसवार लांबीचें कापड परदेशांत गेलें होतें. हिंदुस्थानांतली आपली गिऱ्हाइकी कमी झाल्याविषयीं मँचेस्टरवाल्यांची ओरड आहे.

### सक्करच्या धरणाकरितां काढलेल्या कर्जाची फेड

सिंधू नदीवरील सक्कर येथील धरणावर आतांपर्यंत सुमारें २६ कोटि रुपये खर्च झालेले आहेत. ह्या बाबतच्या कर्जाची फेड करण्यास १९४२ सालीं प्रारंभ व्हावयाचा आहे, तथापि, सिंध सरकारनें हप्त्याहप्त्यानें फेड करण्याचा उपक्रम चालू केला आहे. धरणाचे पाण्याखाली येणाऱ्या जमिनी लवकर विकल्या जाण्यावर व शेतीचे मालास चांगला बाजारभाव येण्यावर सिंधची आर्थिक प्रगति बरीच अवलबून आहे

### रेलवेजचें उत्पन्न वाढत आहे

| | |
|---|---|
| १ एप्रिल ते ३१ जुलै १९३७ | ३१ कोटि, ५७ लक्ष रु. |
| ,, ,, ,, १९३६ | २९ कोटि, २२ लक्ष रु. |
| ,, ,, ,, १९३५ | २८ कोटि, ४१ लक्ष रु. |

### नवीन राज्यघटनेचा जादा खर्च

बंगाल प्रातांत नवीन राज्यघटनेचा एकूण जादा खर्च सव्वा वीस लक्ष रुपये चालू सालीं येणार आहे. ह्यापैकी सुमारें १९ लक्ष कायम स्वरूपाचा खर्च आहे. प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीप्रीत्यर्थ सरकारचे ४५ हजार रुपये खर्ची पडले.

### बँकांस सुटी

शनिवार, ता. २१ ऑगस्ट, रोजीं नारळी पौर्णिमेनिमित्त बँका बद रहातील.

### राष्ट्रसंघाचें अदाजपत्रक

राष्ट्रसंघाच्या १९३८ सालच्या अदाजपत्रकात १ कोटि ८५ लक्ष रुपयांचा खर्च दाखविण्यांत आला आहे. १९३७ सालच्या खर्चाचा अंदाज १ कोटि ७३ लक्षाचा होता. कांहीं सभासद-राष्ट्रें संघाची वर्गणी वक्तशीर भरीत नाहींत, ह्याकरितां अंदाजपत्रकांत कूस ठेवलेली असते.

### सर फ्रेड्रिक साइक्स ढाल

मुंबई इलाख्यांतील उत्तर भागामधील आदर्श खेड्यास देण्यांत यावयाची सर फ्रेड्रिक साइक्स ढाल चालू झालीं सुरत जिल्ह्यांतील एनढाल गावास मिळाली आहे.

### असेंब्लीच्या अधिवेशनांत विचारावयाचे प्रश्न

मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या अधिवेशनात विचारण्याकरिता सभासदानीं पाठविलेले ४०० प्रश्न आतांपर्यंत अध्यक्षाकडे दाखल झाले आहेत.

### कलकत्ता बंदरास ६५ हजार रु तोटा

कलकत्ता बंदराची व्यवस्था पहाणाऱ्या पोर्ट ट्रस्टला १९३६–३७ सालीं ३ कोटि, १०½ लक्ष रुपये उत्पन्न झालें व खर्च ३ कोटि ११ लक्ष रुपये खर्च आला, म्हणजे ½ लाख रुपयांचा तोटा झाला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| १–८–३७ ते ७–८–३७ | ४४,६६,७०६ |
| ८–८–३७ ते १४–८–३७ | २९,३२,७६५ |
| २१–९–३१ ते १४–८–३७ | ३,०१,९०,६६,८८८ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४०६ | ५ हिंद-ब्रिटन कपास-कापडाचा व्यापार .. | ४११ |
| २ नवीन विमाविषयक कायदा . | ४०७ | ६ कंपनी कायद्यामध्यें झालेले फेरफार ... | ४११ |
| ३ मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची माहिती | ४०८ | ७ मुंबई बंदरांतील व्यापार | ४११ |
| ४ स्फुट विचार ... | ४०९ | ८ सुप्त एशियाटिक राष्ट्रांत जागृति ... | ४१२ |
| तागाच्या ब्रिटिश कारखानदाराची ओरड—लफंग्यापासून सावध रहा—हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार—सेव्हिंग्ज बँकांतील ठेवी | | ९ सहकारी चळवळ ... | ४१३ |
| | | १० टेलिफोन नं. ९९९ ... | ४१४ |
| | | ११ विजगापट्टम् बंदर तोट्यांत आलें ... | ४१४ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ४१५ |



# अर्थ

बुधवार, ता. १८ ऑगस्ट, १९३७


## नवीन विमाविषयक कायदा

### संरक्षणाची आवश्यकता व विरोधी हितसंबंधांचा मेळ

हिंदुस्थानांत व्हावयाच्या विमाविषयक कायद्याचा मसुदा ह्या वर्षाचे प्रारंभीं प्रसिद्ध झाला व तो मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मांडण्यांत आला. त्यांतील कलमावर गेले सहा महिने बरीच साधक बाधक चर्चा झाली आहे. बिलाचा तपशीलवार विचार सिलेक्ट कमिटी लवकरच करील व असेंब्लीच्या येत्या अधिवेशनात त्याचें रूपांतर कायद्यामध्यें होईल विमा कंपन्यांचा कारभार सध्या १९१२ सालाच्या दोन कायद्यांस धरून चालतो, त्या वर्षापर्यंत विम्याकरिता स्वतंत्र असा कायदा नव्हता. गेल्या २५ वर्षांमध्यें हिंदी विमा व्यवसायानें बरीच प्रगति केलेली आहे. तथापि, ह्या धंद्याचें व्यवस्थित नियंत्रण करणारा योग्य असा कायदा अस्तित्वात नाहीं ह्याबाबत आज अनेक वर्षें तक्रार ऐकूं येत होती व परदेशी कंपन्यांच्या स्पर्धेपासून आपणास संरक्षण मिळावें, अशी मागणीहि हिंदी कंपन्या एकसारख्या करीत आल्या होत्या. विमाविषयक नवीन बिलानें हिंदी आकांक्षाचें पूर्ण समाधान होणार नसलें, तरी अनेक वर्षांच्या सुधारणाविषयक चळवळीस आतां यश येत आहे, एवढी गोष्ट खरी.

बिलामधील मुख्य मुद्याचा सारांश 'अर्था' मध्यें मागेंच येऊन गेला आहे. स्वत:च्या हितांचें रक्षण करण्यास विमेदार समर्थ नाहींत, हें लक्षांत घेऊन सरकारनें विमा कंपन्यांच्या कारभारावर अधिक नियंत्रण घालण्याचें ठरविलें आहे ह्या बाबतींत देशी व विदेशी कंपन्या ह्यामध्यें भेदाभेद करण्यांत यावयाचा नाहीं. विम्याचें काम करणाऱ्या कंपन्यास सरकारांत जबर डिपॉझिट ठेवावें लागणार आहे व कंपन्यांच्या हिशेबावर व व्यवस्थेवर कडक नजर रहावी अशी तजवीज करण्यांत येणार आहे. कंपन्यांची व्यवस्था मॅनेजिंग एजंटाचे हातीं असूं नये, ह्या युक्तिवादाचे आधारावर मॅनेजिंग एजंटाचे कंपन्यांशीं झालेले करार तीन वर्षांनंतर रद्द होणार आहेत. विम्याचें काम मिळवून देणाऱ्या एजंटांवर बंधनें बसणार असून त्यांच्या कमिशनचे कमाल दर निश्चित होणार आहेत व रिबेटच्या पद्धतीस आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात यावयाचा आहे. एजंटास ह्यापुढें लायसेन्स घेणें जरूर पडेल. नव्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचें काम " सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स "कडे सोपविण्यांत यावयाचें आहे. वर उल्लेखिलेली विदेशी कंपन्यापासून स्वतःचें संरक्षण व्हावें ही देशी मंडळ्याची मागणी पूर्णपणें पार पडेल, असें म्हणतां येणार नाहीं. तसेंच, कायद्यातील योजनामुळें विदेशी कंपन्यास आपल्या हिंदुस्थानातील व्यवहारासंबधीं माहिती तपशीलवार प्रसिद्ध करावयास लावण्यास नवा कायदा समर्थ ठरेल, अशी खात्री देतां येत नाहीं. विदेशी कंपन्यांनीं हिंदी रोख्यात गुतविलेल्या रकमा हिंदी विमेदारांचे हितसंरक्षणाकरिता राखून ठेवण्याची योजना केल्यावाचून विदेशी कंपन्यांनीं केवळ सरकारी रोख्यात पैसे ठेवून उपयोग होणार नाहीं आणि ह्या दृष्टीनें बिलात दुरुस्ती होणें जरूर आहे. तथापि, देशी कंपन्याची सर्वांत महत्त्वाची सूचना अशी आहे कीं, हिंदी कंपन्यांनीं आपली लायकी, सचोटी व कार्यक्षमता आतां सिद्ध करून दिलेली असल्यानें त्यांचा व्यवहार वाढावा व विदेशी कंपन्यांस ह्या देशांत हातपाय पसरण्यास जागा राहूं नये, अशी व्यवस्था झाल्याखेरीज देशी धंद्याचें सरक्षण केलें, असें म्हणता येणार नाहीं. विदेशी कंपन्यांजवळ पैशाचा पुरवठा मुबलक असल्यानें त्यास बिलातील कित्येक नियंत्रणें मुळीच जाचक वाटणार नाहींत मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें, स्थानिक स्वराज्य संस्था, पोर्ट ट्रस्ट्स, इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट्स, इत्यादींनीं हिंदी कंपन्यासच काम द्यावें, सरकारकडून संरक्षण मिळणाऱ्या कारखान्यांस विदेशी कंपन्याकडे विमा काम देण्यास प्रतिबंध असावा, विदेशी कंपन्यांनीं रीइन्शुअरन्सचें काम हिंदी कंपन्यांकडेच द्यावें, इत्यादि बंधनाचा बिलात अंतर्भाव होणें देशी कंपन्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

विमा क्षेत्रांत कंपन्याची गर्दी झाली आहे, तेव्हां कांहीं काळपर्यंत नव्या कंपन्या स्थापन होण्यास प्रतिबंध करण्यात यावा, अशी कांहीं हितसंबंधी लोकांची सूचना आहे सकल्पित कायद्यानें विमा व्यवसाय नियंत्रित केला असल्यानें, तीं नियंत्रणें स्वीकारून नवीन कंपन्या काढणाऱ्या हुशार व व्यवहारदक्ष लोकांच्या वाटेंत आडकाठी येणें इष्ट दिसत नाहीं. बिलातील अटी पुऱ्या करून नवीन मंडळी स्थापन करणें अगोदरच कठीण जाणार आहे. तेव्हां अशा प्रतिबंधाची आवश्यकता नाहीं. आयुर्विम्याच्या हप्त्यांवरील कमिशनचे कमाल दर बिलानें निश्चित करून दिले आहेत, ते नवीनच ह्या धंद्यात पडणाऱ्या कंपन्यांचे दृष्टीनें अत्यल्प आहेत व त्यांस ते जाचक होतील, हें उघड आहे. भारी डिपॉझिट व नवें काम मिळविण्याकरितां कराव्या लागणाऱ्या खर्चावर नियंत्रण, ह्या दोहोंच्या कात्रींत नवीन कंपन्यांचा ह्यापुढें टिकाव कसा लागणार ?

विमा एजंटास लायसेन्स देण्याची पद्धति अंमलात येणार असून, त्यामुळें त्यांचा दर्जा वाढणार आहे, असें सांगण्यांत येतें. परंतु, त्यांच्या कमिशनच्या दरांत घट होणार आहे, हें विसरतां कामा नये. रिबेटची पद्धत अजीबात बंद झाल्यास विमा एजंटांस तें किफायतशीर होईल, परंतु केवळ रिबेट बेकायदा केल्यानें त्यास प्रतिबंध कसा होणार, तें कळत नाहीं. खुद्द विमा कंपन्या स्वत: आपल्या व्यवहारात जरूर तीं व्यवसायात्मक नीतितत्त्वें पाळीत नाहींत, असें आढळून येतें, मग गरीब बिचाऱ्या एजंटांकडून त्यांच्या पालनाची कशी अपेक्षा करतां येईल ! मोटारींचा विमा उतरणें ह्यापुढें सक्तीचें व्हावें अशी शिफारस रौटन कमिटीनें

केली आहे. ह्या शिफारशीचें कायद्यांत रूपांतर झालें, म्हणजे मोटारींच्या विम्याचें काम मिळविणाऱ्या एजंटांचा धंदा मर्यादित होण्याचा संभव आहे. आयुर्विम्याचे एजंटासहि कंपनीकडून मिळावयाच्या कमिशनांत छाटाछाट आणि रिबेटची विमेदाराकडून मागणी ह्यांचे तडाक्यात केवळ विम्याचे धंद्यावर जगणें अशक्य होणार आहे.

विम्याचा धंदा सुरक्षित व सुसघटित व्हावा, ह्याविषयीं सार्वत्रिक एकमत आहे. परंतु, प्रत्यक्ष काम करणाराच्या अडचणी व त्यांचे हितसंबंध ह्याकडे दुर्लक्ष करणें कायदेमंडळास योग्य होणार नाहीं. बिलाचें कायद्यांत रूपांतर होते वेळीं त्यांत काहीं दुरुस्त्या केल्या जातीलच, तथापि त्यांमुळें सर्वांचें समाधान होणें अर्थातच अशक्य आहे. विमा कंपन्यांची घटना व त्यांचा कारभार ह्या संबंधांतील बिलामधील योजना विमेदारांचे दृष्टीनें समर्थनीय आहेत, ह्यांत शंका नाहीं. तथापि, बिलांतील इतर अनेक मुद्दे वादग्रस्त आहेत. सर्वांच्या हितसंबंधांचें न्याय्य रक्षण करून हिंदी विम्याचे धंद्यास बळकट पायावर संस्थापण्याचें अवघड कार्य सिलेक्ट कमिटी व कायदेमंडळ हीं कसें पार पाडतात, तें आता पहावें.

---

## मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची माहिती (२)

### शेतकी प्राथमिक पतपेढ्या

शेतकऱ्याच्या प्राथमिक पतपेढ्याची संख्या १९३४-३५ चे मानानें १९३५-३६ सालीं थोडीशी वाढली, तथापि नवीन सोसाट्यांच्या नोंदणीसंबंधांतील लोकांची मागणी पुरी झाल्यास ह्या संख्येंत बरीच वाढ होण्यास जागा आहे. शेतकी प्राथमिक पतपेढ्यांची परिस्थिति ठोकळ मानानें दर्शविणारे आकडे येथें दिले आहेत.—

| | १९३४–३५ | १९३५–३६ |
|---|---|---|
| सोसायट्यांची संख्या | ३,५७२ | ३,६१४ |
| सभासदांची संख्या | २,०२,३८३ | १९९,५२२ |
| | लक्ष हजार | लक्ष हजार |
| खेळतें भांडवल | २९१,९५ | २९१,३२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ६६,४३ | ७२,७७ |
| सभासदांच्या ठेवी | ४४,२० | ३८,०० |
| भाग भांडवल | १६,६३ | १९,९८ |
| बँकेचीं देणीं | १,४४,३२ | १,३८,३० |
| इतर बाहेरचीं देणीं | २७,३० | २२,२६ |

प्राथमिक सहकारी सोसायट्यांनीं आपल्या सभासदास १९३५ ३६ सालीं नवीं कर्जें त्या पूर्वीच्या सालाचे मानानें कमी दिलीं व वसुलीहि कमी झाली. ह्याचें एक कारण १९३४-३५ हें वर्ष १५ महिन्याचें झालें, हें होय कर्ज बाकी व वसुली ह्या बाबतचे आकडे येथें दिले आहेत:—

( आकडे लक्ष रुपयाचे आहेत )

| वर्ष | येणें असलेली बाकी | नवीन कर्ज | वसूल | तडजोडी | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| १९३४–३५ | २५२ | ७९ | ९० | १५ | १४४ |
| १९३५–३६ | २४७ | ६९ | ७१ | २१ | १४० |

# THE COMMONWEALTH ASSURANCE COMPANY, LIMITED.

## Notice to Share-Holders.

Notice is hereby given that the 8th Annual General Meeting of the Commonwealth Assurance Company, Limited, will be held at the Company's Registered Office, 11 Budhwar Peth, John Small Memorial Hall, Opposite 'Huzar Paga, Poona City, on Sunday the 12th September, 1937, at 4 P. M. to transact the following business :—

1. To receive and adopt —
   (a) the report of the Board of Directors regarding the affairs of the Company for the year ending on 30th April, 1937
   (b) the audited Revenue Account and Balance Sheet for the year ending on 30th April, 1937.

2. To appoint Auditors as recommended by the Policy-holders for the current year i. e 1937-38 and fix their remuneration. The present Auditor, Mr. G D. Apte, B. A., G. D. A., R A, retires and is eligible for re-election. He offers himself for re-election.

3 Under Article No 138, and as per provisions of the Indian Companies Act, in this behalf, three Directors viz, Prof V, G Kale, R B. Dr R K. Naidu and Mr H. V. Tulpule retire this year, but are eligible for re-election and offer themselves for the same.

4. To transact such other business as may be brought before the meeting by the Chairman

The transfer books of the Company, will be closed from 2nd September, 1937, to 22nd September, 1937, both days inclusive.

Poona, 12th August, 1937.

By Order of the Board of Directors,
**Abhyankar & Co.,**
Managing Agents


**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**
( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी )
आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत: खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो —
(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या
श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें (२)

# स्फुट विचार

## तागाच्या ब्रिटिश कारखानदारांची ओरड

हिंद-ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी लंडनमध्यें चालल्या होत्या, त्या तूर्त बंद असून सध्याची सुटी संपतांच पुन्हां चालू होतील. ह्या चर्चेमध्यें दोन्ही बाजूचे प्रतिनिधि शक्य तितकें ताणून धरणार आणि ज्यास्तींत ज्यास्त सवलती आपल्या देशाच्या व्यापारास व उद्योग धंद्यांस मिळवण्याचा यत्न करणार हें उघड आहे. ह्या ओढाताणीमुळेंच लंडनमधली चर्चा लांबली असून हिंदी प्रतिनिधींस तिकडे दीर्घकाल रहावें लागलें आहे. हिंदुस्थाननें आपल्या मालास विशेष सवलती द्याव्या अशी ब्रिटिश व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे आणि आपलें जकातविषयक धोरण राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें आखण्याचें स्वातंत्र्य हिंदी लोकांस असलें पाहिजे अशी येथील पुढाऱ्यांची मागणी आहे. दोन्ही देश एकाच साम्राज्याचे घटक असल्यानें त्यांनीं परस्परास व्यापारी सवलती द्याव्या अशी ब्रिटिशांची भूमिका आहे तर हिंदुस्थानच्या आर्थिक धोरणावर हिंदी लोकांची सत्ता नसल्याविषयीं येथें तक्रार आहे. व्यापारी कराराच्या चर्चेची संधि साधून आपलें घोडें दामटण्याची ब्रिटिश कारखानदारांनीं खटपट चालविली असून आपणास योग्य सवलती न मिळाल्यास हिंदुस्थानास जशास तसें ह्या न्यायानें आपण वागवूं असें सांगण्याचा त्यांचा सध्या रोख आहे. ह्याचें ताजें उदाहरण तागाच्या ब्रिटिश गिरणीवाल्याच्या अलीकडील घोषणेंत सापडतें. कपाशीप्रमाणें तागहि ग्रेटब्रिटनमध्यें पिकत नाहीं, तरी तेथें तागाच्या गिरण्या स्थापण्यात आल्या आहेत आणि स्वाभाविकपणेंच त्यास कलकत्त्याच्या गिरण्यांची स्पर्धा जाचक होत आहे. तागाच्या हिंदी मालावर नियंत्रणें घालण्यात यावीं आणि जबर जकाती बसवल्या जाव्या अशी ब्रिटिश कारखानदारांनीं मागणी केली आहे हिंदुस्थानातल्या गिरण्यांचा विस्तार होत आहे, पण आपला धंदा मात्र तोट्यांत चालला आहे असें त्यांचें गाऱ्हाणें आहे. हिंदुस्थानावाचून दुसरीकडे कोठेंहि त्यांस ताग मिळण्यासारखा नाहीं ही गोष्ट त्यांनीं दृष्टीआड करून मात्र चालावयाचें नाहीं.

## लफंग्यांपासून सावध रहा!

सरळ वृत्तीच्या व भोळ्या लोकास फायद्याचें आमिष दाखवून भलत्या सलत्या कंपन्यांचे भाग विकत घेण्यास प्रवृत्त करण्याचा किफायतशीर व बिनभांडवली धंदा चालवणाऱ्या भामट्याच्या लीला बंद पाडण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें असल्याची माहिती आम्हीं मागें दिली होती. त्यासंबंधातली ताजी बातमी अशी आहे कीं, ब्रिटिश सरकारच्या व्यापार खात्यानें ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या कमिटीच्या शिफारसी आता प्रसिद्ध झाल्या असून कंपन्यांचे भाग खपवण्याचा व्यवहार करणारा इसम अधिकृत संस्थेचा सभासद असला पाहिजे किंवा त्याचें नाव विशिष्ट कडक अटींवर नोंदलेलें असलें पाहिजे अशी त्या समितीची सूचना आहे शेअर्सची खरेदीविक्री करणारे दलाल सर्वसाधारणपणें प्रामाणिक असतात, तथापि, त्याच्या कक्षेच्या बाहेरील कांहीं लोक केवळ लफंगेगिरीचा धंदा करतात आणि त्यांच्या कारवाया बंद होतील असे कडक निर्बंध घालणें आवश्यक झालें असल्याचें ती कमिटी सांगते. ह्या धंद्यासंबंधाचे सध्याचे नियम किती सैल आहेत ह्याचीं कांहीं उदाहरणें कमिटीनें दिलीं आहेत. वाणसवदा करणारा एक सामान्य इसम आणि पादत्राणें दुरुस्त करणारा एक चांभार ह्यांचीं नांवें दलाल म्हणून नोंदली गेलीं आहेत! तुरुंगातून सुटतांच एका लफंग्यानें रोखेदलालाचा धंदा थाटून अनेक भाबड्या लोकास लुबाडलें असल्याचें उदाहरणहि लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. मडळ्यांचे कुचकामाचे भाग भोळ्या गिऱ्हाइकांच्या गळ्यात बांधून त्यांस लुटावयाचें आणि नांव व पत्ता बदलून हा उद्योग चालू ठेवावयाचा, असा ह्या उचल्याचा धंदा असतो. श्रमानें मिळविलेला आपला पैसा गुंतविण्यापूर्वी लोकानीं नीट विचार व चौकशी केली पाहिजे हा बोध हिंदुस्थानातहि घेतला जाणें अगत्याचें आहे.

## हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

गेल्या एप्रिलच्या प्रारभीं ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून वेगळा झाल्यामुळें हिंदी परराष्ट्रीय व्यापारासबंधाच्या आकड्यात त्या देशाचा अतर्भाव सरकार करीत नाहीं. ह्या कारणानें, प्रसिद्ध होणाऱ्या व्यापाराच्या आकड्यांचा तुलनात्मक विचार करताना सावधगिरी बाळगावी लागते ब्रह्मदेश आतां हिंदुस्थानचा भाग राहिला नसून तो परदेश समजला जातो आणि त्या दृष्टीनें आयात निर्गत व्यापाराच्या आकड्यांची मांडणी केली जाते. हिंदी परराष्ट्रीय व्यापाराचे गेल्या जून महिन्याबाबतचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांकडे पाहिलें असतां असें दिसतें कीं त्या महिन्याची मालाची आयात १३ कोटि ८८ लक्ष रुपयाची भरली चालू वर्षांतील सर्वांत कमी असा हा मासिक आकडा आहे. मे महिन्याच्या मानानें जून महिन्याची निर्गत मात्र थोडी अधिक झालेली आहे. मे महिन्यात सोन्याची निर्गत आयातीपेक्षां १३० लक्ष रुपयांनीं ज्यास्त होती आणि चांदीची आयात तिच्या निर्गतीपेक्षां २८ लक्षांनीं अधिक होती. जून महिन्यात हे आकडे अनुक्रमेंकरून ४८ लक्ष व ७५ लक्ष रुपये असे होते. सोनें व चांदी एकत्र हिशेबात घेतल्यास मे महिन्यांत ह्या धातूची निवळ निर्गत (आयातीचा आकडा वजा जातां) १०२ लक्ष रुपये होती, परतु जून महिन्यात हें पारडें फिरून निर्गतीपेक्षा आयातच २७ लक्ष रुपयानीं अधिक झाली ब्रह्मदेश वगळून गेल्या सालची व चालू वर्षाची एप्रिल ते जून ही तिमाही घेतली तर हिंदुस्थानच्या आयातीच्या मानानें निर्गतीचा निघणारा मामुली वाढावा कमी झाल्याचें आढळून येतें. तथापि ह्या तिमाहींत एकंदरीनें पहाता आयात निर्गत व्यापार वाढलेला आहे असें दिसतें ब्रह्मदेशाच्या विभक्तीकरणानें घडून आलेले फेरबदल येथें विचारांत घेतले पाहिजेत हें वर सांगितलेंच आहे.

## ब्रिटिश व हिंदी पोस्टल सेव्हिंग्ज बँकेतल्या ठेवी

ब्रिटिश पोस्टल सेव्हिंग्ज बँकेत एक कोटीच्यावर ठेवीदार असून त्यांची एकूण शिल्लक ६०० कोटि रुपयाच्यावर आहे. पैसे ठेवण्याचे व काढण्याचे व्यवहार दररोज सरासरीनें १ लक्ष ४० हजार इतके होतात. ठेवींच्या रकमेच्या मानानें ठेव ठेवणारांची सख्या सारखी वाढत आहे, ह्यावरून ग्रेटब्रिटनमध्यें आर्थिक चलती चालू आहे आणि बेकारी कमी होत आहे असें स्पष्ट दिसतें. वर्षाच्या प्रारभापासून आतापर्यंत ठेवींच्या एकूण रकमेंत ३० कोटि रुपयाची वाढ झाली आहे इंग्लंडमध्यें संपत्ति आणि जनतेची बचत करण्याची संवय ह्याविषयींची परिस्थिति हिंदुस्था-

नाच्या मानानें कशी आहे, हें वरील आकडे स्पष्ट सांगत आहेत. हिंदी पोस्ट ऑफिसाची संख्या १९३५-३६ सालीं सुमारें १३ हजार होती ठेवींचीं खातीं साडेपस्तीस लक्ष होतीं आणि वर्षअखेर ६७ कोटि रुपये इतकी ठेवींची एकूण शिल्लक होती. १९३४-३५ च्या मानानें १९३५-३६ सालीं ठेवींच्या रकमेंत नऊ कोटींचा वाढावा झाला इंग्लंड व हिंदुस्थान ह्याच्या लोकसंख्येची आणि पोस्ट ऑफिसमधील ठेवींची तुलना केली असता निघणारें अनुमान उघड आहे हिंदुस्थानांत १९२८-२९ मध्यें २० लक्ष ठेवीदार होते, त्यांमध्यें सात वर्षांत १५ लक्षाची वाढ झाली आणि ठेवींची रकम ह्या अवधींत जवळ जवळ दुप्पट झाली. ह्या आकड्यात प्रगति दिसत असली तरी हिंदुस्थानांतली जनता आर्थिक दृष्ट्या किती मागसलेली आहे ह्याची त्यावरून शंका उरत नाहीं.

---

नादारीच्या अर्जीच्या चौकशीच्या तारखेची धनकोस

# नोटीस

कलम १९, नमुना नंबर ४

## पुणें येथील फर्स्टक्लास सबजज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम पुणें येथें

नि नादारी अर्ज न. ७१, सन १९३७ पैकीं

शकर मारुती कदम, मराठा, वय ३४, धंदा नोकरी, रा पुणें पठ मीठगंज, घ. नं. ८१२, अ. दा. रिणको.

विरुद्ध

कणीराम गोरधन वगैरे ९, जाब देणार धनको.

ज्याअर्थी सदर अर्जदार रिणको यानें, प्राव्हिन्शियल नादारीचा आक्ट (सन १९२० चा ५ वा) याअन्वयें आपणास नादार ठरविण्याविषयीं या कोर्टास तारीख १७ माहे ७ सन १९३७ या तारखेची अर्जी सादर केलेली आहे व सदरीं सांगितलेल्या रिणकोनें फैल केलेल्या धनकोच्या यादींत तुमचें नाव आहे, त्याअर्थीं तुम्हास यावरून नोटीस देण्यात येत आहे कीं, सदरीं सांगितलेल्या अर्जीच्या चौकशीसाठीं व रिणकोची जबानी घेण्यासाठीं या कोर्टानें तारीख १९ माहे ८ सन १९३७ ही तारीख नेमली आहे. सदरहू प्रकरणांत तुमच्या वतीनें काहीं सांगावयाची तुमची इच्छा असल्यास, तुम्हीं जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडरच्या द्वारें, हजर राहावें

तसेंच तुम्हास अशीहि नोटीस देण्यात येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यात तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यात येणार नाहीं.

आज तारीख ६ माहे ८ सन १९३७.

S S. Jogalekar,
नाझर.

शिक्का

---

फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांकरितां

# नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची २० वी वार्षिक साधारण सभा रविवार ता. ५ सप्टेंबर, १९३७, रोजीं दुपारीं १२॥ वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरणार आहे सदर सभेंत खालील कामें करण्यात येतील.

१. गेल्या वार्षिक साधारण व 'विशेषसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणें.

२ ता. ३० जून, १९३७, रोजीं संपणाऱ्या सालाबद्दलचा डायरेक्टराचा अहवाल नफावाटणी-पत्रकासह व ताळेबंद मंजूर करणें.

३ सरकारी व बँकेनें नेमलेल्या हिशेब तपासनिसांच्या तपासणीयाद्याचा विचार करणें या याद्या सोबत आहेत.

४ सन १९३७-३८ सालाकरता बँकेचे हिशेब तपासण्यास ऑडिटर नेमणें व त्याचें वेतन ठरविणें.

५. बोर्डानें नियमांत दुरुस्त्या केल्या आहेत त्या पोटनियम नंबर ७७ अन्वयें साधारण सभेस दाखल. ( सदर दुरुस्त्या दुरुस्तीपत्रक नंबर ९ म्हणून छापून पाठविल्या आहेत. )

६. बोर्डानें पोटनियम नंबर ३ ( १० ), ६, २१, ४० ( ११ ) ६१, ६५ ( ६ ), ६५ ( ८ ) व ६७ वगैरे यांस सुचविलेल्या दुरुस्त्याचा विचार करणें. दुरुस्त्याचे मसुदे सोबत जोडले आहेत.

७. अवसरी खुर्द को. के सोसायटीच्या प्रतिनिधींनें पोटनियम नंबर ३३ यास व डायरेक्टराच्या निवडणुकीबाबतचा नियम नंबर २७ यास दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्याचा विचार करणें ( त्याचें पत्र सोबत छापलें आहे )

८ सन १९३७-३८ सालांत डायरेक्टरांनीं उभारावयाच्या भांडवलाची कमाल मर्यादा ठरविणें.

९ बोर्डाच्या निकालाविरुद्ध कोणाच्या तक्रारी आल्यास त्या ऐकून त्याचा निकाल देणें.

१०. पुढील सालाकरितां बँकेचे डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाइस-चेअरमन निवडणें.

११. सभेपुढें आणखी कांहीं किरकोळ कामें आल्यास त्यांचा मे चेअरमन याचे परवानगीनें विचार करणें.

१२. सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें.

१३ वार्षिक सभेच्या वेळीं सभासदास काहीं प्रश्न विचारावयाचे असल्यास अगर ठराव विचाराकरिता मांडावयाचे असल्यास त्यांनीं ते तारीख २४ ऑगस्ट, १९३७ चे दुपारीं ३ वाजण्यापूर्वी बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत मॅनेजिंग डायरेक्टर यांजकडे दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत. नवीन सालच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या निवडणुकीकरितां मतें देण्याची वेळ तारीख ५ सप्टेंबर, १९३७ रोजीं सकाळीं ८ ते १० व दुपारीं ३ ते ५ अशी ठरविली आहे.

बोर्डाचे हुकुमावरून
द दि चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर,
पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

पुणे शहर,
तारीख १०, ऑगस्ट १९३७.

## हिंद-ब्रिटन कपास-कापडाचा व्यापार

हिंदुस्थानातील कपास कापडाचें उत्पादन दिवसानुदिवस वाढत आहे व जपानमधूनहि कापडाची आयात जास्त जास्त होत आहे. हिंदी बाजारांत कापडास येणारी मागणी लोकांच्या अल्प कयशक्तीमुळें मर्यादित असल्यानें ह्या स्पर्धेचा परिणाम लँकेशारच्या व्यापारावर होणें अपरिहार्य आहे. कापडाच्या बाजारावरील आपली पकड सुटूं लागल्याची जाणीव लँकेशायरच्या गिरणीवाल्यास झाली असून, ब्रिटिश कापडास हिंदुस्थानात ज्यास्त वाव मिळावा, असा त्यांचा प्रयत्न आज कित्येक वर्षे चालू आहे १९३७ सालाच्या पहिल्या सहामाहींत लँकेशायरनें एकूण १०० कोटि चौरस वार कापड परदेशांत पाठविलें, त्यापैकीं हिंदुस्थानानें सुमारें २० कोटि चौरस वाराची उचल केली, ह्यावरून लँकेशायरच्या व्यापाराचा व हिंदी बाजारपेठेचा किती महत्त्वाचा संबंध आहे, हें दिसून येईल ब्रिटिश कापडाची आयात करण्यात ब्रिटिश पश्चिम आफ्रिका व ऑस्ट्रेलिया ह्याचा नंतर अनुक्रम लागतो, परतु दोघाची मिळूनहि आयात हिंदुस्थानच्या चार-पंचमाश इतकी जेमतेम भरते. अशी महत्त्वाची बाजारपेठ हातची घालवणें लँकेशायरला अत्यत नुकसानीचें आहे व आपल्या हिताचे संरक्षणार्थ तेथील कारखानदार भगीरथ प्रयत्न करीत आहेत आपल्या राष्ट्रीय सरकारमार्फत हिंदुस्थान सरकारवर वजन आणवून लँकेशायरच्या मालास सवलती मिळविणें हा त्यातील एक भाग झाला. हिंदी लोकमत सहाजीकच ह्या प्रकारच्या सवलतींचे विरुद्ध असून, देशी धद्याच्या वाढीस जरूर तें सहाय सरकारनें केलें पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. "आम्ही तुमची कपास खरेदी करूं, तुम्हीं आमचें कापड सवलतीनें आंत येऊं द्या" अशी देवाणघेवाणीची भाषाहि लँकेशायरनें चालू ठेवली आहे. सामोपचारानें व खेळीमेळीनें मिळतील तेवढ्या सवलती मिळवून जरूर तें अधिक सरक्षण सरकारमार्फत मिळवावयाचें, असें हें धोरण आहे. लँकेशायरच्या गिरण्या गेलीं चार वर्षे हिंदी कपाशीची उचल वाढत्या प्रमाणावर करीत आहेत हें खरें असलें, तरी हिंदी कपाशीच्या एकूण निर्गतीच्या मानानें ही खरेदी अत्यल्प आहे, असें इंडियन मर्चंट्स चेंबरनें लँकेशायर इंडियन कॉटन कमिटीला आकडेवार दाखवून दिलें आहे. चेंबरनें दाखल केलेले आकड येथें दिले आहेत.—

### हिंदी कपाशीची निर्गत

( आकडे हजार गासड्याचे आहेत १ गासडी=४०० पौंड )

| वर्षे :ऑगस्ट १ ते जुलै ३१ | हिंदी कपाशीची एकूण निर्गत | ग्रेट ब्रिटनची खरेदी | ग्रेट ब्रिटनच्या खरेदीचें एकूण हिंदी निर्गतीशीं प्रमाण |
|---|---|---|---|
| १९३२–३३ | २,८६८ | २५७ | ८·६% |
| १९३३–३४ | ३,२७० | ३६७ | ११ |
| १९३४–३५ | ३,११५ | ३७४ | १२ |
| १९३५–३६ | ३,८२६ | ५३३ | १३९ |

*हिंदी कपाशीच्या खरेदीच्या मुद्यावर* लँकेशायरची सवलतीच्या जकातीची मागणी कशी फोल आहे हें वरील आकड्यांवरून दिसून येईल. हिंदुस्थानानें लँकेशायरची मागणी सहानुभूतिपूर्वक मान्य न केल्यास हिंदी कपाशीचा ग्रेटब्रिटनमधील खप कमी झाल्याखेरीज रहाणार नाहीं, असें लँकेशायर इडियन कॉटन कमिटीनें आपल्या रिपोर्टांत ध्वनित केलें आहे. हा प्रश्न केवळ कपास व कापड ह्यांच्या आयात-निर्गतीपुरताच नियत्रित न करतां ह्या दोन देशातील सबद्र व्यापाराकडे सामुदायिक रीतीनें पाहिलें पाहिजे, असें इंडियन चेंबरचें त्यावर म्हणणें आहे. ग्रेटब्रिटनचा इतर अनेक प्रकारांचा माल हिंदुस्थानांत खपतो व *विमा आणि बँकिंग ह्याचे क्षेत्रातहि ब्रिटनला ह्या* देशाकडून बराच फायदा मिळतो ही गोष्ट चेंबरनें लँकेशायर इडियन कमिटीच्या नजरेस आणली आहे. ह्या सर्वच प्रश्नाची चर्चा हिंदी- व ब्रिटिश प्रतिनिधींमध्यें सध्या चालू असून, तिच्यामधून निष्पन्न काय होतें ह्याकडे सर्वांचें लक्ष आतां लागून राहिलें आहे

### "कंपनी कायद्यामध्यें झालेले फेरफार"
### ( श्री. गजेंद्रगडकर ह्यांचें छोटें पुस्तक )

हल्ली सर्वत्र संयुक्त भांडवलाच्या मडळ्या स्थापन होत आहेत व लहान-सहान धद्यांचेंहि रूपातर त्यांत करण्यात येत आहे. संयुक्त भांडवलाच्या मंडळ्या बड्या व्यापाऱ्यांच्या व्यवहारासच योग्य, ही कल्पना आता उरलेली नाहीं. स्वत.चें पुरेसें भांडवल नसलें तरी मडळी *स्थापून तें उभारता येतें, ह्या गोष्टीचा* कित्येकांनीं फायदा घेऊन उद्योगधदे यशस्वी केले आहेत. सहाजीकच असे धदे करणारांस व त्यात भागरूपानें भांडवल घालणारांस कपनी कायद्याचें ज्ञान आवश्यक झालें आहे. मध्यवर्ती कायदेमडळानें ह्या बाबतच्या चालू कायद्यांत दुरुस्ती करून व कांहीं महत्त्वाचे फेरबदल करून एक दुरुस्ती कायदा पास केला, त्याच्या अमलबजावणीस १५ जानेवारी, १९३७ पासून सुरवात झाली. ह्या कायद्यामधील प्रमुख योजनाचा जनतेस परिचय करून देण्याकरिता श्री. के बा गजेंद्रगडकर, बी ए, एलएल बी, वकील, सातारा, ह्यानीं एक छोटेखानी पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें आहे, तें वाचकास उपयुक्त व बोधप्रद वाटेल ह्यांत सशय नाहीं. नवीन कायदा बराच गुतागुंतीचा असूनहि श्री. गजेंद्रगडकर ह्यानीं दुरुस्त कायद्यानें केलेले बदल सोप्या भाषेंत समजावून सागितले आहेत पुस्तकाची पृष्ठसंख्या १५ असून त्याची किंमत अवघी १ आणा आहे.

### मुंबई बंदराचा प्रचड व्याप

मुबई बदरात एका वर्षाचे अवधींत चढणाऱ्या व उतरणाऱ्या मालाचीं पोतीं व खोकीं सरळ मांडलीं, तर त्याची लाबी १३,२५८ मैल भरेल मुबई ते *लडनचा जलमार्ग ह्याच्या निम्म्या* इतकासुद्धां लाब नाहीं बदराची व्यवस्था पोर्ट ट्रस्टकडे आहे ट्रस्टच्या कपास साठवणीच्या डेपोंत ८ लक्ष गासड्या मावतात *उघड्यावर ४ लक्ष गासड्यांस जागा आहे, ती वेगळीच.* जगांत कपाशीचा एवढा मोठा डेपो अन्यत्र नाहीं मुबईच्या डेपोंतलि कपाशीची सरासरी किंमत १० कोटि रुपये व धान्याची किंमत १३/४ कोटि रुपये भरते. तेलाच्या डेपोंत २ कोटि गॅलन जळणाचें तेल, २३/४ कोटि गॅलन रॉकेल व १३/४ कोटि गॅलन पेट्रोल मावतें. पोर्ट ट्रस्टच्या आगगाडीच्या फाट्याची लाबी ११७ मैल आहे. जी. आय. पी व बी. बी. अँड सी. आय ह्या रेल्वेजनीं मुबईंत येणाऱ्या व मुबईबाहेर जाणाऱ्या मालापैकी निम्म्याहून अधिक माल ट्रस्टच्या फाट्यांवरूनच जावा लागतो.

## सुप्त एशियाटिक राष्ट्रांत आर्थिक जागृति

एशिया खंडाच्या वायव्य व पश्चिम भागांतील लोक राजकीय व आर्थिक दृष्ट्या अनेक वर्षे सुप्तावस्थेंत होते. त्यामध्यें अलीकडे विलक्षण जागृति झाली आहे ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे महायुद्धानतर पौरस्त्य सस्कृतीच्या देशांमध्यें जी खळबळ उडाली तिचे दीर्घगामी परिणाम आतां राजकीय व आर्थिक क्षेत्रातहि स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येत आहेत. केमालपाशाच्या नेतृत्वाखाली तुर्कस्तानचें आधुनिककरण झपाट्यानें झालें आहे व होत आहे हें सुप्रसिद्ध आहे पाश्चात्य सुधारणेच्या दृष्टीनें मागासलेलें तुर्की राष्ट्र आपल्या इस्लामी सस्कृतीवर आधुनिक आर्थिक व सामाजिक पद्धतीचा पक्का मुलामा चढवीत आहे इजिप्तमध्येंहि ह्याच प्रकारची प्रगति चालू असून ह्या दोन राष्ट्रांतील चळवळीचा ओघ आतां पश्चिम एशियातील इस्लामी देशात पसरला आहे आणि त्याचा पछा इराक, इराण व अफगाणिस्थान ह्याचेपर्यंत येऊन थडकला आहे पॅलेस्टाइनमध्यें सध्या चाललेल्या धडामोडींच्या योगानें एशियांतील ह्या भागात संघटन कसें वाढत आहे ह्याची कल्पन बाहेरील लोकांस येऊ लागली आहे इराण व इराक ह्या देशातल्या रॉकेल तेलाच्या खाणी हा तेथील जनतेच्या नैसर्गिक सपत्तीच्या ठेवा आहे आणि त्याचा पूर्ण उपयोग करून घेण्याचें महत्त्व त्याच्या लक्षांत येत आहे आधुनिक पद्धतीचे रस्ते, लोहमार्ग, कारखाने इत्यादि सोयींची तरतूद करण्याचा आणि व्यापारवृद्धि घडवून आणण्याचा पद्धतशीर यत्न त्याचें राज्यकर्ते करूं लागले आहेत युरोपियन राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीवर ह्याचा परिणाम झाल्यावाचून राहणार नाहीं, हें उघड आहे.

वरील प्रवृत्तीचीं अनेक चिन्हें दर्शविता येतील इजिप्शन सरकारच्या विद्यमानें कैरो येथें एक आर्थिक परिषद् भरवण्याचा स्थानिक व्यापाऱ्याचा विचार असून तिला सीरिया, इराक व पॅलेस्टाइन येथील व्यापारी प्रतिनिधींस पाचारण करण्यांत यावयाचें आहे. ह्या राष्ट्राचे परपस्पराचे व्यापारी संबंध दृढ करणें हा परिषदेचा प्रमुख उद्देश आहे आणि परस्पर सवलतीच्या जकातींची योजता निश्चित करण्याचा प्रश्नहि तिच्यापुढें यावयाचा आहे. तुर्कस्तान, इजिप्त, सीरिया, इराक, पॅलेस्टाइन इत्यादि पश्चिम एशियातल्या राष्ट्राचें आर्थिक सघटन हें जगाच्या इतिहासात अत्यत महत्त्वाचें समजलें जाईल आणि त्याचे राजकीय परिणामहि दूरगामी होतील ह्यात शका नाहीं. इराक देशाच्या दक्षिण भागांतील राकेल तेलाच्या खाणींचा उपयोग करण्याचा हक्क अमेरिकेंतील धदेवाल्यांच्या एका गटास देण्याचें निश्चित झालें असून त्याबद्दल अडीच कोटि रुपयाचा मोबदला इराकी सरकारास मिळावयाचा आहे. ही रकम प्रारंभीं कर्ज म्हणून देण्यात येईल आणि त्याची फेड मालकी हक्काबद्दल मिळावयाच्या वार्षिक मोबदल्यातून इराक परस्पर करील. इराकी सरकार इंग्लंडमध्यें चार कोटि रुपयांचें कर्ज काढीत असून त्या पैशाचा विनियोग आपल्या देशात रस्ते बनवण्याकडे तें करणार आहे त्यामधून नवीन लोहमार्गांचे प्रीत्यर्थहि खर्च व्हावयाचा आहे. तसेंच राष्ट्रीय उद्योगधंद्यांस उत्तेजन देणें हा एक त्या योजनेंतला भाग आहे व्यापारी व्यवहारांचे नियमनाकरिता इराकी सरकार एक कायदा तयार करीत आहे आणि तो लवकरच विधिमडळापुढें माडण्यांत यावयाचा आहे. इराक व तुर्कस्तान ह्याचेमध्यें एक व्यापारी करार होण्याचेंहि घाटत आहे. तुर्की बँकेच्या शाखा इराकमध्यें निघाल्या आहेत आणि त्या देशाच्या बाजारपेठा आपल्या हातीं ठेवण्याचा तुर्कस्तानचा विचार आहे. इराकमध्यें नवीन होणाऱ्या रस्त्याची पहाणी तुर्की तज्ज्ञांनीं नुकतीच केली आहे. पश्चिम एशियातील राष्ट्रांत आर्थिक सवर्धन व संघटन कोणत्या दिशेनें चाललें आहे ह्याची वर दिलेल्या माहितीवरून चांगली कल्पना येईल.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,१८,६०० वसूल झालेलें भांडवल १,०८,५९०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात या बँकेवरील चेक मुबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी

M V GOKHALE,
मॅनेजर

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर कस्टम द्या.

बुधवार चौक, पुणें

# सहकारी चळवळ

## नंदुरबार तालुक्यांतील सहकारी सुपरवायझिंग यूनियन व बँक यांचे तर्फे ग्रामसुधारणा

ता. ९-८-३७ रोजीं नंदुरबार यूनियनचे सुपरवाझर, श्री. उपाचार्य व बँकेचे इन्स्पेक्टर श्री. मेहता यांनीं माजरे को.-के सोसायटीस भेट दिली त्यावेळीं गावात कॉलऱ्याची साथ होती. दोघानीं गांवात फिरून जेथें जेथें घाण होती, ती काढून टाकण्याबद्दल समज दिली व चरपद्धत पायखाना ठेवणेबद्दल सल्ला दिला, कॉलऱ्यावर औषधोपचार सांगितले, व गावात- स्वच्छता ठेवणेबद्दल कळकळीनें सांगितलें. खड्डे केल्यास खत कसें मुरलें जातें याचीहि जाणिव श्री. उपाचार्य यानीं करून दिली.

### शिरूर हवेली ता. रिफ्रेशर्स ट्रेनिंग क्लास, पुणे

पुणें जिल्हा को-ऑप इन्स्टिट्यूटचे वियमानें पुणे येथें शिरूर हवेली ता. को. सुपरवायझिंग यूनिअनच्या कार्यक्षेत्रातील सोसायट्यांच्या सेक्रेटरींकरिता यूनिअनच्या ऑफिसात ता २१-७-३७ ते ता. २४-७-३७ पर्यंत रिफ्रेशर्स ट्रेनिंग क्लास भरविण्यांत आला, रोज नियमितपणें पाच तास शिक्षण देण्यात येत होतें सहकारी चळवळ, हिशेब, सोसायट्यांचें कामकाज वगैरे महत्त्वाचे विषयावर त्या त्या तज्ज्ञाचीं व्याख्यानें झालीं.

ता २४-७ ३७ रोजीं क्लासकरितां आलेल्या सेक्रेटरींची चाचणी परीक्षा घेण्यात आली त्याच दिवशीं सायंकाळीं रा. ब जी एम काळभोर याचे अध्यक्षतेखाली क्लासचा समारोप यूनिअनचे ऑफिसात साजरा करण्यांत आला

समारोपाचे वेळीं क्लासचा अहवाल वाचून झाल्यावर क्लासचे सेक्रेटरींना उद्देशून श्री चितळे, देवभानकर, इनामदार, तुपे, सावत वगैरे मडळींचीं उपदेशपर भाषणें झालीं. शेवटीं श्री. देवभानकर यांनीं सर्वांचे आभार मानले

### दि को-ऑपरेटिव्ह पीपल्स बँक लि, लिंब

वरील बँकेच्या सभासदात १९३६–३७ सालीं तिघाची भर पडून एकूण संख्या ५९ झाली भाग भांडवल ३,२२५ रु झालें. एकूण व्यवहार सुमारें ८० हजारांपर्यंत झाला. सभासद व बिनसभासद ह्यांचीं मिळून ८० खातीं असून त्यात १९ हजार रु आहेत. हुंडीचा व्यवहार हळु हळु वाढत आहे. मालाच्या खरेदी–विक्रीचे व्यवहारात बँकेस ९१ रु. मिळाले. साल अखेर १,१४१ रु. नफा झाला " थकबाकीचें प्रमाण वाढत आहे, " " व्यवस्थापक मडळानें बँकेचा व्यवहार कितीहि कसोशीनें चालविला, तरी सभासदानीं कर्जाचा योग्य उपयोग करून तें वेळच्या वेळीं परत केलें तरच बँकेची लवकर भरभराट होऊन सभासदाचाहि फायदा होईल " अशी बँकेच्या १९३६–३७ च्या वार्षिक अहवालात नोंद आहे.

### सोलापूर को इन्स्टिट्यूट ट्रेनिंग क्लास

सोलापूर को. इन्स्टिट्यूटचे वियमानें निघालेला को. ज्यू. सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास १८-४-३७ ते ९-५-३७ पर्यंत चालून परीक्षेचा नुकताच निकाल लागला, त्यात ६६ विद्यार्थ्यांपैकीं ५६ विद्यार्थी पास झाले.


स्थापना १९२० मुंबई सरकारमान्यतेचें, एच एच दि छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील



जाधव टेलरिंग कॉलेज

नवीन वर्ग सुरू झाले जुलैचे आंत नांवें नोंदवणारास फीमध्यें सवलत माहिती मागवा

४९७ बुधवार, पुणे

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application.

*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरीयाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते भेटा अगर लिहा:—

भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणे

नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८३,१०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | ८९४ |
| मुदतबंद ठेवी | १,६२,९९३ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ६,७१६ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,८६,५३६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४२,६२४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

### टेलिफोन न ९९९

आगीचा बब, ॲम्ब्युलन्स गाडी अगर पोलीस ह्यापैकीं कोणास तातडीनें बोलावण्याची गरज पडल्यास ती भागविण्याची लडन शहरामध्यें एक नवीन सोय करण्यात आली आहे. ९९९ नबरला टेलिफोन केला, कीं तात्काळ टेलिफोन करणारास आवश्यक तो नबर दिला जातो व वेळाची बचत होते. लडनसारख्या मोठ्या शहरीं अशा व्यवस्थेची फारच गरज भासते, कारण तेथें दर आठवड्यास पोलिसाना २,४०० बोलावणीं येतात, १,२०० वेळा ॲम्ब्युलन्स गाडीला काम पडतें व आगीचा बब २५० वेळां बाहेर पडतो लोकास आधुनिक सोईची इतकी सवय झालेली आहे, कीं आता ९९९ नबर मिळविण्याकरिता टेलिफोनची तबकडी तीनदां फिरवावी लागते, त्यास लागणाऱ्या वेळात बचत होणें जरूर आहे, अशा सूचना येऊं लागल्या आहेत! एक-आकडी नबर निश्चित करावा, अशी काहींची शिफारस आहे, परतु तसें करणें खर्चाचें पडेल, ह्यासाठी ती तूर्त अमलात न आणण्याचें ठरलें आहे.

---

### विजगापट्टम बंदर तोट्यांत आलें!

मुबई व कलकत्ता येथील बदरांस पुरेसें काम आहे व व्यापार वाढत असून नव्या चांगल्या बदरास वाव आहे, ह्या हिशेबानें विजगापट्टम येथें उत्कृष्ट बदर बांधण्याची योजना १९२६ सालीं आखण्यात आली. अतर्गत मालाची ने-आण करण्यास सोपें जावें म्हणून पोषक रेल्वेज बांधण्यात आल्यां मध्यप्रांतातील मालास हें बदर सोईचें पडेल आणि व्यापारवृद्धीस सहाय होईल, असा विश्वास वाटला. विजगापट्टममधून सध्या मुख्यतः मध्यप्रातीय मॅंगेनीज धातूची निर्गत होते व हा व्यापार तेजींत आहे. तथापि, सर्वसाधारण आर्थिक मदीची झळ इतर बदराप्रमाणें विजगापट्टमलाहि लागली आहे बदराचे बाधणींत ४ कोटि रुपये गुतलेले असून त्यावरील वार्षिक व्याजच, ४ टक्के दरानें हिशेब केला असता, १६ लक्ष रुपये होतें बदर तोट्यात का आलें व त्यास उपाययोजना काय करावी, ह्याची चौकशी मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची पब्लिक फिनॅन्स कमिटी करणार आहे.

---

### झारापकर टेलरिंग कॉलेज, पुणें

मुबई इलाख्याचे माजी फडनवीस, श्री. जमनादास मेहता, ह्यानीं झारापकर टेलरिग कॉलेजास ता ९-८-३७ रोजीं भेट देऊन समाधान व्यक्त केलें.

---

### महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन

या सस्थेची पहिली सर्वसाधारण सभा ता. २० ऑगस्ट रविवार, रोजीं सायकाळीं ५॥ वाजतां पुणें येथें भारत इतिहास सशोधक मंडळाच्या सभागृहांत भरेल त्यावेळीं (१) आजपर्यंतच्या कार्याचें विवरण व झालेला जमाखर्च (हीं छापून प्रसिद्ध झालींच आहेत) यांची मंजुरी, (२) पुढील कार्यकारी मंडळाची निवडणूक, (३) मंत्रिमडळाकडे शिष्टमंडळ पाठविणें, (५) अध्यक्षांचे परवानगीनें इतर कामें, इत्यादि कामें होतील.

ता. ८।८।३७ आषाढ व. १४, १८५९, पुणें.

दत्तो वामन पोतदार
प्रचालक, म यु अ.



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकू
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत किंमत बाटलीस रु. २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासुन ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १२०—९ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०५–१५ |
| ४% १९४३ | १०८—६ |
| ३½% बिनमुदत | ९७–१२ |
| ३½% १९४७–५० | १०७—० |
| २¾% १९४८–५२ | १००–१० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) | १०९—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | १११—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | ३२—८ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% | १५४७—८ |
| चाँबे प्रॉ को बँक ( ५० ) ५% | ६१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | १०३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९५—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९७५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७७०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| चाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १४६—९ |
| कराची ( १०० ) ९% | २६५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | ३५४—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५४२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% | १७३०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु | १७८–१२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ५१—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २९–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ | ४६—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु. बोनस | ५०००—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% | १९२—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १६८—० |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. | ३४९—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ ६ पै | १६४१—४ |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३४–८¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५१–१४ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—८ |
| „ केसर प्रत्येक मणास | १०–१४ |
| „ सरया प्रत्येक मणास | १०—८ |

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed tenders are invited in B–2 form (Item rate Contract) for Modernizing (with 2½" thick Asphaltic Concrete 18 feet wide) the following roads in and around the town of Ahmednagar.

Tenders accompanied by Treasury Chalans, for amounts shown below, against each work, should be addressed to the Executive Engineer, Ahmednagar Division and delivered at his Office up to 4 P. M. on 20th August 1937 at which time they will be opened by the Executive Engineer.

Tender forms with specifications and conditions of contract will be issued from the Executive Engineer's Office at any time during office hours up to 12 Noon on 20–8–1937. New Tenderers should furnish solvency certificates.

The Executive Engineer reserves the right to reject any or all tenders and no reasons will be given for the acceptance or the rejection of any tender.

When tendered rates are the same, preference will be given, at the discretion of the Executive Engineer, to those who undertake to use vehicles with pneumatic tyres for carting of Materials.

| Name of road | Approximate cost | Amount of earnest money. |
|---|---|---|
| (1) Nagar Manmad Road Mile 1–2 and part of Nagar Manmad Road joining Pottinger Road. | Rs 23,284/- | Rs 233/- |
| (2) Poona—Nagar Road, 1 Mile 2 Furlongs 300 feet and Approach road joining Nagar—Dhond Road 960 feet. | Rs. 22,483/- | Rs. 225/- |
| (3) Nagar Paithan Road Miles 0 to mile 1 and Furlong 4 | Rs. 25,560/- | Rs. 256/- |
| (4) Nagar Paithan Road Mile 1/4 to 2/8. | Rs. 25,047/- | Rs. 250/- |
| (5) Ahmednagar Sheogaon Road within Cantt. limits. | Rs. 35,346/- | Rs. 353/- |
| (6) Nagar Sholapur Road, within Cantt Limits. | Rs. 30,079/- | Rs 301/- |

Ahmednagar,
Dated 10th August 1937.

Sd/- N. B. GADRE,
B. E., A. M. I. E., I. S. E.,
Executive Engineer,
Ahmednagar Division.

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धद्यांना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २॥; किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रक्मा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडास्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

**९३१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

कामाची वेळ—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

**से**विंग्ज बँक ठेवींवर द सा. द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारे ३००, किंमत तीन रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF ...**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you.

**NEW BUSINESS**

**Last year**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches*: Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Office* throughout India & the East

S C MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

विक्रीस तयार ] **विक्षिप्तराव** [ दुसरी आवृत्ति

लेखक—प्रो वा गो काळे

एका काळी फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे. ' विक्षिप्तराव ' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळामधून तें करण्यास फार उपयुक्त आहे **किंमत फक्त १० आणे.**

## दी सनशाइन इन्शुअरन्स लि.

या कंपनीच्या रुपी पॉलीसी, मॅरेज पॉलीसी, डेली प्रिमियम पॉलीसी, पेरेंट्स गिफ्ट पॉलीसी वगैरे नवीन योजनाचा प्रचार करणेकरतां पगारी एजंट पाहिजेत. माहितीकरतां लिहा अगर समक्ष भेटा.

ब्रँच सेक्रेटरी,
ब्रँच ऑफीस . ३३४ गणेश पेठ, पुणें.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
(टपाल हशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ॥

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ | पुणें, बुधवार, तारीख २५ ऑगस्ट, १९३७ | अंक ३४

## दि गुड-वुइल
### ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजटस् नेमणें आहेत

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,

मॅनेजिंग डायरेक्टर

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळी १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

**से**विंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्ज. सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्

पहिली बक्षिसाची वाटणी एक हजार रुपयांची
ता २०-६-३७ ला झाली

थेंबे थेंबे तळें साचे

आयुष्यातील नानाविध आपत्तीशीं तोंड देण्यास 'कल्पतरू बाँड' खरेदी करा

फक्त रु १२-८ पुन्हां हप्ता नाहीं

बक्षिसाची वांटणी दरसाल एका बाँडची मुदत २० वर्षे

— प्रॉव्हिडंट विमा —

डॉक्टरी तपासणी नाही जास्तीत जास्त मिळणारी रक्कम रु ५००
मासिक हप्ता ८८ ते रु २ फायदेशीर एक हप्ता विमा पॉलिसी

माहिती मागवा, अगर आमचे एजटास विचारा

धी महाराष्ट्र इन्शुअरन्स कं. लि.

कराड : जि सातारा

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४; किंवा प्रथम ६८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई

ब्रँच —लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

**RELIABLE STENOGRAPHERS
AND TYPISTS**

ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS

*Apply*—**MARATHI KENDRA,**
10 BUDHWAR, POONA 2

# विविध माहिती

### जंतुनाशक रंग

गिरण्या, कारखाने व कामकाजाच्या कचेऱ्या ह्यांस वेळोवेळ रंग देण्यांतील हेतु स्वच्छता हा असतो. ताज्या रंगामध्यें जंतूचा नाश करण्याची शक्ति असते, असें आता आढळून आलें आहे. तथापि, हा गुण रंग दिल्यापासून काहीं आठवड्याचे अवधींत नाहींसा होतो चुन्यामध्यें जंतुनाशकत्व मोठ्या प्रमाणांत असतें तेलाच्या रंगातहि हा गुण आणण्याचा शास्त्रज्ञांचा यत्न चालू आहे न्यूयॉर्क येथील एका रसायनवेत्त्यानें जंतुनाशकत्व कायम टिकविणारे रंग शोधून काढले आहेत. ह्या शोधाचा व्यावहारिक उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जाण्याचा बराच संभव आहे.

### विक्रमशाली गाईचा पुतळा

कॅनडा देशांतील एका गाईनें दुग्धवैपुल्याचे बाबतींत सर्व जगांत पहिल्या प्रतीचा मान मिळवला होता ह्या विक्रमाचें स्मारक म्हणून त्या गाईचा भव्य पुतळा उभारण्यात आला आहे आणि तो विजेच्या सहायानें पूर्ण प्रकाशित होईल अशीहि व्यवस्था करण्यांत आली आहे स्मारकाचें महत्त्व लक्षात घेऊन ऑंटारिओ प्रांताचे लेफ्टेनंट गव्हर्नर ह्यांनीं पुतळ्याचें अनावरण समारंभानें केलें पुतळ्याच्या खर्चासाठी एका सार्वजनिक संस्थेनें तेरा हजार रुपये मंजूर केले होते

### मागाची संख्या

कपाशीचें कापड विणणाऱ्या जगांतील एकूण यांत्रिक मागात गेल्या वर्षी १०½ हजाराची भर पडून त्याची संख्या ३०½ लक्ष इतकी झाली.

### बंगालमधील कपास-कापडाचें उत्पादन व खप

बंगालमध्यें दरसाल सुमारें १५ कोटि रुपयाचें कपास-कापड खपतें, त्यापैकीं फक्त एक दशांश कापड त्या प्रांतांत तयार होतें. बाकीचें बाहेरून येतें.

### ॲबिसिनियांत वसाहत स्थापण्याचा इटलीचा पद्धतशीर प्रयत्न

ॲबिसिनिया देशास आपल्या साम्राज्यात सामील करून घेतल्यानंतर तेथें वसाहत करण्याचा पद्धतशीर प्रयत्न मुसोलिनीनें चालविला आहे. त्या देशात जाऊन स्थायीक होण्यास योग्य अशा स्त्रियास विशेष प्रकारचें शिक्षण देण्यात येत आहे. इटलीच्या साम्राज्याविषयीं त्याचे मनांत आदर उत्पन्न करून स्वतःच्या वंशाविषयीं अभिमान जागृत करण्याची मुसोलिनीची खटपट आहे. २८ ऑक्टोबरचे सुमारास सुमारें ४०० पुरुष वसाहतवाल्यांची टोळी ॲबिसीनियाकडे रवाना होईल. काहीं वर्षांच्या अनुभवानंतर, त्यांतील लायक लोकांस प्रत्येकी ८० ते १२५ एकर जमीन बक्षीस मिळेल व त्यांच्या कुटुंबासहि तिकडे जाता येईल. दोन वर्षेपर्यंत इटालियन स्त्रियास ॲबिसीनियांत पाठविलें जाणार नाहीं.

### जुन्या लोखंडाचें सोनें !

पोलादाच्या बनावटींत जुन्या, मोडक्या-तोडक्या लोखंडाची आवश्यकता असते, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. ग्रेटब्रिटनमध्यें १९३६ सालीं जेवढें पोलाद तयार करण्यांत आलें, त्यातील प्रत्येक टनाचे ( २० हंड्रेडवेट ) उत्पादनांत १०.६७ हंड्रेडवेट पोलादाचे तुकडे व १.०६ हंड्रेडवेट ओतीव लोखंडाचे तुकडे खर्चीं पडले. युरोपांतील बहुतेक सर्व देशांनीं मोडक्या-तोडक्या लोखंडाचे व पोलादाचे निर्गतीस बंदी केली आहे.

### मोटारींच्या स्पर्धेस तोंड देण्याकरितां बी. बी. अँड सी. आय. रेल्वेची पूर्वतयारी

मोटारींच्या स्पर्धेस तोंड देण्याकरितां रेल्वेजनीं स्वतःच्या मोटारी चालवाव्या, असें वेजवुड कमिटीनें सुचविलें आहे. हा व्यवहार हातीं घेण्यापूर्वी बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेच्या स्थापना-कायद्यांत दुरुस्ती करावी लागेल व त्या बाबतचा मसुदा भागीदारापुढें लवकरच ठेवण्यात येईल, असें रेल्वे कंपनीचे अध्यक्ष, मेजर ए डी. जी. शेले, ह्यानीं कंपनीच्या सभेंत नुकतेंच सांगितलें.

### तुरुंगातील कैद्यांची शिरगणती

दि इंटरनॅशनल पीनल ॲन्ड पेनिटेन्शिअरी कमिशन ह्या संस्थेकडे जगांतील सर्व देशांमधील तुरुंगवासी कैद्यांची खानेसुमारी करण्याचें काम राष्ट्रसंघानें दिलें आहे. ८८ देशांविषयीं माहिती आतापर्यंत जमा झाली आहे. त्या सर्वांमध्यें दर लक्ष लोकसंख्येशीं कैद्यांच्या पडणाऱ्या संख्येचे प्रमाणांत ग्रेट ब्रिटनचा अनुक्रम खाली लागतो. इंग्लंडमध्यें एक लक्ष लोकांपैकीं ३० जण कैदखान्यांत आहेत, जर्मनींत हें प्रमाण १५७ इतकें पडतें.

### वसाहतींशीं होणारा व्यापार

पाश्चात्य राष्ट्रांची आफ्रिका व एशिया खंडांतील त्यांच्या वसाहतींशीं होणारी व्यापारी देवघेव जगांतील एकूण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आठव्या हिश्शाइतकी आहे

### वसाहतींची लोकसंख्या

प्रबल राष्ट्रांच्या सत्तेखाली असलेल्या वसाहतींची एकूण लोकसंख्या २९ कोटि आहे.

### मूषक-प्रदर्शन

भिन्न-भिन्न जातींच्या व रंगांच्या उंदरांचें एक प्रदर्शन इंग्लंडमध्यें नुकतेंच भरवण्यात आलें होतें. उंदीर पाळण्याचा शोक त्या देशांत अनेक स्त्रियास असून तो किफायतशीरहि होतो.

### टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें पुरवणी परीक्षा.

( प्रवेश, प्रथम, मध्यम, उपाध्य व विशारद परीक्षा )

| | |
|---|---|
| अर्ज पाठविण्याची तारीख | १५-९-३७ |
| परीक्षांची सुरवात | ११-१०-३७ |

### ट्रेझरी बिलांवर ६ आणे ११ पै व्याजाचा दर

मंगळवार, ता. १७ ऑगस्ट रोजीं रिझर्व्ह बँकेनें १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें स्वीकारलीं त्यावर द. सा. द. शे. सरासरी ६ आणे ११ पै इतका व्याजाचा दर पडला.

### बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेच्या भागीदारांस ६ टक्के डिव्हिडंड

बी. बी. ॲन्ड सी. आय रेल्वे कं. ची सभा लंडन येथें जुलै २१ रोजीं भरली होती, त्यावेळीं कंपनीच्या भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें.

### हिंदुस्थानांतील पाण्याचे कालवे

हिंदुस्थानातील पाण्याच्या कालव्यांमध्यें एकूण सुमारें १५० कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे, त्यांतून वाहणाऱ्या पाण्याचे सहायानें काढण्यांत येणाऱ्या पिकांची वार्षिक किंमत १०० कोटि रुपये भरते. कालव्यांचें उत्पन्न १३ कोटि रुपयांचें आसपास असतें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| ८-८-३७ ते १४-८-३७ | २९,२२,७६५ |
| १५-८-३७ ते २१-८-३७ | ३३,७०७,७० |
| २१-९-३१ ते २१-८-३७ | ३,०२,२४,३७,६५८ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती .. | ४१८ | ६ पुणें सें को बँक लि | ४२३ |
| २ स्वायत्त मुंबई प्रांताचें पहिलें अंदाजपत्रक .. | ४१९ | ७ मुंबई इलाख्यातील सहकारी चळवळीची माहिती | ४२४ |
| ३ कपास-कापडाच्या गिरण्यांतील माग ... | ४२० | ८ वसाहतींबाबत झगडा | ४२५ |
| ४ कर्जें उभारण्याच्या कार्यक्रमांत एकसूत्रता ... | ४२० | ९ स्वदेशी चळवळ यशस्वी का होत नाहीं? ... | ४२६ |
| ५ स्फुट विचार ... | ४२१ | १० बँक व खातेदार ह्यांचे परस्पर संबंध ... | ४२७ |
| -सावधगिरीनें पुढें पाऊल—ध्येय आणि व्यवहार ह्यामधील अंतर—देशाची आर्थिक पहाणी–सिनेमाच्या धंद्यास सरकारी सहाय–"पुरुषोत्तम" | | ११ मुंबई इलाख्यातील कारखाने | ४२८ |
| | | १२ वेड्यांची व्यवस्था | ४२८ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ४२९ |

# अर्थ

बुधवार, ता. २५ ऑगस्ट, १९३७

## स्वायत्त मुंबई प्रांताचें पहिलें अंदाजपत्रक

१ एप्रिल, १९३७ रोजीं नवीन राज्यघटना अंमलात येऊन प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभ झाला. १९३७–३८ च्या पहिल्या सहामाहीमध्यें प्रांतिक सरकारानीं करावयाच्या खर्चास कायदेमंडळाच्या संमतीची आवश्यकता नव्हती. गव्हर्नराच्या अधिकारांतील ती गोष्ट होती. मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरानीं ५ कोटि, ९२ लक्ष रुपयांच्या खर्चाचें पहिल्या सहामाहीचें बजेट तयार केलें, त्यास अनुसरून सप्टेंबर अखेर कारभार चालेल. १९३७–३८ चें संपूर्ण अंदाजपत्रक ता. १७ ऑगस्ट रोजीं अधिकारारूढ पक्षाच्या फडनवीसानीं असेंब्लीस सादर केलें, त्यांतील महत्वाच्या बाबींचा सारांश येथें दिला आहे.

एप्रिल, १९३७ पूर्वी प्रांतिक सरकाराचा कारभार द्विदल राज्यपद्धतीस अनुसरून चालत असे. १९१९ च्या कायद्यानुसार प्रांतिक सरकारास देण्यात आलेल्या खात्याचे 'राखीव' व 'सोपीव' असे दोन भाग असत व राखीव खात्याची व्यवस्था गव्हर्नर व त्याचें कौन्सिल ह्यांजकडे सोपविलेली असे. नवीन घटनेनुसार प्रांतिक कारभाराचीं सूत्रें सर्वस्वी दिवाणांच्या हातांत आलेलीं आहेत, म्हणजे अधिकारारूढ पक्ष हा खरोखरच स्वायत्त आणि लोकमतास जबाबदार असा झालेला आहे. कायदे मंडळांतील सर्वांत बलिष्ठ पक्षानें आतां राज्य–धुरा उचलली असल्यानें, सरकारचें बजेट हें खऱ्याखुऱ्या पहिल्या जबाबदार सरकारचें अंदाजपत्रक आहे ही फडनवीसाची उक्ति वस्तुस्थितीस धरूनच आहे.

मुंबई इलाख्यांतील जनतेवरील कराचा बोजा इतर प्रांतातील करभारापेक्षा मोठा आहे, ही गोष्ट अर्थसचीव श्री. लठ्ठे ह्यांनीं आपल्या भाषणात प्रारंभींच स्पष्ट केली. दर माणशी त्याच्या लागणाऱ्या जमीन महसुलाचे आकडे त्यांनीं दिले, ते येथें उतरले आहेत:—

जमीन महसूल—दर माणशी सरासरी
(रु.)

| मध्यप्रांत | आसाम | संयुक्त-प्रांत | पंजाब | मुंबई | इतर प्रांत |
|---|---|---|---|---|---|
| १ ४१ | १ २५ | १ १४ | १ ०३ | १ ९५ | १ पेक्षां कमी |

अबकारी पट्टीच्या उत्पन्नाबाबतच्या आकड्याची तुलना केली असताहि त्यांत मुंबईचा नंबर वर लागतो आपल्या इलाख्यात दर माणशी प्रमाण १·८३ रु. पडतें. इतर कोणत्याहि प्रांतात तें एक रुपयापेक्षा ज्यास्त नाहीं. प्रत्येक नागरिकानें एकूण भरावयाच्या करांचे आकडे पाहिले असता, मुंबई इलाख्यातील प्रत्येक मनुष्य सालिना सरासरीनें ६ रु. कर भरतो, मद्रास, पंजाब, बंगाल व संयुक्त प्रांत ह्यामधील जनतेस अनुक्रमें फक्त ३·२६, ४·४३, १·७८, व २·२९ रु द्यावे लागतात. गेल्या १८ वर्षांत मुंबई इलाख्यात ७९ लक्ष रुपयांचे कर वाढविण्यात आले व वार्षिक खर्च २७५ लाखानीं ज्यास्त झाला. अशा परिस्थितीमध्यें लोकावर नवीन कर लादणें न्याय्य होणार नाहीं असें फडनवीसानीं प्रतिपादलें करवाढीसंबंधीं ह्याप्रमाणें खुलासा करून फडनवीसानीं अंदाजपत्रकावरील आपल्या प्रास्तविक भाषणांत कूपर मंत्रिमंडळानें सुचविलेल्या नवीन कराच्या योजनेचा परामर्श घेतला व त्याची अव्यवहार्यता विधिमंडळाचे नजरेस आणण्याचा यत्न केला. राज्यसूत्रें हातीं घेतल्यानंतर बजेट आखण्यास खेर मंत्रिमंडळास पुरेसा अवधि मिळाला नाहीं, तरी त्यानीं दोन आठवड्यांतच सुमारें ५½ लक्ष रुपयांची काटकसर करणारी योजना आंखली व स्वतःच्या आणि इतर लोकनियुक्त अधिकाऱ्यांच्या पगारास कात्री लावून आपल्या आगामी धोरणाचा ओनामा केला.

कॉंग्रेसनें आपल्या मतदारांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणें सुधारणा अमलांत आणण्यास व त्याकरिता पैशाची तरतूद करण्यास मंत्रिमंडळास सवड मिळाली नाहीं, तरी अधिकारारूढ पक्षाच्या कार्यक्रमाचें प्रतिबिंब बजेटांत स्पष्ट दिसल्याखेरीज रहात नाहीं. बहुजन समाजाचें हित साधण्याचा निश्चय केलेल्या मंत्रिमंडळानें शेतकऱ्याच्या दुःस्थितीकडे प्रथम लक्ष द्यावें, हें सहाजीकच होतें. वनचराईची संपूर्ण माफी देऊन व जमीन महसुलाची गेल्या जुलै अखेर संपलेल्या वर्षाचे अगोदरची सर्व बाकी वसूल न करण्याचें ठरवून मंत्रिमंडळानें आपला संदेश खेडुतास पोंचविला आहे कांहीं ठिकाणीं शेतसाऱ्याचा बोजा असह्य झाला होता, तेथें तो कायमचा कमी करण्यात यावयाचा आहे. येत्या सहा महिन्यात खेडेगावांतून विहिरी व तळीं खणण्याकरितां १० लाखांची तरतूद केलेली आहे व १९३८-३९ च्या बजेटात आणखी रकम राखून ठेवण्याचें आश्वासन देण्यात आलें आहे. खेडेगावातील रस्त्याकरिता ३½ लक्ष रुपये दिले जातील खेडेगावी उद्योगधंद्याच्या पुनरुज्जीवनाचा मंत्रिमंडळास विसर पडलेला नाहीं, तूर्त १½ लक्ष रुपये पूर्वतयारीकरितां खर्चण्यात येऊन मोठ्या योजना पुढें हातीं घेण्याचा सरकारचा विचार आहे दारूबंदीची कामगिरी खेडोपाडीं पंचायती स्थापून त्यांचे हातीं देण्याची योजना मंत्रिमंडळानें आखली आहे व त्याबाबत उपक्रम करण्याकरितां आरोग्य मंत्र्यांचे हवालीं २ लक्ष रुपये करण्यात यावयाचे आहेत

मुख्याच्या लिलांवाची सध्याची मुदत १ एप्रिल, १९३८ पर्यंत असल्यानें ह्यापेक्षां ज्यास्त कांहीं करणें सरकारास शक्यच नव्हतें कारखान्यांतील कामगारांच्या हिताचा विसर मंत्रिमंडळास पडलेला नाहीं, तथापि त्या बाबतच्या योजना तातडीनें आखणें अशक्य असल्यानें आपल्या कार्यक्रमाची सर्वसाधारण माहिती देण्यापलीकडे फडनवीसास आपल्या बजेटांत कांहीं करता आलें नाहीं. हरिजनांचे उद्धारासाठी व प्रौढ शिक्षणाकरिता व शारीरिक शिक्षणाप्रीत्यर्थ लहानशी तरतूद करून त्याबाबतची आपली मनीषा मंत्रिमंडळानें जाहीर केली आहे वरील सर्व जमा-खर्चांची सदरें हिशेबात घेतली असता, एप्रिल १९३७ ते मार्च, १९३८ अखेरचा जमाखर्च खालीलप्रमाणें होतो:—

| | |
|---|---|
| एकूण उत्पन्न (रु) | ११ कोटि, ९९ लक्ष; ५५ हजार |
| „ खर्च (रु) | १२ कोटि, १७ लक्ष, २२ हजार |
| उत्पन्नापेक्षा ज्यास्त खर्च (रु) | १७ लक्ष, ६७ हजार |

गेल्या वर्षाचे हिशेबांत आढळलेल्या ४० लाखांच्या वाढाव्यापैकीं जरूर ती रकम वरील तूट भरून काढण्याकडे उपयोगात आणण्याचा फडनवीसाचा विचार आहे

## कपास-कापडाच्या गिरण्यांमधील मागांत वाढ

### तुलनात्मक आकडे

कपास कापडाच्या गिरण्यांतील मागांच्या सख्येवरून कोणत्याहि देशांतील त्या धंद्याच्या वस्तुस्थितीची कल्पना करता येईल खालील कोष्टकात १९३३ व १९३६ ह्या दोन वर्षांची प्रमुख देशांतील मागाच्या सख्येचे दृष्टीनें तुलना केलेली आहे:—

(आकडे हजाराचे आहेत)

| | १९३३ | १९३६ |
|---|---|---|
| ग्रेटब्रिटन | ५८८ | ५०५ |
| जर्मनी | २०५ | २०० |
| युरोप (एकूण) | १७,७७ | १७,४२ |
| जपान | २७७ | ३३३ |
| हिंदुस्थान | १९० | २०२ |
| आशिया (एकूण) | ५५५ | ६०० |
| अमेरिका सयुक्त संस्थानें | ६१४ | ५७३ |
| अमेरिका (एकूण) | ७६६ | ७२५ |
| जग (एकूण) | ३०,६० | ३०,७० |

जगांतील मागाच्या एकूण सख्येंत फारसा फरक झालेला आढळून येत नाहीं. युरोपांत ३४½ हजार माग कमी झाले, ग्रेटब्रिटनमधील मागात तर ८३ हजारांची घट झाली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतहि ४० हजार माग कमी झाले परंतु रशिया, जपान, चीन व हिंदुस्थान ह्या देशांत मागांची सख्या वाढली. एशिया खंडातील देशांमध्यें होणाऱ्या औद्योगिक प्रगतीचें हें स्पष्ट चिन्ह आहे. कारखान्यास पुरेसें काम नसलें, म्हणजे माग अर्थातच बद ठेवण्यात येतात १९३३ सालीं ३ लक्ष, ९६ हजार माग बद होते, १९३६ सालीं फक्त २ लक्ष, २६ हजार मागच बद राहिले, म्हणजे सबद जगात मिळून गेल्यावर्षी १९३३ चे मानानें १ लक्ष १० हजार ज्यास्त माग चालू होते. तीन वर्षांपूर्वीपेक्षा गतसालीं कपास कापडाच्या गिरण्यांचा धंदा तेजींत होता असा त्याचा अर्थ आहे.

## कर्जें उभारण्याच्या कार्यक्रमांत एकसूत्रता

### स्वायत्त प्रांतांचे अधिकार व त्यांच्या मर्यादा

नव्या घटनेनुसार प्रांतामध्यें लोकमतास जबाबदार अशीं मंत्रिमंडळें आता स्थापन झालीं असून त्यांनीं आपल्या कार्यास उत्साहानें प्रारंभ केला आहे. प्रांतिक सरकारास नवे कर बसवण्यास अतिशय अल्प वाव असल्यानें, आपल्या योजना पार पाडण्याकरितां त्यापैकीं कित्येकास लवकरच कर्जें उभारण्याची पाळी येणार आहे. हीं कर्जें देणाऱ्या लोकाजवळील पैसा अमर्याद नसल्याकारणानें, सर्वच प्रांतिक सरकारें व त्याबरोबर मध्यवर्ती सरकारहि कर्जें काढण्यास एकदम बाजारांत आल्यास पैशाच्या पुरवठ्यावर ताण पडून त्याचा परिणाम व्याजाचे दर चढण्यात होण्याचा सभव आहे. म्हणून मध्यवर्ती व प्रांतिक कर्जविषयक-योजनामध्यें एकसूत्रीपणा आणण्याचे हेतूनें येत्या जानेवारीमध्यें त्यांचे प्रतिनिधींची एक परिषद बोलावण्यात यावयाची आहे

१९१९ चा सुधारणा कायदा अमलात येण्यापूर्वी मध्यवर्ती सरकार प्रांतिक सरकाराकरितां जरूर तेवढें कर्ज उभारून देत असे, व त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थास व शेतकरी वर्गास कर्ज मिळे सुधारणा कायद्याचा अमल चालू झाल्यानतर प्रांतिक सरकारास आपल्या उत्पन्नाचे तारणावर भांडवली खर्च भागविण्याकरिता कर्जें उभारण्याची परवानगी मिळाली प्रत्येक कर्जास, त्यावरील व्याजाचे दरास व परतफेडीचे योजनेस गव्हर्नर जनरल इन कौन्सिलच्या मंजुरीची आवश्यकता असे मुंबई येथील समुद्र हटविण्याकरिता व सक्कर येथें सिंधू नदीवर धरण बांधण्याकरिता मुंबई सरकारनें अशाच रीतीनें कर्ज उभारून ह्या नव्या सवलतीचा फायदा घेतला.

१९३५ सालाच्या नव्या राज्यघटनेनें स्वायत्त प्रांतास कर्जें उभारण्याचा संपूर्ण हक्क दिलेला आहे मध्यवर्ती (फेडरल) सरकारच्या मंजुरीविना प्रांतिक सरकारास हिंदुस्थानबाहेर कर्जरोखे विकतां येणार नाहींत व त्यांनीं मध्यवर्ती सरकारचें कांहीं कर्ज फेडणें असल्यास, तें फिटण्याचे आधी नवें कर्ज काढण्यास त्यास हिंदुस्थान सरकारची परवानगी घ्यावी लागेल. बंगाल, बिहार, आसाम, सरहद्द प्रांत, ओरिसा व मध्यप्रांत ह्या प्रांतास नीमायर लवादानें मध्यवर्ती सरकारच्या कर्जांतून मुक्त केलें असल्याकारणानें, नवीन कर्जांची उभारणी करण्यास ते स्वायत्त बनले आहेत. मुंबई, पंजाब, सयुक्त प्रांत, मद्रास व सिंध ह्यांस मात्र हें सुदैव लाभलेलें नाहीं आणि त्यास मध्यवर्ती (फेडरल) सरकारच्या संमतीवांचून कर्ज उभारण्यास मनाई आहे. प्रांतिक सरकारांनीं नव्या कर्जाचा बोजा स्वीकारण्यापूर्वी, आपण दिलेल्या कर्जाच्या सुरक्षितपणाविषयीं खात्री करून घेण्यास हिंदुस्थान सरकारास अवधि मिळावा, हा वरील योजनेचा हेतु आहे. कर्जांबाबतचे सर्व व्यवहार ह्यापुढें रिझर्व्ह बँकेच्या सहकार्यानें व्हावयाचे असून येत्या जानेवारींत भरावयाची परिषद ह्या बँकेच्या पुरस्कारानेंच बोलावण्यात आलेली आहे. १९३८-३९ सालासबंधांचीं अंदाजपत्रकें तयार होण्यास त्यानंतर पुरेसा अवधि मिळेल व त्या वर्षांतील कर्जविषयक कार्यक्रम अगोदरच निश्चित झाल्यानें त्यात एकसूत्रता येईल फेडरेशन अस्तित्वात येण्यापूर्वी सध्याचें हिंदुस्थान सरकारच ह्या प्रश्नाचे संबधांत फेडरल सरकारची भूमिका स्वीकारील, हें गृहीतच आहे

# स्फुट विचार

## सावधगिरीनें पुढें पाऊल

राष्ट्रीय सभापक्षानें मुंबई इलाख्यात अधिकारसूत्रें हातीं घेतल्यावर त्याचें मंत्रिमंडळ आपलें अंदाजपत्रक कसें तयार करतें ह्याविषयीं सार्वत्रिक कुतूहल उत्पन्न झालें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं राष्ट्रीय सभेचीं तत्त्वें, तिनें वेळोवेळ प्रसिद्ध केलेलें धोरण व कार्यक्रम आणि निवडणुकीच्या प्रसंगीं दिलेलीं अभिवचनें ह्यांचा प्रत्यक्ष कृतीशीं कसा मेळ घातला जातो हें जाणण्याची उत्सुकता जनतेंत उत्कट होती. विशेषतः पूर्वीच्या कामचलाऊ मंत्रिमंडळानें आपला कार्यक्रम विस्तृत रीतीनें अगोदरच प्रसिद्ध केला होता आणि त्यांत स्वत. तयार केलेल्या अंदाजपत्रकाची व आखलेल्या कार्यक्रमाची रूपरेखा मांडली होती हा आणि नवीन प्रधानमंडळाचा कार्यक्रम यांची तुलना लोकाकडून केली जाणें अपरिहार्य होतें कोणत्याहि पक्षानें किंवा मंत्रिमंडळानें आपलें विविध धोरण विस्तारानें व बढाईनेंहि नागरिकास सादर करणें आणि तें प्रांतिक राज्यकारभाराच्या अंदाजपत्रकाच्या आकुंचित चौकटींत बसवणें ह्यात महदंतर आहे. सध्या प्रांतिक विधिमंडळापुढें असलेलें अंदाजपत्रक चालू वर्षाच्या उरलेल्या सहा महिन्यापुरतें असून तें तयार करण्यास मंत्रिमंडळास फारसा वेळहि मिळाला नाहीं पुढील आणि कायमच्या धोरणास अनुसरून चालू सालीं कोणत्या सुधारणा हातीं घेतां येतील आणि त्यापैकी कोणत्या बाबींचा अंतर्भाव अंदाजपत्रकांत करावा ह्याचाहि निर्णय करणें त्यास शक्य नव्हतें. ह्या दृष्टीनें पहातां, प्रसिद्ध झालेल्या उत्पन्न-खर्चाच्या नियोजित तरतुदींच्या फारसें पलीकडे जाणें फडनवीसास शक्य होतें असें म्हणतां येत नाहीं ध्येय म्हणून पुढें मांडण्यात आलेल्या राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाच्या कित्येक विभागास कुरतडणें आणि भावी धोरणाचें दिग्दर्शन करणें एवढेंच त्यास साधलें आहे प्रांतिक सरकारची सांपत्तिक परिस्थिति आणि खर्च व करांचें उत्पन्न याबाबतचें त्याचें आजपर्यंतचें धोरण ह्याच्या मर्यादा स्पष्ट करून सावधगिरीनें आपण पुढें पाऊल टाकीत आहों हें श्री. लठ्ठे यांनीं स्पष्टपणें सांगितलें असून ध्येयवादित्वास व्यावहारिक बुद्धीची वेसण त्यानीं घातली आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

## ध्येय आणि व्यवहार यांमधील अंतर

कोणत्याहि सरकाराचा खर्च आणि उत्पन्नाच्या बाबी ह्यांचा जनतेच्या रहाणीशीं अत्यंत निकट संबंध असतो. ह्या कारणानें कोणत्या बाबींवरचा खर्च कमी किंवा अधिक करावा आणि कोणते कर चढवावे किंवा उतरवावे ह्याचा काळजीपूर्वक विचार प्रधान मंडळास करावा लागतो. उदाहरणार्थ, दारूबंदीची बाब घेतली तर दारूच्या व्यसनाचें उच्चाटन व्हावें ह्या ध्येयानुसार योजना अमलात आणणें हें सरकारचें आवश्यक कर्तव्य आहे ह्यांत कोणाचा मतभेद होईल ? तथापि, दारूपासून होणारें उत्पन्न अग्राह्य आहे हें खरें असलें तरी तें नाहींसें झाल्यास त्याची जागा भरून काढण्यास करांच्या दुसऱ्या बाबींची व्यवस्था केल्यावांचून गत्यंतर नाहीं. खर्चाचीं तोंडें तर अनेक आहेत आणि कर कमी करण्याविषयींच्या अगदीं न्याय्य अशा मागण्याहि अनेक आहेत. दारूबंदीचा हुकूम काय केव्हाहि काढता येईल परंतु त्याचे दूरगामी परिणाम काय होतील ह्याचा अगोदर विचार झाला पाहिजे. नाहींतर एका बाजूनें दारूचें उत्पन्न नाहींसें होईल पण त्या धोरणाचें फळ मात्र पदरीं पडावयाचें नाहीं, असें होण्याचा संभव आहे. तसेंच, दारूच्या उत्पन्नाचा खळगा दुसऱ्या कोणत्या करानीं भरून काढावा हें ठरविणें सोपें नाहीं. वीज, ट्रॅम्स इत्यादि सारखे जनतेच्या नित्याचा आयुष्यक्रमास अत्यंत आवश्यक असे धंदे सरकारनें स्वतःच्या ताब्यांत घ्यावे ही सूचना प्रांतिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनें सोपी दिसते. पण हे धंदे सरकारच्या हातीं आले म्हणजे फायदेशीर होऊन प्रांतिक उत्पन्नांत भर घालण्यास त्याचें सहाय होईलच ह्याची काय शाश्वती आहे ? जावें करावयास एक आणि होतें भलतेंच, हा रोजच्या व्यवहारातला अनुभव सरकारासहि येणारच ह्या बाबतींत सरकारच्या सामर्थ्यास मर्यादा असतात, त्या त्यानीं ओळखल्या पाहिजेत. आकांक्षा, अपेक्षा आणि व्यवहार व प्रत्यक्ष अनुभव ह्याच्यामध्यें अंतर असतें तें दृष्टिआड होणें इष्ट नाहीं. खादी व ग्रामोद्योग ह्याचें कार्य किती मंदगती आहे हें राष्ट्रीय सभेच्या अनुयायांस कळून चुकलें आहे. त्याची जाणीव श्री. लठ्ठे ह्याच्या अंदाजपत्रकावरून प्रत्ययास येत आहे आणि ती तशीच जागृत रहाणें अगत्याचें आहे. शेतकरी व कामकरी वर्ग याच्यावरच्या कराचा बोजा हलका होऊन त्याच्या सुखसोयीप्रीत्यर्थ केला जाणारा खर्च वाढला पाहिजे आणि असें होतांना नागरिकास करावा लागणारा स्वार्थत्याग लोकाच्या ऐपतीच्या मानानें वाटला जाणें आवश्यक आहे. ही वांटणी न्याय्य व्हावी एवढ्यासाठी नीट चौकशी झाली पाहिजे आणि त्याच मार्गानें जाण्याचें प्रधान मंडळानें ठरविलें आहे हें चागलें आहे.

## देशाची आर्थिक पहाणी

सामाजिक संस्था व आर्थिक व्यवहार-पद्धति ह्याचीं मुळें इतकीं खोल गेलेलीं असतात आणि त्याची परस्पराशीं अशी गुंतागुत झालेली असते कीं, त्यापैकीं एकास हात लावला असता इतरासहि त्याचा धक्का बसतो. सरकारच्या उत्पन्नखर्चाचे बाबतींत हा विचार महत्त्वाचा असल्याचें आम्हीं वर दर्शविलें आहेच. राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम विविध आणि दीर्घपरिणामकारक असा आहे आणि त्यास मूर्तस्वरूप यावयाचें म्हणजे अनेक सामाजिक व आर्थिक संस्थाची पुनर्घटनाच व्हावी लागेल. हें कार्य सहज होण्यासारखें नसून त्याची योजना पूर्ण माहिती मिळवून व दीर्घ विचाराअंतीं निश्चित करावी लागेल आणि योजनेचीं भिन्न भिन्न अंगें परस्पराशीं जुळतीं करून घ्यावीं लागतील. हिंदुस्थानांतील नैसर्गिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिति प्रांताप्रांतात वेगवेगळी आहे ह्या कारणानेंहि विस्तृत पूर्वचौकशीचें महत्त्व विशेष आहे. राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळानें प्रांतिक प्रधानमंडळास धोरण आखून देतांना त्याच्या विशिष्ट स्थानिक परिस्थितीचा विचार करणें प्राप्त आहे आणि योग्य मर्यादेंत ठरलेल्या सर्वसाधारण कार्यक्रमास मुरड घालण्याचें स्वातंत्र्य त्यास देण्यावाचून गत्यंतर नाहीं. विस्तृत स्वरूपाची अशी देशाचा आर्थिक पहाणी करण्याचा ठराव राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळानें नुकताच केला असल्याचें प्रसिद्ध झालें आहे, त्याच्या मुळाशीं वर निर्दिष्ट केलेली कल्पनाच आहे मात्र ही पहाणी पद्धतशीर रीतीनें झाली पाहिजे, आणि तीमध्यें राष्ट्रीय जीवनाच्या अंगोपांगांचा योग्य परामर्श घेण्यांत आला पाहिजे ह्या चौकशींत घाई आणि एकांगीपणा हीं टाळलीं पाहिजेत. कित्येकांस कदाचित् वाटत असेल त्या प्रमाणें हें कार्य सोपें आणि त्वरित होण्यासारखें नाहीं.

### सिनेमाच्या धंद्यास सरकारी सहाय

हिंदी सिनेमाच्या धंद्यास सरकारनें सहाय करावें, कच्च्या फिल्मसवरील जकात कमी करण्यांत यावी, विदेशी लोकांचीं बोलपटगृहें हिंदुस्थानात उभारली जाण्यावर नियंत्रण असावें, इत्यादि सूचना देशी सिनेमाचे धंद्यांतील पुढारी आज अनेक वर्षे करीत आले आहेत अमेरिकेनें सिनेमाच्या धंद्यात कमालीचें यश मिळविलें असून त्या देशांत तयार होणाऱ्या फिल्मसच्या तोडीचे चित्रपट इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशांतहि अद्याप तयार होऊं लागलेले नाहींत ब्रिटिश चित्रपटाचा दर्जा सुधारून त्यांचा खप वाढावा एवढ्याकरितां त्या देशाचें सरकार सहाय करीत आहे. ह्याबाबत सध्या अमलांत असलेल्या योजनेची मुदत लवकरच संपत असल्यानें, तिचे ऐवजीं नवीन योजना सुचविण्याकरितां ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें एक कमिटी नेमली होती तिनें केलेल्या शिफारशींस अनुसरून कायदा करण्यात यावयाचा आहे, त्याचा मसुदा नुकताच जाहीर करण्यांत आला आहे. ग्रेटब्रिटनमधील सिनेमागृहात विशिष्ट प्रमाणामध्यें ब्रिटिश चित्रपट दाखविण्यात आलेच पाहिजेत, अशी सक्ति सध्यां आहे, ती चालू ठेवण्यात येणार आहे. कोणत्या फिल्मला ब्रिटिश फिल्म म्हणावें, ह्याची व्याख्याहि ठरविण्यात यावयाची आहे. आपल्या देशांतील सिनेमाच्या धंद्यास ब्रिटिश सरकार करीत असलेलें सहाय हिंदुस्थानातहि मार्गदर्शक होण्याजोगें आहे. अनियंत्रित व्यापार आणि औद्योगिक उन्नतीचे बाबतींत राजकर्त्यांची तटस्थपणाची वृत्ति ह्याचे गोडवे एकाकाळीं गायले जात होते आणि त्याचें बाळकडू हिंदुस्थानास पाजण्यांत आलें होतें. परतु आतां 'पुराणांतलीं वांगीं पुराणात' ह्या न्यायाचा आश्रय सर्वत्र करण्यात येत आहे. हिंदी राष्ट्रानें ही वस्तुस्थिति ध्यानांत बाळगणें अत्यावश्यक आहे.

### 'पुरुषोत्तम'

नमुनेदार नागरिकत्व, लोकहिताविषयीं तीव्र कळकळ व त्याकरितां स्वार्थत्याग करण्याची तत्परता, औदार्य, स्वधर्मनिष्ठा, प्रगतिप्रियता आणि साधी रहाणी इत्यादि गुणामुळें कै. वा. रावबहादुर काळे ह्यांचें चरित्र आदरणीय व अनुकरणीय झालें आहे आणि जनतेच्या बोधासाठी त्याचा जीवनवृत्तात आत्मीय वृत्तीनें लिहिला जाणें आवश्यक होतें. तें कार्य* श्री. चं. ह. पळणिटकर ह्यांनीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे ह्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. रावबहादुराच्या आचार-विचारांचें विस्तृत विवेचन चरित्र लेखकानें केलें असून तें स्फूर्तिदायक झालें आहे. ग्रथाची भाषा ओघवती आहे आणि लेखनशैली प्रभावी आहे. तथापि, एक दोन वैगुण्याकडे येथें लक्ष वेधणें आवश्यक आहे. पुस्तकाच्या प्रारंभीं अर्पणपत्रिका, पुरस्कार, प्रस्तावना इत्यादींची इतकी गर्दी उसळली आहे कीं एखाद्या रम्य उपवनाच्या महाद्वाराजवळ अस्ताव्यस्त पडलेल्या अडगळीचा भास ग्रथप्रवेशाचे प्रसगीं होतो. चरित्रग्रथात जाहिरातींचीं पानें कोंबल्यामुळें झालेला औचित्यभंग तर विशेष उठावदार दिसतो व तसेंच आठवणी व आख्यायिका ह्याचें प्रकरण हा जणूं काय मध्येंच घुसडलेला एक भाग आहे असें वाटतें. हे व इतर दोष टाळतां येण्याजोगे होते. तथापि, चरित्रनायकाच्या कार्यव्यापृत जीवनाचा सदेश ग्रथकर्त्यानें महाराष्ट्रीय जनतेस सांगितला आहे, तो बोधप्रद आणि इष्टपरिणामकारक असाच आहे ह्यांत संशय नाहीं. ग्रथाचीं पृष्ठें १७५ असून किमत १२ आणे आहे.

* "पुरुषोत्तम"—लेखक श्री चिंतामण हरि पळणिटकर, सहसंपादक, "ऐक्य," सातारा


स्थापना १९१० मुंबई सरकारमान्यतेचें, एच. एच. श्री छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील



**जाधव टेलरिंग कॉलेज**

नवीन वर्ग सुरू झाले जुलैचे आत नावें नोंदवणारास फीमध्यें सवलत माहिती मागवा.

४९७ बुधवार, पुणें.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा:—

**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,१०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१९ |
| इतर फंड | १,४०९ |
| मुदतबंद ठेवी | १,९२,९२७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,८४२ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७९,७८५ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४१,९४७ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## पुणें सेंट्रल को. बॅंक लि, पुणें

वरील बॅंकेचा, ३०–६–३७ अखेर संपणाऱ्या विसाव्या वर्षाचा अहवाल आमच्याकडे आला आहे जनतेचा बॅंकेवरील विश्वास अजमावण्याचें एक प्रमुख साधन म्हणजे तिच्याकडे येणाऱ्या ठेवी हें होय नियमान्वयें स्वीकारता येणाऱ्या कमाल रकमेपेक्षां ठेवी स्वीकारल्या गेल्या होत्या, त्या मर्यादेंत आणण्याकरिता व्याजाचे दर कमी करूनहि नवीन ठेवी नाकारण्याची पाळी बॅंकेवर आली, ह्यावरून संस्थेची लोकप्रियता दिसून येईल आलेल्या ठेवी किफायतशीर गुंतविण्याचा बॅंकेचा प्रयत्न सतत चालू आहे व्यक्तिशः सभासदास विशिष्ट तारणावर थोडीफार कर्जें देण्यास सहकारी खात्यानें मान्यता दिली असून त्याबाबत जरूर ते नियम बोर्डानें केले आहेत अहवालाचे वर्षी बॅंकेनें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स बांधून कागदपत्रें, मौल्यवान जिनसा वगैरे सुरक्षित ठेवण्याची नागरिकाची उत्कृष्ट सोय केली तूर्त २०० खातेदारांस ह्या सवलतीचा फायदा घेता येईल व्हॉल्ट्सचें भाडेंहि मध्यम वर्गाच्या आवाक्यातीलच आहे

अहवालाचे साल अखेरीस ५१ लक्षाच्या खेळत्या भांडवलापैकीं ३ लक्ष, ५४ हजाराची भागाची रकम असून गंगाजळींत १ लक्ष, ५ हजार रुपये आहेत ठेवी सुमारें ४३½ लाखाच्या आहेत व इतर फंड आणि शिलकी नफा मिळून २ लक्ष ८६ हजार रुपये होतात - शेतकी व इतर सोसायट्यांस सुमारें १४ लक्ष रुपये दिलेले आहेत व सरकारी रोखे, डिबेंचर्स, प्रॉ को. बॅंकेचे भाग आणि इंडियन ट्रस्ट ॲक्टान्वयें गुंतविलेली रकम मिळून ३०½ लक्ष रुपये होतात. संस्थेच्या इमारतीची व मालमत्तेची किंमत १ लक्ष, १८ हजार रु. भरते सभासदांना ओव्हरड्राफ्ट, कॅश क्रेडिट, इ मिळून १ लक्ष, ७३ हजार रुपये दिलेले असून २ लक्ष, ६९ हजार रुपये बॅंकांत व जवळ रोख आहेत. ताळेबंदांत कर्जरोख्यांची दाखविलेली किंमत २६ लक्ष रुपये असली, तरी त्याची आजच्या बाजारभावानें सुमारें २७ लक्ष रुपये किंमत होते ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

वर्ष अखेर बॅंकेजवळ नफावाटणीकरिता ३७,६२५ रु ७ आ १० पै शिल्लक रहातात, त्याची वाटणी खालील प्रमाणें करावी, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे

| | रुपये |
|---|---|
| ( १ ) गंगाजळी ठेव | ९,४०७ |
| ( २ ) बुडीत व संशयित कर्ज फंड | १,८८२ |
| ( ३ ) डिव्हिडंड, सन १९३६ ३७ सालचें, ६ टक्केप्रमाणें | २१,५०० |
| ( ४ ) बोनस फंड | २,५०० |
| ( ५ ) रिबेट फंड | १,५०० |
| ( ६ ) डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड | ४१८ ७ १० |
| ( ७ ) सहकारी चळवळ फंड | ४१८ |
| एकूण रुपये | ३७,६२५-७-१० |

बॅंकेची सालोसाल होत असलेली प्रगति निःसंशय अभिनंदनीय आहे कर्जदारास सवलती व शेतकी सोसायट्यास रिबेट देऊनहि बॅंकेनें आपलें उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न नेटानें चालविले आहेत व त्यात तिला यश येत आहे आर्थिक मंदीच्या काळात बॅंकेनें आपला कारभार काळजीनें व दूरदृष्टीनें चालविला आहे, ह्यातच तिच्या यशाचें मर्म आहे

---

### लष्करी कामास नालायक असणाऱ्या जर्मनांवर कर

१ जानेवारी, १९१४ नंतर जन्मास आलेल्या व लष्करी कामास नालायक ठरविलेल्या प्रत्येक जर्मन नागरिकास ह्यापुढें 'संरक्षण कर' भरावा लागणार आहे आपल्या उत्पन्नापैकीं शेकडा ६ इतकी रकम त्यानें वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत दरसाल सरकारात भरली पाहिजे सुमारें २ लक्ष, ७० हजार जर्मन तरुण ह्या कराचे कक्षेत येतील, असा अजमास आहे प्राप्तीवरील कर, आजारीपणाचा विमा, बेकारांचा विमा, अक्षमतेचा विमा, नागरिक कर, इत्यादि पट्ट्या पगारांतून कापून घेण्यांत येतात त्याप्रमाणेंच हा नवा कर १ सप्टेंबरपासून कापून घेण्यांत येईल सक्तीचें लष्करी शिक्षण घेण्यास येणाऱ्या तरुणांचें नोकरीचे व धंद्याचे बाबतींत नुकसान होतें, त्याची भरपाई करण्याचा हा मार्ग आहे शरीरप्रकृतीनें नाजुक असे आपले बांधव पैसे मिळवीत असता आपण दोन वर्षेपर्यंत लष्करी नोकरी करावयाची, ह्याबद्दल तरुणास आतां वैषम्य वाटण्याचें कारण उरणार नाहीं.

---

### " विद्वान् इतरत्र पूज्यते "

नवीन राजवटीस प्रतिकूल असल्याच्या संशयावरून अनेक लोकास हद्दपार करण्याचा किंवा जबर शिक्षा देण्याचा सपाटा जर्मनी व रशिया ह्या देशामध्यें चालला आहे जर्मनींतली विश्वविद्यालयें आणि शास्त्रीय संशोधनाच्या संस्था ह्यांमधील १,६०० शिक्षकास व कार्यकर्त्यांस ज्यूइश वंशाशीं संबंध असल्याच्या अपराधाबद्दल कामावरून काढून टाकण्यात आलें आहे ह्यापैकीं शेकडा सत्तर विवाहित आहेत आणि त्यांतल्या दोन तृतियांशास मुलेंबाळें आहेत कामावरून निघालेल्या ह्या विद्वान् लोकास विद्वत्तेचें आपलें कार्य चालू ठेवण्यास अवसर मिळत नाहीं आणि त्यापैकीं कित्येकाची शास्त्रीय कामगिरी तर बहुमोल अशी आहे ह्या असहाय आणि बेकार पंडिताच्या मदतीस विद्येची अभिरुचि असलेली परदेशस्थ मंडळी धावून गेली आहे आणि सुमारें ८०० विद्वानाच्या उपजीविकेची व कार्याची सोय जर्मनीबाहेर करण्यांत आली आहे. निरनिराळ्या ४३ देशामध्यें त्याची विभागणी झाली असून अमेरिका व ग्रेट ब्रिटन हीं राष्ट्रें त्यात अग्रेसर आहेत विद्येचा व शास्त्रीय शोधाचा प्रसार करण्यात ह्या जर्मन पंडिताच्या कार्याचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे प्रस्तुत प्रकरणावरून "विद्वान् इतरत्र पूज्यते" असें सुभाषित तयार होत आहे, असें दिसतें

---

### नॅशनल लायब्ररी, वांद्रें
( वार्षिक सभा: १८ ७ ३७ )

१९३६-३७ सालीं संस्थेच्या पटावर एकूण २७४ सभासद होते लायब्ररीमध्यें ४,२४६ पुस्तकें आहेत, त्यापैकीं अहवालाचे वर्षी ३३४ नवीन घेण्यात आलीं एकूण ७,०९६ पुस्तकें वाचण्याकरिता दिलीं गेलीं, त्यांत कादंबऱ्या व नाटकें ह्यांची संख्या ४,४८१ भरली. संस्थेकडे १६१२ रु. जमा होऊन १२२९ रु. खर्च झाले वर्गणीदाराचे व पुस्तकाचे संख्येंत भर पडून लायब्ररीची उपयुक्तता वाढत आहे

---

### "बॉंबे यार्न एक्सचेंज लि "

मुंबईमधील सुताचा व्यापार नियंत्रित करण्याकरितां वरील संस्थेची स्थापना करण्याचें निश्चित झालें आहे त्यामुळें वायद्याचे करार, हेजिंगचे व्यवहार ( खरेदी अगर विक्री ह्यापासून होणारें भावी नुकसान टाळण्याकरिता खरेदी बरोबर विक्री अथवा विक्री बरोबर खरेदी करून ठेवणें ) इत्यादींची सोय होणार आहे वायद्याचे व्यवहार पार पाडण्याकरिता महिन्यांतून एक दिवस निश्चित केला जाईल. सभासदाबरोबर परवाना दिलेल्या दलालासहि ह्या एक्सचेंजमध्यें व्यवहार करतां येईल, अशी योजना आहे

## मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची माहिती

(३)

### मुंबई प्रांतिक सहकारी बँक

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेसबंधीं तुलनात्मक आकडे येथें दिले आहेत:—

| | १९३३–३४ | १९३४–३५ | १९३५–३६ (१५ महिने) |
|---|---|---|---|
| सभासद (व्यक्ती, बँका व सोसायट्या मिळून) | २,९३४ | २,९४५ | २,९७७ |
| | लक्ष, हजार | लक्ष, हजार | लक्ष, हजार |
| खेळतें भांडवल | २,१४ | २,१२ | २,४३ |
| सोसायट्यांस व बँकास दिलेलीं कर्जें | ९४ | ८९ | ८३ |
| सोसायट्यांकडील व बँकांकडील थकबाकी | ३२ | २९ | १९ |
| थकबाकीचें प्रमाण | ३४·३% | ३२ ६% | २२ ४% |
| | लक्ष, हजार | लक्ष, हजार | लक्ष, हजार |
| व्यवस्थेचा खर्च | २,६५ | ३,४२ | ३,०० |
| नफा | १,४० | १,९७ | १,२९ |

इलाख्याच्या मध्य व दक्षिण भागातील वसुलींच्या प्रमाणात मोठी घट पडली, असें रजिस्ट्रारसाहेबांनीं आपल्या अहवालात नमूद केलें आहे.

### वर्गीकरण

प्राथमिक सहकारी सोसायट्याचें त्यांच्या गुणदोषपरत्वें वर्गीकरण कसें करण्यांत आलें, हें खालील कोष्टकावरून लक्ष्यांत येईल:—

| वर्ष | ऑडिटरनें तपासलेल्या सोसायट्या | वर्गवारी | | | | न तपासलेल्या व वर्ग न दिलेल्या सोसायट्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | |
| १९३४–३५ | ३,५२० | १४४ | १,५५१ | १,३९१ | ४२६ | ६१ |
| १९३५–३६ | ३,४४० | १७१ | १,६०२ | १,२१७ | ४४० | १८२ |

अ आणि ब वर्गांतील सोसायट्याच्या सख्येंत वाढ झाली आहे आणि क वर्गांतील सोसायट्या कमी झाल्यां आहेत ड वर्गांतील सोसायट्या गुडाळल्या जाण्याच्या लायकीच्या समजाव्या

### प खा. गव्हर्नमेंट सर्व्हंट्स को बँक लि, धुळें

(वार्षिक सभा : २६-९ ३७)

वरील बॅंकेच्या पटावर १९३६ ३७ अखेर ११२५ सभासद आहेत अहवालाचे वर्षी वर्गणींत ३४ हजार रुपयानीं वाढ होऊन तिचा आकडा ३ लक्ष ८० हजार इतका झाला भाग भांडवल ४४ हजार रु. आहे. कर्ज येणें १ लक्ष, ९८ हजार रु. असून थकबाकीचें प्रमाण २·५ आहे बॅंकेच्या सेव्हिंग्ज बँक खात्यात ९७ खात्यांची भर पडली नफ्याच्या रकमेंतून (४,२१८ रु १ आ ११ पै) ६¼ टक्के दरानें डिव्हिडंड वाटावें, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे ताळेबंदावरून बॅंकेची परिस्थिति समाधानकारक असल्याचें दिसतें व बँकेचा व्यवहारहि वाढत आहे ताळेबंदांतील सरकारी रोख्यांची किंमत दर्शविताना त्यास पडलेल्या रकमेचा व त्याच्या बाजारभावाचा खुलासा केलेला असता, म्हणजे बरें झालें असतें


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि पुणें) | १६ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १७ विरमगाव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | १८ धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | १९ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | १० शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी(„ „) | २१ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २२ नदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २३ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २४ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २५ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २६ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २७ सटाणा („ „) |
| १३ भिवडी („ ठाणें) | २८ कळवण („ „) |
| १४ पालघर („ „) | २९ दोहद („ पचमहाल) |
| १५ कल्याण („ „) | ३० कालोल („ „) |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चें वर.

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरिता हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## वसाहतींबाबत झगडा

—:०:—

" आमच्या हिरावून घेतलेल्या वसाहती परत द्या " ही जर्मनीची मागणी राष्ट्रसंघातील प्रमुख राष्ट्रांस कठिण होऊन गेली आहे वसाहतींवर सत्ता असली म्हणजे त्यात होणारा कच्चा माल उद्योगधंद्यांस उपयोगी पडतो आणि त्यातील बाजारपेठांत पक्का माल खपवता येतो, त्याचप्रमाणें, वाढत्या लोकसंख्येस वसाहतींत उपजीविकेचीं साधनें उपलब्ध करून देता येतात वसाहती ताब्यात नसल्यानें आपल्या राष्ट्रीय आर्थिक जीवितात विलक्षण वैगुण्य निर्माण झालें आहे ही तक्रार वरील मुद्यांवर जर्मनीनें चालविली आहे. इटलीनें ॲबिसीनिया घशात टाकला तोहि ह्याच सबबीवर आणि जपाननें चीनमध्यें युद्ध आरंभिलें आहे, त्याच्या मुळाशीं हेंच कारण आहे इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम व हॉलंड इत्यादि राष्ट्राच्या वसाहतो आहेत, आणि आपणांस मात्र स्वतःच्या मुलखास मुकावें लागलें आहे, ह्या जर्मनीच्या ओरडीस काय उत्तर द्यावें ह्याचा वरील राष्ट्रास पेच पडला आहे. वसाहतींपासून वाटतो तसा फायदा होत नाहीं, त्या युरोपियन लोकाच्या वसतीस सोयीच्या नाहींत, त्यात मिळणारा माल, रबर व जस्त वगळल्यास, दुसरीकडे हवा तेवढा मिळू शकतो, इत्यादि मुद्दे पुढें करण्यात येत असून वसाहतींशीं व्यापार करण्याची सवलत सर्व राष्ट्रास सारखीच ठेवण्यात आली तर हा वाद मिटेल असें जर्मनीचें समाधान करण्यात येत आहे वसाहतींच्या राज्यकारभारात सर्व पाश्चात्य राष्ट्राचा हात असावा आणि त्यातील अधिकारी वर्ग संमिश्र असावा अशीहि सूचना करण्यांत आली आहे. परंतु वसाहतींतले रहिवाशी असल्या संमिश्र राजकीय सत्तेखाली कायमचे रहातील आणि सर्व पाश्चात्य राष्ट्रें त्यास उदारपणानें वागवून स्वातंत्र्याचे हक्क देतील ह्याविषयीं काय शाश्वती आहे? युरोपियन राष्ट्रांची साम्राज्यतृष्णाहि वरील योजनेनें शांत होणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ, इटलीस विस्तृत साम्राज्य हवें आहे आणि त्या राष्ट्राची राजकीय महत्त्वाकांक्षा स्वतःच्या सर्वस्वी अंकित असलेल्या वसाहतींवाचून तृप्त व्हावयाची नाहीं.

वसाहतींच्या मालकीपासून सत्ताधारी राष्ट्रास विशेष फायदा होत नाहीं, ह्या म्हणण्यातहि कांहीं जीव नाहीं. वसाहतींतून कच्चा माल मिळून उद्योगधंद्यांचा योगक्षेम चालतो आणि पक्का मालहि त्यामध्यें खपवता येतो ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. आर्थिक मंदीच्या काळात इतर राष्ट्रांशीं होणारा व्यापार कमी होत असतां वसाहतींचें चांगलें सहाय मिळतें असा अनुभव आहे. सध्याच्या मंदीच्या पूर्वी फ्रान्सचा आपल्या वसाहतींशीं होणारा व्यापार एकूण फ्रेंच परराष्ट्रीय व्यापाराच्या १०-१५ टक्के इतका होता, मंदीच्या काळात तो दुप्पट झाला! चलतीच्या परिस्थितींत बाजारभाव चढतात तेव्हां कच्चा माल स्वस्त दरानें वसाहतींतून मिळू शकतो आणि ह्या रीतीनें सत्ताधारी राष्ट्रास आपल्या व्यापाराची व उद्योगधंद्याची घडी नीट राखतां येतें. फ्रान्स व हॉलंड ह्या देशास आपला हुंडणावळीचा दर बराच काळ पावेतों टिकवता येऊन चलनाचा, सुवर्णाचा आधार काढून टाकण्याची आवश्यकता भासली नाहीं ह्याचें तरी कारण वसाहतींचा ताबा हेंच पुष्कळ अंशीं आहे, ह्यात संशय नाहीं वसाहतींचा आर्थिक व राजकीय उपयोग पाश्चात्य राष्ट्रांस नसता तर त्यांनीं त्यांचेविषयीं इतका हव्यास का धरला असता? जोंपर्यंत आंतरराष्ट्रीय स्पर्धा सत्तेच्या क्षेत्रात चालू राहील तोंपर्यंत वसाहतींचा प्रश्न वर निर्दिष्ट केलेल्या सोप्या उपायानीं सुटावयाचा नाहीं खरें खुरें आंतरराष्ट्रीय सहकार्य होण्यासारखी सार्वत्रिक नवी मनोभूमिका तयार होईनोंपर्यंत वसाहतींचा झगडा असाच चालू रहाणार अशी भीति वाटते.


लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणी भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. (ट ख निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

**माधव सोमण ब्रदर्स**

पावसाळी कोट व छत्र्या — धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक

लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

## स्वदेशी चळवळ यशस्वी कां होत नाहीं ?

लेखकः—डी आर. मुठाणे, एम. ए.

( 'अर्था'तील ता. ४।८।३७ चा 'स्वदेशी व अर्थशास्त्रीय सिद्धांत' हा लेख वाचून सुचलेले विचार )

स्वदेशी चळवळीची आवश्यकता राष्ट्राच्या औद्योगिक व सांपत्तिक उन्नतीस किती आहे याबद्दल आतां दुमत असणें शक्य नाहीं. तसेंच अर्थशास्त्राचा स्वदेशीस आधार शोधण्याचेंहि प्रयोजन उरलेलें नाहीं कारण स्वदेशीचें महत्व समाजास पूर्णपणें पटलें आहे पण स्वदेशी चळवळ सुरू होऊन आज कितीं तरी काळ लोटला असता ही चळवळ व्हावी तितकी यशस्वी झाली नाहीं असें मात्र खेदानें म्हणावें लागतें. तेव्हां ही चळवळ हिंदुस्थानांत का पूर्ण यशस्वी होत नाहीं अगर झालेली नाहीं याची मीमांसा करणें योग्य आहे आमच्या मतें ही चळवळ खालील कारणामुळें पूर्ण यशस्वी झालेली नाहीं.

( १ ) पांढरपेशा वर्गाचें पूर्ण औदासीन्य.

( २ ) स्वदेशी धंदेवाल्याची भांडवलशाही वृत्ति

( ३ ) जनतेचा अविश्वास.

या तिन्ही कारणाचा क्रमशः विचार करू.

१ पांढरपेशा वर्गाचें औदासीन्यः—शेंकडा ७० लोक शेतकीवर आपल्या उपजीविकेसाठीं अवलंबून आहेत हें सर्वश्रुत आहेच ह्या शेतकरी वर्गाची किती निकृष्ट अवस्था आहे हेंहि सूर्यप्रकाशाइतकेंच उघड आहे यापैकीं कितीतरी लोकाना एकवेळसुद्धा पोटभर अन्न मिळत नाहीं, मग अंगभर कपडा न मिळाल्यास नवल तें काय ? अर्थातच वर्षभर ज्याना पोटभर अन्न व अंगभर कपडा मिळत नाहीं, त्यास स्वदेशी वस्तु खरेदी करून स्वदेशास प्रोत्साहन द्यावें म्हणून सांगणें म्हणजे वस्तुस्थिति डोळ्याआड करण्यासारखें आहे शिवाय जो काय कपडा अगर इतर माल सणावारी अगर लग्नप्रसंगीं या शेतकरी वर्गांत खपतो तो सर्वस्वी स्वदेशीच असतो. त्याचें कारणही अगदीं उघड आहे कारण नवीन कपडा अगर वस्तू यांची निवड करतांना ती जास्त टिकाऊ असेल तरच ते विकत घेतात आणि स्वदेशी मालच धडधाकट व टिकाऊ असतो. याखेरीज या गरजाही फारच थोड्या व प्राथमिक असतात व त्या स्वदेशी वस्तु घेऊन पुरविल्या जातात तेव्हा या वर्गांत स्वदेशीचा प्रचार करण्याचें कारणच पडत नाहीं.

आता या वर्गापैकीं काहीं तरुण लोकांत, तलम व मौल्यवान कापड व चैनीच्या वस्तु वापरण्याकडे अलीकडे थोडी थोडी प्रवृत्ति आढळून येते याचें कारण म्हणजे मध्यम वर्गाचें वागणें मध्यम वर्ग अगर पांढरपेशा वर्ग याच्याच आचारविचाराचें अनुकरण खालचा वर्ग करीत असतो मध्यम वर्गाची प्रवृत्ति छानछोकीनें रहाणें, उत्तम कपडा वापरणें, फॅन्सी वस्तु खरेदी करणें, याकडे वाढत आहे. हा मध्यम वर्गसुद्धा श्रीमंत वर्गाचेंच या बाबतींत अनुकरण करतो. यामुळें अमूक एक वस्तु स्वदेशी आहे अगर परदेशी आहे याची फारशी चौकशी न करतांच ती वस्तु खरेदी केली जाते उदाहरणार्थ, अलिकडे 'पारकर'चे फौंटनपेनची फॅशन इतकी वाढली आहे कीं, आम्ही स्वदेशी फौंटनपेन उत्तम असूनहि घेत नाहीं याचें कारण काय ? तर तें पेन एका श्रीमतानें विकत घेतलेलें असते. लागलीच मध्यमवर्गांत त्या वस्तूची प्रशंसा सुरू होते. असें होत होत तिची कीर्ति समाजात चोहोंकडे पसरते व त्या वस्तूची जाहिरात आपोआप होते आणि मालाचा उठाव होतो. अशी सामान्य जनतेची मानसिक भूमिका असते तेव्हां स्वदेशी चळवळ जर पूर्ण यशस्वी व्हावयाची असेल तर श्रीमंत व पांढरपेशा वर्गानेंच यात पुढाकार घेऊन आपल्या गरजा स्वदेशी मालापुरत्याच मर्यादित केल्या पाहिजेत. इतकेंच नव्हे तर एकादी गरजेची पण चैनीची वस्तू स्वदेशी नसेल तर ती अजिबात न घेण्याची वृत्ति ठेविली पाहिजे. एकदा का या दोन वर्गांनीं हा स्वदेशीचा धडा घालून दिला तर गरीब लोक तो खात्रीनें गिरवितात तेव्हां स्वदेशीचा प्रसार पाहिजे तो या दोन वर्गांतच पण हे वर्ग सुशिक्षित व ऐपतवान असूनहि या स्वदेशी चळवळीकडे दुर्लक्ष करतात हें देशाचें दुर्दैव नव्हे काय ?

२ धंदेवाल्याची भांडवलशाही वृत्तिः—स्वदेशी वस्तू मिळाव्यात म्हणून येथेंच निरनिराळ्या धंद्याची वाढ होणें आवश्यक आहे त्याप्रमाणें आज पुष्कळ स्वदेशी उद्योगधंदे लहानमोठ्या प्रमाणावर निघाले आहेत हे धंदे कित्येकानीं स्वत:च्या भांडवलावर काढले तर कित्येकानीं भाग काढून कंपन्या उभारल्या आहेत. पण या सर्व धंद्यांचा उत्कर्ष प्रशंसनीय खात्रीनें नाहीं. यास अनेक कारणें आहेत, पण मुख्य कारण म्हणजे ते धंदे चालविणाराची भांडवलशाही वृत्ति. असहकारितेच्या चळवळीच्या काळात स्वदेशीच्या चळवळीस जोर होता पण जनतेच्या या आवेशाचा उपयोग वस्तु उत्तम व स्वस्त करण्याकडे न करता स्वदेशी वस्तूच्या नावावर कित्येक धंदेवाल्यांनी खूपच फायदा मिळविला. स्वदेशी वस्तूस जबर किंमत द्यावी लागणारच, पण त्यासहि मर्यादा आहे. हिंदी जनतेचें दारिद्य जगप्रसिद्ध आहे. म्हणून स्वदेशी वस्तुस सदासर्वकाळ, परदेशी वस्तुपेक्षा हलकी असूनही जबर किंमत देणें हिंदी जनतेस शक्य नाहीं म्हणून स्वदेशीबद्दल वाटणाऱ्या कळकळीचा उपयोग स्वदेशीची चळवळ टिकविण्याकडे या धंदेवाल्यानीं केला पाहिजे, पण तसा प्रयत्न झालेला दिसत नाहीं.

ह्या सबंधातील उदाहरणें येथें देण्याचें कारण नाहीं; तीं वाचकांच्या बागलीं परिचयाचींच आहेत जबर फायदा मिळविण्याचा हेतू न धरतां माल चोख, टिकाऊ व स्वस्त निघेल इकडे अधिक लक्ष कारखानदारानीं पुरवावयास नको काय ? तसेंच कित्येक देशी धंद्याच्या कंपन्याचा खर्च पाहतां व त्यातील व्यवस्थापक व इतर अधिकारी वर्गाचे पगार पाहतां त्या कंपन्याविषयीं आदर वाढत नाहीं. कित्येक कंपन्यात मॅनेजिंग एजन्सीची पद्धति आहे, ती तर जास्तच गर्हणीय आहे. हिंदी गरीब लोकास हलक्या पण महाग देशी वस्तु विकून देशी धंदेवाल्यास भरभक्कम पगार घेण्याचा काय हक्क आहे ? अशा प्रकारच्या स्वदेशी कारखान्यांतील भांडवलशाही वृत्ति नष्ट झाल्याखेरीज लोकाच्या स्वदेशीच्या भावनेचें चीज होणार नाहीं.

३ जनतेचा अविश्वासः—वरील दुसऱ्या कारणामुळें जनतेंत आपल्या उद्योगधंद्याबद्दल अविश्वास उत्पन्न होऊ लागला आहे. कारण, हिंदी जनतेनें गेल्या स्वदेशीच्या चळवळीच्या वेळीं कुवतीबाहेर त्याग केला आहे. आतां तीस त्याग करण्याची कुवत नाहीं, आणि विशेषत. जेव्हा या त्यागाचा फायदा कारखानेवाले स्वत. श्रीमंत गब्बर होण्याकडे करतात अशा वेळीं तरी तसा त्याग करावयास जनतेस भाग पाडणें सयुक्तिक दिसत नाहीं. थोडक्यांत, जोंपर्यंत कारखानेवाल्यात स्वदेशीचें खरें राष्ट्रीय तत्व उतरलेलें नाहीं व प्रामाणिकपणाहि आढळत नाहीं तोंपर्यंत या गरीब हिंदी जनतेनें स्वदेशी महाग माल का खरेदी करावा ? कोणी यावर असा आक्षेप घेतील कीं, स्वदेशी कारखानेवाल्याना जर हा फायदा मिळाला नाहीं तर परदेशी - कारखानेवाल्यांना सहजच मिळणार आहे. पण या बाबतींत जनता आतां जागृत होत आहे. तशी जाणीव जनतेंत नसेल तर स्वदेशी मालहि घेऊं नका व परदेशीस स्पर्श करू नका असाच प्रचार करण्याची पाळी यावयाची ! महात्मा गांधींच्या मताप्रमाणें या आर्थिक बिकट कालांत आपल्या गरजा वाढविण्यापेक्षां त्या शक्य तों कमी कराव्यात हेंच ध्येय डोळ्यापुढें या दरिद्री हिंदुस्थानानें ठेविलें पाहिजे.

तेव्हां ही स्वदेशी चळवळ जर पूर्णांशानें यशस्वी व्हावयास पाहिजे असेल तर वरील तिन्ही दोष नष्ट केले पाहिजेत.

## बँकर व खातेदार ह्यांचे परस्पर संबंध

### ब्रिटिश कोर्टातील एक निवाडा

लंडन येथील कार्पेटर्स कंपनीचा काहीं व्यवहार एका व्यवस्थापक मंडळाचे देखरेखीखालीं ब्लॅकबरो नामक कारकुनाकरवीं करण्यात येत असे ब्लॅकबरो हा कंपनीकडे अनेक वर्षे नोकरीस असल्यानें त्याचेवर विश्वास ठेवण्यांत कंपनीचे अधिकाऱ्यास धास्ती वाटत नसे कंपनीस पुरविलेल्या मालाचे यादीवर तो व्यवस्थित दाखल झाला असल्याविषयीं नोंद करून व त्याच्या किंमतीच्या चेकवर कंपनीच्या अधिकाऱ्याची सही घेऊन कारकून बिलें भागवीत असे. कित्येक प्रसंगीं माल दाखल झाला नसताहि तो खोटीं बिलें तयार करून अधिकाऱ्याकडे पाठवी व त्याच्या किमतीचे चेक मिळवी आणि ह्या सर्व चेकावर बनावट सह्या स्वत. करून अगर मिळवून, त्याचे पैसे तो बँकेमधील आपल्या स्वत.चे खात्यावर भरीत असे कार्पेटर्स कंपनीचें व ब्लॅकबरोचें खातें एकाच बँकेंत होतें, ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. सुमारें १५ वर्षें ही फसवणूक चालू होती वरील गोष्ट उघडकीस आल्यानंतर झालेल्या नुकसानीस बँक जबाबदार आहे किंवा नाहीं, असा प्रश्न उपस्थित झाला

खातेदार त्यानें भरणा केलेल्या चेकचा खरा मालक असल्याविषयीं बँकेनें विशेष चौकशी करण्याचें कारण नाहीं, असा कायदा आहे तो चेक खातेदाराच्याच मालकीचा आहे, अशी बँकेची खात्री पटली, म्हणजे झालें मात्र, त्यात निष्काळजीपणा होता कामा नये, असा दंडक आहे. वरील उदाहरणात, बँकेनें कार्पेटर्स कंपनीच्याच नोकराचे खात्यात कंपनीनें दुसऱ्याचे नावावर काढलेले चेक विनाचौकशी भरले व त्यात बँकेचा निष्काळजीपणा दिसून आला, ह्या कारणानें कायद्यातील वरील सवलतीचा तिला फायदा देता येत नाहीं असा कोर्टानें निकाल दिला

ह्यावर बँकेनें बचावाचा दुसरा मार्ग स्वीकारला कंपनीच्या चेकचे पैसे देताना, चेकवरील सह्या बनावट आहेत हें बँकेस तिच्या रोजच्या नेहमीच्या व्यवहारांत आढळून आलें नाहीं, तर त्याकरितां बँक जबाबदार नाहीं, असें तिच्यातर्फे सांगण्यात आलें. निष्काळजीपणा सिद्ध झाल्यानंतर हा बचाव टिकणें शक्य नाहीं, असा मुद्दा वादीतर्फे पुढें आला. तथापि, तो कोर्टास ग्राह्य न होऊन निकाल बँकेतर्फे झाला.

"रोजच्या व्यवहारापेक्षां काहीं निराळें वागणें म्हणजेच निष्काळजीपणा होय" असें मत कायदेपंडित इतके दिवस देत आले होते वर उल्लेखिलेल्या निवाड्यापेक्षां हेंच मत ग्राह्य आहे, असा ग्रेट ब्रिटनमधील व्यापारी मंडळींचा व कायदेपंडिताचा समज आहे. तथापि, हा निकाल वरिष्ठ कोर्टे फिरवीपर्यंत कायमच समजला जाईल बँकिंगच्या व्यवहारात घेणें जरूर असलेली दक्षता व त्यांतील सूक्ष्म भेदाभेद, हें स्पष्ट करण्याकरिताच वरील माहिती येथें दिली आहे.

---

### झारापकर टेलरिंग कॉलेजला प्रदर्शनांत सुवर्णपदक

पुणें येथें चालू वर्षी लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियमतर्फे भरलेल्या पुणें औद्योगिक प्रदर्शनांत येथील सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजला प्रदर्शन कमिटीकडून कॉलेजमधील उत्कृष्ट शिक्षणाबद्दल फर्स्टक्लासचें सर्टिफिकेट व एक सुवर्णपदक देण्यांत आलें आहे


आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाऊस भी मिलेगा नियम बहुत सरल हैं (नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें)

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—
दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.
(स्थापित १९१६) अमीनाबादपार्क-लखनऊ

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २. ट. ख. १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्च माफ

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते —
धी इंडो फॉरिन एजन्सीज (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ वेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

डॉ. जोशी म्हणजे जी. जी. ब्रदर्सचीं मलमें— त्वचा रोगांवर अत्यंत लवकर गुण देतात
इसनास ११८. नरिबास फुकट १८९ सदाशिव, पुणें.

## मुंबई इलाख्यांतील कारखाने

### गेल्या वर्षाच्या अहवालांतील कांहीं माहिती

(१) गेल्या वर्षी मुंबई इलाख्यांत १८७९ कारखाने चालू होते व त्यांतील मजुरांची संख्या ३,९१,७७१ इतकी होती.

(२) ६२,६५२ स्त्रिया कारखान्यांतून कामावर होत्या, त्यांपैकीं २३,९९० स्त्रियास एकट्या मुंबई शहरांतच काम लागलें होतें मुलांची संख्या ९२२ भरली, त्यांतील बहुतेक सर्व मुंबई बाहेरील कारखान्यांत कामावर होतीं

(३) अहमदाबाद शहरांतील कारखाने ज्या गतीनें वाढत आहेत, त्या गतीनें आरोग्यरक्षणाच्या सोयींत सुधारणा होत नाहीं. गिरण्यांत टाकाऊ खराब माल व कचरा आणि सांडपाणी ह्याची वासलात लावण्याची चांगलीशी सोय नाहीं.

(४) सर्व कारखान्यांत मिळून ७,०४३ अपघात झाले, त्यांपैकीं १,६८० अपघातात जबर दुखापती झाल्या.

(५) गिरण्यांचे आवारात स्त्री-कामगारांचीं मुलें सभाळण्याची व्यवस्था कित्येक ठिकाणीं करण्यात आली असली, तरी त्याचा फायदा घेण्यांत आलेला दिसत नाहीं मुंबई शहरांतील स्त्री-कामगारांमध्यें विधवाचें प्रमाण फार मोठें आहे.

(६) बॉंबे मॅटर्निटी बेनिफिट ॲक्टाखालीं बाळतपणाकरितां रजा घेणाऱ्या स्त्रियास १,०३,९३१ रुपये मिळाले, म्हणजे प्रत्येकी सरासरी मुंबईत २५ रु. १४ आ. ९ पै व अहमदाबादमध्यें २५ रु ९ आ. ६ पै अशी पडली

## वेड्यांची व्यवस्था

रस्त्यात एखादा वेडा विचित्र लीला करीत असतां त्या पहाण्यांत लोकांस सामान्यतः गंमत वाटते. कैदी व वेडे ह्यांच्या बाबतींत जनतेची वागणूक सर्वच देशांमध्यें तुच्छतेची व क्रूरतेची असे. अलीकडे ह्या प्रवृत्तींत सुधारणा झाली असून वेड्यांची विशेष काळजी घेतली जाण्याची व्यवस्था सरकारी व सार्वजनिक संस्थांमध्यें करण्यात येते. दीडशें वर्षांमागें इंग्लंडमध्यें वेड्याची मजा पहाण्यास तिकिट लावण्यांत येऊन ही एक उत्पन्नाची बाब होत असे. त्यांचे रहाण्याचे व खाण्यापिण्याचे हाल होत असत. अलीकडे इस्पितळांत वेड्यास सौम्य रीतीनें वागण्यात येतें आणि त्याची प्रकृति व मानसिक स्थिति ह्याची चांगली काळजी घेतली जाते. उघड्या हवेंतील व बैठे खेळ, वाचनाचे व वादविवादाचे कार्यक्रम, इत्यादि बाबींचा त्याच्या दिनचर्येंत अतर्भाव करण्यांत आलेला आहे. वेड्याच्या प्रत्येक संस्थेंत फिरता ग्रथसग्रहहि असतो.

### हिंदी पोस्ट खात्याचा सांवत्सरिक उत्सव

१८३७ सालीं पास झालेल्या पोस्ट ऑफिस ॲक्टानें, हिंदुस्थानांतील टपाल वहातुकीचा एकमेवाद्वितीय अधिकार ईस्ट इंडिया कंपनीस दिला. ह्या गोष्टीस चालू महिन्यात १०० वर्षें पुरी होतात, त्या निमित्तानें पोस्टाचीं खास तिकिटें काढण्याचा पोस्ट खात्याचा विचार आहे. हिंदी पोस्ट खातें आपला व्याप हळुहळु वाढवीत आलें १८७७ सालीं बग्या व व्हीप्या स्वीकारण्यास पोस्टानें सुरवात केली. १८८८ सालीं विमा उतरलेले जिन्नसहि पोस्ट खातें वाहू लागलें. १८८० सालीं मनीऑर्डरी आल्या व १८८५ सालीं सेव्हिंग्ज बॅंकेच्या व्यवहारास प्रारभ झाला. ह्याखेरीज अनेक आनुषगिक कामें पोस्ट खातें करीत आलें आहे व आतां तर पोस्टाचे व्यवहार फारच वाढले आहेत.


# दि बॅंक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,१८,६०० वसूल झालेलें भांडवल १,०८,५९०

सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात. या बॅंकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात. बॅंकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १२०—६ |
| ५% (१९३९–४४) लोन ... ... ... | १०५–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—६ |
| ३½% बिनमुदत ... ... .. ... | ९७–१२½ |
| ३½% १९४७–५० .. ... ... | १०६–१४ |
| २¾% १९४८–५२ ... .. ... | १००–१० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... .. | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षें मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... .. | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडड दर्शवितो)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४५—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११७—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ६% | ३१–१२ |
| इंपीरिअल बँक (५०) १२% ... ... | १५४०—० |
| बाँबे मॉ को बँक (५०) ५% ... ... | ६१—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १२८–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४¾% ... ... | १०३—० |
| पाचोरा–जामनेर (१००) ४½% .. ... | ९५—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु ४ आ बोनस | ९६२— ८ |
| तापी व्हॅली (५००) ७½% .. ... ... | ७७७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि (५०) १०% ... ... | १४२—८ |
| कराची (१००) ९% ... ... | २६५—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | ३५४–१४ |
| टाटा पॉवर ऑर्डि (१०००) ५½% ... .. | १४१८–१२ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि (१०००) ७½% ... ... | १६८७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ८ रु .. .. ... | १७४—६ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ५०—० |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... .. | २९–१३ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु ४ आ ... | ४४–१४ |
| ओरिएटल विमा (२००) १२५ रु ७५ रु बोनस .. | ४,९००—० |
| टाटा आयर्न प. प्रे (१५०) ६% .. . | १९६–१४ |
| टाटा आयर्न दु प्रे (२००) १५ रु. २ आ ... | १७१—० |
| टाटा आयर्न ऑर्डि (७५) १० रु. ... ... | ३४८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु ३ आ. ६ पै ... | १६१०—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४–८½ |
| चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१–११ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—८ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | १०–१३ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | १०—८ |

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट
पांढरें-सत्त्व किंमत १। रु.
मलशुद्धी टॅबलेट्स कि. ८ आ.
या दोन औषधाच्या मदतीनें पोटांतील सर्व विकार खात्रीनें बरे करतां येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, करपट ढेंकर येणें, छातींतील जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे.
डॉ. बी. आर. गुणे
पुणे २.

नादारीच्या अर्जीच्या चौकशीच्या तारखेची धनकोस

## नोटीस

कलम १९, नमुना नबर ४.

### पुणें येथील फर्स्टक्लास सबजज्ज यांचे कोर्टांत

#### मुक्काम पुणें येथें

नि. नादारी अर्ज न ७७, सन १९३७ पैकीं

बापूजी रामजी गायकवाड, महार, वय ३५, रा. पुणें यांचे बाबतींत.

विरुद्ध

मुलाजी वाझाझी आणि कं. वगैरे ६, जाब देणार धनको.

ज्याअर्थीं सदर अर्जदार रिणको यानें, प्राव्हिन्शियल नादारीचा आक्ट (सन १९२० चा ५ वा) याअन्वयें आपणास नादार ठरविण्याविषयीं या कोर्टास तारीख २० माहे ७ सन १९३७ या तारखेची अर्जी सादर केलेली आहे व सदरीं सांगितलेल्या रिणकोनें फैल केलेल्या धनकोच्या यादींत तुमचें नाव आहे, त्याअर्थीं तुम्हास यावरून नोटीस देण्यात येत आहे कीं, सदरीं सांगितलेल्या अर्जीच्या चौकशीसाठीं व रिणकोची जबानी घेण्यासाठीं या कोर्टानें तारीख १ माहे ९ सन १९३७ ही तारीख नेमली आहे. सदरहू प्रकरणात तुमच्या वतीनें कांहीं सांगावयाची तुमची इच्छा असल्यास, तुम्हीं जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडरच्या द्वारें, हजर राहावें.

तसेंच तुम्हास अशीहि नोटीस देण्यात येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख २० माहे ८ सन १९३७.

S. S. Joglekar,
क्लार्क ऑफ दि कोर्ट

शिक्का




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी यांचे
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकूं.
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा.

# दि नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कं. लि.

हेड ऑफिस : : : : नागपूर

त्रैवार्षिक बोनस
हयातींतील विम्यास ३६ रु.
हयातीनंतरच्या विम्यास ४५ रु.

वार्षिक हप्त्यावर २½ टक्के सूट

विम्याचे पैसे त्वरीत देण्याचें कंपनीचें वैशिष्ट्य

काटकसरीची व्यवस्था व भरभक्कम लाइफ फन्डस

फायदेशीर अटींवर काम करण्यास वजनदार व उत्साही एजंटस पाहिजेत. समक्ष भेटा अगर अर्ज करा.—

ब्रँच मॅनेजर,
साठे बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद का पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. | अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२०।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १ सप्टेंबर, १९३७ अंक ३५

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट

पांढरें-सत्व किंमत १। रु.

मलशुद्धी टॅबलेट्स कि ८ आ

या दोन औषधाच्या मदतीनें पोटातील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, कर्पट ढेंकर येणें, छातीतील जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारांवर हा इलाज रामबाण गणला गेला आहे.

डॉ. बी. आर. गुणे
पुणे २

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेव्हिंग्ज बँक ठेवींवर द. सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज. सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस

न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई
( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वांत मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत खालील तीन गोष्टीकडे लक्ष देतो.—
(१) कंपनीचें स्थैर्य ( २ ) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री डी के जोगळेकर, बी ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्याना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना कर-ण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठीं कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २५, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.

हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई

ब्रँच —लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

RELIABLE STENOGRAPHERS
AND TYPISTS

ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.

*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2

# विविध माहिती

### नोकरीचे मार्गांत शिक्षणाचा अडथळा

अलाहाबाद येथें पोलिस खात्यात २१ जागा नुकत्याच भरण्यांत आल्या सुमारें २,५०० अर्ज आले होते, त्यात पदवीधरांचेहि अनेक होते. तथापि, जास्त शिक्षण घेतलेले असणारास अग्रहक्क मिळाला नाहीं. कमी पगाराच्या लहान नोकऱ्यांवर सुशिक्षित संतुष्ट रहात नाहींत, हें ह्याचें कारण आहे

### रशियांत सुलभ प्रवेश मिळत नाहीं.

रशियामध्यें सुटी घालवूं इच्छिणाऱ्या ब्रिटिश प्रवासी लोकांस त्या देशामध्यें पूर्वीप्रमाणें सुलभतेनें प्रवेश मिळत नाहीं व अनेकांस पासपोर्ट ( प्रवेशपत्रिका ) नाकारण्यात येतो, अशी तक्रार ग्रेटब्रिटनमध्यें ऐकू येते

### सेंट्रल बँकेचे नवे व्यवस्थापक

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि चे मॅनेजिंग डायरेक्टर, सर सोराबजी पोचखानवाला, ह्यांच्या मृत्यूनतर त्याचे जागीं सर फिरोज सेठना हे काम पहाणार आहेत. बँकेचे आतापर्यंतचे सेक्रेटरी मि. कॅप्टन ह्यांची मॅनेजरच्या जागीं नेमणूक झाली आहे

### रोड फडाचा विनियोग

पेट्रोलवर पट्टी बसवून जमा करण्यात येणाऱ्या मध्यवर्ती रस्ते-सुधाराई फंडांतून प्रत्येक प्रांतास त्याचा हिस्सा मध्यवर्ती सरकार वाटून देतें मार्च, १९३६ अखेरपर्यंत मुंबई इलाख्याचे वाट्यास ( सिंध वगळून, ) ८८½ लक्ष रु आले त्यातील ४७ लक्ष रु. खर्चण्यात येऊन ४१½ लक्ष रु. अद्याप शिल्लक आहेत. १९३६-३७ मधील रोड फडाचा हिस्सा त्यात मिळविला असता, १९३७ अखेरच्या वर्षांत खर्चण्यास सरकारजवळ ६१ लक्षाची बेजमी होईल. चालू वर्षांत २० लक्ष रुपये खर्चीं पडतील आज पब्लिक वर्क्स खातें रस्त्याच्या दुरुस्तीवर दरसाल सुमारें २८ लक्ष रु खर्च करतें. दुरुस्तीचा दरसालचा खर्च कमी येईल, अशा प्रकारचे रस्ते बनविण्यात येण्याकडे रोड फडाचा विनियोग होणें आवश्यक आहे

### मुंबई व अहमदाबाद येथील चिमण्या

रेल्वे इंजनें, खडी दाबणारीं इंजनें, आगबोटी, इत्यादींच्या धूर सोडणाऱ्या चालत्या पळत्या चिमण्या सोडल्या असता, मुंबई शहरात गेल्या वर्षी १,०४६ चिमण्या असल्याची नोंद आहे. अहमदाबादमध्यें फक्त १४७ आढळल्या. १९३६-३७ मध्यें मुंबईमध्यें ४५ व अहमदाबादेंत ३ चिमण्याची वाढ झाली. कोळशाऐवजी तेलाचें सर्पण वापरणाऱ्या गिरण्याची संख्या अहवालाचे वर्षी वाढली.

### मुंबई ते कलकत्ता मोटारीचा रस्ता

मुंबई ते कलकत्ता ह्या नियोजित रस्त्याचा नकाशा करण्याचें काम लवकरच हातीं घेण्यांत येईल. बंगाल, बिहार, मध्यप्रांत व मुंबई इलाखा, ह्या प्रांतातून तो रस्ता जाईल. काम पुरें होण्यास एक कोटि रु लागतील

### उंसाची लागवड

हिंदुस्थानात ३८ लक्ष एकर जमीनींत उसाचें पीक लावण्यात आलें असल्याविषयींचा अदाज सरकारी रीत्या प्रसिद्ध झाला आहे. गेल्या सालीं लागवडीचा आकडा ४२ लक्ष एकर इतका होता. म्हणजे चालू सालीं गेल्या वर्षाच्या मानानें उंसाखालील क्षेत्रात १० टक्के घट झाली आहे.

### इटलीच्या ॲबिसिनियन साम्राज्याचें डोईजड ओझें

साम्राज्यलालसेनें ॲबिसिनिया इटलीनें जिकला. परंतु ह्या साम्राज्यविस्ताराबद्दल इटलीस किती किंमत द्यावी लागणार आणि त्याचें दृश्य फळ कितीसें पदरात पडणार ह्याची कल्पना फारशी आशादायक नाहीं ॲबिसीनिअन युद्धापायीं इटलीचे १७५ कोटि रुपये खर्ची पडल्याचें जाहीर झालें आहे व आणखी १७५ कोटींचें कर्ज काढावयाचें असून त्या रकमेचा विनियोग ॲबिसिनिया वसाहतीस व आर्थिक प्रगतीस योग्य करण्याकडे व्हावयाचा आहे

### सक्कर धरणाकरितां वापरलेल्या यंत्रसामुग्रीची विक्री

सिंधू नदीवर सक्कर येथें धरण बाधण्याकरिता बरीच यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली होती, ती हळु हळू विकून टाकण्यांत येत आहे मार्च, १९३७ अखेर अशा रीतीनें ३४ लक्ष रु. वसूल झाले

### इंपीरियल- बँकेच्या उपशाखा

इंपीरियल बॅक ऑफ इडियानें गेल्या वर्षी ६३ उपशाखा स्थापन केल्या.

### मि ॲन्ड्र्यू मेलन

सुप्रसिद्ध अमेरिकन राजकारणपटु मि मेलन हे गेल्या आठवड्यांत खिस्तवासी झाले गजकीय वाटाघाटींत चमकण्यापूर्वीच त्यांनीं व्यापार व उद्योगधंदे ह्यात नाव मिळवून पैसे कमावले होते अमेरिकेमधील अल्युमिनियमच्या व्यापारापैकीं ९९ टक्के व्यापार मि मेलन ह्याचे कुटुंबीयाचे हातीं होता. एकेकाळीं मि मेलन हे ½ ते ¾ अब्ज रुपयाचे धनी होते. १९२६ सालीं आपल्या कन्येस तिच्या विवाहाचे निमित्तानें त्यांनीं २¾ कोटि रु. बक्षीस दिले !

### ट्रेझरी बिलावर ७ आणे ७ पै व्याज

रिझर्व्ह बॅकेनें मगळवार, ता. २४ ऑगस्ट रोजीं २ कोटि रुपयाचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यावर सरासरीनें द सा द. शे ७ आणे ७ पै व्याजाचा दर पडला.

### ग्रेटब्रिटनला भेट देणारे परराष्ट्रीय प्रवासी

१९३७ सालाच्या पहिल्या सहामाहींत एकूण १,१६,३१७ परदेशीय प्रवासी ग्रेटब्रिटनमध्यें येऊन गेले. १९३६ च्या पहिल्या सहामाहींत तत्सम आंकडा ९७,१९८ इतकाच होता चालू वर्षातील प्रवाशाची वर्गवारी येथें दिली आहे:—

| प्रवाशाचा मायदेश | प्रवाशाची एकूण सख्या | व्यापार व उद्योगधंदे ह्याकरिता आलेल्या प्रवाशाची सख्या |
|---|---|---|
| अमेरिका | १४,३२९ | ९३५ |
| फ्रान्स | ४,१३९ | १,५१६ |
| जर्मनी | ३,७९६ | १,९०९ |

जर्मनाचा प्रवासातील प्रमुख हेतु व्यापारविषयक असून अमेरिकन प्रवाशी बव्हशीं मजेखातर येतात, हें वरील आकड्यावरून स्पष्ट होईल.

### मुंबई बदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| १५-८-३७ ते २१-८-३७ | ३३,७०,७७० |
| २२-८-३७ ते २८-८-३७ | ३६,२३,९३८ |
| २१-९-३१ ते २८-८-३७ | ३,०२,६०,६१,५९६ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध–माहिती ... | ४३२ |
| २ विमा कायद्यात दुरुस्ती | ४३३ |
| ३ विमेदारांची वैद्यकीय तपासणी करणारे डॉक्टर | ४३३ |
| ४ उद्योगधंद्यांची वाढ संघटनेनें करा ... | ४३४ |
| ५ ग्रेटब्रिटनमधील आयुर्विम्याची प्रगति ... | ४३४ |
| ६ स्फुट विचार ... प्रांतिक विधिमंडळांत महत्त्वाची चर्चा–शेतीविषयक कर्जांच्या रकमेबाबत तडजोड—" अर्ध त्यजति पंडित."–मुंबई इलाख्यात कर्जलवादाची आवश्यकता | ४३५ |
| ७ बँकर व खातेदार ह्यांचे परस्पर संबंध .. | ४३६ |
| ८ दि नागपूर प्रीमियर को ऑ सोसायटी लि | ४३७ |
| ९ सहकारी चळवळ | ४३८ |
| १० दिवाणी दावा व सर्च वारंट | ४३९ |
| ११ मुंबई इलाख्यातील गुन्हेगार जाती ... | ४३९ |
| १२ बँकेच्या शाखेची स्थापना | ४४० |
| १३ निवडक बाजारभाव | ४४१ |
| १४ प्रांतिक सरकारांचीं नवीं कर्जे ... | ४४१ |



# अर्थ

बुधवार, ता. १ सप्टेंबर, १९३७


## विमा कायद्यांत दुरुस्ती

### सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

नवीन विमाविषयक कायद्याचा तपशीलवार विचार करण्याकरिता मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें सिलेक्ट कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट हिंदुस्थान सरकारचे न्यायमंत्री सर एन. एन सरकार ह्यानीं गेल्या बुधवारीं असेंब्लीस सादर केला. सदरहू रिपोर्टावरील चर्चेस ता. ३० ऑगस्ट रोजीं प्रारंभ झाला असून, आता लवकरच बिलाचें कायद्यांत रूपांतर होईल रिपोर्टांतील सर्व सूचना एकमतानें करण्यात आलेल्या नसल्या, तरी मूळ बिलात मूलग्राही बदल झालेला नसल्यानें दुरुस्त बिलाच्या पुनःप्रकाशनाची आवश्यकता कमिटीस भासली नाहीं.

सिलेक्ट कमिटीनें सुचविलेल्या दुरुस्तींत सर्वांत महत्त्वाची सूचना म्हणजे मॅनेजिंग एजंटाच्या विसर्जनाबाबतची होय. विम्याचे धंद्यात मॅनेजिंग एजंटाकडे व्यवस्था सोपविण्याची आवश्यकता नाहीं, असें बऱ्याच लोकांचें म्हणणें आहे आयुर्विम्यासेरीज बाकीच्या विम्याचे व्यवहारांत हिंदी कंपन्या स्थायी झालेल्या नाहींत व त्यांस जरूर तें आर्थिक सहाय करण्यास व त्यास बळकटी आणण्यास मॅनेजिंग एजंटाची जरूरी आहे, असें मत कमिटीनें व्यक्त केलें आहे. आयुर्विमा कंपन्यांचे बाबत मात्र मॅनेजिंग एजंटाचा संबंध दहा वर्षांचे मुदतींत तुटला पाहिजे, असें कमिटीनें आपलें स्पष्ट मत दिलें आहे. ह्या मध्यंतरींच्या काळांतहि मॅनेजिंग एजंटांवर बंधनें घालणें कमिटीस अत्यावश्यक वाटलें व सदरहू एजंटाची प्राप्ती दरमहा दोन हजार रुपयांवर जाऊं नये, असें तिनें सुचविलें विम्याचें काम मिळणाऱ्या प्रचारकास कंपन्यानीं द्यावयाच्या कमाल कमिशनची मर्यादाहि कमिटीनें काढून टाकली आहे. केवळ तात्त्विक मुद्याचा विचार करून व प्रत्यक्ष स्पर्धेच्या व्यावहारिक अंगाकडे दुर्लक्ष करून मूळ बिलांत घातलेली ह्याबाबतची अट कमिटीस ग्राह्य वाटली नाहीं.

विमेदाराच्या हिताचें संरक्षण करणें हा नव्या कायद्याचा प्रधान हेतु असल्यानें, विमा मंडळयाच्या डायरेक्टर बोर्डावर विमेदाराचे प्रतिनिधि असणें कमिटीनें सक्तीचें केलें आहे. एकूण डायरेक्टराच्या एक चतुर्थांशाइतकी तरी त्यांची संख्या असली पाहिजे, असा कमिटीचा आग्रह आहे कित्येक विमा कंपन्यानीं विमेदाराचे प्रतिनिधी आपल्या बोर्डावर घेण्याचा ह्यापूर्वींच प्रघात पाडलेला आहे. त्यास आतां प्रतिनिधींच्या संख्येंत वाढ करावी लागेल एवढेंच विमेदारास क्लेमचे पैसे अल्पकाळात मिळावे, अशी व्यवस्थाहि कमिटीनें सुचविली आहे. कांहीं कंपन्या ह्या बाबतींत दिरंगाई करून विलंब लावतात, त्यास आळा बसावयास पाहिजेच होता.

विम्याचें काम नव्यानें प्रारंभ करणाऱ्या कंपन्यास आता सरकारात जबर अनामत रकम ठेवावी लागणार आहे. ह्या रकमेच्या भरण्याबाबत कमिटीनें हप्ते ठरवून दिले आहेत. आयुर्विम्याचें काम चालू होण्यापूर्वीं ते स्वीकारणाराजवळ पुरेसें भांडवल असणें आवश्यक आहे, ह्याविषयीं दुमत होण्याचा संभव नाहीं. ह्या संबंधात अनामत ठेवावयाच्या रकमेबाबतची अट बळकट पायावर उभारलेल्या कंपन्याच्या अंगीकृत व्यवहारात अडचण न आणण्याजोगी सुलभ परंतु उपऱ्या, लेच्यापेच्या कंपन्यांस प्रतिबंध करण्यास समर्थ अशी असणें युक्त आहे

विदेशी कंपन्याच्या स्पर्धेपासून हिंदी कंपन्यांस संरक्षण मिळावें, ही हिंदुस्थानातील विमा व्यवसायातल्या लोकाची फार जुनी परंतु आग्रहाची मागणी आहे ती पुरी करण्यास कमिटीच्या सूचना कोठ्या पडतील, ह्यांत संशय नाहीं विदेशी कंपन्याकडून अनामत रकम मागितल्यानें अगर हिंदी विमेदाराचे हितसंरक्षणार्थ त्यानीं आपले विवक्षित फंडस हिंदुस्थानात गुंतवावे, असा निर्बंध घातल्यानें देशी कंपन्याचें समाधान होण्यासारखें नाहीं. कारण, ह्या अटी विदेशी कंपन्यास जाचक होण्याचा संभव नाहीं रीइन्शुअरन्सचा कांहीं वांटा हिंदी कंपन्यास मिळावा, ही कमिटीची सूचना मात्र देशी कंपन्याचें हित साधणारी आहे आपलें रीइन्शुअरन्सचें काम देतेवेळीं देशी कंपन्यांकडून तसाच मोबदला विदेशी कंपन्या मागतील, हें उघड आहे. तथापि, ही योजना स्वीकारली गेल्यास आज न होणाऱ्या व्यवहाराचा पायंडा पडेल ह्यांत संशय नाहीं असेंब्लीमध्यें सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टावर कलमवार चर्चा होईल, त्यावेळीं अनेक दुरुस्त्या सुचविण्यात येतील मूळ बिलापेक्षां दुरुस्त बिल सुधारलेलें असलें, तरी देशी कंपन्यास परिणामकारक संरक्षण मिळण्याची भरपूर तरतूद करण्याचा यत्न असेंब्लींत होईल, अशी अपेक्षा आहे.

## विमेदारांची वैद्यकीय तपासणी करणारे डॉक्टर

विमा कंपन्यानीं विमेदाराची वैद्यकीय तपासणी करण्याकरितां नेमावयाच्या डाक्टरांची लायकी व त्यास मिळावयाची फी ह्यासंबंधीं विमाविषयक नवीन कायद्यात तजवीज करण्यात यावी, असा ठराव मुंबई येथें भरलेल्या विमा कंपन्याच्या कांहीं डॉक्टराचे सभेंत पास झाला. कित्येक कंपन्या सरकारात नोंद नसलेल्या गृहस्थासहि वैद्यकीय तपासणी करण्यास परवानगी देतात व तपासणी व्हावी तशी कसोशीनें होत नाहीं, अशी सभेमध्यें तक्रार करण्यात आली. कंपन्यांच्या प्रमुख वैद्यकीय सल्लागाराचे संमतीनेंच इतर डॉक्टरांच्या नेमणुका केल्या जाव्या, असें मत सभेनें व्यक्त केलें कित्येक कंपन्या कामाचे मानानें अवाच्या सवा डॉक्टरांच्या नेमणुका करतात, हें इष्ट नाहीं व त्यास मिळणाऱ्या फींत एकसूत्रता असणें जरूर आहे, अशी सभेनें सूचना केली.

## उद्योगधंद्यांची वाढ संघटनेनें करा

### सर एम विश्वेश्वर अय्या ह्यांचे विचार

सेवानिवृत्त इंजिनियर आणि म्हैसूर संस्थानचे माजी दिवाण, सर एम् विश्वेश्वर अय्या, ह्यांची हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नती-संबंधीं तळमळ आणि त्या विषयाची तात्त्विक व व्यावहारिक माहिती ह्या बाबत प्रसिद्धी आहे. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीमध्यें त्यांनीं गेल्या शनिवारीं आपल्या आवडत्या विषयावर अत्यंत विचारपरिप्लुत असें भाषण केलें, त्याचा त्रोटक गोषवारा खालीं दिला आहे —

हिंदी लोकाची वसाहती व इतर परकी देश ह्यामध्यें असमाधानकारक स्थिति आहे, ती सुधारण्यास आपले प्रतिनिधि म्हणून अधिकारी तेथें नेमले पाहिजेत आणि त्यांनीं तिकडची माहिती गोळा करून इकडे पुरवली पाहिजे कॅनडानें पस्तीस राष्ट्रात आपले प्रतिनिधि नेमले आहेत

हिंदुस्थानात प्रगतीची पहिली महत्त्वाची बाब आहे ती शिक्षणाची आहे खेडेगावांमध्यें अत्यंत अल्प खर्चात शिक्षणाची सोय करून साक्षरतेचें प्रमाण आपण वाढवलें पाहिजे. इमारतींवर निष्कारण खर्च न करता ही खेडेगावी शिक्षणाची व्यवस्था होणें जरूर आहे. शहरातलें सर्व शिक्षण व्यावहारिक पद्धतीचें असलें पाहिजे आणि विश्वविद्यालयीन शिक्षणाचा उपयोगहि आर्थिक उन्नतीकडे झाला पाहिजे

दुसरी महत्त्वाची गोष्ट उद्योगधंद्याच्या वाढीसंबधाची होय. ह्या बाबतींत हिंदुस्थानाइतकी वाईट स्थिति जगांत इतरत्र क्वचितच सापडेल ती सुधारण्याचे प्रयत्न आतापर्यंत अगदीं जुजबी रीतीनें झाले आहेत ते आता उत्साहानें, नेटानें व संघटनानें झाले पाहिजेत शेतकऱ्यांचें आणि मध्यम वर्गाचें उत्पन्न कितीं तरी पटीनें वाढणें अगत्याचें आहे.

स्वदेशी धंदे सर्व प्रकारचे पाहिजेत. मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांपासून तों खेडेगावी लहान धंद्यापर्यंत सर्वत्र उद्योग व्यवसाय चालले पाहिजेत शेतीवर अवलंबून रहाणारांची संख्या कमी करून उद्योगधंद्यात लोकास वाढत्या प्रमाणात काम मिळालें पाहिजे. शेतीची व खेडेगावाची सुधारणा होण्यास ह्या औद्योगिक संघटनाची जरूर आहे मोटारी व इंजनें ह्यापासून सुयाटाचण्या ह्यापर्यंत सर्व जातींचा माल देशांत काढता येईल अशी व्यवस्था हवी.

तिसरी महत्वाची बाब म्हणजे राष्ट्र संरक्षण. फौज, आरमार, लढाऊ विमानें ह्या सर्वांत हिंदी लोकाचा प्रवेश झाला पाहिजे आणि त्या बाबतच्या शिक्षणाची व उद्योगधंद्याची योजना झाली पाहिजे.

ह्या महत्वाच्या तीन विषयांत प्रगति होण्यास भांडवल, संघटन व संरक्षण ह्यांची आवश्यकता आहे. नवीन धंदे प्रस्थापित होण्यास जकातीचें भरपूर संरक्षण लागतें. इतर देशात तेथील सरकारें सढळ हातानें औद्योगिक संरक्षण देतात हिंदुस्थानातील सरकारानें मात्र आपला हात आखडता धरला आहे. लोकांनीं सरकारी सहायाची वाट न पहाता भांडवल जमवून उद्योग स्थापावे. धंदेवाल्यांनीं ह्या कामीं एकमेकांस मदत करावी आणि बॅंकाचें जाळें सर्वत्र पसरण्यांत यावें.

पण ह्या सर्व गोष्टी दीर्घ विचारानें आणि योजनात्मक पद्धतीनें केल्या जाणें इष्ट आहे. भरमसाटपणानें धंदे काढणें अयोग्य आहे कित्येक धंदे अयशस्वी ठरणें अपरिहार्य आहे तथापि योग्य योजना आखल्यास असे अनुभव थोडेच येतील

खेडेगावांतील आमचे लोक समंजस आहेत. त्यास एखादी गोष्ट पटवून दिली असतां ते ती उचलतात खेडेगावाची व्यवस्था त्यांच्या पुढाऱ्याकडेच सोपवणें इष्ट आहे पंचायती संस्थाखुऱ्या, वजनदार व कार्यक्षम असल्या पाहिजेत.

आर्थिक सुधारणावर सरकार व जनता ह्यांनीं खर्चलेला पैसा उत्पादक रीतीनें वापरल्यास चागला फलद्रूप होतो आणि त्याकरितां आखलेला आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम कसा पार पडत आहे ह्याविषयींची माहिती व आकडेसंख्या तयार ठेवले पाहिजत आणि तुलनात्मक दृष्टीनें त्याची वारवार छाननी झाली पाहिजे. बिनहिशेबी उद्योग व कारभार हानिकारक होतात.

साराश, उद्योगधंद्याचा पिच्छा पुरवल्यावाचून हिंदुस्थानाची धडगत नाहीं आणि संघटन व योजनात्मक कार्यक्रम ह्याची कास धरल्यावाचून प्रगति नाहीं, हें सर्वांनीं ध्यानात वागवून स्वकर्तव्य करावें

---

### ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विम्याची प्रगति

१९३६ सालीं ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विम्याचें काम मिळविणाऱ्या कंपन्यांनीं यशाच्या मार्गांत आणखी एक पाउल पुढें टाकलें पांच वर्षांपूर्वीच्या कामाचे मानानें गेल्या वर्षी त्यांस ५०% काम ज्यास्त मिळालें हप्त्यापासूनचेहि उत्पन्न वाढलें व्याजाचे दर सर्वत्र उतरल्याकारणानें व प्राप्तीवरील करांत थोडी वाढ झाल्यामुळें कंपन्यास त्याचे फंडावर कमी दरानें व्याज पडलें हा उतार असाच कांहीं काळ टिकण्याचा संभव आहे नवीन कामात वाढ झाली, तरी खर्च फुगला नाहीं ब्रिटिश विमा कंपन्या दिवसानुदिवस साम्राज्यातर्गत देशात ज्यास्त ज्यास्त काम मिळवू लागल्या आहेत १९३६ सालीं ज्या कंपन्यांचीं मूल्यमापनें झालीं त्यापैकीं एक सोडून सर्वांस आपला बोनसचा दर कमी करावा लागला हा दर कंपन्यांच्या व्यवहाराच्या किफायतशीरपणावर अवलंबून असल्यानें, त्यातहि कांहीं वर्षे उतार होत राहील, अशी अपेक्षा आहे. विम्याची लोकप्रियता वाढत असून, हा धंदा भरभराटींत आहे, ह्यात संशय नाहीं. विमे मिळविण्यास कंपन्यांस कष्ट पडत नसले, तरी हप्त्यांच्या रकमा फायदेशीर रीतीनें गुतविणें मात्र त्यास अवघड जात आहे

---

### विमा कंपन्यास पेच—विसर्जन कीं एकत्रीकरण ?

हिंदुस्थानात गेल्या कांहीं वर्षांत अनेक नवीन आयुर्विमा कंपन्या स्थापन झाल्या असून, त्यापैकीं कित्येकांनीं अद्याप जरूर ती अनामत रकम सरकारात भरलेली नाहीं अनामत रकम ठेवण्याची सुरवातीची मुदत वाढवून मिळविण्याचा कांहीं कंपन्यांनीं प्रयत्न केला व सरकारनेंहि त्यास सहानुभूति दाखविली तथापि, बऱ्याच कंपन्यास ही प्राथमिक जबाबदारी अद्याप पार पाडता न आल्यानें त्याजवर नोटिसा बजावण्याची पाळी आली. नवीन विमा कायदा अमलात आल्यानंतर, हलक्या बुडाच्या कंपन्याचा टिकाव लागणें कठीण होणार आहे त्यापैकीं कांहींस गट करून पुनर्घटना करावी लागेल, तर कांहींस विसर्जन पावावें लागेल, अशी भीति आहे.

# स्फुट विचार

## प्रांतिक विधि-मंडळांत महत्त्वाची चर्चा

प्रांतिक प्रधान मंडळाच्या चालू सालच्या अदाजपत्रकांतील खर्चाच्या रकमांबाबतच्या मागण्या मुंबई विधि-मंडळापुढें गेल्या आठवड्यांत मांडण्यात आल्या, त्यावेळीं जमीनमहसुलाच्या प्रश्नावर बराच वादविवाद झाला आणि जमीनधारा पद्धति आणि शेतकऱ्यांचें कर्जनिवारण ह्यासंबधानें अनेक सूचनाहि करण्यात आल्या. प्रधान मंडळाच्या मागण्यांत काट सुचवणाऱ्या सभासदांचा हेतु सरकारच्या विवक्षित धोरणावर टीका करून त्यांत इच्छित सुधारणा घडवूं पहाणें हा असतो. जमीनमहसुलाच्या खात्यावरील खर्चाच्या मागणीची चर्चा चालू असता कित्येक सभासदांनीं जमीनद्वाराचें त्यांच्या कुळांकडून असणारें येणें वसूल होण्याच्या बाबतींत विशिष्ट मुदतीची तहकुबी देण्यांत यावी आणि कुळांस त्याच्या मालकाचीं शेतें करण्याचे संबंधांत शाश्वती वाटेल अशी योजना अमलांत यावी ह्या अर्थाच्या सूचना सभासदांनीं केल्या. ह्या गोष्टी दीर्घ व खोल विचार करूनच अमलांत आणल्या पाहिजेत आणि प्रधान मंडळ त्यांचेविषयीं चौकशी करीत असून आपला निर्णय शक्य तितका लवकर जाहीर करील असें आश्वासन महसूल मंत्र्यानीं दिलें आणि खर्चांतल्या काटाची उपसूचना विधि-मंडळानें नामंजूर केली. शेतकऱ्याचें कर्ज सरकारनें सावकारांस कर्जरोखे लिहून देऊन फेडून टाकावें अशीहि मागणी दुसऱ्या एका उपसूचनेंत ग्रथित होती. ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं तज्ज्ञांची कमिटी नेमण्याचा आपला विचार असल्याचें मंत्र्यानीं सांगितलें. शेतकऱ्यांची ऋणमुक्तता व्हावी, त्यांची आर्थिक स्थिति सुधारावी, जमीनमहसुलाचा त्यांचेवरचा बोजा हलका व्हावा इत्यादि सुधारणांविषयीं आपणांस आस्था वाटते ती प्रधान मंडळास सूचना करणाऱ्यांच्या आस्थेपेक्षां कमी नसून कोणत्याहि योजना स्वीकारण्यापूर्वीं त्याची सर्व बाजूंनीं व व्यावहारिक दृष्ट्या छाननी होणें अगत्याचें आहे हा युक्तिवाद सरकारच्या बाजूनें करण्यांत आला आणि तो विधिमंडळांतील बहुसंख्याक सभासदांस पटला. वादमूलक प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचे पण गुंतागुंतीचे व अवघड असल्यानें त्यांचा तडकाफडकी निकाल करणें केव्हांहि श्रेयस्कर नाहीं. तथापि, हे विषय आज अनेक वर्षें लोंबत राहिले असून त्यांचे बाबतींत निश्चित धोरण आखण्यात आलेलें नाहीं. ह्याकरितां त्यांची तज्ज्ञांकरवीं चौकशी करण्याचें आणि त्यांच्या सूचनांस कृतीचें स्वरूप देण्याचें प्रधान मंडळानें ठरविलें आहे. ह्या अभिवचनाची पूर्तता लवकर करण्यांत यावी हें अगत्याचें आहे.

## शेतीविषयक कर्जाच्या रकमेबाबत तडजोड

कर्ज काढल्यावांचून शेतकऱ्याचें चालत नाहीं, पण कर्जफेड करण्याचें सामर्थ्य त्याच्यामध्यें नसतें. अशा स्थितींत व्याजापायीं कर्जाची रकम फुगत जाते आणि सावकारासहि आपला पैसा परत मिळण्याची मारामार पडते. व्याजाच्या चक्रवाढीला आणि कर्जाच्या परिमाणास कांहींतरी मर्यादा असावी म्हणून दामदुपटीचा नियम पूर्वापार चालत आला आहे. त्याचप्रमाणें, शेतकरी कायद्यान्वयें सावकाराच्या मागणीची न्यायाधिकाऱ्यांनीं छाननी करून व्याज कमी होण्याची व कर्जदारास हप्तेवदी मिळण्याची व्यवस्था झालेली आहे. सामान्य परिस्थितीकरितां ही योजना झाली. परंतु गेल्या सात वर्षांत बोकाळलेल्या आर्थिक मंदीमुळें शेतकऱ्यांचीं कर्जें फुगून त्यांचें परतफेडीचें सामर्थ्य संपुष्टात आलें आहे. सावकारांसहि आपला पैसा परत मिळण्याची आशा उरलेली नाहीं आणि गहाण घेतलेल्या जमिनींचा उपयोग करतां येणें त्यांस शक्य नाहीं. सध्याची हलाखीची परिस्थिति सर्वांस सारखीच बाधक होत आहे. बाजारभाव विलक्षण रीतीनें घटले असल्यामुळें शेतकऱ्यास आपला चरितार्थ चालवण्याची जेथें मारामार आहे, तेथें त्याचेकडून व्याजाच्या भरपाईची व मुद्दलाच्या फेडीची अपेक्षा कशी करावी ? सर्वांवर आलेल्या आपत्तीमध्यें प्रत्येक वर्गानें समभागी झालें पाहिजे हें समाजघटनेचें आद्यतत्व आहे. त्यास अनुसरून, शेतकऱ्यानें आपलें देणें देण्याची ज्याप्रमाणें शिकस्त करावी, त्याप्रमाणें सावकारांनींहि आपल्या येण्यात योग्य सूट देण्याची तयारी दाखविली पाहिजे. सावकारी येणें करारास धरून असेल आणि त्यास जमीन गहाणाचा भरपूर आधार असेल. तरीहि, एकंदर परिस्थितीच्या दृष्टीनें पहातां आपला हक्क शंभर टक्के प्रस्थापित करून पूर्ण कर्जाची उगवणी करणें सार्वजनिक नीतिनियमाप्रमाणें सावकारांस उचित होणार नाहीं. ह्यासाठीं सावकारानीं कर्जाबाबतच्या तडजोडीस स्वयंस्फूर्तीनें मान्यता देणें योग्य आहे.

---

### " अर्धं त्यजति पंडितः "

सावकाराच्या निवळ स्वार्थाच्या दृष्टीनें जरी विचार केला तरी त्यांनीं कर्जाची तडजोड करून आपल्या येणें रकमेस काट लावून घेणें श्रेयस्कर ठरतें. कर्जदारावर फिर्याद करून सावकारास आज काय मिळणार आहे ? शेतकऱ्याची गहाण असलेली जमीन फारतर त्याच्या ताब्यात येईल, पण तो ती स्वतः करूं शकत नाहीं आणि तिचा खंड हातीं येण्याची शाश्वती नाहीं. कर्जांत अडकून पडलेला पैसा सावकारी व्यवहारास प्रतिबंधक होतो आणि तो परत हातीं येण्याची चिंता धनकोस लागून रहाते. येणें असलेली रकम देणेदाराकडूनच रोकडीनें पदरात पडण्याचा संभव असतो तेव्हां धंदेवाले सूट देण्यास नेहमीच तयार असतात. हा सर्व व्यवहारी लोकांचा नित्याचा रिवाज आहे, आणि तोच न्याय शेतकऱ्यांच्या कर्जाबाबतच्या तडजोडीस लावण्यांत आला पाहिजे. तडजोडी व्यक्तिशः सावकार आणि कर्जदार ह्यांवर अवलंबून राहू न देतां त्याची पद्धतशीर व्यवस्था करण्याचें कर्तव्य सरकाराचें आहे. हिंदुस्थानांतील कांहीं प्रांतांत कर्जलवादाचीं मंडळें सरकारांनीं स्थापन केलीं आहेत आणि त्यांच्या व्यवहारांचा अनुभव उत्तेजनकारक आहे. मध्यप्रांतात ह्यासंबंधांत बरीच प्रगति झालेली दिसून येते. गेल्या सालचे त्या प्रांतातल्या कर्जलवादाच्या व्यवहाराचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं त्या बारा महिन्यांत एकूण १ कोटि ८७ लक्ष रुपयाच्या कर्जाची तडजोड झाली आणि त्यामध्यें ८० लक्ष ७० हजारांची सूट कर्जदारास मिळाली. सुटीचें प्रमाण कर्जाच्या ४७ टक्के इतकें पडतें. वऱ्हाडमध्यें ५१ लक्षांच्या कर्जाची तडजोड झाली आणि त्यापैकी १३ लक्ष म्हणजे २५ टक्के सूट शेतकऱ्याच्या पदरांत पडली. सावकारानीं तडजोड मान्य केली नाहीं अशीं बरींच म्हणजे २,२०७ प्रकरणें निकालांत निघालीं आणि त्यांत १२३ लक्ष एवढी रकम गुंतलेली होती. सावकारांनीं विनाकारण तडजोड होऊं दिली नाहीं असा शेरा ह्या प्रकरणावर कर्जलवाद मंडळांनीं मारलेला असल्यानें त्यांबाबत फिर्यादी झाल्यास त्यांचा कोर्ट खर्च धनकोस मिळावयाचा नाहीं आणि सरळ

व्याजाचा दर ६ टक्क्याहून अधिक असणार नाहीं तडजोड झालेल्या कर्जाच्या परतफेडीचे हप्ते करण्यांत आले असून कर्जदाराच्या ऐपतीस अनुसरून त्यांच्या रकमा निश्चित करण्यांत आल्या आहेत तडजोड सावकाराच्याहि हिताची आहे, हें त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे.

## मुंबई इलाख्यात कर्जलवादाची आवश्यकता

आमच्या इलाख्यांत सहकारी पद्धतीच्या जमीन गहाणाच्या बँका स्थापन झाल्या असून त्यांचें काम सुरळीत चाललें आहे. प्रांतिक जमीनगहाणाची मध्यवर्ती बँकहि त्या प्राथमिक संस्थात पैसा पुरवण्याचें कार्य करीत आहे ह्या बँका शेतकऱ्यास कर्जें देताना सावकारानीं आपल्या येणें रकमे बाबत तडजोड करून द्यावी असा यत्न करतात आणि त्याच्या ह्या खटपटीस थोडेंफार यशहि येत आहे तथापि, कर्जलवादाची कायदेशीर योजना सरकारनें करून तिची जोड जमीन गहाणाच्या बँकाच्या कार्यास दिल्या वाचून त्याची खटपट व्हावी तितकी फलद्रूप होणें शक्य नाहीं हें उघड आहे. मध्यप्रांतात अशा बँका स्थापन करण्यात आल्या आहेत परतु कर्जदारानीं त्याचा विशेष फायदा घेतलेला दिसत नाहीं सबध प्रांतांत तडजोड झालेल्या कर्जांपैकीं तीन चार लक्ष इतकेच रुपये बँकांनीं दिलेले आहेत आमच्या प्रातात बँकाचें काम बरें चाललें आहे, पण त्याच्या जोडीस कर्जलवादाची पद्धतशीर सोय नाही तेव्हा ह्या प्रश्नाकडे प्रधान मडळाचें लक्ष जाणें आवश्यक आहे मध्यप्रातात एकूण ४३ कर्जलवादमडळें आहेत आणि एक शिवाय करून सर्व जिल्ह्यामध्यें प्रत्येकी निदान एक तरी मंडळ आहे.

## बँकर व खातेदार ह्यांचे परस्पर संबंध
### आयर्लंडमधील एक निवाडा

सन १९१९ सालीं म्युलेट नावाच्या एका गृहस्थास बँक ऑफ आयर्लंडचें देणें झालें व त्याच्या ओव्हरड्राफ्टकरिता जामीन घेण्यात आले मार्टिन व दुसरा एक असे दोघे जण १,८०० पौंडाकरितां जामीन राहिले १९२२ सालीं मार्टिननें त्याच बँकेंत आपलें खातें उघडून त्यात ५०० पौंड ठेवले. १९२३ च्या सुमारास म्युलेटकडून बँकेनें ओव्हरड्राफ्टची रकम परत मागितली, परंतु त्याजकडून ती मिळेना, म्हणून मार्टिनकडे त्याची मागणी केली. एकापेक्षा जास्त जामीनदार असल्यास, त्यांपैकीं कोणत्याहि जामीनदाराकडे आपल्या येण्याची मागणी करण्याचा बँकेस अधिकार असतो, जामीनदारानीं नंतर वाटल्यास तें देणें आपसात वाटून घ्यावें मार्टिननें बँकेच्या मागणीस नकार दिला, तेव्हा मिळेल तेवढी तरी वसुली करावी, ह्या उद्देशानें बँकेनें मार्टिनच्या खात्यावरील ५०० पौंडाची रकम म्युलेटच्या खात्यावर चढवून तेवढ्या रकमेनें ओव्हरड्राफ्ट कमी करण्याचें ठरविलें मार्टिनच्या समतीखेरीज तसें करतां येत नाहीं, असा कोर्टानें निकाल दिला. आयरिश कोर्टातील निवाडा इतर देशात बंधनकारक नसला तरी त्यातील मूलतत्त्व आक्षेप घेण्यासारखें नाहीं. मार्टिनच्या खात्यावरील रकम बँकेस घ्यावयाची होती, तर जरूर तो कायदेशीर इलाज बँकेनें करावयास पाहिजे होता मार्टिनवर प्रथम दावा लावून त्यात यश मिळविल्यानतर व मार्टिननें पैशाचा भरणा केला नसता तर मार्टिनचें खातें जप्त करण्याचा हुकूम बँकेस मिळविता आला असता अगदी साध्या व्यवहाराचे बाबतींत सुद्धा कोणीहि आपल्या हातात कायदा घेता कामा नये हें आद्य तत्व कसें लागू होतें, ह्याचा वरील निवाडा हें उत्कृष्ट उदाहरण आहे


**अर्थशास्त्र**

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ३००, किंमत तीन रुपये
ह्या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**
टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८४,१०० |
| रिझर्व्ह फड | ४,८१९ |
| इतर फड | १,४०९ |
| मुदतबंद ठेवी | १,९२,९२७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,८४२ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७९,७८५ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रकम | ४१,९४७ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## दि नागपूर प्रीमियर को. हौसिंग सोसायटी, लि.

वरील सोसायटीची वार्षिक सभा सोसायटीचे चेअरमन, श्री जी ए भोंसुले, ह्याचे अध्यक्षतेखाली ता. ८-८-३७ रोजीं भरली होती सभेस वार्षिक अहवाल व ताळेबंद सादर करतेवेळीं ते म्हणाले:—

" कर्ज देताना कमेटीनें सुरक्षिततेच्या दृष्टीनें उच्च दर्जाच्या तारणाकडे विशेष लक्ष पुरविलें आहे. गतवर्षी प्रातिक को-ऑपरेटिव्ह बँकेस, सोसायटीला देण्यात येणाऱ्या कर्जाऊ रकमेवरील व्याजाचा दर कमी करण्याबद्दल आम्ही विनति केली. बँकेनें तो दर शेकडा पाचपर्यंत खाली उतरविला. बँकेशीं असलेले आमचे संबंध संपूर्ण स्नेहभावमूलक आहेत. ठराविक हप्त्यापेक्षा आमचेकडून परतफेड केव्हाहि अधिकच झालेली आहे. याचा इष्ट परिणाम असा झाला आहे कीं अल्पावधीच्या सूचनेबरोबर आम्हाला हवी तेवढी रकम बँकेकडून त्वरित मिळू शकते.

सोसायटीची सापत्तिक स्थिति याप्रमाणें भरभराटीची असल्यामुळें साहजिकच मुदतीच्या ठेवी तिच्याकडे अधिकाधिक येत आहेत. गेल्या ३० जून रोजीं संपणाऱ्या वर्ष अखेर सोसायटीजवळ १,६३,००० रु. ठेवीच्या रूपानें अनामत होते आणि गेल्याच महिन्यात ही रकम आणखी ३०,००० रुपयानीं वाढली आहे याचा निष्कर्ष एवढाच कीं, सोसायटीच्या कारभारावर लोकाचा संपूर्ण विश्वास आहे. ठराविक तारखेला आपली रकम परत मिळू शकेल असा ठेव ठेवणाऱ्याना आत्मविश्वास वाटत असतो व हीच आमच्या यशाची गुरुकिल्ली आहे पुढील वर्षी परत करण्याच्या ठेवींचा आकडा ५१,००० रु. आहे. पण त्यासाठी आताच आमच्याजवळ ४५,००० रुपये रोख तारण तयार आहे याशिवाय कर्जाच्या परतफेडीची येणारी ५०,००० रुपये रकम ही निराळीच आहे

गेल्या वर्षापासून आम्हीं, जे कर्जदार आपले हप्ते नियमितपणे परत करतात, त्याना व्याजाच्या दरात थोडी सूट देण्याचा प्रघात सुरू केला आहे आणि मला आशा आहे कीं ही सवलत यापुढेंहि चालू ठेवली जाऊ शकेल.

आपल्या हिश्शावरच्या डिव्हिडंडचा दर केव्हाहि आकर्षकच आहे व मला खात्री आहे कीं तो उतरणार नाहीं. शिवाय, त्याच्यावर प्राप्तीवरील कर आकारला जात नाहीं हें विशेष आहे आपल्या सोसायटीनें जाहीर केलेल्या दराइतका डिव्हिडंडचा दर फारच थोड्या नवीन कंपन्यात दिसून येईल

शेवटीं एवढेंच सागावेसें वाटतें कीं, सोसायटीचा भविष्यकाल फार उज्जल आहे आणि सोसायटीचा दर्जा उत्तरोत्तर वाढत जावा ही एकच आपणा सर्वांची मनीषा आहे."

नतर अध्यक्षानीं सोसायटीच्या गेल्या सात वर्षांच्या कारभाराचा आकडेवार आढावा सादर केला यानतर सभेनें वार्षिक अहवाल मजूर केला. गेल्या वर्षअखेरच्या ( १९३६-३७ च्या ) ठेवघेवीवर डिव्हिडंडचा दर शेकडा रु ५ व कर्जदाराच्या व्याजाच्या दरात शेकडा तीनचतुर्थांश सूट जाहीर करण्यात आली.

यानतर पुढील वर्षासाठी निवडणूक होऊन इतर कामकाज आटोपण्यांत आलें सोसायटीचे उत्साही व उद्योगी अध्यक्ष श्री जी. ए. भोंसुले यांची पुन्हा त्याच जागीं निवडणूक झाली श्री. डी वाय भाड याची उपाध्यक्षाच्या जागीं व श्री पी. के. हरदास व एच. एस कोलते याची चिटणीसाच्या जागीं नेमणूक होऊन सभा बरखास्त झाली


## आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाऊंस भी मिलेगा. नियम बहुत सरल है ( नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें )

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.

( स्थापित १९१६ ) अमीनाबादपार्क-लखनऊ

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोपारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करू शकत नाहींत किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते —

धी इंडो फॉरिन एजन्सीज ( डिपार्टमेंट न. ६ )

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

**K. K. & Co.**

Photographic Dealers

POONA

# सहकारी चळवळ

## बेळगांव पायोनियर अर्बन को. क्रे. बँक, लि.

—:०:—

( वार्षिक सभा: ५–९–३७ )

वरील बँकेच्या १९३६–३७ च्या अहवालावरून तिची प्रगति अखंड होत असल्याचें दिसतें. बँकेचें एकूण खेळतें भांडवल ११ लक्ष रुपयांचें आहे, त्यापैकीं १ लक्ष २८ हजार रु. भाग भांडवल, १ लक्ष २६ हजार रु. गंगाजळी, ४१ हजार बूड व संशयित कर्ज फंड, ३०½ हजार रुपये रु. इमारत फंड, ८½ हजार रु. डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड व ६½ हजार रु. इनव्हेस्टमेंट डिप्रीसिएशन फंड अशा वर्गवारींत आहे. एकूण भांडवलाशीं फंडसचें पडणारें प्रमाण समाधानकारक आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें आपल्या कर्जावरील दर उतरविले आहेत सालअखेर एकंदर कर्जाऊ रकमा ६ लक्ष ८३ हजारांच्या आहेत, त्यांमध्यें दोन महिन्यांपेक्षां जास्त वेळ थकलेल्या बाकीची रकम १ लक्ष ४० हजार रु. असून थकलेल्या बाकीचें एकंदर कर्जाऊ रकमेशीं प्रमाण शेकडा २०·८ इतकें पडलें. म्हणजे, थकलेल्या बाकींत शेकडा ३ ची वाढ झाली. थकबाकीच्या वसुलीसंबधीं मॅ. क. नें कसून प्रयत्न चालविले आहेत, अशी अहवालात नोंद आहे वर्षअखेर बँकेस २९,८०२ रु नफा झाला, त्यांतून ९,६०० रु. डिव्हिडंड ( ७½% ) देण्याविषयीं मॅ. क. ची शिफारस आहे. ताळेबंदांतील रोख्यांची किंमत बाजारभावापेक्षा सुमारें १५ हजारांनीं कमी आहे. एकंदरीनें ताळेबंद मजबूत असून भागीदारांस ७½ टक्के इतका भारी दरानें डिव्हिडंड देणें बँकेस जड वाटण्याजोगें नाहीं.

## दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

( वार्षिक सभा : २६–९–३७ )

वरील बँकेचें भाग भांडवल १४½ हजार रु. असून ठेवी सुमारें ४८ हजारांच्या आहेत. सर्व फंडांत मिळून ९ हजार रुपये आहेत. सभासदांकडे येणें कर्ज ५१ हजार रु. आहे थकबाकीचें प्रमाण २४·१% पडतें, तें कमी करण्याची बोर्ड खटपट करीत आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १,९०० रु. नफा झाला, त्यातून भागीदारांस ६¼% डिव्हिडंड द्यावें अशी बोर्डाची शिफारस आहे.

## मिरज प्रांत व कुची तालुका को. सु. यूनियन, लि.

यूनियनमध्यें सामील झालेल्या सोसायट्यांची संख्या ४४ आहे, व त्यांचेकडील ठेवी ८१½ हजारांच्या आहेत. मे, १९३७ अखेर सभासदांकडे २ लक्ष २१½ हजार रु. येणें आहे, त्यातील १ लक्ष ३८½ लक्षांची थकबाकी आहे. थकलेल्या बाकीचें प्रमाण ७०% चें अहवालाचे वर्षी ६०% झालें. सोसायट्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देण्याकरितां सेक्रेटरी व पंच ट्रेनिंग क्लास भरविण्यात आले.

## सांगली संस्थान शिक्षक सहकारी पतपेढी लि.

( वार्षिक सभा : २२-८-३७ )

वरील पतपेढीच्या सभासदांची संख्या ३२५ असून एकुण ठेवी २,१२२ रुपयांच्या आहेत. भाग भांडवल ६,८३० रुपयांचें आहे. सभासदांस सुमारें ९ हजार रु कर्ज दिलेलें आहे, त्यापैकी जुनें कर्ज फेडण्याकरितां २,९०० रु., घरखर्चासाठी ३,३०० रु., लग्नमुंजीकरितां १,१०० रु. अशी प्रमुख वर्गवारी आहे. शिलक व अहवाळाचे सालचा नफा मिळून ५२७ रु होतात, त्यांतून ५% डिव्हिडंड वाटलें जावें अशी कार्यकारी मंडळाची शिफारस आहे.

## मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

३०-६-३७ अखेर वरील बँकेचें भाग भांडवल ३½ लक्ष रुपये होतें. अहवालाचे वर्षी बँकेनें ११ प्राथमिक बँकांना ४१२ कर्जदारांस वाटण्याकरितां ५ लक्ष, ६५ हजार रु. दिले. कर्जाबाबत एकूण १ लक्ष ११ हजारांची शेतकऱ्यांस सूट मिळाली. प्राथमिक बँकाकडून येणें ( ४१,३६३ रु ). पूर्णपणें वसूल झालें. प्राथमिक बँकांस ·४½ % दरानें कर्ज देण्यांत येतें व त्या बँका ६ % दरानें आपल्या सभासदांस कर्ज देतात. १९३५-३६ अखेर प्रांतिक बँकेस ९,५३० रु. तोटा आला होता, त्यांत अहवालाचे वर्षी आलेला तोटा मिळविला असतां एकूण १०,६८० रु. होतात. सरकारी ग्रँट ( १०,००० रु. ) त्यांतून वजा जातां, पुढील सालाकरितां ६८० रु. तोटा बाकी रहातो, तो १९३७–३८ अखेरच्या सरकारी ग्रँटमधून भागेल. प्राथमिक बँकांची प्रगति समाधानकारक होत असून, मध्यवर्ती बँकेस डिबेंचर भांडवलाची लवकरच गरज भासेल, ही गोष्ट सरकारच्या नजरेस आणण्यांत आलेली आहे व सरकारकडून २० लाखांच्या डिबेंचर्सकरिता परवानगी मागण्यांत आली आहे.

## पुणें जिल्हा को इन्स्टिट्यूट, पुणें

( वार्षिक सभा : ४–९–३७ )

अहवालाचे सालीं इन्स्टिट्यूटच्या सभासद-सोसायट्यांची संख्या २१२ असून व्यक्तिशः सभासद १०९ आहेत. नवीन सोसायट्या स्थापन करण्याकरितां इन्स्टिट्यूटतर्फे १२ गांवीं प्रचार करण्यांत आला परंतु फक्त २ सोसायट्या त्यांच्याकडून नोंदल्या गेल्या. सवलतीची योजना सोसायट्यांस समजावून सांगण्याचा इन्स्टिट्यूटनें कसून यत्न केला सेक्रेटरींकरितां उजळणी वर्ग, पंच कमिटीचें शिक्षण वर्ग, लायब्ररी, सोसायट्यांचें दप्तर व्यवस्थित व काळजीपूर्वक ठेवणाऱ्या सेक्रेटरींस उत्तेजनार्थ पारितोषक, तालुका परिषदा, सर्क्युलर्स, इत्यादि मार्गांनीं इन्स्टिट्यूटनें सहकाराच्या प्रचाराचें कार्य कळकळीनें व तत्परतेनें केलें, ही गोष्ट कार्यकारी मंडळास भूषणावह आहे. अहवालाचे वर्षी श्री य. रा. दाते हे इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष व श्री. भा. ऱ्यं. देवभानकर हे ऑनररी सेक्रेटरी होते.

ऐक्य
ऐक्य संपादन मंडळाचें नियतकालिक
दर रविवारीं प्रसिद्ध होतें
संपादकः—न ग जोशी बी. ए, एलएल. बी.
वा. व. फक्त २ रु. १२ आ.
गांवांत २ रु.
स्वतंत्र व निःपक्षपाती राजकारण, सामाजिक व औद्योगिक वगैरे विषयांवर माहितीयुक्त व अभ्यासपूर्ण लेख, महत्त्वाचें व विविध शहर, जिल्हा आणि संस्थानवृत्त आणि प्रसंगोचित व नानाविध चित्रें याबद्दल या पत्राची प्रसिद्धि आहे.
जाहिरातीचें उत्तम साधन
लिहा किंवा भेटा—मॅ. ऐक्य, सातारा

### दिवाणी दाव्यांत सर्च वॉरंट गैरवाजवी

"फौजदारी फिर्याद दाखल करण्यापूर्वी कागदपत्राची तपासणी करण्याकरिता सर्च वॉरंट काढण्यास क्रि. प्रो. कोडच्या ९८ व्या कलमानें परवानगी दिली असली, तरी त्याचा उपयोग दिवाणी दाव्यात करणें गैरवाजवी आहे कागदपत्रें शोधून काढण्याकरितां दिवाणी दाव्यात त्या कलमाची अंमलबजावणी करण्यात यावी असा कायदेमंडळाचा हेतु असता तर सिव्हिल प्रो कोडांतच त्याचा अंतर्भाव करण्यात आला असता दस्तऐवज व कागदपत्र बनावट आहेत, असा मुद्दा दिवाणी दाव्यात कित्येक प्रसंगीं माडण्यात येतो, परंतु तेवढ्यावर भिस्त ठेवून केवळ क्रि. प्रो कोडाच्या ९८ व्या कलमाचा आश्रय घेणें रास्त नाहीं."

मुंबई हायकोर्टचे सर न्यायाधीश, सर जॉर्ज बोमट, ह्यानीं नुकत्याच दिलेल्या एका निवाड्यातील उतारा

---

### धंदा अंगलट आला !

आपला धंदा भलत्याच ठिकाणीं चालविल्यानें आपत्ति ओढवण्याची भीति असते एक जादूगार आपल्या मित्रासह भाड्याच्या बसमध्यें बसून जात होता. हातचलाखीचा आपला पराक्रम दाखवण्याची त्यास मध्येंच हुक्की आली खिडकींतून, बाकाखालून आणि हवेमधून त्यानें भराभर अनेक नाणीं काढून जमा केलीं. प्रेक्षकांस मोठी मौज वाटली, पण बसचा कंडक्टर जादूगाराजवळ आला आणि गाडींत सापडलेला माल कंपनीच्या स्वाधीन केला पाहिजे असें म्हणून त्याचेपासून जमा केलेले पैसे मागू लागला आपण जादूगार असून हातचलाखीचा खेळ करून दाखविला असें त्यानें जीव तोडून सागितलें, पण कंडक्टर काहीं ऐकेना आणि पोलिसाची धमकी घालू लागला शेवटीं जादूगारास हातातली सर्व रकम द्यावी लागली आणि ह्या उदाहरणावरून त्यानें कानास खडा लावून घेतला

### मुंबई इलाख्यांतील गुन्हेगार जाती

गुन्हेगार जातींना त्यांच्या गुन्हेगारीच्या प्रवृत्तीपासून परावृत्त करण्याचा एकच मार्ग म्हणजे, गुन्ह्यांचीं कारणें कमी करणें हा होय गिरणीवाल्यानीं व कारखानदारानीं गुन्हेगार जातींतील लोकास कामावर घेतल्यानें हा प्रश्न सोडविण्यास बरीच मदत होणार आहे. १९३६–३७ मध्यें गुन्ह्यांचें प्रमाण उतरलें, ह्याविषयीं सरकारी अहवालात समाधान व्यक्त करण्यांत आलें आहे. विशेषतः सोलापूर, गदग, हुबळी, बार्शी, जळगाव व अहमदाबाद येथील गिरण्याच्या व बेलापूर साखर कंपनी ( बेलापूर ), वेस्टर्न इंडिया मॅच फॅक्टरी ( अंबरनाथ ) व डेक्कन पेपर मिल्स ( मुंढवा ) ह्या कारखान्यांच्या चालकानीं गुन्हेगार जातींतील कामगारास काम देऊन सहानुभूति दाखविली. हुबळी येथील रेल्वे वर्कशॉपमध्येंहि काहीं जणास काम मिळालें

---

### सद्र्याच्या लांबींत छाटाछाट

स्वयंपूर्णता साधण्याकरिता जर्मन राष्ट्र किती कसोशीनें प्रयत्न करीत आहे, ह्याची कल्पना पुरुषांच्या सद्र्याचे लांबीमध्यें सुचविण्यात आलेल्या कपातीवरून तात्काळ येईल जर्मनींत दरसाल ३ कोटि शर्ट बनविले जातात प्रत्येक कपड्याची पुढील व पाठीकडील उंची दोन इंचानीं कमी करून कापडात बचत करण्याचा जर्मनीचा विचार आहे.

---

### हिंदी कालव्यांतून वहाणारें पाणी

हिंदुस्थानांतील सर्व कालव्यातून मिळून दररोज २,६०० कोटि गॅलन पाणी वहातें इंग्लंडमधील थेम्स नदीच्या आकाराच्या १०० नद्यांतून मिळून सुद्धा एवढें पाणी वहात नाहीं


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याचद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलूएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रातील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बॅंकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें-
१ बॅंका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बॅंक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १२ ( ट ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

**१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले**

**★ महिंद्रकर ब्रदर्स ★**

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.
बुधवार चौक, पुणें

## बँकेच्या शाखेची स्थापना

( एक उद्बोधक काल्पनिक पत्र )

सा. न. वि. वि

दोन वर्षांमागें एका वड्या धेंडानें सुचविलें कीं शेजारच्याच काहीं अंतरावरील शहरात व्यापार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालतो, तेथें आमच्या बँकेचें बस्तान चागलें बसेल त्याप्रमाणें आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून मला तेथें जाण्याचा हुकूम मिळाला व बँकेकरितां उत्कृष्ट जागा शोधून काढण्याविषयीं सूचना आली ही जागा बाजाराजवळ असावी पण श्रीमंताचे व्यवहारक्षेत्रापासून दूर नसावी, असेंहि मला सांगण्यांत आलें

अनोळखी शहरांत जाऊन बँकेकरिता जागा शोधण्याचें काम सोपें नाहीं. सुरवातीस मला एजटानीं इतकें सतावून सोडलें, कीं मी शेवटीं स्वस्थ बसण्याचें ठरविलें. अखेर बँकेकरिता एक घर निश्चित करण्यांत आलें. बँकेच्या कामास तें उपयोगी करण्यापूर्वी त्यात अनेक दुरुस्त्या करणें जरूर होतें. जुनें घर म्हणजे ताळेबंदाप्रमाणें बाहेरून दिसावयास ठाकठीक,पण ज्यास्त खोल शिरण्याची सोय नाहीं ! एकदाचें दुरुस्तीचें व फेरफार करण्याचें काम सपलें व गवडी, सुतार, प्लॅस्टरवाले, रंगवाले, पॉलिशवाले, वीजकाम करणारे इत्यादींची फौज बाहेर निघाली काँटर जणू काय कर्ज मागणाऱ्या अर्जदारांची आतुरतेनें वाट पहात आहे, असा आम्हांस भास होऊ लागला. बँकेचे हजार तऱ्हेचे फॉर्मस् व्यवस्थित लावण्यांतच आमचा आखा दिवस गेला.

बँकेच्या उद्घाटनाची जाहिरात सर्वत्र देण्यात आली असल्यानें पहिल्या दिवशीं कित्येक लोकानीं बँकेस भेट दिली काहींनीं खातीं उघडलीं, परतु बहुतेकाचीं खातीं इतर बँकांत आधीच असल्यानें, आशीर्वादापलीकडे त्यांचेकडून काहींच ज्यास्त मिळालें नाहीं विमा एजंटानीं आम्हास जें पिसाळून सोडलें, तें मात्र काहीं विचारू नकोस त्यांनीं दिलेले कागद व पत्रकें साठवून ठेवलीं असतीं, तर त्यांचा केवढा मोठा गड्डा झाला असता ! कांहीं एजटांमार्फत थोडा व्यवहार मिळाला, हें मात्र खरें

एखाद्या चालू शाखेचें ठिकाणीं बदली म्हणून जाणें व अगदी अपरिचित ठिकाणीं प्रथमच शाखा उघडणें ह्यांमध्यें महदतर आहे खरें व खोटें ओळखण्याचें नव्या शाखेचे प्रारभास काहींच साधन नसतें व गिऱ्हाइकें शेकडों तऱ्हेच्या हकीकती सागतात, त्यापैकीं कशावर विश्वास ठेवावा, हेंच कळत नाहीं नादार कोण व दार कोण, हें गिऱ्हाइकांच्या बोलण्यावरून काय समजणार ? मनुष्यस्वभावामध्यें विविधता किती आहे ह्याचा अनुभव मला येथें फार सुरेख आला.

खासगी सयुक्त भांडवलाची मडळी उभारून, आपल्या योजना आकर्षक रीतीनें माडून ओव्हरड्राफ्ट मागणाराची येथें कमतरता दिसत नाहीं. हळूच मी तारणाचा प्रश्न उपस्थित केला, कीं ते डिबेंचरची योजना सुचवितात. त्याच्या कपनीचे जागेची बाजार भावानें होणारी किमत किती म्हणून विचारलें, म्हणजे तीन वर्षांच्या भाडेपट्ट्याची हकीकत समजते शेवटीं त्यास नाराज करणें मला भाग पडतें, पण लवकरच त्यांचीं नावें कोर्टाच्या नोटीस बोर्डावर झळकतील ह्याविषयीं मला मुळींच शका नाहीं.

हें सर्व असूनहि, आमच्या शाखेनें काम बरें मिळविलें आहे. आमचेकडे येणारीं पत्रें व गिऱ्हाइकांशीं समक्ष भेटींत होणारी चर्चा हीं फारच उद्बोधक असतात. कांहीं लोक किती हिकमतीनें पैसा कमावतात ह्याचा अनुभव येतो, तर कित्येक लोक केवळ भपक्याच्या जोरावर काम साधण्याचा प्रयत्न कसा करतात, हेंहि समजून येतें स्थानिक व्यापारी वर्गांत व समजूतदार लोकांत बँकेचें नाव आदरणीय झालें आहे, हें पाहून आम्हास समाधान वाटतें व हुरूप येतो. कित्येक अडाणी लोक आम्हांस गैरवाजवी महत्त्व देतात, तें पाहून तर अचंबाच वाटतो असो.

तुझा जुना मित्र

× × ×

( " मँचेस्टर गार्डियन कमर्शिअल " वरून )

---

### झारापकर टेलरिंग कॉलेज, पुणें

वरील कॉलेजास मुंबई सरकारचे मंत्रि ना. मुरारजी देसाई, ना ल. मा पाटील व ना बॅरिस्टर एम वाय नूरी ह्यांनीं गेल्या आठवड्यात भेटी देऊन, तेथील शिक्षणपद्धति व व्यवस्था पाहिली आणि समाधान व्यक्त केलें

### जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें

वरील कॉलेजात शिक्षण घेऊन लडन डिप्लोमा परिक्षेस बसलेले तीन विद्यार्थी पास होऊन त्याना टेलर अँण्ड कटर अँकॅडमी लडन कपनीचा डिप्लोमा मिळाला. विद्यार्थ्यांचीं नावें खालीलप्रमाणें आहेत:—

१ श्री. वसत शकर पानट (जळगाव ), २ श्री. माधवजी नारायणजी चावडा ( कच्छ ) व ३ श्री. दशरथ भिकाजी चोपडेकर ( रत्नागिरी ).

मनपसंत काम
रिसवूड ब्रदर्स-टेलर्स
सदाशिव हौदानजीक : : : पुणें
वक्तशीरपणाची गॅरंटी

माधव सोमण ब्रदर्स
पावसाळी कोट व छत्र्या
धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक
लक्ष्मी रोड : : : : : पुणें २

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | १२०—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०५-१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९७—६ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६-१३ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षें मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा व सूल झालेलें भांडवल व कसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४५—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११७—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३१-१० |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५४५—० |
| चाँबे मॉ को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२८—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४¾% ... .. | १०३—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ बोनस | ९६०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७७१—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| चाबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १०% ... ... | १३२—८ |
| कराची ( १०० ) ९% .. ... ... | २७६-१४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २३०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% ... .. | १४०५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% .. ... | १६५७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु .. . ... | १६८—२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु ... ... | ५०—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु ... ... .. | २८—७ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु ४ आ .. | ४४—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु बोनस .. | ४,९००—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% ... .. | २००-१० |
| टाटा आयर्न दु. प्रे ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६९—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. ... ... | ३४०—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १५४७—८ |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... .. | ३४-१०½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... .. | ४९-१४ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—८ |
| " केसर प्रत्येक मणास ... ... | १०-१४ |
| " सरया प्रत्येक मणास ... ... | १०—८ |

## प्रांतिक सरकारांचीं नवीं कर्जें

### ४ कोटि, ६० लक्ष रुपयांची मागणी

मद्रास, संयुक्त प्रांत, पंजाब, मध्यप्रांत व वऱ्हाड आणि सरहद्द प्रांत यांच्या सरकारांनीं गव्हर्नर-जनरल इन् कौन्सिलच्या परवानगीनें रिझर्व्ह बँकेमार्फत कर्जें उभारण्याचें जाहीर केलें आहे.

( १ ) ३१ ऑगस्ट, १९३७ रोजीं कर्जरोख्याची विक्री सुरू झाली. पुरेसें कर्ज खपताच विक्री थांबविण्यात येईल.

( २ ) कर्जरोख्यांवर १ सप्टेंबरपासून ३ टक्के दरानें दरवर्षी १ मार्च व १ सप्टेंबर रोजीं व्याज दिलें जाईल

( ३ ) ९९ रुपयास १०० रुपये दर्शनी किंमतीचा रोखा मिळेल. कर्जांची परतफेड १ सप्टेंबर, १९५२ रोजीं होईल.

( ४ ) प्रत्येक प्रांत कर्जाच्या दर्शनी किंमतीच्या १½% इतकी रकम दरसाल बाजूस काढून ठेवील. रोख्याचा बाजारभाव खरेदीच्या किंमतीखालीं गेला, म्हणजे कर्जरोखे बाजारात विकत घेऊन ते रद्द करण्याकरितां ह्या फंडाचा विनियोग केला जाईल.

( ५ ) मुंबई सरकारावर कर्जाचा बोजा अगोदरच फार मोठा असल्यानें तूर्त नवीन कर्ज उभारण्याचा त्या सरकारचा विचार नाहीं.

### कर्जांचा तपशील

| प्रांत | कर्जांची रकम | कर्जाचा उद्देश |
|---|---|---|
| | लक्ष रु. | |
| मद्रास | १५० | उत्पन्नदायी भांडवली खर्च, विद्युत्पुरवठा, शेतीस पाण्याची सोय, इ. |
| संयुक्त प्रांत | १०० | उत्पन्नदायी भांडवली खर्च, विद्युत्पुरवठा, ट्यूब विहिरी, रस्ते सुधराई, इ. |
| पंजाब | १०० | ५½%टक्क्यांचें मुदत भरलेलें कर्ज फेडण्याकरिता |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ५० | मध्यवर्ती सरकारच्या कर्जाची फेड, भांडवली खर्च, इ |
| सरहद्दप्रांत | ६० | मध्यवर्ती सरकारच्या कर्जाची फेड, विद्युत्पुरवठा, इ |

## आंतरराष्ट्रीय साखर करार व हिंदुस्थान

आंतरराष्ट्रीय साखर करारास हिंदुस्थानतर्फे मान्यता मिळाली असली तरी अधिकृतरीत्या त्यावर अद्याप सही झालेली नाहीं. तथापि, हा करार हिंदुस्थानाचे हितास बाधक असून, साखरेच्या निर्गतीस आळा घालणारा आहे, अशी सर्वत्र ओरड झाली. मध्यवर्ती कायदेमंडळांत ह्या प्रश्नावर चर्चा झाल्यानंतर हिंदुस्थान सरकार वरील करारास मान्यता देण्याच्या प्रश्नाचा विचार करील, असें आतां जाहीर झालें आहे.

## दि पूना प्रायव्हेट मोटार ड्रायव्हर्स असोसिएशन, पुणें

वरील संस्थेचे नव्या वर्षाचे अध्यक्ष, श्री. ल. ब. भोपटकर, यांनीं ता. २६ ऑगस्ट रोजीं रात्रीं १० वाजतां संस्थेस भेट दिली संस्थेचे चेअरमन, श्री. बर्वे, यांनीं संस्थेची परिस्थिति त्यास सांगून, जमाखर्च व इतर कागदपत्र दाखविले. श्री. भोपटकरांनीं, व्यवस्थित रीतीनें चाललेल्या ह्या संस्थेचें कौतुक करून समाधान व्यक्त केलें व सुधारणेसंबंधीं सूचना केल्या.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें सरकारमान्य
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचें दुकान
रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा बर्फी**
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्ही पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हास सर्व स्वदेशी कागद का पुरवता येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2

विक्रीस तयार **] विक्षिप्तराव [** दुसरी आवृत्ति

लेखक—प्रो वा गो काळे

एका काळी फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे ' विक्षिप्तराव ' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळांमधून तें करण्यास फार उपयुक्त आहे. किंमत फक्त १० आणे.

## भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पाच रुपये

प्रथमत. अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वाचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरश. विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चुळवळ, हुडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं १५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ८ सप्टेंबर, १९३७ अंक ३६

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट
पांढरें-सत्त्व किंमत १। रु.
मलशुद्धी टॅबलेट्स किं ८आ

या दोन औषधाच्या मदतीनें पोटांतील सर्व विकार खात्रीनें बरे करतां येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, करपट ढेंकर येणें, छातींतील जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारांवर हा इलाज रामबाण गणला गेला आहे.

डॉ. बी. आर. गुणे
पुणें १

न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई
( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—
(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं, अहमदाबाद

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्याना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २.

RELIABLE STENOGRAPHERS
AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2

## THE DECCAN EDUCATION SOCIETY'S
## 3½% Debentures

The Deccan Education Society, Poona, at its general meeting held in August 1935 sanctioned the issue of 3½% Debentures of the amount of Rs 2,00,000 ( Two Lacs ) against the security of the general assets of the Society. Debentures worth Rs 1,30,000 have been already subscribed for privately

Debentures of the remaining amount of Rs 70,000 are now offered for subscription to the public. Each Debenture is of the value of Rs. 1,000; interest is payable half yearly at 3½% P. C on 1st April and 1st October These Debentures are repayable in 15 years from the date of first issue i. e. on the 1st of October 1950 at the latest. Further particulars may be had from the undersigned. Please apply to —

P. M. LIMAYE,
Secretary, D. E. Society,
Poona

Fergusson College
3rd September 1937.


# विविध माहिती

### शेतीच्या धंद्याचें उत्पन्न

इंग्लंड व वेल्स ह्यामध्यें दरवर्षी शेतकऱ्यांनीं उत्पन्न केलेल्या एकूण मालाची किंमत सुमारें २७० कोटि रुपये भरते. हिंदुस्थानातील शेतीच्या मानानें हा आकडा दर माणशीं किती तरी पट मोठा आहे हें सांगावयास नकोच

### बीर दारूचा व्यापार

बीर दारूच्या निर्गतीचे व्यापारात ग्रेट ब्रिटनचा एक तृतीयांश हिस्सा आहे जर्मनी व जपान हे देश खालोखाल ( २०% ) घेतात. ब्रिटनमधून ब्रिटिश वसाहतींस मुख्यत: बीरचा पुरवठा होतो, पूर्व आशियांतील व्यापार जपानकडे आहे. जर्मन बीर जगभर खपते !

### पोलादाचें उत्पादन

ग्रेट ब्रिटनमध्यें अलीकडे दर वर्षी सुमारें १२५ लक्ष टन पोलाद तयार होतें हिंदुस्थानातलें पोलादाचें वार्षिक उत्पादन ह्याच्या पधराव्या हिश्याइतकेंहि नाहीं.

### बँक ऑफ एथिओपियाच्या विसर्जनाचा कायदेशीरपणा

ॲबिसिनियामध्यें युद्ध उपस्थित होण्यापूर्वी बँक ऑफ एथिओपिया ( ॲबिसिनिया ) नें लंडन येथें नॅशनल बँक ऑफ इजिप्तमध्यें रोखे ठेवून दिले होते इटलीनें सदरहु बँकेचें विसर्जन केलें असल्याकारणानें बँक ऑफ इजिप्तनें ते रोखे परत करण्याचें नाकारलें. ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय खात्यानें ॲबिसिनियावर इटलीची मालकी असल्याविषयीं दाखला दिला, तो कोर्टानें मान्य केला. सहाजीकच इटलीनें बँक ऑफ एथिओपियाचें केलेलें विसर्जन ब्रिटिश कोर्टानें कायदेशीर मानलें पाहिजे, असें झालें. राष्ट्रसंघ ॲबिसिनियाच्या प्रश्नाचा मामुली पद्धतीनें एकीकडे विचार करीत आहे, त्याचवेळीं दुसरीकडे व्यवहारांत इटलीचें वर्चस्व केव्हांच प्रस्थापित झालेलें आहे !

### हिंदुस्थानांतील पाण्याचीं धरणें

पाण्याच्या धरणांचा वेगवेगळ्या दृष्टीनें अनुक्रम लावतां येईल धरणांतील पाणी वाहून नेणाऱ्या कालव्यांच्या व पाटांच्या लांबीचे दृष्टीनें सक्करच्या धरणाचा अनुक्रम पहिला लागतो, कारण त्यांतून निघणाऱ्या कालव्याची व पाटाची लांबी ६,५०० मैल भरते. धरणाचे बांधकामामधील दगड-चुन्याच्या घनफळाचे दृष्टीनें भाटघर येथील धरण जगांत मोठें ठरेल. तेथील धरणानें २ कोटि, १५ लक्ष घनफूट चुन्या-दगडाचें भक्षण केलें आहे भंडारदरा येथील विल्सन धरणाची उंची २७० फूट आहे. जगांत इतकीं उंच धरणें अन्यत्र फार नाहींत. बांधकामाच्या लांबीचे दृष्टीनें हैदराबाद संस्थानांतील निजामसागर धरण ( १६,००० फूट लांब ) पहिलें येईल, तर साठलेल्या पाण्याची परिणामकारक तुलना करावयाची म्हटल्यास मद्रास इलाख्यांतील मेतुर धरणाचा हात कोणास धरता येणार नाहीं. त्यांत ५ कोटि, ४७ लक्ष घनफूट पाणी मावतें.

### अहमदाबाद येथील गिरण्यांत रात्रपाळी

अहमदाबाद येथील सुमारें ४५ कपास कापडाच्या गिरण्यात रात्रपाळी चालू आहे. २५ हजार कामगार रात्रीच्या कामावर आहेत.

### इंडियन शुगर सिंडिकेट, लि.

हिंदी साखरेच्या धंद्याचें नियंत्रण करण्याकरिता स्थापन झालेल्या वरील कंपनीनें सुमारें ९० साखर कारखान्यांच्या शिलकी साखरेचा ताबा आपणाकडे घेतला आहे. ही साखर बाजारांत कोणत्या दरानें विकण्यांत यावी व मालाचा पुरवठा कसा व्हावा, ह्याविषयीं सर्व अधिकार सिंडिकेटकडे सोपविण्यात आलेले आहेत. साखरेचा भाव स्थिर व किफायतशीर रहावा, ह्याकरितां हा प्रयत्न आहे.

### बल्गेरिया देशांत शतायूंची मोठी संख्या

कोणत्याहि राष्ट्रात किंवा समाजात शतायूंची संख्या मोठी असणें हें त्यामधील लोकाच्या निकोप प्रकृतीचें स्पष्ट चिन्ह होय. बल्गेरियामध्यें चार हजार लोकांनीं शंभर वर्षांची वयोमर्यादा गाठली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. उघड्या हवेंत काम करणें, मित आहार आणि ताक पिण्याची सवय हीं सदरहु दीर्घायुष्याचीं कारणें देण्यात आलीं आहेत, तीं लक्षात ठेवण्यासारखीं आहेत

### वार्षिक सभा

पुणें, पोस्टस्, आर एम. एस. ॲन्ड टेलीग्राफस को-ऑ. अर्बन बँकेची वार्षिक साधारण सभा पुणें हेड पोस्ट ऑफिसचे इमारतींत रविवार ता. १२ सप्टेंबर, सन १९३७ रोजीं दुपारीं ३ वाजतां भरणार आहे.

### चित्रपट पहाणारांचा खर्च

दर आठवड्यास ग्रेटब्रिटनमध्यें साडेचार हजार सिनेमा गृहांत दोन कोटि लोक वीस हजार मैल लांबीचे चित्रपट पहातात आणि वर्षाकाठीं त्याप्रीत्यर्थ ५२ कोटि रुपये खर्चतात. साडेपांच कोटि रुपये किंमतीचे ब्रिटिश चित्रपट प्रतिवर्षी तयार होतात.

### मुबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| २२-८-३७ ते २८-८-३७ | ३६, २३, ९३८ |
| २९-८-३७ ते ४-९-३७ | ३५, ४८, १९२ |
| २१-९-३१ ते ४-९-३७ | ३, ०२, ९६, ०९, ७८८ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध-माहिती ... | ४४४ | ५ महागलेला कागद आणि वृत्तपत्राची हलाखी | ४४८ |
| २ मोठे आणि छोटे उद्योगधंदे ... | ४४५ | ६ विमा कंपन्यांचे पैसे व्याजी कसे लावण्यांत येतात? | ४४८ |
| ३ चित्रपटाच्या धंद्यास संरक्षण ... | ४४६ | ७ सहकारी चळवळ | ४४९ |
| ४ स्फुट विचार ... चीन आणि चांदी-सिंधी व्यापाऱ्यांचें धाडस-शरीरसंवर्धनाचें राष्ट्रीय महत्त्व-किनाऱ्यालगत आगबोटीची वहातूक—डेअरी तज्ज्ञांचा रिपोर्ट | ४४६ | ८ रा. ब. जोशी ह्यांचें तैलचित्र ... | ४५१ |
| | | ९ पांच व दहा रुपयाच्या चलनी नोटा ... | ४५१ |
| | | १० कपाशीच्या पिकांत वाढ | ४५२ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ४५३ |



# अर्थ

बुधवार, ता. ८ सप्टेंबर, १९३७


## मोठे आणि छोटे उद्योगधंदे

उद्योगधंद्याच्या खात्यावर करावयाच्या खर्चास मुंबईच्या प्रधानमंडळानें विधिमंडळांत मंजूरी मागितली तेव्हां झालेल्या चर्चेंत औद्योगिक प्रगतीबाबत अनेक भिन्नभिन्न विचार प्रकट करण्यांत आले प्रांतिक औद्योगिक खातें धंद्यांस सहाय देण्याचे कसे व कोणते यत्न करीत आहे, ह्याची माहिती त्या खात्याच्या अहवालांत प्रसिद्ध झाली असून श्री. अडवाणी ह्यानीं कांहीं आठवड्यामागें मराठा चेंबरमध्यें केलेल्या भाषणांत ती त्रोटक रीतीनें दिली होती आणि "अर्था"मध्यें तिचा सारांश आम्हीं वाचकांस सादर केला होता. सध्याच्या प्रांतिक प्रधानमंडळाचा विशेष कटाक्ष ग्रामोद्योगांवर आहे आणि जुन्या खेडेगांवीं धंद्यांचें पुनरुज्जीवन करण्याचें धोरण त्यानें स्वीकारलें आहे हेंहि सर्वश्रुत आहे. खादीचें उत्पादन व खप ह्यांस उत्तेजन देणें हें राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाचे एक महत्त्वाचें अंग होऊन बसलें असून खेडीं आर्थिक दृष्ट्या शक्य तितकीं स्वयंपूर्ण करणें हें त्याचें ध्येय आहे. विधिमंडळांत चर्चा झाली, तीमध्यें अर्थातच ह्या धोरणावर टीका होणें अपरिहार्य होतें आणि प्रधानमंडळासहि स्वतःच्या धोरणाचें स्पष्टीकरण व समर्थन करणें आवश्यक झालें. चर्चेमध्यें प्रकट झालेल्या विविध विचारांचा येथें थोडक्यात समाचार घेणें जरूर आहे.

चरख्यासारख्या जुनाट साधनांच्या सहायानें माल तयार होण्यास उत्तेजन देणें म्हणजे सध्यांच्या आधुनिक यांत्रिक सुधारणांच्या कालांत त्रेता युगांतल्या औद्योगिक पद्धतीस कवटाळणें होय आणि त्या योगानें जनतेच्या आर्थिक स्थितींत प्रगति होणें अशक्य आहे असें एक मत विधिमंडळांत व्यक्त करण्यांत आलें काँग्रेस आणि प्रधानमंडळ खादीवर भर देतें, तें केवळ राजकीय दृष्ट्या योग्य होईल, परंतु आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें पहातां चरख्याचा उद्योग श्रेयस्कर नाहीं, असेंहि प्रतिपादण्यांत आलें. मध्यम स्थितींतल्या वर्गांतील बेकारीचा प्रश्न सरकारनें हातीं घेऊन धंदे शिक्षणाची सोय करावी असें कांहीं सभासदांनीं सुचविलें. परदेशी कंपन्या व परदेशी माल ह्यांच्या स्पर्धेमुळें देशी उद्योगधंदे चालत नाहींत असें नसून सरकारच्या औद्योगिक संरक्षणाच्या धोरणाचा परिणाम स्वदेशी धंद्यांवर अनुकूल होत आहे असें युरोपिअन प्रतिनिधींनीं सांगितलें.

शेतकरी वर्गाची व खेडेगावांची उन्नति होण्यास लहान धंदे जगवणें व त्यांस उत्तेजन देणें अपरिहार्य व अगत्याचें आहे आणि ह्या करितांच काँग्रेस खादीच्या धंद्यास विशेष पाठिंबा देत आहे असा युक्तिवाद प्रधानमंडळाच्या वतीनें करण्यांत आला. मोठ्या धंद्याची हेळसांड आपण करणार नाहीं, पण छोटेखानी धंद्यांची आपण विशेष काळजी घेऊ असें मुख्य प्रधानांनीं सांगितलें. खेडेगांवी धंद्यांच्या परिस्थितीची चौकशी करून मालाचें उत्पादन व खप ह्यांविषयीं अनुकूल परिस्थिति पाहूनच त्यांसंबंधाचें आपलें धोरण सरकार ठरवील असें आश्वासनहि त्यानीं दिलें. वास्तविकपणानें पहातां मोठे कारखाने विरुद्ध छोटे धंदे असा आत्यंतिक विरोधाचा हा प्रश्न नाहीं. हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितींत ह्या दोहोंसहि जागा आहे आणि असली पाहिजे. यांत्रिक पद्धति व मोठ्या प्रमाणावर चालणारे कारखाने ह्यांस आमचे देशांत अमर्याद वाव आहे आणि त्यांचे बाबतींत आम्ही फार मागसलेले आहों अशी वस्तुस्थिति आहे. छोटेखानी व खेडेगांवी धंदे ह्यांस उत्तेजन देणें चुकीचें आहे असें मात्र ह्यावरून ठरत नाहीं. जपान, जर्मनी, इटली फ्रान्स इत्यादि देशांत कारखानी धंद्यांच्या बरोबरीनें घरगुती छोटेखानी धंदे चालतात, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. मोठ्या कारखान्यांत सुशिक्षितांस व खेडेगावी जनतेस भरपूर उद्योग मिळण्याची शक्यता कालमर्यादित आहे. तसेच, कित्येक धंदे लहान प्रमाणावर चालणें शक्य आणि इष्टहि आहे. शेतीच्या धंद्यास लहानसहान उद्योगाची जोड दिल्यावांचून तो धंदा आणि खेडेगावांतल्या बहुसंख्य जनतेचें जीवित चालणें अत्यंत कठीण होऊन गेलें आहे अशा स्थितींत, मोठ्या कारखान्यांवरच सर्व भर देणें चुकीचें आहे. त्याचप्रमाणें, खेडेगावें स्वावलंबी करण्याच्या ध्येयाचे मागें लागून मोठ्या प्रमाणावरील व आधुनिक यांत्रिक सुधारणांच्या सहायानें चालणाऱ्या धंद्यांकडे दुर्लक्ष करणें हेंहि तितकेंच अनहितकारक आहे. मुंबई इलाख्याच्या विशिष्ट परिस्थितीचाहि ह्यासंबंधांत काळजीपूर्वक विचार होणें अगत्याचें आहे. कोणत्याहि ध्येयवादास व्यावहारिकतेचें नियंत्रण घातलें नाहीं तर समाजहितदृष्ट्या तो अनुपकारकच ठरतो, हें येथें विसरून चालणार नाहीं मोठे आणि छोटे धंदे ह्यांचा मेळ घालूनच पुढें जाण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें पाहिजे. हे धंदे परस्परपूरक करण्यात तज्ज्ञांनीं व राजकर्त्यांनीं आपलें कौशल्य प्रकट केलें पाहिजे. मध्यवर्ती सरकाराचें धोरण, जागतिक स्पर्धा, विशिष्ट प्रांतिक परिस्थिति, भांडवलाचा पुरवठा, प्रचलित शिक्षणपद्धतींत सुधारणा होण्याची आवश्यकता, शहरी व खेडेगांवी लोकांत पसरलेली बेकारी इत्यादि अनेक बाबींची गुंतागुंत ह्या प्रश्नांत झालेली आहे आणि तो सोडवतांना व्यापक, व्यावहारी व दीर्घदर्शी दृष्टी ठेवणें अगत्याचें आहे. दीर्घ अनुभव आणि विचार ह्यांवर आधारलेले ह्या विषयावरील आपले विचार सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं नुकतेच पुढें मांडले आहेत आणि त्याचा योग्य परामर्श प्रांतिक प्रधान मंडळाकडून घेतला जाईल अशी आम्हांस आशा आहे.

## चित्रपटाच्या धंद्यास संरक्षण

### हिंदी सिनेमा धंद्यावर आक्रमण ?

हिंदुस्थानामध्यें चित्रपटशाळा, सिनेमा स्टुडिओ व सिनेमा-गृहें स्थापन करण्यास आपणांस सरकारनें सहाय करावें अशी ब्रिटिश धंदेवाल्यांची मागणी आहे आणि ह्याबाबत एक योजना आखून ती ब्रिटिश सरकारास सादर करण्याचा त्यांचा विचार आहे. अमेरिकन व जर्मन सिनेमावाल्यांनीं हिंदी फिल्मसचे धंद्यांत प्रवेश केला असून त्यांच्याशीं स्पर्धा करणें ब्रिटिश धंदेवाल्यांस जड जातें, अशी त्याची तक्रार आहे ब्रिटिशांनीं आपल्या भांडवलाच्या व तज्ज्ञाच्या जोरावर हिंदी लेखकांच्या कथांचें हिंदी नट-नटाकरवी चित्रीकरण ह्या देशांत आरंभिलें म्हणजे त्या उद्योगाची येथील स्वदेशी धंद्याशीं अनिष्ट स्पर्धा चालू होईल हें उघड आहे. अमेरिकन व जर्मन कपन्यानीं ह्याबाबत प्रगति केली असून, ब्रिटिश कंपन्यास त्यांची स्पर्धा भोवते ह्या मुद्यात तथ्य दिसत नाहीं. कारण, अद्याप त्या दिशेनें विशेषसे प्रयत्न झालेले नाहींत. हिंदी लोकांत चित्रपटांची अभिरुचि निर्माण करून सिनेमाचे धंद्याकरितां गिऱ्हाइकी तयार करण्याचें प्राथमिक काम देशी सिनेमा कपन्यानीं अगोदरच मोठ्या परिश्रमानें व पैशाची झीज सोसून केलें आहे.त्याचा फायदा विदेशी कपन्यांस मिळावा, हें सयुक्तिक होणार नाहीं. इंग्लंडमध्यें चांगले चित्रपट निर्माण झाल्यास हिंदी लोक त्यांस आश्रय देतील, परंतु देशी धंद्याची गळचेपी कृत्रिम मार्गानें करण्यात येऊं लागली, तर त्यास मात्र जोराचा विरोध होईल, ह्यांत शका नाहीं. मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष, सर फिरोज सेटना, ह्यांनीं उपरिनिर्दिष्ट कारवाईविरुद्ध आपलें मत स्पष्टपणें व्यक्त केलें आहे व हिंदुस्थान सरकारनें देशी धंद्याचें सरक्षण करण्याकरिता सदैव जागरूक राहिलें पाहिजे, असें सुचविलें आहे.

### ब्रिटिश बोलपटांविषयीं नियम

ग्रेटब्रिटनमधील चित्रपटाच्या धंद्यास उत्तेजन देण्याच्या हेतूनें सिनेमागृहांत दाखवण्यात येणाऱ्या चित्रपटामध्यें अमूक टक्के इतके पट ब्रिटिश बनावटीचे असेलच पाहिजेत असा तेथील सरकारनें निर्बंध घातला आहे. ब्रिटिश बोलपटांमध्यें सुधारणा व्हावी म्हणून तें सरकार आणखी एक पाऊल पुढें टाकण्याच्या विचारात आहे बोलपट भाड्यानें देण्याची परवानगी देताना लाब पटांचे बनावटींत दर फूट लांबीमागें १३ रुपये मजूरीप्रीत्यर्थ खर्च झालेच असले पाहिजेत आणि मजूरीची एकूण किमान रकम १ लक्ष रुपयापेक्षा कमी असता कामा नये असा नवीन नियम करण्यात येणार आहे कमी खर्चाचे आणि सामान्य प्रतीचे चित्रपट घेऊन कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेंत त्याची सख्या आणून ठेवावयाची ह्या चित्रपटाच्या धंदेवाल्यांच्या प्रवृत्तीस आळा घालून उच्च दर्जाचे बोलपट देशात तयार व्हावे, हा सरकारचा सदरहु नियम करण्यांत उद्देश आहे. अमेरिकन बोलपटांची बरोबरी अजूनहि ब्रिटिश बनावटीचे बोलपट करूं शकत नाहींत आणि ब्रिटिश धंद्यास उत्तेजन व सहाय देण्याचा कायद्याचा मूळ हेतु साध्य होत नाहीं, ह्याकरिताच वरील नवीन नियम करण्यात येत आहे

---

## स्फुट विचार

### चीन आणि चांदी

जपाननें चीनशीं युद्ध आरंभल्यापासून ह्या झटापटीचे जागतिक व्यापारावर काय परिणाम होतात इकडे सर्वांचें लक्ष लागून रहाणें स्वाभाविक आहे. युद्ध म्हणजे व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या व्यवहारात व्यत्यय हें ठरलेलेंच आहे. युद्धात पडलेल्या राष्ट्रास लढाऊ सामुग्रीच्या पुरवठा अव्याहत चालू असणें अगत्याचें असतें आणि तो पुष्कळ अंशीं बाहेरून आणावा लागतो सरकारी नैमित्तिक खर्चहि वाढतो आणि त्या प्रमाणांतच द्रव्याचा पुरवठा करणें आवश्यक होतें अतर्गत देवघेवीसाठीच पैसा मोठ्या प्रमाणांत खेळावा लागतो असें नसून बाहेरून येणाऱ्या मालाची भरपाई होण्याची तरतूद करावी लागते. ह्यासाठी हुंडणावळीचा दर अनुकूल रहाणें आवश्यक असतें आणि तो दर राष्ट्राची बाहेर पत आणि येणें असेल त्या मानावर अवलंबून रहातो. परराष्ट्राचें कर्ज काढून किंवा तेथें सोन्याचा सचय करून हें काम भागवावें लागतें चीनमध्यें चादीच्या नाण्याचा व चलन परिमाणाचा पूर्वापार चालत असलेला प्रघात आहे, आणि ह्या कारणानें आपल्या संग्रहातली चादी विकून त्या राष्ट्रास परदेशामध्यें पत उभारावी लागणार. चीनची चादी जगाच्या बाजारात ह्याप्रमाणें एकदम विक्रीस आली असता तिची किंमत उतरून इतर देशाच्या सराफी बाजारांत गोंधळ उडेल अशी भीति उत्पन्न होणें स्वाभाविक आहे हिंदुस्थानास चादीचा व्यापार आणि चादीचे भाव ह्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या वाटतात, कारण, जगाच्या चादीच्या बाजारांत ह्या देशास विशिष्ट स्थान आहे चांदीच्या भावात विशेष चलबिचल होऊं न देण्यात अमेरिकन राष्ट्राचें स्वहित गुरफाटलेलें आहे. आर्थिक दृष्ट्या प्रबल असलेल्या त्या राष्ट्रांत जागतिक बाजारांत येणारी चादी पचवण्याचें सामर्थ्य आहे चीनमध्यें २५-३० कोटि रुपयांच्या चांदीचा सग्रह आहे आणि त्याची विक्री अमेरिकेच्या सहायानें व्यवस्थित पार पाडण्याची योजना अमलात येत असल्याचें प्रसिद्ध झालें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

---

### सिंधी व्यापाऱ्यांचें धाडस

सिंधी व्यापारी मंडळानें प्रांतिक गव्हर्नर आणि व्हाइसरॉय यांचेकडे तारा पाठविल्या आहेत आणि चीन-जपानच्या युद्धामुळें शांघाय, पेकिंग व टीन्सटिन येथील आपली मालमत्ता व लोकांचे जीव धोक्यांत असल्यानें त्यांच्या सरक्षणाची तजवीज व्हावी अशी विनंति केली आहे सिंधी व्यापाऱ्याची धंद्यातील साहसाविषयीं प्रसिद्धी आहे. हिंदुस्थानांतला कलाकुसरीचा माल व "क्युरिओ" लांबलांबच्या देशांत नेऊन विकणें ह्या धंद्यात त्यांनीं अपूर्व यश संपादिलें आहे. चीनमध्यें सध्या चालु असलेल्या रणधुमाळीच्या प्रसंगानें ही गोष्ट प्रामुख्यानें पुढें आली आहे. तथापि, ती इतर प्रांतातील हिंदी लोकांनीं ध्यानांत बाळगण्यासारखी आहे. झांझिबारमध्यें हिंदी व्यापाऱ्यांनीं कसें बस्तान बसवलें ह्याची कल्पना तेथें चाललेल्या लढ्यावरून येत आहे. निरनिराळ्या वसाहतींमध्यें ह्याप्रमाणें विशिष्ट प्रांतांतल्या हिंदी रहिवाशांनीं आपल्या व्यापाराचें जाळें पसरलें आहे आणि तेथें मार्गांत येणाऱ्या अडचणींस ते तोंड देत आहेत आपला व्यापार स्वदेशाच्या बाहेर पसरवण्यांत धडाडी व साहस लागतें आणि तें अंगीं असल्यावांचून

हिंदी धंदेवाल्याची सांपत्तिक प्रगति होणें अशक्य आहे मुलतानी श्रॉफ ह्या नांवानें संबोधिले जाणारे धंदेवाले सिंधी सराफ आहेत आणि त्यानीं बँकिंग व सावकारी ह्या विषयींचे व्यवहार सर्व देशभर पसरले आहेत. त्यानीं इंपीरिअल बँकेसारख्या सस्थाशीं उत्तम जम बसवला आहे आणि फायदेशीर व्यवहार चालवले आहेत. हीं उदाहरणें महाराष्ट्रीयास बोधदायक झालीं पाहिजेत.

## शरीरसंवर्धनाचें राष्ट्रीय महत्त्व

राष्ट्रीयदृष्ट्या तरुण पिढीच्या शरीरसंवर्धनाचें महत्त्व फार मोठें असून उघड्या हवेंतले खेळ, पोहणें, कवाइत, नमस्कार व कुस्त्या इत्यादि साधनांनीं भावी समाजाचें शारीरिक सामर्थ्य वाढवण्याचे पद्धतशीर प्रयत्न आमचे इकडे होऊं लागले आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे विश्वविद्यालयानें शरीरसंवर्धनाचा कार्यक्रम कॉलेजामध्यें सक्तीचा केला आहे आणि महाराष्ट्रीय मडळासारख्या सस्था सामान्य जनतेच्या हितार्थ ह्या दिशेनें आस्थेवाइकपणानें झटत आहेत. पाश्चात्य देशांत तेथील राज्यकर्ते शारीरिक शिक्षणाच्या योजना आखून त्या अमलात याव्या म्हणून सढळ हातानें सहाय देत आहेत म्युनिसिपालिट्या व इतर स्थानिक स्वराज्य सस्था तिकडे ह्या कामात लक्ष घालतात आणि पैसा खर्च करतात ह्या प्रकारचा उपक्रम आमच्या प्रांतिक सरकारांनीं करणें आवश्यक आहे ब्रिटिश पार्लमेंटनें चालू सालीं शारीरिक शिक्षणाचा प्रश्न व्यावहारिक कृतीच्या क्षेत्रात आणून सोडला आहे आणि त्यासबंधातल्या योजनेस कायद्याचें व पैशाचें पाठबळ व्यवस्थित रीतीनें दिलें आहे. ह्या कार्यासाठी राष्ट्रीय सल्लागार मडळ स्थापण्यात आलें आहे आणि संस्थास द्यावयाच्या द्रव्यसहायाची व्यवस्था पाहण्यासाठी एक समितीहि नेमली गेली आहे येत्या चार वर्षांच्या अवधींत वरील योजनेप्रीत्यर्थ चार कोटि रुपये खर्चले जावयाचे आहेत स्थानिक स्वराज्याच्या व इतर सार्वजनिक सस्थास त्याच्या मान्य झालेल्या खर्चाचा मोठा हिस्सा सरकारी ग्रँट म्हणून देण्यात यावयाचा आहे पोषक अन्न आणि व्यायाम ह्याच्या सहायानें तरुण पिढी सुदृढ व कार्यक्षम बनवण्याचें राष्ट्रीय महत्त्व पाश्चात्य देशात ओळखलें जात आहे तेंच धोरण हिंदुस्थानात अंगिकारलें जावयास पाहिजे. ह्यासबधात लोकात जागृति झाली आहे, हें सुचिन्ह आहे.

## किनाऱ्यालगत आगबोटींची वहातूक

हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असूनहि त्यात मालाची वहातूक करणाऱ्या आगबोटी सर्वस्वीं परकीयांच्या मालकीच्या आहेत. आपला व्यापार शक्य तितका स्वतःच्या आगबोट मंडळयांच्या हातीं असावा अशी व्यवस्था समुद्रकिनारा असणाऱ्या देशानीं केलेली असते. आगबोटींच्या वहातुकीचा धंदा किफायतशीर आहे आणि राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीनें त्याचें विशेष महत्त्व असतें. आगबोटी बांधणें आणि त्यातून मालाची वहातूक करणें ह्या दोन्ही धंद्यात, ह्या देशास विस्तृत किनारा असूनहि हिंदी लोकास मुळींच स्थान नाहीं ही खरोखर लाजिरवाणी गोष्ट आहे किनाऱ्यालगतची मालाची व उतारूंची वहातुक तरी निदान आपल्या हातीं आणावी ह्या उद्देशानें अनेक हिंदी आगबोट मंडळयांनीं प्रयत्न केले आहेत, परतु त्या धंद्यात अगोदरच दृढमूल झालेल्या ब्रिटिश मंडळयांच्या स्पर्धेपुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं असा अनुभव आलेला आहे. हिंदी मालकीच्या मंडळयांस ह्या उद्योगांत सरकारचें सहाय मिळावें आणि त्याचा स्पर्धेपासून बचाव व्हावा ह्यासाठी आजवर प्रयत्न झालेले आहेत, पण त्यास यश आलेलें नाहीं श्री हाजी ह्यांनीं ह्यासबधांत मागें एक बिल मध्यवर्ती विधिमडळापुढें आणिलें होतें आणि त्याची थोड्या बदललेल्या स्वरूपातली पुनरावृत्ति सर अबदुल हलीम गझनवी ह्यांनीं आता असेंब्लीपुढें मांडलेल्या बिलानें काढली आहे. आगबोट मंडळयांमध्यें वहातुकीचे दराबाबत जी भयकर स्पर्धा चालते आणि जिच्या योगानें हिंदी मडळयांची प्रगति खुंटते, तिला आळा घालण्याची व्यवस्था व्हावी एवढाच आपल्या बिलाचा उद्देश आहे असें सर अबदुल ह्यानीं सांगितलें तरीहि सरकारनें त्यास विरोध केला कांहीं सभासदांच्या मतानें बिलाचा उद्देश व मर्यादा हीं अत्यत आकुंचित आहेत तर युरोपिअन सभासदांच्या मतें बिल अनावश्यक व अहितकारक आहे सध्या हें बिल सिलेक्ट कमिटीकडे गेलें आहे आणि त्यासबधानें सरकार शेवटीं कोणतें धोरण स्वीकारणार हें अजून निश्चित व्हावयाचें आहे.

## डेअरी तज्ज्ञांचा रिपोर्ट

हिंदुस्थानांतील शेती व दुधदुभतें ह्यासबंधीं चौकशी करून सुधारणा सुचविण्याकरिता सर जॉन रसेल व डॉ राइट ह्या दोन ब्रिटिश तज्ज्ञाची नेमणूक करण्यांत आली होती. एका पधरवड्याचे आंत त्याचा रिपोर्ट प्रसिद्ध होईल तज्ज्ञांनीं दिलेल्या मताचा सारांश येथें दिला आहे.—

( १ ) युरोपियन पद्धतीच्या डेअऱ्या स्थापन करण्यास हिंदुस्थानांत अनुकूल परिस्थिति नाहीं जलद वहातुकीच्या साधनांचा खेड्यापाड्यात असलेला अभाव, ही डेअऱ्यांचे मार्गांतील प्रमुख अडचण आहे. लोणी व साय ह्यापेक्षां तूप बनविण्याकडे जास्त लक्ष पुरविण्यात यावें. तुपासबधीं सशोधन चालू ठेवण्याची आवश्यकता विसरता कामा नये

( २ ) गव्हाविषयीं संशोधन होण्याविषयीं सर जॉन रसेल ह्याचा आग्रह आहे. चपातीचे बनावटींत सुधारणा करता येण्याजोगी आहे, असा त्याचा समज दिसतो. परदेशांतून दुभतीं जनावरें आणण्यापेक्षा देशी पैदास सुधारावी, अशी त्यांची शिफारस आहे. विश्वविद्यालयात आज प्रत्यक्ष सशोधन चालू नसलें, तरी त्यांस सरकारानें ग्रँट चालू ठेवावी; कारण संशोधनाच्या पूर्वतयारीचेंच आज विशेष महत्त्व आहे, असें दोघाहि तज्ज्ञाचें म्हणणें आहे

## " पाचोरा जामनेर " व " दौंड बारामती " रेल्वे क

पाचोरा जामनेर रेल्वे कपनीस मार्च, १९३७ अखेर सपलेल्या वर्षी ४७,१३९ रु नफा झाला, त्यातून ४½ टक्के दरानें ( प्राप्तीवरील कर न भरलेलें ) डिव्हिडंड वांटण्याचें कंपनीच्या साधारण सभेंत ठरलें

दौंड बारामती रेल्वे कंपनीस ४९,८०२ रु नफा झाला; तिच्या भागीदारासहि वरील दरानेंच डिव्हिडड मिळेल

दोनहि कपन्यांच्या वार्षिक सभा मुंबई येथें ता. १ सप्टेंबर रोजीं श्री. पुरुषोत्तम काशिनाथ गोडबोले ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरल्या होत्या.

## महागलेला कागद आणि वृत्तपत्रांची हलाखी

कागदाचे भाव एकाएकी चढल्यामुळें वर्तमानपत्राच्या धंद्यामध्यें गडबड उडून गेली आहे. वर्तमानपत्रवाले ज्याप्रमाणें कागदाच्या गिरण्यावर अवलंबून असतात त्याप्रमाणें ह्या गिरण्याचे मालकास त्यांचा मुख्य कच्चा माल जो लांकडाचा रांधा, तो तयार करणाऱ्या कारखानदारांवर अवलंबून रहावें लागतें. एका धंद्याचा पक्का माल तो दुसऱ्या धंद्याचा कच्चा माल अशी साखळी येथें लागल्यानें वर्तमानपत्राचे वाचक आणि कर्ते ह्याचा संबंध, लाकडाची जंगलें व राधा तयार करणारे कारखाने ह्याचे पर्यंत जाऊन भिडतो.

जंगलांतलीं झाडें

लाकडाचा राधा

वर्तमानपत्रास उपयोगी कागद

कागदाच्या गिरण्या

छापखानेवाले—वर्तमानपत्रकर्ते

ह्या प्रकारची सदरहु परंपरा आहे. आधुनिक वर्तमानपत्रात वापरण्यात येणारा कागद विशिष्ट प्रकारचा असून लाकडाचा विशिष्ट तऱ्हेचा रांधा हा त्यांतला कच्चा माल असतो. कागद मोठ्या प्रमाणात लागत असल्याकारणानें त्याचा पुरवठा ठराविक किंमतीस सारखा होत राहील अशी व्यवस्था वर्तमानपत्राच्या धंदेवाल्यास अगाऊ करावी लागते आणि भावासंबंधानें करार करावे लागतात. कागदाच्या कारखानदारांस राधा बनवणाराशींहि त्याच प्रकारचे करार करणें आवश्यक असतें. १९३८ सालांत व्हावयाच्या कागदाच्या पुरवठ्याबाबतचे करार अलीकडे झाले असून कागदाच्या कारखानदारांनीं वर्तमानपत्राच्या मालकाकडून कागदाच्या प्रत्येक टनास पूर्वी ठरलेल्या १२० रुपये दरापेक्षा २५ रुपये ज्यास्त मागितले आहेत आणि दर टनामागें २० ते २५ रुपये इतका वाढवा वर्तमानपत्रकर्त्यांस कबूल करावा लागला आहे. लाकडाचा राधा बनवणाऱ्या कारखानदारांनीं उत्तर युरोपात आपला संघ बनवून कागदाच्या गिरणीवाल्यावर चढीच्या किंमती लादण्याचा प्रयत्न केला असल्याची तक्रार आहे. कागदाच्या बनावटीच्या खर्चात काटकसर करण्यात आली आहे तरी तिच्या योगानें राध्याच्या भावातील वाढावा निघूं शकत नाहीं. राध्याच्या दोन मुख्य प्रकारांचे भाव एकदम कसे वाढले ह्याची कल्पना खाली दिलेल्या आकड्यावरून सहज येईल.

### दर टनास बंदरावरची किंमत

| | न्यूज सल्फाइट | | | मेकॅनिकल वेट | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पौंड | शिलिंग | पेन्स | पौंड | शिलिंग | पेन्स |
| जानेवारी, १९३६ | ६ | १७ | ६ | २ | २ | ६ |
| जुलै, १९३६... | ७ | १५ | ० | २ | ४ | ३ |
| डिसेंबर, ...१९३६... | ९ | ५ | ० | २ | ८ | ३ |
| जुलै, . . १९३७... | १६ | ५ | ० | ३ | १३ | ९ |

एक टन वर्तमानपत्री कागद बनवण्यास वरील दोन प्रकारांपैकीं पहिल्या जातीचा एक टन आणि दुसऱ्या जातीचा आठ टन इतका राधा लागतो. गेल्या जुलैमधील रांध्याच्या भावानें वृत्तपत्रीय कागदाच्या एका टनास ५० रुपये इतका उत्पादन खर्च वाढणार. ग्रेटब्रिटनमध्यें कागदाच्या गिरण्यांचा एका मालकीचा एक मोठा गट आहे व त्याचें एकूण भांडवल १५ कोटि रुपये आहे. त्यास राध्याच्या कच्च्या मालास वाढलेल्या दरानें रांधा विकत घ्यावयाचा म्हणजे एका वर्षाच्या त्याच्या पुरवठ्यास सुमारें २½ कोटि रुपये अधिक खर्च येणार. राध्याच्या किंमतींत पुढें आणखी वाढावा व त्या योगानें स्वतःचें नुकसान होऊं नये म्हणून वरील गिरणीवाल्यांच्या गटानें स्वीडनमधील राध्याचे दोन कारखाने आपल्या नियंत्रणाखाली आणले आहेत आणि न्यू फौंडलंडमधील लाकडाच्या खरेदीचा हक्कहि मिळवून ठेवला आहे.

लाखो प्रतींचा दैनिक खप असलेल्या वर्तमानपत्रांच्या मालकांस कागदाच्या चढलेल्या भावामुळें मोठी अडचण सोसावी लागत आहे. ह्यापैकीं एका मोठ्या मंडळीस प्रतिवर्षीं दीड लक्ष टन कागद लागतो आणि तिला कागदाच्या वाढलेल्या किंमतीनें सुमारें तीस लक्ष रुपये अधिक खर्च येईल. इतर मंडळयास ह्याच तऱ्हेनें कागदाचा पुरवठा करण्यांत जादा खर्च येणार आहे. वर्तमानपत्राच्या किंमती वाढवून हा वाढलेला खर्च भागवावा म्हटलें तर तें सहज करतां येईलच असें नाहीं. ग्राहकास कमी पानें देण्याचा काटकसरीचा एक मार्ग आहे आणि त्याचप्रमाणें हलक्या वजनाचा कागद वापरणेंहि शक्य आहे. गिऱ्हाइकें आकर्षून घेण्यासाठी ब्रिटिश पत्रें प्रतिवर्षीं एकूण अडीच कोटि रुपये खर्चतात, त्यास काट मारतां येऊन बचत घडवून आणता येईल; पण ह्या बाबतींत सर्व मंडळयाचें पूर्ण सहकार्य व्हावें लागेल. सारांश, कागद महागल्यामुळें वृत्तपत्राच्या धंद्यावर संकट ओढवलें असून त्यातून कसें सुरक्षित बाहेर निघावें ह्याची त्यास काळजी लागून राहिली आहे. ही ब्रिटिश वर्तमानपत्राची अवस्था आहे तेथें हिंदुस्थानातील वृत्तपत्राची काय हलाखी झाली आहे, हें सांगावयास नको. काहीं अपवाद सोडल्यास, देशी दैनिकें व साप्ताहिकें ह्यांचें हातावरचें पोट भरण्याची बहुशः मारामार असते आणि त्यात महागड्या कागदाच्या आपत्तीची भर पडली आहे.

## विमा कंपन्यांचे पैसे कसे व्याजीं लावण्यांत येतात ?

हिंदी विमा कंपन्यांवर नियंत्रण घालणाऱ्या कायद्याचा मसुदा सध्या मध्यवर्ती कायदेमंडळांत चर्चिला जात आहे. कंपन्यांनीं आपला पैसा कोणत्या रीतीनें गुंतवावा, सरकारी रोख्यात त्यांनीं किती पैसे घालावे, इत्यादि मुद्दे ह्यासंबंधात महत्त्वाचे आहेत. देशी कंपन्या आपले पैसे कोणकोणत्या ठिकाणीं कसकशा प्रमाणात गुंतवितात, ह्याची माहिती खालील आकड्यावरून होईल. हे आकडे सर्वांत ताज्या सरकारी अहवालातील आहेत.—

| | % |
|---|---|
| स्थावर मालाचे गहाणावर कर्जें | ३·८ |
| पॉलिसीवर कर्जें | ८·९ |
| स्टॉक्स व शेअर्स कर्जें | ०·५ |
| सरकारी रोखे | ५१·८ |
| म्युनिसिपल रोखे व डिबेंचर्स | १२·२ |
| हिंदी कंपन्याचे भाग | ५·३ |
| जमीन व घरें | ५·२ |
| इतर | १२·४ |
| | १००·० |

### लोखंडाचें उत्पादन

जगातल्या सर्व खाणींतून जेवढें लोखंड निघतें, त्यातलें सुमारें १४ टक्के ब्रिटिश साम्राज्यातल्या देशांमध्यें काढण्यात येतें. तथापि, गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमध्यें बाहेरच्या देशातून जेवढें लोखंड आयात करण्यात आलें, त्यातला दहावा हिस्साच काय तो ब्रिटिश साम्राज्यामधील देशामधून गेला. लोखंडाच्या उत्पादनात हिंदुस्थानचा नंबर चांगला वर लागतो.

## सहकारी चळवळ

### नांदगांव येवल–तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन लिमिटेड, नांदगांव.

साळाबादप्रमाणें युनियनला सामील असलेल्या सोसायट्यांच्या वार्षिक साधारण सभा भरल्याः—

१ माडवड को. क्रे. सो. ता. नांदगांव ता. १७-८-३७ रोजीं.
२ गौंडगांव „ ता. येवला ता. १८-८-३७ „
३ सुरेगांव „ „ ता. १९-८-३७ „

वरील तिन्ही ठिकाणीं मे. एस. एस जोशी बँक इन्स्पेक्टर-साहेब व मे. के. के. कोष्टी सुपरवायझरसाहेब व यू. क. मे. भाऊ बाबाजी पाटील हे हजर होते.

४ नागडे को. के. सो. ता. येवला ता. २०-८-३७
५ नगरसुल लाडवंजारी „ „ „ ता. २१-८-३७

वरील दोन्ही ठिकाणीं मे. के. के. कोष्टी सुपरवायझरसाहेब हजर होते.

वरीलपैकीं नगरसुल लाडवंजारी को. क्रे सो. ची सभा भरवून सुपरवायझर यांनीं सहकारी तर्फे त्यांना समजावून देण्याचा प्रयत्न केला व सोसायटीची आस्था त्यांच्या मनावर बिंबविली व नवीन सुधारलेले शेअरपद्धतीचे पोटनियम–पत्रक (१) सोसायटीनें मोठ्या खुल्या दिलानें स्वीकारण्याचा ठराव पास केला.

---

### पुणें पोस्टस्, आर. एम. एस. आणि टेलिग्राफस को. अर्बन बँक लि., पुणें

(वार्षिक सभा : ता. १२-९-३७)

सन १९३६-३७ अखेर वरील बँकेच्या सभासदांची संख्या ९८१ असून भाग भांडवल २५,८४५ रुपयांचें आहे. रिझर्व्ह फंडांत ८,३२० रु. आहेत. बँकेकडे ४४½ हजारांच्या ठेवी असून ९९½ हजारांचीं कर्जे येणें आहेत. काटकसर फंड ४८ हजारांवर आहे. वर्षअखेर बँकेस २,५९२ रु. १ आ. ६ पै नफा झाला, त्यातून १,८८९ रु. १ आ. ० पै इतक्या रकमेचा डिव्हिडंड (७½ %) देण्याकडे विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. सध्या बँकेची कचेरी ज्या भाड्याचे जाग्यांत आहे, ती जागा पोस्ट खात्यास लागण्याचा संभव आहे. स्वतःची इमारत बांधण्याचे हेतूनें मोफत अगर अल्प मुदतीच्या भाड्यानें पुणें हेड पोस्ट ऑफिसचे आवारात जागा मिळण्याविषयीं खात्याकडे बोर्डानें मागणी केली आहे. ती मान्य झाल्यास ६ ते ७ हजार रु. खर्चून इमारत बांधण्याकरितां बोर्ड साधारण सभेची मंजुरी मागत आहे. बँकेची प्रगति समाधानकारक होत असून, तिची स्वत.ची इमारत असणें इष्ट आहे.

---

### पुणें मर्चंट्स को बँक लि.

(वार्षिक सभा ता. १२–९–३७)

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ६४८ असून वसूल झालेलें भांडवल ६४,८४० रु. व ठेवी २,८२,३८० रुपयांच्या आहेत. रिझर्व्ह फंड ११ हजारांचा आहे व इतर फंड ६½ हजारांचे आहेत. सभासदाकडे असलेल्या कर्जाची रकम ३,०७,०८१ रु. आहे. थकबाकीचें प्रमाण वाढलें आहे. ही बाकी शक्य तों कमी करण्याचें बोर्डाचें धोरण आहे. १९३६-३७ सालअखेर बँकेस ८,५९८ रु. १५ आ. ५ पै निवळ नफा झाला, त्यांतून ६ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याकरितां ३,७२० रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेच्या स्थापनेपासून कौन्सिलच्या अध्यक्षाचे जागेवर काम करीत असलेले श्री. न. चिं. केळकर हे सेवानिवृत्त झाले, त्या समयानें त्यांचा सत्कार मोठ्या समारंभानें नुकताच करण्यांत आला.

---

### खेड अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक, लि.

वरील बँकेची वार्षिक साधारण सभा २९-८-३७ रोजीं भरली होती. सन १९३७-३८ सालाकरितां रा. रघुनाथ वामन जोशी चेअरमन म्हणून निवडून आले. सन १९३६-३७ च्या अहवाला-वरून बँकेचें शेअर भांडवल ४१७० रु. व रिझर्व्ह फंड, संशयित कर्ज फंड, डिव्हिडंड ईक्वालायझेशन फंड व स्पेशल फंड मिळून १३८९ रुपयांचे असून स्वीकारलेल्या ठेवींची रक्कम १५१०५ रु. आहे. सालअखेरीस कर्जाची येणें बाकी १८,२५७ रु. असून इन्व्हेस्टमेंट म्हणून रु. १६०० गुंतविले आहेत. थकबाकीचा आंकडा (४२८४ रु.) कमी करणेचा पंच मंडळींचा सतत प्रयत्न चालू असल्याचा खुलासा अहवालाचे रिपोर्टांत नमूद आहे. बँकेस चालू सालीं ७७७ रुपये नफा झाला आहे भागी-दारास ५½ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरविलें आहे.

---

### मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

असें जाहीर करण्यांत येतें कीं बँकेची २६ वी सर्व साधारण सभा मंगळवार ता. २१ सप्टेंबर १९३७ रोजीं दुपारीं २-३० वाजतां (स्टँ. टा) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसात-आपोलो रस्ता, मुंबई–खालील कामाकरितां भरविण्यात येणार आहे

(१) ३० जून १९३७ अखेर संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले हिशेब व डिरेक्टराचा रिपोर्ट स्वीकारणें
(२) नफ्याची वाटणी (डिव्हिडंड) ठरविणें.
(३) डिरेक्टराची निवडणूक करणें.
(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.
(५) डिरेक्टरांच्या निवडणुकी संबंधीचे नियमांत खालील प्रमाणें दुरुस्ती करण्यासंबंधींचा विचार करणें व योग्य वाटल्यास त्याचा स्वीकार करणें:—

(अ) नियम नं. ३ पॅराग्राफ नं. ३ च्या पूर्वी खालीलप्रमाणें नवीन वाक्य घालणें
"शेतकरी संस्थातर्फे निवडून येणाऱ्या डिरेक्टर्सची निवडणूक एक वर्षाआड करण्यांत येईल"
(ब) नियम नं. ५, ओळ १ मधील "प्रत्येक वर्षी" या शब्दाऐवजीं "एक वर्षाआड" हे शब्द घालावे.
(क) नियम नं. ७, ओळ १ मधील "दर वर्षी" या शब्दाऐवजीं "एक वर्षाआड" हे शब्द घालावे.
(ड) नियम नं. ३ मध्यें ज्या ज्या ठिकाणीं "सह्यागार" असा शब्द आला असेल त्या त्या ठिकाणीं "शाखा" हा शब्द घालावा.

मुंबई, ता. १८ ८ ३७.

बोर्डाच्या हुकुमावरून,
वैकुंठ ल. मेहता.
मॅनेजिंग डिरेक्टर.

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्सफर बुकें) २२ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर १९३७ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

---

## गव्हर्नमेंट सर्व्हंट्स महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें

### नवें कार्यकारी मंडळ

वरील बँकेची वार्षिक साधारण सभा ता. २९ ऑगस्ट १९३७ रोजीं होऊन खालील सभासद नवीन कार्यकारी मंडळांत निवडून आले.

**सल्लागार मंडळ**—( १ ) श्री. ज्ञा. उ. मांढरे, ( २ ) प्र. रा फडणीस व ( ३ ) रा म. येरी.

**कार्यकारी मंडळ**—( १ ) श्री. ग. गं आळेकर, ( २ ) प्र वा. गुंजटकर, ( ३ ) मु शं गुते, ( ४ ) द्वा ज कावळे, ( ५ ) वि न खुरुद, ( ६ ) गो गु कुळकर्णी, ( ७ ) चि व लागवणकर, ( ८ ) रा. य. नाईक व ( ९ ) पु ग. विद्वांस

**हिशेब तपासनीस**—( १ ) श्री वा. शं गोरे व ( २ ) दा मो मोघे.

---

### प. खानदेश जिल्हा को इन्स्टिटयूट, धुळें

ता. १ व ३ ऑगष्ट १९३७ रोजीं अनुक्रमें धुळें व नंदुरबार येथें मे. आसि. रजिष्ट्रारसाहेब को सोसायटीज्, खानदेश विभाग, यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी खात्यातील सर्व ऑफिसर्स, प्रोपागँडा ऑफिसर, सुपरवायझर्स व बँक इन्स्पेक्टर्स यांची फील्डवर्कर्स कॉन्फरन्स भरली होती

या सभेमध्यें वाईट सोसायट्या कशा सुधारतां येतील, चालू वर्षाकरिता कर्ज देण्याचें धोरण, थकलेली कर्जबाकी लवकर कशी वसूल करतां येईल या व इतर अशाच महत्त्वाच्या प्रश्नांचा उहापोह करण्यांत आला मे. आसि. रजिष्ट्रारसाहेबांनीं आलेल्या सर्व मंडळींना खुल्या अंत:करणानें व मनमोकळेपणानें आपापले विचार मांडण्याची मोकळीक दिली होती त्यामुळें सर्वांनीं मनापासून सभेंत भाग घेतला व सर्व प्रश्नांचा सर्वतोपरी विचार केला गेला

## नागपूर प्रीमियर को. हौ. सोसायटी लि., नागपूर

नागपूर प्रीमियर को. हौसिंग सोसायटीच्या सभासदाची संख्या अहवालाचे वर्षीं ६१ नी वाढून ती २४६ झाली. भाग भांडवल २३,९०० रु. नीं वाढून तें ८३,१०० रु झालें. सोसायटीकडील कायम ठेवींत ५० हजारांची भर पडली. तिला ठेवींवर द्यावा लागणारा व्याजाचा दर इतर जुन्या व मोठ्या बँकास द्याव्या लागणाऱ्या दराप्रमाणेंच अल्प आहे, ही उल्लेखनीय गोष्ट आहे प्रातिक सहकारी बँकेच्या कर्जाचे हप्त्यापेक्षा सोसायटीनें सुमारें ३६½ हजार ज्यास्त रुपये बँकेकडे भरणा केलेले आहेत. भागीदारास ५% दरानें डिव्हिडंड वाटण्याकरिता ३७०४ ६-९ रु. मंजूर झाले. सोसायटीनें केलेली कर्जफेड, जिकडे अल्प व्याजाच्या दरानें येणारा ठेवींचा ओघ, तिनें भक्कम तारणावर दिलेल्या कर्जाची सुरक्षितता, ह्या सर्वच गोष्टी अभिमानास्पद असून, सोसायटीच्या भरभराटीच्या निदर्शक आहेत

### नाशिक जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

( वार्षिक सभा. ता १२-९-३७ )

वरील बँकेकडे १९३६-३७ मध्यें १ लक्ष, ८२ हजार रुपयाचे कर्जमागणीचे ८६ नवीन अर्ज आले एकूण मंजूर झालेल्या ५०½ हजार रुपयाच्या कर्जापैकीं १७ सभासदांना २४ हजार रु कर्ज वाटण्यांत आलें आहे यापैकीं २५० रु खेरीज बाकी सर्व कर्ज जुन्या कर्जफेडीकरिता दिलेलें आहे सावकारांकडून ३½ हजार रुपयांची सूट बँकेनें मिळवून दिली गेल्या सालीं बँकेस १,००० रु. तोटा आला होता, अहवालाचे वर्षांतील तोटा ७६० रु. आहे बँकेची प्रगति समाधानकारक होत असून, कर्जाची संख्या वाढेल, त्या मानानें बँकेस आपला तोटा बऱ्याच मोठ्या प्रमाणात कमी करता येईल व हळुहळू ती स्वतःचे पायावर उभी राहू शकेल. अहवालाचे वर्षी सरदार एन् जी. विंचूरकर, बी ए, एम एल ए. हे बँकेचे अध्यक्ष होते.


लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा



" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.



**१२ वर्षे पुण्यांत लोकादरास पात्र झालेले**

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.

बुधवार चौक, पुणें

### इतिहास मंडळांत रा व जोशी ह्यांचें तैलचित्र

कै. वा. रावबहादुर गणेश व्यंकटेश जोशी हे भारत इतिहास मंडळाचे पहिले अध्यक्ष होते आणि त्यांच्या स्मरणार्थ प्रो. पिंपळखरे ह्यांनीं तयार केलेल्या तैलचित्राचें अनावरण, प्रांतिक विधि मंडळाचे अध्यक्ष, श्री. मावळणकर, ह्यांच्या हस्तें गेल्या रविवारीं झालें. श्री. तात्यासाहेब केळकर, प्रो काळे, प्रो. पोतदार, श्री. शंकरराव वैद्य व अध्यक्ष ह्यांनीं रावबहादुर जोशाच्या गुणाचें वर्णन केलें रावबहादुर जोशी हे न्यायमूर्ति रानडे ह्यांचे शिष्य असून आपल्या गुरूंप्रमाणेंच विद्याव्यासंगी व निगर्वी होते. इतिहास व अर्थशास्त्र ह्या विषयाचा त्यांस विलक्षण नाद असून भारतीय अर्थशास्त्राचें त्यांनीं सूक्ष्म अध्ययन केलें होतें. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत इंग्लंडमध्यें मान्य झालेलें व आमचेकडील कॉलेजात शिकवलें जाणारें अर्थशास्त्र निरुपयोगी असल्यानें हिंदी उद्योगधंदे व व्यापार ह्याच्या अभिवृद्धीस पोषक होईल असेंच अर्थशास्त्र येथें आवश्यक आहे, ही न्यायमूर्ति रानड्यांची शिकवण रावबहादुर जोशांच्या मनावर पक्की बिंबली होती. ह्या कारणानें इतिहास व अर्थशास्त्र ह्याचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास केला होता. राज्यकारभार व आर्थिक व्यवसाय ह्याविषयीं त्यास जितकी बारीक माहिती असे तितकी सरकारी अधिकाऱ्यासहि नसे. त्यामुळें त्यांचे लेख आदरणीय होत. वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्यासाठी चार हिंदी पुढारी विलायतेस गेले होते, त्यामध्यें ना. गोखले हे एक होते. न्यायमूर्ति रानड्यांच्या सांगण्यावरून त्यांनीं रावबहादूर जोशी ह्यांच्याशीं विचारविनिमय करून आपली साक्ष तयार केली. हिंदी अर्थशास्त्राची माहिती असणारी अभ्यासू मंडळी आजच्या परिस्थितींत आपणास विशेषच हवी आहेत, तेव्हा तरुण पिढीनें रावबहादुर जोशांच्या आस्थेवाइक वृत्तीचें अनुकरण अवश्य केलें पाहिजे. प्रो काळे ह्याचें वरील आषयाचें भाषण झालें. श्री. मावळणकर ह्यांनीं रावबहादुर जोशी याची साधी रहाणी, उच्च ध्येयवादित्व व करारीपणा इत्यादि गुणाची प्रशसा केली आणि राजकीय मतभेद असले तरी सर्वांनीं एकमेकाविषयीं आदर बाळगून राष्ट्राच्या प्रगतीस सहाय करावें असें सांगितलें

---

### पांच व दहा रुपयांच्या चलनी नोटा

( मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजच्या चिटणिसानीं कंट्रोलर ऑफ करन्सी, मुंबई, ह्यास एक पत्र पाठवून, पाच व दहा रुपये किंमतीच्या चलनी नोटांसबधीं सूचना केल्या आहेत उपरिनिर्दिष्ट पत्रातील सूचनांचा सारांश येथें दिला आहे. )

( १ ) पांच रुपयाच्या नोटेचा नंबर तिच्या मध्यावर छापलेला असतो. नोटाची घडी करण्याची लोकास सर्वसाधारणपणें सवय असते व ह्यामुळें नोटावरील नंबर पुसट होतो. नवीन नोटा काढताना, हा नंबर परस्पर समोरच्या दोन कोपऱ्यात छापण्यात यावा. नोटीचे दोन तुकडे झाले तरी त्या तुकड्याचे बदली नवीन नोट त्यामुळें मिळूं शकेल.

( २ ) पांच रुपयाच्या नोटेप्रमाणें दहा रुपयांच्या नोटेवरहि नंबर दोन ठिकाणीं छापण्यांत यावा.

( ३ ) ब्रह्मदेशाकरितां काढलेल्या नोटांवरील त्या सबधांतील सूचना पुरेशी ठळक दिसत नाहीं. नोटाशीं नेहमी व्यवहार असणारासहि हीं अक्षरें चटकन दिसत नाहींत. ब्रह्मदेशाच्या नोटा सहज ओळखल्या जाव्या, अशी त्याची छपाई होणें जरूर आहे.

( ४ ) वरील सूचना योग्य त्या अधिकाऱ्याकडे जरूर त्या तजविजीसाठीं पाठविण्यांत याव्या.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगाव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोल ( „ „ |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## कपाशीच्या पिकांत वाढ

—:०:—

**मागणी व पुरवठा ह्यांत तफावत पडेल काय ?**

कपाशीची लागवड जगामध्यें ज्या प्रमाणांत वाढली आहे, त्या प्रमाणात तिचा उठाव होण्याचा संभव नाहीं. ह्या कारणानें बराच माल शिलक पडून राहण्याची भीति आहे

जगांतील पांची खंडांमधील देशांत कपाशीची लागवड गेल्या सालाचे मानानें यंदा ज्यास्त झाली आहे. १९३६ सालाशीं तुलना केली असता, अमेरिकेंत कपाशीनें १० टक्के अधिक क्षेत्र व्यापलें आहे, इजिप्तमधील लागवड १५ टक्क्यांनीं वाढली आहे व हिंदी कपाशीचें उत्पादनहि ५ टक्के अधिक भरेल, अशी अपेक्षा आहे चीन व ब्राझील ह्या देशात अशीच परिस्थिति आहे. इतर देशहि आपल्या देशांत कपाशीच्या पिकास प्रोत्साहन देत आहेत

येत्या मोसमांतील उत्पादनाचा अंदाज खालीलप्रमाणें करण्यांत आला आहे:—

कपाशीच्या पिकाचें अदाजी उत्पादन

( १ गासडी=४७८ पौंड वजन )

| देश | गासड्या ( हजार ) |
|---|---|
| अमेरिका | १५,५०० |
| हिंदुस्थान | ५,६०० |
| चीन | ३,८०० |
| रशिया | ३,२५० |
| ब्राझील | १,९०० |
| इजिप्त | २,२०० |
| आफ्रिका | ८०० |
| एकूण | ३५,२०० |

जगातील एकूण कपाशीच्या उत्पादनात अमेरिकेचें महत्त्व केवढें मोठें आहे, ह्याची कल्पना वरील आकड्यांवरून येईल.

गेल्या वर्षी कपाशीचा खप झाला तेवढा येत्या मोसमात होण्याची खात्री वाटत नाहीं. आंतरराष्ट्रीय व्यापारावरील कृत्रिम बंधनें, स्थैर्याची अशाश्वती, तुटीचीं अंदाजपत्रकें, राष्ट्रसंरक्षणा-करितां युद्धाची पूर्वतयारी, इत्यादि अनेक अडचणी अद्याप प्रगतीच्या मार्गांत आहेत मागणीचे मानानें कपाशीचा पुरवठा जास्त होण्याचा सध्या तरी रग दिसतो. एकाद्या देशातील पिकाची प्रतिकूल हवा पाण्यामुळें नासाडी झाली, तरी एकूण पुरवठ्यावर त्याचा मोठा परिणाम घडण्याचा संभव नाहीं. ह्या कारणानें कपाशीच्या बाजारभावास तेजी येण्याचे मार्गांत अडथळे आहेत मागणी व पुरवठा ह्यामध्यें फार मोठी तफावत पडल्यास बाजारभाव मदीचेच रहातील हें उघड आहे.

### हिंदुस्थान सरकारचें कर्ज

हिदुस्थान सरकारास एकूण ११६० कोटि रुपये कर्ज आहे. महायुद्धाकरिता सरकारनें दिलेली देणगी, नव्या दिल्लीची मांडणी, विजगापट्टम बदरावर केलेला खर्च, इत्यादि अनुत्पादक कार्या-प्रीत्यर्थ १७८ कोटि रुपयांचें कर्ज उभारण्यात आलें, त्यावर व्याज सुटत नाहीं एकूण कर्जापैकी ४८७ कोटि रुपये हिदुस्था-नांत उभारण्यांत आलेले असून बाकीचें कर्ज ग्रेट ब्रिटनमध्यें काढण्यांत आलें आहे.


**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा गो काळे व प्रो द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ३००, किंमत तीन रुपये
ह्या ग्रथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोप्लाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८४,१०० |
| रिझर्व्ह फड | ४,८१९ |
| इतर फड | १,४०९ |
| मुदतबंद ठेवी | १,९२,९२७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,८४२ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,७९,७८५ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४१,९४७ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्र-व्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... ... | १२०—६ |
| ५% (१९३९-४४) लोन ... ... .. | १०५-१४ |
| ४% १९४३ .. ... ... .. | १०८—६ |
| ३½% चिनमुदत ... ... .. ... | ९७—४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६-१३ |
| २¾% १९४८-५२ .. ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरटी व लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४४—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११७—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ६% ... | ३१—२ |
| इंपीरिअल बँक (५०) १२% ... ... | १५४०—० |
| बँबि मॉ को. बँक (५०) ५% ... ... | ६१—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४¾% ... ... | १०३—८ |
| पाचोरा-जामनेर (१००) ४½% ... ... | ९५—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९६०—० |
| तापी व्हॅली (५००) ७½% .. ... ... | ७७३-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाबे ट्रॅम्वे ऑर्डि (५०) १०% ... ... | १३६—९ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २७६-१४ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि (१०००) ५½% ... ... | १४२२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि (१०००) ७½% ... ... | १६५५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ८ रु. ... ... ... | १७१-१४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु ... ... | ५०—० |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु ... ... ... | २९-१० |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु ४ आ .. | ४४—४ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु ७५ रु बोनस ... | ४,९००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २०१—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे (२००) १५ रु २ आ. ... | १६९—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि (७५) १० रु ... ... | ३४६—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु ३ आ. ६ पै ... | १५९२—८ |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४-११½ |
| चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१—४ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—८ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | १०-१४ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | १०—८ |


# आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है. वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाऊस भी मिलेगा. नियम बहुत सरल है (नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें).

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

**दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.**

(स्थापित १९१६) अमीनाबादपार्क-लखनऊ

# S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

# स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकाली गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करू शकत नाहींत किंमत बाटलीस रु २. ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्च माफ

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** (डिपार्टमेंट न ६)

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

# K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें - सरकारमान्य
**झारापकर टेलरिंग**
**कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचें दुकान
रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा बर्फी**
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयांची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

# ऐक्य

ऐक्य संपादन मंडळाचें नियतकालिक
**दर रविवारीं प्रसिद्ध होतें**
संपादकः—न. गं. जोशी बी. ए., एलएल. बी.
वा. व. फक्त २ रु. १२ आ.
सांवांत २ रु.
स्वतंत्र व निःपक्षपाती राजकारण, सामाजिक व औद्योगिक वगैरे विषयांवर माहितीयुक्त व अभ्यासपूर्ण लेख, महत्त्वाचें व विविध शहर, जिल्हा आणि संस्थानवृत्त आणि प्रसंगोचित व नानाविध चित्रें याबद्दल या पत्राची प्रसिद्धि आहे.
जाहिरातीचें उत्तम साधन
लिहा किंवा भेटा.—मॅ. ऐक्य, सातारा

**डॉ. जोशी** म्हणजे **जी. जी. ब्रदर्सचीं मलमें**—त्वचा रोगांवर अत्यंत लवकर गुण देतात.
डबनास १॥रु. गरियास फुकट १८९ सदाशिव, पुणें.

# DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals
(4) We procure any book published any where and supply it at publisher's price

# The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
**The Only Book Depot of its Kind in India.**
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

मनपसंत काम | **रिसबूड ब्रदर्स-टेलर्स** सदाशिव हौदानजीक : : : पुणें | वक्तशीरपणाची गॅरंटी

# माधव सोमण ब्रदर्स

पावसाळी कोट व छत्र्या — धोतरजोडी, शर्टिंग व कोटिंगचा भरपूर स्टॉक
लक्ष्मी रोड : : : : : पुणें २


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

' अर्थ एव प्रधान ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १५ सप्टेंबर, १९३७ अंक ३७

## स्पेशल स्टमक ट्रीटमेंट
## पांढरें-सत्त्व
किंमत १। रु.

मलशुद्धी टॅबलेट्स किं ८आ

या दोन औषधाच्या मदतीनें पोटातील सर्व विकार खात्रीनें बरे करतां येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, करपट ढेंकर येणें, छातीतील जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे

डॉ. बी. आर. गुणे
पुणे २

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारी १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

## न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई
( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वात मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो —
(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री डी के जोगळेकर, बी ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वत च्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४, किंवा प्रथम ६।८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि .
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई
ब्रँच —लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २

## संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टकल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग-कं., अहमदाबाद

RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2

# विविध माहिती

### ऑस्ट्रेलियाच्या स्थापनादिनाचा उत्सव

ऑस्ट्रेलियाच्या वसाहतीच्या स्थापनेस येत्या वर्षी १५० वर्षे पुरीं होतात, त्या निमित्तानें सिडने येथें उत्सव करण्यात येणार आहे १७७० सालीं कुकनें ह्या देशाच्या किनाऱ्याची पहाणी करून ब्रिटिश निशाण उभारलें होतें, तथापि स्थायी वसाहत होण्यास कांहीं वर्षे लागलीं. १७८८ हें वर्ष ऑस्ट्रेलियाचें स्थापना सवत्सर समजलें जातें १९३८ सालीं साजरा व्हावयाच्या उत्सवाकरिता प्रसगास उचित असे पाहुणे ग्रेट ब्रिटनमधून बोलावण्यात आले आहेत, परतु अद्याप निमत्रणाच्या स्वीकाराबाबत ऑस्ट्रेलियाचे पदरात निराशाच आलेली आहे

### स्त्री कैद्यांसाठी नवे कपडे

स्त्री कैद्यामध्यें स्वाभिमानाची जाणीव व्हावी, ह्या उद्देशानें ग्रेट ब्रिटनमधील तुरुंगांतील स्त्री कैद्यांस वापरण्यासाठी द्यावयाच्या कपड्यात सुधारणा करण्यात आली आहे ह्या नव्या कपड्याची शिलई ज्यास्त चागली असून रगहि अधिक आकर्षक आहे

### ज्यू पुस्तकविक्रेत्यांवर निर्बंध

ज्यू लोकावरील जर्मन सरकारची मोहीम अद्याप जोरात चालूच आहे ज्यू पुस्तकविक्र्यानीं बिगर-ज्यू गिऱ्हाइकाशीं व्यवहार करता कामा नये, असा हुकूम आतां निघाला आहे "फक्त ज्यू लोकांसच पुस्तकें विकलीं जातील, आपण ज्यू असल्याविषयीं त्यानीं समाधानकारक पुरावा दिला पाहिजे" अशा अर्थाच्या पाट्या दुकानावर लावण्याची ज्यू पुस्तकविक्र्यावर सक्ती करण्यात आली आहे. ज्यू वाङ्मयाखेरीज इतर पुस्तकें त्यानीं आपल्या दुकानात ठेवतां कामा नयेत, असाहि त्याचेवर निर्बंध घालण्यात आला आहे

### भुइमुगाच्या पिकाचा सरकारी अदाज

गेल्या वर्षापेक्षां यदा हिंदुस्थानामध्यें शेकडा १८ टक्के इतकी ज्यास्त जमीन भुइमुगाखाली आहे २३ लक्ष, १३ हजार एकरात भुइमूग पेरण्यात आला आहे, त्यापैकीं १७ लक्ष ६२ हजार एकर जमीन मुंबई इलाख्यांतील आहे

### पी ॲन्ड ओ. कपनीस १०० वर्षे पूर्ण झालीं

आगबोटींची वहातुक करणाऱ्या पी. ॲन्ड ओ. कपनीच्या स्थापनेस १०० वर्ष आतां पुरीं होत आहेत. कपनीच्या पहिल्या आगबोटीनें सप्टेंबर, १८३७ मध्यें प्रथम जलप्रवास केला

### रेडिओवर राजकीय पुढाऱ्यांचीं भाषणें

ग्रेट ब्रिटनमध्यें राजकीय पक्षाच्या पुढाऱ्याचीं रेडिओवर भाषणें होतात, परतु हिंदुस्थानात तसें करण्याची अद्याप वेळ आलेली नाहीं, असें सरकारतर्फे असेंब्लीत उत्तर देण्यात आलें

### रेडिओ महाग होणार

रेडिओच्या किंमतींत ह्यापुढें वाढ होण्याचा सभव आहे हा धदा नवीन होता, तोंपर्यंत बनावटींत झपाट्यानें सुधारणा होत गेली व उत्पादन खर्चांत बचत करता आली आता, रेडिओच्या बनावटीस लागणाऱ्या मालाच्या किंमती चढल्या असल्यानें व उत्पादनाचे खर्चात काटकसरीस वाव नसल्यानें, रेडिओच्या किंमती वाढणार, असा रग दिसतो.

### हिंदी सरकारी रेलवेच्या उत्पन्नाची चढती कमान

| | रु. कोटि | लक्ष |
|---|---|---|
| १ एप्रिल ते ३१ ऑगस्ट, १९३६ | ३५, | ३३ |
| ” ” १९३७ | ३८, | १७ |

### खाणींत काम करण्यास स्त्री-कामगारांस प्रतिबंध

स्त्रियास खाणींमध्यें जमिनीखाली काम करण्यास प्रतिबंध करणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी १ जुलै रोजीं सुरू व्हावयाची होती, ती तीन महिने पुढें ढकलण्यात आली होती. १ ऑक्टोबर नंतर आतां सदरहु प्रतिबंधक नियम अंमलात येतील, असें जाहीर झालें आहे.

### कोळशाचें वाढतें उत्पादन

हिंदी खाणींतून होणारें कोळशाचें उत्पादन गतसालचे मानानें यदा वाढत्या प्रमाणावर आहे.

### नाविक शिक्षण घेणारांतील बेकारी

नाविक शिक्षण देणाऱ्या डफरिन जहाजावर शिकून बाहेर पडलेल्या हिंदी तरुणांस बेकार रहावें लागत आहे. हिंदी व्यापारावर नफा मिळविणाऱ्या ब्रिटिश वहातुक कपन्या हिंदी लायक तरुणास आपल्या आगबोटींवर नेमीत नाहींत व हिंदी नाविक दलातहि त्यास जागा मिळत नाहीं अशी तक्रार मध्यवर्ती असेंब्लीमध्यें करण्यात आली प्रत्येक विद्यार्थ्यामागें शिक्षणाप्रीत्यर्थ सुमारें १० हजार रु खर्च येतो. ब्रिटिश कपन्यास सरकारी कामाचें कंत्राट देतेवेळीं त्याच्याशीं हिंदी नाविक विद्यार्थ्यांसबंधीं करार करणें शक्य आहे. सरकार तूर्त ब्रिटिश कपन्यास गोंजारून त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

### वॉर्डन विमा कं लि., अहमदाबाद

वरील कपनीनें १९३६ मध्यें ३५¾ लक्ष रुपयाचे १८२० विमे उतरविले तिच्या पॉलिसीच्या किंमतीची सरासरी प्रत्येकीं २,००० रु पडली. श्री भास्करराव जाधव हे कपनीचे अध्यक्ष आहेत.

### लष्करी खात्याकरितां कत्तलखाना व कोल्ड स्टोरेज

लाहोर येथील कॅन्टोन्मेंट हद्दींत लष्करी खात्यामार्फत एक कत्तलखाना बाधण्यात येत असून, मास ताजें राखण्याकरिता कोल्ड स्टोरेजची व्यवस्था केली जात आहे. कत्तलखान्याचे बाधकामास २८¾ लक्ष रु. खर्च येईल व कोल्ड स्टोरेजच्या व्यवस्थेकरिता कोल्ड स्टोरेज क. ऑफ इंडिया लि. ह्या कपनीस सालिना ४¾ लक्ष रु द्यावे लागतील.

### साम्राज्यांतील वसाहतींत लोक पाठवा

ब्रिटिश वसाहतींत कायम रहाण्यास जाण्याकरितां ग्रेट ब्रिटननें आपले प्रजाजन पाठविण्यास पुनः सुरवात करण्याची वेळ आली आहे व ह्याबाबत वसाहतींच्या सरकारांकडून मदत व सवलती मिळणें जरूर आहे, अशा अर्थाचा एक ठराव लंडनच्या मेयरचे अध्यक्षतेखाली येत्या ऑक्टोबरात भरणाऱ्या परिषदेंत पास होणार आहे. इटली व ग्रीस ह्या देशातील लोक कॅनडा, ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका ह्या देशांत अजूनहि प्रवेश मिळवीत आहेत, ह्याविषयीं परिषदेंत नापसती व्यक्त करण्यात येईल

### लंडन बंदराची सुधारणा

लंडनच्या बदराचा व्यापार वाढत असल्यानें त्याची सोय व्हावी ह्याकरिता बंदरात जरूर त्या सुधारणा वरचेवर कराव्या लागतात. सुमारें १६ कोटि रुपयाची एक योजना नुकतीच हातीं घेण्यात आली आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| २२-८-३७ ते ४-९-३७ | ३५,४८,१९२ |
| ५-९-३७ ते ११-९-३७ | ९,२८,६२५ |
| २१-९-३१ ते ११-९-३७ | ३,०३,०५,३८,४१३ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४५६ | जीवन-वसाहतींचें आर्थिक महत्त्व-विमा बिलाची असेंब्लींत चर्चा-कॉमनवेल्थ विमा क लि | |
| २ मध्यवर्ती कारभारात काटकसरीस जागा नाहीं | ४५७ | ५ सहकारी बँकांचे अहवाल | ४६१ |
| ३ हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य | ४५८ | ६ कपाशीच्या पिकात वाढ | ४६२ |
| ४ स्फुट विचार ... | ४५९ | ७ प्राप्तीवरील कर व त्याचा रिफंड .. | ४६२ |
| शक्तिवर्धक औषधाचा गुण किती वेळ टिकणार ?-राष्ट्रीय कर्जाचा डोंगर-भूपृष्ठाची वांटणी व मानवी | | ८ बॉबे मॉं को बँक लि | ४६३ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ४६४ |


# अर्थ

बुधवार, ता. १५ सप्टेंबर, १९३७

## मध्यवर्ती कारभारांत काटकसरीस जागा नाहीं !

### हिंदुस्थान सरकारचा नकार

प्रांतामध्यें सर्वस्वी जबाबदार असलेलीं प्रधानमंडळें आणि मध्यवर्ती राज्यकारभारात लोकनियुक्त सभासदास जबाबदार नसलेली नोकरशाही ह्यांचा मेळ बसणें कठीण आहे जनतेची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगति घडवून आणण्याचा चंग प्रांतिक प्रधानमंडळानीं बांधला असला तरी तो कार्यक्रम पुरा करण्यास लागणाऱ्या पैशाची त्यांस टंचाई भासत आहे. मध्यवर्ती सरकाराच्या उत्पन्नाचा हिस्सा त्यास मिळाल्यावाचून प्रांतिक राज्यकारभाराचा योगक्षेम योग्य तऱ्हेनें चालण्याची पंचाईत आहे. त्या सरकारानें आपल्या स्वतःच्या खर्चांत छाटाछाट करून प्रांतांचीं उत्पन्नें वाढण्यास सहाय द्यावें अशी मागणी मध्यवर्ती कायदे मंडळांत होणें ह्यासाठी अपरिहार्यच होतें त्याप्रमाणें, गेल्या आठवड्यात लोकनियुक्त पक्षाकडून ठरावाच्या मार्गानें सूचना करण्यांत आली आणि ती बहुमतानें मंजूर झाली. लोकप्रतिनिधींस आपापल्या प्रांतांत सरकाराची सांपत्तिक स्थिति अत्यंत अडचणीची असल्याची पूर्ण जाणीव असल्यानें त्यांनीं वरील ठरावास जोराचा पाठिंबा दिला आणि सरकारनें स्वतःच्या बाजूनें केलेलें समर्थन फिकें पडलें रेल्वेजचें उत्पन्न सध्या हळु हळु वाढत आहे ही गोष्ट आशाजनक आहे आणि त्यामधून प्रांतिक सरकारास कांहीं अंश मिळण्याचा चांगला संभव आज दिसत आहे. परंतु दारुबंदीसारख्या सुधारणा अंमलांत येण्यास प्रांतिक सरकाराच्या उत्पन्नांत अधिक वाढ होणें आवश्यक आहे आणि हिंदुस्थान सरकारानें आपल्या खर्चांत बचत करून ती होण्यास मदत करावी अशी मध्यवर्ती विधिमंडळानें सूचना केली आहे. तिला उत्तर म्हणून सरकारी सभासदानीं नन्नाचा पाढा वाचला.

लोकनियुक्त सभासदांनीं प्रथम चढवलेला हल्ला लष्करी खर्चावर होता. लष्करी खर्च कमी होण्याची व फौजेचें हिंदीकरण करण्याची आवश्यकता अनेक वर्षें सारखी प्रतिपादण्यांत येत आहे. संरक्षण खात्याच्या चिटनवीसांनीं ही गोष्ट कशी अव्यवहार्य आहे, हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आणि प्रथमच गेल्या सोळा वर्षांत लष्करी खर्च साडेतेवीस कोटि रुपयांनीं कमी झाला आहे असें सांगून ह्या काटकसरीबद्दल सरकारची पाठ थोपटली युद्धाची भीति खरी ठरल्यास खर्च कमी होण्याचें राहून तो वाढणेंच अपरिहार्य आहे असा त्याच्या युक्तिवादाचा रोख होता महायुद्धाच्या परिस्थितीमधून देश नुकताच बाहेर पडत होता आणि महर्घता भयंकर रीतीनें जाणवत होती असा काळ लष्करी खर्चांत काटकसर झाली आहे हें तुलनात्मक रीतीनें दाखवण्यास त्यांनीं निवडला हें त्यांच्या कोटिक्रमाच्या भ्रामकपणाचें द्योतक आहे. सैन्याचें हिंदीकरण झाल्यास ७½ कोटि रुपयांची बचत होईल आणि एवढीच रकम नीमायर शिफारसींस अनुसरून प्रांतिक सरकारास पुढें मिळावयाची आहे. परंतु हिंदी फौजेंतून ब्रिटिश सैनिक काढून टाकणें अनेक वर्षें अशक्य होणार आहे. इतर राष्ट्रें लष्करी खर्च करताहेत, त्या मानानें हिंदुस्थानचा सध्याचा खर्च अत्यंत अल्प आहे आणि देशाचें संरक्षण नीट होण्यास चालू व्यवस्थाच श्रेयस्कर आहे असें मि. ऑजिल्व्ही ह्यांनीं निक्षून सांगितलें. सरहद्दीवर शांतता ठेवणें फार खर्चाचें पण तितकेंच महत्त्वाचें आहे आणि ह्याकरिता सैन्य कमी करणें किंवा त्याच्या खर्चांत छाटाछाट करणें आत्मघातकीपणाचें आहे असा कर्नल पार्सन्स ह्यांनीं खुलासा केला

बिन लष्करी खर्चाबाबत फडनवीस, सर जेम्स ग्रिग, बोलले. हिंदुस्थानास प्रतिवर्षी पेन्शनासारख्या मागील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पावणेपाच कोटि रुपये खर्चावे लागतात आणि कितीहि काटकसर करावयाची म्हटली तरी ह्या रकमेस हात लावतां येत नाहीं ही माहिती त्यांनीं दिली. ही रकम व मि. ऑजिल्व्ही ह्यांनीं उल्लेखिलेली ७½ कोटींची रकम ह्यांचा बोजा हिंदुस्थानच्या डोक्यावरून हालणें शक्य नाहीं. असें असल्यानें ही किंवा इतर दुसरी काटकसर ह्याविषयींची भाषा व्यर्थ आहे मध्यवर्ती सरकाराच्या नोकरींत असलेल्या युरोपिअनांच्या वार्षिक पगाराची बेरीज १½ कोटि रुपये होते. ती सर्व रकम वांचविली तरीहि प्रांतिक सरकाराच्या हातीं विशेष कांहीं लागणार नाहीं असें सर जेम्स म्हणाले रेल्वेज व प्राप्तीवरील कर ह्यांचें उत्पन्न वाढल्यास प्रांतिक सरकारास फायदा होण्यासारखा असून तें वाढवण्यास लोकनियुक्त सभासदांनीं सहाय करावें अशी सूचना त्यांनीं केली. साखरेच्या धंद्यास दिलेल्या संरक्षणामुळें कस्टम्सचें आपलें ११ कोटि रुपयांचें नुकसान झालें तें देशी साखर कारखान्यावर बसविलेल्या पट्टीच्या ४ कोटि आणि त्यांनीं भरलेल्या प्राप्तीवरील कराच्या २८ लक्ष रुपयांतून भरून निघालेलें नाहीं अशी फडनवीसांनीं तक्रार केली. लोकनियुक्त सभासदांनीं मध्यवर्ती सरकाराचें करांचें उत्पन्न वाढण्यास हातभार लावावा म्हणजे प्रांतिक सरकारास त्यापासून सहाय मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, हें त्यांच्या भाषणाचें सार होतें. सर जेम्स ह्यांचा सर्व युक्तिवाद त्यांच्या आतां सर्वांस परिचित झालेल्या थाटाचा होता एवढीच टीका त्यावर केली म्हणजे पुरें आहे.

## हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य

### प्रो. काळे ह्यांचीं ग्वालेर येथील व्याख्यानें
(१)

यदा ग्वालेर येथें सरकारच्या विद्यमानें गणेशोत्सव मोठ्या प्रमाणांत साजरा करण्यांत आला आणि त्यामध्यें भजनें व कीर्तनें ह्याबरोबरच बाहेरच्या नामांकित विद्वानाचीं व्याख्यानें करण्यात आलीं. हा उपक्रम लोकशिक्षणाच्या दृष्टीनें फारच उपयुक्त ठरला. राजवाड्यात होणाऱ्या व्याख्यानाचे बरोबरच गावांत टाउन हॉलमध्येंहि जनतेच्या सोयीसाठी कांहीं व्याख्यानें झालीं

### प्रो. काळे यांचें टाउन हॉलमधील व्याख्यान

टाउन हॉलमधील आपल्या व्याख्यानात प्रो. काळे ह्यांनीं ग्वालेर संस्थानातील सहकारी पतपेढ्या व बँका ह्याचे संबंधानें नुकत्याच केलेल्या चौकशीचा उल्लेख करून तिच्यावरून, शिकलेल्या व जाणत्या लोकांनीं शेतकरी व धदेवाले ह्यांच्या सघटनाची जबाबदारी उचलण्याची आवश्यकता फार मोठी असल्याचें ठळक अनुमान निघत असल्याचें सांगितलें संस्थानात गहू व कपास पिकवणारा शेतकरी- जागतिक बाजार पेठावर आज अवलंबून आहे आणि इतर देशामध्यें अलीकडे शेतीच्या धद्यात यांत्रिक व शास्त्रीय सुधारणाच्या सहायानें झपाट्यानें सुधारणा घडून आल्यामुळें परदेशी स्वस्त मालाशीं त्यास स्पर्धा करावी लागत आहे हिंदी शेतकरी मागसलेला आणि असहाय आहे मालाची पैदास व विक्री ह्यांविषयींची पद्धति सुधारून आपली कमाई वाढवण्याचें ज्ञान त्यास नाहीं ह्यासाठी त्यास शिक्षण देऊन त्या वर्गाचें सघटण करण्याचें महत्त्व फार वाढलें असून त्या बाबतची जबाबदारी जनतेचे पुढारी व सरकार ह्याचेवर येऊन पडते आणि ती त्यानीं ओळखली पाहिजे असें व्याख्यात्यानीं प्रतिपादलें.

प्रो काळे पुढें म्हणाले —"गेल्या सात वर्षांत हिंदुस्थानामधून तीनशे कोटि रुपयाचें सोनें बाहेर गेलें त्याच्या मोबदला ह्या देशाला परदेशी माल मिळाला असला तरी त्यांतलें पुष्कळसें सोनें सामान्य लोकाच्या शिलकी भाडवलामधून गेलें आणि त्या प्रमाणातजनतेची आर्थिक शक्ती नि.सशय कमी झाली राष्ट्रांचीं परस्पराचीं व्यापारी व्यवहारातून उद्भवणारीं देणीं भागवण्याकडे सोन्याचा उपयोग मागें केला जात असे आणि त्या योगानें बाजारभाव स्थिर रहाण्यास सहाय होत असे. सध्या अनेक देशांत सोन्याचा तुटवडा पडला आहे आणि अमेरिकेस सोन्याचें अजीर्ण झालें आहे प्रत्येक राष्ट्र आर्थिक बाबतींत स्वावलबी होऊं पहात असून त्याचा परस्परावरील विश्वास उडाला आहे ह्या कारणानें व्यापार आणि सोन्याची आयात-निर्गत मर्यादित झाली आहे. असल्या परिस्थितींत, हिंदुस्थानामध्येंहि राष्ट्रीय उद्योग धदे व व्यापार ह्याची घडी सरकारनें नीट बसवली पाहिजे. जपानशी कापडाची आयात व कपाशीची निर्गत ह्यासबधानें व्यापारी करार होणें अपरिहार्य झालें असून त्याच प्रकारचा हिंद-ब्रिटन करार होण्याचें घाटत आहे औद्योगिक सरक्षणामुळें पोलादाचा मोठ्या प्रमाणावरील धदा हिंदुस्थानांत चालूं शकला आहे त्याच संरक्षणाच्या जोरावर स्वदेशी साखर-कारखानदारानी परदेशी साखरेचें उच्चाटन केलें आहे ह्या कारणानें हिंदुस्थान सरकारचें साखरेवरील आयात जकातीचें दहा कोटि रुपयाचें उत्पन्न बुडालें अशी सर जेम्स ग्रिग यांची तक्रार आहे, परतु हिंदी साखरेचा धंदा उदयास आल्यानें लोकांचें अप्रत्यक्ष रीत्या झालेलें हित त्यानीं दृष्टीआड केलें आहे. सरक्षणावांचूनहि स्वदेशी सिमेंटचा धंदा उदयास आला, हें सघटनेचें दृश्य फळ आहे हें लक्षात ठेवलें पाहिजे. जगात चाललेल्या घडामोडी हिशेबांत धरून हिंदुस्थानात आर्थिक प्रगति घडवून आणण्यास सर्वांनीं झटलें पाहिजे."

---

### इचलकरंजी सेंट्रल को. बँक लि.
(वार्षिक सभा: २६-९-३७)

वरील बँकेचें भाग भांडवल २९,१२५ रुपयाचें असून फंडस ११½ हजार रुपयावर आहेत. एकूण देण्याशीं तरत्या भाडवलाचें प्रमाण ३७% पेक्षा अधिक आहे. इचलकरंजी जहागिरींत १९१२ चा अखिल भारतीय सहकारी कायदा लागू असल्यामुळें थकबाकीदार सभासदास परत फेडीची जबाबदारी भासत नाहीं, ह्याकरिता १९२५ चा मुंबईचा सहकारी कायदा जहागिरीस लागु करण्यात यावा, अशी बोर्डाची विनंति आहे. बँकेची स्वत.ची इमारत असणें अनेक दृष्टींनीं श्रेयस्कर असतें, ह्या विचारानें अशी सोय करण्याची योजना बोर्डानें आखली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ५,३४५ रु नफा झाला, त्यांतून भागीदारास डिव्हिडड देण्याकडे १७४० रुपयांचा विनियोग करावा, १५२७ रु इमारत फडात टाकावे व बाकी रकम इतर फंडामध्यें जावी, अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेकडील ठेवींत वाढ होत असून तिच्याकडून कर्जेंहि अधिक उचलली जात आहेत, हें प्रगतीचें निदर्शक आहे.

---

### सौ लीलाबाई विजापूरकर ह्यांना जमनादास सुवर्ण पदक

सौ लीलाबाई विजापूरकर जी. टी. सी. (बॉबे) ह्या, सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजच्या नुकत्याच झालेल्या सरकारी परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या ५१ विद्यार्थ्यांमध्यें त्या पहिल्या वर्गांत पहिल्या आल्या. श्री जमनादास मेहता एम ए, एल. एल बी, बॅर-ॲट-लॉ, ह्यानीं झारापकर टेलरिंग कॉलेजमध्यें प्रत्येक सरकारी परीक्षेंत पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी सुवर्णपदक ठेवलें आहे, तें सौ. विजापूरकर ह्यास मिळालें

---


### औंध स्टेट सेंट्रल बँक, लिमिटेड. औंध.
(स्थापना—८ आक्टोबर १९३२)
हेड ऑफिस—औध (सातारा)
शाखा—आडपाडी, कुंडल, गुणदाळ व बिचूद स्टेशन.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्हीं मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.

ऑफिसचे कामाकरितां रेमिंग्टन टाईपरायटर
स्वस्त विकाऊ आहे
मराठी केन्द्र : हुजूरबागेसमोर पुणें

## स्फुट विचार

### शक्तिवर्धक औषधाचा गुण किती वेळ टिकणार ?

पाश्चात्य राष्ट्रांमध्यें सध्या मदी कमी होऊन आर्थिक चलतीचें पाऊल पुढें पडल्यासारखें दिसत आहे बेकाराची संख्या मर्यादित होत आहे, उद्योगधंद्यांतल्या नफ्याची चढती कमान आहे आणि बाजारभाव वर गेले आहेत कारखान्यास भरपूर काम मिळत असून कित्येक ठिकाणीं निष्णात कामगारांची टचाइ भासत आहे ह्या वाढत्या भरभराटींत टिकाऊपणा किती आहे ह्याची मात्र विचारी लोकांस शंका वाटू लागली आहे लढाऊ साधनें तयार करण्यासाठी सरकारें कोट्यवधि रुपये खर्चीत आहेत आणि कर्जें काढूनहि लोकांस काम मिळण्याचा व्यवस्था त्यांनीं चालविली आहे एखाद्या रोग्यास शक्तिवर्धक औषध दिलें असतां त्यास काहीं काळपर्यंत हुशारी वाटते तसाच प्रकार आज औद्योगिक घटनेचा झालेला आहे पण औषधामुळें आलेला तकवा फार वेळ टिकत नाहीं असा अनुभव आहे. चागलें अन्न पचन होऊन रक्त शरीरातून खेळलें तर माणसाची प्रकृति कायमची सुधारते नाहींतर शक्तिवर्धक औषध बंद होतांच हुशारी ओसरत जाते. सध्या आर्थिक चलतीची लाट उसळल्यासारखी दिसत आहे, ती कृत्रिम स्वरूपाची आहे, तिला मुळांत जोर नाहीं ह्या कारणानें तिला हलवणारी शक्ति कमी होतांच तिची गती मंद होणार हें उघड आहे. मदीचीं मूळ कारणें दूर झाल्यावांचून तिची पुनरावृत्ति होण्याची भीति नाहींशी होणें शक्य नाहीं. सध्या स्थिति बरी आहे, उगाच उद्याची काळजी आज कशाला ? असें कांहीं लोकाचें म्हणणें आह परतु दीर्घ परिणामकारक उपाय आज योजतां येत नाहींत म्हणून कोणताच इलाज करूं नये ही वृत्ति चुकीची आहे, ह्यांत शका नाहीं आलेली अडचण दूर करून पुढें चालावें हें व्यावहारिकपणाचें धोरण आहे खरें तथापि, मंदीनें पुन्हां भीषण स्वरूप धारण करण्यापूर्वीं तिचा विचार होणें आवश्यक आहे हें नाकबूल करता यावयाचें नाहा. पुढें घडणाऱ्या गोष्टींचा अंदाज करून वेळींच त्याचे संबंधांत योजना आखणें ह्यात शहाणपणा आहे. पण जगात पुढारला समजलीं जाणारीं राष्ट्रें युद्ध व संरक्षणाचा तयारी ह्यांत गर्क असल्यानें आगामी घडामोडींकडे दुर्लक्ष होत आहे, ह दुर्दैवाचें लक्षण आहे. ब्रिटिश ट्रेड यूनिअन कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाचे प्रसगीं मि बेव्हिन ह्यानीं आपल्या अध्यक्षीय भाषणात ह्या प्रश्नाकडे प्रामुख्यानें लक्ष वेधलें त्याचा काळजीपूर्वक विचार होणें अगत्याचें आहे

---

### राष्ट्रीय कर्जाचा डोंगर

उत्पादक कार्यासाठी काढलेलीं कर्जें आवश्यक आणि इष्टफलदायी अशींच असतात कर्जानें आपल्या उद्योगाची कार्यक्षमता वाढवून तिच्या योगानें ज्यास्त मिळणाऱ्या मिळकतींमधून दुसऱ्याकडून घेतलेल्या रकमाची फेड करावयाची आणि ह्या रीतीनें आपल्या कमाईत कायमची भर टाकावयाची हा व्यवहार हिताचा असतो. हा नियम ज्याप्रमाणें व्यक्तींस लागू आहे त्याचप्रमाणें तो राज्यकर्त्यांसहि लागतो. राष्ट्राच्या रक्षणाप्रीत्यर्थ झालेला खर्च व काढलेलें कर्ज हीं अप्रत्यक्षपणानें उत्पादकच असतात असें म्हणतां येईल कारण, समाजास स्वास्थ्य व शांतताच न मिळेल तर त्याची सापत्तिक अवस्था चांगली कशी राहील ? तथापि, राष्ट्रें एकमेकांशीं युद्धें करून सर्वांसच संकटात व खर्चांत घालतात, तेव्हां तो पैशाचा सर्वस्वी दुरुपयोगच आहे ह्यांत शका नाहीं. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जाचे आकडे नुकतेच मध्यवर्ती विधिमंडळात सांगण्यात आले, त्यावरून युद्धकर्जाचा बोजा हिंदी लोकांसहि सोसावा लागत आहे असें दिसून येईल. जगांतलीं सर्व राष्ट्रें आज ही आपत्ति भोगीत आहेत, तरी युद्धाची खुमखुम त्यांमध्यें कमी होत नाहीं, ही अत्यत निराशाजनक गोष्ट आहे. मोठ्यांचें सर्वच मोठें या न्यायानें पहातां ब्रिटिश राज्याचें कर्ज अवाढव्य आहे ह्याचें आश्चर्य वाटत नाहीं आजमितीस ह्या कर्जाचा बोजा दहा हजार पांचशें कोटि रुपये इतका आहे ! ह्या कर्जावर प्रतिवर्षी द्यावें लागणारें व्याजच २८० कोटि रुपये भरतें. एवढी मोठी रकम जनतेवर कर बसवूनच सरकारास उभी करावी लागते. राष्ट्राच्या संमतीनेंच हें कर्ज काढण्यात आलें असलें, त्यावरील व्याजाची वाटणी नागरिकांमध्यें होत असली आणि एका हातानें घ्यावें व दुसऱ्या हातानें द्यावें असा प्रकार जरी ह्यात असला तरी अनुत्पादक खर्च हा केव्हाहि असमर्थनीयच समजला पाहिजे तो सपत्तीचा दुरुपयोग असून सामान्य जनतेस अनहितकारक असाच होतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे

---

### भूपृष्ठाची वांटणी व मानवी जीवन

वसती आणि उपजीविका ह्याच्यासाठी मनुष्यमात्रास भूमीचें स्वामित्व आवश्यक आहे. जगाच्या पाठीवर माणसें पसरलीं आहेत त्यांनीं स्वतःच्या जीवनाकरताच निरनिराळे प्रदेश आक्रमले आहेत. हवापाणी, भूमीच्या पृष्ठाचा उचसखलपणा, जमिनीचे उत्पादक गुण इत्यादि बाबींचा परिणाम ह्या मनुष्य वसतीच्या प्रसारावर अर्थातच झालेला आहे. ह्या कारणानें भूपृष्ठावरच्या मानवी वसतींत विषमता उत्पन्न झालेली आहे भिन्न भिन्न प्रदेशांमध्यें लोकसंख्या वाढत चालल्यानें भूमीपासून उपलब्ध होणाऱ्या जीवनाच्या साधनाचा प्रश्न अवघड होत असून राजकीय व आर्थिक स्पर्धा आतरराष्ट्रीय युद्धामध्यें प्रतीत होत आहे. सर्व जगाचें भूक्षेत्र व त्याची २०० कोटि इतकी लोकसंख्या पाहिली असतां दर चौरस मैलाच्या प्रदेशांत सरासरीनें ४० माणसें आहेत असें आढळतें. हिंदुस्थानात हें प्रमाण याच्या चौपटीइतकें आहे आणि तें निरनिराळ्या प्रातात व लहानमोठ्या विभागात भिन्न भिन्न असें आहे युरोप खड, अमेरिकाचा उत्तरेकडचा भाग, एशियामध्यें हिंदुस्थान, सिलोन, चीन व जपान ह्यांनीं मिळून एकूण २०० कोटि माणसांपैकीं तीन-चतुर्थांशास आश्रय दिला आहे जगांतला एकूण भूपृष्ठाचा एक अष्टमाश वरील देशात १५० कोटि माणसानीं व्यापला आहे ह्या देशामधून मनुष्य वसतीचा गेल्या दोनशें वर्षांत सारखा प्रसार चाललेला आहे रशिया व चीन ह्या देशातील लोक आपल्या सरहद्दीपलीकडे पसरत आहेत आणि अमेरिकेंतहि तीच स्थिति दिसुन आली आहे. तथापि, एकदरीनें पहाता तुरळक वस्तीचे प्रदेश जगाच्या पाठीवर आहेत, त्यामध्यें मनुष्यवस्ती म्हणण्यासारखी वाढत नाहीं. अगोदरच व्यापलेल्या प्रदेशांत गर्दी करण्याची सामान्य प्रवृत्ति दृष्टीस पडते मनुष्याचा ओघ खेडेगांवाकडून शहरांकडे वहात आहे आणि त्यामुळें सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे अनेक अवघड प्रश्न उपस्थित होत आहेत. वसाहतींचे अमर्याद प्रदेश विशिष्ट राष्ट्राच्या स्वामित्वाखालीं असल्यानें आणि तेथें जाऊन उपजीविका

करण्यास सर्वांत सारखीच संधी मिळत नसल्यानें आंतरराष्ट्रीय वितुष्टें वाढत आहेत. हिंदुस्थानात माणसाची वाढ जोरानें होऊन जीवनाची साधनें मर्यादित होत आहेत, तर ऑस्ट्रेलिया व कानडा ह्यासारख्या देशात अफाट भूविस्तार रिकामा पडला आहे व तेथील जमिनीची मशागत करण्यास लोक मिळत नाहींत, अशी अवस्था आहे स्वकीय वर्णाच्या राष्ट्रांच्या व संस्कृतीच्या लोकासच आंत येऊ द्यावयाचें आणि इतरास आपल्या देशाचे दरवाजे बंद करावयाचे असें धोरण त्यानीं अंगिकारलें आहे हा प्रश्न एकदर मानवी जीवनाचा, शांततेचा व प्रगतीचा असल्यानें तो समाधानकारक रीतीनें सुटण्यावर मनुष्य जातीचें भवितव्य अवलंबून आहे

---

## वसाहतींचें आर्थिक महत्त्व—राष्ट्रसंघाच्या कमिटीचा अभिप्राय

महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्याकारणानें त्या देशास आपल्या वसाहतींस मुकावें लागलें, ह्याविषयीं त्या राष्ट्रास एकसारखी चुटपुट लागून राहिली आहे. वसाहतींच्या अभावामुळें कच्च्या मालाचा पुरवठा नीट होत नाहीं व व्यापार आणि उद्योगधंदे ह्यावर अनिष्ट परिणाम होतो, अशी जर्मनीची तक्रार आहे ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता राष्ट्रसंघानें एक कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे वसाहतवालीं व बिनवसाहतवालीं राष्ट्रें ह्यांचे विचारात वसाहतींपासून होणाऱ्या फायद्याविषयीं मूलग्राही विरोध असल्याचें कमिटीच्या नेमणुकीचे वेळींच स्पष्ट दिसलें व ह्या प्रश्नाची चर्चा व्यापक दृष्टीनें कमिटीकडून होणें कठीण आहे, ह्याविषयींहि शंका उरली नाहीं. औद्योगिक राष्ट्रास कोणत्या प्रकारचा कच्चा माल लागतो व तो वसाहतींमधून मिळविण्यास त्यास कोणत्या अडचणी येतात, एवढ्या मर्यादित प्रश्नाचाच कमिटीनें विचार केला. व्यापारी महत्त्वाच्या कच्च्या मालाचे एकूण जागतिक उत्पादनापैकीं वसाहतींत फक्त शेकडा तीन टक्केच माल तयार होतो, असें आपलें मत तिनें रिपोर्टांत नमूद केलें आहे, तें बिनवसाहतवाल्या राष्ट्रांस ग्राह्य वाटण्याचा संभव नाहीं. वसाहतींची पुनः वांटणी केल्यानें कच्च्या मालाचा प्रश्न सुटणार नाहीं, आंतरराष्ट्रीय देणीघेणीं मिटण्याचे मार्गांतील अडचणी दूर करण्याचा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे, असें कमिटीचें मत आहे वसाहतींचे दरवाजे त्याच्या मालक राष्ट्रांनीं बंद केले असून किल्ल्या स्वतःजवळ ठेवल्या आहेत, ह्या कारणानें बिनवसाहतवाल्या राष्ट्रात माणसाची खेचाखेच झाली आहे, असें जर्मनी प्रभृति राष्ट्रांचें म्हणणें आहे तथापि, ह्या विस्तृत भूमिकेवर कमिटीनें विचार केलेला नाहीं इटलीनें जर्मनीच्या मागणीस पाठिंबा दिलेला असून जपानचीहि तीच मागणी आहे. वसाहतवाल्या व बिनवसाहतवाल्या राष्ट्राचे म्हणण्यात राजकीय हेतु किती आहे व किती हेतु अर्थमूलक आहे, हें निश्चित सांगता आलें नाहीं, तरी असे दोन गट पडून त्यात पूर्ण मतभेद व्हावा, ही गोष्ट चिंतनीय आहे, ह्यात संशय नाहीं वसाहतींचें आर्थिक महत्त्व खरोखरच इतकें अल्प असेल, तर त्याच्या वाटणीसंबधीं रणें कां माजावीं ?

---

## विमा बिलाची असेंब्लींत चर्चा

विमाविषयक बिलाची कलमवार चर्चा मध्यवर्ती असेंब्लींत चालू झाली आहे बिलास सुमारें ७५० दुरुस्त्या सुचविण्यात आल्या आहेत, त्या सर्वांचा तपशीलवार विचार करावयास कायदेमंडळास वेळ पुरणार नाहीं हें जाणून प्रमुख दुरुस्त्याकडेच विशेष लक्ष देण्याचें धोरण पुढारी सभासदांनीं स्वीकारलें आहे विमेदाराचे भाषेंत विमा पॉलिसी छापलेली असावी व विमेदारानें कपनीस लिहून दिलेल्या पत्रकाची एक फोटो-प्रत त्यास पुरविण्यांत यावी, ह्या डॉ. देशमुखाच्या सूचना कायदामंत्र्यानीं तात्काळ मान्य केल्या. सर नृपेंद्र सरकार ह्यानीं आपल्या भाषणात बिलाच्या प्रमुख अंगाचा जोरदार भाषेंत पुरस्कार केला आणि विम्याचा धंदा, विमेदार व कपन्याचे मॅनेजिंग एजंट्स ह्यांच्या हितसबधातील विरोधात्मक बाबींचें स्पष्ट भाषेंत विवेचन केलें हिंदी कंपन्यास संरक्षण देताना ब्रिटिश कपन्यावर थोडेफार निर्बंध बसणारच असें सांगून ब्रिटिश कंपन्यास अन्याय होईल अशी व्यवस्था करण्याचा हिंदी कायदेमंडळास अधिकारच नाहीं, असा खुलासा केला. अनेक विरोधी हितसंबधाचा शक्य तितका न्यायपूर्वक मेळ घालून, घेतलेल्या भूमिकेची तडफदार तरफदारी करण्याचें कायदामंत्र्याचें धोरण हिंदी विम्याचे धद्यास हितकारक झाल्याखेरीज रहाणार नाहीं, हें कायदेमंडळातील चर्चेमधील वैचित्र्यपूर्ण टीकेवरून लक्षांत येण्याजोगें आहे. मॅनेजिंग एजन्सी विषयींचें त्याचें धोरण निश्चित व प्रखर आहे मॅनेजिंग एजटाचें काम करणारानें स्वतःस मॅनेजर अगर मॅनेजिंग डायरेक्टर असें जरी म्हणवून घेतलें, तरी ॲक्टातील २७ वें कलम त्यास लागू झाल्याखेरीज रहाणार नाहीं, अशी दुरुस्ती असेंब्लीनें मान्य केली आहे "सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स" ह्या हुद्यावरील अधिकाऱ्यास ५०० रुपयेच पगार असावा अशी दुरुस्ती सुचविण्यात आली होती, ती नापास झाली बिलावरील चर्चा अद्याप चालू असून, ह्या महिनाअखेर बिलाचें तिसरें वाचन पुरें होईल अशी अपेक्षा आहे.

---

## कॉमनवेल्थ विमा कं. लि

वरील कपनीची वार्षिक सभा रविवार, ता. १२-९-३७ रोजीं भरली होती कपनीच्या संस्थापक डायरेक्टरापैकीं एक व तिचे सुरवातीपासूनचे अध्यक्ष, श्री न. चिं. केळकर, ह्यानीं अनेक संस्थाबरोबर कॉमनवेल्थच्याहि अध्यक्षस्थानाचा राजीनामा दिला आहे, ह्या गोष्टीचा सभेचे प्रारंभीं उल्लेख करण्यांत आला व त्यांच्या सहाय्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल त्याचे आभार मानण्यात आले. कंपनीच्या प्रगतीविषयींचे आकडे अहवालात दिले आहेत त्यावरून कॉमनवेल्थची वाढती लोकप्रियता तात्काळ ध्यानात येईल. १९३६–३७ मध्यें कपनीनें विमाखातीं फंडात २½ लक्ष रुपयाची भर घातली, खर्चाचें प्रमाण २ ३६% नीं उतरवलें, क्लेम्सचे पैसे विलंब न लावता तात्काळ दिले, इत्यादि गोष्टी तिच्या व्यवहाराच्या भक्कमपणाची खात्री पटवतील कपनीनें पैसे गुंतविण्याच्या योजनेंत प्रागतिकपणा व साहसमिश्रित सुरक्षितपणा दाखविला आहे मुंबई, मद्रास, दिल्ली, कलकत्ता व अहमदाबाद येथें तिच्या शाखा असून त्याचेमार्फत कपनीचा व्यवहार दिवसानुदिवस वाढत आहे कॉमनवेल्थचें येत्या वर्षअखेर तिसरें मूल्यमापन होणार आहे, त्यावेळीं कपनीच्या भरभक्कमपणाची परीक्षा पुनः होईलच. कंपनीची अखंड प्रगति हें तिच्या कार्यक्षमतेचें व जनतेच्या तिच्यावरील विश्वासाचें स्पष्ट निदर्शक आहे. मंडळीचे चालक व मॅनेजिंग एजंट्स, अभ्यकर आणि कपनी, ह्याचें या प्रसंगानें अभिनंदन होणें स्वाभाविक आहे.

---

### महाड को. अर्बन बँक लि, महाड
( वार्षिक सभाः ता. १८-९-३७ )

वरील बँकेच्या सेळत्या भाडवलात साल अखेर ८ हजाराची वाढ होऊन तें ४८ हजार झालें एकूण देवघेव १४३ लाखांची झाली. वर्ष अखेर नफा १,६१४ रु. उरला, त्यातून ६ टक्के दरानें डिव्हिडंड वाटावें, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे बोर्डाच्या सूचनेप्रमाणें फडात रकमा टाकल्यानंतर जून, १९३७ अखेर फंड्समधील रकम १,९१२ रु. होईल. बँकेंत सेव्हिंग्ज बँक खातें उघडण्याचा बोर्डाचा विचार आहे बँकेची प्रगति एकसारखी होत आहे, हें तिच्या व्यवहाराचे तक्त्यावरून दिसून येतें वाढत्या व्यवहारास सोइस्कर असे नियम तयार करण्याकरितां वार्षिक सभेनें एक कमिटी नेमावी,अशी बोर्डानें यादी दिली आहे.

### वाई अर्बन को-बँक लि., वाई
(वार्षिक सभा. ता. २६-९-३७)

जून, १९३७ अखेरच्या वर्षी बँकेच्या सभासदात ३१ ची भर पडली व भाग भाडवल १ हजारानें वाढलें बँकेच्या थकबाकीचें भांडवलाशीं प्रमाण २९% आहे, तें कमी करण्याचा बँकेचा प्रयत्न चालू आहे बँकेचा हल्ली चालू असलेला व्याजाचा दर (८१२८६) उतरविण्याची डायरेक्टर बोर्डाची इच्छा असूनहि, कांहीं जुन्या व्यवहारामुळें तें लवकर शक्य होत नाहीं, असा रिपोर्टांत उल्लेख आहे भागीदारास ६% दरानें डिव्हिडंड देण्याची बोर्डानें शिफारस केली आहे.

### पूर्व खानदेश जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.
( वार्षिक सभाः ता. २४-९-३७ )

अहवालाचे सालीं वरील बँकेच्या सभासदांची संख्या ३४६ झाली असून कर्ज न घेणारे सभासद ४३ आहेत 'ब' वर्ग सभासद १७५ आहेत. ३०-६-३७ अखेर बँकेनें ५८ सभासदास ७८,८२७ रु. कर्ज वाटलेलें आहे ही सर्व रकम जुनें कर्ज फेडण्याकरिताच दिलेली आहे, व त्यावेळीं १६,९८२ रुपयांची सूट मिळविण्यांत आलेली आहे म्हणजे एकूण कर्जाशीं सुटीचें प्रमाण १८% इतकें पडतें देणें असलेल्या खर्चाच्या बाक्या व डेडस्टॉकवरील झीज याची तरतूद करून बँकेस रिपोर्टाचे सालात रु २५५-०-२ इतका नफा झालेला आहे हें नमूद करण्यास आम्हास आनंद वाटत आहे. सदर रु. २५५-०-२ च्या नफ्यातून गेल्या सालचा रु २४९ २-१ चा तोटा भरून काढण्यात येत असून रु ५-१४ १ चा नफा पुढें ओढण्यात येत आहे. दुसऱ्या वर्षअखेर वरील बँकेस अल्पसा का होईना नफा दाखविता आला, ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

### जी आय पी रेलवेचीं झोन तिकिटें

१९३६ सालातील दिवाळी व नाताळ आणि १९३७ मधलि ईस्टर ह्या सुट्याच्या निमित्तानें जी आय पी रेलवेनें झोन तिकिटें काढलीं होतीं, त्यापासून व सबंध रेल्वेवर कोठेंहि प्रवास करण्यास परवानगी देणाऱ्या तिकिटापासून रेल्वेस अनुक्रमें २ लक्ष, ७८ हजार, ४ लक्ष १६ हजार व ४ लक्ष ३९ हजार रुपये उत्पन्न झालें तिसऱ्या वर्गाच्या तिकिटाचा खप वरील मुदतींत कमी झाला व व्यवस्थेचा खर्च वाढला, तरी एकंदरींनें पहाता झोन तिकिटें रेलवेस फायदेशीर झालीं व लोकांचीहि सोय झाली.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,१८,६०० वसूल झालेलें भांडवल १,०८,५९०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

मनपसंत काम — रिसबूड ब्रदर्स-टेलर्स — वक्तशीरपणाची गॅरंटी
सदाशिव हौदानजीक : : : पुणें

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2

### कपाशीच्या पिकाच्या वाढीचा बाजारावर परिणाम

कपाशीची जागतिक लागवड वाढली असून, त्या प्रमाणात पिकाचा उठाव होणें कठीण आहे, ह्या विषयीं हकीकत 'अर्था'चे मागील अकांत आलीच आहे अमेरिकेंतील पिकाच्या अधिकृत ताज्या अदाजाप्रमाणें, त्या देशांतील उत्पादन १ कोटि, ६१ लक्ष गासड्या होईल, अशी अपेक्षा आहे गेल्या महिन्यात करण्यात आलेल्या अदाजापेक्षां हा आकडा ५ लाखानीं मोठा आहे वाढत्या उत्पादनाच्या बातमीचा परिणाम मुबईचे बाजारावर तात्काळ झाला व बाजारभावास तेजी येण्यास इतर कारणें अनुकूल असताहि तेजीवाल्यास सॅरक्षक उपायाची योजना करणें भाग पडलें

### प्राप्तीवरील कर व त्याचा रिफंड

सरकारी राखे व मंडळयाचे भाग ह्यावरील व्याज आणि डिव्हिडड व नोंदुलेल्या फर्म्सच्या भागीदाराचें उत्पन्न ह्याच्या प्राप्तीवरील कर मुळांतच कापून घेण्यात येतो. वास्तविक पडणाऱ्या दरापेक्षा ज्यास्त दरानें जेवढी रकम वसूल करण्यात आलेली असत, तेवढी मागाहून परत करण्यात येते. मुंबई शहरात १९३६-३७ मध्यें एकूण ३ कोटि, ३१ लक्ष रु इनकमटॅक्स वसूल झाला, त्यांपकीं ५८ लक्ष रु अशा रीतीनें कर भरणारास परत देण्यात आले एकाच प्राप्तीवर दोन ठिकाणीं कर घेतला गेला असेल, तर जादा वसुलीचा रिफड दिला जातो असा २४¾ लक्ष रुपयाचा रिफंड मुबई कचेरीमार्फत देण्यात आला. म्हणजे, एकूण सुमारें ३२ हजार लोकास ८२ लक्ष रुपयाचा रिफंड मिळाला.

### कॉमनवेल्थ विमा कंपनी, लिमिटेड

प्रगति दाखविणारे आकडे

| वर्ष | विमा अर्ज | दिलेल्या पॉलिसी | हप्त्याचें उत्पन्न | लाइफ फंड | खर्चाचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | रु | रु | रु | रु. | % |
| १ लें | ११,५९,२५० | ७,०४,२५० | २७,२६४ | ४४२ | ८६ |
| २ रें | १३,०४,००० | १०,५३,७५० | १,१४,३९७ | ६२,३९७ | ५० |
| ५ वें | २३,०२,७५० | १८,२७,२५० | २,२१,४०१ | २,२९,३४४ | ४६·७ |
| ७ वें | ३३,१५,५०० | २८,१६,००० | ४,०४,५४१ | ५,३६,३९५ | ४४·०१ |
| ८ वें | ४१,४८,१०२ | ३२,२३,७५० | ५,०९,२३१ | ८,०८,४७३ | ४१·६५ |

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बॅका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बॅक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट. ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले

महिंद्रकर ब्रदर्स

यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.

बुधवार चौक, पुणें

## बाँबे प्रॉ. को. बँक, लि०

( वार्षिक सभा : ता. २१।९।३७ )

वरील बँकेच्या स्थापनेस ११ ऑक्टोबर, १९३६ रोजीं २५ वर्षे पुरीं झालीं, तथापि अवर्षणामुळें इलाख्याच्या अनेक भागात दु:स्थिति असल्याकारणानें, बँकेनें आपली रौप्य ज्युबिली थाटानें साजरी केली नाहीं तथापि, १९३६–३७ सालाचे नफ्यातून, ज्युबिलीचे निमित्तानें भागीदारास १ टक्का दरानें बोनस ( १२,९७० रु ), बँकेच्या नोकर वर्गास बोनस ( ११,५०० रु. ) व सोसायट्यास रिबेट ( १०,००० रु. ) देण्याविषयीं डायरेक्टराची सूचना आहे अहवालाचे सालअखेर बँकेस १ लक्ष ४०½ हजार रु नफा झाला, त्यांतून ५ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याकरितां ६४½ हजार रुपयाचा व बँकेच्या नोकर वर्गास प्रत्येकी एक महिन्याच्या पगाराइतकें बोनस देण्यास १४ हजार रुपयाचा विनियोग करावा, अशीहि त्यांची शिफारस आहे.

बँकेचें भरणा झालेलें भांडवल १२ लक्ष ९८½ हजाराचें असून एकूण फंड्स १६ लक्ष ४४ हजाराचे आहेत १२ लक्ष ८० हजाराचीं डिबेंचर्स फेडण्याचीं आहेत व १ कोटि, ९३ लक्ष रुपयाच्या ठेवी आहेत बँकेनें ५७ लक्ष ६२ हजार रुपये रोखे व ट्रस्टी सिक्युरिटीजमध्यें गुंतविले असून सहकारी सोसायट्या व सेंट्रल बँका ह्यांस ९१½ लक्ष रुपये दिलेले आहेत गेल्या वर्षापेक्षा खेळत्या भांडवलांत ११½ लाखांची घट झाली असली तरी बँकेनें दिलेल्या कर्जाचे रकमेंत ४½ लाखांची भर पडली. सोसायट्यांस दिलेल्या रकमांवरील व्याजात सूट व बँकेच्या ठेवींवर सुटलेल्या व्याजांत घट ह्यामुळें नफा कमी उरलेला आढळून येईल नीरा कालव्याचे विभागांतील सोसायट्यांचे परिस्थितींत अद्याप सुधारणा होत नाहीं बँकेचें जमीन गहाण खातें प्रांतिक लॅन्ड मॉर्गेज बँकेकडे वर्ग करण्यासंबंधांतील वाटाघाटी सालअखेर पुऱ्या झालेल्या नाहींत. सभासद सोसायट्यातर्फे बँकेवर डायरेक्टर निवडले जातात, त्याची निवडणूक दरसाल न होता एक वर्षआड व्हावी, अशी नियमात दुरुस्ती करण्याविषयीं बोर्डाची सूचना आहे.

संस्थापकांपैकीं एक प्रमुख, सर लल्लुभाई सामळदास, ह्यांच्या निधनामुळें त्यांच्या अनुभवी सल्ल्यास व उत्साहवर्धक नेतृत्वास बँक मुकली आहे. सर लल्लुभाई स्मारक फंडास बँक देणगी देणार आहे सर चुनीलाल मेहता ( डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष ) व श्री वैकुंठराय मेहता ( मॅनेजिंग डायरेक्टर ) ह्यांचे कुशल देखरेखीखाली बँकेची प्रगति समाधानकारक होत आहे सहकारी बँका व सोसायट्या ह्यांच्या बाबतच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्यास बँकेचे चालक स्वायत्त प्रांतिक सरकारास सहाय करीत आहेत, ही गोष्ट सहकारी चळवळीचे दृष्टीनें अत्यंत आशाजनक आहे.

---

### ट्रेझरी बिलांवर ८ आणे ११ पै व्याज

मंगळवार ता. ७ सप्टेंबर रोजीं रिझर्व्ह बँकेनें २ कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलांचीं टेंडरें स्वीकारलीं, त्यावर द. सा. द. शे. ८ आणे ११ पै व्याजाचा दर पडला.

---


# भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारे ५५०, किंमत पांच रुपये

प्रथमत. अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या प्रथात विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा.—

**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

# स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्समध्यें** असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करू शकत नाहींत किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ मेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

आणखी एक

**प्रगतीचा मोठा टप्पा**

५१ लाखांवरून ६६ लाख

# वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लि, सातारा.

विमा व्यवसायांत विशेष महत्त्वाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या अशा ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी कोणत्याहि जीवन विमा कंपनीस हार जाणार नाहीं आणि सुप्रसिद्ध विमागणिती श्री ग स. मराठे, एम् ए, ए आय ए, (लंडन) म्हणतात त्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया ही

सर्व विमाकंपन्यांना आदर्श

अशी विमा संस्था आहे

**गेल्या वर्षअखेरचा प्रगतीचा आढावा.**

| | | |
|---|---|---|
| एकूण विमा | रु | ३,२०,००,०००हून अधिक |
| एकूण शिल्लक | रु. | ८३,००,०००हून अधिक |
| सन १९३६ मधील उत्पन्न | रु | १९,३२,८९९ |
| लाईफ फंड व इतर गंगाजळी | रु | ७७,०५,३७९ |
| सन१९३६मधील नवें काम | रु | ६६,४०,८३९ |
| एकूण क्लेम्स दिले | रु | १७,१०,२०६ |
| ल्याप्सचें प्रमाण | | शेंकडा ४ |

त्रैवार्षिक दर हजारी बोनस

**होल लाईफ रु. ७५ व एण्डोमेण्ट रु. ६०**

विमा उतरण्याला किंवा एजन्सी घेण्याला हीच कंपनी उत्कृष्ट.

पुणें शाखाः— बुधवार चौक, पुणें

मॅनेजर

# NOTICE.

Sealed percentage rate tenders are invited and will be received by the undersigned upto 3 P. M. on Friday the 1st October 1937, for the Construction of R C C slab Causeway with masonry piers and abutments, on the Chikhal Nallah on the Miraj-Bijapur Road, estimated to cost Rs. 29238.

Detailed information regarding the work and the tender form with the conditions of contract and Abstract Sheet can be obtained from the undersigned on payment of Rs 8/- during office hours on working days. An earnest money (in cash) of Rs 1500 must accompany each tender The undersigned does not bind himself to accept the lowest or any tender nor to give the reasons for rejection.

Tenders will be opened the same day in presence of any intending tenderers.

P. W D Office, Miraj.
7th Sept. 1937

Sd/-V P BEDEKAR, B. SC B E.
State Engineer, Miraj.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) | १२०—६ |
| ५% (१९३९–४४) लोन | १०५—१४ |
| ४% १९४३ | १०८—० |
| ३½% बिनमुदत | ९६-१३½ |
| ३½% १९४७–५० | १०६—१२ |
| २¾% १९४८–५२ | १००—२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) | १०९—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२३—० |

### मंडळ्याचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४४—१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११६—१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ६% | ३०—८ |
| इंपीरिअल बँक (५०) १२% | १५४५—० |
| बाँबे प्रॉ को. बँक (५०) ५% | ६१—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १२८—१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४¾% | १०३—८ |
| पाचोरा–जामनेर (१००) ४½% | ९५—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु ४ आ. बोनस | ९५८—१२ |
| तापी व्हॅली (५००) ७½% | ७७३—१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाबे ट्रॅम्वे ऑर्डि (५०) १०% | १७३—१३ |
| कराची (१००) ९% | २७६—१४ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | २१२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १४१७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि (१०००) ७½% | १५६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ८ रु | १७२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु | ५०—० |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु | २९—१४ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु ४ आ. | ४४—८ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ७५ रु बोनस | ४,९००—० |
| टाटा आयर्न प. प्रे (१५०) ६% | २०१—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे (२००) १५ रु २ आ. | १६९—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि (७५) १० रु. | ३५७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु ३ आ. ६ पै | १६७२—८ |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ३४—१३ |
| चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास | ५१—३ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—७ |
| „ केसर प्रत्येक मणास | १०—११ |
| „ सरया प्रत्येक मणास | १०—७ |

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८४,४०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८२३ |
| इतर फड | १,४०८ |
| मुदतबंद ठेवी | १,९४,९०७ |
| सेव्हिंग्ज बॅंक ठेवी | ७,९५९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७७,९७८ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४१,५९९ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्यांहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्



## धी बॅंक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भाडवल | रु २,००,००,००० |
| वसूल झालेलें भाडवल | रु १,००,००,००० |
| रिझर्व्ह फड | रु १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वाद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बॅंक लिमिटेड

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दरगोजच्या रु ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाही कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बॅंकेकडील ठेवी सुद्धा आम्ही ठेवून घेतों, व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों, विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बॅंक करते. नियमाची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बॅंकेचे व्यवहार या बॅंकेमार्फत केले जातात

एजंटः— टी. आर. लालवाणी.



## आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाउंस भी मिलेगा. नियम बहुत सरल हैं ( नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें ).

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

**दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.**

( स्थापित १९१६ ) अमीनाबादपार्क-लखनऊ



## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City



शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.



पुणे येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामे करणारी

टेलरिंग फर्म

## पाटसकर आणि कंपनी

४८ निहाल पेठ, पुणे शहर

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील



## K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you

**NEW BUSINESS**

Last year 1936-37

Exceeds

**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Office* throughout India & the East

S C. MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला

मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचे

देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान

रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा बर्फी**

आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकू.

तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा






अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals

(4) We procure any book published any where and supply it at publisher's price



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्याच्या यांत्रिक युगात, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवता येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणे, पेठ भांबुर्डा घ. न. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२०।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २२ सप्टेंबर, १९३७ अंक ३८

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट
**पांढरें-सत्त्व** किंमत १। रु.
**मलशुद्धी टॅबलेट्स** किं ८आ

या दोन औषधाच्या मदतीनें पोटातील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, कर्पट ढेंकर येणें, छातीतिल जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे.

डॉ. बी. आर. गुणे
पुणे १.

**दि गुड-वुइल**
**ॲशुअरन्स कंपनी लि.**
पोस्ट : मिरज् मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ—
दररोज सकाळी १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात
सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३॥ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात
मॅनेजिंग एजंटस्

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २॥; किंवा प्रथम ६।८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई
ब्रॅंच—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २

ऑफिसचे कामाकरितां **रेमिंग्टन टाईपरायटर**
स्वस्त विकाऊ आहे
मराठी केन्द्र : : हुजूरपागेसमोर पुणें

# विविध माहिती

### मुंबई इलाख्यातील विजेचा प्रसार

विजेच्या वापरावर मुंबई इलाख्यात सरकारी पट्टी आहे, तिचेपासून १९३४-३५ मध्यें ९ लक्ष, ६५ हजार रुपये उत्पन्न झालें होतें. १९३५-३६ सालीं ९ लक्ष, ६९ हजार रुपये उत्पन्न मिळालें गुळेदगुड, इलकल, चाळिसगांव, नदुरबार, महाबळेश्वर, सिन्नर, मालवण व दोहद येथें वीज पुरविण्याकरितां गेल्या वर्षी परवाने देण्यांत आले मुंबई इलाख्यांतील ४३ ठिकाणीं आतां विजेनें प्रवेश केला आहे व १० ठिकाणीं वीज-काम चालू आहे.

### खडवसुलीच्या तहकुबीमुळें वकिलांत बेकारी

सयुक्त प्रांत सरकारनें खडवसुली सबधातील कोर्टातील सर्व दावे तहकूब केले असल्याकारणानें वकिलाचें काम कमी झालें आहे व विशेषत. नवशिक्या वकिलाची ताराबळ उडाली आहे.

### आस्ट्रेलिया-जपान व्यापार—मालाची वहातुक

ऑस्ट्रेलिया व जपान ह्या दोन देशांचे दरम्यान चालणाऱ्या व्यापारातील ८५ टक्के माल जपानी आगबोटींतून वाहिला जातो. ४० वर्षांमागें ह्या वहातुकींत जपानचा कांहींहि भाग नव्हता; आतां १७ जपानी आगबोटी या वहातुकीचे धंद्यांत असून, ब्रिटनच्या फक्त ३ च आगबोटी ह्या मार्गावर मालाची ने-आण करीत आहेत.

### लाहोर येथील कत्तलखान्याची योजना रहित झाली

लाहोर येथील कॅन्टोन्मेंट हद्दींत लष्करी खात्यामार्फत एक कत्तलखाना बांधण्यात येत होता व बाधकामावर ५० लक्ष रु. खर्चहि झाले होते. लोकांच्या धार्मिक भावना दुखविल्या जाण्याचा सभव दिसून आल्यावरून, सरकारनें ही योजना रहित केली असल्याचें जाहीर झालें आहे.

### फॅक्टरी ॲक्टाचे कक्षेंत लहानसहान कारखाने येणार

दहा किंवा दहापेक्षां जास्त कामगार असणाऱ्या व यत्राचे सहायानें काम करणाऱ्या कारखान्यांस फॅक्टरी ॲक्ट व पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट लागू करण्याचा मुबई सरकारचा विचार आहे. सध्या वरील दोनहि कायद्यांस २० कामगारांची किमान मर्यादा आहे

### दुग्धपानाचा प्रसार

कारखान्यांतील व खाणींमधील कामगार आणि कचेऱ्यातील नोकर ह्यांमध्यें दुग्धपानाचा प्रसार ग्रेटब्रिटननें मोठ्या प्रमाणावर केला आहे. कामाचे तासातील सुटीचे वेळीं उपरिनिर्दिष्ट कामगार व नोकर मिळून दरमहा ५ लक्ष गॅलन दूध पितात, असा अजमास आहे.

### टाटा कपनीचे कामगारांस बोनस

आपल्या नफ्यांतील काहीं भाग, कामगारांस त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल देण्याचें धोरण टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीनें अगीकारलेलें असून गेलीं तीन वर्षें असें बोनस देण्यात आलेलें आहे. बोनसच्या पद्धतीस स्थाइकपणा यावा ह्या हेतूनें कंपनीनें यंदाचे वर्षी एक योजना तयार केली आहे तीस अनुसरून ५०० रुपयांपेक्षां कमी दरमहा वेतन असणारास बोनसची रकम तीन हप्त्यानीं देण्यांत येते. बहुसख्य कामगारांनीं आपणांस बोनस एका रकमेनेंच मिळावें, अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, त्याप्रमाणें कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें चालू महिन्यांत द्यावयाच्या दुसऱ्या हप्त्याबरोबर तिसरा हप्ताहि वांटून टाकण्याचें ठरविलें आहे.

### बगदादमध्यें धान्याचीं कोठारें

निर्गत व्यापाराचे सोयीसाठी बगदाद् शहरांत धान्याचीं सहा कोठारें बांधण्याचा तेथील बॅंकेचा विचार आहे. इराकमधील खेडेगांवांस विजेचा पुरवठा करण्याविषयींची योजनाहि सरकार हातीं घेत आहे.

### इंग्लंडमध्यें परदेशस्थ प्रवासी

गेल्या जुलै महिन्यांत ७७,३४९ परदेशस्थ प्रवासी इंग्लंडमध्यें गेले. त्यापैकीं तिसरा हिस्सा अमेरिकन होते.

### हस्तांदोलनास बदी

युरोपिअनाचा हस्तादोलनाचा शिष्टाचार, तो बायकी आहे ह्या कारणानें, मुसोलिनीनें इटलींत बंद केला आहे असें म्हणतात. अमेरिकेच्या प्रेसिडेंटास कित्येक सार्वजनिक समारभांचे प्रसगीं एका वेळेस पांच-सात हजार लोकांशीं हस्तादोलनें करावीं लागतात.

### पृथ्वीचें वय काय?

ब्रिटिश असोसिएशन ह्या शास्त्रज्ञाच्या सभेचे अध्यक्ष, सर एडवर्ड फूल्टन, ह्यांनीं आपल्या भाषणांत पृथ्वीच्या वयाचे सबंधात तज्ज्ञामध्यें झालेल्या मतभेदाचा उल्लेख केला. लॉर्ड केलव्हिन ह्यांच्या मतें तें वय १० कोटि वर्षांचें असलें पाहिजे. भूगर्भशास्त्रवेत्त्यास हें मत न पटून त्यांनीं पृथ्वीचें वयोमान १०० कोटि वर्षे असावें असें प्रतिपादलें!

### वहानांचा वेग किती वाढणार?

नैसर्गिक शक्ति व यान्त्रिक कला ह्यांचे जोरावर वहानांची गति वाढवण्याचे विलक्षण प्रयत्न चालू आहेत. सर माल्कम कॅंबेल ह्यानीं पाण्यावर दर तासास १२६ मैल वेगानें नांव चालवून अमेरिकेंत पहिल्या प्रतीचें बक्षिस नुकतेंच मिळवलें. जमिनीवरचा त्याचा विक्रमाचा वेग दर तासास ३०१ मैल इतका आहे.

### व्यापारी करारावाबत बोलणीं

दक्षिण आफ्रिका, नेदरलंड ईस्ट इंडीज, सयाम व मस्कत ह्या देशांशीं व्यापारी करारावाबत हिंदुस्थान सरकारच्या वाटाघाटी चालू आहेत.

### मुंबई बंदराची भरभराट

मुंबई बंदरांतून होणारी मालाची आयात-निर्गत वाढत असल्यानें, पोर्ट ट्रस्टला १९३६-३७ मध्यें १४$\frac{3}{4}$ लक्ष रुपये, खर्च वजा जाऊन, शिलक राहिले. बदरांत एकूण सुमारें २,००० मजूर कामावर आहेत. दर टन ओझ्यामागें हमालीचें प्रमाण ३·८४ आणे पडलें.

### रेलवेच्या रुळाची लांबी १८० फूट

रुळाच्या सांध्यावरून जातांना आगगाडीस धक्के बसतात व आवाज होतो. रुळांची सध्याची ६० फुटाची लांबी वाढवून ती १८० फूट केल्यास सांध्यांची संख्या कमी होईल व प्रवास ज्यास्त सुखकर होईल, ह्या हतूनें ग्रेट ब्रिटनमधील सदर्न रेलवेनें प्रयोग चालू केले आहेत. एका बोगद्यांतील रेलवे रस्ता ह्याकरितां प्रथम निवडण्यांत आला आहे, कारण तेथें हवामानात चढउतार कमी होतो. वरील बोगद्याची लांबी १$\frac{3}{4}$ मैल आहे. रुळाच्या सांध्यावर बसणाऱ्या धक्क्यांवरून आगगाडीचा वेग अजमावणें ह्यापुढें कठीण होईल, कारण लांब रुळामुळें हे धक्के चटकन ओळखतां येणार नाहींत, असें म्हणतात.

### मुबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किमत रु. |
|---|---|
| ५-९-३७ ते ११-९-३७ | २९,५३,१९९ |
| १२-९-३७ ते १८-९-३७ | ३३,४२,७४९ |
| २१-९-३१ ते १८-९-३७ | ३,०३,५९,०५,७३६ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४६८ | सायिक शिक्षण व मुंबई-सरकार—विमा विषयक बिलांत महत्त्वाची दुरुस्ती—हुड्यांचा सकार | |
| २ रिझर्व्ह बँक आणि सराफ | ४६९ | ५ कपड्याच्या शिलाईचा धंदा ... | ४७३ |
| ३ हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य .. | ४७० | ६ सहकारी चळवळ | ४७४ |
| ४ स्फुट विचार ... | ४७१ | ७ केसांतील आकड्यावरून कल्पना सुचली | ४७६ |
| हिंदी लष्करी खर्च वाढणार ?—बिहार सरकार आणि स्वदेशी साखर—लहान स्वदेशी धंद्यास सरक्षण हवें—कागद व लाकडाचा रांधा—व्याव- | | ८ लांकूड, कोळसा, पेट्रोल व वीज | ४७६ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ४७७ |



# अर्थ

बुधवार, ता २२ सप्टेंबर, १९३७


## रिझर्व्ह बँक आणि सराफ

देशात आर्थिक व्यवहारासाठी लागणाऱ्या चलनाचा जरूरीप्रमाणें पुरवठा करून समाजात खेळणाऱ्या विनिमय-साधनाचें नियमन करणें हा रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचा प्रमुख हेतु आहे सोनें आणि चांदीचे रुपये ह्याचा योग्य संचय जवळ राखून नोटा बाहेर काढणें किंवा आंत परत घेणें ह्या गोष्टी केल्या असता त्या बँकेस आपलें पहिलें कार्य यशस्वी करता येतें परंतु समाजांत पैसा खेळतो व इतर विनिमय-साधनें देवघेवीचें काम भागवतात, त्याचें नियत्रण कसें व्हावें ? विनिमय-साधनांत रुपये व इतर नाणीं आणि नोटा ह्याचाच अंतर्भाव होतो असें नसून चेक व हुंड्या ह्याचाहि देणें-घेणें पुरें पाडण्याचे कामीं उपयोग केला जातो. बँका आपल्या गिऱ्हाइकास कर्जे देतात तेव्हां उत्पन्न झालेल्या पतीच्या जोरावर कर्जदार चेक काढतात आणि त्याचा उपयोग रुपये किंवा नोटा याच्यासारखा करतात. म्हणजे, चेक व हुड्या ह्याचें समाजांत खेळणारें चलनच बनतें आणि म्हणून त्यास “ बँकेनें निर्माण केलेला पैसा ” असें म्हणतात ह्या सर्व चलनाचें नियत्रण करून मागणी-पुरवठ्याच्या दृष्टीनें तो वेळोवेळ कमीजास्त होईल अशी परिस्थिति घडवून आणणें हें कार्य रिझर्व्ह बँकेनें करावयास हवें. इतर देशात मध्यवर्ती बँका आहेत, ह्या मुख्यतः हेंच कार्य करतात आणि तें यशस्वीहि होत असतें हिंदुस्थानातली त्या प्रकारची संस्था म्हणजे रिझर्व्ह बँक आणि तिनेंहि सदरहु काम करणें आवश्यक आहे. पाच लक्ष रुपयाचें भाडवल असलेल्या बँका तिला जोडल्या आहेत आणि त्यास तिचेकडून लागेल तेव्हा योग्य तारणावर पैसा मिळण्याची सोय करण्यांत आली आहे ती ह्याचकरितां होय. चणचणीचे वेळीं व्याजाचे दर कडाडतात तेव्हा बँकास त्याच्या हुड्या विकत घेऊन रिझर्व्ह बँकेनें पैसा पुरवावा अशी व्यवस्था करण्यांत आली आहे तिचा उद्देश पैशाचा खेळता पुरवठा वाढवणें हाच आहे.

हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत येथें एक अडचण भासते ती ही कीं, आमचेकडील पुष्कळसा अतर्गत व्यापार आधुनिक घटनेच्या बँकांच्या कक्षेबाहेर चालतो आणि त्यांत देशी सराफांचाच पैसा खेळत असतो. मोसमामध्यें पैशाची टंचाई भासते तेव्हां खेळता पैसा दुर्मिळ होतो आणि सराफी हुंडीचा भाव बाजारांत. विलक्षण रीतीनें चढतो. रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या बँकांची सोय ज्याप्रमाणें ती बँक पहाते, त्याप्रमाणें ह्या सराफांची सोय पाहिली जात नाहीं आणि ह्या कारणानें व्यवहारांत खेळणारें चलन कमी-ज्यास्त करून व्यापारास लागणारा पैसा पतीच्या जोरावर पुरवणें हें रिझर्व्ह बँकेचें कार्य येथें सिद्ध होत नाहीं ही दुहेरी अडचण दूर करण्यास कायद्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेपाशी साधन नाहीं, कारण, कायद्यात व्यापारी बँका आणि प्रांतिक सहकारी बँका ह्याची तरतूद केलेली आहे, तशी देशी पद्धतीनें व्यवहार करणाऱ्या सराफांची नाहीं. ह्याबाबतींत चौकशी करून सराफाच्या व्यवहाराचाहि सबंध रिझर्व्ह बँकेशीं जोडणें शक्य असल्यास त्याप्रमाणें एखादी योजना सुचविली जाण्याची व्यवस्था कायद्यात आहे. तिला धरून रिझर्व्ह बँकेनें एक योजना नुकतीच प्रसिद्ध केली आहे. जोडलेल्या बँकाचें एकूण भाडवल निदान पाच लक्ष असलें पाहिजे अशी अट आहे, ती सराफाचे बाबतींत दोन लक्षावर खाली आणण्यात येईल आणि रिझर्व्ह बँकेपाशीं त्यांनीं आपल्याजवळील ठेवींचा विशिष्ट प्रमाणांत हिस्सा बिनव्याजी राखला पाहिजे, ही अट घालण्यांत यावयाची नाहीं पण व्यापारी बँकांप्रमाणें सराफास सर्व सवलती मिळावयाच्या तर सराफांनीं बँकिंग व्यतिरिक्त दुसरे व्यवहार करावयाचें सोडलें पाहिजे आणि विशिष्ट पद्धतीनें आपले हिशेब ठेवून ते योग्य रीतीनें तपासून घेतले पाहिजेत. तसेंच, त्यांनीं वेळोवेळ रिझर्व्ह बँकेस ठराविक रीतीनें मागण्यांत येणारी माहिती पुरवली पाहिजे. ह्यापैकीं काहीं अटी सराफास कडक वाटतील, पण त्या सामान्यतः सयुक्तिक व सरळ आहेत हें त्यासहि मान्य करावें लागेल. रिझर्व्ह बँकेनें सराफाचेकडून अभिप्राय गोळा करून आपली योजना तयार केलेली असून ती पुन्हां त्याचे पुढें आतां ठेवली गेली आहे. वर दिलेल्या अटींच्या मर्यादेंत किती सराफ येऊ शकतील ह्याची कल्पना रिझर्व्ह बँकेस हवी आहे. ती सराफ मंडळांनीं पुरवावी आणि त्या योजनेंत काय कमी-जास्त होणें आवश्यक आहे तेंहि स्पष्ट रीतीनें पुढें मांडण्यात यावें. बँकेच्या सामान्य व्याख्येंत सराफ बसावे आणि व्यापारी बँकाच्या व्यवहाराप्रमाणें त्यांच्या व्यवहारावरहि रिझर्व्ह बँकेस नजर ठेवता यावी, हा त्या बँकेच्या योजनेच्या मुळांतला उद्देश आहे. तो साध्य होण्यास दुसरे काहीं मार्ग सुचवितां आल्यास त्याचाहि योग्य विचार होईल अशी आम्हांस आशा आहे

### शर्यतींचा नाद-बेडूक व गोगलगायी !

शर्यतींमध्यें पैज लावण्याचा नाद लोकास किती लागला आहे हें प्रसिद्धच आहे घोड्याच्या शर्यतींनीं तृप्ती न होऊन इंग्लंडसारख्या पाश्चात्य देशांत कुत्र्याच्या शर्यती त्याच धर्तीवर चालवण्यांत येत आहेत. विजेच्या जोरानें पुढें एक ससा पळवला जातो आणि त्याच्या मागें परस्परांशीं स्पर्धा करणारे कुत्रे धावतात. ह्याच तऱ्हेनें दुसऱ्या प्राण्याच्याहि शर्यती कां लावूं नयेत? ह्या कल्पनेनें काहीं लोकांनीं उंदराच्यामागें धांवणाऱ्या मांजराच्या शर्यती करण्याचा उद्योग आरंभला आहे मनुष्याच्या कल्पकतेस मर्यादा नसल्यानें उड्या मारणारे बेडूक आणि संथपणानें जाणाऱ्या गोगलगायी ह्याच्याहि शर्यती कित्येक ठिकाणीं करण्यात येत असल्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे

## हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य

### प्रो. काळे ह्यांचीं ग्वालेर येथील व्याख्यानें

(२)

ग्वालेरास सरकाररीत्या साजरा झालेल्या गणेशोत्सवात जय विलास पॅलेसमध्यें प्रो. काळे ह्यांनीं वरील विषयावर व्याख्यान दिलें, त्याचा सारांशः—

"धार्मिक उत्सवांत उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांसारख्या ऐहिक विषयावर व्याख्यान देणें कोणास चमत्कारिक वाटेल परंतु हिंदु धर्मांत व संस्कृतींत पारमार्थिक आणि ऐहिक जीविताचा उत्कृष्ट मेळ घालण्यांत आला आहे, हें लक्षात ठेवलें पाहिजे कौटिल्य ह्या राजकारणी विद्वान पुरुषानें आपला "अर्थशास्त्र" नांवाचा ग्रंथ दोन हजार वर्षांमागें लिहिला त्यांत तत्त्वज्ञान, वेद, अर्थकरण व दंडनीति या चार विद्या असून अर्थ हा त्यामध्यें अत्यंत महत्त्वाचा विषय आहे असा स्पष्ट अभिप्राय त्या व्यवहारचतुर मुत्सद्यानें व्यक्त केला आहे अर्थ म्हणजे संपत्ति असेल तरच धर्म शक्य होईल असें त्याचें मत आहे ह्या मताची परंपरा हिंदुस्थानांत शेकडो वर्षे चालत राहिली आणि हें तिचें सातत्य कौटिलीय "अर्थशास्त्रा"वरील आपल्या अलीकडील ग्रंथांत एका जर्मन प्रोफेसरानें मराठी साम्राज्याच्या पेशवेदप्तरातील कागदपत्रांवरून सिद्ध केलेलें मीं नुकतेंच पाहिलें.

"एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत हिंदुस्थानांतील आर्थिक घटना अनेकांगी होती आणि तिच्यामध्यें उद्योगधंद, व्यापार, सराफी व शेती ह्याचा योग्य मेळ बसलेला होता. इग्लंडमध्यें मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक पद्धतींच्या कारखान्यास प्रारंभ झाला त्याचा परिणाम जगातील सर्व देशांच्या आर्थिक परिस्थितीवर घडून आला. अमेरिका, जर्मनी, फ्रान्स इत्यादि राष्ट्रांनीं हळूहळू ग्रेटब्रिटनचें अनुकरण करून त्या देशाशी यशस्वी स्पर्धा आरंभिली. पुढें जपाननें तेंच केलें आणि औद्योगिक प्रगतीमध्यें पाश्चात्य राष्ट्रावरहि ताण केली. ह्या उलाढालींत हिंदुस्थान देश मात्र मागें राहिला. हिंदी उद्योगधंद्यात सुधारणा झाली नाहीं, शेतीच्या धंद्यावर वाढत्या लोकसंख्येचा ताण पडूं लागला, जुने धंदे बुडत चालले आणि त्यांची जागा नव्यानीं घेतली नाहीं.

"महायुद्धाच्या अनुभवानें थोडासा शहाणपणा शिकवला तेव्हां स्वदेशी उद्योगधंद्यास संरक्षण देण्याचें धोरण हिंदुस्थान सरकारास अंगिकारावें लागलें. पण औद्योगिक उन्नतीचें पाऊल पुढें पडण्यास सुरवात होते न होते तोंच आर्थिक मंदीनें देशास गाठलें बाजारभाव विलक्षण उतरल्यानें शेतकरी वर्गाची हलाखी उडाली आहे आणि सोन्याच्या निर्गतीच्या मार्गानें देशाचें भांडवल कमी झालें आहे. जगामध्यें चोहोंकडे राष्ट्राचा परस्परांविषयीं अविश्वास प्रकट होत आहे आणि प्रत्यक्ष युद्धें व भावी मोठ्या युद्धाची भीति ह्यानीं प्रगतीचा मार्ग बंद केला आहे सर्व देश आर्थिक बाबतींत स्वावलंबी होत आहेत आणि स्वतःच्या विविध उद्योगधंद्यास झीज सोसूनहि उत्तेजन देत आहेत. जगातील व्यापाराच्या गाड्यास खीळ बसली आहे आणि आंतरराष्ट्रीय देवघेव मर्यादित होऊन चलनपद्धतींत सर्वत्र अव्यवस्था माजली आहे अशा स्थितींत हिंदुस्थानच्या वाढत्या लोकसंख्येचा संसार कसा चालावा हा प्रश्न आपणापुढें उभा आहे. जर्मनीस आपल्या वसाहती परत मिळावयास हव्या आहेत आणि जपान चीनमध्यें आपलें घोडें दामटीत आहे जगांतील मोकळ्या प्रदेशांत वसाहती करून रहाण्याची-सवड हिंदी लोकास कां मिळूं नये? त्यांनींहि आपल्या ह्या हक्कासाठी झगडलें पाहिजे. हिंदुस्थानातील सरकारांनीं दुसऱ्या राष्ट्रांचें अनुकरण करून येथील उद्योगधंदे, व्यापार व शेती ह्यांच्या उन्नतीची व्यवस्था हातीं घेणें अगत्याचें आहे. असें न होईल तर ह्या देशाची आर्थिक स्थिति सुधारण्याची आशा रहाणार नाहीं. मध्यवर्ती स्वायत्त प्रांतिक सरकारें आणि हिंदी संस्थानें ह्याचे हितसंबंध परस्पराशीं निगडित झाले आहेत आणि त्या सर्वांचे पुढें सारखेच प्रश्न व सारख्याच अडचणी उभ्या आहेत. सध्याच्या निराशाजनक वातावरणातहि हिंदी जनतेनें व राज्यकर्त्यांनीं बुद्धिपुरःसर, जुटीनें व विश्वासानें आर्थिक संघटन केलें तर त्याच्या कार्यक्रमास यश मिळाल्यावांचून रहाणार नाहीं. जेथें सर्व जग बदलत आहे, तेथें आम्हीं स्वस्थ बसून कसें चालेल? हिंदी लोकानीं आळस झाडून उद्योगास लागलें पाहिजे आणि आपल्या राष्ट्राची औद्योगिक उन्नति परस्परसहायानें व स्वपराक्रमानें घडवून आणली पाहिजे."

### मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीस खो मिळणार

विमा बिलातील मॅनेजिंग एजटाबाबतची योजना गेल्या शनिवारीं व सोमवारीं असेंब्लींत चर्चिली गेली. सरकारचें ह्या संबंधातील धोरण स्पष्ट होतें व मॅनेजिंग एजंटाची आयुर्मर्यादा शक्य तितकी मर्यादित करण्याचा सर नृपेंद्रनाथ सरकार ह्याचा मानस होता कायदा पास झाल्यानंतर स्थापन होणाऱ्या कोणत्याहि विमा कंपनीचा कारभार मॅनेजिंग एजटाचे हातीं असता कामा नये व सध्या अस्तित्वांत असलेल्या एजटाचे करार तीन वर्षानंतर रद्द व्हावेत अशा अर्थाची दुरुस्ती डॉ. झियाउद्दीन अहमद ह्यांनीं सुचविली व सरकारतर्फे सर नृपेंद्रानीं तिला पाठिंबा दिला आयुर्विम्याचें काम करणाऱ्या कंपन्यास मॅनेजिंग एजंटाच्या विशिष्ट सहायाची आतां आवश्यकता उरली नसली, तरी इतर प्रकारच्या विमा व्यवसायाचें त्यांच्यावाचून भागणार नाहीं, अशी भूमिका कॉंग्रेस पक्षानें घेतली, परंतु सभागृहातील इतर प्रमुख पक्षास ती पटली नाहीं. मॅनेजिंग एजटाची पद्धतिच अहितकारक ठरवून टाकल्यानंतर डावें-उजवें बघण्याचा प्रश्नच उरत नाहीं, असा मुद्दा पुढें मांडण्यात आला.

---

### वेड्याच्या इस्पितळातील रोगी

१९३६ सालीं मुंबई इलाख्यातील वेड्याच्या सर्व इस्पितळांत मिळून २,९०० व्यथित होते ८३६ लोकांस नव्यानें अगर पुनः प्रवेश मिळाला, ३९३ लोकाचें वेड बरें होऊन त्यांस सोडण्यात आलें, १२५ वेड्याची स्थिति सुधारली व ३३ जणाची अन्य कारणाकरिता मुक्तता करण्यात आली. २०३ रोगी इस्पितळात मरण पावले ह्या इस्पितळाप्रीत्यर्थ मुंबई सरकारनें ७½ लक्ष रु खर्च केले आणि त्यापैकीं वसुली वजा जातां सरकारास ३½ लक्ष रु निवळ खर्च आला.

नोव्हेंबरमधील
टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे
व्यापारी परीक्षेचा
— खास वर्ग —
चालक, पुणे व्यापारी शाळा,
पुष्कर्णी हौदासमोर पुणें

## स्फुट विचार

### हिंदी लष्करी खर्च वाढणार ?

हिंदुस्थान सरकारचा लष्करी खर्च हिंदी जनतेच्या ऐपतीच्या मानानें अवाढव्य आहे आणि तो कमी करण्यांत आल्यावांचून राष्ट्राची उन्नति होण्यास लागणारा पैसा उपलब्ध व्हावयाचा नाहीं; त्याचप्रमाणें, हिंदी फौजेमध्यें हिंदी लोकांचा भरणा केल्यास काटकसर करतां येऊन देशाचें रक्षण जनतेच्या हातीं येण्याचें श्रेय मिळेल असा अभिप्राय मध्यवर्ती कायदे मंडळांत लोकप्रतिनिधींनीं व्यक्त केला त्यास फार दिवस लोटले नाहींत. सरकारच्या खर्चांत काटकसर होण्यास जागा नाहीं आणि सैन्याचाहि खर्च कमी होणें शक्य नाहीं असें त्यांस अधिकारी प्रतिनिधींनीं स्वच्छ सांगितलें होतें. परतु हें प्रकरण एवढ्यावरच थांबत नाहीं असें आतां स्पष्ट झालें असून लष्करी खर्च वाढवावयाचा सरकारचा विचार असल्याचें व्हाइसरॉयांनीं कायदेमंडळांत केलेल्या आपल्या भाषणांत असंदिग्ध रीतीनें सांगितलें सर्व राष्ट्रें आपल्या फौजात यांत्रिक सामुग्री वाढवीत आहेत आणि शस्त्रास्त्रें अधिक कार्यक्षम बनवीत आहेत. अशा स्थितींत हिंदुस्थाननें त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालणें आवश्यक आहे असें सरकारचें म्हणणें आहे, त्यांत नवीन कांहीं नाहीं. लष्करी खर्चांत व्हावयाची वाढ बरीच मोठी आहे असें व्हाइसरॉयाच्या भाषणावरून उघड होत आहे आणि ती हिंदुस्थानास झेपण्यासारखीहि नाहीं ह्याची जाणीव सरकारास आहे ह्यांत संशय नाहीं. हिंदी फौजेची घटना आणि तिचा उद्देश हीं अशा प्रकारचीं आहेत कीं, ब्रिटिश साम्राज्यसरकारानें तिच्या खर्चांत अंशभागी होण्याची आवश्यकता हिदुस्थान सरकारासहि भासत आहे. योजनेचा जादा खर्च डोईजड असल्यानें त्याच्या ओझ्यांतला हिस्सा ब्रिटिश सरकारानें उचलावा अशी मागणी येथील सरकारानें केली आहे आणि ती मान्य होईल अशी आशा व्हाइसरॉयांनीं प्रकट केली आहे. हिंदी सरकारचें लष्करी धोरण ग्रेटब्रिटनमध्यें निश्चित होत असल्याकारणानें ह्या दोन सरकाराचा प्रस्तुत प्रकरणीं विचारविनिमय चालला असला पाहिजे हें स्पष्ट आहे. हिंदुस्थानातील लष्करी व्यवस्थेंत सुधारणा होण्यास ब्रिटिश सरकार ह्या देशास सहाय देऊन जणूं काय त्याचेवर उपकार करणार असें स्वरूप ह्या प्रश्नास दिलें जात आहे तें यथार्थ तर नाहींच; परतु साम्राज्य सरकारानें केवढीहि रकम दिली तरी हिंदी जनतेवर जादा बोजा पडण्याचा चुकत नाहीं. मामुली लष्करी खर्चांत बचत होण्याचें बाजूस राहून तो वाढण्याचें निश्चित झाल्याचें स्पष्ट झालें आहे.

### बिहार सरकार आणि स्वदेशी साखर

स्वदेशी साखरेस जकातीचें सरक्षण चालू ठेवण्याचे बाबतींत टॅरिफ बोर्ड चौकशी करीत आहे. त्यास बिहार प्राताच्या सरकारनें आपला अभिप्राय कळवला आहे, तो मुंबईच्या प्रधानमंडळानें विचारांत घेणें आणि त्या तऱ्हेनें आपलें मत प्रगट करणें अगत्याचें आहे. आमच्या प्राताचें सरकार आणि प्रांतिक साखरेचा व उंसाचा धंदा ह्यांच्या सांपत्तिक हिताचा संबंध संरक्षणाच्या प्रश्नाशीं किती निकट आहे, हें आम्हीं मागें अनेक वेळा दाखविलें आहे. बहारमधील शेतकऱ्यांनीं पिकवलेला ऊस तेथील कारखान्यांत मुख्यत्वें करून उपयोगांत येत असल्यामुळें कारखान्याचें योग्य संरक्षण होऊन शेतकऱ्यांच्या हातांत उंसाची वाजवी किंमत पडली पाहिजे असा तेथील सरकारचा आग्रह आहे. ऊस तयार करण्याचा व तो कारखान्यांत नेऊन विकण्याचा खर्च आणि त्याचबरोबर रीतसर नफा शेतकऱ्यांच्या हातीं पडण्यास दरमणी सहा आणे इतकी किमत त्यास मिळणें आवश्यक आहे असें त्या सरकारचें म्हणणें आहे कामकऱ्यांस पुरेसें वेतन देऊन चालविण्यांत आलेल्या कारखान्यांत तयार होणारी साखर कलकत्त्यांत ९¾ रुपये मणानें जाऊन पडते आणि सध्याची आयात जकात देऊन जावाच्या कारखानदारास आपला माल तेथें ९ रुपये ९ आणे मण ह्या भावानें उतरता येतो. ही किमतीमधली तफावत परदेशी साखरेशी स्पर्धा यशस्वीपणानें करता येण्यास देशी कारखानदारांस पुरेशी नाहीं. एवढ्याकरितां चालू संरक्षक आयात-जकातीचा दर कायम करण्यांत यावा एवढेंच नव्हे तर देशी साखरेवरची पट्टी दूर करण्यात यावी अशी सूचना बिहार सरकारनें केली आहे. ह्याप्रकारची संरक्षणासबधाची दुहेरी मागणी त्या सरकारनें पुढें माडली आहे ह्याबद्दल त्याचें अभिनंदन करणें जरूर आहे. मुंबई सरकारानें ह्या धर्तीवर आपल्या प्रांतांतल्या साखरेच्या धद्यास सहाय मिळण्याकरिता स्वतःचें मत टॅरिफ बोर्डास कळवून तें जाहीर केलें पाहिजे. आमचें प्रांतिक प्रधान मंडळ ह्याविषयींचें आपलें कर्तव्य बजावील अशी आम्हास आशा आहे.

### लहान स्वदेशी धंद्यांस संरक्षण हवें

अनेक लहान स्वदेशी धदे, त्यांस जरूर तें सरक्षण मिळाल्यास, चालू शकतील, परतु जपानीसारख्या परदेशी मालाची तीव्र स्पर्धा त्यास सहन करावी लागते, असा अनुभव आहे. हिंदुस्थानांत लहान मोठ्या सर्वच धंद्यांची जोपासना होणें अगत्याचें आहे. तथापि, मोठ्या प्रमाणावरील धंद्याची दाद जेथें नीट लागत नाहीं तेथें बिचाऱ्या लहान धंद्यास कोण विचारणार ? अशी आजची स्थिति आहे. अलीकडे हिंदुस्थान सरकारचें ह्या विषयाकडे विशेष लक्ष वेधलें गेल्यानें त्या बाबत त्यानीं चौकशी करण्याचें ठरवून सदरहु कामावर मि आर. के. नेहरू ह्या सिव्हिलियन अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे त्यांनीं सुमारें पन्नास छोटेखानी उद्योगधंद्यांच्या परिस्थितीची माहिती गोळा करण्याचें काम हातीं घेतलें आहे आणि त्यांस संरक्षणाची आवश्यकता आहे कीं काय हें ते पहाणार आहेत. मि नेहरू ह्यांच्या चौकशीचा रिपोर्ट मात्र प्रसिद्ध केला जाणार नाहीं असें सरकारतर्फे कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सागण्यात आलें. ह्या रिपोर्टांत असें काय गुप्त असणार आहे कीं त्यास प्रसिद्धी मिळाल्यास कोणाचें नुकसान होईल ? उलट, एवढ्या श्रमानें व खर्चानें गोळा झालेली माहिती जनतेस मिळणें अगत्याचें आहे. लहान-सहान धंद्यांची आज स्थिति काय आहे, त्यांपैकीं कोणत्या उद्योगास सहाय मिळालें असता ते चालू शकतील इत्यादि गोष्टी विस्तृत रीतीनें जितक्या प्रसिद्ध होतील तितक्या चांगल्या. श्री. नेहरू ह्याचा रिपोर्ट प्रसिद्ध होण्याविषयीं कायदेमंडळानें आग्रह धरला पाहिजे.

### कागद व लांकडाचा रांधा

वृत्तपत्रास लागणाऱ्या कागदाच्या किंमती चढल्या आहेत, त्या कित्येक महिने तशाच राहून पुढें खात्रीनें उतरतील असा अंदाज करण्यांत आला आहे लाकडाचा राधा महागल्यामुळें कागदाच्या किंमती चढल्या आहेत, परतु मागणी व किंमती वाढल्या असतां पुरवठा वाढण्याची प्रवृत्ति उत्पन्न झालीच

पाहिजे हा अर्थशास्त्रीय नियम येथें लागू पडणार आहे. मोठे कागदाचे कारखाने आणि मोठे वर्तमानपत्रवाले ह्यानीं आपणांस लागणाऱ्या मालाची कित्येक महिन्यांची तजवीज अगाऊ केली आहे. अमेरिका, जपान इत्यादि देशांत नवीन कारखाने निघत आहेत आणि रांध्याकरितां लाकडाचा पुरवठा होईल अशी जादा व्यवस्था होत आहे. ह्या पूर्व तयारीस कांहीं काळ लागणें अपरिहार्य आहे म्हणून, पुढच्या सालापर्यंत रांध्याचा नवीन पुरवठा हातीं येण्याची अपेक्षा करता येत नाहीं. पण कागदाची महागाई एक वर्षाच्या अवधींत कमी होईल असा तज्ञांचा अजमास आहे. पुरवठा वाढला म्हणजे स्कँडेनेव्हियामधील रांध्यांच्या कारखानदाराच्या संघाचे भाव चढवण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहींत असें त्यांचें म्हणणें आहे.

---

## व्यावसायिक शिक्षण व मुबई सरकार

मोठमोठ्या कारखान्याबरोबर हस्तव्यवसायांस जर्मनीसारख्या देशात किती महत्त्व देण्यात येतें, ह्याची कल्पना, ह्या व्यवसायाच्या शिक्षणाबाबतचे आकडे पाहिले असतां सहज येते. हस्तव्यवसायांतल्या नैपुण्याबद्दल १९३३ मध्यें जर्मनींत २४,००० प्रशस्तीपत्रकें देण्यात आलीं होतीं, १९३६ सालीं त्यांची संख्या ६०,००० झाली. औद्योगिक शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या वरील अवधींत ४,२०,००० ची ५,९०,००० झाली. हस्तव्यवसायांच्या शिक्षणाची ह्या प्रकारची तरतूद आमच्या देशात अत्यत आवश्यक असतां ह्या प्रश्नाकडे दुर्दैवानें आमचें सरकार व पुढारी ह्यांचें लक्ष विशेषसें गेलेलें नाहीं. हिंदी शिक्षणपद्धतीमधील दोष आणि ते दूर करण्याची आवश्यकता याची चर्चा आजवर पुष्कळ झाली आहे, तरी इच्छित सुधारणेस अजून प्रारंभहि झालेला नाहीं, असें म्हणावें लागतें मुबईच्या विधिमंडळात शिक्षणाबाबत अलीकडे विस्तृत वादविवाद होऊन प्रधानमंडळानें आपल्या शिक्षणविषयक धोरणाची रूपरेखा स्थूलमानानें दिग्दर्शित केली आहे, तीवरून नवीन प्रकारच्या शिक्षणपद्धतीस लवकरच सरकार हात घालील असा रग दिसत आहे हिंदी राष्ट्राच्या आजच्या सामाजिक आणि आर्थिक गरजास अनुलक्षूनच प्राथमिक व दुय्यम प्रतीच्या शिक्षणाची व्यवस्था होणें अगत्याचें आहे, ही गोष्ट समजण्यास अत्यत सोपी असूनहि ती कृतींत कां उतरत नाहीं ह्याचा विचार सरकारनें केला पाहिजे. स्थानिक स्वराज्य सस्थाच्या हातीं दिलेलें प्राथमिक शिक्षणाचें कार्य नीट वठलेलें नसल्यानें प्रातिक सरकारनें त्याचीं सूत्रें आपल्याकडे घेतलीं पाहिजेत असें मुबईच्या प्रधानांनीं ध्वनित केलें आहे. दुय्यम प्रतीच्या शिक्षणासहि व्यावहारिक वळण लावलें गेलें पाहिजे आणि विश्वविद्यालयीन शिक्षण-पद्धतीचें योग्य स्थान व कार्य हीं निश्चित झालीं पाहिजेत. ही सर्व सुधारणा अल्प कालात घडून येणें शक्य नाहीं आणि तिच्या मार्गांत अनेक अडचणीहि आहेत तथापि, इष्ट असलेल्या प्रगतीसंबंधानें ठाम कल्पना आणि त्यांस अनुसरून आखलेला कार्यक्रम प्रथम तयार होऊन शक्य तितक्या विधायक कार्यक्रमास सरकारनें प्रारंभ केला तर खऱ्याखुऱ्या प्रगतीच्या मार्गांत पुढें पाऊल टाकल्यासारखें होईल प्रातिक प्रधान मंडळाच्या शिक्षणविषयक योजना पुढील वर्षीचें अदाजपत्रक तयार होण्यापूर्वी येत्या चार–पांच महिन्यांत निश्चित झाल्या पाहिजेत, हें उघड आहे.

---

## विमाविषयक बिलांत महत्त्वाची दुरुस्ती

सध्या मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें विमाविषयक बिलाची चर्चा चालली आहे आणि अनेक उपसूचना पुढें मांडण्यांत येत आहेत. विमा मंडळ्यानीं हिंदुस्थानात व इतर देशांत त्यांच्या झालेल्या व्यवहारांचे आकडे स्वतंत्र रीतीनें पुरवावे अशा आशयाच्या एक उपसूचनेवर खडाजंगी होऊन सरकारचे व युरोपिअन प्रतिनिधि ह्याचा विरोध असताहि ती मंजूर झाली. परदेशी मंडळयांचा व्यवहार हिंदुस्थानांत किती होतो आणि त्यासाठी लाइफ फंड किती असतो ह्या विषयींची माहिती येथील जनतेस असणें अगत्याचें असून इतरत्र मिळवलेल्या फायद्यांतून ह्या देशांत त्या बोनस वांटतात ह्यामुळें स्वदेशी विमा मंडळ्याशी होणाऱ्या अनिष्ट स्पर्धेस आळा बसावा हा सद्‌हु उपसूचनेचा उद्देश होता. निरनिराळ्या देशांतील व्यवहाराचे व लाइफ फंडाचे हिशेब स्वतंत्र ठेवल्यास मडळ्यांच्या सांपत्तिक स्थितींत व वांटावयाच्या बोनसमध्यें एकसूत्रीपणा रहाणार नाहीं आणि विमेदारांचें निष्कारण नुकसान होईल अशी भीति युरोपिअन आणि सरकारी सभासद ह्यानीं व्यक्त केली. हिंदी मंडळयास आपल्या व्यवहारांची माहिती प्रसिद्ध करण्याबाबत जे नियम लागू आहेत तेच परराष्ट्रीय मंडळ्यांस उपसूचनेनें लागू होतील, आणि त्यास कां विरोध व्हावा हें आपणांस समजत नाहीं असा युक्तिवाद उपसूचनेचे बाजूनें अनेक सभासदांकडून करण्यांत आला. त्यावर समाधानकारक उत्तर सरकारी व युरोपिअन सभासदांकडून मिळालें नाहीं. उपसूचनेची आवश्यकता नाहीं असें सांगण्यात आलें असतां, ती पास झाल्यानें निदान काहीं बिघडत नाहीं, असा कोटिक्रम स्वाभाविकपणेंच झाला आणि बहुमतानें ती मान्य करण्यात आली. १९३४ सालीं परदेशी कंपन्याचें हिंदुस्थानातील प्रीमियमचें उत्पन्न सुमारें पावणेपाच कोटि रुपये होतें तर हिंदी कंपन्याचें साडेसहा कोटींच्यावर होतें, ह्यावरून देशी कंपन्यास बाहेरील मडळ्याची स्पर्धा फारशी बाधत नाहीं असें अनुमान सर नृपेंद्र सरकार ह्यानीं काढलें. पण हिंदी कंपन्यांस विमा क्षेत्रात आक्रमण करण्याजोगें केवढें मोठें क्षेत्र आहे, एवढेंच त्यामुळें सिद्ध झालें आपल्या मूल्यमापनाचे वगैरे आकडे हिंदी मंडळ्यानीं प्रसिद्ध केले पाहिजेत आणि परदेशी कपन्याचे व्यवहार मात्र गुप्त रहावे हा वास्तविक अन्याय आहे, ह्या मुद्याचें आविष्करण सर कावसजी जहागीर ह्यानीं उत्कृष्ट रीतीनें केलें.

---

## हुड्यांचा सकार–हायकोर्टाचा निर्णय

हुडी म्हणजे धनकोनें रिणकोला लिहिलेलें आज्ञापत्र. ज्याला रकम मिळावयाची असेल, त्यानें हातीं हुडी येताच जो पैसे देण्यास बाधलेला असेल, त्याचेकडून हुडीवर सही मिळवावी लागते. ह्या सहीचा म्हणजे सकारण्याचा अर्थ, सही करणारा इसम रकम देण्यास बांधलेला आहे, असा होतो. सकारणारानें आपणावरील जबाबदारी टाळल्यास, दुसऱ्या कोणाकडून रकम मिळावी, ह्यासाठी इतरहि कांहीं इसमाचीं नावें हुंडीवर लिहिण्यांत येतात. हुडी सकारणारानें आपलें वचन पाळलें नाहीं, तरच ह्या दुसऱ्या इसमांवर पैसे देण्याची जबाबदारी येते. मूळ रिणकोनें हुंडी सकारावी लागते, त्याखेरीज तो पैसे देण्यास बाधलेला नसतो. इतराचीं नावें लिहिलेलीं असतात, त्यांचेकडून पैसे वसूल करण्यापूर्वी त्यांचाहि सकार मिळवणें जरूर असतें काय? असा प्रश्न मुंबई हायकोर्टांत नुकताच उपस्थित झाला होता. असा सकार मिळविलेला नसेल, तर पैसे देण्याची जबाबदारी त्यांचेवर येत नाहीं, असा कोर्टानें निर्णय दिला.

## कपड्यांच्या शिलाईचा धंदा

पोषाखाचा प्रकार आणि त्यावर केला जाणारा खर्च हीं श्रीमंती-गरीबी आणि हवापाणी ह्यांच्या परिस्थितीवर अवलंबून असतात. कोणत्याहि समाजांत दिखाऊ आणि मोलवान कपडे वापरण्याची इच्छा प्रत्येकास स्वाभाविकच असते. तथापि, निरनिराळे वर्ग आणि निरनिराळे देश ह्यांमध्यें रूढ झालेल्या प्रघाताच्या मुळाशी वर दिलेलीं कारणेंच मुख्यत्वेंकरून असल्यानें त्यांच्यामध्यें पोषाखाचे बाबतींत वैचित्र्य आढळून येतें. थंड हवेच्या देशांत व प्रदेशांत अधिक व गरम कपडे आवश्यक असतात, तर उष्ण देशांत हलके व कमी कपडे पुरतात तथापि, पैशाच्या बळाचे मानानें कपड्यांची संख्या व त्यांचा खर्च हीं बदलतात यांत संशय नाहीं. कापसाचें कापड घेतलें तर हिंदुस्थानांत दरवर्षी दरमाणशी सरासरीनें १६ चौरस वार इतकें कापड लागतें आणि त्यावर सर्व देशांत मिळन १५० कोटि रुपये खर्च होतात असा अंदाज आहे. ह्या व इतर सर्व वस्त्रप्रावरणाचा हिशेब केल्यास हिंदुस्थानचा कपड्यावरील वार्षिक खर्च ३०० कोटींच्या आंतबाहेर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या देशांत लाखो लोक असे आहेत कीं, अंग झाकण्यास व थंडीवाऱ्याचें निवारण करण्यास आवश्यक असलेलें कापड वापरणें त्यास दारिद्र्यामुळें परवडत नाहीं, ही गोष्ट सबंद देशाविषयींची सरासरी पहाताना लक्षांत ठेवली पाहिजे ह्या गरीब लोकांचे बाबतींत कपड्याच्या जुन्या किंवा नव्या फॅशनचें नावहि घेण्याचें कारण नाहीं.

ग्रेट ब्रिटनच्या चार कोटि प्रजेचा कपड्यांचा वार्षिक खर्च ४५० कोटि रुपयांच्या वर आहे. ब्रिटिश जनता दरवर्षी आपल्या राहणीवर जो खर्च करते त्यांतला बारावा हिस्सा कपड्यावर खर्चला जातो आणि अन्नासाठी होणाऱ्या खर्चाच्या एकतृतियांशाइतका तो असतो. तयार कपड्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करण्याचा धंदा ग्रेटब्रिटनमध्यें वाढत आहे. पुरुष व स्त्रिया ह्यांस लागणारे निरनिराळ्या प्रकाराचे कपडे अधिकाधिक बनवले जाऊन त्यांच्या खर्चांत सारखी वाढ होत आहे कपड्याच्या शिलाईचें काम यंत्राच्या सहायानें करण्याची प्रवृत्ति बळावत आहे आणि त्यांत काम करणारांची संख्याहि चढणीस लागली आहे. विविधता व वैचित्र्य हे गुण विलायतेंतील स्त्री-पुरुषाच्या पोशाखांत विशेषें करून दिसून येतात तशी स्थिति या देशांत नाहीं. पादत्राण वजा जातां बाकीचे पोषाखाचे प्रकार तयार करण्यांत ब्रिटिश कामकऱ्यांपैकीं शेकडा पाच लोक गुंतलेले आहेत. ह्यावरून कपड्याचा धंदा इग्लंडमध्यें किती मोठ्या प्रमाणावर चालतो, हें दिसून येईल. कपड्याच्या कारखान्यांत व दुकानांत कामावर असलेल्या पांच लक्ष पुरुष-स्त्रियांची कामाची परिस्थिति अलीकडे चांगली सुधारली आहे. नीटनेटके व स्वस्त कपडे गिऱ्हाइकास मिळूं लागल्यानें त्यांचा खप वाढत आहे आणि मध्यम स्थितींतल्या व कामकरी लोकांचीहि सोय झाली आहे. तयार कपड्यांची प्रथा आतां हिंदुस्थानांत पडत असून धंदेवाल्यांचें लक्ष गिऱ्हाइकांस चांगले कपडे पुरवण्याकडे अधिकाधिक लागत आहे. कपड्याची फॅशन दर पिढीस बदलत जाणें ह्या देशांतहि अपरिहार्य असून ते पुरवणाऱ्या धंदेवाल्यांनीं जनतेची अभिरुचि पाहून तिच्या गरजा योग्य रीतीनें भागवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिंपी काम शास्त्रीय पद्धतीनें शिकवण्याच्या संस्था पुण्यासारख्या ठिकाणीं प्रगतिपर पद्धतीनें चालवल्या जात आहेत, ह्याची माहिती आता लोकांस झाली असून तयार कपडे विकणें आणि गिऱ्हाइकांच्या इच्छेप्रमाणें कपडे तयार करून देणें ह्या कामातहि पुढें पाऊल पडत आहे हें "अर्था" च्या वाचकास निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.


लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

"जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत"

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु. (ट ख निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

**१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले**

# ☆ महिंद्रकर ब्रदर्स ☆

**यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.**

बुधवार चौक, पुणें

## सहकारी चळवळ

**नगर डि. अ. सें. को. बँक., लि.**
**( वार्षिक सभा : ता. २६-९-३७ )**

३० जून, १९३७ अखेर वरील बँकेचे १६८१ व्यक्ती व २९ सोसायट्या मिळून १७१० सभासद आहेत. भाग भांडवल १ लक्ष, ३ हजाराचें आहे. चालू ठेवींत व मुदतीच्या ठेवींत अनुक्रमें ६ लक्ष, ४० हजार व ५ लक्ष,४७ हजार रु. आहेत १ लक्ष,२० हजारांचा रिझर्व्ह फंड असून इतर फंडात सुमारें ७५ हजार रु. आहेत. कॅश क्रेडिटवरील ३ लक्ष, ८४ हजार रु. येणें असून सभासदांकडील कर्जाची रकम २ लक्ष, १५ हजार रु. आहे. थकबाकीचें प्रमाण वाढत आहे, तथापि डायरेक्टर बोर्ड वसूलीविषयीं दक्षता बाळगीत आहे बँकेनें इतर बँकात सुमारें ६½ लक्ष रुपयांच्या ठेवी ठेवलेल्या आहेत. सरकारी रोख्याची ताळेबंदामधील किंमत १ लक्ष ५१ हजार रु. धरलेली असली, तरी बाजारभावानें त्याची किंमत १ लक्ष, ७८ हजार रु भरते; म्हणजे सुमारें २७ हजार रुपयांचा हा एक गुप्त रिझर्व्हच आहे, असें म्हणतां येईल. बँकेचे ताब्यांतील जमिनींची किंमत ३३½ हजार रु. भरते व त्यावर १,०१५ रु. सरकारी सारा सालिना द्यावा लागतो. खंडाचें उत्पन्न समाधानकारक येत नाहीं व जमिनींची विक्रीहि नीट होत नाहीं, असा अहवालात उल्लेख आहे. इमारत फंडात सुमारें ३०,००० रु आहेत, त्यांतून बँकेकरिता इमारत बांधण्याची योजना व्यवस्थापक मंडळापुढें आहे. वर्षअखेर बँकेस सुमारें २९,००० रु. नफा झाला. ७½ टक्के दरानें भागीदारास देण्या करितां ७½ हजार रु. लागतील अहमदनगर जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थिति व तिचा बँकेच्या व्यवहारावर झालेला प्रतिकूल परिणाम, हीं लक्षांत घेतां नगर डि अर्बन सेंट्रल बँकेची परिस्थिति समाधानकारक असल्याचें दिसून येईल. खेळत्या भांडवलाचे मानानें बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड नि:संशय चांगले आहेत.

---

**बेळगांव डि. सें को बँक लि.**
**( वार्षिक सभा: ता. २७-९-३७ )**

वरील बँकेचें भाग भांडवल २,०५,१०० रु. असून गंगाजळींत ८१ हजार रु. व इतर फंडात ७७ हजार रु. आहेत. ठेवींवरील व्याजाचे दर उतरविले असतांहि ठेवींमध्यें वाढ होऊन त्याची एकूण रकम १७⅞ लक्ष रुपये इतकी झाली. बँकेनें रोख व इतर बँकांतील खात्यावर मुदतबंद मिळून सुमारें ९ लक्ष, ९० हजार रु ठेवले आहेत, १०½ लाखांची कर्जें दिलेली आहेत. सरकारी रोखे, म्यु बॉन्ड्स, भाग, कॅशसर्टीफिकेटे, इत्यादि व स्थावर मिळकतींच तारणावर २¾ लक्ष रुपये दिलेले आहेत. थकबाकीचें प्रमाण २१ २% इतकें पडतें. वर्षअखेर बँकेस १५,५२४ रु ८ आ. ७ पै नफा उरला, त्यातून ५ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी १०,२१८ रुपयांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टरबोर्डाची शिफारस आहे.

**पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.**
**( वार्षिक सभा: ता. २६-९-३७ )**

वरील बँकेकडे एकूण ५½ लक्ष रुपयांच्या कर्ज मागणीचे ३३१ अर्ज आले, त्यांपैकीं प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेनें ११९ अर्जदारांस १,३४,७०० रुपये कर्ज मंजूर केलें. ८२ अर्जदारांस ९५,१३१ रु. कर्ज जादा करण्यांत आलेलें आहे, त्यापैकी शेकडा ८७ इतकी रक्कम जुनें कर्ज फेडण्याकरितां दिलेली आहे. १ लक्ष १ हजार रुपयांच्या कर्जांत बँकेमार्फत सुमारें १९ हजाराची सूट मिळवून देण्यात आली. येणें रकमेपैकीं रिपोर्टाचे तारखेस फक्त २५० रु. बाकी राहिली आहे. बँक 'अ' वर्गांत दाखल आहे. बँकेचा कारभार काटकसरीनें चालू आहे व पुढील वर्षी तोट्याची बहुतेक रकम भरून काढतां येईल, अशी अपेक्षा आहे. श्री. वा. सी. कामत हे बँकेच्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष आहेत.

---

## नोटीस

### औंध स्टेट सेंट्रल बँक, लिमिटेड, औंध, ( जि. सातारा )

असें जाहीर करण्यात येतें कीं—

बँकेचे भागीदारांची पाचवी सर्वसाधारण सभा रविवार तारीख २४ ऑक्टोबर १९३७ रोजीं दुपारीं ३ वाजता ( स्टँ. टा. ) औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत खालील कामाकरितां भरणार आहे.

१. तारीख ३०-६-१९३७ अखेरचा अहवाल व मे. ऑडिटर यांनीं तपासलेला ताळेबंद व नफातोटापत्रक स्वीकारणें.
२. नफ्याची वाटणी करणें व डिव्हिडंड जाहीर करणें.
३. सन १९३७–३८ सालाकरिता व्यक्तिश: सभासदांतर्फे व व्यापाऱ्यांतर्फेच्या डायरेक्टराची निवडणूक करणें व इतर निवडून आलेल्या डायरेक्टराचीं नांवें जाहीर करणें.
४. सन १९३७–३८ सालाकरितां ऑडिटर याची नेमणूक करणें व त्याचें वेतन ठरविणें.

सूचना—

१. डायरेक्टरांच्या निवडणुकीकरतां ज्याना उभे रहावयाचें असेल, त्यानीं आपले अर्ज ता. ३०–९–३७ रोजीं सायकाळीं ५ वाजणेचे आंत पोहोचतील अशा बेतानें बँकेचे कचेरींत औंध येथें पाठवावे.

२ सदर दिवशीं सदर वेळेस कोरम न झाल्यास सदर सभा तहकूब करणेंत येईल व अशा रीतीनें तहकूब झालेली सभा रविवार तारीख ३१ ऑक्टोबर १९३७ रोजीं त्याच जागीं व त्याच वेळीं भरेल व कोरम नसलें तरी वरील सर्व कामें पुरीं करण्यात येतील.

औंध
ता. १५ सप्टेंबर १९३७

बोर्डाचे हुकुमावरून
वा. रा वर्तक
मॅनेजर

ता० क०–बँकेचीं ट्रान्स्फरबुकें तारीख २४ १० ३७ ते ६–११–३७ अखेर दोन्हीं दिवस धरून बंद राहतील

मनपसंत काम
रिसबूड ब्रदर्स-टेलर्स
सदाशिव हौदानजीक : : : पुणें
वक्तशीरपणाची गॅरंटी

पू. खानदेश जिल्हा को. इन्स्टिटयूट

वरील शाखा इन्स्टिट्यूटची वार्षिक सधारण सभा मंगळवार ता. २८-९-३७ रोजीं सकाळी ११-३० वाजतां जळगांव येथें नटवर थिएटरांत भरणार आहे.

## नोटिस

धी नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची या सालची सर्वसाधारण वार्षिक सभा रविवार ता. २६ सप्टेंबर १९३७ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां अहमदनगर येथें अमेरिकन मिशन हायस्कूल हॉलमध्यें भरणार आहे. तरी त्यावेळीं बँकेच्या सर्व सभासदानीं ( शेअरहोल्डर्सनीं ) हजर रहावें अशी विनंति आहे.

### सभेपुढें येणारीं कामें

१. सन १९३७ जून अखेरचा ताळेबंद व अहवाल मंजूर करणें.

२ अहवालांत बोर्डानें सुचविल्याप्रमाणें नफ्याची वाटणी मंजूर करणें.

अ. भागीदारांस शें ७½ प्रमाणें डिव्हिडड मंजूर करणें.
ब ऑफिसचे लोकांस बोनस व प्रॉ. फड मंजूर करणें.

३. पुढील वर्षाकरितां मॅनेजिंग बोर्डाची व चेअरमनची निवडणूक करणें

४ मॅनेजिंग बोर्डानें मेसर्स पी. जी. भागवत अँड को., रजिस्टर्ड अकौंटटस् यांची बँकेचे हिशेब दर तिमाहीस तपासण्यासाठीं म्हणून १९३७-३८ सालाकरिता नेमणूक केली आहे त्यास मंजुरी देणें.

५. सरकारी ऑडिटर्सकडून आलेल्या ऑडिट मेमोचा विचार करणें.

६ वसूल न होणारी रकम मॅनेजिंग बोर्डाचे शिफारशीप्रमाणें सुटींत घालण्यास मंजुरी देणें

७ सन. १९३७-३८ सालाकरितां कमाल जबाबदारीची मर्यादा ठेवणें.

८ शेअर्सचे वर्गांचें एकीकरण करणें.

टीप—सध्यां बँकेच्या शेअर्सचे तीन प्रकार अनुक्रमें फर्स्ट सीरीज, ऑर्डिनरी, व सेकंड सीरिज असे आहेत. सदरहू प्रकार फक्त शेअरहोल्डर्सचे सोईकरिताच करण्यात आले असावेत. कारण त्यावर कोणतेहि प्रकारें कमीजास्ती डिव्हिडड आजपर्यंत दिलें नसून त्याप्रमाणें बायलॉजमध्येंहि नोंद नाहीं.—

सदरहू तिन्ही प्रकारच्या शेअर्सचें एकीकरण करून एक सातें करण्याबद्दल मॅनेजिंग बोर्डानें ठराव नं. ३५५ ता. ३१।५।३७ चा केला आहे.

९. मॅनेजिंग बोर्डानें बँकेचे इमारतीसाठी जागा विकत घेतली आहे, त्यास मंजुरी देणें.

१०. चेअरमनचे मान्यतेनें सभेपुढें येणारीं इतर कामें

कृ. ज जोशी, मॅनेजर — कुं. सो. फिरोदिया, चेअरमन

अहमदनगर ता. ८ ऑगस्ट १९३७ — नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.

## NOTICE.

Sealed percentage rate tenders are invited and will be received by the undersigned upto 3 P. M. on Friday the 1st October 1937, for the Construction of R. C C slab Causeway with masonry piers and abutments, on the Chikhal Nallah on the Miraj–Bijapur Road, estimated to cost Rs. 29238.

Detailed information regarding the work and the tender form with the conditions of contract and Abstract Sheet can be obtained from the undersigned on payment of Rs. 8/– during office hours on working days. An earnest money (in cash) of Rs 1500 must accompany each tender. The undersigned does not bind himself to accept the lowest or any tender nor to give the reasons for rejection.

Tenders will be opened the same day in presence of any intending tenderers.

P. W D. Office, Miraj. 7th Sept 1937 — Sd/-V P BEDEKAR, B SC. B E State Engineer, Miraj.


जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहाः—

भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.



## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध आर्तोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्तोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

## केसांतील आकड्या ( पिन् ) वरून कल्पना सुचली

### दार्जिलिंग-हिमालयन रेल्वे

सन १८७९ पूर्वी दार्जिलिंगला जाण्यास आगगाडीचा रस्ता नव्हता १८७८ सालीं ईस्टर्न बंगाल रेल्वेचे एजंट, मि. फ्रँकलिन प्रेस्टेज, ह्यानीं वाफेच्या ट्राम्वेची कल्पना काढली व तीस अनुसरून रेल्वेच्या रस्त्याचें बांधकाम सुरू झालें. पहिल्या बैलगाडी वाटेवरच रूळ टाकण्यात आले, परंतु ह्या रस्त्यास मधून मधून अत्यंत कठीण चढ असल्यानें काम दुष्कर झालें. कांहीं ठिकाणीं तर १५ फुटात एक फूट इतका हा चढ होता रेल्वेच्या इंजिनास इतका चढ झेपण्यासारखा नव्हता ह्यामुळें बांधकामाच्या योजनेवर नेमलेल्या इंजिनियरांना मोठा पेच पडला आणि काय करावें हें त्यांस सुचेना. इतक्यात मिसेस प्रेस्टेज ह्यांच्या डोक्यात एक कल्पना आली "अगोदर मागें सरून मग पुढें कां जात नाहीं ?" असें म्हणून त्यांनीं डोक्यातील दोन आकडे टेबलावर मांडून दाखविले. ही कल्पना रेल्वे तज्ज्ञास तात्काळ पटली आणि 'रिव्हर्सिंग'च्या पद्धतीचा अवलंब करून त्यांनीं रेल्वे योजना पार पाडली पुणें-मुंबई रस्त्यावरील बोर घाटांत अशाच तऱ्हेचें 'रिव्हर्सिंग' मार्गे करावें लागत असे. आगगाडीला वळण्यास जागा नसली, म्हणजे तिला तशीच मागें नेऊन व साधा बदलून मार्ग आक्रमण करावयास लावण्याच्या कल्पनेचा उगम एक स्त्रीच्या व्यवहार-चातुर्यांत आहे दार्जिलिंग रेल्वेवर रिव्हर्सिंगचीं अशीं कित्येक ठिकाणें आहेत जगातील इतर देशामधील पर्वतावरील रेल्वेजनीं ह्या युक्तीचा अवलंब केलेला आहे

---

### लाकूड, कोळसा, पेट्रोल व वीज

कारखान्यातील यंत्रें चालविण्यास लागणारी शक्ति कोळसा, लाकूड, वीज, गॅस, इत्यादींपासून मिळते आपल्या कारखान्याकरितां जळणाचा स्वस्त व निर्वेध पुरवठा व्हावा, ह्यासाठीं सर्व राष्ट्रें प्रयत्न करीत आहेत. एक-दोन शतकामागें लाकूड हेंच प्रमुख जळण होतें, परंतु दगडी कोळशानें त्याची जागा लवकरच पटकावली. आतां कोळशाचेंहि महत्त्व किंचित कमी झालें आहे १९१३ सालीं एकूण जळणापैकीं शेकडा ७१ टक्के जळण कोळशापासून मिळत असे. १९३२ सालीं हें प्रमाण शेकडा ५७ वर उतरलें. कोळशाचा खप त्यानंतर कायम राहिला असला, तरी लाकडाचें महत्त्व कमी होत गेलें आहे तेलें व गॅस ह्यांचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागला आहे एकूण जळणात त्याचें प्रमाण १९१३ सालीं शेकडा ६ टक्के होतें, तें १९३५ सालीं शेकडा २० टक्के इतकें झालें एकूण जळणापैकीं निम्में जळण अद्याप कोळशाच्या खाणी पुरवितात, ह्यावरून कोळशाचें वर्चस्व अद्याप कायम असल्याचें दिसून येईल ग्रेट ब्रिटनमध्यें कोळसा मुबलक सापडतो, परंतु त्या देशाचे हद्दींत इतर प्रकारचीं जळणें उपलब्ध नाहींत ह्याकरितां, कोळशापासूनच पेट्रोल निर्माण करून स्वयपूर्ण होण्याची खटपट त्या देशानें चालविली आहे. जर्मनीनेंच ह्या बाबतींत प्रथम पुढाकार घेतला जळण मिळविण्याकरितां इतर देशांवर आपलें वर्चस्व ठेवण्याचें धोरण कित्येक देशांनीं अंगीकारलें असून त्या कारणानें कोळसा व पेट्रोल ह्यांच्या पुरवठ्यामुळें आंतरराष्ट्रीय कारस्थानास नवीन वळण लागत आहे.

---


**औंध स्टेट सेंट्रल बँक, लिमिटेड. औंध.**
( स्थापना-८ आक्टोबर १९३२ )
हेड ऑफिस-औंध ( सातारा )
शाखा-आटपाडी, कुंडल, गुणदाळ व विटूद स्टेशन.
चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्हीं मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.
कर्जें-सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात
चेक, हुंड्या ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.
शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी
B R. Vartak
मॅनेजर



**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**
( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी )
आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—
(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या
श्री डी के. जोगळेकर, बी ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( ३ )



**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**
टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,४०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८२३ |
| इतर फंड | १,४०८ |
| मुदतबंद ठेवी | १,९४,९०७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,९५९ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,७७,९७८ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रकम | ४१,५९९ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.
**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**
जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( ३० नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | १२०—१ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन | १०५-१२ |
| ४% १९४३ | १०८—० |
| ३½% बिनमुदत | ९६-१३ |
| ३½% १९४७-५० | १०६—८ |
| २¾% १९४८-५२ | १००—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरटी व लाब मुदत) | १०९—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्ष मुदत ) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४३—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११६-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | ३०-१२ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% | १५५०—० |
| चांबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ६१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १२७—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४¾% | १०४—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ बोनस | ९६०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७६०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १०% | १३३—७ |
| कराची ( १०० ) ९% | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% | १४४२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% | १६४२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५० ) ८ रु. | १७६-१४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु | ५०—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २९—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु ४ आ | ४४—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु बोनस | ४७१०—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% | २०१—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १६९-१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | ३४४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ. ६ पै | १५८५—० |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३४-११¼ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५१—३ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—५ |
| „ केसर प्रत्येक मणास | १०-११ |
| „ सरया प्रत्येक मणास | १०—७ |


# आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाउंस भी मिलेगा. नियम बहुत सरल हैं ( नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें ).

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

**दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.**

( स्थापित १९१६ ) अमीनाबादपार्क-लखनऊ

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

**भारतीय अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०, किंमत पांच रुपये

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुराची चळवळ, हुडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नाचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व छिटाचे व्यापारी.

एरोप्लाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you

**NEW BUSINESS**

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
*Office* throughout India & the East

S. C. MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application. *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला

मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचें

देशी बनारसी साखरेच्या मिठाईचें दुकान

रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा बर्फी**

आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकू

तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

UNEMPLOYMENT NO MORE



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

# ऐक्य

ऐक्य संपादन मंडळाचें नियतकालिक

**दर रविवारीं प्रसिद्ध होतें**

संपादक—न ग. जोशी बी. ए, एलएल. बी.

वा. व. फक्त २ रु. १२ आ

गांवांत २ रु

स्वतंत्र व निःपक्षपाती राजकारण, सामाजिक व औद्योगिक वगैरे विषयावर माहितीयुक्त व अभ्यासपूर्ण लेख, महत्त्वाचें व विविध शहर, जिल्हा आणि संस्थानवृत्त आणि प्रसंगोचित व नानाविध चित्रें याबद्दल या पत्राची प्रसिद्धि आहे.

जाहिरातीचें उत्तम साधन

लिहा किंवा भेटा —मॅ. ऐक्य, सातारा

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,१९,६०० वसूल झालेलें भांडवल १,०९,५४०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशन शिवाय वसूल केले जातात बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४.
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान' इति कौटिल्य· अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २९ सप्टेंबर, १९३७ अंक ३९

आणखी एक

## प्रगतीचा मोठा टप्पा

५१ लाखांवरून ६६ लाख

## वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लि., सातारा.

विमा व्यवसायांत विशेष महत्त्वाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या अशा ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी कोणत्याहि जीवन विमा कंपनीस हार जाणार नाहीं आणि सुप्रसिद्ध विमागणिती श्री ग स मराठे, एम् ए, ए आय ए, (लंडन) म्हणतात त्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया ही

सर्व विमाकंपन्यांना आदर्श

अशी विमा संस्था आहे.

गेल्या वर्षअखेरचा प्रगतीचा आढावा.

| | | |
|---|---|---|
| एकूण विमा . | रु | ३,२०,००,०००हून अधिक |
| एकूण शिल्लक . | रु. | ८३,००,०००हून अधिक |
| सन १९३६ मधील उत्पन्न | रु | १९,३२,८९९ |
| लाईफ फंड व इतर गंगाजळी | रु | ७७,०५,३७९ |
| सन १९३६ मधील नवें काम | रु | ६६,४०,८३९ |
| एकूण क्लेम्स दिले . | रु | १७,१०,२०६ |
| त्यापैकी खर्चाचें प्रमाण . | | शेंकडा ४ |

त्रैवार्षिक दर हजारी बोनस

होल लाईफ रु. ७५ व एण्डोमेण्ट रु. ६०

विमा उतरण्याला किंवा एजन्सी घेण्याला हीच कंपनी उत्कृष्ट.

पुणें शाखा:— बुधवार चौक, पुणे. मॅनेजर.

## दी सी. पी. अँड बरार प्राव्हिन्शल कोऑपरेटिव्ह बँक लि.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर शहर

दुसरा हप्ता विक्रीस निघाला

ग्रामोद्धार ३½% षण्मासिक व्याज ३ लक्षाचे } ३,००,००० चे ३½ टक्याचे १५ वर्षें मुदतीचे { सुरक्षितता सरकारी हमी ट्रस्टी गेले

गहाणी रोखे ( डिबेंचर्स )

प्रान्तिक सरकारची मुद्दल व व्याज दोहोंची हमी

या पैशाचा विनियोग आपल्या गरीब शेतकरी बांधवांच्या ऋणमुक्ततेकडे होणार आहे.

ता ५ ते १५ आक्टोबर १९३७ च्या दरम्यान केव्हाही अर्ज पाठवावे

☞ विशेष माहितीकरितां प्रॉस्पेक्टस् मागवा

दे. गो. लांडगे
ता २५-९-३७ ऑफि. मॅनेजर

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person.

— मनपसंत काम —

वक्तशीरपणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी

सदाशिव हौदाजवळ, पुणें




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत तीन रुपये

ह्या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

# विविध माहिती

### रानडे इंडस्ट्रिअल ॲन्ड इकनॉमिक इन्स्टिट्यूट, पुणें

कै न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे ह्याचे स्मरणार्थ स्थापन झालेल्या वरील संस्थेचें सशोधनकार्य व्यवस्थितपणें चालू आहे. इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर, श्री दि ब. लिमये, एम्. ए, बी. एस्सी, ह्यानीं एम्. एस्सी. व पीएच डी. ह्या पदव्यांकरितां विद्यार्थी तयार करण्यास मुंबई विश्वविद्यालयानें मान्यता दिली आहे व त्याचे हाताखाली रासायनिक संशोधन चालू आहे. त्यांनीं केलेल्या सशोधनाचीं टाचणेंहि प्रसिद्ध करण्यात आलीं आहेत. इन्स्टिट्यूटमध्यें काम करणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यासाठी इचलकरंजीच्या संस्थानाधिपतींनीं एक शिष्यवृत्ति ठेवली आहे. संस्थेमध्यें थोड्या खर्चांत व काटकसरीनें उत्कृष्ट सशोधनकार्य होत असतें, हें तिचें वैशिष्ट्य होय श्री. लिमये ह्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या कार्यास आर्थिक सहायाची आवश्यकता आहे.

### उत्पन्नाची वाटणी विषम परंतु दरमाणशी उत्पन्न मोठें

ग्रेट ब्रिटनमधील सुमारें ५ लक्ष लोकाची सालिना प्राप्ति १५ हजार रुपयावर आहे. एक कोटि लोकास प्रत्येकी ३ ते ७ हजार रु. मिळतात. एकूण लोकसंख्येच्या ६० टक्के म्हणजे सुमारें ३ कोटि लोकांचें वार्षिक उत्पन्न १½ ते ३½ हजार रु आहे व शेकडा १५ लोकासच फक्त १½ हजारापेक्षां कमी रुपयावर आपला संसार चालवावा लागतो!

### ब्रिटिश प्रवाशांची फ्रान्सवर स्वारी

ब्रिटिश प्रवासी फ्रान्समध्यें यदाचे वर्षी गेले, तितके ते ह्यापूर्वी कधींच गेले नव्हते त्यानीं सर्व फ्रान्स व्यापलें आहे १७ हजार खासगी ब्रिटिश मोटार गाड्या त्या देशात हिंडत आहेत.

### मुंबई इलाख्यातील कामगारसंघ

मुंबई इलाख्यातील कामगारसंघांची एकूण संख्या ९८ असून सुमारें ९० हजार कामगार त्याचे सभासद आहेत

### आणखी एका विलायती तज्ञाची नेमणूक

हिंदुस्थान सरकारास आर्थिक सल्ला देण्यासाठी एका तज्ञाची नेमणूक करण्यांत यावयाची आहे. जी जागा अत्यत महत्वाची आहे, पण ती युरोपियनास देऊं केली असल्याचें मध्यवर्ती असेंब्लींत सरकारतर्फे सागण्यात आलें जागेचा मासिक पगार ३,००० रु. आहे

### ट्रेझरी बिलावर १० आ ११ पै व्याज

मंगळवार, ता. २१ सप्टेंबर, रोजीं रिझर्व्ह बँकेनें २ कोटि रुपयाचीं ट्रेझरी बिलें स्वीकारलीं, त्यावर व्याजाचा सरासरी दर द सा. द. शे. १० आणे ११ पै इतका पडला

### एम्पायर ऑफ इंडिया विमा कं लि.

- एम्पायर ऑफ इंडिया लाइफ ॲशुअरन्स कंपनीची विशेष साधारण सभा गेल्या आठवड्यांत भरली होती, त्यावेळीं कंपनीचा २८ फेब्रुवारी, १९३७ अखेरच्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा ॲक्चुअरीचा रिपोर्ट मान्य करण्यात आला. २८ फेब्रुवारी रोजीं कंपनीकडे १२ कोटि, ७६ लक्ष रु. किंमतीच्या ७०, २३७ पॉलिसी चालू होत्या. म्हणजे, पाच वर्षांपूर्वींच्या मानानें कंपनीच्या कामात २४ % वाढ झाल्याचें दिसून येतें. मूल्यमापनात ४४ लक्ष, २९ हजार रुपयांचा वाढावा आढळून आला.

### खादीचा पुरवठा वाढविण्याकरितां योजना

खादीच्या वाढत्या मागणीबरोबर तिचें उत्पादनहि वाढणें आवश्यक आहे, ह्याकरितां अखिल भारतीय चरखा सघानें तिच्या गेल्या सभेंत ३ लक्ष रु. भाडवली खर्चाकरितां मंजूर केले.

### ग्रेट ब्रिटनमधील कामगार संघ

ग्रेटब्रिटनमधील-कामगार सघांजवळील द्रव्य निधींची रकम २०० कोटि रुपयावर आहे

### चिलमींचें उत्पादन

ग्रेटब्रिटनमध्यें गेल्या वर्षीं सुमारें ५५ लक्ष रु. किंमतीच्या ६६ लक्ष चिलमी (पाइप्स) उत्पादन करण्यांत आल्या. १९३३सालाचे मानानें हे आकडे बरेच मोठे आहेत. चिलमींतून तंबाखू ओढण्याचा प्रघात त्या देशात किती मोठ्या प्रमाणात आहे, हें सदरहु आकडे दर्शवतात

### परदेशी तज्ञाच्या नेमणुकीस विरोध

हिंदुस्थान सरकारास आर्थिक बाबतींत सल्ला देण्याकरितां एका परदेशी तज्ञाची नेमणूक करण्याचें घाटत असल्याविषयीं माहिती सरकारतर्फे कायदेमंडळांत सागण्यात आली. ह्या नेमणुकीस आपला तीव्र विरोध आहे, असें इंडियन मर्चंट्स चेंबरनें सरकारला तारेनें कळविलें आहे.

### न्यू इंडिया विमा कं लि.

वरील विमा कंपनीच्या आयुर्विमा खात्यानें १९३६-३७ मध्यें १ कोटि, ६७ लक्ष रुपयाचें काम मिळविलें. त्यापूर्वींच्या सालांतील कामाच्या आकड्यापेक्षां हा आंकडा ९ लक्ष, ४१ हजारानीं लहान आहे. एकूण कामाचा आकडा मोठा असल्याकारणानें, एकादे वर्षीं थोडें कमी काम मिळाल्यास त्यास महत्त्व देण्याचें कारण नाहीं आयुर्विम्याचा व्यवहार नव्यानें सुरू करणाऱ्या कंपनीस असा अनुभव येणें अपरिहार्यच असतें, कारण तिचा बोनसाचा दर सुरवातीस अल्पच रहातो. व्यवस्थेच्या खर्चाचें प्रमाण ३८·७% वरून ३३·९% पर्यंत खाली उतरलें. अहवालाचे वर्षांत विमा खातीं फंडात १८½ लक्ष रुपयांची भर पडून तो ५९ लक्ष रुपये झाला. मार्च, १९३६ अखेरचा त्रैवार्षिक मूल्यमापनाचा रिपोर्ट मागेंच प्रसिद्ध झाला आहे. कंपनीनें ८½% कर भरलेलें डिव्हिडंड (प्रत्येक भागास १ रु.४आ) जाहीर केलें आहे.

### ब्रिटिशेतर मालकीच्या आगबोटींवर युनियन जॅक

ब्रिटिश आरमाराचें आपणांस संरक्षण मिळावें, ह्याकरितां यूनियन जॅक फडकवून कित्येक ब्रिटिशेतर आगबोटी भूमध्य समुद्रांत वहातुकीचा धदा करीत आहेत. ब्रिटिश म्हणून नोंदविल्या जाणाऱ्या आगबोटींत ब्रिटिश नागरिकाचा अत्यल्प मालकी हक्क असला तरी पुरतो, असा प्रचलित कायदा आहे. म्हणजे, वस्तुत. परदेशी मालकीच्या आगबोटी ब्रिटिश म्हणून खुशाल हिंडू शकतात. ह्या बाबतींत कायद्याचें कडक नियंत्रण असावें अशा मागणीची चळवळ ग्रेटब्रिटनमध्यें चालू आहे.

### पोस्ट व तार खात्याचें वाढतें उत्पन्न

| | | |
|---|---|---|
| १ एप्रिल ते ३१ ऑगस्ट, १९३६ | | ४ कोटि, २ लक्ष |
| „ | „ १९३७ | ४ „ २५ „ |

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| १२-९-३७ ते १८-९-३७ | ३३,४२,७४९ |
| १९-९-३७ ते २५-९-३७ | ४६,०९,९९७ |
| २१-९-३१ ते २५-९-३७ | ३,०४,०५,१५,७३३ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४८० |
| २ हिंदी रेल्वेजवर उच्च दर्जाचे हिंदी लोक नेमा | ४८१ |
| ३ सनदी नोकराच्या तनख्याचें समर्थन ... | ४८२ |
| ४ स्फुट विचार ... प्रांतिक प्रधानमंडळ व शेतकरी वर्ग—सर चुनीलाल मेथा ह्याच्या महत्वाच्या सूचना—"साहसे श्रीं प्रतिवसति"—व्हेल मासेमारीचा जपानी धंदा—मँचुकाऊमध्यें लाकडाच्या राध्याचे कारखाने—हिंदी कपास कापडाच्या निर्गतीत वाढ | ४८२ |
| ५ मुंबई इलाख्यातील तुरुंगखात्याचा अहवाल .. | ४८४ |
| ६ सरकारतर्फे करार करण्याचा अधिकार ... | ४८४ |
| ७ मध्यवर्ती असेंब्लीत विमाबिलावर चर्चा ... | ४८५ |
| ८ डेअरी तज्ञाचा रिपोर्ट | ४८६ |
| ९ कचरा करणारांस शासन | ४८७ |
| १० फळें व भाज्या ह्यांच्या उठावास सहाय | ४८९ |
| ११ सहकारी चळवळ | ४८८ |
| १२ निवडक बाजारभाव | ४८९ |


# अर्थ

बुधवार, ता. २९ सप्टेंबर, १९३७

## हिंदी रेल्वेजवर उच्च दर्जाचे हिंदी नोकर नेमा

ह्या देशाच्या राज्यकारभारात हिंदी लोकास वरिष्ठ दर्जाच्या व जबाबदारीच्या जागा मिळण्यासंबधानें जततेच्या वतीनें दोन पिढ्याच्यावर चळवळ चालविली गेली तेव्हाच त्या राखीव क्षेत्रांत हिंदी नोकरास प्रवेश मिळाला आहे. आय सी. एस. ची परीक्षा हिंदुस्थानात घेण्यात यावी आणि त्या नोकरीमध्यें हिंदी उमेदवारांची संख्या वाढवावी ही मागणी ब्रिटिश सरकाराकडून मान्य करून घेण्यास किती महाप्रयास आमच्या पुढारी मंडळीस पडले आहेत, ह्याची कल्पना अनेकांस नसेल. हिंदुस्थानांतील सैन्याचें हिंदीकरण व्हावें अशी ओरड लोकप्रतिनिधींनीं सारखी चालू ठेवली आहे, तिचा परिणाम कसा निराशाजनक होत आला आहे हें प्रसिद्ध आहे हीच परिस्थिति हिंदी रेल्वे बोर्डाच्या कारभाराबाबतची आहे. ह्या बोर्डावर काम करण्यास लायक असा हिंदी सभासद अजूनहि सरकारास शोधून सापडत नाहीं, ह्यापेक्षां अधिक आश्चर्यकारक काय असणार ? रेल्वेज् ह्या देशात नव्यानें चालू झाल्या तेव्हा त्यांच्या व्यवस्थेची जबाबदारी उचलण्यास लायक अशीं माणसें ह्या देशात उपलब्ध नव्हतीं हें स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणें,रेलवेजचा कारभार करण्याची पात्रता अंगीं असलेले हिंदी व्यवस्थापक व नोकर अनुभवानें तयार होण्यास काहीं वर्षें लोटावीं हेंहि साहजिक आहे. परतु हिंदी रेल्वेज्ना सुरू होऊन आयशी वर्षें लोटलीं आहेत, तरीहि हिंदीकरणाच्या मार्गातली पहिली अडचण विशेषशी दूर झालेली नाहीं. रेल्वेजचा कारभार युरोपिअन कंपन्याच्या ताब्यांत होता त्यावेळीं सरकारास मध्यें पडून हिंदी लोकाच्या नेमणुका होण्याविषयीं आग्रह धरतां येत नसे, ही पूर्वीची सबबहि आतां राहिली नाहीं. बहुतेक मोठाल्या रेल्वेज सरकारच्या मालकीच्या झाल्या आहेत, एवढेंच नव्हे तर त्याचा कारभारहि सरकारच पहात आहे. असें असून रेल्वेजच्या व्यवस्थेचें हिंदीकरण मुंगीच्या पायानेंच चाललें आहे ! हिंदीकरणाचें धोरण आपणास सर्वस्वी मान्य असून त्यासबंधांत आपले प्रयत्न कसून चालले आहेत, असें आश्वासन सरकार देत आलें आहे, पण त्यास समाधानकारक रीतीचें मूर्तस्वरूप मात्र अजून मिळालेलें नाहीं.

लायक हिंदी माणसें तयार नाहींत म्हणून हिंदीकरण व्यवहार्य नाहीं आणि होतकरू हिंदी उमेदवारास संधि मिळत नाहीं म्हणून लायक हिंदी लोक तयार होत नाहींत आणि सरकारास बाहेरून नोकर आणावे लागतात अशी येथें वर्तुलाकार विचारसरणी उत्पन्न होते. कुशल आणि कार्यक्षम ,अशीं हिंदी माणसें हिंदी रेल्वेजमध्यें नेमण्यात आलीं तर त्याचा कारभार नीट आणि कमी खर्चानें होईल ह्याविषयीं कोणासहि शका घेतां येणार नाहीं पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, ही गोष्ट घडून आलेली नाहीं आणि अजूनहि येत नाहीं. हिंदी रेल्वेजच्या व्यवस्थेंत काटकसर कशी करता येईल ह्यासंबधानें शिफारसी करण्यासाठी सरकारनें वेजवुड कमिटी नेमली होती, तिनेंहि रेल्वेजमध्यें बाहेरच्या तज्ञाच्या नेमणुकी होणें इष्ट असल्याचें प्रतिपादलें आहे. ह्या धोरणाचे विरुद्ध कायदेमंडळात आणि त्याचें बाहेर ओरड झाली ह्या प्रतिकूल टीकेस उत्तर देण्याचे हेतूनें रेल्वेजचे चीफ कमिशनर, सर गथ्री रसेल, ह्यांनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें स्वत.च एक ठराव गेल्या आठवड्यात मांडला. कौन्सिलमध्यें त्यावर होणाऱ्या वादविवादाचे दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें वेजवुड कमिटीच्या सूचनाची व्यवस्था करावी असा त्या ठरावाचा आशय होता.

वेजवुड कमिटीच्या, वरिष्ठ रेलवे नोकराची भरती विलायतेंत करण्याविषयींच्या शिफारशींचें समर्थन करण्याचा सर गथ्री रसेल ह्याचा प्रयत्न सफळ होणें हिंदी चष्म्यांतून पहाणाराच्या मतें शक्य नाहीं. रेलवे-व्यवस्थेच्या निरनिराळ्या अगांत सुधारणा होऊन त्याची कार्यक्षमता वाढण्याची आवश्यकता असल्यानें एक एक खातें घेऊन, त्यात बाहेरून उमेदवार आणून त्यास नेमण्याची जरूरी कोठें आणि कशी आहे हें त्यानीं दाखविलें. वर्कशॉप्समधील खालच्या दर्जाच्या वरच्या जागासाठीं नोकरांची भरती हिंदुस्थानाबाहेर होणें अगत्याचें आहे असें त्याचें मत आहे. रेलवेज संबधाच्या आकड्याची व्यवस्था व अर्थ लावण्याची योग्यता असलेला तज्ज्ञ ह्या देशात नसल्यानें तोहि दुसरीकडून आणण्यांत यावयाचा आहे आणि त्याच्या हाताखाली लोक शिकून तयार व्हावयाचे आहेत. प्रसिद्धी खात्यासाठींहि बाहेरचा तज्ज्ञ आणावा ही कमिटीची सूचना आपणास मान्य नसल्याचें सर गथ्री रसेल ह्यानीं सांगितलें आणि ही नेमणूक हिंदुस्थानात करणें शक्य झालें पाहिजे असें आपलें मत त्यानीं दिलें. रेल्वे व्यवस्थेचें हिंदीकरण आणि हिंदी उमेदवाराचें व्यावहारिक शिक्षण ह्याचे बाबतींत मागें दुर्लक्ष झालें असलें तरी आजची परिस्थिति पाहून सुधारणेच्या दृष्टीनें परकीयाची भरती होणें अपरिहार्य आहे हा कोटिक्रम वारंवार सरकारचे बाजूनें पुढें मांडण्यात आला असल्यानें त्यात स्वारस्य उरलेलें नाहीं. हिंदुस्थानात बेकारी माजली आहे आणि व्यावहारिक शिक्षणाची व तरुणाच्या उपजीविकेची व्यवस्था होण्याची जरूर अनेक वर्षें भासत आहे. असें असता हिंदुस्थानातल्या रेल्वेजमध्यें काम करण्याकरितां बाहेरून लोक आणण्यावांचून त्याची सुधारणा अडून रहावी ही स्थिति भूषणावह आहे असें कोणासच म्हणता यावयाचें नाहीं. व्यावहारिक, आर्थिक, हिशेबी आणि राष्ट्रीय दृष्ट्या आमच्या रेल्वेजच्या कारभाराचें परकीयावरचें अवलंबन अनिष्ट आहे. कोणत्याहि देशांत तेथील सरकार आणि जनता

रेल्वेजसारख्या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय जीवनाच्या अगासंबधात असलें परावलंबन चालू देणें शक्य नाहीं. एखादा नवा धंदा किंवा एखादी अपरिचित कला प्रस्थापित करण्याचे कामीं परकीय तज्ज्ञांची आवश्यकता कांहीं कालपर्यंत भासते आणि अशा प्रसगीं असल्या तज्ज्ञांची नेमणूक समर्थनीय असते परतु हिंदी रेलवेजच्या कारभाराचा सर्वच प्रकार निराळा आहे आणि त्याचें परकीयावाचून नेहमीच आडून रहात आहे ह्यावरून ही रेलवे व्यवस्था मुळातच सदोष आहे असें सिद्ध होत नाहीं काय?

## सनदी नोकरांच्या तनख्याचें समर्थन

"सबद हिंदुस्थानांत मिळून सध्या १,००५ आय. सी. एस अधिकारी आहेत. १९१२ सालीं ह्याच अधिकाऱ्यांची सख्या १,२१० इतकी होती. लोकसख्येंत मोठी वाढ झाली असताहि आय. सी एस. अधिकारी २५ टक्क्यानीं कमी झाले आहेत. सर्व आय. सी. एस. अधिकाऱ्यास मिळून सालिना २१ कोटि रुपये तनखा मिळतो. एकट्या सुपर टॅक्स पासूनच सरकारास २१ कोटि रुपये उत्पन्न मिळतें, म्हणजे ह्या अधिकाऱ्याच्या पगाराचा बोजा सुपर टॅक्स भरणाऱ्या थोड्याशा व्यक्तींवरच बसतो" वरील अर्थाची माहिती मि मॅक्सवेल ह्यानीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें दिली आय. सी. एस. मधील अधिकाऱ्यावर किती खर्च होणें वाजवी व सयुक्तिक आहे, हा प्रश्न जरी बाजूस ठेवला, तरी त्या खर्चाचा विशेष भार हिंदी प्रजेवर पडत नाहीं, हें भासविण्याचा मि मॅक्सवेल ह्यानीं केलेला प्रयत्न मात्र हास्यास्पद वाटल्याखेरीज रहाणार नाहीं सरकारचें उत्पन्न विवक्षित खर्चाकरिता तोडून दिलेलें नसतें, हें तत्त्व त्यांनीं दृष्टिआड करून आय. सी एस च्या पगाराचें ओझें आणि अतिश्रीमत लोकांनीं भरलेला प्राप्तीवरील कर ह्याचा काकतालीय न्यायाचा सबध जोडून दिला। मिठावरील कर देणाऱ्या दरिद्री प्रजेच्या करभागाशी ह्या अधिकाऱ्यांच्या पगाराची तुलना करणेहि शक्य आहे। श्रीमान लोकाकडून कराच्या रूपात घेण्यांत येणारा पैसा सामाजिक हिताच्या योजनावर खर्चता येणार नाहीं असें नाहीं. सुपरटॅक्स देणारे लोक दुसऱ्या कोणत्याहि कारणाकरिता आपली कराची रकम खर्च केली जाऊ नये असा आग्रह धरीत आहेत, असेंहि मानण्याचें कारण नाहीं कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी मि. मॅक्सवेल ह्यानीं दिलेले आकडे गैरलागू व निरर्थक ठरतात हिंदी जनतेच्या पधराशें कोटि रुपयाच्या एकूण वार्षिक उत्पन्नाशीं सनदी नोकरांच्या वेतनाचें प्रमाण बसवून तें अत्यंत सूक्ष्म आहे असें नाहीं कां दाखवता येणार? हा कोटिक्रम अशा तऱ्हेनें हास्यास्पद मर्यादेपर्यंत नेता येईल आय. सी एस मधील सर्व अधिकारी युरोपियन नाहींत, त्यातील निम्मे हिंदीच आहेत, हा मि. मॅक्सवेल ह्याचा मुद्दा पगार कमी करण्याच्या मागणीस पोषकच ठरतो. समतोल व न्यायबुद्धीच्या अधिकाऱ्यांचें महत्त्व त्यांनीं सांगितलें, परन्तु हे अधिकारी कमी पगारावर मिळणार नाहींत, हें त्याचें म्हणणें मात्र पटण्याजोगें नाहीं. सनदी नोकराचा प्रश्न हिंदी कायदेमडळाच्या कक्षेबाहेरचा असल्यानें, तूर्त त्या बाबतींत काहींच करता येण्याजोगें नाहीं तथापि, राज्यकारभाराचा खर्च हलका करण्याचें प्रांतिक सरकाराचें धोरण व सनदी नोकराचे डोईजड पगार ह्याचा मेळ बसवण्याच्या प्रश्नाचा विचार लवकरच होणें जरूर पडेल

# स्फुट विचार

## प्रांतिक प्रधानमडळ आणि शेतकरीवर्ग

शेतकरी वर्गाच्या अडचणी इतक्या वर्षांच्या जुन्या व महत्त्वाच्या आहेत कीं, राष्ट्रीय सभेच्या वतीनें निवडून आलेल्या प्रधानमडळांस त्याकडे तात्काळ लक्ष देऊन त्याच्या निवारणासाठी उपाय योजना आखणें अगत्याचें होतें. राष्ट्रीयसभेचें शेतकऱ्यांची गाऱ्हाणीं नाहींशीं करण्याबाबतचें धोरण आश्वासनाचे स्वरूपात नवीन विधिमडळाच्या निवडणुकीचे प्रसंगीं प्रसिद्ध केलें असल्यानेंहि ह्या प्रश्नासबधानें विशेष जबाबदारी प्रांतिक मत्रिमडळावर येऊन पडली होती, परतु त्याविषयीं विधायक आणि मोठ्या प्रमाणावर कोणतीहि योजना हातीं घेण्यास वेळ व संधी त्यास मिळाली नाहीं आणि ह्या कारणानें त्यांच्या अदाजपत्रकात किंवा विधिमडळातील चर्चेंत अभिवचना पलीकडे सरकारास जाता आलें नाहीं. तथापि, ह्यापुढें आपण कोणता कार्यक्रम हातीं घेणार आहों ह्याची स्थूलमानाची कल्पना महसूलमंत्र्यानीं नुकतीच जाहीर केली आहे. शक्य आहे तेथें डोईजड जमीन महसूल कमी करणें, शेतीचा धदा जेथें नुकसानीनें चाललेला आहे तेथें तो फायदेशीर होईल अशी व्यवस्था करणें, शेताचे तुकडे उडून उत्पादनाचे बाबतींत ते फुकट जातात, त्या प्रवृत्तीस आळा घालणें, शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणातून त्याची योग्य रीतीनें मुक्तता करणें, जमीनमहसुलाच्या वसुलींतला कडकपणा कमी करणें, शेत कसणाऱ्या, जमिनीच्या मालकाच्या, कुळास स्थैर्य व शाश्वती प्राप्त होईल अशी तजवीज करणें, शेती कॉलेजांतला शिक्षणक्रम अधिक व्यावहारिक होण्याविषयीं दक्षता बाळगणें, जमीनीची उत्पादनशक्ती व शेतकऱ्याचें उत्पन्न वाढण्यासाठी योजना करणें इत्यादि अनेक महत्त्वाच्या बाबींचा अतर्भाव प्रधानमडळाच्या कार्यक्रमात करण्यात आला आहे ह्या सुधारणा किंवा त्याच्या मुळाशीं असलेल्या शेतकऱ्याच्या अडचणी ह्यात नवीन असें काहीं नाहीं, हें खरें. परतु प्रस्तुत प्रसगीं जर कांहीं नवीन असेल तर त्यांचा साकल्यानें विचार करून शक्य तितक्या लवकर निकाल लावणें ह्यास लागणारी कळकळ, निश्चय आणि सामर्थ्य सध्याच्या प्रधानमंडळात आहे ही विशेष गोष्ट आहे. जुने आर्थिक व सामाजिक प्रश्न चुटकीसरशी सुटत नाहींत ह्याची जाणीव प्रधानमंडळास आहे, ही गोष्ट अभिनदनीय आहे जुन्या राजवटींत चालढकल आणि दिरंगाई होत असे तिला आतां जागा नाहीं आणि विचारपूर्वक पण शक्य तितक्या त्वरेनें पुढें पाऊल टाकलें जाईल अशी साधार अपेक्षा आहे.

## सर चुनीलाल मेथा ह्यांच्या महत्त्वाच्या सूचना

मुबई प्रांतिक सहकारी बॅंकेच्या वार्षिक सभेच्या वेळीं त्या संस्थेचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेथा, ह्यानीं वर वर्णिलेल्या प्रधान मंडळाच्या कार्यक्रमाबद्दल सरकारचें अभिनदन करून त्यास कित्येक विधायक सूचना केल्या, त्याचा योग्य स्वीकार होईल, अशी आम्हास आशा आहे सहकारी चळवळीचें यश बरेंचसें शेतीच्या उत्पादकतेवर अवलबून असतें ह्या कारणानें शेतीच्या धंद्याची सुधारणा सहकारी सस्थांस इष्टच आहे. व्यक्तिश: शेतकऱ्याच्या परिस्थितीचा विचार होऊन त्यांच्या जमीनींत ताली घालणें, लहान-सहान पाटबधाऱ्याची सोय करणें, इत्यादि गोष्टींची तरतूद होणें थोड्या खर्चांत शक्य असून ह्या कार्यक्रमास मध्य-

भागातील व कर्नाटकांतील कित्येक जिल्ह्यात चांगला वाव असल्याचें सर चुनीलाल ह्यानीं महसूलमंत्र्याचे निदर्शनास आणलें आहे. ह्या सबधांत पूर्व पहाणीचें काम मार्गेच झालें आहे, त्याच मार्गानें पुढें जाणें शक्य व इष्ट आहे, या गोष्टीकडे सर चुनीलाल मेथा ह्यानीं लक्ष वेधलें आहे वसुलीच्या कडकपणाचे संबंधांत सहकारी सस्था व सामान्य सावकार ह्याचेमध्यें महत्त्वाचा भेद आहे, त्याचाहि त्यानीं निर्देश करून लवाद निवाड्यांच्या अंमलबजावणींत होणाऱ्या दिरगाईचे दुष्परिणाम पतपेढ्या व पर्यायानें शेतकरी ह्यांसच भोगावे लागतात ही गोष्ट सूचित केली पतपेढ्याचीं कर्जें जबाबदारीच्या भावनेनें व काळजीपूर्वक दिलीं जातात आणि त्यात नफेबाजीचा यत्किंचितहि सबध नसतो. तेथें नाठाळ कुळावर कडक उपाय योजणें भाग पडतें आणि अशा अपवादात्मक प्रसगावरून सहकारी पतपेढ्यांचें विरुद्ध सरसकट प्रतिकूल अनुमान काढणें योग्य नाहीं असा सर चुनीलाल ह्याच्या म्हणण्याचा भावार्थ होता, त्याकडे प्रधानमडळानें आवश्यक लक्ष द्यावें कर्जलवाद-प्रकरणीं, सहकारी चळवळीचें आद्य तत्त्व आणि त्यास अनुसरून असलेली सहकारी संस्थाची कार्यपद्धति ह्याचा विचार होणें अगत्याचें आहे भरमसाट कर्जें देऊ नयेत आणि कर्जाची फेड करण्याच्या जबाबदारींतून रिणकोनीं कसेंतरी निसटण्याचा यत्न करूं नये ह्या सहकारी तत्त्वास हरताळ लागेल अशी कर्जलवादाची योजना सरकारनें सहकारी संस्थास लागू करूं नये ही सर चुनीलाल ह्याची महत्वाची सूचना आहे. ती सरकारनें ग्राह्य केली पाहिजे

---

## " साहसे श्री. प्रतिवसति "

चीन देशात ग्रेट ब्रिटनचें सुमारें ४½ अब्ज रुपयाचें भाडवल गुंतलेलें आहे व त्यावरील व्याज व डिव्हिडंड मिळून ब्रिटिश प्रजाजनास दरसाल २५ कोटि रुपये इतकी प्राप्ती होते इतर देशांनींहि चीनमध्यें भाडवल घातलेलें आहे, परतु ह्या सर्व परदेशी भांडवलापैकी शेकडा ४० इतकें भांडवल एकट्या ब्रिटिश मालकीचें आहे. चीनमधील नद्यांवरील वहातुक आगबोटींतून होते, त्यापैकीं शेकडा २० आगबोटी ब्रिटिश पैशानें विकत घेतलेल्या असून त्याचे सारथीहि ब्रिटिश नागरिक आहेत चिनी घरातील प्रकाश ब्रिटिश तेल जाळूनच निर्माण होतो व थंडीमध्यें ब्रिटिश खाणींतील कोळसा जाळूनच त्यास ऊब मिळते. शेतातील पिकें जोमदार यावींत, ह्याकरितां शेतकरी रासायनिक खतें वापरतात, तींहि बहुशीं ब्रिटिशच असतात. जपाननें आता ब्रिटिश कापडास मात्र जोराची टक्कर देण्यास प्रारभ केला आहे. वरील हकीकतीवरून ग्रेट ब्रिटनमधील सर्वसाधारण नागरिकांचें सुख व स्वास्थ्य हीं परराष्ट्रीय व्यापारावर कशीं अवलंबून आहेत, हें दिसून येईल चीनसारख्या देशात आंतपर्यंत प्रवेश मिळवून व स्वतःच्या जिवाची पर्वा न करता प्रचारकार्य करून ब्रिटिश मालाचा उठाव करणाऱ्या विक्रेत्याच्या साहसावर हा व्यापार टिकणें अवलंबून असतें चीन देशांत ब्रिटिश माल खपविणाऱ्या कित्येक प्रचारकांस दहा–वीस स्थानिक भाषाचें ज्ञान मिळवावें लागतें. चिनी सरकारचा कारभार हाकणाऱ्या नानकिंग राजधानींतील मंत्र्यापेक्षां ह्या प्रचारकांस अंतर्गत मुलखाची व परिस्थितीची ज्यास्त तपशीलवार माहिती असते. 'अर्था'च्या ता. ८ सप्टेंबरच्या अंकात सिधीं व्यापाऱ्याच्या धाडसाविषयीं माहिती आलेली आहे व त्यांच्या धडाडीमुळें त्यास यश कसें आलें आहे, हेंहि तेथें सांगितलें आहे साहसाविना फलप्राप्ती होणें शक्य नाहीं, असाच बोध ह्या सर्व माहितीवरून निघत नाहीं काय? ब्रिटिश व्यापाऱ्यांस त्यांच्या सरकारचा पाठिंबा असतो आणि ब्रिटिश साम्राज्याच्या राजकीय सत्तेचें त्यांस सहाय होतें ह्यात सशय नाहीं. म्हणूनच, राष्ट्रीय सरकारचें प्रोत्साहन आणि लोकाचें साहस ह्याचें साहचर्य असलें म्हणजे व्यापार व उद्योगधदे ह्यांच्या उत्कर्षाचा मार्ग मोकळा होतो.

---

## व्हेल मासेमारीचा जपानी धंदा

जपानी राष्ट्रानें सर्वच उद्योगधद्यामध्यें कशी आघाडी मारली आहे, हें त्यानें केलेल्या व्हेल मासेमारीच्या धद्यातील धडाडीवरून दिसून येतें. उत्तरेकडील समुद्रात ग्रेटब्रिटन आणि नॉर्वे ह्या राष्ट्राच्या बरोबरीनें जपाननें आपलीं जहाजें ह्या धद्यात घातलीं असून त्याच्या योग्य वाटणीच्या प्रश्नाची चर्चा आता चालली आहे. ह्या धद्याचें नियमन झालें नाहीं तर व्हेल माशांच्या उत्पत्तीवर व पुरवठ्यावर गदा येईल अशी भीति इंग्लड व नॉर्वे ह्या देशास वाटत आहे आणि राष्ट्रसघानें केलेल्या नियमानीं जपान देश बाधला जात नसल्याकारणानें ही भीति दुणावली होती. ह्या सबधात भरलेल्या आतरराष्ट्रीय परिषदेंत जपाननें भाग घेतलेला नाहीं आणि आपल्या हितसंबधाचें योग्य सरक्षण झाल्यावांचून आपणांस तिच्याशी काहीं कर्तव्य नाहीं अशा प्रकारची त्या राष्ट्राची भूमिका होती. तथापि, आतां असल्या चर्चेत भाग घेण्याची तयारी जपाननें दाखविली आहे.

---

## मँचुकाऊमध्यें लाकडाच्या रांध्याचे कारखाने

कागद महागल्याकारणानें त्यास लागणारा लाकडाचा रांधा तयार करण्याचे नवीन कारखाने निघून त्या कच्चा मालाचा पुरवठा वाढेल आणि कागदाच्या किंमती वाढू न देण्याचे प्रयत्न यशस्वी होतील असें आम्हीं गेलया अंकात म्हटलें होतें त्याचें एक प्रत्यंतर, मँचुकाऊ देशात सोयाबीनचीं फोलपटें, दलदलीच्या प्रदेशात उगवणारीं बोरूच्या जातीचीं झाडें आणि जंगलातलें लाकूड ह्याच्यापासून राधा बनवण्याच्या हेतूनें कारखाने स्थापण्याकरिता कपन्या स्थापन होत आहेत, त्यांमध्यें मिळण्यासारखें आहे. जपानी भाडवल व साहस ह्याचें मँचुकाऊमध्यें जोरानें पुढें पाऊल पडत आहे आणि मँचुकाऊचें सरकारहि आपल्या देशातल्या नैसर्गिक सपत्तीचा विकास करण्यामध्यें पुढाकार घेत आहे पूर्व एशियात लाकडाच्या रांध्याचा पुरवठा वाढल्यास युरोपियन व अमेरिकन बाजारांवर सध्या मागणीचा ताण पडत आहे, तो कमी होऊन जागतिक मागणी व पुरवठा ह्याचा मेळ बसण्यास सहाय मिळेल अशी अपेक्षा आहे.

---

## हिंदी कपास कापडाच्या निर्गतींत वाढ

१९३७ च्या पहिल्या सहामाहींतील कपास कापडाच्या निर्गतीचा जागतिक आढावा घेतला असता असें दिसून येतें, कीं ह्या व्यापारांत हळु हळु वाढ होत असली, तरी अद्याप त्यांत सुधारणा होण्यास पुष्कळ जागा आहे. जपानचें हिंदुस्थानांतील गिऱ्हाइक कमी झालें असून डच ईस्ट इडीज, मलाया, अर्जेंटिना, ब्रिटिश पूर्व आफ्रिका व हॉगकॉंग ह्या देशातील जपानी मालाचा उठाव वाढला आहे. हॉलंड, जर्मनी, इटली व हिंदुस्थान ह्या देशांतून होणाऱ्या निर्गतींत बरीच वाढ झाली आहे. हिंदी माल इजिप्त, इराण, मलाया, सिलोन, नैगेरिया, इत्यादि देशात चांगला खपू लागला आहे.

## मुंबई इलाख्यांतील तुरुंग खात्याचा अहवाल

तुलनात्मक आकडे

| | १९३५ | १९३६ |
|---|---|---|
| शिक्षा झालेले कैदी | २७,९७२ | २५,७७७ |
| कैद्यांची रोजची सरासरी | ६,९६१ | ७,०७९ |
| ज्याच्यावरील खटला चालू आहे, अशांची रोजची सरासरी | १,५१२ | १,७९४ |
| साध्या कैदेची शिक्षा भोगणारे एकूण कैदी | २,०२६ | १,८४७ |
| बेडी घातलेले कैदी | ३,३३७ | ३,७१२ |
| तुरुंगांतून पळालेले कैदी | ५ | १४ |
| तुरुंगातील मृत्यूचें प्रमाण | १० ६% | १० २% |
| आजारीपणाचें प्रमाण | १९ ९% | १६ ८% |
| तुरुगातील उत्पादनाच्या विक्रीपासून उत्पन्न ( रु. ) | १,५६,२९६ | १,६६,७८२ |
| तुरुगाप्रीत्यर्थ सरकारास पडलेला निवळ खर्च ( रु. ) | ९,४६,९४१ | ९,५२,९४० |
| प्रत्येक कैद्यामागें वार्षिक खर्च (रु) | ११२ | १०७ |
| प्रत्येक कैद्यामागें अन्नाप्रीत्यर्थ वार्षिक खर्च ( रु. ) | २८३ | २६३ |

### सरकारतर्फे करार करण्याचा अधिकार कोणास आहे ?

मुंबईचे कलेक्टर व श्री भगवानदास गोवर्धनदास ह्याचेमध्यें बराच पत्रव्यवहार चालून सरकारमार्फत एक जमीन ९९९ वर्षे भाड्याच्या करारानें मिळवून देण्याचें कलेक्टरानीं त्यास कबूल केलें. सरकारच्या मंजुरीवर करार कायम होण्याचें अवलंबून आहे, असें त्यानीं स्पष्ट केलें व सर्व अटी ठरून अखेर करारावर कलेक्टर व श्री. गोवर्धनदास ह्यानीं सह्या केल्या. कलेक्टरानीं सरकारकडे लिहून भाड्याच्या करारास त्याची समती मिळविली व त्याप्रमाणें श्री. गोवर्धनदास ह्यास कळविण्यांत आलें काहीं दिवसानंतर कराराचा मसुदा त्याचेकडे पाठविण्यात आला, परतु त्यांनीं कायद्याप्रमाणें करार बधनकारक होत नाहीं, असें सागून भाडेखत कायम करण्याचें नाकारलें सरकारतर्फे श्री गोवर्धनदास ह्याचेवर करारांतील शर्ती पाळण्यास भाग पाडण्याविषयीं दावा लावण्यात आला, परतु हायकोर्टानें तो काढून टाकला

"सरकारी जमीन भाड्यानें देण्याचा करार करण्याचा कलेक्टरास अधिकार नव्हता पत्रव्यवहारावरून हें स्पष्ट दिसतें कीं प्रतिवादीबरोबर करारातील अटी विषयीं त्याची चर्चा चालू होती व सरकारकडे त्यांनीं आपली फक्त शिफारस पाठवावयाची होती सरकारनें ह्या अटी मान्य केल्यानतरच कराराचा प्रश्न उपस्थित होतो. प्रस्तुत प्रकरणांत, करारासंबधीं सरकारास माहिती मिळण्यापूर्वीच त्यावर सह्याहि होऊन गेल्या होत्या. मागाहून करार मान्य केला, असें समजलें तरी सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या नावाने करार झाला नसल्याकारणानें गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या ३० व्या कलमाप्रमाणें करार कायदेशीरच होत नाहीं. सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल ह्यांच्यातर्फे मुंबईच्या कलेक्टरानीं करार केला, असें सिद्ध न झाल्यामुळें, करार अस्तित्वातच येत नाहीं" असा हायकोर्टानें निकाल दिला.


औंध स्टेट सेंट्रल बॅंक. लिमिटेड. औंध.
( स्थापना-८ आक्टोबर १९३२ )
हेड ऑफिस-औंध ( सातारा )
शाखा-आटपाडी, कुंडल, गुणदाळ व बिचूद स्टेशन.
चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्हीं मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.
कर्जे-सोनें, चादी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात.
चेक, हुंड्या ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.
शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.
B R Vartak
मॅनेजर

न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई
( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वात मोठी कंपनी )
आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत: खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—
(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या
श्री. डी के जोगळेकर, बी ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.
टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८४,४०० |
| रिझर्व्ह फड | ४,८२३ |
| इतर फड | १,४०८ |
| मुदतबंद ठेवी | १,९४,९०७ |
| सेव्हिंग्ज बॅंक ठेवी | ७,९५९ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,७७,९७८ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रकम | ४१,५९९ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतांपर्यंत डिव्हिडड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.
सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा
जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज.

## मध्यवर्ती असेंब्लीमध्यें विमा बिलावर चर्चा

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें विमा बिलावर कलमवार चर्चा चालू आहे. मॅनेजिंग एजंटाची मुदत मर्यादित करण्याविषयीं सभासदांत मतभेद नव्हता. सध्या अस्तित्वात असलेल्या एजंटांचे करार तीन वर्षांनंतर रद्द व्हावेत अशी योजना मूळ विमा बिलांत होती आणि १० वर्षापर्यंत त्याची मुदत वाढविण्यांत यावी आणि एजंटास मिळणाऱ्या वेतनावर नियत्रण असावें अशी सिलेक्ट कमिटीनें दुरुस्ती सुचविली होती. कॉंग्रेस पक्षानें सुचविलेल्या योजनेस अनुसरून एजंटाचे करार तीन वर्षांनंतर रद्द व्हावयाचे आहेत, परतु त्याच्या वेतनावर मात्र निर्बंध रहाणार नाहीं. ही योजना बिलास दुरुस्ती म्हणून असेंब्लींत सुचविण्यात आली व ती पास झाली.

***

हप्त्यांच्या एकूण उत्पन्नाचे २½% किंवा वार्षिक २४ हजार रुपये, ह्यापैकीं कमी भरेल त्या रकमेइतकेंच वेतन विमा कंपन्याच्या मॅनेजिंग एजंटास मिळावें, अशी एक उपसूचना मांडण्यात आली, तथापि सर नृपेंद्र सरकार ह्यानीं तिची अव्यवहार्यता स्पष्ट केली. वरील योजनेप्रमाणें छोट्या कंपन्यांच्या मॅनेजिंग एजंटास आठ-चार रुपये वेतनावरच संतुष्ट रहावें लागेल, असें त्यानीं सांगितलें. एजंटास २४ हजार रु. प्राप्ती होण्यास विमा कंपनीचें हप्त्याचें सालिना उत्पन्न २ लक्ष ४० हजार रु. असावयास पाहिजे. हा आकडा बहुसंख्य कंपन्याचे शक्तीबाहेरचा आहे असा त्यानीं खुलासा केला आणि उपसूचना फेटाळली गेली.

***

विमेदाराचा अर्ज, डॉक्टरचा रिपोर्ट, स्नेह्याचा रिपोर्ट इत्यादि कागदपत्रांतील दाखल्यावरून विमा कंपनी विम्याचा स्वीकार करण्याचें ठरविते. ह्या कागदपत्रातील कांहीं उत्तरें चुकीचीं अथवा खोटीं आहेत, ह्या सबबीवर विमा उतरल्याचे तारखेपासून दोन वर्षांनतर कंपनीस विमा पॉलिसी रद्द करता येणार नाहीं. तथापि, हें चुकीचें किंवा खोटें उत्तर महत्त्वाच्या बाबींसबधीं होतें, विमेदारानें तें कंपनीस फसवण्याच्या हेतूनें दिलें व तें देताना विमेदारास उत्तर खोटें असल्याची जाणीव होती, असें कंपनीनें सिद्ध केल्यास वरील दोन वर्षांची मुदत लागू पडणार नाहीं, अशी दुरुस्ती सिलेक्ट कमिटीनें केली होती वरील योजनेची व्यापकता वाढविणारी एक उपसूचना युरोपिअन गटातर्फे मि जेम्स ह्यानीं सुचविली आणि व ह्या शब्दाऐवजीं अगर असा शब्द घालावा असें त्याचें ह्मणणें होतें विमा कपन्याची बाजू सबळ करणाऱ्या ह्या दुरुस्तीस सर कावसजी जहांगीर ह्यानीं पाठिंबा दिला, परंतु सर नृपेंद्र सरकार ह्यानीं तिला जोराचा विरोध केला. विमा अर्जातील क्षुल्लक चुकांचा फायदा घेऊन पॉलिसी बुडविता येणें अशक्य झालें पाहिजे, असें ते म्हणाले मि जेम्स ह्याची उपसूचना असेंब्लीस मान्य झाली नाहीं.

***

विमा पॉलिसीमध्यें दाखल असलेलें विमेदाराचें वय चुकीचें आहे असें आढळल्यास विमा कंपनीस पॉलिसीमधील अटींत जरूर तो फेरफार करण्यास अधिकार असावा, अशी सूचना मि जेम्स ह्यानीं केली, परंतु विमा कपन्यांस विमेदाराचे बाबत कोणत्याहि तऱ्हेनें ज्यास्त संरक्षण देण्यास सर नृपेंद्र सरकार तयार नव्हते व मि. जेम्स ह्यांची सूचना फेटाळली गेली.

***

विमा पॉलिसीवर स्थानिक भाषेमध्यें विम्याचा करार छापण्यांत यावा व विम्याची सोड किंमतहि त्यांत नमूद असावी; विमेदारानें लिहून दिलेल्या कागदपत्राची एक फोटो-प्रत त्यास मिळावी, विम्याचे दोन हप्ते भरून झाल्यानतर विमेदाराचा विमा पुढील हप्ते मिळाले नाहींत म्हणून रद्द होऊं नये. अशा अर्थाची दुरुस्ती डॉ. देशमुख ह्यानीं सुचविली. पोस्टाच्या कॅश सर्टिफिकिटावरहि अशा सोड किमती छापलेल्या असतात हें डॉ झियाउद्दीन ह्यानीं दाखवून दिलें अखेर डॉ. देशमुख ह्याची दुरुस्ती पास झाली नाहीं.

***

कपनीच्या स्थापनेनतर १० वर्षांनीं तिच्या बोर्डावरील विमेदार डायरेक्टराचें प्रमाण एक-चतुर्थांशाचें एक द्वितीयांशाइतकें वाढविण्यात यावें, अशी एक सूचना माडण्यांत आली, तीहि असेंब्लीस पसत पडली नाहीं विमेदारास डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधित्व देण्याचें तत्त्व असेंब्लीनें अगोदरच मान्य केलें आहे, त्याचीच व्याप्ती वाढविण्याचा प्रस्तुत प्रयत्न होता कपनीच्या जिदंगीमधील विमेदारांचा हिस्सा वाढल्यानतर त्यास व्यवस्थेतहि त्या मानानें स्थान मिळणें जरूर आहे, असा युक्तिवाद करण्यात आला, परतु ५६ वि ४६ मतानीं असेंब्लीनें ही सूचना नापास केली

***

विमा कपन्यानीं आपले पैसे कसे गुंतवावे, ह्याविषयींची योजना सर नृपेंद्र सरकार ह्यानीं सुचविली, तिला कॉंग्रेस पक्षातर्फे श्री. सतानम् ह्यानीं उपसूचना माडली व ती पास झाली. हिंदी कंपन्यांनीं आपल्या जिदगीपैकीं ५५ टक्के रकम सरकारी व इतर तत्सम रोख्यात गुतवावी, व ह्यापैकीं २५ टक्के रकम सरकारी रोख्यातच असावी असा ह्या उपसूचनेचा सारांश आहे. ब्रिटिश कपन्याचे बाबतींतहि अशाच प्रकारची योजना आहे. परदेशी कपन्यास त्यानीं विमेदारांस देणें असलेली सर्वच रकम हिंदुस्थानात गुतविणें भाग पडणार असून त्याचे बाबत जास्त दक्षता बाळगण्यात यावयाची आहे व त्यानीं विमेदारांस देणें असलेली रकम ट्रस्टींच्या ताब्यात देण्यात यावयाची आहे. चार वर्षांचे आत ह्याप्रमाणें तजवीज झाली पाहिजे कंपनीचे डायरेक्टर, मॅनेजर, मॅनेजिंग एजंट, ॲक्चुअरी, ऑडिटर किंवा इतर अधिकारी ह्यांस कंपनीनें पॉलिसीच्या सोड किमतीचे बाहेर दुसऱ्या कोणत्याहि तारणावर कर्ज देऊं नये, अशी दुरुस्ती असेंब्लीनें मान्य केली. सध्या दिलें गेलेलें कर्ज कायदा अमलात आल्यानतर एका वर्षाचे आत परत आलें पाहिजे, नाहींतर कर्जदार अधिकारी आपल्या जागांस मुकतील, अशी तरतूद एका दुरुस्तीनें कायद्यात करण्यांत आली आहे.

***

विम्याचें काम करण्याचा लायसेन्स असणाऱ्या एजटाखेरीज इतर कोणासहि कमिशन मिळण्यास बंदी करणारें बिलातील कलम असेंब्लीनें मान्य केलें.

***

आयुर्विमा व इतर विमा ह्याचें काम मिळविणाऱ्या एजटास कपन्यानीं यावयाच्या कमिशनची कमाल मर्यादा निश्चित करणारी दुरुस्ती असेंब्लींत पास झाली. आयुर्विम्याचे पॉलिसीवरील

हप्त्यावर पहिल्या वर्षी ४५ टक्के व नतर दरसाल ५ टक्के ही कमिशनची मर्यादा कायम करण्यात आली. इतर प्रकारच्या विम्यावरील हप्त्यावर ३० टक्के कमिशन देतां येईल. आयुर्विमा कपन्यानीं पहिलीं दहा वर्षे अनुक्रमें ५५ व ६ टक्के पहिल्या वर्षी व नतर दरसाल कमिशन देण्यास हरकत नाहीं कमिशन किती देण्यांत यावें, हा कंपन्याच्या अंतर्गत व्यवस्थेचा प्रश्न आहे, प्रस्तुत योजनेमुळें नवीन कपन्यांच्या व्यवहारांत व्यत्यय येण्याचा सभव आहे इत्यादि मुद्दे पुढें मांडण्यात आले श्री सुशील सेन ह्यांनीं काहीं विमा कपन्या हप्त्याचें सर्वच उत्पन्न कसें खर्चून टाकतात हें दाखवून दिलें व हिंदी कंपन्यास नको असलें तरी आपण त्याचें सरक्षण केलें पाहिजे, असें त्यानीं सागितलें कॉंग्रेस पक्षानें सरकारच्या बाजूनें मत देऊन ही दुरुस्ती पास होण्यास सहाय केलें.

## डेअरी तज्ज्ञाच्या शिफारशी

### डॉ राइट ह्यांचा रिपोर्ट

हिंदुस्थान सरकारच्या बोलवण्यावरून डॉ राइट व सर जॉन रसेल ह्यानीं हिंदुस्थानातील शेती व दूधदुभतें ह्यासंबंधीं चौकशी करण्याचें काम स्वीकारलें होतें. डॉ राइट ( डेअरी तज्ज्ञ ) ह्यांच्या रिपोर्टाचा साराश येथें दिला आहेः—

( १ ) हिंदी दूधदुभत्याची वार्षिक किंमत हिंदुस्थानातील तादळाच्या पिकाइतकी भरेल गव्हाचें उत्पादन दूधदुभत्याचे मानानें एक चतुर्थांश असेल नसेल जनावराची कातडींच दरसाल ४० कोटि रुपये किमत देतात हिंदी साखरेचेंहि उत्पादन इतकें होत नाहीं. बैल व इतर जनावरांकडून शेतीचें काम करून घेण्यांत येतें, तें ३ ते ५ अब्ज रुपयाचें होतें खताची किंमत २$\frac{१}{२}$ अब्ज रु भरेल. ह्या सर्व आकड्याची बेरीज १० अब्ज रुपयांवर जाते. कोंबड्यांच्या धद्याचा त्यात समावेश नाहीं हिंदुस्थानात दरसाल ७० ते ८० कोटि मण दूध निघतें. दोन आणे शेर दरानें त्याची किमत ३०० ते ४०० कोटि रुपये होईल. ग्रेट ब्रिटनमधील दुधाच्या पुरवठ्याचे मानानें हिंदुस्थानातील पुरवठा चार पट आहे, परतु प्रत्येक माणसाचे वाट्यास सरासरीनें फारच थोडें दूध येतें हा पुरवठा निदान दुप्पट तरी झाला पाहिजे. एका मध्यवर्ती डेअरी संस्थेची स्थापना करण्यांत यावी

( २ ) हिंदुस्थानातील बहुसख्य लोक खेडेगावात रहातात व दुधाच्या पुरवठ्यापैकीं शेकडा ९८$\frac{१}{२}$ भाग दूध, तूप, दही, खवा, इत्यादींचे स्वरूपात लोकांचे पोटात जातो. पाश्चात्य पद्धतीचें लोणी इत्यादि जिनसाचे वाटणीस फक्त उरलेला १$\frac{१}{२}$ टक्के भाग येतो ही परिस्थिति लक्षात घेऊनच योजना आखली पाहिजे, पाश्चात्य पद्धतीच्या डेअरींचें केवळ अनुकरण करून भागणार नाहीं

( ३ ) हिंदुस्थानातील प्रत्येक गाय सरासरीनें सालिना ३०० शेर दूध देतें गाईचें दूध वाढविण्याचा प्रयत्न होणें जरूर आहे. देशी पैदाशींची वाढ करणेंच ज्यास्त हितावह होईल कडब्यांचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होणें जरूर आहे, कारण हिंदुस्थानातील जनावरांचें पोषण सध्या नीट होत नाहीं

हिंदुस्थानातील डेअरीचे धद्याची जोपासना करण्याचे दृष्टीनें डॉ. राइट ह्यानीं एक योजना सुचविली आहे सल्लागारमडळें, मध्यवर्ती सस्था, अधिकाऱ्याच्या नेमणुका, इत्यादि गोष्टी त्यांच्या सूचनात अंतर्भूत आहेत

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

जुन्या घराची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा.—
भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करू शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—
धी इंडो फॉरिन एजन्सीज ( डिपार्टमेंट नं. ६ )
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

### कचरा करणारांस शासन

सार्वजनिक ठिकाणीं कागद, कचरा, साली, इत्यादि टाकून घाण करणारास कडक शासन करण्याचें धोरण ग्रेट ब्रिटनमध्यें अंगीकारण्यात आलें आहे. हा उपक्रम हिंदुस्थानातहि चालू होणें अगत्याचें आहे सार्वजनिक आरोग्य व इतराच्या सोई ह्याकडे दुर्लक्ष करणारास नागरिकत्वाचे धडे शिकविण्यात आले पाहिजेत. ग्रेट ब्रिटनमध्यें लोकांची ह्याबाबत बरीच प्रगति झालेली असली तरी जबाबदार संस्थाची व सरकारची त्या संबधातील अपेक्षाहि पुष्कळच वाढलेली आहे, हेंच अरुंडेल येथील कित्येक खटल्यांवरून स्पष्ट होतें. मोटार सायकलीची साइडकार खरडून कागद जागेवरच टाकणारास १० रु. दंड झाला व एका सहल करणारास चिंधी फेकण्याबद्दल तितकाच भुर्दंड पडला मोटारींतून बाहेर सहा फुटांवर संत्र्याचें साल फेकल्याबद्दल एका गृहस्थास १० रु दंड म्हणून द्यावे लागले व कागद अस्ताव्यस्त टाकणारासहि तेच प्रायश्चित्त मिळालें. चहा करून राहिलेली पत्ती हरळीवर फेकल्यामुळें एका स्त्रीस ४ रु. दंड झाला. चहाच्या पानाचें खत चागलें होतें, असें सागण्यात आलें, परतु त्या पत्तीबरोबर अपराधी स्त्रीनें अंड्याची टरफलेंहि टाकलीं होतीं, ह्यामुळें तिला ह्या बचावाचा उपयोग झाला नाहीं. ह्या सर्व उदाहरणावरून सार्वजानिक स्वच्छता, आरोग्य व टापटीप ह्यास पुढारलेल्या राष्ट्रात किती महत्त्व दिलें जातें व सरकार त्याबाबत कसें दक्ष असतें, हें दिसून येईल.

### फळें व भाज्या ह्यांच्या उठावास सहाय

प्रॉव्हिन्शिअल फ्रूट ॲन्ड व्हिजिटेबल मार्केट कमिटीची दुसरी सभा गेल्या आठवड्यात डॉ. जी. एस. चीमा ह्याचे अध्यक्षतेखाली भरली होती. त्या वेळीं त्यानीं कमिटीनें केलेल्या कामाचा आढावा घेतला. मुबई शहर म्युनिसिपालिटी (कॉर्पोरेशन) सध्या कोणाहि इसमास दलालीचा लायसेन्स नाकारीत नाहीं व एक रुपया भरल्याबरोबर परवाना मिळूं शकतो, ह्यामुळें बेजबाबदार लोकहि ह्या धंद्यांत प्रवेश मिळवतात. हें थाबविण्यासाठी दलालाकडून जामीन घेण्यात यावे, असें सभेत सुचविण्यात आलें. कित्येक प्रश्नाचा विचार करण्याचें काम सबकमिट्याकडे सोपविण्याचें ठरलें. रेलवे व आगबोट कपन्या ह्यानीं फळें आणि भाज्या ह्याच्या वहातुकीविषयीं, सहानुभूतिपूर्वक धोरण अंगीकारलें असल्याचें, डॉ. चीमा ह्यानीं सागितलें फळें आणि भाज्या ह्याची घाऊक विक्री, फळांची प्रतवारी लावणें,त्यांचे पॅकिंगमध्यें सुधारणा करणें इत्यादि प्रश्न कमिटीपुढे आहेत. आंब्याच्या फळाच्या परदेशाकडे होणाऱ्या निर्गतींत समाधानकारक वाढ होत आहे, त्यास तज्ज्ञाचा सल्ला व प्रयोगाचें निष्कर्ष उपयोगी पडल्याखेरीज रहाणार नाहींत फळें व भाज्या ह्याची हिंदुस्थानात सालिना आयात होते, तिची किमत २ ते ३ कोटि रुपये सहज होईल. ह्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागणें आवश्यक आहे उत्पादक व विक्रेते आणि ग्राहक ह्यामधील मार्केट कमिटी हा महत्वाचा दुवा होणें, तिला चिरस्थाइकत्व येण्यावर अवलबून आहे. ह्या कमिटीच्या स्थैर्याच्या प्रश्नाचा विचार सरकारनें सहाभूतीनें केला पाहिजे.


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

"जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा-सस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी-आहोंत"

**श्री. आर. एन. अभ्यंकर,** बी ए, एलूएल् बी,
मॅनेजिंग एजंटस्,
**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड**
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बॅंक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु (ट ख निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

**१२ वर्षें पुण्यांत लोकादरास पात्र झालेले**

# ★ महिंद्रकर ब्रदर्स ★

**यांचे येथें आपले कपड्यांची खरेदी करा अगर करवून घ्या.**

**बुधवार चौक, पुणें**

# सहकारी चळवळ

## सारस्वत को बँक, लि

वरील बँकेची १९ वी वार्षिक साधारण सभा शनिवार, ता. १८ सप्टेंबर, १९३७ रोजीं बँकेचे चेअरमन, श्री. व्ही पी. वर्दे, ह्याचे अध्यक्षतेखाली भरली होती ऑडिटरनें तपासलेला ताळेबद व नफा-तोटा पत्रक हीं सभेनें एकमतानें मजूर केलीं अहवाळाचे वर्षी बँकेनें सर्वांगीण प्रगति केलेली आहे, हें खालील आकड्यावरून दिसून येईलः—

| | १९३५–३६ | १९३६–३७ |
|---|---|---|
| | रु. | रु |
| भाडवल व रिझर्व्हज् | ५५,६४० | ८०,९४७ |
| ठेवी | ४,३१,४५८ | ७,३०,७४१ |
| कर्जें, कॅशक्रेडिटस्, ओव्हरड्राफ्ट इ. | १,७२,२१८ | २,३०,६३२ |
| रोख व रोखे | २,९९,७९७ | ५,७९,८२५ |

एकूण नफ्यापैकीं ( ९,६२७ रु ) निम्म्यापेक्षा अधिक रकम गगाजळींत व इतर फंडात टाकण्यात आली व द. सा. द. शे. ६ रु १४ आ ( बोनस धरून )दरानें डिव्हिडड वाटण्याचें ठरलें. वक्तशीर कर्जफेड करणारास, त्यांनीं भरलेल्या व्याजावर २५% रिबेट देण्याचें ठरलें.

## सिंदखेडे ता को. सुपरवायझिंग यूनियन, लि

वरील यूनियनची वार्षिक साधारण सभा ता १९-९-३७ रोजीं भरली होती, त्यावेळीं श्री दगाजीराव लहूजी पाटील ह्यांची यूनियननें प्रेसिडेंट म्हणून फेरनिवडणूक केली.

## मालेगांव तालुका को. सु यूनियन लि

( १ ) यूनियनची वार्षिक सभा ता. ९-९-३७ रोजीं श्री. बी. एस हिरे, एम. एल ए. ह्याचे अध्यक्षतेखाली झाली. ( २ ) तालुका डे. असोसिएशनचीहि सभा त्यांचेच अध्यक्षतेखालीं ता. ९ रोजीं झाली. ( ३ ) बँकेचे सीनियर इन्स्पेक्टर श्री. हळबे ह्याची बदली झाल्याचे निमित्तानें त्याचें सन्मानार्थ पानसुपारी समारंभ झाले.

## दि मराठा मार्केट पीपल्स को. क्रे. सोसायटी लि, मुंबई

वरील सोसायटी स्थापन होऊन दोन वर्षे पुरीं झालीं आहेत. मुंबई येथील क्रॉफर्ड मार्केट, भुलेश्वर मार्केट व फोर्ट मार्केट ह्यामधील पुष्कळशा लोकाच्या गरजा भागवून सोसायटीनें त्यास कर्जमुक्त केलें आहे. सोसायटीचे पटावर ४३८ सभासद असून वसूल भांडवल १०½ हजार रु आहे १९३५–३६ मध्यें १५० सभासदांनीं एकूण ३७¾ हजार रु. कर्ज घेतलें होते, १९३६–३७ सालीं ३२६ सभासदांस १ लक्ष ११¼ हजार रु कर्ज देण्यात आलें, त्यांतील ८० हजार रु फळाच्या व्यापाराकरिता व १६ हजार रु कर्जफेडीसाठीं होते कर्जाची रकम सभासदांनीं सावकाराकडून घेतली असती तर त्या रकमेवर सुमारें २५ हजार रु. व्याज पडलें असतें. सोसायटीस त्यास फक्त ३,११० रु द्यावे लागून त्याची २१,८९० रुपयाची बचत झाली. वर्षअखेर सोसायटीस निवळ नफा १,३०७ रु. झाला. सोसायटीनें अल्पावधींत श्री. भास्करराव जाधव ह्याचे नेतृत्वाखाली उत्कृष्ट प्रगति केली आहे, ह्यात संशय नाहीं.

## इंदूर परस्पर सहकारी पेढी, मर्यादित

( वार्षिक सभा . ता. २९–८–३७ )

वरील बँकेच्या पटावर १४९३ सभासद आहेत व भांडवल ९९ हजाराचें आहे. गंगाजळींत व इतर फंड्समध्यें मिळून ६७¾ हजार रु. आहेत. बँकेकडील ठेवींत ६¾ लक्ष रु. असून ४ लक्ष १५ हजारांचीं सभासदास कर्जे दिलेलीं आहेत. एकूण खेळतें भाडवल सुमारें ९ लक्ष रु. आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १४,८९२ रु नफा झाला. भागीदारास ७ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. बँकेजवळील सरकारी रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदात दाखवलेल्या किंमतीपेक्षां सुमारें ६¾ हजारांनीं कमी आहे, तथापि रोख्याच्या भावाच्या घसाऱ्याप्रीत्यर्थ काढलेल्या स्वतंत्र फडात ४ हजार रु. आहेत; ह्या कारणानें रोख्याची पडलेली किंमत ताळेबंदात घेण्यामुळें त्यास विशेष वैगुण्य आलेलें नाहीं. बँकेची परिस्थिति भक्कम असल्याचें तिच्या ताळेबंदावरून दिसून येतें. भागीदारास द्यावयाच्या डिव्हिडडचा दर गेलीं ४ वर्षे अनुक्रमें ११, १०, ९ व ८ टक्के होता तो अहवालाचे वर्षअखेर ७ टक्के करण्यात आला, हें ठीकच झालें बँकेची प्रगति अखड होत आली आहे. १९३६–३७ सालीं मुन्तजीव बहादुर वि मा माटे हे पेढीचे अध्यक्ष होते.

## सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक, लि.

( वार्षिक सभाः ता ३-१०-३७ )

वरील बँकेचें १९३६-३७ अखेर भाग भांडवल १,२२,२०० रु. झालें आहे. बँकेकडील एकूण ठेव १३¾ लक्ष रुपयाची आहे. रिझर्व्ह फडात ३८½ हजार रुपये असून इतर फंड्स ३४ हजारांवर आहेत. एकूण खेळतें भाडवल सुमारें १६½ लक्ष रु. आहे. ७ लक्ष रुपये कर्जाऊ देण्यात आले आहेत. माल, सोनें-चांदीं, घर-जागा, इत्यादींचे तारणावर रकमा गुतविण्याचा उपक्रम बँकेनें चालू केला आहे व अहवालाचे वर्षी त्या व्यवहाराची चागली प्रगति झाली आहे. दुष्काळीं परिस्थितींत शेतकऱ्यास सहाय म्हणून बँकेनें ४८ हजार रु. कर्जे मंजूर केलें व तें ताबडतोब वाटण्याची व्यवस्था केली. साळअखेर थकबाकी ७६ हजार रु म्हणजे येणें कर्जाच्या २०% आहे. बँकेच्या सर्व शाखाचें काम चागलें चाललें आहे. वर्षअखेर बँकेस १५,००४ रु. नफा झाला,त्यातून भागीदारास ६% दरानें डिव्हिडंड द्यावें अशी बोर्डाची शिफारस आहे बॅलन्स शीटमध्यें कर्जाचे बाजूस ८,४०३ रु. ९ आ. सिक्युरिटी अॅप्रीसिएशन म्हणून जमा आहेत, त्याची वाटणी वेगवेगळ्या फडात करण्याविषयीं बोर्डानें सूचना केलेली आहे. बँकेची मजबुती वाढविण्याकडे ह्या रकमेचा विनियोग करण्याचें बोर्डाचें धोरण स्तुत्य आहे

ताळेबदात दर्शवलेली रोख्यांची किंमत बाजारभावानें होणारी आहे, किंवा ती बँकेस पडलेळी निवळ रकम आहे, हें समजण्यास मार्ग नाहीं.तसा खुलासा रिपोर्टात केला जाणें आवश्यक आहे.बँकेची परिस्थिति एकदरीनें पहाता चांगली असून तिची प्रगति होत आहे ह्यांत संशय नाहीं हिशेबाच्या माडणीसंबंधीं वर सूचना केली आहे,तिकडे बँकेच्या व्यवस्थापकाचें लक्ष जाईल अशी अशा आहे.

## सटाणा ता को. सु. यूनियन, लि

वरील यूनियनची वार्षिक साधारण सभा गुरुवार, ता. ३०-९-३७ रोजीं सकाळीं १२ वाजतां यूनियनचे कचेरींत भरणार आहे.

### दि रेमंड वुलन मिलस्टाफ अ‍ॅन्ड वर्कमेन को ऑ. सोसायटी, लि.

वरील बॅकेच्या सभासदांचे संख्येंत अहवालाचे सालअखेर ९१ ची वाढ झाली. ठेवी ८,८८५ रुपयाच्या आहेत. वर्षामध्यें कर्जाचें एकूण ३७१ अर्ज मंजूर करण्यात येऊन ३२,१३० रु. कर्ज देण्यात आलें, त्यातील १७½ हजार रु. बाहेरील सावकाराच्या कर्जफेडीकरितां काढण्यांत आलें होतें. १७ सभासदांचीं २,०४६ रुपयाचीं कर्जें १,३०९ रुपयांस मिटवून दिल्यामुळें सभासदास ७३६ रुपयांची सूट मिळाली. नफावांटणींतील १,४३६ रुपयांपैकीं ६¼% दरानें डिव्हिडंड देण्याकरिता ७२५ रुपयांचा विनियोग करण्यात आला. सोसायटी पहिल्यापासूनच ' अ ' वर्गांत आहे, हें तिला भूषणावह आहे सावकारापासून सरक्षण करून सभासदांचें हित पहाणाऱ्या ह्या सोसायटीची प्रगति समाधानकारक होत आहे व ससून कंपनी तिचे व्यवहारांत लक्ष घालीत आहे, ही गोष्ट उत्साहवर्धक आहे.

---

### कॉसमॉस को अर्बन बँक लि, पुणें
( वार्षिक सभा ता. २६-९-३७ )

वरील बॅकेच्या सभासदांची संख्या १९१७ असून भाग भांडवल ८०½ हजार रु. आहे. ४ लक्ष १६ हजारांच्या तिचेकडे ठेवी आहेत. थकबाकींत घट झाली असून अहवालाचे साल अखेर तिचें प्रमाण ९.५% पडतें. ह्या बाबत विशेष लक्ष देण्याचें बॅकेचें धोरण आहे व तें यशस्वी होत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. वर्ष अखेर बॅकेस ११,५९८ रु. नफा झाला, त्यातून भागीदारास ७½ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्यासाठी ६,०२० रु. मंजूर झाले. बॅकेच्या इमारतीचे संबंधांत कार्यकारीमंडळानें विशेष प्रयत्न केले, त्याचें दृश्यफळ लवकर दिसून येईल, अशी आशा रिपोर्टांत व्यक्त करण्यांत आली आहे बॅकेची एकसारखी प्रगति होत आहे.

---


## Notice to Contractors

Sealed percentage Tenders in form B—1 for the following works are invited and will be received by the undersigned on 11-10-37 upto 2 p.m Other particulars regarding the contract etc., and tender form can be had at the Undersigned's Office on any working days during office hours upto 9th October 1937. The undersigned reserves the right to reject any or all tenders without assigning reasons.

| | Estimated Cost Rs. |
|---|---|
| (1) Improving Dharwar–Saundatti–Bagewadi Road. (Miles 1, 2, 5, 6, 7, 8, 10 & 11) Collection of metal only. | 21,220 |
| (2) Improving Dharwar–Saundatti–Bagewadi Road (Miles 1,2,5,6,7,8,10,11,16 & 20to24) Collection of murum only. | 19,793 |
| (3) Reconstructing Bridge No. 182, in flg. 115/7 of Karwar Bellary Road. Section from Hubli to Gadag | 42,853 |

P. K. SHINDE,
Executive Engineer, D. Dn.

Executive Engineer's Office,
Dharwar, 20th Sept. 1937.


### निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी कर्जरोखे** | |
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १२०—२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०५–११ |
| ४% १९४३ | १०८—० |
| ३½% विनमुदत | ९७—१ |
| ३½% १९४७–५० | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ | ९९–१५ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरटी व लांब मुदत) | १०९—० |
| ४% मुबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) | १०८—८ |
| ४% मुबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |


## प्रयोग यशस्वी झाला
### ९ रुपये टन ऊंस
### साखरेच्या धंद्यांतील फायदा मुख्यत: उंसावर अवलंबून असतो

' जावा ' स्वस्त साखर टिकूं शकते याचें एक प्रमुख कारण तेथें दर एकरीं ६० ते ६५ टन ऊंस येतो. जावा जातीच्या उंसाला महाराष्ट्राचें हवापाणी मानवतें व महाराष्ट्रातही जावा जातीचा ऊंस आडसालीं ६० ते ६५ टन व सुरू ४५ ते ५० टन येतो.

कॅनॉलच्या पाण्यावर ऊंस करावयाचा असल्यास जमिनी कोणत्या प्रकारच्या पाहिजेत याबद्दल शेतकी खातें व इरिगेशन खातें यातील तज्ज्ञांनीं संशोधन केलें आहे. खतें कोणतीं वापरावीं, किती वापरावीं याचेंही संशोधन झालेलें आहे.

अशा तज्ज्ञांच्या सहाय्यानें सिंडिकेटनें जमिनी निवडून व एका ठिकाणीं घेतल्यामुळें सिंडिकेटच्या जमिनी कमी खर्चात उंसाचें पीक चागलें देत आहेत व त्यामुळें सिंडिकेटला ९ रुपये टन ऊंस पडतो. सीं. ओ. ४१९ व पी. ओ. जे. २८७८ ह्या जातीचा ऊंस ८ रुपये टनानें मिळेल असा अंदाज वाटू लागला आहे. पी. ओ जे. २७२५ जातीचा ऊंस लावण्याबद्दल तज्ज्ञाचा सल्ला मिळाला आहे ऊस काढून घेतल्यानंतर अमेरिकन जातीचा कापूस उसाच्या सरीवर सरक्या टोचून सिंडिकेटनें लावला आहे, तो उत्तम आला आहे. वरील कारणामुळें साखरेचे भाव कमी झाले तरी सिंडिकेट ५ ते १० टक्के फायदा देऊं शकेल.

बहुतेक लिमिटेड कंपन्यास नफ्यावर २ ते २½ टक्के मॅनेजिंग एजंट याना प्रथम देण्यात येतात व मग भागिदाराना नफा वाटला जातो. तसा प्रकार सिंडिकेटच्या मॅनेजिंग एजन्सीचा नाहीं. ६½ टक्के नफा " ऑर्डिनरी " शेअर होल्डर याना दिल्याशिवाय मॅनेजिंग एजंट याना नफ्यांतून कोणताहि भाग मिळणार नाहीं. यामुळें वरील २ ते २½ टक्के प्रथम भागीदारानाच मिळतात व साखरेचे भाव उतरले तरी भागीदाराचें नुकसान होत नाहीं.

मशिनरी मुंबईस येत्या नोव्हेंबरमध्यें येईल. ऑर्डिनरी शेअर रु. २५ चे व प्रेफरन्स शेअर रुपये १० चे आहेत.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.
२५७, बुधवार पेठ, पुणें २.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you.

**NEW BUSINESS**
Last year 1936-37
Exceeds
2 CRORES & 82 LAKHS

**BONUS**
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
*Office* throughout India & the East

*S C. MAJUMDAR,*
MANAGER Bombay Branch
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेलस मिलेगी ट्राविलिग व फूडिंग अलाऊंस भी मिलेगा. नियम बहुत सरल है ( नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें )

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

## दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.

( स्थापित १९१६ ) अमीनाबादपार्क-लखनऊ

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटिंग, सडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

# स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २५; किंवा प्रथम ६।८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

## दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

# दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —
दररोज सकाळी १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवीवर द. सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्.

ऑफिसचे कामाकरितां **रेमिंग्टन टाईपरायटर**

स्वस्त विकाऊ आहे

मराठी केन्द्र : : हुजूरबागेसमोर पुणें

# K. K. & Co.

Photographic Dealers
POONA


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न १९५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. न. ९२५।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ६ आक्टोबर, १९३७ अंक ४०

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धयाना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४, किंवा प्रथम ६४८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि .**

हेड ऑफिसः—गिरगाव, मुबई

ब्रँच.—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

## दी सी. पी. अँड बरार प्राव्हिन्शल कोऑपरेटिव्ह बँक लि.

**टिळक पुतळयाजवळ, नागपूर शहर**

**दुसरा हत्ता विक्रीस निघाला**

| | | |
|---|---|---|
| ग्रामोद्धार ३½% षण्मासिक व्याज ३ लक्षाचे | २,००,००० रु चे ३½ टक्याचे २५ वर्षे मुदतीचे | सुरक्षितता सरकारी हमी ट्रस्टी रोखे |

**गहाणी रोखे ( डिबेंचर्स )**

प्रान्तिक सरकारची मुद्दल व व्याज दोहोंची हमी

या पैशाचा विनियोग आपल्या गरीब शेतकरी बाधवाच्या ऋणमुक्ततेकडे होणार आहे

ता ५ ते १५ आक्टोबर १९३७ च्या दरम्यान केव्हांही अर्ज पाठवावे

☞ विशेष माहितीकरिता प्रॉस्पेक्टस् मागवा

**दे. गो लांडगे**
ता २५-९-३७ ऑफि मॅनेजर

लक्षांत ठेवा ] **१९३७-३८ सालअखेर** [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

"जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत"

**श्री. आर. एन. अभ्यंकर,** बी ए, एलएल बी,
**मॅनेजिंग एजंटस्,**
**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड**
**११ बुधवार पेठ, पुणे नं २**

**महाराष्ट्रांतील** प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

## "अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बॅंक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

कि १ रु ( ट. ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४

# विविध माहिती

### लोण्याचा व्यापार

पाश्चात्य पद्धतीनें दुधाचें लोणी काढून त्याची विक्रीची व्यवस्था नीट केल्यास ह्या धंद्यांत किफायत मोठी आहे. ३१ मार्च, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी हिंदुस्थानांतून १ लक्ष, ५८ हजार रु किंमतीचें १,७७६ हंड्रेडवेट लोणी बाहेर गेलें. त्याच्या पूर्वीच्या वर्षी २ लक्ष, ४ हजार रुपयांचें २,२८९ हंड्रेडवेट लोणी निर्गत झालें होतें. मुंबई बंदरातून बहुतेक सर्व निर्यात होते व हिंदी लोण्याचा खप बहुशीं टांगानिका व सिलोन ह्या देशांत होतो. १९३७ सालीं सुमारें ४० लक्ष रुपयांचें ६३ हजार हंड्रेडवेट परदेशी लोणी हिंदुस्थानात उतरलें.

### म्हैसूर येथें सल्फ्यूरिक ॲसिडचा कारखाना

सल्फ्यूरिक ॲसिडचें उत्पादन करणारा २५ लक्ष रु भांडवलाचा एक कारखाना म्हैसूर येथें उभारण्यात येत आहे. संस्थानाचें सरकार २½ लक्ष रुपयाचें भांडवल देणार असून कारखान्याच्या मालास आपल्या खरेदींत प्राधान्य देणार आहे कंपनीच्या डायरेक्टरबोर्डांत सर धनजीशहा कूपर ह्यांचें नाव आढळतें

### ॲल्युमिनियमच्या उत्पादनाकरितां तज्ञांची पूर्वपहाणी

हिंदुस्थानांत ॲल्युमिनियमचे कारखाने स्थापन करण्याचे दृष्टीनें पूर्वपहाणी करण्याकरिता कांहीं हिंदी कंपन्याच्या पुरस्कारानें विदेशी तज्ञ लवकरच मुंबईत दाखल होणार आहेत

### युरोपियन सैनिकांसाठी थंड हवेची ठिकाणें

हिंदुस्थानांतील युरोपियन सैनिकांस दरवर्षी थंड हवा खाण्यास मिळावी ह्याकरिता त्यास डोंगरावरील थंड ठिकाणीं नेण्यात येतें. हिंदुस्थानातील १८ ठिकाणें अशीं निश्चित केलेलीं आहेत हिंदी सैनिकांकरिता ह्या प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली नाहीं.

### ट्रेझरी बिलांवर ११ आणे व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यात २ कोटि रुपयाचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यावरील व्याजाचा सरासरी दर द सा द. शे. ११ आणे पडला

### हिंद-ब्रिटन व्यापारी करार

हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन ह्याच्यामधील व्यापाराचे संबंधानें व्हावयाच्या कराराच्या वाटाघाटी लंडनमध्यें आज कित्येक महिने चालल्या आहेत. त्याच्यामध्यें बिकट अडथळे येऊन ब्रिटिश व हिंदी व्यापारी ह्याच्या मागण्याचा मेळ बसणें अवघड झालें आहे, अशा बातम्या मध्यंतरीं प्रसिद्ध झाल्या होत्या. ह्या वाटाघाटी सध्या कोणत्या मुक्कामावर आहेत, त्या केव्हा संपण्याचा संभव आहे, त्या मान्य होण्यापूर्वी हिंदी कायदेमंडळाचा अभिप्राय घेण्यांत येईल कीं नाहीं इत्यादि बाबींसंबंधानें आपणास कांहींच माहिती देता येत नाहीं, असें सर सुलतान अहमद यांनीं असेंब्लींत सांगितलें

### गंज प्रतिबंधक उपाय

रॅले सायकल कंपनीचे अध्यक्ष, सर हॅरोल्ड बॉडन, ह्यानीं आपल्या एका भाषणांत, सायकली गंजू नयेत म्हणून त्यानीं एक नवीन उपाय योजिला आहे, त्याची माहिती सांगितली. सायकलीच्या भागावर फॉस्फेटचा बारीक थर शिंपडला, म्हणजे धातूशीं त्याचा एकजीव होतो व एनॅमेलची चकाकी नेहमींपेक्षा पांचपट टिकते, असें ते म्हणाले

### दिल्लीदरबार प्रदर्शन

१९३८ सालाचे हिवाळ्यांत दिल्ली येथें थाटाचा दरबार भरेल, ह्या भरवशानें 'दिल्लीदरबार प्रदर्शना'ची मोठ्या प्रमाणावर पूर्वतयारी चालू आहे. प्रदर्शनकमिटीच्या अध्यक्षस्थानीं सर एच. पी. मोदी ह्याची योजना झालेली आहे.

### वधूचा तुटवडा पडणार

"ग्रेटब्रिटनमध्यें १८७५ सालीं जननाचें प्रमाण दर हजारीं ३५ ४ होतें, तें आता १४ ८ वर उतरलें आहे. जननाच्या प्रमाणात असाच उतार होत गेल्यास १०० वर्षांचे अवधींत ब्रिटनची लोकसंख्या ५० लक्षावर येईल १९४३ चे सुमारास त्या देशात विवाहक्षम मुलींचा तुटवडा भासूं लागेल व वयात आलेल्या मुलींस मागणी घालणाऱ्या लोकात चुरस लागून राहील १९४५ च्या आधीं व नतर दोन-तीन वर्षें, नव वधूवरांस आपला ससार थाटण्यासाठी लागणाऱ्या जिनसाचा खप कमी होईल व त्या धंद्यांस मंदीची झळ लागेल." वरील आशयाचे उद्गार तज्ञ व अधिकारी ब्रिटिश शास्त्रज्ञानीं काढले आहेत

### जपानी रेयॉनकरितां बाजारपेठांचा पहाणी

जपानी रेयॉन (नकली रेशीम) च्या बाजारपेठांची पहाणी करण्याकरितां जपानमधील व्यापारी संस्थेचें एक प्रातिनिधिक मंडळ हिंदुस्थान, इराक, सीरिया, इजिप्त, दक्षिण आफ्रिका, इत्यादि देशांस भेट देणार आहे सदरहु मंडळ हिंदुस्थानांत दाखल झालें असून, त्याचा येथें मुक्काम तीन आठवडे आहे. बनारस, आग्रा, दिल्ली, मुंबई व कराची ह्या शहरांस भेट देण्याचा त्याचा संकल्प आहे.

### हिंदुस्थान सरकारचे व्यापार-प्रतिनिधि

"हिंदुस्थान सरकारनें इंग्लंड, जर्मनी, इटली व जपान ह्या देशात आपल्या व्यापार-प्रतिनिधींची (ट्रेड कमिशनर्सची) नेमणूक केली आहे पूर्व आफ्रिका व केन्या येथें नेमावयाच्या अधिकाऱ्याची योजनाहि झालेली आहे इजिप्त व अमेरिका येथील नेमणुकाविषयीं सरकारचा अद्याप विचार चालू आहे. इतर देशांत व्यापार-प्रतिनिधि नेमण्याची सरकारास तूर्त आवश्यकता वाटत नाहीं," अशी माहिती सर सुलतान अहमद, व्यापार मंत्रि, ह्यांनीं असेंब्लींत सांगितली

### आसामांतील मळ्यांमधील मजूर

आसाममधील चहाच्या मळ्यातील कामावर गेल्या वर्षी २३,१७५ मजूर नव्यानें दाखल झाले, त्यांतील १२,९१८ बिहारमधून व ७,०३७ ओरिसातून आले मजुरांमधील देशी दारूचा खप एका वर्षांत दिढीनें वाढला आहे.

### हिंदी साखरेच्या धंद्याची प्रगति

| | १९३५-३६ | १९३६-३७ |
|---|---|---|
| उसापासून बनविलेली साखर (टन) | ९,१२,१०० | ११,२८,९०० |
| चालू कारखाने | १३७ | १४० |
| गाळलेला ऊस (टन) | १,१८,७३,७८० | ९८,०१,७४८ |
| साखरेचा उतारा | ९·२९ | ९ ५० |
| काकवीचा उतारा | ३ ४३ | ३ ५० |

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| १९-९-३७ ते २५-९-३७ | ४६,०९,९९७ |
| २६-९-३७ ते २-१०-३७ | ३८,३७,११३ |
| २१-९-३१ ते २-१०-३७ | ३,०४,४३,५२,८४६ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४९२ | परकीयाची अंतर्गत स्पर्धा—विमा बिल पास झालें | |
| २ आंतरराष्ट्रीय साखर करारास विरोध .. | ४९३ | ५ मध्यवर्ति असेंब्लींत विमा बिलावर चर्चा | ४९७ |
| ३ हिंदुस्थानच्या लोकसंख्येंत वाढ ... | ४९४ | ६ आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य . | ४९८ |
| ४ स्फुट विचार ... | ४९५ | ७ रासायनिक द्रव्याचे कारखाने .. | ४९८ |
| ब्रिटिश वसाहतींत ब्रिटिश तरांचा भरणा—जागतिक व्यापाराच्या मार्गांतील अडथळे—किनाऱ्यालगतचा वहातुकीचा व्यापार—लखनौ साखर परिषद्— | | ८ धर्मादायाचा धंदा करणारे लोक . | ४९९ |
| | | ९ खरें शिक्षण . | ४९९ |
| | | १० सहकारी चळवळ | ५०० |
| | | ११ निवडक बाजारभाव | ५०१ |

# अर्थ

बुधवार, ता ६ आक्टोबर, १९३७

## आंतरराष्ट्रीय साखरकरारास विरोध

### सरकारच्या धोरणाविषयीं असेंब्लीची नापसती

गेल्या एप्रिल–मे महिन्यात लंडन येथें एक आंतरराष्ट्रीय साखर परिषद् भरली होती साखरेचें जागतिक उत्पादन व तिला असलेली मागणी ह्यांचा मेळ घालून निरनिराळ्या देशांतून होणारी साखरेची निर्गत मर्यादित करणें व साखरेची किंमत निश्चित करणें, हा सदरहु परिषदेच्या मुळाशीं प्रमुख हेतु होता. हें उदात्त धोरण अर्थातच स्वार्थप्रेरित होतें. कित्येक पाश्चात्य राष्ट्रांनीं मुद्दाम संरक्षण देऊन आपल्या देशात साखरेच्या धंद्याची जोपासना केलेली आहे. ह्या धंद्यास जागतिक चढाओढीची झळ लागूं नये, ह्या हेतूनें सर्वच राष्ट्रांतील साखरेचा धंदा नियंत्रित करण्याच्या उद्देशानें साखरपरिषद् भरविण्यात आली होती, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं हिंदुस्थान सरकारच्या संरक्षक-धोरणाचे छत्राखाली देशी कारखान्याचें बस्तान नुकतेंच बसूं लागलें असतांना, त्याच्या हिताचें रक्षण करणें सरकारचें कर्तव्य होतें व्यापारविषयक कराराचे बाबतींत परराष्ट्रीय प्रतिनिधींशीं बोलणीं होतात, त्यावेळीं हितसबंधीं व्यापाऱ्याची बाजू समजून घेण्यासाठीं त्याचा सल्लागार म्हणून उपयोग करण्याचा सर्व देशांतील सरकाराचा परिपाठ असतो हल्लीं ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान ह्या देशांचीं व्यापारविषयक करारासंबधीं बोलणीं चालू आहेत व हिंदुस्थान सरकारच्या मदतींकरिता व्यापारी वर्गाच्या सल्लागार मंडळाची नेमणूक झालेली आहे, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. साखरपरिषदेचे वेळीं, हिंदी व्यापाऱ्यांची बाजू समजून घेण्याची हिंदुस्थान सरकारास आवश्यकता वाटली नाहीं व सर डेव्हिड मीक ह्यांची परिषदेंत हिंदी हितसबंधांचें रक्षण करण्याकरितां सरकारनें आपले प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली. सहाजिकच हिंदी लोकमत परिषदेमध्यें प्रभावी झाल नाहीं व हिंदुस्थानास प्रतिकूल असा कराराचा मसुदा तेथें मंजूर झाला. इतर देशाप्रमाणें हिंदुस्थानासहि आपली साखर पाच वर्षेंपर्यंत बाहेर निर्गत करण्याची सवड लंडन येथील साखर परिषदेनें मान्य केलेल्या योजनेंत ठेवलेली नाहीं. तरीहि हा निर्णय हिंदुस्थानच्या वतीनें परिषदेंत मान्य करण्यात आला

हिंदी साखरेच्या निर्गतीस केलेली बंदी अन्याय्य आहे, सबब ह्या प्रश्नाची चर्चा मध्यवर्ति कायदेमंडळात व्हावी व लोकप्रतिनिधींना आपलें मत व्यक्त करण्यास संधि मिळावी, अशी व्यापारी मंडळांच्या सघानीं मागणी करून त्याबाबत चळवळ सुरू केली. ह्या चळवळीचा सरकारवर योग्य तो परिणाम झाला व अखेर व्यापारखात्याचे मंत्री, सर सुलतान अहमद, ह्यानीं आंतरराष्ट्रीय साखर करारावर असेंब्लीचें शिक्कामोर्तब मिळण्यासाठी एक ठराव मध्यवर्ती कायदेमंडळात गेल्या आठवड्यात मांडला साखरेच्या आजच्या जागतिक भावानें हिंदी कारखानदारास आपला माल परदेशात विकणें परवडणार नाहीं, तेव्हा स्वदेशातील गिऱ्हाइकांवर जादा दराचा बोजा लादल्याखेरीज परदेशात हलक्या दरानें साखर विकतां येणें अशक्य होईल, अशा अर्थाचा युक्तिवाद हिंदी साखरेच्या निर्गतबंदीचे समर्थनार्थ करण्यात येत असे; परंतु त्याचा फोलपणा तात्काळ सिद्ध झाल्याकारणानें सरकारपक्षीयास इतर मुद्याचा अवलंब करणें भाग पडलें हिंदुस्थानानें करारावर सही करणें नाकारल्यास इतर देश बिथरून जातील व जागतिक स्पर्धेपुढें हिंदुस्थानास बाहेरील बाजारपेठात हार खावी लागेल, पाच वर्षांच्या अवधींत हिंदी साखरकारखान्याची प्रगति होईल व नंतर निर्गत व्यापारात त्यास निश्चयपूर्वक पाऊल टाकता येईल, तोंपर्यंत निर्गतीस बंदी झाल्यानें कांहीं बिघडत नाहीं, उलट, हिंदुस्थानाचा त्यात अंतिम फायदाच आहे, अशा अर्थाचें समर्थन सरकारतर्फे करण्यांत आलें., मि रॅम्से स्कॉट ह्या लोकनियुक्त युरोपियन सभासदानें सर सुलतान ह्याच्या मूळ ठरावास उपसूचना मांडली. साखरेच्या धंद्यातील कारखानदारांस सरकारनें आपल्या विश्वासांत घेतलें नाहीं ह्याविषयीं तीव्र निषेध प्रदर्शित करून सदरहु उपसूचनेनें सरकारास साखरेच्या निर्गतीस हरप्रयत्नांनीं सहाय करण्याची शिफारस केली ब्रिटिश मालास हिंदुस्थानामध्यें प्राधान्य मिळतें, तर मग हिंदी साखरेस ग्रेटब्रिटनमध्यें प्राधान्य मिळण्याचे मार्गांत येणाऱ्या, साखरकरारास हिंदुस्थानानें संमती कां द्यावी ? असा, प्रश्न लोकनियुक्त सभासदांनीं उपस्थित केला, त्यास समर्पक उत्तर देणें सरकारास शक्य झालें नाहीं. हिंदी साखरेच्या उत्पादनाच्या खर्चांत अजूनहि काटकसर करता येणें शक्य आहे, हें श्री. न. वि. गाडगीळ ह्यानीं दाखवून दिलें. प्रांतिक सरकारें आता लोकप्रतिनिधिक झालीं असून, तीं उसाच्या लागवडींत व साखरेच्या उत्पादनांत जरूर ती सुधारणा करण्यास मनोभावानें सहाय करतील, असा त्यानीं हवाला दिला अखेर मि स्कॉट ह्यांची उपसूचना मंजूर होऊन सरकारचा ६६ विरुद्ध ५२ मतानीं पराभव झाला.

साखरेच्या कराराविरुद्ध हिंदी लोकमत किती प्रखर आहे हें असेंब्लीमधील वादविवादाचे वेळीं दिसून आलें. मि. स्कॉटसारख्या युरोपियन प्रतिनिधीनें विरोधी पक्षाचें नेतृत्व स्वीकारून सरकारवर हल्ला चढविला हें येथें लक्षात ठेवण्याजोगें आहे कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें साखर-करारास मान्यता देणारा एक ठराव सरकारतर्फे मांडण्यांत आला, तो २२ विरुद्ध १२ मतांनीं पास झाला, ह्यात अनपेक्षित असें कांहींच नाहीं. असेंब्लीमध्यें स्पष्टपणें व्यक्त झालेल्या लोकमतास धाब्यावर

बसवून सरकार आपलेंच घोडें पुढें दामटतें कीं काय हें आतां लवकरच दिसेल. ब्रिटिश साम्राज्याच्या हितसबंधाचा व हिंदी आकांक्षांचा ह्या बाबतींत विरोध असण्याचा संभव आहे व ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारच्या खंबीरपणाची प्रस्तुत प्रसंग ही कसोटी आहे. साखर परिषदेसबंधीं सरकारनें स्वीकारलेलें धोरण प्रथमपासूनच जरा सशयास्पद वाटत होतें. आतां सरकार पुढें काय करतें, हें पाहावें.

## येत्या शिरगणतीचे वेळीं हिंदुस्थानची लोकसंख्या ४० कोटि होणार

**हिंदुस्थान सरकारच्या पब्लिक हेल्थ कमिशनरचा रिपोर्ट**

(१) हिंदुस्थानातील लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे. १९३१ सालीं शिरगणति झाली, तेव्हाचे मानानें १९३५ सालअखेर हिंदी लोकसख्येंत १½ कोटींची भर पडली येत्या पांच वर्षांत मोठ्या प्रमाणावर साथ अगर दुर्भिक्ष ह्याची पाळी न आल्यास ही वाढ अशीच होत राहून १९४१ च्या शिरगणतींत हिंदी लोकसख्येनें ४० कोटींची सीमा ओलांडलेली आढळेल, असा सरकारी तज्ञाचा अधिकृत अंदाज आहे.

(२) १९३५ सालीं हिंदुस्थानात एकूण ९७ लक्ष अर्भकें जन्मास आलीं, त्यापैकीं ५०½ लक्ष मुलगे होते व ४६½ लक्ष मुलीं होत्या. दर हजार लोकसख्येशीं जननाचें प्रमाण अनुक्रमें १८.१ मुलगे व १६.७ मुली असें पडलें. एकूण मृत्यूची सख्या ९५¾ लक्ष इतकी भरली

(३) हिंदुस्थानातील तीन प्रमुख साथीचे रोग म्हणजे पटकी, प्लेग व देवी, हे होत. अहवालाचे वर्षीं प्लेगनें बळी कमी घेतले, परंतु पटकीचा फैलाव ज्यास्त झाला.

(४) हिंवताप, क्षय, बालमृत्यू व बाळंतपणांतील मृत्यू ह्या सर्वांच्या मुळाशीं पौष्टिक व सात्विक आहाराचा अभाव, हें प्रमुख कारण आहे व तें दूर केल्याविना ह्या रोगाची नागी मोडतां येणें शक्य होणार नाहीं

(५) १९१८ सालापर्यंत प्लेगनें दरसाल ५ लक्ष लोक मरण पावत असत.१९३१ ते १९३४ ह्या मुदतीमधील सालीना सरासरी ५० हजाराची आहे व १९३५ सालीं तर फक्त ३२ हजार लोक ह्या रोगास बळी पडले.

(६) दर वर्षीं सुमारें ८० ते १०० लक्ष लोक देवी टोचून घेतात, त्यापैकीं बहुतेक सर्वांची सुई घेण्याची ती पहिलीच खेप असते. कांहीं लोक पुनः सुई घेतात व कांहींस देवी येऊन गेल्यामुळें रोगाची भीति रहात नाहीं. तथापि, देवी टोचण्याचे बाबतींत सुधारणा होण्यास पुष्कळ जागा आहे.

(७) तापानें मृत्यू आलेल्यातील शेकडा ७३ टक्के लोक बंगाल ते सरहद्दप्रात ह्या उत्तर हिंदुस्थानातील पट्टीमधील होते. सुमारें १२½ लक्ष लोक हिवतापास बळी पडतात. ह्या तापामुळें मनुष्यास क्षीणत्व येतें व त्याची कार्यक्षमता कमी होते, ह्या दृष्टीनें तो हटविण्याचे प्रयत्न जारीनें होणें आवश्यक आहे.

(८) क्षयरोगाचें मूळ शहरांतून खेड्यांत पसरू लागलें आहे व त्याचा फैलावहि जोरानें होत आहे.

(९) हिंदुस्थानांत सुमारें १० लक्ष महारोगी आहेत, त्यापैकीं काहींची व्यथा सौम्य प्रमाणात असली, तरी त्यातील ३½ लक्ष महारोग्यांचें समाजांत वावरणें सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीनें हितावह नाहीं. महारोग्यास इतर लोकापासून अलिप्त राखणें खर्चाचें काम आहे.

(१०) हिंदुस्थानातील १९३५ सालामधील मृत्यूपैकीं २८ लक्ष मृत्यू (४३%) पाच वर्षांखालील मुलांचें होते १½ ते १¾ लक्ष स्त्रिया बाळतपणांत निवर्तल्या बाळंतपणाची इस्पितळांतून सोय पुरेशी नाहीं मुबई इलाख्यातील इस्पितळात बाळंतपणें करण्यात आलीं, त्यांचें एकूण बाळंतपणाशीं प्रमाण १,१०.२:१ असें पडतें.

(११) एकूण जिल्ह्यांपैकीं निम्म्या जिल्ह्यातून व तीन चतुर्थांश म्युनिसिपालिट्यातून लायक आरोग्याधिकाऱ्याची नेमणूक झालेली नाहीं. आरोग्य खात्याकडील नोकर वर्गाचा पुरवठाहि पुरेसा नाहीं. आरोग्यावर खर्चहि अधिक होणें जरूर आहे


**गव्हाचे पोहे**

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात. विशेषत. लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खाता येतात.

७५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.

**कर्तबगारीची कमाल—**

असेच जनता म्हणूं लागली आहे.

रोज १ लाख

या प्रमाणांत विमे उतरणारी, देशभक्तांनीं अत्यंत प्रेमाने सहकार्य केलेली हिंदी विमा संस्था म्हणजेच

**भारत इन्शुअरन्स कं. लि.**

हेड ऑफिसः—लाहोर.

(स्थापना १८९६)

| | | |
|---|---|---|
| भांडवल | : | ... २ कोटी ७० लक्ष रु पेक्षां जास्त |
| विमाफंड | : | ... १ कोटी ८० — „ — |
| क्लेम्स दिले | : | ... १ कोटी ४१ — „ — |

**६७॥ रु.** ] त्रैवार्षिक बोनस [ **५२॥ रु.**

पेट्रनः— डॉ रवींद्रनाथ टागोर.

डायरे बोर्डाचे चेअरमनः— श्री शेठ रामकृष्ण दालमिया.

प्रांतिक बोर्ड चेअरमनः— बे. भ के एफ् नरीमन.

महाराष्ट्रांतील सर्व ठिकाणीं एजटस् व सस्थानात स्पेशल रिप्रेझेंटेटिव्हज् नेमणें आहेत वजनदार इसमानींच अर्ज करावे योग्य इसमांस उत्कृष्ट अटी व भरपूर कमिशन.

माहितीसाठीं लिहाः—

डॉ. आर के गवंडे.
ब्रँच सेक्रेटरी.

भारत इन्शुअरन्स कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २

# स्फुट विचार

## ब्रिटिश वसाहतींत ब्रिटिशेतरांचा भरणा

ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड इत्यादि ब्रिटिश स्वयंशासित वसाहतींमध्ये अलीकडे ब्रिटिशेतर लोकाची गर्दी उसळली असून त्याचें ब्रिटिश स्वरूप पालटण्याची भीति उत्पन्न झाली आहे ह्या वसाहतींत शेतीचा व इतर धंदे करण्यास माणसाची उणीव भासत आहे आणि ती ब्रिटिशेतर देशातली दरिद्री व गरजू माणसें येऊन भरून निघत आहे. ब्रिटिश वसाहतींत इतर राष्ट्रीयाचें संख्याधिक्य होणें ब्रिटिश साम्राज्याच्या एकजीवीपणाच्या व बळकटीच्या दृष्टीनें इष्ट नाहीं असें वाटून त्या प्रवृत्तीस आळा घालण्याची चळवळ इंग्लंडमध्यें कित्येकांनीं चालविली आहे. ग्रेटब्रिटनमधून ब्रिटिश लोक वसाहतींत जाऊन रहातील तर ब्रिटिशांमधली बेकारी कमी होईल आणि कॅनडा व ऑस्ट्रेलिया सारख्या देशांत आर्थिक प्रगतीसाठी कामकऱ्याची व नागरिकांची वाण भासत आहे ती दूर होईल असा दुहेरी उद्देश ह्या चळवळीच्या मुळाशी आहे गेल्या सात वर्षांत ऑस्ट्रेलियातून तीस हजार ब्रिटिशवंशीय लोक दुसरीकडे गेले आहेत आणि कॅनडामध्यें एकूण लोकसंख्येपैकी निम्मे ब्रिटिशेतर आहेत. ह्या वस्तुस्थितीचा आणि तीवरील उपाय योजनेचा विचार करण्यासाठी लंडनमध्यें एक परिषद भरणार आहे. ग्रेटब्रिटनमधील आणि वसाहतींतील प्रधानमंडळानीं ह्या प्रश्नाकडे आजवर विशेष लक्ष दिलेलें नाहीं अशी तक्रार आहे आणि लंडन येथें तेथील मेयॉरच्या आश्रयानें गिल्ड हॉलमध्यें भरणाऱ्या परिषदेचा हेतु या विषयासंबंधानें जागृति व भरीव कार्य करणें हा आहे वसाहत सरकारांचे प्रतिनिधि ह्या परिषदेस उपस्थित होणार आहेत, हें सागणें नकोच हिंदुस्थानास त्या परिषदेंत स्थान नाहीं, हेंहि तितकेंच स्पष्ट आहे. ब्रिटिश स्वयंशासित वसाहतींत ब्रिटिशांचें वर्चस्व रहाणें हें प्रस्तुत चळवळीचें उद्दिष्ट असल्यानें हिंदुस्थानच्या वाढत्या लोकसख्येस साम्राज्यातील रिकाम्या पडलेल्या प्रदेशात उपजीविकेचें साधन प्राप्त करून देण्याच्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाचा विचार कोण करतो ? ब्रिटिश साम्राज्यात त्या देशाचें स्थान दृढ व्हावें अशी इच्छा प्रकट करणाऱ्या मुत्सद्याचें ह्यासबधांत काय म्हणणें आहे ?

## जागतिक व्यापाराच्या मार्गांतील अडथळे

"आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाल्यावाचून जनतेची आर्थिक स्थिति सुधारणार नाहीं, ही गोष्ट प्रत्येक देशातल्या राज्यकर्त्यांनीं आपल्या नागरिकाच्या मनावर बिंबवली पाहिजे" अशा अर्थाचे उद्गार, ब्रिटिश सरकारचे आर्थिक सल्लागार आणि राष्ट्रसघाच्या आर्थिक कमिटीचे अध्यक्ष, सर फ्रेडरिक लीथ रॉस्, ह्यांनीं नुकतेच काढले आहेत. आर्थिक मंदी हळुहळु दूर होते आहे ह्या कारणानें राष्ट्राच्या परस्परामधील व्यापाराच्या मार्गांतले अडथळे दूर करण्यास आता हरकत नाहीं, मदीनें गारठून गेलेल्या देशानीं परदेशी मालावर नियत्रण घालून स्वदेशात उत्पन्न होणाऱ्या मालास उत्तेजन देणें अपरिहार्य होतें, असें मानलें तरी आतां तशी परिस्थिति राहिलेली नाहीं हें लक्षात घेऊन राष्ट्रीय सरकारानीं आतरराष्ट्रीय व्यापारास घातलेले पायबंद तोडून टाकणें किंवा सैल करणें अगत्याचें आहे, असें त्याचें म्हणणें आहे युरोपिअन राष्ट्राच्या राजकीय महत्वाकाक्षा आणि त्याचेमधली वितुष्टें पुष्कळ अंशीं मंदीस आणि आंतरराष्ट्रीय व्यापारांत घट होण्यास सहाय करीत आहत, ही गोष्ट सर फ्रेडरिक ह्यानीं ध्यानात ठेवणें आवश्यक आहे. राष्ट्रीय व्यापार व उद्योगधदे ह्याचा राजकीय परिस्थितीशीं अत्यत निकट सबध असतो 'जगांत व्यापार अनियंत्रितपणानें चालला म्हणजे सर्वत्र शांतता नादेल ही जुनी कल्पना अलीकडच्या इतिहासानें खोटी करून दाखविली आहे. आपल्या लोकाचे उद्योगधदे सुरळीतपणें चालण्यास त्याचें सरक्षण करून त्यास उत्तेजन देणें सर्व राष्ट्रातील राज्यकर्त्यास आवश्यक वाटत आहे. ह्याचा परिणाम स्वाभाविक रीतीनें आतरराष्ट्रीय व्यापार मर्यादित होण्यांत झाला आहे राष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या योगक्षेमास हानिकारक होणार नाहीं इतक्या बेतातच आंतरराष्ट्रीय देवघेव चालणें आतां अपरिहार्य आहे निर्गत व्यापारावर बहुशीं अवलबून रहाणाऱ्या राष्ट्रानीं ही प्रवृत्ति नीट ओळखली पाहिजे, आणि ती ओळखूनच ग्रेट ब्रिटन सारख्या राष्ट्रामधील राज्यकर्तेहि स्वदेशातील व्यापारास उत्तेजन देत आहेत. अलीकडच्या राजकीय व आर्थिक घडामोडींच्या मर्यादा आतरराष्ट्रीय व्यापारास बसणें स्वाभाविक आहे त्याच्या पलीकडे उडी मारण्याच्या प्रयत्नास सद्यःस्थितींत यश येणें अशक्य आहे परदेशांशीं वाढत्या प्रमाणात व्यापार करा असा उपदेश, तो व्यापार फायदेशीर असेल तर, कोणत्याहि जाणत्या राष्ट्रास मुद्दाम करण्याचें प्रयोजन नाहीं. प्रत्येकाला स्वहित कशात आहे हें समजतें असें गृहीत धरण्यास वस्तुतः प्रत्यवाय नसावा

## किनाऱ्यालगतच्या वहातुकीच्या धद्यांत परकीयांचें वर्चस्व

हिंदुस्थानाच्या किनाऱ्यालगतची आगबोटींची वहातुक हिंदी कंपन्याकरिता राखून ठेवावी, निदान त्यास ह्या वहातुकात प्राधान्य मिळावें, किमानपक्षीं देशी कपन्याचें विदेशी कपन्यांच्या घातुक स्पर्धेपासून सरक्षण तरी व्हावें, अशा तऱ्हेचे प्रयत्न आजवर अनेक वेळा करण्यात आलेले आहेत. प्रत्येक वेळीं अशा योजनाविषयीं लोक आतुर असूनहि, सरकारनें त्या योजनास एकजात विरोध केलेला आहे सरकारच्या ह्या बाबतच्या सहानुभूतिशून्य धोरणाचा अनुभव कौन्सिल ऑफ स्टेटमधील चर्चेच्या वेळीं नुकताच आला. किनाऱ्यालगतची समुद्रावरील वहातुक करण्याचा हक्क त्याकरिता परवाना देण्यात आलेल्या मडळयासच फक्त असावा व वहातुकीचे कमाल व किमान दर निश्चित करण्याचा अधिकार सरकारकडे असावा, असा श्री. सप्रू ह्याच्या बिलाचा आशय होता. बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यात यावें, अशी श्री सप्रू ह्यानीं सूचना माडली, तिला सरकारनें विरोध केल्यामुळें ती फेटाळली गेली. सर्व लोकनियुक्त सभासदानीं एकजात सदर सूचनेचे बाजूनें मत दिलें, ह्यावरून लोकमताची ह्या प्रश्नाविषयींची तीव्रता दिसून येते इग्लड स्वत आपल्या आगबोटींच्या धद्यास सरक्षण देत असताना हिंदुस्थानात मात्र तें नाकारण्यात यावें, हें विचित्र दिसतें ग्रेट ब्रिटननें ब्रिटिश हितरक्षणाची खातरजमा हिंदी घटना कायद्यातच करून ठेवली आहे, तथापि श्री. सप्रू ह्याच्या योजनेमुळें वहातुकीच्या धद्यात निष्कारण अडथळा उत्पन्न होईल असें सागण्यात येत आहे. हिंदी कंपन्यांनीं विदेशी मडळ्याशीं सलोख्यानें वागावें, ह्यांतच त्यांचें हित आहे, असा पोक्त सल्ला हिंदुस्थान सरकारच्या व्यापार खात्याचे सेक्रेटरी, मि डौ, ह्यानीं दिला मि. पार्कर ह्यांस श्री सप्रू ह्याचे बिलामध्यें वजनदार हिंदी

व्यापारी लोकाच्या स्वार्थी हेतूचा वास आला सरकारतर्फे मांडण्यात आलेले मुद्दे नवीन नसले, तरी जनतेची मागणी मात्र ह्यापुढें जास्त निकडीची होत जाईल ह्यांत संशय नाहीं.

---

### लखनौ साखर परिषद्—स्तुत्य उपक्रम

आपापल्या प्रांतांतील धंद्याचें योग्य संरक्षण करण्याचें धोरण त्यांतील सरकारांनीं अंगीकारण्याची आवश्यकता आम्हीं वारंवार प्रतिपादली असून मुंबईच्या प्रधानमंडळानें ह्या बाबतींत ठळक कार्यक्रम हातीं घ्यावा असें सुचविलें आहे संयुक्त प्रान्त आणि बहार या प्रांतांत उंसाची लागवड व साखरेचें उत्पादन हीं एकवटलीं असून त्यांचें योग्य संघटन आणि शेतकरी व कारखानदार यांच्या हिताचें रक्षण कसें करतां येईल ह्या प्रश्नाकडे तेथील प्रधानमंडळाचें लक्ष लागून राहिलें आहे. उंसाच्या व साखरेच्या धंद्यांच्या मार्गांत आलेल्या व येणाऱ्या अडचणींचा विचार एकत्र करण्याचें ठरवून दोघांनीं लखनौ येथें त्यासाठीं नुकतीच एक संयुक्त परिषद भरवली होती संयुक्तप्रांताचे मुख्य प्रधान श्री. गोविंदवल्लभ पंत यांनीं परिषदेंतील आपल्या भाषणात, शेतकरी व कारखानदार ह्यांच्या परस्परावलंबनाच्या दृष्टीनें दोघांच्या हिताचा मेळ बसवण्याची आवश्यकता असल्याचें सांगितलें. शेतकऱ्यांस आपल्या उंसाबद्दल योग्य मोबदला मिळावा, कामकऱ्यांची स्थिति समाधानकारक रहाण्याची व्यवस्था कारखानदारांनीं करावी आणि साखरेस किफायतशीर भाव येऊन तिचें उत्पादन व्यवस्थित चालावें हा त्रिविध उद्देश सफल होण्यास सहकार्य अगत्याचें आहे आणि संयुक्त प्रांत व बहार येथील सरकारांनीं तें घडवून आणण्याचा प्रयत्न करावा असें मत लखनौ-परिषदेंत व्यक्त करण्यात आलें. ह्या कामासाठीं एक संयुक्त कमिटी नेमण्यांत येणार असून तिच्यामार्फत साखरेच्या धंद्याविषयींच्या प्रश्नांची व्यवस्था व्हावयाची आहे. संयुक्तप्रांत व बहार ह्या प्रांतांतील प्रधानमंडळांनीं साखरेच्या धंद्याचें आर्थिक महत्त्व ओळखून त्याची नीट घडी बसावी म्हणून सहकार्याची संघटित योजना आखण्यांत पुढाकार घेतला आहे ही गोष्ट त्यांस भूषणावह आहे. मुंबई सरकारानें प्रांतिक धंद्यांचे बाबतींत आणि विशेषतः साखरेच्या धंद्यासंबधानें असेंच विधायक संघटनवृत्तीचें धोरण अंगिकारणें आवश्यक आहे. उंसाची लागवड व साखरेचें उत्पादन ह्या गोष्टी जनतेची आर्थिक उन्नति होण्याच्या दृष्टीनें आमच्या इलाख्यात विशेष महत्त्वाच्या आहेत. त्यांचा परामर्श जनता व प्रधानमंडळ ह्यांनीं सहकार्यानें घेतला पाहिजे

---

### परकीयांची अंतर्गत स्पर्धा—चीनपुढील प्रश्न

एकीकडे युद्धांत जपानला तोंड देत असता चीननें आपलें सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे चीनच्या कांहीं विभागांत त्या देशाचें सार्वभौमत्व नसून परकीयांचेंच वर्चस्व आहे व त्यांनीं ह्या गोष्टीचा फायदा घेऊन सदरहु मर्यादित क्षेत्रांत कारखाने चालविले आहेत. चीनमधील रेल्वेफाट्यांचा चौथा हिस्सा, आगबोटींच्या वहातुकीचा दोनतृतीयांशावर भाग, कपास कापडाच्या गिरण्यांत गुंतलेल्या भांडवलापैकी शेकडा ५०% भांडवल व तेलाच्या आणि तंबाखूच्या गिरण्या व बँका ह्यावर परकीयाची सत्ता चालते. परकीयांच्या मालकीच्या कोळशाच्या दोन खाणींतील मालाचें उत्पादन एकूण उत्पादनाच्या निम्म्यापेक्षा ज्यास्त भरतें. लोखंडाच्या उत्पादनांतील ८२% भागाची मालकी जपान्यांकडे आहे. परकीयानी चीनच्या औद्योगिक क्षेत्रात महत्त्वाचें स्थान पटकावलें असल्याकारणानें केवळ आयात मालावर जकात बसवून चिनी कारखानदारांस संरक्षण मिळत नाहीं, उलट, अशा मदतीचा फायदा विदेशी कारखानदारांसच ज्यास्त मिळण्याचा संभव असतो. मोठ्या कारखान्यांस टक्कर देण्यापेक्षा लहान प्रमाणावर अनेक उद्योगधंदे चालविण्याखेरीज चीनला आता गत्यंतर उरणार नाहीं.

---

### विमा बिलाचें तिसरे वाचन पास झालें

विमा बिलाचें तिसरें वाचन असेंब्लीमध्यें गेल्या शनिवारीं पास झालें व आता कौन्सिल ऑफ स्टेटनें त्यास मंजुरी दिली, म्हणजे त्याचें कायद्यांत रूपांतर होईल. परस्पर विरोधी हितसंबंधांचा शक्य तितका मेळ घालून आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्याचें बिकट काम सर नृपेंद्र सरकार ह्यांनीं मोठ्या यशस्वी रीतीनें पार पाडलें, ह्याबद्दल त्याचें असेंब्लीमध्यें सर्व पक्षांच्या सभासदांनीं अभिनंदन केलें, हें योग्यच झालें. कंपनी कायदा दुरुस्त करणारें बिलहि सर नृपेंद्रांनीं अशाच कुशलतेनें असेंब्लींत पास करून घेतलें होतें. ह्या दोन्ही बिलाचे बाबतींत त्यानीं बजावलेली कामगिरी अत्यंत महत्त्वाची असून हिंदी मंडळ्यांचे कारभारास त्यामुळें इष्ट व योग्य वळण लागेल, अशी अपेक्षा आहे. मॅनेजिंग एजटाचें उच्चाटन, कमकुवत विमा मंडळ्यांच्या स्थापनेचें नियंत्रण, विमा मंडळ्याच्या पैसे गुंतविण्याच्या योजनेवर बंधन, विमेदारांचें हितसरक्षण, विमा मंडळ्यांच्या व्यवस्थापक मंडळांवर विमेदारांचें प्रतिनिधित्व, एजंटांस लायसेन्स घेण्याची सक्ती व त्यांच्या कमिशनच्या कमाल मर्यादेचें स्पष्टीकरण, इत्यादि महत्त्वाच्या सुधारणा विमा बिलानें घडवून आणल्या आहेत. बिलांतील तपशीलवार योजना प्रत्येकास सर्वस्वी मान्य होणें शक्यच नव्हतें; तथापि त्यामधील महत्त्वाच्या सुधारणास सर्व साधारण पाठिंबा मिळाला व क्षुल्लक मतभेद बाजूस सारून, असेंब्लीच्या सभासदांनीं विमा बिलाचें महत्त्व जाणून विधायक सूचना करण्याचेंच ठरविलें, ह्यामुळें सदरहु बिलास सुचविण्यांत आलेल्या २,००० उपसूचनांचा विचार एवढ्या अल्प मुदतींत होऊ शकला. बिलाचे सारथी सर नृपेंद्र सरकार व त्यांचे मदतनीस श्री. सुशील सेन ह्यांनीं या बिलाचे बाबतींत अतिशय परिश्रम घेतले व सर नृपेंद्र ह्यांनीं फार कुशलतेनें अत्यंत कठीण असें मार्गदर्शनाचें काम केलें. कंपनी कायदा व विमा विषयक कायदा हीं त्यांच्या कर्तृत्वाचीं जिवंत स्मारकें रहातील, ह्यात संशय नाहीं. मंडळ्याच्या व्यवहारांचा संबंध आतां खेड्यापाड्यातील लोकांशींहि येऊं लागला आहे, ह्या दृष्टीनें ह्या दोन कायद्यांचें विशेष महत्व आहे.

—महाराष्ट्रीय मुसलमान समाजाचें—
साप्ताहिक मुस्लीम वर्तमानपत्र
वार्षिक वर्गणी ] राह—बर [ मनिऑर्डरीनें रु. ३
( मराठी, इंग्रजी व हिंदी या तिन्ही भाषेंत निघणार )
जनाब—सी. बी. मुजावर ( महेताब ) यांचे
संपादकत्वाखालीं
मु. पो. कराड ( जि. सातारा )
—तारीख १५ आक्टोबर १९३७ पासून—
मोठ्या थाटामाटांत सुरूं होणार !

## मध्यवर्ती असेंब्लींत विमा-बिलावर चर्चा

विमा उतरतेवेळीं विमा कंपनीनें अगर तिच्या एजंटानें विमेदारास हप्त्यामध्यें रिबेट देण्याची पद्धति हिंदुस्थानात सर्व ठिकाणीं आढळते, तिला आळा घालण्याचे उद्देशानें विमा-बिलांत तरतूद करण्यात आली आहे व रिबेट देणें बेकायदा ठरविण्यात आलें आहे. ही योजना बिलांतून वगळण्यात यावी, अशी एक सूचना असेंब्लीपुढें आली, परंतु ती नापास झाली. रिबेट घेणारासहि बिलामध्यें शिक्षा सांगितलेली आहे. रिबेट देणारास १०० रुपयाचा ज्यास्तींत ज्यास्त दंड होईल; रिबेट घेणारास ५० रुपयापर्यंत दंड यावा लागेल.

* * *

विमा एजंटाचे परवान्यास सालीना तीन रुपये पडावे अशी मूळ बिलांत तरतूद होती, परंतु असेंब्लीनें फी एक रुपया ठरविली.

* * *

नव्या विमाचे कायद्याअन्वयें प्रत्येक एजंटास दरसाल एक रुपया भरून लायसेन्स घ्यावें लागणार आहे त्याकरितां विमा-एजंटानें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे अर्ज केला पाहिजे. नोंदलेल्या कोणत्याहि विमा कंपनीतर्फे प्रचारकाचें काम करण्याची ह्या लायसेन्सनें मोकळीक ठेवली आहे. प्रत्येक वर्षाच्या मार्चच्या ३१ व्या तारखेस परवान्याची मुदत संपेल व एक रुपया भरला असतां नव्या वर्षाचा परवाना दिला जाईल. वयात न आलेल्यांस लायसेन्स मिळणार नाहीं. वेड, अफरातफर, लबाडी, इत्यादि गोष्टी लायसेन्स मिळण्याचे अटींतील नालायकीचे सदरात येतात. विमा-कंपनीचे कामांत अगर पॉलिसीचे संबंधात एजंटानें अफरातफर अगर लबाडी केल्यास त्याचें लायसेन्स रद्द होईल

* * *

विमेदारानें विमा अर्जांत व डॉक्टरी तपासणींत लिहून दिलेल्या उत्तराची नक्कल त्यास मिळावी, अशी तरतूद एका उपसूचनेनें बिलांत केली आहे.

* * *

विमा कंपन्यातील नोकरवर्गासाठी प्रॉव्हिडंड फंडाची तरतूद असावी, अशी एक उपसूचना प्रो. रंगा ह्यांनीं मांडली, परंतु अध्यक्षांनीं ती नियमबाह्य ठरविली.

* * *

परदेशी विमा कंपन्यावर नियंत्रणें लादण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार बिलानें दिला आहे, तो मर्यादित करण्याचा मि. जोन्स ह्यांनीं एक उपसूचना मांडून प्रयत्न केला परंतु तो निष्फळ झाला.

### स्वतंत्र पोस्ट खातें राहिलें तरच फेडरेशन मान्य

हिंदी फेडरेशनच्या योजनेस संस्थानिकाची मान्यता मिळविण्याचा सरकार यत्न करीत आहे कांहीं संस्थानिकांनीं फेडरेशनला अनुकूलता दाखविली आहे तर कांहीं जण विशिष्ट अटींवरच त्यांत सामील होण्यास तयार आहेत. फेडरेशनमध्यें सामील होतांना हैद्राबाद संस्थानचें पोस्ट खातें अलग कायम राहिलें पाहिजे, अशी त्या सरकारची अट असल्याचें सर अकबर हैदरी ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें. सार्वभौमत्वाचें एक लक्षण ह्या दृष्टीनें हैद्राबाद सरकारास पोस्ट खात्याचें विशेष महत्त्व वाटत आहे


**औंध स्टेट सेंट्रल बँक, लिमिटेड. औंध.**

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आडपाडी, कुंडल, गुणदाळ व किर्लोस्करवाडी ? स्टेशन.

चालूं ठेवीवर शेंकडा दीड टका व्याज दिलें जातें सेव्हिंग्ज ठेवींवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्हीं मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेंचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी

B R. Vartak
मॅनेजर.



**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री डी के. जोगळेकर, बी. ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )



**नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,४०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८२३ |
| इतर फंड | १,४०८ |
| मुदतबंद ठेवी | १,९४,९०७ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,९५९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७७,९७८ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात | |
| गुतविलेली एकूण रकम | ४१,५९९ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबरांना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## आर्थिक स्वातंत्र्यावांचून राजकीय स्वातंत्र्य व्यर्थ

### हिटलर-मुसोलिनी भेट

मुसोलिनी व हिटलर ह्यांची जर्मनींत भेट होऊन खलबतें झालीं, त्यांमध्यें कोणतें आतरराष्ट्रीय धोरण आखलें गेलें, व कोणतें कारस्थान रचण्यांत आलें ह्याची विश्वसनीय माहिती मिळणें शक्य नाहीं. तथापि, त्याच्या भाषणांचे साराश प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून ह्याबावत थोडीशी कल्पना येण्यासारखी आहे जर्मनी व इटली ह्या दोन्ही राष्ट्रांस जागतिक शातता हवी आहे, पण स्वसंरक्षणासाठीं त्यास आर्थिक व सामाजिक पुनर्घटना करून परस्पर-स्नेहानें स्वत:स निगाडित करून टाकणें अत्यावश्यक आहे असा हिटलर व मुसोलिनी ह्याच्या भाषणांचा मथितार्थ आहे नात्सी पक्षाचें जर्मनींत प्रावल्य प्रस्थापित होईपर्यंत त्या राष्ट्रास परकीय जुलमाखाली वाकावें लागलें आणि आता आपण स्वकीयांची त्या पारतन्त्र्यामधून सुटका केली आहे अशी बढाई हिटलरनें मारली आहे. जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांचें ध्येय एकच असल्यानें त्यानीं हातात हात घालून चालणें स्वाभाविक व अगत्याचें आहे आणि आर्थिक स्वातंत्र्यावांचून राजकीय स्वातंत्र्य व्यर्थ आहे अशी मुसोलिनीची घोषणा आहे. आपल्या ॲबिसीनियन युद्धाच्या मार्गांत इंग्लड, फ्रान्स इत्यादि राष्ट्रानीं अडथळे आणले हीं गोष्ट इटलीच्या मनांत डाचत आहे स्पेनमध्यें इटालियन सैन्य बडखोरास सहाय देत असल्याचें त्यानीं स्पष्ट कबूल केलें आहे. जर्मनी किंवा इटली ह्या देशात हुकूमशाही अस्तित्वात नाहीं, तेथील जनतेच्या हितासाठी सामाजिक व आर्थिक पुनर्घटना आपणास करावी लागली आहे, असें फॅसिझमचें समर्थन मुसोलिनेनें केलें आहे बोल्शेव्हिक कल्पना व सस्था ह्याच्याशीं सामना करण्यास जर्मनी व इटली हीं राष्ट्रें सज्ज झालीं आहेत आणि जगांतील शांततेचें रक्षण करण्याचा आपला निर्धार आहे अशी त्याची घोषणा आहे ह्या बढायावरून हिटलर-मुसोलिनी कारस्थानाविषयीं अनुमानें जगानें काढावयाचीं आहेत.

### रासायनिक द्रव्यांचे कारखाने

कांचकारखान्यास आपल्या मालाचे उत्पादनाकरिता कच्चा माल लागतो, त्यात सोडा ॲशला महत्त्वाचें स्थान आहे. सोडा ॲश हिंदुस्थानांत तयार होत नाहीं, म्हणजे शेकडा ६५ टक्के कच्चा माल विलायतेहून यावा लागतो, ह्या सबबीवर कांचेच्या धंद्यास सरक्षण कसें नाकारण्यात आलें, ह्याचा इतिहास ताजा असून तो सर्वांच्या परिचयाचाच आहे. सोडियमपासून निघणाऱ्या रासायनिक द्रव्याचा हिंदुस्थानातील खप वाढत आहे त्यांची आयात थाबवून हिंदुस्थानात उत्पन्न झालेल्या द्रव्यानीं त्यांची जागा घेतल्यास स्वदेशी धद्यास उत्कृष्ट सहाय होऊन औद्योगिक प्रगतीस जोराची चालना मिळेल, ह्यात सशय नाहीं सोडा ॲश व सोडियम मूलक इतर द्रव्यें ह्याचें उत्पादन घडवून आणणाऱ्या कंपन्यांची उभारणी कलकत्ता येथें करण्यात येत आहे इंपीरियल केमिकल इडस्ट्रीज (इडिया) लि च्या पुरस्कारानें एका सयुक्त भाडवलाच्या मडळीची स्थापना तेथें होणार असून कारखाना पजाबात काढण्यात येईल मुंबई इलाख्याच्या पश्चिम किनाऱ्यावरील सोइस्कर जागीं टाटा सन्स लि मार्फतहि एक कारखाना निघणार आहे व त्याचीहि पूर्व तयारी झाली आहे

---


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भाडवल | रु २,००,००,००० |
| वसूल झालेलें भाडवल | रु १,००,००,००० |
| रिझर्व्ह फड | रु १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दरम्यानच्या रु. ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धा आम्ही ठेवून घेतों; व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते नियमाची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजट.— टी. आर. लालवाणी.

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट

**पांढरें-सत्त्व** किंमत १। रु.

**मलशुद्धी टॅबलेट्स** किं ८आ

या दोन औषधांच्या मदतीनें पोटांतील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, करपट ढेकर येणें, छातींतील जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे.

डॉ. बी. आर. गुणे
पुणे २

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## धर्मादायाचा धंदा करणारे लोक

### दानधर्माचा पैसा आणि त्याचा उपयोग

लोकांच्या धार्मिक वृत्तीचा फायदा घेऊन त्यावर चरणारे लोक अनेक असतात. जमा झालेल्या रकमेपैकी मूळ हेतूप्रीत्यर्थ किती पैसे खर्चण्यांत येतात, ह्याचा हिशेब कोणी मागत नाहीं आणि कोणी देतहि नाहीं. प्रचारकांच्या पगारांतच सर्व जमा खलास होण्याची अनेक वेळां पाळी येते हिंदुस्थानांतील लोकांची श्रद्धाळू धार्मिक प्रवृत्ति सर्वांच्या परिचयाची आहे. तथापि, आपण दिलेल्या पैशाचा विनियोग कसा होतो, हें पहाण्याची हिशेबी व व्यवहारबुद्धि, सामान्य जनतेंत क्वचितच आढळते ग्रेटब्रिटनमध्येंहि धर्मादायाचा धंदा करणाऱ्या लोकांचा सुळसुळाट झालेला असल्यानें, लॉर्ड केनेट ह्यानीं लॉर्डांच सभेंत माडण्यासाठी एक बिल तयार केलें आहे. पोलीस खात्यानें परवाना दिला असेल अशा व्यक्तींस व संस्थासच फक्त वर्गण्या जमवण्यास परवानगी असावी, असा सदरहु बिलाचा आशय आहे. वर्गणी जमवणारास भरमसाट पगार देण्यात येत असेल, हिशेब नीट ठेवण्यांत येत नसतील, पैशाचा विनियोग व्यवस्थित होत नसेल, जमा रकमेपैकी साधारणपणें योग्य इतक्या प्रमाणांत उद्दिष्ट हेतूप्रीत्यर्थ खर्च होत नसेल किंवा परवाना देण्यापूर्वी जरूर ती माहिती पोलीस खात्यास पुरविण्यात अर्जदारानें कसूर केली असेल, तर परवानगी नाकारण्याचा अधिकार वरील बिलाअन्वयें पोलिसास देण्यांत येणार आहे.

## ज्यानें जगाचें ज्ञान होत नाहीं, तें शिक्षण नव्हे

### मि. एच. जी. वेल्स ह्यांचे उद्गार

ब्रिटिश असोसिएशनच्या शिक्षण शाखेच्या सभासदास उद्देशून मि. एच. जी. वेल्स ह्यानीं प्रचलित शिक्षणपद्धतीवर झणझणीत टीका केली. त्यांच्या मतें सध्याच्या शिक्षणानें अडाणी तरूण पिढी तयार होते आणि तिला सृष्टी म्हणजे काय व जगात सभोंवार काय चाललें आहे, ह्याची काहींच माहिती नसते. मुलें प्रश्न विचारण्याचा संभव नसतो अशाचीं उत्तरें त्यांस शिकवण्यांत येतात आणि त्यामुळें त्यांच्या डोक्यांत नको असलेले विषय कोंबले जातात. आमच्या रहात्या घरास वेळोवेळ आंतून बाहेरून रंगसफेती द्यावी लागते, पण इंग्लंडमध्यें असे शिक्षक आहेत कीं ज्यास अनेक वर्षे उजाळा मिळालेला नाहीं. अशा शिक्षकांस निवृत्ती तरी दिली पाहिजे किंवा त्यांची चांगली डागडुजी झाली पाहिजे. मुलांस स्वाभाविक जिज्ञासा असते, तिच्या अनुरोधानें त्यास ज्ञान देणें आवश्यक आहे. निसर्गाचें, मानवी समाजाचें आणि जगाच्या उत्क्रांतीचें व सद्यःस्थितीचें ज्ञान त्यास क्रमाक्रमानें व सहज पटण्यासारख्या रीतीनें देतां येईल. अशा शिक्षणास खर्च लागेलतो सोसण्याची राष्ट्राची तयारी हवी. अनुकूल परिस्थितींत शिक्षकहि आपलें काम परिणामकारक रीतीनें करू शकतील.

### परदेशांतील हिंदी लोकांची वसति

हिंदी लोकांची परदेशांतील वसति अंदाजें खालीलप्रमाणें आहे.—

| | |
|---|---|
| कॅनडा. १,५९९ | ऑस्ट्रेलिया: २,४०४ |
| न्यूझीलंड १,१६६ | त्रिनिदाद: १,५१,०७६ |
| फिजी: ८५,००२ | ब्रिटिश ग्यायना: १,३८,३३४ |
| केनिया: ३४,९५५ | अमेरिका. ५,८५० |
| डच ग्यायना. ३६,१५० | इजिप्त: १,०२५ |
| चीन: ४,००० | |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयांची मिठाई पुरवूं शकू.
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करू शकत नाहींत किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

## सहकारी चळवळ

### औंध सेंट्रल बँक लि, औंध

( वार्षिक सभा : ता. २४-१०-३७ )

बँकेच्या पटावर २३० व्यक्ती व ८० सहकारी सोसायट्या सभासद आहेत. भरलेल्या भांडवलांत वर्षअखेर २३/४ हजाराची वाढ होऊन तें १ लक्ष, १३३/४ हजार रु. झालें आहे ठेवींमध्यें विशेषशी वाढ झालेली नसली तरी सेव्हिंग्ज ठेवींची लोकप्रियता मात्र वाढत असल्याचें दिसून येतें. बँकेच्या रिझर्व्ह व इतर फंडांत मिळून २४३/४ हजार रु आहेत. रोखे, कॅशसर्टिफिकिटें, इत्यादींत ७९ हजार रु. आहेत. त्याची बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदांत दाखविलेल्या रकमेपेक्षा कमी आहे, तथापि इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड मजबूत करण्याचें बँकेनें धोरण स्वीकारलें असल्यामुळें त्यातील वैगुण्य कमी झालें आहे. एकूण ३ लक्ष, ५८३/४ हजाराची कर्जें देण्यांत आलेलीं आहेत, त्यापैकीं १ लक्ष ८५ हजार रु. सोसायट्याकडे आहेत. गेल्या वर्षी संस्थानाचे सर्व भागात पाऊस अत्यल्प पडल्याकारणानें थकबाकीचें प्रमाण थोडें वाढलें आहे. तथापि, तें ( १९.१% ) इतर बँकाशीं तुलना करतां, असमाधानकारक नाहीं असें म्हटलें पाहिजे जुन्या स्टेट बँकेनें दिलेल्या कर्जाची छाननी करून त्याची तडजोडीनें वसुली करण्याकरता संस्थाननें एक कमिटी नेमली आहे, तिचे प्रयत्न बरेच यशस्वी झाले आहेत बँकेच्या कर्जाच्या व्यवहारांत अभिनंदनीय प्रगति होत आहे. आटपाडी, कुडल, गुणदाळ व विंचूद स्टेशन ह्या चार ठिकाणीं बँकेच्या शाखा आहेत, त्या सर्व नफ्यांत आहेत. जून, १९३७ अखेरच्या वर्षी बँकेस १५,६२७ रु. १२ आ. ४ पै. नफा झाला, त्यातून भागीदारास ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याकरिता ६,७४८ रु. १४ आ ९ पै चा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे.

### सहकारी रिफ्रेशर्स ट्रेनिंग क्लास

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेनें रिफ्रेशर्स ट्रेनिंग क्लास एक आठवडाभर मुंबई येथें नुकताच भरवला. प्रांतिक बँकेची मुख्य कचेरी व शाखा आणि अर्बन बँका ह्यातील मिळून ( ३६ + ८ ) ४४ नोकरांनीं सदरहू वर्गाचा फायदा घेतला. कार्यक्रमांत बँकिंग, सहकार, हिशेब, हिशेब तपासणी, कचेरींतील व्यवस्था आणि खेडेगावांसबधीं अर्थशास्त्र ह्या विषयांवर ४० व्याख्यानें करविण्यात आलीं. प्रो वा. गो काळे, प्रिन्सिपॉल मनोहरलाल टॅनन, प्रो. बेरी, रिझर्व्ह बँकेचे श्री. पजाबी, रा ब. तालमाकी व असि रजिस्ट्रार श्री हुली ह्यानीं व्याख्यानें दिलीं. ह्या व्याख्यानापासून शिकणारांचा पुष्कळ फायदा होतो, असें आढळून आलें आहे. इतर केन्द्राचे ठिकाणींहि वरील प्रकारचे वर्ग भरवून बँकांतील नोकरवर्गाची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न होणें जरूर आहे प्रस्तुत उपक्रमाबद्दल प्रांतिक बँकेच्या चालकाचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

### पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूट

वरील इन्स्टिट्यूटची वार्षिक साधारण सभा ता. ४-९-३७ रोजीं भरून श्री. य. रा दाते व श्री भा. त्र्य देवभानकर ह्यांची अनुक्रमें अध्यक्ष व ऑनररी सेक्रेटरी म्हणून निवडणूक झाली.

### धुळें तालुका शेतकी सुधारणा संघ, लि

वरील संघातर्फे ता २९-८-३७ रोजीं मु. सरवड येथें शेतकी सुधारणा विषयांचें प्रात्यक्षिक दाखविण्यात आलें, त्यावेळीं २०० ते २५० शेतकरी हजर होते. देवभानें येथें शेती व सहकार ह्या विषयावर सद्दीप व्याख्यान झालें

### मुं प्रां को. बँक लि, पालघर शाखा

पालघर शाखेची सहावी वार्षिक साधारण सभा तारीख ११-१०-१९३७ रोजीं सोमवारीं दुपारीं एक वाजता पालघर येथें शाखेच्या ऑफिस हॉलमध्यें श्री. व्ही. पी वर्दे, बी कॉम, एफ. आर. इ कॉन एस. (लंडन), मुंबई यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे तरी सामील सोसायट्यांच्या अधिकृत प्रतिनिधींनीं सदरं सभेस हजर राहावे.

### दि बँक ऑफ बार्शी, लि

( वार्षिक सभा: ता. २६-९-३७ )

वरील बँकेचे भाग ७० हजार रुपयाचे वर खपले असून १३३/४ हजार रु भांडवल प्रत्यक्ष वसूल झालें आहे. ठेवी १ लक्ष, १० हजारांच्या आहेत रिपोर्टाचे वर्षांत बँकेस २,०९१ रु. नफा झाला, त्यातून ५ टक्के दरानें प्राप्तीवरील करमाफ डिव्हिडंड देण्याकरिता ७०० रुपयांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. ठेवींमध्यें कायम ठेवींचें प्रमाण मोठें असल्यामुळें रोख शिल्लक कमी राखली तरी पुरी होते, असें ताळेबंदावरून दिसून येतें. बँकेच्या व्यवहारात धिमेपणानें वाढ होत आहे

### कराड अर्बन सहकारी बँक लि

वरील बँकेच्या पटावर ५६५ सभासद असून भरणा झालेलें भांडवल २४३/४ हजार रु आहे रिझर्व्ह फंडात १० हजार रु. आहेत व इतर फंड्स ११३/४ हजार रुपयांचे आहेत २३/४ लाखांच्या ठेवी आहेत. बँकेनें सरकारी रोखे व भाग ह्यांत ४५ हजार रुपये गुंतविले आहेत इतर कर्जें २ लक्ष १२ हजार रुपयांचीं आहेत. थकबाकीचें प्रमाण ९.४% इतकें पडतें गेलीं पांच वर्षे बँक 'अ' वर्गांत आहे. बँकेच्या खेळत्या भांडवलांत सालोसाल वाढ होत आहे अहवालाचे सालीं बँकेची स्वत.ची इमारत पुरी होऊन तिचें उद्घाटन ता २८ २-३७ रोजीं झालें वर्षअखेर बँकेस ५,९१९ रु नफा उरला. भागीदारास ७१/२% दरानें डिव्हिडंड मिळावयाचें आहे व त्यासाठीं १,८०० रु. लागतील.

### भुसावळ पीपल्स को. बँक लि

वरील बँकेच्या पटावर ६७५ सभासद आहेत. एकूण ठेवी ५ लक्ष, ११ हजाराच्या असून ३३/४ लक्ष रुपयाचीं कर्जें, ओव्हरड्राफ्ट, कॅश क्रेडिट्स इ० देण्यांत आलीं आहेत. थकबाकीचें प्रमाण ८.५७% म्हणजे सध्याच्या परिस्थितींत अल्प व समाधानकारक आहे. बँकेचें एकूण खेळतें भांडवल ६ लक्ष, ६० हजार रुपये इतकें आहे आणि त्यापैकीं २ लक्ष, ९३ हजार रु. रोख शिलक अगर बँकात खात्यावर आहेत बँकेनें मुंबई प्रांतिक सहकारी विमा कंपनीची एजन्सी घेतली असून, हप्त्याचे पैसे भरण्यासबधीं तिनें रजिस्ट्रारमार्फत सवलती मिळवल्या आहेत गेल्या वर्षीच्या शिलकी नफ्यासह साल अखेर रु १५,१६९-१३-९ नफा बँकेस झाला, त्यातून भागीदारास ७१/२ टक्के दरानें डिव्हिडंड मिळावयाचें आहे बँकेचे फंड्स समाधानकारक आहेत व तिची प्रगति चांगली होत आहे.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १२०—३ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन .. ... ... | १०५–११ |
| ४% १९४३ .. ... | १०८–१० |
| ३½% विनमुदत ... ... ... .. | ९७–१० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ . .. .. | १००—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरटी व लांब मुदत) ... | १०९—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... . | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११७—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% .. | ३०–१२ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १४५०—० |
| बाँबे प्रॉ को. बँक ( ५० ) ५% ... . | ६१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२६—४ |

### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... .. | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९६०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६३–१२ |

### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १३% ... ... | १३३–१२ |
| कराची ( १०० ) ९% .. ... ... | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% ... . | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% . .. | १६५७—० |

### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु. .. ... ... | १७८–१२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु ... ... | ५०—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु ... ... . | २८–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ .. | ४४—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु बोनस ... | ४७५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% ... . | २०१–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे ( २०० ) १५ रु २ आ .. | १६८—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. .. ... | ३५६—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ ६ पै ... | १६६०—० |

### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्यक तोळ्यास ... ... | ३४–१२¼ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०–१२ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—४ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | १०–११ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | १०—८ |


## Notice to Contractors

Sealed percentage Tenders in form B—1 for the following works are invited and will be received by the undersigned on 11-10-37 upto 2 p m Other particulars regarding the contract etc, and tender form can be had at the Undersigned's Office on any working days during office hours upto 9th October 1937 The undersigned reserves the right to reject any or all tenders without assigning reasons

| | Estimated Cost Rs. |
|---|---|
| (1) Improving Dharwar–Saundatti–Bagewadi Road. (Miles 1, 2, 5, 6, 7, 8, 10 & 11) Collection of metal only | 21,220 |
| (2) Improving Dharwar–Saundatti–Bagewadi Road. (Miles 1,2,5,6,7,8,10,11,16 & 20to24) Collection of murum only. | 19,793 |
| (3) Reconstructing Bridge No. 182, in flg 115/7 of Karwar Bellary Road. Section from Hubli to Gadag | 42,853 |

P. K SHINDE,
Executive Engineer, D. Dn

Executive Engineer's Office,
Dharwar, 20th Sept. 1937

— मनपसंत काम —

वक्तशीर पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी

सदाशिव हौदानजिक, पुणें.

SAHYADRI INS. CO

NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX

Particulars by post or in person

ऑफिसचे कामाकरितां रेमिंग्टन टाईपरायटर

स्वस्त विकाऊ आहे

मराठी केन्द्र : : हुजूरपागेसमोर पुणें

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत तीन रुपये

ह्या ग्रंथात अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई

शाखा

| | |
|---|---|
| १ बरामती ( जि पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
--मॅनेजिंग डायरेक्टर.

# आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाऊस भी मिलेगा. नियम बहुत सरल है ( नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें )

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

## दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.

( स्थापित १९१६ ) अमीनाबादपार्क-लखनऊ

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

# K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वगणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्य' अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १३ आक्टोबर, १९३७ अंक ४१

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वत च्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४, किंवा प्रथम ६८८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडींच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि .**

हेड ऑफिसः—गिरगाव, मुबई

ब्रॅच —लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २

## दी सी. पी. अँड बरार प्राव्हिन्शल कोऑपरेटिव्ह बँक लि.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर शहर

दुसरा हप्ता विक्रीस निघाला

| | | |
|---|---|---|
| ग्रामोद्धार ३½% षण्मासिक व्याज ३ लक्षाचे | ३,००,००० रु चे ३½ टक्याचे २५ वर्षे मुदतीचे | सुरक्षितता सरकारी हमी ट्रस्टी रोखे |

गहाणी रोखे ( डिबेंचर्स )

प्रान्तिक सरकारची मुद्दल व व्याज दोहोंची हमी

या पैशाचा विनियोग आपल्या गरीब शेतकरी बाधवांच्या ऋणमुक्ततेकडे होणार आहे

ता ५ ते १५ आक्टोबर १९३७ च्या दरम्यान केव्हांही अर्ज पाठवावे

☞ विशेष माहितीकरितां प्रॉस्पेक्टस् मागवा

दे. गो लांडगे
ऑफि मॅनेजर

ना २५-९-३७




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितिपत्रक मागवा ]

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

**श्री. आर. एन. अभ्यंकर,** बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
**दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड**
११ बुधवार पेठ, पुणें नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

### " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बॅंक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु. ( ट ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४

# विविध माहिती

### शांघाय येथील हिंदी रहिवासी

चीनमध्यें तेथील युद्धामुळें लोकांच्या जीवितास धोका उत्पन्न झाला आहे. धोक्याच्या ठिकाणातील हिंदी लोकांस सुरक्षिततेच्या जागीं पोचविण्यात आलें आहे शांघायच्या हद्दीमध्यें आतां २½ हजार हिंदी लोक शिल्लक आहेत.

### ब्रिटिश शिक्षण–पद्धतीचें फिरतें प्रदर्शन

इंग्लंडमधील शिक्षणपद्धतींतील आधुनिक दिशा हिंदी शिक्षण पद्धतीस मार्गदर्शक व्हाव्यात ह्या हेतूनें, त्यासंबधांतील एक प्रदर्शन हिंदुस्थानांत पाठविण्याचें इंग्लंडमधील बोर्ड ऑफ एज्युकेशननें ठरविलें आहे प्रत्येक प्रांतातील प्रमुख ठिकाणीं हें प्रदर्शन मांडण्यात येईल

### विमान विद्येच्या लायसेन्सची किंमत

विमानाच्या सारथ्याचें काम धंदा म्हणून करणारास शिक्षण घ्यावें लागतें, त्यास हिंदुस्थानांत निदान ८ हजार रु खर्च येतो शिक्षणाचे मुदतींत (१½ ते २ वर्षें) रहाण्याचा व जेवण्या-खाण्याचा खर्च होतो, तो वेगळा. इंग्लंडमधील संस्थेंत शिक्षण घेणारास १५ हजाराचे वर खर्च येतो

### विमा–बिलाची वरिष्ठ कायदेमंडळात चर्चा

विमा बिलाचें तिसरें वाचन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें पास केल्यानंतर तें कौन्सिल ऑफ स्टेटला ता ५ रोजीं सादर करण्यात आलें. कौन्सिलची बैठक तहकूब झाली असून, नोव्हेंबर १५ रोजीं नवी दिल्ली येथें ती पुनः सुरू होईल, त्यावेळीं कौन्सिलात विमा बिलाची चर्चा करण्यात येईल

### ११ महिन्यात १ कोटि, ४० लक्ष रु. खर्च

हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील बंडाळी २५ नोव्हेंबर, १९३६ रोजीं सुरू झाली, तेव्हांपासून सप्टेंबर १९३७ अखेर-पर्यंत ही धुडाई कमी करण्याप्रीत्यर्थ १ कोटि, ४० लक्ष रु जादा खर्च आला ह्या मुदतींत २२१ सैनिक मारले गेले व ६०१ सैनिकास दुखापती झाल्या.

### चीनमध्यें औद्योगिक प्रगति

चीनमध्यें उद्योगधंद्यांची वाढ व्हावी ह्या हेतूनें त्या देशाच्या सरकारनें ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया, स्वित्सरलंड, इत्यादि देशांशीं करार केले आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें चीननें ९ कोटि रुपयाचें कर्ज उभारलें आहे, फ्रेंच बँकांनीं चीनला परदेशात क्रय–साधन पुरविण्याचें कबूल केलें आहे व झेकोस्लोव्हाकिया आणि स्वित्सर्लंड ह्या देशांतील कारखानदारांनीं आपल्या व्यापारी येण्याच्या वसुलीबाबत सवलत देऊन पतीवर माल देण्यास संमती दिली आहे

### कलकत्ता म्युनिसिपालिटीची १७½ लाखाची करबाबत थकबाकी

मार्च, १९३७ अखेर कलकत्ता कॉर्पोरेशनकडे नागरिकांकडून १७½ लक्ष रुपये कराची बाकी आहे.

### परदेशी तज्ज्ञाची नेमणूक झाली

हिंदुस्थान सरकारास आर्थिक बाबतींत सल्ला देण्याकरिता एका परदेशी तज्ज्ञाची नेमणूक होणार असल्याचें मागेंच जाहीर झालें आहे ही जागा लंडन युनिव्हर्सिटीमधील प्रोफेसर टी. ई. जी ग्रेगरी ह्यास देऊ केली आहे, असें समजतें. नेमणुकीची मुदत पांच वर्षें आहे प्रो ग्रेगरी हे १९३८ च्या सुरवातीस हिंदुस्थानात दाखल होतील.

### इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंट

हिंदुस्थान सरकारच्या खात्यास लागणाऱ्या मालाची खरेदी इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंट मार्फत केली जाते कार्यक्षमतेस बाध येऊं न देता शक्य तितका स्वदेशी मालच विकत घ्यावयाचा, असें स्टोअर्स डिपार्टमेंटचें धोरण आहे १९३६–३७ मध्यें खरेदी केलेल्या मालापैकीं २ कोटि रुपयाचा, म्हणजे शेकडा ३८ टक्के माल हिंदी बनावटीचा होता

### न्यूझीलंडमध्यें जन्मास येण्यात धोका कमी

न्यूझीलंड देशामध्यें जन्मास येणें सर्वांत कमी धोक्याचें आहे, कारण बालमृत्यूचें प्रमाण त्या देशात इतर सर्व देशांपेक्षां कमी आहे

### म्हैसूरमधील रेल्वेफाटे संस्थानचे ताब्यांत जाणार

म्हैसूर संस्थानचे हद्दीमधील एम्. एस एम रेल्वेचे ताब्यातील बंगलोर–हरिहर व बंगलोर–हिंदुपूर हे रेल्वेफाटे म्हैसूर सरकार ता १ जानेवारी, १९३८ पासून आपल्या ताब्यात घेणार आहे ह्या फाट्यावर कामास असलेल्या ७ हजार नोकरांसहि म्हैसूर सरकार कामावर ठेवील.

### गॅसच्या दिव्याचे जागीं विजेचे दिवे

कलकत्ता शहरातील १९ हजार गॅसच्या दिव्याचे जागीं विजेचे दिवे बसविण्याचें तेथील कॉर्पोरेशननें ठरविलें आहे व त्याप्रीत्यर्थ १४ लक्ष रु मंजूर केले आहेत

### म्हैसूर लॅंप वर्क्स

म्हैसूर संस्थानात विजेचा सर्वत्र प्रसार झालेला आहे, तेव्हां विजेचे दिवे व इतर विद्युत्साधनें तयार करणारे कारखाने संस्थानातच काढून स्वयपूर्णता साधण्याचा तेथील सरकारचा विचार आहे म्हैसूरच्या दिवाणांनीं बंगलोर येथील विजेच्या दिव्यांच्या कारखान्याचें नुकतेंच उद्घाटन केलें

### जर्मन कोळशाची निर्गत वाढत आहे

स्पेन व त्या देशाच्या वसाहती हें वेल्स (ग्रेट ब्रिटन) मधील खाणींतील कोळशाचें मोठें गिऱ्हाइक होतें. आतां जर्मन कोळशानें तेथें प्रवेश होऊन वेल्श कोळशास खो बसण्यास प्रारंभ झाला आहे इटलीमध्यें जर्मन कोळशाची सरशी होत आहे.

### कागदाच्या धंद्याचे वाढीस अनुकूलता

डेहराडून येथील फॉरेस्ट रीसर्च इन्स्टिट्यूटच्या पेपर पल्प विभागाचे प्रमुख, श्री. भार्गव, ह्यांनीं हिंदी कागदाचे धंद्याविषयीं नुकतेच आशाजनक उद्गार काढले ते म्हणाले, "हिंदुस्थानात दरसाल ४५ हजार टन कागद तयार होतो. बंगालमधील तीन-चार कारखान्यास दरवर्षी ५० हजार टन बांबू लागतो, तथापि ह्या देशात बांबूचा पुरवठा कमी पडण्याचा संभव नाहीं चांगल्या दर्जाचा सुमारें १५ हजार टन कागद आयात होतो, तो हिंदुस्थानात तयार करणें शक्य असलें तरी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होणें तूर्त कठीण आहे. वर्तमानपत्रास दरसाल लागणारा ४० हजार टन कागद आयात होतो, तो येथें उत्पादन कसा करता येईल, ह्याविषयीं डेहराडून येथें संशोधन चालू आहे वर्तमानपत्रास लागणाऱ्या कागदाचा राधा हिंदुस्थानात होऊ शकला, म्हणजे हें मोठें गिऱ्हाइक देशी कारखान्यास मिळेल"

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| २६-९-३७ ते २-१०-३७ | ३८,३७,११३ |
| ३-१०-३७ ते ९-१०-३७ | २६,१६,७५२ |
| २१-९-३१ ते ९ १०-३७ | ३,०४,६९,६९,५९८ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ५०४ |
| २ प्रांतिक प्रधानमंडळ व आर्थिक कार्यक्रम | ५०५ |
| ३ गिऱ्हाइकाची आवडनावड | ५०६ |
| ४ स्फुट विचार ... निसर्गाचें औदार्य व मनुष्याचें दारिद्र्य—रिझर्व्ह बँक आणि हिंदुस्थान सरकार—बाहेरील तज्ज्ञाची भरती—हिंदुस्थानांत लायक अर्थशास्त्रज्ञ नाहीत—दुसावर डागण्या—इटलीमध्यें नवीं वीजगृहें | ५०७ |
| ५ मेवामिठाईचा धंदा | ५०९ |
| ६ सहकारी चळवळ | ५१० |
| ७ औद्योगिक मंडळ्यांत मृत्यूचें प्रमाण | ५११ |
| ८ बेकाराची आकडेवार माहिती | ५११ |
| ९ आर्थिक जीवनात विम्याचें स्थान | ५११ |
| १० संशोधन कार्याचा शेतकऱ्यास उपयोग कसा होईल ? | ५१२ |
| ११ हिंदुस्थानातील दवाखाने व इस्पितळें | ५१२ |
| १२ निवडक बाजारभाव | ५१३ |



# अर्थ

बुधवार, ता १३ आक्टोबर, १९३७


## प्रांतिक प्रधान मंडळ व आर्थिक कार्यक्रम

बहुजन समाजाची म्हणजे खेडेगावीं जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याचा कार्यक्रम तात्काल हातीं घेण्याची जबाबदारी साम्प्रत आमच्या प्रांतिक प्रधानमंडळावर येऊन पडली असून त्यासंबंधातली आपली योजना त्यास लवकरच जाहीर करणें अगत्याचें आहे महसूल मंत्र्यानीं आपल्या कार्यक्रमाची त्रोटक रूपरेखा नुकतीच पुढें मांडली होती परंतु विधिमंडळाच्या डिसेंबर महिन्याच्या बैठकींत, योजिलेल्या सुधारणाविषयींच्या कायद्याचे मसुदे प्रविष्ट करावे लागतील आणि त्यांचें सर्वसाधारण स्वरूप कसें असेल ह्याची कल्पना लोकांस येणें आवश्यक आहे. जमीन महसुलाच्या सध्याच्या दरास कांट लावणें, दारूबंदी करून एक्साइजचें उत्पन्न नाहींसें होण्याची तयारी करणें, शेतकरी वर्गाचीं कर्जें कमी करणें, शेतीच्या धंद्यास लागणाऱ्या पैशाचा पुरवठा करणें, शिक्षण व आरोग्य ह्याचा प्रसार घडवून आणणें, कर्जफेडीची मदी पुकारणें, शेतकऱ्याची मिळकत वाढेल अशी व्यवस्था करणें इत्यादि मुख्य मागण्या व आकांक्षा सरकारापुढें मांडण्यात येत असून एकाचवेळीं त्यांची पूर्तता करण्याचें प्रधानमंडळानें ठरविल्यास अनवस्था प्रसंग प्राप्त होईल, हें अल्प विचारांतीं तेव्हांच कोणाच्याहि ध्यानात येण्यासारखें आहे वरील सुचविलेल्या सुधारणा कांहींशा परस्पर-छेदक स्वरूपाच्या आहेत. एका सूचनेस मूर्त स्वरूप यावयाचें म्हणजे दुसऱ्या अशक्य करणें होय ही गोष्ट त्यांचा समुच्चयानें विचार केला असता स्पष्ट होईल. कांहीं सुधारणा सरकारी उत्पन्न कमी करणाऱ्या आहेत तर कांहीं सरकारी खर्च वाढवणाऱ्या आहेत, कांहीं आर्थिक व्यवहारात भांडवल अधिक खेळावें असें सुचवणाऱ्या आहेत, तर कांहीं त्यास मर्यादा घालणाऱ्या आहेत

अशी परिस्थिति उत्पन्न होण्याचें पहिलें कारण मुंबई सरकारची आर्थिक सुधारणेबाबतची गेल्या पांच-दहा वर्षांतली सुस्तासीनत्वाची निष्क्रियता हें आहे. आवश्यक सुधारणा हातीं घेण्यात दिरंगाई व बेफिकीरपणा हे दोष सरकारी धोरणात आजवर ठळकपणानें दिसून आले आहेत आणि ह्या विषयींचे जिव्हाळ्याचे प्रश्न खुंटीस टांगले गेल्यानें त्याचा भार आता असह्य वाटू लागला आहे जमिनीचा धारा कायद्यानें निश्चित केला जावा ह्याबद्दल चौकशी झाली, शिफारशी झाल्या, सर्व कांहीं झालें, पण कृती मात्र झाली नाहीं. शेतकरी कायद्याच्या दुरुस्तीची चौकशी व चर्चा झाली, पण पुढें कांहीं नाहीं प्रांतिक बँकिंग कमिटीनें सावकाराच्या हिशेब ठेवण्याच्या व शेतकऱ्याशीं व्यवहार करण्याच्या पद्धतींत सुधारणा सुचवल्या आणि शेतकऱ्यासाठी साधा नादारीचा कायदा होण्याची आवश्यकता प्रतिपादली पण त्या शिफारसी कमिटीच्या रिपोर्टांतच राहिल्या. सरकारच्या निष्क्रियतेचीं अशीं अनेक उदाहरणें देतां येतील तिचा परिणाम, आजच्या प्रधानमंडळावर, मागची साचलेल्या शिलकी कामाची बाकी पूज्य करून नवीन कार्यें हातीं घेण्याचा बोजा एकदम टाकण्यात झालेला आहे एकीकडे सरकारचें दिरंगाईचें धोरण व दुसरीकडे गेल्या सात वर्षांत माजलेली आर्थिक मंदी ह्याचा योग एकच आल्यानें सद्यःस्थिति अधिकच बिघडून गेली आहे प्रांतिक स्वायत्तता स्थापन झाल्यानें आता सरकारचे हात मोकळे झाले असून पूर्वीचें निष्क्रियतेचें धोरण त्यास झुगारून देता आलेंच पाहिजे ही जनतेची अपेक्षा तिच्या प्रगतीविषयीच्या आतुरतेचें महत्त्वाचें कारण आहे. त्यातहि, राष्ट्रीय सभा शेतकरी वर्गाची हलाखी दूर करण्यास बद्धपरिकर झालेली आणि तिच्या नेत्याच्या हातीं अधिकारसूत्रें आलेलीं पाहून तर लोकांची आकांक्षा बलवत्तर होऊन गेली आहे

प्रधानमंडळानें आर्थिक सुधारणेचा व्यापक व परिणामकारक कार्यक्रम हातीं घेण्याविषयींचा लोकांचा आग्रह किती सकारण व साधार आहे, हें वरील विवेचनावरून दिसून येईल त्याबरोबरच, एकसमयावच्छेदेंकरून विविध सुधारणा हातीं घेण्याचे कामीं सरकारच्या मार्गांत कोणत्या प्रकारच्या अडचणी आहेत, हेंहि ध्यानात येईल ह्या दोन्ही बाजूंचा विचार करता, प्रधानमंडळानें शेतकरी वर्गाच्या जीवनाशीं ज्या अनेक बाबींचा संबंध येतो, त्याचा अंतर्भाव एका व्यापक योजनेमध्यें करून ती प्रसिद्ध करावी आणि त्यातल्या प्रत्येक बाबींसंबंधानें कायदा व कृति ह्यांच्या दिशेनें जें करणें व्यवहार्य दिसेल, तें तात्काळ हातीं घेऊन हा कार्यक्रम शक्य तितक्या त्वरेनें पार पाडावा हेंच धोरण उचित दिसतें ह्यात सर्व मागण्या व इच्छा सर्वस्वीं पुऱ्या होणें आणि भिन्नभिन्न प्रकृतींच्या व विचारांच्या लोकांचें पूर्ण समाधान होणें अर्थातच अशक्य आहे पण खेडेगावीं जनतेचें खरेंखुरें हित साधावयाचें असेल तर एकांगी आणि आत्यंतिक विचारसरणीचा आश्रय करून चालणार नाहीं सामाजिक व आर्थिक पुनर्घटनेच्या कार्यांत एका बाजूनें जोराची प्रगति करावयास जावें तर दुसऱ्या बाजूनें पीछेहाट होण्याचा संभव असून सर्वच कार्यभाग बिनसण्याची भीति असते युद्धात सेनानायकास ज्याप्रमाणें आपल्या बलाच्या अनेकांगी हालचालींवर सारखें लक्ष ठेवून त्या परस्पर-पोषक होतील ह्याविषयीं काळजी घ्यावी लागते, त्याप्रमाणें मंत्रिमंडळास आपल्या कार्यक्रमाचा विचार वैशिष्ट्यानें आणि साकल्यानें करावा लागतो हा विचार आणि त्यास अनुसरून कृति हीं त्वरित होण्यात प्रगतीचें स्वारस्य आहे इष्ट व साध्य असलेल्या आर्थिक कार्यक्रमातील प्रमुख प्रश्नांचें विवेचन क्रमाक्रमानें आम्हीं करणार आहों

———

## गिऱ्हाइकांची आवडनावड

### किरकोळ विक्रीचीं दुकानें

" व्यक्ती तितक्या प्रकृती " ह्या म्हणीस अनुसरून बाजारात खरेदी करणाऱ्या गिऱ्हाइकांच्या अभिरुचीमध्यें विलक्षण वैचित्र्य दिसून येतें कापडामध्यें रंग, किनार व पोत ह्यांविषयीं स्त्री-पुरुषांचीं वैयक्तिक मतें किती तरी भिन्न असतात " मला हें आवडतें " किंवा " मला हें आवडत नाहीं " असें कोणी म्हटलें कीं त्यासबधानें वाद घालण्याची सोय नसते दुकानदारास अशा विविध अभिरुचींच्या गिऱ्हाइकांचें समाधान करणें प्राप्त आहे. आपल्याजवळ असलेल्या विशिष्ट तऱ्हेच्या मालाची ते मोठ्या खुबीनें स्तुती करतात आणि तो गिऱ्हाइकाच्या " गळ्यात बाधण्या "चा प्रयत्न करतात. पण मालाचा ठरलेला वाणच गिऱ्हाइकास हवा असतो तेव्हां असला प्रयत्न यशस्वी होण्याचा फारसा सभव नसतो आणि गिऱ्हाइकें दुसऱ्या दुकानीं जाणें अपरिहार्य होतें. चोखदळ गिऱ्हाइकाचें समाधान करतां यावें म्हणून दुकानदारास अनेक तऱ्हाचा माल जवळ ठेवावा लागतो आणि ज्यामध्यें निवड करण्यास अधिक वाव मिळतो अशा दुकानात खरेदीसाठी जाण्याची प्रवृत्ति जनतेमध्यें उत्पन्न होते विविध प्रकारचा माल दुकानात ठेवण्याचें सामर्थ्य लहान-सहान व्यापाऱ्यात असणें शक्य नसल्यानें मोठमोठीं दुकानें काढून त्यात नाना तऱ्हाचे जिन्नस विक्रीसाठी माडणाऱ्या धंदेवाल्याची आवश्यकता भासते आणि अशीं दुकानें निघाल्यास त्याची भरभराट होते.

अनेक जातींचा व तऱ्हाचा माल साठवून तो आकर्षक रीतीनें माडणारीं आणि ठराविक किमतीनें विक्री करणारीं दुकानें (स्टोअर्स) हिंदुस्थानातील शहरांमध्यें वाढत्या प्रमाणावर निघत आहेत. विस्तृतपणा आणि उलाढालींचें परिमाण, तसेंच, शाखांची सख्या ह्याचे बाबतींत पाश्चात्य देशांतील स्टोअर्सशीं त्यांची तुलना होणें अर्थातच शक्य नाहीं प्रचड भाडवलाचें बळ, सघटन आणि शिस्तीची व्यवस्था ह्याचे सबधात त्या देशामध्यें लोकाची विशेष प्रगति झाली आहे. जनतेची अभिरुचीहि तिकडे विशिष्ट वळणानें गेली असून तिचें सहाय मोठमोठाले स्टोअर्स यशस्वी होण्यास मिळालें आहे अधिक सोय पाहिजे तर अधिक पैसा खर्चण्यास तयार व्हा असें पर्यायानें गिऱ्हाइकांस सागतां येण्यासारखी दुकानदाराची स्थिति आहे पाश्चात्य देशांमध्यें दुकानाची आर्थिक पहाणी होत असल्यानें त्याच्या व्यवहारासंबंधाची अत्यंत उपयुक्त अशी माहिती मिळते आणि तिच्यावरून बोधप्रद अनुमानें काढतां येतात. दुकानें लहान प्रमाणावर चालली असता गिऱ्हाइकास बाजवीपेक्षां अधिक किमतीनें जिन्नस घ्यावे लागतात काय ? दुकानातील नोकराचे पगार योग्य आहेत काय ? मोठ्या प्रमाणावर चाललेल्या दुकानापासून गिऱ्हाइकास वास्तविक फायदा मिळतो काय ? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें तपशीलवार माहितीवाचून देता येणें शक्य नाहीं

इग्लडमध्यें सेल्फ्रिज ह्या नावाचा प्रचड स्टोअर असून त्याच्या अनेक शाखा आहेत. त्याच्या मालकाच्या सागण्यावरून असें दिसतें कीं, किरकोळ विक्रीचा म्हणून होणारा खर्च पाहिल्यास जिनसाच्या विक्रीच्या किमतीच्या ३० टक्के तो असतो आणि असें सामान्यत आढळतें म्हणजे, एखाद्यानें १०० रुपयांचा माल विकत घेतला तर त्यातले ३० रुपये त्या मालाच्या किरकोळ विक्रीच्या एकूण व्यवस्थेप्रीत्यर्थ खर्ची पडतात, असें झालें. सबध ग्रेटब्रिटनमध्यें हा खर्च अदमासें ६८० कोटि रुपये इतका प्रतिवर्षी होतो आपणास हव्या असलेल्या सोयींची किंमत म्हणून ब्रिटिश जनता दरवर्षी एवढा खर्च करते प्रत्येक व्यक्तीची हौस पुरवण्याचा प्रयत्न दुकानदारास करावा लागतो आणि ह्यास खर्च येणार व किंमत यावी लागणार हें उघड आहे सेल्फ्रिज ह्याच्या दुकानामध्यें १०,७६३ निरनिराळ्या तऱ्हाचें स्टॉकिंग ठेवावे लागतात ! एका टूथपेस्टचे १३५ भिन्नभिन्न प्रकार दुकानात संग्रहावे लागतात. व गिऱ्हाइकांपैकीं ८० टक्के लोक ६ प्रकारच्या टूथपेस्टमधून निवड सामान्यतः करीत असले तरी १३५ जातींचा सग्रह दुकानदारास आवश्यक वाटतो. मालाच्या प्रत्यक्ष खरेदीशिवाय दुसऱ्या कित्येक सुखसोयी गिऱ्हाइकांस पाहिजे असतात आणि त्यांचेसाठी कोट्यवधि रुपये हे लोक दुकानदाराच्या पदरात घालतात माल आपल्या घरीं परस्पर पोचता व्हावा अशी त्याची इच्छा असते आणि तिची जादा किंमत दुकानदार चोपून घेतात पण ह्या विशिष्ट सुखसोयींचा खर्च सर्व गिऱ्हाइकावर का वाटला जावा आणि त्याचा भुर्दंड सर्वांस का पडावा हा प्रश्न येथें उद्भवतो. ज्यास चैन हवी असेल त्या गिऱ्हाइकानीं तिचा खर्च सोसावा हें सरळ दिसतें. पण मोठ्या दुकानाची शक्ति एवढी मोठी असते कीं त्याच्या व्यवस्थेपुढें किरकोळ वैयक्तिक गिऱ्हाइकाचें काहीं चालत नाहीं आणि मागितलेल्या किंमती देणें त्यास प्राप्त होतें. ह्या रीतीनें, विस्तृत प्रमाणावर चाललेलीं दुकानें गिऱ्हाइकाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीनें लहान दुकानापेक्षां अधिक फायदेशीर असतातच, असें अनुमान काढता येत नाहीं

---

#### घटा वाजवण्याबद्दल दड

दाराची घटा वाजवून फेरीवाले, भिक्षेकरी इत्यादि लोक मालकास त्रास देतात तो वाचवण्यासाठी अमेरिकेंत एका कल्पकानें खुबीदार घटा बनवली आहे आठ आणे किंमतीचें नाणें आत टाकल्यावाचून ही घटा वाजत नाहीं घंटा वाजवणारा घरमालकास नको असलेला असा पाहुणा नसल्यास त्यास आठ आणे परत दिले जातात. इतरांचे आठ आणे बुडतात आणि मालक जाळींतून बाहेर पाहून त्यास दारच उघडीत नाहीं.

---


**बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

**( स्थापना १९०६ )**

# नोटिस

शेअरर्सचें वसूल झालेलें भाडवल रु ७८३५०/-
रिझर्व्ह फड रु. ४५४००/-

ह्या बॅंकेमध्यें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जात असून त्यावरील व्याजाचे दर पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

| | | |
|---|---|---|
| १ चालू ठेव | द. द. | १% |
| २ सेव्हिंग बॅंक ठेव | द. द. | २% |
| ३ कायम ठेव मुदत १ वर्ष | द द | २½% |
| ४ कायम ठेव मुदत २ वर्षे | द. द | ३% |
| " " " ३ " | " " | ३½% |
| " " " ५ " | " " | ४% |

अधिक माहिती करिता समक्ष अगर पत्रद्वारें चौकशी करावी.

बार्शी ७-१०-३७ — र. प पटवर्धन, मॅनेजर.

## स्फुट विचार

### निसर्गाचें औदार्य आणि माणसांचें दारिद्र्य

अमेरिकेंतील कपाशीचें पीक चालू मासमात अपेक्षेच्या मानानें मोठें आल्यामुळें त्या मालाचे भाव एकदम उतरून बाजारात खळबळ उडून गेली आहे. जगातील मागणीचे मानानें कपाशीचें जागतिक उत्पादन अलीकडे वाढत चाललें आहे आणि त्याचा परिणाम कपास स्वस्त होऊन शेतकऱ्याची मिळकत घटण्यात झाला आहे कपाशीच्या पैदाशीच्या बाबतींत अमेरिकेचा नंबर सर्व जगात पहिला आहे कपाशीच्या स्वस्ताईनें अमेरिकन शेतकऱ्याचें नुकसान होऊ नये म्हणून प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं कपाशीच्या लागवडीचें क्षेत्र मर्यादित करण्याची व शेतकऱ्यास जरूर तो पैसा पुरवण्याची योजना अमलात आणली आहे. परतु यंदा अमेरिकन कपाशीचें पीक कल्पनेबाहेर मोठें येणार ह्या बातमीनें सर्वत्र धादल उडवली आहे हें पीक १७५ लक्ष गाठी इतकें येईल असा अदाज अधिकारीरीत्या प्रसिद्ध झाला आहे. दर एकरी सुमारें २५० पौंड इतकी कपास हातीं येईल आणि सुमारें ८२ लक्ष गाठीं सप्टेंबरअखेर सरकथा काढून तयारहि होऊन पडल्या आहेत. मागच्या महिन्यात असा अदाज करण्यात आला होता कीं एकूण पीक १४३ लक्ष गाठी होईल, परतु हवामानाच्या अनुकूल परिस्थितीच्या योगानें आताचा अजमास विलक्षण रीतीनें फुगला आहे. जगाच्या बाजारपेठेंत कापसाचा इतक्या मोठ्या प्रमाणांतील माल येऊन उभा राहिला असता त्याची विक्री करण्यात व्यापाऱ्यामध्यें चढाओढ लागणार आणि त्याच्या किंमती खाडकन् उतरणार हें उघड आहे. जगातील निरनिराळ्या देशातील बाजारपेठा एकमेकाशीं संलग्न झालेल्या असून भिन्नभिन्न जातींच्या कापसाच्या किंमती प्रमाणबद्धतेनें चढत-उतरत असतात. मुंबईच्या व्यापाऱ्याचें लक्ष सारखें अमेरिकेकडे लागलेलें असतें आणि तेथें होणाऱ्या किंमतींच्या हेलकाव्यांचे धक्के येथील किंमतीस बसतात. अमेरिकन कपाशीच्या पुरवठ्याविषयींच्या बातम्या येथें येतांक्षणींच भडोच कापसाचा भाव १६३ रुपयांवरून १५८ रुपयावर घसरला, आणि न्यूयॉर्कचे भाव खाली आल्यानें तो गेल्या आठवड्याचे अखेरीस १५५ रुपये झालेला दिसला. कांहीं वेळ ह्या भावाची घसरगुंडी १५२ रुपयांपर्यंतहि झाली होती हिंदुस्थानात पिकणाऱ्या कपाशीची किंमत ह्या प्रमाणात उतरल्यास ती आमच्या शेतकऱ्यावर आलेली मोठी आपत्तीच समजली पाहिजे अगोदरच मदीनें गाजलेल्या शेतकऱ्याची तुटपुजी मिळकत घटली असता त्यावर नवीन संकट आल्यासारखेंच झालें. निसर्गानें अमेरिकेच्या पदरात कपाशीच्या रूपानें ज्यास्त संपत्ती ओतली, पण त्याचा परिणाम हिंदी शेतकऱ्याची कमाई घटण्यात होत आहे!

### रिझर्व्ह बँक आणि हिंदुस्थान सरकार

रिझर्व्ह बँकेची स्थापना होण्यापूर्वी चलनी नोटा व रुपयाचें नाणें ह्यांच्या प्रसाराची व्यवस्था करण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारावर असे. नोटा व रुपये ह्याचा पुरवठा योग्य क्षेत्रांत योग्य वेळीं होईल अशी तरतूद फडनवीशी खात्यासच करावी लागे कट्रोलर ऑफ करन्सी ह्या त्या खात्यातल्या अधिकाऱ्यावर ही कामगिरी सोंपवण्यात आलेली होती. सरकारी कर्जरोखे काढणें वगैरे व्यवहारहि त्याचे मार्फत होत असत. परतु नोटा व नाणीं ह्यांच्या पुरवठ्याची जबाबदारी आता रिझर्व्ह बँकेकडे गेली आहे आणि तिच्या अनुषंगानें येणारीं इतर कामेंहि त्याच बँकेनें करावयाचीं आहेत. सरकारी कर्जाची व्यवस्था व हुडणावळीचा दर स्थिर राखण्यासाठी अवश्यक असलेली कारवाई त्याच बँकेच्या कक्षेंत गेलीं आहे ह्या घडामोडीमुळें कंट्रोल ऑफ करन्सीला स्वतः करावयाचें असें काम उरलेलें नाहीं आणि एक अधिकारी अलीकडे आपलें काम रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करण्याच्या उद्योगात व्यापृत असा राहिलेला आहे अधिकारसमर्पणाचें काम आता पुरें झालें असल्यानें कंट्रोलरची जागा कमी होणें, आवश्यक झालें आहे. इंडिअन सिक्यूरिटीज ॲक्टाची दुरुस्ती, ह्या वस्तुस्थितीस कायदेशीर स्वरूप देण्यासाठी सर जेम्स ग्रिग ह्यानीं मध्यवर्ती असेंब्लीपुढें गेल्या आठवड्यात माडली कट्रोलर ऑफ करन्सी आपल्या खात्याच्या कामाची अत्यंत बोधप्रद माहिती वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध करून देत असे परराष्ट्रीय व्यापाराचा आढावा, बाजारभावाची चलबिचल, सोनेंचांदीची आयात-निर्गत, खेळत्या पैशाचा पुरवठा, हुडणावळीचे दर, हुडीचे बाजारभाव ह्याविषयींच्या घडामोडीचा मनोवेधक वृत्तात त्यात वाचावयास मिळे कट्रोलरची जागाच खाली झाल्यानें सदरहु माहिती रिझर्व्ह बँक प्रसिद्ध करील असें आश्वासन सर जेम्स ह्यांनीं दिलें आहे तसेंच, सरकारी फडनवीशी खात्याचें नियंत्रण रिझर्व्ह बँकेच्या व्यवहारावर राहून सरकार व जनता ह्यांच्या हिताच्या रक्षणाविषयीं दक्षता बाळगिली जाईल असेंहि त्यानीं सागितलें रिझर्व्ह बँकेच्या चालकानीं ह्या बाबतींतली आपली लोकहितासबधाची जबाबदारी ओळखली पाहिजे आणि ती ओळखली जाण्याविषयींची व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें केली पाहिजे

### बाहेरील तज्ज्ञांची भरती

मध्यवर्ती सरकार कायदेमडळास जबाबदार नसल्याकारणानें, असेंब्लीच्या मताचा सरकारवर परिणाम होत नाहीं. असेंब्लीमध्यें पास झालेले ठराव सरकारावर बधनकारक नसतात व त्यामुळें कायदेमडळातील बहुमतास मान देण्याची आवश्यकता सरकारास भासत नाहीं. असेंब्लीनें सरकारी धोरणास पाठिंबा दिला, तर फारच उत्तम, तिनें विरोध केला तर मात्र कांहीं बिघडत नाहीं, अशी आजची परिस्थिति आहे असेंब्लीच्या नुकत्याच सपलेल्या अधिवेशनात अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर सरकारचा पराभव झालेला आहे कांहीं बाबी तहकुबीच्या सूचनाच्या द्वारा चर्चेसाठीं माडून विरोधी पक्षानें सरकारी धोरणावर हल्ला चढविला व जनतेचा तीव्र असतोष असदिग्धपणें व्यक्त केला. गेल्या आठवड्यात ओळीनें दोनदा सरकारवर लोकमतानें मात केली. ज्यावर हिंदी अधिकारी नेमणें शक्य आहे, त्या जागीं मुद्दाम इंग्लंडमधून भारी पगारावर माणसें मागविण्याच्या सरकारी धोरणावर असेंब्लीनें तीव्र निषेधाचा छाप मारला इनकम टॅक्स कमिशनरच्या जागेवर सरकारनें मि चेंबर्स ह्याची नेमणूक केली आहे त्याच्या लायकीचा मनुष्य हिंदुस्थानात दुर्मिळ आहे कीं काय? या प्रश्नास, आम्हास तो इसम नेमणें योग्य वाटलें हें अर्थशून्य सरकारी उत्तर ठरलेलें आहे मि चेंबर्स यास सध्या इंग्लडमध्यें सुमारें ५०० रुपये मासिक पगार मिळत आहे हिंदुस्थान सरकार त्यास २,५०० रुपयांचा तनखा देणार आहे! एवढ्या भारी पगाराचें प्रयोजन काय, असाहि प्रश्न असेंब्लीमध्यें विचारण्यात आला. सर जेम्स ग्रिग ह्यानीं मि. चेंबर्स ह्याच्या नेमणुकीचें लगडें समर्थन केलें तें कोणासहि पटण्यासारखें नव्हतें असेंब्लीमधील तह-

कुबीची सूचना ५९ विरुद्ध ४२ मतांनीं पास झाली, ह्यावरून सरकारची बाजू किती लेचीपेची होती हें स्पष्ट दिसून आलें. सनदी नोकरांतील युरोपियनांचें प्रमाण कमी होत आहे, त्यांची जागा 'तज्ज्ञां'च्या नेमणुकीनें भरून काढण्याचा सरकारचा विचार दिसतो. हिंदुस्थानांत लायक माणसांचा अभाव आहे काय व परकी तज्ज्ञांची नेमणूक अनिवार्य असल्यास ग्रेट ब्रिटनचे बाहेर इतर देशांतून ते आणल्यास कमी खर्चांत ते मिळणार नाहींत काय, असाहि प्रश्न येथें विचारतां येण्याजोगा आहे.

### हिंदुस्थानांत लायक अर्थशास्त्रज्ञ नाहींत !

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार म्हणून डॉ. टी. ई. ग्रेगरी ह्यांची सरकारनें नेमणूक केली, ह्याविषयींहि असेंब्लीनें आपली नापसंती एक तहकुबीची सूचना मांडून व्यक्त केली. हिंदुस्थान सरकारास सल्ला देण्याकरितां एक आर्थिक तज्ज्ञ नेमण्यांत यावा, असें आज किल्येक वर्षें घाटत होतें. स्टँडिंग फिनॅन्स कमिटीनें ह्या तज्ज्ञाच्या चालू वर्षांतील खर्चाकरितां गेल्या फेब्रुवारींतच रकम मंजूर केली होती. ब्रिटिश सरकारच्या आर्थिक धोरणास पाठिंबा देणारे "होयबा" सर जेम्स ग्रिग ह्यांस हवे होते आणि हिंदी अर्थशास्त्रज्ञांमध्यें त्या प्रकारचा 'तज्ज्ञ' उपलब्ध होण्याची अपेक्षा नसल्यामुळें त्यांनीं एका ब्रिटिश अध्यापकाची निवड केली असा आक्षेप श्री. सत्यमूर्ती ह्यांनीं सदरहु नेमणुकीचा प्रश्न असेंब्लीमध्यें गेल्या आठवड्यांत उपस्थित करून स्पष्टपणें घेतला. फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांनीं नेमणुकीचें केलेलें समर्थन नुसतें लटपटितच नसून प्रक्षोभक होतें. आर्थिक सल्लागाराचें काम करण्यास लायक असा एकहि हिंदी अर्थशास्त्रज्ञ सर जेम्स ह्यांस आढळला नाहीं, एवढेंच नाहीं तर हिंदुस्थानांतील अर्थशास्त्रज्ञांची त्यांनीं दोन गटांत विभागणी केली. ( १ ) विद्यार्थी पढवण्याच्या मर्यादेबाहेर ज्यांची दृष्टि जाऊं शकत नाहीं असे पुस्तकी अध्यापक व ( २ ) ज्यांस हिंदुस्थानाबाहेरच्या जगाची जाणीवहि नाहीं, असे आकुंचित वृत्तीचे कुपंडित अर्थशास्त्रवेत्ते. असें वर्गीकरण झाल्यावर त्यांपैकी कोणत्याच वर्गांतील अर्थशास्त्रज्ञास सरकारचा सल्लागार होण्याची लायकी नाहीं असें विधान सर जेम्स ह्यांनीं सहज ठोकून दिलें.

### दुःखावर डागण्या

उपरिनिर्दिष्ट दोन गट खुद्द इंग्लंडमध्यें नाहींत काय? ते सर्वच देशांत असतात. आर्थिक परिस्थितीची स्वतंत्र वृत्तीनें छाननी करून तिच्यामधून प्रमेयें काढणाऱ्या अभ्यासू हिंदी अर्थपंडितांची सर जेम्स ग्रिग ह्यांस माहिती नाहीं काय? ती नसल्यास सदरहु दोष हिंदी जनतेचा व हिंदी अर्थशास्त्रज्ञांचा नसून फडनवीसांच्या अज्ञानाचा व अहंभावाचा आहे. एका ब्रिटिश अधिकाऱ्याची वर्णी लावतांना हिंदी अर्थशास्त्रज्ञांवर निष्कारण नालायकीचा शिक्का मारून त्यांचेवर सर जेम्स ह्यांनीं अन्याय केलेला आहे. हातांत असलेल्या राजकीय सत्तेच्या जाणीवेनें त्यांची विचारशक्ती दूषित झाल्यामुळें त्यांचें भाषण बरळणें ह्याच सदरांत ढकलणें योग्य आहे आणि असेंब्लीच्या लोकनियुक्त सभासदांनीं त्या रीतीनें त्याची संभावना केली हें योग्य झालें. इंग्लंडमध्यें उच्च शिक्षणासाठी जाऊन तज्ज्ञ बनण्याची धडपड करणाऱ्या हिन्दी लोकांनीं सर जेम्स ग्रिग ह्यांनीं ब्रिटिश तज्ज्ञाची केलेली निवड आणि त्या अनुषंगानें हिंदी तज्ज्ञांवर उडवलेले शिंतोडे ह्यांपासून धडा घेणें अगत्याचें आहे. सांपत्तिक प्रश्नांचे बाबतींत गव्हर्नर जनरल यांचेवर नवीन घटना कायद्यानें जबाबदारी टाकली आहे व ती पार पाडतां यावी ह्याकरितां एका विशिष्ट तज्ज्ञ सल्लागाराची तरतूद त्या कायद्यामध्यें करण्यांत आली आहे. ह्या सल्लागारांची नेमणूक अद्याप व्हावयाचीच आहे, ती कशी होणार हें सांगण्यास भविष्यवाद्याची आवश्यकता नाहीं. परकीय तज्ज्ञांची भरती केव्हां व कशी थांबणार हाच प्रश्न विचार करण्यासारखा आहे.

### इटलीमध्यें नव्वद नवीं वीजगृहें


निसर्गानें निर्माण केलेल्या अनुकूल परिस्थितींत पाण्याच्या साठ्याच्या जोरावर वीज उत्पन्न करून तिचा, प्रकाश आणि औद्योगिक प्रेरक शक्ति ह्यांच्या पुरवठ्याकरितां उपयोग करून घेणें हें आर्थिक प्रगतीचें एक महत्त्वाचें साधन आहे. मुंबई इलाख्यांत पश्चिम घाटांत ह्या प्रकारचीं वीजगृहें स्थापन झालीं असून त्यांत तयार होणाऱ्या विजेचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होत आहे, हें सुप्रसिद्ध आहे. म्हैसूर संस्थानांत ह्यासंबंधांत अनुकूल नैसर्गिक परिस्थिति आहे आणि तिच्या सहायानें वीज मोठ्या प्रमाणावर तयार केली जात आहे व उपयोगांतहि आणली जात आहे. इटलीमध्यें कोळशाचा पुरवठा अपुरा आहे आणि त्याची उणीव विद्युत्‌शक्तीनें भरून काढण्यांत येत आहे. सध्याच त्या देशांत १४०० कोटि किलोवॅट तास इतका विजेचा पुरवठा आहे आणि त्यांत तितकीच भर घालतां येणें शक्य आहे. तूर्त नव्वद नवीन वीज गृहें उभारण्याची योजना हातीं घेण्यांत आली आहे. ती पुरी होईल तेव्हां इटलीच्या विजेच्या पुरवठ्यांत २०० कोटि किलोवॅट तास इतक्या शक्तीची भर पडेल.

### मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

१९३७ अखेर संस्थेचे पटावर ४१८ सभासद असून तिचे जवळ १७,४३५ पुस्तकांचा संग्रह आहे. मुंबई म्युनिसिपालिटीनें ग्रन्थसंग्रहालयास १,५०० रु. वार्षिक देणगी देण्याचें आपल्या ता. ३०-३-३७ च्या सभेंत ठरविलें आहे.


# R. B. Jog & Sons

**Deccan Gymkhana, Poona 4**




Big Stock of Shell Oils & Greases. Motor Washing & Cleaning. Motor Oiling & Greasing. Moderate Charges.

## मेवामिठाईचा धंदा

लहान मुलांस प्रिय असलेला मेवा बनविण्याच्या धंद्यात अत्यंत कुशल व शीघ्र गतीच्या यंत्रांचा उपयोग पाश्चात्य देशामध्यें वाढत्या प्रमाणावर होत आहे. एक नवीन यंत्र दर मिनिटास मेव्याच्या पांचशे गुडाळ्या करतें ज्याचा मेवा बनवावयाचा त्या पदार्थाच्या मिश्रणाचा लादा यंत्राच्या एका बाजूस घातला असतां दुसऱ्या बाजूनें त्याच्या बनलेल्या वड्या कागदांत व्यवस्थित रीतीनें गुडाळलेल्या स्थितींत बाहेर पडतात ! आमच्या इकडे अलीकडे पेढे, बर्फी, बदामाच्या व आंब्याच्या वड्या इत्यादि प्रकारच्या मिठाईच्या बनावटींत, वेष्टनात व विक्रीच्या पद्धतींत अभिनंदनीय सुधारणा झाली आहे पण हलवायाचा व्यवसाय सामान्यत. जुन्या पद्धतीस अनसरूनच अजून चालला आहे बत्तासे, रेवड्या, भेंटें, पेढे व बर्फी. ही मुलामुलींची आवडीची मिठाई पूर्वापार चालत आलेल्या तऱ्हेचाच अद्याप आहे. पेपरमिंटच्या वड्या, लिंबलेटच्या गोळ्या वगैरे अलीकडे तयार होत असून दुकानात विक्रीस ठेवण्यात येत आहेत. तथापि, एकदरीनें पाहता, मेवामिठाईच्या धंद्यांत नावीन्य व बदल ह्याचा भाग म्हणण्यासारखा दिसत नाहीं होतकरू व हुशार धंदेवाल्यानीं इकडे लक्ष देणें आवश्यक आहे. विलायतेंत चाकोलेट व टॉफी मुलांमुलींस व मोठ्या माणसासहि प्रिय झालीं असून त्याचें उत्पादन व खप हीं वाढत्या प्रमाणावर आहेत त्या विलायती मेवामिठाईचा प्रवेश इकडील बाजारांत व घरात झाला आहे. बिस्किटाचा स्वदेशी धंदा जसा आतां समाधानकारक रीतीनें प्रस्थापित झाला आहे, तसा मुलांच्या मिठाईचाहि धंदा यशस्वी होणें जरूर आहे. बिस्किटाचे कारखानदार साठे बधु, गव्हाचे पोहे बनविणारे श्री. सहस्रबुद्धे, पेढ्यांचे कारखानदार व्यापारी श्री तुळजाराम मोदी, सरबतें तयार करणारे, श्री आपटे इत्यादींनी मोठ्या मेहनतीनें व धडाडीनें आता आपला जम बसविला आहे यंत्रसामुग्री स्वत च्या कल्पकतेनें योजून व बनवून अत्यंत अल्प भाडवलावर धंदा उभारल्याचीं इतरहि अनेक उदाहरणें आहेत पाश्चात्य पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर अद्याप जरी उत्पादन होत नसलें, तरी विलायती मालास तोंड देण्याचें धाडस महाराष्ट्रीय धंदेवाले करीत आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे लोकाच्या बदलत्या गरजा व आवडीनावडी ह्यांचें निरीक्षण करून त्याप्रमाणें माल तयार करणें व त्याचा उठाव यशस्वी रीतीनें घडवून आणणें सोपें नसलें तरी तें अशक्यप्राय नाहीं, हें आतां सिद्ध झालें आहे. घरोघरीं लागणारी मेवामिठाई परदेशातून येऊन येथें खपते, तिला आळा बसण्यास देशी कारखानदाराचे प्रयत्न सहायकारक होतील. हें मोठें व वाढतें गिऱ्हाइक त्यास मिळण्याजोगें आहे

---

### जी आय पी. व बी बी ॲण्ड सी आय रेल्वेजचा विद्युत्पुरवठा

जी. आय. पी. रेल्वे सध्या चोला स्टेशनमध्यें स्वत स लागणारी वीज निर्माण करते, परतु तेथील पुरवठा कमी पडतो व टाटाच्या वीज कपन्याकडून रेल्वेस वीज विकत घ्यावी लागते, कल्याण ते पुणें व कल्याण ते इगतपुरी ह्या फाट्याचा वीजपुरवठा कंपनीच्या स्वतःचे वीज घरातून होतो. रेल्वेनें टाटा कंपन्याशीं नवा करार केला आहे, त्या अन्वयें रेल्वेचें वीजगृह येथून पुढे वापरात येणार नसून जरूर तेव्हांच त्याचा उपयोग केला जाईल. टाटा कंपन्याचीच वीज सर्व साधारणपणें वापरली जाईल जी आय पी. व बी बी ॲन्ड सी आय ह्या दोन्ही रेल्वेजला लागणारा विद्युत्पुरवठा ह्यापुढें टाटा कपन्यानीं करावयाचा आहे हल्लींच्या विजेच्या दराचे मानानें करारातील दर हलके असले तरी त्यामुळें कपन्यांचे उत्पन्नात विशेष घट होणार नाहीं. नवीन करार अनुक्रमें १९४० व १९४२ सालीं अमलात यावयाचे आहेत


## औंध स्टेट सेंट्रल बँक. लिमिटेड. औंध.

( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ व बिचूद स्टेशन.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात

चेक, हुंड्या ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B R Vartak
मॅनेजर.

## न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वात मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—

(१) कंपनीचें स्थैर्य ( २ ) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री डी के जोगळेकर, बी ए,
ऑर्गेनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८४,४०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८२३ |
| इतर फंड | १,४०४ |
| मुदतबंद ठेवी | १,९१,५१३ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,९५९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,८०,५८६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रकम | ४१,५९९ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

# सहकारी चळवळ

## बॉंबे प्रेसिडेन्सी को. डि. ए. को. क्रे. सोसायटी, लि.

मुंबई इलाख्यातील सहकारी खात्यामधील नोकरासाठी स्थापन करण्यांत आलेल्या वरील सोसायटीचा पहिला वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे सहकारी रजिस्ट्रार श्री के एल पजार्बा ह्याच्या पुरस्कारानें वरील सोसायटीची स्थापना झाली व तिची पहिली साधारण सभा ता. ८-९ ३६ रोजीं भरली ता १-१०-३६ रोजीं सोसायटीच्या कामकाजास प्रारभ झाला; म्हणजे प्रस्तुत अहवाल हा खरोखर ९ महिन्यातील कामाचा रिपोर्ट आहे सोसायटीनें सहकारी खात्याच्या फडाचीं देणी-घेणीं स्वत: स्वीकारून तेंच काम व्यापक स्वरूपात पुढें सुरू केलें सोसायटीचें भाडवल ६०५ रु. जमा झालेलें असून रिझर्व्ह फडात २,४२२ रु आहेत सशयित कर्ज फडात ६०५ रु आहत. सहकारी खात्याच्या फडातील १२४१ रु व सोसायटीनें दिलेले १३३५ रु असें कर्जखातीं येणें आहे वर्षअखेर सोसायटीस २६ रु. ४ आ १ पै नुकसान आलें.

"ज्याच्याकडून सहकारी संस्था मदतीची व मार्गदर्शनाची अपेक्षा करतात, अशा सहकारी खात्यातील नोकरवर्गाच्या ह्या सोसायटीचा कारभार यशस्वी होऊन तिच्या प्रगतीचा मार्ग पूर्णपणें सहकारी तत्त्वानुसार आक्रमला गेला पाहिजे" असा उपयुक्त उपदेश अहवालाचे समारोपांत करण्यात आला आहे सोसायटीचे चेअरमन, श्री डी ए शहा, ह्याचे देखरेखीखाली ही सोसायटी इतर सहकारी सस्थास आदर्शभूत होईल, अशी अपेक्षा आहे.

## पूर्व खानदेश सें को. बॅंक, लि.

६०६ सोसायट्या व ५१४ व्यक्ती वरील बॅंकेचे भागीदार आहेत. बॅंकेकडे सुमारें ४८ लाख रुपयाच्या ठेवी असून एकूण खेळतें भाडवल सुमारें ५६½ लक्ष रु इतकें म्हणजे गेल्या वर्षापेक्षा ३½ लाखानीं जास्त आहे. भाग भाडवल (४½ लक्ष रु ) धरून बॅंकेचें स्वत.चें भाडवल सुमारें ९ लक्ष रु भरतें एकूण कर्जापैकी (४२ लक्ष रु.) ३५½ लक्ष रु सोसायट्याकडे आहे. वसुलाचे रकमेंत वाढ होत असून थकबाकीहि १७ लक्ष, ८८ हजाराची ८ लक्ष ९० हजारांवर आली आहे बॅंकेची कर्जफेड वक्तशीर करण्याकडे सोसायट्यांची प्रवृत्ति वाढल्या प्रमाणावर दिसून येत आहे. सोसायट्याकडील कर्जावरील व्याजाचा दर बॅंकेच्या पोटनियमांत असलेल्या कमींत कमी मर्यादेपर्यंत म्हणजे ६½% पर्यंत बोर्डानें उतरवला आहे अंमळनेर व भुसावळ येथें बॅंकेकरितां इमारती बांधण्याचा बॅंकेचा विचार आहे. वरील हकीकतीवरून पू खा. सें को बॅंकेच्या प्रगतीची व भक्कमपणाची कल्पना येईल.

## बंगाल प्रांतांतील सहकारी चळवळ

नवीन संस्था स्थापन करण्यापेक्षा आहेत त्या सहकारी संस्थाच मजबूत करण्याचें धोरण बंगाल प्राताच्या सहकारी खात्यानें गेल्या वर्षी अवलबिलें. शेतकी सोसायट्याच्या स्थापनेस प्रोत्साहन देण्यात आलें नाहीं. शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितींत विशेष सुधारणा न झाल्याकारणानें सहकारी चळवळीचें पाऊल पुढें पडू शकलें नाहीं. बंगालमधील सर्व प्रकारच्या मिळून सोसायट्याची संख्या २३,५२९ भरते व त्याचे ८ लक्ष, ४३½ हजार सभासद आहेत. शेतकी पतपेढ्याची सख्या १९,७९० आहे. एकूण खेळतें भांडवल १८ कोटि, ८४ लक्ष रु. असून त्यापैकीं सोसायट्याचें स्वत.चें भांडवल ५ कोटि, ५१ लक्ष रु. आहे कर्जाचा सरासरी दर ९¾% आहे.

## सारस्वत को. बॅंक लि.

वरील बॅंकेचे पटावर ११७८ सभासद आहेत, त्यापैकीं ८० स्त्रिया आहेत. भाग भाडवल ४८,२९७ रुपयाचें आहे. रिझर्व्ह व इतर फडात मिळून ३२,६५० रु. आहेत एकूण ठेवींपैकीं ५½ लक्ष रुपये सभासदांचे असून १½ लक्ष रु. बिगर सभासदाचे आहेत अहवालाचे वर्षी १ लक्ष ३२ हजाराचे १२२ कर्जअर्ज मंजूर करण्यात आले. ३० जून अखेर सभासदाकडून येणें असलेल्या कर्जाची रकम २ लक्ष, ३०½ हजार रु भरते दरखास्तीमधील ४½ हजाराची रकम सोडली, तर थकबाकीचें प्रमाण ८% पडतें कर्जाच्या वसुलीबाबतची बॅंकेची कार्यक्षमता ह्यावरून दिसून येईल. बॅंकेकडील ठेवी वाढल्या आहेत व तिचें चालू खातेंहि लोकप्रिय होत चाललें आहे जून, १९३७ अखेर तिला ९,५७२ रु. निवळ नफा झाला. सरकारी कर्जरोख्याच्या विक्रींत झालेल्या नफ्यापैकीं १० हजार रु इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फडांत टाकण्यात आले सर्वच दृष्टींनीं बॅंकेची परिस्थिति अत्यंत समाधानकारक असून तिची प्रगतीहि शीघ्र गतीनें होत आहे. श्री वा. पु. वर्दे हे बॅंकेचे चेअरमन आहेत

## दि पूना हिंदु मिडल क्लास को. हौसिंग सोसायटी, लि, पुणें
(वार्षिक सभा : ता. २६-९-३७)

जून, १९३७ अखेर सभासदास १ लक्ष, १२ हजार रु कर्ज देण्यांत आलें. आजमितीस सभासदाकडे १ लक्ष, ५ हजार रु. कर्ज आहे बॅंकेच्या कर्जावर (१ लक्ष रु ) ६½% व्याज द्यावें लागतें व सभासदांकडून ७ रु १३ आ. % दरानें व्याज घेण्यात येतें. सोसायटीच्या सभासदांनीं सोसायटींत अल्प व लाब मुदतीच्या ४–४½ टक्के दरानें ठेवा ठेवल्यास, त्यास योग्य व्याज मिळून, त्याच्या कर्जावरील व्याजाचा दरहि सोसायटीस उतरविता येईल, अशी विनंति सोसायटीच्या कार्यद्रष्टयांनीं अहवालात केली आहे. सोसायटी 'अ' वर्गांत आहे.

## औंध स्टेट सेंट्रल बॅंक, लि, औंध
### रोख्याचा तपशील

वरील बॅंकेच्या अभिनंदनीय प्रगतीची माहिती 'अर्था' च्या गेल्या अकात आम्हीं दिली आहे, तीमध्यें "रोखे, कॅश सर्टिफिकिटें यानी बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदात दाखविलेल्या रकमेपेक्षां कमी आहे" असें म्हटलें आहे. वस्तुतः ताळेबदात फक्त म्यु लोन व म्हैसूर लोन ह्याचीच खरेदीची किंमत दाखविलेली आहे व ती बाजार भावानें होणाऱ्या किमतीपेक्षा सुमारें १,१०० रुपयानी कमीच आहे १४ हजार रुपये. दर्शनी किमतीच्या कॅश सर्टिफिकेटांची ताळेबदात ११½ हजार रुपयेच किंमत धरलेली आहे अशा रीतीनें ताळेबदातील इनव्हेस्टमेंटचे आकडे बॅंकेची मजबुती दाखवीत आहेत इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फडात सालअखेर १½ हजाराची भर पडली म्हणजे तो फंड २½ हजाराचा हाईल. रोख्याच्या दाखवलेल्या व पडलेल्या किमतीमधील असलेली अनुकूल तफावत व रिझर्व्हमध्यें वाढ ह्या कारणानें बॅंकेच्या मजबुतीमध्यें भर पडलेली आहे ह्यात सशय नाहीं.

### नवीन औद्योगिक मडळयांत मृत्यूचें प्रमाण

आपला धंदा फायदेशीर रीतीनें चालू शकेल ह्या कल्पनेनें लोक औद्योगिक व व्यापारी मडळ्या स्थापतात. परंतु चुकलेला अंदाज, परिस्थितीचें अज्ञान, भरमसाट आशावादित्व आणि जनतेच्या बदलणाऱ्या आवडीनावडी ह्या कारणांनीं सदरहु मंडळ्या अल्पायुषी होण्याची नेहमी भीति असते महायुद्धानंतरच्या काळात ब्रिटिश औद्योगिक मंडळ्याच्या जनन-मृत्यू सबधानें चौकशी करण्यात आली, तीवरून निघणारीं अनुमानें विचार-प्रवर्तक आहेत. नवीन निघालेल्या मंडळ्यांपैकीं शेकडा ३ जन्म होऊन एक वर्ष होताच मृत्यू पावल्या, शेकडा २२ पाच वर्षे जगल्या, शेकडा ३० दहा वर्षे व शेकडा ३२ अकरा वर्षे टिकल्या असें चौकशीवरून आढळून आलें. सामान्यत सरासरीनें पहाता नवीन कंपन्यातल्या शेकडा २५ आयुष्याच्या अकराव्या वर्षीच नष्ट होतात असें दिसून येतें. ज्या धंद्यात विशेष स्पर्धा असते आणि जे जनतेच्या चंचल अभिरुचीवर विशेषें करून अवलबून असतात अशांत पडणाऱ्या मडळ्या मुख्यत्वें करून अल्पायुषी होतात, असा अनुभव आहे अल्पावधींत नष्ट होण्यापूर्वी त्यामधील काहीं मडळ्यानीं भागीदारास भरभक्कम नफाहि दिलेला असतो जुगारी वृत्तीच्या पैसेवाल्यास ह्या जातीच्या अल्पायुषी मडळ्याचें काहीं वाटत नाहीं. पण ज्यास दीर्घकाळपर्यंत स्थिर मिळकत हवी असते असे लोक ह्या मंडळ्याच्या वाऱ्यासहि उभे रहात नाहींत

### बेकारांची आकडेवार माहिती

"बेकारीचें निवारण करण्यासबधीं कोणतीहि योजना आखतांना मुख्य अडचण भासते ती बेकारांविषयींच्या अधिकृत आकडेवार माहितीच्या अभावाची होय. १९३५ सालीं सयुक्त प्रात सरकारनें एक बेकारीनिवारण कमिटी नेमली होती, तिनेंहि आपल्या रिपोर्टांत ह्यासबधीं तक्रार केली आहे. आर्थिक प्रगति मोजण्याचें बेकारीचे आकडे हें एक उत्कृष्ट माप आहे, ह्या दृष्टीनेंहि त्यांचें महत्त्व कमी नाहीं निदान म्युनिसिपालट्या असलेल्या शहरातून तरी बेकारीविषयीं आकडेवार माहिती जमा करणें कठीण पडणार नाहीं सबद इलाख्यासंबंधींचे आकडे गोळा करून प्रसिद्ध करणें सरकारास शक्य झालें तर उत्तमच. परंतु निदान ह्या बाबतींत प्रयत्नास आरभ होणें जरूर आहे" अशा अर्थाची सूचना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें मुंबई सरकारास पत्र पाठवून केली आहे.

### आर्थिक जीवनात विम्याचें महत्त्वाचें स्थान

ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रीय सपत्तीपैकी शेकडा ७ इतकी रकम विमा कंपन्याचे जिंदगींत आहे वार्षिक हप्त्यांची एकूण बेरीज दरसालच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे ६·४१ टक्के भरते रोख्यात एकूण गुंतविण्यात आलेल्या रकमापैकी शेकडा ७ रकम विमा कंपन्याची आहे १९३५ सालीं ग्रेट ब्रिटनची लोकसंख्या ४ कोटि, ६८३/४ लक्ष इतकी होती व चालू आयुर्विमा पॉलिसी व वर्षासनें मिळून ९ कोटि ५७३/४ लक्ष भरलीं म्हणजे, प्रत्येक माणसागणिक दोन विमापत्रकें, असा हिशेब झाला. लोकाच्या उत्पन्नापैकी प्रत्येक रुपयांतील एक आणा हप्त्याचे रूपानें कपन्याकडे भरण्यांत आला. सर्व तऱ्हेच्या इस्टेटींत मिळून विमा पॉलिसींचा हिस्सा ३१/२ टक्क्याइतका आहे ग्रेट ब्रिटनच्या आर्थिक जीवनात विम्यानें किती महत्त्वाचें स्थान पटकावलेलें आहे आणि विमा कपन्यास आपलें जाळें वाढविण्यास हिंदुस्थानात अद्याप किती वाव आहे ह्याची कल्पना वरील आकड्यावरून येईल.


## भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमत अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रथात विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी सस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धदा, मजुरांची चळवळ, हुडणावळ, सहकारी चळवळ, सरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नाचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय

प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

## गव्हाचे पोहे

(REGD) **(BLOSSOM)** (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात. विशेषत. लहान मुलाना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो

ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधातून खाता येतात.

७५३ सदाशिव पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार

## आवश्यकता है

बेबी इंक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अकोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाऊस भी मिलेगा. नियम बहुत सरल हैं (नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें)

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.

(स्थापित १९१९) अमीनाबादपार्क-लखनऊ

## संशोधन कार्याचा शेतकऱ्यांस उपयोग कसा होईल ?

### सर जॉन रसेल ह्याचा रिपोर्ट

हिंदुस्थानातील शेती व दूधदुभतें ह्यांसबंधीं चौकशी करून त्याबाबत सुधारणा सुचविण्याकरिता दोन " तज्ज्ञा "ची नेमणूक सरकारनें केली होती. त्यापैकीं डेअरी " तज्ज्ञ " डॉ राइट ह्याच्या रिपोर्टाचा साराश ' अर्था 'मध्यें येऊन गेलाच आहे. सर जॉन रसेल ह्याचा रिपोर्ट व्यापक स्वरूपाचा आहे, त्याचा साराश येथें देत आहों —

( १ ) इपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचें कार्य समाधानकारकपणें चालू आहे हिंदी शेतीच्या सुधारणेचे दृष्टीनें कौन्सिलच्या कामाचा व्याप वाढविण्यात यावा

( २ ) शेतीसुधारणेच्या योजनेंत केवळ सशोधनानें कार्यभाग होणार नाहीं, ह्याकरिता कौन्सिलच्या कार्यक्षेत्रांत सुधराईच्या प्रत्यक्ष योजनाचा समावेश व्हावा.

( ३ ) शेतीविषयक चालू असलेल्या प्रयोगाचा व सर्वसाधारण शेतकरी वर्गाचा निकट सबध येणें आवश्यक आहे व ह्या दृष्टीनें जारीनें खटपट केली पाहिजे माहीत असलेल्या गोष्टी सर्व शेतकऱ्यास कळतील अशी व्यवस्था झाली पाहिजे

( ४ ) पिकाच्या रोगराईविषयींचें सशोधन, प्रत्यक्ष भासणाऱ्या अडचणी कशा निवारता येतील, ह्या दृष्टीनें करण्यांत आलें पाहिजे. पिकावर रोग अजिबात पडणारच नाहीं, अशी व्यवस्था करता येण्याजोगी आहे

( ५ ) सशोधन कार्यामध्यें 'नमुना पद्धती' चें महत्त्व विशेष आहे द ह्याकरिता तज्ज्ञ आकडेशास्त्रज्ञाच्या सहायाची आवश्यकता आहे

( ६ ) दुष्काळी मुलुखातील लागवडी व खतें ह्याविषयीं सशोधन मोठ्या प्रमाणावर होणें जरूर आहे

( ७ ) हिंदुस्थानातील शेतीविषयक सशोधनकार्याची हिंदुस्थानाबाहेर विशेषशी माहिती नाहीं. ही उणीव दूर करण्याच्या दृष्टीनें, झालेल्या सशोधनाची अधिकृत टाचणें कौन्सिलनें प्रसिद्ध करीत जावीं.

---

### हिंदुस्थानांतील दवाखाने व इस्पितळे

१९३५ अखेर हिंदुस्थानात पाश्चात्य पद्धतीचीं औषधें देणाऱ्या इस्पितळांची व दवाखान्याची सख्या ६,७०० होती ह्यापैकीं फक्त ८ टक्के इस्पितळें व दवाखाने खासगी खर्चानें चालविलीं जात होतीं, बाकीच्याचा खर्च सरकार, म्युनिसिपालिट्या, जिल्हा लोकलबोर्ड अगर रेल्वेज हीं करीत होतीं ४०,१८५ लोकसख्येस १ इस्पितळ असें प्रमाण पडलें एकूण ७ कोटि, ८५ लक्ष लोकांस औषधोपचार करण्यात आला. इस्पितळाचा फायदा घेणाऱ्या पुरुष रोग्याचे मानानें स्त्री रोग्याचें प्रमाण शेकडा ४० टक्क्यांनीं कमी होतें प्रत्येक प्रांतात परिचारिकाची सख्या गरजेच्या मानानें अत्यल्प आढळली इस्पितळातील ११ लक्ष, ७१ हजार रोग्याची शुश्रूषा करण्याकरितां फक्त ३,८७९ हजार परिचारिकाची नेमणूक झालेली होती सर्व इस्पितळावर मिळून ३ कोटि, ९२½ लक्ष रु खर्च झाला, त्यापैकीं १ कोटि, ८७ लक्ष रु सरकारनें दिले व १ कोटि, ४९ लक्ष रु म्युनिसिपल व स्थानिक स्वराज्य सस्थाच्या फडांतून मिळाले.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA

— मनपसंत काम —
वक्तशीर-पणाची ] रिसवूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें

RELIABLE STENOGRAPHERS
AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

The Co-operators' Book Depot.
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

## इंग्रजी लघुलेखनाचा मोफत वर्ग

पुणें येथील मराठी केंद्र ही संस्था दर वर्षी दिवाळीचे सुट्टींत इंग्रजी लघुलेखनाचा मोफत वर्ग काढीत असते यदाचा दिवाळीचे सुटींतील मोफत वर्ग गुरुवार तारीख १४ आक्टोबर पासून दसऱ्याचे मुहूर्तावर सुरू होणार आहे या मोफत वर्गामध्यें इंग्रजी लघुलेखन अगदी मोफत शिकविलें जातें. साधारणत तीन महिन्याचा अभ्यासक्रम फक्त २५ दिवसात सपविण्याचे चालकानीं ठरविलें आहे या वरील विषयाची महाराष्ट्रिय तरुणा मध्यें फारच अनास्था दिसून येते म्हणून या विषयाची व्यापारी-दृष्ट्या महति व त्याची सुभलता या गोष्टी प्रौढ विद्यार्थ्याना पटवून देण्याकरिताच सदर मोफत वर्गाची योजना आहे ज्याना या सधीचा फायदा घेणें असेल त्यानीं चालक, मराठी केन्द्र, हुजूरपागेसमोर, यास भेटावें.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बॅंक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) .. | १२०—६ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०५–११ |
| ४% १९४३ . .. | १०८—४ |
| ३½% बिनमुदत . ... .. ... | ९७–१५ |
| ३½% १९४७–५० . ... ... | १०६—९ |
| २¾% १९४८–५२ . ... | १००—१ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरटी व लाब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) .. ... | १०९—० |
| ४% मुबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... . | १२३—० |

### मंडळ्याचे भाग

( कसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भाडवल व कसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इडिया (१००—५०) १०% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११७—० |
| सेंट्रल बँक ऑफ इडिया ( ५०—२५ ) ६% .. | ३०–१२ |
| इपीरिअल बँक ( ५० ) १२% ... .. | १५४१—४ |
| बॉबे प्रॉ को. बँक ( ५० ) ५% ... .. | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... . | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% .. ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रातज (५००) १०% व ६ रु ४ आ. बोनस | ९५७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६३–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १०% .. ... | १३४–११ |
| कराची ( १०० ) ९% .. .. | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% . ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४७५—० |
| आध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% .. ... | १६१०—० |

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application *General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ **तुळजाराम मोदी** यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचें दुकान
रत्नागिरीच्या हपूस आंब्याची शक्तिवर्धक **आंबा बर्फी**
ओगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकू
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका तिष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करू शकत नाहींत किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते —
**धी इंडो फॉरिन एजन्सीज** ( डिपार्टमेंट न ६ )
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशीव पेठ, पुणें शहर

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Office* throughout India & the East

S. C MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## स्पेशल स्टमक ट्रीटमेंट

# पांढरें-सत्त्व किंमत १। रु.

## मलशुद्धी टॅबलेट्स कि. ८ आ

या दोन औषधाच्या मदतीनें पोटातील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, कर्पट ढेंकर येणें, छातीतील जळजळणें, मोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे.

**डॉ. बी. आर. गुणे**
पुणे २



## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हास लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद का पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चोकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४.
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्य' अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २० आक्टोबर, १९३७ अंक ४२

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वत च्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २७, किंवा प्रथम ६८८ व दरमही ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रक्कमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगाव, मुबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २.

## दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,

मॅनेजिंग डायरेक्टर




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

— मनपसंत काम —

वक्तशीर-पणाची ] **रिसबूड ब्रदर्स-टेलर्स** [ गॅरंटी

सदाशिव हौदानजिक, पुणें

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

**श्री. आर. एन. अभ्यंकर,** बी ए, एलएल बी,

मॅनेजिंग एजंटस्,

**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड**

६११ बुधवार पेठ, पुणे नं २.

**महाराष्ट्रांतील** प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे

किं. १ रु. ( ट. ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

# विविध माहिती

### डायमंड टोबॅको कंपनी

अंधेरी येथें डायमंड टोबॅको कंपनीचा उद्घाटन समारंभ श्री. जयसुखलाल मेथा ह्यांचे हस्तें झाला. घरगुती धंद्यांच्या उत्कर्षास कंपनीचें सहाय होईल अशी अपेक्षा आहे. मोत्यांचे व हिऱ्यांचे व्यापारी, शेट सोमचंद शहा, ह्यांनीं वरील कंपनीची मालकी मिळविली आहे

### ३२ तासांत १२५० मैल प्रवास

हिंदुस्थानचें टपाल घेऊन आगबोट दर आठवड्यास शनिवारीं मुंबई बंदरांतून सुटते. बंगालच्या बाजूचें टपाल मुंबई मेलमध्यें कलकत्त्याहून गुरुवारीं रात्रीं निघतें गेल्या आठवड्यांत खराब हवा व पाऊसपाणी ह्यांमुळें टपालाच्या थैल्या हौरा स्टेशनवर मेलगाडीच्या वेळीं पोहोचूं शकल्या नाहींत म्हणून सात तास उशीरानें खास डब्यांतून टपालाची रवानगी करण्यांत आली आणि त्यानें १२५० मैलांचें अंतर ३२ तासांत तोडलें. ह्या टपालास नेहमीपेक्षा फक्त २½ तास उशीर झाला.

### जपानी मालाच्या व्यापाऱ्यांस आश्वासन

जपानी मालाची आयात करणाऱ्या हिंदी व्यापाऱ्यास, मागविलेला माल वेळेवर येऊन दाखल होईल किंवा नाहीं ह्याविषयीं भीति वाटत असल्याचें मुंबई येथील जपानी वकिलाचे निदर्शनास आल्यावरून त्यानीं खुलासा प्रसिद्ध केला आहे. जपान व चीन ह्यांमधील तंट्याचा जपानच्या निर्गत व्यापारावर प्रतिकूल परिणाम होणार नाहीं व माल मागविणारांनीं निर्धास्तपणें व्यवहार करावा, असें जपानच्या वकिलानीं त्यांत आश्वासन दिलें आहे.

### त्रावणकोरमध्यें कागदाच्या कारखान्यास अनुकूल परिस्थिति

त्रावणकोर सस्थानांत कागद तयार करण्यास योग्य असा राधा देणारें गवत मुबलक असून त्यापासून दरसाल ८ ते १० हजार पौंड रांधा निघावयास हरकत नाहीं, असा अभिप्राय डेहराडून फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटचे तज्ञ, श्री भार्गव, ह्यांनीं दिला आहे.

### असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि च्या भागांस स्टॉक एक्चेंजमध्यें परवानगी

हिंदी सिमेंट कंपन्यांचें एकत्रीकरण होऊन स्थापन झालेल्या "असोसिएटेड सिमेंट कंपनीज् लि" ह्या कंपनीच्या भागाची स्टॉक एक्सचेंजवर रोखीनें व वायद्यानें विक्री करण्यास नेटिव्ह शेअर 'ॲन्ड स्टॉकब्रोकर्स असोसिएशनच्या डायरेक्टरबोर्डानें परवानगी दिली आहे. २१ ऑक्टोबरपासून ह्या व्यवहारास प्रारंभ होईल.

### हिंदी वानरांची निर्गत

गेल्या वर्षी हिंदुस्थानातून २२,५४४ वानरें निर्गत झालीं. १९३१ सालीं १६,२२० वानरें परदेशीं गेलीं होतीं. ही निर्गत सालोसाल वाढत आहे.

### कराची बंदराची प्रगति

कराची बंदरास १९३६-३७ हें वर्ष चांगलें गेलें. आयात-निर्गत व्यापार वाढला व खर्च वजा जाता पोर्ट ट्रस्टला ३ लक्ष, १० हजार रुपयांचा वाढावा उरला. अहवालाचे सालीं ९६९ विदेशी आगबोटींनीं बंदरांत नांगर टाकला. कपाशीच्या १८ लक्ष, ८१ हजार गासड्या बंदरांतून निर्गत झाल्या. इतकी कपास ह्यापूर्वी कधींच निर्गत झाली नव्हती. गव्हाची निर्गतहि बरीच वाढली.

### अविवाहितांवर पोलंडमध्यें कर

पोलंडमध्यें प्रत्येक तीन मुलींपैकीं एकीचा विवाह होत असल्यानें अविवाहित स्त्रियांची संख्या वाढत आहे ह्यावर उपाय म्हणून अविवाहित तरुणावर खास कर बसवण्याचें तेथील सरकारनें ठरविलें आहे.

### इंग्लंडमध्यें तंबाखूची लागवड

तंबाखूच्या लागवडीचा प्रयोग इंग्लंडमध्यें करण्यात येत आहे.

### सिंध कॉटन असोसिएशन लि

कपास कापडाच्या जिनिंगचे कारखाने काढणें व कपासाविषयक इतर व्यवहार करणें ह्या उद्देशानें वरील कंपनीची स्थापना झालेली आहे. सिंधमध्यें कपाशीच्या लागवडीत झपाट्यानें वाढ होत असल्यानें ह्या धंद्यास तेथें उत्कृष्ट वाव आहे. सिंधू नदीच्या दक्षिण तीरावरील म्हणजे उत्तर सिंधमधील मोठ्या प्रदेशांत जिनिंगचा धंदा करण्याचा सिंध कॉटन असोसिएशनला ५ वर्षेपर्यंत एकमेवाद्वितीय अधिकार सरकारकडून मिळालेला आहे. शहादादकोट येथें पहिली जिनिंग फॅक्टरी उभारण्यात येईल.

### चीन-जपान युद्ध व हिंदी कपास गिरण्या

जपान चीनशीं लढण्यात गुंतलें असल्याकारणानें जपानी कापडाची हिंदुस्थानात होणारी आयात मर्यादित होईल व त्याचा फायदा हिंदी गिरण्यास मिळेल, अशी अपेक्षा आहे. हें युद्ध किती काळ टिकेल, ह्यावर सर्व अवलंबून आहे.

### युरोपांतील सर्वांत लांब पूल

डेनमार्कच्या राजेसाहेबानीं एका पुलाचें नुकतेंच उद्घाटन केलें. हा पूल युरोपांतील इतर कोणत्याहि पुलापेक्षां लांब आहे. त्यास एकूण २½ कोटि रु खर्च आला. हा पूल ब्रिटिश स्थापत्यतज्ञांनीं बांधला. त्यास २० हजार टन पोलाद लागलें, तें सर्व ब्रिटिश बनावटीचें घेण्यात आलें.

### हिंद-ब्रिटन व्यापारी करार

आज अनेक महिने रेंगाळत चाललेलीं हिंद-ब्रिटन व्यापारी कराराविषयक बोलणीं संपत आलीं असून, दोन्हीं पक्षांनीं आपले अखेरचे मसुदे सादर केले आहेत. करारातील अटी उभयतांस मान्य होऊन त्या लवकरच प्रसिद्ध केल्या जातील अशी अपेक्षा आहे.

### तंबाखूच्या उपयोगांत इंग्लंडचा वर नंबर

निरनिराळ्या स्वरूपांत तंबाखूचा उपयोग करण्याच्या संबंधींत जगातील सर्व राष्ट्रांमध्यें ग्रेटब्रिटनचा चौथा नंबर लागतो.

### बॉंबे लाइफ ॲशुअरन्स कं. लि.

३१ डिसेंबर, १९३६ अखेर वरील कंपनीकडे ५ कोटि, १४ लक्ष रुपये किंमतीचे २८,२८९ विमे चालू होते, म्हणजे तीन वर्षांपूर्वीच्या मानानें हे आकडे ६७ टक्क्यांनीं मोठे आहेत. १९३६ अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनांत ९३ लक्ष रुपयांचा वाढावा आढळला. विमेदारास ८½ लक्ष रुपये बोनसचे रूपानें वाटण्यात आले. भागीदारास १०% दरानें डिव्हिडंड मिळालें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| ३-१०-३७ ते ९-१०-३७ | २६,१६,७५२ |
| १०-१०-३७ ते १६-१०-३७ | १७,५४,७१४ |
| २१-९-३१ ते १६-१०-३७ | २०४,८७,२४,३१२ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५१६ | ६ कपास कापडाच्या गिरण्यांची प्रगति ... | ५२१ |
| २ कर्जफेड–तहकुबी | ५१७ | ७ असेंब्लीच्या बैठकीचें सिंहावलोकन ... | ५२१ |
| ३ पदवीधरामधील बेकारी–इंग्लंड व हिंदुस्थान | ५१८ | ८ सहकारी चळवळ .. | ५२२ |
| ४ स्फुट विचार ... किमान मजुरीचे दर—पैशाची बचत करा–जपानचा चीनशीं व्यापार—मादाम सुसुकी–रेल्वे अधिकाऱ्याची परिषद्–आरोग्याच्या विम्याच्या योजना. | ५१९ | ९ हिटलर राजवटीचे आर्थिक कार्यक्रम ... ... | ५२३ |
| | | १० दक्षिण हिंदुस्थानांतील गिरण्या ... ... | ५२४ |
| | | ११ जर्मनीमधील कराचा बोजा ... ... | ५२४ |
| | | १२ हिंद–जपान व्यापारी करार | ५२४ |
| ५ चहाचा खप ... | ५२१ | १३ निवडक बाजारभाव | ५२५ |



# अर्थ

बुधवार, ता २० आक्टोबर, १९३७


## कर्जफेड–तहकुबी (मॉरेटोरिअम्)

प्रांतिक सरकारनें शेतकरी वर्गाची सांपत्तिक हलाखी दूर करण्यासाठी ज्या विशिष्ट गोष्टी तात्काल केल्याच पाहिजेत असें सुचवण्यात येत आहे, त्यांमध्यें कित्येकांनीं कर्जफेड-तहकुबीस अग्रस्थान दिलें आहे तहकुबीच्या मुदतींत कोणत्याहि सावकारास आपल्या कर्जदारावर स्वत:चा येणें पैसा परत मागण्यासाठी कायदेशीर इलाज करतां येऊ नये हा सदरहू योजनेचा उद्देश आहे. आर्थिक मंदीमुळें रिणकोंस सावकारांच्या देण्याची फेड करणें अशक्य झालें आहे त्यास स्वत:चा उद्योग करून पोटास पुरेल इतकी मिळकत होण्याची मारामार पडत असतां कर्जावरचें व्याज किंवा मुद्दलाचा अंश सावकारास देणें अशक्य व्हावें ह्यात आश्चर्य नाहीं. ह्या स्थितींत सावकारानें तरी काय करावें हा प्रश्नच आहे त्याचें येणें पूर्ण कायदेशीर असलें तरी कर्जाच्या परतफेडीचे बाबतींत तो हप्तेबंदी व इतर सवलती कदाचित् देईल परंतु ह्यापेक्षां कांहीं ज्यास्त करणें त्यास परवडत नाहीं किंवा इष्ट वाटत नाहीं. कर्जफेड शक्य तितकी लवकर व परिपूर्ण व्हावी अशी खटपट तो करणारच. हा त्याचा सरळ स्वार्थ आहे आणि त्यात भूतदयेचा प्रश्न येत नाहीं. सावकार भला किंवा सधन मनुष्य असेल तर रिणकोची अडचणीची स्थिति लक्षात घेऊन त्यास सवलती कदाचित् देईल. पण व्यवहार म्हटला कीं सामान्य मनुष्य आपल्या हक्काची अंमलबजावणी चोपून करण्यास मागें पुढें पहात नाहीं हा मनुष्यस्वभावच आहे कराराप्रमाणें रिणकोकडून कर्जफेड करून घेण्याची सवड व सोय कायद्यानें करून ठेविली आहे आणि ह्या व्यवस्थेचा उपयोग धनको अर्थातच करतो. जमीन-गहाणावर कर्ज दिलेलें असल्यास कायद्याचा आश्रय घेऊन तो ती विक्रीस काढतो आणि स्वहित साधण्यासाठी कायद्याच्या मर्यादेंत जें कांहीं करतां येणें शक्य आहे, तें तो केल्यावाचून रहात नाहीं. शेतकरी अशा पेचांत पडला असतां त्यास आपल्या उपजीविकेचें मूल्य साधन जी जमीन तिला मुकावें लागून बेकार मजूर बनण्याची त्यावर पाळी येते. शेतजमिनी बिनशेतकरी सावकाराच्या ताब्यात गेल्यानंतर त्यास त्या स्वत: कसतां न आल्या कारणानें शेतीच्या धंद्याची अनास्था होऊन पर्यायानें समाजाचें आर्थिक नुकसान होतें. शेतांचा मालक खंडकरी बनला म्हणजे दुसऱ्याचें शेत करण्यात त्याचें मन लागत नाहीं. सावकारास जमिनीच्या स्वरूपांत कर्जाचा पैसा परत मिळाला तरी ह्या रीतीनें पदरात पडलेलीं शेतें खंडानें देणें त्यास प्राप्त होतें आणि खंडाचा पैसा वसूल होण्याची पुन्हां पचाईत पडते, ती पडतेच, अशी स्थिति निर्माण होते.

ह्या तऱ्हेच्या आपत्तीवर तोडगा ह्या नात्यानें कर्जवसुली बाबतची कायदेशीर कारवाई धनकोस करता येऊं नये म्हणून कायदेशीर तहकुबी सुचवण्यात आली आहे शेतकऱ्याच्या देण्याची वसुली कडक व तडकाफडकी उपायानें करण्याच्या पद्धतीची अमलबजावणी शेतीच्या मोसमापर्यंत तहकूब व्हावी ह्या विषयींचा हुकूम मुंबई सरकारनें ह्या पूर्वीच काढला आहे. त्याची मर्यादा आकुंचित आहे हें उघड आहे. कर्जवसुलीचा ससेमिरा शेतकऱ्याच्या मागें कदाचित् जोरानें लागेल अशी भीति वाटण्यास जागा असल्यानें दीर्घकालिक आणि व्यापक स्वरूपाची तहकुबी जाहीर व्हावी असें ह्या सूचनेच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. शेतकऱ्यांच्या देण्याघेण्याचे संबंधात कॉंग्रेसचीं प्रधान मंडळें कांहीं तरी कडक उपाययोजना करणार आणि ह्या बाबतींत होणाऱ्या कायद्याचा रोख आपल्या पैशाच्या येण्यावर असणार अशी भीति वाटून सावकार लोक आपल्या कर्जदारांचे मागें पैशाच्या वसुलीचा लकडा लावणार आणि नवीन सरकारी धोरण अमलात येण्यापूर्वी कायदेशीर इलाज करून शेतकऱ्याच्या जमिनी वगैरे मालमत्तेवर गदा आणणार हें मनुष्यस्वभावास धरून पण अनिष्ट असल्यामुळें सरकारनें कर्जवसूल तहकुबीचा अंमल सरास करावा असा *त्याच्यामागें तगादा लावण्यांत* येत आहे. तहकुबीचा उद्देश व उपयुक्तता मान्य असूनहि तिचा परिणाम सरकार, रिणको वर्ग व एकंदर समाज ह्याचेवर काय होईल ह्याचा विचार करणें मात्र सार्वजनिक हिताचे दृष्टीनें अगत्याचें असतें हें विसरून चालणार नाहीं. दुर्धर रोगावर जालीम औषध द्यावें लागतें, हें खरें, परंतु तें अंगावर उलटूं नये म्हणून तोडग्यावरच्या उताऱ्याचीहि तजवीज शहाण्या माणसास वेळींच करावी लागते तहकुबीमुळें जनतेंतल्या परस्पर-विश्वासास धक्का बसून कर्जाचे व्यवहार बंद होणार हें स्पष्ट आहे शेतीच्या धंद्यास लागणारा पैसा न मिळाल्यास शेतकऱ्यानें काय करावें हाहि प्रश्न उभा रहातो. सावकारांनीं हात आखडते धरल्यास शेतकऱ्यास लागणारीं कर्जे तहकुबी जाहीर करणाऱ्या सरकारास वांटता येतील काय? तहकुबी एकदम जाहीर करता आली तरी पैशाच्या पुरवठ्याची व्यवस्था होण्यास कालावधि लागणें अपरिहार्य आहे. त्या मधल्या काळात शेतीस लागणारें भांडवल कोठून येणार आणि तें मिळण्यास शेतकऱ्यानें काय करावें? आई जेवू घालीना आणि बाप भिक्षा मागू देईना अशी त्यांची अवस्था होणार. तेव्हा, कर्जवसुलीच्या तोडग्याबरोबर त्यावरचा उताराहि तयार ठेवणें अगत्याचें आहे, हें स्पष्ट आहे. राष्ट्रावर एखादी भयंकर आपत्ती आली असतां सरकारास कांहीं देण्याघेण्याचे व्यवहार, मॉरेटोरियम म्हणजे कर्जवसुलीची बंदी अमलात आणून थांबवावे लागतात पण हे उपाय अगदी थोडा वेळ अमलांत राहून मामुली व्यवहार पुन्हां पूर्ववत् चालू होतील अशी व्यवस्था करण्यांत येते. किंवा कांहीं बाबतींत तहकुबी अधिक

कालपर्यंत टिकावयाची असल्यास तिचे दुष्परिणाम रिणको वर्गास आणि एकदर समाजास जाचक होणार नाहींत ह्या विषयीं काळजी घ्यावी लागते असें न झाल्यास "रोगापेक्षा औषधच अधिक वाईट" ठरण्याची भीति असते म्हणून कर्जवसुलीची तहकुबी जाहीर करावयाची तर तिला पूरक व परिपोषक अशा उपायाच्या योजना प्रांतिक सरकारानें तात्काळ हातीं घेतल्या पाहिजेत. त्यांची अमलबजावणी एकाच वेळीं होईल तर तहकुबीचा फायदा रिणकोच्या पदरांत पडून सामाजिक व्यवहारात गोंधळ उडणार नाहीं. आम्हीं तहकुबी जाहीर करतों, पुढें काय होईल तें पहाता येईल, असें कोणत्याहि जबाबदार सरकारास म्हणता येणार नाहीं. तहकुबीच्या औषधाबरोबर त्याचे अनुपान त्यास तयार करून ठेवावेंच लागेल. मुंबईच्या प्रधानमंडळास ह्या सर्व गोष्टींची चांगली जाणीव आहे अशी आमची समजूत आहे कर्जवसूलीच्या तहकुबीचे अनुषगानें सरकारनें शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणत्या विधायक योजना हातीं घेतल्या पाहिजेत ह्याचें विवेचन पुढें करू

## पदवीधरांमधील बेकारी—इंग्लंड व हिंदुस्थान

"एकदरीनें पहातां, शिक्षण व नोकरी ह्यांचा विजोड होतो, तो सोडून दिला असतां, विश्वविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या तरुणास मिळणाऱ्या व्यवसायावरून असें म्हणता येईल कीं, पदवीधराच्या शिक्षणावर खर्च करण्यांत येणाऱ्या पैशाचें चीज होतें, व्यवसायांत नवीन पडल्याबरोबर त्याची चागली माहिती होईतोंपर्यंत त्या लोकांनीं मोठ्या पगाराची अपेक्षा करतां कामा नये इतकेंच सामान्य पदवीधरास प्रारभीचा पगार दर महिना २००–२५० रुपये मिळेल, आणि तो ५००–६०० रुपयापर्यंत जाईल. साधारणपणें मिळकतीचें मान ह्याहिपेक्षा जास्त राहील आणि काहीं निवडक लोकाच्या प्राप्तीस तर मर्यादाच नाहीं!" ब्रिटिश पदवीधरांच्या स्थितीसबधानें एका तज्ज्ञ व जबाबदार लेखकानें वरील उद्गार काढले आहेत. त्यांवरून इग्लडमधील पदवीधर दैववान आहेत असें म्हटलें पाहिजे. त्याचा सुरवातीचा पगार तेथील राहणीच्या मानानें विशेष नाहीं हें मात्र लक्षात ठेवलें पाहिजे तथापि, येथें महत्त्वाची गोष्ट आहे ती विश्वविद्यालयातून शिक्षण सपवून बाहेर पडताच ब्रिटिश पदवीधरास सहज प्राप्त होणाऱ्या उद्योगाविषयींची आहे. वेतन बेताचें असेना, ब्रिटिश सुशिक्षित तरुणास काम मिळण्यास पंचाइत पडत नाहीं आणि हिंदुस्थानात ती पडते हा महत्वाचा फरक आहे ह्यासबधात ऑक्सफर्ड व केंब्रिज ह्या प्रसिद्ध विश्वविद्यालयाच्या पदव्या मिळवणाऱ्या तरुणाच्या नोकऱ्याविषयींचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, ते बोधप्रद आहेत. १९२६ ते १९३६ ह्या दहा वर्षांचे अवधींत २,९३४ ऑक्सफर्डच्या पदवीधरास कायमचा उद्योग मिळाला. त्यापैकीं ५२५ सरकारी नोकर झाले, ७८५ बॅकिंग व विमा व्यवसाय ह्यांत गेले, १३५ जणांनीं वृत्तपत्राचा व कारकुनी पेशा पत्करला आणि १,४५५ शिक्षण सस्थामध्यें शिरले. केंब्रिजच्या पदवीधरांपैकीं १९३२ ते १९३६ ह्या मुदतींत २,३५२ लोकास उद्योग मिळाला. त्यातले एक हजारांचेवर व्यापार व धदे ह्यांत व सुमारें तितकेच शिक्षणव्यवसायात शिरले. बर्मिंगहॅम विश्वविद्यालयाच्या पदवीधरांपैकीं ३०० लोक १९३५–३६ सालीं पोटाचा व्यवसाय करूं लागले त्यांतले १७३ शाळांत शिक्षक म्हणून घेतले गेले, ८१ लोकास उद्योगधंद्यात काम मिळालें आणि ४७ व्यापारात शिरले वरील आकड्यावरून असें दिसून येईल कीं, इग्लडमध्यें उच्च दर्जाचें शिक्षण घेऊन पदवी मिळवणारांस शिक्षणसस्थात, व्यापारांत, कारखान्यांत व इतरत्र नोकरी सहज लागते. त्या देशात सामाजिक प्रगति सारखी चालू असल्यानें सुशिक्षितास विविध प्रकारची मागणी असते आणि तिच्या मानानें पदवीधराचा पुरवठा इतका फाजील मोठा नसतो. विश्वविद्यालयातून बाहेर पडल्यावर फारच थोड्यां पदवीधरांस वर्ष–सहा महिने रिकामें रहाणें भाग पडतें. त्याचेपैकीं बहुतेकाची कोठें ना कोठें तरी कामाची सोय होते.

हिंदुस्थानात गेलीं कित्येक वर्षे प्राथमिक शिक्षणाच्या प्रसार जोरानें होण्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न झाल्या आहेत, ह्यामुळें पदवीधरास शिक्षणखातें व शिक्षणसंस्था ह्याचेमध्यें काम मिळणें कठीण झालें आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणाची सख्या ह्या देशाप्रमाणें पाश्चात्य देशातहि वाढत आहे आणि आर्थिक मंदीचा परिणाम बेकारी उत्पन्न करण्यात तिकडेहि झाला आहे. पदवीधरामध्यें बेकारी माजू लागल्याकारणानें जर्मन सरकारानें विश्वविद्यालयीन शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या तरुणांची संख्या मर्यादित केली आहे. ही संख्या १९३२ मध्यें तीस हजार होती, ती १९३४ मध्यें सोळा हजार झाली. इंग्लडमध्यें सामान्यतः पदवीधर फार वेळ बेकार राहिले असें क्वचित् घडतें. पदवीधरांस काम मिळवून देण्याचे कामीं संघटित प्रयत्न तेथें करण्यांत येत आहेत. विश्वविद्यालयांनीं हिंदुस्थानांत असा उपक्रम अलीकडे चालू केला आहे, परतु तो विशेष फलदायक झाला आहे, असें दिसत नाहीं. शिक्षण एका हेतूनें व विशिष्ट प्रकारचें घ्यावें आणि काम मिळतें तें दुसऱ्याच प्रकारचें अशी तक्रार इंग्लडमध्यें बरीच ऐकूं येते हिंदुस्थानांत हा प्रकार नेहमींच घडतो. विलायतेंत कारखाने व व्यापारी आणि शिक्षणसंस्था व पदवीधर ह्यांचा परस्पर-संबंध घडवून आणण्यात येत आहे आमचेकडे ह्या दोहोंमध्यें भली मोठी खिंड आहे. उद्योगधंद्यांत सुशिक्षित माणसांचा व पदवीधराचा चागला उपयोग होतो ही भावना ब्रिटिश कारखानदार व व्यापारी ह्याचेमध्यें दृढमूल होत आहे, ते आपल्या उद्योगांतील नोकरवर्ग पदवीधरांमधून निवडून घेतात आणि विश्वविद्यालयाचे अधिकारी व कारखान्याचे मालक ह्याचें सहकार्य चालतें. पदवीधर म्हणजे धंद्यामध्यें कुचकामाचा मनुष्य ही कल्पना आमच्या देशांत पसरली आहे, ती दूर होणें आवश्यक आहे. ह्या कामीं शिक्षणांत किंवा पदवीधरात दोष असतील ते निदर्शनास आणले जाऊन दूर व्हावे, हें उचित आहे आणि त्यासंबधातली आपली जबाबदारी शिक्षक व शिक्षित तरुण मंडळी ह्यांनीं उचलली पाहिजे. परंतु, त्याबरोबरच पदवीधराचेविषयीं धदेवाल्याच्या मनात वसत असलेला दुराग्रह नष्ट होणें अगत्याचें आहे शिक्षणपद्धति, पदवीधर, उद्योगधंदे व व्यापार आणि कारखानदार व व्यापारी ह्यास एकमेकांपासून अलग राहून भागावयाचें नाहीं. हे सर्व राष्ट्रीय व सामाजिक व्यवस्थेंतले परस्परावलंबी घटक आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. राष्ट्राच्या उन्नतीस पोषक अशी शिक्षणव्यवस्था असणें आवश्यक आहे, त्याप्रमाणेंच ह्या व्यवस्थेचा ज्यास्तींत ज्यास्त फायदा राष्ट्रीय प्रगतीस सहायकारक झाला पाहिजे. पाश्चात्य देशांत शिक्षण, बेकारी, सामाजिक प्रगति इत्यादि प्रश्नाचा व्यापक राष्ट्रीय दृष्टीनें विचार होतो, तसें आमच्या देशांत झालें पाहिजे.

## स्फुट विचार

### किमान मजुरीचे दर

अनेक शिलकीं कामें साचलेलीं असलीं आणि तीं निकालात काढण्याचें ठरलें म्हणजे विधायक काम करू इच्छिणाऱ्या माणसाची तारांबळ उडत असते. तसलाच प्रकार मुंबईतल्या व इतर प्रांतांतील प्रधानमंडळाचा झाला आहे शेतकऱ्याची स्थिति सुधारणें जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच गिरण्यांत व कारखान्यात मजुरीचें काम करणाऱ्या कामकरी वर्गाचीं गाऱ्हाणीं दूर करणें अगत्याचें आहे शेतकरी वर्गाचे मानानें गिरणी कामगार अधिक संघटित असून त्यांच्या संघानीं चळवळींचें आणि मजूर वर्गाच्या तक्रारी वेशीस टांगण्याचें कार्य पद्धतशीर रीतीनें चालविलें आहे. मोठमोठ्या कारखान्यांतील कामकरी लोक निर्जीव यंत्रेंच बनत असतात आणि गिरणी मालकाच्या हातात आर्थिक सत्ता एकवटली असल्यानें कामगारास मिळेल तें वेतन स्वीकारून पडेल तें काम, मेईल त्या परिस्थितींत करणें भाग पडतें कामकरी वर्गाच्या हिताचें संरक्षण करण्याची जबाबदारी ह्याच कारणानें सरकारवर येऊन पडते आणि फॅक्टरी ॲक्टासारखे कायदे करून सरक्षणाचा हेतु साध्य करून घ्यावा लागतो कामाचे तास, मजूरीचे दर, सुट्याचे व विश्रांतीचे दिवस इत्यादि अनेक बाबींसबधात कायद्याचें नियत्रण घालणें हें आता जगभर राज्यकर्त्यांचें कर्तव्य समजलें जातें आणि ह्या नियमास हिंदुस्थान देश अपवाद नाहीं शेतकरी वर्गाच्या दु:स्थितीचें निवारण करण्याच्या प्रश्नाबरोबरच गिरणी कामगाराच्या गाऱ्हाण्याची दाद लावणें मुंबई सरकारास आवश्यक आहे प्रांतिक प्रधान मंडळानें कापड गिरण्यांतील काम करणाऱ्या कामगाराच्या मजुरीचा प्रश्न प्रामुख्यानें हातीं घेतला असून त्याची छाननी करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे मजुरीचे योग्य व किमान दर ठरवण्याचें काम सोपें नाहीं. त्या सबंधात निश्चित मतें बनविण्यास अनेक गुंतागुंतीच्या बाबींची चौकशी करावी लागेल कारखानदारांचा फायदा, सामान्य जनतेवर पडणारा कापडाच्या किंमतीचा बोजा, मजुरीचा सयुक्तिक दर ठरवण्याची अडचण इत्यादि बाबी वादग्रस्त व निर्णय करण्यास कठीण अशा आहेत तथापि, त्याचा परामर्श घेतला जाऊन कामकरी वर्गास न्याय मिळणें नि:संशय अगत्याचें आहे.

### पैशाची बचत करा

मनुष्य श्रीमान असो वा गरीब असो, बचतीचें महत्त्व सर्वांस सारखेंच आहे गरीब लोकास तर तें विशेष आहे. बचतीच्या सार्वत्रिक सवयीनें व्यक्तींचा फायदा होतो, तसाच राष्ट्राचाहि होतो. शेती, धंदे, व्यापार इत्यादि व्यवसायांस भांडवल लागतें आणि त्याचा संचय समाजांत जेवढा अधिक तितकी राष्ट्राची आर्थिक उन्नति ज्यास्त सुलभ बचतीची रकम मोठी आहे का लहान आहे ह्याबाबतचा हा प्रश्न नसून आपल्या कमाईतून, अल्प प्रमाणांत का होईना, पैसा बाजूस काढून ठेवण्याच्या सवयीचा आहे आमचे इकडे पोस्टल व इतर सेव्हिंग्ज बँक्स, कॅश सर्टिफिकिटें, सहकारी संस्था ह्याचेमध्यें बचत करून रकमा घालण्याची प्रवृत्ति वाढत आहे, तिचा विस्तार अधिक जोरानें व्हावयास पाहिजे आहे. बचतीबाबतची चळवळ व लोकशिक्षण सतत चालू असणें आवश्यक आहे लहान मुलांमुलींस, प्रौढ विद्यार्थ्यांस, गरीब व मध्यम स्थितींतल्या कुटुंबांस बचतीचें वळण लागलें असतां त्याचा सुपरिणाम आर्थिक प्रगतीवर नि:संशय होईल इंग्लंडसारख्या श्रीमान राष्ट्रास बचतीचें महत्त्व वाटतें ह्यावरून दरिद्री हिंदी लोकांनीं योग्य बोध घेणें आवश्यक आहे राष्ट्रीय बचतसमिती ही ब्रिटिश संस्था ह्यासबधांत प्रचार चालवून त्याविषयींची माहिती प्रसिद्ध करते महायुद्ध सपल्यावर राष्ट्रीय बचतीची आवश्यकता राहिली नाहीं ही काहीं जणाची कल्पना खोटी ठरून मंदी असो, चलती असो, बचतीची सवय ब्रिटिश राष्ट्राच्या अंगवळणीं पडली असल्याचें दिसून येतें निरनिराळ्या प्रकारच्या सेव्हिंग्ज बँकामध्यें मिळून ब्रिटिश जनतेची आजमितीस १८२५ कोटि रुपये इतकी बचत आहे, आणि केवळ गेल्या सालीं सुमारें ९० कोटि रुपये इतकी बचतीच्या रकमेंत भर पडली गरीब वर्गास बचत करा असा उपदेश करणें विपरीत दिसतें, हें खरें. पण बचत सापेक्ष आहे आणि ती प्रत्येकानें आपापली परिस्थिति, शक्ति व सधि ह्यास अनुसरून केली पाहिजे.

### जपानचा चीनशीं व्यापार

चीनच्या उत्तर विभागात बळजबरीनें प्रवेश करून तेथें आपलें उद्योगधंद्याचें व व्यापाराचें बस्तान बसवावयाचें असा जपानचा हेतु आहे त्यास अनुसरून जपानी व्यापार उत्तर चीनमध्यें पसरला तरी ह्या दोन राष्ट्रामधील स्नेहसबधात बिघाड झाल्याकारणानें चीन देशाशीं होणाऱ्या जपानच्या देवघेवीस जोराचा धक्का बसल्यावाचून रहाणार नाहीं. चीनशीं जपानचा व्यापार स्वाभाविकपणें फार मोठ्या प्रमाणावर चालत आला आहे तो ह्यापुढें घटल्यावाचून रहाणार नाहीं आपला कच्चा माल जपान्याच्या हातीं पडूं न देण्याची खबरदारी चिनी राष्ट्र घेत आहे आणि जपानी मालास चीनमध्यें मज्जाव होणार हें ठरल्यासारखेंच आहे. केवळ दंडुक्याच्या जोरावर परराष्ट्रांवर आपला व्यापार व उद्योगधंदे लादण्याचा जपानचा यत्न काहींसा यशस्वी दिसला तरी एका बाजूस होणाऱ्या फायद्यापेक्षा दुसऱ्या बाजूस त्या राष्ट्राचा तोटाच अधिक होणार आहे.

### आरोग्याच्या विम्याच्या योजना

पचवीस वर्षामागें ब्रिटिश जनतेच्या आरोग्याविषयींच्या विम्याचा उपक्रम झाला, तेव्हापासून ह्या योजनेची प्रगति अत्यत समाधानकारक रीतीनें झाली आहे ह्या पचवीस वर्षांच्या अवधींत ग्रेटब्रिटनमध्यें १३/४ कोटि लोकाचा आरोग्यविषयक विमा उतरलेला असून त्याच्या आजारीपणात औषधाच्या व शुश्रूषेच्या खर्चासाठीं ८९० कोटि रुपये वाटण्यात आले आहेत. आरोग्य विमा फंडात उपयोग करता येईल असा २५० कोटि रुपयाचा निधि शिल्लक आहे विम्याच्या योजनेचा विस्तार करण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार असून मुलें शाळा सोडून उद्योगात शिरतात, तेव्हा त्यास काम मिळण्यात कालावधि जातो, त्या मुदतींत ह्या तरुणासहि विम्याचा फायदा मिळावा अशी योजना आहे. आजारीपणात जनतेच्या प्रकृतीची काळजी घेण्याची व्यापक तजवीज ग्रेट ब्रिटनमध्यें आहे तशी जगात दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं असे उद्गार आरोग्यमंत्रि, सर किंग्सले वुड, ह्यानीं आरोग्याच्या विम्याचें ज्युबिलीचें निमित्तानें नुकतेच काढले. आजारी माणसाची शुश्रूषा व जनतेचें आरोग्य ह्याचे बाबतींत हिंदुस्थान किती मागसलेला आहे ह्याची कल्पना वरील माहितीवरून सहज येईल.

### रेलवे अधिकाऱ्यांची परिषद

हिंदुस्थानातील रेलवेजच्या अधिकाऱ्यांची सदतीसावी वार्षिक परिषद सिमल्यास गेल्या आठवड्यात भरली होती. तिच्यामध्यें वेजवुड कमिटीच्या रिपोर्टातील शिफारसींचा उल्लेख प्रामुख्यानें होणें स्वाभाविक होतें परिषदेंत सर सुलतान अहमद यानीं भाषण केलें, त्यात काहीं महत्त्वाच्या बाबींकडे त्यानीं लक्ष वेधलें. उतारू व माल ह्याच्या वाहतुकीचा वेग वाढवणें आणि रेलवेच्या नोकरानीं जनतेशीं सभ्यतेचें वर्तन ठेवणें ह्याविषयींच्या वेजवुड कमिटीच्या शिफारसींवर त्यांनीं जोर दिला रेलवेजच्या कारभाराबाबत जनतेचें मत प्रतिकूल असल्याचें सागून लोकाची सोय पाहून त्याच्याशीं प्रामाणिकपणानें व अदबीनें रेलवेजच्या नोकरानीं वागावें असा त्यानीं उपदेश केला हिंदी रेलवेजचें निवळ उत्पन्न हळहळु वाढत आहे आणि गेल्या वर्षाच्या मानानें आतांपर्यंत ३½ •कोटि रुपयानीं तें ज्यास्त आहे चीनमध्यें चाललेल्या युद्धाचा प्रतिकूल परिणाम हिंदी व्यापारावर व रेलवेजच्या उत्पन्नावर होण्याची भीति वाटत आहे, ह्यामुळें वरील वाढावा असाच टिकेल कीं नाहीं, हें सागता येत नाहीं. मोटारींची रेलवेजशी चाललेली स्पर्धा अजून कमी होत नाहीं, असें रेलवेबोर्डाकडे आलेल्या माहितीवरून दिसतें, ह्यावरून मोटारवहातुकीचें योग्य नियंत्रण करण्याची आवश्यकता असल्याचें सर सुलतान अहमद ह्यानीं प्रतिपादिलें रेलवेज व मोटारी एकमेकास पोषक असाव्या आणि त्यांमधील स्पर्धा देशाच्या आर्थिक उन्नतीस सहायकारक व्हावी ह्या तत्वाचा उच्चार करून हिंदुस्थान सरकार, प्रांतिक सरकाराच्या सहकार्यानें मोटार वाहतुकीच्या नियंत्रणाबाबत कायदा करणार आहे तो इष्टफलदायी होईल अशी सदिच्छा त्यानीं प्रकट केली रेल्वे परिषदेचे अध्यक्ष, सर मॉरिस ब्रेशे, ह्यानींहि शेवटीं उल्लेखिलेल्या प्रश्नाची चर्चा आपल्या भाषणात केली रेलवेजचे भाडवल रूळ, पूल, व स्टेशनें ह्यामध्यें अडकून पडल्यानें त्यास विनबुडाच्या मोटारींच्या धंद्याशी चढाओढ करणें कठीण होतें असें त्यानीं सागितलें रेलवेजच्या कारभारात नुकसान येणार नाहीं, अशा बेतानें त्यास वहातुकीचा हिस्सा विभागून द्यावा आणि बाकीचा मोटारींनीं उचलण्यास हरकत नाहीं, अशी त्यांची सूचना आहे

---

### मादाम सुझुकी

आधुनिक आर्थिक घटनेंत धंदे–व्यापारात हुशार व दक्ष पुरुषासच नव्हे, तर स्त्रियासहि संपत्ति कशी कमावता येते ह्याचें उदाहरण म्हणून एका जपानी बाईची हकीकत इंग्रजी साप्ताहिकांत प्रसिद्ध करण्यात आली आहे मादाम सुझुकी ही आज जपानमधीलच नव्हे, तर सबंद जगातील सर्वांत श्रीमंत स्त्री आहे लहानपणापासूनच तिला व्यापाराची आवड होती ४० वर्षामागें पतिनिधनानतर तिनें आपली सर्व जिंदगी उद्योगधद्यात गुतविली एका तागाच्या कारखान्याचे भाग, किंमतींत चढ–उतार होईल त्याप्रमाणें विकून अगर खरेदून तिनें फायदा कमावला व अखेर तिला त्या कपनीच्या डायरेक्टरबोर्डावर जागा मिळाली तिनें तागाच्या गिरण्या खरेदी केल्या, आगबोटकपन्याची मालकी मिळविली, वर्तमानपत्राच्या कपन्या स्थापल्या व अशा रीतीनें व्यापारी जगांत पहिल्या प्रतीचें स्थान संपादन केलें जपाननें युद्धात उडविलेल्या प्रत्येक गोळ्याबरोबर इकडे मादाम सुझुकीच्या संपत्तींत भर पडत आहे! पतीच्या संपत्तीनें श्रीमंत झालेल्या स्त्रिया जगात अनेक आहेत, परंतु स्वतःच्या कर्तबगारीनें पैसा कमावणाऱ्या स्त्रियात मादाम सुझुकीची बरोबरी कोणास करता आलेली नाहीं

---


## कर्तबगारीची कमाल—

असेंच जनता म्हणूं लागली आहे.
रोज १ लाख
या प्रमाणांत विमे उतरणारी, देशभक्तांनीं अत्यंत प्रेमानें सहकार्य केलेली हिंदी विमा संस्था म्हणजेच

**भारत इन्शुअरन्स कं. लि.**

हेड ऑफिसः—लाहोर.
(स्थापना १८९६)

| | |
|---|---|
| भाडवल | .. २ कोटी ७० लक्ष रु पेक्षां जास्त |
| विमाफंड | : ..१ कोटी ८० — „ — |
| क्लेम्स दिले | १ कोटी ४१ — „ — |

६७॥ रु. ] त्रैवार्षिक बोनस [ ५२॥ रु.

पेट्रनः— डॉ रवींद्रनाथ टागोर
डायरे बोर्डाचे चेअरमन.— श्री शेठ रामकृष्ण दालमिया
प्रांतिक बोर्ड चेअरमन — दे भ के एफ् नरीमन.

महाराष्ट्रातील सर्व ठिकाणी एजंटस् व संस्थानात स्पेशल रिप्रेझेंटेटिव्हज् नेमणें आहेत वजनदार इसमानीच अर्ज करावे योग्य इसमास उत्कृष्ट अटी व भरपूर कमिशन
माहितीसाठीं लिहाः—
डॉ आर. के गवंडे
ब्रँच सेक्रेटरी
भारत इन्शुअरन्स कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २



## ऐक्य

ऐक्य संपादन मंडळाचें नियतकालिक
**दर रविवारीं प्रसिद्ध होतें**
संपादक.—न गं जोशी बी. ए, एलुएल् बी.
वा. व. फक्त २ रु. १२ आ.
गांवांत २ रु
स्वतत्र व नि:पक्षपाती राजकारण, सामाजिक व औद्योगिक वगैरे विषयावर माहितीयुक्त व अभ्यासपूर्ण लेख, महत्त्वाचें व विविध शहर, जिल्हा आणि संस्थानवृत्त आणि प्रसंगोचित व नानाविध चित्रें याबद्दल या पत्राची प्रसिद्धि आहे
जाहिरातीचें उत्तम साधन
लिहा किंवा भेटा —मॅ ऐक्य, सातारा



## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

### चहाचा खप

बाजारभाव स्थिर व किफायतशीर रहावे म्हणून चहाचें उत्पादन व पुरवठा धंदेवाल्यानीं सगनमतानें मर्यादित केला आहे. ह्या योजनेंत चहा पिकवणारे प्रमुख देश सामील झाल्यानें त्या धंद्यास अलीकडे बरेंच स्थैर्य प्राप्त झालें आहे. १९३६-३७ सालीं ८३ कोटि पौंड वजनाच्या चहाची एकूण निर्गत झाली हिंदुस्थानचा नंबर चहाच्या निर्गतीमध्यें सर्व जगांत पहिला लागतो. वरील ८३ कोटि पौंडापैकीं ३० कोटि पौंड चहा हिंदुस्थानांतून बाहेर गेला, २० कोटि पौंड सिलोनहून गेला आणि जाव्हाच्या बाजूनें सुमारें १५ कोटि पौंड गेला ह्या तीन देशाच्या चहाच्या निर्गतीची बेरीज सुमारें ६६ कोटि पौंड भरली. बाकीचे १७ कोटि पौंड चीन, जपान, फोर्मोसा इत्यादि देशातून निर्गत झाले त्यात चीनचा हिस्सा ९ कोटि पौंड होता. जागतिक मागणीच्या मानानें चहाचें जागतिक उत्पादन अधिक असल्याकारणानें त्याच्या पुरवठ्याचें नियमन करणें धंदेवाल्यास प्राप्त झालें आहे, आणि ह्या कामीं त्यास बरेंच यशहि आलेलें आहे. ग्रेटब्रिटन व अमेरिका हीं राष्ट्रें चहा पिणारीं आहेत आणि हिंदुस्थान व सिलोन चहा पिकवणारीं राष्ट्रें आहेत.

### कपास कापडाच्या गिरण्यांची प्रगति

गेलीं काहीं वर्षें साखरेच्या धंद्यानें लोकाचें व सरकारचें मन आकर्षून घेतलें आहे, तथापि ह्या काळामध्यें कपास कापडाच्या धंद्यानें केलेल्या प्रगतीकडे पुरेसें लक्ष पोंचलेलें नाहीं. १९३० ते १९३५ ह्या मुदतींत ह्या धंद्यानें मिळविलेल्या यशाविषयीं खाली आकडे दिले आहेतः—

| वर्ष (३१ ऑगस्ट-अखेर) | गिरण्याची संख्या | गिरणीकामगाराची रोजची सरासरी संख्या | कपाशीचा उठाव गासड्या (३९२ पौंडाची १ गासडी) |
|---|---|---|---|
| १९३१ | ३१२ | ३ लक्ष, ९५ हजार | . २६ लक्ष |
| १९३२ | ३१४ | ४ लक्ष, ३ ह | २९ ल. |
| १९३३ | ३११ | ४ लक्ष | २८ ल |
| १९३४ | ३२० | ३ लक्ष, ८५ ह | २८ ल |
| १९३५ | ३३६ | ४ लक्ष, १५ ह. | ३१ ल. |

आर्थिक मदीच्या पूर्वीच्या काळातील उत्पादनाचे मानानें आता उत्पादन ६०% वाढलें आहे सध्या ह्या धंद्यास मिळत असलेलें संरक्षण ३१ मार्च, १९३९ अखेर चालू रहाणार आहे त्यानंतर तें चालू ठेवावयाचें किंवा कसें ह्या प्रश्नाचा विचार टारिफ बोर्डाकडे सोंपविण्यात येईल

### असेंब्लीच्या बैठकींचे सिंहावलोकन

मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या नुकत्याच संपलेल्या सिमला येथील अधिवेशनात सभेच्या एकूण ३५ बैठका झाल्या, त्यापैकीं १९ बैठका विमा बिलावरील चर्चेनें घेतल्या. सभातहकुबीच्या एकूण ५१ सूचना पाठविण्यात आल्या, त्यापैकीं फक्त ५ सूचनास चर्चेची परवानगी मिळाली. ह्या पाचापैकीं चार सूचना सरकारच्या विरोधास न जुमानता पास झाल्या एकूण २१ वेळा मतनोंदणीचे प्रसग आले, त्यापैकीं १२ वेळा सरकारविरोधी पक्षाची सरशी झाली

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी यांचे
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हूपूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयाची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

*For All Medicinal Requisites*
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS
City Post Office Corner POONA, 2

स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टरसं मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते—
धी इंडो फॉरिन एजन्सीज (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

# सहकारी चळवळ

**नादगांव येवला तालुका को सुपरवायझिंग यूनियन लि.**

या यूनिअनला नादगांव व येवला तालुक्यांतील मिळून २९ सोसायट्या सामील आहेत पैकीं नांदगाव तालुक्यात बहुतेक पैशाचें पीक खरीप हंगामात येते रब्बीचे पीक फारसें नाहीं येवले तालुका मात्र दोन्ही हंगामाचा उपभोग घेणारा आहे नादगांव तालुका एकेरी हगामाचें पीक घेणार असल्यानें या तालुक्यांत वसुलाला सुरवातहि लवकरच होते. अर्थात् मेंबरांनीं सोसायटीत वसूल दिला म्हणजे त्याच्या गरजा भागविण्यासाठी त्याना सोसायटींतून नवीन कर्ज घ्यावें लागतें व तें मिळण्याची व्यवस्था लवकर व्हावी यासाठी सोसायटीचा कमाल मर्यादा तक्ता लवकर तयार झाला पाहिजे ही गोष्ट मुख्य आहे. याकरिता कमाल मर्यादा तक्ते तयार करून पाठविण्याची माहिती देणेसाठी व चालू हगामी पीक, माव व वसुली यावर विचारविनिमय व चर्चा करणेसाठी ता. २४-९-३७ रोजीं यूनिअनचे ऑफिसात एक छोटिशी सभा भरविली होती. त्या सभेस श्री वामनराव गोविंदराव पाटील प्रेसिडेंट तालुका यूनीअन, श्री. के. के. कोष्टी सुपरवायझर व श्री एस एस. जोशी बँक इन्स्पेक्टर नादगाव शाखा व नादगाव तालुक्यातील सर्व ग्रुप सेक्रेटरी हजर होते. या सर्वांनीं विचारविनिमय करून चालू सालीं वसुलीचें धोरण ठरवून सर्वांनीं एकत्रित प्रयत्न करून वसुलावर भर द्यावा असें सर्वांनीं ठरविलें व कमाल मर्यादा तक्त्याचें काम एकमेकानीं एकमेकाच्या सहाय्यानें पार पाडावें असेंहि ठरलें

**मुं. प्रॉ. को बँक, लि०, पालघर शाखा**

वरील बँकेच्या पालघर शाखेची सहावी वार्षिक साधारण सभा ता ११-१०-३७ रोजीं पालघर येथें शाखेच्या ऑफिस हॉलमध्यें श्री. व्ही. पी वर्दे, बी कॉम मुबई, याचे अध्यक्षतेखालीं भरली होती सभेस प्रॉव्हिन्शियल बँकेचे सुपरिन्टेंडेंट श्री. एस. जी देवधर, जिल्हा इन्स्टिट्यूटचे प्रोपागेंडा ऑफिसर, तालुका यूनिअनचे सुपरवायझर, चिचणी हायस्कूलचे प्रिन्सिपॉल श्री. जी एन शहा व कल्याण भागाचे सिनिअर इन्स्पेक्टर श्री एम डी चावडा इत्यादि अधिकारी, सोसायट्याचे प्रतिनिधि व स्थानिक सहकारी चळवळीचे पुढारी हजर होते सभेंत मेंबरांच्या व इतर शेतकऱ्यांच्या हिताचे असे अनेक महत्त्वाचे ठराव जरूर त्या चर्चेनंतर पास झाले.

**बॉबे प्रॉ को इन्स्टिट्यूट ( शाखा सोलापूर )**

या सस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापूर येथें इन्स्टिट्यूटच्या ऑफिसात ता २-१०-३७ रोजीं सायकाळीं सहा वाजता भरली होती सभेस एकदर प्रतिनिधि ९६ व प्रेक्षक मिळून सुमारें २०० लोकसमुदाय हजर होता

रीतीप्रमाणें कामास सुरवात झाल्यावर, मागील सालचा अहवाल व ताळेबद मजूर करण्यात आला व पुढील सालाकरितां कार्यकारी मडळ निवडण्यात आलें.

श्री. गणपतराव एकनाथराव पाटील हे चेअरमन व श्री एम एम. गव्हाणे, बी. ए, एलएल बी. हे ऑ सेक्रेटरी निवडले गेले.

सदर सस्थेचे माजी चेअरमन श्री. जी डी साठे यानीं गेल्या ४।५ वर्षांत चेअरमन या नात्यानें केलेल्या कामगिरीचा श्री. गव्हाणे यांनीं गौरवपर उल्लेख केला व शेवटीं नवीन निवडून आलेले चेअरमन मि जी. ई पाटील यानीं सर्व प्रतिनिधींनीं एकमतानें त्याची चेअरमनचे जागीं निवड केली याबद्दल आभार मानले व सभा सपली.

**थ्रिफ्ट सोसायट्यांचा उपयोग**

सहकारी चळवळीस उत्तेजन मिळावें म्हणन महाराष्ट्र को. थ्रिफ्ट सोसायटी लि. नें 'थ्रिफ्ट सोसायट्यांचा उपयोग' ह्या विषयावर निबध मागवून सर्वांत उत्तम ठरणाऱ्या निबधास २५ रु. पर्यंत उत्तेजनार्थ बक्षीस देण्याचें ठरविलें आहे. निबंध पाठविणारा इसम कोणत्याहि सहकारी सोसायटीचा सभासद असला पाहिजे निबध मराठींत अगर इंग्रजींत असावा व त्याची लाबी सुमारें ५०० ओळी असावी निबध स्वीकारण्याची मुदत ३१-१-१९३८ अखेर आहे सोसायटीनें नेमलेल्या चिकित्सा मडळाकडून निबधाची परीक्षा केली जाईल. जो निबध पसत पडेल, त्यावर महाराष्ट्र को. थ्रिफ्ट सोसायटीचा पूर्ण हक्क राहील. निबध, चेअरमन, महाराष्ट्र को. थ्रिफ्ट सोसायटी, लि. C/o पुणें सें. को बँक, लि. पुणें २ ह्या पत्त्यावर पाठवावेत.

**बार्शी तालुका ॲ को. क्रे. ॲन्ड सेल सोसायटी, लि.**

**( वार्षिक सभा : ता. २४-१०-३७ )**

शेतकऱ्याच्या मालाची विक्री किफायतशीर घडवून आणण्याचा व्यवहार करणाऱ्या वरील सोसायटीचे कामकाजावर शेतीच्या पिकाचा परिणाम होणें अपरिहार्यच आहे. अहवालाचे वर्षी आगाताचें पीक मुळींच न आल्याकारणानें हें साल सोसायटीस अडचणीचें गेलें. शेंगदाण्याचे विक्रींत मोठी घट पडली, तशीच तुट हरबरे, तुरी वगैरे मालातहि आली ज्वारीचे विक्रींत मात्र बरीच वाढ झाली एकूण ४६ गावचा माल सोसायटीकडे विक्रीस आला. मागील सालातील ओढलेला नफा धरून अहवालाचे सालअखेर सोसायटीस ६४८ रु. नफा झाला, त्यातून भागीदारास ५% डिव्हिडड ( ४०७ रु. ) द्यावें, अशी मॅ. क. ची शिफारस आहे. सोसायटीची, प्रतिकूल परिस्थितींतहि, समाधानकारक प्रगति होत आहे.

## राष्ट्रसंघाच्या असेंब्लीचें १८ वें अधिवेशन

**हिंदी प्रतिनिधींच्या नेमणुका**

राष्ट्रसघाच्या असेंब्लीचें १८ वें अधिवेशन १३ सप्टेंबरपासून जिनीव्हास सुरू झालें आहे. यदा हिंदी प्रतिनिधींचें प्रमुख नेक नामदार आगाखान यांना अध्यक्षपद देण्यांत आलें आहे. असेंब्लीचें काम नेहमीच्या पद्धतिनुसार निरनिराळ्या पाच समितींमध्यें विभागण्यात आलें आहे व त्यावर हिंदी प्रतिनिधींची खालील प्रमाणें नेमणूक झाली आहे १. कायदा—सर डॅनिस ब्रे, मदतनीस:—सर गोविंदराव प्रधान, २ आरोग्य, आहार, दळणवळण, अर्थशास्त्र वगैरे:—दिवाण बहादुर पंडित धर्म नारायण, मदतनीस—सर गोविंदराव प्रधान, ३ अदाजपत्रक:—सर गोविंदराव प्रधान, ४. सामाजिक विभाग.—दिवाण बहादुर पडित धर्म नारायण, व ५ बौद्धिक कार्य.—सर डॅनिस ब्रे, मदतनीस:—दिवाण बहादुर पडित धर्म नारायण. हे प्रतिनिधि इतर राष्ट्रातील प्रतिनिधींच्या बरोबर सहकार्य करून आपआपल्या विषयाबद्दल असेंब्लीला शिफारसी करतील

## हिटलर राजवटीचे आर्थिक पराक्रम

जर्मनीमध्यें अधिकारारूढ असलेल्या नात्सी पक्षानें आपलें राष्ट्र आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करण्याचा चंग बांधून एक चतुर्वार्षिक योजना हातीं घेतली आहे. त्या पक्षाच्या सभेंत, नात्सी पुढाऱ्यांनीं ह्या योजनेच्या बाबतींत काय पराक्रम केले याची वर्णनें लक्षावधि जर्मन नागरिकास ऐकवलीं आहेत. त्यांत, बेकारी कमी झाली, व्यापार वाढला, लोकांची मिळकत पूर्वीपेक्षा अधिक झाली, कारखान्यांचा विस्तार झाला, नवीन प्रकारचा माल जर्मनींत निघूं लागला, इत्यादि बाबींविषयींचे आकडे दिले आहेत, ते मनोरंजक आहेत. पांचापेक्षां अधिक मजूर ज्यात कामावर आहेत अशा जर्मन कारखान्यांची संख्या १९३२ मध्यें २,०६,००० होती, ती १९३६ सालीं २,५४,००० इतकी झाली. गेल्या चार वर्षीत जर्मन उद्योगधंद्यात, ३,००० कोटि रुपयांच्या वर रकमेच्या भाडवलाची उलाढाल झाली. ह्या अवधींत दहा लक्ष नवीं घरें बांधण्यात आलीं. त्याचप्रमाणें जर्मन उद्योगधंद्यांतल्या उत्पादनाची किंमत ३½ हजार कोटि रुपयांवरून ६½ कोटि रुपयांवर चढली. चालू सालीं हा आकडा ७ हजार कोटि रुपये इतका होईल असा अदाज आहे. जर्मन जनतेची एकूण मिळकत ४,५०० कोटि रुपयाची ६,८०० कोटि रुपये झाली आहे करांचें उत्पन्न १९३२ मध्यें ६०० कोटि रुपये होतें, तें आतां १००० कोटि रुपये झालें असून चालू वर्षी तें पूर्वींच्या आंकड्याच्या दुप्पट होईल दुसऱ्या कित्येक देशात भाकरीची किंमत वाढली आहे पण जर्मनींत ती स्थिर राखण्यात आली आहे जर्मनींतल्या शेतीच्या वार्षिक उत्पन्नात १०० कोटि रुपयाची भर पडली आहे. सर्वच पिकांच्या पैदाशींत वाढ झाली आहे आणि जनावरांची सख्याहि वाढली आहे मोटारींच्या वहातुकीस उपयोगी पडतील असे हजारो मैल लांबीचे रस्ते तयार झाले असून लक्षावधि टन सिमेंट त्या कामीं खर्च झालें आहे. ह्या रस्त्यांवरून मोटारी मोठ्या वेगानें जाऊं शकतात आणि त्यांस पेट्रोल कमी पुरतें.

---

## लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें

नामदार पाटील, स्थानिक-स्वराज्य व उद्योगधंदे खात्याचे मंत्री, यांनीं नामदार बापूसाहेब गुप्ते, पार्लमेंटरी सेक्रेटरी, यांचे समवेत पुणें येथील लॉर्ड रे इडस्ट्रियल म्यूझियम या सस्थेस ता. १५-१०-३७ रोजीं भेट दिली. संस्थेचें औद्योगिक व व्यापारी वाचनालय, पेटन्ट व रजिस्टर यासबंधींचे हिंदुस्थान सरकारचे येथें असलेलें वाङ्मय, माहिती-विभाग, नियतकालिक प्रदर्शनें इत्यादि गोष्टींचीहि नामदारसाहेबांनीं बारकाईनें पाहणी केली. औद्योगिक संग्रहालयें, त्यातील प्रात्यक्षिकें व त्यांचीं इतर उपयुक्तताप्रचुर कार्यें यांचें महत्त्व हा संग्रहालय पाहून नामदारसाहेबांना उत्तम प्रकारें पटलें.

---

## पोंच

संघशक्ति (चीन अंक):—जपानच्या चीनवरील आक्रमणामुळें चीन देशाविषयीं सर्वांस कुतूहल वाटूं लागलें आहे. चीनमधील धडामोडींचें आकलन होण्यास जरूर ती पार्श्वभूमि तयार करण्याचें काम हा अंक चांगलें करील.

## धि मिरज स्टेट बँक लि , मिरज

वरील बॅकेची आठवी साधारण सभा रविवार ता. १०-१०-३७ रोजीं बँकेचे चेअरमन श्री बी के जोशी, दिवाण मिरज सिनियर स्टेट, याचे अध्यक्षतेखाली भरली होती ऑडिटर्सनीं तपासलेला ताळेबद व नफातोटा-पत्रक हीं सभेनें एक मतानें मजूर केलीं.

अहवालाचे सालीं बॅकेस तिच्या २० हजार रु. भाडवलावर निवळ नफा रु १४६१०८८४ व मागील सालचा नफा रु ७३८३८१० मिळून रुपये १४६८३८४८२ ची वाटणी मे. बोर्डाचे शिफारशीप्रमाणे एकमतानें करण्यात आली. निम्यापेक्षां जास्त रकम सशयित कर्जफेडीकडे जमा करण्यांत आली आहे याशिवाय रिझर्वफड, इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फड, डिव्हिडड ईक्वलायझेशन फंड, इमारत फड, इत्यादि स्वरूपाच्या फडाकडे नफ्याची रकम वर्ग केलेली आहे. अहवालाचे सालअखेर बँकेनें दरसाल दर शेकडा पांच टक्केप्रमाणें डिव्हिडंड दिलेलें आहे व याप्रमाणेंच कायम डिव्हिडड देतां यावें म्हणून बॅकेनें चालू साली डिव्हिडड ईकलायझेशन फडाची तरतूद केलेली आहे.

बँकेकडील एकूण ठेवी रु. १०,१६,०१८ च्या असून रिझर्व्ह फंड रु. १०,०००, बॅडडेट फड रु. ४६,००० व इतर रुपये ५,४०० मिळून सुमारे रु. ५१४०० चे वर फंडाचा आकडा गेलेला आहे. बॅकेचें एकूण खेळतें भाडवल रु ११,२८,६९९ असून त्यापैकीं मुख्यतः सरकारी कर्जरोख्यांत सुमारे रुपये ४,१६,४५० गुंतविलेले असून कॅशक्रेडिट व लोनमध्यें सुमारे ३,३२,६७५ वे सोनेगहाण व स्थावर मिळकत तारणावर सुमारे रु. १,४७,६२६ गुतविलेले आहेत

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर
मशिनरीचा पहिला हप्ता मुंबईस आला
दहा लक्ष रुपयांची साखर
सिंडिकेटच्या जमिनी चांगल्या असल्यामुळें
हंगामशीर लागणीने दर एकरीं ४५ टन ऊंस
सहज येऊं शकतो, असा प्रत्यक्ष अनुभव
आला आहे
साखरेचे भाव उतरले तरी
५ ते १० टक्के नफा.
सविस्तर माहिती व शेअरफॉर्म मागवा.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट
लिमिटेड.
२५७ बुधवार पेठ, पुणें

अर्थशास्त्र
लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द्द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

### दक्षिण हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्या

दक्षिण हिंदुस्थानातील कपाशीच्या मुलुखात कापडाच्या गिरण्या भराभर निघू लागल्या आहेत. मद्रास, म्हैसूर व त्रावणकोर ह्यांच्या सरकारांनीं पाण्याच्या प्रवाहापासून वीज निर्माण करणारीं मोठीं वीजगृहें स्थापन केल्यामुळें कारखान्याच्या स्थापनेस चालना मिळालेली आहे. दक्षिण हिंदुस्थानात प्रथम ब्रिटिश लोकानीं कापडाच्या गिरण्या काढल्या, त्यांचा कित्ता स्थानिक व्यापाऱ्यांनीं गिरविला आतां पुनः विदेशी व्यापारी ह्या मुलुखाकडे लक्ष देऊ लागले आहेत. त्रावणकोर संस्थान ससूनला सर्व तऱ्हेनें सहाय देत आहे बहुतेक सर्व नव्या-जुन्या गिरण्या सूत काढणाऱ्याच आहेत हातमागावर कापड विणणारे लक्षावधि विणकरी हें ह्या गिरण्यांचें गिऱ्हाइक होय नवीन गिरण्यांत बसविली जात असलेली यंत्रसामुग्री बहुशीं जर्मन बनावटीची आहे

### जर्मनीमधील करांचा बोजा

जर्मनीमध्यें कराचा बोजा सालोसाल वाढत आहे. शक्य त्या निरनिराळ्या प्रकाराचे कर लोकावर बसविण्यांत आले आहेत कामगाराच्या मजुरींतून त्याचेवर बसवलेला कर कापून घेण्यात येतो. हीं पट्टी किती भारी असते, ह्यासबधीं एक उद्बोधक संवाद एका ब्रिटिश साप्ताहिकांत प्रसिद्ध झाला आहे:—"एके दिवशीं पगार मिळाल्यानंतर एक जर्मन कामगार दारूच्या दुकानात गेला व त्यानें तीन पिंट दारू फस्त केली. त्याच्या स्नेह्यास हें पाहून अचंबा वाटला व तो म्हणाला, "मेहेरबान, ह्या दारूचें बिल आपण कसें भागवणार?" "कांहीं काळजी करूं नको," कामगारानें उत्तर दिलें, "मी आणखीहि दारू मागवितों आज माझ्या पगारातून कराची रकम कापण्याऐवजीं चुकून मालकानें तीच मला दिली व मला मिळावयाची बाकी त्यानें ठेवून घेतली!"

### हिंद-जपान व्यापारी करारावर मामुली शिक्कामोर्तब

हिंद-जपान व्यापारी करारावर ता. १२ ऑक्टोबर रोजीं हिंदुस्थानतर्फे मि अँथनी ईडन व जपानतर्फे बॅरन योशिडा ह्यांनीं सह्या केल्या व करारावर शिक्कामोर्तब झालें हिंदुस्थान व जपान ह्यामध्यें १९३४ सालीं झालेला करार रद्द होण्याविषयीं हिंदुस्थान सरकारनें ऑक्टोबर १९३६ मध्यें नोटीस दिली होती व त्याप्रमाणें ३१, मार्च १९३७ रोजीं ह्या कराराची मुदत संपली नवीन करारातील अटी दोन्ही देशाच्या प्रतिनिधींमध्यें हिंदुस्थानांत ठरल्या, तरी करारावर मामुली शिक्कामोर्तब होण्याचें राहिलें होतें, तें लंडनमध्यें गेल्या आठवड्यांत झालें. हिंदुस्थानतर्फे ब्रिटिश परराष्ट्रीय मंत्र्यानीं सही केली आहे, ही गोष्ट हिंदुस्थानच्या आर्थिक दास्यत्वाची निदर्शक आहे.

### दर हलके केले, म्हणजे वहातुक वाढेल

रेल्वेजवरील वहातुक किफायतशीर करण्याचा प्रयत्न सर्वच देश करीत आहेत इटलीनें तिकिटाचे दर कमी करून वहातुक वाढविण्याची खटपट चालविली आहे परदेशातून येणाऱ्या पाहुण्यास निम्मा दर, सुट्या, प्रदर्शनें, यात्रा इत्यादींचे प्रसंगीं सवलतींचे दर, नूतन विवाहित वधूवरांस विशेष स्वस्त दर, इत्यादि मार्गांनीं इटली प्रवाशास आकर्षित आहे. हिंदी रेल्वेजनींहि आपला ताठपणा आता सोडला असून, प्रवासी जनतेच्या सोयीकडे लक्ष देण्यास आरंभ केला आहे व सवलतीच्या तिकिटांच्या योजना अमलांत आणल्या आहेत.


**औंध स्टेट सेंट्रल बँक. लिमिटेड. औंध.**

(स्थापना—८ आक्टोबर १९३२)

हेड ऑफिस—औंध (सातारा)

शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ व विंचूर स्टेशन.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टका व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्हीं मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात.

चेक, हुंड्या ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B R Vartak

मॅनेजर

**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**

(सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी.)

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो.—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री डी के जोगळेकर, बी ए,

ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,

टिळक रोड, पुणें (२)

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,४०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८२३ |
| इतर फंड | १,४०४ |
| मुदतबंद ठेवी | १,९१,५१३ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,९५९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,८०,५८६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रकम | ४१,५९९ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्जे देते

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १२०—६ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... .. | १०५—७ |
| ४% १९४३ ... .. .. ... | १०८—४ |
| ३½% बिनमुदत .. ... .. ... | ९८—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—९ |
| २¾% १९४८–५२ .. ... ... | १००—१ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११८—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३०–१२ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५५२—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२४—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद् प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९५०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १०% ... ... | १३२—३ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% ... ... | १४६५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% ... ... | १५८७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु . .. ... | १९२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ५०—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु ... ... ... | २८—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ. ... | ४४—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४७००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०१—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६७—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३५४—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ. ६ पै ... | १६५०—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्यक तोळ्यास ... ... | ३४–१२ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०–१५ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—५ |
| " केसर प्रत्येक मणास ... ... | ११–१ |
| " सरया प्रत्येक मणास ... ... | ११–० |


RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS

ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.

*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.


एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

R. B. Jog & Sons

Deccan Gymkhana, Poona 4




Big Stock of Shell Oils & Greases Motor Washing & Cleaning Motor Oiling & Greasing. Moderate Charges.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA

आवश्यकता है

बेबी इक बेचने के लिये हरएक शहरमें कनवेसरों की आवश्यकता है वेतन अक्कोर्डिंग टू सेल्स मिलेगी ट्राविलिंग व फूडिंग अलाऊंस भी मिलेगा. नियम बहुत सरल हैं ( नियमो के लिये एक आना का टिकट अवश्य भेजें )

—मैनेजिंग डाइरेक्टर साहब—

दी इंक्स मैनूफेक्चरिंग कम्पनी लि.

( स्थापित १९१६ ) अमीनाबादपार्क—लखनऊ

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट
पांढरें-सत्त्व किंमत १। रु.
मलशुद्धी टॅबलेट्स् किं ८ आ.

या दोन औषधाच्या मदतीनें पोटांतील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, करपट ढेंकर येणें, छातींतील जळजळणें, मोंवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे

डॉ. बी. आर. गुणे
पुणे २

गव्हाचे पोहे
(REGD.) ( BLOSSOM ) (REGD)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो

ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधातून खाता येतात

७५२ सदाशिव पुणें २ — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
५२।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेव्हिंग्ज बँक ठेवींवर द सा द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० — विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,२३,९०० — वसूल झालेलें भांडवल १,११,७४०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी,
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २७ आक्टोबर, १९३७ अंक ४३

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४, किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रक्मा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगांव, मुबई.
ब्रॅंच.—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

UNEMPLOYMENT . अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य




## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर
मशिनरीचा पहिला हप्ता मुंबईस आला

## दहा लक्ष रुपयांची साखर

सिंडिकेटच्या जमिनी चांगल्या असल्यामुळे हंगामशीर लागणीने दर एकरीं ४५ टन ऊंस सहज येऊं शकतो, असा प्रत्यक्ष अनुभव आला आहे

साखरेचे भाव उतरले तरी

५ ते १० टक्के नफा.

सविस्तर माहिती व शेअरफॉर्म मागवा

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.
२५७ बुधवार पेठ, पुणें

— म न प सं त का म —

वक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजन्टस् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधद्दे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे

किं. १ रु ( ट. ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

## अर्थाचा पुढील अंक

**दिवाळीच्या सुट्टीनिमित्त "अर्था" चा ता. ३ नोव्हेंबरचा अंक बंद राहील आणि त्यापुढचा अंक ता. १० नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल**

# विविध माहिती

### बँकांस सुटी

मंगळवार, बुधवार व गुरुवार ता. २, ३ व ४ नोव्हेंबर रोजीं दिवाळीनिमित्त बँका बंद राहतील

### ट्रेझरी बिलांवर १२ आणे दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आणे इतका पडला.

### सिलोनमधील हिंदी मजूर

सिलोनमध्यें मजुरी करण्याकरितां अनेक हिंदी लोक जात असतात त्या देशांत १९३६ अखेर ८ लक्ष हिंदी लोक होते. सिलोनमधील एकूण लोकसंख्येच्या मानानें हिंदी लोकांची संख्या एक सप्तमांश भरते. सिलोनी लोक आतां हिंदी लोक करीत असलेलीं कामें हातीं घेण्यास पुढें येऊं लागले असल्यानें सिलोनमध्यें पोट भरण्यास हिंदी मजुरांस पूर्वींइतका वाव ह्यापुढें रहाणार नाहीं.

### एका टायरला किती रबर लागतें ?

रबराच्या प्रत्येक झाडापासून सालिना पाच ते सहा पौंड शुद्ध रबर मिळतें. दोन झाडाच्या एका वर्षांतील रबरापासून मोटारीची एक टायर बनू शकते.

### सुएझच्या कालव्यामधील वहातुक

१ जानेवारी ते १० सप्टेंबर, १९३७ अखेर सुएझच्या कालव्यांतून ४,६४६ आगबोटी गेल्या व त्यांनीं सुमारें १० कोटि रुपये कालव्याचे कंपनीस कालव्याचा उपयोग केल्याबद्दल भरले. तत्सम मुदतींत गेल्या वर्षी ४,०५६ आगबोटींनीं ह्या कालव्याचा फायदा घेतला होता

### पॅकिंगचें प्रदर्शन

मालाचा उठाव होण्यास त्यावरील वेष्टनाची चांगली मदत मिळते. कित्येक वेळा, एकाच प्रतीचा जिन्नस वरील वेष्टनाच्या निरनिराळ्या प्रकारांमुळें कमी-अधिक किंमतीस विकला जातो. लंडन येथें नुकतेंच एक पॅकिंगचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरलें होतें त्यावेळीं व्यापाऱ्यांस व कारखानदारांस आपल्या प्रतिस्पर्ध्यांचे पॅकिंगचे नमुने पहावयास मिळाले ब्रिटिशांपेक्षा ब्रिटिशेतर कारखानदाराच्या पॅकिंगमध्यें तपशीलास अधिक महत्त्व दिलें असल्याचें आढळून आलें

### दररोज ७०० टन खडी फोडणारा कारखाना

परेळ येथें खडी फोडण्याच्या एका कारखान्याचें उद्घाटन गेल्या आठवड्यांत झालें. खाणींतील दगडापासून दररोज ७०० टन खडी फोडण्याची ह्या कारखान्यातील यंत्रांची क्षमता आहे.

### फोर्ड कारखान्याची वाढ

ग्रेटब्रिटनमधील डेट्रॉइट येथील आपल्या कारखान्याची वाढ करण्याकरितां फोर्ड मोटार कंपनी १०½ कोटि रु. खर्च करणार आहे.

### उसाच्या उठावाची पहाणी

हिंदुस्थानांतील उसाच्या साखरेच्या उठावाविषयीं चौकशी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक मार्केटिंग अधिकारी नेमला असून त्याचे हाताखालीं दोन सहायक दिले आहेत.

### हुंड्यांवरील स्टॅंप ड्यूटी कमी होणार

शेतीच्या व इतर देशी मालाबाबत काढलेल्या हुंड्यांवरील स्टॅंप फी कमी करून, अंतर्गत व्यापारास प्रोत्साहन देण्यांत यावें, असें करन्सी कमिशननें व बँकिंग कमिटीनें सुचविलें होतें. हिंदुस्थान सरकारनें ह्या सूचनेची अंमलबजावणी करण्याचें ठरविलें आहे.

### नामदार मुनशी व सौ मुनशी यांची रे-इंडस्ट्रिअल म्यूझियमला भेट

नामदार मुनशी, मुंबई प्रांतिक सरकारच्या कायदा व सुव्यवस्था खात्याचे मंत्रि आणि सौ. लीलावती मुनशी यांनीं पुणें येथील लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझियम या संस्थेस ता. २२-१०-३७ रोजीं भेट दिली. नामदारसाहेबांना संग्राहलय पहातांना फार आनंद वाटला आणि सर्व संग्रहालयाच्या उपयुक्ततेबद्दल त्यांचें मनावर उत्कृष्ट परिणाम झालेला दिसला.

### ब्रिटिश पोस्टखात्याच्या कार्यक्षेत्राची वाढ

पोस्टाविषयीं कोणतीहि माहिती पाहिजे असल्यास टेलिफोनवर ती मिळण्याची सोय लंडन शहरांत तेथील पोस्टखात्यानें केली आहे सर्व उत्तरें तत्परतेनें देण्यांत येतात व कांहीं माहिती पुरविण्यास थोडा वेळ पाहिजे असल्यास पुन. फोन करून पोस्टखातें शंकेचें समाधान करतें इंग्लंडातील इतर शहरातहि अशी सोय करण्यांत यावयाची आहे. किती वाजले, हें टेलिफोनवर सांगण्याची व्यवस्थाहि पोस्ट खातें करणार आहे.

### बायबलाचा खप

बायबल ह्या खिस्ती धर्मग्रन्थाचीं ७०० भाषांतरें प्रसिद्ध झालीं आहेत. ब्रिटिश अ‍ॅन्ड फॉरिन बायबल सोसायटीची स्थापना १८०४ सालीं झाली तेव्हापासून तिनें बायबलाच्या ५० कोटि प्रती वाटल्या आहेत अजूनहि ह्या पुस्तकास प्रचंड मागणी असते गेल्या वर्षी त्याच्या १ कोटि, १० लक्ष प्रती खपल्या.

### 'कोल्ड स्टोरेज'ची व्यापारी दृष्टीनें उपयुक्तता

फळें, मांसे, दुधदुभतें, इ. लवकर नासणाऱ्या जिनसा 'कोल्ड स्टोरेज'मध्यें कित्येक महिने चांगल्या स्थितींत राहू शकतात. 'कोल्ड स्टोरेज'मुळें मोसम नसला तरी जिनसाची मागणी पुरवतां येईल व त्याकारणानें व्यापारास व उद्योगधंद्यांस सहाय मिळेल. हिंदुस्थान सरकारच्या मार्केटिंग अ‍ॅडव्हायसरनें ह्या प्रश्नाबाबत समक्ष चौकशी करून सरकारास रिपोर्ट सादर केला आहे, त्यांत कोल्ड स्टोरेजच्या उपक्रमास हिंदुस्थानात मुबलक वाव असल्याचें म्हटलें आहे.

### बेकारी कमी होत आहे

सर्व सुधारलेल्या देशात बेकारांची नोंद ठेवण्याची पद्धति आहे. १९३७ च्या तिसऱ्या तिमाहींत नोंदलेल्या बेकारांच्या संख्येंत बरीच मोठी घट पडली असल्याचें राष्ट्रसंघानें प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टावरून दिसून येतें. गेलीं चार वर्षें ओळीनें बेकारीच्या आकड्यात सुधारणा आढळून येत आहे. हिंदुस्थानांतील बेकारांची गणति अर्थातच कोणीं केलेली नाहीं.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| १०–१०–३७ ते १६–१०–३७ | १७,५४,७१४ |
| १७–१०–३७ ते २३–१०–३७ | ६,९७,२८२ |
| २१–९–३१ ते २३–१०–३७ | ३,०५,०४,२१,५९४ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५२८ |
| २ सावकारी धंद्याच्या नियमनाचा कायदा ... | ५२९ |
| ३ मराठा चेंबरनें केलेला प्रधान मंडळाचा सन्मान | ५३० |
| ४ स्फुट विचार ... बाजाराच्या परिस्थितीचें सिंहावलोकन–हिंद-ब्रिटन व्यापारी करार–अमेरिकेच्या बाजारांत गडबड–वण्यांची शिक्षण परिषद्–आर्थिक मंदी व प्रतिकूल हुडणावळ ... | ५३१ |
| ५ धूम्रपान–तंबाखूचा धंदा | ५३३ |
| ६ सहकारी चळवळ... | ५३४ |
| ७ निवडक बाजारभाव | ५३६ |


# अर्थ

बुधवार, ता २७ आक्टोबर, १९३७

## सावकारी धंद्याच्या नियमनाचा कायदा

कर्जबाजारी व दरिद्री शेतकऱ्याची हलाखी दूर करण्याकरितां प्रांतिक सरकारनें अनेक विधायक व नियमनात्मक आर्थिक योजना एकसमयावच्छेदेंकरून हातीं घेणें आवश्यक असल्याचें मत आम्हीं व्यक्त केलें आहे. ह्या बाबतींतलीं अनेक बिलें प्रांतिक विधिमंडळापुढें सरकार येत्या जानेवारींत मांडणार असल्याचें प्रसिद्ध झालें असून सावकारी व्यवहाराच्या नियंत्रणाविषयींच्या बिलाची स्थूलमानाची रूपरेषाहि काहीं वर्तमानपत्रांत सूचित केलेली आहे. मुद्दल व व्याज ह्यांचे बाबतींतल्या सावकारांच्या कारवाया अडाणी शेतकऱ्यास भोंवतात, त्यांपासून गरीब व त्रस्त रिणकोंचें संरक्षण करण्याचे हेतूनें केलेला शेतकऱ्यांचा कायदा ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला कायदा मुंबई इलाख्यांत लागू आहे. रिणको शेतकऱ्याचे कर्जफेडीचे संबंधांत ह्या संबंद व्यवहाराची अथपासून इतीपर्यंत चौकशी करून योग्य दिसेल ती मुद्दलाची रकम व व्याज आणि हप्तेबंदीनें फेड आपल्या निकालात निश्चित करण्याचा अधिकार ह्या कायद्यानें कोर्टास दिला आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यास मिळत आहे खरा; पण हा कायदा असावा तसा व्यापक व परिणामकारक नाहीं. पाश्चात्य देशात व अलीकडे हिंदुस्थानातील कित्येक प्रांतात सावकारी व्यवहाराच्या नियंत्रणाविषयींचे कायदे करण्यात आले आहेत आणि त्यांचें क्षेत्र अधिक विस्तृत असें आहे. पंजाब, बंगाल व मध्यप्रांत ह्यांमधील कायदे विचारात घेण्यासारखे आहेत. मुंबई इलाख्यांत आता जुन्या पुराण्या शेतकऱ्यांच्या कर्जांच्या कायद्यावर किंवा त्याच्या दुरुस्तीवर विसंबून चालणार नाहीं. रिणको वर्गास मुख्यत्वेंकरून ज्या बाबतींत संरक्षण आवश्यक आहे, त्या सर्वांचा समावेश एकत्र होईल अशा प्रकारचा एक नवा कायदा होणें आवश्यक आहे.

सावकारी नियंत्रणाच्या कायद्यातलीं मुख्य अंगें येणेंप्रमाणें आहेत.—सावकाराची सुटसुटीत अशी व्याख्या बसवणें, सावकारांनीं आपल्या धंद्याबाबत परवाना काढणें किंवा आपलें नांव सरकारी यादींत नोंदवून घेणें, आपलें सावकारी देणें न्यायाधिशाकरवी चौकशी अंतीं निश्चित करून घेण्याचा हक्क रिणकोस देणें, दामदुप्पटीचा नियम कर्ज-फेडीच्या रकमेस लागू करणें, कोर्टमार्फत व्याजाचा दर निश्चित करून घेणें, व्याजाचा कमाल दर कायद्यानें ठरवणें, विशिष्ट प्रद्धतीनें हिशेब ठेवण्याची व रिणकोस दाखवण्याची सावकारावर सक्ती करणें, कर्जाची रकम कमी करण्याचा अधिकार कोर्टास देणें, रिणकोची विशिष्ट जिंदगी सावकाराच्या ताब्यात जाणार नाहीं अशी व्यवस्था करणें, इत्यादि. ह्या गोष्टींची तरतूद सावकारी व्यवहार रिणको वर्गास जाचक व अन्यायाचे होऊ नयेत म्हणून सामान्यतः कायद्यानें करण्यांत येते. सावकारांवर वरीलप्रमाणें अनेक निर्बंध घातले असता त्याचा धंदा बुडेल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. हा धंदा बुडण्यात शेतकरी व इतर गरजू वर्गांचेंहि हित नाहीं. उद्योगधंदे, व्यापार व शेतीचा धंदा ह्यांस खेळता पैसा लागतो आणि सामान्य जनतेस नडीअडीच्या प्रसंगीं कर्ज काढावें लागतें. हा पैसा सर्वस्वी सरकारमार्फत मिळूं शकत नाहीं तोंपर्यंत तरी तो पुरवणारा सावकारचा धंदा करणारा वर्ग प्रत्येक समाजात व देशात आवश्यक असतो आणि तो धंदा समाजास उपकारक असाच होतो जमीनदार व कित्येक शेतकरी आपल्या व्यवसायबंधूशीं सावकारी व्यवहार करतात त्यातलें रहस्य हेंच आहे. सावकारीचें कायद्यानें असें नियमन व्हावें कीं त्या योगानें प्रामाणिक व सरळ वृत्तीच्या धंदेवाल्यांचे व्यवहार सुरळीत चालण्यास अडचण पडू नये आणि लबाड व जुलमी सावकाराच्या मात्र कारवाया बंद पडाव्या. कर्जें देण्या-घेण्याचे व्यवहार धंदा म्हणून करणारा मनुष्य तो सावकार अशा आशयाची व्याख्या कायद्यांत केली जाते ह्याचें कारण उघड आहे. एखाद्यानें मित्रत्वाच्या, ओळखीच्या किंवा शरीरसंबधाच्या नात्यानें दुसऱ्यास पैशाची मदत केली असतां तो सावकार बनत नाहीं आणि सावकार म्हणून आपलें नांव नोंदून घेण्याची किंवा परवाना काढण्याची त्यास आवश्यकता असू नये नाव नोंदून घेतल्यावाचून धंदा करणारा सावकार दंडास पात्र होतो.

सावकारीचा धंदा करणारास परवाना काढावा लागण्याची तरतूद कित्येक ठिकाणच्या कायद्यात केलेली असते आपल्या इकडील परिस्थितींत नावनोंदणीची सक्ती करण्यांत आली असतां तूर्त कार्यभाग होईल असें वाटतें अनुभव येईल त्याप्रमाणें परवान्याची सक्ती करावी किंवा नाहीं हें ठरविता येईल कायद्यानें ठरविल्याप्रमाणें हिशेब ठेवणें, पावत्या देणें, दस्तऐवज करणें, व्याज आकारणें इत्यादि बाबतींत सावकारानें नियम पाळले पाहिजेत. ह्याची देखरेख होईल अशी काहीं तरी व्यवस्था अमलांत आणणें आवश्यक असल्यानें तिच्या व्यवहार्यतेचा विचार होणें आवश्यक आहे. नियंत्रणाचें उल्लंघन करणारांस शिक्षा कायद्यानें सांगितली जाणें व त्याची अमलबजावणी होणें अपरिहार्य आहे. सावकारी धंद्याचें नियमन होण्यासाठी करावयाचा कायदा केवळ शेतकऱ्याशीं व्यवहार करणाऱ्या सावकारापुरता नसून त्याच्या व्याप्तींत सर्व सामान्य व्याजबट्ट्याच्या व्यवहाराचाहि अंतर्भाव व्हावा लागेल. शेतकऱ्यास कर्जें देणारे आणि बिनशेतकरी लोकाशीं व्यवहार करणारे असा स्पष्ट भेद सावकारामध्यें करणें शक्य नाहीं, हें लक्षात ठेवलें पाहिजे शेतकरी वर्गास विशेष संरक्षण देण्यासाठी विशेष प्रकारची तजवीज निराळी करावी लागेल, इतकेंच. वर वर्णिलेल्या प्रकारचा व्यापक स्वरूपाचा कायदा सावकारी धंद्याचें नियमन करण्याकरितां झाल्यास शेतकरी व इतर गरीब वर्ग ह्याच्या दुःस्थितीचें निवारण होण्याच्या मार्गांतील एक मोठा अडथळा दूर होऊन आर्थिक सुधारणेचें कार्य सुकर होईल. असल्या कायद्यानें साध्य करावयाच्या विविध बाबींचें विवेचन पुढच्या लेखात करू.

## मराठा चेंबरनें केलेला प्रधान मंडळाचा सन्मान

गेल्या आठवड्यात मराठा चेंबर ऑफ कॉमर्सनें प्रांतिक प्रधान मंडळाच्या सन्मानार्थ उपहाराची थाटाची व्यवस्था पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत केली होती. मुख्य प्रधान श्री खेर, श्री. मोरारजी, डॉ. गिल्डर व श्री. पाटील उपस्थित होते श्री. बापूसाहेब गुप्ते आणि इतर पाहुणे मंडळीहि हजर होती. चेंबरचे अध्यक्ष, श्री. बाबासाहेब कामत, ह्यांनीं संस्थेच्या स्थापनेचा उद्देश स्पष्ट करून प्रधान-मंडळानें महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीस सहाय द्यावें असें सुचवलें. चेंबरच्या कार्यकारी मंडळाचे चेअरमन, प्रो. काळे, ह्यांनीं नंतर भाषण केलें, त्याचा साराश खाली दिला आहे.—

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

मराठा चेंबरच्या स्थापनेस तीनच वर्षें झालीं असलीं तरी मुंबईच्या प्रधान-मंडळाचा सन्मान करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. ह्याचें कारण असें आहे कीं, ह्या प्रांतात लोकांचें प्रतिनिधि व जनतेचा विश्वास असलेलें प्रधान-मडळ नुकतेंच पहिल्यादा अधिकारारूढ झालें आहे. लहान व मध्यम प्रतीच्या उद्योगव्यवसायास सहाय देऊन त्याचें संघटन करणें हा आमच्या चेंबरचा मुख्य उद्देश आहे. मुंबई इलाख्यातल्या निरनिराळ्या विभागांत नैसर्गिक आणि शैक्षणिक वगैरे परिस्थिति स्वाभाविकपणेंच भिन्न भिन्न आहे. तिचा परामर्श घेऊन आर्थिक उन्नतीचे पद्धतशीर प्रयत्न झाल्यावांचून आपल्या प्रांताची सर्वांगीण उन्नति व्हावयाची नाहीं सबंध राष्ट्राच्या हिताचे मोठमोठाले प्रश्न आम्हांस महत्त्वाचे वाटत असले तरी त्याचा विचार मुंबई शहरांतील मोठ्या व्यापारी मंडळावर सोपवून शेतीशी संलग्न झालेल्या व सुशिक्षित वर्गांनीं केले पाहिजेत अशा लहान व मध्यम दर्जाच्या उद्योगांकडेच मराठा चेंबर विशेष लक्ष पुरवतें. ह्या प्रकारच्या संघटनाची आणि प्रगतीची आवश्यकता महाराष्ट्रांत विशेष आहे, हें श्री. कामत ह्यांनीं सांगितलेंच आहे आणि त्याबाजूनें प्रगति चालू झाली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. महाराष्ट्रानें आजपर्यंत राजकारणात पुढारीपणाचा मान मिळवला आहे आणि त्याच्या जोडीस अर्थकारणाचाहि पिच्छा पुरविणें आता अगत्याचें वाटूं लागलें आहे. राजकारणास आर्थिक शक्तीचा पाठिंबा असला पाहिजे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

पैसाफंडाच्या काचशाळेचा उपक्रम स्वदेशाभिमान आणि धंदा ह्याचा योग्य प्रकारचा सांधा जोडण्यात कसा झाला आहे आणि त्याचा उपयोग कांचेच्या धंद्याच्या प्रगतीस किती झालेला आहे, हें सर्वश्रुतच आहे. किर्लोस्करांनीं लहान प्रारंभापासून मोठा कारखाना निर्माण केला आहे आणि ओगलेबंधूंनीं हरिकेन कंदील बनवण्यात विलक्षण साहस प्रकट केलें आहे. येथें जमलेल्या चेंबरच्या सभासदांमध्यें अनेकांनीं ह्याप्रमाणें अलीकडे निरनिराळ्या धंद्यात यश मिळवलें आहे, त्या सर्वांचा नामानिर्देश करणें येथें अशक्य आहे खेड्यांच्या परिस्थितीची पहाणी करून शेतास कोणते जोडधंदे योग्य आहेत ह्याचीहि चौकशी चेंबरनें चालविली आहे. महाराष्ट्रात मोठे भांडवलवाले नाहींत. ह्या दृष्टीनें धंद्यांची स्थापना विशिष्ट रीतीनेंच करावी लागणार आहे, हें लक्षांत ठेवून लोक आपापला कार्यक्रम पुरा करीत आहेत.

मुंबईच्या प्रधानमंडळानें शेतकरीवर्ग आणि सर्वसामान्य जनता ह्याच्या उन्नतीचा अवघड-प्रश्न हातीं घेतला असून त्यासंबधानें त्यांस किती कळकळ वाटते आहे हें आम्ही जाणतों. कॉंग्रेसच्या प्रधानमंडळास जनतेच्या हिताचीं कार्यें करण्याची उत्कंठा आहे, इतकेंच नव्हे तर त्या कार्यक्रमाच्या परिपूर्तीस लागणारें सामर्थ्यहि त्यात आहे. मुंबईचें प्रधानमंडळ आपल्या कामात किती वेळ व शक्ति खर्चीत आहे हें मी स्वतःच्या अनुभवावरून सांगू शकतों. आमच्या चेंबरच्या क्षेत्रांत येणाऱ्या कार्यांत प्रधान-मंडळास आमच्या शक्तीप्रमाणें सहाय देण्यास आम्ही तयार आहों, असें आश्वासन मी आजच्या प्रसंगीं देतों. व्यापाऱ्यांच्या अडचणी व गाऱ्हाणीं पुढें मांडण्याचें हें स्थान नव्हे योग्य वेळीं व योग्य मार्गानें चेंबर तें काम करील आणि प्रधान-मंडळाकडून जरूर तें सहाय व सहानुभूति आम्हांस मिळेल असा भरंवसा मला वाटतो. आपला अत्यंत बहुमोलाचा वेळ खर्चून आजची पाहुणीं मंडळी चेंबरच्या निमंत्रणास मान देऊन येथें आलीं ह्याबद्दल मी त्यांचे स्वागत पूर्वक आभार मानतों.

ह्यानंतर चेंबरचे चिटनवीस, श्री. आत्मारामपंत भट, ह्यांनीं मुख्य प्रधान व त्याचे सहकारी ह्यांचे चेंबरच्या वतीनें आभार मानले आणि लहान उद्योगधंद्यांस भांडवलाची मदत देण्यासंबधानें मुंबई सरकारनें कायदा करावा असे सुचवलें. ह्या कायद्याचा मसुदा तयार करण्याचें पूर्वतयारीचें कार्य चेंबर करील असेंहि आश्वासन त्यांनीं दिलें.

### मुख्य प्रधान श्री. खेर, ह्यांचें भाषण

प्रांतिक प्रधान मंडळाच्या वतीनें श्री. खेर ह्यांनीं आपल्या भाषणांत चेंबरच्या कार्याविषयीं समाधान व्यक्त केलें आपल्या पक्षाचा जनतेशीं इतका निकट व जिव्हाळ्याचा संबध आहे कीं प्रधान मंडळाच्या कार्यासंबंधानें लोकांमध्यें असमाधान उत्पन्न होण्याची आपणांस भीति वाटत नाहीं, असें श्री. कामत ह्याच्या उद्गारांस अनुलक्षून ते विश्वासानें म्हणाले कारकून उत्पन्न करण्याविषयीं महाराष्ट्राची कुप्रसिद्धी असली तरी मराठे एका काळीं राज्यकर्ते होते व राजकारणांत त्यांनीं पुढाकार घेतला ह्याची श्री. कामतांस आठवण करून देऊन आर्थिक उन्नतीच्या कार्यांतहि आतां ते लक्ष घालीत असल्यानें आज नाहीं उद्यां महाराष्ट्रीय लोक त्या मार्गानें प्रगति केल्यावाचून रहाणार नाहींत ह्याविषयीं आपणास शंका नाहीं असा अभिप्राय श्री. खेर यांनीं व्यक्त केला. मराठे लोक बुद्धिमान आहेत आणि त्यांनीं आपली बुद्धि व्यापारउदीमाकडे वळवली असता त्यास यश कां येणार नाहीं असे उत्साहवर्धक उद्गार काढून मराठा चेंबरचें सहकार्य स्वीकारून तिच्या कार्यास यथाकाल व यथायोग्य असें सहाय आपलें सरकार देण्यास मागें पहाणार नाहीं असें आश्वासन मुख्य प्रधानांनीं दिलें प्रधान मंडळ आजहि महाराष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञाचें सहाय साभार स्वीकारीत असल्याविषयीं त्यांनीं गौरवपूर्वक उल्लेख केला आणि चेंबराच्या पाठिंब्याबद्दल त्या संस्थेचे व इतर सर्वांचे आभार मानले.

**L. S. G. D CLASSES:**—The Poona Training Class has begun its work from 18-10-37. Admission available upto 1st November. Apply for the Prospectus to

Hon. Secretary & Treasurer,
MAHARASHTRA BRANCH
1867 Sadashiv, POONA 2.

## स्फुट विचार

### बाजाराच्या परिस्थितीचें सिंहावलोकन

मुंबईच्या मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं तिचे अध्यक्ष श्री बेगराज गुप्त ह्यांनीं आपल्या भाषणात हिंदुस्थानच्या व्यापारी व आर्थिक परिस्थितीचें सिंहावलोकन केलें, त्यांत जगाच्या व्यापारात गेल्या वर्ष दोन वर्षांत सुधारणा झाली आहे, तिचा उल्लेख करून पक्क्या मालाच्या मानानें कच्च्या मालासच तेजी आली आहे ह्याविषयीं समाधान व्यक्त केलें. लढाऊ सामानाच्या उत्पादनात कारखाने गुंतले असल्यामुळें ही स्थिति निर्माण झाली आहे आणि जगांत युद्ध केव्हा चालू होईल याचा नियम नसल्यामुळें ती किती वेळ टिकेल हें अनिश्चित आहे असें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या मतें महायुद्ध पुढेमागें उद्भवलें तरी त्याची तूर्त भीति बाळगण्याचें कारण नाहीं हिंदुस्थानांत सरकारानें लहानमोठ्या उद्योगधंद्यास सहाय देऊन जनतेची मिळकत वाढवणें आवश्यक आहे अशी त्यांनीं सूचना केली. अमेरिकन कपाशीचें पीक कल्पनेबाहेर मोठें आल्यानें बाजारभावांत झालेल्या आकस्मिक उताराचा उल्लेख करून श्री. गुप्त हिंदी कपास बाजाराच्या मदीच्या अवस्थेकडे वळले. यंदा हिंदुस्थानांत फारसें मोठें कपाशीचें पीक येण्याची अपेक्षा नाहीं आणि ह्या कारणानें बाजारभाव चढीचे रहातील असें वाटत होतें. अमेरिकन कपाशीचा पुरवठा वाढला आणि युद्धामुळें जपान व चीन ह्यांचा उठाव मंदावला. त्यांतच मुंबईच्या बाजारात उलाढाल करणाऱ्या व्यापाऱ्यांनीं मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री करून भाव खाली दाबले अणि गिरणीवाल्यानीं अमेरिकन कापसाच्या एक लक्ष गाठी खरेदी केल्या. न्यूयॉर्क व लिव्हरपूल येथील बाजारांत वायद्याची खरेदी व मुंबईच्या बाजारांत तत्सम विक्री ह्या स्ट्रॅडलच्या व्यवहारांत मुंबईकर धंदेवाल्यानीं सात लक्ष गाठींची उलाढाल केली आहे ती असमर्थनीय आहे असें श्री. गुप्त ह्यांचें मत आहे; असल्या खरेदी-विक्रीनें बाजारभावांत स्थैर्य व प्रमाणबद्धता रहाण्यास सहाय्य होतें ह्या युक्तिवादावर त्यांचा विश्वास नाहीं. हें कांहीं असलें तरी कपशीचे भाव उतरते राहिल्यास हिंदी शेतकरी वर्गाचें नुकसान होईल आणि ती आपत्ती टाळण्याचा प्रयत्न सरकारनें केला पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे.

---

### हिंद-ब्रिटन व्यापारी करार— प्रकरण रेंगाळलें !

श्री बेगराज ह्यांनीं हिंद-ब्रिटन व्यापारी कराराबाबतच्या प्रश्नाचीहि चर्चा आपल्या भाषणांत केली. ह्या करारासंबंधानें इंग्लंडमध्यें कित्येक महिने वाटाघाटी होऊन हिंदी व्यापारी सल्लागारांचें शिष्टमंडळ स्वदेशीं परतहि आलें. परंतु कराराविषयीं चर्चा कोठवर आली आहे, ती पुरी होण्यास किती कालावधी लागणार व आतां निर्णयाच्या मार्गांत कोणत्या अडचणी आल्या आहेत ह्या बाबत विश्वसनीय माहिती मिळत नसून तत्संबंधीं अनेक तर्क मात्र पसरले आहेत. इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांनीं परस्परास कोणत्या व्यापारी सवलती द्याव्या ह्याविषयीं ब्रिटिश व हिंदी प्रतिनिधि ह्यांचेमध्यें तीव्र मतभेद उत्पन्न झाले असल्यावांचून कराराच्या अटींचा निकाल लागण्यास इतका काळ लागलेला नाहीं, हें उघड आहे. दोन बाजूचें म्हणणें स्थूल मानानें एकमेकास पटण्यासारखें असतें तर करार केव्हाच निश्चित झाला असता. आपल्या मालास हिंदुस्थाननें विशेष सवलती द्याव्या म्हणून लँकेशायरवाले ताणून धरीत असून हिंदी प्रतिनिधींच्या मतानें ही मागणी अग्राह्य आहे. हिंदी कपाशीचा परदेशांत होणारा खप दिवसानुदिवस कमी होत जाणार आणि लँकेशायरच्या गिरणीवाल्यांच्या सहायावांचून हिंदी शेतकऱ्यास आपल्या मालाच्या मोबदला चांगला भाव मिळावयाचा नाहीं, ह्या मुद्यावर जोर देऊन ब्रिटिश मालाचें घोडें पुढें दामटण्यांत येत आहे. हिंदी प्रतिनिधी लँकेशायरनें टाकलेला डाव ओळखून आहेत आणि आपल्यावर मात होऊं न देण्याइतके ते कुशल व निश्चयी आहेत. ह्या प्रकारची रस्सिखेच चालली असतां नवीन करार मान्य होईपर्यंत ओटावा कराराच्या त्याज्य ठरलेल्या अटी अंमलांत रहावयाच्या असल्यानें कालहरण झालें तरी लँकेशायरचें फारसें बिघडत नाहीं. हिंदुस्थानच्या दृष्टीनें मात्र सध्याची अनिश्चितता अनिष्ट आहे. पुढच्या महिन्यांत वाटाघाटी हिंदुस्थानातच पुन्हां चालू होणार अशी बातमी आहे. एकदरीनें हें प्रकरण रेंगाळणार ह्यात संशय नाहीं.

---

### अमेरिकेच्या बाजारांत गडबड

एखाद्या तळ्यांत कोणी दगड टाकला असतां त्याच्या भोंवतीं अनेक वर्तुळें पसरत जातात त्याप्रमाणें रोखे, कपन्यांचे भाग व माल ह्यांच्या बाजारांत किंमतींमध्यें होणाऱ्या फेरबदलाविषयीं भीतिदायक बातमी कोणी सोडून दिली कीं घाबरटपणाचे परिणाम सर्वत्र दिसूं लागतात. किंमती उतरणार ह्या भयानें फारसा विचार न करतां हातातले रोखे व माल अनेक धंदेवाले विकू लागतात आणि अनिश्चितपणाच्या वातावरणात खरेदी करणारांपेक्षां विकणाराचीच संख्या अधिक झाल्यानें बाजारभाव पडतात मालाच्या व रोख्यांच्या किमती उतरणें म्हणजे मदीस बोलावणें पाठवणेंच होय. बाजारभावातली घट म्हणजे मालास किंवा देशास मर्यादित होऊन न रहातां ती सर्व व्यापारास व उद्योगांस ग्रासूं लागते आणि सबद जगातल्या व्यापारास व उद्योगधंद्यांस तिची झळ त्रास देते. गेल्या आठवड्यात अमेरिकन बाजारात घाबरटपणाची लाट एकाएकीं पसरली आणि रोख्यांची व भागांची खरेदी-विक्री विलक्षण मोठ्या प्रमाणावर झाली. हें लोण कोठपर्यंत जातें आणि त्याचे दूरगामी अनिष्ट परिणाम कोणास व कसे भोगावे लागतात ह्याविषयीं क्षणभर चिंता उत्पन्न झाली. परतु सुदैवानें ही वावटळ लवकरच शमली आणि अमेरिकन बाजारांत पुन्हा शातता प्रस्थापित झाली. आज जगांत राजकीय वातावरण प्रक्षुब्ध होऊन गेलें आहे आणि युद्धाच्या व आंतरराष्ट्रीय वैमनस्याच्या ज्वाळा केव्हां भडकतील ह्याचा नियम नाहीं असें वाटूं लागलें आहे. आग लागली अशी ओरड कोणी तरी करावी आणि त्या योगानें गर्दी जमून आरडाओरड व्हावी व गोंधळ माजावा, तथापि मुळात विलक्षण असें कांहींच घडलेलें असू नये, ह्या तऱ्हेचा प्रकार गेल्या आठवड्यात अमेरिकेच्या बाजारात झाला असें तिकडच्या बातम्यावरून दिसतें. गडबड विशेष पसरून आर्थिक हानी झाली नाहीं, ह्याविषयीं तूर्त समाधान मानलें पाहिजे.

---

### वर्ध्याची शिक्षण परिषद

महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथें गेल्या आठवड्यांत शिक्षण परिषद भरली होती, तीमध्यें वक्त्यांनीं प्रदर्शित केलेल्या विचाराची माहिति प्रसिद्ध न झाल्याकारणानें तिच्या ठरावांसंबंधानें अभिप्राय देणें कठीण आहे वर्तमानपत्राचे प्रतिनिधी उपस्थित असले म्हणजे मोकळे मनानें चर्चा करण्याचे मार्गांत अडथळा येतो ह्या कल्पनेनें परिषद् निमंत्रित लोकांस मर्यादित करण्यात आली होती आणि तिचा अत्यंत त्रोटक वृत्तांत प्रसिद्ध करण्यात आला आहे खर्च झेपत नसल्यानें प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें करण्याचे कामीं आज प्रगति होत नाहीं आणि सध्याच्या गतीनें चालल्यास शिक्षणाचें ध्येय गाठण्यास अनेक वर्षे लागतील ह्यांत शंका नाहीं. शिक्षणास लागणारा पैसा बाहेरून पुरवावा लागूं नये आणि तें स्वयंपूर्ण व स्वावलंबी व्हावें म्हणजे त्याची प्रगति झपाट्यानें होईल ही कल्पना महात्मा गांधींच्या योजनेच्या मुळाशीं आहे आणि शिक्षणाच्या प्रश्नाचें जिव्हाळ्याचें महत्त्व लक्षात घेतां ती विचार करण्यासारखी गोष्ट आहे प्राथमिक शिक्षणाचा क्रम सात वर्षांचा असावा, शिक्षणाचें माध्यम मातृभाषा हें असावें आणि उपयुक्त हस्तव्यवसायाशीं त्याचा निकट संबंध असावा हीं त्यांच्या योजनेचीं प्रमुख अंगें आहेत. खेडेगांवांत शेतकऱ्यांच्या मुलास शिक्षण द्यावयाचें तें त्यांच्या परिस्थितीस धरूनच असलें पाहिजे आणि कारकुनी पेशाचा छाप त्यावर असतां कामा नये, हें निर्विवाद आहे. हस्तव्यवसायांकडे दुर्लक्ष झाल्याकारणानें आमची सर्वच शिक्षणपद्धति सदोष बनली आहे. तिला मुळातच व्यावहारिक वळण लागल्यास ती अत्यंत इष्ट अशीच गोष्ट होणार आहे. शाळांतलें शिक्षण उत्पादक आणि खर्चाचे दृष्टीनें स्वयंसिद्ध व स्वतंत्र कसें होणार हाच येथें महत्त्वाचा प्रश्न आहे मुलांनीं शिकून तयार केलेल्या मालाच्या विक्रीमधून शिक्षणाचा सर्व खर्च भागण्याच्या शक्यतेविषयीं शंका उत्पन्न होणें साहजिक असून ह्या बाबतींत येणाऱ्या आर्थिक अडचणींचा उल्लेख प्रो शहा ह्यानीं परिषदेंत केल्याचें प्रसिद्ध झालें आहे त्याचा रोख तात्काळ ध्यानात येण्यासारखा आहे. शिक्षकाचा खर्च हळुहळु शिक्षण-व्यवस्थेंतून निघू लागेल अशी सावधगिरीची भाषा ठरावाच्या शेवटीं घातलेली आहे ती अर्थपूर्ण आहे. शिक्षणयोजनेचा विचार करण्यासाठी कमिटी नेमली आहे, तिच्या रिपोर्टानें ह्या सर्व प्रश्नावर प्रकाश पडेल.

### आर्थिक-मंदी व प्रतिकूल हुंडणावळ

लाहोर येथें हिंदुस्थानचे व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, हे गेल्या आठवड्यांत गेले, त्या वेळीं तेथील 'देशी व्यापार मंडळा'नें लाट साहेबाचें स्वागत करून त्यांस मानपत्र समर्पण केलें. मंडळानें आपल्या मानपत्रात हिंदुस्थानच्या बिकट आर्थिक परिस्थितीचें वर्णन केलें व १८ पेन्साच्या हुंडणावळीमुळें देशाचें नुकसान होत असल्याविषयीं तक्रार केली. साखरेच्या उत्पन्नावरील अंतर्गत पट्टी, रेल्वेजच्या मालवहातुकीचे दरांचा देशी मालाचे व्यापारावर होणारा प्रतिकूल परिणाम, इत्यादींचाहि उल्लेख मानपत्रांत करण्यात आला. व्हाइसरॉयानीं उत्तर देताना, हिंदी आर्थिक प्रगतीविषयीं आशादायक उद्गार काढले व 'देशी व्यापार मंडळा'स ह्या प्रगतीची पुरेशी जाणीव नसल्याचें सूचित केलें! आर्थिक मंदीबद्दल १८ पेन्सांच्या हुंडणावळीस जबाबदार धरण्यास सबळ कारण सांपडणार नाहीं, असें ते म्हणाले. हिंदुस्थानांतील शेतकऱ्याचे हिताच्या दृष्टीनें १८ पेन्साचा दर हाच योग्य आहे व त्यांत फेरफार करण्याचा सरकारचा विचार नाहीं, असें त्यानीं स्पष्ट जाहीर केलें हिंदी सोन्याच्या निर्गतीचा ओघ रोडावला म्हणजे १८ पेन्साची हुंडणावळ उचलून धरणें कठीण जाईल, असें मत खुद्द ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञानीं व्यक्त केलेलें असतांना सुद्धां, हिंदुस्थान सरकारास ह्या प्रश्नाचा विचार करण्याचीहि जरूरी भासत नाहीं, असें दिसतें; कारण, व्हाइसरॉयानीं ह्याबाबतची घोषणा असंदिग्ध शब्दात केलेली आहे. शेतीच्या मालाचे बाजारभाव हळुहळु सुधारत असले, तरी इतर देशाचे मानानें हिंदुस्थानातील प्रगति मंद आहे ह्यांत संशय नाहीं व्हाइसरॉयानीं हिंदी आर्थिक प्रगतीविषयीं समाधान व्यक्त केलें असलें व १८ पेन्सांच्या हुंडणावळीची तरफदारी केली असली, तरी त्याचें मत हिंदी जनतेस ग्राह्य होण्याचा अर्थातच संभव नाहीं.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,२३,९०० वसूल झालेलें भांडवल १,११,७४०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## धूम्रपान—तंबाखूचा धंदा

तंबाखूची संवय जगातील सर्व राष्ट्रांतल्या लोकांमध्यें सारखीच पसरलेली असून वरच्या व खालच्या सर्व वर्गांमध्यें तिचा प्रसार झालेला आढळतो. हिंदुस्थानात चिलमींत, चुट्ट्यात, विड्यात तंबाखू घालून तिचा धूर लोक घेतात आणि खाण्यासाठी व तपकिरीच्या स्वरूपातहि तिचा उपयोग केला जातो. तंबाखूचें पीक ह्या देशांत शेतकऱ्यास फायदेशीर होतें आणि विड्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. अलिकडे सिगरेट ओढण्याची सवय जोरानें पसरत चालली आहे आणि सिगार व सिगरेट स्वदेशी कारखान्यांत तयार होऊं लागल्या आहेत तरी त्याचा बहुतेक पुरवठा परदेशांतून होतो. विलायतेमध्यें हा धंदा एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालतो आणि त्याचें संघटन इतकें बळकट आहे कीं त्याच्याशीं स्पर्धा करणें स्वदेशी कारखानदारास कठीण पडतें.

तयार केलेल्या तबाखूचा उपयोग ब्रिटिश जनता फार मोठ्या प्रमाणावर करते. तेथें सिगरेट्सचा खप विलक्षण मोठा आहे आणि तो गेल्या दहा वर्षांत दुप्पट वाढला आहे. बारा तेरा कोटि पौंड वजनाची तंबाखू दरवर्षी सिगरेट्सच्या मार्गानें त्या देशांत उपयोगांत आणली जाते आणि इतर स्वरूपातला तिचा उपयोग त्याच्या तिसरा हिस्साहि नसतो. तबाखू चिलमींत घालून तिचा धूर ओढण्याच्या ऐवजी सिगरेटमधून तो घेणें लोकांस अलीकडे आधिक आवडूं लागलें आहे. इंग्लंडमधील स्त्रीवर्गांत तंबाखूची सवय पसरल्यामुळें सिगरेटसला मागणी वाढत्या प्रमाणात येत आहे सिगरेटसच्या जाहिरातींचाहि बऱ्याच अंशीं हा परिणाम आहे असें दिसतें. कित्येक देशांत सिगार्सवरची सरकारी जकात आधिक सोयीची असल्यानें सिगरेटच्यापेक्षां त्याचा खप तेथें ज्यास्त होतो. दर वर्षी दर माणशी ९०० ते १,००० सिगरेटसचा धूर ग्रेट ब्रिटनमध्यें निघतो, असा अंदाज आहे. अमेरिकन राष्ट्राचा नंबर ह्याच्याखाली लागतो. वीस-पंचवीस कोटि पौंड वजनाची तंबाखू प्रतिवर्षी इंग्लडमध्यें बाहेरून जाते.

तबाखूचा धंदा एकत्रित आणि अत्यंत सघटित आहे हें वर सांगितलेंच आहे. मध्यंतरीं कच्च्या तंबाखूचे भाव उतरले होते तेव्हा सिगरेटस् बनवणाऱ्या मडळ्यांनीं जाहिरातींवर खूप खर्च करून आपल्या मालाचा खप वाढवला आणि ग्रेट ब्रिटनमध्यें आर्थिक मंदी जराशी कमी होताच त्यास चागला नफा मिळूं लागला. इंपीरिअल टोबॅको आणि केरराज् ह्या दोन प्रचड कारखानदार मंडळ्या आहेत. त्यास १९३२–३३ सालीं एकूण ११ कोटि रुपये निवळ नफा झाला होता. १९३५–३६ मध्यें त्याच्या नफ्याची रकम १५ कोटि रुपयाच्यावर गेली. सिगरेट्स बनवणाऱ्या मोठ्या कंपन्यानीं उत्पादनाच्या व विक्रीच्या व्यवस्थेचा जम अशा सुदर रीतीनें बसवला आहे आणि धूम्रपानाची सवय इतकी दृढमूल झाली आहे कीं, कच्ची तंबाखू थोडीशी महागली तरी खप व नफा कमी होण्याची त्यांस भीति वाटण्याचें कारण आहे असें दिसत नाहीं. अलीकडे चिलमींची जागा सिगरेटस् झपाट्यानें पटकावीत असून तंबाखूच्या एकूण खपापैकीं सुमारें तीन–चतुर्थांश खप सिगारेटस मधल्या तबाखूचा असतो. वार्षिक उत्पादन सुमारें ४० कोटि रुपयांच्या आत बाहेर असतें. कच्च्या तबाखूच्या किंमतीवर सिगरेटसच्या खपाची प्रगति अवलबून राहाणार आहे आणि त्यांच्या जाहिरातीस व खपास अर्थातच स्वाभाविक मर्यादा आहेत. ब्रिटिश अमेरिकन टोबॅको सिक्यूरिटीज ट्रस्ट ह्या प्रचंड मडळ्या आपला माल सर्व जगातील बाजारांत विकतात. सिगरेट्स् ओढण्याची संवय इतक्या झपाट्यानें पसरत आहे कीं, ह्या मंडळ्याचा धंदा अनेक वर्षे जोरानें चालत राहील अशीं चिन्हें दिसत आहेत. सुसघटित व प्रथितयश अशा ब्रिटिश व अमेरिकन कारखानदार कपन्यानीं सुस्थितीची अपेक्षा करणें वावगें होणार नाहीं असें अनुमान काढण्यास जागा आहे.


# NOTICE

**TO BUILDING CONTRACTORS**

Sealed **Item Rate Tenders** are invited for the construction of a building for the Primary School of the Progressive Education Society, Poona, Estimated to cost approximately Rs 38,000/- on the site at the Jangli Maharaj Road. Tenders and copies of specifications etc can be had from the office of the Modern High School, Poona, on payment of Rs 5/- per set (which money will not be refunded), between 12 noon and 3 P. M from the 25th to the 30th instant. Plans can be inspected in the office. Tenders should be submitted to the Secretary of the Society by 12 noon on Wednesday the 10th of November 1937, accompanied by earnest money of Rs. 500/-. The Secretary reserves the right to reject any or all the tenders without giving any reasons thereof.

S. R. KANITKAR,
Secretary,
Progressive Education Society, Poona,
Modern High School,
23-10-37, 507 Shanwar, Poona.

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल … … … | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भाडवल … … … | रु १,००,००,००० |
| रिझर्व्ह फड … … … | रु. १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), वांद्रें (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट— टी. आर. लालवाणी

## औंध संस्थान मध्यवर्ती बँक, लि.

### दिघंची (ता. आटपाडी) शाखेचा उद्घाटन समारंभ

तारीख १८ आक्टोबर, १९३७ रोजीं औंध संस्थान मध्यवर्ती बँक लि च्या दिघंची शाखेचा उद्घाटन समारंभ श्रीमंत राजकुमार आप्पासाहेब पंत, बी. ए., बार-अॅट लॉ, याचे हस्तें दिघंची येथें बँकेच्या कचेरींत दुपारीं ४ वाजता मोठ्या उत्साहानें व थाटानें पार पडला

सदर समारंभास औंध संस्थानांतील अधिकारी वर्गापैकीं रावब पटवर्धन डी. एस पी, राव. हिवरेकर दप्तरदार, राव. कुंडलकर, राव. एल. बी. कुलकर्णी अॅग्रिकल्चरल अॅडव्हायसर, राव पटवर्धन, मुन्सफ, आटपाडी, राव. कुलकर्णी मामलेदार, ता. आटपाडी, बँकेचे डायरेक्टरांपैकीं मे. देवी माधवदास शेटजी, आटपाडी शाखेचे चेअरमन ना. वि. गो. दर्शने व शाखा कमिटीचे सभासद मे बी. आर. वर्तक, बँक मॅनेजर, व्यापारी वर्गापैकीं श्री स भि. शेटे, सरताळे, होनराव, गोडबोले, दिघची शाखेखालील सोसायट्यांचे प्रतिनिधी, गावांतील सभ्य गृहस्थ व शेतकरी लोक असा सुमारें ४०० चे वर समाज जमला होता.

श्री. बी आर वर्तक, बँक मॅनेजर, यानीं आपल्या प्रास्ताविक भाषणात थोडक्यांत बँकेची माहिती देऊन दिघची शाखा उघडण्याचा उद्देश सांगितला. त्याप्रमाणें त्यानीं आटपाडी तालुक्यांतील सहकारी चळवळीचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यानीं सांगितलें कीं, यापेक्षांहि येथें सहकारी चळवळीचा जास्त विस्तार होऊं शकेल दिघची शाखेशीं ज्या दहा सोसायट्या जोडल्या आहेत त्यांच्या नावांचा त्यानीं निर्देश केला. व्यापाऱ्याना व इतराना शाखेपासून कसे फायदे करून घेता येतील तेंहि त्यांनीं निवेदन केलें. शेवटीं शाखेशीं सर्वांनीं सहकार्य करून तिला उर्जितावस्थेस आणणेबद्दल विनंति करून त्यानीं आपलें भाषण संपविलें

त्यानतर राव० हिवरेकर दप्तरदार, राव० एल बी. कुलकर्णी, अॅग्रिकल्चरल अॅड्व्हायसर, राव० कुडलकर, ना. वि. गो दर्शने व श्री. स. भि शेटे यांनीं भाषणें करून बँकेची उपयुक्तता पटवून दिली. तसेंच दिघची शाखेचा दिघची गाव व त्या शेजारील गावें याना फायदा होईल व लोक त्याप्रमाणें तो करून घेतील अशी आशा प्रदर्शित केली

तदनतर बँकेचे डायरेक्टरांपैकीं श्री देवी माधवदास शेटजी यानीं श्रीमत अप्पासाहेब याना दिघची शाखेचें उद्घाटन करणेबद्दल विनति केली. त्याप्रमाणें श्रीमतांनीं पूजन करून शाखेचें उद्घाटन केलें.

#### श्रीमंतांचें भाषण

प्रथमतः श्रीमतांनीं पाश्चिमात्य राष्ट्रांतील बँकिंग पद्धतीची माहिती सागून तिकडे बँकिंगचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे, तसा आपलेकडेहि होणें जरूर आहे असें सागितलें आपले संस्थानात बँकिंगचें जाळें पसरावयास पाहिजे संस्थानांतील औंध संस्थान मध्यवर्ती बँक, लि ही शेतकरी व इतर व्यापारी वगैरे लोकाना उपयोगी पडत आहे तिनें आपल्या शाखा तालुकानिहाय काढल्या आहेत. आज आटपाडी तालुक्यात व्यापारांत पुढें असलेल्या दिघची गावीं बँकेची नवीन शाखा काढण्याचा योग आला आहे, ही खरोखरच अत्यत अभिनंदनीय गोष्ट आहे. तरी या शाखेचा सर्वांनीं उपयोग करून घ्यावा असें त्यांनीं सुचविलें. बँकेचें कर्ज काढल्यानंतर, तें प्रामाणिकपणें फेडण्याचें धोरण सर्वांनीं ठेवलें पाहिजे. बँक सवलती देईल. मात्र कर्जदारांनीं प्रामाणिकपणें कर्जाची फेड करून काटकसरीनें वागलें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें दिघंची शाखेशीं सर्वांनीं सहकार्य करून शाखेची भरभराट करावी अशी आशा त्यानीं प्रदर्शित केली व दिघंची शाखा उघडल्याचें जाहीर करून आपलें भाषण संपविलें.

नंतर श्री. बा. वा. घमंडे, इन्स्पेक्टर, आटपाडी तालुका यानीं ज्या लोकानीं सुरवातीसच शाखेंत ठेवी ठेवून सेव्हिंग्ज खातीं उघडलीं त्याचीं नांवें जाहीर केलीं व श्रीमंताचे व पाहुणे मंडळींचे आभार मानले.

## शिंदखेडा तालुका सहकारी परिषद

प. खा जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या वियमानें व शिंदखेडा ता. को सु. यूनियन व प. खा. जिल्हा को. खरेदीविक्री संघ यांच्या मदतीनें ता. १५।१०।३७ रोजीं "दोंडाईचे" ता. शिंदखेडे येथें शिंदखेडा ता को परिषद् मे. असि. रजिष्ट्रारसो. को. सोसायटीज खानदेश विभाग यांचे अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. या परिषदेस सुमारें ४० सोसायट्यांचे सभासद् व इतर शेतकरी मिळून सुमारें १५० लोक हजर होते. अध्यक्षसाहेबांनीं परिषदेस आलेल्या सोसायटी–सभासदांशीं व इतर शेतकऱ्यांशीं त्याच्या सोसायट्यांच्या वसुलासंबंधीं अडीअडचणी काय आहेत यांचा प्रश्नोत्तररूपानें पांच तास ऊहापोह करून सर्वांच्या संमतीनें त्याच्या अडचणी दूर करण्यासाठी बरेच ठराव केले व त्याप्रमाणें शक्यतो त्याची ताबडतोब अमलबजावणी करण्यास सांगितलें. सोसायट्यांच्या सभासदानीं आपला सर्व माल दोंडाईचें, धुळें व शिरपूर येथील सहकारी खरेदीविक्रीसंघातर्फे विकण्याचें आश्वासन दिलें. दोंडाईचे येथील सहकारी खरेदीविक्री संघाच्या दुकानांत जो सोसायटी-सभासद जास्त माल विकील व दुसऱ्याना विकावयास लावील त्याला १० दहा रुपयाचें बक्षीस ठेवलें आहे.

सरते शेवटीं प खा जिल्हा को. इन्स्टिट्यूटचे चेअरमन, श्री दामोदरराव गणपतराव पाटील, यानीं परिषदेमध्यें झालेल्या कामाचा थोडक्यांत गोषवारा सांगितला व आपापला माल सर्वांनीं सहकारी खरेदीविक्री सघातूनच का विकावा हें सप्रमाण दाखविलें

## पंढरपूर माध्यंदिन ब्रह्मवृंद को अर्बन बँक, लि.

(वार्षिक सभा: ३१-१०-३७)

३०-६-३७ अखेर वरील बँकेच्या पटावर १९० सभासद आहेत. ठेवींवरील व्याजाचे दर कमी केले असतांहि, ठेवींत थोडीफार वाढच झालेली आहे. थकबाकीचें प्रमाण मागील सालअखेरीस २१ ५% होतें, तें आतां ४३ ३% इतकें झालें आहे. वसुलीची शक्य ती खटपट मॅनेजिंग बोर्ड करीत आहे. प्रॉ नोटवर कर्जे न देण्याचें व ५०० रु. पेक्षा ज्यास्त कर्ज न देण्याचें धोरण बँकेनें अंगीकारलें आहे. वर्षअखेर बँकेस निवळ नफा ७५९ रु झाला, त्यांतून भागीदारांस ४३/४% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ३१७ रुपयाचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. धान्याचे व सोन्या-चांदीचे तारणावर कर्जे देण्यास बँक लवकरच प्रारंभ करणार आहे. म्हणजे मग तिच्या व्यवहारांत व उत्पन्नात वाढ होण्यास सहाय होईल.

नांदगांव-येवला तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनिअन लि. नांदगांव, जि० नाशिक

सहकारी चळवळींतील पुढारी आमदार बी. एस. हीरे, बी ए. एल. एल. बी., एम. एल ए, मालेगांव याची प्रांतिक असेंब्लीमध्यें निवडणूक होऊन, पार्लमेंटरी सेक्रेटरी होण्याचा जो त्यांना बहुमान मिळाला त्याप्रीत्यर्थ नांदगांव व येवला तालुक्यांतील सर्व शेतकी व सहकारी सोसायट्या व को. सु. यूनीअन यांचेतर्फे ता. १०-९-३७ रोजीं त्यांना पानसुपारी व मानपत्र अर्पण करण्याचा समारंभ आमदार गंभीरराव अवचितराव चव्हाण एम. एल. ए. याचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें करण्यांत आला.

श्रीयुत बी. व्ही. हाळवे, सिनीयर इन्स्पेक्टर, मुंबई प्रॉ को. बॅ. लि. मालेगांव विभाग याची धुळें भागांत बदली झाल्यानें त्या प्रीत्यर्थ त्यांना नांदगांव व येवला तालुक्यांतील सर्व सहकारी संस्था व यूनीअन याचेतर्फे ता १०-९-३७ रोजीं पानसुपारी करण्यात आली.

सालाबादप्रमाणें नांदगाव येवला तालुका को. सुपरवायझिंग यूनीअनची वार्षिक साधारण सभा ता. १०।९।३७ रोजीं श्रीयुत निळकंठराव माधवराव पवार मालेगाव, याचे अध्यक्षतेखाली यूनीअननें स्वीकारलेल्या नवीन सुधारलेलें पोटनियमपत्रक एफ. एफ. च्या नियमास अनुसरून भरली. सभेमध्यें खालावलेल्या सोसायट्याची व त्यांतहि येवले तालुक्यांतील सोसायट्यांची असलेली दुःस्थिति याबद्दल चर्चा करण्यात आली.

---

प. खानदेश को. इन्स्टिट्यूट, धुळें

वरील इन्स्टिट्यूटचे ५ व्यक्ती व ३४२ संस्था मिळून ३४७ सभासद आहेत. अहवालाचे सालीं इन्स्टिट्यूटच्या कार्यक्षेत्रांत २७ सहकारी संस्था नव्यानें रजिस्टर झाल्या व जुन्यांपैकीं एक कमी झाली. अहवालाचे वर्षी सोसायट्यांना धर्मादाय देणगीप्रीत्यर्थ २,२७२ रु ९ आ. मंजूर करण्यात आले. सेक्रेटरींचे शिक्षण वर्ग, पंच कमिटींचे शिक्षण वर्ग, सार्धी व सदीप व्याख्यानें, परिषदा, इत्यादींचे द्वारा इन्स्टिट्यूटनें सहकाराचा प्रचार केला. संस्थेचे चेअरमन, श्री. दामोदरराव गणपतराव पाटील, ह्यांच्या परिश्रमाचा ऑडिटरनीं आपल्या टिपणात उल्लेख केला आहे

---

प. खानदेश जिल्हा को-इन्स्टिट्यूट, धुळें

प. खा. जिल्हा को इन्स्टिट्यूटची वार्षिक साधारण सभा ता १७-१०-३७ रोजीं श्री दामोदरराव गणपतराव पाटील याचे अध्यक्षतेखाली भरून सन १९३७-३८ सालाकरितां खालीलप्रमाणें चेअरमन, व्हा चेअरमन व ऑन सेक्रेटरी बहुमतानें निवडून आले सभेस सुमारें ३०० लोक हजर होते.

श्री एम. टी मोरे बॅरिस्टर, चेअरमन

श्री. गजाराम राघो पाटील, व्हा. चेअरमन

श्री. पुंडलीकराव माधवराव पाटील, ऑन. सेक्रेटरी

---

सटाणा उत्तर भाग को. क्रें. सोसायटी लि.

वरील सोसायटीची वार्षिक सभा ता. २२-९-३७ रोजीं श्री. शिवराम अजबा पाटील ह्याचे अध्यक्षतेखाली भरली होती. "यंदा हंगाम चांगला आहे, म्हणून वसुलाची विशेष खटपट करून सोसायटी वरच्या वर्गांत आणण्याचा प्रयत्न करावा व थकबाकी कमी करावी" असा अध्यक्षांनीं सभासदांस उपदेश केला.


"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

आपले पैसे खर्च झाल्याचा योग्य मोबदला
मिठाई शास्त्रज्ञ तुळजाराम मोदी यांचें
देशी बनारसी साखरेच्या मिठाईचे दुकान
रत्नागिरीच्या हापूस आंब्याची शक्तिवर्धक आंबा बर्फी
आगाऊ ऑर्डर दिल्यास हजारों रुपयांची मिठाई पुरवूं शकूं
तुळजाराम मोदी, मुख्य कारखाना, मोती चौक, सातारा

FOR SAFETY, ECONOMY AND DURABILITY Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS AND LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठवरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्च माफ.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १२०—६ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ..., | १०५—७ |
| ४% १९४३ ... .. .. ... | १०८—४ |
| ३½% विनमुदत . ... ... ... | ९८—३ |
| ३½% १९४७–५० .. ... ... | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ .. ... ... | १००—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) .. ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४२—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११८—१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३०—६ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५५७—८ |
| बॉंबे मॉ. को. बँक ( ५० ) ५% ... .. | ५९—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२४—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १६४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९५०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... .. ... | ७६५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १३% ... ... | १३०—१० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४६७—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% ... ... | १५९०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु. ... .. ... | १९२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु ... ... | ५०—८ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २७—१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ. ... | ४२—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु बोनस ... | ४७००—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% ... ... | २०१—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६६—१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. ... ... | ३४७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ. ६ पै ... | १५८०—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४—१२ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०—१५ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—५ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११—२ |
| „ सूर्य प्रत्येक मणास ... ... | ११—१ |


# K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

---

# The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

---

# DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published any where and supply it at publisher's price

---

# गव्हाचे पोहे

(REGD ) **( BLOSSOM )** ( REGD. )

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खाता येतात.

७५२ सदाशिव, पुणें २ — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार

## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड. औंध.

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुडल, गुणदाळ, विठूद स्टेशन व दिघची

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी

B R. Vartak
मॅनेजर.

## न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री डी के. जोगळेकर, बी ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

## नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,४०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८२३ |
| इतर फंड | १,४०४ |
| मुदतबंद ठेवी | १,९१,५१३ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ७,९५९ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,८०,५८६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४१,५९९ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

**RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS**

ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.

*Apply*—**MARATHI KENDRA,**
10 BUDHWAR, POONA 2

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.


एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

## R. B. Jog & Sons

Deccan Gymkhana, Poona 4




Big Stock of Shell Oils & Greases. Motor Washing & Cleaning. Motor Oiling & Greasing. Moderate Charges.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

Last year 1936-37

Exceeds

2 CRORES & 82 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Office* throughout India & the East

S C. MAJUMDAR,

MANAGER Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



स्पेशल स्टमक ट्रीटमेंट

## पांढरें-सत्व किंमत १। रु.

मलशुद्धी टॅबलेट्स् कि ८ आ.

या दोन औषधाच्या मदतीनें पोटातील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, कर्पट ढेंकर येणें, छातींतिल जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे

डॉ. बी. आर. गुणे

पुणे २.



## दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ.—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बॅंक ठेवींवर द सा. द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ न ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १० नोव्हेंबर, १९३७ अंक ४४

— मनपसंत काम —
वक्तशीरपणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

धी बँक ऑफ इंडिया लि.
[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,०५,५०,००० |

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई
शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवींवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा
कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं. २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

# विविध माहिती

### ब्रिटिश रेडिओच्या श्रोतृवर्गांत वाढ होणार

ग्रेट ब्रिटनमधील रेडिओ स्टेशनवरून आजपर्यंत फक्त इंग्रजी भाषेंतूनच कार्यक्रम केले जात असत. ह्यापुढे इतर भाषांतूनहि संदेश पाठविले जातील असें पोस्ट-मास्टर-जनरलनीं कॉमन्स सभेंत जाहीर केलें.

### कृत्रिम रेशमाच्या कारखान्याची स्थापना

हिंदुस्थानात कृत्रिम रेशमाच्या कापडाचा खप वाढत्या प्रमाणावर होत आहे, ह्या दृष्टीनें असल्या रेशमाच्या कारखान्यास येथें वाव आहे. मुंबई येथें, सर जहांगिर बोमन बेहराम ह्यांचे अध्यक्षतेखालीं "आर्ट सिल्क प्रॉडक्टस" लि. ह्या नांवाची एक कंपनी स्थापन होत असून, तिचे कारखान्यात दरमहा दोन लक्ष वार कापड निघूं शकेल, अशी अपेक्षा आहे

### सहकारी परीक्षांचा निकाल

प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटच्या सेंट्रल एज्युकेशन बोर्डामार्फत गेल्या मे महिन्यात घेण्यात आलेल्या सेक्रेटरीज्च्या परीक्षेस १५२ उमेदवार बसले होते, त्यांपैकीं ३६ उत्तीर्ण झाल्याचें जाहीर झालें आहे. सहकारी सर्टिफिकेटाच्या परीक्षेस बसलेले सातहि उमेदवार नापास झाले आहेत.

### विमा बिलाची वरिष्ठ कायदेमंडळांत चर्चा

विमा बिल मध्यवर्ती असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनात पास झाल्यानतर-तें आता कौन्सिल ऑफ स्टेटकडे मंजुरीसाठी धाडण्यांत आलें आहे. ता १५ नोव्हेंबर रोजीं कौन्सिल ऑफ स्टेटच्या बैठकीस प्रारभ होईल.

### पजाबांत बेकारांची गणती

पजाब सरकारनें सुशिक्षित बेकाराची गणती करण्यास आरभ केला आहे. सांपत्तिक सुस्थितीमुळें अगर काम करण्याच्या अनिच्छेमुळें जे बेकार असतील त्याचा समावेश यादीमध्यें होणार नाहीं.

### जगांतील सर्वांत वेगवान आगगाडी

फ्रान्स देशातील पॅरिस लिऑन्स अॅन्ड मेडिटेरेनियन रेल्वेवरील पॅरिस ते नीस हा ६८० मैलाचा टप्पा दर तासास सरासरीनें ८१½ मैल वेगानें आक्रमणाऱ्या नियोजित आगगाडीशी बरोबरी करणारी दुसरी आगगाडी इतरत्र नाहीं प्रत्येक गाडीच्या पुढें व मागें एक इजन जोडण्यात येईल. त्या दोघाची मिळून ४ हजार अश्वशक्ति भरेल. तेलाच्या जळणावर वीज निर्माण करून त्या शक्तीनें आगगाडीस गति देण्यात येईल. ग्रेटब्रिटनमध्यें कोळसा मुबलक असल्यानें व इतर जळण बाहेरून आणावें लागत असल्याकारणानें, तेथील रेल्वे कपन्या शक्यतोंवर कोळशाच्या उपयोगावरच भर देत असतात वेगाचे बाबतींत कोळशाचीं इजनें इतरास मागें सारूं शकत नाहींन

### ब्रिटिश रेडिओ आणि बिअर दारू

ब्रिटिश रेडिओमधील एका भाषणात बिअर दारुची जाहिरातवजा स्तुति करण्यात आल्याबाबत मितपानाचा व दारूबदीचा पुरस्कार करणाऱ्या ब्रिटिश संघानें जोराची तक्रार केली आहे बिअर हें निरुपद्रवी व लोकप्रिय पेय असल्यामुळें वरील प्रकारच्या भाषणाचा निषेध करण्याचें विशेष कारण नाहीं असें मत काहीं लेखकानीं व्यक्त केलें आहे.

### कामगार-संघांच्या सभासदांची संख्या

अमेरिकेंतील कामगारसंघाच्या सभासदांची संख्या अलिकडे झपाट्यानें वाढली असून आज ती ७५ लक्ष-आहे. ग्रेटब्रिटन हा लहान देश असूनहि तेथील कामगार संघांत ५३ लक्ष सभासद आहेत.

### पदवीधरांस काम पाहून देण्याची योजना

रिकाम्या पदवीधरास काम पाहून देण्याच्या हेतूनें एक कचेरी स्थापन करण्याच्या योजनेस मद्रास विश्वविद्यालयाच्या सेनेटनें मान्यता दिली आहे.

### बार्शी लाइट रेल्वे कं लि.

वरील कपनीची वार्षिक सभा लंडन येथें नुकतीच झाली, त्यावेळीं तिच्या अध्यक्षांनीं कंपनीच्या व्यवहाराविषयीं माहिती सागितली गेल्या वर्षी कंपनीस १५⅓ लक्ष रु. उत्पन्न झालें. हा आकडा त्या पूर्वीच्या सालातील उत्पन्नापेक्षा २० टक्क्यांनीं लहान आहे. खर्चहि ११⅔ लाखावरून १०लक्ष, ८७ हजारावर आला व निवळ नफा ४⅓ लक्ष रु. उरला, म्हणजे त्यात त्या पूर्वीच्या वर्षाचे मानानें ३⅓ लक्षांची घट झाली. भागीदारांस २½% दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें. "मोटारींच्या वहातुकीस आळा घालण्याची योजना हिंदुस्थानसरकार आखीत आहे, तिला अनुसरून एक बिल कायदे मंडळात लवकरच मांडण्यांत येईल. म्हणजे मग रेल्वेजना अनिष्टस्पर्धेचा घातुक जाच होणार नाहीं " असें अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत सांगितलें.

### ट्रेझरी बिलांवर द. सा द. शे. १४ आणे ८पै व्याजाचा दर

नोव्हेंबर १ तारखेस ट्रेझरी बिलाचीं टेंडर्स खोलण्यात आलीं तेव्हां १ कोटि रु. किंमतीच्या बिलांस १ कोटि ८१ लक्ष रुपयाची मागणी होती असें आढळलें. व्याजाच्या सरासरीचा दर द. सा. द. शे. १४ आणे ८ पै इतका बसला.

### लॉर्ड रे म्युझियम, पुणें

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम पुणें ही संस्था पहावयास गेल्या तीन महिन्यांत—जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर मिळून १९,७७६ प्रेक्षक आले होते.

### न्यू इडिया अॅशुअरन्स क लि.

वरील विमा कपनीची वार्षिक साधारण सभा ता २२ सप्टेंबर रोजीं भरली होती कंपनीनें ३१ मार्च, १९३७ अखेर संपलेल्या वर्षांत मिळविलेल्या कामाची व सभेनें जाहीर केलेल्या डिव्हिडडचीं माहिती "अर्था"त आलेलीच आहे. आगबोटींतील वहातूक, अपघात, इत्यादि न्यू इंडियाच्या प्रमुख शाखा असून आयुर्विम्याचें काम स्वीकारण्यास तिनें प्रारंभ करून फक्त आठच वर्षें झालेलीं आहेत, त्या मानानें ह्या शाखेनें केलेली प्रगति अत्यत अभिनंदनीय आहे १९३६-३७ मध्यें तिनें १ कोटि. ६७ लक्ष रुपयाचे विमे उतरले. तिचें जाळें सर्वत्र पसरलेलें आहे, सर नवरोजी सकलातवाला हे कंपनीचे चेअरमन व मि. आर. जी. डफ हे जनरल मॅनेजर आहेत.

### दिल्ली ते मद्रास २७ तासात प्रवास

मुंबई ते दिल्ली वैमानिक वहातुक ता. ८ नोव्हेंबर रोजीं सुरू झाली. प्रत्येक आठवड्यात विमानांची दोनदां ये-जा होईल व वाटेंत ग्वाल्हेर, भोपाळ व इंदूर हीं शहरें घेण्यात येतील. मुंबईहून मद्रासला जाणाऱ्या विमानाच्या वेळाशीं ह्या विमानाच्या वेळा जोडण्यात यावयाच्या आहेत.

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| ३१-१०-३७ ते ६-११-३७ | ३२,९८,५१४ |
| २१-९-३१ ते ६-११-३७ | ३,०५,६५,७९,२३८ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५४० | सरकारी खर्च व स्वदेशी उद्योगधंदे जकाती कमी करण्याची भाषा फोल आहे–हिंदुस्थान इंडस्ट्रियल क. लि. | |
| २ शेतकऱ्यांचें कर्ज व लवादाचा कायदा ... | ५४१ | ५ पुण्यातील सहकारी दिन | ५४५ |
| ३ विश्राम मंडळांत औद्योगिक शाळेचें उद्घाटन | ५४२ | ६ बँबे को ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली | ५४५ |
| ४ स्फुट विचार .. | ५४३ | ७ औंध स्टेट बँकेची वार्षिक सभा ... ... | ५४६ |
| लोकरीच्या हातकामाचा धंदा-कंपन्यांच्या कायद्यासबंधीं तक्रार—मुंबईस नवीन रोखे बाजार !—दोन रोखे बाजारांची आवश्यकता आहे कायॉ— | | ८ इंग्लिशांचें हिंदुस्थानांतील शिवणकामाकडे लक्ष | ५४७ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ५४८ |


# अर्थ

बुधवार, ता १० नोव्हेंबर, १९३७

## शेतकऱ्यांच्या कर्जाचें ओझें लवादानें हलकें करण्याचा कायदा

शेतकरीवर्गाची आर्थिक हलाखी दूर करण्याकरितां प्रांतिक सरकारनें हातीं घेण्यासारख्या योजनांपैकीं सावकारी व्यवहाराचें नियमन होण्याविषयींच्या कायद्याची रूपरेखा आम्हीं स्थूल मानानें मागें दिली आहे. ह्या कायद्याचा उपयोग ऋणको शेतकऱ्यांस चांगला होईल, ह्यांत शंका नाहीं तथापि, त्यांच्या डोक्यावर मागच्या कर्जाचे डोंगर चढले आहेत, त्याचें ओझें हलकें झाल्यावाचून शेतकरीवर्गाची दु स्थिति नाहींशी होण्याची आशा करणें व्यर्थ आहे. चक्रवाढ व्याजानें कर्जें फुगलीं असून तीं फेडण्याचें त्राण शेतकऱ्यामध्यें उरलें नाहीं आणि तें ओझें डोक्यावर वागवून त्यांनीं आपला उद्योग चालवावा आणि कुटुंबपोषण करावें ही अपेक्षा फुकट नाहीं काय ? ह्या करिता, लवादाकरवीं शेतकऱ्याच्या कर्जाची छाननी होऊन कर्जदारांच्या ऐपतीस जुळतील आणि सावकारांवर न्याय्य स्वार्थत्यागाचा बोजा पडेल अशा रीतीनें त्यांच्या रकमा कमी करणें आणि त्याच्या फेडीची तरतूद करणे ह्या बाबी कायद्यानें निश्चित केल्या जातात. कर्जलवादाचे ह्या तऱ्हेचे कायदे मध्यप्रांत, बंगाल व मद्रास ह्या प्रांतात चालू आहेत आणि त्यांचा उपयोग शेतकऱ्यांस होत असल्याचा अनुभव आला आहे. दुसरीकडे मिळालेल्या अनुभवाचा फायदा घेऊन इतर प्रांतांच्या धर्तीवर मुंबई सरकारनें नवीन कायदा करणें अगत्याचें आहे. ह्या कायद्याचें स्वरूप कसें असावें ह्या विषयींची कल्पना आम्हीं येथें देत आहों

कर्जफेडीची रकम ठरवावयाची ती सक्तीनें नसून धनको ऋणकोच्या समतीनें निश्चित व्हावयाची हा प्रस्तुत कायद्याचा एक विशेष असतो. लवादाच्या हस्तें दोन बाजूंमध्यें कर्जाबाबत तडजोड घडवून आणणें हा त्यांतला मुख्य भाग होय. कोणत्याहि शेतकऱ्यास, तो जमीनीचा मालक असो अथवा कुळ असो, आपल्या देण्याबाबत तडजोड व्हावी अशी मागणी करण्याचा हक्क कायद्यानें प्राप्त होतो. धनकोसहि आपलें येणें लवादाकडून निश्चित करून घेतां येतें. पण कायद्यानें दिलेली ही सवलत कर्जदार-शेतकऱ्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. सावकार मुद्दल व व्याज देण्याचा तगादा करूं लागला असतां किंवा कर्जाचा बोजा वाढत आहे असें दिसल्यानें कोणत्याही ऋणकोस आपला बोजा कमी करून घेतां येतो. मोठ्या जमीनदारांनीं आपण शेतकरी आहों ह्या सबबीवर कायद्याच्या सवलतींचा अयोग्य फायदा घेऊं नये म्हणून कर्जलवादाच्या रकमेस मर्यादा घालण्यात येते उदाहरणार्थ, शंभर रुपयांपेक्षा कमी नाहीं आणि दहा हजारांपेक्षां अधिक नाहीं अशा कर्जांच्या बाबतींतच लवादाकरितां अर्ज करतां येईल असा निर्बंध कायद्यांत असतो. कर्जलवादमंडळ सरकार नेमतें आणि त्याच्या अधिकाराची व्याप्ती तालुका किंवा जिल्हा ह्याच्या क्षेत्रांत मर्यादिलेली असते.

लवादाकडे करावयाच्या अर्जांत कर्जाचा विस्तृत तपशील द्यावा लागतो. अर्जाची पूर्व चौकशी होऊन लवाद करावा असें मंडळास वाटल्यास तें कर्जदाराच्या सर्व धनकोंस आपल्या येणें कर्जाची माहिती पुरवण्याविषयीं सूचना करतें आणि ही माहिती ठराविक वेळांत न आल्यास कर्जाची फेड झाली असें समजलें जातें. सावकारास माहिती देण्याचे संबधांत हयगय करून चालत नाहीं आणि आपल्या कर्जाच्या पुष्टीसाठी आवश्यक असलेलीं कागदपत्रें पुढें मांडावीं लागतात. लवादमंडळापुढे वकील लोकांस उभें रहाण्यास प्रतिबंध केलेला असतो कर्ज–लवादाबद्दलचा अर्ज मंडळाकडे गेला कीं त्यांत दाखल असलेल्या कर्जाबाबत कोणत्याहि दिवाणी कोर्टांत खटला चालू शकत नाहीं, एवढेंच नव्हे, तर चालू असलेले दावेहि बंद पडतात. कायद्यामधली ही तरतूद अत्यंत महत्त्वाची आहे तिनें कर्जवसूलबंदीचें कार्य आपोआप घडून येतें. अशा प्रकारची बंदी सरकारनें करावी म्हणून जी कित्येकांची मागणी आहे तिची पूर्तता ह्या रीतीनें सहज होते. लवादाची मागणी कर्जदारानें केलेली असल्यामुळें सावकारास ह्या बंदीविरुद्ध तक्रार करतां येत नाहीं. ज्या कर्जाबाबत सावकार फिर्याद करणार किंवा तगादा लावणार, त्याचीच कायदेशीर चौकशी व्हावयाची असल्यानें वसूलीचे सर्व मार्ग स्वाभाविकपणानें खुंटतात शेतकरी वर्गाच्या मालमत्तेवर सावकारांनीं गदा आणू नये हा मॉरेटोरियमचा म्हणजे कर्ज–वसूल–तहकुबीचा जो उद्देश तो ह्या कायद्यानें व्यवस्थित रीतीनें साध्य होतो कर्जे हलकीं करण्याच्या योजनेचा तहकुबी हा प्रारंभाचा भाग आहे नुसती तहकुबी जाहीर केली आणि तिच्यापुढें कर्ज–फेडीची कांहींच योजना नसली, तर तिचा कांहींच उपयोग नाहीं. कारण, तिच्या योगानें कर्जफेडीचें आजचें मरण उद्यावर ढकललें, एवढेंच होतें परत कर्जाच्या रकमेस हात लागण्याची तरतूद तीमध्यें नसते कर्जलवादाचा कायदा सावकारांच्या स्वार्थाच्या मुळावर येतो -आणि तहकुबी त्यास पसत होणें अशक्य आहे, हें खरें, परतु बहुजन समाजाच्या हिताचें दृष्टीनें आणि शेतीच्या धंद्याचे संरक्षणार्थ त्यास कायद्यानें येणारा स्वार्थत्याग केलाच पाहिजे तागाईचीं कर्जें देणारा सरकार हा सावकार लवादाच्या कायद्याचे तडाक्यातून सुटत नाहीं आणि सहकारी संस्थांसहि त्यांनी झळ सहन करावी लागते हें येथें लक्षात ठेवलें पाहिजे.

---

## विश्राम-मंडळांत औद्योगिक शाखेचें उद्घाटन

येथील विश्राम मडळात दिवाळी पाडव्यानिमित्त गेल्या गुरुवारीं स्नेहसमेलन भरलें होतें आणि त्या प्रसगीं प्रो काळे ह्यांनीं अध्यक्ष ह्या नात्यानें मडळाची औद्योगिक शाखा चालू झाल्याची औपचारिकरीत्या घोषणा केली. मडळाचे कार्यवाह ह्यानीं त्याच्या पचायतनातल्या श्रीराम विश्रामधाम, शिक्षण विचारिणी महासभा इत्यादि सस्थांच्या कार्याचा वृत्तांत सांगितला आणि औद्योगिक मडळ स्थापण्याच्या कल्पनेविषयीं माहिती दिली. ह्यानतर समेलनाचे अध्यक्ष, प्रो काळे, ह्यानीं भाषण केलें, त्याचा गोषवारा येणेंप्रमाणें:—

### प्रो. काळे ह्याचें अध्यक्षीय भाषण

विश्राम-मडळ ही सेवानिवृत्ताची संस्था आहे, परतु सेवानिवृत्ति म्हणजे एक प्रकारची सेवा सुटली असता दुसऱ्या तऱ्हेची सेवा अंगिकारणें असा अर्थ केला पाहिजे. कर्मसन्यास शक्य व इष्ट नाहीं अशी गीतेची शिकवण आहे. तिला अनुसरून सरकारी नोकरींतून मोकळे होऊन समाजसेवा करण्याचें व्रत विश्राम-मडळाचे सभासद आचरीत आहेत, हें अभिनंदनीय आहे. औद्योगिक क्षेत्रात मडळ पाऊल टाकीत आहे, ती सेवा मात्र भिन्न प्रकारची आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. धर्म, वेदांत, शिक्षण इत्यादि विषयावर येथें प्रवचनें व व्याख्यानें होतात त्यातले विचार कोणास पसंत पडले नाहींत किंवा त्यांचेप्रमाणें आचरण करणें कोणास आवडलें नाहीं, तर त्याच्यावर कोणत्याहि प्रकारची जबाबदारी येत नाहीं आणि त्या बाबतींत मडळावरहि जबाबदारी नसते. पण औद्योगिक मंडळाचा सबध दुसऱ्याचे पैशाशीं यावयाचा आहे त्याची कायद्याप्रमाणें नोंदणी व्हावयाची असून त्याचा कारभार नियमाप्रमाणें व जबाबदारीच्या जाणीवेनें व्हावा लागेल नवीन निघणारें व्यापारी मडळ संयुक्त भांडवलाच्या घटनेचें असणार, तरी त्याच्या कारभारात सहकारितेचें नैतिक तत्त्व आचरलें पाहिजे. मॅनेजिग एजंटची सस्था अलीकडे अप्रिय झाली आहे हें ध्यानात वागवून मंडळाच्या भागीदारास नफा वाटला जाईपर्यंत त्याचे मॅनेजिंग एजट विनावेतन काम करणार आहेत ही गोष्ट चागली आहे. विश्राम मडळाचे सभासद निरनिराळ्या सेवाक्षेत्रांत अनुभव घेतलेले गृहस्थ आहेत. पण स्वतत्र व्यापार करून किंवा कारखाना चालवून निवृत्त झालेले त्यामध्यें क्वचितच आढळतील ह्या कारणानें, तज्ज्ञाच्या सल्ल्यानें, पद्धतशीर रीतीनें व व्यावहारिकपणानें वागण्याची मोठी जबाबदारी मंडळाचे शिरावर आहे. कोणतीहि गोष्ट प्रत्यक्ष केल्याविना समजत नाहीं, पण प्रयोग सावधगिरीनें केला पाहिजे. गावांत दुकानदार व अडत्ये अनेक आहेत तेव्हा मडळानें केवळ घोपट, क्षुण्ण, मार्गानें न जातां नवीन क्रांति करून दाखविली पाहिजे मालाच्या खरेदी-विक्रीबरोबर मालाचें उत्पादनहि क्रमाक्रमानें करता येण्यासारखें आहे. तिकडे लक्ष दिलें पाहिजे पाढरपेशावर्गानें आपली नैतिक भूमिका न सोडता बदलत्या काळात उत्पन्न झालेल्या नवीन परिस्थितीशी अडचणींस तोंड देऊन झगडलें पाहिजे महाराष्ट्रात लाखो रुपयाचें भाडवल सहज मिळण्यासारखें नाहीं, म्हणून, आम्हीं आमचें उद्योगधदे लहान प्रमाणावर काढून ते हळुहळु वाढवणें आवश्यक आहे सचोटी, स्वार्थत्यागाची तयारी व सघटनाची प्रवृत्ति हे गुण आपणामध्यें वास करतील, तर महाराष्ट्राची औद्योगिक उन्नति निश्चयानें होईल परिस्थितीप्रमाणें महाराष्ट्रियानीं राजकारण, युद्धें, व्यापार व धंदे यशस्वी रीतीनें मार्गे करून दाखवले आहेत. त्यास सध्याच्या आधुनिक काळांत औद्योगिक क्षेत्रात कामगिरी का करतां येऊं नये? येथें निश्चयाचें, संघटनेचें व स्वार्थत्यागाचें बळ पाहिजे विश्राम-मंडळानें नवीन उद्योग हातीं घेतला आहे त्यास सर्वांनीं यथाशक्ति व यथामति सहाय केल्यास यश प्राप्त झाल्यावाचून रहाणार नाहीं.

## NOTICE TO CONTRACTORS.

Separate sealed percentage tenders in Form B-1 for each of the following works are invited and will be received by the Undersigned upto 2 P M on 22-11-1937. Other particulars regarding the contract etc and tender forms can be had at the Undersigned's Office on any working day, during office hours upto 20th November 1937 The Undersigned reserves the right to reject any or all tenders without assigning reasons.

| Work | Estimated Cost Rs | Cost of Tender Form Rs |
|---|---|---|
| (1) Improving Kamatgi Gadag Road section from Badami to—Border of Dharwar District. | 13 573/- | 1-2-0 |
| (2) Improvements to Havanur Ekkambi Road, Constructing drains & Culverts in miles 0 to 20 | 45,213/- | 7-8-0 |

Ex Engr's Office, Dharwar, 27th October, 1937.

P. K SHINDE
Executive Engineer,
Dharwar Division, Dharwar.

U.P.GOVT. ARTS & CRAFTS EMPORIUM,
Hazaratgung, Lucknow.
CATERS FOR COTTAGE TO PALACE DEMANDS.
FOR UTILITY, DECORATION & PRESENTATION ARTICLES THROUGH ITS ART HANDLOOM AND VILLAGE INDUSTRIES SECTIONS
Please apply for our illustrated catalogue for more details and also pay a personal visit when you are in Lucknow
BUSINESS MANAGER

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

# स्फुट विचार

## लोकरीचा हातकामाचा धंदा

घरगुती धंद्याचा आधुनिक स्पर्धेच्या काळात टिकाव लागावयाचा असेल तर त्यास सुधारणा करण्यास वाव आणि सहाय देणें आवश्यक आहे ह्या दृष्टीनें हातमागाच्या धंद्याचें संघटन आणि प्रगति सध्या देशात चालू आहेत हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांस दिलेल्या ग्रँटचा विनियोग त्या कामीं करण्यांत येत आहे. लोकरीच्या बनावटीचें काम करणाऱ्या विणकरास अशाच प्रकारच्या सहायाची आवश्यकता होती, आणि त्यासंबधात मुंबई सरकारनें तयार केलेल्या योजनेस हिंदुस्थान सरकारची मान्यता मिळाली आहे मध्यवर्ति सरकारनें पाच वर्षेपर्यंत ग्रँट देण्याचें कबूल केलें असून तिच्यामधून लहान प्रमाणावर लोकरीचें सूत व कापड तयार करण्याच्या धंद्याच्या सुधारणेवर खर्च व्हावयाचा आहे नव्या प्रकारचे नमुने चालू करणें, मालास तजेला देणें आणि त्याच्या विक्रीची व्यवस्था करणें ह्या बाबतींत मुख्यत्वेंकरून धंद्यास सहायाची आवश्यकता आहे, आणि ह्या व इतर गरजा भागवण्याची तरतूद करण्यात येत आहे एका तज्ञाच्या देखरेखीखाली वरील सुधारणा घडवून आणण्यात यावयाची आहे आणि मुंबई सरकारच्या उद्योगखात्याचे मुख्य प्रस्तुत योजना यशस्वी होण्यासाठी तिच्यावर नजर ठेवतील. लोकरीचा लहान प्रमाणावरील धंदा हातीं घेऊन त्याचें संरक्षण व प्रतिपालन करण्याचें विधायक कार्य चालू केल्याबद्दल मुंबई सरकार व मि. आडवणी अभिनंदनास पात्र आहेत घरगुती व छोटेखानी धंद्याच्या उत्कर्षाचा प्रश्न ह्याच मार्गानें सोडवणें आवश्यक आहे.

## कंपन्यांच्या कायद्यासंबंधीं तक्रार

अकौंटंटस व ऑडिटर्स ह्यांची मुंबईस एक संस्था आहे, तिच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं मि व्हिट्बी ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणात कंपन्याविषयींच्या नवीन कायद्यास अनुलक्षून उद्गार काढले ते मननीय आहेत. जमाखर्चाचे व हिशोबतपासनीसाचें काम करणाऱ्या मंडळीस ह्या कायद्यामुळें उद्भवलेल्या अडचणी जशा दिसतात तशा त्या इतरांच्या क्वचितच लक्षात येण्याचा संभव असतो. कंपन्यांचा कायदा इतका विस्तृत व गुंतागुंतीचा आहे कीं, त्याच्या कित्येक कलमांचा अर्थ नीट लागत नाहीं आणि त्याप्रमाणें कृति घडून येण्याचे कामीं शंका उत्पन्न होतात. हा कायदा अशा घाईनें पास करून घेण्यात आला कीं, त्यातलीं निरनिराळीं कलमें एकमेकास धरून आहेत कीं नाहीं आणि त्यापैकीं काहींमध्यें विरोध आहे कीं काय ह्याचा काळजीपूर्वक विचारहि कोणी केला नाहीं अशी मि. व्हिट्बी यांची तक्रार आहे. कायदेपडिताच्या मतें काहीं कलमाचा अर्थ होतो तो कायदा करणाराच्या उद्देशास धरून नाहीं हें उघड दिसतें तेव्हा, कोणताहि कायदा स्पष्ट व असंदिग्ध असावा, असें त्याचें म्हणणें आहे कायद्याच्या अस्पष्ट व वादग्रस्त कलमाचा अर्थ कोर्टांत जाऊन निश्चित करून घेण्याची आवश्यकता भासावी हें चांगलें नाहीं आणि कंपन्याच्या कायद्याची दुरुस्ती होण्याविषयींच्या सूचना सरकारकडे गेल्या आहेत व जात आहेत ह्यावरून त्याचें सदोषत्व सिद्ध होतें असें मत त्यानीं व्यक्त केलें आहे कोणत्याहि कायद्याच्या अर्थासंबंधानें शका किंवा वाद उपस्थित झाला असता निर्णायक अभिप्राय तो करणारे देऊं शकत नाहींत आणि त्यासाठी कोर्टाकडे धाव घ्यावी लागते ह्या बाबीकडे मि व्हिट्बी ह्यांनीं सरकारचें लक्ष वेधलें, ही गोष्ट चागली आहे ह्या प्रश्नाचा विचार हिंदुस्थान सरकानें लवकर करावा, एवढें त्याचें महत्त्व सूचित आहे.

## मुंबईस नवीन रोखेबाजार ?

सरकारी कर्जरोखे व कंपन्याचे भाग ह्यांची खरेदी-विक्री होण्यास सोयीचें पडावें म्हणून दलालाची संस्था असते आणि तिच्या कामकाजाच्या नियमास सरकारनें मान्यता दिलेली असते. व्यापाराच्या मोठ्या शहरात अशा संस्था असतात आणि रोखे व भाग विकणें व विकत देणें ह्या जनतेच्या व्यवहारास तिचें सहाय मिळतें. मुंबईस ह्या प्रकारची संस्था आहे, तिचें नाव "नेटिव्ह शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन" असें आहे. ही फार जुनी संस्था असून तिच्या कारभाराविषयीं अडचणींचे व तक्रारींचे प्रश्न उपस्थित झाल्याकारणानें मुंबई सरकारनें कमिट्या नेमून चौकशा करवल्या आहेत. अलीकडे मॉरिसन कमिटीनें केलेली चौकशी व तिच्या शिफारशी हीं प्रसिद्ध आहेत. त्यासंबधात व्हावयाच्या सुधारणाचे बाबतींत चर्चा झालेली आहे आणि ह्या प्रश्नाचा अखेरचा निकाल लागलेला नाहीं. ह्या परिस्थितींतच "इंडिअन स्टॉक एक्सचेंज लि" ह्या नावाची नवी संस्था रोखेबाजाराचे व्यवहार करण्यासाठीं स्थापण्याचें ठरलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्या बातमीमुळें लोकांत कुतूहल उत्पन्न होणें साहजिक आहे. आमच्या प्रातात "बॉबे सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट्स कंट्रोल ॲक्ट" ह्या नांवाचा कायदा प्रचलित आहे रोख्यांच्या खरेदीविक्रीचे करार होतात, त्याचें नियमन करणें हा त्या कायद्याचा हेतु आहे. रोख्याच्या खरेदी-विक्रीबद्दलचे वायद्याचे करार सरकारची मान्यता असलेल्या रोखेबाजाराच्या संस्थेच्या सभासदाचे मार्फतच झाले पाहिजेत, नाहींतर त्यास कायदेशीरपणा प्राप्त होत नाहीं आणि न्यायमंदिरामध्यें त्यास स्थान मिळत नाहीं. रोखीनें होणाऱ्या ह्या व्यवहारास सदरहू नियम लागू नाहीं. नेटिव्ह शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन ही संस्था मुंबई सरकारनें मान्य केली आहे, आणि रोख्यांच्या बाबतचा वर निर्दिष्ट केलेल्या कायद्याच्या कक्षेंत ती येते. नवीन होऊं घातलेल्या स्टॉक एक्सचेंजच्या उत्पादकास मुंबई सरकारची मान्यता मिळवावी लागेल.

## दोन रोखेबाजारांची आवश्यकता आहे काय ?

रोखेबाजाराचें एकच प्रकारचें कार्य करणाऱ्या दोन संस्थांची मुंबई शहरास व इलाख्यास आवश्यकता आहे काय ? हा प्रश्न येथें उपस्थित होतो. सध्या अस्तित्वात असलेली आणि अनेक वर्षांचा अनुभव घेतलेली स्टॉक एक्सचेंज जनतेच्या मागणीच्या मानानें अपुरी आहे काय ? एकाच क्षेत्रात दोन संस्था वावरूं लागल्या असता धंद्यात अगोदरच माजलेली स्पर्धा अधिक तीव्र होण्याची आणि तिचे परिणाम प्रतिकूल होण्याची भीति नाहीं काय ? ह्या गोष्टींचा मुंबई सरकारास विचार करावा लागेल. नवीन रोखेबाजाराच्या उत्पादकानीं ह्या बाबी लक्षात घेऊनच आपली योजना आखली असली पाहिजे, पण त्याविषयींची तपशीलवार माहिती प्रसिद्ध होणें आवश्यक आहे मुंबईमधील कित्येक धनाढ्य धंदेवाल्यानीं नवीन स्टॉक एक्सचेंज स्थापण्यात पुढाकार घेतलेला आहे दोनशें लोकाचे सभासद होण्याविषयींचे, अर्ज आले आहेत आणि सभासदत्वाचें प्रवेशमूल्य दहा हजार रुपये इतकें निश्चित करण्यांत आलें आहे मडळीस नुकसान आल्यास

त्याची भरपाई करण्यासाठी प्रत्येक सभासद शंभर रुपयांची हमी घेणार असें ठरलें आहे मॉरिसन कमिटीच्या शिफारसी नवीन रोखेबाजाराच्या संस्थापकास मान्य आहेत आणि बाजारांतले व्यवहार त्यांस अनुसरून व्हावेत अशी त्यांची योजना आहे. जुन्या स्टॉक एक्सचेंजची मंडळी व मुंबई सरकार ह्याचेमध्यें वरील कमिटीच्या कांहीं शिफारसींचे बाबतींत मतभेद झाल्याचें दिसत होतें, ह्या दृष्टीनें नवीन एक्सचेंजची भूमिका अधिक समाधानकारक आहे असें सकृत्दर्शनी वाटतें. तथापि, रोखे व मंडळयाचे भाग ह्याची खरेदी-विक्री सोइस्कर रीतीनें व्हावी हा जो स्टॉक एक्सचेंजचा प्रधान हेतु तोच जनतेच्या हिताच्या दृष्टीनें निर्णायक समजला पाहिजे आणि एकाच्या ठिकाणीं दोन रोखेबाजार झाले असता तो हेतु अधिक सुलभतेनें सफल होईल किंवा कसें ह्याच महत्वाच्या प्रश्नाचा सरकारनें विचार करावयाचा आहे. जुगारी स्वरूपाच्या सट्टेबाजीचें नियमन व्हावें म्हणून स्टॉक एक्सचेंजचे नियम सरकार घालून देतें आणि त्यांचें पालन व्हावें असा त्याचा आग्रह असतो. रोखेबाजारातील दलालास आणि त्याच्या संस्थेस आपल्या व्यवहारात सहाजिकच स्वायत्तता हवी असते, परतु लोकाच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक वाटेल त्या प्रमाणात ती मर्यादित करणें हें राज्यकर्त्यांचें कर्तव्य समजलें जातें.

---

## सरकारी खर्च व स्वदेशी उद्योगधंदे

कोणत्याहि राष्ट्राच्या उद्योगधंद्याची सुस्थिति, त्यास स्वदेशात आणि परदेशात मिळणाऱ्या गिऱ्हाइकीवर अवलबून असते. त्यामध्यें तयार होणारा माल देशात किंवा देशाबाहेर खपण्यास अवसर असला पाहिजे. सध्याच्या जागतिक आर्थिक मंदीच्या काळांत आणि विशेषतः राष्ट्रें शक्य तितक्या प्रमाणांत स्वावलंबी होण्याचा यत्न करीत असतां परराष्ट्राशीं व्हावयाची देवघेव मर्यादित झाली आहे आणि प्रत्येक देशानें तयार केलेला माल त्याच देशाच्या बाजारात खपणें आवश्यक झालें आहे अलीकडे औद्योगिक चलती सर्वत्र दिसत आहे, तिच्या मुळाशी राष्ट्राचें स्वदेशी व्रताचें आचरण पुष्कळ अशानीं आहे, ह्यात शंका नाहीं. ह्या स्वदेशी प्रवृत्तीस राष्ट्रीय सरकारें सर्वतोपरी सहाय देत आहेत, हें ध्यानात ठेवण्यासारखें आहे. स्वदेशीच्या प्रगतीस उत्तेजन देण्याचे अनेक मार्ग आहेत, त्यामध्यें सरकारी उत्पन्नाचा शक्य तेवढा मोठा भाग देशामध्यें खर्चून लोकास कामधंदा मिळवून देणें हा एक आहे. मंदी हाटवण्याचे पद्धतशीर प्रयत्न ग्रेटब्रिटनमध्यें तेथील सरकार करीत आहे ब्रिटिश संरक्षण-खात्याचे मुख्य, सर टॉमस् इन्सकिप, ह्यांनीं कॉमन्स सभेंत गेल्या आठवड्यात माहिती दिली तिच्या योगानें त्या बाबतींतल्या धोरणावर बोधप्रद प्रकाश पडला आहे त्याच्या अधिकारातल्या खात्यानीं गेल्या वर्षी सुमारें २६५ कोटि रुपयाचा माल घेतला आणि चालू सालच्या पहिल्या सहा महिन्यातला हा आकडा सुमारें १२० कोटि रुपये आहे ह्या रकमांचा मोठा अंश आर्थिक मंदीनें विशेष ग्रासलेल्या ग्रेटब्रिटनच्या भागामध्यें खर्चण्यांत आला आहे.सरकारच्या पैशाचा विनियोग एवढ्या मोठ्या प्रमाणांत स्वदेशी धंदे.व व्यापार ह्यांच्या उन्नतीकडे होत आहे इंग्लंडचें खुल्या व्यापाराचें तत्त्व केव्हाच गुंडाळलें गेलें आहे याचा निराळा पुरावा देण्याचें आतां कारण नाहीं. हिंदुस्थानांत स्वदेशी चळवळीस उत्तेजन देण्याचें महत्त्व किती आहे हें वरील विवेचनावरून सिध्द होत आहे.

---

## जकाती कमी करण्याची भाषा फोल आहे !

जगाची आर्थिक घडी विस्कटली आहे ती पुन्हां नीट बसण्यास आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मार्गीतील सध्याचे जकातींचे वगैरे अडथळे दूर होणें अगत्याचें आहे ह्या आशयाची भाषा मुत्सद्यांच्या व धंदेवाल्याच्याहि तोंडून वारंवार ऐकूं येते. संरक्षक जकातींच्या सारख्या योजना राष्ट्रांनीं आपल्या पुरत्या बदलल्या म्हणजे सर्वांचाच परस्पर-व्यापार जोरानें चालू होऊन आर्थिक प्रगतीचा मार्ग मोकळा होईल असें ध्वनित करण्याकडे त्यांचा रोख असतो. परतु वस्तुस्थिति अशी आहे कीं जकाती कमी करण्याचें धोरण दुसऱ्यांनीं अवलंबावें म्हणजे आपला व्यापार बिनधोक चालेल असें प्रत्येकास वाटत असतें आणि सत्य स्पष्टपणें बोलून दाखवण्याचा निस्पृहपणा क्वचित् आढळतो. ब्रिटिश व्यापारी संघाचें एक मध्यवर्ती मंडळ आहे त्याचे अध्यक्ष,सर जॉफ्रे क्लार्क, ह्यानीं त्या मडळाच्या सभेंत प्रास्ताविक भाषण करतांना मात्र या सबंधात स्पष्टोक्तीचा आश्रय केला. ते म्हणाले:-"जकातींचे दर कमी व्हावे आणि आयात-व्यापारावरचीं नियंत्रणें दूर व्हावीं असें आपणांस मनापासून वाटतें काय? आज आपल्या देशांत (ग्रेट ब्रिटनमध्यें) औद्योगिक चलती दिसत आहे, तिला मुख्य कारण जकाती व व्यापारावरील निर्बंध हे नाहींत काय? लढाऊ सामान तयार करणाऱ्या कारखानदारास जकाती कमी करण्याचें धोरण पसत पडेल असें तुम्हाला वाटतें काय? जकाती काहीं नव्या नाहींत. त्या वर्षानुवर्ष चालत आहेत आणि त्या असूनहि व्यापार वाढलाच आहे कीं नाहीं? चलन व हुंडणावळ पद्धति, राष्ट्रीय स्वावलंबन इत्यादि अडथळे वास्तविक रीतीनें व्यापारवृद्धीच्या मार्गांत येत आहेत." नियत्रणात्मक जकातींचा उंट गिळल्यावर सर जॉफ्रे क्लार्क ह्यास राष्ट्रीय स्वावलंबनाचें चिलिट त्रास देत आहे असें दिसतें. तेंहि पचवण्याचा प्रसग त्यांचेवर आल्यावाचून रहाणार नाहीं.

---

## दि हिंदुस्थान इंडस्ट्रिअल कं लि.

वरील कपनीची कर्जाची योजना कशी हिशेबी तत्त्वावर बसविलेली आहे व कंपनीचा व्यवहार यशस्वी झाल्यानें अनेक लोकांचें हित कसें साधणार आहे, ह्याचें विवेचन "अर्था"च्या ता २६ मे, १९३७ च्या अकांत आम्हीं केलें आहे. कर्जाची नेहमी गरज असणाऱ्या लोकास तें मिळण्याची सघटित व्यवस्था पद्धतशीररीतीनें आखून परतफेडीची योजनाहि कंपनीनें शिस्तवार केली आहे तथापि 'स्नो बॉल' स्वरूपाच्या योजनाचा लोकास आलेला अनुभव उद्वेगजनक असल्यानें हिंदुस्थान इंडस्ट्रियल कपनीच्या योजनेचीं विशेष अंगें त्याच्या लक्षात आलेलीं दिसत नाहींत. गरजू लोकांनीं ह्या कंपनीच्या योजनांची पूर्ण माहिती मिळवून त्यास अनुसरून कर्जाकरितां लोन सर्टिफिकिटें घेतलीं म्हणजे त्यामुळें त्यांची वैयक्तिक साय होईल आणि कंपनीच्या कार्यास यश प्राप्त होण्यास त्यानें सहाय मिळून तिच्या सामाजिक उपयुक्ततेच्या योजना पुऱ्या होण्याचा मार्ग मोकळा होईल. लोकाश्रयावरच कंपनीच्या योजनांची यशस्विता अवलंबून आहे.

## पुण्यांतील सहकारी–दिन

*जिल्हा इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें अखिल भारतीय सहकारी दिन गेल्या शनिवारीं सेंट्रल बँकेच्या दिवाणखान्यात साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील अनेक ठिकाणीं सभा भरवून आतरराष्ट्रीय सहकारी सघाचा संदेश खेडेगांवापर्यंत पोहोंचविण्याचा अभिनंदनीय उपक्रम जिल्हा इन्स्टिट्यूटनें यंदा केला होता इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, श्री. दाते, ह्यानीं प्रारंभीं सहकारी दिनाचें महत्त्व आणि संदेशाच्या ठरावाचें स्वारस्य समजावून सागितलें, नतर श्री. पोतदार, श्री नानासाहेब भोंडे, श्री. सावत, श्री. गोखले इत्यादि वक्त्यांचीं सहकारी चळवळीच्या निरनिराळया अगासबंधानें भाषणें झालीं शेवटीं समारंभाचे अध्यक्ष, प्रो काळे, ह्यांचें समारोपाचें भाषण झालें त्याचा साराश खाली दिला आहे.—*

### प्रो काळे ह्यांचें अध्यक्षीय भाषण

आतरराष्ट्रीय सहकारी सघाच्या सदेशात जागतिक शाति सारख्या आमच्या शक्तीच्या बाहेर असलेल्या विषयाचा उल्लेख आहे आम्हीं आमचें सघटन व बल वाढविल्यावाचून त्या सदेशाचा परामर्श आम्हांस घेता येणार नाहीं मुबई सरकारनें नेमलेल्या कमिटीनें प्रातिक इन्स्टिट्यूट बद करावें, अशी सूचना केली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे इन्स्टिट्यूटच्या म्हणजे सहकारी लोकशाहीच्या घटनेवरच गदा येत असता, ह्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार आपणास करावा लागेल. कमिटीच्या प्रत्यक्ष शिफारसी ह्यासंबंधांत काय आहेत आणि प्रधान मंडळ ह्यास मान देतें किंवा काय ह्याची विश्वसनीय माहिती उपलब्ध होईतोंपर्यंत, प्रस्तुत प्रश्नासंबधानें अभिप्राय व्यक्त करणें अवघड व अनिष्ट आहे तथापि, प्रातिक इन्स्टिट्यूट व त्याच्या शाखा रहाव्या असें आपण म्हणतों तेव्हां ह्या सस्थाची स्थिती, अधिकार व कार्य आज काय आहे, हें निर्विकारपणानें पहाणें अगत्याचें आहे.

गेल्या पाच–सात वर्षातला इन्स्टिट्यूटचा इतिहास पाहिला, तर असें दिसून येईल कीं स्वतंत्र व लोकशाहीच्या तत्त्वाच्या घटनेचें आपलें ध्येय जवळ आलें नसून आपली पीछेहाटच झाली आहे. ऑडिट, देखरेख, शिक्षण हीं सर्व कार्यें इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें व्हावीं हें आमचें ध्येय, पण तें कितीसें साध्य झालें आहे? ऑडिट दूरच राहो, पण देखरेखही डिस्ट्रिक्ट बोर्डस ऑफ सुपरव्हायजिंग यूनिअन्सच्या स्वतंत्र घटनेमुळें इन्स्टिट्यूटच्या क्षेत्रमर्यादेच्या बाहेर गेली आहे. शिक्षणाचें कामातहि हिंदुस्थान सरकारच्या ग्रँटचा विनियोग करताना आमच्या सरकारनें इन्स्टिट्यूटला नुसतें विचारलेंहि नाहीं. अशा रीतीनें इन्स्टिट्यूटला जबाबदारी व कार्य हीं अत्यत सकुचित प्रमाणात राहिलीं असता पतपेढ्या, बँका व इतर सस्था ह्याच्या वर्गण्या आणि सरकारी ग्रँट आम्हीं खर्चीत रहाण्यात स्वारस्य काय? पुणें जिल्हा इन्स्टिट्यूट आपल्या मर्यादेंत उपयुक्त कामागिरी करीत आहे हीं अभिमानाची गोष्ट आहे. दुसऱ्या कांहीं जिल्ह्यातहि चांगलें काम चाललें असेल परंतु एकदरीनें आजची परिस्थिती काय आहे, तें पहा आणि मग सरकाराकडे योग्य मागणी करा इन्स्टिट्यूट जगायचें असेल तर तें कार्यक्षम, कार्यव्यापृत व बलवान असें असलें पाहिजे. नाहीं तर परिस्थितीस व ध्येयास अनुसरून त्याची पुनर्घटना करा

आपल्या प्राताच्या कॉंग्रेस प्रधान मंडळानें शेतकऱ्याची स्थिति सुधारण्याच्या हेतूनें व्यापक कार्यक्रम आखला आहे, त्याचा सुपरिणाम आपल्या चळवळीवर झाल्यावाचून रहाणार नाहीं. सावकारी व्यवहाराच्या नियंत्रणाचा कायदा व्हावयाचा आहे. त्याचप्रमाणें, लवादानें शेतकऱ्याचीं कर्जें हलकीं होण्याचा कायदाहि करण्याचें घाटत आहे. तडजोडीमुळें सावकारांस आपल्या देण्यापैकीं कांहीं रकमेस मुकावें लागेल. कमी प्रमाणांत पण तसाच स्वार्थत्याग सहकारी सस्थास करावा लागणें अपरिहार्य आहे, ही गोष्ट आपणास हिशेबात घ्यावी लागेल आज कित्येक वक्त्यानीं भाषणात सागितल्याप्रमाणें स्वार्थत्यागी कार्यकर्त्यांची संख्या आपल्या चळवळींत वाढली पाहिजे ग्रामसुधारणेच्या कार्याचा विस्तार देशभर होत आहे, आणि जनतेच्या सहकारयुक्त घटनेवाचून तें यशस्वी होणें अशक्य आहे सहकारी संस्था व व्यक्तिशः कार्यकर्ते ह्यास सदरहु ग्रामसुधारणेंत महत्त्वाचें स्थान आहे इन्स्टिट्यूटसारख्या लोकशाहीच्या तत्त्वावर चाललेल्या संस्था सर्व प्रातांमध्यें बलहीन झालेल्या आहेत, हें त्याची परिषद बंगलोर येथें गेल्या जुलै महिन्यात भरली होती, तिच्या कार्यक्रमावरून दिसून आलें आहे तरी, ह्यासंबधांत आपण निराश होता कामा नये. येणाऱ्या परिस्थितीस तोंड देऊन निश्चयानें व आत्मविश्वासानें आपण पुढें गेलें पाहिजे. पतपेढ्यांच्या कारभारावर सतुष्ट न होता, शेतीच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करणें जरूर आहे, ह्याविषयीं सर्वांची खात्री पटली आहे त्या कामीं सरकार आणि सहकारी सस्था ह्यानीं प्रगति करणें आवश्यक आहे सहकारी खात्याचें कार्य, कायदा व नियम ह्याचें परिपालन योग्य रीतीनें पाहण्याचें असून बाकी सर्व काम लोकानीं करावयाचें आहे हें आपल्या चळवळीचें ध्येय कसें गाठता येईल इकडे आपलें लक्ष पाहिजे. इन्स्टिट्यूटची व इतर पुनर्घटना ह्या ध्येयाचे दृष्टीनेंच होणें आवश्यक आहे. आज इतके पुढारी कार्यकर्ते येथें उपस्थित आहेत, ह्यावरून सहकारी चळवळीच्या भवितव्याविषयीं आपणात जिवंत जाणीव असल्याचें समाधानकारक रीतीनें सिद्ध होत आहे.

*जिल्हा इन्स्टिट्यूटचे उत्साही कार्यवाह, श्री. देवभानकर, ह्यानीं संस्थेच्या कामाची त्रोटक माहिती देऊन सर्वांचे आभार मानले आणि वंदेमातरमचें गायन होऊन समारभ समाप्त झाला.*

---

### बाँबे कोऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा सप्टेंबर, १९३७ चा अक प्रसिद्ध झाला *आहे, तो नेहमीप्रमाणें उपयुक्त लेखानीं सजलेला आहे श्री. के. एल पंजाबी ह्यांनीं आपल्या लेखात लंडन येथील ॲग्रिकल्चरल मॉर्टगेज कॉर्पोरेशनच्या व्यवहाराची माहिती दिली आहे.* आपल्या देशात जमीन गहाणाच्या बँका अद्याप प्रयोगावस्थेंत असल्यानें, *वरील माहिती अत्यंत बोधप्रद वाटेल पजाब प्रांताचे सहकारी* राजिस्ट्रार, मि एफ्. डब्ल्यू. वेस, ह्यानीं मुबई इलाख्यांतील सहकारी चळवळीचें आपल्या १२ दिवसाचे प्रवासात निरीक्षण केलें, त्यावरून त्यास दिसून आलेल्या गुणदोषाचें वर्णन त्यानीं आपल्या लेखात केलें आहे श्री सी. बी. हुली ह्याचा डेन्मार्कमधील शेतीविषयक सहकारावरील लेख माहितीपूर्ण असून श्री मळजी ह्याचा ऑडिटवरील लेख विचारप्रवर्तक आहे. कु शाता भालेराव ह्यानीं मुबई शहरातील मजुराच्या सहकारी सोसायट्यांचें स्वानुभवपूर्ण वर्णन केलें आहे, तें उद्बोधक होईल. क्वार्टर्लीमध्यें नेहेमीचीं इतर सदरें आहेतच.

---

## औंध स्टेट सेंट्रल बँक, लि औंध. (सातारा)

बँकेच्या भागीदाराची पांचवी वार्षिक साधारण सभा तारीख २४-१०-१९३७ रोजीं दुपारीं श्री. दर्शने ह्याचें अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं बँकेचे २५ भागीदार व गावातील सभ्य गृहस्थ आणि सस्थानचे अधिकारीं मिळून सुमारें १०० लोक हजर होते श्री. सभाजीपंत दर्शने आपल्या प्रास्ताविक भाषणांत म्हणाले.—

### श्री दर्शने ह्याचें भाषण

"बँक लिमिटेड झाली, त्यावेळीं जुन्या बँकेचें खेळतें भाडवल सात लाख रु होतें, तें आता सुमारें दहा लाख झालें आहे शेअर भाडवल एक लाख तेरा हजाराचे वर झालें असून शेअर होल्डर्सची सख्या ३१० आहे. एकूण ठेवींत रुपये २,०६,८०० ची वाढ झालेली आहे. गेलीं दोन वर्षे ठेवींवरील व्याजाचे दर अगदीं कमी असूनहि ही वाढ कायम आहे हें नमूद केलें पाहीजे

जुन्या बँकेचें येणें रुपये ७,०७,८०० होतें तें आता ४,०६,५०० इतकें राहिलें आहे, म्हणजे मुद्दल रुपये ३,०१,३०० इतके वसूल झालें आहे. जुन्या बँकेचे वसूलाबाबद गेल्या जानेवारींत सस्थाननें जी तडजोड कमेटी नेमली त्या कमेटीचा उपयोग चालू सालीं वसूलास फार झाला हें नमूद करणेंस मला आनद वाटतो. तसेच या तडजोड कमेटीची मुदत आणखी एक वर्ष वाढविल्याबद्दल सरकारचे बोर्डातर्फे आम्हीं आभार मानतों नव्या बँकेचा व्यवहार उत्तरोत्तर प्रगतिपर आहे थकबाकीचें प्रमाण १९१ इतकें आहे व तें इतर बँकाशीं तुलना करता बरेच कमी आहे हें दिसून येईल. ठेवींचे मानानें तरती रक्कम भरपूर असून तिचें प्रमाण, एकूण ठेवीशीं शेंकडा २८ इतकें आहे. हेंच प्रमाण जर सस्थानची वीस वर्षे मुदतीची ठेव सोडली तर, शेंकडा ३७ इतकें पडत आहे. तारीख ३०-६-१९३७ अखेर एकूण पाच वर्षात बँकेस नफा रुपये ६४,१६५ इतका झाला. यापैकीं आजचे सभेचे ठरावाप्रमाणें सामील होणाऱ्या रकमा धरून एकूण रिझर्व्हज्‌ची बेरीज रुपये ३३,३०० इतकी होईल रुपये २८,९५७-४-० डिव्हिडडचे रुपानें भागीदारास वाटण्यांत आले पहिले वर्षी पांच टक्केप्रमाणें डिव्हिडंड दिलें व पुढें प्रत्येक वर्षी सहा टक्केप्रमाणें दिले आहे. एकूण रुपये २८,९५७ जें डिव्हिडड वाटण्यांत आले त्यापैकीं रुपये २६,६१६ इतके सस्थानला मिळाले आहेत शिवाय सस्थानच्या बऱ्याचशा ठेवींवर दरसाल दर शेकडा सहा प्रमाणें व्याजहि देत आहोंत.

हल्लीच्या नोकराची सख्या २२ आहे नोकराना भरपूर पगार देऊन त्याचेकडून चागलें काम करून घेण्याचें आमचें धोरण आहे व त्यास अनुसरून नोकरांना ठरलेल्या स्केलप्रमाणें बढती देण्यांत येते तसेंच ता १-७-१९३७ पासून प्रॉव्हिडड फडाची योजना सुरु केली आहे. या योगानें त्याच्या कामात तत्परता राहून त्याच्या नोकरीला स्थैर्य येतें असें आमचें मत आहे. इतकेंहि करून बँकेच्या खेळत्या भांडवलाशीं खर्चाचें प्रमाण अत्यल्प म्हणजे १ १४% इतके आहे श्री केतकर यानीं बँकेची तपासणी केली त्यात त्यानीं पगार अगदी अपुरे आहेत असें नमूद केलें आहे

पूर्वी सस्थानात ३० सोसायट्या होत्या, हल्लीं त्या ९८ झाल्या. आहेत सभासदाची सख्या-१४२६ वरून ३२०७ वर गेली आहे सोसायट्याचें खेळतें भाडवल रुपयें ९८,००० वरून ३,३१,००० रुपये पर्यंत गेलें असून सस्थानातील एकूण लोकसख्येचे मानानें या चळवळींत सामील झालेले लोक फारच थोडे आहेत हे आपणास दिसून येईल. ही चळवळ फैलावण्यास भरपूर वाव आहे. सरकार व बँक ह्याबाबत प्रयत्न करीत आहेत, यास जनतेनें सहाय करावें."

### निवडणुका

यानतर पुढील सालासाठी निवडून आलेल्या डायरेक्टरांचीं नावें खालीलप्रमाणें जाहीर करण्यात आलीं.

१ मे. ल. का. किर्लोस्कर, कारखानदारातर्फे.

२ मे. स बा. दर्शने, व्यक्तीशः सभासदातर्फे.

३ मे. देवी माधवदास रामदास, व्यापाऱ्यातर्फे.

४ मे म .जि रेगे, सोसायट्यांतर्फे

५ मे. वा. बळवंत दाडेकर, "

६ मे श्रीमत अप्पासाहेब पत, संस्थानतर्फे.

प्रातिनिधिक सभेतर्फेच्या डायरेक्टराची निवडणूक झाली नसल्यानें ती जागा रिकामी आहे

मेसर्स पी. जी. भागवत आणि क. ह्यांस बँकेचे १९३७-३८ सालाकरिता ऑडिटर नेमण्यात आलें.

### श्रीमंताचें भाषण

याप्रमाणें ठराव पास झाल्यानंतर श्रीमताचें भाषण झालें. ते म्हणाले —"गेले पाच वर्षांत बँकेची उत्तरोत्तर वाढ होत गेली आहे हें समाधानकारक आहे. सहकारी चळवळीची वाढ बँक लिमिटेड झाल्यापासून झपाट्यानें होत असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईलच यात शंका नाहीं. तथापि बँकेनें आता सेलिंग सोसायट्या स्थापन करून शेतकऱ्याचें दलालांपासून सरक्षण करावें. कारण दलाल लोक शेतकऱ्यास भावात व मापांत असें दोन्ही तऱ्हेनें बुडवितात. सध्या सस्थानात ग्रामोद्धाराचें कार्य सुरु झालेलें आहे व त्यात बँकेनें आम्हास आजपर्यंत जसें सहाय केलें तसेंच पुढें केले पाहिजे व ती तशी करील असा आम्हांस भरवसा आहे सस्थानातील प्रत्येक गाव ऋणमुक्त कसा होईल याची आम्हास काळजी आहे व या आमच्या प्रयत्नांत बँकेनें मदत केली पाहिजे

संस्थानातील रयतेच्या विम्याचा पैसा, तसेंच घरादाराच्या विम्याचा पैसा बाहेर जातो तोच धदा जर बँकेनें सुरु केला तर बँकेची भरभराट होईल असें आम्हास वाटते. तरी त्या योजनेचा बँकेनें अवश्य विचार करावा अशी आमची शिफारस आहे. शेवटीं आमचें असें म्हणणें आहे कीं, बँकेची दिवसानुदिवस अशीच प्रगती होत जावी व भागीदाराना त्याचे पदरात जास्ती दरानें डिव्हिडड वांटण्याची पाळी आहे याच डायरेक्टरावर यावी"


**व्ही. पी. बेडेकर आणि सन्स**

याचेकडील मसाले, लोणचे आणि पापड याचा आपले जेवणांत नेहमीं उपयोग करा

पत्ता —मुगभाट, गिरगाव, मुंबई.

पुणें एजट :—दत्तात्रय नारायण हेजीब २०, शुक्रवार.

## हिंदुस्थानांतील शिवणकामाच्या धंद्याकडे इंग्लिशांचें लक्ष

["अर्थाच्या" २२-९-३७ च्या अंकांत इंग्लंडमधील कपडे तयार करण्याच्या धंद्यासंबंधीं माहिती आली होती. तिला पोषक असे विचार श्री झारापकर ह्याचेकडून खालील लेखाचे रूपानें आमचेकडे आले आहेत, ते वाचकास उद्बोधक वाटतील. ]

ले—'शिवणकलाकुशल' का. रा. झारापकर, डी. एफ. सी (लंडन), गोल्ड मेडॅलिस्ट, प्रिन्सिपॉल 'झारापकर टेलरिंग कॉलेज' पुणें.

आपल्या हिंदुस्थानांतील शिवणकामाच्या धंद्यासंबंधीं इंग्लिश लोकांचें काय मत आहे याची थोडक्यात कल्पना यावी म्हणून "धी असोसिएशन ऑफ ब्रिटिश क्लोदिंग डिझायनर्स (The Association of British Clothing Designers) या संस्थेच्या लीड्समधील शाखेत मि. एस. बी. ब्रोचा (Broacha) नांवाच्या सभासदानें काहीं आठवड्यापूर्वी जें भाषण केलें त्या भाषणाचा थोडक्यात साराश पुढें देत आहोंत. मि. ब्रोचा हे एक उत्कृष्ट कर्तक असून त्यानीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या युरोपियन फर्म्समधून कर्तकाचें काम केलेलें आहे.

"हिंदुस्थानात आज पसतीस कोटि लोकसंख्या असून तेथें कोणत्याहि देशाच्या मालापेक्षा ब्रिटिश माल जास्त खपला जातो. शिवणकामाच्या धंद्यासंबंधीं म्हणावयाचें झाल्यास मला असें शरमेनें म्हणावें लागतें कीं, आपणाकडे ५० शिलिंगाना जे सूटस् (अर्थात् कापडासह) विकत मिळतात त्या सूटच्या दर्जाचें काम तेथील युरोपियन फर्ममधून देखील जेथें मिळत नाहीं, तेथें तद्देशीय शिंपीवर्गाची गोष्टच सोडा. बरे, हा दोष हलक्या मालाचा असें म्हणावें तर तसेंही नाहीं कारण, बहुतेक सर्व माल ब्रिटिश बनावटीचाच असतो या दोषाचें मुख्य कारण तेथील लोक नेहमी अल्पसंतुष्ट असतात, हें होय कारण तेथील शिंपीवर्ग आपणापेक्षाहि जरी फार कष्टाळू असला तरी तेथें आधुनिक यंत्रसामुग्रीवर काम करण्याची पद्धत नसून लोक उमेदवारी करण्यासहि तयार नसतात. तेथें थोडीदेखील कोणासही कला येऊं लागली तरी त्या कलेंतील नवीन नवीन निघणारें वाङ्मय, यंत्रसामुग्री किंवा शोध इत्यादिकाचा मुळींच विचार किंवा अभ्यास न करतां तो इसम तावडतोब स्वतःचें असें स्वतंत्र दुकान उघडतो व त्यामुळें धंद्याचाहि चुथडा होतो कामाबद्दल मिळणारा मोबदलाहि इतका कमी असतो कीं उत्कृष्ट काम करणाऱ्या तद्देशीय शिंप्याचें मासिक वेतन चार पौंडापेक्षा जास्त असत नाहीं हें सुद्धा एक कारण तेथील एकंदर शिवणकाम कनिष्ठ अशा प्रकारचे निघण्यास पोषक असेंच होतें.

तेथील लोक नाविन्याचे भोक्ते असल्यामुळें रेडिओ, टेलिफोन, सिनेमा इत्यादिकाचा झपाट्यानें प्रसार होत असलेला तुम्हास दिसून येईल परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, साध्या शिवण्याच्या यंत्राखेरीज तेथें तुम्हास शिवणकामाचें एकहि आधुनिक यंत्र सांपडणार नाहीं कारण बहुतेक सर्व शिंपीवर्ग फारच अशिक्षित असून त्याच्यात संघशक्तीनें काम करण्याचा अतिशय अभाव आहे.

हिंदुस्थानातील निरनिराळ्या शहरासारख्या ठिकाणीं शिवणकामाच्या धंद्यात बराच पैसा मिळविण्याचें केवढें तरी मोठें क्षेत्र रिकामें आहे. तिकडे निरनिराळ्या ऋतूंत गरम, रेशमी, सुती, वगैरे कपडे वापरण्याची पद्धत असल्यामुळें तेथील शिंपीवर्गास सतत वर्षभर काम मिळत असते"

अशाप्रकारें धंद्यासंबंधीं सर्वसाधारण माहिती दिल्यावर ते पुढें म्हणतातः—"जपान आणि दक्षिण आफ्रिका इत्यादि ठिकाणीं इतर राष्ट्रांच्या शिवण कामाच्या कंपन्या असूनहि आपल्या कंपन्या फायदेशीर चाललेल्या आहेत. हिंदुस्थानासारख्या देशांत, म्हणजे जेथें दुसऱ्या कोणाच्याहि आधुनिक यंत्रसामुग्रीनें युक्त अशा कंपन्या नसल्यामुळें व्यापारी स्पर्धेची भिती नाहीं, तेथें आपल्या कंपन्या अल्पावधींतच फारच फायदा मिळवूं शकतील याबद्दल कांहींच शंका नाहीं तरी येथें जमलेल्या आपणां सर्वांस मी अशी विनंति करतों कीं आपणापैकीं कोणीतरी आधुनिक यंत्रसामुग्रीनें युक्त अशी एक तरी शिवण कामाची कंपनी हिंदुस्थानात काढून योग्य त्या अल्प मोबदल्यात आम्हीं चागले कपडे सहज पुरवू शकतों असें हिंदी जनतेस पटवून द्यावें"


"उशीर झाला पण नंबर पहिला आला"

—कार्यक्रम—

मशिनरीची उभारणी व ११०० एकर उंसाची लागवड. १० लक्ष रुपयांची साखर.

५ ते १० टक्के नफा.

साखरेचे भाव वाढले त्या प्रमाणांत नफाहि वाढणार,

कारण

सिंडिकेटचा नफ्याचा अदाज १० रुपये भाव धरून दिलेला असतो हल्लीं साखरेचा भाव दर हंड्रेडवेटास

११ रुपयांचे वर आहे. शेअर आज घेऊन ठेवा पुढें शेअरचे भाव वाढतील.

सविस्तर माहिती व शेअर फॉर्म्स खालील पत्त्यावर मिळतील

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.

१५७ बुधवार पेठ, पुणें २



स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियाच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २ ट. ख. १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—

धी इंडो फॉरेन एजन्सीज (डिपार्टमेंट नं. ६)

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) … | १२०-१० |
| ५% (१९३९-४४) लोन .. … … | १०५—५ |
| ४% १९४३ .. .. . … | १०८—६ |
| ३½% विनमुदत … … … … | ९८-१२ |
| ३½% १९४७-५० .. … … | १०६—८ |
| २¾% १९४८-५२ … … … | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट (विगर गॅरंटी व लांब मुदत) … | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) … … | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षे मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) … .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) … … | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% … … | १४२-१३ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% … … | ११९—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ६% … | ३०-१२ |
| इंपीरिअल बँक (५०) १२% … … | १६०५—० |
| बाँबे प्रॉ को. बँक (५०) ५% … … | ५९—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% … … | १२७-१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४¾% … … | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर (१००) ४½% … … | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९५१—४ |
| तापी व्हॅली (५००) ७½% . … … | ७६२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि (५०) १३% … … | १२५—० |
| कराची (१००) ९% .. … … | २७१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% … … | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१००० ) ५½% … … | १४७५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि (१०००) ७½% … … | १५७५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ८ रु … … … | १८७—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. … … | ५०-१२ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. … … … | २५—३ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु ४ आ … | ४४—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ७५ रु. बोनस … | ४७००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% … … | २०१—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे (२००) १५ रु. २ आ. … | १६६—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि (७५) १० रु. … … | ३४१—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०)-३६ रु. ३ आ. ६ पै … | १५१५—० |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास … … | ३४—९ |
| चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास … … | ५०—६ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास … … | १५—४ |
| „ केसर प्रत्येक मणास … … | ११—४ |
| „ सरया प्रत्येक मणास … … | ११-२ |


**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड. औंध.**
(स्थापना-८ आक्टोबर १९३२)
हेड ऑफिस-औंध (सातारा)
शाखा-आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिवंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवींवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें-सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.



**न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई**
(सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी.)

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत: खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—
(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री डी. के. जोगळेकर, बी. ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें (२)



**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,५०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९६,७१६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ९,२०२ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७८,८४६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ३६,६८३ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्यांहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner POONA, 2.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट
पांढरें-सत्त्व किंमत १। रु.
मलशुद्धी टॅबलेट्स् किं ८ आ.
या दोन औषधाच्या मदतीनें पोटातील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात. अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें कर्पट ढेंकर येणें, छातीतील जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे
डॉ. वी. आर. गुणे
पुणे २

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ.—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द सा. द. शें ३ टक्के व्याज दिलें जातें
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

RELIABLE STENOGRAPHERS
AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

गव्हाचे पोहे
(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)
कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो.
ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधातून खाता येतात.
७५३ सदाशिव पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २४, किंवा प्रथम ६/८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि,
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न. २.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves; Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED
**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**
Last year 1936-37
Exceeds
**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**
PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN
## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca
*Office* throughout India & the East

S. C. MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बरामती ( जि पुणें ) | १६ अकलूज ( जि सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगाव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगाव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगाव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

**खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं ११५।१ आर्यभूषण छापखान्यात रा अनंत विनायक पटवर्धन यांना छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGIS TERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ | पुणें, बुधवार, तारीख १७ नोव्हेंबर, १९३७ | अंक ४५

— मनपसंत काम —
चक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती | माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजटस् नेमणें आहेत
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

अर्थशास्त्र
लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथात अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांताचें विवेचन केलें आहे

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स
याचेकडील मसाले, लोणचे आणि पापड याचा आपले जेवणात नेहमीं उपयोग करा.
पत्ता.—ठाकुरद्वार, गिरगाव, मुंबई
पुणें एजट.—दत्तात्रय नारायण हेजीब २०, शुक्रवार.

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा
कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार
" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "
श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.
महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहिती-करिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु ( ट ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४

# विविध माहिती

### ब्रिटिश सैन्यात रिक्रूट भरती

ब्रिटिश सरकारी फौजेमध्यें भरतीचें काम चालू आहे. तथापि पुरेसे तरुण हा व्यवसाय पत्करण्यास पुढें येत नाहींत असा अनुभव आला आहे. गेले काहीं महिने रिक्रूटिंगचें काम समाधानकारक चालू आहे, असें यद्ध मंत्र्यानीं कॉमन्स सभेंत नुकतेंच सागितलें परतु उमेदवाराच्या कृत्रिम दांताच्या कमाल संख्येवरील नियत्रण दूर केलें असल्याचें त्यांनीं कबूल केलें.

### मुबई कॉर्पोरेशनच्या अंदाजपत्रकांत तूट !

मुबई कॉर्पोरेशनच्या १९३८–३९ च्या अंदाजपत्रकांत ३ कोटि, २१ लक्ष रु. उत्पन्न धरलेलें असून खर्च ३ कोटि, ४१ लक्ष रु अपेक्षित आहे, म्हणजे, २० लाखाची तूट आहे.ती भरून काढण्याकरता करवाढ करावी लागेल, असें कमिशनर, मि टॉटन, ह्यानीं स्पष्ट केलें आहे

### मॉरिशस बेटांमधील हिंदी वसाति

मॉरिशस बेटातील मजुरांपैकीं शेकडा ८० मजूर हिंदी रक्ताचे आहेत १९३६ अखेर त्या बेटांतील हिंदी लोकसख्या २ लक्ष, ६८ हजार भरली. बेटामधील १ लक्ष ४४ हजार एकर उंसापैकी हिंदी मजुरानीं ५५ हजार एकर ऊंस केला. पोस्टामार्फत ८० हजार रुपये हिंदुस्थानात आले

### चीनला आर्थिक मदत

जपानच्या आक्रमणामुळें चीनमध्यें कोणत्याहि साथींचा उद्‌भव होऊं नये म्हणून खबरदारी घेण्यासाठी राष्ट्रसघाच्या असेंब्लीनें बरीच मोठी रकम खर्च करण्याचें ठरविलें आहे याच स्वरूपाची मदत करण्यासाठी आरोग्यतज्ज्ञ चीनमध्यें लवकरच पाठविण्यांत येतील.

### जर्मनींतून हद्दपार झालेल्यांची सोय

जर्मनींतून हद्दपार होणाऱ्या निराश्रिताची सोय करण्यासाठी लडन येथें एक कचेरी उघडण्यात आली आहे. १९३३ पासून १ लक्ष १५ हजार लोकानीं जर्मनी सोडून परदेशगमन केलें त्याच्यापैकीं ४१ हजार पॅलेस्टाईनमध्यें व ४० हजार इतर देशात स्थायिक झाले अद्याप २० हजार लोकांची हलाखीची स्थिति आहे. १९३६ मध्यें १६ हजारांची या आंकड्यात भर पडली आहे जर्मनींतून बाहेर जाणाऱ्या ज्यू लोकाच्या व्यवस्थेसबधीं विचारविनिमय करण्यासाठीं लवकरच एक परिषद भरवण्याची राष्ट्रसघाच्या असेंब्लीची इच्छा आहे जर्मनीवर या बाबबींत काहीं दडपण घालता आल्यास त्याचाहि विचार या परिषदेंत होईल.

### साखरेच्या धद्याचें संघटन

इडियन शुगर मिल्स असोसिएशन लि व इडियन शुगर सिंडिकेट लि ह्याची एक साधारण सभा लखनौ येथें नुकतीच भरली होती. बिहार व सयुक्त प्रात ह्याच्या सरकारांनीं, आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व साखरकारखान्यावर शुगर सिंडिकेटला मिळण्याची सक्ती करण्याचें योजिलें आहे, ह्याबद्दल सभेंत समाधान व्यक्त करण्यांत आलें व जरूर ती कायदेशीर व्यवस्था लवकर व्हावी ह्यासाठी प्रयत्न करण्याकरिता सात कारखानदाराची एक उपसमिती नेमण्यात आली. संयुक्त प्रांत व बिहार येथील कारखान्यांच्या कामास ५ डिसेंबर पूर्वी प्रारंभ होऊं नये, असेंहि ठरलें.

### इंपीरियल एअरवेजचें मुख्य ठाणें

इपीरियल एअरवेजचें मुख्य ठाणें कराचीहून कलकत्त्यास हलविलें जाण्याचा बराच संभव आहे.

### शेतीच्या पाणीपुरवठ्यासंबंधीं सशोधन

सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशनची वार्षिक सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती. शेतीच्या पाणी पुरवठ्याविषयीं व तदनुषगिक प्रश्नासबधीं संशोधन करण्याकरिता एक मध्यवर्ती केंद्र असावें, असें सभेंत ठरलें ह्या संशोधन केंद्राची स्थापना दिल्ली शहराचे शक्य तितक्या नजीक करण्यात यावी, असेंहि सुचविण्यांत आलें. पुणें येथील केंद्र बंद करण्यात येईल

### आतरराष्ट्रीय मजुर परिषदेकरितां हिंदी प्रतिनिधींची निवड

आतरराष्ट्रीय मजूर परिषदेचें २४ वें अधिवेशन जिनीव्हा येथें जून, १९३८ मध्यें भरणार आहे परिषदेस प्रत्येक सरकारतर्फे दोन, कारखानदारांतर्फे एक व कामगारातर्फे एक असे प्रतिनिधी पाठविणें असतात व त्याची अखेर नेमणूक करण्याचा अधिकार, हिंदुस्थानाचे बाबतींत, हिंदुस्थान सरकारासच पूर्णत्वानें आहे जरूर तेवढे सल्लागारहि परिषदेस धाडतां येतात. बिगर सरकारी प्रतिनिधींची निवड करण्यापूर्वी त्याविषयीं सरकारनें सुचना मागविल्या आहेत नावें सुचविण्याची अखेरची तारीख १५ जानेवारी, १९३८ ही आहे.

### लायक पोलिसांचा तुटवडा

आदर्श पोलीस ह्या दृष्टीनें लंडन शहरातील पोलिसांचा लौकिक आहे. तथापि, ह्या पोलिस खात्यास नवीन चागल्या उमेदवाराची वाण भासत असल्याचें जाहीर झालें आहे. काहीं वर्षांपूर्वी रिकाम्या जागाचे मानानें उमेदवारांची गर्दी उसळत असे, आतां सुमारें ७०० जागा शिल्लक आहेत. प्रत्येक आठवड्यास सरासरीनें २० जागा रिकाम्या होतात, परतु तितके लायक उमेदवार मिळत नाहींत. अर्जदाराची सख्या पुरेशी असली, तरी पोलिस खात्याच्या शारीरिक व शैक्षणिक कसोटीस उतरणें सोपें नसतें. उमेदवाराची निवड किती दक्षतेनें केली जाते, हें ह्यावरून दिसून येईल लायकी वाढविण्याची स्पर्धा निर्माण करणारें वातावरण प्रगतीस पोषक होतें व त्यामुळें सर्व समाजाचा फायदा होतो, हें उघड आहे.

### विमा बिलाची कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें चर्चा

कौन्सिल ऑफ स्टेटच्या बैठकीस ता १५ नोव्हेंबर रोजीं प्रारभ झाला. असेंब्लीच्या गेल्या बैठकींत पास झालेल्या विमा बिलाची चर्चा करणें, हा प्रस्तुत बैठक बोलावण्यातील प्रमुख हेतु आहे असेंब्लीमध्यें राहून गेलेल्या व इतर काहीं मामुली दुरुस्त्या कौन्सिलमध्यें मंजूर झाल्यावर, विमा बिल पुन असेंब्लीकडे जाईल व तें जसेंच्या तसें पास झालें, म्हणजे त्याचें कायद्यात रूपातर होईल.

### हिंदुस्थानातील तिळाची लागवड

सबंध हिंदुस्थानात मिळून चालू मोसमात २७ लक्ष, ६६ हजार एकर तिळाखाली आहेत. गेल्या वर्षी २५ लक्ष, ४४ हजार एकर तिळाची लागवड झाली होती.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किमत रु. |
|---|---|
| ३१-१०-३७ ते ६-११-३७ | ३२,९८,५१४ |
| ७-११-३७ ते १३-११-३७ | १८,०६,४६२ |
| २१-९-३१ ते १३-११-३७ | ३,०५,८३,८५,७०० |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५५२ | ग्रामसुधारणा मँटचा विनियोग | |
| २ सोनारानें काय टोचले | ५५३ | ५ कर्ज देतांना बँकेनें बाळगावयाची दक्षता | ५५७ |
| ३ हिंदुस्थानचा आयात-निर्गत व्यापार . | ५५४ | ६ सहकारी चळवळ ... | ५५८ |
| ४ स्फुट विचार .. | ५५५ | ७ उसाच्या पिकाचा सरकारी अदाज | ५५८ |
| जवाहिरावरील आयात कमी झाली—दिल्ली ते मुंबई विमानाची वहातुक—प्रांतिक सरकार आणि प्राप्तीवरील कराची वाटणी—भारत विमा कंपनी —प्लेगप्रतिबधक लस— | | ८ हिंदी बँकिंगचा आढावा | ५५८ |
| | | ९ अहमदाबाद येथील मजूर वर्गाचा कर्जबाजारीपणा | ५५९ |
| | | १० निवडक बाजारभाव | ५६० |



# अर्थ

बुधवार, ता १७ नोव्हेंबर, १९३७


## सोनारानें कान टोचले !

### रिझर्व्ह बँक आणि शेतकऱ्यांचें जीवन

रिझर्व्ह बँक ही बँकाची बँक असल्यानें उद्योगधदे व व्यापार ह्यास लागणाऱ्या खेळत्या भाडवलाचा पुरवठा जरूरीप्रमाणें होण्याची व्यवस्था तिनें केली पाहिजे ही गोष्ट अपेक्षितच होती परतु हिंदुस्थान देशात शेतीचा धंदा बहुसंख्याक जनतेच्या उपजीविकेचें साधन असल्यामुळें शेतकऱ्यास आवश्यक असलेल्या पैशाची तरतूद तिच्या हातून पद्धतशीर रीतीनें होणें आवश्यक होतें. तथापि, मध्यवर्ती बँकेचें कार्यक्षेत्र अत्यत मर्यादित असल्याची तिच्या उत्पादकास व पुरस्कर्त्यास जाणीव होती त्वरित फिरणारें आणि अल्प मुदतींत परत येणारें कर्जाऊ भाडवल हाच व्यापारी बँकाच्या व्यवहाराचा मुख्य विषय असतो आणि त्याच्या द्वारानें चलन व हुडणावळ ह्याचें नियमन रिझर्व्ह बँकेनें करावयाचें असतें. शेतीच्या धद्यास कमी-अधिक लाब मुदतीचें भांडवल लागतें आणि त्या धंद्यात अनेक अनपेक्षित अडचणी येत असल्या कारणानें त्याची परतफेड शेतकऱ्यांकडून होणें अनिश्चित असतें ह्यास्तव, शेतीचे भाडवली व्यवहार व्यापारी बँकाच्या कक्षेंत येत नाहींत, आणि म्हणून ते मध्यवर्ती बँकेच्या कार्यक्षेत्राच्या सीमेच्या बाहेर रहातात सावकार, सराफ व सहकारी संस्था ह्यांना शेतीच्या व्यवहारांत जरूर असलेला पैसा पुरवण्याचें कार्य करावें लागतें. ह्यापैकीं सहकारी बँका सघटित असून त्यांस कायदे व नियम ह्याचें बंधन असतें. म्हणून व्यापारी बँकाच्या बरोबरीनें त्यास वागवण्यात यावें अशी तजवीज रिझर्व्ह बँकेच्या कायद्यात केलेली आहे. शेतीस पैशाचा पुरवठा होण्याबाबत योजना करण्यासाठी रिझर्व्ह बँकेंत एक स्वतंत्र खातें उघडण्यांत आलें आहे आणि त्यानें पूर्वचौकशी चालविलेली आहे. प्रांतिक सहकारी बँकास व्यापारी बँकाप्रमाणें सवलतीनें पैसा मिळावा अशी कायद्यात तरतूद आहे तरीहि सहकारी पतपेढ्यांचीं कर्जें बरीचशीं थकलेलीं असल्यानें आणि त्याची परतफेड व्यापारी बँकाच्या कर्जाप्रमाणें अल्प काळात होत नसल्यानें त्या बाबतींत कोणत्या सुधारणा होणें इष्ट व अगत्याचें आहे इकडे रिझर्व्ह बँकेच्या शेतकी खात्याचें लक्ष लागलें आहे

प्रस्तुत विषयावर सदरहु खात्यानें "खेडेगावीं सहकारी बँक" ह्या नावानें एक चोपडें प्रसिद्ध केलें आहे, त्याची माहिती जनतेस होणें अवश्यक आहे. शेतकऱ्यांचीं कर्जें कमीं करावीं, व्याजाचे दर हलके व्हावे, सावकारी व्यवहारास नियत्रण घालावें, अशा मागण्या चोहोंकडे जोरानें चालल्या आहेत परतु अशा तात्पुरत्या स्वरूपाच्या उपायानीं कायमची व भरीव सुधारणा होणें शक्य नाहीं आणि ह्यासाठी मूलग्राही प्रश्नाचा परामर्श घेतला जाणें अगत्याचें आहे, अशी प्रस्तावना करून रिझर्व्ह बँकेच्या शेती खात्यातील तज्ज्ञ लेखकानें वस्तुस्थितीच्या पृथःकरणास प्रारभ केला आहे. शेतीचा धद्रा शेतकऱ्याच्या कौटुंबिक, सामाजिक व धार्मिक जीवनाशीं पूर्णपणें सबद्ध झालेला असल्यानें त्या विषयाचे प्रश्न सोडवावयाचे असतां ह्या सर्व अगाचा साकल्यानें व व्यापक दृष्टीनें विचार होणें आवश्यक आहे असें लेखकानें प्रारंभींच म्हटलें आहे आर्थिक अगाचें विवेचन करताना शेतकऱ्याच्या उद्योगाची तपशीलवार छाननी केलेली असून त्याच्या मार्गातल्या अनेक अडचणींचा पाढा वाचला आहे.

"शेतकरी अज्ञानी व निरक्षर आहे, त्याच्या शेताचे तुकडे उडाले आहेत, त्याला सावकार व व्यापारी फसवतात, त्याला औषधपाणी व सकस अन्न मिळत नाहीं, खेडेगावात कज्जेदलाली वाढली आहे, त्यांत आर्थिक क्रांति घडून आली असून जुने उद्योगधदे नष्ट झाले आहेत, शेतकऱ्यास एखादृसऱ्या पिकावर अवलबून रहावें लागतें, आणि तेंहि नीटपणें त्याच्या पदरात पडत नाहीं, शेतीच्या धद्यावर अवलबून रहाणाऱ्या जनतेची सख्या सारखी वाढत आहे आणि त्या मानानें उपजीविकेचीं साधनें वाढलेलीं नाहींत, खेडेगावांत बेकारी व उपासमार पसरली आहे, आणि एकदर परिस्थिति काळजी उत्पन्न करण्याइतकी हलाखीची झाली आहे खेडेगांवची आर्थिक घडी ह्याप्रमाणें विस्कटली आहे, ती नीट बसल्यावाचून शेतकऱ्याच्या जीवनाचा मेळ बसावयाचा नाहीं " शेतकरी वर्गाच्या दुःस्थितीचें हें चित्र रिझर्व्ह बँकेच्या हस्तें रगलेलें आहे, हें येथें विशेष आहे, एरव्ही त्यात नवीन असें काहीं नाहीं. सहकारी सस्था नीट चालत नाहींत, त्यांतल्या कर्जदाराच्या थकबाक्या वाढल्या आहेत, इत्यादि तक्रारी वरील हलाखीची स्थिति लक्षात घेतां दूर कशा होणार ह्याचा विचार झाला पाहिजे. स्वस्त कर्जें दिलीं किंवा जुनीं कर्जें रद्द केलीं तरी शेतकऱ्याची उत्पादन शक्तीच जेथें अपुरी आहे तेथें त्याचा धदा व चरितार्थ कसा चालणार ? आडांत नाहीं तेथें पोहोऱ्यात कोठून येणार ? सहकारी पतपेढ्या यशस्वी का होत नाहींत, ह्याचीं कारणें शोधून काढण्यास दुसरीकडे चौकशी करण्याचें कारण नाहीं. जनता निरक्षर आहे, मागसलेली आहे. दरिद्री आहे, बेकार आहे, ही कित्येक वर्षांची ओरड आहे आणि सरकारनें ती दूर करण्याचे कामीं विशेष लक्ष घातलेलें नाहीं हें निराळें सागावयास नको. पतपेढ्याचीं किंवा दुसरी कोणतीहि सुधारणा यशस्वी होण्यास व्यापक स्वरुपाच्या व सर्वांगीण प्रगतीच्या योजना हातीं घेतल्या जाणें अगत्याचें आहे म्हणजे, सरकारनें आपलें आर्थिक धोरण व्यापक विधायक केल्यावाचून शेतकरीवर्गाचें पाऊल पुढें पडणें अशक्य आहे, हेंच रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तुत कथेचें सार आहे. हिंदुस्थान सरकारचें ह्या कार्यक्रमात पूर्ण सहकार्य होईल तरच प्रांतिक सरकारांच्या हातून भरीव कृति होऊं शकेल हेंहि लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या चोपड्यात कोणत्याहि सरकारावर किंवा त्याच्या धोरणावर प्रत्यक्ष टीका नाहीं. परतु त्याचा निष्कर्ष आम्हीं वर काढला आहे त्याहून निराळ्या तऱ्हेचा निघू शकत नाहीं. एक प्रकारें सोनारानें कान टोचल्या सारखीच ही गोष्ट आहे. त्यापासून प्रांतिक मंत्रिमंडळें व जनता ह्यानीं योग्य तो बोध घेतला पाहिजे

## हिंदुस्थानचा आयात-निर्गत व्यापार

### (१)

### जागतिक व्यापारात सुधारणा—हुंडणावळीविषयीं धोरण

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचा १९३६-३७ सालाबाबतचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून ह्या व्यापारांतली मंदी हळहळु दूर होत असल्याचें दिसतें चलतीच्या चढत्या कमानीस प्रारंभ झाला आणि तिची प्रगति झाली आहे, तिच्या मुळाशीं, इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स इत्यादि राष्ट्रांनीं आपलीं चलनें हलकीं करण्याचें म्हणजे परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर अनुकूल करून घेण्याचें धोरण अंगिकारलें ही गोष्ट आहे, हें त्या वृत्तांतात स्पष्ट म्हटलें आहे आपल्या निर्गत व्यापाराची बढती व्हावी ह्या उद्देशानें वरील राष्ट्रांनीं हुंडणावळीचे दर बदलले. फ्रान्सच्या फ्रँक ह्या चलनाची तेथील सरकारानें अलीकडे आणखी घसरगुंडी होऊ दिली आहे आणि त्या कामीं इंग्लंड व अमेरिका ह्यांचें त्यास पाठबळ आहे, हें येथें सांगणें आवश्यक आहे. हिंदुस्थानच्या हुंडणावळीचा दर १८ पेन्सचा १६ पेन्स करा अशी नुसती सूचनाहि आमच्या सरकारास असह्य वाटते आणि लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं अलीकडील आपल्या एका भाषणांत ह्या बाबतींत "शांतं पापं, शांतं पापम्" असे स्पष्ट उद्गार काढले आहेत. १९३६–३७ सालात जगाच्या बाजारात मालाचे भाव चढले ह्याचें प्रमुख कारण वर निर्दिष्ट केलेलें पाश्चात्य राष्ट्रांचें हुंडणावळीचें धोरण आहे, असें असतां हिंदुस्थानांत त्याचा नुसता विचारहि होऊ नये हें चमत्कारिक नाहीं काय? पाश्चात्य राष्ट्रांनीं युद्धसामुग्रीच्या व्यापारावर सपाटून खर्च चालवला आहे, त्या योगानें विविध प्रकारच्या कच्च्यापक्क्या मालास विशेष मागणी उत्पन्न झाली आहे, ह्याचेंहि सहाय्य बाजारभाव चढण्यास झालें आहे. गाडीबरोबर नळयास यात्रा ह्या न्यायानें हिंदुस्थानच्या परदेशीय व्यापारास ह्या परिस्थितीचा थोडाबहुत फायदा मिळाला आहे.

### (२)

### आयात-निर्गत व्यापाराचे आकडे

गेल्या वर्षी हिंदुस्थानच्या निर्गत व्यापाराची एकूण किंमत १९६ कोटि रुपये इतकी भरली. १९३५–३६ सालाच्या मानानें ३६ कोटींची व १९३२–३३ च्या तुलनेनें ६४ कोटींची वाढ ह्या व्यापारात झालेली आहे. १९३० सालीं मंदीस प्रारंभ झाला, त्याच्या पूर्वीच्या वर्षाच्या मानानें आमचा निर्गत व्यापार अजूनहि १३४ कोटि रुपयांनीं म्हणजे ४१ टक्क्यांनीं कमी आहे. शेतीच्या मालाचे भाव उतरले ह्याचाच हा सर्वस्वी परिणाम आहे. माल पूर्वीइतकाच बाहेर गेला तरी त्यास किंमत कमी आली आहे. म्हणजे, त्या प्रमाणात हिंदी राष्ट्राची मिळकत मर्यादित झाली आहे १९३६-३७ सालीं हिंदुस्थानात आलेल्या परराष्ट्रीय मालाची किंमत १२५ कोटि रुपये होती ह्याच्या पूर्वीच्या वर्षाचा आकडा १३४ कोटींचा होता आणि १९२८–२९ सालाचा तर २५३ कोटि रुपये इतका होता. आयात व्यापारात एवढी घट केवळ मालाच्या स्वस्ताईमुळें झाली नाहीं. देशात मालच कमी आला हें येथें मुख्य कारण आहे हिंदी जनतेची कमाई कमी होऊन माल विकत घेण्याचें लोकांचें सामर्थ्य मर्यादित झालें हें प्रस्तुत आकड्यांवरून सिद्ध होत आहे. १९३६-३७ मध्यें पूर्वीच्या वर्षापेक्षा निर्गत व्यापार ३६ कोटि रुपयांनीं वाढला त्या वाढाव्यांत कापूस, गळिताचीं धान्यें व ताग ह्यांचा प्रमुख भाग आहे. नुसत्या कापसाच्या निर्गतींत सुमारें ११ कोटि रुपयाचा वाढावा झाला आणि गळिताच्या धान्याची निर्गत सुमारें ८ कोटि रुपयांनीं वाढली आयातीच्या बाजूस विशेष घट कापसाचें कापड व सूत ह्याच्यामध्यें झाली असून ती ३½ कोटि रुपये आहे. पोलादाची आयात १½ कोटीनें व मोटारींची ½ कोटीनें कमी झाली. यंत्रसामुग्री आणि कापूस वगळून इतर जातीचें कापड व सूत ह्याच्या आयातींत किंचित् वाढ झाली आहे सोनें-चांदी वगळून बाकीच्या मालाचा विचार केला असतां असे दिसतें कीं, १९३६-३७ मध्यें आयातीपेक्षा निर्गत ७८ कोटि रुपयांनीं अधिक होती. १९२८-२९ सालीं हा आंकडा ८६ कोटि होता. तो मंदीमुळें १९३२–३३ मध्यें फक्त ३ कोटि झाला व त्यानंतर तो वाढावा हळुहळु चढला आहे.

### (३)

### व्यापाराचा आढावा व बाजारभाव

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारात चांदी-सोन्याच्या आयातनिर्गतीस महत्त्वाचें स्थान आहे १९२८–२९ सालीं सोन्याची आयात २१ कोटि रुपयांची होती, गेल्या वर्षी २८ कोटींचें सोनें, उलट, हिंदुस्थानच्या बाहेर गेलें निर्गत व्यापारांत सोन्याची जागा अलीकडे चांदीनें घेतली असून गेल्या सालीं १४ कोटि रुपयाची चांदी हिंदुस्थानांत आली. ह्या देशाच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या आढाव्याचा हा विशेष आहे कीं आमची एकूण निर्गत एकूण आयातीपेक्षां किती तरी कोटि रुपयांनीं अधिक असते. मंदी चालू झाली तेव्हां हिंदी मालास बाहेरच्या देशात असलेली मागणी घटली आणि आमच्या निर्गतींत सोन्याचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणावर होऊ लागला चांदी आणि सोनें या दोहोंचीच आयात-निर्गत घेतली तर १९३२–३३ सालीं त्याच्या एकूण आयातीपेक्षां निर्गत ६५ कोटि रुपयांनीं ज्यास्त होती. १९३५–३६ मध्यें हा फरकाचा आकडा ३६ कोटि रुपये होता आणि १९३६–३७ सालीं तो फक्त १४ कोटि इतकाच होता. एकीकडे सोन्याची निर्गत कमी झाली आणि दुसरीकडे चांदीची आयात वाढली, ह्या कारणानें सोन्या-चांदीच्या आयात–निर्गतीमधली तफावत घटलेली आहे. शेतीचा व इतर कच्चा माल गेल्या वर्षी अधिक प्रमाणात बाहेर गेल्या कारणानें हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति हळुहळु पूर्वपदावर आली आहे. निर्गत होणाऱ्या हिंदी कच्च्या मालाचे बाजारभाव मंद गतीनें चढत आले आहेत. चहाची लागवड व पुरवठा मर्यादित केला गेल्यानें त्याची किंमत मंदीच्या पूर्वीच्या काळाच्या बाजारभावाच्या जवळ येऊन ठेपली व आळशीची किंमतहि चांगली वाढली. कपाशीचा भाव मात्र १९२९ सालाचे मानानें ४० टक्के कमी होता तागाच्या किंमतीची स्थिति त्याहिपेक्षा प्रतिकूल होती. तांदूळ, गहू, भुईमूग ह्याच्या किंमती मंदींतच राहिल्या, त्यांत झालेला वाढावा विशेष महत्त्वाचा नव्हता परदेशांतील विशिष्ट परिस्थिति आणि हिंदुस्थानातल्या कच्च्या मालाची विशिष्ट अवस्था ह्यास अनुसरून निरनिराळ्या प्रकारच्या पदार्थांचे भाव थोडेबहुत चढले आहेत असें वरील माहितीवरून दिसून येईल उदाहरणार्थ, आळशीस इंग्लंडमध्यें चांगली मागणी असल्यानें तिला भाव बरा आला आणि तिची लागवडहि मोठ्या प्रमाणावर झाली साखरेच्या कारखान्यांचा अलीकडे संरक्षणामुळें झपाट्यानें विस्तार झाला आहे आणि त्याचा परिणाम उसाच्या पिकाचें क्षेत्र वाढण्यात झालेला आहे १९२९-३० च्या मानानें १९३६–३७ मध्यें उसाच्या लागवडीचे क्षेत्रात ७५ टक्क्याच्यावर वाढावा झाला.

# स्फुट विचार

## जवाहिरावरची आयात जकात कमी झाली

चैनीच्या वस्तूंवर जबर आयात जकाती बसवून श्रीमतावर भारी करांचा बोजा टाकणें आणि ह्या मार्गानें सरकारी तिजोरींत उत्पन्नाची-भर घालणें हें धोरण योग्य समजलें जातें तथापि तत्त्व आणि प्रत्यक्ष अनुभव ह्याचा मेळ बसतोच असें नाहीं, आणि वरील प्रकारच्या जकातींचे दर कमी करणें सरकारास भाग पडतें ह्याचें उत्कृष्ट उदाहरण हिन्यांच्या आयातीवरील हिंदुस्थान सरकारच्या आयात जकातीचें आहे. ही जकात प्रारंभीं २५ टक्के होती, ती पुढें १९३६ मध्यें १० टक्के झाली आणि आता ती ५ टक्के इतकी करण्यांत आली आहे. जकातीचा दर भारी असला म्हणजे ती चुकवून देशांत माल आणण्याच्या प्रवृत्तीस उत्तेजन मिळतें. जवाहीर ही अशी वस्तु आहे कीं, तिचें मोल भारी असून जकात न देतां देशांत आणावयास ती सोपी आहे ह्यामुळें २५ टक्के जकात असूनहि तिचें सरकारास मिळणारें उत्पन्न मात्र थोडें. ही गळती बंद करण्याचा मार्ग जकातीचा दर कमी करून ती चुकवण्याचा धोका सहन करण्याचा मोह नाहींसा करणें हा होय. जकात २५ ची १० टक्के झाली तेव्हां ती चुकवणारांचा फायदा कमी झाला, पण ह्या चोरट्या 'व्यवहारास परिणामकारक असा आळा बसला नाहीं जकातीचा यावा लागणारा पैसा, ती चुकवण्याच्या हिकमतीस होणाऱ्या खर्चापेक्षा अधिक असला म्हणजे चोरटा धदा चालणार, हें लक्षात घेऊन आतां दर ५ टक्के सरकारनें केला आहे त्याचा योग्य तो परिणाम होईल अशी अपेक्षा आहे जकात भरून सरळ धंदा करणाऱ्या व्यापाऱ्याच्या मार्गांतली अनिष्ट स्पर्धेची अडचणहि त्यामुळें दूर होईल. दरवर्षी हिंदुस्थानांत दोन कोटि रुपये किंमतीचें जवाहीर बाहेरून येतें असा अंदाज आहे. त्यापैकी निम्में जकात चुकवीत असावें अशी कल्पना आहे कोणताहि कर बसवितांना त्याच्या वसुलीच्या बाबतींत विविध प्रकारांची परिस्थिति लक्षांत घ्यावी लागते आणि श्रीमंतांवर व भारी दरानें त्याची आकारणी केली कीं काम झालें असें समजून चालत नाहीं, हें जवाहिरावरील हिंदुस्थानातल्या आयात जकातीच्या इतिहासावरून मनोरंजक रीतीनें स्पष्ट झालें आहे. जकाती व इतर कर कायदेशीर रीतीनेंहि चुकवणें शक्य असल्यानें ते बसवणारांस ही च इतर तऱ्हेची गळती हिशेबांत घ्यावी लागते.

---

## दिल्ली ते मुंबई विमानांची वहातुक

दळणवळणाच्या मार्गांतले नैसर्गिक अडथळे दूर करून माल व माणसें याची वहातुक व प्रवास सुकर व त्वरित करणें हे आधुनिक सुधारणेचें एक कार्य आहे. निरनिराळे प्रदेश व देश ह्यांच्यामधील अंतरें मोठीं असल्यानें त्यांच्या परस्परांशीं होणाऱ्या व्यापारात काळाचा व्यय होतो, ही विनिमयास भासणारी अडचणच आहे. वहानें वेगवान झालीं आणि त्याचे मार्ग सुलभ व सुरक्षित झाले असता देवघेव आणि प्रवास थोड्या वेळात होऊं शकतो ह्या बाबतींतल्या व्यवस्थेची उत्क्रांति हजारों वर्षे चालली आहे. बैल, घोडे व उंट ह्यांच्या पाठीवरून माल नेण्याचे ऐवजी गाड्यांतून चागल्या रस्त्यावरून त्याची वहातुक करणें हें प्रगतीच्या मार्गांतलें एक पाऊलच होय. लोहमार्ग व आगगाड्या आणि मोटारी ही त्या पुढची पाहिरी ओलांडलेली आहे. जमिनीपेक्षां पाणी आणि हवा ह्यांचा अडथळा वहातुकीला कमी होतो. समुद्रावरचा प्रवास आगबोटींतून अत्यंत सुखकर व वेगवान झालेला आहे आणि त्यांमधून होणारी मालाची वहातुक अल्प खर्चाची होते हा सार्वत्रिक अनुभव आहे. पाण्यावर रस्ते करण्याचा खर्च नाहीं, त्याप्रमाणेंच हवेंतहि हा खर्च नाहीं आणि आकाशमार्गानें विमानें अधिक वेगानें जाऊं शकतात हिंदुस्थान हा देश अफाट आहे आणि त्याचें मधलीं अंतरें फार मोठीं आहेत, तीं आगगाड्या आज तोडीतच आहेत. परंतु मुंबई ते कलकत्ता किंवा मद्रासपर्यंतचा प्रवास दीड दिवस खातो. विमानमार्गानें माणसाची जाण्यायेण्याची व्यवस्था झाल्यानें ह्या काळात बचत करतां येऊं लागली आहे. हिंदुस्थानची राजधानी व मुंबई ह्यांच्यामध्यें विमानाची व्यवस्था नव्हती, तिचा उपक्रम गेल्या आठवड्यात करण्यात आला. दिल्ली ते मुंबई ह्या मार्गांत मध्यें ग्वालेर व भोपाळ येथें विमानगृहें बांधण्यात आलीं आहेत टाटा सन्स ह्या मंडळींनें विमानांच्या वहातुकीच्या धयात हें साहस केलें आहे त्याबद्दल ती अभिनंदनास पात्र आहे आगगाडीनें मुंबई व दिल्ली ह्यातल्या प्रवासास चोवीस तास लागतात, विमानानें तो साडेसात तासात होणार आहे. आधुनिक आर्थिक उत्क्रांतीच्या ओघात हिंदुस्थान देश आतां पडला आहे ह्याचें प्रस्तुत उपक्रम हें उत्कृष्ट निदर्शक आहे.

---

## प्रांतिक सरकार आणि प्राप्तीवरील कराची वांटणी

हिंदुस्थान सरकार प्राप्तीवरील कराचें सर्वच उत्पन्न स्वतःस घेतें, परतु त्यातला योग्य अश आपणास मिळणें वाजवी आहे अशी मागणी प्रांतिक सरकारांनीं मागेंच केली आहे. प्रांतिक सरकारास तोडून देण्यात आलेल्या उत्पन्नाच्या बाबींमध्यें वाढ होण्यास जागा नाहीं, एवढेंच नव्हे, तर तें कमी होण्याच्या मार्गांत आहे दारूबदीमुळें सरकाराचीं उत्पन्नें घटणार असून जमीनमहसुलात शेतकऱ्यास सवलती देणें अगत्याचें झालें आहे. प्रांतातील श्रीमान व मध्यम स्थितींतल्या वर्गाच्या प्राप्तीवरचा सगळा कर मध्यवर्ती सरकार घेत असल्यामुळें प्रांतिक सरकारास आपल्या लोकावर करांचें ओझें लादणें कठीण झालें आहे. सद्रहु कराच्या जमेचा प्रमाणशीर अंश प्रांतिक सरकारास मिळणें न्यायाचें असून प्रांतिक स्वायत्ततेचा राज्यकारभार चालू झाल्यापासून त्याचें महत्त्व विशेषच वाढलें आहे सर ऑटो नीमायर ह्यांनीं चौकशी करुन मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांचेमध्यें उत्पन्नाच्या वांटणीची योजना सुचविली होती. रेलवेजचें घटलेलें उत्पन्न सुधारलें म्हणजे हिंदुस्थान सरकारच्या हातात उत्पन्नाचा वाढावा येऊन त्यास प्रांतिक सरकारामध्यें पैशाची वांटणी करणें परवडेल अशी त्याची कल्पना होती. गेल्या वर्षाचे मानानें रेलवेजचें उत्पन्न वाढत आहे. त्या वाढींत खंड न पडल्यास आणि अंदाजपत्रकांत दाखवलेली प्राप्तीवरील कराची जमा हातीं आली तर पुढच्या सालीं एक ते दीड कोटि रुपये प्रांतामध्यें वांटता येतील असा तर्क आहे. असें झाल्यास सध्याच्या तिजोरीच्या हलाखीच्या स्थितींत प्रांतिक सरकारास थोडेंबहुत द्रव्यसहाय्य मिळण्यासारखें आहे. वांटावयाच्या रकमेचा एकपंचमांश मुंबई सरकाराकडे यावयाचा आहे. वरील अदाज खरा ठरून आमच्या प्रांतिक सरकाराच्या उत्पन्नात तीस चाळीस हजारांची भर पडेल अशी आशा आहे.

---

## भारत विमा कं लि

लाहोर येथील भारत इन्शुअरन्स कंपनीची नवीन काम मिळविण्याचे बाबतींत अत्यंत प्रशसनीय प्रगति होत आहे गेल्या महिन्यात ह्या कंपनीनें ३६ लाखांचा व्यवहार केला म्हणजे,रोजची सरासरी एक लाखाची पडली. येत्या डिसेंबर अखेर कंपनीच्या व्यवहाराचें वर्ष पुरें होतें, तेव्हां उरलेल्या दीड महिन्यात कंपनीचे प्रचारक शक्य तितकें काम मिळवितील, अशी व्यवस्थापकांस उमेद आहे पुणें शाखेखालील प्रचारकास उत्तेजन मिळावें म्हणून त्यास कामाच्या मानानें रोख बक्षिसें देण्याचें निश्चित झालें आहे. कंपनीच्या प्रॉस्पेक्टसमध्यें आवश्यक त्या सुधारणा आता घडवून आणलेल्या असून नवीन विमेदारास अनेक नव्या सवलती मिळण्याची व्यवस्था झालेली आहे. भारत कंपनीची स्थापना १८९६ सालीं झालेली असून हिंदुस्थानातील प्रमुख कंपन्यांत भारत कंपनीस महत्त्वाचें स्थान आहे

## प्लेग प्रतिबंधक लशीचा गुण दुप्पट झाला!

१९३६ सालीं मुंबई इलाख्यामध्यें २३,८७३ लोकांस प्लेग झाला. १९३५ सालीं ४१,०४२ लोकांस ह्या साथीनें पछाडलें होतें प्लेग प्रतिबंधक लस गुणकारक असल्याचें आता जनतेस पटलें आहे, ह्याचें प्रत्यंतर म्हणजे १९३५ सालीं मुंबईच्या हाफकिन इन्स्टिटयूटच्या मार्फत लशीचे १० लक्ष, १७ हजार डोस पुरविले गेले, १९३६ सालीं प्लेगचें मान कमी असूनहि ८ लक्ष, ८१ हजार डोसास मागणी आली. इन्स्टिटयूटमध्यें लस तयार करण्यांत येत असते, ती दुप्पट गुणकारी करण्याची योजना अहवालाचे वर्षी यशस्वी झाली आहे पिसाळलेलें कुत्रें चावलें असतां, त्यापासून होणारा अपाय चुकविणें आता त्या संबंधांतील लस टोचण्यानें सोपें झालें आहे. मुंबई इलाख्यांत ६९ ठिकाणीं अशी लस टोचण्याची व्यवस्था आहे.

## हिंदुस्थान सरकारच्या ग्रामसुधारणा ग्रँटचा विनियोग

ग्रामोन्नति व ग्रामसुधारणा ह्याप्रीत्यर्थ हिंदुस्थानसरकारनें १९३५–३६ सालीं मुंबई इलाख्याचे हवाली ७ लक्ष रु केले, त्यापैकीं १½ लक्ष रुपये मुंबई सरकारच्या औद्योगिक व शेती खात्याच्या योजनानुसार खर्चण्यांत आले. बाकीची रकम इलाख्याच्या वेगवेगळया भागातील योजनावर लोकसंख्येचे प्रमाणात खर्चावयाचें ठरलें. मुंबई इलाख्यात (सिंध वगळून) मार्च १९३७ अखेर ३½ लक्ष रु. खर्ची पडले १९३६–३७ मध्यें मुंबई इलाख्यास मध्यवर्ती सरकारनें आणखी ५ लक्ष रुपयाची ग्रँट दिली व तिचा विनियोग काहीं निवडक बाबींकडे व्हावा असें सुचविलें. तथापि, गेलें वर्ष अहमदाबाद, पंचमहाल, अहमदनगर, पुणें, सोलापूर, विजापूर इत्यादि जिल्ह्यांतील जनतेस दुष्काळामुळें काळजीचे गेलें व तेथें विशेष कार्य झालें नाहीं. इतर ठिकाणीं तें सुरळीत चालू राहिलें.

## हुंड्यावरील ड्यूटी कमी करण्यास प्रांतिक सरकाराचा विरोध

हुंड्यांवरील स्टँप ड्यूटी कमी केली असतां त्याच्या व्यवहारास प्रोत्साहन मिळून व्यापारास सहाय होईल, ह्या दृष्टीनें, मध्यवर्ती बँकिंग इन्क्वायरी कमिटीच्या सूचनेप्रमाणें दर हजारी दोन आणे अशी ड्यूटी असावी, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणे होतें प्रांतिक सरकाराचा ह्यासंबंधात मध्यवर्ती सरकारनें अभिप्राय विचारला होता काही प्रांताचीं उत्तरें आलीं आहेत, त्यावरून तीं आपलें उत्पन्न कमी होऊ देण्यास तयार नाहींत, असें दिसतें.


**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड. औंध.**

(स्थापना–८ आक्टोबर १९३२)

हेड ऑफिस–औंध (सातारा)

शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिघंची

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवींवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेंचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B R. Vartak

मॅनेजर.

**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**

(सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वात मोठी कंपनी)

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—

(१) कंपनीचें स्थैर्य, (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री डी. के जोगळेकर, बी. ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें (२)

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८४,५०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९६,७१६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ९,२०२ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,७८,८४६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ३६,६८३ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज.

## कर्ज देतांना बँकेनें बाळगावयाची दक्षता

( इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सनें मागविलेल्या निबंधांपैकीं बक्षीस मिळालेल्या निबंधाचा सारांश )

लोक आपले पैसे सुरक्षित व किफायतशीर रहावे ह्या हेतूनें विश्वासानें बँकेंत ठेवतात, ते गरजू माणसांस कर्जाऊ देण्याचा व अन्य रीतीनें व्याजी लावण्याचा व्यवहार बँक करते ठेवीदारास द्यावें लागणारें व्याज व कर्जदाराकडून मिळणारें व्याज ह्यातील तफावत, हेंच बँकेच्या नफ्याचें मुख्य साधन होय. दुसऱ्याचा पैसा गुतवितांना बँकास अत्यंत सावधगिरीनें व्यवहार करावा लागतो ह्या कामीं निष्काळजीपणा झाल्यास बँकेनें ठेवीदाराचा विश्वासघात केल्यासारखें होईल. जनतेच्या व्यवहारांमध्यें दोन प्रकारच्या कर्जाची आवश्यकता असते—( १ ) लांब मुदतीचें कर्ज व ( २ ) अल्प मुदतीचें कर्ज. व्यापारी बँका अल्प मुदतीच्या कर्जांचाच मुख्यतः व्यवहार करितात, कारण त्यांचेजवळील ठेवी लहान मुदतीच्याच असतात. खालील विवेचनांत बँकांनीं कर्जे देताना सावधगिरी कशी बाळगली पाहिजे हें सांगितलें आहे, त्यात व्यापारी बँकांच्या व्यवहाराविषयीं जरी प्रामुख्यानें उल्लेख आला असला, तरी त्यांतील तत्त्वें इतर बँकांसहि मार्गदर्शक होण्याजोगीं आहेत.

बँकांच्या व्यवहारामुळें व्यापार व उद्योगधंदे ह्यास दोन प्रकारांनीं मदत होते. ( १ ) चांगल्या योजनास भांडवलाचा पुरवठा करणें ( २ ) व अनिष्ट योजनास सहाय देण्याचें नाकारणें, ह्या दोन तऱ्हेनें बँका आर्थिक प्रगतीस हातभार लावीत असतात. कर्जे देताना सुरक्षिततेकडे बँकांनीं प्रथम लक्ष पुरवलें पाहिजे व व्याजाच्या भारी दराच्या आमिषानें भुलून जाता कामा नये. कर्जदाराच्या पतीविषयीं त्याच्या अर्जाचा विचार करण्यापूर्वी बँकेनें चागली चौकशी करावी अर्जदाराची प्रवृत्ति जुगारीपणाची नाहीं ह्या विषयींचीहि खात्री करून घ्यावी. त्याच्या लायकीची व सचोटीची खातरजमा झाल्यानंतर आपले पैसे दीर्घ काळपर्यंत अडकून पडणार नाहींत, ह्या संबधानें बँकेनें पूर्ण विचार करावा. लांब मुदतीचीं कर्जे देणें हें जमीन गहाणाच्या व औद्योगिक बँकांच्या कार्यक्षेत्रात येतें, व्यापारी बँकास आपला पैसा खेळता ठेवावा लागतो. मागणी करता क्षणींच बँकेस आपलीं कर्जे वसूल करता यावींत, अर्थात् जोपर्यंत बँक व कर्जदार ह्यांचा व्यवहार व्यवस्थित चालू आहे तोंपर्यंत अशा वसुलीचें कारणच उरणार नाहीं.

कर्जदार कर्जाच्या रकमेचा विनियोग कोणत्या कार्याकडे करणार आहे व कर्जफेडीची व्यवस्था त्यानें काय केली आहे ह्याची शहानिशा बँकेनें केली पाहिजे.बँकेनें आपले सर्व पैसे एकाच धंद्यात गुंतवू नयेत किंवा एकाद्या विशिष्ट गटासच कर्जे देऊं नयेत. थोड्या व्यक्तींस प्रत्येकी मोठ्या रकमा देण्यापेक्षा अनेक गिऱ्हाइकास व्यक्तिशः लहान रकमांचीं कर्जे देणें हें केव्हांहि श्रेयस्कर असतें.आपले पैसे व्यवस्थित रीतीनें पेरून धोक्याचें प्रमाण कमी करण्यातच बँकेच्या चालकांची शिताफी दिसून येते आतापर्यंत बँकरनें ध्यानात बाळगण्याच्या गोष्टींची सर्वसाधारण चर्चा झाली. विशिष्ट तारणावर देण्यात येणाऱ्या कर्जाबाबत त्यानें कोणती दक्षता बाळगणें आवश्यक आहे, ह्याचा खुलासा पुढें केला आहे.

केवळ कर्जदाराच्या प्रॉमिसरी नोटीवर कर्जे देण्यास बँका सहसा तयार नमतात तथापि, चांगल्या कुळांस अशीं कर्जे देण्यास हरकत नाहीं. कर्जदार कित्येक वेळा जामीन देतो. ह्या जामीनदाराच्या पतीसंबधीं कर्जदाराच्या पतीइतकीच चौकशी करणें जरूर असतें, कारण, कर्जदार व जामीनदार ह्यावर परतफेडीची सारखीच जबाबदारी असते. एकच मनुष्य कित्येक वेळां अनेकास जामीन रहातो, ह्यामुळें त्याच्या जामिनकीचें तारण कमी होतें, ह्याकडे बँकेनें लक्ष द्यावें.

कर्जदाराची परतफेडीविषयींची कितीहि तीव्र तळमळ असली, तरी तेवढ्यानें बँकेचें काम भागत नाहीं दिलेल्या तारणातून बँकेस आपली रकम तावडतोब उभी करतां आली पाहिजे, नाहीं तर त्या तारणाची किंमत काय ? तारण लावून दिलेल्या जिनसाचा बाजारभाव कायम रहाणें शक्य नसतें, ह्याकरिता बँकेनें नेहेमी आपल्या कर्जाची रकम सुरक्षित राहील, ह्याविषयीं काळजी घ्यावी तारण कमी पडू लागल्यास ज्यास्त मागून घ्यावें. किमतींत फारच मोठीं आंदोलनें खाणाऱ्या बाबी तारण म्हणून घेऊंच नयेत बँकेकडे कर्जदाराचें जें वेळोवेळ येणें निघेल, तें भागविण्यासाठी बँकेस तारण जिनसा विकणें, गहाण टाकणें, इत्यादींचा अधिकार आहे, असा खुलासा बँकरनें कर्ज देतेवेळेस केलेला चागला.

सरकारी कर्जरोख्याचे बाजारभावात फार मोठा चढ–उतार सहसा होत नाहीं, हें खरें असलें तरी अनपेक्षित परिस्थिति निर्माण होणें अशक्य नसतें, ह्या दृष्टीनें तारण रोख्यांची किंमत व कर्जाची रकम ह्यात जरूर तेवढी कूस राखावी. बँकेकडे दाखल केलेले रोखे खरोखरीच अर्जदाराच्या मालकीचे असल्याविषयीं बँकेनें खात्री करून घ्यावी. म्युनिसिपल रोखे, पोर्ट ट्रस्ट डिबेंचर्स व तत्सम निमसरकारी रोखे ह्यांचे बाबतहि अशाच प्रकारचें धोरण राखावें

सयुक्त भांडवलाच्या कपन्याचे भागाच्या तारणावरहि बँका कर्जे देतात प्रत्येक बँक, कोणते भाग तारण म्हणून स्वीकारावयाचे, ह्याविषयीं एक यादी करून ठेवते. भागांवरील मागितलेल्या कॉलची रकम भरलेली असल्याविषयीं बँकेनें चौकशी करावी. तिऱ्हाइतांच्या नांवावरील भाग स्वीकारते वेळीं, त्याचे मालकाकडून आपले हक्क अर्जदारास दिल्याविषयीं लेखी पत्र घेण्यात यावें. तथापि, अशा पुनर्गहाणावर कर्जे देण्याचें बँकेनें नाकारणेंच ज्यास्त श्रेयस्कर असतें.

मालाचे तारणावर कर्जे देण्याचा व्यवहार बँका नेहेमी करीत असतात तारण घेतलेला माल सहज विकतां येण्याजोगा व साठवणींत न नासण्याजोगा असावा. ह्या मालावर बँकेचा पूर्णपणें ताबा असणें जरूर आहे व त्यावर कर्ज देणें अगर नाकारणें अवलंबून ठेवणें जरूर आहे. गहाण ठेवणाऱ्या मनुष्याचा सद्रहु मालावर पूर्ण हक्क असणें अत्यावश्यक आहे. मालाचा दर्जा व त्याचें माप तपासून घ्यावें व त्याबाबत कर्जदाराचा लेख घ्यावा. गोदाउनवर बँकेचें नांव ठळकपणें दिसेल, अशा मोठ्या पाट्या बाहेरच्या भिंतींवर लावण्यात याव्या व दरवाज्यावरील कुलुपावरहि बँकेचें नाव कोरण्यात आलेलें असावें कोठाराचें भाडें कर्जदार जरी भरीत असला, तरी घरमालकानें बँकेस भाडेकरी म्हणून समजावें, अशी व्यवस्था करण्यात यावी कोठारातील मालाचा सर्व तऱ्हेच्या धोक्याचा विमा उतरवून घ्यावा. विम्याचे हप्ते कर्जदार वक्तशीर भरतो किंवा नाहीं, ह्याविषयीं बँकेनें जागरूक रहावें. कोठारावर देखरेख करण्याकरितां विश्वासू नोकराची नेमणूक करावी. ( अपूर्ण )

# सहकारी चळवळ

## मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि०

### शाखा इस्लामपूर व शिराळा येथील वार्षिक साधारण सभा

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. शाखा इस्लामपूर व शिराळा या शाखांच्या वार्षिक साधारण सभा ता १० व ११ आक्टोबर रोजीं आमदार आत्माराम पाटील एम एल. ए. याचे अध्यक्षतेखाली भरल्या होत्या. शाखांचें अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रकें मे. एजंट यानीं वाचून दाखविल्यावर तीं मंजूर करण्यात आलीं तसेंच इतर मामुली विषयाचे ठरावहि मंजूर करण्यात आले नंतर बँकेच्या डायरेक्टर्सची निवडणूक १ वर्षाची असून ती निवडणूक झाल्यानतर एक वर्षापुरती नसून ती २ वर्षांची आहे असें बँकेनें ठरविलें. या प्रश्नाबद्दल शाखा कमेटीचा सल्ला घेतला नाहीं, त्याबद्दल एक तक्रारवजा ठराव शाखा कमेटीनें केला आहे त्यास मान्यता यावी म्हणून श्री बोगर यानीं तो सभेपुढें मांडला त्यावरहि बरीच चर्चा झाली व तो मजूर झाला.

### सटाणा तालुका को. सु. युनियन लि.

वरील यूनियनची वार्षिक साधारण सभा ता. ३०-९-३७ रोजीं श्री. धर्माजी तानाजी पाटील ह्याचे अध्यक्षतेखाली भरली होती. १९३६-३७ सालच्या अहवालास व हिशेबास मंजुरी, १९३७-३८ सालच्या बजेटास मजुरी, सरकारी तपासणी यादीचें व अ. रजिस्ट्रार ह्याच्या शेऱ्याचें वाचन, नवीन व्यवस्थापक मडळाची निवड, पोट-नियमात दुरुस्त्या, बँक कर्जावरील व्याजाचे दर कमी करण्याविषयीं बँकेस विनंति, वसुलीच्या शिकस्तीची आवश्यकता इत्यादि विषयासबधानें ठराव सभेनें पास केले.

श्री धर्माजी तानाजी पाटील ह्यांची चेअरमनच्या जागीं फेर-निवडणूक झाली अध्यक्षानीं आपल्या समारोपाच्या भाषणात यूनियनच्या वाढत्या कामाचा उल्लेख केला. शाळांप्रमाणें प्रत्येक गांवीं सोसायट्या पाहिजेत, असें ते म्हणाले. नवीन सोसायट्यांचे नोंदणीबाबत होणारी दिरंगाई व दुर्लक्ष ह्याकडे त्यानीं लक्ष वेधलें व सेक्रेटरीच्या ट्रेनिंग वर्गाच्या उणीवेचाहि निर्देश केला.

### कर्जाच्या वसुलीस पुन. प्रारंभ

सहकारी सोसायट्याकडून सभासदांनीं घेतलेल्या कर्जाच्या वसुलीबाबत करावयाचे कायदेशीर इलाज थाबविण्याविषयीं मुबई सरकारनें हुकूम काढला होता. नोव्हेंबर अखेर पिकें काढली जाऊन शेतकऱ्यास आपला माल विकतां येईल व देणें पार पाडणें शक्य होईल, ह्या हिशेबानें ह्या महिन्याचे अखेर पासून कर्ज वसुलीबाबतचे हुकूमनामे बजावण्यास प्रारंभ करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### दि सोलापूर डि सें. को बँक लि.

वरील बँकेच्या करमाळा येथील नवीन शाखेचा उद्घाटन-समारभ रविवार ता २१ नोव्हेंबर, १९३७ रोजीं ५ वाजतां करमाळा येथें श्री. के. एस् फिरोदिया, बी. ए., एलएल. बी, एम् एल ए, ह्याचे हस्तें होणार आहे.

### हिंदी उंसाच्या पिकाचा सरकारी अंदाज

चालू मोसमात सबंद हिंदुस्थानांत मिळून ३८ लक्ष, ५५ हजार एकर उसाखाली आहेत, असा सरकारी अजमास आहे. गेल्या वर्षी ४२ लक्ष, ३२ हजार एकरात ऊस लावण्यांत आला होता. म्हणजे गेल्या वर्षीपेक्षां चालू सालीं ९ टक्क्यानीं लागवड कमी झाली आहे उंसाच्या क्षेत्राचे दृष्टीनें प्रांताची प्रतवारी खालीलप्रमाणें आहे –

| प्रांत | उंसाखालील एकर | एकूण लागवडीशीं प्रमाण % |
|---|---|---|
| संयुक्त प्रांत | २१ लक्ष, ७५ हजार | ५२·२ |
| पजाब | ५ लक्ष, २९ हजार | १३ ७ |
| बिहार | ३ लक्ष, ८५ हजार | १० ३ |
| बंगाल | २ लक्ष, ९० हजार | ७ ५ |
| मद्रास | ... ९१ हजार | ३ ४ |
| मुबई | ... ७१ हजार | २ ९ |

१९३६–३७ सालातील साखरेचें जागतिक उत्पादन (बीटा-पासूनची व उसाची साखर धरून) ३ कोटि, १० लक्ष टन झालें. १९३५–३६ सालीं २ कोटि, ८७ लक्ष टन साखर तयार झाली होती.


## न्यू अिंडिया अॅशुअरन्स कंपनी लिमिटेड, मुंबअी

सर्व लोकांस जाहीर करण्यात येतें कीं, आमचे पुणें मुक्कामीचे अेजन्टस "मेसर्स भट ब्रदर्स" (या नावानें आयुष्याचे विम्याचें काम करीत असलेले) यांची अेजन्सी कंपनीनें बंद केली आहे सदरहू अेजन्सीचे दोन भागीदार श्री. **नारायण दिनकर जोगळेकर** व श्री **भास्कर विष्णु भट** हे उभयता भागीदारींतून विभक्त झाल्याकारणानें, त्यांना त्याचे स्वत.चे नांवा-वर आयुष्याचे विम्याचें काम करण्याबाबत डेक्कन, कुलाबा, ठाणा व रत्नागिरी या ठिकाणीं व्यक्तिशः अेजन्सी देण्या न देण्य विषयी कंपनी विचार करीत आहे.

टिळक रोड, पुणें न २
ता १४–११–१९३७

लाअिफ म्यानेजर याचे हुकुमावरून,
डी के जोगळेकर,
ऑर्गनायझर ऑफ अेजन्सीज (डेक्कन)

## WEALTH OF DESIGNS IN HANDICRAFTS

*Made of*

WOOD, BRASS, SILVER, IVORY, CLAY, COTTON AND SILK YARN, GOLD & SILVER TISSUE

*By the following processes*

**Engraving, Embossing, Carving, Modelling, Weaving, Inlaying**

Kindly pay a visit to our show-room or apply for our catalogue for further particulars.

BUSINESS MANAGER,
U. P ARTS & CRAFTS EMPORIUM, LUCKNOW

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते
भेटा अगर लिहाः—
**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

## हिंदी बँकिंगचा आढावा

[ गेल्या वर्षातील हिंदी बँकिंगचा आढावा 'एकॉनॉमिस्ट' पत्रानें घेतला आहे, त्याचा सारांश येथें देत आहों. ]

हिंदुस्थानांतील मालाच्या बाजारभावात एकसारखी हळु हळु वाढ होत गेली ह्यामुळें अतर्गत व परराष्ट्रीय व्यापारास चालना मिळाली. नोव्हेंबर, १९३६ ते मे, १९३७ या निर्गत व्यापाराचे मोसमांत चलनास मागणी चागली असल्याकारणानें मोठ्या शहरात "कॉलमनी" वरील व्याजाचा दर ½ टक्क्यांवरून १½ टक्क्यांवर गेला. तीन महिने मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचा दरहि ¾ टक्क्याचा १¾ टक्के झाला. ऑक्टोबर, १९३६ मध्यें रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या बँकानीं ८९कोटी,३७ लक्ष रुपयाचीं कर्जे दिलेलीं होतीं. एप्रिल, १९३७मध्यें हा आकडा १३२ कोटी, ६८ लक्षावर गेला. रोख रकमेचें एकूण देण्याशीं असलेलें प्रमाण १४ ९८ टक्क्यांवरून ९.९ टक्क्यावर आलें, तेव्हा रिझर्व्ह बँकेनें योग्य ती व्यवस्था करून हें प्रमाण १२ ९३ टक्क्यापर्यंत चढवलें. रिझर्व्ह बँकरेट वर्षभर ३ टक्केच कायम होता. १६५ कोटि रुपयाच्या चलनी नोटा सप्टेंबर, १९३६ मध्यें बाजारात खेळत होत्या, एप्रिल, १९३७मध्यें १९५कोटि रुपयाच्या नोटा बाजारात आल्या.

ट्रेझरी बिलाची खरेदी-विक्री करण्याचें व विलायतेंत जरूर त्या रकमा उभ्या करण्याचें काम आतां हिंदी रिझर्व्ह बँकेकडे आलें आहे. तेव्हां इंग्लंडमध्यें मोठाल्या रकमा शिल्लक राखण्याची जबाबदारी सरकारावर उरलेली नाहीं. जानेवारी ते एप्रिल, १९३७ ह्या मुदतींत बँकेनें सुमारें ४० कोटि रुपये ईंग्लडातून हिंदुस्थानात आणविले व त्या बरोबरच ट्रेझरी बिलाबाबतचें आपलें देणें २८ कोटि रुपयांवरून १३ कोटींवर उतरविलें चलनास मागणी भरपूर असल्यानें १९३६ च्या ऑगस्ट-सप्टेंबरातील ट्रेझरी बिलावरील ½ टक्के व्याजाचा दर जानेवारी, १९३७ मध्यें १ टक्क्यावर गेला. १९३७ च्या पहिल्या तिमाहींत सरकारी रोख्याच्या किंमती थोड्या-फार घटल्या, तरी त्यानतर त्यात इष्ट ती वाढ झाली

गेलें वर्ष शेतीस सर्वसाधारणपणें बरें गेल्याकारणानें, जानेवारी-जून, १९३७ ह्या सहामाहींत बँकास नफा चागला सुटला असल्याचें आढळतें औद्योगिक प्रगतीचीं सुचिन्हें सर्वत्र दिसत आहेत व ह्या दृष्टीनें प्रस्तुत काळ बँकिंगच्या व्यवहारास अत्यत फायदेशीर आहे इतके चागले दिवस गेल्या कित्येक वर्षांत आले नव्हते. सोन्याच्या निर्गतीची जागा, मालाची वाढती निर्गत भरून काढीत आहे, ह्यामुळें हुंडणावळ स्थिर राहिली आहे वाढत्या आयातीचा परिणाम जकातीच्या उत्पन्नातील सुधारणेच्या रूपानें लवकरच दिसूं लागेल

जानेवारी १९३५ पासून १९१३ च्या कंपनीकायद्यामधील दुरुस्त्या अंमलांत आल्या. कायद्यातील नव्या कलमाचे रूपानें बँकिंगचा व्यवहार नियमबद्ध करण्याचा हा यत्न स्तुत्य आहे, तथापि तो कितपत यशस्वी होतो, हें पहावें एप्रिल,१९३७ मध्यें नवीन राज्यघटना अंमलात आली, तिला अनुसरून रिझर्व्ह बँक व प्रांतिक सरकारें ह्याचे परस्पर सबंध बदलले गेले. हिंदुस्थान व ब्रम्हदेश ह्या दोनहि देशात नोटा काढण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार रिझर्व्ह बँकेस आहे हिंदी नोटा ब्रह्मदेशांत चालतात परंतु ब्रम्ही नोटावर "ब्रह्मदेशापुरत्याच चालणाऱ्या" असा शिक्का मारलेला असतो प्रांतिक सरकाराचे बँकर ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेनें ५ प्रांताकरिता मिळून ४ कोटि, ६० लक्ष रुपयाचें कर्ज उभारलें, त्यास चागली मागणी आली.

रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या बँकाचे शाखेंत १९३६-३७ मध्यें सुमारें शभराची भर पडली, ह्याचा रिझर्व्ह बँकेचे रिपोर्टांत प्रामुख्यानें उल्लेख आलेला आहे शेतीच्या घधाशीं मध्यवर्ती बँकेच्या व्यवहाराचा सबंध कसा पोंचेल, ह्याविषयीं बँकेनें प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टांत नवीन असें कांहींच नाहीं. चागल्या पूर्वतयारीविना हें कार्य हातीं घेता येणें कठीण आहे असा बँकेचा अभिप्राय आहे. काहीं निवडक श्रॉफ व सावकार ह्यांच्या हुंड्यांचे तारणावर, जोडलेल्या बँकानीं परतफेडीची हमी दिल्यास, कर्जे देता येणें शक्य होईल, असें रिझर्व्ह बँकेनें आतां सुचविलें आहे ह्या सर्व बाबतींत आपला अभिप्राय १ एप्रिल, १९३८ पूर्वी हिंदुस्थान सरकारास कळविण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर कायद्याच्या ५५ व्या कलमानें घातलेली आहे.

### अहमदाबादमधील मजूरवर्गाचा कर्जबाजारीपणा

मुबई सरकारच्या लेबर ऑफिसनें अहमदाबाद येथील गिरण्यांतील मजुराच्या रहाणीविषयीं चौकशी करून, कामगारांच्या घरखर्चाचे आकडे जमा केले. कौटुबिक उत्पन्न-खर्चासबधींचा लेबर ऑफिसचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे कुटुंबांच्या नेत्यामध्यें साक्षरतेचें प्रमाण वाढलें असल्याचें ह्या चौकशीमध्यें आढळून आलें. एकूण १,२९३ कुटुबाचे हिशेब तपासले, त्यापैकीं ८८९ कुटुबें कर्जात असून, कर्जाच्या रकमेचें प्रत्येकीं प्रमाण ३२२ रु असल्याचें दिसून आलें ह्या १२९३ कुटुंबास एकूण २ लक्ष, ८७ हजार रु देणें आहे


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,२३,९०० वसूल झालेलें भांडवल १,११,७४०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात या बँकेवरील चेक मुबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) .. ... | १२०–११ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन .. ... .. | १०५—५ |
| ४% १९४३ .. .. ... | १०८—९ |
| ३½% बिनमुदत ... ... .. ... | ९८–१२ |
| ३½% १९४७–५० .. ... ... | १०६—८ |
| २⅜% १९४८–५२ .. .. .. | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... . | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४७—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | ३०–१० |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... | १५९५—० |
| बाँबे प्रॉ को बँक ( ५० ) ५% ... .. | ५९—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२७–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... .. | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु ४ आ बोनस | ९५०—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% . .. ... | ७६५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १०% . ... | १२८–१२ |
| कराची ( १०० ) ९% . ... ... | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% . ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% .. . | १४८७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% . . | १५८९—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु . . | १८७—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु ... | ५०—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु .. ... .. | २७—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ .. | ४३–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु बोनस . | ४७००—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% . .. | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु २ आ. . . | १६८–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु . ... | ३४९—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु ३ आ. ६ पै ... | १५७५—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास .. . | ३४–९½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास .. . | ५०—१ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास .. ... | १५—४ |
| ,, केसर प्रत्येक मणास ... ... | ११–४ |
| ,, सरया प्रत्येक मणास ... ... | ११–२ |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर

माशिनरीचा पहिला हप्ता मुंबईस आला

**दहा लक्ष रुपयांची साखर**

सिंडिकेटच्या जमिनी चांगल्या असल्यामुळे हंगामशीर लागणीने दर एकरीं ४५ टन ऊंस सहज येऊं शकतो, असा प्रत्यक्ष अनुभव आला आहे

साखरेचे भाव उतरले तरी

**५ ते १० टक्के नफा.**

सविस्तर माहिती व शेअरफॉर्म मागवा.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.**

२५७ बुधवार पेठ, पुणें

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणामध्यें याची बरोबरी बाजारातील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत बाटलीस रु २ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते.—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डिपार्टमेंट नं. ६ )

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

# NOTICE TO CONTRACTORS.

Separate sealed percentage tenders in Form B-1 for each of the following works are invited and will be received by the Undersigned upto 2 P. M. on 22-11-1937. Other particulars regarding the contract etc and tender forms can be had at the Undersigned's Office on any working day, during office hours upto 20th November 1937. The Undersigned reserves the right to reject any or all tenders without assigning reasons

| Work | Estimated Cost Rs | Cost of Tender Form Rs |
|---|---|---|
| (1) Improving Kamatgi Gadag Road section from Badami to—Border of Dharwar District. ...... | 13,573/- | 1-2-0 |
| (2) Improvements to Havanur Ekkambi Road, Constructing drains & Culverts in miles 0 to 20.. .. . . | 45,213/- | 7-8-0 |

Ex Engr's Office, Dharwar, 27th October, 1937

P K SHINDE
Executive Engineer,
Dharwar Division, Dharwar.

स्पेशल स्टमक ट्रीटमेंट
पांढरें-सत्त्व किंमत १। रु.
मलशुद्धी टॅबलेट्स् किं ८आ

या दोन औषधांच्या मदतीनें पोटातील सर्व विकार खात्रीनें बरे करता येतात अपचन, आम्लपित्त, पोटदुखी, पोट फुगणें, करपट ढेंकर येणें, छातीतील जळजळणें, भोवळ वाटणें अन्नावरची इच्छा नष्ट होणें, झोंप समाधानकारक न येणें वगैरे विकारावर हा इलाज रामबाण गणला गेला आहे.

डॉ. बी. आर. गुणे
पुणें २.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

गव्हाचे पोहे
(REGD) (BLOSSOM) (REGD)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात. विशेषतः लहान मुलाना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधातून खाता येतात.

७५३ सदाशिव पुणें २.
भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे
कारखानदार.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you

**NEW BUSINESS**

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* . Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Office* ' throughout India & the East

S. C MAJUMDAR,
MANAGER Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २५, किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न. २.



## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्.



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २४ नोव्हेंबर, १९३७ अंक ४६

आणखी एक

प्रगतीचा मोठा टप्पा

५१ लाखांवरून ६६ लाख

वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लि., सातारा

विमा व्यवसायात विशेष महत्त्वाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या अशा ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी कोणत्याहि जीवन विमा कंपनीस हार जाणार नाहीं आणि सुप्रसिद्ध विमागणिती श्री ग. स. मराठे, एम्. ए., ए. आय. ए., (लंडन) म्हणतात त्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया ही

सर्व विमाकंपन्यांना आदर्श

अशी विमा संस्था आहे

गेल्या वर्षअखेरचा प्रगतीचा आढावा.

| | | |
|---|---|---|
| एकूण विमा | रु | ३,२०,००,०००हून अधिक |
| एकूण शिल्लक . | रु | ८३,००,०००हून अधिक |
| सन १९३६ मधील उत्पन्न | रु | १९,३२,८९९ |
| लाईफ फंड व इतर गंगाजळी | रु | ७७,०५,३७९ |
| सन १९३६मधील नवें काम | रु. | ६६,४०,८३९ |
| एकूण क्लेम्स दिले . | रु | १७,१०,२०६ |
| त्याप्सर्चे प्रमाण | | शेंकडा ४ |

त्रैवार्षिक दर हजारी बोनस

होल लाईफ रु. ७५ व एण्डोमेण्ट रु. ६०

विमा उतरण्याला किंवा एजन्सी घेण्याला हीच कंपनी उत्कृष्ट.

पुणें शाखाः— बुधवार चौक, पुणें } मॅनेजर.

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर

मशिनरीचा पहिला हप्ता मुंबईस आला

दहा लक्ष रुपयांची साखर

सिंडिकेटच्या जमिनी चांगल्या असल्यामुळे हंगामशीर लागणीनें दर एकरीं ४५ टन ऊस सहज येऊं शकतो, असा प्रत्यक्ष अनुभव आला आहे

साखरेचे भाव उतरले तरी

५ ते १० टक्के नफा.

सविस्तर माहिती व शेअरफॉर्म मागवा

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.

२५७ बुधवार पेठ, पुणें

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स

याचेकडील मसाले, लोणचे आणि पापड याचा आपले जेवणात नेहमीं उपयोग करा

पत्ता —मुगभाट, गिरगाव, मुंबई

पुणें एजंट.—दत्तात्रय नारायण हेर्जीब २०, शुक्रवार.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

— मनपसंत काम —

वक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी

सदाशिव हौदानजिक, पुणें

K. K. & Co.

Photographic Dealers.

POONA

# विविध माहिती

### ग्रेटब्रिटन-अमेरिका व्यापारी करार

व्यापारी करार करण्यासाठी अमेरिकेनें २१ देशांशीं बोलणीं सुरू केलीं, त्यांपैकीं १६ देशांशीं करार पुरे झाले आहेत इंग्लंड व अमेरिका ह्या देशामध्यें आता वाटाघाटी चालू आहेत. अमेरिकेनें ब्रिटिश पक्क्या मालास व इंग्लंडनें अमेरिकन शेतीच्या मालास सवलती याव्या असें धोरण नियोजित कराराचे मुळाशीं आहे.

### कॅनिंगचा धंदा

अमेरिका, इंग्लंड वगैरे पाश्चात्य देशात पदार्थ डब्यांत साठवण्याचा (कॅनिंग) धंदा झपाट्यानें प्रसार पावत आहे एकट्या स्वीडन देशात कॅनिंगचे १३० कारखाने आहेत. आयते तयार केलेले पॅकबंद जिन्नस वापरण्याची सवय तिकडे समाजांत जोरानें पसरत चालली आहे.

### उंसाची किमान किंमत मद्रासमध्येंहि निश्चित होणार!

उसाची किमान किंमत निश्चित करण्याच्या इष्टानिष्टतेविषयीं चर्चा करण्याकरिता मद्रास सरकारनें उंसाचे बागाइतदार व साखरेचे कारखानदार ह्यांची एक सभा बोलाविली आहे. बिहार व संयुक्तप्रांत येथें उसाची किंमत अशा रीतीनें ठरवून देण्यांत आलेली आहे.

### अमेरिकन विमानांस मागणी

गेल्या महायुद्धाचे वेळीं ब्रिटिश मोटार कारखाने युद्धखात्याकरितां मोटारी बनविण्यात गुंतले होते, त्या संधीचा फायदा अमेरिकेनें घेतला अमेरिकन गाड्यांनीं ग्रेटब्रिटनमधीलच नव्हे तर साम्राज्यांतर्गत इतर देशांतीलहि गिऱ्हाईक काबीज केलें अमेरिकेचें मोटारींच्या धंद्यामधील पुढारीपण अद्याप कायम आहे. विमानाचे बाबतींत त्याचीच पुनरावृत्ति होण्याचा संभव दिसतो, कारण इंग्लंडमधील विमानांचे कारखानदार ब्रिटिश वैमानिकखात्याकरितां विमानें बनविण्याचे कामात गढून गेले आहेत व अमेरिकन विमानें व्हातुकीच्या धंद्यावर आक्रमण करीत आहेत! ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कॅनडा, हे सर्व देश अमेरिकन बनावटीचीं विमानें खरेदीत असून दक्षिण आफ्रिकेंत जर्मन विमानांनीं प्रवेश केला आहे.

### प्रेमपत्रें लिहिण्याचा धनोत्पादक धंदा

इतराकरितां आकर्षक व योग्य शब्दात प्रेमपत्रें लिहून देण्याचा धंदा एका इंग्रजानें सुरू केला आहे. प्रत्येक पत्रास तो तीन-चार रु. घेतो आपल्या कामात तो वाकबगार झाला आहे व संतुष्ट झालेल्या गिऱ्हाइकांचे प्रशस्तीमुळें त्याचा धंदा वाढला आहे त्यानें आता आपल्या हाताखाली सहायक घेतले आहेत.

### भुइमुगाच्या पिकाचा अंदाज

मद्रास व मुंबई हे प्रांत व हैद्राबाद व म्हैसूर हीं संस्थानें ह्यात मिळून एकूण हिंदी भुइमुगाच्या ९५ टक्के लागवड होते. ह्या चार प्रांतात व संस्थानात मिळून ७० लक्ष एकरांत, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा ३३ टक्के ज्यास्त क्षेत्रात, भुइमूग पेरला असल्याचा सरकारी अंदाज आहे मुंबई इलाख्यात, संस्थानें धरुन, २० लक्ष, ४० हजार एकर भुइमुगाखाली आहेत. गत सालीं, तत्सम आकडा १४ लक्ष, ९८ हजार इतका होता.

### इटलीचें आर्थिक स्वावलंबन

इटलीच्या आर्थिक स्वयपूर्णतेकरिता कसून यत्न करण्याची पुनर्घोषणा हुकूमशहा मुसोलिनीनें केली आहे. येत्या वर्षी परदेशांतून इटलींत यावयाच्या खाद्य पदार्थांची कमाल मर्यादा त्यानें घालून दिली आहे.

### विद्यार्थ्यांची संख्या घटली

ग्रेटब्रिटनमधील विश्वविद्यालयांत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. व्यापार व उद्योगधंदे ह्यांची चलती असली म्हणजे नेहेमीच उच्च शिक्षणाची आकर्षकता कमी होते व तरुण लोक व्यापारात व उद्योगधंद्यांत पडतात. मंदीच्या काळात बेकार राहण्यापेक्षां शैक्षणिक लायकी वाढविणें बरें, ह्या हेतूनें विश्वविद्यालयातून गर्दी होते. जननाचें प्रमाण उतरत चाललें आहे, हेंहि विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्याचें एक कारण आहे. ऑक्सफर्डचें विश्वविद्यालय हें एकच कायते वरील प्रवृत्तीस अपवाद आहे.

### हिंदी व ब्रिटिश सैनिकांचे पगार

हिंदुस्थानात सध्या ५२,४६६ ब्रिटिश व १,२२,५३१ हिंदी सैनिक आहेत व त्यास अनुक्रमानें दरमहा सरासरीनें ३८$\frac{3}{4}$ लक्ष व २७ लक्ष रु. पगार द्यावा लागतो. ब्रिटिश सैनिकाचा मासिक भत्ता ७$\frac{1}{4}$ लक्ष रु. व हिंदी सैनिकांचा भत्ता ३$\frac{1}{10}$ लक्ष रु. आहे. ब्रिटिश सैनिकास दरमहा ४५ ते ८० रु. पगार मिळतो. हिंदी शिपायाचा पगार १६ रु. आहे.

### मध्यवर्ती असेंब्लीची येती बैठक

मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या येत्या बैठकीस ता. ३१ जानेवारी, १९३८ रोजीं सुरवात होऊन ती १२ एप्रिल, १९३८ अखेर चालेल. सरकारी कामाकरितां २७ दिवस राखून ठेवण्यात आले असून खासगी बिलाचे वाटणीस ४ दिवस आले आहेत. १४ फेब्रुवारी रोजीं रेल्वे बजेट असेंब्लीस सादर करण्यांत येईल व २६ फेब्रुवारी रोजीं मुख्य बजेट मांडण्यात येईल.

### गिरणी कामगाराच्या वेतनात वाढ होणार काय?

मुंबई सरकारनें कपास कापडाच्या गिरण्यातील कामगाराच्या परिस्थितीविषयीं चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठी एक कमिटी नेमली आहे. गिरणीकामगाराचे वेतनात तात्काळ वाढ करण्याजोगी गिरण्यांची अनुकूल परिस्थिति आहे, किंवा नाहीं, ह्याबाबत कमिटीनें चौकशी करून आपला अभिप्राय व्यक्त करावयाचा आहे. ह्यासंबंधात माहिती मिळविण्याकरितां कमिटीनें प्रश्नपत्रिका काढली आहे

### लाहोर येथील ब्रॉडकास्टिंग स्टेशन

लाहोर येथील ब्रॉडकास्टिंग स्टेशन ता. १६ डिसेंबरपासून सुरू होणार आहे.

### मुंबई शहरातील टेलिफोनचे दर

बॉबे टेलिफोन कंपनीनें आपले टेलिफोनचे दर उतरावे, ह्यासाठी इंडियन मर्चंटस चेंबर प्रयत्न करीत आहे. चेंबरच्या कमिटीनें कंपनीस एक पत्र लिहून आपले म्हणणें तिनें सिद्ध केलें आहे. मुंबई शहरात १६,२०७ टेलिफोन असून त्यापासून कंपनीस ४०$\frac{3}{4}$ लक्ष रु. उत्पन्न होतें. घरगुती वापरासाठी घेतलेल्या टेलिफोनकरितां वार्षिक १८० रु. द्यावे लागतात. इतर कारणांसाठी घेतलेल्या टेलिफोनला २८० रु पडतात. हे दर अनुक्रमें रु.१३५ व रु.२५० असे करावे, असें चेंबरचें म्हणणें आहे.

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| ७-११-३७ ते १३-११-३७ | १८,९६,४६२ |
| १४-११-३७ ते २०-११-३७ | ३७,८१,३५२ |
| २१-९-३७ ते २०-११-३७ | ३,०६,२१,६७,०५२ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५६४ | व मुंबई सरकार—लॉर्ड रे म्यूझियमची सरकारास विनति | |
| २ हिंदुस्थानांत पदार्थ संग्रहालयांची आवश्यकता | ५६५ | ५ ग्वाल्हेर संस्थानांतील सहकारी चळवळ ... | ५६९ |
| ३ घाउक बाजारभाव अद्याप पूर्वपदावर आले नाहींत | ५६६ | ६ महाराष्ट्र इन्शुअरन्स कं. लि., कराड .. | ५७१ |
| ४ स्फुट विचार ... | ५६७ | ७ जपानच्या काटकसर योजना ... | ५७१ |
| जादा लष्करी खर्चासाठीं ८० लाखांची देणगी—सहकारी बँकांचें महत्त्वाचें स्थान—सहकारी बँकांची यादी व नकाशा—कपाशीच्या वहातुकीचे दर उतरविण्याची आवश्यकता—सहकारी चळवळ | | ८ हकीम व वैद्य ह्यांच्या धंद्याचें संघटन ... | ५७१ |
| | | ९ कॉमनवेल्थ कंपनीचा नववा वाढदिवस . | ५७२ |
| | | १० निवडक बाजारभाव | ५७३ |



# अर्थ

बुधवार, ता. २४ नोव्हेंबर, १९३७


## हिंदुस्थानांत पदार्थ संग्रहालयांची आवश्यकता

"कार्नेजी कॉर्पोरेशन ऑफ न्यूयॉर्क" च्या पुरस्कारानें डॉ. मार्कहॅम व मि. हारग्रीव्हज् ह्यांनीं १९३६ मध्यें हिंदुस्थानांतील पदार्थ संग्रहालयाची पहाणी केली आणि त्याबाबतचा रिपोर्ट लंडन येथील म्यूझियम असोसिएशनें प्रसिद्ध केला आहे. जनतेच्या शिक्षणाचे दृष्टीनें अशा संग्रहालयाचें महत्त्व विशेष आहे, हें लक्षांत घेऊन आता हिंदुस्थान सरकारनेंहि ह्याबाबत विधायक कार्य करण्याचें ठरविलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. डॉ. मार्कहॅम व मि. हारग्रीव्हज् ह्यांनीं केलेलें निरीक्षण व सुचविलेल्या सुधारणा हीं सरकारास मार्गदर्शक होतील.

हिंदुस्थानांतील पदार्थ संग्रहालयें लोकसंख्येच्या मानानें अत्यंत अपुरीं आहेत. कित्येक मोठ्या वस्तीच्या शहरांत एकहि संग्रहालय आढळणार नाहीं. डेहराडूनसारख्या मध्यम प्रतीच्या शहरांतील म्यूझियम ह्यास अपवाद आहे. म्यूझियम्सची संख्या हें जर देशाच्या प्रगतीचें व सांस्कृतिक दर्जाचें लक्षण मानलें तर युरोपांतील देश, ब्रिटिश वसाहती व अमेरिका ह्यांच्या पासंगासहि हिंदुस्थान लागणार नाहीं. अगदींच मागसलेले देश वगळल्यास, हिंदुस्थानांतील म्यूझियम्सविषयींच्या अनास्थेइतकी दुरवस्था इतरत्र कोठेंहि आढळणार नाहीं. कांहीं प्रमुख देशांत लोकसंख्येचें म्यूझियम्सशीं पडणारें प्रमाण दर्शविणारे आकडे येथें दिले आहेत.—

| देश | किती लोकवस्तीस एक म्यूझियम |
|---|---|
| जर्मनी | ३९,००० |
| ग्रेट ब्रिटन | ६३,००० |
| अमेरिका | ९१,००० |
| जपान | ४,२०,००० |
| हिंदुस्थान | ३६,९०,००० |

हिंदुस्थानची लोकसंख्या युरोप (रशिया वगळून) च्या लोकसंख्येइतकी आहे. तथापि, युरोपांत ५,००० म्यूझियम्स आहेत आणि हिंदुस्थानांत फक्त १०५ च आहेत. ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या सारख्या देशांतून म्यूझियम्सवर दर माणसी दरसाल सरासरीनें ७½ आणे खर्च होतो, हिंदुस्थानांत तत्सम खर्च केवळ ₁⁄₂₀ आणा आहे! एक लाखापेक्षां ज्यास्त वसति असणाऱ्या रंगून, अहमदाबाद, अमृतसर, कानपूर, मदुरा, सोलापूर, जबलपूर इत्यादि १५ शहरांत अद्याप म्यूझियमची स्थापना झालेली नाहीं. अशा मागसलेल्या परिस्थितीमध्यें, सहाजिकच, हिंदी व इतर देशांतील म्यूझियम्स ह्यांची कार्यक्षमतेच्या दृष्टीनेंहि तुलना करण्यांत अर्थ नाहीं.

शिक्षणप्रचारास सहाय व्हावें, ह्या हेतूनें पाश्चात्य देशांतील म्यूझियम्सची योजना झालेली आहे. हिंदुस्थानांत साक्षरतेचें प्रमाण अत्यल्प असल्याकारणानें जनतेस आहेत त्या म्यूझियम्सचाहि पुरा उपयोग करून घेतां येत नाहीं. हिंदी संग्रहालयाच्या स्थापनेचा विचार केला असतां, त्याचें मूळ खालील चार गोष्टींत आढळतें (१) शास्त्रीय विषयावरील म्यूझियम्सची सरकारनें व त्याच्या युरोपियन नोकरवर्गानें केलेली स्थापना, (२) ह्याचेंच हिंदी संस्थानांनीं केलेलें अनुकरण, (३) पुराण वस्तु संशोधन खात्याच्या पुरस्कारानें झालेले संग्रह व (४) स्वत.च्या कार्याकरितां शैक्षणिक व संशोधन संस्थानीं स्थापिलेले वस्तुसंग्रह. प्राथमिक व दुय्यम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणास व्यापक स्वरुप यावें, ह्या हेतूनें, इतर राष्ट्रांप्रमाणें हिंदुस्थानांत म्यूझियम्सची योजना झालेली नाहीं. आहेत हीं म्यूझियम्स म्हणजे इतर कारणपरत्वें झालेले वस्तुसंग्रह होत, असें म्हणणें वावगें होणार नाहीं. म्यूझियम्सच्या इमारतींचे बाबतींत सुधारणेस फार मोठा वाव आहे हा प्रश्न स्वतंत्रच आहे.

म्यूझियम्सची संख्या अपुरी आहे, लोकवस्तीशीं त्याचें पडणारें प्रमाण अत्यल्प आहे व जनतेच्या शिक्षणाशीं म्यूझियम्सच्या स्थापनेचा विशेष कांहीं संबंध नाहीं, हें वरील माहितीवरून स्पष्ट होईल. हिंदी म्यूझियम्सवर होणाऱ्या वार्षिक खर्चाचा विचार केला असतां, अस्तित्वांत असलेल्या संस्थाहि इतक्या खालावलेल्या कां आहेत, हें ध्यानांत येईल. हिंदुस्थानांतील सर्व म्यूझियम्सवर मिळून ७ लक्ष, २० हजार रु. सालिना खर्च होतो, युरोप अगर अमेरिका ह्यांतील अनेक म्यूझियम्सचा प्रत्येकी वार्षिक खर्च ह्यापेक्षां मोठा आहे.

एकशेपाच हिंदी म्यूझियम्सपैकीं शेहेचाळीसांचें जेमतेम १ हजार रुपये उत्पन्न आहे व १८ संस्थांना २½ हजार रुपयांवर खर्च करण्याची ऐपत नाहीं. २½ हजार ते १० हजार रुपये सालिना उत्पन्न असणारीं २४ म्यूझियम्स असून त्यापेक्षां भाग्यवान असें फक्त १५ संग्रह आहेत. अनुक्रमानें पहिल्या पांच म्यूझियम्सचें मिळून वार्षिक उत्पन्न उरलेल्या शंभरापेक्षां मोठें आहे, परंतु कित्येक पाश्चात्य म्यूझियम्सचें प्रत्येकीं उत्पन्न ह्यापेक्षां ज्यास्त आहे. आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे, असें एकाहि हिंदी म्यूझियमचे बाबतींत म्हणतां येणार नाहीं. म्यूझियम्सचें उत्पन्न वाढविल्याखेरीज त्यांची प्रगति होणें अशक्य आहे, असें डॉ. मार्कहॅम व मि. हारग्रीव्हज् ह्यांनीं स्पष्ट विधान केलें आहे. जनतेस म्यूझियम्सचें महत्त्व पटलेलें नसल्याकारणानें, पदार्थ संग्रहालयें स्थापन करण्याकरितां देणग्या देणारे गृहस्थहि पुढें येत नाहींत. ह्यामुळें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांनीं ह्या प्रश्नांत लक्ष घालणें जरूर आहे. म्यूझियम्सवरील देखरेख करणाऱ्या कमिट्यांचें व क्यूरेटर म्हणून व्यवस्थापकाचें काम करणारांचें स्वत.च्या कर्तव्याकडे दुर्लक्ष, हीं हिंदुस्थानांत सर्वत्र

आढळतात तथापि, पुणें येथील लॉर्ड रे म्यूझियमचें व त्याच्या क्यूरेटरचें नाव अपवाद म्हणून उपरिनिर्दिष्ट म्यूझियम तज्ञांच्या रिपोर्टांत प्रामुख्यानें आढळतें, ही गोष्ट खचित ह्या शहरास भूषणावह आहे क्यूरेटरनें स्वतः लक्षपूर्वक काम केलें असतां किती सुधारणा होणें शक्य आहे, हें दाखविताना पुणें येथील क्यूरेटरचा सन्मानपूर्वक उल्लेख त्यात आलेला आहे

रिपोर्ट लेखकानीं सुधारणा सुचविल्या आहेत, त्यांपासून योग्य तो बोध घेतला जाणें आवश्यक आहे प्रथम, म्यूझियम्सच्या उत्पन्नात भरभक्कम वाढ झाली पाहिजे त्याबरोबरच म्यूझियम्सच्या व्यवस्थापकाचे कार्यपद्धतीमध्येंहि सुधारणा घडून येणें जरूर आहे.- कित्येक क्यूरेटर्सच्या अंगवळणी पडलेला आळस व त्याचें अज्ञान हीं प्रगतीच्या मार्गांतील मोठी अडचण आहे हिंदुस्थानातील बहुतेक सर्व संग्रहालयें सरकारी सहायानेंच चालविण्यात येत आहेत ह्या दृष्टीनें सुधारणेची जबाबदारीहि सरकारवरच पडते. मध्यवर्ती सरकारनें, युरोपियन म्यूझियम्सचा अभ्यास केलेल्या तज्ञाची इन्स्पेक्टर जनरल ऑफ म्यूझियम्स म्हणून नेमणूक करावी, क्यूरेटर्सच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्याची योजना आखावी, प्रांतिक सरकारें, संस्थानें, म्युनिसिपालव्या इत्यादींनीं चागल्या म्यूझियम्सना सढळ हातानें सहाय करावें व म्यूझियम्स व शिक्षणसस्था ह्याच्या कार्याचा मेळ घालावा, म्यूझियम्सची सख्या व त्याची कार्यक्षमता वाढवावी, इत्यादि शिफारसी रिपोर्ट लेखकांनीं केल्या आहेत. क्यूरेटर्सचें कामहि चांगलें व्हावें ह्याकरितां तपशीलवार सूचना करण्यांत आल्या आहेत

म्यूझियम्सच्या व्यवस्थेचें केंद्रीकरण रिपोर्टांत सुचविण्यांत आलें आहे व त्याचें समर्थनहि केलेलें आहे म्यूझियम्सबाबतची चळवळ हिंदुस्थानात अद्याप बाल्यावस्थेंत आहे. ह्या दृष्टीनें तिचा पुरस्कार व तिचें नियत्रण हीं एका सबळ मध्यवर्ती केंद्रामार्फत व्हावींत, हें इष्टच आहे अशा प्रकारची योजना लवकर न केल्यास हिंदी म्यूझियम्सची अनास्था चालू राहून, संचित ठेव्याचाहि नाश होईल, अशी भीति डॉ मार्केहॅम व मि. हारग्रीव्हज ह्यांनीं व्यक्त केली आहे म्यूझियम्सच्या उपयुक्ततेची जाणीव लोकास व्हावी ह्याकरिता कसोशीनें प्रयत्न करण्यात यावे, केवळ मामुली उपायानीं हें कार्य होणार नाहीं, असा वरील तज्ञांचा अभिप्राय आहे हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नात लक्ष घालण्याचें ठरविलें आहे, ही गोष्ट आशाजनक आहे. सरकारच्या ह्या कार्यास मूर्त स्वरुप लवकर येणें मात्र अत्यत आवश्यक आहे.

---


## हिंदी कपाशीच्या उत्पादनाचा अंदाज

हिंदी कपाशीच्या उत्पादनाचा १९३७–३८ सालाविषयींचा सरकारी अधिकृत अदाज प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें दिसतें कीं, एकूण २ कोटि, ७ लक्ष एकरात कपास पेरण्यात आली आहे हा आकडा १९३६–३७च्या पेरणीच्या आकड्यापेक्षा एक टक्क्यानें जास्त आहे. मुबई इलाख्यातील ४४३/४ लक्ष एकर क्षेत्र कपाशीखाली आहे व मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील ४० लक्ष एकरांत कपास पेरलेली आहे. पंजाब, मद्रास, सयुक्त प्रांत, सिंध, बगाल इत्यादि प्रांताचा अनुक्रम त्याचे खालीं लागतो देशी सस्थानापैकी हैद्राबाद सस्थान कपाशीचे दृष्टीनें महत्वाचें आहे, तेथें २७३/४ लक्ष एकरांत कपास लावलेली आहे

अमेरिकेंतील कपाशीच्या उत्पादनाचा अदाज प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून त्या देशांत १ कोटि, ७६ लक्ष गासड्यां ( १ गासडी=५०० पौंड ) कपास तयार होईल, असें दिसतें. १९३६–३७ मध्यें १ कोटि, २४ लक्ष गासड्यांचें उत्पादन झालें होतें.

## घाउक बाजारभाव-अद्याप पूर्वपदावर आले नाहींत

खालील कोष्टकात घाउक बाजारभावाची शतमानानें तुलना केली आहे. १९२९ सालचा बाजारभाव १०० असा धरल्यास चालू बाजारभाव त्या मानानें किती होईल, हें या कोष्टकावरून समजेल. प्रत्येक देशातील बाजारभावांची स्पष्ट कल्पना यावी, ह्यासाठीं ठळक पट्टयाची योजना केली आहे




१९२९ नंतर बहुतेक सर्व देशानीं आपल्या चलनांची सुवर्णांतील किमत उतरविली व त्या मानानें बाजारभावांतहि फरक झाला. तथापि, प्रमुख औद्योगिक देशांतील चलनामधील उताराच्या मानानें बाजारभाव सुधारलेले नाहींत. चलनाची किंमत शेकडा ४० टक्क्यांनीं उतरली असतांहि औद्योगिक मंदीच्या पूर्वीच्या पातळीस अद्याप भाव आलेले नाहींत. कांहीं शेतीप्रधान देशात मात्र कच्च्या मालाचे व धान्याचे भाव चढले आहेत.

( "एकॉनॉमिस्ट" वरून)

## स्फुट विचार

### जादा लष्करी खर्चासाठी ८० लाखाची देणगी !

हिंदुस्थानच्या सैन्याचा खर्च, ह्या देशाच्या आर्थिक सामर्थ्याच्या व मध्यवर्ती सरकाराच्या ऐपतीच्या मानानें फार मोठा आहे आणि त्याचप्रमाणें त्या सैन्याचे हिन्दीकरण होण्यास दिरगाई चालली असल्यानें आमचा पैसा विलायतेमध्यें जाऊन राष्ट्रसरक्षणाची जबाबदारी हिंदी लोकांवर टाकण्यात येत नाहीं अशी टीका आज अनेक वर्षे होत आहे सरहद्दीवरील युद्धात लष्करी खर्च मधून मधून मोठ्या प्रमाणावर करावा लागतच आहे. त्या खर्चाचा ताण हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीवर सारखा पडत आला आहे जगातील राष्ट्रानीं अलीकडे युद्धसामुग्रीमध्यें यांत्रिक सुधारणा झपाट्यानें चालविल्या आहेत आणि त्यास अनुसरून हिंदुस्थानातहि सुधारलेल्या प्रकारचीं लढाऊ साधनें तयार ठेवणें लष्करी तज्ञास अगत्याचें वाटत आहे. हिंदुस्थानच्या सरक्षणाची व लष्करी तयारीची सर्व जबाबदारी ब्रिटिश पार्लमेंटनें आपल्या शिरावर घेतली आहे आणि हिंदी लष्कराच्या यंत्रीकरणास जादा खर्च लागावयाचा असून तो ह्या देशाच्या सरकारास झेपण्यासारखा नाहीं. लष्करी खर्च वाढण्याविरुद्ध हिंदी लोकाची जोराची ओरड होणार आणि फेडरेशनची नवी घटना चालू होण्याचे वेळीं तिला अधिक तीव्र स्वरूप प्राप्त होणार ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून ब्रिटिश सरकारानें हिंदुस्थानाच्या लष्करी खर्चास हातभार लावण्याचा आपला मनोदय अगाऊ जाहीर करण्यात दूरदृष्टि व मुत्सद्दीपणा प्रकट केला आहे लढाऊ सामुग्रीप्रीत्यर्थ भांडवलवजा करावयाचा खर्च भारी असल्यानें ग्रेटब्रिटननें हिंदुस्थानास ८० लक्ष रुपये देणगीदाखल देण्याचें योजिलें असल्याची घोषणा कॉमन्स सभेंत लॉर्ड स्टॅन्ले ह्यानीं केली आहे तिचें स्वारस्य वर केलेल्या विवेचनावरून ध्यानात येईल.

### सहकारी बॅंकाचें महत्त्वाचें स्थान

आपल्या खर्चांत काटकसर करून बचत झालेला पैसा सुरक्षित रीतीनें व्याजानें ठेव म्हणून ठेवण्याची संवय सहकारी बॅंकानीं जनतेस मोठ्या प्रमाणात लावली आहे - ह्या सहकारी बॅंकाचें विस्तृत जाळें सर्व प्रातभर पसरलें आहे आणि त्याचा विस्तार सारखा वाढत आहे जॉइंट स्टॉक बॅंकापेक्षां सहकारी बॅंकाची सख्या फार मोठी आहे ही गोष्ट मुंबई बॅंकिंग चौकशी कमिटीच्या अहवालास नकाशा जोडला आहे, त्यावरून स्पष्ट दिसून येत आहे. हिंदी बॅंकिंगच्या व्यवसायक्षेत्रात सहकारी बॅंकास एवढें महत्त्वाचें स्थान असतानाहि हिंदुस्थान सरकारच्या, व्यापारी माहिती गोळा करून पुरवणाऱ्या खात्यास ह्या गोष्टींची किंमत वाटत नाहीं "डिपार्टमेंट ऑफ कमर्शल इंटेलिजन्स अँड स्टॅटिस्टिक्स" ह्या खात्याकडून दरवर्षी हिंदुस्थानातील बॅंकांविषयीच्या माहितीचे आकडे प्रसिद्ध केले जातात. बॅंकिंगचा व्यवहार करणाऱ्या सस्थाची ही माहिती असल्यानें तीमध्यें सहकारी बॅंकांचा अतर्भाव होणें वास्तविकरीत्या उचित आहे मुंबई इलाख्यातील सहकारी बॅंकाची परिषद भरत असते व तिची कार्यकारी समिती महत्त्वाच्या प्रश्नाचा परामर्श घेत असते तिनें हिंदुस्थान सरकारच्या वर निर्दिष्ट केलेल्या खात्याच्या मुख्याचे नजरेस ही बाब आणली असतां त्यानीं बॅंकाच्या यादींत सहकारी बॅंका दाखल करता येत नाहींत ह्याविषयीं खेद प्रदर्शित केला कपन्याच्या कायद्यात बॅंकेची जी व्याख्या दिलेली आहे, तिला अनुसरून सहकारी बॅंकाचा व्यवहार असल्यानें ह्या अमान्यतेस काय आधार आहे, हें समजत नाहीं लोकाचा पैसा ठेव म्हणून घेऊन तो चेकच्या किंवा ड्राफ्टच्या द्वारें त्यानीं काढून घेण्याची व्यवस्था करणें हें बॅंकिंगच्या व्यवहाराचें विशेष असें लक्षण आहे. राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे दृष्टीनें जनतेची होणारी बचत, तिच्या ठेवी आणि त्यातल्या पैशाची काढघाल ह्याची उलाढाल वाढत्या गतीनें होणें आवश्यक असतें, आणि ह्या बाबतींतली माहिती प्रतिवर्षी प्रसिद्ध करणाऱ्या सरकारानें सहकारी बॅंकाच्या व्यवहाराकडे दुर्लक्ष करावें हें आश्चर्य आहे सहकारी सस्था वगळल्या गेल्या असतां हिंदी बॅंकिंगच्या परिस्थितीचें चित्र अपूर्ण व गैरसमज उत्पन्न करणारें होणार हें उघड आहे.

### सहकारी बॅंकांची यादी व नकाशा

हिंदुस्थान सरकारनें सहकारी बॅंका बाजूस टाकल्या तेव्हां त्याचें योग्य स्थान स्पष्ट व्हावें ह्या उद्देशानें सहकारी बॅंकांच्या परिषदेच्या कार्यकारी समितीनें तो प्रश्न स्वत चे हातीं घेतला आणि सरकारच्या अहवालातली उणीव आपणच दूर करण्याचें ठरवलें समितीनें २१६ सहकारी बॅंकाची यादी छापून प्रसिद्ध केली आहे आणि तिची किंमत ८ आणे ठेवली आहे बॅंकाच्या ठिकाणाच्या आद्याक्षराच्या इग्रजी अनुक्रमानें ही यादी तयार केलेली असून तीमध्यें प्रथम शहर, नंतर जिल्हा, पुढें बॅंकेचें नाव व पत्ता आणि शेवटच्या रकान्यात सस्था ही शाखा असल्यास तसा उल्लेख अशी माहिती दिली आहे. प्रस्तुत यादीचा हा विशेष आहे कीं, तिला मुंबई इलाख्याचा नकाशा जोडला आहे आणि त्यात भिन्नभिन्न रंगात प्रातिक बॅंक व तिच्या शाखा, जिल्हा बॅंका व त्याच्या शाखा, ५० हजार रुपये व अधिक खेळतें भांडवल असणाऱ्या अर्बन बॅंका व त्या मर्यादेपेक्षा कमी भाडवलाच्या अर्बन बॅंका असा तपशील दाखवला आहे. अशा प्रकारची यादी व नकाशा तयार करून ही उपयुक्त माहिती प्रसिद्ध केल्याबद्दल सहकारी बॅंकाच्या परिषदेच्या कार्यकारी समितीचें अभिनंदन करणें आवश्यक आहे समितीचे कार्यवाह, श्री. वैकुंठराय मेथा, ह्याचा उत्साह व कार्यतत्परता हीं, परिषद व समिती ह्याच्या भरीव कामगिरीमध्यें प्रतीत होत आहेत. त्याच्या नेतृत्वानें सहकारी बॅंकाविषयींच्या प्रश्नाची चर्चा व निर्णय होण्यास किती सहाय व उत्तेजन मिळतें ह्याची माहिती सहकारी कार्यकर्त्यांस नव्यानें दिली पाहिजे असें नाहीं प्रस्तुत यादी व नकाशा हें त्याच्या भरीव कामगिरीचें ताजें उदाहरण आहे. यादीचा उपयोग सहकारी सस्थास तर होईलच, पण स्टॉक भाडवलाच्या बॅंका, व्यापारी व कारखान्याच्या मडळ्या इत्यादींसहि होण्यासारखा आहे तालुक्याच्या आतल्या भागामध्येंहि सहकारी बॅंकांचा प्रसार झाला असल्यानें पैसा इकडून तिकडे पाठवण्याच्या वगैरे कामीं सर्वांसच त्याची उपयुक्तता अनुभवास येईल

### कपाशीच्या वहातुकीचे दर उतरविण्याची आवश्यकता

हिन्दी कपाशीच्या वहातुकीवरील रेल्वेचा दर उतरविण्याविषयीं इडियन मर्चंट्स चेंबरच्या कमिटीनें रेल्वे बोर्डास तारेनें विनति केली आहे. कपाशीच्या भावात भयकर घट झाली असल्याकारणानें, सध्याच्या बाजारभावास रेल्वे वहातुकीचे दर परवडणार नाहींत कपाशीस चागला भाव असताना निश्चित केलेले दर आतां उतरविणें जरूर झालें आहे. ईस्ट इडिया कॉटन असो-

सिएशनें ह्याच स्वरूपाचें आपलें ह्मणणें रेल्वे बोर्डास कळविलें आहे अमेरिकेंत यदाचे वर्षी कपाशीचें फार मोठें पीक अपेक्षित असून, त्या संबंधातील अंदाजापेक्षाहि प्रत्यक्ष उत्पादन ज्यास्त होण्याचा रंग दिसत आहे हिन्दी कपाशीचें पीकहि जागतिक पुरवठ्यात नेहमीपेक्षा मोठी भर घालणार आहे अशा परिस्थितींत शेतकऱ्याचें नुकसान कमी करून कपाशीचा उठाव करण्यास रेल्वे बोर्डानें आपलें वहातुकीचे दर उतरवून सहाय करणें अत्यंत आवश्यक आहे

## सहकारी चळवळ व मुंबई सरकार

मुंबई सरकाराचे महसूल मंत्री, श्री. मुरारजी, ह्यानीं आमच्या प्रांतातल्या सहकारी सस्थाची स्थिति सुधारावी ह्यासाठी कोणत्या सुधारणा अमलात आणणें आवश्यक आहे, याविषयीं सूचना करण्याचें काम रजिस्ट्रार, श्री भणसाळी व श्री. वैकुंठराय मेथा याचेकडे सोपवलें होतें त्यानीं आपला रिपोर्ट सादर केला आहे. त्यांच्या शिफारशींचा निकाल लावण्यापूर्वी सहकारी चळवळींतल्या प्रमुख कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय करण्याचें श्री मुरारजी ह्यानीं ठरविलें. त्याप्रमाणें गेल्या सोमवारीं मुंबईस सेक्रेटारियटमध्यें सुमारें वीस गृहस्थाशीं त्यानी चर्चा केली उपस्थित असलेल्या मंडळींनीं आपल्या अडचणी व आक्षेप मनमोकळेपणानें मंत्र्याच्यापुढें मांडले शेतकी पतपेढ्याची सध्याची हलाखीची स्थिति कशी सुधारावी आणि त्याची प्रगति कशी घडवून आणावी, ह्या बाबतींत मध्यवर्ति बँकाचें कार्य व धोरण काय असावें आणि इन्स्टिट्यूटचें सहकारी संस्थांमध्यें कोणत्या प्रकारचें स्थान असावें इत्यादि महत्त्वाच्या बाबींची चर्चा झाली हें साहजिक आहे. ह्यापैकी कित्येक प्रश्न वादग्रस्त आहेत आणि त्यांवर एकमत होणें कठीण वाटलें असल्यास त्यात आश्चर्य नाहीं.

## पुणें लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियमची सरकारास विनंति

हिंदुस्थान देशात पदार्थ संग्रहालयाविषयींची चळवळ जोरानें होणें किती जरूर आहे, ह्याचें विवेचन "अर्था"च्या अग्रलेखात आज आलेलेंच आहे. हिंदुस्थानातील संग्रहालयाची संख्या अपुरी असून त्याची कार्यक्षमताहि कनिष्ट दर्जाची आहे तथापि ह्या परिस्थितीस अपवाद म्हणून पुणें येथील म्यूझियमचा उल्लेख मि. मार्कहॅम व मि हारग्रीव्हज ह्यानीं आपल्या रिपोर्टांत केला आहे, ही गोष्ट सदरहू म्यूझियमच्या चालकास अत्यंत भूषणावह आहे, ह्यात सशय नाहीं ह्या संग्रहालयाची स्थापना १८९० सालीं इंडस्ट्रियल असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियानें केली, तथापि असोसिएशन १८९६ सालीं विसर्जन पावली व तिनें आपला फंड व संग्रह हीं शहर म्युनिसिपालिटीचे स्वाधीन केलीं. सुमारें ३०-३५ वर्षानतर म्युनिसिपालिटीनें म्यूझियमचें पुनरुज्जीवन केलें व सस्थेची व्यवस्था सात ट्रस्टींकडे सोपवली ह्या सात विश्वस्तांपैकीं चौघेजण म्युनिसिपालिटीचे अधिकारपरत्वें सभासद हेच असतात ट्रस्टींनीं रे म्यूझियमच्या वाढीकडे काळजीपूर्वक लक्ष पुरविल्यामुळेंच ह्या सस्थेस आजचा दर्जा प्राप्त झाला आहे म्यूझियमची आणखी ज्यास्त प्रगति होण्यास तिला स्वतःच्या अशा स्वतंत्र व प्रशस्त जागेची आवश्यकता आहे. त्यासाठी मुंबई सरकारनें म्यूझियमला ग्रँट द्यावी, अशी चालकांनीं सरकारास विनंति केली आहे संग्रहालय-संवर्धनाचे बाबत आपलें म्हणणें मुख्य प्रधानाचे कानावर आज ता २४ रोजीं विश्वस्त मंडळातर्फे श्री सरदार जगन्नाथ महाराज व क्यूरेटर श्री घारपुरे हे समक्ष घालणार आहेत म्यूझियमनें औद्योगिक प्रवृत्तीचें जनतेमध्यें बीजारोपण होण्यास केलेलें सहाय व महाराष्ट्राचा ह्या बाबतीमधील मागसलेपणा हीं ध्यानात घेऊन सरकारनें रे म्यूझियमला चिरस्थाइत्व प्राप्त करून देणें श्रेयस्कर आहे आजपर्यंत म्युनिसिपालिटी संस्थेस मदत करीत आली आहे हें सहाय ती चालू ठेवील व सरकारहि कार्याचें महत्त्व जाणून योग्य ती ग्रँट देईल, तर पुणें येथील हा संग्रहालय लवकरच आदर्श झाल्याखेरीज रहाणार नाहीं.


**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड. औंध.**

( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस—औंध ( सातारा )

शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, बिचूद स्टेशन व दिघंची

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिले जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे—सोनें, चादी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B R. Vartak
मॅनेजर.



**न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वांत मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टीकडे लक्ष देतो.—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री डी के जोगळेकर, बी. ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )



**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८४,५०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९६,७१६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ९,२०२ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७८,८४६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ३६,६८३ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडंड पाच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर-कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## ग्वाल्हेर संस्थानांतील सहकारी चळवळ

### प्रो. काळे ह्यांचा चौकशी रिपोर्ट

( लि आ. म. )

ग्वाल्हेर संस्थानातील सहकारी सोसायट्या व बँका ह्यांच्या परिस्थितीचें निरीक्षण करून त्याच्या सुधारणेचा मार्ग दाखविण्याकरिता ग्वाल्हेर दरबारनें ह्या वर्षाचे प्रारभीं प्रो. वा. गो. काळे ह्यांची नेमणूक केली. ही चौकशी शक्य तितकी सूक्ष्म व परिपूर्ण व्हावी अशी महाराजासाहेबांची इच्छा होती चौकशीच्या बाबी मुख्यतः खालीलप्रमाणें ठरविण्यात आल्या:—

( १ ) सहकारी सोसायट्यांचें ऑडिट करणें

( २ ) सहकारी खात्याच्या नोकरवर्गासंबंधी चौकशी करून अभिप्राय देणें.

( ३ ) आतापर्यंत स्वीकारलेल्या व चालू धोरणातील चुका दर्शविणें.

( ४ ) पुढें अंगीकारण्याच्या योजना आखून देणें

( ५ ) सहकारी चळवळीकरिता एक पचवार्षिक योजना सुचविणें.

प्रो काळे ह्यांनीं, पुणें सें को बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चितळे व ऑडिटर श्री. आपटे ह्यांच्या सहायानें चौकशीचें काम ता. १९ फेब्रुवारी रोजीं सुरू केलें व २० एप्रिलपर्यंत ग्वाल्हेर संस्थानच्या सर्व विभागात समक्ष हिंडून जरूर तें परीक्षण व निरीक्षण केलें २० ऑगस्ट रोजीं दरबारास रिपोर्ट सादर करण्यात आला, तो आतां प्रसिद्ध झाला आहे.

रिपोर्टाचे पूर्वार्धात, दुसऱ्या प्रकरणात संस्थानातील "शेतकी बँका"चा इतिहास दिला असून त्याचे जागीं सहकारी पतपेढ्या कशा आल्या हें वर्णिलें आहे. शेतीचे धंद्यास सरकार कोणत्या मार्गानें सहाय करीत आलें आहे, ह्याचीहि माहिती दिली आहे. सहकारी चळवळीचा ग्वाल्हेर संस्थानातील उदय व तिचा विस्तार, सेंट्रल बँका व त्यांचे व्यवहार, प्राथमिक सोसायट्या व त्यांची कार्यपद्धति, ऑडिटची व्यवस्था, सहकारी खात्याचे अंमलदार व त्याचा नोकरवर्ग, इत्यादि बाबींचें तपशीवार परीक्षण रिपोर्टांत करण्यात आलें आहे जरूर नाहीं तेथें तपशील देऊन रिपोर्टाची लाबी वाढविण्यात आलेली नाहीं, प्रत्येक मुद्दा स्पष्ट व असंदिग्ध भाषेंत माडण्यात आला आहे चौकशीचें कार्यक्षेत्र ग्वाल्हेर संस्थानापुरतेंच मर्यादित असलें, तरी परीक्षणाची पद्धति व आंकड्यांचें व प्रत्यक्ष गोष्टींचें मुद्देसूद आविष्करण, हीं इतरत्रहि अनुकरणीय वाटतील. रिपोर्टाचे उत्तरार्धांत, चळवळीच्या प्रगतीच्या दृष्टीनें सूचना करण्यात आल्या आहेत.

ग्वाल्हेर संस्थानांत सहकारी संस्थांची स्थापना होण्यापूर्वी, मुलकी अधिकाऱ्यांचे देखरेखीखाली ॲग्रिकल्चरल बँका दरसाल सुमारें १० ते १५ हजार लोकांस कर्जे देत असत. ब्रिटिश हिंदुस्थानांत सहकारी चळवळीस १९०४ सालीं प्रारभ झाला व १९१२ सालीं पहिल्या सहकारी कायद्यात जरूर त्या सुधारणा करण्यात आल्या १९१२ च्या ह्या कायद्याचे धर्तीवर संस्थानाचा १९१९ चा सहकारी कायदा पास करण्यात आलेला आहे. १९१६–१७ सालीं ग्वाल्हेर संस्थानात १७८ सहकारी सोसायट्या होत्या, त्यांच्या सभासदांची संख्या २,४८३ होती व त्यांचें भांडवल ३,०७१ रु. होतें. १९२४–२५ सालीं, सोसायट्यांची संख्या २,१७१ झाली व त्यांच्या ३६,५५४ सभासदांचें भांडवलहि वाढून तें ३,४६,२३८ रु. झालें जिल्हा व परगणा बँका ह्यांची संख्या वरील मुदतींत दोहोंची पंधरा झाली व त्यांचें भांडवल १८३ हजारांचें ४३ लाखांवर गेलें. ग्वाल्हेर संस्थानातील सोसायट्यांच्या सभासदांची सरासरी संख्या अवघी १७ असून त्यांचें सरासरी भांडवल १६० रु आहे सुमारें ३० सभासद असल्याखेरीज सोसायटीचा कारभार नीट चालणें कठीण आहे. प्रत्येक मध्यवर्ती बँकेचे कक्षेंत १४५ सोसायट्या आहेत. बँकांचें सभासदत्व खासगी व्यक्तींस व सहकारी सोसायट्यांस, दोघांसहि, खुलें आहे. १९३५ अखेर १८ मध्यवर्ती बँकांचें मिळून भांडवल ६ लाखांवर असून त्यापैकीं १½ लक्ष रु. सहकारी सोसायट्यांचे आहेत. एकूण सभासदांपैकीं २७३९ व्यक्तिश. व ३९६२ सोसायट्या सभासद आहेत. बँकाकडील ठेवी सुमारें ४५ लक्ष रुपयांच्या असून त्यांचें खेळतें भांडवल ६२¾ लक्ष रु. आहे. ३३¾ लक्ष रु. सोसायट्यांस कर्जाऊ दिलेले आहेत व ८½ लक्ष रु. सभासदांकडून येणें आहेत. सहकारी सोसायट्यांनीं आपल्या सभासदांस सुमारें ३६ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत, त्यावरील सरासरी व्याजाचा दर ९ टक्के पडतो. सुपरवायझिंग युनियन्सच्या स्थापनेस ग्वाल्हेरमधील परिस्थिति अनुकूल नाहीं, तेव्हा हें काम सेंट्रल बँकानींच हातीं घेणें इष्ट आहे, असें रिपोर्टांत सुचविण्यात आलें आहे. फक्त ७ ऑडिटर्सच्या सहायानें संस्थानातील सर्व सोसायट्यांची वार्षिक तपासणी करणें सहकारी खात्याच्या मुख्याधिकाऱ्यास शक्य नाहीं, दोन-तीन वर्षांत मिळून एकदा प्रत्येक सोसायटीच्या तपासणीची पाळी येते. ऑडिटर्सची संख्या वाढविणें आणि ऑडिटचें नमुनापत्रक असणें जरूर आहे.

प्रो. काळे ह्यांनीं सर्व बँकांचें ऑडिट करवलें, २५ विशिष्ट सोसायट्यांची तपशीलवार हिशेबतपासणी करून घेतली व ५७ प्रातिनिधिक सोसायट्यांची तपासणी मुद्दाम करवली, त्यावरून असें दिसून आलें कीं, ग्वाल्हेरमधील सहकारी संस्थांची परिस्थिति समाधानकारक नाहीं. निदान २५ ते ३० टक्के येणीं तरी वसूल होणें अशक्य म्हणून बुडींत धरावीं लागतील. स्थानिक बँकर्सजवळ व्याजानें रकमा ठेवण्याची बँकांची पद्धत घातुक असून, ह्या ठेवी बुडण्याचा बराच संभव आहे. कर्जें मजूर करण्यात डायरेक्टरांचा फारच थोडा हात असतो, सरकारी इन्स्पेक्टरच हें काम पहातो व कर्जाच्या गरजेकडे अथवा द्यावयाच्या रकमेकडे जरूर तें लक्ष पुरवलें जात नाहीं.

महसूल खात्याच्या मंत्र्यांचे अधिकार क्षेत्रांत सहकारी चळवळ ही येते डायरेक्टर ऑफ को ऑपरेटिव्ह सोसायटीज् व इन्स्पेक्टर जनरल ऑफ बँक्स ह्या हुद्याचा अधिकारी सहकारी खात्याची व्यवस्था पहातो त्याचे हाताखालीं दोन दुय्यम डायरेक्टर्स व एक मदतनीस डायरेक्टर हे आहेत, परतु ह्या जागांची जरूरी नाहीं, असें प्रो काळे ह्यांनीं सुचविलें आहे इन्स्पेक्टरांची संख्या ४३ व ऑडिटर्सची संख्या ७ आहे सुपरवायझर्स ५८ आहेत व ४,२२६ सोसायट्यास मिळून २६९ सेक्रेटरी आहेत. प्रो काळे ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत जागजागीं केलेल्या सूचनास अनुसरून सहकारी नोकरवर्गाची संख्या व पगार ह्याविषयीं तपशीलवार सुधारणा सुचविली आहे. सहकारी खात्याचें बजेट आखण्यात आलें आहे, त्यात ८५ हजार रु नोकरवर्गावर खर्च दाखविण्यात आला असून ५० हजार रु इतर खर्चाकरिता राखलेले आहेत. सेक्रेटरींच्या पगारासाठी सरकारी ग्रँट व प्रचाराकरिता तरतूद, ह्यासाठी सरकारनें सालिना १९ हजार रु खर्चावेत, ही सूचना गृहीत धरून, ह्या रकमेचा समावेश वरील अंदाजपत्रकात केलेला आहे.

(अपूर्ण)

### श्री. भास्करराव जाधवांची सह्याद्रि विमा कपनीस भेट

मुंबई सरकारचे माजी दिवाण व प्रख्यात पुढारी श्री. भास्करराव जाधव यांनीं नाशिक येथील सह्याद्रि विमा कपनीस भेट दिली त्यावेळीं त्यांचेबरोबर कपनीच्या सचालक मंडळाचे चेअरमन रा. ब. प्रधान व रा सा आर. एस. आठवले, श्री. घोंड्यें कोपरगावकर, हे संचालक, कपनीचे कायद्याचे सल्लागार श्री. माधवराव जानोरकर आणि रा. ब वडेकर ही मंडळी होती कंपनीचे फायनॅन्स मॅनेजर श्री वामनराव जोशी यांनीं स्वागत करून, कंपनीची माहिती करून दिली. ना. जाधव यांनीं कपनीच्या व्यवस्थेबद्दल व कार्याबद्दल समाधान व्यक्त करून "कंपनीचा भविष्यकाल उज्वल आहे" असा विश्वास प्रदर्शित केला

### दि सदर्न निटिंग वर्क्स लि, पुणें

वरील कारखान्याचे व्यवस्थापक व आद्य सस्थापकापैकीं श्री. काकासाहेब सुपनेकर व कपनीचे चेअरमन शेट काकुभाई उर्फ द्वारकादास वखारिआ हे नुकतेच जपानांतील सफर पूर्ण करून आले त्यांनीं तेथें केलेल्या परीक्षणाची माहिती मिळावी म्हणून त्याचे सहकारी व मित्र यांनीं ता. १५।११।३७ सोमवारीं सायकाळीं ५।१५ वाजता कारखान्याचे नवीन जागेंत सत्कार-समारभ केला, त्याप्रसंगीं श्री. सुपनेकर व शेट काकुभाई ह्यानीं आपले अनुभव सागितले

### हिंदी कापडास परदेशांत वाढती मागणी

महायुद्धाचे काळांत हिंदुस्थानातून दरसाल सरासरीनें १५ कोटि, ६४ लक्ष वार कापड परदेशीं जात असें. १९२९-३० मध्यें ही निर्गत रोडावून १२३ कोटि वारावर आली, १९३०-३१ मध्यें फक्त ९ कोटि, ८० लक्ष वार कापड बाहेर गेले व १९३१-३२ मध्यें १० कोटि, ४० लक्ष वार कापडाची निर्गत झाली. नंतरच्या तीन वर्षांतील निर्गतीची सरासरी ६½ कोटि वाराची आहे १९३७ मध्यें हिंदी कापडास परदेशात चागली मागणी येत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. सप्टेंबर १९३७ अखेरच्या पहिल्या सहामाहींत ७ कोटि, ९९ लक्ष वार हिंदी कापड परदेशात खपलें. हा आकडा गेल्या वर्षांतील निर्गतीचे तत्सम आंकड्यापेक्षा दुप्पट तर आहेच, परंतु तो १९३५ मधील एकूण निर्गतीपेक्षाहि तो मोठा आहे कापडाची निर्यात करण्याचे बाबतींत मुबईस अग्रेसरत्वाचा मान आहे, मद्रासचा अनुक्रम त्याचे खालीं येतो सिलोन हें हिंदी कापडाचें प्रमुख गिऱ्हाइक आहे. हिंदी सुताची निर्गतहि वाढत्या प्रमाणावर होऊ लागली आहे. ह्या निर्गतीचा आकडा ५० लक्ष पौंडांवरून १ कोटि १६ पौंडावर गेला आहे. जपान देश सध्या चीनशीं युद्धात गुंतलेला असल्याकारणानें हिन्दी मालास जपानची स्पर्धा आता सोसावी लागत नाहीं, त्याचा वाढती हिंदी निर्गत हा सुपरिणाम आहे. नवीन मिळविलेल्या बाजारपेठा कायम राखणें, हाच आता गिरणी मालकापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे.


लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा सस्थात अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलूएल् बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,२३,९०० वसूल झालेलें भांडवल १,११,७४०

सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात या बॅंकेवरील चेक मुबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बॅंकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी

M V. GOKHALE,
मॅनेजर

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## महाराष्ट्र विमा कं लि, कराड.

श्री पांडुरंग केशव शिराळकर, बँकर व जमीनदार, कराड, ह्यांचे नेतृत्वाखालीं वरील कंपनीची स्थापना झालेली आहे शेतकरी, गरीब व मध्यम वर्ग ह्याचें उत्पन्न अल्प व अनियमित असल्याकारणानें नेहमींच्या विम्याचा त्यास नीट फायदा घेता येत नाहीं, कारण त्याच्या अटी पार पडणें त्यास कठीण जातें शेतकरी, कामकरी व मध्यम वर्ग यांना सवडीप्रमाणें व ऐपती-प्रमाणें बचत करण्यास उत्तेजन मिळून भरलेला पैसा फुकट न जाता एकमेकाचे सहायानें स्वत ला व आपल्या कौटुंबीयास उपयोगी पडेल अशा रीतीनें पैसा परत मिळूं शकेल, अशा शास्त्र-शुद्ध योजना कंपनीनें आखल्या आहेत. कंपनीचे 'कल्पतरू' बेनिफिट बॉंड लोकप्रिय झाले आहेत, त्याची योजना विमागणिती श्री. ग स मराठे ह्यांनींच केलेली आहे. कंपनीनें तूर्त प्रत्येकीं रु १० किंमतीचे १ लक्ष बॉन्ड्स विक्रीस काढले आहेत. हप्त्यानें रकमेचा भरणा करण्याची सवलत ठेवलेली आहे बॉंड खरेदीदार सभासद झाल्यावर त्यास (अ) दरसाल वाटावयाची देणगी, (ब) मृत्यूनंतरचा फायदा अगर, (क) वरील दोन्हींतून २० वर्षांत रकम न मिळाल्यास मिळावयाचा फायदा हीं मिळूं शकतात व बॉंड चालू आहे, तोंपर्यंत रकम कर्जाऊ मिळूं शकते. बॉंडच्या किंमतीची रकम सुरक्षित व किफायतशीर रीतीनें गुंतविली गेली आणि रिझर्व्ह फंड व दरसालच्या वाटणीची सावधगिरीची योजना असल्यास बॉंड धारण करणाराचें हित सुरक्षित राहील, हें सांगावयास नकोच. १ लक्ष बॉंड खपल्यास ४५ हजाराचीं २,२२६ बक्षिसें दिलीं जातील बॉंड कमी अगर जास्त खपतील त्या मानानें बक्षिसाची संख्या व रकम हीं कमीजास्त होतील. बॉंड धारण करणाराच्या मृत्यूनंतर वारसदारास विम्याप्रमाणें रकम मिळेल अशी व्यवस्था आहे कंपनीची योजना शास्त्रशुद्ध आहे. तिचा व्यवहार ज्या मानानें वाढेल, त्या मानानें भागीदारास मिळावयाचे फायदेहि वाढतील हें उघड आहे. २०-६-३७ रोजीं कंपनीनें १ हजार रुपयाची वाटणी केली आहे.

---

## राष्ट्रहितासाठी जपानच्या काटकसरी योजना

परदेशी मालाची आयात नियंत्रित करून जपान देश आपली परराष्ट्रीय देणीं कमी करण्याचा यत्न करीत आहे. जपानचे दुय्यम अर्थमंत्रि, मि इशिवाटारी, ह्यांनीं ह्या दृष्टीनें प्रयत्न म्हणून स्वत.-साठीं काहीं काळपर्यंत नवीन कपडे न शिवण्याचें ठरविलें आहे. आपल्या खात्यामधील नोकरवर्गास एकत्र जमवून त्यांनीं आपली ही योजना त्यांस समजावून सांगितली. २६ हजार नोकरानीं ह्याबाबत स्वार्थत्याग केला, तर सुमारें २½ लक्ष रुपयाची बचत होईल व तिचा विनियोग युद्धविषयक कार्याकडे करता येईल, असें उपमंत्र्यांनी सांगितलें इतरास धडा घालून देण्यासाठी म्हणून त्यानीं आपला सूट उलटून घेण्याचें ठरविलें आहे. जपाननें इतरहि अनेक उपायानीं काटकसर करण्याचें ठरविलें आहे परदेशी फिल्म्सच्या आयातीस पूर्णपणें बंदी करण्यात आली आहे. झाडाचा राधा कपाशीच्या व लोकरीच्या धाग्यात घालून त्याबाबतचें परदेशावरील अवलंबन कमी करण्यात येत आहे. अधिकाऱ्याचें परदेशागमन व अभ्यास आणि निरीक्षण ह्यांकरितां काढण्यात येणारे दौरे हेहि कमी होणार आहेत.

---

## हकीम व वैद्य ह्यांच्या धंयाचें संघटन

मुंबईसरकार आपल्या कायदेमंडळाच्या येत्या अधिवेशनात हकीम व वैद्य ह्याच्या धंद्याचें नियंत्रण करणारें एक बिल मांडणार आहे. त्या अन्वयें हकीमाचा व वैद्यकीचा धंदा करणाराची नोंद ठेवण्यात येईल काहीं विशिष्ट काळ (उ १० वर्षें) ह्या धंद्यात असणारास नोंदीसाठी रु १५ फी भरावी लागेल ह्यापेक्षा कमी वर्षें काम करीत असलेल्यास "बोर्ड ऑफ इंडियन मेडिसिन" ठरवील ती परीक्षा द्यावी लागेल औषधोपचार, शवच्छेदन व सूतिकाशास्त्र ह्या विषयाचा परीक्षेंत समावेश होईल असें समजतें बोर्डावर तेरा सभासद असतील, त्यांपैकीं अध्यक्ष व इतर सहा सभासद सरकार नेमील व उरलेले सहा सभासद वैद्य व हकीम ह्याच्यातून निवडले जातील दर पांच वर्षांनीं फेर-नेमणुका व फेर निवडणुकी होतील. बोर्डानें नेमावयाचा रजिस्ट्रार युनानी व आयुर्वेदिक वैद्यांची नोंद ठेवील.

---

## सहकारी चळवळीप्रीत्यर्थ १ कोटि रु भांडवलाची मागणी

डुमका (बिहार) येथें नुकत्याच भरलेल्या डिव्हिजनल को. फेडरेशन बोर्डानें एका ठरावाचे द्वारा सहकारी चळवळीस दीर्घ मुदतीच्या परतफेडीचें कर्ज पुरविण्याकरिता सरकारनें एक कोटि रुपयांचें कर्ज उभारावें, अशी विनंति केली आहे.

---

## आकोला सहकारी अडत दुकान

वरील दुकानाचे सभासद ३०-६-३६ अखेर ३०७ असून त्यांनीं ६,८४० रु किंमतीचे ६८४ भाग घेतलेले आहेत. गेल्या ३ वर्षांत दुकानच्या कारभाराचा खर्च वजा जाता निवळ नफा ४३६ रु १० आ उरला. अडतीचा व्यवहार ह्यापुढें फायदेशीर होईल असें वाटत नसल्यामुळें अडत दुकानाचें रूपांतर बँकेंत करण्यात यावें अशी वार्षिक अहवालात सूचना करण्यात आलेली आहे.

---

## श्री. देवभानकर यांची नेमणूक

श्री भालचंद्र त्र्यंबक देवभानकर, ऑनररी सेक्रेटरी, पुणें जिल्हा को-ऑप० इन्स्टिट्यूट याची पुणें हरिजन को-ऑप० हौसिंग सोसायटी, लि० चे मॅनेजिंग कमिटीवर मे रजिस्ट्रार-साहेब, को-ऑप० सो० मुंबई इलाखा, पुणें, यांचे प्रतिनिधी म्हणून ता. १-१०-३७ रोजीं नेमणूक झाली.

## सहकारी हौसिंग सोसायट्यांचीं गाऱ्हाणीं

मुंबई शहरांतील सहकारी हौसिंग सोसायट्याच्या शिष्टमंडळानें महसूल मंत्री, श्री. मुरारजी देसाई, ह्याची गेल्या आठवड्यात गाठ घेतली व त्याचे कानावर सोसायट्याचीं गाऱ्हाणीं घातलीं.

U. P. IS FAMOUS FOR HANDICRAFTS

EVERY DISTRICT HAS SOME INDIGENOUS MANUAL SKILL TO SHOW

U. P. ARTS & CRAFTS EMPORIUM,

(Hazratgunj, Lucknow)

Solely under Government management—has brought together all these lines under one roof.

*Please pay a visit to our show-room.*

BUSINESS MANAGER.

## कॉमनवेल्थ विमा कंपनीचा नववा वाढदिवस

पुणें येथील कॉमनवेल्थ विमा कंपनीचा नववा वाढदिवस श्री भुलाभाई देसाई, यांचे अध्यक्षतेखालीं रविवार, ता २१ नोव्हेंबर रोजीं साजरा करण्यांत आला. प्रथम कंपनीचे चेअरमन, खान बहादुर एम्. एन्. मेहता, ह्यांनीं भाषण करून पाहुण्यांचें स्वागत केलें व कंपनीच्या कारभाराविषयीं चार शब्द सांगितले. त्यानंतर कंपनीचे मॅनेजिंग एजंट, श्री. रा न. अभ्यंकर, ह्यांनीं कंपनीच्या स्थापनेपासूनचा इतिहास व तिची अखंड प्रगति ह्यासंबंधीं पत्रक वाचून दाखविलें. श्री भुलाभाई देसाई ह्यांनीं आपल्या भाषणांत कॉमनवेल्थच्या उत्कर्षाबद्दल समाधान व्यक्त करून तिची अशीच भरभराट होवो अशी इच्छा प्रकट केली.

### कंपनीच्या प्रगतीचा आढावा

ता. १९ नोव्हेंबर, १९२८ रोजीं कंपनी रजिस्टर झाली. श्री. न. चिं. केळकर व इतर वजनदार गृहस्थ डायरेक्टर बोर्डावर काम करण्यास मिळाल्याकारणानें कंपनीवर जनतेचा विश्वास बसून तिला आजची परिस्थिति प्राप्त झाली. गेलीं नऊ वर्षें कॉमनवेल्थ कंपनीस केवळ ह्या प्रांतातच नव्हे, तर सबंध हिंदुस्थानात चांगलें काम मिळत आलें आहे. कंपनीच्या प्रगतीचा निदर्शक तक्ता खाली दिला आहे:—

| वर्ष | मिळालेलें काम रु | पॉलिसी दिल्या रु | हप्त्यांचें उत्पन्न रु | विमाखातीं फंड रु. | खर्चाचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| पहिलें | ११,५९,२५० | ७,०४,२५० | २७,२६४ | ४४० | ८६% |
| दुसरें | १२,२८,३७५ | ९,१२,३७५ | ५९,२७७ | ११,५०१ | ७२% |
| तिसरें | १३,०४,००० | १०,५०,७५० | १,१४,३९७ | ६२,३९८ | ५०% |
| चौथें | १५,१९,७५० | १२,३५,२५० | १,५०,३५२ | १,२४,०३९ | ४६ ७% |
| पांचवें | २३,०२,७५० | १८,२७,२५० | २,२१,४०१ | २,२९,३४४ | ४६ ७% |
| सहावें | २९,२९,५०० | २४,३०,००० | ३,००,९७५ | २,००,५२५ | ४४ ६% |
| सातवें | ३३,१५,५०० | २८,१६,००० | ४,०४,५४१ | ५,३६,३९६ | ४४ ०९% |
| आठवें (एप्रिल १९३७ अखेर) | ४१,४८,१०१ | ३२,२३,७५० | ५,०९,२३१ | ८,०८,४७३ | ४१ ६५% |

कंपनीस मिळालेलें काम, तिचा लाइफ फंड व हप्त्यांचें उत्पन्न ह्यांतील अखंड वाढ आणि खर्चाचें उतरतें प्रमाण ह्या कारणामुळें कॉमनवेल्थ कंपनीस हिंदी विमाक्षेत्रात पहिल्या प्रतीचा दर्जा प्राप्त झाला आहे. कंपनीनें आपल्या भागीदारास ६ टक्के दरानें प्राप्तीवरील कर माफ असलेलें डिव्हिडंड दिलें असून सध्याच्या बोनसचा दर सालिना दर हजारीं १२½ रु (हयातीमधील विम्यावर) व १५ रु. (हयातीनंतरच्या विम्यावर) असा आहे. कंपनीचें तिसरें मूल्यमापन एप्रिल, १९३८ अखेर होईल, त्यावेळीं ह्यापेक्षाहि ज्यास्त समाधानकारक आंकडे जाहीर करतां येतील, अशी आशा आहे सध्या कंपनीच्या पांच शाखा—मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली व अहमदाबाद येथें—आहेत.

नवीन विमा बिलांतील कित्येक नवीन महत्त्वाच्या बाबी कॉमनवेल्थनें अगोदरच आचरणांत आणलेल्या आहेत क्लेमचे पैसे तात्काळ देण्याची व्यवस्था, विमेदाराचें डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधित्व, इत्यादि गोष्टी कॉमनवेल्थला नवीन नाहींत कायदेमंडळानें वगळलेली, कंपन्यांच्या नोकरवर्गासाठी प्रॉव्हिडंड फंडाची योजना ही कॉमनवेल्थमध्यें प्रत्यक्ष अंमलात आहे.

### श्री भुलाभाई ह्यांचें भाषण

श्री भुलाभाई ह्यांनीं आपल्या भाषणांत कॉमनवेल्थच्या प्रगतीविषयीं समाधान व्यक्त केलें आणि तिच्या चालकांचें अभिनंदन केलें. विम्यासारखा धंदा हिंदी लोकांनीं चालवून परकी कंपन्याच्या मार्फत परदेशीं जाणाऱ्या पैशाचा ओघ थांबवणें कसें जरूर आहे आणि स्वदेशी उद्योगाचें संवर्धन होण्याची आवश्यकता ह्या दरिद्री देशात किती आहे, ह्याचें मार्मिक विवेचन त्यांनीं केलें कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनीं मध्यवर्ती कायदेमंडळात नवीन विमाबिल पास होताना कोणती कामगिरी बजावली ह्याचेंहि सुंदर वर्णन त्यांनीं केलें. विमेदार पॉलिसीचे पैसे कंपनींत भरतात, ते सुरक्षित राहून ठरलेल्या वेळीं त्यास किंवा त्यांनीं नियोजिलेल्या इसमास ते मिळण्याची व्यवस्था बिनघोक असण्याच्या महत्त्वावर श्री. भुलाभाईनीं विशेष जोर दिला. विमेदाराचा बराचसा पैसा एजंटाच्या कमिशनमध्यें जातो, हें बरें नाहीं आणि ह्या बाबतींतला कंपन्याचा खर्च कमी होणें अगत्याचें आहे असें त्यांनीं सांगितलें विमाएजंटाच्या कार्याचें महत्त्व कितीहि मोठें असलें तरी त्यास देण्यात येणाऱ्या कमिशनचे पायीं आज पैसा खर्च होत आहे तो अनाठायी आहे असा आपला अभिप्राय त्यांनीं ठासून सांगितला कॉमनवेल्थचें खर्चाचें प्रमाण उतरत असल्याविषयीं समाधान व्यक्त करून व ह्या मार्गानें कंपनीची प्रगति होत जावो असा आशिर्वाद देऊन त्यांनीं आपलें भाषण संपाविलें.




### भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द्व गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमत अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १२०–१३ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०५—३ |
| ४% १९४३ | १०७–१४ |
| ३½% विनमुदत | ९८–११ |
| ३½% १९४७–५० | १०६–१२ |
| २¾% १९४८–५२ | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लाब मुदत) | ११०—० |
| ४% मुबई म्युनिसिपल ( लाब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४५—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११७—९ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | ३०—८ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% | १५९२—८ |
| बाँबे प्रॉ को. बँक ( ५० ) ५% | ५९—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १२६—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९४–१२ |
| अहमदाबाद् प्रांतज (५०० ) १०% व ६ रु ४ आ. बोनस | ९४७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७६६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १०% | १२५–१५ |
| कराची ( १०० ) ९% | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १५८१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु. | १८५— ० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ५०—८ |
| सिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २६—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ | ४३—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु बोनस | ४६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १७०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. | ३४५—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | १५३५—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३४—८ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ४९–१५ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—९ |
| „ केसर प्रत्येक मणास | ११–४ |
| „ सरया प्रत्येक मणास | ११–२½ |

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु २. ट. ख. १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्च माफ.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

*For All Medicinal Requisites*

— TRY —

## N. MAHADEV & Co.

**DISPENSING CHEMISTS**
AND
**DRUGGISTS**

City Post Office Corner POONA, 2

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY.**
Consult

## V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published any where and supply it at publisher's price

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठीं कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २॥; किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रॅंच.—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २

## दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

कामाची वेळ —
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बॅंक ठेवींवर द सा. द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

## गव्हाचे पोहे

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात विशेषत लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खाता येतात.

७५२ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.

## संजीवन हेअर टॉनिक

**दारुणा, केंस गळणें व टक्कल**
**ह्यावर अनुभविक उपाय**
**संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद**

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२॥१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख १ डिसेंबर, १९३७ अंक ४७

UNEMPLOYMENT NO MORE



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

— मनपसंत काम —
वक्तशीर-पणाची रिसबूड ब्रदर्स-टेलर्स गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स
याचेकडील मसाले, लोणचें आणि पापड याचा आपले
जेवणात नेहमीं उपयोग करा
पत्ता —मुगभाट, गिरगाव, मुंबई
पुणें एजट.—दत्तात्रय नारायण हेजीब २०, शुक्रवार

अखेर त्याला आज
आढळून आलें कीं—
" कल्पतरु बॉंड " म्हणजे १२॥ रुपयाची एक–हप्ता विमा–पॉलिसी–जास्तींत जास्त रुपयाची–किंवा ५००० रुपयेपर्यंत जास्तींत जास्त बक्षिस मिळविण्याचें सुंदर साधन आहे आणि नतर त्यानें दुसरी बक्षिसवाटणी साधण्याकरितां लगेच बॉंड विकत घेतला आपणहि आजच आमचे स्पेशल एजंट्स मे. केळकर ब्रदर्स, पुणें व नाशिक, श्री व्ही व्ही डाके, बी ए, एस टी सी पुणें, अगर एजट श्री वि पां पंडित, १२६ शुक्रवार पुणें, यापैकीं कोणासहि भेटून आजच एक तरी बॉंड घ्या ! ते आपणास विम्याचीहि माहिती देतील

उंसाची नवी लागवड सुरू झाली.

—कार्यक्रम— डिसेंबर १९३७ मशिनरीचा दुसरा हप्ता / जानेवारी १९३८ मशिनरीचा तिसरा हप्ता / फेब्रुवारी १९३८ मशिनरीचा शेवटचा हप्ता — मुंबईस येणार.

साखरेचे भाव वाढले त्या प्रमाणांत नफाही वाढणार.
शेअर आज घेऊन ठेवा, पुढें शेअरचे भाव वाढतील.
॥ विश्वासः फलदायकः ॥
सविस्तर माहिती व शेअर फॉर्म्स खालील पत्त्यावर मिळतील.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें.
२५७ बुधवार पेठ, पुणें २.

# विविध माहिती

### मुंबई इलाख्यांतील मिठाचा खप

१९३६-३७ मध्यें मुंबई इलाख्यात एकूण ४० लक्ष, ८८ हजार मण मीठ खपलें इलाख्याची लोकसंख्या २ कोटि, ४४ लक्ष आहे, म्हणजे मिठाचा दर माणशी खप सुमारें ७ शेर झाला.

### सर जगदीशचन्द्र बोस ह्याचें दातृत्व

विख्यात हिंदी शास्त्रज्ञ सर जगदीशचन्द्र बोस हे गेल्या आठवड्यांत मरण पावले. त्याच्या वार्षिक ५० हजाराच्या उत्पन्नापैकी ४० हजार रुपये ते शास्त्रीय संशोधनासाठी व शिक्षणासाठी बाजूस काढून ठेवीत असत. त्यानीं अशा रीतीनें १७ लक्ष रु. आपल्या सशोधन मदिराकरितां व इतर शास्त्रीय कार्यासाठी खर्चिले आहेत. त्यांच्या पत्नी, श्री. अबला बोस, ह्यांस त्याच्या हयातींत दरमहा ८०० रु. व २० हजार रु एकरकमेनें रोख मिळावयाचे आहेत.

### मुंबई इलाख्यांतील विद्युद्‌गृहें

मुंबई इलाख्यात वीज उत्पादन करणाऱ्या व पुरविणाऱ्या ६८ कंपन्या आहेत त्या दरसाल ६० कोटि युनिट्स वीज निर्माण करतात, त्यापैकी ५३ कोटि युनिट्स वीज खपते विजेच्या खपावरील अर्ध्या आण्याच्या पट्टीपासून सरकारास सालिना १० लक्ष रु मिळतात

### मुंबई सरकार नर्मदेवरील पूल खरेदी करणार ?

नर्मदा नदीवरील भडोच येथील जुन्या रेल्वे पुलाची बी. बी. ॲन्ड सी आय रेल्वेस आता जरूरी नसल्यानें, मिळेल त्या किंमतीस तो पूल विकण्याचा रेल्वे कंपनीचा विचार आहे. मुंबई सरकार ह्या पूल खरेदी करणार असल्याचें समजतें. असें झाल्यास रस्त्यानें होणाऱ्या मुंबई–अहमदाबाद दळणवळणास सहाय होईल

### कामगारास ९२ लक्ष रु बोनस

कॅमेरे व फोटोग्राफीचें साहित्य तयार करणाऱ्या ईस्टमन कोडॅक कपनीनें आपल्या नफ्यातून कामगारास सुमारें ९२ लक्ष रु. बोनस देण्याचें ठरविलें आहे.

### मुंबई इलाख्यांतलि तबाखूवरील कर

मुंबई इलाख्यातील तबाखूवरील कराची मुदत ३१ मार्च, १९३८ अखेर सपते. ह्या करापासून मुंबई सरकारास सालिना १८ लक्ष रुपये उत्पन्न होतें. सध्याच्या कराचे आकारणीच्या पद्धतींत सुधारणा करून किरकोळ विक्रेत्यांवरील करभार कमी करण्याचा व घाउक व्यापाऱ्यांवर ज्यास्त पट्टी बसविण्याचा सरकारचा विचार असल्याचें समजतें ह्यामुळें कराचें उत्पन्नहि वाढेल अशी अपेक्षा आहे

### हिंदी रेलवेजवरील काटकसर

हिंदी रेलवेजचें उत्पन्न घटूं लागल्यामुळें खर्चांत काटकसर करणें जरूर वाटूं लागलें. गेलीं पाच वर्षे हें काटकसरीचें धोरण अमलात आहे. १९२८-२९ सालीं ४,२९७ इंजनें आगगाड्या ओढीत होतीं. १९३३-३४ सालीं त्याची सख्या ४,११६ वर आणण्यांत आली व १९३८-३९ सालीं फक्त ३,६८५ इंजनेंच वापरात रहातील. म्हणजे १० वर्षांचे अवधींत एकट्या इंजनाचे बाबतींतच तीन कोटि रुपयाची बचत झाली. इजनें व डबे हे पडून राहूं न देतां त्यांचे कढून जास्तींत ज्यास्त वेळ काम करवून घेण्याचें सरकारी रेलवेजचें धोरण आहे.

### कराची ते कोलंबो ३१ तासांत प्रवास

कराची ते मद्रास हा प्रवास विमानांतून सध्याहि करतां येतो. १८ डिसेंबर पासून मद्रास ते कोलंबो, टाटाच्या विमानांची वाहतुक सुरू होणार आहे. म्हणजे, कराची ते कोलंबो हें अंतर ३१ तासात तोडतां येईल.

### त्रावणकोर सस्थानांतील नाणीं

त्रावणकोर सस्थान आपलीं नाणीं इंग्लंडमध्यें पाडून घेतें. बनावट नाण्याचा ह्या संस्थानात सुळसुळाट झाला आहे असें म्हणतात. नाणें खरें का खोटें हें तात्काळ ओळखता यावें, ह्यासाठी इंग्लंडांत पाडून घेतलेल्या नाण्यावर कांहीं विशिष्ट गुप्त खूण योजण्याचें घाटत आहे

### ग्वाल्हेर संस्थानांतील ग्रामसुधारणा

ग्वाल्हेर दरबारनें आपल्या सस्थानातील ग्रामोद्धाराकरिता व्यावहारिक योजना आखण्यासाठी एका कमिटीची योजना केली आहे सर मनुभाई मेहता हे तिचे अध्यक्ष असून मि. एफ. एल. ब्रेन, आय. सी. एस. ( पंजाब ), डॉ. हिगिनबोटॅम, प्रो. वा. गो. काळे, इत्यादि दहा तिचे सभासद आहेत. ग्वाल्हेर येथील व्हिक्टोरिया कॉलेजचे प्रिन्सिपॉल, मि. बुल, हे कमिटीचे सेक्रेटरी म्हणून काम पहाणार आहेत. डिसेंबर महिन्यांत कमिटीचें काम सुरू होईल.

### मुंबई इलाख्यांतील आगीच्या विम्याचे हप्ते

• मुंबई इलाख्यांतील कापसाच्या सर्व गिरण्यांना मिळून आगीच्या विम्याचा वार्षिक हप्ता सुमारें १५ लक्ष रु. भरवा लागतो• कपाशीच्या विम्यावरील हप्त्याची रकम १० लक्ष रु. होते. हे व इतर विमे मिळून मुंबई इलाख्यांतील आगीच्या विम्यावरील वार्षिक हप्त्याची रकम ५० लक्षांवर जाते.

### किमान मजुरीच्या दरास विरोध

कपास कापडाच्या गिरण्यांत काम करणारास कांहीं निश्चित किमान वेतन मिळण्याचें कायद्यानें ठरविण्यांत यावें, ह्या सूचनेस मुंबई गिरणीमालक संघानें तीव्र विरोध प्रदर्शित केला आहे.

### ब्रिटिश कोळशाच्या खाणींचे मालकी हक्क व सरकार

ग्रेट ब्रिटनमधील कोळशाच्या खाणींचे मालकी हक्क तेथील सरकारनें योग्य समजली जाणारी किंमत देऊन विकत घेण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेची अंमलबजावणी होण्याची व्यवस्था चालू झाली आहे

### इंग्लंडची परराष्ट्रांतील सावकारी

इंग्लंडनें परदेशास कर्जाऊ दिलेलें भांडवल सुमारें पांच हजार कोटि रुपये असून त्यावर गेल्या वर्षी २५० कोटि रुपये इतकें व्याज त्या राष्ट्रास मिळालें.

### जपानी गांवांस ब्रिटिश शहरांचीं नावें

बर्मिंगहॅम, न्यूकॅसल, इत्यादि ब्रिटिश शहरें औद्योगिक उत्पादनाबद्दल सुप्रसिद्ध आहेत जपाननें आपल्या कांहीं गांवांस हीं नावें दिलीं आहेत, त्यामुळें कांहीं जपानी माल ' बर्मिंगहॅममध्यें बनविलेला ' इत्यादि लेबलाखाली विकतां येणें शक्य होतें.

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| १४-११-३७ ते २०-११-३७ | ३७,८१,३५२ |
| २१-११-३७ ते २७-११-३७ | २९,४९,२७३ |
| २१-९-३१ ते २७-११-३७ | ३,०६,५१,१६,३२५ |

अनुक्रमणिका


| पृष्ठ | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५७६ | को रिव्ह्यू—विदेशी तज्ञाची आयात — लॉईड्स बँकेची शाखा | |
| २ आर्थिक लढ्याची मीमांसा | ५७७ | ५ इंग्लंडच्या औद्योगिक प्रगतींत कापडाच्या धंद्याचें स्थान | ५८१ |
| ३ कपाशीचें उत्पादन वाढलें पण बाजारभाव उतरले | ५७८ | ६ मँचेस्टरच्या गिरण्यांतील यंत्रें | ५८१ |
| ४ स्फुट विचार | ५७९ | ७ सहकारी चळवळ | ५८२ |
| सरकारी नोकरींत पदव्यांचा भाव उतरणार !— प्रेरक अल्कोहॉलचें उत्पादन — जर्मन अर्थसचीवाचें उच्चाटन — के आर. आर नावर — मराठा चेंबर — इंडियन | | ८ ग्रामोद्योगाच्या योजना | ५८४ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ५८५ |


# अर्थ

बुधवार, ता. १ डिसेंबर, १९३७

## आर्थिक लढ्याची मीमांसा

जगाच्या घडामोडींत नवीन आचार-विचारांच्या लाटा उसळूं लागल्या म्हणजे त्यांचा पल्ला हिंदुस्थानापर्यंत येऊन पोहोचणें अगदीं स्वाभाविक आहे. सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होण्याविषयींची चर्चा व प्रयत्न युरोपांत अनेक पिढ्या चालू असून त्यांस अनुसरून तिकडे कित्येक उलाढालीहि झाल्या आहेत. लोकशाहीचें पाऊल हिंदुस्थानात जसजसें पुढें पडत आहे आणि जनतेस राजकीय शिक्षण जसजसें अधिकाधिक मिळत आहे, तसतशी नवीन आचारविचाराची छाप आमच्या समाजावर ज्यास्त ज्यास्त पडत आहे. कारखानदार व कामगार, सावकार व कर्जदार आणि जमीनदार व कुळें ह्यांचे आजवर चालत असलेले संबंध बदलणें इष्ट आहे कीं नाहीं आणि संपत्तीच्या मालकीचा हक्क अबाधित राखणें किंवा त्यामध्यें बदल करणें योग्य आहे कीं नाहीं हे व असले दुसरे प्रश्न उपस्थित होण्याचें कारण वर निर्दिष्ट केलेल्या उलाढालींत सापडण्यासारखें आहे. कारखान्यामध्यें काम करणाऱ्या लोकामध्यें संपाची साथ अलिकडे उठली असून, मुंबई, अहमदाबाद इत्यादि औद्योगिक शहरांत गिरणीमालक व कामकरी याच्यामध्यें लढा उत्पन्न झाला आहे. खोती पद्धति रत्नागिरी जिल्ह्यांत अनेक पिढ्या अस्तित्वांत आहे, ती नाहींशी व्हावी अशीहि मागणी प्रांतिक सरकारकडे करण्यात आली आहे सर्व आर्थिक व सामाजिक संस्थाचा पाया जनतेचें अंतिम हित हाच असला पाहिजे हें निर्विवाद आहे. तथापि, ह्या संस्थाचा मूळ हेतु व त्यांची परिस्थिति ह्यांची कालांतरानें फारकत होत असते. अशा प्रसंगीं त्या दोहोंची सांगड पुन्हां घालणें, कोणास आवडलें नाहीं तरी, सामुदायिक हिताच्या दृष्टीनें इष्ट असतें गिरण्यांतल्या कामगारांचे कामाचे तास कमी होणें, त्यांचें वेतन वाढणें आणि त्यांची रहाणी सुधारणें ह्या गोष्टी निर्विवाद अत्यंत आवश्यक आहेत. पण या सर्व एकदम अमलांत येणें कठीण आहे, आणि त्या अमलात आणावयाचें म्हटल्यास ज्यांमध्यें कामकरी लोकास उद्योग मिळावयाचा ते धंदेच नष्ट होण्याची भीति असते. भांडवलवाल्यांच्या स्वार्थास आळा घालणें योग्य आहे खरें, पण कारखानदार नाहींत, कामकरी नाहींत व संपत्तीचें उत्पादनहि नाहीं असा प्रकार न होऊं देण्याची खबरदारी घेतली पाहिजे एका इंग्रजी म्हणीप्रमाणें, टबातलें पाणी फेकून देताना त्यातलें मूलहि फेकलें जाण्याचा येथें संभव आहे. प्रधानमंडळाचे पुरस्कर्ते कामकरीवर्गाच्या पुढाऱ्यास संपासारख्या चळवळीचे बाबतीत सबूर करण्यास सांगत आहेत, ह्यांतलें इंगित तरी हेंच नाहीं काय?

समतावादाकडे जगातील देशात कल अधिकाधिक झुकत आहे, हें जितकें खरें आहे, तितकेंच हेंहि खरें आहे कीं, त्या सबधांतल्या अतिरेकाविरुद्ध जोराची प्रतिक्रिया झाली आहे व होत आहे. भांडवलशाही असो, आकुंचित सामाजिक वृत्ति असो किंवा समाजसमता असो, तिची मजल सार्वत्रिक हिताच्या विशिष्ट मर्यादेपलीकडे गेली असता ह्या स्थितीच्या विरुद्ध दिशेनें चळवळ झाल्यावाचून रहात नाहीं. त्याचप्रमाणें, एका देशात कोणतीहि सुधारणा यशस्वी झाली आहे असें वाटल्यानें तिची हुबेहुब नक्कल इतरत्र उठवली पाहिजे हेंहि क्रमप्राप्त होत नसतें इष्ट आणि शक्य गोष्टींमध्यें एवढें मोठें खिंडार असतें कीं, अविचारानें किंवा घाईनें पुढें जाणारा समाज त्यात अडखळून गारद होण्याची भीति असते हिंदुस्थानात विशेष प्रकारची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिति आहे, ती पूर्णपणें लक्षात घेऊनच आपणास ज्यास्तींत ज्यास्त विधायक कार्य कोणतें करता येण्याजोगें आहे ह्याचा प्रत्येक पावलास निर्णय केला पाहिजे. पूर्ण दारूबंदीची इष्टता सर्वांसच मान्य आहे, पण तिच्या संबधातले प्रयोग मर्यादित क्षेत्रात करणेंच व्यवहार्य आहे, हेंहि सामान्यत हिंदी प्रांतिक सरकारास पटलेंच आहे कीं नाहीं? शेतकऱ्याचें कर्ज-निवारण, शेतीच्या धंद्याची सुधारणा, जमीनदाराच्या कुळाची सुरक्षितता, सावकारी व्यवहाराचें नियंत्रण, कामकरी वर्गाच्या हिताची जोपासना इत्यादि बाबीस हाच न्याय लागू करणें अगत्याचें आहे. विविध प्रकाराच्या अनेक आर्थिक व सामाजिक सुधारणा घडून आल्या असता ती एक क्रांतीच बनत असते आपल्या सभोंवार सूक्ष्म दृष्टीनें पहाणारास गेल्या पिढीच्या मानानें आज क्रांति झालेली दिसून येईल क्रांतीस कोणीहि बुजून जाण्याचें कारण नाहीं. पण क्रांति हें कांहीं ध्येय नव्हे सामुदायिक हितात व्यक्ति व वर्ग ह्यांचे हित असतें, किंबहुना, तीं परस्परावलंबी आहेत केवळ अमूक एका किंवा अधिक वर्गास हाणून पाडणें हा जसा प्रगतीच्या कार्यक्रमाचा उद्देश किंवा भाग असू शकत नाहीं, तसाच, परंपरागत हक्कास चिकटून राहून सार्वत्रिक हिताच्या प्रयत्नास निर्भेळ विरोध करणें हाहि कोणत्याहि सामाजिक गटाचा शहाणपणाचा मार्ग ठरणार नाहीं कारखानदार, सावकार व जमीनदार ह्या लोकानीं याच दृष्टीनें परिस्थितीचा विचार केला पाहिजे सुधारणेचे पुरस्कर्ते व समतावादी ह्यानीं निकड लाविली व इतरानीं विरोध चालविला असतां हिंदुस्थानांतील प्रांतिक सरकारास प्रगतीविषयींचे प्रश्न सोडवतांना न्यायदायक, तडजोडीची व व्यावहारिक वृत्तीची भूमिका अंगिकारण्यावांचून गत्यतर नाहीं.

" समाजाचे सर्व आर्थिक व्यवहार व्यक्ति-स्वार्थावर आधारलेले असून कायद्यानें दिलेल्या सवलतीच्या शेवटच्या मर्यादेपर्यंत

तो स्वार्थ चालवण्याचा प्रत्येकास हक्क आहे व असला पाहिजे" हें तत्त्वज्ञान सांगण्याचे दिवस गेले आहेत; कोणत्याहि व्यक्तींच्या अथवा वर्गांच्या सुखदुःखाची अंतिम जबाबदारी सर्वांवर आहे, हें तत्त्व सामाजिक घटनेच्या मुळाशीं आहे ह्याची जाणीव आता आर्थिक तत्त्ववेत्त्यासहि झालेली आहे व्यक्तिस्वार्थमूलक आर्थिक घटनेचें जेथें आतांपर्यंत प्राबल्य वसत आलें आहे, अशा इंग्लंडसारख्या राष्ट्रांतहि कामकरी व इतर हीन स्थितींतल्या लोकांची स्थिति सुधारण्याचें कार्य समाजाच्या वतीनें सरकारानें हातीं घेतलें आहे, हें उदाहरण प्रस्तुत सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ दिलें असता पुरें होणार आहे. श्रीमंताच्या मिळकतीवर आणि त्यांनीं आपल्या मागें ठेवलेल्या मालमत्तेवर जबर कर, कामकरी लोकांची बेकारी, आजारीपणा वगैरेबद्दलचे विमे उतरण्याची योजना व वृद्धांस पेन्शनें मिळण्याची तरतूद, इत्यादि सुधारणा, वेडेपणाचा दानधर्माचा खर्च व व्यक्ति-स्वातंत्र्यावर हल्ला असल्या सदरात एका काळीं लोटण्यात आल्या असल्या, पण त्याच योजना आज आवश्यक व शास्त्रशुद्ध अशा समजण्यांत येत आहेत. पाश्चात्य देशांतल्या ह्या विचार व आचार ह्याच्यामधील क्रांतीपासून हिंदुस्थानात सर्वांनीं बोध घेणें अगत्याचें आहे. प्रांतिक सरकारांस ह्याच मार्गानें जावें लागणार असून निरनिराळ्या वर्गांचे आर्थिक हितसंबंध व सामाजिक कार्य लक्षांत घेऊन कोणासहि निष्कारण अन्याय होऊं न देता सार्वत्रिक प्रगतीच्या योजना आखाव्या व हातीं घ्याव्या लागतील.

---

## कपाशीचें उत्पादन वाढलें पण बाजारभाव उतरले

कपाशीच्या जागतिक पिकामध्यें चालू मोसमात फार मोठी वाढ झाली असल्यानें तिचे भाव फार उतरले आहेत. यंदाचे वर्षीं कपाशीचें एकूण उत्पादन ३ कोटि, ९० लक्ष गासड्या इतकें होईल, अशी अपेक्षा आहे गेल्या वर्षीं ३ कोटि ७ लक्ष व १९३५-३६ मध्यें २ कोटि, ६३ लक्ष गासड्या कपास निघाली होती अमेरिका, इजिप्त, हिंदुस्थान, जपान, ह्या सर्व देशात कपाशीखालील क्षेत्र वाढलें आहे. जपान स्वतःची कपास पेरण्याचा प्रयत्न करीत आहे व इटलीनेंहि ॲबिसिनियामध्यें तिची लागवड सुरू केली आहे. अशा प्रकारें कपाशीचें उत्पादन विस्तार पावत असून, तिचा उठाव मात्र त्या मानानें ज्यास्त होण्याचीं लक्षणें दिसत नाहींत. कृत्रिम रेशीम (रेयॉन) कपास कापडाची जागा घेऊं लागलें आहे. १९२७ सालीं २९½ कोटि पौंड इतकें रेयॉनचें जागतिक उत्पादन झालें होतें; १९३६ सालाचा तत्सम आकडा १०० कोटि पौंड इतका आहे. जपान चीनशीं लढण्यात गुतला असल्यामुळें तो देश आपली सर्व शक्ति युद्ध जिंकण्यात एकवटत आहे ह्यासाठी आयात कपाशीवर नियंत्रण घालून जपान आपलें परदेशातील देणें कमी करीत आहे. यंदाच्या मोसमातील हिंदी कपाशीचें उत्पादन ७० लक्ष गासड्या भरेल व एवढा माल बाजारात आला, म्हणजे त्याच्या किमतीवर अनिष्ट परिणाम झालेला आढळून येईल जपान आतां पूर्ववत् कपास विकत घेत नाहीं. लँकेशायरचे गिरणीवाले अमेरिकन कपास स्वस्त मिळत असल्यामुळें तिला प्राधान्य देऊं लागले आहेत कपाशीच्या जागतिक उत्पादनात कमालीची वाढ, त्या मानानें तिला असलेली मर्यादित मागणी, हिंदी कपाशीच्या प्रमुख गिऱ्हाइकाचें-जपानचें-परराष्ट्रीय देणीं कमी करण्याचें धोरण, ब्रिटिश गिरण्यात अमेरिकन कपाशीचें होत असलेलें वाढतें स्वागत, हिंदी गिरण्यांच्या कामगारांतील अस्वस्थता व तिचा उत्पादनावर होणारा दुष्परिणाम, ह्या सर्व गोष्टी हिंदुस्थानातील कपाशीच्या उत्पादकांचे दृष्टीनें चिंताजनक आहेत सध्यांच्या पडलेल्या बाजारभावास रेल्वेचे वहातुकीचे दर परवडत नाहींत व दर उतरवून उत्पन्न बुडविण्याची रेल्वे मंडळाची तयारी नाहीं. कपाशीच्या किमतीपैकीं दहावा ते विसावा भाग रेल्वे वहातूक खातें जेव्हां कपाशीचा बाजारभाव किफायतशीर होता, तेव्हा वहातुकीसाठी भारी दर देणें परवडत असे, आतां तो डोईजड झाला आहे. हिन्दी शेतकरी अशा प्रसंगीं हतबुद्ध झाला असल्यास नवल नाहीं. कपाशीचा बाजारभाव जागतिक स्वरूपाचा असल्यानें, त्याच्या चढउताराकडे डोळे लावून बसण्यापलीकडे शेतकऱ्याचे हातीं कांहींच नाहीं तथापि, सरकारास ही दुःस्थिति निवारण्यास थोडेंफार सहाय करता येणें शक्य आहे व त्याबाबत लवकर उपाययोजना झाली पाहिजे जरूर तर वहातुकीस प्रत्यक्ष मदत करून, कपाशीचा साठा हलविला जाण्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे पुढील मोसमात कपास न पेरण्याचें शेतकऱ्याचें हातात आहे, परंतु आजच्या कठीण प्रसंगीं त्यास निकडीच्या सहायाची आवश्यकता आहे.


## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed per centage tenders in Form B-1 for construction of a new Biological Building costing Rs 67897/- in the compound of the Karnatak Arts College at Dharwar are invited and will be received by the Undersigned upto 2 P M on 20th December 1937. Drawings and other particulars regarding the contract and Tender forms can be had at the Undersigned's office during office hours upto 18th December 1937 on payment of Rs 11/-.

2 The tender is subject to the acceptance of the Superintending Engineer, Southern Circle. Belgaum who reserves the right to reject any or all tenders without assigning reasons.

3 Tenders sent by wire will not be considered.

Office of the Ex. Engr, Dharwar Division, Dharwar, 27th November 1937

Sd/- P K SHINDE, Executive Engineer, Dharwar Division.



## ARTWARE TREASURES OF UNITED PROVINCES

**Are Patronised by Europe & America,**

THEY ARE FED UP WITH MACAINE-MADE ARTICLES

**INDIANS should not lag behind in encouraging the skilled** *artizans by purchasing their unique pieces.*

For particulars apply for our illustrated catalogue for or pay a visit to our show room.

BUSINESS MANAGER

**U. P. ARTS & CRAFTS EMPORIUM,**

**( Hazratgunj, Lucknow )**

# स्फुट विचार

### सरकारी नोकरीत पदव्यांचा भाव उतरणार?

मध्यम दर्जाच्या नोकरींतील उमेदवारांची शैक्षणिक लायकी काय असावी ह्याचा विचार हिंदुस्थान सरकार करीत असून सप्रू कमिटीच्या ह्या सबधांतल्या शिफारसींस अनुसरून तें आपलें धोरण आखणार असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे सामान्य दर्जाच्या नोकरीसाठींहि शेकडों पदवीदाराचे अर्ज येतात आणि सुशिक्षितामधली बेकारी झपाट्यानें वाढत आहे असा अलीकडचा अनुभव आहे. सर तेजबहादूर सप्रू ह्यांचे अध्यक्षतेखाली संयुक्तप्रांताच्या सरकारनें ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली होती, तिनें युनिव्हर्सिट्याच्या पदव्यांचें वड कमी झालें पाहिजे आणि दुय्यम प्रतींच्या शिक्षणक्रमानतर निरनिराळ्या धद्यात तरूणांस पडता यावें ह्याकरितां भिन्नभिन्न अभ्यासक्रमाची योजना व्हावी असा अभिप्राय व्यक्त केला होता. उच्च दर्जाची पदवी सामान्य प्रतीच्याहि नोकरीस आवश्यक आहे किंवा उच्च पदवीच्या योगानें अशी नोकरी मिळण्याची सुलभता होते ह्या कल्पनेनें अनेक विद्यार्थी कॉलेजातील अभ्यासक्रमाची सोपान-परपरा मोठ्या कष्टानें चढत असतात शक्ती आणि वेळ ह्याचा दुरुपयोग करणारा पदव्याविषयींचा हा मोह नाहींसा होण्यास नोकरी बाबतच्या लायकीची कसोटी उच्च विश्वविद्यालयीन पदव्यामध्यें नाहीं ही गोष्ट प्रस्थापित होणें आवश्यक आहे दरवर्षी शेकडो उमेदवाराची नोकरीसाठी निवड करणाऱ्या सरकारानें ह्या प्रकरणीं पुढाकार घेतला असता मागणीप्रमाणें पुरवठा ह्या न्यायानें शिक्षण घेणारे तरूण, त्याचे पालक व शिक्षणसस्था ह्यांचेवर इष्ट परिणाम होण्यासारखा आहे ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें योजलेलें धोरण अभिनंदनीय आहे, असें म्हटलें पाहिजे

---

### प्रेरक ऑल्कोहॉलचे उत्पादन

दारू गाळण्यासाठी ज्या मालाचा आज उपयोग केला जातो त्याचेपासून कारखान्यास प्रेरकशक्ती पुरवण्यासाठी ऑल्कोहॉल तयार करता येणें शक्य आहे कीं काय ह्याची चौकशी मुबई सरकार करवणार आहे साखरेच्या कारखान्यात आज कितीतरी काकवी फुकट जाते, तिचाहि उपयोग ह्या कामीं होण्याजोगा आहे काकवीचा फायदेशीर विनियोग करतां येणें शक्य झाल्यास साखरेच्या व गुळाच्या धद्यास चागलें सहाय मिळेल. फुकट जाणाऱ्या पदार्थांचे किमतवान जिन्नस बनवणें हा आर्थिक प्रगतीचा एक मार्ग आहे चिंध्याचा व गवताचा कागद बनवणें हा त्यातलाच प्रकार आहे. उसाच्या चोयट्याचा तसाच उपयोग झाल्यास तो नवीन धंदा उपयुक्त ठरेल. जगलातली मोहोडा फुलाचा दारू गाळण्याकडे उपयोग केला जातो, त्याच्याऐवजी औद्योगिक व्यवहारास लागणारा ऑल्कोहॉल बनवला गेल्यास तें अत्यत इष्ट होईल मुबईसरकारचें ह्या प्रश्नाकडे लक्ष गेलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

---

### जर्मन अर्थसचीवाचें उच्चाटन

जर्मनीच्या मध्यवर्ती बॅंकेच्या व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष व नात्सी पक्षाच्या प्रधान मंडळातले अर्थमंत्रि, डॉ शाख्ट, ह्याचें हेर हिटलर व त्याचे सहकारी ह्याचेशी पटेनासें झाल्यामुळें त्यांस आपल्या कामावरून दूर करण्यात येणार असल्याच्या बातम्या मध्यंतरीं प्रसिद्ध झाल्या होत्या, त्या आता खऱ्या ठरल्या आहेत जर्मन सरकाराचा लढाऊ खर्च वाढूं लागून लोकांवर कराचा बोजा अधिकाधिक जड होऊं लागला. ह्याचा ताण चलन पद्धति व हुडणावळीची व्यवस्था ह्याच्यावर पडूं लागली कच्च्या मालाची आयात मर्यादित करून पक्क्या मालाची निर्गत वाढल्यावांचून राष्ट्रीय व्यापाराचा ताळेबद जमेनासा झाला मध्यवर्ती बॅंकेचें चलनात्मक कार्य व्यवस्थितपणें चालवून हिटलरशाहीच्या धोरणास पाठिंबा देण्याची कसरत डॉ. शाख्ट ह्यांनीं आजवर मोठ्या हुशारीनें केली परतु हिटलर व त्याचें पचायतन ह्यांच्या उधळपट्टीच्या धोरणास सतत पाठिंबा देऊन जर्मनीच्या आर्थिक व्यवस्थेंत घोटाळे माजवण्याचें धोरण त्यास असह्य होऊन त्यांस हिटलर, जनरल गोरिंग इत्यादींस विरोध करणें प्राप्त झालें. राष्ट्राच्या हिताचा असला तरी कोणत्याहि प्रकारचा विरोध जर्मनीच्या हुकूमशहास सहन होणें अशक्यच होतें जर्मनीची सापत्तिक व्यवस्था अबाधित राखण्यात डॉ. शाख्ट ह्यानीं अपूर्व यश मिळवलें होतें आणि जर्मनींत व इतर राष्ट्रांत लोकाचा विश्वास सपादन केला होता. हे गृहस्थ अत्यत हुशार व महत्वाकाक्षी असून नात्सी पक्षाचें आर्थिक नेतृत्व आपल्या हातीं ठेवण्याची त्यानीं पराकाष्ठा केली आहे त्यास अधिकार-पदावर तर ठेवतां येत नाहीं, पण मंत्रिमडळातून त्यांचें उच्चाटनहि करता येत नाहीं अशी अडचणीची स्थिती हिटलर व त्याचे दोस्त ह्याची झाली होती. शेवटीं डॉ शाख्ट ह्याचें अर्थसचीवत्व त्याच्याकडून काढून घेण्यात आलें असून त्यास मत्रिमडळांत नावाला ठेवून घेण्यात आलें आहे. मध्यवर्ती बॅंकेचें अध्यक्षपद त्य चेकडे चालू रहावयाचें आहे. ही अर्धवट तडजोडीची व्यवस्था कशी काय टिकते हें सागणें कठीण आहे डॉ. शाख्ट ह्याच्या समूळ उच्चाटनाची ही पूर्वतयारी तर नाहींना?

---

### के आर आर नाबर

मुबई येथील स्टॉक एक्सचेंजचे एक प्रमुख सभासद ब्रोकर, श्री आर. आर नाबर, बी. ए, हे नुकतेच निवर्तल्याचें ऐकून त्यांच्याशी व्यवहार असणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व लोकास हळहळ वाटल्यावाचून रहाणार नाहीं. श्री नाबर ह्यानीं आज अनेक वर्षें यशस्वी रीतीनें आपला दलालीचा धद्दा चालविला होता व आपल्या सचोटीनें व कार्यक्षमतेनें शेअरबाजारात बहुमानाचें व आदराचें स्थान मिळविलें होतें. स्टॉक एक्सचेंजवरील धद्यामोडींचें ज्ञान सुशिक्षित तरुणास व्हावें व त्यानीं ब्रोकरच्या धद्यात पडून किफायतशीर कमाई करावी, ह्या हेतूनें त्यानीं आपला व्यवसाय संभाळून मार्गदर्शक अशीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. त्याच्या " Successful Speculation in Shares " ह्या मौल्यवान ग्रन्थाचें परीक्षण "अर्थ"च्या ता. २६ मे च्या अग्रलेखात आलेलेंच आहे बदला कसा करावा ह समजावून सागणारें एक पुस्तक ते लिहीत होते तें तयार झालें असल्यास, प्रसिद्ध होणें आवश्यक आहे श्री. नाबर ह्याचे सहकारी म्हणून आमचे मित्र, श्री. व्ही पी वर्दे हे गेलीं काहीं वर्षें काम करीत आहेत. त्यास बॅंकिंगच्या धंद्याची चांगली माहिती असून स्टॉक एक्स्चेंजच्या व्यवहाराचा चांगला अनुभव श्री नाबर ह्याच्या घरगुती नेतृत्वाखाली मिळाला आहे श्री वर्दे ह्याच्यावर आता नाबर कंपनीचा लौकिक टिकविण्याची जबाबदारी पडली आहे ते कंपनीची कार्यक्षमता व विश्वासार्हता कायम ठेवून तिच्या कीर्तींत भर घालतील अशी आम्हास सबळ आशा आहे

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज, पुणें

मराठा चेंबरची तिसरी वार्षिक साधारण सभा मंगळवार, ता. ३० नोव्हेंबर रोजीं भरली होती. त्यावेळीं चेंबरच्या १९३६–३७ या सालाच्या कामाचा अहवाल व जमाखर्चाचें पत्रक हीं मजूर करण्यांत आलीं अहवालाचे वर्षी चेंबरच्या पटावर ९८ सभासद होते कार्यकारी मडळाच्या एकूण ११ सभा झाल्या, त्यांत चेंबरच्या दृष्टीनें महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा करण्यांत आली पुणें म्युनिसिपालिटीनें लादू केलेला सोन्या-चांदीवरील कर, बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या भाडवलाची योजना, हिंदी विमा कायदा सुधारणा बिल, स्टॉक एक्सचेंज चौकशी कमिटी, मोटारींच्या सक्तीच्या विम्याचा प्रश्न, पुण्याची आर्थिक पहाणी, पुरदर तालुक्याची पहाणी, व्यापारी परीक्षा, इत्यादि अनेक महत्त्वाच्या प्रश्नावर चेंबरनें आपलें विचारपूर्वक मत व्यक्त केलें चेंबरचें कार्य ज्यास्त प्रभावी होणें तिच्या सभासदांचे उत्साहावर व सहानुभूतिपर सहायावर अवलंबून आहे

### " इंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्ह्यू "

ह्या त्रैमासिकाच्या ताज्या अकात अनेक महत्त्वाच्या विषयावर लेख प्रसिद्ध झाले आहेत हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रातात शेतकऱ्याच्या कर्जाचे निवारणासाठी कोणकोणत्या योजना अमलात आणल्या आहेत, ह्याचें विवेचन सहा लेखकानीं स्वतंत्र लेखांत केलें आहे बगलोर येथें जुलै महिन्यात भरलेल्या अखिल भारतीय सहकारी परिषदेचा सायत वृत्तांत प्रस्तुत अकात देण्यात आला आहे त्याचप्रमाणें अकात आलेली इतर विविध माहिती उपयुक्त आहे कर्जनिवारणाच्या कायदेशीर योजनाचें सध्याच्या परिस्थितींत, विशेषत: मुंबई इलाख्यात, विशेष महत्व असल्यानें प्रस्तुत अंकातील त्या विषयावरील लेखाचा सारांश सवडीप्रमाणे " अर्था " त आम्हीं देणार आहों


**ANNOUNCEMENT**

**Bharat Insurance Co. Ltd.**

**Laxmi Road, Poona 2**

As Bharat has decided to open 3 Sub-branches under Poona-Branch the applications for office Superintendent's post are invited from really capable persons, who can give monthly guaranteed business personally or through the agents appointed by them in the whole of Maharashtra. Monthly Salary Rs 100/- P. M Apply with credentials to the —

Secretary,
**Bharat Insurance Co. Ltd.,**
Laxmi Road, Poona City

**टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स**

सर्व प्रकारचे स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात ] प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,
मो. मु. टिळक

**औंध स्टेट सेंट्रल बॅंक लिमिटेड. औंध.**

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )
हेड ऑफिस–औंध (सातारा)

शाखा–आटपाडी, कुडल, गुणदाळ, बिचूद स्टेशन व दिघची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें–सोनें, चादी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.

B R. Vartak
मॅनेजर.

**न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत: खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो.—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था
(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता
" न्यू इंडिया " ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री डी के. जोगळेकर, बी ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें (२)

**नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,५०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९६,७१६ |
| सेव्हिंग्ज बॅंक ठेवी | ९,२०२ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,७८,८४६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ३६,६८३ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्क्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्र-व्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज

## इंग्लंडच्या औद्योगिक प्रगतींत कापडाच्या धंद्याचें स्थान

### अडीच हजार लोक काम करीत असलेलीं शिवण कामाचीं दुकानें

लेखकः—' शिवणकलाकुशल ' का रा झारापकर, डी एफ सी. ( लंडन ); जी. टी सी ( बॉंबे ); गोल्ड मेडॅलिस्ट, प्रिन्सिपॉल ' झारापकर टेलरिंग कॉलेज,' पुणें

इंग्लंडच्या व्यापारी समितीनें (Board of Trade ) आपल्या देशाच्या औद्योगिक प्रगतीचा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्या अहवालावरून असें दिसून येतें कीं गेल्या वर्षी इंग्लंडमध्यें इतर कोणत्याहि दुकानापेक्षां कापडाचे धंद्याचीं दुकानें जास्त निघालीं.इंग्लंडमध्यें गेल्या सालीं निरनिराळया धंद्याचे मिळून एकंदर ५५१ नवीन कारखाने निघाले व पूर्वीपासून जे चालत आले होते त्यापैकीं ३८६ कारखाने बंद झाले तसेंच, २०१ कारखानदारांनीं आपला व्याप वाढविला या कारखान्यां-पैकीं कापडासंबंधीच्या दुकानांचे आकडे पुढीलप्रमाणें आहेत.नवीन दुकानें १२७, वाढविलेलीं दुकानें २९, बंद झालेलीं दुकानें ९०. या आंकड्यावरून, एकंदर सर्व धंद्याच्या मानानें इंग्लंडांत कापडाचा धंदा किती मोठ्या प्रमाणांत चालत आहे याची सहज कल्पना येण्याजोगी आहे वर जीं १२७ नवीन दुकानें निघाल्याबद्दल लिहिलें आहे त्यापैकीं प्रत्यक्ष कपडे बनविणारीं ९३ दुकानें असून बाकीचीं दुकानें कपड्याच्या धंद्यास लागणारा माल पुरविणारीं आहेत. वरील ९३ दुकानांपैकीं खुद्द लंडनमध्येंच ४४ दुकानें आहेत.

तसेंच, एकंदर ५५१ धंद्याचीं दुकानें ( पाहिजे तर कारखाने म्हणा ) जीं निघालेलीं आहेत, त्यापैकीं परदेशी भांडवलावर चालत असलेलीं १० दुकानें असून त्यातील एकट्या कापडाच्या धंद्याचींच ५ दुकानें आहेत.

वरील सर्व माहितीवरून इंग्लंडमध्यें कापडाच्या धंद्याला किती महत्त्व आहे याची सहज कल्पना येण्याजोगी असली, तरी आपल्याकडील लोकाना इंग्लंडसारख्या देशात सर्व धंद्याचीं मिळून अवघीं ५५१ दुकानें ( किंवा कारखाने ) निघावीं याचें मोठेंसें महत्व वाटणार नाहीं. कारण आपल्याकडे पुण्यासारख्या ठिकाणीं देखील एकट्या शिवणकलेच्या धंद्याचीं सुमारें ७५-१०० तरी दुकानें निघत असतील. मग इतर सर्व धंद्याचीं मिळून किती दुकानें निघत असतील याची कल्पनाच करणें बरें !

आपल्याप्रमाणें तिकडील लोक एकट्या व्यक्तीच्या मालकीचें असें लहानसें स्वतंत्र दुकान न उघडता समाईक भांडवलाच्या मालकीचीं मोठमोठीं दुकानें उघडीत असतात यामुळें त्या धंद्यामध्यें होणाऱ्या नफानुकसानीचे परिणाम तें दुकान स्थापन करण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींनीं पैसा दिलेला असतो त्या त्या व्यक्तींना भोगावा लागत असल्यामुळें, त्या दुकानाच्या प्रत्येक हालचालीवर त्या भागीदाराचें अत्यंत बारकाईनें लक्ष असतें. कांहीं कारणांमुळें तें दुकान नुकसानींत येण्याचा संभव आहे असें दिसून आल्यास दुकानाचे भागीदार ताबडतोब तज्ञ इसमांची अशी एक कमेटी नेमून त्या कमेटीच्या सूचनानुसार त्या दुकानाची सर्व दृष्टींनीं पुनर्घटना करतात. त्या दुकानास कांहीं राष्ट्रीय घडामोडीमुळें किंवा अन्य कारणामुळें कांहींच फायदा होणार नाहीं असें दिसून आल्यास ती कमेटी ताबडतोब दुकान बंद करण्याबद्दल सूचना देते आणि दुकानाचे चालकहि आपल्या हेकेखोरपणामुळें दुकान चालविण्याचा हट्ट धरून जास्त नुकसानीस कारणीभूत न होतां ताबडतोब दुकान बंद करतात.

तिकडील दुकानांच्या विस्ताराची साधारणत. कल्पना यावी म्हणून १६, बेवीस मार्कस, लंडन येथें असलेल्या एका दुकानाची पुढें अत्यंत संक्षिप्तात माहिती दिलेली आहे ही माहिती देताना तिकडील कामकाजासंबंधीं माहिती देण्याऐवजी कामगाराना कसें वागविण्यात येतें याविषयीं मुद्दाम तपशील देण्यात येत आहे.

या दुकानामध्यें एकंदर अडीच हजार कामगार कामावर आहेत. सोमवार पासून शुक्रवार पर्यंतच्या कामगाराच्या कामाच्या वेळा पुढीलप्रमाणें आहेत

सकाळीं—८-१० ते ९-४५ आणि १० ते १२-५०
दुपारीं २ ते ४ आणि ४-१५ ते ६-३०
शनिवारच्या वेळा ८-१० ते ९-४५ आणि १० ते १
आठवड्यातील एकूण कामाचे तास ४८.

तिकडील ट्रेड्स् युनियन ( Trades Union ) च्या नियमाप्रमाणें कामगाराकडून आठवड्याला ४८ तासापेक्षां जास्त तास काम मालकास करून घेता येत नाहीं तसेंच,प्रत्येक ४॥ तासांच्या अवधीमध्यें कामगाराना विसावा म्हणून जीं १५ मिनीटें द्यावीं लागतात तीं पंधरा मिनीटें पगारांत धरलीं जात नाहींत

तेथील कामगारांच्या खाण्याच्या वेळा पुढीलप्रमाणें असतात. सकाळीं ९-४५ ते १० नंतर दुपारीं १२-५० ते २ पर्यंत 'लंच' व ४ ते ४-१५ पर्यंत चहा. ( सायकाळीं ६॥ वाजता रजा ).

कामगाराच्या सोईसाठीं दुकानाच्या मालकीचें एक उपहारगृह इमारतीच्या तळघरात आहे तेथेंच सर्व कामगार खाण्यासाठी जमतात. कारण एकतर लांब जावयास नको आणि दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे येथें बाहेरच्यापेक्षा स्वस्त माल मिळण्याची केलेली सोय ही होय. तसेंच कामगाराना खेळता यावें म्हणून एक स्पोर्ट्स सोसायटी स्थापन झालेली असून त्यातर्फे पिंगपॉंग, बिलीअर्ड इत्यादि खेळ आठवड्याला फक्त २ पेन्स देऊन खेळतां येतात. याशिवाय कामगाराचा फुटबॉल संघहि आहे.

तेथील प्रत्येक खात्यात मॅनेजर, फोरमन व फोर लेडीहि असते. आठवड्याला पगार देण्याच्या पद्धतीप्रमाणें प्रत्येक कामगाराला शनिवारीं पगार मिळत असल्यामुळें लोक शनिवारीं सायंकाळीं आणि रविवारीं सर्व दिवस मर्जेत वेळ घालवितात.

---

### मॅंचेस्टरच्या गिरण्यांतलीं यंत्रें काढून टाकलीं !

मंदीचा प्रभाव आणि मागणीचा अभाव ह्याचे योगानें मॅंचेस्टरमधील सुताच्या गिरण्यात काम काढणें नुकसानीचें होऊं लागलें मागणीच्या मानानें सुताचें उत्पादन व पुरवठा अधिक झाला. मालाच्या किंमती उतरल्या आणि सूत कांतणाऱ्या सर्वच गिरण्यास तोटा येऊं लागला म्हणून पार्लमेंटच्या संमतीनें एक योजना अमलात आणली गेली आणि तिला अनुसरून कांहीं कारखान्यातलीं सूत कातण्याचीं यंत्रें बंद ठेवण्याचें व काढून टाकण्याचें ठरलें. चात्यांची संख्याच कमी झाली म्हणजे उत्पादन मर्यादित होईल ह्या कल्पनेनें सदरहु योजनेचा खर्च शिल्लक राहिलेल्या कारखानदारांनीं सोसावा अशी व्यवस्था झाली. ह्या योजनेस अनुसरून गेल्या वर्षी ४८ कारखान्यांतल्या सुताच्या चात्या काढून टाकण्यांत आल्या आणि त्यास सुमारें एक कोटि रुपये खर्च आला !

# सहकारी चळवळ

## येलूर को सुपरवायझिंग यूनिअन लि. जि. सातारा

वरील संस्थेची वार्षिक साधारण सभा ता ३१-१०-३७ रोजीं श्री आत्माराम नाना पाटील एम. एल ए याचे अध्यक्षतेखाली भरली होती. सदर सभेस सोसायट्यांचे प्रतिनिधि व इतर सभासद व सर्व सेक्रेटरी आणि अधिकारी व गावांतील रहिवासी मिळून १५० लोक हजर होते सभेत यूनिअनच्या कामगिरीचें व सोसायट्याच्या परिस्थितीचें निवेदन वाचण्यात आलें.

यूनिअनला २० क्रेडिट सोसायट्या व ४ नॉन क्रेडिट सोसायट्या सामील आहेत. क्रेडिट सोसायटयांमधून १८९७ सभासद व्यवहार करीत आहेत या पैकीं कर्ज घेणारे सभासद १४६० आहेत व त्यांचेकडे २,५२,६०४ रु. कर्ज आहे वसुली समाधानकारक होत आहे खेळत्या भांडवलाशीं थकबाकीचें प्रमाण शेकडा २४ आहे सोसायट्यांचे खेळतें भांडवल ३,०९,८०६ रु आहे या पैकीं स्वतःचें भांडवल १,८०,९४० रु म्हणजे शेकडा ५८% आहे. सोसायट्यांनीं आपले व्यवहारांत साठविलेला रिझर्व्ह फंड १,०४,०८२ रु व मेंबर ठेवी ६८,२०६ आहे सवलतीचे योजनेचा फायदा या भागचे सोसायट्यांनीं उत्तम प्रकारें घेतल्याचें दिसून येते या योजनेचे मुदतींत सोसायट्यांनीं एकूण २८,७४८ रु सूट सभासदांना दिली आहे युनिअन "अ" वर्गात दाखल आहे

सोसायट्यांची ऑडिट वर्गवारी—(अ) ४ (ब) १२ (क) ४ (ड) ० एकूण २० अशी. सर्व सामील सोसायट्यांनीं आपले धर्मादाय फंडातून रक्कम जमा करून त्यातून येलूर येथें या भागाकरता एक प्रसूतिगृह व बालसंगोपनगृह ही संस्था चालविली आहे.

येथील यूनियननें खालीलप्रमाणें योजना हातीं घेतलेल्या आहेत

(१) सोसायटयांचे सभासद-शेतकऱ्यांचे मुलांना दुय्यम धंद्याचे शिक्षण देणेकरिता इंडस्ट्रियल स्कूल सुरू करणें, या योजनेंत कपड्यांचे बाबतींत प्रत्येक गाव-स्वावलंबी करणेचे योजनेचा समावेश आहे

(२) सोसायटयांनीं आपले सभासदांचे आयुष्याचा विमा उतरणें

(३) सोसायटयांचे सभासदांचा प्रपंचांतील जमाखर्च दर आठवड्यास सोसायटीमार्फत लिहून देणें,

(४) सोसायटयांचे सभासदांकरतां लागणारे सामानाचा स्टोअर चालविणें.

(५) या भागांतील पानमळेवाल्या शेतकऱ्यांची संघटणा करून त्यांचे अडचणींची दाद लावून देणें.

(६) सोसायटयांचे सेक्रेटरी व इतर कार्यकर्ते याना तज्ञांचे व्याख्यानद्वारें सहकारी चळवळीचें सांगोपांग शिक्षण देणें"

याप्रमाणे कामाची आखणी करून त्याप्रमाणें सुरवात केल्याचें दिसून येतें सभेतील इतर कामें झाल्यानतर अध्यक्षांनीं आपलें समारोपादाखल भाषण केलें व यूनियननें आपले क्षेत्रांत अनेकविध कामगिरी केलेली आहे, त्याची प्रशंसा केली.

### सोलापूर जिल्हा को इन्स्टिटयूट

सोलापूर शहरात व सोलापूर जिल्ह्यांतील सोसायट्यांच्या प्रत्येक गावीं अखिल भारतीय सहकारी दिन ता ६ नोव्हेंबर रोजीं पाळण्यांत आला प्रत्येक ठिकाणीं सहकारी चळवळीवर निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें होऊन संदेश वाचून दाखविण्यात आला व सहकारितेच्या दहा मुद्यांची प्रत्येक सभासदास जाणीक करून देण्यांत आली.

वाचून दाखविण्यांत आलेला संदेश:—

"सहकारी चळवळीचा कोणत्याहि इतर चळवळींशीं, संस्थेशीं अगर व्यक्तींशीं हेवा-दावा अगर चुरस असण्याचें कांहीं कारण नाहीं समतेच्या भूमिकेवर एकत्र येणाऱ्या सर्व बांधवांचें जीवन, आहे त्यापेक्षा जास्त चांगलें करण्यासाठीं त्यांची आर्थिक, नैतिक, बौद्धिक व शारीरिक उन्नती करण्याचें ध्येय सहकारितेनें आपल्यापुढें ठेविलें आहे हें ध्येय साध्य होण्यासाठीं आम्हीं न्याय, नीति, प्रामाणिकपणा आणि चिकाटी या गुणांचा आश्रय केला पाहिजे.

"कोणालाहि विरोध करण्याचा जरी आमचा हेतु नसला तरीदेखील आम्हांवर होणाऱ्या आघातांना तोंड देण्यासाठीं आम्हास सदैव तत्पर राहिलें पाहिजे. कोणत्याहि सैन्यांत ज्याप्रमाणें शिस्तीला अत्यंत महत्व असतें त्याचप्रमाणें या सहकारी चळवळीच्या स्वयंसेवकामध्येंहि शिस्त असणें जरूर आहे. म्हणून आम्हीं इतर गुणांबरोबर शिस्तीचें पालन करण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करू."

### मालेगाव ता. (जि नाशिक) सहकारी वृत्त

(१) बॉंबे प्रॉ. को बॅंक लि (मालेगाव शाखा) हिनें खरेदीविक्रीचें काम हातीं घेऊन बॅंकेच्या दुकानामार्फत मालाची विक्री करण्यासाठीं खाकुर्डी, निमगाव, झोडगे व मालेगांव येथें नोव्हेंबर महिन्यात निरनिराळ्या तारखेस सभा बोलावून दुकानांमार्फत माल विक्रीची योजना समजावून दिली

(२) मालेगाव तालुक्यातील संगमेश्वर, निमगाव, सौंदाणें, येसगाव खुर्द, येसगाव बु॥ टेहेरे व सोयगाव येथील महार लोकांची विणकर सोसायटी काढण्यासाठी ठिकठिकाणी सभा बोलावून शेअरभांडवल गोळा करण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु अद्याप त्यास मूर्तस्वरूप प्राप्त झालें नाहीं

### खेड येथें सहकारी दिन

खेड येथें पुणें सेंट्रल को. बॅंक लि. खेडशाखा कचेरींत तारीख ६।११।१९३७ रोजीं सायंकाळीं ५ वाजता श्री आर. एम. शेटये बी. ए. एलएल बी. सबजज्ज खेड यांचे अध्यक्षतेखालीं अखिल-भारतीय सहकारी दिन साजरा करण्यात आला

सभेचे सुरवातीस श्री कृष्णाजी पुरुषोत्तम दीक्षित, चेअरमन खेड सोसायटी, यानीं श्री आर एम शेटये यांनीं आजच्या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना केली व त्यास श्री रघुनाथ वामन जोशी, चेअरमन, खेड अर्बन बॅंक यांनीं अनुमोदन दिल्यानतर अध्यक्ष स्थानापन्न झाले

प्रथमत स्वागताध्यक्ष श्री. परशुराम भगीरथ आपटे, वकील, यानीं जमलेल्या मंडळीचें स्वागत करून सहकारी दिनाचें महत्त्व व सहकारी चळवळ आरंभापासून वाढीस कशी लागली व त्या दृष्टीनें कायद्यात वेळोवेळीं सुधारणा कसकशा करण्यात आल्या याबद्दलची तपशीलवार माहिती सांगितली तसेच सहकारी चळवळीचा जास्तींत जास्त फायदा सर्वसाधारण समाजासहि कसा करून घेता येईल हेंहि त्यानीं स्पष्ट केलें याबरोबरच खेड येथील उत्साही वकील श्री. हरी कृष्ण भिडे यानीं शाळेतील मुलांकरिता सहकारी पद्धतीवर स्टोअर स्थापन करणेबाबत केलेला उपक्रम लहान मुलांत सुरवातीपासून सहकार्याची गोडी लावणेचे दृष्टीनें अत्यंत स्तुत्य आहे हेंहि त्यानीं प्रामुख्यानें नजरेस आणलें नंतर खेड-ग्रूप सोसायटीचे सेक्रेटरी मि. लोहोगावकर यानीं इन्स्टिटयूटकडून आलेला संदेश वाचून दाखविला

### कोल्हापूर अर्बन को. बँक लि.

वरील बँकेच्या सभासदांची संख्या २,५५० आहे. रिझर्व्ह फंड ५२ हजारांचा असून इतर फंडात एकूण ५२ हजार रु. आहेत ठेवी २½ लक्ष रुपयांच्या आहेत बँकेनें ५० हजार रु सरकारी रोखें इत्यादींत गुतविले असून २ लक्ष, ५६ हजार रु कर्जाऊ दिले आहेत. १९३६–३७ अखेर बँकेस ४,०५८ रु नफा उरला, त्यांतून भागीदारांस ६¾% दरानें १,३९३ रु देण्याचें ठरलें बँकेची एकूण थकबाकी १ लक्ष, १५ हजार रु म्हणजे एकूण कर्जाच्या ४५ ३% इतकी आहे थकबाकीच्या वसुलीचा शक्य तो प्रयत्न बँक करीत आहे. एक हजारावरील लांब मुदतीचीं कर्जे देण्याचें बँकेनें शक्य तितकें कमी केलें आहे कर्जासबधीं तडजोड करण्यासाठी कमिटीहि नेमण्यात आली आहे बँकेवरील जनतेचा विश्वास ठेवींवरील दर उतरले तरी त्यात वाढ होत आहे, ह्यावरून स्पष्ट होतो

### शेतीच्या प्रश्नांकडे सरकारचें वाढतें लक्ष

हिंदी मध्यवर्ति सरकार. व प्रांतिक सरकारें ह्यांनीं मिळून १९३५–३६ सालीं शेतकी खात्यांवर १ कोटि, ३८ लक्ष रु, म्हणजे १९३४–३५ पेक्षा १५ लक्ष रु. ज्यास्त खर्च केले इंपिरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चला मध्यवर्ति सरकारकडून ९½ लाखाची ग्रँट मिळाली, त्यापैकीं २½ लक्ष रु. साखरेच्या धंद्याबाबतच्या सशोधनावर खर्चण्यात आले. विशेष आर्थिक उपयुक्ततेच्या योजनावर खर्चण्याकरितां मध्यवर्ति सरकारनें २१½ लक्ष रु. दिलें, ते वेगळेच. जनावराची आयातीपेक्षां निर्गत ८ कोटि रुपयांनीं जास्त झाली.

### कॉफीचा खप वाढविण्याचे प्रयत्न

इंडियन कॉफी सेस कमिटीनें १९३६-३७ सालीं कॉफीच्या प्रचारकार्यावर ५२ हजार रु. खर्च केले. मद्रास इलाख्यातील सेलम जिल्ह्यांत दारूबदीमुळें कॉफीचा खप वाढत आहे. चालू वर्षी पुणें अगर अहमदाबाद येथें कॉफीचा प्रसार वाढविण्यासाठी प्रचारगृह स्थापन होण्याचा सभव आहे व त्याकरितां कमिटीनें २,८५० रु मजूर केले आहेत.

### अहमदाबाद येथें अलाहाबाद बँक लि ची शाखा

अलाहाबाद बँक लि च्या अहमदाबाद येथील शाखेचें उद्घाटन ता. २२ नोव्हेंबर रोजीं सर चिनुभाई माधवलाल, ह्यांचे हस्तें झालें.

### ट्रेझरी बिलांवर १२ आ ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें ता २३ नोव्हेंबर रोजीं दोन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आ ११ पै इतका पडला.


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए., एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजेंट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु (ट ख निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

**गव्हाचे पोहे**

(REGD) **( BLOSSOM )** (REGD)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात विशेषत: लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधातून खाता येतात.

७५३ सदाशिव पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## ग्रामोद्योगाच्या योजना

### अ भा. ग्रामोद्योग संघाशी सरकारचे सहकार्य

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या मुंबई इलाख्याच्या शाखेनें मुंबई सरकाराकडे खेडेगावातील उद्योगधंद्याच्या वाढीसंबंधीं कांहीं योजना आंखून पाठविल्या होत्या, त्या सर्व मंजूर झाल्या असून, त्यांवर चालू वर्षी खर्चण्यासाठी सरकारनें ८,५०० रु देण्याचें ठरवलें आहे.

शिंदीच्या गोड रसापासून गूळ तयार करण्याचें शिक्षण देण्याकरितां पाच केंद्रें स्थापण्यासाठी ७,०५० रु. मंजूर झाले आहेत प्रत्येक केंद्रांत ४० विद्यार्थ्यांस प्रवेश मिळेल व त्याचे २० विद्यार्थ्यांचा एक, असे दोन वर्ग करण्यात येतील दीड ते दोन महिन्यांत शिक्षणक्रम पुरा होईल निवड केलेल्या विद्यार्थ्यांस दरमहा ज्यास्तींत ज्यास्त १० रु. शिष्यवृत्ति मिळेल व त्याच्या रहाण्याची व जेवण्याखाण्याची व्यवस्था केली जाईल ताडी गाळणाऱ्या स्थानिक जातींस प्राधान्य मिळेल वर्गाविषयीं ज्यास्त माहिती प्रत्येक केंद्राचे ठिकाणच्या प्रतिनिधीकडून मिळेल केंद्रें पुढील ठिकाणीं आहेत:—

(१) बोर्डी (ठाणें) प्रिन्सिपॉल एस. आर. भिसे
(२) हरिपुरा (सुरत) श्री. जगत्राम दवे
(३) होसुर (बेळगांव) श्री. गंगाधरराव देशपांडे
(४) होनावर (उत्तर कानडा) श्री एम के. कलापूर
(५) विलेपार्ले (मुंबई उपनगर) श्री गोकुळभाई भट्ट

वर्धा येथील ग्रामसेवक शाळेंत शिक्षण घेणारांसाठी ३ महिने मुदतीच्या दरमहा १० रुपयाच्या २० शिष्यवृत्त्या देण्यासाठी सरकारनें ६०० रु मंजूर केले आहेत, त्यापैकीं १० शिष्यवृत्त्या कागदाचे धंद्याकरिता व १० तेल गाळण्याचे धंद्यासाठी राखून ठेवल्या आहेत

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघामार्फत येणाऱ्या नमुन्याची परीक्षा पुणें येथील शेतकी कॉलेजांत ॲग्रिकल्चरल केमिस्टच्या प्रयोगशाळेंत मोफत होण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. संघानें शिफारस केलेल्या ग्रामोद्योगासंबंधीं पत्रकें प्रसिद्ध करण्याकरिता सरकारनें ३०० रु खर्चण्याचें ठरविलें आहे कातडी कमावण्याच्या धंद्याविषयींचें चोपडें तयार होत आहे

बैलांनीं ओढावयाच्या तेलाच्या घाणींत संघानें सुधारणा केली आहे ह्या सुधारलेल्या घाण्याच्या प्रसारार्थ ५५० रुपयाची ग्रँट मिळावयाची आहे

### नेपच्युन विमा कं. लि

वरील आयुर्विमा कंपनीनें ३१ जुलै, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी एकूण ३४ लक्ष, ६५ हजार रुपयाच्या ३,९७० विमा पॉलिसी दिल्या हप्त्याचें उत्पन्न ३ लक्ष, ६४ हजार रु झालें व विमासातीं फंड ३ लक्ष, ६४ हजार रु. झाला प्रत्येक पॉलिसीची सरासरी किंमत गेल्या सालीं ६६२ रु. होती, ती आतां वाढून ८७३ रु झाली आहे खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण ४७ टक्के पडलें कंपनी स्वतःच्या मालकीची इमारत बांधण्याच्या विचारात आहे. शेठ विठ्ठलदास गोविंदजी हे कंपनीचे अध्यक्ष आहेत

### इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स व वायरमेन यांच्या परीक्षा

इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स व वायरमेन ह्याच्या परीक्षेस गुरुवार ता. २७ जानेवारी, १९३८ रोजीं प्रारंभ होईल. मुंबई, पुणें, अहमदाबाद, व कराची ह्या चार ठिकाणीं परीक्षा घेतली जाईल

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठवरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणांवर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारातील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. २ ट. ख. १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्च माफ.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—
धी इंडो फॉरिन एजन्सीज (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणे शहर

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १२०–११ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन .. ... ... | १०५—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८– ६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८–१०½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६–१० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भाडवल व कसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१०० — ५०) १०% ... ... | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३०—६ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% .. ... | १५९३–१२ |
| बाँबे प्रॉ को बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२६—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४–१२ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९४६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% .. ... | ११५–१० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% . ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% ... ... | १४३७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% ... ... | १५३०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु ... ... ... | १७८—२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु ... ... ... | २४–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ. ... | ४२—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु. बोनस ... | ४६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% ... ... | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३०९—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १३७०—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्यक तोळ्यास ... ... | ३४–९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०—१ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—९ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११–४ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | ११—२ |

### ( मं ) जुळाबाईंचें अभिनंदन

लंडनमध्यें रहाणारी एक गरीब स्त्री आपल्या अकरा मुलांचा संसार सुखानें करीत असल्याबद्दल राजमाता क्वीन मेरी ह्यांनीं तिला अभिनंदनपर संदेश पाठवला आहे मिसेस प्लेजर ह्या नावाच्या ३९ वर्षांच्या त्या बाईस गेल्या वीस वर्षांत १६ अपत्यें झालीं आहेत त्यापैकीं ५ जुळीं मुलें आहेत. जिवंत असलेलीं ११ हि मुलें चांगलीं धष्टपुष्ट असून त्यांची माता आनंदांत आहे. पांच जुळयास जन्म दिल्याकारणानें मिसेस प्लेजर ह्यास इष्ट-मित्र शेजारी प्रेमानें "जुळाबाई" म्हणतात स्त्रियास मुलांची आवड असावी असें त्यांचें मत असून संततिनियमन त्यांस पसंत नाहीं.

## पुणें येथील स्मॉल कॉज जज यांचे कोर्टांत

### मुक्काम पुणें येथें

दिवाणी मुकदमा नंबर ६९३६ सन १९३६ पैकीं

रशीद खुदादाद आणि कं. ईस्ट स्ट्रीट, कँप पुणें, या फर्मचे मालक } वादी

विरुद्ध

बी. जी. हडे, रा शनवार वाडा मोटार स्टँड, पुणें } प्रतिवादी

प्रतिवादी यास:—

ज्यापेक्षा वादी यानें तुम्हावर तुम्ही उधारीनें पेट्रोल, ऑईल वगैरे माल नेला, त्याबद्दल जे रुपये येणें निघाले रु. १५८१४ त्याबद्दल दावा केला आहे, त्यापेक्षा सदरहू दाव्याचा जबाब देण्यासाठीं ता. ३ माहे १२ सन १९३७ रोजीं दिवसां ११ वाजता जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्यासंबंधीं सर्व मुख्यांच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल, किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊ शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्याबरोबर असेल अशा प्लीडराच्यामार्फत या कोर्टांत हजर होण्याविषयीं या लेखावरून तुम्हास समन्स करण्यांत येत आहे, व तुम्हीं हजर होण्यासाठीं जो दिवस ठरविला आहे तो दाव्याच्या अखेर निकालासाठीं नेमिला आहे. यास्तव ज्याच्या जबानीवरून व ज्या दस्तऐवजावरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तसे सर्व साक्षीदार व तसे सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्यास तुम्हीं सिद्ध असलें पाहिजे

तुम्हास नोटीस देण्यात येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं तुम्हीं हजर न झाल्यास तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

तसेंच तुम्हास अशीहि नोटीस देण्यात येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यात तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यात येणार नाहीं.

आज तारीख २२ माहे ११ सन १९३७ रोजीं आमच्या सही-निशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिलें.

Sd S. V. Chinmulgund,
for Registrar.

शिक्का

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २५, किंवा प्रथम ६।८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई

ब्रँच.—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणे नं २.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ.—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्


## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं, अहमदाबाद

## R. B. Jog & Sons

**Deccan Gymkhana, Poona 4**




Big Stock of Shell Oils & Greases Motor Washing & Cleaning Motor Oiling & Greasing Moderate Charges




पुणें एजंटः—ठाकूर आणि कं, जोगेश्वरी नाका, पुणें २

## भारतीय अर्थशास्त्र

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०, किंमत पांच रुपये

प्रथमत अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढे हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरश विचार केलेला आहे हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचे सांगोपांग विवेचन केलेले वाचकास आढळेल.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं १९५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२५।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान.' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख ८ डिसेंबर, १९३७ अंक ४८

## टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

सर्व प्रकारचे स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात ]
मो. मु. टिळक
प्रो मेकॅनिकल इंजीनिअर,

जुन्या घराची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते
भेटा अगर लिहाः—
**भाऊ गंगाधर साठे**, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें

## दी प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : बेंगलोर
शाखा . मुम्बई, दादर, पुणे, पुणें शहर, सोलापूर, पांचगणी, कऱ्हाड
चेअरमन : खानसाहेब हाजी कासम, अेम्, अेल, सी
प्रेसिडेंट, कऱ्हाड म्युनिसिपालिटी
मॅनेजिंग डायरेक्टर : अेस पी ठाकर
चालू ठेवी द सा द शें २% सेव्हिंग्ज बँक ठेवी. द सा द शें ३%
मुदतीच्या ठेवीच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात सविस्तर माहितीकरिता बँकेकडे चौकशी करा
डॉ जी एस् गोरे, अेजट १७ मेन स्ट्रीट, पुणें
अेच जी गद्रे, बी अेससी, अेजट, लक्ष्मीरोड, पुणे शहर
८७१५

— मनपसंत काम —
वक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

उत्तम प्रकारचा शक्तिवर्धक

## सुवर्ण–मालिनी वसंत

आठ रुपये तोळा ( मुद्दाम किंमत उतरविली आहे )
— खास हिवाळ्याकरितां पौष्टिक 'च्यवनप्राश' —
त्रिभुवनकीर्ति-गंधकरसायन-सुवर्णभस्म-मौक्तिकभस्म-चंद्रप्रभा हेमगर्भमात्रा-सुवर्णराजवंगेश्वर-रससिंदूरमात्रा-
हिंगाष्टकचूर्ण-स्वादिष्ट विरेचनचूर्ण योगराज गुग्गुळ—अशोकारिष्ट—जंब्वासव—विडंगारिष्ट
शिवाय भस्में, आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे औषधी—सूचिपत्रक मागवा
गेलीं १५ वर्षे लोकादरास पात्र झालेला आयुर्वेदीय औषधें तयार करणारा मोठा कारखाना

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

डेक्कन जिमखाना : : : : पुणें ४
आयुर्वेद महाविद्यालय मंडळाच्या व्यवस्थेखालील ह्या कारखान्यात होणारा सर्व नफा आयुर्वेद-शिक्षण व संशोधन ह्यांकडे खर्च केला जातो

## विविध माहिती

### केसर-इ-हिंद बोटीचा अखेरचा प्रवास

पी. अन्ड ओ. कंपनीची " केसर-इ-हिंद " आगबोट आतां जुनी झाली असल्यानें तिला वहातुकीस नालायक ठरविण्यांत आलें आहे. ही आगबोट २३ वर्षांपूर्वी बांधण्यांत आली. तिनें मुंबईच्या १०४ खेपा केल्या आहेत व १५,०८,५८१ मैल प्रवास केला आहे. मुंबई बंदरांतून तिनें नेलेल्या व आणून पोंचविलेल्या उतारूंची संख्या ५५ हजार भरते. गेल्या शनिवारीं ह्या बोटीनें मुंबईचा अखेरचा निरोप घेतला. चीनकडे एकदा जाऊन आल्यावर तिचे भाग सोडविण्यांत येतील.

### अहमदाबाद येथील नवे पूल

अहमदाबाद शहराजवळून साबरमती नदी वहाते. ही नदी ओलंडण्यास " एलिस ब्रिज " हा पूल सध्याच्या वाढत्या वहातुकीस अपुरा पडतो. नदीपलीकडे नवीन वसती झाली आहे व तींत झपाट्यानें भर पडत आहे. पुलासबधाची ही अडचण ध्यानांत घेऊन शहर म्युनिसिपालिटीनें दोन नव्या मोठ्या पुलांचें काम हातीं घेतलें आहे. आणखीहि कांहीं लहान पूल बांधण्यांत यावयाचे आहेत. ह्या सर्व योजनेस २५ लक्ष रु. खर्च येईल, असा अजमास आहे.

### बंगालमधील कपास-कापडाच्या गिरण्या

बंगाल प्रांतात कपास कापडाच्या २२ गिरण्या आहेत, परंतु लवकरच त्यांमध्यें कित्येक नवीन गिरण्यांची भर पडण्याचा संभव आहे. कपाशीच्या क्षेत्रापासून बंगाल फार दूर असल्यानें कच्च्या मालावरील जबर वहातुक गिरण्यास सोसावी लागते. तथापि, बंगालमध्यें सालिना ४२ कोटि रुपयाचें स्थानिक गिऱ्हाइक आहे, ही तेथील गिरण्यांचे दृष्टीनें फायदेशीर गोष्ट आहे. बंगाली लोक गिरण्यांत काम करण्यास इतके दिवस नाखूष असत; आतां ही परिस्थिति पालटली असल्यानें तेथील गिरण्या वाढीस लागण्याचा रंग दिसतो.

### मुंबईमधील बँकांच्या स्थानिक शाखा

मुंबई शहरांतील बँकिंगचे व्यवहार कोटांत केंद्रीभूत झालेले आहेत. आतां तेथील बँकानीं क्रॉफर्ड मार्केटाचे आसपास हिंदी व्यापारी भागात शाखा स्थापण्यास सुरवात केली आहे. ब्रिटिश एक्सचेंज बँकाहि तिकडे सरकूं लागल्या आहेत.

### लष्कराच्या यंत्रीकरणामुळें हिंदी सैनिकांची नोकरी जाणार !

हिंदी लष्कराच्या यंत्रीकरणाकरितां जादा खर्च लागेल, तो हिंदुस्थान सरकारास झेपण्याजोगा नाहीं, ह्यासाठी लढाऊ सामुग्रीप्रीत्यर्थ भांडवलवजा करावयाच्या खर्चाकरितां ग्रेटब्रिटननें हिंदुस्थानास ८० लक्ष रु देणगीदाखल देण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेच्या विनियोगासंबंधाची योजना हिंदुस्थान सरकारनें जाहीर केली आहे, तीवरून, कांहीं हिंदी सैनिकास आपल्या नोकरीस मुकावें लागेल, असें दिसतें. त्यांपैकी शक्य तेवढ्या लोकांची सैन्यातच सोय लावण्याचा अर्थातच यत्न करण्यांत येईल.

### चांदीची बनावट नाणीं किती हुडतात ?

सरकारी तिजोऱ्या आणि रेल्वेजचीं ऑफिसें ह्यांमध्यें येणारीं बनावट नाणीं तोडतात, त्यांची वार्षिक किंमत सरासरीनें पावणेदोन कोटि रुपयांच्या वर होते. ह्यांत रुपयाचेंच नाणें दीड कोटींचें असतें.

### हिंदुस्थानांतील संयुक्त भांडवलाच्या मंडळ्या

जुलै, १९३७ मध्यें सबंध हिंदुस्थानांत मिळून संयुक्त भांडवलाच्या ९२ मंडळ्या रजिस्टर झाल्या, त्यांपैकीं ३० मंडळ्या बंगालमध्यें निघाल्या. ४१ मंडळ्या त्या महिन्यात गुंडाळण्यांत आल्या.

### लाहोर येथील औद्योगिक परिषद

लाहोर येथें ता. १५ व ता. १६ डिसेंबर रोजीं एक औद्योगिक परिषद भरविण्यात येणार आहे, तीमध्यें भाग घेण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें प्रमुख प्रांत व संस्थानें ह्यांस निमंत्रण केलें आहे.

### चलनी नोटांची तुलनात्मक लोकप्रियता

चलनी नोटांच्या लोकप्रियतेबाबत १० रुपये किंमतीच्या नोटीचा पहिला नंबर लागतो. ह्या नोटीची किंमत सामान्य व्यवहारांत अत्यंत सोयीची होते. एकूण खेळत्या नोटांपैकीं ४० टक्के ह्याच नोटा असतात. त्यांच्या खालोखाल १०० रुपये किंमतीच्या नोटा येतात आणि त्यांचें खेळण्यातलें प्रमाण ३६ टक्के आहे.

### विदेशी तज्ञांची आयात—आणखी एकाची भर ?

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे अधिकारांतील कीटकतज्ञाची जागा भारी पगारावर एक युरोपियनास देऊं करण्यांत आली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ही जागा भरण्यापूर्वी, हिंदुस्थानात त्यासाठी अर्जे मागविण्यांत आले नव्हते, ह्या टीकेस सर जगदीश प्रसाद ह्यांनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें उत्तर देण्याचा यत्न केला. नेमणूक हिंदुस्थान सरकारचे हातातील नाहीं व इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या सल्लागार मंडळानें नेमणुकीबाबत शिफारसी केल्या असल्या तरी कौन्सिलची सभा १३ डिसेंबरच्या आत होणार नाहीं असा त्यांच्या खुलाशाचा आशय होता.

### दिल्ली प्रांतांतील ग्रामसुधारणा

दिल्ली प्रांतामध्यें ३८१ खेड्यांचा समावेश होतो. ह्या प्रांतांतील ग्रामसुधारणेची ४ लक्ष रुपयाची योजना चीफ कमिशनर, मि. जेंकिन्स, ह्यांनीं जाहीर केली आहे. जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करून शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढविल्याखेरीज त्यांची रहाणी सुधारणें शक्य नाहीं असा मि. जेंकिन्स ह्याचा अभिप्राय आहे. रस्त्यांची सुधारणा, बळू व इतर जनावरांकरितां सालिना १० हजार रुपयांची तरतूद, आरोग्याची मोहीम, प्राथमिक शाळांची स्थापना, इत्यादि योजना मि. जेंकिन्स ह्यांनीं आखल्या आहेत.

### लॉईड्स बँकेची मुंबई शहरांतील नवीन शाखा

लॉइड्स बँक लि. ह्या ब्रिटिश एक्सचेंज बँकेनें आपली एक शाखा मुंबई शहरातील प्रिन्सेस स्ट्रीटवर गेल्या आठवड्यात सुरू केली कोटांत तिची दुसरी शाखा आहेच लॉइड्स बँक ही पांच प्रमुख ब्रिटिश बँकांपैकीं एक असून तिच्या ग्रेटब्रिटनमध्यें १,९०० शाखा आहेत. व्यापारी पेठेंत शाखा उघडून आतां लॉइड्स बँक हिंदी व्यापारी बँकांच्या व्यवहाराचा कांहीं भाग पटकावील, हें उघड आहे. गरजेच्या मानानें बँकिंगची सोय अपुरी पडते ही अडचण दूर करण्यासाठी नव्या शाखेची योजना असेल तर ठीक आहे, नाहीं तर हिंदी बँकांशीं तिची स्पर्धा होण्याचा संभव आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| २१-११-३७ ते २७-११-३७ | २९,४९,२७३ |
| २८-११-३७ ते ४-१२-३७ | ९,६४,८९१ |
| २१-९-३१ ते ४-१२-३७ | ३,०६,६०,८१,२१६ |

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ५८८ |
| २ न कर्त्यांचा वार शनवार! | ५८९ |
| ३ विजेच्या दराबाबत चौकशी | ५९० |
| ४ स्फुट-विचार शाळांतील अभ्यासक्रमात व्यावसायिक शिक्षणाचा समावेश–व्यावसायिक शिक्षणाच्या सरकारी शाळा–हिंद-ब्रिटन व्यापारी करारार्चे घोडें अडलें कोठें!–सरकारी नोकराचे पगार कायमचे कमी होणार!–जर्मनीमधील मोटारीचे नवीन रस्ते | ५९१ |
| ५ अ भा ग्रामोद्योग संघ | ५९३ |
| ६ सह्याद्रि विमा क लि. | ५९४ |
| ७ मराठा चेंबरचें सरकारला पत्र | ५९४ |
| ८ कॅश सर्टिफिकिटास ओहोटी लागली | ५९५ |
| ९ पो सेव्हिंग्ज बँकांतील शिल्लक | ५९५ |
| १० निवडक बाजारभाव | ५९७ |

**अर्थ**

बुधवार, ता ८ डिसेंबर, १९३७

## न कर्त्यांचा वार शनवार!

### लहान स्वदेशी धंद्यांस सहाय हवे

हिंदुस्थान सरकारनें लहान-सहान स्वदेशी धंद्यांस परदेशी, विशेषत: जपानी, मालाची स्पर्धा सोसावी लागते, त्यासंबंधांत चौकशी करून विशिष्ट धंद्यांस सहाय देण्याची आवश्यकता आहे कीं काय हें पहाण्यासाठी श्री. नेहरू ह्या अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. हिंद-जपान व्यापारी कराराच्या वाटाघाटी चालल्या होत्या त्यावेळीं कपाशीची निर्गत व कापडाची आयात ह्या बाबींसच चर्चा मर्यादित न करता अनेक देशी लहान-मोठ्या धंद्यास जपानची स्पर्धा भोवते, त्याचाहि विचार अवश्य व्हावा अशी सूचना सरकारास करण्यात आलेली होती. तिचा उपयोग होऊन हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाची चौकशी तात्काळ हातीं घेतली ह्याबद्दल स्वदेशी धंद्याच्या चालकास व जनतेस समाधान वाटलें. सरकारची ही तत्परता पाहून कित्येकांस सानंद आश्चर्यहि वाटल्यावाचून राहिलें नसेल. श्री नेहरू ह्यांची चौकशी चालू होऊन त्यांनीं आपल्या कामात कांहीं प्रगतिहि केली. पण मध्येंच माशी शिंकली आणि त्यांची चौकशी तहकूब केली असल्याची बातमी प्रसिद्ध झाली जपान चीन देशाशीं युद्ध करण्यात गुंतल्यामुळें जपानी स्पर्धेची धार बोथटली असून ज्यासाठी श्री. नेहरूंची चौकशी चालली होती तें कारणच नाहींसें झाल्यानें ती पुढें चालवण्याचें प्रयोजन उरलें नाहीं असें तहकुबीच्या समर्थनार्थ सागण्यांत आलें. हें स्पष्टीकरण अर्थातच लोकांस पटलें नाहीं आणि आपण चौकशीविषयीं केलेल्या घाईचा सरकारास पश्चात्ताप झाला कीं काय, अशीहि शंका त्यास आली असल्यास नवल नाहीं. सरकारनें बंद केलेली चौकशी पुरी होऊ द्यावी अशी मागणी व्यापारी व धंदेवाले ह्यांनीं केली आणि आता ती सयुक्तिक नसल्याचीं कारणें पुढें येत आहेत. व्यापारी मंडळ्यांचें म्हणणें सरकारास कां अमान्य आहे ह्या विषयीं असोसिएटेड प्रेस मार्फत कित्येक मुद्दे मांडण्यात आले आहेत, त्यांची छाननी करणें आवश्यक आहे.

चीन-जपान युद्ध उद्भवल्यामुळें जपानी मालाच्या किंमती चढल्या होत्या, त्या उतरून पूर्वपदास आल्या आहेत आणि त्या कारणानें जपानी मालाची स्पर्धा पुन्हां जाचक होण्याची शक्यता उत्पन्न झाली, ही गोष्ट सरकारास अमान्य करतां येत नाहीं. असें असल्यानें स्वदेशी उद्योगधंद्यांस जरूर तें संरक्षण देण्याची आवश्यकता सिद्ध होते तीहि प्रथम दर्शनीं मान्य होण्यासारखी आहे हिंद-जपान व्यापाराची परिस्थिति अत्यंत अस्थिर आहे आणि त्यामुळें जीवरून बिनधोक अनुमानें काढता येतील अशी चौकशी होणें व तिच्यावर आधारलेल्या शिफारशी करण कठीण आहे असें कारण नेहरू-चौकशी थांबवण्याच्या बुडाशीं आहे असें सरकारनें मागें म्हटलें होतें. तें कारण अजूनहि प्रभावी आहे, आणि त्या अनिश्चित परिस्थितींत जोंवर सुधारणा झाली नाहीं तोंवर चौकशी चालू ठेवण्याचा उपयोग नाहीं ह्या समर्थनाचा आश्रय सरकारनें केला आहे ह्या पुढें जाऊन सरकार असेंहि म्हणत आहे कीं, नेहरू-चौकशीचा हेतु कोणत्याहि धंद्यास संरक्षण देण्याचा नव्हता कारण, संरक्षणाचे संबधात चौकशी व शिफारशी करणें हें टारीफ बोर्डाचें काम आहे नेहरू चौकशी केवळ सरकारी खात्याकडून होणाऱ्या मामुली पद्धतींची चौकशी होती आणि हिंद-ब्रिटन कराराच्या वाटाघाटींचे प्रसंगीं हिंदी व्यापाऱ्यांनीं जपानच्या स्पर्धेविरुद्ध निकडीची तक्रार केल्यामुळें ती हातीं घेण्यात आली परदेशी मालाची स्पर्धा स्वदेशी उद्योगधंद्यांस कितीशी जाचक होते आणि तिच्या योगानें लहानसहान उद्योगास तात्पुरतें सहाय किती प्रमाणात देणें अगत्याचें आहे एवढेंच अजमावण्याचा सरकारचा नेहरू चौकशीच्या बाबतींतला उद्देश होता. श्री नेहरू ह्यांनीं लहान प्रमाणावरील सुमारें वीस धंद्यांच्या स्थितीविषयीं माहिती गोळा केली, तीवरून सरकारला असें दिसून आलें कीं गेल्या दोन वर्षांत त्यांचें उत्पादन वाढत चाललें आहे, आणि स्पर्धेपासून त्यास पीडा होत नाहीं असें अनुमान त्यावरून काढण्यात आलें आहे. स्वदेशी उद्योगाच्या उत्पादन-खर्चाच्या पातळीस येऊन मिळेल ह्या बेतानें संरक्षक जकाती चढवून परदेशी मालाची किंमत चढवावी अशी सूचना करण्यात आली आहे. परंतु खेडेगांवात रहाणाऱ्या जनतेच्या उपयोगांत येणारा हा माल असल्यानें गरीब लोकांच्या हिताच्या दृष्टीनें किंमती वाढवणें योग्य नाहीं, असें सरकारनें ठरवलें आहे ओगल्यांच्या कारखान्यात तयार होणाऱ्या कंदिलांना पुरेसें संरक्षण द्यावयाचें म्हणजे परदेशी व त्याबरोबरच स्वदेशी कंदिलाची किंमत ४०० टक्क्यांनीं वाढवावी लागेल आणि एवढा बोजा गरीब शेतकऱ्यावर लादणें अयोग्य आहे असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे.

सरकारच्या युक्तिवादासंबधानें खालील मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. (१) आर्थिक परिस्थिति अनिश्चित आहे हें कारण नेहरू-चौकशी बंद करण्यास पुरेसें नाहीं. चौकशी पुरी झाली असती तर पुष्कळ उपयुक्त माहिती उपलब्ध होऊन छोटेखानी स्वदेशी धंद्याच्या परिस्थितीवर उद्बोधक प्रकाश पडला असता. (२) परिस्थिति केव्हा निवळेल हें सांगणें कठीण असल्यानें तींमध्यें सुधारणा होण्याची वाट पाहण्यात कांहीं स्वारस्य नाहीं. (३) परकीय स्पर्धेविषयीं तक्रार करणाऱ्या छोटेखानी धंद्यांचें उत्पादन गेलीं दोन वर्षें वाढलें आहे, ह्यावरून त्यांस संरक्षणाची आवश्यकता नाहीं असें अनुमान काढणें

चुकीचें आहे उत्पादन व धंदा चालू ठेवावयाचा तो पुढच्या आशेवर आणि तो बंद झाला नाहीं यावरून तो चांगला चालला आहे असें कसें मानता येईल ? (४) धंद्यांस संरक्षण देणें योग्य आहे किंवा नाहीं हें ठरवण्याचें काम टारिफ बोर्डाचें आहे ठीक. आवश्यक दिसेल तेथें त्या बोर्डास विशिष्ट धंद्यांची चौकशी करण्यास सांगण्यास हरकत कोणती आहे ? पण हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांस संरक्षणाचें वावडें आहे आणि ब्रिटिश सरकारनें इंग्लंडमध्यें मान्य केलेलें संरक्षणात्मक धोरण ह्या देशात अवलंबण्यास ते तयार नाहींत हें मागेंच स्पष्ट झालें आहे (५) देशी कंदिलांसारख्या धंद्यास पुरेसें संरक्षण द्यावयाचें म्हटल्यास जबर आयात जकात बसवावी लागेल व त्यामुळें गरीब रयतेवर विशेष बोजा पडेल ह्या विषयीं सरकारास विलक्षण सहानुभूति वाटत आहे पण शेतीच्या मालाच्या किंमती वाढवण्यासाठीं आणि बेकारांच्या पोषणासाठीं सरकारनें काय झीज सोसली आहे ? देशी माल महाग विकल्यानें लोकांस काम मिळत असेल तर महागाईचा स्वार्थत्याग जनतेनें केल्यावाचून गत्यंतर नाहीं देशी धंदे चालले नाहींत आणि लोकांची आर्थिक स्थिति सुधारण्याचे उपाय सरकारनें योजिले नाहींत तर जनतेचें काय होणार ? देशी धंद्यांस उत्तेजन द्यावयाचें ठरलें म्हणजे तें जकातींच्याच मार्गानें दिलें पाहिजे असें कोठें आहे ? टाटा कंपनीचें पोलाद विशिष्ट किमतीनें घेऊन तिला सहाय देण्याचें धोरण सरकारनें अवलंबलें नाहीं काय ? तोच न्याय छोटेखानी धंद्यास लागू करण्यात आला पाहिजे. मोठ्या कारखान्याचें वजन सरकारावर पडतें, छोट्याचें पडत नाहीं, असें समजावयाचें कीं काय ?

---

## विजेच्या दराबाबत चौकशी

### कंपन्यांचे नफ्यावर नियंत्रण

स्वायत्त मुंबई प्रांताचें पहिलें अंदाजपत्रक ना. लठ्ठे ह्यांनीं १७ ऑगस्ट रोजीं कायदेमंडळास सादर केलें, त्यावेळीं त्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणात नियोजित उत्पन्न-वाढीची दिशा ध्वनित केली होती व वीज कंपन्यांसारख्या सार्वजनिक उपयुक्ततेच्या मंडळ्याचे व्यवहार नियंत्रित करून त्यांच्या नफ्यामध्यें जनतेस वाटणी देण्याचें सरकारी धोरण त्यांनीं सूचित केलें होतें. सदरहु मंडळ्यांचा कारभार सरकारनें स्वतः च्या हातीं घेऊन नफा नुकसानीची हमी पत्करण्यापेक्षां, त्याच्या नफ्याचें प्रमाण मर्यादित करणें सरकारास उचित वाटलें आहे, असें दिसतें. वीज कंपन्याचा नफा–तोटा बाहेरून होणाऱ्या स्पर्धेवर अवलंबून नसतो व त्याच्या व्यवहारक्षेत्रापुरता त्यास एकमेवाद्वितीय अधिकार सरकारनें दिलेला असल्यानें, त्याच्या उत्पन्नात आंदोलनें होण्याची भीति नसते. इतर व्यवसायाचे मानानें, वीज निर्माण करून ती पुरविण्याचा धंदा बिनधोक व किफायतशीर असतो ही गोष्ट सरकारी लायसेन्समुळेंच मुख्यतः शक्य होते. समाजांतील आर्थिक विषमता दूर करण्याचा मानस असलेल्या सध्याच्या प्रधान मंडळाचें लक्ष वीज कंपन्याच्या प्रचंड व्यवहाराकडे व नफ्याकडे प्रथम वळणें ओघानेंच प्राप्त होतें. कंपन्या आपल्या गिऱ्हाइकांस भारी दरानें वीज पुरवितात, त्यांत बचत करता येणें कितपत शक्य आहे, ह्याविषयींहि मुंबई सरकार आतां चौकशी करणार आहे. १९१० सालच्या इंडियन इलेक्ट्रिसिटी ॲक्टान्वयें, कंपनीच्या लायसेन्सला पांच वर्षें पुरीं झालीं असल्यास, तिच्या परवान्यामधील विजेच्या कमाल दरासंबधीं चौकशी करविण्याचा व जरूर वाटल्यास त्यात फरक करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे. ह्या अधिकाराचा अवलंब करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. चौकशी कमिटीच्या सभासदांचीं नांवें लवकरच प्रसिद्ध होतील. विजेच्या दराविषयीं चौकशी करण्याचें सरकारनें योजिलें आहे, ह्या संबंधांत खालील माहिती उद्बोधक होईल मुंबई इलाख्यांत वीज उत्पादन करणाऱ्या व वीज पुरविणाऱ्या ६८ कंपन्या आहेत व त्या दरसाल ५१ कोटि यूनिट्स वीज खपवितात. पुण्याच्या वीज कंपनीच्या प्रत्येक भागाची दर्शनी किंमत १०० रु. आहे, परंतु त्याचा बाजारभाव २२५ रुपयांच्या आसपास असतो. ही कंपनी ९ टक्के दरानें डिव्हिडंड देते. टाटाच्या कंपन्याचे भागहि असेच किफायतशीर असून त्याचे बाजारभाव भागांच्या दर्शनी किंमतीच्या सुमारें दीडपट आहेत. वीज कंपन्याचा किफायतशीर कारभार सरकारी लायसेन्सवर अवलंबून असल्यानें, त्याच्या नफ्याचें प्रमाण योग्य मर्यादेंत आणून जनतेच्या हिताकडे ह्या वाढाव्याचा विनियोग करण्याचें सरकारी धोरण रास्त असेंच आहे. लोकाच्या हिताचे दृष्टीनें होणारी ही बचत व सरकारी उत्पन्नात पाहिजे असलेला वाढावा ह्याचा मेळ सरकारास बसवावा लागेल कोणासहि निष्कारण अन्याय होऊं न देतां, व्यावहारिक दृष्टीनें समाजाच्या आर्थिक रचनेची घडी व्यवस्थित बसविण्याचें आणि त्या बरोबरच स्वत.चें उत्पन्न वाढवण्याचें बिकट काम प्रांतिक प्रधान मंडळास आपल्या शिरावर घ्यावें लागणार आहे वीज कंपन्यांचें नियोजित नियंत्रण ही त्या कार्यांतील पहिली पायरी आहे

---

श्री.

सांगली (S. M O)

कु सा. न वि वि. ता २-८-३७

आपलें जा. न. ६५२ ता. २७।७।३७ चें आलेलें सर्क्युलर पोंचलें. त्यांत नमूद असलेप्रमाणें बाँड मागणीबद्दल अर्ज पुरा करून या सोबत ठेविला आहे पूर्वीचा नं. २३३३ चा (कल्पतरू) बाँड भरपाई करून या लगत पाठविला आहे. माझे बांडवर लागलीच बक्षीस मिळाल्याकारणानें आनंद वाटतो व मी आपला त्याबद्दल अत्यंत आभारी आहें. कळावे लोभ अ. हे वि.

आपला.

(सही) रघुनाथ गोपाळ साटजरे

C/o मॅजिस्ट्रेट वर्ग१ ऑफिस, मु पो. सांगली ”

दुसरी बक्षीस वांटणी साधण्यास आताच ‘कल्पतरू बाँड’ विकत घ्या.

लिहा अगर भेटा:–मे. केळकर ब्रदर्स, स्पेशल एजंट्स्, बुधवार चौक, पुणें. श्री. त्र्यं. रा. अभग, स्पे. ऑ. सातारा सिटी.

महाराष्ट्र इन्शु. कं. लि कऱ्हाड जि. सातारा.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

## स्फुट विचार

### शाळांतील अभ्यासक्रमांत व्यावसायिक शिक्षणाचा समावेश

मराठी शाळेंतून इंग्रजी शाळेंत व इंग्रजी शाळेंतून मॅट्रिक परीक्षेच्या द्वारा कॉलेज, अशी शिक्षणाची सध्याची शिडी आहे मॅट्रिक परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा हेतु विद्यार्थ्यास कॉलेजांत मिळावयाच्या शिक्षणास लायक करणें, हा आहे; तथापि, मॅट्रिकला दरसाल बसणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांपैकीं फारच थोड्यांस कॉलेजांत प्रवेश मिळूं शकतो. विश्वविद्यालयीन पदवीस नोकरीचे बाजारांत किंमत उरली नसल्यानें, कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसहि बेकार रहावें लागतें; मग मॅट्रिकच्या कत्तलींत सांपडणाऱ्या विद्यार्थ्यांची काय कथा? शाळांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यास कोणताच व्यवसाय हातीं घेतां येत नाहीं, कारण त्यास मिळालेलें शिक्षण त्या हेतूनें दिलें गेलेलेंच नसतें ही परिस्थिति सुधारून ज्यास विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्याची इच्छा व ताकद आहे, अशाकरितांच मॅट्रिकचा दरवाजा खुला ठेवावयाचा व पोटापाण्याकरितां शिक्षण घेणारासाठी वेगळी स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट परीक्षा ठेवावयाची, असा मुंबई सरकारचा विचार आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास कोणत्या तरी व्यवसायांत प्राविण्य मिळालें, म्हणजे त्याच्या पोटापाण्याचा प्रश्न सुकर होईल, ह्या अपेक्षेनें नवीन अभ्यासक्रम आखण्यांत येणार आहे. सध्याच्या कांहीं शाळांत आवश्यक ते फेरफार करून ह्या उपक्रमास तत्काळ सुरवात केली जाईल. मॅट्रिकची परीक्षा देणारास मग "मला काम मिळत नाहीं" अशी तक्रार करतां येणार नाहीं. शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांस नोकरी देणें हें अर्थातच सरकारास शक्य नाहीं, तथापि व्यवसायात्मक शिक्षण घेऊन बेकार रहाणें व निरुपयोगी पदव्यांनीं विभूषित होऊन रिकामें फिरणें ह्यांत अंतर आहे. तरुणांच्या मनोभूमिकेंत आवश्यक तो बदल घडून आला म्हणजे आर्थिक पुनर्घटनेचें कार्य सोपें होतें, हें उघड आहे. ह्या दृष्टीनें मुंबई सरकारचा उपक्रम स्तुत्य आहे. धंदेशिक्षण आणि औद्योगिक प्रगति ह्यांचा मेळ मात्र नीट बसला पाहिजे आणि त्यासाठी उद्योगधंद्यांच्या उत्कर्षास सहाय देण्याचें धोरणहि सरकारनें अंगिकारणें आवश्यक आहे.

### व्यावसायिक शिक्षणाच्या सरकारी शाळा

सुशिक्षित तरुणांमधील बेकारीस आळा घालण्याचे उद्देशानें त्यांस व्यावसायिक शिक्षण देण्याकरितां मुंबई सरकारनें दोन शाळा स्थापन करण्याचें निश्चित केलें आहे. कातड्याचे जिन्नस करावयास एका शाळेंत शिकविलें जाईल व दुसऱ्या शाळेंत शिंपी कामाचें शिक्षण देण्यांत येईल. ह्या दोनहि शाळा मुंबई येथें येत्या जूनपासून सुरू होतील. प्रत्येक शाळेमध्यें दोन तऱ्हेचें शिक्षण मिळेल. इंग्रजी सातवी इयत्ता पास झालेल्यांकरितां व केवळ मातृभाषेंतून लिहितां वाचतां येणारांसाठी असे दोन अभ्यासक्रम आंखण्यांत यावयाचे आहेत. पत्रव्यवहाराचें व धंद्यासंबंधीं हिशेब ठेवण्याचें शिक्षणहि देण्याची व्यवस्था होईल. प्रत्येक शाळेकरितां प्रत्येकीं १५ रुपयांच्या १५ शिष्यवृत्त्या ठेवण्यांत येणार आहेत. धंदेशिक्षणाचें महत्त्व सरकार जाणीत आहे, ह्यांत शंका नाहीं. तथापि, सध्या अस्तित्वांत असलेल्या सरकारमान्य व्यावसायिक शिक्षण-संस्थांस सहाय करून व त्यांचेवर देखरेख ठेवून सरकारास आपला कार्यभाग कमी खर्चांत साधतां येणें शक्य आहे. विशेषतः शिंपी काम शिकविणाऱ्या अनेक संस्था आज पुणें, मुंबई, इत्यादि ठिकाणीं अस्तित्वांत आहेत. त्यांच्या अभ्यासक्रमांतच आवश्यक ते विषय ज्यास्त घालून त्याची उपयुक्तता वाढवितां येणें कठीण नाहीं. सरकारनें स्वतःचीं हायस्कुलें व शाळा चालविण्याचे ऐवजी सुव्यवस्थित खाजगी संस्थांस सहाय देणें हें अधिक श्रेयस्कर ठरलें आहे हेंच तत्त्व प्रस्तुत उपक्रमास का लागू केलें गेलें नाहीं हें समजत नाहीं. व्यावसायिक शिक्षणाबाबत सरकारनें दाखविलेली आस्था अभिनंदनीय आहे, ह्यांत संशय नाहीं. तथापि प्रत्यक्ष योजनांपासून शक्य तितक्या कमी खर्चांत इष्ट फलप्राप्ती व्हावी, अशी व्यवस्था झाली पाहिजे.

### हिंद-ब्रिटन व्यापारी करारांचें घोडें अडलें कोठें?

मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें ओटाव्याच्या हिंद-ब्रिटन व्यापारी कराराविरुद्ध आपलें मत गेल्या सालीं स्पष्ट प्रकट केलें तरी त्या कराराचा अंमल अद्याप चालूच आहे. नव्या व्यापारी कराराची वाटाघाट आज सुमारें एक वर्षभर चालली आहे, तथापि हिंदी व ब्रिटिश व्यापारी प्रतिनिधी ह्यांचेमध्यें एकमत होण्याचा रंग दिसत नाहीं. हिंदी शिष्ट मंडळ कंटाळून परत हिंदुस्थानात आलें आहे. ब्रिटिश व्यापाऱ्यांचें म्हणणें असें आहे कीं, हिंदुस्थानास ओटावा करारामुळें जितका फायदा झाला, तितका ग्रेट ब्रिटनला झालेला नाहीं. १९३१-३२ ते १९३६-३७ ह्या मुदतींत ग्रेट ब्रिटनमध्यें हाणारी हिंदी मालाची आयात ४३ कोटि रुपयांची ६१ कोटि रुपयांवर गेली, ह्या उलट, ब्रिटिश मालाची हिंदुस्थानांतील आयात '४४३ कोटींची फक्त ४८ कोटि रुपये इतकीच, म्हणजे सुमारें ७ टके वाढली. ह्याच मुदतींत जपानी मालींची आयात ५९ टक्क्यांनीं सुधारली! लँकेशायरनें हिंदी कपास जास्त प्रमाणांत उपयोगांत आणण्याचें १९३३ सालीं अभिवचन दिलें व त्या वचनास अनुसरून हिंदी कपाशीची आयात वाढविली. तथापि, ब्रिटिश कापडाचा खप मात्र हिंदुस्थानांत त्या मानानें वाढला नाहीं अशी तेथील व्यापाऱ्यांची तक्रार आहे. कपास कापडाचे बाबतींतच केवळ नव्हे, तर लोखंड व पोलाद यांचे संबंधांतहि हिंदुस्थान आतां स्वावलंबी होऊं लागला असला तरी विदेशी मालांत ब्रिटिश मालास प्राधान्य देणें शक्य आहे, असें ब्रिटिश व्यापाऱ्यांचें म्हणणें आहे. विजेचीं उपकरणें व यंत्रें, मोटार गाड्या, कारखान्यांस लागणारी यंत्रसामुग्री, रंग, रसायनें इत्यादि मालाचे बाबत ब्रिटिश आयातीस सवलत मिळावी, असा त्याचा आग्रह आहे हिंदी शिष्ट मंडळास ब्रिटिश मागणी मान्य नाहीं, हे स्पष्ट दिसतें. ब्रिटिश मालास आज जकातींत १० टक्क्यांची सवलत आहे, ती उपयोगणाऱ्या मालाची यादी मर्यादित करण्याचा हिन्दी शिष्टमंडळाचा प्रयत्न आहे.

### सरकारी नोकरांचे पगार कायमचे कमी होणार?

सरकारी अधिकाऱ्यांचे व नोकरवर्गाचे पगार डोईजड असल्या विषयींची तक्रार अत्यंत जुनी आहे. जनतेची रहाणी व सरकारी नोकरांचे पगार ह्यामध्यें कांहीं तरी प्रमाणबद्धता असणें आवश्यक आहे, ही गोष्ट सरकारास पटवून देण्याचा यत्न आज कित्येक वर्षें सार्वजनिक कार्यकर्ते करीत आले आहेत. परतु

भारी पगाराविरुद्ध ओरड करणारे लोक अधिकाराचे जागीं येताच, त्यास सर्विक राज्यकारभाराविषयींच्या आक्षेपाचें विस्मरण होत असे स्वायत्त प्रांतांचीं अधिकारसूत्रें आपल्या हातीं पडल्याबरोबर काँग्रेस मंत्रिमंडळांनीं पगाराचे बाबतींत काटकसरीचें धोरण आक्रमण्याचें ठरवून त्याबाबत पुढाकार घेतला व आपला स्वत:चा पगार ५०० रुपयावर आणून ठेवला. कायदेमंडळाच्या सभासदास मिळावयाचा तनखाहि, सभासदाच्या नेहमींच्या रहाणीस साजेसा असाच ठरवून दिला व इतर लोकनियुक्त अधिकाऱ्याच्या पगारासहि त्यांनीं कात्री लावली. प्रांतिक सरकारच्या अधिकारातील नोकरवर्गाच्या पगारात आता कायमची काट करण्याचें मुंबई प्रधान मंडळानें ठरविलें आहे, असें दिसतें. १०० रुपयापेक्षा कमी पगार असणाऱ्या नोकराचे पगारास हात लावण्यात येणार नाहीं; परंतु त्यापेक्षां ज्यास्त पगार मिळविणाऱ्या नोकरास, त्यांचे पगाराचे मानानें १० ते २५ टक्के कपात सोसावी लागेल सनदी नोकरांचे पगार अर्थातच प्रांतिक सरकाराच्या अधिकार कक्षेबाहेर आहेत. लट्ठ पगारास कात्री लावल्यानें नोकरांच्या कार्यक्षमतेस बाध येण्याचा संभव आहे, असें त्यांच्या भारी पगाराचें समर्थन आजवर करण्यात आलेलें आहे. लोकाची रहाणी सुधारावी, त्यासाठीं गरीबांची क्रयशक्ति वाढावी व त्याकरितां लागणारा पैसा श्रीमंतांकडून घ्यावा, हें काँग्रेस सरकारचें धोरण आहे. ज्याप्रमाणें अत्यल्प वेतन कार्यक्षमतेस बाधक, त्याप्रमाणें भारी पगारहि अनवश्यक व खर्चिक ठरतो, असा लोकांचा अनुभव असल्यास आश्चर्य नाहीं विशिष्ट तज्ज्ञांस मोठें वेतन देणें आणि केवळ अधिकारपरत्वें उच्च दर्जाच्या नोकरांस मोठा तनखा चालू ठेवणें ह्यात अंतर आहे. राज्यकारभारावर होणारा डोईजड खर्च कमी करून जनतेच्या कल्याणाच्या योजना हातीं घेण्याचें सरकारनें ठरविलेलें आहे आणि त्यास पोषक अशीच ही पगारकाट आहे हें लक्षात ठेवलें पाहिजे सरकारी नोकर म्हणजे जनतेचे नोकर ही गोष्ट सरकारी अधिकाऱ्यावर ठसण्यास पगार कपात सहायकारक होईल, अशी अपेक्षा आहे. पगार कपातीचें प्रमाण काय असावें हा प्रश्न मात्र विचार करण्यासारखा आहे.

---

### जर्मनीमधील मोटारींचे नवीन रस्ते

जर्मनीमधील बेकारी निवारणाचा एक उपाय म्हणून मोठे हमरस्ते तयार करण्याचें काम तेथील सरकारनें १९३३ सालीं सुरू केलें. शक्य तितकें काम यंत्रांचे सहायावाचून करावयाचें, असें सरकारचें धोरण होतें. १९३४ सालीं ८४ हजार लोक ह्या कामावर होते; १९३५ सालीं त्यांची संख्या १ लक्ष, १५ हजारांवर गेली, १९३६ सालीं १ लक्ष, २४ हजार लोकांस रस्त्यांचें कामानें उपजीविकेचें साधन मिळवून दिलें व चालू वर्षी १ लक्ष, १ हजार लोक त्या कामावर आहेत. सप्टेंबर, १९३७ अखेर एकूण ८ कोटि, २० लक्ष तास इतकें काम पुरें झालें आहे बेकारीनिवारणाचा एक उपाय, ह्या दृष्टीनें रस्त्याचें बांधकाम यशस्वी झालें, असें म्हणतां येईल, तथापि, जर्मनींतील वहातुकीस इतक्या रस्त्यांची जरूरी नव्हती, हें मात्र खरें आहे केवळ मोटारींच्या वहातुकीसाठीच ह्या रस्त्यांची योजना असल्यानें, आडवे रस्ते टाळण्याकरितां प्रत्येक ठिकाणीं पूल बांधण्यांत आले आहेत. वळणें शक्य तितकीं कमी घेण्यांत येऊन चढ-उतारहि कमींत कमी करण्याचा यत्न केलेला आहे. रस्त्यांचे बांधणींत मुख्यत: सिमेंटचा ( ३० लक्ष टन ) उपयोग करण्यांत आला आहे रस्त्यांचे योजनेस लागणारी भांडवली स्वरूपाची रकम कर्जाचे द्वारा उभारलेली आहे. पेट्रोलवरील व वहातुकीवरील कर सरकारनें वाढविला असला, तरी मोटारवाल्याच्या वेळात, वहानांस लागणाऱ्या जळणांत व यंत्रांच्या झिजेमध्यें बचत होत आहे.

---


**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.**

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुडल, गुणद्दाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिघंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर



**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वात मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत: खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो —

(१) कंपनीचें स्थैर्य. ( २ ) उत्तम व्यवस्था.

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री डी के जोगळेकर, बी. ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणे ( २ )



**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८४,५०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९६,७१६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ९,२०२ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,७८,८४६ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रकम | ३६,६८३ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज.

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ

### हस्तपत्रक नं. ५

वैकुंठ ल मेहता
C/o पोस्ट बॉक्स नंबर ४७२
मुबई, ता. १-१२-१९३७

मुंबई प्रांतिक सरकारनें डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी ह्या अवधींत अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ, वर्धा, यानीं चालविलेल्या ग्रामोद्योग शिक्षण विद्यालयांत तेल घाण्यासंबधीं शिक्षण घेण्यासाठीं व कागद हातानें बनविण्याच्या क्रियेसबधीं शिक्षण घेण्यासाठी प्रत्येकीं १० शिष्यवृत्त्या देण्याचें नक्की केलें आहे जे विद्यार्थी निवडले जातील त्याना दरमहा १० रुपयेप्रमाणें शिष्यवृत्ति मिळेल वर्धा येथें जाण्यायेण्याचा खर्च व जेवण्याचा खर्च ज्याचा त्यास करावा लागेल विद्यालयाचे वसतिगृहात जेवण केलें तर दरमहा ६ रुपये खर्च येतो. शिक्षण ३ महिन्यापेक्षा जास्त असणार नाहीं. तरी ज्याना हें शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यानीं अर्ज माझेकडे पाठवावा अर्जांत वय, पूर्ण नांव, गाव, तालुका, शिक्षण, शरीरप्रकृति, पूर्वअनुभव, हल्लीं करीत असलेला उद्योग, खादीधारी किंवा नाहीं, ग्रामोद्योगाचें कार्य करण्याचें एकादें केंद्र ठरविलें आहे का व असल्यास तें कोणतें, पालकाचें नाव, वर्तणुकीबद्दल स्थानिक सद्‌गृहस्थाची शिफारस, विडी वगैरेची सवय आहे का इ सर्व माहिती कृपा करून द्यावी.

ग्रामोद्योग सघाचे कार्यकर्त्यांना जर तेल, रग, पाणी, याचें पृथ करण अगर एकाद्या पदार्थांत निरनिराळ्या वस्तूचें प्रमाण किती आहे हें पहावयाचें असेल तर त्यानी ह्या बाबतींत प्रथम माझेकडे चौकशी करून त्यांचे हे पदार्थ त्यांनी अदमासें २० तोळे "धी अग्रिकल्चलर केमिस्ट्स लॅबोरेटरी, पुणें शेतकी कॉलेज" याचेकडे पाठविल्यास पुणें शेतकी कॉलेजामधील रसायनशास्त्रज्ञामार्फत त्या पदार्थाची परीक्षा बिनखर्चानें (फी न घेता) करून देण्याचें सरकारनें मजूर केलें आहे. ही वस्तु पाठविल्यावर मला कळवावें म्हणजे मी शेतकी कॉलेजमधील रसायन शास्त्रज्ञाना विनति करीन

वैकुंठ ल मेहता
सभासद, व्यवस्थापक मंडळ,
अखिल भारतीय ग्रामोद्योग सघ, वर्धा.

---

### उंस करणारे शेतकरी व साखरेचे कारखानदार ह्यांचे हितसबंध

" उंस लावणारा शेतकरी वर्ग व साखरेचे कारखानदार ह्याचे हितसंबंध परस्परविरोधी नसून, ते एकमेकाशी निगडित झालेले आहेत. साखरेच्या धद्याचा विचार करताना कोणीहि केवळ आपल्या स्वत.च्या फायद्याकडे न पहाता, आपल्या प्रातातील साखरेच्या धंद्याचे प्रगतीच्या व्यापक दृष्टीनें त्याचा परामर्श घेतला पाहिजे " असें, मद्रास सरकारचे उद्योग खात्याचे मंत्रि, श्री गिरी, हे आपल्या एका भाषणांत म्हणाले

---

### हिंदी कोळशाचें उत्पादन

१९३६ सालीं हिंदी खाणींतून एकूण ५ कोटि, ६० लक्ष रु. किंमतीचा २ कोटि, ६८ लक्ष टन कोळसा निघाला, १९३५ सालीं ह्यापेक्षां ४½ लक्ष टन ज्यास्त उत्पादन झालें होतें. २ लक्ष, ७० हजार लोक खाणींत कामावर होते. १६ लक्ष, ८७ हजार टन कोळसा निर्गत झाला.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... . | रु | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भाडवल .. .. .. | रु | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड . ... | रु. | १,०५,५०,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुबई ), बांद्रें ( मुबईनजीक ), मलबार हिल ( मुबई ), कुलाबा ( मुबई ), काळबादेवी (मुबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु ३०० ते रु १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल सहामाही अखेर व्याजाची रकम ५ रु इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धा आम्ही ठेवून घेतों, व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों, विशेष माहिति व नियम वगैरे अर्जानें मागवावेत

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धा ही बँक करते नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात

एजंटः— टी आर लालवाणी


---


आणखी एक

## प्र ग ती चा मो ठा ट प्पा

५१ लाखांवरून ६६ लाख

# वे स्ट र्न इं डि या

**लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लि., सातारा**

विमा व्यवसायात विशेष महत्त्वाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या अशा ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी कोणत्याहि जीवन विमा कपनीस हार जाणार नाहीं आणि सुप्रसिद्ध विमागणिती **श्री ग स मराठे**, एम् ए, ए आय ए, (लंडन) म्हणतात त्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया ही

**सर्व विमाकंपन्यांना आदर्श**

अशी विमा सस्था आहे

**गेल्या वर्षअखेरचा प्रगतीचा आढावा.**

| | | |
|---|---|---|
| एकूण विमा | रु. | ३,२०,००,०००हून अधिक |
| एकूण शिल्लक | रु. | ८३,००,०००हून अधिक |
| सन १९३६ मधील उत्पन्न | रु | १९,३२,८९९ |
| लाईफ फंड व इतर गंगाजळी | रु | ७७,०५,३७९ |
| सन१९३६मधलि नवें काम | रु | ६६,४०,८३९ |
| एकूण क्लेम्स दिले : | रु | १७,१०,२०६ |
| ल्याप्सचें प्रमाण . | | शेंकडा ४ |

**त्रैवार्षिक दर हजारी बोनस**

**होल लाईफ रु. ७५ व एण्डोमेण्ट रु. ६०**

**विमा उतरण्याला किंवा एजन्सी घेण्याला हीच कंपनी उत्कृष्ट.**

पुणें शाखाः— बुधवार चौक, पुणें. मॅनेजर.

## सह्याद्रि विमा कंपनी लि.

### प्रथम वार्षिक अहवाल

### चेअरमन, रा. ब प्रधान, यांचें भाषण

सुमारें एक वर्षापूर्वी स्थापन झालेल्या नाशीक येथील सह्याद्रि इन्शुरन्स कंपनीच्या भागीदाराची प्रथम वार्षिक सभा ता १४ नोव्हेंबर रोजीं सायकाळीं कंपनीच्या ऑफिसमध्यें होऊन, कंपनीच्या गेल्या वर्षातील अभिनंदनीय प्रगतीचा व भावी उज्ज्वल कार्याविषयीं आशा व विश्वास निर्माण करणारा अहवाल आणि ताळेबंद मंजूर करण्यात येऊन, सचालक मंडळाची निवड झाली.

या सभेस संचालक मंडळाचे चेअरमन रा ब गोपाळराव प्रधान, श्री दे स वाघ, श्री. धों. त्र्यं कोचरगावकर व सांगली संस्थानचे माजी दिवाण व सेवानिवृत्त डेप्युटि कलेक्टर श्री आर एस. आठवले, या स्थानिक डायरेक्टराचे सेरीज, वऱ्हाड-मध्य प्रांताचे एक माजी मंत्रि व प्रख्यात पुढारी डॉ. पंजाबराव देशमुख, अहमदनगरचे प्रमुख नागरिक व सरकारी वकील रा. ब देशमुख, वऱ्हाड मध्यप्रांतातील कंपनीच्या शाखेचें देखरेखीचें काम ज्यानीं आपल्या शिरावर स्वयस्फूर्तीनें घेतलें आहे, ते कंपनीचे उत्साही व सुविद्य सचालक रावसाहेब एम बी रोंघे, सोलापूरचे प्रो गोडबोले, हे संचालक मंडळातील बाहेर गावचे सभासद, तसेच, कायद्याचे सल्लागार श्री. माधवराव जानोरकर वकील, मुंबई सरकारचे एक उपमंत्रि व जिल्ह्यांतले कॉंग्रेस-पक्षीय आमदार श्री भाऊराव हिरे, ही मंडळी उपस्थित झाली होती व भागीदारही बरेच हजर होते

सभेच्या प्रारंभीं सचालक मंडळाचे चेअरमन रा. ब. जी. व्ही. प्रधान यानीं कंपनीच्या उपस्थित भागीदाराना उद्देशून पुढील-प्रमाणें भाषण केलें.

"ता २० जून, १९३७ रोजीं आपणास सादर केलेल्या सहामाही अहवालातील अपेक्षा वृत्तांत काळात समाधानकारक रीतीनें पूर्ण झाल्या आहेत, हें पाहून आपणास आनंदच वाटेल जुलै, ऑगस्ट, आणि सप्टेंबर हे महिने कोणत्याहि धंद्याचे दृष्टीनें मंदीचेच असतात. याखेरीज उद्योगधंद्यातील सार्वत्रिक मंदी, विम्याच्या आगामी नव्या कायद्यामुळें निर्माण झालेलें सशयपूर्ण वातावरण, आणि एकसारखी वाढणारी तीव्र चढाओढ हीं लक्षात घेता मिळालेलें चार लाखाहूनहि अधिक काम अत्यंत उत्साह-जनक असून, त्यावरून व्यवस्थापकाचा व निरनिराळ्या जिल्ह्या-तून कार्य करणाऱ्या सन्माननीय प्रतिनिधींचा दांडगा उत्साह, कळकळ, आणि परिश्रम हीं निदर्शनास येत आहेत मिळालेल्या कामापैकीं वसूल झालेल्या हप्त्याचें उत्पन्न रुपये १०,१५८-१३-० आहे.

प्रीमिअमच्या उत्पन्नांतून प्रचार खर्चांतील रु ५१५।२।६ एवढी रक्कम कमी करू शकलों, आणि प्राथमिक अवस्थेंत सुद्धा आपण रु १४७१९।७ येवढा फंड निर्माण करू शकलों, ही गोष्ट कंप-नीच्या कुशल व चोख व्यवस्थेचें, आणि खर्चाच्या कमी प्रमाणाचें द्योतक आहे. आतापर्यंत आपणास एकही क्लेम द्यावा लागला नाहीं ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. जोखीम स्वीकारताना आमचे वैद्यकीय सल्लागार व निरीक्षक कमिटी अत्यंत कसोशीनें काळजी घेतात हें मी येथें सांगितलें तर योग्यच होईल.

सह्याद्रीचे हप्ते अत्यंत माफक असले, तरीहीं मिळालेल्या कामाचा भक्कमपणा, मृत्यूचें अनुकूल प्रमाण, काटकसरीची व्यवस्था, आणि खर्चाचें अत्यंत कमी प्रमाण ही विचारात घेता, कंपनी भागीदाराना चांगलें डिव्हिडंड, व विमेदारांना चांगलें बोनस देऊं शकेल, असा मला दृढ विश्वास वाटतो "

रा. ब प्रधानांचें याप्रमाणें भाषण झाल्यावर कंपनीचे हिशेब व ताळेबंद यांचेसह डायरेक्टराचा अहवाल मंजूर करण्याबद्दलचा ठराव श्री. माधवराव जानोरकर यांनीं मांडला. त्याच्या समर्थ-नार्थ भाषण करताना त्यानीं, व्यवस्थापकानीं व सचालकानीं अविश्रांत परिश्रम करून केवळ ६-७ महिन्यात केलेल्या अभि-नंदनीय प्रगतीबद्दल धन्योद्गार काढले. कंपनीनें प्रत्यक्ष विम्याचें काम सुरू करून आतापर्यंत फक्त सहासातच महिने झाले आहेत. इतक्या अत्यंत अल्प काळात चार लाखापेक्षा अधिक काम कंपनी मिळवूं शकली आणि इतकी शिल्लक टाकणें शक्य झालें, ह्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें

नव्या विमाविषयक कायद्याच्या मुख्य आणि महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा करून, त्यामुळें कंपन्याना स्थैर्य प्राप्त होईल व या कायद्यांत विमेदारांचें हित सुरक्षित करण्याचीच दृष्टि प्रामुख्यानें आहे याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें

हिशेब व ताळेबंद सर्वानुमतें पास झाले व गेल्या वर्षांतील सचालकाचीच पुन निवड करण्यांत आली. या सभेनंतर सचालक मंडळाची सभा भरली, तींत रा ब जी व्ही प्रधान यांचीच पुढील वर्षाकरता चेअरमन म्हणून निवड करण्यात येऊन डॉ. पंजाबराव देशमुख याना पुन्हा व्हाईस चेअरमन निवडण्यांत आलें. रा. ब. प्रधान, डॉ देशमुख आणि जामदार के एस ऊर्फ भाऊसाहेब फिरोदिया यांचीच पुन. स्टँडिंग कमिटी निवडण्यांत आली.

### मराठी चेंबर आणि व्यावसायिक शिक्षणाच्या सरकारी शाळा

कातडयाचे जिन्नस बनविण्यास व शिंपी काम करण्यास शिकविणाऱ्या शाळा मुंबई सरकार स्थापन करणार आहे, त्या विषयींची चर्चा आजच्या अंकांत दुसरीकडे आलेलीच आहे. मराठा चेंबरनें ह्या संबधात एक पत्र लिहून सरकारच्या व्यावसा-यिक शिक्षणाबाबतच्या धोरणाविषयीं समाधान व्यक्त केलें आहे व त्याबरोबरच विधायक सूचनाहि केल्या आहेत शिंपी काम शिकविणाऱ्या पुण्यातील झारापकर, जाधव व तुळपुळे ह्या सर-कारमान्य टेलरिंग कॉलेजातील शिक्षकवर्ग लायक व कार्यक्षम आहे आणि त्या संस्थांतील उपकरणेंहि अगदी नवीन पद्धतीचीं व पुरेशीं आहेत. ह्या संस्थांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा सरकारतर्फे घेण्यात येते, त्यात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाणहि अत्यत समाधानकारक आहे अशा कार्यक्षम संस्था उत्कृष्ट रीतीनें शिक्षणाचें कार्य करीत असतांना सरकारनें स्वत ची एक संस्था काढणें विनाकारण खर्चाचें होणार आहे, असा चेंबरच्या पत्राचा आशय आहे शिक्षणसंस्था स्वत. न चालवितां खाजगी संस्थावर देखरेख ठेवून त्यास आवश्यक तें सहाय करण्याचें धोरण कमी खर्चाचें व जास्त फलदायी होईल, असा चेंबरचा मुख्य मुद्दा आहे. सरकारी मदतीनें जिल्हा-निहाय देखील खासगी व्यावसायिक शिक्षणसंस्था निघूं शकतील व त्यामुळें सरकारच्या खर्चांत बचत होऊन कार्यहि सुकर होईल असें चेंबरचें म्हणणें आहे. असल्या संस्थावर सर-कारची चांगली देखरेख मात्र असली पाहिजे.

### पोस्टल कॅश सर्टिफिकिटांस ओहोटी लागली

करांची माफी, पैसे जरूर तेव्हां परत मिळण्याची सोय व सुरक्षितपणा ह्या विशेष गुणामुळें हिंदी पोस्टाची कॅश सर्टिफिकिटें लोकप्रिय झालीं असल्यास त्यात नवल नाहीं. जुलै १९३६ पासून व्याजाचा दर ३ टक्क्यांचा २½ टक्के करण्यात आला १९३४-३५ सालीं सरकारास अल्प व्याजानें कर्जें सहज मिळू लागल्याकारणानें त्यानीं पूर्वीचा ४ टक्के व्याजाचा दर ३½ टक्के केला, आणि पुन्हां त्याच वर्षीं तो आणखी ½ टक्का उतरला. सोन्याचा भाव १९३१ पासून चढला आणि बचत करणाऱ्या लोकास आपला पैसा गुतवण्यास कॅश सर्टिफिकिटाचें साधन पसत पडलें. ह्यामुळें व्याजाचा दर कमी झाला तरी त्यांत गुतवल्या जाणाऱ्या वार्षिक रकमा त्या मानानें घटल्या नाहींत तथापि, लोकांनीं काढून घेतलेल्या रकमा १९३५-३६ आणि १९३६ ३७ ह्या दोन वर्षांमध्यें फुगल्या. पोस्ट कॅश सर्टिफिकिटाच्या सरकारी कर्जाची एकूण शिलकहि न वाढता थोडीशी कमीच झाली आहे, ही परिस्थिति स्पष्ट करणारे आकडे खाली दिले आहेत:—

पोस्ट कॅश सर्टिफिकिटें
( आकडे लक्ष रुपयाचे आहेत )

| वर्ष | जमा | परतफेड | वर्षाची निव्वळ जमा | एकूण शिल्लक कर्ज |
|---|---|---|---|---|
| १९३०-३१ | ११,७८ | ८,३५ | ३,४३ | ३८,४३ |
| १९३१-३२ | १४,४९ | ८,३४ | ६,१५ | ४४,५८ |
| १९३२-३३ | १५,७४ | ४,६८ | ११,०६ | ५५,६४ |
| १९३३-३४ | १३,३१ | ५,२४ | ८,०७ | ६३,७१ |
| १९३४-३५ | ९,९५ | ७,७० | २,२५ | ६५,९६ |
| १९३५-३६ | १३,४५ | १३,४३ | २ | ६५,९८ |
| १९३६-३७ | १४,८८ | १६,४६ | -१,५८ | ६४,४० |

### पोस्टल सेव्हिंग्ज बॅकेंतील ठेवींची शिल्लक

पोस्टल सेव्हिंग्ज बॅकेंतील ठेवींवरील व्याजाचा दर कॅश सर्टिफिकिटांप्रमाणेंच कमी करण्यांत आला असून जुलै, १९३६ मध्यें २½ टक्क्याचा २ टक्के झाला. ह्या ठेवींच्या काढघालीमध्येंहि व्याजाच्या दरांत घट व आर्थिक परिस्थितींत बदल ह्यांचे योगानें फेरफार घडून आला आहे नोव्हेंबर, १९३३ मध्यें पूर्वी २८ वर्षेपर्यंत कायम असलेला ३ टक्क्याचा व्याजाचा दर २½ टक्के करण्यात आला. मध्यतरीं महायुद्धाचे काळात व नतर व्याजाचे सर्वसामान्य दर पुष्कळ चढले होते तरी, सरकारनें पोस्टल सेव्हिंग्ज बॅकेंतल्या ठेवींवरील व्याजाचा दर चढवला नाहीं. त्या दरात उतार होताच मात्र हा दर वर सागितल्याप्रमाणें कमी केला ठेवींमध्यें होणाऱ्या वार्षिक जमेमधून काढून घेतलेले पैसे वजा केले असतां ठेवींची निवळ रकम किती होते हें पाहिलें असता खाली दिल्याप्रमाणें परिस्थिति दिसते—

पोस्टल सेव्हिंग्ज बॅकेंतल्या ठेवींमधील वाढावा

| वर्ष | ( कोटि रुपये ) |
|---|---|
| १९३३-३४ ... ... ... | ८¾ |
| १९३४-३५ ... . . | ५¾ |
| १९३५-३६ ... . . . | ९ |
| १९३६-३७ ... . .. | ७½ |

आर्थिक मंदी आणि व्याजाच्या दरात घट ह्यांचा परिणाम ठेवींच्या शिलकेच्या रकमेवर झालेला आहे, हें वरील आकड्यावरून स्पष्ट होत आहे.


"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोमाफ प्रिंटिंग, सडीकाम, पक्क्या रगाचे छापकामाचा व रगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत: विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत किंमत, बाटलीस रु ३ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते.—
श्री इंडो फॉरिन एजन्सीज (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed per centage tenders in Form B-1 for construction of a new Biological Building costing Rs. 67897/- in the compound of the Karnatak Arts College at Dharwar are invited and will be received by the Undersigned upto 2 P. M on 20th December 1937 Drawings and other particulars regarding the contract and Tender forms can be had at the Undersigned's office during office hours upto 18th December 1937 on payment of Rs 11/-.

2 The tender is subject to the acceptance of the Superintending Engineer, Southern Circle. Belgaum who reserves the right to reject any or all tenders without assigning reasons.

3 Tenders sent by wire will not be considered

Office of the Ex. Engr, Dharwar Division, Dharwar, 27th November 1937

Sd/- P. K SHINDE, Executive Engineer, Dharwar Division


## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २॥, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठीं २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि,**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रॅंच.—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

## व्ही. पी. बेडेकर आणि सन्स

याचेकडील मसाले, लोणचें आणि पापड यांचा आपले जेवणात नेहमीं उपयोग करा.

पत्ता :—मुगभाट, गिरगाव, मुंबई

पुणें एजंट :—दत्तात्रय नारायण हेजीब. २०, शुक्रवार.

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत "

**श्री. आर. एन. अभ्यंकर,** बी ए., एलूएल बी,

मॅनेजिंग एजंटस्,

**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड**

११ बुधवार पेठ, पुणे नं २.

महाराष्ट्रातील प्रत्येक ठिकाणी भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

### " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं १ रु ( ट ख निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

## गव्हाचे पोहे

(REGD) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात विशेषत लहान मुलाना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो

ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधातून खाता येतात.

७५३ सदाशिव, पुणें २

भास्कर पाडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.

## दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ.—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द.सा. द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा. द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... | १२०–१३ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०५—० |
| ४% १९४३ ... ... .. ... | १०८– ६ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८—१२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... .. | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षें मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आंकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आंकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४२—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११७—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | २९–१० |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५८१—४ |
| बॉंबे प्रॉ को बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२६—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४–१२ |
| अहमदाबाद–प्रांतिज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९४६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५८–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १०% ... ... | ११७—२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४१५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% ... ... | १५४७—७ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु .. .. ... | १७०— ० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु ... ... .. | २२–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ. ... | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु ७५ रु बोनस ... | ४,४००—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% ... ... | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६५—० |
| टाटा आयर्न ऑर्डि ( ७५ ) १० रु. ... ... | २६७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १२०२—८ |

### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास .. ... | ३४–८¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४८–१ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटस ... | १५—९ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११–४ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | ११ –२ |

### सहकारी स्टाफ वाचनालय कळवण ( जि. नाशिक )

सहकारी चळवळीचे प्रमुख नेते कै सर विठ्ठलदास ठाकरसी व कै. सर लल्लुभाई सामळदास ह्यांच्या फोटोचा अनावरण समारंभ ता. २५-११-३७ रोजीं सरदार रावबहादुर, मालेगांव, ह्यांचे हस्तें मोठ्या थाटानें झाला. बँक इन्स्पेक्टर, श्री. ठाकूर, ह्यांनीं प्रास्तविक भाषण केलें व ऑनररी सेक्रेटरी, श्री कुळकर्णी ह्यांनीं रिपोर्ट वाचून दाखविला. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत कै सर विठ्ठलदास व कै सर लल्लुभाई ह्यांच्या कामगिरीचें वर्णन केलें

---

### नंदुरबार येथील अर्बन बँकांची सभा

नंदुरबार, तळोदें व शहादें या तीन तालुक्यात मिळून नऊ अर्बन सोसायट्या आहेत ह्या सर्व सोसायट्यांच्या प्रतिनिधींची सभा ता २७ नोव्हेंबर १९३७ इसवी रोजीं नंदुरबार येथील म्युनिसिपल हॉलमध्यें या भागाचे मे. असिस्टंट रजिस्ट्रार मि. एस जी अलमौला यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती (१) अर्बन सोसायट्यांत थकबाक्यांचें प्रमाण वाढत आहे त्यासंबधानें उपाययोजना, (२) शेतकरी सभासद अर्बन सोसायट्यांत दाखल करणें, (३) देखरेख करणारें अर्बन सोसायट्यांची सुपरवायझिंग युनियन स्थापन होईपर्यंत शेतकी सोसायट्यांच्या सुपरवायझिंग युनियनला अर्बन सोसायट्या जोडणें वगैरे विषयावर उपयुक्त चर्चा झाली. सभेस या भागचे ऑडिटर, डिस्ट्रिक्ट व तालुका ऑनररी ऑर्गनायझर व मुंबई प्रॉ. को. बँकेचे सीनियर इन्स्पेक्टर हे उपस्थित होते.


## 'मेजवानी'ची पुनरावृत्ति निघणार

(सरस्वती उत्सवातील काव्य-गायनाविषयीं एक उतारा)

"कराड:–श्री. अभंग याच्या मेजवानी या राष्ट्रीय गीतांच्या पुस्तकावरील बंदी मुंबई सरकारनें नुकतीच उठविली असल्यानें श्रोत्यांना त्यांतीलच कविता ऐकण्याची इच्छा होणें साहजिक असल्यानें विशेषत: त्यांनीं त्यांतीलच बहारीचीं पदें म्हणून दाखवून श्रोत्यांकडून वाहवा मिळविली . .."

दै नवभारत पुणें, १३-१०-३७

'मेजवानी' व इतर लेखन लवकरच प्रसिद्ध होणार

एक रुपाया भरून

आजच मागणी नोंदावी.

अभंग एजन्सी, सातारा सिटी.

## PROFITEERING IS NOT OUR GOAL

A SAFE BUSINESS HOUSE FOR PATRONS OF U P ARTWARES

**One price, no bargaining, efficient service, latest & original designs.**

Please pay a visit to our show-room or apply for our catalogue.

BUSINESS MANAGER.

**U P. ARTS & CRAFTS EMPORIUM,**
**( Hazratgunj, Lucknow )**

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
*City Post Office Corner* POONA, 2

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**उंसाची नवी लागवड सुरूं झाली.**

—कार्यक्रम— डिसेंबर १९३७ मशिनरीचा दुसरा हप्ता; जानेवारी १९३८ मशिनरीचा तिसरा हप्ता; फेब्रुवारी १९३८ मशिनरीचा शेवटचा हप्ता — मुंबईस येणार.

**साखरेचे भाव वाढले त्या प्रमाणांत नफाही वाढणार.**
शेअर आज घेऊन ठेवा; पुढें शेअरचे भाव वाढतील.
॥ विश्वासः फलदायकः ॥
सविस्तर माहिती व शेअर फॉर्म्स खालील पत्त्यावर मिळतील.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें.**
२५७ बुधवार पेठ, पुणें २.




पुणें एजंटः—ठाकूर आणि क., जोगेश्वरी नाका, पुणें २.

**भारतीय अर्थशास्त्र**

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारे ५५०, किंमत पाच रुपये

प्रथमत अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वाचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरश विचार केलेला आहे हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुराची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नाचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी ए, यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. न. १२५।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधान' इति कौटिल्य अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ | पुणें, बुधवार, तारीख १५ डिसेंबर, १९३७ | अंक ४९

## टिळक आयर्न ॲंड स्टील वर्क्स

सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात ]
मो. मु. टिळक
प्रो मेकॅनिकल इंजीनिअर,

## दी प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : बेंगलोर

शाखा मुम्बअी, दादर, पुणे, पुणे शहर, सोलापूर, पांचगणी, कऱ्हाड

चेअरमन खानसाहेब हाजी कासम, अेम् अेल सी प्रेसिडेंट, कऱ्हाड म्युनिसिपालिटी

मॅनेजिंग डायरेक्टर : अेस पी ठाकर

चालू ठेवी द सा द शें २% सेव्हिंग्ज बँक ठेवी: द सा द शें ३%

मुदतीच्या ठेवीच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात सविस्तर माहितीकरिता बँकेकडे चौकशी करा

डॉ जी एस् गोरे, अेजंट १७ मेन स्ट्रीट, पुणें | अेच जी गद्रे, बी अेससी, अेजंट, लक्ष्मीरोड, पुणे शहर

## दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यास असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद का पुरवता येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. | अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## विविध माहिती

**ग्रेटब्रिटनचें इतर देशांत गुंतलेलें भांडवल**

ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रांत एकूण सुमारें ४९ अब्ज रु. भांडवल गुंतलेलें आहे व त्यापासून २ अब्ज, ४० कोटि रु. सालिना उत्पन्न त्या देशास मिळतें, असा हिशेब सर रॉबर्ट किंडर्सले ह्यांनीं " इकनॉमिक जर्नल " मध्यें प्रसिद्ध केला आहे हिंदुस्थान व सिलोन ह्यांतील ब्रिटिश भांडवल सुमारें ५½ अब्ज रु. भरेल

**हिंदी पदार्थसंग्रहालयांची परिषद्**

डॉ. मार्कहॅम व मि. हारग्रीव्हज ह्यांनीं १९३६ सालीं हिंदुस्थानातील पदार्थसंग्रहालयांची पहाणी केली, त्या बाबतच्या रिपोर्टाचा परामर्श ' अर्था ' च्या ता २४ नोव्हेंबरच्या अंकातील अग्रलेखांत घेण्यांत आला आहे हिंदी म्यूझियम्स परिषदेचें अधिवेशन गेल्या आठवड्यात भरलें, त्यावेळीं सर गिरीजाशंकर बाजपाई ह्यांनीं उपरिनिर्दिष्ट रिपोर्टाचा उल्लेख करून, अहवालातील सूचना उपयुक्त असल्याचें कबूल केलें.

**हिंदी आय सी. एस परीक्षा—तीन जागांसाठी चढाओढ**

हिंदुस्थानात येत्या वर्षी घेण्यात येणाऱ्या आय सी. एस. परीक्षेस जे उमेदवार बसतील, त्यांपैकी पहिल्या तिघास निवडण्यात येऊन इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें घेण्यात येईल, असें फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशननें जाहीर केलें आहे

**हातानें बनविलेल्या कागदाचे धंद्यास वाव**

हातानें कागद बनविण्याच्या क्रियेमध्यें सुधारणा होण्यास वाव आहे व हा धंदा हिंदुस्थानात खेडेगांवी धंदा म्हणून उर्जितावस्थेस आणतां येणें शक्य आहे, असें मत डॉ हंटर ह्या एका अमेरिकन संशोधकानें व्यक्त केलें आहे

**संयुक्त प्रांतातील साखरेच्या कारखान्यांचें नियंत्रण**

साखरेच्या कारखानदारांनीं शेतकऱ्याकडून ऊस कोणत्या दरानें विकत घ्यावा, हें बिहार सरकारनें मागेंच ठरवून दिलेलें आहे. संयुक्त प्रांत सरकारहि त्याच पद्धतीची कायदेशीर योजना करणार आहे प्रांतिक कायदेमंडळाची बैठक जानेवारी, १९३८ मध्यें भरेल, त्यावेळीं ह्या बाबत बिल मांडण्यात येईल, त्यात कारखान्यांचें नियंत्रण करणारीं कांहीं कलमेंहि घालण्यात येतील असें समजतें

**दि त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँक लि.**

वरील बॅकेची शाखा २८४, मेन स्ट्रीट, कॅप, पुणें, या ठिकाणीं ता ६ डिसेंबर पासून उघडण्यात आली व देवघेवीचे व्यवहारास ता. ७ डिसेंबर १९३७ पासून सुरवात झाली. दि त्रावणकोर नॅशनल क्विलॉन बँक लि ही दक्षिण हिंदुस्थानांत जॉईंट स्टॉक बॅकामध्यें प्रमुख गणली जाते. तिच्या एकूण ७१ शाखा असून दिल्ली व विजगापट्टम येथेंहि शाखा लवकरच उघडण्यात यावयाच्या आहेत रिझर्व्ह बँकेशीं जोडलेल्या बॅंकांचे यादींत त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बॅकेचें नांव आहे.

**म्हैसूर सरकारच्या ताब्यांत रेल्वे फाटे जाणार ?**

बंगलोर–हरिहर व बंगलोर–हिंदुपूर हे रेल्वे फाटे मद्रास ॲन्ड सदर्न मराठा रेल्वेचे ताब्यातून म्हैसूर दरबारच्या ताब्यात १ जानेवारी, १९३८ रोजीं जाणार आहेत बंगलोरचें रेल्वे स्टेशनहि म्हैसूरचे ताब्यात जाईल, परंतु मद्रास ते बंगलोर हा ब्रॉड गेज फाटा मात्र एम्.एस.एम् रेल्वेच्या नियंत्रणाखाली पूर्ववत् राहील.

**हलक्या वजनाचीं नाणीं**

हलक्या वजनाचीं चांदीचीं नाणीं वितळवून टाकण्याची पद्धत आहे. १९३६–३७ मध्यें एकूण ५९ लक्ष, ९२ हजार नाणीं अशा रीतीनें वितळविण्याकरिता टांकसाळीकडे पाठविण्यात आलीं, त्यांपैकीं ३५ लक्षापेक्षा ज्यास्त रुपये होते.

**नाताळाचें प्रचंड विलायती टपाल**

नाताळामध्यें पाश्चात्य लोक इष्टमित्रांस शुभचिंतनहेतुक पत्रें व नजरा पाठवतात गेल्या ४ तारखेच्या विलायतच्या बोटीनें २० लक्ष पत्रें रवाना झालीं आणि त्यांनीं ५०० थैल्या भरल्या होत्या. एकूण अडीच हजार पोस्टाच्या थैल्या होत्या आणि त्यांपैकीं प्रत्येकींत दोन हजार ते आठ हजार पत्रें, पाकिटें वगैरे होतीं. आठ हजार रजिस्टर केलेले जिन्नस व एक हजार पार्सलें होतीं. तीं ह्याशिवाय निराळींच !

**ग्रेटब्रिटनमधील सहकारी मालविक्रीचीं दुकानें**

मालविक्री किरकोळीनें करणाऱ्या ब्रिटिश सहकारी मंडळ्यांच्या सभासदांची संख्या ७८ लक्ष आहे त्यांचें भांडवल १९० कोटि रुपये आहे आणि एकूण जिंदगी २८० कोटि रुपये आहे. गेल्या सालीं त्यांची ३०० कोटि रुपयांच्यावर विक्री झाली. चालू सालीं हा आकडा २५ कोटींनीं वाढेल असा अंदाज आहे.

**पृथ्वीचा वेग कमी होत आहे !**

पृथ्वीचा स्वतःभोंवती फिरण्याचा वेग कमी होत आहे आणि त्यामुळें दिवसाची लांबी वाढणार आहे पण ही फार काळांतराची गोष्ट आहे. २७,००० वर्षांनीं दिवसाच्या चोवीस तासांत एका सेकंदाची भर पडेल आणि इसवी सनाच्या ३,८८,८१,९३७ ह्या वर्षी दिवस २५ तासांचा होईल.

**ट्रेझरी बिलावर १२ आणे ११ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बॅंकेनें गेल्या आठवड्यात २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शें. १२ आ. १ पै पडला

**बेलापूर कंपनीचें डिव्हिडंड**

बेलापूर कंपनीची १८ वी वार्षिक साधारण सभा सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांचे अध्यक्षतेखाली गेल्या आठवड्यात भरली होती. ३० सप्टेंबर, १९३७ अखेरच्या वर्षी कंपनीस ७ लक्ष, ९१ हजार रु नफा झाला, त्यातून प्रत्येक भागास ७ रु. ( करमाफ ) डिव्हिडंड सभेंत मजूर झालें कंपनीचा प्रत्येक भाग ५० रुपयांचा आहे. गेल्या वर्षी कंपनीनें ८ टक्के दरानें डिव्हिडंड दिलें होतें.

**इटालिअन कपडे १०० टक्के स्वदेशी ?**

हिंदुस्थान, इजिप्त व अमेरिका ह्या देशांतून कापूस आणून त्याच्या मोबदल्याची भरपाई करण्याची अडचण भासूं नये म्हणून इटलीनें कपास, लोकर व रेशीम ह्यांच्या ऐवजी कृत्रिम पदार्थ वापरण्याचा यत्न चालवला आहे कापसाच्या कापडात पूर्वी ९० टक्के कापूस असे, आता ५२ टक्केच असतो.

**इटलीनें राष्ट्रसंघ सोडला**

इटलीनें ता. ११ डिसेंबर, १९३७ रोजीं राष्ट्रसंघ सोडल्याचें जाहीर केलें गेले १८ महिने इटलीनें संघाच्या बैठकींत भाग घेतला नव्हताच. तथापि, सभासदत्व सोडल्याची मामुली घोषणा आतां करण्यांत आली आहे.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रु. किंमत |
|---|---|
| २८–११–३७ ते ४–१२–३७ | ९,६४,८९१ |
| ५–१२–३७ ते ११–१२–३७ | ५०,९८,०४९ |
| २१–९–३१ ते ११–१२–३७ | ३,०७,११,७९,३६५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ६०० | बाजारभाव—चीनमधील कपास कापडाच्या जपानी गिरण्या | |
| २ हिंदुस्थानचा व्यापार आणि हिंदुस्थान सरकार | ६०१ | ५ अमेरिकन धनिकाची चैनबाजी | ६०५ |
| ३ कर्ज देताना बँकेनें बाळगावयाची दक्षता | ६०२ | ६ फेडरल कोर्टांत वकिली करण्याची सनद | ६०५ |
| ४ स्फुट विचार | ६०३ | ७ हिंदुस्थान सरकारचें काच कारखान्यांबाबत विपरीत धोरण | ६०६ |
| कपास आणि हिंदी शेतकरी—सर पुरुषोत्तमदास ह्यांची सूचना—धंदेवाइक पैसेवाले काय करणार ?—ग्वालेर संस्थानांत ग्रामसुधारणा व सहकार—साखरेचे वाढते | | ८ सहकारी चळवळ | ६०७ |
| | | ९ शेती आणि सहकार | ६०८ |
| | | १० निवडक बाजारभाव | ६०९ |



# अर्थ

बुधवार, ता. १५ डिसेंबर, १९३७


## हिंदुस्थानचा व्यापार आणि हिंदुस्थान सरकार

हिंद–ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी लंडनमध्यें पुऱ्या झाल्या नाहींत आणि हिंदी शिष्टमंडळ स्वदेशीं परत आलें. आतां हिंदुस्थानातच चर्चा पुढें चालू व्हावयाची आहे आणि आवश्यक वाटल्यास मध्यवर्ती सरकारचे व्यापार मंत्री त्याकरितां पुन्हा विलायतेस जाण्याचा संभव आहे इंग्लंड व हिंदुस्थान ह्याचेमधील व्यापारी कराराच्या बोलण्या–चालण्यासंबधांत आज घटकेस हा रागरंग आहे. हिंदी व्यापारी शिष्टमंडळ आणि ब्रिटिश व्यापारी प्रतिनिधी ह्याचा मतभेद कोणत्या बाबींचे संबंधात आहे ह्याविषयीं तर्क करण्यात येत आहेत. त्याचे बाबतींत नक्की माहिती मिळणें अशक्य असलें तरी सामान्य अनुमानें करता येण्यासारखीं आहेत तथापि, हा विषय तूर्त बाजूस ठेवला तरी हिंदी व्यापाऱ्याच्या शिष्टमंडळानें व्यापक दृष्टीनें आपलें काम केलें असल्याबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार केवळ इंग्लंड व जपान ह्याच्याशींच नाहीं. आमच्या व्यापाराचे दृष्टीनें हीं राष्ट्रें महत्त्वाचीं असलीं तरी लहान–मोठ्या प्रमाणात इतर देशांशीं हिंदुस्थानची देवघेव चालते, ती सध्यासारख्या मंदीच्या काळात दृष्टीआड करून भागणार नाहीं ही गोष्ट ध्यानात घेऊन हिंदी व्यापारी शिष्टमंडळानें हिंदुस्थान सरकारानें कोणत्या गोष्टी केल्या पाहिजे ह्याकडे त्याचें लक्ष वेधलें आहे.

सध्या प्रत्येक राष्ट्र आपापली परिस्थिति व गरजा ह्यांस अनुलक्षून इतर राष्ट्राशीं निरनिराळ्या प्रकाराचे व्यापारी करार करीत आहे पूर्वीचा खुला व्यापार केव्हांच संपला आहे प्रत्येक देश आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्याची खटपट करीत आहे हें सर्वांस सारख्याच प्रमाणात शक्य नाहीं, हें उघड आहे कारखान्यांस लागणारीं काहीं कच्चीं द्रव्यें बाहेरून आणणें आणि आपला विशिष्ट माल परदेशाच्या बाजारात विकणें प्रत्येक राष्ट्रास अपरिहार्य आहे. देशांचे दरवाजे मालाच्या आयात-निर्गतीस खुले नसल्याकारणानें आणि व्यापारावर सरकाराचें नियंत्रण बसलें असल्यामुळें प्रत्येक राष्ट्रास दुसऱ्याशीं तडजोड व देवाण-घेवाण करून आपल्या व्यापाराचें बस्तान बसविणें भाग आहे. हिंदुस्थानातून गळिताच्या धान्यासारखा माल पूर्वी जर्मनींत खपत असे. परंतु अलीकडे जर्मनीनें मध्य-युरोपियन राष्ट्राशीं स्वतंत्र करार करून तो माल त्यानीं पिकवावा आणि स्वतःस विकावा अशी योजना अमलांत आणली आहे आमचा अमूक जातीचा माल तुम्हीं घ्या आणि त्याच्या मोबदला अमूक प्रतीचा माल तयार करून आम्हास पुरवा अशा तऱ्हेची व्यवस्था राष्ट्रें परस्परात करीत असून जर्मनीनें ती घडवून आणण्यात पुढाकार घेतला आहे आणि त्यात बरेंच यश मिळविलें आहे गळिताचीं धान्यें वगैरे हिंदुस्थानाचा माल युरोपियन देशात खपेनासा झाल्यास ह्या देशाचें नुकसान होणार आहे

वरील देशाशीं हिंदुस्थाननें स्वतंत्र करार करून आपल्या व्यापाराचें संरक्षण करावें अशी सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृति शिष्टमंडळाची सरकारास सूचना आहे बरीच चळवळ झाल्यावर सरकारनें जर्मनींत हॅम्बुर्ग येथें व्यापारी हालचालींवर नजर ठेवण्यासाठी एक अधिकारी नेमला परंतु त्याचें कार्यक्षेत्र विस्तीर्ण असल्याकारणानें त्याचे हातून पुरेसें काम होऊ शकत नाहीं. म्हणून त्याचें ठाणें बर्लिन शहरीं हालवण्यांत यावें अशी शिष्टमंडळाची सरकारास शिफारस आहे त्याचप्रमाणे, परराष्ट्रातली व्यापारविषयक माहिती आज दीर्घसूत्रीपणानें हिंदुस्थानांत उपलब्ध होते, त्या पद्धतींत तात्काळ सुधारणा होणें अगत्याचें आहे असें शिष्टमंडळानें म्हटलें आहे हिंदी व्यापार व उद्योगधंदे ह्यांची नीट जोपासना होण्यास हिंदुस्थान सरकारनें दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचें सोडून देऊन त्यासंबधांत स्वतः जागरूकपणानें योग्य व्यवस्था केली पाहिजे ही शिष्टमंडळाची मागणी सयुक्तिक व न्याय्य असून तिला अनुसरून सरकारनें कृति करणें आवश्यक आहे जागतिक व्यापाराची घडी नवीन तऱ्हेनें बसवली जात आहे आणि प्रत्येक राष्ट्र आपल्या सोयीप्रमाणें ती बनवीत आहे अशा स्थितींत हिंदुस्थाननें आपल्या आर्थिक हितसंबंधास जागणें जरूर आहे हिंदुस्थान सरकारानें ह्या बाबतींत नेटानें पुढें पाऊल टाकलें पाहिजे आणि साम्राज्य सरकारानें त्यास पाठिंबा दिल्यावाचून विधायक कार्य घडून येणें शक्य नाहीं

### १९३४ च्या चांदीविषयक कराराची मुदत संपली

हिंदुस्थान, चीन व स्पेन हे चांदीचा मोठा सांठा बाळगणारे प्रमुख देश आणि ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका, मेक्सिको व पेरू हे चांदी उत्पादन करणारे देश ह्यामध्यें लंडन येथें जुलै १९३३ मध्यें एक करार झाला. त्या अन्वयें हिंदुस्थानानें १ जानेवारी, १९३४ नंतरच्या चार वर्षांत १४ कोटि फाइन औंस पेक्षा ज्यास्त चांदी विकूं नये, असें ठरलें. कोणत्याहि एका वर्षांत ५ कोटींपेक्षा ज्यास्त औंसांची विक्री होऊं नये अशी करारांत अट होती सरकारी धोरणाचा चांदीचे किंमतीवर अनिष्ट परिणाम होऊं नये, हा वरील कराराचे मुळाशीं हेतु होता. कराराची मुदत ३१ डिसेंबर, १९३७ अखेर संपते, ती लांबविण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार नाहीं. करार संपल्यामुळें चांदीची किंमत उतरेल, असा संभव दिसत नाहीं.

## कर्ज देतांना बँकेनें बाळगावयाची दक्षता

(ता २७ नोव्हेंबरच्या "अर्था"त ह्या लेखाचा पूर्वार्ध आला आहे)

रेल्वे रशिदींवर कर्ज देतेवेळीं राशिदींत दर्शविलेला माल बँकेनें स्वत चे नावावर दाखल करून घेणें इष्ट असतें साखरेच्या पोत्याचे ऐवजीं वाळूची पोतीं निघालीं, तर रेल्वेस त्याकरिता जबाबदार धरतां येत नाहीं. कर्जदाराचे शब्दावर विश्वास ठेऊनच बँकेस व्यवहार करावा लागतो, म्हणून चागल्या पतवाल्या जुन्या गिऱ्हाइकाखेरीज इतरांस रेल्वे रशिदींवर कर्जें देण्याचें टाळावें. कर्ज घेणाराचें नाव रशिदीवर माल घेणारा म्हणून असल्या-विषयीं बँकेनें खात्री करून नतर रशिद आपल्या नावावर करून घ्यावी बँकेच्या नावावरच रशिद लिहिली असल्यास फारच उत्तम. रेल्वे कपनीचें भाडें व इतर देणें बाकी राहिलेलें नाहीं, ह्याविषयीं बँकेनें नीट चौकशी करावी.

विमा पॉलिसींचे तारणावर कर्जे देताना अत्यत दक्षता बाळ-गणें आवश्यक असतें व ह्याकरितां फक्त विश्वासार्ह गिऱ्हाइकासच पॉलिसीवर कर्ज द्यावें. कपनीकडून पॉलिसीची सोडकिंमत किती होते, त्याचा निश्चित आकडा मागवून त्यापेक्षा कमी रकम कर्जाऊ द्यावी. विमेदाराचें वय कपनींत दाखल झालें असल्या-विषयीं बँकेनें खातरजमा करून घ्यावी विमेदार हप्ते वक्तशीर भरीत रहाणें जरूर आहे व ह्याबाबत बँकेस जागरूक रहावें लागतें. काहीं विशिष्ट प्रकारच्या पॉलिसी बँकेनें तारण घेऊन त्याचा तिला उपयोग होऊ शकत नाहीं अशा पॉलिसी स्वीका-रण्यात येऊ नयेत.

सोन्याचे दागिन्यावर रकम देण्यापूर्वी तारण घ्यावयाच्या दागिन्यावर अर्जदाराची मालकी असल्याविषयीं व ते गहाण टाक-ण्याचा त्यास अधिकार असल्यासबधीं त्याचेकडून लेख घ्यावा. पैसे देण्यापूर्वी, एकाद्या लायक सुवर्णकाराकडून दागिन्यातील सोन्याच्या शुद्धतेविषयीं, वजनाविषयीं, व किंमतीविषयीं सल्ला घेण्यात यावा. घराच्या गहाणाचे तारणावर कर्जें देण्यास बँका नाखूष असतात, कारण त्यात पैसे दीर्घकाळ पर्यंत अडकून बस-तात व पैसे देण्यापूर्वी कायद्याच्या अनेक भानगडी उरकाव्या लागतात. परतफेड ज्यास वक्तशीर करता येईल, अशा अर्जदारा-सच गहाणावर रकमा द्याव्या घर कोणत्या वस्तींत आहे, त्याचें क्षेत्रफळ किती आहे, भाडें किती येतें, इत्यादि गोष्टींची बारका-ईनें चौकशी करवून इजिनियरामार्फत घराची किमत अदाजून घ्यावी घर स्वकष्टार्जित आहे कीं आनुवशिक आहे, आधीं तें कोणाकडे गहाण आहे कीं काय, घराखालील जमीन भाड्याची आहे कीं मालकीची आहे, भाड्याची असल्यास भाडेपट्ट्याची मुदत किती आहे, घरावर कराचा बोजा किती आहे, इत्यादि गोष्टींच हि बँकेनें चौकशी करावी घरावर मालकी दर्शविणाऱ्या कागदपत्राची कायद्याचे सल्लागाराकडून तपासणी करवून घ्यावी व रजिस्ट्रारच्या कचेरींतून मालकीचा निर्वेधपणा निश्चित करून घ्यावा. कायद्याचे सल्लागाराकडून घराच्या मालकाचे निर्वेध मालकीविषयीं व त्यास घर विकण्याचा हक्क असण्यासबधीं लेखी अभिप्राय मिळाल्यानतरच बँकेनें पढचा तजवीज करावी घराचा विमा उतरलेला असणें जरूर आहे व ही विमा पॉलिसी बँकेचे नावानें केली जाणें आवश्यक आहे घर सुस्थितींत राखलें जात आहे किंवा नाहीं, ह्याची बँकेनें मधून मधून चौकशी करावी

हुंड्याचा व्यवहार फक्त अब्रूदार गिऱ्हाइकाशीच करण्यात यावा हुडी विकत घेण्यापूर्वी, तीं नाकारली गेल्यास पैशाची वसुली कशी करावयाची ह्याविषयीं गिऱ्हाइकाशीं बोलणें केलेलें असावें हुंड्या डिस्कौंट करणें, म्हणजे एकाप्रकारानें दोघां तिघां-च्या सहीवर रकम कर्जाऊ देणेंच होय हुडी काढणारा हाच वास्तविक निश्चित दिवशीं रकम भरण्यास बाधलेला असतो व हुडी नाकारली गेली तरच तीवर सही करणाऱ्या इतर लोकावर ती जबाबदारी पडते ह्यासाठीं, हुंडी काढणाराच्या पतीची शहा-निशा नीट केली पाहिजे अनेक हुड्यावर सह्या करणाराचा हुड्या काढणाऱ्या एकाच इसमाशी फार हितसंबंध गुतलेला नसावा.

शेतकऱ्यांस कर्जें देताना विशेष काळजी घ्यावी लागते, कारण त्याच्या सबंधात प्रातिक सरकारानीं विशिष्ट कायदे केलेले आहेत. अज्ञान मुलांस कर्जें देता येत नाहींत, कारण त्यानीं केलेले करार कायदेशीर रीत्या बंधनकारक नसतात त्याचे तर्फे पालक कित्येक वेळां कर्जे मागतात, परतु मुलें वयात आल्यावर त्यास हें कर्ज अमान्य करतां येणें शक्य असतें

दुसऱ्याचा कायदेशीर प्रतिनिधि ह्या नात्यानें कोणासहि कर्ज देते वेळीं प्रतिनिधित्वाच्या कायदेशीरपणाची खात्री करून घ्यावी एकत्र हिंदी कुटुबाच्या नेत्यास कुटुबाचे हिताचे बाबी-करितां कर्ज उभारता येतें, परतु कुटुबातील सर्व पुरुषाची त्यास समति मिळविणें बँकेच्या दृष्टीनें सुरक्षित असतें. ट्रस्टीजना कर्ज देण्यापूर्वी ट्रस्ट डीडची छाननी करून ट्रस्टींच्या कर्ज काढण्या-सबधींच्या अधिकाराची शहानिशा करून घ्यावी. भागीदाऱ्या, सयुक्त भाडवलाच्या मंडळ्या इत्यादींकडून येणाऱ्या कर्जविषयक अर्जांचा विचारहि अशाच प्रकारची पूर्वचौकशी करून नतरच होणें इष्ट आहे

वरील विवेचनावरून बँकरचें काम किती जबाबदारीचें व जोखमदारीचें असतें हें दिसून येईल. ठेवीदार व कर्जदार ह्यां-मधील बँकर हा दुवा होय ठेवीदाराचा बँकेवरील विश्वास एकी-कडे वाढविण्यावर व कर्जदाराच्या सापत्तिक परिस्थितीचें पूर्ण-पणें निरीक्षण करून रकमा गुंतविण्यात कौशल्य दाखविण्या-वरच बँकरची कार्यक्षमता अवलबून राहते. व्यापार व उद्योग-धदे ह्याची जोपासना व वाढ हीं करणें बँकाच्या हातात असतें व बँका आपलें कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडतात किंवा नाहीं ह्यावर सर्वसामान्य जनतेचा उत्कर्ष अवलंबून असतो. ठेवीदाराचें हितसरक्षण करणें हें बँकरचें आद्य कर्तव्य आहे

(समाप्त)


## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें.

## नोटीस.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि, पुणें या कंपनीच्या भागीदाराची तिसरी वार्षिक साधारण सभा पुणें येथें टिळक स्मारक मदिरात रविवार ता २६ डिसेंबर १९३७ रोजीं दुपारीं ४ वाजता भरणार आहे.

सभेपुढें येणारीं कामें:—

१ ता ३० नव्वबर १९३७ पर्यंतचा ताळेबद, अहवाल व नफातोटा पत्रक मजूर करणें.

२ सन १९३७-३८ सालाकरिता ऑडिटर्स नेमणें व त्याचा मेहनताना ठरविणें

३ अध्यक्षाच्या परवानगीनें येणारीं इतर कामें.

तरी सर्व भागीदारानीं सभेस हजर रहावें अशी विनति आहे.

संचालक मडळाचे हुकुमावरून,
सी जी. आगाशे ॲंड को,
मॅनेजिंग एजट्स

पुणें, ता. ८ १२-३७

# स्फुट विचार

### कपास आणि हिंदी शेतकरी

अमेरिकेंतलें विलक्षण मोठें उत्पादन आणि जपानच्या खरेदीमध्यें घट ह्याचे योगानें कपाशीचे भाव घसरले आहेत आणि तीं पिकवणाऱ्या हिंदी शेतकऱ्यावर जबर सकट आलें आहे. कपाशीसारख्या महत्त्वाच्या पिकावर अशी आपत्ति आली असता तिचें निवारण कसें करावें ह्यासबधानें अनेक सूचना करण्यात येत आहेत रेल्वेजच्या वहातुकीचे दर कमी करावे इत्यादि सूचना अमलात आल्या तरी त्याचा म्हणण्यासारखा परिणाम कपाशीच्या किंमतीवर होण्याचा संभव दिसत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्न त विशेष लक्ष घातलें आहे असेंहि म्हणण्यास जागा नाहीं. कपाशीची घाऊक खरेदी-विक्री होण्याचें महत्त्वाचें स्थान ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनचा बाजार हें होय त्या सस्थेच्या सोळाव्या वार्षिक सभेचे प्रसगीं अध्यक्ष ह्या नात्यानें केलेल्या आपल्या भाषणात सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांनीं ह्या विषयाची चर्चा केली आणि कांहीं विधायक सूचनाहि केल्या हिंदी कपाशीच्या उत्पादनात अलीकडे वाढ झाली नसल्यानें त्या मामुली उत्पादनाइतकें पीक ह्या देशांत निघत रहाणें अपरिहार्य व न्यायाचें आहे. ईस्ट इंडियन व नॉर्थ वेस्टर्न रेल्वे ह्यांनीं सामान्य शेतकऱ्याच्या मालास सहाय होईल अशा रीतीनें वहातुकीचे दर कमी केलेले नाहींत ह्या विषयीं त्यानीं तक्रार केली कपाशीची सरकी काढणें व कापसाचे गठ्ठे बाधणें ह्याचे दर कमी केले जावे ह्या सूचनेचा त्यांनीं उल्लेख करून त्याच प्रकारच्या दुसऱ्या सूचना पुढें येण्याविषयींची आपली अपेक्षा व्यक्त केली. कपाशीच्या सध्याच्या भावानें शेतकऱ्याच्या पदरात काहींच निवळ मिळकत पडत नाहीं अशीहि माहिती त्यानीं दिली

---

### सर पुरुषोत्तमदास ह्यांची सूचना

कपाशीचा भाव उतरला आहे, त्यास मजबुती आणण्यासाठी हिंदुस्थान सरकार शेतकऱ्यास द्रव्यसहाय देईल अशी आशा करावयास नको असें म्हणून सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यानीं स्वतःची एक महत्त्वाची विधायक सूचना केली. उतरलेल्या भावानें नेहमींपेक्षा अधिक कपास खरेदी करणें हिंदी गिरण्यास शक्य व सोयीचें होईल. त्याची वार्षिक खरेदी २५ लक्ष गाठी असते यदाच्या विशेष आणीबाणीच्या प्रसंगीं त्यास आणखी १० लक्ष गाठी विकत घेता येणें शक्य आहे. आणखी १० लक्ष गाठी पैसेवाल्या लोकांनीं खरेदी करून ठेवल्या तर चालू मोसमात २० लक्ष गाठी फाजील होण्याचा सभव आहे, त्याचा उठाव होऊन कपाशीचे भाव सध्यापेक्षा जास्त घसरणार नाहींत कपास एकदा बाजारात येऊ लागली म्हणजे मागणीच्या मानानें पुरवठा अधिक होईल आणि बाजारभाव कोठपर्यंत घसरतील, ह्याचा नियम नाहीं एवढ्याकरिता सुमारें १५० रुपयाच्या भावानें धनिकानीं खरेदी केली तर त्याच्या पैशावर व्याज सुटून शेतकऱ्यास सहाय केल्याचें श्रेय त्यांस मिळेल, असें सर पुरुषोत्तमदास ह्यांचें म्हणणें आहे सुमारें १५ कोटि रुपये ह्या कामीं गुतवावे लागतील, पण आज चोहोंकडे व्याजाचे दर खाली गेले आहेत, तेव्हा आपण सुचवलेला व्यवहार फायद्याचाच आहे अशी त्याची विचारसरणी आहे पुढच्या सालीं हे अमेरिकन कपाशीचा पुरवठा चालू वर्षासारखाच मोठा झाला तर हिंदी कपाशीची लागवड मर्यादित करावी कीं काय, हा प्रश्न उद्‌भवेल परंतु चालू वर्षीं बाजारांत २० लक्ष गाठी फाजील येतील त्याचा वेळींच उठाव झाल्यास हिंदी शेतकऱ्यास त्याच्यावर आलेल्या भयंकर सकटातून वाचवतां येईल, असा सर पुरुषोत्तमदास ह्यांचा युक्तिवाद आहे. धनिक वर्ग त्याचा परामर्श कसा घेतो तें पहावें.

---

### धंदेवाइक पैसेवाले काय करणार ?

सर पुरुषोत्तमदास यानीं केलेल्या सूचनेसबधानें धदेवाइक पैसेवाल्यामध्यें ऐकमत्य आहे असें दिसूत येत नाहीं सूचनेच्या मुळाशीं ज्या गृहीत गोष्टी आहेत, त्या पुष्कळ अंशानीं अदाजावर आधारलेल्या असल्यानें त्या अदाजीची ग्राह्यता वादाचा विषय झालेली आहे अमेरिकन सरकारनें कपास पिकवणाऱ्या जमीनदारास सहाय देऊन जरूरीपेक्षा अधिक माल बाजारात येऊ नये अशी व्यवस्था केली आहे चालू हंगामाचे अखेर हिंदी कपाशीच्या वीस लक्ष गाठी शिल्लक राहतील त्याचा उठाव कसा होणार हा कठीण प्रश्न आहे. पुढच्या सालीं अमेरिकेंत कपास किती पिकेल हें सागता येत नाहीं आणि त्याचप्रमाणें हिंदी कपाशीची लागवड मर्यादित करता येणें शक्य आहे असेंहि म्हणता येत नाहीं. हिंदी गिरण्यानीं कापूस खरेदी करून पुरेशी साठवण अगोदरच केली आहे आणि त्याच्याकडून फारसें सहाय मिळेल असा सभव दिसत नाहीं. कपाशीच्या खरेदींत पैसा गुतवणारांच्या दृष्टीनें पाहिलें असता परदेशी मालाच्या मानानें हिंदी कपाशीच्या किंमती अनुकूल नाहींत. केवळ किंमती व त्यांतून मिळणारा फायदा ह्याचा विचार करता ते परदेशी कपासच पसत करतील हिंदी कापूस साठवण्याच्या सोयी चागल्या नसल्यानें अमेरिकेप्रमाणें एका मोसमाचा कापूस दुसऱ्या मोसमात साठवणें म्हणून विकण्यात नुकसान येईल अशी भीति प्रदर्शित केली जात आहे. कपाशींत भेसळ करणें व तीमध्यें पाणी घालणें असल्या वर्तनाविरुद्ध मध्यप्रातात कायद्याची अंमलबजावणी केली जात आहे. तशा प्रकारचा कायदा मुंबई इलाख्यात करावा अशी सूचना करण्यात आली आहे. बिन पाण्याची एका मोसमातली कपास दुसऱ्या मोसमात टिकू शकेल आणि तीमध्यें पैसे गुतवणें सोपें जाईल असें कित्येकांचें म्हणणें आहे वर निर्दिष्ट केलेल्या शकाचें निवारण होऊन कांहीं तरी विधायक धोरण आखणें अगत्याचें आहे.

---

### ग्वालेर संस्थानात ग्रामसुधारणा व सहकार

ग्वाल्हेरच्या महाराजानीं आपल्या सस्थानातील खेडेगांवाची उन्नति करण्याच्या हेतूनें एक कोटि रुपयाचा फंड बाजूस काढला आणि त्यासबंधाची योजना आखण्याचें काम एका तज्ञाच्या कमिटीकडे सोपवलें. त्याप्रमाणें पंजाबचे ग्रामसुधारणेच्या खात्याचे मुख्य, मि ब्रेन, अलाहाबादचे मि हिगिनबॉटम, पुण्याचे प्रो. काळे व कोल्हापूरचे रा ब पाटील ह्यानीं गेल्या आठवड्यात आपल्या चौकशीचें काम सुरू केलें त्यानीं अनेक सरकारी अधिकाऱ्यांच्या साक्षी घेतल्या आणि हिंडून खेडेगावातल्या शाळा व सहकारी पतपेढ्या पाहिल्या. त्याचा विचारविनिमय चालू असून कमिटीच्या शिफारसी लवकरच प्रसिद्ध होतील. ग्रामोद्धाराच्या कार्याविषयीं महाराजांस विशेष कळकळ वाटत असून त्यानीं ह्या बाबतींत स्वतः चालना दिली असल्याकारणानें हें अत्यंत महत्त्वाचें काम मार्गास लागेल

आणि कांहीं तरी भरीव कामगिरी होऊ शकेल असें मानण्यास जागा आहे. प्रो काळे ह्याच्या सहकारी संस्था व बँका ह्याचे संबंधातल्या रिपोर्टातल्या शिफारसींस ग्वालेर सरकारची मान्यता मिळाली असून त्याप्रमाणें कृति घडून येण्याचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून जानेवारीच्या मध्याचे सुमारास ग्वाल्हेर येथें एक सहकारी परिषद् भरवण्याचें ठरलें आहे. प्रो काळे ह्यानीं सुचवल्याप्रमाणें खुद्द महाराज ह्या परिषदेचें उद्घाटन करणार असून सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेस आणि सुधारणेस चालना देणार आहेत.

## साखरेचे वाढते बाजारभाव

साखरेचा बाजारभाव वाढूं लागला असल्यानें, जावा साखरेच्या निर्गतीस प्रोत्साहन मिळण्याचीं चिन्हें दिसत आहेत गेलीं दोन वर्षे जावा साखरेची निर्गत वाढत आहे आजवर जपान हें त्या साखरेचें मोठें गिऱ्हाइक होतें; परतु जपाननें आतां आपल्या साम्राज्यातच मोठ्या प्रमाणावर साखरेचें उत्पादन सुरू केलें आहे. १९३८ मध्यें जपानला जावा साखरेची गरज भासणार नाहीं, उलट जपानी साखरच चीनमध्यें जाऊं लागली आहे युरोपातील देशात मात्र जावा साखरेची आयात वाढत्या प्रमाणावर होत आहे. गेल्या एप्रिलमध्यें लंडन येथें आतरराष्ट्रीय साखर-करार झाला, तेव्हापासून जावा साखरेचा धंदा चलतींत आहे. १९३५ सालीं जावा बेटात ३७ साखर कारखाने चालू होते; सध्या ८० कारखान्यांत साखरेचें उत्पादन सुरू आहे. अशा रीतीनें वाढत्या बाजारभावाचा फायदा त्या देशास मिळत आहे. इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानासहि आपली साखर बाहेर पाठविण्याची सवड लंडन येथील योजनेनें दिली नाहीं, असें असूनहि ह्या करारावरील हिंदुस्थानातर्फेची सही कायम करण्यात आली लंडन परिषदेच्या निर्णयास जपाननें मान्यता दिली नाहीं, ही गोष्ट येथें लक्षात ठेवण्याजोगी आहे त्या देशानें वेळींच आपल्या हिताचें रक्षण केलें, परतु हिंदुस्थानास मात्र निर्गतीची बदी मान्य करावी लागली हिंदी कारखानदारांस साखर निर्गत करणें परवडलें, तरी त्यास तसें करण्यास मुभा नाहीं, अशी आजची परिस्थिति आहे

## चीनमधील कपास-कापडाच्या जपानी गिरण्या

चीनमधील कपास-कापडाच्या गिरण्यापैकीं शेकडा पन्नास गिरण्या जपानी मालकीच्या आहेत शांघाई हें जपानी गिरण्याचें मुख्य केंद्र आहे, ४४ पैकी ३० जपानी गिरण्या येथें आहेत चीनमधून निर्गत होणाऱ्या सुतापैकीं व कापडापैकीं शेकडा ८० टक्के माल जपानी बनावटीचा असतो चीनमधील जपानी गिरण्याची स्पर्धा चिनी गिरण्यास भोवते, इतकेंच नव्हे, तर खुद्द जपानमधील गिरण्यासहि निर्गत व्यापारात त्यांच्याशी टक्कर द्यावी लागते चिनी गिरण्यापेक्षा तेथीलच जपानी गिरण्यातील मजूर जास्त कार्यक्षम आहेत व त्यांस मजुरीहि थोडी जास्त मिळत, त्याचप्रमाणें जपानी व्यवस्था व देखरेख अधिक कुशल व चोख असते उत्तर चिनात जपानी गिरण्याचा विस्तार होऊं लागला आहे व लवकरच चीनमधील कपास कापडाचें सर्व उत्पादन जपानी मालकीच्या गिरण्यांतून होऊं लागेल, असा रग दिसतो


**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.**

( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस—औंध ( सातारा )

शाखा—आटपाडी, कुडल, गुणदाळ, विचूद स्टेशन व दिघची.

चालूं ठेवीवर शेंकडा दीड टका व्याज दिलें जातें सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी

कर्जें—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B R Vartak

मॅनेजर.

**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वात मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो.—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री डी के. जोगळेकर, बी ए,

ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,

टिळक रोड, पुणें ( २ )

**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८५,८०० |
| रिझर्व्ह फड | ४,८१२ |
| इतर फड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९८,५८६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ९,०८२ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७४,४३९ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात | |
| गुंतविलेली एकूण रकम | ४०,७७४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठीं पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज

### अमेरिकन धनिकांची चैनबाजी

मेजवान्या व नाच ह्यांचे पायीं लक्षावधि रुपये उधळणाऱ्या चैनबाजी श्रीमंतांच्या लीलाचीं वर्णनें हिंदुस्थानांत ऐकू येतात परंतु त्यांस अमेरिकन धनिकांनीं मागें टाकलें आहे असें म्हणावें लागतें. अमेरिकेंत अलोट संपत्ति असलेलीं अनेक माणसें आहेत आणि आपला पैसा कसा खर्चावा ह्याची त्यांस पंचाईत पडते असें दिसतें. एखाद्या मेजवानीप्रीत्यर्थ लाख, दोन लाख रुपये उडवण्याचें त्यास काहींच वाटत नाहीं.

"मिलगेट"-मासिकांत एका लेखकानें ह्या चैनबाजीचें वर्णन केलें आहे, तें मोठें मनोरंजक आहे. आपली मुलगी वयात आल्या-बद्दलचा समारंभ एका दंपत्यानें साजरा केला आणि त्यासाठी अडीच लक्ष रुपये खर्चले. महाग शॅंपेन दारूच्या साठ पेट्या, घोड्याच्या शर्यतीचें नमुनावजा रिंगण, जगप्रसिद्ध संगीताचा ताफा, ह्या खर्चांतल्या बाबी होत्या. दुसऱ्या एका मेजवानीस लेखकाचा मित्र हजर होता, त्याच्या सांगण्यावरून, त्या मेज-लसीस सव्वा लक्ष रुपये खर्च आला ह्या मेजवान्या खर्चिक करण्यात व त्यासाठी नवीन नवीन ढंग शोधून काढण्यात धनि-कांची स्पर्धा चालते त्यामध्यें पुष्पगुच्छांचा सडा पडतो आणि दारूचे पाट वहातात. दिवाणखाने चित्रविचित्र रीतीनें शृंगार-ण्यांत येतात आणि त्यांचीं नंदनवनें बनवलीं जातात.

समाजातील उच्च दर्जाच्या लोकामध्यें आपणास स्थान मिळावें म्हणून महत्त्वाकांक्षी धनिकाची ही धडपड चाललेली असते. श्रीमंतीच्या असल्या प्रदर्शनामुळें धनिक वर्गाविरुद्ध लोकमत अर्थातच तयार होतें. इंग्लंडप्रमाणें अमेरिकेंत उमराव, त्यांच्या पदव्या व बीरुदावल्या नाहींत म्हणून त्याच्या जागीं पैसेवाले लोक संपत्तीचीं अशीं प्रदर्शनें मांडतात, असें सांगण्यात येतें. परंतु अमेरिकेंतहि मि रूझव्हेल्ट व इतर राजकारणी पुरुष त्यांच्या ढंगाकडे ढुंकूनहि पहात नाहींत व आपलीं कामें करीत असतात. मिसेस रूझव्हेल्ट एखाद्या सामान्य नागरिकाप्रमाणें श्रम करून पैसे मिळवतात आणि त्यातली प्रत्येक पै समाजहितासाठी खर्च होते.

### फेडरल कोर्टांत वकिली करण्याची सनद

फेडरल कोर्टाच्या स्थापनेनें आता फेडरेशनच्या पूर्वतयारीचें पाऊल आणखी एक पायरी पुढें पडलें आहे ह्या कोर्टांत हाय-कोर्टांचे निकालावरील अपिलें चालतील संयुक्त सरकार व प्रांत अगर फेडरेशनला सामील झालेलीं संस्थानें ह्याच्यात कायदेशीर हक्कांबाबत वाद उपस्थित झाल्यास फेडरल कोर्ट त्याचा निर्णय करील. ह्या अखिल भारतीय न्यायमंदिरात काम चालविण्याची सनद मागणारा वकील प्रांतिक हायकोर्टाचा ॲडव्होकेट असला पाहिजे ३१ डिसेंबर, १९३८ पूर्वी सनदीकरिता अर्ज करणारास मागाहून अर्ज करणारापेक्षा उच्च दर्जा मिळेल. त्यानंतर अर्ज करणाराची प्रत त्यांनीं प्रांतिक हायकोर्टाची सनद केव्हां काढ-लेली आहे, ह्यावर अवलंबून राहील संस्थानांच्या हायकोर्टांत काम करणारे वकील एखाद्या ब्रिटिश प्रांताच्या हायकोर्टांत नोंदलेले असल्याखेरीज त्यास फेडरल कोर्टांत उभे रहाता येणार नाहीं.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

RELIABLE STENOGRAPHERS
AND TYPISTS
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS.
*Apply*—MARATHI KENDRA,
10 BUDHWAR, POONA 2.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी
एरोमाक प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ

स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यत विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकि-त्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी कर-ण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणामध्यें याची बरोबरी बाजारां-तील इतर औषधें करूं शकत नाहींत किंमत, बाटलीस रु ३ ट. ख १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्चासह ९ रु
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते.—
धी इंडो फॉरिन एजन्सीज (डिपार्टमेंट नं ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

## महाराष्ट्रांतील कंदिलाच्या एका कारखान्यासंबंधांत हिंदुस्थान सरकारचें विपरीत धोरण

(लि. आ. म.)

परवांच्या जुलै महिन्यात हिंदुस्थान सरकारनें छोट्या धंद्यांच्या सरक्षणाचा विचार करण्यासाठीं एका खास अधिकाऱ्याची नेमणूक करून त्या जागीं श्री. नेहरू ह्यांची योजना केली. ज्या ज्या धंद्यांना यापूर्वी प्रयत्न करूनहि कांहीं संरक्षण मिळालें नव्हतें, त्यांचे मनांत ह्यामुळें जरा अंकुर उत्पन्न होऊन, श्री आर. के. नेहरूनीं जी जी माहिती मागितली ती ती त्यांनीं उत्साहानें दिली. आतां जे धंदे सरक्षणाचे अभावीं पूर्वीच बंद पडले होते त्यांचेकडून जरूर ती माहिती दिली गेली नसेल. पण प्रांताप्रांतांतील सरकारी औद्योगिक खातीं ती माहिती पुरविण्यास समर्थ नव्हतीं काय? आपापल्या प्रांतांत काय उद्योगधंदे आहेत, त्यांची आजची स्थिति काय आहे, त्यास कारणें काय आहेत वगैरे माहितीसुद्धा जर त्यांचेकडे नसेल तर मग तीं खातीं आहेत तरी कशाला हा प्रश्न उद्भवतो असो

ज्या ज्या धंद्यांनीं पुरेशी माहिती सरकारकडे दिली त्यांत आपल्या महाराष्ट्रांतील ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड ही कंपनी होती त्यांनीं आपल्या कंदिलाच्या धंद्याची सरकारला पाहिजे होती तितकी अगदीं पुरेपूर माहिती पुरविली होती. त्यापैकीं अमुक एक माहिती चुकीची आहे असें सरकारनें मुळींच कळविलेलें नाहीं. उलट आतां आपल्यास कांहीं करावयाचें नाहीं असें मनाशीं ठरविलेवर "चीन-जपानचें युद्ध सुरू झाल्यामुळें उत्पन्न झालेली अस्थिर परिस्थिति अशा प्रकारचें संरक्षण देण्यास योग्य नाहीं" हें एक लंगडें कारण सरकारकडून नुकतेंच ही चौकशी बंद केली असल्याचें जाहीर करतांना पुढें करण्यात आलें.

यावर मल्लिनाथी करून, आतां पुनः सरकारनें ही श्री. नेहरूंचेकडून करविलेली चौकशी का थांबविली याचीं कारणें जास्त विस्तारानें कळणेसाठीं "कोणता धंदा संरक्षण देण्यास पात्र आहे हें पहाणेचें काम टॅरिफ बोर्डाचें असलेमुळें सदरहु चौकशी ही कोणत्या धंद्यास संरक्षण यावें हें पाहाण्याचे दृष्टीनें करावयाची नव्हतीच. हिंदुस्थान व जपान ह्यामधील व्यापारविषयक वाटाघाटींबाबत नेमलेल्या बिनसरकारी सल्लागारांच्या सांगण्यांत लहानसहान उद्योगधंद्यांना जपानची स्पर्धा भासते असें आलें. तशी वस्तुस्थिति कितपत आहे हें पाहाण्याचे दृष्टीनेंच ती मुख्यतः करविली" असा खुलासा नुकताच प्रसिद्ध केला आहे असें होतें तर ज्या ज्या धंद्यांनीं, उदाहरणार्थ आमचे महाराष्ट्रांतील ओगले ग्लास वर्क्स, लिमिटेड, ह्या कंपनीनें, श्री. नेहरूंचेकडे आपापली माहिती पाठवून आपल्यास इतकें संरक्षण मिळावें असें लिहिलें.त्यांना "ही आमची चौकशी संरक्षण देण्याचे दृष्टीनें केलेली नाहीं" असें त्याच वेळीं कां सांगितलें गेलें नाहीं?

हिंदुस्थानातील उद्योगधंद्याचे मालाच्या मूळ निपजेच्या किंमती इतकी त्याच तऱ्हेच्या बाहेरून येणाऱ्या परदेशी मालाची बंदराच्या अगदीं आंत येणें पर्यंतची (म्हणजे सी आय. एफ.) किंमत राहावी असें केलें जावें, अशी एक सूचना होती. "छोट्या धंदेवाइकाचा माल मुख्यतः गोरगरिबांकरताच असल्यानें अशा तऱ्हेचें कांहीं केल्यास जनतेला माल महाग पडेल या दृष्टीनें असें करणें इष्ट वाटलें नाहीं" असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. मग हें जर अगोदरच सरकारला कळलें होतें तर देशी उद्योगधंदेवाल्यांचेकडून माहिती तरी कां मागविली?' न कर्त्याचा वार शनवार हेंच यांतील धोरण आहे, असें म्हटलें तर तें चुकीचें होईल काय?

वर उल्लेखिलेल्या धोरणाचे स्पष्टीकरणार्थ म्हणून सरकारनें आपले महाराष्ट्रांतील कंदील कारखानदार, ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, यांचें उदाहरण देऊन त्यांचे मागणीप्रमाणें करावयाचें झाल्यास परदेशी कंदिलावर ४०० टक्के जकात वाढवावी लागेल असें म्हटलें आहे. म्हणजे ओगले यांचें म्हणणें रास्त असून त्यांना संरक्षणाची जरूरी आहे पण त्या बाबतींत ४०० टक्के जकात बसवावी लागत असल्यानें तसें करतां येत नाहीं असा याचा अर्थ आहे.

पण यांतहि सरकारनें अन्याय, इतकेंच नव्हे तर अंधारांतून आघात केला आहे. कारण ओगले यांची मागणी जपानी कंदिलावर डझनास ६ रुपये म्हणजे आज उतरलेल्या हुंडणावळीनें जपानी माल येतो त्याचेशीं तुलना केली असतांहि १००–१२५ टक्के व इतर म्हणजे जर्मन, अमेरिकन, वगैरे कंदिलावर सध्या पडते त्यापेक्षा दर डझनास रु. ३ जास्त म्हणजे सध्याचे हुंडणावळीचे मानानें फार झाल्यास ६० टक्के ड्यूटी बसवावी अशी मागणी होती; ४०० टक्के नव्हे ती त्यांच्या तिसऱ्या हिश्यानेंही नव्हती इकडे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणारे बातमींत त्यांची मागणी ४०० टक्के जकात बसवावी अशी असल्याचें भासवावयाचें व प्रत्यक्ष मागणी यापेक्षा कितीतरी प्रमाणांत कमी असता त्यांना उत्तर "आपल्यास सरक्षण देण्याजोगी आपली केस नाहीं' असें मोघम द्यावयाचें. या धोरणात राष्ट्रीय वृत्तीचा पूर्ण अभाव हा तर दिसून येतोच पण याहीपेक्षा प्रत्यक्ष देशी उद्योधंदेवाल्यास एक भासवावयाचें व जनतेंत त्यांचेबद्दल गैरसमज उत्पन्न करून देशी उद्योगधंद्यास मदत नाकारावयाची या धोरणास काय म्हणावें समजत नाहीं.

एकीकडे उद्योगधंद्यांचे कळकळीची जाहिरात करावयाची व प्रत्यक्ष उद्योगधंदे चालू आहेत, त्यांची परदेशी नाण्याचे भावाचे चढाओढीमुळें गळचेपी झाली तरी दाद घ्यावयाची नाहीं. अशा तऱ्हेनें कारखाने बंद झाल्यास हिंदी कारखानदारांना नालायक ठरवावयाचे व त्यांतील बेकार झालेल्या लोकांना नुसताच शांत रहाणेचा उपदेश करावयाचा. परंतु ही परिस्थिति किती काळ टिकणार? आतां कांहीं हिंदी प्रजा सरकार म्हणेल तें निमूटपणें मान्य करण्याइतकी निर्बुद्ध राहिली नाहीं. तरी वेळींच हिंदी उद्योगधंदे कसे जगतील इकडे सरकारनें लक्ष देऊन हिंदी जनतेच्या व कारखानदारांच्या विश्वासास व आदरास पात्र होणेचें धोरण ठेवावें या कामीं जनतेनेंहि हिंदी कारखानदारांच्या मालास उत्तेजन देऊन त्यांच्या मागणीस पाठिंबा द्यावा.


**AN OBJECT OF BEAUTY IS A JOY FOR EVER**

U P. GOVERNMENT ARTS AND CRAFTS EMPORIUM

Hazratgunj, Lucknow.

SOLELY UNDER GOVERNMENT MANAGEMENT.

Has collected and kept on display at their show-rooms at Hazratgunj

**The Selected Artware Objects.**

A personal visit will be of unique interest.

BUSINESS MANAGER.

## नाशिक जिल्हा सहकारी वृत्त

नाशिक डिस्ट्रिक्ट को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें मु नांदगांव येथें ता. १५-११-३७ पासून २७ ११-३७ पर्यंत को-ऑपरेटिव्ह सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास सुरू होता क्लासमध्यें नांदगाव, येवला, सटाणा, सिन्नर, मालेगांव या ठिकाणचे विद्यार्थी आले होते. क्लास चालू असलेल्या मुदतींत मे एम. जी. शेटे प्रोपगेंडा ऑफिसर, मे एन यु पुरोहित सिनीयर इन्स्पेक्टर मालेगाव, मे एस एस - जोशी ब्यांक- इन्स्पेक्टर नांदगाव, श्री तळपदे मुंबई इन्स्टिट्यूट, मे. के. के कोष्टी सुपरवायझर, व मे धर्माजी तान्हाजी पाटील प्रेसिडेंट सटाणा यूनीअन, या सर्वांनीं क्लासला शिक्षण देण्याचें काम करून व विद्यार्थ्यांना जरूर ती माहिती देऊन मदत केली.

सहकारी परीक्षेचें केंद्र नादगाव ठरविलें असल्यानें ता. २८ व २९।११।३७ रोजीं सेक्रेटरींची तेथें परीक्षा झाली. परीक्षेचे वेळीं सुपरव्हिजनचें काम करणेसाठी मे वामनराव गोविंदराव पाटील प्रेसिडेंट नादगाव यूनीअन, याना मुंबई इन्स्टिट्यूटकडून सुपरवायझर म्हणून नेमिले होते. परीक्षेस एकंदर ३५ विद्यार्थी बसले होते.

परीक्षा संपल्यावर ता. २९।११।३७ रोजीं सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा समारोप होऊन मे धर्माजी तान्हाजी पाटील यांचे अध्यक्षतेखालीं छोटासा समारंभ झाला व जमलेल्या विद्यार्थ्यांचा निरोप घेण्यात आला.

## तासगांव अर्बन को. क्रे बँक लि.

वरील बँक ता. ६ फेब्रुवारी, १९३६ रोजीं नोंदण्यांत आली. ३०जून, १९३७ अखेर बँकेचे सभासद १२६ होऊन भाग भांडवल ४,२६० रु झालें ३० नोव्हेंबर अखेर भांडवल ५,५७० रु. झालें आहे. ३० जून अखेर १४,४९३ रु. च्या ठेवी होत्या, त्या आता १९ हजारापर्यंत आल्या आहेत. अहवालाचे सालअखेर सभासदाकडे १५,३७६ रुपयांचीं कर्जें येणें होतीं; ह्या व्यवहारातहि बँकेची प्रगति झालेली दिसून येते १५,७०० रुपयांचीं सार्धी कर्जें व हळदीच्या तारणावरील ३,७०० रु. अशी एकूण १९,४०० रुपयांचीं कर्जें बँकेनें दिलेलीं आहेत बँकेनें हुंडीचा व्यवहार सुरू केला आहे. पेवातील हळदीच्या तारणावरील कर्जाचा व्यवहारहि बँकेस किफायतशीर होईल, असें दिसतें. बँकेच्या आतांपर्यंतच्या प्रगतीवरून, ती लवकरच भरभराटीस येईल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. श्री. सदाशिवराव बाबाजीराव शेटे हे व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष आहेत त्यांस इतर सभासदांचें बँकेच्या कारभाराचे बाबतींत उत्कृष्ट सहाय मिळत असल्याविषयीं वार्षिक अहवालांत उल्लेख आहे. मुं को बँकेचे श्री. जी. एम जोशी ह्यांना तासगांव बँकेकडे नेमणूक करून पाठविण्यांत आलेलें आहे.


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

"जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत"

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयावरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. (ट. ख. निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,२३,९०० वसूल झालेलें भांडवल १,११,७४०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी

M V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## शेती आणि सहकार

तारीख १-१२-३७ रोजीं प. खा. जिल्ह्याच्या कलेक्टरांचे अध्यक्षतेखालीं धुळें येथें धुळें तालुक्यांतील सर्व पाटील-तलाठ्यांचा जमाबंदी दरबार भरविण्यांत आला, त्यावेळीं सुमारें ५०० लोक हजर होते

या संधीचा फायदा घेऊन शेतकी खात्यानें व धुळें शेतकी सभेनें शेतकऱ्याकरितां निरनिराळ्या जातींच्या उत्तम बीं-बियाण्यांचें व फळझाडांचें प्रदर्शन भरविलें त्यावेळीं शेतकी खात्याचे इन्स्पेक्टर मि.मोदी यांनीं प्रदर्शनामध्यें मांडलेल्या,जीरेला कपाशी, पुसा नं. ४ चा गहूं, अकोला बाजरी, लसूणघासचें बीं वगैरे वस्तु प्रत्यक्ष दाखवून त्यापासून शेतकऱ्याना काय फायदे आहेत हें सप्रमाण दाखविलें. तसेंच लोखंडी नांगर, पिकावर औषध शिंपडण्याचें यंत्र, उपटणीचें यंत्र, सायनोगॅस पंप यांचा उपयोग शेतकऱ्यांस कसा होतो हें प्रत्यक्ष दाखविलें. त्यानंतर शेतकी सभेचे प्रेसिडेंट श्री. घोगरे यांनीं शेतकी सभेचें महत्त्व व त्यापासून शेतकऱ्यांनीं कसा फायदा करून घ्यावा याविषयीं सांगितलें.

नतर प. खा. जिल्हा को० इन्स्टिट्यूटचे प्रोपगंडा ऑफिसर श्री. पाटील यांनीं शेतकऱ्यांची सध्याची आर्थिक परिस्थिति व तिचा सहकारी चळवळीवर परिणाम ह्याविषयीं सविस्तर भाषण केलें यापुढें क्रेडिट सोसायट्यावरच नुसतें अवलंबून न राहातां नॉन-क्रेडिट सोसायट्या सुद्धा काढून सर्व बाजूंनीं एकाच वेळीं प्रयत्न झाले पाहिजेत, तरी त्याकरिता पीक संरक्षक सोसायटी, सुखसंवर्धक सोसायटी, खरेदी विक्रीसंघ, को० स्टोअर्स इत्यादि सोसायट्या काढून त्यापासून शेतकऱ्यानीं फायदे करून घेतले पाहिजेत असें त्यांनीं सांगितलें सोसायट्यातून शेतकऱ्याना सर्व पैसे रोख न देतां त्यान्च्या सर्वसाधारण गरजा जर सोसायट्यामधून भागवून अगदीं जरूरी पुरताच रोख पैसा त्यांना दिला तरच त्याचें कर्ज हलकें होण्याचा संभव आहे असें ते म्हणाले. शेवटीं, मामलेदारसाहेबानीं दरबारचा समारोप केला.

### पेठ ता. को. सुपरवायझिंग यूनियन लि

१९३६-३७ अखेर वरील यूनियनला १९ सोसायट्या सामील आहेत. यूनियन 'अ' वर्गांत आहे. सामील सोसायट्यापैकीं 'क' वर्गांतील संस्था वाढू लागल्या आहेत. साल अखेर सभासदांची संख्या १,८२८ आहे. २१,८१८ रुपयाच्या मेंबराच्या ठेवी आहेत व शेअर भांडवल ६६,६१० रु. आहे बँकेच्या कर्जाचें थकबाकीचें प्रमाण शेकडा ११ टक्के इतकें आहे स्वत:च्या भांडवलाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ५८% पडतें प्रत्येक सभासदास सरासरीनें १७० रु. कर्ज आहे थकबाकीचें एकूण येण्याशीं प्रमाण ३५ टक्के आहे. सामील सोसायट्यांपैकीं ३ सोसायट्याना १,१२८ रु. तोटा झाला व १६ सोसायट्यांना मिळून ७,३०१ रु. नफा झाला ८ सोसायट्यातील सभासदाना १,५६२ रु सवलत वाटण्यांत आली. नॉनक्रेडिट सोसायट्याच्या उत्कर्षाकरितां यूनियननें प्रयत्न केले यूनियनची वार्षिक सभा ता. ६-१२-३७ रोजीं झाली

### अ. भा ग्रामोद्योग संघ

कागद तयार करण्याच्या व तेल गाळण्याच्या क्रिया शिकविण्याच्या वर्धा येथील वर्गाकरिता मुंबई सरकारनें शिष्यवृत्त्या ठेवल्या आहेत, त्यासाठी अर्ज करण्याची अखेरची तारीख २० डिसेंबर, १९३७ ही आहे. श्री वै. ल मेहता, C/o पो. बॉक्स नं ४७२, मुंबई, ह्याचेकडे उमेदवारानीं अर्ज पाठवावे व त्याचेकडून माहिती मागवावी


**व्ही. पी. बेडेकर आणि सन्स**

यांचेकडील मसाले, लोणचें आणि पापड यांचा आपले जेवणांत नेहमीं उपयोग करा.

पत्ता:—मुगभाट, गिरगाव, मुंबई.

पुणें एजंट:—दत्तात्रय नारायण हेजीब. २०, शुक्रवार.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.,**

हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २

**गव्हाचे पोहे**

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषत: लहान मुलाना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो

ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो तसेंच हे दह्या दुधांतून खाता येतात.

७५३ सदाशिव पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा. द. शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवींवर द सा. द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्.

## निवडक बाजारभाव

वॅंक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १२०–१० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०५—० |
| ४% १९४३ | १०८— ६ |
| ३½% बिनमुदत | ९८—६ |
| ३½% १९४७–५० | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लाब मुदत) | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षं मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानतरचा आकडा वार्षिक डिव्हिडड दर्शवितो )

#### बॅंका

| | |
|---|---|
| बॅंक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४१—० |
| बॅंक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११७—० |
| सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया (५०—२५ ) ६% | २९–१२ |
| इंपीरिअल बॅंक ( ५० ) १२% | १५७५—० |
| बॉंबे प्रॉं को बॅंक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बॅंक ( १०० ) ३½% | १२६—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९४–१२ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु ४ आ बोनस | ९५८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७६१–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १०% | १२२—३ |
| कराची ( १०० ) ९% | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि ( १००० ) ५½% | १४२७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% | १५०५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ८ रु. | १७६— ४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु | ४९—८ |
| शिंदा स्टीम ( १५ ) १ रु. | २३—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु ४ आ | ४०–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस | ४,२५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १६३—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २६८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | १,२००—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३४–७¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ४६–१३ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास | १५—९ |
| „ केसर प्रत्येक मणास | ११–४ |
| „ सरया प्रत्येक मणास | ११ –२ |

श्री.

सांगली ( S M O. )

कु. सा. न. वि. वि. ता. २ ८-३७

“आपलें जा. न. ६५२ ता. २७।७।३७ चें आलेलें सर्क्युलर पोचलें, त्यांत नमूद असलेप्रमाणें बॉंड मागणीबद्दल अर्ज पुरा करून या सोबत ठेविला आहे. पूर्वीचा नं. २३२३ चा ( कल्पतरू ) बॉंड भरपाई करून या लगत पाठविला आहे. माझे बाडवर लागलीच बक्षीस मिळाल्याकारणानें आनंद वाटतो व मी आपला त्याबद्दल अत्यंत आभारी आहे. कळावे लोभ अ. हे वि

आपला.

( सही ) रघुनाथ गोपाळ साखरे

C/o मॅजिस्ट्रेट वर्ग १ ऑफिस, मु. पो. सांगली ”

दुसरी बक्षीस वांटणी साधण्यास आताच ‘ कल्पतरू बॉंड ’ विकत घ्या.

लिहा अगर भेटा:–मे. केळकर ब्रदर्स, स्पेशल एजंटस्, बुधवार चौक, पुणें. श्री र्यं. रा. अभंग, स्पे. ऑ. सातारा सिटी.

महाराष्ट्र इन्शु कं. लि. कऱ्हाड जि सातारा.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you

NEW BUSINESS

Last year 1936-37

Exceeds

2 CRORES & 82 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Office* · throughout India & the East

S C. MAJUMDAR,

MANAGER · Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

— मनपसंत काम —
वक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा.—
भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें

UNEMPLOYMENT NO MORE

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

# उंसाची नवी लागवड सुरू झाली.

—कार्यक्रम— डिसेंबर १९३७ मशिनरीचा दुसरा हप्ता, जानेवारी १९३८ मशिनरीचा तिसरा हप्ता, फेब्रुवारी १९३८ मशिनरीचा शेवटचा हप्ता मुंबईस येणार.

साखरेचे भाव वाढले त्या प्रमाणांत नफाही वाढणार.

शेअर आज घेऊन ठेवा; पुढें शेअरचे भाव वाढतील.

॥ विश्वासः फलदायकः ॥

सविस्तर माहिती व शेअर फॉर्म्स खालील पत्त्यावर मिळतील.

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें.

२५७ बुधवार पेठ, पुणें २.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर-मुंबई.
याचे
ओरिजिनल
ब्राह्मी तेल
मेंदूचे विकार व डोके दुखणे यावर
बालंत काढा
मुलांकरिता बाळकडू.
कुमारी आसव
नं १ दहा दिवसात घेणेचा
नं २ दहा दिवसानतर घेणेचा.
मुख्य दुकान: ठाकुरद्वार, शाखा: परळ व दादर.
पुणे एजंट.—ठाकूर आणि क, जोगेश्वरी नाका, पुणे २

## भारतीय अर्थशास्त्र

लेखक:—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारे ५५०, किंमत पांच रुपये

प्रथमत: अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरश विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धदा, मजुराची चळवळ, हुडणावळ, सहकारी चळवळ, सरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नाचें सागोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न १९५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. न. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434


जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४


# अर्थ


वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा


'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र


संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २२ डिसेंबर, १९३७ अंक ५०



## टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

सर्व प्रकारचे स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,

## K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

## दी प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : बेंगलोर
शाखा : मुम्बअी, दादर, पुणें, पुणे शहर, सोलापूर, पांचगणी, कऱ्हाड
चेअरमनः खानसाहेब हाजी कासम, अेम्. अेल. सी. प्रेसिडेंट, कऱ्हाड म्युनिसिपालिटी
मॅनेजिंग डायरेक्टर : अेस पी ठाकर.
चालू ठेवी : द सा द शें. २% सेव्हिंग्ज बँक ठेवी : द सा द शें ३%
मुदतीच्या ठेवींच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात सविस्तर माहितीकरितां बँकेकडे चौकशी करा
डॉ जी एस् गोरे, अेजंट, १७ मेन स्ट्रीट, पुणें.
अेच जी गद्रे, बी अेससी, अेजंट, लक्ष्मीरोड, पुणें शहर

— मनपसंत काम —
वकशीरपणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
## झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

## उंसाची नवी लागवड सुरूं झाली.

—कार्यक्रम— { डिसेंबर १९३७ मशिनरीचा दुसरा हप्ता / जानेवारी १९३८ मशिनरीचा तिसरा हप्ता / फेब्रुवारी १९३८ मशिनरीचा शेवटचा हप्ता } मुंबईस येणार.

साखरेचे भाव वाढले त्या प्रमाणांत नफाही वाढणार.
शेअर.आज घेऊन ठेवा; पुढें शेअरचे भाव वाढतील.

॥ विश्वासः फलदायकः ॥

सविस्तर माहिती व शेअर फॉर्म्स खालील पत्त्यावर मिळतील.

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें.

२५७ बुधवार पेठ, पुणें २.

# विविध माहिती

### बँकास सुटी

शुक्रवार व शनिवार, ता २४ व २५ डिसेंबर, १९३७ रोजी "नाताळ' निमित्त बँका बंद रहातील

### प्रोफेसर फिशर ह्यांचें व्याख्यान

लंडन युनिव्हर्सिटीचे सुप्रसिद्ध प्रोफेसर डॉ आर ए फिशर, एफ आर. एस, ह्यांचें गेल्या रविवारीं पुणें येथें हिंदी आकडे-शास्त्र संस्थेच्या पुणें शाखेच्या विद्यमानें प्रो वा गो काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली "आकडेशास्त्रातील नमुना पद्धति" ह्या विषयावर उद्बोधक व्याख्यान झालें व्याख्यानास हिंदी हवामान-खात्याचे प्रमुख डॉ. नॉर्मंड, शेतकी कॉलेजातील वेगवेगळ्या शास्त्राचे अधिपती व अनेक प्राध्यापक हजर होते

### सरक्षक जकातींचा प्रश्न पुनः टारीफ बोर्डाकडे सोपविला

कागद, कागदाचा राधा व मॅग्नेशियम क्लोराईड ह्या धंद्यास सरकारनें १९३१ सालीं दिलेल्या सरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९३९ अखेर सपते. त्यानंतर किती संरक्षण आवश्यक आहे, ह्याविषयीं चौकशी करून रिपोर्ट सादर करण्याचें काम सरकारनें टारीफ बोर्डाकडे सोपविलें आहे. कागदावरील जकातीवर बसविण्यांत आलेली करपट्टी अनवश्यक वाटल्यास बोर्डानें तशी शिफारस तात्काळ करण्यास हरकत नाहीं

### टारीफ बोर्डाचा साखरेच्या धंद्याचे सरक्षणाबाबत रिपोर्ट

हिंदी साखरेच्या धंद्यास ३१ मार्च, १९३८ ते ३१ मार्च, १९४६ ह्या मुदतींत किती संरक्षण आवश्यक आहे, ह्याबाबत चौकशी करून शिफारसी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें टारीफ बोर्डाची नेमणूक केली होती. बोर्डानें आपला रिपोर्ट सरकारास सादर केला आहे, परंतु त्यावरील आपल्या अभिप्रायाबरोबरच तो सरकार प्रसिद्ध करणार आहे ह्यामुळें, लोकमताचा सरकारावर परिणाम होण्यास कांहींच साधन नाहीं ३१ मार्च, १९३८ च्या आत गव्हर्नर जनरल इन कौन्सिलनें मध्यवर्ती कायदेमंडळास सरक्षक जकातीं विषयीं आपल्या सूचना सादर केल्या पाहिजेत, असें १९३२ च्या साखरेच्या सरक्षणा बाबतच्या कायद्यात एक कलम आहे

### ढब्बू पैसे

ढब्बू पैसा हें कायदेशीर चलन असलें, तरी ह्या नाण्याचा प्रसार मर्यादित करण्यात येत आहे व सरकारी तिजोऱ्याकडे येणारीं नाणीं परत बाहेर दिलीं जात नाहींत.

### इंग्लंडमध्यें आरोग्य विम्याचें कार्य

ग्रेटब्रिटनमध्यें जनतेच्या आरोग्याचा विमा उतरून लोकास औषधपाण्याची सोय करून देण्याबाबतच्या विम्याची योजना अमलात आहे त्या योजनेच्या कार्यक्रमात एका वर्षांत साडे-सहा कोटि रोग्यांना औषधें देण्यात आलीं आणि त्याप्रीत्यर्थ तीन कोटि रुपये खर्च झाला.

### जननाच्या प्रमाणांत घट व त्याविषयी चौकशी

इंग्लंडमध्यें जननाचें प्रमाण कमी होत असून लोकसंख्या घटत चालली आहे ह्या प्रश्नाच्या चौकशीस आधार म्हणून जनन व मृत्यु ह्या संबधातली माहिती गोळा होण्यासाठी कायद्याची व्यवस्था व्हावयाची आहे त्या विषयींचें एक बिल कॉमन्स सभेंत चर्चिलें जात आहे

### ग्रामसुधारणेवर ग्वालेर येथें व्याख्यान

ग्रामसुधारणा कार्याचे पंजाबमधले प्रवर्तक, मि ब्रेन, ह्यांचें प्रो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली व्हिक्टोरिया कॉलेजच्या दिवाणखान्यांत ग्वालेर येथें सदीप व्याख्यान झालें.

### नाताळानिमित्त टेलिफोनचे दरात सवलत

हिंदुस्थानातून ग्रेट ब्रिटनमधील माणसाशी टेलिफोनवर बोलण्यास पहिल्या तीन मिनिटास ४० रु पडतात व नंतर प्रत्येक मिनिटास १३ रु. ५ आ पडतात. नाताळानिमित्त हे दर निम्मे करण्यात आले आहेत २५ व २६ डिसेंबर, १९३७ आणि २ जानेवारी, १९३८ ह्या दिवशीं मात्र ही सवलत मिळणार नाही.

### गोशाळानियंत्रक कायदा

गोशाळांच्या व्यवस्थेचें नियंत्रण सार्वजनिक हितदृष्ट्या व्हावें ह्या हेतूनें एक कायदा करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे ह्या संबधातल्या मसुद्यांत कित्येक आक्षेपार्ह बाबी होत्या त्या एका शिष्ट मंडळानें मुख्य प्रधानांच्या नजरेस आणल्या असून त्याचा विचार होऊन नवीन बिल तयार करण्यात येईल असें आश्वासन सरकारतर्फे देण्यात आलें आहे

### इटलीनें लेबर ऑफिसचें (मजूर संघाचें) सभासदत्व सोडलें

इटलीनें ११ डिसेंबर रोजी राष्ट्रसंघाचें सभासदत्व सोडलें. आतरराष्ट्रीय मजूरसंघ राष्ट्रसंघापासून स्वतंत्र आहे, म्हणजे मजूर संघाचा सभासद राष्ट्रसंघाचा सभासद असावाच लागतो, असें नाहीं राष्ट्रसंघाच्या सभासदांपेक्षा लेबर ऑफिसचे सभासद ज्यास्त आहेत. जपाननें राष्ट्रसंघातून अंग काढून घेतलें तरी लेबर ऑफिसनें सभासदत्व सोडलें नाहीं. इटलीनें मात्र हें सभासदत्वहि सोडल्याचें जाहीर केलें आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु ० आ. ७ पै दरानें व्याज

रिझर्व्ह बॅंकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यावर व्याजाचा दर सरासरीनें द. सा. द. शे. १ रु. ० आ. ७ पै इतका पडला.

### इंपीरियल कौन्सिलची संशोधन कार्याकरितां ६ लक्ष रुपयांची मंजुरी

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बॉडीची सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती. सभेनें नव्या संशोधन योजनास संमति दिली व त्याप्रीत्यर्थ ६ लक्ष रु मंजूर केले डेअरी तज्ञाच्या रिपोर्टासहि गव्हर्निंग बॉडीनें मान्यता दिली एक कीटक तज्ञ व एक कॉफी तज्ञ ग्रेटब्रिटनमधून मागविण्याविषयींची सूचना नामंजूर झाली कोयनेलच्या लागवडीच्या प्रसाराकरितां ४४ हजार रु. मंजूर करण्यात आले

### लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम, पुणें

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें या संस्थेच्या संवर्धनासाठी मुंबई सरकारकडे या संस्थेच्या विश्वस्त मंडळानें मदतीसाठी योजना सादर केली आहे या योजनेंतील मागणीचे पुष्ट्यर्थ पुणें येथील "पुणें प्रेस ओनर्स असोसिएशन, पुणें" व मुंबई येथील "महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स" या संस्थानीं खास ठराव केले आहेत.

### रिझर्व्ह बॅंकेच्या चलनी नोटा

रिझर्व्ह बॅंक पाच, दहा, शंभर, हजार व दहा हजार रुपयांच्या नोटा काढण्यास लवकरच प्रारंभ करणार आहे पन्नास व पाचशें रुपयांच्या नोटा न काढण्याचें बॅंकेनें ठरविलें आहे. हिंदुस्थान सरकारच्या चलनाची व्यवस्था आता रिझर्व्ह बॅंकेकडे आहे.

### मुंबई बंदरातून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु किंमत |
|---|---|
| ५-१२-३७ ते ११-१२-३७ | ५०,९८,०४९ |
| १२-११-३७ ते १८-१२-३७ | ९,७३,०९६ |
| २१-९-३१ ते १८-१२-३७ | ३०७,२१,५२,[illegible] |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ६१२ | मनुष्याचें यंत्रीकरण—दगडी कोळशापासून साबण—इंडियन अकौन्टन्सी बोर्ड | |
| २ साम्राज्य आणि हिंदुस्थान | ६१३ | ६ मोटार रस्त्याची योजना | ६१७ |
| ३ हिंद ब्रिटन व्यापारी कराराची रस्सीखेच | ६१४ | ७ इंग्रजी कॅलेंडरांत सुधारणा | ६१८ |
| ४ "हिंदुस्थानचा राज्यकारभार" | ६१४ | ८ सहकारी चळवळ | ६१९ |
| ५ स्फुटविचारः—नवीन शिक्षण पद्धतीची योजना—डॉ झकीर हुसेन ह्यांच्या योजनेचा एक विशेष—मुंबई सरकारचें स्वदेशी मालास उत्तेजन— | | ९ दड थोपटू लागले | ६१९ |
| | | १० ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर | ६२० |
| | | ११ निवडक बाजारभाव | ६२० |
| | | १२ दिल्ली येथील सपद्मालय संस्थांची परिषद् | ६२१ |



# अर्थ

बुधवार, ता २२ डिसेंबर, १९३७


## साम्राज्य आणि हिंदुस्थान

ब्रिटिश साम्राज्यांतील राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीविषयींच्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठीं लंडन येथें रॉयल ऐंपायर सोसायटीच्या विद्यमानें नुकतीच एक परिषद् भरली होती. साम्राज्यातील लोकांची रहाणी सुधारण्यासाठी संघटित प्रयत्न करणें हा तिचा मख्य उद्देश होता. हिंदुस्थान सरकारचे माजी कार्यकारी मंत्री, सर फ्रॅंक नॉइस, ह्यांनीं ह्या देशांतल्या परिस्थितीविषयीं आपले विचार परिषदेपुढें माडले चागलें अन्न, अंगभर कपडे, स्वच्छ घरें ह्यांची आवश्यकता शेतीच्या धंद्यावर बहुतांशी अवलंबून राहणाऱ्या हिंदुस्थानात जितकी तीव्र आहे तितकी ती साम्राज्यातील दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं असें त्यानी सांगितलें हिंदी जनतेस मिळणारें अन्न पुष्टिदायक नसतें आणि त्यासाठीं धान्य, भाजीपाला व फळें ह्याची योग्य पैदास होण्याची व्यवस्था केली पाहिजे असें सर फ्रॅंक ह्यांनीं सुचविलें. नुसत्या पिकाचा विस्तार करून कार्यभाग होणार नसून हिंदी खेडेंगावें रहाण्यास लायक आणि त्यातला शेतीचा धंदा उत्पादक होणें अगत्याचें आहे असा अभिप्राय त्यानी व्यक्त केला. इंग्लिश लोकांचें लक्ष हिंदी जनतेनें अधिक ब्रिटिश माल घ्यावा इकडे नेहमी असतें पण माल विकत घेण्याचें ह्या देशाचें सामर्थ्यच मर्यादित आहे, तर तो परराष्ट्रीय माल खरेदी कसा करणार? ब्रिटिशांनीं हिंदुस्थानचा कच्चाच नव्हे तर पक्का माल घेतल्यावाचून हिंदी लोकांनीं ब्रिटिश मालास आश्रय द्यावा अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे असें सर फ्रॅंक नॉइस ह्यानी निक्षून सांगितलें. देवाण-घेवाणीचा हा व्यवहार आहे आणि तो हिंदुस्थानास परवडला पाहिजे केवळ साम्राज्याविषयींच्या अभिमानाचा पुरस्कार करून कार्यभाग होणार नाहीं हें ब्रिटिशांनीं लक्षांत ठेवावें

वरील वादविवादामध्यें सर फ्रॅंक नॉइस ह्यांचें, हिंदी खेडेगावातील लोकांची प्रगति त्यांस स्थानिक परिस्थितींतच ठेवून घडवून आणली पाहिजे हें मत सर जॉन मेनार्ड, दुसरे एक सेवानिवृत्त सिव्हिलियन, ह्यांनीं खोडून काढलें. हिंदुस्थानाच्या अडचणींशीं परिचय असलेल्या ह्या अनुभवी गृहस्थाचें असें म्हणणें पडलें कीं येथील खेडेगांवामध्यें आजच माणसाची गर्दी उडाली आहे आणि बेकारी माजली आहे आणि त्यासाठी लहान-मोठे उद्योगधंदे काढून त्यास आपल्या टापूत काम मिळेल अशी सोय केली पाहिजे लोकसंख्या वाढत जाणार आणि तिच्याबरोबर खेडेगांवी लोकांची बेकारी अधिकाधिक बिकट होणार. ह्या लोकांनीं अनुत्पादक मर्यादेमध्यें राहून आपला चरितार्थ कसा चालवावा? खेडेगावी जनतेस शेतीशिवाय इतर व्यवसायात उद्योग मिळल्यावाचून तिच्या दुःस्थितीचा प्रश्न सुटावयाचा नाहीं हा महत्वाचा व चिंतनीय मुद्दा सर जॉन मेनार्ड ह्यांनीं पुढें माडला सर सेल्व्हिन फ्रिमँटल ह्यांनीं असें सांगितलें कीं उद्योगधंद्याचा विस्तार झाला तरी बेकारीचा प्रश्न सुटण्यास तेवढ्यानें विशेष सहाय मिळेल असें नाहीं हिंदी जनतेची आर्थिक स्थिति सुधारणें ही केवळ आर्थिक स्वरूपाची गोष्ट नाहीं आपला भौतिक अभ्युदय व्हावा असें सामान्य माणसास आतून वाटलें पाहिजे आणि त्याची मनोभूमिका बदलणें हें संघटित संस्थाचें काम आहे सर सेल्व्हिन ह्यांचा हा अभिप्राय अगदी एकांगी आहे हें सांगावयास नको. सर हेन्री लॉरेन्स ह्यांनीं असें सुचविलें कीं साम्राज्यातील इतर भागात हिंदी लोकास जाण्यास व वसाहत करण्यास संधी देणें आवश्यक आहे

सेवानिवृत्त होऊन ह्या देशातून स्वगृहीं गेलेल्या नोकरानीं प्रकट केलेल्या विचारांचा हिंदुस्थानचे हाय कमिशनर, सर फिरोजखान नून, ह्यांनीं समारोप केला ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इत्यादि साम्राज्यांतर्गत राष्ट्रांशीं हिंदुस्थानची तुलना केल्यास हिंदी लोकांची रहाणी किती हलक्या दर्जाची आहे, हें दिसून येतें असें म्हणून हा देश दरिद्री राहिला असता ब्रिटिश साम्राज्याची बळकटी कशी टिकणार ह्याचा विचार झाला पाहिजे असें त्यानीं सांगितलें साम्राज्याचें बळ पुष्कळ अंशानीं हिंदुस्थानच्या सुस्थितीवर अवलंबून असल्यानें ह्या देशातील जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्यास सर्व साम्राज्यप्रेमी लोकानीं हातभार लावला पाहिजे अशी त्यानीं सूचना केली. ब्रिटिश साम्राज्य-मंदिराचा हिंदुस्थानचा अभ्युदय हा पाया आहे आणि तो कच्चा राहिल्यास सबंध इमारतीस धोका आहे असेंहि त्यानीं बजावलें अर्थशास्त्रीय तज्ज्ञ म्हणून हिंदुस्थानच्या सरकारासाठी मि ग्रेगरी ह्यास सल्लागार नेमण्यांत आलें आहे. त्याचें ह्या देशाच्या वतीनें सर फिरोजखान यानीं स्वागत केलें; त्यास मात्र हिंदी लोकमताचा पाठिंबा नाहीं हें त्यानीं ध्यानांत वागवावयास हवें होतें. हिंदुस्थानच्या जनतेची रहाणी सुधारण्याच्या हेतूनें मि ग्रेगरी योजना सुचवणार आणि त्या योगानें ह्या देशाचें आर्थिक नशीब उघडणार ही बालिश कल्पना त्याच्या डोक्यात कशी आली हें आश्चर्य आहे

### सिंधमधील नवीन रस्ते

सिंधच्या प्रातिक सरकारनें येत्या पाच वर्षांत ८०० मैल लाबीचे नवे रस्ते तयार करण्याचें ठरविलें आहे रेल्वेच्या फाट्यास पोषक होतील, असेच रस्ते हातीं घेण्यात येतील. हिंदुस्थान सरकार ह्या रस्त्यांसाठी पेट्रोल फंडातून १० लक्ष रु देणार आहे.

## हिंद-ब्रिटन व्यापारी कराराची रस्सीखेच

हिंदी व्यापारी शिष्टमंडळ लंडनहून परत आल्यापासून इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें व्हावयाच्या व्यापारी करारानें पुढें काय होतें ह्याविषयीं साशंकपणा उत्पन्न झाला आहे. ब्रिटिश व हिंदी शिष्टमंडळें ह्यांच्या मागण्या परस्परास पसंत पडत नसल्यानें वांघा उत्पन्न झाला आहे, ह्यांत संशय नाहीं तथापि, हिंदी शिष्टमंडळाची बाजू हिंदुस्थान सरकारनें उचलून धरली आहे अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. ती खरी असेल तर ही परिस्थिति समाधानकारक आहे असें म्हटलें पाहिजे सरकार व सल्लागार मंडळ ह्यांची एकवाक्यता असेल तरच ब्रिटिश व्यापारी व ब्रिटिश सरकार ह्यांचेवर वजन पडून हिंदुस्थानास अनुकूल असा करार होण्याचा संभव आहे. हिंदुस्थान सरकारनें आपलें म्हणणें ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडला कळवलें असून त्याच्या उत्तराची तें वाट पहात आहे जरूर पडेल तेव्हा हिंदी व्यापाऱ्यांशीं पुन्हां विचार-विनिमय करावयाचें त्यानें ठरवलें आहे आणि सल्लागार मंडळानेंहि ह्या गोष्टीस मान्यता दिली आहे. मतभेदाच्या बाबींची चर्चा करण्यासाठी ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडचा प्रतिनिधि कदाचित हिंदुस्थानात येईल किंवा हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि लंडनला जातील असा रंग दिसतो. ह्यावरून काहीं महत्त्वाच्या प्रश्नांचे संबधांत हिंदुस्थान आणि ग्रेट ब्रिटन ह्यांचेमध्यें रस्सीखेच चालली आहे ह्यात संशय रहात नाहीं.

इंग्लंडला विशेष अनुकूल अशा अटी हिंदुस्थाननें मान्य कराव्या असा लँकेशायरचा आग्रह आहे असें उघड दिसतें कपाशीच्या बाजारभावातील घट आणि तिचा हिंदी व्यापारावर होणारा परिणाम ह्याच्या योगानें आपली बाजू बळकट झाली असल्याचें लँकेशायरला वाटत असलें पाहिजे हिंदुस्थानास आपला कापूस परदेशामध्यें खपावयास पाहिजे आहे. इतर बाजारपेठा मर्यादित होत असता ठराविक प्रमाणात हिंदी कपास खरेदी करण्याचें अभिवचन आपण देत आहों आणि त्याच्या मोबदला आमच्या कापडास जकातींच्या सवलती द्या अशी सरळ व सयुक्तिक मागणी आम्ही करीत आहों, असें मँचेस्टरचे गिरणीवाले म्हणणार. हिंदुस्थानास हा एक प्रकारचा पेच आहे हिंदी कापसाची जपानची खरेदी ह्यापुढें किती राहील हें अनिश्चित आहे. सध्याची युद्धपरिस्थिति बाजूस ठेवली तरी जागतिक राजकारणाची घडी नवीन तऱ्हेनें बसत आहे, तीमध्यें जपानचें हिंदी व्यापाराबाबत कोणत्या प्रकारचें धोरण राहील हें सागता येत नाहीं. हिंदी कपाशीस आज जपानमध्यें मोठी मागणी आहे ती कमी झाल्यास त्या बाजाराची जागा कशी भरून काढावी हा अवघड प्रश्न हिंदुस्थानचे पुढें उभा रहाणार आहे. लँकेशायर हिंदी कापसाची खरेदी निश्चितपणानें व वाढत्या प्रमाणात करण्याचें अभिवचन देईल, पण त्याबरोबर आपल्या कापडास ह्या देशात विशेष सवलती मिळाव्या अशी मागणी करील. देवाण-घेवाण तऱ्हेची ही मागणी असल्यानें तिचा योग्य परामर्श हिंदुस्थानास घ्यावा लागेल. केवळ व्यावहारिक दृष्टीनें व व्यापारी सवदा ह्या दृष्टीनें तिच्याकडे पाहिलें असता लँकेशायरचें म्हणणें सयुक्तिक दिसेल पण तें मान्य केल्यास हिंदी कपास-गिरण्यांच्या परिस्थितीवर काय परिणाम होईल ? जपानी व ब्रिटिश दोनहि कारखानदारांचें कापड ह्या देशात येऊं लागल्यास उत्पन्न होणारी स्पर्धा हिंदी गिरण्याम परवडेल काय ? त्याचप्रमाणें, लँकेशायर मागत असलेल्या सवलतींचा पूर्ण मोबदला हिंदुस्थानास अन्य बाबींमध्यें मिळत आहे काय ? ह्या गोष्टींचा येथें प्रामुख्यानें विचार करावा लागेल राजकीय दृष्ट्या राष्ट्रांचे नवीन तऱ्हेनें गट बनत आहेत. जर्मनी, इटली व जपान ह्यांचा गट बनला असून, त्यांच्या आर्थिक व व्यापारी धोरणास विशिष्ट प्रकारचें वळण लागण्याचा संभव दिसतो. होईल तों कच्चा माल आपल्या हद्दींतच तयार करण्याचा चंग जर्मनी व इटली यानी बांधला असून मध्य युरोपांत नवीन व्यापारी करार होत आहेत. जगाच्या व्यापाराची घडी नीट बसविण्याचा यत्न करणारा राष्ट्रसंघ दुर्बल झाला आहे. आतरराष्ट्रीय व्यापारासंबधीं परिस्थिति अशा तऱ्हेची अनिश्चित आहे. ती लक्षात ठेवून हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचें धोरण आखलें जाणें अगत्याचें आहे.

## " हिंदुस्थानचा राज्यकारभार*"

नवीन राज्यघटनेपैकी प्रांतिक स्वायत्तता आता अमलात आली असून फेडरल–संयुक्त–कोर्टाचीहि स्थापना झालेली आहे. फेडरेशन अद्याप अस्तित्वात यावयाचें आहे. ह्या नव्या घटनेची माहिती सोपपत्तिक करून देणाऱ्या मराठी पुस्तकाची वाण प्रो. रा. वि ओतुरकर ह्यांच्या " हिंदुस्थानचा राज्यकारभार " ह्या ग्रन्थानें भरून काढली आहे. प्रो. ओतुरकर ह्यानीं आपल्या पुस्तकांत प्रथम राज्यघटनेच्या मूलतत्त्वाचें तात्त्विक विवेचन केलें आहे हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचा पूर्वेतिहासहि त्यानीं दिला आहे, त्यामुळें चालू घटनेची संगतवार माहिती वाचकास सुलभतेनें मिळते प्रास्ताविक, विलायत सरकार, हिंदुस्थान सरकार, प्रांतिक सरकार, राज्यकारभाराचीं विविध खातीं, उपसंहार, इत्यादि पुस्तकाचे प्रमुख विभाग आहेत. पुस्तकाची भाषा सुबोध अशीच आहे. प्रस्तुत पुस्तक विद्यार्थ्यांप्रमाणें सामान्य नागरिकास व सार्वजनिक कार्यकर्त्यांस खात्रीनें उपयुक्त वाटेल. खास मॅट्रिकचे विद्यार्थ्यांकरितां " हिंदुस्थानची सोपपत्तिक शासनपद्धति " हें लेखकाचे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होणार आहे तेव्हां, "हिंदुस्थानचा राज्यकारभार " ह्या ग्रन्थात नवीन राज्यघटनेमुळें हिंदी आर्थिक प्रगतीची गळचेपी कशी झाली आहे, हिंदी व्यापारवृद्धीच्या मार्गांत त्यामुळें अडथळे कोणते येणार आहेत इत्यादि मुद्यांचें आविष्करण ज्यास्त तपशीलवार आलें असतें, तर पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडली असती. औद्योगिक उन्नति झाल्याखेरीज केवळ मामुली लोकशाहीचा काहीं उपयोग नाहीं, आणि ही उन्नति घडवून आणण्याचें कार्य नव्या घटनेनें ज्यास्तच दुर्घट केलें आहे असो प्रो. ओतुरकर ह्यांचा ग्रन्थ नव्या घटनेचें आकलन होण्याचे दृष्टीनें अत्यत उपयुक्त झाला आहे, ह्यात संशय नाहीं. पृष्ठसंख्येचे मानानें किंमत अल्प आहे

*ले.—प्रो राजाराम विनायक ओतुरकर, एम ए, पृ सं ३५० किं २ रु

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person

# स्फुट विचार

## नवीन शिक्षण पद्धतीची योजना

वर्धा येथें कांहीं आठवड्यामागें भरलेल्या परिषदेंत मुलांकरिता नवीन शिक्षणक्रम आखण्याचा विचार झाला महात्मा गांधींच्या प्रेरणेनें वरील तऱ्हेची शिक्षणाची पद्धति चालू करण्याची कल्पना बळावली आणि त्यासाठी एक समिती नेमण्यांत आली समितीचे अध्यक्ष डॉ. झकीर हुसेन ह्यांनीं मुलामुलींसाठी शिक्षणक्रम तयार केला आहे आणि त्यांच्या शिफारसी प्रसिद्ध झाल्या आहेत कोणत्या तरी हस्तव्यवसायावर सर्व शिक्षण आधारलें जावें हें त्याच्या योजनेचें आद्यितत्त्व आहे कारकुनी पेशाचे तरुण तयार करण्यात चालू शिक्षणपद्धतीचा परिपाक होत असतो, असा कटु अनुभव सर्वांसच आला आहे आणि त्या सबधानें कित्येक वर्षे ओरड चाललेली आहे. आमच्या शाळांत शिकून तयार झालेला मुलगा हस्तव्यवसाय आणि अगमेहनत करण्यास नाखुष असतो आणि नोकरीसाठी धडपड करतो ह्या कारणानें शेती व उद्योगधंदे ह्यांची अनास्था होऊन समाजात बेकारी माजते. शाळांतून हस्तव्यवसायास प्राधान्य दिलें गेलें तर ह्या अनिष्ट प्रवृत्तीस आळा बसेल ह्यात शंका नाहीं. स्वभाषा, भौतिक शास्त्रें, नागरिकत्व इत्यादि संस्कृतिमूलक विषयांचेंहि शिक्षण दिलें जावें अशी नवीन शिक्षणक्रमाची योजना आहे, हें समाधानकारक आहे हस्तव्यवसायाच्या भोंवतीं हे महत्त्वाचे आणि आवश्यक विषय गुंफले जावयाचे आहेत ह्या दोहोंचा योग्य मिलाफ करण्याचें काम अवघड आहे, ह्यात शंका नाहीं त्यासाठी शिक्षकांचा तीन वर्षांचा शिक्षणक्रम आखण्यात आला आहे योग्य व लायक शिक्षकाचे अभावीं नवीन योजलेली शिक्षण पद्धति अयशस्वी होण्याची भीति असल्यानें ह्या बाबीकडे विशेष लक्ष पुरवलें जाणें अगत्याचें आहे.

---

## डॉ. झकीर हुसेन ह्यांच्या योजनेचा एक विशेष

वर्ध्याच्या शैक्षणिक परिषदेमधून निघालेल्या झकीर हुसेन कमिटीनें नवीन शिक्षणक्रम आखला आहे, त्याचा एक विशेष असा आहे कीं, त्यास अनुसरून दिलेलें शिक्षण खर्चाच्या दृष्टीनें स्वयसिद्ध व्हावें विद्यार्थ्यांस हस्तव्यवसाय तर यावेत, पण त्याचे बरोबरच शिकत असता त्यांनीं तयार केलेला माल विकला जाऊन येणाऱ्या उत्पन्नातून शाळेचा खर्च भागावा असा सुचवण्यांत आलेल्या शिक्षणक्रमाच्या योजनेचा प्रमुख हेतु आहे हें कितपत शक्य आणि इष्ट आहे ह्याविषयींची शंका परिषदेंत झालेल्या चर्चेमध्येंच प्रदर्शित करण्यात आली होती आणि डॉ. झकीर हुसेन ह्यांच्या योजनेविरुद्ध तो आक्षेप अजूनहि घेतला जात आहे विद्यार्थ्यांनीं तयार करावयाच्या मालांतून शाळेकरितां पैसा उभारण्याचें तत्त्व ग्राह्य आहे कीं नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न असून हा पैसा शाळेच्या खर्चास पुरा होईल किंवा कसें ही बाबहि विचार करण्यासारखी आहे शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या ध्येयाच्या मार्गांत त्यास लागणारा अवाढव्य खर्च ही मोठीच अडचण आहे ह्यात सशय नाहीं परंतु योजलेल्या शिक्षणक्रमानें ती दूर होण्यास कितीसें सहाय्य मिळेल ह्याविषयीं वाद आहे सप्तवार्षिक अभ्यासक्रमात अनेक विषयाचा अतर्भाव करण्यात आलेला आहे आणि तो तसा केलाच पाहिजे म्हणून विद्यार्थ्यांनीं हातानीं विणलेलें कापड, सुतारी व लोहारी माल, कलाकुसरीचे जिन्नस इत्यादींची विक्रीची व्यवस्था आणि तीमधून निव्वळ किंमत ह्याचा बनाव कसा होईल ह्याचा व्यावहारिक पद्धतीनें विचार होणें अगत्याचें आहे.

---

## मुंबई सरकारचें स्वदेशी मालास उत्तेजन

स्वदेशी उद्योगधद्यास जनतेनें उत्तेजन देण्याची आवश्यकता प्रतिपादण्याचे दिवस वास्तविक आता राहिलेले नाहींत तथापि, परदेशी माल स्वस्त व दिसण्यात सुबक असल्यानें त्याच्याकडे लोकाचें लक्ष सहज जाऊन तो विकत घेण्याचा मोह उत्पन्न होतो. ह्यासाठी जनतेच्या दृष्टीस स्वदेशी माल वारवार आणून तो खरेदी करण्याची प्रवृत्ति तिच्यामध्यें वाढेल व बळावेल असा प्रयत्न करावा लागतो प्रत्यक्ष सरकार हें हरतऱ्हेच्या मालाचें मोठें गिऱ्हाइक आहे आणि त्यास खरेदीची सघटित व्यवस्था करावी लागते. ह्याकरिता हिंदुस्थान सरकारचें लडनमध्यें व ह्या देशात स्वतत्र खातें आहे आणि त्याच्या विद्यमानें मालाची खरेदी केली जाते. ह्या खात्यानें शक्यतोंवर हिंदी बनावटीचा माल विकत घ्यावा अशी मागणी लोक करीत आले आहेत. मुंबई सरकारनें ह्या कामात लक्ष घालण्याचें ठरवलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. सरकारनें एक कमिटी नेमली असून निरनिराळ्या खात्यास लागणारा माल विकत घेण्यासाठी कोणती योजना कार्यक्षम होईल ह्याचा विचार करण्याचें काम तिच्याकडे सोपवलें आहे स्वदेशी माल आणि विशेषत हातसुताचें व हातमागावरील कापड व हातांनीं केलेला कागद ह्याची खरेदी केल्यास सरकारास जादा खर्च किती लागेल ह्याचा अदाजहि कमिटीनें करावयाचा आहे.

---

## मनुष्याचें यंत्रीकरण

ड्यूक ऑफ वुइडसर अमेरिकेंत दौऱ्यावर जाणार असें जाहीर झालें असता त्यास आयत्या वेळीं तो बेत रहित करावा लागला हें प्रसिद्ध आहे ड्यूक ह्याचे एक अमेरिकन मित्र, मि बेडो, हे त्याच्या दौऱ्याची सर्व व्यवस्था करणार होते, परतु हे गृहस्थ मोठे भाडवलवाले व कारखानदार असून कामकरी लोकात अत्यत अप्रिय आहेत ड्यूक ऑफ वुइडसर याची मजूर वर्गाविषयींची सहानुभूति प्रसिद्ध आहे आणि त्याचा दौरा असल्या खाष्ट कारखानदाराच्या विद्यमानें व्हावा हें त्या लोकास न आवडून त्यांनीं गिल्ला केला अशा परिस्थितींत आपला दौराच तहकूब करण्याचें ड्यूक ऑफ वुइडसर ह्यांनीं ठरविलें असल्यास त्यात आश्चर्य नाहीं. आपल्या कारखान्यात मजुराकडून चोपून काम करून घेण्याची पद्धति मि बेडो ह्यांनीं अमलात आणली आहे प्रत्येक मजुराम अधिकात अधिक किती काम करता येणें शक्य आहे ह्याचा शास्त्रीय पद्धतीनें हिशेब काढून त्या मापानें ते सर्वांचें काम मोजतात आपणास मानवी यंत्राप्रमाणें वागवण्यात येतें अशी कामकरणाराची तक्रार आहे कित्येकास शक्तीबाहेर काम करावें लागतें आणि अधिक कामामुळें वाढणाऱ्या नफ्याचा मोठा अश कारखानदार घेतो असें त्यांचें म्हणणें आहे कमी श्रम केले असता अधिक लोकांस काम मिळूं शकतें ह्या समजुतीनें कार्यक्षम व सुधारलेल्या यत्रास मजूर वर्गाचा नेहमीं विरोध असतो हें प्रसिद्ध आहे तथापि, मनुष्यास यत्र बनवून त्याचें शरीर आणि मन ह्याकडे दुर्लक्ष करणें हा आर्थिक शक्तीचा दुरुपयोग आहे ह्यात सशय नाहीं कामकऱ्याकडून ज्यास्तींत ज्यास्त काम पिळून काढण्याचे दुष्परिणाम रशियातहि दृष्टोत्पत्तीस आले आहेत असें म्हणतात तेथेंहि ही गोष्ट अनिष्टच समजली पाहिजे.

---

### दगडी कोळशापासून साबण !

आधुनिक भौतिक शास्त्रांची प्रगति इतक्या झपाट्यानें होत आहे कीं, कोणत्या पदार्थापासून कृत्रिम रीतीनें दुसरा कोणता पदार्थ तयार करतां येईल ह्याची कल्पना करणें अशक्य झालें आहे. दगडी कोळशापासून नाना तऱ्हेचे रंग व अत्तरें तयार करण्यात येत असून यत्रें चालवण्यास लागणारी प्रेरक शक्ति उत्पन्न करणारें तेलहि त्यांतून काढण्यात येत आहे जर्मन शोधक आता त्याच्याहि पुढें गेले आहेत साबण बनवण्यास लागणारें तेल दगडी कोळशापासून तयार केलें जात आहे आणि ह्या नवीन बनावटीचा साबण जर्मन बाजारात विकू लागला आहे ह्या साबणाचें वार्षिक उत्पादन साठ हजार टन इतकें होईल असा अंदाज आहे साबणात तेल घालतात त्यासाठी बाहेरून गळिताचीं धान्यें आणावीं लागू नयेत म्हणून जर्मनीची धडपड चालली आहे, त्या कार्यक्रमाचा हा एक भाग आहे

### इंडियन अकौन्टन्सी बोर्ड

हिंदुस्थानातील हिशेबतपासनिसाचे तीन वर्ग आहेत-(१) चार्टर्ड, (२) इन्कॉर्पोरेटेड व (३) रजिस्टर्ड हिंदी अकौन्टन्सी बोर्डावर सतरा सभासद असून ते सर्व हिंदुस्थान सरकारनें नेमलेले असतात सरकारच्या व्यापारखात्याचे सेक्रेटरी हे बोर्डाचे अध्यक्ष असतात. बोर्डावरील नेमणुकाची मुदत तीन वर्षांची असते हें बोर्ड प्रातिनिधिक स्वरूपाचें करण्यात यावें, अशी सूचना सरकारपुढें आहे प्रांतिक सरकारांनीं निवडणुकीच्या तत्त्वाचाच पुरस्कार केला आहे असें कळतें बोर्डाच्या गेल्या सभेंत ता १० डिसेंबर रोजीं ह्या प्रश्नाचा विचार झाला, त्या वेळीं प्रत्यक्ष बोर्डानेंहि नव्या योजनेस मान्यता दिली वेगवेगळ्या प्रांतात निरनिराळ्या वर्गांचे अकौन्टंट्स कमी-अधिक असल्यानें, त्या सर्वांस न्याय्य प्रतिनिधित्व कसें मिळवून देता येईल, हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे ह्याविषयीं निश्चित सूचना लवकरच पुढें येतील व हितसबंधी लोकांचीं मतें घेतलीं जातील सध्याच्या बोर्डाची मुदत एका वर्षानें तूर्त वाढविण्यात आली आहे. मध्यंतरीच्या काळात अकौन्टन्सी बोर्डाची पुनर्घटना करण्यात येईल

### मेघना नदीवरील नवीन पूल

पूर्व बंगालमधील मेघना नदीवर बांधण्यांत आलेल्या पुलाचें उद्घाटन नुकतेच पार पडलें पुलाची लांबी ३,००० फूट असून एकूण कामास ५६ लक्ष रु खर्च आला. आसाम व पूर्व बंगाल ह्यामधील दळणवळण ह्या पुलामुळें सुकर झालें आहे. पुलास सहाव्या जॉर्ज राजाचें नांव देण्यात आलें आहे

### कपास कापडाच्या गिरण्यांतील रात्रपाळी

नोव्हेंबर, १९३७ चे सुरवातीस मुंबई शहरातील कपास कापडाच्या ४६ गिरण्यातून ४४½ हजार कामगार रात्रपाळीवर होते अहमदाबादमधील ५८ गिरण्यात रात्रपाळी चालू होती व ३४ हजार कामगार रात्रीं काम करीत होते

### अहमदाबादमधून बाहेर जाणारें कपास कापड

२ लक्ष, ३८ हजार मण कपास-कपाड ऑक्टोबर, १९३७ मध्यें अहमदाबादेंतून बाहेर गेलें जानेवारी ते डिसेंबर, १९३७ ह्या दहा महिन्यातील निर्गत २०½ लक्ष मण भरते. १९३६ मधील पहिल्या दहा महिन्यातील निर्गतीच्या आकड्यापेक्षा हा आकडा १७ ३ टक्क्यानीं जास्त आहे.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा.—

**भाऊ गंगाधर साठे**, कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

श्री
सांगली (S M C)
क्र सा न वि. वि. ता २८-३७

"आपलें जा नं ६५१२ ता २७।७।३७ चें आलेलें सर्क्युलर पोंचलें त्यात नमूद असलेप्रमाणें बॉंड मागणीबद्दल अर्ज पुरा करून या सोबत ठेविला आहे पूर्वीचा नं २३३३ चा (कल्पतरू) बॉंड भरपाई करून या लगत पाठविला आहे माझे बाँडवर लागलीच बक्षीस मिळाल्याकारणानें आनंद वाटतो व मी आपला त्याबद्दल अत्यंत आभारी आहे कळावे लोभ अ हे वि

आपला.
(सही) रघुनाथ गोपाळ साखरे
C/o मॅजिस्ट्रेट वर्ग १ ऑफिस, मु पो. सांगली."

दुसरी बक्षीस वाटणी साधण्यास आताच 'कल्पतरू बॉंड' विकत घ्या.

लिहा अगर भेटा.—मे केळकर ब्रदर्स, स्पेशल एजंटस, बुधवार चौक, पुणें. श्री. [illegible] रा अभंग, स्पे. ऑ सातारा सिटी

महाराष्ट्र इन्शु क. लि कऱ्हाड जि सातारा

आणखी एक
**प्रगतीचा मोठा टप्पा**
५१ लाखांवरून ६६ लाख
**वेस्टर्न इंडिया**
लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लि, सातारा

विमा व्यवसायात विशेष महत्त्वाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीच्या अशा ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी कोणत्य हि जीवन विमा कंपनीस हार जाणार नाहीं आणि सुप्रसिद्ध विमागणिती श्री ग स मराठे, एम् ए, ए आय ए, (लंडन) म्हणतात त्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया ही

**सर्व विमाकंपन्यांना आदर्श**
अशी विमा संस्था आहे.

**गेल्या वर्षअखेरचा प्रगतीचा आढावा.**

| | | |
|---|---|---|
| एकूण विमा : | रु | ३,२०,००,०००हून अधिक |
| एकूण शिल्लक : | रु. | ८३,००,०००हून अधिक |
| सन १९३६ मधील उत्पन्न | रु | १९,३२,८९९ |
| लाईफ फंड व इतर गंगाजळी | रु | ७,०५,४७९ |
| सन १९३६ मधील नवें काम | रु. | ६६,४०,८३९ |
| एकूण क्लेम्स दिले : | रु. | १,८०,२०६ |
| त्याप्सचें प्रमाण : | | शेंकडा ४ |

**त्रैवार्षिक दर हजारी बोनस**
होल लाईफ रु. ७५ व एण्डोमेण्ट रु. ६०
विमा उतरण्याला किंवा एजन्सी घेण्याला -हीच कंपनी उत्कृष्ट.

पुणें शाखा:— बुधवार चौक, पुणें } मॅनेजर

## मोटार रस्त्यांची योजना

**जुन्यांची सुधारणा करावी का नवीन हमरस्ते तयार करावे?**

१९३६ सालीं, जगातील सर्व देशातील रस्त्यावर मिळून एकूण ४ कोटि मोटारगाड्या सचार करीत होत्या गेल्या तीन वर्षांत अमेरिकेंतील गाड्यांची सख्या १३ टक्क्यानीं वाढून ती २ कोटि, ८२ लक्ष इतकी झाली. युरोपातील गाड्यात २३ टक्के वाढ होऊन त्यांची संख्या १९३६ सालीं ७८½ लक्ष भरली हिंदुस्थानाच्या क्षेत्रफळाच्या व लोकसंख्येच्या मानानें ह्या देशांतील मोटारगाड्यांची संख्या ( सुमारें १½ लक्ष ) अल्प असली तरी मोटारींची वहातुक दिवसानुदिवस ज्यास्त, ज्यास्त होत आहे, ह्यात संशय नाहीं शीघ्र गतीनें जाणाऱ्या ह्या वाहनाच्या वहातुकीस योग्य असे रस्ते नवीन तयार करण्याची आवश्यकता अनेक देशास भासूं लागली आहे सध्या आहेत हेच रस्ते रुदावून मोटार वहातुकीस लायक करावे का नवीनच रस्ते तयार करण्यात यावे, ह्या संबधात तज्ज्ञामध्यें चर्चा चालू आहे सध्यांचेच रस्ते रुद करावयास यात्रिक साधनांचा फारसा उपयोग होत नाहीं व त्यामुळें त्यास खर्च फार येतो उलट, नवीन रस्ते यंत्रांचे सहायानें लवकर व थोड्या खर्चात करता येतात, असा अनुभव आहे जर्मनीनें मोठे हमरस्ते तयार केले आहेत, त्यापासून मोटारवाल्यांच्या वेळात, वहानास लागणाऱ्या जळणांत व यंत्राच्या झिजेमध्यें बचत होते. ह्याची माहिती "अर्था" च्या ता ८ डिसेंबरच्या अकात आलेलीच आहे. मोटारसारथ्यास थकवा कमी येतो, हा मुद्दाहि महत्त्वाचा आहे

जर्मनीमधील हमरस्त्यावरून मोटारी ताशीं ९० ते १०० मैल वेगानें जाऊं शकतात एका तासात, दर दोन सेकंदास एक गाडी, ह्या हिशेबानें २,००० गाड्यातून ६०,००० उतरू प्रत्येक रस्त्यावरून प्रवास करू शकतात. रस्त्याच्या दोन्हीं बाजूच्या २५ फूट रुंदीच्या पट्ट्या येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्यांसाठी स्वतत्र राखून ठेवलेल्या आहेत व दोन पट्ट्याचे मध्यभागीं १२ ते १६ फूट रिकामी जागा आहे इटलीमधील हमरस्त्याच्या मध्यावरून मोटारी जातात व येतात फ्रान्समध्यें सध्याचे रस्ते रुंद करण्याचें व नवीन हमरस्ते तयार करण्याचें हीं दोनहि कामें सुरू आहेत अमेरिकेंतील कॉक्रीटचे रस्ते केवळ मोटार वहातुकीसाठी राखून ठेवण्यात आलेले नसले, तरी त्याची रचना वेगवान मोटारींच्या येण्याजाण्यास सोइस्कर अशीच आहे.

नवीन रस्ते करावयाचे का जुनेच सुधारावयाचे, ह्या प्रश्नाचा निकाल लावण्यापूर्वी स्थानिक व राष्ट्रीय परिस्थिति विचारात घ्यावी लागेल अमेरिकेंतील ४० संस्थानातून ह्या विषयावर सशोधन चालू आहे प्रश्नाचा निकाल कसाहि लागला, तरी त्या करिता पैसे कोठून आणावयाचे, हा प्रश्न काहीं सुटत नाहीं मोटारवाल्याकडून घेण्यांत येणाऱ्या जादा करचे पट्टींतूनच तो खर्च भागवावा लागतो तथापि, ह्या पट्टीचें सर्व उत्पन्न रस्तेसुधराईकडे खर्चेलें जात नाहीं, असा अनुभव आहे मिळणारें उत्पन्न व होणारा खर्च एकत्र्याचाच विचार करूनहि भागत नाहीं उदाहरणार्थ, जर्मनीनें रस्त्याचें काम सुरू केलें, तें प्राय. बेकारीनिवारणासाठी केलें प्रत्येक देशांतील परिस्थिति भिन्न असणार व तीस अनुसरूनच धोरण आखावें लागेल मोटार वहातुक व रेल्वे वहातुक ह्यामध्यें अनिष्ट स्पर्धा होऊ नये, ह्यासाठीहि योजना करणें भाग पडेल. हिंदी रेल्वेजचें उत्पन्न बुडू नये, उलट मोटारींचे रस्ते रेल्वे वहातुकीस पोषक व्हावे, असें हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे.


**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.**

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व विघची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवींवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्हीं मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात

चेक, हुड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B R. Vartak

मॅनेजर

**न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वात मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो.—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री. डी के. जोगळेकर, बी ए,

ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,

टिळक रोड, पुणें ( २ )

**नागपूर प्रीमिअर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भाडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भाडवल | ८५,८०० |
| रिझर्व्ह फड | ४,८१२ |
| इतर फड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९८,५८६ |
| सेव्हिंग्ज बॅक ठेवी | ९,०८३ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७४,४३९ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुतविलेली एकूण रक्कम | ४०,७७४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात. आतापर्यंत डिव्हिडड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्याच्या घराचे तारणावर कर्ज देते.

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठी पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज्

## इंग्रजी कॅलेंडरांत सुधारणा

इंग्रजी कॅलेंडरांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रश्न राष्ट्रसंघापुढें गेलीं १५ वर्षें आहे. प्रथम १९२३ सालीं राष्ट्रसंघानें ह्या प्रश्नाच्या विचारास प्रारंभ केला, तेव्हांपासून हें भिजत घोंगडें असेंच पडलें आहे तथापि, ह्या प्रश्नास आता लवकरच चालना मिळेल, असा रंग दिसतो

सध्याच्या इंग्रजी वर्षांतील एक महिना दुसऱ्यासारखा नसतो २८, २९, ३० अगर ३१ ह्यांपैकी कितीहि दिवस एका महिन्यांत असू शकतात वर्षाच्या पहिल्या तिमाहींत ९० दिवस असतात, दुसऱ्या तिमाहींत ९१ दिवस येतात व शेवटच्या दोन तिमाहींत प्रत्येकीं ९२ दिवस असतात, म्हणजे वर्षाचा उत्तरार्ध पूर्वार्धापेक्षा तीन दिवसानीं मोठा असतो प्रत्येक महिन्यातील विशिष्ट तारखेस अमूकच वार येईल असें सांगता येत नाहीं. एका महिन्यात पाच रविवार येतील किंवा चारहि येतील सर्व महिन्यात कामाचे दिवस सारखे येत नाहींत. व्याज, डिव्हिडड इत्यादींचे हिशेब ठराविक दिवसाचें वर्ष नसल्याकारणानें फार घोटाळ्याचे होतात लीप इयरमध्यें फेब्रुवारी हा महिना २९ दिवसाचा असतो. सरकारी फडनविसाना जकातींपासून व इतर करापासून ह्या वर्षी एका दिवसाचें ज्यास्त उत्पन्न मिळतें व ही रकम बरीच मोठी असते ज्याचा रेल्वेचा पास असतो, त्यास एक दिवस फुकट प्रवास करता येतो. ज्याचा पगार महिन्याचा बोलीनें ठरलेला असतो, त्यास एक दिवस काम ज्यास्त पडतें, परंतु त्याबद्दल मोबदला मात्र मिळत नाहीं विद्यार्थ्यांची परीक्षा एक दिवस पुढें गेल्यामुळें त्यास मात्र अभ्यासास एक दिवस ज्यास्त मिळतो

प्रत्येक वर्षाचा प्रारंभ एका विशिष्ट दिवशींच—उ रविवारीं—व्हावा व प्रत्येक वर्षांतील प्रत्येक तारीख विशिष्ट दिवशींच यावी, अशी योजना असणारें कॅलेंडर अमलात आणण्याची सूचना राष्ट्रसंघापुढें आहे काहींचें म्हणणें असें कीं प्रत्येक वर्षांतील चारहि तिमाहींत ९१ दिवस असावेत व प्रत्येक तिमाही व सहामाही एका ठराविक वारींच सुरू व्हावी तिमाहींतील पहिल्या महिन्यात ३१ दिवस व पुढील दोन महिन्यात ३० दिवस असावेत प्रत्येक महिन्यांत कामाचे २६ दिवस रहावेत काहींचें म्हणणें असें कीं प्रत्येक महिना सारखा—२८ दिवसाचा—असावा व त्याकरिता जून व जुलै ह्याचेमध्यें एक नवीन- तेरावा--महिना घुसडून द्यावा. वरील दोनहि सूचनांनीं ३६४ दिवसाचा हिशेब केला तेव्हां ३६५ व्या दिवसास कोठेंतरी जागा दिलीच पाहिजे वर्षाचे अखेर हा दिवस जोडून द्यावा, मात्र त्याचा अतर्भाव कोणत्याच आठवड्यात करू नये, त्याचप्रमाणें लीप इयर मध्यें आणखी एका दिवसास स्थान द्यावें लागेल, तें पहिल्या सहामाहीनतर जून अखेर देण्यांत यावें अशी सूचना आहे.

राष्ट्रसंघानें अद्याप कोणत्या सुधारणा स्वीकारावयाच्या हें निश्चित केलेलें नाहीं वर्षांतील दिवसाचे चार सम भाग करणारें कॅलेंडर काहींस पसत आहे, तर काहींस तेरा महिन्याचें वर्ष ज्यास्त पसत आहे काहींतरी सुधारणा लवकरच घडून आल्याखेरीज रहात नाहीं, हें मात्र निश्चित आहे.

---

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA"

**RELIABLE STENOGRAPHERS AND TYPISTS**
ON TEMPORARY & PERMANENT CONTRACTS
*Apply*—**MARATHI KENDRA,**
10 BUDHWAR, POONA 2.

**S. B. JOSHI & Co.**
**ENGINEERS & CONTRACTORS**
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
**रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी**
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**स्त्रियांचा आजार**
म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयात बिघाड होणें होय आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगावर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटात कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणामध्यें याची बरोबरी बाजारातील इतर औषधें करू शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु ३ ट. ख १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्चासह ९ रु
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते—
**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** (डिपार्टमेंट न. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

### मिरजप्रांत कुची ता० को. सु युनियन लि. सांगली

या संस्थेमार्फत ता १।१२।३७ ते ता ८।१२।३७ अखेर मुदतीचा को. सो. सेक्रेटरींचा उजळणी वर्ग 'कुची' या गावीं काढण्यात आला होता मिरजप्रात तालुक्यातील सोसायट्यांकरिता नाद्रे येथें वेगळा वर्ग गेल्या आक्टोबर महिन्यात काढण्यांत आला असल्यानें फक्त कुची तालुक्यातील सेक्रेटरींकरिताच हा वर्ग चालविण्यात आला. वर्गाचें उद्घाटन मे. पालकर तालुकाधिकारी याचे हस्ते ता. १।१२।३७ रोजीं सकाळीं ८ वाजता झालें. पाश्चात्य चळवळीच्या उपयोगाचे धोरणानें त्यांचें उद्बोधक भाषण झालें वगास दप्तर काम, कायदा, पोटनियम व युनियन, इस्टिट्यूट आणि बँक याचे सबंध वगैरे विषयाची माहिती देण्यात आली याच मुदतीत ग्रामोद्धार, सहकाराचीं विविध अगें, वगैरे विषयांवर तज्ञाचीं व्याख्यानें करविण्यांत आलीं. शेवटीं उमेदवाराची चाचणी घेण्यात येऊन, मे मामलेदारसाहेब याचे अध्यक्षतेखालीं वर्गाचा समारोप करण्यांत आला वर्गास एकंदर २१ उमेदवार हजर होते कामांतील प्रत्यक्ष अडचणी योग्य तऱ्हेनें समजाऊन दिल्यानें वर्गाचा त्यांना चांगला उपयोग झाला.

---

### बार्शी ता. अॅ. को क्रे ॲन्ड सेल सोसायटी लि बार्शी

वरील संस्थेची वार्षिक साधारण सभा ता २४-१०-३७ रोजीं झाली. १९३६–३७ मध्यें दुष्काळ असूनहि सोसायटीचा व्यवहार समाधानकारक झाला व तिला चागला नफा होऊन भागीदारांस ५ टक्के दरानें डिव्हिडड मिळालें.

### दंड थोपटूं लागले !

जगात शांतता नांदावी अशी इच्छा पुन्हां पुन्हां जोरानें ओरडून प्रकट करतां करता जर्मनी, इटली व रशिया ह्या देशांतील पुढारी दड थोपटून प्रतिस्पर्ध्यास जणूं काय युद्धाचें आव्हान करू लागले आहेत. मुसोलिनी व हिटलर ह्यानीं रशियन क्रांतिमूलक घटनेचा निषेध केला असून तिच्या प्रतिकारार्थ जपानशीं सगनमत केलें आहे. राष्ट्रसंघाचा प्रतिस्पर्धी ह्या नात्यानें जर्मनी, इटली व जपान ह्यानीं आपला स्वतत्र संघ स्थापला आहे आपल्या विरुद्ध उठवण्यात आलेलें हें काहूर पाहून रशियानें आपण युद्धास तयार असल्याची घोषणा केली आहे कोणतेंहि राष्ट्र किंवा राष्ट्राचा गट आपणावर चालून आला तरी आपण दोन हात करण्यास कचरणार नाहीं, एवढी आपली तयारी असल्याचें रशिया जगास सागत आहे सर्वच प्रमुख राष्ट्रें युद्धास तयार आहेत हें पाहून तरी त्यापैकी प्रत्येकाची लढण्याची खुमखुम जिरून जाऊन जगात शांतता नादो असें वाटण्याचा प्रसग सध्या आलेला आहे.

---

### भाडें खरेदी ( हायरपर्चेस ) व्यवहार

कोणताहि जिन्नस रोखीनें सबंध किंमत देऊन विकत घेण्याचें मध्यम स्थितींतल्या व गरीब लोकास शक्य नसतें दर महिनो ठरलेला हप्ता भरून सर्व रकम पुरी होताच जिनसाची मालकी तो ह्या मुदतींत वापरणारास प्राप्त होते, हा सदरहु प्रकारच्या व्यवहाराचा फायदा आहे. तथापि, कित्येक प्रसंगीं त्याचे योगानें लोकाची फसगत होते, तिला आळा घालण्यासाठी मिस विल्किनसन ह्या स्त्री समासदानें ब्रिटिश कॉमन्स सभेंत एक कायद्याचा मसुदा दाखल केला आहे


लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा सस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत "

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल बी,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरिता हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें

१ बँका आणि त्याचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु ( ट ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,२३,१०० वसूल झालेलें भांडवल १,११,७४०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढता येतात या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी

M V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## ट्रेझरी बिलावरील व्याजाचा दर

सरकारी तिजोरींत जमा होणारें उत्पन्न व खर्चाकरितां बाहेर जाणारी रक्कम ह्याचा सारखा मेळ रहावा लागतो, व त्यासाठी अल्प मुदतीनें सरकार लोकांकडून वेळोवेळ कर्ज काढीत असतें. जरूर असेल तेवढी रकम शक्य तितक्या अल्प व्याजाच्या दरानें मिळावी, ह्यासाठी व्याजाचे दर व कर्जाची रकम नमूद केलेलीं टेंडरें मागाविण्यात येतात व त्यांपैकी आवश्यक तेवढीं किमान दराचीं टेंडरें स्वीकारण्यात येतात. ट्रेझरी बिलाची विक्री व कर्जाच्या रकमेची परतफेड, हीं आता रिझर्व्ह बॅंकेमार्फत होतात पैसा किफायतशीर गुतविण्यास दुसरीकडे वाव नसला म्हणजे हलक्या व्याजाच्या दरानेंहि ट्रेझरी बिलें विकलीं जातात. १९३५-३६ चे मानानें १९३६-३७ सालीं ट्रेझरी बिलावर फारच अल्प व्याजाचा दर पडला आहे, हें खालील कोष्टकावरून दिसून येईल:—

( आकडे हजाराचे आहेत )

| महिना | १९३५-३६ ३ महिने मुदतीच्या ट्रेझरी बिलाची विक्री ( रु ) | पडलेला सरासरी व्याजाचा दर (द. सा. द. शे.) | १९३६-३७ ३ महिने मुदतीच्या ट्रेझरी बिलांची विक्री ( रु. ) | पडलेला सरासरी व्याजाचा दर द सा द. शे |
|---|---|---|---|---|
| एप्रिल | २,००,०० | १ ७५ | ५,००,०० | ·७९ |
| मे | ४,९८,२५ | १ ७३ | ८,००,०० | ·६३ |
| जून | ४,००,०० | १·७४ | .. | ... |
| जुलै | ३,००,०० | १ ७२ | ९,९९,५० | ·६२ |
| आगस्ट | ... | ... | ८,००,०० | ·४७ |
| सप्टेंबर | १६,६५,०० | १·०७ | ८,००,०० | ·५७ |
| आक्टोबर | ११,८७,२५ | ·९१ | ९,९९,७५ | ·७३ |
| नोव्हेंबर | १०,००,०० | १ ०० | ८,००,०० | ·७३ |
| डिसेंबर | ६,००,०० | १ ०४ | ८,०१,५० | ·९६ |
| जानेवारी | ८,०००० | ·९९ | ७,९८,२५ | १·१३ |
| फेब्रुवारी | १,००,०० | ·७५ | ४,००,०० | ·९९ |
| मार्च | ३,००,०० | ५७ | ३,९९,५० | ·९८ |
| एकूण | ७०,५०,५० | १ २१ | ८०,९८,५० | ·७८ |

१९३४-३५ सालीं व्याजाचा दर सरासरीनें १·५८% पडला, १९३५-३६ सालीं तो १·२१ % झाला व १९३७-३८ मध्यें ·७८% दरानें ट्रेझरी बिलावर व्याज सुटलें गेल्या आठवड्यात रिझर्व्ह बॅंकेनें २ कोटि रुपयाचीं बिलें विकलीं, त्यावर व्याजाचा द. सा द शे. १ रु, ० आ, ७ पै पडला.


एच एच दि छत्रपति महाराजा

ऑफ कोल्हापूर याचे आश्रयाखालील

जाधव कॉलेज ऑफ

टेलरिंग ॲन्ड कटिंग

जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू होणार नावें नोंदवा

नवीन माहितीपत्रक मागवा ४९७ बुधवार, पुणें


## निवडक बाजारभाव

बॅंक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) 3%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | १२०—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०५—० |
| ४% १९४३ ... .. .. .. | १०८—६ |
| ३½% बिनमुदत .. ... ... ... | ९८—६ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... ... | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बॅंका

| | |
|---|---|
| बॅंक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४३—८ |
| बॅंक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | २९-१२ |
| इंपीरिअल बॅंक ( ५० ) १२% ... ... | १५७५—० |
| बॉंबे प्रॉ को. बॅंक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बॅंक ( १०० ) ३½% ... ... | १२६—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४-१२ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु ४ आ बोनस | ९५८-१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १०% ... ... | ११९—६ |
| कराची ( १०० ) ९% ... .. ... | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४४०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% ... ... | १५२१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु .. ... ... | १७३-१२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु ... ... | ४९—८ |
| शिंदा स्टीम ( १५ ) १ रु ... ... ... | २२—८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ४ आ ... | ४२—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु बोनस .. | ४,४००—० |
| टाटा आयर्न प. प्रे ( १५० ) ६% ... ... | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ ... | १६५—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २७८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १,२४५—० |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४-७¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४७—२ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५-१० |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११-१० |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | ११ -२ |

## दिल्ली येथील संग्रहालय संस्थाची परिषद

हिंदी संग्रहालयाच्या प्रतिनिधींची हिंदुस्थान सरकारनें बोलाविलेली परिषद दिल्ली येथें डिसेंबर महिन्याच्या ६, ७ व ८ या तारखास मद्रास सरकारच्या संग्रहालयाचे मि ग्रेव्हले ह्याचे अध्यक्षतेखालीं पार पडली व्हाइसरॉय किंवा शिक्षण मंत्रि इतर कामामुळें परिषदेस आले नसले तरी हिंदुस्थान सरकारचा संग्रहालय संवर्धनास पूर्ण पाठिंबा आहे असें सर गिरिजा शंकर वाजपेयी ह्यानीं आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगितलें व त्याच्या व हिंदुस्थान सरकारच्या वतीनें सर्वांचें स्वागत केलें इतकी प्रातिनिधिक परिषद गेल्या सुमारें २५ वर्षांत भरली नव्हती लंडन येथील संग्रहालयाच्या असोसिएशननें हिंदुस्थानातील संग्रहालयाची पहाणी करून अहवाल प्रसिद्ध केला व या महत्त्वाच्या प्रश्नास चालना मिळाली हिंदुस्थानातील संग्रहालयाची स्थिति हलाखीची आहे व ती पालटण्याचे अटोकाट यत्न केले पाहिजेत या कामीं मध्यवर्ती सरकार, संस्थानें, प्रांतिक सरकार, देशातील पुढारी व संपन्न धनिक यांनीं पुढाकार घेतला पाहिजे. ज्या गोष्टी प्रांतिक सरकारांच्या हातीं आहेत त्याबद्दल हिंदुस्थान सरकार त्याना जरूर त्या योग्य शिफारशी करील इत्यादि गोष्टी सर वाजपेयी यानीं सांगितल्या तसेंच, या प्रश्नाकडे हिंदुस्थान सरकार ह्यापुढें अधिक लक्ष देईल असें सर जगदीश प्रसाद यानीं, खाजगी चर्चेच्या वेळीं, आश्वासन दिलें. परिषदेमध्यें अनेक महत्वाच्या प्रश्नाचा उहापोह झाला. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे संग्रहालयाची अखिल भारतीय असोसिएशन स्थापावयाचें ठरलें व या असोसिएशनच्या कौन्सिलचीहि स्थापना करण्यात आली परिषदेनें त्यावर काम करणाऱ्या सभासदाचीहि निवड केली असोसिएशनच्या कौन्सिलवर १८ सभासद आहेत मुंबई इलाख्याच्या वतीनें श्री आचार्य, मि ग्रेटर, व श्री भा वि घारपुरे याची नेमणूक झाली आहे


पुणे येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामे करणारी
टेलरिंग फर्म
पाटसकर आणि कंपनी
४८ निहाल पेठ, पुणे शहर
मॅनेजर श्री पां पाटसकर, D M T O A (London)
स्थापना सन १९१२ (?)
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व
तयार कपड्याचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें याचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळी तयार करून मिळतील घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत
माहितीसाठीं लिहा
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें सेक्रेटरी.



पुणे एजंट:—ठाकूर आणि कं, जोगेश्वरी नाका, पुणें २

भारतीय अर्थशास्त्र
लेखक-प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे
पृष्ठसंख्या सुमारे ५५०, किंमत पाच रुपये
प्रथमत अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वाचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथात विस्तरश. विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नाचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल

## व्ही. पी. बेडेकर आणि सन्स

याचेकडील मसाले, लोणचें आणि पापड याचा आपले जेवणात नेहमीं उपयोग करा

पत्ता:—मुगभाट, गिरगाव, मुंबई.

पुणें एजंट:—दत्तात्रय नारायण हेजीब २०, शुक्रवार.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

### दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि,

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं २

## गव्हाचे पोहे

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात. विशेषतः लहान मुलाना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हितकारी ठरतो

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधातून खातां येतात.

७५२ सदाशिव पुणें २ — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द सा द शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द सा. द शें. ३ टक्के व्याज दिलें जातें

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्ज. सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| १ बारामती | ( जि. पुणें ) | १६ अकलूज | ( जि सोलापूर ) |
| २ सातारा | ( „ सातारा ) | १७ विरमगाव | ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर | ( „ „ ) | १८ धुळें | ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड | ( „ „ ) | १९ दोंडाईचें | ( „ „ ) |
| ५ तासगाव | ( „ „ ) | १० शिरपूर | ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी | ( „ „ ) | २१ शहादें | ( „ „ ) |
| ७ शिराळें | ( „ „ ) | २२ नंदुरबार | ( „ „ ) |
| ८ कोरेगांव | ( „ „ ) | २३ साक्री | ( „ „ ) |
| ९ भिवडी | ( „ „ ) | २४ शिंदखेडें | ( „ „ ) |
| १० अहमदनगर | ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें | ( „ „ ) |
| ११ शेवगांव | ( „ „ ) | २६ मालेगाव | ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगाव | ( „ „ ) | २७ सटाणा | ( „ „ ) |
| १३ वाई | ( „ ठाणें ) | २८ कळवण | ( „ „ ) |
| १४ पालघर | ( „ „ ) | २९ दोहद | ( „ पचमहाल ) |
| १५ कल्याण | ( „ „ ) | ३० कालोला | ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यास लिहा

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४.
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ३ पुणें, बुधवार, तारीख २९ डिसेंबर, १९३७ अंक ५१

## टिळक आयर्न अॅड स्टील वर्क्स

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात ]

मो. मु. टिळक
प्रो मेकॅनिकल इजीनिअर,

## दी प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : बेंगलोर

शाखा : मुम्बआी, दादर, पुणें, पुणे शहर, सोलापूर, पांचगणी, कऱ्हाड

चेअरमन खानसाहेब हाजी कासम, अेम्. अेल सी
प्रेसिडेंट, कऱ्हाड म्युनिसिपालिटी

मॅनेजिंग डायरेक्टर : अेस पी ठाकर

चालू ठेवी : द सा द शें २% सेव्हिंज बँक ठेवी : द सा द शें ३%

मुदतीच्या ठेवीच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सविस्तर माहितीकरिता बँकेकडे चौकशी करा

डॉ जी एस् गोरे, अेजट १७ मेन स्ट्रीट, पुणें
अेच जी गद्रे, बी अेसर्सी, अेजट, लक्ष्मीरोड, पुणें शहर

श्री.

सांगली ( S M C )

कु. सा न वि वि. ता २८-३७

"आपलें जा. न. ६५२ ता २७।७।३७ चें आलेलें सर्क्युलर पोंचलें. त्यांत नमूद असलेप्रमाणें बाँड मागणीबद्दल अर्ज पुरा करून या सोबत ठेविला आहे पूर्वीचा नं. २३३२ चा ( कल्पतरू ) बाँड भरपाई करून या लगत पाठविला आहे माझे बाडवर लागलीच बक्षीस मिळाल्याकारणानें आनंद वाटतो व मी आपला त्याबद्दल अत्यंत आभारी आहे कळावे लोभ अ. हे वि

आपला.
( सही ) रघुनाथ गोपाळ साखरे

C/o मॅजिस्ट्रेट वर्ग १ ऑफिस, मु. पो सांगली."

दुसरी बक्षीस वाटणी साधण्यास आतांच 'कल्पतरू बाँड' विकत घ्या.

लिहा अगर भेटा.—मे. केळकर ब्रदर्स, स्पेशल एजंटस्, बुधवार चौक, पुणें श्री. ड्यं. रा अभंग, स्पे. ऑ सातारा सिटी.

महाराष्ट्र इन्शु. क. लि कऱ्हाड जि. सातारा.

## उंसाची नवी लागवड सुरू झाली.

—कार्यक्रम— 
डिसेंबर १९३७ मशिनरीचा दुसरा हप्ता
जानेवारी १९३८ मशिनरीचा तिसरा हप्ता
फेब्रुवारी १९३८ मशिनरीचा शेवटचा हप्ता
मुंबईस येणार.

साखरेचे भाव वाढले त्या प्रमाणांत नफाही वाढणार.

शेअर आज घेऊन ठेवा; पुढें शेअरचे भाव वाढतील.

॥ विश्वासः फलदायकः ॥

सविस्तर माहिती व शेअर फॉर्म्स खालील पत्त्यावर मिळतील.

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें.

२५७ बुधवार पेठ, पुणें २.

## विविध माहिती

### बँकास सुटी-

शुक्रवार ता ३१ डिसेंबर, १९३७ व शनिवार, ता १ जानेवारी, १९३८ रोजीं इंग्रजी नूतन वर्षानिमित्त बँका बंद रहातील

### ब्रिटिश पोस्ट ऑफिसचा किफायतशीर व्यवहार

ग्रेट ब्रिटनमधील पोस्ट खात्यास ३१ मार्च, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें १५ रु कोटि नफा झाला. पोस्टानें एकूण ७ अब्ज, ७० कोटि कार्डें व पाकिटें इकडून तिकडे पोचतीं केलीं ३१ मार्च अखेर २८½ लक्ष टेलिफोन चालू होते हा आकडा त्यापूर्वीच्या सालातील आंकड्यापेक्षा २½ लाखानीं मोठा आहे सेव्हिंग्ज बँक खात्यात लोकाचे ५½ अब्ज रु आहेत

### बॉंबे टॉकीज लि

वरील मंडळीची तिसरी वार्षिक सभा गेल्या आठवड्यात भरली होती ३१ ऑक्टोबर, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी ह्या मंडळीस १,००,४७१ रु नफा झाला कंपनीच्या 'इज्जत' 'प्रेम कहाणी' व 'सावित्री' ह्या फिल्म्स फलदायी झाल्या, असा डायरेक्टराचे रिपोर्टांत उल्लेख आहे. गेल्या सालीं मंडळीस ८८ हजार रु नुकसान आलें होतें.

### पेट्रोलच्या उतरण्याच्या पट्टींत उतार

मुंबई पोर्ट ट्रस्टनें पेट्रोल उतरण्याच्या दरात दर गॅलनी २ पै उतार केला आहे, म्हणून १ एप्रिल,१९३८ नंतर प्रत्येक गॅलनास फक्त ४ पै पट्टी द्यावी लागेल ह्यामुळें पेट्रोलवाल्याचे सालिना ३ लक्ष रु. वाचणार आहेत

### टेम्स नदीखालून नवीन बोगदा

टेम्स नदीपार जाण्यास सध्याचा ब्लॅकवेल बोगदा पुरेसा पडत नाहीं ह्यासाठी नवीन एक बोगदा करण्याची योजना लंडन कौन्सिलनें मंजूर केली आहे. हा नवीन बोगदा ब्लॅकवेल कालव्यापासून ८०० फूट अंतरावर खणण्यात येईल बोगद्यातील रस्ता २० फूट रुंद ठेवला जाईल. बोगद्याचें काम पुरें झालें, म्हणजे दोनहि बोगद्यातून एकमार्गी वहातुकच चालू ठेवण्यात येईल, म्हणजे उत्तरेकडे जाणारीं वहानें जुन्या बोगद्यांतून जातील व दक्षिणेकडे येणारीं वहानें नव्या बोगद्याचा अवलंब करतील सबंध योजनेस एकूण सुमारें ४ कोटि रु. खर्च येईल.

### रेडिओदृष्ट्या मुंबईचें महत्त्व

हिंदुस्थानात एकूण सुमारें ५० हजार रेडिओ लायसनदार आहेत, त्यापैकीं २२ हजार मुंबई इलाख्यात आहेत एकट्या मुंबई शहरात १५ हजार लोकाचेजवळ रेडिओ आहेत.

### जुन्या वर्तमानपत्राच्या रद्दीची आयात

१९३६-३७ सालीं ३० लक्ष रुपये किंमतीची ११ लक्ष हंड्रेडवेट वजनाची रद्दी हिंदुस्थानात आली; त्यापैकीं शेकडा ९९ इतकी रद्दी ग्रेटब्रिटननें पाठविलेली होती.

### झेनिथ विमा कं लि

झेनिथ आयुर्विमा कंपनीचें १९३६ अखेरचें चौथें मूल्यमापन पुरें झालें आहे. त्यांत १,७०,९०० रु वाढावा दृष्टोत्पत्तीस आला त्यापैकीं १,३४,८५४ रु विमेदारास बोनस म्हणून देण्याचें ठरलें व भागीदारास दरसाल ७½% दरानें डिव्हिडंड मिळावें ह्यासाठी चार वर्षाची तरतूद म्हणून १५,००० रु बाजूस ठेवण्यात आले कंपनीची सभा गेल्या आठवड्यात भरली होती, त्यावेळीं वरील वाटणीस मंजुरी मिळाली.

### सिनेमा धंद्यास लायसेन्स लागणार

मुंबई कॉर्पोरेशननें आपल्या हद्दीमधील फिल्म स्टूडिओंवर प्रत्येकीं सालिना १०० रु लायसेन्स फी बसविली आहे.

### रिझर्व्ह बँकेची सभा

रिझर्व्ह बँकेच्या सभासदांची साधारण सभा दिल्ली येथें फेब्रुवारी, १९३८ मध्यें भरणार आहे

### साखर करार समितीवर हिंदी प्रतिनिधि

आतरराष्ट्रीय साखर करारावर हिंदुस्थानातर्फें सही करण्यात आली आहे. साखर समितीवर हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हाय कमिशनर, सर फिरोझखान नून, ह्याची नेमणूक आतां जाहीर झाली आहे

### सेंट्रल प्रॉव्हिन्सेस रेल्वे कं, लि

वरील कंपनीस सप्टेंबर, १९३७ अखेरच्या वर्षी ४½ लक्ष रु नफा झाला भागीदारास ४½ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें.

### बर्लिन सहस्रायु नगर होणार!

काळाच्या उदरांत कितीहि महत्त्वाकांक्षा गडप झाल्या असल्या तरी मानवी आशा दुर्दम आहे "कालाय तस्मै नमः" हा उद्गार मनुष्याच्या दर्पोक्तींचें वैय्यर्थ्य प्रकट करतो जर्मनीचे हुकूमशहा, हेर हिटलर, ह्यानीं बर्लिन शहर हजार वर्षें टिकावें ह्या बेतानें त्याची पुनर्रचना करण्याचा चंग बाधला आहे युद्धशास्त्र-मंदिर ह्या नावाच्या इमारतीचा पाया घालण्याच्या समारंभाचे प्रसगीं गेल्या महिन्यात त्यानीं वरील आशयाच्या आपल्या हेतूची घोषणा केली नवीन मंदिर जर्मन लोकांची संस्कृति, ज्ञान व शक्ति ह्यांचें स्मारक होणार असल्याचें त्यानीं सांगितलें

### अमेरिकेंत तीस-चाळीस लक्ष नवीन घरें बांधणार!

आर्थिक मंदीचें निवारण व्हावें आणि बेकार लोकास काम मिळावें म्हणून नवीन रहात्या घरांच्या बांधणीची योजना हातीं घेण्यातयावी अशी शिफारस प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यानीं अमेरिकन कायदे मंडळास केली आहे त्या विषयींच्या कायद्याचा मसुदा प्रथम विधिमंडळानें मंजूर केला आहे.

### शिमशा येथील वीजगृह

म्हैसूर संस्थानातील शिमशा नदीवरील नव्या वीजगृहाच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ म्हैसूरच्या महाराजाचे हस्तें गेल्या आठवड्यात पार पडला संस्थानात विजेचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला असून सध्याचा पुरवठा अपुरा पडू लागला आहे शिमशा वीजगृहाच्या बांधणीचें काम सुमारें १½ वर्ष चालेल व ३ हजार कामगारास तेथें काम मिळेल म्हैसूर सरकारास शिमशा विद्युत्गृहाच्या योजनेपासून दरसाल निव्वळ २० लक्ष रु किफायत होईल.

### सिंधमधील कपाशीच्या पिकात वाढ

सिंधमधील सक्करचें धरण पुरें होण्यापूर्वी फक्त ३ लक्ष एकर जमिनींत त्या प्रातात कपास पेरण्यात येत असे आता कपाशीखालीं ९ लक्ष एकर आहेत

### ज्यू नट-नटींची हकालपट्टी

१९३३ सालीं हुकूमशहा हिटलर हा जर्मनीचा सत्ताधारी झाला, तेव्हांपासून आतापर्यंत रंगभूमीवर व सिनेमात काम करणाऱ्या व वृत्तपत्राचे व्यवसायांत असणाऱ्या तीन लक्ष ज्यू लोकांची हकालपट्टी करण्यांत आली आहे जर्मन नट-नटींना वृद्धापकाळीं पेन्शन मिळावें, अशी व्यवस्था जर्मन सरकार आता करणार आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ६२४ | ५ डॉन्र ऑफ इडिया विमा क लि | ६२९ |
| २ हिंदी साखरेच्या धंद्याचें संघटन | ६२५ | ६ सह्याद्रि विमा क. लि | ६२९ |
| ३ हिंदी शेतकऱ्यांचें ऋण-विमोचन | ६२६ | ७ परस्थ प्रवासी आकर्षण्याचा धंदा | ६२९ |
| ४ स्फुटविचारः— अकलूज येथें सहकारी पेढ्याची सभा—फलटण श्री लक्ष्मी सें को बँक—रोजचा व्यवहार आणि शिक्षण ह्यामध्यें सिंड—हिंदी कापडाचा परदेशांमध्यें खप—बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि — सातारा स्वदेशी कमर्शिअल क. लि | ६२७ | ८ हिंदी रेल्वेजचा कार्यक्रम | ६३० |
| | | ९ कराची आकारणी चुकविणारांची नाकेबंदी | ६३० |
| | | १० धनको व ऋणको देश | ६३१ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ६३२ |
| | | १२ हिंदी चहाचा धदा | ६३२ |
| | | १३ स्वल्पविरामाचें महत्त्व | ६३२ |
| | | १४ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि | ६३३ |
| | | १५ हिंदी आयात मालाची वर्गवारी | ६३३ |



# अर्थ

बुधवार, ता २९ डिसेंबर, १९३७


## हिंदी साखरेच्या धंद्याचें संघटन

### महाराष्ट्रीय कारखान्यांस अनुकूल संधि

हिंदी साखरेच्या धद्यास हिंदुस्थान सरकारनें १९३२ सालीं संरक्षण दिलें, तेव्हांपासून साखरेच्या कारखान्याची सख्या एकसारखी वाढत आली असून, हिंदी साखरेनें आता विदेशी साखरेचें उच्चाटन केलें आहे. १९३१-३२ मध्यें सबध हिंदुस्थानात मिळून फक्त ३२ साखर कारखाने होते, १९३७-३८ मध्यें त्यांची संख्या दीडशेवर गेली आहे! ह्यापैकी एकट्या सयुक्तप्रातात ७२ व बिहारमध्यें ३६ कारखाने एकत्रित झाले आहेत. ह्या प्रातातील उंसाची लागवडहि त्या मानानें वाढली आहे साखरेच्या धद्याची प्रगति उत्तर हिंदुस्थानात अत्यंत शीघ्र गतीनें झाली असून, तेथें कारखानदार, कामकरी, शेतकरी व व्यापारी ह्यांच्या हितसंबधाचा मेळ नीट बसलेला नाहीं. साखरेच्या धंद्यास सरक्षण देताना शेतकऱ्याच्या हिताचें रक्षण होईल, अशी खबरदारी टारिफ बोर्डानें आपल्या रिपोर्टांत घेतली होती शेतीप्रधान हिंदुस्थानातील पिकात उंसाचें महत्त्व व त्या पिकाच्या उत्पादनास किफायतशीर भाव येऊन गिऱ्हाइक मिळण्याची आवश्यकता ह्यावर टारिफ बोर्डानें भर दिला होता बोर्डाच्या अपेक्षेपेक्षा दुप्पट साखरेचें उत्पादन आता होऊं लागलें असून ऊंस पेरणाऱ्या शेतकऱ्यांचें साखरेच्या कारखान्यावरील अवलंबनहि वाढलें आहे १९३५-३६ सालीं सर्व कारखान्यांनीं मिळून ८१/३ कोटि रुपये किंमतीचा ऊस गाळला व सुमारें ३१/२ कोटि लोकांत ती रकम कमी-आधिक प्रमाणात विभागली गेली, ह्यावरून ऊस लावणारे शेतकरी व साखर करणारे कारखानदार ह्यांचे सबंध कसे निगडित झालेले आहेत, ह्याची कल्पना येईल. महाराष्ट्रातील कारखान्यांची वाढ धिमेपणानें झाल्यानें आणि येथील उसाच्या लागवडीची परिस्थिति भिन्न असल्यामुळें इकडे उत्तर हिंदुस्थानातल्या सारख्या अडचणी उपस्थित झालेल्या नाहींत.

शेतकरी वर्गांत सहकार्याचा अभाव असल्याकारणानें व प्रत्येकाची जमीन व तींत पिकणारा ऊंस मर्यादित असल्यानें, कारखानदारास अन्याय्य फायद्याची संधी सापडते व शेतकऱ्याच्या असाहयतेचा ते फायदा घेतात, ही फार तीव्र स्वरूपाची तक्रार उत्तर हिंदुस्थानात आहे आपला ऊंस दुसरीकडे कोठेंहि खपविण्याचें शेतकऱ्याजवळ साधन नसल्यामुळें मिळेल त्या किमतीवर त्यास संतुष्ट रहाण्याची पाळी येते. त्यास आपल्या उंसाबद्दल योग्य मोबदला मिळावा, अशी व्यवस्था १९३४ च्या शुगरकेन ॲक्टानें केली आहे. कोणत्याहि प्रातिक सरकारनें आपल्या अधिकारातील विवक्षित टापू नियंत्रित क्षेत्र म्हणून जाहीर करून, त्या टापूतील ऊस कारखान्यात गाळण्यासाठी विकत घेण्याची किमान किंमत निश्चित करण्याचा अधिकार स्वतःकडे घ्यावा, अशी ह्या कायद्यात तरतूद आहे ह्याबाबत जरूर ते नियम करण्याचा अधिकारहि प्रातिक सरकारास ह्या कायद्यानें दिला आहे संयुक्त प्रांत व बिहार ह्या प्रातानीं वरील कायद्यास अनुसरून उसाच्या किंमतीचें नियत्रण करणारे नियम जाहीर केले. ह्या दोन प्रांतात कारखान्यानीं उसास द्यावयाच्या किमान किमती प्रत्येक पधरवड्यानें जाहीर केल्या जातात. ह्या किमती साखरेच्या बाजारभावावर अवलबून रहातात. दरसाल परिषदा भरवून धोरणाचे प्रश्नहि सोडविण्यांत येतात

गेल्या वर्षीं साखरेस भाव चागला आला नाहीं, परतु त्या मानानें उसाची किमान किंमत फार भारी ठरवण्यात आली, अशी तक्रार कारखानदारानीं करण्यास प्रारंभ केला व तेव्हांपासून ह्या प्रश्नास विशेषच महत्त्व प्राप्त झालें. संयुक्तप्रांत व बिहार ह्या प्राताच्या सरकारानीं ह्या विषयात लक्ष घातलें व साखरेच्या धद्याची घडी नीट बसावी, ह्याकरिता कसून यत्न केले. साखरेच्या उठावाकरितां सघटित प्रयत्न करण्यासाठी मध्यतरीं इंडियन शुगर सिंडिकेटची स्थापना झाली. ह्या सिंडिकेटनें आपल्या सभासद-कारखान्यांकडून साखर विकत घ्यावी व ती किफायतशीर भावानें विकावी, अशी तिची योजना आहे ९५ कारखाने सिंडिकेटला मिळाले आहेत साखरेस योग्य किंमत येण्यात कारखानदार, शेतकरी व व्यापारी ह्या सर्वांचेंच हित आहे साखरेचा खप कमी होणार नाहीं इतकी ती महाग असू नये व तिच्या बाजारभावानें आकर्षून नवीन कारखाने निघूं नयेत, अशा बेतानें साखरेची किमत स्थिर राखण्याचें सिंडिकेटचें धोरण आहे

बिहारमधील साखरेच्या कारखान्यांवरील नियंत्रण जास्त दृढ करणारा एक कायदा बिहार कायदेमडळानें पास केला आहे व सयुक्त प्राताताहि त्याच प्रकारचा कायदा लवकरच केला जाण्याचा सभव आहे. बिहार सरकारनें शुगर सिंडिकेटला मान्यता दिली असून तिच्या मार्फतच आपल्या नियत्रणाची योजना तें पार पाडणार आहे. कलकत्ता येथें ता ३० डिसेंबर रोजी सिंडिकेटची साधारण सभा बोलावण्यात आली असून सर्व कारखानदारास त्यात भाग घेण्यासाठी निमत्रण देण्यात आलें आहे सिंडिकेटनें प्रातिक सरकाराशीं चर्चा करतेवेळीं कारखानदारांच्या हिताचें रक्षण नीट केलें नाहीं, असें कित्येक कारखानदाराचें म्हणणें आहे, त्यातील फोलपणा सिंडिकेटनें आता उघड करून दाखविला आहे साखरेच्या किंमती भरमसाट वाढवून तिचा खप मर्यादित करण्याचें धोरण सिंडिकेटला मान्य नाहीं, हें तिनें जाहीर केलें आहे लखनौ येथील सिंडिकेटच्या सभेस गैरहजर राहून आतां

भागाहून ओरड करण्यांत हशील नाहीं, असेंहि तिनें प्रसिद्ध केलेल्या पत्रकात स्पष्ट म्हटलें आहे सिंडिकेटच्या ९५ सभासदांपैकी ५५सभासदास हें धोरण मान्य नाहीं व त्यानीं राजीनामा देण्याचें ठरविलें आहे, असें जाहीर झालें होतें, तथापि,सिंडिकेटच्या सभासदांसच फक्त लायसेन्स देण्याचें बिहार सरकारनें निश्चित केलें असल्यानें सिंडिकेटला बळकटी येईल हें उघड आहे.

सुदैवानें, महाराष्ट्रात कारखानदार विरुद्ध शेतकरी असा लढा नाहीं दक्षिण हिंदुस्थानातील कारखान्यांचा ऊस बहुतांशीं स्वतःच्या मालकीचा असल्यानें त्याची किंमत ठरवून देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं इतर काहीं गोष्टी पूर्ण अनुकूल नसल्या तरी ह्या परिस्थितीचें एक प्रकारचें सरक्षण महाराष्ट्रीय कारखान्यांस मिळत आहे, त्याचा फायदा लोकानीं करून घेतला पाहिजे. बिहार व सयुक्तप्रात येथील कारखानदारास ह्याचें वैषम्य वाटेल पण त्या कारखानदारानीं स्वतःस विशेष अनुकूल असलेल्या परिस्थितीचा भरपूर फायदा घेतला असून धंद्याचा विस्तार वाटेल तेवढा केला आहे मुंबई सरकारनें वेळींच जागरूक राहून आपल्या प्रातातल्या ह्या धद्याचे सवर्धनास हातभार लावणें जरूर आहे

---

## हिंदी शेतकऱ्यांचें ऋणविमोचन

[वरील प्रश्नाविषयीं "इडियन कोऑपरेटिव्ह रिव्ह्यू" च्या ताज्या अकात अधिकारी लेखकानीं दिलेली माहिती प्रसिद्ध झाली आहे, तिचा आधार ह्या लेखास घेतला आहे मध्य प्रांतातील ऋणविमोचनावर डॉ पी जे टॉमस ह्यांनीं लेख लिहिला असून पजाबमधील लवाद बोर्डाची माहिती खान महमंद बशीर अहमदखान यांनीं दिलेली आहे]

हिंदी शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा अनेक वर्षें चालत आला आहे. आर्थिक मंदीनें त्याचें स्वरूप विशेष तीव्र आणि दुःसह केलें आणि कर्जनिवारणाची योजना तात्काळ हातीं घेतल्यावांचून गत्यतर नाही, हें प्रातिक सरकारांस स्पष्ट दिसू लागलें. १९३० सालापासून ह्या प्रश्नाच्या चर्चेस अधिक चालना मिळाली. काहीं प्रांतानीं कर्जनिवारक योजना आखल्या व जमीन गहाणाच्या बँकाहि स्थापल्या तथापि, प्रातिक स्वायत्ततेस प्रारंभ होऊन कॉंग्रेसनें अधिकारस्वीकार केल्यानतर शेतकऱ्याचें कर्जाचें ओझें हलकें करण्यासंबंधाच्या सूचनास विलक्षण जोर आला. कर्जवसुलीची अजिबात तहकुबी, सावकाराच्या व्यवहाराचें नियत्रण, कर्जाचा भार लवादामार्फत चौकशी होऊन कमी करण्याची व्यवस्था, इत्यादि योजना त्यासबधात महत्त्वाच्या आहेत मुंबई सरकार ह्या बाबतींत एक बिल तयार करून कायदेमंडळास लवकरच सादर करील, अशी अपेक्षा आहे शेतकऱ्याच्या कर्जनिवारणाचे कामीं इतर प्रातानीं काय प्रयत्न केले आहेत व त्यांस यश कितपत आलें आहे, ह्याचा तुलनात्मक विचार केला, म्हणजे आपल्या प्रातास योग्य असें धोरण आखण्यास सहाय होईल, ह्या दृष्टीनें हिंदुस्थानात इतरत्र प्रचलित असलेल्या कर्जनिवारणाच्या प्रयत्नाचा परामर्श येथें घेण्याचें योजिलें आहे

### मध्यप्रात

१९३० सालानतरच्या आर्थिक मंदीतून वाट काढण्यांत मध्यप्रांतानें आघाडी मारली असें म्हणण्यास हरकत नाहीं इतर प्रांतांनीं त्या योजनेचेंच बव्हंशीं अनुकरण केलें आहे ह्या दृष्टीनें, मध्यप्रातानें केलेल्या उपक्रमाचें महत्त्व आहे तेथील जमिनी मुख्यतः मालगुजारी पद्धतीखाली आहेत व त्यापैकीं बहुतेक जमिनींची लागवड कुळामार्फत केली जाते ह्या कुळास ते करीत असलेल्या जमिनीवर कर्ज मिळणें अशक्यप्राय होतें ह्यामुळें व्याजाचा दरहि चढतो. वऱ्हाडमध्यें रयतवारी पद्धत अमलात आहे व तेथें मात्र कर्जास तारण देता येतें.

कर्जाची तडजोड करणारीं बोर्डें मध्य प्रांतात स्थापन करणारा कायदा १ एप्रिल, १९३३ रोजीं अंमलात आला १९३७ च्या प्रारभीं अशीं ४३ बोर्डें अस्तित्वांत होतीं. प्रत्येक बोर्डाचा अध्यक्ष सरकारी अधिकारी असून सभासद बिनसरकारी, बिनावेतन काम करणारे असतात. कर्जाची तडजोड व्हावी, असा बोर्डाकडे अर्ज सावकार अगर ऋणको शेतकरी ह्यापैकीं कोणासहि करता येतो. अर्जदाराचें म्हणणें ऐकून घेतल्यानतर, तडजोड होण्याजोगी आहे असें बोर्डास वाटल्यास सर्व धनकोंकडून ऋणकोच्या कर्जाबाबत हिशेब मागविण्यात येतो एकूण कर्जापैकी ४० टक्क्यापेक्षा ज्यास्त येणें असलेल्या धनकोंनी तडजोड मान्य केली, म्हणजे करार कायम करण्यात येऊन रजिस्ट्रेशन ॲक्टाखालीं नोंदण्यात येतो तडजोडीचे वेळीं वकिलास लवादमडळापुढें उभें रहातां येत नाहीं. तडजोडीनें मान्य केलेले हप्ते ऋणकोनें वक्तशीर भरले नाहींत, तर त्याची वसुली साऱ्याप्रमाणें धनकोस करवता येते तडजोड बोर्डापुढें चौकशी चालू असेपर्यंत दिवाणी कोर्टातील दावे तहकूब रहातात सहकारी सोसायट्यानीं आपल्या सभासदांस दिलेल्या कर्जासहि तडजोड बोर्डाचा कायदा लागू आहे कुळानीं मालगुजारास द्यावयाचा खडहि बोर्डाच्या कार्यक्षेत्रांतून वगळण्यात आलेला नाहीं; त्याबाबत परिस्थित्यनुरुप खबरदारी घेण्यात आलेली आहे.

जून, १९३७ अखेर सर्व बोर्डांनीं मिळून ५ कोटि, ६३ लक्ष रु कर्जाची चौकशी करून तें २ कोटि, ९३ लक्षावर तोडलें, म्हणजे शेकडा ४८ इतकी सूट शेतकऱ्यांत मिळाली भरभक्कम तारणावर कर्ज दिलेलें असल्यास सावकार तडजोड करण्यास राजी नसतो, असा अनुभव आहे लहान कर्जाचे हप्ते ठरवून देता येतात, परतु मोठें कर्ज एका रकमेनें फिटणार नसल्यास सावकार तडजोडीस तयार होत नाहीं मोठ्या कर्जाचे परतफेडीसाठी काहीं जमीन सोडून देणेंच शेतकऱ्याच्या अतिम हिताचें ठरतें, असें आढळून येतें काहीं प्रसगीं शेतकऱ्यास दिवाळखोर म्हणून जाहीर करणें हा एकच त्याच्या मुक्ततेचा मार्ग उरतो, परतु तसें करण्यास सध्याचे कायद्यात तरतुद नाहीं कर्जाच्या वसुलीबाबत सावकारास पूर्ण सुरक्षितपणा वाटल्यास तो सूट देण्यास तयार होईल. जमीन गहाणाच्या बँकेनें, तडजोडीनें मान्य केलेलें कर्ज सावकारास देऊन टाकावें व शेतकऱ्याकडून स्वतः हप्त्याहप्त्यानें वसुली करावी, अशी व्यवस्था करता येण्याजोगी आहे. कर्जाची तडजोड ही कर्जनिवारणाचे मार्गांतील पहिली पायरी आहे, परतफेड कशी होईल हा प्रश्न ज्यास्त महत्त्वाचा आहे कर्जावरील व्याजाचे दर नियंत्रित करणारा, सावकारास हिशेब व्यवस्थित ठेवण्यास लावणारा, व्याजाचा दर उतरविण्यास लावणारा, ऋणकोस होणारा जाच कमी करणारा, असे दुसरेहि कित्येक कायदे मध्यप्रांत सरकारनें केलेले आहेत.

( अपूर्ण )

# स्फुट विचार

### अकलूज येथें सहकारी पेढ्यांची सभा

प्रांतिक सहकारी बँकेची माळशिरस तालुक्यात अकलूज येथें शाखा आहे तिच्या क्षेत्रातल्या सहकारी संस्थांची वार्षिक सभा गेल्या बुधवारीं प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती त्या प्रसंगीं अहवाल, ताळेबंद व अंदाजपत्रक ह्यांस मंजुरी देणें इत्यादि मामुली कामें झालीं. त्यानंतर सभासदांनीं सुचवलेल्या अनेक महत्त्वाच्या ठरावांची चर्चा झाली. अकलूज शाखेच्या क्षेत्रातल्या पतपेढ्यांची बँकिंग यूनियन बनवण्याविषयींची सूचना पुढें मांडण्यात आली असता ह्या योजनेस प्रांतिक बँकेची कोणतीच हरकत नाहीं, इतकेंच नव्हे तर पेढ्यांनीं स्वतःचा कारभार आपल्या हातीं घेतल्यास तिला आनंदच होईल असें आश्वासन देण्यात आलें. बँकेनें चालविलेलें अकलूज येथील दुकान तालुक्यांत अलीकडे काढण्यात आलेल्या विक्री-संस्थेच्या स्वाधीन करण्यात यावें ह्या आशयाचाहि ठराव पुढें मांडण्यात आला. ह्या कामीं जरूर असलेली सिद्धता झाल्यास याचा विचार बँक सहानुभूतीनें करील असें सांगण्यांत आलें शेतकऱ्यांस भासणाऱ्या कित्येक अडचणींचा सभेंत विचार झाला आणि त्यासंबंधात योग्य ते ठराव करण्यात आले शेतकी खात्याचे स्थानिक अधिकारी, श्री पाटील, ह्यांनीं सध्यांच्या मंदीच्या काळातहि शेतकऱ्यांनीं कोणत्या सुधारणा करून आपलें उत्पन्न वाढवावें ह्याविषयीं उपयुक्त माहिती दिली जमिनीस ताली व बांध घालणें, चांगलें बीं वापरणें इत्यादि सुधारणा करणें आणि सहकारी पद्धतीनें आपल्या व्यवहाराची संघटना करणें ह्या गोष्टींचा शेतकरी वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें किती निकट संबंध आहे, हें अध्यक्ष, प्रो काळे, ह्यांनीं नीट समजावून सांगितलें परस्पर सहायाच्या तत्त्वानें वागल्यास लोकांस किती तरी फायदा करून घेतां येतो, ह्याचीं उदाहरणें त्यांनीं दिलीं आणि शेती व सहकार संबंधीं आणि इतर सरकारी खात्यांनीं शेतकऱ्यांच्या जीवनाचे प्रश्न सहकार्यानें सोडवण्याचें महत्त्व किती आहे ह्याचें विवेचन केलें शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था स्वावलंबन व संघटन ह्याच्या जोरावर स्वतःचीं कार्ये जबाबदारीच्या भावनेनें करण्यास पुढें येणें अगत्याचें असून अशा प्रगतीस प्रांतिक बँक मनःपूर्वक सहाय करील असें आश्वासन त्यांनीं दिलें.

---

### फलटण श्री लक्ष्मी सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक

प्रांतिक सहकारी बँकेचे डायरेक्टर आणि महाराष्ट्रीय अर्थविषयक संस्थांचे हितचिंतक ह्या नात्यानें फलटण येथील श्री लक्ष्मी सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेस प्रो काळे ह्यांनीं गेल्या आठवड्यात अकलूजहून परत येतांना भेट दिली चेअरमन, डायरेक्टर्स व व्यवस्थापक ह्यांनीं त्यांस बँकेच्या घटनेची व कार्याची माहिती सांगितली बँकेची परिस्थिति आणि कामकाज ह्यासंबंधानें विचार-विनिमय होऊन प्रो काळे ह्यांनीं फलटणचे राजेसाहेब व अधिकारी ह्यांनीं बँकेच्या प्रगतीविषयीं आस्था दाखविली आहे तीबद्दल त्यांचें अभिनंदन केलें आणि सुधारणेच्या बाबतींत कित्येक सूचनाहि केल्या. प्रॉव्हिन्शियल बँकेनें फलटण बँकेस स्थापनेचे वेळीं व पुढें कित्येक वर्षें सहाय केलें, त्याबद्दल व्यवस्थापकांनीं कृतज्ञता प्रकट केली, तिला उद्देशून, प्रांतिक बँक, जरूर पडेल तेव्हा लागेल ती मदत देण्यात आनंद मानील असें प्रो. काळे ह्यांनीं आश्वासन दिलें फलटण बँकेचे भागाचें रोख भरलेलें भांडवल सुमारें साठ हजार रुपये असून एकूण खेळतें भांडवल साडेपाच लक्ष रुपयांचे वर आहे संस्थानातील एकंदर खेड्यांपैकीं निम्याचे वर गावांत सहकारी पतपेढ्या स्थापन झाल्या आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. अलीकडील आर्थिक मंदीची झळ इतर ठिकाणाप्रमाणें येथील सहकारी संस्थांसहि लागली असल्यास त्यात आश्चर्य नाहीं ही परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न दरबारच्या सहायानें बँकेनें चालवला असून त्या संबंधात प्रो काळे यांनीं काहीं सूचना केल्या सध्याप्रमाणें विधायक कार्यक्रमाचें धोरण चालू राहिल्यास बँकेच्या कार्याचा विस्तार समाधानकारक रीतीनें होईल ह्यात शंका नाहीं खेडेगावाच्या सुधारणेच्या बाबतींत फलटणच्या राजेसाहेबांचें प्रो काळे ह्यांच्याशीं बोलणें झालें त्यावरून श्रीमंत नानासाहेब ह्यास ग्रामोद्धाराविषयीं वाटणारी कळकळ स्पष्ट व्यक्त झाली संस्थानचे दिवाण, रा. सा. गोडबोले आणि इतर अधिकारी ह्यांचें बँकेच्या कामात लक्ष असून त्यांचें धोरण प्रगतिपर असल्याचें दिसून आलें बँकेचें आणि एकंदर आर्थिक सुधारणेचें विधायक कार्य फलटण संस्थानात नेटानें व व्यावहारिक पद्धतीनें चालू राहील अशी आम्हांस आशा आहे

---

### रोजचा व्यवहार आणि शिक्षण ह्यांमध्यें खिंड

इतर देशातल्या परिस्थितीचा अनुभव असलेल्या तज्ज्ञांचें हिंदी शिक्षणपद्धतीविषयीं काय मत आहे हें समजणें प्रगतीच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहे न्यू एज्युकेशन फेलोशिपचें आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळ हिंदुस्थानात आलें असून येथील शिक्षणव्यवस्थेशीं तें परिचय करून घेत आहे निरीक्षणाचा त्याच्या मनावर काय परिणाम झाला हें जाणण्याकरिता शिष्टमंडळाचे प्रमुख, डॉ झेलिऑकस, ह्यास पृच्छा केली असता त्यांनीं सांगितलें कीं, प्रगतिपर व व्यवस्थित शिक्षणपद्धतीचे काहीं नमुने पहावयास सांपडले तरी एकंदरीनें विचार करतां असें म्हटलें पाहिजे कीं काहीं पाश्चात्य देशातल्या प्रमाणें हिंदी शिक्षणपद्धति सदोष आहे. रोजचा व्यवहार व शिक्षण ह्यांचेमध्यें भली मोठी खिंड आहे आणि तरुण पिढीस दिलेलें शिक्षण तांत्रिक प्रकारचें आहे. देशांत पुरेशा शाळा नाहींत आणि प्राथमिक व वरचे शिक्षक ह्यांच्या दर्जांत फार अंतर आहे असा त्याचा अभिप्राय आहे हिंदी शिक्षणपद्धति तरुण पिढीस आयुष्यात उपयोगी पडेल ह्या रीतीचें वळण लावीत नाहीं आणि शिक्षणाचा मन, बुद्धि व शरीर ह्यांचेवर हितकारक परिणाम होत नाहीं ह्याची जाणीव आता हिंदुस्थानात दृढ होत आहे आणि ह्या संबंधात परराष्ट्रीय तज्ज्ञांप्रमाणेंच विचारी हिंदी लोकांचें मत बनत चाललें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे या मताची प्रचीति शिक्षणपद्धतीच्या प्रत्यक्ष सुधारणेंत येणें ही महत्त्वाची गोष्ट आता घडून येणें अगत्याचें आहे. प्रांतिक सरकारांचें लक्ष ह्या विषयाकडे लागलें आहे ह्यामुळें प्रगतीविषयींची आशा दृढ होण्यास अवसर मिळत आहे.

---

### हिंदी कापडाचा परदेशांमध्यें खप

हिंदुस्थानांतील कापसाच्या कापड-गिरण्यांचें उत्पादन व खप अलीकडे वाढला आहे. असें असूनहि जपानी कापडानें हिंदी बाजारावर आक्रमण केलें आहे, तें कायम आहे जपान आपलें कापड हिंदु-

स्थानाप्रमाणें आशिया व आफ्रिका ह्या खंडातील इतर देशांतहि खपवीत आहे. हिंदी गिरणीवाल्यास ह्या क्षेत्रात प्रवेश का करता येऊं नये आणि तेथें जपानलाच आपलें बस्तान कां बसवता यावें हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे जपानचें लक्ष सध्या चीनशीं युद्ध करण्याकडे लागलें असल्याकारणानें त्या राष्ट्राचा परराष्ट्रीय व्यापार मंदावला आहे आणि जपानी कापडाची जागा व्यापणें हिंदी गिरणीवाल्यांस शक्य होत आहे असें दिसतें. गेल्या सप्टेंबरमध्यें पुऱ्या झालेल्या सहामाहींत ८ कोटि चौरस वार हिंदी कापड परदेशात गेलें (ह्या आकड्यात ब्रह्मदेशचा अंतर्भाव केलेला नाहीं) पूर्वीच्या वर्षाच्या तत्सम सहामाहीच्या मानानें ही निर्गत दुप्पट आहे आणि १९३५ च्या बारा महिन्यापेक्षाहि ती अधिक आहे हिंदी कापडाची निर्गत वाढली ह्यास कारण येथील गिरण्यांच्या खर्चात झालेली बचत होय असें सांगण्यात येत आहे सध्याची अनुकूल परिस्थिति टिकेल किंवा नाहीं ह्याविषयीं मात्र संशय व्यक्त करण्यांत येत आहे कामकरी लोकांच्या पगारवाढीसबधांतल्या मागण्याची चौकशी सध्या चालू आहे तिच्यावरून हिंदी गिरण्यांस जपानची वगैरे स्पर्धा सहन करता येणार नाहीं असा मॅंचेस्टर गार्डियन कमर्शलच्या बातमीदाराचा अदाज आहे

### सातारा स्वदेशी कमर्शिअल कं लि.

वरील मडळीचा ३० जून, १९३७ अखेरचा ३१ वा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे मडळीचें भरणा झालेलें भांडवल २५ हजार रु. असून २७ हजाराचे फंड वेगळे काढलेले आहेत मडळीकडे १५½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. लोकाकडून येणें कर्ज ५ लक्ष, ५ हजार रु आहे मडळीनें पोर्ट ट्रस्ट बॉंड्स, सरकारी रोखे, कॅश सर्टिफिकिटें, प्रेफरन्स व इतर भाग, इत्यादींत १० लक्ष रु. गुंतविले आहेत वर्ष अखेर, मागील सालचा शिलक नफा धरून, मडळीस एकूण नफा ३,५४२ रु झाला, त्यातून साधारण भागीदारांस करमाफ ८ टक्के व अग्रहक्काचे भागीदारास ६ व ५ टक्के प्रमाणें १,८५१ रु डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें रिझर्व फंडाकडे १ हजार रु वर्ग करण्यात आले व ६९१ रु पुढील वर्षात ओढण्यात आले मडळीच्या एकूण येण्यापैकीं सशयित येणें फक्त ४,८७७ रुपयेच आहे ह्यावरून मंडळीचा तारणावर कर्जे देण्याचा व्यवहार सुरक्षित पायावर असल्याचें दिसून येतें मडळीचा कारभार-काटकसरीनें चाललेला आहे

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट

ह्या मडळीच्या भागीदाराची सर्वसाधारण सभा श्री आण्णासाहेब वर्तक यान्या अध्यक्षतेखाली गेल्या रविवारीं भरली होती तीमध्यें गेल्या नोव्हेंबर अखेरच्या व्यवहाराबाबतचा वृत्तात आणि हिशेब मजूर करण्यात आले मडळयाच्या नवीन कायद्यास अनुसरून एकतृतियाश डायरेक्टर निवृत्त व्हावे लागून त्याच्या निवडणुका पुन्हा व्हाव्या लागतात त्याप्रमाणें डायरेक्टराची निवड करण्यात आली पूर्वीचेच हिशेबतपासनीस पुन्हा निवडण्यात आले आणि त्यास द्यावयाचा मेहनताना निश्चित करण्यात आला सिंडिकेटच्या कामाची सविस्तर माहिती प्रो काळे ह्यानीं दिली व त्यानें एक एक पाऊल कसें पुढें टाकलें गेलें आहे हें सांगितलें कारखान्यास लागणारी यत्रसामुग्री येत असून तिचा शेवटचा हप्ता फेब्रुवारी अखेर येऊन उतरेल गेल्या आठ-दहा महिन्यात सिंडिकेटची प्रगति झपाट्यानें होत आली असून तिच्या विषयींचा लोकाचा विश्वास दृढ होत आहे जनतेनें मडळीस असाच पाठिंबा आपुलकीनें द्यावा अशी विनंति प्रो काळे ह्यानीं केली आणि अध्यक्षाचे आभार मानल्यानतर सभेचें काम संपलें


**औंध स्टेट सेंट्रल बॅंक लिमिटेड, औंध.**

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुडल, गुणदाळ, चिंचूद स्टेशन व चिंचणी

चालू ठेवीवर शेंकडा दीड टका व्याज दिलें जातें सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी

कर्जें–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात

चेक, हुड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.

B R. Vaitak
मॅनेजर



**न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानातील सर्वात मोठी कंपनी )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यत. खालील तीन गोष्टीकडे लक्ष देतो.—

(१) कंपनीचें स्थैर्य (२) उत्तम व्यवस्था

(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या

श्री डी के जोगळेकर, बी ए,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )



**नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.**

टिळक पुतळयाजवळ, नागपूर सिटी

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८५,८०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | १,४०३ |
| मुदतबद्ध ठेवी | १,९८,५८६ |
| सेव्हिंग्ज बॅंक ठेवी | ९,०८३ |
| मेंबराकडून येणें असलेलें कर्ज | २,७४,४३९ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यात गुंतविलेली एकूण रक्कम | ४०,७७४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते ठेवींची रक्कम पूर्ण सुरक्षित शेअर्स विकत मिळतात आतापर्यंत डिव्हिडंड पांच टक्क्याहून केव्हाही कमी दिलें गेलें नाहीं सोसायटी आपल्या मेंबराना त्यांच्या घराचे तारणावर कर्ज देते

**सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठी पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा**

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज

## डॉन ऑफ इंडिया विमा कं लि., पुणें

### खुलासा

सन १९३१ ते ३४ अखेरपर्यंत कंपनीनें प्रॉव्हिडंट सोसायटी कायद्यान्वयें केलेल्या विमा कामाच्या हप्त्याच्या उत्पन्नावरील ३/४ हिस्सा इतकी रकम आयुर्विमा कायद्याच्या ठेवींच्या कलमाप्रमाणें कंट्रोल ऑफ करन्सीकडे भरणें जरूर होतें, असें गव्हर्मेंट ॲक्च्युअरीनें कंपनीचे चालकांस सन १९३५ सालीं कळविलें. या बाबत हिंदुस्थान सरकार व कंपनी यामध्यें बराच पत्रव्यवहार झाला व शेवटीं मागील चार वर्षांच्या प्रॉव्हिडंट विमा उत्पन्नावरहि सन १९१२ च्या आयुर्विमा कायद्यानें ३/४ इतकी आकारणी केली जाते असा अखेरचा अभिप्राय कॉमर्स डिपार्टमेंटनें दिला. त्याप्रमाणें रकम रु. ९,१४८ किंमतीचे सरकारी रोखे हिशेबानें भरावी लागणाऱ्या रकमेंत भरून टाकली आहे. वरील रकम वास्तविक कंपनीचे चालक मंडळाचे मताप्रमाणें प्रॉव्हिडंट बिझिनेसबद्दल भरावी लागत नाहीं या समजुतीनें सन १९३१ ते ३४ पर्यंत ती भरली गेली नाहीं व ती चुकार थकबाकी म्हणून हिंदुस्थान-सरकारनें त्याची मागणी केल्यावरून व नवीन होऊ घातलेल्या विमा कायद्याच्या याबाबत किमान अटी लक्षात घेतां जरूर ती सरकारी रोख्याच्या रूपानें ठेव रकम रिझर्व्ह बँकेकडे भरून पूर्ण परिपूर्तता करण्यात आली आहे. हा वस्तुस्थितीचा योग्य खुलासा विमेदारांचे हितसंरक्षण दृष्टीनें कंपनीनें जाहीर केला आहे

## सर प्रभाशंकर पट्टणी यांची सह्याद्रि विमा कंपनीस भेट

### प्रगतीबद्दल प्रदर्शित केलेलें समाधान

भावनगर संस्थानचे माजी दिवाण व कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद नामदार सर प्रभाशंकर पट्टणी यांनीं शनिवार ता. १८।१२।३७ रोजीं सायकाळीं सात वाजता सह्याद्रि विमा कंपनीस भेट दिली. सर प्रभाशंकर यांनीं व पाहुणेमंडळींपैकीं इतर अनेक गृहस्थांनीं आस्थापूर्वक अनेक प्रकारचे प्रश्न विचारून कंपनीविषयीं माहिती करून घेतली कंपनीनें इतक्या अल्प काळातच केलेल्या स्पृहणीय प्रगतीबद्दल सर प्रभाशंकर पट्टणी व इतर पाहुणे मंडळी यांनीं पूर्ण समाधान व्यक्त करून, नवा विमा कायदा अस्तित्वात आल्यावर देखील कंपनी आपली प्रगति निर्वेधपणें अशीच चालवूं शकेल, इतकी उत्तम आर्थिक परिस्थिति इतक्या अल्प काळात प्राप्त करून घेतल्याबद्दल संचालकांचें व इतर कार्यकर्त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें

### परस्थ प्रवासी आकर्षण्याचा धंदा

परराष्ट्रीय पाहुण्यास स्वतःच्या देशात येऊन प्रवास करण्यास प्रवृत्त करण्याचा पाश्चात्य लोकामध्यें एक धंदाच होऊन बसला आहे परस्थांनीं आपल्या देशातील सृष्टिसौंदर्याचा व संस्कृतिविशेषाचा आस्वाद घ्यावा हा सदरहु धंद्याचा उद्देश नसतो. परकी पाहुणे आपल्या देशांत येऊन पैसे खर्चतात,त्याचा उपयोग व्यापार व उद्योगधंदे ह्यास होतो म्हणूनच त्यास हे प्रवासी प्रिय असतात. ग्रेटब्रिटनमध्यें दर वर्षीं पाच लक्ष प्रवासी बाहेरून येतात आणि चाळीस कोटि रुपये खर्च करतात. हा पैसा हॉटेलवाले, रेल्वेज, बसेस इत्यादींच्या खिशांत जाऊन तेथून समाजात खेळतो आणि अनेक लोकास काम मिळतें व मिळकत होते. परस्थास आकर्षून घेण्याची अधिक विस्तृत प्रमाणावर खटपट व्हावी असें इंग्लंडमध्यें सुचवण्यांत येत आहे.


जुन्या घराची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा.—

**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family Prospectus sent free on application

*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

**S. B. JOSHI & Co.**

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यत. विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि)-एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करू शकत नाहींत किंमत, बाटलीस रु ३ ट स १२ आणे निराळा एकदम तीन बाटल्या मागविणारास टपालखर्चासह ९ रु

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते.—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज** (डिपार्टमेंट नं ६)

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर

### हिंदी रेल्वेजचा १९३८-३९ च्या खर्चाचा कार्यक्रम

१९३१ सालानंतर चालू वर्षापर्यंत हिंदी रेल्वेजचा संसार तुटींतच चालला होता व मध्यवर्ती सरकारास रेल्वेजकडून एका पैचीहि मदत मिळाली नाहीं शिलकी निधींतून कर्जाऊ रकमा उचलून रेल्वेजनीं कशीबशी वेळ मारून नेली. मध्यवर्ती सरकारचें देणें व कर्जाऊ रकमाची परतफेड ह्याकरिता ६२ कोटि रुपये लागले असते व त्याची तरतूद करणें रेल्वेजना कठीण गेले असतें ह्याकरिता ही रकम हिशेबातून अजिबात काढून टाकून चालू वर्षापासून नवीनच सुरवात करावी, असें ठरलें ह्यामुळें रेल्वेजची मागील देण्याची जबाबदारी टळली व नव्या जोमानें ससार चालविण्यास त्यास मोकळीक मिळाली सुदैवानें रेल्वेजचें उत्पन्न वाढत आहे १९३७—३८ च्या पहिल्या आठ महिन्यात गेल्या वर्षांतील तत्सम मुदतीमधील उत्पन्नापेक्षा सुमारें ३¾ कोटि रु उत्पन्न ज्यास्त झालें आहे रेल्वे फिनॅन्स कमिटीनें १९३८--३९ सालाकरिता ९½ कोटि रुपयाचा भांडवली खर्चाचा कार्यक्रम आखला आहे ह्यापैकीं ४५ लक्ष रु नव्या रेल्वे रस्त्यांकरिता राखून ठेवण्यात येतील. वाघिणी व इजनें ह्यासाठी ४ कोटींची तरतूद आहे

---

### ग्लासगो येथील प्रचड प्रदर्शन

ग्लासगो येथील प्रचड साम्राज्य प्रदर्शनाचें उद्घाटन ता ३ मे रोजीं करण्याचें राजेसाहेबानीं कबूल केलें आहे सहा महिन्यात सुमारें १¼ कोटि लोक प्रदर्शनास भेट देतील, अशी अपेक्षा आहे प्रदर्शनावर १ कोटि रु खर्च होतील.

### कराची आकारणी चुकविणारांची नाकेबदी

नवीन कराची योजना अगर अस्तित्वात असलेल्या करात वाढ हीं सरकारी गॅझेटात जाहीर झाल्यानंतर त्याचें कायद्यात रूपातर होण्यास सहाजीकच काहीं काळ लागतो. ह्या मध्यंतरीच्या वेळाचा फायदा घेऊन अनेक लोक कर चुकविण्याचा यत्न करितात व त्यामुळें सरकारचें उत्पन्न बुडतें प्रातिक कायदेमडळास कराचें बिल सादर केल्या दिवसापासूनच सदरहु बिलाची अमलबजावणी करण्यात यावी व अखेरच्या मजुरीची वाट पहाण्याचें कारण राहूं नये अशा प्रकारचा अधिकार सरकारास देणारें एक बिल मुबई कायदेमडळाच्या येत्या बैठकीपुढें मत्रिमडळ माडणार आहेत. कर बसविणारें बिल नामजूर झाल्यास सरकारनें वसूल केलेली कराची रकम अर्थात्च परत करण्यात येईल. कायदेशीर रीतीनें बसवलेला कर लोकास कायदेशीर रीतीनें चुकवतां येतो, अशीं उदाहरणें नेहमीं घडतात आणि करांबाबतचा कायदा करताना तीं सरकारास हिशेबात घ्यावीं लागतात. ज्या व्यक्ती व जे वर्ग करांस पात्र समजण्यांत येतात, त्याचेवरच त्या कराचा बोजा पडावा अशी तजवीज सरकारास करावी लागते. तसें न झाल्यास सरकारचें अपेक्षित उत्पन्न बुडतें आणि भलत्याच लोकांस कराचें ओझें सहन करावें लागतें.

---

### ब्रिटिश टाकसाळींत पाडण्यात आलेली नाणी

ब्रिटिश टाकसाळींत १९३६ सालीं एकूण ३३ कोटि, ४० लक्ष नाणीं पाडण्यात आलीं इतकीं नाणीं ह्या टाकसाळींत एका वर्षांत आजवर पाडण्यात आलेलीं नव्हतीं




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]


एच एच दि छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
**जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग**
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू होणार. नावें नोंदवा
नवीन माहितीपत्रक मागवा ४९७ बुधवार, पुणें

लक्षांत ठेवा ] १९३७—३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा
**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**
" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यत आभारी आहोंत "
श्री. आर. एन. अभ्यंकर, बी ए, एलएल. बी,
मॅनेजिंग एजटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणे नं २.
महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजट्स् नेमणें आहेत तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं १ रु. ( ट ख निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

### धनको व ऋणको देश

ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, बेल्जम, हॉलड, स्वित्सरलड व अमेरिका ह्या देशांनीं बरेंच मोठें भाडवल परदेशात गुतविलेलें आहे सर्व सावकार देशांनीं मिळून एकूण सुमारें १३० अब्ज रु. इतर देशास कर्जाऊ दिलेले आहेत त्यापैकीं एकट्या ग्रेट ब्रिटनचीच सावकारी एक तृतीयांशापेक्षा मोठी आहे. अमेरिकेचा अनुक्रम त्याचे खालोखाल लागतो. ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक मनुष्यास ह्या कर्जावरील व्याजाचे व डिव्हिडडचे रुपानें दरसाल सरासरीनें ५५ रुपये मिळतात राष्ट्रीय उत्पन्नाच्या विसावा भाग ह्या रूपानें इंग्लंडला प्राप्त होतो यावरून त्याचें महत्त्व सदरहु राष्ट्रास किती आहे हें लक्षांत येईल. अमेरिकेस परदेशातील कर्जाऊ रकमावर दरसाल सुमारें ३५ अब्ज रु मिळतात, परंतु त्या देशांतील लोकसख्या ब्रिटनमधील लोकसख्येच्या तिप्पट मोठी असल्यानें, दरमाणशीं उत्पन्नाचें प्रमाण अमेरिकेंत अल्प पडतें चीन व हिंदुस्थान हीं प्रमुख ऋणको राष्ट्रें आहेत, परतु त्यातील व्याजाचा दरमाणशी भार लोकसंख्येच्या अफाटपणामुळें अर्थातच हलका दिसतो ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड, ह्या ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशातून बाहेर जाणारी व्याज व डिव्हिडंड ह्याची रकम लोकसंख्येचे मानानें बरीच मोठी आहे. आतरराष्ट्रीय व्यापारावर विशेष नियत्रणें नसतील आणि देवघेव करणें सुरक्षित असेल तरच एका देशातील भाडवल दुसऱ्या देशाकडे धाव घेईल महायुद्धापूर्वीच्या काळांत अशी अनुकूल परिस्थिति होती व तिचा ग्रेट ब्रिटननें पुरेपूर फायदा घेतला जागतिक मदी, हुंडणावळीचें नियत्रण, आर्थिक स्वावलबनाचें राष्ट्राचें धोरण व राजकीय अस्थिरता ह्या कारणामुळें भाडवलाच्या आयात–निर्गतीस अलीकडे अडथळा उत्पन्न झाला आहे ग्रेटब्रिटनचें भाडवल दीर्घकालिक स्वरुपाचें आहे. रबर व चहा ह्याचे मळे, रेल्वे रस्त्याची बाधणी, इत्यादि स्वरुपानेंच मुख्यत. ब्रिटिश भाडवल व्याज व डिव्हिडड कमावीत आहे कित्येक राष्ट्रास धनोत्पादक योजना पार पाडण्यासाठीहि कर्जें देण्यात आलेलीं आहेत. हिंदी रेल्वेजच्या भांडवलाचा बराच मोठा अश ब्रिटिश मालकीचा आहे

### क्षयरोगाचा फैलाव

क्षयरोग प्रतिबंधक फडाच्या कार्यास प्रारंभ करण्याकरिता लाहोर येथे प्रातिक गव्हर्नराचे अध्यक्षतेखाली एक प्रातिनिधिक सभा भरविण्यात आली होती, त्यावेळीं ते म्हणाले:–“ लाहोर शहरातील कॉलेज विद्यार्थ्यापैकी शेकडा ८० जणांत क्षयाचीं मूल चिन्हें आढळलीं अमृतसर येथील शाळातील विद्यार्थ्यापैकी मुसलमानात ४८ टक्के, शिखात ४५ टक्के व हिंदूमध्यें ३८ टक्के असें क्षयाचें प्रमाण निदर्शनास आलें खेडुतापैकी शेकडा ६५ जणात क्षयाचीं पूर्वचिन्हें दिसून आलीं. ”

### बावळटास नोकरी व हुशारास बेकारी

चागल्या चलाख, शिकलेल्या मुलींस कामावर नेमण्याचें सोडून नोकरदार लोक बावळट तरुणींस काम देतात, अशी तक्रार कित्येक लडनस्थ धदेवाल्याच्याविरुद्ध शिक्षण सस्थाच्या तपास नोसानें केली आहे. मद बुद्धीच्या स्त्रिया हलक्या पगारावर वाटेल तो वेळ काम करण्यास तयार असतात म्हणून मालक त्यास पसत करतात परतु ह्या योगानें हुशार मुलींस काम मिळत नाहीं आणि मिळालें तर हलक्या वेतनावर त्यास संतुष्ट रहावें लागतें ह्या गोष्टीकडे सरकारनें लक्ष द्यावें असें वरील तपासनीसाचें म्हणणें आहे


**अर्थशास्त्र**

लेखक—प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

पृष्ठसंख्या सुमारे ३००, किंमत ३ रुपये

या ग्रथात अर्थशास्त्राच्य सर्वसामान्य सिद्धांताचें विवेचन केलें आहे.

विक्रीस तयार ] **विक्षिप्तराव** [ दुसरी आवृत्ति

लेखक—प्रो वा गो काळे

एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे. ‘ विक्षिप्तराव ’ प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळांमधून तें करण्यास फार उपयुक्त आहे. किंमत फक्त १० आणे

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you

NEW BUSINESS

Last year 1936-37

Exceeds

2 CRORES & 82 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs 23 | On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD 1907 )

*Branches* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca

*Office* throughout India & the East

S C MAJUMDAR,

MANAGER Bombay Branch

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| **बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून )** | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १२०—९ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०४–१४ |
| ४% १९४३ | १०८– ६ |
| ३½% बिनमुदत | ९७—१४ |
| ३½% १९४७–५० | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत) | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४५—४ |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | २९–१० |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% | १५७५—० |
| बाँबे प्रॉ को बँक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १२५—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ बोनस | ९५८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७६२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि ( ५० ) १०% | १२०—० |
| कराची ( ४०० ) ९% | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १४३५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि ( १००० ) ७½% | १५०७—८ |

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX
Particulars by post or in person




स्टॉकिस्ट : मा गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

## हिंदी चहाचा धंदा

हिंदुस्थानांत चहाची लागवड सुरू होऊन आता शंभर वर्षे पुरीं झालीं आहेत. १८३७ सालीं इंग्लंडकडे प्रथम हिंदी चहा पाठविण्यात आला, तो दर पौंडास ६ रु. ८ आ ह्या भारी दरानें खपला! १८७८ सालीं २ लक्ष एकर जमीन चहाखालीं होती; आता ८½ लक्ष एकरात चहाची लागवड होत असून सालिना ४० कोटि पौंड चहाचें उत्पादन होत आहे. त्यापैकीं ३० कोटि पौंड चहा निर्गत होतो हिंदुस्थानात एकूण ५ हजार चहाचे मळे आहेत व त्यात दरसाल ३० कोटि रुपयाचा चहा तयार होतो सुमारें १० लक्ष लोकास ह्या धंद्यात काम मिळतें

एकट्या आसामात २२½ कोटि पौंड चहाचें उत्पादन होतें. बाकीच्या उत्तर हिंदुस्थानात मिळून ११ कोटि पौंड चहा तयार होतो व संबंध दक्षिण हिंदुस्थानात मिळून ६½ कोटि पौंड चहा निघतो. निर्गत होणारा चहा मुख्यत कलकत्ता बंदरातून बाहेर पडतो शेकडा ६० निर्गत त्या बंदरावाटे होते. चितगांव बंदराचे मार्गानें २४ टक्के निर्गत होते बाकीची निर्गत मद्रास बंदरातून होते.

चहाची निर्गत करणाऱ्या प्रमुख देशातून किती चहा बाहेर जातो हें दर्शविणारे तुलनात्मक आकडे येथें दिले आहेत —

**चहाची निर्गत ( कोटि पौंड )**

| | १९३२ | १९३४ | १९३६ |
|---|---|---|---|
| उत्तर हिंदुस्थान | ३१·३ | २७ ३ | २६ १ |
| दक्षिण हिंदुस्थान | ५ ५ | ४ ७ | ४ ९ |
| सिलोन | २५ ३ | २१ ९ | २१ ८ |
| जाव्हा | १५·२ | ११ ३ | १२ ३ |
| सुमात्रा | ३·२ | २·८ | ३ ० |
| चीन | ८ ७ | १०·४ | ८·२ |
| जपान | ३ ० | ३ २ | ३ ६ |
| फोर्मोसा | १ ४ | २ १ | २ १ |
| एकूण | ·९२ ६ | ८३ ७ | ८२ ० |


वरील कोष्टकावरून, हिंदी चहाच्या निर्गतीस आता थोडा आळा बसला असल्याचें दिसून येतं

### स्वल्पविरामाचें महत्त्व

एखाद्या क्षुल्लक स्वल्पविरामामुळें कित्येक प्रसंगीं मोठा अर्थ-पालट होतो ह्याचें प्रत्यंतर फ्रेंच कायदे मंडळांतील वादविवादाचे प्रसंगीं नुकतेंच आलें कायद्याच्या मसुद्यात एके ठिकाणीं नको असलेला स्वल्पविराम विराजित झाल्यामुळें शेतकऱ्यांवर चारपांच कोटींचा करभार पडण्याचा प्रसंग उपस्थित झाला.अशा तऱ्हेच्या एका चुकीमुळें अमेरिकन सरकारचें एकदा फार मोठें नुकसान झालें होतें कराचे व्याप्तींतून सर्व फळझाडास माफी देण्याचा एका अमेरिकन बिलाचा उद्देश होता, परंतु " सर्व फळ झाडें " ह्या समुच्चयापैकीं फळ व झाडें ह्याचे दरम्यान स्वल्पविराम घुसल्याकारणानें सर्व फळांस कराची माफी मिळाली कायदा दुरुस्त होईपर्यंत ही माफी कायम टिकली

### कराड व पाटण ता. सुपरवायझिंग यूनियन लि.

वरील यूनियनची वार्षिक साधारण सभा ता. ३ १-१९३८ रोजीं २ वाजता कराड येथें कोयना पुलाजवळील लोकलबोर्डाचे धर्मशाळेंत भरणार आहे



१९३७ च्या दिवाळीचे सुटींत मोफत वर्ग या संस्थेनें सुरू केला होता. सदर प्रसंगीं प्रो. वा. म. जोशी यांचे अध्यक्षतेखाली घेतलेला फोटो.

## मराठी केंद्र, पुणें.

ही संस्था दरवर्षीं लघुलेखनाचा मोफत वर्ग दिवाळीचे सुटींत काढीत असते. महाराष्ट्रांत लघुलेखन कलेबद्दल फारच औदासिन्य दिसून येतें. आपल्या सुशिक्षित स्त्री-पुरुष विद्यार्थ्यांना या कलेचें ज्ञान देऊन त्याचें महत्व पटवावें म्हणून महाराष्ट्रांत हीच एक संस्था असे मोफत वर्ग काढीत असते. आतांपर्यंत संस्थेंतून ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनीं या कलेंत प्रावीण्य संपादन केलें आहे. संस्थेनें यंदापासून वहिविद्या व हिशेब-विद्या हे वर्गहि सुरू केले आहेत. पुढच्या वर्षी बँकिंग आणि टेलिग्राफी या विषयांची जोडहि या संस्थेस देण्याचें ठरलें आहे.

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि.

वरील मंडळीच्या ३० नोव्हेंबर, १९३७ अखेरच्या रिपोर्टावरून तिचें काम समाधानकारक चाललें असल्याचें दिसून येतें. सिंडिकेटनें २,००० एकर जमीन ३० वर्षांच्या खंडानें घेतली असून तिला कालव्याचें पाणी मिळण्याबाबतचा करार सरकारशी नुकताच पुरा झाला आहे. कारखान्याच्या इमारतींसाठी जागा खरेदी करण्यांत आली असून बांधकामाची योजना चालू आहे. स्कोडा कंपनीची कार्यक्षम यंत्रसामुग्री मंडळीनें मागविली आहे, तिचा पहिला हप्ता येऊन दाखल झाला आहे. दुसरा हप्ताहि नुकताच आला असल्याचें समजतें. एकूण ८०० टन वजनाच्या ह्या यंत्रसामुग्रीची किंमत सुमारें ४ लक्ष रु. आहे. फेब्रुवारी अखेर सबंद यंत्रसामुग्रीची आयात पुरी होईल. डिसेंबर, १९३८ पासून सिंडिकेटची साखर बाजारांत विकत मिळूं शकेल, अशी अपेक्षा आहे. सिंडिकेटची जमीन उत्कृष्ट दर्जाची असून, पेरलेला ऊंसहि पहिल्या प्रतीचा आहे. सिंडिकेटनें आपल्या कार्यांत केलेल्या प्रगतीचा जनतेवर अनुकूल परिणाम झाला असून, भागांचे व ठेवींचे रूपानें मंडळीकडे भांडवल वाढत्या प्रमाणांत येऊं लागलें आहे. सिंडिकेटनें आपल्या कार्याची आखणी व्यवस्थितपणें केली आहे व लोकांनींहि भांडवल पुरवून या योजनेवरील आपला विश्वास प्रकट केला आहे. महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांची व विशेषतः सिंडिकेटची अनुकूल परिस्थिति ध्यानांत ठेवून जनतेनें सिंडिकेटला सढळ हातानें भांडवल पुरवावें, म्हणजे मंडळीचें काम सुकर होऊन यशःप्राप्ति लवकर होईल आणि सिंडिकेटच्या चालकांनीं आपलें काम निष्ठेनें व चिकाटीनें चालविलें आहे, त्याचें चीज झाल्याशिवाय राहणार नाहीं. गेल्या एक-दोन महिन्यांतील अनुभव अत्यंत उत्तेजनकारक आहे. लोकांचा हा पाठिंबा असाच वाढून सिंडिकेटचें पाऊल जोमानें पुढें पडेल, असा भरवसा आहे.

## हिंदुस्थानांतील आयात मालाची वर्गवारी

हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या मालाची वर्गवारी खालील कोष्टकांत करण्यांत आली असून प्रत्येक तऱ्हेच्या आयातीची किंमतहि देण्यांत आली आहे. वेगवेगळ्या मालाच्या आयातीचें एकूण आयातीशीं पडणारें प्रमाणहि दिलें आहे:—

आयात

| | १९३४–३५ (लाख रु.) | १९३५–३६ (लाख रु.) | १९३६–३७ (लाख रु.) | एकूण आयातीशी शतमानानें प्रमाण (१९३६–३७) |
|---|---|---|---|---|
| कपास व कपास कापड | ३४,०९ | २७,०५ | २३,३३ | १८·६३ |
| यंत्रसामुग्री | १०,५४ | १२,६३ | १४,१४ | ११·२९ |
| धातु | ९,७३ | ११,३८ | ९,६९ | ७·७३ |
| तेलें | ८,०० | ६,९७ | ७,२५ | ५·७९ |
| वहानें | ३,८१ | ६,६० | ६,५८ | ५·२५ |
| उपकरणें इ. | ३,८५ | ४,७२ | ५,१९ | ४·१५ |
| लोखंडी सामान | २,९९ | ३,०५ | २,८९ | २·३१ |
| साखर | ४,२३ | २,११ | २४ | ०·१९ |
| कांच व कांच सामान | १,४२ | १,३३ | १,२८ | १·०२ |
| फळें व भाज्या | १,१७ | १,३० | १,४२ | १·१३ |
| साबण | ८३ | ६३ | २७ | ·२१ |
| पायनणें | ५२ | ३४ | २१ | ·१७ |
| आगपेट्या | ५२ | ६२ | ४८ | |
| एकूण आयात | १३२,५८ | १३२,२९ | १२५,२४ | १०० |


पत्ता बदलला

**मराठी केन्द्र**

हीं

१ जानेवारी १९३८ पासून

२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.

**ऑफिस सुपारी**— आपल्या कुटुंबांत आरोग्यदायक, भरपूर मसाल्याची, 'स्वादिष्ट सुपारी' वापरा. विनकिडकी सुपारी व निर्भेळ मसाला वापरल्याबद्दल खात्री करा.

**म. गो. कुळकर्णी आणि मंडळी,**

किराणा दुकानः—पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें २

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धद्याना उत्तेजन देऊन त्याची योग्य जोपासना कर-ण्यास व स्वत.च्याहि फायद्यासाठी कपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु २५; किंवा प्रथम ६८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि**

हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई.

ब्रँच.—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें न २.

# K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA**

— मनपसंत काम —

वक्तशीर-पणाची ] **रिसबूड ब्रदर्स-टेलर्स** [ गॅरंटी

सदाशिव हौदानजिक, पुणें

## व्ही. पी. बेडेकर आणि सन्स

यांचेकडील मसाले, लोणचें आणि पापड यांचा आपले जेवणात नेहमीं उपयोग करा

पत्ता —मुगभाट, गिरगाव, मुंबई

पुणें एजट :—दत्तात्रय नारायण हेजीब २०, शुक्रवार.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

कामाची वेळ —

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द सा द शें २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

**से**व्हिंग्ज बँक ठेवींवर द सा द शें ३ टक्के व्याज दिलें जातें

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्ज सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात

मॅनेजिंग एजंटस्

## गव्हाचे पोहे

(REGD) **( BLOSSOM )** (REGD)

कित्येकाना गहू खाण्याची इच्छा असते पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं अशा लोकाना हे गव्हाचे पोहे चागले मानवतात विशेषत लहान मुलाना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्याचा उपयोग हित-कारी ठरतो

ह्या पोह्याचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या दुधातून खाता येतात

७५३ सदाशिव पुणें २ } भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार




पुणे एजंटः—ठाकूर देसाई आणि क , बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था
सकाळी ८ ते ९ सायकाळीं ४॥ ते ५॥

## भारतीय अर्थशास्त्र

लेखक —प्रो वा गो काळे व प्रो द गो कर्वे

**पृष्ठसंख्या सुमारे ५५०, किंमत पांच रुपये**

प्रथमत अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रथांत विस्तरश. विचार केलेला आहे हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धदा, मजुराची चळवळ, हुडणावळ, सहकारी चळवळ, सरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नाचें सागोपाग विवेचन केलेले वाचकास आढळेल


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ न १९५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा अनत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. न ९२४।१३, पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें